# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_182117
UNIVERSAL
LIBRARY

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

## ( शरीरखंड. )

हा ग्रंथ

श्रीधर व्यंकटेश केतकर; एम्. ए पीएच्. डी

यांनीं

मंडळांतील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केला

## विभाग तेरावा

---:*:---

## घ—जलपैगुरी.

—*—

ज्ञानं राष्ट्रधनं महत्तममिदं ब्राह्मण्यसंरक्षकम् ।
लोके क्षत्रियवैश्यकार्यघटनासौकर्यसंस्थापकम् ॥
कर्तृत्वागमबोधको ननु भवेज्ज्ञानार्थयत्नोऽधुना ।
ज्ञात्वा नागपुरे सुपण्डितजनैः संघः शुभो निर्मितः ॥

———

१९२५

मुद्रक —डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी ज्ञानकोश छापखाना ८४१ सदाशिव पेठ पुणें येथें छापला

प्रकाशकः—महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ लिमिटेड नागपूर, तर्फे श्रीधर व्यंकटेश केतकर,
८४१ सदाशिव पेठ, पुणें.

# संपादकमंडळ

## मुख्य संपादक

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए. पीएच्. डी.

## संपादकीय कार्यव्यवस्थापक

रा. रा. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्‌एल. बी.

## उपसंपादक

रा. रा. सर्वोत्तम वासुदेव देशपांडे, बी. ए.

रा. रा. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

रा. रा. लक्ष्मण केशव भावे, बी. ए. एल्‌एल्. बी.

हौत्रवेत्ते वेदशास्त्रसंपन्न चिंतामणभट्ट शंकर दातार.

डॉ. भास्कर गोपाळ नेने, एल्. एम्. एस्.

मिस्. एच. कोहन, बी. ए. ( लंडन )

## शाखासंपादक

| | |
|---|---|
| रा. सा. विनायक त्र्यंबक आगाशे एल. सी. इ. | स्थापत्यशास्त्र |
| रा. ब. गणेश केशव केळकर | कृषिकर्म |
| प्रो. विनायक नानाभाई हाटे बी. एस सी. | प्राणिशास्त्र |
| प्रो. रघुनाथ विष्णु दामले बी. ए. | वनस्पतिशास्त्र |
| प्रो. त्र्यंबक विष्णु मोने एम. ए. | गणितशास्त्र |
| प्रो. दत्तात्रय लक्ष्मण सहस्त्रबुद्धे एम. एजी. | भूस्तरशास्त्र |
| वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी | आर्यवैद्यक |
| कै. विनायकशास्त्री खानापूरकर | आर्यज्योतिषशास्त्र |
| रा. रा. दिवाकर यशवंत फाटक | यंत्रशास्त्र |

या विभागांतील विशिष्ट लेख व लेखकः—चलन प्रो. व्ही. एन्. गोडबोले. चित्रकला ( सामान्य स्वरूप )—श्री. दा. सातवळेकर.

ज्या विषयावर शाखासंपादक नाहींत त्या विषयाची जबाबदारी संपादकमंडळावर आहे असें समजावें.


Checked 1969

—:*S*:—

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

## अंतरंग परिचय

प्रस्तुत विभागांत घ, ङ, च, व छ हीं अक्षरें पुरीं झालीं असून जवळ जवळ १८२ पृष्ठें झालीं आहेत. त्यांचें वर्गीकरणः—

### घ—घोळ

**हिंदुस्थान, इतिहास**-पौराणिक.—घटोत्कच. मुसुलमानी.— घोरीघराणें. मराठे.-घाटगे, घाशीराम, घांसदाणा, घोरपडे. जाती.-घानची, घासी, घिरथ, घिसाडी, घोसी.

**वाङ्मय**, संस्कृत.-घटकर्पर. तेलगु.—घंटय्याकवि. फारशी.-घनी.

**प्रादेशिक इतिहास व भूगोल**, मुंबई इलाखा.-घटोत्कचलेणीं, घारगड किल्ला, घारापुरी, घेरिया, घोडनदी, घोडबंदर, घोडासर, घोडें, घोरपडी. सिंध.—घोटकी, घोडाबारी. संयुक्त प्रांत.—घातमपूर, घोसी. मध्य प्रांत.—घारघोडा, घुगुस. बंगाल.—घाटाळ, घोडाघांट. पंजाब.-घग्गर नदी, घनौर, घुड, घुराम. सामान्य.—घांट

**यूरोप**—घेंट.

**शास्त्रें**, वनस्पतिशास्त्र—घायपात, घेवडा, घोडेघांस, घोसाळें, घोळ. प्राणिशास्त्र—घुनड, घोडा, घोरपड. यंत्रशास्त्रः—घड्याळ. कायदा.—घटस्फोट.

**अक्षरविकास**—घ.

### ङ

**अक्षरविकास**—ङ

### च—च्यवन

**हिंदुस्थान, इतिहास**, वैदिक.—चक्रवर्ती, चरक, चरणव्यूह, चातुर्मास्ययाग, चिति, चिलखत, च्यवन पौराणिक.—चंडी, चंद्रहास, चर्मण्वती, चक्षुर्मनु, चित्रगुप्त, चित्ररथ, चित्रसेन, चित्रांगदा, च्यवन. प्राचीन हिंदुस्थान.—चच-चचनामा, चंद्रगुप्त, चाणक्य, चामुंड, चेदि, चेर, चोल, चौगुला, चौधरी दक्षिण हिंदुस्थान.—चन्नबसव, चालुक्य. मुसुलमानी.—चच-चचनामा, चतुरमहाल, चंदरभान, चंदासाहेब, चांदबिबी, रजपूत.-चंदघराणें, चंदभाट, चंदेल्ल, चांदभाट चावडा, चाहमान, चूडामण जाट. मराठे-चतुरसाबाजी, चतुरसिंग, चांगा केशवदास, चिटणीस चिदंबर दीक्षित चिमणाजीआप्पा, चिमणाजीआप्पा (धाकटे), चिमणाजी दामोदर, चोपदार, चौथ. इंग्रजी अमदानी.-चंदावरकर, चिपळूणकर कृष्णशास्त्री, चिपळूणकर विष्णुशास्त्री चैतसिंग. जाती—चंगर, चढार, चतुर्थ, चाननशानन, चानाल, चांभार, चाम, चारण, चासा, चिक, चितारी चिन, चिस्ती, चुकुचि, चुटिया, चुडा, चेचेंझे, चेट्टी, चेरुमन, चेरो, चोध्रा, चौहाण-चव्हाण.

**वाङ्मय**, संस्कृत.-चंद्रगोमिन्, चरणव्यूह, चित्रकाव्य. महाराष्ट्र-चक्रपाणी, चांगदेव, चिंतामणि कवि, चिदानंदस्वामी, चोखामेळा, चोंभा. कानडी.—चन्नबसव तेलगू-चक्राप्पा, चन्नबसव, चिन्नविरन्ना. इंग्रजी.—चॉसर. फ्रेंच-चीझी.

**प्रादेशिक इतिहास व भूगोल**, मुंबई इलाखा, महाराष्ट्र—चंदगड, चंदनवंदन, चाकण, चांगदेव, चांदवड, चाफळ, चांभारलेणीं, चावंद, चासकमान, चाळिसगांव, चिखली. चिचलीगड, चिंचवड, चिपळूण, चोपडें, चैल. कर्नाटक.—चब्बी, चिकंर्जा, चिकोडी, चिक्कणीति, चिक्केरूर, चित्ताकुल, चिनमुलगुंद. गुजराथ.—चक्कीनोआरो, चचान, चंद्रावती अथवा चंद्रावली, चंपा, चंपानेर, चमारडी, चरखा, चादचा, चानोड, चारखा, चिखली, चितळ, चित्रावाव, चुडा, चुडेश्वर, चोरु, चोबारी, चोरांगल, चोरासी. सिंध.—चाचो. मध्य प्रांत.-चांगभकार, चांदला, चादा, चामुर्शी, चिखली, चिचगड जमीनदारी, चिचेवाडा, वऱ्हाड.-चादूर, चांदूरबाजार, चिखलदरा, चिखली, चितलनर, चित्रकोट. बडोदें संस्थान.-चांदोड, चानस्मा. म्हैसूर संस्थान.-चन्नगिरी, चन्नपट्टण, चन्नरायपट्टण, चल्लाकेरे चामराजनगर, चिकबळ्ळापूर, चिक्कनायकन्हळ्ळी, चिक्कमगळूर, चितळदुर्ग, चिंतामणी. संयुक्त प्रांत-चकिया, चकात, चंदल्ल, चंदौली, चंदौसी, चंपावत, चांदपूर ( बिजनोर जि. ), चांदपूर ( झांशी जि. ), चिनूफिरोजपूर, चित्रकूट, चुनार. मध्य हिंदुस्थान.—चंदेरी, चंबळानदी, चरखारी, चिफ्टेआवर, चौबेजहागीर. मद्रास.-चक्कियर, चंगनाचेरी, चंद्रगिरी, चिकाकोल चिंगलपट, चित्तूर, चित्तूर (जि.) चिदंबरम्, चिंगकल, चीपुरुपल्ले चींराल, चेटवई. चेयूर, चोडवरम्, चौघाट. हैद्राबाद संस्थान—चिंचोली, चिन्नूर, चेरिअल. बिहार ओरिसा.—चत्रा, चंपरण, चैबासा. बंगाल,—चकमा, चकलागोपनाबाद, चंदापुर, चंद्रकोना, चंद्रनगर, चांदपूर, चाप्रा, चित्तगांग, चित्तगांग डोंगराळ प्रदेश, चिनसुरा, चिल्कासरोवर, चुआडांगा, चोबीस

परगणा जिल्हा. पं जा ब.—चकवाल, चंद्रभागा, चंबा संस्थान, चरी, चिनाब, चिन्योत, चिलिअनवाला, चीनी, चुनियन, चेल. ब्र ह्म दे श.—चिंदविन, चिंदविन नदी, चिन डोंगर, चेदूबबेट, चौगझीन, चौंगू. आ सा म.—चाबुआ, चारदुआर, चेरापुंजी, चेरी. रा ज पु ता ना.—चउमू, चात्सु, चितोड, चिरावा, चुरू. वा य व्य स र ह द्द.—चागई, चामन, चारसद, चित्रळ, चेरात. हि मा ल य, भू ता न.—चुमल्हारी, चोल.

आशिया हिंदुस्थानेतर, ऐ ति हा सि क.—चाघताईखान. प्रा दे शि क.—चारीकार, चिच्यु, चिफू, चीन.

यूरोप, ऐ ति हा सि क.—चार्लमांट अर्ले ऑफ, चेंबर्स रॉबर्ट, चेस्टरफील्ड फिलिफ डॉरम स्टॅनहोप. प्रा दे शि क.—चॅथेम, चाल्सिस, चेकोस्लोव्हेकिया, चेस्टरफील्ड.

अमेरिका, प्रा दे शि क.—चिली.

शास्त्रे, इ ति हा स शा स्त्र.—चांचेगिरी. वै द्य क शा स्त्र—चरक, चामखीळ. चरित्र—चेसेल डेल विल्यम. व न स्प ति-शा स्त्र—चंदन, चरबीचें झाड, चवळी, चहा, चाकवत, चार, चारा, चिंच, चीर, चुका, चोचो, चौलमुग्रा. ज्यो ति ष शा स्त्र.—चंपाषष्ठी. चरित्र— चिंतामणी रघुनाथाचार्य ज्योतिषी. अ र्थ शा स्त्र.—चलन. चरित्र.—चाणक्य. प्रा णि-शा स्त्र —चित्ता, चिमणी. प दा र्थ वि ज्ञा न.—चुंबकजन्य विद्युद्यंत्रें, चुंबकत्व, चुंबकीयदकशास्त्र. त त्त्व ज्ञा न चरित्र.—चार्वाक. धा र्मि क व सां प्र दा यि क.—चन्नबसव चरणदासी, चातुर्मास्य, चातुर्वर्ण्य, चांद्रायण, चार्टिझम, चैतन्य, चैत्य. सा मा जि क.—चुंबन, चैन. औ द्यो गि क व क ला वि ष य क—चटया, चरखा, चरबी, चलच्चित्रें, चित्रकला, चित्रसंग्रहालयें. ख नि ज प दा र्थ.—चिनीमाती, चुना. का य दा—चोरी.

अक्षरविकास—च.

## छ—छोटीसाद्री

हिंदुस्थान—इतिहास, प्रा ची न हिं दु स्था न.—छप्पन्न देशचे राजे, छिंदलक. उ त्त र हिं दु स्था न.—छट्टू, छत्रसाल. जा त.—छिंपा.

वाङ्मय. सं स्कृ त.—छंदःशास्त्र. म रा ठी. चरित्र—छत्रे सदाशिव काशीनाथ.

प्रादेशिक इतिहास व भूगोल, मुं ब ई इ ला खा गुजराथः—छलाल, छालिअर, छोटाउदेपूर. म ध्य प्रां त.—छत्तिसगड, छिंदवाडा, छिंदवाडा ( नरसिंगपूर जि. ) छुईखदान. व ऱ्हा ड.—छाप्री. रा ज पु ता ना.—छब्रा, छाल, छोटीसाद्री. म ध्य हिं दु स्था न.—छत्तरपूर. सं यु क्त प्रां त.—छतारी, छप्रौली, छात, छापिआ, छिब्रामऊ. पं जा ब.—छछरौली. बं गा ल.—छुटिआ. बि हा र ओ रि सा.—छोटानागपूर. म द्रा स.—छत्रपूर.

शास्त्रे, ग णि त शा स्त्र. चरित्र—छत्रे, केरो लक्ष्मण. प दा र्थ वि ज्ञा न शा स्त्र.—छायाचित्रपेटिका. क ला वि ष य क.—छत्री, छापखाना. चरित्र—छत्रे, विष्णु मोरेश्वर.

अक्षरविकास—छ.

## ज—जलपैगुरी

हिंदुस्थान, इतिहास, पौ रा णि क—जटायु, जटासुर, जडभरत, जनक, जनमेजय, जमदग्नि, जयद्रथ, जयविजय, जरत्कारु, जरासंध. प्रा ची न हिं दु स्था न.—जयपाल, जयसिंग. र ज पू त.—जयचंद, जयमल्ल. म रा ठे.—जनजसवंत, जमालखान, जरीपटका. इं ग्र जी अ म दा नी.—जगन्नाथ शंकर शेट. जा ती.—जंगम, जलधा.

वाङ्मय, सं स्कृ त.—जगन्नाथ पंडित, जयदेव. म रा ठी.—जगन्नाथ, जनाबाई, जनार्दनस्वामी, जनीजनार्दन, जयरामस्वामी, जयरामात्मज.

प्रादेशिक इतिहास व भूगोल, मुं ब ई इ ला खा. महाराष्ट्रः—जंजिरा, जगगड. क र्ना ट क.—जत, जमखिंडी. गु ज रा थ —जंबूसर. सिं ध.—जमेसाबाद. व ऱ्हा ड.—जगदलपूर, जत्रा. म ध्य प्रां त.—जबलपूर. म्है सू र स स्था न.—जगलूर, जतिंगरामेश्वर. सं यु क्त प्रां त.—जम्नोत्री. म द्रा स.—जगय्यापेटा, जंबुकेश्वर, जम्मलमडुगु, जयपूरजमीनदारी. है द्रा बा द सं स्था न.—जगत्याल, जमिकुंता. बि हा र ओ रि सा.—जमालपूर, जमुई, जयपूर. बं गा ल.—जगदीशपूर; जगन्नाथपुरी, जंगलमहाल, जंगीपुर, जमालपुर, जयनगर, जयनगर (जि. दर्भंगा), जलंगी, जलपैगुरी. पं जा ब.—जगाध्री, जग्रांव, जतोई, जंदिआलगुरु, जंदिआला, जम्मू. रा ज पु ता ना.—जयपूर संस्थान. वा य व्य स र ह द्द.—जंदोला, जमरूड. प्रा ची न.—जनस्थान, जंबुद्वीप.

आशिया हिंदुस्थानेतर—जपान.

यूरोप, प्रा दे शि क.—जटलंड.

अमेरिका—जॅक्सन्व्हिले शहर, जमेका. ऐ ति हा-सि क.—जॅक्सन अँड्रू.

शास्त्रे, वै द्य क शा स्त्र.—जखमा, जंघाशूलें, जठरदाह, जठरव्रण, जडान्नविषबाधा, जंतुजन्यरोग, जननेंद्रियांचे गुप्त रोग, जर उतणें, जरा. व न स्प ति शा स्त्र.—जटामांसि, जरदाळू. त त्त्व ज्ञा न.—जडजीववाद, जडवाद. चरित्र—जयरथशृंगार. धा र्मि क ध सां प्र दा यि क.—जगजीवनदास. अ र्थ शा स्त्र.—जकात, जझिया, जमाबंदी, जमीन, जमीनदार व कुळें, जमीनमहसूल. व्या पा र व औ द्यो-गि क.—जडावाचें काम, जपानी वार्निश, जमाखर्च, जरतार, जर्मनसिल्व्हर. जं ग ल शा स्त्र.—जंगल. प्रा णि शा स्त्र.—जनावरें. प दा र्थ वि ज्ञा न शा स्त्र.—जडद्रव्य.

अक्षरविकास—ज.

घ, अ क्ष र वि का स—या वर्णाला आजच्या स्थितीला पोंचण्यास मुख्य पांच अवस्थांतून जावें लागलें. पहिली अवस्था



अशोक याच्या इ. स. पू. ३ ऱ्या शतकांतील गिरनार लेखांत; दुसरी इसवी स. २ ऱ्या शतकांतला क्षत्रप राजा जो रुद्रदामा त्याच्या गिरनार येथील लेखांत; तिसरी इ. स. ८३७ तल्या प्रतिहार बाउकच्या जोधपूर लेखांत; चवथी ११ व्या शतकांतील परमार राजा जो उदयादित्य त्याच्या उदेपूर येथील लेखांत; व पांचवी त्याच शतकांतील उज्जनीच्या शिलालेखांत दृष्टीस पडते. दुसऱ्या अवस्थेतील 'घ' मोडी 'प' च्या सारखा दिसतो. या 'घ' ला शेवटच्या अवस्थेला पोंचण्यास उजवीकडून डावीकडे थोडें वर्तुळाकार फिरावें लागलें व या काळांत त्याला काना फुटत चालला होता असें अनुमान निघतें. आजचा 'घ' इसवी स. १२०८ मधील परमारराजा धारावर्ष याच्या वेळच्या ओरिआ लेखांत स्पष्ट ओळखूं येतो.

**घग्गर नदी**—सिरमूर संस्थानांतून निघून अंबाला शहरापासून ३ मैलांवरून पतिआला संस्थानांत ही नदी जाते व पुढें विकानेर संस्थानांत हनुमानगडाजवळ जवळजवळ नाहींशी होते. दोन्ही बाजूंचीं वरच्या भागांचीं खेडीं या नदीच्या पाण्याचा उपयोग शेतीकडे करून घेतात. अंबाला जिल्ह्यांत या रीतीनें १०००० एकर जमीन भिजते. जखतक स्टेशनपासून रणगोई कालवा काढला आहे. त्यानें १२००० एकर जमीन भिजते. या व्यवस्थेकरितां नदीला ठिकठिकाणीं घातलेल्या बांधांनीं खालीं बिकानेरमध्यें पाणी येत नाहीं अशी संस्थाननें तक्रार केल्यावरून दोघांच्याहि सोईकरितां धानूर तलावापासून दोन कालवे काढण्यांत आले. बिकानेरमध्यें ५०॥ मैल व इंग्रजी हद्दीत ४३॥ मैल व उपकालवेहि २३ मैल पर्यंत आहेत. बिकानेरमध्यें २०००० एकर जमीन भिजते.

घग्गर नदीचें पाणी आरोग्यविघातक आहे व तें प्याल्यानें नाना तऱ्हेच्या विकृती होतात. सतत पाणी प्याल्यानें ४ पिढ्यांच्या वर कोणतेंच घराणें रहात नाहीं असें म्हणतात व यामुळें या भागाला वस्ती फार कमी आहे. प्रवाहाच्या खालच्या भागांत (हिसार जिल्ह्यांत) नोव्हेंबरपासून पात्र बहुतेक कोरडेंच पडतें व गहूं आणि तांदूळ यांचीं पिकें तेथें फार चांगलीं निघतात.

**घ ग्ग र का ल वे.**—इंपिरियल कालव्यांपैकीं घग्गर नदीपासून काढलेले हे कालवे होत. आरोग्यविघातक परिस्थितीनें शिरसाच्या आसपासची जमीन पडीत पडल्या सारखीच झाली होती. तेव्हां ब्रिटिश व बिकानेर या दोघांनीं मिळून धानूर तलावामध्यें पाणी सांठवून तेथून कालवे काढण्याचें ठरवलें. १८९६–९७ मध्यें दुष्काळीं मजूर कामावर लावून हें काम करण्यांत आलें (घग्गर नदी पहा). खर्चापैकीं निम्मा खर्च संस्थानांतून झाला. या कालव्यांपासून कराचें कांहीं उत्पन्न होत नाहीं.

**घटकर्पर**—या नांवाचा एक कवि व काव्य. घटकर्पर हा विक्रमादित्याच्या दरबारांतील नवरत्नांपैकीं एक होता अशी आख्यायिका आहे. कोणी कालिदासाचें हें एक टोपण नांव होतें असें मानितात. वर्षाऋतूचें वर्णन करणारें एक छोटेंसें कृत्रिम काव्य 'घटकर्पर' या नांवानें संबोधिलें जातें. अभिनवगुप्त (घटकर्परकुलकवृत्ति), चतुर्भुजपुत्र कमलाकर, कुशलकवि, घनश्यामपुत्र गोवर्धन, ताराचंद्र, विंध्येश्वरीप्रसाद, वैद्यनाथ वगैरेंच्या या काव्यावर टीका आहेत. याचें जर्मन भाषेंत भाषांतर झालें आहे.

**घटस्फोट**—झालेलें लग्न रद्द करणें हा वास्तविक निव्वळ सामाजिक प्रश्न आहे. पण पुष्कळ समाजांत त्याला धार्मिक स्वरूप आहे. तसेंच घटस्फोटाचा प्रश्न अगदीं प्राचीन काळापासून व अगदीं रानटी लोकांतहि आढळतो. चीनसारख्या प्राचीन पुराणप्रिय राष्ट्रानेंहि या बाबतींत केलेले नियम आधुनिक प्रगतिप्रिय पाश्चात्य राष्ट्रांना धडा शिकविण्यालायक आहेत. घटस्फोटानंतर (१) मुलांवर कोणाची मालकी, (२) इस्टेटीवर एकमेकांचा किती हक्क व (३) बायकोला पुन्हां लग्न करण्याचा हक्क, हे तीन महत्त्वाचे प्रश्न उद्भवतात व या बाबतींत निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या चाली आढळतात.

भा र ती य.—हिंदु लोकांत विवाह हें धार्मिक बंधन असून तें यावज्जन्म टिकणारें आहे. त्यामुळें घटस्फोट व पुनर्विवाह या गोष्टी हिंदु धर्मांत नाहींत. तथापि कांहीं स्मृतिकारांनीं स्त्रीला पहिला नवरा टाकून दुसरा विवाह करण्यास कांहीं परिस्थितींत परवानगी दिलेली आहे (याज्ञवल्क्य १. ७२; नारद १२. ९२, ९३). पुनर्विवाहाला मुख्य आधारभूत असलेला पुढील श्लोक प्रसिद्ध आहेः—

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्योविधीयते ॥

या श्लोकांत, नवरा बैरागी बनल्यास किंवा नपुंसक असल्यास किंवा धर्मभ्रष्ट झाल्यास स्त्रीनें दुसरा नवरा करावा, असें सांगितलें आहे. तथापि या स्मृतिवचनानुसार आचार रूढ झालेला आढळत नाहीं. आधुनिक हिंदु कायद्यांतहि

घटस्फोट उच्च हिंदू जातींत मान्य नाहीं. रूढी म्हणून पुष्कळ हलक्या जातींत घटस्फोट होऊं शकतो. मलबारांत स्त्रीपुरुष दोनतीन वेळांहि नवरा बायकोचें नातें बदलतात मध्यप्रांतात अनेक जातींत पूर्वीच्या लग्नाचा खर्च नवऱ्याला देववून पंचायत घटस्फोट मान्य करते. बडोद्यामध्यें पुनः विवाह रूढ असलेल्या सर्व जातींत घटस्फोटहि रूढ आहे. नेपाळांत नेवार स्त्री पहिल्या नवऱ्याशीं असंतुष्ट झाल्यास केव्हांहि दुसरा नवरा करूं शकते.

योग्य कारणाकरितां नवऱ्यानें बायकोस सोडचिठ्ठी दिल्यावर त्या स्त्रीस पहिल्या नवऱ्याच्या हयातींत पुनर्विवाह करतां येतो व तो सशास्त्र मानतात. नवराबायकोचे विवाहनिर्मित जे हक्क आहेत - म्हणजे नवऱ्यानें बायकोस जवळ ठेवावें व बायकोनेंहि त्याच्याजवळ जाऊन राहावें व उपभोग घ्यावा अशाकरितां स्त्रीपुरुषांस एकमेकांविरुद्ध कोर्टांत फिर्याद करतां येते व तसा हुकूम न्यायमूर्तींस फर्मावितां येतो. परंतु नवऱ्याजवळ बायकोनें जाऊन राहाण्यास तिला कोर्ट भाग पाडूं शकत नाहीं, याचीं कारणें अशीः—( १ ) बायकोच्या जीवितास धोका येइल अशा निर्दयपणानें तिच्याशीं पतीनें वागणें ( रिपोर्ट,१३ अला. १२६ ). ( २ ) हिंदूनें आपल्या घरांत मुसलमानीण वेश्या आणून ठेवणें व बायकोचा तेणेंकरून उपमर्द व मानखंडना करून तिला अब्रूनें घरांत रहाणें अशक्य करणें ( १४ डब्ल्यू आर. ४५१) ( ३ ) लग्नसंबंधीं हक्काविरुद्ध गुन्हेगार होऊन बायकोस घराबाहेर घालवून देणें. ( ३४ क. ९७१). ( ४ ) हिंदूचा ख्रिश्चन होणें धर्मांतर करणें ( ५ डब्ल्यू आर.२३५.) हिंदू पति किंवा पत्नी यांनीं धर्मांतर केलें तरी त्याचा परस्पर लग्नसंबंध तुटत नाहीं ( ९ म. ४४६; ४ मुं. ३३०; १८ क. २६४). ( ५ ) जातिभ्रष्ट होणें ( ३१ मुं. ३६६ ). ( ६ ) महारोग किंवा इतर गलिच्छ शरिरव्याधी ( १ मुं. (१६४.५ मुं आ. शि.). ( ७ ) उभयताच्या करारानें बायको निराळी रहात असल्यास. ( ५३ मुं. ८७९ ).

सोडचिठ्ठी देणें, पुनर्विवाह करणें—हे हक्क मुंबई हायकोर्टानें मान्य केले आहेत ( ६ मुं. १२६; ४ मुं. ३३०; १ मुं.३४७; २ मुं. १२४ ). मुंबई इलाख्यांत निदान खालच्या जातींत बायकोनें व विधवेनें दुसरें लग्न करण्याची चाल आहे असें दिसून येतें.

नवरा जर पुरुषत्वामध्यें कमी असला, पतिपत्नींचा निरंतर कलह होत असला, लग्न सशास्त्ररीतीनें झालेलें नसलें, नवऱ्यानें बायकोच्या संमतीनें मंगलसूत्र तोडून टाकलें, व तिला लेखी सोडचिठ्ठी दिली, किंवा नवरा देशांतरास गेला, व तो बारा वर्षांत परत आला नाहीं किंवा त्यानें तिला खबर दिली नाहीं, तर त्या स्त्रीनें तिचा नवरा जिवंत असतां दुसरा नवरा तिला वाटेल तर करावा. पण नवरा देशांतरास गेला असला तरी पुनर्विवाह करतां येत नाहीं याचें एक पुढील उदाहरण आहे. बायको अगदीं अल्पवयी असतांना लग्न झालें, नंतर नवरा कोठें देशांतरास गेला; १५।१६ वर्षांत बायकोचा समाचार घेतला नाहीं; तिची अन्नवस्त्राची वगैरे कांहीं सोय केली नाहीं; लग्न झाल्यापासून या अवधींत शरीरसंबंध घडला नाहीं; अशा स्थितींत गंगा नांवाच्या स्त्रीनें फारकत मिळण्याकरितां जातीकडे मागणें केलें—जातीनें—पंचांनीं चौकशी करून गंगास पुनर्विवाह करण्यास परवानगी दिली. तिनें त्याप्रमाणें दुसरें लग्न केलें. नंतर नवरा परत आला व नवरा जिवंत असतां दुसरें लग्न केलें तें रद्द आहे; सबब ती पीनलकोडचें कलम ४९८ यांतील गुन्ह्यास पात्र आहे म्हणून तिच्यावर फौजदारी फिर्याद लाविली.

मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्तींनीं १९ मुं. लॉ. रिपोर्टर पा. ५६ यांत ठरविलें कीं, जातीस नवराबायकोचें लग्नसंबंध तोडण्याबद्दल ठराव करण्याचा अधिकार नाहीं. ही चाल किंवा रूढी जनपदहितास विरुद्ध अतएव गैरकायदेशीर आहे अठरा वर्षे देशांतरास राहून त्यानंतर पतीचा हक्क पत्नीवर फौजदारींत फिर्याद करण्याकरितां बजावला. दुसरें लग्न करावयाचें नाहीं; पहिला नवरा या बायकोस काय वागविणार हें दिसतेंच आहे, अशा वेळीं दुसरें लग्न सशास्त्र मानणें हेंच न्यायाचें व जनहिताचें आहे. नवऱ्याच्या व बायकोच्या संमतीनें लग्नसंबंध तोडणें व दुसरें लग्न करणें हें अनीतिमान नाहीं, असें मद्रास हायकोर्टानें ठरविलें ( १७ म. ४७९ ). नवऱ्याच्या संमतीशिवाय जातीनें बायकोस दुसरें लग्न करण्यास परवानगी देणें हें अनीतिमान एतएव बेकायदेशीर आहे असें मानिलें आहे ( २ मुं. १२४; २. मुं. १४०.) जात ठरवील ती रक्कम दिली कीं नवराबायकोचे लग्नसंबंध नवऱ्यास किंवा बायकोस तोडून टाकतां येतात अशी चाल इं. कॉन्ट्रॅक्ट ॲक्टाचें कलम ( करारशास्त्र ) २३ याप्रमाणें अनितीमान किंवा सार्वजनिक ( हित ) युक्तीस विघातक आहे असें ठरविलें ( ३९. मुं. ५३८; १९. मुं. लॉ. रिपोर्टर ५६ ).

ग्री क—प्राचीन ग्रीक लोकांत घटस्फोट करण्याची नवऱ्याला पूर्ण मुभा असे. स्त्रीधन स्वाधीन करून बायकोला तिच्या बापाच्या घरीं पाठविली कीं घटस्फोट झाला. उभयतांच्या सम्मतीनें केव्हांहि घटस्फोट करतां येत असे. व्यभिचार हें बायकोविरुद्ध नवऱ्याला घटस्फोटास मोठें कारण असे. मात्र नवऱ्याविरुद्ध बायकोतर्फे हें कारण कायदा मान्य करीत नसे.

रो म न.—प्राचीन रोमन कायद्यांत ख्रि. पू. ५ व्या शतकापूर्वी घटस्फोटाला परवानगी होती. पण दुसऱ्या शतकाच्या सुमारास घटस्फोटांची संख्या फार वाढूं लागली. चांगल्या आचरणाच्या प्रसिद्ध रोमन पुरुषांनींहि अनेकदां विवाह केले. पॉंपीनें पांच वेळां, सिझरनें चार वेळां, सिसरोनें तीन वेळां, ओव्हिडनें तीन वेळां लग्न केलें. घटस्फोट ही

अगदीं साधी खासगी बाब गणली जात असे व नवरा किंवा बायको कोणतीहि गैरवर्तणूक वगैरे कोणतेंहि कारण न दाखवितां नोटीस पाठवून घटस्फोट करूं शकत असत. विवाहसंस्थेची ही अवनति रोमन राष्ट्राच्या अधःपाताला अंशतः कारणीभूत झाली असें कांहींचें मत आहे.

ख्रि स्ती.—रोमन लोकांतील वैवाहिक बंधनाची शिथिलता पाहिल्यास ख्रिस्ती धर्मप्रवर्तकांची प्रवृत्ति, घटस्फोटाकडक निर्बंध घालण्याकडे झालीसें दिसतें. न्यू टेस्टामेंटमध्यें या बाबतींत स्पष्ट उल्लेख नाहींत. तथापि घटस्फोटाला बायबलांत परवानगी नाहीं असेंच प्रारंभीं सर्वांचें मत होतें. पण पुढें प्रॉटेस्टंट धर्मसुधारणेच्या वेळीं घटस्फोट हा धार्मिक प्रश्न नसून खासगी सामाजिक प्रश्न आहे असें ठरविण्यांत आलें. १७ व्या शतकांत प्रथम हॉलंड व अमेरिका ह्या देशांत घटस्फोटविषयक स्वतंत्र कायदा करण्यांत आला. १८०३ मध्यें झालेला 'कोडनेपोलियन' हा फ्रेंच कायदा घटस्फोटाच्या प्रश्नाला यूरोपांत सर्वत्र निश्चित स्वरूप देण्यास परिणामकारक झाला. अलीकडे घटस्फोटाला सामान्यतः पुढील पांच कारणांपैकीं कोणतेंहि एक कायदेशीर समजतात. ( १ ) व्यभिचार, ( २ ) खुनाचा प्रयत्न, ( ३ ) द्वेषमूलक त्याग,(४)वैवाहिक कर्तव्याच्या महत्त्वाचें अतिक्रमण किंवा विवाहसंबंधाला अपमानास्पद असें वर्तन आणि ( ५ ) तीन वर्षे टिकलेलें वेड. हीं तीं पांच कारणें होत.

सर्व ख्रिस्ती देशांत सामान्यतः वरील स्वरूपाचा कायदा प्रचलित आहे. अशा कायद्याअन्वयें झालेल्या घटस्फोटाचें कोष्टक पुढें दिलें आहे:—

| देश | इ.स १८८६ | इ.स. १८९४ | इ. स. १९०४ |
|---|---|---|---|
| आस्ट्रिया | ७४८ | ८५६ | १८६४ |
| बेल्जम | ३५४ | ५४८ | ९३२ |
| कानडा | ५७७ | ३१६ | ५४९ |
| डेन्मार्क | ... | ६२४५ | ९८६० |
| इंग्लंड | ... | ७२७ | ... |
| फ्रान्स | ... | ५३४२ | ९५६३ |
| जर्मनी | ५३४२ | ९५६३ | ८०३७ |
| इटाली | ... | ... | ५९१ |
| नार्वे | ... | ७१ | १८५ |
| ग्रीस | ८८ | १०३ | ... |
| रशिया | १३८८ | ... | ... |
| स्वित्झर्लंड | ११०२ | ... | १२४३ |

१९२० मध्यें इंग्लंड व वेल्स मिळून ३०९० घटस्फोट झाले.

सां प्र त चा इं ग्र जी का य दा.—वैवाहिक संबंधविषयक तीन प्रकारचे दावे कोर्टांत येतात. ( १ ) विवाह मूलतः गैरकायदा ( व्हॉइड ॲबइनीस ) ठरविण्यासंबंधीं दावे, ( २ ) विवाहसंबंध पुनः प्रस्थापित करण्याचे ( रेस्टिट्यूशन ऑफ कॉंज्युगल राइट्स ) दावे; आणि ( ३ )कायदेशीर विभक्तपणा ( ज्युडिशियल सेपरेशन ) व घटस्फोट ( डायव्होर्स ).

विवाह मूलतःच रद्द ठरविण्यास ( १ ) नजीकचा आप्तपणा, ( २ ) अनेकपतित्व किंवा अनेकपत्नीत्व, ( ३ ) असंमति, ( ४ ) वेड आणि ( ५ ) विवाहपूर्तीची ( अपत्योत्पादनाची ) अशक्यता; यांपैकीं कोणतेंहि एक कारण पुरतें. पतिपत्नीपैकीं कोणाहि एकानें दुसऱ्याचा त्याग केल्यास एकत्र नांदणुकीचा हक्क प्रस्थापित करण्याकरितां दावा आणतां येतो. पण कोर्टाचा पुनः प्रस्थापनाचा हुकुमनामा अमलांत न आल्यास पतिपत्नींनी एकमेकांचा त्याग केला असें कायदा मानतो व घटस्फोटाच्या दाव्यास तें कारण पुरेसें होतें.

कायदेशीर विभक्त स्थिति मागण्याचा दावा व्यभिचार, क्रूरकर्म, दोन वर्षे किंवा अधिक अकारण त्याग, या कारणानें आणतां येतो. या उपायानें विवाह रद्द न होतां स्वतंत्र रहाण्याचा हक्क मात्र मिळतो. हा कायदेशीर विभक्तपणा पुढें घटस्फोटाच्या दाव्यास कारण होऊं शकतो.

घटस्फोटाच्या दाव्यास ( १ ) क्रूरकर्म, ( २ ) व्यभिचार सृष्टिनियमाविरुद्ध गुन्हा, ( ३ ) अनेक पतिपत्निसंबंध, ( ४ ) जबरीसंभोग, आणि ( ५ ) त्याग, यांपैकीं एक कारण असावें लागतें. क्रूरकर्म या सदरांत जिवाला, अवयवाला किंवा आरोग्याला ( शारीरिक किंवा मानसिक ) अपाय करणाऱ्या कृत्यांचा समावेश होतो.

घटस्फोटाचा किंवा विवाहविघटनाचा ( नलिटि ऑफ मॅरेज ) हुकुमनामा सहा महिने मुदतीनंतर कायम झाला असें कायदा समजतो; म्हणजे त्या मुदतीपर्यंत पूर्वीचा विवाहसंबंध तुटत नाहीं व पुनर्विवाहाला मोकळीक होत नाहीं.

मुलांच्या पालकत्वाचा हक्क दाव्याचा निकाल होईपर्यंत प्रत्यक्ष ज्याच्या ताब्यांत मुलें असतील त्यास असतो. निकालानंतर पालकत्व, पोषणखर्च व शिक्षण या बाबतींत मातापितरांच्या मागणीअर्जाचा योग्य तो निकाल करण्याचा कोर्टाला पूर्ण अधिकार असतो.

पोटगी खर्चाची मागणी दाव्याच्या निकालापर्यंतच्या काळापुरती दावा लागतांच बायकोला करतां येते; व पोटगी म्हणून उभयतांच्या संमतीनें ठरलेली किंवा उभयतांच्या उत्पन्नाच्या बेरजेच्या एकपंचमांशाइतकी रक्कम कोर्ट देवविते.

मु स ल मा नी का य दा.—या कायद्यांत घटस्फोटाला पूर्ण परवानगी आहे;कारण इस्लामीधर्मांत विवाहाला धार्मिक स्वरूप नसून केवळ करारांचें स्वरूप आहे. विवाहरूपी करार मोडण्याचे उर्फ घटस्फोटाचे तलक, खुला, मुबारत, वगैरे प्रकार आहेत. नवरा कांहीं एक कारण न दाखवितां घटस्फोट ( तलक ) करूं शकतो; किंवा उभयतांच्या संमतीनें घटस्फोट ( खुला ) होतो; किंवा कोर्टांत दावा लावून क्लैब्य वगैरे कारणास्तव बायको घटस्फोटाचा हक्क मिळवूं शकते.

**घंटय्याकवि**—घंटय्या ( घंटया ) हें कुलदेवतेचें नांव या कवीला त्याच्या आईबापांनीं ठेवलें होतें. हा तैलंगण देशांत जन्मला. यानें आपलें अध्ययन संपवल्यानंतर काशीखंडांतून सुराभांडेश्वराची कथा तेलंगी भाषेंत काव्यरूपें उतरली. या कथेचे पांच अध्याय आहेत. या कवीची स्वतंत्र ग्रंथरचना नाहीं. कांहीं संस्कृत भाषांतरित ग्रंथ आहेत. पण काव्य-माधुर्यामुळें हा बराच लोकप्रिय झाला. [ परशा–तेलगू वाङ्मय; जनार्दन रामचंद्र–कविचरित्र ].

**घटोत्कच**—पांडवांतील भीमसेनापासून हिडिंबा राक्षसीच्या ठायीं झालेला पुत्र. लाक्षागृहप्रसंगानंतर याचा जन्म झालेला आहे. हा जन्मला त्यावेळीं याचें मस्तक घटाप्रमाणें मोठें असून त्यास केस अगदीं नव्हते, म्हणून याचें घटोत्कच असें नांव पडलें. याशिवाय पितृमातृसंबंधानें याला भैम्य, भैमसेनि, हैडिंब, हैडिंबेय, अशींहि नांवें असत. यास अंजनपर्वा आणि मेघवर्ण असे दोन पुत्र होते.

घटोत्कच नेहमीं आपल्या मातेजवळच राही. पांडवांजवळ रहात नसे, म्हणून तो मोठा झाला असतां हिडिंबानें त्याकडून गुप्त–प्रकट होणें, पाहिजे तेव्हां, पाहिजे तें व जेवढें पाहिजे तेवढें रूप धरणें, इ. अनेक राक्षसी विद्यांचा ( मायेचा ) अभ्यास करविला होता. पांडव वनवासांत असतां तीर्थयात्रा करीत हिंडतेवेळीं त्यांस हिमालयाच्या गंधमादन शिखरावर जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां चढतां चढतां भीमाखेरीज बाकीची मंडळी थकली. भीमसेन हा पांडवांस जरी नेण्यास समर्थ होता. तरी ऋषींसहित सर्वांस नेण्यास नव्हता. त्यानें घटोत्कचानें स्मरण केलें. त्यावेळीं हा तेथें गेला व सर्वांस गंधमाली पर्वतावर नेऊन नरनारायणाश्रमीं सोडलें. बलरामाची वत्सला म्हणून कन्या होती ती अभिमन्यूस देऊं केली असतां पांडव राज्यभ्रष्ट झाले असें पाहून दुर्योधनाच्या विनंतीवरून बलरामानें दुर्योधनपुत्र लक्ष्मणाशीं तिचें लग्न ठरविलें. तेव्हां अभिमन्यूनें हें वृत्त कळवून तिचा विवाह आपणाशीं होण्याबद्दल याचें साहाय्य मागितलें. त्यावरून यानें अभिमन्यूस द्वारकेस नेऊन कौरवांची कृष्णानुमतें दुर्दशा करून वत्सलेचा विवाह अभिमन्यूशीं केला. ( जैमिनीकृत भारत ).

हा भारती युद्धांत पांडवांकडे होता. त्याचें शरीर भयंकर व धिप्पाड होतें. याच्या रथास आठ चाकें व शंभर घोडे असत. याचा ध्वज गृध्र पक्ष्याचा असून याचें धनुष्य पौलस्त्य नांवाचें होतें.

द्रोण सेनापति असतां जयद्रथवध झाला तेव्हां दुर्योधनानें द्रोणाची निर्भत्सना केल्यानें द्रोणानें त्या दिवशीं रात्रींहि युद्ध चालू ठेवलें. त्यावेळीं कर्णानें पांडवांच्या सैन्याचा फार संहार केला. त्याच्यावर अर्जून चालून जात असतां कृष्णानें त्याचें निवारण करून ( कारण कर्णाजवळ वासवी शक्ति होती व ती ज्याच्यावर फेंकली जाईल व त्याचा निःपात होईल असा तिचा गुण होता, म्हणून अर्जुनाचा बचाव व्हावयासाठीं ) घटोत्कचास कर्णावर पाठविलें. त्यानें अनेक माया प्रगट करून व राक्षसीपद्धतीनें युद्ध करून कर्णास जर्जर केलें. शेवटीं प्राणावर येऊन बेतल्यानंतर ज्या वासवीस केवळ अर्जुनासाठींच इतकीं वर्षें जपून ठेवलें होतें ती कर्णानें घटोत्कचावर सोडली. ती अमोघ असल्यानें तिनें घटोत्कचाचा प्राण घेतला. मरतां मरतां घटोत्कचानें विशाल देह धारण करून कौरवसैन्यांत आपल्या देहाचें विसर्जन केलें. त्याच्या त्या देहाखालींहि बरेच लोक चिरडले गेले असें वर्णन कवीनें केलें आहे. [ महाभारत, आदि. अ. १५५; वन. अ. १४५; द्रोण. अ. २३, १७४–१७९ ].

**घटोत्कच लेणीं**—पूर्वखानदेशच्या दक्षिण सरहद्दीपासून ३ मैलांवर अजंठ्याच्या पश्चिमेस ११ मैलांवर व पाचोऱ्याच्या नैर्ऋत्येस १६ मैलांवर जिंजाळ खेड्याजवळील डोंगरांत हीं लेणीं आहेत. यांत एक मोठा विहार असून तो अजिंठा येथील सहाव्या व सोळाव्या लेण्याप्रमाणें आहे. या विहारास २० खांब आहेत. त्यांपैकीं कांहीं सोळा कोनी आहेत. व त्यांवर उत्तम नकशी आहे. पाठीमागच्या बाजूस गाभाऱ्यांत शाक्यमुनीची मूर्ति आहे व तिच्याजवळ विद्याधर, धर्मचक्र, हरिण वगैरे नेहमींप्रमाणें आहेत. विहारांत एकंदर १० खोल्या आहेत. पुढील भिंतीस ३ दरवाजे व दोन खिडक्या आहेत. यांच्यावरहि बुद्ध व किन्नरी वगैरे मूर्ती कोरलेल्या आहेत. पडवीच्या मागील भिंतीवर उत्तरेस अश्मक राजांच्या वेळचा एक शिलालेख आहे. विहारांतील एका खांबावर बुद्धाची मूर्ति कोरलेली असून त्याच्यावर बौद्ध धर्मतत्वें खोदलेला एक शिलालेख आहे. विहाराच्या पुढील भागांतहि भिंतीवर पुष्कळ बुद्धाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. अश्मक शिलालेख हल्लीं धुपून गेला आहे. पुढील पडवीचे खांब वगैरे सर्व पडून गेले आहेत. जवळच दुसरें एक लहानसें लेणें आहे. हेंहि बहुतेक सर्व पडून गेलें आहे. [ खानदेश ग्याझे.; जर्नल. बॉम्बे. ब्रँच. रा. ए. सो. अंक ११७ ].

**घड्याळ**—कालमापनाचें एक यंत्र. घड्याळांचें मोठें महत्व व त्यांची आवश्यकता आज दिसत आहे. घड्याळ तयार करण्याचा व नीट करण्याचा एक स्वतंत्र धंदाच होऊन बसला आहे. क्लॉक ( मोठें घड्याळ ) व वॉच (लहान घड्याळ ) यांच्या रचनेंत यांत्रिकदृष्ट्या फारसा फरक नसला तरी हे दोन धंदे अगदीं पृथक चालतात. घड्याळ म्हणजे कालमापक यंत्र या अर्थानें पाहतां याचें अस्तित्व फार पुरातन आहे. कालाचे दोन नैसर्गिक लहान विभाग म्हटले म्हणजे दिवस व रात्र हे होत. पण यापेक्षांहि लहान कालविभाग पाडण्याची जरूरी मनुष्यजातीस प्राचीन काळींहि भासल्यामुळें पृथ्वीच्या गतीचाच उपयोग करून घेण्यासाठीं बनविलेलीं वेलामापक साधनें निरनिराळ्या प्राचीन राष्ट्रांत आढळतात. दिवसा उन्हांतील पदार्थांची पडणारी लहान मोठी सावली दिवसाचे कालविभाग दर्शविण्याचें कामीं उपयोगांत आणण्याची कल्पना मनुष्याला प्रथम

सुचली असावी. अशा प्रकारच्या साधनाचा उल्लेख "आहाझचें सन-डायल" (छायायंत्र ऊर्फ शंकुयंत्र) म्हणून बायबलांतील सेकंड बुक ऑफ किंग्ज ( राजासंबंधींचें दुसरें पुस्तक ) या भागांत आढळतो. पण टीकाकारांचे मत असें आहे कीं, हें प्रत्यक्ष सन-डायल नसून केवळ एक अशी शिडी असावी कीं, तिच्या पायऱ्यांच्या पडणाऱ्या सावलीवरून दिवसाचे तास समजत असत. ईजिप्तमधील प्रख्यात प्राचीन मनोऱ्यांचा सन-डायलप्रमाणें वेलामापक यंत्र म्हणून उपयोग करण्याचा हेतु असावा असा पुरावा मिळतो. पण सन-डायल हें सार्थ नांव देतां येईल असें खरें आद्य यंत्र खाल्डियन ज्योतिषशास्त्रज्ञ बेरोसूस याचा अर्धगोल हें होय. हा शास्त्रज्ञ खि. पू. ५४० च्या सुमाराचा असावा. हिंदु, ग्रीक व रोमन हे प्राचीन लोकसमाज सन-डायल वापरीत असत हें निःसंदेह आहे. ब्रिटिश म्युझियममधील एल्जिनच्या वस्तुसंग्रहांत एक यंत्र आहे तें अथेन्स शहरांत सांपडलें असून तें अथेन्स शहरांतील एका चौकांत वेळ दर्शविण्याकरितां ठेवलेलें असावें असा तर्क आहे.

छायेव्यतिरिक्त इतर वेलामापक साधनांत पाण्याच्या सहाय्यानें चालणारींहि यंत्रें फार प्राचीन असून त्यांचें जनकत्व पौरस्त्य देशाकडे आहे. हिंदु लोकांतील लग्नमुंजींच्या वगैरे धार्मिक कार्यांत सूर्योदयापासून घटी मोजण्याचें पाण्यानें भरलेल्या घंगाळांतील घटिकापात्र सर्वांच्या परिचयाचें आहेच. पण त्याशिवाय पाण्याच्या आघातानें चालणारीं अनेक प्रकारचीं वेलादर्शक यंत्रें तयार करण्याकडे पौरस्त्य विद्वानांनीं आपली कल्पकता खर्चिली होती असें उपलब्ध झालेल्या अनेक वेलादर्शक जलयंत्रां (वॉटर क्लॉक्स) वरून दिसून येतें. अशा प्रकारचें यंत्र ग्रीसमध्यें प्लेटोनें प्रथम ज्ञात करून दिलें अशाबद्दल पुरावा मिळतो. असलें एक जलयंत्र ग्रीनिच येथील रॉयल ऑब्झर्व्हेटरीमध्यें आजहि उपयोगांत आहे.

याशिवाय हिंदुस्थानांतील जुनें वेलामापक साधन म्हणजे वाळूचें घड्याळ हें होय. दहा पंधरा वर्षांपूर्वी देखील देवळांत, शाळांतून किंवा संस्थानी कचेऱ्यांत वाळूच्या शिश्या तास दाखविण्याकरितां उपयोगांत होत्या. आजहि जुन्या व धार्मिक संस्थानांत वाळूचीं घड्याळें दृष्टीस पडतात. हल्लींचीं पाश्चात्य घड्याळें हिंदुस्थानांत पाश्चात्य लोकांबरोबरच शिरलीं असावींत. मराठी राज्यांत थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपासून हीं घड्याळें आलीं असें दिसतें. (इति. सं. पु. ४ अं. १-३).

आधुनिक घड्याळाची कल्पना पूर्वीच्या वेलामापक जलयंत्रावरून सुचली असावी हें उघड आहे. पाण्याऐवजीं गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीचा उपयोग करण्याची कल्पना सुचणें इतकें साहजिक आहे कीं, आधुनिक घड्याळयंत्राचें जनकत्व खिस्तपूर्व काळांतील आर्किमीडीजपासून दहाव्या शतकांतील गेरबर्ट नांवाच्या मंकपर्यंत अनेकांचें नांव मूलसंशोधक म्हणून प्रतिपादिलें जातें. तथापि "घड्याळ" या संज्ञेस आधुनिक अर्थानें पात्र होईल असें यंत्र प्रथम हेनरी डि विक नांवाच्या इसमानें फ्रान्सचा राजा पांचवा हेनरी याच्याकरितां तयार केलें व तें १३६८ सालच्या सुमारास राजवाड्याच्या टॉवरवर बसविण्यांत आलें. अर्थात् हें आद्य वेलायंत्र अगदीं ओबडधोबड असून त्याला एकच (तास दाखविणारा) कांटा होता. परंतु सांप्रतच्या क्लॉक उर्फ मोठें घड्याळ यांच्या यांत्रिक रचनेचा मूळ आधार विकचें घड्याळच असल्यामुळें विक् हाच घड्याळाचा मूळ जनक होय. विक्च्या घड्याळाची रचना पुढीलप्रमाणें होती. एका सिलेंडरभोंवतीं दोर गुंडाळून दोराच्या टोंकाला एक जड वजन बांधलेलें असे व या वजनामुळें सिलेंडरमध्यें गति उत्पन्न होऊन त्यामुळें तासाचा कांटा फिरत असे. पण सिलेंडरची गति तासकांट्याला मिळण्याकरितां दोघांचा प्रत्यक्ष संबंध न ठेवतां मध्यंतरीं अनेक दंतयुक्त चक्रें बसविलीं होतीं, त्यामुळें सिलेंडरच्या एका फेऱ्यांत तासकाट्याचे अनेक फेरे होत असून व त्यामुळें वजन बांधलेला दोर सिलेंडरभोंवतीं वरचेवर गुंडाळावा लागत नसे. विक्च्या घड्याळाचे बहुतेक भाग लोखंडाचे होते आणि या घड्याळाचा आणखी एक विशेष गुण म्हणजे तासांचे ठोके पडण्याचीहि त्यात व्यवस्था केली होती. तात्पर्य सांप्रतच्या घड्याळांतील महत्त्वाच्या सर्व मूल कल्पनांचें श्रेय विकयास आहे.

विक्नंतर घड्याळांतील पहिली महत्त्वाची सुधारणा म्हणजे पेंड्युलम ऊर्फ लंबकाचा उपयोग ही होय. गॅलिलीओनें १६३९ मध्यें गतिसंबंधाचा महत्त्वाचा शोध लावल्यानंतर लंबकाची योजना घड्याळांत होऊं लागली व त्याची कल्पना ह्यूधेन्स नामक फ्रेंच यांत्रिकानें काढली; व त्याबरोबरच लंबक पोलादी स्प्रिंगला जोडून देण्याची युक्ति निघाली. याप्रमाणें १७ व्या शतकाच्या अखेरीस घड्याळाची सर्व यांत्रिक रचना बहुतेक पूर्णत्वास पोहोंचली. त्यांत एकच मोठा दोष राहिला तो उष्णतामानानुसार घड्याळाच्या गतींत होणारा फेरफार होय. हा दोष घालविण्याकरितां ग्रॅहॅमनें ( १७१५ ) एक आणि जॉन हॅरिसननें एक अशा दोन निरनिराळ्या युक्त्या योजल्या; त्यांपैकीं ग्रॅहॅमची युक्ति अधिक ग्राह्य ठरली आहे. घड्याळांत विजेचा उपयोग करण्याचा प्रथम प्रयत्न अलेक्झांडर बेननें १८४०-५० त केला. याच सुमारास विजेचीं निरनिराळीं घड्याळें तयार करण्यांत आलीं. मोठाल्या शहरीं अनेक घड्याळें लांबून विजेच्या सहाय्यानें एकदम चालूं शकतील कीं नाहीं याची शंका आहे. पण मोठमोठ्या वाड्यांतील व हॉटेलांतील सर्व घड्याळें तळघरांतल्या एका मोठ्या विजेच्या घड्याळाच्या चालनानें चालूं राहतात, हें अनुभवसिद्ध आहे.

ल हा न घ ड्या ळ ( वॉच ).—दोराला वजन बांधून गति देणें ही गोष्ट खिशांतील घड्याळाबाबत शक्य नसल्यामुळें १५०४ च्या सुमारास न्युरेंबर्ग येथील पीटर हेले यानें मुख्य ( मेन ) स्प्रिंगची कल्पना काढून लहान घड्याळें तयार केलीं, त्यांनां आरंभीं " न्यूरेंबर्ग एग्ज " ( न्यूरेंबर्ग अंडी ) असेंच म्हणत असत. १६३२ त पहिल्या चार्लस राजानें लंडन शहरांतील घड्याळकारांनां सनद ( चार्टर ) दिली, आणि तेव्हांपासून क्लॉक व वॉच यांची सुधारणा करण्यांत अनेक इंग्रज यांत्रिकांची मदत झाली. त्यांत डॉ. राबर्ट हूक यानें घड्याळांतील यंत्रें पूर्णत्वास नेण्यास जेम्स वॅटनें वाफेच्या यंत्रांत केल्या इतकी मदत केली आहे. तसेंच थॉमस टॅम्पियन, जॉन हॅरिसन, जॉर्ज ग्रॅहम, थामस म्यूज वगैरे अनेकांचे शोध घड्याळांतील सुधारणेला कारणीभूत झाले आहेत. शिवाय ग्रीनिच ऑब्झर्व्हेटरीमध्यें अॅस्ट्रॉनमर रॉयल ( मरीन क्रॉनॉमिटर ) याच्या देखरेखेखालीं दर्यापयोगी घड्याळांची जी चढाओढीची परीक्षा घेण्यांत आली त्यानें घड्याळांच्या सुधारणेस मदत झाली आहे.

१६९० च्या सुमारास फॅसिओ नामक जेनेवाच्या एका यांत्रिकानें घड्याळांतलि जास्त घर्षणाच्या जागीं हिरे, पांच वगैरे अत्यंत कठीण रत्नांचे बारीक तुकडे बसविण्याची ( ज्युवेलिंग ) युक्ति काढली.

इंग्रज घड्याळकारांनीं यांत्रिक निर्दोषता साधण्याकडे लक्ष पुरविलें, तर स्विस व अमेरिकन कारागिरांनीं घड्याळ बनविण्याचा खर्च कमी करण्याचें ध्येय पुढें ठेविलें; या दुहेरी प्रयत्नांचें फळ म्हणजे हल्लीं बेताच्या किंमतींत चांगलीं टिकाऊ व सोईस्कर मिळणारीं घड्याळें हें होय.

घ ड्या ळां तील वि वि ध ता.—कांहीं घड्याळें किल्ली दिल्याशिवाय वर्षभर चालतात. कांहीं पाण्याच्या टांकींतून थेंब थेंब पाणी पडून तें संपेपर्यंत चालू रहातात. कांहीं घड्याळें चांद्र-सूर्यमान दाखवितात. कांहीं घड्याळें कशीं चालतात तें समजत नाहीं म्हणून त्यांनां जादूचीं घड्याळें म्हणतात. ठराविक वेळीं गाणारीं कांहीं घड्याळें असतात. कोकिळ-घड्याळांतला कोकीळ पक्षी पंख व शेंपटी वर उचलून व चोंच उघडून गाऊं लागतो. मनोवेधक किंवा हास्यकारक चमत्कार करून दाखविणारीं कांहीं घड्याळें असतात. हौशीप्रमाणें घड्याळें लहान मोठीं किंवा नक्षीचींहि असतात. घड्याळयाच्या ' केसी ' ( पेट्या ) सुंदर व नक्षीदार बनविण्यांत फ्रेंच व इंग्लिश सुतारांची ख्याति आहे. [ लॉर्ड ग्रिमथोर्प-रुडिमेंटरी ट्रीटाईज आॅन क्लाक्स, वाचेस अँड बेल्स; ब्रिटन—ओल्ड क्लॉक्स अँड वॉचेस अँड देअर मेकर्स. ].

**घनी**—हें मिर्झा महंमुद ताहिर याचें काव्यविषयक टोपणनांव होतें. त्याला बहुतेक घैनी काश्मिरी असें म्हणत असत; कारण तो काश्मीरचा रहिवासी होता. तो शेख मुहसीन फानीचा शिष्य असून त्यानें विद्वत्तेच्या व काव्याच्या बाबतीत गुरूच्याहि वर ताण केली. त्यानें ' दिवाण घनी ' नांवाचें एक काव्य केलें आहे. तो काश्मीर येथें इ. स. १६६८ मध्यें मरण पावला. अवरंगझेब ह्यानें आपला काश्मीरचा सुभेदार सैफखानाला घनी यास दरबारीं पाठविण्याबद्दल कळविलें होतें; परंतु घनीनें जाण्याचें नाकारून खानाला अवरंगझेबास असें कळविण्यास सांगितलें कीं, घनी हा वेडा झाला असून तो दरबारांत येण्यास नालायक आहे. खानानें घनीसारख्या शहाण्या मनुष्यास वेडा म्हणण्याचें नाकारलें. त्यानंतर घनी खरोखरच वेडा झाला व पुढें तीन वर्षांनीं मरण पावला. मरणाच्या वेळीं तो अगदीं तरुण होता. अठरा वर्षेपर्यंत त्याची कवित्वाबद्दल ख्याति झाली होती. कवितेंत तो कधीं कधीं ताहिर असेंहि आपलें नांव घालीत असे [ बील-ओरि. बायॉ. डिक्श. ]

**घनौर**—पतिआळा संस्थानचा एक तालुका. क्षेत्रफळ १८५ चौ. मै. व लोकसंख्या ( १९११) ३६०५८ खेडीं १७३. उत्पन्न १९०३-४ सालीं २० लाख रुपये झालें.

**घाट**—दक्षिण हिंदुस्थानच्या पूर्व व पश्चिम दोन्हीं बाजूंस विशाल तटासारखे थेट दक्षिणेपर्यंत जाऊन एकमेकांस मिळणारे पूर्वघाट व सह्याद्री नांवाचे दोन पर्वत आहेत. पूर्वघाट हे तुटक तुटक आहेत व ते आणि समुद्र यांच्या दरम्यानची पट्टी बरीच रुंद असल्यानें व देशाच्या इतर भागांतूनहि तिकडे जाण्यायेण्यास सोप्या वाटा असल्यानें इकडलि संस्कृतीचा प्रसार तिकडे होण्यास संधि मिळे. बहुतेक सर्व राज्यांच्या राजधान्या पूर्वी याच बाजूला होत्या. सह्याद्रि व समुद्र यांच्यामधील पट्टी अरुंद व तिच्या माथ्या वरील देशांशीं दळणवळण कमी असल्यामुळें येथील लोकांची संस्कृति स्वतंत्र असे. पश्चिम घाट ( सह्याद्रि ) फार उंच व एकसारखा असल्यानें देशबाजूच्या बहुतेक सर्व नद्या पूर्ववाहिनी झाल्या आहेत. पूर्ववाहिनी नद्यांत गोदावरी, कृष्णा व कावेरी या मुख्य असून त्या थेट पूर्व समुद्राला मिळतात. दक्षिणेला जेथें हे दोन पर्वत भेटतात तेथील पठार २ पासून ३ हजार फुटापर्यंत उंच आहे. त्यांतील प्रसिद्ध पर्वत निलगिरी आहेत. उटकमंड साधारण ७००० फूट उंच आहे व या पर्वताची सर्वात जास्त उंची ८८३७ फूट आहे. पूर्व घाटावर झाडी फार कमी असून पाऊस ४० इंच पडतो. तर पश्चिम घाटांत पाऊस १०० ते ३०० इंच पडतो. या पर्वतांवर झाडी फार आहे.

**घाटगे**—मराठे सरदारांमध्यें घाटग्यांचें कुटुंब प्रमुख आहे. हे मूळचे खटाव गांवचे राहणारे व मलवडीचे देशमुख. ब्राह्मणी राज्यांत त्यांस माण प्रांताची देशमुखी व सरदेशमुखी मिळाली. कामराजे घाटगे हा त्यांचा मूळ पुरुष. इब्राहिम आदिलशहानें स. १६२६ त नागोजी घाटगे यास सरदेशमुख व झुंजारराव हे किताब दिले. विजापूरच्या राज्यांतून त्यास जहागिरीहि पुष्कळ होत्या. ' सर्जेराव, ' 'प्रतापराव' इत्यादि अनेक किताब या कुटुंबास मिळाले आहेत.

इ. स. १६३३ त दौलताबाद मोंगलांच्या हातीं लागल्या-वर विजापुरचें सैन्य स्वदेशीं परत येत असतां त्याच्या मोहोबतखान नामक मोंगल सरदाराशीं ज्या चकमकी झाल्या त्यांपैकीं एकींत नागोजी घाटगे मारला गेला.

अवरंगजेब व मीरजुमला हे आदिलशहाच्या मुलखांत चालून आले; तेव्हां सर्जेराव नांवाचा एक घाटगे विजापूरकरांकडून लढत होता ( १६५७ ).

इ. स. १६५९ त विजापूर दरबाराकडून शिवाजीच्या पारिपत्याकरितां पाठविण्यांत आलेल्या अफझुलखानाबरोबर झुंजारराव म्हणून एक घाटगे असून तो शिवाजीच्या हातीं सांपडला होता. त्यास शिवाजीनें मोठ्या सन्मानपूर्वक विजापुरला रवाना केलें. या झुंजाररावाचा बाप शहाजीचा मोठा मित्र होता. स. १६६१च्या पावसाळ्यानंतर आदिलशहा कर्नाटकांतील बंडें मोडण्याकरितां त्या प्रांतीं गेला तेव्हां हा झुंजारराव त्याच्या बरोबर होता.

पुढें ( १६७५ ) हा व निंबाळकर यांनीं शिवाजीनें नुकतींच घेतलेलीं पन्हाळा वगैरे ठाणीं विजापूरकरांस परत घेऊन दिलीं; पण शिवाजीनें झुंजाररावाचा पराभव करून तीं ठाणीं पुन्हां काबीज केलीं (१६७८).

शाहूच्या कारकीर्दीत घाटगे हे कोल्हापूरकर संभाजीकडे गेले. परंतु कोल्हापूरकराशीं त्यांचें नेहमीं भांडण चाले, म्हणून ते पेशव्याशीं मिळून मिसळून असत. खर्ड्याच्या लढाईंत घाटगे हे आपले पथक घेऊन पेशव्यांकडे हजर होते.

सखाराम ( सर्जेराव ) घाटगेः— १७९६ सालच्या सुमारास या घराण्यांतील ज्या दोघां पुरुषांचीं नांवें इतिहासांत विशेष प्रसिद्धीस आलीं, त्यांतील एक यशवंतराव व दुसरा सखाराम होय. यशवंतरावाची बहीण कोल्हापूरकरास दिली होती. यशवंतराव व सखाराम या दोघांत वतनासंबंधीं कांहीं भांडण होऊन त्यांच्यामध्यें एक चकमक झाली. तींत सखारामाचा पराजय होऊन तो पळून येऊन परशुराम भाऊच्या चाकरीस राहिला. कांहीं दिवसांनीं त्यानें भाऊची नौकरी सोडून नाना फडनविसाची धरली. नानानें त्याजकडे १०० स्वारांचें आधिपत्य दिलें होतें. सन १७९६ त नाना पुणें सोडून गेले तेव्हां सखाराम हा शिंद्यांच्या चाकरींत शिरला; येथेंहि त्यास १०० स्वारांचेंच आधिपत्य देण्यांत आलें. त्यानें आपल्या चातुर्यानें, शिंद्यांचा कारभारी राघोजी पाटलाची मर्जी संपादिली. सखारामाची मुलगी सुस्वरूप म्हणून प्रसिद्ध असल्यामुळें तिच्याशीं विवाह करण्याच्या उद्देशानें स्वतः दौलतराव शिंदेहि त्याची खुशामत करी. शिंद्याशीं संबंध जोडण्यास सखारामहि उत्सुक होताच, परंतु जितकें आपण ओढून धरूं तितका आपला फायदा जास्त असें समजून तो शिंद्यास मुलगी देण्यास वर कांकू करी. रावबाजी याला उत्तरहिंदुस्थानांत नेण्याकरितां बाळोबा तात्यानें सखारामाचीच योजना केली. तेव्हां त्यानें बाजीरावास सांगितलें कीं, तुम्हाला पेशवाई मिळवून देण्यासाठीं मी शिंद्याचें मन वळवितों आणि शिवाय शिंद्यास आपली मुलगी देतों. मात्र आपण पेशवे झाल्यावर शिंद्यास दोन कोट रुपये द्यावें व मला शिंद्याची दिवाणगिरी व कागलची जहागिरी मिळवून द्यावी. तें रावबाजीनें कबूल केलें.

पुढें सखारामानें मायकेल फिलोज याच्याकडून विश्वासघात करवून नानांस शिंद्याच्या गोटांत आणवून नंतर फिलोजकडून त्यांनां व बरोबर आलेल्या सर्व बड्या बड्या मंडळींसह कैद केलें. त्यांच्या बरोबरचे स्वार व शिपाई यांनां लुटून लंगडे, लुळे केले व कांहींनां तर ठार मारलें. नंतर घाटग्यानें केवळ नानांच्याच नव्हे तर त्यांच्या अनुयायांच्याहि घराची मनस्वी लुटालूट केली. तेव्हां यांपैकीं कांहीं मंडळींनीं त्याच्या लूट मिळविण्याकरितां आलेल्या शिपायांशीं तोंडहि दिलें. एखाद्या शत्रूनें अकस्मात् हल्ला चढवावा अशी त्यावेळीं पुणें शहराची स्थिति झाली होती. सर्व रात्रभर व दिवसादेखील शहरांत गोळीबार चालत असे. सर्व बाजूंनीं रस्ते अडवून ठेविले जात व शहरांत हलकल्लोळ, लुटालूट व रक्तपात याशिवाय दुसरें कांहीं दिसत नसे. सर्व लोक घाबरून गेले होते. व रस्त्यांतून जाणारी मंडळी जमावानें व सशस्त्र जात ( पुण्यांतील सर्जेरावी—नवयुग, १९२२ ).

पुढें ( १७९८ मार्च ) सखारामाच्या मुलीचा दौलतराव शिंद्याशीं विवाह झाला. हीच प्रसिद्ध बायजाबाई शिंदे होय. दौलतरावानें मागितलेले दोन कोट रुपये देण्यासाठीं पेशव्यांनीं घाटग्यास शिंद्याची दिवाणगिरी देऊन बाळोजी कुंजराच्या मदतीनें पुण्यांतील लोकांपासून पैसे गोळा करण्याच्या कामावर त्याला नेमलें. यावेळीं पैसे गोळा करण्याकरितां घाटग्यानें जे उपाय योजले ते अत्यंत अमानुष होते ( डफ ) शनिवार वाड्यांत जुनी कारभारी मंडळी कैदेंत होती, त्यांनां त्यानें बाहेर काढून ते आपला पैसा कोठें आहे तें सांगेपर्यंत त्यांच्या अंगावर कोरडे ओढून, त्यांच्या जवळून बलात्कारानें सर्व पैसा काढून घेतला. शहरांतील व्यापारी, सराफ वगैरे ज्या ज्या लोकांजवळ पैसा आहे असें वाटत होतें त्या सर्वांनां पकडून त्यांचा इतका छळ करण्यांत आला कीं, त्यांतील कांहीं मंडळी त्यायोगें मरणहि पावली. गंगाधरपंत भानू यांस पैशासाठीं तापलेल्या तोफेवर बांधलें असतां तो तेथल्या तेथेंच मरण पावला. महादजीच्या दोघा वडील बायकांनीं दौलतरावावर आपल्या धाकट्या सवतीशीं व्यभिचार केल्याचा आरोप केला, तेव्हां घाटग्यानें बळजबरीनें त्यांनां पकडून खूप मार दिला व त्यांची अतिशय विटंबना केली ( १७९८ ). ( डफ. पु. ३. पृ. १६२ ). त्यामुळें बायकांच्या बाजूस असलेल्या मुजफ्फरखानाची व सखारामाची दोनदां चकमक उडाली.

सखारामाच्या वर्तनास कोणाकडूनहि प्रतिरोध न झाल्यामुळें शेवटीं तो इतका बेताल झाला कीं, तो शिंद्यासहि जुमानीना. फकीरजी गाढवे याच्या साहाय्यानें लोकांपासून

ळजबरीनें पैसे उकळण्याचें काम त्यानें चालविलेंच होतें. शिंद्यांच्या सैन्यांतील चार अधिकाऱ्यांस तर बायांच्या बंडांत सामील असल्याच्या केवळ संशयावरून त्यानें तोफेच्या तोंडीं दिलें. शेवटीं आपला स्वतःचाच उपमर्द होऊं लागल्यानें चीड येऊन व पेशव्यांच्या आज्ञेवरून आणि लोकांच्या शिव्यापाशास कंटाळून शिंद्यानें सखारामास पकडून कैदेंत टाकलें (१७९८). परंतु बाळोबातात्यानें रदबदली करून त्याला कैदेंतून सोडविलें ( १८०० ). कैदेंतून सुटतांच त्यानें पुन्हां शिंद्यावर पगडा बसविला व बाळोबातात्याच्या विरुद्ध एक पक्ष उपस्थित केला आणि शिंद्याचें मन वळवून बाळोबास व त्याच्या अनुयायांस कैद करवून नगरच्या तुरुंगांत त्यांची रवानगी केली. बाळोबा कैदेंत लवकरच मरण पावला. त्याचा भाऊ धोंडीबा यास सखारामानें तोफेच्या तोंडीं दिलें. नारायणराव बक्षी (शिंद्याचा सेनापति) याच्या अंगास दारूचे बाण बांधून ते पेटविण्यांत आले; त्याबरोबर त्या दुर्दैवी माणसाचें शरीर आकाशांत उडून त्याच्या चिंध्या चिंध्या झाल्या. हेंहि कृत्य सखारामानें केलें.

पुढें दौलतरावानें पटवर्धनावर स्वारी केली त्यावेळीं सखारामानें कोल्हापुरकरांची मदत शिंद्यांस मिळवून दिली होती (१८००). यानंतर तो उत्तर हिंदुस्थानांत जाण्यासाठीं निघाला तेव्हां त्यानें सखारामाच्या हाताखालीं पांच पलटणी व दहा हजार स्वार देऊन त्यास पुण्यास ठेवलें. परंतु सखारामानें पुण्याच्या दक्षिणेकडील मुलुखांत लुटालुटीची मोहीम सुरू केली (१८०१ ).

पुढें तो पुण्यास आला व पैशाकरितां बाळोजी कुंजराच्या घरांत धरणें देऊन बसला. त्यानें पेशव्यांच्या दरबारांतील एकाहि माणसाचा अपमान करण्याचें बाकी ठेविलें नव्हतें. शेवटीं बाळोजी कुंजरानें सावकारांवर वरात देण्याकरितां म्हणून त्याला आपल्या घरीं बोलावून व त्याचा मोठा आदरसत्कार करून थोड्या वेळानें कागद आणण्याचें मिष करून तो तेथून जाऊं लागला. बाळोजी तेथून उठला कीं घाटग्यास कैद किंवा ठार करण्यांत यावें असा पूर्वी संकेत झाला होता. परंतु बाळोजीचा हेतु ओळखून सखारामानें स्वतः उठून व बाळोजीचा हात धरून त्याला आपल्या बरोबर आणलें व आपण घोड्यावर बसून तेथून निघून गेला. नंतर त्यानें आपल्या सर्व सैन्यासह पुणें शहर लुटून जाळून फस्त करण्याची बाजीरावास धमकी दिली. परंतु बाजीरावानें इंग्रज वकिलाच्या मध्यस्तीनें तो प्रसंग टाळला.

याच सुमारास सखारामास शिंद्याचें माळव्यांत निघून येण्याविषयीं निकडीचें बोलावणें आल्यावरून तो पुण्याहून निघून दौलतरावास नर्मदापार जाऊन मिळाला. शिंद्यानें त्यांस १०,००० घोडदळ व कवाइती पायदळांच्या चौदा पलटणी देऊन इंदूर लुटण्याकरितां पाठविलें. तेव्हां यशवंतराव होळकराहि कांहीं कवायत शिकविलेल्या पलटणी, ५००० बिनकवायती पलटणी व २५००० स्वार घेऊन चालून आला. दोन्ही पक्षांत कांहीं दिवस किरकोळ चकमकी झाल्यावर शेवटीं होळकरानें शिंद्याच्या लष्करावर जोराचा हल्ला केला; तथापि त्यांत त्याचा पराजय होऊन इंदूर लुटलें गेलें. इंदूर हातीं आल्यावर सखारामानें तेथें इच्छेस येईल त्याप्रमाणें पशुतुल्य क्रूरपणाचीं व अंगावर शहारे आणण्यासारखीं कृत्यें केलीं (डफ पुस्तक ३, पृ. २०१ ). पुढें इंग्रजांचें यशवंतराव होळकराशीं युद्ध चाललें असतां शिंद्यानें होळकरास मिळावें अशी सखारामाचा आरंभापासून इच्छा होती व त्याप्रमाणें ( १८०४ आक्टोबर ) दौलतराव हा बऱ्हाणपुराहून उज्जनीकडे जावयास निघाला होता. भरतपूरच्या जाटानें इंग्रजांशीं तह केल्यावर, होळकर व शिंदे एक होऊन अजमेरला आले, तेव्हां सर्जेराव हाच शिंद्याचा दिवाण होता. व त्याचें मत वरीलप्रमाणें होळकराप्रमाणेंच शिंद्यानेंहि इंग्रजांशीं युद्ध चालू ठेवावें असें होतें. तथापि पुढें सर्जेरावच्या जुलमी वर्तनामुळें स्वतःच शिंद्यानें त्याला कामावरून दूर केलें. यानंतर शिंदे व होळकर यांनीं इंग्रजांशीं तह केला. त्यांत दोघांनींहि अतःपर सर्जेरावच्या सल्ल्यानें न चालण्याचा व त्याला आपल्या पदरीं चाकरीस न ठेवण्याचा करार केला ( १८०५ ) परंतु पुढें लवकरच हा करार रद्द करण्यांत आला. व घाटग्यानें शिंद्याच्या कारभारांत पुन्हां वर्चस्व संपादन केलें. पुढें एकदां वाठारच्या निंबाळकर नांवाच्या एका शिलेदारास शिंद्यांच्या इच्छेविरुद्ध जहागीर देण्याचें घाटग्याच्या मनांत येऊन त्या प्रकरणीं त्याची व शिंद्यांची बरीच बोलाचाली झाली; त्या गडबडींत मानाजी फांकड्याचा मुलगा आनंदराव शिंदे यानें सखारामास जागच्याजागीं भाल्यानें भोंसकून ठार केलें ( १८०९-१० ). डफनें याला राक्षस म्हटलें आहे ( पु. ३. पृ. ३२४ ). याला सर्जेराव असा किताब होता. याच्याच वंशांत कोल्हापूरचे माजी राजे शाहूछत्रपती यांचा जन्म झाला होता. याशिवाय घाटगे घराण्याची माहिती ज्ञानकोशाच्या १० व्या विभागांत कागल या शब्दाखालीं पहावी [ डफ. पु. ३; खरे-ऐ. ले. संग्रह पु. १०, ११, १२. ].

**घाटाळ,** पोट विभाग.-बंगाल. मिदनापूर जिल्हा. क्षे. फ. ३७२. चौ. मै. लो. सं ( १९११ ) ३०१३९६. यांत पांच शहरें व ७१९ खेडीं असून जमीन उत्तम आहे पण नेहमीं पुराची भीति असते. पीक बहुधां नेहमीं चांगलें असतें पण लोकांनां मलेरियाचा उपद्रव फार होतो.

तालुका.—क्षे. फ ९१ चौ. मै. व लो. सं. ( १९११ ) ८३३४१. यांत २ शहरें व १४७ खेडीं आहेत.

शहर.—तालुक्याचें मुख्य ठिकाण. लो. सं. (१९११) १२०६४. सीलाई व रूपनारायण यांच्या संगमावर आहे. येथून बोटीनें कलकत्याशीं व्यापार चालतो. पूर्वी येथें डच लोकांची फॅक्टरी होती. हल्लीं कपडा व रेशीम बनतें. म्युनिसिपालिटी व इतर आफिसें वगैरे इतर ठिकाणाप्रमाणें आहेत.

**घातमपूर**—संयुक्तप्रांत. कानपूर जिल्ह्यांतला तालुका. क्षेत्रफळ ३४५ चौ. मै. लो. सं. (१९११) १२२२९३. दर चौ. मै. प्रमाण ३४५. शहर एकहि नाहीं. खेडीं २३३. तालुक्याच्या मध्यावरून शोण नदी वहाते. उत्तरेकडील जमीन सुपीक आहे. दक्षिणेकडचीहि जमीन बरी आहे, पण तींत रान फार माजतें व नाले फार पडतात. १९०३ सालीं २१६ चौ. मै. जमीन लागवडीखालीं होती पैकीं ६२ मै. कालव्यानें भिजत असे. भोगनीपूर कालव्यानें त्यांतल्या पांचपष्ठांश म्हणजे ५०।५१ मैलांनां पाणी मिळे.

**घानची**—मुंबई इलाख्यांतील एक तेली जात. हें घाणी या शब्दापासून ज्ञातिनाम बनलेलें दिसतें. लो. सं. (१९११) २२८१९. गुजराथेंतील शहरें व मोठालीं खेडीं यांमध्यें हे लोक आढळतात. यांचीं आडनांवें रजपूत राष्ट्रजातींचीं आहेत. तरी आम्ही उत्तर गुजराथेंतील मोधेरा येथील वाण्यांचे वंशज आहों असें ते म्हणतात. हे मुख्यत्वेंकरून तेली आहेत; कांहीं धान्य व भाजीपाला विकतात व कांहीं शेतकरीहि आहेत. यांमध्यें ६ पोटभाग असून मोध व सिंधपुरी पोटजातींतील लोक सर्वांत श्रेष्ठ समजले जातात व यांच्या हातचें अन्न इतर चार पोटजातींतील लोक स्वीकारतात. हे इतर पोटजातींतील लोकांचें अन्न घेत नाहींत. पोटजातींपैकीं कोणच्याहि दोन पोटजातींमध्यें विवाहसंबंध होत नाहींत. लग्नें बाळपणीं होतात. पुनर्विवाहाची चाल आहे. विधवेला वडील दिराशीं लग्न करतां येत नाहीं; धाकट्याशीं करितां येतें. घटस्फोट फार क्वचित होतो. मोध व सिंधपुरी याखेरीजकरून इतर सर्व घानची लोक मांसाहारी आहेत. हे स्वामी नारायण, रामानंदी व इतर पंथाचे आहेत. यांचे उपाध्ये ब्राह्मण आहेत.

गुजराथच्या कांहीं भागांत मुसुलमान लोक घानची लोकांचा धंदा (तेल्याचा धंदा) करतात. गोधरा येथील मुसुलमान घानची इतर मुसुलमान घानच्यांपासून वेगळे झालेले असून आपल्याला शीख समजतात; व यांचे विवाहसंबंधहि इतर शीख लोकांशीं झालेले आहेत. यांचा सामाजिक दर्जा शीख लोकांबरोबरचा आहे. सुरत येथील मोढघानच्यांची एक मध्यवर्ती संस्था आहे. सुरतेंत या लोकांचे सात वर्ग झाले असून प्रत्येक वर्गावर एक शेट व एक पटेल आहे.

पटानि घानची लोकांचे ९ वर्ग असून त्यांमध्येंहि अशाच संस्था आहेत. सिंधपुरिया घानची लोकांचे सामाजिक प्रश्नांचे निकाल वयांत आलेल्या सर्व माणसांच्या सभेंत बहुमतानें ठरले जातात. अहमदाबाद शहरांमधील घानची लोकांचे पांच भाग असून त्या प्रत्येकांवर दोन वरिष्ठ अधिकारी आहेत. [से. रि. १९११ (मुंबई)].

**घायपात**, वस्तुक्षेत्र.—ही वनस्पति मूळची दक्षिण अमेरिकेच्या उष्ण कटिबंधांतील भाग व दक्षिणेकडील संस्थानें येथील होय. समशीतोष्ण कटिबंधांतील उष्ण प्रदेश व इतर उष्ण कटिबंधांतील प्रदेश; दक्षिण यूरोप, आफ्रिका, हिंदुस्थान, वेस्ट इंडीज व अमेरिका खंडांतील कांहीं भागांत ही वनस्पति आढळते. हिंदुस्थानांतील कित्येक उष्ण प्रदेशांत ही वनस्पति कायमची राहिली असून जमीन कोरडी व खडकाळ आणि हवा फार सर्द नसल्यास ६००० फूट उंचीपर्यंतच्या प्रदेशांत ही वनस्पति वाढते.

इतिहास—स्पॅनिश वेस्ट इंडीज व मेक्सिको यांसंबंधीं लिहितांना गोमारानें या वनस्पतीचा उल्लेख केला आहे. हिच्या वाखाचा शिवण्याच्या दोऱ्यासारखा उपयोग करीत असत असें तो म्हणतो. फ्रँगोसस यानें या वनस्पतीपासून निघणाऱ्या मद्याचा उल्लेख केला आहे. डोडोनिअस यानें क्लुशियसपासून आणलेलें चित्र प्रसिद्ध केलें. त्याचा पुढील लेखकांस बराच उपयोग झाला. पुढें १७२७ सालीं ट्र्यु यानें या झाडाच्या फुलांचें चित्र काढून झाडासंबंधीं बरीच माहिती दिली आहे. हिंदुस्थानांत याच्या संबंधीं महत्वाची माहिती रॉक्सबर्ग यांजकडून मिळते. त्यानें ए. कॅन्टला, ए. लुरिडा व ए. ट्यूबेरोसा अशा तीन जातींचा उल्लेख केला आहे. यांपैकीं पहिलीचा कलकत्ता येथें १७९४ सालापूर्वीच प्रवेश झाला. हीस कौतल (कौटल) असें संस्कृत नांव होतें. दुसरी जात मूळची अमेरिकेंतील असून तिसरी क्यू येथील होती. परन्तु कौतल हें नांव संस्कृत असल्याचें दुसऱ्या लेखकांस मान्य नाहीं. यांचीं दुसरीं नांवें आहेत तीं वर्णनात्मक आहेत.

जाती.—मुख्य जाती सात—(१) अॅंगाव्हा ही जात केवळ शोभेकरितां बागेंत लावतात. तिचा विणकामांत उपयोग होत नाहीं. ही मूळ वेस्ट इंडीजबेटांतील होय. (२) ए. कँटाला, ही जात हिंदुस्थानांत सर्वत्र विपुल आढळते व तिचा कुंपणाकरितां उपयोग करतात. या झाडाच्या पानांपासून वाख काढतात. (३) ए. इलॅंगेटा ही जात पंजाब, दिल्ली, ग्वालेर आणि चंबळा व यमुना या नद्यांमधील कोरड्या प्रदेशांत पुष्कळ सांपडते. हिच्या तंतूची नीट परीक्षा झालेली नाहीं. पण ते अत्यंत उपयोगी असण्याचा संभव आहे. (४) ए. सिसालाना ही जात मूळ युकॅटनमधील असून ती १८९० च्या सुमारास हिंदुस्थानांत आली व ती हल्लीं हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांत आहे. (५) ए. व्हेराकूझा ही जात मूळ मेक्सिकोमधील असून ती १८३६ च्या सुमारास हिंदुस्थानांत आली. ही सर्द हवेंत चांगली होते, व म्हैसुरांत तिचा प्रसार फार आहे. हिच्या तंतूची उपयुक्तता अद्याप माहीत नाहीं. (६) ए. विघटी ही जात म्हैसूर ते पंजाबपर्यंतच्या सर्व कोरड्या प्रदेशांत सांपडते. (७) ए. लॉंगिसेपाला ही जात सहराणपूर येथें रामबन्स (रामवंश?) केवडा या नांवानें प्रसिद्ध असून ती कलकत्ता, ब्रह्मदेश व दक्षिणहिंदुस्थानांत आढळते. हिचा वाख फार चांगला निघतो.

उपयोग.—औषधि, अन्न, पेय, साखर, द्राक्षासव, साबणासारखें द्रव्य, संधान द्रव्य वगैरे कामांकरितां या वनस्पतीचा उपयोग होतो. याच्या पानांपासून वाख निघतो. यापैकीं अलोफायबर, सिसल हेम्प अथवा व्हिजिटेबल सिल्क हीं मुख्य असून यांनां पीत म्हणतात. मोठया, जाड व ओलसर अशा पानांचा पोटिसाकरितां उपयोग करतात. अमेरिकन डॉक्टर उपदंशानंतर रक्त शुद्ध करण्याकरितां या पानांचा रस देतात. याचीं मुळें मूत्ररेचक व उपदंशहारक आहेत सार्सापरिल्यांत या पानांचें मिश्रण करतात. योग्य रीतीनें शिजविलें असतां याच्या मुळ्यांचें स्वादिष्ट व पौष्टिक अन्न तयार होतें. हिरव्या बुंध्यांचा मनुष्यांनां व पानांचा गुरांनां खाण्याकरितां उपयोग होतो. फुलांच्या हंगामांत याची मधली कळी तोडली असतां त्या जागेंतून आंबट-गोड रस बाहेर निघतो. त्यापासून जिला स्पॅनियर्ड्स ' पल्क ' म्हणतात ती दारू तयार होते. पल्ककरितां ए. साल्मियाना जातीच्या झाडाची लागवड करतात. या रसापासून साखर किंवा सिरकाहि तयार करतां येतो. या रसाचा साबणाऐवजींहि उपयोग करतां येतो. वाळवी लागू नये म्हणून या रसाचा उपयोग भिंतीस लावावयाच्या चुन्यांत करतात. हातांस किंवा पायांस हा रस चोळला असतां अग्नीपासून अपाय होत नाहीं. याचा बुंधा वाळवून कापला असतां त्याचा वस्तरा घासण्याकरितां किंवा बुचाऐवजीं उपयोग करतां येतो. वाख काढून घेतल्यानंतर उरलेला लगदा खताच्या उपयोगी पडतो. घायपाताच्या तंतूंचा उपयोग दोर, सतरंज्या, चटया, कुंचले वगैरे करण्याकरितां करतात. उरलेल्या वाईट तंतूंचा कागद करण्याच्या कामीं उपयोग होतो. सफाईदार तंतूंचें कापड विणतात. तागाऐवजीं किंवा त्यांत मिसळण्याकरितां घायपाताच्या वाखाचा उपयोग करतात. घायपाताचे तंतू काढण्याचें काम यंत्राच्या सहाय्यानें करतात. घायपाताच्या झाडाची पूर्ण वाढ, बाहेरचीं मोठालीं पानें वरचेवर न कापल्यास ६ वर्षांत पूर्ण होते. कित्येक वेळां पूर्ण वाढ होऊन दांडे येण्यास २०–२५ वर्षेंहि लागतात. १००० पानांपासून ५० ते ७० पौंड वजनाचे तंतू निघतात व एक टन तंतूंस ३० ते ३५ पौंडपर्यंत किंमत येते.

**घारगड किल्ला**—मुंबई इलाखा. नाशिक जिल्हा, त्र्यंबकेश्वरच्या पूर्वेस ६ मैलांवर समुद्रसपाटीपासून ३५७२ फूट उंचीवरील किल्ला. खालच्या भागाची चढण सोपी आहे. पुढें चढण उभी आहे पण फारशी लांब नाहीं. माथ्यावर जागा थोडी आहे. पाणी विपुल असून दोन दरवाजे व कांहीं घरें आहेत. हा किल्ला त्र्यंबकेश्वराबरोबर जे १७ किल्ले स. १८११ त ब्रिटिशांच्या स्वाधीन झाले त्यांपैकीं एक होय. [ ब्रिग्ज रिपोर्ट १८१८; ब्ल्याकर-मराठा वॉर; नाशिक ग्याझे. ].

**घारघोडा**—मध्यप्रांत, रायगड संस्थानांतील तारापूर जमीनदारींतील मोठें इनामी गांव. हें बंगाल-नागपुर रेल्वेच्या रायगड स्टेशनपासून २१ मैल असून हद्दीच्या राणीकडे आहे. येथें पोलिस ठाणें व शाळा असून आठवड्यास बाजार भरतो. त्यांत लाख, तीळ, मोहरी व शेतकीचीं अवजारें विकलीं जातात.

**घारापुरी**—मुंबई इलाख्यांतील कुलाबा जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यांतील एक बेट. उत्तर अक्षांश १८°, ५८' व पूर्व रेखांश ७३°. लो. सं. (१९०१) ८८०. मुंबई शहरापासून हें ६ मैलांवर असून ह्याचा समावेश मुंबई बंदरांतच होतो. ह्या द्वीपाचा परीघ ४ ते ४॥ मैल आहे व ह्या बेटांत दोन डोंगर आहेत. बेटाच्या खालच्या बाजूस असलेल्या खऱ्या हत्तीएवढया मोठ्या दगडी हत्तीवरून ह्या बेटात ' एलिफन्टा' हें नांव पोर्तुगीज लोकांनीं दिलें. हा हत्ती खालीं पडून पुष्कळ दिवस नाहींसा झाला होता; पण पुढें १८६४–६५ सालीं तो सांपडल्यावर राणीच्या बागेंत ठेवण्यांत आला. तो अद्याप तेथें आहे. तीन ते दहा शतकांच्या दरम्यान हें बेट म्हणजे एक मोठें शहर व क्षेत्र होतें असें म्हणतात. मौर्य राजांचें प्राचीन पुरीनामक शहर तें हेंच होय असें कांहीं पुराणवस्तुसंशोधकांचें मत आहे. येथील पहाण्याजोग्या विशेष गोष्टी म्हणजे गुहा होत. शिवाय भग्नस्तंभ व शिवाच्या मूर्ती, तसेंच इमारतींचा जीर्णावशेष ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं येथें प्राचीन काळीं मोठी नगरी असावी. येथील 'त्रिमूर्ति ' पाहून कारागिरांच्या कुशलतेचें कौतुक काटतें. ही मूर्ति म्हणजे शिवाच्या उत्पादन, पालन व संहार ह्या तीन गुणांचे दर्शक (ब्रह्मा, विष्णु व रुद्र) होय. येथील सर्व मूर्ती शिवमूर्तीच आहेत १८६५ मध्यें कोणी ह्या मूर्ती विरूप केल्या. येथील एका गुहेस 'सीताबाईचें देउळ ' म्हणतात. या गुहा केव्हांपासून अस्तित्वांत असाव्या तें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. कोणी म्हणतात ह्या पांडवांच्या वेळच्या असाव्या. कोणी म्हणतात, बाणासूर नामक करणराजाच्या वेळच्या, तर कोणी म्हणतात शिकंदर बादशाच्या वेळच्या. फर्ग्युसनच्या मतें या इ. स. १० व्या शतकांतल्या असाव्यात. येथील एक लेखांकित शिला पोर्तुगीज व्हाईसरॉय डोम जोआवोडीकॅस्ट्रो ह्यानें १५४० त युरोपांत नेली असें म्हणतात. येथें फेब्रुवारी महिन्यांतील शिवरात्रीस मोठी यात्रा भरते.

या ठिकाणीं एकंदर सहा लेणीं आहेत; त्यांपैकीं चार पूर्ण आहेत. सर्वांत मोठ्या लेण्यांत " त्रिमूर्ति " नांवानें प्रसिद्ध असलेला भव्य मुखवटा आहे. एलिफंटांतील इतर शिल्पांप्रमाणें हेंहि भग्न केलें गेलें आहे. याच्या दोहों बाजूंनां द्वारपाल उभे आहेत. त्रिमूर्तीच्या पूर्वेस असलेल्या खोलींत अर्धनारीश्वर, गरूडवाहन विष्णु, इंद्र, ब्रह्मा वगैरे मूर्ती आहेत. पश्चिमेच्या खोलींत शिव-पार्वती कोरली आहेत. पुढें पश्चिमओरींत शिवपार्वती-विवाहाचा अत्युत्कृष्ट देखावा आहे. नंतर कैलासांत शिवपार्वती बसली आहेत; खालीं दशमुख रावण आहे. शिवपार्वतीविवाहाच्या दृश्यासमोर वीरभद्र किंवा भैरव यांची भयानक मूर्ती आहे. बऱ्याच पुढें भूतेश्वराचें भूतगणासमवेत तांडव नृत्य दृष्टीस पडतें.

दुसऱ्या लेण्यांतील शिल्प छिन्नविच्छिन्न झालें असल्यानें त्याचें फारसें वर्णन करतां येत नाहीं. तिसऱ्याची तर फारच दुर्दशा झाली आहे. चवथ्यांत डियोगो डो कोउटोच्या माहितीवरून, चंडी व वेताळ यांच्या मूर्ती होत्या. पण त्या बऱ्याच दिवसांपासून नाहींशा झाल्या आहेत.

**घाशीराम कोतवाल**—याचें नांव मराठी इतिहासांत प्रसिद्ध आहे. हा कनोजी ब्राह्मण असून ह्याच्या बापाचें नांव शामळदास ( सावळदास ) असें होतें. हा मूळ अवरंगाबादचा राहणारा. पण नोकरी किंवा व्यापार करून आपलें नशीब काढण्याकरितां हा पुण्यास आला होता. गोड वर्तन आणि हुषारी यामुळें लौकरच त्याचा पुण्याच्या दरबारांत प्रवेश होऊन नाना फडणविसाची मर्जी त्याच्यावर बसली.

घाशीराम लवकरच बढतीला चढून १७८२ मध्यें पुणें शहरचा कोतवाल झाला. खरोखरच तो लायख व कार्यक्षम अधिकारी होता. कोतवाली ( पोलीस ) खातें सुधारून वाढविण्यांत यानें अतिशय परिश्रम घेतले व नजरबाज ( गुप्त-पोलिस ) लोक ठेवून पुण्यांत फंदाफितुरास पुष्कळच आळा घातला. जुन्या कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, प्रथम कोतवालीची जागा आनंदराव काशीकडे असून १७७७ सालीं ती घाशीराम याला देण्यांत आली. पण १७८२ पर्यंत त्याला त्या जाग्यावर कायम करण्यांत आलें नव्हतें. त्याचा ठराविक पगार म्हणजे अबदागिरी धरण्याकरितां ठेवलेल्या नोकराचे ६६ रुपये आणि मशाल धरणाऱ्याचा (दिवट्याचा) ५५ रुपये धरून एकंदर वर्षास ६२१ रुपये होता. घाशीरामाच्या हाताखालीं तीन अधिकारी असून त्यांच्याकडे कोतवालींतील तीन खातीं सोंपविलीं होतीं. मुजुमदाराकडे दस्तैवज, अर्ज वगैरे लिहिण्याचें काम असे. दुसऱ्याकडे कागदपत्रें सांभाळण्याचें काम असे आणि तिसरा जमाबंदीचा अधिकारी असे. तिघांचा पगार मिळून वर्षास ६४० रु. खर्ची पडत. घाशीरामाच्या वेळीं शहरांत खालील सहा चबुतरे किंवा मुख्य पोलीस ठाणीं होतीं.

(१) कोतवाल चावडी, (२) सोमवार, (३) वेताळ, (४) रविवार, (५) नारायण, व (६) शनवार. या सर्व पोलीस ठाण्यांचें उत्पन्न दरवर्षी अजमासें २५००० रुपये असे.

इ. स. १७९०-९१ मधील जमेच्या आंकड्यांवरून कोतवाली उत्पन्नाच्या बाबी कोणकोणत्या असत. हें चांगलें दिसून येतें.

रु. ३१५, नजर—माल मिळकत सह्यानाच्या ताब्यांत आल्या बद्दलची सरकारास द्यावी लागे ती.

रु. १५४, कमावीस.

रु. ४६६३, घरविक्रीवर कर.

रु. २०५, पाट-दाम ( पाट लावण्यावर कर ).

रु. ६१, गवयांकडून फी.

रु. १५९८५, दंड.

रु. ३०४२, बेवारसी मालमत्ता.

रु. २९३, जुगाराबद्दल दंड.

रु. २३७६, वजनें, मापें, कापड इत्यादिकांवर सरकारी छाप मारण्याची फी.

हें एकंदर उत्पन्न २७६१० रुपये असे. आणि तें पुणें शहराच्या पोलीस खात्याचें उत्पन्न म्हणतां येईल. १७९१ सालीं पुण्यांत दंडाला पात्र असे फक्त २३४ गुन्हे होते. त्यावरून पुण्यास गुन्हे किती कमी होत हें दिसून येतें. या गुन्ह्यांत पुढील गोष्टी असतः—सरकारच्या परवानगीशिवाय वेश्या होणें, परवानगीशिवाय बकरीं मारणें; बेवारसी प्रेताची वाट लावणें, स्वतःची जात चोरणें, बहिष्कृत असतां फसवून जातीच्या पंक्तींत बसणें, हीन वर्णाच्या हातचें जेवणें, कुंटिणपणा करणें, वेश्या करण्याकरितां मुली विकत घेणें, एक नवरा जिवंत असतांना दुसरा करणें, बायकोला काडी मोडून दिल्यानंतर तिला घेऊन राहणें, कोळयांनां चाकरीस ठेवणें इत्यादि. त्या वेळीं कोतवालाचें काम पुढें दिल्याप्रमाणें होतें. 'शहराच्या पेठा, पुरे व कसबे येथील किरकोळ कजिया, पेठेचे कमाविसदार यांनीं मनास आणावा; मातबर कजिया असल्यास कोतवालीकडे मनास आणून हलकी गुन्हेगारी घेत जाणें. रस्त्याचा, गल्लीचा व घरचा कजिया लागेल त्याचा इनसाफ कोतवालानें करावा.' [इतिहाससंग्रह, ऐ. गोष्टी, भा. २; पूना इन बाय गॉन डेज; खरे—ऐ. ले. संग्रह. भा ९; वाड. भा. ८. पृ. १२६]

वरील यादीवरून असें वाटतें कीं, स्त्रीपुरुषविषयक अनीति त्यावेळीं फार माजली असावी. घाशीरामाबद्दल लोकांत झालेल्या अप्रीतीचें हें एक कारण असूं शकेल. त्यांतून कदाचित नाना फडणविसांच्या बळावर तो जुलमी व उन्मत्त बनला असावा. त्यामुळें पुढें त्याचा फारच वाईट रीतीनें अंत झाला.

१७९१ च्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस श्रावणमासची दक्षिणा आटोपल्यानंतर पस्तीस द्राविडी ब्राह्मण घाशीरामाच्या बागेंत गेले; तेथें त्यांनीं माळ्याच्या परवानगीशिवाय कांहीं कणसें तोडिलीं. त्यावरून तंटा होऊन माळी घाशीरामाकडे आला व त्याला त्यानें सांगितलें कीं कित्येक चोर व कोमटी यांनीं बागेंत दंगा केला. तेव्हां कोतवालानें २५ प्यादे पाठवून ब्राह्मणांनां पकडून स्वतःच्या (भवानी पेठेंतील) वाड्यांत भुयारांत त्यांनां कोंडलें. रविवारची रात्र, सोमवार दिवस-रात्र व मंगळवार दिवसपर्यंत ते तेथें होते. मानाजी फांकड्यास ही गोष्ट कळल्यावर त्यानें जबरीनें कुलूप तोडून ब्राह्मण बाहेर काढिले. त्यांत १८ ब्राह्मण मेले होते; तीन बाहेर काढल्यावर मेले; तेव्हां हें वर्तमान मानाजीनें पेशव्यांनां कळविलें. त्यांनीं नानांनां सांगितल्यावरून त्यांनीं घाशीरामास विचारिलें. त्यानें ते कोमटी चोर होते असें उत्तर दिल्यावरून नानांनीं मुडदे जाळण्यास परवानगी दिली. परंतु मानाजी मुडदे उचलूं देईना. तेव्हां नानांनीं घाशीरामास चौकींत बसवून चौकशी चालविली. इतक्यांत हजार तैलंगी

ब्राह्मण नानांच्या वाड्यापुढें येऊन दंगा करूं लागले. न्यायाधीश अय्याशास्त्री हे वाड्यांत जात असतां त्यांची शालजोडी व पागोटें ब्राह्मणांनीं फाडलें व मारामारी केली. शास्त्रीबुवांनीं चौकशी करून घाशीरामास देहांतशासन शिक्षा दिली. तेव्हां मंगळवारीं रात्रीं त्याची धिंड काढली व बुधवारीं सायंकाळीं भवानी पेठेच्या पलीकडे त्याला नेऊन सोडला. तेथें वरील द्रवीड ब्राह्मणांनीं 'दगड उचलून मस्तकावर घालून ( त्यास ) जीवें मारला.' मग ब्राह्मणांचीं प्रेतें जाळ शी. घाशीरामाच्या प्रेतास अग्नी दिला नाहीं. त्याच्या हाताखालील लोकांस व दोघा मुलांस कैद करून त्यांची मालमत्ता जप्त केली ( खरे. ऐ. ले. सं भा. ९ ).

यावरून ब्राह्मणांबद्दल खरा प्रकार घाशीराम यास शेवटपर्यंत माहीत नव्हता असें दिसतें. चार्लस मॅलेटहि म्हणतो, हा भयंकर प्रकार उघडकीस येईपर्यंत घाशीरामाला त्याची माहिती नव्हती असें दिसतें. त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपलें काम बजावलें होतें. तथापि घाशीरामाविरुद्ध फार मोठी ओरड झाली, व श्रीमंतांनीं ब्राह्मणांच्या भीतीनें त्या दुर्दैवी मनुष्याला पिसाळून गेलेल्या तैलंगी ब्राह्मणांच्या स्वाधीन केलें. घाशीरामाला त्याच्या उत्कर्षाच्या दिवसांत मोठा मान असे.

अशा प्रकारानें घाशीरामाचा अंत झाला. पण त्याच्या अंगीं कितीहि दोष असले तरी त्यानें पुण्याच्या पोलिसांना व्यवस्थेशीर वळण लाविलें एवढें खरें. त्यानें नवापुरा नांवांची भवानी पेठेच्या पूर्वेस एक नवी पेठ वसविली आणि हडपसरच्या रस्त्यावर एक बाग व तलाव त्यानें बांधला होता.

**घांसदाणा**—या नांवाखालीं मोंगलांच्या मुलुखांतून पैसा गोळा करण्याची चाल मराठ्यांनीं इ.स. १६९२ च्या सुमारास काढली. चौथाई व सरदेशमुखीप्रमाणें घांसदाण्याची रक्कम सरकारांत भरावयाची नसून तो पैसा गोळा करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यानें आपल्या लष्कराच्या चरितार्थाकडे लावावयाचा असे. घोडे, बैल वगैरे जनावरांच्यासाठीं गवत, वैरण वगैरे ( घांस ) आणि माणसांसाठीं धान्य, रसद ( दाणा ) वगैरे शत्रूंच्या मुलुखांतून गोळा करून लष्कराचें पोट परभारें (मराठे) सरकारचा पैका खर्च न होता भरलें जावें अशी योजना असे. ज्या गांवाकडून हा कर विनतक्रार वसूल होई त्यास मराठे लष्कर मग त्रास देत नसे; वसूल न दिल्यास मात्र त्या गांवांची लूट करी. शत्रूच्या प्रदेशांत सैन्याचें पोट भरण्याची ही पद्धत नेपोलियनहि अंमलांत आणीत असे. [ डफ. पु. १; खरे–ऐ. ले. सं. ]

**घासी**—यांची मुख्य वस्ती बिहार–ओरिसा व मध्यप्रांत यांतून आहे. एकंदर लोकसंख्या (१९११) १३४०७६. द्रविड वर्गांतील ही जात दिसते. मध्यप्रांतांत यांची संख्या ४३००. आहे. हे अत्यंत खालच्या दर्जाचे आहेत. हे मध्यप्रांतांत बुंदेलखंड व ओरिसा प्रांतांतून रहाण्यास आले. यांच्या धंद्यावरून कांहीं वर्ग पडले आहेत. उदा. उडिया हे कातडी स्वच्छ करतात. डिंगकुचिया हे गुरांस खच्ची करतात. डोलवोहा हे डोली वाहतात, नगारची हे नगारा वाजवितात. यांच्यापैकीं जे घोड्याचें काम करतात त्यांस सैस म्हणतात व ते आपणांस उच्च समजून इतरांस मुली देत नाहींत व इतरांच्या मुली करीत नाहींत. छोटा नागपूरांत हे शिंप्यांचा धंदा करून एक निराळीच जाती बनवीत आहेत. यांच्या कुळांचीं नांवें, पशुपक्षी, झाडें व निर्जीव पदार्थांचींच आहेत. स्वकुलांत विवाह निषिद्ध आहे. पण बहीणभावांच्या संततींत लग्नें होतात. यांपैकीं कबीरपंथी लोक इतरांबरोबर लग्नें करतात. स्वजातीयाच्या कुमारीबरोबर व्यभिचार केला तर उंबराच्या फांदीसमोर उभें करून कांहीं बायका त्यांच्यावर हळदीचें पाणी शिंपून लग्न लावितात. जर बाहेरच्या माणसाबरोबर मुलीनें संबंध केला तर तिला जातींतून कढतात व तिच्या आईबापांपासून जातीभोजन घेतात.

कांहींचा धंदा गवत कापण्याचा, मोतद्दारीचा, कोष्टयांचा व कुंचले व फण्या करण्याचा आहे. जातींत घेण्याचा यांचा फारच घाणेरडा विधि आहे. उमेदवाराच्या डोक्यास मूत्र लावून क्षौर करावयाचें व पाण्यांत चांदी किंवा सोनें बुडवून तें पाणी व गोमय, तुळस, आणि दूर्वा त्याला खाऊं घालायच्या. यांच्या बायका चोळी घालीत नाहींत. कोठें कोठें कुंकूहि लावीत नाहींत. सौंदर्य वाढविण्याकरितां निरनिराळ्या भागावर बायका गोंदवितात. प्रायश्चित्त देऊन जातींत घेण्याकरितां पुरुषांचा क्षौर व बायकांची बट कापतात. हे कायस्थांची चाकरी करीत नाहींत व त्यांच्या स्पर्शाचें अन्न देखील खात नाहींत.

आसामांतहि यांची संख्या १५११४ आहे. हे डोम व मुसहार लोकांबरोबरीचे असून ते डुकरांचें मांस व गोमांस भक्षक आहेत. हे लोक अट्टल दारूबाज असून मोलमजुरी करितात. [ रसेल व हिरालाल; से. रि. १९११ ].

**घिरथ**—पंजाबांतील एक जात. लो. सं. ( १९११ ) १७११२९. हे मुख्यतः हिंदु असून विशेषतः कांग्रा व होशियारपूर जिल्ह्यांतील डोंगरांत राहतात. रजपूत लोकांच्या अनीतिसंबंधापासून हे झालेले आहेत असें म्हणतात. ते फार उत्तम शेतकरी असून वरील जिल्ह्यांत ते शेतकरी आहेत. भाटी, चांग व ही जात एकच आहे. या तीन्ही जाती आपसांत रोटीव्यवहार करितात. [ से. रि. ( पंजाब ) १९११ ]

**घिसाडी**— धंद्यावरून बनलेली महाराष्ट्रांतील एक जात. बहुतेक हे लोखंडी काम करणारे फिरते लोक असतात. भाता चालविणें वगैरे किरकोळ कामें यांच्या बायकाच करतात. यांच्यांत पोटजाती नाहींत. मराठ्यांप्रमाणेंच यांचीं नांवें व आडनांवें असतात. आपण गुजराथेंतून आलों असें हे सांगतात व त्यांच्या भाषेंतहि गुजराथी भाषेचें मिश्रण दिसतें.

रहाणी मगळ्यांप्रमाणेच असतें विसाड्यांत भांडणें फार होतात. गुन्ह्यांचा निकाल बहुमतावरून केला जातो. [ मुं. गॅ. ]

**घुगुस**—मध्यप्रांत, जिल्हा चांदा. चांद्याच्या पश्चिमेस १३ मैलांवर हें खेडें आहे. जवळ खडकाळ जमिनींत तीन लेणींवजा देवळें आहेत. एकांत पाय भंगलेली अशी भैरव देवाची मूर्ति आहे. चांदा जिल्ह्यांत घुगुस गांवीं प्रथम दगडी कोळशांची खाण सांपडली. इ. स. १८७० सालीं लॉर्ड मेयोनें मेयोखाण उघडली; परंतु पुढल्याच वर्षी ती बंद पडली.

**घुंड**—पंजाब. केओंथळ संस्थानचें मांडलिक संस्थान. क्षेत्रफळ २८ चौ. मैल. लो. सं. ( १९०१ ) १९२७. उत्पन्न २०००. केओंथळला २५० रु. खंडणी द्यावी लागते. संस्थानिकाला सर्व अधिकार दिले आहेत. मृत्युच्या शिक्षेला मात्र सुपरिं. सिमलाहिल् स्टेट्स याची संमति घ्यावी लागते.

**घुबड**—घूघू असा अवाज करणारा पक्षी. यालाच दिवाभीत असेंहि दुसरें नाव आहे. दिवाभीत म्हणजे दिवसा भिऊन दडून बसणाऱ्या अनेक पक्षिजातींपैकीं एक आहे. दिवाभीत पक्ष्यांच्या एकंदर सुमारें दोनशें जाती असल्याचा शोध आधुनिक प्राणिशास्त्रज्ञांनीं लावला आहे. घुबडाची लांबी २ ते ५ फूटापर्यंत असते. त्याचे पंख अत्यंत मऊ असतात; त्यामुळें त्याच्या उडण्याचा आवाज मुळींच होत नाहीं. या पक्ष्याचा सर्वसाधारण रंग पिंगट असून त्यात कांहींचा तांबूस व कांहींचा करडा असे दोन प्रकार असतात. घुबडांमध्यें एक मोठ्या आकाराची जात असून ती यूरोपांतील बहुतेक देश, आशियामायनर, पॅलेस्टाइन, उत्तर अमेरिका वगैरे देशांत आढळते. या घुबडाचे कान मोठाले असून चेहऱ्याच्या दोन्ही अंगास समकेंद्रक अशीं अनेक वर्तुळें असल्यामुळें हा पक्षी विलक्षण दिसतो व कुरूप माणसाला घुबडाची उपमा देण्याची चाल यावरूनच पडली असावी. दुसऱ्या एका जातीच्या घुबडानां डोक्यावर पिसांचे दोन तुरे शिंगाप्रमाणें असतात. घुबड हा पक्षी उंदरांचा संहार करणारा अतएव शेतकऱ्यांचा उपकर्ता आहे. घुबडाची मादी तीन ते पांचपर्यंत अंडीं घालते व तीं एकदम न घालतां कालावधीनें घालते. त्यामुळें घुबडाच्या घरट्यात एकाच वेळीं नुकतीच जन्मलेलीं पिलें व ताजीं अंडीं दोन्ही आढळतात.

घुबड व त्याचें ओरडणें हीं सर्वत्र अशुभ गणलीं जातात. व त्या अर्थानें मोठमोठ्या पौरस्त्य व पाश्चात्य कवींनीं भयंकर कृत्यांचें पूर्वचिन्ह म्हणून त्याचा उल्लेख केला आहे. वेदांत उलूक या नांवानें घुबडाचें अस्तित्व दिसत असून, त्याचें ओरडणें सर्वांच्या परिचयाचें होतें. दुर्भाग्याचा दूत म्हणून त्याला मानण्यांत येई ( ऋ. १०. १६५, ४; अथ ६. १९, २; तै. सं. ५. ५. १८ १; वाज. सं. २४. ३८.). अश्वमेधांत जंगली झाडांनां घुबडांचे बळी देण्यांत येत ( वाज. सं. २४. २३; मैत्रा. सं ३. १४, ४ ). प्राचीन ग्रीसमध्यें मात्र अगदीं निराळी समजूत होती. घुबड हा पालास अथेन्सचा पक्षी, शास्त्र व कला यांच्या वास्तव्याचें दर्शक चिन्ह गणला जात असे. पण या पक्ष्याचे विलक्षण हावभाव व भेसूर स्वर लक्षांत घेतां कदाचित् ग्रीक लोकांनीं उपरोधिक अर्थानें या पक्ष्याला विद्यासंपन्नतेचें ( म्हणजेच विद्याशून्यत्वाचें ) लक्षण मानलें असावें अशी शंका येते.

**घुराम**—( अथवा रामगड. ) पतिआळा संस्थानांत घनौर तालुक्यांतलें एक जुनें शहर. दंतकथेवरून येथें श्रीरामचंद्राचें आजोळ होतें असें दिसतें. ११९२ मध्यें महमद घोरीनें हें घेतलें. प्रारंभीं हें दिल्लीचें मांडलिक म्हणून होतें. पुढें तें मोडकळीस आलें व आतां त्याच्या पूर्ववैभवाची साक्ष देणारे कांहीं अवशेष मात्र आहेत.

**घेंट**—बेल्जम पूर्वफ्लँडर्सची राजधानी. ही शेल्ड व लीज या नद्यांच्या संगमावर आहे. येथील लोकसंख्या १८८० त १३१४३१ इतकी होती. १९१२ त ती १६७४७७ होती. या शहरांत जवळ जवळ २०० पूल आहेत. या शहराभोंवतीं बागबगीचे पुष्कळ आहेत. या शहरातील भाग जुने आणि कोंदट आहेत. या शहरातील अत्यंत प्रसिद्ध इमारत सेंट बॅव्हान यांचें भव्य मंदिर ही होय. सेंट निकोलसचें चर्च हें गॉथिक धर्तीवर बांधलेलें आहे. या शहरात बाराव्या आणि चौदाव्या शतकात बांधलेला एक चतुष्कोनी मनोरा आहे. व त्यावर लोखंडाचा कळस असून त्यावर सुवर्णाचा ड्रेगन आहे. हा कान्स्टांटिनोपलहून आणला अशी दंतकथा आहे. लीज नदीच्या दुसऱ्या बाजूस आणि आडेबर्गच्या उत्तरेस शहरांतील मुख्य भाग आहे. पूर्वी हा शहराचा फार प्रमुख भाग गणिला जात असे. येथें एक १९ फूट लांब व १८ फूट व्यासाची फार प्रसिद्ध अशी प्राचीन तोफ आहे. येथें एक विश्वविद्यालय, कोर्ट, नाटकगृह व रसायनशाला आहे. व त्याचप्रमाणें एक कलाकौशल्याच्या वस्तूंचें संग्रहालय आहे. येथें व्यापार फार मोठा चालतो. येथें कापूस पिंजणें, लोंकर कांतणें, चामडें कमावणें, साखर करणें, लोखंड व तांबें गाळणें, यंत्रें ओतणें, दारू, कागद, साबण इत्यादि तयार करणें हे धंदे चालतात. घेंट हें आता बंदर करण्यात आलें आहे. येथें एक सरकारी विश्वविद्यालय आहे. येथें फार प्रसिद्ध ग्रंथसंग्रहालय आहे. बेल्जममधील सर्वांत जुनें वृत्तपत्र गॅझेट व्हॅन् घेंट हें येथें निघतें.

इतिहास:—हें शहर बाल्डविन यानें ८६८ मध्यें वसविलें. ९४९ मध्यें ओटो ( पहिला )बादशहानें तें जिंकलें. १३ आणि १५ या शतकांमध्यें हें शहर भरभराटीच्या शिखरास पोंहोंचलें. प्लेबियन आणि पॅट्रिशियन (श्रीमंत व गरीब) लोकांमध्यें येथें नेहमीं लढे चालू असत. याप्रमाणें येथें श्रीमंत सरदार लोकांचें मोठें प्रस्थ होतें. १४५० मध्यें या शहराचें स्वातंत्र्य नष्ट झालें. परंतु १४८२ मध्यें येथील लोकांनीं मॅक्झिमीलियन यास आरासचा तह करावयास भाग

पाडलें. पुढें येथील लोकांनीं ५ व्या चार्लसची सत्ता न जुमानतां कर देण्याचें नाकारलें. तेव्हां येथील बरेच पुढारी फांशी देण्यांत आले.

नेदरलंड्सच्या स्पेनविरुद्ध चाललेल्या दीर्घकालीन युद्धांत घेंट शहरानें बराच मोठा भाग घेतला. परंतु १५८४ मध्यें या शहराला मोठ्या लाजिरवाण्या अटीवर पार्माशीं तह करावा लागला. धर्मच्छळामुळें व लढायांमुळें या शहरानें फार नुकसान झालें. व पुढें शेल्डवरील व्यापार बंद पडल्यामुळें तर त्यास उर्जितावस्था येणें कठिण झालें. फ्रेंचांनीं हें शहर इ. स. १६९८, १७०८ व १७४५ या वर्षी जिंकलें. १८१४ मध्यें हें नेदरलंड्सनां जोडलें. येथेंच १८ वा लुई पळून आला होता. १९ व्या शतकांत या शहराची फार लौकर भरभराट झाली. १८६६ मध्यें येथें कॉलऱ्यानें फार कहर उडाला. गेल्या महायुद्धांतहि बरेंच नुकसान झालें.

**घेरिया**—मुंबई, रत्नागिरी जिल्ह्यांतलें एक बंदर. 'विजयदुर्ग' पहा.

**घेवडा**—याचें लॅटिन नांव डोलीचोसएबलन. घेवड्याचे वेल असतात. ते कित्येक एक वर्ष व कित्येक अनेक वर्षे टिकणारे असतात. कित्येकांचे वेल ४।५ फूट वाढणारे तर कित्येक जाती एखाद्या झाडावर चढविल्या असतां सर्व झाड व्यापून टाकतात. यांचीं पानें त्रिदळी असतात. फुलें पांढरीं, निळीं, तांबडीं वगैरे रंगांचीं असतात. या वेलांस शेंगा येतात, त्या २ ते १२ इंच लांब व अर्धा ते ४ इंच रुंद असतात. त्यांत १ ते १२ पर्यंत दाणे असतात. दाणे उग्रट गोडसर असतात. कित्येक जातींच्या शेंगांस कोंवळें पणापासूनच कीड लागते.

बहुतेक जातींच्या घेवड्यांची कोंवळेपणीं शेंगा व दाण्यांची एकत्र शिजवून भाजी करितात. घेवड्यांत डफळ म्हणून एक जात आहे. तिच्या सालींची भाजी कधींच करीत नाहींत; कारण त्या शिजून नरम होतच नाहींत. घेवडे जून झाल्यानंतर त्यांच्या हिरव्या दाण्यांची ( सोलाणे ) उसळ करितात. घेवड्याचें वाळलेलें बीं २।३ दिवस भिजवून फुगलें म्हणजे त्याचीहि उसळ करितात. घेवड्याच्या मुख्य जाती पुढीलप्रमाणें आहेत. उन्हाळी व पावसाळीः— ( १ ) श्रावणघेवडा, (अ) ठेंगणा, ( आ )आणि वेलीवर वाढणारी (२ ) चवधारी घेवडा. श्रावणघेवड्याची लागण बागाइतांत थंडी संपतांच सुरू करितात. जेथें थंडी फार नाहीं अशा ठिकाणीं थंडींतहि करितात. पुण्यासारख्या समशीतोष्ण हवेंत शिवरात्रीपासून पाटाच्या अगर विहिरीच्या पाण्यावर घेवडा लावितात. कोरडवाहू शेतांत पावसाच्या पाण्यावरहि लावितात. त्यास २।२॥ महिन्यांनीं श्रावणांत शेंगा यावयास लागतात; म्हणून त्यास श्रावणघेवडा म्हणतात. श्रावण घेवड्याचें बीं सरींत अगर वाफ्यांत वितीच्या अंतरानें लावितात. वेल सुमारें हातभर वाढले म्हणजे त्यांस आधाराकरितां वेलाजवळ काठ्या पुरतात. ठेंगण्या जातीस ३।४ फूट उंचीच्या व उंच वाढणाऱ्या जातीस ५।६ फूट उंचीच्या काठ्या लावतात. शेंगांचा तोडा वरचेवर करावा लागतो. कारण त्या लवकर जून होतात. व जून शेंगा वेलावर बियांकरितां वाढूं दिल्या तर शेंगा कमी येतात. परदेशांत श्रावणघेवड्याच्या फुलांचा, शेंगांचा व बियांचा रंग व शेंगांची लांबी व उंचनीच वाढ यावरून ५०।६० प्रकार झाले आहेत.

चवधारी घेवडा शिमग्यापासून पुढें मृग अखेरपर्यंत लावतात. त्याचीं आळीं सुमारें ५ फूट अंतरानें करावीं व प्रत्येक आळ्यांत ३।४ वेल राहूं द्यावे. आळ्यांच्या सासळ्या करून पाणी देतात. पहिल्यानें आधारास काठ्या लावतात व नंतर मांडव करून त्यांवर वेल चढवितात. खत व पाणी मुबलक असल्यास थंडी पडेपर्यंत पुष्कळ शेंगा लागतात. फुलें निळीं असतात. शेंगास ४ धारा ( कोपरे ) असतात म्हणून त्यास ' चौधारी–चवधारी ' घेवडा म्हणतात. शेंगा ६ ते १२ इंच लांब होतात. त्या कोंवळेपणींच भाजीच्या उपयोगी पडतात. जून शेंगांच्या वरील हिरवा पालेदार भाग जरी कोंवळा दिसतो तरी आंतील भाग लांकडासारखा कठिण होतो. शेंगा काढतांना हातांत कटकन मोडल्याशिवाय लवल्या म्हणजे त्या कोंवळ्या शेंगा असें समजावें. शेंगा वाळल्या म्हणजे आंत लहान सागरगोट्याएवढ्या काळसर उदी रंगाच्या बिया असतात. चौधारी घेवड्याची चिरून, बारीक तुकडे करून, ते शिजवून भाजी करतात. ती रुचकर होते.

पावसाळी व शालु या जातीचे घेवडे पावसाळ्यात लावतात व थंडी पडावयास लागली म्हणजे त्यांस फुलें व शेंगा येतात. हे उंसाच्या बाजूनें कुंपणावर लावतात. अगर वर चौधारीची लावणी सांगितल्याप्रमाणें याची लावणी करतात. घरीं परसांत मांडव करूनहि लावतात. अगर पाण्याच्या आसऱ्यानें लावून झाडावर अगर वईवर चढवितात. कधीं कधीं शेताच्या बांधावरील झाडावर चढवितात. अशा प्रकारें हे घेवडे वाटेल तेथें होतात. पावसाळ्यांत लावणी व पाऊस गेल्यानंतर उन्हाळ्यापर्यंत पाणी देणें या दोन मुख्य आवश्यक गोष्टी आहेत. या घेवड्याच्या खालीं दिलेल्या जाती आहेत. व प्रत्येकींत पांढरा, हिरवा व जांभळा असे तीन रंग असतात. डफळीप्रमाणें हे घेवडे लावतात.

### घेवड्याच्या जाती.

| जात | लांबी | रुंदी | आकार | रुचा |
|---|---|---|---|---|
| अरुंद | ३ ते ५ इंच | अर्धा इंच | गोल | चांगली |
| रुंद | ,, | १ इंच | चपटा | मध्यम |
| फताडया | ,, | २ इंच | ,, | चांगली |

डफळ या नांवाची घेवड्याची एक जात आहे. ही परदेशांतून आलेली आहे. हिची शेंग जाड असल्यामुळें 'डबल' बीन असें नांव हिला पडलें आहे. पण माळ्यांनीं ' डफल ' हें सोपें नांव पाडलें असावें. याचें खरें नांव ' लिमा ' बीन आहे. तें दक्षिण अमेरिकेंतून प्रथम यूरोपांत व नंतर इकडे

आलें असावें. ह्मी परदेशी लिमाबीनचें २।३ जातींचें बीं येतें तें सुमारें२आणेलीएवढें मोठें, दोन्ही बाजूंस फुगलेलें, नीळसर पांढऱ्या रंगाचें असतें. त्याजपासून डफळी ही एक एतद्देशीय जात निष्पन्न झाली असावी. डफळीचें बीं चपटें, आणेली एवढें,स्वच्छ पांढरें व मोड येण्याच्या ठिकाणीं दोन्ही बाजूस तांबूस जांभळाप्रमाणें डाग असलेलें असतें. पावटा अगर वालाप्रमाणें डफळीच्या शेंगांचीं टरफलें अगर सालींची घेवडयाप्रमाणें भाजी होत नाहीं. कारण या शेंगा शिजून मऊ होत नाहींत. मात्र दाण्यांचा उसळीकडे उपयोग होतो. हे दाणे दुसऱ्या भाज्यांत मिळवण घालतात; अगर त्यांची स्वतंत्र उसळ करतात. डफळीच्या सोलाण्याची उसळ सर्वांत उत्तम होते. दाणे वाळल्यानंतर भिजाण्यांचीहि उसळ सोलाण्यासारखीच होते.

डफळीची लागण पावसाळयांतच करावयाची. ती मळे जमिनींत चौधारा घेवड्याप्रमाणें करावी. एकर अर्धा एकर अगर जास्त लावणी करणें असल्यास सुमारें ७।८ फुटांवर २ फूट रुंदीच्या सऱ्या काढाव्या व तितक्याच लांबीवर सरीच्या बाजूस चार बिया टोंचाव्या. सरीच्या तळाशीं उंच वाढणाऱ्या एरंडाच्या २।३ बिया लावाव्या. खत चांगलें व पुष्कळ दिलेलें असावें आणि हिंवाळ्यांत व उन्हाळ्यांत पाणी देण्याची सोय असावी. कारण डफळीस वैशाखापर्यंत शेंगा लागतात. एरंड जोरानें वाढून लहाणपणींच वेलांनीं गुरफटून जाऊं न देण्याबद्दल काळजी घेतली म्हणजे एरंडाशिवाय दुसऱ्या आधाराची जरूर पडत नाहीं. सर्व पावसाळाभर वेल वाढतात. हिंवाळयाच्या आरंभीं फुलें येऊं लागून हिंवाळयांत व उन्हाळयांत शेंगा येतात. बाजारांत या शेंगा इतर घेवड्याच्या शेंगांपेक्षां २।३ पट भावानें महाग विकतात. वाळलेल्या शेंगांचे दाणेहि महाग विकतात.

परसांत आळी लावून झाडांवर अगर कुंपणांवर वेल सोडल्यास डफळींपासून बरीच भाजी मिळेल. शेंगांच्या मानानें हिरवीं फुलें बारीक असतात. तीं चांगलीं दिसून येत नाहींत. शेंगांचा रंग पानांप्रमाणेंच असल्यामुळें त्या चांगल्या शोधून काढाव्या लागतात.

**घोटकी ता लु का.**—सिंधमधील सक्कर जिल्ह्याचा तालुका. क्षेत्रफळ ३३९ चौ. मै. लोकसंख्या (१९११) ४६०८७.एक शहर व ८४खेडीं. उत्पन्न २.२लाख रु. तालुक्यांत नेहमीं पूर येण्याचा संभव असतो. ज्वारीकरितां सिंधु नदीचे कालवे आणले आहेत. जमीनदार फारच लहान व गरीब स्थितींत आहेत. नदीच्या काठानें बरेंच जंगल आहे.

श ह र.—घोटकी तालुक्याचें मुख्य ठिकाण. लो. सं. (१९११) ३४३०. येथें १८५५ पासून म्यु. क. आहे. आणि दवाखाना व दोन शाळा आहेत. घोटकी १७४७ मध्यें वसवलें. सिंधमधील अत्यंत मोठी व सुंदर मशीद येथें आहे. येथें वस्ती बहुतेक मुसुलमानांचीच आहे व कांहीं हिंदु वाणीहि आहेत. येथील लोहारकाम, कोरीव व रंगीत लांकूडकाम प्रसिद्ध आहे. येथें धान्य, नीळ, लोंकर व ऊंस यांचा व्यापार चालतो.

**घोडनदी**—मुंबई. पुणें जिल्हा. शिरूर तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथें व्यापार बरा चालतो. येथें म्युनिसिपल कमिटी व पोस्ट ऑफिस आहे. घोडेस्वारांचा रिसाला आहे [ शिरूर पहा ].

**घोडबंदर**—मुंबई. ठाणें जिल्ह्यांतलें एक बंदर. टॉलेमीनें उल्लेखिलेलें हिप्पोकुर तें हेंच असावें असें म्हणतात. १९०१ मध्यें लो. संख्या ६४६. कस्टमचा घोडबंदर हा एक डिव्हिजन आहे व त्याखालीं ५ बंदरें आहेत. आयात २.३३ लाख रु.व निर्यात ५.३३ लाख रु.आयात माल कपडा, तांदूळ, गूळ, लोंगी, ताग, लांकूड वगैरे. निर्यात माल तांदूळ, चुना, दगड, नारळ, मीठ, मासे वगैरे. १६७२ मध्यें शिवाजी येथें आला होता. १७३७ हा गांव पोर्तुगीजांपासून मराठ्यांनीं घेतला. पोर्तुगीज इमारती अद्याप आहेत. येथें एक गेस्टहाऊस आहे. व्यापार आगरी, कोळी, मुसुलमान व ख्रिस्ती यांच्या हातीं आहे व बहुतेक भांडवल कर्जाऊ आहे.

**घोडा**—वेदकालीन घोड्यासंबंधीं माहिती ज्ञानकोशाच्या तिसऱ्या विभागांतील वेदकालांतील शब्दसृष्टी या प्रकरणांत पान २३५ ते २३८ येथें दिलेली आहे. त्याचा थोडक्यांत सारांश असा कीं, त्या काळीं विविध रंगांचे व जातींचे घोडे होते. त्यांना सोन्यामोत्यांच्या दागिन्यांनीं शृंगारीत असत. रथाकडे त्यांचा उपयोग होत असे; आणि घोड्यांना पागेंत बांधणें, व त्यांच्याकरितां मोतद्दार नेमणें वगैरे सर्व गोष्टी वेदकालीं होत्या. शिवाय लगाम, काढणी व चाबूक वगैरेंचाहि उल्लेख आढळतो. शर्यतीचे घोडेहि त्यावेळीं होते व राजसूय यज्ञाच्या वेळीं व वाजपेयक्रतूंत शर्यती होत असत.

प्राणिशास्त्राच्या दृष्टीनें एक्विडी या जातपासून घोड्यांच्या सर्व उपजाती झालेल्या आहेत असें आढळून येतें. इतर प्राण्यांहून घोडयाचा असा विशेष आहे कीं, त्याची शेपूट लांब केसांच्या झुबक्याची असून त्याची आयाळहि मोठी असते. त्याचे कान आंखूड असतात, अवयव लांब असतात व डोकें आखूड असतें. त्याचा रंग करडा, पांढरा व पिंगट असा असतो. घोड्यांच्या दोन संकरज अशा जाती आहेत. नॉर्वे देशांतील ‘डन’ तट्टे, व अरबस्तानांतील ‘बार्ब’ जातीचीं तट्टें प्रसिद्ध आहेत. यूरोपच्या वायव्येकडील घोडे ‘डन’ व ‘बार्ब’ अशा दोन्ही जातींचे आहेत. शिवाय केल्टिक घोडा व मंगोलियांतील रानटी घोडा अशाहि जाती आहेत. यूरोपांतील बहुतेक काळ्या रंगाचे घोडे ‘डन’ व ‘बार्ब’ अथवा ‘अरब’ या दोन जातींच्या मिश्रणामुळेंच झालेले आहेत.

प्रागैतिहासिक काळीं यूरोपांत रानटी घोडे पुष्कळ होते असें संशोधन करणाऱ्यांस आतां आढळून आलें आहे. इतिहासाला सुरुवात होण्यापूर्वीच्या काळांत तत्कालीन लोकांच्या शिक्षणामुळें रानटी घोडे माणसाळलेले होते असें दिसून

येतें. परंतु मध्या सर्व जगांत घोड्याच्या विविध जाती असलेल्या आढळतात व त्यांच्यांत बरीच सुधारणा झाल्याचेंहि दृष्टीस पडतें. घोडा, रानटी घोडा व तट्टू याप्रमाणें गाढव, झिब्रा, क्वॅग्गा अशा घोड्यांच्या उपजाती आहेत. शिवाय संकरज अशी एक जात आहे ती वेगळीच होय. गाढव नामक घोड्याच्या उपजातीचे, कान मध्यम असतात पण त्याचें शेंपूट बरेंच लांब असतें. एशीआटिक रानटी गाढवांच्या दोन उपजाती असून, चिगेटाइ व किआँग मिळून एक जात व ओनेगर म्हणून एक दुसरी जात आहे व ती वायव्य हिंदुस्थान, पर्शिया, सीरिया, बलुचिस्तान व अरबस्तानमध्यें आढळून येते. या दोन्ही जातींत घोड्याचें पुष्कळ सादृश्य असतें. झिब्रा नांवाच्या जातींत सोमालिलँड व अबिसीनिया येथील ग्रेव्हीझिब्रा प्रसिद्ध असून त्याचा विशेष असा कीं झिब्रा जातीच्या घोड्याच्या मागील भागावर रंगाचे पट्टे असतात व त्याचे कान केसाळ असतात. दक्षिणआफ्रिकेंतील क्वॅग्गा जातीच्या घोड्याचे कान लहान व अणकुचीदार असतात. त्याच्या अंगावर काळे पट्टे असून मधून मधून पिंगट व पांढरा रंगहि असलेला दिसतो.

प्राणिशास्त्रवेत्त्यांच्या मतें घोड्यांच्या वर दिल्याप्रमाणें अनेक उपजाती आहेत व त्यांचा परस्परसंबंध इतका निकट आहे कीं वरीलपैकीं कोणत्याहि एका जातीचा दुसऱ्याशीं संबंध घडला तर सहज निपज होऊं शकते. उपर्युक्त वर्गांतूनच संकरज जाती होऊं शकतात. घोडा व गाढव यांपासून खेचर निर्माण होतें. वरील सर्व उपजातींच्या बाह्य स्वरूपांत ज्याप्रमाणें वैचित्र्य आढळतें; त्याचप्रमाणें त्यांच्या मनोभूमिकेंतहि फरक दिसून येतो. गाढवाचा सोशिकपणा, घोड्याची तेजस्विता व खेचराचा हट्टीपणा सर्वश्रुत आहे.

मराठी इतिहासांत भिमथडी घोडीं अतिशय चपळ म्हणून प्रसिद्ध आहेत. काठेवाडी व अरबी घोडेंहि भारतीय इतिहासांत प्रसिद्ध आहेत.

घोडे निर्माण करण्यासंबंधीं बरेच नियम आहेत. दोन किंवा तीन वर्षांनीं घोड्याचें जनन होऊ शकतें. घोडीचा गर्भस्थ काल साधारणतः अकरा महिने असतो. त्या स्थितीत घोडीस कामाला लावणें गैर असतें. पोटशूळ न व्हावा म्हणून शिंगरास तें गवत खाऊ लागण्यापूर्वी एक प्रकारचें अन्न घालतात. शिंगरांस अति खाऊं घातल्यानें तीं पुढें अशक्त व जड होतात.

अश्वशिक्षेला प्रारंभ घोडा दोन वर्षांचा झाल्यानंतर होतो. त्यावेळीं त्याच्या तोंडांत लगाम घालून व वारंवार कैचींत आणून त्यास अश्वशिक्षेंतील विविध प्रकार शिकविण्यांत येतात. गॅलव्हानिंग नांवाची पद्धति अश्वशिक्षेंत अत्यंत उपयुक्त आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. अश्वशिक्षकांत सुस्वभाव, जागरूकता व अढळपणा असावा लागतो. घोड्यास गाडीला जुंपून फेरफटका करणेंहि हितावह असतें. कारण त्यावेळीं घोड्याचे गुणावगूण कळून येतात. बसावयाच्या घोड्यास फार खाऊं घालणें हितावह नसतें व त्याच्याकडून फाजील काम करून घेण्यानें सुद्धां घोड्यास वाइट संवयी जडतात. सदोष व्यवस्था व टाळतां येण्यासारखे अपघात घडल्यामुळेंहि घोडे बिघडतात.

रंवथ करणाऱ्या इतर प्राण्यांपेक्षां घोड्यांचें पोट लहान असतें. त्यामुळें त्यांस आहारहि कमी लागतो ओट गवतानें घोडीं पुष्ट होतात. ओट नांवाचें धान्यहि त्यांनां चांगलें मानवतें. आपल्या देशांत हरळी हें घोड्याचें विशेष प्रिय असें गवत आहे. ओला हरभराहि घोड्यास चांगला मानवतो. घोड्यास हरबऱ्याची चंदी विशेषेंकरून देतात. कांहीं धान्यें कांहीं घोड्यांनां वर्ज असतात. कोणतेंहि शिजलेलें अन्न घोड्यांनां देणें घातुक असतें, कारण त्यामुळें पोटशूळ उत्पन्न होतो. वहानास जुंपल्या जाणाऱ्या घोड्यांनां बहुधा गवतच घालतात. अति श्रमानें घोडा थकला कीं त्यास कुरणांत सोडून द्यावें. हिवाळ्यांत इजा झालेला घोडा लवकर बरा होतो. मोठी सफर करावयाची असल्यास टप्पाटप्प्यावर घोड्यास थोडी दारू किंवा पाणी द्यावे व इष्ट स्थळीं पोंचल्यावर त्यास तीं पेयें अधिक प्रमाणांत द्यावीं. या उपायानें घोड्यास थंडाई व नवा दम प्राप्त होतो. मराठेशाहींत व पेशवाईंत चांगले घोडे तयार करण्याचा प्रयत्न करीत असत. साताराचे प्रतापसिंह यांनीं आपल्या कारकीर्दीमध्यें जनावरांच्या चांगल्या जाती आणवून, राज्यामध्यें चांगलीं जनावरें निपजवून त्यांची समृद्धि करण्याचाहि प्रयत्न केला. त्यांनीं चांगले घोडे तयार व्हावे याकरितां लोकांस उत्तेजन देण्यासाठीं जो जाहीरनामा प्रसिद्ध केला होता, तो पुढील प्रमाणें:—

" जाहीरनामा श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति सरकार राजमंडळ हुजूरून इलाखा सातारा येथील लोकांस महशूर व्हावयाकरितां आज्ञा केली ऐसी जेः—या मुलखांत पेशजी लोक घोडे पाळीत होते. अलीकडे फौजेची चाकरी नाहीं, व लोकांत घोडी पाळावयास ताकद नाहीं. याजमुळें घोड्यांची कमती पडली. त्यास घोड्यांची आमदानी असावी हें सरकारचे मनांत आहे. सर्वांनीं समजोन घोडीं आपलें घरीं पाळून तयार करावीं. येविशींः—

१ लोकांच्या घरीं घोडीं तीन वर्षेपर्यंत उमरीचीं हल्लीं तयार असतील तीं पेस्तर दसरीयाचे दिवशीं, हुजूर सातारीयांत सरकारांत आणून दाखवावीं. व पुढें तयार होतील तीं दरसाल दसरीयास दाखवीत जावीं. त्यांत जीं घोडीं चांगलीं असतील, त्यांपैकीं चौ घोड्यांचे धण्यास एक साली इनाम पावेल.त्याचा तपशील (१) चांगलें, उत्तम, नामी, घोडें असेल त्याचे धण्यास रुपये ४०० चारशें पावतील.(२) त्याहून कमी असेल त्याचे धण्यास रुपये ३०० तीनशें पावतील .(३ त्याहून कमी असेल त्याचे धण्यास रुपये २०० दोनशें पावतील.(४) त्याहून कमी असेल त्याचे धण्यास रुपये १०० एकशें पावतील.

# घोडा.

कोचगाडीचा घोडा.



घोडयाची करटी व दांत.




१ शिरःपृष्ठास्थि. २ कर्णास्थि ३ ललाटास्थि ४ अक्षिकोश. ५ नासिकास्थि. ६ ऊर्ध्वदंताधा-रास्थि ८ छेदकदांत ९ दाढा. ११ खालचें दाभाड

पोलो पोनी घोडा.



सेलनेच्या घोड्याचें तोंड

[पार्थिनॉन (अथेन्स) देवळांतील शिल्प.]



हॅकने (गाडीचा घोडा.



# चिति.



कंकचिति.



कूर्मचिति.

(पृ.१०-१३)

२ सदरहूप्रमाणें चौ घोड्यांचे धण्यास इनाम पावेल. बाकीच्यांस मिळणार नाहीं. नंतर घोडें ज्याचें त्याणें माघारीं न्यावें. फरोक्त करावयाचें असल्यास, सरकारांत घ्यावयाचें असले तरी, खुषखरेदी घेतील, त्याची किंमत इनामाचे ऐवजाखेरीज पावेल. अगर माल धण्याचे खुशीस पडेल तेथें विकावे, अगर घरीं पाळावे.

३ घोडे चांगले अवलादीचे व्हावयाकरितां, घोडे आरबी वळू सरकारांतून जागजागीं ठेविले आहेत, तीं ठिकाणेः—शहर सातारा येथें, मौजे दहिवडी कर्यात मलवडी पेटा खटाव येथें, क्षेत्र पंढरपूर येथें.एकूण तीन ठिकाणीं तूर्त ठेविले आहेत.मार्गांतून मुनासब पाहून आणखी ठिकाणीं ठेविले जातील त्यास, ज्यास, आपलीं घोडीं सरकारचे घोड्यांकडून काढिवणें असेल, त्यानें या घोड्याकडून काढवावी. त्याजपासून घोडीं काढण्याबद्दल खर्च कांहीं सरकरांत घ्यावयाचा नाहीं.

४ सरकारांतून चांगले अवलादीकरितां आरबी घोडे वळू जागजागीं ठेविले आहेत. या घोड्यांपासून ( झालेलें ) घोडें नर अगर मादी, तीन वर्षांचे उमरीचें जो कोणी सरकारांत आणून दाखवील, त्याबद्दल त्यास पांचशें रुपये सरकारांतून इनाम पावतील. घोडें त्याणें आपलें माघारें न्यावें, घरीं पाळावें, अगर सरकरांत अथवा दुसरे कोणास खुषखरेदी किंवा मर्जीस पडेल तसें द्यावें.

५ घोडे आणून सरकारांत दाखवील त्यास वर लिहिल्याप्रमाणें इनाम द्यावयाविषयीं लिहिलें आहे, त्य प्रमाणें नक्त पावतील. कोणाचे मनांत रुपये घेऊं नये, हा बहुमान सरकारचा असावा असें असल्यास, त्यास त्या किमतीअन्वयें कडें सोन्याचें अथवा पोशाख पावेल.

६ कोणाचे घरीं जीं घोडीं विकावयाचीं असतील, तीं त्यांणीं दसरीयाचे दिवशीं सातारियास दरसाल घेऊन येत जावी. त्यांतून सरकार पसंत पडतील तीं सरकारांत खरेदी होतील, व ज्यास गरज असेल तेहि घेतील. परंतु घोडा आणावयास दसऱ्यापुढें एक दिवस देखील जास्ती लागूं नये. बरोबर दसरीयाचे दिवशीं सातारीयास येऊन घोडीं दाखल असावी.

एकूण सहा कलमें जाहीरनामा पेटाम नकुरीं सर्वांस महशूर होई तें करणें. जाणिजे. ( १९ जानेवारी सन १८२२ ) मोर्तब सुद [ इतिहास संग्रह. पु. ६ अं. ७।८।९ ].

घोड्याच्या शुभाशुभ लक्षणांसंबंधीं अनेक संस्कृत ग्रंथांतून माहिती सांपडते. अश्वशास्त्र किंवा शालिहोत्रशास्त्र म्हणून एक स्वतंत्र शास्त्रच असे. या शास्त्रावरील ग्रंथांकरितां 'अर्थशास्त्र' लेख ( पान ४४६ ) पहा. घोड्याचीं कांहीं अशुभ लक्षणें खालीलप्रमाणें होत. अंसुढाळ किंवा अंसुपात, आसनकुहा, उघडगांड्या किंवा केरसुणी, एकांड्या, कैराडोळा, एकवागी, उतरंड, खुंटेउपाड, गोस, चिमुट किंवा चिमोट, चक्रावळ, दळभंजन, कुसभोवरा, कुसगोम, जांघडजाड, रिकाबदाल, अदमचसम, खांडकुहा, आसनखोड, जांघभोवरी, हृदावळ, चोटीभोवरी, भुजभोवरी, त्रिकर्ण, दोखुरी, पंचदंती, विकाळनामा, कृष्णताळु, काळमुखी, काखभोंवरा, पंचनखी, रक्तनेत्र, काळांजनी, जानुवर्त्त, नाकभुंकन, कर्णमूळ, सारभुंकन, लेंडावर्त्त, मेंडुकमुख, लघुदंती, खिमावर्त्त, विषानैनी, पीतानी, काळटिक्या, सर्पजाति, कीरमुख, किंवा रावामुख, चांदणी, शीरगामी, हयभग, अंगावर्त्त, पांढरपायी कपिमुख, शिरीगोम, फासोळीस उजळटिक्या, ऊर्ध्वमुखीगोम, एकरंगी, पाठीवर शुभ्र, एकरंगी किंवा हरएक रंगी. शुभ लक्षणी घोड्याचें तोंड, शेंपूट, आयाळ, छाती, आणि खूर पांढरे असतात; त्याला अष्टमंडळ म्हणतात.

**घोडाघांट**—दिनाजपूर ( बंगाल ) जिल्ह्यांतिलें एक पडकें शहर. येथील कांहीं अवशेषांचा संबंध महाभारतांतील विराटराज्याशीं जोडतात. पंधराव्या शतकाच्या शेवटीं मुसुलमानी अंमलांत अल्लाउद्दीनानें येथें बसवलेल्या कारभाराचे व लष्करी ठाण्याचेहि अवशेष अद्याप आहेत.

**घोडाबारी**—मुंबई. सिंधप्रांत. कराची जिल्ह्याचा एक तालुका. क्षेत्रफळ ५६४ चौ. मै. लोकसंख्या ( १९११ ) ३३५३९. तालुक्यांत केटी बंदर हें शहर व ९३ खेडीं आहेत. उत्पन्न १९०३–४ सालीं ७८००० होतें. केटीमहाल आहे. तालुक्यांतली जमीन मळीची आहे; व कांहीं भागांत वारंवार समुद्राचें पाणी येतें. कालव्याच्या पाण्याची सोय आहे. मुख्य पीक तांदुळाचें. बाजरी व ऊंसहि काढतात.

**घोडासर**—मुंबईइलाखा. महीकांठामधलें एक चिमुकलें संस्थान घोडासर हें मुख्य ठिकाण आहे. येथेंच ठाकूर रहातात. येथील ठाकूर पूर्वी रजपूत होते असें म्हणतात; पण त्यांनीं कोळी बायका केल्यामुळें ते हाभी कोळी बनले.

**घोडें**—मुंबई. पुणें जिल्हा. खेड तालुका. खेडच्या उत्तरेस २५ मैलांवर वसलेलें एक खेडें. खेड तालुक्यांतील आंबेगांव पेटचाचें हें मुख्य ठिकाण आहे. येथें आठवड्याचा बाजार भरतो. गांवांत एक मशीद आहे. तीतील खांबावर फारशी भाषेंत, कोणी पीर महम्मदानें ही मशीद १५८० सालीं बांधली अशा अर्थाचे दोन लेख आहेत. १८३९ सालीं कांहीं कोळी लोकांनीं येथील खजिन्यावर छापा घातला होता. पण असिस्टंट कलेक्टर मि. रोज ह्यांनीं गावकऱ्यांच्या मदतीनें हल्ला परतविला.

**घोडेघांस** ( विलायती गवत )—या झाडास लॅटिनमध्यें मेडिकागो साटिव्हा; इंग्रजींत ल्युसेर्न, पर्पल ल्युसेर्न आल्फाल्फा; मराठींत विलायती गवत, लसूणघांस इत्यादि नांवें आहेत.

हें गवत आशियाखंडाच्या पश्चिम समशीतोष्ण कटिबंधांत व अफगाणिस्तान आणि बलुचिस्तान येथें सर्वत्र होतें. त्याचा जनावरांस चाऱ्याप्रमाणें उपयोग करितात. याची अलीकडे हिंदुस्थानांत बहुतेक सर्वत्र खेड्यांपाड्यांत सुद्धां लागवड करतात. हें घोड्यांनां व इतर जनावरांनां बेतानें दिलें असतां उत्तम वैरणीचें काम भागवतें.

कंदाहार आणि इराण किंवा अरबस्तानमधील दोन प्रकारच्या घासांची येथें ( हिंदुस्थानांत ) लागवड करितात. पावसाळ्याच्या सुरुवातीस किंवा आक्टोबर आणि डिसेंबर या दोन महिन्यांच्या मध्यंतरीं हें गवत पुण्याकडे पेरावें आणि अक्टोबर महिन्याच्या मध्यापासून तो नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत उत्तर हिंदुस्थानात याची लागवड करावी, असें मोलिसन याचें मत आहे. याच्या एकपौंड बियाची किंमत चवदा आण्यापासून दीड रु. पर्यंत असते. एतद्देशीय पेरण्याच्या पद्धतीप्रमाणें हें बी चांगल्या मशागत केलेल्या जमिनीवर फेंकून देतात पण या पद्धतीमुळें इतर गवत व कुंदा माजून, घोडेघांसाची ऐनभरांत नासाडी होते. याची लागवड करण्याची उत्तम पद्धति पुढीलप्रमाणें आहेः— पहिल्यानें पावसाळ्याच्या दिवसांत जमीन चांगली नांगरून तयार करावी. नांगरल्यानंतर सप्टेंबर महिन्यांत एका एकराला तीस गाड्या याप्रमाणानें खत घालून तें सारखें जमीनीवर पसरावें व त्याचें मातीशीं चांगलें मिश्रण करावें. नंतर २२ पासून २८ इंच लांबीवर दांड किंवा बांध करून त्यांत ( एका एकरांत १० पौंड प्रमाणें) बी पेरून त्याच्यावर दीड इंच मातीचा थर लोटावा. पहिल्या पंधरवड्यांत त्याला नेहमीं पाणी द्यावें लागतें. या पद्धतीप्रमाणें मध्यम प्रकारच्या जमीनीवर लागवड केल्यास थंडीच्या दिवसांत दर आठव्या दिवशीं व उन्हाळ्यांत दर सहाव्या दिवशी व हलक्या जमीनीला नेहमीं, पाणी द्यावें लागतें. थोडे दिवस टाकून मधून मधून याचे शेंडे खुडावे लागतात. तीनदां घास कापलें म्हणजे कमींत कमी ५ टन खत घालावें. सहा महिन्यांत घांस चांगलें तयार होऊन तें वरीच वर्षेपर्यंत टिकतें व त्याची दरवर्षी कमींत कमी १० वेळ कापणी करतां येते. १८९३ सालीं पुण्याच्या फार्मवर निघालेल्या सर्वांत उत्तम पिकाचे आकडे येणेंप्रमाणेः—

एका एकरांतील पीक ३१८१६ पौंड; किंमत १२० पौंडाला रु. १. एकराच्या लागवडीला लागणारा खर्च ८५रु. ३ आ. ८ पै; दर एकरीउत्पन्न २६५ रु.२ आ. ० पै.

**घोरपड**—या प्राण्याची गणना सरपटणाऱ्या प्राण्यांच्या वर्गांत होते. घोरपडींना उष्ण व ओलाव्याची हवा लागते. म्हणून हे उष्ण कटिबंधातील नदीनाल्यांच्या आसपास आढळतात.या प्राण्याचें डोकें धडाला एका मणक्यानें जोडलेलें असतें. शरीरावर बाह्यत्वचा असून कांहीं जातींत ती कठिण व जाड असते. फुप्फुसेंहि असतात. घोरपडीची प्राणिशास्त्रीय माहिती ‘ उरोगामी ’ या लेखांत सांपडेल.

घोरपडीची त्वचा साधारणतः खरबरीत व जाड असून हनुवटीच्या खालीं बारीक त्वचा असते. दांत तीक्ष्ण असून पायाचीं बोटें मोठीं असतात. शेंपूट बारीक व लांब असतें. घोरपड अत्यंत चपळ असते. व तिचें वास्तव्य उष्ण प्रदेशांत विशेषतः असतें. दक्षिण अमेरिका व वेस्ट इंडीज या ठिकाणीं हिंदुस्थानपेक्षां हे प्राणी जास्त प्रमाणांत आढळतात. वनस्पती व जीवजंतू यांवर घोरपडीची उपजीविका असते. घोरपडीची चरबी औषधी असते व तिचें मांस फार रुचकर असतें असें म्हणतात. घोरपडीस पोहतां येतें. या प्राण्याची जास्तींत जास्त लांबी पाच फुटापर्यंत असून रंग हिरवट असतो. हे प्राणी भित्रे असतात परंतु दिसावयास मात्र भयंकर असतात. घोरपड आपलीं अंडीं वाळूमध्यें घालते व सूर्याच्या उष्णतेमुळें तीं तेथें उबवलीं जातात. घोरपड आपल्या नखांनीं खडकांस घट्ट धरून राहूं शकते म्हणून पूर्वी किल्ल्यावर चढतांना हिच्या कमरेस दोर बांधून हिचा उपयोग करून घेत होते. तान्हाजी ‘ यशवंती ’ घोरपडीच्या साहाय्यानें सिंहगड किल्ल्यावर चढून गेला होता.

**घोरपडी**— मुंबई, पुणें जिल्हा. पुणें कँटोनमेंटांत घोरपडीचा समावेश होतो. मद्रास—सदर्न मराठा रेलवेचें हें पुण्यापासून दुसरें स्टेशन आहे. या ठिकाणीं लष्करी छावणी आहे. १८४२ त प्रथम येथें पराकी बांधण्यांत आल्या.

**घोरपडे**— घोरपड्यांचें मूळचें उपनाव भोसले. हें एक मराठ्यांचें मोठें घराणें आहे. बहामनी राज्यांत त्यांनीं कोंकणांतील एक किल्ला घोरपडीच्या साह्यानें वर चढून सर केला, तेव्हांपासून त्यांस हें नांव प्राप्त झालें. विजापुरच्या राज्यात त्यास देशमुखी होती. कापशीकर, मुधोळकर, सोंडूरकर, दतवाडकर व गुत्तीकर अशीं घोरपड्यांचीं अनेक घराणीं इतिहासांत प्रसिद्ध आहेत. घोरपड्यांचें घराणें पुष्कळ जुनें असून त्यास ‘ हिंदुराव ’ हा किताब बहामनी राज्यातून व ‘ अमीर–उल्–उमराव ’ हा किताब आदिलशाहींतून मिळाला होता. कोल्हापूर प्रांताची देशमुखी व सरदेशमुखी आदिलशाहींतून कापशीकर घोरपड्यांस मिळाली असावी. कापशीकर म्हालोजी घोरपडे आदिलशहास सोडून शिवाजीस मिळाला. म्हालोजीचे मुलगे संताजी, बहीरजी व मालोजी हे पुढें मराठशाहींत उदयास आले.

घो र प डे इ च ल क रं जी क रः—यांची बरीचशी माहिती ज्ञा. को. च्या आठव्या विभागांत इचलकरंजी या नावाखालीं आली आहे. तिच्या विरहांत जास्त माहिती येथें देतों. साताराचे महाराज व करवीरकर यांच्या दौलतीच्या इतिहासात इचलकरंजी संस्थानाचा उद्भव, विस्तार व त्यावर आलेली नाना संकटाची परंपरा यांची गुंतागुंत झालेली असल्यामुळें इचलकरंजी संस्थानाचा इतिहास म्हणजे मराठी राज्यातल्या अंतःकलहाचा व विशेषेंकरून इचलकरंजी व करवीर या संस्थानांमधल्या कलहांचा इतिहास होय. इचलकरंजीकर घोरपडयांचें उपनाम वरवडेकर जोशी. या घराण्याच्या मूळपुरुषाची ( नारोपंताची ) माहिती कापशीकर घोरपडयांच्या हकीकतींत आली आहेच.

व्यंकटराव नारायण हा नारोपंताचा पुत्र. नारोपंत मरण पावले तेव्हां त्यांचें कुटुंब बहिरेवाडी येथें रहात होतें. पंताच्या मृत्यूचें वर्तमान पिराजी घोरपडे यांस कळतांच ते

बहिरेवाडीस आले. पंतांची स्त्री लक्ष्मीबाई व पुत्र व्यंकटराव यांची भेट झाल्यावर ते फार कष्टी होऊन बोलले कीं, “आमचे वडिलांनीं नारोपंतास पुत्राप्रमाणें मानून त्यांचें कल्याण केलें; तें स्मरून नारोपंतांनीं आमचे वडील वारले तेव्हां आम्ही नेणतीं मुलें होतों, तरी आमच्या दौलतीसाठीं बहुत खस्त खाल्ली. त्यांनीं भाऊपणाचें उत्तम सार्थक केलें. त्यांचे तुम्ही पुत्र आहां ते आमचेच आहां. आमचे देशमुखी सरदेशमुखीचें वतन मिरजप्रांतीं आहे तें आमचे वडिलांनीं व आम्हीं नारोपंताकडे वहिवाटीस दिलें होतें. तेंच वतन आम्ही तुम्हाकडे चालू ठेविलें.” असें म्हणून पिराजी परत गेला.

नारोपंतांच्या हयातींत सेनापतीकडून व इतरांकडून इचलकरंजी, आजरें, आरग, मनेराजुरी, म्हापण, बहिरेवाडी व शिपूर इतकीं खेडीं त्यास इनाम मिळालेलीं होतीं. शिवाय तर्फ आजरें येथील एकतर्फी खेड्याची वहिवाट व प्रांत मिरज येथील देशमुखीची वहिवाट सेनापतीकडून पंताकडे चालत होती. हें सारें उत्पन्न सालिना तीस चाळीस हजारांचें होतें. शिवाय करवीर राजमंडळापैकीं सचिवाचें पद त्यांस मिळालें होतें ( १७११ ) त्याचा सरंजाम ते उपभोगीत होते; व सेनापतीच्या संस्थानाचा कारभार त्यांजकडे असल्यामुळें त्यासंबंधींहि त्यांची प्राप्ति बरीच असावी. पण पंत वारल्यावर संभाजीनें सचिवाचें पद व्यंकटरावास दिलें नाहीं व सेनापतींनींहि त्यांच्या हातीं कारभार ठेविला नाहीं. कारण कीं नारोपंतांचे पुरस्कर्ते रामचंद्रपंत अमात्य हे यापूर्वींच वारले होते व व्यंकटरावांचें नीट बनत नव्हतें. अशा वेळीं व्यंकटराव यांची नजर शाहूचा आश्रय संपादण्याकडे लागली. पेशव्यांच्या द्वारें तिकडे त्यांचा वशिलाहि चांगला होता. पेशव्यांनीं त्या वेळेपासून त्यांची सोय, उत्पन्न व अधिकार वाढविण्याचा हळू हळू उपक्रम सुरू केला.

पेशव्यांच्या विनंतीस अनुसरून शाहूनें व्यंकटरावास सन १७२२ त शिरढोण हा गाव व पुढच्या वर्षी मनेराजुरी नांदणी, आरग व म्हापण हे गाव इनाम दिले. त्याच्या पुढच्या वर्षी उत्तूर हा गांव इनाम दिला. या सालीं ( १७२४ ) व्यंकटराव यांच्या नांवें निराळा सरंजामजाबता करून दिला. मागलें ( १७०३ ) सरंजामजाबत्यांत व्यंकटरावांनीं कापशीकरांच्या हाताखालीं चाकरी करावी असें ठरलें होतें. परंतु आतांच्या जाबत्यामुळें त्यांचा कापशीकर व करवीरकर यांशीं अजीबात संबंध तुटला व ते शाहू महाराजांचे स्वतंत्र सरदार झाले.

व्यंकटराव व अनूबाई हीं दोघेंहि आतां वयांत आलीं होतीं. पेशव्यांनीं ( १७२२ ) व्यंकटरावास रहाण्याकरितां पुण्यांत वाडा बांधून दिला. आणि तेथच्या संसाराच्या सोईकरितां त्यास वडगांव ( चाकण ) हा सबंध गांव, पर्वतीनजीकचा बाग व हडपसर येथलि बाग इनाम दिला.

याप्रमाणें पुण्यांत रहाण्याची सोय झाल्यामुळें व्यंकटराव वर्षांतून कांहीं दिवस तेथें रहात असत. त्यांस दोन अपत्यें झालीं. पहिली कन्या वेणूताई, व दुसरा पुत्र नारायणराव ही वेणूताई ही पुढें पेशवाईतले प्रसिद्ध सरदार त्रिंबकराव मामा पेठे यांस दिली.

इ. स. १७३० मध्यें सातारकर व करवीरकर यांच्या दरम्यान वारणातीरीं जी लढाई झाली तींत व्यंकटराव घोरपडे हे करवीरकराकडून लढत होते. सभोंवतीं संभाजीचें राज्य, आपण दूर एकटे पडल्यामुळें अपली काय जीं खेडीं आहेत तीं तात्काळ हातचीं जाऊन नाश होईल, या भयानें ते त्यांच्या फौजेंत हजर झाले असावे. या लढाईंत करवीरकरांचा पराभव होऊन भगवंतराव अमात्य, व्यंकटराव घोरपडे वगैरे करवीरकरांकडील प्रमुख असामया कैद झाल्या. शेवटीं बाजीराव पेशव्यांनीं दहा हजार रुपये दंड भरून आपल्या मेहुण्याची सुटका करून घेतली.

यापुढें शाहूनें आपल्याजवळ रहाण्याविषयीं व्यंकटरावास आज्ञा केल्यावरून साताऱ्यास ते राहिले. पूर्वी त्यांचें पथक पांचशें स्वारांचें असतां आतां सातशें स्वारांचें झालें. त्या पथकास शाहूकडून सरंजामास यावेळीं आणखी कडलास, पापरी व बेडग हे गांव मिळाले व वाडा बांधण्याकरितां सातारा येथें जागा मिळाली. त्या जागेवरच व्यंकटरावांनीं वाडा बांधिला व पेठ वसविली.त्या पेठेचें अद्यापि व्यंकटपुरा हें नांव प्रसिद्ध आहे.

व्यंकटरावांचे पुत्र नारायणरावतात्या यांचें लग्न याच वेळीं झालें. त्यांच्या स्त्रीचें नांव लक्ष्मीबाई. पूर्वी व्यंकटराव लहान होते तेंच त्याच्या वडिलांनीं देशमुखीचा मामला त्यांच्या हवालीं करून व त्यांस त्र्यंबक हरि पटवर्धन हे दिवाण नेमून देऊन त्यांजकडून त्या वतनाचा करभार करविला. तसेंच आता नारायणराव वयात येण्याच्या पूर्वींच व्यंकटरावांनीं तीच देशमुखी त्यांच्याहि हवालीं केली, व त्र्यंबक हरि यांसच त्यांचे दिवाण नेमून दिले.( १७३३ ).

सन १७३९ त व्यंकटरावांनीं इचलकरंजीचें ठाणें वसवण्याची सुरुवात केली. गांवकुसवापैकीं अमुक उंचीचा व रुंदीचा भाग रयतेपैकीं प्रत्येक कुळानें बांधून द्यावा, याप्रमाणें ठराव करून त्यांनीं गांवकऱ्यांकडून सक्तीनें गांवकुसूं घालविलें.

वसईची मोहिम चालू असतां व्यंकटरावांनीं गोव्यावर स्वारी करून तेथें फिरंग्याचा पुरा मोड केला व ते परत देशीं आले (१७३९). त्या वेळीं शाहूमहाराज मिरजेच्या किल्ल्यास वेढा घालून बसले होते. त्यांच्या लष्करांत व्यंकटराव चारशें स्वारांनिशीं येऊन दाखल झाले. त्यावेळीं इंग्रजांकडून गॉर्डन नांवाचा वकील शाहूमहाराजाकडे आला होता. यानें त्या वेळची अशी एक बातमी लिहून ठेविली आहे कीं, “गोवेकर पोर्च्युगीज लोकांनीं सहा लक्ष रुपये देण्याचें कबूल करून मराठयांशीं ( व्यंकटरावांशीं ) समेट करून घेतला.

त्यांपैकीं त्यांनीं पस्तीस हजार रुपये रोख व एक लक्ष पस्तीस हजार रुपये किमतीचीं ताटें तबकें वगैरे चांदी दिली. सर्व रकमेचा फडशा होईपर्यंत मराठी फौज गोंव्याच्या आसपास रहावयाची आहे व गोवेकरांनीं तिच्या खर्चाकरितां दरमहा दोन हजार रुपये देण्याचें कबूल केलें आहे." गोंव्यावरच्या स्वाऱ्यांत व्यंकटरावांनीं जितका मुलूख जिंकिला होता तितका सर्व शाहूमहाराजांनीं त्यांजकडे जहागीर म्हणून वहिवाटीस ठेविला. त्या मुलखाच्या आसपास कोल्हापूरकरांचे कांहीं टापू असल्यामुळें त्यांशीं नेहमीं तंटे होतील या भयानें ते टापूहि व्यंकटरावांनीं संभाजीपासून कमाविशीनें घेतले होते. गोंव्याच्या स्वारींहून परत आल्यावर करवीरकर संभाजी यांनीं व्यंकटरावांस सुळकूड, टाकळी व दोन्ही शिरदवाडें मिळून चार गांव इनाम दिले.

मिरज प्रांतीं मोंगलांचा अंमल होता तेथपर्यंत (१७४०) तिकडचा देशमुखीचा अंमल व्यंकटरावांस कधींच सुरळीतपणें मिळाला नाहीं. मोंगलाई मुलुखांत महाराजांची देणगी जरी असली तरी तिजवर मोंगल अधिकारी मोंगलबाब म्हणून एक कर घेत असत. पन्हाळा प्रांतीं शाहूमहाराजांनीं व्यंकटरावांस देशमुखी दिली होती त्याबद्दल जिजाबाईचा कारभार सुरू झाल्यावर करवीर दरबारानें व्यंकटरावांजवळ इनाम तिजाई मागितली परंतु ती त्यांनीं देण्याचें साफ नाकारिलें. त्यामुळें यापुढें करवीरकर व व्यंकटराव यांच्या नेहमीं कटकटी होत. एकदां तर इचलकरंजीवर करवीरकरांनीं चाल केली होती परंतु त्या वेळीं त्यांचा पराभव झाला (१७४२).

गोंव्याच्या स्वारीहून परत आल्यावर व्यंकटराव कांहीं दिवस साताऱ्यास होते. त्यानंतर आणखीहि एकदोन मोहिमांत ते नानासाहेब पेशव्यांच्या फौजेबरोबर चाकरी करीत होते. पुढें १८४३ पासून त्यांच्या शरीरावर क्षयरोगाचा पगडा दिवसेंदिवस हळू हळू बसत चालला या आजारांत एके जागीं राहून त्यांच्या प्रकृतीस धरें वाटेना, म्हणून ते इचलकरंजी, नांदणी, टाकळी, उत्तूर या ठिकाणीं रहात असत. त्या काळीं देवधर्मावर व भुतांखेतांवर लोकांचा विश्वास फार असे. सदलगें येथें कोणी प्रसिद्ध देवरुषी होता त्याजकडून कांहीं दैवी उपाय करविण्याकरितां ते सन १७४५ त कुटुंबसुद्धां जाऊन राहिले होते. तेथेंच त्यांचें देहावसान झालें.

व्यंकटराव हे शूर व कर्तृत्ववान् पुरुष होते. करवीर व सातारा या दोन्ही दरबारांत त्यांचें वजन चांगलें असे. इचलकरंजी संस्थानाच्या इतिहासांत त्यांनीं शाहूमहाराजांची स्वतंत्र सरदारी मिळविली ही गोष्ट महत्त्वाची आहे. ही सरदारी मोठ्या योग्यतेची होती. त्यांचा 'ममलकत मदार' हा किताब शाहूनें मान्य केल्याचें सरंजामजाबत्यावरून स्पष्ट होतें.

ना रा य ण रा व व्यं क टे श व अ नू बा ई.—यापुढें नारायणरावतात्यांची कारकीर्द येते. ही कारकीर्द पंचवीस वर्षांच्या अवधीची असून तींत इचलकरंजी संस्थानाच्या वैभवाचा कळस झाला म्हटलें तरी चालेल. त्या संस्थानाचें वैभव इतकें वृद्धिंगत होण्यास तात्यांची करामत कारण नसून त्यांच्या मातोश्री अनूबाई यांचेंच कर्तृत्व होय. ( अनुबाई पहा. ). मुलगा संस्थानचा कारभार व सरदारीचा बोजा सांभाळण्याजोगा होण्यापूर्वीच व्यंकटराव वारले; त्यामुळें तीं दोन्ही कामें नीट चालतील अशा तजविजी योजणें अनूबाईचें कर्तव्य होतें.

नानासाहेब पेशवे व त्यांचे बंधू हे अनूबाईचे भाचे असल्यामुळें त्यांनीं तात्यांचा पुरस्कार करण्याचें मनावर घेतलें व त्यांच्या वडिलांकडे सरदारी होती तीच त्याजकडे कायम करून प्रत्येक स्वारींत त्याजकडे कांहींना कांहीं तरी कामगिरी सोंपविली इतकेंच नव्हे तर इनामें तैनाता देऊन मोठमोठ्या मामलती सांगून व मुलुखगिरींत संस्थानिकांकडे खंडणी करार करण्याच्या बोल्या त्यांजवरच सोंपवून त्यास लाखों रुपये मिळवून दिले. व्यंकटराव वारल्यावर शाहूनें सबंध आजरें महाल अनूबाईस इनाम करून दिला.

पूर्वी गोकाकचा देसाई शिवलिंगप्पा म्हणून होता. त्यानें बंडावा केल्यामुळें सावनूरचा नबाब अबदुल मजीदखान यानें त्यावर स्वारी केली. तेव्हां तो देसाई पळून चिकोडीकर देसायाच्या आश्रयास जाऊन राहिला. नबाबानें त्याचें देसगतीचें वतन त्याचाच भाऊ अमीन आप्पा म्हणून होता त्यास दिलें. इकडे चिकोडीकरानें शिवलिंगप्पास दगा करून मारून टाकिलें व त्याचे मुलगे लखमगौडा व शिवरामगौडा म्हणून होते त्यांस कैदेंत ठेविलें. प्रस्तुतच्या प्रसंगीं त्या दोघां मुलांनीं आपली मुक्तता करण्याविषयीं प्रार्थना केली व त्यांनां आश्रय दिला.

यावेळीं पेशवे कर्नाटकांत आले होते व त्यांचा धारवाड काबीज करण्याचा मनसबा ठरला होता. तेथें मोंगलांचा किल्लेदार पृथ्वीसिंग म्हणून होता. त्याजकडे राजकारण करून शिबंदी खर्चाबद्दल त्यास ३५००० रुपये देऊन तारीख १३ रोजीं श्रीमंतांनीं तो किल्ला व त्याखालचा सरंजाम ताब्यांत घेतला व तेथील मामलत तात्यांस दिली. पुनः ( १७५३ ) श्रीमंत कर्नाटकच्या स्वारीकरितां आले. त्यावेळीं त्यांनीं तेरदाळची मामलतहि तात्यांस दिली.

सन १७५४ च्या कर्नाटकच्या मोहिमेंत महादजीपंत पुरंदरे व नारायणरावतात्या हेच मुख्य सरदार होते. पुरंदरे व तात्या यांनीं प्रथमच गोकाकचें ठाणें देसायापासून हिसकावून घेऊन मागें देसायाचे दोन मुलगे तात्यांच्या आश्रयास राहिले होते त्यांसच त्यांनीं या वेळीं हें देसगतीचें वतन देऊन गोकाकचें ठाणें आपल्या ताब्यांत ठेविलें. देसायाच्या मुलांनीं यावेळीं कृतज्ञताबुद्धीनें हुनशाळ हा

गांव तात्यांस इनाम दिला. नंतर हें लष्कर श्रीरंगपट्टणापर्यंत जाऊन त्यानें कितुर, सोंदे, सावनूर, बिदनूर, चित्रदुर्ग, रायदुर्ग, श्रीरंगपट्टण, बसवापट्टण, कनकगिरी या नऊ संस्थानांपासून एकंदर खंडणी ३८७०००० रुपये घेतली. संस्थानिकांशीं खंडणीचा ठराव तात्या यांच्या विद्यमानें होत असे. सन १७५५ च्या मे महिन्यापर्यंत हा मजकूर झाला. नंतर तात्यांनीं पांच हजार फौजेसह धारवाडास छावणीस रहावें याप्रमाणें पेशव्यांचा हुकूम झाल्यावरून पुरंदरे पुण्यास गेले व तात्या धारवाडास राहिले. स्वारीच्या सुरुवातीस गोकाक परगणा तात्यांनीं घेतला होता त्याची मामलत पेशव्यांनीं त्यांसच सांगितली.

सन १७५६ च्या सावनूरच्या मोहिमेंत तात्या व अनूबाई हजर होती. पुढें तात्यांच्या शरीरीं आराम नसल्यामुळें ते परत इचलकरंजीस आले. परंतु सरदार व मुत्सद्दी व फौजेसुद्धां अनुबाई श्रीमंतांच्या स्वारीबरोबर राहिल्या. यावेळीं काबीज केलेला मर्दनगड इचलकरंजीकरांचकडेच ठेवावा असें मनांत आणून श्रीमंतांनीं त्यांचेच लोक किल्ल्यांत ठेविले. नंतर श्रीमंतांनीं पटवर्धन व इचलकरंजीकरांचे कारभारी यांस धारवाड प्रांतीं छावणीस ठेवून त्या प्रांतांची मामलत पटवर्धन, इचलकरंजीकर व विठ्ठल विश्राम या तिघांस सारखी वाटून दिली. पूर्वींचा व हल्लींचा नवीन मिळालेला मुलूख मिळून हा धारवाडचा सुभा इचलकरंजीकरांच्या ताब्यांत आला. त्या वेळीं सुभ्याचें क्षेत्र फार मोठें असून त्याखालीं मिश्रीकोट, धारवाड वगैरे तेरा परगणे होते. खुद्द धारवाडचा किल्ला अनूबाईच्या ताब्यांत होता. बाकीचीं ठाणीं व परगण्यांतील किल्ले अनूबाईनीं आपल्या तर्फेनें त्या त्या परगण्याच्या मामलेदारांच्या ताब्यांत दिले होते. याशिवाय वल्लभगड, पारगड, भीमगड, कलानिधि, खानापूर व चंदगड हीं ठाणीं व कितूर संस्थानांपैकीं बागेवाडी हीं सर्व गेल्या तीन सालांत पेशव्यांनीं इचलकरंजीकरांच्या हवालीं केलीं होतीं. परगणा कंकणवाडी हाहि त्याजकडे पेशव्यांकडून मामलतीनें होता. एवढा हा मोठा धारवाडचा सुभा जो इचलकरंजीकरांकडे दिला होता त्याचा वसूल सरकारांत नियमितपणें यावा म्हणून येसाजीराम व रामचंद्र नारायण हे पेशव्यांच्या तर्फे सुभ्याची वहिवाट करण्यास नेमिले होते व वसुलाबद्दल पेशव्यांस व बंदोबस्ताबद्दल इचलकरंजीकरांस ते जबाबदार होते. रायबागची कमाविशीहि पेशव्यांकडून याच वेळीं तात्यास मिळाली होती.

तात्या हा लाडांत वाढलेला अनूबाईचा एकुलता एक मुलगा. त्याचे वडील व्यंकटराव यांनीं त्यास लहापणींच देशमुखीच्या कामांत घालून राज्यकारभाराचा ओनामा पढविला होता. परंतु दुर्दैवानें तात्यांस एकविसावें वर्ष लागतें तोंच वडील मृत्यू पावून सर्व कारभार अनूबाईस पद्धाणें प्राप्त झाले. बाईची हिंमत, धोरण व महत्त्वाकांक्षा जबरदस्त होती. त्यांचे भाचे नानासाहेब पेशवे, भाऊसाहेब, दादासाहेब यांजवर त्यांची चांगली छाप होती. तात्यांस त्यांनीं स्वतंत्रपणें कधीं वागूं दिलें नाहीं. 'हे लहान पोर याला काय समजतें !' अशा भावनेनें अनूबाई त्यास जन्मभर वागवीत गेल्या. तात्या हे सरदारीचे मालक नांवाचे मात्र होते. या सर्व गोष्टींचा परिणाम तात्यांच्या मनावर प्रतिकूल रीतीचा होऊन बाईच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा त्यांस कंटाळा येऊं लागला. संस्थानांतील लबाड लोकांनीं तात्यांस भर देऊन आई व तिचे कारभारी यांविषयीं त्यांच्या मनांत वितुष्ट उत्पन्न केलें.

सन १७५७ च्या प्रारंभीं नानासाहेब व भाऊसाहेब श्रीरंगपट्टणच्या स्वारीस आले. स्वारींत अनूबाई नव्हत्या. तात्या धारवाड प्रांतीं फौजेसह होते. त्यांस श्रीमंतांच्या स्वारींत हजर रहाण्याविषयीं अनूबाईनीं लिहून पाठविलें. तेव्हां वर सांगितलेल्या वितुष्टाचा प्रकार प्रथम उघडकीस आला. तात्या श्रीमंतांबरोबर स्वारीस गेले नाहींत. अनूबाईच्या हातीं कांहीं सत्ता नसावी, सर्व कारभार आपल्या हातीं असावा, मन मानेल त्याप्रमाणें वागण्यास आपणास कोणाची आडकाठी नसावी, ही त्यांची इच्छा आतां उघड रीतीनें दिसू लागली. स्वारी आटोपून श्रीमंत परत पुण्यास गेले तेव्हा अनूबाईचें म्हणणें पडलें कीं, तात्यांनीं आपणाबरोबर पुण्यास श्रीमंतांकडे जाऊन आपल्या सरदारीचे व दौलतीचे लढे उलगडून घ्यावे. परंतु तें त्यांच्या मर्जीस येईना. ते धारवाडाकडे परत आले. मग बाईनीं धारवाडास जाऊन तात्यांची कांहींशी समजूत काढून त्यास घेऊन त्या परत इचलकरंजीस आल्या.

तात्यांस तीन अपत्यें होतीं. थोरला मुलगा व धाकट्या दोघी मुली. मुलाचें नांव व्यंकटरावदादा व मुलींचीं नांवें अनुक्रमें बयाबाई व सगुणाबाई अशीं होतीं. पुण्यास भिडे म्हणून सावकार होते त्याची कन्या व्यंकटरावांस दिली होती. तिचें नांव रमाबाई.

सन १७५९ च्या अखेरीस मराठ्यांची व मोंगलांची लढाई सुरू झाली. भाऊसाहेब व दादासाहेब बरोबर फौज घेऊन बेदरच्या रोखें चालले व वेळ पडल्यास त्यांस कुमक करितां यावी म्हणून पेशवे खुद्द अहमदनगर येथें तळ देऊन राहिले. व्यंकटरावाचें लग्न उरकून अनूबाई तेथेंच श्रीमंतांजवळ राहिल्या. पेशव्यांच्या लष्करास मिळण्याकरितां नगराहून निघून तात्या उद्गीर येथें दाखल झाले. परंतु ते तेथें पोंचण्याच्या आधींच मोंगलांचा पूर्ण पराजय झाला होता. पुढें रास्ते व पटवर्धन यांजबरोबर पेशव्यांनीं कर्नाटकाच्या स्वारीस त्यांसहि पाठविलें.

त्या वेळीं तात्यांनीं ( १७६१ डिसेंबर ) कोपळावर स्वारी केली. तिकडे काटकांनीं दंगा करून ठाणीं घेतलीं होतीं. त्यांचें पारिपत्य करून ते गजेंद्रगडास येऊन तेथून बागलकोटाकडे गेले.

या सुमारास अनूबाईचें व तात्यांचें सौरस्य पुन्हां कमी झालें व तंटा मोडण्यासाठीं पुण्यास जाण्याचेंहि त्यानीं साफ नाकारलें. एवढेंच नव्हे तर ते कारभारांत व खासगी वागणुकींतहि अव्यवस्थितपणा करूं लागले. त्यामुळें त्यांस व त्यांच्या स्त्रियेस यापुढें अनूबाईनीं जवळ जवळ नजरकैदेंतच ठेविलें. या सुमारास कडलास येथील देशपांड्यांच्या मुलीशीं त्यानीं लग्न केलें असें ऐकण्यांत आहे. नानासाहेब पेशवे यानीं देशस्थाच्या मुलीशीं लग्न लाविलें. हें मामेबंधूचें उदाहरण पाहून तात्यानींहि त्याचप्रमाणें केलें. दुसऱ्या कांहीं गोष्टींत अलीकडे त्यांचें जें बेफामपणाचें वर्तन सुरू होतें त्या वर्तनानें ते राज्यकारभारासारख्या व सरदारीसारख्या जबाबदारीच्या कामास अगदीं नालायख झाले होते. अनूबाई, खुद्द पेशवे, त्यांच्या मातोश्री गोपिकाबाई यांनीं व इतर पुष्कळ थोर लोकांनीं त्यांस दुर्व्यसनांपासून परावृत्त करावें म्हणून बहुत यत्न केला, धाक घालून पाहिला, निष्ठुरपणानें व कडकपणानें वागवून पाहिलें, पण सर्व व्यर्थ.

स. १७६२ त थोरले माधवरावांच्या बाजूस दादासाहेबांविरुद्ध अनूबाई होत्या व त्यांचें पथक घेऊन विसाजी नारायण हा दादासाहेबांशीं झालेल्या लढायांत कामगिरीवर हजर होता. नंतर दादासाहेबानीं मिरज घेतली तेव्हां सामान व पायदळ वगैरे कुमक इचलकरंजीहून पेशव्यांस होत होती. स० १७६३त मोंगलानें पुणें जाळिलें व पेशव्यांनीं बेदर शहर जाळिलें व अवरंगाबाद व भागानगर या शहरांपासून खंडणी घेतली. त्यावेळीं नारायण तात्या पेशव्यांबरोबर होते. यावेळीं दोन तीन निरनिराळ्या प्रसंगीं श्रीमंतांनीं तात्यांस स्वतंत्र कामगिरीवर पाठविलें होतें व त्यानीं थोडीबहुत खंडणीहि वसूल करून आणिली होती.

इकडे मोंगल व मराठे यांचें युद्ध सुरू असतां कर्नाटकांत हैदरअल्ली फार प्रबळ होऊन त्यानें धारवाडचा सुभा बहुतेक काबीज केला. धारवाडचा सुभा हातचा गेल्यामुळें इचलकरंजीकरांचें फार नुकसान झालें. यापूर्वी याच वर्षी मर्दनगड किल्ला व त्याखालचा मुलूख पोर्तुगीज लोकांनीं त्यांजपासून हिसकावून घेतला होता. ती नुकसानी झाली होतीच. याप्रमाणें हैदराचें प्राबल्य फार वाढल्यामुळें पेशव्यांनीं १७६४ त त्याच्यावर स्वारी केली. त्यावेळीं इचलकरंजीचें पथक नरगुंदास होतें तें या लष्करास येऊन मिळालें होतें.

पुढें १७६४ त धारवाडचा सुभा मोकळा होतांच त्याची मामलत इचलकरंजीकरांस पेशव्यांनीं दिली; कारण त्यांच्याकडे ती पूर्वी बहुत वर्षे होती. व त्यांचाहि पैसा त्या मामलतींत पुष्कळ गुंतला होता; यावेळीं तात्या इचलकरंजीहून निघून स्वाऱ्या करीत भटकत होते. श्रीमंतांनीं त्यास धारवाडास बोलावून नेलें व उपदेश केला. परंतु त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

अनूबाई इचलकरंजीस दुखणेकरी पडून होत्या. ती संधि साधून तात्यानीं परत आल्यावर बराच दंगा केला. प्रथम ते आजऱ्यांस आले. तेथें स्वार व पायदळ मिळून पांच सातशें नवे लोक त्यानीं चाकरीस ठेविले आणि राणोजी घोरपडे सेनापति यास कांहीं उपद्रव केला. तात्यांचे आजे नारो महादेव यानीं दत्तक घेतलेले नरसिंगराव यांचे पुत्र सदाशिव घोरपडे हे रघुनाथराव दादासाहेब यांजवळ होते. त्यांच्या द्वारें दादासाहेबांशीं तात्यानीं संधान बांधिलें होतें. मातोश्रीच्या निसबतीचे जितके लोक आहेत त्यांचें पारिपत्य करावें, सर्व दौलत आपल्या स्वाधीन करून घ्यावी, गोविंद हरि व त्रिंबक हरि पटवर्धन यांशीं कज्या करावा हे त्यांचें बेत होते. तात्यानीं इचलकरंजीच्या ठाण्यांत प्यादे होते त्यांस वश करून घेतलें व किल्ल्या हिसकावून घेतल्या सर्व दौलतींत त्यांचा अंमल बसला. परंतु अनुबाईची प्रकृति बरी झाली व पेशवेहि कर्नाटकांतून परत आले. तेव्हां त्यांचे सर्व बेत विरघळून जाऊन त्यांस पुन्हां पूर्वीप्रमाणेंच प्रतिबंधांत रहाणें भाग पडलें.

सरकारची कामगिरी करून दाखवून आपली बढती करून घ्यावी, इकडे तात्यांचें लक्ष नसल्यामुळें त्यांची सरदारी काढून घ्यावी असें श्रीमंतांच्या मनांत आलें; त्यामुळें ( सन १७६६ ) अनुबाई व त्यांचे नातू व्यंकटराव दादा ही पुण्यास गेलीं. तात्याची कशी तरी समजूत घालून त्यांनीं त्यांसहि बरोबर नेलें. अद्यापि अनुबाईची भीड पुणें दरबारीं बरीच असल्यामुळें त्यानीं पेशव्यांकडून व्यंकटरावांच्या नावें सरदारी करून घेतली व पुन्हां पथकाची उभारणी केली. कडलास, पापरी व बेडग हे गांव इचलकरंजीकरांकडे पथकाच्या सरंजामांत चालत होते ते या सालच्या डिसेंबरांत पेशव्यांनीं दूर करून तेच गांव त्यांच्या तैनातीस लावून दिले. पेशवे सरकारातून एकंदर ११४१०रुपयांची तैनात इचलकरंजीकरांस रोख मिळत होती तिच्या ऐवजीं त्यानीं या तीन गांवांचा वसूल तैनातीकडे घेत जावा असें ठरलें.

कोल्हापूरकर जिजाबाईनीं इचलकरंजीकरांचें सरदेशमुखीचें वतन जप्त केलें होतें तें सोडण्याबद्दल व तिकडे इचलकरंजीकर यांचीं गांवें, खेडीं, शेतें, कुरणें, बाग, मळे वगैरे आहेत त्यांस उपसर्ग न देण्याविषयीं श्रीमंतांनीं जिजाबाईस पत्रें लिहिलीं. म्हापण गांवास वाडीकर सावंत यांजकडून उपद्रव होत होता तो बंद करण्याविषयींहि पेशव्यांनीं सावंतांस एक ताकीदपत्र पाठविलें. आपल्या दौलतीचा याप्रमाणें बंदोबस्त करून घेऊन अनुबाई, तात्या व दादा परत इचलकरंजीस आलीं. पुढें तात्या ख्यालीखुशालींत व दुर्व्यसनांत मग्न होऊन इचलकरंजींत आयुष्याचे दिवस घालवूं लागले. त्यामुळें ( १७६९ ) धारवाडचा सुभा इचलकरंजीकरांकडून काढून पेशव्यांनीं नारो बाबाजी नगरकर यांस सांगितला.

सन १७७० व १७७१ साली हैदरअल्लीवर मोहीम सुरू होती. तींत इचलकरंजीकरांची पागा मात्र होती. यावेळीं तात्या बेहोष व व्यंकटराव दादा अल्पवयी असल्यामुळें इचलकरंजीचें पथक मोडल्यासारखेंच झालें होतें. याच सुमारास नारायणराव तात्या हे ( १७७० च्या प्रारंभापासून ) आजारी पडले होते. तें दुखणें वाढत जाऊन शेवटीं त्याच वर्षी ( नोवेंबर १० ) त्यांचें देहावसान झालें.

व्यंकटराव नारायणराव उर्फ दादासाहेब.—इचलकरंजीकरांकडून धारवाडचा सुभा काढून तो दुसऱ्या मामलेदाराकडे पेशव्यांनीं दिला होता. सुमारें सोळा वर्षेपर्यंत तो सुभा त्यांजकडे होता. त्या अवधींत मामलतीसंबंधीं तफावत रहातां रहाता आजपर्यंत सरकारची बाकी बरीच तुंबली होती. सरकारचा तगादा उठविण्यासाठीं अनूबाईस पुण्यास जावें लागलें. व्यंकटरावदादा त्याजबरोबर या खेपेसहि गेले होते. तेथें गेल्यावर हिशेब होऊन मुत्सद्दी व पेशवे याजवळ अनुबाईनीं बहुत रदबदली केल्यावरून शेवटीं ७३००० रुपयावर तोड झाली. पेशव्यांची स्वारी कर्नाटकच्या मोहिमेस निघाली तेव्हां व्यंकटरावासह अनूबाई पुण्याहून निघून जेऊरच्या मुक्कामीं लष्करांत जाऊन पोंचल्या. तेथें चार दिवस रहावयाचा त्यांचा बेत होता, परंतु इचलकरंजीस तात्यांस देवाज्ञा झाल्याचें वर्तमान कळतांच त्या व व्यंकटराव तेथून तावडतोब निघून इचलकरंजीस आल्या. या व्यंकटराव नारायणाचा व त्यांच्या पुढील वंशाची या घराण्याची हकीकत ज्ञानकोशाच्या आठव्या विभागांत 'इचलकरंजी' या शब्दाखालीं आलेली आहे; तरी ती तेथें पहावी. [डफ; ऐ. इ. ले. संग्रह; इचलकरंजी इतिहास].

घोरपडे कापशीकर—विजापूरच्या बादशहाकडून कापशीचें ठाणें व त्याभोंवतालचा कांहीं तालुका कापशीकरांकडे सरंजाम म्हणून चालत होता. त्यांस 'हिंदुराव' हा किताब बहामनी बादशहाकडून व 'अमीर-उल्-उमराव' हा किताब आदिलशहाकडून मिळालेला आहे. कोल्हापूर प्रांताची देशमुखी व सरदेशमुखी कापशीकरांकडे विजापूरकराच्या अमदानीपासून चालत आली असावी.

कापशीकरांनां नऊकस घोरपडे म्हणतात. शिवाजीमहाराजांचा अभ्युदय होत होता त्यावेळीं कापशीकरांच्या घराण्यांत म्हाळोजी घोरपडे मुख्य होते. त्यानीं बादशहाची चाकरी सोडून महाराजांचा पक्ष धरला होता. त्यांचें पांचशें स्वारांचें पथक होतें. त्या पथकानिशीं स्वारींत हजर राहून ते शिवाजीची एकनिष्ठेनें चाकरी करीत असत. त्यांस संताजी, बहिरजी व मालोजी असे तीन पुत्र झाले. ते तिघेहि पराक्रमी निघाले. तेव्हां शिवाजीनें त्या तिघांस तीन स्वतंत्र पथकांची सरदारी सांगून त्यांची चाकरी हंबीरराव सेनापतीच्या निसबतीस लावून दिली. त्या तिघां भावांत शूरत्वाविषयीं संताजीचा नांवलौकिक विशेष झाला. परंतु कापशीकर व त्यांचे अनुयायी इचलकरंजीकर यांची प्रसिद्धि ते 'कर्नाटकांतले सरदार' म्हणून आहे. कापशीकर घोरपड्यांचीं पाटिलकीचीं वतनें सातारा जिल्ह्यांत आहेत. पण त्यांनीं कृष्णेच्या उत्तरेस कधीं जहागीर मिळविण्याचा यत्न केला नाहीं. प्रथमपासून त्यांचें वळण कर्नाटकाकडे पडत गेल्यामुळें तोच मुलूख त्यांच्या व इचलकरंजीकर यांच्या कर्तृत्वाचें क्षेत्र होऊन बसला.

संताजी घोरपडे.—संताजीनें १६७४ तच शिवाजीच्या वेळीं आपलें नांव काढलें होतें. अवरंगझेबानें संभाजीस धरून कैद केलें त्यावेळीं लढाई झाली तींत म्हाळोजी घोरपडे ठार झाले. बादशहाच्या फौजेचा छापा येण्यापूर्वीच संभाजीस सुरक्षित स्थळीं पोहोंचवावें म्हणून बहिरजीनें यत्न केला. परंतु संभाजीच्या दुराग्रहामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. त्यानंतर राजाराम गादीवर बसला. त्यानें इ. स. १६९१ मध्यें संताजी घोरपडे यास सेनापतीचें पद दिलें.

संताजीस दोन बायका होत्या व प्रत्येकीस एकेक पुत्र झाला होता. थोरला राणोजी व धाकटा पिराजी. शिवाय संताजीचा मानलेला मुलगा नारोपंत ( इचलकरंजीकर ) हा तिसरा पुत्र होय.

संताजीबरोबर नारोपंत प्रत्येक स्वारींत हजर रहात असल्यामुळें त्यास लष्करी कामाचा अनुभव येत चालला. सेनापती झाल्यापासून संताजीच्या अचाट पराक्रमांची परंपरा सुरू झाली. तो काळ विलक्षण धामधुमीचा होता. त्यामुळें आपल्या अंगचा पराक्रम व कर्तृत्व प्रकट करण्यास त्यास ती उत्तम संधि सांपडली. नारोपंतावर संताजीचा पूर्ण विश्वास असल्यामुळें आपल्या दौलतीचा सर्व कारभार त्यानें त्याजकडे सोंपविला. राजारामाच्या कारकीर्दींत महाराष्ट्राचें स्वातंत्र्य राखण्याकरिता संताजीनें जे असाधारण पराक्रम केले आहेत, त्यांच्या योगानें त्याचें नांव इतिहासांत अजरामर झालें आहे.

सन १६९० त मोंगलांच्या फौजा महाराष्ट्रांतील किल्ल्यांस वेढा घालून बसूं लागल्या. कित्येक किल्ले त्यांनीं काबीजहि केले. त्यापुढें आपला निभाव लागत नाहींसें पाहून राजाराम गुप्तपणें चंदीचंदावरास गेले. त्याबरोबर जे मुत्सद्दी व सरदार गेले त्यांत संताजीहि होता. हा प्रवास फारच धोक्याचा होता व त्यांत एका प्रसंगीं महाराजांचा जीव बचावण्याकरितां संताजीचा बंधु मालोजी यांस आपल्या प्राणाची आहुति द्यावी लागली. चंदीस गेल्यावर राजारामानें संताजीस सेनापतीचें पद, जरीपटका व नौबत दिली. आणि "हिंदुराव ममलकतमदार" असा किताबहि दिला. संताजी वगैरे त्रिवर्गबंधूच्या घराण्यांत यावेळीं तीन निरनिराळे किताब मिळाले. संताजीच्या घराण्याकडे "ममलकतमदार," बहिरजीच्या घराण्याकडे "हिंदुराव" व मालोजीच्या घराण्याकडे "अमीर उल् उमराव" असे हे किताब असून ते अद्यापि चालत आहेत.

सन १६९१ च्या प्रारंभीं संताजी व धनाजी जाधव परत महाराष्ट्राकडे येऊन रामचंद्रपंत हुकमतपन्हा यांस मिळाले.

त्यांच्या मदतीस संताजीनें कर्नाटकांत जातांना कांहीं फौजेसह नारोपंतांस ठेविलें होतें. मोंगलांवर स्वाऱ्या करण्याकरितां फौजेची नवीन जमवाजमव केली. संताजी व बहिरजी व विठोजी चव्हाण हिंमतबहाद्दर यांनीं खुद्द अवरंगझेबाच्या फौजेवर छापा घालून त्याच्या डेऱ्याच्या तणावा तोडून सोन्याचे कळस काढून आणिले.

सन १६९२ त संताजीनें वांईच्या फौजदारावर छापा घालून त्यास सैन्यासह कैद केलें; नंतर मिरजेच्या फौजदाराचीहि हीच दुर्दशा केला. त्यावेळीं महाराजांच्या आज्ञेवरून रामचंद्रपंतांनीं संताजीस मिरज प्रांतांची देशमुखी व सरदेशमुखी इनाम दिली. सन १६९३ त संताजी व धनाजी जाधव यांनीं गंगथडीवर स्वारी केली व तीन वर्षे तिकडे राहून तो मुलुख लुटला, आणि बादशहाच्या लष्करास पुरवठा करण्याकरितां हिंदुस्थानांतून रसद व खजिना त्या मार्गानें येत असे तो कित्येक वेळां लुटून घेतला. यांच्या पारिपत्याकरितां बादशहाकडून आलेल्या एकामागून एक तीन फौजा त्यांनीं मोडून गर्दीस मिळविल्या. झुल्फिकारच्या स्वारींत संताजी हा छत्रपतींची कुमक करण्याकरितां पुनः कर्नाटकांत (१६९६) गेला. त्याच्याबरोबर त्यावेळीं फौज वीस हजार होती. संताजीनें धनाजीस पुढें पाठविलें. संताजी मागून येत असतां त्यावर त्या प्रांताचा फौजदार अलीमर्दान चालून आला. त्या प्रसंगीं फौजदाराचा पूर्ण पराजय करून त्याची फौज लुटून काढिली व त्यास पकडून जबर खंड घेऊन सोडून दिलें. नंतर चंदीस पोंचल्यावर त्यानें मोंगलांवर वारंवार तुटून पडून त्यांस चंदीचा वेढा उठविणें भाग पाडिलें. नंतर तो कर्नाटक, बालेघांट या प्रांतांत शिरून तेथें लुटालूट करूं लागला. तेथील फौजदार कासिमखान यास त्यांशीं युद्ध करण्याची छाती होईना; सबब त्याच्या कुमकेस बादशहानें मोठे मोठे सरदार पाठविले. ते कासिमखानास येऊन मिळाल्यावर ती सर्व सेना संताजीवर निघाली तोंच त्यानें एकदम येऊन चोहोंकडून या फौजेस घेरा दिला. संताजीची ही मगरमिठी सुटेनाशी झाली. तेव्हां त्या फौजेची सुटका करण्याकरितां बादशहानें हिंमतखान नांवाचा सरदार पाठविला, तों संताजीनें त्यास परस्पर वाटेंतच गांठून त्याची फौज उधळून दिली.

इकडे आठपंधरा दिवस मार खातांच कासीमखानाचीहि फौज टेंकीस आली. शेवटीं कासिमखानानें विष खाऊन प्राण दिला. व बाकीची सर्व फौज संताजीच्या हातीं लागली, तेव्हां त्यानें ती लुटली व सरदारांपासून भारी खंड घेऊन त्यांस सोडून दिलें. इतक्यांत हिंमतखान पुन्हां नवी फौज घेऊन लढाईस आला; परंतु संताजीनें तीहि फौज धुळीस मिळविली, व त्यास मारून टाकिलें.

धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांमध्यें यावेळीं वांकडें आलें. सन १६९७ त राजाराममहाराज जिंजीहून स्वदेशीं परत आले. त्यांनीं या उभय सरदारांचा समेट करून द्यावा तें न करतां जाधवाचा पक्ष धरिला, त्यामुळें संताजीचें बळ कमी पडलें. त्या दोघां सरदारांच्या फौजांचा विजापुरानजीक तळ पडला असतां जाधवरावानें घोरपड्यांच्या बहुतेक फौजेंत फितूर केला व त्या फौजेच्या मदतीनें संताजीस धरण्याचा बेत केला. ही बातमी संताजीस कळतांच त्यानें नारो महादेव वगैरे आपले विश्वासू सेवक व मुलेंमाणसें व जिवास जीव देणारी थोडीशी फौज होती ती घेऊन तेथून पळ काढिला. त्यानंतर कांहीं दिवस तो जाधवरावाचा शह चुकवीत मुलखांतून हिंडत होता. एके प्रसंगीं त्याचा मुक्काम म्हसवडास पडला. तेथें म्हसवडकर माने नागोजी यानें ( आपल्या सासऱ्याचा सूड घेण्यासाठीं ) संताजीस दग्यानें ठार मारिलें.

याप्रमाणें संताजी हा मारेकऱ्यांच्या हातें प्राणांस मुकला. संताजीरावांचे मुलगे राणोजी व पिराजी हे त्यावेळीं लहान होते. यावेळीं नारोपंतानें कापशीकर घराण्याची लाज राखिली. धन्यास दगा देऊन तो जाधवरावास मिळता तर राजाराममहाराज यांची मर्जी त्याजवर सुप्रसन्न झाली असती व त्यास मोठें वैभवहि मिळालें असतें, पण त्याची बुद्धि तशी नव्हती. त्यानें राणोजी व पिराजी यांस हातीं धरून सेनापतींचे अनुयायी एकत्र जमविले व बहिरजी घोरपडे निराळी सरदारी करून कर्नाटकांत होता त्यास आणविलें. मग ही घोरपड्यांची एक स्वतंत्रच फौज जमा झाली असें पाहून जाधवरावानें त्यांशीं विरोध करण्याचें सोडून दिलें.

ताराबाईच्या कारकीर्दींत घोरपडे ताराबाईच्या ताब्यांत न रहातां नेहमीं स्वतंत्रपणें मोंगलाई व मराठी राज्यांत स्वाऱ्या करीत, असें डफ म्हणतो; परंतु तें खरें दिसत नाहीं. कारण कीं, सन १७०३–४ या सालीं ताराबाईचे पुत्र शिवछत्रपति यांनीं पिराजी घोरपडे यांच्या नांवें सरंजामजाबता करून दिला आहे त्यांत कलमें आहेत तीं:–

( १ ) मशारनिल्हेचे पिते संताजी घोरपडे यांस मामले मिरज येथील अठरा कर्यातींचे देशमुखी वतनें दिलीं होतीं तेणें प्रमाणें यांजकडे करार. (२) सरदेशमुखीचें वतन मशारनिल्हेस पेशजपासून होतें तेणेंप्रमाणें करार. सुभा पन्हाळा व मामले मिरज. (३) मशारनिल्हेचे वडील बंधु राणोजी स्वामिकार्यावरी पडले त्यानिमित्त त्यांची स्त्री संतुबाई इजवरी कृपालु होऊन तिचा योगक्षेम चालण्यानिमित्त कसबे कापशी गांव इनाम दिला. (४) नारो महादेव, यानीं कष्ट मेहनत बहुत केली. या बाबे त्यांस भिलवडी हा गांव इनाम दिला. ( ५ ) मशारनिल्हेकडे सरंजाम करून सरदार दिले. ( अ ) संभाजी निंबाळकर. हजार फौजेची दौलत. ( आ ) वेंकटराव नारायण पांचशें जमावाची तैनात.

ताराबाईचा व घोरपड्यांचा जर बिघाड असता तर छत्रपतींकडून असा सरंजाम पिराजीस कधींच मिळाला नसता हें उघड आहे. या राजपत्रावरून नारो महादेव यांच्या कर्तृत्वाचें अनुमानहि होतें.

सन १६९८ ते १७०५ पर्यंत बेदर, गुलबुर्गे व विजापूर या प्रांतीं घोरपड्यांची धामधूम व लुटालूट एकसारखी सुरू होती; औरंगझेबाच्यानें घोरपड्यांचा बंदोबस्त झाला नाहीं. यावेळीं नारो महादेव यांची तेजस्विता उत्तम रीतीनें प्रकट झाली. सन १७०७ त घोरपड्यांनीं स्वराज्यांतच कांहीं स्वारी शिकारी केल्यावरून ताराबाईचा क्षोभ होऊन त्यांचें पारिपत्य करण्याकरितां त्यांनीं त्यांवर धनाजी जाधव यास पाठविलें; तेव्हां घोरपड्यांनींहि झुलपिकारखान यास मदतीस बोलाविलें. संताजीरावांची व खानाची मैत्री फार दिवसांची होती, सबब त्यानें कुमकेस जाऊन जाधवरावास हुसकून लाविलें. त्यानंतर बहिरजी व त्याचे पुत्र शिदोजी हे संताजीच्या मुलांमाणसांस घेऊन गजेंद्रगडाकडे गेले व तिकडे मोंगलांच्या आश्रयानें त्यांनीं आपली जहागीर वाढविली.

घोरपड्यांनीं स्वराज्यांतल्या मुलखावर स्वारी केल्याचें वर लिहिलें आहे. त्यांत नारो महादेव यांचें अंग नव्हतें. मोंगलांचे अंकित म्हणवून घेऊन कर्नाटकांत रहावें ही गोष्ट नारोपंतास मुळींच पसंत पडली नाहीं. छत्रपतींच्या पदरीं राहून आपल्या धन्यानें मिळेल त्या भाकरीवर निर्वाह करावा हा त्याचा निर्धार पूर्वीपासून पक्का होता. यामुळें आतां घोरपड्यांची वांटणी होऊन त्यांच्या कर्तृत्वास भिन्न भिन्न दिशा लागल्या. बहिरजी व शिदोजी हे गजेंद्रगडास राहून मोंगलाईचें सरदार म्हणून आपणांस म्हणवून घेऊं लागले व तिकडे त्यांनीं गुत्ती व गजेंद्रगड वगैरे मुलुख मोंगलांकडून सरंजाम मिळविला; त्यावरून त्यांस गजेंद्रगडकर हें नांव पडलें. संताजीचीं मुलेंमाणसें त्यांजवळ होतीं, परंतु नारोपंतांनीं त्यांशीं तंटा करून तीं सर्व मंडळी आपल्या ताब्यांत घेऊन ते कापशीस येऊन राहिले. इतउत्तर पिलाजीराव व त्यांचे वंशज हे मात्र कापशीकर या नांवानेंच प्रसिद्धि पावले व त्यांनीं छत्रपतींचा आश्रय कधीं सोडिला नाहीं.

नारो महादेव यांनीं हिंमत धरून आपले अल्पवयी धनी पिराजीराव यांच्या नांवें त्यांचीं वडलोपार्जित वतनें छत्रपतींकडून करार करून घेतलीं व आपले अल्पवयी पुत्र व्यंकटराव यांची पांचशें स्वारांच्या सरदारीवर नेमणूक करून घेतली! त्यावेळीं छत्रपतींच्या दरबारांत नारो महादेव यांचें फार वजन होतें.

कापशीकर घोरपड्यांचा एकंदर सरंजाम सत्तावीस लक्षांचा होता. त्याचा तिसरा हिस्सा (म्हणजे नऊ लक्षांचा) संताजीरावांस मिळालेला होता. परंतु त्यांचे पुत्र पिराजीराव यांच्या ताब्यांत सुमारें पांच लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूखच राहिला. इतका मुलुख तरी नारोपंतांच्या मर्दुमकीमुळेंच राहिला. कापशीकर आपल्या पक्षास चिकटून राहिल्यानें राज्याला उपयोग होत आहे हें ताराबाईच्या प्रत्ययास आल्यामुळें त्यांनीं मिरज व पन्हाळा येथील देशमुखी व सरदेशमुखी वतन पुनः पिराजीराव यांजकडे कायम केलें. या वतनाचा सर्व कारभार नारोपंतांनीं पिराजीरावांकडून आपल्या नांवें करून घेतला.

पुढें करवीर राजमंडळाचा पक्ष अधिक प्रबल करावा म्हणून कापशीकर व नारो महादेव यांस रामचंद्रपंतांनीं पूर्णपणें अनुकूल करून घेतलें. रामचंद्रपंतांनीं 'हिंदुराव' यांस वळविण्याचाहि प्रयत्न केला पण तो सफळ झाला नाहीं. त्या घराण्याचे स्थापक बहिरजी घोरपडे गजेंद्रगडकर मरण पावले होते. त्यांचे पुत्र सिदोजीराव यांस रामचंद्रपंतांनीं करवीरकराकडून सेनापतीचें पद देवविलें. ते फौजबंद व शूर होते. परंतु त्यांचें मन कर्नाटकच्या स्वाऱ्यांत गुंतलें असल्यामुळें करवीरच्या मसलतींत पुढाकार घेण्याचें त्यांच्यानें होईना. मग त्यांजकडून सेनापतीचें पद काढून रामचंद्रपंतांनीं पिराजी कापशीकर यांस तें देवविलें. तें पद त्या दिवसापासून आजपर्यंत कापशीकरांच्या घराण्याकडे अव्याहत चालू आहे. त्या वेळीं पिराजीराव वयानें लहान असल्यामुळें अर्थात सेनापतीनिसबतीचीं सर्व कामें नारो महादेवच पहात. याप्रमाणें त्या वेळीं करवीर राजमंडळाच्या सचिवाचे व सेनापतीचे अधिकार कांहीं वर्षेपर्यंत त्यांच्या हातीं आले होते! कापशी घराण्याच्या किताबांपैकीं 'ममलकतमदार' व मानमरातबापैकीं जरीपटका व नौबत हीं कापशीकरांचे अनुयायी व संताजीरावांना मानलेले पुत्र या नात्यानें बाळगण्याविषयीं नारो महादेव यांस परवानगी मिळाली होती. इचलकरंजीकरांच्या घराण्यांत हा किताब व बहुमान अद्यापपर्यंत चालू आहे.

सन १७२८ सालीं पिराजी घोरपडे मौजे हलकर्णी हें ठाणें काबीज करण्याकरितां गेले होते. तेथें ते लढाईंत ठार झाले. त्यानंतर त्यांचे पुत्र राणोजी हे सेनापतींच्या दौलतीचे मालक झाले. कापशीकर यजमान व इचलकरंजीकर नोकर हा संबंध आतां राहिला नव्हता. तथापि कापशीकरांच्या दौलती विषयीं व्यंकटरावांची (नारोपंताचा पुत्र) अनास्था नसे. जेव्हां जेव्हां राणोजीचें काम शाहू महाराजांच्या दरबारीं पडे तेव्हां तें व्यंकटरावांच्या वशिल्यानें सिद्धीस जाई. या दोन्ही घराण्यांत परस्परांविषयीं प्रेमभाव व घरोबा पुढेंहि कायम राहिला. पिराजीराव मरण पावल्यावर कापशीकरांच्या दौलतींत पुष्कळ अव्यवस्था होऊन ती दौलत अगदीं नातवानीस आली. कोल्हापुरकर संभाजीच्या मनांतून सबंध कापशी संस्थानच खालसा करावयाचें आलें. त्याचा तो बेत पाहून संताजीराव घोरपडे यांची थोरली स्त्री द्वारकाबाई अद्यापि हयात होती ती आपल्या नातवास (राणोजी) बरोबर घेऊन साताऱ्यास शाहुमहाराजांच्या आश्रयास राहिली. (ही इ. स. १७६२ त मरण पावली. त्यावेळीं तिचें वय ऐंशीं वर्षांपेक्षां अधिक असावें. तिचा मुलगा पिराजी व पिराजीचा मुलगा राणोजी. द्वारकाबाईच्या स्मरणार्थ राणोजीनें कृष्णा व पंचगंगा यांच्या संगमावर कुरुंदवाडच्या घांटावर घोरपड्यांचा कुलस्वामी सुब्रह्मण्य, याचें देवालय बांधिलेलें आहे).

वर सांगितलेल्या मिरज व पन्हाळा प्रांतची देशमुखी सरदेशमुखीच्या वतनाची सनद पूर्वीच्या क्रमाप्रमाणें शाहूकडूनहि कापशीकरांस करार करून मिळाली. वतनाच्या मालकीस नांव मात्र कापशीकरांचें व भोगवटा व्यंकटरावांचा असल्यामुळें व सासुरवाडीकडून ( पेशव्यांकडून ) शाहूच्या दरबारांत व्यंकटरावांचा वशिला उत्तम रीतीचा असल्यामुळें ही वतनाची सनद पिराजीस मिळण्यास अडचण पडली नाहीं ( १७२१ ).

द्वारकाबाई व राणोजी सातार्‍यास असतां शाहूनें त्यांस सन्मानानें वागविलें. राणोजी यास सरंजामाचे महाल नवीन नेमून देऊन त्याच्या सरदारीची स्वतंत्र उभारणी करावी, त्यांस नवीन इनाम गांव द्यावे,याप्रमाणें महाराजांचा मनोदय होता व त्याप्रमाणें सरंजामाच्या सनदाहि तयार झाल्या होत्या. परंतु पुढें लौकरच संभाजीकडून समेटाविषयीं संदर्भ आल्यावरून घोरपड्यांच्या सरदारीचें काम थांबलें. पुढें संभाजी हा शाहूच्या भेटीकरितां सातार्‍यास आला त्यावेळीं 'तुम्हीं कापशीस परत या, आम्ही तुमचे संस्थान तुम्हांकडे चालवितों' असें संभाजी द्वारकाबाईस व राणोजीस म्हणूं लागला. परंतु शाहू व त्याचे पेशवे बाजीराव यांची हमी घेतल्याखेरीज तीं दोघे परत जाण्यास कबूल झालीं नाहींत. शेवटीं पेशवे, प्रतिनिधि व मंत्री यांस बरोबर घेऊन शाहू महाराज राणोजीच्या घरीं गेले व तुमचें संस्थान चालविण्याबद्दल आम्हीं संभाजीस सांगितलें आहे, त्याप्रमाणें ते बिनदिक्कत चालवितील, तुम्हीं कापशीस जावें, असें त्यांनीं व प्रधानमंडळींनीं त्यांस आग्रहानें सांगितलें. त्यावरून तीं दोघें कापशीस परत गेलीं व कबूल केल्याप्रमाणें संभाजीनें त्यांचें संस्थान त्यास परत दिलें ( १७३० ). पिराजीराव मरण पावल्यानंतर राणोजीस सनद मिळावयाची; परंतु व्यंकटरावांवर शाहूची कृपा असल्यामुळें त्यांनीं त्यास आज्ञा केली कीं 'देशमुखीचा भोगवटा अनेक वर्षें तुम्हीच करीत आहां. नवी सनद द्यावयाची तींत राणोजीचें नांव कशाला ! तुमच्याच नांवें सनद देतों' पण ती गोष्ट व्यंकटरावास पसंत पडली नाहीं. त्यानें सांगितलें कीं, सनद पूर्वीप्रमाणें राणोजी यासच द्यावी. ते देतील तर तीच सनद त्यांजपासून आम्हीं मागून घेऊं. मग शाहूनें ( १७३४ ) राणोजीच्या नांवें सनद तयार केली. तें वर्तमान राणोजी यांस कळतांच व्यंकटरावाच्या कृतज्ञतेचें हें उदाहरण पाहून त्यास हर्ष झाला व त्यानें तीच देशमुखीची सनद त्यास बक्षीस दिली. एवढेंच नव्हे तर, पुढच्या वर्षीं मौजे रांगोळी हा आपला इनाम गांव त्यास इनाम करून दिला. राणोजीचा पुत्र संताजी होय. यापुढें या घराण्यांत विशेष प्रख्यात पुरुष झाले नाहींत. पेशव्यांशीं व पुढें कोल्हापूरकरांशीं सूत्र ठेवून हें घराणें राहिलें. [ डफ पु. १; राजारामछत्रपतीची बखर; इचलकरंजीचा इतिहास. ].

गजेंद्रगडकर घोरपडे.-यांची माहिती गजेंद्रगड या शब्दाखालीं आली आहे ती तेथें पहावी.

गुत्तीकर घोरपडे.-या घराण्याचा मूळ पुरुष सेनापती संताजी घोरपड्याचा भाऊ बहिरजी हिंदुराव हा होय. संताजीच्या खुनानंतर बहिरजी कर्नाटकांत आला व त्यानें मोंगलांची नोकरी पत्करून, गजेंद्रगड, गुत्ती वगैरे मुलुख मिळविला. त्याच्यानंतर त्याचा पुत्र शिदोजी हा गादीवर बसला. शिदोजीच्या मागून त्याचा पुतण्या यशवंतराव हा गुत्तीचा मालक झाला. हा पुढें मोंगलांकडून निघून पेशव्यांनां मिळाला. हा हैदराच्या स्वार्‍यांत नेहमीं पेशव्यांतर्फे हजर असे. शिदोजीचा मुलगा प्रख्यात मुरारराव त्यानें त्या भागांत आपलें सामर्थ्य फार वाढवून पुष्कळच प्रांत मिळविला ( मुरारराव घोरपडे पहा ). हाहि गुत्तीचा कारभार पाहत असे. पुढें टिपूनें एका लढाईंत मुरारराव व यशवंतराव यांस पकडून कैदेंत ठेविलें. तेव्हां यशवंतरावाचा मुलगा मालोजी हा गुत्तीचा मालक झाला. त्यानंतर दुसर्‍या एका लढाईंत गुत्ती टिपूनें घेऊन आपल्या राज्यास जोडली. त्यामुळें पेशव्यांनीं मालोजीस गुत्ती ऐवजीं सोंडूर ( हें टिपूकडून घेऊन ) ठाणें दिलें व त्याबरोबरच कंकणवाडी, बेळवती वगैरे तालुके सरंजामादाखल दिले. यानंतर सोंडूर संस्थान स्थापन होऊन त्याचा पहिला पुरुष शिवराव घोरपडे हा बनला. पुढें गुत्तीकर घराण्यांतील दुसरा यशवंतराव हा नाना फडणिसांनां कैदेंतून सोडविण्याच्या वेळीं पुढें आला होता. पेशवाईअखेर हा रावबाजी विरुद्ध इंग्रजांस मिळाला. आणि त्यांच्या तर्फे पेशव्यांशीं लढला. या त्याच्या मदतीबद्दल ज. वेलस्लीनें त्यास सदतीस हजारांची जहागीर दिली. पुढें दौलतराव शिंद्यांच्या दरबारींहि हा इंग्रजांतर्फे काम करीत असे. हा सन १८२१ सालीं पुणें येथें मरण पावला; त्यास मालोजी हा एक पुत्र होता. याचा वंश हल्लीं सोंडूर प्रांतीं नांदत आहे ( गजेंद्रगड पहा ). [ खरे-ऐ. ले. संग्रह; डफ; बाड-कैफियती ].

**घोरी घराणें**—गजनी घराण्यांतील बहराम ( १११८-११५२ ) याच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे तंटे चालू होते. गजनी व हिरात यांमधील प्रदेशांत घोर प्रांत आहे. हेंच अफगाण लोकांचें मूळ ठिकाण. आरबांनीं हा प्रांत जिंकून तेथील लोकांस मुसुलमान बनविलें. बहरामच्या वेळीं घोरचे अफगाण बलाढ्य होऊन स्वतंत्र झालेले होते. यांची राजधानी फिरोझकोह नांवाची होती. फिरोझकोहचा हल्लीं नक्की तपास लागत नाहीं. त्यावेळीं कुत्-बुद्दीन सूर नामक घोरचा अंमलदार होता. हा कुत्-बुद्दीन व बहराम यांमध्यें वैमनस्य उत्पन्न होऊन बहरामनें कुत्-बुद्दीन घोर याला ठार मारिलें. कुत्-बुद्दीन हा बहरामचा जांवई होता.

कुत्-बुद्दीनच्या सैफ-उद्दीन व अल्ला-उद्दीन नामक भावांनीं बहरामचा सूड घेण्याचा निश्चय केला. सैन्याच्या

विश्वासघातानें सैफ-उद्दीन हा बहरामच्या हातीं सांपडल्यामुळें बहरामनें त्याचे हाल हाल करून त्यास ठार मारिलें. या कृत्यानें अला-उद्दीन चिडून गेला व लवकरच लढाई जुंपून तींत अला-उद्दिनास विजय प्राप्त झाला. त्यानें गजनी शहरात शिरून तें शहर जाळून पोळून उध्वस्त केलें. त्यामुळें त्याला जहानसोझ् ( जग जाळणारा ) म्हणूं लागले. बहराम पराभव पावून पळत असता वाटेंतच मरण पावला ( ११५२ ).

बहरामच्या पश्चात् त्याचा पुत्र खुश्रू यानें गजनी शहर परत मिळविण्याची बरीच खटपट केली. परंतु तींत त्याला यश न आल्यामुळें त्यानें लाहोरास आपली राजधानी नेली. परंतु त्याच्या राज्यास उतरती कळा लागली; कारण सर्व लोक घोरच्या सुलतानास ( अला-उद्दिनास ) मिळाले. खुश्रू इ. स. ११६० त मरण पावला. त्याचा मुलगा मालिक खुश्रु हा गजनी वंशाचा शेवटचा सुलतान होय. पुढें त्याच्या मरणानंतर राज्य घोरच्या अफगाणांनीं बळकाविलें.

गजनी शहर हस्तगत केल्यावर अलाउद्दीन आपल्या घोर प्रांतांत जाऊन फिरोजकोह येथें स्वस्थ बसला. तो ११५६ त मरण पावला. त्याला सैफ-उद्दीन नावाचा एक पुत्र होता त्यास राज्य मिळालें. परंतु त्याचा लवकरच खून झाल्यामुळें ग्यास्-उद्दीन व शहाबुद्दीन नावाचे त्याचे चुलत भाऊ म्हणजे अला-उद्दीनाचे पुतणे राज्यकारभार पाहूं लागले. दोघा राजांनीं एकमतानें राज्यकाभार चालविल्याचें मुसुलमानी इतिहासांत हें एकच उदाहरण आहे. शहाबुद्दीनची दृष्टि हिंदुस्थानाकडे होती. त्यानें स्वतःस महंमद असें नांव घेतलें. त्याचा भाऊ ग्यास-उद्दीन १२०२ त मरण पावल्यावर सर्व राज्य शहाबुद्दीन उर्फ महंमद घोरी याजकडे आलें. ग्यासुउद्दीन यानें हिरात येथे एक उत्तम मशीद बांधिली होती. ज्याप्रमाणें गजनीच्या महंमूदानें हिंदुस्थान उध्वस्त केलें त्याप्रमाणेंच महंमद घोरीनें ११७६ पासून १२०६ पर्यंतच्या तीस वर्षांत हिंदुस्थान देशात धुमाकूळ घातला.

हिंदुस्थानांतील मुसुलमानी प्रांत आपल्या ताब्यात घेणें हा त्याचा मुख्य उद्देश होता. त्यानें ११७५-७६ त मुलतान काबीज केलें व सिंधुनदावरील ऊच येथील राजाच्या मुलीशीं लग्न लाविलें. पुढें ११७८ त त्यानें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी करून गजनीच्या खुश्रू मलिकचा पाडाव केला; व ११८२ पर्यंतच्या काळांत सिंध प्रांत काबीज केला. नंतर ११८४ त त्यानें लाहोर प्रांत उध्वस्त करून टाकिला व खुश्रू मलिकला फसवून कैद करून ( सन ११८५-८६ ) त्याला फिरोजकोह येथें पाठवून दिलें. कांहीं दिवसांनीं गजनीच्या या सुलतानाचा तेथें शिरच्छेद करण्यांत आला.

महंमद घोरीनें आपल्या सर्व मुसुलमान प्रतिस्पर्ध्यांचा बंदोबस्त केल्यावर हिंदू लोकांकडे त्यानें आपली दृष्टि वळविली. त्यानें हिंदु लोकांस आपल्या फौजेंतून काढून टाकन मुख्यतः अफगाण व तुर्क यांचा भरणा केला. यावेळीं पृथ्वीराज चव्हाण हा बलाढ्य राजा हिंदुस्थानांत राज्य करीत होता. अजमीर व दिल्ली हीं दोन्हीं राज्यें पृथ्वीराजाकडे होतीं. परंतु कनोजचा राजा जयचंद राठोड व पृथ्वीराज यांमध्यें वैमनस्य असल्यामुळें जयचंदानें पृथ्वीराजाचा नाश करण्याकरितां महंमद घोरीला हिंदुस्थानांत बोलाविलें. महंमद घोरी हिंदुस्थानांत येण्याच्या तयारींतच होता; जयचंदाचें हें निमंत्रण त्याच्या पथ्यावरच पडलें. इ. स. ११९१ त महंमद घोरी व पृथ्वीराज यांची गांठ पडून पानपतजवळ नारायणगांव येथें लढाई झाली. तींत महंमद घोरीचा पूर्ण पराभव होऊन तो कैद झाला. परंतु आठ हजार घोड्यांची खंडणी दिल्यावर त्यास पृथ्वीराजानें उदारपणें सोडून दिलें. या पराभवामुळें महंमद घोरीला तळमळ लागून राहिली. पृथ्वीराजाचा सूड उगविण्याचे विचार त्याच्या मनांत सतत घोळूं लागले. दुसऱ्या वर्षी त्यानें १२०००० सैन्य जमविलें. या सैन्यांत अफगाण, तुर्क व इराणी लोक होते. जयचंद राठोड वगैरे लोकाशीं त्यानें फितूर करून ठेविला होताच. इकडे पृथ्वीराजाच्या मदतीसहि बरेच रजपूत जमा झाले होते. दोन्ही सैन्यांची गांठ स्थानेश्वर येथें पडून प्रथमतः रजपुतांची सरशी झाली. परंतु ते बेसावध राहिल्यामुळें महंमदानें त्यांच्यावर एकदम हल्ला करून रजपूत सैन्याची दाणादाण केली. पृथ्वीराज हा घोरीच्या हातांत सांपडल्यावर त्यानें त्याला ठार मारिलें. मुसुलमानांस मागें हटविण्याची यावेळीं रजपुतांनीं शिकस्त केली; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

त्यानंतर महंमदानें अजमीर, हंसी वगैरे शहरें घेऊन तेथील लोकांची कत्तल केली. हिंदूंचीं देवळें फोडून त्या जागीं मशीदि बांधिल्या आणि राजवंशापैकीं एका मुलास आपला मांडलिक म्हणून अजमीरच्या गादीवर बसविलें व ऐबक नांवाच्या आपल्या एका गुलामास सुभेदार नेमून महंमद गझनीस परत गेला. याच कुत्-बुद्दीन ऐबकनें आपल्या धन्याच्या मृत्यूनंतर दिल्ली येथें आपलें राज्य स्थापलें ( गुलाम घराणें पहा. ).

कांहीं दिवसांनीं महंमद घोरीनें कनोजच्या जयचंद राठोडाचा पाडाव करून तें शहर लुटलें. याप्रमाणें जयचंदास त्याच्या देशद्रोहाचें फळहि मिळालें. ऐबकनें ग्वाल्हेर, काल्पी, कलिंजर वगैरे शहरें घेतलीं. महंमदानें काशी लुटून बहार प्रांतावरहि स्वारी केली व अनेक देवळें फोडलीं. बखत्यार खिलजी नामक एका सरदारानें बंगाल, बहार व अयोध्या हे प्रांत जिंकून बंगालची राजधानी गौड (लखनौती) हें शहर हस्तगत केलें. तिकडे खिवाच्या शहाशीं महंमदाचा तंटा होऊन त्या दोघांमध्यें लढाई जुंपून त्यांत महंमदाचा पराभव झाला; व मोठी खंडणी देऊन त्यानें आपली सुटका करून घेतली. पंजाबच्या आसमंतांतील गक्कर लोकांनीं पुंडाई सुरू केल्यामुळें महंमदानें त्यांचा बंदोबस्त केला. परंतु कांहीं दिवसांनीं सिंधुकांठच्या रोहटक गांवीं याच गक्कर लोकांनीं महंमद बेसावधपणें राहिला असतां त्याचा खून केला (१२०६). महंमदाच्या

कारकीर्दीत पंजाबपासून बाबिलोनपर्यंत व आक्सस नदीपासून आर्मेन्न सामुद्रधुनीपर्यंत त्याचें राज्य पसरलें होतें असें म्हणतात.

महंमद हा शूर होता, परंतु त्याच्या अंगीं विशेष चातुर्य असल्याचें दिसून आलें नाहीं. तो स्वतः विद्वान नसल्यामुळें विद्वान लोकांस त्यानें आश्रयहि दिला नाहीं. त्याचा बहुतेक काळ लढायांत गेला. त्यानें हिंदुस्थानांत मुसुलमानी राज्याचा पाया घातला. त्याला मूलबाळ नसल्यामुळें त्याचें हिंदुस्थानांतील राज्य त्याचा हुशार गुलाम ऐबक याजकडे आलें त्याचा पुतण्या महंमद यास गझनीचें राज्य मिळालें, परंतु त्याच्या मरणानंतर तें राज्य खारिजम्च्या( खिवाच्या )शहांनीं घेतलें. अशा रीतीनें घोरी घराण्याचा शेवट हिंदुस्थानांत १२०६त व गझनीस १२१५ त झाला. [ लेनपूल; सरदेसाई-मुसुलमानी रियासत. एन्सायक्लो. ब्रिटा. पु. ११; इंपे. गॅझे. पु. १२ ].

**घोशी**—संयुक्तप्रांत. अजमगड जिल्ह्यांतला एक तालुका. क्षेत्रफळ ३६७ चौ. मै. हा तालुका १९०४ मध्यें बनविण्यांत आला. लोकसंख्या ( १९११ ) २४५२६५. शहरें दोन दोहरीघाट व कोपागंज, व खेडीं ७३६ आहेत.सारा२७२००० रु. व कर ४६०००. हा छोटी शरयु व टोन या नद्यांच्यामध्यें असल्यानें पुरामुळें वगैरे नुकसान होण्याचा संभव असतो.

**घोसाळें**—या वेलास लॅटिन नांव लफ्फा इजिप्टिआका मराठी शिराळें-पारोसे इत्यादि नांवें आहेत. या वेलाचीं फुलें पिवळीं असतात. फळें आंखूड ( ६ ते ९ इंच ) अगर लांब ( १२ ते १८ इंच ) व घडदार ( एकाच देंठास ४।६ फळें ३।४ इंच लांब ) असतात. याचीं आळीं मृगाच्या सुमारास घालतात. वेल कुंपणावर, झाडावर, माडवावर अगर छपरावर चढवितात. वेल सर्व पावसाळाभर वाढतात. हिवाळ्यांत फळें यावयास लागतात. पाणी घातल्यास उन्हाळ्यांत वैशाखापर्यंतहि फळें येतात. फळांची भाजी, भजीं व भरीत करितात. भजीं फार उत्तम होतात. वाळलेल्या फळांचा सांगाडा खाजविण्याकरितां अगर लांकडांस पॉलिश करण्यास उपयोगी पडतो. तो फार चिवट असतो. बीं पांढरें, करडें अगर काळें असतें.परंतु तें दोडक्याच्या बींसारखें खडबडीत नसतें. घोसाळीं बाजारांत दोडक्यापेक्षां महाग विकतात.

शि रा ळे क डू वंस्तुक्षेत्र.—हा वेल हिंदुस्थानांत सर्वत्र व विशेषतः पश्चिम बाजूस सांपडतो.

उ प यो ग—या वेलीच्या फळांचा एतद्देशीय औषधींत उपयोग करतात. भाजलेल्या फळांचा रस काढून तो कानशिलास लावला असतां डोकें दुखण्याचें थांबतें असें म्हणतात.

ए ल ए जि प्टि आ का.—लफ्फा वर्गांतील तिसरी जात. हिचीं नांवें घीआ-तरई, धुंडुल, भोल, लीआसद दिलपसंत घोसाळी इ.

**घोसी**—ही हिंदु-मुसलमान गवळ्यांची एक जात आहे. एकंदर लो. सं. सुमारें ५० हजार. पैकीं ४० हजार मुसुलमान आहेत. त्यांच्यांतील बहुतेक लोक मूळचे अहिर पण इस्लाम धर्मांत गेलेले असेच आहेत.एका गुजर कुलापासून त्यांचा विस्तार झालेला असून लिलार, चोपार व गद्दिगुजर अशा त्यांच्या तीन पोटजाती आहेत. अयोध्येच्या उत्तरेस प्रधान, गद्दि व लाला अशा घोसी लोकांच्या तीन पोटजाती आहेत. खानेसुमारीवरून पहातां एकंदर १११ विभाग या जातींत असलेले आढळतात. लखनौचे घोसी दुभत्या गाई पाळून दूध विकून खवा करण्याचा धंदा करतात. घोसी मुसलमानी धर्माचे असूनहि कांहीं हिंदु चाली त्यांच्यांत आहेत. धर्मांतर केलेला दयाराम गुजर हा त्याचा मुळ पुरुष होय. हे घोसी सुनी पंथाचे आहेत.कांहीं घोसी गोमांस खात नाहींत. पंचपीर, इमामसाहेब, गोरख व भैरव इ. त्यांच्या देवता आहेत. मध्यप्रांतांतहि यांची थोडी वस्ती असून हवेलिया व बिरछेया असे त्यांचे दोन वर्ग आहेत.

**घोळ**—हिच्या मोठी घोळ व चिलघोळ अशा दोन जाती आहेत. हिची महाराष्ट्रांत मुद्दाम लागण करीत नाहींत. उत्तर हिंदुस्थानांत करतात. तिकडे तिला 'कुलफा' असें नांव आहे. हिची भाजी करतात.

घोळीच्या दोन जाती आहेत. एक लहान किंवा रानघोळ व दुसरी मोठी किंवा राजघोळ. रानघोळीचीं पानें रंगानें फार तांबूस व राजघोळीपेक्षां लहान परंतु चरबट अशीं असतात. राजघोळीचीं पानें व झाडें जरा मोठीं असून किंचित कोमल असतात. घोळीची भाजी थंड असून अमांशादि उपद्रव उत्पन्न करणारी आहे.

# ङ



**ङ**—या वर्णाला आजचें स्वरूप प्राप्त होण्यास तीन अवस्थांतून जावें लागलें. बुद्धगया येथील स्तंभावर



पहिल्या अवस्थेंतील ङ दिसतो. यांतील ङ चौकोनी कंसासारखा आहे. राजा यशोधर्माच्या वेळच्या मंदसोर लेखांत ( इ. स. ५३२ ) 'ङ्शो' या जोडाक्षरांत दुसऱ्या अवस्थेंतील ङ आहे. ड वर्णासारखी दिसणारी तिसरी अवस्था उदयादित्याच्या वेळच्या ( ११ वें शतक ) उज्जनीच्या लेखांत पहावयास सांपडेल.

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

## च



**च, अर्थ.**—हें अव्यय शब्दाला जोडल्यानें खुद्द, तो, (ती, ते) च, खरोखर याप्रमाणें अर्थ निघतात; उदा॰



तो चोरच आहे; तोच चोर आहे. आग्रह करावयाचा किंवा म्हणण्याला जोर द्यावयाचा असला तर क्रियापदापुढें च लावितात; जसें तुम्ही याच. याशिवाय संस्कृत वाक्यांत आणि, व या अर्थी व पादपूरणार्थी च योजितात.

अ क्ष र वि का स.—या वर्णाच्या तीन विकासावस्था आहेत. पहिली अशोकाच्या गिरनार लेखांत, दुसरी, इ. स. पहिल्या दुसऱ्या शतकातल्या मथुरेच्या लेखांत व तिसरी ११ व्या शतकांतल्या उज्जनीच्या लेखांत दिसून येते. हा च व आजचा च यामध्येंहि फारसं अंतर आहे.

**चउमू**—राजपुतान्याच्या जयपूर संस्थानाच्या चउमू जहागिरींतील मुख्य ठिकाण आहे. येथील लोकसंख्या सन १९११ त ६४९७ होती. याच्या सभोंवार मातीची भींत व खंदक आहे. या शहरात ठाकूर रहातो.हा खंडणी देत नाहीं. परंतु ५० घोडेस्वारांची मदत देतो. यांत एक दवाखाना व ७-८ शाळा आहेत.

**चकमा**—चितागांग पहाडी प्रदेशाच्या तीन विभागांतील एक विभाग. क्षेत्रफळ २४२१ चौ. मैल. लोकसंख्या (१९११) ७७१५५. चकमा जातीचे लोक येथें रहातात. त्या विभागावरील अधिकार चकमा राजाच्या हातीं आहे. एकंदरींत ९४ खेडीं आहेत त्यांपैकीं रंगमती येथें मुख्य संस्थानिकाची रहाण्याची जागा आहे.

**चकला रोषनाबाद**—हिलटिपऱ्याच्या राजाच्या ताब्यांत असलेला ५७० चौ. मैलांचा प्रदेश. येथें कायमधाऱ्याची पद्धत चालू आहे. हा भाग बंगाल्यांतील टिपरा आणि नौखाली व आसामांतील सिल्हट जिल्ह्यांत वसलेला आहे. जमीनमहसुलापासून व इतर किरकोळ करांपासून होणारें उत्पन्न ८ लाख रुपये आहे.

**चकवाल, त ह सी ल**—पंजाबांत झेलम जिल्ह्यांत वायव्येकडील तहशील. याचें क्षेत्रफळ ९९९ चौ. मैल असून उ. अ. ३२°४५′ ते ३३°१३′ व पू. रे. ७२°३२′ ते ७३°१३ मध्यें आहे. १९११ मध्यें लोकसंख्या १७५२३६ होती. यांत चकवाल मुख्य ठाणें व २५१ खेडीं आहेत. १९०३ मध्यें जमीनसारा व कर ३. ३ लाख होता.

श ह र–चकवाल तहशिलीचें मुख्य ठाणें. झेलम शहराच्या बरोबर पश्चिमेस ५५ मैलांवर लुणीपट्टी मैदानांत उ. अ. ३२°५६′ व पू. रे. ७२°५′ त आहे. १९११ मध्यें लोकसंख्या ६४००. मेद्यापासून चकवालपर्यंत लहान आगगाडी सुरू करण्याचा विचार आहे. येथें एक अँग्लोव्हरन्याकुलर शाळा व सरकारी दवाखाना आहे.

**चकिया.**—संयुक्त प्रांतांतील मिर्झापूर जिल्ह्यांतील एक तहसील. बनारस इस्टेटीचा हा एक भाग आहे. लोकसंख्या (१९११) ७०३८३. उत्तरेचा भाग सुपीक आहे. तेथें तांदूळ पिकतो. डोंगरसपाटीवरील भाग जंगलांनीं व्याप्त आहे. त्यांतील पुष्कळसा भाग शिकारीसाठीं राखून ठेवला आहे. क्षेत्रफळ ४७४ चौ. मैल. १६० चौ. मै. जमीन लागवडीखालीं आणली आहे. ही तहसील स्वतंत्र जमीनदारी आहे व हींतून सरकारांत महसूल जात नाहीं.

**चक्कियर**—मद्रासेंतील अंबलवासीचा एक वर्ग. हा व्यभिचारी नंबुद्रि बायकांपासून झालेल्या लोकांचा बनलेला आहे. नंबुद्रि बायका व्यभिचार करू लागल्यानंतर त्यांच्या दोषाविष्करणापूर्वी व त्यांना जातींतून काढून देण्यापूर्वीची यांची उत्पति आहे. अशा उत्पन्न झालेल्या मुलांपैकीं ज्यांचें मौंजी बंधन दोषाविष्करणापूर्वी झालेलें असतें त्यांस चक्कियर असें म्हणतात; आणि ज्यांचें झालेलें नसतें त्यांस चक्कियर नंबियर असें म्हणतात. मुली या दोन जातींपैकीं कोणत्याहि जातींत जाऊं शकतात. यांच्या बायकांना इलोदम्मा असें म्हणतात; आणि चाक्कियर नंबियरच्या बायकांना नंगियर असें म्हणतात. यांचा परंपरागत धंदा म्हटला म्हणजे चालू गोष्टींना किंवा श्रोते मंडळींना उद्देशून केलेल्या उल्लेखासहित पुराणांची टीका व पुराणें तोंडपाठ म्हणणें हा होय. म्हणतांना तें मिझवू म्हणून धातूचें नगारें वाजवितात. नंबियर ज्ञांजेची सांथ करितात. कधीं कधीं नंबियर एक प्रकारचा कुतु लोकांचा खेळ (मूक नाट्य) करून दाखवितात. चक्कियर हे यज्ञोपवीत धारण करितात परंतु नंबियर हे करीत नाहींत. चक्कीयर हे नंबियर बायकांशीं विवाह करूं शकतात. परंतु नंबियर हे इलोदम्मांशीं लग्न करूं शकत नाहींत. त्यांचा सुतकाचा व वृद्धीचा काल ११ दिवस असतो [ से. रि. (कोचीन) १९११ ].

**चक्कीनोआरो**—मुंबई इलाख्यांत पंचमहाल जिल्ह्यांत कलोलतालुक्यामध्यें कराड नदीवर एक यात्रेचें ठिकाण आहे. येथें काशीचा राजा सुलोचन यानें पापक्षालनार्थ यज्ञ केल्याबद्दल दंतकथा प्रचलित आहे.

**चक्रपाणि**—इ. स. १०७५ आणि ११०० यांच्या दरम्यान चक्रपाणि नांवाचा कवि उदयास आला. गंगाधर कवीच्या शके १०५९ ( स. ११३७ ) सालच्या शिलालेखांत त्याचा उल्लेख आला आहे, व श्रीधरदासाच्या सदुक्तिकर्णामृत ( इ. स. १२०५ ) नांवाच्या पुस्तकांत, ज्या चक्रपाणिच्या कविता आल्या आहेत, तो हाच चक्रपाणी असावा असें दिसतें.

**चक्रवर्ती**—हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ जगाचा राज्यकर्ता ( सम्राट् ) असा आहे. या शब्दाला प्राचीन संस्कृत वाङ्मयांत महत्त्व असून बौद्ध व जैन वाङ्मयांतहि हा शब्द बराच आढळतो. "चक्र" म्हणजे चाक किंवा वर्तुल आणि "वर्तिन्" म्हणजे राहणारा असा याचा व्युत्पत्यर्थ आहे. सार्वभौम म्हणजे सर्व पृथ्वीचा राजा असणें ही कल्पना फार प्राचीन काळापासून हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांत प्रबल असलेली आढळते. राज्याभिषेक होतांच आठहि दिशांतील राजे पराभूत करून नंतर अश्वमेध यज्ञ करण्याची महत्त्वाकांक्षा व परिपाठ सर्व पराक्रमी राजांनीं पाळलेला आढळतो. ही सार्वदिग्विजयाची परंपरा चालू ठेवण्याची कल्पना मुसुलमानी अमदानींतहि इ. स. १४ व्या शतकापर्यंत कित्येक रजपूत राजांमध्यें दृष्टीस पडते. अशा राजांस "सम्राट्" हा शब्द योजिलेला आहे.

चक्रवर्ती हा शब्द मैत्रायणी उपनिषदांत ( १.४ ) महाधनुर्धरांची यादी देऊन "त्यांतील कांहीं चक्रवर्ती होते" असें म्हटलें आहे; व तेथें हरिश्चंद्र, अंबरीष, ययाति, भरत वगैरेंचा उल्लेख आहे. महाकाव्यांपैकीं रामायणांत हा शब्द योजिलेला नाहीं; आणि महाभारतांतहि मुख्य कथेंतलि कोणाहि राजास हें पद लाविलेलें नाहीं. मात्र महाभारतांतील उपकथांत भरत, मांधातृ, मरुत वगैरे राजांना उद्देशून हा शब्द योजलेला आढळतो. पौराणिक वाङ्मयांपैकीं विष्णुपुराण ( १.१३,४६ ), भागवतपुराण ( ४.१५,१६ ) वगैरेंमध्यें चक्रवर्ती राजांबद्दल उल्लेख असून मार्कंडेय पुराणांत अशा राजांचीं चिन्हें जीं चौदा महारत्नें त्यांची यादी पुढीलप्रमाणें दिली आहेः— हत्ती, अश्व, रथ, पत्नी, बाण, कोष, माला, वस्त्र, वृक्ष, रत्न, छत्र, विमान इत्यादि.

बौद्ध व जैन धर्मांत बुद्ध व जिन हे जसे अध्यात्मिक सामर्थ्याचे तसा चक्रवर्ती हा भौतिक सामर्थ्याचा प्रतिनिधि मानला जातो. गौतम हा बुद्ध बनला नसता तर चक्रवर्ती झाला असता असें मानितात; कारण बुद्धाच्या ठायीं चक्रवर्तीप्रमाणें महापुरुषाचीं बत्तीस लक्षणें होतीं. जैन लोक भरत, सगर, मघवन्, सनत्ककुमार, शांति, कुंथु, अर, सुभुम, पद्म, हरिसेन जय व ब्रह्मदत्त असे बारा चक्रवर्ती मानतात.

**चक्रात**, त ह शी ल-संयुक्त प्रांत. डेराडून जिल्ह्यांतील उत्तरेकडील तहशील. ही जौनसार-बवार या नांवानें विशेष प्रसिद्ध आहे. उ. अ. ३०°३१' ते ३१°२' व पू. रे. ७७° ४२' ते ७८°५' मध्यें आहे. उत्तरेकडील भागांत पर्वत पुष्कळ आहेत. हा सर्व प्रदेश इतका डोंगराळ आहे कीं, याचें क्षेत्रफळ ४४६ चौ. मैल आहे. तरी एकहि सपाटीचा भाग १०० यार्डांच्यावर नाहीं व फक्त ३१ चौरस मैल जमीनच शेतीस लावितात. १९११ मध्यें लोकसंख्या ५४८१२ होती. यांत चक्रात कॅन्टोनमेंट व कालसी हीं दोन शहरें आहेत. यांत ३९ वसुली भाग पाडले आहेत. १९०३-४ मध्यें जमीनसारा १३४०० रु. व कर ३८०० रु. याप्रमाणें उत्पन्न झालें. लोकवस्ती दाट नसून प्रत्येक चौ. मैलास १०७ इतकी पडते. चक्रात येथें पाऊस सरासरी ८० इंच असतो. जंगलें पुष्कळ असून देवदार व ताडाचीं झाडें पुष्कळ आहेत. अफूची लागवड थोडी होते.

श ह र.—कॅन्टोनमेंट व तहशिलीचें मुख्य ठाणें. उ. अ ३०°४२' व पू. रे. ७७°५२'. कालसीपासून ४५ मैलांवर व मसुरीच्या पश्चिमेस४० मैलांवर टेंकडयांवर समुद्रसपाटीपासून ६८८५ फूट उंचीवर आहे. १९०१ मध्यें लोकसंख्या १२५० होती. येथें एक इंग्रज पायदळांची तुकडी आहे.

**चक्राप्पा**—एक तेलगू कवि. नेलोर जिल्ह्यांत मानारपोलर नर्जाक तेटु गांवीं हा राहात असे. कलहस्ति येथील जमीनदार बंगारु याचम्मा नायडू याचा हा समकालीन होता. वय १६ वर्षांचें असतांच हा कविता करूं लागला. एकदां हा आपल्या गांवाहून दुसऱ्या एका खेड्यास चालला असतां बंगारूची व याची अकस्मात् गांठ पडली व त्यानें यास ओळखून तेथेंच कित्येक प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें यानें कवितानिबद्ध इतकीं सुंदर दिलीं कीं, तीं ऐकून तो जमीनदार फार संतुष्ट झाला. नंतर त्यानें यास सांगितलें कीं आपण कृपा करून माझ्या दरबारीं यावें व रामचंद्राच्या स्तुतिपर १०० स्तोत्रें करावीं. त्याप्रमाणें कांहीं दिवसांनीं हा त्याच्या दरबारीं गेला व जमीनदाराच्या इच्छेप्रमाणें यानें १०० स्तोत्रें करून दिलीं. तीं पाहून जमीनदार खूप होऊन काय पाहिजे तें मागा असें यास बोलला. यानें ८० शेर जोंधळे मागितले. परंतु जमीनदार सज्जन असल्यामुळें, त्यानें यास कांहीं इनाम वर्षासनादाखल करून देऊन यास याच्या गांवीं पोंचविलें. यानें बरेच लोकोपयोगी ग्रंथ लिहिले आहेत. हा वयाच्या ६० व्या वर्षी मरण पावला. हा मोठा रामभक्त असे [ अ. कोश; परशा-तेलगू वाङ्मय ].

**चंगनचेरी**—मद्रास इलाख्याच्या त्रावणकोर संस्थानांतील चंगनाचेरी तालुक्याचें हें मुख्य ठिकाण आहे. येथील लोकसंख्या सन १९११ त १७२४२ होती. येथें आठवड्यांतून दोनदां मोठा बाजार भरतो व त्यांत तांदूळ, मिरीं, सुंठ, सुपारी व कापडाचा व्यापार होतो. हें राम अय्यन दलव नांवाच्या त्रावणकोरच्या महाराजा ( मार्तंडवर्मा ) यांच्या प्रधानानें सन १७५० त जिंकून त्रावणकोरच्या राज्यास जोडिलें.

**चंगर**—पंजाबांतील एक जात. लो. सं. ( १९११ ) ४०४०७. हे मुख्यत्वें मुसुलमान आहेत. चंगर ही जात

मूळची रानटी असून पुष्कळ दिवसांपूर्वी मुलतानच्या शामा ताब्रेझनें तिला मुसुलमान करून घेतलें असें सांगतात ही एक जिप्सी जात आहे असें यांच्या भटक्या संवयीवरून वाटतें. चंगर लोक कामाकरितां गांवोगांव भटकतात ते वाटेल तें काम करितात. परंतु विशेषतः पीक कापणें, टोपल्या बनविणें, गाड्या हांकणें हीं यांचीं कामें होत. काश्मीरांतहि थोडे चंगर आहेत [ से. रि. ( पंजाब ) १९११ ].

**चच, चचनामा**—चच हा सिंध देशचा ब्राह्मण राजा. याच्या वंशाचा इतिहास ज्या बखरींत लिहिला आहे तो चचनामा होय. अरबांनीं आठव्या शतकांत सिंध जिंकला त्या वेळचीहि माहिती चचनाम्यांत आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, इ. स. ६३२ या वर्षी सिंधवर अरबांनीं पहिली स्वारी केली; त्यावेळीं चच हा ब्राह्मण राजा असून त्याला त्या वेळेस राज्यावर येऊन ३५ वर्षे झालीं होतीं. म्हणजे त्याचें राज्यारोहण इ. स. ५९७ या वर्षी झालें. यानें एकंदर चाळीस वर्षे राज्य केल्यावर मग त्याचा भाऊ चंद्र हा गादीवर बसला ( ६३७ ). चचनाम्यांतील बरीच वर्णनें काल्पनिक व ऐकीव असल्यानें ऐतिहासिक दृष्ट्या त्याचें महत्व फारसें नाहीं. चच हा शूर होता. त्यानें उत्तर, पश्चिम व दक्षिण या दिशास आपलें राज्य वाढविलें, व मुलतान आणि पर्वत हे प्रांत जिंकून काश्मीर देशास आपली सरहद्द भिडविली. या चचाचा मुलगा प्रख्यात दाहीर होय. यालाच महंमद कासीमनें पुढें (७१२) जिंकलें. चचानें सिंधुराज साहसीचें राज्य बळकावलें होतें. हा मूळचा साहसीरायाचा प्रधान होता. साहसी मेल्यानंतर यानें त्याचें राज्य व राणी दोन्हीं हस्तगत केलीं. यानें इस्कंदिया व बाबिया हीं मुसुलमानी संस्थानेंहि जिंकलीं. सिविस्तानच्या व ब्राह्मणाबादच्या ( अघम लुहाणा ) राजांनां मांडलिक बनवून ( लुहाणा लढाईंत ठार झाल्यानें ) लुहाणाच्या राणीशींच लग्न लावलें. लुहाणा हा बौद्धधर्मी होता. चच पक्का हिंदूधर्मी होता; त्यामुळें त्यानें ब्राह्मणाबाद राज्यांतील बौद्धधर्मीय लोकांचा सामाजिक दर्जा कमी होईल असे करडे हुकूम सोडले होते. [मध्ययुगीन भारत; चचनामा].

**चचान**—मुंबई. काठेवाड. भोयका ठाण्यांतील फक्त एक खेड्याचें संस्थान. मालक झाला रजपूत असून लिमडीचे भायाद आहेत.

**चटया**—जमीनीवर अंथरण्याकरितां, लांकडी सामान झांकण्याकरितां, पडदे करून टांगण्याकरितां व इतर कित्येक कामांकरितां चटयांचा उपयोग केला जातो. विलायतेंत नारळीच्या झाडांच्या तंतूपासून अनेक खरबरीत गालिचे तयार करण्यांत येतात. दारांत अंथरण्याच्या चटया बनविण्याकरितां वेत, निरनिराळें गवत व नारळीच्या झावळ्या इत्यादिकांच्या तंतूंचा उपयोग करण्यांत येतो. चटया एक किंवा अनेक रंगांच्या व आकाराच्या असतात. त्यांवर नांवेंहि लिहितात. दारांत टाकण्याच्या व जमिनीवर अंथरण्याच्या चटया तयार करण्याच्या कामीं वेध पाडलेलें रबर व तारेनें विणलेलें सामान यांचाहि उपयोग करण्यांत येतो. विविध प्रकारच्या गवतांपासून रंगीबेरंगी व तऱ्हेतऱ्हेच्या चटया करण्याचा धंदा हिंदुस्थान, जपान वगैरे पौरस्त्य देशांत अस्तित्वांत आहे. अनेक ओबडधोबड चटया करण्याचे कारखाने रशियांत आहेत. व्हायाटका, निझनीनोव्हगोराड, कॉस्ट्रोमा, काझन, पर्म व सिम्बस्क या ठिकाणीं रशियाप्रमाणें चटयांचे कारखाने आहेत.

हिंदुस्थानांत चटयांचा धंदा फार मोठ्या प्रमाणांत चालतो व त्यांची निर्गतहि फार होते. अनेक वस्तूंच्या चटया बनवितात. त्यांची सविस्तर माहिती पुढें दिली आहे.

चटया दोन प्रकारच्या असतात. मागावर विणलेल्या किंवा हातानें गुंफलेल्या. विणलेल्या चटयांविषयीं माहिती गालीचे, सतरंज्या आणि घोंगड्या या विणकापडाच्या माहितींत जाईल. पुढील स्थळीं होणाऱ्या हातानें गुंफलेल्या गवताच्या चटया फार प्रख्यात आहेतः—

( १ ) तिन्नेवेल्लीच्या मलबार किनाऱ्यावरील पालघाट आणि दक्षिण हिंदुस्थानांतील गंजम. (२) बंगालमध्यें मेदापूर आणि कलकत्ता. (३ ) आसाममधील 'सीतलपति' चटया. ( ४ ) दक्षिणहिंदुस्थान आणि बंगालमधील काथ्याच्या चटया. (५ ) उत्तरहिंदुस्थानांतील अलाहाबाद, आग्रा आणि दिल्ली येथील 'मुंज' गवताच्या चटया. (६) शिंदीच्या व माडाच्या झावळयांच्या चटया; या पश्चिम व दक्षिणहिंदुस्थानांत वापरतात. यांनां शेलू चटया म्हणतात.

**चटयांतील कच्च्या मालाचे प्रकार.**—(१)घायपात. याच्या दोऱ्या, चटया आणि दोर करतात. ('घायपात' पहा).(२)निरनिराळया जातीचे बांबू; (३)वेत; (४) क्लिनोजिन डायकोटोमा याचीं सीतलपाति, मुक्तापात, मूर्त, थिन, गोडुनीक, भूद्रा इत्यादि नांवें आहेत. हें झुडूप बंगाल, आसाम, ब्रह्मदेश, मलाया द्वीपकल्प याठिकाणीं ओलसर जमीनींत होतें.

या झुडपाच्या दांड्यापासून किंवा देंठापासून सीतलपति किंवा थंड चटया तयार करितात. ह्या चटया अतिशय थंड असल्यामुळें यूरोपियन व एतद्देशीय लोक उन्हाळयांत त्यांचा उपयोग अंथरुणावर चादरीखालीं घालण्याकरितां करतात. लेडनहाल स्ट्रीटमधील ईस्ट इंडिया हौसच्या मुख्य सभागृहांत याच चटया पूर्वी अंथरीत होते असें म्हणतात व ही एक ऐतिहासिकदृष्ट्या येथें नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. चकाकी, गुळगुळितपणा व सुबकपणा यांवर चटयांची किंमत अवलंबून असते व अत्यंत गुळगुळित चटईवरून सापसुद्धां जाऊं शकत नाहीं असें म्हणतात. या चटयांची किंमत रु. २ पासून रु. १०० पर्यंत असते. या चटया विणण्याचें काम फरिदपूर, बकरगंज, टिप्पेरा, चित्तगांव, सिलहट, आसामांतील काचर, आणि ब्रह्मदेशांतील हेंझाडा, येथें बहुतकरून बायका करतात. पनामा तंतूंच्या ऐवजीं साहेबी टोप्या करण्याकरितां याचा उपयोग करतां येईल असें कांहीं लोकांचें मत आहे.

( ५ ) कोकोस नुसिफेरा किंवा काथ्या; ( ६ ) पंखे तयार करण्याचा ताड ( कोरिफा उम्ब्राकुलिफेरा ); ( ७ ) सणाचे तंतू किंवा दोर ( क्रोटलरिया जन्सिआ ): ( ८ ) लव्हाळा ( सायपेरस टेगेटम ); ( ९ ) कापुरकचरी, शेंदरी वगैरे (हेडिचिअम सिपकाटम);डोंगरी लोक याच्या पानांच्या चटया करतात. (१०)हिबिस्कस टिलिआसिअस: हें एक लहान झुडूप असून त्यापासून एक चांगल्या प्रकारचा तंतू निघतो. याच्यापासून चटया, दोर, आणि कागदहि होऊं शकेल. पंजाबमध्यें याच्या खाटा, गाड्यांचे कठडे वगैरे जिनसा तयार करतात. न्यू कालेडोनिआ आणि ताहिति येथें याच्यापासून मासे धरण्याची जाळी तयार करतात. ( ११ ) भाबरगवत ( इस्चेनम अंगुस्तिफोलिअम ); ( १२ ) जंकस एफुसस; हें लव्हाळें सिक्किम, हिमालय आणि खासिआ डोंगरांत होतें. ( १३ ) तराई प्रांतांतील बांबू ( मेलोकन्ना बांबू सॉइडेस ). ( १४ ) वझिरि चटया ( नन्नोरहोप्स रिट्चीना ); याला मझ्री, पथ, किलु, पिस इत्यादि नांवें आहेत. सिंध, पश्चिम पंजाब, कुरम खोरें, बलुचिस्तान आणि हरणईजवळील बराच भाग या ठिकाणीं याची उत्पत्ति होते. ( १५ ) गुल्गा, निप फ्रुटिकन्स; यास गोलफळ, गोलपत्ता, दानि इत्यादि नांवें आहेत. सुंदरबन, चित्तगांव, ब्रह्मदेश आणि अंदमान बेटें या ठिकाणीं हें होतें. ( १६ ) भाताचा पेंढा (राइस स्ट्रॉ) याच्या चटया व दोऱ्या करितात ( १७ ) केवडा ( पँडानस, पाइन)स्क्रु; हीं झाडें दक्षिण हिंदुस्थानच्या वालुकामय किनाऱ्यांवर ब्रह्मदेशांत व अंदमान बेटांत होतात. (१८ ) खजूर, शिंदी वगैरेंच्या झावळ्या ( फोनिक्स ); ( १९ ) प्रागमाइट्स किंवा वेत; हीं हिंदुस्थानाच्या उष्णकटिबंधांत, दलदलीच्या जागीं होतात. ( २० ) एक जातीचा बांबू ( स्यूडोस्टाच्युम); (२१) मुंज गवत; (२२) टायफा उर्फ हत्तिगवत, ( २३ ) वाळा (वेटिव्हेरिआ झिझानिओइडस) खस. याखेरीज रबर, लोखंडाच्या तारा, ताग, सण, जूट वगैरेंच्या दोऱ्या, नारळी, ताड, शिंदी यांच्या झावळ्या इत्यादिकांपासून चटया तयार होतात.

**गवती चटया, ( कलकत्ता ).**—लव्हाळ्याच्या कांड्यापासून चटया करितात. जाड्याभरड्या चटया करावयाच्या असल्यास लव्हाळ्याच्या पट्ट्या काढाव्या लागत नाहींत; परंतु सुबक चटया करावयाच्या असल्यास लव्हाळ्याच्या बारीक बारीक पट्ट्या काढाव्या लागतात. लव्हाळ्याच्या पट्ट्या काढून त्या वाळवितात. पट्ट्या काढण्याचें काम फार कठिण असतें. पट्ट्या काढून त्या वाळविण्याचें काम बायका करितात. पुरुषांचें काम चटया विणण्याचें असतें. " सुदर काटी " लव्हाळ्याचा चटया करण्याच्या कामीं उपयोग फार होतो. उत्तम चटया तिनेवेल्लीमध्यें होत असून त्या " गोल मेर्थी " लव्हाळ्याच्या करितात. कोचीन, पलामपेठ, पालघाट, बेलोर, इंद्रावती, शेवरी, ताळापियर, मिदनापूर येथील चटयाहि फार प्रसिद्ध आहेत.

**कारखाने.**—जाड्याभरड्या व सुबक या दोन्ही चटया करण्याची पद्धति सारखीच आहे. चटया करितांना १ किंवा १॥ इंचाच्या अंतरावर सुतळीचे संडे जमीनीवर टाकतात व दोन्ही टोकांनां एका बांबूला सारख्या अंतरावर बांधतात. नंतर एका लांकडी सुईंत लव्हाळ्याच्या बारीक पट्ट्या ओवून त्यांनीं सुतळीच्या एकदां वर व एकदां खालीं अशी वीण घेतात व वीण घट्ट यावी म्हणून ती कुंच्यानें दाबतात. अजून यंत्रानें चटया करण्याची कला हिंदुस्थानांत निघाली नाहीं.

मद्रास प्रांतांतील चटया बहुधा सुंदर व रंगीत असून त्यांत बरेंच कसब असतें. कलकत्याच्या चटया साध्या पण सुबक असतात. पश्चिम हिंदुस्थानांत चटया करण्याजोगीं गवतें पुष्कळ आहेत, परंतु त्या भागांतील लोक त्यांचा या कामीं उपयोग करीत नाहींत. चटयांचा व्यापार परदेशांशींहि चालतो. अलीकडे हा व्यापार फार वाढत चालला आहे. [ वॅट ]

**चड्डार**—मध्यप्रांतांतील विणकऱ्यांची एक लहान जात. सागर, दमोह, जबलपूर व नरसिंगपूर जिल्ह्यांत हे राहतात. यांची संख्या २८००० आहे. यांचें नांव ' चीरकार ' या संकृत शब्दापासून निघालें असावें. यांच्या दोन जाती आहेत.एक परमेसुरिया व दुसरी अथिया. पहिले विष्णूची पूजा करतात व दुसरे देवीची पूजा करतात.

यांचे असगोत्रविवाही वर्ग उर्फ बैंक आहेत. जसे धाना, कातिया, गोइया, बहालिया, गुजारिया, मोरिया, लहारिया, खटकारा, बरैया, नेओरा, भर्तुचरैया, इत्यादि; एकंदर ३९ आहेत व आपल्या वंशाच्या नांवाचा प्राणी किंवा झाड यास ते लग्नादिप्रसंगीं पूजितात व त्याची हत्या करीत नाहींत मुलींचीं लग्नें ५ व्या, ७ व्या, ९ व्या व ११ व्या वर्षी करतात व मुलांचीं लग्नें ८ व्या. व १६ व्या वर्षी करतात. जर अविवाहित मुलीला जातीच्याच माणसानें भ्रष्टविली तर तिचें लग्न विधवेप्रमाणें करतात; परंतु दुसऱ्या नीच जातीच्या माणसाबरोबर तिनें व्यभिचार केला तर तिला जातींतून बाहेर घालवितात. जर कोणाची बायको दुसऱ्याबरोबर पळाली तर त्यानें नवऱ्याचा लग्नखर्च भरून दिला पाहिजे. यांचा दर्जा फार नीच आहे. अंत्यजापेक्षां हे थोडेसे उच्च समजले जातात [ रसेल व हिरालाल ].

**चंडी**—उद्दालक ऋषीची विपरीत स्वभावाची स्त्री. त्यानें तिला कांहीं दिवस विपरीत आज्ञा देऊन आपल्या मनाप्रमाणें वागावयास लाविलें. पण एकदां श्राद्धप्रसंगीं तिनें सर्व यथासांग केल्यावर पिंड भागीरथींत टाकण्याऐवजीं अमंगल स्थलीं टाकल्यामुळें ती शापानें शिला झाली.ती पांडवांचा अश्वमेधीय अश्व आला त्या वेळीं अर्जुनाच्या स्पर्शानें पूर्वरूप पावली [ जै. अश्वमेध, अ. १६ ].

**चतुरमहाल**—ही अयोध्येच्या शेवटच्या नबाबाच्या बेगमांपैकीं एक बेगम होती. अयोध्येचें राज्य खालसा झाल्यानंतर कुरबान अली नांवाच्या ई. इं. कंपनीतील एका

शिरस्तेदारानें हिच्याशीं लग्न लावलें. त्यामुळें तो श्रीमंत झाला. प्रथम कुरबान अलीनें हिचा परिचय करून घेऊन नंतर लग्नाच्या कामीं तिची संमति मिळविली. तथापि कुरबान-सारख्याअगदीं हलक्या दर्जाच्या इसमाशीं खुद्द अयोध्या येथें उघडपणें लग्न लावण्याची तिला लाज वाटून तिनें मक्केच्या यात्रेस जाण्याच्या निमित्तानें अयोध्या सोडण्याची चीफ कमि-शनरकडून परवानगी मिळविली. नंतर ती लखनौपार झाल्या-वर कुरबान अली तिला जाऊन मिळाला व बुंदेलखंडांतील बिज-नौर शहरीं उभयतांनीं लग्न लाविलें. [ बील. ]

**चतुर साबाजी**—या पुरुषाबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. कांहीं बखरींत तो निजामशाहींत तर कांहींत आदिलशाहींत झाला असें म्हटलें आहे. तसेंच त्याच्या कालाबद्दलहि नक्की माहिती नाहीं. शहाजीच्या वेळीं हा झाला व शहाजी आणि मुरार जगदेव यांच्या विरुद्ध पक्षास हा होता. याला शहाजीची भरभराट पहावली नाहीं व तो त्यामुळें मोंगलास मिळाला वगैरे गोष्टी बखरींतून आढळ-तात. फक्त एक गोष्ट सर्वसामान्य आढळते, ती ही कीं, याचें नांव साबाजी अनंत असून आडनांव चतुर होतें. व यानें जमीनींची मोजणी करून उत्कृष्ट धारेबंदी अंमलांत आणिली. याची मोजणीची काठी सात हातांची होती. यानें ओसाड जमीनी कौल देऊन लागवडीस आणल्या, रयतेस तगाई, जनावरें दिलीं. याच्या चतुरपणाच्या अनेक गोष्टी ( बिरबलप्रमाणें ) प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रसारस्वतांत तर याला पेशवाईअखेरचा म्हटलें असून यानें रावणगर्वपरिहार वगैरे काव्यें केल्याचें लिहिलें आहे. [ शिवप्रताप; शिवदि-ग्विजय; मराठी रियासत; महाराष्ट्रसारस्वत ].

**चतुरसिंग**—हा साताराच्या धाकट्या शाहूमहाराजांचा भाऊ. इ. स. १७९८ सालीं शाहूपासून साताराचा किल्ला घेण्या-करितां रावबाजीनें पाठविलेलें परशुरामभाऊचें सैन्य अचानक आलें व त्यानें साताराचा किल्ला ताब्यांत घेतला. या सुमारास चतुरसिंगानें आपले थोडेसे लोक कसे तरी जमवून पाठलाग होत असतांहि तो कोल्हापूरच्या राजाकडे निसटून गेला.

त्या वेळीं चतुरसिंगाच्या मागें रास्त्यांची व प्रतिनिधींची फौज पाठलाग करण्याकरितां कोल्हापुरच्या राज्यांत आली होती. तिनें वारणा नदीच्या तीरावर आपला तळ दिला असतां चतुरसिंगाच्या लोकांपैकीं ५०० स्वारांनीं ही बातमी त्यांस दिली. तेव्हां त्यानें ह्या लोकांच्या व कोल्हापूरकरां-कडून मिळविलेल्या फौजेच्या मदतीनें रास्त्यांच्या लोकांवर हल्ला करून जवळजवळ त्यांचा पराभव केला. पुढें लवक-रच चतुरसिंगानें परशुरामभाऊंच्या फौजेवरहि अचानक छापा घालून तिची दाणादाण केली. भाऊ साताऱ्याहून गेल्यावर त्यांच्या मागें रास्त्यांची दोन तीन हजार फौज साताऱ्याजवळ तळ देऊन राहिली आहे असें चतुरसिंगास समजलें. तेव्हां त्यानें रानावनांतून आडवाटेनें ६०० प्यादे साताऱ्यानजीक आणले व तेथें तो अंधार पडेपर्यंत लपून राहिला. रात्र होतांच त्याचे प्यादे हातपाय, तोंड व कपडे हळदीनें पिवळे करून जिवावर उदार होऊन बाहेर पडले. रास्त्यांचे लोकहि बेसावध नव्हते; त्यांनीं एकदम तोफांचा मारा सुरू केला. परंतु चतुरसिंगाच्या लोकांनीं शत्रूवर त्वेषानें हल्ला चढविला, तोफा हस्तगत केल्या व रास्त्यांची फौज उधळून लावली. या त्याच्या धाडशी कृत्यांमुळें मराठे शिपायांत त्याचा चांगला नांवलौकिक होऊन थोडक्याच महिन्यांत त्याला बरेच अनुयायी मिळाले. पुढें त्यानें पैशावांचून व स्वतःजवळ कमी सैन्य असतांहि रास्त्यांच्या ७००० फौजेस नीरेपासून वारणेपावेतों इकडून तिकडे नाचविलें. या कामांत चतुरसिंगाचा अनेकदां पराभव झाला व एके प्रसंगीं तर त्याच्या पांचशे लोकांस रास्त्याच्या ५००० स्वारांनीं वेढा दिला असतां तो मोठ्या मुष्किलीनें शत्रूची फळी फोडून बाहेर पडला ह्या प्रयत्नांत त्याचे अर्धे अधिक लोक गारद झाले. तथापि त्यानें कित्येक गांवापासून अनेकवार कर वसूल केले व सर्वत्र धुमाकूळ व वंडाळी माजविली. त्याचें तें धाडस व संकटांतून स्वतःचा बचाव करण्याची त्याची शिताफी वाखाणण्यासारखी होती.

यशवंतराव होळकर दक्षिणेंत आला तेव्हां चतुरसिंग हा कांहीं काळपर्यंत त्यास सामील झाला होता. त्यावेळीं तो फत्तेसिंग माने याच्या तुकडीबरोबर पेशव्यांच्या मुलखास उपद्रव देत फिरत होता. पुढें यशवंतरावानें अमृतरावाच्या पुत्रास पेशवा करण्याचा घाट घातला, तेव्हां चतुरसिंगानें खटपट करून साताराच्या महाराजांकडून त्यास वस्त्रें देव-विलीं (१८०२). यानंतर चतुरसिंगानें हिंदुस्थानच्या निर-निराळ्या भागांत नोकरी केली. असई येथें जी लढाई झाली तींत तो इंग्रजांविरुद्ध मोठ्या शौर्यानें लढला (१८०३). पुढें त्यानें कांहीं दिवस होळकरांच्या सैन्यांत, कांहीं दिवस अमीरखानाच्या सैन्यांत व कांहीं दिवस रजपुतांच्या सैन्यांत नोकरी केली. १८१२ सालीं तो खानदेशांतून स्वदेशीं परत येत असतां, त्रिंबकजी डेंगळ्यानें त्यास आपल्या भेटीस बोलावून कैद केलें व त्याच्या पायांत बेड्या घालून त्याला कोंकणांत कांगोरीच्या किल्ल्यांत ठेविलें. चतुरसिंगाच्या लोकांनीं त्याला सोडविण्याकरितां अनेक प्रयत्न केले पण ते सर्व निष्फळ झाले. व सरतेशेवटीं चतुरसिंग हा १८१८ च्या एप्रिल महिन्यांत कांगोरीच्या किल्ल्यांतच मरण पावला. [ खरे–ऐ. ले. सं. पु. १०,११; डफ. पु. ३. ].

**चतुर्थ**—हे लोक मुख्यत्वें महाराष्ट्राच्या दक्षिण भागांत आढळतात. लोकसंख्या (१९११):८९२०८. हे दिगंबर पंथाचे जैन असून यांच्या चालीरीती जैनांप्रमाणेंच आहेत. यांचा परंपरागत धंदा शेतीचा आहे. मिरजनजीक नंदीमठाचा "जैन श्रीस्वामी" हा सर्व चतुर्थ लोकांचा गुरु असून व्यावहारिक व धार्मिक बाबींत याचा अधिकार श्रेष्ठ मान-तात. धारवाड जिल्ह्यांतील खेड्यांचे ४ वर्ग केले असून त्या प्रत्येकांवर "सरसंगमी" हा स्वामीचा प्रतिनिधी

नेमलेला असतो. सामाजिक प्रश्नांचे निकाल जातीच्या सभेंत सरसंगमी देतो. दारू पिणें व घोडे विकणें इत्यादि जातिनियमभंगाबद्दल दंड होतो व दंडाचा पैसा सरसंगम्याकडे जाऊन तो देवळें, मठ, व शिक्षण यांकडे खर्चिला जातो. बेळगांव जिल्ह्यांतील चतुर्थांमध्यें दंड न दिल्यास वस्तींत व जैन देवळांत जाण्याची बंदी होते व जातीबाहेरहि टाकण्यांत येतें. [ मुं. से. रि. १९११ ].

**चत्रा**—बिहार-ओरिसा.हजारीबाग जिल्ह्यांतलें एक शहर. यांत सन १९११ त ९२२२ लोकसंख्या होती. सन १८६९ त या शहरीं म्युनिसिपॉलिटी सुरु झाली. सन १९०३-०४ त याचें उत्पन्न ६००० रुपये व खर्च ५००० रुपये होता.

**चॅथॅम**—हें इंग्लंडांतलि केंटचें बंदर असून म्युनि. व पार्लमेंटरी बरोचा भाग आहे. मेडवे नदीच्या उजव्या तीरावर हें असून लंडनच्या आग्नेयीस साऊथईस्टर्न अँड चॅथॅम रेल्वेनें ३४ मैल आहे. १९२१ सालीं येथील लोकसंख्या ४२६६५ होती. येथें सेंटमेरी नांवाचें प्रार्थनामंदिर आहे. अर्चेंगलच्या उत्तरमार्गाचा शोधक स्टिफेनबरो याचा पुतळा येथें आहे. सेंट बार्थरलोमा मुख्य प्रार्थनामंदिर गंडुल्फ नांवाच्या राचेस्टरच्या बिशपनें १०७० सालीं स्थापिलें. सर जॉन हॉकिन्सनें १५९२ सालीं वृद्ध खलाशी व समुद्रावरील अनाथ लोकांकरितां सदावर्त ( आल्म हाऊस ) काढलें. जनरल गॉर्डन व हिंदुस्थानच्या खुष्कीमार्गाचा उत्तेजक थॉमस वार्धान यांचे पुतळे येथें आहेत. पिट्ट किल्ल्यांत लष्करी रुग्णालय आहे. खलाशी लोकांकरितां येथें निराळें रुग्णालय आहे.

येथें लष्करी शाळा आहेत. येथील गोदीचें क्षेत्रफळ ५१६ एकर आहे. पार्लमेंटरी विभागांतून १ सभासद पार्लमेंटांत जातो. राज्यकारभार १ मेयर, ६ शहरचे सनदी अधिकारी व १८ सभासद यांच्या हातांत असतो. शहरचें क्षेत्रफळ ४३५५ एकर आहे. शहराजवळच ल्युटन नांवाचें एक खेडें आहे.

डूम्सडे मोजणीच्या वेळीं चॅथॅम हें ओडो ह्याच्या ताब्यांत होतें. मध्ययुगांत परगणा म्हणून एलिझाबेथनें येथें शस्त्रागार व गोदी बांधली. हें इंग्लंडचें मुख्य लष्करी ठाणें होतें. १७५८ सालीं चॅथॅम टेंकडी खोदून काढल्यामुळें मानवअवशेष, मडकीं, व नाणीं वगैरे जिनसा सांपडल्या. १८३२ सालच्या रिफॉर्म (सुधारणा) बिलान्वयें हें पार्लमेंटरी विभाग झालें.

**चंदगड**—मुंबई इलाखा. बेळगांव जिल्हा. बेळगांवच्या पश्चिमेस २२ मैलांवर चंदगड पेठ्याचें हें मुख्य ठिकाण आहे. येथील खळनाथाच्या देवळांत एक फारसी लिपींत शिलालेख आहे. येथें एक पडकी मातीची गढी आहे. १७२४ सालीं सावंतवाडीचा प्रसिद्ध फोंड सावंताचा पुत्र नागसावंत यानें चंदगड पेटा लुटला होता. पुढें १७५० सालीं पेशव्यांचें व सदाशिवराव भाऊंचें भांडण झाल्यावरून सदाशिवराव भाऊंनीं कोल्हापूर सरकारच्या पेशवेपदाचा मान आपणांस मिळवून चंदगड, पारगड आणि काळानंदीगड व सालिना ५००० रुपये उत्पन्नाचा मुलुख आपणांस कोल्हापूर सरकाराकडून मिळविला होता.

**चंद घराणें**-कुमाऊन येथें तेराव्या शतकांत चंद घराण्यानें राज्य करण्यास सुरुवात केली असें तत्कालीन ताम्रपटादि लेखांवरून दिसतें. त्यांतील राजांचीं नांवें अढळतात तीं अशीं.—(१) इंद्रदेव ( वैजनाथ ताम्रपट -स. १२०२), ( २ ) शोहरचंद (१२६१), ( ३ ) नरचंद्र (१२९७),( ४ ) अभयपाल, यानें श्रीनगर येथें एक राजवाडा बांधला(१३५८), ( ५ ) ज्ञानचंद्र ( गरूर ताम्रपट, १३६७ ), ( ६ ) नरचंद्र (गंगनाऊ ताम्रपट, १३८५ ), ( ७ ) भरतचंद्र ( आसरगांव ताम्रपट, १३९७ ), ( ८ ) कल्याणचंद्र ( उडागांव ताम्रपट १४४०), (९) वरचंद्र (गंगनाऊ ताम्रपट, १४५५),(१०-११) हरिचंद्र व प्रतापचंद्र ( उडागांव ताम्रपट, १४६१), ( १२ ) सुतिरणमल्ल (१४६८), ( १३ ) भरतचंद्र (१४६९), ( १४ ) कीर्तिचंद्र ( पाऊ ताम्रपट, १५०० ), ( १५ ) विष्णुचंद्र ( चंपावत ताम्रपट, १५११ ). याप्रमाणें या घराण्यांतील पंधरा राजांचीं नांवें व त्यांचा काल सांपडतो. सारांश, हें चंद घराणें कुमाऊन येथें तीनशें वर्षें राज्य करीत होतें असें दिसतें. तीनशें वर्षांत पंधरा पिढ्या म्हणजे दर पिढी वीस वर्षांची येतें; त्यावरून ही वंशावळ बरोबर असावी व तींत खंड पडलेला नसावा असें वाटतें [ माबेल डफ ].

**चंदन**—या झाडास लॅटिनमध्यें सँटालम आलबम; इंग्रजींत सँडल; संस्कृतमध्यें चंदन, मल्यज, गंधसार; मराठींत चंदन; हिंदींत चंदल; गुजराथींत सुखड, इत्यादि नांवें आहेत.

**वस्तुक्षेत्र**—दक्षिण हिंदुस्थानच्या कोरड्या प्रदेशांत ( म्हैसूर, कुर्ग, दक्षिण मराठा, हैदराबाद, कर्नाटक, पश्चिमघाट, निलगिरी पर्वत, कोइंबतूर प्रांतीं ) हें झाड नैसर्गिक रीत्या उगवतें व उत्तर हिंदुस्थानांत याची मुख्यतः लागवड करतात. हें नेहमीं हिरवें असून गवत व इतर झाडें असलेल्या वनप्रदेशांत, बहुधा तांबड्या अथवा खडकाळ जमिनींत वाढतें. हें झाड पुष्कळ झाडांवर बांडगुळाप्रमाणें वाढतें व म्हणून ज्या जमिनींत दुसरीं झाडें नसतात तेथें याची लागवड करण्यास अडचण पडते. सुपीक जमिनीवर हें झाड चांगलें वाढतें, परंतु तेथील खोडांस चांगला वास येत नाहीं म्हणून बाजारांत तें हलक्या प्रतीचें ठरतें.

**इतिहास**—अगदीं प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत चंदनाची माहिती आहे. वैदिक ग्रंथांत, पुराणांत, व संस्कृत काव्यांत चंदनाचे उल्लेख पुष्कळ ठिकाणीं आढळतात. कालिदासाच्या ऋतुसंहारांत "मणिप्रकाराः सरसं च चंदनं शुचौ प्रिये यांति जनस्य सेव्यतां।" चंदनाचा असा मार्मिक रतीनें उल्लेख केला आहे. संस्कृत ग्रंथकारांनीं रंगावरून त्याच्या निरनिराळ्या जाती ठरविल्या आहेत.

चंदन हें या लांकडाच्या वर्गाचें सर्वसाधारण नांव आहे. श्रीखंड म्हणजे खरें (अथवा पांढरें), चंदन व पीत चंदन म्हणजे हलकें (अथवा पिवळें) चंदन. हे दोन्ही प्रकार स्टॅंटालम आलबम या नांवाखालीं येतात. तांबड्या अथवा रक्तचंदनाच्या दोन जाती आहेत. हिंदुस्थान व चीन देशांत येणाऱ्या प्राचीन अरबी व्यापाऱ्यांनां या निरनिराळ्या प्रकारच्या चंदनी लांकडांची माहिती होती.

तेराव्या शतकांत मार्कोपोलोनें रक्तचंदन व साधें चंदन यांचा उल्लेख केला आहे व गार्सियाडि ओर्टा म्हणतो कीं, पांढरें व पिवळें चंदनाचें झाड तिमोरमध्यें होतें; त्याला तिमोरमध्यें चंदन व अरब लोक सदल म्हणत व इतर प्रकारचें चंदनी झाड मलाया बेटांत, व व्हर्मेलहो नांवाचें एक विशिष्ट प्रकारचें तांबडें चंदनी झाड तेनासरीममध्यें उत्पन्न होतें.

लागवड.—चंदनवृक्ष इतर बऱ्याच झाडांवर बांडगुळाप्रमाणें वाढतो. या गोष्टीच्या काळजीपूर्वक अभ्यासानें लागवडीच्या पद्धतींतील अत्यावश्यक सुधारणांचा, व "स्पाईक" नांवाच्या विशिष्ट रोगाच्या स्पष्टीकरणाचा शोध लागण्याचा संभव आहे. श्रीयुत रामराव नांवाच्या गृहस्थानें बांडगुळत्वाचें उत्कृष्ट उदाहरणासह वर्णन करून चंदनवृक्ष ज्यांवर होतो अशा शंभर पोषक वृक्षांची यादी आपल्या लेखांत दिली आहे. [इंडि. फॉरे. २९ पृ. ३८६-९]

कृत्रिम रीतीनें चंदन वृक्षांच्या पुनर्लागवडीस झुडुपें वाढविल्यानें बरीच मदत होते व ही गोष्ट आग, व चराई टाळल्यानें साधते. झुडूप दोन तीन फूट उंच वाढल्यावर पक्ष्यांनीं टाकलेल्या बियांपासून नैसर्गिक रीतीनें चंदनवृक्ष पुन्हां उत्पन्न होतो, व शेव पाडण्यानें जास्त मदत होईल. रामराव म्हणतात कीं, रान काढणें (निंदण) घातुक आहे. झुडुपें दाट होतात तेव्हां फक्त खर्च करावी. दहा वर्षांत झाडाचा घेर सरासरी ८ इंच वाढतो. चाळीस वर्षे वयाच्या झाडाचा घेर जमीनीपासून ४॥ फूट अंतरावर कमींत कमी ३२ इंच असतो आणि या वेळीं हें झाड उपयोग करण्यास लायक होतें.

चंदनवृक्षाला होणारे रोग.—१८९२मध्यें चंदन वृक्षावर एकप्रकारचा रोग झाल्याचें आढळून आलें. याचें कारण एक प्रकारचा चार शिंगट पंखांचा किडा होता असें आढळून आलें. कुर्गमध्यें२०८००दूषित झाडें उपटून टाकण्यांत आलीं व इतर प्रांतांतहि असेंच करण्यांत आलें. परंतु यामुळें रोगप्रसाराचा प्रतिकार झाला नाहीं. मि. मॅक्कार्थीनेंच प्रथम या रोगाचा उल्लेख केला व याला 'स्पाइक' हें नांव दिलें. रोग झालेल्या फांद्या उभ्या राहिल्यासारख्या दिसतात व यांनां अरुंद, जाड, ताठ पानें येतात व ही रोग जसजसा बळावत जातो तसतशी अकुंचित होत जातात. एका खांदीपासून दुसऱ्या खांदीला रोग होतो, फुलें येत नाहींत व अखेरीस झाड मरतें. बटलर व बार्बर या दोघांनींहि दूषित वृक्षांची काळजीपूर्वक चिकित्सा केली परंतु त्यांनां किडा किंवा सूक्ष्म जीव कांहीं एक सांपडलें नाहीं. दूषित वृक्षांच्या मुळांची बुंध्यांपासून उपमुळांपर्यंत तपासणी करण्यांत आली, परंतु रसशोषक लहान मुळ्यां सांपडण्यापूर्वीच हीं मुळें मृत झाल्याचें आढळून आलें. हा रोग पीच-यलोप्रमाणें असतो असें बटलरनें सुचविलें, व कलम लावण्यानें हा रोग दुसऱ्या झाडांत उत्पन्न करतां येतो किंवा नाहीं हा प्रयोगहि त्यानें करून पाहिला. परंतु हें अशक्य असल्याचें आढळून आलें. अद्याप या रोगाचें समाधानकारक स्पष्टीकरण सापडलें नाहीं हें यावरून दिसून येईल, परंतु पोषक वृक्षांच्या अपुरेपणामुळें पुरेसें पोषक द्रव्य मिळत नसल्यामुळें हा रोग होतो असा बऱ्याच तज्ञांचा समज असल्याचें दिसतें.

चंदनी तेल व अत्तर.—चंदन वृक्षांची अतिशय लागवड होत असलेल्या प्रदेशांत सुद्धां चंदनाचें तेल काढण्याचा धंदा किफायतशीर होणें मुष्कील पडतें. हिंदुस्थानांत अयोध्या प्रांतांतील कनोज व म्हैसूर संस्थानांत चंदनी येथें चंदनी तेल तयार होतें.

सरकारी रिपोर्टांवरून समजतें कीं, लखनौ व जानपूर शहरांत पूर्वी चंदनी तेल काढण्याचे कित्येक कारखाने होते. परंतु बऱ्याच वर्षांपासून या शहरांतील हा धंदा मंदावला आहे, व कनोजच्या तेलाची खरेदी करण्याची आतां वहिवाट पडली आहे. लखनौ व जानपूरच्या लोकांनीं हें तेल बनविण्याची कृति पुढें दिल्याप्रमाणें वर्णन केली आहेः—या प्रांतांत पांढरें व तांबडें या दोन प्रकारच्या चंदनाचा उपयोग करतात. तांबडें चंदन औषध म्हणून व रंगविण्याच्या कामीं वापरतात, आणि पांढरें तेल काढण्याच्या कामीं वापरतात. या प्रांतांत चंदनाचीं झाडें सर्वत्र सांपडतात. आजपर्यंत लांकूड बरेंच उपयोगांत आणीत असत, परंतु गेल्या १० वर्षांपासून स्थानिक लांकडांपासून कमी तेल निघाल्यामुळें म्हैसूर व मलबारमधील लांकूड मुंबईहून मागवितात. मुंबईच्या जास्त ओलसर प्रदेशांतील चंदनी लांकूड तेल काढण्याकरितां उत्कृष्ट असें समजलें जातें. पैदाशीच्या देशाच्या हवेंतील ओलाव्यावर तेलाचें प्रमाण अवलंबून असतें असें मानतात.

प्रथम चंदनी लांकडांची भुकटी करून सुमारें ४० ते ६० पौंड भुकटी ४८ तासपर्यंत स्वच्छ पाण्यांत भिजवितात, नंतर तांब्याच्या ऊर्ध्वपातन यंत्रांत ती घालतात. तैलमिश्रित पाण्याचें बाष्पीभवन होतें व नेहमींच्या पद्धतीनें त्याला द्रवरूप बनविण्यांत येतें. थंड झाल्यावर तेल पाण्यावर तरंगतें, तें निराळें काढून घेतात. नंतर त्याला कित्येक रीतींनीं शुद्ध करतात; फिल्टरांतून गाळतात, किंवा बुडाशीं इतर मिश्रित पदार्थ जमा होईपर्यंत एक वर्षपर्यंत न हालवितां काळजीनें ठेवितात. कित्येक प्रकारचें पाणी इतर पाण्यापेक्षां उच्च प्रतीचें असल्यामुळें पाण्याचें अंग

(या कृतींत)महत्वाचें आहे असें समजतात.कनोजमध्यें लांकूड मऊ केल्यानंतर त्या लांकडापासून तेल निघणें सुलभ जातें. कनोज येथें एक मण चंदनी लांकडापासून २। ते ३ शेर तेल निघतें असें म्हणतात. भट्टींतून प्रथम जें तेल निघतें तें उत्कृष्ट प्रतीचें असतें. तेल बनविणारांनीं पुढील नियम घालून दिलें आहेतः— ( १ ) एकसारखी आंच दिली पाहिजे; (२) भरल्याबरोबर ग्राहक पात्रें काढून घेतलीं पाहिजेत; ( ३ ) स्वच्छता अवश्यक आहे. भट्टीची आंतील कल्हई गेलेली असल्यास ताब्यामुळें तेलाचा रंग हिरवट होतो; (४) वाफ बाहेर निघणार नाहीं अशा प्रकारें सर्व सांधे घट्ट असले पाहिजेत. चंदनी तेलाचे पुष्कळ प्रकार आहेत.

कनोज येथें बनविलेल्या तेलास मलियागिरी म्हणतात; हलक्या प्रतीच्या तेलास काठियावाला व जहाझी म्हणतात. परंतु हलक्या प्रतींचें तेल कनोज येथें बनवीत नाहींत, व असलें तेल व्यापारी लोक भेसळ करण्याकरितां वापरतात असा समज आहे. कनोज येथें सालीना सुमारें १०० मण तेल बनत असे. परंतु चंदनी लाकूड महाग झाल्यामुळें पैदास कमी होत आहे व व्यापारी लोक तेलाची भेसळ करतात अशी तक्रार ऐकूं येते. कनोजच्या साधारण प्रतीच्या तेलास शेरास रु. १७ किंमत पडते.

व्या पा र.— म्हैसूर व कुर्गमधील चंदनी लांकडाची पुरातन काळापासून प्रसिद्धि आहे. शिवाय हें तेल उत्कृष्ट प्रतीचें गणलें जातें. हिंदुस्थानाला खऱ्या चंदनी लांकडाचा पुरवठा दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांतून होतो, व हा क्रम फार प्राचीन काळापासून होता असेंच सिद्ध होतें. वेस्ट इंडियन म्हणून एक तिसऱ्या प्रतीचें चंदन मिळतें परंतु हें वस्तुतः व्हेनेझुएला देशांतून येतें. म्हैसूर मधून १८४१ टन; कुर्गमधून १०२ टन; मद्रास इलाख्यांतून ७५ टन व मुंबईहूनहि बऱ्याचशा चंदनी लांकडाची विक्री होते, एकंदर २००० टन चंदनी लाकूड ४०,००० पौंडांस सालीना विकलें जातें. म्हैसूरमध्यें २४० मैल लांब, १६ मैल रुंद अशी नैर्ऋत्येकडून वायव्येकडे जाणारी जमिनीची पट्टी चंदनी वृक्षांनीं आच्छादिलेली आहे. पुढें पूर्वेस लहानसा दुसरा एक चंदन वृक्षांचा टापू आहे. या दोन्ही प्रदेशांचें क्षेत्रफळ ५४५० चौरस मैल आहे. म्हणून जगास चंदन पुरविणारा हा मुख्य प्रदेश आहे, असें म्हणतां येईल; कारण एकंदर वार्षिक पुरवठ्याचा सात अष्टमांश भाग म्हैसूरमध्यें उत्पन्न होतो. वीस पौंडांहून कमी वजनाच्या नसलेल्या उत्कृष्ट प्रतीच्या ओंडयापासून अगदीं हलक्या दर्ज्याच्या चुऱ्यापर्यंत चंदनाचे अठरा विभाग केले जातात. चंदनी तेलाचे व लांकडाचे अनेक औषधी उपयोग आहेत. [ वॅट. ]

**चंदनवंदन**—साताऱ्याच्या ईशान्येस १० मैलांवर असलेले दोन किल्ले. यांपैकीं वंदन हा अधिक मजबूत व मुख्य आहे. त्यांत दुसऱ्या दरवाज्यावर एक फारसी लेख आहे. हे किल्ले ११९० त पन्हाळ्याच्या राजानें बांधले असावे व १६०० च्या सुमारास विजापूरच्या इब्राहिम आदिलशहानें यांची दुरुस्ती केली असावी. इ. स. १६७३ त हे शिवाजीनें घेतले होते.ते पुनः मोंगलांकडे जाऊन शाहूनें पुनः घेतले.हे १८१८ मध्यें इंग्रजांकडे आले. वंदन हा विस्तृत असून त्यावर बरेंच सैन्य रहात असावें. हे एका काळीं विजापूरच्या एका परगण्याचें ठाणें होतें.

**चंदभाट**—हा एक प्रख्यात हिंदु कवि ( भाट ) होऊन गेला. दिल्लीपति पृथ्वीराज चव्हाणाच्या काळीं म्हणजे बाराव्या शतकाच्या अखेरीस हा प्रसिद्धीस आला. पृथ्वीराजाच्या पदरीं असलेल्या कवींपैकीं हा एक प्रमुख कवि होता. शहाबुद्दीन घोरीशीं झालेल्या अखेरच्या लढाईंत, पृथ्वीराज कैद केला जाऊन, घोरीनें त्यास गझनीस नेलें. तेव्हां चंदहि पृथ्वीराजाबरोबर गझनीस गेला. शहाबुद्दीन घोरीच्या मरणानंतर दोघांनींहि आपापल्या हातांनीं आपापला नाश केला असें इतिहास सांगतो. होमर या ग्रीक भाटाप्रमाणें प्रस्तुत कवीचें जन्मस्थान म्हणून निरनिराळीं शहरें दाखविण्यांत येतात ( दिल्ली, कनोज, महोबा आणि लाहोर ). परंतु खुद्द चंदकवीच्याच रासांतील लिहिण्यावरून तो लाहोरचा रहाणारा होता असें नक्की अनुमान निघतें. चंद याची दुसरी एक दंतकथा आहे. चंदानें गझनीस असतांना एके दिवशीं शहाबुद्दीन यास पृथ्वीराजाच्या शब्दवेधाची व निशाणबाजीची गोष्ट सांगितली. त्यावर शहाबुद्दीन यानें एकावर एक सात तवे बांधून त्यावर खडे मारले व पृथ्वीराजानें त्या आवाजाच्या अनुरोधानें ते सातहि तवे फोडले (कारण पृथ्वीराजाचे डोळे काढिले होते); शेवटच्या तव्याच्या वेळीं शहाबुद्दीनानें शाबास असा शब्द उच्चारला, त्याबरोबर पृथ्वीराजानें त्या शब्दाच्या रोखानें बाण मारून शहाबुद्दीनाचें डोकें उडविलें. यावेळीं चंदानें पृथ्वीराजास गुपचुपपणें शहाबुद्दीन बसला होता तें अंतर व जागा वगैरे सर्व माहिती दिली होती. यानंतर परस्परांनीं परस्परांचा शिरच्छेद केला. [ बील–मु. रिसायत. ]

पृ थ्वि रा ज रा सा.—या नांवाचा एक काव्यग्रंथ चंदभाट (बरदाई) यानें केला आहे. यांत पृथ्वीराजाचीं व मुसुलमानांचीं झालेलीं युद्धें व तत्कालीन माहिती आलेली आहे. मात्र यांत चंदानंतर इतरांनीं (म्हणजे त्याचे वंशज व इतर कवी) बरीच भर घातली आहे. हा ग्रंथ हल्लीं जवळजवळ सव्वालक्ष आहे. परंतु चंदाच्या हातच्या फक्त ५० हजारच कविता आहेत असें म्हणतात. खुद्द चंदाचा वंशज हल्लीं जोधपूर संस्थानांत पृथ्वीराजानें चंदाला दिलेलें इनाम उपभोगीत आहे. त्याच्याजवळ जें रासाचें हस्तलिखित लिखाण आहे त्यांत वरील संख्येपर्यंतच काव्य आहे. अर्थात् यापुढील पद्यसंख्या इतरांनीं त्यांत भर घालून फुगविली आहे. हें काव्य राजपुताना व संयुक्तप्रांत इकडे फार लोकप्रिय आहे. वर सांगितलेली भर बहुधां चंदाच्या वंशजांनींच टाकलेली असून ती अकबराच्या काळापर्यंतची

आहे असें स्मिथ म्हणतो. रासेंत जी कालगणना आलेली आहे, ती विक्रमसंवतांतील अनंदपद्धतीची आहे ( म्हणजे इ. स. ३३ = १ अनंदवर्ष ); सनंद ( म्हणजे नेहमींप्रमाणें विक्रमसंवत १ = ख्रि. पू. ५८, ५७ ) पद्धतीची नाहीं. अनंद म्हणजे नंदरहित व सनंद म्हणजे नंदनसहित. येथें नंद म्हणजे ९० किंवा ९१ संख्या(वाचक) होय. वास्तविक नंद म्हणजे ९. तेव्हां १००–९ = ९१ म्हणजे अनंद होय. चंद्राची शकयोजना लक्ष्यांत न आल्यानें श्यामलदास यांनीं (रॉयल ए. सो. बंगाल, जर्नल १८८७, अं. ५) रासेला (या शकांच्या चुक्यांच्या आधारावर) कमी दर्जाचा इतिहास म्हणून म्हटलें होतें. परंतु ग्रीअर्सननें ही चंदाची खुबी दाखविल्यानें श्यामलदासांचे आक्षेप उडून गेले. नुकतीच या ग्रंथाची एक आवृत्ति नागरीप्रचारिणी सभेनें प्रसिद्ध केली आहे (स. १९११). तिच्या प्रस्तावनेंत याबद्दल बराच उहापोह केलेला आहे. चंदानें जो भाग वर्णिला आहे, तो महत्त्वाचा आहे. कारण त्यापैकीं बहुतेक सर्व भाग त्यानें स्वतः पाहिलेला (व तो सर्व तो पत्नीला सांगतो आहे असा) आहे. एकंदर रासेंतील प्रक्षिप्त भाग ठरविणें बरेंच कठिण काम आहे. महाभारताचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून (निरनिराळ्या कवींनीं ) याची संख्या सव्वा लक्षावर नेली आहे. त्यामुळें महाभारताप्रमाणेंच यांतहि अनेक कथोपकथा आल्या आहेत; निरनिराळीं भृष्टिवर्णनें, एकाच समयीं सर्व ऋतूंचें एकत्र वर्णन करणें, शास्त्रें व दर्शनें यांची माहिती, राजनितिशास्त्र, व्यवहारशास्त्र, कूटें वगैरे अनेक विषय यांत आले असून त्यामुळें याची मोहकता वाढली आहे. त्यासाठीं यास महाकाव्य असें सार्थ नांव दिलें जातें. चंदानें युधिष्ठिर व नंद यांच्यांत १११५ वर्षें झालीं असें म्हटलें आहे. परंतु बहुतेक पुराणें १०१५ संख्या देतात. रासेंत रजपुताच्या ३६ कुळीं उल्लेखिल्या आहेत. एकंदरींत रजपुतांचा इतिहास साग्र जाणण्याच्या कामीं रासा हा एक आवश्यक ग्रंथ होय. [मध्ययुगीन भारत. भा. २; जर्नल रा. ए. सो. १८८१; स्मिथ– अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया; रासा–नागरी प्रचारिणी आवृत्ति.].

**चंद्रभान**—पतियाला संस्थानामधील एक ब्राह्मण रहिवाशी. याला फारशी भाषा चांगली अवगत असून शहाजहानाचा वडील मुलगा जो दारा शुकोह, त्याच्या पदरीं हा मुन्शी म्हणून नोकर होता. त्यानें फारशी भाषेंत बरीच ग्रंथरचना केली आहे. ‘ गुलदस्त ’, तुहफत्--उल्--अनवार, तुहफत्-उल्-फस्-हा, जम्मा--उल्-- फक्रा ’ हे त्याचे प्रमुख ग्रंथ होत. ‘ चार चमन ’ आणि ‘ मन्शात ब्राह्मण ’ या दोन पुस्तकांत त्यानें निरनिराळ्या व्यक्तींनां लिहिलेल्या पत्रांचा संग्रह केला आहे. कित्येक प्रसंगीं चंदरभानानें ‘ब्राह्मण’ या टोपण नांवाखालीं काव्यरचना केली आहे. दारा शुकोहच्या दुःखजनक निधनानंतर तो काशीस परत जाऊन राहिला. १६६२ सालीं चंदरभान काशी येथें मृत्यु पावला. त्यानें आग्रा शहरीं एक मोठा वाडा बांधला होता. परंतु त्याचे कांहीं एक अवशेष आज सांपडत नाहींत. [ बील- ओरि. बॉयो. डिक्श. ]

**चंदावरकर, नारायण गणेश**( १८५५–१९२३ )—गौडसारस्वत ज्ञातींत यांचा जन्म झाला. लहानपणीं हे मुंबईस शिकण्याकरितां आले ते कायमचेच मुंबईकर बनले. १८७९ सालीं चंदावरकर एलएल्. बी. पास झाले. त्यानंतर त्यांनीं वकिली सुरू केली. तेथून पुढें क्रमाक्रमानें मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश, युनिव्हर्सिटीचे चॅन्सेलर, राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, इंदूरचे दिवाण व शेवटीं कायदेकौन्सिलचे अध्यक्ष असे मोठया सन्मानाचे निरनिराळे हुद्दे त्यांना लाभले. सरकारचा त्यांच्यावर विश्वास असून सरकारांत त्यांचें मोठें वजन असे. व सरकारहि रौलेट कमिटीनंतर बसविलेल्या कमिटीसारख्या कांहीं कमिटयांवर त्यांचा उपयोग करून घेत असे. लहानपणापासून त्यांनां वर्तमानपत्रांत लिहिण्याचा सराव असे. बरेच दिवस त्यांनीं इंदुप्रकाश चालविला होता. १८९९ पर्यंत ते फेरोजशहा मेथा यांचे सहकारी म्हणून राजकारणांत भाग घेत. पुढें न्यायाधीश झाल्यापासून लोकपक्षाला ते जवळ जवळ मुकल्यासारखेच झाले. सामाजिक सुधारणेंत त्यांचीं मतें पाश्चात्य नमुन्याचीं होतीं, पण तितकीं ते आचरणांत आणीत नसत. धर्माच्या बाबतींत ते प्रार्थनासमाजिष्ट म्हणून वावरत. भक्तिसंप्रदायावर त्यांचा मोठा विश्वास असे.

**चंदासाहेब**—याचें खरें नांव हुसेन दोस्तखान असें असून हा दोस्तअली नांवाच्या अर्काटच्या नबाबाचा जांवई होता. प्रथम तो सासऱ्याची दिवाणगिरी करीत असे. हा मूळचा गरीब, महत्त्वाकांक्षी, हुशार व धाडशी होता. त्यामुळें त्यास अनेक प्रतिस्पर्धी होते. त्यानेंहि त्यासाठीं प्रथमपासूनच फ्रेंचांशीं संधान बांधून ठेविलें होतें. डुमास व डुप्ले(फ्रेंच गव्हर्नर) त्याची नेहमीं बरदास्त ठेवीत असत ( याच्याबद्दल जास्त माहिती ज्ञा.को. च्या दहाव्या विभागांत कर्नाटकचा नबाब या नांवाखालीं पहा ).

पुढें त्रिचनापल्लीच्या राणीस मदत देण्याचें मिष करून, चंदासाहेबानें त्रिचनापल्ली आपल्या ताब्यांत घेतली ( १७३७ ) व मोठया युक्तीनें तंजावरकरांचें कारिकल बंदर फ्रेंचांस मिळवून दिलें ( १७४० ). पुढें रघूजी भोंसल्यानें दमलचरी येथें दोस्तअलीवर स्वारी करून त्यास लढाईंत ठार मारिलें ( १७४० ). यावेळीं सासऱ्यानें जांवयास मदतीस बोलाविलें असतां चंदा हा मुद्दामच गेला नाहीं. पुढें दोस्त अलीचा मुलगा सफदर अली यानें रघूजीस खंडणी देऊन तह केला. यावेळीं चंदानें आपलें कुटुंब व खजिना पांडेचरीस फ्रेंचाकडे ठेविला होता.

चंदासाहेब हा दिवसेंदिवस प्रबळ होत चालला होता त्यामुळें व आयत्या वेळेस तो मदतीस आला नाहीं म्हणून सफदरअली याच्या मनांत त्याजविषयीं मत्सर उत्पन्न होऊन त्याचा नाश करण्यासाठीं सफदरअलीनें रघूजीस सांगितलें.

त्याप्रमाणें रघूजीनें एकदम त्रिचनापल्लीवर स्वारी करून तीन महिने किल्ल्यास वेढा देऊन ता. २१ मार्च सन १७४१ रोजीं त्रिचनापल्ली हस्तगत केली; व चंदासाहेबास कैद करून त्यास सातार्‍याला कैदेंत ठेविलें. चंदाचा भाऊ बडासाहेब हा त्याला मदत करण्यास येत असतां रघूजीनें त्याच्यावर दुसरी फौज पाठवून त्यास लढाईंत ठार केलें होतें. चंदासाहेबाची कैद विशेष कडक नव्हती. पुढें सात वर्षे कैदेंत राहून स. १७४८ त चंदासाहेबाची सातार्‍याहून मुक्तता झाली. त्याची बायको डुप्ले याच्या पाशीं होती. तिची व डुप्लेच्या बायकोची मैत्री होती. तिच्या तर्फे कारस्थान होऊन व सात लाख रु. दंड भरून चंदा मोकळा झाला. मराठ्यांनीं तीन हजार स्वार त्याच्या संरक्षणास देऊन त्याला देशीं पोंहचविलें. नंतर चंदानें डुप्लेशीं तह करून व त्याची आणि मुज्फरजंग ( निजामाचा नातु ) याच्या सैन्याची मदत घेऊन तो अर्काटवर चालून गेला. तेव्हां अनवरुद्दिनाची व चंदाची गांठ अंबूर येथें पडून मोठी लढाई झाली. प्रथम फ्रेंच सैन्य हटलें;परंतु बुसीनें पळणार्‍या सैन्यास एकत्र करून जोरानें हल्ला केला त्यांत अनवरुद्दिन ठार झाला व त्याचा एक मुलगा चंदाच्या हातीं लागला ( १७४९ ). नंतर चंदा बिन हरकत अर्काट येथें जाऊन अर्काटचा नबाब बनला व मुज्फरजंग दक्षिणचा निजाम झाला. या उपकाराबद्दल डुप्ले यास पांडेचरीजवळ ८१ गांव दिले. अनवरुद्दिनचा दुसरा मुलगा महंमदअल्ली यानें इंग्रजांची मदत घेतली आणि त्रिचनापल्ली काबीज केली. तेव्हां डुप्लेच्या मदतीनें चंदा महंमदावर चालून गेला. परंतु मध्येंच त्यानें तंजावरच्या राजास त्रास दिला व त्रिचनापल्लीवर जाण्यास दिवसगत लाविले. इतक्यांत नासिरजंग ( निजाम ) हा मुजफरजंगावर चालून आला व त्यानें मुजफराला पकडून चंदाचा पराभव केला ( १७५० ). परंतु डुप्लेनें पुन्हां चंदास मदत देऊन महंमदावर पाठविलें. चंदानें यावेळीं महंमदाचा बराच मुलूख घेतला ( १७५१ ) व तो त्रिचनापल्लीस वेढा घालून बसला. तो उठविण्यासाठीं क्लाइव्हनेंअर्काट येथें वेढा घालून तें घेतलें. तेव्हां चंदानें आपला मुलगा राजासाहेब यास अर्काटच्या मदतीस पाठविलें. त्यानें अर्काटास वेढा दिला. अनेक हल्ल्यांनीं क्लाइव्हचा पुरा पराभव होत नाहीं असें पाहून राजा परतला; त्याचें सैन्य फितुर झालें होतें असें म्हणतात. पुढें क्लाइव्हनें अरणी व कावेरी येथें राजाचा पराभव केला. चंदाच्या ढिलाईनें त्याच्या बाजूचे पुष्कळ लोक महंमदअल्लीस मिळाले. पुढें श्रीरंगम् येथें महंमदअल्लीनें चंदास कोंडलें. लढाईचा कांहीं उपयोग न होतां चंदा व फ्रेंचांचा पराभव झाला. तंजावकरांचा सेनापति मानाजी जगताप यास पैसे भरून चंदा निसटून जात असतां मानाजीनें विश्वासघात करून चंदास पकडून ठार मारिलें व त्याचें शिर महंमदअल्लीकडे पाठविलें ( ३ जून १७५२ ). [ डफ. पु. १, २; ब्रिटिश रियासत ]

**चंदीपूर**—हें बंगालच्या बालासोर जिल्ह्यांतील एक खेडें आहे. हें समुद्रकांठीं बुर्हाबलंग नदीच्या मुखावर आहे. येथील लोकसंख्या सन १९०१त ६२७ होती. येथें तोफखाना आहे व तोफा पारखण्याकरितां आर्डनन्स प्रूफ खात्यानें समुद्रांत एक जागा बांधली आहे. समुद्रकांठची हवा खाण्यास लोक येथें येत असतात. बालासोरपासून चंदीपूरपर्यंत बी. एन. रेल्वेचा एक फाटा निघणार आहे. येथें मच्छिमारीचा धंदा बराच चालतो.

**चंदेरी**—मध्य हिंदुस्थान, ग्वाल्हेर संस्थानाच्या नरवर जिल्ह्यांतील शहर. यांत चंदेरीचा किल्ला आहे. इ. स. १९०१ त याची लोकसंख्या ४०९३ होती. याच्याभोंवतीं दाट झाडी असलेल्या टेंकड्या आहेत. या शहरांतील जमीन फार सुपीक आहे. एके काळीं हें भरभराटीचें शहर होतें. या चंदेरी किल्ल्यांत एक राजवाडा बांधलेला आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीं किरतसागर नांवाचा तलाव आहे. इ. स. १४९० त हा किल्ला माळव्याच्या घैसुद्दिनच्या ताब्यांत असून याच्यावर शेरखान नांवाचा किल्लेदार होता. शेरखानाचा मुलगा झामनखान यानें या किल्ल्याच्या दक्षिणेकडील टेंकडींतून एक रस्ता खोदला आहे. या किल्ल्यापासून ९ मैलांवर जमनिदोस्त झालेलें जुनें चंदेरी शहर आहे.

**इतिहास**— या शहराची अगदीं जुनी माहिती म्हणजे इ. स. १०३० त अल्बेरुणीनें दिलेली होय. हें शहर इ. स. १२५१ त घ्यासुद्दिन बल्बननें जिंकून नासिरुद्दीन बादशहाच्या राज्याला जोडलें. माळव्याच्या पहिल्या महमूद खिलजीनें इ. स. १४३८ त हें घेतलें, चितोडच्या संग राण्यानें इ. स. १५२० त माळव्याच्या दुसर्‍या महमुदापासून जिंकून मेदिनीराय नांवाच्या महमुदच्या प्रधानास दिलें.पुढें मेदिनीराय जवळून बाबरनें जिंकलें नंतर इ.स. १५४० त शेरशहानें हें जिंकल्यावर सुजातखानाच्या देखरेखीखालीं होतें. अकबर बादशहानें माळवा जिंकल्यावर या शहरास माळव्याचा सुभा करण्यांत आलें. सन १५८६ त बुंदेल घराण्यांतील मधुकर राजाचा मुलगा रामसाहयाच्या ताब्यांत हें शहर होतें. सन १६८० त याच्यावर देवीसिंह नांवाचा बुंदेला सुभेदार नेमिला होता व त्याच घराण्याचा ताबा या शहरावर सन १८११ पर्यंत होता. यानंतर हे दौलतराव शिंदे याजकडे आलें. सन १८४४ त जेव्हां इंग्रजांची फौज ग्वाल्हेरमध्यें ठेवण्यांत आली होती त्या वेळेस या फौजेचा खर्च चालविण्याकरितां जो मुलुख इंग्रजांस दिला होता त्यांत हें शहरहि होतें. सन १८५८ त सर ह्यू रोजनें हें शहर जिंकलें व सन १८६१ पर्यंत ब्रिटिशांच्या अमलाखालीं होतें; नंतर शिंदे सरकारास पुन्हां तें परत करण्यांत आलें. येथें उत्तम प्रकारची मलमल होते. येथें एक शाळा आहे.

चंदेल्ल (बुंदेलखंड)– चंदेल्ल हे आपणास चंद्रवंशी रजपूत म्हणवितात, परंतु यांनां त्या प्रांतीं मिश्रबीजाचे मानतात. या वंशाचा पहिला इंद्रजित गहरवार याची कन्या हेमवती हिला चंद्रापासून झालेला चंद्रवर्मा असून त्यापासून ( संवत् २०४ ) परमर्दी उर्फ परमालपर्यंत ४९ पिढ्या झाल्या अशा प्रकारची ही पौराणिक कथा आहे.

बुंदेलखंडचे चंदेल्ल.—व्हिन्सेंटस्मिथ यानें रॉयल ए. सो. जर्नलमध्यें बुंदेलखंड अगर जेजाकभुक्तीचा पूर्वेतिहास दिला आहे; पण तो बराचसा दंतकथात्मक आहे असें रा. वैद्य यांचें म्हणणें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, बुंदेलखंडांत चंदेल्लाचा प्रवेश होण्यापूर्वी तेथें प्रथमतः गहरवारांचें व नंतर परिहारांचें वास्तव्य होतें. बुंदेलखंडांतील मनोहर तलाव गरहवारांनींच बांधिले; परंतु " चंदेल्लांच्या पूर्वी गहरवार बुंदेलखंडांत असावेत असें दिसत नाहीं " असें रा. वैद्य म्हणतात. ह्युएनत्संगानें आपल्या प्रवासवर्णनांत असें लिहिलें आहे कीं, जझ्झोटी येथें एक ब्राह्मण जातीचा राजा राज्य करीत होता. हा ब्राह्मण राजा कनोजच्या सम्राट हर्ष राजाचा सुभेदार असावा असें वैद्य म्हणतात. हर्षानंतर कनोज येथें मौखरी उर्फ वर्म घराणें राज्य करूं लागलें. जोंपर्यंत वर्म घराण्याची सत्ता अबाधित होती तोंपर्यंत जझ्झोटी प्रांतावर कनोजची पूर्ण सत्ता असावी. पण कनोजच्या साम्राज्याला उतरती कळा लागल्याबरोबर तो प्रांत हळूहळू स्वतंत्र झाला असावा; म्हणजे इंद्रायुध गादीवर बसला त्यावेळीच ही घडामोड झाली असावी. ह्या कालनिर्णयास बनारस येथें उपलब्ध झालेल्या चंदेल्ल वंशाच्या अतिप्रसिद्ध धंग राजाच्या लेखाचा ( एपि. इं. भाग १ पा. १२९ ) आधार मिळतो. ह्या लेखांत चंदेल्ल घराण्याच्या मूळ पुरुषापासून जी वंशावळ दिलेली आहे तीवरून नन्नुक हा या वंशाचा मूळपुरुष दिसतो व नन्नुकापासून धंग राजाच्या कारकीर्दीचा विचार करितां नन्नुकाचा काल ८३१ ते ८५० असा ठरतो. महोबाच्या कानुगोजवळ सांपडलेल्या २०४ व २२५ या हर्षशकांतील लेखांवरून स्मिथनेंहि नन्नुकाचा राज्यारोहणकाल ८३१ च ठरविला आहे. त्याकाळीं हर्षशक चालू होता. त्याचा अर्थ असा कीं कनोजची सत्ता ह्या प्रांतावर अद्याप चालू होती. चंदेल्ल घराणें हर्षशक २०४(स.८१०)मध्यें भरभराटीस येऊं लागलें असावें व ८३१ मध्यें पडत्या सम्राटाशीं एखादी लढाई होऊन त्यांत नन्नुकास विजय मिळाला असावा व त्यानें परिहारास हुसकावून देऊन बुंदेलखंडांत चंदेल्लांची स्वतंत्र राज्यस्थापना केली असावी.

नन्नुकानंतर विजयानें ( ८७० ते ८९० ) राज्य केलें असावें. पण वरील लेखांत नन्नुकानंतर जयशक्ति व विजयशक्ति यांनीं अनुक्रमें राज्य केलें व हे दोघेहि भाऊ होते असें सांगितलें आहे. परंतु हर्षाच्या एका लेखांत नन्नुकाच्या पुढच्या राजाचें नांव नुसतें जेज्जक ( जयशक्ति ) असें दिलें आहे.

विजयानंतर राहिल ( इ. सन. ८९० ते ९१० ) यानें राज्य केलें. त्याची पराक्रमाविषयीं बरीच ख्याति होती. त्याची राजधानी महोबा होती. राहिल राजाच्या पराक्रमाचें वर्णन पृथ्वीराज चव्हाणाच्या चंदभाटानेंहि केलें आहे. ह्या राजाच्या कन्येचा विवाह तत्कालीन चेदीच्या गादीवर असलेल्या कोकल राजाशीं झाला. राहिलानंतर त्याचा मुलगा हर्ष(९१०–९३०)राज्य करूं लागला. त्याचा विवाह चाहमान कुलांतील कंचुका नामक कन्येशीं झाला होता. हर्षाचा मुलगा यशोवर्मा असून त्यानें आपल्या पराक्रमानें चंदेल्ल कुलाची अत्यंत महती वाढविली. याचें दुसरें नांव लक्षवर्मा होतें असें माबेल डफ म्हणते. त्यानें कलचुरीचा पराभव करून प्रसिद्ध कालंजर किल्ला काबीज केला. कालंजर हें महाभारतकालापासून तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असून तो किल्ला ताब्यांत असणें हें एक मोठें भूषणच असें तत्कालीन राजे समजत असत. चेदींचे राजे तर आपणांस ' कालंजर पुरवराधीश्वर ' असें म्हणवीत. परंतु यशोवर्म्यानें चेदींचा पाडाव केल्यामुळें वरील किताब यशोवर्म्यास मिळाला. शिवाय त्यानें गौड, खश, कोसल, काश्मीर, मिथिला, मालवा, कुरु, गुर्जर इत्यादि देश जिंकले असें म्हणतात. यांपैकीं गुर्जरराज ( प्रतिहार राजा ) हा कनोजच्या सम्राट्पदावर असलेला महिपाल होय. कारण यशोवर्म्याच्या पित्यानें म्हणजे हर्षराजानें कनोजच्या देवपालाला, राष्ट्रकूटांच्या तिसऱ्या इंद्र नामक राजाविरुद्ध सहाय्य केलें होतें असें शिलालेखांतून लिहिलेलें आढळतें. म्हणजे त्याच काळीं कनोजच्या सत्तेला थोडीफार उतरती कळा लागली असावी. ह्या उतरत्या काळाचा फायदा घेऊन यशोवर्म्यानें कनोजच्या सम्राटाचा पराभव केला व त्यापासून वैकुंठाची म्हणजे विष्णूची मूर्ति मिळविली. यशोवर्म्याच्या राणीचें नांव पुष्पा होतें. खजुराहो लेखावरून ( सन ९५५)असें दिसतें कीं, ही विष्णुमूर्ति प्रथम भोत( तिबेट )च्या राजाजवळ असावी; त्याच्यापासून ती कीरच्या शाहीराजानें मिळविली; व नंतर ती महीपालास प्राप्त झाली. ह्याच लेखावरून असें समजतें कीं चंदेल्लाचा जझ्झोटी येथील राजा कनोज अगर इतर कोणत्याहि सार्वभौमाचा मांडलिक नसून पूर्णपणें स्वतंत्र होता. स्मिथच्या म्हणण्याप्रमाणें भोज व महेंद्रपालाच्या कारकीर्दीत हे चंदेल्ल राजे कनोजचे मांडलिक असून मागाहून ते स्वतंत्र राजे झाले. वि. सं. १०५३ ( इ. स. ९९९ )च्या एका लेखांत हर्षाला व यशोवर्म्याला परमभट्टारक व परमेश्वर अशीं विशेषणें लावलेलीं आहेत (इंडि. अँटि. व्हा. १६ पृ. २०२). त्यावरून हर्ष हाच चंदेल्लाचा पहिला स्वतंत्र राजा झाला असें अनुमान निघतें.

यशोवर्म्याच्या ( ९२५ ते ९५० ) नंतर चंदेल्लांचा अतिपराक्रमी पुरुष धंग राजा राज्य करूं लागला. खजुराहो लेखांत प्रथमच धंग राजाच्या राज्यविस्ताराच्या मर्यादा दिलेल्या आहेत. त्याच्या राज्याची सीमा उत्तरेस यमुने-

पासून दक्षिणेस मालवा ( बेटवा ) नदीच्या कांठच्या भास्वत ( भेलसा ) गांवापर्यंत आणि पूर्वेस कालंजरपासून पश्चिमेस गोपाद्री( ग्वालेर )पर्यंत होती.

धंग राजाच्या कारकीर्दीचे बरेच लेख सांपडले आहेत. त्यांपैकीं खजूराहोचा लेख ( ९५४ ) मुख्य असून दुसऱ्या दोन महत्वाच्या लेखांचे काल अनुक्रमें स. ९९८ व १००२ असे आहेत. ९९८ च्या लेखांत धंग राजाची तुलना हम्मिराबरोबर केली आहे. त्यावरून ( ९८९-९९०.) कम्मु येथें सबक्तेगिनाबरोबर झालेल्या रणसंग्रामांत धंग राजानें विशेष पराक्रम दाखविला असावा असें दिसतें. फेरिस्त्यानें यास दुजोरा दिला आहे. तो म्हणतो कीं लाहोरच्या जयपाळाच्या मदतीस कालंजर राजा मोठया सैन्यानिशीं व खजिन्यासह धांवून आला. ह्या लेखावरून हिंदूंचा जय झालेला दिसतो.

धंगाची कारकीर्द फार मोठी असून तो दीर्घायुषी होता. आयुष्याच्या अंतीं त्यानें गंगायमुनेच्या प्रवाहांत जिवंत जलसमाधि घेतली ( १००० सुमारें ) अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. धंग राजाच्या तिसऱ्या दानपत्रावरून असें दिसतें कीं, त्याच्या राज्याचा विस्तार काशीपर्यंत झाला असावा. सारांश धंग हा चंदेल्ल वंशांत विख्यात वीर पुरुष होऊन गेला यांत संशय नाहीं. तसाच तो मोठा शिवभक्त होता. त्यानें एक मोठें शंकरांचें देऊळ बांधलें होतें. ह्या काळांत शिव विष्णु, सूर्य किंवा देवी इत्यादि देवतांची उपासना विशेष प्रचारांत होती.

धंगानंतर त्याचा पुत्र गंड गादीवर आला(१०००). याला मुसुलमान इतिहासकार नंद म्हणत. याच्या कारकीर्दीत गझनीच्या महंमुदाच्या स्वाऱ्या झाल्या. सन १००९ च्या स्वारीच्या वेळीं आनंदपालाला मदत करण्याकरितां गंड यानें आपलें सैन्य पाठविलें.परंतु दोस्तांबरोबर त्याच्याहि सैन्याचा पराभव झाला. महंमूद परत गेल्यावर गंडानें कनोजच्या राजावर स्वारी करून आनंदपालानें दाखविलेल्या भित्रेपणाबद्दल त्याला ठार मारून दुसऱ्या एका राजपुत्रास गादीवर बसविलें. त्याचा सूड घेण्याकरितां महंमुदानें गंडावर ( १०२० ) स्वारी करून त्याचा पराभव केला व पुष्कळ लूट नेली. या लुटीमुळें त्याला आणखी लोभ सुटून त्यानें पुन्हां ( १०२२ ) गंडावर स्वारी केली. गण्डानें लढाई न करतां महंमुदाला पुष्कळ नजराणा देऊन परत लाविलें. यां नंतर चंदेल राज्यावर मुसुलमानांनीं १७० वर्षेपर्यंत स्वारी केली नाहीं.

गंडानंतर, विद्याधर, विजयपाल व देववर्मा यांच्या कारकीर्दीत महत्त्वाच्या गोष्टी घडल्या नाहींत. विद्याधर ( १०२५ ) हा कच्छपघाट अर्जुन याचा समकालीन होता. याच अर्जुनानें मागें गंडासाठीं कनोजच्या राज्यपालाला ठार मारिलें असें दुबकुंडच्या शिलालेखांत म्हटलें आहे. विजयपालाच्या राणीचें नांव भुवनदेवी होतें; त्यांचा पुत्र देववर्मा होय. त्याच्या मागून त्याचा भाऊ कीर्तिवर्मा याची कारकीर्द सुरू झाली; ती महत्वाची आहे. त्यानें देवगड नांवाचा प्रांत आपल्या राज्याला जोडला व तेथें कीर्तिगिरि नांवाचा किल्ला बांधला. तसेंच जबलपूर जिल्ह्यांतील बलिहि शहर यानेंच वसविलें अशी दंतकथा आहे. यानंतर स. ११०० पासून ११२८ पर्यंत सल्लक्षणधर्मा, जयवर्मा व पृथ्वीवर्मा, या राजांच्या कारकीर्दीत महत्वाच्या गोष्टी झाल्या नाहींत. सल्लक्षणानें माळवा अंतर्वेद व चेदी देश काबीज केले होते.

मदनवर्म्याची कारकीर्द महत्वाची आहे. ( ११२८-६५ ). यानें गुर्जर राजाचा पराभव केला. हा गुर्जर राजा सिद्धराज जयसिंह असावा. मदनवर्म्यानें मदनसागर नांवाचा तलाव बांधला. त्यानें चेदीच्या राजाचा पराभव केला. माळव्याच्या राजाची कत्तल केली व बनारस राजाची मैत्री संपादन केली. पुढें याचा पुत्र यशोवर्मा हा तरुणपणींच वारल्यानें त्याचा मुलगा म्हणजे मदनवर्म्याचा नातु परमर्दी अथवा परमाल हा गादीवर आला ( ११६७ ). याच्या कारकीर्दीत चव्हाण व चंदेल्ल यांच्यांत युद्ध झालें. त्यांत सिरवागड येथें परमालचा पराभव झाला. हें ठिकाण जालनाच्या पश्चिमेस आहे. या वेळेला चंदेल्लांचा हमीरपूरपासून महोबापर्यंत पाठलाग करण्यांत आला. व महोबा पृथ्वीराजाच्या ताब्यांत गेलें. याला मुसुलमान इतिहासकार परमार म्हणतात. कुतुबुद्दीन ऐबक यानें पुढें याजवर स्वारी केली व कालंजर किल्ल्याला वेढा दिला पुष्कळ दिवस लढून शेवटीं नाइलाजानें परमालनें खंडणी देण्याचें कबूल केलें परंतु आपलें वचन पुरें करण्याच्या पूर्वींच तो मरण पावला. तेव्हां त्याचा प्रधान अजदेव यानें कालंजर किल्ला मुसुलमानास दिला ( १२०३ ). नंतर कुतुबुद्दीनानें महोबा घेऊन कालंजरचा राज्यकारभार सरदाराच्या ताब्यांत दिला.

अशा तऱ्हेनें उत्तर हिंदुस्थानांतील चंदेल्ल राजघराण्याचा इतिहास स. १२०३ मध्यें समाप्त झाला. यापुढें त्या घराण्यापैकीं नांव घेण्यासारखा पुरुष राज्यपदावर बसला नाहीं. परमर्दीच्या नंतर त्रैलोक्यवर्मा ( १२१३ ) व त्याचा पुत्र वीरवर्मा गादीवर आले (१२६१).वीरवर्म्याची राणी कल्याण देवी नांवाची होती. यांचा पुत्र भोजवर्मा होय; तो १२८९त गादीवर बसला. परमर्दीच्या नंतर हे पुढले राजे मुसुलमानांचे मांडलिक बनले.

**चं दे ल्लां चें स त्ता क्षे त्र.**—यांचें अर्वाचीन नांव बुंदेलखंड असें आहे. त्यासच प्राचीन नांव जिझोटी किंवा जिजाकभुक्ती असें होतें. कनिंगहाम म्हणतो कीं पूर्वीच्या या बुंदेलखंडांत ( हल्लींचे ) हमिरपुर, बांडा, ललितपुर, अलाहाबाद व मिरझापुर यांचा कांहीं भाग व सागर व दमो हे जिल्हे येतात. शिलालेखांतील जिजाकभुक्ती प्रांत या प्रांताशीं साधारणतः जुळतो. हुएनत्संगहि याच प्रदेशाला जिजाकभुक्ती म्हणून उल्लेखितो.इब्न बतुता व अल्बेरुनी यांच्या

वेळीं या प्रांताची राजधानी खजुराहो होती. हल्लीं हें खेडें असून तें छत्रपुर संस्थानांत महोबाच्या दक्षिणेस ३४ मैलांवर आहे. या प्रातांत ह्युएनत्संग स.६४१त आला. त्यानें केलेल्या राजधानीच्या वर्णनावरून खजुराहो ही राजधानी नसून एरण असावी असें दिसतें. या गांवासंबंधींच्या बुद्धगुप्ताच्या व तोरमाणाच्या शिलालेखावरून हें गांव पांचव्या शतकाच्या शेवटीं व सहाव्या शतकाच्या आरंभीं महत्त्वाचें होतें व सातव्या शतकांत तें राजधानीचें ठिकाण झालें असावें असें दिसतें.

चंदेल्ल वंशाचा खजुराहोवरील अतिप्राचीन ताबा दाखविणारा पुरावा म्हणजे खजुराहो येथील शिलालेख होय. नं. २ च्या शिलालेखांत यशोवर्म्यानें कालंजर जिंकलें असें आहे. चंदेल्ल वंशानें या यशोवर्म्याच्या राज्यारंभाच्या पूर्वी थोडे दिवस खजूराहो जिंकलें असावें. सारांश सातव्या शतकांत राजधानी एरण असावी व पुढें स. ९०० च्या नंतर खजुराहो झाली असावी असें दिसतें.

दंतकथेवरून छत्रपुर संस्थानांतील मनियागढ हें चंदेल्ल वंशाचें मूळ ठिकाण होतें असें म्हणतात.

खजुराहो हें गांव मूर्तिविध्वंसक मुसुलमानांच्या नेहमींच्या रस्त्याआड एकीकडे होतें म्हणूनच तेथील सुंदर देवालयें वगैरे कायम राहिलीं. उत्तरहिंदुस्थानांतील अतिशय सुंदर अशीं हिंदु देवालयें येथें आहेत. धंग राजाच्या कारकीर्दींत खजुराहो हें भरभराटीच्या शिखरास पोहोंचलें. पुढें गण्ड राजाच्या कारकीर्दींत गझनीच्या महमुदानें चंदेल राजाचा पराभव केला व तेव्हांपासून खजुराहोला उतरती कळा लागली.

चंदेल्लांचें दुसरें शहर म्हणजे महोबा होय. हें खजुराहोच्या उत्तरेस ३४ मैलांवर आहे. येथें व याच्या आसपास चंदेल्ल वंशाची स्मृति अनेक काळपर्यंत कायम राखणाऱ्या इमारती व स्थळें असून त्यांत कीर्तिवर्म्यानें बांधलेला कीरत सागर तलाव, राहिलानें बांधलेला राहिलासागर तलाव व एक शिवमंदीर, मदनवर्म्यानें बांधलेला मदनसागर तलाव, व कर्कामठ नांवाचें स्फटिकमंदिर वगैरे स्थळें मुख्य आहेत. महोबा शहराशीं चंदेल्ल वंशांतील सर्व राजांपेक्षां परमर्दि याचाच संबंध जास्त होता. याला पृथ्वीराजानें महोबांतून जेव्हां हांकून लावलें, तेव्हां हा कालंजरला गेला ( ११८२ ). पुढें (चंदभाट व दंतकथा यांच्या आधारावरून) परमर्दिनंतर महोबा येथील कारभार त्याचा मुलगा समरजित हा पाहूं लागला असें दिसतें. हा इ. स. १२०३ मध्यें मुसुळमानांकडून मारला गेला. महोबा हें गांव हल्लीं फार लहान असून हमीरपुर जिल्ह्यांत आहे.

अजयगड हें त्रैलोक्यवर्म्याचें मुख्य ठिकाण होतें. हें हल्लीं याच नांवाच्या संस्थानांत असून खजुराहोच्या जवळ आहे. इ. स ९३०-९४०यांच्या दरम्यान कालंजर किल्ला चंदेल्ल राजांनीं जिंकला व कीर्तिवर्मा राजानें येथें एक तलाव बांधला. एक दंतकथा अशी आहे कीं, कीर्तिवर्मा राजाचा महारोग या तलावांत स्नान केल्यामुळें बरा झाला. हा किल्ला इ. स. १२०३ मध्यें कुतुबुद्दीन ऐबकनें घेतला. कुतुबुद्दीननें कालंजर घेतल्यानें पुढें चंदेल्लांनीं अजयगड येथें राजधानी केली. चंदेल्लांच्या ताब्यांत वरील दोन किल्ल्यांखेरीज आणखी सहा प्रख्यात किल्ले होते. त्यांपैकीं (१) बारीगड हा चरखारी संस्थानांत असून महोबापासून १० मैलांवर आहे. (२) मौढा हा किल्ला हमीरपुर जिल्ह्यांत आहे. (३) मनियागड हा किल्ला चंदेल्ल वंशाचें मूळ ठिकाण आहे असें म्हणतात. हा हल्लीं मोडकळीस आलेला आहे. येथील मनिया देवी चंदेल वंशाची कुलस्वामिनी होय. (४) बांडा जिल्ह्यांत कालंजरपासून १२ मैलांवर मार्को किल्ला होता. हल्लीं तेथें जंगल आहे. (५) गढा हा किल्ला जबलपुरच्या पश्चिमेस ४ मैलांवर आहे. (६) किल्ले महियर येथें हल्लीं अलाहाबाद जबलपूर रेल्वेचें स्टेशन आहे.

खजुराहो येथील दंतकथेवरून असें दिसतें कीं चंदेल्ल वंशाचे लोक मूळचे मनियागड येथील असावे; या चंदेल्लांचीं स्वतंत्र नाणीं कोठें कोठें सांपडतात. चेदी राजांच्या व चंदेल्लांच्या नाण्यांत विशेष साम्य आहे. फरक इतकाच कीं चेदींच्या नाण्यांवर दुर्गेचा शिक्का असे तर चंदेल्लांच्या नाण्यांवर हनुमानाचा शिक्का आहे; एकीकडे हनुमान व दुसरीकडे राजाचें नांव असतें. मात्र धंगाच्या पूर्वींच्या राजांचीं नाणीं आज उपलब्ध होत नाहींत. फक्त कीर्तिवर्म्यापासून वीरवर्म्यापर्यंतचीं कांहीं सांपडतात. कर्णदेव चेदीराजाचा पराभव कीर्तिवर्म्यानें केल्यानंतर त्यानें आपलें नाणें पाडलें व तें साधारण चेदीवंशाच्या नाण्याप्रमाणेंच पाडलें म्हणून त्यांत साम्य दिसतें. स्मिथनें इंडि. अँटि. व्हॉ. ३७ मध्यें चंदेल्लांचीं व त्यांच्या नाण्यांची १९०८ पर्यंतची माहिती दिली आहे. कीर्तिवर्म्याचीं नाणीं फक्त सोन्याचीं असत व तीं द्रम व अर्धा द्रम अशीं असत. बाकीच्या राजांनीं तांब्याचींहि नाणीं पाडलीं होतीं. हनुमानाचा उपासक कोणता चंदेल्लराजा होता हें नक्की समजत नाहीं. खजुराहो लेखांत शेवटीं "विनायकपालाच्या कारकीर्दींत" असे शब्द आढळतात. रा. वैद्यांच्या मतें हा विनायकपाल म्हणजे कनोजचा महीपाल नांवाचा सम्राट असावा.

### चंदेलघराण्यांतील राजांची वंशावळ.

१ नन्नुक (स. ८३१)
|
२ वाक्पति (८४५)
|
- ३ जयशक्ति (ऊर्फ जेजा, जेजाक, जेज्जाक) (८६०)
- ४ विजयशक्ति (ऊर्फ विजय, विजा, ऊर्फ विज्जीक) (८८०)
  |
  ५ राहिल (९००)
  |
  ६ हर्ष × कंचुका (९१५)
  |
  ७ यशोवर्मा × पुष्पा (लक्षवर्मा) (९३०)
  |
  - ८ धंग (९५०)
    |
    ९ गण्ड (१०००) (नंद)
    |
    १० विद्याधर (१०२५)
    |
    ११ विजयपाल × भुवनदेवी (१०४०)
    |
    - १२ देववर्मा (१०५५)
      |
      १४ सल्लक्षणवर्मा (११००)
      |
      १५ जयवर्मा (१११०)
    - १३ कार्तिवर्मा (१०६०)
      |
      १६ पृथ्वीवर्मा (११२०)
      |
      - १७ मदनवर्मा (११२८) (यशोवर्मा)
        |
        १८ परमर्दि (११६५)
        |
        १९ त्रैलोक्यवर्मा (१२०३)
        |
        २० वीरवर्मा × कल्याणदेवी (१२४५)
        |
        २१ भोजवर्मा (१२८७)
      - प्रताप
  - कृष्णप × असर्वादेवी
    |
    देवलब्धि

चंदेल ठाकूर.—चंदेल ठाकुरांच्या खालील शाखा आहेत. (१) चांदे चांदावाल (२) चंदेरी स्थापनकर्ता-दमखोह. (३) महोबा मदनवर्मा (४) कनोज (सभाजित). पहिलीं दोन घराणीं ऐतिहासिक कालापूर्वीचीं असून त्यांची माहिती उपलब्ध नाहीं.

इलियटच्या ग्लॉसरीप्रमाणें या वंशांत १८ राजे झाले. एका फारशी बखरीप्रमाणें ८ झाले व एका हिंदी बखरीप्रमाणें १४ झाले. त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेतः—

मानवर्मा, ग्यानवर्मा, जानवर्मा, गजवर्मा, कीलवर्मा, सकतवर्मा, भगतवर्मा, जगतवर्मा, रहिलियावर्मा, सुरजवर्मा, रुपवर्मा, मदनवर्मा, किरातवर्मा, परमालदेव.

कनोज (चंदेरी).—ठाकूर कनोजची गादी सं. ११२३ या वर्षी स्थापिली गेली. या वंशांत जे राजे झाले. ते येणेंप्रमाणें:—

(१) सभाजित, (२) ग्यासदेव, (३) घनश्यामदेव, (४) विहरदेव, (५) लहरदेव, (६) सूपदेव, (७) वासदेव, (८) खाखदेव, (९) धामदेव. शिवराजपूरचें घराणें धामदेवाच्या नंतर आस्तित्वांत आलें. त्या घराण्याचा मूळ पुरुष धामदेव राजाचा मुलगा होय.

धामदेव
|
- शिवराजदेव (शिवराजपूर) — ओन्हा येथील रावत.
- पातदेव (पाचोर) — साकेंगचें घराणें.
- लगदेव — वातपूरचे रावत

सचेन्दि घराणें-गंगातीरीं बिहरी गांवीं राहणाऱ्या करकालदेवाचा मुलगा हरसिंगदेव यास हिंदुसिंग नांवाचा एक मुलगा होता. हा फार बलिष्ठ असून लोकांना त्रास देत असे; म्हणून तेथील राजानें त्यास आपल्या राज्यांतून हांकलून लाविलें. तो तापासपींहि येथें जाऊन राहिला यानें पुढें बनौर व सचेंदि येथें किल्ले बांधले व मोठी फौज जमवून आसपासचे प्रांत काबीज केले. त्यानें सचेंदी येथें गादी स्थापन केली.

गजराजदेव
|
- कंपनदेव
- हरसिंगदेव

गजराजदेव मेल्यानंतर कम्पनदेव व हरसिंगदेव या दोघांत भांडण उपस्थित झालें. राणीनें कंपनदेवास गादी दिली. हरसिंगदेव तेथून निघून बनौरला आला व त्यानें तेथें नवें राज्य स्थापन केलें. [संदर्भग्रंथ.-वैद्य-मध्ययुगीन भारत भा. २; माबेल डफ; जर्नल ए. सो. बंगाल. पु. १; इंडियन अँटिक्वरी. पु. ३२; सतिप्रसादकृत चंदेल घराण्याचा फारसी इतिहास].

**चंदौली**—संयुक्त प्रांत, बनारस जिल्ह्यांतील एक तह- शील. हिचें क्षेत्रफळ ४२६ चौ. मैल आहे. व लोकसंख्या इ. स. १९११ सालीं २४३९२८ होती. इ. स. १९०३–०४ सालीं शेतसारा रु. २८०००० व जकात, कर वगैरेंचें उत्पन्न रु. ६४००० होतें. याच्या जवळून कर्मनाशा नदी वाहते. येथील माती चिकण आहे. येथें तांदुळाचें मुख्य पीक आहे.

**चंदौसी**.—संयुक्त प्रांत मोरादाबाद जिल्ह्याच्या बिहारी तहसिलींतील एक शहर आहे. हें औधरोहिलखंड रेल्वेवरील एक जंक्शन स्टेशन आहे. येथें इ.स.१९११सालीं लोकसंख्या २२२५५ होती. येथें रेल्वे सुरु झाल्यापासून हें एक व्यापाराचें ठिकाण झालें आहे. येथें पक्के रस्ते आहेत. म्युनिसिपालिटी इ. स. १८६३ सालीं झाली. येथून साखर, सण, धान्य व कापूस बाहेर गांवीं जातो व बाहेरून मीठ व कापड येतें. येथें कापूस व सण दाबण्याच्या गिरण्या आहेत. येथें ७ शाळा आहेत.

**चंद्र**—सूर्यमंडळांतील पृथ्वीचा उपग्रह. या लेखामध्यें चंद्राची सामान्य माहिती दिली आहे. चंद्रग्रहणाविषयीं विवेचन 'ग्रहण' या लेखांत केलेंच आहे. सर्व नक्षत्रांतून चंद्राची एक प्रदक्षिणा होण्यास मध्यम मानानें सुमारें २७ दिवस १९ घटका लागतात. कधीं याहून कांहीं घटिका कमी लागतात व कधीं जास्त लागतात. अशा कमजास्त मानांच्या सरासरीनें काढिलेलें जें मान त्यास ज्योतिषशास्त्रांत मध्यम म्हणतात. एका तारेजवळ एकदां चंद्र दिसला तर पुन्हां वर लिहिलेल्या काळानें तो तेथें येईपर्यंतच्या काळास नाक्षत्र-मास म्हणतात. २७ नक्षत्रांतून कांहींच्या दक्षिणेकडून नेहमीं चंद्र जातो; कांहींच्या उत्तरेकडून जातो; आणि बाकी कृत्तिका, रोहिणी, पुष्य, मघा, चित्रा, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, शततारका, रेवती, यांचें तो कधीं कधीं आच्छादन करितो. ह्या आच्छादनास पिधान असें म्हणतात. रोज सरासरी पांच तारांचें पिधान चंद्र करितो. परंतु त्यातल्या तेजस्वी तारांचें मात्र पिधान नुसत्या डोळ्यांनीं चांगलें पाहण्यास सांपडतें. मघा, ज्येष्ठा, चित्रा, रोहिणी, ह्या पहिल्या प्रतीच्या तारा आहेत. त्यातहि क्रमानें त्या एकीकडून एक जास्त तेजस्वी आहेत. रोहिणी सर्वांत तेजस्वी आहे. यामुळें चंद्र सर्वांहून तिच्या फारच जवळ येईपर्यंत ती दिसत असते. अर्थातच तिचें पिधान सर्वांहून मनोहर दिसतें. हीच गोष्ट चंद्राची रोहिणीवर अति प्रीति आहे या समजुतीचें कारण होय. आणि ही गोष्ट अति प्राचीनकाळीं आमच्या लोकांस ठाऊक होती असें तैत्तिरीय संहितेंतील [ २. ३. ५. ] कथेवरून ठरतें. ती कथा अशी आहेः—

" प्रजापतीला ३३ कन्या होत्या. त्या त्यानें सोमराजास दिल्या. तो त्यांपैकीं रोहिणीशीं मात्र समागम करूं लागला. यामुळें इतरांस मत्सर उत्पन्न होऊन त्या प्रजापतीकडे गेल्या. सोम त्यांच्या मागत जाऊन त्यांस प्रजापतीपाशीं परत मागूं लागला. प्रजापतीनें सांगितलें, सर्वांशीं सारखा वागेन अशी शपथ घे, म्हणजे तुला कन्या परत देतों. त्यानें शपथ घेतली.प्रजापतीनें कन्या परत दिल्या. तरी तो पुन्हां त्यांच्या पैकीं रोहिणीजवळ मात्र जाऊं लागला. त्यामुळें त्यास यक्ष्मा झाला. सोमराजास यक्ष्मा झाला म्हणून त्यास राजयक्ष्मा म्हणतात. याप्रमाणें राजयक्ष्म्याची उत्पत्ति झाली. नंतर सोम त्या तारांच्या पायां पडत पडत त्यांच्या मागें जाऊं लागला. त्या बोलल्या, तूं आम्हां सर्वांशीं सारखें वागावें असा आम्ही वर मागतों. मग त्यांनीं आदि-त्यास चरु दिला, आणि त्याच्या योगानें सोमास पापापासून मुक्त केलें.

चंद्राच्या योगानें कांहीं तारांचें पिधान कां होतें याचें कारण असेंः—चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरतो. म्हणजे तो पृथ्वीचा उपग्रह आहे. तो पृथ्वीभोंवतीं क्रांतिवृत्तांतून फिरत नाहीं. त्याची कक्षा क्रांतिवृत्तास छेदिते. त्या दोहोंच्यामध्यें सुमारें सवापांच अंशाचा कोन आहे. यामुळें चंद्रकक्षेचा अर्धा भाग क्रांतिवृत्ताच्या उत्तरेस सुमारें सवापांच अंशांपर्यंत व अर्धा भाग दक्षिणेस सवापांच अंशांपर्यंत असतो. म्हणून चंद्र नेहमीं क्रांतिवृत्ताच्या दक्षिणेस किंवा उत्तरेस सवापांच अंशांत असतो. खस्थ पदार्थापासून क्रांतिवृत्तापर्यंत जें अंतर त्यास शर म्हणतात. हें अंतर त्या खस्थापासून क्रांतिवृत्तावर लंब काढून त्यानें मोजितात. चंद्राचा शर सवापांच अंशांपर्यंत असतो. क्रांतिवृत्त आणि चंद्रकक्षा ह्यांच्या दोन पातबिंदूंस अनुक्रमें राहु आणि केतु म्हणतात. राहूमध्यें किंवा केतूमध्यें चंद्र असतो तेव्हां अर्थातच क्रांति-वृत्तापासून त्याचें अंतर मुळींच नसतें. म्हणजे त्या वेळीं शर शून्य असतो. क्रांतिवृत्ताच्या आसपास सवापांच अंशांच्या आंत ज्या तारा आहेत, म्हणजे ज्यांचा शर सवा-पांच अंशांहून जास्त नाहीं, त्यांचें पिधान चंद्र करितो. विषुव-वृत्तापासून क्रांतिवृत्ताचें परम अंतर सुमारें २३॥ अंशांवर आहे. आणि चंद्र कधीं त्याच्या दक्षिणेस किंवा उत्तरेस असतो. म्हणून चंद्राची परम क्रांति कधीं सुमारें २८॥ अंश होते, कधीं सुमारें १८। अंशच होते. याहून जास्त ज्यांची क्रांति असेल त्या तारांचें पिधान कधींहि होण्याचा संभव नाहीं. चंद्रकक्षा आणि क्रांतिवृत्त यांचे पात म्हणजे राहूकेतु हे स्थिर नाहींत; त्यांस गति आहे ( आणि म्हणू-नच हे भारतीय ज्योतिषांत ग्रह कल्पिले आहेत. वस्तुतः हे दृश्य किंवा द्रव्यघटित पदार्थ नाहींत ). ते सुमारें १८॥ वर्षांत क्रांतिवृत्तात एक फेरा करितात. यामुळें क्रांतिवृ-त्ताच्या कोणत्याहि बिंदूशीं चंद्राचा शर सर्वदा सारखा नसतो. कधीं शून्य असतो, कधीं सवापांच अंशांपर्यंत असतो. यामुळें एका तारेचें पिधान चंद्र एकदां करूं लागला म्हणजे सुमारें २ वर्षे करितो; व पुढें करीनासा होतो. तो पुन्हां १८॥ वर्षांनीं करूं लागतो. ज्या तारा क्रांतिवृत्तावर किंवा त्याच्या अगदीं जवळ आहेत त्यांचें पिधान तो १८॥

वर्षांत दर खेपेस दोन दोन वर्षें असें दोनदां करितो. वर त्या नक्षत्रांचें पिधान चंद्र करितो असें सांगितलें त्यांतील बहुतेकांच्या सर्व तारांचें पिधान तो १८॥ वर्षांत केव्हां ना केव्हां तरी करितो. जेव्हां करीत नाहीं, तेव्हां त्यांच्या उत्तरेकडून किंवा दक्षिणेकडून तो जातो.

कधीं कधीं बुधशुक्रादि ग्रहहि चंद्राच्या सपाट्यांत सांपडून त्यांचेंहि पिधान चंद्र करितो. ग्रह बहुधा पहिल्या प्रतीच्या ताऱ्याएवढे किंवा त्याहून मोठे दिसतात. यामुळें त्यांचें पिधान पाहण्याची विशेष मौज असते. कधीं कधीं तारा आणि ग्रह यांचें पिधान एका कालीं होण्याचा संभव आहे. बुधाला रौहिणेय असें नांव आहे, ह्या गोष्टीचें मूळ ह्या पिधानांत आहे. बुध आणि रोहिणी यांचें एकाकालीं पिधान झालें असतां त्यावेळीं चंद्रबिंबांतून बुध बाहेर पडला असें पाहून रोहिणीचंद्रसमागमापासून बुध हा पुत्र झाला अशी कल्पना होण्याचा संभव साहजिक आहे. गुरुपत्नी तारा हिचें हरण चंद्रानें केलें आणि तिला बुध हा पुत्र झाला या कथेंत तारा म्हणजे वस्तुतः रोहिणी नामक जी तारा ती होय. बुधाला रौहिणेय अशी संज्ञा आहे. त्याप्रमाणें इतर ग्रहांसहि अशा संज्ञा आहेत. त्या फारशा प्रसिद्ध नाहींत. तरी पुराणांत त्या आहेत. शुक्र, मंगळ ह्यांस अनुक्रमें मघाभू व आषाढाभू अशीं नांवें आहेत.त्या त्या तारा, ते ते ग्रह आणि चंद्र, यांच्या एककालिक निकट समागमापासून तीं नावें पडलीं यांत संशय नाहीं.

चंद्रपृष्ठाचा जो भाग काळा दिसतो तो चंद्रानें धारण केलेला ससा किंवा हरिण आहे अशा कल्पना उद्भवल्या. त्याप्रमाणें जो भाग चकचकीत दिसतो तेथें पाणी असावें अशी कल्पना होणें हें त्याहून अधिक स्वाभाविक आहे. दुर्बिण प्रथमच प्रचारांत आली तेव्हां तींतून दिसून आलें कीं, चंद्राचा जो भाग चकचकीत दिसतो तो पर्वतांचीं शिखरें व ज्वलत्पर्वतांचीं मुखें यांनीं उंचसखल झालेला आहे; आणि काळा भाग दिसतो तो सखल आहे व त्यावरून पाश्चात्य ज्योतिष्यांनीं प्रथम असें अनुमान केलें कीं, काळा भाग दिसतो तेथें समुद्र आहेत. परंतु मोठमोठ्या दुर्बिणींनीं चंद्राचे वेध झाल्यावर चंद्रावर पाणी मुळींच नाहीं असा निर्णय झाला.

पृथ्वीपासून चंद्राचें मध्यम अंतर २४०००० मैल आहे. कधी तें याहून १९ हजार मैल कमी होतें, कधीं जास्त होतें. इतक्या अंतरावरून चंद्र आपल्या पृथ्वीभोंवतीं फिरत असतो. आपल्या पायापासून पृथ्वीच्या मध्यबिंदूपर्यंत अंतर सुमारें ४ हजार मैल आहे. म्हणजे भूगोलाची त्रिज्या इतकी आहे. हिच्या साठपट चंद्र दूर आहे. चंद्राचा व्यास सुमारें २१६० मैल आहे. म्हणजे पृथ्वीच्या व्यासाच्या चौथ्या हिश्याहून थोडा जास्त आहे. पृथ्वीच्या पृष्ठाचें क्षेत्रफळ म्हणजे पृथ्वीचें पृष्ठफळ चंद्राच्या सुमारें १३ पट येतें. म्हणजे चंद्रावर जेवढी जागा आहे त्याच्या १३ पट पृथ्वीवर आहे. चंद्राच्या आकाराच्या सुमारें ४९ पट पृथ्वी मोठी आहे आणि चंद्राच्या ८१ पट पृथ्वीचें वजन आहे. दोन गोलांचे व्यास ठाऊक असले तर त्यांचीं पृष्ठफळें आणि आकार म्हणजे घनफळें ह्यांची तुलना करतां येते. चंद्राच्या ४९ पट पृथ्वीचा आकार आहे, तर वजनहि तितकें पट असलें पाहिजे असें मनांत येईल. दोन्ही गोलांची घनता सारखी असती तर तसें झालें असतें. परंतु दोहोंची घनता सारखी नाहीं; पृथ्वीच्या निम्याहून किंचित् जास्त इतकीच म्हणजे पाण्याच्या सुमारें ३॥ पट चंद्राची घनता आहे. आणि अर्थात् इतकेंच त्याचें विशिष्ट गुरुत्व आहे. म्हणून चंद्राच्या ८१ पट पृथ्वीचें वजन आहे. चंद्राचा एक तुकडा घेतला आणि तितकेंच पाणी घेतलें तर त्या पाण्याचें जितकें वजन भरेल त्याच्या सुमारें ३॥ पट वजन त्या तुकड्याचें भरेल. हें चंद्राचें विशिष्टगुरुत्व होय.

चंद्राच्या कला वाढूं लागल्यापासून सुमारें १५ दिवसांनीं तो पूर्ण होतो. चंद्र एकदां पूर्ण झाल्यापासून पुन्हा होईपर्यंत किंवा एका रात्रीं मुळींच न दिसल्यापासून पुन्हा दिसेनासा होईपर्यंत सुमारें ३० दिवस जातात. इतक्या काळास चांद्रमास म्हणतात. प्राचीन खाल्डियन लोकांत चंद्रमानांचें प्राधान्य होतें. मुसलमानांत अजूनहि आहे. ते बारा चांद्रमासांचेंच वर्ष धरितात. आम्ही अधिकमास धरून चांद्र आणि सौर या दोहोंचा मेळ ठेवतों. युरोपियन लोक चांद्रमास हल्लीं मुळींच धरीत नाहींत. सौरमास घेतात.

चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरत फिरत सूर्याभोंवतीं फिरतो. नक्षत्रांतून त्याची एक प्रदक्षिणा सुमारें २७। दिवसांत होते असें मागें सांगितलें. पृथ्वी स्थिर असती तर इतक्याच काळांत चंद्राची पृथ्वीप्रदक्षिणा झाली असती परंतु इतक्या काळांत पृथ्वी थोडीशी पुढें जाते म्हणून प्रदक्षिणेस सुमारें २९॥ दिवस लागतात. पृथ्वीभोंवतीं चंद्र जितक्या काळांत फिरतो तितक्या काळांत तो आपल्या आंसाभोंवतीं एक प्रदक्षिणा करतो. त्यामुळें चंद्राचा अर्धा भाग मात्र आपल्यास नेहमीं दिसतो. या भागावर जसजसा सूर्यप्रकाश पडलेला आपणांस दिसतो तसतसें चंद्रबिंब कमी जास्त दिसूं लागतें. यालाच कला म्हणतात. अमावास्येच्या २ ऱ्या व ३ ऱ्या दिवशीं चंद्राची अगदीं बारीक कोर दिसते. तिच्या टोकांस शृंगें म्हणतात. या टोकांच्या उच्चनीचतेवर समृद्धिमहर्गता अवलंबून असते असें मानतात. समुद्राची भरती ओहटी चंद्राच्या उदयास्तावर अवलंबून आहे. ' भरती ओहटी ' पहा.

चंद्रावर कांहीं डोंगरांच्या रांगा आहेत; कांहीं शांत झालेलीं ज्वालामुखें निरनिराळीं पसरलीं आहेत; व कांहीं प्रदेश सपाट आहे. जेथें बिंब काळसर दिसतें, तेथील




बार्न घुबडाचें डोकें
(उघडया कानांसहित)
(अ) कानझांकणी (आ) कानाचें भोंक



घुबड (पृ.१३)




चंद्राच्याकला.
(पृ.१६)




चंद्रसूर्यग्रहण.
(आ)सूर्यग्रहण(आ) चंद्रग्रहण.



चिमणी (पृ.१५६)

| जपानीशब्द. | | चिनीशब्द. | |
|---|---|---|---|
| मनुष्य | 人 | 中 | मध्य. |
| पर्वत | 山 | 九 | नऊ |
| नदी | 川 | 五 | पांच |
| चंद्र | 月 | 八 | आठ |
| सूर्य | 日 | 门 | 半 एकमर्यादा |
| झाड | 木 | 印 | शिक्का |
| अरण्य | 林 | 天 | स्वर्ग |
| मोठें अरण्य | 森 | 邑 | खेडेगांव |
| घोडा | 馬 | 左 | डावाहात |
| तोंड | 口 | 床 | पलंग |
| मूल | 子 | 旦 | प्रभात |
| | | 舍 | झोंपडी |



कार्ले चैत्य (ए.३२)



ग्रेझ (पात्र) चित्रकला (पॉलिग्नाटसपथ)

प्रदेश चकचकीत प्रदेशांपेक्षां सपाट आहे. तरी अगदीं सपाट आहे असें नाहीं. त्यावरहि उंचवटे आहेतच. परंतु ते इतर प्रदेशांतील उंचवटयांपेक्षां पुष्कळ ठेंगणे आहेत. नुसत्या डोळ्यांनीं चंद्रावरील कांहीं प्रदेश काळसर व कांहीं पांढरा दिसतो. हा फरक मुख्यतः त्या प्रदेशांची घटकद्रव्यें भिन्न रंगांचीं आहेत त्यामुळें आहे. सपाट प्रदेशावर पूर्वी समुद्र होता असें कांहींचें मत आहे. सांप्रत चंद्रावर पाणी नाहीं.

चंद्रावरील उंचवटयांचें स्वरूप पृथ्वीवरील उंचवट्यांच्या स्वरूपाहून निराळें आहे. त्यांच्या कांहीं रांगा आहेत. तथापि निरनिराळे पसरलेले ज्वालामुखी फार आहेत. पृथ्वीपेक्षां चंद्रावर ज्वालामुखी पर्वत फारच मोठमोठाले आहेत. ते सर्व सांप्रत शांत आहेत. कांहीं लहान लहान डोंगर निरनिराळे पसरलेले आहेत. कांहीं पर्वतांचीं पठारें सपाट असून त्यांच्या भोंवतीं लहान लहान कडे आहेत. ह्या पठारांवर कोठे कोठें शंकाकृति उंचवटे आहेत. कांहींवर एकच उंचवटा आहे. कांहींचीं पठारें खोलगट आहेत. चिखल किंवा कमावलेला चुना सपाट पसरलेला असून त्यावर लहानसा दगड मारला असतां जशी आकृति दिसते त्याप्रमाणें चंद्रावरलि उंचवटयांची आकृति सामान्यतः दिसते.

चंद्राची प्रत्यक्ष माहिती करून घेण्याचें आजपर्यंत बरेच प्रयत्न झालेले आहेत. एक दारूनें भरलेला अजस्र बाण चंद्रावर सोडून कांहीं प्रत्युतर मिळतें कीं काय यासंबंधीं शोध चालू आहेत. चंद्रासंबंधीं पौराणिक माहिती ‘ सोम ’ लेखांत सांपडेल.

**चंद्रकोना**--हें बंगालच्या मिदनापूर जिल्ह्याच्या घाटाल विभागातील शहर आहे. यांत सन १९११ त ८१२१ लोकसंख्या होती. बरद्वानच्या कीर्तिचंद्रराय नांवाच्या राजानें हें शहर इ. स. च्या १८ व्या शतकात एका हिंदू राजापासून घेतलें; व तेव्हांपासूनच हें बरद्वानच्या राज्यास जोडलें गेलें. येथें म्युनिसिपालिटी सन १८६९ त स्थापन झाली.

**चंद्रगिरी**, ता लु का—हा मद्रास इलाख्याच्या चित्तूर जिल्ह्यातील एक तालुका आहे. याचें क्षेत्रफळ ५४८ चौ. मै. आहे. याची लोकसंख्या सन १९२१त १२२२०८ होती. हा अतिशय डोंगराळ मुलूख आहे. याच्या उत्तरेस पूर्वघाट व दक्षिणेस कारवेतनगर नांवाच्या टेंकड्या आहेत. टेंकड्यांमधील जमीनी फार सुपीक आहेत.

श ह र.—मद्रासच्या चितूर जिल्ह्यांतील चंद्रगिरी तालुक्याचें मुख्य शहर. हें स्वर्णमुखी नदीच्या तीरावर आहे. येथील लोकसंख्या सन १९०१ त ४९२३ होती. सन १५६५ त तालिकोटच्या लढाईत पराभव झाल्यानंतर विजयानगरचे राजे या चंद्रगिरी किल्यांत आले. हा किल्ला इम्मदी नरसिंह यादव रायलू राजानें इ. स. १००० मध्यें बांधिला. हा किल्ला सन १६४६ त गोवळकोंडाच्या सुलतानांनें व सन १७५८ त कर्नाटकच्या नबाबचा भाऊ अबदुल वहाबखानानें घेतला होता. हैदरअलीनें सन १७८२ त जिंकिल्यानंतर हा किल्ला सन १७९२ पर्यंत म्हैसूरच्या ताब्यांत होता. हा किल्ला अशा जागीं बांधिलेला आहे व तटबंदी इतकी मजबूत होती कीं जुन्या काळांत तो हल्ला चढवून सर करणें शक्य नव्हतें. या किल्यावरील इमारती. देवळें वगैरे ढांसळून पडलेलीं आहेत. ईस्ट इंडिया कंपनीला सेंट जॉर्ज किल्ला बांधण्यास येथील राजानें परवाना दिला.

**चंद्रगुप्त**—चंद्रगुप्त हा नंद घराण्यांतील होता. शेवटच्या नंदापासून मुरा नांवाच्या शूद्रेला झालेला हा मुलगा होता म्हणून यास मौर्य म्हणत अशी एक दंतकथा आहे. लहानपणीं अलेक्झांडरची व याची भेट झाली होती (खि. पू. ३२५.) अलेक्झांडरच्या मरणानंतर चंद्रगुप्तानें ( तो मगध देशांतून हद्दपार झाला होता तेव्हां ) आपल्या चाणक्य नांवाच्या ब्राह्मण गुरूच्या सल्ल्यानें मॅसिडोनियन अधिकाऱ्यांचा नाश केला; व नंतर त्याप्रमाणेंच पाटलीपुत्र येथें बंड करून नंद घराण्याचाहि नाश करून आपण स्वतः मगध राज्याच्या सिंहासनावर चढला: त्यानें सर्वत्र व्यवस्था करुन एक प्रचंड साम्राज्य स्थापन केलें ( खि. पू. ३२२ ). चंद्रगुप्त हाच ऐतिहासिक कालांतील हिंदुस्थानचा पहिला सार्वभौम बादशहा होय. यानें चोवीस वर्षे राज्य केलें. पाटलिपुत्र ही त्याची राजधानी होती.

ॲलेक्झांडरच्या मृत्यूनंतर ( खि. पू. ३२३ ) त्याच्या राज्याचे तुकडे होऊन एकेक तुकडा त्याच्या एक एक सेनापतीस मिळाला. आशियामधील मुलुखावर ॲंटिगोनस व सेल्यूकस असे दोघे हक्क सांगूं लागले व बरींच भांडणें होऊन सेल्यूकसला राज्य मिळालें. अलेक्झांडरनें जिंकलेला जो प्रदेश चंद्रगुप्तानें ताब्यांत घेतला होता, तो परत मिळविण्यासाठीं सेल्यूकसनें सिंधु नदी ओलांडून चंद्रगुप्तावर स्वारी केली; पण त्याचा पराभव झाल्यामुळें त्याला माघार घ्यावी लागली. नंतर त्यानें चंद्रगुप्ताशीं तह केला; त्यांत त्यानें काबूल, कंदाहार, हिरात, बलुचिस्तान इत्यादि प्रदेश चंद्रगुप्ताला दिले. याशिवाय चंद्रगुप्ताला सेल्यूकसनें आपली मुलगी दिली व मेगॅस्थेनीस याला चंद्रगुप्ताच्या दरबारीं आपला वकील म्हणून पाठविलें; मेगॅस्थेनीसनें मौर्य घराण्याबद्दल व तत्कालीन हिंदुस्थानाबद्दल पुष्कळ माहिती लिहून ठेविली आहे. चंद्रगुप्तानेंहि सेल्यूकसला ५०० हत्ती बक्षीस दिले.

वर दिलेल्या त्रोटक माहितीखेरीज चंद्रगुप्तासंबंधींची अधिक माहिती उपलब्ध नाहीं. यानें एकंदर २४ वर्षे राज्य केलं याच्या मरणसमयीं याचें राज्य नर्मदेच्या उत्तरेस सर्व हिंदुस्थानभर ( अफगाणिस्थानसुद्धां ) पसरलें होतें. कदाचित् दक्षिणेकडे देखील ( म्हैसूरपर्यंत) त्याचें राज्य पसरलें असेल पण त्याबद्दल खात्रीलायक आधार सांपडत नाहीं.

चंद्रगुप्ताच्या राज्यकारभारासंबंधीं जी माहिती मिळते तिवरून चंद्रगुप्त हा अतिशय कडक शिस्तीचा व व्यवस्थित होता असें दिसतें. त्याचा राज्यकारभार एकतंत्री होता. त्याचें मंत्रिमंडळ असे; परंतु चाणक्यानेंच शेवटपर्यंत याच्या राज्याचा कारभार फार उत्कृष्ट रीतीनें चालविला असें दिसतें. चाणक्याच्या शेवटाबद्दल कांहीं समजत नाहीं. अग्निपुराण व दंतकथा यावरून एक मत तो बिंदुसाराच्या वेळीं जिवंत होता व एक मत भडोचजवळील शुक्लतीर्थी तो चंद्रगुप्तानंतर जाऊन राहिला असें आहे.

चंद्रगुप्ताची कारकीर्द शेवटाला कशी गेली याचा उलगडा होत नाहीं. जैनग्रंथांतून मात्र एक गोष्ट दिलेली आढळते. जैन लोक चंद्रगुप्ताला जैनधर्मी मानतात. व त्याच्या काळीं मगध देशामध्यें जैनधर्माचा प्रसार फार झाला होता असें म्हणतात. याच्याबद्दलची जैन आख्यायिका अशी आहे कीं "जैनमुनि भद्रबाहूनें उत्तर हिंदुस्थानामध्यें बारा वर्षे दुष्काळ पडेल असें भविष्य वर्तविलें होतें; व तें थोडें फार प्रत्ययाला येतांच त्या मुनीनें बारा हजार शिष्यांसमवेत सुपीक अशा प्रदेशावर जाण्याचा निश्चय केला. चंद्रगुप्तहि राज्यत्याग करून त्याच्या बरोबरच गेला. भद्रबाहू व त्याचे शिष्य श्रवण बेलगोल येथें ( म्हैसूरप्रांत) आले. येथें भद्रबाहू वारला व त्यानंतर बारा वर्षांनीं चंद्रगुप्त हा प्रायोपवेशन करून वारला ( ख्रि. पू. २९८ ). चाणक्याच्या अर्थशास्त्रावरून ( शेवटचा भाग ) चंद्रगुप्तानें ज्या नंदाला ठार मारिलें तो नंदराज नास्तिक ( जैन किंवा बौद्धधर्मीय ) होता असें दिसतें. चंद्रगुप्त नेहमीं शिकार करीत असे यावरून तो जैन नसून शैव ( ब्राह्मणधर्मी ) असावा असें वाटतें; व त्याचा शिक्षक आणि अमात्य ( चाणक्य ) तर साक्षात् ब्राह्मणच होता. याचें सैन्य चतुरंग ( दळ ) असून त्यांत सहा लक्ष पायदळ, नऊ हजार गजदळ व तीस हजार घोडदळ होतें; रथदळाची संख्या आढळत नाहीं; सारांश एकंदर चतुरंगदळ नऊ लक्षांचें होतें. चंद्रगुप्ताच्या राज्यांतील व देशांतील एकंदर परिस्थितीचें वर्णन ज्ञा. को. चा प्र. खं. विभाग चौथा यांत आलेलें आहे तेथें पहावें. [ संदर्भग्रंथ मुद्रा राक्षस; अग्निपुराण; एशिआटिक रिसर्चेस. पु. १. रासमाला. पु. १. चाणक्य-अर्थशास्त्र. स्मिथ-ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया ].

**चंद्रगोमिन्**—प्राचीन भारतीय वैय्याकरण. असंगाच्या पंथांतला होता. याची वैयाकरण, तत्ववेत्ता व कवि म्हणून बौद्ध लोकांत फार कीर्ति आहे. तो चंद्रकीर्तीचा समकालीन होता. व चंद्रकीर्तीच्या मतांचा त्यानें प्रतिकार केला; आणि इ. स. ६७३ मध्यें इ-त्सिंग हिंदुस्थानांत आला होता त्यावेळींहि तो जिवंत होता असें विंटरनिझ म्हणतो. ( भारतीय वाङ्मयाचा इतिहास पु. २ ). याचा काल मागें चवथ्या शतकापर्यंत कांहीं पंडित नेतात. चंद्रगोमीनबद्दल पुष्कळ दन्तकथात्मक माहिती असलेल्या तारनाथाच्या मते चंद्रगोमीनें केलेलीं सर्व व विद्वत्ताप्रचुर ग्रंथ असंख्य आहेत. त्याच्या काव्यलेखनापैकीं स्वतःच्या शिष्यास पत्र अशा स्वरूपांत लिहिलेलें शिष्यलिखधर्मकाव्य मात्र आज अस्तित्वांत आहे. त्यांत सुंदर काव्यरचना केलेली असून बौद्धधर्माचीं तत्वें ग्रथित केलेलीं आहेत. याच्या व्याकरणासंबंधीं माहिती विज्ञानेतिहास ( पृ. १९७ ) या भागांत दिली आहे.

**चंद्रनगर**—बंगाल. हुगळी जिल्हा. हुगळी नदीवर फ्रेंच लोकांच्या वसाहतीचें शहर आहे. वसाहतीच्या सरहद्दीवर चंद्रनगर ई. आय. रेल्वेवर कलकत्यापासून २१ मैलांवर स्टेशन आहे. सन१९१७ मध्यें येथील लोकसंख्या २७३५६ होती. फ्रेंच लोकांनीं या ठिकाणीं सन १६८८ त कायमचें ठाणें दिलें. डुप्लीच्या कारकीर्दीत याची भरभराट झाली. अॅडमिरल वाट्सननें समुद्रावरून व क्लाइव्हनें जमीनीवरून याच्यावर मारा करून सन १७५७ त काबीज केलें; व सन १७६० त पुन्हां फ्रेंचांस परत केलें. जेव्हां जेव्हां यूरोपांत ब्रिटिशांची व फ्रेंचांची लढाई सुरू होई तेव्हां हें शहर ब्रिटिश आपल्या हस्तगत करून घेत व लढाई संपल्यावर पुन्हां परत करीत असें सन १८१६ पर्यंत चाललें होतें. शेवटीं सन १८१६ त तें फ्रेंचांच्या ताब्यांत दिलें. येथील कारभारी फ्रेंचांच्या वसाहतींतील गव्हरनरच्या हाताखालीं असतो. ब्रिटिश लोकांनीं जेव्हां अफूच्या व्यापाराचा मक्ता घेतला तेव्हां सन १८१५ च्या कराराप्रमाणें फ्रेंच लोकांस वर्षास ३०० अफूच्या पेटया विकत घेण्यास परवानगी दिली. नंतर अफूच्या पेटयांऐवजीं त्यांस वार्षिक ३००० रु. व त्यांच्या राज्यांतून कोणी अफूचा चोरटा व्यापार करूं नये व केल्यास तो बंद करावा याकरितां वार्षिक रु. २००० देण्यांत येतात. येथें डुप्ली नांवाचें एक कॉलेज आहे. एक ज्यूटची गिरणी आहे.

**चंद्रभागा**—चिनाब म्हणून जी पंजाबांतील नदी तिचें मूळचें नांव.पंढरपुराजवळ भीमानदीला चंद्रभागाच म्हणतात.

**चंद्रहास**—हा केरलाधिपति सुधार्मिक राजाचा पुत्र सुंदर व सर्व लक्षणायुक्त असूनहि त्याचा जन्म मूळ नक्षत्रावर झाला होता व याच्या पायास सहावी अंगुली होती त्यामुळें हा जन्मतांच त्याच्या पित्यास शत्रूंनीं ठार मारलें. मातेनें सहगमन केल्यामुळें हा निराश्रित बनला; तथापि त्याच्या दाईनें त्याला कौंतलकापुरींत वाढविलें, पण तीहि लवकरच मरण पावली. पुढें चंद्रहास भिक्षेवर निर्वाह करीत असतां धृष्टबुद्धि प्रधानाच्या घरीं आला. पण चंद्रहास पुढें राजा होणार असें भविष्य कळल्यावरून धृष्टबुद्धीनें त्याला ठार मारण्याचा अनेकदां प्रयत्न केला. पण सुदैवानें सर्व संकटांतून निभावून आणि प्रत्यक्ष धृष्टबुद्धीच्या विषया नामक कन्येशीं विवाह होऊन चंद्रहास अखेर राजपद पावला. चंद्रहासाचें पौराणिक आख्यान कीर्तनकारांत फार लोकप्रिय आहे.

**चंद्रावती अथवा चंद्रावली**—मुंबई.पालनपूर संस्थान. अबूच्या पहाडापासून दक्षिणेस १२ मैलांवरील ठिकाण. येथें

एक प्राचीन शहर असून त्याचा परीघ १८ मैल होता असें म्हणतात. चंद्रावती हें एकदां व्यापाराचें व धार्मिक ठिकाण म्हणून प्रसिद्ध होतें. अमदाबादचें चीट व रेशीम प्रसिद्ध होण्याला येथील रंगारी व कोष्टी वरेच कारणीभूत झाले. या शहराची भरभराट ७ व्या शतकापासून १५ व्या शतकाच्या आरंभापर्यंत सारखी चालली होती. १३०४ मधील अल्लाउद्दीनाच्या स्वारींनें चंद्रावतीचें स्वातंत्र्य नष्ट झालें. १४०५ त सिरोहीची वस्ती झाल्यापासून येथील लोक तेथें रहाण्यास जाऊं लागले. १८२४ त येथें संगमरवरी दगडाचे २० मनोरे होते. १८७४ त यांपैकीं फक्त तीन किंवा चारच शिल्लक राहिले होते.

**चन्नागरी**—म्हैसुरांतील शिमोगा जिल्ह्याचा एक तालुका. याचें क्षेत्रफळ ४६५ चौ. मैल आहे. येथील लोकसंख्या सन १९११ साली ८३२३३ होती. याचा शेतसारा सन १९०४–५ सालीं रु. १४५००० होता. याच्या मध्यभागी सुलेकेरें नांवाचें मोठें तळें आहे. याच्या दक्षिणेस व पश्चिमेस टेंकड्या आहेत. उत्तरेकडील प्रांत सपाट असून सुपीक आहे. त्यांत बगीचे व उसाची लागवड करतात.

**चन्नपट्टण**, ता लु का.—म्हैसुरांतील बंगलोर जिल्ह्याचा एक तालुका. याचें क्षेत्रफळ ४५३ चौ. मैल आहे. येथील लोकसंख्या सन १९११ त १२२२६९ होती. सन १९०३–४ त यातील शेतसारा १४३००० रु. होता. याच्या उत्तरेस टेंकड्या आहेत व पुष्कळ जमीन पडीत आहे. दक्षिणेस मोठीं तळीं आहेत व जमीन चांगली आहे. याच्या पूर्वेस अक्रावती व पश्चिमेस कम्बनदी आहे. यांत तुती व नारळाच्या झाडांचे वगीचे आहेत.

श ह र.—म्हैसूरच्या बंगलोर जिल्ह्यांतील चन्नपट्टण तालुक्याचें मुख्य शहर आहे. हें रेल्वेस्टेशन असून बंगलोर शहरापासून ३५ मैल आहे. सन १९११ त येथील लोकसंख्या ७६२४ होती. इ. स. च्या १४ व्या शतकांत तेलगू लोकांतील बनजींग घराणे उदययास आलें होतें. त्यांत जगदेवराय नांवाच्या पुरुषानें सन १५७७ त पेनुकोंडाचा चागला बचाव केला म्हणून विजयानगरच्या राजानें त्यास ९ लाख पगोड्याच्या उत्पन्नाचा प्रांत बहाल केला. त्यांत जगदेवरायानें आपली राजधानी आणली व सन १५८० त एक किल्ला बांधला होता. हा किल्ला हल्लीं मोडकळीस आलेला आहे. या ठिकाणीं बनजीग घराण्यांतील पुरुषांनीं सन १६८० पर्यंत राज्य केलें. नंतर हें म्हैसूरच्या ताब्यांत गेलें. यांत लाखेचीं भांडीं, मुलांचे खेळ, पोलादी तारा आणि बांगड्याचे कारखाने आहेत. येथें सन १८७० सालीं म्युनिसिपालिटी सुरू झाली. यांतील उत्पन्न व खर्च सन १९०३–४ त अनुक्रमें ५५०० रु. व ६४०० रु. होता.

**चन्नबसव**—लिंगाईत धर्माचा संस्थापक जो प्रख्यात बसव त्याचा हा भाचा होता. बसवाची बहीण नागलंबिका तिचा हा पुत्र. बसवानें काढलेल्या वीरशैव धर्माची यानें पूर्णपणें स्थापना केली. या चन्नबसवाविषयीं एक पुराण आहे त्याचा गोषवारा पुढें दिला आहे.

च न्न ब स व पु रा ण—हें पुराण कानडी भाषेंत 'वर्धिक षट्पदी' ह्या वृत्तांत विरुपाक्षी कवीनें शालिवाहन शक १५०७ मध्यें रचलें. ह्या वृत्ताचे सहा चरण असून त्यांपैकीं पहिला, दुसरा, चौथा व पांचवा चरण वीस वीस मात्रांचा आणि तिसरा व सहावा पाद बत्तीस मात्रांचा असतो. ह्या पुराणाचा मुख्य विषय म्हणजे चन्नबसव यानें सिद्धरामास दिलेल्या लिंगायत धर्माच्या दीक्षेचें कथानक होय.

पहिल्या प्रास्ताविक अध्यायांत शिव, वृषभ, वीरभद्र, बसव, चन्नबसव, सिद्धरामेश, महादेवी अक्का, शंकरदेव, इत्यादि देवतांस व लिंगायतपंथी विभूतींस नमन केलेलें असून त्यानंतर मलिमल्लेश साधूनें परधर्मीय म्लेच्छांसह मक्केस यात्रा करून तुरुकान्य देशांत वृष्टी पाडली ह्यासंबंधीं माहिती असून विद्यानगरींतील सिद्धवीरेश साधूंची माहिती दिली आहे. त्यानंतर लिंगायत लोकाच्या प्रार्थनेवरून विरुपाक्ष कवीनें हें पुराण कशा रीतीनें रचलें ह्याची माहिती आहे.

प्रथम विरुपाक्षानें सरसकवि, बाण, मयूर, भवभूति, रुद्र, कालिदास, मल्लहन, मलेयराज, अतिबिरिदंक कवि, राघवन, हंपेयहरेश्वर, हलायुध, उद्भट, गुरुपंडितेश, पाल्कुरिकेअराध्य, भीमरस, मोग्गेय, मायिदेव, चामरस, शंकर केरयपद्मरस इत्यादि शैव कवींनां प्रथमारंभीं नमन केलें असून नंतर सर्व काव्यांत शिवकाव्याची महती किती आहे हें सांगून प्रस्तुत चन्नबसव पुराणात नवरसांनीं किती परिपूर्णता आली आहे ह्याचें वर्णन आहे. ह्या पुराणाचा सारांश थोडक्यात सांगावयाचा म्हणजे (१) कैलासवर्णन, (२) नारददर्शन, (३) चन्नबसव जन्म. (४) जन्मोत्सव, (५) बाललीला. (६) राजवाडा, (७) कल्याण राजधानी व भोंवतालच्या प्रदेशाचें वर्णन, (८) सिद्धरामेश्वरास चन्नबसवानें केलेला शिवतत्वोपदेश, (९) शिवाची ताण्डवलीला, (१०) सोमवर्णन, (११) वृषभ, (१२) महालिंग, (१३) अर्धनारी नटेश्वर, (१४) ब्रह्मदेवाचें शीर्षच्छेदन, (१५) भिक्षालीला, (१६) दाक्षिणामूर्ति (१७) विष्णुस्वरूपपरिग्रह, (१८) नीलकण्ठ, (१९) भालचंद्र (२०) जालंधरनाश, (२१) सुदर्शनदान, (२२) गजासुरनाश, (२३) दक्षयज्ञ, (२४) विष्णुनाशक, (२५) कामदहन, (२६) शिवपार्वती परिणय, (२७) कुमारजन्म. (२८) तारकासुरवध. (२८) त्रिपुरदहन, (३०) आनंदसमय, (३१) गंगावतरण, (३२) अंधकासुर वध, (३३) यमदाह, (४४) अर्जुनास पाशुपतास्त्रदान, (३५) आनंदस्वरूप, (३६) चंद्रसूर्याची शर्यत, (३७) शिवोपसक साधूंच्या कथा, (३८) दीक्षाविधि, (३९) षट्स्थानें, (४०) भविष्यकथन, हीं ह्यांतील मुख्य प्रकरणें होत.

प्रथम ब्रह्माण्डगोलांतील सप्तद्वीपांतील जंबुद्वीपाभोवतीं असलेल्या समुद्राचे वर्णन असून नंतर जंबुद्वीप व कैलासपर्वत

यांचें वर्णन आहे. या पर्वतावर महेश्वरापुढें सर्व देव, गंधर्व, अप्सरा, महानद्या, अनेक शृंगीभृंगी इत्यादि भूतगणांसमवेत जमले होते. त्या वेळीं ब्रह्माविष्णू इत्यादिकांनीं महेश्वरास स्तुतींनीं संतुष्ट केलें, इतक्यांत पार्वतीनें महेश्वरास "पृथ्वीवर शिवतत्वकथनाकरितां चित्कला प्रगट करीन" अशा पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण केली. त्यानंतर शंकरांनीं प्रणवध्यान करून भरतखंडांत शिवोपासना किती कमी झाली आहे आणि जैन, बौद्ध, चार्वाक इत्यादि दुष्ट मतांचा किती फैलाव झाला आहे इत्यादि नारद महर्षींनीं सांगितलेली माहिती षण्मुखास सांगून पृथ्वीवर भरतखंडांत जंगमाचें स्वरूप स्वतः ईश्वरानेंच धारण करून शिवोपासनेचा प्रसार करणें किती जरूरीचें झालें आहे त्याबद्दल पार्वतीस सांगितलें. त्यावर पार्वतीनें ईश्वरास पृथ्वीभार हलका करण्याची प्रार्थना केली व नंदीश्वरानें ह्या म्हणण्यास पुष्टी दिली. यावर महेश्वरानें नंदीस भारतवर्षांत मनुष्यरूपानें अवतार घेण्यास सांगून वीरशैवोपासनेचा प्रसार करण्याची आज्ञा केली व स्वतःच्या चित्कलेकरवी षट्स्थानाची उपासना प्रसृत करण्याचें अभिवचन दिलें.

त्यानंतर 'मादिराज' ब्राह्मणाच्या 'मदांबी' स्त्रीच्या पोटीं पार्वतीचा अंश म्हणून नागलंबिका जन्मली व नंदी 'बसव' रूपानें तिचा बंधू झाला व तोच बिज्जल राजाचा मुख्य प्रधान झाला. ह्यानंतर महेश्वरांनीं षण्मुखास नागलंबिकेच्या पोटीं जन्म घेण्याची आज्ञा केली.

च न्न ब स व ज न्म — नागलंबिकेनें गुरूची पूजा केली व प्रसाद भक्षण करून शिवाचें ध्यान करीत ती बिछान्यावर पडली. इतक्यांत महेश्वर तिजपुढें आविर्भूत होऊन त्यांनीं तिच्या उदरातून वीरशैव लिंगायत धर्माचा प्रस्थापक जन्मणार आहे असें सांगितलें. प्रातःकालीं नागलंबिकेनें रात्रीं घडलेला प्रकार बसव प्रधान व इतर लिंगायत लोकांस जाहीर केला. नागलंबिकेची गरोदर स्थिति कळतांच लोक तिच्याबद्दल कुजबुज करूं लागले व राजास देखील ही गोष्ट कर्णोपकर्णी कळली व बसव प्रधान लबाड मनुष्य आहे असें ठरवून नागलंबिकेस समक्षच भेटण्याचा विचार केला. इतक्यांत पोटांतील गर्भानें राजास आंतून प्रत्युत्तर देऊन स्वतःच्या दिव्यत्वाबद्दल खात्री पटवली. तरी राजाचें समाधान होईना. म्हणून नागलंबिकेनें आपलें उदर विदारण करून राजापुढें दाखाविलें. तो आंतून एक दिव्य तेजःपुंज तापस वेषधारी कुमार बाहेर आला. मग मात्र राजाची खरी खात्री पटून त्या दिव्य बालकाची राजानें स्तुती केली. त्या दिव्य बालकाच्या जन्मोत्सवानिमित्त सर्व नगर शृंगारलें गेलें आणि राजानें त्यास पालखींत घालून मोठया समारंभानें त्याची मिरवणूक काढली. नगरवासी स्त्रियांनीं बालकास आशीर्वाद दिले. त्यानंतर बसवानें जंगमपूजा केली व लिंगायत लोकांबरोबर भोजन वगैरे उरकलें. रात्रीं दिव्य बालकास जवळ घेऊन नागलंबिका झोपी गेली असतां महेश्वर व पार्वती यांनीं बालकाचें जातकर्म करुन 'चन्नबसव' असें त्याचें नामाभिधान ठेवलें व कांहीं वेळ बालकाशीं खेळून व त्याच्या जवळ सुवर्ण कलश व सोनेरी पाळणा ठेवून नाहींसे झाले. नागलंबिकेनें वरील प्रकार सत्य समजून बसव प्रधानास सांगितला. सर्व शास्त्रें आपोआप चन्नबसवास प्राप्त झालीं व त्याचें दिव्य सामर्थ्य पाहून बसव प्रधानानें त्याजकरितां एक राजवाडा बांधला व त्यांत चन्नबसव यास ठेवलें. चन्नबसवानें शिवतत्व जाणणारे सहा द्वाररक्षक सहा द्वारावर ठेवून नित्य हजारो जंगमांचा यथास्थितपणें आदरसत्कार करीत राहिला.

प्रा ण लिं गो पा स ना.— एका प्रातःकाळीं लिंगायत लोकांसह बसव प्रधान चन्नबसवाकडे आला व बसवाचा इष्टलिंगउपासनेचा बाह्य प्रकार पाहून प्राणलिंगोपासना कशी करावी ह्याबद्दल विवेचन करुन लौकरच जंगमांस निराळीं घरें बांधून देण्याविषयीं व अल्लमा प्रभूच्या दर्शनाविषयीं आश्वासन दिलें. ज्यावेळीं ह्या नवीन बांधलेल्या मठांत रहाण्यास जंगमांस आज्ञा झाली, त्यावेळीं कांहींनीं ही गोष्ट नाकारली. इतक्यांत चन्नबसवानें त्या मठास आग लावली व त्यामुळें चोहोंकडे एकच गोंधळ उडाला. ह्यांपैकीं तिघेजण मात्र लिंगध्यान करीत धैर्य धरून त्याच ठिकाणीं राहिले. चन्नबसवानें आपल्या प्रभावानें सर्व आग विझाविली.

एकदां एका दिव्य जंगमानें बसव प्रधानाचा प्राण आकर्षण केला आणि राजदूतांनीं ह्या बसवाच्या चमत्कारिक मृत्यूबद्दल राजास कळविल्यावर त्यास अतिशय वाईट वाटून त्यानें चन्नबसवास खरी हकीकत विचारली. चन्नबसवानें सांगितल्याप्रमाणें तो जंगम बसवाजवळ आल्याबरोबर तो सजीव झाला व राजा आनंदानें परत गेला. चन्नबसवानें बसावास लिंगास प्राण समर्पण करणाऱ्या कांहीं साधूंच्या कथा सांगितल्याः—

लिंगान्न नामक याच्या गळ्यांत बांधलेलें लिंग हरवलें, त्याबरोबर त्याचा प्राण गेला व नातलग रडूं लागले, परंतु तें लिंग पुनः जेव्हां त्याच्या गळ्यांत बांधलें त्यावेळीं तो सजीव झाला. सत्यान्न मारण राजा व राणी, घट्टीवाल देव इत्यादिकांच्या देखील अशाच गोष्टी आहेत.

चन्नबसव हा शिवाचा अवतार असून बसव हा साक्षात वृषभ होय व बिज्जल राजा हा द्वाररक्षक असून कल्याण हें प्रतिकैलासच होतें, व त्यांतील रहिवासी हे शिवगण होते. ह्या अवतारी विभूतीस पहाण्याकरितां लांबलांबून शिवोपासक येत आणि सर्व नगरांत महोत्सव चालू असत. ही भरभराट सहन न होऊन मंचन्न नामक एका दुष्ट मनुष्यानें चन्नबसवाच्या वाढत चाललेल्या मोठेपणाबद्दल राजाचे कान भरविले. त्यावर राजानें चन्नबसवास बोलावून घेऊन

जंगमांना खजिन्यांतील पैसे देणें, त्याचप्रमाणें जंगमांमध्यें चाललेले अनाचार इत्यादि गोष्टींसंबंधीं त्यास विचारलें. त्यावर चन्नबसवानें राजास स्वधर्मपालनाचा उपदेश विविध तऱ्हांनीं करून बसव अमात्याबद्दल राजाच्या मनांत उत्पन्न झालेला किंतु काढून टाकला. इतक्यांत सायंकाळ झाला व नगरांत फिरण्याची राजास इच्छा झाली व त्यानें शहराच्या निरनिराळ्या भागांत चाललेले प्रकार पाहिले.

सृ ष्टयु त्प त्ति (अ. ११–१५).—कल्याण येथें बसव व चन्नबसव यांस भेटण्याकरितां सिद्धराम यास बरोबर घेऊन प्रभु सोलापुराहून निघाला. वाटेंतील प्रदेशाची शोभा पाहून वाटसरूंचीं मनें प्रसन्न झालीं. कल्याण नगराच्या बाहेरील उपवनाची शोभा पाहून वरील दोघे प्रवासी राजवाड्याकडे फिरले. यानंतर शांतीचें परमस्थान अशा बसव प्रधानाच्या राजवाड्यासमीप येतांच बसवानें आपल्या चाकराकरवीं ह्या वाटसरूंना आंत बोलाविलें, परंतु ह्या भाडोत्री आदरसत्कार पाहून प्रभूनें आमंत्रण नाकारिलें. इतक्यांत चन्नबसवानें वरील प्रकाराचे परिणाम अत्यंत अनिष्ट होणार हें जाणून वरील पूज्य अतिथींची अर्घ्यपाद्यादिकांनीं पूजा केली.

प्रभु सिद्धरामासह चन्नबसवाच्या वाड्यांतील बाहेरच्या एका दिवाणखान्यांतच बसले, कारण शिवतत्वाच्या षट्स्थानांची दीक्षा न घेतलेल्यांस आंत घ्यावयाचें नाहीं असा चन्नबसवाचा प्रघात होता.

सिद्धरामानें शरीरावर इष्टलिंग धारण केलें नव्हतें, कारण स्वतः प्राणलिंगी मनुष्यास इष्टलिंग धारण करण्याची जरूरी नाहीं अशी त्याची समजूत होती. परंतु ह्या प्रघात शिवोपासकाचा असून वीरशैवोपासनेचा प्रकार अगदींच निराळा आहे ही गोष्ट चन्नबसवानें सिद्धरामास समजाऊन दिली.

ह्या ठिकाणीं सृष्टयुत्पत्तीचें वर्णन आलें आहे. त्यांत वेदांत मतांतील ब्रह्माऐवजी "परशिव" तत्व कल्पिलें असून त्याजपासून मायाशक्ति, तीपासून महालिंग, महालिंगापासून पराशक्ति, पराशक्तीपासून सदाशिव व आदिशक्ति, त्याजपासून ईश्वर व इच्छाशक्तिमहेश्वर व संज्ञानशक्ति ह्या महेश्वरानेंच विराट् स्वरूप धारण करून स्वर्ग, पाताल इत्यादि लोक व चराचर भूतें जन्मलीं, असा थोडा फरक आहे. ब्रह्मा हा त्याच्या उजव्या बाहूपासून व विष्णू हा त्याच्या डाव्या बाहूपासून उद्भवल्याचें वर्णन आहे. कल्पांतीं महेश्वर प्रलयनृत्य करून जगताचा संहार करतो.

ह्या महेश्वराच्या आज्ञेनें प्रकृति-महत्तत्व-अहंकार--त्रिगुण व त्यानंतर पंचमहाभूतें हा सृष्टयुत्पत्तीचा क्रम आहे. नंतर महेश्वरापासून रुद्र, ब्रह्मा, त्याजपासून मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पलाश, क्रतु, भृगु, वसिष्ठ, दक्ष हे नऊ ब्रह्मे होतात. नंतर इतर दक्षसृष्टीचें वर्णन इतर ठिकाणच्या प्रमाणेंच आहे. पुढें चतुर्दशभुवनांचें ठराविक वर्णन असून एकंदर ब्रह्माण्डरचना वर्णिली आहे.

म हा लिं गो पा स ना (१६–२५).—ह्या दहा अध्यायांत महालिंगाचें महत्व प्रस्थापित करणारी अशी एक कथा आली आहे कीं, एकदां ब्रह्मा व नारायण ह्यांमध्यें बलवान् कोण ह्याबद्दल वाद माजला. विष्णूनें पुष्कळ प्रकारें शंभु हाच श्रेष्ठ आहे असें सिद्ध केलें, परंतु पत्नीस अर्धांग देणारा व स्मशानांत फिरणारा हा शंभु मोठा देव कसा हें ब्रह्मदेवास कळेना. इतक्यांत पांच तोंडें, दहा हात, पंधरा नेत्र असें स्वरूप महेश्वरानें धारण केलें तरी ब्रह्मदेव त्याची निंदाच करूं लागला. इतक्यांत एक आकाशास शिखर भिडवणारें व पाताळांत पाया असलेलें असें महालिंग उत्पन्न झालें आणि त्याचें शिखर किंवा पायथा जो शोधील तो मोठा अशी आकाशवाणी झाली. नारायणानें वराहरूप धारण करून पृथ्वी खणण्यास सुरवात केली आणि ब्रह्मदेवानें हंसाचें रूप धारण करून शिखर पाहण्याचा प्रयत्न चालविला. परंतु तेथील केतकीनें, ब्रह्मदेवानें शीर्ष पाहिलें अशी खोटीच साक्ष देण्याचें कबूल केलें. परंतु पुढें दोघेहि महालिंगापुढें नम्र झाले व आपापलें काम करूं लागले.

अ र्ध ना री श्व र.—ब्रह्मदेवानें अतिशय तप करून महेश्वरास आपल्या पोटीं पुत्ररूपानें जन्मून सृष्टयुत्पत्तीस मदत करण्याची प्रार्थना केली. त्यावेळीं महेश्वरानें 'रुद्रस्वरूप' व महाशक्तीनें 'महाकाली'स्वरूप धारण केलें. परंतु ब्रह्मदेवानें भीतिग्रस्त होऊन दुसरें सौम्य स्वरूप धारण करण्यास सांगितल्यावरून शंभूनें अर्धनारीश्वर स्वरूप धारण केलें व अकरा रुद्रांची मदत ब्रह्मदेवास सृष्टयुत्पत्तीच्या कामीं मिळवून दिली.

ब्र ह्मा शी र्ष च्छे द न.—ब्रह्मदेवानें एकदां सभेंत सर्व मुनींपाशीं बढाई मारली कीं आपण सर्वश्रेष्ठ आहोंत. विष्णूनें शंभूच्या मोठेपणाबद्दल पुष्कळ सांगितलें तरी देखील त्याची बरोबरी करण्याकरितां स्वतःच्या ठिकाणीं आणखी एक पांचवें मुख उत्पन्न केलें व त्यांतून शिवनिंदा करूं लागला. तेव्हां शंभूनें रुद्रस्वरूप धारण करून त्याचें तें मस्तक तोडलें. तेव्हां सबंध विश्वांत रक्ताचा पूर झाला. तो शंभूनें तृतीयनेत्रांतील ज्वालेनें नाहींसा केला. तेव्हां ब्रह्मदेवास पश्चात्ताप झाला व शंभूनें त्याला प्रेमानें उचलून त्याचें सांत्वन केलें.

शि व भि क्षा ट न—ब्रह्मदेवाचें तोडलेलें पांचवें मस्तक घेऊन भिक्षेकऱ्याच्या वेषांत विष्णुप्रमुख इतर देवांची आपल्या ठिकाणीं किती भक्ति आहे हें पाहण्याकरितां शिव भिक्षाटनास निघाला तो प्रथम वैकुंठास आला. त्या ठिकाणीं 'विष्वक्सेन' नामक द्वाररक्षकानें जाण्यास निर्बंध केल्यावरून त्याचें मुंडकें त्रिशूलानें छेदून टाकलें, तरी देखील तो शिवदर्शनानें आनंदीतच दिसत होता. विष्णूनें अंतर्ज्ञानानें ह्या अतिथीस ओळखून केवळ स्तुतीनें ह्याचें समाधान होणार नाहीं असें जाणून सुदर्शन चक्रानें त्यानें आपल्या भालप्रदेशांतील रक्ताचा त्या ब्रह्मदेवाच्या मस्तकास उपहार एक हजार वर्षें दिला, व शिवानेंहि ह्याबद्दल विष्णूची वाहवा केली. ह्यानंतर शिव हा इंद्र, अग्नि, यम वगैरेकडे गेला व

सरतेशेवटीं तो हिमालयांतील तपस्वी लोकांची सत्वपरीक्षा करण्याकरितां जाऊन त्यानें तेथील पतिव्रता तापसस्त्रियांस मोह घालून आपल्या सौंदर्यानें आकर्षित केलें. स्त्रियांची अशी स्थिति पाहून मुनिवृंदास अत्यंत कोप आला व त्यांनीं ह्या याचकवेषधारी शिवास दग्ध करण्याकरितां एक होम सुरू करून त्यांतून बरेच दैत्य, सर्प, शस्त्रास्त्रें उत्पन्न केलीं व त्याकरवीं याचकास दग्ध करण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्व प्रयत्न निष्फळ झाले. सरतेशेवटीं मुनिवरांस शिवस्वरूपाचें ज्ञान होऊन त्यांनीं शिवाची क्षमा मागितली.

**मत्स्य भेद व विष्णूचे दशावतार.**— एकदां ब्रह्मदेवास निद्रा लागली व वेद त्याजपासून निघून जात असतां 'तम' दानवाच्या हातीं गेले,त्यावेळीं देवांच्या प्रार्थनेवरून विष्णूनीं मत्स्यावतार घेऊन वेद परत आणले. परंतु त्या मत्स्यास आपल्या पराक्रमाचा गर्व येऊन तो देवास त्रास देऊं लागला, त्यावेळीं शिवानें मत्स्यास ठार मारून त्याच्या अस्थींचें हत्यार बनविलें. या विष्णूच्या दशावतारांचें कारण असें झालें कीं, देवदैत्यांत लढाई सुरू असतां देवगुरूनें शिवापासून संजीवनी विद्या मिळविण्याचे ठरविलें व त्याचप्रमाणें शुक्राचार्यानेंहि ठरविलें. दोघांनीं खडतर तपश्चर्या केली म्हणून शिवास अत्यंत संकट प्राप्त झाल्यामुळें शिवानें अशी युक्ति काढली कीं, जो कोणी एखाद्या खड्डयात विस्तव पेटवून त्यांत धूम्रपान करीत दहा हजार वर्षे राहील त्याला संजीवनी प्राप्त होईल. बृहस्पति भ्याला परंतु शुक्राचार्यानें धाडस करण्याचें ठरविलें व दैत्यास भृगुमुनींच्या आश्रयास जाऊन राहण्यास सांगितलें. त्यावेळीं नारायणानें त्याजवर हल्ला केला. भृगुपत्नीनें मंत्रसामर्थ्यानें देवांचें स्तंभन केलें. त्यावेळीं नारायणानें तिला ठार मारलें. इतक्यांत दैत्यांच्या ओरडण्यामुळें भृगु भानावर आले व त्यांनीं नारायणास दहादां पृथ्वीवर अवतीर्ण होण्याचा शाप दिला. पुढें एकदां समुद्रमंथन करतांना हालाहलविष शिवाच्या वांटयास आलें व अमृत देवांस मिळालें.

**जालंधरवध व सुदर्शनदान.** (अ.२६-२७).— एकदां शिवास इंद्रानें एखादा बरोबरीचा वीर युद्धाकरितां उत्पन्न करण्यास प्रार्थना केली.त्यावेळीं शिवानें आपल्या तृतीय नेत्रांतील एका तेजस्वी ठिणगीपासून समुद्रांत जालंधर दैत्य उत्पन्न केला. त्यानें राहुकेतु यांची कथा ऐकून देवाशीं युद्ध आरंभिलें. प्रथम दैत्यांचा पराजय झाला परंतु पुढें पुढें जालंधराच्या मारानें जेव्हां देव भयभीत झाले त्यावेळीं नारायणानें जालंधराशीं युद्ध आरंभिलें आणि सरतेशेवटीं सर्व देव जालंधराचे कैदी बनले. परंतु दैत्यसेना शिवगणापुढें भयभीत झाली व शिवांनीं जालंधरवध केला व त्याच्या शरीरापासून सुदर्शनचक्र तयार करून तें नारायणास दिलें. परंतु एकदां तेंच चक्र विष्णूनें आपला पूजक जो क्षुप राजा त्यास यूतांत जिंकणारा दधीच याच्या नाशाप्रत योजलें परंतु तें व्यर्थ गेलें. त्यामुळें क्षुपानें शैवोपासना स्वीकारली.

**गजासुरवध व शिवलोकवर्णन**(अ.२८-२९).— कावेरी तीरावर अगस्त्यमुनी तपश्चर्या करीत असतां आकाशांत फिरणाऱ्या एका गंधर्वानें आपल्या स्त्रीच्या हारांतील एक पुष्प त्यास मारलें व त्यामुळें अगस्त्याच्या शापानें तो बलाढ्य हत्ती झाला व त्रैलोक्यास ताप देऊं लागला. कोणाहि देवास त्याचा वध करतां येईना. तेव्हां सरतेशेवटीं शिवानें त्याचें मुंडकें तोडलें व कैलासावर येतो तों पार्वतीनें आपल्या अंगाच्या मळाचा केलेला एक पुत्र त्यास आडवूं लागला तेव्हां शिवानें त्याचें मुंडकें कापलें व त्यास हत्तीचें लावलें आणि यामुळें तोच पुत्र पुढें 'गणपति' नांवानें प्रख्यात झाला.याप्रमाणें शिवलोकवर्णनाचा हा २९ वा अध्याय आहे.

**दक्षयज्ञ, पार्वतीपरिणय व कुमारजन्म** (३०-४०).-दक्षप्रजापतीचें हें कथानक इतर पुराणांतल्यासारखेंच आहे. परंतु मध्यंतरीं दक्षयज्ञांत वीरभद्रानें शरभ पक्षाचें स्वरुप धारण करून नृसिंहवध केला. आणि शिवास त्याचें सिंहासन करून दिलें असें वर्णन आहे. पुढें तारकासुराचा वध करण्याकरितां षण्मुख जन्मला व त्यानें दैत्याचा वध केला.

**त्रिपुरदाह व गंगाधारण** (अ.४१-५०).-तारकासुराचे तीन पुत्र तारकाक्ष, कमलाक्ष व विद्युन्माति यांनीं बापाच्या मृत्यूनंतर उग्र तपश्चर्या करून ब्रह्मदेवापासून अभेद्य अशा त्रिपुरांची प्राप्ति करून घेतली व सर्व त्रैलोक्यास त्रास देण्यास सुरुवात केली. परंतु षण्मुख व नंदीश्वर ह्यांनीं विद्युन्मति, शिंशुमार इत्यादींचा नाश केल्यामुळें तारकराक्षसास फार काळजी लागली. त्यावेळीं शिवानें ब्रह्मा व विष्णू यांस त्याच्या नगरांतील अमृतनिधि पिऊन टाकण्यास व त्याच्या स्त्रियांचें पातिव्रत्य भ्रष्ट करण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें दोघांनीं पशूंचीं रूपें धारण करून अमृत संपविलें व विष्णूनें बौद्ध स्वरूपानें स्त्रियांत भ्रष्टाकार माजवला; आणि नंतर शिवानें त्याचा नाश केला. पुढें इंद्राच्या चित्ररथ उद्यानांत क्रीडा केल्यावर पार्वतीश शिवानें गंगा आपल्या जटेंत धारण करण्याची लीला केली, पुढें कमलाक्षानें तपःसामर्थ्यानें अंधकासुर नामक पुत्र शिवापासून मिळवला. पुढें शिवानें त्रिशूलानें त्याचा नाश करून त्याच्या छातीवर तांडव नृत्य केलें. यानंतर विष्णूचे दशावतार वर्णन केले आहेत.

**श्वेतराज व गौतममुनि यांच्या कथा** (अ.५१-५४).—श्वेत नामक एक बलाढ्य राजा सैन्याचें निरीक्षण करीत नगरांतून चालला असतां प्रवासास गेलेल्या व्यापाऱ्याची एक सुंदर स्त्री पाहून तो मदनातुर झाला व त्यानें तिला पकडून आणून भ्रष्ट केलें. एकदां तिला चंपक पुष्पांचा गुच्छ देत असतां त्यांतील एक फूल खालीं पडल्यावरून त्यानें "हें फूल शिवास अर्पण" असें सहजगत्या वाक्य उच्चारलें

पुढें यमाचे दूत त्यास नेण्यास आले असतां त्याच्या पापाबद्दल शिक्षा देण्यापूर्वी एक रात्र रंभेसह क्रीडेंत काढण्याची परवानगी दिली. तो रंभेकडे गेला असतां रंभेनें त्याला लिंगायत होण्याविषयीं उपदेश केला व अजाणतां घडलेल्या पुण्याच्या योगानें कैलासी गेलेल्या कित्येक प्राण्यांच्या कथा सांगितल्या. एक मरणोन्मुख पापी जुन्या देवळांत पडला असतां एक कुत्रें तो मेला असें समजून त्याला खाण्याकरितां भस्माच्या पायांनीं त्याच्या अंगावर चालून येत होतें. तों तो जिवंत आहे म्हणून पळालें. पण त्या कुत्र्याच्या पायाचें भस्म त्याच्या कपाळास लागल्यामुळें त्याला कैलास प्राप्ति झाली. अशा कथा ऐकून तो श्वेत राजा लिंगायत झाला. जेव्हां यम त्यास नेऊं लागला तेव्हां त्यानें शिवाचें ध्यान केलें, तों लिंगातून शिव आविर्भूत होऊन त्यानें तृतीयनेत्रांतील अग्नीनें यमराजास दग्ध केलें. परंतु ब्रह्मदेवाच्या मध्यस्थीनें जगाचा संहार करावयासाठीं शिवानें त्यास पुनरपि जिवंत केलें.

एकदां भयंकर दुष्काळ पडला असतां गौतम नामक ऋषीनें खडतर तपश्चर्या करून " बीं पेरल्याबरोबर तावडतोब धान्य व्हावें " असा वर शिवापासून मागून घेतला. पुढें त्यायोगानें हजारों ऋषींचे प्राण वांचविले. पाऊस पडून आबादानी झाली.

५३ व्या अध्यायांत सूर्यवंश व चंद्रवंश यांतील राजांच्या वंशावळी असून पहिल्यांतील राम हा स्त्रीच्यामुळें व दुसऱ्या वंशांतील पांच पांडव हे संपत्तीच्या आशेनें नाश पावल्याचें उत्तम उदाहरण म्हणून दिलें आहे.

५५ व्या अध्यायांत शिवोपासनेनें कोणाकोणास सद्गति मिळाली असा सिद्धरामानें प्रश्न केला असतां चन्नबसवानें कथा सांगितल्या आहेत.

सा नं द मु नि ( अ. ५६ )—संपूर्णवित्त मुनीचा पुत्र सानंद मुनि हा शैवोपासकांपैकीं एक प्रख्यात पुरुष होय. एकदां दुसऱ्या एका ऋषीनें त्यास मरणानंतर चांगल्या व वाईट माणसांस प्राप्त होणाऱ्या शिक्षेचें स्वरूप सांगितलें. तें ऐकून सानंदाच्या मनांत यमलोकांत जाण्याची इच्छा उत्पन्न झाली. यमानें सर्व भाग त्यास दाखविले. परंतु नरक दाखविण्याचें त्याच्या जिवावर आलें. मोठ्या कष्टानें त्यानें सानंदास नरकाकडे नेलें. तेथील प्राण्यांची दुःखद स्थिति पाहून सानंदानें त्यांस मुक्ति दिली. हें पाहून यमास राग आला व त्यानें शिवाकडे आपल्या जागेचा राजीनामा पाठविला. परंतु शिवानें समजूत घालून त्यास पुनः स्वपदावर नेमलें.

वी र शै व पं थी सा धूं च्या क था ( अ. ५७ ).—शैव पंथात सांगितलेल्या मार्गानें जर कैलासप्राप्ति होते, तर इष्टलिंग धारण करुन वीरशैव होण्याची काय जरुरी आहे? असा सिद्धरामाचा प्रश्न ऐकून चन्नबसव म्हणाला, शैवपंथांतील उपासक कैलासांत जाऊन फक्त बाहेरच उभे राहतात, आणि नंदीश्वराकडून त्यांच्या गळयांत इष्टलिंग बांधलें जाई. तोंपर्यंत त्यांस आंत जातां येत नाहीं, परंतु वीरशैव उपासक थेट कोठें मज्जाव न होतां अगदीं अंतर्गृहांत जातात. यानंतर वीरशैव पंथातील साधूंच्या कथा सांगितल्या आहेत.

च न्न ब स वा चा सि द्ध रा मा स उ प दे श.(अ.५८)—ह्या अध्यायांत लिंगायत धर्मांतील आधिभौतिक व अध्यात्मिक तत्वज्ञानाचा चन्नबसव सिद्धरामास उपदेश करतो. प्राणि हा स्वेदज, अंडज, उद्भिज, व जारज या प्रकारांनीं कसा जन्मास येतो, पंचमहाभूतापासून पंचवीस मूलपदार्थ कसे उत्पन्न होतात, कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें यांचे व्यापार कसे चालतात, एकंदर स्थूल, सूक्ष्म व कारण यांतील शरीराची स्वरूपें काय, वगैरे गोष्टींचें सविस्तर वर्णन आहे.

शि व त त्त्व व वी र शै व ध र्म ( अ. ५९-६१ ).—सिद्धराम हा शैव होता परंतु वीरशैव धर्माची दीक्षा देतांना चन्नबसवानें पुढीलप्रमाणें त्यास उपदेश केला.

वीरशैव होऊं इच्छिणारानें प्रथम पृथ्वी, संपत्ति, व स्त्री ह्या तीन दोषांपासून अलिप्त राहिलें पाहिजे. दीक्षा देण्याच्या कामीं पांच जलपात्रांचा उपयोग करावयाचा असतो, कारण मूळ ' परशिव ' ह्यानें प्रथम सदाशिव, ईश्वर, महेश्वर व रुद्र ह्यांस लिंगायत धर्माचा उपदेश केला, व त्याच प्रत्येकापासून ( १ ) रेवणसिद्ध, ( २ ) मारूळसिद्धेश्वर ( ३ ) येकोराम, ( ४ ) पंडिताराध्य हे पृथ्वीवर अवतार झाले व त्यांच्याच नांवानें चार पात्रें ठेवलीं जातात. मधलें पात्र मुख्य शिवतत्व याचें दर्शक असून त्याचा पार्थिव अवतार चन्नबसव होय. लिंगपूजा सूर्योदयापूर्वी केली तर उत्तम, सूर्योदयाच्या वेळींच केली तर मध्यम,व सूर्योदयानंतर कनिष्ठ होय. प्रथम शिवापासून चित्प्रणव, त्याजपासून नाद, बिंदु, कला व ह्या तीनपासून अ,उ,म् हीं तीन अक्षरें उत्पन्न झालीं.

शि व पू जे चे प्र का र.—( १ ) वेद व आगम यांचें ज्ञान नसतांना केलेली, ( २ ) वेदावर श्रद्धा न ठेवतां केलेली, व ( ३ ) लिंगायत शास्त्राप्रमाणें केलेली पूजा.

शि वा चीं प ट्स्था नें.—पहिलें ऐक्यस्थल, दुसरें शरणस्थल, तिसरें प्राणलिंगिस्थल, चौथें प्रसादीस्थल, पांचवें महास्थल व सहावें भक्तिस्थल. ह्या स्थानांची प्राप्ति झालेल्यास अनुक्रमें:—( १ ) ऐक्य, (२) शरण, (३) प्राणलिंगी, (४) प्रसादी, ( ५ ) महेश, ( ६ ) भक्त, असें म्हणतात. ह्यांपैकीं साधकास प्रथम भक्तिस्थलापासून वर मार्ग आक्रमण करावा, लागतो.

भ वि ष्य क थ न (अ.६२).—यानंतर प्रभूनें चन्नबसवाची रजा घेतली. नंतर सिद्धरामानें भविष्यकालाबद्दल प्रश्न केल्यावरून चन्नबसव सांगूं लागला:—प्रभु हा फिरतां फिरतां कल्याण येथें बसवाच्या यज्ञकुंडावर आरोहण करील व त्यामुळें सर्व जंगम रागावतील, पुढें प्रभु हा तें सर्व अन्न एकटाच खाऊन तो जंगमांसहि संतुष्ट करील. पुढें विज्जल राजाच्या, बसव प्रधानाच्या मृत्यूनंतर चन्नबसव हा प्रधान होईल.

नागलंबिकेच्या सांगण्यावरून चन्नबसव हा राजास भविष्य सांगेल. त्याप्रमाणें तो राजा ६० वर्षे राज्य करून, नंतर तुर्क लोक ७७० वर्षे राज्य करतील व कल्याण शहराची धुळधाण होऊन कुरुगली शहर भरभराटीस येईल व या प्रदेशास "तुरकान्य" हें नांव पडेल. सिद्धराम हा सोलापुरासच राहील व चन्नबसव हा शिवध्यानांत गर्क होईल. इतक्या सुमारास होयसल राजवंश राजपदावर चढेल. या वंशातील राजा वेलापूरांत विष्णूचें एक देवालय बांधील व त्यांत विष्णूची प्रतिमा स्थापन करील. श्रीशैल पर्वतावर वारांगना आपल्या झोंपड्या बांधतील व मद्यविक्रय करतील व कुम्मट किल्ला दिल्लीच्या तुर्कांकडून काबीज केला जाईल. ( अ. ६३ ) अनेगोंदीचे राजे विद्यानगरी हें हंपीशेजारी नवीन शहर बांधतील. १०१ साधू लिंगायत धर्माचा प्रसार करतील. त्यानंतर पुनः ७०० साधू शैवोपासनेचा प्रसार करतील. त्यानंतर तुरकांचा नाश होईल व हा राजा कल्याण शहराची बांधणी पुनश्च करून लिंगायत धर्माचा चोहोंकडे प्रसार करील [ रॉयल ए. सो. पु. ३ ].

**चन्नरायपट्टण**—हा म्हैसूरच्या हस्सन जिल्ह्याचा तालुका आहे. याचें क्षेत्रफळ ४१५ चौरस मैल आहे. यांतील लोकसंख्या सन १९११ त ९७१३५ होती. येथील शेतसारा सन १९०३-४ त रु. १९७००० होता. यांत हिमवती व शिमशा या दोन नद्या व पुष्कळ तळीं आहेत. यांतील प्रदेश चढउतारीचा आहे.

**चंपा**—मालिनी नगरीस चंप राजानें ठेविलेलें नांव. ही अंग देशाची राजधानी होय ( भार. वन. अ. ११३ ). हींत पांडवांच्या वेळेस कर्ण रहात होता ( भार. शांति. अ. ५ ). हल्लीं या जागीं भागलपूर आहे असें म्हणतात. येथें बौद्धांचीं लेणीं आहेत असें सांगतात. येथें ह्युएनत्संग गेला होता. हें ठिकाण मोंगीरपासून ५० मैलांवर आहे. चंपावती, चंपमालिनी, चंपापुरी अशींहि दुसरीं नांवें आहेत

**चंपानेर**—मुंबई, पंचमहाल जिल्ह्यांतील गांव, उ. अ. २२°३०' व पु.रे ७३°३०'. चंपानेर हें नांव एका कुणब्याच्या किंवा वाण्याच्या नांवावरून पडलें असें म्हणतात. अनहिलवाडा येथील राजानंतर अल्लाउद्दिनानें पराभूत केलेल्या कांहीं रजपूत चव्हाणांनीं येथें वस्ती केली. नंतर १४८४ त सुलतान महंमद बेगडानें हें ठिकाण हस्तगत करून घेतलें. त्यानें तेथें बरीच सुधारणा करून बगीचे, घरें, वगैरे तयार केलीं. लवकरच येथील व्यापार वाढला व आंबे, चंदन, तरवारी व रेशीम यांकरितां यांची फार प्रसिद्धि झाली. १५३६ पर्यंत चंपानेर गुजराथची राजधानी होतें. १५३५ त हुमायूननें गुजराथच्या बहादूरशहाचा पराभव केल्यापासून चंपानेरचें महत्त्व कमी होत गेलें. मोंगलांच्या कारकीर्दींत चंपानेरची उतरती कळा चालू राहून १७ व्या शतकांत तेथील जमीन उजाड पडली. १८५३ त ब्रिटिश सत्तेखालीं तें आल्यावर तेथें वस्ती वाढवून उर्जितावस्था आणण्यांकरितां १२६० रुपये खर्च करण्यांत आले, परंतु हा व पुढील सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

येथील प्राचीन वैभवाची साक्ष देणाऱ्या अनेक पुराण्यांपैकीं शिकंदरशहाची कबर ही एक होय. याशिवाय खोनपीरची कबर, एक मिनार्की मसीद, पंचमहु डाक मशीद, कसबिन तलाव, शहराभोंवतालची तटबंदी, शहरका मसीद, जामामसीद, नागिना मसीद व बडा तलाव वगैरे इतर इमारती व तलाव आहेत.

**चंपारण**—बिहार—ओरिसा. तिरहुत विभागांतील एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ ३५३१ चौरस मैल आहे. हा गंडकी नदीच्या डाव्या तीरावर १०० मैल लांब व उत्तरेच्या बाजूस २० मैल व दक्षिणेच्या बाजूस ४० मैल रुंद पसरलेला आहे. यांत मळीच्या जमीनीचें मैदान पुष्कळ असून सोमेश्वर नांवाचा एक पर्वत आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून २८८४ फूट आहे.

सोमेश्वर पर्वताच्या दक्षिणेस दोन टेंकड्या आहेत. जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागांत जंगल असून त्यांतून इमारती लांकूड तोडतात व गवत गुराढोरांस चारितात. गंडकी नदीनें याचे दोन भाग केले आहेत. उत्तरेकडील भाग जुन्या मळीचा बनलेला असून त्यांत तांदूळ होतात, व दक्षिणेकडील भाग नव्या मळीचा असून त्यांत मका, हरबरा, वाटाणा, गहूं, जोंधळा, जवस, तीळ हीं धान्यें होतात. गंडकी नदींत सगौलीपर्यंत ७ ते १२ टन वजन घेऊन होड्यांतून जातां येतें, परंतु ही उन्हाळ्यांत आटते तेव्हां इच्यांतून पायीं देखील पलीकडे जातां येतें. भागमती नदीवर १५ ते १८ टन वजन घेऊन होड्या चालूं शकतात, व हिचा प्रवाह फार जोराचा आहे. पावसाळ्यांत हिला लवकर पूर येतो व कधीं कधीं पाणी दुथडी भरून फार नासधूस करते. या नदीचा प्रवाह पुष्कळ वेळा बदलत गेलेला आहे. या जिल्ह्याच्या मध्यभागांतून ४३ तळ्यांची एक ओळच्या ओळ आहे. याच्या उत्तरेकडील भागांत जंगल असून त्यांत साल, सिस्सू, खैर आणि तुती यांचीं झाडें फार आहेत. दक्षिणेकडील भागांत नांगरलेली शेतीची जमीन बरीच आहे. वस्तीच्याजवळ आंबा, जांभूळ वगैरे झाडें लाविलीं आहेत; व कोठें कोठें खजूरीचीं व ताडाचीं झाडें आहेत.

याच्या उत्तरेकडील जंगलांत वाघ, चित्ते व त्याच बाजूच्या खालील जंगलांत अस्वली आढळतात. यांत नीलगाई, नाना प्रकारचे मृग व हरिण, काळवीट व रानडुकरें हीं बहुतकरून सर्व भागांत आहेत. यांतील वर्षांचें उष्णमान सरासरी ७६ अंश असतें. यांत वर्षास सरासरी ५५ इंच पाऊस पडतो.

**इतिहास.**—येथील प्रचलित कथा, प्राचीन काळच्या अवशिष्ट वस्तू व आतां धुळीस मिळालेलीं प्राचीन शहरें हीं पूर्वींचा इतिहास दर्शवितात. पुरातन हिंदूंच्या काळांत हें घनदाट अरण्य होतें. ज्या ठिकाणीं राम आणि लव व कुश यांचा

संग्राम झाला त्या ठिकाणास संग्रामपूर नांव पडलें असें सांगतात. या प्रांताच्या कांहीं पोटविभागांशीं हिंदू ऋषींच्या नांवांचा संबंध आहे. इ. सनाच्या १००० वर्षांपूर्वी चंपारण हें संस्कृत अध्यापनाचें माहेरघर असून, मिथिला राज्यांत होतें. अरराज व केसरीया येथें पुष्कळ मनोरंजक प्राचीन वस्तू आहेत. अशोकाच्या वेळेचा एक सुंदर खांब लौरिया मंदनगडजवळ उभा असून दुसरा रामपुर्वा नांवाचा खांब पिपरियाजवळ पडला आहे. बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्यानंतर एक हिंदु राजघराणें नेपाळांत सन १०९७ते १३२२च्या दरम्यान सिमराऊन येथें राज्य करीत होतेंसें दिसतें. त्या ठिकाणीं अजूनहि कांहीं धुळीस मिळलेल्या प्राचीन वस्तू आहेत. सन १७६५ त हा जिल्हा, बंगालच्या दुसऱ्या भागांबरोबर ईस्ट इंडिया कंपनीच्या अमलाखालीं गेला. सन १८६६ पर्यंत हा सारम जिल्ह्याचा भाग गणला जात होता. सन१८५७ त सगौली येथील शिबंदीनें दंगा केला होता. सन१९१२ त बंगाल्यांतून नवीन बिहार–ओरिसा प्रांतांत याचा समावेश झाला.

सन १९११ मध्यें लो. सं. १९०८३८५ होती; पैकीं १६१९४६३ हिंदू व २८६०९८ मुसुलमान होते. यांतील ठारू लोक पूर्वी हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या कोसी नदीपासून गंगानदीपर्यंतच्या टापूंत रहात असत. त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या असून त्यांची उपजीविका तांदुळावर होत असे. ते उद्योगी व प्रामाणिक शेतकरी होते. या जिल्ह्यांत डोमांची मगहीया पोटजात आहे. ते चोर व घरफोडीचे धंदे करणारे असून त्यांच्या कामांत कोणी आडवे आल्यास ते चाकू व लाठ्या यांचा उपयोग करतात.

शे त की.—मोठ्या गंडकी नदीच्या उत्तरेकडील जमीनींत काळी माती आहे. या मातीला तेथें "बांगर" म्हणतात. ही जमीन धान्यास योग्य आहे. परंतु पाटानें त्यास पाणी द्यावें लागतें. उत्तरेकडील कांहीं भागांत चिकण माती आहे. त्या ठिकाणीं तांदूळ होत नाहीं; त्यांत मका, जव, हरबरा, वाटाणा, उडीद, तीळ व जवस पिकतात. यांत दोन पिकें निघतात. एक पावसाळ्यांत व दुसरें हिंवाळ्यांत. पावसाळ्यांतल्या पिकाची कापणी झाल्यावर त्याच शेतांत पुन्हां जवस, हरबरा, वाटाणा वगैरेंचीं पिकें काढतां येतात. यांत तांदुळाचें पीक मुख्य आहे. त्याखालोखाल जव, मका, गहूं वगैरेंचीं पिकें आहेत. याशिवाय यांत नीळ, गळिताचीं धान्यें, खसखस व ऊंस हीं होतात. खसखसीच्या लागवडीसाठीं सरकार अगाऊ पैसे देतें. स. १९०३–४ सालांत ५०००० एकर जमीनींत खसखस लावली होती व त्यांतून ३०० टन अफू निघाली. गंडकी नदींत व पांचनद, हरहा, भब्स, आणि सोनाह यांच्या ओहोळांतून कधीं कधीं सोन्याचे बारीक कण वहातात. बघहा ठाण्यांत अरराज, लौरिया, व हरहा नदीच्या तीराजवळ चुन्याचे वाटोळे दगड सांपडतात. हे दगड पक्की सडक करतांना त्यांत घालतात किंवा भाजून त्याचा चुनाहि होतो. या जिल्ह्याच्या सर्व भागांत क्षारमिश्रित माती आहे व त्यांतून नुनिआ जातीचे लोक सोरा काढतात. या उद्योगाचें मुख्य ठिकाण संग्रामपूर येथें आहे. इ. स. १९०३–०४ सालांत ३०,००० मण सोरा काढला गेला

व्या पा र व द ळ ण व ळ ण.––यांत जाडेंभरडें सुती कापड, घोंगड्या, कांबळी व मातीचीं भांडीं होतात. बेट्टिहा येथील साखर शुद्ध करण्याचा कारखाना भरभराटीस येत चालला आहे. सराह येथें साखर करण्याचा कारखाना आहे. निळीचा व्यापारहि बराच चालतो. इ. स. १८१३ त बार येथें कर्नल हिके यानें प्रथम एक निळीचा कारखाना सुरू केला. आतां नीळीचे बरेच लहानमोठे कारखाने आहेत. निळीची लागवड 'झिरात' पद्धतीनें म्हणजे आपल्या नोकरांकडून किंवा 'आसामीवार' पद्धतीनें म्हणजे कास्तकारांकडून करावतात. या दोन्ही पद्धतींत निळीच्या झाडांची कटाई व गाडींत भरून वहाण्याचीं कामें जमीनमालकाकडे असतात. ज्या वेळेस कास्तकार लागवड करतात त्या वेळेस त्यांनां बी व लागल्यास कर्जाऊ पैसे मक्तेदार लोक देतात व त्यांचा हिशोब वगैरे वर्षाच्या शेवटीं होतो. निळीचीं झाडें तोडून एका मोठ्या पिपांत शिजवितात व त्यांनां बुडवून किंवा वाफेनें जो रस काढतात त्याला शिजविलें व वाळविलें म्हणजे रंगाच्या वड्या तयार होतात. १९०३–०४ सालांत निळीचें उत्पन्न २०.२० लाख रु. झालें. निळीच्या मोसमांत या कामांत दररोज ३३००० मजूर खपतात.

गांधींच्या जाण्यामुळें चंपारण्यास थोडेंसें राजकीय महत्व प्राप्त झालें होतें. १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसनंतर बिहार येथील नागरिकांच्या आग्रहावरून गांधी चंपारण्याकडे जाण्यास निघाले. निळीच्या बागांतून काम करणाऱ्या मळेवाल्यांची स्थिति समक्ष पहाण्याकरितां ते त्या ठिकाणीं गेले होते. चंपारण्याच्या हद्दींत पाऊल टाकतांच तेथील मॅजिस्ट्रेटनें शांतता व सुव्यवस्था यांच्या संरक्षणार्थ गांधींनां मनाई केली व त्यांनींहि कायदेभंगाचें आव्हान सरकारास केलें. त्यांच्यावरील खटला काढून टाकावा असा वरील सरकारचा हुकूम झाला व बिहारच्या मळेवाल्यांची स्थिति पहाण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें व गांधींनाहि सदस्य म्हणून घेण्यांत आलें. १९१७ मध्यें चंपारण्यासाठीं बिहारकौन्सिलांत एक बिल मांडण्यांत आलें व नामदार मॉड यांनीं गांधींची स्तुति केली. परंतु मळेवाल्यांनां गांधींची ही घरसोड पसंत पडली नाहीं. व त्यांच्यावर अन्यत्रहि टीकेचा भडिमार वृत्तपत्रांतून होऊं लागला. या प्रसंगीं गांधींनीं आपलें धोरण अनत्याचारी व शांतपणाचें ठेवलें होतें.

या जिल्ह्यांतून नीळ, जवस, तीळ वगैरे धान्य व साखर हीं बाहेर जातात व मीठ, कपडा, मातीचें तेल, कोळसा व तंबाखू बाहेरून आंत येतात. नेपाळाकडे जाणारा मुख्य व्यापाराचा रस्ता चंपारण्यामधून गेला आहे. बराचसा व्यापार

लहान गंडकी व मोठी गंडकी या नद्यांमधून होतो. या नद्यांवर गोविंदगंज, बरहरवा, मानपूर आणि बगहा या व्यापारी पेठा आहेत. याशिवाय यांत व्यापाराचीं ठिकाणें बेहीआ, मोतीहारी, चैनपतिआ, चापकाहिआ, रामगर्व केसरिया व मधुवन हीं होत.

बेंगॉल आणि नॉर्थवेस्टर्नरेल्वेची तिरहुत स्टेटरेल्वे नांवाची शाखा बेहीआला १८८३ च्या आगस्ट महिन्यांत खुली झाली. या रेल्वेचा व इस्टइंडियन रेल्वेचा संबंध गंगा नदीवरील मोकमेह या ठिकाणीं तरीच्या योगानें होतो.

दु ष्का ळ.—हा जिल्हा दुष्काळाच्या फार आधीन आहे. सन १७७० चा मोठा दुष्काळ यांत फारच जाणवला, व बंगाल प्रांतांत एकंदर लोकसंख्येपैकीं एक तृतीयांश लोक बळी पडले असें म्हणतात. १८६६ च्या दुष्काळांत, जे दुष्काळ निवारण्याचे उपाय केले गेले ते अपुरे झाल्यामुळें ५०००० माणसें मृत्यूमुखीं पडलीं. सन १८७४ च्या दुष्काळाचें उग्रस्वरुप बगहा, शिकारपूर आणि अदापूर ठाण्यात भासलें. परंतु त्याच्या प्रतिकारार्थ मोमोठीं कामें सुरु करून १० लाख रु. खर्च झाला व २८ हजार टन धान्य बाहेरून आलें त्यामुळें माणसें दगावलीं नाहींत. यानंतर सर्वांत मोठा कोरडा दुष्काळ १८९७ त पडला. १८९५ व ९६ सालांत पाऊस कमी पडल्यामुळें व वस्तूंच्या किंमती सर्व ठिकाणीं फारच वाढल्यामुळें हा दुष्काळ फारच उग्र स्वरुपाचा झाला.

रा ज्य व्य व स्था.—राज्यव्यवस्थेकरितां या जिल्ह्याचे सद्र व बेदीआ असे दोन विभाग केले आहेत. सन १५८२ त अकबर बादशहाच्या तोडरमल्ल प्रधानानें जमिनीचा बंदोबस्त व मापणी प्रथम सुरू केली. त्यावेळेस जमिनीची मापणी १४८ चौरस मैल होती व महसूल १.३८ लाख रु. होता. १९०८ सालीं ज्यावर कर बसविला आहे अशी जमीन ३२००चौ. मै. होती. सन१९०३–४ त १२४७ वतन वाड्यांस १.१५ लाख रु. जमिनमहसूल होता. रयतेपैकीं शेंकडा ८६ लोकांचा आपल्या जमिनीवर मालकी हक्क व लागवडीच्या जमीनीपैकीं शेंकडा८३जमीन त्यांच्या ताब्यांत आहे. "रयतेस आपला जमिनीवरील मालकीचा हक्क दुसऱ्यास देता येत नाहीं", असा जरी कायदा आहे तरी असे प्रकार या जिल्ह्यांत फार घडतात, व विकत घेणारे निम्मे लोक धनको असतात. या जिल्ह्याचें एकंदर उत्पन्न ( फक्त मोठमोठ्या सदरांखालीं येणारें ) व शेतसारा अनुक्रमें ११.१४ लाख व ५.१५ लाख रुपये आहे. येथील शिक्षण मागासलेलें आहे. येथील लोक संख्येपैकीं शेंकडा २.५ जणांस ( ४.५ पुरुष आणि ०.१ स्त्रियांस ) लिहितां व वाचतां येतें.

[हंटर—स्टॅटिस्टिकल अकाउंट ऑफ बेंगाल पु.१३(१८७७); स्टीव्हन्सन—मूर—सेटलमेंट रिपोर्ट, कलकत्ता, १९००; इं. गॅ. १० ].

**चंपावत**—संयुक्त प्रांताच्या अलमोरा जिल्ह्याची तहसील. हिचें क्षेत्रफळ १२५३ चौ. मै. आहे. इ. स. १९११ सालीं याची लोकसंख्या १३९४५३ होती. यांत १६०४ खेडीं आहेत; परंतु एकहि शहर नाहीं. इ.स.१९०३-०४ सालीं शेतीचा वसूल ६५००० रुपये व कराचें उत्पन्न ८००० होतें. नांगरलेली जमीन १६९ चौ. मै. होती. तीपैकीं १४चौ. मै. जमिनीला पाटाचें पाणी देण्याची व्यवस्था होती. तनकपूरपासून लिपूलेख आणि दार्मा या घाटांकडे एक रस्ता जातो व त्या वाटेनें तिबेटशीं व्यापार चालतो.

**चंपाषष्ठी**—मार्गशीर्षांतील शुद्ध षष्ठीस चंपाषष्ठी असें म्हणतात. या दिवशीं शंकराच्या अंशभूत अशा मल्लारि नामक देवतेनें मल्लासुराचा वध केल्याबद्दलची कथा मल्लारि महात्म्यांत आहे. चंपाषष्ठीचा उत्सव ( नवरात्र ) मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत असतो. यास खंडोबाचें नवरात्र असें म्हणतात. हा उत्सव देशावरील लोकांत विशेष रूढ आहे. कोकणस्थ ब्राह्मणांत हा उत्सव आढळत नाहीं.

**चंबळा नदी**—मध्यहिंदुस्थान व राजपुताना या प्रांतांतून वहात जाणारी व यमुनेला मिळणारी ही नदी, इंदूर संस्थानांत महुनजीक जनापओ डोंगरांत उगम पावून विंध्यगिरीच्या उत्तरेकडील बाजूनें इंदूर, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणांहून राजपुतान्याकडे वहात गेली आहे. या नदीला मध्यहिंदुस्थानांत चंबळा व क्षिप्रा या उपनद्या मिळाल्या आहेत बुंदी व कोटा यांच्या मर्यादा चंबळा नदीवरून झाल्या आहेत. कोटा शहरानजीक डोंगरकड्यांतून वाहणारा या नदीचा नीलवर्ण प्रवाह फार शोभिवंत दिसतो कालीसिंध व पार्वती या उपनद्याहि तीस मिळाल्या आहेत. पुढें ईशान्येकड वहात जातांना जयपूर, जोधपूर आणि ग्वाल्हेर यांच्यामधून ही नदी गेली आहे. जयपूर प्रांतांतील बना नदी या नदीला मिळते व तेथून ती धोलपूरच्या दक्षिण प्रांतांतून पुढें वहात जाते. धोलपूर शहराच्या दक्षिणेस तीन मैलांवर राजघाट या ठिकाणीं नावेचा पूल असून त्या घाटाच्या पूर्वेस थोड्या अंतरावर एक रेल्वेचा मोठा पूल, ही नदी तरून जाण्याकरितां बांधण्यांत आला आहे. आग्रा व एटावा जिल्हे आणि ग्वाल्हेर यांमधून जाणारी ही चंबळानदी एटावा शहरापासून पंचवीस मैलांवर यमुनेला जाऊन मिळते. चंबळा व यमुना यांचा संगम झाल्यानंतरहि चंबळा नदीचा धवल प्रवाह बऱ्याच अंतरापर्यंत दिसून येतो. यमुनेला मिळेपर्यंत या नदीचा आक्रमणमार्ग ६५० मैल आहे. चंबळेचें मूळचें नांव "चर्मण्वति" होतें असें म्हणतात.

**चंबा संस्थान**—पंजाबांतील एक एतद्देशीय संस्थान. हें पंजाब कमिशनरच्या राजकीय अधिकारांत आहे. क्षेत्रफळ ३२१६ चौ. मैल. ह्या संस्थानच्या पश्चिमेस व उत्तरेस काश्मीर; पूर्वेस व दक्षिणेस इंग्रजांच्या ताब्यांतील कांग्रा आणि गुरुदासपूर. हिमपर्वताच्या दोन श्रेणी व हिमनद्या ह्या

संस्थानांतून जातात. पश्चिमेस व दक्षिणेस बऱ्याच दूरपर्यंत सुपीक खोरीं पसरलीं आहेत.

इ ति हा स.—चंबा संस्थानांत बरेच महत्वाचे शिलालेख व ताम्रपट सांपडले आहेत. त्यांवरून त्या प्रांताच्या इतिहासाची थोडीबहुत खात्रीलायक जुळणी झाली आहे. साधारणपणें ६ व्या शतकांत मारुत नांवाच्या सूर्यवंशी राजानें ब्रह्मपूर नांवाचें शहर वसविलें. ६८० मध्यें मेरुवर्मा यानें त्या संस्थानच्या मर्यादा लांबपर्यंत वाढविल्या. ९२० मध्यें सहीलवर्मा यानें चंबा शहर वसविलें. मोंगल कारकीर्दीत हें संस्थान मांडलिकच समजलें जात असे. तरी अंतर्व्यवस्थेमध्यें हें जवळजवळ स्वतंत्रच होतें. इंग्रजांच्या वर्चस्वाखालीं हें संस्थान १८४६ मध्यें आलें व १८४८ मध्यें तेथील राजाला सर्व संस्थानच्या मालकीची सनद दिली. १८६२ मधील सनदेनें राजास दत्तक पुत्र घेण्याचा हक्क प्राप्त झाला. संस्थानात एकंदर १६१७ खेडीं आहेत. लोकसंख्या १९२१ मध्यें १४१८६७ होती. मुख्य भाषा चंबियाली. लेखनपद्धतीस टाका म्हणतात. पंजाबी, हिंदी, ऊर्दू ह्या भाषाहि थोड्याबहुत बोलल्या जातात.

सर्व जमीनीची संपूर्ण मालकी राजाकडे आहे. पेरणीसाठीं व एकंदर लागवडीकरतां संस्थानाकडून ज्यांना करारानें जमीन मिळाली आहे त्यानां मालगुजार म्हणतात. या मालगुजारांना आपली जमीन गहाण टाकतां येते व जमीन विकण्याचा व इतर रीतीनें तिची वासलात लावण्याचा पूर्ण हक्क ह्या मालगुजारांनां असतो.

येथील मुख्य पीक तांदूळ, मका, डाळ, ज्वारी, बाजरी, बटाटे यांचें होय. कांहीं कांहीं भागांत चहाची लागवड करतात. जनावरें साधारण दिसावयाला लहान व हलक्या दर्जाची असतात. लाहूल टेंकड्यावर सापडणारीं तट्टें फार प्रसिद्ध आहेत. मेंढ्या बहुतेक सर्व लोक पाळतात. ब्लँकेटें व निरनिराळीं कापडें मेंढ्यांच्या लोकरीपासून तयार करतात.

संस्थानाचा फार महत्वाचा असा जंगलाचा भाग १८६४ मध्यें ९९ वर्षांच्या करारानें इंग्रज सरकारास दिला आहे. याचें संस्थानास २१००० रुपये वर्षाचे येतात. येथील देवदार लांकूड सर्व ठिकाणीं पाठविण्यांत येतें. पर्वतश्रेणींमधून खनिज पदार्थ फार सांपडतात. ब्रह्मौर व चौरा वझारतीमध्यें लोखंड सांपडतें. स्लेटीच्या दगडांच्या खाणी फार आहेत. संस्थानांत कारखाने असे कोठेंच नाहींत. येथील लोक रोजच्या गरजा भागविणाऱ्या वस्तु काय त्या घरीं तयार करतात. येथून मध, लोकर, लांकूड यांचा निर्गत व्यापार आहे. संस्थानांत एकंदर आठ पोस्टऑफिसें आहेत. यांतील मध्यवर्ती ऑफिस राजधानीच्या ठिकाणीं आहे. पोस्टखातें पोस्ट-मास्तर-जनरलच्या ताब्यांत असून पोस्टऑफिसांची पहाणी अंबाला विभागांतील सुपरिंटेंडेंट करीत असतो.

रा ज्य का र भा र.—हल्लींचा राजा रामसिंग रजपूत वंशांतील आहे. संस्थानचें उत्पन्न सुमारें ५ लाख आहे. खंडणी ३२२५ रुपये आहे. राज्यकारभाराच्या कामांत राजाला त्याच्या हाताखालील दिवाण (वजीर) मदत करीत असतो. हा दिवाण अम्मलबजावणी खात्याचा व न्यायखात्याचा वरिष्ठ अधिकारी असतो. राजाच्या खालोखाल अधिकार दिवाणाचा असतो व राजाच्या अभावीं दिवाणच राजाचें काम पहात असतो. पांच वझारातींचे निरनिराळे परगणे आहेत. या परगण्यांमधून जमीनमहसूल गोळा करण्यासाठीं निरनिराळे अधिकारी नेमले आहेत.

संस्थानांतील मुख्य कोर्टें चंबा शहरांतच आहेत. प्रत्येक वझारतीमध्यें तहशिलदाराप्रमाणेंच एकेक अधिकारी नेमलेला असतो. परंतु त्यास १००० रुपयांपर्यंत दिवाणी खटले चालविण्याचा अधिकार असतो. अपिलें सदर कोर्टाकडे जातात. तेथून वजीराकडे व सर्वांवर मुख्य अपिलकोर्ट राजा होय. राजानें दिलेली मरणाची शिक्षा लाहोरच्या कमिशनरनें मुक्रर करावयाची असते. इंडियन पिनलकोड व क्रिमिनल प्रोसीजर कोड हीं थोड्याबहुत प्रमाणानें संस्थानांत चालतात.

**चब्बी**—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हुबळीच्या दक्षिणेस आठ मैलांवर एक खेडें. या गांवाचें पुर्वीचें नांव शोभ होतें असें म्हणतात. प्राचीन काळीं ही जैन राजांची राजधानी होती व त्या वेळच्या बांधलेल्या सात जैन देवळांपैकीं एक देऊळ अजून राहिलें आहे. इ. स. ९७१ च्या एका शिलालेखात याचा उल्लेख सांपडतो. विजयानगरच्या राजांनीं ( इ. स. १३४८–१५६७ ) चब्बी नगराची सुधारणा केली असें म्हणतात. कृष्णरायानें ( इ. स. १५०९–१५२९ ) येथें हुबळी येथील किल्ल्याप्रमाणें किल्ला बांधला. मुसुलमानी अमलांत सावनूरच्या नबाबाच्या राज्यांत हा भाग मोडत होता. पेशव्यांच्या वेळीं दारूगोळा करण्याचा कारखाना होता. मल्लिकार्जुन व नेदगल बसवण अशीं दोन जुनीं देवळें येथें आहेत. किल्ल्यांतील एका विहिरीवर एक शिलालेख व कालकादेवीच्या देवळाजवळ एक शिलालेख असे सांपडले आहेत.

**चमारडी**.—मुंबई. काठेवाड. गोहिलवाड जिल्ह्यांतील स्वतंत्र खंडणी देणारा तालुका, व एजन्सी ठाण्याचें मुख्य ठिकाण. हें धोला जंक्शनच्या पूर्वेस सुमारें १० मैलांवर आहे. प्रासिया भावनगरचे भायाद आहेत.

**चरक**—यजुर्वेदाच्या कांहीं प्राचीन शाखांनां सामान्यतः चरक असें नांव आहे. चरकशाखांत कठ, अव्हरक कठ, प्राच्य कठ, कपिष्ठल कठ, चारायणीय, वारायणीय, वार्तांतवेय, श्वेततर, औपमन्यव, पातांडनीय, मैत्रायणीय हे भेद येतात. वाजसनेयीसंहितेच्या एका खिलांत चरक ही संज्ञा निंदाद्योतक दिसते. ३० व्या अध्यायांत पुरुषमेधप्रसंगीं बळी द्यावयाच्या माणसांची एक यादी दिली आहे. तींत चरकाचार्य हा दुष्कृताचा बळी म्हणून

निवडला आहे. यावरून व शतपथ ब्राह्मणांतील या अर्थाच्याच निंदास्पद वाक्यांवरून अध्वर्यूंच्या प्राचीन शाखांविषयीं याज्ञवल्क्यासारख्या प्रतिस्पर्ध्यांच्या मनांत किती द्वेषबुद्धि जागृत होती हें दिसून येतें. स्वाभाविक कारण असें असावें कीं हे भटकणारे ऋत्विज निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन दक्षिणा घेत असावेत व स्थानिकांची भिक्षुकी बुडवीत असावेत आणि त्यामुळें शुक्ल यजूंस त्यांबद्दल द्वेष वाटत असावा. चरकांची गणना शुक्लांत किंवा कृष्णांत अशी कोणांतच निश्चितपणें करतां येणार नाहीं जे चरक नसतील ते स्थायिक आणि स्थायिकांतील शुक्ल कृष्ण हे पुढले भेद अशी ऐतिहासिक परंपरा असणें शक्य आहे. भागवतामध्यें वैशंपायन याज्ञवल्क्य यांच्या भांडणापूर्वी जे वैशंपायनांचे शिष्य होते त्या सर्वांसच चरकाध्वर्यू म्हटलें आहे. (स्कंद १२ अध्याय ६ श्लोक ६१) चरक शाखेंतील महाराष्ट्रीयांच्या आजच्या स्थितीविषयीं वेदविद्या पृ. १९६ येथें थोडीशी माहिती दिलीच आहे.

**चरक.**—एक प्राचीन भारतीय वैद्य. याचा ग्रंथ चरकसंहिता या नांवानें प्रसिद्ध असून आयुर्वेदांत प्रमाणभूत मानिला जातो. या ग्रंथांत सूत्र, निदान, विमान, शारीर, इंद्रिय, चिकित्सा, कल्प व सिद्धी अशीं आठ स्थानें आहेत. [विज्ञानेतिहास, पा. ३७९ पहा.] चरक हा बौद्धधर्मीय राजा कनिष्क याचा राजवैद्य होता असें चिनी ग्रंथांवरून दिसतें. अरबी ग्रंथकारहि हिंदुस्थानांतून इराण, अरबस्थान देशांत गेलेला एक वैद्यकावरील ग्रंथकार अशी चरकाची माहिती देतात. चरकसंहितेवरील कांहीं टीका फार जुन्या (इ. स. ६५० च्याहि पूर्वीच्या) आहेत.

**चरखा**—सूत काढणें पहा.

**चरखा.**—मुंबई इलाख्याच्या काठीयावाडांतील लाखापादर ठाण्यांतील एक स्वतंत्र खंडणी देणारी जहागीर. हींत एकच गांव आहे. प्रासिया वालजातीचे काठी आहेत.

**चरखारी संस्थान**—मध्यहिंदुस्थानांतील बुंदेलखंड पोलिटिकल एजन्सीच्या ताब्यांतील एक सनदी संस्थान. याचें क्षेत्रफळ ८८० चौ. मै. आहे. यांत केन व धासन या नद्या आहेत. येथील हवा माळव्यापेक्षां उष्ण आहे, परंतु त्रासदायक होत नाहीं. येथें वर्षांत सरासरी ४३ इंच पाऊस पडतो. या संस्थानाची घटना स. १७६५ त झाली. स. १७३१ त पन्नाच्या छत्रसाल राजानें आपल्या राज्याचे कांहीं भाग करून त्यांतील एक भाग आपल्या तिसऱ्या मुलास, जगत् राजास दिला. या भागाची राजधानी जैतपूरास होती व त्याचें वार्षिक उत्पन्न ३१ लाख रु. होतें. जगत् राजानें आपल्या मागें आपल्या तिसऱ्या मुलास, किरत्‌सिंगास गादीचा वारस नेमिला होता. परंतु बाप हयात असतांनाच किरत्‌सिंग मेला. सन १७५७ त जेव्हां जगत्‌राज मरण पावला तेव्हां गादीच्या वारसासंबंधानें कलह उत्पन्न झाला. किरतसिंगास गुमानसिंग व खुमानसिंग हे दोन पुत्र होते. त्यांपैकीं गुमानसिंग यानें गादी घेण्याचा प्रयत्न केला, परंतु जगत्‌राजच्या पहाडसिंग नांवाच्या मुलानें त्या दोघां भावांनां चरखारी किल्यावर ठेविलें. सन १७६४ त यांचा कांहीं शर्तीवर समेट झाला व पहाडसिंगनें आपल्या राज्यापैकीं बांडा गुमानसिंगास दिलें व चरखारी खुमानसिंगाकडे आलें. त्यावेळीं चरखारीचें उत्पन्न ९ लाख होतें. खुमानसिंग हा चरखारीचा पहिला राजा होय. तो सन १७८२ त मेल्यावर त्याचा मुलगा विजय विक्रमाजित बहादूरसिंग गादीवर बसला. विजय बहादूरसिंग व त्याचे भाऊबंद यांमध्यें नेहमीं तंटेबखेडे चालत. शेवटीं बांडाच्या अर्जुनसिंगानें त्यास राज्याबाहेर हांकून दिलें. अलीबहादर व हिम्मतबहादूर यांनीं जेव्हां इ. स. १७८९ त बुन्देलखंडावर स्वारी केली तेव्हां आपलें राज्य आपल्यास परत मिळेल या हेतूनें त्याचें स्वामित्व पत्करून त्यांस सामील झाला. अलीबहादरानें सन १७९८ त सनद देऊन विजय बहादुरास चरखारी किल्ला व जवळील प्रदेश परत दिला. त्यावेळेस याचें उत्पन्न ४ लाख होतें. ब्रिटिशांनीं सन १८०३ त बुंदेलखंड घेतलें त्यावेळेस विजय बहादुरनें त्यांच्या अटी मान्य करून सन १८०४ मध्यें सनंद घेतली. विजय बहादूर स. १८२९ त मेला व त्याचा नातु रतनसिंग हा गादीवर आला. यानें स. १८५७ च्या बंडांत ब्रिटिशांस फार मदत दिल्यामुळें कारणानें त्यांनीं यास वंशपरंपरेनें २०००० ची जहागिरी, ११ तोफांची सलामी व दत्तक घेण्यास अधिकार दिला. रतनसिंग मरण पावल्यावर सन १८६० त त्याचा अज्ञान मुलगा जयसिंगदेव गादीवर बसला. सन १८७४ त वयांत आल्यावर यास आपल्या संस्थानचा अधिकार देण्यांत आला, परंतु या संस्थानांत ४-५ वर्षांत इतकी अव्यवस्था झाली कीं सन १८७९ त या ठिकाणीं एक ब्रिटिश अधिकारी सुपरिंटेंडेंट नेमावा लागला व जयसिंगाचे सर्व आधिकार काढून घ्यावे लागले. जयसिंग निपुत्रिक होता. तो मेल्यावर त्याच्या बायकोनें मलखानसिंग या ९ वर्षाच्या मुलास दत्तक घेतलें. इ. स. १८८६ त हें बुंदेलखंडाच्या पोलिटिकल एजंटच्या अधिकाराखालीं आलें, व मलखानसिंगाच्या ताब्यांत पूर्ण अधिकार सन १८९४ त देण्यांत आले. या संस्थानिकास महाराजाधिराज सिपाहदार-उल्-मुल्क ही पदवी आहे व ११ तोफांची सलामी आहे. तेथील लोकसंख्या १९११ सालांत १३२५३० होती. याच्या क्षेत्रफळापैकीं २६३ चौ. मैल जमिनींत लागवड करितात. यांत गहूं, ज्वारी, हरबरा, कोद्रू आणि कापूस पिकतो. यांत हिऱ्यांच्या कांहीं खाणी आहेत. या खाणी लोकांनां टेक्यानें देतात, व ठेकेदारांपासून हिऱ्यांच्या किंमतीवर शेंकडा २५ रु. संस्थानास मिळतात. चरखारीपासून महोबापर्यंत पक्का रस्ता झाल्यामुळें व्यापार बराच चालतो. या संस्थानातर्फे पोस्टाचीं तिकिटें संस्थानांतच छापलेलीं आहेत.

येथील कारभार महाराजा स्वतः पहातो. संस्थानचे बावन-चोरासी, हसनगर, राणीपूर आणि सतवार असे चार भाग करून प्रत्येकावर एक एक तहसिलदार नेमिला आहे. येथील वार्षिक उत्पन्न ५ लाख रुपये आहे. एकंदर कारभार पहाण्यासाठीं व संस्थानिकाच्या इतमामासाठीं १.५ रुपये, लष्करासाठीं ८९००० रुपये,सारावसूली करण्याकरितां ३७००० रुपये इत्यादि खर्चाचीं महत्वाचीं खातीं आहेत.

**शहर**—मध्यहिंदुस्थानच्या चरखारी संस्थानांतील मुख्य शहर. याचें महाराजनगर नांव आहे. हें शहर जी. आय. पी. रेल्वेच्या झांशी–माणिकपूर शाखेवरील महोबा स्टेशनपासून १० मैल आहे. १९११ त येथील लोकसंख्या ९८७९ होती. हें रंजीत पहाडाच्या पायथ्याशीं वसलेलें आहे व यांत तीन तळीं आहेत. पहाडावर मंगलगड नांवाचा किल्ला आहे. राजा खुमानसिंगनें येथें आपली राजधानी केली. तेव्हांपासून या ठिकाणास महत्त्व आलें. आतां रेल्वे सुरु झाल्यापासून हें व्यापाराचें एक केंद्रस्थान झालें आहे यांत साखर, मीठ, कापड आणि रॉकेल हे पदार्थ येतात. व यांतून धान्य, तीळ, जवस आणि तूप हे पदार्थ बाहेर जातात. यांत दवाखाना, मुलांच्या व मुलींच्या शाळा आणि एक डाक बंगला आहे.

**चरणदासी**—एक वैष्णवपंथ. १७३० च्या सुमारास चरणदास नांवाच्या गृहस्थानें दिल्ली येथें हा पंथ स्थापिला. त्यानें रचलेलें या पंथाचें बरेचसें वाङ्मय हिंदी पद्यांत आहे. याच्या दोन भक्तिणींनींहि ग्रंथ लिहिले आहेत. या पंथाची रचना कबीरपंथासारखीच आहे. गुरूची अवश्यकता, मूर्तिपूजानिषेध, भक्तांची आवड, शाश्वत अशा ईश्वराचें नामस्मरण या तऱ्हेची शिकवण या पंथाकडून दिली जाते. भागवतपुराण हें या पंथाचा प्रमाणभूत धार्मिक ग्रंथ आहे. पंथानुयायी मूळ शिक्षेविरुद्ध देवळांतून मूर्ती बसवितात व राधाकृष्णाच्या स्वरूपांत ईश्वराराधना करितात.

**चरणव्यूह**—वेदाभ्यासाची व्यापकता दाखविणारा ग्रंथ. याच्या हस्तलिखित प्रतींत अनेक प्रकारचे पाठभेद आढळतात. पुढील माहिती चौखंबा आवृत्तीवरून देऊन मधून मधून बडोदे आवृत्तींत (संपादक के. त्रिं. पेंडसे शके १८२४) आढळून येणारे फरक देत आहों. या ग्रंथांत वेदांच्या सर्व शाखांची माहिती दिली आहे. 'चरण म्हणजे वेदराशीचा चवथा भाग व त्यांचा व्यूह म्हणजे समुदाय तो चरणव्यूह अशी चरणव्यूह शब्दाची कांहीं व्याख्या देतात. चरणव्यूहाचीं चार खंडें असून प्रत्येक खंडांत एक एक वेदाची माहिती दिली आहे. चरणव्यूहांत ऋग्वेदाच्या आश्वलायनी, शांखायनी, शाकल, बाष्कल व मांडूकेयी (भांडूकायन पं. प्रत) पांच शाखा दिल्या आहेत. या पांचहि शाखांच्या संहितांत मंडलें दहा व अध्याय ६४ हे सारखेच आहेत. ऋचांच्या संख्येंत फरक आहे. शाकल संहितेंत ऋक्संख्या १०४७२ व सूक्तसंख्या १०१७ आहे. ( परंतु आठव्या मंडलांतील वालखिल्य नामक सूक्तांचा यांत संग्रह नाहीं ). ऋचांतील पदांची संख्या १५२८८५ आहे. शांखायनांची वालखिल्यसहित पदसंख्या १५३७४३ आहे. ज्या मंत्राचा पदपाठ नाहीं त्यांनां 'खिल' अशी संज्ञा आहे. असे मंत्र म्हणजे त्र्यंबकंयजामहे हा (मं. ७ सू. ५९ ऋ.१२) मंत्र व ऋतंचसत्यं ( मं. १० सू. १९०) हें सूक्त होय. ऋग्वेदाध्ययन करणारांच्या चार संज्ञा आहेत. त्या पुढीलप्रमाणें:–( १ ) चर्चाः—ताल्वोष्ठपुटव्यापारानें दुसऱ्यास ऐकूं जाण्यासारखें अध्ययन, याला चर्चा म्हणतात. ( हल्लीं वैदिक लोक पष्ठांचे मंत्रजागररूप जें उच्च स्वरांत अध्ययन करतात तो याचाच प्रकार असावा.) ( २ ) श्रावकः—अध्ययन ऐकणारा, म्हणजे अध्यापक कदाचित् श्रोता ( ३ ) चर्चकः—म्हणजे अध्ययन करणारा.( ४ ) श्रवणीयपारः—म्हणजे श्रवणीय अशा वेदाच्या अध्ययनाची समाप्ति. मध्यें विच्छेद न होऊं देतां संहितेचें अध्ययन करणें यास पारायण असें म्हणतात. या पारायणांतहि प्रकृतिरूप व विकृतिरूप असे दोन प्रकार आहेत. संहितेंतील मंत्रांचें पठण, मंत्राच्या पदाचें पठण व दोन पदें जोडून त्यांची संधिरूप संहिता करून पठण करणें ( या प्रकारास क्रमपार म्हणतात ) यांनां प्रकृतिरूप पारायण म्हणतात. विकृतींचे प्रकार आठ आहेत त्यांचीं नांवें:—जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंड, रथ व घन. यांत जटा, दंड व घन हे तीनच मुख्य आहेत. कारण शिखा व जटा यांत फारसा भेद नाहीं. व माला, रेखा आणि ध्वज या विकृती दंडानुसारी आहेत. म्हणून जटा, दंड व घन यांचींच उदाहरणें पुढें दिलीं आहेत.

**जटा**.—दोन पदांची संहिता करणें यास क्रम म्हणतात. जसें अग्निं, ईळे हीं दोन पदें जोडून अग्निमीळे हा क्रम झाला. या दोन जोडलेल्या पदांनां 'द्वयी' असें म्हणतात. या द्वयींत पदांचा क्रम, व्युत्क्रम व पुनः क्रम केल्यास त्यास जटा म्हणतात. उदा. 'अग्निमीळईळेऽग्निमग्निमीळे.' ही एक द्वयी झाली. याच्या पुढें ईळे या पदास पुरोहितं हें पद जोडून 'ईळेपुरोहितंपुरोहितमीळेईळेपुरोहितं' अशी दुसरी द्वयी म्हणावयाची ही जटा झाली. येथें विराम करून पुढील तुकडा अथवा द्वयी म्हणतात. मागलि ईळे हें पद घेऊन त्याचा पुढील पदास क्रम, व्युत्क्रम व क्रम पूर्ववत् करणें.

**दंड**.—जटेंत एका विरामांत तीन पदांचाच क्रमव्युत्क्रम होतो. परंतु दंडविकृतींत एका विरामांत हा व्युत्क्रम अर्धे ऋचेपर्यंत केला जातो.

**घन**.—या विकृतींत जटेप्रमाणेंच एक द्वयी म्हणून त्या दोन पदांस पुढील तिसरें पद जोडून तीं तीन पदें व्युत्क्रम व क्रमानें एका विरामांत म्हणावयाचीं जसें:—'अग्निमीळेईळेऽग्निमग्निमीळेपुरोहितंपुरोहितमीळेऽग्निमग्निमीळेपुरोहितं' ही एक द्वयी झाली. यापुढें ईळे हें मागील पद घेऊन पुढील दोन पदांसह 'ईळेपुरोहितंपुरोहितमीळेईळेपुरोहितंयज्ञस्ययज्ञस्यपुरोहितमीळेईळेपुरोहितंयज्ञस्य' ही दुसरी द्वयी झाली. याप्रमाणें घनविकृतीचें पठण करावयाचें असतें.

वरील प्रकृति व विकृतींचें अध्ययन स्वरांसहित करावयाचें असतें. निरनिराळ्या पदांचे संधी जोडतांना संहितेंतील स्वरांच्या नियमाप्रमाणें त्यांनां स्वर द्यावयाचे असतात.

पदांमध्यें कांहीं जोड पदांनां द्विखंड अशी संज्ञा आहे. उदा. रत्नऽधातमं अशीं पदें बहुधा सामासिक असतात. यांची संख्या ३२०१६ आहे. क्रमपाठांत या पदांस इति हें पद लावलें जाऊन ' रत्नधातममितिरत्नऽधातमं अशी द्वयी बनते. पदांमध्यें संधुध्यंत पदांनां इति पद लागतें. उदा. इंदोइति, शतक्रतोइति. अशा पदांचीहि ' इंदोइतींदो ' अशी द्वयी होते. अशीं पदें व द्विखंडें मिळून एकंदर वेष्टणें क्रमपाठांत ३४ हजार येतात. प्रातिशाख्याप्रमाणें संधींच्या निरनिराळ्या नियमांशिवाय वरील विकृतींचें पठण बहुतेक सर्व वेदांचें सारखेंच असतें.

यजुर्वेदाचे ८६ भेद आहेत. त्यांत चरक नामक मुख्य१२ भेद आहेत.ते चरक, आव्हरक, कठ, प्राच्यकठ, कपिष्ठलकठ, चारायणीय, वारायणीय, वार्तांतवेय, श्वेत, श्वेततर, औपमन्यव, पातांडनीय व मैत्रायणीय.मैत्रायणीयाचे मानव, दुंदुभ, वाराह, छगलेय, हरिद्रवीय, श्याम व शामायणीय हे सातभेद होत. यजुर्वेदाच्या शाखांची पाठभेदासंबंधीं माहिती पूर्वी वेदविद्या या विभागांत ( पृष्ठ ७२ ) दिली आहे. कांहीं प्रतींत मैत्रायणीचे ६ भेद दिले असून त्यांत श्याम हा भेद आढळत नाहीं.

वाजसनेयी हिचे १७ भेद आहेत तेः—जाबाल, बहुधेय काण्व, माध्यंदिन, शापीय स्थापनीय, कापाल, पौंड्रवत्स, आवटिक, परमावटिक, पाराशर्य, वैधेय, वैनेय, औधेय, गालव, वैजव व कात्यायनीय हे होत. वाजसनेयी संहितेंत १९०० मंत्र आहेत.

तैत्तिरियाचे औख्य आणि कांडिकेय असे दोन भेद आहेत. पैकीं काण्डिकेयांचे आपस्तंबी, सत्याषाढी, बौधायनी, हिरण्यकेशी व औधीयी असे पांच भेद आहेत. तैत्तिरीय संहितेचीं कांडें ७, प्रश्न अथवा अध्याय ४४, अनुवाक ६४८, पदें १९२९० व अक्षरसंख्या २५३८६८ दिली आहे. यजुर्वेद हा गाथाग्रंथ असल्यामुळें त्याची पदसंख्या अनिश्चित असणें संभवनीय आहे.

सामवेदाचे हजार भेद होते. परंतु अध्ययन करणारांनीं अनाध्यायास त्यांचें अध्ययन केल्यामुळें इंद्रानें आपल्या वज्रानें त्यांपैकीं पुष्कळांचा नाश केला. अवशिष्ट राहिलेल्या शाखाः—आसुरायणीया, वासुरायणीया, प्रांजलऋग्वेदविध प्राचीनयोग्या व राणायणीया. राणायणीयांचे ९ भेद आहेत तेः—राणायणीय, शाट्यायणीय, सात्यमुग्र, खल्व, महाखल्वत, लांगल, कौथुम, जैमिनीय, गौतमीय हे होत. पैकीं कौथुमी, राणायणी व जैमिनी या तीनच शाखा विद्यमान आहेत. याचीं ८००० सामें व१४८१०गानें आहेत. त्यांपैकीं आग्नेय १९०, पावमान १०४, रौद्र २६, शिष्ट २८, वगैरे गानांची पृथक् अशी कांहीं प्रतींत विभागणी आहे. परंतु याचा स्पष्टार्थ समजत नाहीं.

अथर्ववेदाचे ९ भेद आहेत तेः—पैप्पल, दान्त, प्रदान्त, स्तौत, औत, ब्रह्मदायश, शौनकी, वेददर्शी व चरणविद्य हे होत. या वेदाचें अध्ययन पुढील पांच कल्पांनीं पूर्ण होतें. ते कल्प नक्षत्रकल्प, विधानकल्प, विधिविधानकल्प, संहिताकल्प व शांतिकल्प असे आहेत.अथर्ववेदाची मंत्रसंख्या १२००० दिली असून पांच कल्पांची प्रत्येकीं ५०० दिली आहे. परंतु ती पांच कल्पांसह १२००० किंवा कल्पांची संख्या वेगळी याचा स्पष्ट बोध होत नाहीं.

याज्ञवल्क्यापासून वाजसनेयी हिची उत्पत्ति झाली. ही आख्यायिका भागवतांत आहे, ती अशीः—व्यासशिष्य वैशंपायन यानें आपल्या शिष्यांस निगदरूप यजुर्वेद शिकविला, त्याच्या अनेक शाखा झाल्या. ब्रह्महत्येच्या पापाचा नाश होण्यासाठीं वैशंपायनानें आपल्या शिष्यांनां व्रत करण्यास सांगितलें असतां ' मी एकटाच पापनाश करतों असें याज्ञवल्क्य बोलला असतां तुला विद्येचा अभिमान झाला आहे तरी ती विद्या परत दे ' असें वैशंपायनानें सांगितल्यावरून याज्ञवल्क्यानें यजुर्वेद आपल्या रक्तरूपानें ( कांहीं स्थलीं वमनरूपानें ) परत केला असतां इतर शिष्यांनीं तो तित्तिर पक्ष्याच्या रूपानें सेवन केला. म्हणून त्यास तैत्तिरीय असें नांव पडलें. पुढें याज्ञवल्क्यानें वाजिरूप सूर्यापासून नवा वेद ग्रहण केला म्हणून त्यास वाजसनेयी असें नांव मिळालें.

वेदांच्या निरनिराळ्या शाखांपैकीं वाजसनेयी शाखा पूर्व, उत्तर आणि नैर्ऋत्य दिशेस आहे. नर्मदेच्या दक्षिणेस आपस्तंब, आश्वलायन, राणायणी आणि पिप्पल या शाखा आहेत. नर्मदेच्या उत्तरेस माध्यंदिन, शांखायन, कौथुमी आणि शौनकी या शाखा, तुंगा, कृष्णा आणि गोदावरी या नद्यांच्या कांठीं तैलंगणापासून सह्याद्रीपर्यंत आश्वलायनी, उत्तरेस आणि गुजराथ देशांत कौषीतकी, शांखायन; तैलंगणाच्या दक्षिणेस व आग्नेयीस तैत्तिरीय व आपस्तंब या शाखा आहेत. सह्याद्रीपर्वतापासून नैर्ऋत्य सागरापर्यंत व कोंकणांत हिरण्यकेशी शाखा; नर्मदेच्या उत्तरेस गुजराथ आणि सिंधपर्यंत मैत्रायणी शाखा, बंगाल, बिहार, अयोध्या, कनोज व गुजराथ या भागांत वाजसनेयी शाखा आहे. अशा प्रकारची शाखांच्या विभागणीबद्दल माहिती महार्णव व इतर पुराणांतून दिलेली आढळते.

हल्लींच्या सर्व वेदांच्या उपलब्ध शाखांचें वाङ्मय आणि त्यांचा अनुयायी वर्ग यांची माहिती वेदविद्या ग्रंथांत दिली आहे. ( विशेषतः ७२ व १४८ पृष्ठें पहा ) बरेंच अनुपलब्ध वैदिक वाङ्मय अजून सांपडण्याजोगें आहे अशी दयानंद आंग्लोवैदिक कॉलेजनें केलेल्या परिश्रमावरून आशा उत्पन्न होते.

**चरबी**—कित्येक प्राणिजन्य व वनस्पतिजन्य स्निग्ध पदार्थांस हें नांव देतात. नेहमींच्या उष्णमानावर हा पदार्थ गोठलेल्या तुपाप्रमाणें घनरूप असतो. रासायनिकदृष्ट्या स्टीरिक,पामिटिक व ओलिक ह्रीं अम्लांच्या संयोगानें झालेलीं ग्लिसरीनचीं लवणें आहेत. यांत नत्रवायू नसतो हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. प्राण्यांच्या पेशीजालांत हा पदार्थ प्राणी जन्मास येण्याच्या अगोदर देखील असतो. वनस्पतिसृष्टींत हा पदार्थ बीज, फळ व कधीं कधीं मूळ यांत असतो. रासायनिकदृष्ट्या याचें तेलाशीं फार सादृश्य आहे. फक्त तेलें द्रवरूप असतात व चरबी घनरूप असते. सर्व प्रकारची चरबी औद्योगिकदृष्ट्या उपयोगांत आणिली जाते. यांत विशेष महत्त्वाची चरबी पाळलेल्या जनावरांची म्हणजे मेंढी, बकरी, गाय, बैल व वांसरें यांची होय. सरस तयार करण्याच्या कारखान्यांत हाडें व कातडीं यांपासून प्रथमच जी चरबी काढली जाते तिचा उपयोग साबण, मेणबत्त्या व ग्लिसरीन तयार करण्याकडे होतो.

डुकरापासून तयार केलेल्या चरबीला 'लार्ड' असें म्हणतात. हा एक मौल्यवान् असा व्यापारी पदार्थ आहे. गुरांपासून आणि मेंढ्यांपासून तयार केलेल्या दुसऱ्या अशाच एका पदार्थाला 'टॅलो' असें म्हणतात. डुकराच्या मूत्रपिंडासभोंवतालचा भाग आणि कातडीखालील ढलपेदार थर यांपासून तयार केलेल्या चरबीला 'लीफ लार्ड' असें म्हणतात. ही चरबी उत्तम प्रकारची समजली जाते.

'लार्ड'—कलकत्ता येथील 'चरबीच्या कृति संबंधाची साग्र माहिती आय. एच. बर्किल यानें लिहून ठेविली आहे. पूर्वी कलकत्ता येथें चरबी तयार करणारे तीन मोठे कारखाने होते. परंतु सध्यां ते नष्ट झाले असून त्यांची जागा एतद्देशीयांनीं चालविलेल्या लहान लहान कारखान्यांनीं घेतली आहे. चरबी करण्याचा धंदा सबंध वर्षभर चालू असतो परंतु मोसम म्हटला म्हणजे उन्हाळ्याचा आरंभ होय. याकरितां दोन प्रकारच्या डुकरांचा वध करण्यांत येतो. एक खुद्द कलकत्त्यांत पोसलेलीं डुकरें--ज्यांनां 'चिनी डुकरें' असें म्हणतात व दुसरीं बंगालमधील खेड्यापाड्यांतील डुकरें--ज्यांनां 'ग्राम डुकरें' असें संबोधितात. पहिल्या प्रकारच्या डुकराचा रंग पांढरा असून दुसऱ्या प्रकारच्या डुकराचा काळा असतो. दिवस उजाडण्याच्या सुमारास डुकरांचा वध करितात व "चरबी-करणाला" माध्यान्हीं सुरुवात होते. 'चरबीकरण-गृहांत' एक छोटीशी खोली व एक मोठी वखार असते. या वखारींत चरबी थंड करून सांठवितात. दोन फूट रुंद व ८ इंच खोल अशी एक कढई मंद विस्तवावर ठेवून तींत ती चरबी वितळवितात. याच्या अगोदर चरबीचे ३ किंवा ४ औंस वजनाचे तुकडे सुमारें दोन तासपर्यंत पाण्यांत ठेवून धुतात. आणि ते लोहपात्रांत घालतात. चरबी संपूर्ण वितळली म्हणजे कापूस आणि मलमल यांच्या दुहेरी जाड कापडांतून ती एका मातीच्या भांड्यांत गाळून घेतात.नंतर तो द्रव अर्धा तासपर्यंत, हळू हळू ढवळून चांगला खालीं बसूं देतात. 'चिनी-डुकराच्या' चरबीला खालीं बसण्याला दोन दिवस लागतात. 'ग्राम' डुकराच्या चरबीला यापेक्षां कमी अवधी लागतो. याप्रमाणें तयार झालेली चरबी सुमारें दोन महिन्यांपर्यंतच टिकते.

उपयोग.—उत्तम प्रकारच्या डुकराच्या चरबीचा मलम वगैरे करण्याकडे उपयोग करितात. मध्यम प्रकारच्या 'लार्ड' चरबीचें तेल काढतात आणि कनिष्ठ प्रकारची जी चरबी असते तिचा साबू करण्याकडे उपयोग करितात. फ्रान्समध्यें ऑलिव्ह तेलांत आणि अमेरिकेमधील पूर्वसंस्थानांत देवमाशाच्या तेलांत या 'लार्ड' तेलाची भेसळ करून विकण्याचा प्रघात आहे. या तेलाचा ओंगणासारखा देखील उपयोग करितात. या तेलांत अभ्यंजनीय गुणधर्म असल्यामुळें अंगावरील सूज, खरवडलेल्या जागा, मुरगळल्यामुळें किंवा लचकल्यामुळें दुखत असलेले भाग इत्यादि ठिकाणीं हें तेल चोळण्याचा फार प्रघात आहे.

टॅलो—मांसापासून किंवा बकऱ्याच्या चरबीपासून अथवा या दोहोंच्या मिश्रणापासून तयार केलेला पदार्थ म्हणजे 'टॅलो' होय. 'लार्ड' पेक्षां हा पदार्थ जास्त कठिण व कमी द्राव्य असतो. हा पदार्थ वितळून झाल्यावर पाण्यांत घालून उकळवितात व जास्त चांगला करितात. बहुधा नत्राम्लाचा उपयोग करून तो स्वच्छ धुवून काढतात.

उपयोग.—साबू व मेणबत्त्या करण्याकडे या पदार्थाचा उपयोग करतात. लखनौ येथील कांहीं मेणबत्त्या करणारे चरबीचा उपयोग करतात. साबू करण्याकडेहि या चरबीचा उपयोग करतात असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. ओंगणासारखा देखील या चरबीचा उपयोग कोठें कोठें करतात.

व्यापार.—'लार्ड' या पदार्थाचा परदेशीय व्यापार अलीकडे बराच मंदावलेला आहे. हिंदुस्थानांतून बाहेर जाणारी जवळजवळ सबंध 'लार्ड' चरबी बंगालमधून मॉरीशस येथें जाते. हिंदुस्थानांत बाहेरून येणारी 'लार्ड' स्टेटस सेटलमेंटमधून आणि अलीकडे चीन मधून देखील येते. टॅलोचा व्यापार हा विशेषतः मुंबई येथें केन्द्रीभूत झाला आहे. १९०६-७त टॅलोची ४१३५ हंड्रेड. निर्गत परदेशीं करण्यांत आली, पैकीं एकट्या मुंबई शहरानें ३५१७ हं. निर्गत केली. हिंदुस्थानीय टॅलो खरेदी करणाऱ्या देशांत अरबस्तानचा नंबर सर्वांत वर लागतो. एकंदर सर्व निर्गतीपैकीं २२६० हंड्रे. एकटा हा देश खरेदी करतो. ज्याप्रमाणें सर्वांत जास्त टॅलो मुंबई येथून बाहेर जाते, त्याच प्रमाणें बाहेर देशची सर्वांत जास्त टॅलो खरेदी करणारे शहरहि मुंबईच होय. हिंदुस्थानांत बाहेरून येणारी टॅलो बहुधा 'युनैटेड किंगडम' व बेलजम येथून येते [ वॅट ]

**चरबीचें झाड**—या झाडास लॅटिनमध्यें सॅपियम सेब्रिफेरम, इंग्रजींत चायनीज टॅलो ट्री किंवा चिनी चरबीचें झाड, पिप्पल–यँग, मोम चिन, ( ताड टार ) चर्बी, वगैरे नांवें आहेत. हें एक प्रकारचें लहान गुळगुळीत झाड चीन व जपान देशांत मूळचेंच असून याची तेथें लागवडहि करतात. उत्तर हिंदुस्थानांत याची लागवड सुरू झाली आहे. डेराडून भागांत या जातीचीं जंगली झाडें आहेत; आणि गर्वाल, कुमाऊन व कांग्रा या भागांत हीं झाडें विपुल होतात.

बियांपासून या झाडांची सहज उत्पत्ति करतां येते, परंतु कलमांनीं याची साधारणपणें लागवड करतात. यांच्या फळांत तीन फोडी असून, प्रत्येकींत एक बी असते, व बियाच्या सभोंवार जाड, चरबीसारख्या पदार्थाचें वेष्टण असतें, ह्या वेष्टनासच वनस्पतिज चरबी म्हणतात. चीन देशांत हिचा प्राणिज चरबीऐवजीं मेणबत्त्या व साबण करण्याच्या कामीं व कपड्यावर खळ देण्याचे कामीं उपयोग करतात. या जाड चरबीशिवाय बियांच्या मगजापासून सुमारें शेंकडा ५० भाग पिंगट पिवळ्या रंगाचें तेल निघतें. या तेलाचा औषधींमध्यें जाळण्याच्या तेलाप्रमाणें व छत्र्यांचें रोंगण तयार करण्याच्या कामीं उपयोग करतात. हिंदुस्थानांत या चरबीचा उपयोग करण्याचे प्रयत्न केले जात आहेत, परंतु या पदार्थाच्या किंमतीपेक्षां तो बनविण्याला खर्च जास्त येतो असें म्हणतात. कांग्रा खोऱ्यांतील बियांच्या मगजांत शेंकडा ६३.६ भाग चरबी असते असा उल्लेख आहे. गॅंबल म्हणतो कीं, "डेहराडून येथें बाबू विर्वल यांनीं प्रयोग करून चरबी काढली व तिच्या पोळया बनविल्या, परंतु ही रीत त्रासदायक होती व परिणाम समाधानकारक नसल्यामुळें चरबी काढण्याकरितां या झाडांची लागवड करावी अशी शिफारस करण्यांत आली नाहीं." या चरबीचा पक्का माल बनविणें रासायनिक व व्यापार या संबंधीं जास्त सविस्तर माहिती ॲग्रिकल्चरल लेजर या ग्रंथांत सांपडेल. या झाडाच्या पानांपासून एक प्रकारचा काळा रंग निघतो, परंतु याविषयीं विशेष माहिती नाहीं. या झाडाचें लांकूड पांढरें व साधारण कठिण असतें, व त्याचे पलंग, मेजें, खेळणीं बनवितात व छापण्याचे ठोकळे (ब्लॉक्स) बनविण्यास हें योग्य लांकूड आहे असें सुचविलें आहे.

**चरी**—पंजाबच्या कांग्रा जिल्ह्यांतील एक खेडें आहे. येथील लोकसंख्या १९०१ त २५९७ होती. येथें सन १८५४ त एका जुन्या पडक्या देवळांत शिलालेख सांपडला होता. त्याच्या एका बाजूस बौद्ध धर्माचीं तत्वें दुसऱ्या बाजूस वराही देवीची मूर्ति खोदलेली होती. ही शिला गमावली आहे.

**चर्मण्वती**—चंबळा नदीचें प्राचीन नांव (चंबळा पहा) ही अपर कुंतिराष्ट्राच्या दक्षिणेस असून, रंतिदेव राजाच्या यज्ञांत जे पशु मृत झाले, त्यांच्या चर्मराशीपासून जो रक्तप्रवाह निघाला त्यायोगानें उत्पन्न झाली म्हणून हें नांव हिला पडलें ( भार.शांति. अ. २९ ).

**चलत्-चित्रें**.—( सिनेमांतील चित्रें ) हल्लीं करमणुकीकरतां उपयोगांत असलेलीं हीं चित्रें फोटोग्राफर्ने प्रतिमा घेऊन तयार करण्यांत येतात. पंचवीस वर्षांपूर्वी चलत्-चित्रें हा मुलांचा खेळ समजला जाई. पण आज हजारों लोकांनां किफायतशीर उद्योग देणारा, लाखो लोकांनां शिक्षण व करमणूक करून देणारा व जगांतील मोठमोठ्या धंद्यांत उच्च स्थान मिळवून अगणित पैशाची उलाढाल करणारा असा हा धंदा होऊन बसला आहे. कॅमेरानें चलत्-चित्रें घेणारा मनुष्य आपला फिरता कॅमेरा मोठमोठ्या जंगलांतून व त्याचप्रमाणें दाट वस्तीच्या शहरांतून उभा करतो. तो राजांची पदच्युती, राष्ट्राध्यक्षांचें अधिकारारोहण, मोठाल्या आपत्तींतील देखावे आणि लोकप्रिय योध्यांच्या कर्तबगारी नमूद करीत असतो. सृष्टींत आणि मनुष्यकृतींत नाटकांत व खऱ्या आयुष्यांत जें जें कांहीं मनोरंजक असेल तें तें सर्व तो आपणापुढें आणून ठेवतो.

याच्या लवचीक विपर्यस्त (निगेटिव्ह) पटावर एकामागून एक भराभर अनेक चित्रें घेतां येतात. कॅमेरांतील हा लवचिक विपर्यस्त पट म्हणजे जिलेटिन अवलेहानें आच्छादिलेली सेल्युलॉईडची एक लांब पट्टी असते. वास्तविक पट पारदर्शक असल्यामुळें एखाद्या पडद्यावर तीं चित्रें मोठीं करून वठवितां येतात व तीं अशीं वठविलीं असतां असंख्य प्रेक्षकांस पाहणें सुलभ जातें. आरंभापासूनच अशा चलत्-चित्रांना जनतेचा आश्रय मिळून तीं करण्याचा धंदा लवकरच वाढत गेला. आरंभीं आरंभीं हालचाल असलेली कोणचीहि गोष्ट फोटो घेऊन वरील रीतीनें दाखविली असतां प्रेक्षक आश्चर्यानें थक्क होऊन जात असे. त्यानंतर चित्रांचा विषय, प्रवास, शास्त्रीय गोष्टी आणि प्रासंगिक हास्यकारक प्रहसनें हीं बनलीं. त्यावेळीं नाटकें ( पडद्यावर दाखविलीं जाणारीं ) माहीत नव्हतीं. लवकरच लोकांनां असें आढळून आलें कीं, रंगभूमीवर होणाऱ्या नाटकापेक्षां चित्र-नाटकें जास्त वस्तुस्थितिदर्शक असतात, व चित्रपटाचे विषय अगणित व अमर्यादित असूं शकतात. या नाटकांत कृत्रिम रंगवलेले देखावे उपयोजण्याऐवजीं त्यांस लागणारा देखावा खरोखरीचा दाखविणें अगदीं शक्य असतें. जेव्हां चित्रोत्पादकाला एखाद्या जहाजाचा देखावा पाहिजे असेल तेव्हां तो कापडाचें रंगवलेलें जहाज न बांधतां नटवर्गासह समुद्रांतून प्रवास करणाऱ्या खरोखरीच्या जहाजावर जाऊन तेथील देखावा उद्धृत करतो. वस्तुस्थितिदर्शनाची वाढती इच्छा हीं चित्र-दृश्यें पुरवितात.

कधीं कधीं चित्रोत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठीं किंवा छतावरून उलटें चालणें, आगगाडीखालीं चिरडणें असे असंभाव्य देखावे दाखविण्यासाठीं कांहीं युक्त्या लढवाव्या लागतात. पण त्या इतक्या बेमालूम रीतीनें

लढविल्या जातात कीं नाटकगृहांत चलत्-चित्रें बघणाऱ्या पैकीं फारच थोड्यांनां त्या लबाड्या कळून येतात. याकरितां चित्र-पटलोत्पादक हुशार असावा लागतो. थोडक्या श्रमांत व खर्चांत ज्यास्त परिणामकारक दृश्यें अनेक युक्त्या लढवून त्याला तयार करावीं लागतात. पुढें या चित्रांच्या कारखानदारानां असें आढळून आलें कीं, बाह्य देशांतील देखावे त्यांच्या आश्रयदात्यांनां जास्त आकर्षक होतात. त्यामुळें प्रवासांचीं चित्रें अस्तित्वांत आलीं. हीं चित्रें मनोरंजक असतात एवढेंच नव्हे तर बोधप्रदहि असतात.

केवळ सिनेमाकरितां बांधलेलीं गृहें अस्तित्वांत आल्यापासून नाटकांच्या चित्रांनां मागणी वाढूं लागली. त्यामुळें चलत्-चित्रांच्या कारखानदारांनां नाटकें करण्यासाठीं सोईस्कर जागा मिळवणें, नाटकें लिहिण्यासाठीं लेखक ठेवणें, फिरत्या कॅमेरापुढें नाट्यसंविधानक वठविण्यासाठीं नटवर्ग आणि रंगभूमिचालक नेमणें, आणि देखावे रंगवण्यासाठीं चित्रकार ठेवणें भाग पडलें. सारांश उत्तम नाटकगृहाप्रमाणेंच चलत्-चित्र-गृह तयार करावें लागतें. तेथाल व्यवस्थेप्रमाणेंच इकडेहि सर्व व्यवस्था करावी लागते. फक्त प्रेक्षकानां बसण्याची सोय मात्र उत्पादन जागीं ( स्टुडिओमध्यें ) करावी लागत नाहीं. व तेथें खरें नाटक कॅमेरापुढें एकदांच करावें लागतें.

एकामागून एक येणाऱ्या प्रवेशांतून गुंतविलेलें कथानक सांगणारे नाट्यचित्रपट, खऱ्या रंगभूमीवरील नाटकाप्रमाणेंच सर्व बाबतींत असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. फरक एवढाच कीं, हीं मुग्ध नाट्यें असतात. या नाट्यांतील प्रसंग खऱ्या नाटकाप्रमाणेंच एखाद्या हस्तलिखीतानुसार किंवा गोष्टविरून बसविलेले असतात. त्याला दृश्य-नाट्य वस्तु ( सेनेरिओ ) म्हणतात. नटवर्ग साध्या नाटकांतल्याप्रमाणें कॅमेरापुढें खेळ करून दाखवितात. या ठिकाणीं कॅमेरा प्रेक्षकाचें काम करितो. नाटकांतील अंतर्दृश्य कारखानदाराच्या स्टुडिओमध्यें घेण्यात येऊन, बहिर्दृश्य खुद्द खेळांत सांगितलेल्या जागीं, मग ती जागा आर्टिक महासागराच्या दक्षिणेला असो कीं अंटार्टिक महासागराच्या उत्तरेला असो, जेथें प्रसंग घडला असेल त्या ठिकाणीं घेतात.

खेळांतील अभिनय, प्रवेश इत्यादि सर्व कामें चित्रोत्पादकाला पहावीं लागतात. नाटकें बसविणें व स्टुडिओची व्यवस्था ठेवणें यातील मुख्य भाग त्याच्याकडे असतो. लेखकानें दिलेला दृश्य-नाट्यप्रबंध हातीं पडल्यापासून तो विपर्यस्त पट व्यक्तीकरण (डेव्हलपिंग) खात्याकडे जाई पावेतों तो नटाची कामें आणि देखावे यांजवर सारखा देखरेख करीत असतो. लेखकानें दृश्य-नाट्यप्रबंध हातीं दिल्यावर त्यांत तो जरूर ती छाटाछाट करतो किंवा अधिक भर घालतो. त्यांतील देखावे सविस्तर नमूद करून ठेवतो आणि खेळाला लागणारें साहित्य कोणतें तें पहातो. स्टुडिओबाहेरील देखावे असले तर त्यांनां योग्य जागा कोणती तें ठरवितो, व त्याच वेळीं नटवर्ग निवडून त्यांनां तालमीला बोलावितो. जर तालीम स्टुडिओमध्यें घेण्यासारखी असेल तर तेथें रंगभूमि तयार करून पात्रें ठरीव पोषाकांत तेथें येतील अशी व्यवस्था ठेवितो. तेथेंच कॅमेरा लावून ठेवलेला असतो. उद्देश हा कीं, ऑपरेटरला प्रवेशांची व तालमींत होणाऱ्या गोष्टींची आगोदर माहिती व्हावी. प्रवेश वठवण्यासाठीं किंवा पटांच्या नियमित कालकक्षेंत येण्यासाठीं जरूर तो कमी अधिकपणा उत्पादक अनेकवेळां करीत असतो व शेवटीं त्याची संमति मिळाल्यावर कॅमेरावरील मनुष्य आपलें काम सुरू करतो. नंतर लगेच "काम सुरू करा" अशी आज्ञा होते. "तूं कॅमेराच्या बाहेर आहेस.", "केली! लवकर लवकर चालूं दे," "ए जनान्यांतील पेषा करणारे! आनंदी दीस;" "इतके नको," "डोळे फिरव" "जास्त गंभीर हो." इत्यादि अनेक सूचना उत्पादक देत असतो. तालमीच्या वेळीं पात्रें प्रसंगाला अनुरूप अशीं भाषणें नेमून दिलेलीं किंवा स्वतःचींच करीत असतात. भाषणें पडद्यावर वटत नाहींत पण त्यायोगानें चेहऱ्याला हवींतशीं वळणें मिळून चित्र जास्त हुबेहुब तयार होतें.

फोटो घेताना जर कांहीं चूक झाली तर तो चित्रपट रद्द करण्यांत येतो व पुन्हां खेळ सुरू करितात. बाहेरचे देखावे घेण्यापूर्वीं स्टुडिओमध्यें त्यांची तालीम घेतात. विशेषतः रस्त्यांतील प्रवेशाच्या बाबतींत तरी असें करण्यांत येतें. कारण त्या ठिकाणीं जास्त वेळ प्रवेश केल्यास रस्त्यांतील तमासगिराकडून अडथळा येण्याचा संभव असतो.

बहुतकरून पात्रें नेहमींच्या नाटकांतीलच घेतात. एका वेळीं एक दिवसच कांहीं पात्रें चाकरीस ठेवण्याची वहिवाट आहे. कारण त्यांनां इतर स्टुडियोकडून मागणी असते. एखाद्या दिवशीं उत्पादकाला पाचशें नट लागतील तर दुसऱ्या दिवशीं पंचवीस सुद्धा लागणार नाहींत; कारण त्याची संख्या त्यावेळीं चाललेल्या खेळाच्या जातीवर अवलंबून असते. कंपनीजवळ कायमचे कांहीं पगारी नट असतातच. नट व नटी निवडणें हें कांहीं सोपें नाहीं. कारण ते मुग्ध चित्राविष्करणात पटाईत असले पाहिजेत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपलें पात्र उत्तम तऱ्हेनें रंगविलें पाहिजे. कॅमेरा हा एक निष्ठुर टीकाकार असून सर्व दोष व नटाचे हावभाव मोठ्या प्रमाणात पुढें मांडतो. जे दोष रंगभूमीवर प्रेक्षकांनां दिसणार नाहींत ते पडद्यावर ठळकपणे दिसून येतात. एखादें पात्र चरबीच्या रंगानें सफाईदार करणें अशक्य होतें. कारण पडद्यावर त्याची प्रतिमा मोठी झाली असतां फार हास्यास्पद दिसूं लागते. याच कारणामुळें म्हाताऱ्याला तरण्याची किंवा तरुणाला म्हाताऱ्याची भूमिका घेणें अशक्य होतें. ज्या कंपनींत निरुपमचंद्र गुहा हा बंगाली गृहस्थ दुय्यम उत्पादकाचें काम करीत आहे ( १९१६ ), ती युनिव्हर्सल कंपनी अमेरिकन असूनतींत निरनिराळे २६ उत्पादक काम करीत आहेत.

कंपनी प्रत्येकाला नाटकाची लेखी प्रत व पैसा पुरविते. हे उत्पादक चित्रपट तयार करतात. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत हीच कंपनी सर्वांत मोठी असून तींत रोज वीस हजार माणसें काम करितात. तिचे स्टुडिओ व कारखाना चार हजार एकर जागेवर असून "युनिव्हर्सल सिटी" असें त्याचें नांव आहे. रानटी प्राण्यांच्या शिकारीचीं व आफ्रिकेंतील चित्रें तयार करण्यासाठीं म्हणून कंपनीनें रानटी प्राण्यांचा शिकारखाना बाळगला आहे.

स्टुडिओ हें उत्पादकाचें खातें असून कारखाना फोटोग्राफरचें खातें मानला जातो. कारखान्यावरील सुपरिंटेंडेंट म्हणजे फोटोग्राफर हा स्वतः फोटोचें काम फारसें करीत नाहीं. चित्रपट तयार करण्याकरितां उपयोगी अशी जीं त्याच्या कारखान्यांत पोटखातीं केलीं असतात,तीं येणेंप्रमाणें. कच्चे,ज्यावर प्रतिमा घ्यावयाच्या असतात,ते पट खरेदी करून त्यांचे तुकडे करून जास्ती डब्यांतून भरतात. दाहप्रतिरोधक लोखंडी कोठींत त्यांची जरूर लागेपर्यंत ते ठेवून देतात. तेथून एकएक पट भोकें पाडण्याच्या खोलींत नेऊन त्याच्या कडांना भोकें पाडण्यांत येतात.नंतर हा विपर्यस्त पट कॅमेरा चालवणाऱ्या मनुष्याकडे जातो. हा मनुष्य फोटोग्राफरच्या हाताखालचा असून उत्पादकाकडे काम करण्यास त्याला ठेविलेलें असतें. त्यानें त्यावर प्रतिमा घेतल्यानंतर त्यांचा विकास करण्याकरितां ठराविक जागेकडे तो पोंहचता करतात. याच्यापुढें चित्रांनां नांवें कोणतीं द्यावयाचीं तें ठरवून त्याप्रमाणें तीं छापून घेतात. छापण्याच्या खोलींत विपर्यस्त पटावरून वास्तविक ( पॉझिटिव्ह ) पट छापण्यांत येतो. सर्व छापून झाल्यानंतर विपर्यस्त पट साठ्याच्या खोलींत कायमचा जाऊन बसतो. छापलेला वास्तविक पट व्यक्तीकरण ( डेव्हलपिंग ) करण्याच्या खोलींत नेतात. तेथून धुण्याच्या खोलींत, तेथून वाळवण्याच्या खोलींत, असें एकामागून एक नेण्यांत येतें. वाळल्यानंतर त्याची तपासणी होऊन चिकटविण्याच्या खोलींत त्याला नेतात. तेथून पुन्हां दाहप्रतिरोधक अशा सांठ्याच्या खोलींत त्याला परगांवीं पाठविण्याची वेळ येईपावेतों ठेवून देतात. येणेंप्रमाणें फोटोग्राफरच्या कारखान्यांतील खात्यांचें वर्णन झालें. त्यांची थोडक्यांत याद म्हणजे, पट साठवणें, भोकें पाडणें, नांवें तयार करणे, विकास करणें, छापणें, धुणें, आणि वळविणें, तपासणें आणि बोटीवर चढविणें. फोटोग्राफरचें एकंदर काम म्हणजे उत्पादकानें प्रवेश करून दाखविल्यानंतर व त्यांना नांवें दिल्यानंतर सर्वोत्कृष्ट चित्रपट तयार करणें हें होय. या कामाकरितां फोटोग्राफरला जेव्हां उत्पादक प्रवेश करून दाखवितो त्यावेळीं आपला दुय्यम जो कॅमेरावरील मनुष्य त्याला तेथें हजर ठेवावें लागतें. व या कॅमेरामनुष्यामार्फत विपर्यस्त पटावर प्रवेश उत्तम रीतीनें घेण्याची सर्व जबाबदारी फोटोग्राफरकडे येते.

जर कॅमेरा मनुष्याच्या चुकीमुळें पट खराब झाला, तर ही चुकी फोटोग्राफखात्याची असल्यामुळें फोटोग्राफरकडे त्याच्या नालायक दुय्यमाबद्दल दोष साहजिकच येतो. फोटो घेण्यापासून तों बोटीवर पट चढवीपर्यंतच्या सर्व क्रिया फोटोग्राफखात्याच्या म्हणून समजतात. उत्पादकाला पाहिजे असेल त्यावेळीं फोटोग्राफर आपला दुय्यम, कॅमेरा, विपर्यस्त पट, वगैरे साहित्य देऊन त्याकडे धाडतो, व उत्पादकाच्या परीक्षणार्थ छापील पटांचीं प्रुफें त्याच्याकडे पाठवितो. दुरुस्त प्रुफावरुन शेवटचा चित्रपट तयार करण्यांत येऊन, ग्राहकाकडे मागणी येईल त्याप्रमाणें बोटीवर चढविण्यांत येतो.

चलत् चित्रांच्या धंद्याचें क्षेत्र अति व्यापक आहे. त्याच्या शैक्षणीक महत्वामुळें तर तो कधींहि जुना होत नाहीं. मनुष्याच्या मेंदूतून निघालेली इतकी अमर्याद शैक्षणिक व मनाचें रूपांतर करण्याची शक्ति दुसरी कोणतीहि नाहीं असें म्हटल्यास चालेल.

पाश्चात्य देशांत शाळांतून याची मदत शिक्षणाच्या कामीं घेतली जाते. तिकडे कांहीं शाळांतून आठवड्यांतून एक दिवस त्या मागील आठवड्यांत शिकविलेल्या धड्यांची सिनेमा दाखवून प्रत्यक्ष समजावणी करण्यांत येते. निरनिराळ्या शाळांतील वर्ग नेहमींप्रमाणें वर्गांत भूगोल व शास्त्रें वगैरे शिकण्याकरितां न बसतां, थेट सिनेमा थिएटरकडे जातात. व त्यांच्याकरितां मुद्दाम तयार ठेविलेला चित्रपट पाहिल्यानंतर परत शाळेंत जातात.

पिट्सबर्ग येथील कार्नेगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी मध्यें पोलाद तयार करण्याचा धंदा चित्रपटमालिकांच्या द्वारें शिकविण्यांत येतो. या विशिष्ट चित्रपटाचें नांव "लोखंडाच्या दगडापासून ते बनावट पोलादापर्यंत" असें आहे. मिनेसोटाच्या मेसाबा जिल्ह्यांतील "हल-रस्ट" नांवाची जगांतील सर्वांत मोठी लोखंडाची खाण या पटांत दृष्टीस पडते; तसेंच वाफेच्या राक्षसी फावड्यांनीं खाण कशी खणली जात आहे, कुजलेल्या लाकडाचें सर्पण कसें वाहून नेलें जात आहे इत्यादि या धंद्यांतील प्रकार सविस्तर दाखविले जातात. वाङ्मयाला सुद्धां हीं पडद्यावरील हालचाल करणारीं चित्रें आपल्या प्रभावांत मागें सारतील. अमेरिकन व यूरोपियन पाठशाला व विश्वविद्यालयें यांतील शैक्षणिक क्रमांत या चित्रांचा प्रवेश झालेला आहे. तीं केवळ निर्जीव चित्रें असलीं तरी त्यांचा परिणाम खराच असतो. लोकांनां चित्रें आवडतात आणि गोष्टी आवडतात; तेव्हां चलत्-चित्रनाटक सचित्र गोष्टींचें असल्यानें तें लोकप्रिय होण्याला दुप्पट कारण झालें आहे. मानवेतिहास रचणाऱ्या मानवी शोधांमध्यें ही कल्पना अगदीं नवी आहे.

लहानमोठ्या माणसांनां इतिहास व पौराणिक गोष्टी नुसत्या वाचून न दाखवितां त्यांच्या समोर त्या करून दाखविल्या असतां त्यांच्या ध्यानांत त्या चांगल्या रहातात.

ऐतिहासिक दृश्यें घडलेल्या जागीं घेतां येतात अशिक्षित सामान्य लोकांनांसुद्धां ही सचित्र कथा फार मनोरंजक होते.

**हिंदुस्थानांतील सिनेमा कंपन्या.**—पाश्चात्त्य चलत्-चित्रें बघून तशीं स्वदेशी चित्रें तयार करण्याची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्या हिंदी गृहस्थांत रा. फाळके यांचा बराच वर नंबर लागेल. त्यांनीं मोठ्या परिश्रमानें विलायतेंतून ही विद्या शिकून येऊन नाशकास 'हिंदुस्थान फिल्म कंपनी' काढिली. या कंपनीचे पौराणिक हरिश्चंद्र, लंकादहन, कृष्णजन्म वगैरे पट लोकप्रिय होऊन या कंपनीशीं इतरांची स्पर्धा सुरू झाली; व महाराष्ट्र फिल्म कंपनी, पाटणकर फ्रेंड्स कंपनी, भारत फिल्म कंपनी यांसारख्या पौराणिक व ऐतिहासिक पट तयार करणाऱ्या देशी कंपन्या निघाल्या. कोल्हापुरच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीचे सिंहगड, कल्याणखजिना हे पट शिवकालीन महाराष्ट्र डोळ्यांपुढें उभा करतात. इंग्रजी न जाणणाऱ्या प्रेक्षकांनां विशेषतः बायकामुलांनां देशी पट उपयुक्त होतात व आवडतातहि. पण कलेच्या दृष्टीनें पहातां फोटोग्राफी व अभिनय या बाबतींत देशी पट अगदीं कमी दर्जाचे ठरतील चलत्-चित्रदर्शनांत अभिनयावरूनच कथासंगति लावावयाची असल्यानें अभिनय हुबेहुब व अकृत्रिम पाहिजे. नाटकांतील नटांनां ज्याप्रमाणें अभिनयाचे धडे द्यावे लागतात, त्याचप्रमाणें सिनेमा-नटांनांहि अभिनयाचें उच्च शिक्षण दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें कथाप्रसंगातील स्थळें जितकीं नैसर्गिक व रम्य घेता येतील तितकीं घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि विशेषतः ऐतिहासिक पटात तत्कालीन पेहेराव व स्थळें अवश्य दाखविलीं पाहिजेत. सारांश हिंदी (देशी) पट अद्याप बाल्यावस्थेंतच आहेत. मादन थिएटर्स कंपनी, कोहिनूर कंपनी यासारख्या हिंदुस्थानांतील सिनेमा कंपन्या पूर्ण देशी नाहींत. तथापि त्याचे प्रयत्न पाश्चात्त्य धर्तीवर आहेत यामुळें त्यांचे पट सरस असतात.

हिंदुस्थानांत सुद्धां मोठ्या काळजीपूर्वक व हुषारीनें असले चित्रपट तयार करून परकीय देशांत धाडण्याची व्यवस्था केली तर तो एक मोठा किफायतशीर धंदा होऊन शेंकडो गरीब लोकांनां उपजीविकेचें साधन होईल व त्याच प्रमाणें लोकांनां सुशिक्षित करण्यासहि बरीच मदत होईल. पाश्चात्त्य देशांत बाहेरील देशांची विशेषतः पौरस्त्य देशांचीं चित्रें फार हवी असतात. अमेरिकेंत अशीं चित्रें करण्याला जो खर्च येतो त्याच्या १/२ खर्चांत तीं येथें तयार होऊं शकतील. असें तज्ज्ञांचें मत आहे.

ज्या कांहीं थोड्या कंपन्या हिंदुस्थानांत आहेत, त्यांनीं आपले पट यूरोपियन मार्केटांत पाठविल्यास त्यांचें चांगलें चालेल. तेव्हां आपल्याकडील चित्रपटकारांनां आपला धंदा चांगला स्थिर करण्यास मोठा वाव आहे. थोडेंसें धाडस मात्र पाहिजे. त्यांनीं हें काम केलें नाहीं तर यूरोपियन कंपन्या आपल्या स्टुडियोच्या शाखा हिंदुस्थानांत काढतील यांत संशय नाहीं. सबंध संयुक्त संस्थानांत दर आठवड्यास सुमारें दोनशें पौरस्त्य चित्रपट (दृश्यें) तयार होतात. एकट्या लॉस्‌एंजल्स शहरांत दर आठवड्यास बहुतेक हिंदुस्थानविषयक दहा नाटकें तयार करितात. हीं दृश्यें ज्यांच्या सहाय्यानें घेण्यांत येतात ते पौर्वात्य चालीरीतीविषयीं अगदीं अनभिज्ञ असतात.

चलत्-चित्रें तयार करणें व विकणें हें काम एखादें वर्तमानपत्र किंवा मासिक छापण्याविकण्यासारखेंच आहे. सिनेमा नाटकगृहांतील खेळांचा कार्यक्रम बहुधा दर आठवड्यानें बदलत असतो. तेव्हां चित्रपट भाड्यानें देणारा आठवड्याच्या बोलीनें तो थिएटरला भाड्यानें देतो व कारखानदाराकडूनहि तशाच बोलीनें आणतो. ज्याप्रमाणें व्यापारी मनुष्याला रोज सकाळीं वर्तमानपत्र मिळतें. त्याचप्रमाणें रोज नवीन चलत्-चित्रें दाखविणाऱ्या नाटकगृहाला गुमास्त्याकडून रोज नवीन नवीन पट मिळतो. व गुमस्त्यालाहि कारखान्याकडून रोजच्यारोज पट मिळत जातात. यांचा हिशोब मात्र आठवड्यावर असतो. [ मॉडर्न रिव्ह्यू, अंक आक्टोबर १९१६ मधील निरुपम चंद्रगुप्त यांच्या लेखाच्या व इतर माहितीच्या आधारें ].

**चलन**—प्रत्येक समाज सुसंस्कृत झाला म्हणजे सर्व वस्तूंचें क्रयविक्रयानें होणारें प्रसरण सुलभ करण्याकरितां कांहीं विवक्षित पदार्थ सर्वमान्य होतात. त्या पदार्थांची प्रत्येकास अपेक्षा असते व ते सर्वत्र चलनात येतात. त्यामुळें त्यांनां चलन अशी संज्ञा देतात. याशिवाय प्रत्येक सरकारास आपल्या देशांत कोणत्याही देण्याची फेड करण्याकरितां कायद्याप्रमाणें कोणत्या वस्तू देणें व घेणें हें आवश्यक आहे हें ठरवावें लागतें. या वस्तूंस कायदेशीर चलन असें म्हणतात. या दोहोंत फरक हाच कीं चलन ही अधिक व्यापक जाति आहे व त्यांत अधिक वस्तूंचा समावेश होऊं शकतो. उदाहरणार्थ व्यापारी लोकांत सर्व देशांमध्यें चेक मोठ्या खुशीनें ग्रहण करतात. परंतु चेक हें कायदेशीर चलन नाहीं. चेक घेण्याविषयीं ऋणकोनें आग्रह केल्यास तो कोर्टांत चालणार नाहीं. त्याचप्रमाणें सोनें हे सार्वत्रिक चलनांत असलें तरी सोन्याचा गट हें कायदेशीर चलन होऊं शकत नाहीं. इंग्लंडांत किंवा हिंदुस्थानांत ऋणकोनें सोनें दिल्यास धनको तें घेण्यास बांधला नाहीं. यावरून सर्वग्राह्यता हें चलनाचें मुख्य अंग समजलें पाहिजे. चलनांतील पदार्थांस दुसरे आवश्यक गुण प्राप्त झाले म्हणजे त्यास पैसा ही संज्ञा प्राप्त होते व ते पैशांचें कार्य उत्तम रीतीनें करूं लागतात.

चलनासंबंधीं महत्त्वाचा सिद्धांत "ग्रेशॅमचा सिद्धांत" या नांवानें प्रसिद्ध आहे. या सिद्धांतांचें स्वरूप असें आहे कीं, 'खोटा पैसा खऱ्या पैशाचें निःसारण करतो.' चांगलीं नाणीं व वाईट नाणीं एकाच काळीं प्रचारांत असल्यास चलनांत वाईट नाणीं राहून चांगलीं नाणीं आटविलीं जातात, किंवा परदेशांत पाठविलीं जातात. याकरितां नाणें कायद्यानें

ठरविलेल्या मर्यादेच्या पलीकडे कमी वजनाचें झाल्यास तें सरकारनें परत घेऊन रद्द केलें पाहिजे. अशा तऱ्हेची आपत्ति मध्ययुगांत अनेक वेळां अनेक संस्थानांत आली होती व याचें मुख्य कारण राजांचा कर्जबाजारीपणा हें होय. कर्ज मिळेनासें झालें म्हणजे चलनांत लटपट करून पैसा जमा करणें हा सोपा मार्ग असे, व याचा अवलंब करण्यास त्या काळांतील अनियंत्रित राज्यपद्धतीमुळें राजांस कोणताहि प्रतिबंध नसे. लोकांच्या हातांत सत्ता आल्यापासून हलके हलके ही स्थिति बदलून आजमितीस नाण्यांत ढवळाढवळ करण्याचें साहस बहुतकरून कोणीहि करीत नाहीं. वाईट चलनाचे व्यापारावर फार अनिष्ट परिणाम होतात, हें सत्यहि आतां सर्व मुत्सद्यांस कळून चुकलें आहे.

ग्रेशॅमच्या सिद्धातांचें दुसरें उदाहरण नोटा व नाणीं हीं दोनहि चलनांत असून नोटांची किंमत कमी झाल्यास दृग्गोचर होतें. असें झाल्यानंतर होता होईल तों नोटांत व्यवहार करून नाणीं आटविण्याकडे व परदेशीं पाठविण्याकडे प्रत्येकाची प्रवृत्ति होते. १८६२ पासून १८७९ पर्यंत युनायटेड स्टेट्समध्यें नोटांची किंमत अतिशय कमी झाली व त्यामुळें सोनें परदेशीं जाऊं लागलें. ही आपत्ति टाळण्याचा उत्तम उपाय हाच कीं नोटांच्या मोबदला केव्हांहि नाणीं मिळतील अशी सरकारनें खबरदारी घेतली पाहिजे. शिवाय नोटांचें चलन अमर्याद न वाढेल अशी व्यवस्था केली पाहिजे. हल्लीं जर्मनींत नोटा पैशापासरी झाल्यामुळें सोन्यारुप्याचें चलन अजीबात बंद झालें आहे. हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची आपत्ति कधींहि आली नाहीं याचें मुख्य कारण हें आहे कीं नोटांचे रुपये देण्याची हिंदुस्थानसरकारची पूर्ण तयारी असते. महायुद्धाच्या अतिशय बिकट प्रसंगांतसुद्धां नोटांचे रुपये देण्याची जबाबदारी सरकारनें पार पाडली. ही गोष्ट सरकारास भूषणावह आहे.

चलनपद्धतींचे तीन प्रकार आहेतः—(१) एकचलनपद्धति, (२) द्विचलनपद्धति व (३) तुलनात्मक पद्धति. एकचलन पद्धतींत मुख्य नाणें सोनें किंवा रुपें यांपैकीं एका धातूचें असतें. इतर धातूंचीं नाणीं हीं फक्त उपनाणीं अथवा परचुटण म्हणून वापरण्यांत येतात, परंतु एका ठराविक मर्यादेपलीकडे कायदेशीर चलनें असूं शकत नाहींत. मुख्य चलन हें कोणत्या वाटेल त्या रकमेंपर्यंत कायदेशीर चलन असतें. शिवाय पूर्ण एकचलन पद्धतीमध्यें मुख्य नाण्याची टांकसाळ खुली असते. म्हणजे ठराविक प्रमाणांत मुख्य धातु दिल्यास नाणें पाडून घेण्याचा वाटेल त्यास अधिकार असतो. उदा० अजमासें ७$\frac{1}{3}$ मासे सोनें दिल्यास इंग्लंडमध्यें एक सॉव्हरिन पाडून देतात; हिंदुस्थानांत १८९३ च्या पूर्वी पंधरा षोडशांश तोळे अथवा ११$\frac{1}{4}$ मासे चांदी दिल्यास एक रुपया पाडून देत असत. एक चलनपद्धतींत अशी व्यवस्था असते कीं चलनांतील नाणें आटविल्यास मूळ धातुगत मूल्य प्राप्त होतें व त्या धातूचें वाटेल तेव्हां पुन्हां नाणें पाडून मिळतें. यामुळें धातुगत मूल्य व नाण्याचें मूल्य यांमध्यें नेहमीं एकवाक्यता असते. या कारणानें नाणीं आटविण्यासंबंधानें विशेष कायदे करावे लागत नाहींत. लोकांस जें सोईचें असेल तें स्वरूप लोक पसंत करतात. गट पाहिजे असल्यास नाणीं आटवावीं व नाणीं पाहिजे असल्यास टांकसाळींत गट नेऊन त्यांस नाण्याचें रूप द्यावें. या पद्धतीमुळें एक प्रकारची नैसर्गिकता व कृत्रिम युक्त्यांचा अभाव हीं या पद्धतींत साध्य होतात. ही मुख्य धातु सोनें असल्यास सुवर्णैकपद्धति व रुपें चलन असल्यास रौप्यैकचलनपद्धति अशीं नावें द्यावीं लागतात.

या पद्धतींचा एक फायदा असा आहे कीं द्विचलनपद्धतीमध्यें जीं अनेक नियंत्रणें व दोनहि धातूंचें प्रमाण ठराविक रहाण्याविषयीं प्रयत्न करावे लागतात तीं या पद्धतींत अनवश्यक असतात खुली टाकसाळ ठेविली म्हणजे इतर कोणत्याहि गोष्टाकडे सरकारास लक्ष द्यावें लागत नाहीं.

द्विचलनपद्धतींत सोनें व रुपें या दोनहि धातूंचीं नाणीं कायदेशीर चलन असतात व दोनहि नाण्याकरितां टांकसाळ खुली असते. अर्थात् त्या नाण्यांत असणारें धातूचें प्रमाण व दोन नाण्यामधील गुणोत्तर हीं कायद्यानें ठरवावीं लागतात. उदा० अमुक सोनें दिल्यास सॉव्हरिन व अमुक चांदी दिल्यास रुपया अशीं नाणीं पाडून दिल्यास, व १ सॉव्हरिन = १५रुपये असें ठरवून टाकल्यास हिंदुस्थानांत द्विचलनपद्धति होईल या पद्धतीची विशेष खुबी अशी आहे कीं या नाण्यांपैकीं कोणतें द्यावयाचें हें ऋणकोच्या इच्छेवर सोंपविलेलें असतें. त्यामुळें ज्या धातूचीं नाणीं पाडून घेणें फायदेशीर असतें त्या धातूचीं नाणीं सर्वच लोक पसंत करतात. याचा परिणाम स्वाभाविक असा होतो कीं, दोहोंपैकीं जी धातु तात्पुरती स्वस्त असते तिचीं नाणीं चलनांत येऊन दुसऱ्या धातूचीं नाणीं ग्रेशॅमच्या सिद्धांताप्रमाणें आटविलीं जातात किंवा बाहेरच्या देशांत जातात. कल्पना करा कीं, पौंडाचा व रुपयाचा भाव ठरविल्यानंतर बाजारांत सोनें स्वस्त झालें; अर्थात् १५ पेक्षा कमी रुपये देऊन पौंडांत जितकें सोनें असतें तितकें मिळूं शकतें. असें दिसून येतांच प्रत्येक व्यापारी व बँक रुपये देऊन सोनें खरेदी करून त्याचे पौंड टांकसाळींतून घेऊन पौंडांत आपलें देणें देऊं लागेल. उलटपक्षीं चांदी स्वस्त झाल्यास प्रत्येकजण रुपये पाडून घेईल. एका पौंडास १६ रुपयांत जी चांदी असतें ती मिळाल्यास तेवढ्या चांदीचे सोळा रुपये पाडून मिळतील व त्यापैकीं पंधरा रुपये धनकोस देऊन एक रुपयाचा फायदा ऋणकोस होईल. अशा रीतीनें तत्वतः द्विचलनपद्धति असून प्रत्यक्ष अमलांत दोन एकचलनपद्धतींचें रहाटगाडगें सुरू होईल. कांहीं दिवस रुप्याचीं नाणीं आटविलीं जातील व कांहीं दिवस सोन्याचीं नाणीं आटविलीं जातील. देशांमध्यें सोनें व रुपें यांमध्यें कोणतेंहि गुणोत्तर ठरविणें सरकारच्या हातांत

असतें; परंतु सर्व जगांतील या दोहोंतील गुणोत्तर ठरविणें हें एका देशांतील राजसत्तेच्या कक्षेच्या बाहेर आहे.

सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत बहुतेक देशांत द्विचलनपद्धति अमलांत होती परंतु इंग्लंडनें एकचलन-पद्धतीचा स्वीकार केल्यापासून एकचलनपद्धतीकडे राष्ट्राचा कल जास्त होऊं लागला. फ्रान्सनें मात्र ही पद्धति अमलांत आणण्याची पराकाष्ठा केली. १८०३ सालीं नेपोलियननें द्विचलनपद्धतीचा आश्रय केला. परंतु नवीन सोन्याच्या खाणींचा शोध लागल्यापासून सोन्याची पैदास जास्त होऊं लागली व फ्रान्समधून रुपें नाहींसें होऊं लागलें.

१८५६ त फ्रान्स, बेल्जम स्वित्झर्लंड, इटली व ग्रीस या राष्ट्रांनीं 'लॅटिन युनियन' नांवाचा संघ स्थापन केला व द्विचलनपद्धति कायम ठेवण्याचा निश्चय केला. नंतर १८७१ सालीं जर्मनीनें सुवर्णैकचलनपद्धतीचा स्वीकार केला. १८७२ मध्यें नॉर्वे, स्वीडन व डेन्मार्क यांनींहि एकचलन पद्धति अमलांत आणिली. त्यामुळें या चार देशांतील सर्व रुपें 'लॅटिन युनियन' मध्यें येऊन तेथील सर्वच नाणें रुप्याचें होण्याची भीति वाटूं लागली. तिचा परिहार करण्याकरितां 'लॅटिन युनियन' नें रुप्याची खुली टांकसाळ बंद केली. १८७६ मध्यें युनायटेड स्टेट्सनें द्विचलनपद्धतीस शक्य तितकी मदत केली. १८७२, १८८१, १८९२, १८९७ या सालांत सर्व राष्ट्रांच्या चलनावर परिषदा भरल्या; परंतु इंग्लंड व जर्मनी यांचा विरोध असल्यामुळें द्विचलनपद्धति स्वीकारणें इतर राष्ट्रांस सोईचें नव्हतें. सर्व जगांत द्विचलनपद्धति होत नाहीं असें पाहून हिंदुस्थानांतहि १८९३ सालीं टांकसाळ बंद करून सोन्याचें नाणें सुरू करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें. तेव्हांपासून द्विचलनपद्धति ही निकामी झाल्यासारखीच आहे. फ्रान्सच्या अनुभवावरून असें स्पष्ट दिसतें कीं, दोन चार देशांनीं द्विचलनपद्धति अमलांत आणल्यास ती फायदेशीर न होतां उलट दुःखदायक होते. याकरितां या पद्धतीच्या कट्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असें आहे कीं सर्व राष्ट्रांनीं ह्या पद्धतीचा अंगिकार केल्यास पूर्वीच्या इतिहासांत घडून आलेल्या गोष्टी असंभाव्य होतील. कारण प्रत्येक देशांत दोन्ही धातूंची नाणीं मुख्य असलीं म्हणजे रुपें स्वस्त झाल्याबरोबर प्रत्येक देशांतील लोक रुप्याचें नाणें देऊं लागतील व या वाढलेल्या मागणीमुळें पुन्हां रुपें पूर्वपदावर येईल. त्याचप्रमाणें सोनें व रुपें यांमधील गुणोत्तर किंचित् बदलून सोनें स्वस्त होऊं लागल्यास सर्व जगांतील देशांत सोन्याची मागणी जास्त होऊन हें गुणोत्तर पुन्हां कायदेशीर गुणोत्तरावर येऊन स्थिर होईल. कांहीं देशांत द्विचलनपद्धति असल्यास सोनें किंवा रुपें इतर देशांत जाईल. परंतु सर्व जगांत हीच पद्धति असल्यास सोनें व रुपें बाहेर जाणार कोठें? जर भविष्यकाळीं राष्ट्रसंघाच्या मार्फत सर्व देश त्या पद्धतीचा अंगिकार करतील तरच ही पद्धति यशस्वी होईल, नाहींतर होणार नाहीं. सध्यां तरी द्विचलनपद्धतीचा कोणी पुरस्कार केल्यास त्याची गणना विक्षिप्त मनुष्यांत होते. शिवाय सध्यां सुवर्णैकचलन हेंच उत्तम असा सर्वांचा पूर्वग्रह झाल्यामुळें दुसऱ्या पद्धतींचा कोणीहि निःपक्षपातानें विचार करीत नाहीं. ज्या वेळेस सोन्याची पैदास अतिशय कमी होऊन सर्व देशास सोनें पुरेनासें होईल त्या वेळेस द्विचलनपद्धतीचा उदयकाल येईल. द्विचलनपद्धतीचा मोठा फायदा हा आहे कीं एकंदर चलनाचें प्रमाण वाढून पैशाची टंचाई पडत नाहीं. हल्लींच्या पद्धतींत सोन्याची कधीं कधीं इतकी टंचाई पडते कीं एका देशास जरूर लागल्यास दुसऱ्या देशांतून सोनें पळवून आणण्याविषयीं अनेक क्लृप्त्या सुरू आहेत. विशेषतः इंग्लंडचा १८४४ चा बँक चार्टर ॲक्ट हा अगदीं ढिला असल्यामुळें इंग्लंडवर हा प्रयोग अनेक वेळां होतो. जर्मनी, युनायटेड स्टेट्स, रशिया यांनां सोनें लागलें म्हणजे ते इंग्लंडांतून वाटेल तेव्हां नेतात. पुष्कळशीं 'बिल्स ऑफ एक्सचेंज' म्हणजे परराष्ट्रांच्या लंडन येथील व्यापाऱ्यांवर दिलेल्या हुंड्या जमा केल्या म्हणजे त्यांच्या नोटा मिळतात व त्या नोटा पटवून बँक ऑफ इंग्लंड या संस्थेंत रोख सॉव्हरिन कायद्यानें मिळतात व हे पेटयांत घालून बाहेर देशांत नेण्यासहि कायद्याचा प्रतिबंध नसतो. अशा रीतीनें अनेक वेळा ८।१०कोटी पौंडाचें सोनें इंग्लंडांतून इतर देशांत गेलेलें आहे. अशा तऱ्हेच्या प्रयोगास इंग्रजींत कॉर्नर ( कोंडी ) अशी संज्ञा आहे. सोन्याचें उत्पादन दरसाल अधिकाधिक वाढत चाललें आहे. १९१५ सालीं १४५ कोटी रुपयांचें सोनें जगांत पैदा झालें. असें असूनहि सर्व देशांत सुवर्णचलन झाल्यास हल्लींचें सोनें सर्व राष्ट्रांत पुरणार नाहीं हें खास. अशी स्थिति असतां रुप्यावर बहिष्कार घालून चलनाची संख्या कमी करणें हें दुराग्रहाचें व अदूरदर्शित्वाचें लक्षण आहे. शिवाय हल्लीं चलनाच्या अस्थिरतेमुळें सर्व देशांत किंमतीवर जो परिणाम होतो तो द्विचलनपद्धतींत होणार नाहीं असें या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. हें मत पुष्कळ अंशीं ग्राह्य आहे यांत शंका नाहीं. रुप्याचीं नाणीं दिसण्यांतहि इतकीं तेजस्वी व सुंदर दिसतात कीं सोन्याच्या नाण्यांत व ह्या नाण्यांत कोणताहि फरक नाहीं. रुप्याचें नाणें मुख्य नाणें केल्यास रुप्याची किंमतहि हल्लींपेक्षां पुष्कळ वाढेल; कांहींच्या मतें ती इतकी वाढेल कीं सोनें व रुपें यांमधील गुणोत्तर १:१० असें थोडक्या अवधींत होईल. परंतु हें करावयास कोणी? मिल, फॉसेट यांस द्विचलनपद्धतीचें रहस्य मुळींच कळलें नाहीं असें त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट दिसतें. आधुनिक इंग्रजी अर्थशास्त्रज्ञांत प्रो. मार्शल यानीं द्विचलनपद्धतीस अनुकूल अशा कांहीं सूचना केल्या आहेत त्या त्यांच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ् एकॉनॉमिक्स' या ग्रंथाच्या तिसऱ्या भागांत वाचकांस सांपडतील.

तुलनात्मक पद्धतींत दोनहि धातूंचीं नाणीं तोलून त्यांचें जें बाजारांतील भावाप्रमाणें मूल्य होईल त्याप्रमाणेंच त्यांचा स्वीकार होतो. किंवहुना नाण्यास गटाचेंच स्वरूप प्राप्त होतें. ही पद्धति कोणत्याहि एकाच देशांत सध्यां चालू नाहीं. परंतु मध्ययुगीन युरोपांत व हिंदुस्थानांतहि शेंकडों नाणीं प्रचारात असल्यामुळें ह्या पद्धतीचा अवलंब करीत असत हल्लीं फक्त आंतरराष्ट्रीय व्यापारांत ही पद्धति दृगोचर होते.

भा र ती य.—हिंदुस्थानांत ऋग्वेद काळापासून सोन्याचें चलन होतें. परंतु तें नुसत्या धातूचें असावें असें दिसतें. कारण वेदांत नाण्यांचा उल्लेख आढळत नाहीं. महाभारतांतसुद्धां नाण्यांविषयीं स्पष्ट उल्लेख सापडत नाहीं. तथापि गट या रूपांत सोन्याचें चलन त्या कालीं होत हें निःसंशय आहे. अकबराच्या वेळीं द्विचलनपद्धति सुरू होती. सोनें व रुपें या दोनहि धातूंचीं नाणीं असून त्यांचें एकमेकांशीं गुणोत्तर ठरविलें होतें. परंतु प्रत्यक्ष बाजारांमध्यें कमीजास्त भाव होऊन बटाव द्यावा लागे. मराठी साम्राज्यात सोन्याचीं नाणीं पुष्कळ वापरीत असत परंतु सामान्य व्यवहारांत निरनिराळ्या तऱ्हेचे रुपये आतील रुप्याच्या मानानें किंमत ठरवून घेत असत.

ईस्टइंडिया कंपनीनें उत्तम रुपये पाडण्याचें सुरू केल्यापासून तिचे रुपये सर्व ठिकाणीं लोकप्रिय होऊं लागले. मद्रास प्रांतांत सोन्याचें नाणें जास्त चलनात होतें परंतु १८१८ मध्यें कंपनीनें त्या प्रांतांत रुपया चलनांत आणला. नंतर १८३५ सालीं रुपया हेंच फक्त कायदेशीर चलन आहे असें कंपनीनें जाहीर केलें. परंतु खजिन्यात सोन्याचीं नाणीं धातूच्या किंमतीप्रमाणें घेत असत. १८५३ सालीं लॉर्ड डलहौसीनें सोन्याचीं नाणीं बेकायदेशीर ठरवून रौप्यैकचलनपद्धति प्रस्थापित केली. यानंतर १८९३ पर्यंत ही पद्धति चालू होती. १८६६ मध्यें एका कमिटीनें सोन्याचें नाणें चालू करण्याविषयीं शिफारस केली परंतु भारतमंत्री यानीं ही सूचना मान्य केली नाहीं.

१८९३ सालीं सरकारनें खुली टांकसाळ बंद केली. याचीं कारणें दोन होतीं. एक कारण असें कीं, १८७० पासून रुपें स्वस्त झाल्याकारणानें पौंड व रुपया यांमधील हुंडणावळ रुपयाच्या बरीच विरुद्ध झाली होती. कधीं कधीं तर १ पौंड = ३० रुपये इतका रुपयाचा दर कमी लागे यामुळें इंग्लंडांत पाठविण्याची रक्कम पौंडांत ठरली असल्यानें तिची रुपयांत अधिक किंमत होऊन करांचें ओझें जास्त वाढत चाललें. शिवाय हुंडणावळीच्या अस्थिरतेमुळें बजेट करणें कठिण पडूं लागलें. दुसरें कारण हें होतें कीं रुप्याच्या स्वस्तपणामुळें हिंदुस्थानांत रुपें आणून त्याचे रुपये इतर देशांतलि व्यापारी पाडून घेऊं लागले. त्यामुळें चलनांत रुपये अमर्याद वाढून रुपयाची किंमत या देशांतहि कमी होऊन सर्व किंमती वाढण्याची खात्री वाटूं लागली. ही आपत्ति टाळण्यास नवीन रुपये बंद करणें हा मार्ग होता. कारण त्यायोगें रुपयांची टंचाई पडून किंमती पूर्ववत् राहतील हें निश्चित होतें. या दोनहि कारणांमुळें टांकसाळ बंद करून सोन्याचें नाणें करण्याचें सरकारनें ठरविलें. १८९८ मध्यें सॉव्हरिन हें कायदेशीर चलन ठरवून त्याचें रुपयाशीं प्रमाण १:१५ असें निश्चित केलें व सोन्याची खुली टांकसाळ करण्याचें ठरविलें. १९०२ त ही टांकसाळीची कल्पना रद्द झाली. चलनांत फक्त इंग्लंडांतून आलेले सॉव्हरीन येऊं लागले. परंतु त्यांचें एकंदर चलनांशीं प्रमाण फार थोडें होतें. यानंतर चेंबरलेन कमिशननें असें ठरविलें कीं हिंदुस्थानास सुवर्णचलनाची मुळीच अपेक्षा नाहीं; रुपये व नोटा हेंच चलन उत्तम आहे; फक्त परदेशीं सोनें पाठविण्याची जरूर पडल्यास सरकारनें रुपये घेऊन लंडनवर पौंडांचे ड्रॅफ्ट विकावे. या कमिशनचा अहवाल मान्य झाल्यापासून सोन्याच्या चलनाची कल्पना सरकारनें सोडून दिली. गेल्या वीस वर्षांत गोखले, ठाकरसी, वेब इत्यादि अर्थशास्त्रज्ञ धुरीणानीं सुवर्णचलनाविषयीं शक्य तितकी चळवळ केली. परंतु तिचा फायदा झाला नाहीं.

आजमित्तीस जें चलन आहे, त्याचें वर्णन 'सुवर्णसंलग्नचलन' या नांवानें केलें जातें. या पद्धतीचीं तत्वें अशीं आहेत कीं, खरोखरी चलनांत सोनें न ठेवितां सोन्याच्या नाण्यांशीं व्यवहारातील चलनांचा संबंध जोडून देणें; एका केंद्रस्थानीं सर्व सोनें ठेवणें व त्या सोन्याच्या आधारावर इतर राष्ट्रांचें देणें फेडून टाकणें; सोन्याचें नाणें व व्यवहारांतील रुप्याचें नाणें यांचें प्रमाण पक्कें ठरवून टाकून तें अनेक युक्त्यांनीं कायम टेवणें. ह्या तत्वांनुसार पुढीलप्रमाणें प्रत्यक्ष आचरणांत योजना केलेल्या आहेत.

प्रत्यक्ष चलनांत रुपये व नोटा हीं महत्वाचीं अंगें आहेत; सॉव्हरिन कोणाजवळ इंग्लंडांतून आले असल्यास ते कायदेशीर चलन आहेत. महायुद्धापर्यंत पौंड १ = १५ रुपये असा भाव होता व हल्लीं पौंड १ = १० रुपये असा भाव आहे. परंतु हें चलन महत्वाचें नाहीं भारतमंत्री हे 'होमचार्जेस' वसूल करण्याकारितां इंग्लंडांत हुंड्या विकतात व त्या हुंड्यांचे हिंदुस्थानांत हिंदुस्थानसरकाराकडून रुपये अथवा नोटा मिळतात. आतां कोणांस इतर राष्ट्रांचें देणें चुकविण्याकरितां पौंड लागल्यास प्रत्यक्ष पौंड देण्यास सरकार बांधलें गेलें नाहीं. परंतु या कामाकरितां 'उलट हुंड्या' विकण्यास सरकार नेहमीं तयार असतें. उलट हुंड्या सरकारास येथें रुपये देऊन मिळतात व त्या लंडन येथें दाखविल्या म्हणजे भारतमंत्री त्याबद्दल पौंड देतात. म्हणजे येथील चलनाचा मोबदला केव्हांहि सोन्याचें नाणें पौंड हें मिळूं शकतें. ही व्यवस्था कायम राखण्याकरितां जितक्या हुंड्या भारतमंत्री विकतील तितक्यांचे रुपये येथील खजिन्यांत ठेवितात; रुपये कमी पडल्यास रुपें इंग्लंडांतून पाठवून टांकसाळींत नवे रुपये पाडतात. याशिवाय सॉव्हरिन देऊन त्यांच्या मोबदला

रुपये मागतां येतात. रुपये पाडण्यांत प्रत्येक रुपयामागें ५।६ आणे नफा होतो. हा नफा सर्व एकत्र करून त्याचा सुवर्णनिधि बनविला आहे. याशिवाय नोटांच्या निधीमध्यें सॉव्हरिन घेऊन रुपये किंवा नोटा दिल्यामुळें जें सुवर्ण सांचतें त्याचा दुसरा एक निधि होतो. या दोनहि निधींचा उपयोग उलटहुंड्या विकण्याकडे करण्याची भारतमंत्री यास परवानगी आहे. याच कारणाकरितां हे दोनहि सुवर्णनिधि इंग्लंडमध्यें ठेवतात, कारण त्यांचा हिंदुस्थानांत विशेष उपयोग नसतो याशिवाय हे निधी इग्लंडांत ठेवण्याचा उपयोग असा होतो कीं एखाद्या सालीं ‘हुंड्या’ किफायतशीर भावानें न विकल्या गेल्या तर ‘होमचार्जेस’ ची सर्व रक्कम भारतमंत्री या निधींमधून काढून घेतात; व त्याच रकमेइतके रुपये हिंदुस्थानांत जो निधीचा भाग असतो त्यांत जमा करतात.

हिंदुस्थानचा निर्यात माल आयात मालापेक्षां पुष्कळच अधिक असल्यामुळें इतर देशांचें कर्ज फिटून या देशास ४०।५० कोटि घेणें निघतें त्यामुळें उलटहुंड्या विकत घेण्याचे प्रसंग फार कमी येतात. असे प्रसंग गेल्या तीस वर्षांत १९०७, १९१४, १९१५, १९१८, १९२०, या सालीं आले होते. सामान्यतः इतर लोकांस हिंदुस्थानचें देणें असल्यामुळें ‘हुंड्या’ विकत घेण्याचांच यूरोपांतील बँकांना जरूर असते. या देशात दुष्काळ पडतो तेव्हां निर्यात माल कमी असतो, परंतु लोकांच्या संवयीमुळें आयात माल फारसा कमी होत नाहीं. त्यामुळें अशा सालांत हिंदुस्थान रिणको देश बनतो व उलटहुंड्या विकण्याचा प्रसंग येतो.

नोटांच्या चलनाची व्यवस्था पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. एकंदर चलनांत जेवढ्या नोटा असतील तितकी रक्कम रोख रुपये, पौंड किंवा सोन्याचा गट आणि सिक्यूरिटी या स्वरूपांत नोटांच्या निधींत पाहिजे. सिक्यूरिटी किती असाव्यात यासंबंधाचा नियम आहे. १८९० पर्यंत सिक्यूरिटींची संख्या ६ कोटि होती. ती १९११ मध्यें १४ कोटींवर नेली. महायुद्धामध्यें जास्त रकमेची जरूर लागल्यामुळें सिक्यूरिटींची मर्यादा १०० कोटीपर्यंत नेली. एकंदर नोटांच्या संख्येंत हे १०० कोटि वजा केले म्हणजे बाकीचे रुपये किंवा सोन्याचें नाणें अथवा गट असे निधीमध्यें असलेच पाहिजेत असा कायद्यानें निर्बंध आहे. हल्लींच्या मितीस चलनामध्यें अजमासें १७५ कोटींच्या नोटा आहेत. सुवर्णनिधि फौलर कमिटीच्या शिफारसीप्रमाणें १८९८ त जमा करूं लागले. त्यावेळेस असा उद्देश होतो कीं, हा निधी ५० कोटींइतका झाला म्हणजे इंग्लंडांतील चलनाप्रमाणें येथें सुवर्णचलन सुरू करावयाचें. परंतु नंतर सरकारनें चेंबरलेन कमिशनच्या सल्ल्यावरून ‘सुवर्णसंलग्नचलन’ हेंच हिंदुस्थानास हितावह आहे असें ठरविलें. आतां फिरून हा प्रश्न वादास लावण्याची सरकारची इच्छा नाहीं. तथापि हिंदुस्थानांतील सर्व अर्थशास्त्रज्ञ पंडित व मुत्सद्दी यांचें असें ठाम मत आहे कीं हल्लींची चलनपद्धति अतिशय सदोष व देशाच्या हितास विघातक अशी आहे व सुवर्णचलन स्थापित करणें हाच श्रेयस्कर मार्ग आहे.

हल्लींच्या चलनपद्धतींत पुढीलप्रमाणें ठळक दोष आहेत. ही पद्धति कृत्रिम आहे. सोनें व रुपें यांचे भाव नेहमीं बदलत असल्यामुळें रुपया व पौंड यांमधील गुणोत्तर कायम राखणें कठिण पडतें. हें करण्याकरितां ज्या क्लृप्त्या कराव्या लागतात, त्यामुळें सरकारचा चलनपद्धतीशीं निकट संबंध येऊन सरकारास नेहमीं जागृत रहावें लागतें त्याच्या मज्जातंतूंवर चांगलाच ताण बसतो रुपें महाग व सोनें स्वस्त झाल्यास ही पद्धति टिकणार नाहीं. कौन्सिलबिलें अथवा ‘हुंड्या’ विकल्यामुळें हिंदुस्थानांत रुपयांचें चलन अमर्याद वाढलें आहे. यामुळें चलनाचें द्रवीभवन होऊन किंमतीवर परिणाम होऊन १८९८ पासून किंमती अतोनात वाढल्या आहेत. किंमती वाढल्यामुळें कर वाढवावे लागतात, लष्करी खर्च वाढतो, नोकरांचे पगार वाढवावे लागतात. अशा रीतीनें अनर्थपरंपरा सुरू होते. दोन देशांमधील हुंडणावळ ही व्यापाराच्या नेहमींच्या स्थितीवर अवलंबून असते. परंतु हुंडणावळ कृत्रिम केल्यास आयात व निर्गत मालाच्या नैसर्गिक गतींत विरोध उत्पन्न होतो. हुंडणावळ हें कारण व व्यापार हें कार्य असा विपर्यास कधीं कधीं होतो हुंडणावळ अनुकूल वाटल्यास जरूरी नसतां व्यापारी माल मागवितात व मागणीकडे दुर्लक्ष करतात. सुवर्णनिधि इंग्लंडांत ठेवल्यामुळें त्या रकमेचा इंग्लंडमधील व्यापाऱ्यांस फायदा मिळतो, व हिंदुस्थानात व्याजाचे दर वाढत जातात. सिक्युरिटींमध्यें इंग्लंडांतील व इतर देशांतील सिक्यूरिटी जास्त असल्यामुळें आमच्या निधीचा फायदाहि इतर देशांस मिळतो. व आम्हांस फक्त ३।-३॥ टक्के व्याज मिळतें. हा निधि येथें ठेवल्यास आमच्या व्यापारास अतिशय साहाय्य होईल. हल्लीं सोनें व सिक्युरिटी या रूपांत इंग्लंडांतील सुवर्णनिधि जवळ जवळ ८० कोटींचा आहे.

सुवर्णचलन केल्यास या सर्व आपत्ती नाहींशा होऊन इंग्लंड व हिंदुस्थान या दोनहि देशांत एकच चलन झाल्यामुळें हुंडणावळीचा प्रश्न तापदायक होणार नाहीं. हिंदुस्थान देश हा सुवर्णचलन करण्यास सर्वस्वी पात्र आहे. येथील निर्गात आयातीपेक्षां ३०।४० कोटींनीं जास्त असल्यामुळें आठ वर्षांत हें सोनें एकत्र केल्यास जवळ जवळ ३०० कोटींचें सोनें सुवर्णचलन करण्यास उपयोगी पडेल. नंतर हल्लींच्या नोटा रद्द करून त्यांच्याऐवजीं पौंडांच्या नोटा केल्या म्हणजे पूर्ण सुवर्णकचलनपद्धति अस्तित्वांत येईल. मटचुरण म्हणून ५० कोटि रुपये लहान सहान व्यवहारांकरितां पाडले म्हणजे पुरेसे होतील. १०० रुपये रकमेच्या पलीकडे रुपया हें कायदेशीर चलन नाहीं असें कायद्यांत नमूद केलें म्हणजे रुपयास खरें उपनाण्याचें स्वरूप प्राप्त होईल. प्रत्यक्ष चलनांत पौंड फारसे न राहण्यास बँकिंगची पद्धति सार्वत्रिक

करणें हा उपाय आहे. हा उपाय अमलांत आणून प्रत्येक जिल्ह्यांत इंपीरियल बँकेची शाखा उघडली व चेकचा प्रसार जास्त वाढत गेला म्हणजे इंग्लंडांतल्या प्रमाणें येथेंहि प्रत्यक्ष धातूच्या चलनाची काटकसर करतां येईल.

हल्लीं चलनाची स्थिति फारच घोंटाळयाची झाली आहे. पूर्वीची हुंडणावळ कायम ठेवण्याची प्रतिज्ञा महायुद्धाच्या कालांत मोडावी लागली. हल्लीं हुंडणावळ स्थिर नसून नेहमीं बदलत असते. परंतु हल्लीं ती जास्त नैसर्गिक आहे. सरकारनें आपलें नियंत्रण काढून टाकल्यामुळें व्यापाराच्या क्रियेमुळें जी हुंडणावळ निश्चित होते तिला अनुसरून देवघेव होते. हुंडणावळ स्थिर करण्याविषयीं अनेक लोक मागणी करूं लागले आहेत; व हल्लीं सर पुरुषोत्तम यांनीं त्या आशयाचें बिल असेंब्लीमध्यें आणलें आहे. एकदम उलट कांहीं अर्थशास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं, सुवर्णचलन अमलांत आणावें म्हणजे हुंडणावळीचा प्रश्नच उद्भवणार नाहीं.

स्मिथ कमिटीच्या शिफारसीवरून १९१९ मध्यें सरकारनें कायदा करून पौंड व रुपया यांमधील प्रमाण १: १० असें ठरविलें. परंतु पौंडांची खरी किंमत बदलत असून मध्यंतरीं १६-१७ रुपये असल्यामुळें सरकारी भावानें पौंड-घेणें अशक्य झालें. यामुळें इंग्लंडांतून पौंड आणण्याचें बंद झालें. व व्यवहारांतहि पौंडांचें चलन बंद झालें. सरकारी हिशेब ठेवण्याकरितांच या प्रमाणाचा अवलंब केलेला आहे. व हुंडणावळ ठरविण्याचा सरकारचा यांत मुळींच उद्देश नाहीं असें नुकतेंच सर बेसिल ब्लॅकेट यांनीं जाहीर केलें आहे. एकंदर जगांतील किंमतीची व हुंडणावळीची स्थिर स्थावर झाल्यानंतर हिंदुस्थानांतील सुवर्णचलनाचा प्रश्न हातांत घेऊं असेंहि १९२४च्या मार्चच्या बजेटाच्या वेळीं हिंदुस्थान सरकारनें अश्वासन दिलें आहे. नुकत्याच व्हाइसरायांनीं दिल्लीस केलेल्या भाषणांत हा प्रश्न लवकरच विचारांत विचारांत घेतला जाईल असें सांगितलें आहे [ ले. व्ही. एन. गोडबोले ].

**चल्लाकेरे**— म्हैसूरमध्यें चितलदुर्ग जिल्ह्यांत ईशान्येकडील तालुका. याचें क्षेत्रफळ ७९६ चौ. मै. असून उ. अ. १४ ° ४' ते १४° ३७' व पू. रे. ७६ ° २७' ते ७७ ° २' मध्यें आहे. १९११ मध्यें लोकसंख्या ८०२४० होती. यांत दोन शहरें—नायकन्हाटी व चल्लाकेर. मुख्य ठाण्याशिवाय १९२ खेडीं आहेत. १९०३—४ मध्यें जमीनसारा ११०००० रु. होता. पूर्वभागांत दक्षिणोत्तर वेत्रवती नदी वहाते. तिला पश्चिमेकडून दोन ओढे येऊन मिळतात. तालुक्यांतील जमीन सपाट असून खडक व टेंकड्या क्वचित् आहेत. जमीन बहुतेक तांबडी असून रेताड आहे. परंतु नैर्ऋत्येस कांहीं काळी जमीन आहे. तळीं पुष्कळ आहेत. परंतु फारशीं मोठीं नाहींत. पिकें ज्वारी, रागी, हरबरा, गहूं व तमाखू. काळया जमिनींत थोडासा कापूस होतो.

**चवळी**—ह्या वेलास लॅटिनमध्यें विगना काटजंग, इंग्रजींत काऊपी, मराठींत चवळी, संस्कृतमध्यें राजमाष इत्यादि नांवें आहेत. ह्या वेलाची लागवड हिंदुस्थानच्या उष्ण भागांत करतात. चवळीला साधारण हलकी जमीन चांगली मानवते. हें खरीप पीक असून बहुतकरून तें शेतांत नुसतें न पेरतां, बाजरीसारख्या पिकाबरोबर दुय्यम पीक म्हणून पेरतात.

चवळीच्या हिरव्या व कोंवळया शेंगांची भाजी करतात. वाळलेल्या दाण्याचें ( यांनां चवळया म्हणतात ) पीठ अथवा डाळ करून खातात. चवळयांची उसळ व आमटी होते. चवळीचीं पानें व देंठ यांपासून एक प्रकारचा हिरवा रंग तयार होतो असें म्हणतात.

चवळया गोड असतात. परंतु थोडा तुरटपणाहि त्यांत असतो. त्या रुक्ष, जड, व थंड असतात. चवळया सारक, वृष्य, थकवा दूर करणाऱ्या, रुचिकारक, असून कफ व पित्त दोषांना नाहींशा करितात. [ ग्रँट; पदे; धन्वं. नि; राजनिघंटु ].

**चहा**—याचें लॅटिन नांव कॅमेलीआ थिइफेरा. यूरोप व आशियांत चहाला टी, टिटे, टी. चा, चाय्, वगैरे निरनिराळीं नांवें असून त्यांवरून ' चहा ' हें मराठी नांव बनलें आहे. चीनमधील प्राचीन शब्दकोशांत चहाला शब्द आढळतो. पण प्राचीनकाळीं भाजीपाल्याला चव आणण्याकरितां चहाच्या पानांचा उपयोग करीत असत असें दिसतें. वेंति नामक चिनी बादशहाला ( इ. स. ५६९-६०५ ) डोकें दुखण्यावर चहाचें पेय औषध म्हणून एका बौद्ध भिक्षूनें सांगितल्याचा उल्लेख आहे. जगांतील बहुतेक देशांत चहाचें पेय अगदीं अलीकडे ज्ञात झालें, ही गोष्ट जपानी, संस्कृत, अरबी, फारशी, हिब्रू, ग्रीक, लॅटिन वगैरे प्राचीन भाषांत चहाला नांव नाहीं यावरून स्पष्ट दिसतें. डच ईस्टइंडियाकंपनीनें चहा प्रथम यूरोपांत नेला व लॉर्ड अर्लिंगटन यानें हालंडमधून तो इंग्लंडांत नेला. १६७७ पासून इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें चहाचा पुरवठा इंग्लंडांत करण्यास सुरुवात केली. त्यावेळीं लंडनमध्यें एक पौंड चहाला '५ ते १० पौंड किंमत पडत असे. चहाच्या लागवडीचा प्रयत्न ब्रिटिश अमदानींत १७८८ नंतर सुरू झाला. लॉर्ड विल्यम बेंटिंकनें या बाबतींत एक कमिटीहि नेमली होती. कित्येक ठिकाणीं प्रयोगांकरितां चहाचे सरकारी मळे तयार करण्यांत आले. गॉर्डन नांवाच्या इसमाला माहिती मिळविण्याकरितां चिनांत पाठविलें. या कामांत सरकारनें १८००० पौंड गार्डनची सफर व चहा कमिशनसाठीं खर्च केले.

आरोग्यदृष्टया चहाच्या पानांतील ३।४ द्रव्यांचा विचार करणें जरूर आहे. पहिलें द्रव्य अर्क ( इसेंन्शियल आईल ). ह्याचें प्रमाण ०·७०६ इतकें असून त्याचे गुणधर्म अद्याप नीट कळले नाहींत. दुसरें द्रव्य केफिन् अथवा थेइन हें शेंकडा ३ ते '५ या प्रमाणांत असतें. चहांतील उत्तेजकपणा या द्रव्यामुळें आलेला आहे. उंची चहा कोंवळया पानापासून तयार होत असल्यामुळें त्यांत केफिन जास्त असतें. चहांतलें तिसरें द्रव्य टॅनिन; यापासून होणाऱ्या अनिष्ट परिणामांसंबंधीं जे लेख लिहिलेले असतात त्यांत अतिशयोक्ति

असते. चहाला जालीमपणा व रंग या द्रव्यापासून येतो. व या दोन गुणांवरच चहाची किंमत ठरते. अर्थात् टॅनिनच्या प्रमाणावर ती अवलंबून असते.

## चहासंबंधीं व्यापारी माहिती देणारीं कोष्टकें.

हिंदुस्थानांतील चहाचें पीक. ( सन १९२० ).

| देश | लागवड क्षेत्र एकर | पैदास पौंड |
|---|---|---|
| आसाम | ४२०२०० | २३४३१४०६१ |
| बंगाल | १७२४०० | ७१६९६५६७ |
| बहार-ओरिसा | २१०० | ३८४'१९४ |
| संयुक्तप्रांत | ६७२३ | १४९१८८७ |
| पंजाब | ९७४४ | १६६३'१४७ |
| मद्रास | ४११४९ | १२२५'१७५५ |
| त्रावणकोर कोचीन | ४७१०५ | २३३९९१२३ |
| ब्रह्मदेश | १७०० | १३४१२२ |

खालील कोष्टकांतील निर्गतीचे आंकडे पौंडाचे आहेत.

हिंदुस्थानांतील चहाच्या निर्गतीचें कोष्टक.

| देश | १९१६-१९१७ सालीं निर्गत | १९१९-१९२० सालीं निर्गत |
|---|---|---|
| युनैटेडकिंगडम | २२४९२७८९४ | ३३६९१६९४२ |
| इतर यूरोप | २७७२६६१२ | १४४७४५ |
| आफ्रिका | २३९३८६३ | ३११३२६४ |
| कानडा | ८४४३०९२ | ८२९९५७९ |
| युनैटेडस्टेट्स | ३०३१६४८ | ६५९४३८३ |
| इतर अमेरिका | १७४१६१८ | ३७२६२८० |
| सीलोन | ३६४७१५७ | १७२०७३५ |
| चीन | ९३०४७३८ | १६१३६५ |
| इराण | १२६२८९९ | १९५९४०२ |
| तुर्कस्तान | १४८२९७७ | ४६४५८०६ |
| इतर आशिया | २३१६१८५ | २५२८२२६ |
| आस्ट्रेलिया | ५१६०३९९ | ७७८२९७६ |
| इतर | ११५४९४४ | २८३७२९६ |

जगांतील चहाच्या निर्गतीचें कोष्टक.

| देश | १९००-०१ सालीं निर्गत | १९१०-११ सालीं निर्गत | १९१९-२० सालीं निर्गत |
|---|---|---|---|
| हिंदुस्थान | १९२३००६५८ | २५६४३८६१४ | ३८२०३३६९४ |
| सीलोन | १४९२६४६०३ | १८६९२५११७ | २०८५६०९८३ |
| चीन | १९६४६१६०० | २०८१०६६७७ | ९१९८३६०० |
| जाव्हा | ... | ४०६३९१८५ | ११८५४१२०० |

हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या चहाची मागणी वाढविण्याकरितां टी असोसिएशन व चहाचे व्यापारी यांचे प्रयत्न चालू आहेत. चहाच्या लागवडींत, मशागतींत व तयार करण्यांत तज्ज्ञांच्या साह्यानें फार सुधारणा होत चालली आहे. मुंबई सरकारच्या शेतकीखात्यांतील अधिकारी डॉ. हॅरोल्ड एच. मॅन्. यांनीं पुष्कळ श्रम घेऊन शक्य तितकी चहासंबंधीं माहिती प्रसिद्ध केली आहे.

**चक्षुर्मनु**— उत्तानपादवंशीय सर्वतेजस् राजर्षीपासून आकूती भार्येच्या ठायीं झालेला पुत्र. हा चालू मन्वंतरापूर्वीचा होऊन गेलेला सहावा मनु. याच्या कालसत्तेस चाक्षुषमन्वंतर असें म्हटलेलें असून, त्यांत भृगु, सुमेधा, विरजा, सहिष्णु, मधु विवस्वान् आणि अतिनामा हे सप्तर्षि; हविष्मान् वीरक इ. नामांतरांनीं होते.लेख, प्रसूत,भव्य,पृथुग,महानुभाव असे आप्यादिक नामांतरानें पंचविध देव होते. स्वर्गामध्यें मंत्रद्रुम नांवाचा इंद्र असून वैराजऋषीपासून संभूती भार्येच्या ठायीं अजित नामक विष्णूचा अवतार झालेला त्यानें समुद्रमंथनकाळीं कूर्मरुपानें मंदराचल आपल्या पृष्ठावर धारण करून देवास अमृत प्राप्त करून दिलें होतें यावरून या कल्पांतील कूर्मावतार या मन्वंतरांत झाला होता असें समजतात. यास नड्वला किंवा वीरिणी नांवाची स्त्री होती व तिजपासून यास अकरा पुत्र झाले. [ भागवत, स्कं. ४ अ. १३; ८ अ. ५; विष्णुपुराण; मत्स्यपुराण वगैरे ].

**चाकण**—मुंबई इलाख्यांत पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत एक खेडें. हें खेडें पुण्याच्या उत्तरेस १८ मैल आहे. येथील किल्ला ऐतिहासिक महत्वाचा आहे. पहिल्या प्रथम १४४३ मध्यें बहामनी राज्यांतील एका सरदारानें येथें आपला तळ दिला होता. तेव्हांपासून चाकण व जुन्नर हीं लष्करी महत्वाचीं ठाणीं आहेत. १४८६ मध्यें अहमदनगर घराण्याचा मूळ पुरुष मालिक अहमद यानें हा किल्ला हस्तगत केला. १५९५ मध्यें अहमदनगर घराण्यांतील दहावा पुरुष बहादुर यानें शिवाजीचे आजोबा मालोजी भोसले यांस हा किल्ला दिला.

शिवाजीनें विजापुरकरांपासून हा किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन त्या जागीं फिरंगोजी नरसाळा नांवाच्या मूळच्या किल्लेदाराचीच पुन्हां नेमणूक ( १६४७ ) केली. पुढें शाहिस्तेखानानें या किल्यास वेढा दिला असतां फिरंगोजीनें ५६ दिवसपर्यंत किल्ला मोटया शौर्यानें लढवून शेवटीं तो मोंगलांच्या स्वाधीन केला ( १६६२ ). त्यानंतर अवरंगजेबानें चाकण परगणा शिवाजीस परत केला त्या वेळीं हा किल्लाहि त्यास परत मिळाला असावा ( १६६८ ). इ. स. १६७१-७२ च्या सुमारास दिलेरखानानें चाकणच्या किल्यावर आपल्या २०००० सैन्याच्या मदतीनें हल्ला केला होता. राजारामाच्या धामधुमीच्या कारकिर्दीत मोंगलांनीं किल्ला घेतला; परंतु मोंगलांचीं फौज दक्षिणेंतून जातांच धनाजी जाधवानें मोंगलांपासून चाकण किल्ला परत घेतला. ( १७०७ ). यानंतर हा किल्ला शेवटपर्यंत मराठ्यांच्याच ताब्यांत राहिला होता. [ डफ. पु. १ ].

**चाकवत**—या झाडास लॅटिनमध्यें चेनोपोडिअम् आलबम्, इंग्रजींत व्हॉइट गूझ फूट, मराठींत चाकवत अशीं नांवें आहेत.

उ प यो ग:—याचा भाजी करण्याकडे व औषधी अशा दोन रीतीनीं होतो. पश्चिम हिमालयाच्या उंच भागांवर याची लागवड त्यापासून होणाऱ्या धान्य व भाजीपाल्याकरितां करतात. निळीचा रंग तयार करण्यांत या झुडुपाच्या पाल्याचा काढा उपयोगी पडतो. याच्या बियांत शेंकडा २० या प्रमाणांत तेल असतें व पालाशक्षारहि असतात.

ला ग व ड.—चाकवताची भाजी बागाइतांत पाण्यावर करितात. ती पावसाळ्यांत चांगली होत नाहीं. हिंवाळ्यांत उत्तम होते. पाऊस संपताच जमीन खतावून वाफे करून बीं फेकून मातींत मिसळून पाणी देतात. ती आठ दिवसांत उगवून येते. दोन अडीच महिन्यांत काढावयास येते. दुसऱ्या गरव्या भाज्या लावण्याचे ठिकाणीं मिश्र पीक म्हणून चाकवताचें बी फेकून करितात. वांगीं, टामाटो, कांदे, कोबी, फुलवर, मका, वगैरे भाज्या लावण्याच्या ठिकाणीं चाकवताचें बीं पातळ फेकल्यास भाजीच्या उत्पन्नांतून खुरपणीचा कांहीं खर्च भागतो.

चाकवताचें बीं चपटें, करड्या रंगाचें असतें. बी धरणें झाल्यास झाडें अर्धीं वाढलीं म्हणजे कापून भाजीकरितां घ्यावीं व पुन्हां जी वाढ होते तीवर धरलेलें बीं चांगलें ठोसर येतें. बीं पातळ फेकलें नाहीं तर भाजी दाट येते व चांगल्या मोठ्या पानांची जोमदार वाढत नाहीं. म्हणून बियांत चौपट ( चार पट ) माती मिसळून तें फेकावें. चाकवताची पातळ भाजी नुसती अगर ताकांतली फार नामी होते. ती सारक आहे असें म्हणतात.

**चागई**, जि ल्हा:—बलुचिस्तानमधील एक जिल्हा. क्षेत्रफळ १८८९२ चौरस मैल. ह्याच्या उत्तरेस अफगाणिस्थान उत्तरेस सरवान विभाग व कलात संस्थान. दक्षिणेस खारान व पश्चिमेस इराण आहे. ह्या प्रांतांतील पुष्कळ वालुकामय डोंगर अर्धचंद्राकृति आहेत. सर्वांत मोठी नदी पीशीनलोरा ही घोर ह्या नांवानें ओळखली जाते. वालुकामय प्रदेशांत विषारी साप व विंचू फार आढळतात. अगदीं एकीकडील प्रांतांत जंगली गाढवें सांपडतात. हवा रुक्ष आहे. परंतु पावसाळ्यांत व वसंतांत बरीच आल्हादकारक असते. थंडींत दोन तीन इंच पाऊस पडतो. डोंगरांवर बर्फ पडतें.

इ ति हा स:—१७४० मध्यें नादीरशहानें खारानच्या संस्थानिकास नुश्की हा प्रांत दिला. पुढें हा प्रांत लवकरच ब्राहुई लोकांच्या हातांत गेला. १८८६ मध्यें अफगाणिस्थानच्या अमीरानें चागई प्रांतांत सैन्य पाठविलें. परंतु १० वर्षांनंतर हा नुश्की प्रांतासच जोडला गेला. लोकसंख्या १९११ मध्यें १६३४४ होती. बहुतकरून सर्व वस्ती सुना जातीच्या मुसुलमानांची आहे. एकंदर खेडीं ३२ आहेत नुश्की हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे.

शेतकी अगदीं बाल्यावस्थेंत आहे व उद्योगधंदे मुळींच नाहींत म्हटलें असतां चालेल. शिसें, तांबें, लोखंड व पांढरा दगड पुष्कळ ठिकाणीं सांपडतो. परंतु प्रांतांतील दळण वळणाच्या अभावीं धंद्याच्या दृष्टीनें त्यांचें महत्व फार कमी आहे. बायका घरगुती उपयोगासाठीं कापड तयार करतात. विणकाम फार चांगलें असतें व रंगहि पक्का असतो. प्रांताच्या एकंदर स्थितीवरून दुष्काळ पडण्याचा फार संभव असतो. अशा वेळेला लोक एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जातात. एजन्सी प्रदेशांत ह्या जिल्ह्याचा समावेश होतो व प्रांतावर व्हॉइसरॉयचा अधिकार चालतो. ह्या प्रांताचे तीन भाग आहेत. नुश्की तहसील, चागाई व पश्चिम संजरानी. एक प्राथमिक शाळा व एक इस्पितळ नुकतेंच उघडलें आहे.

पो ट त ह शी ल—बलुचिस्तानमध्यें चागाई जिल्ह्यांतील पोट तहशील. उ. अ. २८° १९' व २९° ३४' मध्यें व पू. रे. ६३° १५' व ६५° ३५' मध्यें आहे. उत्तरेस अफगाणिस्थान व दक्षिणेस रासकोह टेंकड्या आहेत. क्षेत्रफळ ७४०७ चौ. मै. असून लोकसंख्या १९११ मध्यें ६६०६ होती. वसुलीच्या बाबींमध्यें याच्यांत पश्चिम सिञ्जाणीचा समावेश होतो; या भागाची लोकसंख्या ६००० असून क्षेत्रफळ ९४०७ आहे. ह्या भागांत चोहोंकडे दगड व वाळू आहे. पाण्यांत विशेषतः उन्हाळ्यांत सल्फेट्स सांपडतात. येथील बहुतेक लोकांजवळ उंटाचे तांडे व शेळयांचे कळप असतात. कायमचीं खेडीं २२ असून दालबंदिन मुख्य ठाणें आहे. १९०३ मध्यें जमीनवसूल ६१०० रु. झाला. त्यापैकीं निम्मा गुरें चारण्यास दिलेल्या परवानगीवर मिळाला.

**चांगदेव:**—या नावाचे अनेक पुरुष झाले असावेत व त्याच्या दंतकथेवरून त्या त्या पुरुषाबद्दल अनेक घोटाळे झाले आहेत. मुक्ताबाईशिष्य चांगदेव हा प्रथम योगी असून नंतर भक्तिमार्गी झाला. हा दीर्घायुषी असावा. याला वटेश्वर चांगदेव म्हणत. मुधेश चांगा, केशवदास चांगा वगैरेहि चांगदेव होऊन गेले. या नावांवरून चांगदेव हा चवदाशें वर्षें वांचल्याची दंतकथा रचिली गेली. मुक्ताईशिष्य चांगदेवानें गोदावरीकांठीं शके १२१७ त समाधी घेतली. याचे ग्रंथ फारसे उपलब्ध नाहींत. याचा वंशज शामजी गोसावी यानें याचें एक चरित्र लिहिलें आहे. हा वाघावर बसून व सर्पाचा चाबूक करून ज्ञानेश्वराच्या दर्शनास गेल्याची व यानें ज्ञानेश्वरास कोरा कागद पाठविल्याची दंतकथा प्रसिद्ध आहे चांगदेवास ज्ञानेश्वरानें केलेला बोध ' चांगदेव पासष्टी ' म्हणून प्रसिद्ध आहे. [ संतकाव्यसूचि; भक्तिविजय; महाराष्ट्र सारस्वत ].

**चांगदेव**—मुंबई पूर्वखानदेश. भुसावळ तालुक्यांत एदलाबादच्या वायव्येस ४ मैलांवर पूर्णा व तापी यांच्या

संगमावर हें गांव असून येथें एक चांगल्या स्थितींत असलेलें चांगदेवाचें देऊळ आहे. हें हेमाडपंती असून काळया संगमरवरी दगडांचें चुन्याशिवाय जोडून बांधलेलें आहे. यामध्यें दरवाज्याच्या दोन्हीं बाजूंस दोन बाळबोध शिलालेख आहेत. परंतु ते अस्पष्ट आहेत. संगमावर अहिल्याबाईनें बांधलेलें एक महादेवाचें देऊळ आहे.

**चांगभकार**—मध्यप्रांतांत एक मांडलिक संस्थान आहे. याचें क्षेत्रफळ ९०८ चौ. मैल आहे. हें सन १९०५ सालच्या पूर्वी बंगालच्या छोटानागपूर प्रांतांत होतें. याच्या पूर्वेस कोरिया संस्थान व दक्षिणेस, पश्चिमेस आणि उत्तरेस मध्य-हिंदुस्थानांतील रेवा संस्थान आहे. हा अतिशय डोंगराळ मुलूख आहे. यांत एका पाठीमागून एक अशा कित्येक टेंकड्या लागतात व त्यांवर सालवृक्षांचीं जंगलें आहेत. यांत बनास, बप्पी आणि नेऊर या नद्या आहेत. येथील जंगलांत वाघ, चित्ते, अस्वल आणि नाना तऱ्हेचे मृग आढळतात. पूर्वी मराठे व पेंढारी लोकांकडून इतका उपद्रव होत होता कीं या संस्थानिकाला त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं रेवा संस्थानांतील रजपूतास आठ गांव इनाम द्यावे लागले. इ. स १८१९ त हें संस्थान ब्रिटिश सरकारकडे आलें येथील संस्थानिकाचें राहाण्याचें ठिकाण भरतपूरास आहे. यांतील हरचोकजवळच्या डोंगरांत पुष्कळ कोरींव लेणीं आहेत. येथील लोकसंख्या सन १९०१ त १९५४८ होती. यांत गोंड व होस लोकांची वस्ती फार आहे. हे लोक शेतकी करून आपली उपजीविका करतात. रेवा संस्थानांतील व्यापारी लोक येथें येऊन साखर, गूळ, मीठ कापड वगैरे जिन्नस विकतात. या संस्थानिकास इ. स. १८९९ त आपल्या संस्थानांतील कारभार पहाण्यास कांहीं अटींवर सनद दिली. हें संस्थान ब्रिटिश सरकारास ३८७ रु. खंडणी देतें सन १९०५ मध्यें पुन्हां सनद देण्यांत आली व ही खंडणी २० वर्षेंपर्यंत मुकर करण्यांत आली. शेतावर सारा बसविणें, शेतसारा गोळा करणें, कर बसविणें, न्यायखातें, अबकारीखातें, मीठ, अफू किंवा संस्थान-संस्थानांमध्यें वाद वगैरे बाबतींत हा संस्थानिक छत्तिसगड कमिशनरच्या अंकित आहे. चीफ कमिशनरच्या परवानगीशिवाय या संस्थानिकास आयात किंवा निर्गत मालावर जकात बसविण्याचा अधिकार नाहीं. या संस्थानांतील सर्व खनिज पदार्थांवर ब्रिटिश सरकारचा पूर्ण ताबा आहे. या संस्थानिकास कमिशनरच्या संमतीशिवाय ५ वर्षांवर कैद किंवा ५० रु. वर दंड करण्याचा अधिकार नाहीं. येथील जमा व खर्च सन १९०४–०५ त रु.१३००० होता. जमीनदार लोकांनां ठराविक साऱ्यानें संस्थानिकाकडून जमिनी मिळतात. शेतकरी लोकांचा जमीनीवर हक्क जोंपर्यंत ते सारा वेळच्या वेळीं पटवितात तोंपर्यंत असतो. येथें एक कैदखाना आणि एक शाळा आहे. येथील शिक्षण फारच मागसलेलें आहे.

**चांगा केशवदास**—चांगदेव तापी नदीच्या तीरीं असतां नारायणडोह येथील एक कुलकर्णी मुधोपंत यानें सहकुटुंब त्यांची सेवा केली. पुढें त्यांस चांगदेवाच्या वरप्रदानावरून पुत्र झाला. त्याचें नांव चांगदेव ठेविलें. तो रूपानें चांगदेवाप्रमाणेंच असे. हाहि चांगदेवाप्रमाणेंच मोठा सिद्ध पुरुष निपजला. त्याच्या अलौकिक कृत्यांच्या अनेक गोष्टी प्रचलित आहेत. "पुत्रवती भव" असा आशीर्वाद गतधवा स्त्रीस दिला गेल्यावर त्यानें तिच्या मृत पतीच्या अस्थींवर सिंचन केलेलें पाणी प्यावयास देऊन तिला पुत्रप्राप्ति करून दिली. दुसरी गोष्ट अशी सांगतात कीं, बेदरच्या मुसुलमान राजानें पंढरपुरच्या विठ्ठलमंदिराजवळ मशीद बांधल्यानंतर लवकरच त्याची आवडती राणी मृत झाली. त्यावेळीं चांगकेवशदासानें तेथें जाऊन मशीद काढविल्यास राणी जिवंत होईल असें सांगून त्याप्रमाणें चमत्कार घडवून आणला. पुणतांबें येथें या सिद्ध पुरुषाची समाधि आहे.

**चाघताइखान**—हा चेंगीझखानाच्या सर्व पुत्रांतील अतिशय धार्मिक व गुणी पुत्र होता. बापाच्या मृत्युपत्रान्वयें ट्रॅन्सोक्सिआना, बल्ख, बदख्शान् आणि काशघर या प्रांतांची मालकी याच्याकडे आली होती ( इ. स. १२२७ ). परंतु या प्रांताची राज्यव्यवस्था करण्याचें काम अधिकाऱ्यांवर सोंपवून चाघताइ हा, आपल्या ओक्ताखान नामक थोरल्या भावासमागमें स्वस्थ बसून राही. ओक्ताखानाची याच्यावर फार भक्ति असून यास तो गुरूप्रमाणें मान देत असे. चाघताईखान इ. स. १२४१ च्या जूनमध्यें वारला. सात महिन्यानंतर ओक्ताखान हाहि मृत्यु पावला हिंदुस्थानांत मोंगल साम्राज्याची स्थापना करणाऱ्या वंशाचें नांव चाघताईखानाच्या नांवावरूनच पडलें आहे. [ बील–ओरि. बायों. डिक्श. ].

**चांचेगिरी**—चांच नांवाचें बेट काठेवाडनजीक अरबी समुद्रांत आहे. तेथील लोक लुटारूपणाचा धंदा समुद्रावर मोठ्या प्रमाणांत करीत असल्यामुळें चांचिया हा शब्द समुद्रावरील लटारूंस सामान्य अर्थानें रूढ झाला. दुसरें असें एक स्पष्टीकरण करण्यांत आलें आहे कीं हे दर्याचार चोंच असलेली पगडी वापरीत; तशी पगडी आज गुजराथ्यांत बरीच रूढ आहे. इंग्रजी कायद्यांत 'पायरसी' ( चांचेगिरी ) म्हणजे समुद्रावर जहाज किंवा त्यांतील माल यांची लुटालूट किंवा दरोडेखोरी करणें असा अर्थ आहे. समुद्रावरील लुटालूट हा गुन्हा कोणाहि विशिष्ट राष्ट्राविरुद्ध नसून कोणत्याहि देशांतील लोकांविरुद्ध होणारा असल्यामुळें चांचे लोकांनां शासन करण्याचा अधिकार गुन्हेगारांनां पकडून ज्या देशांतील कोर्टापुढें हजर करण्यांत येईल अशा कोणत्याहि देशांतील कोर्टास असतो. या लुटारू लोकांचा पाठलाग करून त्यांचा उपद्रव नष्ट करण्याचा हक्क प्रत्येकास आहे; मात्र प्रत्यक्ष लढाईखेरीज

इतर वेळीं चांचे लोकांस ठार मारण्याचा हक्क नाहीं; फक्त त्यांना पकडून न्यायकोर्टापुढें खेंचतां येतें.

पा श्चा त्य इ ति हा स.—जमीनीवरच्या पेक्षां समुद्रावर शांतता व सुव्यवस्था राखण्याचें काम नेहमींच अवघड असल्यामुळें कोणत्याहि प्राचीन किंवा अर्वाचीन राष्ट्राला जमीनीवरील बंदोबस्त नीट केल्यावरच समुद्रावरील बंदोबस्ताकडे लक्ष देणें शक्य झालेलें आहे. त्यामुळें कोणत्याहि देशांत जमिनीवर अशांतता माजली किंवा प्रत्यक्ष लढाई सुरू झाली कीं चांचे लोकांस उत्तेजन मिळतें. तसेंच चांचे लोकांपासून लुटीतला माल विकत घेण्यास व्यापारी मिळत असले म्हणजे चांचेगिरी फैलावते.

इतिहासांत चांचेगिरीचा शिक्का परस्पर अगदीं भिन्न स्वरूपाच्या व्यक्तींवर मारलेला आढळतो. लढाईच्या वेळची लुटालूट आणि चांचेगिरी यांत मोठी तफावत आहे. निव्वळ चांचेगिरी करणारा इसम आपपरभाव न ठेवतां परदेशांतल्याप्रमाणें स्वदेशांतल्या इसमांसहि लुबाडतो. पण स्वदेशाचा अभिमान धरून स्वकीय सरकारच्या कायद्यास पूर्ण अवलंबून परकीयांची समुद्रावर लुटालूट करणारे शूर व धाडसी इसम प्राचीन ग्रीकांप्रमाणें अर्वाचीन इंग्रजादि यूरोपियनमध्यें आढळतात. इलिझाबेथ राणीच्या काळांत असे अनेक इंग्रज, फ्रेंच, डच वगैरे इसम होऊन गेले. त्यांनां चांचे म्हणतां येत नाहीं. सरकारी सैन्यांत ज्यांचा अंतर्भाव नाहीं अशा खासगी मालकीच्या सर्व लढाऊ जहाजांवरील इसमांची चांचे लोकांत गणना केली पाहिजे या नेल्सनच्या म्हणण्यांतील तत्व आधुनिक यूरोपीय राष्ट्रांत जसजसें पटत गेलें त्या मानानें स्वदेशहितोद्युक्त अशा खाजगी स्वरूपाच्या लढाऊ लोकांवरहि नियंत्रण घालण्याचा यूरोपीय राष्ट्रांनीं प्रयत्न सुरू केला.

१७ व्या शतकांत कायदा व पोलीस यांचा अम्मल वाढत गेल्यामुळें यूरोपीय किनाऱ्यावरील चांचेगिरीच्या धंद्यास बराच आळा बसला. पण नूतन वसाहत झालेल्या अमेरिका खंडाच्या बाजूला हा धंदा जोरावला. विशेषतः अमेरिकेंतील नूतन वसाहतवाल्यांनीं मायदेशाशींच व्यापार केला पाहिजे, इतर देशांशीं व्यापार करणें तो मायदेशामार्फत केला पाहिजे, अशा प्रकारचे निर्बंध स्पेन, फ्रान्स, ग्रेटब्रिटन वगैरे देशांनीं आपापल्या वसाहतवाल्यांवर घातल्यामुळें एका निराळ्या प्रकारचा गुप्त व्यापाराचा व तदनुषंगिक चांचेगिरीचा धंदा वाढला. परंतु अमेरिकेंतील वसाहतींनां जसजसा कायमपणा येऊन कायदा व शांतता अधिकाधिक प्रस्थापित होत गेली त्या मानानें अमेरिकन राष्ट्रांनींहि चांचेगिरी बंद करण्याचे जोरानें प्रयत्न केले; व १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत ती बहुतेक बंद झाली. तरी इकडे ग्रीक बेटांकडे चांचेगिरी चालू होतीच, आणि मलाया बेटांत तर १८५० पर्यंत ती बंद पडूं शकली नाहीं. मलाका सामुद्रधुनी व चीनचा समुद्र यांमध्यें यूरोपीयांनां १५ व्या शतकाच्या उत्तरार्धांतहि अनेक वेळां चांचे लोकांपासून उपद्रव झालेला आहे. चांचे लोकांचीं कृत्यें प्राचीन ग्रीक अद्भुत कथालेखकांप्रमाणें आधुनिक काव्यकादंबरीलेखकांनांहि रम्य संविधानकें रचिण्यांत उपयुक्त झालीं आहेत. पाश्चात्य चांचे लोकांमध्यें कॅप्टन अव्हेरी, कॅप्टन किड, बार्थोलोम्यू रॉबर्टस वगैरे इसम प्रसिद्ध आहेत. यूरोपीय इतिहासांत समुद्रावर लुटालूट करणाऱ्या लोकांस 'व्हायकिंग्ज,' 'बुकॅनियर्स' 'डच बेगर्स ऑफ दी सी', 'इंग्लिश सी डॉग्ज' वगैरे निरनिराळीं सामान्य नामें लावलेलीं आहेत.

म ल बा र कि ना ऱ्या व री ल चां चे.—वास्को द गामा यानें हिंदुस्थानाचा शोध लावल्यापासून यूरोपियन चांच्यांचा उपद्रव हिंदुस्थानास होऊं लागला. वास्कोच्या बरोबर आलेला व्हिन्सेन्ट सोडर हा पहिला यूरोपियन चांचा होय. इ. स. १६२८च्या सुमारास इंग्लंडच्या राजानें कॅ. क्वेल याला चांचेगिरी करण्यास हुकूम दिला होता. त्यानें मोंगलाचें एक जहाज पकडलें, परंतु पुढें सुरतच्या ई. इ. कंपनीनें त्याची भरपाई मोंगलास करून दिली ( १६३० ). त्यानंतर पोर्टर, बोनेल, किंग्स्टन, कॉब वगैरे इंग्लीश लोक चांचेगिरी करण्यास निघाले ( १६३५ ). कॉबनें त्या वेळीं तांबड्या समुद्रांत मोंगली ( दिल्लीच्या पातशाहीचीं ) जहाजें लुटलीं, तेव्हांहि सुरतच्या इं. कंपनीनें भरपाई केली. या पोर्टर वगैरे चांच्यांनां इंग्लंडच्या राजानेंच अशी लुटालूट करण्यास परवाने दिले होते असें म्हणतात. पोर्टरनें जेव्हां हा धंदा सुरू केला व एक भागीदार मंडळी काढली, तेव्हां तींत तर इंग्लंडच्या राजानेंच १० हजार पौंडांचा एक भाग घेतला होता असें म्हणतात. पोर्टरनें पुन्हां मोंगलाचीं सरकारी जहाजें लुबाडलीं व त्याबद्दल सुरतकर वखारवाल्यांनां कैद व पावणेदोन लाखांचा भुर्दंड पडला. हिंदुस्थानचीं जीं गलबतें जेद्दा बंदराशीं व्यापार करीत त्यांना मालांच्या किंमतीबद्दल प्रत्यक्ष रुपें व सोनें मिळे आणि त्यांची लूट हे यूरोपियन चांचे तांबड्या समुद्रांत जमून करीत असत. पुढें ( १७८३ ) जॉन हॅन्ड व इतर चार इंग्रज व दोन डच चांचे प्रख्यातीस आले. यांच्यापैकीं कांहीं जणांनीं एका फेरींत सहा लाखांची लूट मिळविली होती. यापुढें ( १६८५-८६ ) कांहीं डेन्स लोकहि सुरत ते मुंबई यांच्या दरम्यान चांचेगिरी करीत होते. तसेंच एका इंग्रज चांच्यानें व बॅबिंग्टन या ऐरिश चांच्यानें तेलिचरीजवळ धुमाकूळ घातला. यानंतर ( १६८९ ) वेस्ट इंडीजकडील पुष्कळ यूरोपियन चांचे इकडे आले व त्यांनीं हिंदुस्थानी व पुढें पुढें युरोपियन ( एवढेंच नव्हे तर स्वतःच्या देशाचींहि ) जहाजें लुटण्यास प्रारंभ केला. या लोकांनीं या वेळीं मलबार किनारा, इराणी आखात, तांबडा समुद्र, मोझांबिकची खाडी वगैरे ठिकाणीं धुमाकूळ मांडला होता. या दहा वर्षांत यांच्यापासून झालेलें नुकसान अपरिमित होतें. स. १६९१ डेन व विल्यम आणि टयू नांवाचे इंग्रज चांचे सुरतेजवळ प्रख्यातीस

आले. इंग्रज ई. इं. कंपनीकडून यांचें पारिपत्य होत नसे कारण कंपनीचे खलाशीच चांच्यांनां अनुकूल असत. या वेळीं सर्व चांच्यांवर ताण करणारा असा हेन्री एव्हरी हा इंग्रज पुढें आला. यानें हिंदी महासागरांत अतिशय लुटालूट केली. याचें एक चरित्रहि प्रसिद्ध झालें आहे. यानें अनेक लोक ठार केले. गलबतांनां आगी लाविल्या व गांवें जाळलीं. कंपनीकडून याचें पारिपत्य झालें नाहीं ( १६९५ ). एव्हरीनें पेरिम व मादागास्कर येथें वसाहत केली, व किल्ले बांधले. मादागास्कर येथें यापुढील ३०।४० वर्षें या यूरोपीय चांच्यांच्या अनेक वसाहती झाल्या. त्यांनीं माणुसकीस काळिमा लावणारे अनेक प्रकार तेथें केले. न्यू इंग्लंड व वेस्ट इंडीज येथून या यूरोपीय चांच्यांची भरती होई. हे हिंदी व्यापाऱ्यांस फार वाईट वागवीत, त्यांचे हालहाल करीत, मात्र यूरोपियनांनां चांगलें वागवीत. या एव्हरीमुळें सुरतच्या इंग्रज वखारवाल्यांनां तर अनेकदां मोंगल पातशहानें कैदेंत टाकिलें होतें. एव्हरीला पकडण्याकरितां मोठमोठालीं बक्षिसें लाविलीं होतीं. पण तो शेवटपर्यंत कोणाच्याच हातीं लागला नाहीं. याच सुमारास इंग्रजांचीं सातआठ जहाजें ( डिफेन्स, जोसाथा, रेझोल्यूशन वगैरे ) चांचेगिरी करीत होती. ई. इं. कंपनीचे बहुतेक खलाशी त्यांनां अनुकूल होते. पुढें ( १६९६ ) इंग्रज व्यापाऱ्यांनीं एक जहाज तयार करून त्यावर किड् यांस नेमून त्याला चांच्यांच्या बंदोबस्तास नेमिलें. परंतु हाच किड् उलट अट्टल चांचा बनला. त्यानें इतर व्यापाऱ्यांचीं, एवढेंच नव्हे तर ई. इं. कंपनीचीहि जहाजें लुटण्यास सुरुवात केली. त्याला कोणी पकडावयास आल्यास, त्याच्याजवळ असलेलें इंग्लंडच्या राजाचें फर्मान ( चांच्यांचा नाश करण्याबद्दलचें ) तो त्यांनां दाखवून फसवीत असे. तो १६९७ त अरबी समुद्रांत आला व तेव्हांपासून मलबार किनाऱ्यावर त्यानें धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. त्यामुळें मोंगल सरकारनें सर्व यूरोपीय वखारवाल्यांच्या वखारींवर पहारे ठेविले व नुकसानभरपाई जबरदस्तीनें भरून घेतली. इंग्लंडनें चांच्यांच्या बंदोबस्ताकरितां नेमलेले आरमारी लिटल्टन वगैरे अधिकारी त्यांनांच आंतून अनुकूल होते. लिटलटननें तर एकहि चांचा पकडला नाहीं. पुढें मोठ्या प्रयासानें किड्ला पकडून त्याला व त्याच्या साथीदारांनां फांशीं दिलें. यानें अनन्वित दुष्कृत्यें केलीं होतीं. सन १७००च्या सुमारास मादागास्करकडील चांचेगिरीस थोडासा आळा बसला. इंग्लंडनें यावेळीं त्यासाठीं ठिकठिकाणीं कोर्टें स्थापिलीं व त्यांनां फांशीचे अधिकार दिले. हीं कोर्टें १७२२ पर्यंत अस्तित्वांत होतीं. यूरोपियनांप्रमाणेंच अरब वगैरे मुसुलमानहि या वेळीं चांचेगिरी करीत असत. १७१३ सालीं इंग्लंड, टेलर, बूश या नांवांच्या इंग्रज चांच्यांनीं तर ई. इं. कंपनीच्या मोठमोठ्या लढाऊ जहाजांचाहि पराभव करून लुटालूट ( मलबार किनाऱ्यावर ) केली; इ. स. १७२३ पर्यंत स्टीट, फोर्ड, बोवेन, शिव्हर्स, नॉर्थ, हल्से, विल्यम्स व्हाईट वगैरे इंग्लिश व इतर यूरोपियन चांचे लोक ई. इं. कंपनीस मधून मधून लुटीत होतेच. पुढें मराठ्यांचें आरमार महत्त्वास चढल्यानें व त्यांचा आरमाराधिपती कान्होजी आंग्र्यासारखा प्रख्यात पुरुष असल्यानें या यूरोपियन व मुसलमान चांच्यांची चांचेगिरी बंद झाली व मलबार किनारा सुरक्षित झाला. [ जॉन बीडल—धि पायरेट्स् ऑफ मलबार ]

**चाचो**—मुंबई इलाख्यांत सिंध प्रांतांत थर व पारकर जिल्ह्यांतील तालुका. याचें क्षेत्रफळ २५५५ चौ. मैल असून उ. अ. २४°४४ ते २६° ४५ व पू. रे. ६९° ४८ व ७१°८ यांमध्यें आहे. १९११ मध्यें लोकसंख्या ५३५०१ होती. या तालुक्यांत ३९ खेडीं आहेत. व चाचो हें मुख्य ठिकाण आहे. लोकसंख्या प्रत्येक चौ. मैलास १५ आहे. १९०४-०५ मध्यें जमीनसारा व कर ४१००० रु. आहे. जमीन डोंगराळ व वाळूची आहे. बाजरी मुख्य धान्य आहे. नेहमीं दुष्काळ पडण्याचा संभव असतो.

**चांडोद**—मुंबई. बडोदें संस्थान. चांडोद पोटभागाचें मुख्य ठिकाण. येथून डाभोईला एक लहानसा रेलवेचा फांटा जातो. हें केवळ क्षेत्रस्थान म्हणूनच प्रसिद्ध नसून इमारती लांकडाचेंहि येथें बरेंच उत्पन्न होतें. शेषशाई, काशीविश्वेश्वर, महादेव, कपिलेश्वरमहादेव आणि चंडिकामाता यांचीं देवळें प्रमुख आहेत. चैत्र व कार्तिक पौर्णिमेला मोठी जत्रा भरते. नर्मदेच्या कांठची ही काशीच समजतात.

**चाणक्य**—' अर्थशास्त्र ' ( भाग ७ पृ. ४३९ ) व ' कौटिल्य ' ( भाग ११ पृ. ८३६ ) पहा.

**चातुर्मास्य**—आषाढ शुक्ल एकादशीपासून अथवा पौर्णिमेपासून कार्तिक शुक्ल एकादशीपर्यंत अथवा पौर्णिमेपर्यंत होणाऱ्या चार महिन्यांस चातुर्मास्य अशी संज्ञा आहे. चातुर्मास्याच्या आरंभीं जी एकादशी असते तिला शयनी एकादशी म्हणतात आणि समाप्तीला जी एकादशी असते तिला बोधिनी म्हणतात. मनुष्याचें वर्ष म्हणजे देवांची एक अहोरात्र. दक्षिणायन ही देवांची रात्र आणि उदगयन हा देवांचा दिवस होय. उदगयन कर्कसंक्रांतीला होत असतें व कर्कसंक्रांति आषाढ महिन्यांतच असते. शयन म्हणजे झोंप घेणें. देव आषाढ शुद्ध एकादशीला झोंप घेतात; म्हणून तिला शयनी असें नांव पडलें आहे; आणि कार्तिक शुद्ध एकादशीला उठतात, म्हणून तिला बोधिनी हें नांव पडलें आहे. देवांची रात्र म्हणजे मनुष्यांचे ६ महिने आहेत. परंतु देवांच्या शयनाचा काल चारच महिने आहे. अर्थात् रात्रीचा एकतृतीयांश शिल्लक आहे तोंच देव जागे होतात आणि व्यवहार करूं लागतात.

देव चातुर्मास्यामध्यें निद्रा घेत असतात, तेव्हां असुरांपासून रक्षण होण्याविषयीं आपण फारच सावध असलें

पाहिजे. चातुर्मास्यामध्यें कांहीं तरी व्रत केल्याशिवाय राहूं नये असें धर्मशास्त्र सांगतें

आषाढ शुक्ल एकादशीस उपोषण करून पुरुषानें चातुर्मास्यापर्यंत ( चार महिने ) शुचिर्भूत राहून व्रत करण्यास सुरुवात करावी असें भारतांत सांगितलें आहे व निर्णयसिंधु, धर्मसिंधु वगैरे ग्रंथांतून चातुर्मास्यसंबंधीं विशेष व्रतेंहि कथन केलीं आहेत. त्याप्रमाणेंचः—

वार्षिकांश्चतुरो मासान्वाहयेत्केनचिन्नरः।
व्रतेन नोचेदाप्नोति किल्बिषं वत्सरोद्भवम् ॥

असें वचन भारतामध्येंच असून त्याचा अर्थ " पावसाळ्याचे चार महिने कोणतें तरी व्रत करून पुरुषानें काढावे. नाहीं तर संवत्सरसंबंधीं सर्व कांहीं पातक त्याला प्राप्त होतें " असा आहे. तेव्हां चातुर्मास्यामध्यें पुरुषानें आपल्या शक्तीच्या मानानें कांहीं तरी नियम धरणें अवश्य आहे. चातुर्मास्यसंबंधीं व्रताचा आरंभ कर्तव्य असल्यास गुरुशुक्रांच्या अस्ताचा अथवा खंडतिथीचा दोष नाहीं. कारण,

न शैशवं नवा मौढ्यं शुक्रगुर्वोर्न वा तिथेः।
खण्डत्वं चिन्तयेदादौ चातुर्मास्यविधौ नरः॥

असें वृद्धगार्ग्यस्मृतींत वचन असून तें चतुर्वर्गचिंतामणींत घेतलेलें आहे. भविष्यपुराणामध्यें श्रावण महिन्यांत शाक, भाद्रपदांत दहीं, आश्विनांत दूध आणि कार्तिकांत द्विदल वर्ज्य करण्यास सांगितलें आहे. स्कंदपुराणामध्यें पहिल्या तीन महिन्यांत वरील प्रमाणेंच अनुक्रमें तीन पदार्थ वर्ज्य सांगून कार्तिकांत द्विदल, बहुबीज आणि वांगें वर्ज्य करावयास सांगितलें आहे आणि हीं चातुर्मास्यव्रतें नित्य आहेत असेंहि स्कंदपुराणांतच म्हटलें आहे. त्याचप्रमाणें पांढऱ्या मोहऱ्या, तांबडा मुळा, कोहळा, ऊंस, बोरें, आंवळा आणि चिंच हीं चातुर्मास्यांत वर्ज्य करावयास सांगितलीं आहेत. प्रसंग विशेषीं जीर्ण झालेला आवळा घेण्याची अनुज्ञा आहे. त्याचप्रमाणें माचा, पलंग वगैरेंवर शयन, ऋतुकाल नसतांना स्त्रीसंभोग, मांस, मद्य, परान्न व पडवळ हीं वर्ज्य करावीं. बहुबीज कार्तिकांत वर्ज्य करावें असें वर सांगितलें आहे. तेथील बहुबीज ह्या शब्दाचा अर्थ एकापेक्षां अधिक बिया ज्यांत आहेत तें, असा कांहीं ग्रंथकारांनीं केलेला असून कांहीं निबंधकारांनीं इतर अंशांपेक्षां बीजाचाच अंश ज्यांत जास्त असेल तें, असा अर्थ केला आहे.

चातुर्मास्यामध्यें वांगें, कलिंगड, बेल, उंबर आणि जळलेलें अथवा करपलेलें अन्न ज्याच्या उदरांत जिरतें त्याच्यापासून ईश्वर फारच दूर रहातो असें आचार्यप्रदीपांत सांगितलें आहे. ब्रह्मचर्य, शुचिर्भूतपणा, सत्य आणि आमिषवर्जन हीं चार व्रतें चातुर्मास्यामध्यें श्रेष्ठ आहेत असें देवलस्मृतींत म्हटलें आहे. प्राण्याचा अवयव, चर्मांतील उदक, ईडलिंबू, महाळुंग, यज्ञशेष नसलेलें, ईश्वराला निवेदन न केलेलें, करपलेलें अन्न, मसुरा आणि मांस हें आमिष होय; असें पद्मपुराणांत सांगितलें असून ज्या ज्या देशांत जो जो रुचिकर पदार्थ मिळतो तो चार महिने वर्ज्य करावा असेंहि पद्मपुराणांत सांगितलें आहे.

परंतु कार्तिकमहात्म्यामध्यें गाय, शेळी आणि म्हैस त्यांच्यावांचून कोणतेंहि दूध, धान्यांपैकीं मसुरा, शिळें अन्न, द्विजापासून विकत घेतलेले सर्व रस, भूमींतील मीठ, तांब्याच्या भांड्यांत ठेविलेलें गाईचें दूध, दहीं, ताक, लोणी वगैरे, डबक्यांतील पाणी आणि स्वतः करितांच तयार केलेलें अन्न हें आमिष होय असें म्हटलें आहे. पावटेंहि चातुर्मास्यांत वर्ज्य करावे म्हणून सांगितलें आहे. चार महिन्यांत जो हविष्यभक्षण करितो तो पापापासून अलिप्त राहतो असेंहि विष्णुधर्मांत सांगितलें असून अग्नीवांचून पक्व केलेलें धान्य मूग, यव, तीळ वाटाणे, कांग, देवभात, कंद, सैंधव, समुद्रजन्य मीठ, गाईचें दहीं व तूप, साय न काढलेलें दूध, फणस, आंबा, पिंपळी, जिरें, जुनी चिंच, नारिंग, केळें, आंवळे, गुळावांचून इतर इक्षुपदार्थ, तेलांत न तळलेलें वगैरेंची गणना हविष्यांत केलेली आहे. अगस्तिसंहितेमध्यें नारळहि हविष्यांत सांगितला आहे. भविष्यपुराणांत विशिष्ट पदार्थ वर्ज्य करण्यापासून प्राप्त होणारीं फलेंहि सांगितलीं आहेत. गूळ वर्ज्य केला असतां पुरुष जन्मांतरीं मधुर स्वरानें युक्त असा राजा होतो; तेल वर्ज्य केल्यानें कांति प्राप्त होते; योगाभ्यास केल्यानें ब्रह्मपद प्राप्त होतें. तांबूल वर्ज्य केल्यानें भोग प्राप्त होतात. घृताचा त्याग केल्यानें सौंदर्य प्राप्त होऊन शरीर तुळतुळीत होतें. शाकपत्रावरच उपजीविका केल्यानें भोग प्राप्त होतात. पक्व अन्न वर्ज्य केल्यानें पुरुष निर्मल होतो. भूमीवर अथवा पाषाणावर शयन केल्यानें मुनित्व प्राप्त होतें. धरणेंपारणें केल्यानें ब्रह्मलोक प्राप्त होतो; नखें व केंस वाढविल्यानें गंगास्नानाचें फल मिळतें; मौनव्रत धारण केलें असतां अप्रतिहत आज्ञा चालू लागते. नेहमीं भूमीवर भोजन केल्यानें पृथ्वीपतित्व प्राप्त होतें. मुखानें स्तुति करून ईश्वराला शंभर प्रदक्षिणा घातल्या असतां पुरुष हंस जोडिलेल्या विमानांत बसून स्वर्गाला जातो. अयाचित व्रतानें धर्माला अनुसरून वागणारे असे पुत्र प्राप्त होतात. तिसऱ्या दिवशीं एक वेळ भोजन करणारा कल्पायु होतो. ज्यानें गूळ वर्ज्य केला असेल त्यानें गुळानें भरून सुवर्णासहवर्तमान ताम्रपात्र दान करावें. लवणवर्जनाचाहि विधि हाच आहे. चातुर्मास्यामध्यें जो शिवालयांतील अथवा विष्णूच्या देवालयांतील अंगण सारवून त्याच्यावर पंचरंगी स्वस्तिकें व कमळें काढितो त्याला रुद्रलोक प्राप्त होऊन गाणपत्य मिळतें. असो. एकभुक्त व्रत करणाऱ्यानें दंपत्यास गोप्रदान करावें. नक्त व्रत करणाऱ्यानें दोन वस्त्रें द्यावीं. धरणेंपारणें केल्यास गाय द्यावी. भूमीवर शयन केल्यास शय्या द्यावी. तिसऱ्या दिवशीं एक वेळ भोजन केल्यास गोप्रदान करावें. तांदूळ, गहूं वगैरे धान्य सोडल्यास तें तें धान्य सोन्याचें करून द्यावें. शाखाभक्षण अथवा पयोव्रत केल्यास गोप्रदान करावें. दहीं, मध व घृत वर्ज्य केल्यास

वस्त्रदान व गोप्रदान करावें. ब्रह्मचर्यानें वागल्यास सुवर्णाची प्रतिमा दान करावी. तांबुलाचा त्याग केल्यास दोन वस्त्रें द्यावीं. मौन धारण केल्यास घृतकुंभ, दोन वस्त्रें आणि घंटा ह्यांचें दान करावें. देवासमोर रांगोळी काढण्याचा नेम केला असल्यास दुभती गाय व सुवर्णकमल द्यावें. चार महिने दिवा लाविल्यास दिवा आणि दोन वस्त्रें द्यावीं. भूमीवर अथवा पानावर भोजन केल्यास कांस्यपात्रदान व गोप्रदान करावें. चार रस्ते फुटतात तेथें दीप लाविल्यास अथवा गोग्रास घातल्यास गाय व बैल हीं दोन द्यावीत. शंभर प्रदक्षिणा घातल्यास वस्त्रदान करावें आणि अमुक द्यावें असें ज्याबद्दल विशेष सांगितलें नसेल त्याबद्दल सुवर्णदान व गोप्रदान सामान्यतः समजावें. चातुर्मास्यामध्यें अभ्यंग वर्ज्य करावें आणि समाप्ति झाल्यावर तिळाच्या तेलानें भरलेला घट द्यावा. [ धर्ममासिक, १. ]

**चातुर्मास्य याग**—अनेक इष्टींच्या समुदायानें होणारा याग. याच्याबद्दल सविस्तर माहिती ' वेदविद्या ' विभागांत ( पृष्ठ ७५ ) दिली आहे. हा याग राजसूय नामक क्रतूच्या अंगभूत आहे. परंतु स्वतंत्रच करण्याचा प्रघात विशेष रूढ आहे.

**चातुर्वर्ण्य**—समाज चार प्रकारच्या वर्गांनें पूर्ण होतो आणि त्या चार वर्गांत अन्योन्याश्रय आहे अशी कल्पना. या कल्पनेचा भारतीय समाजशास्त्रावर बराच परिणाम झाला आहे. समाज चार वर्णांनीं संयुक्त आहे ही कल्पना फारच जुनी म्हणजे मूलगृह्यकालीन असावी. कां कीं या कल्पनेचे अवशेष प्राचीन ग्रीक व इराणी लोकांत आढळून येतात.

ऋग्वेदमंत्रकालांत चार वर्गांचें अस्तित्व अनेकदां सूचित व उल्लेखित आहे पण त्या वर्गांस वर्ण ही संज्ञा नव्हती. ऋग्मंत्रकालीं वर्ण या शब्दाचा अर्थ यजनवैशिष्टयामुळें पडलेला वर्ग असा असावा. वर्ण हा शब्द पर्शुभारतीय आहे आणि त्या शब्दाचा अर्थ प्रांतिक वैशिष्टय आणि संप्रदाय या दोन अर्थांच्यामध्यें दिसतो. 'कातडीचा रंग' या अर्थानें वर्ण या शब्दाचा उपयोग ऋग्वेदांत नाहीं आणि चातुर्वर्ण्यांतील वर्गभिन्नत्व कातडीच्या रंगावर रचलें गेलें नाहीं.

चातुर्वर्ण्याची कल्पना मुख्यतः हीच कीं, समाजांत याजन-शिक्षण, रक्षण, व्यापार व दास्य या क्रिया आहेत आणि त्यांच्या अन्योन्याश्रयावर समाज रचला गेला आहे. हे चार वर्ण वर्गस्वरूपाचे होते. तथापि ब्राह्मणवर्ण कुरुयुद्धाच्या सुमारास जातिरूप पावला आणि पुढें ब्राह्मणादि हजारों जाती लोकांस दिसूं लागल्या. तेव्हां वर्ण आणि जाति हीं एकच असावींत, मूळ चार जाती असाव्यात आणि पुढें चारांच्या शेंकडों जाती संस्कारकर्मलोपानें किंवा मिश्रणानें उत्पन्न झाल्या असाव्यात अशा कल्पना उत्पन्न झाल्या. या कल्पनांचा परिणाम अनेक धर्मग्रंथांत दिसून येत आहे. समाजांत चार वर्ण चार क्रियांच्या स्वरूपांत होते. पुढें चारहि वर्णांनां भिन्नभिन्न संस्कार चालू झाले. तेव्हां चातुवर्ण्य केवळ भिन्नकर्मांकित न रहातां भिन्नसंस्कारांकित झालें. आणि त्यामुळें कर्मदृष्ट वर्ण आणि संस्कारदृष्ट वर्ण यांमध्यें असंगति उत्पन्न होऊं लागली. म्हणजे संस्कार ब्राह्मणाचे व कर्म शूद्राचे अशी परिस्थिति उत्पन्न झाली, आणि यामुळें धर्मशास्त्रांत आपद्धर्म हें प्रकरण उत्पन्न झालें. वर्णसंकर याचा खरा अर्थ भिन्न वर्गांत विवाह होणें. पण वर्ण आणि जाति यांजविषयीं झालेल्या घोंटाळयामुळें वर्णसंकर म्हणजे निरनिराळया जातींनीं एकमेकांशीं लग्न लावणें अशी कल्पना प्रचलित होऊन या क्रियेला मोठा धार्मिक अपवाद आहे अशी भावना उत्पन्न होऊं लागली.

चातुवर्ण्याचें तात्विक अस्तित्वहि टिकलें नाहीं. बौद्ध, जैन, चार्वाक इत्यादि मतें सूत्रकालांतच उत्पन्न झालीं आणि त्यामुळें क्षत्रियवैश्यादिकांमध्यें वैदिक परंपरेचा म्हणजे स्मार्त संस्कारांचा प्रसार पुरा झाला नाहीं एवढेंच नव्हे तर लोपहि झाला, त्यामुळें ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण देशांत आहेत अशी कल्पना प्रसृत होत गेली. शूद्र राजांचें अस्तित्व मनुस्मृतीच्या काळींहि होतें. राजे जर क्षत्रिय आहेत तर ते शूद्र कसे होतील. पण त्या राजांनां स्मृतिकार शूद्र म्हणतात याचा अर्थ एवढाच कीं त्या राजांनां वैदिक संस्कार नसावेत.

चातुर्वर्ण्याच्या तत्वाचा शासनशास्त्रावर परिणाम कितपत झाला असावा हें सांगतां येत नाहीं. ब्राह्मणांनां कांहीं अधिकार मिळाले असतील एवढेंच. नीतिशास्त्रवेत्ते व धर्मशास्त्रकार यांनीं राजानें प्रत्येक वर्ण आपल्या वर्णानुसार कर्म करीत आहे किंवा नाहीं हें पहावें म्हणून सांगितलें आहे. पण तें कितपत अमलांत आलें याविषयीं संशय आहे. त्या गोष्टी अमलांत आणण्यासाठीं कार्यपद्धति कोणीहि निर्माण केल्याचें दिसत नाहीं.

चातुर्वर्ण्याच्या तत्वाच्या दृष्टीनें अस्पृश्य वर्गाचें निराळें अस्तित्व संभवत नाहीं. तत्वाप्रमाणें अस्पृश्यांची गणना शूद्रांतच झाली पाहिजे. [ वर्ण, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, दास, जातिभेद, इत्यादि लेख पहा. शिवाय, ब्राह्मण्याचा इतिहास ( विभाग ३ ), वैदिक वाङ्मय ब्राह्मण जाति व यज्ञसंस्था( विभाग २ ), चातुवर्ण्य संस्थापना (विभाग १ ) हीं प्रकरणें पहा. ]

**चात्सू**—राजपुताना. जयपूर संस्थान. चात्सू तहशिलीचें मुख्य शहर. हें जयपूर-सवाई माधोपूर रेल्वेवर स्टेशन आहे. विक्रमादित्य राजा ( ज्यानें संवत नांवाचा नवीन शक सुरू केला ) एके काळीं येथें राहिला होता. शहराच्या भोंवतीं तांब्याच्या भिंती होत्या असें सांगतात. यांत एक दवाखाना व ५ प्राथमिक शाळा आहेत.

**चादवा**—मुंबई इलाख्यांत पालनपूर एजन्सींमधील एक लहान संस्थान. याला संतालपूरहि म्हणतात.

**चांदपूर**, विभाग—बंगाल. टिपरा जिल्ह्याचा एक विभाग. याचें क्षेत्रफळ ५८८ चौ. मैल आहे. येथील लो. सं. ( १९११ ) ५७३८०५ होती. यांत पुष्कळ नद्या व ओहोळ आहेत. यांत चांदपूर व दुसरे दोन तालुके आहेत. चांदपूर तालुक्याचें क्षे. फ. २१५ चौ. मै. असून लो. सं. २४७०३६ आहे.

शहर.—टिपरा जिल्ह्याच्या चांदपूर विभागांतील मुख्य शहर. याच्या जवळ मेघना नदी व डाकाटिआ नदीची एक शाखा यांचा संगम होतो. यांत सन १९११ त १२७१७ लोकसंख्या होती. या ठिकाणीं जूटचा व्यापार चालतो. येथें म्युनिसिपालिटी सन १८९७ पासून सुरू झाली. यांत व कलकत्ता, गोअलुंडो, नारायणगंज, आसाम आणि काचार यांच्यांत आगबोटीनें दळणवळण चालतें.

**चांदपूर**—संयुक्त प्रांताच्या बिजनोर जिल्ह्यांतील एक शहर. औध आणि रोहिलखंड रेल्वेची एक शाखा राजरा डला जंक्शनपासून चांदपूरपर्यंत गेली आहे. येथील लो. सं. ( १९११ ) ११८३२ होती. अकबरच्या वेळेस हें एका परगण्याचें मुख्य शहर होतें. याच्या अगोदरचा इतिहास उपलब्ध नाहीं. हें ठिकाण सन १८०५ त पेंढारी लोकांनीं व सन १८५७ त मुसुलमान बंडखोरांनीं आपल्या ताब्यांत घेतलें होतें. सन १८९४ पर्यंत हें तहशिलीचें मुख्य ठिकाण होतें. सन १८६६ त म्युनिसिपालिटी सुरू झाली. येथें हुक्क्याच्या चिलमी व पाण्याचे खुजे तयार होतात. येथें दवाखाना व शाळा आहेत.

**चांदपूर**—संयुक्त प्रांताच्या झाशी जिल्ह्याच्या ललितपूर तहशिलींतील एक खेडें. येथें कांहीं जुने शिलालेख आहेत. त्यांतला एक लेख इ. स. ८६८ मधील आहे.

**चांदबिबी**—चांदबिबी ही विजापूरचा बादशहा अली आदिलशहा ह्याची पत्नी व अहमदनगरचा बादशहा हुसेन निजामशहा ह्याची कन्या होय. हिचा जन्म अदमासें इ. स. १५४७ मध्यें झाला. हिचा अहमदनगर व विजापूर ह्या दोन्ही राजघराण्यांशीं अशा प्रकारचा संबंध असल्यामुळें तिला ह्या दोन्ही ठिकाणीं आपलें राजकारणचातुर्य व पराक्रमपटुत्व व्यक्त करण्याचे अनेक प्रसंग आले, व दोन्ही ठिकाणच्या इतिहासांत तिनें आपलें नांव गाजविलें. अली आदिलशहा गादीवर बसल्यानंतर विजापूर व अहमदनगर ह्या दोन्ही राज्यांमध्यें तह होऊन, दोन्ही बादशहांचें सख्य झालें. त्यावेळीं हुसेननें ही लावण्यवती शहाजादी, अली यास अर्पण करून, सोलापुरचा किल्ला त्यास अंदण दिला ( १५६४ ).

चांदबिबी व अली ह्यांचा विवाह झाल्यापासून विजापूरच्या पातशाहीचा चांगला उत्कर्ष झाला. अली यास राज्यकारभाराच्या कामीं चांदबिबीचें फार सहाय्य झालें. ती मूळची कुशाग्र, सद्गुणी व राज्यव्यवहारदक्ष होती. ती युद्धकलेमध्यें चांगली निष्णात असून प्रत्येक स्वारीमध्यें घोड्यावर बसून आपल्या पतीबरोबर जात असे. तिला फारसी, अरबी इत्यादि भाषांचें ज्ञान असून कानडी, मराठी इत्यादि भाषाहि समजत असत. आणि चित्रकला व संगीतशास्त्र ह्यांचीहि तिला माहिती होती.

अली हा स. १५८० मध्यें निपुत्रिक मरण पावला. मृत्यूपूर्वी त्यानें आपल्या बंधूचा मुलगा इब्राहिम ह्यास गादीवर बसवून आपल्या पत्नीनें सर्व राज्यकारभार चालवावा अशी योजना केली होती. त्याप्रमाणें त्याच्या पश्चात् घडून आलें. इब्राहिम हा विजापूरच्या गादीवर येऊन चांदबिबी ही त्याच्या वतीनें सर्व राज्यकारभार पाहूं लागली. इब्राहीमचें वय ह्या वेळीं अवघें नऊ वर्षांचें असल्यामुळें चांदबिबीनें सर्व राज्यकारभार दिवाण कामीलखान ह्याच्या सहाय्यानें उत्कृष्ट रीतीनें चालविला. ह्या वेळीं दक्षिणेंतील सर्व राज्यांमध्यें विजापूरचें राज्य विस्तीर्ण व मोठें होतें. चांदबिबीनें नवऱ्याच्या पश्चात् विजापूरच्या बादशाहीचा लौकिक व दरारा तसाच कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. तिनें राजपुत्राच्या शिक्षणाकडे चांगलें लक्ष पुरविलें. व सर्व राजदरबारी कामें मोठ्या तत्परतेनें चालविलीं. ती न्यायाच्या कामांत फार दक्ष असे. बुधवार व शुक्रवार खेरीज करून सर्व दिवशीं, ती राजवाड्यांत आपला दरबार भरवून व राजपुत्रास तख्तावर बसवून न्यायनिवाडे स्वतः करी. त्यामुळें ती प्रजेस फार प्रिय झाली होती. पुढें दिवाण कामीलखान हा राणीस जुमानीनासा झाला; व त्यानें तिचें महत्व कमी करण्याचा प्रयत्न चालविला. तेव्हां तिनें त्यास कामावरून दूर केलें. किशवर नामक दुसऱ्या एका जुन्या वजिरास दिवाणगिरी सांगितली. परंतु तोहि लवकरच उन्मत्त होऊन राणी व तिचे अनुयायी ह्यांच्या विरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हां त्यास दिवाणगिरीवरून काढून टाकण्याची मसलत चांदबिबी व तिचे सरदार ह्यांनीं केली. परंतु ती सिद्धीस जाण्यापूर्वीच कोणी विश्वासघात करून ती किशवर यास कळविली. त्यानें एकदम इब्राहिमच्या नांवानें द्वाही फिरवून चांदबिबी हिला कैद केलें, व तिची फार अप्रतिष्ठा करून, तिला साताऱ्याच्या किल्ल्यावर बंदिवासांत टाकिलें ( १५८२ ).

चांदबिबी विजापुरांतून गेल्यानंतर सर्वत्र झोटिंग पादशाही माजली. किशवर ह्याची सत्ता कोणी जुमानीनासें झालें. शेवटीं अमीर उमराव व लष्करी लोक ह्यांनीं एकत्र होऊन दिवाण किशवरखान ह्यास विजापुराहून पिटाळून लाविलें. पुन्हां चांदबिबीस साताऱ्याहून परत आणविलें व एखलासखान नामक एका हबशीला दिवाण केलें. परंतु त्यामुळें 'हबशी' व दाक्षिणी असे राज्यामध्यें दोन पक्ष झाले व ते परस्परांशीं मत्सरबुद्धीनें वागू लागले व त्याचा परिणाम बादशाहीस भोगावा लागला. वऱ्हाड, बेदर व गोवळकोंडा येथील बादशहांनीं आदिलशाही कमजोर झाली अ

पाहून तिकडे स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. अशा एका प्रसंगीं खुद्द विजापूर शहरास शत्रूंनीं वेढा घातला, व राजधानी काबीज करण्याचा प्रयत्न केला. त्या आणीबाणीच्या प्रसंगीं चांदबिबी हिनें हिंमत धरून किल्ल्याचें रक्षण केलें व सैनिकांस प्रोत्साहन देऊन शत्रूंची चढाई होऊं दिली नाहीं. तिचें शौर्य व हिंमत सर्व लोकांस कळून चुकल्यामुळें सतत एक वर्षपर्यंत वेढा पडला असतांहि सर्व सैन्यानें मोठ्या उत्साहानें व निकरानें शत्रूशीं टक्कर दिली, व अखेर त्यासच वेढा उठवून परत जाण्यास भाग पाडिलें ( १५८४ ).

पुढें सन १५८५ त पुन्हां अहमदनगर व विजापूर येथील बादशहांचा शरीरसंबंध जडण्याचा योग आला. चांदबिबी हिचा भाऊ मूर्तिजा निजामशहा याला इब्राहिम आदिलशहाची बहिण खुदिजा बेगम ही दिली. त्याच वेळीं चांदबिबी अहमदनगरास आली. अथात् हें लग्न उरकून घेऊन राहिलेलें आयुष्य स्वस्थ चित्तानें ईश्वर भक्तींत घालवावें असा तिचा संकेत होता.परंतु त्यावेळीं नगर येथील दरबारामध्यें विजापूरपेक्षांहि अधिक पक्ष व कलह माजले होते. त्यामुळें मूर्तिजा व त्याचा मुलगा मिरान त्यांच्या मध्यें कलह सुरू झाला आणि या पितापुत्रांच्या झटापटींत मूर्तिजा याचा वध झाला. त्या प्रसंगीं इतिहासकार फेरिस्ता हा राजवाड्यामध्यें हजर होता त्यानें स्वतः पाहिलेला हा वृत्तांत आपल्या ग्रंथांत लिहिला आहे. त्यावेळीं चांदबिबी नगरच्या किल्ल्यांत हजर होती. मिरान यानें आपल्या बापाचा वध करून गादी बळकाविली, परंतु लवकरच त्याचाहि शिरच्छेद होऊन अहमदनगर येथें झोटिंगबादशाही सुरू झाली. अखेर मूर्तिजाचा पुतण्या गादीवर येऊन जुमालखान हा मुख्य दिवाण झाला. परंतु त्या बादशहाच्या विरुद्ध विजापूर व वऱ्हाड येथील शहांनीं प्रतिकार करून जुमालखानाचा पराभव केला. चांदबिबी ही त्या परिस्थितीस कंटाळून पुन्हा विजापूरास परत गेली. तेथें गेल्यावर तेथील तिचा प्रजेकडून चांगला सत्कार झाला व बादशहानेंहि तिची मानमान्यता कायम ठेविली. चांदबिबी विजापुरास गेल्यानंतर अहमदनगर येथें राज्यक्रांति होऊन रक्तपात व मारामाऱ्या चालू झाल्या. बुऱ्हाण निजामशहा मृत्यु पावल्यानंतर दरबारांतील निरनिराळ्या पक्षांनीं बहादुरशहा,अहमदशहा वगैरे अज्ञ बालकें गादीवर बसवून जो तो आपल्या हातीं सत्ता घेण्याचा प्रयत्न करू लागला. त्यावेळीं मिया मंजू नामक एक वजनदार मुत्सद्दी पुढें आला व त्यानें अहमदशहाची बाजू उचलली व शहाजादा मुराद, जो गुजराथप्रांतामध्यें तीस हजार सैन्यानिशीं होता त्यास आपल्या मदतीस बोलाविलें. दिल्लीच्या सैन्यास दक्षिणेंत प्रवेश करण्याची उत्कट इच्छा होतीच. मंजू यास प्रथमदर्शनीं आपल्या कृतीचें भावी फळ लक्षांत आलें नाहीं. परंतु मोंगली जेव्हां फौजा नगरावर चालून आल्या त्या वेळीं त्याचे डोळे उघडले व त्यानें नगरच्या इतर अमीरउमरावांची सल्ला विचारिली. सर्वांनीं त्याच्या कृत्याचा निषेध करून त्यास चांदबिबीस नगरास आणण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्यानें बोलावणें केलें. तेव्हां तिनें निजामशाहीची संकटावस्था पाहून उदार अंतःकरणानें साह्य करण्याचें मान्य केलें व ती नगरास आली. तिचें वय त्या वेळीं अदमासें ५० वर्षांचें होतें; तथापि तिचा अभिमान, तेजस्विता, शौर्य आणि धैर्य यत्किंचित्‌हि कमी झालें नव्हतें. तिनें नगरास येऊन सर्व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं आणि प्रथम सर्व सैनिक लोकांस प्रोत्साहन देऊन किल्ल्याची तटबंदी वगैरेंचा पक्का बंदोबस्त केला; आणि मिया मंजू यास गोवळकोंडें व विजापूर येथें पाठवून तिकडून कुमकेसाठीं अधिक सैन्य बोलाविलें. परंतु तिकडून कुमक येऊन पोहोंचण्यापूर्वीच नगरास दिल्लीच्या फौजा येऊन दाखल झाल्या व त्यांनीं शहराभोंवतीं वेढा घातला (१५९५). तेव्हां चांदबिबीनें स्वतः मोठें शौर्य दाखवून किल्ल्याचें रक्षण केलें.

मुराद हा राणीचें अलौकिक शौर्य व विलक्षण धैर्य अवलोकन करून आश्चर्यानें थक्क झाला व त्यानें तिचें अभिनंदन करण्यासाठीं आपले प्रतिष्ठित सरदार तिजकडे पाठवून, तिच्या मर्दुमकीबद्दल तिला ‘ चांद--सुलताना ’ असा किताब समर्पण केला ( १५९६ ). यानंतर मंजु यानें पुन्हां अहमदशहाचा पक्ष स्वीकारिला. परंतु चांदबिबी हिनें बहादुरशहा हाच खरा वारसदार आहे असें ठरवून त्याची बाजू धरिली. हा तंटा लवकर मिटेना. तेव्हां चांदबिबीनें विजापुराहून इब्राहिम यास लढाऊ सैन्यानिशीं नगरास बोलाविलें. त्यानें निजामशाहीच्या खऱ्या वारसाची चौकशी करून बहादुरशहाच्या नांवानें द्वाही फिरविली. यानंतर कांहीं दिवस राज्यामध्यें शांतता झाली, आणि चांदबिबीनें राज्यसुधारणेकडे लक्ष दिलें.

अकबर बादशहा याचा अहमदनगरचें राज्य काबीज करून घेण्याचा फार हेतु होता. सबब कांहींहि कारण नसता त्यानें नगरवर स्वारी केली. चांदबिबी हिनें हें मोंगलाचें प्रचंड सैन्य येण्यापूर्वीं पुन्हां एकदां विजापुराहून सोहीलखान नामक एक अनुभवी मुत्सद्दी आणवून राज्यांतील अंतर्गत कलह नाहींसे करण्याचा प्रयत्न केला. अकबराचा पुत्र दानियल हा खानखान, राजा अलीखान, राजा जगन्नाथ वगैरे मोठमोठया योध्यांसहवर्तमान प्रचंड सैन्यानिशीं इ. स. १५९७च्या जानेवारीमध्यें नगरच्या राज्यावर चढाई करून आला. निजामशाही सरदारांनीं मोठया निकरानें मोंगली सैन्याशीं टक्कर दिली, व त्यांचा पराभव केला. अकबर बादशहाचा इतिहासकार अबुलफजल यानें या घनघोर रणसंग्रामाचें विस्तृत वर्णन दिलें आहे.

इ. स. १५९९ मध्यें दानियल हा पुन्हां नगरावर चालून आला. त्यावेळीं चांदबिबीनें कोणाहि दरबारी इसमावर विश्वास न ठेवतां आपल्या स्वतःच्या विचारानें या आलेल्या संकटाचा परिहार करण्याचा संकल्प केला. मोंगली सैन्य

प्रचंड असल्यामुळें त्याशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य निजामशाही सैन्यांत बिलकुल राहिलें नव्हतें. तेव्हां चांदबिबी हिनें युक्तीनें तह करून, बालराजासह जुन्नरास जाण्याचा विचार मनांत आणिला. परंतु निजामशाही सरदारांमध्यें दुफळी होऊन त्यांनीं चांदबिबी हिजवर हल्ला केला व मोंगल सैन्याशीं लढाई चालू असतांच हमीदखान नामक एका पठाण सरदारानें तिचा राजवाड्यांत खून केला ( सन १५९९ ). अर्थात चांदबिबीच्या मागें मोंगलांस नगर जिंकून घेण्यास फारसा वेळ लागला नाहीं. [ ऐने-इ-अकबरी; बील-ओरि. बायॉग्रा. डिक्शनरी; फेरिस्ता; इतिहाससंग्रह. पु. १. अं. ३; मुसलमानी रिसायत. ].

**चांदभाट**—'चंदभाट' पहा.

**चांदला**—मध्यप्रांत. चांदा जिल्हा. क्षेत्रफळ १७ चौरस मैल. ही जमीदारी जरी बरीच प्राचीन आहे तरी हल्लींच्या जमीनदारांच्या पूर्वजांस ही अगदीं अलीकडे इ. स. १८२० मध्यें मिळाली. हल्लींचें घराणें व पनरवस जमीनदाराचें घराणें यांचें परस्पर नातें आहे. पूर्वेस खुटगांव जमीनदारी; पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या दिशांस गडचिरोळी तहशील. हींत एकंदर अकरा खेडीं असून पैकीं सात खेड्यांत वस्ती आहे. जमीन बहुतेक रेताड असून भाताचें पीक मुख्य आहे. येथील घराणें राजगोंडांचें आहे. उत्पन्न ४०० रु. ते ५०० रु. टाकोळी ३० रु. व इतर कर रु. १६-८-०.

**चांदवड**, ता लु का.—( चांदोर ) मुंबई इलाख्याच्या नाशिक जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ३८५ चौ. मैल आहे. लोकसंख्या सन १९११ त ५६६०४ होती. सन १९०३-४ त येथील शेतकऱ्यांचें उत्पन्न १ लाखावर व जकातीचें उत्पन्न ८००० रु. होतें. येथील जमीन सपाट असून गोदावरी नदीच्या बाजूस उतरती होत गेलेली आहे. याच्या मध्यभागांतील जमीन पिकांस बरी आहे. त्यांत गहूं व हरभरा पिकतो. एकंदरींत शेतीची स्थिति चांगली नसून बहुतेक शेतकरी लोक कर्जबाजारी आहेत

श ह र—मुंबई. नाशिक जिल्हा. नाशिकच्या ईशान्येस ४० मैलांवर व लासलगांव स्टेशनापासून उत्तरेस १४ मैलांवर आग्रारोडवर ६०० ते १००० फूट उंचीच्या एका टेंकड्यांच्या रांगेच्या पायथ्याशीं हें गांव उत्तर अक्षांश २०° २०' व पूर्व रेखांश ७४° १६' यांवर वसलेलें आहे. लोकसंख्या (१९११) ३७००. हा गांव उतारावर वसलेला असून सभोंवतीं मातीची भिंत आहे. येथें मल्हारराव होळकरानें एक टांकसाळ घातली होती. या टांकसाळीवर देखरेखीकरितां एक ब्राह्मण नेमलेला असून त्याचें नांव टांकसाळे असें पडलें. ही टांकसाळ प्रथम किल्ल्यांत होती परंतु किल्लेदाराशीं कांहीं तंटा झाल्यामुळें ही गांवांत आणली. या टांकसाळींत हजारीं २१ रुपये घेऊन चांदीचे रुपये पाडून मिळत असत. इ. स. १८२९ मध्यें चांदीचें नाणें व १८३० मध्यें तांब्याचें नाणें येथें पाडण्याचें बंद करण्यांत आलें.

शहराच्या ईशान्येस रेणुकादेवीचें देऊळ आहे. गांवाच्या पूर्वेस एक कालिकादेवीचें देऊळ आहे. हीं दोन्ही देवळें खडकांत खोदलेलीं आहेत. यांतील दुसरें जैन असावें. येथें एक बादशाहि मशीद असून तींत फारसी शिलालेख आहे. पौष शुद्ध पौर्णिमेस येथें खंडोबाची जत्रा भरते. या गांवाच्या वरच्या बाजूस एक किल्ला आहे. त्याची वाट सुरुंगानें उडवून दिल्यामुळें वर जाणें अशक्य आहे. खानदेश व नाशिक यांच्या दरम्यानचा घांट किल्ल्याच्या पूर्ण आटोक्यात आहे.

वऱ्हाड व नाशिक यांच्या वाटेवर हें असल्यामुळें येथें फार मोठा व्यापार चालत असला पाहिजे. इ. स. ८०१ मध्यें चांदोरच्या यादव घराण्याचा संस्थापक दृढप्रहार, ( धीप्रप्रहार?) यानें याचें वैभव वाढविलें असा उल्लेख आहे. कारण सोळंकी यानें वरलेल्या मैनलदेवीचें चंद्रपुर हेंच असावें. इ. स. १६३५ त हा किल्ला मोंगलांनीं घेतला आणि पुन्हां तो मराठ्यांपासून सन १६६५ त अवरंगझेबानें घेतला. मल्हारराव होळकरानें येथें १७५४-५६ च्या सुमारास कारागिरांची वस्ती केली. इ. स. १८०४ मध्यें कर्नल वालेस यानें हा किल्ला घेतला परंतु तो होळकरास परत मिळून १८१८ सालीं अखेरीस ब्रिटिशांच्या ताब्यांत आला. [ मुं. गॅ.; डॉ. बर्जेस लिस्ट; ईलियट अँड डौसन ७].

**चांदा**, जि ल्हा.—मध्यप्रांताच्या नागपूर भागांतील एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ १०१५६ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस नांदगांव संस्थान, भंडारा, वर्धा आणि नागपूर जिल्हा; पश्चिमेस व दक्षिणेस यवतमाळ जिल्हा आणि निजामसरकारचें राज्य आणि पूर्वेस बस्तर आणि कांकर संस्थानें व द्रुग जिल्हा आहे.

नैसर्गिक वर्णनः—याच्या पश्चिमेस वर्धा, प्राणहिता आणि गोदावरी या नद्या व उत्तरेस वुन्ना नदी आहे. वैनगंगा नदी या जिल्ह्याच्या मध्यभागांतून उत्तरेकडून दक्षिणेस वाहत जाऊन शिवनी येथें वर्धा नदीस मिळते. या दोन्ही नद्यांच्या संगमास प्राणहिता म्हणतात. वैनगंगेस अन्धारी, बोतेवाही, देनी, गरव्ही व कोब्रागरही आणि वर्धा नदीस पेनगंगा, इराई या नद्या मिळतात. वैनगंगा नदीच्या पश्चिमेस चिमूर, मूल आणि फेरसागड व पूर्वेस सुर्जीग आणि तिचागड या टेंकड्या आहेत. या टेंकड्यांवर दाट जंगल आहे. या जंगलांत साग, साज, बिजासाल, रोहन, कदम, हल्दू, सेमूर, महुआ, धावडा, तेंडू, गराई, पळस, सालई, बेहडा, रेउंझा, सिरिझ, कैका, मोयेन, मोरवा, पडेर, अंजन व निर्मळीचीं झाडें आहेत. या वस्तीच्या जवळ आंबा, ताड आणि चिंचेचीं झाडें फार आहेत. जंगलांत वाघ, चित्ते, अस्वल, गवा, रेडा, सांबर हरिण आहेत. उन्हाळ्यांत उष्णता जास्त असते परंतु एकंदरींत हवामान चांगलें आहे. वर्षांत एकंदर ५१ इंच पाऊस पडतो.

इतिहास.—पूर्वीं वाकातक नावांच्या हिंदू राजांची राजधानी भांदक येथें होती. या राजांनीं चौथ्या शतकापासून

बाराव्या शतकापर्यंत राज्य केलें. याच्यानंतर गोंड राजांनीं या ठिकाणीं आपली गादी स्थापिली. गोंड लोकांच्या राजघराण्यांत इ. स.च्या १२ व्या शतकापासून १७५१ पर्यंत एकंदर १९ राज्यकर्ते पुरुष होऊन गेले. सर्जाबल्लारसाह या गोंड राजानें आपल्या घराण्यास बल्लारसाही हें नांव दिलें. हीरसाह नांवाच्या राजानें चांद्याचा किल्ला बांधला व शहराच्या भोंवतालच्या भिंती उभारण्याचें काम पूर्ण केलें. हिंदूंचा धर्म स्वीकारणारा गोंडराजा कर्णशाह नांवाचा होता. ऐने. ई. अकबरींत कर्णशाहाचा मुलगा स्वतंत्र असून दिल्लीच्या बादशहास खंडणी देत नव्हता. याच्या जवळ १००० घोडेस्वार आणि ४०,००० पायदळ सैन्य होतें असें वर्णन दिलें आहे. अकबराच्या वेळेपासून मराठयांच्या वेळेपर्यंत हे गोंडराजे स्वतंत्र व प्रबळ होते. यांच्या राज्यांत सर्वत्र शांतता नांदत होती. पुष्कळ पडित जमीनी नांगरून तयार करण्यांत आल्या व त्यांनां पाणी देण्यासाठीं कालवे बांधण्यांत आले. इ. स. १७५१ सालीं गोंडराजाला पदच्युत करून हा जिल्हा मराठे लोकांनीं नागपूरच्या राज्यास जोडला. या जिल्ह्यावर आणि छत्तिसगडावर भोंसले राजाचे दोन लहान भाऊ (एक झाल्यावर दुसरा) नेमिले होते. परंतु त्यांची राज्यव्यवस्था जुलमी पद्धतीची असल्या कारणानें याची प्रगति बरीच मंदावली. सन १८१७ त अप्पासाहेब भोंसल्यानें बंड केलें व इंग्लिशाविरुद्ध आप्पासाहेबाची बाजू घेऊन अहीरीच्या जमीनदारानें चांद्याच्या जिल्ह्यांत लष्कर जमविलें. त्याच वेळीं पुण्याच्या पेशव्यानीं आप्पासाहेबाच्या मदतीकरितां कांहीं फौज पाठविली होती. तिचा ब्रिटिशांनीं सन १८१८ च्या एप्रिलांत पांढरकवड्याजवळ पराभव करून चांदा किल्यास वेढा दिला व थोड्या दिवसांनंतर एकदम हल्ला करून तो सर केला. किल्ल्यावरील फौजेनें अखेरचा मनुष्य पडेपर्यंत किल्ल्याचें रक्षण केलें. सन १८१८ पासून १८३० पर्यंत ब्रिटिश अधिकारी सर रिचर्ड जेंकिन्स याच्यावर देखरेख करीत होता. नंतर भोंसले घराण्यांतील शेवटचा राजा तिसरा रघूजी यास हा जिल्हा देण्यांत आला. सर १८५३ त रघुजी वारल्यावर याचा कोणी वारसदार नसल्यामुळें हा ब्रिटिश राज्यास जोडण्यांत आला. सन १८५७ सालच्या बंडांत मनुपल्ली व अरपल्ली जमीनदारांनीं बंड उभारून तारायंत्रावरील दोन अधिकाऱ्यांचे खून केले. हें बंड मोडून अहीरीची जमीनदारीण लक्ष्मीबाई, हिच्या मदतीनें त्या दोघां जमीनदारांस पकडण्यांत आलें व त्याबद्दल तिला ६७ गांवें देण्यांत आलीं. जुन्या गोंड राजाचा वंशज चांद्यास रहातो. त्याला हल्लीं पोलिटिकल पेन्शन देतात. यांत ज्या प्राचीन काळच्या वस्तू वगैरे सांपडतात त्यांची माहिती भांडक, चांदा शहर व मार्कंडी या सदराखालीं दिली आहे. या जिल्ह्यांत चांदा व वरोडा हीं शहरें असून २५८४ खेडीं आहेत. याच्या चांदा, वरोडा, ब्रह्मपुरी, सिरोंचा व गडचिरोली या तहसिली आहेत. सन १९०५ त अहीरी जमीनदारी सिरोंचा तहसिलींत सामील केली गेली. हिचें क्षेत्रफळ १०१५६ चौ. मैल व लोकसंख्या ( १९२१ ) ६६०६३० आहे. जमीनदारींत फार जंगल असल्यामुळें तींत फार थोडे लोक रहातात.

गोंड लोकांत मारिआ गोंड म्हणून एक निराळी जात आहे. त्यांची अंगकाठी बळकट असून उंच आहे. त्यांच्यांत प्रौढविवाह आहे व लग्नाला वधूची संमति जरूर लागते. लग्नाच्या अगोदर स्त्रीपुरुषांनीं व्यभिचार केला तरी त्याचा विधिनिषेध मानीत नाहींत. परंतु लग्न झाल्यानंतर ज्या स्त्रिया व्यभिचार करतांना सांपडल्या तर त्यांचे खूनहि पडतात. मारिआ गोंडांत स्त्रीपुरुषनृत्य प्रचलित आहे.

जमीन व शेती.—वर्धा नदीच्या जवळील व वर्धा आणि एरई या नद्यांमधील जमीन बरीच काळी आहे. वैनगंगेच्या तीरावरील जमीन काळी आहे परंतु तींत रेती आहे. जमीनदारींतील जमीन रेताड व खडकाळ आहे वरील प्रदेश सोडून यांत सगळीकडे पिंवळी माती आहे. खुद्द चांद्यांतल्या काळ्या जमीनींत गहूं, हरबरा व जवस, सिरोंचा व वरोडा तहसिलींत ज्वारी व जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागांत तांदूळ होतो. या.च्या क्षेत्रफळापैकीं सन १९०३–४ पर्यंत नांगरून तयार केलेली जमीन १५१२ चौ. मैल होती व तीपैकीं १८२ चौ. मैलांत पाटाचें पाणी देतां येतें; २६७२ चौ. मैल जमीनीवर जंगल आहे; बाकीची जमीन पडित आहे. ज्वारी आणि कापसाचीं पिकें वर्षांतून दोन वेळ काढतात, पहिलें शरदृतूंत व दुसरें वसंतऋतूंत. दुसऱ्या पिकाच्या कापसाचें सूत मजबूत असतें. सुमारें १००० एकर जमीनींत उसाची लागवड केली जाते.

या जिल्ह्याच्या क्षेत्रफळापैकीं २६७२ चौ. मैल सरकारी जंगल व ३९१९ चौ. मैल जमीनदारी व मालगुजारी जंगल आहे. अहीर जंगलांतून सागाचीं झाडें बाहेरगांवीं व वरोड्याच्या कोळशाच्या खाणीकडे जातात. १९०३–४ सालांत जंगलाचें उत्पन्न जवळ जवळ २ लाख रु. झालें. पैकीं ७५००० रु. लांकडांपासून व ५५००० रुपये चराईपासून झालें.

खनिज पदार्थः—इ. सन १८७१ पासून वर्धानदीजवळ वरोडा येथें सरकारनें कोळशाची खाण सुरू केली. १९०४ त जवळ जवळ ११२००० टन कोळसा निघाला. तो ५२ लाख रुपयांस विकला जाऊन २ लाख रु. निव्वळ नफा राहिला. सुमारें १००० लोक खाणींत काम करीत असत. हा कोळसा जी. आय. पी. रेल्वे, म्युनिसिपालिटी, कापसाच्या गिरण्या वगैरेस विकला. वरोडा येथील कोळशाची खाण १९०६ त बंद केली. वरोड्यापासून ३० मैलांवर बंदर येथें व चांद्यापासून ६ मैलांवर बल्लारपूर येथें कोळशाच्या खाणी आहेत. तलोधीजवळ गोविंदपूर येथें राजोलीजवळ मेंढे येथें आणि धनवासन येथें जुन्या तांब्याच्या खाणी आहेत. कोठें कोठें उत्तम प्रकारचे लोखंडाचे दगडहि आढळतात. देवळगांव,

गुंनेवाही, लोहार, पिंपळगांव आणि रत्नापूर हीं प्रसिद्ध ठिकाणें होत. लोहार आणि पिंपळगांव येथील दगडांत अनुक्रमें शेकडा ६९ आणि ७१ लोखंड सांपडतें. १९०४ सालांत जुन्या चालीच्या कोळशांच्या भट्टीत सुमारें ११५० टन लोखंड गाळलें गेलें; परंतु हा धंदा किफायतशीर झाला नाहीं. पूर्वी वैरागड जवळ साटीननदीवर हिऱ्याच्या खाणी होत्या. आणि इंद्रावती आणि वैनगंगानदींत सोन्याचे कण सांपडतात. उत्तम इमारती दगड पुष्कळ ठिकाणीं आढळतात. वऱ्हाडांतील चुनखडीचा भांदक येथें चुना होतो आणि नवगांव जवळ रत्नापूर येथेंहि चुना तयार करितात.

व्यापार व दळणवळण.—तसर रेशीम ज्या किड्यांपासून होतें, त्या किड्यांची ढीवर लोक वैरागड आणि सिंदेवाही येथील जंगलांत जोपासना करितात आणि चामुरसी व इतर खेडेगांतील कास्काटी हे लोक या रेशमाचें कापड विणतात. पागोटयाकरितां याचा मुख्यत्वें उपयोग होतो. चांदा येथें रेशमी धोतरजोडे होतात. त्यांचा पूर्वी फार दूरवर प्रसार होता. चांदा, चिमूर आणि आरमोरी हीं व्यापाराचीं मुख्य ठिकाणें होत. परंतु मोठमोठया खेडेगावांतूनहि विणकरी लोकांची वस्ती आहे. कधीं कधीं जरीकांठी धोतरेंहि विणलीं जातात. गिरणींतील सुतापासून साधें, जाडेभरडें कापड महार लोक विणतात. गिरणींत रंगविलेल्या सुतापासून रंगीत कापड तयार केलें जातें, परंतु कधीं कधीं आयात निळीपासून सूत येथेंच रंगविलें जातें. छिप आणि रंगारी लोक हलक्या प्रतीच्या कापडास तांबडा आणि जांभळा रंग देतात. रंगारी लोक चांदा, मुल, सावली आणि ब्रह्मपुरी येथें पुष्कळ आहेत. वरील रीतीनें रंगविलेलें कापड फक्त गरीब लोक वापरतात. कारण त्यास एक प्रकारचा वास येत असतो. विशेष प्रकारच्या नमुन्याचे सोनें आणि चांदीचे दागिने चांदा येथें तयार करितात; त्याचे नमुने दिल्ली येथील प्रदर्शनांत ठेविले होते. तांब्याचीं व पितळेचीं भांडीं चांदा आणि ब्रह्मपुरी तहसिलींत नेरी येथें होतात. तीन भाग पितळ व एक भाग जस्त यांच्या मिश्रणापासूनहि दागिने केले जातात; व ते गरीब लोक वापरितात. बांबूचें रंगीत सामान चांद्यास होतें. चंद्रपूर हें नक्षीदार जोड्याविषयीं प्रसिद्ध होतें. पण आजचे जोडे अगदीं खराब आहेत. वरोऱ्यास उत्तम प्रकारच्या कौलांचा व विटांचा सरकारचा कारखाना होता. नुकतेच कांहीं वर्षांपूर्वी चार कापूस पिंजण्याचे व दोन दाबण्याचे कारखाने सुरू केले आहेत. या जिल्ह्यांतून रेल्वेनें जवस, तीळ, इमारती लांकूड, कांतडी, जनावरांचीं शिंगें, कापूस व कडधान्यें हे जिन्नस बाहेर जातात. हैदराबाद, वऱ्हाड व वर्धा येथें तांदूळ बैलगाडीनें जातात. सागवानी लांकूड अलापिल्ली व उत्तरेकडील जमीनदारींतून बाहेरच्या गांवीं जातें. रेल्वेजवळील जंगलांतून बांबू, डिंक, हरडा आणि लांख बाहेर पाठविली जाते. गवत व लांकडी कोळसा ही कधीं कधीं उत्तरेकडील जमीनदारींतून रायपुर जिल्ह्यांत विक्रीकरितां नेतात. चाकूच्या मुठीसाठीं सांबरांचीं शिंगें बाहेर जातात. मोहाचीं फुलें वऱ्हाडांत व वर्धा येथें जातात. रेशीमकांठी धोतरें नागपूर, वऱ्हाड व हैदराबाद येथें जातात. जोडे व चामड्याचे दोर, वऱ्हाडांत जातात. मीठ, साखर, सूत, सुती कापड, मातीचें तेल आणि धातू हा आयात माल आहे. मुंबईहून मीठ, मॉरिशस व उत्तरहिंदुस्थानांतून साखर, बंगलोर व उत्तरहिंदुस्थानांतून गूळ हा माल येतो. गुळाचा व्यापार गेल्या दहा वर्षांतच भरभराटीस आला. वर्ध्यापासून जी. आय. पी. रेल्वेचा फांटा चंद्रपुरास जातो व त्यावर हिंगणघाट आणि वरोडा हीं स्टेशनें आहेत. बाहेर जाणारा बहुतेक माल वरोडा स्टेशनावरून जातो. चांद्याला गोंडिया दुसऱ्या एका रेल्वेनें जोडलें आहे. वरोड्याहून चांदा व चिमूर यांस पक्की व वऱ्हाडांत वणी येथें कच्ची सडक जाते. चंद्रपुराहून आंत जाण्यास मुल आणि सिरोंचा हे मुख्य रस्ते आहेत. पावसाळ्यांत कांहीं माल वैनगंगा नदींतून होड्यांनीं भंडारा व अरमोरी येथें नेतात. दुष्काळांत गडचिरोलीस नावांनींच धान्य आणिलें होतें. जिल्ह्यांत रस्ते कमी आहेत. यांत पक्क्या सडकांची लांबी ७९ व कच्च्या सडकांची लांबी ३९६ मैल आहे, व यांच्या दुरुस्तीसाठीं वर्षाच्या कांठी ५४००० रु. खर्च येतो. येथील राज्यव्यवस्था इतर जिल्ह्यांप्रमाणेंच आहे.

शिक्षणासंबंधीं मध्यप्रदेशांत चांद्याचा १३ वा नंबर लागेल. शेकडा २ लोकांस लिहितांवाचतां येतें. यांत १ खासगी हायस्कूल, ३ मिडलस्कुलें, ४ व्हर्नाक्युलर मिडलस्कुलें आणि ११४ प्रायमरीस्कुलें, व ४ मुलींच्या शाळा आहेत.

तहशील.—चांदा जिल्ह्याची तहसलि क्षेत्र. ११७४ चौ. मै. व लोकसंख्या ( १९११ ) १३४६६०. हींत एक शहर (चांदा) असून ३९७ खेडीं आहेत. येथें तांदुळाचें मुख्य पीक आहे या तहशिलीचा बराचसा भाग टेंकड्या व जंगलांनीं व्यापिला आहे. येथील शेतसारा ६०००० रुपये होता.

शहर.—चांदा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. या ठिकाणीं एरई व झरपत या नद्यांचा संगम झाला आहे. हें शहर वरोडा रेल्वेस्टेशनपासून २८ मैलांवर आहे. याची लोकसंख्या इ. स. १९११ सालीं १९८६६ होती याठिकाणीं इ. स. १२ पासून १८ व्या शतकापर्यंत गोंड राजांची राजधानी होती. याच्या पूर्वेस व उत्तरेस दाट जंगल आहे. दक्षिणेस माणिकदुग नांवाची टेंकडी आहे व पश्चिमेस जिराईत जमीन आहे. याच्या सभोंवतीं तट बांधलेला आहे. यांत अचलेश्वर, महाकाली आणि मुरलीधर हीं तीन मोठीं देवळें आहेत. यांत रमाल नांवाचें एक तळें असून त्यांतून नळानें शहरांत पाणी आणिलें होतें. पण हल्लीं विहिरींचें पाणी पितात. या शहराच्या बाहेर एके ठिकाणीं रावण, दुर्गा वगैरे देवतांच्या मोठाल्या

मूर्ती पडलल्या आहेत. येथील म्युनिसिपालिटीची स्थापना इ. से. १८६७ साली झाली. येथे रेशमी कपडा, रेशिमकाठी धोतरें, नक्षीदार जोडे, सोन्याचांदीचीं भांडीं, बांबू विणकाम व लांकडांचीं कामें होतात. येथे एप्रिल महिन्यांत अचलेश्वर देवालयाजवळ मोठी यात्रा भरत असते. येथें पुष्कळ इंग्रजी व मराठी शाळा असून एक हायस्कूल व दोन दवाखाने आहेत.

**चांदूर,** ता लु का—वऱ्हाड—मध्यप्रांतांतील. उमरावती जिल्ह्याचा हा आग्नेयीकडील तालुका आहे. उत्तर अ. २०° ३१' ते २१° १३' व पू. रे. ७७° ४०' ते ७८° १८. क्षेत्रफळ ८५५ चौ. मैल. लोकसंख्या इ. स( १९११ )२०४१३३. या तालुक्यांत ४ गांवें आहेत. मंगरूदस्तगीर, तळेगांवदशासर, चांदूर आणि दत्तापूर. ३९१ खेडीं. पैकीं ८६ ओसाड आहेत.

शेतकीः-कापूस, ज्वारी आणि गहूं.रब्बीचे पीक येथे फारसें नाहीं. पाटबंधाऱ्याचें पाणी या तालुक्यांत नाहीं. विहिरीतून मोटेनें काढून बागाईत करण्याची पद्धत मोडत चालली आहे.

( रे ल्वे ) गां व—चांदूर तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथील डाकबंगला जुना असून हल्लीं एक सराई बांधलेली आहे. इ. स. १८९५ सालीं कापसाचा बाजार स्थापला. सालीना उत्पन्न सुमारें २००० रुपये. येथें सरकी काढण्याचे कारखाने ५ व रुई दाबण्याचे कारखाने ३ आहेत. आठवड्याचा बाजार दर रविवारीं भरतो. येथील बागेंत संत्रीं चांगल्या प्रकारचीं होतात. जुना गांव रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस एक मैल असून फार गलिच्छ आहे. कॉलरा व प्लेग हे रोग येथें नेहमीं होतात. तालुक्याचें ठिकाण झाल्यापासून याला बरेंच महत्व आलें आहे. सन १९०८ सालीं लोकसंख्या ५७०० होती. येथें एक लायब्ररी आहे. येथें प्राचीन असें कांहींच नाहीं. परंतु इ. स. च्या सहाव्याशतकांत वाकाटक राजांच्या शिलालेखांत उल्लेखिलेले 'चंद्रपूर' हेंच असावें असें म्हणतात.

**चांदूर बाजार**—वऱ्हाड मध्यप्रांत. उमरावती जिल्हा. इलिचपूर तालुक्यांतील गांव. लोकसंख्या ( १९११ ) ५२०८. उमरावतीच्या उत्तरेस २२मैल व इलेचपूरच्या पूर्वेस १४ मैल हें गांव आहे. इलिचपूरचा नबाब नामदारखान याच्या ताब्यांत सुमारें ९५ वर्षांपूर्वी हा जहागिरीचा गांव होता त्यावेळीं त्यानें येथें बाजार वसविला. त्यावेळेपासून हा गांव प्रसिद्ध आहे. हल्लीं मोर्सी आणि हिवरखेडें येथें नवीन बाजाराच्या पेठा झाल्यामुळें, आणि वऱ्हाडांत मोठमोठया कंपन्या दलालांशीं फारसा व्यवहार न ठेवतां शेतकऱ्यापासूनच परस्पर माल विकत घेत असल्यामुळें या बाजाराचें महत्व कमी होत चाललें आहे. मध्यप्रांताची सीमा येथून आठ मैलांवरआहे.आणि खामळा मुलताई,बैतुल येथून काकवी, गूळ, गहूं, गोंद वगैरे जिन्नस या बाजारांत येतात. गुरांचाहि बाजार येथें भरतो. बाजार चांगला बांधलेला असून दिवे, पाण्याची टांकी, सामान ठेवण्याकरितां जागा, झाडें वगैरे व्यवस्था चांगली आहे. येथें सट्याचा व्यापार फार चालत असल्यामुळें नेहमीं दिवाळीं निघतात. येथें वीस-पंचवीस वर्षे सतत चाललेलें दुकान एकहि नाहीं. आठवड्याचा बाजार दर रविवारीं भरतो.

**चांद्रायण**—यथोचित कर्म न घडल्यास देहदंडरूप असें हें प्रायश्चित्त आहे. याचे यवमध्य व पिपिलिकामध्य असे दोन प्रकार आहेत. शुक्लपक्षांतील प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत दररोज भोजनांत कुक्कुटांडप्रमाणानें एक एक घांस ( प्रतिपदेस एक, द्वितीयेस दोन असे ) वाढवून कृष्णपक्षांतील प्रतिपदेपासून दररोज एक एक घांस कमी घेत घेत अमावास्येस उपोषण करणें यास यवमध्यचांद्रायण असें म्हणतात. आणि कृष्णपक्षांतील प्रतिपदेस एक एक घांस याप्रमाणें आरंभ करून अमावास्येपर्यंत वाढविणें व पुन्हां प्रतिपदेपासून एक एक घांस कमी करीत येऊन पौर्णिमेस उपवास करणें यास पिपीलिकामध्यचांद्रायण असें म्हणतात. याशिवाय कृच्छ्रचांद्रायण हा आणखी एक प्रकार आहे.याच्या संबंधीं व कृच्छ्रप्रायश्चित्तांसंबंधीं धर्मसिंधु, निर्णयसिंधु इत्यादि धर्मग्रंथांत सविस्तर माहिती दिली आहे.

**चानन शानन**—मलयालम् भाषा प्रचारांत असलेल्या प्रदेशांतील इझवा जातीसारखीच एक तामिळ जात. लो. सं. ( १९११ ) ८०८२६४. शेतकी व ताडी तयार करणें हे यांचे प्रमुख धंदे होत. १९११ सालच्या खानेसुमारींत यांच्या सुमारें ३६ पोटजाती नोंदल्या होत्या. [ सेन्सस रि. ( त्रावणकोर ) १९११ ].

**चानस्मा**—बडोदा संस्थानच्या कडी प्रांतांतील वडावली तालुक्याचें हें मुख्य ठिकाण आहे. येथील लोकसंख्या १९११ सालीं ७००३ होती. येथें एक मराठी शाळा, मॅजिस्ट्रेट कोर्ट, दवाखाना व कांहीं कचेऱ्या आहेत. येथील म्युनिसिपालिटीस १७०० रु. ची वार्षिक देणगी आहे. येथें जैन लोकांचें एक देवालय आहे. तें प्रांगघ्रा दगडाचें बांधलेलें असून त्याच्यावर चांगलें खोदींव काम केलेलें आहे व आंतील सर्व फरसबंदी संगमरवरी दगडाची आहे.

**चानाल**—( चांडाळ ) पंजाबांतील एक जात. लो. सं. ( १९११ ) १२४४८. हे डोंगरांतील हलक्या जातीचे लोक मुख्यत्वें करून हिंदू आहेत. सपाटीच्या प्रदेशावरील चमारांशीं त्यांचें साम्य आहे.ही जात चांडाल शब्दाइतकी प्राचीन आहे. [ से. रि; रोज ग्लसरी ].

**चानोड**—मुंबई. रेवाकांठा. सांखेडमेहवासच्या अगदीं पश्चिमेकडील नर्मदेच्या तीरावरील ठिकाण. उ. अ. २१° ५८' व पू. रे. ७३° ३०' येथील बहुतेक सर्व इमारतींत देवळें, मठ व विश्रांतिगृहेंच पुष्कळ आहेत. यात्रेकरूंची येथें नेहमीं गर्दी असते. सर्व देवळांत कपिलेश्वर महादेवाचें, काशिविश्वनाथ महादेवाचें, चंडिकामातेचें, श्रीहनुमानजींचें, श्रीमार्कंडेश्वर महादेवाचें वगैरे देवळें मुख्य आहेत. येथील

शेषशायी मूर्तीची कार्तिक शुद्ध १३ पासून वद्य २ पर्यंत जत्रा भरते, व दुसरी एक जत्रा नर्मदा व ओर या नद्यांच्या संगमावर चैत्री पौर्णिमेला भरते.

**चाप्रा—** हें बंगालच्या सारण जिल्ह्याचें मुख्य शहर आहे. याच्याजवळ गंगा व गोदा नद्यांचा संगम होतो. येथील लोकसंख्या १९११त ४२३७३ होती. यांत १९०१ त धरणीकंपाचा धक्का बसून प्राणहानि फार झाली होती. अठराव्या शतकांत या ठिकाणीं फ्रेंच, डच, पोर्तुगीज व इंग्लिश लोकांच्या वखारी होत्या. गंगा व गोग्रा नद्यांना पूर येऊन या वखारींचें फारच नुकसान झालें. तेव्हांपासून या ठिकाणाहून त्यांनीं आपल्या वखारी उठविल्या. बाहेरून या ठिकाणीं तांदूळ, रॉकेल, कपडा आणि मीठ येतें व सोरा, अफू जवस, गूळ इत्यादि पदार्थ बाहेर जातात. येथें सन १८६४ त म्युनिसिपालिटी सुरू झाली. येथील म्युनिसिपालिटीनें दोन बाजाराच्या जागा, दवाखाना व सराई बांधली आहे. येथें दोन इस्पितळें व तीन शाळा आहेत.

**चाफळ—** हें गांव सातारा जिल्ह्यांत मांड नदीच्या तीराबर असून उंब्रजच्या पश्चिमेस ६ मैल आहे. याची लोकसंख्या ( १८८१ ) १९५३ होती. हें सह्याद्रीच्या अरुंद खोऱ्यांत असून यांतील माती काळी आहे. या खोऱ्यास चाफळ खोरें असेंच नांव आहे. पिण्याच्या पाण्याचा चांगला पुरवठा आहे. हें गांव शिवाजीचे गुरु रामदासस्वामी यांच्या बंधूच्या वंशजांस इनाम आहे. साताऱ्याच्या छत्रपतींचें हें ( अद्यापपर्यंत ) गुरुघराणें होय. नदीच्या दोन्ही बाजूस गांव आहे. डाव्या बाजूच्या वस्तींत पेठ व बाजार वगैरे आहेत. उजव्या बाजूच्या वस्तीकडे जाण्यास लांकडी पूल आहे. तिकडे शाळा आणि स्वामींचा वाडा आहे. वाड्याच्या मध्यभागीं रामदासस्वामींनीं स्थापिलेल्या श्रीरामाचें व मारुतीचें देऊळ असून तें १७७६ सालांत बाळाजी मांडवगणे नांवाच्या श्रीमंत ब्राह्मणानें बांधिलें. त्यास एकंदर खर्च १ लाख रु. आला. रामनवमीस येथें यात्रा भरते. चाफळास श्रीरामाची स्थापना समर्थांनीं शके १५७१ (सन१६४९ ) त केली. ही मूर्ति अंगापुरच्या डोहांतून समर्थांनीं काढिली असून ती रथारूढ व धनुष्यबाण हातीं घेतलेली अशी आहे. रामापुढें दासमारुती व मागें वीरमारुती आहेत. समर्थांच्या अकरा मारुतींत या दोन मारुतींचा समावेश होतो. चाफळच्या जवळच एक कोसावर शिंगणवाडी येथें शिवाजीराजे यांनां समर्थांनीं अनुग्रह दिला ( १६४९ ). चाफळांस स्वामींचा पुष्कळ वेळ मुक्काम असे. येथून दोन कोसांवर रामघळ, कुबडीतीर्थ, भैरोबाचा डोंगर, वगैरे समर्थांशीं संबंध आलेलीं स्थळें आहेत. चाफळच्या रामाच्या संस्थानास शिवरायांनीं १६७५ मध्यें १२१ खंडी धान्य नेमून दिलें व १६७८ त ३३ गांवें व ४१९ बिघे ( आणि एक कुरण ) जमीन इनाम दिली. अद्यापिहि हें इनाम चालू आहे. समर्थांनीं तयार करविलेला रामाचा रथ अजून येथें आहे. [सातारा ग्याझे; रामदास रामदासी भा. २ हनुमंतस्वामींची बखर].

**चाबुआ—** आसाममधील लखीमपूर जिल्ह्यांतील डिब्रूगड विभागांतील एक खेडें. हें चहाच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण आहे. त्याच्या ईशान्येस ३ मैलांवर दिजन आहे. येथें तेथील भिक्षु लोकांचें विद्यालय आहे. मटक नांवाचे तेथील मूळचे लोक ह्या विद्यालयास फार मान देतात.

**चांभार—** चमार किंवा चर्मकार हे शब्द चर्मकार या संस्कृत शब्दापासून झाले आहेत. यांचा मूळ प्रांत बिहार व संयुक्तप्रांत असून हल्लीं हिंदुस्थानांतील सर्व भागांत हे आहेत. १९०१ च्या खानेसुमारीवरून पाहतां या जातीचे तेवीस निरनिराळे धंदे दिसतात; पण त्यांचे मुख्य धंदे शेतकी व कातड्याचें काम हेच आहेत. कातडीं कमावण्याचा धंदा न करितां कमावलेल्या कातड्याचे जोडे व इतर जिन्नस करणारे लोक स्वतःस मोची हें नांव घेतात; व आपला दर्जा जरा उच्च समजतात. या जातीच्या लोकांनीं बरेंच धर्मांतर केलें आहे. त्यांची संख्या पुढीलप्रमाणें ( आंकडे १९०१ सालचे आहेत). आहे.

| | चमार | मोची |
|---|---|---|
| हिंदु | ११,०४३,०९३ | ५३१९२५ |
| मुसुलमान | १६९९२ | ४७५४४० |
| शीख | ७६२६३ | ५४ |
| जैन | ५७ | २३९ |
| बौद्ध | १९ | ... |

एकंदर हिंदुस्थानांत चांभारांची संख्या सुमारें १ कोटी १५ लक्ष आहे. पैकीं ६० लक्ष संयुक्तप्रांतांत आहे. मुंबई इलाख्यांत सुमारें तीन लाख आहे. वेदकालीं आणि बुद्धाच्या पूर्वी चामडें कमावण्याचा धंदा कमी दर्जाचा समजला जात नव्हता. यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेंतील पुरुषमेधसंबंधीं प्रकरणांत चांभार हा बळी देण्यास योग्य आहे असें म्हटलें आहे.

मुंबई इलाख्यांत यांच्या आडनांवांवरून यांचीं कुळें ठरलीं गेलीं आहेत. यांमध्यें देवकें असून एकाच देवकांतील लोकांचे परस्परांशीं विवाहसंबंध होत नाहींत. लग्नें बाळपणीं होतात. पुनर्विवाह व घटस्फोट या चाली यांच्यामध्यें रूढ आहेत. हे हिंदू आहेत व यांचा वारसासंबंधीं कायदा हिंदूप्रमाणेंच आहे. यांचे उपाध्याय ब्राह्मण आहेत. ठाणें प्रांतांत कुंभार व अहमदनगरांत जंगम हे यांच्या क्रियाकर्मांच्या वेळीं उपाध्याय असतात.

का न डी चां भा र.—यांमध्यें आठ पोटभेद आहेत. आतेभाऊ व मामेबहीण यांमध्यें विवाह होतो. पुनर्विवाहाची चाल यांच्यांत आहे. कर्नाटकांतील चांभारांत घटस्फोट होतात पण कानडा जिल्ह्यांतील चांभारांत घटस्फोटाची चाल नाहीं. हे स्मार्त असून यांचा वारसासंबंधीं कायदा हिंदूप्रमाणेंच आहे. हविक ब्राह्मण लग्नप्रसंगीं यांचे उपाध्ये असतात.

नाशिक जिल्ह्यांत दक्षिणीचांभारांचा भरणा आहे. यांचा धर्मगुरु निफाड तालुक्यांतील सकेना येथील "भगतबावा" हा आहे. भगतबावा गुरुपदेश देतो. गुरुपदेश घेण्यापूर्वी, चोरी, चहाडी व छिनालकी न करणें हे तीन नियम आचरण्याबद्दल कबुली द्यावी लागते. मालेगांव नांदगांव, चांदूर वगैरे ठिकाणीं दरसालीं भगत बावाची फेरी असते. अहिर्वाल, जातवा, ढोर व कताई अशा चार परदेशी चांभारांच्या पोटजाती या जिल्ह्यांत आढळतात. यांचे सर्व धर्मविधी इतर चांभारांप्रमाणेंच असतात. लग्नप्रसंगीं अंतःपट धरण्याची चाल नाहीं. त्याऐवजीं नवरानवरीला एक स्तंभाभोंवतीं सात प्रदक्षिणा घालाव्या लागतात. यांत व्याह्मीभोजन नाहीं. व कार्य आटपेपर्यंत मांसभक्षण वर्ज्य करण्याची चाल यांच्यामध्यें आहे. हे भवानीचे उपासक आहेत.

मध्यप्रांत व वऱ्हाडांत यांची संख्या ९०००००आहे. पैकीं ६००००० संस्थानांत व छत्तीसगडांत आहे. यांचे व हिंदूंचें युद्ध चालू आहे असें रसेल म्हणतो ! महाराष्ट्रांत चांभारांची उत्पत्ति धीवर बाप व चांडाळ आईपासून झाल्याबद्दल कथा सांगतात. पण चांभारांचा बांधा, चेहऱ्याचा सुबकपणा पुष्कळ जागीं आढळतो. मुंबई इलाख्यांतील कानडी जिल्ह्यांत तर चांभार बायका फार सुंदर असून पद्मिनी जातीच्या नायिका त्याच्यांतच सांपडतात. छत्तीसगडांत सुद्धां चांभार लोक उंच बांध्याचे, साधारण गोऱ्या रंगाचे असून ब्राह्मणांपेक्षां जास्त सुंदर दिसतात. यांच्या शरीराचा सदृढपणा व सुंदर बांधा त्यांच्या प्रौढविवाह व मांसाशनामुळें असावा असें रसेल म्हणतो.

चांभार लोक स्वतःस रविदास म्हणवितात. रविदास हा रामानंदाचा शिष्य होता. यांचे असगोत्र विवाही पुष्कळच उपवर्ग आहेत. त्यापैकीं सतनामी चांभार हा फार मोठा वर्ग आहे. इतर चांभार सतनामी चांभारांस झाडिया म्हणतात. सतनामी लोक चर्माचा धंदा सोडून सगळे शेतकरी झाले आहेत.यापैकीं चुंगिया वर्ग तंबाखू ओढतो. यांच्या अहिरवार व कनपातिया अशा जातीहि आहेत. अहिरवराचा दर्जा जरासा उच्च आहे. रामदास किंवा रोहिदासाच्या पुष्कळ बायकापैकीं एक अहीर जातीची होती तिचे हे वंशज आहेत असें म्हणतात. कनौजिया व अहिरवारांस बाहेरचे लोक पैका म्हणतात. कांहीं गांवांत मेलेलीं गुरें नेणारांस कातडीं देण्याची चाल आहे. चांभारांच्या बायका गांवच्या सुइणी असतात. अशा चांभारांस मेहेर म्हणतात.कनपजिया एकाच तुकड्याचा जोडा करतात, व अहीरवार पुढचा भाग कापतात. जोड्यावर कलाबतुचें काम करण्यांत अहीरवार मुलगी जोंपर्यंत कौशल्य दाखवीत नाहीं तोंपर्यंत तिचें लग्न होत नाहीं. जैसवार चांभार मोतद्दारीची नोकरी करतात. हे फक्त डोक्यावरूनच ओझें नेतात. खांद्यावरून नेत नाहींत. यांमध्यें भदावरी, अंतर्वेदी, परदेशी, गंगापारी, देशवार अशा पोटजाती आहेत. विधवांनीं वाटेल त्याच्याबरोबर लग्न करावें. छत्तीसगडांत विधवांचे दोन वर्ग आहेत. वारंडी व रंडी.अक्षतयोनी विधवेस वारंडी म्हणतात. व इतरांस रंडी म्हणतात. पहिल्या प्रकारच्या विधवेनें नवरा मेल्यावर बांगड्या फोडण्याची जरूरी नाहीं. अशा मुलीस मागण्या फार येतात व तिचा शुल्कहि पुष्कळ मिळतो.पहिला नवरा जिवंत असतांना जर स्त्रियेचें लग्न करावयाचें असलें तर त्यास छंदवेवनाना म्हणतात. दुसऱ्या नवऱ्यास पहिल्या नवऱ्याचा खर्च द्यावा लागतो. पहिल्या नवऱ्याची मालमत्ता किंवा संपत्ती त्याच्याच घरीं रहाते व अगदीं तान्हीं मुलें खेरीज करून मुलेंहि त्याच्याच घरीं रहातात. जातपंचायतीसमोर नवराबायकोनें एक काडी मोडली कीं घटस्फोट झाला. चांद्यांत काडी मोडलेल्या बाईची गवताची प्रतिमा करून जाळतात.

छत्तीसगडांत विवाहसंबंध फार कडक रीतीनें कधींच पाळीत नाहींत. व व्यभिचार हा गुन्हा तर कधींच समजला जात नाहीं. राजरोसपणें नवऱ्याला सोडून स्त्रियांनीं दुसऱ्याबरोबर कांहीं दिवस रहाण्यास जावें व हौस पुरली म्हणजे पुन्हां नवऱ्याकडे परत यावें. कधीं कधीं दोघांची फारच दृढ मैत्री असली किंवा दोन माणसांनीं महाप्रसाद केला असला तर परस्परांनीं परस्परांच्या बायका खुशाल वापराव्या असें रसेल व हिरालाल म्हणतात !

सागराकडे चांभार मरीची पूजा करतात. सिवनीस एरंडाच्या झाडाची पूजा करतात. छत्तीसगडांत सुधारक सतनामी पुष्कळ आहेत.

कातडें स्वच्छ करून कमाविणारे सारे ८०,००० लोकच आहेत. गावातील चांभाराचा, मेलेल्या गुरांचें कातडें फुकट मिळावें असा हक्क होता. आतां कसायास हिंदुलोक सुद्धां गुरें विकूं लागल्यामुळें यांचा धंदा बुडत चालला. सागराकडे यांची फारच दैन्यावस्था आहे. तेथें यांना बेगारीस धरतात. हेच लोक बैलास खच्ची करतात. आतां छत्तीसगडांतील चांभार आसाममध्यें चहाच्या मळ्यांत नोकरीस जाऊं लागले आहेत व खरगपुरास आगगाडीच्या कारखान्यांत हे नौकर आहेत. हे लोक मुहूर्त वगैरे पाहण्यास ब्राह्मणाच्या घरीं जातात त्यांस आपल्या घरीं बोलावीत नाहींत. हे लोक अत्यंत गुन्हेगार वर्गापैकीं आहे. गुरांनां विष घालण्याची यांना फारच वाईट खोड आहे. गुरांची चोरी देखील हे करतात. शेणांतून धान्य काढून त्यावर निर्वाह करण्याची यांच्यापैकीं कांहींनां संवय असल्यामुळें लोक यांचा फार तिरस्कार करतात. या जातीची लोकसंख्या(१९११) आसामांत ५४२३४, काश्मीरांत ३९०९९, पंजाबांत १४२८७०४ आहे.

[संदर्भग्रंथ–थर्स्टन; कूक; रसेल व हिरालाल; मुं. गॅ.; से. रि.; रिस्ले–ट्राईब्स ॲंड कास्ट्स ऑफ बेंगाल; शेरिंग–हिंदु ट्राईब्स ॲंड कास्ट्स; रोज ग्लॉसरी; ब्रिग्स्–दि चमार्स.].

**चांभारलेणीं**—मुंबई. नाशिक जिल्हा. नाशिकच्या उत्तरेस ५ मैलांवर असलेल्या एका ६०० फूट उंच टेकडीमध्यें हीं लेणीं खोदलेलीं आहेत. हीं लेणीं जैन आहेत. इ. स. १८७० च्या सुमारास नाशिक येथील कांहीं जैन मंडळीनीं येथें एक भिंत, एक टांकें व पायथ्याशीं धर्मशाळा वगैरे बांधली आहे.

हीं लेणीं टेकडीच्या पायथ्यापासून ४५० फूट उंचीवर असून नैर्ऋत्य बाजूस आहेत. कांहीं भाग चढून गेल्यावर १७३ पायऱ्यांचा रस्ता लागतो. व मध्यंतरीं उजव्या बाजूस दोन टांकीं आहेत. या पायऱ्या चढून गेल्यावर खडकांत खोदलेल्या १६ पायऱ्या चढून गेलें म्हणजे लेण्यावरील गच्चीवर जातां येतें. पश्चिमेकडून पहावयास आरंभ केला म्हणजे प्रथम एक टाकें लागतें. नंतर एक गुहा असून तिच्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे आंत दोन्ही बाजूंस परिचारिका असलेली गौतमबुद्धाची मूर्ति दिसते. दरवाज्यावर एक जिनाची मूर्ति सिंहासनाधिष्ठित आहे. याखेरीज, अंबा, पार्श्वनाथ वगैरे कांहीं मूर्ती आहेत. व्हरांड्याच्या उजव्या बाजूस आणखी एक गुहा असून तींतहि कांहीं मूर्ती खोदलेल्या आहेत. यानंतर उजवीकडे दहा यार्डांवर आणखी एक अर्धवट खोदलेली जागा असून पुढें तिसरी गुहा आहे. या गुहेंत व्याघ्रारूढ अंबिका व इतर कांहीं मूर्ती आहेत. याच्यापुढें उजव्या बाजूस सुमारें दहा फुटांवर चवथी गुहा असून यातहि कांहीं ओबडधोबड आकृती आहेत.

**चाम**—इंडोचीनमधील एक जात. ही प्राचीन चंपामधून आलेली आहे. हल्लीं त्यांची संख्या १३०००० इतकी आहे. अनाम, कँबोडिया व कोचीनचीन या भागांत त्यांची वस्ती असून सयाममध्येंहि चाम लोक आढळतात, मूळचे मलायोपॉलिनोशियन जातीचे हे लोक आहेत; प्रथमतः इंडोचीन, अनाम व चंपा येथें प्राचीनकाळीं हे लोक होते असें आढळतें. चाम जातीच्या लोकांचें येथें राज्य असून त्यांत कोचीनचीन अनाम व कँबोडिया यांचा अन्तर्भाव झालेला होता. १४७१मध्यें चंपा हें अनाम लोकांच्या ताब्यात गेलें; त्यावेळीं बरेचसे चाम लोक कॅम्बोडियामध्यें गेले. एकोणिसाव्या शतकात चाम लोकांचा मुलूख फ्रेंचांनीं घेतला व त्यांची अनामी लोकांपासून मुक्तता झाली. प्राचीन चंपा नगरीच्या चाम लोकांचा हिंदूधर्म असून त्रैमूर्तींची ते उपासना करीत. नंतर बुद्ध धर्माचा पगडा चाम जातीवर बसला व शेवटीं इस्लामधर्मानें चाम जातींत प्रवेश केला. आजमितीच्या चाम लोकांचा धर्म म्हणजे ब्राह्मणधर्म व इस्लामधर्म यांचें मिश्रण होय. या दोन्ही धर्मांचें एवढें विकृत स्वरूप या जातींत आढळून येतें कीं ब्राह्मण कोण व इस्लामी कोण हें ओळखणें आज कठिण आहे. ब्राह्मण चाम लोकांनां जाट ( जटा ) अथवा 'मूळचे चाम' असें म्हणण्यांत येतें. इस्लामी चाम लोक त्यांनां काफीर, अकाफीर व नास्तिक अशीं नांवें ठेवतात. मुसुलमानी चाम हे स्वतःस बनी व इस्लामचाम असें म्हणवून घेतात. कॅम्बोडियांतील बहुतेक चाम मुसुलमान झालेले आहेत.

ब्राह्मण चाम जातींत शैव पंथाचा बराच प्रसार झालेला असला तरी सध्यां ते लोक जवळ जवळ मुसुलमानच बनले आहेत. पो यान भोह, पो ओटा, व पो अलल्हा अथवा अल्ला असे त्यांचे तीन देव असून पो इनो नोगार, पोजायू यान व पोयान दारी अशा तीन देवी आहेत. या देवतानां कांहीं मुलें असून त्यांचींहि निरनिराळीं नांवें आहेत. वरील देवतांनां विविध नैवेद्य अर्पण करण्यांत येतात. व त्यांच्या नांवानें कांहीं सण व उपासहि पाळण्यांत येतात. या देवतांसंबंधीं चाम लोकांत अनेक दंतकथा प्रचलित आहेत. देवतांप्रमाणें धर्मगुरू व उपाध्ये बरेच आहेत. त्यांचा पोषाख विशिष्ट तऱ्हेचा असून ते सर्व धर्मकृत्यें चालवितात.

पोर्डिमोम्रू, पोयान, इनो, नोगर, बसाइह, फामेनेह, कथार, मोडवान व पजायू इत्यादि नांवें निरनिराळे धार्मिक विधि करणाऱ्या उपाध्यायाचीं असतात. कटे व काबूर हे त्यांचे मोठे धार्मिक उत्सव प्रतिवर्षीं होतात; व त्या समयीं मेजवान्या व यज्ञ करण्यांत येतात. किरकोळ उत्सवहि नेहमीं होत असतात. धर्मकृत्यें करतांना कांहीं पवित्र पदार्थांचा व भांड्यांचा उपयोग करण्यांत येतो. बालनोह, बगनराक, हबाडक, बाक, कलेह, सान, स्वाक, कराह, कनोम व गैचरान इत्यादि नांवें कांहीं धार्मिक उपकरणांचीं असल्याचें आढळतें. प्राचीन काळीं त्यांच्यात नरयज्ञ होता व मनुष्याच्या रक्तानें देवास स्नान घालण्याची पद्धति होती असें म्हणतात.

मुसुलमान चाम अथवा बनी लोकांत इस्लामी धर्म प्रथम कसा व केव्हां शिरला हें अनिश्चित आहे. एखाद्या अरबानें इ. स. १००० च्या सुमारास चंपा येथें इस्लामचा प्रसार केला असावा. कंम्बोडिया व अनाम येथें बरेच मुसुलमानी धर्माचे अनुयायी आहेत. पो, इमाम, इतीब, मोदिन, अकार इत्यादि बनी चाम लोकांचे धर्मगुरू व उपाध्याय असतात. मुसलमानी धर्मगुरूप्रमाणें त्यांचा एक विशिष्ट पोषाखहि असतो. करोह व ताबा यासारख्या मोठ्या मेजवान्या व रमझान रोझासारखे उपवास करण्यांत येतात.

१५ ते १८ वर्षांची वयोमर्यादा स्त्रीपुरुषांच्या लग्नाच्या बाबतींत पाळली जाते. या जातींत स्त्रियांचा योग्य दर्जा राखला जातो व त्यानां बरेच हक्क देण्यांत आले आहेत. ब्राह्मण चाम लोकांत अशी समजूत आहे कीं, पुण्यवान् पुरुषांचे आत्मे सूर्यावर जातात, स्त्रियांचे चंद्रावर जातात व इतर हलक्या लोकांचे ढगांवर जाऊन राहतात. कित्येक देवपणास पोंचतात व पापात्मे नीच योनींत जातात. [ ए. रि. ए. ].

**चामखीळ** (वर्मकील)–ह्या रोगांत साध्या त्वचेवर किंवा श्लेष्मल त्वचेवर मांसार्बुदासारखा विस्फोट अगर ग्रंथि (गांठी) उत्पन्न होतात. ह्यांपैकीं कांहीं तर्‍हा मुलांच्या किंवा तरुण माणसांच्या हातांवर आढळतात व त्या सपाट असतात; दुसरे लोंबत्या जातींचे चामखीळ नाजूक कातडीच्या मुलांनां हनुवटीवर अगर मानेच्या ठिकाणीं किंवा मोठ्या माणसांनां डोक्यावर होतात. ते झाले म्हणजे एखाद्या पिकाप्रमाणें एकदम बरेचसे होतात व एकदम नाहींसेहि होतात. हे येण्याची प्रवृत्ति कांहीं कांहीं कुटुंबांत नैसर्गिकच असते. मोठेपणी चामखीळ होण्याचें कारण हातावर अगर बोटावर वरचेवर होणारें घर्षण-मग तें कितीका अल्प असेना-हें होय. कसाईखान्यांतील लोक व नेहमीं प्रेतव्यवच्छेदन करणाऱ्या लोकांच्या मनगटावर व बोटांच्या पेरांवरहि हे बरेच वेळां आढळतात व त्यांपैकीं कांहीं क्षयजंतुजन्य ग्रंथी असतात. धुराडीं झाडणारे लोक, कोळशाच्या कारखान्यांतील मजूर किंवा रॉकेलाच्या खाणींत काम करणाऱ्यांनां हे पुष्कळ होतात. व त्यांचें पर्यवसान कॅन्सरग्रंथि होण्यामध्यें होतें. नाक, ओठ, जीभ व इतर जागीं मोठ्या वयाच्या माणसांनां या गांठी होतात व त्यांपैकीं कित्येकांचें वरीलप्रमाणें कॅन्सर ग्रंथींत रूपांतर कालांतरानें होतें. म्हातारपणीं खांद्यावर अगर कोणाच्या पाठीवरहि रुंद व चपटे चामखीळ असतात; व त्यांचाहि शेवट वरीलप्रमाणें दुःखपर्यवसायी होतो. यावरून चाळीस वर्षांच्या वयापेक्षां जास्त उमरीच्या माणसांनां असें झालें असतां तें कॅन्सरच असावें हें ध्यानांत ठेवून तदनुरूप रोग्याची चिकित्सा करण्यास ठीक पडतें. परम्याचे दाहामुळें किंवा उपदंशाच्या संसर्गानें अशा ग्रंथी गुह्येंद्रियावर व इतर जागीं होतात.

चामखिळाच्या रचनेकडे लक्ष दिल्यास तो बरा होण्यास अवघड कां जातो हें लक्षांत येईल. सूक्ष्म रक्तवाहिन्यांचें प्रथम एक जाळें अगर गांठ बनून तिच्या भोंवतालीं तंतुमय वेष्टण असतें व त्यावर कोंड्यासारखे त्वचेचे पापुद्रे असतात. जोंवर चामखीळ नवीन व कोंवळा असतो तोंवर तो मऊ व गुळगुळीत दिसतो. पण घर्षण झालें कीं तो चरतो. चपट्या चामखिळांत रक्तवाहिन्यांचा सपाट व समांतर असा झुबका असतो पण लोंबत्या चामखिळांत प्रथम एकच रक्तवाहिनी मधोमध बुंधाप्रमाणें असते व सर्व बाजूंनीं भोंवतालीं तिला शाखा असतात. हे चामखीळ मान व हनुवटी यांवर असतांतच पण श्लेष्मावरणत्वचेंतहि ते होतात. त्यांत रक्ताचा पुरवठा भरपूर असल्यामुळें चाकूनें खरडून काढले तरी पुनः वाढतात कारण शाखा त्वचेच्या सपाटीबरोबर जरी कापल्या तरी मधल्या धमनींतून रक्तप्रवाह चालू रहातो. म्हणून कातरीनें हे चामखीळ जरी कातरले किंवा चाकूनें खरडले तरी या रक्तवाहिन्यास तापल्या तारेनें अगर दुसऱ्या एखाद्या ज्वलनाप्रमाणें चटका देणारें औषध लावावें. किंवा तालीं लवचिक ताणलेलें बंधन घट्ट बांधणें हाहि एक उपाय आहे. तीव्र ॲसेटिक ॲसिड किंवा कॅर्बालिक ॲसिड त्या जागीं जपून लावावें. आयर्न परक्लोराईड हें असेंच लावण्यास उपयोगी आहे. काडीखार (सिल्व्हर नैट्रेट) लावल्यानें मागून काळा डाग पडतो. अशा गुणधर्मांचे झाडपाले (ह्यांचा रस) आपल्या देशांत असण्याचा संभव आहे. हीं औषधें लावून चामखीळ लहान होऊन गळतो. क्षयजंतुजन्य अगर कॅन्सर जातीचा चामखीळ आमूल खरडून त्या जागीं कॅरबालिक ॲसिड लावावें.

**चामन**, पो ट वि भा ग.—बलुचिस्तानांतील क्वेटापिशिन जिल्ह्यांतील अगदीं उत्तरेकडील एक पोटविभाग व तहशील. उ. अ. ३०° २८′ व ३१° १८′ आणि पू. रे. ६६° १६′ व ६७° १९′ मध्यें आहे. याच्या उत्तरेस अफगाणिस्तान आहे. यांतील बहुतेक भाग डोंगराळ आहे. त्यास टोंबा म्हणतात. याची सरासरी उंची ८००० फूट आहे. जमीनीची लागवड थोडी होते; बहुतेक लोक गुरांस कुरणांत चारून त्यांच्यावर उपजीविका करतात. याचें क्षेत्रफळ १२३६ चौ. मै असून १९११ मध्यें लोकसंख्या १७२५२ होती. यांत एकच महत्वाचें ठिकाण चामन शहर आहे व तें मुख्य ठाणें आहे. येथील मूळचे रहिवासी अचाकशी अफगाण भटकत असतात, व त्यांनां कायमची वस्ती माहीत नसल्यामुळें कायमचीं खेडीं नाहींत.

श ह र.—बलुचिस्तानांत क्वेटापिशिन जिल्ह्यांत चामन पोटविभागाचें ठाणें. हें नॉर्थ-वेस्टर्न रेल्वेच्या सरहद्दीवरचें शेवटचें स्टेशन आहे. हें समुद्रसपाटीवर ४३११ फू. उंच आहे. हें देशी असिस्टंटचें मुख्य ठाणें आहे. १९११ मध्यें लोकसंख्या २००९ होती. किल्ल्यांत कांहीं देशी पायदळ व घोडेस्वारांची फौज रहाते.

**चामराजनगर**, ता लु का–म्हैसूर संस्थानच्या म्हैसूर जिल्ह्यांतील तालुका. याचें क्षेत्रफळ ४७४ चौ. मै. आहे. इ. स. १९११ मध्यें याची लोकसंख्या ११४१९७ होती. यांत १६० खेडीं आहेत व मुख्य ठिकाण चामराजनगर हें आहे. या तालुक्याची जमाबंदी इ. स. १९०३-४ सालीं रु. १५७००० होती. याच्या दक्षिणेस होन्नुहोल (सुवर्णावती) नदी वहाते. नदीवर दोन बंधारे बांधले असून सर्व तालुक्यास तेथून पाटानें पाणी पुरवितात. येथील जमीन सपाट असून फार सुपीक आहे. या जमीनींत काळी व तांबडी माती आहे. परंतु पश्चिमेस रेताड जमीन आहे. येथील मुख्य पीक जोल नांवाचें आहे. यांत कापूस व ऊंस होत नाहीं. काळ्या जमीनींत तुतीच्या झाडांची लागवड होते. नदीच्या कांठीं सुपारी, नारळ आणि विड्याच्या पानांचे बगीचे लाविले आहेत. यूरोपियन लोकांनीं थोडे कॉफीचे मळेहि लाविले आहेत. येथें खजुरीचीं झाडें अतोनात आहेत. याच्या आग्नेयेकडील

श ह र—म्हैसूर जिल्ह्याच्या चामराजनगर तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें नंजनगुड रेल्वेपासून २२ मैल आहे. याची लोकसंख्या इ. स. १९११ त ६५५६ होती. हें शहर इ. स. १११७ सालीं जैन लोकांनीं वसविलें असून त्याचें पूर्वीचें नांव अरकोत्तर होतें. सन १८१८ त यांचें चामराजनगर नांव त्यावेळच्या म्हैसूरच्या राजानें ठेविलें. कारण त्याचा बाप या ठिकाणीं जन्मला होता. येथें चामराजेश्वर नांवाचें एक देऊळ आहे.

याच्या पूर्वेस मणिपूर नांवाचें एक प्राचीन शहर होतें. येथें म्युनिसिपालिटी इ. स. १८७३ सालीं स्थापन झाली.

**चामुंड** (९९७-१०००)—हा चालुक्य वंशांतील असून मूळराजाचा पुत्र होय. त्यानें आपलें राज्य मोठया शहाणपणानें व नीतीनें चालविलें; आणि राज्यसंपत्ति व कीर्ति वाढवून राज्याचें चांगल्या प्रकारें रक्षण केलें. त्याच्याच कारकीर्दीत गझनीच्या महंमदानें सोमनाथपट्टणावर स्वारी केली. चामुंडरायाची त्याजबरोबर लढण्याची तयारी नसल्यामुळें तो राजधानी मुलाच्या हवालीं करून अरण्यांत निघून गेला. महंमद सोमनाथास गेल्यावर चामुंडाचा वडील पुत्र वल्लभसेन व नातू भीमदेव हे मोठया फौजेनिशीं त्याजबरोबर लढण्यास आले. त्या लढाईत भीमदेवाचा पराजय झाला. तरी त्यानें तीन हजार मुसुलमान लोक कापून काढले. हा राग मनांत धरून सोमनाथाचें देवालय लुटल्यावर महंमद हा अनहिलवाड्यास गेला. महंमुदानें चामुंडाचें राज्य काबीज करून त्याजवर त्याचा दुसरा मुलगा दुर्लभसेन यास स्थापलें आणि आपण स्वदेशी निघून गेला. महंमुदाच्या या स्वारीविषयीं हिंदू इतिहासलेखांत बरेंच भिन्न वर्णन आढळतें. अनहिलवाड्याच्या गादीवर त्यावेळेस भीमदेव होता असें हिंदू इतिहासकार लिहितात आणि चामुंड होता असें मुसुलमान इतिहासकार लिहितात. त्यावरून महंमूद प्रथम आल्यावर चामुंडानें वानप्रस्थाश्रम स्वीकारून राज्य भीमदेवाच्या हवालीं केलें असावें असें दिसतें. द्व्याश्रय काव्यांत याचें वर्णन आढळतें [ रासमाला; मुसुलमानी रियासत ].

**चामुर्शी**—मध्यप्रांत.जिल्हा चांदा. तहशिल गडचिरोली हें नांव चमार-वासी ( चांभारांचें राहण्याचें ठिकाण ) या नांवावरून निघालें आहे अशी कांहीं लोक व्युत्पत्ति लावतात. हें खेडें वैनगंगा नदीच्या वामतीरावर असून तें चांदाच्या पूर्वेस ४४ मैल आहे. लोकवस्ती (१९११)२४४९.येथें६ तळीं आहेत.दर शनिवारीं बाजार भरतो. येथें एक जुनें महत्वाचें देऊळ आहे.

**चार**—(चारोळया) हें एक मोठें झाड आहे. यास संस्कृतमध्यें राजादनू, मराठींत चार किंवा चारोळया, हिंदींत चिरंजी वगैरे नांवें आहेत. कोंकण, नागपूर प्रांत व मलबार या प्रांतांत हीं झाडें पुष्कळ आहेत याचीं पानें लांबोडीं असून तीं मोहाच्या पानाएवढीं मोठीं असतात. याच्या पत्रावळी लावतात. याची छाया फार थंड आहे. याचें लांकूड कांतीव कामास फारसें उपयोगीं पडत नाहीं. या झाडास लहान लहान फळें येतात. त्यांच्या बियांत तुरीएवढ तांबूस रंगाचे दाणे असतात. त्यांस चारोळया म्हणतात. चारोळया मिठाईंत व पक्वान्नांत घालतात. चारोळयांचें तेल निघतें तें बदामाच्या तेलासारखें थंड आहे. चाराच्या पक्व फळांचा रंग जांभळा असतो. हीं फळें मधुर असतात.

**चारखा**—मुंबई. काठेवाड. लाखापादर ठाण्याच्या अमलांतील स्वतंत्र खंडणी देणारी एका खेड्याची जहागीर.

**चारण**—या जातीची लोकसंख्या सुमारें पाऊण लाख आहे. मुख्य वस्ती मुंबई इलाखा व राजपुताना यांतून आहे. मुंबई इलाख्यांत कच्छ, काठेवाड, गुजराथ, सिंध व राजपुताना येथें हे लोक आहेत. चारण हे गाढवें पाळणें व मडकीं करणें हीं कुंभारांचीं कामें पूर्वी करीत असत. गुरें पाळणें, रजपूत व काठी यांचे पोवाडे गाणें व भीक मागणें हे यांचे मूळचे धंदे होत. अजूनसुद्धां काठी लोकांच्या वंशावळींची माहिती या लोकांना आहे. हल्लीं हे गुराखी, व्यापारी, कापडवाले व शेतकरी आहेत. भाट लोकांप्रमाणेंच पूर्वी हे लोक वंचनाबद्दल जामीन रहात असत व वचनभंग केल्यास त्रागा करण्याची धमकी घालून ते वचन पाळावयाला भाग पाडीत असत. कच्छप्रांतांतील खालचे लोक चारण बायकांना माता मानून त्यांमध्यें दैविक शक्ति असते असें समजतात.

गुजराथचारणामध्यें गुजर, कच्छेला अथवा पर्जिया, मारुस, व टंबेल अशा चार पोटजाती असून एका पोटजातीचा दुसरीशीं विवाहसंबंध होत नाहीं. लग्नासंबंधीं चाली फार निरनिराळ्या आहेत. मारवाडीचारणामध्यें रोटीबेटीव्यवहार होत नाहीं. हे लोक नियमानें जानवें घालतातच असें नाहीं. मुलींचीं लग्नें वयाच्या १०–१२ वर्षांपर्यंत होतात. रेवाकाठा पंचमहालमधील चारणांखेरीज इतर सर्व चारणांमध्यें पुनर्विवाहाची चाल आहे. घटस्फोटाबद्दल वेगवेगळ्या चाली आहेत. हे लोक मांसाहारीहि आहेत. अहीर, लोहार, दरजी व रजपूत लोकांबरोबर हे जेवतात. मुलगा वारस नसल्यास त्या कुळांतील पुरुषांस वारसाचा हक्क जातो. हे लोक हिंदू धर्माच्या वेगवेगळ्या पंथांचे असून अंबा व भवानी देवीचे उपासक आहेत. मेवाड, सारस्वत, श्रिगुड, राजगुरू, पारजिया व कांहीं ठिकाणीं श्रीमाळी ब्राह्मण यांचे उपाध्याय आहेत.

**चारदुआर**—हें आसामच्या दरंग जिल्ह्यांतील राखून ठेवलेलें ( रिझर्व ) जंगल आहे. याचें क्षेत्रफळ १२१ चौ. मैल आहे. यापैकीं २८७२ एकरांत रबराच्या झाडांची लागवड केली आहे. ही लागवड सन १८७३ त प्रथम सुरू झाली व १९०४ पर्यंत त्याच्याकरितां खर्च २ लाख रु. झाला.

**चारसद**, त ह शी ल.—वायव्य सरहद्दीवरील प्रांताच्या पेशावर जिल्ह्याची तहशील. क्षेत्रफळ ३८० चौ. मैल आहे. इ. स. १९११ त हिची लोकसंख्या १५९१०५ होती.

येथील शेतसारा १९०३-०४ त ३६०००० होता. यांतील काबूल नदीची शाखा अदिझी आणि स्वातनदी यांमधील दुआब फार सुपीक आहे. मोहंमद टेकड्यांच्या पायथ्याशी असणाऱ्या शेतांस लोकांनीं आपले बंधारे बांधून पाण्याची व्यवस्था केली आहे. स्वात नदीच्या पूर्वेस उत्मानखेल टेकड्यांपासून दक्षिणेस काबूल नदीपर्यंतच्या प्रदेशास हस्तनगरपत्त म्हणतात.

शहर.—वायव्येकडील प्रांताच्या पेशावर जिल्ह्यांतील चारसद्द तहसिलीचें मुख्य ठाणें आहे. याला लागूनच प्रांग शहर आहे. याची व प्रांग शहराची मिळून लोकसंख्या १९११ त ९१७८ होती. हें पेशावरपासून २० मैल आहे. यांत धान्याचा मोठा व्यापार आहे. यांत एक शाळा व दवाखाना आहे. प्राचीन पुष्कलावती नांवाची नगरी, जिला ग्रीक इतिहासकारांनीं पेयुकेलऊस अथवा पेयुकेलैटीस् असें नांव दिलें आहे ती हें चारसद्द शहरच होय असें जनरल कनिंगह्यामचें म्हणणें आहे. टॉलेमी ( भूगोलविद्यावेत्ता ) यानें हें प्राचीन शहर स्वात नदीच्या पूर्वेकडील किनाऱ्यावर आहे असें लिहिलें आहे. व ह्युएनत्संग म्हणतो कीं हें शहर पेशावरच्या ईशान्येस सुमारें १७ मैलांवर आहे. यांत जुनीं नाणीं, मातीचे अलंकार व एक खोदकाम केलेली शिला सांपडली आहे. येथें शहराच्या बचावाकरितां बांधलेला बालाहिसार नांवाचा जुना किल्ला होता.

**चारा**—पाळीव जनावरांचें वनस्पतिखाद्य. गुरांविषयीं विचार करूं लागलों म्हणजे चाऱ्याचा प्रश्न पुढें उभा रहातो. गुरांचा स्वाभाविक चारा म्हणजे गवत होय. हिंदुस्थानांत मुख्यत्वेंकरून डोंगराळ प्रदेशांत गवताचीं अनेक रानें आहेत. सह्याद्री व सातपुडा या पर्वतांच्या जवळील भागांतील गुरें बहुतकरून डोंगरी गवतावरच पोसलीं जातात. अशीं कुरणें महाराष्ट्रांत व काठेवाडांत बरींच आहेत. देशावर व त्याच प्रमाणें कर्नाटकांत डोंगर सपाटीवर नदीकांठीं अफाट कुरणें असून तेथें उत्तम जातीचें गवत होतें. ज्या रानांत उत्तम जातीचें गवत मुबलक होतें त्याला महाराष्ट्रांत कुरण असें म्हणतात व गुजराथेंत त्यालाच वीड अशी संज्ञा आहे. साधारणपणें गवताची एकच कापणी होते. सपाट रानांतील व नदीकांठच्या रानांतील गवत हिरवें कापून तें गुरांनां चारितात. अशा ठिकाणीं कापणीनंतर सोईचा पाऊस झाल्यास दुसरी फूट होऊन गुरांस चरावयास मिळते. शहराच्या आसपासचीं कुरणें गुरांनां उभीं चारतात. प्रत्येक खेड्यांत गुरांस चारण्याकरितां म्हणून ‘ गायरानें ’ ठेवलेलीं असतात परंतु तीच जागा गांवांतील गुरांनां उभें रहाण्यासाठीं असल्यामुळें तेथें चरण्यालायक गवत फारसें होत नाहीं. बादिस्त जंगली भागांत पुष्कळ गवत होतें. पण त्याचा मुख्य उपयोग दुष्काळ सालीं जास्त होतो. जंगली भागांतील गवत दरसाल कापून जागोजागीं त्याच्या गंजी करून ठेवाव्यात व त्यांचा उपयोग दुष्काळांत गुरांसाठीं करावा अशी तजवीज सरकारांतून चालू आहे. गुजराथेंत शेताचे बांध रुंद ठेवितात. व त्यांवर झालेलें गवत कापून तें आपल्या गुरांसाठीं राखून ठेवितात. देशावर कुरणांतून चरण्याची बंदी झाल्यापासून गंजी लावण्याची पद्धत जास्त प्रचारांत येऊं लागली आहे. मोठमोठ्या शहरांजवळ विक्रीसाठीं गंजी करून गवत सांठवून ठेवितात.

गवताचा व इतर चाऱ्यांचा सांठा साधारणपणें प्रत्येक भागांतील हवापाण्याच्या परिस्थितीवर अवलंबून असतो. जेथें नियमित व पुरेसा पाऊस पडतो तेथें चाऱ्याची वाण उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत मिळून एक दोन महिनेच पडते. पहिल्यानें पावसाळ्यांत तयार झालेलें हिरवें गवत मिळतें. तें सरतें तों तृण, धान्याचा कडबा, सरम व द्विदल धान्याचें भूस मिळावयास लागतें. अशा रीतीनें खर्च होऊन जो चारा शिल्लक रहातो त्याच्या गंजी करून तो सांठवून ठेवितात. लहान गंजी वाटोळ्या असतात व मोठ्या चौकोनी असतात. सांगली, मिरज वगैरे भागांत त्या वरळीच्या आकाराच्या घालून त्या मातीच्या ढेकळांनीं झांकितात. त्यांस ‘ ढेपण ’ म्हणतात. सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यांत गंजी शाकारल्यावर त्यांच्या बाजू व वरील भाग माती व शेणाच्या काल्यानें लिंपितात. नाशिक, पुणें व सह्याद्रीजवळील भागांत गवताच्या गंजी छपरांनीं शाकरतात. गव्हाचें कुटार ( भुसा ) व कडदणाचें भूसपळकाठीच्या कणगींत किंवा कडब्याच्या ताटांचें कूड बांधून त्यांत सांठवून ठेवितात. नाशीक जिल्ह्यांत कूट विटांनीं बांधलेल्या वाटोळ्या खोलींत सांठवितात. कोंकणभागांत पेंढा गंजी घालून ठेवितात महाराष्ट्रांत गवताच्या अनेक जाती आढळतात. त्यांपैकीं गुजराथेंत झिंझवो, गांधी, मोसी, लाचरा, व कडकडीया देशावर पवन्या, मारवेल, पवनभूरी, भातेड व तांबडगोटा या कोंकणांत फुलेण, करवेल वगैरे गवताच्या मुख्य जाती होत. गवताखेरीज ज्वारीचा कडबा, बाजरीचें सरमड, भाताचा पेंढा, राळ्याची व नाचणीची काड, गव्हाच्या काडीचा भुसा व कडदन धान्यांचें भूस वगैरे गुरांनां चारितात.

जेथें जेथें पाण्याची सोय असते तेथें तेथें मुद्दाम चाऱ्याचीं पिकें करितात. उदाहरणार्थ, उत्तर गुजराथेंत सुंड्या; हुंडी व खोंडी, खानदेशांत व देशी भागांत; मका, हुंडी, उतावळी, निळवा, लसूणघांस पुणें व नगर जिल्ह्यांत; मेथी, नाशिक व पश्चिम खानदेश जिल्ह्यांत; सांगली व मिरजेकडे नदीबूड रानांत मका, शेवरी, बाल वगैरे गुरांनां चारण्यासाठीं करितात. उंसाच्या रानांत गुऱ्हाळावर बैलांनां उंसाचीं वाढीं चारितात.

काहीं भागांत जेथें उन्हाळ्यांत चारा कमी पडतो तेथें मावळांत धामण, पिंपरीचा पाला, कोंकणांत बांबूची चिवार, पांगारा, भारंडी, भेंडी, फणस वगैरेंचा पाला; खानदेश व नाशिक जिल्ह्यांत अंजन, हेकळ, कांटेबोर वगैरे झाडांचा

पाला व गुजराथेंत सांबडी, हरेरा, दोदी, हिरमाडी वगैरेंचा पाला चारितात. दुष्काळांत वड, पिंपळ, पिंपरी, नांदुरकी लिंब, उंबर, पांगारा आंबा वगैरे झाडांचा पाला व केळीचे खुंटहि गुरांनां घालितात.

वर सांगिल्याप्रमाणें नेहमीं चाऱ्यासंबंधीं गुरांची आबाळ मुख्यत्वेंकरून दुष्काळी भागांत जानेवारी ते जून अखेरपावेतों फार होते. यावेळीं रानांत चरावयास फारसें नसतें. अशा वेळीं चाऱ्याची तरतूद करणें अगदी अवश्य आहे. पावसाळ्यांत हिरवा, त्यावेळीं खाण्यास अयोग्य असा बराच चारा असून तो स्वस्तहि असतो. हा चारा खड्ड्यात अगर चुनेगच्ची विहिरीच्या आकाराच्या 'सायलो' मध्यें भरून ठेविल्यास तो उन्हाळ्यांत फार उपयोगी पडेल. अशा चारा सांठवून ठेवण्याची पद्धत इंग्लंड, अमेरिका वगैरे ठिकाणीं फार वर्षांपासून प्रचलित आहे. हिंदुस्थानांत सुद्धां असा मुरवलेला चारा मिलिटरी डेअरीफार्मांत व शेतकी खात्याच्या सरकारी शेतावर करण्याची वहिवाट चालू आहे. तो चारा उत्तम असून गुरें मोठ्या आवडीनें खातात.

सायलो म्हणजे जमीनींत खोदलेला विहिरीसारखा चौकोनी अगर वाटोळा खड्डा असतो. कित्येक वेळां हा खड्डा जमिनींत खोदून जशाचा तसाच 'सायलो' म्हणून वापरतात. पण कित्येक वेळा त्याच्या बाजू व तळ बांधून काढितात व नंतर चारा सांठवितात. कच्च्या सायलोंत चाऱ्याचें कुजून बरेंच नुकसान होतें. तसेंच तो बांधून काढिला असता होत नाहीं. सायलेज म्हणजे मुरवलेला चारा. हिरव्या गवताचा कडवळाचा किंवा मक्याचा कसलाहि सायलेज करितां येतो. पण मक्याचा सायलेजचा चांगला होतो. अमेरिकेंत मक्याची ताटें बारीक करून मग तीं सायलोंत भरितात. हा चारा आगष्ट-सप्टेंबरांत सायलोंत भरून ठेविल्यास तो फेब्रुवारी-मार्च महिन्यांत काढण्यास तयार होतो. खड्ड्यांत भरलेल्या चाऱ्यापैकीं शेंकडा ६० ते ७० टक्के सायलोज गुरानां खाण्यास योग्य असा निघतो. सुमारें २५ गुराना तीन महिनेपर्यंत पुरेसा चारा मावण्यास २० फूट खोलीचा व १५ फूट व्यासाचा खड्डा पुरे होईल.

मुरवलेल्या चाऱ्याखेरीज हल्लीं जो चारा चारण्यांत येतो. तो कडबा कापण्याच्या यंत्रानें किंवा कुऱ्हाडीनें किंवा दुसऱ्या हत्यारानें बारीक करून गुरांनां खाऊ घातल्यास आहे हाच चारा जास्त दिवस पुरवितां येईल.

याखेरीज देशावरील कांहीं भागांत व कर्नाटकांत जसें गंजी मारचून सुमारें एक वर्ष पुरण्याजोगा चारा सांठवून ठेवतात. त्याप्रमाणें मुख्यत्वेंकरून दुष्काळनिवारणार्थ एका वर्षाचा चारा दुसऱ्या वर्षांपावेतों राखून ठेवला पाहिजे. ही पद्धत चोहोंकडे अमलांत येणें अवश्य आहे.

अलीकडे दिवसानुदिवस हलकी जमीनसुद्धां लागवडींत येऊं लागल्याकारणानें चराऊ रानें कमी कमी होत चाललीं आहेत. याकरितां सर्व शेतकऱ्यांनीं गुरांच्या चाऱ्यासाठीं म्हणून आपल्या शेताच्या कांहीं भागांत दर वर्षी चाऱ्याचें पिक पेरावें. निदान पाणी असेल; त्यांनीं तरी ही गोष्ट अवश्य करावी.

कापूस आणि गळिताचीं धान्यें पिकणाऱ्या प्रदेशांत चाऱ्याची टंचाई फार असते. अशा ठिकाणीं सरकीच्या टरफलांचा कडब्याप्रमाणेंच उपयोग होतो. असें सुरत फार्मवरील प्रयोगाअंतीं अनुभवास आलें आहे.

साधारणपणें इकडील चाऱ्यासंबंधीं माहिती दिल्यावर युरोपांतल्यासंबंधीं काय तजवीज करतात याचें दिग्दर्शन करणें जरूर आहे. पाश्चात्य देशांत गुरांनां चारण्यासाठीं जनावरांची फार काळजीनें निगा ठेवितात, गवत खराब होऊं लागलें म्हणजे चांगल्या चांगल्या जातींच्या गवतांचें मुद्दाम बीं धरून त्यांत कांहीं द्विदल जातीच्या बियांची मिसळ करून चराऊ रानांत पेरितात. कुरणांस खत देतात व त्यांत वाईट जातीचें तण होऊं देत नाहींत. कुरणासभोंवतीं कुंपण घालून चाऱ्याचा बचाव करितात व तो वाळवून ठेवितात अगर सबंध, क्षेत्राचे तुकडे करून तो बेताबेतानें गुरांस चारितात. तिकडे गवत फुलांवर असतांना कापितात व तें वाळवितात. अशा गवताला तिकडे 'हे' म्हणतात. आपल्या इकडे गवत अगदीं पक्कें होऊन वाळल म्हणजे कापितात सबब तें बरेंच निकस होतें. याखेरीज टर्निप, मेन्जल वुरझल, कोबी, गाजरें वगैरेंसारखीं पिकें करून ती गुरांनां चारितात. इकडे तशा तऱ्हेचे प्रयत्न झालेले दिसत नाहींत. तथापि कोइमतूरकडे व बहार प्रांतांत कांहीं ठिकाणीं अशीं चराऊ रानें राखून ठेवलेलीं आढळतात.

गुरांची वाढ व संभाळ करण्यासाठीं प्रत्येक शेतकऱ्यानें चाऱ्याचीं पिकें मुद्दाम केलीं पाहिजेत असें वर सांगितलें आहे. त्याप्रमाणें कोणतीं चाऱ्याचीं पिकें कोणत्या हंगामांत करावीं वगैरेंसंबंधीं उपयुक्त माहिती पुढें दिली आहे.

चाऱ्याच्या पिकांची निवड करतांना खालीं दिलेल्या गोष्टी लक्षांत ठेवाव्या. चाऱ्याचें पीक लवकर तयार होणारें, जास्त उत्पन्न देणारें, गुरांस आवडणारें, पचण्यास सोपें, गुरांस अपाय न करणारें, ताटांत बारीक, पालेदार व तो पाला लुसलुशीत व नरम असणारें असलें पाहिजे. शिवाय चाऱ्याचीं हीं पिकें मुद्दाम पाण्यावर करावयाचीं असल्यामुळें तीं थोड्या पाण्यावर येणारीं असावींत. चारा वाळवून रचून ठेविल्यास तो लवकर नासूं नये. साधारणपणें तृणवर्गांतील व त्यामुळें द्विदल वर्गांतील पिकें चाऱ्याकरितांच करावयाचीं असतील तेव्हां तीं फुलवरावरच (कणसांत किंवा शेंगांत दाणे भरण्यापूर्वी) कापावीं. जोंधळ्याच्या ज्या अनेक जाती कडवळाकरितां पेरितात, त्या फुलावरा आल्याखेरीज कापून गुरांनां कधींहि घालूं नये. कारण फुलवरा येण्यापूर्वी जोंधळ्याच्या ताटांत हायड्रोसायनिक आसिड नांवाचा विषारी पदार्थ

असतो. तो गुरांनां अपायकारक आहे. त्याचप्रमाणें लसूण-घांस गुरांनां कापल्याबरोबर घालूं नये. तो कांहीं तास उन्हानें हडकल्यावर मग चालावा. त्याचा दररोजचा रतीब १०-१५ पौंडांपेक्षां जास्त नसावा.

तृणवर्गीतील धान्यांनां 'काणी' किंवा 'काजळी'पासून बराच अपाय होतो. यासाठीं बी पेरण्यापूर्वी तें मोरचुताच्या पाण्यांत भिजवून मग पेरावें.

मुख्य मुख्य चाऱ्याच्या पिकांसंबंधीं तपशीलवार माहिती खालीं दिली आहे. दर एकरी उत्पन्नाचे आंकडे हजार पौंडांचे सरासरीच्या मानानें दिले असून चाऱ्याचे आंकडे पौंडांचे आहेत.

## चाऱ्यांच्या पिकांचें कोष्टक

| पिकाचें नांव | हंगाम | एकरी बीं | वाळलेला कडबा | हिरवी वैरण |
|---|---|---|---|---|
| सुंडिया ज्वारी | पावसाळीं व उन्हाळीं | ५०-७० | ८-१० | ... |
| खोंडी ज्वारी | उन्हाळी | ३०-४० | ४-६ | १२-१५ |
| हुंडी | ... | ३०-४० | | १४-१६ |
| शाळू | ... | ३५-५० | | ८-१० |
| निळवा उतावळी | पावसाळी | ४०-५० | ६-१० | १८-२२ |
| सॉरघम | पावसाळी | ४०-५० | | १५-२० |
| इम्फी | ... | ३०-४० | ८-१० | ... |
| मका | वर्षभर | ३०-४० | | १८-२० |
| रिआनाल ब्लूरिअन्स | पावसाळी | ५-८ | ... | १८-२० |
| बफेलो ग्रास (मॉरिशिस वॉटरग्रास) | ... | ताण्याचे तुकडे | ... | २५-३० |
| गिनीग्रास | ... | मुळांसहित ठोंब | ... | १८-२० |
| वाटाणा ओट | हिंवाळीं | ४०-५० वाटाणा, ७०-८० ओट | ... | १०-१२ |
| वाल | सर्वकाळीं | २०-३० | ... | ८-१० |
| चंवळी | ... | ३०-४० | ... | १२-१५ |
| मेथी | हिंवाळीं | ३५-४० | ... | २५-३० |
| लसूण घांस | पावसाळीं व हिंवाळीं | १२-१५ | ... | २५-४० |
| बरसीम (सिंध) | हिंवाळीं | ३०-४० | ... | २०-२५ |

सुंडिया.—हें चाऱ्याचें पीक उत्तर गुजराथ व बडोदें संस्थानांत महत्त्वाचें आहे. हें गोराडू जमिनींत चांगलें होतें. तिकडे सुंड्याची पेरणी अगदीं दाट करितात. यास्तव त्याचीं ताटें अगदीं बारीक व गवतासारखीं येतात. हा चारा गुरें मोठ्या आवडीनें खातात. बीं पेरल्यापासून हें ६० ते ७० दिवसांत फुलवऱ्यावर येऊन तें हिरवें कापणीस तयार होतें. उन्हाळी पिकास आठदहा दिवसांनीं पाणी द्यावें लागतें.

हुंडी, काळ भोंडी व खोंडी.—ह्या ज्वारीच्या जातीचा पेरा उन्हाळ्यांत करितात. याचा विशेष पेरा पुणें, सोलापूर, नगर व नाशिक या जिल्ह्यांत करितात. काळभोंडी केव्हां केव्हां हिंवाळ्यांतहि करितात. पेरणीचा हंगाम फेब्रुवारी व मार्च महिना होय. यांचा चारा कापणीस सुमारें तीन महिन्यांत येतो. कापणीनंतर वाफे व वरंबे सुधारून पुनः खत व पाणी दिल्यास दुसरी कापणी दोन महिन्यांत मिळते.

शाळू.—हें पीक मुख्यतः हिवाळी आहे. तथापि पाण्याची सोय व्यवस्थेशीर असल्यास तें उन्हाळ्यांतहि जोरानें वाढतें. पेरणीपासून तीन महिन्यांत चारा फुलवऱ्यावर येऊन तयार होतो. दर आठ दहा दिवसांनीं पाणी देत जावें.

निळवा.—याचा विशेष पेरा पुणें जिल्ह्यांत आढळतो. हें चाऱ्याचें पीक मुख्यतः पावसाळी आहे. पण उन्हाळ्यांतहि बरेंच पाणी दिल्यास पीक बरें येतें. याची पेरणी चांगला पाऊस झाल्यावर चारफणी पाभरीनें उभी आडवी करितात. म्हणजे सर्व जमिनींत बीं सारखें पसरलें जातें. हें कापणीस येण्यास सुमारें तीन महिने लागतात.

उतावळी.—अरगडी अगर उतावळी ही देशावरील चाऱ्याची एक जात आहे. ही जात खरीप व रब्बी हंगामाच्या मध्यावर पेरण्यास योग्य अशी आहे. म्हणजे हिचा पेरा आगष्टअखेरपर्यंत करण्यास हरकत नाहीं. ही जात ६०-७० दिवसात फुलवऱ्यावर येऊन कापणीस तयार होते. बुडखा राखून कापणी करून पुन्हां पाणी दिल्यास दुसरी कापणी घेतां येते.

सॉरघम.—ही एक अमेरिकन ज्वारीची जात आहे. अमेरिकेंत याच्या ताटापासून रस काढून त्याचा गूळ तयार करितात. याच्या कणसामधील धान्य पक्कें होईतों ताटांचीं पानें हिरवीगार रहातात. त्यामुळें या पिकापासून चारा व धान्य हीं दोन्ही एकदम मिळूं शकतात. याचा खोडवाहि चांगला येतो. पेरणीनंतर सुमारें ७५।८० दिवसांत पीक कापणीस तयार होतें.

इम्फी.—ही एक परदेशी ज्वारीची जात आहे. या जातीचीं ताटें सॉरघमप्रमाणें गुळचट असतात. सॉरघमचा व इम्फीचा दाणा काळया बोंडांत वेष्टिलेला असतो.

मका.—हें पीक वर्षांतून केव्हांहि पेरितां येतें व तें कोणत्याहि स्थितींत गुरांस चारतां येतें. पीक फुलवऱ्यास येण्यापूर्वी गुरांस चारलें तरी तें खाल्यानें शाळूप्रमाणें गुरांस अपाय होत नाहीं. पीक पेरल्यापासून तें दोन महिन्यांत चारण्यास तयार होतें. याच्या लागवडीस जमीन दमदार असून खत व पाणी यांचा भरपूर पुरवठा असावा लागतो.

रि आ ना ल क्झु रि अ न्स.—ही चाऱ्याची जात आफ्रिकेंतील असून तिचा प्रसार सरकारी फार्मच्या बाहेर फारसा झालेला नाहीं. हें पीक दिसण्यांत मक्यासारखें दिसतें. याच्या दोन कापण्या येतात व शेवटीं बीं येतें. याचें ताट थोडेंसें कडक व तंतुमय असतें. ह्याचा पाला मक्यापेक्षां चरबट असतो.

ब फेलो ग्रा स.—हें सिंहलद्वीपांतील एक गवत आहे. तें पाणथळ जमिनींत बरें वाढतें. याचे लांब लांब ताणे येतात. ताण्यांचे नऊ इंच लांबीचे तुकडे करून त्याची लागण करितात. याच्या वर्षांतून सात आठ कापण्या येतात.

गि नी ग व त.—कानडी गिनी हुल्लू हें गवत दिसण्यांत गवती चहासारखें दिसतें. हें ईस्ट इंडिया कंपनीच्या वेळीं परदेशांतून हिंदुस्थानांत आलें असावें. हें गवत एकदां लाविलें म्हणजे बरींच वर्षें टिकतें व खत व पाणी यांचा ज्याप्रमाणें पुरवठा असेल त्याप्रमाणें त्याचें उत्पन्नहि वाढतें. गिनिगवत कोणत्याहि जमिनींत येतें; परंतु जमीन निचऱ्याची असावी. जमीन चांगली तयार करून दर एकरीं शेणखत सुमारें तीस गाड्या द्यावें व नंतर पावसाच्या तोंडीं दीड दोन फूट हमचौरस अंतरानें ठोंबांचे तुकडे ( प्रत्येक ठोंब्यांत ५-६ बुडखे मुळांसहित) करून लागण करावी. बियांपासूनहि याची लागण करितां येते. परंतु याला फार उशीर लागतो. मुळांनीं जीव धरला म्हणजे सऱ्या व पाट करावेत. पावसाळ्याखेरीज सर्व वर्षभर प्रत्येक दहाबारा दिवसांनीं पाणी देत जावें. भांगलणी करून किंवा प्रत्येक कापणीनंतर नांगराची आडवी उभी तासें घालून जमीन स्वच्छ ठेवावी. दरवर्षी सुमारें पंधरा गाड्या शेणखत देत जावें. या गवताच्या दर. वर्षी नऊपासून दहापर्यंत कापण्या होऊन दर एकरीं अजमासें १८००० ते २०००० पौंड हिरवा चारा मिळूं शकेल. गिनीगवताचें शेत दर तीन चार वर्षांनीं बदलावें

वा टा णा आ णि ओ ट.—ह्याचें पीक थंडीच्या दिवसांत चांगलें येतें. ओट हें परदेशी पीक आहे. याचें मिश्रपीक सरकारी मिलिटरी फार्मांत फार करितात. याचा पाला वाळवूनहि गुरांना चारतात. याला पाण्याची व खताची योग्य तजवीज पाहिजे. हें पेरिल्यापासून अडीच ते ३ महिन्यांनीं तयार होतें.

वा ल.—हा नदीबुड रानांत व कधीं कधीं मळईंतहि चाऱ्याकरितां करितात. याचे वेल फार पौष्टिक असतात. पेरणीपासून पीक सुमारें तीन महिन्यांत कापणीस तयार होतें.

च व ळी.—चवळीच्या बऱ्याच जाती आहेत. त्यांपैकीं हळव्या जाती चाऱ्याकरितां पसंत कराव्या. हें पीक ७०-८० दिवसांत कापणीस येतें.

मे थी.—ही चाऱ्यासाठीं नाशिक व पश्चिम खानदेश या जिल्ह्यांत पेरितात. हा पौष्टिक व लुसलुशीत चारा गुरें मोठ्या आवडीनें खातात. कामकरी व दुभत्या जनावरांस हा चारा चांगला मानवतो. हा एका जनावरास रोजीं १५।२० पौंड देण्यास हरकत नाहीं. चाऱ्याच्या पिकाला एकंदर सहा वेळ पाणी द्यावें लागतें.

ल सू ण घां स.–(विलायती गवत) गुज.–विलायती घास. कानडी बिलायती हुल्लू. हें पीक परदेशांतून आलेलें असून तें दिसण्यांत मेथीसारखें दिसतें. याची वैरण पुष्टिकारक असते. पाण्याचा व खताचा भरपूर पुरवठा असल्यास जनावरांनां वर्षभर उत्तम लुसलुशीत ओली वैरण यापासून मिळूं शकते.

या पिकाला जमीन निचऱ्याची असावी. मध्यम काळी व काळी, सुमारें तीन फुटांखालीं मुरूम असलेली जमीन पसंत करावी. जमिनीची चांगली मशागत करून ती सुमारें एक फूटभर खोल भुसभुशीत करावी. दर एकरीं ३०।४० गाड्या शेणखत देऊन तें जमिनींत चांगलें मिसळावें. याची लागण दोन तऱ्हेनें करितात. एका पद्धतींत दहा फूट चौरस चौरस वाफे करून त्यांत हातानें बीं फेंकितात. दुसऱ्या पद्धतींत दोन दोन फुटांच्या अंतरानें दांड पाडून त्यांच्या माथ्यावर बीं पेरितात. दुसऱ्या पद्धतींत जमीन सपाट असणें जरूरीचें आहे. पहिल्या पद्धतींत निंदणी टिपणी हातानेंच करावी लागते पण दांडच्या लागवडींत ती बैलाच्या सहाय्यानें थोड्या खर्चांत आटोपतां येते. वाफ्याच्या पेरणींत बीं दर एकरीं १२।१५ पौंड लागत असन दुसऱ्या पद्धतींत तें ६।८ पौंड पुरतें. पहिल्यानें ३।४ वेळ पाणी ४दिवसांच्या अंतरानें द्यावें. पुढें हिंवाळ्यांत प्रत्येक दहा दिवसांनीं व उन्हाळ्यांत आठ दिवसांनीं पाणी देत जावें. लसूणघासानें पीक वरचेवर तण काढून स्वच्छ ठेवावें व वर्षांतून तीन चार वेळ थोडथोडें खत देत जावें. दर खेपेस चांगल्या कुजलेल्या शेणखताच्या पांच गाड्या द्याव्या म्हणजे पुरें आहे. पहिली कापणी सुमारें दीड दोन महिन्यांनीं येते. व पुढें प्रत्येक कापणी सरासरी सव्वा महिन्यानें येते.

दर एकरीं कापणीस सुमारें २००० पौंड ते ३००० पौंड घांस निघतो. प्रत्येक जनावराला सुमारें दहा पौंडांपेक्षां रोज जास्त गवत घातल्यास जनावराचें पोट फुगून अपाय होण्याचा संभव असतो. लसूणघास कापल्यावर लागलाच गुरांनां न चारतां तो कांहीं वेळपर्यंत हवेंत पसरून जरासा सुकूं द्यावा व मग गुरांना चारावा.

ब र सी म.—बरसीमहि एक लसूणघासासारखी ईजिप्त देशांतील चाऱ्याची जात आहे. हिचें उत्पन्न सिंध प्रांतांत व पंजाबांत चांगलें येतें. उत्तर गुजराथ व कोंकण येथें याचे प्रयोग चालू आहेत. ‘घोडेघांस’ व ‘गवत’ यांवर स्वतंत्र लेख आहेत.

च रा ई सं शो ध न—स्वतःचा योगक्षेम चालवून समाजांतील इतर भागाला अन्नवस्त्र पुरविण्यासाठीं शेतकरीवर्गानें आपलीं गुरेंढोरें कार्यक्षम स्थितींत राखणें अत्यंत जरूरीचें आहे. परंतु हल्लींच्या दुष्काळी युगांत जनावरांच्या चाराचराईचा प्रश्न फार बिकट होऊन बसला आहे. म्हणून मुंबई इलाख्याच्या शेतकीखात्याचे डायरेक्टर यांनीं या

प्रांताच्या शेतकीची आर्थिक पहाणी करून २० व्या शतकाच्या आरंभींच वरील बाबींत लोकांची हीन स्थिति होत चालली आहे असा निष्कर्ष काढला व ती सुधारण्यासाठीं चराईसंशोधनाचा उपक्रम केला.

तदनुरूप डॉ. हॅरल्ड. एच्. मॅन यानीं चाऱ्याच्या कांहीं पिकांसंबंधानें प्रयोग केले. त्यांत पिकांचा वृत्तान्त, धर्म, संवर्धन, त्यांचें रासायनिक पृथक्करण, त्यांतील घटकावयव, पोषक द्रव्यें व त्यांचें प्रमाण, तत्संबंधीं जनावरांची अभिरुचि व आवडनावड, त्या पिकांना लागणारा खर्च व येणारें एकरीं उत्पन्न इत्यादि गोष्टींचा विचार केला गेला. त्याच्या मागोमाग डॉ. बर्न्स यानीं कुरणांतील सहज उगवणारीं कांहीं रानगवतें व कडवळें यांसंबंधीं माहिती मिळविली व यांमध्यें उच्चनीच असे वर्ग लावून त्यांतील कांहीं तृणकडवळांच्या मिश्रणाची चराऊ रानांत लागवड करून चाऱ्याची पैदास करण्यास सुरुवात केली. याबरोबरच मुंबईच्या सासून डेव्हिड् ट्रस्ट मंडळाकडून आपल्या कार्ययोजनेंत "इलाख्यांतील निकस चराऊ रानांची सुधारणा" या प्रश्नाचा समावेश केला जाऊन त्याबाबत संशोधन करण्यासाठीं श्री. गणेश महादेव चक्रदेव यांची निराळी नेमणूक झाली. त्यांच्या संशोधनामधून जी फलनिष्पत्ति झाली तींत खालील ठळक गोष्टींचा सिद्धांत-निष्कर्ष निघाला.

(१) सर्वच पडिक, चराऊ रानें एकसारखीं निकस असत नाहींत. अशा रानांत निसर्गतःच मोठमोठे विभाग उत्तम कुरणें म्हणून असतात परंतु यांच्यावर एकसारखी चर चालू असल्यामुळें चांगलीं आवडीचीं गवतें आधीं खालीं जाऊन, त्यांना वाढावयास बिया उत्पन्न करून आपला वंश चालू ठेवण्यास वाव मिळत नाहीं व म्हणून त्यांतील चांगल्या विभागांचा बहुमोलपणा झांकला जातो.

(२) अशीं सर्व रानें वाईट मानलेल्या 'कुसळ' गवतानेंच प्रामुख्यानें व्यापिलीं असत नाहींत. कुसळरहित असे शेंकडो विभाग विस्तीर्ण पसरलेले असतात. शिवाय या सर्व कुसळी अगर बिनकुसळी रानांमध्यें पॅनिकम्, इस्किमम् यांसारख्या गणांतील चांगल्या गवतांच्या अनेक जातीहि बऱ्याच संमिश्र असतात.

(३) आजवर कुसळगवताची जात फक्त बहुवर्षायूच आहे अशी समजूत असून ग्रंथांतूनहि त्याची तशीच नोंद आहे. परंतु हीमध्यें मोठी व धाकटी अशा दोन पोटजाती असून पैकीं पहिली बहुवर्षायु व दुसरी एक वर्षायु आहे असें दिसून आलें आहे. शिवाय पहिली जात चांगल्यापैकीं आहे असेंहि निदर्शनास आलें आहे.

(४) पहिल्या सिद्धांतानुरूप रानाची योग्य पहाणी करून त्याचे कापणीलायक, चराऊ, वगैरे निरनिराळे विभाग करावेत. नंतर त्यांत चर, काप व राख या क्रिया आलटून पालटन मदतीमदतीनें करीत जाव्या म्हणजे रानें सुधारून नेहमींच चांगल्या स्थितींत रहातात व या रीतीनें गुरांच्या चाऱ्याची भरपूर व पुष्टिदायक पैदास होईल.

(५) वरील योजनेमुळें चराऊ रानांत तीं नांगरून व कुळवून तृणकडवळाच्या मिश्रणाच्या लागवडीनें चाऱ्याची पैदास करण्याची पद्धत आपोआपच बाजूला पडते. शिवाय ती शास्त्रीयदृष्टया चूक, आर्थिकदृष्टया आंतबट्टयाची व व्यावहारिकदृष्टया विफलदायी अशी ठरते. तेव्हां कुसळी गवताचें उच्चाटण करण्याच्या पाठीमागें निराळें न लागतां वरील योजना अमलांत आणल्यास निकस चराऊ रानें चांगलींच सुधारतां येतील.

**चारीकार**—अफगाणिस्तानांत खोकंद दरीच्या मुखाजवळ हें एक शहर आहे. या ठिकाणीं कोहिस्तानचा गव्हर्नर रहातो. येथें तुर्कस्तानाकडे जाणाऱ्या मालावर कर वसूल करण्यांत येतो. खोकंद खाणींतलें कच्चें लोखंड येथें शुद्ध करून काबूलांत विकतात. येथें व याच्या आसपास मातीनें बांधिलेले पुष्कळ किल्ले आहेत. सन १८३९ त ब्रिटिश पोलिटिकल एजंट, मेजर एल्ड्रेड पाटिंजर व शाहा शुजाची गुरखा पलटण या ठिकाणीं रहात होती. कोहिस्तानवाल्यांनीं सन १८४१ या लोकांवर हल्ला करून त्या सर्व पलटणीची कत्तल केली. त्यांतून फक्त पाटिंजर, एक ब्रिटिश अधिकारी आणि एक गुरखा एवढेच काय ते काबुलास पोहोंचले.

**चार्टिझम**—विशिष्ट हक्कांच्या सनदेबाबतची चळवळ. सदरहू चळवळ इंग्लंडमध्यें इ. स. १८३७ मध्यें सुरू होऊन इ. स. १८५४ पर्यंत कमी अधिक प्रमाणांत चालू होती. ती राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही स्वरूपाची होती. इ. स. १८३२ मध्यें झालेली राजकीय सुधारणेची चळवळ ही मुख्यत्वें मध्यम स्थितींतल्या लोकांचीच असल्यामुळें तिच्या योगानें मजूर वर्गाचें समाधान झालेलें नव्हतें तथापि एक जें महत्त्वाचें तत्व या चळवळीनें निर्विवादपणें सिद्ध केलें तें असें कीं, इंग्रजी राज्यपद्धति ही प्रातिनिधिक तत्वांवरच उभारली गेली पाहिजे. त्यामुळें या चळवळीनें मजूरवर्गाचें जरी समाधान झालें नाहीं तरी तिनें व्यक्तिमतदानाच्या मार्गांत एक पाऊल पुढें टाकलें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. प्रत्येक व्यक्तीस मतदानाचा हक्क देणें ही गोष्ट जरी त्या वेळच्या लिबरल पक्षास मान्य नव्हती, तथापि ती जहाल पक्षास पूर्णपणें संमत होती, आणि स्वाभाविकपणेंच त्यावेळीं अत्यंत निकृष्टावस्थेस पोहोंचलेल्या आणि स्वतःच्या आकांक्षा कोणत्याहि मार्गानें तृप्त करून घेण्यास आतुर असलेल्या मजूरवर्गाचें जहाल पक्षाशीं संगनमत होऊन 'कामगार लोकांचा संघ' या संस्थेची स्थापना झाली. नंतर या संघांतील कांहीं सभासद मिळून एक मंडळ स्थापण्यांत आलें आणि त्या मंडळानें एक जाहीर सभा बोलावून कामगार लोकांच्या मागण्यांचें एक पत्रक तयार केलें. त्यांतील मुख्य कलमें येणेंप्रमाणें:— ( १ ) सर्व दर्जाच्या पुरुषांस मतदानाचा हक्क असणें. ( २ ) पार्लमेंटच्या वार्षिक

सभा बोलावणें. ( ३ ) चिठ्ठीनें—गुप्त रीतीनें मत देण्याची पद्धत अंमलांत आणणें. ( ४ ) मतदानाचा दर्जा ठरविण्यांत जिंदगीचा विचार न करणें. ( ५ ) सभासदांचें वेतन ठरविणें व ( ६ ) समानमतदारसंघ तयार करणें. या षट्सूत्रांस 'लोकपक्षाची सनद' असें विशिष्टार्थसूचक नांव देण्यांत आलें.

मजूर लोकांस ही चळवळ अत्यंत महत्वाची वाटत असल्यामुळें त्यांनीं या चळवळीचा जोरानें फैलाव करण्यास सुरुवात केली मोठमोठ्या शहरांतून व्याख्यानें देऊन जागृति करण्यासाठीं प्रचारक नेमण्यांत आले. या चळवळीस मोठमोठ्या विद्वान आणि कर्तबगार अशा लोकांचा पाठिंबा मिळाला होता. त्यांमध्यें प्रमुखपणें ज्याचें नांव नमूद करता येईल असा मनुष्य म्हणजे विल्यम लव्हेट हा होय. हा एक उत्तम लेखक असून कामगार लोकाच्या संघाचा चिटणीस होता. त्याचप्रमाणें दुसरा मोठा मनुष्य म्हणजे हेनरी व्हिन्सेन्ट हा होय. हा अत्यंत देखणा असून त्यावर वाग्देवतेची विशेष कृपा असल्याबद्दल त्याची ख्याति होती. त्याचा आवाज अतिशय मधुर असून प्रसंगविशेषीं आवाजास चढउतार देणें, भाषणांतील अस्खलितपणा आणि दुसऱ्याची हुबेहूब नक्कल करणें या गुणांच्या योगानें त्याची लोकांवर मोठी विलक्षण छाप बसत असे. त्याचे चहाते त्यास इंग्रजी 'लोकशाहीचा तरुण डिमॉस्थिनीस्' असें म्हणत असत.याहिपेक्षा चळवळीच्या अग्रेसरत्वाचा मान विशेषेंकरून ज्याच्याकडे येऊं शकेल असा मनुष्य म्हणजे फर्गस ओकोनर हा होय. हा आयर्लंडचा रहिवासी असून यानें 'दि नॉर्दर्न स्टार' या नावाचें एक वर्तमानपत्र सुरू केलें होतें. हें या चळवळीचें केवळ मुखपत्र समजलें जात असे.

१८३९ त झालेल्या परिषदेच्या वेळीं मात्र चळवळीचा कमजोरपणा लोकाच्या निदर्शनास येऊं लागला. एकंदर चळवळ्या लोकांमध्यें दोन तट पडले. एकाचें मत आपण शांततेच्या मार्गाचा अवलंब करावा असें होतें तर दुसऱ्या बाजूचे लोक प्रसंगीं अत्याचार करण्यासहि तयार होते. देशांत बेबंदशाही माजल्यामुळें सरकारी अधिकारी या चळवळ्यांवर लक्ष ठेऊं लागले. तेव्हां सरकारी अधिकारी आणि चळवळीचे पुढारी यांमध्यें चकमकी झडूं लागल्या. बर्मिंगहॅम शहरीं लव्हेट्, टेलर, कॉलिन्स या पुढाऱ्यास अटक करण्यात आली. त्याबरोबर चळवळ्या लोकाच्या डोळ्यांत सलत असलेल्या कांहीं लोकांची मालमत्ता जाळून पोळून फस्त करून टाकण्यांत आली. मध्यंतरीं सुमारें १२,८०,००० लोकांच्या सह्याचा एक अर्ज कॉमन्स सभेकडे पाठविण्यांत आला. परंतु तो २३७ विरुद्ध ४८ अशा प्रचंड बहुमतानें नापास करण्यांत आला. अशा रीतीनें सकृद्दर्शनींच आपल्या अर्जाचा वासलात लागलेली पहातांच चळवळे लोक अतिशय खवळून गेले, आणि न्यू पोर्ट शहरीं त्यांनीं मोठा दंगा केला. हा दंगा इतिहासांत 'दि वेल्श इन्सरेक्शन" या नांवानें प्रसिद्धच आहे. या दंग्यानंतर सरकारनें मोठी दडपशाही सुरू केली व बऱ्याच जणांनां शिक्षा ठोठावल्या. त्यामुळें थोडक्याच कालांत चळवळीचें उग्र स्वरूप नाहींसें झालें. तशांत त्यांच्या पुढाऱ्यांमध्यें मतभेद झाल्यामुळें चळवळ अगदींच कमजोर होऊन गेली. ही गोष्ट, दुसऱ्या खेपेस कॉमन्स सभेकडे जो अर्ज करण्यांत आला त्यांवर अवघ्या ३३,००० च सह्या होत्या, या गोष्टीवरून सिद्ध होत आहे.

तथापि इ. स. १८४८ मध्यें त्या चळवळीवर शेवटचा आघात होईपर्यंत ती थोड्याबहुत प्रमाणांत चालूंच होती. इ. स. १८४८ मध्यें फ्रान्स देशांत जी राज्यक्रांति झाली, तिच्या योगानें चळवळ करणाऱ्या लोकांच्या अंतःकरणांत नवीन आशांकुर उत्पन्न झाले. फ्रान्समधील लोकांनां जी गोष्ट करतां आली ती इंग्लंडमधील लोकांनां कां करतां येऊं नये, असा विचार त्यांच्या डोक्यांत घोळूं लागला. शेवटीं त्यांनीं पुन्हां एकदां कॉमन्ससभेकडे विनवणी अर्ज करावयाचा, आणि कामन्ससभेच्या सभासदांनां अर्जाचा योग्य तो विचार करण्यास भाग पाडील एवढें प्रचंड लोकमत अर्जास अनुकुल आहे ही गोष्ट त्यांच्या नजरेस आणून द्यावयाची, असा विचार ठरविला.

एक प्रचंड जाहीरसभा बोलावून कॉमन्स सभेकडे अर्ज पाठविण्याचें ठरविलें. तो अर्ज तीन पेट्यांमधून भरून उरण्याइतका मोठा होता. तो फर्गस ओकोनर यानें कॉमन्स सभेकडे सादर केला. त्याच्या सांगण्यात त्या अर्जावर सत्तावन लक्ष लोकांच्या सह्या आहेत असें आलें. परंतु प्रत्यक्ष मोजून पहातां त्या सुमारें पावणेवीस लाखच भरल्या. त्यांतहि कित्येक सह्या लबाडीनें केलेल्या असून दुसऱ्याहि कित्येक बनावटच होत्या. अशा तऱ्हेनें अर्जाची नापत झाल्यामुळें त्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. यानंतर ५।६ वर्षेपर्यंत ही चळवळ थोडीबहुत चालू होती. परंतु वस्तुतः ती असून नसल्यासारखीच होती असें म्हणणें भाग आहे.

प्रत्यक्ष परिणामाकडे पाहिलें असता, ही चळवळ मोठ्या डौलात सुरू होऊन अखेरीस ओफस ठरली असेंच वरवर पहाणारांस दिसून येईल. परंतु वस्तुस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करणारास असें आढळून येईल कीं सनदेमध्यें नमूद केलेल्या सर्व गोष्टी यथाकाल अमलांत येऊन चुकल्या आहेत. गेल्या तीस चाळीस वर्षांत झालेल्या इंग्लंडच्या प्रगतीचें श्रेय या चळवळीस कितपत देतां येईल हें जरी नक्की अजमावतां ओल नाहीं, तथापि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्यें ज्या स्वातंत्र्य-वृक्षाची पूर्णपणें वाढ झाल्याचें आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें त्याचें बीजारोपण या चळवळीच्या वेळींच झालेलें होतें, ही गोष्ट कोणाहि इतिहासवाचकाच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. [ए. सोशल रिफॉर्म्स ].

**चार्लेमांट, अर्ल ऑफ** ( १७२८-१७९९ )—जेम्स कॉल्फील्ड चार्लेमांट हा डब्लिन येथें सन १७२८ च्या आगस्ट महिन्याच्या १८ व्या तारखेस जन्मला; हा ज्या घराण्यांत जन्मला त्या घराण्यांत या पूर्वी तीन पिढ्यांना व्हायकाऊंट ही पदवी देण्यांत आलेली होती व जेम्स चार्लेमांट हा चौथा सरदार होता. हा लहानपणापासूनच विद्याव्यासंगी असल्याकारणानें लंडनमध्यें व डब्लिनमध्यें जे विद्वान गृहस्थ असत त्यांचा व याचा चांगला स्नेह असे. जॉन्सन, बर्क, गोल्डस्मिथ यांच्याशींहि त्याचा चांगला परिचय असे. आयर्लंडमध्यें त्यानें निरनिराळया अधिकाराच्या जागा पत्करून त्यांत जें आपलें प्रावीण्य व्यक्त केलें, त्यामुळें त्याला अर्ल ही पदवी १७६३ मध्यें अर्पण करण्यांत आली. पण त्यामुळें त्याची लोकसेवा करण्याची हौस मात्र भागली नाहीं. आयर्लंडमध्यें त्यावेळीं स्वातंत्र्याची चळवळ सुरू झालेली होती. त्या वेळच्या पुढाऱ्यांनां आयरिश पार्लमेंट स्वतंत्र असावें असें वाटूं लागलें होतें. याचवेळीं अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाची सुरुवात झाल्यामुळें व त्यांत इंग्लंडचा पराजय होऊं लागल्यामुळें आयर्लंडमधील इंग्रजी सैन्य अमेरिकेकडे पाठविलें. त्यांतच आयर्लंडवरीहि परचक्र येतें कीं काय अशा तऱ्हेची भीति पडल्यामुळें आयर्लंडमध्यें स्वतंत्र स्वयंसैनिक पथकें उभारण्याची चळवळ जोरांत सुरू झाली व हां हां म्हणतां ६०००० सैन्य गोळा झालें. पुढें परचक्राची भीति नाहींशी झाल्यावर याच स्वयंसैनिकांच्या साहाय्यानें आयर्लंडला स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचा तत्कालीन पुढाऱ्यांनीं निश्चय केला. या सैनिकांचा पुढारी चार्लेमांट असून त्याचा ग्रॅटन व फ्लड या लोकपक्षीय पुढाऱ्यांशीं उत्तमप्रकारचा संबंध होता व ग्रॅटन व चार्लेमांट यांनीं मोठ्या उत्साहानें खटपट करून स्वतंत्र पार्लमेंट मिळविलें. पण हें पार्लमेंट मिळविल्यावर अर्थातच स्वयंसैनिक पथकांची विशेष गरज नसल्यामुळें पुष्कळशीं पथकें कमी करण्यांत आलीं. १७९२ सालीं त्यानें आपल्या गव्हर्नरीचा राजीनामा देऊन 'व्हिग् क्लब'ची स्थापना केली. पण १७९८ सालच्या टोनच्या बंडामुळें त्याला धक्का बसला व आपण केलेल्या चळवळीचा वाईट प्रकारनें शेवट होणार असें त्याला वाटूं लागलें. यामुळें त्याच्या मनावर भयंकर परिणाम होऊन तो १७९९ सालीं मरण पावला.

**चार्वाक**—एक नास्तिक तत्वज्ञानी. यास नास्तिकशिरोमणी असें नांव सायणाचार्यांनीं सर्वदर्शनसंग्रहांत दिलें आहे.

चार्वाक कधीं जन्मला व मरण पावला याविषयीं ज्या एका जैन ग्रंथांत लिहिलें आहे,त्याचा नामनिर्देश न करतां त्या ग्रंथाचा सारांश अर्वाचीन कोशकार देतात तो असाः—अवंती देशांत क्षिप्रा नदी व चामला नदी यांच्या संगमीवर शंखोद्धार नामक क्षेत्र आहे. तेथें कलियुगाचीं अथवा युधिष्ठिर शकाचीं ६६० वर्षे गेल्यावर ६६१ व्या वर्षी प्रभवसंवत्सर चालला असतां उत्तरायणांत वैशाख शुद्ध १५ रविवारीं मध्यान्ह समयास चार्वाकाचा जन्म झाला. याच्या बापाचें नांव इंदुकांत व आईचें सुग्विणी असें होतें. पुढें पुष्करतीर्थी यज्ञनामक गिरीच्या ठायीं भाद्रपद शुद्ध १२ सोमवारीं श्रीमुख संवत्सर असतां युधिष्ठिर शकाचीं ७२५ वर्षे गेल्यावर ७२७व्या वर्षी दक्षिणायनांत चार्वाक मरण पावला. ही माहिती सत्य म्हणून ग्राह्य धरण्यास बऱ्याच अडचणी आहेत. सर्व दर्शनसंग्रहांत माधवाचार्यांनीं याचें मत काय होतें तें थोडक्यांत पुढीलप्रमाणें मांडलें आहे.

पृथ्वी, आप तेज आणि वायु हीं चार भूतें परस्पर संयोग पावून देहाच्या रूपानें परिणाम पावलीं म्हणजे त्यांत आपोआपच जीवचैतन्य उत्पन्न होतें. जशीं कित्येक द्रव्यें संयोग पावलीं म्हणजे त्यांपासून मद्य होतें. अथवा पान, सुपारी, चुना, कात हे पदार्थ एकत्र मिळाल्यानें तांबडा रंग उत्पन्न होतो त्याचप्रमाणें जीवचैतन्य म्हणून कांहीं निराळें आहे असें नाहीं. चार भूतांचा जो परस्परसंयोग त्याचें नांव जीवचैतन्य आणि वियोग तो त्याचा नाश होय. सारांश, प्रत्यक्ष चैतन्ययुक्त जो देह तोच आत्मा असें चार्वाकाचें म्हणणें आहे. कारण मी स्थूल, मी कृश असा प्रयोग हें यास प्रत्यक्ष प्रमाण आहे. आतां माझा देह असा जरी प्रयोग होतो, आणि त्यावरून माझा असें म्हणणारा कोणीतरी निराळा असेलसें वाटतें, तरी तो प्रयोग राहूचें शिर या म्हणण्याप्रमाणें औपचारिक आहे. कारण राहू तोच शिर असेंच लोकप्रसिद्ध आहे.

आतां द्रव्यसंपादन आणि स्त्रीसंभोग यांपासून होणाऱ्या सुखांत दुःखमिश्रितता आहे. यास्तव अर्थ आणि काम हे पुरुषार्थ नव्हेत, असें कोणी म्हणूं नये. धान्य घेऊं गेलें असतां त्या समागमें भूस येतें. किंवा मत्स्यादिकांसमागमें कंटक इत्यादि येतात म्हणून जसा कोणी धान्य व मत्स्य टाकीत नाहीं, तर भूस व कंटक यांचा त्याग करून सुखार्थी मुख्यार्थ ग्रहण करून सुखोपभोग घेतो, त्याचप्रमाणें द्रव्य आणि स्त्रीसंभोग यांतील दुःखाचा त्याग करून शहाणे आहेत ते सुख मात्र घेतात. मूर्खाप्रमाणें दुःखभीतीनें सुख टाकीत नाहींत. उदा., धान्यास उपद्रव देणारे पशू आहेत म्हणून किंवा अन्न मागणारे मधुकरी आहेत म्हणून त्या भयानें कोणी शेती करीत नाहींत व पाक करीत नाहींत काय? तर धान्य पेरतात आणि पाकहि करितात. याप्रमाणें हीं उदाहरणें प्रत्यक्ष सिद्ध असतां जो कोणी दुःखभयानें सुख टाकितो तो पशूच जाणावा.

देहोत्पत्तीस कर्माची अपेक्षा नाहीं. कारण कर्म आहे अशाविषयीं प्रत्यक्ष प्रमाण नसून तें केवळ अनुमानसाध्य आहे. अनुमानप्रमाण हें तर मुळीं मिथ्याच आहे. तर मग जग कसें उत्पन्न होईल ? हें एक आणि दुसरें एक रोगी, एक निरोगी, एक गरीब, एक श्रीमंत असें कां ? याचें उत्तर असें आहे कीं,जगाची उत्पत्ति व त्यांतील वैचित्र्य हीं स्वाभाविकच

आहेत म्हणजे स्वभावेंकरूनच तीं तशीं उत्पन्न झालीं आहेत. जसा अग्नि हा सहजउष्ण आणि पाणी व वायु हीं सहज शीतल आहेत त्याप्रमाणें.

परलोक नाहीं, परलोकीं गमन करणारा आत्मा नाहीं व तेथें सुखहि नाहीं. वर्णाश्रमांच्या क्रियांपासून कांहीं फल प्राप्त होतें असें म्हणतात; परंतु त्यांत कांहीं हांशील नाहीं. कोणी म्हणेल जर हें कांहींच नाहीं,तर मोठमोठे विद्वान द्रव्यसाध्य व कष्टसाध्य अशीं वेदोक्त अग्निहोत्र, यज्ञ इत्यादि कर्में करण्यास कसे प्रवृत होतात? तर असें समजावें कीं जे बुद्धिहीन व पौरुष म्हणजे पराक्रमहीन पुरुष आहेत, त्यांस हा जीवनोपाय आहे, दुसरें कांहीं नाहीं. कारण वेदच मुळीं भंड, धूर्त आणि निशाचर म्हणजे थट्टेखोर, ठक आणि राक्षस यांनीं केले आहेत तर त्यांतील कर्में तशींच आहेत.

यज्ञांत पशु मारला असतां जर त्यांस स्वर्ग प्राप्त होतो, तर असें करण्यापेक्षां यजमानानें पित्यासच कां मारूं नये? श्राद्धानें पितरांची तृप्ति आहे म्हणावें तर गांवास जाणारानें बरोबर फराळाचें ओझें वागवावें यांत हांशील काय? घरीं मुलानें श्राद्ध करावें म्हणजे झालें. जर येथें अन्नादिक दान केल्यानें स्वर्गास पोंचतें तर घराच्या खालच्या मजल्यांत केलेलें दान वरच्या मजल्यांतल्यास पोहोंचावें तसें कां घडत नाहीं?देहाहून भिन्न असा आत्मा परलोकास जर गेलाच आहे तर बंधु इत्यादिकांच्या स्नेहास्तव त्यांस तो कधीं कां येऊन भेटत नाहीं? यास्तव जीव आहे तोंपर्यंत खुशाल खावें प्यावें व वेळेस कांहीं नसेल तर बेलाशक ऋण काढून तूप प्यावें: ऋणाचें भय बिलकुल वाळगूं नये. कारण भस्म झालेला देह पुन्हां जन्मास येत नाहीं. आणि जन्मच नसल्याकारणानें ऋण फेडण्याची पंचाइतहि नाहीं. सारांश 'घोड्याचें शिश्न पत्नीस ग्राह्य ' हें वाक्य जसें थट्टेचें आहे, तशाच वेदामधील गोष्टी असून मांसभक्षण करण्यास राक्षस मात्र शिकवितील; दुसरें कोणी शिकविणार नाहींत. तस्मात् परलोकप्राप्तीच्या आशेनें जे कोणी येथें सध्या कष्ट सोशितात ते कंटकादिकांपासून होणाऱ्या वेदनांप्रमाणें नर्कदुःखच अनुभवितात. सारांश, प्रत्यक्ष जें कष्टरूप दुःख, याचेंच नांव नरक, स्त्रीसंभोगादिक जें सुख तोच स्वर्ग, प्रत्यक्ष प्रमाण तेंच प्रमाण, लोकप्रसिद्ध जो राजा तोच परमेश्वर आणि देहपात हाच मोक्ष. याहून स्वर्ग, नरक, ईश्वर, अनुमानादिक प्रमाणें व मोक्ष हीं दुसरीं नाहींत. याप्रमाणें शुक्राचार्य तपश्चर्येस गेले असतां बृहस्पतीनें त्यांचें रूप धारण करून दैत्यांच्या बुद्धीस मोह पाडण्यासाठीं विरोचन सिद्धांताचें पुष्टीकरण केलें व त्यांस जें मत शिकविलें त्या मताचा अनुयायी चार्वाक आहे.

चार्वाकदर्शनाचा स्वतंत्र ग्रंथ नाहीं. अन्य दर्शनकारांनीं त्याच्यावर केलेल्या पूर्वपक्षात्मक टीकांवरून या दर्शनांतील विषयाची माहिती मिळते. या दर्शनाला सुखापेक्षकर्मवाद असें म्हणतां येईल व उघड जरी नाहीं तरी आचरणांत याचे अनुयायी शेंकडा ९९ वर आढळतील. [ अर्वाचीन कोश; सर्वदर्शनसंग्रह ].

**चालुक्य घराणें**—चालुक्य घराण्याचें राज्य मोठें विस्तीर्ण असून यांनीं इ. स. सहाव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत सहा शतकें राज्य केलें. या कालापैकीं बराचसा काल हें एक बलिष्ठ राष्ट्र समजलें जात असे. चालुक्य दक्षिणेंत आल्याबद्दलची माहिती प्रथम आपणांस सुमारें इ. स. ५५० च्या सुमाराची मिळते. पहिला पुलकेशी यानें इ. स. ५५० च्या सुमारास आपली सत्ता स्थापन केली. या घराण्याचे पुष्कळ शिलालेख आहेत व त्यांपैकीं शेवट शेवटच्या राजांच्या शिलालेखांतून या घराण्याची वंशावळ दिली आहे. तसेंच यांच्या मूळपुरुषाबद्दल, अयोध्येमध्यें राज्य करीत असलेला सोमवंशांतील ५९ वा पुरुष विजयादित्य ( अयोध्येस ५९ पुरुष होऊन गेल्यावर विजयादित्य हा दक्षिणेंत आला ) हा मुलुख जिंकण्याकरितां दक्षिणेंत आला पण लढाईंत मारला गेला अशी माहितीहि दिली आहे. या विजयादित्याची स्त्री गरोदर असून आपला जीव बचावून पळून गेली व एका ब्राह्मणाच्या घरीं आश्रयास राहिली.तेथें तिला विष्णुवर्धन नावाचा पुत्र झाला. यानें विष्णुगिरीवर तप करून गौरीला प्रसन्न करून घेतलें व मग राज्य स्थापून पुष्कळ विजय संपादन केले व कांची येथील पल्लव राजाच्या कन्येशीं विवाह करून आपल्या राज्यास बळकटी आणली. याचा पुत्र विजयादित्य व त्याचा पुत्र पुलकेशिवल्लभ हा होय. ऐहोळ येथील शिलालेखांत पुलकेशीचा पिता रणराग व आजा जयसिंहवल्लभ नामक होता असा उल्लेख आहे (फ्लीट म्हणतो कीं या सर्व दंतकथा असून, चालुक्य राजे हे पल्लव राजे राज्य करीत असतां दक्षिणेंत आले व त्यांचें राज्य त्रिलोचन ( त्रिनेत्र ) यानें स्थापिलें. एवढें मात्र ऐतिह्य आहे). यालाच पुलिकेशी असेंहि म्हणत असत. पुलकेशी याचे नातू विभक्त होऊन त्यांनीं पूर्व व पश्चिम चालुक्य घराण्याची स्थापना केली. या पैकीं वडील नातू हा पश्चिमेकडे राहिला व धाकटा कुब्जविष्णुवर्धन यानें वेंगी येथील पल्लवराजा शालंकायन यास जिंकून व पूर्वकिनारा काबीज करून पूर्व घराण्याची स्थापना केली.

वेंगी येथील पल्लव राजे हे आंध्रभृत्य यांच्यानंतर कृष्णा नदीच्या प्रदेशांत राज्य करीत असून बुद्धधर्मी होते. तेव्हां हा विजय म्हणजे बुद्धधर्मावरील ब्राम्हणधर्माचा विजयच होय. कारण चालुक्य हे वैष्णव होते. चालुक्य घराण्याला कल्याणचे चालुक्य असें म्हणण्याचा जो प्रघात आहे, त्याबद्दल फ्लीट म्हणतो कीं, पूर्वकलीन चालुक्य राजांच्या शिलालेखांत कल्याणच्याबद्दल कांहींच उल्लेख नाहीं. अगदीं प्रथमच कल्याणचा उल्लेख पश्चिम चालुक्य घराण्यांतील राजा त्रैलोक्यमल्ल ( सोमेश्वर पहिला ) याच्या शा.श. ९७५ (इ.स १०५३-५४ ) च्या शिलालेखांत सांपडतो.

चालुक्य पूर्व घराणें.—पूर्वचालुक्य वंशाच्या राज्याला वेंगी देश म्हणतात. याच्या चतुःसीमा.—पश्चिमेस पूर्वघांट, पूर्वेस समुद्र, उत्तरेस गोदावरी नदी व दक्षिणेस कृष्णा नदी अशा आहेत. या चतुःसीमेंत असलेल्या मुलुखाचें क्षेत्रफळ सुमारें ८००० चौरस मैल होतें. या देशाचें खरें नांव आंध्र देश असें असून त्याची राजधानी वेंगी ही होती.

पूर्व चालुक्य वंशाची स्थापनाः—चालुक्य साम्राज्यावर दुसरा पुलिकेशी हा इ. स. ६०९ अथवा १० सालीं गादीवर आला. हा बलाढ्य राजा असल्यामुळें यानें दक्षिणेकडे आपलें राज्य वाढविलें व येथील पल्लव राजाचा पराभव केला. पुलकेशीला आपल्या राज्यांतून इतक्या लांब मुलुखगिरीवर जावें लागलें म्हणून त्यानें आपला भाऊ पहिला विष्णुवर्धन याला आपल्या देशांत युवराज करून ठेविलें ( ६१५ ). या स्वारींतच बहुधा वेंगी देश चालुक्य साम्राज्याला जोडला गेला असावा. राजधानीला आल्यावर पुलिकेशी यानें आपल्या भावाला नवीन जिंकलेल्या मुलुखावर सुभेदार नेमून पाठविलें. थोड्याच काळांत ( ६३२ ) परम्परानुमतानें विष्णुवर्धन यानें पूर्व किनाऱ्यावर स्वतंत्र साम्राज्य स्थापिलें; व चालुक्य वंशाचें पूर्व घराणें सुरू केलें. कोणी म्हणतात कीं त्यानें बंड करून स्वतंत्र राज्य स्थापिलें. हें राज्य ५०० वर्षें तरी या भागावर होतें. या घराण्यांतील निरनिराळ्या राजांनीं किती किती वर्षें राज्य केलें त्याबद्दलच्या शिलालेखांतील माहितींत फरक दिसून येतो. तसेंच शिलालेखांतील माहिती नुसती वंशावळीपुरतीच आढळते.

पूर्वचालुक्य वंशांत होऊन गेलेले राजेः—(१) पहिला विष्णुवर्धन ( ६१५ ते ६३३ ). हा पश्चिम चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याचा धाकटा भाऊ होय. याच्या बापाचें नांव पहिला कीर्तिवर्मा असें होतें. याला कुब्जविष्णुवर्धन, कुब्जविष्णु व बिट्टीदेव असेंहि म्हणतात. याला पृथ्वीवल्लभ असें उपपद असून विषमसिद्धि असें बिरुद होतें. याच्या राज्याला वेंगीदेश म्हणतात. यानें वेंगीराज शालंकायण याचा पराभव करून आपलें राज्य स्थापिलें. यानें ओरिसापर्यंतचा मुलूख जिंकून राजमहेंद्री येथें राजधानी केली. याचें राज्य सर्व कलिंग देशावर होतें. यानें वेंगीवर स्वारी ६०५ च्या सुमारास केली व ६१० त हा स्वतंत्र झाला असें एके ठिकाणीं म्हटलें आहे तर दुसऱ्या ठिकाणीं ६१५ मध्यें गादीवर आला असें म्हटलें आहे. याच्या आज्ञेवरून याचा दरबारी कवि नानय्याभट्ट यानें महाभारताचें तेलगू भाषांतर केलें होतें. ( २ ) पहिला जयसिंह (६३३ ते ६६३), जयसिंह हा विष्णुवर्धनाचा वडील मुलगा होता. याला सर्वसिद्धि असें बिरुद होतें. एका ताम्रपटावरून यानें ३३ वर्षें राज्य केलें तर दुसऱ्यावरून ३० वर्षें केलें असें दिसतें. ( ३ ) इंद्र ( भट्टारक ) ( ६६३ ). हा जयसिंहाचा धाकटा भाऊ. कोठें कोठें याला इंद्रराज असेंहि म्हटलें आहे. एका राजसंघानें याला गादीवरून काढण्याचा प्रयत्न केला त्यांत अधिराजेंद्र हा मुख्य होता. अधिराजेंद्र बहुधा कलिंगनगरच्या गंगवंशाचा इंद्रवर्मा असावा. इंद्रानें ७ दिवसच राज्य केलें असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. (४) दुसरा विष्णुवर्धन (६६३ ते ६७२), हा इंद्राचा मुलगा होय. याला सर्वलोकाश्रय हें उपपद होतें व विषमसिद्धि हें बिरुद होतें. यानें नऊ वर्षे राज्य केलें. याचे २ शिलालेख नेलोर व मट्टेवाडा येथें आहेत. (५) मंगि युवराज (६७२ ते ६९६), हा दुसऱ्या विष्णुवर्धनाचा मुलगा होता. याला युवराज हा किताब होता. यालाहि सर्वलोकाश्रय व विजयसिद्धि हीं बिरुदें होतीं. याचा एक शिलालेख सांपडला आहे. (६) दुसरा जयसिंह (६९६ ते ७०९), हा मंगीचा सर्वांत वडील मुलगा होता. यानें १३ वर्षें राज्य केलें. (७) कोक्किली, हा दुसरा जयसिंहाचा धाकटा सावत्र भाऊ असून यानें सहा महिनेच राज्य केलें. (८)तिसरा विष्णुवर्धन (७०९ ते ७४६), हा कोक्किलीचा वडील भाऊ होता. हा सावत्र कीं सख्खा याचा स्पष्ट उल्लेख नाहीं. कोक्किलीला गादीवरून काढून टाकून हा गादीवर बसला.(९) पहिला विजयादित्य (७४६ ते ७६४). हा तिसऱ्या विष्णुवर्धनाचा मुलगा होय. याला विजयादित्य भट्टारक असेंहि म्हणत. यानें १८ वर्षें राज्य केलें. (१०) चवथा विष्णुवर्धन ( ७६४ ते ७९९ ),हा पहिल्या विजयादित्याचा मुलगा होता. यानें ३६ वर्षें राज्य केलें. एका शिलालेखांत यास विष्णुराज नामाभिधान दिल्याचें आढळतें. ( ११ ) दुसरा विजयादित्य (७९९–८४३), हा चवथ्या विष्णुवर्धनाचा मुलगा. याला त्रिभुवनांकुश नरेंद्रमृगराज असेंहि म्हणत. यानें ४०, ४४ व ४८ वर्षें राज्य केलें असा निरनिराळ्या ताम्रपत्रांत उल्लेख आहे. यांतील ४४ वर्षें हा उल्लेख विश्वसनीय असावा. हाच या घराण्यांतील पहिला सार्वभौम राजा असावा. एका शिलालेखावरून असें म्हणतात कीं, यानें बारा वर्षांत गंग व रट्ट राजांच्याबरोबर १०८ लढाया केल्या व तितक्यांच देवळेंहि बांधलीं. हे बहुधा मालखेडचे राष्ट्रकूट असावेत. यांचा समकालीन रट्ट राजा तिसरा गोविंद होता. विजयादित्याच्या नंतर रट्ट राजांनीं वेंगीवर स्वारी करून तेथें कांहीं काळ आपला अंमल बसविला होता. याचे दोन शिलालेख उपलब्ध आहेत. ( १२ ) पांचवा विष्णुवर्धन अथवा कालविष्णुवर्धन ( ८४३ ते ८४४ ), हा दुसऱ्या विजयादित्याचा मुलगा होता. याला महाराज ही पदवी लावीत असत. यानें अठरा महिनेच राज्य केलें ( १३ ) तिसरा विजयादित्य उर्फ गुणांक ( ८४४—८८८ ), हा पांचव्या विष्णुवर्धनाचा वडील मुलगा. याला एका ताम्रपत्रांत गुणांक असें म्हटलें आहे. रट्टांच्या राजानें मदतीस बोलाविल्यावरून यानें त्यास मदत देऊन गंगांचा मंगीराज यास लढाईंत ठार मारिलें. तसेंच पुढें मालखेडच्या ( राष्ट्रकूट ) दुसऱ्या कृष्णराजाचा पराभव करून त्याची राजधानीहि यानेंच जाळली. ( १४ ) पहिला भीम ( ८८८ ते ९१८ ), हा मागील राजाचा भाऊ पहिला विक्रमादित्य याचा मुलगा

होता. तिसऱ्या विजयादित्याच्या मृत्यूनंतर रट्ट लोकांनीं वेंगी देशावर स्वारी करून तो देश घेतला. पुढें भीमानें आपलें राज्य त्यांच्यापासून परत जिंकून घेतलें व कृष्ण-राष्ट्रकूटाचा पराभव केला. याचें दुसरें नांव द्रोहार्जुन असें होतें. ( १५ ) चवथा विजयादित्य-कोल्लभिगंड ( ९१८ ), हा पहिल्या भीमाचा मुलगा. याच्या बायकोचें नांव मेलांबा. यानें सहा महिने राज्य केलें. यानें कलिंगांच्या राजांना जिंकलें. ( १६ ) पहिला अम्म ( अप्प? ), सहावा विष्णुवर्धन ( ९१८—९२५ ), हा चवथ्या विजयादित्याचा वडील मुलगा याचें नांव विष्णुवर्धन असें होतें. याच्या कारकीर्दीत राजमहेंद्री शहर चालुक्यांनीं जिंकलें. राष्ट्रकूटांबरोबर याच्या आप्तांनीं याच्याविरुद्ध कट केला होता परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. ( १७ ) पांचवा विजयादित्य ( ९२५ ). हा पहिल्या अम्माचा मुलगा. याचें दुसरें नांव बेट्ट.याला तैलप्पनें गादविरून काढलें. याचा कारभार महिनाभरच झाला.

( १८ ) तालप ( ९२५ ), हा पहिल्या भीमाचा मुलगा जो युद्धमल्ल ( पहिला ) त्याचा पुत्र होय. याच्या नांवाचा उल्लेख तारप, तालप ( तैलप्प ) असा निरनिराळ्या ठिकाणीं आहे. हा पांचव्या विजयादित्याला गादीवरून काढून गादीवर आला. याला विक्रमादित्य ( दुसरा ) यानें गादीवरून काढलें- यानें १ महिनाच कारभार केला. तालप व विक्रमादित्य ( दुसरा ) यांच्या झटापटींत तालप ठार झाला असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. ( १९ ) दुसरा विक्रमादित्य ( ९२५–९२६ ), हा पहिल्या भीमाचा दुसरा मुलगा. यानें तैलप्पाला जिंकून राज्य कमाविलें. यानें ११ महिने राज्य केलें. ( २० ) दुसरा भीम ( ९२६–९२७ ), हा पहिल्या अम्माचा दुसरा मुलगा. यानें दुसऱ्या विक्रमादित्याला जिंकून राज्य मिळविलें. तैलप्पाचा मुलगा दुसरा युद्धमल्ल यानें याची कत्तल करून राज्य घेतलें. यानें ८ महिने कारभार केला. ( २१ ) दुसरा युद्धमल्ल ( ९२७–९३४ ), हा तैलप्पाचा वडील मुलगा. यानें दुसऱ्या भीमाचा पराभव करून राज्य कमाविलें. परंतु याचा पराभव करून तिसऱ्या भीमानें याच्यापासून राज्य घेऊन याला हाकून लावलें. ( २२ ) तिसरा भीम.—सातवा विष्णुवर्धन ( ९३४–९४५ ), हा चवथ्या विजयादित्याचा मुलगा व पहिल्या अम्माचा सावत्र भाऊ. यानें बारा वर्षें राज्य केलें. याच्या राणीचें नांव लोकमहादेवी होतें. यानें राजमय्य, ढळग, ब्रिज्ज व अय्यप यांचा वध केला. राष्ट्रकूट ( पांचवा ) गोविंद याचा या भीमानेंच पराभव केला. ( २३ ) दुसरा अम्म; सहावा विजयादित्य (९४५ते९७०), हा दुसरा भीम याचा धाकटा मुलगा होता. याचें दुसरें नांव सहावा विजयादित्य असें होतें. यावेळीं पांचव्या विजयादित्यापासून चालत आलेला गृहकलह थांबला. कामराज व नायमांबा यांची मुलगी ही याची राणी होय. हा९४५च्या दिसेंबरच्या पांचव्या तारखेला शुक्रवारीं गादीवर बसला. त्यावेळेला तो बारा वर्षांचा होता. ( २४ ) दानार्णव ( ९७०–९७३ ), हा दुसऱ्या अम्माचा वडील सावत्र भाऊ होता. याला घनार्णव असेंहि म्हणत. कांहीं लेखांत दानार्णव यानें तीस वर्षें ( ९७३–१००३ ) राज्य केलें असें आहे. परंतु पुष्कळ लेखांत यानें तीनच वर्षें राज्य केलें व बाकीचीं २७ वर्षें चोळ राजांच्या स्वाऱ्यांच्या अंदाधुंदींत गेलीं व त्यावेळीं वेंगी देशावर कोणीहि राजा नव्हता असें आहे. तसेंच कांहीं लेखावरून असें अनुमान निघतें कीं, सदर अवधींत चोल राजांनीं हा मुलूख जिंकला असावा ( २५ ) शक्तिवर्मा ( १००३–१०१५ ), हा दानार्णवाचा सर्वांत वडील मुलगा होता. याला चालुक्यचंद्र असें म्हणत. अनुपलब्ध माहितीचीं ३० वर्षें संपल्यानंतर हा राज्यावर आला. (२६) विमलादित्य. ( १०१५–१०२२ ), हा शक्तिवर्म्याचा धाकटा भाऊ.याच्या बायकोचें नांव कुंदवा महादेवी होतें. चोल राज राजराजा याची ही कन्या होती. विमलादित्यास विमलार्क असें दुसरें नांव होतें. ( २७ ) राजराज ( पहिला )—आठवा विष्णुबंधन ( १०२२ १०६३ ), हा विमलादित्याचा मुलगा होता. कांहीं लेखांत यानें ४१ वर्षें राज्य केलें असें आहे तर कांहींत ४० वर्षें आहेत. याची राणी राजेन्द्र चोलाची कन्या होती. ही याची मामेबहीण असून तिचें नांव अम्मंगदेवी होतें. सातवा विजयादित्य ( राज प्रतिनिधी १०६३–१०७७ ) हा कुलोत्तुंग देव याचा चुलता होय (पहिला राजराज याचा भाऊ). हा आपल्या पुतण्याच्या हाताखालीं त्याचा प्रतिनिधी होता. ( २८ ) कुलोत्तुंग पहिला (१०६३–१११२), हा पहिला राजराज याचा मुलगा होता व याला पहिला राजेन्द्रचोल असें म्हणत. यानें चोलांचें राज्य जिंकलें (१०६३) व वेंगी प्रांतावर प्रतिनिधी नेमून आपण चोलांचें राज्य पाहूं लागला. याचा पहिला प्रतिनिधी सातवा विजयादित्य ( १०६३–१०७७ ), दुसरा प्रतिनिधि दुसरा राजराज ( १०७७–७८ ) व तिसरा वीरनाथ उर्फ वीरदेव (१०७८ते११०७)होता.कुलोत्तुंगापासून वेंगींचें राज्य हा चोल देशाचा एक प्रांत झाला. कुलोत्तुंगाचा समकालीन पश्चिम चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य होय. कुलोत्तुंगानें आपला मांडलिक कलिंग देशचा राजा याच्यावर खंडणी न दिल्यामुळें १०७१ मध्यें स्वारी केली होती. याची राजधानी यावेळीं गंगापुरी होती. विक्रमांकदेवचरित्र या काव्यावरून असें दिसतें कीं, चोल राज्यांतील अंतःकलहामुळें कुलोत्तुंग देव याला चोल राज्य बळकाविण्यास संधि मिळाली. ( २९ ) विक्रमदेव ( १११२–११२७ ), हा पहिला कुलोत्तुंगदेव याचा मुलगा. यानें १५ वर्षें राज्य केलें. आपल्या भावाप्रमाणें हाहि युवराज असतांना वेंगी देशाचा राजप्रतिनिधि असावा. व त्याचा हा काल वीरदेव यानंतरचा असावा. दुसरा राजराज ( वेंगी राजप्रतिनिधी १०७७–७८ ), पहिल्या कुलोत्तुंगदेवाचा हा दुसरा मुलगा. सातव्या विजयादित्यानंतर

याला वेंगीवर पाठविण्यांत आलें. परंतु एक वर्षानें हा कंटाळून परत आला. वीरदेव उर्फ नववा विष्णुवर्धन वेंगीचा राजप्रतिनिधि (१०७८–११००) हा पहिल्या कुलोत्तुंगाचा तिसरा मुलगा. याचा प्रतिनिधित्वाचा काल खात्रीलायक उपलब्ध नाहीं. याच्या राज्यकारभाराचें ठाणें जननाथ नगरी होतें. ( ३० ) दुसरा कुलोत्तुंगदेव, हा विक्रमदेवाचा मुलगा होता. हा पूर्वचालुक्य वंशांतील शेवटचा पुरुष होय. हा ११२७ त गादीवर आला. यानें ११३२ मध्यें दिलेलें एक ताम्रपत्र उपलब्ध आहे. याच्या वेळीं वारंगळचे गणपती राजे हे या सर्व चालुक्यांचा प्रदेश हळू हळू घशाखालीं उतरीत होते, शेवटीं त्यांनीं स. ११२८ ( डॉ. बर्नेलच्या मतें ) या सुमारास या चालुक्यांचें राज्य खालसा केलें असावें. पुढें हे राजे फार तर मांडलिक म्हणून असावेत.

[ संदर्भग्रंथः—इंडियन ॲंटिक्वेरी, पु. ४, ५, ७, ८, १२, १३ व २०; हुल्ट्झ्—साऊथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स; माबेल डफ–इंडि. क्रॉनॉलजी; बॉंबे गॅझे. पु. १. भा. २; एपि. इंडिका, पु. ६; सेवेल–डिनॅस्टीज ऑफ सदर्न इंडिया ].

## पूर्व चालुक्य घराण्याची वंशावळ.

[ ही वंशावळ, इंडियन ॲंटिक्वेरीच्या तिसऱ्या पुस्तकांत ( पृ. १–१५; ९३–१०४; २६६–२८५ ) या घराण्याची जी माहिती आली आहे तिच्यावरून व सेवेलच्या ' दक्षिण हिंदुस्थानांतील घराणीं ' या पुस्तकांत जी वंशावळ दिली आहे तिच्यावरून तयार केली आहे. हींत नांवांमागें दिलेला अंक गादीवर बसलेल्या राजांचा अनुक्रमांक होय ]

१ विष्णुवर्धन पहिला
- २ जयसिंह पहिला
- ३ इंद्रराज
  - ४ विष्णुवर्धन दुसरा
    - ५ मंगीराज
      - ६ जयसिंह दुसरा
      - ८ विष्णुवर्धन तिसरा
        - ९ विजयादित्य पहिला
          - १० विष्णुवर्धन चवथा
            - ११ विजयादित्य दुसरा
              - १२ विष्णुवर्धन पांचवा
      - ७ कोकिलि (कौकिली)

( विष्णुवर्धन पांचवा पुढें चालू )
- १३ विजयादित्य तिसरा (गुणांक)
- (अनामिक)
  - १५ विजयादित्य चवथा
    - १६ अम्म पहिला (विष्णुवर्धन सहावा)
      - १७ विजयादित्य पांचवा
        - २४ दानार्णव
          - २५ शक्तिवर्मा
          - २६ विमलादित्य
            - २७ राजराज पहिला (विष्णुवर्धन आठवा)
              - २८ कुलोत्तुंग राजेंद्र पहिला
                - २९ विक्रमदेव
                  - ३० कुलोत्तुंग दुसरा
                - राजराज
                - वीरदेव (विष्णुवर्धन नववा)
            - विजयादित्य सातवा
    - २२ भीम तिसरा (विष्णुवर्धन सातवा)
  - १९ विक्रमादित्य दुसरा
- विक्रमादित्य पहिला
  - १४ भीम पहिला
    - युद्धमल्ल पहिला
      - १८ ता(तै)लप
        - २१ युद्धमल्ल
      - २० भीम दुसरा
        - २३ अम्म दुसरा (विजयादित्य सहावा)

प श्चि म चा लु क्य घ रा णें.—ब्रह्मदेवाच्या हातांतील चुळू ( अर्घ्या )पासून चालुक्य घराणें उत्पन्न झालें अशी एक कथा आहे. या घराण्याचा मूळपुरुष जयसिंह पहिला हा होय. या घराण्याची पहिली राजधानी इंदुकांती ही होती. तेथून पहिल्या पुलकेशीनें ती वातापी ( बदामी ) येथें बदलली. जयसिंहास दोन पुत्र होते, वडील बुद्धवर्मा व धाकटा रणराग. पैकीं बुद्धवर्मा यास विजयराज ( विजयवर्मा ) नांवाचा पुत्र होता. हा इ. स. ५७२ च्या सुमारास हयात होता. याच्या वंशाची माहिती मिळत नाहीं. रणरागाचा पुत्र पुलकेशी ( अथव पुलिकेशी ) असून त्यास वल्लभ अशी पदवी होती. हाच खरोखर या बदामीच्या पश्चिम चालुक्य घराण्याचा संस्थापक होय. याला सत्याश्रय, रणविक्रम असेंहि म्हणत. याच्या राणीचें नांव दुर्लभदेवी होतें.

पुलकेशी वल्लभानें कदंब वंशांतील एका शाखेची राजधानी वनवासी ही जिंकल्याबद्दल ऐहोळ येथील शिलालेखांत उल्लेख आहे. त्यानें बदामी ( वातापी ) सुद्धां काबीज केलें. याच शिलालेखांत कीर्तिवर्मा ( पहिला ) याला नळ, मौर्य, कादम्ब यांची " काळरात्र " असें म्हटलें आहे. त्यानें कादम्बांचा पूर्ण पराजय केला असें म्हणतात. कीर्तिवर्मा ( पहिला ) हा पुलकेशीचा वडील पुत्र असून त्यास पृथ्वीवल्लभ म्हणत. ह्याची कारकीर्द इ. स. ५६७ ते ५९७ होती. यानें अंग, वंग, कलिंग, मगध, केरळ, मद्रक, गंग, मूषक वगैरे देशांवर स्वाऱ्या केल्या. याच्या नंतर याचा धाकटा भाऊ मंगलीश गादीवर आला. यानें कच्छूरीस ( कलचुरीस ) जिंकल्याबद्दल त्याच शिलालेखांत उल्लेख आहे. त्यानें आपल्या मुलास ( सत्याश्रय इंद्रवर्म्यास ) गादी मिळवून देण्याचा प्रयत्न केला, त्यांत हा मारला गेला. यानें रेवती द्वीप, कोंकणचा कांहीं भाग हे प्रदेश व मातंग लोक, व चेट्टीचा शंकरगण याचा पुत्र बुद्ध इत्यादिकांस जिंकलें. यास मंगलीश्वर, मंगलराज, रणविक्रांत अशीं नांवें होतीं. यानें स. ५९७ ते ६१० पर्यंत राज्य केलें. याच्या मागून पहिला सत्याश्रय गादीवर बसला. या घराण्यांत सत्याश्रय ( पहिला ) हा फार बलिष्ठ राजा होऊन गेला. हा पहिल्या कीर्तिवर्म्याचा पुत्र असून त्यास वल्लभेंद्र, पृथ्वीवल्लभ किंवा दुसरा पुलकेशी म्हणत. हा या वंशांतील पहिला सार्वभौम राजा होय. याची कारकीर्द स. ६१०–६४२ पर्यंत होती. याच्या वंशजांस यांचेच नांव पुष्कळदां कवींनीं दिलेलें आहे. यानें कनोजचा राजा हर्षवर्धन यांस व उत्तरेकडील एका गोविंद नांवाच्या राजास जिंकलें ( हा बहुतेक कोणी राष्ट्रकूट वंशांतील राजा असावा असें फ्लीट याचें मत आहे ). पुष्कळशा शिलालेखांतून यानें कोंकणचे मौर्य, लाट, कदंब, मालव, गुर्जर इत्यादि राजांस जिंकल्याचा उल्लेख आहे. तसेंच यानें पिष्टपुर (पिठापुरम्) व पुरी हस्तगत करून महाराष्ट्र व वेंगी देश काबीज केला. कलिंग व कोसल येथील राजे त्यास भीत असत. तसेंच त्यानें चोल, पांडय व केरळ लोकांवर स्वाऱ्या केल्या; इत्यादि गोष्टी शिलालेखांतून आढळतात. म्हैसूरकर गंग व अलुप हे त्याचे दोस्त होते. एकंदरींत तो फार बलाढय असून त्यानें बराचसा मुलुख जिंकला असावा. नंतर यानें परमेश्वर बिरुद धारण केलें. पल्लव (पहिला महेंद्र) याचा यानें पराभव केला.ह्युएनत्संग हा याच्या राज्याबद्दल व राज्यांतील चालीरीति व वैभव यांच्याबद्दल फार सुरस वर्णन देतो. तो त्यास पुलोकिशे म्हणतो. फर्ग्युसन असें म्हणतो कीं या वेळीं इराणच्या गादीवर असलेला खुश्रु ( दुसरा ) व पुलकेशी दुसरा यांच्यामध्यें नजरनजराणे जात येत असत ( ६२५ ). एका शिलालेखांत सत्याश्रयास अंबेरा नांवाची मुलगी होती असा उल्लेख आहे. याच्याच धाकट्या भावानें (कुब्जविष्णुवर्धनानें)वेंगीस पूर्वचालुक्य घराणें स्थापन केलें. याचा वडील पुत्र आदित्यवर्मा यानें कृष्णतुंगा दुआबांत राज्य केलें होतें. दुसरा पुत्र चंद्रादित्य यानें सावंतवाडीस राज्य केलें. पुलकेशीचा धाकटा भाऊ जयसिंह यानें नाशिक येथें राज्य केलें व ध्रुवइंद्रवर्म्यानें रेवतीद्वीपास राज्य केलें. पुलकेशीच्यावेळीं रविकीर्ति नांवाचा जैन कवि होता. यानेंच पुलकेशीचा ऐहोळ शिलालेख लिहिला आहे. त्यांत तो आपल्याला कालिदास व भारवि यांच्या बरोबरीचा मानतो. सत्याश्रयानंतर पल्लव, पांड्य, चोल व केरळ यांनीं बंड केलें. त्यांत कांहीं काळपर्यंत त्यांनां जय मिळाला. पण विक्रमादित्य ( पहिला ) यानें त्यांचा पराजय करून व कांची घेऊन आपल्या पूर्वजांची गादी मिळविली. हा दुसऱ्या पुलकेशीचा तिसरा पुत्र होय. यानें सन ६५५ ते ६८१ पर्यंत राज्य केलें. याला सत्याश्रयरण रसिक ही पदवी होती. सेन्द्रकांचा राजा याचा मांडलिक असल्याबद्दल एका शिलालेखांत उल्लेख आहे. याचा पुत्र युद्धमल्ल(पहिला) उर्फ विनयादित्य ( सत्याश्रय) हा बापामागून गादीवर आला. यानें प्रचंड सैन्य घेऊन पल्लवांचें राज्य जिंकलें. विनयादित्य हा सर्व दक्षिण देशाचा राजा असून यानें कळंभ्र (कदंब?), केरळ, हैहय, पल्लव, विल, मालव, चोल, पाण्ड्य इत्यादि राजे जिंकल्याचा उल्लेख आढळतो. तसेंच कावेर, सिंहल व पारसीक या राजांनां मांडलिक बनविल्याचें तो सांगतो. कदाचित हें सर्व खरें नसलें तरी तो बलाढय राजा होऊन गेला एवढें खरें आहे. यानें इ. स. ६८१–६९६ पर्यंत सार्वभौम राज्य केलें.

विनयादित्याचा पुत्र विजयादित्य याची विशेष माहिती मिळत नाहीं. त्यावरून त्याची कारकीर्द ( ६९६–७३३ ) साधारण शांततेंतच गेली असावी. यानें पट्टदकल येथें एक शिवालय बांधलें. याचा वडील पुत्र विक्रमादित्य (दुसरा ) हा आपण पल्लव राजास मारून कांचीमध्यें प्रवेश केला, असें म्हणतो व त्याप्रमाणें एका शिलालेखांत त्यानें कांची येथील राजास तीन वेळ जिंकलें असा उल्लेखहि आढळतो. यानें पांड्य, चोळ, केरळ व कदंब यांनां जिंकलें होते. याच्या म्हणण्याप्रमाणें यानें कांची येथलि राजा नन्दिपोतवर्मा यास ठार मारून कांचींत प्रवेश केला होता. तेथें त्यास पूर्वींचा राजा नरसिंह पोतवर्मा यानें केलेलीं पुष्कळ कारागिरीचीं कामें आढळलीं, असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. याच्या राणीचें नांव लोकमहादेवी असून यानें इ. स. ७३३ते ७४७ पर्यंत राज्य केलें. नंतर याचा पुत्र कीर्तिवर्मा( दुसरा ) हा गादीवर आला. यानें पल्लवांवर जय मिळविल्याचा उल्लेख आहे. पण लवकरच याच्या राज्यांत बंडाळी होऊन व बाजूच्या राष्ट्रकूटादि राजांनीं स्वारी करून त्याचें राज्य डबघाईस आणलें. यानें स. ७४७–७५७ पर्यंत राज्य केलें. विक्रमादित्य ( दुसरा ) गादीवर असतां राष्ट्रकूट, कलचुरी, यादव वगैरेंनीं या राज्यास पुष्कळ उपद्रव दिल्यामुळें यांची सत्ता अगदीं डळमळीत झाली होती. ती पुढें तैलप ( दुसरा ) यानें पुन्हां प्रस्थापित केली. या राजांबद्दल बिल्हणकृत विक्रमांकदेवचरित या काव्यांत पुष्कळ माहिती दिली आहे.

कीर्तिवर्म्याच्या मागून पहिला भीम, तिसरा कीर्तिमान, पहिला तैल, तिसरा विक्रमादित्य,दुसरा भीम, पहिला अय्यण व चवथा विक्रमादित्य हे गादीवर बसले. या विक्रमादित्याचा मुलगा तैल ( दुसरा ) यानें कक्कराष्ट्रकूटापासून पुन्हां आपलें राज्य मिळविल्यामुळें पश्चिम चालुक्य घराण्याची सत्ता साधारणतः दोन शतकांनीं पुन्हां प्रस्थापित झाली. यालाहि विक्रमादित्य पदवी होती व पहिला आहवमल्ल असेंहि यास म्हणत. याला कल्याणशाखेचा पहिला पुरुष असें फ्लीट म्हणतो व याची कारकीर्द इ. स.९७३-९९७ अशी तो देतो. यानें माळव्याच्या मुंज राजाला ठार मारिलें यानें कक्कराष्ट्रकूटाची मुलगी जाकलदेवी इच्याशीं लग्न लाविलें. व कल्याण येथें पुन्हां आपलें राज्य स्थापिलें ( शके८९६श्रीमुखसंवत्सर). यावेळीं याच्या हाताखालीं चेदी, चोल, हानगल, बेळगोळ, कुंतल वगैरे प्रांत होते. याचा पुत्र सत्याश्रय दुसरा व याची राणी अंबिकादेवी होय. यानें स. ९९७–१००८ पर्यंत राज्य केलें. याच्या मागून याचा पुतण्या विभुविक्रम (विक्रमादित्य पांचवा उर्फ त्रिभुवनमल्ल पहिला ) यानें १००८--१०१८ पर्यंत राज्य केलें व त्याच्यामागून त्याचा भाऊ जगदेकमल्ल पहिला उर्फ जयसिंह (तिसरा) हा गादीवर आला.यानें माळवा(भोजराज),चेर (राजेंद्र)व चोल या राजांस जिंकल्याचा व समकोंकण घेतल्याचा उल्लेख आढळतो. यानें १०१८--१०४२ पर्यंत राज्य केलें. याच्या बायकोचें नांव सुग्गलदेवी. याचा मुलगा सोमेश्वर(पहिला)किंवा आहवमल्ल (दुसरा ) उर्फ पहिला त्रैलोक्यमल्ल. यानें चोल राजाचा एकदां पराभव केला, तेव्हां चोल राजा कुलोत्तुंग ( पहिला ) यानें याच्यावर स्वारी करून याचाहि पराभव केला.

बिल्हण म्हणतो कीं,सोमेश्वर यानें दोन वेळां चोल राजाचा पराभव केला. यानें भोजाचा पराभव करून धार घेतलें. याच कारकीर्दींत कदम्ब वगैरे लोकांनीं स्वतंत्र होण्याचा उपक्रम सुरू केला. बिल्हणानें याच्या पराक्रमाचें फार वर्णन केलें आहे. त्यानें कांची, गौड, बंगाल, कामरूप वगैरे देशांवर स्वाऱ्या केल्या व कल्याण ही राजधानी केली. मैळालदेवी(त्याची राणी) ही बनवासी प्रांतावर सन१०५०च्या सुमारास राज्य करीत होती व दुसरी राणी केतलदेवी ही १०५४ त पोन्नवाड जिल्ह्यावर राज्य करीत होती. यानें बच्चलदेवी, चन्दलकब्बे ( चन्द्रिकादेवी ) व मैळालदेवी व केतलदेवी या चार राण्या केल्या होत्या. हा इ. स. १०४२ ते १०६८ पर्यंत राज्यावर होता. याच्या मागून याचा पुत्र सोमेश्वर ( दुसरा ) हा राजा झाला. यानें कादम्ब, अलुप व चोल यांवर वचक बसविला. यास सोयीदेव उर्फ भुवनैकमल्ल असें म्हणत. याची राणी चोलकन्या होती. यानेंच चोल राजास गादीवर बसण्यास मदत केली होती. याची कारकीर्द स. १०६९ ते १०७६ पर्यंत होती. नंतर याचा भाऊ विक्रमादित्य ( सहावा ) राजा झाला. यानें कदंबांचा कांहीं मुलूख घेतला. यास परमादिकालि विक्रम उर्फ दुसरा त्रिभुवनमल्ल विक्रमांक म्हणत. यानें १०७६ ते ११२६ पर्यंत राज्य केलें. यानें ( चालुक्य ) विक्रमशक फाल्गुन शुद्ध पंचमी शके ९९७ ( तारीख १४ फेब्रु. इ. स. १०७६ ) रोजीं चालू केला. यानें आपली मुलगी मैळलदेवी ही जयकेशी कदम्ब राजास देऊन आपण चोल राजकन्येशीं विवाह केला. यानें राज्यारोहण केल्यावर लगेच वरील आपला शक सुरू केला. पण त्याच्या मृत्यूनंतर तो नाहींसा झाला. यानें पुष्कळ लढाया मारल्या. याला आपल्या राज्याकरितां शत्रूप्रमाणें आपल्या भाऊबंदाबरोबरहि नेहमीं युद्ध करावें लागलें. द्राविड, पांड्य, कोंकण होयसळ या राजांचा यानें पराभव केला. याची राणी मलयमतीदेवी ही केरेयूर प्रांतावर १०९५ च्या सुमारास राज्य करीत होती व दुसरी राणी लक्ष्मीदेवी ही धर्मपुरास राज्य करीत होती. हा फार बलाढ्य असून पुष्कळशा शिलालेखांवरून याच्या राज्याचा विस्तार अजमावता येतो. याच्या नंतरच्या राजांनीं विशेष कांहीं केलें नाहीं. त्यांच्या सत्तेस येथून उतरती कळा लागली. या विक्रमादित्याचा मुलगा सोमेश्वर ( तिसरा ) हा त्याच्या नंतर गादीवर आला. यानें बिज्जल व कलचुरि यांनीं डळमळित केलेली चालुक्यसत्ता तात्पुरती पुन्हां प्रस्थापित केली. यानें आंध्र, द्रविड, मगध, नेपाळ येथील राजांवर स्वारी केली व मानसोल्लास ( अभिलषितार्थ चिंतामणी ) ग्रंथ रचिला ( ११२७ ). पुढें कालचुरी व गणपति या घराण्यांची वाढती सत्ता व म्हैसूरच्या होयसळ बल्लाळ राजाचा उदय यामुळें या चालुक्य सत्तेस यावेळीं ग्रहण लागलें.

सोमेश्वरास भूलोकमल्ल असें म्हणत. यानें ११२६–११३८ पर्यंत राज्य केलें. नंतर त्याचा पुत्र जगदेकमल्ल(११३८–५०) व त्याचा भाऊ तिसरा तैल ( तिसरा त्रैलोक्यमल्ल ) यानें ( ११५०-६२ ) राज्य केलें. याचा सेनापति बिज्जण ( बिज्जल ) कलचुरी यानें याला ११५७ पर्यंत कैदेंत ठेविलें होतें. हा केव्हां मेला तें समजत नाहीं. स. ११६३च्या पूर्वी बहुधा तो मेला असावा. त्यानें कल्याण सोडून अण्णेगिरी ही राजधानी केली व ११६२ त सार्वभौम सत्ता स्थापिली. याचा पराभव काकतीय प्रोल राजानें केला होता पुढें याचा पुत्र सोमेश्वर चवथा ( त्रिभुवनमल्ल तिसरा, वीर सोमेश्वर ) यानें ११६३ ते ११८९ पर्यंत राज्य केलें. याच्या वेळीं हें पश्चिम चालुक्य घराणें नामशेष झालें. हा या घराण्याचा शेवटचा राजा होय. याच्या उत्तरेकडील राज्यांत वऱ्हाड व माळवा हीं सुद्धां येत असत. हे निरनिराळ्या प्रांतांवर आपले राजपुत्र, राण्या व इतर नातलग यांनां राजप्रतिनिधी नेमीत असत. अशा प्रतिनिधींचीं नांवें निरनिराळ्या शिलालेखांतून, व ताम्रपटांतून पुष्कळ आलीं आहेत. शेवटीं यांच्या उत्तरेकडील राज्य देवगिरीचे यादव व दक्षिणेकडील राज्य द्वारसमुद्राचे होयसल यांनीं जिंकून घेतलें.

[ संदर्भग्रंथः—इंडियत अँटिक्वेरी. पु. ४,५,६,७,८,१०, २१व३९; फ्लीट–डिनॅस्टीज ऑफ दि कॅनरीज डिस्ट्रिक्टस्; राईस—इन्स्क्रिप्शन्स; बॉम्बे ग्याझे. पु. १, भा. २; माबेल डफ—इंडियन क्रॅनॉलॉजी; जर्नल रा. ए. सोसायटी पु. ४. ११; अमरावती डिस्ट्रिक्ट ग्याझे; सेवेल—डिनॅस्टीज ऑफ सदर्न इंडिया. ].

## पश्चिम चालुक्य घराण्याची वंशावळ

[ शिलालेख, ताम्रपट व फ्लीट ( दक्षिण हिंदुस्थानांतील घराणीं ) यांनीं उद्धृत केलेल्या वंशावळीवरून ही वंशावळ तयार केली आहे ]

जयसिंह पहिला

- बुद्धवर्मा ( गुजराथशाखा )
  - विजयराज ( सन ५७२ )
- रणराग
  - १ पुलकेशी पहिला(५५०)
    - २ कीर्तिवर्मा पहिला ( सन ५६७–५९७ )
      - ४ सत्याश्रय पहिला उर्फ पुलकेशी दुसरा ( ६१०–६४२ )
        - आदित्य वर्मा
        - चंद्रादित्य × विजयमहादेवी (६५५–६५९)
        - ५ विक्रमादित्य पहिला (६५५–६८१)
          - ६ विनयादित्य (युद्धमल्ल)पहिला (६८१–६९६)
            - ७ विजयादित्य(६९६–७३३)
              - ८ विक्रमादित्य दुसरा (७३३–७४७)
                - ९ कीर्तिवर्मा दुसरा (७४७–७५७)
              - भीम पहिला
                - कीर्तिवर्मा तिसरा
                  - तैल पहिला
                    - विक्रमादित्य तिसरा
                      - अय्यण पहिला ( ९२० )
        - अंबेरा(मुलगी)
        - जयसिंह (गुजराथ शाखा)
      - जयसिंह दुसरा (गुजराथ शाखा)
        - नागवर्धन
      - कुब्जविष्णुवर्धन(पूर्व चालुक्यवंश संस्थापक)
    - ३ मंगलीश ( सन ५९७–६१० )
      - इंद्रवर्मा (सन६१०)

( अय्यण पहिला पुढें चालू )

- १ विक्रमादित्य चवथा
  - २ तैल दुसरा (९७३–९९७)
    - ३ सत्याश्रय दुसरा (९९७–१००८)
    - दशवर्मा×भाग्यवती
      - ४ विक्रमादित्य पांचवा ( १००८–१०१८ )
      - अय्यण दुसरा
      - अक्कादेवी× कदंबराज (१०२२–१०४७)
      - ५ जयसिंह तिसरा (१०१८–४२)
        - ६ सोमेश्वर पहिला (१०४२–१०६८)
          - ७ सोमेश्वर दुसरा (१०६९–१०७६)
          - ८ विक्रमादित्य सहावा (१०७६–११२६)
            - जयकर्ण
            - ९ सोमेश्वर तिसरा (११२६–११३८)
              - १० जगदेकमल्ल दुसरा ( ११३८–११५० )
              - ११ तैल तिसरा ( ११५०–११६२ )
                - १२ सोमेश्वर चवथा (११६३–११८९)
            - मैळलादेवी
          - जयसिंह चवथा बनवासीचा प्रतिनिधि (१०७९–१०८१)

कन्नड कवींपैकीं रन्न नांवाचा एक प्रख्यात कवि, पश्चिम चालुक्य दुसरा तैल याच्या पदरीं होता. यानें स. ९८२ व स. ९९३ मध्यें गदायुद्ध व अजितपुराण हे ग्रंथ रचिले. हा जैनधर्मी वैश्य जातीचा होता. यानें या चालुक्य घराण्याची जी वंशावळ दिली आहे तींत व वर दिलेल्या वंशावळींत थोडासा फरक पडतो. यानें दिलेली वंशावळ अशी:[ इंडि. अँटि. पु. ३९ ].

सत्याश्रय विष्णुवर्धन

- जयसिंह
  - पुलकेशी
    - कीर्तिवर्मा पहिला
      - सत्याश्रय दुसरा
        - आदित्यवर्मा
    - मंगलार्णव

(आदित्यवर्मा पुढें चालू)
|
विक्रमादित्य पहिला
|
दुर्धरमल्ल
|
विजयादित्य
|
विक्रमादित्य कोंकणी — कीर्तिवर्मा

भीम पहिला
|
कीर्तिवर्मा दुसरा
|
तैलप पहिला
|
भीम (कुंदीय) दुसरा
|
विक्रमादित्य दुसरा
|
अय्यण रणरंगमल्ल
|
विक्रमादित्य (तिसरा उत्तुंगमल्ल)
|
अहवमल्ल नुर्मदी (तैलप दुसरा)

प श्चि म चा लु क्य श क.—पश्चिम चालुक्य राजा साहवा विक्रमादित्य.यानें शालिवाहनशकाऐवजीं आपला एक शक प्रचारांत आणला. याला त्याच्या नांवावरून चालुक्य-विक्रमकाल व चालुक्यविक्रमवर्ष म्हणत असत. या शकाचें पहिलें वर्ष म्हणजे त्याच्या कारकीर्दीचें ( राज्यरोहणाचें ) पहिलें वर्ष होय.अनल अथवा नल संवत्सर, शालिवाहन शक ९९७ म्हणजे इ. स. १०७५—७६ होय. परंतु मागें दर्शविल्याप्रमाणें हा शक फाल्गुन शुद्ध पंचमी शालीवाहन श. ९९७ ( तारीख १४ फेब्रुवारी इसवी स. १०७६ ) रोजीं सुरू झाला असें दिसतें. ही तारीख माबेल डफनें शिलालेखाच्या आधारें दिली आहे. इलियटन यानें हिरेमुद्दनूर, कुर्तकोटी, अरलेश्वर, लक्ष्मेश्वर, नरेगळ वगैरे ठिकाणच्या शिलालेखांवरून या शकाच्या आरंभाचें ( १०७५ इसवी सनाचें ) वर्ष दिलें आहे. परंतु हें वर्ष याप्रमाणें एक येत नसून निरनिराळें येतें. मात्र त्यांत फारसा फरक न येतां एखाद्या वर्षाचेंच अंतर येतें [ इंडि. अँटि. पु. २२ ].

ला ट दे शा चें चा लु क्य घ रा णें.—या घराण्याची स्थापना बारप्प यानें इ. स. ९७५ च्या सुमारास केली. हा अनहिलवाडच्या चालुक्य घराण्याचा मूळपुरुष मूलराज ( सोळंखी ) याचा नातेवाईक असावा. फोर्बस म्हणतो कीं हा पश्चिम चालुक्य दुसरा तैलप याचा सेनापति होता; परंतु संस्कृत संकीर्तनांत याला कान्यकुब्ज येथील राजाचा सेनापति म्हटलें आहे; यानें राष्ट्रकूटाशीं सोयरीक केली होती. यानें मूळराज( सोळंखी )याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला; तेव्हां मुळराज हा कंथकोटकडे पळून गेला. परंतु कांहीं दिवसांनीं त्यानें मोठया सैन्यानिशीं बारप्पावर स्वारी केली. या लढाईंत बारप्प हा ठार झाला. याच्या नंतर गोंगीराज, कीर्तिराज, वत्सराज व त्रिलोचनपाल हे राजे लाट देशावर राज्य करीत होते. त्रिलोचनपाल इ. स. १०५१ त हयात होता [ माबेल डफ; रासमाला ].

पि ठा पु र म् चें चा लु क्य घ रा णें.—मद्रास इलाख्यांतील पिठापुरम् येथें एक चालुक्य घराणें नांदत होतें. हे स्वतःला वेंगीच्या पूर्वचालुक्यांतील पहिला विजयादित्य बेट्ट याचे वंशज मानीत असत. यांचा पहिला राजा विजयादित्य नांवाचा होता. या वंशांत मल्लपदेव नांवाचा एक शूर राजा इ. स. १२०२ मध्यें होऊन गेला [ माबेल डफ ].

गु ज रा थें ती ल ती न चा लु क्य घ रा णीं.—फ्लीटच्या मतें गुजराथेंत चालुक्यांच्या तीन शाखा राज्य करीत होत्या. पहिलींत ( जयसिंह,त्याचा पुत्र ) बुद्धवर्मा व (नातु) विजयराज हे झाले. पहिल्या कीर्तिवर्म्याचा पुत्र जयसिंह धराश्रय यानें दुसरी शाखा स्थापन केली. त्याचा पुत्र नागवर्धन नांवाचा होता. तिसऱ्या शाखेचा मूळपुरुष जयसिंह धाराश्रय दुसरा हा होय. हा दुसऱ्या पुलकेशीचा मुलगा होता. यांच्या वंशावळी मुख्य वंशावळींतील ( पश्चिम चालुक्यांची वंशावळ) मूळ पुरुष जो पहिला जयसिंह त्याच्यापासून खालीं देतों.

पहिली शाखाः—
जयसिंह पहिला
|
बुद्धवर्मा
|
विजयराज ( ५७२ )

दुसरी शाखाः—
जयसिंह पहिला
|
रणराग
|
पुलकेशी पहिला
|
कीर्तिवर्मा पहिला
|
जयसिंह धाराश्रय
|
नागवर्धन

तिसरी शाखाः—
जयसिंह पहिला
|
रणराग
|
पुलकेशी

[ संदर्भग्रंथ:—इंडियन अँटिक्वेरी. पु. ४,५,६,७,८,१०, २१व३९; फ्लीट–डिनॅस्टीज ऑफ दि कॅनरीज डिस्ट्रिक्टस्; राईस—इन्स्क्रिप्शन्स; बॉम्बे ग्याझे. पु. १, भा. २; माबेल डफ—इंडियन क्रॅनॉलॉजी; जर्नल रा. ए. सोसायटी पु. ४. ११; अमरावती डिस्ट्रिक्ट ग्याझे; सेवेल—डिनॅस्टीज ऑफ सदर्न इंडिया. ].

## पश्चिम चालुक्य घराण्याची वंशावळ

[ शिलालेख, ताम्रपट व फ्लीट ( दक्षिण हिंदुस्थानांतील घराणीं ) यांनीं उद्धृत केलेल्या वंशावळीवरून ही वंशावळ तयार केली आहे ]

- जयसिंह पहिला
  - बुद्धवर्मा ( गुजराथशाखा )
    - विजयराज ( सन ५७२ )
  - रणराग
    - १ पुलकेशी पहिला(५५०)
      - २ कीर्तिवर्मा पहिला ( सन ५६७–५९७ )
        - ४ सत्याश्रय पहिला उर्फ पुलकेशी दुसरा ( ६१०–६४२ )
          - आदित्य वर्मा
          - चंद्रादित्य × विजयमहादेवी (६५५–६५९)
          - ५ विक्रमादित्य पहिला (६५५–६८१)
            - ६ विनयादित्य (युद्धमल्ल)पहिला (६८१–६९६)
              - ७ विजयादित्य(६९६–७३३)
                - ८ विक्रमादित्य दुसरा (७३३–७४७)
                  - ९ कीर्तिवर्मा दुसरा (७४७–७५७)
                - भीम पहिला
                  - कीर्तिवर्मा तिसरा
                    - तैल पहिला
                      - विक्रमादित्य तिसरा
                        - अय्यण पहिला ( ९२० )
          - अंबेरा(मुलगी)
          - जयसिंह (गुजराथ शाखा)
        - जयसिंह दुसरा (गुजराथ शाखा)
          - नागवर्धन
        - कुब्जविष्णुवर्धन(पूर्व चालुक्यवंश संस्थापक)
      - ३ मंगलीश ( सन ५९७–६१० )
        - इंद्रवर्मा (सन६१०)

( अय्यण पहिला पुढें चालू )

- १ विक्रमादित्य चवथा
  - २ तैल दुसरा (९७३–९९७)
    - ३ सत्याश्रय दुसरा (९९७–१००८)
    - दशवर्मा×भाग्यवती
      - ४ विक्रमादित्य पांचवा ( १००८–१०१८ )
      - अय्यण दुसरा
      - अक्कादेवी× कदंबराज (१०२२–१०४७)
      - ५ जयसिंह तिसरा (१०१८–४२)
        - ६ सोमेश्वर पहिला (१०४२–१०६८)
          - ७ सोमेश्वर दुसरा (१०६९–१०७६)
          - ८ विक्रमादित्य सहावा (१०७६–११२६)
            - जयकर्ण
            - ९ सोमेश्वर तिसरा (११२६–११३८)
              - १० जगदेकमल्ल दुसरा ( ११३८–११५० )
              - ११ तैल तिसरा ( ११५०–११६२ )
                - १२ सोमेश्वर चवथा (११६३–११८९)
            - मैळलादेवी
          - जयसिंह चवथा बनवासीचा प्रतिनिधि (१०७९–१०८१)

कन्नड कवींपैकीं रन्न नांवाचा एक प्रख्यात कवि, पश्चिम चालुक्य दुसरा तैल याच्या पदरीं होता. यानें स. ९८२ व स. ९९३ मध्यें गदायुद्ध व अजितपुराण हे ग्रंथ रचिले. हा जैनधर्मी वैश्य जातीचा होता. यानें या चालुक्य घराण्याची जी वंशावळ दिली आहे तींत व वर दिलेल्या वंशावळींत थोडासा फरक पडतो. यानें दिलेली वंशावळ अशी:[ इंडि. अँटि. पु. ३९ ].

- सत्याश्रय विष्णुवर्धन
  - जयसिंह
    - पुलकेशी
      - कीर्तिवर्मा पहिला
        - सत्याश्रय दुसरा
          - आदित्यवर्मा
      - मंगलार्णव

(आदित्यवर्मा पुढें चालू)
|
विक्रमादित्य पहिला
|
दुर्धरमल्ल
|
विजयादित्य
|
विक्रमादित्य कोंकणी — कीर्तिवर्मा

भीम पहिला
|
कीर्तिवर्मा दुसरा
|
तैलप पहिला
|
भीम (कुंदीय) दुसरा
|
विक्रमादित्य दुसरा
|
अय्यण रणरंगमल्ल
|
विक्रमादित्य (तिसरा उत्तुंगमल्ल)
|
अहवमल्ल नुमेदी (तैलप दुसरा)

**प श्चि म चा लु क्य श क.**—पश्चिम चालुक्य राजा साहवा विक्रमादित्य.यानें शालिवाहनशकाऐवजीं आपला एक शक प्रचारांत आणला. याला त्याच्या नांवावरून चालुक्य-विक्रमकाल व चालुक्यविक्रमवर्ष म्हणत असत. या शकाचें पहिलें वर्ष म्हणजे त्याच्या कारकीर्दीचें ( राज्यरोहणाचें ) पहिलें वर्ष होय.अनल अथवा नल संवत्सर, शालिवाहन शक ९९७ म्हणजे इ. स. १०७५—७६ होय. परंतु मागें दर्शविल्याप्रमाणें हा शक फाल्गुन शुद्ध पंचमी शालीवाहन श. ९९७ ( तारीख १४ फेब्रुवारी इसवी स. १०७६ ) रोजीं सुरू झाला असें दिसतें. ही तारीख माबेल डफनें शिलालेखाच्या आधारें दिली आहे. इलियटन यानें हिरेमुद्दूर, कुर्तकोटी, अरलेश्वर, लक्ष्मेश्वर, नरेगळ वगैरे ठिकाणच्या शिलालेखांवरून या शकाच्या आरंभाचें ( १०७५ इसवी सनाचें ) वर्ष दिलें आहे. परंतु हें वर्ष याप्रमाणें एक येत नसून निरनिराळें येतें. मात्र त्यांत फारसा फरक न येतां एखाद्या वर्षाचेंच अंतर येतें [ इंडि. अँटि. पु. २२ ].

**ला ट दे शा चें चा लु क्य घ रा णें.**—या घराण्याची स्थापना बारप्प यानें इ. स. ९७५ च्या सुमारास केली. हा अनहिलवाडच्या चालुक्य घराण्याचा मूळपुरुष मूलराज ( सोळंखी ) याचा नातेवाईक असावा. फोर्बस म्हणतो कीं हा पश्चिम चालुक्य दुसरा तैलप याचा सेनापति होता; परंतु संस्कृत संकीर्तनांत याला कान्यकुब्ज येथील राजाचा सेनापति म्हटलें आहे; यानें राष्ट्रकूटाशीं सोयरीक केली होती. यानें मूळराज( सोळंखी )याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला; तेव्हां मुळराज हा कंथकोटकडे पळून गेला. परंतु कांहीं दिवसांनीं त्यानें मोठया सैन्यानिशीं बारप्पावर स्वारी केली. या लढाईंत बारप्प हा ठार झाला. याच्या नंतर गोंगीराज, कीर्तिराज, वत्सराज व त्रिलोचनपाल हे राजे लाट देशावर राज्य करीत होते. त्रिलोचनपाल इ. स. १०५१ त हयात होता [ माबेल डफ; रासमाला ].

**पि ठा पु र म् चें चा लु क्य घ रा णें.**—मद्रास इलाख्यांतील पिठापुरम् येथें एक चालुक्य घराणें नांदत होतें. हें स्वतःला वेंगीच्या पूर्वचालुक्यांतील पहिला विजयादित्य बेट्ट याचे वंशज मानीत असत. यांचा पहिला राजा विजयादित्य नांवाचा होता. या वंशांत मल्लपदेव नांवाचा एक शूर राजा इ. स. १२०२ मध्यें होऊन गेला [ माबेल डफ ].

**गु ज रा थें ती ल ती न चा लु क्य घ रा णीं.**—फ्लीटच्या मतें गुजराथेंत चालुक्यांच्या तीन शाखा राज्य करीत होत्या. पहिलींत ( जयसिंह,त्याचा पुत्र ) बुद्धवर्मा व (नातु) विजयराज हे झाले. पहिल्या कीर्तिवर्म्याचा पुत्र जयसिंह धराश्रय यानें दुसरी शाखा स्थापन केली. त्याचा पुत्र नागवर्धन नांवाचा होता. तिसऱ्या शाखेचा मूळपुरुष जयसिंह धाराश्रय दुसरा हा होय. हा दुसऱ्या पुलकेशीचा मुलगा होता. यांच्या वंशावळी मुख्य वंशावळींतील ( पश्चिम चालुक्यांची वंशावळ) मूळ पुरुष जो पहिला जयसिंह त्याच्यापासून खालीं देतों.

पहिली शाखाः—

जयसिंह पहिला
|
बुद्धवर्मा
|
विजयराज ( ५७२ )

दुसरी शाखाः—

जयसिंह पहिला
|
रणराग
|
पुलकेशी पहिला
|
कीर्तिवर्मा पहिला
|
जयसिंह धाराश्रय
|
नागवर्धन

तिसरी शाखाः—

जयसिंह पहिला
|
रणराग
|
पुलकेशी

(पुलकेशी पुढें चालू)
|
कीर्तिवर्मा पहिला
|
पुलकेशी दुसरा
|
जयसिंहधराश्रय
|
शिलादित्यधराश्रय

तिसऱ्या घराण्यांतील शिलादित्य धराश्रय हा इ. स. ६७१ मध्यें आपल्या बापाच्या राजवटींत युवराज असून एका प्रांताचा सुभेदार होता. याच्याच वंशांत मंगलराज हा राजा स. ७००च्या सुमारास झाला.त्याच्यानंतर त्याचा धाकटा भाऊ जनाश्रय पुलकेशीवल्लभ हा गादीवर बसला. ताजीक (अरब) या लोकांनीं या सुमारास सिंध, काठेवाड वगैरे देशांत स्वाऱ्या केल्या होत्या. त्यानंतर ते नवसरी ( गुजराथ )वर स्वारी करून गेले; त्यावेळीं या पुलकेशीनें त्यांचा पराभव करून त्यांनां हांकलून लाविलें (७३९). [ माबेल डफ; रासमाला ]

अनहिलवाडचेचालुक्य उर्फ सोळंखी घराणें.— या घराण्याचा मूळपुरुष मूळराज म्हणून होता. या चालुक्य घराण्यास सोळंखी असेंहि म्हणतात. मूळराज हा कल्याणच्या एका चालुक्यराजाचा पुत्र होता. यानें गुजराथ इ. स. ९४१ त जिंकलें व अनहिलवाडच्या चावडा घराण्याचा पाडाव करून तेथें आपली गादी स्थापिली. यानें अनेक युद्धें करून सभोंवतालच्या राजांस मांडलिक बनविलें. हा ९९६ त वारला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा चामुंड हा राजा झाला (चामुंड पहा). त्यानें राज्यत्याग केल्यानंतर त्याचा वडील पुत्र वल्लभसेन व नातु भीमदेव यांनीं गिझनीकर महंमूद याचा लढाईत पराभव केला व तीन हजार मुसुलमान कापून काढिले. तेव्हां महंमूद सोमनाथ लुटून परत जात असतां त्यानें अनहिलवाड्यावर स्वारी केली व भीमदेवाचा पराभव केला आणि त्याचा चुलता दुर्लभराय यास गादीवर बसविलें. चामुंडाचा वडील पुत्र वल्लभसेन यानें सारे सहाच महिने राज्य केलें. त्यानें माळव्यावर स्वारी केली होती. त्याच्यामागून त्याचा धाकटा भाऊ दुर्लभसेन यानें(१००९ते १०२२) राज्य केलें. यानें लाटदेशावर स्वारी केली होती. हा साधुवृत्तीनें राहत असे. याच्यामागून याचा पुतण्या भीमदेव पहिला, हा राजा झाला. हा फार पराक्रमी होता. यानें चेदिराज कर्ण यास माळव्याच्या भोजराजाच्या विरुद्ध मदत केली होती. या स्वारींत भोजराज मेला असें म्हणतात. याची राणी उदयमती. हिनें अनहिलवाडास 'राणीनी वाव' (राणीची विहीर) बांधविली ( १०४५ ). यानें १०६३ पर्यंत राज्य केलें. यानें अबूच्या पहाडावरील प्रख्यात जैनमंदिरें, व पालिठाणा व चंद्रावती येथील देवालयें बांधिलीं. अजमीरच्या वीसलदेवानें याच्यावर स्वारी करून याचा पराभव केला व वीसलनगर (वीसनगर) स्थापिलें. पुढें भीमदेवानें आपल्या कर्ण ( पहिला ) नांवाच्या पुत्राच्या स्वाधीन राज्य करून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारला. पहिल्या कर्णानें १०६३ ते१०९३ पर्यंत राज्य केलें. याची राणी मयाणल्लदेवी (मैनलदेवी) ही जयकेशी कदंबाची मुलगी होय. कर्णानें हल्लीं जेथें अहमदाबाद शहर आहे तेथें कर्णावती नांवाचें शहर स्थापिलें ( १०७० ); यानें शांततेनें राज्य केलें व लोकोपयोगी अनेक कृत्यें केलीं, व कर्णसागर नांवाचा एक तलाव बांधला. मैनलदेवीचा मुलगा प्रसिद्ध सिद्धराज जयसिंह होय. यानें कर्णानंतर १०९३–११४३ पर्यंत राज्य केलें. यानें मालवराज यशोवर्मा यास जिंकून अवंतीचें, राज्य घेतलें व बर्बरक नांवाच्या एका अनार्य राजालाहि जिंकलें.याच्या पदरीं श्रीपाल नांवाचा एक कवि होता; त्यानें वैरोचनपराजय नांवाचें काव्य केलें होतें. सिद्धराजाच्या लहानपणीं त्याची आई मैनलदेवी ही कारभार पाहत असे. जयसिंहानें हुशारीनें राज्य करून अनेक तलाव व इमारती बांधल्या. सौराष्ट्रदेश यानें जिंकला होता. याचेवेळीं जैनधर्माचा प्रसार याच्या राज्यांत विशेष होता.हेमचंद्र नांवाचा एक विद्वान जैन याच्या पदरीं होता. त्यानें द्याश्रय नांवाचें काव्य केलें आहे. त्यांत गुजराथचा बराच इतिहास येतो. जयसिंह अनेक गुणांनीं संपन्न असूनहि स्त्रीलंपट होता; तरीहि त्यास गुजराथदेशाचें भूषण व चालुक्यवंशदीप असें फोर्बसनें म्हटलें आहे. तो स्वतः विद्वान व विद्वानांचा पोशिंदा होता.त्याच्या राज्याचा विस्तार मोठा होता.हा निपुत्रिक वारल्यानें याच्या मागून क्षेमराजाचा नातु कुमारपाल हा गादीवर बसला. या कामीं त्याला प्रधान कान्हदेव व अनेक जैनधर्मी साधू व लोक यांची मदत होती. त्यामुळें पुढें त्यानें जैनधर्माला फार मदत केली (ज्ञा. को. विभाग. ११ वा. कुमारपाल पहा). याच्या मागून याचा पुतण्या अजयपाल हा राजा झाला (११७४–११७६); याच्या बापाचें नांव महीपाल. हा शैवपंथी असल्यानें यानें जैनांच्या विरुद्ध वागणूक ठेविली, तेव्हां त्यांनीं याचा खून केला. त्याच्या पश्चात् त्याचा वडील पुत्र दुसरा मूलराज हा गादीवर आला. यानें दोन वर्षेंच ( ११७६–७८ ) राज्य केलें. तो अज्ञान असल्यानें त्याची आई नैकीदेवी ही कारभार पाही. हा मेल्यावर त्याचा धाकटा भाऊ दुसरा भीमदेव हा राजा झाला ( ११७८–१२४१ ). याला भोळा असें उपपद होतें. याची माहिती चंदभाटाच्या रासाग्रंथांत बरीच आढळते. हा फार शूर होता; याचें सैन्यहि फार होतें. याचीं जहाजें सिंधदेशापर्यंत वावरत असत. अमरकोशकार अमरसिंह हा याच्या पदरीं होता.याचें व पृथ्वीराज चव्हाणाचें हाडवैर माजल्यानें मुसुलमानांची धाड हिंदुस्थानावर कायमची आली. यांचें भांडण तोडण्याचा प्रयत्न झाला पण तो फसला. अबूचा राजा जैत परमार यांच्या इच्छिनीकुमारी या मुलीला या दोघांनीं मागणी घातली व त्यामुळें यांच्यांत कलह पेटून पृथ्वीराजानें भीमाचा पराभव

केला. पण ही संधि साधून शहाबउद्दीनानें पृथ्वीराजावर स्वाऱ्या करून शेवटीं त्यास पकडून नेलें. कुत्बुद्दीन ऐबक यानें गुजराथवर स्वारी केली होती पण भीमानें त्याला धुडकावून दिलें. याच्या व मालवराज सुभटवर्मा व अर्जुनदेव यांच्या लढाया झाल्या होत्या याच्या कारकीर्दीच्या अखेरीस वाघेल लोकांच्या सरदारांनीं याच्या राज्याचे बरेचसे प्रांत काबीज केले. हा सन १२४१त मेला. याच्यानंतर याचा पुत्र त्रिभुवनपाल हा राजा झाला. यानें दोन वर्षे राज्य केलें. हा दुर्बल असल्यानें वीसलदेव वाघेलानें याचें राज्य १२४३ मध्यें घेतलें. याप्रमाणें या चालुक्य घराण्याचा यावेळीं शेवट झाला [ कीर्तिकौमुदी; सुकृतसंकीर्तन; वडनगर प्रशस्ति; द्व्याश्रयः रासमाला; पृथ्वीराजरासा; माबेल डफ. ].

धोलकाचें ( वाघेल ) चालुक्य घराणें.— या घराण्यानें इ. स. १२१९ पासून १३०४ पर्यंत गुजराथेंत राज्य केलें. अनहिलवाडचा राजा कुमारपाल याचा मावसभाऊ अरुणराज म्हणून होता. कुमारपालानें त्यास वाघेल वगैरे कित्येक गांवांची जहागीर दिली होती. म्हणून या घराण्यास ( व्याघ्र पल्लीय) वाघेल म्हणत. अरुणाचा मुलगा लवणप्रसाद यानें दुसऱ्या भीमदेवाच्या वेळीं स्वपराक्रमावर बराच प्रांत लुटालूट करून मिळविला. हा भीमाचा प्रधानहि झाला होता. वाघेल व धोलका हे परगणे त्यांच्या ताब्यांत होते. यानें स. १२१९ मध्यें धोलका येथें आपलें राज्य स्थापिलें.व वस्तुपाल आणि तेजपाल या जैनधर्मीय भावांनां आपले प्रधान केले. लवणाचा पुत्र वीरधवल हा फार शूर व धाडशी होता. यानें देवगिरीकर यादव व उत्तरेकडील रजपूत राजे यांचा पराभव केला होता. मुसुलमानांचेंहि यानें कांहीं चालू दिलें नाहीं. हा न्यायी, कर्तबगार, दयाळू व धर्मनिष्ठ होता. त्यानें प्रजेस फार सुख दिलें. हा स.१२३५ मध्यें मेला. तेव्हां त्याच्या चितेवर त्याच्या १८० सेवकांनीं अग्निकाष्ठें भक्षण करून जीव दिला असें सांगतात. वस्तुपाल व तेजपाल यांनीं अनेक देवळें व वाडे बांधले. वस्तुपाल विद्वान व कल्पक होता. गिरनार पर्वतावर यानें बांधलेल्या अनेक इमारती आहेत. वीरधवलानंतर त्याचा वडील पुत्र वीरम हा गादीवर बसत असतां त्यास अडथळा करून वस्तुपालाच्या मदतीनें त्याचा धाकटा भाऊ वीसलदेव हा राजा झाला. तेव्हां वीरम हा आपला सासरा जबालीपूरचा उदयसिंह याच्याकडे पळून गेला; परंतु वस्तुपालानें त्याचा खून करविला. वीरमनें वीरमगांव स्थापिलें. वस्तुपाल पुढें लवकरच मेला (१२४१). मेरुतुंग म्हणतो वीसलदेव हा १२३५ त गादीवर न येतां १२४३ त आला. यांस विश्वमल्ल असें उपपद होतं. यानें अन्हिलवाडच्या त्रिभुवनपालास पदच्युत करून तें ठिकाण आपली राजधानी केलें ( १२४३ ). यांवरून धोलकाच्या गादीवर १२३५ त व अनहिलवाडच्या गादीवर १२४३ त हा बसला असें ठरतें व मेरुतुंगाचें म्हणणेंहि खरें ठरतें. यानें देवगिरीकर दुसरा सिंघण, मालवराज पूर्णमल्ल व मेवाडराज गुहिल यांचा पराभव केला. कर्नाटकची राजकन्या याची राणी होती. यानें १२६३ पर्यंत राज्य केलें. याच्या मागून वीरमचा मुलगा अर्जुनदेव यानें ( १२६३—७५ ) राज्य केलें. हा शैव होता. याचा वेरावळ येथें एक शिलालेख आहे. याच्या पश्चात् याचा पुत्र सारंगदेव हा राजा झाला. त्यानें १२७५—१२९६ पर्यंत राज्य केलें. त्याच्या कारकिर्दीत' काव्यप्रकाशावरील जयंतीटीकाकार जयंत हा होऊन गेला( १२९३ ). त्याच्यामागून त्याचा पुत्र कर्णदेव गादीवर आला. यानें १२९६ ते १३०४ पर्यंत राज्य केलें. याचें राज्य अल्लाउद्दीन खिलजीनें घेतलें व या ( वाघेल) चालुक्य घराण्याचा येथें शेवट झाला ( कर्णाची माहिती, करणवाघेला ज्ञा. को. विभाग पहावा, याठिकाणीं पहा ). [ रासमाला; मॅबेल डफ; वडनगर प्रशस्ती; मुसुलमानी रियासत.]

**चाल्सिस**—ग्रीसमधील युबोइआ या बेटाचें हें मुख्य शहर आहे. येथें पूर्वी आयोनिक जातीचे लोक राहत असत. या शहराला, भूमध्यसमुद्राभोंवतालच्या प्रदेशांशीं निरनिराळीं धातुचीं कामें, खनिज पदार्थ आणि मातीचीं भांडीं, इत्यादि वस्तूंचा भरभराटीचा व्यापार चालत असे. इरीट्रिआ येथील शत्रुसंघाशीं ' लीलॅंटाइन युद्ध ' या नांवानें प्रसिद्ध असलेलें युद्ध करून, चाल्सिस शहरानें युबोइआ हा प्रांत मिळविला. परंतु सहाव्या शतकाच्या आरंभीच अथेन्सशीं झालेल्या युद्धांत चाल्सिसचा पराभव होऊन उमरावांच्या पिढीजात सत्तेला खो मिळाला व ' जमीनीची समविभागणी ' या तत्वावर स्थापिलेली नवीन वसाहतपद्धति ( जिला क्लेरुची असें म्हणतात ती ) सुरू करण्यांत आली. अथेन्सची सत्ता संपुष्टांत आल्यावर चाल्सिसवर रोमचें स्वामित्व प्रस्थापित झालें. इ. स. १२०९ त चाल्सिस व्हेनिसच्या ताब्यांत गेलें व १४७० त तुर्कांनीं तेथें आपला अंमल बसविला. अर्वाचीन कालीन चाल्सिस शहरांत सुमारें १०,००० लोकसंख्या असून, १९०४ मध्यें अथेन्स आणि पिरिअस हीं आगगाडीनें जोडलीं गेल्यामुळें, येथील निर्गत व्यापाराला फारच जोराचें चलन मिळालें आहे. येथें यहुदी, तुर्क, आणि ग्रीक अशा तिन्ही प्रकारचे लोक राहतात.

**चावडा, अनहिलवाडपाटणचे.**—चावडा घराण्याचा मध्ययुगीन कालांतील संगतवार इतिहास देणें जरासें कठिण आहे; कारण प्राचीन इतिहासाचीं मुख्य साधनें जीं शिलालेख व ताम्रपत्रें तीं या घराण्यासंबंधीं उपलब्ध नाहींत. मुंबई गॅझिटिअर (व्हॉ १ ) मध्यें गुजराथची हकीकत देतांना ह्या घराण्याविषयीं थोडी फार माहिती दिली आहे. पण गॅझिटिअरची सर्व भिस्त प्रबंध व बखरी यांसारख्या आधारावर असून या प्रबंधांतून दिलेल्या वर्णनांत भाकडकथाहि असतात व त्यांतील इतिहास सर्वथैव विश्वसनीय नसतो. हें घराणें आठव्या शतकांत उदय पावलें. उत्तर गुजराथेंतील सारस्वत मंडल हें त्याचें मुख्य ठिकाण असावें; चावड्यांचें

घराणें अत्यंत प्रबल झालें खरें परंतु हें घराणें स्वतंत्र नव्हतें; सार्वभौम कनोजच्या राज्याच्या मांडलिकांत याची गणना होत असावी.

चावडा घराण्यांतील कांहीं पुरुष आपणांस सूर्यवंशी समजतात तर कांहीं चंद्रवंशी म्हणवून घेतात. कांहीं आपली उत्पत्ति अबूमधील होमकुंडांतून झाली असें मानतात तर कांहीं प्रसिद्ध ऋषींनां आपले मूळपुरुष समजतात. कर्नल टॉडच्या मतें हे कोणी परकी लोक पहिल्यानें सौराष्ट्रांत येऊन उतरले व तेथून उत्तरेकडे जाऊन वनराजानें पट्टण येथें राज्य स्थापन केलें. फोर्बस हा कनकसेनाचा विचित्रवंश असा याचा उल्लेख करतो, पण त्यांच्या मूळपुरुषाबद्दल कांहींच बोलत नाहीं. वॉटसन म्हणतो कीं, ही परमार वंशाचीच एक शाखा असावी. गुजराथेंतील बहुतेक सर्व शहरें पूर्वी परमाराच्या ताब्यांत होतीं. रजपूत लोकांनां पोटजातीचें नांव ठाऊक असून मूळ वंशाचें नांव ते विसरून जातात अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. वनराजाचा मूळपुरुष वेणी राजाचा बाप वचराज होता हें प्रसिद्ध आहे. या वचराजानें दीपगडावर राज्य केलें. वेणी राजानें समुद्राची शपथ घेऊन एका व्यापारास फसविल्यामुळें दीवगड वाहून गेला व वेणीची गरोदर राणी पळून गेली. तिला चांदुर येथें वनराज हा पुत्र झाला. याला अनहुल नांवाच्या धनगरानें पट्टण येथें एक निधि असलेला दाखविला. तो घेऊन त्यानें तेथें एक शहर वसविलें व त्यास अनहिलपट्टण असें नांव दिलें. हें पट्टण ज्यानें वल्लभी उध्वस्त केली त्यानेंच स्वारी करून पूर्वी ओसाड पाडिलें असावें. पूर्वी वढवाण व वालाक क्षेत्र येथेंहि परमार राजे राज्य करीत असत. ज्या कवितेवरून वरील हकीकत घेतली आहे त्यांत तीस परमार असें स्पष्ट म्हटलें आहे. ती कविता अशी.—

परवरियो परमार ॥ वासभनिमाळ वसायो ॥

यांत वनराजानें भीनमाल (श्रीमाल) वसविल्याचा उल्लेख आहे. वॉटसननें पाहिलेल्या एका वंशावळींत वनराज, वेणीराज, व वचराज यांचा मूळपुरुष विक्रमादित्य हा दाखविला आहे व तो परमार वंशांतीलच होता.

रा. वैद्य म्हणतात कीं, चावडा घराण्याची भिनमालच्या चापोत्कठ अथवा चाप कुलाच्या उपशाखेंत गणना करतात. चापकुलांतील एक लहानसें सरदार घराणें पंचसर येथें नांदत असे; या घराण्यांतील शेवटचा पुरुष एका 'भुयड' कडून मारला गेला. हा भूयड कोण कोठील वगैरे कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. चाप सरदाराची राणी गर्भवती होती; ती वनांत प्रसूत झाली, तिला जो मुलगा झाला तोच वनराज. वरील हकीकतींत व बाप्पारावळ किंवा दक्षिण चालुक्य वंशाच्या संस्थापकाच्या जन्माच्या दन्तकथेंत बरेंच साम्य आहे. वनराजानें प्रथम भिल्ल लोकांच्या सहाय्यानें लूट वगैरे मिळवून द्रव्यसंचय करण्याचा उपक्रम सुरू केला. एकदां तर त्यानें कान्यकुब्ज नगरास जात असलेल्या सरकारी मुख्य खजिन्यावर छापा घालून तो हस्तगत करून घेतला. [प्रबंध चिंतामणींत सांगितलें आहे कीं, कनोजचा एक धंचकुल नांवाचा सरदार गुजराथेंत सुभेदार होता. तो खजिना घेऊन परत जात असतां वनराजानें त्याच्यावर एका खिंडींत छापा घातला व त्यास ठार करून खजिना लुटला. त्याला त्यांत २४ लाख रौप्य द्राम्म (नाणीं) मिळाले] ह्या प्रचंड लुटीच्या जोरावर त्याला सैन्य उभारितां आलें व या सैन्याच्या साहाय्यानें त्यानें राज्य स्थापिलें. हल्लींच्या गुजराथ प्रांताच्या उत्तरेस त्यानें अनहिलपुर नांवाचें शहर इ. स. ७४६ च्या सुमारास वसविलें व तेथें राजधानी केली. त्यावेळीं कनोजच्या साम्राज्यास उतरती कळा लागली होती. त्यामुळें वनराजासारख्या धाडशी व कर्तबगार वीर पुरुषास स्वतंत्र राज्य स्थापतां आलें. बाप्पारावळ, सांबरचा सामन्तदेव व मांडोरचा नागभट्ट यांनींहि याच तऱ्हेनें आपलीं राज्यें स्थापिलीं नवसरी ताम्रपटावरून असें दिसतें कीं, अरबांनीं कोणत्यातरी चापराजाचा पराभव केला; मग तो वनराज कीं कोण तें नक्की समजत नाहीं. बाप्पारावळप्रमाणेंच वनराज दीर्घायुषी असून त्याची कारकीर्दहि बरीच मोठी होती (स. ७४६-८०५).

वनराजानंतर त्याचा मुलगा योगराज किंवा जोगराज राज्य करूं लागला. त्याची कारकीर्द इ. स. ८०६ ते ८४१ पर्यंत होती. ह्या वेळीं कनोजच्या गादीवर भोज हा राज्य करीत असावा व योगराज हा भोजराजाचा मांडलिक असावा. योगराजानंतर रत्नादित्य गादीवर बसला व त्याच्या पश्चात् वीरसिंहाकडे राज्यसत्ता आली. वीरसिंहानंतर इ. स. ८५६ मध्यें खेमराज राजा झाला व त्यानंतर ८८१ मध्यें मुंडराज सिंहासनारूढ झाला. मुंडराजाचेंच भूयड असें नांव होतें. (मुंडराजाऐवजीं कांहीं ठिकाणीं चामुण्ड असें नांव आढळतें). भूयडनें द्वारका व त्या बाजूचा सर्व समुद्रकिनारा काबीज केला होता. भूयडानंतर ९०८ मध्यें घाघड उर्फ राहप गादीवर आला व त्याच्या नंतर ९३७ पासून ९६१ पर्यंत ह्या कुलांतील शेवटच्या राजपुरुषानें राज्य केलें. ह्याचें नांव ज्ञात नाहीं असें मुंबई गॅझीटिअरमध्यें म्हटलें आहे. हा शेवटचा राजा राज्य करीत असतां त्याच्या मूलराज सोळंखी नामक भाच्यानें त्याला पदच्युत केलें व स्वतः राज्य पटकाविलें. माबेल डफनें या शेवटच्या राजाचें नांव (व कारकीर्द) सामंतसिंह (इ. स. ९३५ ते ९४२) असें दिलें आहे. सुकृतसंकीर्तननामक ग्रंथांत या राजाचें नांव भूभट असें दिलें आहे. प्रबंधचिंतामणींत वनराजानंतरची राजांची यादी व त्यांच्या कारकीर्दीच्या समाप्तीचे संवत खालीलप्रमाणें आहेत (१)योगराज (सं. ८७८); (२)रत्नादित्य(सं.८८१); (३) खेक्षेमराज (सं. ९२२); (४) चामुण्ड उर्फ मुंड किंवा भूयड (सं. ९३८);(५)अकडदेव (सं.९६५); (६)भूयडदेव (सं.९९१ = इ. स. ९३४). योगराजानें व भूयडदेवानें पट्टण येथें बरींच मंदिरें व तट बांधले.

पाटणच्या चावड्यासंबंधी जैन प्रबंधकारांनी दिलेली माहिती एवढीच. यावरून चावडा घराण्यांतील राजपुरुषांची यादी व त्यांच्या कारकीर्दीची शकावली यांशिवाय इतर माहिती सांपडत नाहीं. चावडा घराणें शिवोपासक असावें. पुढें पुढें त्यांनीं जैन पंडितांसहि आश्रय दिला असावा. याप्रमाणें पाटण येथील चावड्यांची हकीकत फारच त्रोटक असल्यामुळें ती येथेंच संपते. माबेल डफ हिनें या घराण्याची वंशावळ जी दिली आहे ती अशीः— वनराज ( ७४६–८०६ ),योगराज,( ८०६–८४१ ), क्षेमराज ( ८४१–८६६ ),भूयड ( ८६६–८९५ ), वीरसिंह( ८९५ ते ९२० ), रत्नादित्य(९२०–९३५)व सामंतसिंह(९३५-९४२).

चाप घराण्याच्या दुसऱ्या उपशाखेची उपलब्ध असलेली थोडीशी माहिती येथें देतों. इंडि. अँटि. पु. १२ ( पृ. १९३ ) मध्यें धरणीवराहाचा एक ताम्रपट छापिला आहे. त्याचा शक ८३९ ( इ. स. ९१७ ) आहे.त्यावरून असें दिसतें कीं, वढवान ( वर्धमान ) येथें चाप घराण्याची एक उपशाखा नांदत असावी, व ती कनोजची मांडलिक असावी. ताम्रपटावरून धरणीवराह हा कनोजच्या महीपाल राजाधिराजाचा मांडलिक होता हें उघड दिसतें. मात्र धरणीवराहाचा काठेवाडांतील चूडासम घराण्याशीं कांहीं संबंध नसावा. या दानपत्रांत धरणीवराहाच्या पूर्वीच्या ४ राजांचीं नांवें दिलीं आहेत; तीं अशीं:—(१) विक्रमार्क, (२)अड्डक, (३)पुलकेशिन्,(४)ध्रुवभट व (पांचवा धरणीवराह) विक्रमार्क व कनोजचा राजा भोज हे समकालीन असावेत. या दानपत्रांत चाप घराण्याची उत्पत्ति शंकराच्या धनुष्या- ( चाप = धनुष्य )पासून झाली असें म्हटलें आहे.

चा व डां च्या व सा ह ती.—मूळराज सोळंखीनें जेव्हां वनराजाच्या शेवटच्या वंशजास हांकून दिलें, व आपण गादीवर बसला ( ९४२ ) तेव्हां चावडा राणी अहिपत नांवाच्या आपल्या एक वर्षाच्या मुलास घेऊन जेसलमीर येथें आपल्या बापाकडे गेली. अहिपत मोठा झाल्यावर त्यानें पाटणच्या राज्यांत लुटालूट करण्यास आरंभ केला व कच्छच्या राज्यांत ९०० खेडीं पादाक्रांत करून मोरगड येथें आपली गादी स्थापन केली. अहिपतच्या घराण्यांतील पुणजाजी नांवाचा तेरावा वंशज अल्लाउद्दीन खिलजीचा ( १२९५–१३१५ ) समकालीन होता. जाडेजांनीं कच्छप्रांत आपल्या अमलाखालीं आणल्यावर पुणजाजी बडोद्यासन्निध असलेल्या धारपुर खेड्यास गेला व तेथें त्यानें चोरासी ( ८४ खेड्यां )ची जहागिरी संपादन केली; परंतु इसवी सन १३०६ च्या सुमारास अलपखानानें गुजराथ प्रांत जिंकला तेव्हां पुणजाजी पाटण येथें सुभेदाराच्या आश्रयास जाऊन राहिला. मुसुलमान सुभेदाराला विसलनगरच्या कोळ्यांनीं बराच उपद्रव दिला. पुणजाजीस त्या प्रांताची चांगली माहिती असल्यामुळें सुभेदारानें त्यास मोठ्या खुषीनें आपल्या पदरीं ठेविलें व त्याच्या मदतीस १६००० शिपायांची फौज देऊन त्यास कोळ्यांचें पारिपत्य करावयास सांगितलें. त्याप्रमाणें पुणजाजीनें विसलनगर व कडी यांच्या दरम्यान शांतता प्रस्थापित केली. त्यानंतर त्याला विसलनगरच्या जिल्ह्यांतील २४८ व आणखी दुसरीं ५२ अशी एकूण ३०० खेड्यांची जहागीर मिळाली. यांपैकीं ४६ गांवें व कित्येक जमिनी त्यानें आपल्या नातेवाईकांस व अनुयायांस बक्षीस दिल्या. यानें आवासान किंवा आंबासान येथें आपली गादी स्थापन केली व तेथें ४६ वर्षेंपर्यंत राज्य केलें.

अहिपतची वंशावळ अशीः–अहिपत,त्याचा पुत्र विक्रमसी त्या पुढील वंश अनुक्रमें:—विभूराज, ताधुलजी, शेपकरण, वाघजी, अखेराज, तेजसी, करमसी, तारवनसी, आसकरण, मोकमसी, पुणजाजी. पुणजाजीनें आंबासान येथें गादी स्थापिली याच्या वंशांतील इंदरसिंघ नांवाच्या पुरुषानें दमाजी गायकवाडाशीं लढाई करून मे(ह)साणा येथें त्याचा पराभव केला होता. पुणजाजीस दोन मुलें वडील मेसाजी व धाकटा बनवीर. मेसाजीनें मेहसाणा शहर वसविलें व त्याच्या आई ( पद्मावती )नें तेथें पदमसागर तलाव बांधिला. हा निपुत्रिक असल्यानें बनवीर गादीवर आला. याचे वंशज आपणास रावळ म्हणवूं लागले. याचा पुत्र नरवरसिंग व त्याचा जयसिंग. याला इसरदास, सुरजमल व सामन्तसी अशीं तीन मुलें झालीं. इसरनें अंभोद, सूरजनें वरसोडा व सामन्तनें मानसा येथें मूळ जहागिरीचे वाटे पाडून तीन निरनिराळ्या जहागिरी स्थापिल्या. इसरचा पुत्र वरणसी व त्याचा सिंघोजी. या सिंघोजीस सात पुत्र होते. त्यांपैकीं तीन अंभोदला राहिले व बाकीच्या चौघांनीं वसाजी, भोतना, करा व कमाना या गांवीं जहागिरी स्थापिल्या. त्यांचे वंशज त्या त्या गांवीं हल्लीं नांदत आहेत. सामन्तचा वंश मानसा ( मेहसाणा ? ) येथें आहे. सुरजचा पुत्र पुणजाजी, त्याचा सिसाजी, त्याचा सोढूल व त्याचा गंगाजी. गंगाजीच्या वडील ( असकरण ) मुलानें पोथा येथें जहागीर स्थापिली. धाकटा जगजोती यास चार मुलें; पैकीं दोघांनीं वाडु व अहाजोल येथें जहागिरी स्थापन केल्या. जगजोतीचा वडील मुलगा रामदास, त्याचा केशव व त्याचा दयाल. या दयालास आठ मुलें होतीं. त्यांपैकीं चौघांनीं, रंगपूर,गालथल वरसोडा व लाखागड येथें जहागिरी मिळविल्या. दयालचा वडील पुत्र गिरधर; याला चार मुलें; पैकीं धाकटा अमरा त्याचा भीमसी, त्याचा रतनसी,त्याचा मोतीसिंग.मोतीसिंगास किशोरसिंग म्हणून पुत्र होता. हा स. १८७६ मध्यें वरसोड्याच्या गादीवर होता. [ बॉंबे ग्याझे. पु. १; सुकृतसंकीर्तन; प्रबंधचिंतामणी; इंडियन अँटिक्वरी पु. ४, १२, व स. १८७५ चें; मध्ययुगीन भारत पु. २; माबेल डफ ].

**चावंद**—मुंबई. जिल्हा पुणें. जुन्नरच्या वायव्येस दहा मैलांवर व नाणाघांटच्या आग्नेयीस दहा मैलांवर हा एक मोडकळीस आलेला व निकामी किल्ला आहे. येथून हडसर आणि जविधन हे किल्ले जवळच आहेत. हे तीन किल्ले आणि

शिवनेरी किल्ला यांचा उपयोग नाणाघाटाचें रक्षण करण्याकरितां फार होत असे व त्यामुळें कोंकण आणि जुन्नर यांमधील दळणवळण सुरक्षित राही. या किल्ल्याची नैसर्गिक बळकटी जितकी चांगली आहे त्यामानानें तटबंदी नाहीं. इ. स. १८२० च्या सुमारास किल्ल्याचा महादरवाजा उडवून दिला. डोंगरी लोकांशिवाय दुसऱ्या कोणास किल्ल्यावर जातां येत नाहीं. वर चावंदबाईचें एक लहान देऊळ असून पाणीपुरवठा चांगला आहे. अहमदनगर निजामशाहीचा मूळ पुरुष मलिक महमद यानें हा किल्ला इ.स. १४८६ सालीं सर केला होता. दुसरा निजाम बुऱ्हाणशहा याच्या लहान मुलास सुमारें एक वर्ष याच किल्ल्यावर ठेवलें होतें व नंतर त्यास अहमदनगरची गादी मिळाली. इ. स. १६३७ सालीं शहाजीनें जे पुण्याकडील किल्ले मोंगलांस दिले त्यांत जुंद अथवा चावंद असावा असें दिसतें. इ. स १८१८ सालच्या मराठ्यांबरोबर झालेल्या लढाईंत ब्रिटिशांनीं हा किल्ला घेतला.

**चास-कमान**—मुंबई. जिल्हा पुणें. खेडच्या वायव्येस ६ मैलांवर भीमा नदीच्या दक्षिण तीरावर हें एक व्यापारानें गांव आहे. खेडच्या उत्तरेस चौदा मैलांवर चासनरोडी म्हणून गांव आहे. येथें चास नांवाचीं जवळजवळच दोन गांवें असल्यामुळें त्यांनां वेगवेगळें ओळखण्याकरितां चासकमान आणि चासनरोडी अशीं नांवें दिलीं आहेत. कमान आणि नरोडी हीं त्या त्या चासजवळील खेडीं आहेत. पेशव्यांच्या अमदानींत हा गांव जरा पुढें आलेला होता. इ स. १७५० सालीं दुसरे बाजीराव बल्लाळ यांची कन्या रखमाबाई हीस चासचा कृष्णराव महादेव जोशी यांस दिली होती. हा जोशी इ. स. १७६१ सालीं पानिपतच्या रणसंग्रामांत प्राणास मुकला. रखमाबाईनें गांवाचें सौंदर्य वाढविण्याकरितां बराच पैसा खर्च केला. भीमा नदीवर तिनें घांट बांधला असून गांवाच्या पश्चिमेस नदीकांठीं सोमेश्वर महादेवाचें देऊळ तिनेंच बांधलेलें आहे. मुख्य दरवाजा पूर्वाभिमुख आहे. आंत गेल्यावर एक सुंदर दीपमाला दिसते. ही कार्तिक शुद्ध पौर्णिमेस लावतात. हें देऊळ प्रेक्षणीय आहे.

**चॉसर**–एक प्राचीन इंग्रजी कवि.या कवीचा जन्म केव्हां झाला हें निश्चयात्मक ठरवितां येत नाहीं. तरीपण त्याचे चरित्रकार त्याचा जन्म १३४० त झाला असें म्हणतात. १९ वर्षांचा असतांनांच हा फ्रान्सच्या रणभूमीवर गेला व तेथें कैद झाला. पण इंग्लंडच्या राजानें खंडणी भरून त्याला सोडवून आणलें. इंग्लंडला परत आल्यावर त्याला कायमची पेन्शन (वार्षिक १३ पौं. ६ शिलिंग ८ पेन्स) देण्यांत आली. परदेशच्या राजांशीं राजकीय व व्यापारी बाबतींत तह अगर करार करण्यासाठीं त्याची बऱ्याच वेळां योजना करण्यांत आली होती. इटालीमध्यें एकंदर ३ वेळां त्याला जावें लागलें व फ्रान्समध्येंहि तो पुष्कळ वेळ गेला. तो कांहीं दिवस लंडन बंदरांत घेतल्या जाणाऱ्या जकातीचा कंट्रोलर व केंटमधील जस्टिस ऑफ पीसहि होता.

चॉसरला फ्रेंच, इटालियन व इंग्लिश या भाषांचें चांगलें ज्ञान होतें. त्याच्या पहिल्या कविता म्हणजे फ्रेंच (भाषेंतील) कवितांचीं भाषांतरें असून त्या फ्रेंच धर्तीवर रचलेल्या आहेत. मधल्या काळांत लिहिलेल्या पुस्तकांचीं कथानकें इटालियन भाषेंतून घेतलेलीं आहेत. पण त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या भागांत त्यानें इंग्लिश भाषेंत स्वतंत्र पुस्तकें लिहिलीं. काल्पनिक कथानकें त्याला लिहितां येत नसत; परंतु थोडाफार आधार असलेल्या कथानकांनां चांगलें स्वरूप देण्यांत तो फार प्रवीण असे. बोकॅशिओच्या ' फिलोस्ट्रयाटो ' या काव्याचें थोड्याफार फरकानें त्यानें भाषांतरच केलें आहे. परंतु हें प्रणयकथानकाचें भाषांतर इतकें सुंदर आहे कीं, त्यावरून चॉसरचा विनोदीपणा व सहृदयता यांची आपणाला चांगली कल्पना होते. त्यानें लिहिलेल्या पुस्तकांवरून आपण उत्तम लेखक म्हणून पुढें यावें या हेतूनें तो लिहीत असे असें अनुमान काढतां येतें. त्याचे लेख नाटकी थाटाचे आहेत व इलिझाबेथ राणीच्या वेळीं नाट्यकलेंत जी सुधारणा झाली तिचा आरंभ चॉसरपासून झाला असें म्हटलें तरी चालेल त्याचें सर्वांत उत्तम पुस्तक ' क्यांटरबरी टेल्स ' हें आहे. सरव्हॅन्टीसप्रमाणें चॉसरला जगाचा पुष्कळ अनुभव होता व त्याचा उपयोग त्यानें क्यांटरबरी टेल्स लिहितांना चांगला करून दाखविला आहे.हें पुस्तक चॉसरच्या विद्वत्तेची साक्ष देतें एवढेंच नव्हे तर त्याच्या युगाची आधुनिक वाचकाला योग्य कल्पनाहि त्यावरून होते. इंग्लिश भाषेंत फ्रेंच शब्द आणून इंग्लिश भाषा अशुद्ध केल्याचा आरोप चॉसरवर केव्हां केव्हां लादण्यांत येतो. परंतु त्याच्या वेळीं इंग्लंडमध्यें इंग्लिश व फ्रेंच या दोन्ही भाषा बोलत असत ही गोष्ट जर आपण लक्षांत ठेवली तर हा आरोप अगदीं निराधार आहे असें वाटूं लागतें. हा कवि सन १४००मध्यें मरण पावला.

**चासा**—एक शेतकरी जात. ( बंगाली चाश, हिंदी चास = शेती ).यांची एकंदर लो. सं.८५१८९४ असून बहुतेक वस्ती बिहार-ओरिसांत आहे. आसामांतहि या जातीची लो.सं ४४५० असून बहुतेक चहाच्या मळ्यांतून मजूरी करीत असतात. ओरिसांतील शेतकरी लोकांत ह्या जातीच्या लोकांनां बरेच वरच्या वर्गांतील समजतात. यांच्यांत मृतांनां पुरण्याची असलेली चाल अनार्यत्व द्योतक आहे व त्यामुळें ह्यांच्या ब्राह्मणांनां खंडाइत, करण या ब्राह्मणांच्या दर्जाचे समजत नाहींत. चासा हे वैष्णवपंथी आहेत [ रिस्ले. से रि. ].

**चाहमान उर्फ चौहान ( चव्हाण )**—चाहमान म्हणजे चव्हाण हें घराणें रजपुतांत अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें असून तें मूळचें सांबरचें आहे. वीर्यशाली वृत्तींत ह्या कुलाची इतर कोणीहि बरोबरी करूं शकत नाहीं, असा टॉडचा अभिप्राय आहे. आजतागायत ह्या घराण्याच्या १२०० वर्षांच्या इतिहासाचें अवलोकन केलें तर टॉडचा अभिप्राय खरा होय असें दिसून येतें. गुहिलोट घराण्याप्रमाणें ह्याचें मूळ राजधानीचें

ठिकाण जरी आज पूर्वींचेंच नसलें तरी राजपुतान्यांतील बुंदी, कोटा व शिरोही हीं प्रमुख राज्यें ह्याच्या ताब्यांत आहेत व येथील राजांच्या पराक्रमाची ख्याति मुसुलमानी स्वाऱ्यांपासून पसरलेली आहे. पृथ्वीराज चव्हाण व त्याचा आजा विशालदेव ह्यांच्या काळीं तर सार्वभौमत्वाचाहि मान ह्याच घराण्याकडे होता. पानिपतच्या पहिल्या लढाईनंतर या घराण्यास व त्याबरोबरच हिंदूपदपादशाहीस एकदम उतरती कळा लागली. गुहिलोट घराणें व चव्हाण घराणें ह्यांच्यात फारच साम्य आहे. दोन्हीहि घराणीं अद्याप चालू आहेत; दोन्हीहि सारखींच प्रतापशाली आहेत. पण गुहिलोट घराणें जास्त बाणेदार व करारी आहे. चव्हाण घराण्याचा अभिमान मुसुलमानी अमदानींत टिकला नाहीं. दिल्लीच्या मुसुलमानी राजांचें सार्वभौमत्व त्यांनीं कबूल केलें व ह्या वंशांतील अनेक सरदारांनीं आपलीं इमानें जप्त होऊं नयेत, म्हणून मुसुलमानी धर्महि स्वीकारला.

या चव्हाण घराण्याच्या मूळ संस्थापकाविषयीं खात्रीची माहिती मिळत नाहीं. चंद बरदाई भाटानें ह्या घराण्याचा जो अग्नीशीं संबंध लावला आहे तो प्रत्यक्ष नसून कविकल्पित असावा. ह्या कुलाचा मूळपुरुष चाह्मान अगर अनहिल समजला जातो. चाह्मानाचा काळ बुंदीसंस्थानच्या सुरजमल नामक भाटानें दिलेला आहे परंतु तो संशयास्पद दिसतो. ह्यानें आपल्या 'वंशभास्कर' ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, चाह्मानापासून पृथ्वीराज चव्हाणापर्यंत एकंदर १३६ राजे होऊन गेले. हें म्हणणें इतिहासदृष्ट्या अतिशयोक्तीचें दिसतें. कारण पृथ्वीराजरासांत तर पृथ्वीराजाच्या आजापर्यंतच्या राजांची संख्या फक्त छत्तीसच सांगितली आहे. सारांश इ. स. ८००ते १००० पर्यंतची या वंशाची फारच तुटपुंजी माहिती मिळते व जी मिळते तिची भिस्त हर्ष टेंकडीवरील सात ( ९५५–९७२ ) शिलालेखांवरच ठेवणें भाग पडतें.

नर्मदेच्या उत्तरेचें माहिष्मती गांव या घराण्याचें मूळ ठिकाण होतें व ह्या घराण्याकडे हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचा मान वारंवार येत असे, असें चाह्मानकुलाचे भाट वर्णन करतात. परंतु प्राचीन लेखांवरून यांचें ऐतिहासिक मूळचें ठिकाण म्हणजे, मेवाडच्या उत्तरेस असलेला सांबर अथवा शाकंबरी प्रदेश होय. अजमीरदेखील ह्याच प्रदेशांत मोडतें. हा प्रदेश एकंदर १। लाख खेडीं मिळून झालेला आहे अशी त्या प्रदेशाची ख्याति होती व त्यामुळेंच ह्या प्रदेशास सपादलक्ष असें नांव होतें.

भाण्डारकरांच्या मतें सपादलक्ष हें नांव शिवालिक डोंगराळ प्रदेशाचें असावें व शिवालिक प्रदेश हेंच चाह्मानांचें आद्य वसतिस्थान असावें. हरबिलास शारदा हे म्हणतात कीं, सपादलक्ष म्हणजे सांबरराज्य होय, व चाह्मानांचें आद्य ठिकाण अहिच्छत्र हें भाण्डारकर म्हणतात त्याप्रमाणें शिवालिक डोंगरांत नसून हल्लींचें राजपुतान्यांतील नागोर शहर होय. महाभारतांत अहिच्छत्र हें पांचाल देशांतील अति प्रसिद्ध ठिकाण म्हणून म्हटलें आहे. प्राकृत काव्यांतून सुद्धां चाह्मानांनां संबरीराय म्हणजे सांबरचे राजे असेंच संबोधिलें जातें. सारांश, सांबर हेंच चाह्मानांचें मूळचें ठिकाण असावें.

या कुलाच्या मूळ संस्थापकांविषयीं जुन्या लेखांतून पुढील माहिती आढळते. हर्षशिलालेखांत गूवक राजापासून वंशावळ दिली आहे. बिजोलिया लेखांत प्रथम पुर्वजांचा उल्लेख सांपडतो; पण तो घोटाळ्याचा आहे. त्यांत वत्सगोत्री सामंत ब्राह्मण यालाच अहिच्छत्राचा मूळपुरुष म्हटलें आहे.

परंतु या लेखावरून चंदानें दिलेल्या चाह्मान कुलाच्या पुढील उत्पत्तीस बराच मोठा धक्का बसतो. अबूपर्वतांत वसिष्ठ ऋषीचा आश्रम असून त्या आश्रमांत असलेल्या अग्निकुंडापासून चाह्मानांचा पूर्वज निर्माण झाला व त्यामुळें चाह्मानकुलाची अग्निकुलांत गणना केली जाते वगैरे बिजोलियालेखांत म्हटल्याप्रमाणें सामंत हा ब्राह्मण नसून क्षत्रिय होता असें रा. वैद्य म्हणतात व असा तर्क लढवितात कीं, अहिच्छत्रपुरांत ( हल्लींचें रामपुर अथवा नागोर ) चाह्मान घराण्यांत अत्यंत पराक्रमी असा सामन्त नांवाचा बलाढ्य रजपुताग्रणी होता; त्याला अनेक सरदारांचें साह्य असे; ह्यानेंच पुढें सांबर प्रांत काबीज केला व तेथें राज्य स्थापिलें. पृथ्वीराजरासांतहि चाह्मानानंतर सामंतदेवाचें नांव दिलें आहे.

हर्षलेखांत गूवकापासून वंशावळ आहे तर बिजोलियालेखांत ( वि.सं. १२२६ ) सामंतापासून गूवकापर्यंतची वंशावळ आहे. ती अशी:—(१) जयराज, (२) विग्रह पहिला, (३) श्रीचंद्र, (४) गोपेंद्र व (५) दुर्लभ पहिला. यांपुढील गूवकापासून दुसऱ्या दुर्लभ राजापर्यंत दिलेला क्रम दोन्ही लेखांत बहुतेक सारखाच आहे. दुर्लभ राजाच्या वेळींच ( विक्रम सं. १०३० ) हर्षलेख लिहिला असल्यामुळें त्यांत दुर्लभानंतरचीं नांवें नाहींत. दुर्लभानंतरचा चाह्मान घराण्याचा वंशक्रम या लेखाच्या शेवटीं दिला आहे. पहिल्या दुर्लभानें हा वंश भरभराटीस आणला.

सामंतदेव व गूवकराज (पहिला) या दोघांचा काळ स्थूलमानानें पुढीलप्रमाणें ठरतो. दुर्लभ राजाचा( दुसरा )काळ विक्रम संवत् १०३० ( ९७३ ) हें नक्कीच आहे. वाक्पतिराज ( दुसरा ) ह्याचा मुलगा लछमन; यानें नाडूल येथें ह्या घराण्याची दुसरी गादी स्थापन केली. लछमनाचा काळ वि. सं. १०३९ ( सन९८२ ) हा लेखांतून सांपडतो. मागील प्रत्येक राजांची कारकीर्द ठोकळमानानें २० वर्षांची धरली तर गूवकराजा ( पहिला ) सन ८३३ त असावा व सामंत राजा इ. स. ७१३ मध्यें राज्य करीत असावा. राजपुताना गॅझी. मध्यें सामंत राजाचा काळ इ. स. ७५० हा दिला आहे. परंतु तो कसा ठरविला हें सांगितलें नाहीं. अरबांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्यानें जीं गुहिलोट घराण्यासारखीं अनेक घराणीं प्रसिद्धीस आलीं त्यांतच चाह्मानांचा समावेश केला पाहिजे. बाप्पारावळ व सामंतराज हे बहुतेक समकालीन असावे. सामंतानें ८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत सांबर येथें

राज्यस्थापना केली. त्याचा वंशज गूवक (पहिला) अतिशय प्रसिद्धीस आला व रजपूत राजमंडळांत त्याची प्रमुखपणें गणना होत असे. हर्षलेखांत गूवकाविषयीं असें म्हटलें आहे कीं, " यस्मिन्नागावलोकप्रवर नृपसभालब्धवीरप्रतिष्ठः " सार्वभौम नागभट्ट राजाच्या सभेमध्यें गूवकास शौर्याबद्दल मोठी प्रतिष्ठा मिळाली. यावरून कीलहार्न व स्टेन कोनाऊ यांचें असें म्हणणें आहे कीं; गूवक हा नागभट्टाच्या दरबारांतील एक प्रमुख सरदार होता परंतु रा. वैद्यांच्या मतें सामंत हा कदाचित् स्वतंत्र राजा नसेल, तो एखाद्या राजाचा सरदार असेल पण गूवक हा मात्र स्वतंत्र राजा असावा व आपल्या पराक्रमानें तो उदयास आला असावा. व अरबांच्या विरुद्ध लढणाऱ्या रजपूत राजमंडळांत त्याची प्रमुखपणें गणना होत असावी. कदाचित् ह्या राजमंडळाचें आधिपत्यहि नागभट्टाकडे असेल.

पहिला गूवक आणि बप्पारावळ यांमध्यें बरेंच साम्य दिसतें. दोघेहि अत्यंत पराक्रमी वीर, दोघेहि शौर्यानें प्रसिद्धीस आलेले, दोघेहि कुलांचे संस्थापक, दोघांचेंहि, पराक्रम क्षेत्र एक; दोघांनीं मुसुलमानांच्या स्वाऱ्या परतवण्याचा आटोकाट यत्न केला. दोघेंहि सारखेच धर्माभिमानी व दोघेहि सारखेच कट्टे शिवोपासक होते. गुहिलोट घराण्याची एकलिंगजीवर निस्सीम श्रद्धा, तशीच चाहमानांची सावरच्या हर्षदेवावर अत्यंत श्रद्धा. हर्ष लेखांत सांगितलें आहे कीं गूवकानेंच हर्षाचें देऊळ बांधिलें, व त्याच्या पुढील राजांनीं अलोट संपत्ति खर्चून देवळास भव्य स्वरूप दिलें.

गूवकानंतर त्याचा मुलगा चंद्रराज राज्य करूं लागला व त्याच्यानंतर दुसरा गूवक गादीवर बसला. दुसऱ्या गूवकाचा मुलगा चंदन. ह्या चंदनानें दिल्लीच्या तोमर रुद्र राजाचा पराभव केला. या चंदन राजाचा मुलगा वाक्पति पहिला हा अत्यंत वीर्यशाली होता. यानें तंत्रपाळ याचा पराभव केला ( हर्षलेख ). तंत्रपाळ कोणत्या देशचा राजा होता वगैरे कांहींच माहिती सांपडत नाहीं. वाक्पतीस विन्ध्यनृपति म्हणत. ह्यावरून सावर ते विंध्याद्रीपर्यंत त्यानें आपला अधिकार बसविला असावा. रजपुताना गॅझेटियरप्रमाणें पृथ्वीराजरासांत वर्णिलेला माणिकराय तो हाच होय. परंतु या विधानास आधार नाहीं. याच्या कनिष्ठ पुत्रानें ( लछमनानें ) इसवी सन९८२ मध्यें नाडूल येथें ह्याच घराण्याची एक स्वतंत्र शाखा स्थापन केली. सिरोहि येथील हल्लींचे राजे आपणांस सदर शाखेचेच वंशज म्हणतात.

वाक्पतीचा ज्येष्ठ मुलगा सिंहराज सांबरचें राज्य करूं लागला. तो दानशूर असून त्यानें हर्ष देवस्थानास विपुल संपत्ति देऊन देवाळ्याचें छत्र व घुमट सवर्णाचे करविले. दानशूरता, वैभव व पराक्रम या बाबतींत हरिश्चंद्राशीं याची तुलना केली आहे. त्यानें तोमराचा पूर्ण पराभव केला सिंहराजा शत्रूकडून मारला गेला असें म्हणतात. सिंहराजानंतर त्याचा मुलगा विग्रहराज ( दुसरा ) गादीवर बसला. हा सर्व बाबतींत बापाच्याच तोडीचा होता. यानें अनहिलवाडच्या मूलराजाचा पराभव केला. हर्ष देवस्थानास यानें दोन खेडीं इनाम दिलीं. विग्रहानंतर त्याचा भाऊ दुर्लभ ( दुसरा ) राज्य करूं लागला.

दुसऱ्या दुर्लभानंतर बहुधा दुसरा वाक्पति व त्याच्यानंतर त्याचा पुत्र वीर्यराम हा गादीवर आला ( १०३० ). याला धारचा भोज यानें लढाईत ठार केलें. याचा भाऊ चामुंड यानें नरहरपुर येथें एक विष्णुमंदिर बांधिलें होतें. वीर्यरामाचा पुत्र तिसरा दुर्लभ हा १०८५ त राजा होता; तो मालवराज उदयादित्य व गुर्जरराज ( पहिला ) कर्ण याचा समकालीन होता. याच्यामागून अजयदेव हा राजा झाला व त्यानेंच अजमेर शहर स्थापन केलें ( ११०० ), याचीं व याची राणी सोमलदेवी हिचीं पुष्कळ नाणीं आढळतात. त्याच्या मागून पहिला पृथ्वीराज व त्याच्यानंतर अजयराज हे राजे झाले. अजयानें मालवराज सुल्हणाचा पराभव करून, सोमदेवीशीं लग्न केलें ( ११३० ). याला अर्णोराज असेंहि म्हणतात; अवेल्लदेव असेंहि याचें एक नांव आहे. नंतर त्याचा पुत्र चवथा विग्रहराज ( वीसलदेव ) हा गादीवर आला; यानें आपलें राज्य पुष्कळ वाढविलें, दिल्लीच्या ( अनंगपालाचा वंशज ) तोमरराजास जिंकून दिल्ली काबीज केली. कांहीं दिवसापूर्वी अजमेर येथें एका मशिदीच्या खोदकामांत सहा शिलालेख सांपडले; त्यात दोन नाटकें ( अपूर्ण ) आढळलीं. पैकीं एक ललितविग्रहराज नाटक ( सोमदेवकृत ), हें याच विग्रहराजाच्या स्तुतीपर असून, दुसरें हरकेलिनाटक हें खुद्द विग्रहानेंच केलेलें आहे असें म्हणतात. याच्या पुढें पृथ्वीराज दुसरा ( पृथ्वीभट ) हा राजा झाला ( ११६५ ); हा विग्रहाचा पुतण्या होता; याच्या बापाचें नांव सांपडत नाहीं; मात्र त्यानें आपल्या बापा ( अर्णोराजा )चा खून केला असें म्हणतात. पृथ्वीराजा ( दुसरा ) नंतर, अर्णोचा तिसरा पुत्र सोमेश्वर गादीवर आला. याची राणी चेदीराजकन्या असून याचे पुत्र प्रख्यात पृथ्वीराज ( चव्हाण ) व हरिराज हे होते. पृथ्वीराज ( तिसरा ) हा ११७० त गादीवर आला; याचा जन्म ११५९ त झाला होता. याला सावरेश्वर, अजमीराधिपति असें म्हणत. याची राजधानी दिल्लीस होती. यास प्रिथ्वीराज, राय पिठोरा असेंहि म्हणतात. यानें परमर्दी चंदेल्लाचा पराभव करून महोबा घेतलें ( ११८२ ). याच्याच दरबारीं चंदभाट होता. पृथ्वीराजाचें नाव सर्व हिंदूंनां पूज्य वाटत असतें; त्याची उत्तरहिंदुस्थानांत सर्वत्र ख्याति आहे. हाच हिंदूंचा शेवटचा सार्वभौमराजा होय. हा शूर, उदार, प्रेमळ पण विषयी होता. याच्याच चरित्रावर चंदानें ( पृथ्वीराज रासा हें ) महाकाव्य लिहिलें आहे. यानें जयचंदाची कन्या संयुक्ता हिचें हरण केलें ( ११७५ ) होतें. यानें अनेक वेळां मुसुलमानाचा पराभव केला होता. याच्या शौर्यावर व रंगेलपणावर भाटांनीं व कवींनीं महाकाव्यें करावींत

असाच हा पुरुष होता. याच्या कारकीर्दीत शिहाबउद्-दीन घोरी यानें पंजाबचा कांहीं भाग जेव्हां बळकावला, तेव्हां यानें सर्व रजपूतराजांचीं आपसांतील भांडणें मिटवून व त्यांनां एक करून, घोरीचा तराईन किंवा तलावरी ( स्थानेश्वर व कर्नाळ यांमध्यें ) या ठिकाणीं सपाटून पराभव केला व त्याला सिंधूनदाच्यापार हांकलून दिलें ( ११९१ ). या लढाईंत पृथ्वीचा मेव्हणा चितोडकर समरसिंह यानें फार पराक्रम केला. घोरीनें आठ हजार घोडे खंडणी देऊन आपला जीव वांचविला व पृथ्वीनेंहि त्याला उदारपणें सोडून दिलें. परंतु शिहाब हा दुसऱ्या वर्षी बारा हजार घोडदळ व बरेंचसें पायदळ घेऊन पुन्हां स्थानेश्वर येथें आला. या वर्षी रजपुतांत एकी नव्हती. पृथ्वीराजाचा सासरा जयचंद हा मुसुलमानांस आंतून फितूर होता. पृथ्वीराजाची पहिली राणी इच्छिनीकुमारी ही जैत परमार ( अबूचा राजा ) याची मुलगी होती. तिला गुजराथच्या ( भोळ्या ) भीमराजानें मागणी घातली असतां, जैतानें ती नाकारून तिला पृथ्वीराजास देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें निरोप जाऊन पृथ्वीनें येऊन तिच्याशीं लग्न लाविलें. पृथ्वीचा बाप सोमेश्वर यास भोळ्या भीमानें लढाईंत ठार केलें होतें; त्याचा सूड घेण्यासाठीं व सासऱ्या ( जैता ) च्या आग्रहासाठीं पृथ्वीनें भीमावर स्वारी करून त्याचा साबरमतीकांठीं पुरा पराभव केला. हा भीमदेवहि स्थानेश्वरच्या लढाईंत वरील कारणामुळें हजर झाला नाहीं. पृथ्वीनें आपला सासरा जयचंद याच्या राजसूय यज्ञास अडथळा केला होता. तो दंश त्याच्या मनांत होता, म्हणून तो उलट मुसुलमानांस मिळाला. पृथ्वी हा यावेळीं संयुक्तेच्या नादानें वाहवला होता. राज्यकारभाराकडे त्याचें लक्ष राहिलें नव्हतें. चामुंडराय या सरदारास बिनापराध त्यानें कैदेंत ठेविलें, कयमाप नांवाच्या राजहितदक्ष प्रधानास अविचारानें ठार केलें वगैरे कारणांनीं त्याचे कांहीं सरदारहि मुसुलमानांस आंतून फितूर झाले. जयचंदास पृथ्वीचा राग येण्यास आणीक एक कारण होतें. तो व पृथ्वी हे मावसभाऊ होते. दिल्लीचा तुवरवंशी शेवटचा राजा अनंगपाळ यास दोन मुली होत्या. त्यांचे हे दोघे (पृथ्वी व जयचंद ) पुत्र. अनंगानें आपलें राज्य जयचंदास न देतां पृथ्वीस दिलें ( अशी एक दंत कथा आहे ). हें शल्य जयचंदाच्या मनांत होतें त्यामुळें दुसऱ्या खेपेस शिहाबउद्दीन यास जयचंदानें मुद्दाम वकील पाठवून पृथ्वीवर स्वारी करण्यास बोलावून आणिलें असें म्हणतात. ही दुसरी लढाई स्थानेश्वरास झाली. यावेळीं रजपुतराजे दीडशेंपर्यंत होते व पृथ्वीचें सैन्यहि पुष्कळ होतें; परंतु वर सांगितल्याप्रमाणें तें बेदिल होतें. समरसिंह, चामुंडराय, हमीर हाडा वगैरे पृथ्वीच्या निकटच्या मित्रांनीं गंगोदकाच्या शपथा घेतल्या होत्या. शिहाब-उद्-दीननें रजपुतांच्या सैन्याची माहिती पूर्ण मिळविली होती. परंतु पृथ्वीनें मुसुलमानांच्या हालचालीकडे दुर्लक्ष केलें. प्रथम लढाई झाली, तींत रजपुतांनीं मुसुलमानांचा मोड केला तेव्हां ते पळाले; त्यावेळीं रजपूत विस्कळीत होऊन त्यांचे पाठीस लागले. तें पाहून शिहाबनें आपलें सैन्य एकत्र करून एकदम उलटून रजपुतांवर हल्ले केले. त्यांत रजपुतांचा पराभव झाला. भयंकर लढाई होऊन समरसिंहादि सर्व प्रमुख मंडळी ठार झाली. पृथ्वीराज हा शत्रूच्या हातीं सांपडला; त्यास त्यांनीं ठार मारिलें. मुसुलमानांस मार्गे हटविण्याचा हा रजपुतांचा शेवटचा प्रयत्न होय. घोरीनें लगेच अजमिरावर स्वारी करून तेथील निरपराधी लोकांची कत्तल करून तेथें आपल्या एका हस्तकाची स्थापना केली. आसपासचीं देवळें फोडून तेथें मशिदी बांधल्या व अखेरीस ऐबक नांवाच्या आपल्या एका गुलामास दिल्लीस ठेवून व त्याच्या हातीं जिंकलेल्या प्रांतांचा कारभार सोंपवून शिहाब परत गेला. ( ११९२ ). पुढें दोन वर्षांनीं शिहाबनें स्वारी करून कनोज घेतलें; त्यावेळीं जयचंदास आपल्या कर्माचें फळ मिळालें ( ११९४ ). पृथ्वीराजाच्या मृत्यूबद्दल चंदानें रासामध्यें निराळीच गोष्ट दिली आहे ( चंद पहा ). याप्रमाणें या चाहमान ऊर्फ चौहान ( चव्हाण ) घराण्याचा शेवट झाला. इ. स. ११६२ त एका आसाराजाच्या अल्हणदेव नांवाच्या पुत्राचा व चाहमान राजाचा उल्लेख आढळतो; हा कदाचित अजमेर शाखेंतील असावा. तसेंच इ. स. १२२० त जाबालिपुरच्या एका उदयसिंह चाहुमानाचा उल्लेख सांपडतो. याच्याच कारकिर्दींत विवेकविलासकर्ता जिनदत्त हा उदयास आला.

हर्ष लेख ( १० वें शतक ) पावेतों तरी चाहमान आपणांस सूर्यवंशी म्हणवीत असत. चौदाव्या शतकापर्यंत हीच समजूत दृढ होती. हम्मीर काव्यांत चाहमानाबद्दल पुष्कळ माहिती आहे. ब्रह्मदेवाला यज्ञ करावयाचा होता म्हणून त्यासाठीं सूर्यापासून चाहमानांस त्यानें निर्माण केलें व अजमीर येथें यज्ञ केला. येथें ब्रह्मदेवाचें कमळ ( पुष्कर ) हातांतून खालीं पडलें; तेथें पुष्कर सरोवर बनलें. येथेंच फक्त ( साऱ्या हिंदुस्थानांत ) ब्रह्मदेवाचें मंदीर आहे, अशी आख्यायिका आहे.

परंतु याच आख्यायिकेवरून चंदभाटानें चाहमान कुलाचा अग्निकुलाशीं संबंध जोडला आहे. एकंदरीनें असें दिसतें कीं, चाहमान हे सूर्यवंशी क्षत्रिय असावेत व त्यांचा प्रवेश हिंदुस्थानांत फार प्राचीनकाळीं झाला असावा. अर्वाचीन चाहमान आपणांस सूर्यवंशी न समजतां अग्निवंशी मानतात हा वस्तुस्थितीचा विपर्यास होय.

[ संदर्भग्रंथः—एपि. इंडिका. पु. २, ९; इंडि. अँटिक्वरी. १९१२; राजपुताना ग्याझे. पु. ३; विजोलिया व हर्ष शिलालेख; मध्ययुगीन भारत भा. २; पृथ्वीराज विजय; पृथ्वीराजरासा; स्मिथ—अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया; मुसुलमानी रियासत; तबकत् ई नासिरी.]

चाहमान यांची वंशावळ(या लेखांत आली आहे ती)अशीः—

चाहमान मूळ पुरुष ( इ. स. सुमारें ७०० )
|
सामंत ( ७१३ )
|
जयराज
|
विग्रह पहिला
|
श्रीचंद्र
|
गोपेंद्र
|
दुर्लभ पहिला
|
गूवक पहिला ( ८३३ )
|
चंद्र
|
गूवक दुसरा
|
चंदन
|
वाक्पति पहिला उर्फ बाप्पयराज विन्ध्य
|
सिंह
|
विग्रह दुसरा
|
दुर्लभ दुसरा ( ९७३ )
|
वाक्पति दुसरा

वीर्यराम विग्रह तिसरा ( १०३० ) | चामुंड | लक्ष्मण ( ९८२ )

वीर्यराम विग्रह तिसरा ( १०३० )
|
दुर्लभ तिसरा ( १०८५ )
|
अजयदेव ( ११०० )
|
पृथ्वीराज पहिला
|
अजयराज अर्णोराज ( ११३० )

अनाम | विग्रहराज चवथा वीसल | सोमेश्वर

अनाम
|
पृथ्वीराज दुसरा ( ११६५ )

विग्रहराज चवथा वीसल — सोमेश्वर
|
पृथ्वीराज तिसरा रायपिठोरा ( ११५९–११९३ ) | हरिराज

**चालिसगांव** ता लु का.—मुंबई इलाख्यांत पूर्व खानदेश जिल्ह्यांतील एक तालुका, क्षेत्रफळ ५०९ चौ. मै. असून उ. अ. २० १६' ते २०° ४१' व पू. रे. ७४° ४६' ते ७५° १०' यांच्यामध्यें आहे. यांत एक मोठें शहर चाळीसगांव ( मुख्य ठाणें ) व १३३ खेडीं आहेत. लोकसंख्या १९११ मध्यें ९९२३५ होती. १९०३–४ मध्यें उत्पन्न १५००० रु. होतें. चालिसगांव हा जिल्ह्याच्या अगदीं दक्षिणेकडे सातमाल पर्वताच्या पायथ्याशीं आहे. याच्या उत्तर भागांत गिरणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वहाते. गिरणा नदीस मन्माद व तितर नद्या मिळतात. गिरणेच्या कांठची जमीन काळी आहे, तथापि पिकांस साधारणच आहे.

श ह र—मुंबई. पूर्वखानदेश, धुळ्याच्या दक्षिणेस ३० मैलांवर रेल्वेवर चालिसगांव तालुक्याचें हें मुख्य ठिकाण लो. सं. ( १९११ ) ९४५३ चें गांव आहे. येथें रेल्वे झाल्यापासून व्यापाराची वाढ झाली आहे. येथून धुळ्यास रेल्वेचा फांटा गेला आहे. येथील किल्ला १८६२ सालीं साधारण बरा होता पण आतां अगदीं पडून गेला आहे. येथें प्रवाश्यांकरितां बंगला आहे.

**चिक**—एक जात. वस्ती बिहार–ओरिसा व संयुक्त प्रांत यांतून बरीच आहे. कुकच्या मतें खाटिकांमध्यें चिक ही एक पोटजात आहे. परंतु कानपूर व इतर कांहीं प्रांतांत चिक व खाटिक लोक एकमेकांपासून अगदीं वेगळे असून त्यांमध्यें कोणताहि संबंध नाहीं. सर्व चिक लोक हिंदू आहेत. बकर कसाब हें कुक म्हणतो त्याप्रमाणें चिक जातीचें दुसरें नांव नसून ती एक स्वतंत्र मुसुलमानी जात आहे. चिक लोकांत पुनर्विवाहाची व दिराशीं विवाह करण्याची चाल आहे. त्याचप्रमाणें त्या लोकांत कायमची पंचायतहि आहे; चिक लोक परजातीशीं विवाहसंबंध करीत नाहींत. चिक लोकांत ७ गोत्रें आहेत. आसामांतहि या जातीचे कांहीं लोक ( ५७०३ ) मळयामध्यें आढळतात. [ से. रि. संयुक्तप्रांत १९११ ].

**चिकंजी**—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हनगलच्या पश्चिमेस अडीच मैलांवर खेडें आहे. येथील स्मार्तांच्या अमृतलिंग देवळाबाहेर चार शिलालेख असून देऊळ ५०० वर्षांपूर्वीचें असावें असें म्हणतात.

**चिकबळ्ळापूर**, ता लु का.—म्हैसूर संस्थानच्या कोलार जिल्ह्याच्या पश्चिमेकडील एक तालुका असून याचें क्षेत्रफळ २५०चौ. मै. आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ५६७५८ होती. यांत एक गांव व २१७ खेडीं आहेत. हा तालुका डोंगराळ असून यांत ७ नद्या आहेत. नैर्ऋत्येकडील जमीन सुपीक असून तींत ऊंस चांगला पिकतो. याच्या ईशान्येकडील प्रदेशांत मोठमोठ्या दऱ्या आहेत.

गां व.—हें म्हैसूर संस्थानच्या कोलार जिल्ह्यांतील त्याच नांवाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण असून दोड्डबळ्ळापूरच्या ईशान्येस २२ मैलांवर आहे. १९११ सालीं याची लोक-

संख्या ७६६१ होती. हें नंदीदुर्ग रांगेच्या पूर्वेकडील पायथ्याशीं असून आवती येथें आश्रयास राहिलेल्या मोरसु वोक्कलिंग लोकांच्या नायकानें १४७९ त वसविलें. त्या वेळेपासून हैदरअल्ली घेईपर्यंत हें विजयानगरचें मांडलीक असून वरील नायकाच्या वंशजांच्या ताब्यांत होतें. येथें १८७० त म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

**चिकाकोल,** तालुका.—हा मद्रास इलाख्याच्या गंजम जिल्ह्यांतील एक तालुका असून याचें क्षेत्रफळ ३५० चौ. मैल आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या २६६११७ होती. या तालुक्यांत दोन गांवें व ३०५ खेडीं आहेत.१९०३–०४ सालीं सान्याचें उत्पन्न ४१६५०० रुपये होतें. या तालुक्याच्या दलदलीच्या प्रदेशांत कालवे आहेत.

शहर.—मद्रास इलाख्याच्या गंजम जिल्ह्यांतील एका विभागाचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण असून लांगुल्य नदीच्या डाव्या तिरावर वसलें आहे. १९२१ सालीं याची लोकसंख्या १६२९८ होती. मुसुलमानी अमदानींत हें उत्तर सरकार विभागापैकीं एका सरकारचें मुख्य ठिकाण होतें. येथें १६४१ त गोवळकोंड्याच्या कुतुबशाहींतील शेर महम्मदखान या फौजदारानें बांधलेली एक मसीद आहे. हें इंग्रजांच्या ताब्यांत आल्यावर कांहीं दिवस जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून येथें लष्करी छावणी होती. १८६५ पर्यंत येथें जिल्हान्यायधीश रहात असे. याची हवा चांगली आहे. येथें १८६७ सालीं म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. येथें एक हायस्कूल व सार्वजनिक पुस्तकालय आहे. हें मलमलीच्या व इतर कपड्याकरितां फार प्रसिद्ध आहे.

**चिकोडी,** तालुका.—मुंबई इलाख्याच्या बेळगांव जिल्ह्याचा वायव्येकडील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ४९४ चौ. मैल आहे. यांत १ शहर व ९७ खेडीं आहेत. लोकसंख्या ( १९११ ) १५७:५९ होती. जिल्ह्यांतील इतर भागांपेक्षां याची लोकवस्ती दाट असून तिचें प्रमाण दर मैलास ३६४ आहे. १९०३–०४ सालीं सान्याचें व इतर उत्पन्न ३.५६ लाख होतें. याची तंबाखू, उंस, फळें व भाजीपाला या जिनसांकरितां प्रसिद्ध आहे. दरवर्षी ३२ इंच पाऊस पडतो.

गांव.—तालुक्याचें मुख्य ठिकाण. याची लोकसंख्या ६८९७ होती. याची व्यापाराकरितां प्रसिद्धि आहे. १७९० त कॅप्टन मूरच्या म्हणण्याप्रमाणें हें एक मोठें शहर होतें. त्या वेळेस येथें उत्तम द्राक्षें होत असत. येथें एक पतपेढी व इंग्रजी शाळा आहे. हल्लीं कापड व भांडीं हीं होतात.

**चिक्कणार्ति.**—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. हुबळीच्या आग्नेयीस सुमारें ११ मैलांवरचें एक खेडें. येथील कळमेश्वराच्या देवळांत एक शिलालेख आहे.

**चिक्केरूर**—मुंबई इलाखा. धारवाड जिल्हा. कोडच्या पश्चिमेस सुमारें १० मैलांवरचा एक गांव. दर बुधवारीं येथें बाजार भरतो. हिरिकेर नांवाच्या तलावावर इ. स. १०९४ व ११६३ सालचे शिलालेख आहेत. बनशंकरी, हनुमंत, आणि सोमेश्वर या देवळांत अनुक्रमें इ. स. १०५३, ११०१, आणि ११०१ या सालचे शिलालेख आहेत. त्याचप्रमाणें इ. स. १०७७ आणि १२२२ या सालचे दोन वीरगल व इ. स. ११२० व ११२९ सालचे दोन शिलालेख येथें आहेत.

**चिक्टीआबर**—मध्यहिंदुस्थानच्या भोपावर संस्थानिक प्रदेशांतील एक ठाकुरात.

**चिक्कनायकनहळ्ळी,** तालुका.—म्हैसूरसंस्थानच्या तुमकूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील एक तालुका असून याचें क्षेत्रफळ ४३५ चौ. मै. आहे. १९११ सालीं लोकसंख्या ५७४८४ होती. यात १ शहर व २०० खेडीं आहेत. १९०३–४ सालीं याचें सान्याचें उत्पन्न ११९००० रु. होतें. याच्या पूर्वोत्तर प्रदेशांत टेकड्यांची रांग आहे. याच्या ईशान्येस बोरंकनेव नांवाचें तळें आहे. यांत ताडाचीं व सुपारीचीं झाडें पुष्कळ आहेत.

गांव.—तालुक्याचें मुख्य ठिकाण असून याची लोकसंख्या १९११ सालीं ५१८८ होती. हें १६ व्या शतकाच्या अखेर कर्नाटकी सरदारांपैकीं चिक्कनायक यानें बसविलें. १६७१ पर्यंत मुसलमान व मराठे लोकांनीं यावर आळीपाळीनें अंमल गाजविला. १६७१ सालीं हें म्हैसूरच्या राजानें हस्तगत केलें. १६७२ त म्हैसूरच्या दोड्डदेवराय राजा येथें मरण पावला. १७९१ त मराठ्यांनीं येथील किल्ल्याचा विध्वंस करून हें शहर लुटलें. याच्या आसपास सुपारी व ताडांच्या झाडाचे बगीचे आहेत. येथें रंगीत व पांढरें सुती कापड होतें. १८७० त म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. येथें ७ देवालयें आहेत.

**चिक्कमगळूर,** तालुका.—म्हैसूर संस्थानच्या कडूर जिल्ह्याच्या मध्यावरील एक तालुका असून याचें क्षेत्रफळ ६४० चौ. मैल आहे. १९११ सालीं याची लो. सं. ८२०४४ होती. यांत १ गांव व २२० खेडीं आहेत. १९०३–४ सालीं उत्पन्न २१३००० रु. होतें. याच्या पश्चिमेकडील सरहद्दीवरून भद्रानदी वहाते. यांत दरवर्षी ३६ इंच पाऊस पडतो. चिक्कमगळूरच्या सभोंवतालचा प्रदेश उंच असून त्यांतील जमीन सुपीक व काळीची आहे. व बाबाबुदन पर्वतामधून निघणाऱ्या कित्येक नद्या या प्रदेशांतून वहात जातात. या प्रदेशांत झाडेंझुडपें फारशीं नाहींत पण त्यांत गहूं, हरभरा, ऊंस, तांदूळ, कांदे हे जिन्नस होतात. बाबाबुदन पर्वताच्या उतारावर कॉफी होते.

शहर.—तालुक्याचें मुख्य ठिकाण. १९११ सालीं याची लो. सं. ८५३७ होती. हें बाबाबुदन पर्वताच्या दक्षिणेकडील काळीची जमीन असलेल्या सुपीक खोऱ्यांत वसलें आहे. येथील किल्ला ९ व्या शतकांत गंग घराण्याच्या ताब्यांत होता व त्यापासून पुढें तो होयसल घराण्यानें हस्तगत केला. स्थ्यांचें गांव १८६५ त अस्तित्वांत आलें. येथें

कित्येक मुसुलमान व्यापारी व दुकानदार राहतात. येथें १८७० त म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

**चिखलदरा** ( चिकल्डा )—वऱ्हाडांतील उमरावती जिल्ह्याच्या मेलघाट तालुक्यांतील एक हवा खाण्याचें प्रसिद्ध ठिकाण असून तें सातपुडा पर्वताच्या ५ मैल लांब तीनचतुर्थांश मैल रुंद व समुद्रसपाटीपासून ३६६४ फूट उंच अशा एका पठारावर वसलें आहे. हें एलिचपुराहून २० मैल अंतरावर असून येथून एलिचपुरास जाण्यास ३ रस्ते आहेत. चिखलदरा व एलिचपूर यांच्या दरम्यान घटंग येथें प्रवाशी लोकांस उतरण्याकरितां एक बंगला आहे. १८३९ पासून याची चांगल्या हवेबद्दल प्रसिद्धि असून येथें मेलघाटाचा तहशिलदार व एक जंगलखात्याचा अधिकारी राहतो. वऱ्हाडांतील प्रमुख अधिकारी उन्हाळ्यांत कांहीं दिवस येथें रहावयास येतात. येथील हवा समशीतोष्ण, थंड व प्रकृतीस मानवेल अशी आहे. मे, जुलै व डिसेंबर महिन्यांतील सर्वसाधारण उष्णमान अनुक्रमें ८६°, ७५°, ६५° असतें. येथील देखावा सुंदर आहे व येथें नाना तऱ्हेचीं फुलें व वनस्पती दृष्टीस पडतात. पूर्वी येथें बटाटे होत असत. चहा देखील येथें होण्यासारखा आहे. येथील खासगी बगीच्यांतील कॉफी फार उत्तम असते.

**चिखली**, ज मी न दा री—मध्यप्रांत. जिल्हा भंडारा. या जमीनदारींत चिखली आणि सावंगी अशीं दोनच खेडीं आहेत.अर्जुनी जमीनदारीच्या दक्षिणेस ही जमीनदारी आहे. जमीनदार हलबा घराण्याचे आहेत. एकंदर ५० लोक या घराण्याचे असून हल्लीं ते गरीब शेतकरी झाले आहेत.

**चिखली**, ता लु का—वऱ्हाड. बुलढाणें जिल्ह्यांतील एक तालुका. उत्तर अ. २०° ते २०° ३७' व पूर्व रे. ७५°५७' ते ७६° ४२' यामध्यें. क्षेत्रफळ १००९ चौरस मैल. या तालुक्यांत २९९ गांवें आणि ८ जहागिरीचीं गांवें आहेत. याला पूर्वी देउळघाट तालुका म्हणत असत. तालुक्यांत महत्वाच्या अशा नद्या नाहींत. लोकसंख्या ( १९०१ ) १२९५९०. शेतकी—जमीन अगदीं साधारण प्रतीची आहे-तरी खरीप आणि रब्बी पिकें बरी येतात. खरीप पिकें—ज्वारी, कापूस, तूर इत्यादि. रब्बी पिकें—गहूं, हरभरा,मसूर इत्यादि. जिल्ह्याचें मुख्य ठिकाण बुलढाणा याच तालुक्यांत आहे.

गां व.—हें तालुक्याचें मुख्य ठिकाण असून बुलढाण्यापासून १४ मैल आहे. उ. अ. २०° २१' व पू. रे. ७६°१८' लोकसंख्या ( सन १९०१ ) ५८८९ क्षेत्रफळ.४४४६ एकर. या गांवाच्या पश्चिमेस एक महादेवाचें देवालय असून तें पुराणवस्तुसंशोधकांच्या दृष्टीनें महत्वाचें आहे.

**चिखली**, ता लु का.—मुंबई इलाख्याच्या सुरत जिल्ह्याच्या पूर्वेकडील एक तालुका असून याचें क्षेत्रफळ १६७ चौ. मै. आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ६२७७४ होती. यांत ६३ खेडीं आहेत. १९०३-४ सालीं सारा व इतर उत्पन्न मिळून २.३ लाख रु. वसूल झाले होते. हा तालुका कित्येक पठारांचा बनला असून या पठारांच्या दरम्यान सखल प्रदेश आहेत. एकंदरींत यांतील जमीन नापीक असून सखल प्रदेशांत मात्र कांहीं धान्यें व ऊस यांचें पीक होतें. यांत अंबिका, कावेरी या नद्या आहेत.

**चिखली**,सं स्था न.—मुंबई इलाखा. खानदेश जिल्ह्यांतील एक संस्थान. यांत भिल्लांची वस्ती आहे. संस्थानिकाच्या पूर्वजांनीं राजपिप्पलापासून मूळ जमीनी घेतल्या.

**चिंगलपट**, जि ल्हा.—हा मद्रास इलाख्याच्या पूर्व किनाऱ्यावरील एक जिल्हा असून याचें क्षेत्रफळ ३०७१ चौ. मै. आहे. याच्या पूर्वेस बंगालचा उपसागर असून उत्तरेस नेलोर आहे व पश्चिमेस व दक्षिणेस उत्तर व दक्षिण अर्काट आहे. हा जिल्हा सर्व साधारण सपाट असून याचा समुद्राकडील भाग दलदलीचा आहे व इतर भाग कांहीं ठिकाणीं डोंगराळ आहे. यांतील तिरुवल्लूर तालुक्यांत नागलापुरम पर्वत व आणखी एक टेंकड्यांची रांग आहे. दुसऱ्या रांगेत २५४८ फूट उंचीचें कंम्बाक्कम नांवाचें एक शिखर असून नागलापुरमची उंची २५०० फूट आहे. या जिल्ह्यांत पालर कोर्सलैयार, अरणी, कुवम, चेय्यार, अड्यार या नद्या असून पुलीकत व एन्नोर हीं सरोवरें आहेत हीं सरोवरें बकिंगहॅम काल्व्यानें एकमेकांस जोडलीं आहेत. यांतील एकाहि नदींतून आगबोटी जाऊं येऊं शकत नाहींत. या जिल्ह्यांत जंगली जनावरें फारशीं नाहींत. कधीं कधीं वाघ, अस्वल वगैरे जनावरें दृष्टीस पडतात. यांतील हवा समशीतोष्ण असून एकंदरींत प्रकृतीस मानवणारी आहे सबंध जिल्ह्यांतील पावसाचें प्रमाण ४५ इंच आहे.

इ ति हा स.—स. ७५० पर्यंत हा जिल्हा पल्लव राज्याचा एक भाग होता. स. ७६० च्या सुमारास पल्लव घराणें नामशेष झाल्यानंतर हा म्हैसूरच्या पश्चिमगंग घराण्याच्या हातीं लागला. या घराण्याच्या अमदानींत मालखेडच्या राष्ट्रकूट घराण्यानें यावर ९ व १० व्या शतकांत स्वाऱ्या करून हा हस्तगत केला होता. पुढें लवकरच या जिल्ह्यावर चोल घराण्यानें आपलें राज्य स्थापन केलें. १२५० च्या सुमारास चोल घराण्यास उतरती कळा लागली; व वरंगळच्या काकतीय घराण्यानें या जिल्ह्यावर आपली सत्ता स्थापन केली. या घराण्याच्या अमदानींत ज्या चोल राजांनीं या जिल्ह्याचा राज्यकारभार चालविला ते सर्व काकतीय घराण्याचे मांडलिक होते.

सन १३९३ च्या सुमारास या जिल्ह्याचा विजयानगरच्या राज्यांत समावेश होऊं लागला. पुढें स. १५६५ त तालीकोट येथें विजयानगरचा पराभव झाल्यावर त्याचा राजा चंद्रगिरी येथें जाऊन राहिला. याच सुमारास हा जिल्हा विजयानगरच्या एका नाइकाच्या हातीं लागला. हा अधिकारी चंद्रगिरी येथील राजाचा मांडलिक म्हणवीत असे. स. १६३९ त याच नाइकाच्या वंशजापासून इंग्रजांस फोर्ट

सेंट जॉर्ज किल्ल्याच्या जागेची सनद मिळाली होती. यानंतर लवकरच या जिल्ह्यावर कुतुबशाही अंमल सुरू झाला. १६८७ त गोवळकोंड्याची कुतुबशाही लयास गेल्यावर याच्यावर मोंगलांनीं आपली सत्ता स्थापन केली. स. १७६३ त अर्काटचा नबाब महम्मदअली यानें हा जिल्हा इंग्रजांस जहागीर म्हणून दिला व सन १७६५ त मोंगल बादशहानें जहागिरीच्या सनदेस आपली संमति दिली. १७६९ व १७८० सालीं हैदरअल्लीनें या जिल्ह्यावर स्वारी करून त्याची धूळधाण उडविली. पुढें स. १८०१ मध्यें याची गणना इंग्रजांच्या राज्यांत होऊं लागली. या जिल्ह्यांतील पुलीकत बंदरावर डच लोकांनीं स. १६०९ त वसाहत केली. पुढें इसवी सन १८२५ मध्यें तें इंग्रजांच्या स्वाधीन करण्यांत आलें. इसवी सन १९२१ मध्यें या जिल्ह्यांची लोकसंख्या १४९३०५८ होती. यांतील लोक तेलगू व तामील भाषा बोलतात.

शेती.—या जिल्ह्यांत काळी, लाल व बरड अशा तीन जातींच्या जमिनी असून त्या प्रत्येकींत लोम, चिक्कण व वाळवंटी असे तीन प्रकार आहेत. यांतील वाळवंटीशिवाय इतर सर्व जमीन सुपीक आहे. पण काळी जमीन सर्वांत सुपीक आहे. या जिल्ह्याच्या बहुतेक भागांत रयतवारी पद्धति चालू असून ६०६८५३ एकर जमीनदारी व इनामी जमीन आहे. या जिल्ह्यांतील मुख्य पिकें म्हटलीं म्हणजे तांदूळ व रागी आहेत. याशिवाय यांत बरगू, नीळ, कंबू, भुईमूग वगैरेचें उत्पन्न होतें. या जिल्ह्यांत २५५३ तळीं, १५८ नदीचे कालवे व ३४० ओढ्यांचे पाट असून त्यांचें बऱ्याच शेतांस पाणी पुरतें. यांच्याशिवाय विहिरींचें पाणीहि शेतकीच्या उपयोगांत आणितात. यांत जंगलें फारशी नाहींत. जंगलांचा मुख्यत्वेकरून कुरणांकडे उपयोग होतो. १९२१–२२ सालीं जंगलाचें उत्पन्न ६२ हजार रु. होतें.

धातू.—या जिल्ह्यांत दोन जातीचे फेलस्पार, कित्येक रंगाचे ग्रानाइट व जिप्सम वगैरे धातू सांपडतात.

व्यापार.—या जिल्ह्यांत चांगलें सुती व रेशमी कापड विणलें जातें. पूर्वी अरणी येथें उत्तम मलमल निघत असे. येथें कांहीं चामडें कमविण्याचे कारखाने आहेत; परंतु अमेरिका व इतर ठिकाणीं निघणाऱ्या क्रोम चामड्याचा प्रसार वाढल्यामुळें हल्लीं हा धंदा बुडत चालला आहे. सध्यां कातडीं न कमावतां तशीच मद्रास शहरीं पाठाविण्यांत येतात व तेथून तीं परदेशांत रवाना होतात. गिंदी येथें एका युरोपिअन कंपनीचा सिगारेटचा कारखाना आहे. मद्रासजवळ सेंबिम येथें कागदाचे १० कारखाने आहेत. याशिवाय एकंदर जिल्ह्यांत ४०० निळीच्या व ५०० तेलाच्या गिरण्या आहेत. या जिल्ह्याच्या किनाऱ्यावर म्हणण्यासारखें एकहि बंदर नाहीं. व्यापार म्हटला म्हणजे, गोवऱ्या, सर्पण वगैरे किरकोळ जिन्नस मद्रास शहरास पुरवून तेथून घासलेट, कापड, धातू वगैरे जिन्नस आणणें हा होय. या जिल्ह्यांत आगगाडीचे रस्ते आहेत. याशिवाय यांतील बकिंगहॅम कालव्यांतून दक्षिण अर्काट व याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांपर्यंत जलमार्गानें जातां येतें. या जिल्ह्याचें जमीनमहसुलाचें व इतर करांचें उत्पन्न सुमारें १२ लाख आहे. १९०३–०४ सालीं या जिल्ह्यांत ८३३ प्राथमिक, २५ दुय्यम प्रतीच्या, ७ विशेष प्रतीच्या व ४२२ खासगी शाळा असून २ कॉलेजें होतीं. १९०३–०४ सालीं शिक्षणाप्रीत्यर्थ ३३७००० रु. खर्च झाले. जिल्ह्यांत एकंदर १७ दवाखाने असून त्यांपैकीं एक स्त्रियांचा आहे.

पोटविभाग.—मद्रास इलाख्याच्या चिंगलपट जिल्ह्यांतील एक पोटविभाग यांत चिंगलपट, कांजीवेरम व मदुरांतकम हे तालुके आहेत.

तालुका.—या जिल्ह्याचा समुद्रकिनाऱ्यावरील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ४३६ चौ. मै. आहे. याची लोकसंख्या १९२१ सालीं १८१८४८ होती. यांत दोन गांवें व २९८ खेडीं असून चिंगलपट हें मुख्य ठिकाण आहे. १९२१–२२ सालीं सारा व इतर पट्टया यांचें उत्पन्न सुमारें तीन लाख रु. होतें. यांतील जमीन सुपीक नाहीं. पालर नदीचे कालवे काढले आहेत.

शहर.—मद्रास इलाख्यांतील चिंगलपट जिल्ह्यांतील त्याच नांवाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें मद्रास शहराच्या ईशान्येस ३६ मैल अंतरावर वसलें आहे. याची लोकसंख्या १९२१ सालीं ११७६३ होती. हें रेल्वेचें जंक्शन असून जिल्हाकोर्ट विभागाचा अधिकारी यांचें मुख्य ठिकाण आहे. विजयानगरच्या कृष्णदेवराजाचा प्रधान तिम्मिरराजा यानें येथील किल्ला बांधला असें म्हणतात. १८९६ त येथें म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. येथील हवा साधारण थंड असून प्रकृतीस मानवेल अशी आहे. येथें २ मैल लांब व १ मैल रुंद असा एक तलाव आहे. येथें इलाख्याची गुन्हेगार मुलांची शाळा असून तींत चित्रकला, सुतारी-लांकडावरील कोरीव काम, लोखंड व इतर धातूंचें काम व शिवणकाम हे धंदे शिकविले जातात. याशिवाय शेतकी कॉलेज, शिक्षकांकरितां कॉलेज व दोन हायस्कुलें आहेत.

**चिंच**—नेहमीं हिरवा असणारा, व हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश यांच्या पुष्कळ भागांत लावण्यांत येणारा असा हा मोठा वृक्ष आहे. ओसाड व जंगली भागांत याची झाडें आपोआप वाढतात. हा वृक्ष मूळचा आफ्रिकेंतील आहे असें म्हणतात. अरब लोक याला तामरेहिंदी असें म्हणत व यावरून यास इंग्रजी टॅमेरिंड शब्द आला आहे. या झाडास संस्कृतमध्यें आम्लिका, चिंचा; मराठींत चिंच; गुजराथींत आमली; हिंदींत इमली, इत्यादि नांवें आहेत.

चिंचेचे तीन प्रकार आहेत (१) आंबट, (२) गोड, व (३) तांबडी. तिसऱ्या प्रकारच्या चिंचेचा गीर गुलाबी तांबडा असून जास्त दिवस टिकण्यामध्यें तीच चिंच सर्वांत चांगली असते असें म्हणतात. चिंचेला एप्रिल व मे महिन्यांत फुलें

येऊन हिवाळ्यांत फळ तयार होतें. चिंचेखालीं निजूं नये किंवा तंबू, डेरे वगैरे ठोकूं नयेत; विशेषतः पावसाळ्यांत कपड्यावर चिंचेचीं पानें पडल्यावर कपडा लवकर कुजून विरूं लागतो. चिंचेचें झाड मळीच्या अथवा गाळाच्या जमिनींत चांगलें वाढतें; व या झाडामुळें सभोंवारच्या प्रदेशाला शोभाहि चांगली येते.

गु ण ध र्म व प यो ग.—या झाडास घाणेरडा डिंक निघतो; परंतु त्याचा कांहींच उपयोग नसतो. जुन्या वृक्षांतून कधीं कधीं वयाहिशकम ॲफ्लेटयुक्त द्रव निघतो असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. पानांच्या काढ्यापासून एक प्रकारचा तांबडा रंग तयार होतो व निळीनें रंगविलेल्या कपड्यास तो रंग दिल्यास कपड्यावर पिंवळी छटा येते. कुसुंब्याचा रंग देतांना या झाडाचीं पानें, फळें व फुलें कामीं पडतात. चिंचोक्यांपासून अंबरच्या रंगाचें ( पिवळसर तांबूस ) तेल निघतें. पित्तशामक म्हणून चिंचेच्या फळाचा उपयोग आज कित्येक वर्षे केला जात आहे. शाकभाजींत घालण्याकरितां चिंचेचा पुष्कळ उपयोग करतात. चिंच व मीठ यांचे पाणी वांतिकारक असतें. चिंचेच्या मोठ्या झाडापासून वर्षास सरासरी ४,४॥ मण चिंच निघते, व ती वाळून तींतील चिंचोके काढल्यावर तिचें वजन सुमारें दोनपूर्णांक एकद्वितीयांश मण होतें असा एका लेखकानें अंदाज केला आहे. मेवा मिटाईचे पदार्थ व सरवतें करण्याकरितां जिनोवामध्यें चिंचेला मागणी वाढत आहे. अमेरिकेमध्यें चिंचेंत एक थर चिंचेचा व एक साखरेचा अशा रीतीनें भरून वर पाक ओतून एक पदार्थ तयार करतात. अशा रीतीनें मुरवलेल्या चिंचा मुरंब्याप्रमाणें कित्येक दिवस राहूं शकतात.

चिंचोक्यांवरील साल काढून ते उकळून किंवा भाजून गरीब लोक विशेषतः दुष्काळांत खातात. लहान कोंम,पानें व फुलेंहि निरनिराळ्या प्रकारांनीं खाण्यांत येतात. कागद वगैरे चिकटविण्याकरितां आणि देशी कांबळ्यांना लावण्याकरितां चिंचोक्यांची खळ करतात. चिंचेचें लांकूड चिवट व टिकाऊ असून, गाडीचीं चाकें, रंधे, खुर्च्या, टेबलें, मुसळें, उंसाचे चरक वगैरे करण्याकरितां तें चांगलें असतें. कांतकामालाहि हें लांकूड उत्तम असतें. चिंचेच्या लांकडाचा विस्तव प्रखर असतो. चिंचेपासून टार्टरिक व सायट्रिक अम्लें तयार करतात. चिंचेचे नरेच औषधी उपयोग आहेत. भांगेवर चिंचेचें सार उतारा म्हणून देतात.

गो र ख चिं च.—हिची माहिती विभाग १२ पृष्ठ २२७ येथें दिली आहे.

**चिचगड, जमीनदारी**—मध्यप्रांत. जिल्हा भंडारा. साकोळी तहशिलीच्या आग्नेयीस नांदगांव संस्थान व चांदा जिल्हा यांच्या सरहद्दीवर ही वसलेली असून हिचें क्षेत्रफळ २४० चौरस मैल आहे. बराच भाग डोंगराळ असून येथें जंगल आहे. जमीनदार हलबा आहेत. हे पूर्वी संयुक्त प्रांतांतील रजपूत असून एकदां यांच्या घराण्यांतील एका रूपवती मुलीला एका मुसुलमान राजानें मागणी घातली. तेव्हां हे तेथून पळून जाऊन चांदा येथील गोंड राजाच्या आश्रयास येऊन राहिले. याच घराण्यांतील नरसिंग ठाकूर हा वीरशहा नांवाच्या गोंड राजाच्या अमलाखालीं ( इ. स. १६४७-७२ ) ५०० घोडेस्वारांचा नायक झाला होता आणि याच वेळीं त्यास चिचगडच्या इस्टेटीपैकीं कांहीं भाग इनाम मिळाला होता. परंतु याच्या मुलांमध्यें परस्पर भांडणें झाल्यामुळें यापैकीं कांहीं भाग जप्त करण्यांत आला होता. तथापि पुढें याच्या नातवास (निर्गुणराव) पेंढाऱ्यांचा नाश करण्यास मदत केल्यावरून पुन्हां ही इस्टेट इनाम देण्यांत आली. १८१८ सालीं चांदा जिल्ह्यांतील सोनसाराच्या जमीनदारापासून जप्त केलेली वारभाटी इस्टेट या जमीनदारींत सामील करण्यांत आली. सोनसारीचा जमीनदार हा त्यावेळीं आप्पासाहेबाच्या बंडांत सामील होता. केशवराव बापू या नांवाचा हल्लींचा जमीनदार मुख्य असून यास, संपतबापू आणि रामचंद्रबापू असे दोन भाऊ आहेत. या तिघांनीं आपसांत सारखी इस्टेटीची वांटणी करून घेतली आहे. या जमीनदारींत एकंदर ८४ खेडीं असून त्यापैकीं ११ गांवांत वस्ती नाहीं. इ. स. १९०१ मध्यें एकंदर लो. सं. १३४५५ होती. इ. स. १९०६-०७ मध्यें २०००० एकर जमीन लागवडीखालीं असून पैकीं सुमारें ४००० एकर बागाइत होती. सुमारें १६० चौरस मैल जंगल आहे. इस्टेटीचें उत्पन्न सुमारें १६००० रुपये आहे. पैकीं सुमारें ७००० रुपये जंगलाचें उत्पन्न आहे. टाकोळी ५४०० रुपये ठरविली आहे. जमीनदाराला कर्ज नाहीं. चिचगड येथें शाळा, पोलिस ठाणें व टपालघर आहे. कसारी येथें इमारती लांकडाचा मोठा बाजार भरतो.

**चिंचलीगड्ड**—मुंबई इलाख्याच्या डांग प्रदेशांतील एक लहानसें संस्थान. क्षे. फ. २२ चौ. मै. येथील संस्थानिक भिल वंशांतील आहे.

**चिंचवड**—मुंबई इलाखा. पुणें जिल्हा. हवेली तालुक्यांत पवना नदीवर हें गांव वसलें आहे. १९०१ सालीं याची लोकसंख्या १५९६ होती. येथें मोरयागोसाव्यांची समाधि आहे. हे गणपतीचे भक्त असून यांच्या व यांच्या कुळांतील पुरुषांच्या अंगांत गणपति संचार करीत असे अशी जुनी समजूत आहे. तीवरून यांस देव असें आडनांव पडलें. शिवाजी, औरंगझेब वगैरेस यांनीं साक्षात्कार दाखविले होते असें सांगतात. शके १८१० त वरील देव घराण्याच्या ७ पिढ्या होऊन तें खुंटलें. पुढें देव घराण्याच्या गादीवर दोन दत्तक पुरुष बसल्यानंतर संस्थान ट्रस्टींच्या ताब्यांत गेलें.

हल्लीं या घराण्याचा वंशज नानाफडणवीस व हरिपंत फडके यांनीं बांधलेल्या वाड्यांत रहात असतो. या वाड्याजवळ या घराण्याच्या दोन शाखांचीं दोन देवालयें आहेत. त्यापैकीं एक इ. स. १६५९ त व दुसरें १७२० त बांधलें. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यांत येथें मोठा उत्सव होत असतो.

या देवस्थानास शिवाजी, संभाजी, राजाराम व थोरला शाहू यांनीं अनेक इनामें दिलीं आहेत. येथील देवास चिंचवड हें गांव इनाम म्हणून प्रथम शिवाजानें दिलें. शाहूनें त्याशिवाय वाकड (जि. पुणें ) हें गांव इनाम दिलें (१७०९). मध्यंतरी राजारामाच्या वेळीं अवरंगझेबानें चाकणपर्यंतचा मुलूख जेव्हां मारिला, तेव्हां चिंचवड गांव देवस्थानाकडून काढून चाकणच्या किल्ल्याच्या खर्चास नेमून दिलें होतें. पुढें शाहूच्या कारकीर्दींत 'भीमे अलीकडे स्वराज्य झाल्यामुळें' व मोंगलांचा संबंध त्या प्रांताचा तुटल्यानें शाहूनें चाकणच्या किल्ल्याच्या नेमणुकींतून काढून चिंचवड गांव पुन्हां तेथील देवाकडे इनाम म्हणून सुरू केलें (१७२४–२५). [ इतिहास संग्रह पु. ७. अं. १,२,३, ]

**चिखेवाडा**, जमीनदारी.—मध्यप्रांत. जिल्हा भंडारा. साकोली तहशिलाच्या पूर्वेस देवरी–किशोरी जमीनदारीपैकीं ही दुय्यम जमीनदारी आहे. हिचें क्षेत्रफळ ४० चौरस मैल असून बहुतेक जंगल आहे. ही जमीनदारी हलबा घराण्याकडे असून हींत एकंदर ११ खेडेगांवें आहेत. हिची व्यवस्था फार वाईट असून हिला कर्ज आहे. जमीनदार अगदींच अशिक्षित आहेत. इ. स. १९०१ मध्यें लोकसंख्या सुमारें १०८२ होती. लागवडीखालीं एकंदर १८०० एकर ( स. १९०८ ) असून इस्टेटीचें उत्पन्न २१०० आहे. टाकोळी १००० रुपये आहे. जमिनदार टाकूर आहे.

**चिंचोली**—हैदराबाद संस्थानांतील गुलवर्गा जिल्ह्याच्या ईशान्येकडील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ८२३ चौ. मैल आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ७७'६१ होती. यांत १३८ खेड्यांचा समावेश होतो. १९०१ सालीं याच्या साऱ्याचें उत्पन्न १.५ लाख होतें. हा तालुका डोंगराळ आहे.

**चिंच्यु**—हें नांव चीनमधील एका प्राचीन व प्रसिद्ध बंदराचें आहे. हें फुकिएन प्रांतांत असून याचें चिनी नांव च्वांगचौफु अथवा त्स्वांगचौफु आहे. हें उत्तर अक्षांश २७° ५७' व पूर्व रेखांश ११८° ३५' यांत आहे. येथून चहा, साखर, तंबाखू, चिनीमातीचीं भांडीं, वगैरे वस्तूंची निर्यात होते. यांत अरबी व्यापाऱ्यांनीं बांधिलेल्या एका सुंदर मशीदीचे अवशेष आहेत. वऱ्याच अंतरावर लोयांग नांवाचें एक गांव आहे. तेथें जाण्याचा मार्ग एका चीनमधील अति प्रसिद्ध पुलावरून आहे. वाळूमुळें येथील बंदर निरुपयोगी झाल्यानें अमॉय बंदर भरभराटीस आलें. याचा व्यापार न्गानहाई बंदरांतून चालतो. अजून हें मोठें व लोकवस्तीचें शहर आहे. हें मध्ययुगांत पश्चिमेकडील देशांशीं व्यापार करणारें मोठें बंदर होतें. युरोपियन व अरबी व्यापाऱ्यांच्या वेळीं झैतुन अथवा झेटन या नांवानें हें प्रसिद्ध होतें. अबुल फेदाचा भूगोल, रशीदुद्दीनचा मोंगलांचा इतिहास, इब्नबतूता, मार्को पोलो वगैरे ग्रंथांत व प्रवासी लोकांच्या पुस्तकांत वरील नांव आढळतें. इब्नबतताच्या माहितीवरून येथें झैतुनिया नांवाचा रेशमी कपडा होत असे. यावरूनच साटीन हें नांव आलें असावें.

**चिटणीस**, चिटणिसी कामें.—शिवाजीराजे गादीवर बसल्यानंतर त्यांनीं सरकारी अंमलदारांचे जे कानुजाबते तयार केले, त्यांत चिटणिसाकडे पुढील कामें असत:—चिटणीस यांनीं सर्व राज्यांतील राजपत्रें लिहावीं, राजकारणपत्रें आलीं असतील त्यांस उत्तरें लिहावीं; सनदा, दानपत्रें, महालकऱ्यांनां हुकूम वगैरे पत्रेंहि लिहावीं. हातरोखा म्हणजे छत्रपतींनीं स्वहस्तें लिहिलेलें पत्र व नाजूक पत्रें यांजवर मोर्तब करावें. हा चिटणिसी जाबता बत्तीस कलमांचा आहे त्यांत आणिक पुढील मजकूर येतो. नूतन इनाम कोणास दिल्यास त्याचीं पत्रें, कोणास गांवमोकासा किंवा जहागीर दिल्यास त्यांचीं पत्रें साहित्य पत्रें, राजकारणी जाबसालीं ( उत्तराचीं ) पत्रें, ताकीदपत्रें, रोखा, वरात, जकात, कौल ( अभयपत्र ), खंडणीपत्र, अंमलदारनेमणूकपत्र, घांसदाणारोखा, लग्नकार्य आमंत्रणपत्रें, तंट्यांतील निवाडपत्रें, प्रायश्चित्तपत्रें, रहदारीची दस्तकें, तलबपत्र, किल्लेकोटांस दारूगोळा पाठविण्याबद्दलचीं पत्रें, जप्तीचीं पत्रें व कैदेचा हुकूम लिहिणें. सारांश इतक्या प्रकारचीं पत्रें लिहिणें व आलेलीं पत्रें छत्रपतींस वाचून दाखविणें हें काम चिटणिसाचें असे.

चिटणीस घराणें.—सातारकर छत्रपतींचे चिटणीस, हे बाळाजी आवजीच्या वंशांतील होते. बाळाजींचें व खंडोबल्लाळाचें चरित्र त्या त्या नांवांखालीं पहावें. खंडोबा १७२६ त वारला. त्याचा वडील पुत्र जिवबा हा भिमासी व दुसरा बापूजी याला घोड्याचा नाद होता. बापू हा नानासाहेब पेशव्यांच्या मर्जींतील होता. खंडोबास एकंदर सहा पुत्र होते. खंडोबा वारल्यावर प्रथम त्याचा मेव्हणा गणेश रुक्मांगद द्याव ( मुलें लहान असल्यानें ) चिटणिसी कारभार पाही. पुढें जिवाजी खंडेराव हा कांहीं दिवस काम पाहूं लागला. त्यास शाहूराजानें कोंकणांतील जमेनिसी व कारखाननिसी दिली. पुढें जिवाजीचा भाऊ गोविंदरावहि काम ( चिटणिसी ) करूं लागला. शाहूची धाकटी राणी सगुणाबाई ही याला मुलाप्रमाणें वागवी. विरूबाईचीहि त्याच्यावर मर्जी होती. तिच्याच शिफारसीनें शाहूनें त्याला चिटणिसी सांगितली. बाळाजी विश्वनाथाची व गोविंदरावाची मैत्रि होती. शाहूच्या मृत्युसमयीं पेशव्यांनीं जी मसलत केली, तींत गोविंदरावहि होता. राज्यकारभार पुण्यास आल्यावरहि गोविंदराव हा साताऱ्यासच अखेरपर्यंत राहिला. शेवटीं त्याच्या पुतण्यानें त्याला फार त्रास दिल्यावरून त्यानें सर्व कौटुंबिक उत्पन्न पुतण्यास लावून दिलें. गोविंदराव १७८५त मेला. त्याचा पुत्र लक्ष्मण हा राघोबादादातर्फे सुरतेस इंग्रजांकडे तह करण्यास गेला होता. खंडोबाचा धाकटा भाऊ निळोबा यास शाहूनें पेशव्यांची चिटणीसी सांगितली, त्याचा मुलगा आबजी व त्याचा महिपती हे नानासाहेब पेशव्यांचे चिटणीस होते. महिपतीचा भाऊ आनंदराव हा पानपतांत पडला. जीवाजी

खंडो १७४३ त वारला; तेव्हां त्याचा पुत्र रामराव यास शाहूनें चिटणीसी दिली. यास सहा मुलें होती. वडील मल्हारराव हा प्रतापसिंह छत्रपतींचा चिटणीस होता. यानें छत्रपती घराण्यांतील राजपुरुषांच्या बखरी लिहिल्या आहेत. मराठ्यांच्या इतिहासास साधन म्हणून त्यांचा उपयोग आहे. डफनें आपलें पुस्तक करतांना यांचा उपयोग करून घेतला होता. मल्हाररावाचा पुत्र बळवंत हाहि प्रतापसिंह राजाचा चिटणीस होता. त्याचा पुत्र खंडेराव हा आपल्या वयाच्या ९३ व्या वर्षी नुकताच (१९१७) वारला. मोठमोठया मराठे सरदारांस चिटणीस पुरविण्याचें काम या घराण्याकडे असे. [भारतवर्ष; पत्रें यादी. ले. ७२; शाहुम. चरित्र. पृ. ८३; इति. संग्रह. पु. ७; धाकटे राजाराम चरित्र; राजवाडे खं.६; महाराष्ट्र साहित्य. व. १. अं. १० व ११. वाड–सनदापत्रें]

**चितलनर जमीनदारी**—वऱ्हाड. मध्यप्रांत. ही जमीनदारी बस्तर संस्थानांत उ. अ. १८° १०' ते १८° ३०' आणि पू. रे. ८१° २' ते ८१°३३' यांत असून क्षेत्रफळ ४३४ चौ. मै. व लोकसंख्या ५११२ आहे. यांतील ६३ गांवांपैकीं ६ उजाड आहेत. बहुतेक भाग डोंगराळ आहे. जगरगुंडा हें जमीनदाराचें राहण्याचें गांव असून तेथील वस्ती सुमारें २०६ आहे. जमीदारास १५२६-१०-३रु. सारा द्यावा लागतो. मुख्य पीक ज्वारी.

**चितळ**—मुंबई. काठेवाड. अमरेळीच्या उत्तरेस ९ मैलांवर जेतपूरच्या वालाकाठी घराण्याचें मुख्य ठिकाण. भावनगरच्या ठाकूर बखतसिंगजीनें १७९३ त काठी लोकांपासून जिंकलं परंतु काठींना तें लवकरच परत मिळालें. काठी लोकांच्या अमलाखालीं या शहराची बरीच भरभराट झाली.

**चितळदुर्ग जिल्हा**—हा म्हैसूर संस्थानच्या उत्तरेस असून याचें क्षेत्रफळ ४१५९ चौ. मैल आहे. याच्या उत्तरेस मद्रास इलाख्यांतील बल्लारी जिल्हा असून पूर्वेस अनंतपूर जिल्हा आहे. आणि आग्नेयेस टुमकूर असून नैर्ऋत्येस कडूर आहे व पश्चिमेस मुंबई इलाख्यांतील धारवाड जिल्हा व शिमोगा आहे.

हा जिल्हा वेदवती नामक सखल प्रदेशाचा एक भाग असून यांत तुंगभद्रा, वेदवती, हरिद्रा वगैरे नद्या आहेत. या जिल्ह्याच्या मध्यभागांतील २० मैल रुंदीचा एक आडवा पट्टा पर्वतरांगांनीं व्यापिला आहे. याच पट्टयांत नाके भैरव (३०२२ फूट) जतिंग रामेश्वर (३४६९ फूट) वगैरे शिखरें आहेत. या पट्टयाच्या उत्तर व दक्षिण दिशांकडील प्रदेश सपाट आहे. या जिल्ह्यांत चितळदुर्ग येथें दरवर्षी २५ इंच पाऊस पडतो. सर्व जिल्ह्याचें साधारण उष्णमान जानेवारींत ७४°, मेंत ८३° व जुलैंत ७५° असतें.

**इतिहास**—अशोक राजाचे जे लेख सांपडले आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, या जिल्ह्याचा पूर्वेकडील प्रांत इसवी सनाच्या पूर्वी तिसऱ्या शतकांत मौर्य राज्यांत मोडत असे. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत आंध्र किंवा सातवाहन सत्ताधीश होते असें चितळदुर्ग जवळ जीं शातकर्णीचीं नाणीं सांपडलीं आहेत त्यांवरून व शिमोगा जिल्ह्याच्या शिकारपूर तालुक्यांत जे शातकर्णीचे लेख सांपडले त्यांवरून दिसून येतें. गंग, राष्ट्रकूट व चालुक्य हीं घराणीं राज्य करीत असतांना या जिल्ह्याच्या पूर्व व उत्तरभागांत पल्लव लोक (ज्यांना नोलंब किंवा नोनंब म्हणत असत व त्या प्रदेशास नोलंबवाडी अथवा नोनंबवाडी म्हणत) त्यांची राजधानी येंजेरु अथवा हेंजेरु (सध्यां जिला हेमावती म्हणतात) येथें होती; परंतु एके काळीं बल्लारीच्या उत्तरेस तुंगभद्रा नदीवर काम्पीली (कांपिल्य) येथें राजधानी होती. इ. सनाच्या ११ व्या व १२ व्या शतकांत नोलंबवाडीवर उच्छंगी येथील पांडय लोक राज्य करीत होते. त्याच्या नंतर होयसल राजे झाले. तेराव्या शतकाच्या शेवटीं देवगिरीचें यादव घराणें प्रबळ होऊन त्यांनीं होयसलांवर जय मिळविला व आपलें राज्य या जिल्ह्याच्या वायव्यभागांत स्थापिलें व दावणगिरी (दावंगेर?) जवळील बेलतूर अथवा बेतूर या ठिकाणीं आपली राजधानी केली. होयसल पुनः प्रबळ होऊन त्यांनीं आपली राजधानी बेम्मात्तनकल्लु (हल्लींचें चितळदुर्ग) येथें केली. परंतु १४ व्या शतकांत हीं दोन्ही राष्ट्रें मुसुलमानांच्या स्वाऱ्यांस बळी पडलीं. पंधराव्या शतकांत चितळदुर्ग विजयनगर राज्याच्या अधिकाराखालीं मांडलिक होतें. तें सन १७७९त हैदरअल्लीनें जिंकून त्यांतील २०००० बेद लोक श्रीरंगपट्टण बेटांत वसाहत करण्यासाठीं पाठविले. या जिल्ह्याच्या पूर्वेकडील प्रांतांत दोड्डेरीभोंवतीं आणखी एका संस्थानचा मुलुख हरती वंशाकडे होता. विजापूरच्या स्वाऱ्यांनीं त्यांना तेथून हुसकून लावल्यानंतर त्यांनीं निडुगल येथें आपलें राज्य स्थापलें. सन १७८४ त टिपू सुलतानानें त्यांस जिंकलें. मराठयांच्या स्वाऱ्यांपासून या जिल्ह्यास फारच नुकसान पोहोंचलं व यांतील वस्तीहि फार कमी झाली. पुनः १८३० च्या बंडानें याच्या पश्चिम व दक्षिण भागास फारच उपद्रव पोंचला. याच्या पश्चिमेस अंक्कीमठ आहे. त्यांत देवालयें, स्नानगृहें व योगासाठीं चयुत्रे बांधलेले आहेत. यांत कोणाची वस्ती नाहीं. व याचा पूर्वेतिहास उपलब्ध नाहीं. याच्या जवळच एका गुहेवर १३ व्या शतकांत लिहिलेला शिलालेख आहे. तुंगभद्रा नदीवर पुष्कळ पडकीं जुनीं देवळें आहेत. परंतु सर्वांत मुख्य व चांगलें हरिहर येथें हरिहरेश्वराचें देऊळ आहे. हें होयसलांनीं सन १२२४ त बांधलें. या देवळाच्या छपराचाच मुसुलमानांनीं मशीदीसारखा उपयोग केला व देवळाच्या घुमटांत दरवाजा बसवून त्याचें उपदेशपीठ बनविलें. येथील लो. सं. १९११ त ५६४२४३ होती. यांत ९ शहरें व १२४२ खेडीं आहेत. पैकीं दावणगिरी शहर सर्वांत मोठें आहे व चितळदुर्ग हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. यांतल्या लोकसंख्येपैकीं शेकडा ६० शेतकीवर, शेकडा १९ इतर धंद्यांवर व शेकडा ८.९ निवळ मोलमजुरी वगैरे करून उपजीविका करतात.

शेतकीः—चितळदुर्ग शहराच्या उत्तर व पश्चिमेकडील तालुक्यांत काळी, मधून मधून रेताड व कंकरी, पश्चिमेस तांबड चिकणी व दक्षिण भागांत खारी जमीन आहे. चितळदुर्ग शहरांजवळील कांहीं टेंकड्यांत लोहमिश्रित दगड सांपडतात. मत्तोडजवळ भांडीं तयार करण्यायोग्य दगड सांपडतात.

व्यापार.—यांत घोंगड्या व सुती कापड विणण्याचा धंदा फार आहे. सर्वांत उत्तम व बारीक विणीच्या घोंगड्या दावणगिरी आणि जगलूर तालुक्यांत होतात. जाडेभरडें कापड सर्व तालुक्यांत विणतात. रेशमाचे कारखाने फक्त मोलकालमुरु व हरिहर तालुक्यांतच आहेत. मोलकालमुरु येथें उपर्णी, पागोटीं व स्त्रियांचीं रेशमी लुगडीं होतात. बंगलोरपासून कच्चें रेशीम घेऊन त्याचें काळें व पांढरें कापड हरिहर येथें विणतात. हिरीयूर, होसदुर्ग व चितळदुर्ग तालुक्यांत लोखंड व पोलादाचे कारखाने आहेत. मोलकालमुरुंत पितळेचीं भांडीं होतात. मत्तोडांत कांचेच्या बांगड्या होतात. कातड्याचें सामान ( चपला वगैरे ) मोलकालमुरुंत होतें. या जिल्ह्यांत ८ रेशमाचे, ७६७७ सुताचे, व १३५४ लोकरीचे माग असून ३१ लोखंडाचे कारखाने, ९५ तेलाच्या गिरण्या, आणि ८० साखरेच्या गिरण्या आहेत. बंगलोरपासून पुण्यास जातांना सदर्न मराठा रेल्वे या जिल्ह्याच्या पश्चिम भागांतून जाते.

राज्यव्यवस्था.—या जिल्ह्याचे चल्लकेरे, चितलदुर्ग, दावणगिरी, हिरीयूर, होललकेरे, होसदुर्ग, जगलूर आणि मोलकालमुरु असे आठ तालुके आहेत. सन १९०३-०४ त जमीनीचें उत्पन्न ७ लाख ४८ हजार व एकंदर उत्पन्न ११ लाख ५४ हजार होतें. सन १९०१ त यांच्या लोकसंख्येतील शेंकडा ४·६ मनुष्यांस ( ८·६ पुरुषांस व ०·४ स्त्रियांस ) लिहितां वाचतां येत होतें. सन १९०३-०४ त यांत ४२७ शाळा होत्या त्यांत २१५ सार्वजनिक व २१२ खासगी शाळा होत्या. यांत १० दवाखाने व चितलदुर्ग येथें एक मोठा दवाखाना आहे.

ता लु का.—या तालुक्याचें क्षेत्रफळ ५३० चौरस मैल असून इ. स. १९११ मध्यें येथील लोकसंख्या ९३२५१ होती. ह्यांत चितळदुर्ग ( तालुक्याचें मुख्य ठिकाण ) शहर व १६४ खेडीं आहेत. दक्षिणोत्तर खडकाळ टेंकड्यांच्या ओळीनें ह्या तालुक्याचे दोन समभाग पाडलेले आहेत. ह्या टेंकडीचा पूर्व आणि पश्चिमेकडील प्रांत सपाट असून जंगल विरहित आहेत. पूर्वेपेक्षां पश्चिमेकडील प्रांतांत पाण्याचा चांगला पुरवठा असून भीमसमुद्र नांवाचें तळें आहे. पूर्वेकडील प्रांतांत मुख्यत्वेंकरून रब्बीचीं पिकें काढितात व पश्चिमेकडील प्रांतांत भात पिकतें.

श ह र.—होललकिर रेल्वेस्टेशनापासून २४ मैलांवर आहे. येथील लोकसंख्या इ. स. १९११ मध्यें ६९८६ होती. चंद्रावळी नामक प्राचीन नगरी ह्या शहराच्या अगदीं पश्चिमेस होती. या शहरीं कांहीं काळापूर्वी बुद्धलोकांचीं शिक्याचीं नाणीं सांपडलीं आहेत त्यांवरून असें दिसून येतें कीं, ती नगरी ख्रिस्तीशकानंतरच्या दुसऱ्या शतकांतील आंध्र अथवा सातवाहन राजांची असावी. अर्वाचीन शहर अनुक्रमें राष्ट्रकूट, चालुक्य, होयसल, यादव आणि विजयनगर यांच्या ताब्यांत असून त्याचें नांव बेम्मात्तनकल्ल अथवा बेम्मात्तनूर होतें. चितळदुर्गचे सरदार बेद किंवा बोय जातीचे होते. ते जिल्ह्यांतील अनेक भागांत राहिल्यानंतर त्यांनीं या शहरीं सोळाव्या शतकांत कायमची वस्ती केली, व विजयानगरचें राज्य मोडल्यानंतर आपली स्वतंत्रता स्थापली. त्यांनीं टेंकडीवर तटबंदी करून चितळदुर्ग नांवाचा किल्ला बांधला होता. या शहरांत उच्छंगीअम्मा नांवाचें दुमजली देऊळ आहे. हल्लीं असलेली विस्तीर्ण तटबंदी व मोर्चे हैदरअल्ली व टिपूसुलतान यांनीं अठराव्या शतकांत बांधलेले आहेत. इ. स. १७९९ नंतर कांहीं दिवस या ठिकाणीं ब्रिटिशांची छावणी होती. शिवभक्त किंवा लिंगायत लोकांच्या मुख्य गुरूचें रहाण्याचें ठिकाण मर्गीमठ येथून ३ मैलांवर आहे. पश्चिमेस अवघड अशा टेकड्यांच्या समुदायांत अंकलीमठ आहे. येथें डोंगरांत कोरीव लेणीं आहेत. त्यांत देवळें, स्नानगृहें आणि योगासाठीं बांधलेले चबुत्रे आहेत. प्रवेशद्वाराजवळच पंचलिंग नांवाची गुहा आहे, तीवर इ. स. १२८६ मधील होयसलांचा शिलालेख आहे. दक्षिणेस जोगिमरदी नांवाची टेंकडी उन्हाळ्यांत हवा खाण्याचें ठिकाण आहे. ह्या शहरांत म्युनिसिपालिटीची स्थापना इ. स. १८७० त झाली. या ठिकाणीं एक हायस्कूल आहे.

चिंताकुल.—मुंबई इलाख्याच्या उत्तरकानडा जिल्ह्याच्या कारवार तालुक्यांतील एक खेडें. हें कारवारपासून ४ मैल अंतरावर आहे. १९०१ सालीं याची लो. सं. ४७९६ होती. याचा ९०० पासून १६६० पर्यंतच्या अरब व इंग्रजी प्रवाशांनीं ठिकठिकाणीं उल्लेख केलेला आढळतो. सोंदचा राजा बस्व लिंग ( १६९७-१७४५ ) यानें येथें कालीनदीच्या उजव्या तीरावर एक सदाशिवगड नांवाचा किल्ला बांधला. १७५२ त तो पोर्तुगीज लोकांनीं काबीज केला. पुढें दोन वर्षांनीं त्यांनीं तो सोंदच्या राजास परत दिला. १७६३ तो हैदरअल्लीनें काबीज केला. १७९९ त तो टिपूच्या ताब्यांत होता.

चिंतामणी—म्हैसूर संस्थानच्या कोलार जिल्ह्यांतील एक मध्यवर्ती तालुका असून याचें क्षेत्रफळ २७२ चौ. मैल आहे. याची लो. सं. १९११ सालीं, ६२०७७ होती. या तालुक्यांत एक गांव व २७७ खेडीं आहेत. १९०३—०४ सालीं याच्या सान्याचें उत्पन्न १२२००० रु. होतें. याचा उत्तरभाग खडकाळ असून याच्या दक्षिण भागांतील जमीन तांबडी आहे. तींत ऊंस चांगला पिकतो. यांतील कांहीं ठिकाणीं घोंगड्या व पोतीं होतात.

चिंतामणी कवि—हा मोरोपंताचा समकालीन होता. याची विशेष माहिती नाहीं. मराठी भाषेंत दिंडी वृत्तांतलें

सुप्रसिद्ध ध्रुवाख्यान यांचेंच आहे. हा नरहरिभक्त असून याच्या घरची वृत्ति ज्योतिषाची असावी. याच्या गणपतीवर ११०० आर्या आहेत. गोपीचंदाख्यान व सीतास्वयंवर यांचा कर्ता चिंतामणि हाच कीं काय हें निश्चित नाहीं. [ मराठी सारस्वत. काव्यसंग्रह. ]

**चिंतामणी रघुनाथाचार्य ज्योतिषी** ( १८२८–१८८० ).—एक भारतवर्षीय अर्वाचीन ज्योतिषी. हे मद्रास-येथील वेधशाळेंत हेड असिस्टंट होते. मि. पोग्सन, मद्रास येथील सरकारी ज्योतिषी, यांच्याबरोबर इ. स. १८६२पासून याम्योत्तर लंघनदर्शकयंत्राच्या सहाय्यानें वेध करून ताऱ्यांची यादी तयार करण्याचें काम यांनीं सुरू केलें. इ. स. १८५९ त त्यांनीं लंडन येथील "रॉयल अस्ट्रॉनॉमिकल सोसायटी" कडे ज्योतिषसंबंधीं एका विषयावर एक निबंध पाठविला. नंतर मधून मधून हे ज्योतिष विषयावर कांहीं लिहित असत. इ. स. १८७२ त त्यांस वरील रॉयल अस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे फेलो नेमिलें. इ. स. १६८८ तील आगष्ट महिन्यांत सूर्याचें खग्रास ग्रहण होतें तेव्हां वेध घेण्याकरितां निजाम सरकारच्या राज्यांत वनपर्थी येथें त्यांस पाठविलें होतें. पुढें इ. स. १८७१ च्या डिसेंबर महिन्यांत खग्रास सूर्यग्रहण पडलें तेव्हां कोईमतूर जिल्ह्यांत आवनशाई येथें वेध घेण्याकरितां त्यांस पाठविलें. दोन्ही प्रसंगीं हे यशस्वी होऊन आले. इ. स. १८६७ व १८७८ ह्या वर्षी त्यांनीं दोन 'अनियत तेजस्क' तारे शोधून काढिले. त्यांपैकीं पहिला 'जालक' नामक तारकापुंजांत आहे व दुसरा 'वृषपर्वा' नामक पुंजांत आहे. नवीन खस्थ पदार्थांचा शोध लावणारे हेच पहिले एतद्देशीय गृहस्थ होत. 'आसायलम प्रेस आलमनाक' नांवाच्या पंचागांतील ज्योतिषसंबंधी मजकूर हेच लिहित असत. इ. स. १८७४ च्या डिसेंबरांत शुक्रानें सूर्यबिंबाचा भेद केला म्हणजे त्यानें सूर्यबिंबाचें अतिक्रमण केलें ही गोष्ट पूर्वी वर्तवून हिजपासून कोणता मोठा फायदा जगतास होत असतो हें भरतखंडांतील सर्व भाषांत निबंध छापवून त्यांनीं सर्वांस कळविलें. [ विविधज्ञानविस्तार ]

**चितारी**—चित्रें काढण्याच्या धंद्यावरून स्वतंत्र बनलेली ही जात वऱ्हाड मध्यप्रांतांतच दिसते. इतर प्रांतांतून चितारी ही जात–नसून धंदेवाईक वर्ग आहे. वऱ्हाड मध्यप्रांतांत या जातीची वस्ती दीडहजारपर्यंत आहे. लांकडावर व भिंतीवर चित्रें काढणाऱ्या या जातीला हिंदी मुलुखांत चितर, मराठींत चितारी, उडिया मुलखांत महाराणा व फलवडाई, आणि क्वचित ठिकाणीं मोची व जिनगर म्हणतात. रसेल म्हणतो कीं चितारी वर्ग मोची वर्गापासून उत्पन्न झाला. मंडला जिल्ह्यांत चितारी व जिनगर हे एकमेकांच्या हातचें पाणीसुद्धां पीत नाहींत. हे लोक विश्वकर्म्याची पूजा करतात. जिनगर लोक स्वतःला रजपूतांचे वंशज समजतात व त्यांनीं राजपूत नांवेंहि आपणांस लाविलीं आहेत. मंडल्याचे चित्रकार आपण गढ्याच्या चित्रकारांचे वंशज आहोंत असें सगतात. कोणी चित्ररेखेचे वंशज आहोंत असें सांगतात. या वर्गांत मराठी, तेलगू व हिंदुस्थानी जातीचे लोक आहेत. प्रत्येकाच्या निरनिराळ्या जाती आहेत व त्या जातीच्या नियमाप्रमाणें त्यांचीं लग्नें होतात. जिनगर बायका लग्नसमारंभांत वरातीबरोबर जातात पण चिताऱ्यांच्या बायका जात नाहींत. महाराणा लोकांत विधवाविवाह संमत आहे धाकट्या दिराबरोबरच लग्न केलें पाहिजे आणि तो जर नसला तर विधवेनें जन्मभर विधवा राहिलें पाहिजे. मंडल्यांत जर विधवेनें लहान दिराबरोबर लग्न केलें तर तिच्या नवऱ्याची अर्धी संपत्ति दिरास मिळते व अर्धी पहिल्यानवऱ्याच्या मुलांस मिळते. परंतु जर तिनें दुसऱ्या कोणाबरोबर लग्न केलें तर पहिल्या नवऱ्याची सर्व संपत्ति मुलांसह ती नेते. पूर्वी जर कोणी विवाहित स्त्रीनें व्यभिचार केला तर तिचा लिलांव करून विकून टाकीत. आतां ही चाल बंद आहे. जर नवऱ्यानें बायकोस काडी मोडून दिली तर तिच्या बापास लग्नाचा खर्च द्यावा लागतो परंतु तिच्या बरोबर लग्न करणाऱ्यापासून बाप तो खर्च पूर्णपणें भरून घेतो. हे लोक अजून भिंतीवर लग्नमुंजीच्या वेळीं चित्रें काढतात व नागपुरांत अजून भिंतीवर चित्रें काढण्याचा कांहीं मंडळीस शोक आहे, त्यांचीं चित्रें काढून यांचा धंदा चालतो [ रसेल व हिरालाल].

**चिति**—अथवा चयन. एक श्रौतकर्म. हें कर्म अग्निष्टोमादि सप्तसोमसंस्थांपैकीं कोणत्याहि यागाबरोबर करतात. यांतील मुख्य विधि म्हणजे मातीच्या विशिष्ट आकाराच्या इष्टका(विटा)तयार करून त्यांच्या थरांनीं विशिष्ट आकाराची उत्तरवेदी ( हवन करावयाचें मुख्य आयतन ) रचावयाची व गार्हपत्य आणि दाक्षिणाग्नि हे याच विटांचे परंतु नेहमींच्या आकाराचेच रचावयाचे. हें अनुष्ठान ज्यास प्रथमच करावयाचें असेल त्यानें सहस्रचिति( दररोज दोनशें विटा प्रत्येक स्थलीं याप्रमाणें एक हजार विटांचे पांच थर ) करावयाचा असतो. याचे द्विषाहस्र ( दोन हजार विटा रचणें ) व त्रिषाहस्र ( तीन हजार विटा ) असे आणखी दोन प्रकार आहेत. हे पुढील प्रकार दुसऱ्यावेळीं ज्यास हें चितीचें अनुष्ठान करावयाचें असेल त्यानें करावयाचे असतात. कामनापरत्वें या चितींचे श्येनचिति, कंकचिति, रथचक्रचिति इत्यादि निरनिराळे प्रकार तैत्तिरीय संहितेंत ( कांड ५ प्रपाठक ६ ) दिले असून त्यांचें विधानहि त्याच स्थलीं दिलें आहे. वरील चितींपैकीं जो चिति करावयाचा असेल त्या आकाराचा विटांचा थर रचावयाचा. उदा. श्येनचिति करावयाचा असल्यास श्येनाचा (गरुडाचा)आकार विटांच्या थरास द्यावयाचा. हा श्येनचितीच नेहमीं करण्याचा परिपाठ आहे. चितीचें अनुष्ठान करणें असल्यास प्रथम वायव्यपशु नामक काम्य पशूचें अनुष्ठान करावयाचें असतें आणि त्रैधातवी नामक एक इष्टि करावयाची असते. सूत्रग्रंथाप्रमाणें या

कर्मांत करावयाच्या मुख्य विधींचें सामान्य विवेचन पुढें दिलें आहे.

या कर्मांत इष्टका भाजण्यास माती गाढवाच्या पाठीवर लादून आणून तींत खापरांची भुकटी, भाताचा कोंडा, हरणाचे व बकऱ्याचे केस व आणखी कांहीं माती चिकण करणारे पदार्थ घालून भिजवून मळतात व त्याची एक शेगडी व चितीच्या इष्टका बनवितात व त्या गार्हपत्याच्या पूर्वेस खळग्यांत भाजतात. कर्माची हल्लीं फक्त नक्कल होते.

विटा भाजण्याच्या कर्मास उखासंभरण म्हणतात. यानंतर वायव्य पशूचें अनुष्ठान होतें. यानंतर भाजलेली शेगडी आहवनीयावर तापवून लाल करावयाची व तींत पेट घेण्यायोग्य इंधनें व समिधा घालून अग्नि उत्पन्न करून यजमानानें त्याचें उपस्थान करावयाचें असतें. नंतर यजमान आपल्या तीन अग्नीसह रथांत बसून यजनप्रदेशीं ब्रह्मा व अध्वर्यू यांसह येतो. हें कर्म झाल्यानंतर ज्या शिंक्यांत ती शेगडी ठेवली आहे असें शिंकें यजमानानें शेगडी बेंबीजवळ येईल अशा बेतानें गळ्यांत अडकवून अंतर्वेदींत उभें राहून उपस्थान करावयाचें असतें. नंतर ती शेगडी उंबराच्या लांकडाच्या घडवंचीवर परळांत माती घालून तींत ठेवून ती प्रदीप्त राखतात. यानंतर दीक्षाग्रहण होतें. यास दीक्षा तीन दिवस असते. क्वचित् मासदीक्षेचाहि प्रघात आहे. दीक्षा संपल्यावर प्रायणीयेष्टीच्या दिवशीं प्रथम गार्हपत्य व दक्षिणाग्नि यांच्या इष्टकांचें उपधान होतें. सहस्रचिति असेल तर यजमानाच्या गुडघ्याइतकी पांच प्रस्तरांची उंची, द्विसाहस्र असेल तर नाभीच्या इतकी आणि त्रिसाहस्र असेल तर तोंडाइतकी उंची असावी. गार्हपत्य चितीवर पूर्वीची शेगडी ठेवतात. शिंकें व आसंदी हीं घेऊन यजन प्रदेशाच्या दक्षिणेस जाऊन तेथें निर्ऋत्येष्टकांचें उपधान करून त्यांवर शिंकें व आसंदी ( घडवंची ) टाकतात. यानंतर प्रायणीयेष्टि होते व नंतर महावेदि व चितीची जागा आंखतात. नंतर चितीची जागा खणून नांगरानें नांगरतात या नांगरास सहा अथवा बारा बैल जुंपतात. बारा तासे पाडल्यावर बैल सोडून ते यजमान अध्वर्यूस देतो. नंतर नांगरलेल्या जागेवर तूप, मध व पाणी शिंपडून तिल, व्रीहि, यव, माष, प्रियंगू इत्यादि धान्यें यजमान पेरतो. यानंतर सोमक्रय, आतिथ्येष्टि व प्रवर्ग्याचें अनुष्ठान झाल्यावर चित्यग्नीचें प्रणयन होतें. यावरोबर एक पांढरा घोडा उत्तरवेदीकडे नेतात. नंतर उत्तरवेदीच्या इष्टका ( विटा ) मांडण्यास आरंभ होतो. कांहीं विशिष्ट इष्टका मांडल्यावर एका कासवास तूप व मध चोपडून त्याचें उपस्थान करून त्या कासवास शेवाळयांत गुंडाळून तें चितीच्या जागेंत दक्षिण भागीं पुरतात. आणि पूर्वीची उखा चितीच्या जागीं मध्यें ठेवितात. आणि पूर्वी वायव्यपशूचें ठेवलेलें शिर, पुरुषशिर, सर्पशिर, यांचें इष्टकाप्रमाणेंच चितीच्या जागेंत निरनिराळ्या ठिकाणीं उपधान करतात व कुंभेष्टका, धृतेष्टका, हिरण्येष्टका, घोडा, नाकसदा इत्यादि इष्टकांचें प्रयोगांत सांगितलेलें स्थल व अनुक्रम याप्रमाणें उपधान होतें. या तऱ्हेच्या दोनशें इष्टकांच्या उपधानाचा एक प्रस्तर झाला म्हणजे पुन्हां पूर्ववत् प्रवर्ग्यानुष्ठान होतें. याप्रमाणें प्रवर्ग्य, प्रस्तर मांडणें व पुन्हां प्रवर्ग्य अशा क्रमानें पांच दिवस अनुष्ठान होतें. इष्टकोपधानापूर्वी अध्वर्यूनें दक्षिणेस असलेल्या अश्वास स्पर्श करून आरंभ करावयाचा असतो. दुसऱ्या दिवशीं पहिल्या प्रस्तरावर दुसरा प्रस्तर मांडतांना प्रस्तरावर चढून अध्वर्यू इष्टका मांडतो. प्रत्येक प्रस्तर मांडून झाल्यावर विटांच्या मधील भेगा वाळूनें भरतात. प्रत्येक प्रस्तराची दोनशें विटांची संख्या पूर्ण करण्यास ' लोकपृण ' या एकाच मंत्रानें कांहीं विटा मांडाव्या लागतात. पांचव्या दिवशीं पांचवा प्रस्तर झाल्यावर त्यावर वाळू पसरल्यावर सुवर्णाचे हजार तुकडे पसरतात; त्यानंतर अध्वर्यू उत्तराध्यीं नामक इष्टकांवर शतरुद्रीय नामक अभिषेक ( रुद्राभिषेक ) रुईच्या पानांतून शेळीच्या दुधानें करतो. नंतर रुद्राचें उपस्थान करतो. यावेळीं प्रस्तोता नामक ऋत्विज सामगान करतो व होता शंसन करतो. नंतर अग्निष्टोमवत् अग्नीषोमीयप्रणयनादि कर्म होतें. आग्नीध्रीय मंडपांतील अग्नींचें आयतन इष्टकोपधानानेंच होतें व धिष्ण्यांकरितांहि इष्टकाच असतात. याप्रमाणें चितींतील विशिष्ट कृत्यें आहेत. याशिवाय जास्त माहिती बौधायन, आपस्तंब, सत्यापाढ इत्यादि श्रौतसूत्रांत पहावी.

प्रथम चयनाचें अनुष्ठान स्वतंत्र असावें व मागाहून तें सोमसंस्थेस जोडलें असावें कारण सोमयागांत प्रत्यक्ष असा त्याचा कांहींच संबंध दिसत नाहीं. या चितीसारखेंच काटक नांवाचें अनुष्ठान आहे. त्यांत इष्टकांच्या ऐवजीं शर्करा ( चुनखडीचे खडे ) यांचें उपधान असतें व त्यांवरच उत्तरवेदी करावयाची असते. चितीचें अनुष्ठान कोणी केल्यास त्या विटांचें एखाद्या देवस्थानाप्रमाणें संरक्षण करण्याची वहिवाट आहे.

**चितोड**—चितोड हें शहर राजपुतान्याच्या उदेपूर संस्थानांतलि चितोड जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून तें चितोड रेल्वे ( उदेपूर-चितोड-लाईन ) स्टेशनापासून दोन मैलांवर आहे. याच्याजवळच चितोड नांवाचा प्रसिद्ध किल्ला आहे. याच्या पश्चिमेस गंभीर नांवाची नदी वहाते. तिच्यावर इ. स. १४ व्या शतकांत बांधलेला एक पूल आहे. या नदीचा उल्लेख सुप्रसिद्ध पद्मावतीच्या गोष्टींत येतो. मेवाडांतून बाहेर जाणारी सर्व अफू याच गांवीं तोलतात. वर्षास सरासरी ४४०० अफूच्या पेटयांची निर्गत होते. याची लोकसंख्या ( सन १९११ ) ७३३२ आहे. यांत एक प्राथमिक शिक्षणाची शाळा व एक दवाखानाहि आहे. चितोडचा प्रसिद्ध किल्ला कोणी व केव्हां बांधला हें सांगणें कठिण आहे. तो पांडवांनीं बांधला अशी दंतकथा सांगतात. या किल्याला पूर्वी चित्रकोट म्हणत. त्याचें कारण त्या ठिकाणीं इ. स. ७ व्या शतकांत चित्रांग नांवाचा मोरी ( मौर्य ) रजपूत राज्य

करीत होता असें म्हणतात. हा किल्ला बाप्पारावळ यानें इ. स. ७३४ त मोरी लोकांजवळून सर केला व येथेंच इ. स. १५६७ पर्यंत मेवाड संस्थानची राजधानी होती. मुसलमानांनीं याच्यावर चार वेळ स्वाऱ्या केल्या; इ. स. १३०३ त अल्लाउद्दीन खिलजीनें ( ज्ञा. को. वि. ७ पहा ), इ. स. चौदाव्या शतकांत महम्मद तघलकनें, इ. स. १५३४ त गुजराथच्या बहादुर शहानें आणि इ. स. १५६७ त अकबरानें. शेवटच्या वेळीं चितोडास २० अक्टोबर १५६७ ते २३ फेब्रुवारी १५६८ पर्यंत अकबरानें वेढा दिला होता. किल्ला मोठ्या शौर्यानें व चिकाटीनें लढला. परंतु सेनापती जयमल्ल हा अवचित एका बंदुकीच्या गोळीनें ठार झाल्यानें व अन्नपाण्याच्या तुटवड्यानें अखेर किल्ला अकबराच्या हातीं आला. मात्र तत्पूर्वी सर्व रजपूत स्त्रियांनीं जोहार केला व रजपूत शिपायांनीं आपले प्राण धारातीर्थी अर्पण केले. त्यामुळें अकबरानें चिडून तीस हजार लोकांची कत्तल केली (स्मिथ). किल्ल्याच्या मुख्य वेशीचे दरवाजे, साहेबी नौबती व कालीमातेच्या देवळांतील मोटमोठीं मौल्यवान झुंबरें हीं सर्व अकबरानें आग्र्यास नेलीं. जहांगीरनें किल्ल्याची दुरुस्ती करूं दिली नाहीं. तो मेल्यावर शहजहानाच्या वेळीं राणा जगसिंग यानें डागडुजी चालविली होती. परंतु शहाजहानानें ती बंद पाडिली व तट पाडून टाकला. पुढें १६८० च्या सुमारास औरंगझेबानें येथील ६३ देवळें पाडून टाकिलीं ( स्मिथ ). तेव्हांपासून १८ व्या शतकापर्यंत हा ओसाड पडला होता. या किल्ल्यावर कीर्तिस्तंभ नांवाचा एक जुना विजयस्तंभ आहे. तो जिजा नांवाच्या एका रजपूत सरदारानें इ. स. बाराव्या किंवा तेराव्या शतकांत बांधला. माळवा आणि गुजराथच्या सुलतानांवर जेव्हां कुंभराण्यानें जय मिळविला तेव्हां त्या यशाचें स्मारक म्हणून त्यानें इसवी सन १४४२ ते ४९ च्या दरम्यान एक अप्रतिम खोदित्र काम केलेला जयस्तंभ नांवाचा मनोरा येथेंच उभारला. चितोड शहरापासून सात मैलांवर राजपुतान्यांतील एक अतिशय जुनें नागरी नांवाचें खेडें आहे. तेथें ख्रिस्ती शकापूर्वीचीं कांहीं नाणीं व शिलालेख सांपडले आहेत. याचें पूर्वीचें नांव मध्यमिका असून त्यावर ख्रि. पू. १५४ च्या सुमारास मेनांडर यानें स्वारी केली होती. हें गांव त्यावेळीं शिबी नांवाच्या एका राजवंशाची राजधानी होती. शिलालेख शुंगकालीन असून, त्यांत अश्वमेध व वाजपेय यज्ञाबद्दलची माहिती (विधी व प्रयोग)आहे. चितोडच्या किल्ल्यावरील एका जयस्तंभावर वास्तुशास्त्रावरील टीकेचा एक शिलालेख खोदलेला आहे. चितोड गांवास हल्लीं तट व चार वेशी आहेत. येथील घराच्या भिंतीवर रजपूत व मुसुलमान यांच्यांत पूर्वी झालेल्या लढायांचीं चित्रें काढलेलीं दिसतात. किल्ल्याच्या पहिल्या दरवाजाचें नांव हनुमानदरवाजा आहे. त्याच्या पुढें सात दरवाजे टाकून आठवा सूर्यदरवाजा आहे. प्रत्येक दरवाज्यांत साधारण अर्धा मैल अंतर आहे. हनुमानदरवाज्यांतून एकदम सूर्यदरवाजांत एका ( मधले ७ दरवाजे न लागतां ) चोर वाटेनें जातां येतें. चितोडच्या अनेक युद्धांत सूर्यदरवाजा व रामपालदरवाजा हे प्रसिद्धीस आले आहेत. सूर्यदरवाज्याजवळ उदेपुरकरांचे किरमिजी निशाण उभारलेलें असतें. दरवाज्याच्या आंत दक्षिणेकडे लाखानें बांधलेला दरबार महाल, लाखाना महाल ( येथील शिल्प फार उत्कृष्ट आहे. ), मीराबाईचें मंदिर ( येथें तिच्यावेळचें एक तुळशीवृंदावन आहे ) , कुंभाचा विजयस्तंभ ( दोन पुरुष उंचीच्या चवुथ्यावर, दहा मजली उंचीचा हा स्तंभ आहे; आंतून वर जाण्यास प्रशस्त रस्ता असून, चित्रें व मूर्ती भिंतीवर कोरलेल्या आहेत. मूर्तीखालीं त्यांचीं नांवें आहेत; मुसुलमानांचा हात मूर्तिचित्रांवर फिरलेला आहे. नवव्या मजल्याच्या गच्चीवर संगमरवरी हत्ती असून त्याच्यावर दहावा मजला उभारला आहे; येथेंच पश्चिमेकडील २ खांबावर २ शिलालेख, कुंभाच्या जयाच्या हकीकतीचे आहेत. ), पुढें लाखानें बांधलेलें विश्वकर्म्याचें( ब्रह्मदेवा )चें मंदिर आहे व त्यांत ब्रह्मदेवाची मूर्ति आहे. सासूसुनांचीं कुंडें, दर्यामहाल ( येथील चित्रांचा रंग अजून शाबूत आहे ), माताजी उर्फ कालीचें देऊळ ( येथील झुंबरें, नगारे वगैरे सर्व सामुग्री अकबरानें नेली होती. हल्लीं देवळांतील सर्व सामान नवें असून मूर्तीहि अर्वाचीन आहे. येथें एक शिलालेख आहे ), पद्मिनीचा महाल ( हा हल्लीं सर्व नवीन बांधलेला आहे. याच्याजवळ सुंदर तलाव आहे ), भीमसिंगाचा महाल ( हा पडका आहे ), जोहाराची गुहा (ही पद्मिनीच्या महालापासून १ मैलावर रानांत आहे. येथेंच प्रत्येक वेळीं रजपूत स्त्रियांनीं जोहार केला.पहिला जोहार पद्मिनीच्या वेळचा;यावेळीं हजार दीड हजार बायका होत्या;दुसरा जोहार कर्णावतीच्या वेळचा; यावेळीं तेरा हजार बायका होत्या व तिसरा जोहार उदेसिंगाच्या वेळचा होय. अशा रीतीनें वीरमाता व वीरपत्न्या यांच्या पवित्र अस्थींनीं शुद्ध असलेली ही गुहा नवसास पावते अशी तिकडे सर्वत्र समजूत आहे. हींत काळोख आहे. स. १८८२ त सज्जनसिंह राण्यानें येथील सर्व अस्थी व राख भरून काशीस पाठविल्याचें समजतें ), लाखानें बांधलेलें रत्नमंदिर ( हें रत्नेश्वर महादेवाचें असून, आंत सर्वत्र उत्तम कोरिव चित्रें आहेत ), कीर्तिस्तंभ, मोतीबाजार, दारूगोळ्यांचीं कोठारें, चतुर्भुजाचें ( विष्णूचें ) मंदिर, अन्नपूर्णेचें मंदिर ( पूर्वीची देवी मुसुलमानांनीं फोडली होती. हल्लींची नूतन आहे ) वगैरे ठिकाणें पाहण्यासारखीं आहेत. गडावर देवळें व महाल वगैरे शें दीडशें पडक्या इमारती आहेत. चितोडगडाचें क्षेत्रफळ बारा चौरस मैल आहे. वरील इमारतीशिवाय मळे, शेतें, तलाव व बागा गडावर आहेत. गडाचा डोंगर उंच व विस्तीर्ण आहे. गडावर चढण्यास ( अवजड लष्करी सामानासह ) फक्त एकच रस्ता आहे. त्यामुळें शत्रूला किल्ला पाडाव करण्यास फितुरीशिवाय दुसरें साधन नाहीं असें म्हणतात. सारांश, हा दुर्भेद्य व अजस्र

किल्ला असल्यानें ' तालमें ताल भोपाळ ताल और सब तलैया है ' याप्रमाणें ' गडमें गड चितोडगड और सब गडैया है ' ही तिकडील प्रसिद्ध म्हण पडली असावी. [ इंपे. ग्याझे. पु. १०; स्मिथ–अर्लि व ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया; केसरी ७।३।१९०५. ].

**चित्तगांग**, जिल्हा.– (उर्फ चितगांव) हा बंगाल प्रांताच्या चित्तगांग विभागांतील एक जिल्हा असून याचें क्षेत्रफळ २४९७ चौ. मैल आहे. हा बंगालच्या उपसागरच्या पूर्वेस असून याच्या दक्षिणेस ब्रह्मदेशांतील अकियाव जिल्हा आहे. याच्या उत्तरेस फेन्नी नदी असून पूर्वेस चित्तगांग डोंगराळ प्रदेश आहे. हा प्रदेश चारनदीथडी व त्यामध्यें असणाऱ्या टेंकड्यांच्या मुख्य तीन रांगांनीं बनला आहे. फेन्नी, कर्णफुली, मातामुखरी, संगु वगैरे या प्रदेशांतील मुख्य नद्या होत. डोंगराळ भागांत देवदार, ताड वगैरे पुष्कळ प्रकारचीं झाडें आढळतात. समुद्रकिनाऱ्यालगतचा प्रदेश गवतानें व्यापिला आहे. या जिल्ह्याचें हवामान उष्ण व दमट असून वार्षिक पावसाचें प्रमाण १११" आहे. या जिल्ह्यांत तुफानें होतात.

इतिहासः—या जिल्ह्याचा पूर्वी टिप्पेराच्या हिंदूराज्यांत समावेश होत होता. ९ व्या शतकांत तें आराकानच्या बौद्ध राजानें काबीज केलें. पुढें तेराव्या शतकांत तें कांहीं कालपर्यंत मोगलांच्या ताब्यांत होतें पण १५१२ त टिप्पेराच्या राजानें मुसलमानास हांकून लावून आपलें राज्य परत घेतलें. यानंतर पुन्हां एकदां हा जिल्हा मोंगलांच्या ताब्यांत गेला. १५३८ त गोव्याहून येथें पोर्तुगिज लोक धर्मप्रसारार्थ आले होते. १५६० व १५७० च्या दरम्यान मोंगल व अफगाण यांच्यांत झटापट चालू असतां आराकानच्या राजानें हा जिल्हा आपल्या राज्यास जोडला. परंतु मोंगलांनीं १५८२ त याच्या जमिनीचा सारा वसूल केला.

पुढें आराकानी अथवा माघ लोकांनीं हा जिल्हा आपल्या ताब्यांत राहावा म्हणून त्यांत पोर्तुगीज चांचे लोकांची फौज पाठवून त्यांच्या स्वाधीन चित्तगांग बंदर केलें. १६०५ मध्यें हे चांचे लोक आपल्या धन्याशीं अरेरावी करूं लागले. त्यांना हांकून लाविल्यावर तें संदवीप बंदरांत जाऊन राहिले व तेथून त्रास देऊं लागले. त्यांच्या त्रासामुळें बंगालच्या सुभेदारास आपलें ठाणें बदलून डाक्यास जाऊन रहावें लागलें. १६३८ त मतकराय या आराकानच्या सुभेदारानें आपल्या धन्याशीं वेबनाव करून मोगलांची मदत मागितली व त्यांच्या स्वाधीन हा जिल्हा केला. यानंतर १६६४–६५ त शहाजहान बादशहानें आराकानच्या राजाचा व पोर्तुगीज चांचे लोकांचा पराभव करून चित्तगांग जिल्हा पुन्हां बंगाल प्रांतास जोडला. १६८५ व १६८९ त ईस्ट इंडिया कंपनीनें चित्तगांग काबीज करण्याचे प्रयत्न केले पण ते सर्व निष्फळ ठरले. १७६० त हा जिल्हा मीर कासीमनें इंग्रजांच्या स्वाधीन केला. या वेळेस एक इंग्रज अधिकारी व त्याचें सल्लागार मंडळ याचा कारभार पहात असत. १७८४ त ब्रह्मी लोकांनीं आराकान काबीज केलें तेव्हां तेथील पुष्कळ लोक चित्तगांग येथें पळून आले व ते इंग्रजांनीं पुन्हां त्यांच्या स्वाधीन करण्याचें नाकारल्यामुळें पहिलें ब्रह्मी युद्ध झालें. १८२३ त ब्रह्मी लोकांनीं या प्रदेशावर पुन्हां चाल केली होती. १८५७ च्या बंडांत येथेंहि थोडी धामधूम उडाली होती.

सन १९२१ सालीं या जिल्ह्याची लोकसंख्या १६११४२२ होती. खुद्द चित्तगांग शहराची हवा रोगट आहे. परंतु बाकी सर्व जिल्ह्याची हवा साधारणतः बरी आहे. यांतील बहुतेक लोक चतगैया नांवाची भाषा बोलतात.

शेतीः—या जिल्ह्यांतील डोंगरप्रदेश खेरीजकरून बाकीची सर्व जमीन मळीची आहे. यांतील सखल जमीनींत तांदुळाचें व कडधान्याचें पीक होतें. उंच प्रदेशांत तांदुळाची दोन पिकें होतात. याशिवाय सण, ताग, तंबाखू, विड्याचीं पानें, गवत, ऊंस वगैरे जिनसांची पिकें होतात. यांतील गुरेंढोरें जातवान नाहींत. या प्रदेशाच्या समुद्रकिनाऱ्यावर मासे पकडण्याचा धंदा चालतो.

जं ग लें—या जिल्ह्यांतील ⅓ जमीन जंगलांनीं व्यापिली असून २८६ चौरस मैल जमीन जंगलाकरितां राखून ठेवली आहे. येथील जंगलांतून, गुरजन, जारूल, नागेश्वर, गमहार वगैरे झाडें व वेत व बांबू होतात. १९०३–४ सालीं जंगलांचें उत्पन्न १५००० रु. होतें.

व्यापार आणि दळणवळण.—चहा तयार करण्याचा या जिल्ह्यांतील मुख्य धंदा असून सन १९०३ सालीं १३७०००० पौंड चहा तयार झाला होता. पहारतली व कॉक्सचा बाजार येथें हलक्या प्रतीचें सुताचें व रेशमी कापड होतें. याशिवाय वेळूच्या व गवती चटया, टोपल्या, मासे धरण्याची जाळीं तयार होतात. चित्तगांग येथें पूर्वी जहाजें बांधण्याचें काम होत असे. चित्तगांग बंदराहून तांदूळ, चहा व कापूस बाहेरगांवीं पाठविले जाऊन कापड, धातू, साखर, मीठ व तेल हे जिन्नस जिल्ह्यांत आणले जातात. कॉक्सचा बाजार, तेकनाफ, महाजनहाट, नाझीरहाट वगैरे ठिकाणें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहेत. या जिल्ह्यांत आगगाडीचे कांहीं फांटे असून ३४५ मैल लांबीचे कच्चे व ५२३ मैल लांबीचे पक्के रस्ते आहे.

शि क्ष णः–१९०३–०४ सालीं एकंदर १९८७शिक्षणसंस्था असून त्यांपैकीं १ कॉलेज, ५९ दुय्यम प्रतीच्या शाळा, ११३८ प्राथमिक शाळा व ७८९ विशेष प्रतीच्या शाळा होत्या. १९०३ सालीं एकंदर १३ दवाखाने होते.

श ह र.—याच नांवाच्या जिल्ह्याचें व विभागाचें हें मुख्य शहर असून कर्णफूली नदीवर हें वसलें आहे. हें आसाम–बंगाल रेल्वेवरील एक स्टेशन आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या २८७६६ होती. येथें १८६४ त म्युनिसिपालिटी स्थापन झाली.

याची पूर्वी पासून व्यापाराकरितां प्रसिद्धि असून सध्यां हें पूर्वबंगाल प्रांतांतील एक मुख्य बंदर आहे. येथें आगगाडी झाल्यापासून व्यापारास उत्तेजन मिळालें आहे. या बंदरांतून ताग बाहेर रवाना होतो. याशिवाय इतर आयात व निर्गत जिन्नस म्हटले म्हणजे अनुक्रमें कापड, मीठ, रॉकेल तांदुळ, चहा, कातडीं वगैरे होत. १९०३-०४सालीं येथून ३१६.७ लाखांचा माल बाहेर रवाना झाला व ७६.१ लाखांचा माल बाहेरून तेथें आला. येथें सरकारी कचेऱ्या, दवाखाना, रेल्वेकचेऱ्या वगैरे इमारती आहेत. येथें एक कॉलेज व आहे. हायस्कुलें बरीच आहेत. पौरस्त्य विद्येच्या उत्तेजनार्थ संस्कृत कॉलेज, ओरिएंटल ॲकेडमी, चितगांग मद्रसा वगैरे संस्था आहेत. येथें ज्योति नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र निघतें.

**चित्तगांग डोंगराळ प्रदेश**—या नांवाचा हा बंगाल प्रांताच्या चित्तगांग विभागांतील सरहद्दीवरील एक जिल्हा असून याचें क्षेत्रफळ ५१३८ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस टिप्पेराचें डोंगराळ संस्थान असून पश्चिमेस चित्तगांग जिल्हा आहे. दक्षिणेस आराकन असून पूर्वेस ब्रह्मदेशांतील उत्तरआराकान जिल्हा व आसाममधील लुशाई हा डोंगराळ जिल्हा हे आहेत.

हा जिल्हा डोंगर, जंगलें व दऱ्या यांनीं व्यापिला आहे. यांतील केओकादंग व पिऱ्यामिड टेंकड्या अनुक्रमें ४०३४ फूट व ३०१७ फूट उंच आहेत. यांतील मुख्य नद्या म्हटल्या म्हणजे फेन्नी, कर्णफुली, संगू व मातामुखरी या होत. येथील जंगलांत हत्ती, वाघ, चित्ते वगैरे जंगली जनावरें आहेत. या जिल्ह्याची हवा एकंदरींत थंड असून दऱ्यांतील हवा रोगट आहे. पाऊस ९४ इंच पडतो.

या जिल्ह्याचा इतिहास म्हणजे त्यावर होणारे हल्ले व त्यांचा प्रतिकार यांचीं वर्णनें होत. १७७७ येथील राजानें गव्हरनर जनरल वारन हेस्टिंग्ज यास कुकी अथवा लुशाई लोकांचा नायक रामूखान याच्या हल्ल्याविषयीं लिहिलें होतें. हाच क्रम १८९१ पर्यंत चालू होता. याच वर्षी इंग्रजांनीं लुशाई प्रदेश आपल्या राज्यास जोडला. १९२१ सालीं या जिल्ह्याची लोकसंख्या १७३२४३ इतकी होती. यांत एकंदर ३६३ खेडीं आहेत आणि याचें मुख्य ठिकाण रंगामाती हें आहे. या जिल्ह्यांत चक्मा, माघ व टिप्पेरा या तीन रानटी जाती रहातात. त्यांची अदमासें संख्या अनुक्रमें ४४०००, ३५००० व २३००० अशी आहे.

शे ती.—हा जिल्हा बहुतेक डोंगराळ असल्यामुळें त्यांतील जमीन नांगरतां येत नाहीं. यांतील जमीनीची पेरणी झूम पद्धतीनें होते ती येणेंप्रमाणें:—जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत एखादा चांगलासा जमीनीचा तुकडा पाहून त्यांतील बांबू व इतर झाडेंझुडें तोडून तो साफ करतात. पुढें उन्हाळ्यांत या जमीनीस वणवा लावितात व नंतर पावसाळ्यांत तींत कापूस, तांदूळ, कांहीं भाजीपाला व मका वगैरे एकदम पेरण्यांत येतात. अलीकडे शेतकऱ्यांस जमीन नांगरावयास लावण्याबद्दल बरीच खटपट करण्यांत आली.

जं ग लें.—या जिल्ह्यांत विनवर्गीकरण केलेलीं व राखून ठेवलेलीं अशीं दोन प्रकारचीं जंगलें असून त्यांचीं क्षेत्रफळें अनुक्रमें ३७५३ व १३८५ चौरस मैल आहेत. १९०३-४ सालीं जंगलखात्याचें उत्पन्न ८८००० रु. होतें. यांतील जंगलांत उत्तम इमारतीलांकूड सांपडतें.

व्या पा र व द ळ ण व ळ ण.—या जिल्ह्यांतील रानटी बायका स्वतःसाठीं सुती वस्त्रें विणतात. याशिवाय येथील जमीनींत चहा, कापूस, तांदूळ, तीळ, मोहरी, तंबाखू वगैरेंचें उत्पन्न होतें. यांपैकीं कापूस बाहेर गांवीं रवाना होतो. यांतील आयात जिन्नस म्हटले म्हणजे सुती कापड, तांदूळ, मीठ, तंबाखू व वाळवलेले मासे हे होत. याचा बहुतेक व्यापार जलमार्गानें चित्तगांग बंदराशीं चालतो. बांदरबन, चंद्रघोना, रंगामाती वगैरे गांवांची व्यापाराकरितां प्रसिद्धि आहे. या जिल्ह्याचें बहुतेक दळणवळण जलमार्गानें होतें. यांत २३० मैल लांबीचे कच्चे रस्ते आहेत परंतु त्यांवरून गाड्या जाऊं शकत नाहींत.

रा ज्य व्य व स्था.—या जिल्ह्याचे चक्मा, मोंग व बोमोंग असे तीन विभाग असून त्यांवर एका अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. या अधिकाऱ्यास सुपरिंटेंडेंट म्हणतात. प्रत्येक विभागाचा कारभार तेथील नायकावर सोंपविला असून सारा वसूल करण्याची जबाबदारी राजकडेच असते. या विभागांतील प्रत्येक खेड्यावर तेथील पुढारी देखरेख करतो व यास सारावसुलीच्या कामाबद्दल कांहीं दस्तुरी मिळते. किरकोळ दिवाणी व फौजदारी खटल्यांत खेड्याचे व विभागाचे नायक निकाल देतात. यांच्याविरुद्ध सुपरिंटेंडेंट व त्याचे दोन मदतगार अपील ऐकतात. शेवटचा निकाल देण्याचा अधिकार विभागाच्या कमिशनरास असतो. फांशीच्या शिक्षेस मात्र स्थानिक सरकारची संमति घ्यावी लागते. १९०३-४ सालीं या जिल्ह्याचें उत्पन्न १२८००० रु. होतें. १९०३-४ सालीं एकंदर १११ शिक्षणसंस्था होत्या. व यापैकीं ३ दुय्यम प्रतीच्या, ८१ प्राथमिक व २७ विशेष प्रतीच्या शाळा होत्या. वरील सालीं दोन दवाखाने पोलिस शिपायाकरितां असून ३ धर्मार्थ दवाखाने होते.

**चित्ता.**—सिंह व बिब्यावाघ यांच्यासारखा दिसणारा हा प्राणी प्राचीनकाळीं सर्वांस ठाऊक असून मध्ययुगीन लोक सिंह व चित्ता यांच्यांतील फरक चित्त्याचें चित्रांतील पूर्ण तोंड पाहूनच ओळखीत असत. मोठया ठिपक्याचें मांजर म्हणून हा प्राणी जुन्या लोकांस माहीत असे. हिंदुस्थानांतील चित्त्याच्या पाठीवर काळे ठिपके असून डोक्याच्या बाजूला हे ठिपके जास्त ठळक असतात. केंसाळ इराणी चित्ताहि अशाच प्रकारचा असतो. मॅच्युरियांतील चित्ते जास्त केंसाळ असून त्यांच्या पाठीवर फार मोठे ठिपके असतात. पश्चिमआफ्रिकेंतील चित्ते रंगानें फार काळे असल्याचें दिसून येतें.

चित्त्यांच्या आकारांत बराच फरक असलेला नजरेस पडतो. त्याचें डोकें व शरीर यांची साधारणतः लांबी ३॥ ते ४॥ फूट असून शेपूट २॥ ते ३ फूट लांब असतें. मोठ्या चित्त्यापेक्षां लहान चित्त्याचे केंस मोठे असतात. दक्षिणआशिया व आफ्रिका यांमध्यें अगदीं काळया रंगाचे व कमी ठिपके असलेले चित्ते आढळतात. क्रूरपणांत या प्राण्याचा इतर हिंस्र पशूपेक्षां वर नंबर लागेल चित्ता हा अत्यंत चपळ व सावध असतो आणि एखद्या झुडुपांत दबा धरून उडीच्या आटोक्यांत भक्ष्य येतांच अकस्मात तो त्याजवर झडप घालतो व पंज्यानें व दातांनीं त्यास पकडतो. काळवीट, हरीण, मेंढी, बकरें, वानर, व विशेषतः कुत्रीं वगैरे प्राण्यांची शिकार करणें त्यास आवडतें. हिंदुस्थानांत हा मनुष्यभक्षक प्राणी म्हणून प्रसिद्ध आहे. संधि मिळतांच जरूरीपेक्षांहि जास्त प्राण्यांचा तो संहार करितो. या गोष्टीस त्याचा क्रूरपणा किंवा ताजें रक्त पिण्याची लालसा यांपैकीं एखादें कारण असावें. चित्त्यांची वस्ती अरण्यांत, रानावनांत झुडुपांत व खडकाळ डोंगरांत असते. चित्त्याची शिकार करूं लागले तर त्याप्रसंगीं हा प्राणी झाडावरहि सहज चढूं शकतो. आफ्रिका, पॅलेस्टाईन ते चीन व मँचुरिया, सिलोन, मलाया बेटें व जाव्हा इतक्या ठिकाणीं चित्त्याची वस्ती असल्याचें प्रसिद्ध आहे.

**चित्तूर**—मद्रास इलाखा कोचीसंस्थानांतील याच नांवाच्या तालुक्याचें हें मुख्य ठिकाण आहे. हें अनईमलई नदीवर वसलें असून याची लोकसंख्या १९११ मध्यें ८५२८ होती. तीपैकीं शेंकडा ९६ हिंदू होते. येथें सुती कापड निघतें. येथें एक लहान राजवाडा, तहशिलदाराच्या कचेऱ्या व एक दुय्यम प्रतीची शाळा या इमारती आहे.

**चित्तूर**, जिल्हा.—मद्रास इलाख्याच्या मध्यभागांतलि एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ ५६११ चौ. मै. असून लो. सं. ( १९२१ ) १२६९१५७ आहे. यांतील जमीनदारी व इनामी जमीन १७५५६९३ एकर आहे. जंगलाचा वसूल सुमारें एक लाख चाळीस हजार असून, जमीनमहसूल व इतर कर यांचें उत्पन्न सुमारें १३ लाख ४० हजार आहे. या जिल्ह्यांत चंद्रगिरी, मदनपल्ली व चित्तूर हे तीन विभाग व ९ तालुके आहेत. दहा हजारांत ६४९ लोक साक्षर आहेत.

ता लु का.—हा मद्रास इलाख्याच्या चित्तूर जिल्ह्यांतील एक तालुका. हा त्या जिल्ह्याच्या मध्यावर वसला असून याचें क्षेत्रफळ ७८६ चौरस मैल आहे. यांत चित्तूर या मुख्य ठिकाणाचा व ३३८ खेड्यांचा समावेश होतो. सन १९२१ सालीं याची लोकसंख्या २३७७३७ होती. १९२१-२२ सालीं सारा व कर यांचें एकंदर उत्पन्न ३३५००० रु. होतें. हा तालुका म्हणजे चढउताराचें मैदान असून यांत मधून मधून खडकाळ टेंकड्या आहेत. याची जमीन चांगली असून तिच्या बहुतेक भागास कालव्याचें पाणी मिळतें.

गां वः —हें चित्तूर जिल्ह्याचें व तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. येथें साउथ इंडियन रेल्वेचें स्टेशन आहे. १९२१ सालीं येथील लोकसंख्या १७९४१ होती. हें समुद्रसपाटीपासून ९९० फूट उंच असल्यामुळें येथील हवा थंड आहे. १८७४ त येथें लष्करी छावणी होती. येथें जिल्ह्याच्या कचेऱ्या आहेत.

**चितफेरोझपूर.**—संयुक्तप्रांत. बलिआ जिल्ह्यांतील एक शहर. यांस बरागांव असेंहि म्हणतात. हें छोटी सर्जू नदीच्या उजव्या बाजूस आहे. येथील लोकसंख्या १९०१ सालीं ९५०१ होती. हें शहर कौशिक रजपुतांचें केंद्रस्थान होतें. यांत चांगल्या सडका नाहींत. येथें दोन मोठालीं तळीं असून त्यांपैकीं एक तळें चुनेगच्चीनें बांधलें आहे. तें सगळ्या जिल्ह्यांत अप्रतिम आहे. तेथें एकशाळा आहे.

**चित्र कला**-या लेखाचे अनेक भाग आहेत ते(१) चित्रकलेचें सामान्यस्वरूप, ( २ ) बाह्य चित्रकला, (३) भारतीय चित्रकलेचा इतिहास व ( ४ ) जागतिक चित्रकला हे होत.

सा मा न्य स्व रू प.

चित्रकला या शब्दानें जरी सपाट फलकावर चित्रें रेखणें व मूर्ति करणें या दोन्ही कलांचा बोध होतो, तथापि या लेखामध्यें ‘ चित्र ’ शब्दानें सपाट फलकावर एका किंवा अनेक रंगांत काढलेल्या ‘ आलेख्या ’ चाच बोध घ्यावयाचा आहे व ‘ चित्र ’ शब्दाचा ‘मूर्ति असा जो दुसरा अर्थ आहे तो येथें घ्यावयाचा नाहीं. चित्रकला म्हणजे काय, तिचीं मुख्य अंगें कोणतीं, प्राथमिक व परिणत अवस्थेच्या चित्रांत काय काय भावना असतात चित्रांमध्यें साधारणतः कोणकोणत्या गोष्टी पाहिजेत, इत्यादि मुद्यांचा या लेखांत मुख्यत्वेंकरून विचार करावयाचा आहे.

चि त्र क ले चा द र्जा.—चित्रकलेची ललितकलांमध्यें गणना आहे. काव्य, गायन, चित्रकला, मूर्तिकला, वास्तुकला, नर्तनकला व नाट्यकला या सात ललितकलांमध्यें चित्रकलेचा दर्जा पुष्कळ कलानिपुणांनीं तिसरा ठरविलेला आहे. हा दर्जा ठरवतांना कलानिपुणांनीं विशिष्ट दृष्टिकोन ठरवून त्यांतूनच ह्या सप्तकलांकडे पाहिलें असावें. कारण एका दृष्टिकोनामधून पाहिलें असतां जरी चित्रकलेला तिसऱ्या स्थानावर बसविण्याची पाळी आली, तरी असे आणखी दुसरे दृष्टिकोन निःसंशय आहेत, कीं त्यांमधून ह्या कलेकडे अवलोकन केलें असतां ह्या कलेचा दर्जा निःसंशय पहिला लागेल.

मूर्तीच्या कलेपेक्षां चित्रकला वरच्या पायरीची आहे या बद्दल मुळींच वाद नाहीं, कारण सृष्टिसौंदर्याची हुबेहूब ठेवण जशी रंगांत चित्रांत सहज व लीलेनें दाखवितां येते त्याप्रमाणें मोठ्या प्रयत्नानेंसुद्धां मूर्तीमध्यें दाखवितां येत नाहीं. दृश्याच्या पायापासून तों क्षितिजापर्यंतचा अफाट सृष्टिसौंदर्याचा भाग लहानशा सपाट जागेवर चित्रकार हुबेहूब दाखवील व त्या चित्रांत विवक्षित भावांचें आविष्करणहि तो करील. पण तसा प्रकार मूर्तिकाराला करतां येणें शक्य

नाहीं. वास्तुकलेचाहि ह्या दृष्टीनें खालचाच दर्जा आहे. अर्थात मूर्तिकला व वास्तुकला ह्यांहून चित्रकला ही वरच्या दर्जाची आहे. गायन व काव्य ह्यांपेक्षां चित्रकला खालच्या प्रतीची समजली जाते. पण तसें मानण्याचेंहि कांहीं कारण नाहीं. गायन मनाला तल्लीन करतें खरें, पण गायनाचा रसास्वाद मिळण्यासाठीं अनेक स्वरसंतति एका पाटीमागून एक श्रोत्रेंद्रियाच्या द्वारें मनापर्यंत पोंचावी लागते व असें होण्यास बराच कालावधि लागतो. पण चित्राची गोष्ट तशी नाहीं. एका दृष्टिक्षेपासरशीं चित्रांतील सर्व प्रतिभा व रसमयता ही पाहणाराच्या हृत्पटलावर आरूढ होते व तो द्रष्टा रसिक असल्यास पहिल्या दृष्टिक्षेपाबरोबरच आनंदानें डोलूं लागतो. काव्य हें कलेच्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट खरें, पण काव्यामधून रस घेणें हें चित्रामधील रस घेण्यापेक्षां अधिक कठिण व अधिक कालावधीचें कार्य आहे. काव्य व गायन ह्या दोनहि कला शब्दमय असल्यामुळें शब्दांचा सारखा प्रवाह कानांवर यावा लागतो व त्यामुळें रसप्राप्तीस कालावधि लागतो, इतकेंच नव्हे तर त्यांत विघातहि होऊं शकतो. जशी गाणें ही गवयाची कला आहे त्याचप्रमाणें चित्र ही चित्रकाराची कला आहे. जशी चित्राच्या रूपानें चित्रकाराची कला प्रेक्षकांच्या समोर एकदम येऊं शकते, त्याप्रमाणें गाणें व काव्य यांचें नाहीं. ह्या दोनहि कला लोकांपुढें येण्यास बराच वेळ लागतो, त्यामुळें कलेचा मुख्य उद्देशच साध्य होण्यास अवधि लागतो. "चित्ररामायण व शब्दरामायण" या दोहोंमधील रस घ्यावयाचा असेल तर तो चित्ररूपानें घेणें सोपें आहे व तें थोड्या कालावधीचें कार्य आहे तसें काव्याचें नाहीं. गायनाला गवयाच्या पाठीमागून अस्तित्वच नाहीं, पण चित्र हें चित्रकाराच्या पश्चात हजारों वर्षे राहूं शकतें, असे अनेक दृष्टिकोन असल्यामुळें कित्येक दृष्टींनीं चित्रकलेचा मान पहिल्या प्रतीचा आहे असेंहि सिद्ध करतां येण्यासारखें आहे.

**ज्ञानेंद्रियें व कला.**—मनुष्याच्या पंच ज्ञानेंद्रियांशीं जर पूर्वोक्त सप्तकलांचा संबंध जोडला तर कित्येक इंद्रियांशीं कलेचा संबंधच नाहीं असें दिसून येईलः—

| पंचभूतें | साधन | इंद्रियें | कला |
|---|---|---|---|
| आकाश— | शब्द — | कर्ण | गायन, काव्य. |
| वायु — | स्पर्श — | त्वचा | ... |
| तेज — | रूप — | नेत्र | चित्रकला, मूर्तिकला, वास्तुकला |
| आप — | रस — | जिव्हा | ... |
| पृथ्वी — | गंध — | नाक | ... |

या कोष्टकावरून हें लक्ष्यांत येईल कीं, केवळ दोनच इंद्रियांनीं वरील सातहि कला व्यापलेल्या आहेत. इतर इंद्रियांच्या व्यापारामध्यें कलेचा भाव कां नसावा, याचाहि थोडासा विचार अवश्य केला पाहिजे. जसें:—

| इंद्रियें | शास्त्रें | इंद्रियांचें कार्य |
|---|---|---|
| कर्ण | —शब्दशास्त्र | ऐकणें व ऐकविणें |
| त्वचा | —कामशास्त्र | ( स्वतः ) उपभोग घेणें |
| नेत्र | —रूपशास्त्र | पहाणें व दाखविणें |
| जिव्हा | —सूपशास्त्र | ( स्वतः ) उपभोग घेणें |
| नाक | —सुगंधशास्त्र | ( स्वतः ) उपभोग घेणें |

या पांच इंद्रियांचीं हीं मुख्य शास्त्रें आहेत. कामशास्त्र हें भोगाचें शास्त्र आहे, व भोग हा स्वतःच भोगावयाचा असतो. आपण भोग भोगीत असतां तो दुसऱ्यांस देतां येत नाहीं. सूपशास्त्राचेंहि असेंच आहे. उत्तम पक्वान्न तयार केलेलें असलें तरी सुद्धां तें एकाच वेळीं अनेकांनां उपभोगितां येत नाहीं. नाकानें वास घ्यावयाचा असतांहि असाच प्रकार होतो. म्हणजे ह्या तीन इंद्रियांचे विषय समुदायाला एकसमयावच्छेदेंकरून ग्रहण करणें अशक्य आहे. पण शब्दशास्त्र व रूपशास्त्र यांचें तसें नाहीं. एका वेळींच एका चित्राचें निरीक्षण करून हजारों लोक जसे आनंदाचे भागी होऊ शकतील त्याचप्रमाणें एकाच वेळीं काव्यश्रवणानेंहि हजारों मनुष्य तल्लीन होऊं शकतील. म्हणून मनुष्याचें मनुष्यत्व राखण्यास व वाढविण्यास जशीं हीं दोन ( कर्ण व नेत्र ) इंद्रियें कारण होत असतात, त्याप्रमाणें इतर इंद्रियें नसतात. मनुष्याचें मनुष्यत्व "सांधिक जीवनानें" विकसित होणारें आहे. म्हणून ज्यांच्या योगानें संघभावाला प्रोत्साहन मिळतें, अशा दोनच इंद्रियांशीं संबंध ठेवणाऱ्या हुन्नरांनां 'ललितकला' असें समजण्यांत येत आहे. यासाठींच चित्रकलेचा अध्यात्मिक दृष्टीनें अत्यंत उपयोग होणें शक्य आहे असें सध्यां समजलें जातें. कारण अध्यात्मिक दृष्टि झाली तरी सामुदायिक दृष्टीच होय.

एकटाच जिचा उपभोग घेऊं शकतो ती कांहीं ललितकला नव्हे तर जिचा अनेक माणसें एकसमयावच्छेदेंकरून आस्वाद घेऊं शकतात तीच ललितकला होय. या दृष्टीनें सुग्रणपणा हा गुण कांहीं कलेमध्यें परिणत होऊं शकत नाहीं. वरील सात कला ह्या अशा दृष्टीनेंच कला आहेत. त्यांच्यामधील माधुर्य एकाहून अधिक माणसें एका वेळीं सुद्धां घेऊं शकतात व तें माधुर्य घेतल्यानंतर सुद्धां तें जसेंच्या तसेंच त्या मूळ कृतींमध्यें कायम असूं शकतें. एका चित्रकारानें काढलेलें चित्र हजार माणसांनीं पाहिलें व त्यांतील आनंद घेतला, तरी त्या चित्राचा गुण कोणत्याच रीतीनें कमी होत नाहीं. म्हणूनच चित्रकलेला 'ललितकला' असें म्हणतात.

'पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥'

शतपथ ब्रा. १४.८,१.

'पूर्णाचें पूर्णत्व घेतलें तरी पूर्णच शिल्लक राहतें.' चित्रांतील सर्व सौंदर्य अनेकांनीं अनुभवलें किंवा उपभोगिलें तरी तें जसेंच्या तसेंच मूकचित्रांत कायम असतें; म्हणूनच आलेख्य ही ललितकला आहे.

क ला व नि स र्ग.—साधारणतः निसर्ग स्वभावाला कला म्हणत नसतात.पक्षी सुंदर घरटें बांधतो म्हणून त्या पक्ष्याला कोणी ' कुशल कारागीर ' म्हणत नसतात. कलेचा संबंध निसर्गाशीं जोडला जात नसून मानवी कृतीशींच जोडला जात असतो. चित्रकला ही तर पूर्णतेनें मानवी कृतीशींच संबंध जोडणारी कला आहे. मनुष्येतर प्राण्यांशीं ह्या कलेचा कोणत्याच प्रकारचा संबंध येत नाहीं.

आतां कोणी असें म्हणतील कीं, सर्वच माणसें कांहीं कुशल चित्रकार बनत नसतात. ज्यांचा स्वभाव अनुकूल असतो, तेच कुशल चित्रकार बनूं शकतात; म्हणून स्वभाव किंवा निसर्ग हा सुद्धां कलेचाच भाग आहे. कांहीं अंशीं विशेषत: अध्यात्मिक दृष्टीनें ह्या म्हणण्यांतहि खरेपणाचा भाग आहेच. मानवी नैसर्गिक स्वभावाचेंच प्रतिबिंब कला असल्यामुळें वरील म्हणणें तरी खोडून निघणार कसें ? पण निसर्गस्वभाव जरी साहाय्यक किंवा आवश्यक असला तरी त्यालाच केवळ कला म्हणतां येत नाहीं. कारण अभ्यास, विचार व प्रयत्न यांनीं कलेची वाढ करतां येते. एखाद्या मनुष्यास जरी जन्मतःच चित्रकलेचा नाद असला, तरी तेवढ्यानें त्याला कलेमध्यें नैपुण्य साधतां येणार नाहीं. योग्य रीतीचा अभ्यास,नीट मार्गानें प्रयत्न व आपल्या कलेच्या उन्नतीचा सतत विचार करीत गेल्यासच त्याला कलेमध्यें नैपुण्य प्राप्त करतां येईल. निसर्ग स्वभावधर्म याहून निराळा आहे.पक्ष्यांचा जो स्वभावधर्म हजारों वर्षांपूर्वी होता तसाच तो आजहि आहे. पण चित्रकलेचा मानवी बुद्धीशीं संबंध असल्यामुळें तिची सारखी प्रगति होत आहे. स्वभावधर्म व कला यांतील हा भेद लक्ष्यांत बाळगला पाहिजे.

प्राण्यांची उपजत बुद्धि, स्वभावाचे निसर्गधर्म व कला यांमध्यें फार अंतर आहे. ही गोष्ट साधारणतः वरील विवेचनावरून लक्षांत येईल. कलेमधील प्रतिभा, अभ्यास, विचार व प्रयत्न यांच्या योगानें हवी तितकी वाढवितां येते. या दिशेनें कलेची वाढ ही अमर्याद आहे. चित्रकला ही अमुकच मर्यादेपर्यंत वाढेल असें केव्हांहि व कोणालाहि सांगतां येणार नाहीं. निसर्गधर्म विशिष्ट योनीमध्यें उत्पन्न झाल्यामुळें प्राप्त होत असतात तसा प्रकार कलेचा नाहीं. अभ्यासानें ती प्राप्त करून हवी तितकी वाढवतां येते.

चि त्र क ले चा उ प यो ग.—कोणत्याहि ललितकलेचा मनुष्याच्या दैनंदिन व्यवहाराला उपयोग नसतो. ललितकलेशीं मुळींच परिचय नसणारा मनुष्यहि जगतो, शेवटीं मरतो व आपल्या आयुष्याचा क्रम आपल्या इच्छेप्रमाणें सुखानें घालवितो. पण जर त्याला चित्रकलेमध्यें प्रावीण्य संपादन करतां आलें तर जगांतील सौंदर्याकडे त्याला रसिक दृष्टीनें पाहतां येतें. स्वतः सौंदर्य जाणणें, सौंदर्यावर प्रीति करणें व सौंदर्यावरील प्रीतीचें आविष्करण करणें ह्या गोष्टी चित्रकलेच्या उपासकालाच साध्य असतात. म्हणून " ज्याला चित्रकलेचें ज्ञान नाहीं, त्याला जगांतील सौंदर्याचें भान नाहीं, " असें म्हटलें तर तें फारसें सत्याला सोडून होणार नाहीं. म्हणून चित्रकलेच्या ज्ञानाशिवाय सृष्टीकडे पाहण्याचीच योग्यता मनुष्यांत येत नाहीं असें जे कित्येक म्हणतात तें अगदीं खरें आहे असेंच म्हणावें लागतें.

चि त्र क ले ती ल नै पु ण्य.—चित्रकलेकडे कित्येकांची निसर्गतः अभिरुचि असते हें जरी खरें, तरी त्या सर्वांचें त्या कलेंत प्रावीण्य होऊं शकतें असें मात्र नाहीं, प्रावीण्य प्राप्त होण्यास दृढ अभ्यास, एकनिष्ठ तपश्चर्या व सतत निष्ठापूर्वक अव्याहत प्रयत्न यांची अत्यंत आवश्यकता आहे. उपजत कल असला तरी ती निसर्गस्वभावाप्रमाणें मनुष्यास श्रमांवांचून प्राप्त होत नाहीं. चित्रकलेमध्यें सर्वच लोक प्रावीण्य संपादन करूं शकत नाहींत;कित्येकांना उपजत कला असूनहि व ते प्रयत्न करीत असूनहि प्रवीण होत नाहींत. ह्याचें कारण असें कीं ते या कलेच्या ठरीव नियम-उपनियमांप्रमाणें चालत असतात व नियमांचें उल्लंघन करून चित्रकलेच्या नंदनवनांत स्वेच्छसंचार करण्याचें धैर्य व धाडस त्यांच्या अंगांत नसतें. चित्रकलेमध्यें प्रावीण्य संपादन करण्यासाठीं प्रथमतः आपली दिशा व आपला उद्देश ठरविला पाहिजे व नंतर त्यांच्या पूर्तीसाठीं सहेतुक प्रयत्न केले पाहिजेत; पुष्कळवेळां नियम-उपनियमांना अनुकूल वागलें पाहिजे हें खरें पण कित्येक वेळां त्यांच्या प्रतिकूल वर्तन करूनहि चित्रांतील वैशिष्ट्य साधलें पाहिजे तरच या चित्रकलेमध्यें प्रवीण होतां येतें. येनकेन प्रकारेण चित्रांमध्यें विशिष्टपणा साधणें हें कलानैपुण्यतेचें लक्षण होय.

चित्रकलेपासून होणारा आनंद सार्वजनिक स्वरूपाचा असतो. एकदां चित्र काढून तयार झालें कीं त्यांतील आनंदावर कोणांहि एका व्यक्तीची सत्ता असूं शकत नाहीं. तो सार्वलौकिक स्वरूपाचा आनंद असतो. ज्यांना डोळे आहेत त्यांनीं तो आनंद खुशाल लुटावा, कितीहि जरी तो लुटला तरी मूळ चित्रांतून तो कांहीं कमी व्हावयाचा नाहीं. अशा प्रकारें चित्रकलेचें स्वरूप असल्यामुळें ह्या कलेच्या अंगप्रत्यंगांचा विचार करण्याचें या लेखांत योजलें आहे. या विचारांमध्यें मुख्यतः दोन भाग आहेत. ( १ ) पहिला प्राथमिक अथवा साधक अवस्थेमधील अंगप्रत्यंगांचा किंवा नियम उपनियमांचा विचार व ( २ ) दुसरा पूर्ण किंवा सिद्ध अवस्थेमधील नियमउपनियमांच्या मर्यादेबाहेरील स्वातंत्र्याच्या स्वैर संचारांचा विचार. या दोनहि भागांचा आतां विचार करूं:—

प्रा थ मि क अ व स्था.—ह्या अवस्थेमध्यें सृष्टीचें अनुकरण हेंच मुख्य काम असतें. साधकावस्थेमधील चित्रकार हे सृष्टिदेवीचेच निःस्सीम उपासक असले पाहिजेत कारण त्याशिवाय चित्रकला प्राप्तच होत नाहीं. या प्राथमिक अवस्थेमध्यें खालील गोष्टी अवश्यक असतात:—

बाह्य रेषा:—सृष्टीमधील कोणत्याहि पदार्थाचें चित्र दाखण्यासाठीं प्राथमिक अवस्थेमध्यें बाह्यरेषेची आंखणी

नीट रीतीनें व्हावी लागत. पूर्णावस्थेमध्यें देखील बाह्यरेषेच्या ठेवणीकडे दुर्लक्ष करून चालत नाहीं; तथापि कित्येक वेळां स्वच्छंदाच्या भरारीमध्यें या ठेवणीकडे दुर्लक्ष झालेलें चालतेंहि. पण प्राथमिक स्थितीमध्यें अगदीं काळजीपूर्वक ह्या गोष्टींकडे लक्ष्य असलेंच पाहिजे. बाह्य रेषेच्या आंखणीची चित्रकलेमध्यें इतकी आवश्यकता आहे कीं तिच्याशिवाय चित्रकलेमधील प्रावीण्य संपादन करणें जवळ जवळ दुरापास्तच आहे असें म्हटलें तरी चालेल. इतर गोष्टी असोत वा नसोत जर बाह्यरेषा अगदीं हुबेहूब व जशी असावी तशी असली तर चित्र परिपूर्ण झालें असें समजण्यास कांहीं एक हरकत नाहीं, इतकी ह्या एकाच गोष्टीची महती आहे.

छाया आणि प्रकाश:—चित्राची बाह्यरूपरेषा तयार झाल्यावर त्यामध्यें छाया व प्रकाश यांची योजना करावयाची असते. छायेचा प्रदेश व प्रकाशाचा प्रदेश यांचें प्रमाण समतोल प्रमाणांत ठेवणें हें कांहीं साधारण अभ्यासानें साध्य होणारें नाहीं. बाह्यरेषात्मक चित्र कितीहि निपुणतेनें तयार केलेलें असलें, तथापि जर त्यांत छाया व प्रकाश यांचें प्रमाण योग्य राखलें नसेल तर तें चित्र खराब दिसल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. यावरून छाया व प्रकाश हीं व्यवस्थित व सप्रमाण ठेवण्याची किती अवश्यकता आहे याची सहजच कल्पना होईल.

चित्राचा आकार:—चित्राचा आकार कसा व कोणत्या स्वरूपाचा ठेवावा याकडेहि चित्रकाराचें लक्ष्य अवश्य वेधलेलें असलें पाहिजे. गोल, दीर्घवर्तुळ, चतुरस्र, समचौरस किंवा लंबचौकोनी अथवा अन्य प्रकारचेहि विविध आकार आहेत. या आकारांच्या लांबीरुंदीचें प्रमाण ठरवून केवळ अमूकच स्वरूपाचा बाह्य आकार असावा व अमूकच आकार ह्या विशिष्ट चित्राला खरोखर शोभेल हें ठरवणें मुळींच सोपें नाहीं. आंतील चित्र नीट रीतीनें तयार झालेलें असलें तरी त्याचा सर्व बाह्य आकार त्या चित्राच्या एकंदर ठेवणीला साजण्याजोगा न राखला जर सर्व चित्राचा एकंदर ठसा उमटावा तसा उमटत नाहीं, व ह्या अगदीं साधारण वाटणाऱ्या गोष्टीमुळें सर्व चित्र बेढंगी दिसतें. एखाद्या चित्राला जर उभट असा आकार जमत असला तर दुसऱ्या चित्राला याच्या उलट आडवा असा आकार अधिक शोभा देईल. व जर तोच विशिष्ट आकार न दिला तर सर्व चित्राची शोभा बिघडून जाईल. म्हणून ह्या गोष्टीकडे कोणीहि कानाडोळा करतां कामा नये.

व र्ण व्य व स्था—चित्राची बाह्यरेषा, चित्राचा आकार व छाया प्रकाशाची व्यवस्था नीट झाल्यानंतर त्यामध्यें रंगाची ठेवण नीट रीतीनें साधावी लागते. कोणता रंग कोणत्या ठिकाणीं किती प्रमाणांत ठेवावा व त्या रंगाला विशेष सजविण्यासाठीं आजूबाजूला रंगाची योजना कशी करावी याचें ज्ञान पुष्कळ अभ्यासानें मनांत आपोआप येऊं लागतें, तें पढवून येत नसतें. या रंगाच्या ठेवणीमध्यें कांहीं चातुर्य आहे, हें ज्यांच्या ध्यानींमनीं नसतें ते आपल्या चित्रांत भगभगीत व भडक रंग कोठें तरी व कसा तरी वापरतात व चित्राचा सर्व समतोलपणा बिघडवून टाकतात. चित्रामध्यें जी गोष्ट मुख्यतः दाखवावयाची असेल, तिच्या रंगामध्यें विशेष उठाव आणण्यासाठीं, इतर पदार्थांचे रंग जाणूनबुजून थोडेसे मंद दाखवावे लागतात.तसेंच सात्त्विक गोष्टीच्या चित्रांमध्यें भडक रंगांचें प्राधान्य नसावें, राजस चित्रामध्यें भगभगीत व उद्दीपक रंगांचा भरणा असावा आणि तामस चित्रांमध्यें मळकट व निस्तेज रंगांची योजना करावी लागते. अशी रंगांची योजना असली म्हणजे आंतील गोष्टीकडे लक्ष्य जाण्यापूर्वीच केवळ चित्राच्या एकंदर आभासानेंच मनावर इष्ट परिणाम होऊन प्रेक्षकांचें मन चित्रांतलि गोष्टी पाहण्यास योग्य बनतें. म्हणून चित्रांमधील या ' वर्ण–व्यवस्थे ' कडे प्रत्येक चित्रकारानें अवश्य लक्ष्य पुरवलें पाहिजे.

स प्र मा ण ता—मागें सांगितलेल्या गोष्टी ठीक झाल्यानंतर चित्रांतलि पदार्थांची सप्रमाणता ठेवण्याकडे विशेष लक्ष्य दिलेलें असलें पाहिजे.प्रत्येक पदार्थांचें सृष्टांमध्यें जें प्रमाण आहे, अगदीं तसेंच प्रमाण चित्रांत ठेवावें असा उद्देश येथें नाहीं; तर चित्रांतलि विशिष्ट उद्देश साध्य होण्यासाठीं ज्या ज्या पदार्थांचें जसें जसें प्रमाण चित्रांत दाखवणें योग्य असेल, तसें तें दाखवलें गेलें आहे कीं नाहीं याकडे विशेष लक्ष्य दिलें पाहिजे.

य था द र्श न चि त्र ले ख न— दृक्शास्त्राच्या नियमांनुसार सर्व चित्र तयार केलेलें असावें. रेषात्मक दर्शनशास्त्र व वर्णात्मकदर्शनशास्त्र असे या शास्त्रांत दोन प्रकार आहेत. या दोनहि प्रकारांच्या नियमांप्रमाणें चित्र अगदीं यथासांग असावें. असें चित्र नसेल, तर चित्र वांकडें दिसूं लागतें इतकेंच नव्हे तर लहान असलेला पदार्थ प्रमाणाबाहेर मोठा दिसूं लागतो, मोठा असला तरी तो लहान दिसतो, व सारखे पदार्थहि लहान मोठे दिसूं लागून दृष्टिदोष झाल्यामुळें चित्र अगदीं वाईट दिसतें. म्हणून कोणत्याहि चित्रांत ह्या नियमांकडे दुर्लक्ष्य होतां कामा नये.

ए क भा व म य ता—सर्व चित्र अगदीं भावनेनें युक्त असावें. चित्रांतलि सर्व पदार्थ, त्यांचे आकार व रंग, हे सर्व एकाच भावनेचे पोषक असावे. कोणताहि पदार्थ असा असूं नये कीं जो त्या एका विशिष्ट भावनेचा विघात करणारा असेल. समजा कीं, शांतिरसाचें चित्र काढावयाचें असेल तरी मुख्य पात्राशिवाय इतर पदार्थांवरून सुद्धां शांतिरसाचीच अंशतः तरी कल्पना यावी, निदान शांतिरसाचा विघात होईल असे तरी कोणतेहि पदार्थ त्यांत नसावे. भक्तिरसाचें चित्र असल्यास असे पदार्थ चित्रांत दाखवावे कीं ते भक्तिरसाची साक्षात् किंवा परंपरेनें कल्पना प्रेक्षकांच्या मनांत उत्पन्न करतील. चित्रांतील मुख्य अंगामध्यें

किंवा मुख्य पात्रामध्यें तो भाव प्राधान्येंकरून असावा व इतरांमध्यें तोच भाव गौणपणानें तरी असावा.

भावाची व रंगाची सांगड —चित्राचा जो मुख्य रंग असेल तो रंग चित्रांमधील भावाच्या विरुद्ध नसावा. एकंदर चित्र एकदम पाहिल्याबरोबर तें लाल, पिंवळें किंवा निळें अथवा हिरवें दिसेल. हा जो रंगाचा सर्व साधारण आभास असतो, तो आभास मूळ भावनेशीं विरोधक स्वरूपाचा नसावा. लाल रंग हा उत्साह, तरतरी, शौर्य, वीर्य, भोग वगैरे भावनांचा प्रतिनिधि समजला जातो, निळा रंग हा निरुत्साह, भीति, अज्ञान, मृत्यु इत्यादि भावना प्रकट करतो; पांढरा रंग सात्विकपणा, धर्म,यश,पुण्य इत्यादि भाव दाखवतो व अशाचप्रमाणें इतर रंग हे इतर गुण, धर्म व इतर भावना यांचे निदर्शक आहेत. यावरून लक्षांत येईल, कीं भक्ति रसाच्या चित्रांत लाल रंगाला प्राधान्य नसावें व शौर्यभाव दाखवणाऱ्या चित्रांत निळया रंगाला प्राधान्य नसावें. अमुक चित्रांत अमुक रंग कां नको व अमुक चित्रांत अमुकच कां घालावें याचा विचार वर दिलेल्या कारणांत आहे. ज्याप्रमाणें गाण्यामध्यें रागांच्या सुरांमध्यें वर्ज्य सूर व अवर्ज्य सूर असतात, त्याचप्रमाणें चित्रांतीहि कांहीं अंशीं आहेच. अमुक रागांत अमुक स्वर नसावे, त्याचप्रमाणें अमुक भावनेच्या चित्रांत अमुक रंग वर्ज्य समजावे, अशा प्रकारचे नियम आहेत, व जे लोक या गोष्टीकडे फारसें लक्ष्य देत नाहींत त्यांच्या चित्रांमध्यें जसा भाव व्यक्त व्हावा तसा होत नाहीं किंवा एखाद्या वेळीं विरुद्ध भावहि होतो.याचें कारण रंग व भाव यांची सांगड त्यांनीं घातलेली नसते हेंच उघड आहे. म्हणून या गोष्टीकडे चित्रकाराचें दुर्लक्ष्य होऊन चालावयाचें नाहीं.

उठावपणा.—चित्रांत उठावपणा पाहिजे असतो. सजावटीच्या चित्रांत तो नसला तरी चालतो. पण इतर चित्रांत तो अवश्य पाहिजे. उठावपणा हा छाया व प्रकाश यांच्या योग्य ठेवणीनें व रंगांच्या तारतम्य भावनेनें दाखवितां येतो. कांहीं रंगांचे शत्रुमित्रभाव ठरलेले आहेत व त्यांत कधींहि बदल होत नाहीं.

निळा—नारिंगी, लाल—हिरवा, पिंवळा—जांभळा या जोड्या उठावपणाच्या आहेत. यांच्या मधल्या हलक्या रंगांच्याहि अशाच जोड्या आहेत. त्या सहज ठरवतां येतात. विजोड रंग कधींहि खुलत नसतो हें तत्व सर्वांस माहीत आहेच. आपल्या मित्राच्या घरीं जाण्यानें चेहरा जास्त प्रफुल्लित होतो, तसा शत्रूच्या घरीं राहण्याचा प्रसंग आल्यानें होत नाहीं. हाच प्रकार रंगांमध्यें आहे. कांहीं रंगांचे कांहीं दुसरे रंग हे ठरीव मित्र आहेत. त्यांच्याच सहवासांत ते खुलून दिसतात. इतर रंग शत्रुरूप असल्यामुळें त्यांच्या सहवासांत जर त्यांस राहण्याचा प्रसंग आला, तर ते हिरमुसलेले दिसणार. एवढ्यासाठीं आपल्या चित्रांतील रंगांची ठेवण व उठावपणा हा कसा साधावा या गोष्टीकडे चित्रकाराचें लक्ष नेहमीं वेधलेलें असलेंच पाहिजे.

चित्र पाण्याच्या रंगांत असो, किंवा तेलाच्या किंवा दुसऱ्या कसल्याही रंगांत असो; त्यांत साधारणतः वरील प्रकारचे नियम पाळले गेले पाहिजेत, म्हणजे तें ठीक दिसतें, नाहींतर त्यांत जीव येत नाहीं, किंवा तें चित्रकलेच्या नियमांनुकूलहि होत नाहीं.

येथवर जे नियम व ज्या गोष्टी सांगितल्या त्या सर्व चित्रकारांनां व सर्व चित्रांनां जरी लागू असल्या तरी त्यांचा संबंध विशेषतः प्राथमिक किंवा साधक वर्गांतील चित्रकारांशीं येतो. जे या वर्ण काव्यामध्यें निरंकुश झालेले चित्रकार असतात त्यांच्या कलेसंबंधानें आतां थोडेंसें लिहिलें पाहिजे.

प्रारंभीच्या साधक अवस्थेमधून पार पडून जे या वर्णकाव्याच्या उदधीच्या पैलतीरावर स्वेच्छासंचार करूं लागलेले असतात, ते ठरवतील ती त्यांची दिशा, ते म्हणतील ते त्यांचे नियम, ते करतील तें प्रमाण व ते जातील तो त्यांचा मार्ग, अशी स्थिति असल्यामुळें या वर्णकाव्यांतील वर्णकविकुलगुरूंच्या कृती नियमांनीं बांधतां येणें शक्यच नसतें. आधीं वर सांगितलेली प्राथमिक अवस्था हीच प्रायः साधारण जगाची उत्तम चित्रकलानैपुण्याची उच्च पायरी होय. चित्रकलेच्या दरवाजावर लुडबुडणाऱ्या अलबत्यागलबत्यांचा या प्राथमिक वर्गांत समावेश सुद्धां होत नसतो. सर्वसाधारण शिक्षित जनताज्या ज्या चित्रकारांनां कुशल चित्रकार म्हणून समजते व नियमबद्ध कलेमध्यें ज्यांचा खरोखर हातखंडा असतो, असेच निपुण चित्रकार ह्या प्राथमिक वर्गांत येतात व जे इतर नामधारी चित्रकार असतात ते बिनवर्गांमध्येंच गणले जातात. पण या सिद्धवर्गामध्यें अशा उच्च चित्रकारांची गणना होते कीं, जे अलौकिक स्फूर्तीनें कौशल्याच्या पुढील नैपुण्य दाखवीत असतात.

ह्या सर्वोत्कृष्ट चित्रांत अलौकिक दिव्यप्रतिभा व स्फूर्तिदायक नवनिता जिवंत नांदत असते, त्यामुळें पूर्वींचे नियम व उपनियम त्यांनां केव्हां केव्हां मोडावेहि लागतात. वर्णकाव्याची निरंकुशता ह्या प्रकारच्या श्रेष्ठ प्रतीच्या चित्रांतच दिसते. या जगांत ज्यांनीं म्हणून चित्रकलेमध्यें क्रांति घडवून आणली आहे, त्या सर्वांच्या चित्रांत अशा प्रकारची अलौकिक प्रतिभा होती व ती नसेल तर त्यांच्याकडून क्रांति घडणार व नाहीं.

ह्या वर्गांतील चित्रें असाधारण दिव्य दृष्टीनेंच तयार झालेलीं असतात, व यासाठींच तीं साधारण लोकांनां फारशीं आवडत नसतात, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. हीं चित्रें पसंत होण्यास तीच सहृदयता पाहिजे, कीं जी त्या चित्रकारांच्या हृदयांत विराजमान असते. इतरांनां त्या दिव्य दृष्टीच्या अभावी तें अंतर्ज्ञान कसें प्राप्त होणार, व तें नसेल त्यास तें चित्रें समजणार तरी कसें?

ह्या दिव्य प्रतिभायुक्त चित्रांत अमुक असतें किंवा अमुक असावें असें कांहीं एक सांगतां येणें शक्यच नसतें. कारण त्या दिव्य आवेशाच्या भरांत जें कांहीं होईल तें अद्वितीयच असणार!! म्हणून कलेच्या ह्या पायरीवरील चित्राच्या स्वरूपाचें वर्णन करणें अशक्य आहे. या प्रकारच्या चित्रांविषयीं शब्दांनीं जरी दुसरें कांहीं सांगतां आलें नाहीं तरी एवढें खास म्हणतां येतें कीं "त्यांत एक नवीन संदेश झळकत असतो." जें शब्दांच्या पलीकडील अद्भुत कार्य असतें त्याचें शब्दांनीं वर्णन होणें शक्य नसतें. म्हणून याविषयीं इतकेंच लिहिणें पुरे. प्रत्येक चित्रामध्यें, मग चित्र कोणत्याहि वर्गांत मोडत असो, सर्वसाधारण साधावयाचा असा एक उद्देश असतोच असतो. चित्रांतील सर्व भाग व गोष्टी ह्या एका उद्देशाशीं संयुक्त असणाऱ्याच असाव्या व अशा कोणत्याहि गोष्टी चित्रांत नसाव्या कीं ज्या मुख्य उद्देशाशीं विसंगत होतील. ही गोष्ट सर्व प्रकारच्या चित्रांनां सारखीच लागू आहे. चित्रांत मुख्य उद्देश व्यक्त झालेला नसला व चित्रांत काढलेले सर्व पदार्थ त्या उद्देशाला पोषक नसले, तर तें चित्र कितीहि उत्तम रीतीनें काढलेलें असलें व त्यांत कोणत्याहि नियमांचें उल्लंघन झालेलें नसलें तरी तें सर्व फुकट होय. पण जर मुख्य हेतु उत्तम साधलेला असला, तर इतर नियमांचें उल्लंघन केलेलें असलें तरीहि तें क्षम्य असतें, इतकी ह्या गोष्टीची महती आहे.

चित्रांतील मुख्य चुका.—आतांपर्यंत चित्रांत अमुक असावें व अमुक गोष्टीकडे लक्ष्य द्यावें हें सांगितलें. आतां अमुक असूं नये हें सांगावयाचें आहे. चित्रकार थोडासा वेसावध असला कीं एखादा दोष चित्रांत येऊन आपलें ठाणें देतो, म्हणून हे दोष होऊं न देण्यासाठीं खबरदारी घेतली पाहिजे.

युगविपर्यास.—चित्रामध्यें युगाचा विपर्यास होतां होईल तों होऊं देऊं नये. कोणत्याही ऐतिहासिक किंवा दुसऱ्या कसल्याहि प्रसंगाचें चित्र काढावयाचें असेल, तर ज्या युगांतील तें चित्र असेल त्या युगाला अनुरूपच सर्व चित्रांची व आंतील सर्व वस्तूंची मांडणी केलेली असावी. कोणताहि असा पदार्थ त्यात काढूं नये कीं ज्याच्या योगानें भिन्न युगाची भेसळ केल्यासारखें होईल. समजा कीं आपल्याला ऋषिकालाचें चित्र काढावयाचें आहे. तर त्यांत आजकालच्या तऱ्हेच्या पदार्थांची भेसळ करतां कामा नये. बूट पाटलोण घालून ऋषींचीं व देवांचीं चित्रें काढणे हें जसें वाईट तसेंच आजकालच्या चित्रांत प्राचीन काळच्या तऱ्हांची भेळस करणें हेंहि फार वाईट. दशरथाच्या दरबारांत पुणेरी पगडी घातलेले लोक काढणें, किंवा सध्याच्या दरबारांत मृगचर्म परिधान केलेले ऋषी काढणें, हे दोनहि प्रकार अत्यंत वाईट. केव्हां केव्हां हा दोष टाळणें अशक्य असतें. पण होतां होईल तों तो न होण्याची आपणांकडून पराकाष्ठा केलेली असावी.

( २ ) ऋतुविपर्यास.—जें चित्र ज्या ऋतूंतील घटनेचें प्रतिबिंब असेल, त्या ऋतूची पूर्ण छाया त्या सर्व चित्रावर पूर्णपणें पडलेली असावी. वसंत ऋतूंत घडलेल्या प्रसंगाच्या चित्रांत थंडीनें कुडकुडत असलेले लोक दाखविणें, किंवा पावसाळ्याच्या दिवसांत घडलेल्या गोष्टी दाखवावयाच्या असतां पावसाळी हवेचें थोडें तरी प्रतिबिंब न दाखवणें, हें सर्व सदोषच होय. अशा प्रकारेंच इतर ऋतूंविषयीं समजावें.

( ३ ) कालविपर्यास—दिवसाच्या ज्या भागांत जो प्रसंग घडला असेल त्या प्रसंगाच्या चित्रांत पूर्णपणें त्या दिनविभागाचें स्मरण होईल असा कालाचा ठसा वठविलेला असावा. दुपारच्या भर दोन प्रहराच्या वेळीं घडलेल्या प्रसंगाच्या चित्रात सकाळ संध्याकाळच्या वेळांचें प्रतिबिंब दाखविणें अगदीं गैर होय.

एका मोठ्या चित्रकारानें एका प्रसंगाचें चित्र काढून यांत एक चंद्र दाखवला होता. चित्र उत्तम साधलें होतें, पण त्यांत चूक अशी झाली होती कीं ज्या वेळचें तें चित्र होतें त्या वेळीं तेथें चंद्र येणें अगदींच अशक्य होतें. ह्या एका चुकीमुळें ते चित्र जवळ जवळ निरुपयोगीं ठरलें गेलें!! म्हणून असल्या चुका न होऊं देण्याची खबरदारी घेतलेली असावी.

( ४ ) वस्तुविपर्यास.—विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट वस्तूच उत्पन्न होणें शक्य असतें. त्या न दाखवितां त्यांच्या जागीं भलत्याच दाखवणें हा फारच मोठा दोष समजला जातो. तर तो होऊं देऊं नये.

( ५ ) चालीरीतींचा विपर्यास.—देशकालपरत्वें ज्या चाली व रीती असतात त्यांचा विपर्यास चित्रांत दाखवूं नये.

( ६ ) स्थानविपर्यास.—देश, स्थान किंवा प्रदेश यांचा बोध करून देणें शक्य असल्यास ती संधि वायां घालवूं नये. दिल्लीच्या महाराजांच्या चित्रांत किंवा दिल्लीच्या आसपास घडलेल्या कथेच्या चित्रांत मद्रासेकडील गोपुरें दाखविणें, किंवा कोंकणांत घडलेल्या वृत्तांताच्या चित्रांत शक्य असतांहि नारळीचे वृक्ष न दाखविणें हें कधींहि योग्य होणार नाहीं. म्हणून होतां होईल तों चित्रांत प्रदेशाला प्रतिबिंबित करण्यासाठीं कांहीं तरी प्रयत्न केलेला असावा.

( ७ ) जातिविपर्यास.—चित्रात ज्या जातीचे लोक दाखवावयाचे असतील त्या जातीच्या लोकांची ऊंची, रुंदी, ठेवण, रंग, रूप वगैरे सर्व यथायोग्य दाखविण्यांत यावें. आर्य लोकांचा रंग काळा काढणें, शिद्द्यांचा गोरा काढणें, मंगोलियनांचा दुसराच कसला तरी काढणें, याचप्रमाणें ठेंगू जातीच्या पहाडी लोकांनां ऊंच काढणें व ऊंच धिप्पाड पठाणांनां ठेंगू काढणें हें कांहीं चांगलें नव्हे.

थोड्याशा बेसावधपणानेंहि हे दोष उत्पन्न होतात म्हणून यांच्या संबंधानें फार खबरदारी घ्यावी लागते. केव्हां केव्हां तर मानवी ज्ञानाच्या अल्पत्वामुळें फार दक्षता ठेवून सुद्धां

चुका घडतात. मग काळजी न घेतली तर काय अवस्था होत असेल याचा विचार करावा, व होतां होईल तों दक्षता घ्यावी.

चि त्रां चे व र्ग.–विधिनिषेध, रूप व गुणदोषांचें वर्णन झालें. आतां चित्रांच्या पोटभेदांचें थोडेसें स्वरूप द्यावयाचें तें:— चित्रांचे पुष्कळच वर्ग करतां येण्यासारखे आहेत. पण त्यांत पुढील वर्ग मुख्य आहेतः—( १ ) आध्यात्मिक, ( २ ) पौराणिक व ऐतिहासिक, ( ३ ) सामाजिक, ( ४ ) राजकीय, ( ५ ) काल्पनिक, ( ६ ) विनोदात्मक, ( ७ ) वैयक्तिक, ( ८ ) सृष्टिसौंदर्यविषयक, (९) स्थावर पदार्थासंबंधीं, आणि ( १० ) भावात्मक, असें मुख्यत्वेंकरून दहा वर्ग कल्पिले तर यांतच इतर सर्व प्रकारांचा समावेश करतां येईल. आतां या दहा वर्गांचीं सामान्य स्वरूपें व लक्षणें काय काय आहेत याचा आपण विचार करूं.

( १ ) आध्यात्मिक चित्रें—जीवाला त्याच्या उन्नतीसाठीं आध्यात्मिक भूमिकांवर जो अनुभव येत असतो, किंवा परमात्मा, जीवात्मा, प्रकृति यांच्या परस्परसंबंधांमुळें ज्या ज्या विविध घटना होतात व त्यांपासून ज्या कांहीं विविध शक्ती निर्माण होतात, त्यांचा चित्ररूपानें आविष्कार करून मागल्या लोकांस पुढील मार्गाचें ज्ञान करून देण्यासाठीं अशा प्रकारच्या चित्रांचा अवतार असतो. अशा प्रकारच्या चित्रांत दाखविल्या जाणाऱ्या पदार्थांचे आकार, रंग व ठेवण यांची योजना अलौकिक असावी लागते. केवळ सृष्टींतील माणसासारखा माणूस व झाडासारखें झाड काढून भागत नसतें रंगामध्येंहि असाच अपार्थिवपणा दाखवावा लागतो. चित्रांतील प्रत्येक गोष्टींत सांकेतिकपणा वाढविल्याशिवाय अशा प्रकारचीं चित्रें निघणें शक्य नसतें.

( २ ) पौराणिक व ऐतिहासिक चित्रें.—पुराणें, गाथा, आख्यानें वगैरे वाङ्मयांमध्यें वर्णन केलेल्या प्रसंगांचीं चित्रें या सदरांत येतात. पौराणिक चित्रांपैकीं बरींचशीं चित्रें आध्यात्मिक व सांकेतिक तऱ्हेवर न्यावीं लागतात व ऐतिहासिक चित्रें नैसर्गिक नियमांप्रमाणें व दृश्य सृष्टीप्रमाणें वठवावीं लागतात. हा भेद ह्या चित्रांत मुख्यतः ध्यानांत ठेवला पाहिजे. पौराणिक चित्र ऐतिहासिक तऱ्हेवर नसावें व ऐतिहासिक चित्र पौराणिक तऱ्हेवर नसावें. ज्यांच्या लक्षांत हा भेद रहात नाहीं त्यांच्या चित्रांत भेसळ दिसतें व त्यामुळें चित्रांत उणेपणा राहतो. ऐतिहासिक गोष्टी ह्या माणसांच्या घडलेल्या गोष्टी होत व पौराणिक गोष्टी ह्या विशेष संकेतानें लिहिलेलीं रूपकाख्यानेंच असतात. कानांतून व नाकांतून मुलें उत्पन्न झाल्याचीं वर्णनें पुराणांत असतील, पण तीं तशीं इतिहासांत येणार नाहींत. सांकेतिक चित्रांची पद्धति ऐतिहासिक चित्राला लागू होणार नाहीं. हें कोणीहि विसरतां कामा नये.

(३) सामाजिक चि त्रें–मनुष्यसमाजामध्यें ज्या कांहीं बऱ्या वाईट चाली व पद्धती असतात, त्यांचीं चित्रें ह्या वर्गांत मोडतात. वाईट चालींचा हिडिसपणा अधिक दाखवून त्यांचा निषेध करणें, हें एक चित्रकाराच्या महत्त्वाच्या कामांपैकींच एक आहे. चांगल्या चालीरीती असतील त्यांचा चांगुलपणा विशद करणें व ज्या नसतील त्या आपल्या समाजांत बाहेरून आणण्यासाठीं त्यांचा चांगुलपणा वाढवून दाखवणें हें महत्प्रयासाचें काम अशा प्रकारच्या चित्रांच्या योगानें चित्रकार करतात व अशीं चित्रें हीं निरंतर राष्ट्रीय सन्मानाला योग्य समजलीं जातात.

(४) राजकीय चित्रें—राज्याच्या उलाढाली, युद्धें, राज्यक्रांत्या वगैरे राजकीय जीवनांचीं चित्रें ह्या वर्गांत येत असतात. पूर्वीच्या महत्त्वाच्या राजकीय उलाढालींचे प्रसंग पुढील जनतेपुढें चित्ररूपानें ठेवल्यामुळें पुढील जनतेमध्यें विशिष्ट राजकीय जीवनप्रवाह सतत संचरत राहूं शकतो. या दृष्टीनें हीं चित्रें फारच महत्त्वाचीं असतात. चित्रकारांवर केवढी राष्ट्रीय जबाबदारी असते हेंहि लक्षांत येईल.

( ५ ) काल्पनिक चित्रें.—केवळ काल्पनिक चित्रें हीं फारच बोधप्रद असतात. उंदरांची सभा, वानराची मध्यस्थी वगैरे चित्रांतील कृती खऱ्या घडलेल्या नसतात तरीहि त्या माणसांना उपदेश करण्यास अगदीं योग्य असतात. जसा पंचतंत्राचा वाङ्मयामध्यें त्याचप्रमाणें अशा चित्रांचा राष्ट्रास उपयोग होत असतो. म्हणून अशा चित्रांची हेळसांड होऊं नये.

( ६ ) विनोदात्मक चित्रें.—जें काम मोठमोठ्या व्याख्यानांनीं होत नाहीं तें काम विनोदानें सहज होतें. तोच प्रकार 'पंच आजोबा' (हिंदू पंच) आपल्या विनोदी चित्रांनीं समाजांत व राष्ट्रांत करीत असे. वर्तमानपत्राच्या मजकुरानें भरलेले रकाने वाचणें हें वाङ्मयामध्यें विशेष प्रगति झाल्याशिवाय शक्य नसतें. पण पंच आजोबाचीं विनोदी चित्रें निरक्षर मनुष्यहि समजूं शकतो; म्हणूनच कवींच्या शब्दमय भाषेपेक्षां चित्रकारांची रंगमय भाषा अगदीं सोपी आहे असें म्हणतात. विनोदी चित्रें हीं लहान मोठीं हवीं तशीं काढावयाचीं असतात. क्षणभंगुर विनोदी चित्रें वर्तमानपत्राच्या आयुष्याबरोबरच नाश पावतात, पण अशीं कांहीं स्थिरमहत्त्वाचीं विनोदी चित्रें आहेत कीं जीं नेहमींच बोधप्रद होऊं शकतात.

( ७ ) व्यक्तिविषयक चित्रें.—खास खास व्यक्तींचीं किंवा कुटुंबांचीं, एकमेकांचीं ओळख पटण्यासाठीं जीं चित्रें काढलेलीं असतात, तीं ह्या वर्गांत येत असतात. श्री. महाप्रतापी शिवाजीमहाराज, टिपू सुलतान, नेपोलियन वगैरे व्यक्तींची किंवा आजकालच्या व्यक्तींचीं ओळख पटण्यासाठीं काढलेलीं चित्रें ह्या सदरांतील समजावीं.

(८) भावनात्मक चित्रें:—कामक्रोधादि मनोविकार, शृंगारादि रस, भैरवी, दीपराग वगैरे रागरागिण्या, वसंतादि ऋतू इत्यादि भाव, रस व राग यांचीं जीं चित्रें असतात तीं

ह्या सदरांत येत असतात. हीं चित्रें काढावयास जगाचें सूक्ष्म निदर्शन व मानसिक शक्तीचें आकलन अत्यंत व्हावें लागतें. ह्या प्रकारचें खरोखर उत्तम चित्र काढणें हें साधें काम नाहीं. त्याला तपांचीं तपें सतत व अव्याहत मेहनत करावी लागते, तेव्हां कोठें ह्या प्रकारच्या चित्रांमध्यें अंशतः प्रगति होऊं शकते. चित्रकलेत सर्वांमध्यें अत्यंत कठिण अशी जर कोणती बाजू असेल तर ती हीच आहे.साध्या सृष्टीच्या अनुकरणाच्या पलीकडे जाऊन अदृश्य सृष्टींतील मनोविकाराचें उद्घाटन दृश्यसृष्टींतील पदार्थांमधून प्रेक्षकांच्या मनावर बिंबविणें हे अत्यंत प्रयासाचें व परमदुर्घट असें काम आहे. फार मेहेनत, सूक्ष्म विचार, गूढ तत्वांचें आकलन हे गुण ज्याच्या मध्यें असतील तोच चित्रकार ह्या चित्रात प्रगति संपादन करील.

( ९ ) सृष्टिसौंदर्यविषयक चित्रें.—वनदेवतेचीं अथवा सृष्टिसौंदर्याचीं विविध चित्रें ह्या वर्गात येतात. सृष्टीमधील सात्विक उच्च भाव, सकाळ संध्याकाळचे मनोरम रंगाचे आविर्भाव, वादळी हवेचे परिणाम व इतर प्रकारचीं अद्भुत सृष्टिसौंदर्याचीं दृश्यें हीं सर्व ह्या वर्गात मोडतात.

(१०) स्थावर पदार्थांचीं चित्रें:—नुसते स्थावर पदार्थ एकत्र रचून त्यांचीं उत्तमोत्तम चित्रें बनवणें. ही कला फारच मनोवेधक आहे. व सजावटीसाठीं पुष्कळच प्रकारचीं सुंदर सुंदर चित्रें केवळ स्थावर पदार्थांच्या सजावटीनें केलीं जातात.

या दहा वर्गांशिवाय वेलपत्त्या काढणें, सजावटीचीं चित्रें तयार करणें,नाना प्रकारचीं कुसरीचीं कामे करणें, वगैरे अनेक प्रकार आहेत. त्यांची नुसती गणनाच करणार म्हटले तरी सुद्धां त्यास बरीच जागा आडवावी लागणार, म्हणून येथें त्यांचा उल्लेखहि करीत नाहीं.

उ प सं हा र.—याप्रमाणें चित्रकलेचें सामान्य स्वरूप आहे. कोणतेंहि चित्र पुढें आलें असतां तें कसें पहावें, त्यात काय पहावें, चित्र उत्तम आहे कीं नाहीं हें कसें ठरवावें वगैरे गोष्टी या माहितीवरून सहज समजण्यासारख्या आहेत. चित्रकाराची राष्ट्रीय योग्यता किती आहे व जर खरोखर तो योग्य रीतीनें आपलें कार्य करील, तर राष्ट्रीय सुधारणेला कशी व किती मदत होणें शक्य आहे याचीहि कल्पना या लेखावरून सहज होण्यासारखी आहे. चित्रकारानें केलेली राष्ट्रीय शील बनवण्याची खटपट चिरस्थायी असते व ती सर्व डोळसांनां सहज समजण्यासारखी असते. ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें असतां कवींपेक्षां चित्रकाराची योग्यता किती मोठी आहे हें सहजच कळून येणार आहे. अशी ही चित्रकला असल्यामुळेंच तिला चौसष्ट कलांमध्यें आर्यांनीं उच्च स्थान दिलें आहे हें अगदीं उघड आहे.

[ लेखक—श्री. दा. सातवळेकर ]

## बा ह्या ची चि त्र क ला

चि त्र क ला व पें टिं ग.—चित्र शब्दाचा संस्कृत अर्थ चमत्कारिक आणि नामाचा अर्थ प्रतिकृति, आकृति असा आहे. सृष्टपदार्थांची किंवा प्राणिमात्राची आकृति, प्रतिमा काढणें याला चित्रकला म्हणतात. 'पेंटिंग' या इंग्रजी शब्दाचे अर्थ रंग देणें किंवा रंगाच्या साहाय्यानें आकृति काढणें असे दोन आहेत. पण पेंटिंग म्हणजे आकृति किंवा चित्र काढणें अशा व्यापक अर्थानें ललितकलांच्या यादींत चित्रकलेला 'पेंटिंग' हा शब्द हल्लीं रूढ झाला आहे. या लेखामध्यें या विषयाची ( १ ) चित्रकलेच्या प्रगतीचा इतिहास, ( २ ) बाह्य चित्रकलेचे विविधपंथ ( स्कूल्स ऑफ पेंटिंग ) आणि ( ३ ) चित्रकलेचें साहित्य, अशा तीन सदराखालीं मांडणी केली आहे.

प्र ग ती चा इ ति हा स.—चित्रकलेचे रेखाकला(ड्राइंग)व रंगकला ( पेंटिंग ) हे जे दोन मुख्य भाग त्यांचा मूळ उगम अत्यंत प्राचीन काळांत व मानवप्राणी आद्य अवस्थेंत असतानाच पुढीलप्रमाणें झाला असला पाहिजे. रानटी लोकांत असें आढळून येतें कीं, एक इसम जेव्हां एखाद्या प्राण्याबद्दल किंवा पदार्थाबद्दल दुसऱ्यास माहिती सांगूं इच्छितो त्यावेळीं तो हवेमध्यें हाताच्या बोटानें किंवा जमीनीवर काटकीच्या टोंकानें आकृति काढून दाखवितो अशीच आकृति एखाद्या फलकावर काढणें ही रानटी लोकांतील रेखाकलेची पहिली पायरी होय. तसेंच थंडीनें कुडकुडणारें मानवशरीर, पाण्यानें कुजणारी लांकडी होडी आणि अर्धवट भाजल्यामुळें झिरपणारें मातीचें भांडें यांच्याशीं आद्य मानवाचा संबंध आल्यामुळें वरील विवक्षित दोष दूर करण्याकरितां चरबी,मेण,डांबर, राळ वगैरे तैलगुणयुक्त असे चिकटून बसणारे पदार्थ शोधून त्यांचें लेपन करण्यास रानवटानें प्रवृत्त होणें आणि त्यांत तांबडेपणा वगैरे रंगांतील नयनाकर्षक व चित्ताल्हादक गुण लक्षांत घेऊन लेपन करणें ही रंगकलेंतील पहिली पायरी होय. येणेंप्रमाणें चित्रकलेचीं दोन्हीं अंगें प्रागैतिहासिक काळांत आद्य मानवजातींतच उगम पावलेलीं असलीं पाहिजेत.

आकृति व रंग या दोन्ही बाबतींत सृष्ट पदार्थांची हुबेहुब नक्कल करणें हें चित्रकलेंतल्या प्रगतीचें सारभूत तत्त्व होय. तथापि हें साधें दिसणारें तत्त्व अगदीं आधुनिक काळांत म्हणजे १६ व्या व १५ व्या शतकांत ओळखिलें व अंगिकारिलें गेलें. संगीतकलेप्रमाणेंच चित्रकलेची परिपूर्ण उन्नति होण्यास रसायन व पदार्थविज्ञानशास्त्रांतील आधुनिक शोध कारणी भूत झाले आहेत; कारण रेखाकलेला व रंगकलेला लागणारी अनेक प्रकारची साधनसामुग्री या शास्त्रीय शोधांनीं उपलब्ध करून दिली हीं साधने प्राचीन काळीं अस्तित्वांत असल्या मुळें कोणत्याहि प्राचीन देशांत चित्रकला पूर्ण विकास पावली नव्हती उलटपक्षीं वास्तुशिल्प व मूर्तिशिल्प ह्या कला प्राचीन ग्रीक उर्फ हेलेन लोकांतच उच्च शिखरास पोहोंचल्या होत्या.

प्रगतीचे कालविभागः—चित्रकलेच्या उन्नतींत सामान्यतः तीन पृथक् अवस्था किंवा पायऱ्या दिसतात आद्यावस्थेंत चित्र विषयभूत पदार्थांच्या बाह्य आकृतीचें ( कॉंटूर ) यथातथ्य

सादृश्य रेखाटण्याचाच फक्त प्रयत्न आढळतो. चित्रकलेची ही आद्यावस्था प्राचीन पौरस्त्य व ईजिप्शियन लोकांच्या चित्रांत दृष्टीस पडते. त्यानंतर पदार्थांचें 'अंतर्गत स्वरूप' ( फॉर्म ) म्हणजे लांबीरुंदीप्रमाणें जाडीहि हुबेहुब उठविण्याकडे प्रवृत्ति दिसून येते. या बाबतींत पूर्ण यश येण्यास प्राचीन ग्रीक-रोमन काळापासून ख्रिस्तोत्तर १५ व्या व १६ व्या शतकापर्यंतचा काळ लागला. चित्रकलेच्या उन्नतींतील तिसरी व शेवटची पायरी 'अंतर्दर्शन' ( स्पेस ) म्हणजे सपाट पृष्ठभागावर जवळदूरपणाची बरोबर कल्पना आणून देणें ही असून हें कलेचें अंग साध्य करण्याचे प्रयत्न १७ व्या शतकापासून अलीकडे झाले आहेत. अंतरदर्शनाचे प्रयत्न मध्ययुगीन व प्राचीन ग्रीकरोमनकालीन चित्रकारांनीं केलेले आहेत, नाहींत असें नाहीं; पण यथार्थदर्शनशास्त्राची ( पर्स्पेक्टिव्ह ) वाढ अगदीं आधुनिक कालांत झाली असल्यामुळें या बाबतींत खरी व पूर्ण प्रगतीहि अलीकडेच झाली आहे.

प्रागैतिहासिक काळः—सृष्ट पदार्थांची हुबेहूब प्रतिकृति काढण्याचे बरेचसे यशस्वी प्रयत्न मानवप्रगतीच्या अगदीं आद्य कालांत झालेले आहेत व आजहि आस्ट्रेलियन, एस्किमो, दक्षिण आफ्रिकेंतील बुशमेन वगैरे प्राथमिक अवस्थेंतील लोकांनीं अशीं चित्रें काढलेलीं आढळतात; आणि तीं काढण्याचे हेतु ईश्वरोपासना, जादूटोणा किंवा निव्वळ मनोरंजन वगैरे निरनिराळे सुचविण्यांत येतात. पण ग्रोसनें (कलेचे आरंभ-'बिगिनिंग्ज ऑफ आर्ट') समाजशास्त्रदृष्ट्या केलेली कारणमीमांसा अधिक ग्राह्य दिसते. तो म्हणतो "सूक्ष्मनिरीक्षण व हस्तकौशल्य हे दोन गुण चित्रकलेला लागतात, आणि तेच दोन गुण मृगयोपजीवी आद्य मानवजातीला आवश्यक असतात. त्यामुळें अर्थात् प्राथमिक अवस्थेंतील मानवांच्या जीवनकलहामध्यें जे दोन गुण उत्कर्ष असत त्याच दोन गुणांमुळें त्यांमध्यें चित्रकला उदित झाली असली पाहिजे हें उघड दिसतें." फ्रान्सच्या पश्चिम भागांत हजारों वर्षांपूर्वींच्या आद्य पाषाणयुगांतील गिरिकुहरांत वस्ती करून राहणाऱ्या मानवांनीं मॅमॉथ, हरिण, काळवीट, घोडा वगैरे प्राण्यांचीं चित्रें काढून ठेविलेलीं उपलब्ध झालीं असल्यामुळें वरील कारणमीमांसेला पुष्टि मिळते. तसेंच ज्या काळीं हल्लींचें ग्रेटब्रिटन बेट यूरोपखंडापासून विलग झालें नव्हतें अशा काळांतील म्हणजे सुमारें ५०,००० वर्षांपूर्वींचीं रंगीत चित्रें स्पेनमध्यें सांटाडेरनजीक आल्टामिराच्या गुहेंत सांपडलीं आहेत. यांतील प्राण्यांच्या हुबेहुब आकृती व तीन रंगांतलें उठावदार रंगकाम पाहून आद्य मानवाच्या चित्रकलेंतील प्रगतीबद्दल मोठें कौतुक वाटतें. त्यांतहि हीं चित्रें प्रकाशाचा प्रवेश होत नाहीं अशा गुहेच्या अन्तर्भागांत काढलेलीं पाहून तर मति गुंग होते.

पुढें मृगयाजीवी अवस्थेंतून कृषिजीवी अवस्थेंत मानवाची प्रगति झाल्यावरच्या काळांत मात्र चित्रें काढण्याची प्रवृत्ति कमी झालेली दिसते. आद्य पाषाणयुगांतल्यापेक्षां नवपाषाणयुगांतील मानव जातींनीं हत्यारें, शस्त्रें, मृत्तिकापात्रें वगैरे जीवितोपयोगी जिनसा करण्यांत बरेंच हस्तकौशल्य संपादिलेलें दिसतें. परंतु या काळांतील चित्रकौशल्य मात्र निःसंशय फारच कमी दर्जाचें आहे व त्याचें कारणहि उघड आहे कीं, मृगयव्यवसायींना लागणारी तीक्ष्ण निरीक्षणशक्ति व हस्तकौशल्य शेतकऱ्यांना लागत नाहीं. आणि म्हणून कृषिकर्मोपक्रमाच्या काळांत चित्रकलेची अवनति झालेली दिसते. तथापि चित्रकलेचें पुनरुज्जीवन पुढें लवकरच झालेलें आढळतें; आणि स्मारकें करण्याच्या हेतुनें बांधलेलीं थडगीं, देवळें, राजवाडे यांत चित्रकलेला नवें क्षेत्र निर्माण झालें होतें. या अवस्थेप्रत पोहोंचलेले मानवसमाज ईजिप्त, बाबिलोनिया, हिंदुस्थान, चीन वगैरे प्राचीनतर देशांत आढळतात.

ई जि प्त व बा बि लो नि या— या काळांत चित्रांच्या बाबतींत कांहीं ठराविक नियम तयार झालेले दिसतात. एक सरसहा नियम असा आहे कीं, प्रत्येक चित्राचा चेहरा किंवा मुखवटा एकांगी, एकडोळी( प्रोफाईल)असावयाचा. फार तर दुय्यम चित्राच्या चेहऱ्याचा पुढचा किंवा मागचा तिरपा भाग दाखविलेला असतो. ख्रि. पू. १५०० च्या सुमारचा थीबीस येथील एका थडग्यावरील एका चित्राच्या देखाव्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसते. यांत एक उच्च कुलांतील एक ईजिप्शियन, बायको व मुलगा यांस दलदलीच्या प्रदेशांत पक्ष्यांची पारध करीत असलेला दाखविला आहे. याप्रमाणें मर्यादित स्वरूपांत ईजिप्शियन चित्रकारांनीं सजीव व निर्जीव वस्तूंच्या आकृती हुबेहूब काढण्याचा प्रयत्न केलेला आहे.बाबिलोनिया व असीरिया देशांतील राजवाड्यांच्या विटांच्या भिंतींवरचीं अनेक चित्रें आज कलेच्या व एकंदर राजकीय व सामाजिक आयुष्यक्रमाच्या इतिहासाला फारच उपयोगी आहेत.

ग्रीस आणि इटली.–ईजियन बेटांत मायसेनियन युगांतील राजवाडे व थडगीं यांत सांपडलेल्या मातीच्या भांड्यांवर वनस्पतींचीं व प्राण्यांचीं चित्रें सुंदर काढलेलीं असून त्यांवरून जपानी कलेची आठवण होते. क्रीट बेटांत सांपडलेलीं भिंतीच्या प्लॅस्टरवरील चित्रें फार महत्त्वाचीं आहेत. हीं चित्रेंहि केवळ बाह्याकृतिमय ( आऊट-लाईन-ड्राईंग ) आहेत. पण त्यांत तांबूस किंवा पांढरा रंग देऊन स्त्री किंवा पुरुषांचा शरीरवर्ण दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. या चित्रांतहि यथादर्शनशास्त्राचे नियम मुळींच पाळलेले नाहींत, तरीपण चित्रें उठावदार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रीसच्या ऐतिहासिक काळांतील चित्रकलेला ख्रि. पू. ८ व्या व ७ व्या शतकांत आरंभ होतो, पण तिचा वर सांगितलेल्या प्रागैतिहासिक काळांतील कलेशीं संबंध बिलकूल नाहीं. ग्रीक चित्रकलेच्या आरंभाविषयीं प्लिनीनें जी माहिती दिली आहे, तींत त्यानें प्रगतीच्या अवस्था निर्दिष्ट

केल्या आहेत. त्या अशा (१) केवळ बाह्याकृति, (२) बाह्याकृति व अन्तर्गत रेषा, (३) तांबड्या रंगाचा उपयोग, स्त्री व पुरुष आकृतिभिन्नत्वदर्शन, (४) शरीरावयवदर्शन, (५) यथार्थदर्शनचित्र–घुलकरण. रंगामध्यें प्रगति यूमेरसनें खि. पू. ६०० च्या सुमारास, आणि शरीरावयवदर्शनामध्यें (अॅनॅटोमी) प्रगति सिमाननें आणि 'फोरशार्टनिंग' (यथादर्शन चित्र-लघुकरणा)मध्यें प्रगति पोलीग्नोटसनें केली.

खि. पू. ५ व्या शतकांत एकदम मोठी क्रांतिकारक प्रगति झालेली दिसते. आगॅथेर्कस नांवाच्या चित्रकारानें एका मोठ्या देखाव्याचें चित्र काढून त्याविषयीं एक निबंधहि लिहिला. तो वाचून डेमॉक्रिटस व अनॅक्झागोरस या दोन बड्या तत्त्ववेत्त्यांनीं चित्रकलेच्या विषयांत लक्ष्य घालून त्याचें शास्त्रीय विवेचन केलें. त्यांत असें लिहिलें आहे कीं, "सपाट पृष्ठभागावर चित्रें काढतांना देखाव्यांतील व्यक्तींची बरोबर आकृति वठण्याकरितां कांहीं व्यक्ती पुढें आलेल्या व कांहीं मागें असलेल्या अशा दर्शविल्या गेल्या पाहिजेत." या एका वाक्यांत यथादर्शनशास्त्रांतलें सारभूत तत्त्व सांगितलें आहे; आणि याच दिशेनें तत्त्वज्ञ व चित्रकार यांनीं प्रगति चालू ठेविली असती तर चित्रकलेंत अगदीं अलीकडे १६ व १७ व्या शतकांत झालेली प्रगति २ हजार वर्षांपूर्वी खि. पू. ५ व्या शतकांतच होऊन राहिली असती. पण दुर्दैवानें चित्रकारांनीं यथादर्शनशास्त्रांतील उपर्युक्त नियम लक्षांत न घेतां जुन्या पद्धतीनेंच चित्रकला चालू ठेविली. यापुढील काळांतील ग्रीक चित्रकारांचीं चित्रें सौंदर्य, सुबकपणा, उठावदारपणा वगैरे गुणांत रॅफेल, लिओनार्डो वगैरे आधुनिक चित्रकारांच्या तोडीचीं आहेत. पण त्यांत यथादर्शनशास्त्रदृष्ट्या भयंकर चुका आहेत. याचें एक प्रसिद्ध उदाहरण पॉंपीशहरांतील 'माऊंट इडावरील झूस व हेरा" हें चित्र होय. यांत उभ्या असलेल्या देवीच्या चित्रांतील पाय तिच्या पतीच्या आसनाच्यापेक्षां प्रेक्षकांपासून अधिक जवळ दाखविले आहेत, पण त्याच देवतेच्या शरीराचा वरचा भाग तिच्यापेक्षां मागें म्हणजे प्रेक्षकांपासून अधिक दूर असल्यासारखा काढला आहे. आधुनिक चित्रकलेंतील अगदी नवशिक्या इसमहि असल्या तऱ्हेची चूक करणार नाहीं. तसेंच सर्वसाधारणपणें कोणत्याहि देखाव्यांतील व्यक्ती प्रेक्षकांपासूनच्या दूरजवळ अंतराच्या मानानें लहानमोठ्या न काढतां त्या त्या व्यक्तींच्या श्रेष्ठकनिष्ठ दर्जाच्या मानानें लहानमोठ्या काढलेल्या असतात. चित्रकलेंतील यथार्थदर्शनशास्त्राच्या अज्ञानासंबंधाचा हा मोठा उणेपणा मध्ययुगाच्या अंतापर्यंत तसाच कायम राहिलेला दिसतो, आणि त्यामुळें चित्रांतील व्यक्तिमात्रांच्या आकृती कितीहि सुंदर असल्या तरी चित्रकलेची खरी पूर्ण प्रगति खिस्तोत्तर १६व्या शतकापर्यंत झाली नाहीं.

खिस्तोत्तर मध्ययुगांतापर्यंतचा काळः--या काळांत (१) शववापिका, भुयारें (कॅटॅकोंब), वगैरेंच्या भिंतीवरील चित्रें, (२) पुस्तकांमधील चित्रें, आणि (३) चर्चेच्या भिंतींवरील चित्रें असें तीन ठिकाणीं मुख्यतः चित्रकलेचे अवशिष्ट नमुने पहावयास सांपडतात. त्यांपैकीं चर्चेवरील चित्रांचे नमुने विशेष महत्त्वाचे होत. प्रथम प्रथम भिंतीवर रंगीत चित्रें काढण्याचाच विशेष प्रघात होता. परंतु पुढें गॉथिक नमुन्याचीं चर्चें बांधूं लागल्यापासून भिंतीवर चित्रें काढणें अशक्य झाल्यामुळें खिडक्यांच्या लांकडी तावदानांवर रंगीत चित्रें काढण्याकडे, तसेंच कांचेच्या तावदानांत जडावाचें काम करून चित्रें काढण्याकडे विशेष कल गेला. कांचेच्या साहाय्यानें जडावाचें चित्रकाम करण्याची पद्धति खिस्तोत्तर रोमन बादशहाच्या वेळेपासूनच चालू होती, परंतु कांचेला भारी किंमत पडत असल्यामुळें असलीं चित्रें फारशीं नसत. तावदानावरील चित्रांनां विशेष महत्त्व आहे, कारण आधुनिक चित्रपद्धतीचा उगम त्यांपासून आहे.

**चित्रकलेचे विविध पंथ.**–मागें दिलेल्या माहितींत चित्रकलेच्या वाढीचा विचार केला आहे, परंतु चित्रकारांमधील वैयक्तिक गुणांनां विशेष महत्त्व दिलें नाहीं. आधुनिक काळाचा इतिहास देतांना विशिष्ट चित्रकार व्यक्ती व विवक्षित व्यक्तींमध्यें दिसून येणारे समानगुणधर्म यांचा एकत्र विचार करण्याची पद्धत पडली आहे. या पद्धतीप्रमाणें आधुनिक चित्रकारांचे अनेक संप्रदाय किंवा पंथ पडतात. अशा तऱ्हेचा पंथ प्रथम १३४८ मध्यें प्रांग येथें व पुढें लवकरच दुसरा कोलोन येथें स्थापन झाला. कोलोनच्या पंथांतील विलहेम, हरमन वीनरिच, स्टीफन लॉकनेर हे प्रसिद्ध चित्रकार होत. फ्लॅन्डर्स येथें ह्यूबर्ट व्हॅन ईक व त्याचा भाऊ जान यांचा आणखी एक पंथ निघाला. सृष्टींतील नैसर्गिक देखाव्यांचीं चित्रें काढणें, हा चित्रकलेंतला प्रकार कोलोन व फ्लॅन्डर्स या पंथांनींच प्रथम सुरू केला.

जर्मनींत १५ व्या व १६ व्या शतकांत जे पंथ निघाले त्यांत प्रथम अशी एक विशेष प्रवृत्ति होती कीं, कलेच्या दृष्टीनें चित्रांतल्या सौंदर्यादि चित्ताकर्षक गोष्टींनां महत्त्व न देतां वस्तुमात्रांचें ओबडधोबड जसें असेल तसें हुबेहुब चित्र रेखाटणें यासच ते चित्रकलेंतला उत्तमपणा मानीत असत. सौंदर्यगुणाबद्दलच्या अनास्थेचा हा दोष पुढें मार्टिन शोनगौर, ऑल्ब्रेट ड्यूरर, मॅथेस ग्रुनवॉल्ड वगैरे जर्मन चित्रकारांनीं दूर केला.

बाराव्या शतकांत फ्रान्समध्यें गॉथिक पद्धति सुरू होती, व तिचा सर्वांत मोठा गुण म्हणजे कांचेच्या तावदानावरील चित्रांचा चकाकीत व भपकेदार रंग हा होय. गॉथिक पद्धतीचाच परिणाम होऊन १३ व्या शतकांतील इटालींतील निरनिराळे चित्रकलापंथ उदयास आले. त्यांतले निकोला, कॅव्हॅलिनी, डुक्सिओ, गिओटो वगैरे चित्रकार प्रमुख होत. यांपैकीं गिओटो हा सर्वांत महत्त्वाचा चित्रकार होय. त्याच्यापासून चित्रकलेच्या आधुनिक युगाला आरंभ होतो. गिओटो



ईजेप्शियन पारध ( ख्रि. पू. १५०० ) [ पृ. १०३ ].



'माऊंट हाडावरील झूस व हेरा' ( ग्रीक चित्रकला. पृ. १०४ )



'एडनमधून हद्दपारी'
फ्लारेन्स चित्रकला [ पृ. १०५ ]

यानें आपल्या चित्रांत उपरिनिर्दिष्ट पंथांतील अनेक परस्पर विरोधी भासणारे गुण एकत्र आणले. त्याच्या चित्रांपैकीं उत्तम नमुना म्हणजे "हेरॉडच्या जन्मदिनाचा उत्सव" हें चित्र होय. याची ब्रन्सविक येथील कॅथिड्रलच्या भिंतीवरील याच प्रसंगाच्या पूर्वीच्या चित्रांशीं तुलना केल्यास दोहोंत महदंतर दिसतें. जुन्या चित्रांत सर्व देखावा एकाच पातळींत काढला आहे, तर गिओटोनें अंतर्दर्शनाचा प्रयत्न केला आहे. तसेंच गिओटोनें देखाव्यांत पात्रांची संख्या पूर्वीपेक्षां शक्य तितकी कमी करून चित्राला पुष्कळ उठावदारपणा आणला आहे.

इटलींतील फ्लॉरेन्टाइन (फ्लॉरेन्स) चित्रकलापंथाचा गिओटो हाच प्रमुख होय. याच पंथानें चित्रकलेंतील आधुनिक युगाला सुरवात केली. फ्लॉरेन्समधील रहिवाशी मॅसाकिओ हा आधुनिक चित्रकलेचा जनक होय. गिओटोमधील सर्व गुण याच्यामध्यें होते, इतकेंच नव्हे तर यानें चित्रकलेला परिपूर्णता आणून देणारा जो अंतर्दर्शनाचा गुण ( ट्रुथ ऑफ स्पेस) तो साध्य केला. याचें सर्वांत उत्तम चित्र आदाम आणि ईव्ह या आद्यदंपतांची 'एडन मधून हद्दपारी' हें होय. चित्रकलेच्या क्षेत्रांत याहून अधिक हुबेहुब परिणामकारक व हृदयस्पर्शी चित्र क्वचित आढळेल. यांत आदामनें स्वहस्तांनीं आपला चेहरा झांकून घेतला असून ईव्ह दुःखानें रडत आहे, आणि दोघांना आज्ञा करणारा देवदूत मागल्या बाजूला लहान आकारांत दाखविला आहे. फ्लॉरेन्सपंथानें चित्रकलेंत अनेक बाबतींत सुधारणा केली. ह्या सर्व सुधारणा 'ह्युमॅनिझम'च्या तत्त्वानुसार चालल्या होत्या. ह्युमॅनिझम म्हणजे मानवाचें जीवित व चालीरीती यांच्यामधील सौंदर्य, मृदुपणा वगैरे गुणांनां प्राधान्य देण्याचें तत्त्व. या तत्त्वानुसार चित्रकलेंत पुढील सुधारणांचा अन्तर्भाव करण्यांत आला:-(१) यथार्थदर्शनशास्त्राचा अभ्यास (२) शारीरविज्ञानाचें म्हणजे विवस्त्र स्थितींतील शरीरावयवांचे चल व निश्चल स्वरूपांत निदर्शन, (३) सजीव व निर्जीव विषयांचे निरनिराळे प्रसंग व अवस्थानुसार चित्रलेखन आणि (४) तैलचित्रपद्धतीचा अभ्यास. तसेंच या सुमारास तीस पिढ्या चालू असलेली ख्रिस्ती संप्रदायविषयक देखावे रंगविण्याची रूढी मागें पडून प्राचीन ग्रीकोरोमन वाङ्मयांतील पौराणिक कथाप्रसंगांवर चित्रें काढण्याकडे प्रवृत्ति वळली. यथादर्शनशास्त्रांत विशेष प्रगति ब्रुनेलेस्को, मॅसाकिओ, उक्लेल्लो यांनीं घडवून आणली, आणि शारीरविज्ञानाचा अभ्यास पोल्लओलो यानें विशेष केला. त्याचें 'सेंट सेबास्टियनचा स्वधर्मार्थ प्राणत्याग' हें चित्र शरीरावयवांच्या यथातथ्य प्रदर्शनाच्या बाबतींत उत्तम नमुना आहे. यथादर्शनशास्त्रावर शास्त्रीय विवेचनात्मक निबंध आल्बेर्टी व पायेरो यांनीं लिहिले व त्यांत रेषाविषयक ( लिनियर ) यथादर्शनशास्त्र आणि अंतरिक्षीय ( एरिअल ) छायाप्रकाशशास्त्र ( सायन्स ऑफ शॅडोज ) या विषयांचें विवेचन केलें.

व्हेनिसचा चित्रकलापंथ हा इटलींतील दुसरा महत्त्वाचा पंथ होय. बराच काळ तेथील चित्रकलेवर पौरस्त्य देश व जर्मनी यांतील पद्धतींचा परिणाम झालेला होता. बायझंटाईनमधील चित्रकार येऊन व्हेनिसमधील चर्चेच्या भिंतींवर वगैरे ठिकाणीं चित्रें काढीत असत. त्यांत सोन्यारत्नांच्या अलंकारांनीं शृंगारलेलीं श्रीमंती थाटाचीं चित्रें काढण्याची प्रवृत्ति असे. पण पुढें १५ व्या शतकांत फ्लॉरेन्स येथील सुधारलेल्या चित्रकलेचा परिणाम होऊन व्हेनिस येथें स्थानिक चित्रकार उदयास आले. त्यांत बेल्लिनी, गायोर्गायोन, टिटायन वगैरे प्रसिद्ध आहेत. तैलचित्रपद्धतींत खरी प्रगति व्हेनिसचा चित्रकार बेल्लिनी यानेंच केली. व्हेनिसच्या चित्रकारांतहि टिटायन हा सर्वश्रेष्ठ असून त्याचें व्हेनिस अकेडमींतें 'प्रेझेंटेशन' हें चित्र उत्कृष्टांमध्यें गणलें जातें.

आधुनिक काळ, ( इंप्रेशनिझम ).—आतांपर्यंत यथार्थदर्शनशास्त्रांतहि प्रगति झालेली असल्यामुळें १७ व्या शतकाच्या प्रारंभालाच चित्रकलेच्या प्रगतींतील सर्व अंगें उदित झालीं होतीं. त्यापुढें प्रत्येक अंग परिपूर्णतेप्रत पोहोंचविण्याचें कार्य सुरू झालें. या शतकांत चित्रकलेच्या ध्येयाच्या बाबतींत महत्त्वाचा फरक झाला. यापूर्वीच्या दोनतीन शतकांत वस्तुमात्राच्या सत्यस्वरूपनिदर्शनाकडे ( रिएलिझम ) चित्रकारांचा भर असे व त्यामुळें वस्तुतःच सुंदर असलेले मानवी किंवा नैसर्गिक देखावेच मात्र चित्रित केले जात असत. परंतु १७ व्या शतकांत चित्रकारांनां निसर्गाकडे पाहण्याची नवीन अद्भुत दृष्टि प्राप्त झाली. यासंबंधानें जॉन कॉन्स्टेबल म्हणतो, "सृष्टीमध्यें कुरूप असें कांहींच नाहीं, कारण वस्तुमात्राचा प्रत्यक्ष आकार व स्वरूप कसेंहि असलें तरी त्याकडे विशिष्ट दृष्टिकोनानें पाहिलें आणि त्यावर प्रकाश व रंग यांचा होणारा परिणाम लक्षांत घेतला म्हणजे सृष्टींतील प्रत्येक वस्तु सुंदर व प्रेक्षणीय बनते." या विचारामुळें चित्रकलेचें पूर्वीचें श्रीमंती स्वरूप ( अरिस्टोक्रॅटिक ) नाहींसें होऊन सार्वजनिक ( डेमॉक्रॅटिक ) स्वरूप प्राप्त झालें. या नूतन तत्त्वाला मूर्त स्वरूप देणारा पहिला चित्रकार रेंब्रांट हा होय; व या चित्रपद्धतीला 'इंप्रेशनिझम' असें म्हणतात. हा शब्द बऱ्याच उशीरा १८७१ मध्यें पॅरिस येथील प्रदर्शनाच्या वेळीं प्रचारांत आला आणि चित्रपद्धतीची विशेष वाढ १९ व्या शतकांतच विशेष झाली.

चित्रांचे प्रकार.—फ्रान्स व इटलीमधील चित्रकला पंथांचा परिणाम होऊन हालंडमध्यें चित्रकलेला जोराची चालना मिळाली. थोडयाशा चित्रकारांनीं तेथील प्रत्येक बाबतींत इतकी आघाडी मारली आहे कीं, चित्रांचे अनेकविध व उत्तमोत्तम प्रकार हालंडांत एकत्र पहावयास मिळत असून त्यांचें वर्गीकरण करणें आवश्यक तसेंच सोयीचेंहि आहे. १७ व्या शतकापर्यंत चित्रांचा सर्वसाधारणपणें विषय कोणी

तरी व्यक्ति असून त्यांत सामान्यतः धर्मसंप्रदायविषयक प्रसंग असे. ईजिप्शियन चित्रांत स्त्री–पुरुष व्यक्ति, मृतांची थडगीं किंवा कांहींतरी धार्मिक किंवा अर्धधार्मिक विषय बहुधा असतो. ख्रिस्ती धर्मस्थापनेनंतर १६ व्या शतकापर्यंत ख्रिस्ती चित्रकार साप्रदायिक विषयच चित्रांकरितां घेत असत. अशा चित्रांतील व्यक्ति व तिच्या हातून घडत असलेलें धार्मिक स्वरूपाचें कृत्य या गोष्टींनाच चित्रांत मुख्य महत्त्व असे. चित्रांच्या प्रकारांत जी विविधता उत्पन्न झाली ती बहुतेक आधुनिक कालांतील असून सांप्रत एकंदर प्रकार आहेत तेः—(१) सांप्रदायिक प्रसंग, (२) केवळ व्यक्ति, (३) सामाजिक प्रसंग, (४) निसर्गांतील भूमिविषयक देखावे, (५) समुद्रविषयक देखावे, (६) मानवेतर प्राणी, (७) मृगया व (८) निश्चल चित्रें ( स्टिल्–लाईफ ).

व्यक्तिमात्रांचीं हुबेहूब चित्रें काढण्याच्या बाबतींत ईजिप्शियन लोकांनीं बरीच प्रगति केली होती. निरनिराळ्या जातींच्या प्राण्यांचीं व माणसांचीं चित्रें स्पष्ट ओळखतां येतील इतकेंच नव्हे तर सुप्रसिद्ध पुरुषांचीं व विशेषतः राजांचीं चित्रें बरींचशीं यथातथ्य काढलेलीं आहेत. असीरियन लोकांत हें कौशल्य कमी होतें. ग्रीक लोकांतहि प्रथम या चित्रप्रकाराला महत्त्व नव्हतें पण अलेक्झांडर दि ग्रेटच्या काळापासून व्यक्ती चित्रित करण्याकडे प्रवृत्ति वळून अनेक स्त्री–पुरुषांचीं चित्रें काढण्यांत आलीं त्यांत टॉलेमी घराण्यांतील क्लिओपाट्रादि अनेक व्यक्तींचींहि चित्रें आहेत. ख्रिस्तोत्तर काळांत मध्ययुगापर्यंत ही प्रवृत्ति सतत चालू होती व अनेक राजकर्त्यांचीं चित्रें उपलब्ध आहेत बहुधा हीं चित्रें ग्रंथातून आरंभीं काढलेलीं असून त्यांत ग्रंथ ज्याला अर्पण केला त्या व्यक्तीचें चित्र असतें. ६ व्या शतकांतील ३ रा व्हॅलेंटिनिअन याची नात ज्युलिया, ९ व्या शतकांतील लॉथेर बादशाहा, १० व्या शतकांतील बायझंटाईन बादशाहा वगैरेंचीं अशा प्रकारचीं चित्रें आहेत. १४ व्या व १५ व्या शतकांत विशिष्ट चित्रकलापंथ अस्तित्वांत आल्यावर या प्रकाराला अधिक महत्त्व प्राप्त झालें. द्रव्यदाता म्हणून, ऐतिहासिक देखाव्यांतील विषयीभूत व्यक्ती म्हणून, वगैरे संबंधानें काढलेलीं अनेक तत्कालीन व्यक्तींचीं चित्रें उपलब्ध आहेत. रेंब्रँट, व्हेलेझकेझ, रुबेन्स, व्हॉनडीक हे १७ व्या शतकांतील या प्रकारचे प्रसिद्ध चित्रकार होत. इसवीसनाच्या १९ व्या शतकांत सार्वजनिक चित्रसंग्रहालयें व प्रदर्शनें उघडण्याची प्रवृत्ति सुरू झाल्यापासून तर इतर चित्रकलेंतील प्रकाराप्रमाणें या प्रकारालाहि खप उत्तेजन मिळालें आहे, इतकेंच नव्हे तर समाजांतील सर्व वर्गांकडून या चित्रप्रकाराला मागणी वाढत्या प्रमाणांत येऊं लागली आहे.'जेनर वास' (लो टाइप) म्हणजे सर्वसामान्य सामाजिक प्रसंगाचीं चित्रें काढणें हा प्रकार पूर्वकाळीं क्वचित् आढळतो. कारण धार्मिक किंवा ऐतिहासिक महत्त्वाशिवाय इतर सामान्य लोकांच्या आयुष्यक्रमांतील प्रसंगाचीं चित्रें काढणें कमीपणाचें समजत असत. हा चित्रप्रकार १७ व्या शतकांत नेदरलंडमधील चित्रकलापंथांनीं रूढ केला. ईजिप्तमध्यें धार्मिक प्रसंगांवर चित्रें विशेषतः काढीत. ग्रीकरोमन सत्तेच्या उत्तरकालांत या प्रकाराकडे थोडी प्रवृत्ति वळली. पण ख्रिस्तीधर्मसंस्थापनेपासून पुन्हां धार्मिक विषयांनांच महत्त्व मिळालें. आधुनिक काळांत मात्र याचा जोरानें पुरस्कार झाला आहे. टेरबॉर्चे, मेटसु, ब्रौवेर, टेनीर्स, डी हूच्, हुगार्थ, चार्डिन वगैरे चित्रकार या प्रकारांत प्रसिद्ध आहेत.

जमिनीवरील व समुद्रावरील निसर्गाचे देखावेः—हा चित्रप्रकार आधुनिक प्रकारांपैकीं एक अत्यंत महत्त्वाचा होय. असले देखावे रंगविलेले पॉपी व रोम येथील प्राचीन इमारतींच्या भिंतींवर रंगविलेले आढळतात. पण ते चित्रांतील मुख्य व्यक्तींच्या पार्श्वभागीं असत, व असले पार्श्वभाग उत्तम रंगविल्याबद्दल प्लिनीनें तत्कालीन चित्रकारांची स्तुति केलेली आढळते. कारण त्यांत खेडीं, बंदरें, बागा, जंगल, टेंकड्या, डबकीं, ओढे वगैरे निसर्गांतले अनेक देखावे असत. पुढें मध्ययुगापर्यंतच्या काळांतील चित्रांत पार्श्वभागीं सुद्धां असले देखावे क्वचित् काढीत असत. १५ व्या शतकांत पुन्हां फ्लेमिश व इटालियन चित्रकारांनीं चित्रांतील मुख्य व्यक्तींच्या पार्श्वभागीं निसर्गांतील देखावे रंगविण्याची पद्धति सुरू केली पण निव्वळ निसर्गाच्या देखाव्यांचीं चित्रें काढण्याचा पहिला मान रेमब्रँट, कोनिंग, जेकब रुइसडेल या चित्रकारांनीं मिळविला आहे. या प्रकारचीं चित्रें काढणारा उत्कृष्ट चित्रकार जे.एम्. डब्ल्यु टर्नर होय. त्याचें नॅशनल गॅलरी लंडनमधील 'क्रॉसिंग दि ब्रूक'(ओढा उतरून जाणें) या देखाव्याचें चित्र सर्व जगातील चित्रांत पहिल्या प्रतीचें ठरेल. टर्नरनें समुद्रावरील सर्व प्रकारच्या देखाव्यांचीं चित्रें काढलीं आहेत. समुद्राचे देखावे रंगविण्याचा आरंभ ग्रीक चित्रकारांनींच केलेला दिसतो. पण पुढें हा प्रकार अगदीं मागें पडला. त्याला पुन्हां हॉलंडांतील चित्रकारांनीं चलन दिलें, इतकेंच नव्हे तर सायमन डी व्हलीगर आणि व्हाडेव्हेल्ड यांनीं त्यांत सर्वोत्कृष्टता मिळविली.

मानवेतर प्राण्यांचीं चित्रें अगदीं प्रागैतिहासिक काळांतील चित्रकारांनींहि काढलेलीं आहेत, आणि हा प्रकार सर्व कालविभागांत रूढ असलेला आढळतो. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं आद्यकालीन चित्रकारानीं मानवप्राण्यांपेक्षां मानवेतरप्राण्यांचीं चित्रेंच अधिक हुबेहुब काढलेलीं आहेत. ग्रीक चित्रकारांनीं नाण्यांवर काढलेलीं प्राण्यांचीं चित्रें इतकीं विविध व उत्कृष्ट आहेत कीं त्यांची आधुनिक चित्रकारांनीं केलेली स्तुति मुळींच अतिशयोक्तीची नाहीं. पुढील काळांत इटालियन, फ्लेमिश, व जर्मन चित्रकार चित्रांमध्यें दुय्यमस्थानीं एखाद्या प्राण्याचें चित्र बहुधा काढीत असत. पण चित्रांत प्राण्यांनां प्रामुख्य देणारा पहिला चित्रकार रुबेन्स हा होय, आणि फ्रान्स स्नाइडर्स व जॅन फायट हे या प्रकारांतले पहिल्या प्रतीचे चित्रकार होत. डच चित्रकारांनीं

घोडे, गुरें, कोंबडे, बदकें वगैरे प्राण्यांचीं उत्तम चित्रें काढलीं असून रेमब्रँटचीं सिद्धाचीं चित्रें विशेष नांवाजण्यासारखीं आहेत. स्टिल-लाईफ पेंटिंग हा प्रकार इतर आधुनिक प्रकारांप्रमाणेंच ग्रीक काळांत अल्प प्रमाणांत आढळतो; नंतर तो मध्ययुगांतापर्यंत मुळींच अस्तित्वांत नसून आधुनिक काळांत प्रामुख्य पावला आहे. याला स्वतंत्र स्थान डच चित्रकारांनींच प्रथम दिलें. पण खुर्च्या, टेबलें, फळें व खाद्यपदार्थ, सोनें, रुपें, कांचेचीं वगैरे भांडीं, कोणतीहि शास्त्रकलाविषयक उपकरणें वगैरेंचीं हुबेहुब चित्रें काढण्यांत विशेषतः फ्रेंच चित्रकार चार्डिन व व्होलोन ह्यांनीं डच, जर्मन, ब्रिटिश वगैरे चित्रकारांपेक्षां वरचा नंबर मिळविला आहे.

अलीकडील पाश्चात्य चित्रकला पंथ—अलीकडच्या म्हणजे इ. स. १८७०पासूनच्या काळांत यूरोपांतील प्रत्येक देशांत चित्रकलेंत प्रगति झाली असल्यामुळे प्रत्येक देशांत सर्व प्रकारचीं चित्रें काढण्याकडे प्रवृत्ति असल्यामुळें चित्रकला पंथांचें जुनें चित्रकलांगवैशिष्ट्याचें स्वरूप जाऊन त्यांना राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें आहे. म्हणून प्रत्येक पाश्चात्य देशांत चित्रकलेंत प्रावीण्य मिळवण्याकरितां चाललेल्या प्रयत्नांची व सुप्रसिद्ध चित्रकारांची येथें थोडक्यांत माहिती देण्यांत येत आहे.

इंग्लंडांत रॉयल अकॅडमी ही चित्रकलेला उत्तेजन देणारी प्रमुख संस्था आहे. १८७० पर्यंत चित्रकारांनां लोकांकडून मिळणारा आश्रय वाढत्या प्रमाणांत होता. पण पुढें एकदम या आश्रयाला ओहोटी लागली आणि चित्रकारांमध्येंहि चित्रपद्धतींच्या बाबतींत जोराचे वाद माजले. बरेचसे होतकरू चित्रकार पॅरिसमध्यें जाऊन फ्रेंच चित्रपद्धतीचा अभ्यास करूं लागले आणि इंग्लंडमध्यें फ्रेंच पद्धतीला वर्चस्व मिळण्याची भीति वाटूं लागली. पण लवकरच इंग्रज चित्रकारांचा स्वाभिमान जागृत झाला आणि चित्रकलेचा बारकाईनें अभ्यास सुरू करून ब्रिटिश पद्धतीचें वैशिष्ट्य कायम राखलें. या कलेला उत्तेजन देणाऱ्या न्यू इंग्लिश आर्ट क्लब, दि इंटरनॅशनल सोसायटी वगैरे संस्था आहेत; आणि सॉलोमन, बौटन, कॉलीयर, स्टोन, लेस्ली, लेर्डा बटलर, इंट. शॉ, डेव्हिस, ग्रॅहम, सर आल्फ्रेड ईस्ट, लीडर, बाइली, रिव्हियर, मिस ल्युसी कॅंपबेल्प वगैरे प्रसिद्ध चित्रकार आहेत.

फ्रान्समध्यें १८७० पासून झोला, अलेक्झांडर डयूमास वगैरेंच्या कादंबऱ्यानाटकांनीं चित्रकारांनां जगांतील सुंदर देखाव्यांकडे बारकाईनें पाहण्याची स्फूर्ति व उत्तेजन दिलें. बेंजामिन कॉन्स्टन्ट, हेन्नर, मिलेट मॅनेट, रेने मेनार्डे, चाव्हानेस, जे. सी. केझिन, डिनेट, पेरेट, कौबेट वगैरे अलीकडील चित्रकार विशेष प्रसिद्ध आहेत.

बेल्जममध्यें अँटवर्प अकॅडमी, ब्रुसेल्समधील फ्री सोसायटी ऑफ फाईन आर्टस वगैरे संस्था या उत्तेजन देणाऱ्या असून लेईस, प्रौक्स, स्टेव्हेन्स, बौलेंगर वगैरे चित्रकार प्रसिद्ध आहेत. हॉलंडमध्यें जोसेफ इस्त्ररेल्स, जेकुब मॅरिस, टरोप वगैरे; जर्मनींत लीब्ला, डीझ, केलर, झुगेल, ब्लॉक्लिन, मॅक्स क्लिंगर वगैरे; इटालींत सेगँटिनी, मोरेली, मॉंटिसेली, वगैरे; स्पेनमध्यें फॉर्टुनी, प्रॅडिला, झुलोगा वगैरे चित्रकार प्रसिद्ध आहेत. युनायटेड स्टेट्समध्यें चित्रकलेला १८००नंतर आरंभ झाला असून तिच्यांत स्थानिक वैशिष्ट्य असें कांहीं नाहीं.

बा ह्य चि त्र क ले चें सा हि त्य शा स्त्र.

चित्रकलेचा आरंभ एखाद्या वस्तूचा बाह्यरेषाकृति काढणें किंवा एकाद्या पृष्ठभागावर एकाद्या रंगाचा लेप देणें यापासून होतो. चित्रें काढण्याचीं साधनें अतिशय प्राचीन काळापासून ज्ञात आहेत. कोळसा, रंगीत माती, नरम दगड इत्यादि वस्तू मनुष्याला प्राचीन काळापासून सहजगत्या मिळण्यासारख्या आहेत. १५६५ मध्यें शिसपेन्सील नवीनच प्रचारांत आली होती. यूरोपीय मध्ययुगांत चर्मपत्रावर रेघा काढण्याकरतां एकाद्या धातूचा किंवा शिसें अगर कथील याचा अणकुचीदार तुकडा वापरीत असत. जेव्हां एखाद्या रंगानें चित्र काढावयाचें असेल तेव्हां वेताचें टोंक ठेंचून तयार केलेली कुंचली किंवा एकाद्या पक्ष्याचें पिस वापरीत.

वनस्पतीपासून किंवा एखाद्या प्राण्यापासून मिळणारे पातळ रंग मनुष्यास फार प्राचीन काळापासून ज्ञात होते. एखाद्या शत्रूच्या किंवा मारलेल्या प्राण्याच्या रक्तानें योद्धे आपलीं अंगें रंगवीत असत. याचेंच अनुकरण, रंगीत मातीचा रंग तयार करून अंग रंगविण्यांत होऊं लागला. ईजिप्तमध्यें पाण्यांत बुडविले असतांना सहज पसरतील अशा तंतूंच्या कुंचल्या चित्रें काढण्यांत वापरीत असत. अजून सुद्धां नाटकगृहांतून कांहीं रंग लावण्याकरतां ससाण्या पायांचा उपयोग करतात. अर्थात् अशा प्राण्याच्या केसापासून कुंचली तयार करण्याची कल्पना निघण्यास फारसे श्रम पडले नसतील. तसेंच हे रंग चिकटण्याकरितां गोंद वगैरे निसर्गदत्त पदार्थ उपयोगांत आणण्याची कल्पनाहि सुचणें फारसें कठिण नाहीं. कांहीं पदार्थ उष्णतेनें पातळ होतात व थंडीनें घट्ट होता। या ज्ञानाचाहि उपयोग मनुष्यानें चित्रकलेंत फार प्राचीन काळापासून केला असून त्यामुळें चित्रकलेंतील निरनिराळे प्रकार उदयास आले.

चित्रकामांतील बऱ्याचशा गोष्टी ज्यावर चित्र काढावयाचें त्या पृष्ठभागाच्या स्वरूपावर अवलंबून असतात. हे पृष्ठभाग मनुष्याचें शरीर, हत्यारें, भांडीं, उपकरणें, पोषाख, घरांतील सामान, पुस्तकें, होड्या व गलबतें, भिंती व घराचे इतर भाग अशा निरनिराळ्या प्रकारचे असूं शकतात. अर्थात् या निरनिराळ्या वस्तूंवर काढावयाचीं चित्रें एकाच प्रकारचीं असूं शकणार नाहींत. ज्यावर हवा व पाणी यांचा परिणाम होणार नाहीं असा रंग शरीरावर देणें बरेंच कठिण आहे. भांड्यांवर व होड्यांवर द्यावयाच्या रंगाच्या अंगीं त्यास जलाभेद्य करण्याचा गुण पाहिजे. इमारतींनां द्यावयाच्या रंगावर हवामानाचा परिणाम होतां कामा नये. चित्रफलकावर मुद्दाम रंगविलेलें चित्र बरेंच टिकाऊ पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार रंग, आकृति व सौंदर्य या गोष्टींच्या अगोदर

करावा लागतो आणि त्यामुळें रंगबंधक अथवा माध्यम यास महत्व येतें. भिंतींनां गिलावा देण्याची चाल प्राचीन काळापासून चालत आली आहे व त्या गिलाव्याचें एकरंगी स्वरूप बदलून त्याच्यामध्यें कांहीं तरी वैचित्र्य व विशिष्ट रचना दिसून यावी म्हणून त्यावर निरनिराळ्या रंगांच्या आकृती अथवा चित्रें काढण्याचा प्रचार बराच प्राचीन आहे. व यामुळेंच भित्तिचित्र हा एक चित्रकामांतील प्रकार अस्तित्वांत आला आहे. चुन्याचा गिलावा ओला असतानांच त्यावर चित्रें काढलीं असतां त्या चित्रांचा रंग कोणतेंहि बंधक न वापरतां बराच काळ टिकतो. इतर प्रकारच्या गिलाव्यावरील चित्रांत कोणतें तरी रंगबंधक वापरावें लागतें. यामुळें ओल्या चुन्याच्या गिलाव्यांतील व इतर गिलाव्यावरील चित्रांमध्यें मोठा फरक पडला आहे. ओल्या गिलाव्यांतील चित्रांनां त्यांतील रंग नेहमीं ताजे दिसतात म्हणून 'फ्रेस्को' असें नांव देतात. इतर सर्व चित्रांनां त्यांच्या रंगांत बंधकाचें मिश्रण करावें लागतें म्हणून 'टेंपेरा' असें म्हणतात. या दुसऱ्या प्रकारांत जीं अनेक प्रकारचीं बंधकें अथवा माध्यम वापरलीं जातात त्यांवरून त्यांचें वर्गीकरण करण्यांत येतें

बंधकें:—बंधकांमध्यें द्राव्य आणि अद्राव्य असे दोन मुख्य भेद करण्यांत येतात. अद्राव्य विभागांत पुन्हां खनिज व वानस्पत्य किंवा उद्भिज्ज असे दोन वर्ग करतात. भांड्यांवर व चमकदार कौलांवर जे कायमचे रंग देण्यांत येतात व कांच मिन्याच्या प्रकारांत जे रंग वापरण्यांत येतात ते सर्व खनिज असून कांचमय असतात. अद्राव्य उद्भिज्ज बंधकें म्हटलीं म्हणजे बाष्पभावी किंवा सुकणारीं तेलें, राळ, लाख वगैरे होत. द्राव्य बंधकाचे प्राणिज आणि उद्भिज्ज असे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत अंडें, त्यांतील पिंवळा अथवा पांढरा बलक, माशापासून मिळणारा सरस हीं मुख्य होत. दुसऱ्या प्रकारांत अनेक प्रकारचे गोंद मोडतात. यांपैकीं कांहीं द्राव्य व अद्राव्य बंधकें एकत्र करून त्यास जलद्राव्य स्वरूप देतां येतें. अशा पदार्थास 'इमल्शन' असें म्हणतात. अशा प्रकारें मेण, तेल, गोंद वगैरे पदार्थांपासून 'इमल्शन' तयार करतां येतें. त्याप्रमाणेंच कोळसा, खडू, पेन्सिल वगैरे पदार्थ कोणतेंहि बंधक उपयोगांत न आणतां नुसतेच एकाद्या पृष्ठभागावर घासले असतां चिकटून बसतात. रंगीत खडूमध्यें थोडासा गोंद अथवा चिकी घातली असतां त्याच्या अंगीं चिकटण्याचा गुण येतो, या गोष्टीचा फायदा घेऊन अशा प्रकारच्या खडूच्या कांड्या तयार करितात. या कांड्यांनीं काढलेलीं चित्रेंहि चांगलीं दिसतात.

चित्रपद्धती:—आतां चित्रें काढण्याच्या निरनिराळ्या पद्धती कोणकोणत्या काळीं प्रचलित होत्या त्या पाहूं.

टेंपेरा पद्धति:—ही जवळजवळ चित्रकलेच्या आरंभापासून प्रचारांत आहे. हिच्या बरोबरीची दुसरी पद्धति म्हटली म्हणजे कांचरसासारख्या चमकदार पदार्थांनीं रंगविलेलीं चित्रें होत. मेसापोटेमिया, ईजिप्त वगैरे देशांतील राजवाड्यांचीं बाह्य अंगें चमकदार कवलांनींच सुशोभित केलेलीं आहेत. परंतु मेसापोटेमिया, इजिप्त व मायसीनिआमधील भिंतीवरील चित्रें ममींच्या पेटीवरील व पापीरसच्या गुंडाळ्यावरील ईजिप्तमधील चित्रें टेंपेरा पद्धतीनें रंगाविलेलीं आढळतात. इटलीमधील थडग्यावरील चित्रेंहि याच पद्धतीचीं दिसतात. इटलीमध्यें ख्रि. पू. ६ व्या शतकांतील या पद्धतीचीं चित्रें उपलब्ध झालीं आहेत. तसेंच ईजिप्तमधील प्रेतांच्या पेट्यांवरील व मायसीनिअन काळांतीलहि या जातीचीं चित्रें उपलब्ध झालीं आहेत.

फ्रेस्कोपद्धती:—ही पूर्वेकडील देशांत व पूर्व रोमन साम्राज्यांत फार प्राचीनकालापासून प्रचलित होती. ही पद्धति व्हिट्रूव्हिअस आणि प्लिनी यांनां माहीत होती असें त्यांच्या ग्रंथांतील उताऱ्यावरून दिसतें. परंतु पाश्चात्य देशांत ही जरी मधून मधून दृष्टीस पडत असली तरी तिचा बराच काळ लोप झाला होता, व इटलीमध्यें १३।१४ व्या शतकांत हिचें मध्येंच पुनरुज्जीवन झाल्यासारखें दिसतें. ख्रिस्तीशकाच्या आरंभींच्या शतकांत भिंतीवर चित्रें काढण्यांत संगमरवरी दगडाच्या व रंगीत कांचेच्या तुकड्यांचा उपयोग करीत असत.

तथापि एकंदरीत यूरोपमध्यें टेंपेरा अथवा मिश्ररंगाची पद्धतच फार प्राचीन कालापासून बराच कालपर्यंत प्रचलित होती. परंतु बाष्पभावी अथवा सुकणारीं तेलें रंग करण्याच्या कामीं हळूहळू उपयोगांत येऊं लागल्यापासून विशेषतः १५ व्या शतकापासून टेंपेरा पद्धति मागें पडून तेल्या रंगाचीं चित्रेंच आतांपर्यंत विशेष प्रचारांत दिसतात. तथापि फ्रेस्को अथवा ओलेंगिला येथील चित्रांची पद्धति १८ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत भिंतीवर चित्रें काढण्याच्या कामीं उपयोजिली जात असे, व १९ व्या शतकांतहि ती चालू राहून तिच्यांत आणखी कांहीं गोष्टींची भर पडली आहे. पाण्यांतील रंगकामाची वाढ अवघी गेल्या शंभर वर्षांतील आहे. सध्यां टेंपेरा पद्धतीचा उपयोग देखावे रंगविण्याच्या कामीं सामान्यतः करतात व तिला डिस्टेंपर असें म्हणतात.

कांचमय पदार्थांचीं चित्रें:—भांडीं, भिंती, फरशीचीं कवलें, रंगीत कांचेच्या खिडक्या, कांचेवरील रंगकाम आणि सर्व प्रकारचा कांचमिना या कामांत रंगीत कांचेच्या भुकणीचा उपयोग करतात. या भुकटीला निरनिराळ्या धातूंच्या प्राणिदांनीं निरनिराळे रंग देतात. उदा० सोन्यापासून पिवळा, रुप्यापासून तांबडा, तांब्यापासून हिरवट निळा, निकलपासून पिंगट असे रंग देतां येतात. कथलाच्या योगानें ही भुकटी अपारदर्शक करतां येते. या भुकटीला निरनिराळे रंग देण्याच्या रीती अनेक आहेत. या कामांतील सौंदर्य प्रत्यक्ष चित्रापेक्षां भुकटीचा रंग व अखेरीस येणारी चकाकी यांवर अवलंबून असतो. या पद्धतींत पारदर्शक अथवा अपारदर्शक कांचेप्रमाणें दोन भेद करतात. भिंतीच्या रंगीत

कांचा बहुधा पारदर्शक असून त्यांतून येणाऱ्या अनेक रंगांच्या प्रकाशावर त्यांचें सौंदर्य अवलंबून असतें. रंगीत कांचेच्या खिडक्या गॉथिक कालापासून प्रचारांत आल्या व ११–१२ व्या शतकांत त्या उत्तरेकडे विशेष सार्वत्रिक होत्या. इटलीमध्यें भिंतीवर चित्रें काढण्याची पद्धति असल्यामुळें रंगीत तावदानें फारशीं प्रचारांत आलीं नाहींत. अपारदर्शक भुकटीचा उपयोग भांड्यांवरील चित्रांत अथवा जमिनीवर बसविण्याच्या रंगीत कांचा व कौलें तयार करण्याच्या कामांत करतात. मेसापोटेमियामध्यें सुसा वगैरे ठिकाणीं अशा तऱ्हेचीं रंगीत कौलें बसविलेल्या भिंती आढळून आल्या. त्यांत मनुष्यें, प्राणी व इतर नक्षीकाम केलेलें होतें एवढेंच नव्हे तर उठावदार चित्रेंहि काढलेलीं होतीं. ग्रीसमध्यें प्राचीनकाळीं भांड्यांवर रंगीत नक्षीकाम केलेलें आढळतें. ग्रीसमध्यें सांपडणारीं भांडीं कोणत्या पद्धतीनें रंगवीत हें जरी नक्की माहीत झालें नसलें तरी तीं भट्टींतून काढलेलीं असावींत असें वाटतें. जमिनीवर कांचेचे तुकडे बसवून जी नक्षी काढीत तींत वरील रंगीत कांचेच्या पातळ वड्यांचे फोडून लहान लहान निरनिराळ्या आकारांचे घनाकृति तुकडे करीत व ते एका प्रकारच्या सिमेंटमध्यें बसवीत. या कामांत चित्रकारानें आपणाला पाहिजेत त्या आकाराचे व आपल्या आकृतीला जुळतील असे तुकडे निवडून घ्यावयाचे असत. हे तुकडे अर्थात अनेक निरनिराळ्या प्रकारच्या रंगांचे असत. इटलीमध्यें २५००० निरनिराळ्या रंगांचे तुकडे चित्रांत वापरलेले आढळतात. पाँपी येथें कांचेच्या तुकड्यांऐवजीं निरनिराळ्या रंगांचे संगमरवरी दगडांचे तुकडे योजिलेले आढळतात. या प्रकारचीं निरनिराळ्या काळचीं चित्रें अनुक्रमें राव्हेना, रोम, कॉन्स्टांटिनोपल, व्हेनिस व पालेर्मो या ठिकाणीं आढळतात. कांचमिन्याची माहिती स्वतंत्र लेखांत दिली आहे.

फ्रेस्को अथवा चुन्याच्या ओल्या गिलाव्यांतील चित्रें:— हिंदुस्थान देशात ही कला फार प्राचीन कालापासून आहे हें अजिंठा येथील चित्रांवरून दिसून येईल. ही कला प्रथम कोणी शोधून काढली याबद्दल नक्की माहिती नाहीं. ईजिप्त, असुरिया, फिनिशिया, मायसिनी, उत्तरकालीन ग्रीक हे सर्व लोक भिंतीवर गिलावा देत परंतु त्यांवर रंग द्यावयाचा तो गिलावा वाळल्यावर कांहींतरी बंधक वापरून देत असत. व्हिट्रुव्हिअस आणि प्लिनी यांच्या लेखांवरून त्यांस ही पद्धति माहीत होती असें दिसतें हें वर सांगितलेंच आहे. त्यावरून रोमन साम्राज्याच्या आरंभकाली ही पद्धति रोमन लोकांस माहीत असावी असें कांहींचें म्हणणें आहे. परंतु व्हिट्रुव्हिअस याच्या लेखाचा अर्थ निश्चित नसून त्यानें वर्णिलेली पद्धति एक प्रकारची 'टेंपेरा' पद्धतीच असून तींत मेणाचा अथवा लाखेचा उपयोग सांगितलेला आहे व पाँपी येथील चित्रें याच पद्धतीचीं आहेत असें कांहींचें म्हणणें आहे. एकंदरीत हा प्रश्न अनिश्चितच आहे.

या पद्धतीमध्यें गिलावा ओला असतांच त्यावर रंगामध्यें चित्र काढावयाचें असतें व चुना घट्ट झाला म्हणजे रासायनिकरीत्या तो रंगहि पक्का होतो. याकरितां प्रथम गिलावा फार काळजीपूर्वक तयार करावा लागतो व एकावर एक अधिक नरम गिलाव्याचे थर द्यावे लागतात. जें चित्र काढावयाचें त्याची आकृति आपणाजवळ काढून ठेवावी लागते व काम अतिशय जलद करावें लागतें. प्रथम दिलेले रंग कदाचित् हळूहळू अस्पष्ट होतात. तेव्हां त्यांवर पुन्हां हात द्यावे लागतात. गिलाव्यांतील चुना ओला असल्यामुळें वर दिलेले रंग त्यांत भिनतात व ते घट्ट होतांना त्यांवर चुन्याच्या कार्बिताचा थर तयार होतो व तो हवेपासून वगैरे त्या चित्रांचें रक्षण करतो.

या पद्धतींतील चित्रांमध्यें लुईनी याचीं चित्रें फार प्रसिद्ध आहेत. तथापि मिकेलँजेलो हा जरी चितारी नसून शिल्पी होता तरी त्यानें सिस्टाईन चॅपेलच्या छपरावर काढलेली या पद्धतीचीं चित्रें अप्रतिम आहेत. इंग्लंडमध्यें तेथील हवामानामुळें वर सांगितलेल्या चुन्याच्या कार्बिताचें गंधकित तयार होतें, त्यामुळें तेथें या पद्धतीचीं चित्रें टिकत नाहींत. तथापि यूरोपमधील अनुभव याच्या विरुद्ध असून रोम, बर्लिन, म्यूनिच वगैरे ठिकाणीं या पद्धतीनें काढलेलीं चित्रें शाबूत आहेत. अर्वाचीन चित्रांपैकीं एलाशापेळ येथील नगरभवनांत आल्फ्रेड रेथेल यानें १८५० मध्यें काढलेलीं चित्रें प्रेक्षणीय असून चांगलीं टिकलीं आहेत.

फ्रेस्कोसेको.—या पद्धतींत चुन्याच्या गिलाव्यावरच चित्र काढावयाचें असतें. परंतु गिलावा वाळलेला असलेला चालतो. ही पद्धति इ. स. ११०० पासून प्रचारांत आहे असें थिऑफिलस यानें तिचें वर्णन केलें आहे त्यावरून दिसतें. मि. चार्लस हीथ विल्सन यानें १८५० च्या सुमारास या पद्धतीचीं चित्रें इटलीमध्यें विशेष प्रचारांत होतीं असें लिहिलें आहे. बहुतेक गिलावा वाळलेल्या भिंतीवरच चित्रें काढावयाचे प्रसंग जास्त येतात. अशा स्थितींत फ्रेस्कोपद्धति वापरणें शक्य नसतें. तेव्हां कोणतेंतरी बंधक वापरणें अवश्य असतें. फ्रेस्कोसेको पद्धतीमध्यें गिलाव्याला वापरावयाचा चुनाच बंधक म्हणून वापरतात. ज्या भिंतीवर चित्र काढावयाचें असेल ती आदल्या रात्रीं थोडा चुना अथवा भारप्राणिद घातलेल्या पाण्यानें चांगली भिजवितात. सकाळीं चित्रकार पुन्हां पाणी मारून चुन्याच्या अथवा भारप्राणिदाच्या पाण्यांत मिसळलेल्या रंगांनीं आपलें चित्र काढतो. जर भिंत फार वाळली तर फवाऱ्यानें पाणी शिंपून ती ओली करितात. रंगांतील चुना वाळला म्हणजे तें चित्र पक्कें होतें, परंतु हीं चित्रें फ्रेस्कोपद्धतीइतकीं चांगलीं नसतात. कारण हीं अपारदर्शक व जड दिसतात. तर फ्रेस्को चित्रें हलकीं व पारदर्शक दिसतात व हीं तितकीं टिकाऊहि नसतात.

स्टिरियोक्रोमी अथवा कांचरसपद्धति.—ही पद्धति बरीच अर्वाचीन असून तिच्यांत रासायनिक ज्ञानाचा उपयोग केलेला आहे. पार्लमेंटगृहांतील भिंतीवरील कांहीं चित्रें या पद्धतीनें काढलेलीं आहेत. या पद्धतींत म्यूनिच येथील किम व रेकनागेल यांनीं कांहीं सुधारणा केल्या व हिचा १९ व्या शतकाच्या अखेरीस जर्मनीमध्यें बराच प्रसार झाला होता. या पद्धतींत १५ भाग गारेच्या वाळूची पूड, १० भाग शुद्ध पोटॅश व १ भाग कोळशाची पूड हीं एकत्र करून ६ ते ८ तास भट्टींत घालून त्याचा रस तयार करितात. तो निवाल्यावर त्याची पूड करून ती एका लोखंडाच्या भांड्यांत शुद्ध पाण्यांत घालून तीन ते चार तास उकळवितात, म्हणजे रंग तयार होतो. हा रंग उष्ण असतांना लावावयाचा असतो. याच्याकरितां तयार करावयाच्या भिंतीवर १ भाग चुना व ५ ते ८ भाग चांगली वाळू व संगमरवरी दगडाची भुकटी आणि शोषक माती यांच्या मिश्रणाचा पातळ थर देतात यामुळें तिच्या ठिकाणीं सच्छिद्रता व शोषकशक्ति येते. ही शक्ति येण्यास मदत म्हणून तीवर हायड्रोफ्ल्यूओ सिलिसिक ॲसिडचा फवारा सोडतात; म्हणजे पृष्ठभागावर तयार झालेला चुन्याच्या कर्बिताचा थर वितळून जाऊन छिद्रें मोकळीं होतात. यामुळें त्यांत रंग चांगला पक्का बसतो.

स्पिरिट फ्रेस्को अथवा गॅंबियर पॅरी पद्धति.—ही पद्धतीहि अगदीं अर्वाचीन असून ग्रेटब्रिटनमध्यें बरीच प्रचारांत आहे. या पद्धतींत ( १ ) टिकाऊपणा, ( २ ) बाहेरील हवामानांत होणाऱ्या बदलांचा परिमाम फारसा न होणें, ( ३ ) चकाकी, (४)उत्तम पृष्ठभाग व रासायनिक क्रियांपासून अलिप्तता इत्यादि गुण आहेत, असें गॅंबियरपॅरी यांचें म्हणणें आहे. या पद्धतींत वरील प्रमाणेंच पृष्ठभाग तयार करावयाचा असतो. मात्र खनिज रंग वापरावयाच्या ऐवजीं तेल, वॉरनीस, मेण, लाख इत्यादि वस्तू बंधक म्हणून वापरावयाच्या असल्यामुळें हीं चित्रें दिसण्यांत तैलचित्रांसारखींच दिसतात.

एन्कॉस्टिक अथवा उष्णतेची पद्धति.—या पद्धतींत टरपेंटाईन अथवा लव्हेंडरसारख्या तेलांत लाख अथवा मेण वितळून तिच्यामध्यें रंग घोटून तयार करितात. ही लाख भेगाळ्यांत घट्ट बसावी म्हणून उष्णतेचा उपयोग करितात. बर्लिनमध्यें राष्ट्रीय चित्रसंग्रहालयांतील भिंतीवर मिलर यानें या पद्धतीचीं चित्रें काढलीं आहेत. त्यांत त्यानें १ भाग लाखेबरोबर २ भाग टरपेंटाईन व थोडेसें जवसाचें तेल यांचा उपयोग केला आहे. हें मिश्रण जवसाच्या तेलांत घालून त्यांत रंग घोटून तयार करीत. या पद्धतीनें काढलेलीं चित्रें ईजिप्तमधील दुसऱ्या,तिसऱ्या शतकांतील शवपेटिकांवर सांपडलीं आहेत. प्राचीनकाळीं लोकांनां टरपेंटाईनमध्यें लाख वितळविण्याची युक्ति माहीत नव्हती, परंतु त्यांनां लाखेबरोबर राळेसारखे पदार्थ कसे मिळवावे हें माहीत असून ते या मिश्रणाचा उपयोग गलबतांना रंग देण्याच्या कामीं करीत. तसेंच त्यांनां लाख अल्कामध्यें मिसळून तिला साबणासारखें रूप देतां येत असे. अशा लाखेला पाण्यांत, तेलांत किंवा गोंद,चिकी वगैरे बंधकांत मिसळून तिचा रंग देण्याच्या कामीं उपयोग करण्याचें माहीत होतें. प्लिनीनें रंगाच्या कामीं लाखेचा उपयोग करीत असें लिहून ठेविलें आहे व या पद्धतींत उष्णतेची जरूर लागत असे असेंहि म्हटलें आहे. तथापि त्यावेळची पद्धत कशी होती याबद्दल प्लिनीच्या ग्रंथांतील कांहीं भाग प्रक्षिप्त असल्यामुळें नक्की कळून येत नाहीं. ईजिप्तमधील शवपेटिकांवरील रंगीत कामांत कांहीं भाग कुंचलीनें तर कांहीं भाग धातूच्या गरम केलेल्या खिळ्यासारख्या हत्यारानें रंगवीत असावे असें त्या हत्यारांच्या खुणांवरून दिसतें. रिचर यांचें म्हणणें या लाखेचा तेल किंवा राळेशीं संयोग करून पातळ रंग करून तो चपटया हत्यारानें बसवीत असावे. उलट बर्गर म्हणतो कीं, हा रंग वर सांगितल्याप्रमाणें तापलेल्या खिळ्यानें बसवीत व प्रत्यक्ष रंग गरम करण्याची जरूरी नसे. याच पद्धतीनें हस्तीदंतावर चित्रें कशी काढीत हें नक्की समजत नाहीं. उत्तरकालीन हस्तिदंतावरील कामें आंत रेघा कोरून रंग भरलेलीं आहेत. याचे उत्कृष्ट नमुने सेंटपिटर्सबर्ग ( पेट्रोग्रॅड, लेनिनग्रॅड ) येथलि हर्मिटेजमधील आहेत. पश्चिम साम्राज्याच्या अखेरीपासून पुढील काळांतील या पद्धतीचा इतिहास तैलचित्रपद्धतीशीं बराच संबद्ध आहे. म्हणून त्याचा विचार तेथेंच केला आहे.

बंधक ( टॅंपेरा ) पद्धतिः—या पद्धतीमध्यें पुढें दिलेल्या निरनिराळ्या पदार्थांचा उपयोग करितात ( १ ) चिकी, विशेषतः चर्मपत्राचे तुकडे उकळून केलेली; माशापासून मिळणारा सरस व गोंद, ग्लिसरीन, मध, दूध, दारू इत्यादि. ( २ ) अंड्यांतील पिंवळा अथवा पांढरा बलक किंवा या दोहोंमिळून घोटून केलेला पदार्थ अथवा त्यांतच दूध किंवा अंजिरांच्या कोंबांचा रस घालून तयार केलेला पदार्थ अथवा व्हिनीगर मिसळून तयार केलेला पदार्थ. व ( ३ ) इमल्शन. यामध्यें लाख,मेण अथवा तेलाचें अशा एका पदार्थांत मिश्रण केलेलें असतें कीं, त्यामुळें तो पदार्थ पाण्यानें पातळ करतां येतो. उदा० तेलामध्यें गोंद अथवा अंड्यांतील पांढरा बलक घातला असतां त्याचें पाण्याबरोबर मिश्रण करतां येतें.

वरील पदार्थांपैकीं चिकी अथवा हे गोंद पदार्थ पाण्यांत द्राव्य असून पातळ असतात. अंड्यांतील पांढरा बलकहि असाच असतो. परंतु पिंवळा बलक जास्त घट्ट असतो. अर्वाचीन चित्रकारांनीं विशेषतः जर्मनमध्यें याचा उपयोग बराच केलेला आढळतो. परंतु मध्ययुगांतील चित्रकारांनीं अंड्यांतील बलकामध्यें तितकेंच पाणी घालून पातळ रंगांत काम केलें असावें असें त्यांच्या उपलब्ध चित्रफलकांवरून दिसतें. अंड्यांतील पिंवळा बलक त्यांत शेकडा ३० या प्रमाणांत चरबी अथवा तेल असल्यामुळें तें एक प्रकारचें इमल्शनच

आहे, परंतु त्याचें पाण्यांत मिश्रण चांगलें होतें. अंड्यांतील पिवळा बलक हें एक वास्तविक तैलमाध्यमच समजलें पाहिजे असें प्रो. चर्चचें म्हणणें आहे. जेव्हां तो बलक वाळतो तेव्हां त्यांतील तेल घट्ट होतें आणि तें 'चामड्यासारखेंच हवामानाला दाद देत नाहीं. अंजिराच्या कोंबांच्या रसाबद्दल प्रिन्सिपॉल लॉरी यांचें असें म्हणणें आहे कीं, अंजिराचें झाड हें रबराच्याच जातीचें असल्यामुळें त्याच्या रसांत रबर असतो. तेव्हां रबर व बलक यांचें मिश्रण हें एक चांगलें बंधक होईल. हीं निरनिराळीं बंधकें कोणत्या काळीं वापरलीं जात होतीं हें पाहिल्यास आपणांस असें दिसून येतें कीं इटलीमध्यें मध्ययुगांत अंड्याचा पिवळा बलकच वापरीत असत, व अर्वाचीन कालांतहि हाच विशेष वापरला जातो. इटलीमध्यें बंधक याचा अर्थच अंड्याचा बलक असा झाला होता. उलट आल्प्स पर्वताच्या उत्तरेस चिकी अथवा गोंद याचाच उपयोग विशेष दिसतो. इजिप्तमध्यें प्राचीनकाळीं चिकी वापरीत असत. ग्रीसमध्यें ख्रि. पू. ६ व्या शतकापासून लाखेच्या इमल्शनचा उपयोग करीत असावे. शवपेटिकांवरील चित्रकामांत चिकी अथवा गोंद वापरीत असत. पेट्रीच्या मतें बाभळीचा गोंद वापरीत. मेसापोटेमियामधील व हिंदुस्थानांतील आणि पूर्वेकडील भिंतीवरील चित्रें याच पद्धतीचीं (टेंपेरा) असत. परंतु प्रत्यक्ष बंधक कोणचें वापरीत हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. त्याचप्रमाणें प्राचीन ग्रीस, इटली, बायझंटाईन साम्राज्य व आल्प्स पर्वताच्या आजूबाजूच्या प्रदेशांत मध्ययुगाच्या प्रारंभीं काढलेल्या भिंतीवरील व चित्र-फलकांवरील या पद्धतीच्या चित्रांमध्यें कोणतें बंधक वापरीत हें अनिश्चितच आहे. तेव्हांच्या रंगकामांतील प्लिनीनें उल्लेखिलेले व निरनिराळ्या पुस्तकांत आढळणारे सर्व पदार्थ आतां निश्चितपणें माहीत झाले आहेत, परंतु विशिष्ट चित्रामध्यें कोणते पदार्थ वापरलेले आहेत हें सांगणें कठिण आहे. हें शोधून काढण्याचें मुख्य साधन म्हणजे प्रत्यक्ष चित्राचें सौंदर्य वगैरे नसून पृथक्करण हें होय. परंतु पृथक्करणास उपयुक्त रंगद्रव्य फार थोड्या प्रमाणांत मिळत असल्यामुळें त्याचें समाधानकारक रीतीनें पृथक्करण करून मूलद्रव्यांचें संशोधन करतां येत नाहीं.

तै ल चि त्रें—ही पद्धति उत्तर यूरोपमध्यें विशेषतः विकास पावली. याचें कारण तेथील चित्रांचें दमट हवेपासून रक्षण होईल असें माध्यम योजण्याची तेथें विशेष जरुरी असे. आणि या पद्धतीला लागणारीं सुकणारीं तेलें दक्षिणेमध्यें ऑलिव्ह तेलाचा फार प्रचार असल्यामुळें फारशीं तयार करीत नसत. आणि ऑलिव्ह तेल हें बाष्पभावी नाहीं. कांहीं उद्भिज तेलें त्यांवर प्राणवायूचा परिणाम होऊन हवेमध्यें आपोआप वाळतात, व तीं वाळतांना त्यांचा रंगहि बदलत नाहीं किंवा तीं फारशीं कमीहि होत नाहींत. यामुळें त्यांत मिश्र केलेल्या पदार्थांचें स्वरूप अथवा आकार फारसा बदलत नाहीं. कांहीं दिवसांनीं हळहळू त्यामध्यें थोडासा काळसर अगर पिवळटपणा येतो ही गोष्ट वेगळी. अशा तेलापैकीं जवसाचें तेल, खसखशीचें तेल व आक्रोडाचें तेल हीं जास्त महत्त्वाचीं आहेत. यांपैकीं एखाद्या तेलांत बहुतकरून जवसाच्या तेलांत पुढीचे रंग मिसळून आणि त्यांत कांहीं जातीची राळ मिसळून तैल रंग, वॉरनिसें वगैरे तयार करितात. यांतील सुकण्याचा धर्म उष्णता दिल्यानें अथवा शिसें आणि जस्त यांचे कांहीं क्षार मिळविल्यानें वाढवितां येतो. हीं तेलें केव्हांपासून माहीत झालीं हें नक्की सांगतां येत नाहीं. कांहीं जातीच्या वॉरनिसांचा इजिप्तमधील शवपेटिकांवर आणि नूतन साम्राज्यांतील चित्रफलकांवर उपयोग केलेला आढळतो. यांतील कांहीं पाण्यामध्यें द्राव्य असून कांहीं अद्राव्य असत. हीं कदाचित या सुकणाऱ्या तेलांपासून अगर बाष्पभावी तेलापासून तयार केलेलीं असावींत. परंतु बाष्पभावी तेलें करण्याची कृति रोमन साम्राज्यकालापर्यंत इजिप्तमध्यें ज्ञात असावी असें दिसत नाहीं. प्लिनीनें कांहीं तेलांचे गुणधर्म दिले आहेत परंतु तेलांच्या सुकण्याच्या धर्माचा त्यानें उल्लेख केला नाहीं. ग्रीक अथवा रोमन लोकांत या सुकणाऱ्या तेलांचा प्रचार होता असा पुरावा आढळत नाहीं. सुकणाऱ्या तेलांचा पहिला उल्लेख एटिअस या वैद्याच्या ग्रंथांत ख्रिस्ती शकाच्या ६ व्या शतकांत आढळतो. यापुढें सुकणारीं तेलें व वॉरनिसें यांचा उपयोग चित्रकलेमध्यें सररास केलेला आढळतो. थिओफिलसनें जवसाच्या तेलांतील रंगांचें वर्णन दिलें आहे. हेरॅक्लिअसनें या रंगांत वर सांगितलेले सुकविणारे क्षार कसे मिळवावे हें सांगितलें आहे. १४ व्या शतकांत गीओटो याच्या संप्रदायांत ही पद्धति कशी वापरीत असत याबद्दल सेनिनो यानें वर्णन केलें आहे. त्यांत त्यानें ही पद्धति जर्मनीमध्यें विशेष प्रचलित असल्याचें नमूद केलें आहे. यानें तैलरंग आणि बंधकयुक्त रंग या दोहोंचाहि एकाच चित्रांत कसा उपयोग करावा यासंबंधीं थोडी माहिती दिली आहे व ती महत्त्वाची आहे. यानंतर एल्. बी. आल्बर्टी व फिलारेट यांच्या ग्रंथांत या पद्धतीचें थोडें फार वर्णन आढळतें. इंग्लंडमध्यें तिसऱ्या हेनरीपासून निरनिराळ्या राजांनीं आपल्या महालांत तैलचित्रें काढून घेतल्याबद्दल चित्रकारास पैसे दिल्याचे उल्लेख आढळतात. परंतु चौदाव्या शतकांतील चित्रें आज उपलब्ध नाहींत आणि वासरी या ग्रंथकारानें या पद्धतीचा शोध व्हॅन आइक या फ्लेमिश चित्रकारानें १४१०मध्यें लावला असें लिहिलें आहे. तेव्हां वरील गोष्टींची संगति कशी लावावी हा एक प्रश्न उपस्थित होतो. तथापि या बाबतींतील इतर ग्रंथकारांचा व प्राचीन उल्लेखांचा विचार करून पाहतां असें दिसतें कीं, व्हान आइक यानें या पद्धतींत विशेष सुधारणा केली असावी. या पद्धतींतील प्रसिद्ध चित्रकार गिओव्हॅनी बेलिनी यास अर्वाचीन तैलचित्रपद्धतीचा जनक असें म्हणतां येईल. यानें प्रथम बंधकपद्धतीनें चित्रें रंगविण्यास सुरवात करून १४७५ च्या सुमारास या नवीन पद्धतीचा स्वीकार

केला. तथापि या काळीं चित्राचा पहिला हात टेंपेरा पद्धतीनें देत असत. व्हेनिशिअन परंपरेमध्यें फलकांवर चित्रें काढण्याचा प्रघात विशेष असल्यामुळें त्यांनीं बंधक पद्धतीनें पहिले हात देण्याचें सोडून सर्व चित्र तैलरंगांत काढण्याचा विशेष प्रघात पाडला. या पद्धतींत पहिले हात द्यावयाचे ते पारदर्शक अथवा अपारदर्शक असतील त्याप्रमाणें दोन तऱ्हेचीं चित्रें काढण्याच्या स्वतंत्र परंपरा निघाल्या. जुने फ्लेमिश चित्रकार व व्हान आइक, ड्यूरर वगैरे जर्मन चित्रकार प्रथम एखाद्या पाणरंगाचा हात देऊन त्यावर चित्र काढीत. आणि त्यांतील शरीराचा भाग एकाद्या अर्धपारदर्शक पातळ तैलरंगानें रंगवीत. यामधून पहिला रंग दिसत असे. यानंतर पुढील सर्व काम करीत. रूबेन्सनें या पद्धतींत थोडासा फरक केला. पहिला हात बहुधा अंबर अथवा पिंगट रंगाचा हलका परंतु स्पष्ट दिसण्यासारखा सर्व चित्रपटावर दिल्यानें त्याची सर्वत्र छाया दिसत असे. व मागाहून अनेक रंगांचे निरनिराळ्या जाडीचे थर दिले तरी याची छटा सर्वत्र कायम राहून सर्व चित्राचा चांगला मिलाफ होऊन त्याच्या सौंदर्यांत बरीच भर पडत असे. शिवाय या कामांतील चित्राचें सौंदर्य सर्वस्वीं हाताच्या सफाईवर अवलंबून असून छाया दाखवावयाच्या जागीं मुख्य रंग चकाकीच्या खालीं अर्धवट झांकून टाकण्यांत येतो व प्रकाशाच्या जागीं वर उठावदार दाखविण्यांत येतो. ही सर्व कृति एकदम आणि बिनचूक झाली पाहिजे. नाहीं तर चित्र तितकें सफाईदार दिसत नाहीं. जेव्हां अशा चित्रांतील खालचे रंग मधून मधून इतस्ततः मध्येंच डोकावतात तेव्हां चित्रामध्यें बहारीच्या छटा उत्पन्न होतात.

या दोन पारदर्शक अगर अपारदर्शक रंगांचा पहिला हात देण्याच्या पद्धतींपैकीं फ्लेमिंग्ज याच्या पद्धतीचा पुढील कलेवर जास्त पगडा दिसतो. १८ व्या शतकांतील चित्रकार व स्कॉटलंडमधील चित्रकार या पद्धतीचेच अनुयायी दिसतात. तथापि तैल रंगांतील चित्रकार १७ व्या शतकापासून अलीकडे विशेषसे कोणत्याहि नियमांनीं बद्ध असे दिसत नसून त्यांच्या ठिकाणीं बरेंचसें स्वातंत्र्य दिसतें. ते स्वतःला आवडतील तीं माध्यमें उपयोगांत आणतात. या स्वतंत्रतेचा एकंदर चित्रकलेच्या प्रगतीवर चांगला परिणाम झाला आहे असें दिसून येईल. रेंब्रांटनें फ्लेमिश पद्धतीचा स्वीकार केला होता तर व्हेलाजकेज हा अपारदर्शक रंगांचा पहिला दाट हात देत असे. तथापि या दोघांनींहि पुढें पुढें कोणत्याहि विशिष्ट पद्धतीशीं चिकटून न राहतां स्वतःला विशिष्ट चित्र उठावदार करण्यास योग्य वाटतील ते पदार्थ व पद्धति पूर्ण स्वतंत्रेनें वापरली. सध्यां प्रत्येक चित्रकार कोणतीहि विशिष्ट पद्धति न अनुसरतां आपल्याला विशिष्ट चित्र काढण्यास सोईच्या पडतील त्या वस्तू व पद्धती वापरतात.

पा ण रं गां ती ल चि त्रें—पाणरंगांतील चित्रें हा एक 'टेंपेरा' पद्धतीचाच भाग आहे. या पद्धतींत रंगामध्यें चिकटपणा येण्याकरतां बहुधा गोंद वापरतात व तो फार लवकर सुकूं नये म्हणून मध किंवा ग्लिसरिन घालतात. हीं चित्रें बहुधा कागदावर काढितात. तथापि हस्तिदंतावरील लहान लहान चित्रें याच पद्धतीनें काढतात. ही पद्धति इजिप्तमध्यें फार प्राचीन काळापासून पापीरसवर चित्रें काढण्याकरितां आणि मध्ययुगांत पुस्तकांतील चित्रें काढण्याकरितां उपयोगांत आणीत असत. अलीकडील पाणरंगांतील चित्रेंहि १५ते १७ या शतकांत जीं रेषाचित्रें काढीत त्यांपासून विकास पावलीं आहेत. रेंब्रांटसारखे चित्रकार त्यांनां आढळलेले देखावे रेषांमध्यें तात्पुरते काढून ठेवीत आणि मागाहून त्यांमध्यें रंग भरून चित्रें तयार करीत. पुढें रेषांचें महत्त्व कमी होऊन यांतील रंगास जसजसें प्रामुख्य देण्यांत आलें तसतशी या पद्धतीची वाढ होत गेली. अशा पद्धतीच्या देखाव्यांचीं चित्रें ड्यूरर आणि रूबेन्स यांनीं काढलेलीं उपलब्ध आहेत. तथापि पॉल सँडबी आणि जॉन रॉबर्ट कोझेन्स या अठराव्या शतकांतील इंग्लिश चित्रकारांच्या चित्रांपर्यंत या पद्धतींत फारशी वाढ झालेली दिसत नाहीं. थॉमस गिर्टिन आणि टर्नर हेहि या पद्धतींतील उत्तम चित्रकार होते. टर्नर यानें शरीराचा रंग दाखविण्यांत विशेष कौशल्य दाखविलें आहे. या पद्धतींतहि अलीकडे कोणी चित्रकार विशेष नियमास अनुसरून काम करीत नाहीं तर आपल्या कल्पनेस व हस्तकौशल्यास तो पूर्ण स्वातंत्र्य देतो.

चि नी चि त्र क ला.—चित्रकलेंत चिनी लोक फार प्रसिद्ध आहेत. आज बाराशें वर्षें उत्तमोत्तम चित्रकार चीनमध्यें निर्माण झाले असें म्हणतात. चित्रकलेंतील रंग भरण्याच्या कामीं सुसंगतपणा व मार्मिकपणा दाखविण्यांत, चिनी हे जात्याच हुषार म्हणून नांवाजलेले आहेत. शुंग कारकीर्दींत शाईचीं रेखाचित्रें ( रंगीत ) काढण्याची कला विशेष पुढें आली व पंधराव्या शतकापासून ती कला जपाननें चिनी लोकांपासून उचलली. या कलेंत नाजूकपणा व कुंचलीचा सफाईदारपणा यांची जोड अत्यवश्यक असते. बौद्धधर्मविषयक ( पौराणिक ) चित्रांत, पहिल्या प्रतीचे व सोनेरी रंग चीनमध्यें वापरतात. शांत व आल्हाददायक रंगांनीं बागबगीचे व पक्षी वगैरे रंगविण्यांत येतात. अशा कामीं भडक रंग वापरीत नाहींत. चित्रें काढण्यांत, वस्तुस्थितिनिदर्शनाऐवजीं काव्यकल्पनेचा उगम व्हावा, हा चिनी चित्रकारांचा हेतु असतो असें म्हणतात. त्यांच्यांत, 'चित्र हें एक शब्दविरहित काव्यच होय' अशी म्हण फार पूर्वीपासून प्रचारांत आहे. पौरस्त्य देशांत निष्ठुर वस्तुस्थितीपेक्षां उच्च भावनांवरच जास्त लक्ष्य देण्यांत येतें व त्या भावनांना सदृश्य व त्या ज्यामुळें उत्पन्न होतील अशीं चित्रें त्या देशांत काढतात. पौरस्त्य व पाश्चात्त्य (चीन व इटाली) चित्रकलांची तुलना करितांना या गोष्टी लक्षांत ठेवाव्या



‘ सेंट सेबास्टियनचा स्वधर्मार्थ प्राणत्याग ’
[ इटालियन पंथ, पृ १०५ ]



‘ ओढा उतरून जाणें ’ ( १८ वें शतक ) [ पृ. १०६ ]



यंगत्सुअन नदीवरील देखावा ( स. १३०९ )
[ चिनी चित्रकला पृ. ११३ ]



बर्फावरील देखावा. ( १५ वें शतक )
[ जपानी चित्रकला. पृ. ११४ ]

लागतात. इटलीच्या प्राचीन धर्मविषयक चित्रांत व चिनी धर्मविषयक चित्रांत थोडेंसें सादृश्य आढळतें खरें, परंतु पाश्चात्त्यांतील पुनरुज्जीवन, शास्त्रीय चमत्कार, भौतिकपणा वगैरे गोष्टींचा स्पर्शहि चिनी चित्रकलेस झालेला दिसत नाहीं. त्यांच्यांत सत्यापेक्षां कल्पनेची भरारी जास्त असते. त्यामुळें सृष्टिविषयक देखाव्यांची चित्रें त्यांनां उत्तम काढतां येतात. यांचें वर्षाकालाचें, हिमवृष्टीचें, वादळाचें वगैरे ( देखाव्यांचें ) चित्र नांवाजण्यासारखें असतें. माणसाच्या आयुष्याला वळण लावण्यास चित्रकलेचा काय उपयोग होईल ही दृष्टि चिनी लोकांनां अद्यापि आली नसल्यानें, त्या मानानें त्यांची चित्रकला पाश्चात्त्यांच्या मागें आहे. सृष्टिविषयक देखाव्यांचीं चित्रें काढण्यांत आज त्यांचा हातखंडा आहे. चौथ्या शतकांतील कु-कै-ची हा म्हणत असे कीं एखादें उत्तम चित्र काढावयाचें असल्यास, त्याला एखादा उंच पर्वत किंवा खोल दऱ्याखोरीं यांचा पार्श्व देखावा चित्रित करावा लागतो. चिनी चित्रकला केव्हां अस्तित्वांत आली त्याचा नक्की तपास लागत नाहीं. खि. पू. तिसऱ्या शतकांत ती बरीच भरभराटीस आली होती असे उल्लेख आढळतात. या वेळींहि ( चित्रकलेंत वापरण्यांत येणारी ) केंसांची कुंचली हीं चित्रें काढण्यांत व लिहिण्यांत उपयोगांत आणीत असें समजतें (कुंचलीचा शोध या काळींच त्यांनां लागला असें म्हणतात ). चिनी लोक प्रथम रेशमी कापडावर व पहिल्या शतकापासून पुढें कागदावर चित्रें काढूं लागले. तत्पूर्वी लांकडी फळ्यांचा उपयोग करीत व मोठमोठे कथाप्रसंग, भिंतीवर चुना फासून त्यावर चित्रित करीत असत. चीन देशांत बौद्ध धर्माचा प्रवेश होण्यापूर्वी ( इ. स. ६७ ) पुष्कळ दिवसांपासून वाघ व सपक्ष सर्प ( ड्रॅगन ) यांचीं चित्रें सर्वत्र काढण्यांत येत असत. पुढें बौद्धधर्माचा प्रसार झाल्यावर त्यांतील व्यक्तींचीं व प्रसंगांचीं चित्रें काढण्यांत येऊं लागलीं. दुसऱ्या शतकात प्रकृति–निसर्ग–विषयक चित्रें निघूं लागलीं. कु-कै-ची ( ४ थें शतक ) हा त्याच्या वेळचा प्रख्यात चित्रकार होऊन गेला. यानें चित्रिलेलें एक चित्र हल्लीं ब्रिटिश म्यूझिअममध्यें आहे. त्यांत या कलेची वाढ त्यावेळीं पूर्णावस्थेस कशी गेली होती, तें आढळून येतें. त्यांतील कुंचलीचा सफाईदार हात, मोहकता व भव्यपणा हीं वाखाणण्यासारखीं असून या कामांत त्यावर वरचढपणा अद्यापि कोणाकडूनहि झाला नाहीं. पांचव्या शतकांत हीहोयानें चित्रकलेवर टीकात्मक लेख लिहिले. त–आंग कारकीर्दीत बौद्धधर्माचा प्रसार चीनमध्यें बराच झाला ( ६०० ). त्यामुळें त्यांतील कल्पना व भावना यांचा पगडा चित्रकलेवर बसला. या वेळचा वू–तौटझू हा चित्रकार साऱ्या चिनी चित्रकारांतील पहिल्या नंबरचा चित्रकार होय असें सर्वत्र मानतात. याचें एकहि चित्र हल्लीं अस्तित्वांत नाहीं. यानें बौद्धधर्मातील कथानकांचीं चित्रें विशेष काढिलीं आहेत व त्यांतल्यात्यांत त्याच्या बुद्धाच्या निर्वाणाच्या चित्राची सर्वत्र वाहवा होत असते. हें चित्र हल्लीं जपानांत रूपांतरित झालेलें आढळतें. चित्रकलेच्या सर्वच बाबतींत वू–तौटझू हा निष्णात होता. हन–कन हा घोड्यांचीं चित्रें काढण्यांत प्रख्यात होता, याची एक कुंचली हल्लीं ब्रिटिश म्यूझिअममध्यें आहे. यूएन कारकीर्दीत चौ, मेंगफू, वंग-वी हे प्रख्यात चित्रकार होऊन गेले. यावेळीं वंग-वी व ली-शुशून या दोन चित्रकारांच्या दोन निरनिराळ्या परंपरा ( घाटण्या ) अस्तित्वांत आल्या. वंग-वी हा कवि असल्यानें त्याच्या चित्रकलेंत शृंगाररसात्मक भावनांचा परिपोष जास्त झाला असून ली-शुशूनच्या कलेंत माणसाच्या प्राकृतिक ( प्रकृतिविषयक ) गुणाकडे जास्त लक्ष देण्यांत आलें आहे. शुशूनची परंपरा दक्षिण चिनांत प्रसरण पावली ( आठवें, नववें शतक ). दहाव्या शतकांत सूसी ( हा फुलें काढण्यांत निष्णात होता ) व हुआंग च्वन ( हा पक्षी वगैरे अतिशय नाजूक व सफाईदार काढी ) हे प्रसिद्ध चित्रकार झाले. यानंतर सुंगराशयितींत सर्व कलांनां उत्तेजन मिळाल्यानें चित्रकलाहि भरभराटीस आली( ९६०–१२८० ). यावेळीं ली-लुंगमेन ( रंग व चित्राचा नमुना आणि निवड यांची उत्कृष्ट मिलाफी याच्या चित्रांत असे ) हा प्रसिद्ध चित्रकार झाला. या काळीं सृष्टिवर्णनपर भौमिक व प्रकृतिविषयक देखाव्यांचींच चित्रें जास्त प्रचारांत आलीं(पर्वत धुकें, हंसोड्डाण, नदींतील होडग्यांत बसलेला कोळी वगैरे ). या वेळचा है-त्संग हा बादशहाहि प्रख्यात चित्रकार होता. (हा नयनगोचर प्रदेशांचीं चित्रें काढी). व्हांगहो,कौसी,लीचेंग, मुहकी ( हा शाईचीं रेखांकित चित्रें काढी ), चौतनलील ( वाघाचीं चित्रें काढी ), लीती ( फुलांचीं चित्रें काढी ) वगैरे चित्रकार याच वेळीं प्रसिद्धीस आले. यूएन कारकीर्दींत सन (१२८०-१३६८ )चौ–मैंग-फू व चिन–शुन–चू ( यांच्या रंग भरण्याच्या कलेंत व ग्रीकांच्या त्याच कलेंत बरेंच साम्य आहे ) हे मोठे चित्रकार झाले. या नंतरच्या मिंग कालांत ( १३६८-१६४४ ) पूर्वीचा साधेपणा व भव्य आणि गंभीरपणा नाहींसा होऊन, तेथें दरबारी छानछोकी व नटवेपणा चित्रकलेंत शिरला. किऊ-यिंग याच्या चित्रांत दरबारी थाट दृष्टीस पडतो. हल्लीं सुद्धां या मिंगकालाचीच परंपरा दृष्टीस पडते. हल्लीच्या राष्ट्रीय आकांक्षा व जीवित यांचा आदर्श या कलेंत दिसून येत नाहीं. स. १६४४ नंतर आतांपर्यंतच्या काळांतील वंग, यून–शूपिंग, वू–ली हे प्रसिद्ध चित्रकार होत.[गिल्स–हिस्टरी ऑफ चायनीज पिक्टोरिअल-आर्ट; बुशेल—चायनीज आर्ट. पु. २; ओकाकुरा–आयडिअल्स ऑफ धि ईस्ट; सी–इचि-टकी—चायनीज ल्यांडस्केप पेंटिंग.].

**ज पा नी चि त्र क ला.**—जपानी चित्रकलेंत भावनोत्कटता दर्शविण्यांत न येतां जेणेंकरून भावनाच मूळ उत्पन्न होतील असे विषय योजण्यांत येतात. पहाणाऱ्यावर आमच्या

भावनांचा ठसा उत्पन्न करणें हें जपानी चित्रकारांचें मुख्य काम असतें. यासाठीं घडलेल्या प्रसंगांऐवजीं सृष्टीच्या देखाव्यांचीच चित्रें जपानी चित्रकार जास्त काढतो. पाहणाऱ्याच्या कल्पनेस कांहीं तरी वाव मिळावा अशींहि गूढ प्रकारचीं चित्रें तो रेखाटतो. एकंदरींत जपानी चित्रकला ही जपानी (काव्यासारखी कल्पनांचें पोषण न करतां, कल्पना उद्भुत करणारी ) आहे. यांच्या चित्रांतील गवताचें प्रत्येक पान, पक्ष्याचें प्रत्येक पीस सूक्ष्मतेनें व सहृदयतेनें पाहण्याच्या योग्यतेचें असतें. प्रकृतीच्या सूक्ष्म अभ्यासाचा छडा जपानी चित्रकाराच्या चित्रांत पहावयास सांपडतो. त्यांच्या कलेतील महत्त्वाचा भाग म्हणजे, सृष्टिविषयक ( पक्षी, फुलें, मासे वगैरे ) प्राण्यांचीं व देखाव्यांचीं चित्रें काढताना त्यांत आपल्या अंतरंगांतील भावनांचा व अनुकूल हेतूंचा ठसा सहजपणें उठवून देणें हा होय. सजीव प्राण्याचें सौंदर्य जपानी चित्रकारास चित्र काढण्यास फारसें प्रवृत्त करीत नाहीं. नग्नचित्रें काढण्याचें जपान्यांस सभ्यपणाचें वाटत नाहीं. वस्त्राभरणांनीं विभूषित माणसांचीं चित्रें काढण्यांत त्यांच्या कुंचलीच्या सफाईची कीर्ति, सतराव्या, अठराव्या, एकोणिसाव्या शतकांत फार पसरली होती. माणसाप्रमाणेंच इतर सजीव प्राणीहि ( घोडा, बैल, हरिण, कुत्रा, वाघ, अस्वल, मांजर सुद्धां ) नांवाजलेल्या चित्रकारास उत्तम प्रकारें काढितां येत नाहीं. आपल्या चिनी गुरूप्रमाणें जपानी चित्रकारहि सृष्टिविषयक देखाव्यांचीं चित्रें मात्र अत्युत्तम काढतो. यथातथ्यदर्शन व छायादर्शन यांच्या नियमांकडे हा चित्रकार फारसें लक्ष्य देत नाहीं. मात्र चित्रास निरनिराळ्या साधनांनीं शोभा आणण्याच्या कामीं जपानी चित्रकार फार पुढें गेला आहे. त्यांत त्याची तुलना फक्त ग्रीक चित्रकारांशींच करतां येईल चित्राच्या शोभेसाठीं हा चित्रकार स्पष्ट साधनांचाच उपयोग करतो व ती चितारतांना कुंचलीचा नाजुकपणा, भव्यपणा व मोहकपणा जेणेंकरून उत्पन्न होईल तिकडे विशेष लक्ष्य देतो. चित्रांतील एकाच विषयाची निवड व त्याचीं साधनें हीं प्रत्येक चित्रकार आपापल्या आवडी व लहरीप्रमाणें योजतो. त्यामुळें एकाच प्रसंगाच्या चित्रांत निरनिराळे प्रकार दृष्टीस पडतात. अर्थात एखाद्या चित्राची नक्कल करण्यांत जपानी चित्रकार हलकेपणा मानतो. त्याचें म्हणणें असें कीं, एकाच झाडाच्या एकाच फांदीतील पानें जर एकसारखीं नसतात; त्यांत जर विविधता दृष्टीस पडते, तर मग एकाच प्रसंगाच्या निरनिराळ्या चित्रकारांनीं काढलेल्या चित्रांत एकसूत्रीपणा कां असावा ? या सूत्रामुळेंच जपानी चित्रांच्या सुशोभितपणाच्या बाबतींत तीं इतर देशांच्या चित्रांच्या फार पुढें गेलीं आहेत असें म्हणतात.

चित्रांतील वस्तूंच्या प्रमाणबद्धतेतहि जपानी चित्रकार सृष्टीचाच (त्यांत आढळणाऱ्या वस्तूंच्या प्रमाणबद्धतेचाच) कित्ता गिरवितो. उदाहरणार्थ, चित्त्याच्या अंगावर जे ठिपके असतात किंवा ढाण्या वाघाच्या अंगावर जे पट्टे असतात, अथवा फुलपांखरांच्या पंखांत जे ठिपके असतात ते स्वभावतः सारखे नसून एकाच जातीच्या निरनिराळ्या प्राण्यांच्या बाबतींत निरनिराळे असतात, एवढेंच नव्हे तर एकाच प्राण्याच्या एका बाजूस जसे असतात त्याच्यापेक्षां दुसऱ्या बाजूस निराळे असतात. याचेंच प्रत्यक्ष चित्र व ही प्रमाणबद्धता जपानी चित्रकार आपल्या चित्रांत चितारतो. सर्व चित्रकलेंत फुलें व बगीचे काढणें ही जपानी चित्रकाराची आवडती कला होय. रंगांच्या बाबतींत तो भडक रंग न वापरतां सौम्य व शांत रंग वापरतो. योग्य त्या ठिकाणीं चकाकी येण्यास थोड्याश्या प्रमाणांत तो भडक रंगांचा उपयोग करतो. जपानी चित्रकलेचे ठोकळ सहा भाग पडतात. पहिला भाग सहाव्या शतकाच्या मध्यापासून नवव्याच्या मध्यापर्यंतचा होय. यांत चीनमधील कलेचीच थोडीफार नक्कल आढळते. दंतकथा सांगते कीं पांचव्या शतकांत चिनी चित्रकार ननरिऊ यास जपानांत सरकारी निशाणें रंगविण्यास बोलाविलें होतें; यापेक्षां याची जास्त माहिती आढळत नाहीं. जपानांत ( कोरिया मधून ) चिनी लोकांनीं जेव्हां बौद्धधर्माचा प्रसार केला तेव्हां चित्रकलाहि चीनमधूनच जपानांत आली ( ६ वें शतक ). यावेळचें फक्त एकच चित्र ( व तेंहि दोनचो नांवाच्या कोरीयन भिक्षूनें काढिलेलें) हल्लीं जपानांत होरयूरजी येथील देवळांत आहे. या चित्रांत जपानीपेक्षां बौद्ध (चिनी) चित्रकलेचाच ठसा जास्त आहे. याशिवाय तत्कालीन चित्रकार किंवा त्यांचीं चित्रें यांची कांहीं माहिती आढळत नाहीं. जपानी ऐतिहासिक पहिला चित्रकार कोसेना कनोक नांवाचा असून तो शैव बादशहाच्या दरबारीं (८५० - ८५९) चित्रकार होता. त्याचे वंशज एक शतकभर दरबारी चित्रकार म्हणून गाजत होते. त्याच्या म्हणून सांगण्यांत येणाऱ्या चित्रांत रंगांची यथायोग्य मिश्रणाची कला व कलमाचा सफाईदार हात स्पष्ट दिसून येतो. प्राणी, निसर्गदृश्यें व सृष्टिदेखावा यांचीं चित्रें तो फार उत्कृष्ट काढी म्हणून दंतकथा सांगते. याचे वंशज १५व्याशतकापर्यंत चित्रकारच होते. पण त्यांनीं बौद्धधर्माचीं पौराणिक चित्रेंच विशेष चितारलीं. यांच्या चित्रकलेस व-रव-यू असें एक विशिष्ट नांव मिळालें होतें. नवव्या शतकाच्या अखेरीस चिनी, बौद्ध व स्थानिक अशा तीन परंपरा देशांत निघाल्या. जपानी कुंचली बहुधा हरिणाच्या केसांची असे. सृष्टीच्या देखाव्यांचीं चित्रें जपानी चित्रकार बहुधा चिनी चित्रांप्रमाणेंच काढीत असे. विनोदी चित्रें काढणारा जपानी चित्रकार ककुयू हा बाराव्या शतकांत होऊन गेला, त्यानें जुन्या चिनी चित्रकलेचीच परंपरा कायम ठेविली होती. त्याच्या पुढें ती नाहींशी झाली व होकुसाई नांवाची परंपरा सुरू झाली. तींत क्योसाई नांवाचा चित्रकार फार प्रसिद्ध झाला. जपानांत नवव्या व दहाव्या शतकांत चिनीप्रमाणें बौद्धचित्रकलाहि प्रचारांत होती. ही कला चिनीकलेपेक्षां फार जुनी असून, ती मूळची हिंदुस्थानांतील होती. तींत सोनेरी रंग व

निराळ्या प्रकारांनीं चित्र सुशोभित करणें हें मुख्य वैशिष्टय असे. या प्रकाराचा फक्त पौराणिक साधुसंतांच्याच चित्रांत उपयोग होत असे. या परंपरेंतील शेवटचा व प्रख्यात चित्रकार मैको नांवाचा होता. हा इ.स. १४२७ त मेला. यानें काढलेलीं धार्मिक चित्रें फार अप्रतिम आहेत. व-त्त-यू अथवा स्थानिक चित्रकला ही चिनी चित्रकला व जपानांतील स्थानिक ( काव्य, दरबार वगैरेनां आनुषंगिक अशा ) दंतकथा यांचें मिश्रण होय. वर सांगितलेला कोसे हा या परंपरेचा मूळपुरुष होता. परंतु तिला सार्वत्रिक स्वरूप फुजीवरा नोमोटोमित्सु यानें दिलें ( ११ वें शतक ). ह्या परंपरेंत बहुधा ऐतिहासिक चित्रेंच काढण्यांत येतात व यांत वापरलेले रंग थोडेसे भडक असतात. मध्यंतरीं ( ११८५ ) योरीटोमो या शोगनच्या कारकीर्दीत या परंपरेस धक्का बसला; परंतु ती पुन्हां पंधराव्या शतकांत उदयास आली. यावेळीं जपानी चित्रकलेच्या तिसऱ्या अवस्थेस सुरवात झाली. त्याचा नेता जोसेत्सु म्हणून एक उपाध्या होता. याचे शूबन, सेशू आणि कनो असे तीन शिष्य होते. त्या तिघांच्या तीन निरनिराळ्या परंपरा पुढें झाल्या. यांत मुख्यतः कलमाचा सफाईदारपणा, स्थानिक रंगाचा उपयोग व चित्रास नाना प्रकारें शोभा आणणें या बाबी होत्या. या परंपरेंतील कनो ( १४७७-१५५९ ) हा अत्यंत प्रख्यात चित्रकार होऊन गेला. आजसुद्धां याच्या कलेची नक्कल करणारे मोटमोठे चित्रकार जपानांत आढळतात. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धांत जपानी चित्रकलेच्या चवथ्या अवस्थेस आरंभ झाला. या वेळचा हिशीगवा मोरोनोबू हा प्रख्यात चित्रकार होता. याच्या चित्रकलेंत तत्कालीन समाजाचेंच चित्र आढळून येतें. यानें सचित्र पुस्तकांचा व लांकडावरील कोरीवकामाचा उपक्रम प्रथम सुरू केला. यानंतर अठराव्या शतकाच्या शेवटीं ओकयो यानें जपानी चित्रकलेच्या नैसर्गिक चित्रकला नांवाच्या पांचव्या अवस्थेस प्रारंभ केला. यापूर्वीचे चित्रकार नैसर्गिक चित्रें काढीत असत. पण त्यांच्यावर चिनी चित्रकलेची व पुराणमताभिमानाची छाप असे; ती यानें उडवून दिली. याच सुमारास कोकन नांवाच्या एका चित्रकारानें नागासाकी येथें येऊन राहिलेल्या एका वलंदेज ( डच ) चित्रकारापासून यूरोपियन चित्रकला उचलली. यथातथ्यदर्शन, छाया व प्रकाश वगैरे यूरोपियन चित्रकलेचे नियम याच्या व याच्या परंपरेंतील चित्रकारांच्या चित्रांत आढळतात. पुढें १८७५ त जपानी चित्रकलेच्या सहाव्या विभागास सुरवात झाली. या वर्षी सरकारनें एका इटालियन चित्रकाराला नौकरीस ठेविलें होतें. त्यानंतर पुष्कळ नामांकित यूरोपियन चित्रकार जपानांत फिरतीस गेले होते व जपानी चित्रकारहि यूरोपांत जाऊं लागले. त्यामुळें पाश्चात्य व जपानी चित्रकला यांचें थोडेंफार मिश्रण आतां होऊं लागलें आहे. परंतु जपानांत अन्तर्गत भागांत पाश्चात्य चित्रकला लोकांनां पसंत पडत नाहीं व यूरोपमध्येंहि जपानी चित्रकलेस मानाच्या पहिल्या पंक्तींत बसतां येत नाहीं. त्यांच्या योग्य संमिश्रीकरणाचें काम हशीमोटो गहो व ग्योकुशो या सारखे लोक करीत आहेत. हल्लीं जपानमध्यें चित्रकलेचीं बरीचशीं सरकारी विद्यालयें असून लोकांनींहि चालविलेल्या बऱ्याच शाळा आहेत. शिवाय कोक, शिंबी दैकन वगैरे चित्रकलेचीं सचित्र मासिकेंहि आहेत. [एन्सायक्लो ब्रिटा. पु. १५; ब्रिन्क्ले-जपान; ॲस्टन-हिस्टरी ऑफ जपानीज लिटरेचर.].

## भा र ती य चि त्र क ले चा इ ति हा स.

उ पो द् घा त.—चित्र होईल तितकें मनोवेधक असलें पाहिजे, ह्या मुद्यावर पाश्चात्य व पौर्वात्य ह्या दोन्ही चित्रकलांचें ऐकमत्य आहे. दोन्ही चित्रकलांनां सौंदर्य व तत्त्व ह्या दोहोंचीहि सारखीच अपेक्षा असते, परंतु पौरस्त्यांचा विशेष कल तत्त्वार्थाकडे असतो, व पाश्चात्यांचा ओढा सौंदर्याकडे असतो. याप्रमाणें त्यांचें उद्देश व हेतू भिन्न असल्यामुळें त्यांचें तुलनात्मक विवेचन करणें केवळ अशक्य आहे. असें आहे तरी त्यांच्यांत भेदाभेद काय आहेत हें सहज पहातां येतें. पाश्चात्य चित्रकला पिंडमय असते व पौर्वात्य चित्रकला रेखामय असते. पाश्चात्य संगीताप्रमाणें पाश्चात्य चित्रकलाहि मोठ्या समाजाचें मनोरंजन करूं शकते. उलटपक्षीं हिंदी अगर पौर्वात्य चित्रकला ही वैयक्तिक असून कांहीं विशिष्ट व्यक्तींचेंच मनोरंजन करूं शकते. या नियमाला बौद्ध लोकांचीं कोरीव लेणीं मात्र अपवाद आहेत. कारण त्यांची लोकप्रियता सार्वत्रिक आहे. या तऱ्हेचीं विधानें पर्सी ब्राऊन करतो. पण पौरस्त्य आणि पाश्चात्य कलांत त्यानें दाखविलेला भेद आम्हांस मान्य होत नाहीं.

हिंदी चित्रकलेचे हिंदु, मुसुलमान व बौद्ध असे मुख्य तीन भेद आहेत. हिंदु चित्रकला ही मुख्यतः राजपुतान्यांतील असून मुसुलमानी चित्रकला दिल्लीच्या मोगल लोकांची आहे; बौद्ध व राजपुतानी चित्रकलांमध्यें धार्मिक भावना दिसून येते तशी मोगल लोकांच्या चित्रकलेची स्थिति नाहीं.

बौद्धलोकांनीं जीं लेणीं कोरून तयार केलीं तीं करण्यांत त्यांचा उद्देश धर्मप्रसार करण्याचा होता; व तो कांहीं अंशीं साध्य झालाहि. या धार्मिक हेतूमुळें त्यांच्या चित्रविपयास मर्यादा उत्पन्न झाल्या. रजपूत लोकांची कला यापेक्षां अधिक सार्वत्रिक स्वरुपाची होती. धर्मप्रसाराशिवाय ते चित्रकलेच्या द्वारें बहुजन समाजाचेंहि ज्ञान करून देत असत.

मोगल लोकांच्या चित्रकलेंत कोणतेंहि धार्मिक साध्य नसून ते आपल्या चित्रकलेच्या द्वारें रजपुतांप्रमाणें फक्त वस्तुस्थितीचें निदर्शन करीत असत. हिंदुस्थानांत इतकी चित्रकला असूनहि निरनिराळ्या चित्रकारांविषयीं कांहींहि माहिती उपलब्ध नाहीं.

बौद्ध लोक आपल्या भिक्षुवर्गांत कांहीं कलाकुशल भिक्षूहि ठेवीत असत. हे भिक्षू धर्मप्रसाराचें काम करून पुन्हां

देवालयांच्या भिंतींवरून चित्रें वगैरे काढीत. रजपूत चित्रकार राजेरजवाड्यांचीं व सरदारांचीं चित्रें काढून देत असत, व फावल्यावेळीं देवादिकांचीं चित्रें काढीत. मोंगल चित्रकार हे दरबारीं रहात असत, ते धन्याच्या हुकुमाप्रमाणें चित्रें तयार करून देत व त्याबद्दल त्यांनां धन्याकडून नजराणे मिळत असत. हिंदी चित्रकारांची नांवनिशी वगैरे फारच थोडी मिळते हें वरती सांगितलेंच आहे. त्यांतल्यात्यांत रजपूत व बौद्ध चित्रकारांची तर मुळींच माहिती मिळत नाहीं. कांहीं थोड्या मोंगल लोकांच्या चित्रांवरून मात्र चित्रकारांचीं नांवें ( सह्या ) लिहिलेलीं असतात.

भारतीय चित्रकलेच्या इतिहासांत चितार्‍यांचीं नांवें फारशीं उल्लेखिलीं येत नाहींत हें विधान वारंवार होत आहे, व तें बहुतांशीं खरेंहि आहे. ताम्रपटांवर लेखकांचें नांव आपणांस वारंवार आढळून येतें पण त्यामानानें चित्रकर्त्यांचीं नांवें आपणांस कमी आढळतात. तथापि चित्रकारांचीं नांवें मुळींच आढळत नाहींत असें मात्र नाहीं. पुराणोल्लिखित चित्रलेखा हिला पर्सी ब्राऊन आद्य चित्रकार समजतो. पण ती खरी व्यक्ति असावी कीं नाहीं या विषयीं वानवाच आहे. तारानाथा ( पहा ) नें आपल्या कलेच्या इतिहासांत कांहीं नांवें दिलीं आहेत. नाग चित्रकार म्हणून धिमन्, त्याचा मुलगा, आणि बिटपालो हीं नांवें आलीं आहेत. दाक्षिणात्य चित्रकार म्हणून जय, परोजय, आणि विजय हीं नांवेंहि दिलीं आहेत. यक्ष चित्रकारांमध्यें सुजधराचा उल्लेख केला आहे.

अकबरकालीन अनेक चित्रकारांचा उल्लेख ऐनी इ-अकबरींत व इतर ग्रंथांत आढळून येतो. यांत हिंदु व मुसुलमान दोन्हीं नांवें आढळून येतात. त्यांत बसवन, दसवंत, केसुदास, काम्लुक जातीचा फरुख, अबदुल समद शिराझी, सय्यद अली, ताब्रिझ इत्यादि नांवें आढळून येतात. हिंदुस्थानी आणि फारसी या चित्रकलांच्या इतिहासांतील दुवा म्हणून बिहझादचें नांव दृष्टीस पडतें. रजपूत चित्रकारांमध्यें भगवती आणि हुनर हीं नांवें दृष्टीस पडतात, तर शीख चित्रकारांमध्यें कपुरसिंगचें नांव आढळून येतें. रणजितसिंगाच्या पदरीं असलेल्या जीवनरामाचेंहि एक चित्र प्रसिद्ध झालें आहे, मीरचांद नांवाचा एक हिंदु चित्रकार पानपतच्या युद्धाच्या सुमाराचा असावा. त्याचेंहि काम अलीकडे स्पष्ट होऊं लागलें आहे.पंजाबच्या डोंगराळ प्रदेशांतील कांहीं चित्रकारकुलें अद्याप प्रसिद्ध आहेत. मोगल चित्रकारांची थोडीशी माहिती ऐने अकबरी नांवाच्या ग्रंथांत आलेली आहे. अकबर बादशहानें दसवंत केसू वगैरे हिंदु चित्रकारांसहि आपल्या पदरीं ठेवून घेतलें होतें. ते जातीचे कहार होते.

हिंदी चित्रकलेचे, निरनिराळ्या प्रकारांपासून व ठिकाणांवरून दिल्लीकलम, दक्षिणीकलम, कांग्राकलम वगैरे निरनिराळे भाग पाडले आहेत. जयपूरकलम व कांग्राकलम असे रजपूत चित्रकलेचे दोन भाग आहेत. तसेंच दिल्लीकलम, लखनैाकलम, दक्षिणीकलम, इराणीकलम, काश्मिरीकलम व पाटणाकलम हे मोंगल लोकांच्या चित्रकलेचे वेगळाले भाग आहेत. परंतु काश्मिरी कलम हें कित्येक रजपूत चित्रकलेंत घालतील. रजपूत व मोंगल लोकांचीं चित्रें लहान लहान असतात. बौद्ध लोकांचीं कोरीव लेणीं मोठीं व खोदीव असल्यामुळें त्यांचा ह्या कलमांत समावेश केला नाहीं.

प्रा ची न चि त्र क ला.—ख्रिस्ती शकांच्या पूर्वींचीं थोडींच चित्रें उपलब्ध आहेत, तरी तीं फार मनोवेधक आहेत. हीं चित्रें शिकारीसंबंधाचीं असून तीं मध्यप्रांतांतील कैमूर पर्वताच्या कड्यांवरून काढलेलीं आहेत. विंध्य पर्वताच्या आसपासहि तांबडी माती व रंगपाट्या सांपडल्या आहेत, यावरून तेथें पूर्वीं चित्रकला होती असें दिसतें. आतां कांहीं थोड्या कालापूर्वीं मध्यप्रांतांतील सिंघणपूर नांवाच्या खेड्याच्या नजिकच्या पर्वतश्रेणींमध्यें खडकावर कांहीं कोरीव चित्रें सांपडलीं आहेत. हीं चित्रें माणसांचीं व जनावरांचीं असून तांबड्या रंगानें रंगविलेलीं आहेत. त्यांत एक शिकारीच्या प्रसंगाचें चित्र आहे. हीं चित्रें ज्या कड्यांवरून काढलेलीं आहेत त्या कड्यांच्या पायथ्याशीं दगडाचीं हत्यारें सांपडल्यामुळें हीं चित्रें पाषाणयुगांतील असावींत असें अनुमान निघतें. तीं जुनीं झाल्यामुळें तीं जरी नीटशीं समजत नाहींत, तरी त्यांवरून चित्रकारांचें कौशल्य चांगलेंच दिसून येतें अशाप्रकारचीं चित्रें मिर्झापूर जिल्ह्यांतहि सांपडतात. ह्या चित्रांवरून प्राचीनकाळच्या हिंदु लोकांच्या जीवितक्रमावरहि बराच प्रकाश पडतो; हिंदुस्थानांत चित्रकलेच्या अभ्यासाला सुरुवात होण्यापूर्वी एक हजार वर्षें इतका काल वरील डोंगरांतील चित्रांचा असावा, असें दिसतें. तसेंच मध्यप्रांतांतील रामगड पर्वतावर जोगिमरा लेणीं आहेत, हीं लेणीं इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकांत तयार केलेलीं असावींत असें दिसतें. हीं लेणीं तांबड्या व काळ्या रंगांनीं रंगविलेलीं आहेत. हीं दुरून फारच बेढब दिसतात, परंतु तीं मूळचीं तशीं नसून कोणी मागाहून दुरुस्त करण्याच्या इच्छेनें त्यांत कांहीं फेरफार केल्यामुळें तशीं दिसत असावींत. या लेण्यांतील चित्रें माणसांचीं व जनावरांचीं असून त्यांनां मत्स्य, मकर आदिकरून चित्रांची नकशी केली आहे. परंतु ह्या चित्रांमधील गोष्ट अद्याप समजली नाहीं. बौद्ध कालापूर्वीं हिंदुस्थानांत मोठमोठ्या राजवाड्यांच्या भिंतींवरून खोदीव चित्रें काढण्याची वहिवाट होती, परंतु तीं चित्रें ऊन, वारा, व पाऊसपाणी लागून नाहींशीं झालेलीं आहेत. असे पुष्कळ राजवाडे जमीनदोस्त होऊन गेले आहेत, व त्यामुळें हिंदी चित्रकलेचें बरेंचसें नुकसान झालेलें आहे.

त्याचप्रमाणें या मोठमोठ्या प्रासादांच्या जमीनीवरहि चांगलें रंगकाम करण्याची चाल असे; परंतु ते प्रासाद नष्ट झाल्यामुळें जमीनीवरील चित्रकलेची भिंतीवरील चित्रकलेप्रमाणेंच स्थिति झाली.या एकंदर चित्रांवरून पाहतां यावेळीं चित्रकला पूर्णतावस्थेला पोहोंचली नव्हती असें दिसतें. उलटपक्षीं या काळाच्या शेंकडों वर्षांपूर्वी हिंदी चित्रकला पूर्णतावस्थेला

जाऊन पोहोंचली होती असा कित्येक ग्रंथांतून लेखी पुरावा सांपडतो. या विरोधावरून असें सिद्ध होतें कीं, वरील ग्रंथामध्यें हिंदी चित्रकलेची एक फाजील स्तुति तरी केली असावी, अगर तीं चित्रें पूर्वी चांगलीं असून पुढें कालांतरानें खराब झालीं असावींत.

कोणत्याहि कलेची उत्पत्ति सांगावयाची असल्यास प्राचीन लोक त्या कलेच्या उत्पत्तीचा संबंध देवाशीं अगर एखाद्या राजाशीं लावतात; त्याचप्रमाणें त्यांनीं चित्रकलेच्या उत्पत्तीवर जी गोष्ट बसविली ती अशीः—एका ब्राह्मणाचा मुलगा मरण पावला असतांना ब्रह्मदेवानें त्याची तसबीर तयार करविली व त्यांत प्राण घालून तो मुलगा जिवंत केला. या गोष्टीपासून पुढें चित्रकला निर्माण झाली. तसेंच सर्व कलाकौशल्याचा स्वामी ब्रह्मदेवाचा अवतार विश्वकर्मा हा होय, असें ते मानतात. फार पुरातन कालपासून हिंदु राजेरजवाडयांत लहान लहान चित्रें काढण्याची वहिवाट होती. अशा चित्रकेलचा ते प्रेमसंबंधांत उपयोग करीत असत; ह्याचें उत्तम उदाहरण म्हटलें म्हणजे उषा व अनिरुद्ध ह्यांच्या मधील प्रणयसंबंध होय.

संस्कृत वाङ्मयांत सौंदर्यप्रधान चित्रकलेचा उल्लेख असून भिंतीवरील चित्रकलेंत त्या वळचे चित्रकार वाकबगार होते असें म्हटलें आहे. पुढें बौद्धधर्माची स्थापना झा - वर चित्रकलेंत धार्मिक भावनांचा समावेश करण्यांत आला. तेव्हांपासून चित्रकार धार्मिक प्रसंगांचीं चित्रें काढूं लागले. असेंच एक गौतमबुद्धाचें चित्र पाहून एक राजा आपल्या परिवारासह बौद्धधर्मी झाल्यानें एक उदाहरण आहे. विनय पिटकांत पसेनाद नांवाच्या राजाच्या चित्रागारार्चे वर्णन आलें आहे. हें पिटक ख्रिस्ती शकापूर्वीचें आहे. रामायणांतहि अशाच एका चित्रागाराचें वर्णन आलें आहे. असे एक ना दोन अनेक पुरावे या कालांतलि चित्रकलेसंबंधानें देतां येतील. तिबेटांतील १७ व्या शतकांतील इतिहासकार तारानाथ यानें हिंदी लोकांचीं चित्रें फार प्राचीन कालचीं आहेत असें म्हटलें आहे. प्राचीनकालचीं भिंतीवरील चित्रें देवांनीं काढलेलीं असून पुढें देवांची ही चित्रकला यक्ष व नाग यांनीं अर्वाचीन कालापर्यंत तशीच चालू ठेविली असें त्यानें म्हटलें आहे.

चि त्र क ला आ णि शा स्त्री य वि वे च नः—वात्स्यायन यानें कामसूत्रांत षडंग अगर चित्रकलेसंबंधाच्या सहा नियमांचा उल्लेख केलेला आहे. वात्स्यायन हा तिसऱ्या शतकांत होऊन गेला; हे सहा नियम बौद्धकालापूर्वी केव्हां तरी निर्माण झाले असावेत. हे सहा नियम पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

(१) रूपभेद = चर्याज्ञान, देखाव्याचें ज्ञान. (२) प्रमाणम् = लांबी, रुंदी वगैरेंचें सत्यज्ञान. (३) भाव. (४) लावण्य योजनम् = मोहकतेची योजना. (५) सादृश्यम् = सारखेपणा. (६) वर्णिकाभंग = रंग व कुंचल्या यांचें योग्य ज्ञान.

या नियमांवरून आणि मूर्तिशिल्पाच्या अनेक नियमांवरून चित्रकलेस शास्त्र उत्पन्न करून देण्याचा प्राचीनांचा प्रयत्न होता असें दिसतें. पण चित्रकलेचें सविस्तर ज्ञान करून देणारा ग्रंथ अजून उपलब्ध झाला नाहीं, तथापि ग्रंथ नसावा असें वाटत नाहीं. उलटपक्षीं वात्स्यायनानें दिलेला नियम अन्य ग्रंथांतील किंवा परंपरेतील उतारा असावा. हिंदी चित्रकलेचे वरील सहा नियम आधारभूत स्तंभ असून त्या नियमांचें अवलंबन करण्याचा प्राचीनांचा प्रयत्न असावा असें वाटतें. ह्या नियमांवरून पहातां असें दिसतें कीं, हिंदुस्थानांत चित्रकला फार पुरातन काळीं पूर्णतावस्थेप्रत पोंचली असावी. बौद्ध लोकांनीं हे सही नियम तंतोतंत पाळले असावेत, असें अजिंठयाचीं कोरीव लेणीं पाहिल्यास कळून येईल.

चीन देशामध्येंहि चित्रकलेसंबंधानें ६ नियम असून ते, वरील हिंदी चित्रकलेच्या सहा नियमांसारखेच आहेत. यांत चिनी चित्रकलेचे नियम मागाहूनचे असल्याबद्दल पुरावा असल्यामुळें ते हिंदी चित्रकलाशास्त्रावरूनच तयार केले असावेत असें म्हणण्यास हरकत नाहीं असें पर्सी ब्राऊन समजतो.

प्राचीन हिंदी चित्रकलेच्या पूर्णतावस्थेचा आणखी एक भक्कम पुरावा म्हटला म्हणजे चित्रलक्षणासंबंधींचा होय. बौद्ध धर्माच्या देशभर प्रसारापूर्वीच चित्रकारांनीं उत्तम चित्रांचीं लक्षणेंहि ठरवून ठेवलीं होतीं. बहुतेक चित्रें देवादिकांचीं असावींत, असेंहि एक लक्षण त्यांनीं लिहून ठेवलें आहे. याशिवाय, निरनिराळ्या चित्रांच्या लांबीरुंदी वगैरे संबंधानें त्यांनीं प्रमाणेंहि ठरवून टाकलीं. मनुष्यादिकांचीं चित्रें, देव व राजेरजवाडे यांच्या चित्रांपेक्षां लहान आकाराचीं असावींत असाहि आणखी एक नियम त्यांनीं दिला आहे व हिंदुस्थानांत अशा प्रमाणांत चित्रें काढण्याची वहिवाट अद्यापहि जुन्या पद्धतीच्या चित्रकारांत चालू आहे. वरील व्यक्तिमहत्त्वभेद चित्रांना रंग देण्याच्या बाबतींतहि ठेवल्यासारखा दिसतो. या चित्रलक्षणांत चौकोनी आकाराचा चेहरा सर्वांत उत्तम गणला आहे, व तिकोनी, लांबट अगर वाटोळा कनिष्ठ प्रतीचा मानलेला आहे. त्याचप्रमाणें कोणाचे केंस कसे रंगवावेत वगैरेसंबंधींहि चित्रलक्षणांत पुष्कळ नियम आहेत. स्त्रियांचे चेहरे कसे काढावयाचे यासंबंधानें फारसे कडक नियम नाहींत;परंतु स्त्रियांचीं चित्रें प्रमाणशीर, मोहक, नाजुक व विनयशील दिसण्याजोगीं असावींत असा एक नियम आहेच. षडंग व चित्रलक्षण या दोहोंवरूनच पुढें राजांच्या कारकीर्दींत शिल्पशास्त्र उदयास आलें. हें शिल्पशास्त्र अद्याप हिंदुस्थानांत जीव धरून आहे.

बौ द्ध लो कां ची चि त्र क ला (इ. स. ५० ते ७००).– हिंदी चित्रकलेच्या इतिहासांत हा काळ अत्यंत श्रेष्ठ गणलेला आहे. या काळांत हिंदुस्थानदेश वैभवाच्या अत्युच्च शिखराला जाऊन पोंहोंचला होता व विशेषतः कलाकौशल्याच्या बाबतींत तर त्यानें आपलें वैभव अगदीं कळसास नेऊन पोंचाविलें होतें.

धार्मिक भावना व कला यांचा परस्पर निकट संबंध असल्यामुळें ज्या देशांत धर्माचें प्राबल्य होतें तेथें कलाकौशल्याचीहि वाढ होते हें इतिहासांतील उदाहरणांवरून उघड दिसतें. ह्या तत्वानुसार प्रस्तुत कालीं हिंदुस्थानदेशांत बौद्धधर्माचें प्राबल्य झाल्यामुळें शिल्प आदिकरून कलांनां चांगलें पोषण मिळालें, हें सीलोन, जावा, सयाम वगैरे देशांतून आढळून येणाऱ्या कलाकौशल्याच्या कामावरून दिसून येतें. ज्या ज्या देशांत बौद्ध धर्माची लाट जाऊन पोहोंचली, त्या त्या देशांत बौद्ध धर्मभिक्षूंनीं कलाकौशल्याचीं कामें करून ठेविलीं आहेत असें तारानाथ नांवाच्या इतिहासकारानें म्हटलें आहे. बौद्ध लोकांची पुष्कळशी चित्रकला सर्वभक्षक कालाच्या मुखीं पडल्यामुळें जी थोडी चित्रकला आजपर्यंत निभावून टिकाव धरून राहिली,ती पाहिली असतां त्यांचें उत्कृष्ट कलाकौशल्य दिसून येतें. बौद्धधर्म स्वरूपदर्शक असल्यामुळें त्याच्या प्रसारकांनीं आपलें काम लेखणीच्या ऐवजीं रंगविण्याच्या कुंचलीच्या जोरावरच केलें त्यांनीं आपले धार्मिक प्रसंग गोष्टिरूपानें लिहून न ठेवतां, तें कुंचल्यानीं भिंतीवर सुबक रीतीनें रंगवून ठेविले. अशा चित्रांमुळें त्यांचा बराचसा कार्यभाग झाला. नेपाळ व तिबेट या देशांच्या निशाणावरहि असेंच धर्मविषयक रंगकाम केलेलें असे.

पुढें चीन देशाचा बौद्ध धर्मासंबंधीं उत्तम ग्रह झाल्यावर तेथील बादशहा मिंगती यानें हिंदुस्थानांतून काश्यपमदुंग या नांवाच्या बुद्ध भिक्षूला आपल्या दरबारीं बोलावून नेलें. त्यानें जातांना आपल्याबरोबर कांहीं चित्रकलेचे नमुनेहि नेले होते. ही गोष्ट केवळ इ. स ६७ सालीं घडली. या प्रमाणें बौद्ध लोकांची चित्रकला, बौद्ध धर्माबरोबर चीनजपान वगैरे देशांत गेली, व तेथें टिकून राहिली. यामुळें चीन वगैरे बौद्धधर्मी देशांतील कोरीव लेण्यांमध्यें व चित्रांमध्यें हिंदी चित्रकलेची थोडीबहुत छटा दिसून येतेच. हिंदी चित्रकला वैभवाच्या अत्युच्च शिखराला जाऊन पोंचली, असें पाहून इतर देशांतून तरुण विद्यार्थी हिंदुस्थानांत विद्यार्जनासाठीं येऊं लागले. फा हेन, ह्युएनत्संग हे यांपैकींच होत.

ह्या सर्व प्रमाणांवरून, व हल्लीं हिंदुस्थानांत जीं कांहीं कोरीव लेणीं वगैरे स्थळें जीव धरून राहिलीं आहेत, त्यांवरून हिंदुस्थानदेश कलाकौशल्याच्या बाबतींत बौद्धकालांत किती पुढें गेला होता हें सहज कळून येईल. एकंदरीत बौद्धधर्मा प्रमाणें बौद्ध लोकांची चित्रकलाहि हिंदुस्थानांतच उगम पावली.

बौद्ध चित्रकलेचा उत्तरोत्तर कसा विकास होत गेला, हें अजिंठ्याच्या कोरीव लेण्यांवरून समजून येईल. या लेण्यांपैकीं कांहीं जुनीं असून कांहीं मागाहून तयार केलेलीं आहेत. सीलोनमधील सिगिरियाचीं लेणीं व बाघ (ग्वालेर संस्थान)चीं लेणीं, या लेण्यांचाहि वरील कामीं उपयोग होतो. अजिंठ्याच्या कोरीव लेण्यांतील चित्रें रंगवून अत्यंत सुबक केलेलीं आहेत. हीं लेणीं प्रथम १८१९ सालीं यूरोपियन लोकांच्या दृष्टीस पडलीं, तेव्हांपासून शंभर वर्षांत त्यांच्यांत कांहींहि सुधारणा सरकारनें घडवून आणली नाहीं. यामुळें हीं चित्रें दिवसेंदिवस नष्ट होत चाललीं आहेत. अलीकडे निजाम सरकारनें त्यांच्या संरक्षणासाठीं प्रयत्न केला आहे. या २९ पैकीं बहुतेक सर्व लेणीं प्रथम रंगविलेलीं असावींत असें दिसतें. पण यांपैकीं फक्त १६ लेण्यांचेच रंग १८७९ सालापर्यंत टिकाव धरून राहिले होते. दिवसेंदिवस लेण्यांची व त्यांच्या रंगांची फार खराबी होत चालली आहे. यामुळें इ. स. १९१० सालीं पहाण्यालायक अशीं फक्त सहाच लेणीं उरलीं. नंबर १, २, ९, १०, १६ व १७ हीं तीं लेणीं होत. या लेण्यांत पुष्कळ निरनिराळे प्रकार आहेत. ह्या लेण्यांचे काल खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

| | |
|---|---|
| नं. ९ नं. १० सुमारें | इ. स. १०० |
| नं. १० | ... इ. स ३५० |
| नं. १६ व १७ | ... इ. स. ५०० |
| नं. १ व २ | ... इ. स. ६२६–२८ |

ह्या एकंदर लेण्यांनां लागलेला काल सहाशें वर्षांचा आहे. नं. ९ व १० हीं लेणीं तयार झाल्यानंतर पुढें कांहीं काल ह्या कलेला उतरती कळा लागली असावी, व पुढें ती कला बुद्धपक्ष राजाच्या कारकीर्दींत पुन्हां उदयास आली असावी, असा इतिहासकारांचा तर्क आहे. ह्या चित्रांचे प्रसंग बौद्धधर्मांतील आहेत, व त्या कालांतील इतिहासावरूनहि घेतलेले आहेत. बहुतेक सर्व चित्रें जातकांतील गोष्टींवरून तयार केलेलीं आहेत. नऊ व दहा नंबरचीं लेणीं अगदीं प्रथम तयार केलेलीं आहेत. ह्या लेण्यांचें कलाकौशल्य फारच उत्कृष्ट साधलें आहे. यावरून असें सिद्ध होतें कीं, अजिंठ्याच्या लेण्यांनां सुरुवात करण्याच्या सुमारास बौद्ध लोकांची चित्रकला अगदीं पूर्णतावस्थेला जाऊन पोंहोंचली असली पाहिजे. हीं लेणीं आंध्र द्राविडी राजे राज्य करीत असतांना तयार केलीं असावींत. हे राजे जरी वैदिक धर्माभिमानी होते, तरी ते बौद्ध लोकांच्या धार्मिक बाबतींत कधीं हात घालीत नसत. इतकेंच नव्हे तर ते अशा कामीं आपली सहानुभूति दर्शवीत असत. उलटपक्षीं कांहीं लोकांचा असा तर्क आहे कीं, वैदिकधर्मीय राजांकडून धार्मिक बाबतींत छळ झाल्यामुळें बुद्ध भिक्षु अशा निर्जन स्थळीं एका बाजूला लपून बसले असावेत, व मधल्या वेळांत त्यांनीं केव्हां तरी लेणीं खोदून रंगविलीं असावीं. परंतु या लेण्यांचे विषय राजदरबारांसारख्या गोष्टींवरून तयार केलेले असल्यामुळें हा तर्क बरोबर दिसत नाहीं. उलट वैदिक राजे व बुद्ध भिक्षु यांच्यामध्यें सख्य व प्रेम असावें हाच तर्क बरोबर दिसतो.

नं. ९ व १० या लेण्यांमधील विशेष हा आहे कीं, ढळढळीत रेषा, बारीक कामाकडे दुर्लक्ष, झकाकीचे रंग हीं ज्या

चित्रपद्धतीचीं अंगें आहेत ती कठोर चित्रपद्धति यांत दिसून येते. त्यांतील देखावे सुंदर असून आकृती सुबक काढलेल्या आहेत व हाताची ठेवण बरोबर साधली आहे.

यानंतर २५० वर्षांनीं दहा नंबरचें लेणें तयार झालें, यांतील सर्व खांबांवर एकएकटें चित्र आहे. हीं चित्रें गांधार चित्रांसारखीं दिसतात. हीं चित्रें साधीं व भव्य दिसतात. यानंतर सहाव्या शतकांत नं. १६ व १७ हीं लेणीं तयार झालीं; यावेळीं देशावर वाकाटक राजांची सत्ता असावी. नंबर १६ हें लेंणें एका प्रधानाच्या मुलाच्या हुकुमावरून तयार केलें, असें त्या लेण्यावरील एका लेखांत म्हटलें आहे.

या लेण्यांत निरनिराळया आकृतींची ठेवण बरोबर साधली असून हें 'पागोडा' घाटाचें दिसतें. या लेण्यामध्यें मधून मधून इराणी चित्रकलेचीहि छटा दृष्टीस पडते. नंबर १७ च्या लेण्यांत बुद्धाच्या आयुष्यक्रमाविषयींचीं चित्रें असून या चित्रांत एक प्रकारचें इराणी वळण अगदीं स्पष्ट दिसतें. या चित्रांमधील जोम व चलाखी पाहून असें वाटतें कीं, बौद्धधर्माला उतरती कळा लागल्यामुळें बौद्धधर्मी होण्याविषयीं अत्यंत कळकळीचा उपदेश करण्यासाठीं त्यांनीं हें लेणें शेवटचा उपाय म्हणून तयार केलें असावें.

या लेण्यानंतर तयार केलेलीं लेणीं म्हटलीं म्हणजे नं. १ व २ हीं होत. हीं दुसऱ्या पुलकेशिन् राजाच्या कारकीर्दींत झालीं असावींत. या लेण्यांमधील चित्रांवरहि इराणी चित्रकलेची छाया पडल्यासारखी दिसते. नं. १ च्या लेण्यांतील चित्रकला व जावामधील चित्रकला, या दोन चित्रकलांमध्यें बरेंचसें साम्य दिसून येतें. यामुळें जावामधील चित्रकला मूळ हिंदुस्थानांतील असावी असें दिसतें. नं. २ या लेण्यांतील चित्रें पहातां हें लेंणें अगदीं सर्वांत शेवटीं तयार केलें असावें असें दिसतें. येथून पुढें बौद्ध लोकांच्या चित्रकलेला लागलेल्या उतरत्या कळेचीं चिन्हें ह्या लेण्यांमध्यें स्पष्ट दिसत आहेत. ह्या लेण्यांमध्यें तिबेट, व खोतान, या प्रांतांतील चित्रकलांचीं वळणें स्पष्ट दिसून येतात.

तसेंच तिबेटांतील निशाणावरील चित्रकलेची छायासुद्धां या लेण्यांत दिसून येते. अजिंठयाच्या लेण्यांप्रमाणेंच बौद्ध लोकांनीं सिगिरिया व ग्वालेरसंस्थानांतील बाघ ह्या दोन ठिकाणींहि लेणीं तयार करून ठेविलीं आहेत. हीं लेणीं पहिल्या कश्यपाच्या कारकीर्दींत म्हणजे इ. स ४८० च्या सुमारास केलीं असावींत. बाघ येथील लेण्यांत एक ९० चौरस फुटांचा सुंदर सभामंडप आहे. बौद्ध लोकांच्या चित्रकलेचे नमुने हजारों ठिकाणीं पसरलेले होते; पण त्यांचीं बरींच लेणीं व चित्रकला मुसुलमानांनीं उध्वस्त केली, व अजिंठा बाघ वगैरे ठिकाणचीं लेणीं लोकवस्तीपासून दूर असल्यामुळें कशीबशीं टिकाव धरून बसलीं. प्राचीन बौद्ध चित्रकलेचे तारानाथानें पुढीलप्रमाणें भाग केले आहेतः—( १ ) देवांची चित्रकला—बुद्ध जन्मानंतरच्या कांहीं शतकांतील मगध देशांतील चित्रकला. (२) यक्षांची चित्रकला—अशोक राजाच्या वेळची चित्रकला. (३) नागांची चित्रकला—नागार्जुन राजाच्या कारकीर्दींतील चित्रकला; अमरावती येथील स्तूप हा या चित्रकलेचा नमुना आहे. तिसऱ्या शतकानंतर या कलेला उतरती कळा लागली असें तारानाथानें म्हटलें आहे. यानंतर कांहीं कालानें चित्रकलेचा जीर्णोद्धार होऊन पुन्हां तीन प्रकारची चित्रकला हिंदुस्थानांत सुरू झाली. यांपैकीं एक मगध प्रांतांतील चित्रकला होय. ही चित्रकला बुद्धपक्ष राजाच्या कारकीर्दींत बिंबसार यानें स्थापन केली. बिंबसार हा इ. सनाच्या पांचव्या अगर सहाव्या शतकांत होऊन गेला असावा. राहिलेल्या दोन चित्रकला म्हटल्या म्हणजे राजपुताना, व बंगाल या प्रांतांतील होत. यांपैकीं राजपुतान्यांतील चित्रकलेचा शृंगधर हा आधारस्तंभ असून, बंगाल्यांतील चित्रकलेंत धीमन् व त्याचा मुलगा बितपलो हे दोघे चित्रकार फार वाकबगार होते राजपुतान्यांतील चित्रकला शील राजाच्या कारर्दीत उदयास आली;व बंगाल प्रांतांतील चित्रकला धर्मपाल व देवपाल या दोन राजांच्या कारकीर्दींत उदयास आली. याशिवाय काश्मीर, नेपाळ, ब्रह्मदेश, दक्षिण हिंदुस्थान, या प्रांतांतून वेगवेगळया प्रकारच्या चित्रकला अस्तित्वांत होत्या; परंतु ह्या, वरील मुख्य तीन प्रकारच्या कलांचेच फाटे होत असें तारानाथाचें मत आहे.

मध्यकालीन चित्रकला.(इ.स.७००—१६००).—हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचें प्राबल्य असतांना ज्या चित्रकलेचा जन्म झाला, ती चित्रकला पुढील कालांत तशीच वृद्धिंगत होत गेली असेल, असें कोणास वाटणें साहजिक आहे. परंतु ही चित्रकला वृद्धिंगत न होतां, हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा लोप होतांक्षणींच एकदम नष्ट झाली. कांहीं जैन पुस्तकांवरील चित्रें सोडून दिलीं असतां इ. स. ८०० पासून अकबर बादशहाच्या कारकीर्दीपर्यंत हिंदुस्थानांत एकहि चित्र तयार झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या मधील कालांत चित्रकलेची अशी दशा झाली असतांना इतर कला हळूहळू पुढें सुरू लागल्या, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. कारण हा काल एकंदरींत घोर निद्रेचा असल्यामुळें सर्वच कला नष्ट व्हाव्यात हें साहजिक आहे. असें असतांना सर्व कलांनां प्रोत्साहन मिळून एकच कला कशी मागें पडली हें समजत नाहीं.

बौद्ध धर्माच्या अस्ताबरोबर हिंदी चित्रकला जी मावळली ती हिंदुस्थानांत मोगल लोकांचा अंमल पूर्णपणें प्रस्थापित होईपर्यंत पुन्हां उदयास आली नाहीं. ह्या मध्यकालांत हिंदुस्थानांत राजकीय बाबतींत धामधूम व उलटापालट चालली असतांना चित्रकलेसारख्या कामाकडे कोणाचें लक्षच गेलें नसावें असें दिसतें. चित्रकला ही बौद्ध धर्माचा प्राण असल्यामुळें बौद्ध धर्माबरोबर ती आठव्या शतकांत नष्ट व्हावी, यांत कांहीं नवल नाहीं.

व नंतर इतर कला एकामागून एक पुढें सरकूं लागल्या. याचें कारण असें कीं वैदिक धर्माचे लोक घडीव कामें व इतर कारागिरी यांमध्यें वाकबगार असल्यामुळें त्यांच्या उदयाबरोबर त्यांच्या कलाहि उदय पावूं लागल्या असाव्यात. घारापुरी, वेरूळ वगैरे ठिकाणच्या छऱ्या वैदिक लोकांच्या कारागिरीची चांगलीच साक्ष पटवितात. या मधल्या काळांत हिंदी कलासंबंधानें जी विलक्षण स्थिति झाली, त्या प्रकारची स्थिति होण्यास याशिवाय आणखीहि कारणें आहेत. कदाचित ह्या काळांतहि इतर काळाप्रमाणें चांगली चित्रकला निर्माण झाली असेल. परंतु ती एक मुसुलमानांनीं उध्वस्त केली असेल, अगर पाऊस पाणी लागल्यामुळें नष्ट झाली असेल.या संबंधांत निश्चित असें कांहींहि लिहितां येत नाहीं बौद्ध लोकांची चित्रकला हिंदुस्थानांत लोप पावल्यावर खोतान व तिबेट या दोन प्रांतांत गेली असावी असा तज्ज्ञांचा तर्क आहे.

मो ग ल लो कां ची चि त्र क ला ( इ. स. १५५० ते १८००).—मोंगल लोकांची चित्रकला अकबर बादशहाच्या कारकीर्दीत उदयास येऊन शोकी जहांगीर बादशहाच्या कारकीर्दींत ती अगदीं कळसास जाऊन पोहोंचली. मग पुढें शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीत तिला उतरती कळा लागून अवरंगझेबाच्या कारकीर्दीत तिचा अगदीं नायनाट झाला. ही चित्रकला फारच थोडा काल प्रचारांत होती.

ही चित्रकला प्रथम समरकंद व हिरात येथें निर्माण झाली. ही मध्य आशियांतील कलेची शाखा होती आणि या कलेस इंडो-पर्शिअन किंवा इंडो-तैमुरी अशीं नांवें आहेत. तैमुरलंग हा रानटी पशू नसून चित्रकलेचा भोक्ता होता असें अलीकडे वाटूं लागलें आहे. खुरासांनचा सुलतान हुसेन याच्या दरबारीं बिहझद या नांवाचा एक मोठा चित्रकार होता, त्याची चित्रकला बाबर बादशहाला फार आवडत असे. पुढें याच बाबर बादशहाचा नातू अकबर, याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतील मोंगल चित्रकलेचा उदय झाला. मोगल बादशहांच्या स्वभावांतील विशेष हा आहे कीं, ते कलाकौशल्यासारख्या कामांनां प्रोत्साहन देण्याच्या कामीं फार तत्पर असत. अवरंगझेब बादशहा मात्र या नियमाला अपवाद होता. बाबर बादशहा बिहझदच्या चित्रांचा मोठा चहाता होता, अकबर बादशहानें तर निरनिराळ्या कारागिरांनां व उद्यमशील पुरुषांनां आपल्या दरबारीं ठेवून घेतलें होतें. फर्रुख कलमक, अबदूल समद शिराझी, ताब्रिजचा मिरसय्यद अली हे मोंगल कारागीर होत. जहांगीर बादशहाच्या दरबारींहि कांहीं समरकंदहून आणविलेले चित्रकार होते. मोंगल लोक हे ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत परकी होते, त्याप्रमाणें त्यांची चित्रकलाहि परकीय होती. तरी पण अकबर बादशहानें कलाकौशल्याच्या बाबतींत आपपर भाव न ठेवतां आपल्या दरबारीं बसवन, दसवंत, केसुदास या हिंदी चित्रकारांनां ठेवून घेतलें होतें.

प्रथम प्रथम ही चित्रकला राजवाड्याच्या बाहेर बिलकूल पडत नसे; चित्रकार दरबारचे सेवक असल्यामुळें ते फक्त बादशहांच्या परिवारांतील मंडळींचींच चित्रें काढीत असत. परंतु कालांतरानें दरबारची चित्रकला फैलावत जाऊन पुढें इतर लोकांनांहि आपल्या तसबिरी काढवून घेतां येऊं लागल्या. मोंगल लोकांच्या चित्रकलेमध्यें वस्तुस्थितीचें निदर्शन आणि सादृश्य हे दोन धर्म बरोबर पाळले आहेत. मोंगल लोकांचीं चित्रें फार लहान असत.

जहांगीर बादशहाला चित्रकलेचा फार शोक असल्यामुळें त्याच्या कारकीर्दींत चित्रकलेला चांगलें प्रोत्साहन मिळालें. त्यानें चित्रकारांकडून मनुष्यांच्या तसबिरींशिवाय, निरनिराळ्या वनस्पतींची, व नवीन आढळणाऱ्या फुलांचींहि चित्रें काढवून ठेविलीं आहेत. यांपैकीं कांहीं चित्रें अद्याप अस्तित्वांत आहेत.

या बादशहाच्या कारकीर्दींत यूरोपियन लोकांचा दिल्लीच्या दरबारापर्यंत प्रवेश झाल्यामुळें त्यांनीं विलायतेहून आणविलेलीं ख्रिस्ती धर्मासंबंधाचीं व यूरोपियन स्त्रीपुरुषांचीं चित्रें येथील लोकांनां दिसलीं व तीं पाहून मोंगल चित्रकार त्यांची नक्कल करूं लागले. याप्रमाणें जहांगीरच्या कारकीर्दींत चित्रकलेचा उत्कर्ष होऊं लागला.परंतु जहांगीरच्या मागून शहाजहान हा तख्तनशीन झाल्यावर तिच्या ऱ्हासा सुरवात झाली. शहाजहानच्या कारकीर्दीतील चित्रकार चित्रांच्या सुबकतेपेक्षां रंगाच्या चकाकीकडेच विशेष लक्ष पुरवूं लागले. तसेंच शहाजहानच्या मनाचा कल चित्रकलेपेक्षां मोठमोठ्या हवेल्या बांधणें, वगैरे कारागिरीच्या कामांकडे असल्यामुळें चित्रकला मागें पडून ताजमहालसारखीं कारागिरीचीं कामें एकामागून एक उठूं लागलीं.

या बादशहाच्या कारकिर्दींत चित्रकला अजिबात बंद पडली असें नाहीं. या काळांतहि चित्रकार पूर्वीप्रमाणें चित्रें तयार करीत, परंतु तीं हलक्या दर्जाचीं वठत असत. मोंगल लोकांच्या चित्रकलेपैकीं दिल्लीकलम नांवाचा चित्रकलेचा प्रकार शहाजहानच्या कारकीर्दींतच सुरू झाला.

पुढें अवरंगजेब बादशहाच्या कारकिर्दींत तर या कलेला मोठाच धक्का बसला. नंतर कांहीं मोंगल चित्रकारांनीं पाश्चात्त्य चित्रकलेच्या धर्तीवर चित्रें काढून रंगविण्याचा उपक्रम केला. त्यामुळें मोंगल लोकांची चित्रकला अजिबात नष्ट होऊन नवीनच भेडगुजरी चित्रकला निर्माण झाली. अशा चित्रकलेचे नमुने कोठें कोठें पहावयास मिळतात.

र ज पू त लो कां ची चि त्र क ला ( इ. स. १५५० ते १९०० ).—या सदराखालीं राजपुताना व पंजाब या दोन प्रांतांतील चित्रकला येतात. ह्या दोन्ही चित्रकला हिंदू लोकांच्याच आहेत. बौद्धधर्माच्या अस्ताबरोबर नाहींशी झालेली चित्रकला राजपुतान्यांत कशीबशी जीव धरून



सिलोनमधील ५ व्या शतकांतील फ्रेस्को चित्रकला.

चित्रकला.



कृष्णचरित्रांतील एक प्रसंग.
( कांग्रा कलम, १८ वें शतक ).

होती व पुढें रजपूत लोकांचा अमल जवळ जवळ सर्व उत्तर हिंदुस्थानावर बसल्यावर तिनें हळू हळू वर डोकें काढावयास सुरुवात केली. जयपूर, जोधपूर, उदेपूर, वगैरे ठिकाणच्या राण्यांच्या प्रासादांत, अजिंठ्याच्या लेण्यांतील उत्कृष्ट चित्रकला अद्याप पहावयास सांपडते. राजपुतान्यांत जयपूर संस्थान हें चित्रकलेचें आगर आहे. पंजाबांत कांग्रा वगैरे जीं डोंगराळ संस्थानें आहेत, त्या संस्थानांतील चित्रकला राजपुतान्यांतील चित्रकलेचीच एक प्रमुख शाखा आहे. या चित्रकलेला अलीकडे पहाडी चित्रकला असें नांव पडलें आहे. नुरपूर, बसोहली चंब, आणि जम्मू या ठिकाणीं कांग्राकलम चालत असे. कांग्राकलमाच्या चित्रावर सतराव्या शतकानंतरच्या तारखा व वर्षे असल्यामुळें सतराव्या शतकापूर्वी हें कलम अस्तित्वांत नसावें असें दिसतें.

भारतीय चित्रकलेच्या इतिहासांत जे निरनिराळे चित्रसंप्रदाय होते त्यांचे एकमेकांवर परिणाम कसे होत गेले याविषयीं 'आस्टआझीआटिशे त्साइटश्रिफट'मध्यें रजपूत चित्रकलेचा अभ्यास म्हणून दोन लेख प्रसिद्ध केले आहेत. दुसऱ्या लेखांत पहिल्या लेखांतील स्वतःचींच कांहीं मतें खोडलीं आहेत व हा लेख (प्रसिद्धिकाल १९२४) फार महत्वाचा आहे. त्या लेखांत अजंठाकालापासून आजपर्यंतच्या चित्रकलेचें एक कोष्टक दिलें आहे. तें भारतीय चित्रकलेचा इतिहास फारच थोडक्यांत देणारें आणि फारच मार्मिक आहे. तें येथें अवतरितों.

**अजिंठा चित्रकला.**



या लेखामध्यें व त्याच्या पूर्वीच्या लेखामध्यें अनेक काळचीं आणि अनेक ठिकाणचीं चित्रें जमा करून प्रत्येक कालांत पोषाख आणि भूषणें यांविषयीं फेरबदल कसे होत गेले आणि त्याच्या साह्यानें चित्रांचा काल कसा काढतां येतो याविषयीं फार बारीक विवेचन केलें आहे.त्या विवेचनाकडे लक्ष ओढण्या पलीकडे आज आम्ही जाऊं इच्छीत नाहीं. [ पोषाख पहा ].

या लेखांत मोंगल कालांत मोंगल आणि रजपूत चित्र-संप्रदायांत कसकसे फेरफार होत गेले त्याचें थोडक्यांत टांचण गट्झ येणेंप्रमाणें देतो.

| काल | मोंगल चित्र | रजपूत चित्र |
| --- | --- | --- |
| अकबर | नाक बसकें, कपाळ उभें | नाक बसकें, कपाळ उभें |
| जहांगीर | स्वाभाविकतेचा विकास, चित्रकला यूरोपीय धर्तीवर जातें. | नाक अणकुचीदार होऊं लागतें, कपाळ चापट होतें. |
| न | ,, | ,, |
| | ,, | नाक अणकुचीदार, कपाळ चापट अगर मोंगली तऱ्हेवर. |
| | रजपुती किंवा पाश्चात्य वळण | ,, ,, |

चित्रकलेवरील या दोन लेखांच्या दरम्यान हर-गट्झ यांनीं म्यूनिकच्या ललितकलावार्षिकांत (१९२३) म्यूनिक वोलकर कुंडे म्युझियममध्यें असलेल्या संग्रहावर एक मार्मिक आणि चित्रदृष्टसमाजवर्णनपर निबंध लिहिला. तो लेख ऐतिहासिक चित्रकलेच्या दृष्टीनें महत्वाचा आहे.त्यांत शेवटला दिल्लीचा बादशहा दुसरा बहादुरशहा व त्याची बायको झिनातमहाल, नानासाहेब, झांशीची राणी, नानासाहेबांचे बंधु, रावसाहेब व अयोध्येची मालीबेगम, कुरशियाबेगम इत्यादि चित्रें दिलीं आहेत.

मोंगली चित्रकला आणि रजपूत चित्रकला यांचा मिलाफ अनेकांत झालेला दिसतो. अर्न्स्ट कुह्नेल ( बर्लिन म्युझियमचें नियतकालिक डिसेंबर १९२२ ) यानीं मीरचांद ( गंगारामचा पुत्र ) नांवाचा एक चित्रकार उल्लेखिला आहे. तो दोन्ही चित्रकलांचा प्रतिनिधि म्हणतां येईल. त्यानें कांहीं ऐतिहासिक पुरुषांचीं चित्रें काढलीं; त्यांत पानिपतच्या युद्धप्रसंगामुळें मराठयांस परिचित झालेला सुजा उद्दौला, पुण्यास शिवाजीचा मार मिळविणारा शाहिस्तेखान, हुमायून बादशहा व शहाअलम ( १७५९–१८०६ ) इत्यादि ऐतिहासिक चित्रें त्यानें काढलीं आहेत. त्यांत कांहीं समकालीनांचीं असून प्रत्यक्षावलोकनानें काढलीं असतील यांत शंका नाहीं.

**औ दि त्य चि त्र क ला आ णि स त्ता व न सा ल.**—हरमान गट्झच्या मतानें (म्युनिक वार्षिक १९२३ ) सत्तावन सालच्या बंडाचा चित्रकलेवर फार परिणाम झाला.ज्यांनींया स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेतला त्यांचीं चित्रें वारंवार रंगविलीं गेलीं., आणि चित्रकारांच्या मनोभावना उद्दीपित करावयास कारण मिळाल्यामुळें ह्या व्यक्ती चित्रविषय झाल्या. पण त्यांच्या चित्रांमध्यें चित्रकारांवर झालेला यूरोपीय संस्कार दिसून येतो.

यावरून भारतीय हिंदुचित्रकलेविषयीं असें विधान करतां येईल कीं परकीय कलेचा आपल्या कलेला स्पर्श होऊं न देणें मोठी महत्वाची गोष्ट आहे; असें भारतीय चित्रकार समजत नसत. भारतीय चित्रकलेवर इराणी, त्याप्रमाणें यूरोपीय संस्कार जरी झाले तरी त्या चित्रकलेचें भारतीयत्व नष्ट होणें कधींच शक्य झालें नाहीं.

कांग्राकलमाची चित्रकला कटोच राजा संसारचंद हा गादीवर असतांना, म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत वैभवाच्या शिखराला जाऊन पोहोंचली होती. या चित्रकलेचे नाजुक रेषा, चकचकीत रंग व नकशीकाम हे मुख्य गुण आहेत. प्रतिभेच्या बाबतींत ही कला गौण आहे. ही राजेरजवाड्यांचीं चित्रें काढी व पुराणांतील गोष्टींचा चित्ररूपानें उठाव करून देत असे. ह्या चित्रकलेला रणजितसिंग राजानें चांगला आश्रय दिला होता. १९ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं या चित्रकलेला उतरती कळा लागली. तरी पण ती १९०५ ( ता. ४ एप्रिल ) पर्यंत कसाबसा टिकाव धरून होती. ता. ४ एप्रिल १९०५ रोजीं,कांग्रा शहर ‘ धर्मशाला ’ नांवाच्या भूकंपाच्या धक्क्यानें रसातळाला गेल्यामुळें ही चित्रकला कायमची नष्ट झाली.

**औ दि त्य चि त्र क ले चा सं को च का ल.**- इ. स. १७६० सालीं मोंगल लोकांच्या चित्रकलेचा लोप झाल्याबरोबर हिंदी चित्रकलाहि नष्ट होण्याच्या मार्गास लागली; पुढें दिल्ली व लखनौ या ठिकाणीं जे कांहीं थोडे चित्रकार होते ते आपल्या पूर्वजांच्या चित्रांची बरोबर नक्कल करण्याचा प्रयत्न करूं लागले पण त्याचा हा उद्देशहि सिद्धीस गेला नाहीं. कारण यावेळीं त्यांच्या मनावर यूरोपीय चित्रकलेचाहि पगडा बसूं लागला होता, व म्हणून त्यांना कोणत्याहि कलेंत प्राविण्य मिळवितां येईना. राजपुतानी चित्रकलेचीहि तीच स्थिति झाली. पंजाबमधील पहाडी चित्रकला मात्र एकोणिसाव्या शतकापर्यंत मोठ्या जोमानें वाढतच होती. तेथें कापूरसिंग या नांवाचा एक मोठा चित्रकार एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला. बंगालमध्येंहि या सुमारास हिंदी व यूरोपियन या चित्रकलांच्या मदतीनें लहान लहान चित्रें काढावयास सुरुवात झाली. या चित्रकारांच्या कलेंत जॉन आणि कंपनीच्या चित्रांतील हिंदी व यूरोपियन चित्रकलांचा मिलाफ चांगला दिसून येऊं लागला. अवरंगझेबाच्या जुलुमाला कंटाळलेल्या मोंगल चित्रकारांनीं दक्षिणेमध्यें जाऊन चित्रकलेला ऊर्जितकाळ आणण्याचा प्रयत्न केला; ह्या चित्र-

कलेला दक्षिणीकलम असें नांव आहे. ह्या कलमांत इराणी व तैमुरी ह्या दोन्ही चित्रकलांची छटा दृष्टीस पडते.

या चित्रकारांचे वंशज अद्याप हैद्राबाद व नेकोंडा येथें हयात आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकाला कांहीं ठिकाणीं चित्रकला निर्माण झाली होती. त्या चित्रकलेचे जय, परोजय व विजय हे तीन मुख्य चित्रकार होत. या कलेच्या दोन मुख्य शाखा म्हैसूर व तंजावर या शहरीं होत्या. म्हैसूर येथील चित्रकला कृष्णराज ओडियार याच्या कारकीर्दीत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत वैभवाच्या शिखराला जाऊन पोहोंचली होती. ही कला कृष्णराजाच्या आश्रयामुळें थोड्याच काळांत चांगल्या स्थितीला आली. त्यांनीं तंजावरी चित्रकारांप्रमाणें हस्तिदंतावर पुष्कळ चित्रें काढून ठेवलीं आहेत. त्यापैकीं कांहीं अद्याप म्हैसूरच्या राजवाड्यांत पहावयास मिळतात. ही चित्रकला इ स. १८६८ मध्यें कृष्णराजाबरोबरच नष्ट झाली.

**मराठी चित्रकला.**—रजपूत, कांग्राव्हॅली, मुसुलमान, वरेंद्र वगैरे चित्रकलेच्या ज्या भिन्न परंपरा आहेत, त्याप्रमाणें मराठी परंपरा स्वतंत्र असल्याचें कोठें आढळत नाहीं. जयपूर ( रजपूत ) अगर दिल्ली ( मुसुलमान ) इकडील चित्रकारांच्या परंपरेंत तयार झालेले कांहीं मराठी चित्रकार होते. मराठा सरदार, राजे, प्रधान वगैरे मंडळी उत्तर हिंदुस्थानांतूनच चित्रें काढवून आणीत असा दाखला सांपडतो.

शरभोजी ( सर्फोजी ) राजा गादीवर असतांना उत्तरेंतील कांहीं चित्रकारांनीं तंजावर येथें येऊन चित्रकला सुरू केली. या कलेला राजाश्रय मिळाल्यामुळें ती दिवसेंदिवस वाढीस लागून तंजावरच्या शिवाजी राजाच्या (१८३३–५५) कारकीर्दींत पूर्णतावस्थेला जाऊन पोहोंचली. यावेळीं तंजावर येथें एकंदर १८ चित्रकारकुलें होतीं. पुढील काळांतील तंजावर येथील चित्रकार जरहूच्या धर्तीवर चित्रें काढूं लागले. हे तेलांचे व पाण्याचे रंग उपयोगांत आणूं लागले. यांपैकीं पुष्कळ चित्रें पुदुकोटा येथील तंजावर सरकारच्या राजवाड्यांत अद्याप पहावयास मिळतात.

परंतु शिवाजी राजाच्या निधनामुळें तंजावरी घराण्याचा लोप झाला, व सर्व चित्रकारांची पांगापांग झाली. कांहीं चित्रकारांनीं कारागिरीचीं कामें हातीं घेतलीं. कांहीं सोनारकाम करूं लागले व कांहीं थोडे चित्रकार धार्मिक चित्रें काढून विकूं लागले. या चित्रांत कोणत्याच प्रकारचें कौशल्य दिसून येत नाहीं. फक्त तीं रंग देऊन चकचकीत मात्र केलेलीं आहेत.

पुण्याच्या दरबारानें चित्रकलेच्या बाबीकडे फारसें लक्ष्य दिल्याचें आढळून येत नाहीं. इतिहाससंग्रहांतील एक दोन पत्रांत नानानीं तिकडील चित्रकार आणण्याची खटपट चालविल्याचें दिसतें. (पु. १ अं. २) वेल्स नांवाचा एक इंग्रज चित्रकार सवाई माधवरावाच्या वेळीं गालेटच्या वशिल्यानें पुणें दरबारांत येऊन त्यानें खुद्द श्रीमंत, नाना फडणवीस, महादजी शिंदे, परशुरामभाऊ वगैरे बऱ्याच प्रख्यात माणसांच्या तसबिरी काढल्या होत्या; पुढें त्याच्या सांगण्यावरून श्रीमंतांनीं आपल्या वाड्यांत एक चित्रशाळा स्थापिली. तेथें चित्रकलेचें शिक्षण देण्यांत येत असे. त्या शाळेंतून बखतराम व गंगाराम तांबट हे दोन प्रख्यात चित्रकार निपजले. गंगारामानें वेरूळच्या लेण्यांचीं चित्रें काढून मालेट यास दिलीं होतीं. या शाळेंतून पुढें कांहीं चित्रकार निपजले व त्यांनां तत्कालीन मराठी सरदारांचा व दरबारचा आश्रय मिळे. मिरजकर पटवर्धनांच्या पदरीं एक शिवराम नांवाचा चित्रकार होता. त्यानें काढलेलीं चित्रें मिरजमळा संस्थानांत पहावयास सांपडतात. या शिवरामानें काढलेलें ( अर्थात् नक्कल केलेलें ) थोरले बाजीराव व मल्हारराव होळकर यांचें एक चित्र उत्कृष्ट आहे. वरील वस्त्रांतून आंतील अंग दिसणें, रंग फिकट न पडणें, सोनेरी रंग उडून न जाणें व अतिशय बारीक काम सफाईदार करणें वगैरे मुसुलमान व रजपूत परंपरेचें कौशल्य या महाराष्ट्रीय चित्रकारांतहि दृष्टीस पडतें. परंतु महाराष्ट्रीय चित्रकला म्हणून एकहि स्वतंत्र परंपरा दाखविता येणें ( आज तरी फारसा पुरावा नसल्यानें ) शक्य नाहीं. यथातथ्यदर्शनाचा दोष तत्कालीन सर्वच परंपरांत होता व त्याप्रमाणें तो या मराठी परंपरेंत दिसतोहि. पुण्याच्या भा. इ. सं. मंडळात, सातारचे रा. ब. पारसनीस यांच्या संग्रहांत, मुंबईचे शेट पुरुषोत्तम विश्राम मावजी याच्या संग्रहांत, आर्टस्कूलमध्यें व प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममध्यें व सातारच्या छत्रपतींच्या जलमंदिरांत आणि माचीवरील राजवाड्यांत आज सुद्धा हीं चित्रें पहावयास सांपडतात.

इंग्रजी सुरू झाल्यानंतर मात्र मराठी परंपरा निर्माण झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. यापैकीं प्रमुख म्हणजे राजा रविवर्मा होय. हे मल्याळी असतांहि यांनीं आपल्या चित्रकलेस मराठी वळण दिलें. बडोदें येथील लक्ष्मीविलास राजवाड्यांत यांचीं पुष्कळ चित्रें आहेत. यांच्यानंतर धुरंधर, माळी, फडके, मुल्लर, ओक, आजिंक्य, हळदणकर, जोगळेकर वगैरे चित्रकार झाले आहेत.

पण त्याच्या परंपरेस शुद्ध मराठी न म्हणतां पाश्चात्यानुकरणात्मक म्हणतां येईल. रविवर्म्याच्याहि कांहीं चित्रांच्या कल्पना सुचविणारीं चित्रें पाश्चात्य असत असा संशय घेण्यास जागा आहे. विशेषतः शिवाजीचें चित्र एका पाश्चात्त्य शिकारीवरून घेतल्यासारखें दिसतें.

**अर्वाचीन हिंदी चित्रकला.**—मुसुलमानी रियासतींत शहाजहान बादशहाच्या वेळीं चित्रकला उच्च दर्जाला पोहोंचलेली दिसते. पण पुढें अवरंगझेबाच्या कारकीर्दींतच तिला एकदम अवनति आली, व त्याला कारक खुद्द अवरंगझेबाची वैरागी वृत्ति व युद्धांची धामधूम हें झालें. कांहीं लहानसहान हिंदी राजकर्त्यांचा चित्रकारांनां आश्रय असे. पण

हे सर्व चित्रकार गतानुगतिक बनले, इतकेंच नव्हे तर चित्रांचा चेहरा एक चित्रकार, पार्श्वभाग दुसरा चित्रकार, अशा प्रकारें एकच चित्र अनेकजण मिळून पुरें करीत. यामुळे अर्थातच चित्रकलेला फार हिनावस्था आली.

अशा वेळीं ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीमार्फत चित्रकलेंत पाश्चात्य वळण शिरलें. कंपनी सरकारच्या नोकरांनीं कलकत्ता, मुंबई व मद्रास येथें ज्या सरकारी खासगी इमारती बांधवल्या त्यांच्या भिंतींवर चित्रकाम स्वतःच्या पाश्चात्य अभिरुचीनुरूप इंग्रज चित्रकारांकडून करवून घेण्याचा क्रम पाडला. आणि उलटपक्षीं हिंदी चित्रकलेचें सरकारी रीत्या संशोधन मुळींच केलें नाहीं. १८५१ मध्यें सार्वराष्ट्रीय प्रदर्शन भरलें त्या वेळीं हिंदी चित्रकलेकडे लक्ष गेलें, आणि १८५९ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिशसाम्राज्य सरकारकडे हिंदुस्थानचा कारभार गेल्यावर सरकारी रीत्या चित्रकलेला उत्तेजन मिळूं लागलें. मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर वगैरे ठिकाणीं स्कूल्स ऑफ आर्ट स्थापन झालीं. या शाळांत चित्रकलेबरोबर शिल्पकला, मूर्तिकला, वगैरेंनांहि उत्तेजन देण्याचें धोरण आहे. चित्रकलेच्या बाबतींत कलकत्ता व मुंबई या दोन ठिकाणच्या शाळेंत अगदीं परस्पर विरुद्ध धोरण स्वीकारलें गेलें. कलकत्त्यास हॅवेल नामक प्रिन्सिपालनें पाश्चात्य चित्रपद्धति बहिष्कृत करून सर्वस्वी जुन्या मोंगली व रजपूत चित्रकलेचा अभ्यास विद्यार्थ्यांकडून करविला. हॅवेलला अवनिंद्रनाथ टागोर हा उच्च प्रतिभासंपन्न व कळकळीचा शिष्य मिळाला. टागोर व त्याचे इतर सहाध्यायी यांनीं मिळून अस्सल हिंदी वळणाची चित्रकलापद्धति रूढ करून इतकी उत्कृष्ट चित्रें काढलीं आहेत कीं त्यांची यूरोपियन तज्ज्ञांनीं तारीफ केली आहे. तथापि या बंगाली चित्रकारांमध्यें जुनें मोंगली व रजपुती वळण कायम राहिलें नसून अलीकडे त्यांत जपानी पद्धतीची छटा दिसूं लागली आहे. शिवाय या बंगाली चित्रांनां अखिल हिंदी समाजाकडून भरपूर प्रोत्साहन मिळालें नाहीं.

मुंबई आर्ट स्कूलच्या सेसिल बर्न्स या प्रिन्सिपालनें अगदीं विरुद्ध धोरण स्वीकारलें. पाश्चात्य पद्धतीचीं चित्रें व चित्रकलेंतील पाश्चात्यांची शास्त्रीय प्रगति यांचा परिणाम बहुजनसमाज व हिंदी चित्रकार यांच्या मनावर होणें अपरिहार्य असल्यामुळें जुन्या मोंगली व रजपुती वळणाच्या चित्रांची एकतर्फी आवड हिंदुस्थानांत फैलावणें अशक्य आहे असें या प्रिन्सिपालचें मत पडलें. त्यामुळें चित्रकलेची सर्वसामान्य शास्त्रीय तत्त्वें विद्यार्थ्यांनां प्रथम शिकवून नंतर विद्यार्थ्याला त्याच्या वैय्यक्तिक अभिरुचीप्रमाणें पाश्चात्य किंवा भारतीय वळणाचीं चित्रें काढण्याची पूर्ण मुभा द्यावी असें धोरण मि. बर्न्सनें स्वीकारलें. यांपैकीं कोणतें धोरण आज फायदेशीर होय तें आज नक्की सांगतां येत नाहीं.

## विशिष्ट चित्रसंप्रदाय

**लेण्यांतील चित्रकला**—अजिंठ्याच्या कोरीव लेण्यांतील चित्रकलेचा परिणाम बहुतेक सर्व पौरस्त्य देशांच्या चित्रकलांवर झाल्यासारखा दिसतो. या लेण्यांमध्यें भव्य आकृति, उदात्त कल्पना व साधेपणा हे मुख्य गुण दिसून येतात. एकंदर चित्रांची संख्या फारच मोठी आहे. यांपैकीं मुख्य मुख्य व्यक्तींचीं चित्रें इजिप्तमधील राजांच्या चित्रांप्रमाणें मोठीं व भव्य आहेत बाकीच्या सर्व माणसांचीं चित्रें मनुष्याच्यापेक्षां लहान आकाराचीं आहेत. मुख्य व्यक्तींचीं चित्रें मधोमध काढलीं असून त्यांच्या दृष्टीची ठेवण अगदीं बरोबर साधली आहे. हीं लेणीं पहाणाराच्या मनावर एक प्रकारचा उदात्त परिणाम होतो. पौरस्त्य चित्रकला रेखामय आहे व हें रेखाचातुर्य सगळ्यांत अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रांत फार उत्तम प्रकारें दिसून येतें. नुसत्या बाह्य रेषेच्या जोरावर चित्र सुबक करण्याची कला एक बौद्ध चित्रकारांसच माहित. पहिल्या लेण्यांत सर्वस्वाचा त्याग करण्यापूर्वीचें असें एक सिद्धार्थाचें चित्र आहे. परत्र मोक्षसाधन व्हावें म्हणून इह सौख्याचा त्याग करावा की काय, असा गूढ प्रश्न उत्पन्न झाल्यामुळें एखादा मनुष्य जसा कुचंबळ्यांत पडावा तसा सिद्धार्थाचा चेहरा ह्या चित्रांत दाखविला आहे. हें चित्र कांहीं थोड्या रेषांचें झालें असून, त्या चित्रांतील व्यक्तीविषयीं त्यांत पुष्कळ ज्ञान प्राप्त होण्याची तयारी केली आहे. ह्या चित्रांनां दिलेले हिरवे, निळे व काळे रंग आतां, म्हणजे हीं लेणीं तयार होऊन सुमारें १३।१४ शें वर्षें होऊन गेलीं असतांनाहि इतके सुबक दिसतात, तर हे रंग लेणीं नवीं असतांना किती उठून दिसले असतील, याची तर कल्पनाच करवत नाहीं. सिद्धार्थाचें वरील संसारत्यागाचें चित्र जसें सुबक आहे तसेंच महाहंस जातकावरून काढलेलें सम्यग् राजाचें चित्र रमणीय आहे. बौद्धचित्रकलेंतील विशेष गोष्ट म्हटली म्हणजे रेखाकौशल्याप्रमाणें हातांची व बोटांची ठेवण त्यांनां उत्तम साधली आहे. हिंदुधर्मतंत्रांत हातांच्या निरनिराळ्या मुद्रा करावयाच्या असल्यामुळें हिंदी चित्रकारांनां हातांची ठेवण अप्रतीम साधली आहे. बौद्ध लोकांच्या लेण्यांतून ह्या हस्तमुद्रा इतक्या सुबक रीतीनें दाखविल्या आहेत कीं, लेण्यांतील चित्रें एकमेकांशीं करपल्लवी भाषेत बोलत असावींत, असा पहाणाऱ्याला भास होतो.

**लघु चित्रें.**—शिकार, लढाई, वेडे, प्राणिशास्त्र, ऐतिहासिक गोष्टी, दंतकथा, दरबार व क्वचित्काळीं धार्मिक गोष्टी हे सर्व मुसुलमानी चित्रकलेचे विषय होत. ह्या चित्रकारांनीं प्रथम प्रथम जीं चित्रें काढलीं, तीं परदेशी वळणावर गेलीं आहेत. हें वळण म्हटलें म्हणजे तैमूरी चित्रकलेपैकीं इराणी कलम होय. ह्या चित्रकलेचें रंगकाम फार बहारीचें असतें. बारिक व छोटी बाह्य रेषा, वैडूर्य रंग, सूक्ष्म गोष्टी, सोनेरी वस्त्रांचें नकसकाम वगैरे गुण या कलेंत आहेत. परंतु कांहीं दिवसांनीं हें इराणी वळण नाहींसें झालें व मोगल लोकांनां हिंदी वारें लागूं लागलें, तेव्हांपासून त्यांची चित्रकला अजीबात बदलून गेली. यामुळें व रजपूत चित्रकलांच्या मधली चित्रकला जी मोगल

चित्रकला ती निर्माण झाली. बारीक व सुबक बाह्य रेषा हा मोगल चित्रकलेचा मुख्य गुण आहे. याशिवाय त्यांनीं सृष्टिसौंदर्यविषयक कांहीं चित्रें काढलीं आहेत, व त्यावरून त्यांची सुंदर सृष्टीविषयींची कल्पना दिसून येते. जहांगीर बादशहानें एका चित्रकाराकडून तुर्की कोंबड्याचें चित्र काढवून घेतलें होतें, तें अद्याप हिंदी पदार्थसंग्रहालयात पहावयास मिळतें. जहांगीर बादशहानें याशिवाय पुष्कळ इतर प्राण्यांचीं चित्रें काढवून घेतलीं होतीं. परंतु मोंगल चित्रकारांचा अगदीं आवडता विषय म्हटला म्हणजे शिकारीसंबंधींचा होय. मोंगल चित्रकलेचीं पुष्कळ निरनिराळीं कलमें असून त्यांत दिल्ली कलम हें सर्वांत उत्कृष्ट आहे. दक्षिणी कलमांत चित्रें रंगविण्याच्या कामीं बेसुमार सोन्याचा वर्ख खर्च झाल्यामुळें तीं उत्तरेकडील चित्रांपेक्षां अधिक उठावदार दिसतात.

व्यक्तिचित्रें व विषयचित्रें—मनुष्यांच्या व देवांच्या तसबिरी काढण्याच्या कामीं जरी मोगल चित्रकारांचा हातखंडा होता, तरी ही कला हिंदुस्थानात फार प्राचीन कालापासून चालत आहे. जेव्हां अजातशत्रूनें आपला गुरु बुद्ध याच्याजवळ त्याची तसबीर मागितली तेव्हां बुद्धानें उन्हांत एका वस्त्रावर उभा राहून आपली सावली चित्रकाराकडून रंगवून तें वस्त्र अजातशत्रूला दिलें. ही कला पुढें मोंगल चित्रकारांनीं नांवारूपास आणिली. तिबेटमध्यें ग्यान्तसे येथील एका प्रख्यात चित्रकारानें आपलें चित्र काढलें होतें. हा जरी लेण्यांच्या कालानंतर बऱ्याच वर्षांनीं होऊन गेला, तरी त्याची चित्रकला व लेण्यांची चित्रकला या दोन चित्रकलांमध्यें इतकें विलक्षण साम्य दिसून येतें कीं, तें चित्र काढणाऱ्या मनुष्यानेंच अजिंठा लेण्यांतील चित्रें काढलीं असावींत असा भास होतो. मोगल चित्रकारांशिवाय भगवती व हुनर हे दोन हिंदू चित्रकारहि या कलेंत प्रवीण झाले होते. यांपैकीं भगवती हा १६ व्या शतकांतील असून तो मुसुलमानी वळणावर चित्रें काढीत असे. दुसरा जो हुनर, तो चित्रकारकुलांतील असून रजपुती थाटाचीं चित्रें काढीत असे. मोंगल चित्रकारांना चांगला राजाश्रय मिळाल्यामुळें त्यांनां कलाकौशल्याच्या बाबतींत प्राविण्य मिळवितां येऊं लागलें. फ्रांकॉइस बर्नीयर नांवाच्या फ्रेंच वैद्यानें ह्या मोंगल कलेचे गुणदोष दाखविले आहेत. यांपैकीं बहुतेक सर्व तसबिरी बादशहांच्याच आहेत. कांहीं कांहीं तसबिरींतून एकाच ठिकाणीं तीन तीन बादशहांचीं चित्रें काढलेलीं आहेत. बादशहाच्या तोंडाभोंवती प्रभा काढण्याची चाल मोगल चित्रकारांत होती त्यांचे कपडे इतके झिरझिरीत दाखविले आहेत कीं चित्रांत सुद्धां त्यांच्या त्या कपड्यांतून त्यांचें अंग स्पष्ट दिसतें. मोंगल चित्रकार पृष्ठभूमीला कोणताहि रंग देत नसत. मुख्य आकृति ते काळ्या रंगानें रंगवीत असत. कांहीं थोडीं चित्रें मात्र काळ्या पृष्ठभूमीवर पांढऱ्या अगर इतर फिकट रंगांनीं रंगवून काढलेलीं आहेत. दुसऱ्या प्रतीच्या चित्रांनां फार कौशल्य लागतें. मोंगल चित्रकार रंगकाम फार चकचकीत करीत. ह्याशिवाय त्यांनां तोंडवळा फार चांगला साधत असे. चित्राचा तोंडवळा बरोबर साधला म्हणजे त्या व्यक्तीचा स्वभाव चटकन कळतो. यामुळें राजे रजवाड्यांचे स्वभाव पुढील पिढ्यांस कळावेत म्हणून इतिहासापेक्षां चित्रकलेचाच विशेष उपयोग होतो. एखाद्या इतिहासकाराला राजाच्या कृत्यांवर टीका करतां येत नाहीं. पण चित्रकार हें काम आपल्या चित्रांच्या जोरावर करूं शकतो. मोंगल चित्रकार एका बाजूनें ( म्हणजे एकडोळीं ) चित्रें काढीत असत. मोंगल लोकांच्या तसबिरींत सादृश्य, मोहक रंगकाम व उठावदार पृष्ठभूमीची रचना वगैरे गुण दिसून येतात. बौद्ध व रजपूत चित्रकारांप्रमाणें मोंगल चित्रकारांसहि चित्राच्या हातांची ठेवण फार चांगली साधली होती. किंबहुना ह्या बाबतींत हिंदी चित्रकारांचा हात कोणताच इतर चित्रकार धरूं शकणार नाहीं, असें म्हटल्यास चालेल.

मोंगली.—मोंगल चित्रकार बादशहा,त्यांच्या राण्या,सरदार, खिजमतगार, दरबारी अमीरउमराव, मोतद्दार वगैरेंचीं चित्रें काढीत असत. त्यांनीं राजाचे, राण्याचे, खिजमतगारांचे वगैरे निरनिराळ्या माणसांचे चेहरे कसे काढावयाचे हें एकदां ठरवून ठेवलें होतें. त्यांनीं ठरविलेले हेच चेहरे अद्याप चालत आहेत. त्यामुळें चंगिझखान, इमाम अल्ली, अलेग्झँडर दि ग्रेट वगैरे सर्वांचे चेहरे सारखेच काढलेले आढळत. पण पुढें चित्रकलेला उतरती कळा लागतांच बहुतेक सर्व चित्रकार नवीन चित्रें काढावयाचें टाकून देऊन हरप्रयत्नांनीं जुन्या तसबिरांच्या नकला करूं लागले.

मोगल चित्रकारांच्या तसबिरींवर बादशहांचें व सरदारांचें नांव लिहिलेलें आढळतें. परंतु पुष्कळ ठिकाणीं अवरंगजेबाच्या चित्रावर जहांगीरचें नांव व जहांगीरच्या चित्रावर अकबरचें नांव असा चमत्कार दिसून येतो. यावरून असें अनुमान निघतें कीं, हीं नांवें मूळ चित्रकारांनीं घातलीं नसून मागून कोणा तरी अनभिज्ञ मनुष्यानें घातलीं असावींत.

प्रथम प्रथम उत्तर हिंदुस्थानांतील सर्व चित्रकलेचा 'मोंगल चित्रकला' या नांवाखालीं समावेश केला जात असे. परंतु मोंगल चित्रकला व रजपूत चित्रकला, या दोन्ही चित्रकलां अगदीं भिन्न आहेत असें पुढें लोकांनां कळूं लागलें. रजपूत चित्रकला ही बौद्ध चित्रकलेपासून निर्माण झाल्यामुळें ती पूर्वापार कालापासून आलेल्या हिंदी चित्रकलेंत मोडते. मोगल चित्रकला ही केवळ दरबारी असून वस्तुस्थितीचें निदर्शन करते. उलट रजपूत चित्रकला ही सार्वत्रिक असून गूढार्थवादक अशी आहे. अजिंठ्याच्या कोरिव लेण्यांप्रमाणें रजपूत चित्रकारांच्या चित्रांतहि धर्माभिमान दिसून येतो.

रजपुती.—रजपूत चित्रकार हिंदु लोकांच्या आयुष्यक्रमासंबंधीं चित्रें काढीत असत. यामुळें रजपूत चित्रकला ही लोकांची

असून ती हिंदी राष्ट्रीय चित्रकला आहे. रजपूत चित्रकारांनीं गोरगरिबांचीं, शेतकऱ्यांचीं, म्हणजे सामान्य जनतेचीहि चित्रें काढलीं आहेत. त्यांच्या चित्रसंग्रहांत कोष्टी, सोनार वगैरे सर्व धंद्यांच्या माणसांचीं चित्रें पहावयास मिळतात. कांग्राकलमांत, प्रवासाचीं अनेक चित्रें आहेत. त्याचप्रमाणें द्विप्रकाश चित्रें काढण्याच्या बाबतींतहि त्यांचा हातखंडा होता. स्वच्छ चंद्रप्रकाश पडला असून तशांत एक शेकुटी पेटलेली आहे, अशा प्रकारचे पुष्कळ देखावे त्यांनीं रंगविले आहेत. रजपूत चित्रकारांची चित्राला रंग देण्याची कला तर अप्रतीमच आहे. ते प्रथम कागदाला अगर लांकडाला सोन्याचा वर्ख लावीत व मग त्याच्यावर चित्रें काढून रंगवीत असत. बौद्ध चित्रकलेप्रमाणें रजपूत चित्रकला ही रेखामय आहे. दुरून पाहिलें असतां बौद्धचित्रकला व रजपूतचित्रकला ह्या दोन चित्रकला अगदीं भिन्न दिसतात. परंतु बारकाईनें पाहिलें असतां ह्या दोन्ही कला जवळ जवळ एकच आहेत, व एकीचीं चित्रें मोठीं व दुसरीचीं लहान आहेत इतकाच भेद यांच्यांत दिसून येतो.

स्पष्ट व जाड बाह्य रेषा ही दोन्ही कलांत दिसून येते. परंतु दोहींचे वेगळे धर्म असल्यामुळें रजपूत चित्रकलेंत गौतमबुद्धाच्या ऐवजीं शिवपार्वतीआदिकरून पुराणांतर्गत देवतांचीं चित्रें काढलीं आहेत. वास्तविक पहातां दोन्ही कलांतील अंतर्गत तत्वें सारखींच आहेत, आणि धर्मआदिकरून जो भेद आहे तो त्यांच्या बाह्य स्वरूपांत आहे. रजपूत लोकांच्या चित्रांच्या पाठीवर चित्रांचें वर्णन लिहिलेलें असतें. मोंगल चित्रकारांच्या चित्रांवरूनहि असे लेख सांपडतात. परंतु हा लेखक व स्वतः चित्रकार ह्या दोन व्यक्ती असाव्यात असें मोगल चित्रांवरून स्पष्ट दिसतें, तसें रजपूत चित्रकलेचें नाहीं. रजपूत लोकांचीं बहुतेक चित्रें विष्णूसंबंधाचीं आहेत. विष्णूचा अवतार जो कृष्ण त्याच्या पुराणांत जेवढ्या लीला आहेत त्या सर्व लीलांसंबंधींचीं चित्रें रजपूत चित्रकारांनीं काढलीं आहेत. बौद्ध चित्रकार ज्याप्रमाणें गौतमबुद्धाच्या आयुष्यांतील निरनिराळ्या प्रसंगांच्या आधारें चित्रें काढीत असत,त्याप्रमाणें रजपूत चित्रकार श्रीकृष्णाच्या आयुष्यांतील निरनिराळ्या मानवी कृत्यांचीं चित्रें काढीत असत. रजपूत व मोगल चित्रकारांनीं प्राण्यांचीं जीं चित्रें काढलीं आहेत, त्या चित्रामध्येंहि भेद दिसून येतो. रजपूत चित्रकार या सर्व प्राण्यांचीं चित्रें ह्यांनां मनुष्याचे उपकारकर्ते व सहाय्यक मानून मोठ्या आदरानें काढीत असत. उलटपक्षीं मोंगल चित्रकार जंगली जनावरांच्या शिकारीसंबंधाचींच चित्रें काढीत असत. यावरून ह्या दोन धर्मांतील लोकांच्या मनुष्येतर प्राण्यासंबंधाच्या भावना दिसून येतात.

कांहीं रजपूत चित्रकारांनीं शिवासंबंधींचीं चांगलीं चित्रें काढलीं आहेत, त्यांपैकीं सध्यां गायत्री ऊर्फ शिवनर्तन हें चित्र उपलब्ध आहे. हें आठव्या शतकाच्या शेवटीं कांग्रा कलमांत तयार झालें असून त्याचें रंगकाम फार सुबक वठलें आहे. मोंगल चित्रकारांच्या धर्तीवर रजपूत चित्रकारांनींहि तसबिरी काढावयास प्रारंभ केला होता. यांपैकीं कांग्रा कलम व जयपूर कलम या दोन कलमांत कांहीं तसबिरी आहेत. जयपूर कलमाच्या चित्रांत बारिक व स्पष्ट बाह्य रेषा दिसून येते. कांग्रा कलमाच्या तसबिरी अधिक चकचकीत असून त्यांत प्रकाश व छाया हीं चांगलीं साधलीं आहेत. कांग्रा कलमानें सर्वांत महत्वाची व आश्चर्यकारक अशी जर कोणची गोष्ट केली असेल, तर ती "रागमाला"नांवाचीं चित्रें काढलीं हीं होय. संगीत व चित्र या दोन कलांमध्यें जो निकट संबंध आहे तो या " रागमाले " वरून दिसून येतो. या रागमाला नांवाच्या चित्रसंग्रहांत एकंदर ४२ रागांनां अनुरूप अशीं ४२ चित्रें आहेत. तीं चित्रें पाहून हिंदुस्थानांत एखादा लहान पोरहि कोणत्या रागाचें कोणतें चित्र आहे हें सांगूं शकतो असें कित्येक म्हणतात. पण आमची त्यासंबंधानें खात्री नाहीं. शिवाय कांग्रा कलमांत प्रणयासंबंधाचींहि पुष्कळ चित्रें आहेत.

चित्रकलेचें साहित्य-चित्रकलेचा अगदीं सगळ्यांत पहिला माहित झालेला रंग म्हटला म्हणजे काव हा होय. ज्यावेळीं थोडी छाया दाखवावयाची असेल त्यावेळीं चित्रकार कावेचा रंग थोडासा काळा करून लावीत असत.पूर्वी रंग वाटण्यासाठीं रंगपाट्या वगैरे होत्या हें वर आलेंच आहे. कुंचल्याहि असाव्यात असें दिसतें,परंतु बाह्यरेषा काढावयाच्या झाल्यास चित्रकार काडीचा उपयोग करीत असत. पूर्वी रंग चर्बीत भिजवित असावेत असें दिसतें. रामगढच्या जोगिमरा लेण्यांच्या वेळीं काळा पांढरा व तांबडा इतके रंग आढळतात. तांबडा रंग कावेचा होत असे, पांढरा चुन्याचा होत असे व काळा रंग ते हिरड्यांचा तयार करीत. उपनिषदांतील एका उल्लेखावरून पहातां पूर्वी केसांच्या कुंचल्या नसून चित्रकार केसांच्या ऐवजीं तंतूंचा उपयोग करीत असावेत असें दिसतें. भिंती खडबडीत असल्यास ते प्रथम त्यांनां गिलावा करीत असत. या गिलाव्यांत ते शेण, माती व कोंडा वगैरे जिन्नस घालीत असत. अशा गिलाव्यावर पांढरा रंग लावून त्यावर अजिंठ्याच्या लेण्यांतील चित्रें काढलीं आहेत.

लेण्यांतील चित्रांनां रंग कसा देत असत यासंबंधीं वाद आहे. परंतु ते बहुधा फ्रेस्को किंवा बंधक पद्धतीनें रंग देत असें दिसतें. प्रथम चुन्याचे दोन तीन हात देऊन मग ते वर चित्रें रंगवीत; हीं चित्रेंहि बरींच वर्षें टिकत असत. प्रथम भिंतीला पांढरा रंग देऊन ते त्यावर चित्रांच्या तांबड्या बाह्य रेषा काढीत व त्या सर्व काढून झाल्यावर कांहीं चुका असल्यास त्या दुरुस्त करून मग काळ्या रंगांत बरोबर बाह्य रेषा काढीत. ह्याप्रमाणें नुसत्या बाह्य रेषा तयार झाल्यावर ते त्यांवर निरनिराळे रंग देत असत. कांहीं कांहीं चित्रकार रंग देण्यापूर्वी आपल्या बाह्य रेषा दिसूं नयेत म्हणून एक फिकट रंगाचा हात देत असत.

रजपूत चित्रकला व बौद्ध चित्रकला ह्यांच्यांत निकट संबंध असल्यामुळें, त्यांच्या चित्रें काढण्याच्या व रंगविण्याच्या प्रकारांतहि एक प्रकारचें साम्य दिसून येतें. रजपूत चित्रकार भिंतींऐवजीं लहान लहान कागदांवर चित्रें काढीत असत. रजपूत चित्रकलेपैकीं कांहीं कांहीं चित्रें अपुरीं राहिलीं असून त्यांच्या नुसत्या पृष्ठभूमीच तयार केल्या आहेत. व यावरून असें अनुमान निघतें कीं हीं चित्रें एकाच्या हातचीं नसून तीं दोन चित्रकार काढीत असत. पृष्ठभूमी रंगविण्याचें काम हलक्या चित्रकाराच्या अंगावर टाकून मनुष्यांचीं चित्रें मुख्य चित्रकार स्वतः काढीत असावेत असें दिसतें. मध्यकालांत हिंदुस्थानची कागदाबद्दल फार ख्याति होती हा कागद व एकंदर रंगसाहित्य तयार करण्याच्या कामीं मुसलमान चित्रकारांनीं फार मेहेनत घेतली आहे. हारिरी, रेशमी दौलताबादी, हिंदी, शिआलकोटी, मुघाली, करडी वगैरे प्रकारचे कागद त्यावेळीं हिंदुस्थानांत तयार होत असे. त्यांचा कागद तयार करण्याचा कच्चा माल म्हटला म्हणजे बांबू, ताग, व कापूस हा होय. या तिहींपासून तीन प्रकारचा कागद तयार होत असे.

पा श्चा त्य चि त्र क ले चा हिं दु स्था नां त प्र सा र.— भारतीय चित्रकलेला पाश्चात्य वळण कसें लागत गेलें याचें विवेचन मागें आलेंच आहे. आतां हिंदुस्थानांत मागें होऊन गेलेल्या यूरोपीय चित्रकारांकडे थोडेंसें लक्ष देऊं.

अठराव्या शतकाच्या शेवटीं व मागील शतकाच्या प्रारंभीं अनेक विख्यात ब्रिटिश कारागिरांनां हिंदुस्थान हें त्यांची कुंचली व वर्णपत्र उपयोगण्याच्या कामीं एक नवें व उत्पन्नाचें क्षेत्र असल्याचें आढळून आलें. या कारागिरांपैकीं प्रमुख म्हणजे विल्यम होडजेस्, जोहान झोफनी, राबर्ट हॉर्न, ओझियस हंफ्रे, जॉर्ज चिनेरी आणि जॉर्ज बीची होत. हंफ्रे व झोफनी सर्वांत प्रसिद्ध होते. झोफनी हा जर्मन व इटालियन यांच्या मिश्रणापासून झालेला म्हणजे संकर वर्णाचा होता.

इकडे येणारा पहिला व कांहींसा प्रसिद्ध असा ब्रिटिश चित्रकार म्हणजे टिलीकेटल होय. हा गाडी-रंगाऱ्याचा मुलगा १७२१ सालीं कलकत्त्यास उतरला व तेथें त्यानें आपला धंदा सुरू केला. तो लवकरच उदयास येऊन मोठया संपत्तीचा मालक झाला. सर एलिजा इंपे, वॉरन हेस्टिंग्ज, अर्काटचा नबाब यांसारख्यांचीं अनेक चित्रें रंगवून तो लंडनला परत गेला. इंग्लंडमध्यें असतांना 'शहाअलम अलाहाबाद येथें ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याची पहाणी करीत आहे' असें मोठें चित्र त्यानें तयार करून लंडनच्या कलाभिज्ञांपुढें ठेवलें; पण त्यांनीं या कारागिराचें अभिनंदन न केल्यामुळें तो पुनः हिंदुस्थानास येण्यास निघाला पण वाटेंतच मत्युवश झाला. पूर्ववयांत विल्यम होडजेस् लंडनमध्यें निरोप्याचें काम करीत असे. पुढें तो रॉयल ॲकॅडेमिशियन झाला. वॉरन हेस्टिंग्सच्या बोलावण्यावरून १७७८ त तो हिंदुस्थानांत आला. या देशांत तो सात वर्षे राहिला. त्याचें लक्ष बहुधा जंगल-प्रदेशाचे देखावे काढण्याकडे असे. त्यानें ताजमहालाचेंहि एक सुंदर चित्र रेखाटलें आहे. १७८० मध्यें कलकत्ता गॅझेटांत आगस्टस क्लेव्हेलंडच्या मालकीचीं होडजेस्नें काढलेलीं मौल्यवान चित्रें विक्रीकरितां ठेवल्याची जाहिरात होती. या प्रादेशिक चित्रांनीं आपणांस प्रवासास जाण्याचा मोह पाडिला असें हंबोल्टनें "कॉसमॉस" मध्यें नमूद केलें आहे. पुष्कळ वर्षे होड्जेस रॉयल ॲकॅडेमीमध्यें होता. पुढें १७८७ त तो पूर्णपणें पदवीधर झाला.

जोहान झोफनी देखील वॉरन हेस्टिंग्जच्या कृपाछत्राखालीं होता. लंडनमध्यें मोठी कीर्ति, सर जोशुआ रेनॉल्ड्स्कडून चांगली मान्यता आणि तिसऱ्या जॉर्ज राजाचा आश्रय हीं झोफनीनें १७८० मध्यें बंगालला निघाल्यावेळीं मिळविलीं होतीं. प्रथम तो इकडे येताक्षणीं कलकत्त्यास राहिला; नंतर लखनौ व आग्रा या ठिकाणीं गेला. हिंदुस्थानांत रंगविलेल्या त्याच्या सुप्रसिद्ध चित्रांपैकीं कांहीं म्हणजे, "लखनौतील कर्नेल मॉरडांटची कोंबडझुंज" "ईस्टइंडीजमधील वाघाची शिकार" आणि "हैदरबेगची वकिलात", याखेरीज वॉरन हेस्टिंग्स, सर एलिजा इंपे आणि अनेक हिंदी संस्थानिकांचीं चित्रें हीं होत.

कलकत्ता येथें असतांना सेंट जॉन चर्चकरितां अंतिम नक्तभोजनाचा एक वेदिफलक झोफनीनें रंगविला होता. त्या चित्रांतील पात्रांचीं कामें पोलिस मॅजिस्ट्रेट, मोठमोठे शहरचे रहिवाशी, रेसिडेंट ( अयोध्येचा ) वगैरेंनीं केलीं होतीं असें म्हणतात. एक लिलाववाला जुडासबद्दल बसविला होता; पण आपण कोणाचें काम करीत आहों हें त्याला समजूं नये म्हणून, तुमचें काम जॉन प्रेषिताचें आहे असें झोफनीनें त्याला प्रथम सांगून ठेविलें होतें असें म्हणतात. बऱ्याच खर्चानें या विख्यात चित्रकाराकडून हें चित्र तयार करवून घेतल्यावर आपणाजवळ चित्रकाराला द्यावयास पैसे नाहींत असें जेव्हां देवस्थानकमिटीला आढळून आलें तेव्हां पैशाऐवजीं तिनें एक सन्मानपत्र झोफनीला धाडून दिलें.

झोफनीनें ज्या वर्षी हिंदुस्थान सोडलें त्याच वर्षी दुसरा जवळ जवळ झोफनीच्याच तोडीचा चित्रकार इकडे आला. रॉबर्ट हॉर्न हा सैन्यांतील एका शस्त्रवैद्याचा मुलगा होता. तो प्रथम मद्रासला राहिला. तेथें त्याला लॉर्ड कार्नवालीसची तसबीर काढण्याची कामगिरी मिळाली. नंतर तो अयोध्येच्या नबाबाचा ऐतिहासिक चित्रकार या हुद्यावर लखनौला गेला. पण तेथें नबाबाची मर्जी सांभाळणें त्याला फार कठिण गेलें. कारण एखादें चित्र तयार झाल्यावर नबाबाचें त्यांतील एखाद्याशीं जर भांडण झालें तर तो ती व्यक्ति काढून तिच्या जागीं दुसरी काढण्याविषयीं आपल्या चित्रकाराला आज्ञा करी. यामुळें हॉर्ननें आपल्या जागेचा राजीनामा देऊन कानपूरला प्रयाण केलें. तेथें तो १८३० सालीं वारला. त्याच्या सुप्रसिद्ध कामांपैकीं कांहीं पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

" अयोध्येचा नबाब खंडणीचा स्वीकार करीत आहे " " टिपूचे मुलगे ओलीस दिले जात आहेत " आणि " बंगलूरच्या लढाईंत मोअर हाऊसचा मृत्यु " हीं तीनहि चित्रें इंग्लंडला पाठविण्यांत येऊन, त्यांतील पहिलें हॅम्पटन कोर्टमध्यें लाविलें गेलें.

चित्रें रंगविणारा या दृष्टीनें पहातां राबर्ट हॉमनें बरेंच यश मिळविलें असें म्हटलें पाहिजे. कलकत्त्यास मोठमोठ्या नागरिकांनीं त्याच्यापासून काम घेतलें. त्याच्या गिऱ्हाइकांत कमांडर–इन–चीफ मार्किस ऑफ वेलेस्ले आणि म्हैसूरचा गव्हर्नर ड्यूक ऑफ वेलिंग्टन होते. बिशप हेबरनें तर चारदां आपलें चित्र काढविलें. शिवाय नबाब सादत अल्ली त्याला नियमानें दरसाल ५००० रुपये देत असे.

हिंदुस्थानांत येणारा अतिशय विख्यात् इंग्लिश कलाभिज्ञ म्हणजे ओझियास हम्फ्रे हा लघुप्रतिमाकार होय. रोमनेच्या नांवावर पडलेलीं कांहीं चित्रें खरोखर हंफ्रेंन काढलेलीं होतीं ही गोष्ट आतां जगजाहीर आहे. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्याला इकडे तीन वर्षांच्यावर राहवलें नाहीं. १७८८ त तो इंग्लंडला परत गेला व १७९१ मध्यें ॲकेडेमिशियन झाला. त्याचीं चित्रें हिंदी संस्थानिकांनां फार आवडत. कलकत्ता, काशी, लखनौ आणि मुर्शिदाबाद या ठिकाणीं त्यानें अनेक संस्थानिकांच्या रंगित तसबिरा काढल्या. गेल्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थानांत येणारा पहिला चित्रकार जॉर्ज चिनेरी होय. लॉर्ड मॅकार्टनेबरोबर चीनला जाऊन येऊन तो कलकत्त्यास राहिला. तेथें त्याचा चांगला जम बसला. लेडी न्युजेंटनें त्याच्या कारागिरीची फार स्तुति केलेली आहे. ज्या मोठमोठ्या लोकांचीं त्यानें कामें केलीं त्यांपैकीं लॉर्ड मिंटो, जनरल सर आयर कूट, सर हेन्री रसेल आणि सर फ्रॅन्सिस मॅकनॉटन हे होत. यांतील पहिलें चित्र कौन्सिल चेंबरमध्यें, दुसरें गव्हर्मेंट हाऊसमध्यें व शेवटलीं दोन हायकोर्टांत टांगण्यांत आलीं.

एका काळीं लोकांनां चिनेरीचें इतकें वेड लागलें होतें कीं तो मागेल तितका पैसा त्याला मिळे. आपल्या कुंचलीवर दरसाल तो ६०,००० रुपये मिळवी असें सांगतात. यापेक्षां त्यानें जास्त कमाई केली असती. पण त्याच्या स्वभावांत असा दोष उत्पन्न झाला कीं त्याला हातीं घेतलेल्या कामाचा कंटाळा येऊन तो तें अर्धवटच सोडून देऊं लागला. १८२५ च्या सुमारास जेव्हां त्यानें हिंदुस्थान सोडलें तेव्हां अशा पुष्कळ अर्धवट चित्रांचा लिलांव करण्यांत आला.

बंडाच्या पूर्वीच्या दिवसांत हिंदुस्थानांत आपलें चित्रकर्ममंदिर काढणारा शेवटचा ब्रिटिश चित्रकार जॉर्ज बीची होय. हा सर विल्यम बीची याचा मुलगा. बापानें चित्रकलेंत याला इतकें निष्णात केलें होतें कीं केवळ सतराव्या वर्षी रॉयल ॲकेडेमीमध्यें त्याचीं चित्रें ठेवण्यांत आलीं. हिंदुस्थानांत येऊन १८३० मध्यें तो कलकत्त्यास राहिला. पुढें तेथून लखनौला गेला. तेथें अयोध्येच्या नबाबाचा दरबारी चित्रकार व घरचा कारभारी बनला. त्यानें एका हिंदी स्त्रीशीं विवाह केला. तिचें " हिंद " नांवाचें चित्र जेव्हां १८३२ त ॲकॅडॅमीमध्यें दाखविण्यांत आलें, तेव्हां त्या ठिकाणीं बरीच खळबळ उडाली. बीची पंचवीस वर्षें हिंदुस्थानांत राहिला. व बंडाचा उद्भव होण्याच्या जरा पूर्वी येथेंच वारला. ( हिंदुस्थानरिव्ह्यू १९२२ ).

जा ग ति क चि त्र क ला हिं दु स्था नः—स्थानिक किंवा जातिविशिष्ट चित्रकला नाहींशी होऊन मोठ्या प्रदेशास सामान्य अशी चित्रकला उत्पन्न होते ही गोष्ट आपणांस प्राचीन हिंदुस्थानाच्या इतिहासांतच स्पष्टपणें दिसत आहे. अजंठा व सिलोन या दूरच्या ठिकाणची चित्रकला एकच व्हावी ही अशा विकासाचीच परिणति होती. पण भारतीय व जागतिक कला यांच्यांत सादृश्य उत्पन्न व्हावयाचें होतें तें बौद्ध संप्रदायाच्या अन्यत्र प्रसारानें आणि पुढें मुसुलमानी चित्रसंप्रदायामुळें होत गेलें व पुढें जहांगीरच्या काळापासून पाश्चात्त्य वळण येऊं लागलें. मूर्तिशिल्प किंवा रंगीत चित्रें यांपैकीं हिंदुस्थानांतील कोणतीहि कला परकीय संस्कार झाल्याशिवाय राहिली नाहीं. भारतीय चित्रकला जगांतील इतर राष्ट्रांप्रमाणेंच इतरांचा परिणाम पावणारी व इतरांवर परिणाम करणारी होती भारतीय कलेचा डच चित्राचार्य रेम्ब्रांट यावर परिणाम झाला होता असें कुहनेल म्हणतो. परकीय संस्कार आपल्या कलेवर होऊ देणें हीं जर कमीपणाची गोष्ट असेल तर त्या बरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कलेंतील " राष्ट्रीयत्वा "च्या यूरोपीयन वाखाणत्यांच्या स्तुतीनें वेडे होऊन आपली स्वाभाविक आवड निवड व स्वतःचा विचार यांना दूर सारून " जुन्या " " राष्ट्रीय " कलेचीच पुनरावृत्ति करीत बसणें हें तर अधिक लज्जास्पद बौद्धिक दास्य होय. अर्वाचीन चित्रकारांनीं लोकांचीं मनें चुकीचीं आहेत, आपण जुन्या वळणाचें चित्र काढूं तेंच त्यांनां आवडलें पाहिजे अशा कल्पनांनीं बिघडूं न देतां अर्वाचीन जनतेचें मनोरंजन करण्यासाठीं आपला अवतार होय ही गोष्ट प्राधान्यानें लक्षांत ठेवली पाहिजे. चित्र जर जनतेस हालवावयासाठीं आहे, तर चित्रकला ही ज्या एकंदर सामाजिक क्रियांचें विकासांग आहे, त्या समाजामध्येंच क्रांति होत असतां चित्रकलेनें नष्ट समाजाचीं ध्येयें उरावर घेऊन प्रचलित जनतेस शिव्या देऊन जनतेस हालवावयाचें ध्येय कसें साध्य होईल. चित्रकलेचें प्रादेशिक किंवा राष्ट्रीय स्वरूप जाऊन तिला जागतिक स्वरूप मिळण्याचा काल आतां जवळ येऊं पहात आहे. "राष्ट्रीय" चित्रकला वगैरे नांवें देऊन चित्रकलेच्या अर्वाचीन विकासाकडे दुर्लक्ष करीत जाणें हाच भारतीय चित्रकलेचा विकासक्रम ठेवणें अयोग्य आहे. राष्ट्रीय चित्रकला म्हणजे काय ? राष्ट्रांमध्यें ज्या गोष्टींत व्यक्तींचें भावनाप्राधान्य



एक इंडोइराणी चित्र ( १६ वे शतक )

चित्रकला.



" पृथ्विदेवता रामाला उटी देत आहे. "
चित्रकार— वेंकटप्पा ( अर्वाचीन चित्रकला )

आढळून येईल त्या गोष्टी चित्रविषय करणें होय. या तत्वाखेरीज पूर्वगत चित्रकलेच्या दुसऱ्या कोणत्याहि अंगास महत्त्व देणें उपयोगी नाहीं. पूर्वींचें रंगांचें साहित्य होतें त्यापेक्षां आज साहित्य वाढलें आहे. स्वाभाविक रंगांचें पृथक्करण अधिक सूक्ष्म झालें आहे. मुख्य रंगांतील अनेक पोटछटा अवगत झाल्या आहेत. यथादर्शनचित्रलेखन हें देखील वाढलें आहे. या सर्व गोष्टी पाश्चात्य चित्रकलेंत देखील नव्यानेंच शिरत आहेत. ग्रीकांत यथादर्शन पूर्वी कोठें होतें? मानवी भावना आणि चित्रकला व यांच्या परस्परसंबंधाचें ज्ञान हीं जशीं वृद्धिंगत होतील तसतशी भारतीय चित्रकला जगांतील इतर राष्ट्रांशीं सदृश अशी झाल्याशिवाय रहाणार नाहीं. भारतीय मनोभावनांस उद्दीपित करणारे विषय प्रसंगीं निराळे असतील. पण मनोभावनांतच निराळेपणा खास नाहीं. चित्रकौशल्य जरी अर्वाचीन पाश्चात्त्य चित्राचार्यांपासून पैदा केलें तरी चित्रकार हिंदुस्थानांतील विषय घेऊनच चित्रें काढणार. त्यामुळें चित्रकलेचें राष्ट्रीयत्व नष्ट होणार नाहीं. भाषेची अडचण असल्यामुळें भारतीय कवीस जगमान्यता त्याच्या ग्रंथाचें भाषांतर झाल्याशिवाय येणार नाहीं, पण ती अडचण चित्रकारास नाहीं. आपल्या चित्रास जगमान्यता मिळविण्याचें ध्येय भारतीयांनीं कां घालवावें? सध्यांच्या बंगाली चित्रांचें तीं चित्रें आवडावयास मुद्दाम शिकविलेले लोक सोडून दिले तर, इतर भोक्ते देशांतच सांपडणार नाहींत. पाश्चात्त्य लोकांनां कलकत्ती चित्रकलेचें महत्त्व जुन्या चित्रसंप्रदायाचें हृद्यानें लांबविलेलें शेंपूट यापलीकडे नाहीं आणि यामुळें बंगालच्या चित्रकलेस 'पाश्चात्त्य प्रशंसेची गुलाम चित्रकला' असें नांव दिलें तर तें रास्त होईल. पाश्चात्त्य प्रशंसेचें देखील चांगलें पृथक्करण आपण केलें नाहीं. कित्येक पाश्चात्त्य चित्रकारांच्या दृष्टीनें यूरोपियन ठाकठिकीची चित्रकला अस्ताव्यस्त हिंदी आयुष्यक्रमाशीं विसंगत वाटते व त्यामुळें ते कलकत्ती संप्रदायाची प्रशंसा करतात. कलकत्ती चित्रकलेंत देश्य परंपराच टेविली आहे असें नसून तींत परकीय अंश बराच आहे. अवनींद्र टागोरच्या अनेक चित्रांत जपानी चित्रकलेचें वेडें अनुकरण दिसून येतें. भारतीय कलेविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्या पाश्चात्यांच्या प्रशंसेनें भावी चित्रकलाविकासरूपी वृक्षावर हें वाढलेलें केवळ बांडगूळ आहे. मुंबईच्या चित्रकारांवर या कलेनें फारसा परिणाम घडविला नाहीं. भारतीय कला आतां जागतिक कलेचा भारतीय विकास या नव्या स्वरूपांत जागृत होत आहे आणि हिचें फल अधिकाधिक दृष्ट होऊं लागेल अशी आशा बाळगण्याजोगी आज वाढ झाली आहे.

[ सं द र्भ ग्रं थ—पाश्चात्य चित्रकलाः—पाश्चात्य चित्रकलेचें सामान्य विवेचन करणारा ग्रंथ म्हणजे वोल्टमन आणि वोअरमन—हिस्टरी ऑफ पेंटिंग ( इंग्रजी भाषांतर, लंडन १८८० ); पण यांत इ. स. १६ व्या शतकापुढील इतिहास नाहीं. इटलींतील चित्रकलासंप्रदाय क्रौ आणि कॅव्हॅलकॅसले यांच्या 'हिस्टरी ऑफ पेंटिंग इन् इटली' ( २ आवृत्ति, लंडन १९०२ ) यांत विवेचिला आहे. याच ग्रंथकारद्वयाचा 'दि अर्ली फ्लेमिश पेंटर्स' नांवाचा फ्लेमिश चित्रकलेवरील ग्रंथ आहे. हावर्ड–'दि डच स्कूल ऑफ पेंटिंग' या इंग्रजींत भाषांतरिलेल्या ग्रंथांत डच चित्रकलेची माहिती आहे. जर्मन चित्रकलेवर जनिट्रस्चेकचा जर्मन ग्रंथ आहे. लेडी डिल्केनें 'फ्रेंच पेंटर्स ऑफ दि एटीन्थ सेंचरी' यांत १८ व्या शतकांतील फ्रेंच चित्रकारांचा समाचार घेतला आहे. या कलेवर थॉम्सनचेंहि 'दि बार्बिझोन स्कूल' हें पुस्तक प्रसिद्ध आहे. इंग्लिश चित्रकलेचें पर्यालोचन रेडग्रेव्हनें 'ए सेंचरी ऑफ पेंटर्स ऑफ दि इंग्लिश स्कूल' ( लंडन, १८९० ) या ग्रंथात केलें आहे. मॅके–'दि स्कॉटिश स्कूल ऑफ पेंटिंग', यात स्काटलंडची चित्रकला सांपडेल. अमेरिकन चित्रकलेचें सामान्य विवेचन, डाईक–हिस्टरी ऑफ अमेरिकन आर्ट, ( न्यूयॉर्क, १९०३ ) व इशॅम–ए हिस्टरी ऑफ अमेरिकन पेंटिंग ( न्यूयार्क, १९०५ ) या ग्रंथांत केलेलें आढळेल. अर्वाचिन संप्रदायांबद्दल टीपा व संदर्भग्रंथ यांसह सविस्तर माहिती रिचर्ड मुथरच्या 'दि हिस्टरी ऑफ मॉडर्न पेंटिंग' मध्यें दिली आहे. चिनी व जपानी चित्रकलेवरील संदर्भग्रंथ त्या त्या जागीं दिलेले आहेत.

भारतीय चित्रकलाः—डॉ. ए के. कुमारस्वामी—आर्ट्स ॲंड क्रॅफ्ट्स ऑफ इंडिया ॲंड सीलोन; ग्रिफिथ्स-'पेंटिंग्ज ऑफ अजिंठा'; हॅव्हेल—इंडियन स्कल्प्टर—ॲंड पेंटिंग; मार्टिन—मिनिएचर पेंटिंग ॲंड पेंटर्स ऑफ पर्शिया, इंडिया ॲंड टर्की; व्हिन्सेंट स्मिथ—ए हिस्ट्री ऑफ फाइन आर्ट इन् इंडिया ॲंड सीलोन; पर्सी ब्राऊन—इंडियन पेंटिंग; लेडी हेरिंगहॅम—अजिंठा फ्रेस्कोज.

हिंदी चित्रांचे संग्रह—हिंदुस्थानः—इंडियन म्यूझियम, कलकत्ता; व्हिक्टोरिया मेमोरियल कलेक्शन, कलकत्ता; खुदाबक्ष लायब्ररी, बंकीपूर; सेंट्रल म्यूझियम, लाहोर; म्यूझियम ऑफ आर्केऑलजी, दिल्ली; भुरीसिंह म्यूझियम, चंबा, पंजाब; स्कूल ऑफ आर्ट्स, मद्रास. याशिवाय खासगी संग्रह बरद्वान, बनारस, रामपूर वगैरे संस्थानिकांचे आहेत. इंग्लंडः–ब्रिटिश म्यूझियम व व्हिक्टोरिया आलबर्ट म्यूझियम व इंडिया ऑफिस, लंडन. यूरोपः—बिब्लिओथेक नॅशनेल, पॅरिस; एथ्नोग्रॅफिकल म्यूझियम, बर्लिन; बिब्लिओथेक डी पेट्रोग्रॅड, व म्यूझी एसिॲटिक डी पेट्रोग्रॅड. अमेरिकाः—मेट्रॉपॉलिटन म्यूझियम, न्यूयॉर्क.].

**चित्रकाव्य**—चित्रालंकाराचें लक्षण काव्यप्रकाशांत, "तच्चित्रं यत्र वर्णानां खड्गाद्याकृति हेतुता" म्हणजे जेथें वर्णरचनेच्या योगानें खड्गादिक पदार्थांच्या आकृती साधल्या असतात तेथें चित्रनामक अलंकार होतो, असें केलें आहे. त्यांत जरी आकृति साधण्याचा उल्लेख आहे तरी

अलंकारशास्त्राच्या कित्येक ग्रंथांत ह्या अलंकाराचे जे पोटभेद केले आहेत त्यांत स्वरचित्र, गतिचित्र, कूटें, अंतर्लापिका, बहिर्लापिका, प्रहेलिका, इत्यादिक अनेक प्रकारच्या शब्दप्रधान काव्यांचा समावेश केलेला दिसतो. त्यामुळें ह्या अलंकाराचा इतका मोठा विस्तार झाला आहे कीं त्यास चित्रकाव्य ही एक स्वतंत्र संज्ञा प्राप्त होऊन तो एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय झाला, आणि संस्कृत भाषेंत चित्रकाव्यावर अनेक स्वतंत्र ग्रंथहि लिहिले गेले.

चित्रकाव्याची प्रवृत्ति कधींपासून झाली ह्याविषयीं विचार करितां असें दिसतें कीं, संस्कृत भाषेंतील आद्यकवि जो वाल्मिकी, त्यानें रामायण महाकाव्यांत कांहीं नियमित अध्यायांच्या आरंभीच्या अक्षरांत गायत्रिमंत्राचा बंध साधला आहे. (?) व्यासानें अग्निपुराणांत चित्रकाव्याचें चांगलें विस्तारपूर्वक वर्णन केलें आहे. श्रीमत्भागवतांतील गोपीगीतांत एक गुणबंध साधला आहे. बौद्धकालांत वाग्भट यानें आपल्या वाग्भटालंकार या ग्रंथांत चित्रकाव्यांचीं लक्षणें दिलीं आहेत. त्याचप्रमाणें दंडीच्या काव्यादर्शांत व भोजकृत सरस्वती कंठाभरणांतहि अनेक प्रकारें चित्रकाव्याचें वर्णन केलें आहे. दंडीनें दशकुमारचरितांत ७ वा उछ्वास निरोष्ठ साधला आहे. भारवीच्या किरातार्जुनीय काव्यांत, तसेंच माघाच्या शिशुपालवध काव्यांत, कालीदासाच्या रघुवंश काव्यांत, वेंकटाध्वरीच्या 'लक्ष्मीसहस्र' काव्यांत त्या त्या कवींनीं चित्रकाव्याचे कित्येक प्रकार घातले आहेत. व या नंतरच्या कवींनीं तर रामकृष्ण विलोमकाव्य, राघवपांडवीय काव्य इत्यादि चित्रकाव्याचे स्वतंत्रच ग्रंथ केले आहेत.

मराठी भाषेंत चित्रकाव्याचा प्रवेश करविणारा आद्यकवि म्हटला म्हणजे विठ्ठलकवि हा होय. त्यानें 'रुक्मणीस्वयंवर' नामक काव्यांत अनेक बंध साधले असून शिवाय 'षण्मासिचा वायदा' या नांवाचीं अनेक कूटें व प्रहेलिका प्रसिद्ध आहेत. त्यानंतर मोरोपंतानें मंत्ररामायण, नामगर्भरामायण, सीतारामायण, परंतुरामायण, निरोष्ठरामायण इत्यादिक चित्रकाव्याचे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. अलीकडच्या काळांत पाळंदे, गोडबोले, इत्यादि कवींनीं चित्रकाव्याचे कांहीं प्रकार आपल्या कवितेंत आणिले असून, बजाबा बाळाजी नेने ह्यांनीं तर आपल्या सैरंध्री नाटकांत चित्रकाव्याचे बहुतेक सर्व प्रकार साधले आहेत.

चित्रकाव्याचे शब्दचित्र आणि अर्थचित्र असे दोन भेद आहेत. कोणी उभयचित्र असा आणखी एक तिसराहि भेद मानितात. शब्दचित्र म्हणजे ज्यांत वर्ण,मात्रा,स्थान,गति इत्यादिकांच्या संबधानें कोणत्या तरी रीतीनें रसिक जनांस आल्हाद देणारा असा चमत्कार केला असतो, अशी जी काव्यरचना तें शब्दचित्र होय. ह्याचे साधारण ६ भेद आहेत ते असेः—

१ स्वरचित्र, २ वर्णचित्र, ३ स्थानचित्र, ४ आकाराचित्र, ५ गतिचित्र, आणि ६ बंधचित्र. गतिचित्रांत विशिष्ट गतिच्या धोरणानें वर्णरचना करून चमत्कार दाखविण्यांत येतो; उदा. गोमूत्र-गतिचित्र-घ्या.

गाय बैल हे चालत असतां मुतूं लागले तर त्यांची भूमीवर जशी रेषा उमटते, त्याप्रमाणें जेथें वर्णरचना केली असते तेथें हें चित्र होतें. पुढील श्लोक याप्रमाणें रचितातः—

कमले देवदेवस्य महिषिस्त्वं स्तुतारमे
विमले देविदेहस्य ह्यहिमत्वं नतास्यमे.

बंधचित्रांत वर्ण रचनेच्या प्रयोगानें एखाद्या पदार्थाची आकृति साधलेली असते किंवा कांहीं सार्थ अक्षरें व व्यक्तिनामें साधलीं असतात. यांत आकृतिबंध व गुणबंध असे दोन भेद आहेत. चतुर्दलपद्मबंध, अष्टदलपद्मबंध, चक्रबंध, छत्रबंध वगैरे बंधचित्रांतील प्रकार होत.

अर्थचित्रांत अर्थरचनेचा चमत्कार दृष्टीस पडतो. प्रश्नोत्तर-एकानेकोत्तर-गूढ-कूट चित्र, हे प्रकार या चित्रकाव्यांत समाविष्ट होतात. तसेंच प्रहेलिका, अंतर्लापिका, बहिर्लापिका, अपन्हुती,: पदगुप्त, क्रियागुप्त, कर्तृगुप्त, मात्राच्युतक, अक्षरच्युतक, च्युतदत्ताक्षरा हेहि काव्यप्रकार चित्रकाव्यांतलेच होत. त्यांचीं उदाहरणें सुभाषितरत्नभांडागारम् सारख्या ग्रंथांत पहावयास मिळतील. [वि. विस्तार पु. ४४ व ४५].

**चित्रकूट**--चित्रकूटपर्वत संयुक्तप्रांताच्या बांडा जिल्ह्यांत आहे. हा चित्रकूट नांवाच्या जी. आय. पी. रेल्वे स्टेशनपासून ३॥ मैलांवर आहे. हा बांडा जिल्ह्याच्या कर्वी तहसिलींत व कामटा राजोलाच्या चौबे जहागिरींत पसरलेला आहे. याच्या पायथ्यापासून एक मैलावर पैशुनी नदी वाहते. इ.स. १७२५ मध्यें छत्रसालच्या राणीनें याच्यावर एक तट बांधला आहे. राम व सीता वनवासांत असतांना या पर्वतावर रहात असल्याकारणानें यास फार पवित्र मानतात. याचा रामायण, महाभारत, बृहत्संहिता वगैरेंत उल्लेख आहे. यावर व नदीतीरावर पुष्कळ देवळें आहेत. ब्रिटिश हद्दींतल्या ४२ महालांचें उत्पन्न या देवालयांकडे लावलें असून शिवाय आसपासच्या संस्थानांतूनहि बरेंच उत्पन्न येतें. रामनवमीला आणि दिवाळीला येथें मोठी यात्रा भरत असते.

**चित्रकोट**—वऱ्हाड-मध्यप्रांत. बस्तर संस्थानांतील इंद्रावती नदीवर असलेलें गांव. हें जबलपूराहून २४ मैल असून येथें (९६ फूटाचा) धबधबा आहे. सभोंवारचा प्रदेश एके काळीं नागवंशी राजांच्या ताब्यांत असून त्यांस 'चित्रकोट मण्डल' असें म्हणत असत.

**चित्रगुप्त**—हा मनुष्यानें केलेल्या प्रत्येक कृत्याची नोंद ठेवणारा यमाचा हस्तक व लेखक आहे अशी समजूत आहे.

**चित्ररथ**—एक गंधर्व यासच अंगारपर्ण असें नांव होतें. पांडव लाक्षागृहांतून निघून प्रवासांत असतां याचें अर्जुनाशीं युद्ध झालें व त्यानें चाक्षुषीविद्या अर्जुनास दिली. (महाभारत ३१.७०). या नांवाचे दुसरे बरेच गंधर्व आहेत.

**चित्रसंग्रहालयें**—सामान्यतः चित्रसंग्रहालय या शब्दाचा अर्थ ‘ कलासंग्रहालय ’ याहून भिन्न असून त्यावरून फक्त चित्रांचा संग्रह जेथें आहे असें ठिकाण,इतकाच बोध घ्याव-याचा. चित्रांचा संग्रह करणें एवढाच केवळ या संग्रहालयांचा उद्देश नसून, त्यांत मानवी विचारांची व कल्पनांचीं अनेक अवस्थांतरें पहावयास सांपडतात, हा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा उपयोग आहे.एकतर अशा संग्रहालयांत सौंदर्य व कला या दृष्टीनें पाहतां रंगकाम, आकृतिविशेष व निर्माणकौशल्य या गुणांतील अनेक चित्रकारांची करामत दृष्टीस पडते. दुसऱ्या म्हणजे ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां त्या ठिकाणीं गतकालीन थोर पुरुषांच्या हुबेहुब आकृती पहावयास सांपडतात; त्या पुरुषांच्या संबंधी, चालीरीती, पोशाख, त्या काळचीं कलाकसुरीचीं कामें व धार्मिक पूजनार्चनादि प्रकार यांची माहिती मिळते. शिवाय कोणत्याहि देशांतील एकंदर चित्रकलेवरून तीं चित्रें निर्माण करणाऱ्या लोकांच्या उत्कर्षापकर्षाचीहि यथायोग्य कल्पना बांधतां येते. शेवटला सर्वांत महत्त्वाचा उपयोग म्हणजे मनोविकारजागृतीचा; कारण कोणत्याहि खरोखर प्रेक्षणीय अशा चित्रांमध्यें मनांतील निदान एक तरी भावना उद्दीपित करण्याचा गुण असलाच पाहिजे.उदाहरणार्थ ब्रिटिश नॅशनल गॅलरीमधील फ्रान्सियाच्या ‘ पीटा ’ या चित्रामध्यें ओतप्रोत करुणरस भरलेला आहे; व्हेलास्क्वेझनिर्मित ॲडमिरल पॅरेजच्या चित्रांत महानुभावपणा आहे; येणेंप्रमाणें कोठें कौटुंबिक भावना, कोठें पूज्यभाव इत्यादि अनेक भावना मनावर बिंबतात. आणखी असें की अशा चित्रसंग्रहालयांमध्यें जाऊन सर्व सभोंवार सुंदर व रमणीय चित्रांचे देखावे पहात असतां अवर्णनीय सुखसमाधान वाटतें, त्यामुळें अशा संग्रहालयांची मनाला व नेत्राला आनंद देणारीं स्थानें या नात्यानें समाजाला अत्यंत उपयुक्तता व आवश्यकता आहे. मोठमोठ्या चित्रसंग्रहालयांमध्यें अनेक कालांचीं व पद्धतींचीं चित्रें जमवून ठेवलेलीं असल्यामुळें कोणालाहि स्वतःच्या आवडीप्रमाणें विशिष्ट देशांतील किंवा काळांतील, किंवा विशिष्ट प्रकारचीं व विशिष्ट भावनादर्शी पाहिजे तीं चित्रें पाहण्यास सांपडतात. तात्विक दृष्ट्या पाहतां अशा संग्रहालयांच्या योगानें समाजाच्या अभिरुचीला योग्य वळण लागून त्याच्या ज्ञानांत व विद्वत्तेंत मोठी भर पडते.

हल्लीं बहुतेक देशांत सर्व पद्धतींच्या चित्रांचा संग्रह असलेलीं राष्ट्रीय चित्रसंग्रहालयें असून शिवाय फक्त विशिष्ट पद्धतीच्या चित्रांचा संग्रह असलेलीं म्युनिसिपालट्या, चर्चें, देवालयें व खाजगी व्यक्ती यांचीं चित्रसंग्रहालयें आहेत. इंग्लंडमध्यें ब्रिटिश नॅशनल गॅलरी हें सर्वांत उच्च दर्जाचें संग्रहालय आहे.त्यांतील संग्रह पार्लमेंटच्या ५०००,ते १०००० पौंडापर्यंतच्या वार्षिक देणगींतून होत आला आहे. शिवाय प्रसंगानुसार विशेष देणगी देऊनहि पार्लमेंटनें उत्तमोत्तम चित्रें खरेदी केलीं आहेत. उदाहरणार्थ, १८७१ मध्यें ७५००० पौंड देऊन ७७ चित्रें खरेदी केलीं; १८८५ मध्यें ॲन्सिडी मॅडोनाचें चित्र ७०००० पौंडांनां व १ ल्या चार्लसचें चित्र १७५०० पौंडांनां विकत घेतलें. याप्रमाणें मोठाल्या किंमती देऊन उत्कृष्ट चित्रें मिळविण्याचा पार्लमेंटाचा क्रम चालूच आहे.

बर्लिन येथें केसर फ्रेडरिक म्यूझियम आहे. यांतहि सर्व पद्धतींचीं चित्रें असून डच व इटालियन चित्रांचा भरणा विशेष आहे. शिवाय ड्रेसडेन व म्यूनिच येथें मोठाले चित्रसंग्रह आहेत. व्हिएन्ना येथील इंपीरियल गॅलरीमध्यें चित्रें १७०० च पण निवडक आहेत. चित्रांचा संग्रह प्रमाणाच्या बाहेर न वाढवितां तो आटोपशीर व निवडक करणें, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. रशियांत पिटर दि ग्रेट यानें स्थापलेला ( सेंट पीटर्सबर्ग, हर्मिटेज ) चित्रसंग्रह प्रसिद्ध आहे; त्यांत सुमारें १८०० चित्रें आहेत. सर्वांत फ्रेंच लोकांचा ( लूव्हर पॅलेस, पॅरिस ) चित्रसंग्रह महत्त्वाचा आहे. १८०० पर्यंत तर युरोपमध्यें त्याचाच पहिला नंबर होता. शिवाय तेथें प्रत्येक पद्धतींतील सर्वांत उत्तम चित्रें निवडून तीं एकत्र स्वतंत्र जागेंत ठेवण्यांत आलीं आहेत. शेवटला महत्त्वाचा चित्रसंग्रह फ्लॉरेन्स येथील रॉयल गॅलरीज हा होय. तो पिटी व युफिझी या दोन राजवाड्यांत मिळून ठेवलेला आहे. त्यांत १५ व्या व १६ व्या शतकापासूनचा संग्रह असून जगांतील सर्वांत मोठा संग्रह हाच होय.

विवक्षित राष्ट्रीय पद्धतीच्या चित्रांचा संग्रह असलेलीं चित्रसंग्रहालयेंहि चांगल्या योग्यतेचीं आहेत. उदाहरणार्थ ब्रिटिश चित्रकलेचा संग्रह असलेली नॅशनल गॅलरी, पॅरिस फ्रेंच चित्रकलेचा संग्रह व याप्रमाणें बर्लिन, रोम, ड्रेसडेन, व्हिएन्ना, मॅड्रिड वगैरे ठिकाणीं तद्देशीय चित्रांचा संग्रह आहे. ब्रुसेल्स व अँटवर्प येथें फ्लेमिश चित्रकलेचे उत्तम नमुने आहेत. म्यूझियो डेल पेड्रो येथें स्पॅनिश चित्रकलेचे नमुने आहेत. ख्रिश्चियाना, स्टॉकहोम व कोपनहेगन येथें स्कँडिनेव्हियन चित्रकलेचा मोठा संग्रह आहे. रोम येथें इटालियन चित्रकलेचे सर्वोत्कृष्ट नमुने आहेत. पण विशेषतः फ्लॉरेन्स येथील ॲकेडेमियांत इटालियन चित्रकलेचा फार महत्त्वाचा संग्रह आहे. येथेंच बॉटिसेलीचें ‘ प्रायमाव्हेरा ’ व फ्रा ॲन्जेलिकोचें ‘ लास्ट जजमेंट ’ हीं अत्यंत प्रख्यात चित्रें आहेत. मिकेलेन्जेलो डेव्हिडचा पुतळाहि येथें आहे. तथापि एकंदरीनें या नॅशनल गॅलरींची व्यवस्था चांगलीशी नाहीं. या बहुतेक संग्रहालयांनां प्रवेश फी असतेच; रविवारीं व सणाच्या दिवशीं मात्र मोफत प्रवेश होतो. या संग्रहालयांत नवीन भर फारशी होत नसते.

पुष्कळ नगरांमध्यें म्युनिसिपालट्यांनीं केलेले चित्रसंग्रह नांवाजण्यासारखे आढळतात. इटालीमध्यें असल्या संग्रहांचा बराच सुकाळ आहे. हॉलंडमध्यें हार्लेम, लीडेन, रॉटरडॅम, हेग येथील संग्रहालयें पहाण्यालायक आहेत. बर्मिंगहॅम व मँचेस्टर येथें ब्रिटिशकलेचा संग्रह चांगला आहे.

कोलोन येथें व्हेनिश चित्रकलेचा निवडक संग्रह आहे. ग्रेट-ब्रिटनमध्यें लिव्हरपूल व ग्लासगो येथें म्युनिसिपालटीचीं उत्तम संग्रहालयें आहेत. अमेरिकेंत बोस्टन, न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, शिकागो व वॉशिंग्टन येथील संग्रह अलीकडील असूनहि बऱ्यापैकीं आहेत.

ख्रिस्ती देवळांत प्रथम शोभेकरितां जमविलेल्या चित्रांमुळें हल्लीं त्यांचीं बऱ्याच ठिकाणीं चित्रसंग्रहालयें बनवितां आलीं आहेत. उदाहरणार्थ अँटवर्प कॅथिड्रल, घेंट, पिसा वगैरे ठिकाणीं चर्चेसमध्यें विशिष्ट पद्धतीच्या चित्रांचा संग्रह पाहण्यास सांपडतो.

व्हॅटकिन गॅलरीजमध्यें ( पोपांच्या राजवाड्यांतील चित्रसंग्रहालयांमध्यें ) पुतळ्यांचा संग्रहच विशेष असला तरी इटालियन पद्धतींतील चित्रांचा संग्रहहि चांगला आहे. इंग्लंडमध्यें तीन राजवाड्यांतील संग्रह लोकांस पाहण्यास मोकळे असतात. हॅम्पटन कोर्ट, विंडसर व केनसिंगटन या तिन्ही राजवाड्यांतील संग्रह पहाण्यासारखे आहेत. बऱ्याच कॉलेजांचे व युनिव्हर्सिटयांचे संग्रह निमखासगी स्वरूपाचे आहेत. ग्रेटब्रिटनमध्यें अनेक लोकांच्या खासगी वाड्यांतून बहुमोल किंमतीचे जिन्नस सांठविलेले आहेत, पण त्यांची नक्की माहिती देतां येत नाहीं. शिवाय नियतकालिक प्रदर्शनें अनेक ठिकाणीं भरत असतात. गिल्डहालमध्यें वार्षिक प्रदर्शन फुकट असतें. लंडन, बर्लिन, रोम, व्हिएन्ना व इतर अनेक यूरोपीय शहरांमध्यें अशीं प्रदर्शनें उघडत असतात, व त्यांत चित्रकलेचीं नवीं नवीं कामें ठेवण्यांत येतात.

**हिं दु स्था नां ती ल चि त्र सं ग्र हा ल यें**:—हिंदुस्थानांत यूरोपच्या धर्तीवर स्वतंत्र चित्रसंग्रहालयें फारशीं नाहींत. राजेरजवाडे व संस्थानिक यांनीं आपापल्या राजधानींच्या ठिकाणीं उत्तम चित्रांचा संग्रह केलेला आढळतो. सातारच्या महाराजांच्या संग्रहीं अनेक तजबिरा होत्या. त्यांची शके १७४१ मध्यें केलेली यादी रा. राजवाडे यांनीं इतिहास-ऐतिहासिक मासिकांत प्रसिद्ध केली आहे. शहाजी व शिवाजी स्वकालीन व पूर्वकालीन प्रसिद्ध त्रिपुरुषांच्या तसबिरा काढवून संग्रहीं ठेवीत. १७४१ त पुढील फक्त तसबिरा शिल्लक राहिल्या होत्या.

शाहूमहाराज छत्रपती घोड्यावरील, संभाजी महाराज, शाहूमहाराज छत्रपती हुकावढतेत, शाहुमहाराज मांडीवरी मुलगी घेतली, शाहुमहाराज तीरंदाजी करतात, राजाराम महाराज घोड्यावरी स्वारी, संभाजीमहाराज मांडीवरी शाहूमहाराज, शाहूमहाराज मांडीवरी मुली दोघी २, रोडके घोडेस्वार पांढरे, वृद्ध पुरूष हत्तीबाज, बादशहाज्यादी, तसबीर सांबराची, बाला गोपीनाथ, शीदोजी नींबाळकर, बाजीराव बलाल, बसापा खोजे, शाहाज्याह पातशहा, आलावीरदीखान, स्वारी पादशहाची, झुलपुकरखान, आलीइदलशहा, स्त्री पुरूषास पायास धरीते, मुलना तुप्याजा, चेतरशींगटोके, रोडके घोडमनुष्य, पठाण, आली आदलशहा पादशहा, पादशहा व पादशहाज्यानी, हुसेनखा मैणा, नबी साहेब, घोडा कुमाईत, अमरसिंग राणा, तसबीर पादशहाची पारसी नांव, ज्वालामुखी, बाला गोपीनाथ, गुलाबांचे फुलांचें झाड, फत्तेसिंग भोसले, रामरावणाची लढाई, शीपाई ढालतरवारवाला (पारसी नांव आहे), खवासखान माहाराणा, हमेतखान, कागद यक तसबीरा तीन, (पालखीत, उभा पंखा हाती, उभा चौरी हाती) आजमशाह पातशाह, बाहादरशाह पातशाह, बाबा याकूब पातशाह, वृक्षाखाली स्त्री पुरूष त्रीवर्ग, आलमगीर पातशाह, खंड्या कुत्रा, माहाराणाजी, बादशाहाज्यादी, गीरीधरलाला, पुरूषाच्या हाता वरी बाज, माहाराज नाथजी, पाछयायजादा, जानू सेवाला, मायाजी फडतरे, तसबीर ईमान मुसुलमानी, नारायणगीरी, हात्तीनी तसबीर, मलकपीरशहाषहा, तसबीर कागद यक, (ख्वाज खुतमतदीन, ख्वाज महीदीन), आलमगीर पातशाहाचा ररणबाज, अलमगीर पातशहाचा घोडा नीळा थोरला.

हे सर्व संग्रह लहान प्रमाणावर आहेत असेंच म्हटलें पाहिजे. हिंदी चित्रकलेंत हिंदु, मुसुलमान ( मोंगल ) व बौद्ध असे तीन विभाग करतां येतील. त्यासंबंधीं सविस्तर विवरण 'भारतीय चित्रकला' या सदराखालीं सांपडेल. अजिंठा वेरूळ व कार्ल्यांचीं लेणीं हीं भरतखंडांतील पूर्वकालीन कलेचीं स्मारकें आहेत. प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा याच्या हातचीं पुष्कळ चित्रें श्रीमंत गायकवाडसरकार यांनीं आपल्या लक्ष्मीविलास राजवाड्यांत काढविलीं आहेत व परदेशीय चित्रांचाहि संग्रह त्यांनीं बराच केला आहे. तसेंच जयपूर, दिल्ली वगैरे चित्रकलेच्या मूलस्थानीं अद्यापीहि या कलेचे उत्तम नमुने पाहण्यास मिळतात. ह्याखेरीज हिंदुस्थानांतील मुख्य शहरीं असणारे अजबखाने अवश्य पाहण्यासारखे आहेत. त्यांत इतर वस्तुसंग्रहाबरोबरच साधीं रंगीत चित्रें यांचेहि नमुने पाहण्यांत येतात. त्यांचीं नांवें (१) इंडियन म्यूझिअम, कलकत्ता (२) व्हिक्टोरिया आल्बर्ट म्यूझिअम, मुंबई, (३) सेंट्रल गव्हर्मेंट म्यूझिअम, मद्रास; (४) सोसायटी ऑफ ओरिएंटल आर्ट, कलकत्ता, (५) जमशेटजी जीजीभाई आर्टस्कूल, मुंबई, (६) बांबे आर्ट सोसायटी, मुंबई, (७) मद्रास फाईन आर्ट सोसायटी, (८) व्हिक्टोरिया मेमोरिअल कलेक्शन, बेल्व्हेडीर, कलकत्ता, (९) खुदाबक्ष लायब्ररी, बांकीपूर, (१०) सेंट्रल म्यूझिअम, लाहोर, (११) आर्केऑलॉजी म्यूझिअम, दिल्ली, (१२) भूरिसिंग म्यूझिअम, चंबा, पंजाब. याशिवाय पुदुकोट्टा व तंजावर राजवाड्यांत तसेंच बरद्वान, बनारस, रामपूर, वगैरे संस्थानिकांचे संग्रह व जी. एन. टागोर, कलकत्ता, बाबू सीताराम लाल, बनारस व मनुक नांवाचे बांकीपूरचे गृहस्थ यांचे संग्रहहि वाखाणण्यासारखे आहेत.

**चित्रसेन**—एक गंधर्व. हा अर्जुनाचा मित्र होता. यानें देवलोकामध्यें अर्जुनाला गांधर्वविद्या दिली. यानेंच उर्वशीला अर्जुनाकडे पाठविलें होतें. यानें घोषयात्रेच्या वेळीं दुर्योधनाचा पराभव करून त्यास बंधन केलें असतां अर्जुनानें त्यास सोडविलें. याखेरीज एक अभीसारराज, एक कर्णपुत्र, एक धृतराष्ट्र

याचा पुत्र, एक द्रुपदपुत्र, जरासंधाचा सेनापति वगैरे चित्रसेन नांवाच्या व्यक्ती महाभारतांत आढळतात.

**चित्रळ, संस्थान**—हिंदुस्थान. वायव्य सरहद्दीवरील एक संस्थान. याचें क्षेत्रफळ ४५०० चौरस मैल. याच्यांत कशकार बाल किंवा उत्तर कशकार यांचा समावेश होतो. हा प्रांत तिरीच तुरीखो व खो या नद्यांच्या थडीवरील प्रदेशांनीं बनला आहे. याच्या उत्तरेस हिंदूकुश पर्वत असून पश्चिमेस बदकशान व काफिरिस्तान आहेत. दक्षिणेस दिर व पूर्वेस गिलजित, मस्तूज, यासिन वगैरे संस्थानें आहेत.

इतिहासः—एका लेखावरून इसवी सन ९०० च्या सुमारास या प्रदेशावर काबूलच्या जयपाल राजाचें राज्य होतें व त्यांतील लोक बौद्धधर्मीच होते असें अनुमान निघतें. पुढें चेंगीजखानानें या प्रदेशावर कित्येक हल्ले केले. सोळाव्या शतकांत रईस नांवाचा राजा राज्य करीत होता. पुढें संगीन अली या नांवाच्या गृहस्थाच्या चौघा मुलांपैकीं दोघांनीं रईस घराण्याचा नाश करून सर्व सत्ता आपल्या ताब्यांत घेतली. बाकी राहिलेल्या दोन मुलांचे वंशज सध्याचे संस्थानिक होत. यांच्या घराण्यास मेहतर हें नांव आहे. या घराण्याची शेजारच्या गिलजित, यासिन, चिलासी, दक्षिणेकडील पठाण लोक यांच्याशीं नेहमीं झटापट सुरू असे. १८५४ मध्यें काश्मीरच्या महाराजानें शहा अफझूल मेहतराशीं तह करून यासीन व मस्तूज यांचा राजा गौहरअमन याच्याविरुद्ध युद्ध पुकारलें. हें युद्ध कांहीं काळपर्यंत चालल्यावर त्याचा शेवट होऊन शहा अफजलाचा धाकटा मुलगा अमान-उल्-मुल्क हा १८८० त चित्रळ, मस्तूज, यासीन व गझनी या प्रदेशांचा राजा झाला. १८७८त काश्मीर दरबारच्या वेळीं हिंदुस्थानसरकारनें अमान-उलमुल्काचा हक्क कबूल करून अफगाण लोकांच्या हिंदुस्थानावरील स्वारीचा बंदोबस्त करण्याकरितां त्याला देण्यांत येणाऱ्या खंडणीची रक्कम दुप्पट वाढविली.

१८८५–८६ त या संस्थानांत लॉकहार्ट नांवाचा इंग्रज वकील गेला होता. १८८९ त गिलजित येथें इंग्रजांनीं आपला वकील नेमल्यावर अमान-उल्-मुल्क याला सालीना ६००० रु. खंडणी देण्यांत येऊं लागली. १८९१त अमान-उल्-मुल्कानें परराष्ट्रीय कारभारांत व सरहद्दीच्या संरक्षणाच्या बाबतींत हिंदुस्थानसरकारचा सल्ला घेण्याचें कबूल केल्यावर खंडणीची रक्कम १२००० रु. करण्यांत आली.

१८९२ त अमान-उल्-मुल्क एकाएकीं मरण पावला व त्याचा दुसरा मुलगा अफजल-उल्-मुल्क यानें गादी बळकावली. निजाम-उल्-मुल्क हा वडील मुलगा गिलजित येथें पळून गेला. याच सुमारास जंडोलच्या उम्राखानानें चित्रळ संस्थानावर स्वारी केली व नरसत जिल्हा काबीज केला. पुढें अफजल-उल्-मुल्कचा चुलता शेर अफजल हा कांहीं सैन्य घेऊन चित्रळ प्रदेशांत आला. यानें चित्रळचा किल्ला हस्तगत केला. याच धामधुमींत अफजल-उल्-मुल्काचा खून झाला. पुढें शेर अफजल गादीवर बसला. यानंतर निजाम-उल्-मुल्कानें गादी बळकावली. हिंदुस्थानसरकारनें त्याचें आधिपत्य कबूल करून चित्रळ संस्थानांत आपला एक वकील पाठविला. १८९५ त अमीर-उल्-मुल्कानें निजाम-उल्-मुल्कास मारविलें व किल्ला घेतला. याच सुमारास उम्राखान हा कांहीं सैन्यासह तेथें पोहोंचून त्यानें आपला धार्मिक युद्धास जाण्याचा विचार असून आपण अमीर-उल्-मुल्कास आपल्याला मदत करण्याविषयीं विनंति करण्यास आलों आहें. असें जाहीर केलें. अमीर उल-मुल्कानें मदत करण्याचें नाकारल्यावरून त्यानें द्रोश किल्ल्यास वेढा दिला. याच सुमारास हिंदुस्थानसरकारनें चौकशी करण्यासाठीं गिलजित येथील वकीलास पाठविलें. यानें आपल्या ४०० लोकांसह किल्ला हस्तगत केला. पुढें एकाएकीं शेरअफजल हा उम्राखानास येऊन मिळाला. अमीर-उल-मुल्क हा या दोघांस शरण गेला व त्यांनीं त्याला कैदेंत ठेविलें. पुढें अमीर-उल-मुल्क याचा भाऊ शुजा-उल-मुल्क या १४ वर्षांच्या मुलास गादीवर बसविण्यांत आलें. पुढें इंग्रजांनीं शेर अफजल व अमीरउल-मुल्क या दोघांचा पाडाव करून त्यांनां हिंदुस्थानांत पाठवून दिलें व शुजा-उल-मुल्क हा चित्रळ संस्थानचा राजा आहे असें कबूल केलें. या वेळेपासून संस्थानांत जिकडे तिकडे शांतता नांदत असून त्याची एकसारखी भरभराट होत आहे. या संस्थानांतील द्रोश किल्यांत एका इंग्रजी फौजेचें ठाणें आहे. यांत तीन ठिकाणीं दवाखाने उघडले असून शेतीची सुधारणा करण्यांत आली आहे. या संस्थानांत एकंदर १२०० फौज आहे. लोकसंख्या ५०००० असून त्यांतील लोक खोवार भाषा बोलतात, व ते मुसलमानी धर्माचे आहेत.

या संस्थानचा नदीथडीवरील प्रदेश फार सुपीक आहे. यांत गहूं, जव, मका व तांदूळ या धान्यांचें पीक होतें. लोखंड, तांबें वगैरे धातू सांपडतात. या संस्थानांत कट्यारी व तरवारीच्या मुठी चांगल्या तयार होतात.

एकंदर संस्थानचे ८ विभाग असून प्रत्येक विभागावर अतालिक नांवाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली असते. याच्या हाताखालीं चारवेलो असतो. याच्याकडे कांहीं खेडीं असतात. प्रत्येक खेडें बरमूश या कामगाराच्या ताब्यांत असून याला मदत करण्याकरितां चारबू हुद्याच्या अधिकाऱ्याची नेमणूक केलेली असते. परराष्ट्रीय कारभार इंग्रजी वकीलाच्या संमतीनें चालतो. न्याय मुसुलमानी कायद्याप्रमाणें देण्यांत येतो व मुल्लांचें लोकांवर बरेंच वजन असतें. वास्तविक सर्व न्याय राजाच्या खुशीवर अवलंबून आहे. अतालिकास लहान खटल्यांत निकाल देण्याचा अधिकार आहे.

**शहरः**—हें सरहद्दीवरील प्रांतांतील एक गांव असून चित्रळ संस्थानची राजधानी आहे. याची लोकसंख्या २३८० आहे. हें चित्रळ नदीच्या काठीं आहे. हें बाजाराचें ठिकाण असून येथें व्यापार चालतो. इंग्रजी वकीलाचा मदतगार अधिकारी येथेंच रहातो.

**चित्रांगदा**—चित्रवाहन राजाची कन्या व अर्जुनाची स्त्री; हिचा पुत्र बभ्रुवाहन.

**चित्रावाव**—मुंबई काठेवाड. गोहिलवाडाच्या चमारडी ठाण्यांतील निराळी खंडणी देणारी इस्टेट. ही गोहिल रजपुतांच्या ताब्यांत आहे. या तालुक्यांत एकच खेडें आहे.

**चिदंबर दीक्षित**—पेशवाईअखेरचा एक सिद्धपुरुष. हा गुर्लहोसुर येथें रहात असे. चिदंबरचरित्र नांवाचा एक याच्यावर रचलेल्या ओवीबद्ध ग्रंथ आहे. याचा जन्म शके १६८० मध्यें झाला. यानां अवतारी पुरुष समजत. खुद्द पेशवे, रास्ते, गोखले वगैरे संस्थानिक सरदार लोक याच्या सेवेस येऊन रहात. गुर्लहोसुरास याचे वाडेहि अद्याप दिसतात. चिदंबर दीक्षितांचे शिष्य राजारामबुवा होत. या राजाराम बुवाची मराठा कविता पुष्कळच आहे; पण ती बहुतेक सर्व अप्रकाशित आहे.

**चिदंबरम्** ता लु का.—मद्रास इलाख्याच्या दक्षिण-अर्काट जिल्ह्याच्या दक्षिणेकडील तालुका असून याचें क्षेत्रफळ ४०२ चौ. मैल आहे. लो. सं. ( १९२१ ) ३१०४०५ होती. याच्या दक्षिणेस कोलेरून नदी असून वेल्लार ही याच्या मधून वहात जाते. या तालुक्यांत या नद्यांचे पुष्कळ कालवे आहेत. १९२१-२२ सालीं सारा व इतर पट्टया यांचें उत्पन्न ९५३००० रुपये होतें. यांत दरवर्षी ५१ इंच पाऊस पडतो.

श ह र—तालुक्याचें मुख्य ठिकाण. हें साऊथ इंडियन रेल्वेचें स्टेशन आहे. १९२१ सालीं याची लोकसंख्या २२५०१ असून १८७३ सालीं येथें म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. कर्नाटक युद्धांत हें एक महत्त्वाचें लष्करी नाकें होतें. १७५३ त हें फ्रेंचांनीं हस्तगत केलें. पुढें १७६० व मेजरमॉनसननें हें काबीज केलें. यानंतर हें हैदर अल्लीच्या ताब्यांत गेलें. येथें त्यानें तटबंदी करून कांहीं फौज ठेविली होती. १७८१ त सर ऐयर कूटनें याच्यावर हल्ला केला; पण तो परतविण्यांत आला.

हें एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्राचें ठिकाण असून येथें कनकसभा नांवाचें महादेवाचें देवालय आहे. देवळाची इमारत १० व्या शतकांतील दिसते. येथें हिंदुस्थानांतलि पंचलिंगांपैकीं एक लिंग आहे. येथें दरवर्षी डिसेंबर व जानेवारी महिन्यांत यात्रा भरते. येथें यात्रेकरू व प्रवासी यांनां उतरण्याकरितां बरेच मठ व धर्मशाळा आहेत. कांहीं वैदिक शाळा व एक हायस्कूल आहे. येथें जनानी रेशमी व केळी कापड तयार होतें.

**चिंदविन,** जि ल्हा ( उत्तर )—हा उत्तर ब्रह्मदेशाच्या सगैंग विभागांतील एक जिल्हा असून याचें क्षेत्रफळ १५१६३ चौ. मै. आहे. याच्या उत्तरेस टारो व हुकौंग हीं खोरीं असून दक्षिणेस पकोक्कु व दक्षिण चिंदविन हे दोन जिल्हे आहेत. पूर्वेस म्यिचिना, काथा व श्वेबो असून पश्चिमेस आसाम, मणिपूर व चिन डोंगराळ प्रदेश आहे. या जिल्ह्यांत झिंकलिंग, कामति व सौंधसुप संस्थानें आहेत. या जिल्ह्यांतील डोंगरी मुलुखाचे चिंदविन नदीच्या उत्तर-दक्षिण प्रवाहामुळें पूर्व पश्चिम असे दोन भाग झाले आहेत. याच्या वायव्येकडील झिंकलिंग कामती संस्थानच्या सरहद्दीपासून पकोक्कु जिल्ह्यापर्यंतचा प्रदेश डोंगराळ असून यांतील सर्वांत उंच असलेल्या शिखराची उंची १२५५७ फूट आहे. या डोंगरी प्रदेशांतील उत्तरेकडील रांगांस योमा पर्वत ही संज्ञा असून दक्षिणेकडील टेकड्यांच्या रांगांस पोंदौंग म्हणतात. जिल्ह्यांत चिंदविन व तिला मिळणाऱ्या यू वगैरे नद्या आहेत. यांत हत्ती, वाघ, चित्ते, रानमांजर वगैरे रानटी जनावरें आढळतात. या जिल्ह्यांतील चिंदविन नदीथडीवरील प्रदेशाची हवा प्रकृतीस मानवेल अशी असून इतर भाग रोगट आहे. याच्या निरनिराळ्या भागांत ५० पासून ९२ इंच पाऊस पडतो.

इतिहास.—ब्रह्मी अमदानींत या जिल्ह्याचा राज्यकारभार एका वुन अधिकाऱ्यावर सोंपविला असे. त्याला खम्पत म्हणत असत. हा किंदत या लष्करी छावणीच्या ठिकाणीं रहात असे. १८८५ च्या युद्धांत या प्रदेशांत एका व्यापारी कंपनीचा इंग्रज गुमास्ता मारला गेला. १८८६ त डेप्युटी कमिशनरानें नदीथडीवरील कांहीं ठिकाणीं व कबॉ दरीतील तमू येथें इंग्रजी ठाणीं स्थापन केलीं. १८८८ त उत्तर चिंदविन हा जिल्हा दक्षिणचिंदविन जिल्ह्यापासून वेगळा करण्यांत आला. १८८६ त मिंग्यन येथें ग्लीसन नांवाच्या असिस्टंट कमिशनराचा खून झाला. यानंतर १८८८ व १८९०-१ या वर्षी कले दरींतील प्रदेशांत बंडें झालीं. हीं मोडल्यावर १८९२ व १८९४ या सालीं आसाम सरहद्दीवरील चिन लोकांवर स्वाऱ्या करण्यांत येऊन १८९६ सालीं इंग्रजी सीमा दर्शविणारे खांब रोवण्यांत आले. या वेळेपासून चिन लोकांचा उपद्रव कमी झाला. १९२१ सालीं याची लोकसंख्या दोन्हीं संस्थानें धरून १८६८८१ होती. दोन तृतीयांश लोक ब्रह्मी भाषा बोलतात व बाकीच्या राहिलेल्यांपैकीं बहुतेक लोकांची शान भाषा आहे.

शेती.—या जिल्ह्यांतील बहुतेक लोक शेतीवर आपली उपजीविका करतात. यांतील खोरीं फारच सुपीक आहेत. डोंगराळ प्रदेशांतील उतारावरची जमीन तौंग्य पद्धतीनें लागवडीस आणतात. ही पद्धत पुढें दिल्याप्रमाणें आहे. पहिल्यानें एखादा उतार शोधून काढून त्यांतील गवत जाळून टाकितात व नंतर सर्व झाडें पाडून तींहि एके ठिकाणीं जाळतात. असें केल्यावर गवताची व झाडांची राख पेरणीच्या उतारावर पसरण्यांत येते व यानंतर पर्जन्यवृष्टी होतांक्षणींच बी पेरण्यांत येतें.

या जिल्ह्याचें मुख्य उत्पन्न म्हटलें म्हणजे तांदूळ होय. याशिवाय यांत जिल्ह्याच्या उपयोगापुरते बटाटे, तंबाखू, तीळ व कापूस यांचीं पिकें होतात. चार पांच ठिकाणीं चहा होतो. या जिल्ह्यांत रेड्यांचा शेतें नांगरण्याकडे उपयोग

होतो. यांतील घोडे व बकऱ्या हीं जनावरें जातवान नसून तीं फार क्वचित दृष्टीस पडतात. या जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं उथळ नद्या आडवून त्यांचा कालव्यासारखा उपयोग केला आहे. यांतील जलप्रवाहांत मासे सांपडतात. मासे धरण्याच्या कराचें उत्पन्न दरवर्षी १०००० रु. असतें.

जंगलें:—या जिल्ह्यांतील जंगलाचे उत्तर चिंद्विन व मिथ्य असे दोन विभाग असून किंद्त व मिग्यन हीं अनुक्रमें ठिकाणें आहेत. यांतील जंगलांत साग वगैरे इमारतीचीं झाडें आहेत. यांतील लाखेचें उत्पन्न दरवर्षी १०,००० रु. असतें. जिल्ह्याच्या २०७० चौ. मैल प्रदेशांत राखिव जंगलें असून त्यांचा ६१६० चौ. मैल प्रदेश वर्गीकरण न केलेल्या जंगलांनीं व्यापिला आहे. १९०३-४ सालीं जंगलाचें उत्पन्न ३ लाख रु. होतें.

धातु:—या जिल्ह्यांत दगडी कोळसा व घास्लेट बऱ्याच प्रमाणांत आढळतें. यांतील नद्यांच्या प्रवाहांत सोन्याचे कण सांपडतात. याशिवाय लाल, पांच वगैरे मौल्यवान हिऱ्यांच्याहि खाणी आहेत. यू नदीवरील येश्वानी गांवीं खाऱ्या पाण्याचे झरे असून तेथें त्यांच्या पाण्यापासून थोड्या प्रमाणावर मीठ होतें.

व्यापार व दळणवळण:—या जिल्ह्यांतील इंदिन व इतर कांहीं ठिकाणीं एका प्रकारचें कापड विणलें व रंगविलें जातें. यांतून मुख्यत्वेंकरून भात, साग, बांबू व मेण हे जिन्नस बाहेरगांवीं जातात व बाहेरून मीठ, लोखंड व व पाश्चात्य रेशमी व सुती कापड हे जिन्नस आंत येतात. शिवाय संस्थानांतील लोक कापड, घास्लेट, निळीचें तेल व मीठ हे जिन्नस घेऊन त्याबद्दल रबर, मेण, बांबू वगैरे जिन्नस देतात. या जिल्ह्यांत आगगाडीचा एकहि फांटा नाहीं. यांतील बहुतेक दळणवळण व व्यापार जलमार्गानें चालतो. चिंद्विन व तिला मिळणाऱ्या नद्यांतून नावा सदोदित जाऊं येऊं शकतात. याशिवाय यांत ४०० मैल लांबीचे कच्चे रस्ते आहेत. उन्हाळ्यांत व हिंवाळ्यांत कामती या गांवाहून हौंगपा येथें जाण्यास खेचरें उपयोगी पडतात.

हा जिल्हा ब्रिटिश अमलाखालीं आल्यापासून यांतील प्रत्येक कुटुंबामागें १० रु. या प्रमाणें एक थाथमेडा नांवाचा कर बसविण्यांत आला असून तो आजपावेतों चालू आहे. १८९५-९६ सालीं सरकारी जमीनीचा सारा शेंकडा १० ठरविण्यांत आला व याच प्रमाणांत अद्यापिहि वसूल करण्यांत येतो. जिल्ह्याचें एकंदर उत्पन्न १९०३-४ सालीं ४०७००० रु. होतें. व यापैकीं शेतसारा ८०००० असून थाथमेडा कर २६५००० रु. होता.

१९०३-४ सालीं या जिल्ह्यांत ३० प्राथमिक, २४३ खासगी व एक एतद्देशीय भाषेंतून इंग्रजी शिकविणारी, अशा शाळा होत्या. या शिवाय ६ मुलकी व ३ लष्करी दवाखाने आहेत.

चिंद्विन जिल्हा (दक्षिण).—उत्तर ब्रह्मदेशाच्या सगैंग विभागांतील एक जिल्हा असून याचें क्षेत्रफळ ३४८० चौ. मै. आहे. हा जिल्हा म्हणजे एक त्रिकोण असून त्याचें वरचें टोंक उत्तर दिशेस आहे. याच्या उत्तरेस उत्तर चिंद्विन व श्वेबो जिल्हे असून पश्चिमेस पकोक्कु जिल्हा व पोदौंग पर्वत आहे. पूर्वेस श्वेबो जिल्हा असून दक्षिणेस पकोक्कु व सगैंग आहेत. चिंद्विन नदी या जिल्ह्याच्या वायव्येकडून आग्नेयेस वाहत जाऊन याचे पूर्व व पश्चिम असे दोन समसमान भाग करते. या नदीच्या कांहीं भागांत सदोदित नावा जाऊं येऊं शकतात. याच्या पश्चिम भागांत पोदौंग पर्वत आहे. याची उंची ४००० फूट आहे. याच्या पूर्वेस महदौंग पर्वताची रांग आहे. वरील दोन पर्वतांमधील सखल प्रदेशांत पटोलोन व उत्तर योमा या दोन नद्या आहेत. चिंद्विन नदी व महदौंग पर्वत यांच्या दरम्यान थिंगदोन नांवाची २५ मैल लांबीची एक पर्वतांची रांग आहे. महदौंग पर्वत व चिंद्विन नदी यांच्यामधील प्रदेश व या जिल्ह्याची दक्षिणेकडील सरहद्द डोंगराळ आहे. याचा दक्षिण भाग सपाट असून त्याच्या आग्नेयेस पोवनदौंग, तौगकोंमैक व लेप्तदोग वगैरे टेकड्या आहेत. यांपैकीं पहिल्या टेकडीवर कोरिव लेणीं आढळतात. दक्षिण भागांत कैकुमेयत व न्याकोयामा नद्या आहेत. या जिल्ह्यांत हत्ती, चित्ते, रानटी डुकरें वगैरे जनावरें आहेत. या जिल्ह्यांत मार्च, एप्रिल व मे या महिन्यांत उष्णता फार असते. पावसाळ्याच्या सुमारास या प्रदेशावर वारे वाहतात व त्यामुळें हवा समशीतोष्ण असते. या जिल्ह्याचें साधारण उष्णमान ८ असतें. १९००-१ सालीं यांतील मोनिवा, पेल, बुदलिन व कानी येथें अनुक्रमें ३२, ४५, ४३, ५२ इंच पाऊस पडला होता.

हा जिल्हा इ. स. १८८६ त इंग्रजांच्या ताब्यांत आला. १८८७ त त्याच्या बंदोबस्ताकरितां लष्करी शिपायांची एक तुकडी बोलावण्यांत येऊन शांतता राखण्याकरितां मुलकी शिपाई नेमण्यांत आले. पहिल्यानें उत्तर व दक्षिण चिंद्विन हे दोन्हीहि जिल्हे एका डेप्युटी कमिशनरच्या ताब्यांत असून तो अलोन या मुख्य ठिकाणीं रहात असे. १८८८ त उत्तर व दक्षिण चिंद्विन असे दोन भाग पाडण्यांत येऊन मोनिवा हें दक्षिण भागाचें मुख्य ठिकाण ठरविण्यांत आलें. १८८७—८९ च्या दरम्यान या जिल्ह्यांत बरींच बंडें झालीं. यांत पुष्कळ देवालयें असून त्यांमध्यें अलौंगडौ कथप हें फार प्रसिद्ध आहे. हें कनी प्रदेशांतील पटोलोन व योमा या नद्यांच्या उगमाच्या मध्यभागीं बांधलें असून बुद्धानंतर जी पहिली बौद्धिक सभा भरली होती तिच्या अध्यक्षाचें स्मारक आहे. याशिवाय इतर देवालयें म्हटलीं म्हणजे पौंगवश्वेकुनी, श्वेगू, वगैरे होत.

या जिल्ह्यांत १ गांव व १२१२ खेडीं असून १९२१ सालीं याची लोकसंख्या ३४२८८० होती. यापैकीं शेंकडा

९९ पेक्षां अधिक लोक बौद्धधर्माचे असून ते ब्रम्ही भाषा बोलतात. या जिल्ह्यांत पंजाब, बंगाल, संयुक्तप्रांत व मद्रास इलाखा यांतून बरेच हिंदु व मुसलमान रहावयास आले आहेत. यांतील शेंकडा ६० लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह करतात.

शेतकीः—या जिल्ह्यांतील जमीन वाळवंटी, चिक्कण व मळीची या तीन प्रकारची असून वाळवंटी जमीनीनें सर्वांत अधिक प्रदेश व्यापिला आहे. १९०३—४ साली या जिल्ह्याची ६०७ चौ. मै जमीन लागवडीस आणली होती. यांत तांदूळ, ज्वारी, कापूस, तंबाखू, तीळ व केळीं यांचीं पिकें होतात. यांतील गुरेंढोरें म्हटलीं म्हणजे गाई, बकऱ्या, घोडे हीं होत. चिंदविन नदींत मासे सांपडतात.

जंगलेंः—या जिल्ह्यांतील बहुतेक जंगलें पश्चिमेकडील डोंगराळ प्रदेशांत आहेत. त्यांचें एकंदर चार वर्ग असून त्यांतील प्रत्येकांत निरनिराळ्या जातीचें इमारती लाकूड होतें. याशिवाय बांबू, वेत, व कांहीं प्रकारच्या साली यांचें उत्पन्न होतें. १९०३-४ सालीं जंगलाचें उत्पन्न ४०६०० रु होतें.

धातुः-यांतील सलिंगें प्रदेशांत सल्फेट ऑफ कॉपर सांपडतें. चिनव्यित येथें सोन्याची खाण आहे. सलैंगेजवळ गार्नेट व टूरमलीन सांपडतें. कानी प्रदेशांतील मद्दौंग रांगेच्या पायथ्याशीं व पले प्रदेशांतील काईन येथें घास्लेटाच्या खाणी आहेत. सलिंगेंत येथें खान्या विहिरीच्या पाण्यापासून मीठ तयार करतात.

व्यापार व दळणवळणः—अलोन येथें लांकडावरील कोरीव काम होतें. श्वेबोसरहद्दीजवळील अयदव व येदवेट या गांवीं स्वयंपाकाचीं व पिण्याचीं मातीचीं भांडीं तयार होतात. इंदायिंग येथें पितळेचीं भांडीं व घुंगरू होतात. चेहुमोन व मोनिवे येथें खोगीर व लगाम होतात. कोथन येथें थोड्या प्रमाणावर रेशमी कापड विणलें जातें. थिनमाबिन विभागांत चटया व गवती पेटया तयार करतात. मोनीक मौंगदौंग वगैरे ठिकाणीं लाखेच्या बांगड्या व इतर सामान तयार होतें. या जिल्ह्यांतून डाळ, ज्वारी, गुळ, काथ, पितळ व लाखेचें सामान हे जिन्नस बाहेरगांवीं रवाना होतात व मीठ, मीठ लावलेले मासे व परदेशी माल हे जिन्नस बाहेरून येतात. याचा आयात व निर्गत व्यापार बहुतांशीं आगगाडी व जलमार्ग या दोन साधनांनीं चालतो. याशिवाय यांत १४६ मैल पक्क्या व ३५० मैल कच्च्या सडका आहेत. यांतील व्यापारी लोक म्हटले म्हणजे ब्रह्मी व चिनी होत. मोनीवा सतोन हीं यांतील व्यापाराचीं मुख्य ठिकाणें होत. पर्जन्यवृष्टीचें प्रमाण निश्चित नसल्यामुळें या जिल्ह्यांत दुष्काळ पडण्याची भिती असते. १८९१ सालीं असाच एक दुष्काळ पडला होता.

शिक्षणाच्या बाबतींत हा जिल्हा फार मागासलेला आहे. जिल्ह्यांत एकंदर ३ दुय्यम प्रतीच्या, ११३७ प्राथमिक व ७६९ लहान मुलांच्या खाजगी शाळा आहेत.

**चिंदविन नदी**— ही ब्रह्मदेशाच्या उत्तरेकडील हुकौंग दरीच्या सभोंवतालच्या टेंकड्यांत उगम पावून झिंकलिंग, कम्ती, शानसंस्थान, उत्तर व दक्षिण चिंदविन जिल्हे वगैरे प्रदेशांतून वहात जाते व पकोक्कु व मिंग्यान या शहरांच्या दरम्यान इरावतीस मिळते. इला यू म्यित्था वगैरे नद्या मिळतात. इची लांबी ६०० मैल असून कांहीं ऋतूंत मुखापासून आंत ४०० मैलपर्यंत आगबोटी जाऊं येऊं शकतात. या नदीच्या तिरावर तंबाखूचें उत्पन्न होतें.

**चिदानंद स्वामी**—सावंतवाडी संस्थानांतील एक संतकवि. यांचा जन्म शके १६३० च्या सुमारास कुडाळ देशस्थ गौड ब्राम्हण ज्ञातींत झाला. हे दाभोली मठाचे मठाधिकारी होते. वयाच्या ८० व्या वर्षी स्वामी समाधिस्त झाले. तेंडली गांवीं बागलांची राई म्हणून जी वाडी आहे तींत यांची समाधि असून, तीसंबंधी अनेक चमत्कार सांगतात. संकृत गुरुगीतेवर ‘स्वानंद लहरी’ नामक प्राकृत ओवीबद्ध टीकात्मक ग्रंथ स्वामींनीं लिहिला आहे. याचे १४ अध्याय असून ओवीसंख्या १००० आहे. शके १८३३ त छापून प्रसिद्ध झाला. स्वामींची इतर कांहीं (स्फूट) कविता आहे. [ म. कविचरित्र ].

**चिनडोंगर**—ब्रम्हदेशाच्या वायव्येकडील सरहद्दीवरील एक डोंगराळ प्रदेश. याचें क्षेत्रफळ ८००० चौ. मैल आहे. याच्या उत्तरेस मणिपूर असून पश्चिमेस लुशाई पर्वत व चिन मुलुख आहे. दक्षिणेस पकोक्कू चिन टेंकड्या असून पूर्वेस उत्तर–चिंदवीन व पकोकु जिल्हे आहेत. हा सर्व प्रदेश डोंगर व दऱ्या यांनीं व्यापिला आहे. यांतील पर्वतरांगा उत्तर दक्षिण असून, त्यांची उंची ५००० पासून ९००० फुटांपर्यंत आहे. या प्रदेशांतील मुख्य नद्या म्हटल्या म्हणजे मणिपूर, बोईनु, त्याओ वगैरे होत. या शिवाय यांत न्हीं नावाचें एक तळें आहे. याची लांबी $\frac{3}{4}$ मैल असून रुंदी $\frac{1}{4}$ मैल आहे. या प्रदेशांत हत्ती, वाघ, हरण, चित्ते वगैरे जनावरें आढळतात.

या प्रदेशांतील ३००० ते ६५०० फूट उंचीच्या भागांतील हवा समशितोष्ण आहे. अलिकडे उत्तर व कांहीं दक्षिण भागांत गारांचा वर्षाव झाला होता. दर महिन्यांत थोडाफार पाऊस पडतो. पण खरा पावसाळा जूनपासून नोव्हेंबरपर्यंत असतो. पावसाचें साधारण प्रमाण ५० ते १०० इंच आहे.

इतिहास.—उत्तर ब्रम्हदेश इंग्रजी साम्राज्यास जोडण्यांत येण्यापूर्वी या प्रदेशांत त्यांतील लोकांचे आपआपसांतील कलह व त्यांच्या ब्रम्ही, लुशाई वगैरे लोकांवरील स्वाऱ्या यामुळें जिकडे तिकडे अंदाधुंदी माजली होती. १८८७-८८ त उत्तर चिंदविन जिल्ह्याच्या डेप्यूटी कमिशनरानें टाशोन लोकांशीं सलोख्याचें बोलणें लाविलें. परंतु त्यांनीं न जुमानतां बंड उभारलें. याच वेळेस उत्तरेकडील सियिन

व दक्षिणेकडील हक लोक उपद्रव देऊं लागले. १८८८त उत्तरेकडील लोकांविरुद्ध एक फौज रवाना झाली. तिनें त्या लोकांचीं खेडीं जाळून त्यांनां ताळ्यावर आणलें. १८८९-९० त टशोन व हक लोकांवर स्वारी करण्यांत येऊन हक या गावीं लष्करी छावणी स्थापन करण्यांत आली. १८९१-९२ त इंग्रजांनीं फलम गांव काबिज केलें. त्याच्या पुढच्या वर्षी चिनडोंगराळ प्रदेशाच्या दोन भागाचा एक भाग करून फलम हें त्याचें मुख्य ठिकाण केलें. १८९२-९३ सालीं सिर्यीन व न्वेंगल सोक्त या लोकांनीं एका सरकारी अधिकाऱ्यास मारल्यावरून त्यांचीं हत्यारें काढून घेण्यात आलीं. पुढें याचप्रमाणें १८९४ ९५ त हक व दक्षिणेकडील लोकांस व १८९५-९६ त टशोन मध्यवर्ती लोकास निःशस्त्र करण्यांत आलें. १८९५-९६ सालीं हा प्रदेश ब्रह्मदेशास जोडण्यात येऊन त्याचा एक स्वतंत्र जिल्हा करण्यात आला व १८९६ त या जिल्ह्याच्या राज्यव्यवस्थेकरितां कायदे करण्यात आले. १८९६ पासून या प्रदेशांत शातता नांदत आहे. मात्र १८९८-९९ सालीं मात्र एकदा या शाततेचा भंग झाला होता. यावेळीं यांतील रानटी जाती पुन्हा गुप्तपणें सशस्त्र झाल्या, व त्यानीं बंड उभारलें. पुढें १९०० पर्यंत बंड मोडण्यात आलें.

सन १९२१ सालीं याची लोकसख्या ११००७९होती. या प्रदेशांत ब्रह्मी, शान व नागा वगैरे जाती आढळतात परंतु बहुतेक भागात मुख्यत्वेंकरून चिनी लोकाचा भरणा अधिक आहे. या प्रदेशांतलि उत्तर भागात चिन लोकाच्या सोक्त, सिर्यीन, टशोन, यहौ, व्हेन्नोह, हक, व योक्व या जाती असून दक्षिण भागांत योयुन, शिंगताग लक्तु यो लई या जाती राहतात.

शे ती.—पूर्वेकडील व दक्षिणेकडील डोंगरउतारावर तौंगय पद्धतीनें तांदूळाचें पीक होतें. हा प्रदेश डोंगराळ असल्यामुळें त्यांतील पेरणीची जमीन हातानेंच तयार करावी लागते, जनावरांचा शेतीकडे कांहीं उपयोग होत नाहीं. वरील पिकाशिवाय यांत ज्वारी, मका, हरभरे, वाटाणे, बटाटे, तंबाखू, सुंठ, कांदे वगैरेंचें उत्पन्न होतें.

जं ग लें—यांतलि जंगलाचे उंचीच्या मानानें पांच वर्ग होतात त्यांत बांबू, साग, वगैरे झाडें आहेत. या प्रदेशांत चुनखडी वगैरे दगडांच्या खाणी आहेत. याच्या बहुतेक सर्व भागांत थोड्या प्रमाणांत मीठ सांपडतें. याशिवाय खाऱ्या पाण्याच्या विहिरी व झरे आहेत. कुबो खोऱ्यांत दगडी कोळशाच्या खाणी आहे. परंतु त्यांतलि कोळसा चांगल्या प्रतीचा नसून त्याचें प्रमाण फार थोडें आहे. चिनी लोक झऱ्यांचें खारें पाणी, मातीच्या भांड्यांत उकळून त्यापासून मीठ काढतात पण हें मीठ अशुद्ध असतें.

व्या पा र व द ळ ण व ळ ण.—या प्रदेशांत तयार होऊन बाहेर जाणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे वेताच्या व बांबूच्या चटया, टोपल्या हे होत. याशिवाय यांत कानातलि दागिने, बागड्या, धातूचे मणी वगैरे जिन्नस तयार होतात. काहीं ठिकाणीं लोखंडी सामान तयार होतें. टेकड्यांवर कापूस पिकतो व सुती कापड विणण्याचें काम सर्वत्र होतें. घरधुती बायका रेशमी कापड विणतात. या प्रदेशाच्या दक्षिण सरहद्दीवरील भागात ब्रह्मी लाक रेशमी किडे पोसतात व त्यापासून निघणारे रेशीम ते चिनी लोकास विकतात.

या प्रदेशांतून बाहेर जाणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे, वेताच्या चटया, मक्याच्या कणसाचे कुटार व मेण हे होत. बाहेरून मीठ, लोखंड, घुंगरू, पितळ, मणी, रेशमी सूत रगीत सूत वगैरे जिन्नस येतात. यझगिओ, कलेमिओ, इंदिन, कन, गंगौ, पकोक्क वगैरे शहराची व्यापाराकरिता प्रसिद्धि आहे. या प्रदेशात १३३ मैल पक्के व काहीं कच्चे रस्ते आहेत.

रा ज्य व्य व स्था—चिन प्रदेशात तीन पोटविभाग असून प्रत्येक पोटविभागावर एका अ. सुपरिंटेंडेंट अधिकाऱ्याची नेमणूक आहे या अधिकाऱ्यावर सुपरिंटेंडेंट हुद्याचा कामगार देखरेख करतो. पोटविभागाचीं मुख्य ठिकाणें फलम, टिड्डाम, व हक हीं शहरें असून त्यांपैकीं फलम येथें एक डॉक्टर आहे. या प्रदेशाचें सार्वजनिक कामांचे लोकोपयोगी खातें चिंदविन जिल्ह्याच्या खात्याचा एक भाग असून त्यावर एका अ. इंजिनीअराचा नेमणूक केला आहे. सुपरिंटेंडेंट अधिकाऱ्यास सेशन्स जज्जाचा अधिकार असून प्रत्येक असिस्टंट सुपरिंटेंडेंट न्यायाधीश असतो. प्रदेशांत शातता राखण्याची जबाबदारी कोतवालावर सोंपविलेली असते. कोतवालास कांहीं खटल्यात लोकरीतीस अनुसरून न्याय देण्याचा अधिकार असतो. उत्पन्नाची मुख्य बाब म्हटली म्हणजे थायमेडा कर असून १९०४-०५ सालीं त्याचें उत्पन्न ४१९०० रु. होत. प्रत्येक पोटविभागाच्या मुख्य ठिकाणीं एक सार्जंट नेमिलेला असतो मात्र याशिवाय प्रदेशात इतर कोणचेच पोलीस अधिकारी नसतात. फलम या जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं एक लहान तुरुंग आहे. कांहीं ठिकाणीं लष्करी छावण्या आहेत. फलम येथें तद्देशीय भाषेची एक सरकारी शाळा आहे. या प्रदेशात एकंदर आठ दवाखाने असून त्यापैकीं ४ लष्करी व बाकीचे मुलकी आहेत.

**चिनमुलगुंद**—मुंबई. धारवाड. कोडच्या वायव्येस ६ मैलावर हें गाव आहे. चिकेश्वराच्या देवळात जुन्या, कानडी लिपींतील एक शिलालेख आहे. गावाच्या पूर्वेस एका टेंकडीवर सिद्धेश्वराचें स्वयंभू लिंग असून जवळच डाव्या बाजूस भूम्यंतर्गत लेणें आहे. गांवाबाहेर ईश्वराच्या देवळाजवळ इ. स. १२४३ सालचा एक शिलालेख आहे.

**चिन लोक**—हे आपली उत्पत्ति जन्मागता ली इच्या एका अंड्यापासून झाली असें मानतात. हे पर्वतांवरून

रहातात. पूर्वी पुष्कळ वर्षेपर्यंत ते कोठेंहि स्थाईक रहात नसत, व बकऱ्या, कोंबड्या, डुकरें इत्यादिकांचे कळप बाळगीत असत. हे ‘ जगन्माता ली ’ व इतर दैवतें व पितर यांनां पूज्य मानतात. ते मूर्तिपूजा करीत नाहींत. त्यांच्यांत उपाध्यांची वेगळी जात नाहीं. त्यांचे धार्मिक मंत्र वगैरे परंपरेनें आलेले आहेत. ते लिहिलेले नाहींत. यांच्या चाली वगैरे सर्व जगन्माता लींच्या आज्ञेवरून पडल्या असें हे मानतात. यांच्या निरनिराळ्या ४० जाति आहेत. त्यांपैकीं मेंडेट व तलौ या दोन श्रेष्ठ मानल्या जातात. फक्त दोनच जातींनां त्यांपैकीं नार या देवतेला बलिदान देतां येतें. हे आपलें पहिलें पिक, किंवा झाडाचें प्रथम फळ पाहिल्यानें देवतेस अर्पण करतात. तसेंच ते वर्षादेवता ( फ्लॅंग सॉ ) हिला बलिदान देऊन शांत राखतात. ते पिक चांगलें यावें म्हणून देवतांची प्रार्थना करतात. ते देवालयें वगैरे बांधीत नाहींत व मूर्तींची स्थापना करीत नाहींत. पण प्रत्येक गोष्टीला कोणी तरी देवता कारण आहे असें मानतात व ठेंच लागली तरी त्या ठिकाणीं भाताचें बलिदान करतात. यांच्यांत अगणित दैवतें मानिलेलीं आहेत. त्यांचें शांतवन त्यांचे उपाध्ये यैशेन—हा जास्त विद्वान असेल तर त्यास ओकमी व कमी असेल तर मॅांगटेन असें म्हणतात— हे मंत्र वगैरे म्हणून व बलिदान देऊन करतात. हे जग दोन राक्षसांनीं ( न्सॉंग व न्हॉय यांनीं ) आपल्या खांद्यांवर धरलें आहे असें मानतात व जेव्हां ते आपले खांदे बदलतात तेव्हां भूकंप होतात अशी त्यांची समजूत आहे. ते मांत्रिक व जादुगारीणींचें अस्तित्व मानतात. त्यांच्यांतील तंटे, फिर्यादी वगैरे पूर्वी त्यांच्यांतील वृद्ध असे पंच तोडित असत. हल्लीं ब्रिटिश अमदानींत सरकारनें नेमलेला मुख्या हें काम करतो. साक्ष देण्यापूर्वी हे थज्ये झाडाची फांदी धरून शपथ करीत असत. यांच्यांत एकंदर तंटे व फिर्यादी कमीच होतात. त्यांनां आपलें घर सोडावेसें वाटत नाहीं. त्यांची रहाणी अतिशय साधी असते. त्यांचीं घरें, उपकरणें, वगैरे सर्व बहुतेक बांबूंचीं केलेलीं असतात. व ते बांबूचीं वाद्येंहि करतात. त्यांचें खाणें म्हणजे भात व परसांत केलेल्या भाज्यांची आमटी होय. त्यांच्या बायका सूत कांतून कपडे विणतात. ते वनस्पतींपासून रंगहि तयार करतात. त्यांच्या बायका शेतकीच्या सर्व कामास मदत करतात. ते तांदुळाचें कॉंग नांवाचें मद्य करतात. हें मद्य ते आपल्या दैवतांस अर्पण करतात व त्यावेळीं पितात. एरवीं ते फारसें मद्य पीत नाहींत. मात्र अशा वेळीं ते इतके बेफाम होतात कीं त्या वेळीं केलेल्या परस्त्रीगमन वगैरे अपराधांबद्दल कोणी पुरावा देण्याइतकाहि शुद्धींत नव्हता असें धरून अपराध्यास सोडून देण्यांत येतें. हे बलिदान वगैरे प्रसंगीच मांस खातात. यांच्यांतील बायका आपलीं तोंडें गोंदून घेऊन हिरवीं निळीं करतात व पुरुषहि गोंदून घेतात. मुलांचा जन्म झाल्यावर त्यांच्या कानांचा हे वेध करतात. यांच्यांतील पुष्कळ लोकांनीं बौद्धधर्म स्वीकारला असूनहि ते तो कडकरीतीनें न पाळतां आपल्या दैवतांची पूजा चालू ठेवतात. यांची भाषा व पोशाख यांनीं ब्रह्मी लोकांपासून घेतलेले दिसतात. यांच्यांत बहिर्विवाह करतात. एकाच जातींत आपसांत विवाह होत नाहीं परजातींतच करावा लागतो. बहीणीच्या मुलास भावाची मुलगी देतात. वधूपक्ष श्रेष्ठ व वरपक्ष कनिष्ठ समजला जातो. वर मुलीच्या भावाकडे--हा मुलीचा पालक असतो--मद्य घेऊन जाऊन तें स्वीकारण्यास सांगतो. स्वीकार केल्यास मुलाचा बाप रीतसर मुलीस मागणी घालतो. ठरल्यावर मुलाकडून मुलीच्या नातलगांस डुकराच्या मांसाची व वधूकडून वराकडील मंडळीस कोंबडीचें मांस व भात यांची मेजवानी मिळते. यावेळीं दोन्हींकडील मद्य व नातलगांकडील मिळून अतिशय मद्य पिण्यांत येतें. यावेळीं डुकराच्या आंतड्यावरून शकुन पाहून नंतर विवाह करतात. नंतर वधूवरगृहीं गेल्यावर वधूचे हात बांधून तिजवर पतीची व त्याच्या जातीची सत्ता झाली असें दाखवितात. पुनर्विवाहाची व सोडचिठ्ठीची चाल आहे. मृतांस जाळून त्यांची हाडें पुरण्याची चाल आहे. यावेळीं ऐपतीप्रमाणें मद्यमांस सर्वांस पुरविण्यांत येतें. प्रेतयात्रा मरणानंतर २४ तासांपासून ३ दिवसांपर्यंत निघते. यावेळीं खेड्यांतील लोक बरोबर जातात. यावेळीं उपाध्याय नसेल तर एक वर्षानें प्रेत उकरून काढून सर्व संस्कार करतात. मृताचा आत्मा परत येऊन पीडा करणार नाहीं याबद्दल पुष्कळ काळजी घेतली जाते.

**चिनसुरा**—हें बंगाल इलाख्याच्या हुगळी जिल्ह्यांतील एक गांव असून हुगळी नदीच्या उजव्या तीरावर वसलें आहे. हें गांव हुगळी शहरास जोडलें असून १९०१ सालीं त्या दोघांची लोकसंख्या २९३८३ होती. सातव्या शतकाच्या पूर्वार्धापासून तों १८२५ पर्यंत हें डच लोकांच्या ताब्यांत होतें. पुढें इंग्रजांनीं डच लोकांनां सुमात्रा देऊन हें आपल्या ताब्यांत घेतलें. पूर्वी येथें लष्करांतील आजारी शिपाई रहात असत व इंग्लंडला जाणाऱ्या लष्करी फौजेचें हें एक ठाणें असे. १८७१ त येथील ठाणें उठविण्यांत आलें. येथें न्यायकचेऱ्या व इमामवाडा नांवाचा दवाखाना असून डच लोकांनीं नदीतीरीं बांधलेला एक वाडा व ख्रिस्ती देवालय आहे. एक मिशन हायस्कूल व कांहीं दुय्यम शाळा येथें आहेत.

**चिनाब**—ज्या पांच नद्यांमुळें पंजाब हें नांव पडलें, त्यांपैकीं चिनाब ही एक नदी आहे. पंजाबांतील हिमालयाच्या लाहूल परगण्यांतून हिचा उगम चंद्रा व भागा नांवाच्या दोन प्रवाहांनें होतो. हे दोन प्रवाह तंडी येथें मिळतात, व या संगमास चंद्रभागा अथवा चिनाब म्हणतात. ही पंजाबच्या चंबा संस्थानांतून व काश्मीरच्या पद्दर जिल्ह्यांतून वहात जाते. इला युनिअर, शुदी, भुरना, मारुवरद्वान गालनलार, लिदरकोल, बिचलारी, अन्स आणि तावी या

नद्या मिळतात हिच्यावर पुष्कळ पूल बांधलेले आहेत. त्यांपैकीं दोन पूल काय ते वर्णन करण्याजोगे आहेत. खांकीपासून हिचा मोठा कालवा काढला आहे. झेलम नदी झंग जिल्ह्याच्या त्रिमू शहराजवळ हिला मिळते; व पुढें सिंधूजवळ रावी व मद्रालजवळ सतलज नदी मिळते. या सर्व नद्यांच्या संगमास पंचनद म्हणतात व ही पंचनद मियानकोट येथें सिंधूनदीस मिळते. चिनाब नदींत बर्षभर लहान होड्या चालतात. इ स. १२४५ पर्यंत ही नदी मुलतानच्या पूर्वेकडून वहात असे. नंतर तिचा प्रवाह बदलून ती मुलतानच्या पश्चिमेकडून वाहूं लागली आहे.

का ल वा ( खालील ).—हा कालवा पंजाबांत चिनाब नदीच्या डाव्या बाजूकडून काढलेला आहे. याचें पाणी चिनाब व रावी नद्यांच्यामधील जमीनीस देतात. या दोन नद्यांमधील भागांत सरकारी पडीत जमीन असून त्यांत पूर्वी जंगली लोक रहात असत. पुढें या ठिकाणीं फार मोठ्या प्रमाणावर वसाहत करण्यांत आली.सन१८८७त लहान लहान बंधारे बांधून पहिल्यानें पाणी देण्याचें काम सुरू केलें; पण सन १८८९ त मोठा कालवा बांधण्याचें ठरल्यावर याचें काम सुरू होऊन सन १८९२ त पूर्ण झालें. त्यांत पाणी सोडण्याचें मुख्य ठिकाण गुजराणवाला जिल्ह्याच्या खांकी खेड्यांत आहे. या ठिकाणीं नदीवर धंधारा बांधलेला आहे व येथून गरज लागेल त्याप्रमाणें कमी अगर जास्त पाणी सोडता येतें. या कालव्याच्या मुख्य भागांतील पात्र २५० फूट रुंद व ११ फूट खोल आहे. यांतील पाण्याचा वेग दर सेकंदास ११००० घनफूट आहे. डाव्या बाजूस २८व्या मैलावर यांतून सर्वांत मोठी अशी गुजेर नांवाची शाखा काढलेली आहे. ती ५५ मैल लांब गेल्यानंतर तिच्यांतून खालील गुजेर व बरुल नांवाचे दोन फांटे काढलेले आहेत. उजव्या बाजूस १८ मैल लांबीची कोट निक्क शाखा आहे. या कालव्याचा मुख्य भाग ४० मैल लांब गेल्यानंतर त्याच्यातून झंग, रख आणि मिआनअली हे फांटे फुटतात. वीस बावीस लक्ष एकर जमीनीला दरसाल या कालव्यांतून पाणी मिळतें. पंजाबच्या रेचनादुआबमधील सरकारी पडीत जमिनीचे प्रत्येकीं सुमारें २८ एकराचे चौरस तुकडे करण्यांत आले. या जमिनी ज्यांनां देण्यांत आल्या त्या लोकांचे भांडवलवाले, गृहस्थ व निव्वळ शेतकरी असे तीन प्रकार आहेत. हे तुकडे शेतकऱ्यांनां अर्ध्यापासून तीन पर्यंत, गृहस्थांनां ४ किंवा ५ पर्यंत व भांडवलवाल्यांनां ५ किंवा २० अगर जास्त देण्यांत येतात. सरकारनें या जमिनीवर मालकीचा हक्क राखून ठेवला आहे व वसाहत करणारे लोक म्हणजे शेतकरी, कांहीं वर्षांच्या मुदतीपर्यंत व गृहस्थ जोपर्यंत ते शेतसारा भरीत आहेत तोपर्यंत सरकारचे कासाकार होत.परंतु भांडवलवाल्यांनां कांहीं वर्षांच्या मुदतीनंतर जमीनीवर मालकीचा हक्क मिळूं शकतो. जमीनीची विभागणी करून देण्याकरितां व खेड्यापाड्यांत वस्ती करण्याकरितां एक वसाहतकामगार नेमण्यांत आला असून त्याचें रहाण्याचें ठिकाण लायलपूर येथें आहे. या वसाहतींत सन१९०३-४ त १४२३ खेडीं होतीं. मालाची नेआण करण्यासाठीं रेल्वे सुरू करण्यांत आली. या कालव्याला एकंदर खर्च ३२५ लाख रुपये आला आहे. दर साल यापासून १२८ लाख रुपये उत्पन्न मिळतें. त्यामुळें ही एक मोठी उत्पन्नाची बाब झाली आहे.

पु रा चे का ल वे.—पंजाबांत चिनाब व रावी या नद्यांचा संगम झाल्यानंतर त्यांतून डाव्या बाजूकडून काढलेले कालवे आहेत. यांतील पाणी मुलतान जिल्ह्याच्या मुलतान आणि शुजाबाद तहशिलींतल्या भागांत दिलें आहे. हे कालवे मुलतान व शुजाबादच्या पठाण राजांनीं बांधिले होते. जुलै व आगस्ट महिन्यांत चिनाब नदी तुडुंब भरलेली असते. जवळील जमिनींत पाणी शिरून पिकाचें नुकसान होऊ नये म्हणून तिच्यावर बांध घातलेले आहेत व कांहीं ठिकाणीं या कालव्यांच्या भिंतीहि उंच केलेल्या आहेत. पूर्वी शेत वहाणारे लोक पाण्याचे पैसे देण्याऐवजीं आपल्या खर्चानें कालव्यांतील गाळ काढीत असत. ही चाल पुढें बंद करण्यांत येऊन त्यांच्यापासून सारा वसूल करण्यांत येऊं लागला.

**चिनीमाती** किंवा केओलिन.—मूळ या मातीचा शोध चीन देशांत लागला व तेथें या मातीचीं उंचीं भांडीं घडूं लागले. चीन देशांत केओलिंग पर्वताजवळ ही माती सांपडते व त्यावरून हिला केओलीन हें नांव पडलें आहे.

चिनीमाती हा चिकण मातीचा अति शुद्ध प्रकार आहे; व हिचींच चिनी भांडीं करतात. ही शुभ्र पांढरी असते. गार, फेलस्पार, व अभ्रक यांचा बनलेला जो ग्रानाईट नामक कणदार दगड त्यांतील फेलस्पार झरून ही माती उत्पन्न होते. चीन देशांत उत्तम जातीची ही माती सांपडते, व तिची चिनी भांडीं यूरोपांत करतात. ज्या देशांत ग्रानाईट दगडांचे खडक असतात त्या देशीं ही माती उत्पन्न होते. दक्षिण हिंदुस्थानांत त्रिचनापल्ली, अर्काट, म्हैसूर, निजामचें राज्य आणि उत्तर हिंदुस्थानांत पंजाब, व दिल्ली प्रांत यांत व हिमालयावर ही माती सांपडते.

चि नी भां डीं.—हीं( पोर्सेलेन ) करण्यास उत्तम प्रतीची पांढरी व शुद्ध अशी केओलिन नांवाची चिकणमाती घेतात. या भांड्यांकरितां ६२ भाग चिनीमाती ( केओलिन) ४ भाग खडू, १७ भाग वाळू आणि १७ भाग फेल्स्पार दगडाची पूड या चोहोंची वेगवेगळाली बस्त्रगाळ पूड करून मिसळतात, व तें मिश्रण चांगलें मळून कांहीं महिनेपर्यंत सर्द जागीं ढीग करून ठेवतात. नंतर त्याचीं भांडीं घडवितात. हें मिश्रण दुसऱ्या चिकणमातीपेक्षां कमी लवचीक व चिकट असतें, म्हणून याचीं भांडीं चाकावर किंवा साच्यांत घडवितांना विशेष काळजी घ्यावी लागते. भांडीं घडविल्यावर तीं सावकाश वाळू देतात, आणि भट्टींत घालून भाजतात. मिना करण्याकरितां कांचमणी ( क्वार्ट्स ) आणि फेलसपार यांची बुकणी पाण्यांत भिजत घालून व

शुद्ध करून नंतर त्यांचें मिश्रण पाण्यांत कालवून दाट करतात व त्यांत थोडेंसें व्हिनिगर ( शिर्का ) घालतात. या द्रवांत भांडीं बुडवितात, यामुळें भांडयांच्या छिद्रांत द्रव शिरून त्याचें आच्छादन भांडयांवर बसतें. नंतर प्रत्येक भांडें मातीच्या पिपांत घालून भाजतात. चिनी भांडें विस्तवांत मृदु होतें. याकरितां पिपांत अनेक भांडीं एकावर एक रचतां येत नाहींत. प्रत्येक भांडयास निराळें पीप लागतें. हीं पिंपें एकावर एक रचून भट्टींत लांकडें वगैरे घालतात, व भट्टी सावकाश पेटवितात. भट्टी २ । ३ दिवस पेटती राहून भांडीं भाजलीं म्हणजे ३ । ४ दिवस भट्टी निवूं देतात, आणि नंतर भांडीं काढतात.

मिना व केलेलीं चिनी भांडीं पांढऱ्या संगमरवरी दगडासारखीं दिसतात, व त्यावेळीं त्यांस चकाकी नसते. परंतु चिनी भांडयांवर मिना केल्यावर तीं कांचेसारखीं चकचकीत, कणदार, कठीण व कांहीं प्रकाशभेद्य अशीं दिसतात. चिनी भांडयांवर नक्षी वगैरे काढणें तीं मिना केल्यावर हातानें काढतात. निरनिराळे रंग उठविण्याकरितां धातूंचे ऑक्साईड घेतात. हे ऑक्साईड काच भोरा, किंवा टांकणखार या पदार्थांबरोबर कुटून टर्पेटाइन तेलांत खलतात, व त्यानें नक्षी काढितात. लाल रंगाकरिता लोखंडाचा ऑक्साईड घेतात. पिंवळयाकरितां शिशाचा क्रोमेट, निळयाकरितां कोबाल्टचा ऑक्साईड व हिरव्याकरितां तांब्याचा ऑक्साईड घेतात. जांभळा रंग करण्याकरितां सोनें भूपजलांत विद्रुत करून त्यांत शुद्ध कथलाची कांब बुडवितात. म्हणजे जी जांभळी पूड तळीं बसते, तिचा उपयोग करतात. प्रत्येक रंगाचें काम झाल्यावर भांडें भाजावें लागतें. ज्या भागावर शुद्ध सोनें चढवावयाचें असेल त्या ठिकाणीं सोन्याचा वर्ख किंवा पूड, डिंकाचें पाणी व टांकणखार यांनीं लावितात. यास ऊन केल्यावर डिंक जळून जातो, व टांकणखाराची कांच बनून सोनें पक्कें चिकटतें.

चिनी व दुसरीं उंचीं मातीचीं भांडीं करण्याचे फार मोठे कारखाने आहेत, व त्या कारखान्यांत हजारों माणसें काम करीत असून सुमारें २०,००,०००रुपयांचा माल विलायतेहून परदेशीं जातो. हिंदुस्थानांतहि सर्व प्रकारचीं भांडीं करण्याचीं द्रव्यें मिळत असून हिंदुस्थानांत दरसाल लाखों रुपयांचीं मातीचीं भांडीं इतर देशांतून येतात. [ मोडक–पदार्थवर्णन ].

**चिन्नविरन्ना**—एक तेलगू कवि. तेन्नाली येथील हा कवि कोंडवेडू येथील अन्नवेम्मारेड्डी राजाच्या वेळीं उदयास आला. ह्याला एक वडील बंधु पेद्दाविरन्ना नांवाचा होता. त्यानें चांगलें अध्ययन केल्यामुळें त्याची उत्कृष्ट कवींमध्यें गणना झाली. दोघे बंधू प्रत्यहि दरबारांत जात असत. तेथें पेद्दाविरन्ना हा राजास फार प्रिय होता. एकदां राजानें पेद्दाविरन्नास अशा अवघड विषयावर कवित्व करण्यास सांगितलें कीं, तशा विषयावर त्यापूर्वी कोणाहि कवीनें कवित्व केलें नव्हतें. पेद्दाविरन्नानें एकदम थोडक्या अवधींत कवित्व करण्याचें कबूल केलें. पुढें घरीं आल्यावर आपल्या बायकोकडून चिन्नाला ही हकीगत कळविली. चिन्नानें देवीची प्रार्थना केली. तिनें चिन्नविरन्नासाठीं पांच सर्गांचें उत्तम काव्य लिहिलें. शेवटच्या पांच ओळी बाकी राहिल्या. पुढें ते पांच श्लोक पेद्दाविरन्नानें करून तें काव्य राजाला अर्पण केलें. त्या दिवसापासून चिन्नविरन्नाची कवित्वाविषयीं चोहोंकडे ख्याति झाली. [ परशा–तेलगूवाङ्मय. ].

**चिन्नूर** तालुका.—हैद्राबाद संस्थानच्या अदीलाबाद जिल्ह्यांतील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ९७८ चौ. मैल आहे. याच्या दक्षिणेस गोदावरी नदी असून पूर्वेस प्राणहिता नदी आहे, व तिच्या पलीकडे मध्यप्रांत आहे. १९११ सालीं लोकसंख्या ८३३३९ होती. या तालुक्यांत एक गांव व १७१ खेडीं आहेत. १९०१ सालीं याचें सान्याचें उत्पन्न ६४००० रु. झालें होतें. यांत तलावाच्या पाण्यानें तांदुळाचें पीक होतें.

गांव.—तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ६९८९ होती.येथें तहसिलकचेरी व पोलिस इन्स्पेक्टरचें ठाणें असून एक पोस्ट ऑफिस व दवाखाना आहे. येथें टसर रेशमाचें कापड निघतें.

**चिन्योत** तहसिल.—ही पंजाब प्रांताच्या झंग जिल्ह्यांतील एक तहसिल असून हिचें क्षेत्रफळ १०१६ चौ. मैल आहे. १९११ सालीं हिची लो. सं. १८३९६६ होती. हिच्यांत १ गांव ३५४ खेडीं आहेत. १९०५-६ सालीं हिचें एकंदर उत्पन्न २.६४ लाख रु. होतें. या तहसिलींतील प्रदेशांत झेलम व चिनाब नद्यांचे कालवे असून त्यामुळें बहुतेक पडीत जमीन लागवडीस आली आहे.

शहर.— तहशिलीचें मुख्य ठिकाण असून झंग शहराच्या ईशान्येस ५२ मैलांवर वसलें आहे १९११ सालीं याची लोकसंख्या १४०८५ होती. हें गांव फार जुनें आहे. पुरातनकालीं याला साकल (संगल) ही संज्ञा असून हें श्वेतहूण लोकांचें राजधानीचें शहर होतें. येथें ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी आला होता. दुराणीच्या स्वाऱ्यांमुळें हें बरेंच मोडकळीस आलें होतें; व १८४८ च्या अस्वस्थतेमुळेंहि या शहराचा बराच नाश झाला. सध्यां हें भरभराटींत आहे. शहाजहानबाद येथील सुभेदार नबाब सादुल्लाखान यानें बांधलेली एक मशीद असून शहा बुऱ्हान या फकीराचें एक देवालय आहे. या देवालयास हिंदू व मुसलमान सारखेंच पूज्य मानतात. येथें पितळेचीं भांडीं व लांकडावरील कोरीव काम होतें. येथील गवंड्यांची फार प्रसिद्धि आहे. ताजमहाल व अमृतसर येथील सोन्याचें देवालय येथील गवंड्यांनींच बांधलें असें म्हणतात. येथें गहूं, कापूस वगैरेंचा व्यापार चालतो. येथील म्युनिसिपालिटीची स्थापना सन १८६७ सालीं झाली.

**चिपळूण**, ता लु का.—हा मुंबई इलाख्याच्या रत्नागिरी जिल्ह्यांतील मध्यवर्ति असा तालुका असून याचें क्षेत्रफळ ६७१ चौ. मै. आहे. यांत चिपळूण हें एक गांव व २१२ खेडीं आहेत. १९११सालीं याची लोकसंख्या सुमारें १९७हजार होती. जमीनीचा सरकारसारा सुमारें १५.६ हजार रु. आहे. हा तालुका समुद्रकिनाऱ्यापासून पश्चिम घाटापर्यंत पसरला असून यांतील बहुतेक प्रदेश डोंगराळ आहे. यांतील मुख्य नद्या म्हटल्या म्हणजे वाशिष्टी व शास्त्री या होत. यांतील पावसाचें प्रमाण दर वर्षास १४१ इंच आहे. तालुक्यांत प्राथमिक शिक्षणाच्या शाळा ७२ आहेत. शेती हा मुख्य धंदा असून लुगडीं, बांगड्या वगैरे माल कोठें कोठें तयार होतो. चिपळूण हें व्यापाराचें मुख्य ठिकाण आहे.

गां व.—तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे. याची लोकसंख्या स. १९०१ सालीं ७८९६ होती हें चांगलें भरभराटींत असून येथें कोंकण व देश यांमधला व्यापारीह बराच चालतो. स. १८७६ त येथें म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. गांवापासून सरासरी पावमैल अंतरावर कांहीं बौद्ध लेणीं आढळतात. हें गांव कोंकणस्थ ब्राह्मणांचें मूलस्थान होय. येथें एक सबजज्जाची कचेरी, दवाखाना व एक हायस्कूल आहे. येथून जवळच परशुराम क्षेत्र आहे. येथें परशुराम एज्युकेशन नांवाची एक शिक्षणसंस्था असून तिनें एक हायस्कूल चालविलें आहे.

**चिपळूणकर, कृष्णशास्त्री** ( १८२४-१८७८ )—एक महाराष्ट्रीय ग्रंथकार व पंडित. हे कोंकणस्थ ब्राह्मण असून यांचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांत पांवसगांव होय. पण यांचा जन्म पुण्यास १८२४ मध्यें झाला. हे लहानपणापासूनच फार हुशार व बुद्धिमान होते. प्रथम यानीं वेदपठण व शास्त्राध्ययन केलें; यांचे गुरु मोरशास्त्री साठे यानां ' बृहस्पति ' म्हणत. पण १८४८ च्या सुमारास पुण्यास बुधवारवाड्यांत नवीन सरकारी इंग्रजी शाळा सुरू झाली त्यावेळीं सदरहू मोरशास्त्री यानीं कृष्णशास्त्री यांस स्पष्ट सांगितलें कीं, " याउपर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा रहाणार नाहीं. तूं शहाणा असलास तर इंग्रजी शीक. " कृष्णशास्त्र्यांचें शिकण्याचें वयहि राहिलें नव्हतें तरी त्यांनीं वरील उपदेशानुसार आपल्या वयाच्या २५ व्या वर्षी इंग्रजीच्या अभ्यासास सुरुवात केली नंतर कांहीं दिवस ट्रॅन्स्लेटर एक्झिबिशनर व नंतर पुना कॉलेजांत आसिस्टंट प्रोफेसर होते. या वेळीं त्यांनीं कित्येक स्नेह्यांच्या सहाय्यानें ' विचारलहरी ' नामक पत्र सुरू करून तरुण हिंदु विद्यार्थ्यांच्या, मिशनरी मंडळींच्या व्याख्यानांनीं ख्रिस्ती धर्माकडे होत असलेल्या प्रवृत्तीस चांगलाच आळा घातला. पुढें कांहीं दिवस दक्षिणा प्राईझ कमिटीच्या सेक्रेटरीच्या जागीं काम केल्यावर ' रिपोर्टर ऑन दि नेटिव्ह प्रेस'च्या जागीं यांची नेमणूक झाली. हे उत्तम लेखक व वक्ते होते. यांचे मुख्य ग्रंथ आरबी भाषेंतील सुरस गोष्टी, अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह, अर्थशास्त्रपरिभाषा, साक्रेटिसाचें चरित्र, रासेलस आणि व्याकरणावरील निबंध हे होत. हे उत्तम कवीहि होते; यांचीं पद्यरत्नावली, मेघदूत हीं काव्यें सर्वमान्य आहेत. यांची भाषा फार साधी, शुद्ध, प्रौढ व गोड असे; यांचें भाषांतरित ग्रंथ वाचतांना ते भाषांतररूप आहेत असें मुळींच भासत नाहीं; अव्वल इंग्रजींत मराठी भाषेची सेवा ज्या पंडितांच्या हातून झाली त्यांत हे अग्रेसर होते. २० मे १८७८ रोजीं कृष्णशास्त्री मरण पावले. अलौकिक बुद्धिमत्ता, अभिजात रसिकता, व्यापक विचारसरणी, लोकमताला न दुखविण्याचें धोरण, संस्कृत व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आणि बहुमानाची सरकारी नोकरी या कारणांमुळें शास्त्रीबोवांचा लौकिक जसा विद्वन्मंडळांत तसा बहुजन समाजांतहि पहिल्या प्रतीचा होता. शास्त्रीबोवांचे बहुतेक गद्य व पद्य प्रबंध भाषांतरित किंवा आधाररचित आहेत. फक्त ' मराठी व्याकरणावरील चर्चात्मक लेख ', ' अर्थशास्त्रपरिभाषा ' हा निबंध व ' विद्याप्रशंसा ' हें लघुकाव्य, याच काय त्या त्यांच्या स्वतंत्र कृती होत. त्यांचे सर्व ग्रंथ भाषेच्या दृष्टीनें आल्हाददायक असले तरी स्वतंत्र ग्रंथांतील स्वावलंबनाला सहज असलेली तेजस्विता किंवा तडफ त्यांच्या ग्रंथांत आढळत नाहीं. तत्कालीन अनेक सुशिक्षितांप्रमाणें कृष्णशास्त्री हे रसिक तसेच रंगेलहि होते.

**चिपळूणकर, विष्णुशास्त्री** ( १८५०-१८८२ )—आधुनिक महाराष्ट्रवाङ्मयाचा जनक व एक लेखक. यांचा जन्म पुण्यास झाला ( २० मे १८५० ). प्राथमिक शिक्षण झाल्यावर, हे १८६५ सालीं मॅट्रिक झाले व डेक्कन कॉलेजमध्यें गेले; तेथें अभ्यासापेक्षां विविध ग्रंथवाचनाकडे फार लक्ष दिल्यामुळें बी. ए. व्हावयास यानां पांच वर्षे लागलीं. बी. ए. झाल्यावर कांहीं वर्षे शाळाखात्यांत नोकरी केली. १८७९ सालीं सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन स्वतंत्र उद्योगास आरंभ केला. १८७४ त त्यानीं ' निबंधमाला ' मासिक सुरू केलें. ' निबंधमालें ' तील लेखांनीं यानीं महाराष्ट्र हालवून सोडला. न्यू इंग्लिश स्कूल, चित्रशाळा, किताबखाना ह्या संस्था काढल्या व ' केसरी ' आणि ' मराठा ' हीं वर्तमानपत्रें सुरू केलीं. हे असामान्य बुद्धिमान, उद्योगी, करारी व बाणेदार पुरुष होते; हे मोठे विद्वान् व खंदे लेखक होते; सर्वच बाबतींत पाश्चात्य अनुकरणाचें बंड विशेषतः सुशिक्षित लोकांत जास्त माजलें व लोकांस आपलेपणाचा विसर पडूं लागला, इतकेंच नव्हे तर पाश्चात्य दुर्गुण शिक्षित म्हणविणाऱ्या लोकांत मान्यता पावूं लागले, अशा वेळीं आपलेपणाची स्मृति त्यांच्या लेखांनीं जागृत केली व सर्व महाराष्ट्र खडबडून जागा केला. सुशिक्षितांचें लक्ष लोकशिक्षण आणि लोकसेवा ह्या श्रेष्ठकर्तव्याकडे ओढलें जाऊन मराठी भाषेच्या सेवेंत व स्वदेशाच्या इतिहासांत त्यांचें मन अधिकाधिक रमूं लागलें; साधी रहाणी, उदात्त विचार, स्वावलंबन व देशप्रीति इत्यादि महाराष्ट्रीय सद्गुणांची जाणीव

ह्यांच्या लेखांनीं तरुण पिढीस केली; ह्यांचे लेख, व आपल्या आयुष्याच्या अल्पावकाशांत ह्यांनी केलेली देशसेवा महाराष्ट्र कधींहि विसरणार नाहीं. यांना अकालीं मृत्यु आला (१७ एप्रिल १८८२) हें महाराष्ट्राचें दुर्दैव समजलें पाहिजे.

नि बं ध मा ला—मराठी गद्यग्रंथांत अग्रपूजेचा मान 'निबंधमाले'ला सर्वकाळ मिळेल. मालेंतल्या निबंधांत भाषाविषयात्मक सहा ( मराठी भाषेची सांप्रतची स्थिति, भाषादूषण, लेखनशुद्धि, भाषांतर, भाषापद्धति, व इंग्रजी भाषा ), वाङ्मयात्मक सात ( विद्वत्त्व आणि कवित्व, इतिहास, वाचन, वक्तृत्व, ग्रंथावर टीका, जान्सनचें चरित्र व मोरोपंताची कविता ), सामाजिक तीन ( संपत्तीचा उपभोग, लोकभ्रम व आमच्या देशाची स्थिति ), प्रचलित मतखंडनपर एक ( लोकहितवादी ) आणि मानसशास्त्रपर एक ( गर्व ) हे मुख्य होते. भाषाविषयक निबंध मार्मिकपणानें लिहिलेले असून भाषाविषयाचा अभ्यास ज्या दृष्टीनें यूरोपांतील पंडित करितात ती दृष्टि या निबंधांत मालाकारांनीं आपल्या देशबांधवांस आणून दिली आहे. वाङ्मयात्मक निबंधांपैकीं काव्यविषयक निबंधांत कांहीं चुकीचीं मतें चिपळूणकरांनीं प्रतिपादिलीं आहेत. "ह्या सुधारणेच्या प्रगतीबरोबर कवितेचा अपकर्ष होतो", "अर्धवट सुधारलेल्या लोकांचें वाङ्मय कवित्वरूपानें प्रकट होतें" हे प्राकृत इंग्रज निबंधकार मेकॉले याचे अग्राह्य ठरलेले सिद्धांत विष्णुशास्त्री यांनीं कसे ग्रहण केले याचें आश्चर्य वाटतें. या चुकीच्या सिद्धांतांवर टीका पांचव्या विभागांत ( विज्ञानेतिहास पृ. ३२) झाली आहे. तसेंच "सर्वांपेक्षां अधिक सदोष कविता पाहणें असल्यास आमची मराठी होय. तींतील बहुतेक कवींस व्याकरणाची, छंदांची वगैरे ओळखसुद्धां नव्हती असें म्हणण्यास हरकत नाहीं; मग पदलालित्य, अर्थगांभीर्य वगैरे काव्यगुणांची तर गोष्टच नको" वगैरे अभिप्रायहि फार चुकीचे दिसतात. आनंदतनय, रघुनाथपंडित, वामनपंडित, मुक्तेश्वर, विठ्ठल, मोरोपंत, रामजोशी वगैरे पुष्कळ कवी संस्कृत व्याकरण-छंदादि शास्त्रांचे ज्ञाते होते या गोष्टीकडे चिपळूणकरांचें कांहीं दुर्लक्ष झालें असावेंसें वाटतें. चिपळूणकरांचे जे सामाजिक विषयासंबंधाचे निबंध आहेत त्या सर्वांत मुख्य धोरण एकच दिसतें; तें हें कीं, आपल्या लोकांनीं व्यसनाला, आळसाला, कर्तव्यशून्यतेला व अन्तःकलहाला बळी न पडतां यूरोपीय लोकांप्रमाणें देशोन्नतीच्या कार्याला लागावें. शेवटचा 'आमच्या देशाची स्थिति' हा निबंध राजकीय स्वरूपाचा असून तो १९१० सालीं सरकारच्या नजरेनें राजद्रोही ठरल्यामुळें प्रेसअॅक्टान्वयें सरकारजमा झाला. 'लोकभ्रम' या निबंधांत भूतपिशाच्चें, शकून, फलज्योतिष वगैरेसंबंधीं टीका आहे. पाश्चात्त्य शास्त्रज्ञांच्या आधुनिक संशोधनाकडे पाहतां या विषयांच्या खरेखोटेपणाबद्दल निश्चित मत देणें आजहि धोक्याचें आहे. तथापि महाराष्ट्रीय वाचकवर्गामध्यें सदरहू निबंधानें चिकित्सक दृष्टि जागृत केली हें योग्य झालें. 'ग्रंथावर टीका' हा विषय घेऊन त्यावर स्वतंत्र निबंध शास्त्रीबोवांनीं लिहिला व तदनुसार पंडितांचा वेदार्थयत्न, तारानाटक, रसायनशास्त्र, टेंपेस्ट, ब्राह्मणांची गुलामगिरी वगैरे परीक्षणार्थ आलेल्या अनेक पुस्तकांवर टीका केली. त्यांत त्यांचें मूळ ग्रंथाचें ज्ञान, सत्यप्रीति, निर्भिडपणा, शांत स्वभाव, सहृदयता, वगैरे टीकाकारास अवश्य असलेले गुण दृष्टीस पडतात. शिवाय ज्याच्यावर टीका करावयाची त्या लेखकाची विद्वत्ता, योग्यता, अधिकार शास्त्रीबोवा कधीं विसरत नसत. त्यामुळें माधवराव रानडे, वेदार्थयत्नकर्ते पंडित, लोकहितवादीकर्ते देशमुख, यांच्यावरील टीका करतांना लेखकाच्या ज्ञान व देशहिताची कळकळ वगैरे गुणांबद्दल आदरभाव व स्तुति व्यक्त केली आहे. उलटपक्षीं ख्रिस्ती मिशनरी, ज्योतिबा फुले, वगैरे मंडळींची त्यांनीं फजीती उडविली आहे. तात्पर्य सदासर्वकाळ एकच प्रकारचें टीकाशस्त्र न चालविण्याचा योग्य तारतम्यभाव त्यांनीं पाळला आहे.

वर सांगितलेल्या मुख्य निबंधांशिवाय सुभाषितें, अर्थसाहित्य, उत्कृष्ट उतारे, विनोद, म दाख्यायिका वगैरे सदरांखालीं निबंधमालेंत चिपळूणकरांनीं विविध व मनोरंजक माहिती दिली आहे. तात्पर्य, इंग्रजी, संस्कृत व मराठी या तीन वाङ्मयांच्या चिपळूणकरांनीं केलेल्या व्यासंगाचें पूर्ण प्रतिबिंब निबंधमालेंत पडलें आहे विशेषतः इंग्रजी वाङ्मयांत जे जे कांहीं मनोरम चमत्कारिक प्रकार आढळले ते ते सर्व मराठींत आणण्याचा त्यांनीं शक्य तितका प्रयत्न केला. विविध विषयांच्या सुलभ विवेचनानें अनेक प्रकारच्या विपुल माहितीनें भरलेला इतका मनोरंजक व उद्बोधक ग्रंथ मराठींत दुसरा नाहीं. राष्ट्राची विवक्षित स्थिति व जिज्ञासा लक्षांत घेऊन मर्यादित प्रमाणावर रचलेला 'निबंधमाला' हा केवळ वाङ्मयाचा असा एक ज्ञानकोशच आहे. त्यांतील निबंध बेकनच्या निबंधासारखे सूत्रात्मक नाहींत, जॉन्सनच्या निबंधांसारखे गहनविचारपरिप्लुत नाहींत, ह्यूमच्या निबंधांप्रमाणें समाजशास्त्रावर व मानसशास्त्रावर अति खोल विचार करून लिहिलेले नाहींत व अॅडिसनच्या निबंधांप्रमाणें बहुधां केवळ लौकिक विषयांवर लिहिलेले नाहींत. तर ज्यावर मालाकारांनीं शतशः प्रहार केलेल्या मेकॉले नामक इंग्रज लेखकाच्या निबंधांच्या धर्तीवर आहेत. त्यांत अॅडिसनचा बालबोधपणा व मेकॉलेचा तिखटपणा दोन्ही आहेत.

सुधारणा या शब्दाचा व्यापक अर्थ लक्षांत घेऊन पाहिल्यास चिपळूणकर हे पहिल्या प्रतीचे सुधारक होते असें म्हणावें लागेल. सामाजिक व राजकीय सुधारणांचा पुरस्कार करण्याच्या कित्येक महाराष्ट्रीयांच्या मतांत आज जी विसंगति दिसते तिला चिपळुणकरांच्या विचारसरणींत स्थान नव्हतें. त्यांचीं सामाजिक मतें राजकीय मतांइतकी प्रखर होतीं; याचा प्रत्यय 'लोकभ्रम' वगैरे निबंधांवरून येतो. तथापि 'सुधारक' म्हणून म्हणविणारांचा ते द्वेष करीत; त्याला

सुशिक्षितांनें व सुधारकांचें थिल्लरपणाचें वर्तन,मिशनऱ्यांप्रमाणेंच 'सुधारकां'नीं चालविलेली हिंदुधर्माची निंदा आणि आर्यसमाज व प्रार्थनासमाज यांची एकंदर समाजापासून फुटून पडण्याची प्रवृत्ति हीं कारणें होतीं.

महाराष्ट्राच्या तेजस्वी राजकीय विचारांचा उगम निबंधमालेंतूनच झाला. परतंत्र राष्ट्रांतील सुबुद्ध व तेजस्वी व्यक्तींचा कल साहजिक राजकारणाकडे वळतो, कारण स्वदेशाला दास्यांत खितपत पडलेला पहाणें त्यांनां असह्य होतें. चिपळुणकरांचा देशाभिमान स्वयंस्फूर्त होता. त्याचा उगम इंग्रजी राज्याविषयींच्या अप्रेमांत झाला. जुन्या विद्येचा अनादर, हिंदुधर्माची निंदा आणि १८५७ च्या बंडाची म्हणजेच परतंत्र राष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ धडपडीची ताजी आठवण या परिस्थितींत त्यांचा देशाभिमान वाढला; व त्याला 'निबंधमाला', 'केसरी', 'मराठा', 'न्यू इंग्लिश स्कूल', 'चित्रशाळा' वगैरे फळें आलीं. इतकेंच नव्हे तर महाराष्ट्राच्या देशोन्नतिपर प्रयत्नांनां तेथपासून निश्चित वळण लागलें. [पांगरकर–निबंधमालेचें स्वरूप व कार्य. माडखोलकर–विष्णु कृष्ण चिपळुणकर. नटेसन सीरीज मधील चरित्र इत्यादि ].

**चिफू**—उत्तर चिनांतलें एक बंदर असून तें चिलीच्या आखाताच्या दक्षिण किनाऱ्यावर आहे. याला येन्ताई असें स्थानिक नांव आहे. हें शांगटुंग प्रांतांत यीहो नदीच्या मुखाजवळ असून टेंगचौफूच्या पूर्वेला ३० मैलांवर आहे. चिफू पूर्वी फार लहान खेडें होतें. परंतु तेंगचौचें बंदर म्हणून ठरवून १८५८ सालीं टीन्टसीनच्या तहानें हें परदेशच्या व्यापारास खुलें केलें.सध्यां येथें ब्रिटीश वकील रहातो. व चिनी सरकारचें जकातीचें ठाणें आहे. येथें परकीय लोक बरेच रहातात.

जुना गांव व समुद्र यांमध्यें परकीय लोकांची वसाहत आहे. चिफू येथें उन्हाळ्यांत बरेच लोक हवा खाण्यासाठीं येतात. रोमनकॅथोलिक व प्रॉटेस्टंट यांचीं प्रार्थनामंदिरें येथें आहेत. येथील बंदर विस्तीर्ण व खोल आहे तरी मोठीं जहाजें व आगबोटी किनाऱ्यापासून बऱ्याच लांब नांगरतात. लोकरीचें कापड, कापसाचें कापड, लोखंड व अफू इत्यादि वस्तूंची आयात आहे. भाजी, सुकीं फळें, कच्चें रेशीम, वाटाणे, अक्रोड इत्यादि पदार्थ परदेशांत जातात. येथील हवा निरोगी व बंदर चांगलें असल्यामुळें युरोपियन राष्ट्रांच्या चिनी समुद्रांत असलेल्या गलबतांचें हें कोळसे घेण्याचें व एकत्र जमण्याचें ठिकाण झालें आहे. चिफूच्या करारावर (कन्व्हेन्शन,) सर थॉमस वेड आणि लिहुंगचंग यांनीं या ठिकाणीं सही केली ( १८७६ ).

**चिमणाजीआप्पा**—हा बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा दुसरा पुत्र. याच्या जन्माचे १६९० ( राजवाडे ), १६९७ ( भ. कोशकार ) व १७०८ ( सरदेसाई ) असे निरनिराळे सन आढळतात. दमाजी थोरातच्या कैदेंत बापाबरोबर चिमणाजी कांहीं दिवस होता ( १७१३ ). पेशवाई मिळाल्यानंतर थोरल्या बाजीरावानें मोगलांच्या विरुद्ध जें चढाईचें धोरण स्वीकारलें, त्यांत माळवा प्रांतीं मुलुखगिरी करण्याच्या कामावर पेशव्यांनीं चिमणाजी आप्पास नेमिलें. तेव्हांपासून आप्पा स्वाऱ्यांमोहिमांवर जातीनिशी जाऊं लागले. सारंगपूर येथें राजा गिरधर, माळव्याचा सुभेदार याच्यावर स्वारी करून आप्पांनीं त्यास ठार मारिलें ( १७२४ ). तसेंच आप्पांनीं त्याच्या नंतरचा माळव्याचा सुभा दयाबहादुर याच्यावरहि १७३०।३१ त दोन स्वाऱ्या करून त्याला तिरलच्या लढाईत ठार केलें व माळवा हस्तगत केला (आक्टो.१७३१). परंतु शाहूच्या आज्ञेनें आप्पा माळव्यांतून निघून शिद्दीवर कोंकणांत गेले. सरबुलंदखानापासून त्यांनीं १७३० त गुजराथेंत चौथाईचा अंमल बसविला.त्रिंबकरावदाभाडे यांच्या पारिपत्याच्या प्रकरणीं बाजीराव व आप्पा यांचें ऐकमत्य होतें ( १७३१ ).पुढें (१७३३ ) शिद्दीवरील स्वारींत प्रतिनिधीच्या मदतीस आप्पा यास जाण्याबद्दल शाहूनें आज्ञा केली; परंतु शिद्दीच्या तर्फे निजामानें कारस्थान चालविल्यामुळें, निजामावर दाब ठेवण्यासाठीं आप्पा शिद्दीवर न जातां पुण्यास राहिले; परंतु पुढें बाजीराव शिद्दीवर गेल्यानें व सेखोजी आंग्रे मरण पावल्यानें आप्पा हे शिद्दीच्या विरुद्ध आक्टोबरांत कोंकणांत चढाई करून गेले ( १७३३ ). मराठ्यांचें निजामाशीं युद्ध चालू असतां तापी नदीच्या आसपास निजामाला पायबंद म्हणून आप्पा फौजबंद होऊन राहिले होते ( १७३८ ). यापुढें वसईच्या मोठ्या मोहिमेंत आप्पा प्रमुख होते. ही मोहीम दोन वर्षे चालू होती. प्रथम ठाणें व साष्टी काबीज केली ( १७३७ जून ). यावेळीं आप्पांनीं बेलापुर, मांडवी, टकमक, कामणदुर्ग, मनोर वगैरे पुष्कळ ठाणीं फिरंग्यांपासून घेतलीं. फिरंग्यांच्या धार्मिक जुलुमानें कंटाळलेली अंताजी रघुनाथ व अणजूरकर नाईक वगैरे प्रांतस्थ प्रमुख मंडळी मराठ्यांस अनुकूल झाली होती. फिरंग्यांचें आरमार व सैन्य सुसज्जित असतांहि मराठ्यांनीं चिकाटीनें व शौर्यानें वसईसह त्यांचा वरील सर्व प्रदेश काबीज केला. पुढें ( १७३८ ) फिरंग्यांनीं त्या प्रांतीं असलेल्या शंकराजी केशव,रामचंद्र हरि वगैरे सरदारांवर जय्यत तयारीनिशीं मोहिम केली. परंतु या सुमारास मराठे भोपाळच्या मोहिमेंत गुंतल्यानें वसईभागांत त्यांनां फारशी हालचाल करतां आली नाहीं. त्यानंतर १७३८ च्या नोव्हेंबरांत आप्पा वसईच्या स्वारीवर निघाले. सहा महिने या स्वारीचा हंगाम चालू होता. दमण ते दीवपर्यंतचा सर्व किनारा त्यांनीं हस्तगत केला. या भागांत सर्वत्र चकमकी सुरू होत्या व आप्पा या सर्व किनाऱ्यावर एकसारखे लढत होते. त्यांनीं प्रथम माहीम सर केलें ( डिसेंबर ).येथें शंभर गलबतें भरून इंग्रज व हबशी यांची मदत फिरंग्यास झाली असतांहि मराठ्यांनीं माहीम काबीज केलें. नंतर केळवें, शिरगांव, डहाणू, असेरी वगैरे ठाणीं घेतलीं ( जानेवारी १८३९ ).या सर्वांत तारापूरचें

ठाणें मजबूत असल्यानें तेथें शिताफीचा रणसंग्राम झाला. पण अखेर तारापुरचा किल्ला मराठ्यांनीं घेतला. मात्र येथें बाजी भिवराव हा नामांकित सरदार ठार झाला (जाने.). नंतर आप्पानीं वसईवर हल्ला केला. हा वेढा तीन महिने चालू होता. मराठ्यांनीं अत्यंत चिकाटीनें युद्ध चालवून हा किल्ला अखेर १३ मे रोजीं फिरंग्यांपासून काबीज केला ( वसई पहा ). दुसरीकडे वांदरा, वेसावे, धारावी वगैरे ठाणीं आप्पांच्या सरदारांनीं काबीज केलींच होतीं ( फेब्रु ). वसईच्या मोहिमेचीं खास अप्पानीं ब्रम्हेंद्रस्वामीस लिहिलेलीं पत्रें वाचण्यालायक आहेत. ( राजवाडे खं. ३ ले. २७; काव्येतिहास सं. पत्रें यादी. ले. ४३९ ). सारांश या मोहिमेंत फिरंग्यांचा सुमारें पाऊणशें मैल लांबीचा ( ३४० गांवें असलेला ) प्रदेश आप्पानीं काबीज केला. त्याशिवाय ८ शहरें, २० किल्ले, २५ लाख किंमतीचा दारूगोळा व जहाजें, तोफा इतकें सामान आप्पानीं हस्तगत केलें. यावेळीं आप्पानें अगर पेशव्यानें वसईस मराठी आरमाराचा एक सुभा स्थापून इंग्रजास पायबंद घालावयास पाहिजे होता, परंतु हें त्या दोघांच्याहि लक्ष्यांत आलें नाहीं. पुढें पेशव्यांचें निजामाशीं युद्ध झालें त्यांत आप्पाहि सामील होते(१७४०). त्यावेळीं मुंगीपैठणचा तह होऊन आप्पा परतले. इतक्यांत आंग्रयांच्या घरांत कलह माजला व मानाजीनें मदतीस बोलाविल्यावरून आप्पा कोंकणांत गेले व त्यांनीं तेथें संभाजी आंग्रयांचा पराभव करून त्याला सुवर्णदुर्गास परतविलें ( १७४० ). इतक्यांत थोरले बाजीराव वारल्यानें आप्पा बरोबर नानासाहेबास घेऊन, पुण्यास व तेथून साताऱ्यास गेले व त्यांनीं नानासाहेबास पेशवाईचीं वस्त्रें मिळवून दिलीं. (आगष्ट१७४०).बाजीरावाचें व आप्पाचें शेवटीं शेवटीं बिनसलें असावें. " श्रीमंत ( मस्तानीमुळें ) विषयलंपट झाले, यामुळें आप्पाशीं अंतर पडून नर्मदातीरीं गेले." आप्पानीं१७४०च्या जानेवारींत फिरंग्यांचें रेवदंडा नांवाचें ( गोवें व दमण यामधील ) राहिलेलें एकच ठाणें काबीज केलें. येथून परत आल्यावर आप्पांची प्रकृति वाख्यानें ढासळली. आप्पांची पहिली बायको रखमाबाई, ही त्रिंबकरावमामा पेठेची बहीण होती. हिचाच पुत्र सदाशिवराव भाऊ. भाऊचा जन्म झाल्यानंतर २८ दिवसांनींच ही वारली ( ३१-८-१७३० ). त्यानंतर आप्पानीं अन्नपूर्णाबाई नांवाची दुसरी स्त्री केली ( डिसें० १७३१ ). हिला बयाबाई नांवाची एक मुलगी झाली ( नोव्हें. १७४० ). आप्पांची प्रकृति एकदां बिघडली ती न सुधारतां अखेर पुणें येथें त्यांचें देहावसान झालें ( डिसें० १७४० ). त्यावेळीं अन्नपूर्णाबाई ही सती गेली. या और्ध्वदेहिकास ११७५ रु. खर्च झाला. बयाबाई ही गंगाधर नाईक यास दिली ( १४ एप्रिल १७४५ ); ती पुढें १७५९ त वारली. आप्पा हे थोरल्या बाजीरावापेक्षां कांहीं बाबतींत श्रेष्ठ होते. त्यांनीं बाजीरावास त्याच्या दोषांवर पांघरूण घालून शेवटपर्यंत पाठपुरावा केला. बाजीरावास पेशवाई मिळाली तेव्हांच आप्पांस त्यांची मुतालिकी मिळाली होती. आप्पा विचारी, धोरणी, मनमिळाऊ, शूर व नीतिमान होते. वसईच्या किल्ल्यांत सांपडलेल्या फिरंगी सरदाराच्या सुस्वरूप मुलीस त्यांनीं सन्मानानें परत पाठविलें ही गोष्ट प्रख्यातच आहे. शाहू व इतर सरदार मंडळी बाजीरावाकडील काम आप्पांच्या मध्यस्तीनें उरकून घेत. बाजीरावाचीं मुलें बहुधा आप्पाजवळच असत. त्यांना शिक्षणहि आप्पांनींच दिलें होतें. कौटुंबिक व्यवस्थाहि तेच पहात असत. बाजीरावानें उत्पन्न केलेल्या अनेक प्रकरणांचा निकाल आप्पाच लावीत. नानासाहेबांच्या अंगीं जो अष्टपैलु मुत्सद्दीपणा आला होता त्याचें श्रेय आप्पांसच होतें. आप्पांना गुजराथी लोक चिमणराजा म्हणत असत. डफ म्हणतो कीं पोर्तुगीजांवर मिळविलेल्या अनेक विजयांमुळें आप्पांची कीर्ति महाराष्ट्रांत अजरामर झाली. पाश्चात्य राष्ट्रांशीं लढण्याचे वारंवार प्रसंग आल्यानें त्यांचें असें ठाम मत झालें होतें कीं तोफखाना व कवायती पायदळाशिवाय पाश्चात्यांबरोबर टिकाऊ जय मिळणें नाहीं. [ डफ. पु. १, २; मराठी रिसायत, मध्यविभाग; नानासाहेब रोजनिशी; पत्रें यादी वगैरे; ब्रह्मेंद्र स्वामीचरित्र; राजवाडे खं. २, ३; शाहू म.ची बखर; पंतप्रधान शकावली, पृ. ७. ].

**चिमणाजीआप्पा**, ( धाकटे )—हे राघोबादादाचे व आनंदीबाईचे धाकटे औरस पुत्र. यांचा जन्म ता. ३० मार्च १७८४ रोजीं कोपरगांवीं झाला. राघोबादादा वारले तेव्हां चिमणाजीआप्पा यांच्या वेळीं आनंदीबाई चार महिन्यांची गरोदर होती. धाकटे बाजीराव व चिमाजीआप्पा दादासाहेबाच्या पश्चात् बरेच दिवस आनंदवल्लीस राहिले होते.आप्पाची मुंज ८ मार्च १७८९ रोजीं झाली. खर्ड्याच्या स्वारीच्या वेळेस रावबाजी कांहीं खूळ उत्पन्न करतील म्हणून या दोघा भावांना आनंदवल्लीहून काढून शिवनेरीस नजरकैदेत ठेविलें होतें. सवाईमाधवराव वारल्यानंतर मुत्सद्यांच्या व मराठामंडळाच्या आग्रहावरून एखादा गोत्रज यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक बसवावा असें नानानीं ठरविलें, परंतु पुण्यांतील लोकांना तें पसंत पडलें नाहीं. त्यांचें म्हणणें रावबाजी व धाकटा चिमणाजी जिवंत असतां परक्याला दत्तक कां घ्यावें ? इकडे रावबाजीनींहि दौलतराव शिंद्यांस सव्वाकोट रु. देण्याचें अमीष दाखवून आपल्यास गादीवर बसविण्यासाठीं त्याची अनुमति मिळविली. तेव्हां नानांनीं पटवर्धन, रास्ते, वगैरे सरदारांच्या सल्लयानें चिमणाजीस दत्तक घेण्याचें ठरवून परशुरामभाऊस चिमणाजीस आणण्यासाठीं जुन्नरास पाठविलें. चिमणाजी हा यशोदाबाईचा चुलत सासरा होता व धर्मशास्त्राप्रमाणें सुनेस सासरा दत्तक घेतां येत नसे. यास तोड अशी काढिली कीं, चिमणाजीनें फक्त सरकारकागदोपत्रीं चिमणाजी माधवराव म्हणावें व खासगी व धार्मिक व्यवहारांत चिमणाजी रघुनाथ म्हणावें.पुण्याच्या लोकांच्याहि मनांत चिमणा-

जीसच दत्तक घ्यावें असें होतें. परंतु रावबाजीनें दौलतरावाच्या हिमायतीवर नानांचा हा बेतच मुळांत खोडून टाकला. आपणच बाजीराव रघुनाथ म्हणून पेशवे व्हावयाचे; आपण किंवा चिमाजी दत्तक जावयाचे नाहीं. असें त्यांनीं ठरविलें व त्यास परशुरामभाऊहि अनुकूल झाले, व नानांनींहि काळवेळ जाणून त्यास रुकार दिला. त्याप्रमाणें भाऊ या मंडळीस घेऊन पुण्यास आले ( मार्च १७९६ ). यावेळीं चिमणाजीआप्पा घोडीं भरधांव सोडून भाले फेकण्यांत तरबेज झाला होता. हा रंगानें फार गोरा, चपळ व क्रोधिष्ट असे. रावबाजीनें पुण्यास आल्यावर दौलतराव शिंद्यास सव्वाकोट रु. देण्यांचें लांबणीवर टाकलें व पुढें पुढें तर ते निव्वळ दौलतरावाच्या सल्लयानेंहि चालेनात. तेव्हां शिंद्यानें व परशुरामभाऊनें मसलत करून पेशवाईचीं वस्त्रें घेण्याच्या निमित्तानें रावबाजीनां पुण्याच्या बाहेर काढून थेऊर येथें त्यांनां प्रथम कच्च्या प्रतिबंधांत ठेविलें ( ८ एप्रिल ). पुढें देण्याघेण्याचे खटके मोडण्यासाठीं रावबाजी हे शिंद्याच्या गोटांत ता. ९ मे रोजीं रात्रीं गेले असतां शिंद्यानें त्यांनां कायमची नजरकैद केली व त्याच रात्रीं भाऊनें चिमाजीस बळजबरीनें ( तो येत नसतांहि त्यास जबरदस्तीनें ) पालखींत घालून पुण्याचा रस्ता पकडला; त्यानंतर मुहूर्त पाहून १२ मे रोजीं शनिवारवाड्यांत प्रवेश केला ( तोपर्यंत रास्त्यांच्या वाड्यांत राहिले होते ). इकडे नाना फडणीस शिंद्यांच्या भयानें ( ज्यावेळीं शिंदे पुण्यास आले तेव्हांच ) साताऱ्याकडे निघून गेले होते. तेथून ते मेणवलीस गेल्यानंतर चिमाजीआप्पांचें दत्तविधान झालें ( मे २६ ) व सातारकर महाराजांकडून त्यांनां पेशवाईचीं वस्त्रेंहि मिळालीं (२ जून ); परंतु नानानीं निजाम, इंग्रज, होळकर, भोसले वगैरे मंडळींशीं राजकारण करून चिमाजीआप्पाचें उच्चाटन घडवून आणलें. त्यानीं आपल्या मुत्सद्देगिरीनें खुद्द दौलतराव शिंद्यासहि फोडले व त्याच्या तर्फे रावबाजीशीं सूत्र लावून त्यास गादीवर बसविण्याचें ( बाजीराव रघुनाथ म्हणून ) ठराविलें. या वेळीं रावबाजी जांबगावीं होते. या वर्षी दसऱ्याचा समारंभ फार थाटाचा झाला. चिमाजीआप्पाची स्वारी मोठ्या समारंभानें निघाली होती. पण हें आपलें वैभव १५–२० दिवसांतच नष्ट होणार हें श्रीमंतांच्या ध्यानांतहि आलें नाहीं. शेवटीं २६ आक्टोबरच्या रात्रीं या ( चिमाजीस गादीवर बसविण्याच्या ) सर्व कारस्थानाचा उत्पादक बाळोबातात्या पागनीस व त्याचे साथीदार यांनां दौलतरावानें कैद केलें. पहाटे होळकर व निजामाची फौज शनिवारवाड्यावर चालून आली. तत्पूर्वी रात्रींच एक चुकी झाल्यानें भाऊ व चिमाजीआप्पा निसटले. परशुरामभाऊस पकडण्याची चिठ्ठी परशुरामवैद्य यास जावयाची असतां, चुकून जासुदानें ती भाऊजवळच नेऊन दिली. तेव्हां भाऊ तात्काळ हजार पांचशें स्वार घेऊन व चिमाचीआप्पास आपल्या घोड्यावर घेऊन जुन्नरकडे पळाले. परंतु हुजरातीनें त्यांनां तेथें पकडून भाऊस मांडवगणच्या किल्ल्यांत व चिमाजीआप्पास शिवनेरीस कैदेंत ठेविलें. नंतर ठरल्याप्रमाणें नाना पुण्यास आले व रावबाजी गादिवर बसले ( ४ दिसेंबर ). हें सर्व कारस्थान नानांचेंच होतें. पुढें चिमाजी आप्पास शिवनेरीहून पुण्यास आणलें व ते शनीवारवाड्यांतच राहूं लागले. तेव्हां रावबाजीनें पुण्यांतील पंडितांनां विचारून त्यांनीं सांगितल्यावरून ( अशास्त्रीय दत्तविधान झाल्यामुळें ) चिमाजीआप्पास सक्षौर प्रायश्चित देवविलें ( १७९७ नोव्हेंबर ). शिंद्याच्या गृहकलहानें पुण्यास भानगडी चालू झाल्या, त्या सुमारास रावबाजीनें चिमाजीचें लग्न केले ( ८ जून १७९८ ). मुलगी आप्पाजीपंत दामले यांची नात होती; तिचें नांव सीताबाई होतें. दुसरी बायको सत्यभामाबाई नांवाची, मंगळवेढेकर मेंहेंदळयांची मुलगी होती; हिचें लग्न १८१२ सालीं झालें. आप्पांचा राज्यकारभारांत फारसा प्रवेश झाल्याचें आढळून येत नाहीं. फक्त स. १७९७ च्या सुमारास गुजराथचा सुभा पेशव्यानीं यांच्या नांवचा करून दिला होता व यांची मुतालिकी आबा शेलुकरास सांगितली होती. एवढाच उल्लेख आढळतो. पेशवाई नष्ट झाल्यानंतर यांनां इंग्रजानें पेनशन देऊन काशीस ठेविलें व ते तेथें ९ जून १८३० रोजीं वारले. यांची पुढील हकीकत आढळत नाहीं [ खरे–खंड, ७, ९, १०; डफ–पु. ३; राजवाडे–खंड, ४ ].

**चिमणाजी दामोदर**—याचें उपनांव मोघे असून इ. स. १७०८ च्या सुमारास हा खानदेशांत जमावानिशीं रहात होता. प्रथम पेशवे व पिंगळे यांच्या हाताखालचा हा गृहस्थ होता. ताराबाईच्या कारकीर्दींत हा उदयास आला. याचे वंशज पूर्वखानदेशांत रिंगणगांव येथें जहागीरदार आहेत. शाहुराजे औरंगजेबाकडून सुटून महाराष्ट्रांत आले तेव्हां चिमणाजी हा खानदेशांत असल्यानें त्याच्याकडे मनुष्य पाठवून त्यास शाहूनें आपणाकडे वळवून घेतलें. चिमणाजी दामोदरचें घराणें पुढें मराठशाहींत साधारण प्रसिद्ध होतें. या घराण्याचा व बाळाजी विश्वनाथाच्या घराण्याचा विशेष घरोबा असून पेशवे हे मोघ्यास ' चिरंजीव ' लिहीत असत. चिमणाजी प्रथम शाहूस मिळाला खरा पण पुढें कांहीं दिवसांनीं शाहूशीं बेबनाव होऊन, तो कोल्हापूरच्या संभाजीकडे गेला; तेथें त्यानें कांहीं काळ मुख्य प्रधानकीचेंहि काम केलें. त्याचा मृत्यु स. १७३१ च्या दरम्यान झाला. चिमणाजी हा थोरल्या बाजीरावाच्या विरुद्ध पक्षास मिळाला होता व त्रिंबकराव दाभाडेकडून डभईच्या लढाईंत हजर होता. त्या लढाईंत त्याचा पाडाव झाल्यानें पेशव्यांनीं त्याचा सर्व सरंजाम जप्त केला व त्यास फक्त तीन गांवें जहागिरीदाखल ठेविलीं. चिमणाजीचा सरंजाम बराच मोठा होता. त्यास कोल्हापूरकर व निजाम यांचेकडूनहि इनामें मिळालीं होतीं. परंतु वर सांगितल्याप्रमाणें पेशव्यांविरुद्ध वागल्यानें त्याचा

सरंजाम नाहींसा झाला. चिमणाजीचा पुत्र बळवंतराव याचा परामर्श पेशवे खासगी रीतीनें घेत असत. हा १७५० त मेला. त्याचा पुत्र त्रिंबकराव हा पानपतावर होता. त्याच्यानंतर या घराण्यांत नांवाजण्यासारखा कोणी पुरुष निपजला नाहीं. मोघे हे मूळचे कोंकणांतील हरिहरेश्वराचे रहाणारे होते. [ मराठी रिसायत. भा. २; ].

**चिमणी**—कोणत्याहि जातीच्या लहान पक्ष्यास पूर्वी चिमणी असें म्हणत असत,परंतु अलीकडे चिमणी या शब्दानें कुंपणांत असणाऱ्या, घरांभोंवतीं असणाऱ्या, वृक्षांवर असणाऱ्या व वेळूच्या वनांत असणाऱ्या या चार जातींच्या पक्ष्यांचाच मर्यादित बोध होतो. कुंपणात रहाणाऱ्या चिमणीची चोंच पिंगट रंगाची असून मान व डोकें काळसर व करड्या रंगाचें असतें. हा पक्षी जमिनीवरून उड्या मारीत जातो व पंख हालवून उड्डाणहि करतो. त्याची उपजीविका किड्यांवर असते. हा वसंतऋतूंत हिरवट व निळया रंगाचीं अंडीं घालतो. त्याची दोन तीन वेळ वीण होते. त्याचा भारद्वाजसारखा मंजूळ आवाज असतो. घरचिमणी ही चिमण्यांची जात सर्वश्रुत आहेच.हा पक्षी रानावनांत न रहातां मनुष्यानें गजबजलेल्या स्थानींच असतो. हा जगाच्या बहुतेक भागांत आढळतो. यामुळें पिकाची नासाडी बरीच होते. पण त्याच्या कीटकभक्षण प्रवृत्तीमुळें फायदाहि बराच होत असावा. वृक्षावरील चिमणी घराचिमणीसारखीच असते. तथापि तिचें मस्तक तांबड्या रंगाचें व मानेवरील काळा पट्टा व जोडपंख यामुळें ती चटकन् ओळखूं येते. नदीकांठ अथवा कालवे यांच्या आसपास झाडांवर व झुडपांत ह्यांची वस्ती असते व ह्यांची वीणहि तेथेंच होते. यांची वस्तीहि सर्वत्र असल्याचें आढळतें.

**चिरक्कल**—मद्रास इलाख्याच्या मलबार जिल्ह्याच्या अगदीं उत्तरेकडील एक तालुका. याचें क्षेत्रफळ ६८९ चौ. मैल आहे. १९२१ सालीं याची लोकसंख्या ३४६३९५ होती. १९२१–२२ सालीं याच्या साऱ्याचें व इतर करांचें उत्पन्न सुमारें ४ लाख रु. होतें. याचें मुख्य ठिकाण कन्नानोर हें एक बंदर आहे. याच्या ईशान्येच्या बाजूस वेत्तुवर व मविलर या दोन जाती आढळतात. याच्या ईशान्य व पूर्व दिशांस पूर्वघाट असून पश्चिमेस हिंदी महासागर आहे.

**चिरावा**—राजपुतान्याच्या जयपूर संस्थानाच्या खेत्री जहागिरींतील एक गांव. १९११ सालीं याची लोकसंख्या ७९७९ होती. येथील सुंदर किल्ला हल्लीं मोडकळीस आला आहे. येथें एक धर्मशाळा, कांहीं शाळा व एक दवाखाना आहे.

**चिलखत**—वेदकालांतहि चिलखतें होतीं. चिलखतांस 'अत्का' हा शब्द ऋग्वेदांत आढळतो. पण त्याचा अर्थ संशयास्पद आहे त्याचा अर्थ 'अंगांत घालण्याचा अंगरखा' असा असून घालतां येणें, काढतां येणें, शिवणें, व अंगाबरोबर असणें अशा इतर वाक्यांच्या संदर्भावरून वरील ' अत्का ' चा चिलखत हा अर्थ निश्चित असावा असें दिसत नाहीं. झिमरच्यामतें ' अत्का ' म्हणजे योध्याचें चिलखत होय. दुसरा 'द्रापी' हा शब्द ऋग्वेदांत आढळतो. सायणाचार्यांच्या मतें द्रापी म्हणजे ' कवच ' होय. पण त्याचा अर्थ झगा असावा 'वर्मन्' हा शब्द ऋग्वेदांत चिलखत या अर्थी असलेला आढळतो. तें कशाचें करीत असत हें अनिश्चित आहे. तथापि तें ' स्यूत ' असे. पुढें अयस् लोह, अथवा रजत यांच्या चिलखतांचा उल्लेख आढळतो. हीं चिलखतें एखाद्या धातूचीं किंवा कातड्याचीं केलेलीं असावींत.

भारतीय युद्धांत कवच घातलेल्या पदातीचेंहि वर्णन आहे. कवच म्हणजे चिलखत होय. रथी व गजावर बसलेला योद्धा यांच्याजवळ नेहमीं कवच असे. बाणांच्या वर्षावामुळें कवचाचा उपयोग रथी व सारथी यांस फार होत असे. हत्तीवर आरूढ होणारा योद्धाहि कवच वापरीत असे. कर्णाला जन्मतःच कवचकुंडलें होतीं. तीं हरण करण्याच्या हेतूनें इंद्र ब्राह्मणाचें रूप घेऊन त्याच्याकडे आला. त्यावेळीं कर्णानें इंद्रास ओळखलें; परंतु औदार्य व दानशूरत्व हेंच त्याचें शील असल्यानें त्यानें तीं इंद्रास काढून दिलीं अशी महाभारतांत एक कथा आहे.

मुसुलमानी अंमलांत ढाल व चिलखत यांचा नेहमीं उपयोग करीत असत. मराठ्यांच्या व पेशव्यांच्या अंमलांतहि त्यांचा उपयोग सर्व योद्धे करीत असत. त्या काळीं कापूस, रेशीम, कातडें व लोखंडाच्या कड्या इत्यादि पदार्थ चिलखत करण्याच्या कामीं वापरले जात असत. शिवाजीनें अफझुल खानास मारलें त्यावेळीं त्यांच्या अंगांत ' जरी कुडती ' चें चिलखत होतें. शिवाजी, संभाजी, पाहिला बाजीराव यांचीं जुनीं चित्रें पाहिलीं असतां ते चिलखत वापरीत असत असें दिसतें. शिवाजीचें हें चिलखत हल्लीं साताऱ्यास महाराजांच्या जलमंदिरात ठेवलेलें आहे.

लढाईत ज्या घोड्यांवर किंवा हत्तींवर योद्धे बसत त्याघोड्यांना व हत्तींनाहि (अर्थात् योध्यांच्या दर्जाप्रमाणें) कातड्याचें किंवा लोखंडाचें चिलखत घालण्याची चाल प्राचीन व मध्ययुगीन कालांत बहुतेक देशांत असे. योध्याच्या दर्जाप्रमाणें त्याचेंहि चिलखत निरनिराळया वस्तूंचें असे. अगदीं सामान्य शिपयांच्या अंगांत आंत कापूस भरलेलें, तर जरा वरच्या अधिकाऱ्याच्या अंगांत आंत कातडें असलेलें चिलखत असे. कांहीं सबंध अंगाचीं असत तर कांहीं बिनबाह्यांचीं असत. कांहींत छातीवर एकावर एक दुप्पट अस्तरण असे. रेशमाच्या लडी एकांत एक गुंतवून त्यांना सोनेरी तारांनीं वरील जाड कापडाशीं एकजीव करूनहि एखादें चिलखत बनवीत. शिवाजीची जरीची कुडती अशीच आहे.

शस्त्रास्त्रें व चिलखतें यांचा अन्योन्य संबंध अनादि असून त्यांच्या इतिहासास मानवजातीच्या आरंभापासून सुरवात होते. पाषाणयुग कांस्ययुग, व लोहयुग या काळांत कर्माअधिक सुधारलेलीं अशीं शस्त्रें असून त्यांच्यापासून रक्षण व्हावें म्हणून ढाल, शिरस्त्राण व चिलखत

इत्यादि वस्तूहि फार प्राचीन काळीं होत्या असें आढळून येतें. जुन्या ग्रीक इतिहासाकडे पहातां असें आढळतें कीं, मायसीनी व ग्रीक लोक उरस्त्राण, शिरस्त्राण व ढाली वापरीत असत व शिरस्त्राणांत घोड्यांच्या केसाचा झुबका खोवीत असत. मॅसिडोनिअन लोकांचीं देहसंरक्षक आयुधें यापेक्षां सुधारलेलीं असत. स्पार्टन सैन्यांत, पोलादी टोप्या आढळून येत. पूर्ण चिलखतांत, छाती व पाठ यांचें संरक्षण होतें, व इतर भागाच्या रक्षणाचीहि त्यांत व्यवस्था असते. रोमन लोकांच्या सैन्यांत, आघाडीचे लोक चिलखत वापरीत असत व एका हातांत भाला किंवा तलवार घेऊन, दुसऱ्या हातांत ढाल धारण करीत. प्यूनिक लढायानंतर लांब रुंद ढाल वापरण्याची चाल पडली. उच्च दर्जाचे सैनिक जाळीचें चिलखत वापरीत असत.

जुन्या शस्त्रास्त्रांत व चिलखतांत मध्ययुगाच्या सुमारास बरीच सुधारणा झाली. व त्यानंतरच्या काळांत त्यांचा लवकरच त्याग करण्यांत आला. चिलखतासंबंधीं प्रत्येक राष्ट्राची कांहीं विशिष्ट गोष्ट असते. स्पॅनिश चिलखतांवरून मूरलोकांची अभिरुची दिसून येते. इटालियन चिलखतें अभिजात गोष्टीकडे असलेला एक विशिष्ट कल दिग्दर्शित करतात, व जर्मन लोकांच्या शस्त्रास्त्रांवरून व त्यांच्या चिलखतांवरून, ट्यूटन भावना आढळून येते. नॉर्मन लोकांनीं इंग्लंड जिंकलें त्या काळीं सरदाराचा ( नाईटचा ) लष्करी पोषाख म्हणजे एक चिलखत, शिरस्त्राण, ढाल व तरवार यांनीं युक्त असा असे. तत्कालीन चिलखत गुडघ्यापर्यंत असे व तें कातड्यांवर अनेक कड्या शिवून तयार केलेलें असे. त्यांस नॉर्मन लोक हॉबर्क असें म्हणत असत. तत्कालीन शिरस्त्राण धातूचें, कातड्याचें व क्वचित लाकडाचें केलेलें असे व त्याला उंच शिखरासारखा आकार असून नाकाचें व कपाळाचें संरक्षण व्हावें अशी त्यांत व्यवस्था केलेली असे.

नॉर्मन घोडेस्वार पतंगाच्या आकाराची बरीच मोठी ढाल वापरीत असत व ती पाठीवर टाकली किंवा पुढच्या बाजूनें हातांत घेतली तर तिचा उपयोग चिलखतासारखाच होत असे. रिचर्ड दि लायन हार्टेड हा नखशिखांत चिलखत वापरीत असे. व त्याच्या चिलखतावर कांहीं चिन्हें असत. चौदाव्या शतकांतील आर्तत्राण धर्माच्या ऐन भरभराटींत चिलखतांचें महत्व वाढलें. चॉसर कवीनें वर्णिलेला नाइट, चिलखत वापरीत असे व त्याचें वर्णनहि करण्यांत आलें आहे. पंधराव्या शतकाच्या सुमारास शिरस्त्राण व चिलखत यांसंबंधीं रुढी बदलली. नावनिशीविशिष्ट चिन्हें असलेलीं चिलखतें जाऊन त्याच्या ऐवजीं उभय युध्यमान पक्ष ओळखण्याकरितां निशाणें जास्त प्रमाणांत, अस्तित्वांत येऊं लागलीं पंधराव्या शतकांतील चिलखतांच्या आकारांत वैचित्र्य आढळून येतें; परंतु सोळाव्या शतकांतील चिलखतें दिखाऊ व भपकेबाज असत होतीं. पुढे बंदुकीचा उपयोग जास्त होऊं लागला व लष्करी डावपेंच व लांबच्या मजला मारणें ही युद्धांतील महत्वाची बाब होऊन बसली. त्यामुळे अवजड चिलखतांची फारशी जरूरी भासूं लागली नाहीं.

व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीत तिच्या संरक्षक लोकांनां जुनीं उरस्त्राणें देण्यांत आलीं होतीं. एकोणिसाव्या शतकांतील ब्रिटिश घोडेस्वारांच्या खांद्यांवर सांखळीचें चिलखत असलेलें आढळतें. गोळीपासून रक्षण व्हावें म्हणून एखादें नवीन चिलखत बनविण्यासंबंधीं शोध चालू आहेत. मारेकऱ्यांपासून अपाय होऊं नये म्हणून हल्लींच्या काळीं सुद्धां राजे लोक गुप्त चिलखत वापरतात. लंडनच्या गुप्तपोलिसखात्यांत असलीं चिलखतें आहेत. कुतूहल म्हणून जुनीं शस्त्रास्त्रें व चिलखतें पाहण्याची आधुनिक काळच्या लोकांची प्रवृत्ति असून भारी किंमत देऊनहि तीं विकत घेण्यांत येतात. प्रसिद्ध चित्रकारांनीं चिलखत धारण केलेल्या अनेक योध्यांचीं चित्रें काढलेलीं आहेत व ग्रंथकारांनीं केलेलीं जुन्या कवचधारी योध्यांचीं अनेक वर्णनेंहि आढळतात. [ लँग—होमर अँड हिज एज; बरोज-डिस्कव्हरीज इन क्रीट; मॅनाट—दि मायसीनिअन एज; एल्टन-दि कंप्लीट बॉडी ऑफ दि-आर्ट मिलिटरी; वालर—मॉन्युमेंटल ब्रासेस; वेदिक इंडेक्स; वैद्य—महाभारत उपसंहार. ].

**चिलिअनवाला**—पंजाब प्रांतांतील गुजरात जिल्ह्याच्या फालिया तहसिलींतील एक खेडें असून येथेंच १८४९त दुसऱ्या शीख युद्धांत लार्ड गफनें जय मिळविला होता.

**चिली**—चिली हें दक्षिण अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्य असून पेरु व दक्षिण टोंक यांच्यामधील या खंडाच्या पश्चिमेकडील अरुंद उतरणीच्या प्रदेशांचा या राज्यांत समावेश होतो. याची लांबी २६६१ मैल व रुंदी ४६ ते २२८ मैल आहे. क्षेत्रफळ ३०४७७४ चौरस मैल आहे. उत्तरेस पेरु, पूर्वेस बोलिव्हिया व अर्जेंटिना, दक्षिण व पश्चिम या बाजूस पॅसिफिक महासागर आहे.

भौ गो लि क व र्ण न(पर्वत)—अँडीज पर्वताच्या पश्चिमेकडील उतरणी, व कॉर्डिलेरा मॅरिटिमा वगैरे पर्वत आहेत. बिओ-बिओ, पॅलेना व लासहेरास या नद्या आहेत. सेरोबोल्सोन, सेरोडोनाइन्स हीं मुख्य शिखरें आहेत. चिलीमधील अँडीज पर्वताचें शिखर अॅकोनकाग्वा हें २३०९७ फूट उंच आहे. दक्षिण चिलीचा समुद्रकिनारा फार डोंगराळ आहे. ' माउन्ट माका ', ' माउन्ट अॅरेनालेस ', व 'कॅथेड्रल पीक' हीं उंच शिखरें आहेत. सँटिआगो व मेंडोझा यांच्यामध्यें उस्पालाटाचा घाट आहे. अँडीज पर्वताच्या ज्वालामुखी पर्वतामुळें चिलीमध्यें पुष्कळ भूकंप झाले आहेत.

स मु द्र कि ना रा.—चिलीच्या किनाऱ्यावर चिलोई बेटापासून केपहॉर्नपर्यंत असंख्य बेटें आहेत. टेटाव द्वीपकल्पाच्या उत्तरेस चिलोई, ग्वेटेकास व चोनोस द्वीपसमूह आहेत. हीं बेटें मुख्य देशापासून उत्तरेस चाकाव व कोर्कोव्हाडोचीं आखातें व दक्षिणेस मोरॅलेडाखाडी यांनीं अलग केलीं

आहेत. टेटाव द्वीपकल्पाच्या खालीं पेनासचें आखात आहे. या भागांतील मोठीं बेटें आझोपार्डो, प्रिन्स हेनरी, कॅम्पाना, लिटलवेलिंगटन,ग्रेट वेलिंग्टन, मॉनिंग्टन, मॅड्रेडिडिओस,ड्यूक ऑफ यॉर्क, चाथाम, हॅनोव्हर, केमब्रिज, कॉन्ट्रेरास, रेनेल, क्वीन ॲडेलीडा हीं शहरें आहेत. मॅगेलन सामुद्रधुनीच्या दक्षिणेस फ्युजिअन द्वीपसमूह आहे.

टिएराडेल फ्वेगोचा पश्चिमेकडील भाग चिलीचा आहे. केपहॉर्नच्या नैर्ऋत्येस 'डीगो रॅमिरेझ' द्वीपसमूह आहे. अगदीं पश्चिमेकडे सॅला इ-गोमेझ व ईस्टर बेटें आहेत. चिलीच्या किनाऱ्यालगत ' जुआन फर्नंडीज ' बेटें आहेत. सॅन ॲम्ब्रोसिओ व सॅन फेलिक्स, चिलोइच्या उत्तरेस लामोथा, सेन्ट-मेरिया व क्विरिक्विना हीं इतर बेटें आहेत.

बं द रें.—व्हालपरैसो, कोक्विम्बो, इक्विके, व ॲरिका हीं मुख्य बंदरें आहेत. मध्यचिलीच्या किनाऱ्यालगत सॅन ॲंटेनिओ, कॉन्स्टिटयूशन, लिको, हीं लहान बंदरें आहेत. एलटोमे, पेंको व टाल्काहॉनो हीं बंदरें कन्सेप्शन आखातावर आहेत. याच्या दक्षिणेस आरॉको आखातावर कोरोनेल व लोटा हीं बंदरें आहेत. व्हालडिव्हिया नदीच्या मुखाजवळ एलकोरल बंदर आहे. चिलोईच्या उत्तर किनाऱ्यावर सॅन कार्लोस आखातांत ॲन्कड बंदर आहे. मॅगेलन सामुद्रधुनीच्या मध्यभागीं पुन्टा एरेनास नांवाचें दक्षिणेकडचें बंदर आहे.

न द्या.—सामा, टॅक्ना, कॅमारोनेस, लोआ, केपिआपो, हुआस्को, एलक्वी,लिमारी व चोआपा या मोठ्या नद्या ॲंडीज पर्वतांत उगम पावून पॅसिफिक महासागराला मिळतात. मध्यभागाच्या नद्या मायपो, रापेल, माटाक्विटो, मॉले, इटाटा, बिओबिओ, इंपिरियल, टोल्टन, व्हाल्डिव्हिया, ब्युनो व मॉलिन या आहेत. काचापोल रापेलला मिळते.क्लारो मॉलेला मिळते. न्युबल इटाटाला मिळते. लाजा, कॉटिन इंपिरियलला मिळते. प्युलोप्युलो ही सरोवरांत उगम पावून रेलोनकाव्हि आखाताला मिळते. मान्सो प्युलोला मिळते. पेट्रोह्यु रेलोनकाव्हिला मिळते. शिवाय कोमन, येल्पो, पॅलेना, रिओपिको, फिआस, ऐसेन, लासहेरास, टोरो, कॉयले या इतर नद्या आहेत.

स रो व रें :—लॅगुना डिला लाजा व लॅगुना डेल मॉले हीं मध्यचिलींतील सरोवरें आहेत. व्हिलारिका, रिनिह्यु, रॅंको, लानक्विह्यु, लेक्टोडोस, लॉस सॅंटोस, जनरल पाझ, ब्युनॉस एरीस, प्युइरेडन, सॅनमार्टिन, लॅगोआ ब्लॅंका, ऑटवे वॉटर व स्कायरिंग वॉटर हीं इतर सरोवरें आहेत.

ह वा, झा डें व प्रा णीः—येथील हवा सर्व प्रकारची असूनहि आरोग्यदायक आहे. बटाट्याचें पांक मूळचें येथलेंच म्हणतात, त्याचप्रमाणें स्ट्राबेरी फळें होत. मका, मिरच्या, वाटाणे, हीं झाडें यूरोपियन येण्यापूर्वीचीं होत. गहूं, बार्ली, ॲपल, पीयरसारखीं फळें हीं यूरोपियनांबरोबर आलीं. येथें मोठाले सस्तन प्राणी नाहींत. घोडे, गुरें, शेळया, मेंढया, डुकरें हे यूरोपियन प्राणी होत. सरपटणारे प्राणी येथें फार नाहींत.

लो क सं ख्याः—१९१७ च्या खानेसुमारीप्रमाणें लोकसंख्या ३८७००२ आहे. बहुतेक लोक यूरोपियन बीजाचे आहेत मूळच्या लोकांत तीन: जाती आहेत. फ्यूजियन, अरौकन व चांगो.

द ळ ण व ळ णा चे मा र्ग.—१८५० पासून चिलीमध्यें रेल्वे घालण्यांत आल्या आहेत. रेल्वेशिवाय येथें २०७७६ मैल सार्वजनिक रस्ते, ५२८ मैल नद्यीमार्ग व ६६८ मैलांचे सरोवरमार्ग आहेत. रिपब्लिकमधून दक्षिणोत्तर जाणारी लॅंजिटयूडिनल रेल्वे सरकारी आहे. १९१८ त ८५१२ किलोमिटरइतकी रेल्वे होती. पैकीं ४५६७ किलोमिटर सरकारच्या ताब्यांत होती. सर्व मुख्य शहरांमध्यें तारघरें व ऑफिसें आहेत. ब्युनोस एरीसच्या मार्गानें यूरोपशीं १८७५ मध्यें तारेचें दळणवळण स्थापन करण्यांत आलें. पानामाच्या मार्गानें पश्चिम किनाऱ्यावरील तारेनें युरोप व उत्तर अमेरिकेचीं संस्थानें जोडलेलीं आहेत. १९१८ त १५६८७ किलोमिटर अंतरापर्यंत तारायंत्राचीं स्टेशनें नवीन करण्यांत आलीं आहेत. मुख्य शहरांत टेलिफोन आहेत. पोष्टखातें चांगलें आहे. वर्तमानपत्रें वगैरेंचा प्रसार पोष्टानें मोफत होतो व डाकेच्या महसुलाचे दर फार हलके आहेत.

व्या पा र.—गुरें, मासे, कॉफी, चहा, साखर, लांकूड व त्यांचे बनवलेले पदार्थ, इमारती लोखंड व पोलाद, लोखंडी सामान, यंत्रें, रेल्वे व तारायंत्राचें सामान, चुना, सिमीट, कांच, मातीचीं भांडीं, कापूस, लोंकर व रेशीम यांचे पदार्थ, कोळसा, पेट्रोलियम रंग इत्यादि पदार्थ बाहेर देशांतून येथे येतात. सोनें, रुपें, तांबें, कोबल्ट, शिसें, व्हॅनॅडियम अशुद्ध धातु, मॅंगनीज, कोळसा, सोरा (सोड्याचा नायट्रेट) लाइमच बोरेट, आयोडिन, गंधक, गहूं, ग्वानो हे जिन्नस येथून बाहेर देशीं रवाना होतात. १९१७ सालीं २५९२०६० पौंडांची आयात व ५१९९७०९९ पौंडांची निर्गत होती

शे तीः—चिलीचे निम्मे लोक शेतीवर निर्वाह करतात मध्यचिली हा प्रदेश शेतीला विशेष लायक आहे. येथें नारिंगें, लिंबें, अंजीर, कलिंगड, अननस, केळीं फार विकतात द्राक्षाची लागवड होते. चिचा नांवाची दारु हें सार्वजनिक पेय असून ती इंडियन कॉर्न ( धान्य ) पासून बनवितात गहूं, जव, मका चिलीच्या प्रत्येक भागात पिकतो. मका श्रीमंत व गरीब या दोन्ही प्रतींच्या लोकांचें अन्न आहे. येथें बटाटे होतात. " किडनो बीन " हें कडधान्य सर्व भागांत पिकतें व बहुतेक लोक खातात. वाटाणे, आक्रोड, आलिव्ह सफरचंद, पीच, बोरें, मनुका, चेरी, व स्ट्राबेरी यांची येथें लागवड होते. हवा गुरें पाळण्याच्या लायक आहे गुरें, घोडे, खेचरें, शेळया, डुकरें यांनां पाळून वाढविण्याचा धंदा चालतो. लोणी व चीज ( चक्का दहीं, ) बनविण्याचा

धंद्यास थोडेसें महत्त्व प्राप्त होत आहे. मधमाशा पाळण्याच्या धंद्यास महत्व येत आहे.

पक्का माल—खाण्याचे पदार्थ, पेयें, कापड, पांघरण्याचें कापड, कमावलेलीं कांतडीं व त्यांचे बनवलेले पदार्थ, लांकडी सामान, मातीचीं भांडीं, रासायनिक द्रव्यें, लोखंडी सामान इत्यादि पदार्थ बनविण्याचे कारखाने आहेत. अशुद्ध धातु गाळण्याचे कारखाने, कांतडें कमाविणें, बूट व जोडे बनविणें, दारूच्या भट्टया, लांकडी सामानाचे कारखाने, फळें व भाज्या यांचे मुरांबे करण्याचे कारखाने, रेल्वेचें सामान बनविण्याचे लोखंडी कारखाने, 'बीट' नांवाच्या मुळांपासून साखर बनविण्याचे कारखाने, कापडाचे कारखाने, खनीज पदार्थ खणणें, रासायनिक द्रव्यें, औषधें, सुंगधी पदार्थ, साबण मेणबत्त्या वगैरे तयार करण्याचे असे पुष्कळ कारखाने येथें आहेत.

खनिज पदार्थ—खाणी खणणें हा एक फार महत्त्वाचा राष्ट्रीय धंदा आहे. सोनें बहुतेक सर्वत्र सांपडतें. परंतु पुष्कळ प्रमाणांत सांपडत नाहीं. उत्तरेकडील ओसाड प्रदेशांत अँडीज पर्वताचे उंचवटे व उतरणी यावर रुपें सांपडतें. तांबें बऱ्याच प्रांतांत सांपडतें. लोखंड, मँगनीज, शिसें, कोबॅल्ट व व्हॅनॅडियम ह्या इतर धातू सांपडतात. सिंधुनत्रित, कोळसा, मीठ, गंधक, आयोडाइन, गंधकाम्ल वगैरे पदार्थ येथें सांपडतात. १९१७ सालची उकरून काढलेली खनिजसंपत्ति ३६८३७५०० पौंड होती.

राज्यव्यवस्था—राज्यकारभाराची कायदे करणारें, कार्यकारी व न्यायखातें अशीं तीन निरनिराळीं खातीं आहेत. कायदे करण्याचें काम "सीनेट" व 'डेप्युटीचीं चेंबर' या दोन सभांची बनलेली राष्ट्रीय सभा हिच्या हातीं आहे. चेंबरचे प्रतिनिधी प्रत्येक ३०,००० लोकांतून एक असे निवडतात. चेंबरमध्यें ११८ सभासद असतात, व सीनेटमध्यें ३७ सदस्य असतात. सीनेटचे मेंबर प्रांतनिहाय निवडले जातात व त्यांची काम करण्याची मुदत ६ वर्षांची असते. दर तीन वर्षांनीं सीनेटच्या निम्मे सदस्यांची फिरून निवडणूक होते. प्रतिनिधी तीन वर्षे काम करतात. प्रतिनिधि व सदस्य यांचें वय कमीतकमी ३६ असलेंच पाहिजे, व त्यांचें उत्पन्न विवक्षित असलें पाहिजे. त्यांनां बिनपगारी काम करावें लागतें. प्रत्येक वर्षी कांग्रेस जून पहिलीस भरते व सप्टेंबर पाहिलीला संपते सरकारच्या कृत्याला पाठिंबा देणें किंवा न देणें यासंबंधीं कांग्रेसला अधिकार आहे.

कार्यकारी सत्ता प्रांतांनीं निवडलेल्या अध्यक्षाच्या हातीं असते. त्याची मुदत पांच वर्षांची असते. याला न्यायखातें, राजकीय, पोलीस खातें प्रांताधिकारी सुभेदार यांच्या नेमणुका करण्यासंबंधीं अधिकार आहेत. अध्यक्षाचें वय३०पेक्षां कमी असतां कामा नये. तो एतद्देशीय असला पाहिजे व 'चेंबरसभेमध्यें' निवडून येण्यालायक असला पाहिजे. याचा पगार सालीना १३८४ पौंड असतो. याच्या मदतीस अंतर व परराष्ट्रीय कारभार, धर्म व वसाहती, न्याय, सार्वजनिक शिक्षण, लष्कर व आरमार, जमाबंदी, धंदे व सार्वजनिक कामें या खात्यांवरील सहा मंत्र्यांचें एक मंडळ असतें. अध्यक्ष, कांग्रेसनें निवडलेले सहा सभासद व अध्यक्षानें निवडलेले पांच सभासद अशा बारा सभासदांचें राष्ट्रीय सल्लागारमंडळ असतें. याला सल्ला देण्याचा अधिकार असतो व याच्या संमतीवाचून नेमणुका व इतर कार्यें करतां येत नाहींत.

न्याय:—वरिष्ठ न्यायसत्ता राष्ट्रीय राजधानीच्या ठिकाणीं स्थापिलेल्या व सात मेंबरांच्या बनलेल्या एका वरिष्ठ कोर्टाच्या हातांत असते. याच्या हातीं राज्यांतील सर्व कोर्टांवर देखरेख करण्याची सत्ता असते. सात अपील कोर्टें, प्रांतांच्या राजधानीच्या ठिकाणीं अव्वल दर्ज्याचीं कोर्टें व कनिष्ठ कोर्टें व जस्टीस ऑफ धी पीस असतात. पंचांच्या साह्याय्यानें न्याय देण्याची पद्धति येथें नाहीं. पोलीस अधिकाऱ्यांच्या हातीं कांहीं न्यायसत्ता असते.

सेना.—लष्करी सोईकरितां या राज्यानें चार विभाग केलेले आहेत. जर्मन पद्धतीवर सैन्यरचना असून यूरोपियन अधिकाऱ्यांकडून कवाईत शिकविलेली आहे. इ. स १९१६ त एकंदर खडें सैन्य १०२० अंमलदार व १७२८३ सैनिक होते. १९०० च्या कायद्यान्वयें १८ व ४५ वर्षांच्या आंतील प्रत्येक पुरुषनागरिकास लष्करी नोकरी करावी लागते. एकवीस वर्षें वयाच्या प्रत्येक तरुणास कांहीं ठराविक वर्षेंपर्यंत लष्करी नोकरी करणें भाग आहे. सँटिआगो येथील लष्करी शाळेंत चांगलें लष्करी शिक्षण दिलें जातें.

आरमार—चिली देशाचें आरमार ब्रिटिश पद्धतीचें आहे, व यांतील बहुतेक लढाऊ जहाजें ब्रिटिश गोदींत बनविलेलीं आहेत. मुख्य ठाणें व्हालपरैसो येथें असून या ठिकाणीं एक आरमारी शिक्षणाची शाळा आहे. स. १९१८ त ५५९५ लोक आरमारी खात्यांत होते. कन्सेशन आखातांत टाल्काहुआनो येथें लष्करी बंदर आहे. स. १९१८ त वैमानिक दळ तयार करण्यांत आलें.

शिक्षण—सर्वांनां सार्वजनिक शाळांचा फायदा घेतां यावा म्हणून सरकार नेटाचे प्रयत्न करीत आहे. कायद्यानें शिक्षण मोफत दिलें जातें, परंतु तें सक्तीचें नाहीं. शेंकडा ७५ लोक अशिक्षित आहेत. चिलीचें विश्वविद्यालय व सँटिआगो येथील राष्ट्रीयसंस्था व प्रांतनिहाय व मोठ्या शहरांतील हायस्कूलें, शिक्षक तयार करण्याकरितां नॉर्मल स्कूल, धंदेशिक्षण, व लष्करी शिक्षणाच्या शाळा व प्राथमिक शिक्षण शाळा अशी येथील शिक्षणरचना आहे. याशिवाय रोमन कॅथॉलिक विश्वविद्यालय आहे व खासगी शाळा आहेत. सँटिआगो येथें संगीत व कलाकौशल्याच्या शाळा आहेत. शेतकीशाळा, खनिज शिक्षणाच्या शाळा व इतर धंद्यांच्याहि शाळा आहेत. स. १९१८ त ३५८१ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा, १९. उच्च

शिक्षणसंस्था होत्या. विसाव्या शतकाच्या आरंभीं येथें २४०,००० ग्रंथ असलेलीं ४१ पुस्तकालयें होतीं. सँटिआगोच्या राष्ट्रीय पुस्तकालयांत ११६,३०० ग्रंथ आहेत. स. १९१८ त ६९८ वर्तमानपत्रें व नियतकालिकें चिली देशांत निघत होतीं. १९१६ सालच्या रिपोर्टावरून येथें १०८ सार्धी इस्पितळें व २ वेड्यांचीं इस्पितळें होतीं.

धर्म.—कायद्यानें रोमन कॅथोलिक हा राष्ट्रीय धर्म ठरविण्यांत आला. धर्मसंबंधीं खर्च इतर सार्वजनिक खात्यांच्या खर्चाप्रमाणें सरकारी तिजोरींतून चालवितात. इतर धर्म पाळण्याची मनाई नाहीं.

जमाबंदी.—नायट्रेटवर बसविलेले कर, जकातीचें उत्पन्न, आल्कोहोलवरचा कर, रेल्वे, डाक व तार या खात्यांचें उत्पन्न या सरकारी उत्पन्नाच्या बाबी आहेत. चिली प्रजासत्ताक राज्याची १९१६ सालची एकंदर जमा १३८१४१०१ पौंड व खर्च ११३०५४९८ पौंड होता.

नाणें.—पेसो ( १८ पेन्साचा ) या चलनी सुवर्ण प्रमाणावर येथील कागदी नाण्यांचा प्रसार होतो. सोन्याचें पेसो हें नाणें पाडलेलें नाहीं. येथें सोन्याची कोंडोर, पेसो, एस्कयुडो व रुप्याचीं व ब्रॉंझचीं सेंटाव्हो, पेसो हीं नाणीं कायद्यानें मंजूर केलीं आहेत. मेट्रिक पद्धतीचीं वजनें व मापें कायदेशीर प्रमाणवजनें आहेत. परंतु व्यवहारांत जुनीं स्पॅनिश वजनें व मापें चालतात. चिलियन क्विन्टल (१०१.४१ पौंड), मेट्रिक क्विन्टल ( २२०.४६ पौंड ) रुपें व तांब्याच्या खाणींत अशुद्ध धातूंचे प्रमाण मार्क (८ औंस ) नें दाखवितात. धान्य ॲरोबा अथवा फॅनेगानें विकतात. व्हारा हें लांबी मोजण्याचें माप आहे व जमीन मोजण्याकरितां क्युआड्रा हें माप आहे.

इतिहास—उपलब्ध इतिहासाच्या सुरुवातीपासून हा देश चिली नांवानेंच प्रसिद्ध आहे. पूर्वी या प्रदेशांत इंडियन लोकांच्या जाती रहात असत. हे लोक अगदीं रानटी नव्हते तरी मेक्सिको व पेरू या देशांतील रहिवाशांपेक्षां कमी सुधारलेले होते. पंधराव्या शतकांत पेरूच्या इंकानें या देशाचा कांहीं भाग काबीज केला होता. यानें या लोकांत सुधारणा करून त्यांचें सामर्थ्य कमी केलें होतें व याचमुळें स्पॅनिश लोकांनां या देशावर स्वारी करणें सुलभ झालें पूर्वी हे लोक अडाणी व उद्धट असून यांच्यामध्यें एक प्रकारची लष्करी शिस्त होती. प्रत्येक समाजाचा उलमेन ( नायक ) असे व टोकवीच्या नेतृत्वाखालीं हे लोक एकत्र लढत असत.

डायगो डे आल्माग्रो, पिझारोचा प्रतिस्पर्धी, यानें १५३५ मध्यें पहिली स्पॅनिश स्वारी केली. परंतु त्याला जोराचा प्रतिकार झाल्यामुळें तो सगळ्या सैन्यानिशीं १५३८ मध्यें पेरूला परत गेला. १५४० मध्यें पिझारोनें पेड्रो डिव्हॉलडिव्हिह याला देश काबीज करून वसाहत करण्याकरितां पाठविलें. यानें १५४१ मध्यें सँटिआगो शहर वसवून लासेरिना, कन्सेप्शन, व्हिलारिका, इंपिरियल, व्हॉलडिव्हिया, व अँगोल हीं इतर शहरें बांधण्यास सुरुवात केली. परंतु इंडियन लोक फार निकरानें लढले व १५५३ मध्यें सार्वत्रिक बंड होऊन व्हॉलडिव्हियाचा पराभव झाला व तो मारला गेला; आणि बऱ्याच वसाहतींचा नाश झाला. शंभर वर्षेपर्यंत सारखी लढाई चालली होती. १६४० मध्यें क्विलिनच्या तहान्वयें बिओ-बिओ नदीच्या दक्षिणेकडचा प्रदेश इंडियन लोकांच्या ताब्यांत राहिला. १६५५, १७२३ व १७६६ मध्यें लढाया होऊन हा तह मोडला गेला. अखेरीस १८०० मध्यें तह होऊन ॲरॉकानियन ( इंडियन लोकांच्या टोळीचें नांव) लोकांनां सँटिआगो येथें एक मंत्री ठेवण्याचा अधिकार प्राप्त झाला.

वसाहतपद्धति.— स्पॅनिश वसाहतपद्धतीनें पक्का माल बनविण्याच्या धंद्यास प्रतिकार झाला. स्पेनमधील फक्त केडिझ बंदराशीं व्यापार करण्याची मुभा होती. त्यामुळें पेरू व अर्जेंटिनाच्या मार्फत वसाहतवाल्यांस व्यापार करावा लागे. येथील लोकांचा शेती हाच कायतो धंदा असून गहूं पिकवीत असत; त्यांनां आलिव्ह व द्राक्षें यांची लागवड करण्याची मनाई होती. स्पॅनिश हद्दींतील इंडियन लोकांनां गुलामांप्रमाणें वागविण्यांत येत असे. परंतु याच सुमारास दोन्ही जातींचें मिश्रण होण्यास सुरुवात झाली. ॲकरॉनियन लोक मात्र स्वतंत्र राहिले.

अठराव्या शतकांत या वसाहतींची स्थिति सुधारत चालली. स्पेनचे बुर्बोन राजे फार उदारमतवादी होते. चिली देशांत व्यापारी जहाजें येऊं लागलीं व फ्रान्सशीं व्यापार खुला झाला. स्पेनच्या बिस्के प्रांतांतील बरेच काटक लोक येथें पाठविण्यांत आले. इंडियन लोकांशीं होणाऱ्या लढाया बंद झाल्यामुळें गव्हर्नर अधिकाऱ्यांनां देशाचें कल्याण करण्यास सवड मिळाली. १७४७ मध्यें सँटिआगो येथें विश्वविद्यालय स्थापण्यांत येऊन पुष्कळ शहरें बांधण्यांत आलीं, व शेती आणि उद्योगधंदे यांनां उत्तेजन दिलें गेलें व किनाऱ्यावरील व्यापार वाढला. परंतु राज्यकारभारामध्यें लोकांचा मुळींच हात नसे. गव्हर्नर सर्वसत्ताधारी असे व बहुतेक मोठ्या अधिकारांच्या जागेवर स्पेनमधील लोक नेमले जात असत, हे लोक बराच वेळ लांचलुचपत व बळजबरीनें संपत्ति मिळविण्याच्या कामांत गुंतलेले असत. यामुळें स्पॅनिश लोक व एतद्देशीय वसाहतवाले यांच्यामध्यें मत्सर वाढला. इतर स्पॅनिश वसाहतींप्रमाणें याहि भागांत धर्मोपदेशकाचें वजन लोकांत फार असे. हे लोकांनां उद्योगधंदे व शेतकी यांचें शिक्षण देत असत. यांनीं देशांतील बहुतेक संपत्ति जमविली होती. परंतु सरकारी अधिकारी व धर्माध्यक्ष यांच्यामध्यें तंटे होऊन देशांत गोंधळ उडून जात असे.

स्वातंत्र्ययुद्ध.—इंग्लंडच्या उत्तरअमेरिकन वसाहतींचें बंड व फ्रेंच राज्यक्रांति यामुळें स्पॅनिश वसाहतवाल्यांनां बंडाच्या कल्पना सुचल्या व नेपोलियननें सातव्या फर्डिनँड राजाला पदच्युत केल्यावर त्यांनां आयती संधी प्राप्त झाली.

व १८०९ मध्यें व्हेनेझुएला, इक्वेडोर, वरचा पेरु व अर्जेंटिना येथें बंड झाल्यामुळें १८१० मध्यें सँटिओगाच्या कॅबिल्डोनें ( म्युनिसिपालिटी ) गव्हर्नरला राजिनामा द्यावयास लावून सात सभासदांच्या एका जंटोच्या ( मंडळ ) स्वाधीन राज्यकारभार केला. चिलीच्या स्वातंत्र्याचा हा प्रारंभ होय. बरेच लोक अडाणी असून त्यांच्यामध्यें दळणवळण फार थोडें होतें. व बरेच लोक जुन्या राज्यपद्धतीचे भक्त होते. स्वातंत्र्यवाद्यांचा पक्ष प्रथम अल्पसंख्याक होता; व सँटिआगो आणि कन्सेप्शनच्या देशभक्तांमध्यें तंटे होते. या देशभक्तांचा १८१४ मध्यें रॅन्कागुआच्या लढाईंत पेरुच्या व्हाइसरॉयनें पाठविलेल्या स्पॅनिश सैन्यानें पराभव केला. स. १८१७ पर्यंत हा देश स्पॅनिश लोकांच्या ताब्यांत राहिला. नंतर देशभक्त ओ ' हिगिन्स व जोसे डि सॅन मार्टिन यांच्या संयुक्त सैन्यानें चॅकाबुकोच्या लढाईंत राजपक्षीय लोकांचा पराभव केला, ओहिगिन्सला चिलीचा डायरेक्टर जनरल नेमण्यांत आलें व मार्टिननें पेरूवर स्वारी करून मायपो नदीवरील लढाईंत पेरूच्या सैन्याचा १८१८ मध्यें पूर्ण पराभव केला. यामुळें चिलीचें स्वातंत्र्य कायमचें स्थापित झालें.

प्र जा स त्ता क रा ज्य.—पुढील कांहीं वर्षांत चिलीच्या दक्षिण भागांतून राजपक्षीय लोकांनां हांकून लावण्यांत येऊन एक लहानसें आरमार सज्ज करण्यांत आलें. यामुळें स्पॅनिश लोकांच्या हल्ल्यांची भीति नाहींशी झाली. या आरमाराच्या सहाय्यानें सॅन मार्टिननें पेरूवर स्वारी करून पेरूचें स्वातंत्र्य १८११ त जाहीर केलें. आतां राज्यव्यवस्थेची आवश्यकता भासूं लागली. उदारमतवादी संस्थांनां सवलती न देतां जोरदार राज्यव्यवस्था स्थापावी असें ओ ' हिगिन्सचें मत होतें, परंतु त्याला पुष्कळ वैरी उत्पन्न झाल्यामुळें १८२३ मध्यें त्यानें राजिनामा दिला. १८३० पर्यंत निरनिराळ्या दहा राज्यव्यवस्था निर्माण झाल्या. देशांत निरनिराळे लहान पक्ष झाले; दक्षिणेंत इंडियन लोकांची व चिलोई बेटांत राजपक्षीय लोकांचीं बंडें झालीं; आणि धर्मोपाध्यायांचा नवीन प्रजासत्ताक पद्धतीस अडथळा होऊं लागला; अशी एकंदर विस्कळीत स्थिति होती. १८३० पर्यंत उदारमतवादी पक्षाची वरचढ होती. परंतु कान्झर्व्हेटिव्ह (पुराणमतवादीपक्ष ) लोक आणि व त्यांचा पुरस्कर्ता बंडखोर जनरल प्रीस्टो यांनीं जय संपादन केला. १८३१ मध्यें प्रीस्टोला प्रेसिडेंट निवडलें, व नवीन राज्यपद्धति बनवून ती १८३३ मध्यें प्रचलित करण्यांत आली. या पद्धतीनें कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हातांत बहुतेक सर्व सत्ता देण्यांत आली. याच पद्धतींत कांहीं सुधारणा होऊन सध्यांची पद्धति निर्माण झाली आहे. यानंतर पुराणमतवादी लोक बराच काळपर्यंत सत्ताधारी राहिले.

पुराणमतवादीपक्षाचें धोरण बळकट व खंबीर राज्यपद्धति स्थापन करण्याचें होतें. म्हणून सत्ता थोड्या लोकांच्या हातांत देण्यांत आली. लोकांच्या स्वातंत्र्याला आळा घालून सर्व प्रकारचे अडथळे सत्तेच्या जोरावर नाहींसे करण्यांत आले. १८३५, १८५१ व १८५९ मध्यें उदारमतवाद्यांचीं बंडें झालीं. १८३६ मध्यें पेरु व बोलिव्हिया यांच्याशीं लढाई होऊन चिलीचा जय झाला. पुराणमतवादी पक्षानें लोकांनां राज्यकारभारांत मुळींच हात घालूं दिला नाहीं; व त्यांचें कांहीं चालूंहि दिलें नाहीं. मात्र यांच्या कारकीर्दीत देशाची भरभराट फार त्वरेनें झाली. शिक्षणाची व्यवस्था करण्यांत आली, शेती व इतर धंदे वाढले, कायदा बनविण्यांत आला व यामुळें या नवीन स्थापिलेल्या प्रजासत्ताक राज्यास बरीच बळकटी आली. १८६१ नंतर उदारमतवाद्यांची चळवळ सुरू झाली, व प्रेसिडेंट पेरेझ व इरॅझुरिझ यांनीं पूर्वींच्या प्रेसिडेंटांचें धोरण सोडून देऊन उदारमतवाद्यांची सहकारिता संपादन केली. यामुळें राष्ट्राचें राजनीतिविषयक ज्ञान वाढलें. शाळा, रेल्वे, डाक व तारघरें यांचा फैलाव करण्यांत आला व राज्याला स्थायिकत्व प्राप्त झालें. यावेळीं इंडियन लोकांशीं युद्ध सुरू होतें. १८८० मध्यें अर्जेंटिनाशीं बरेच दिवस चाललेल्या सरहद्दीविषयक भांडणाचा निकाल झाला. व १८६५ मध्यें चिलीनें पेरूचा पक्ष घेतल्यामुळें या देशास स्पेनशीं लढावें लागलें. या वेळेपासून चांगलें आरमार सज्ज करण्यांत आलें.

पे रू शीं ल ढा ई:—ही लढाई १८७९–८२ पर्यंत चालली होती. १८८१मध्यें चोरिलोस व मिरॅफ्लोअर्स येथें बराच काळ निकराचें युद्ध होऊन अखेरीस चिली सैन्याचा जय झाला. यानंतर चिली सैन्यानें लिमा व इतर पेरूंतील ठाणीं ताब्यांत ठेविलीं. या विजयाचें श्रेय चिलीचा प्रेसिडेंट पिंटो याला दिलें पाहिजे. १८८१ त पिंटोच्या मागून सँटा मॅरिया प्रेसिडेंट झाला. १८८३ त पेरु सैन्याचा फिरून पराभव झाला व १८८४ त पेरु व चिली यांच्यामध्यें प्रेसिडेंट सँटा मॅरिया यानें तह घडवून आणला. बोलिव्हियाशीं कांहींच तह न झाल्यामुळें चिली लोकांनीं बोलिव्हियाचा समुद्रकिनारा आपल्या ताब्यात ठेविला.

सँ टा मॅ रि या प्रे सि डें ट:—या प्रेसिडेंटनें नोंदलेल्या लग्नाचा कायदा सुरू केल्यामुळें व रजिष्टरांत जननमरणाची नोंद करणें व स्मशानभूमींत सर्व धर्मांच्या लोकांस प्रेतें पुरण्याची मोकळीक ठेवणें या नियमांमुळें पुराणमतवादी लोकांचा याला फार अडथळा झाला. पूर्वीं जननमरणाची नोंद धर्मोपाध्याय करीत असे व रोमन कॅथॉलिक पंथाच्या संस्कारांव्यतिरिक्त झालेलीं लग्नें कायदेशीर मानलीं जात नसत; व रोमन कॅथोलिक पंथाशिवाय इतर पंथाच्या लोकांनां स्मशानभूमींत प्रेतें गाडण्याची परवानगीहि नसे. हे सर्व निर्बंध यानें काढून टाकले व इतर धर्म पाळण्याची परवानगीहि यानें दिली. यामुळें १८८६ मध्यें याची मुदत संपल्यावर सेनॉर जोसे बॅलमॅसेडा हा प्रेसिडेंट झाला.

प्रे सि डें ट बॅ ल मॅ से डा व १ ८ ९ १ ची रा ज्य क्रां ति:—बॅलमॅसेडा प्रेसिडेंट जरी उदारमतवादी होता

तरी त्याला कांहीं उदारमतवादी व पुराणतवादी लोकांचा प्रतिकार झाला. शाळा वाढविणें लोकोपयोगी कामें करणें व सैन्य आणि आरमार सज्ज करणें या बाबतींत बराच खर्च करण्याचें या प्रेसिडेंटनें ठरविलें व यांचे मक्ते देण्यांत आले. परंतु या मक्त्यांत पैशाची बरीच अफरातफर झाली. यामुळें बराच विरोध उत्पन्न झाला. अखेरीस १८८९ मध्यें कांग्रेसनें प्रेसिडेंटच्या अगर्दी विरुद्ध पक्ष घेतला व यामुळें यादवीचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. १८९१ मध्यें कोनकोन येथें कांग्रेस पक्षाचें सैन्य व बॅलमॅसेडाचे लोक यांच्यामध्यें निकराची लढाई होऊन बॅलमॅसेडाचा पराभव झाला व अतोनात नुकसान झालें. राजद्रोहाच्या आरोपावरून बॅलमॅसेडानें सॅन लोरेंझो येथील लष्करी शाळेंतील कांहीं विद्यार्थ्यांनां गोळी घालून ठार मारण्याचा हुकूम सोडला. यामुळें लोकांचीं मनें फारच बिथरलीं व पॅसिलच्या लढाईत प्रेसिडेंटचे दोन्ही सेनापती मारले जाऊन बंडखोरांचा पूर्ण जय झाला. यानंतर प्रेसिडेंट निराश होऊन अर्जेंटाइन वकिलातींत आश्रय घेऊन लपून बसला. त्याची मुदत १८ सप्टेंबर १८९१ रोजीं संपली व याच दिवशीं त्यानें आपणास गोळी घालून आत्महत्या केली. याच्या मरणानें भांडणाचें कारण नाहींसें झालें व यादवी संपली.

राज्यक्रांतीनंतर राज्यकारभार जंटाच्या हातीं आला व निवडणूक होऊन सर्वानुमतें जॉर्ज मॉंट प्रेसिडेंट झाला. तो कर्तबगार मनुष्य होता. यानें बॅलमॅसिडाच्या पक्षाच्या लोकांनां माफी देऊन देशांत येण्याची परवानगी दिली. याच्या कारकीर्दीतील पहिलें राजकीय कृत्य म्हटलें म्हणजे म्युनिसिपालिटयांनां आपल्या उत्पन्नाचा आपल्या इच्छेनुरूप खर्च करण्याची परवानगी मिळाली व याप्रमाणें म्युनिसिपालिटयांनां स्थानिक स्वराज्याचे हक्क देण्यांत आले.

प्रे सि डें ट मॉं ट.—आपापसांतील यादवीमुळें झालेलें देशाचें नुकसान भरून काढण्याकडे नंतर या प्रेसिडेंटनें लक्ष लावलें. १८८७ मध्यें सुरू केलेलीं लोकोपयोगी कामें फिरून चालविण्यांत आलीं, व सैन्य व आरमार यांचें सामर्थ्य वाढविण्यांत आलें. नाण्यांची पद्धत सुधारण्याचें काम नंतर यानें हातीं घेतलें. १८९५ मध्यें अर्जेंटिनाच्या सरहद्दीचें भांडण उपस्थित होऊन याचा निकाल ग्रेटब्रिटनच्या मध्यस्थीवर सोपविण्यांत आला. १८९६ मध्यें मॉंटची मुदत संपून सेनॉर इरॅझुरिझ प्रेसिडेंट निवडून आला.

प्रे सि डें ट इ रॅ झु रि झ.—याच्या कारकिर्दीत अर्जेंटिनाच्या सरहद्दीचा लढा उपस्थित झाला. दोन्ही पक्षांनीं लढाईची तयारी केली. १८९८ मध्यें चिली सरकारनें १८९६ च्या कराराच्या अव्वल मसुद्याचीं कलमें पाळलीं पाहिजेत अशी अर्जेंटिना सरकारास मागणी केली. भांडण पॅटॅगोनियन राज्यासंबंधीं होतें व याचा निकाल ग्रेट ब्रिटनच्या मध्यस्थीवर दोन्ही पक्षांनीं सोंपवून या तंट्याचा शेवट केला. तरी पेरू व बोलिव्हिया या देशांचा प्रश्न शिल्लकच होता. १८९५ च्या अव्वल मसुद्यान्वयें चिलीनें बोलिव्हियाला ॲरिका बंदर अथवा पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावर दुसरें एखादें सोईस्कर ठिकाण देण्याचें कबूल केलें. चिली सरकारनें ॲरिकाच्या थोडेसें दक्षिणेस असलेलें व्हिटोर ठिकाण देऊं केलें परंतु हें ठिकाण तहाच्या अटींविरुद्ध म्हणून बोलिव्हिया सरकारनें नाकारलें व चिली ॲरिका पेरूला देतो कीं काय हें पाहण्याचें ठरविलें.

या प्रेसिडेंटच्या कारकीर्दीत कोणतेंच मंत्रिमंडळ फार वेळ टिकलें नाहीं. कांग्रेसमधील राजकीय पक्षाचा विरोध इतका जोराचा होई कीं मंत्रीमंडळास वारंवार राजीनामा देण्याची पाळी येत असे. यामुळें कोणतेंच राजकीय धोरण स्वीकारता येईना. १९०० मध्यें अर्जेंटिनामध्यें चिलीविरुद्ध लोकमत पुन्हा क्षुब्ध झालें, कारण चिली पोलिसांनीं उल्टिमाएस्पिरँझा या वादग्रस्त भागांतून अर्जेंटाइन वसाहतवाल्यांनां हांकून दिलें परंतु दोन्ही देशांच्या सरकारांनीं चढाईचें धोरण न स्वीकारतां सलोख्यानें समेट करण्याचें ठरविलें.

प्रे सि डें ट रा य स्को.—प्रकृति नीट नसल्यामुळें इरॅझुरिझनें राजिनामा दिला व प्रेसिडेंट रायस्को निवडून आला. अर्जेंटिनाच्या सरहद्दीची पहाणी करण्याकरितां ग्रेटब्रिटननें सर टि. एच्. हॉल्डिच याला पाठविलें. त्यानें आठ महिनेंपर्यंत पहाणी करून रिपोर्ट केला; व एडवर्ड बादशहानें १९०२ मध्यें सरहद्द ठरविली व ही दोन्ही देशांनां पसंत पडली. १९०४ मध्यें बोलिव्हिया व चिली यांच्यामध्यें तह होऊन असें ठरविण्यांत आलें कीं चिलीनें आपल्या खर्चानें ॲरिकापासून लाणेझपर्यंत आगगाडी करावी व बोलिव्हिया सरकारला या रेल्वेचा उपयोग करूं द्यावा व याबद्दल बोलिव्हिया सरकारनें पॅसिफिक महासागरावरील बंदरांची मागणी सोडून द्यावी. ३०००००० पौंड नुकसानभरपाई देण्याचेंहि ठरलें होतें. दोन्ही देशांना हा तह फार फायदेशीर होता.

व्हॉ ल पा रै सो चा भू कं प.—१९०६ मध्यें भूकंप होऊन व्हॉलपारैसो शहराचा पूर्ण नाश झाला व सॅंटिआगो व इतर शहरें यांनां जबर धक्के बसले. ३००० लोक प्राणास मुकले १०००० लोक गृहहीन झाले; मालमत्तेचें नुकसान अपरिमित झालें. यानंतर शहरास आग लागून दुःखाची परमावधि झाली. परंतु लोकांनां मदत देण्याच्या उपायांची योजना त्वरित करण्यांत आली.

पेड्रो मॉं ट—१९०६ मध्यें सेनॉर पेड्रोमॉंट प्रेसिडेंट निवडून आला. पूर्वीच्या दिवसांपेक्षां अलीकडच्या चिली देशावर याचें वजन कमी पडत असे. सर्व कार्यकारी सत्ता कांग्रेसच्या हातांत गेल्यामुळें प्रधानमंडळाला वर्षांतून कैक वेळां राजीनामा देण्याची पाळी येत असे. यामुळें कोणतेंच निश्चित राजकीय धोरण ठरवितां येत नसे. व्हॉलपारैसो व ब्युनॉसएरीसमधील ट्रॅन्स-अँडीयन रेल्वे पुरी होऊन व उत्तरेकडील नायट्रेटचा प्रांत व दक्षिणेकडचा प्यूर्टोमॉंट

प्रांत सँटिआगो शहराशीं जोडणारी रेल्वे सुरू झाल्यामुळें देशाचें औद्योगिक व व्यापारी महत्त्व वाढलें.

१९१० सालीं डॉन पेड्रोमाँट हा अध्यक्ष वारल्यामुळें डॉ. रॅमॉन बॅरॉस हा अध्यक्ष म्हणून निवडला गेला हा उदारमतवादी असल्यानें याच्या अमदानींत उदारमतवादी पक्षाचें प्राबल्य फार माजलें.याच्या कारकीर्दींत ब्यूनॉस एरीस, व्हालपॅरैसो व सँटियगो यांमध्यें रेलवे सुरू झाली. ही रेलवे ट्रॅन्संडाईनच्या भरग्या मोठया बोगद्यांतून नेण्यांत आली होती. याशिवाय याच्या कारकीर्दींतील दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, १९१० च्या सप्टेंबर महिन्यांत चिलीमध्यें स्वातंत्र्य-प्राप्तीचा शतसांवत्सरिक उत्सव मोठया थाटानें करण्यांत आला हीं होय. या वेळीं अर्जेंटीन रिपब्लीकमधील पुष्कळ प्रसिद्ध व्यक्तींनां, निरनिराळया पदव्या बहाल करण्यांत आल्या व त्यामुळें चिली व अर्जेंटीन यांच्यामध्यें जो द्वेषाग्नि धुमसत होता तो शांत होण्यास बरीच मदत झाली. १९१३ सालीं ॲरिका व बोलिव्हिया प्रांतांतील ला पाझ या शहरांमध्यें आगगाडी सुरू करण्यांत आली. पण या रेल्वेवर ताबा कोणाचा असावा यासंबंधीं अनेक भानगडीचे प्रश्न उपस्थित झाले व तो प्रश्न तात्पुरता लांबणीवर टाकण्यांत आला. महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर चिली हा जर्मनीच्या बाजूनें युद्धांत भाग घेणार कीं दोस्तांच्या वतीनें युद्धांत पडणार यासंबंधीं वादविवाद सुरू झाला. चिलीमधील पुष्कळच लोक जर्मनीच्या बाजूचे होते. चिलीमधील सैन्य जर्मन अधिकाऱ्यांच्या तालमींत वाढलें होतें. चिलीच्या व्यापाराला जर्मनीनें उत्तेजन दिलें होतें. याशिवाय जर्मन लोकांनीं चिलीनें आपल्या बाजूनें युद्धांत पडावें यासंबंधीं खटपट सुरू केली होती. यामुळें चिलींतील बहुमत जर्मनीच्या बाजूला होतें. पण चिलीचा इंग्लंडमध्यें असलेला परराष्ट्रमंत्रि आगस्टाइन एडवर्डस् हा दोस्तांच्या बाजूचा होता. चिलीनजीक ड्रेसडेन हें जर्मन जहाज ज्यावेळीं ब्रिटिशांनीं अन्यायानें बुडविलें त्यावेळीं ऑगस्टाइन एडवर्ड्सनें मोठया मुत्सद्देगिरीनें दोस्तांची बाजू सांवरली नसती तर चिलीनें जर्मनीच्या वतीनें लढाई पुकारली असती. पुढें महायुद्धाच्या अखेरीस चिलीला जर्मनीच्या अत्याचारांचा वीट येऊन दोस्तांच्या बाजूनें तिचा कांटा झुकूं लागला. तरी पण चिलीनें अखेरपर्यंत तटस्थ वृत्तीच स्वीकारली.

१९१५ सालीं जुआन ल्युइस सॅनफ्यूएंटिस हा अध्यक्षपदावर आरूढ झाला. या सालीं चिलीची सांपत्तिक स्थिति फारच खालावली होती. १९१६ मध्यें ही स्थिति हळू हळू सुधारली. याचें कारण दोस्तराष्ट्रांनी चिलीमधील पुष्कळ माल विकत घेतला हें होय. १९१८ मध्यें इक्यूक व अँटोफगस्टा, या ठिकाणीं पेरूमधील लोकांविरूद्ध बंडें झाल्यामुळें चिली व पेरूमध्यें धुसफूस उत्पन्न झाली. पण चिलीनें ग्रेटब्रिटनशीं गुप्त तह करून चिली व पेरूमधील तसेंच चिली व बोलीव्हियामधील जे गंतागंतीचे प्रश्न होते ते मिटविण्यासाठीं कमिशन नेमण्याची विनंति करून हा वाद मिटविला.

महायुद्धानंतर इतर सर्व राष्ट्रांप्रमाणेंच चिलीमध्येंहि मजुरीसंबंधाचे भानगडीचे प्रश्न उपस्थित झाले. १९२० मध्यें अध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधाची चिलीमध्यें धामधूम सुरू झाली. अध्यक्षपदासाठीं ,अरटयूरो अलेसांड्री व ब्यूस बॅरास बॉरगॅनो हे दोन उमेदवार होते. अलेसांड्री हा मजुरांचा कैवारी होता. त्यामुळें तोच अध्यक्ष म्हणून निवडून आला. अलेसांड्री याच्या निवडणुकीमुळें लोकशाहीपक्षाला उत्तेजन मिळालें. महायुद्धांत चिलीनें कोणताहि भाग न घेतल्यामुळें वास्तविक चिलीला राष्ट्रसंघामध्यें स्थान नव्हतें पण चिलीचा माजी अध्यक्ष सान फ्यूएंटीस यानें १९१९ सालीं राष्ट्रसंघाला आपला दुजोरा दिला होता त्यामुळें राष्ट्रसंघाच्या अधिवेशनाला, चिलीला आमंत्रण आलें. या बैठकीला परराष्ट्रमंत्री अँटोनियो हुनीयस याच्या हाताखालीं एक प्रतिनिधीमंडळ देऊन पाठवण्यांत आलें होतें.

चि ली ब द्द ल अ ली क डी ल मा हि ती.—१९२० सालच्या खानेसुमारींत चिलीची लोकसंख्या ३७,५४,७२३ व्ह. दर चौरस मैलास १२·९२ इतकी भरली. सँटिआगो शहराची वस्ती ५०७,२९६ भरली. १९२० पासून सक्तीचें शिक्षण सरकारी खर्चानें सुरु झालें आहे.

अलीकडे अनियंत्रित लष्करी राज्यकारभार चिलींत सुरू झाला आहे हा फरक एकदम घडून आला नाहीं. या देशाची नैसर्गिक रचना ( अरुंद व लांबट ) असल्या राज्यपद्धतीला पोषक आहे. चिली देश स्वतंत्र झाल्यापासून सॅन्टिआगो ते चिलनपर्यंतच्या प्रदेशांत अधिकारी वर्ग व श्रीमंत जमीनदारांचा वर्ग एकत्रित होत गेला. हा प्रदेश मध्यभागीं असून धर्माधिकारी व जमीनदार या पुराणमताभिमानी वर्गाच्या हातीं आहे. आर्जेंटाईन देशांतून येणाऱ्या मालावर जबर जकात बसवावी असें या पक्षाचें मत आहे. उत्तरेकडील भागांत समाजसत्तावादी व समतावादी ( सोशॅलिस्ट व कम्यूनिस्ट ) पक्ष आहे. किनाऱ्यालगत उदारपक्षाचे लोक रहातात. दक्षिणेकडे विरोधी पक्ष असून तो सॅन्टिआगो येथील कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाला नेहमीं विरोध करीत असतो. कांझर्व्हेटिव्ह पक्षाच्या विरुद्ध असलेल्या सर्व लोकांनीं मिळून ' अलायन्स लिबरल ' नांवाचा पक्ष तयार करून आर्टुरो आलेक्झांड्री नांवाच्या हुशार महत्वाकांक्षी व बेशक इसमास त्याचा पुढारी केलें. त्यावेळीं सरकारची सांपत्तिक स्थिति चांगली नव्हती. कारण पेरूबरोबर युद्ध करण्याच्या तयारीकडे मोठा खर्च केला गेला होता. आलेक्झांड्रीनें स्वतः कायदेपंडित असल्यामुळें इतर विद्वानांनां जवळ केलें होतें. त्यांनीं राजकीय सुधारणेच्या मोठाल्या योजना केल्या; पण व्यापारांत गोंधळ माजला. त्यामुळें १०० मिलियन ( १००,०००,००० ) डॉलर कर्ज

झालें. कित्येक महिने अधिकाऱ्यांना पगार देण्यास खजिन्यांत पैसा मिळेना. त्यामुळें लष्करी अधिकारी १९२२ मार्चमध्यें सीनेटवर वजन घालूं लागले, व शेवटीं पार्लमेंटनें सर्व सत्ता लष्कराच्या हातीं दिली; व पार्लमेंट मोडलें. नंतर एक नवें कॅबिनेट वरिष्ठ मुलकी अधिकाऱ्यांचें बनविलें गेलें आहे; परंतु त्यांच्यावर सर्व देखरेख लष्कराची आहे. अशा रीतीनें एक मोठी क्रांति घडवून आणण्यांत आली. सांप्रतच्या सरकारवर राष्ट्राचा विश्वास आहे. खासगी बँकांनीं सरकारला कर्ज दिलें आहे. [ संदर्भग्रंथ-कँटो-चिली ॲन ॲकाऊंट ऑफ इट्स वेल्थ ॲंड प्रोग्रेस (१९१२); कोएवेल—मॉडर्न चिली ( १९१३ ); मिल्स-चिली फिजिकल फीचर्स, नॅचरल रिसोर्सेस एटसेटरा ].

**चिलका सरोवर**—बंगाल इलाख्यांतील पुरी जिल्ह्याच्या ईशान्येकडील एक उथळ आखात असून याची दक्षिण बाजू मद्रास इलाख्याच्या गंजम जिल्ह्यापर्यंत पसरली आहे.बंगालचें आखात व हें सरोवर यांच्यामध्यें एक लांब वाळवंटी टेकाड असून याच्या मध्यभागीं फक्त एकाच ठिकाणीं आखात व सरोवर यांचा मिलाफ झाला आहे. सरोवराच्या पश्चिमेस व दक्षिणेस उंच उंच टेकड्या असून उत्तरेस पाणथळ जमीन व प्रतिवर्षी नद्यांच्या मुखांतील सांचलेल्या गाळाचीं बेटें आहेत. सरोवराचा आकार लांबट आहे. हें ४४ मैल लांब असून याच्या उत्तर भागाची रुंदी साधारण २० मैल आहे. दक्षिणभाग निमुळता असून याची रुंदी साधारण ५ मैल आहे. उन्हाळ्यांत याचें क्षेत्रफळ ३४४ चौ. मैल असून पावसाळ्यांत तें ४५० पर्यंत वाढतें. सर्व साधारण खोली ३–५ फूटपर्यंत आहे. उन्हाळ्यांत याचें पाणी समुद्राच्या भरतीच्या ओघाच्या मिश्रणामुळें खारें असतें परंतु पावसाळ्यांत नद्यांचें पाणी आल्यामुळें समुद्राचें पाणी परत घालविलें जाऊन याचें पाणी गोडें होतें. हें सरोवर बंगालच्या उपसागराचा मूळचाच एक भाग आहे.यांच्या दक्षिण बाजूस उंच उंच टेकड्या असून त्यांची रांग समुद्रापर्यंत पसरली आहे; व उत्तरेस या सरोवराला गाळ वाहवून आणणाऱ्या नद्या मिळतात. वरील नद्यांतून येणारा गाळ समुद्रापर्यंत वहात जातो. येथें आल्यावर समुद्राचें पाणी या गाळास अडवून धरतें. याप्रमाणें येथें हा गाळ सांचत जाऊन त्याचा सरोवर व आखात यांच्यामध्यें एक बांध तयार झाला आहे. या सरोवरावर निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे नैसर्गिक देखावे पहावयास मिळतात. याच्या तिरावर सर्व जातींचे पाणबुडे पक्षी आढळतात. ऋषिकुल्या नदी व सरोवर यांच्या दरम्यान एक कालवा असून त्यांतून व्यापारी नावा जात येत असतात. या नावांतून ओरिसा प्रांतांतील धान्य या सरोवराच्या लगतच्या प्रदेशांत येतें व मीठ परत रवाना होतें.

**चिस्ती**—पंजाबांतील एक जात. लो. सं. ( १९११ ) ४१५४. ही शुद्ध मुसलमानांची जात आहे. चिस्ती हें सुनी पंथाच्या एका वर्गाचें नांव आहे; परंतु पाकपट्टनचे बाबा फरीद वगैरे प्रसिद्ध चिस्ती साधूचे वंशज हें नांव आपणांस जन्मावरून मिळालें असें म्हणतात.चिस्ती लोकांना मानसन्मान मोठा आहे. परंतु आजकाल त्यांच्यांतील फार थोडे मुल्लांचा धंदा करतात. ते शेतकी व दुसरे धंदे करतात. [ से. रि. १९११. पु १४ ].

**चीझीं, अँटोनें लिओनार्ड डि** (१७७३-१८३२).—एक फ्रेंच पौरस्त्य वाङ्मयविशारद. १७९९ त राष्ट्रीय ग्रंथसंग्रहालयाच्या पौरस्त्य शाखेंत त्याला नोकरी मिळाली. १८०३ पासून तो संस्कृतचा अभ्यास करूं लागला. त्यावेळीं संस्कृतभाषेचें व्याकरण किंवा कोशहि त्याला उपलब्ध नव्हता. तेव्हां मोठ्या प्रयासानें त्यानें या पौरस्त्य भाषेचें बेताचें ज्ञान करून घेऊन तींत उत्कृष्ट कविताहि करूं लागला. कॉलेज डि फ्रान्समध्यें नेमलेला ( १८१५ ) पहिला संस्कृतचा प्रोफेसर चीझींच होय. ' मेज्नूऊइन एट लीला ' ( १८०७ )-फारशीतून रूपांतरें; ' यद्जन( यज्ञ ? )दत्तबध ' ( १८१४ ), आणि ' ला रिकॉनइसन्स डी सकोउन्तला ( शकुंतला )', ( १८३० )-संस्कृतांतून रूपांतर हे त्याचे कांहीं ग्रंथ होत.

**चीन**—हा पूर्वआशियांतील एक देश आहे. व चिनी साम्राज्याचा मुख्य भाग आहे. मांचुरिया, मांगोलिया, तिबेट आणि सिनक्यांग ( पूर्वतुर्कस्तान, कुलजा वगैरे म्हणजे उत्तरेकडे मांगोलिया व दक्षिणेकडे तिबेट यामध्यें असणारीं संस्थानें ) हे चिनी साम्राज्याचे दुसरे भाग होत. हा देश २०° ते ५०° उत्तर अक्षांशांत व ८०° ते १३०° पूर्व रेखांशांत वसला आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४३ लक्ष चौरस मैल आहे. उत्तरेस आशियांतील रशिया ६००० मैलांच्या सरहद्दीवर पसरला आहे. पूर्वेस कोरिया, चीनचा समुद्र व पीत समुद्र आहेत. दक्षिणेस व नैऋत्येस चीनचा समुद्र, फ्रेंच इंडोचीन, ब्रह्मदेश व हिमालयांतील संस्थानें आहेत. पश्चिमेस हा देश फारच निमुळता झाला आहे.

खरा चीन देश अथवा अठरा परगणे साम्राज्याच्या आग्नेय भागांत आहेत. याच्या उत्तरेला मांगोलिया, पश्चिमेस तुर्कस्तान व तिबेट, दक्षिणेस टाँकिन व टाँकिनचें आखात, पूर्वेस चीनचा समुद्र, पीतसमुद्र, चिलीचें आखात आणि मांचुरिया आहेत. ह्याचें क्षेत्रफळ सुमारें १५,००,००० चौरस मैल आहे. उंच डोंगरपठारें, व पर्वतांच्या ओळी यामुळें हा देश आशिया खंडापासून वेगळा पडला आहे. नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात जातात. एकंदरींत चीन देशाला समुद्रमार्गाखेरीज जगाशीं दळणवळणाचा दुसरा मार्ग नाहीं असें म्हटलें असतां चालेल.

स्व रू प व र्ण न.—पश्चिम चीन डोंगराळ प्रदेश आहे. व येथील लोकवस्ती विरळ आहे. पूर्वचीन सखल प्रदेशांत मोडत असून येथील लोकवस्ती दाट आहे. किनाऱ्याची एकंदर लांबी ४५०० मैलांपेक्षां जास्त आहे. परंतु किनारा अर्धचंद्राकृति आहे. फोर्मोसा आग्नेय किनाऱ्यासमोर

आहे. ईशान्य भागांतील सपाट मैदान फार महत्त्वाचें आहे. हें ७०० मैल लांब असून १५० पासून ५०० मैल रुंद आहे. या मैदानाचा बराच भाग समुद्राकडे उतरता होत गेला आहे.

पर्वतः--पूर्वतिबेटांत कुएनलुन पर्वत आहे. वायव्य भागांत लुंगशांग, रिचयोपेन व नानशान या पर्वतांच्या ओळी आहेत. रिचयोपेन पर्वतांचीं शिखरें २०००० फूट उंच गेलेलीं आहेत. झेचुएन प्रांताच्या उत्तरेला मिन-शान व किऊलुंग ओळी आहेत.

नद्या व कालवेः--चीन देशांत पुष्कळ नद्या व कालवे आहेत. उत्तरेकडील नद्यांतून लहान होड्या जातात. दोन सर्वांत मोठ्या नद्या यांगत्सीक्यांग व हूवांगहो या होत. हूवांगहो (पिवळी नदी) नदीची लांबी २४०० मैल आहे. हिला वेहो हीच कायती महत्त्वाची नदी येऊन मिळते. ही नौकागमनास योग्य अशी नदी नाहीं शिवाय पुरामुळें आजूबाजूच्या प्रदेशांस धोका असतो. या कारणास्तव या नदीच्या कांठांवर मोठीं शहरें नाहींत. यांगत्सीक्यांग ही चीन देशांतील फार महत्त्वाची नदी होय. ही देशांतील मध्यभागांतून २९०० मैल लांब वहात जाऊन पीत समुद्रास मिळते. हिच्या कांठांवर दाट लोकवस्तीचीं व संपत्तीनें भरलेली शहरें आहेत. मिन, हानक्यांग अथवा हान या यांगत्सिक्यांगला मिळतात. चीनच्या आर्थिक, व व्यापारी भरभराटीस हीच नदी कारणीभूत झाली आहे हूवेहो नांवाची दुसरी मोठी नदी वरील दोन नद्यांच्या मध्यभागीं आहे.

यांगत्सिक्यांगच्या खालोखाल युनहा अथवा मोठा कालवा हा नाव्य आहे. हा कृत्रिम कालवा चहक्यांग प्रांतांतील हांगचौ-पासून चिहली प्रांतांतील तीन्त्सीनपर्यंत आहे. तीन्त्सीन येथें हा पैहोला मिळाला असल्यामुळें पेकिंगजवळ तंगचौपर्यंत जातो असें म्हटले तरी चालेल. ह्या कालव्याची लांबी ३६३० ली अथवा १२०० मैल आहे. कालव्याचा सर्वांत प्राचीन भाग यांगत्सि व हूवेहोमध्यें आहे. हा भाग इ. स. ४८६ सालीं बांधला असावा असें कनफ्यूशीयसच्या पुस्तकावरून कळतें. ३ ऱ्या शतकांत ह्या भागाची दुरुस्ती करण्यांत आली. बाकीचा भाग वेगवेगळ्या काळांत बांधला गेला. पैहो (लांबी ३५० मैल) नदींतून पेकिंगला जातां येतें. म्हणून ही महत्त्वाची समजली जाते. दक्षिणेकडील प्रांतांत सिक्यांग अथवा पश्चिम नदी प्रसिद्ध आहे. हिची लांबी १००० मैल आहे. हिला वेगवेगळीं नांवें आहेत.

सरोवरें:--चीन देशांतील मध्यभागांत पुष्कळ सरोवरें आहेत. सर्वांत मोठें तंगसिंग नांवाचें सरोवर हुनानमध्यें आहे. निरनिराळ्या भागाला येथील लोकांनीं निरनिराळीं नांवें दिलीं आहेत. तंगसिंगच्या पूर्वेस १८० मैलांवर पोयांग सरोवर आहे. सुचौफूच्या नजीकचें ताई सरोवर आकारा-साठीं व आजुबाजूच्या रम्य देखाव्याबद्दल प्रसिद्ध आहे. याशिवाय आणखीं कांहीं लहान सरोवरें आहेत.

मोठी भिंतः--परकीय लोकांच्या स्वाऱ्यांपासून बचाव होण्यासाठीं बांधलेली चीन देशांतील प्रसिद्ध भिंत, चिहली, शान्सी, शेनसी आणि कान्सू या प्रांतांच्या उत्तरसिमेवरून जाते. ही भिंत बांधण्यास इ. स. पूर्वी ३ ऱ्या शतकांत सुरुवात झाली. १५ व्या शतकांत हिची दुरुस्ती केली व १६ व्या शतकांत ही ३०० मैल वाढविली. हिची एकंदर लांबी १५०० मैल आहे. लाओतंग आखातावरील शान है क्वान येथील समुद्रकिनाऱ्यापासून ह्या भिंतीची सुरु-वात होऊन. पेकिंगच्या पूर्वबाजूनें जाऊन हूवांगहोपर्यंत गेली आहे. पेकिंग व हूवांगहोच्या दरम्यान आंतील व बाहे-रील अशा दोन भिंती आहेत. भिंतीची उंची २० पासून ३० फूट आहे. २०० यार्डांच्या अंतरावर ४० फूट उंचीचे बुरुज बांधले आहेत. पाया १५ ते २५ फूट खोल असून भिंत १२ फूट रुंद आहे. मुख्य दरवाजावर अजून लष्करी पहारा असतो.

हवामानः--चीन हा अवाढव्य देश असल्यामुळें येथील हवा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी आहे. युनान, क्वांगसी व क्वांगटुंग असलेला दक्षिण भाग (त्यांत कँटन शहर आहे) उष्ण कटिबंधांत आहे उत्तर भागाची (यांत पेकिंग शहर आहे.) हवा उत्तर यूरोपसारखी आहे. येथील हिंवाळा अतिशय कडक आहे. मध्यभाग समशीतोष्ण कटिबंधांत आहे. येथील पावसाचें मान अनिश्चित आहे.

प्रांतः--खऱ्या चीन देशाचे खालीं दिल्याप्रमाणें भाग होतात. चेहक्यांग, चिहली, फुकिएन, आनुहुई, होनान, हुपेह, कानसु, क्यांगसी, क्यांगसु, क्वांगसी, क्वांगतुंग, क्वेचौ, शान्सी, शानतुंग, शेनसी, झेचुएन आणि युनान.

लोकवस्ती--लोकवस्ती दाट असल्याबद्दल चीन देशाची बरीच प्रसिद्धि आहे. चीनमध्यें व्यवस्थित खाने-सुमारी नसल्यानें लोकसंख्या बिनचूक देणें अशक्य आहे. १९१६ च्या कस्टम्स खात्याच्या रिपोर्टावरून चीनची लोक-संख्या (मँचुरीयाचे ३ प्रांत धरून) ४४'५८०७३००० होती असें दिसतें. मध्यचीन देशांत एकंदर लोकसंख्येच्या तृति-यांश लोकसंख्या आहे.

चिनी लोक वसाहत करण्यांत प्रसिद्ध आहेत. त्यांनीं मांचु-रिया, मांगोलिया व तुर्कस्थान येथील जमिनीची मशागत करून शेतीच्या कामात योग्य केली. इंडोचायना, मलाया पूर्वेकडील देशांत चिनी मजूर शेतकरी व व्यापारी आहेत. १० व्या शतकांत आफ्रिकेच्या किनाऱ्यावर चिनी वसाहती होत्या. कॅलिफोर्निया येथील सोन्याच्या खाणींसाठीं व इतर ठिकाणीं मजूर म्हणून पुष्कळ चिनी लोक गेले. परंतु त्यांच्या साध्या रहाणीमुळें व द्वेषामुळें युनायटेडस्टेट्स, आस्ट्रेलिया, कानडा या देशांत चिनी मजुरांविरुद्ध कायदे करण्यांत आले आहेत. वेस्टइंडिज व दक्षिण अमेरिकेंत मुदतबंदीचे मजूर आहेत.

सा मा जि क स्थि तिः—१९०४–५ च्या रुसोजपानी युद्धानें पूर्वेकडील देशांत जी जागृति उत्पन्न झाली त्याचा परिणाम चीन देशांत सुद्धां दृष्टीस पडूं लागला. हा फरक किती प्रमाणांत आहे हें सांगणें कठिण आहे. कारण चिनी लोक मूळचे पुराणप्रिय, त्यांची संस्कृति अतिशय प्राचीन, त्यांचीं नीतितत्वें अजून देखील तींच आहेत. कांहीं बाबतींत चिनी मनुष्य युरोपियन लोकांपेक्षां कमी दर्जाचे असतील पण हा फरक त्यांच्या सुधारणेच्या विरुद्ध धोरणामुळें असतो. त्यांचा व्यवहार गतानुगतीक धोरणावर असतो. सामाजिक व राजकीय रचना कुटुंबपद्धतीवर आहे. बाप कुटुंबाचा मुख्य असतो. राष्ट्र हें एक मोठें कुटुंब असून सरकारची सत्ता ही बापाच्या ठिकाणीं असते. मुलाचे गुणावगुणांवर बापाचा मानापमान अवलंबून असतो.

या पद्धतीमुळें मरणानंतरचे होणारे विधी यांनां महत्व आलें आहे. वडील मुलगा अथवा दत्तक पुत्र यांनीं मृताच्या आत्म्यास आहुती,कागदाच्या केलेल्या सर्व वस्तू, वगैरे गोष्टी अर्पण करावयाच्या असतात. सुतक तीन वर्षेपर्यंत पाळावें लागतें. व सुतकांत पांढरीं वस्त्रें धारण करून सुतक पाळणारानें मांस, दारू व सार्वजनिक उत्सव यांपासून अलिप्त रहावें लागतें. अशाच तऱ्हेचे विधी लग्न व सामाजिक उत्सव यांनांहि लागू आहेत. मध्यवर्ति सरकाराचें विधींचें खातें म्हणून एक वेगळें खातें आहे. मुलांचीं लग्नें लहान वयांत ठरविलीं जातात. वर व वधू यांचे आईबाप सर्व गोष्टी ठरवितात. खुद्द वर व वधू यांनां लग्नाच्या बाबतींत कांहींच अधिकार नाहीं. लग्नाचा शेवटला विधी म्हणजे नवऱ्यानें बुरखा उचलून नवरीचा चेहरा पहाणें हा होय.

चिनी लोकांचे चार सामाजिक वर्ग आहेत ते असेः—विद्वान शेतकरी, कारागीर व बनिये. पिढीजात सरदारी वर्ग येथें नाहीं. अधिकारी वर्गाला जास्त मान दिला जातो. कांहीं चिनी घराण्यांत वंशपरंपरेनें पदव्या असतात. "येनचे पवित्र ड्यूक" ही मुख्य पदवी आहे. चीनी लोकांचीं लहान लहान शेतें असतात. संपत्तीची वांटणी सारखी करावी लागते. एका वारसालाच सर्व संपत्ति देतां येत नाहीं. त्यामुळें फारच लहान शेतें सर्वत्र ठिकाणीं सांपडतात. सरकारी नोकरींत पेनशन घेतलेल्या लोकांचा वर्ग इतर देशांतील बड्या लोकांच्या सारखा असतो. आईबापांना मुलें गुलाम म्हणून विकतां येतात. स्त्रीगुलामांची संख्या जास्त आहे. चिनी लोकांनां मुलगा झाल्यानें आनंद होतो. कारण स्त्रियांचा दर्जा कमी समजला जातो. स्त्रीला लग्नापूर्वी बापाच्या, लग्नानंतर, नवऱ्याच्या व वैधव्यांत मुलांच्या आज्ञेंत रहावें लागतें. अनेक स्त्रिया करण्याची चाल चीन देशांत आहे. केव्हां केव्हां पहिली बायको म्हातारी होत चालली म्हणजे स्वतःच दुसरी बायको पाहून देते. दुसऱ्या बायकांनीं पहिलीच्या आज्ञेंत असलें पाहिजे. वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांनां यापेक्षां चांगल्या रीतीनें वागवितात. पायांची वाढ खुंटवून ते लहान ठेवण्याची चाल चीन देशांत बरेच दिवसांपासून आहे.हक्का स्त्रिया मात्र ही चाल पाळीत नाहींत.मुलाचा जन्म झाल्याबरोबर तो एक वर्षाचा आहे असें समजतात. जन्मदिवशीं त्याला दुसरें वर्ष लागलें असें समजतात.

चीन लोक नव्या वर्षाचा पहिला दिवस सणाचा म्हणून पाळतात. भेटीच्या वेळीं हस्तान्दोलन अथवा चुंबनादि प्रकार न करतां हात जोडून नमस्कार करणें, दंडवत करणें इत्यादि गोष्टी करतात. डोक्याचा कपडा व जोडे या बाबतींत काय तो पुरुष व स्त्रियां यांच्या पोषाकांत फरक असतो बाकी इतर बाबतींत त्यांचे पोषाक सारखे असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. चिनी स्त्रिया चेहऱ्याला रंग लावितात. दक्षिण चीनांतील मुख्य अन्न भात आहे. परंतु उत्तरेकडे तांदुळाखेरील बाजरी नाचणी वगैरे धान्य खातात.

चिनी लोक कोणत्या वस्तू खातात यांची मोजदाद करणें सोपें नाहीं. तांदुळापासून काढलेली एक तऱ्हेची दारू हे लोक पितात. चहा जेवणाच्या अगोदर व नंतर पितात. पाकशास्त्रांत चिनी लोक फ्रेंचांच्या खालोखाल आहेत. चिनी लोकांचा मांगोलियन वंशांत समावेश होतो. कित्येकांच्या मतें मूळची शाखा वायव्येकडून आली असावी व कित्येकांच्या मतें ती मध्यचीन देशांतील असावी. चीनी लोकांचीं गालाचीं हाडें उंच असतात व रंग बहुतकरून पिंवळा असतो.

चीनमधील समाजाची पितृसत्ता व पितृपूजा या दोन तत्वांवर उभारणी झाली आहे. चीनचा पाश्चात्य संस्कृतीशीं जसजसा संपर्क अधिक येत चालला त्या त्या मानानें चीनमध्यें नवीन नवीन कल्पना उदयास येत चालल्या. प्राचीन चालीरीतींविरुद्ध या नवीन पद्धतीनें शिकलेल्या लोकांनीं बंड करण्यास सुरुवात केली. यूरोपीयन व अमेरिकन मिशनऱ्यांनीं चीनमध्यें पुष्कळ शिक्षणसंस्था काढल्या व त्यामुळें चीनमधील समाजाच्या मूलभूत तत्त्वावर आघात होऊं लागले तरी पण एकंदरीनें चीनमधील मागसलेल्या समाजांत पूर्वीच्याच भावना अद्यापि खिळून आहेत. अद्यापीहि बहुतेक चिनी लोक आपले राष्ट्रीय पंचांगच वापरतात. चीनमध्यें मोफत व सक्तीचें शिक्षण, ऊत्करी शिक्षण, इत्यादि गोष्टी प्रचारांत आल्या आहेत. तथापि यांचा अंमल फारसा होत असलेला आढळत नाहीं. स्त्रियांच्या सुधारणेसाठीं जी चळवळ १९१२ मध्यें सुरू करण्यांत आली ती जरी बरीच फैलावली असली तरी सामान्य जनता अद्यापीहि स्त्रियांच्या सुधारणेच्या बाबतींत उदासीनच आहे.

हाँगकाँग बंदरावरील नवीन पुलाचें बांधकाम सुरू असतांना परकी लोक जिवंत मुलांचे तेथें बळी देणार आहेत अशी हूल उठल्यामुळें इंग्रज अधिकाऱ्यांनीं खानेसुमारीस सुरवात केली, तेव्हां आइबापांनीं आपलीं मुलें लपवून ठेविलीं होती.



सैबेरिया
बलखाससरोवर
मँगोलिआ
उर्गा
मांचूरिया
किरिन
मुकडेन
जपानचा समुद्र
पेकिन
टिएटसिन
पोर्टआर्थर
कोरिआ
चेमिल्पो
पीत समुद्र
पूर्व तुर्कस्तान
खोतान
काशगर
यारकंद
तिबेट
सुची
चीन
पूर्वसमुद्र
निंगपो
फारमोसा
अमाय
कँतान
हाँगकाँग
मकाव
हैनान
चीनच्या दक्षिण समुद्र
पॅसिफिक महासागर
हिंदुस्थान
ब्रम्हदेश
युनान
चीन व मांचूरिया
Poona Litho Works.

जु ना ध र्म.—चीन देशांतील जुना धर्म एकेश्वरी पंथाचा होता. या अखिल विश्वाचा एकच शास्ता असून तो सद्गुणांचा पुरस्कर्ता व दुर्गुणांचा द्वेष्टा आहे अशी समजूत होती. हा शास्ता सृष्टिकर्ता समजला जात नसे. याला टिएन म्हणजे आकाश अशी संज्ञा प्राप्त झाली. हळूहळू शांगटी अशी दुसरी संज्ञा प्रचारांत येऊं लागली. या दोन्ही संज्ञा एकाच देवाच्या वेगवेगळ्या रूपास लावीत. पुढें सूर्य, चंद्र, ग्रह आणि तारे यांची पूजा सुरू झाली. पृथ्वीची पूजा व इतर सृष्ट पदार्थांच्या पूजा होऊं लागल्या. पूर्वजांची पूजा व त्यांच्या नांवानें केलेलें हवन इत्यादि गोष्टी प्रचारांत येऊन त्या अजून देखील चालू आहेत.

ता ओ ध र्म.—लाओत्सु याच्या एका शिकवणीवरून एका तऱ्हेच्या धर्मतत्त्वांची मांडणी नंतरच्या लेखकांनीं केली. खुद्द लाओत्सु यानें ताओ म्हणजे मार्ग, या तत्त्वाचा पुरस्कार केला. याच तत्त्वावर धर्ममतांची रचना झाली. या मार्ग शब्दाचे पुढें बरेच अर्थ झाले. परंतु बुद्धधर्मानें या धर्मास मार्गे टाकलें ताओधर्मानें बुद्ध धर्मांतील कांहीं वाईट गोष्टी घेतल्या. सध्यां या दोन्ही धर्मांत फारसा फरक साधारण लोकांस दिसत नाहीं.

बु द्ध ध र्म.—बुद्धधर्म चीन देशांत केव्हां सुरू झाला हें नक्की सांगतां येत नाहीं. तरी अशी दंतकथा आहे कीं, बादशहा मिंगती ( ५८–७६ ) याला स्वप्नांत सोन्याच्या रंगाचा मनुष्य दिसला. बादशहाच्या एका बंधूनें हा मनुष्य म्हणजे साक्षात् शाक्यमुनि बुद्ध असावा असें अनुमान काढलें. यावरून बुद्धधर्माची माहिती चिनी लोकांस अगोदरपासून झाली असली पाहिजे असा तर्क चालतो. तरी इ. स पूर्वी २१७ व्या वर्षी बुद्धधर्माचा शिरकाव चीन देशांत झाला असावा. कारण त्यावेळीं कांहीं श्रमन धर्मप्रसारकांनां कैदेंत टाकलें होतें. एवढेंच सागतां येईल कीं, मिंगतीच्या स्वप्नापासून बुद्धधर्माला विशेष मान मिळूं लागला. इ. स. ६५ त १८ लोकांचें एक धर्ममंडळ पाठवून खोतानमध्यें या धर्माची माहिती मिळविली व ६७ त हें मंडळ बौद्धग्रंथ, मूर्ती व काश्यपमदंग नांवाचा भिक्षु यांसह परत आलें. चवथ्या शतकानंतर चिनी लोक भिक्षू होऊं लागले. पुष्कळ भिक्षू हिंदुस्थानांत जाऊं लागले. ४०१ सालीं कुमरजीव हा गाओसिंग बादशहाच्या दरबारीं येऊन राहिला. ४०५ सालीं हा आचार्य झाला व यानें बौद्धग्रंथांवर टीका लिहिल्या. ५१० त बोधिधर्म ( चिनी याला टामो नांवानें ओळखतात ) हा कँटन शहरीं बौद्ध आचार्यांच्या पवित्र पात्रासह आला. हळूहळू बौद्धर्माची छाप चांगली बसली. ११ व्या शतकाच्या नंतर बुद्धधर्म सुरळीत चालू झाला व सध्यां सर्व चीनभर त्याचा प्रसार झाला आहे. १ ल्या शतकांत कनिष्काच्या वेळेस महायान व हीनयान असे दोन भेद झाले. चीन देश पहिल्या प्रकारांत येतो. महायानांत मूलतत्त्वें कायम ठेवून इतर सुधारणा करण्यांत आली.

म झ्द ध र्मः—७ व्या शतकांत मझ्द धर्म अथवा झोरोॲस्टरचा धर्म चीनदेशांत प्रथम सुरू झाला. यांत अग्निपूजा मुख्य आहे. परंतु या धर्माची विशेष भरभराट झाली नाहीं. व ९ व्या शतकांत याचा मागमूस देखील राहिला नाहीं.

मु स ल मा नी ध र्मः—महमदाचा मामा वाहब-अबी-काभा हा कांहीं मुसुलमानांसह ६२८ त बादशहास नजराणा घेऊन आला व येथेंच राहिला. यानें सर्व चीनभर प्रवास केला. या नंतर खलिफ अबूग्याफरनें ७५५ सालीं ४००० अरबांचें सैन्य बंड मोडण्यासाठीं पाठविलें. ते लोक येथेंच राहिले; व सध्याचे चिनीमुसलमानांचे तेच पूर्वज होत. ४ थ्या शतकानंतर चेंगिझखानाच्या विजयानंतर पुष्कळ अरब येथें येऊन राहिले व लोकांत मिसळले. सध्या मुसलमान लोक इतर लोकांत इतके मिसळले आहेत. कीं, त्यांच्यांत फरक दाखविणें कठीण आहे. आज पन्नास लाखांपासून एक कोटीपर्यंत मुसलमान लोक चीनदेशात आहे.

ने स्टो रि य न ध र्मः—६३१ त नेस्टोरियन लोकांचें धर्ममंडळ चीन देशांत आलें व त्यांनीं ख्रिस्तीधर्माचा प्रसार सुरू केला. बादशाही फर्मानानें ( ६३८ ) यांनां बऱ्याच सवलती मिळाल्या. परंतु १३ व्या शतकापासून यांचा कायमचा नायनाट झाला.

म णि सं प्र दा यः-खाल्डीयन मणि याला पूज्य समजणारे मणिसंप्रदायी लोक ६९४ सालीं चिनात आले. परंतु ९ व्या शतकाच्या सुमारास या धर्मांचा लोप झाला.

य हु दी ध र्म—इतर दंतकथांप्रमाणें मिळालेली माहिती वगळली तरी यहुदी लोक प्रथम सन ११६३ त चीन देशांत आले असें अनुमान काढण्याला कांहीं हरकत नाहीं. यांनीं आपल्या धर्माचा फार थोडा प्रसार केला. हे लोक हळुहळु कमी होत चालले व इतर लोकांत इतके मिसळले कीं, त्यांनां यहुदी म्हणून ओळखणें कठीण होतें. तरी ते आपला संप्रदाय गुप्त रीतीनें पाळतात.

याशिवाय ख्रिस्तीधर्मप्रसार सन १८६० पासून सुरू झाला. सध्यां रोमन कॅथोलिक व प्राटेस्टंट या दोन्ही पंथाचे बरेच अनुयायी आहेत. उदा.–१९२० सालीं १९९४४८३ रोमन कॅथॉलिक चिनी ख्रिस्ती व ६१८६०१ प्रॉटेस्टंट ख्रिस्ती होते. ५००० बाप्टाइज्ड चिनी आहेत. प्रॉटेस्टंट मिशनला जोडून २७ युनिव्हर्सिटी कॉलेजें, २५६ मध्यम शिक्षणाच्या ( मिडल ) शाळा व ५८१ उच्च प्राथमिक शिक्षणाच्या शाळा आहेत.

शि क्ष ण व व र्त मा न प त्रें—१९ व्या शतकाच्या शेवटपर्यंत चीनमध्यें जुन्या ग्रंथांचें अध्ययन हेंच शिक्षण होतें. प्राथमिक शिक्षणाची सोय सरकारानें केली नव्हती. चांगल्या स्थितींतले लोक खासगी शिक्षक ठेवीत असत. गरीब लोकांचीं मुलें शाळेंत जात. या ठिकाणीं मुलगे ४–५ वर्षेपर्यंत ग्रंथ मुखोद्गत करीत. नंतर पत्रलेखन व सोपें लेखन शिकत. दुय्यम शिक्षणाची सोय जरा चांगली होती.

सार्वजनिक खर्चानें प्रांताच्या मुख्य टिकाणीं व इतर मोठ्या शहरांत विद्यालयें असत. सरकारी नोकरींत शिरून बहुमानाच्या जागा विद्येवर मिळत. यामुळें या शिक्षणाची जास्त सोय होती. सिउत्साही, चूजेन व चिनशिह या तीन पदव्या असत. शेवटची पदवी पेकिंगला पास झालेल्यांनां मिळत असे. पाश्चात्य पद्धतीवर शिक्षण देणाऱ्या संस्था प्रथम रोमन कॅथोलिक मिशनऱ्यांनीं सुरू केल्या. यांनीं १८५२ त एक विद्यालय स्थापिलें शिवाय विश्वविद्यालय वैद्यकशाळा, मुलींच्या शाळा इत्यादि गोष्टी मिशनरी लोकांनीं केल्या.

१८६१ त पेकिंग व कँटन येथें विद्यालयें स्थापून सरकारनें पाश्चात्य पद्धतीवर शिक्षणाचा पुरस्कार केला. परंतु बाक्सर बंड होईपर्यंत या शिक्षणाची जास्त महती चिनी लोकांनां व सरकारला कळली नाहीं. १९०२ सालीं पेकिंगला एक विश्वविद्यालय स्थापिलें. रुसो जपानी युद्धानंतर नवीन शिक्षणपद्धतीचा पुरस्कार करण्यांत आला.

१९१० सालीं प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या बऱ्याच शाळा स्थापन झाल्या. प्रत्येक प्रांतांत एकेक विश्वविद्यालयाची स्थापना झाली. परदेशांत विद्यार्थी शिक्षणासाठीं पाठविण्यांत आले.आज चीनमध्यें शिक्षणाचा अहवाल पुढील प्रमाणें आहे. सरकारी शिक्षक(नार्मल) शाळा दोन प्रकारच्या ( उच्च व सामान्य ) आहेत. उच्च ३ व सामान्य २७५ आहेत; प्राथमिक शाळा उच्च व खालच्या दर्जाच्या ( नागरिक शाळा ) अशा दोन प्रकारच्या आहेत. उच्च प्रा. शाळा १०२३६ असून सरकारी आहेत. नागरिक शाळा १६७०७६ आहेत. पैकीं बऱ्याच खासगी खर्चानें चाललेल्या आहेत. उद्योगधंद्याच्या शाळा खालच्या व वरच्या अशा दोन प्रकारच्या आहेत. १० सरकारी विश्वविद्यालयें आहेत. या खेरीज मिशनऱ्यांनीं चालविलेल्या शाळा, कॉलेजें व विश्वविद्यालयें आहेत. बरेच चिनी विद्यार्थी परदेशीं शिक्षणाकरितां जातात. सरकारी खर्चानें रहाणारे सुमारें १२०० चिनी विद्यार्थी ग्रेटब्रिटनमध्यें व ७०० अमेरिकेंत आहेत. खासगी खर्चानें रहाणारे निराळेच. पेकिंग गॅझेट हें सर्व जगांत जुनें वर्तमानपत्र समजलें जातें. परंतु यांत बादशाहीफर्मानें, सरकारी हुकूम व इतर गोष्टी प्रसिद्ध होतात. यावरून याला वर्तमानपत्र म्हणतां येणार नाहीं. १८७० पासून वास्तविक वर्तमानपत्रें प्रचारांत येऊं लागलीं. सध्यां १००० वृत्तपत्रें व नियतकालिकें चीनमध्यें प्रसिद्ध होतात. १९१७ च्या वाङ्मयविषयक ठरावामुळें साध्या भाषेंतलें प्रकाशन अधिक उत्तेजित दिसतें. ५०० पर्यंत वाचनालयें व १९०० व्याख्यानगृहें व ७३३ फिरते व्याख्यानसंघ या देशांत आहेत.

**शे त की व उ द्यो ग धं दे**—चीन देशांत बहुतेक लोक शेतकरी आहेत. येथील शेतें लहान आहेत. जुन्या पद्धतीनें लागवड होते. मेंढ्या, गुरेढोरें यांचे कळपच्या कळप पाळतात. जंगल खात्याकडे दुर्लक्ष आहे.

चिनी शेतकरी फार मेहनती असतात. तांदूळ सर्व देशभर पिकतो. याच्या खालोखाल चहा व कापूस पिकतो व यानंतर ऊंस, खसखस व बांबू यांचा नंबर लागतो. याशिवाय वेगवेगळ्या तऱ्हेची फळफळावळ चीन देशांत होते.

अफूः—१९२१ सालीं, अफूच्या लागवडीची चीनमध्यें अभिवृद्धि झाली. इग्लंडनें या गोष्टीचा निषेध केला व 'लिग-ऑफ नेशन्सनें ती बाब विचारांत घेतली. कित्येक प्रांतांतील लष्करी अधिकारी, सैन्याचा पगार भागविण्याकरितां अफूची पैदास करण्यास भाग पाडीत असत. अफूच्या बंदीमुळें अफूच्या अर्काच्या व्यापारास तेजी आली. इंग्लंड व अमेरिका यांनीं तयार केलेला खंडोगणती मॉर्फिया येथें विकला जात असे व जपानी लोक जकातचोरीनें तो माल चीनमध्यें नेत असत. कानसू व हूनन येथें खसखसीची लागवड करण्याची मुभा देण्यांत चीननें विश्वासघात केला अशी ओरड इंग्लंडनें १९११ नोव्हेंबरमध्यें केली होती. १९२४ नोव्हेंबरच्या जिनोव्हा परिषदेंत, आपल्या नियंत्रणाबाहेरच्या कांहीं खासगी लोकांच्या कृत्यांबद्दल आपण जबाबदार नाहीं असें चीननें बजाविलें होतें.

खनिजः—खनिज पदार्थ विपुल आहेत. पण परकीयांनां खाणी खणण्याची परवानगी दिली नाहीं.यामुळें खनिज पदार्थांचा व्यापारास मुळींच उपयोग झाला नाहीं. खाणी व्यापारी खात्याच्या अंमलबजावणीखालीं येतात. कोळसा, लोखंड, तांबें व कथील हे मुख्य पदार्थ आहेत. शानसी प्रांतांत सर्वांत मोठी कोळशाची खाण आहे. लोखंड देखील कोळशाच्या खाणीजवळच शानसी प्रांतांत व इतर ठिकाणीं सापडतें. सोनें व चांदी यांच्या लहान खाणी देखील आहेत. १९१३ सालीं व्यापारी खात्याच्या मंत्र्यानें खाणींसंबंधीं कांहीं नियम तयार केले. या नियमांमध्यें जी एक प्रमुख गोष्ट गोंवण्यांत आली ती म्हणजे संस्थानांतील सर्व खाणींवर सरकारचा ताबा आहे ही होय. पण खाणींतलि खनिज पदार्थांवर जबर जकात बसविण्यांत आल्यामुळें या धंद्याला जितकें उत्तेजन मिळावें तितकें मिळालें नाहीं. १९१६ मध्यें खाणींबाबत नवीन नियम करण्यांत आले. पण लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनां अशी भीति वाटत होती कीं जर खनिखोदनाचें काम परदेशीय कंपन्यांनीं परदेशीय भांडवलाच्या जोरावर सुरू केलें तर चीनमधील व्यापार परदेशीय लोकांच्या आयताच ताब्यांत जाईल. यासाठीं त्यांनीं या खनिखोदनाच्या धंद्याचा प्रश्न बाजूसच टेवून दिला. एका दृष्टीनें लोकशाहीच्या या पुरस्कर्त्यांचें म्हणणें अगदीं खरें होतें; पण त्यामुळें चीनचा आर्थिकदृष्ट्या तोटा झाला. हीहि एक गोष्ट कांहीं खोटी नाहीं. १९१९ सालीं चीनमध्यें एकंदर १४७७४३३ टन कोळसा बाहेर पडला. चिहली व मँचूरिया या ठिकाणींच कोळशाच्या खाणी पुष्कळ आहेत. याशिवाय चीनमध्यें लोखंड व तांबें या धातुहि पुष्कळ सांपडतात. १९१९ सालीं चीनमधून ६३०००० टन तांबें जपानमध्यें गेलें.

प्राचीनकाळापासून चीनदेश चिनीमातीचीं भांडीं व रेशमाचें कापड याबद्दल प्रसिद्ध आहे. कापसाचें सूत व कापड हातमागावर सर्व ठिकाणीं काढतात. परकीयांनीं चालविलेल्या कांहीं कापसाच्या गिरण्या आहेत. हिंदी सुताचें कापड बहुतेक चिनी स्त्रिया तयार करतात. याशिवाय शाई, पंखे, रंग, मुलाम्याचीं कौलें, लाखेचीं भांडीं इत्यादि लहान-उद्योगधंदे आहेत. चीन देशाचा परक्या देशांशीं व्यापार तहान्वयें खुल्या केलेल्या बंदरांतून चालतो. कापड, अफू, तांदूळ, साखर, धातू, तेल, कोळसा, लोंकरीचें कापड, वगैरे वस्तूंची आयात चीन देशांत होते. हिंदुस्थानच्या खालोखाल चीन देश हा मँचेस्टरचा गिऱ्हाईक आहे. रेशीम व चहा या दोन वस्तूंची निर्गत चीन देशांतून होते. जाणाऱ्या व येणाऱ्या मालावर शेंकडा ५ टक्के जकात पडते. चीनमध्यें धामधुम माजली असतांना सुद्धां या काळांत पुष्कळच कारखाने अस्तित्वांत आले. त्यांपैकीं पुष्कळ कारखाने देशी कारखानदारांनीं चालविले होते. चीनमध्यें कच्च्या मालाची मुबलक पैदास होत असल्यानें व मजूरीहि स्वस्त असल्यामुळें चीनमध्यें कारखाने निघतील तितके थोडेच अशी स्थिति आहे. १९१९ त यासंबंधींचे जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून चीनमध्यें रेशीम, सुताचा माल, छत्र्या, लोंकर, औषधें, सुया, टाचण्या, विजेचे दिवे, टेलीफोनचें साहित्य, दारू, इत्यादि निरनिराळ्या प्रकारचा माल तयार होत होता असें आढळतें. १९१९ त चिनी लोकांनीं पुष्कळच पेढ्या स्थापन केल्या. चीनमध्यें जहाजेंहि पुष्कळ तयार झालीं. चीनमध्यें या लोकशाहीच्या काळांत, जिकडे तिकडे बेबंदशाही माजली असतां व्यापाराची प्रगतीच होत होती. १९१९ सालीं चीनमध्यें बाहेरून २०४८८२५५९ पौंडांच्या किंमतीच्या मालाची आयात झाली व १९९५७८३३१ पौंडांच्या किंमतीच्या मालाची निर्गत झाली. आयात मालांत कापूस, धातू, रॉकेल तेल, साखर, सिगारेट्, रेल्वेच्या गाड्या, यांत्रिक सामान, कोळसा, मासे, कागद व मोटारी वगैरे प्रमुख जिन्नस होत व निर्गत मालांत, रेशीम, द्विदलधान्यें, चहा, कातडीं, लोंकर इत्यादि प्रमुख जिन्नस होत.

१९२० पेक्षां १९२१ सालीं व १९२१ सालापेक्षां १९२२ सालीं चीनमधील व्यापाराची प्रगति झालेली आहे असें आढळतें. निर्गत मालासंबंधीं चांगली प्रगति झालेली आहे. १९२३ च्या फेब्रुवारीमध्यें अमेरिकेंतील तीन मोठ्या भांडवलवाल्यांनीं, कापूस व रेशीम यांच्या व्यापाराबद्दल चीनमधील मोठ्या व्यापाऱ्यांशीं एक करार केला. चीनमधील २००० शहरांत पाश्चात्य जीवितक्रमाची तद्देशीयांना ओळख पटावी म्हणून सिनेमा कंपन्यांनीं चीनमध्यें सिनेमाचा प्रसार करण्याचाहि करार केला. लष्करी लोक व लुटारू यांच्या दंग्यामुळें चीनचा अंतरस्थ व्यापार मंदावलाच होता. १९१९ सालीं एकंदर ४० कापसाच्या गिरण्या होत्या व १९२२ मध्यें १०२ कापसाच्या व १०१ रेशमाच्या गिरण्या होत्या. मजूरवर्गापैकीं शेंकडा ५० स्त्रिया असून चौदा वर्षांच्या आंतील मुलांचें प्रमाण शेंकडा २० असें पडतें. कामाचे तास दर दिवशीं १२ ते १४ पर्यंत असतात. कारखान्यांतील व्यवस्था आरोग्यदृष्ट्या वाईट असून मातृत्व प्राप्त झालेल्या स्त्रियांच्या फायद्याच्या तेथील कारखान्यांत सोई केलेल्या नाहींत. अशा स्त्रियांना प्रत्यहीं ३६ ते ४० सेंट इतकें वेतन मिळतें.

परक्या देशांशीं खुष्कीवरील व्यवहार प्राचीन मार्गांनीं म्हणजे मध्यआशियांतून होतो. अलिकडे आगबोटींचा उपयोग युरोप, अमेरिका वगैरे देशांशीं व्यापार करण्यास होतो. बहुतेक आगबोटी परकीय कंपन्यांच्या मालकीच्या आहेत. अंतर्गत दळणवळण नदी, कालवे, सडका व रेल्वे यांनीं होतें. २० व्या शतकापासून रेल्वेचें महत्व अतिशय वाढलें आहे. शांघाय व वुसुंगमध्यें रेलवेचा पहिला फांटा १८७५ त उघडला. परंतु एक चिनी मनुष्य चिरडल्यामुळें अधिकारी खवळले व त्यांनीं सर्व रेल्वेचें सामान, डबे, इंजिन, स्टेशन वगैरेंची नासधुस केली. नंतर १८८६ त खुद्द अधिकाऱ्यांच्या सत्तेखालीं एक मंडळी स्थापन झाली. परंतु परकीय लोकांच्या सहाय्यावाचून काम चालेना. त्यामुळें स्वतचा ताबा ठेवण्याची धडपड व्यर्थ गेली. यामुळें व राजकीय डावपेंचामुळें फ्रान्स, रशिया व ग्रेटब्रिटन या राष्ट्रांना सवलती मिळाल्या. या सवलतींविरुद्ध पुष्कळ आरडाओरड झाली. १९१८ सालीं चीन देशांत मांचुरियांतील १८५७ मैलांची रेलवे धरून एकंदर ६००० मैल रेलवे होती व २२७३ मैल रेलवे तयार करीत होते.

वै मा नि क आ णि बि न ता री :— १९२१ जुलैंत टीसिनॅनफ्यूपर्यंत 'पेकिंग वैमानिक डाक' सुरू झाली होती. परंतु चिहलीच्या गव्हर्नरानें सवलती देण्याचें नाकारिलें; कारण त्याला वैमानिकखात्याचा ताबा मिळावयाचा होता. म्हणून शांघाइकडे, चिनांकिअँगच्या मार्गानें जावें लागत असे. १९२३ ऑगस्टमध्यें 'मिटसुइ बुसन कैशा' नामक एका जपानी कंपनीनें, पेकिंगजवळ शुअंगचिओ या ठिकाणीं, एक बिनतारी विद्युत्संदेशाचें स्टेशन बांधलें व त्यास अर्ध्या लक्षावर खर्च झाला. सार्वराष्ट्रिय बिनतारी दळणवळणाच्या थेट रस्त्यावरील पेकिंग हें सध्या एक केन्द्रच आहे.

स र का र व रा ज्य का र भा र—चीन देशांतील राज्यव्यवस्थेंत १९०५ पासून बदल होण्यास सुरवात झाली. याच वेळेला एक कमीशन नेमून त्यानें इतर देशांतील राज्यकारभाराचा अभ्यास करावा असें ठरलें. १९०७ सालीं सहायकारी मंडळाची स्थापना झाली. १९०८, १९०९ व १९१० सालांच्या फर्मानांवरून खुद्द पार्लमेंट सभा, तिच्या सभासदांची संख्या व कोणकोणत्या संस्थेकडून सभासद निवडावयाचे या गोष्टींचा उहापोह करण्यांत आला. आठ संस्थांकडून २०० सभासद घ्यावयाचे ठरलें. १९१० सालीं राजप्रतिनिधीनें जी राष्ट्रीयसभेची

सरवात केली तींत दोन तऱ्हेच्या सभांचें बीज होतें. या सुधारणांच्या अनुरोधानें एकंदर राज्यकारभारांत सुधारणा करण्यांत आली.

आजची वस्तुस्थिति पाहिल्यास वरिष्ठ सरकारची मुख्य सत्ता मुख्य प्रधानाच्या हातांत असते. हा प्रधान अध्यक्षानें नेमावयाचा असतो. प्रधानानें नऊ लोकांचें प्रधानमंडळ नेमावयाचें असतें. या नऊ प्रधानांच्या ताब्यांत प्रत्येकी परराष्ट्र, गृह, जमाबंदी, लष्कर, आरमार, न्याय, शिक्षण, व्यापार व दळवळणवळण हीं खातीं असतात. याशिवाय, रेल्वे, पोस्ट व तारखातें, जकात इत्यादि गौण खातीं आहेत.

जुनी पद्धतः—बादशाहा सर्व राज्यांत अतिशय मोठा समजला जात असे. बादशाही फर्मान म्हणजे कायदा समजत. सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांचे अधिकार बादशाहाच्या इच्छेवर अवलंबून असत. बादशहास एक सहाय्यकारी मंडळ असे परंतु या मंडळाच्या इच्छेप्रमाणें बादशहानें चाललेंच पाहिजे असें नव्हतें. अशा तऱ्हेच्या राज्यकारभाराच्या कल्पना अतिप्राचीन काळापासून चालत आल्या होत्या. बादशहाची सत्ता राज्यकारभारांत अनियंत्रित असली तरी इतर बाबतींत ती बरीच मर्यादित होती.

सैन्य व आरमारः—१९०५–६च्या सुधारणेच्या काळापूर्वी मांचुसैन्य व प्रांतिकसैन्य असे दोन तऱ्हेचें सैन्य होतें. बॉक्सर बंडानंतर युआन शिकाई यानें उत्तरेकडील सैन्य तयार केलें व रूसो जपानी युद्धानंतर मात्र पाश्चात्य पद्धतीवर सैन्य तयार होऊं लागलें. १९०९ सालीं चिनी आरमारांत ४३०० टनाचें एक क्रूझर व ३००० टनांचीं तीन क्रूझरें व कांहीं टार्पेडो एवढींच होतीं. परंतु यानंतर बरीच सुधारणा करण्यांत आली आहे.

जमाबंदी.—प्रत्येक प्रांताचा राज्यकारभार स्वतंत्र असून साम्राज्य सरकारास कोणत्याच तऱ्हेचा कर व सारा वसूल करावा लागत नाहीं. प्रांतिक वसूलांतून कांहीं रकम साम्राज्यसरकारास दिली जाते.

उत्पन्नाच्या सात बाबी आहेत. त्या:—( १ ) जमीनीवरचा कर (२) मिठावरील कर (३) साम्राज्याची बंदरावरील जकात (४) व्यापारावरील कर (५) स्थानिक जकात (६) स्थानिक अफूवरील कर (७) किरकोळ.

खर्चाच्या बाबतींत मात्र साम्राज्य व प्रांतिक सरकारांत बरीच तेढ येते. कारण साम्राज्यसरकारास ( १ ) बादशाही घराण्याचा खर्च (२) मांचु सैन्याचा खर्च (३) राजधानींतील मुलकी खर्च (४) इतर सैन्याचा खर्च (५) आरमारी खर्च (६) परकीय कर्ज या बाबींकडे लक्ष द्यावें लागतें. १९१६–१७ सालीं चीनचें एकंदर उत्पन्न ४७२८३ ८५८४ टेल असून खर्चहि तितकाच होता. १९२० सालीं चीनला ६५७६२७०६३ टेल कर्ज होतें.

स्थानिक पेढ्या राष्ट्रांतर्गत व्यापाराला पुरेशा आहेत. शांगसी बँकेच्या शाखा सर्व साम्राज्यभर आहेत. शांघाय येथें व कांहीं प्रसिद्ध बंदरांत परकीय पेढ्या आहेत. पेकिंग येथें एक सरकारी पेढी स्थापन झाली आहे.

१९१० सालच्या फर्मानाप्रमाणें ७२ कँडरीन वजनाचें ( १ कँडरीन = १ शंभरांश टेल औंस ) डॉलर नाणें चालू झालें. त्याचप्रमाणें लहान नाणीं देखील प्रचारांत आलीं.

सांप्रत चांदीचीं व तांब्याचीं नाणीं चालू आहेत. तांब्याच्या नाण्यांचें प्रमाण चांदीच्या नाण्यांशीं बसविलें नाहीं. चिनी औंस अथवा टेल ( ५६५ ग्रेन) हें प्रमाण आहे; कारण टेल हें नाणें नसून एक वजन आहे.

१९२१ च्या सप्टेंबर महिन्यांत कॅनेडिअन बँकिंग सिंडिकेटनें तीन लक्ष सोन्याच्या डॉलरचें कर्ज देऊं केलें. सार्वराष्ट्रियमंडळाचा कटाक्ष अशीं कर्जें दिलीं जाऊं नयेत असा होता; व या बाबतींत इंग्लंडचा दुटप्पीपणा चांगलाच निदर्शनास आला. आक्टोबरअखेर सरकारचें दिवाळें निघालें व पन्नास लक्ष अमेरिकन डॉलरच्या कर्जासंबंधीं करार झाला. सरकारी अधिकाऱ्यांचे पगार बरेच महिने थकले व वॉशिंग्टन कॉन्फरन्सला पाठविलेल्या शिष्टमंडळाचा खर्च भागविण्यासहि पैसा उरला नाहीं. सैन्याची पगाराबद्दल सारखी मागणी सुरूच होती. १९२३ सालीं चीनची आर्थिकदृष्ट्या हलाखीची स्थिति झाली. सार्वराष्ट्रीय मंडळाकडून बारा लक्ष कर्ज अगाऊ घेण्याबद्दलचे प्रयत्नहि व्यर्थ गेले. चीनच्या परराष्ट्रांतील प्रधानांना अकरा महिन्यांचा पगारहि मिळाला नाहीं. टेलिफोनकरितां १६ लक्ष येन व टेलिग्राफकरितां २० लक्ष येन अशी जपानची चीनकडे बाकी होती, ती फेडण्याचें चीनला सामर्थ्य उरलें नाहीं. चीनमधील परकीयांच्या बँका, चीनच्या बँकेतून मोठाल्या रकमा कर्जाऊ घेत असत व त्यामुळें चीनच्या बँकांना फार फायदा होत असे. १९२३ अक्टोबरमध्यें शेवटीं चीनमधील आर्थिक गोंधळ अथवा अस्ताव्यस्तपणा नाहींसा करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

परराष्ट्रीय धोरण :— कोणताहि तहनामा वगैरे न करणाऱ्या परकीयांनीं, सैन्य, पोलीस, टेलिग्राफ व वायरलेस वगैरे ज्या खात्यांचा जम चीनमध्यें बसविला होता तीं सर्व खातीं तेथून काढून टाकण्यांबद्दल१९२१च्या नोव्हेंबर महिन्यांत चीननें वॉशिंगटन परिषदेस लिहून सांगितलें. १९२३ च्या सप्टेंबरांत, लिनचेंजच्या अत्याचाराची जबाबदारी आपणावर नाहीं असें चीननें प्रसिद्ध केलें. तथापि, शॅनटंगच्या गव्हर्नराच्या बडतर्फीखेरीज सर्व मागण्या कबूल करण्यांत आल्या व रेलवेच्या रक्षणार्थ पोलीस ठेवण्याविषयीं निर्णय देण्याचा हक्क चीननें राखून ठेवला . १९२१ मध्यें जर्मनीशीं चीनचा एक तहनामा झाला.१९२४ जुलैमध्यें पुनः जर्मनीशीं तहनामा झाला. 'लीग ऑफ नेशन्स 'च्या कौन्सिलांत आपणास घेतलें नाहीं म्हणून १९२४ आक्टोबरमध्यें चीन देश खचून गेला होता.

जपानबरोबरः—अक्टोबर १९२१ मध्यें चीननें जपानची शानटंग परत करण्याची मागणी नाकारली. चीननें युद्ध पुकारलें तेव्हांच जर्मनीचा किआंचौचा कौल संपला असें चीनचें म्हणणें होतें. शानटंगहून जपाननें चालतें व्हावें असा चीनचा मानस असून शानटंग रेलवेचा समाइक ताबा असावा हेंहि चीनला मान्य नव्हतें. १९२२ त जपाननें तो मुलुख सोडून दिला. १९२३ त बॉक्सर इंडेम्निटींतून ४४ लक्ष येन व शॅनटंगरेल्वेच्या विक्रीतून १५ लक्ष येन, या दोन्ही रकमांचा उपयोग, सिनो-जपानी यांच्या संबधाच्या वर्धनांत व्हावा, असें जपाननें ठरविलें. १९१५ चा सिनो-जपानी तह रद्द व्हावा अशी चीननें मागणी केली व ती जपाननें नाकारली. चिनी विद्यार्थ्यांनीं बहिष्काराची चळवळ केल्यामुळें १९२३ मेमध्यें जपानी व्यापाऱ्यांचें फार नुकसान झालें. परंतु ती चळवळ अल्पायुषी ठरली. चीन देश जपानी माल घेत नसे तरी जपानला आपला माल मात्र विकीत असे. १९२३ जुलैमध्यें चीन व जपान यांचा स्नेह जमला. इंग्लंडच्या ऐवजीं दुसऱ्या एखाद्या राष्ट्राशीं स्नेह करणें जपानला जरूरच होतें. पाश्चात्य राष्ट्रांनां आपला चीन देशांतील मुलूख घेण्याचा हेतू नाहीं असें भासविणें आणि १९१४सालीं जर्मनीपासून शॅनटंग घेतल्यामुळें उत्पन्न झालेला चिनी लोकांचा क्षोभ कमी करणें असें जपानचें दुहेरी धोरण आहे व तेंच वॉशिंग्टन परिषदेंत दिसून आलें.

सोव्हिएट रशियाबरोबरः—१९२२ व १९२३ सालीं, मँचुरियाच्या तीन प्रांतांत बोल्शेव्हिक मतांचा प्रसार सुरू करण्यांत आला होता. १९२३ च्या जानेवारींत सोव्हिएट प्रतिनिधीनें चीनशीं तहाचें बोलणें सुरू केलें. पूर्वी झारनें केलेल्या मागण्या रशियानें सोडून द्याव्या व मँगोलियाबाहेर कोणतेंहि राजकीय धोरण अमलांत आणलें जाणार नाहीं अशी त्यानें हमी घ्यावी अशा दोन अटींवर हें स्नेहाचें बोलणें सुरू करण्यांत आलें. १९२४ मध्यें सोव्हिएट सरकार, चीनशीं युद्ध जुंपेल म्हणून तयारी करू लागलें. व मंचुरीयाच्या सरहद्दीवर सैन्य जमविण्यांत आलें. १९२४ च्या सप्टेंबरांत, इंग्लंड व फ्रान्स हे देश चीनच्या राजकारणांत उगीच पडतात अशी सोव्हिएटनें तक्रार केली. कारण चीनला लढाऊ गलबतें पाठविणें म्हणजे रशियावर हल्ला करण्याची पूर्वतयारीच होय असें सोव्हिएट सरकारास वाटलें.

अमेरिके बरोबरः—१९२३ सालीं अमेरिकेशीं वितुष्ट आलें.एका अमेरिकन मनुष्याचा खून झाला त्याबद्दल अमेरिकेनें चीनला जाब विचारला व वायरलेस स्टेशनें बांधण्याचा करार पूर्ण करावा अशी चीनजवळ मागणी करण्यांत आली १९१८ च्या करारान्वयें जपाननें वरील हक्काचीच मागणी केलेली होती व त्यामुळें चीनला संकट पडलें. अमेरिकन इंजिनियर सर्व सामानासह वरील स्टेशनें बांधण्यास चीनमध्यें आले व चीननें त्यांना मनाई केली. १९२४ मेमध्यें, बॉक्सर इंडेम्निटीचे पैसे देण्यापासून अमेरिकेनें चीनला मुक्त केलें.

ग्रेटब्रिटनबरोबरः—१९२३ एप्रिलमध्यें इंग्लंडनें बॉक्सर इंडेम्निटीचे पैसे अमेरिकेचें अनुकरण करून चीनला शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करावे म्हणून परत दिले व शांघाय येथें एक धंदेशिक्षणाची शाळा काढावी अशीहि सूचना केली.

चीन देशाचा इतिहास—चीन देशाचा पहिला ऐतिहासिक राजा म्हटला म्हणजे फुही हा होय. हा ख्रिस्तीशकापूर्वी २८५२ व्या वर्षी जन्मून २७३८ व्या वर्षी मरण पावला. यानें समाज स्थापन करून विवाहपद्धति अमलांत आणिली. याशिवाय यानें चिनी लोकांस मासे धरणें, शिकार खेळणें व गुरें पाळणें ह्या गोष्टी शिकवून त्यांस गायन, वादन व चित्रलिपी यांचीहि माहिती करून दिली. हा द्वैतमतवादी होता. याच्या मागून शान्नंग हा बादशहा प्रसिद्धीस आला. याचा काळ म्हटला म्हणजे ख्रिस्तिशकापूर्वींचें २८ वें शतक होय. यानें शेतकीचीं आउतें शोधून काढून चिनी लोकांस शेतकीचें ज्ञान करून दिलें. याशिवाय पुष्कळ वनस्पतींच्या औषधी गुणांचा शोध लावला. याच्या नंतर व्हांगति ( हुआंगति ) प्रसिद्धीस आला. याची कारकीर्द ख्रिस्त पूर्व २७०४ अथवा २४९१ व्या वर्षी सुरू झाली असावी. यानें चिनी राज्याची मर्यादा वाढविली. यानें चिनी लोकांस देवालयें व घरें बांधण्याची कला शिकवून दळणवळण सुलभ होण्याकरितां बैलांच्या गाड्या व नावा यांची योजना केली याच्या बायकोनें चिनी लोकांस रेशिमाचे किडे कसे पाळावे व त्यांपासून रेशीम कसें तयार करावें हें शिकविलें.

कन्फ्युशिअस यानें सांगितलेल्या वृत्तांतांत वरील तीन राजे येत नाहींत. तो दुसऱ्याच राजांचीं वर्णनें देतो. त्यांपैकीं पहिला याऊ हा होय. याची कारकीर्द ख्रिस्तापूर्वीच्या २३५७-२२५८ पर्यंत. याच्या नंतर शून हा गादीवर आला, व याच्या नंतर याचा प्रधान यू राजा झाला. यानें ख्रिस्ती शकापूर्वीच्या २२०५ व्या वर्षापासून २१९८ वर्षापर्यंत राज्य केलें यानें हिआ घराणें स्थापन केलें. या घराण्यांत ख्रिस्तीशकापूर्वीच्या १७६६ व्या वर्षापर्यंत एकंदर १८ राजे झाले. या घराण्यांतील चुंगकांग (२१५९-२१४७) नांवाच्या राजाच्या कारकीर्दीत एक ग्रहण दिसलें होतें. या नंतर शांग अथवा यिन घराण्याची चीन देशांत स्थापना झाली. हें घराणें ख्रि पू. १७६३-११२२ पर्यंत टिकलें. यातील पहिला राजा चेंगतंग हा फार दयाळू असून प्रजेला फार ममतेनें वागवीत असे. याच्या मागून पानकाँग( १४०१ ) व वुतींग ( १३२४ ) या राजांनीं राज्य केलें. या घराण्यांतील शेवटचा राजा चौसिन हा होय. हा फार दुष्ट होता. याची वोनवंग या गृहस्थानें चांगली कानउघाडणी केली म्हणून याला कैदेंत टाकण्यांत आलें. तितक्या अवधींत या गृहस्थानें चिनी वाङ्मयांतील पहिला ग्रंथ लिहून ठेविला. याचा मुलगा वूवंग यानें पुढें चौ घराणें स्थापिलें. यानें

चीन देशांत सरंजामी पद्धत अमलांत आणली; याचा परिणाम असा झाला कीं यानें केलेले जहागिरदार कांहीं दिवसांनीं छोटे संस्थानिक झाले. प्रथम चिनी साम्राज्यांतील सर्व सत्ता सम्राटाच्या ठायीं एकवटली असून तिचा सर्व मांडलिकांवर मोठा दरारा असे. परंतु खास सम्राटाच्या ताब्यांतील मुलूख साम्राज्यांतील संस्थानिकांनीं वेष्टिला असल्यामुळें चिनी सम्राटाचें आपली सत्ता वाढविण्याचें साधन खुंटून जाऊन त्याच्या मांडलिकांस एकमेकांविरुद्ध अथवा परकीय लोकांशीं युद्ध करून आपली सत्ता वाढविण्याचा अवसर मिळाला होता. या योगानें सम्राटाचा धाक हळू हळू कमी होऊन संस्थानिक त्याला न जुमानीतसे झाले. हें घराणें ख्रिस्तापूर्वींच्या २४९ वर्षापर्यंत राहिलें.

यानंतर त्सिन घराणें आलें. याची कारकीर्द ख्रि. पू. २४९-२१० पर्यंत झाली. याच घराण्यांत शी व्हांगति नांवाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला. यानें ह्येन यांग (यालाच अलीकडे सगिान फू म्हणतात ). हें शहर राजधानी केलें;व साम्राज्यातील सरंजामी पद्धत मोडून त्याचा प्रांतिक विभागणी केली; व प्रत्येक प्रांतावर स्वतःस जबाबदार असा देखरेख करणारा कामगार नेमला. याशिवाय साम्राज्यांत रस्ते, कालवे, इमारती वगैरे बांधून सांपत्तिकदृष्टया याची सुधारणा केली. याच्याच कारकीर्दींत चीनमधील प्रसिद्ध भिंत बांधली गेली. वरील घराण्यानंतर हान घराण्याचा अम्मल सुरू झाला. व तो इ. स. २३ व्या वर्षापर्यंत कायम होता. या घराण्यांतील दुसरा राजा ह्वेइति ( ख्रि. पू. १९४—१७९ ) यानें वाङ्मयवृद्धीस पुष्कळ उत्तेजन दिलें. याच घराण्याच्या अमदानींत चिनी लोकांस हिंदुस्थानची माहिती झाली. पुढें वूति (१४०-८६ ख्रि. पू.) गादीवर आल्यावर पूर्वतुर्कस्थानांत चिनी लोकांनीं आपली वसाहत करून इराण व रोम येथून येणारा व्यापारी माल व कलाकौशल्याच्या वस्तू ते आपल्या देशांत घेऊन जाऊं लागले. २३ व्या शतकांत याच घराण्यांतील लिऊसिउ नांवाच्या पुरुषानें पूर्वेकडील हान घराणें स्थापन केलें. हें २ ऱ्या शतकाच्या अखेरपर्यंत कायम होतें. या घराण्याच्या कारकीर्दींत ( ६५ इ. स. ) चीन देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला. या घराण्याच्या अमदानींत चीन देशास एकत्व प्राप्त होऊन तें चिरस्थायी झालें व चिनी लोकांची सांपत्तिक व बौद्धिक उन्नति झाली. यानंतर ७ व्या शतकापर्यंत चीन देशांत एकंदर तीन घराणीं झालीं. त्यांचीं नांवें वेई, त्सेन व सुइसाय हीं होत. या मध्यंतरीच्या कालांत हिंदुस्थान व चीनमध्यें बरेंच दळणवळण असावें असें एकमेकांकडे गेलेल्या वकीलातींवरून वाटतें. पुढील वकिलातींची जंत्री मेयेल डफ देतेः २५७ मध्यें हिंदुस्थांतून एक वकीलमंडळ भेट म्हणून हत्ती व घोडे बरोबर घेऊन चीनला गेलें. ४२८ त दुसरें वकीलमंडळ हिंदुस्थानांतून चीनला गेलें ( सुंग घराण्याची बखर ). ४७७ त पश्चिम हिंदुस्थानातून एक वकीलमंडळ चीनला गेलें. यानंतर ५०२, ५०३, ५०४, ५०७, ५०८, ५१५, ५४१, ५७१, ६०४. या वर्षीं निरनिराळीं वकील मंडळें हिंदुस्थांतून चीन देशास गेल्याचे व तेथून इकडे आल्याचे उल्लेख सांपडतात.

इ.स.६१८त काओत्सु यानें तअंग घराण्याची स्थापना केली. याच्या नंतर याचा मुलगा ताइत्सुंग यानें ६२७-६५० पर्यंत राज्य केलें. याच्या कारकीर्दींत मध्यआशियांतील चिनी सत्ता पुन्हां स्थापित झाली व चीन देशाची मर्यादा पूर्वइराण व कास्पीअन समुद्र यांपर्यंत जाऊन पोहोंचली. या वेळस चीन देश फार प्रसिद्धीस येऊन चिनीदरबारांत नेपाळ, इराण, मगध व कान्स्टांटिनोपल येथून वकील येत असत. याच्या राज्यांत शेतकी, व्यापार व वाङ्मय यांची अभिवृद्धि झाली. ताईत्सिंग याच्या मागून या घराण्यांत ६८३ मध्यें वू-हौ ही विधवा राणी राज्यकारभर पाहूं लागली. ही चीन देशांतील राज्यसूत्रें हातीं घेऊन राज्यशकट हांकणारी पहिली स्त्री होय. पुढें याच घराण्यांत सुत्संग ( ७५६-७६२ ) व ताइत्संग ( ७६३-७८० ) या दोन राजांनीं राज्य केलें. हें घराणें ९०० पर्यंत कायम होतें

९०७ सालीं ताइत्सु यानें लाअंग घराण्याची स्थापना केली. ९०७-९६० च्या दरम्यान चीन देशाची सत्ता पांच घराण्यांच्या ताब्यांत जाऊन शेवटीं चाओ क्वांगयीन यानें सुंग घराणें स्थापन केलें. या घराण्यांत पुढें दिलेले राजे झाले. ताईत्सुंग ९७६-९९७, चेनत्सुंग ९९७-१०२२, जेनत्सुंग १०२३-१०६४, ह्वेइत्सुंग ११०१-११२६, काओत्सुंग ११२७-११६३. ह्वेइत्सुंग याच्या कारकीर्दींत नुची तातॅर लोकांनीं शेनसी, शानसी व होनान हे प्रांत काबीज करून यांगत्सिकँगपर्यंतचा मुलूख आपल्या ताब्यांत घेतला; व किन घराणें स्थापन केलें. या वेळेपासून चीन देशांत दक्षिणेस सुंग व उत्तरेस किन या दोन घराण्यांचा अम्मल सुरू झाला. पुढें १२ व्या शतकांत चीन देशावर मोंगल लोकांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. यावेळीं मोंगलांचा पुढारी प्रसिद्ध चेंगीजखान हा होता. मोंगलांनीं सुंग घराण्याची मदत घेऊन किन घराण्याचा पाडाव केला व पुढें लवकरच सुंग घराण्याचा नाश करून सर्व चीन देशाची सत्ता आपल्या हातीं घेतली. मोंगलांचा कुब्लाइखान नांवाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला. यानें मोंगल घराण्यास युएन हें नांव दिलें; व स्वतः शित्सु ही पदवी धारण केली. मोंगलांनीं चीन देशावर १२५९ पासून १३६८ पर्यंत आपली सत्ता गाजविली. १३६८ त चू युएनचांग या चिनी गृहस्थानें मोंगलांची सत्ता झुगारून देऊन मिंग घराण्याची स्थापना केली. याच घराण्याच्या अमदानींत इ. स. १५१७ त कॅन्टन बंदरीं पोर्तुगीज व सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्रज या यूरोपियन लोकांनीं प्रवेश केला. हें घराणें १६४४ पर्यंत कायम होतें. पुढें चीन देशावर मांचू लोकांनीं आपलें राज्य स्थापिलें या नवीन घराण्याच्या कायेनलुंग

नांवाच्या राजाच्या कारकीर्दीत डच, इंग्रज, पोर्तुगीज हे यूरोपियन लोक चीनशीं अफू, चहा, रेशीम या जिनसांचा व्यापार करीत असत. यानंतर कायकिंग या राजाच्या कारकीर्दींत १८०७ सालीं चीन देशांत डॉ. मॉरिसन या प्रोटेस्टंट धर्मप्रचारकानें प्रवेश केला. वरील घराण्याचा ताओक्वांग नांवाच्या बादशहाच्या कारकिर्दीत चीन व ग्रेटब्रिटन या दोन साम्राज्यांत कांहीं व्यापारी बाबतींत तंटा उपस्थित होऊन १८४० त या दोघांमध्यें लढाई सुरू झाली. या लढाईंत चीन देशाचा पराभव होऊन चिनी लोकांस अॅमॉय, फूचौ, निंगपो व शांघई हीं चार बंदरें परदेशीय व्यापाराकरितां खुलीं करावीं लागलीं. यानंतर १८५० त हायेन फेंग नांवाचा राजा चीनच्या गादीवर बसला. याच्या अमदानींत चीन देशांत हुंग सिउत्सुआन या नांवाच्या मनुष्यानें बंड केलें. याच सुमारास म्हणजे १८५७ त ब्रिटिश व फ्रेंच सरकारांनीं चीनविरुद्ध लढाई पुकारली. ही लढाई १८६० पर्यंत चालून शेवटीं चीन देशास हार खावी लागली. या लढाईनंतर झालेल्या तहान्वयें चीन देशानें युद्धखर्च म्हणून ८०००००० टेल नाणें देण्याचें आश्वासन देऊन आणखी यूरोपियनांनां देशाच्या अंतर्भागांत प्रवेश करण्याची व ख्रिस्ती संप्रदायाचा प्रसार करण्याची मोकळीक दिली. हायेन फेंग हा मेल्यावर १८६१ त तुंगची हा गादीवर आला. यानें १८७५ पर्यंत राज्य केलें. याच्यानंतर क्वांगसू हा गादीवर आला. १८७१ त रशियानें सरहद्दीवर बंदोबस्त ठेवण्याकरितां चीनपासून कुलीजा हा प्रांत आपल्याकडेच ठेविला आणि चीनमध्यें शांतता स्थापन झाल्यानंतर तो परत करावा असें ठरलें. पुढें काशगरिया प्रांतांत याकुबबेग यानें बंड केलें. यामुळें सर्व मध्यआशियांत अस्वस्थता उत्पन्न झाली. चिनी सरकारनें ही अस्वस्थता मोडून टाकून सर्वत्र शांतता स्थापन केली व रशियन सरकारापाशीं कुलीजा प्रांत परत देण्याविषयीं बोलणें लावलें. यासंबंधीं बरीच वाटाघाट होऊन १८८१ त तह झाला. या तहान्वयें कुलीजा प्रांताचा कांहीं भाग रशियाच्याच ताब्यांत राहून बाकी चिनीसरकारास परत मिळाला. या वेळेस खुद्द चिनी सरकारच्या ताब्यांतील प्रदेशाच्या विस्ताराची मर्यादा पुढें दिल्याप्रमाणें असून कोरिया, लूच्चू, अनाम, ब्रह्मदेश, नेपाळ वगैरे सरहद्दीवरील राज्यांची चीनच्या मांडलीक संस्थानांत गणना होत होती. उत्तरेस सैबेरियापर्यंत, दक्षिणेस अनाम व ब्रह्मदेशापर्यंत, पूर्वेस पॅसिफिक महासागरापर्यंत व पश्चिमेस काश्गर व यारकंद प्रांतापर्यंत. १८७६ त जपाननें कोरियाशीं व्यापारी तह करून त्या प्रांताचें स्वातंत्र्य कबूल केलें व याचेंच अनुकरण इतर राष्ट्रांनीं स्वीकारून कोरियाशीं याच अटीवर तह करण्यास सुरुवात केली. ही गोष्ट चिनी सरकारास पसंत न पडून त्यांनीं जपानी सरकारास ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला. १८८५ त या दोहोंमध्यें तह झाला. हा तह १८९४ पर्यंत टिकला. १८७७–७८ सालीं चिनी साम्राज्यांतील शानसी व शानटुंग या प्रांतांत मोठा दुष्काळ पडला. १८८१ त चिनी साम्राज्यांत तारायंत्र सुरू झालें. याच सुमारास चिनीसरकारनें बऱ्याचशा आरमारी सुधारणा अमलांत आणल्या. जपानी व चिनी सरकारांची कोरियाबद्दल वाटाघाट चालू असतां फ्रान्ससरकारनें अनाम संस्थानाशीं जपानकोरियासारखाच तह केला व यावरून चीन व फ्रान्स या देशांत युद्ध सुरू झालें. हें युद्ध १८८६ त बंद होऊन या दोन्ही देशांत तह झाला. या तहान्वयें चिनीसरकारनें आपली सरहद्द व्यापारास खुली केली व फ्रान्सनें चिनी सरकारची अनामवरील सत्ता कबूल केली. या युद्धानंतर चिनी साम्राज्याची इभ्रत बरीच वाढली. १८८६ त चिनी सरकारनें ग्रेटब्रिटनची ब्रह्मदेशावरील सत्ता कबूल केली. १८९४ त चीन व जपान यांच्यामध्यें कोरियाच्या बाबतींत पुनः युद्ध सुरू झालें. या युद्धांत चीन देशाचा पराभव होऊन चिनीसरकारनें जपानास ३०००००००० पौंड युद्धखर्च, लायओतंग द्वीपकल्प, फोर्मोसा बेट व कांहीं व्यापारी सवलती देण्याचें कबूल केलें; परंतु जपानची वाढती शक्ति रशियास हानिकारक वाटून त्या राष्ट्रानें फ्रान्स व जर्मनी या दोन यूरोपांतील राष्ट्रांच्या मदतीनें जपानीसरकारास फोर्मोसा बेटाखेरीज चीन देशाच्या इतर प्रदेशावरील आपले हक्क सोडण्यास भाग पाडलें. या कार्याबद्दल रशियानें चीनपासून मान्चूरिया प्रांत आपल्या आटोक्यांत ठेवण्याकरितां सैबेरिया रेल्वेला चीनमधून जाण्याला मोकळीक करून घेतली. फ्रान्सनें कांहीं रेल्वेच्या व खाणीच्या सवलती मिळवून मेकाँग नदीथडीवरील सरहद्द आपल्या मताप्रमाणें ठरविली. १८९५ त या सरहद्दीबद्दल चिनी, इंग्रज व फ्रेंच यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाला होता, परंतु तो फ्रेंच व इंग्रज लोकांनीं आपसांत मिटविला. जर्मनीस चिनीजपानी तहाबद्दल कांहीं मोबदला मिळाला नव्हता. तेव्हां त्याचा वचपा काढण्याकरितां दोन जर्मन धर्मप्रचारकांच्या खुनाच्या सबबीवर चिनी सरकारापासून त्यानें ९९ वर्षांच्या करारानें कियाचौ बंदराचा ताबा घेतला ( १८९८ ). याच सुमारास रशियानें पोर्ट आर्थर बंदराचा व ग्रेटब्रिटननें वेइहैवाइ बंदराचा जर्मनीप्रमाणेंच ताबा घेतला. चिनी-जपानी युद्ध झाल्यावर चिनीसरकारनें साम्राज्यांत परदेशीय भांडवलानें रेल्वे तयार करूं देण्याचें ठरविलें व या गोष्टीचा फायदा घेऊन रशिया वगैरे यूरोपांतील राष्ट्रांनीं आपल्याला सोयीस्कर व फायदेशीर असे आगगाडीचे रस्ते बांधले. याच सुमारास चिनी लोकांत साम्राज्यांतील वाईट राज्यपद्धति बदलून टाकण्याबद्दल जारीनें चळवळ सुरू झाली. या चळवळीचें दृश्य स्वरूप परभाषेंतील वाङ्मयविषयक व शास्त्रीय पुस्तकांच्या चिनी भाषांतरांचा लोकांत वाढता प्रसार होय. वर्तमानपत्रें नवीन कल्पना चोहोंकडे पसरवूं लागलीं व लवकरच १५०० तरुणांनीं पेकींगच्या परदेशीय विश्वविद्यालयांत प्रवेश केला. कांहीं प्रांतिक राजधानींच्या शहरी लोकांनीं वर्गणी जमवून

शाळा उघडल्या. चिनी बादशहानें आपल्या आईची सत्ता झुगारून देऊन स्वतः सर्व राज्यकारभार पहाण्याचें ठरविलें व या चळवळीच्या कांहीं पुढाऱ्यांस बोलावून प्रचलित राज्यव्यवस्था सुधारण्यासंबंधीं त्यांनां सल्ला विचारला. यानंतर पुष्कळ चांगल्या सुधारणा अमलांत आणण्याचीं जाहीरपत्रकें प्रसिद्ध केलीं. पण या सर्व गोष्टींस प्रतिकूल असा साम्राज्यांत एक पक्ष असून त्या पक्षाचें चालकत्व सत्ताहीन केलेल्या विधवा राणीनें ( बादशहाच्या आईनें ) स्वीकारलें होतें व या पक्षास सैन्याचा पाठिंबा होता. या पक्षानें उचल खाऊन बादशहास आपल्या अंकित केलें व त्यास विधवा राणीच्या देखरेखीखालीं वागण्यास भाग पाडलें. याप्रमाणें या चळवळीचा नाश होऊन कांहीं सुधारकाग्रणींस फांशीं जावें लागल. यानंतर १९०० सालीं चिनी साम्राज्यांत परदेशी लोकांविरुद्ध बॉक्सर नांवाची चळवळ झाली या चळवळीचें ध्येय “ परदेशीयांस हांकलून लावा व राजघराण्याचें रक्षण करा ” हें असून इला साम्राज्यसरकारची फूस होती. या चळवळीनें साम्राज्यांत बरीच अंदाधुंदी उत्पन्न होऊन चिनी सरकार व इतर राष्ट्रें यांच्यामध्यें लढाई झाली. पुढें चिनी सरकारचा पराभव होऊन इतर राष्ट्रांनीं ज्या अटी घातल्या त्या अटी कबूल करणें भाग पडलें ( १९०१ ). यानंतर चिनी लोकांत जागृति उत्पन्न होऊन त्यांनां पाश्चात्य संस्कृति व पाश्चात्य राज्यपद्धतीची अवश्यकता भासूं लागली. सुधारणावादी पक्षाचे लोक तर प्रचलित राज्यपद्धति समूळ बदलून टाकावी असें प्रतिपादन करूं लागले. परंतु चिनी सरकार येथपर्यंत मजल मारण्यास तयार नव्हतें. विधवा राणीची प्रवृत्ति अजूनहि सुधारणेला प्रतिकूल अशीच होती. तिनें फक्त, पाश्चात्य पद्धतीवर शिक्षण, जमीनसारावसुलींत फेरफार व सैन्याची पुनर्घटना, वगैरे किरकोळ सुधारणा अमलांत आणल्या. व मागच्या सारखा साम्राज्यावर प्रसंग गुदरूं नये म्हणून ती साम्राज्यांतील परदेशस्थ लोकांशीं विशेष सलगीनें वागूं लागली. पुढें साम्राज्यप्रजाजनांतलि व परकीय लोकांतील पूर्वीचा वैरभाव नष्ट होऊन ते एकमेकांशीं अधिक आदरानें वागूं लागले. परकीय अमलाखालीं न रहातां पाश्चात्य संस्कृतीनें आपण आत्मोन्नति करून घेऊं अशी चिनी लोकांची दृढ समजूत होती. १९०५ च्या दरम्यान समुद्रावरील जकातीची पुनर्घटना झाल्यामुळें चिनी सरकारचें उत्पन्न वाढलें व यानंतर चिनी सरकारानें कांहीं परदेशीय रेल्वे विकत घेतल्या.

१९०२ मध्यें रशियानें मांचूरिया प्रांत सोडून देण्याचें कबूल केलें होतें; पण रशिया आपलें वचन पाळील असा रंग दिसत नव्हता. मांचूरियांतील रशियन सत्ता जपानी सरकारास न खपल्यामुळें जपान व रशिया या दोन राष्ट्रांत युद्ध झालें व त्यांत रशियाचा पराभव होऊन दक्षिण मांचूरियांतील रशियास दिलेल्या सवलती जपानास मिळाल्या, व रशियाचा उत्तरेकडील रेल्वेच्या टापूंतील प्रदेशाचा ताबा कायम राहिला. या युद्धानें चिनी लोकांत बरीच खळबळ उडाली. परकीय दोन राष्ट्रांनीं साम्राज्यसत्तेस यःकश्चित् समजून साम्राज्यपटावर एकमेकांशीं युद्ध करून आपली तडजोड करून घ्यांवी याचा चिनी लोकांस खेद वाटला. त्यांची जागृति अधिक प्रज्वलित होऊन जपानचें अनुकरण केलें असतां आपणासहि यूरोपियन राष्ट्रांस तोंड देतां येईल अशी त्यांची खात्री झाली.

सा म्रा ज्यां ती ल ल ष्क री व इ त र सु धा र णा.— १९०५–७ च्या दरम्यान चिनी सरकारनें बऱ्याचशा लष्करी सुधारणा अमलांत आणल्या. राजघराण्यांतील व सरदार घराण्यांतील तरुणांनीं लष्करी शिक्षण घ्यावें असें जाहीर करण्यांत आलें. याप्रमाणें लष्करी पेशाचा दर्जा वाढविण्यांत येऊन सैन्यांतील लोकांचा पगार वाढविण्यांत आला. १९०७ सालीं एक राष्ट्रीय फौज तयार करण्यांत येऊन तिचें आधिपत्य मुख्य सरकारास जबाबदार अशा अधिकाऱ्यांवर सोंपविण्यांत आलें.

१९०५ सालीं साम्राज्याच्या राज्यपद्धतींत योग्य सुधारणा करण्याकरितां एक साम्राज्यमंडळ स्थापन करून त्यास परदेशांतील निरनिराळया राज्यपद्धतींचें परिशीलन करण्यासाठीं परदेशास पाठविलें. हें मंडळ परत आल्यावर १९०८ नंतर ९ वर्षांनीं चीन देशांत पार्लमेंट ( प्रतिनिधीसभागृह ) स्थापन करण्याचें जाहीर केलें. १९०६ सालीं चिनी सरकारनें अफू पिणें, उत्पन्न करणें किंवा ओढणें बंद करण्याबद्दल जाहीरपत्रकें काढलीं.

१९०२ सालीं चिनी सरकारनें पेकिंग येथें पाश्चात्य धर्तीवर एक विद्यापीठ स्थापन करून एक कलाभुवन उघडलें व शिक्षक व अधिकारी यांस शिक्षण देण्याकरितां एक नवें खातें निर्माण केलें. १९०६ सालीं प्रचलित परीक्षा घेण्याची पद्धत बंद केली. इतिहास, भूगोल, परकीय भाषा व उच्च दर्जाच्या शिक्षणांत अर्थशास्त्र व कायदा हे विषय शिकविण्यांत येऊं लागले.

१९०८ सालीं एंप्रेस डॉवेजर लंगयू मरण पावल्यामुळें चीनचा राज्यकारभार रीजंटच्या मार्फत चालू झाला. यावेळीं चीनची आर्थिक व सामाजिक स्थिति फारच खालावली होती. पाश्चात्य शिक्षणानें नवीन नवीन कल्पना उदयास येऊं पहात असल्यामुळें जुन्या व नव्यांमध्यें दुफळी माजली होती. चिनी सरकार तर कर्जबाजारी बनलें होतें. मांचू राजघराण्याच्या अंमलाखालीं नेहमीं दुष्काळ व महापूर यांनीं, लोकांनां पीडा होत असल्याकारणानें मांचु घराण्याची सत्ता अजीबात नष्ट करण्याची प्रबल इच्छा लोकांत जागृत झालेली होती. विशेषतः डॉ. सन्यत्सेन यांच्या अनेक हस्तकांनीं तर मांचु राजघराण्याच्या विरुद्ध जोरानें चळवळ चालू केली होती. व त्यांच्या प्रयत्नाला यशहि येत चाललें होतें. तशांतच हुकौत्र रेल्वेसाठीं परराष्ट्रांतून कर्ज काढण्याचें मांचुघराण्यानें

लोकांच्या इच्छेविरुद्ध ठरविल्यामुळें, तर काप लोकांनीं बंडें करण्यास सुरवात केली.

१९११ सालच्या आक्टोबर महिन्यांत हंको येथें लोकांनीं बंड करून वूचंग टांकसाळ व हन्यंग येथील दारूगोळा आपल्या ताब्यांत घेतला. हें पहातांच रीजेंटची गाळण उडून त्यानें कांहीं दिवसापूर्वी पदभ्रष्ट करण्यांत आलेल्या युआन शिकाई या चिनी व्हॉईसरॉयला, आपणांस मदत करण्यास बोलावलें व त्याला हुनान व हुयेन या प्रांतांचे व्हाईसराय नेमलें. युआन हा रीजंटच्या बाजूनें बंडखोर लोकांचा पाडाव करण्याच्या उद्योगास लागला. तरी मनांतून त्याला जितका उत्साह वाटावयास पाहिजे तितका वाटत नव्हता. त्यानें लौकरच बंडखोरांचा पराभव केला, पण जनतेमध्यें जो प्रक्षोभाची ज्वाला पसरलेली होती ती मात्र त्याला शमवितां आली नाहीं. कांहीं दिवसांनीं युआन हा चीनचा मुख्य प्रधान झाला.

चीनमधील १४ प्रांतांनीं राजशाहीविरुद्ध बंड पुकारलें होतें व राजशाहीच्या कांहीं कट्टया पुरस्कर्त्यांनींहि राजशाहीबद्दल तटस्थपणा स्वीकारण्यास सुरवात केली होती. राजशाहीचें केंद्र असा नानकिंग प्रांत हाहि लोकशाहीच्याकडे झुकूं लागला होता. अशी परिस्थिति पहातांच, युआननें सन्यत्सेन व त्याचे अनुयायी यांच्या बरोबर, बोलणें लावावयाचें ठरविलें. त्याप्रमाणें वाटाघाट सुरू होऊन ' राजशाही कीं लोकशाही ' या प्रश्नाचें उत्तर चीनच्या जनतेच्या प्रतिनिधींच्या मतावर सोपवावें असें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें सर्व प्रांतांच्या प्रतिनिधींची सभा भरून सन्यत्सेन याला चीनच्या प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. चीनच्या बादशहानें आपण सिंहासन सोडल्याचें जाहीर केलें.

डॉ. सन्यत्सेन हा चिनी प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष झाल्यावर युआन यास निरनिराळया प्रांतांमध्यें प्रांतिक स्वराज्य स्थापन करण्याच्या कामावर नेमण्यांत आलें. पुढें कांहीं दिवसांनीं डॉ. सन्यत्सेन यानें आपल्याऐवजीं युआन यासच तात्पुरता अध्यक्ष नेमलें व युआनहूंग यास उपाध्यक्षाची जागा देण्यांत आली. एप्रिल २ इ. स. १९१२ मध्यें, प्रजासत्ताक राज्याची राजधानी पेकिंग येथें करण्यांत आली. चीनमधील निरनिराळ्या प्रांतांचे प्रत्येकीं पांच प्रतिनिधी कांहीं इतर व औटर मंगोलिया व तिबेट यांमधील प्रत्येकीं पांच प्रतिनिधी व कोकोनरचा प्रतिनिधि अशा सर्व प्रतिनिधींचें मिळून एक मंडळ निवडण्यांत आलें.

युआन शिकाइ हा प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष झाला खरा. पण अध्यक्षाची कामगिरी पार पाडणें हें फार मुष्किलीचें काम होतें. तो स्वतः मनापासून राजशाहीचा पक्षपाती होता. त्यामुळें लोकशाही पक्षाचा तो मनांतून अत्यंत द्वेष करीत असे. चीनची आर्थिक स्थितीहि फार खालावली होती. सर्व जनतेंत बेदिली माजून राहिली होती. अशा स्थितींत आपल्या मुत्सद्देगिरीच्या जोरावर त्यानें कसाबसा राज्यकारभाराचा शकट चालू ठेवला होता. त्यानें निरनिराळया राष्ट्रांकडून कर्ज मिळविण्याची खटपट केली. त्याप्रमाणें १९१३ सालीं १ कोटी पौंडांचें कर्ज मिळालें. अशा रीतीनें पैसा हातीं येतांच त्यानें आपलें खरें स्वरूप प्रगट करण्यास सुरवात केली. चीनच्या पार्लमेंटमध्यें कु पिन टंग या जहाल पक्षाचे लोक फार होते. त्यांच्यांशीं त्यानें विरोध मांडण्यास सुरवात केली अर्थातच त्याचाहि प्रतिकार करण्यासाठीं निरानिराळ्या प्रांतांतून सुरवात झाली. कांहीं कांहीं ठिकाणीं छोटीं बंडेंहि झालीं. पण युआननें तीं सर्व मोडून टाकिलीं. अशा रीतीनें आपलें वर्चस्व स्थापन केल्यानंतर युआननें चीनच्या राज्याची संघटना करण्यास सुरवात केली. पाण्यासारखा पैसा खर्च करून व लष्करी सामर्थ्याचा देखावा मांडून त्यानें आपल्या बाजूचें लोकमत तयार केलें व निवडणुकीमध्यें यश संपादन केलें. अशा रीतीनें पुन्हां पांच वर्षे अध्यक्ष स्थानावर आरूढ होतांच त्यानें प्रथम पार्लमेंटमधील जहालपक्षाच्या प्रतिनिधींनां गुप्त कटांत सामील असल्याच्या आरोपावरून हांकलून लावलें. त्याचप्रमाणें प्रांतिक कायदेमंडळांतूनहि जहालपक्षाच्या प्रतिनिधींचेंहि उच्चाटन करविलें. चीनमधील सर्व सरकारी अधिकाऱ्यांची बैठक भरवून त्यांनां पुढील धोरणासंबंधीची त्यानें दिशा आंखून दिली. इतकी सर्व व्यवस्था झाल्यानंतर त्यानें पूर्वीप्रमाणें एकतंत्री अंमलाची पद्धत सुरू करण्याचा घाट घातला.

पण एवढयावरूनच त्याची महत्त्वाकांक्षा तृप्त झाली नाहीं. त्यानें स्वतःला बादशहा म्हणवून घेण्याची व आपलें घराणें राजघराणें बनविण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा धरली. या त्याच्या महत्त्वाकांक्षेला पुष्कळ दिशेनें विरोध होणार हें त्याला पूर्णपणें माहीत होतें तरी त्या विरोधाला तोंड देऊन आपले हेतू सफळ करण्याचा त्यानें संकल्प केला.

महायुद्ध सुरू होतांच चीनमध्यें राजशाही स्थापन व्हावी एतदर्थ जोराची चळवळ सुरू झाली. युआनच्या पक्षपात्यांनीं युआनला राजपद प्राप्त व्हावें यासाठीं खूप खटपट आरंभिली, पण युआननें राज्यपदावर आपला हक्क सांगितल्यास त्या गोष्टीला जपान कधींहि संमति देणार नाहीं असें जपानच्या परराष्ट्रमंत्र्यानें जाहीर केल्यामुळें या प्रश्नाला नवीनच स्वरूप प्राप्त झालें. खुद्द युआनच्या पक्षपात्यांपैकीं, लियंग चइचओ या प्रसिद्ध विद्वानानें, युआनला असली महत्त्वाकांक्षा न धरण्याबद्दल जाहीर सूचना केली; व आपलें हें मत जनतेमध्यें फैलावण्यास सुरवात केली. युआनहि कमी वस्ताद नव्हता. त्यानें हा प्रश्न प्रांतिक सरकार व त्यांमधील प्रतिनिधींच्या मतांवर सोंपविण्याचा बहाणा केला व त्याला सनदशीरपणाचें स्वरूप आणलें. प्रांतिक मंडळांतील प्रतिनिधी याच्याच बाजूचे होते व त्यांनींहि एकमतानें युआनच्या म्हणण्याला दुजोरा दिला. युआननें जपानची व लोकमताची पर्वा न करतां आपण तख्तनशीन

होण्याचें ठरविलें, व १९१६ च्या २ फेब्रुवारीला आपला राज्याभिषेकाचा दिवस जाहीर केला.

पण युआनाच्या या सुलतानशाहीला प्रत्युत्तर म्हणूनच कीं काय यूनप्रांतानें त्साइ एप्रोच्या नेतृत्वाखालीं बंडाचें निशाण उभारलें. थोडक्याच दिवसांनीं कुअंगशी व क्यूइचौ या प्रांतांनीं तोच मार्ग चोखाळला युआनच्या अनुयायांनीं युआनला आपला बेत लांबणीवर टाकण्याचा व तसें जाहीर करण्याचा उपदेश केला पण त्यानें ही गोष्ट साफ नाकारली त्यामुळें त्याच्या पक्षपात्यांतच फाटाफूट झाली. युआनविरुद्ध जिकडेतिकडे असंतोष माजला. चीनमध्यें यादवी माजण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. पण सर्वांच्या सुदैवानें युआन हा अशा आणीबाणीच्या वेळीं मरण पावला व त्याच्या जागीं युआन हुंग हा चीनचा अध्यक्ष झाला.

पण युआनच्या अंगांत जे अलौकिक गुण होते त्याचा युआन हुंगच्या अंगीं बऱ्याच अंशीं अभाव होता. त्यामुळें याच्या अमदानींत चीनमध्यें अधिकच बंडाळी माजली. चीनमध्यें कुमिन्टं हा पक्ष व लष्करीपक्ष होते. हे पक्ष राजकीय तत्त्वांवर एकमेकांशीं भांडण्यापेक्षां व्यक्तिद्वेषच माजवीत होते. या वेळीं चीनची सत्ता, लष्करीपक्षाच्या ताब्यांत होती ली युआन हुंग यांनें या पक्षाच्या सर्व प्रतिनिधींची बैठक भरवून सर्व चीनावर आपल्या पक्षाचा अंमल असल्याचें जाहीर करण्यास सांगितलें. या लष्करी पक्षाचा प्रमुख टूमन चि गुइ हा चीनचा प्रधान होता. त्यानें दक्षिण चीनमधील कांहीं प्रतिनिधी व चीनमधील कांहीं प्रतिनिधी यांचें एक छोटेंसें मंत्रिमंडळ तयार केलें. पार्लमेंटमध्यें कुमिंटंग पक्षाचें प्राबल्य होतें, त्यानें १९११ पूर्वी नानकिंग येथें ठरलेली प्रजासत्ताक पद्धति अमलांत आणण्याविषयींचें आपलें मत जाहीर केलें पण लियुअन हुंगनें त्याची पर्वाच बाळगली नाहीं. त्यामुळें पुन्हां चीनमध्यें पूर्ववत अंदाधुंदीचें साम्राज्य सुरू झालें,

याचवेळीं महायुद्धांत चीननें दोस्तांच्या वतीनें भाग घ्यावा किंवा नाहीं या प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालें. टुआनाचिजुइ व त्याचें मंत्रिमंडळ दोस्तांच्या वतीनें महायुद्धांत चीननें भाग घ्यावा या मताचे होतें पण पुष्कळसे अधिकारी चीननें तटस्थ रहावें या पक्षाचे होते. अशारीतीनें चीनमध्यें या प्रश्नावर द्विधामत झालें होतें व त्यांतच पक्षद्वेषाचीहि भर पडली. ज्यावेळीं हा प्रश्न पार्लमेंटपुढें आला त्यावेळीं, प्रथम प्रधान व अध्यक्ष यांच्यामध्येंच भिन्नमत झालें.टुआननें राजीनामा देण्याची धमकी घातल्यामुळें अध्यक्षानें प्रधानाच्या म्हणण्याला दुजोरा धावयाचें कबूल केलें. टुआननें दोस्तांच्या वतीनें भाग घेण्याचें बहुमतानें ठरविलें व त्यानें जर्मनी विरुद्ध चीननें लढाई पुकारल्याचें जाहीर केलें. पण थोडक्याच दिवसांत, पक्षभेदाचें झाकलेलें स्वरूप पुन्हां उघडकीस येऊं लागलें. अध्यक्ष युआन हुंग याच्या पक्षामध्यें पुष्कळच लोक, कुमिंटंग पक्षाचे होते. त्यांनां टुआन व त्याच्या लष्करी पक्षाचें वर्चस्व असह्य होऊं लागलें होतें.त्यांनीं टुआनचा पक्ष कमजोर करण्याचें ठरविलें. टुआननें जपानशीं आंतून संधान बांधलें आहे अशी बातमी या लोकांनां लागली होती. या गोष्टीचा फायदा घेऊन त्यांनीं टुआनच्या पक्षाविरुद्ध चळवळ करण्यास सुरवात केली होती. चीननें दोस्तांच्या वतीनें प्रत्यक्ष युद्धांत भाग घेणें, जर्मनांचें मुखासुखी वैर पत्करणें बरें नाहीं असें मत त्यांनीं प्रतिपादन करण्यास सुरवात केली. पार्लमेंटच्या सभेंत दोस्तांनां यापुढें चीननें प्रत्यक्ष मदत करूं नये असें ठरविण्यांत आलें. पण टुआननें, तसें करण्याचें नाकारलें तेव्हां अध्यक्षानें त्याला मुख्य प्रधानाच्या जागेवरून बडतर्फ केलें. टुआननें आपल्या लष्करी पक्षाच्या साहाय्यानें, कुमिंटंगच्या पक्षाचा पाडाव करण्याचा निश्चय केला व उलटपक्षीं कुमिंटगपक्षानेंहि दक्षिण चीनमध्यें आपलें सैन्य जमवून, पार्लमेंट व लोकांच्या हक्कांचें संरक्षण करण्यासाठीं तयारी चालविली.

टुआननें आपल्या पक्षाच्या साहाय्यानें टींटसिन येथें एक तात्पुरतें सरकार स्थापन केलें व त्या सरकाराचा अध्यक्ष सूशी चंग यास नेमलें. आपल्या सैन्याच्या जोरावर त्यानें पेकिंग येथें येऊन ली युआन हुंग यास आपल्या मागण्याला रुकार देण्याबद्दल धमकीवजा निरोप पाठविला. अध्यक्षानें या अडचणींतून आपला बचाव करण्याकरितां जनरल चंग यास बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें तो आपल्या सैन्यासह राजधानींत आला पण टुआनच्या म्हणण्याला शेवटीं ली हनचंगला रुकार द्यावा लागला.

चीनमध्यें अशा प्रकारें बंडाळी माजलेली पहातांच अमेरिकेनें चीनला आपली अंतःस्थ स्थिति सुधारण्याविषयीं व तत्पूर्वी जर्मनीविरुद्ध लढाई न पुकारण्याची सल्ला दिली. याचा अर्थ अमेरिका ही टुआनच्या धोरणाला प्रतिकूल आहे असा कुमिंटंगच्या पक्षपात्यांनीं केला. त्यामुळें तर कुमिंटंगच्या पक्षाला बळ चढलें. शिवाय टुआनचें जपानशीं सूत असल्याची बातमी सगळीकडे पसरल्यापासून तर जपानपासून चीनचें रक्षण करण्याचा या कुमिंटंग पक्षानें निर्धार केला.

इकडे जनरल चंग यानें या अवधींत तिसराच डाव आरंभला होता. त्यानें आपल्या हातीं साम्राज्याची सत्ता आणून मांचू घराण्यांतील बाळराजास पुन्हां तख्तावर बसवून राजशाही स्थापन करण्याचा घाट घातला होता. हें पहातांच टुआननें त्याच्यावर स्वारी करून त्याला शरण येण्यास भाग पाडलें; व अशा रीतीनें पुन्हां प्रधानकीचीं वस्त्र धारण केलीं. टुआन हा आतां जवळ जवळ 'सुलतान' झाला. तेव्हां त्याच्याशीं अध्यक्ष लीयुआनहुंगचें पटेनासें होऊन त्यानें राजीनामा दिला व त्याच्या जागीं फैंगकूचंग हा अध्यक्ष झाला. यानंतर टुआननें दोस्तांच्या वतीनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याचें पुन्हां जाहीर केलें.

दोस्तराष्ट्रें व चीन सरकार यांच्यामध्यें गुप्त तह होऊन 'बाक्सर युद्धाची खंडणी' कमी करण्याचें व समुद्रावरील

व्यापारावर चीनला जकात वाढवूं देण्याचें कबूल केलें. शिवाय चीनला १ कोटी येन कर्जहि देण्याचें ठरविण्यांत आलें.

चीनची आर्थिक परिस्थिति अगदीं खालावत चालली होती. अशा वेळीं ही आयत्यावेळीं पैशाची मदत मिळाल्यामुळें टुआन ह्यां चीनची आर्थिक व राजकीय परिस्थिति सुधारण्याच्या उद्योगास लागला. याचवेळीं त्यानें जर आपल्या विश्वासांत कूमिंटगच्या पक्षाच्या प्रतिनिधींनां घेतलें असतें तर चीनमध्यें पुन्हां शांतता प्रस्थापित होण्याचा बराचसा संभव होता. पण ती मुत्सद्देगिरी त्यानें न दाखविल्यामुळें दक्षिणचीन उत्तरचीन विभागणीबद्दल चळवळ सुरू झाली. अध्यक्ष फेंगचेंग हा नमतें घेण्याला तयार होता पण टुआन हा त्याला तयार नव्हता. अर्थात् अध्यक्ष व टुआन यांचें पटेनासें झाल्यामुळें टुआननें प्रधानकीचा राजीनामा दिला. पण लष्करी पक्षाच्या आग्रहावरून त्यानें तो राजीनामा परत घेतला.

लवकरच अध्यक्षाच्या निवडणुकीला सुरवात झाली, व जनरल सूची चंग हा अध्यक्ष म्हणून निवडून आला. त्यानें दोस्तराष्ट्रांच्या सहाय्यानें उत्तरचीन व दक्षिणचीनमध्यें एकी घडवून आणून संयुक्त पार्लमेंट बनवण्याची खटपट केली; पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. शांघाई येथें जी शांतता-परिषद भरली होती तींत जपानशीं जो गुप्त तह केला होता, व ज्याच्यामुळें जपानला चीनच्या राजकारणांत आपलें वर्चस्व गाजविण्याला संधी मिळण्याचा संभव होता तो तह टुआननें मोडून टाकावा अशी दक्षिण चीनच्या प्रतिनिधींनें व चीनमधील तरुणपक्षानें मागणी केली. ती नाकारण्यांत आल्यामुळें ठिकठिकाणीं प्रचंड निषेधप्रदर्शक सभा भरविण्यांत आल्या. विद्यार्थ्यांनीं संप केले. याचा फार परिणाम होऊन टुआन याला आपल्या प्रधानकीचा राजीनामा द्यावा लागला. चिंचंग याचा पक्ष बळावला व चीनमध्यें शांतता होईल असें वाटूं लागलें. पण सूचि चंग हाहि जपानच्या बाजूचा आहे असें थोडक्याच दिवसांत आढळून येऊं लागलें. उत्तरचीनमधील लष्करी पक्षानेंहि पुन्हां आपलें सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला; व अध्यक्षानें जनरल चंग यास अधिकाराची जागा देऊं केल्यानें पुन्हां राजशाही स्थापन होणार असेंहि भाकीत कित्येकांकडून करण्यांत येऊं लागलें.

या अंदाधुंदीच्या काळांत चीनमध्यें बेबंदशाहीच माजली होती. लोकांचे हाल फार होऊं लागले होते. चीनची आर्थिक परिस्थिति फारच बिघडली होती. ही हलाखीची स्थिति नाहींशी करण्याकरितां अमेरिका, ग्रेटब्रिटन, फ्रान्स व जपान यांनीं एकत्र जमून चीनला आर्थिक मदत करावयाचें ठरवलें. चीननें आपलें लष्कर मोडून टाकावें अशी अट मात्र या राष्ट्रांनीं घातली होती. पण ही अट पाळली जाईल असा रंग दिसेना, उलट कांहीं कांहीं भागांत चीनमधील सरदारांनीं आपापलीं सैन्यें वाढविण्याचाच उद्योग आरंभला.

गेल्या तीन चार वर्षांत चीनमध्यें मध्यवर्ती सरकार मुळींच राहिलें नाहीं असें दिसतें. देशांत पैसा विपुल आहे, परंतु सरकारचें मात्र दिवाळें निघालें आहे. लुटारूपणा करणारे व कर्जेदलाली करणारे लष्करी गव्हर्नर, लोकांवर सत्ता-गाजवूं लागले. बेकायदेशीर वर्तन करणाऱ्यांपासून जनतेचें व परकीय नागरिकांचें रक्षण करण्यास सरकारजवळ सामर्थ्य उरलें नाहीं. वरील पुंड लोक हे सरकारांतून पगार न मिळाल्यामुळें बेफाम झालेले सैन्यांतील शिपाईच होत.

१९२१ मेमध्यें काटकसर करण्याची चळवळ सुरू झाली. लिशिहवेह या गृहस्थाची फडनीस म्हणून नेमणूक करण्यांत आली. याचा परिणाम चीनमध्यें जपानी सत्तेचा पुनः प्रवेश होण्यांत झाला. जूनमध्यें इचंग नामक व्यापारी ठिकाणावर व यांगत्सिक्यांग या नदीतीरांवरलि वूवंग या ठिकाणीं, दंगे होऊन कत्तलहि झाली. याला मुख्य कारण म्हणजे उभारलेल्या कर्जाचें व्याज देण्याची सरकारला ऐपत राहिली नाहीं हें होय. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या बरीच प्रगति झालेली असूनहि सरकारचें दिवाळें निघालें. त्याचें मुख्य कारण असें कीं, निरनिराळया प्रांतांच्या लष्करी गव्हर्नरांमध्यें तंटे होऊं लागले. चीनच्या परदेशाशीं होणाऱ्या व्यापारांत हे गव्हर्नर ढवळाढवळ करीत असत. सप्टेंबरांत जनरल वूपेहफूनें, ३०००० झेचूअॅनीज लोकांचा मोड केला. हे लोक बाह्यतः स्वातंत्र्यार्थ, परंतु वस्तुतः लुटीकरतांच लढत होते. येंगटीझे येथील दर्यावर्दी खात्यांत विस्कळितपणा उत्पन्न झाला व डिसेंबरांत सरकारनें दिवाळें काढलें. डॉ. वूयेन हा परराष्ट्रमंत्री मुख्य प्रधान झाला व त्याच्या नंतर लिअंग शिह्यी हा मंत्रीपदावर आरूढ झाला. ' दि बँक इंडस्ट्रियेले डी चायने' नामक बँकेचें दिवाळें निघालें व फ्रान्समध्यें त्यामुळें खळबळ उडाली.

१९२२ त चीनमधील विविध पक्ष व त्यांची स्थितिः— पेकिंग सरकारचा ताबा मिळावा म्हणून दोन बलाढ्य प्रांतिक गव्हर्नरांमध्यें जी झटापट चालली होती त्यासच अन्तस्थ युद्ध असें म्हणतात. परराष्ट्रांनीं पेकिंग सरकारला मान्यता दिलेली नसून पेकिंग सरकारनेंच लीग ऑफ नेशन्सच्या कौन्सिलांत आपले प्रतिनिधी पाठविले होते. परंतु पेकिंग सरकार सत्ताहीन व द्रव्यहीन झालें होतें. कँटन अथवा दक्षिणेकडील सरकारचा राज्यकारभार सन्यत्सेन पहात होता. चीनच्या १८ प्रांतांपैकीं फक्त दोहोंवर दक्षिण सरकारचा अम्मल चालू होता, व चेन चिअंग मिंगच्या नियंत्रणाखालीं मोठें सैन्यहि होतें. वू पेइफू व चँग टिसो लिन हे प्रतिस्पर्धी पुढारी मुकडेन येथें होतें. ते १९२२च्या एप्रिल मध्यें पेकिंगवर चाल करून गेले. निकराचें युद्ध झाल्यावर वू पेइफूनें चंग टिसोलिनचा पराभव केला. चंग टिसोलिन हा पळून गेला. २० लक्ष डॉलर चिहली लोकांबद्दल व ८

लक्ष डॉलर सामान्य लोकांच्या बद्दल नुकसानभरपाई म्हणून घ्यावे असा वू पेइफूनें त्यांस हुकूम केला. वू पेइफू हा स्वदेशांतील कांहीं भाग जपानला विकावा या सूचनेच्या विरुद्ध होता. कारण कर्जामुळें उत्तरेकडील पेकिंग सरकार जपानच्या हुकमतीखालीं होतें व 'अॅन फ्यू क्लब' च्या चळवळीमुळें जपानचें तेथें चांगलें बस्तान बसलें होतें. ऑगस्ट १९२२ मध्यें, चन हिअंगमिंग यानें दक्षिणचीनातील सन्यत्सेनची सत्ता संपुष्टांत आणली व तेथें तोच मालक झाला. १९२२ नोव्हेंबरच्या सुमारास पार्लमेंटमध्येंहि सुमारें वीस तट पडले.

१९२३ च्या जानेवारींत चॅन चिअंगमिंग हा पळून गेल्यामुळें सन् यत् सेन हा कॅन्टन येथें पुनः अधिकारारूढ झाला. टिसाओ कुन, वू पेइफू, चि सच मुअन, व लू अंग - शिअंग अशा उत्तरेकडील चार पुढाऱ्यांचा दक्षिणेकडील पुढाऱ्यांशीं समेट व्हावा म्हणून फेब्रुवारींत प्रयत्न करण्यांत आला. १९२३ सालीं अनेक दरवडे, मारामाऱ्या व दंगे झाले. पगार थकल्यामुळें संतापलेले लोकच दंगे करीत असत व याच लोकांनीं सरकारला आपलें सैन्य परत बोलवा असा एक निर्वाणीचा संदेश पाठविला. या लष्करी लोकांनां उघडपणें राज्यसूत्रें हातीं घेतां येईनात; तथापि त्यांनीं प्रधानमंडळावर दाब ठेविला होता. लष्करी पुंडांच्या दहशतीमुळें १९२३ जूनमध्यें लि युआनहंग नांवाच्या अध्यक्षानें व त्याच्या प्रधानमंडळानें राजीनामा दिला. अक्टोबरांत टिसाओकुन हा नवीन अध्यक्ष निवडून आला व ह्या कामीं बरेच लाचलुचपतीचे प्रकार घडून आले. सर्व प्रांतांत १९२३ सालभर अंतस्थ युद्धें चालूच होतीं. डिसेंबरांत, सन् यत् सेन यानें कॅन्टन येथील जकातीचें ऑफीस ताब्यांत घेऊन सर्व सारा व जकात ताब्यांत घेण्याचा धाक घातला. सोव्हिएट सरकार व मजूरपक्ष यांचें सहाय्य होईल अशी त्यास अपेक्षा होती. पेकिंगला जकात देऊं नये अशी हानें अमेरिकेस विनवणी केली. बिनहरकतीनें परदेशचें लष्करी सामान चीनमध्यें जाऊं लागलें. फ्रान्सहून बॉबगोळे नेणारीं १२ विमानें मुकडेन येथें उतरलीं व अशा रीतीनें अंतस्थ युद्धाची व्याप्ति वाढत चालली.

१९२४ सालभर युद्धें चालूच होतीं. कइंगसू व चेकिअंग अशा दोन प्रांतांच्या गव्हर्नरांमधील तंटे विकोपाला गेले. पेकिंग येथें १९२४ अक्टोबरांत, राष्ट्रिय सैन्यानें बंड केलें व आगगाड्या, तारायंत्र व टेलिफोन वगैरे उध्वस्त केले. शेवटीं साधारण शांतता झाल्यावर हु अंग फू नामक नवीन अध्यक्षाची निवडणूक झाली. तथापि नोव्हेंबरमध्यें, वू पेइ फू हा दक्षिणेंत सैन्याची जमवाजमव करून दहशत उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत होता असें दिसतें. सन्यत्सेन सु हा १९२५ त मरण पावला.

**चिनी मजूर.**—पुढें दिलेल्या दक्षिण आफ्रिकेंतील चिनी मजुरांच्या स्थितिवरून व अमेरिकेंतील चिनी लोकांच्या स्थितिवरून चिनी मजुरांची परदेशांत कोणत्या प्रकारची स्थिति असते याची कल्पना येईल.

इ. स. १९०४ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या ८ तारखेस ट्रान्सव्हाल कायदेकौन्सिलांत आफ्रिका खंडाच्या बाहेरील मंडळींनां मजुरी करण्याकरितां देशांत येऊं देण्याविषयीं एक नियम पास झाला. त्याचीं कलमें येणें प्रमाणें:—

९ व्या कलमाप्रमाणें प्रत्येक चिनी मजूर आपल्याला पाठविणाऱ्या मालकाला अथवा ज्याला तो आपले सर्व हक्क देईल अशा मालकाला बांधला जाईल.

१४ व्या कलमाप्रमाणें कोणत्याहि चिनी मनुष्याला व्यापार करण्याची, आज्ञापत्र घेण्याची, जमीन करारानें भाड्यानें घेण्याची अगर कोणताहि व्यवहारिक हक्क मिळविण्याची सक्त मनाई होती.

१८ व १९ कलमाप्रमाणें मजुरानें आपल्या धन्याची जागा सोडूं नये व तसें करणें झाल्यास योग्य मनुष्याची अथवा ज्याला त्याच्या मालकानें तसा अधिकार दिला असेल त्याची परवानगी घेतल्याशिवाय बाहेर जाऊं नये.

२० व्यांतील कलम (२) प्रमाणें मजुरानें धन्याच्या आवाराबाहेर सांपडल्यास कोणत्याहि पोलीसला त्याला एकदम पकडण्याची पूर्ण मोकळीक असावी.

३१ कलमा (१०) प्रमाणें आपल्या धन्याची नोकरी सोडून गेलेल्या मजुराला दुसऱ्या मजुरानें घरांत घेतलें अगर लपवून ठेवलें अथवा वरील नियमभंग केला किंवा असें काम करणाऱ्यास दुसऱ्यास प्रवृत्त केलें तर त्या मजुराला ५० पौंड दंड केला जाईल; व तो न दिल्यास तीन महिन्यांची कैद दिली जाईल.

हा कायदा लागू होण्यास राजसंमतीची गरज होती; व ती पार्लमेंटमध्यें दोन दिवस सारखी ववातिनभर्भात होऊन शेवटीं मार्चच्या ११ तारखेला मिळाली, आणि मे महिन्याच्या १२ तारखेस कोणत्याहि चिनी मनुष्याला इंग्रज सरकारला हक्कानें मजुरी करण्याकरितां कोणत्याहि इंग्रजांच्या ताब्यांतील मुलुखांत नेण्याची परवानगी मिळाली. ह्या नियमानुसार चिनी लोकांची पहिली तुकडी हांगकांगहून १९०४ च्या मे महिन्याच्या २५ तारखेस निघाली. मजुरी रोज १ शिलिंग ठरली होती व अडीच वर्षांच्या अवधींत रँड माइन्समध्यें काम करण्यास अर्ध्या लाखाहून अधिक चिनी लोक पाठविण्यांत आले. परंतु लवकरच असें दिसून आलें कीं त्यांनां अति क्रूरपणानें वागविण्यांत येतें. त्यांनां परत आपल्या देशीं पाठविणें हेंहि द्रव्यदृष्ट्या कठीणच झालें. त्यांनां येथें राहूं देणेंहि अधिक खर्चाचें दिसूं लागलें. खाणींच्या मालकांनां चिनीलोकांकडून काम करून घेण्यांत अतोनात फायदा होत असे; कारण त्यांची मजुरी कोणत्याहि गोऱ्या मनुष्यापेक्षां निमपटीनें तरी कमी असे. पुष्कळसे चिनी लोक काम करूं लागल्यामुळें दक्षिण आफ्रिकेंतील मजुरांकरितां नेमलेल्या मंडळास अतिशय फायदा होऊन मुसुलमान लोकांनां

गोळा करून नेण्याची खटपट त्यांच्या कपाळाची एकदाची सुटली. ट्रान्सवालमधील चिनी मजुरांनां निष्ठुरतेनें वागविल्याबद्दल इंग्लंडांतील उदारमतवादी आणि रूढमार्गवादी ह्या उभय पक्षांचा राग खवळला. चाबकानें मारणें व अन्य तऱ्हेनें निर्दयपणानें चिनी मजुरदारांशीं वर्तणूक केल्यामुळें पुष्कळ चिनी लोक पळून गेले व जे राहिले ते लोकांनां भीतिदायक वाटूं लागले. ह्या सर्वांचा शेवट येथें एक राष्ट्रीय संघ स्थापण्यांत झाला. हा संघ (प्रागतिक मंडळाचे) कसेंहि काम पुढें ढकलणाऱ्या मंडळींविरुद्ध होता. चिनी मजूरदारांनां पुढें केव्हांहि आफ्रिकेस आणूं नये व तेथें असलेल्यांनांहि खाणीच्या मालकांच्या खर्चानें परत चीनला पाठवून द्यावें असें तेथील नवीन संघाच्या फेसवेल नांवाच्या एका पुढाऱ्यानें फार स्पष्टरीतीनें जाहीर केलें.

युनायटेड स्टेट्समधील चिनी लोक.—परराष्ट्रांतील लोकांनीं आपल्या देशांत रहाणें म्हणजे देशांतराधिवास करणें हें सामाजिक दृष्ट्या युनायटेड स्टेटस्‌मधील लोकांनां जितकें महत्त्वाचें दिसतें तितकें जगांतील दुसऱ्या कोणत्याहि लोकांनां दिसत नाहीं. देशांतराधिवासाचें मुख्य दोन प्रकार देतां येतात. एक इष्ट व दुसरा अनिष्ट. ह्या दुसऱ्या प्रकारांत नैत्तिक दृष्ट्या, मानसिक दृष्ट्या व शारीरिक दृष्ट्या नागरिक रहाण्यास अयोग्य अशी मंडळी मोडतात. या दोन प्रकारांमधील रेषा बरोबर रेखाटणें आतिशय कठिण आहे म्हणूनच चिनी लोकांनां युनायटेड स्टेट्‌स्‌मधून काढावें कीं नाहीं हा प्रश्न अद्याप सुटत नाहीं.

चिनी लोकांनां आपला देश सोडून जाणें केव्हांहि बरें वाटत नाहीं. परंतु १८५४ सालापासून युनायटेड स्टेट्‌समध्यें त्यांची संख्या फारच जोरानें वाढूं लागली व पुढें तर हजारों चिनी दरवर्षी तिकडे लोटूं लागले. त्यांची गर्दी कॅलिफोर्निआ प्रांतांत इतकी झाली कीं, तेथील लोकांनीं चिनी लोकांनां देशांत येऊं देऊं नये इतकेंच नव्हे तर जे आलेले आहेत त्यांनां हांकून द्यावें असा कायदा पास करण्याकरितां सरकारास विनंति केली. व असा कायदा १८९४ सालीं पासहि केला. त्यामुळें बहुतेक सर्व लोकांनां तो देश सोडून जावें लागलें. कॅलिफोर्निआंतून चिनी लोक निघून गेल्यामुळें त्या प्रांताचें बरेंच नुकसान झालें. कारण तेथील गोऱ्या लोकांपेक्षां चिनी लोक कोणत्याहि कामाकरितां मजुरी कमी घेऊन जास्त वेळ काम करीत असत. अर्थात् थोड्या पैशांत अधिक काम करणारी मंडळी निघून गेल्यामुळें कारखानदारांचें नुकसान होऊं लागलें; व चिनी लोकांनां सरकारनें कायद्यानें हांकून देऊं नये म्हणून पुनः सरकारकडे अर्ज जाऊं लागले. जे गोरे लोक चिनी लोकांमुळें उपाशीं मरूं लागले होते त्यांनीं यांनां हांकून देण्याविषयीं उलट अर्ज केले. मोलमजुरीचें काम रेल्वेचे रस्ते बांधण्याचें काम, शेतकी, वीणकाम, जोडे तयार करण्याचें काम व फेरसुण्या बांधण्यासारखींहि कामें चिनी लोक निम्म्या दरानें करीत असत. थोडक्या पैशांत उदरनिर्वाह करून राहिलेली पुंजी दारू पिण्यांत, भटकण्यांत व अशीं दुसरीं भलती कामें करण्यांत उडवीत असत. तऱ्हेतऱ्हेचे गुन्हे करण्याकरितां चिनी लोकांनीं गुप्तमंडळें स्थापिलीं होतीं व लुटालूट, चोऱ्या, जुगार व वेश्यावृत्ति हे त्यांचे धंदे असत व हीं कामें करण्यास जे प्रवृत्त होत नसत त्यांचा खून करण्याकरितां ते कुऱ्हाडी बाळगणारीं माणसें कामीं लावीत. हा जुलूम ते बहुधा आपल्याच लोकांवर करीत.

थोड्या पैशांत काम करणें हें इष्ट आहे असें चिनी लोकांनां देशांत राहूं देणाऱ्या मंडळींचें मत पडलें. कारण त्यांचें म्हणणें असें कीं थोड्या पैशांत काम केल्यानें मनुष्यामध्यें असलेली अन्तर्लीन बुद्धिमत्ता अथवा कार्यशक्ति हिला अनायसे उद्दीपन मिळतें; व नैसर्गिक द्रव्यसाधनांचा फायदा सहज घेतां येतो. उलट पक्षाचें असें म्हणणें पडलें कीं, थोड्या पैशांत काम करणें हें माल स्वस्त दरानें विकण्यासारखेंच आहे; व त्यामुळें द्रव्यसंचय न होतां उलट द्रव्यविभागणी मात्र होते. असें झाल्यास पेढ्या व सावकारकीच्या धंद्याला मोठाच व्यत्यय येतो. १९०४ सालच्या एप्रिल महिन्याच्या २३ तारखेचा 'आउटलुक' पत्रांतील उतारा घेण्यासारखा आहे. तें पत्र असें म्हणतें कीं चिनी मजुरदारलोकांसारखी काटकसर, कार्यदक्षता, उद्योगीपणा व राजनिष्ठा क्वचित्च आढळते. कॅलिफोर्नियांतील शेतकी व बागाईत हे केवळ त्यांच्या श्रमाचें फल होय. जर कायद्यानें त्यांनां नागरिकत्वाचा हक्क मिळूं शकत नाहीं तर स्वजातिसंघ करून रहाणें त्यांनां भाग पडतें. यांत त्यांचा दोष नाहीं.

कायदेकानू.—१८६८ सालच्या बर्लिंगेम येथें झालेल्या तहाप्रमाणें कोणत्याहि चिनी मनुष्याला देशांत येण्याची अगर देश सोडून जाण्याची पूर्ण परवानगी मिळाली आहे. देशांतराधिवासी होण्याची तेव्हां सक्त मनाई नव्हती. १८८२ त पास केलेल्या कायद्यानें चिनी लोकांनीं १० वर्षें युनायटेड स्टेटस्‌मध्यें येऊं नये असें जाहीर केलें. परंतु तेथें आधीं गेलेल्यांनां घालविण्यांत आलें नाहीं. उलट ज्यांची चीनला जाऊन परत येण्याची इच्छा होती त्यांनां परवाना देत असत. शेवटीं ह्या गोष्टीचा चांगलाच उहापोह होऊन १८९४ च्या डिसेंबर महिन्याच्या ८ तारखेला पुढील कायदा पास करण्यांत आला. त्याचीं कलमें येणें प्रमाणें:—( १ ) दहा वर्षेंपर्यंत चिनी मजूरदारांनीं युनायटेड स्टेट्‌समध्यें पाऊल टाकूं नये. ( २ ) चिनी मजुरदारांनां बायका मुलें व कमींत कमी ३००० रुपयांची मालमत्ता अथवा तितकें कर्ज असल्यास येऊं देण्याची परवानगी असावी. ( ३ ) अंमलदार, शिक्षक, विद्यार्थी, व्यापारी, प्रवासी व देश पाहण्याचे लालसीनें आलेली मंडळी यांनां मज्जाव नसावा. ( ४ ) युनायटेड स्टेट्‌स्‌मध्यें रहाणाऱ्या सर्व चिनी रहिवाशांनां "परमकृपापात्र नागरिक"

अशी संज्ञा देऊन त्यांचें पूर्णपणें रक्षण करावें व त्यांनां नागरिकाचे सर्व हक्क द्यावे असें ठरविण्यांत आलें. परंतु नंतर एक सभा भरून तींत १९०२ सालच्या एप्रिल महिन्याच्या २९ व्या तारखेस पास झालेले सर्व कायदे अधिक जोरानें अमलांत आणले गेले.

पनामा.—पनामाची खाडी (कॅनाल) खोदतांना चिनी मजुरांनां कामाला लावावें किंवा नाहीं याविषयीं युनायटेड स्टेट्सच्या अधिकारीमंडळाला बरीच वाटाघाट करावी लागली. तत्संबंधीं प्रेसिडेंट रूझवेल्टचें म्हणणें असें पडलें कीं, वर्णभेद न ठेवतां शक्य तितक्या लवकर व उत्तम रीतीनें जेणेंकरून पनामा कॅनाल खोदतां येईल अशी योजना करणें इष्ट आहे. चिनी मजुरदारांशीं निष्ठुरतेनें न वागतां नागरिकांचाहि पोटमारा न होऊं देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.अशानें खरे कार्योपयुक्त मजुर कोणते आहेत हें कळून सर्वस्वी हें खोदकाम परराष्ट्रीयांच्या हातांत दिलें जाणार नाहीं. यावर फोरम नांवाचें पत्र चिनी लोकांनां त्यांचा धर्म, कर्मठपणा, चालीरीति, ध्येयें व यांसारख्या दुसऱ्या गोष्टीबद्दल मज्जाव करावा असें म्हणतें. परंतु डॉ. रॉबर्ट ह्चेसनचें म्हणणें असें पडतें कीं चिनी लोकांनां मज्जाव केव्हांहि करूं नये. निदान काटकसरीपणा हा त्यांचा गुण गर्हणीय नसून अनुकरणीय आहे.

चि नी भा षा—ही भाषा बोलण्याची भाषा व लिहिण्याची भाषा या दोन पृथक् सदरांखालीं पडते. पाश्चात्य भाषा व बऱ्याचशा पौरस्त्य भाषा यांत बोलण्याची व लिहिण्याची भाषा एकच असल्यामुळें असा फरक करण्याचें कारण पडत नाहीं. पण चीनमध्यें या दोन भाषा बऱ्याच भिन्न आहेत.

बोलण्याची भाषा ही सर्वत्र एक नसून तिचेहि अनेक पोटभेद आहेत. तथापि या सर्व पोटभाषा मूळ एकाच भाषेपासून निघाल्या आहेत; आणि शिवाय लिहिण्याची भाषा ही सर्वत्र एकच असल्यामुळें सर्व चिनी प्रांतांनां एकत्र जोडणारें तें मोठेंच साधन आहे.

मंडारिन ही एक प्रमुख पोटभाषा आहे. हिची पेकिंगीज (पेकिंग राजधानीची भाषा) ही महत्त्वाची शाखा आहे. ही भाषा बहुतेक चिनी लोकांनां येते. एवढेंच नव्हे तर सरकारी अधिकारी याच भाषेत एकमेकांशीं बोलतात. कॅन्टनीज भाषा ऐतिहासिक व भाषाशास्त्रदृष्ट्या महत्त्वाची खरीच पण तिला पेकिंगीज मागें टाकिते. चीनमधील सर्व पोटभाषा एकाक्षरी असून त्यांमध्यें फारसे वेगवेगळाले उच्चार नाहींत. कॅन्टनीजमध्यें आठशें नऊशें उच्चार व पेकिंगीजमध्यें ४२० पेक्षां जास्त उच्चार नाहींत. मोंगोलियन जनता व काळाची प्रगति यांचा परिणाम होऊन पेकिंगमधील उच्चार हळू हळू कमी होत गेले. या उच्चारदारिद्र्याचा असा परिणाम झाला कीं निरनिराळ्या शब्दांचें काम एका उच्चारावर भागवावें लागत आहे. कधींकधीं एकाच उच्चाराला दहा दहा अर्थ असतात. तेव्हां भाषणाचा अर्थ समजून घेणें फार कठिण जातें यांत शंका नाहीं. या अडचणीला तोड म्हणून अनेक युक्त्या लढविण्यांत आल्या आहेत. एक युक्ति म्हणजे एक कल्पना व्यक्त करण्यासाठीं जोडशब्द योजणें ही होय. उदा. 'को' चा एक अर्थ 'वडील भाऊ' असा आहे पण याच अर्थानें शब्द योजण्यापूर्वी को-को असा अभ्यास किंवा द्विरुच्चार करितात किंवा 'त' (महत्) हा उपसर्ग लावून त-को असा उच्चार करितात. पुष्कळ वेळां शब्दांनां विशेषणें जोडून म्हणतात. उदा. 'लाओ-हु' म्हातारा वाघ. यावरून बोलण्याची भाषा द्विराक्षरी बनली आहे असें दिसून येईल.

आतां कमी उच्चारांची अडचण कशी नाहींशी करण्यांत येते तें पाहूं. एकच उच्चार निरनिराळ्या सप्तकांत म्हणून उच्चारांची संख्या वाढविली जाते. एखादें चिनी वाक्य स्पष्ट, हळूं व नीट म्हटल्यास भाषानभिज्ञ माणसाला तें गाण्याप्रमाणें लागेल. साधारणपणें चार स्वर स्वतंत्र वाटतात-सम, आरोह, अवरोह व प्रवेश. शिवाय प्रत्येकाला खालच्यावरच्या सप्तकांत जातां येतें. पण कॅन्टनीज भाषेला मात्र हे आठ प्रकार लागतात; पेकिंगीजला चारच उपयोगी पडतात. या स्वरांनां प्राचीन इतिहास आहे; म्हणजे कोणत्या काळांत कोणता स्वर उद्भूत व प्रवृद्ध झाला याची कांहीं माहिती सांपडते. पुढील एकाक्षरी संभाषण चार पेकिंगीज स्वरांची बरोबर कल्पना आणून देईलः—१ ला स्वर-मेला (थोड्या खेदपूर्ण, पण उंच एक स्वरांत); २ रा स्वर-मेला ? (निवळ प्रश्न); तिसरा स्वर-मेला ? (लांब ओढून म्हटलेला संशय प्रदर्शित करणारा प्रश्न); ४ था स्वर-मेला ! (चोख व निश्चयाचें उत्तर). हें उच्चारभिन्नत्व संवयीनें कळतें.

चिनी लिपीची माहिती विज्ञानेतिहासांत (पृ. ६५) आलीच आहे. परकीय भाषा शिकण्यास त्या भाषेतील कोश जो आवश्यक लागतो त्याची उणीव चिनी भाषेत नाहीं हें 'चीनचा वैज्ञानिक इतिहास' या ज्ञानकोशाच्या ५ व्या विभागांतील प्रकरणावरून दिसून येईलच. पण व्याकरण मात्र नाहीं याचें आश्चर्य वाटतें. शब्दांचा एकमेकांशीं संबंध कसा असावा, यासंबंधीं नियम चिनी लोकांनीं ठरविलेले नाहींत; कारण त्यांची जरूरीच भासली नाहीं. परकी लोकांनीं मात्र चिनी भाषेचें व्याकरण करण्याचे बरेच प्रयत्न केलेले आहेत. तथापि अगदीं शुद्ध असें व्याकरण अद्याप झालेलें नाहीं. नेहेमींची बोलण्याची भाषा व पुस्तकी भाषा यांत बरेंच अंतर आहे. फार प्राचीनकाळीं या जवळजवळ होत्या. आतां पुस्तकी भाषेचा अर्थ आपल्याकडील प्राकृताप्रमाणें समजावून सांगावा लागतो, पुस्तकी भाषा फार उच्च दर्जाची आहे व बोलकी भाषा अवनत झाली आहे. त्यामुळें वक्तृत्वाचा अभ्यास करण्याची चिनी लोकांत आवड उत्पन्न होत नाहीं.व यामुळें चिनी नाट्य भाषा प्रगत झालेली नाहीं.

चि नी वा ङ्म य.—चिनी वाङ्मयामध्यें आपणाला पुढील गोष्टी आढळून येतील. ( १ ) याचा आरंभ अतिशय पुरातन कालीं झाला असून त्याची वाढ आजपर्यंत अव्याहतपणें होत आहे. ( २ ) हें वाङ्मय सर्वांगपरिपूर्ण असून आपणाला या वाङ्मयामध्यें केवळ विषयच नव्हे तर प्रत्येक पोटविषयांवर व त्यांतील प्रत्येक निरनिराळ्या मुद्यांवर भरपूर लिखाण आढळून येईल, आणि यामुळें एकंदर वाङ्मयाची वाढ फारच अवाढव्य प्रमाणावर झालेली आपणांस दिसून येईल. ( ३ ) चिनी इतिहासाची कितीहि कसून छाननी केली तरी त्यामध्यें आपणांस सत्याचा विपर्यास केलेला क्वचितच आढळून येईल. ( ४ ) त्याप्रमाणेंच या वाङ्मयामध्यें फारच शुद्ध व उच्च ध्येय पुढें ठेवल्याचा प्रत्यय येऊन ग्राम्यता व अश्लीलता यांस अजीबात फांटा दिलेला दिसेल.

चिनी भाषेमध्यें चिनी वाङ्मयाचा इतिहास अद्याप कोणी लिहिलेला नाहीं. परंतु चिनी ग्रंथकार वाङ्मयाचा आढावा काढण्याकरितां अथवा सूची करण्याकरितां या वाङ्मयाचे मुख्यतः ४ भाग करतात. यांपैकीं पहिल्या भागांत वेदांगस्वरूपी वाङ्मयाचा अंतर्भाव होतो. या वर्गांत कन्फ्युशियस यांचे धर्मशास्त्र, कोश, भाषाशास्त्र व व्युत्पत्ति वगैरे शब्दाभ्यासविषयक ग्रंथ यांचा समावेश होतो. दुसऱ्या भागामध्यें निरनिराळ्या प्रकारचे सरकारी, खासगी वगैरे इतिहास,चरित्रात्मक, भूवर्णनात्मक व सूचीस्वरूपी ग्रंथ येतात. तत्त्वज्ञान, धर्म, कला व शास्त्रें, ज्ञानकोश व इतर विषयांवरील ग्रंथ तिसऱ्या भागांत येतात व चवथा भाग केवळ काव्यांकरितां राखून ठेवलेला असतो.

या वाङ्मयाचा कालानुक्रमानें विचार करावयाचा म्हणजे प्रथम आपणांस काव्याकडे वळलें पाहिजे. सर्व सामान्य नियमांप्रमाणेंच मनुष्याच्या विचारांनां प्रथमतः जें उच्चारांचें स्वरूप आलें तें काव्यांतच आलें. व सर्वांत प्राचीन असें जें चिनी वाङ्मय आज उपलब्ध आहे तें पोवाडे व वीररसात्मक लावण्या व इतर अशाच प्रकारच्या गाण्यांच्या रूपांत आढळतें. यांपैकीं कांहीं ख्रिस्तपूर्व १००० वर्षें या कालचीं असून बहुतेक सरंजामी कालांतीलच आहेत. याच काव्यांचा कन्फ्युशियस यानें संग्रह करून त्यास ' शिकिंग ' ( संहिता) असें नांव दिलें व तो संग्रह हल्लीं त्याच्या धर्मशास्त्रांत सामील झाला आहे. मात्र हा संग्रह करतांना कन्फ्युशियस यानें एकंदर ३००० प्रचलित पद्यांपैकीं फक्त निवडक सुमारें ३०० पद्यांचाच यांत समावेश केला आहे. या कवितांचा विषय सामान्यतः युद्ध व प्रेम हा असून कांहींमध्यें नाच, मद्यपान व आयुष्यांतील सुखदुःखें व राजांचे सद्गुण अगर दुर्गुण यांचेंहि वर्णन आढळतें.चिनी काव्याला अन्त्ययमक हें अवश्य आहे व निर्यमक कवितेचा प्रघात चीनमध्यें नाहीं.

यानंतर ' तअंग ' घराणें राज्यावर असतांना ( इ. स. ६१८-९०५ ) चीन देशांत काव्याची फार भरभराट होऊन बेसुमार वाढ झाली. इ. स. १७०७ मध्यें ' तअंग 'कालांतील कवींच्या सर्व कविता बादशहाच्या हुकमानें एकत्र केल्या. त्यांची एकंदर संख्या ४८९०० इतकी भरली व त्यांचे ९०० ग्रंथ झाले. याची एक प्रत केंब्रीज येथील विश्वविद्यालयांतील ग्रंथसंग्रहालयांत आहे. या कालांतील प्रमुख कवी म्हटले म्हणजे मेंग हौ-जॅान ( ६८९-७४० ); वांग वेई ( ६९९-७५९ )हा चितारीहि होता; लिपो उर्फ लितैपो(७०५-७६२) याला ' स्वर्गच्युत देवदूत ' असें म्हणत. हा नौकेंत बसला असतां पाण्यांत पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबास अलिंगन देण्याकरितां ओणावला असतां बुडून मेला. याच्याच तोडीचा तुफु ( इ. स. ७१२-७७० ) हा कवि आपल्या कवितांचें महत्त्व इतकें मानीत असे कीं त्यानें हिंवतापावर औषध म्हणून आपल्या कविता म्हणण्यास उपदेश केला होता. पो चुइ ( इ. स. ७७२-८४६ ) हा मोठमोठ्या अधिकाराच्या जागांवर असूनहि त्यानें पुष्कळ उत्तमोत्तम कविता रचल्या आहेत. याच्या कविता बादशाही हुकुमानें शिलांवर खोदून ठेवल्या आहेत.

तअंग घराण्यानंतर आलेल्या सुंग घराण्याच्या कारकीर्दींतहि काव्याची बरीच भरभराट झाली. या कालच्या काव्यामध्यें कल्पना व रचना यामध्यें जास्त वैचित्र्य आढळून येतें. परंतु या कालांतील काव्यामध्यें ठिकठिकाणीं कृत्रिमता व निर्बंध आढळतात, त्याचप्रमाणें या कालांतील आयुष्यक्रमहि पूर्वींइतका सुखाचा व सुलभ नसून जीवितक्रमावरूनहि कवींचें लक्ष्य वेधलेलें दिसतें. या कालांतील कवींमध्यें सुमा कुआंग, ओश्यांगहिउ, वांग अन्शि हीं नांवें प्रामुख्यानें आढळतात. याखेरीज सु तुंग पो ( इ. स. १०३६-११०१ ) हाहि बराच लोकप्रिय होता.

यानंतर होऊन गेलेल्या मोंगोल व मिंग घराण्यांच्या कारकीर्दींत जरी काव्यामध्यें पुष्कळ भर पडली तरी वरील दोन कालांतील काव्यांची सर त्यांस आली नाहीं. यांच्या मागून नुकतेंच पदच्युत झालेलें मांचु घराणें अधिकारारूढ झालें. या घराण्यांतील दोन बादशहांखेरीज बाकीच्यांच्या कारकीर्दींतहि वरीलप्रमाणेंच स्थिति होती. कांग ही व चिएन लुंग हे दोघेहि सुसंस्कृत बादशहा असून कवी होते व यांपैकीं एकानें तर एकंदर ३३९५० स्फुट काव्यें लिहिलीं.

चीनमध्यें महाकाव्य मुळींच उत्पन्न झालें नाहीं, तथापि सर्वच कविता केवळ लहान लहान चुटके नसून कांहीं कांहीं बरींच मोठीं खंडकाव्यें आहेत. चीनमध्यें ध्वनिकाव्यें फार उत्कृष्ट समजलीं जातात. काव्यामध्यें सुगमता, साधेपणा व व शुद्धरचना यांकडे विशेष लक्ष्य देण्यांत येतें. परंतु कांहीं टीकाकारांचें असेंहि मत दिसतें कीं, क्लिष्टता हाहि एक काव्याचा गुणच असून अर्थ जितका गूढ तितकें स्वारस्य अधिक असें त्यांचें म्हणणें आहे. एका चिनी ग्रंथकारानें ' हृदयतरंगाचें शब्दचित्र ' अशी काव्याची व्याख्या केली आहे. चिनी काव्यांचा विषय सामान्यतः निसर्ग, व आयुष्यांतील सुख-

दुःखांचे प्रसंग हे आहेत. शृंगारिक कवितांचाहि कांहीं अभाव नाहीं. तथापि या विषयावर चिनी कवींचा विशेषसा भर दिसत नाहीं व जीं आहेत त्यामध्येंहि सभ्यतेचें व शिष्टाचाराचें अतिक्रमण अगर ग्राम्यविनोद व अश्लीलता यांना मुळींच वाव नाहीं. चिनी कवींची प्रतिभा गिरिनिर्झर व त्यांतील यक्षकिन्नरं आणि वृक्षलता व पुष्पें यांमध्यें स्वच्छंदानें व उल्हासानें विहार करते. चिनी कवीचे जिवितक्रमाबद्दलचे उद्गार बहुशः निरुत्साही असून त्यांमध्यें पुष्कळवेळां दुःखाची छटा व भविष्यकाळाच्या अज्ञानामुळें औदासिन्य आढळून येतें. कवि आनंदाच्या लहरींत असला म्हणजे त्यास मद्यापासून स्फूर्ति होते व दुःखांत असला म्हणजे समाधान मिळतें. चिनी कवींमध्यें मद्यासक्ति सार्वत्रिक असून पुष्कळ कवींनीं सुरेचे गोडवे गाइले आहेत.ताओधर्म व बौद्धधर्म यांतील कांहीं विषयांवरहि चिनी कवींनीं पद्यरचना केली आहे, पण सामान्यपणें चीनमध्यें पारमार्थिक अगर सांप्रदायिक अशीं काव्येंच आढळत नाहींत.

इतिहासः—कन्फ्यूशिअस यानें काव्याप्रमाणेंच प्राचीन कागदपत्रांचा संग्रह केला. त्यास 'शु किंग' असें नांव असून तो कन्फ्यूशिअस याच्या धर्मशास्त्रांत सामिल केला आहे. जरी हे कागदपत्र म्हणजे अर्धवट टिपणें वगैरे स्वरूपाचे आहेत तरी त्यांवरून वरील काव्यांच्या मदतीनें त्यावेळच्या संस्कृतीचें व समाजस्थितीबद्दलचें अनुमान काढतां येतें. यामध्यें यौ नांवाच्या एका बादशहाच्या कारकीर्दीपासून (ख्रि. पू. २३५७–२२५५) आरंभ केला असून त्यानें वर्षाची लांबी व ऋतुकाल ठरविल्याबद्दलचा उल्लेख आहे. याच्या कालगणनेंत अधिकमास गृहित धरावा लागत असे. यानें आपलें राज्य एका लोकप्रिय व पुत्रवत्सल मनुष्यास अर्पण केलें. याचें नांव शुन बादशहा (ख्रि. पू. २२५५–२२०५). यानें राजकीय संस्था स्थापन केल्या व कायदा, न्याय, दंड, धार्मिक विधि व संस्कार व कामगारांच्या परीक्षा घेण्याची पद्धति इत्यादि गोष्टी अमलांत आणल्या. हा प्रार्थना करीत असे व यज्ञ (होम) करीत असे. यानंतर महात्मायु (ख्रि. पू. २२०५–२१९७) यास राज्य मिळालें. यानें जलप्रलयानें आलेलें पाणी राज्याच्या बाहेर समुद्रांत वाहून नेल्यानें यास हा अधिकार मिळाला. (हा जलप्रलय नोहाच्या काळचाच होय असें दाखविण्याचा पाश्चिमात्य ग्रंथकार भोळसर प्रयत्न करतात.) याखेरीज या बादशहाच्या कारकीर्दींत निरनिराळ्या सभोंवतालच्या देशांतून खंडणीदाखल जें सोनें, रुपें, तांबें, लोखंड, पोलाद, रेशीम, पिसें, हस्तीदंत, कातडीं वगैरे जिन्नस येत असत त्यांबद्दल कांहीं माहिती दिली आहे. एका भागांत निरनिराळ्या मोहिमा व त्यांमध्यें मिळालेल्या विजयांचें वर्णन असून, सैन्यासमोर प्रोत्साहनपर केलेलीं भाषणें, जाहिरनामे वगैरे नमूद केलीं आहेत. यांतच मद्यपानाविरुद्ध काढलेल्या जाहिरनाम्यावरून त्याकाळीं मद्यपानाचा प्रसार विशेष झाला असून तो पुढें अजीबाद बंद झाला असावा असें दिसतें. गेल्या दोन तीन शतकांत मद्यपान हें अपवादादाखलच आढळण्यांत येतें.

यानंतर कन्फ्यूशियस यानें आपला पितृदेश जोलु त्याची बखर लिहिण्याचें काम हातीं घेऊन ती ख्रि. पू. ७२२ पासून ४७९ (कन्फ्यूशियस हा याचवर्षी मरण पावला) पर्यंत आणली व पुढें त्याच बखरीवर टीका लिहिणारा त्सौचिउ मिंग यानें कांहीं वर्षे पुढें चालविलें. या बखरीचें नांव चुनचिउ असें असून तींमध्यें कांहीं मिती देऊन त्या दिवशीं घडलेली हकीगत दिली आहे. यामध्यें राजांच्या परस्पर भेटी, जन्म, मृत्यु, लग्नें, स्वाऱ्या इ. विषय असून ग्रहणें भूकंप, धूमकेतु, दुष्काळ वगैरेंचाहि उल्लेख आहे.

परंतु चीनमध्यें इतिहासाचा वास्तविक आरंभ सुमाचिएन (१४५—८७ ख्रि. पू.) या ग्रंथकारापासून होतो. यानें सर्व देशभर प्रवास केला होता व बापाच्या मरणानंतर तो दरबारी ज्योतिषी होता व याच्या बापानें आरंभ केलेल्या शि-चि नांवाच्या बखरीचें काम यानें बहुतेक पार पाडलें. या बखरीचे ५ भाग केले आहेत. (१) बादशहांच्या कारकीर्दीचें वर्णन, (२) घडलेल्या गोष्टींचें कलानुक्रमानें कोष्टक, (३) निरनिराळ्या विषयांवर स्वतंत्र लेखः (अ) विधि व संस्कार, (आ) संगीत, (इ) सृष्टिशास्त्र, (ई) पंचांग, (उ) ज्योतिष, (ऊ) धर्म, (ऋ) पाटबंधारे, व (ए) व्यापार, (४) मांडलिक राज्यांचा इतिहास, (५) चरित्रें. या बखरींचा आरंभ पीतबादशहापासून होतो. यानें ख्रि. पू. २६९८ या वर्षापासून १०० वर्षें राज्य केलें. यानंतर वर निर्दिष्ट केलेले यौ, शुन व इतर असे ४ राजे झाले. हा काल म्हणजे चीनचें सत्ययुग होतें व सर्व प्रजा व राजा सद्गुणी असून सर्वत्र समृद्धि व शांति नांदत होती. यानंतरचा कांहीं काल असाच दंतकथा वगैरेंनीच व्याप्त आहे. यानंतर चौ घराण्याबद्दल (ख्रि. पू. ११२२–२५५) कांहीं माहिती आढळते. यांपैकीं पहिल्या ३०० वर्षांनंतरची साधारणतः विश्वसनीय अशी माहिती मिळते. ख्रि. पू. तिसऱ्या शतकामध्यें एका राजानें त्यावेळीं सर्व किरकोळ राज्यें स्वसामर्थ्यानें पादाक्रांत करून एकतंत्री राज्यस्थापना केली व ख्रि. पू. २२१ या वर्षी स्वतःची पहिला बादशहा म्हणून द्वाही फिरविली. प्रत्येक गोष्टीचा आरंभ आपल्या कारकीर्दीपासून झाला पाहिजे या महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन एका मंत्र्याच्या सल्ल्यानें त्यानें शेतकी, वैद्यक, ज्योतिषखेरीज करून सर्व विषयांचे ग्रंथ जाळून टाकण्याबद्दल हुकूम सोडले. हा हुकूम अमान्य केल्यामुळें सुमारें ४६० लेखकांस ठार मारण्यांत आलें व पुष्कळांनां हद्दपार केलें. ही गोष्ट पुस्तकांची (ग्रंथांची) होळी म्हणून प्रसिद्ध आहे, परंतु कांहीं ग्रंथ भिंतींमध्यें पुरून किंवा अन्य तऱ्हेनें राखून ठेवण्यांत आले. नाहीं तर चिनी वाङ्मयाचा आरंभ ख्रि.पू.२१२ या वर्षापासूनच व्हावयाचा. ख्रि. पू. २०६ या वर्षी चीन

घराण्याची अखेर होऊन हान घराण्याच्या हातीं राज्य आलें. तेव्हां छपवून ठेवलेलीं पुस्तकें पुनः शोधून काढण्यांत आलीं. मात्र या संशोधनाच्या लाटेमध्यें पुष्कळसे बनावट ग्रंथ मूळच्या नांवानें पुढें करण्यांत आले.व सध्यांच्या शोधकास या काळच्या वाङ्मयामध्यें खरें कोणतें व बनावट कोणतें याची छाननी प्रथम करावी लागते. यापैकीं कन्फ्यूशिअन धर्मशास्त्र –बहुतेक परंतु सर्व ग्रंथ नव्हेत– हें पहिल्या वर्गांत मोडतें व तौ-ते-चिंग वगैरे पुस्तकें दुसऱ्या वर्गांत मोडतात. सुमा चिएन याच्या ग्रंथासारखे निरनिराळया घराण्यांचे इतिहास त्याच्याच पद्धतीनें लिहिलेले असे एकंदर २४ प्रसिद्ध झाले. या सर्वांची एक आवृत्ति इ. स. १७४७ मध्यें निघाली आहे. तिची एक प्रत (ग्रंथसंख्या२१९)केंब्रिज ग्रंथसंग्रहालयांत आहे. प्रत्येक घराण्यांतील राजांनीं आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या घराण्याचा इतिहास लिहून काढविला आहे व तो निःपक्षपातीहि आहे. हे इतिहास बहुतेक सरकारी कागदपत्रांवरून तयार केलेले आहेत. फक्त तअंग घराण्याचा इतिहास पहिल्यानें चुकीचा लिहिलेला आढळून आल्यामुळे ओउ यांग हिउ या पंडितानें तो पुनः लिहून काढला. हे इतिहास सुमा चिएन याच्याच बखरींच्या धर्तीवर लिहिलेले आहेत.

तथापि चीनमधील ऐतिहासिक वाङ्मय म्हणजे केवळ वरील बखरीच नव्हत; कारण चिनी ग्रंथकाराचा इतिहास हा आवडता विषय असून वरील सरकारी बखरींखेरीज पुष्कळ लहानमोठे इतिहास कांहीं पूर्ण, कांहीं विशिष्ट कालचे, कांहीं राजकीय कांहीं शासनसंस्थाविषयीं असे निरनिराळया प्रकारचे बाहेर पडले आहेत. यापैकीं एक दशांशाचाहि नामनिर्देश करण्यापुरेसा आपणाजवळ स्थलावकाश नाहीं. तथापि चिनी लोकांचा सर्वांत आवडता जो 'तुंग चिएन' ( इतिहासादर्श ) त्याचा नामनिर्देश करणें अवश्य आहे. हा इतिहास इ. स.च्या अकराव्या शतकांतील सुमा कुआंग नांवाच्या मुत्सद्यानें लिहिलेला असून त्यामध्यें ख्रि. पू. पांचव्या शतकापासून इ. स. ९६० पर्यंतची हकीकत दिली आहे. याची भाषाशैली मोठी रमणीय आहे. परंतु यांतील विषयांची मांडणी अभ्यासास सुलभ नसल्यामुळें त्याचें पुन्हां परीक्षण करून चुसु या टीकाकारानें ( इ. स. ११३०–१२०० ) ती बदलली व हल्लीं हा ग्रंथ चिनी इतिहासावर आधारग्रंथ समजतात.

**च रि त्रें**–वरील बखरींखेरीज निरनिराळया लोकांनीं चरित्रसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. कांहीं व्यक्तींचीं चरित्रें निरनिराळया लेखकांनीं निरनिराळया दृष्टींनीं लिहिलेलीं आहेत. चिनी लेखकांनीं लिहिलेल्या चरित्रांमध्यें इतर देशांतील सामान्य चरित्रग्रंथांपेक्षां विशेष असें कांहीं आढळत नाहीं. चिनी चरित्रकार नेहमीं जन्मस्थानापासून चरित्राचा आरंभ करितो; परंतु जन्मकाल मात्र देतोच असें नाहीं. तो बहुतेक वय व मृत्युकाळ यावरून काढावा लागतो. पूर्वजांबद्दलचा थोडीशी माहिती असते व आयुष्यामध्यें मिळालेल्या निरनिराळ्या अधिकाराच्या जागा, उत्कर्ष अगर अपकर्ष हीं सर्व काळजीपूर्वक दिलेलीं असतात.

**भू व र्ण न व प्र वा स**:—चिनी वाङ्मयामध्यें भूवर्णनात्मक ग्रंथांचीहि रेलचेल आहे. परंतु चीन देशाबाहेरच्या देशांबद्दल थोड्याशा टिपणांखेरीज सर्वसामान्य भूवर्णनात्मक असे ग्रंथ चीनमध्यें सोळाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत झाले नव्हते. तथापि चीन देशाच्या भूपृष्ठवर्णनावर असंख्य ग्रंथ आहेत. प्रत्येक प्रांत व जिल्हा यांचें सविस्तर वर्णन आपल्याला आढळून येईल व त्यांत मुख्य इमारती, पूल, टेंकड्या व पर्वत, पुराणवस्तू, प्राचीन अवशेष वगैरे, विशिष्ट लोकांचीं चरित्रें व इतर ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टी यांचें टांचण आपणाला दिसेल. चिनी साम्रा ज्याचा एक मोठा भूगोल इ. स. १७४९ मध्यें प्रसिद्ध झाला व इ. स. १७१४ मध्यें एक कालाक्रनुनिक भूगोल बाहेर पडला.

चिनी लोकांना प्रवासाची फार हौस असे. व निरनिराळया प्रवाश्यांनीं शेजारच्या देशांत खासगी रीतीनें अथवा वकील म्हणून सरकारी कामाकरितां गेले असतां मिळालेली विविध माहिती आपल्या लहानमोठ्या टांचणांत नमूद करून ठेविली आहे. बौद्धधर्माच्या प्रवेशाबरोबर बुद्धाची जन्मभूमी, बौद्धधर्माचे ग्रंथ, मूर्ती वगैरे पहाण्याची इच्छा होऊं लागली. यामुळें बरेच चिनी प्रवाशी यात्रेच्या निमित्तानें हिंदुस्थान वगैरे देशांकडे आले. यांपैकीं फाहिआन हा इ. स. ३९९ मध्यें मध्यचिनांतून गोबीच्या ओसाड प्रदेशांतून खोतान येथें येऊन हिंदुकुश पर्वत ओलांडून हिंदुस्थानांतलि मुख्य मुख्य शहरें पाहून कलकत्त्याजवळ गलबतांत बसून वाटेंत सिंहलद्वीपांत २ वर्षे राहून मोठ्या प्रयासानें इ. स. ४१४ यावर्षी किआओजवळ चीनमध्यें उतरला. दुसरा ह्युएनत्संग हा इ. स. ६२९ मध्यें हिंदुस्थानांत येऊन इ. स. ६४५ सालीं परत गेला. यानें आपणाबरोबर पुष्कळ मूर्ती, चित्रें व बुद्धाच्या वेळच्या १५० स्मरणीय वस्तू आणि ६५७ ग्रंथ आणले. व या ग्रंथांचे चिनी पंडितांच्या सहाय्यानें भाषांतर करून इ. स. ६४८ मध्यें आपलें प्रवासवृत्त लिहिलें.

**त त्त्व ज्ञा न**—चिनी तत्वज्ञानाच्या इतिहासामध्यें लौत्झु यास अग्रस्थान दिलें पाहिजे. या नांवाचा खरोखरीच कोणी तत्त्ववेत्ता होता किंवा तो केव्हां होऊन गेला याबद्दल कांहींच विश्वसनीय माहिती नाहीं. निरनिराळ्या ग्रंथांमध्यें उद्धृत केलेलीं सुभाषितें एकत्र केलेला एक ग्रंथ ख्रि. पू. सहाव्या शतकापासून तौतेचिंग या नांवानें लौत्झु याच्या नांवावर प्रसिद्ध आहे. परंतु याचें अंतरंगपरीक्षण केलें असतां हीं सुभाषितें एकाचींच नसून विविध ग्रंथकारांच्या ग्रंथांतील अवतरणें आहेत हें स्पष्ट दिसतें. या ग्रंथाचा ग्रंथांच्या होळीच्या नंतरच पहिल्यानें उल्लेख आढळतो ( म्हणजे त्या ग्रंथाच्या कालानंतर ४०० वर्षांनीं ).

परंतु यांतील प्रक्षिप्त भाग गाळला असतां लौत्सु याच्या नांवानें चालत आलेल्या बहुतेक सर्व सुभाषितांचा संग्रह यांत आढळतो. यामध्यें अकर्तृत्ववादाचा पुरस्कार केला आहे. त्याप्रमाणेंच अपकारिषूपकारः हें तत्वहि त्यांत आढळतें. याच्या उलट कन्फ्यूशिअस यानें कर्तृत्ववादाचा पुरस्कार केला असून ' अपकारिषुन्यायदंडः हें तत्व प्रतिपादन केलें आहे. ख्रि.पू. चौथ्या व तिसऱ्या शतकाच्या सुमारास होऊन गेलेल्या चुआंगत्सू नावांच्या तत्ववेत्त्यानें लौत्सु याचा पक्ष घेऊन कन्फ्यूशिअस याच्या तत्वावर व पुढें दिलेल्या मोति याच्या सिद्धांतावर अशी कडक व मार्मिक टीका केली कीं त्याचें खंडण करणें त्या काळच्या विद्वानांनाहि अशक्य वाटलें. याच्या ग्रंथाच्या ५३ प्रकरणांपैकीं हल्लीं फक्त ३३ च प्रकरणें शिल्लक आहेत.परंतु जें शिल्लक आहे त्यावरूनहि याची गाढी विद्वत्ता सिद्ध होते व जरी तो पाखंडी, केवळ कल्पनावादी समजला जातो तरि त्याची कल्पकता आदरणीय वाटते.

कन्फ्यूशिअस याचे आपल्या शिष्यांबरोबरचे संवाद व त्याच्या आयुष्यांतील कांहीं प्रसंग यांचा समावेश त्याच्या धर्मशास्त्रावरील ग्रंथांमध्यें एका भागांत केलेला आहे. मनुष्य हा स्वभावतः चांगला असून बाह्यपरिस्थितीमुळेंच पुढें दुष्ट होतो हा याचा मूळसिद्धांत असल्यामुळें पुत्रवात्सल्य व शेजारधर्म याचें त्यानें फार जोरदार भाषेंत विवेचन केलें आहे. याचा परमेश्वरावर भरंवसा असावासें दिसतें. परंतु मरणोत्तर स्थितीची कल्पना त्यास नसून मनुष्याच्या चांगल्या अगर वाईट कृत्याचें फळ त्यास मिळतें असेंहि त्यास वाटत नसे. केवळ सद्गुणाकरितांच सदाचरण पाहिजे असें त्याचें म्हणणें असे. कन्फ्यूशियस याच्या धर्मशास्त्रापैकीं दुसरा ग्रंथ मेन्शिअस ( ख्रि. पू. ३७२-२८९ ) याचा असून त्यानें आपला गुरू कन्फ्यूशिअस याचेच सिद्धांत विशद केलेले आहेत. याच्याच ग्रंथामुळें कन्फ्यूशियस याच्या मतांचा सर्वत्र प्रसार होऊन तीं सर्वमान्य झालीं यानें 'मोति' याचा जो विश्वप्रेमाचा ( लोककल्याणवाद ) सिद्धांत त्याचें खंडण केलें. कन्फ्यूशिअस याच्या धर्मशास्त्रांतील बाकीचे दोन ग्रंथ त्याच्या नातवानें लिहिले व त्यांमध्यें तत्वज्ञानविषयक स्फुट लेख आहेत. मेन्शिअस यानें ' मो ति ' प्रमाणेंच ' यांगचू ' याच्या स्वार्थवादाचाहि मोड केला. मेन्शिअस याच्या म्हणण्याप्रमाणें ' मो-ति ' हा लोकहितार्थ सर्वस्वार्पण करण्यास तयार होईल तर ' यांगचू' हा केसभरहि झीज सोसणार नाहीं. ख्रि. पू. ३ ऱ्या शतकांत एक हुन त्सू हा तत्ववेत्ता होऊन गेला. याचें म्हणणें असें होतें कीं मनुष्य हा स्वभावतःच दुष्ट स्वभावाचा असून त्याला उत्तम नैतिक शिक्षण मिळालें तरच तो सुधारतो. यानंतर यांग हिऊंग ( ख्रि. पू. ५३-१८ ) हा होऊन गेला. यानें वरील दोन्ही मार्गांच्या मधील मार्ग पसंत केला. त्याचें मत असें होतें कीं मनुष्य हा स्वभावतः केवळ चांगला अगर वाईट नसून त्यामध्यें दोन्ही स्वभावांचें मिश्रण असतें व वस्तुस्थितीप्रमाणें या गुणांची वाढ होते. याखेरीज हुइनानत्सु ( हुइ नान येथील तत्त्वज्ञानी ) या नांवाखालीं चालत आलेला एक मोठा ग्रंथ आहे. हा ग्रंथ हुइनानचा राजा लिउआंन ( मृ. ख्रि. पू. १२२ ) यानें लिहिला असें म्हणतात. यानें किमयेवरहि एक ग्रंथ लिहिल्याचें ऐकिवांत आहे. परंतु चीनचा ग्रीस देशाशीं संबंध येऊन किमयेचा प्रवेश चीनमध्यें या कालाच्यानंतर झाला. या ग्रंथामध्यें लौत्सु याचेच सिद्धांत प्रतिपादित केले आहेत. परंतु लौत्सु याचे सांप्रदायिक लोक या कालीं अमृताच्या शोधांत गुंतले होते. यावरून हा ग्रंथ कदाचित बनावट असण्याचा संभव आहे. चीनमध्येंहि बेंटलेप्रमाणें कांहीं सत्यान्वेषी टीकाकार होऊन गेले; पण त्यांनीं फक्त कन्फ्यूशिअसच्या ग्रंथांवरच परिश्रम केले व इतर सांप्रदायिक ग्रंथांकडे कोणी लक्ष्य दिलें नाहीं. त्यामुळें परकी मनुष्याला अशा ग्रंथांबद्दल मत बनविणें फार कठीण जातें.

वांगचू ( इ. स. २७-९७ ) हा जडवादी तत्ववेत्ता असून त्यानें कन्फ्यूशिअस व मेन्शिअस यांच्या ग्रंथांवर कडक टीका केली आहे. याच्या ग्रंथांपैकीं फक्त एकच ग्रंथ अस्तित्वांत आहे. याच्या ग्रंथामध्यें दैव, भविष्य, मृत्यू, पिशाच्च, विष, चमत्कार वगैरे निरनिराळ्या विषयांवर ८४ निबंध आहेत.

याखेरीज चीनमध्यें निरनिराळ्या कालांत पुष्कळ तत्त्ववेत्ते होऊन गेले. चुहि ( इ. स. ११३०–१२०० ) हा कन्फ्यूशिअस ग्रंथावरील टीकाकार असून याचे बरेच ग्रंथ आहेत. यानें 'इचिंग' या ग्रंथांतील गूढ उकलण्याचा प्रयत्न केला. इचिंग हा कन्फ्यूशिअस याच्या धर्मशास्त्राचा एक भाग असून तो सांकेतिक भाषेंत लिहिलेला आहे. हा ग्रंथ चौ घराण्याचा संस्थापक वेन राजा ( ख्रि. पू. ११२२–२४९ ) यानें लिहिला असें म्हणतात. शौयुंग ( इ स. १०११–१०७७ ) याच्या मतें ही लिपी संख्यावाचक असावी. चेंगइ ( इ. स. १०३३–११०७ ) याच्या मतें ही भाषा वस्तूंची सार्वकालिक योग्यता दाखविते. याप्रमाणें निरनिराळ्या विद्वानांचे निरनिराळे तर्क आहेत. परंतु १७ व्या शतकांतील एका ग्रंथकाराच्या म्हणण्याप्रमाणें फक्त ' चु हि ' यासच त्या लिपीचा अर्थ बरोबर कळला होता. परंतु तो काय आहे हें अद्यापहि परकीय मनुष्याला एक गूढच आहे.

**अर्थशास्त्र.**—या विषयावरहि चिनी वाङ्मयांत ग्रंथांची उणीव दिसत नाहीं. ख्रि. पू. ७ व्या शतकामध्यें चि संस्थानचा मुख्य प्रधान क्वान चुंग यानें अर्थशास्त्राचा अभ्यास करून त्याअन्वयें आपल्या संस्थानाची संपत्ति व सामर्थ्य पहिल्या प्रतीचें करून दाखविलें. याच्या ग्रंथाचा बराच भाग त्यानें स्वतः लिहिलेला व कांहीं त्याच्याच तत्त्वांचें प्रथन करून त्याच्यानंतर लिहिलेला असा आढळतो. त्याचें प्रत्येक देश हा स्वावलंबी पाहिजे असें होतें.

व त्याप्रमाणें त्यानें शेतकीची सुधारणा केली व कारखानेहि वाढविले. कारण पहिल्याचा उपयोग लढाईमध्यें स्वपोषणार्थ होतो व दुसऱ्याचा शांततेमध्यें स्वसंपत्ति वाढविण्याकडे होतो. तो आयात खुली असावी या तत्वाचा होता व भांडवलवाल्यांचाहि लढाईंत व शांततेच्या काळीं उपयोग होतो असें त्याचें मत होतें. मेन्शिअस हा ठोक व्यापार करणारे व मक्तेदार यांच्यावर जबर कर बसवावे असें म्हणत असे व गो संघ व कोंडी यांच्या विरुद्ध असे वांगअनशि यानें पुष्कळ सुधारणा केल्यामुळें यास 'सुधारक' असें म्हणत. यानें सर्व व्यापाराचा मक्ता सरकारकडे घेतला. उत्पन्नाचा उपयोग प्रथम कर भरण्याकडे नंतर स्थानिक मागणी पुरवण्याकडे करून शिल्लक राहिलेला माल सरकारनें स्वस्त दरानें घेऊन ज्या भागांत विशेष मागणी असेल तिकडे पाठवावयाचा किंवा सांठवून ठेवावयाचा. यामुळें लोकांनां नेहमीं ठराविक भावानें जिन्नस मिळत व जास्त कर देण्याचा त्रास नसे. सरकारचा कर व फायदा मिळून अव्याहत वसूल येत असे. त्याप्रमाणेंच शेतकऱ्यांनां शेंकडा२ $\frac{१}{२}$ व्याजानें सक्तीनें तगाई मिळत असे. परंतु पुराणमताभिमानी चिनी लोकांस या सुधारणा न आवडून त्याच्या आयुष्यांतच त्या बंद पडल्या.

यु द्ध क ला.—युद्धकला अथवा व्यूहरचनाशास्त्र या विषयावर चीनमध्यें वाङ्मय आढळत नाहीं. सुन वु याचा ख्रि. पू. ६ व्या शतकांतला एक युद्धकला या नांवाचा ग्रंथ आहे व त्यामध्यें, व्यूह, व्यूहछिद्रें, हेर वगैरे १३ प्रकरणें आहेत. या ग्रंथांत चित्रेंहि आहेत.

शे त की.—शेतकीवरील सर्व चिनी वाङ्मय अर्वाचीन आहे. इ. स. च्या १२ व्या शतकामध्यें चेन फु यानें शेतकी, गुरांची पैदास व रेशमाचे किडे या विषयांवर लहान लहान पुस्तकें लिहिलीं. याखेरीज १३ व्या शतकामध्यें लिहिलेलें शेतकीवरील एक सचित्र पुस्तक आहे. त्याची पुनरावृत्ति कांग हि बादशहाच्या हुकुमानें निघून तींत चौपिंगचेन यानें अर्वाचीन धर्तीचीं चित्रें घातलीं आहेत. परंतु शेतकीवरील सर्वमान्य ग्रंथ 'तुंग चेंग चुआन शू' हा 'हु कुआंग चि' यानें रचला. यांत ६० प्रकरणें असून त्यांमध्यें प्राचीन शेतकी, जमीनविभागणी, शेतकी, जलयंत्रें, कृषियंत्रें, लागवड, रेशमाच्या किड्यांची जोपासना, झाडें, गुरांची पैदास, अन्न व दुष्काळ इतके विषय आहेत.

वै द्य क.—या विषयावरील ग्रंथ चिनी वाङ्मयामध्यें भरपूर आहेत. त्यांपैकीं सर्वांत प्राचीन ग्रंथ 'पीत' राजानें (ख्रि. पू. २६९८—२५९८) लिहिल्याची आख्यायिका आहे. हा प्रश्नोत्तररूप आहे. यामध्यें सर्व परंपरागत ज्ञान संगृहीत केलेलें आहे. याप्रमाणेंच व्रणचिकित्सा, पोतविधि यांची स्थिति आहे. नाडिशास्त्र, ज्वर, त्वग्रोग, नेत्ररोग वगैरे विषयांवर पुष्कळ स्वतंत्र ग्रंथ आहेत. परंतु यांपैकीं कोणताहि ग्रंथ पेन त्सौ या ग्रंथाची बरोबरी करूं शकणार नाहीं. हा ग्रंथ लि शिचेन यानें वीस वर्षें परिश्रम करून इ. स. १५७८ सालीं समाप्त केला, यामध्यें प्राणिज, खनिज, वनस्पति वगैरे मिळून १८९२ औषधांचें विवेचन केलें आहे.

भ वि ष्य ज्ञा न.—या विषयावरहि फार प्राचीन काळापासून चिनी वाङ्मयामध्यें ग्रंथरचना आढळून येते. सरकारी पंचांगामध्येंहि शुभाशुभ दिवस निर्दिष्ट केलेले असतात. फक्त ज्योतिष, रमल, सामुद्रिक, मुखपरीक्षा, किमया वगैरे विषयांवर अनेक ग्रंथ आहेत.

चि त्र क ला.—चिनी लोकांत लेखनविद्या ही चित्रकलेइतकीच मान्य झालेली आहे. तथापि चित्रकलेवर पुष्कळ मोठमोठे ग्रंथ रचलेले आहेत. त्यांपैकीं 'हुआन हो हुआपु' हा ग्रंथ फार मोठा आहे. पण त्याचा कर्ता अज्ञात आहे. या ग्रंथांत 'हुआन हो' घराण्याच्या काळांतलि (इ. स. ११११—११२६) बादशाही चित्रसंग्रहांत असलेल्या ७१९२ चित्रांची व त्यांच्या २३२ चित्रकारांची नांवनिशी दिली आहे.

सं गी त शा स्त्र.—या विषयावर प्राचीन वाङ्मय अस्तित्वांत नाहीं. कन्फ्यूयीशअन धर्मशास्त्रांतलि या विषयावरचा भाग पुष्कळ शतकापूर्वींच नाहींसा झाला आहे. कांहीं भाग बखरीमध्यें आढळतो पण संगीतावर स्वतंत्र असा ग्रंथ इ. स. ९ व्या शतकापर्यंत आढळत नाहीं. या शतकामध्यें चि ए कुलु या नांवाचा ग्रंथ मध्यआशियांतून आला. अर्थात तो मूळचा सिथिअन लोकांचा होता. १६ व्या व १७ व्या शतकामध्यें झालेले संगीतशास्त्रावरचे अनेक ग्रंथ आहेत. त्यांमध्यें संगीतशास्त्राची उपपत्ती व इतिहास यांचे विस्तृत विवेचन केलेलें आहे. त्यांप्रमाणेंच निरनिराळ्या वाद्यांचीं चित्रें व रागांचे लेखनादर्श (नोटेशन) दाखविले आहेत.

इ त र कि र को ळ—या सदराखालीं निरनिराळ्या विषयांवरील लहान मोठे ग्रंथ येतील. उदाहरणार्थ, पुराणवस्तुसंशोधन, मुद्राविद्या, कला, रत्नपरीक्षा, चहा, दारू, खेळ, विनोद, सूपशास्त्र वगैरे चिनी वाङ्मयामध्यें अमुक विषयावर ग्रंथ नाहीं असें नाहीं.

स मु च्च य ग्रं थ—चिनी लोकांत निरनिराळ्या विषयांवरचीं उपयुक्त पुस्तकें एकत्र करून छापण्याचा प्रघात फार पुरातन कालापासून चालत आलेला आहे. यांपैकीं उदाहरणार्थ आपण लुंग वेइ पि शु हा ग्रंथ घेऊं. हा आकारानें अष्टपत्री ४०० पानांच्या ८ ग्रंथांएवढा होईल. यामध्यें पुढील विषयांचा समावेश केलेला आहे. वाक्प्रचार व म्हणी व त्यांवर टीपा आणि स्पष्टीकरण, भूवर्णन, दक्षिणदेशांतील वनस्पतिवर्णन, १२ लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें, सुंदरस्त्रीचीं लक्षणें व स्त्रीपरीक्षा व किरकोळ विषयांवर टिपणें:— यांत विश्वोत्पत्ति, लोकोत्तर चमत्कार, मंगोल राजवाडा, मिंगबादशहा, चिनांतलि रानटी जाती, ऐतिहासिक प्रसंग, पुराणवस्तु, जादू, अंधविश्वास वगैरे सर्व विषयांवर माहिती

आढळते. भाषेच्या शैलीकडे विशेष लक्ष्य पुरविण्यांत येतें व कांहीं ग्रंथांनां केवळ भाषाशैलीमुळेंच महत्त्व येतें.

याप्रमाणेंच चिनी लोकांमध्यें अशी चाल आहे कीं, प्रसिद्ध अगर अप्रसिद्ध कोणीहि ग्रंथकार मृत झाला असतां त्याच्या आप्तांनीं त्याच्या एकंदर लेखांची एक समुच्चयावृत्ति काढावयाची. या आवृत्तिमध्यें प्रथम लेखकानें बादशहास पाठविलेले अगर इतर सरकारी कागदपत्र ( त्यांचें महत्त्व तात्पुरतें असून नष्ट झालें असलें तरी हरकत नाहीं ), नंतर इतर ग्रंथांस लिहिलेल्या प्रस्तावना व चीनमध्यें एकाच ग्रंथांत निरनिराळया मित्रांकडून निरनिराळया प्रस्तावना लिहून घेण्याची चाल असल्यामुळें यांची संख्या बरीच असते. नंतर समकालीन व्यक्तींचीं व ग्रंथकारांचीं चरित्रें, नंतर ग्रंथकारानें केलेल्या प्रवासाचें वर्णन, त्यानें पाहिलेल्या स्थलांचें व इतर गोष्टींचें वर्णन येतें, नंतर त्यानें लिहिलेले निरनिराळया विषयांवरचे निबंध, व इतर किरकोळ अभिनंदनार्थ, सहानुभूतिपर संदेश वगैरे किरकोळ गोष्टी देतात. यांवरील गोष्टींनीच बहुतेक १०—१२ ग्रंथसंख्या होते. बाकीच्या २० किंवा ३० जसे असतील तितक्या ग्रंथांत ग्रंथकाराची स्वतःची कविता अगर इतर महत्त्वाचें लेखन दिलेलें असतें.

का दं ब ऱ्या—कादंबऱ्या या वाङ्मयाचा भाग समजल्या जात नाहींत तथापि कांहीं कादंबऱ्या त्यांच्या भाषाशैलीमुळें वाचण्यालायक समजल्या जातात. परंतु एकंदर चिनी वाङ्मयामध्यें जें औचित्य दिसून येतें त्याचा मात्र कादंबऱ्यांमध्यें अभाव दिसतो. चिनी कादंबऱ्यांमध्यें साधारणतः मध्यम स्थितींतील आयुष्यक्रमापासून तों समाजाच्या अगदीं नीचावस्थेपर्यंतचीं चित्रें आढळून येतात. सान कुओचि या ऐतिहासिक कादंबरीमध्यें २ ऱ्या शतकाच्या अखेरीच्या काळाचें वर्णन असून त्यांतील कांहीं ऐतिहासिक प्रसंगांचें चित्र फार बहारीचें उठलें आहे याचा कर्ता १३ व्या शतकांतील असून त्याच सुमारास चिनी वाङ्मयामध्यें कादंबऱ्यांचा प्रवेश झाला होता यानंतर कादंबऱ्यांची वाढ अव्याहतपणें चालू होती व ही वाढ १७व्या शतकामध्यें अगदीं शिखरास पोंचून या शतकाची बरोबरी आतां होईल असें दिसत नाहीं. हुंग लौमेंग ही कादंबरी बरीच उच्च दर्जाची असून तिच्या लेखकास कांहीं राजकीय कारणामुळें आपलें नांव अज्ञात ठेवावें लागलें. याचें संविधानक स्वकपोलकल्पित असून बरेंच गुंतागुंतीचें आहे. मुख्य विषय प्रेम असून त्यांत महत्त्वाकांक्षा, श्रीमंती, दारिद्र्य व इतर निरनिराळे मनोविकार व आयुष्यांतील स्थिति व प्रसंग यांचें वर्णन येऊन निरनिराळीं ४०० स्त्री—पुरुषांचीं स्वभावचित्रें दिलीं आहेत. तथापि पुसुंगलिंग यानें १६७९ त लिहिलेल्या लिओ चै या गोष्टींच्या संग्रहाइतकी लोकप्रिय कोणतीच कादंबरी झाली नाहीं या गोष्टींवरून परकीय वाचकांनां चिनी आयुष्यक्रमाचें व परंपरागत कथांचें चांगलें ज्ञान होतें; व चिनी वाचकांस या ग्रंथाची भाषाशैली पाहून मोह पडतो.

ना ट्यः—चिनी वाङ्मयामध्यें नाटकांचा प्रवेश कादंबऱ्यांबरोबरच झाला. त्यापूर्वी कांहीं पद्धतशीर रीतीनें तालसुरावर व गाण्याबरोबर बसविलेले कांहीं नाच असत व हे बहुतेक मोठमोठ्या समारंभकाळीं होत असत. मंगोल सत्तेपूर्वी (इ. स. १२६०–१३६८) नाटक असें चिनी लोकांत प्रचारांत आढळत नाहीं. मंगोल लोकांनीच बहुधा कादंबऱ्या व नाटकें हीं आपल्याबरोबर मध्यआशियामधून चिनांत आणलीं असावीं. परंतु हींच नाटकें सध्यां चिनी लोकांचीं अवश्यक करमणुकीचीं साधनें होऊन बसलीं आहेत. चिनी लोकां इतकी नाटकास जाण्याची चटक इतर कोणत्याहि लोकांमध्यें आढळणार नाहीं. मंगोल कालांतील १०० नाटकांचा एक समुच्चयग्रंथ इ. स. १६१५ मध्यें प्रसिद्ध झाला. दुसरा एक असाच समुच्चय ग्रंथ इ. स. १८४५ मध्यें प्रकाशित झाला. मंगोल कालांतील हिआंगचि अथवा पश्चिम महाल हें नाटक फारच लोकप्रिय असून त्याचें कथानक व त्यांतील रसपरिपोष फार मनोवेधक आहेत. या नाटकग्रंथामध्यें जी भाषा वापरली आहे ती सभ्य आहे. परंतु नट हे वाटेल तसे अचकट विचकट हावभाव करतात व वाटेल तीं वाक्यें बोलतात. चिनी लोकांस लांब कथानकाचें एकच नाटक आवडत नाहीं तर एका मागून एक फार्सवजा निरनिराळया ऐतिहासिक अगर इतर प्रसंगांवरील चुटके त्यांस फार आवडतात.

को शः—खि. पू. १२ व्या शतकामध्यें लिहिलेला एऱ्हया हा ग्रंथ कोशासारखाच समजला जातो. यामध्यें सर्व विषय मुख्य १९ सदरांखालीं देऊन बहुतेक शब्द व वाक्प्रचार यांचा संग्रह केला आहे. हुशेन यानें सर्व लिखाणांतील चिनी शब्द एकत्र करून ते सुमारें ५०० सदरांमध्यें संगतवार लावून शुवेन हा ग्रंथ लिहिला. यामध्यें १०००० शब्दांचा संग्रह असून हा कोश जुन्या ग्रंथांचे काल व कर्तृसत्यत्व सिद्ध करण्यास फार उपयोगी आहे. या कोशांत नसलेले बरेच शब्द ज्या ग्रंथामध्यें असतील तो या कालानंतरचा असें समजण्यास बिलकुल हरकत नाहीं. यावरूनच तौ ते चिंग हा ग्रंथ बनावट असावा हें सिद्ध होतें. चिनी लोकांनीं कोशरचनेमध्यें फार परिश्रम केलेले दिसतात. त्यामुळें चिनी वाङ्मयामध्यें कोशांचा भरणा पुष्कळ आहे. यामध्यें कांगहि या बादशहानें स्वतःच्या देखरेखीखालीं तयार करविलेला व ' कांग हि ' याच नांवाचा कोश फार प्रसिद्ध आहे. यामध्यें ४४००० शब्दसंग्रह आहेत.

चिनी वाङ्मयाची अनादि काळापासून झालेली अवाढव्य वाढ लक्षांत घेतली असतां त्यांतील प्राचीन ग्रंथांतील उल्लेख व संदर्भ एकदम ध्यानांत येणें फार कठिण होत जाणें साहजिकच आहे. त्यामुळें विद्वज्जनांची ही उणीव भरून काढण्याकरितां पुष्कळ अनुक्रमणी व विल्हेवार सूची प्रसिद्ध झाल्या

आहेत. या बाबतींतहि कांग हि बादशहानें पेइ वेन युन फू 'वाङ्मयदीपिका' नांवाचा एक प्रचंड ग्रंथ निर्माण केला आहे यामध्यें विविध संदर्भ, वाक्प्रचार, म्हणी वगैरे सर्वांचा समावेश केलेला आहे व प्रत्येक ठिकाणीं मूळ ग्रंथांतील उतारे दिलेले आहेत यामध्यें सुमारें १॥ कोट शब्द आहेत.

ज्ञा न को श.—सर्व विषयांवरील ज्ञान सारांश रूपानें एकत्र करण्याच्या इच्छेनें काम करीत असतां चिनी लोकांनींच प्रथम ज्ञानकोशाची कल्पना काढली 'तै पिंग युलान' हा ग्रंथ या शाखेपैकीं जरी सर्वांत जुना नसला तरी सर्वांत महत्त्वाचा आहे. हा इ. स. १० व्या शतकाच्या अखेरीस बादशहानें आपल्या खास देखरेखीखालीं व स्वतः सर्व तपासून प्रसिद्ध केला. यांत १०००प्रकरणें असून तो रोज तीन प्रकरणें तपाशीत असे. याच सुमारास 'तै पिंग कुआंग चि' या नांवाचा याच धर्तीवरचा एक ग्रंथ प्रसिद्ध झाला. या दोन्ही ग्रंथांच्या पुष्कळ आवृत्त्या निघाल्या आहेत. मिंग घराण्यांतील ३ ऱ्या बादशहानें युंग लो ( इ. स. १४०३–१४२५ ) ( १ ) कन्फ्यूशिअन धर्मशास्त्र, ( २ ) इतिहास, ( ३ ) तत्त्वज्ञान व ( ४ ) इतर वाङ्मय, यांमध्यें ज्योतिष, भूवर्णन, सृष्टिशास्त्र, वैद्यक, भविष्यज्ञान, बौद्धधर्म, तौधर्म, कला वगैरे सर्व विषयांचा समावेश करून, या चार विषयांवरील सर्व तत्कालपर्यंतचें वाङ्मय एकत्र करण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें इ. स. १४०८ मध्यें एक प्रचंड ज्ञानकोश बादशहापुढें ठेवण्यांत आला. याचें नांव 'युंग लो ता तिएन' असें असून तो लिहिण्यास सुमारें २२०० माणसें ५ वर्षे काम करीत होतीं. यांमध्यें २२८७७ प्रकरणें असून ६० प्रकरणें विषयसूचीचीं आहेत. एकंदर पृष्ठसंख्या अजमासें ९१७४८० आहे. हा ग्रंथ एवढा मोठा होता कीं त्याला छापावयास लागणाऱ्या भयंकर खर्चास भिऊन तो छापावयाचा तसाच ठेऊन दिला. याच्या पुढें दोन नकला केल्या.पैकीं एक पेकिंग येथें होती व दुसरी मुळाबरोबरच नांकिंग येथें होती. नांकिंग येथील दोन्ही प्रतींचा मिंग घराण्याबरोबर नाश झाला व पेकिंग येथील प्रतीचीहि १९०० सालच्या वेढ्यामध्यें तीच स्थिती झाली. परंतु यांतील कांहीं भाग शिल्लक राहिले आहेत. 'तु शु चि चेंग' नांवाचा दुसरा एक ज्ञानकोश 'कांग हि' बादशहानें आरंभिलेला त्याचा पुत्र युंग चंग याच्या कारकीर्दींत पुरा झाला. याच्या १०० प्रती छापून काढल्या होत्या. याची अष्टपत्री आवृत्ति इ. स. १८८९ मध्यें शांघाय येथें निघाली होती. याचे प्रत्येकी २०० पृष्ठांचे १६२८ भाग आहेत. याची एक प्रत ब्रिटिश म्युझिअममध्यें असून त्याच्या विषयसूचीचें इंग्रजींत भाषांतर झालें आहे.

ह स्त लि खि तें व छा प खा ने.—वरील लेख वाचतांना एक प्रश्न उभा रहातो कीं, एवढें प्रचंड वाङ्मय परंपरेनें कसें चालत आलें? प्रथमतः कांहीं पुराणवस्तुसंशोधकांची अशी समजूत होती कीं चिनी लोक बांबूच्या पातळ कांबीटावर चाकूनें कोरून लिहित असत. ही भ्रमक समजूत पुष्कळ काळ पर्यंत चालत आली होती परंतु अलीकडील शोधांतीं असें निश्चित झालें आहे कीं चिनी लोक प्रथमतः ग्रंथलेखन करूं लागले ते पातळ कांबटीवर अगर लांकडाच्या फळ्यांवर बांबूच्या लेखणीनें रंगाच्या आकृती काढित, व चाकूचा उपयोग चुकीचीं अक्षरें खोडून टाकण्याकरितां करीत. पुढें ख्रि. पू. २०० वर्षांच्या सुमारास बांबूच्या लेखणीच्या ऐवजी कुंचलें'चा उपयोग करूं लागले व कांबीटाची व फळकटाची जागा रेशमी कपड्यानें घेतली. पुढें रेशमाचा उपयोग करणें जरा नाजुक व खर्चाचें वाटल्यामुळें कागदाचा शोध लागला. हा शोध प्रथम इ. स. १०५ मध्यें 'त्सैलुन' नावाच्या एका खोजानें लावला व या कालापासून कुंचलें; शाई व कागद हींच चिनी लोकाचीं लेखनसाहित्यें आहेत.

इ. स. १७० मध्यें तैयुंग यानें 'पांच सर्वमान्य ग्रंथ' दगडावर तांबड्या शाईनें लिहून ते खोदून काढविले. याचे ४६ मोठमोठे दगड झाले, त्यांपैकीं कांहीं अद्याप अस्तित्वांत आहेत. तअंग घराण्याच्या कारकीर्दींत प्रसिद्ध शिलालेखांवरील आकृति त्यांतील लेखनपद्धतीच्या दृष्टीनें अगर इतर कांहीं महत्त्वामुळें विद्वज्जनांच्या संग्रहीं आढळूं लागल्या. याच सुमारास लांकडांवर खोदलेल्या लेखांवरून कागदावर अनेक प्रतां काढण्याचा प्रचार सुरू झाला. प्रथमतः फक्त चित्रें व प्रार्थना वगैरेंच्याच नकला अशा प्रकारानें काढीत. या कलेचा उपयोग ग्रंथ छापण्याकडे असा इ. स. ९३२ त कन्फ्यूशिअसचें धर्मशास्त्र छापण्याकडे प्रथम करण्यात आला. इ. स. ९८१ मध्ये 'तैपिंग कुआगचि' हा ज्ञानकोश प्रथम छापला. पिशेंग (किमयागार १०४३) यानें भाजलेल्या मातीचे खिळे ( टाइप ) शोधून काढले. मिंग घराण्याच्या कारकीर्दींत हे प्रथम लांकडाचे तयार होऊं लागले, व पुढें तांबें व शिसें उपयोगात आणूं लागले. तथापि बहुतेक चिनी मोठमोठे ग्रंथ ठोकळ्यांवरच छापलेले आहेत. सध्यां चालू असलेलीं चिनी वर्तमानपत्रें खिळ्यां( टाइपा )वर छापलेलीं असून व साधारण दर्जाच्या छापखान्यांत ६००० ते ७००० प्रकारचीं अक्षरें असतात.

[संदर्भ ग्रंथः—रो चॅन्स ॲन्ड चेंज इन चायना (१९२०) रॉश–इंटलेक्चुअल ॲन्ड पोलिटिकल करंट्स इनदि फार ईस्ट (१९१२)एलिझाबेथ केंडल–ए वे फेअरर इन चायना(१९१३) जोन्स्टन– बुद्धिस्टिक चायना ( १९१३ )लिमोंग व टॅओ—व्हिलेज ॲंड टॉऊन लाइफ इन चायना; टिमॉथी रिचर्ड–फॉर्टी फाइव इयर्स इन चायना ( १९१६ ). ई. एच. वुइल्सन–ए नॅचरॉलिस्ट इन वेस्टर्न चायना ( १९११ ); फ्रेड्रिक कोल्समन—दि फार ईस्ट अनव्हेल्ड (१९१८); ब्लँड रीसेंट इव्हेंट्स, ॲन्ड प्रेझेंट पॉलीसीज इन चायना,(१९१२); चायना, जपान ॲंड कोरिया ( १९२१ ); पुटनॅमवील—दि फाइट फॉर दि रिपब्लिक इन चायना (१९१८); एच. एम. व्हिनके—मॉडर्न कॉन्स्टियूशनल डेव्हलपमेंट इन चायना ( १९२० ); दि चायनीज ईयर बुक ( १९१९ ); मॉर्स—

ट्रेड अँड अँडमिन्स्ट्रेशन ऑफ चायना ( १९२१ ) कॉलिन्स मिनरल एंटरप्राइज इन चायना ( १९११ ); मिल्टन स्मिथ- ब्रिटिश इन चायना अँड फार ईस्टर्न ट्रेड. ].

**चीनी**—हें पंजाबांतील बशहर संस्थानच्या कनावार- नामक विभागाचें मुख्य ठिकाण असून सतलज नदीच्या उजव्या तीरापासून सुमारें एक मैल अंतरावर वसलें आहे. हें नदीसपाटीपासून ९५०० फूट उंचीवर आहे. याच्या आसपास द्राक्षाचे मळे आहेत लॉर्ड डलहौसीला हें ठिकाण फार आवडत असे येथें मोरेव्हियन मिशनचें एक ठाणें असून तहसिलीची एक सुंदर इमारत आहे.

**चीपुरुपल्ले**—मद्रास इलाख्याच्या विजयापट्टम् जिल्ह्या- च्या अगदीं उत्तरेकडील समुद्र किनाऱ्यालगतची एक तह- सिल असून इचें क्षेत्रफळ ५३५ चौ. मै. आहे. १९२१ सालीं इची लोकसंख्या १८५७३२ होती या तहसिलींत २६८ खेड्यांचा समावेश होतो. १९२१-२२ सालीं हिच्या साऱ्याचें उत्पन्न पाऊण लाख रु. होतें. या तहसिलींतील प्रदेश सपाट असून त्याच्या बऱ्याच भागांत झाडी आहे.

**चीर**.—या झाडास लाटिनमध्यें पिनस लॅंगिकोलिआ, इंग्रजींत पाईन, मराठींत चीर, हिंदींत सापिन, नष्नर, रानझुरु, गुलाथान्सा व या झाडातील राळेस गंडाबिरोझा, चिर-का गोंद, कोतो वगैरें नांवें आहेत. हा मोठा वृक्ष आहे हा हिमाल- याच्या बाह्य रांगा व शिवालिक पहाडांत आढळतो पश्चिमेस अफगाणिस्थान व पूर्वेस भूतानपर्यंत असलेल्या हिमालयांतील मुख्य नद्यांच्या १॥ ते ७॥ हजार फूट उंचीच्या खोऱ्यांत हीं झाडें होतात.

रा ळ.—या जातीच्या झाडापासून राळ तयार करतात. झाडांना खाचे पाडून राळ करण्याची पद्धत पश्चिमेस पंजाब- पासून पूर्वेस कुमाऊनपर्यंत प्रचारांत आहे. डेहराडून येथील जंगलखात्याच्या सरकारी कारखान्यांत टरपेन्टाईन तयार होतें. १९१९ सालीं संयुक्तप्रांत व पंजाब या दोन्ही प्रांतांत एकंदर १२५८३३ मण किंवा ४००० टन राळ तयार झाली. झाडांवर खाचा पाडण्याच्या दोन म्हणजे देशी व यूरोपियन अशा दोन पद्धती आहेत.

सांप्रत हिंदुस्थानांत राळ व टर्पेन्टाईन फक्त सरकार करितें. या मालाचा पुरवठा पंजाब, संयुक्तप्रांत, डेहराडून येथील जंगलखात्याच्या मुख्याकडून होतो. काळया राळेचा उपयोग साबण तयार करण्याकडे फार होतो. टर्पेन्टाईनला रेलवेच्या कारखान्यांत व इतर धंद्यांत फार मागणी असते. हिंदी राळ इतर राळेपेक्षां मऊ असते. उर्ध्वपातन क्रियेच्या वेळीं राळेला जास्त उष्णता दिल्यास हा मृदुपणाचा दोष नाहींसा होतो.

व्या पा र.—हिंदुस्थानांत १९०६-०७ सालीं८८२०६० रुपये किंमतीची ९६४८६ हंड्रेडवेट राळ आली. पुरवठा मुख्यत्वें युनायटेड किंगडममधून झाला. त्याच्या खालो- खाल अमेरिका व जर्मनी यांनीं राळ पुरविली. त्याच सालीं १८१५ रु. किंमतीची ६० हंड्रेडवेट राळेची निर्गत झाली.

**चीराल**.—मद्रास इलाख्याच्या गंतूर जिल्ह्याच्या बापतला तालुक्यांतील एक गांव. १९११ सालीं याची लोकसंख्या १८६१८ होती. येथील कापड विणण्याचा धंदा चांगला उर्जितावस्थेस आला आहे.

**चुआडांगा**.—बंगालप्रांताच्या नडिया जिल्ह्यांतील नडिया विभागाचें मुख्य ठिकाण असून मातामंग नदीच्या डाव्या तिरावर वसलें आहे. १९०१ सालीं याची लोकसंख्या ३१४७ होती. येथें ईस्टर्न बंगाल स्टेट रेलवेचें स्टेशन आहे. याची व्यापाराकरितां प्रसिद्धी आहे.

**चुका**.—( सं. चुक्रिका, गुज. चुका, कांगेरी ) चुक्याचें झाड वीत दीडवीत उंच वाढतें. देशावर व गुजराथेंत या भाजीचें बरेंच पीक होतें. यास पांढरें फुल येतें. ही भाजी बारामास होते. चुका अग्निदीपक, उष्ण, रुचिकर, पित्तल, सारक असून शूल, गुल्म, अग्निमांद्य, आमवात वगैरें रोगांवर परिणामकरी असतो. धोत्र्याच्या विषावर याचा उतारा देतात.

**चुकाचि**—आर्टिक महासागर व बेरिंग समुद्र यांच्या किनाऱ्यावरील सैबेरियाच्या अगदीं पूर्वेकडील प्रदे- शांत रहाणाऱ्या मंगोल महावंशाचे लोक. कोलिमा नदी व बेरिंगची सामुद्रधुनी यांच्यामधील आर्टिक महासागराच्या किनाऱ्यावर हे लोक लहान लहान जमाव करून राहिले आहेत. ते उंच व सडणतळ असून त्याचे चेहरे ओबडधोबड आहेत. या जातींत एस्किमो लोक मिसळलेले आहेत. चुकुचि लोकांचें डोकें गोल व गालाचीं हाडें वर आलेलीं असून गाल इतके वर आलेले असतात कीं दोन गालांवर रूळ ठेवला असतां तो नाकाला लागत नाहीं. ते अमुर नदीच्या कांठच्या प्रदेशांतून आले असावे असें म्हणतात. मानवशास्त्रदृष्ट्या ही जात म्हणजे मंगोल व अमेरिकेंतील इंडियन महावंश यांनां जोडणारा सांखळीचा दुवा म्हणतां येईल.

चुकुचि लोक शांत व सुस्वभावी आहेत, परंतु यांच्यांत म्हातारे व पंगू यांनां ठार मारण्याची चाल आहे. पुनर्जन्मा- वर त्यांचा विश्वास आहे परंतु आकस्मिक मरणामुळेंच तो प्राप्त होतो असा त्यांचा समज आहे. व याकरितांच आई- बापांनां ठार मारणें हें मातृपितृ प्रेमाचें चिन्ह मानलें जातें. चुकुचि लोक नांवाला मात्र ख्रिस्ती संप्रदायाचे आहेत परंतु बळि देण्याची चाल त्या लोकांत आहे. ते प्रेतांचें दहन कर- तात अथवा तीं गिधाडांकडून खावावितात.

**चुटिया**—आसामांतील एक जात. लोकसंख्या (१९११) ८८८२५ आहे. अहोम लोकांपूर्वी वरच्या ब्रह्मपुत्रा नदीच्या थडीवरील सत्ताधारी राष्ट्रजातीचे हे लोक वंशज आहेत. सोळाव्या शतकाच्या आरंभीं अहोम लोकांनीं या राष्ट्रजातीचा पराभव केला. ह्या लोकांचे अलिकडे हिंदु, अहोम व बौद्ध चुटिया असे निरनिराळे भाग पडले आहेत.

**चुडा**—एक भंगी जात. यांची एकंदर संख्या ( १९११ १२६९२५० असून पैकीं १०३५१०३ तुसत्या पंजाबांतच

आहे. चुडांत हिंदु ( ७९५०१० ), मुसुलमान (४२२६६०), व शीख (५१५७९ ) असे तीन धर्मपंथ आहेत. आतां बरेच खिस्ती झाले आहेत. यांचा धर्म निश्चित असा कांहीं नाहीं. तरी तो खिस्ती संप्रदायाला जवळ आहे असें इबर्टसन पंजाब सेन्सस रिपोर्टांत मत देतो. कोणी ते मूळचे रानटी जातींचे आहेत असें म्हणतात. परंतु हिंदु जातींतून भ्रष्ट होऊन त्यांच्यांत येऊन मिळालेल्यांची संख्या बरीच असल्यामुळें हल्लीं त्यांच्यांत हे आर्य रक्ताचे व हे अनार्य रक्ताचे हें दाखविणें शक्य नाहीं. ते भंग्याचा धंदा करितात; म्हणून हिंदु समाजांत त्यांचा दर्जा कनिष्ठ आहे. आजकाल ते शेतकीचा धंदाहि करूं लागले आहेत. ईश्वर एक आहे असें चुडा लोक मानितात. त्यांच्यांत एका श्रेष्ठ आचार्याची उपासना करण्यांत येते. या आचार्याला बाला शहा, लालबेग, वाल्मिक वगैरे नांवें आहेत. यांच्यांत देवळें नसून एक घुमटाच्या आकाराचा मातीचा ढीग करितात व त्यांत पंत्या लावण्याकरितां कोनाडे ठेवितात. मृतांनां पुरण्यांत येतें. गुजराथी बायकांप्रमाणें चुडा बायका शोकप्रदर्शनार्थ छाती व कपाळ बडविण्याचा मोठा करुणाजनक देखावा करितात. सध्यां चुडा लोक भराभर खिस्ती कळपांत जात आहेत. तेव्हां कांहीं दिवसांनीं यांचा धर्मसंप्रदाय म्हणजे एक गतकालीन गोष्ट होऊन बसणार आहे. [ से रि. ( पंजाब ) १९११; इं. अँ. १९०७ ].

**चुडा संस्थान**.—मुंबई इलाख्याच्या काटेवाड प्रदेशांतील एक संस्थान असून याचें क्षेत्रफळ ७८ चौ. मै. आहे. १९०१ सालीं याची लोकसंख्या १२००५ होती. यांत एक गांव व १३ खेडीं यांचा समावेश होतो. १९०३-४ सालीं साऱ्याचें उत्पन्न १.२ लाख होतें. हें तिसऱ्या दर्जाचें संस्थान असून वढवाण संस्थानाची एक शाखा आहे. १८०७ मध्यें इंग्रजांचा या संस्थानाशीं संबंध जडला. येथील राजास ठाकूर म्हणतात.

**गांव**.—मुंबई इलाख्याच्या काठेवाड प्रदेशांतील त्याच नांवाच्या संस्थानाचें मुख्य ठिकाण आहे. येथील लोकसंख्या १९११ सालीं ५८६० होती. हें भावनगर वढवाण नांवाच्या आगगाडीच्या फांटयावरील एक स्टेशन आहे.

**चुडेश्वर**—मुंबई इलाख्याच्या रेवाकाठा प्रदेशांतील एक लहानसें संस्थान.

**चुना**—जरी चुना, अगदीं शुद्ध स्थितींत सांपडत नसला तरी कार्बनमय लवणाच्या कर्बितरूपांत तो पृथ्वीच्या पृष्ठभागावर पुष्कळ सांपडतो. कर्बित क्षारांतून कर्बाम्ल काढून टाकून, चुनकळी तयार करण्याच्या रीतीला ' चुना भाजणें ' अशी संज्ञा आहे. हा भाजलेला चुना सत्वर पाणी शोषून घेऊन, उमललेल्या अथवा विरविलेल्या चुन्याचें ऊर्फ फक्कीचें रूप धारण करतो.

**चुन्याचा दगडः**—याला हिंदुस्थानांत अनेक नांवांनीं ओळखतात. परंतु सर्व साधारण नांव म्हटलें म्हणजे चुना हें होय. हा शब्द हिंदुस्थानी भाषांत अनेक रूपें धारण करितो; उ. चुन्हा, चुना, चुनो, चुनक, इ. संस्कृतांत सामान्यपणें याला चूर्ण असें म्हणतात. परंतु कित्येक लेखक चूर्णसुधा शक्तिभस्म अशींहि नांवें देतात. ज्याला इंग्रजींत 'चॉक' म्हणतात, तो पदार्थ ' खडीमाती ' या नांवानें ओळखला जातो. ' क्विकलाईम ' याला चुना असें म्हणतात आणि ' लाईम स्टोन ' याला ' चुनखडी ' असें संबोधितात. 'शेल-लाईम'ला 'शिंपीचा चुना', 'लाईमस्टोन-लाईमला' ' कतलका चुना ' व ' मारबल'ला संगमरवरी दगड अशीं निरनिराळीं नांवें आहेत.

**चुन्याचीं मूलद्रव्यें**.—ज्यापासून चुना उत्पन्न होतो अशा द्रव्यांचे अथवा खडकांचे हिंदुस्थानांत तीन वर्ग आहेत. ते खालीलप्रमाणेंः— (अ) चुनखडी, डोलोमाईट, मिलिओलाईट वगैरे; ( आ ) चुना, कंकर व ( इ ) चुना, शिंप आणि प्रवाळ.

चुनखडीः—चुनखडीच्या दगडांत बहुतेक खटकर्बितच असतें. हें खनिजाम्लांत घातले असतां कर्बद्विप्राणिद वायू निघतो. सिरकाम्ल व खदाम्ल यांशीं संयोग पावून तोच वायू निघतो. कित्येक वेळां यांत इतर धातूंच्या कर्बितांचें मिश्रण असतें यामुळें याचा रंग पांढरा असतांहि कधीं कधीं हा निळसर व काळवट रंगाचा सांपडतो. अगदीं शुद्ध स्थितींत असला तरी याचे दगड अगदीं गुळगुळीत व सपाट असतात. बारीक किड्यांच्या हाडांचे सांपळे एकावर एक बसून त्यांचेच चुनखडीचे दगड होतात असें दिसतें. कारण सूक्ष्मदर्शक यंत्रांतून हे सांपळे स्पष्ट दिसतात. पोंवळीं करणाऱ्या किड्यांचे सापळेहि कधीं कधीं यांत दिसतात.

हिंदुस्थानांत असें एकहि क्षेत्र नाहीं कीं, ज्यांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत चुनखडी सांपडणार नाहीं. हिंदुस्थानांत सांपडणारे कित्येक जातींचे सुंदर पाषाण उत्तमोत्तम संगमरवरी पाषाणांच्या तोडीचे आहेत. मुंबई आणि सिंधमधील कित्येक भागांतील चुन्याचे दगड हे संगमरवरी दगड नसले तरी त्यांची उत्तम इमारती दगडांत गणना होते. दक्षिण हिंदुस्थानांत त्रिचनापल्ली व कोईमतुर येथें स्फटिकमय 'चुन्याचे दगड' आढळतात पण ते फारच हलक्या प्रतीचे आहेत. उत्तम चुनखडी कडापा, कर्नुल, आणि गन्तुर येथें सांपडतात. पालनाड येथें संगमरवरी दगड आढळतात. मध्यप्रांतांत वर्धा, नागपूर, विंध्याद्रि पर्वत इत्यादि ठिकाणीं पुष्कळ चुन्याचे पाषाण व सुन्दर इमारती दगड आहेत. संयुक्तप्रांतांत मिरझापुर येथें स्फटिकमय पाषाण सांपडतात. पंजाबमधील पुष्कळशा भागांत उत्तम पाषाण व संगमरवरी दगड देखील सांपडतात.

चुनखडी व चुना यांच्या उत्पत्तिस्थानांसंबंधीं व्यापारीदृष्टया खालीलप्रमाणें वर्गवारी करतां येईलः—

(१) सतना, रेवा संस्थात आणि कटनी, जबलपुर जिल्हा. या दोन्ही भागांतून उत्तम प्रकारचा चुना कलकत्त्यापर्यंत जातो.

(२) सिलहट—खाशिया आणि जैंतिया टेंकड्यांच्या पायथ्याशीं नवप्रस्तर युगांतलि चुन्याच्या दगडांचा अखंड पुरवठा आहे. पूर्वी कलकत्ता व दक्षिण बंगालची सर्व मागणी या पुरवठ्यांतून पुरी होत असे व अजूनहि येथील बराचसा भाग वरील ठिकाणीं जातो.

( ३ ) रोहटसगड येथील चुनखडीचा शोण कालव्याच्या कामांत पुष्कळ उपयोग करण्यांत आलेला होता. 'सिंगभूम' मधील बिद्रा येथील चुनखडीपासून उत्तम चुना करण्यांत येतो.

(४) हिमालय—हिमालय पर्वताच्या पायथ्याशीं चुनखडीचे मोठाले ढीग रचण्यांत येऊन प्रतिवर्षी भाजण्यांत येतात, आणि अशा रीतीनें उमलविलेल्या चुन्याची उंटाच्या पाठीवरून निर्गत करण्यांत येते.

(५) अंदमान-पोर्ट ब्लेअरच्या नजीक फिकट पिंवळ्या रंगाच्या संगमरवरी दगडांचा एक मोठा संचय आहे. या दगडांपासूनहि चुना चांगल्या प्रकारचा निघतो.

या स्थळांशिवाय इतर स्थळांची यादी पाहिजे असल्यास 'मॅन्युअल ऑफ दी जीआलजी ऑफ इंडिया' या पुस्तकांत सांपडेल.

कंकरः—उत्तर हिंदुस्थानांतील चुन्याचें मुख्य घटकद्रव्य म्हणजे कंकर होय. या पदार्थापासून उत्तम प्रकारचें सीमेंट निघतें. कित्येक वेळां या पदार्थाचे लहान लहान ग्रंथींच्या एकत्रपणानें बनलेले ठोकळे जमिनीच्या आत कांहीं अन्तरावर सांपडतात. इमारती कामांकरितां या ठोकळ्यांचा उपयोग करतात. सडका तयार करण्यांत या कंकराचा बराच उपयोग करण्यांत येतो. लोखंड गाळण्याकरितां, संमिश्रकद्रव्य म्हणून कंकराचा उपयोग करून पाहण्याचे बरेच प्रयत्न झाले; परंतु त्यांनां फारसें यश आलें नाहीं. हिंदुस्थानांतलि अनेक भागांत अत्यंत चूर्णमय अशा भूपृष्ठापासून विपुल चुना तयार करण्यांत येतो. या चुन्यांत जर योग्य प्रमाणांत रेती मिसळली तर उत्तम प्रकारचा इमारती चुना तयार होतो.

चुना, शिंप आणि प्रवाळः—चुना करण्याकरितां हिंदुस्थानांत शिंपा भाजतात. हिंदुस्थानांतील किनाऱ्यालगतच्या प्रदेशांत आणि ब्रह्मदेशांत असंख्य शिंपांचे संचय आणि प्रवाळखडक दृष्टोत्पत्तीस येतात. दक्षिण हिंदुस्थानांतील 'पोर्टलंड सीमेंट' कारखान्याचा धंदा हा वरील साधनसामुग्रीच्याच जोरावर अस्तित्वांत आलेला आहे. 'चुनखडी' आणि 'कंकर' यांतील चुन्याचें प्रमाण अनिश्चित असतें, तसें शिंपांतील चुन्याचें असत नाहीं. त्यांत साधारणतः बराच सारखेपणा असतो. चुनखडीमध्यें स्फटकर्बितांचें (क्यालशम कारबोनेटचें) प्रमाण ५५.३ आढळतें, तेंच शिंपेच्या चुन्याच्या नमुन्यांत ९६.९ आढळतें.

चुना, चुनखडी व संगमरवरी दगड यांचे औद्योगिक उपयोग.—सर्व प्रकारच्या झाडांच्या क्षारांत चुना असतोच; आणि म्हणून खत या दृष्टीनें त्याचें महत्व फार आहे. विशेषतः सेंद्रिय पदार्थानें समृद्ध असलेल्या जमीनीस तर या खताची अत्यंत जरूरी असते. या खताच्या योगें प्राणिज आणि उद्भिज द्रव्यांचें विघटन होण्यास फार मदत होते. चुन्याचा, हरिदाच्या रूपांत पूर्वी दूषित हवा शुद्ध करण्याकडे फार उपयोग करीत. विरंजन द्रव्य [रंग घालविणारें (ब्लीचींग)] म्हणून चुन्याच्या हरिदाचा अजूनहि बराच उपयोग करतात. चीट छापणारे, नीळ तयार करणारे लोकहि याचा बराच उपयोग करून घेतात. क्यालशम कारबोनेट स्फटकर्बिताचा तेल्या रंगाप्रमाणें, दरवाजे रंगविण्याकडे उपयोग करतात. हिंदुस्थानांतील लोक विड्यांत त्याचप्रमाणें औषधांत चुन्याचा उपयोग फार करतात.

चुन्याच्या गारा व सिमिंट.—चुन्याचा अत्यंत महत्वाचा उपयोग म्हटला म्हणजे त्यापासून इमारतीकरितां कमावलेला चुना अथवा सिमिट तयार होतें हा होय. हें सिमिट चुना, रेती व पाणी यांच्या मिश्रणानें बनतें. सिमिटांतून सूर्याच्या उष्णतेनें पाणी निघून जाऊं नये म्हणून प्रथम दगडांवर किंवा विटांवर पाणी शिंपडून नंतर सिमिट लावतात म्हणजे तें कायमचें चिकटून बसतें.

तिसऱ्या आणि आठव्या शतकाच्या दरम्यान वाळूच्या पोटांत गडप झालेल्या इमारतींचे अवशेष स्टीन यानें शोधून काढले आहेत. या इमारतींच्या भिंतींवर 'स्टुको' नामक चुन्याच्या गिलाव्याचा उपयोग केलेला आढळतो. या द्रव्याचें स्टीन यानें सविस्तर वर्णन दिलेलें आहे. यावरून पूर्वतुर्कस्थानात चुन्याच्या अनेक उपयोगांपैकीं सिमिटाचा उपयोग प्रचारांत येण्याच्या अगोदरच स्टुको तयार करण्याची कला माहित होती असें दिसतें. सिमिटचा इमारती बांधण्याच्या कामीं जो उपयोग करतात, तो दक्षिणेंतील चालुक्य राजांच्या अमदानींतलि देवळांच्या मागून प्रचारांत आला असावा असें दिसतें, कारण या देवळांचे त्याचप्रमाणें इतर अत्यन्त प्राचीन इमारतींचे दगड कशा ल्याहि प्रकारच्या सिमिटाशिवाय अजून आपली जागा धरून बसलेले आहेत.

साधारणतः सिमिटाचें खालीलप्रमाणें वर्गीकरण करण्यांत येतें.:—( १ ) चूर्णमय ( २ ) जिलेटिनस चिकट ( ३ ) राळमिश्रित ( ४ ) मिश्रद्रव्यांचें बनलेलें, पण ज्यांत राळ नसतें असें. जें सिमिट पाण्याच्या तळाशीं जाऊन बसतें त्याला 'हैड्रॉलिक' अथवा 'पोर्टलंड' सिमिट अशी संज्ञा आहे. निसर्गतःच ज्यांत शेंकडा १० ते २५ आल्युमिना, मॅग्नेशिआ आणि सिलिका हे पदार्थ आहेत, अशा कित्येक चुनखडींतून हें सिमिट काढतां येतें. अथवा २० ते ३५ हिस्से नदीची माती व शेंकडा ३ ते ४ 'लोहप्राणिद' यांच्यांत ६५ ते ८० हिस्से खडू अथवा इतर शुद्ध चुना मिळविला असतां हें सिमिट कृत्रिमरीतीनें तयार करतां येतें. मद्रास इलाख्यांत आजमितीस मुख्यतः 'पोर्टलंड'

सिमिंटच तयार करतात. परंतु या सिमिंटाचा असा एक विशेष आहे की त्यांत रेती मिसळली असतां त्याची ' संधानशक्ति ' थोडी कमी होते. गिलाव्यासारखा जर या सिमिंटचा उपयोग करावयाचा असेल तर त्यांत मिश्रण करावयाच्या रेतींत बिलकुल चिकटपणा असतां कामा नये. पोर्टलंड सिमिंटांत शुद्ध मॅग्नेशिआचें प्रमाण जर शेंकडा ४ पेक्षां जास्त असेल तर पाण्यांत ठेवलें असतां त्याचें विघटन फार लवकर होतें. दक्षिणहिंदुस्थानांत सालेमनजीक मॅग्नेशिआ व मॅग्नेशीअम असलेल्या चुनखडीच्या दगडांचा बराच मोठा संचय आहे.

स न ला (चुनाम).--हें सिमिंट तयार करण्याच्या पुष्कळ तऱ्हा आहेत. पण साधारण तऱ्हा म्हटली म्हणजे चुन्यांत एखादा साखरेचे गुण असलेला ( साखर, गुळ, काकवी इ. ) पदार्थ मिळविणें ही होय. या कामाकरितां सामान्यतः ताडाच्या किंवा नारळाच्या झाडापासून मिळणाऱ्या गुळाचा उपयोग करतात. उत्कृष्ट प्रकारची सफेती तयार करावयाची असल्यास चुन्यांत थोडें नारळाचें दूध देखील घालतात. हिंदुस्थानांतील कित्येक भागांत, उदाहरणार्थ बिकानेर वगैरे ठिकाणीं सिमिंट केलेल्या भिंतींवरून वेलबुटी वगैरेंचीं नक्षीदार कामें केलेलीं दृष्टीस पडततात.

सिमिंटाचीं साधनें.—चुना अथवा चुन्याचा क्षार यांचें ग्लुटिनस आणि राळमिश्रित पदार्थांशीं मिश्रण करून सिमिंट तयार करतात. शुद्ध चुन्याबरोबर थोड्या प्रमाणांत भाताची पेज मिळविली असतां चांगलें टिकाऊ सिमिंट तयार होतें. गायनकलेंतील वाद्यांचे निरनिराळे भाग जुळविण्याकरितां लुकणाप्रमाणें या सिमिंटचा उपयोग करतात. उत्तम मळलेली कणीक पाण्यांत तिंबवावी व तींत थोडासा शुद्ध चुना मिळवावा म्हणजे जें सिमिंट तयार होतें त्याला ' सुजी ' असें म्हणतात. हें सिमिंट आर्द्रता-प्रतिबंधक असल्यामुळें सर्व प्रकारच्या लांकडीकामाकरितां त्याचा उपयोग करतात.

सं ग म र व री द ग ड.—उत्तम अशा प्रकारचे संगमरवरी दगड जोधपूर, टोंका ( किशनगर ), खारवार ( अजमीर ), रायालो ( जयपूर ) आणि जबलपूर (मध्यप्रांत), इत्यादि ठिकाणीं सांपडतात. मक्रानच्या आसपास या दगडांच्या जवळ जवळ १०० खाणी आहेत, पण त्यांतून १५ खाणींतच सध्यां काम सुरू आहे. साधारणतः जितक्या खोलींतून दगड वर काढला असेल तितका तो उत्तम असतो. मक्रान येथील खाणींतून दगड काढतांना, जे दगडाचे तुकडे व चुरा उरतो तो भाजून चुना तयार करण्यांत येतो. भिंतीवर उत्तम रंग देण्याकरितां हाच चुना जास्त पसंत करतात.

संगमरवरी दगडांचे रंग व त्यांचे उपयोगः—रायालो येथील पांढरा संगमरवरी दगड जाळ्या किंवा पडदे तयार करण्याकडे लावतात. जैसलमीर येथें शुद्ध पिंवळ्या रंगाचे बरेच दगड सांपडतात. बैन्स्लाना येथें सांपडणाऱ्या काळ्या दगडांचे पुतळे किंवा मुलांचीं खेळणीं तयार करतात. बडोदें संस्थानांतील मोतीपूर येथील हिरव्या दगडांचे, आणि किशनगड संस्थानांतील, नारवार येथील गुलाबी दगडांचे अनेक प्रकारचे शोभेचे जिन्नस तयार करतात. ताजमहाल आणि इतर इमारतींतील संगमरवरी दगड आज ३०० वर्षें झालीं तरी अगदीं नवीनप्रमाणें आहेत. याचें कारण या दगडाची रासायनिक शुद्धता व त्यांतील कणांचा खरखरीतपणा हें होय, अशी सामान्य समजूत आहे.

संगमरवरी दगडांच्या उपयोगाचें आग्रा गॅझेटीअरमध्यें चांगलें वर्णन केलें आहे. ' ऐनी अकबरी ' मध्यें दगडावर खोदीव कामें करणाऱ्या हिंदी कारागिरांचा निर्देश आढळतो. जहांगिर व शहाजहान यांच्या अमदानींत या कलेची हिंदुस्थानांत फारच सुधारणा झालेली होती. आग्रा, दिल्ली, वगैरे ठिकाणचें संगमरवरी दगडाचें, आश्चर्योत्पादक व थक्क करून सोडणारें सुंदर जाळीकाम पाहिलें म्हणजे त्यावेळीं हिंदी शिल्पकला किती उच्च दर्जास पोहोंचली होती याची थोडीबहुत कल्पना येते. फत्तेपूर शिक्री येथील जाळीकामाचें यथार्थ व सुंदर असें वर्णन कांहीं ग्रंथकारांनीं केलेलें आहे. संगमरवरी दगडांचे पडदे, मेजें, शोभेच्या पेट्या, चित्रांच्या चौकटी वगैरे तऱ्हेतऱ्हेच्या वस्तू करण्याचा धंदा आग्रा येथें बऱ्याच विस्तृत प्रमाणांत चालतो. इ. स. १६२७-१६५८ च्या दरम्यान ही कला पूर्णतेच्या अगदीं शिखरास पोहोंचली होती. त्यानंतर तिला उतरती कळा लागून १९ व्या शतकाच्या सुरवातीस ती लयास गेली. सुमारें ५० वर्षांनंतर डॉ. जे. मरे यानीं या कलेचा पुनरुद्धार केला असें सांगतात, आणि तेव्हांपासून या कलेची फिरून भरभराट होत आहे.

जिप्सम, प्लॅस्टर ऑफ पारीस, (चुन्याचें गंधकित).—या आर्द्र स्फट गंधकिताला साधारणतः जिपसम या नांवानें ओळखतात. ज्यावेळीं हें दाणेदार अशा स्थितींत असतें त्यावेळीं त्याला ' अलाबास्टर ' असें म्हणतात, व ज्यावेळीं पारदर्शी अशा स्फटिक मण्यांच्या स्वरूपांत असतें त्यावेळीं त्याला ' सेलीनाईट ' अशी संज्ञा असते. भाजून भस्म केलें असतां, यांतील कांहीं पाणी निघून जातें व याचें प्लॅस्टर ऑफ पारिसमध्यें रूपान्तर होतें. चुन्याच्या-गंधकिताला हिंदुस्थानांत अनेकविध नांवांनीं ओळखतात, उ. 'कुलनर', ' कर्पुर-शिलाजीत ', कार्सी, मकोल इत्यादि. प्लॅस्टर ऑफ पारीस याचें सामान्य नांव ' गाच ' असें आहे.

वस्तुक्षेत्रः—मद्रास इलाख्यांत हें अशुद्ध स्थितींत पुष्कळ सांपडतें. चिंगल येथें जिपसम व सेलेनाईटचे स्फटिक पुष्कळ सांपडतात. मुंबई, काठेवाड, आणि दक्षिणप्रांतामधील कांहीं भागांत सेलेनाईट बरेंच दृष्टीस पडतें. कच्छमध्यें

उत्कृष्ट प्रकारचें जिप्सम सांपडतें. सिंध आणि बलुचिस्तानमध्यें, याचे विपुल थर सांपडतात. त्याचप्रमाणें राजपुताना, पंजाब, संयुक्तप्रांत व ब्रम्हदेश इत्यादि ठिकाणीं जिप्समचा संचय आहे. मिठाच्या डोंगरांत तर या पदार्थाचा नुस्ता सुकाळ आहे.

औद्योगिक व शेतकीविषयक उपयोगः—अत्यंत उत्तम प्रतीचें खत अशी जिप्समची पुष्कळ वर्षांपासून ख्याती आहे. या खताच्या योगें, निळीचें पीक फार वाढतें असें मुकतेंच अनुभवास आलें आहे. 'सुपरफॉस्टेट' या खतांत जिप्सम बऱ्याच प्रमाणांत असतें. हें खत म्हणजे स्फट गन्धकित व चुन्याचें स्फुरित 'सुधास्फुरिताम्ल' यांचें मिश्रण होय.

हिंदुस्थानांतील लोकांनां 'प्लॅस्टर ऑफ पारीस' या पदार्थाच्या अनेक उपयोगांपैकीं कांहीं उपयोगांचें ज्ञान कित्येक शतकांपासून आहे. तथापि त्या पदार्थाच्या प्रतिमा ओतणें, किंवा दागिने आणि खेळणीं वगैरे करणें ही माहिती आधुनिक काळांतीलच आहे. आतां खोतानमधील 'स्टुकोचें' सारें काम प्लॅस्टर ऑफ पारीसचें होतें असें ज्या अर्थी स्टीन म्हणतो, त्या अर्थी खोतानमधील प्राचीन लोकांनां ही कला स्वयंस्फूर्तीनें आली असावी, किंवा ती ते हिंदुस्थानीय लोकांपासून तरी शिकले असावेत, असा अजमास वाटतो. दागिने किंवा मुलांचीं खेळणीं वगैरे तयार करण्याकडे अलाबास्टरचा उपयोग करतात. गढवाल येथें सांपडणाऱ्या कृष्ण-हरित अलाबास्टर दगडांचे सुंदर पेले तयार करतात.

व्या पा र.—हिंदुस्थानांत चुना व संगमरवरी दगड यांचें इतकें वैपुल्य असतांहि परदेशांतून दरवर्षी बरीच मोठी आयात होतांना पाहून आश्चर्य वाटतें. १९०२–७ या वर्षांच्या दरम्यान संगमरवरी दगड किंवा असेच दुसरे दगड यांची आयात २०४२०५ ते ३६२५५४ हंड्रेडवेट ( ३॥। ते ४॥ लाख रुपये किंमतीची ) झाली. चुना आणि खडू यांची दरवर्षी सुमारें ३०००० ते ५०००० हं. ( ३०००० ते ३६००० रुपये किंमतीची ) आयात होत असते; व ती सर्व संयुक्त राज्यामधून येत असते. हिंदुस्थानांतून झालेली निर्गत ५३००० हं. ( १ लक्ष रुपयांच्या ) वर कधींच गेलेली नाहीं. सिमिंटाच्या निर्यातीआयातीच्या संबंधांत मात्र इतकी निराशाजनक स्थिति नाहीं. १९०२–१९०६ या वर्षांच्या दरम्यान एकंदर निर्यात ६४६३६६ हं. ते १७८८४२८ हंड्रेडवेट किंवा १३। ते ३२ लक्ष रुपये इतक्या किंमतीची झाली. १९०६–७ मधील सिमिंटाची आयात१७१४५०६ हं. किंवा ३०८७४८४ रुपयांची होती. सिमिंटाच्या आयातीपैकीं पाऊण हिस्सा संयुक्तराज्यामधून व बाकीचा बेलज्यम, फ्रान्स व जर्मनीमधून येतो. [ वॅट ]

**चुनार**, त ह सि ल.-संयुक्त प्रांताच्या मिर्झापूर जिल्ह्यांतलि एक तहासिल. हिचें क्षेत्रफळ ५६२चौ. मै. आहे. १९११ सालीं हिची लोकसंख्या १७६०४२ होती. अहरौरा व चुनार ही दोन शहरें व ५८१ खेडीं आहेत. १९०३–४ सालीं साऱ्याचें व इतर उत्पन्न अनुक्रमें २८७००० व ४५००० रु. होतें. लोकसंख्येचें प्रमाण दर मैलास सुमारें ३१४ आहे. हींतून गंगा व तिला मिळणारी जिर्गो या नद्या वहातात. या तहसिलीच्या पश्चिमेस विंध्याद्री पर्वत व तुरळक टेंकड्या असून पूर्वभागांत मैदान आहे. १९०३–४ सालीं हिची २४२ चौरस मैल जमीन नांगरली होती व त्यांपैकीं ३६ चौरस मैल जमीनीस विहिरी, तळीं यांतून पाणी पुरविण्यांत आलें.

श ह र.—हें तहसिलीचें मुख्य ठिकाण असून गंगेच्या तीरावर वसलें आहे. येथें ईस्ट इंडियन रेल्वेचें स्टेशन आहे. १९११ सालीं यान्ची लोकसंख्या १००९१ होती. येथील किल्ला फार जुना आहे. विक्रमादित्याचा भाऊ भर्तृनाथ ( भर्तृहरि ) याचा येथें मठ होता असें म्हणतात. पहिल्या मुसुलमानी रियासतींत येथील किल्ला पृथ्वीराजाच्या स्वाधीन होता. पुढें त्याच्या मरणानंतर तो मुसुलमानांच्या ताब्यांत गेला. यानंतर एक दोन वेळ धरसोड झाल्यावर पुन्हां हा किल्ला इंग्रजांनीं काबीज करीपर्यंत मुसुलमानांच्याच ताब्यांत होता. कांहीं कालपर्यंत या किल्ल्याचा ताबा शीरशहास मिळाला होता; पुढें १५३७ त हुमायूनानें हा काबीज केला. पण शीरशहानें तो पुन्हां त्याच्यापासून हिसकावून घेतला. मोंगल व पठाण यांच्या झटापटीच्या वेळीं बंगाल व बहार प्रांतांचें नाकें म्हणून या किल्ल्यास बरेंच महत्त्व होतें. १५७५ त हा अकबर बादशहानें काबीज केल्यावर १८ व्या शतकापर्यंत तो मोंगलांच्याच ताब्यांत होता व या नंतर तो अयोध्येच्या नबाबानें हस्तगत केला. १७६४ च्या बक्सारच्या लढाईनंतर हा इंग्रजांच्या हातीं आला. १७८१ त राजा चेतसिंगानें बंड केलें तेव्हां वॉरन हेस्टिंग्ज यानें याच किल्ल्याचा आश्रय घेतला होता. येथें हेस्टिंग्जनें बांधलेलें एक घर आहे.

येथील किल्ला विंध्याद्री पर्वताच्या रांगेतील एका बाहेरच्या बाजूस असलेल्या खडकाळ टेंकडीवर बांधला असून त्याच्या पायथ्याशीं गंगा नदी वाहते. याची लांबी ८०० यार्ड असून रुंदी १३३पासून३००यार्ड आहे; व उंची८०ते१७५ फूट आहे. याच्या भिंतींचा घेर २४०० यार्ड आहे. गांव किल्ल्याच्या उत्तरेस गंगा व जिर्गो यांच्या संगमानें झालेल्या कोनांत वसलें आहे. गांवाच्या जवळच शहा कासीम नांवाच्या फकीराचें थडगें आहे. येथें थोडासा व्यापार चालतो व मातीचीं हलक्या प्रतीचीं भांडीं होतात. येथें चार शाळा आहेत.

**चुनियन**, त ह सी ल.—पंजाब प्रांताच्या लाहोर जिल्ह्याच्या नैर्ऋत्येकडील एक तहासिल असून हिचें क्षेत्रफळ ११७२ चौ. मैल आहे. या तहसीलींत २ कालवे आहेत. १९११सालीं हिची लोकसंख्या२८१०२५ होती. हींत चुनियन व खुदियन हीं शहरें असून ४८० खेडीं आहेत. १९०३–४ सालीं हिचा सारा व इतर उत्पन्न ३२५००० रु. होतें.

श ह र.—हें पंजाब प्रांताच्या लाहोर जिल्ह्यांतील त्याच नांवाच्या तहशिलीचें मुख्य ठिकाण असून बियास नदीच्या जुन्या पात्राच्या जागेलगत वसलें आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ७१५१ होती. येथें १८६७ सालीं म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. येथें थोडासा व्यापार चालतो व कापसाच्या ८ गिरण्या आहेत. याशिवाय एक दवाखाना व दुय्यम प्रतीची शाळा आहे.

**चुंबकजन्य विद्युद्यंत्र** ( किंवा डायनामो )—वरील यंत्रामुळें १९ व्या शतकांत यांत्रिक सुधारणेंत फार उपयुक्त आणि महत्त्वाच्या अशा घडामोडी झाल्या आहेत. या यंत्राच्या योगानें उपलब्ध असेल त्या जागीं शक्तीचा उपयोग करून तिचें विजेंत रूपांतर करून तिला दूर अंतरावर पाठवितां येते, आणि त्याच विजेचें फिरून एकवार गतींत रूपांतर करून त्या गतीचा कारखाने चालविण्याकडे उपयोग करतां येतो. किंवा एका ठिकाणीं सर्व शक्ति उत्पन्न करून तिची अनेक ठिकाणीं पाहिजे त्या प्रमाणांत वांटणी करतां येते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे लोकवस्ती आणि व्यापाराचें केंद्र यांपासून दूर अंतरावर असलेल्या धबधबे इत्यादिक नैसर्गिक शक्तींचा उत्तम उपयोग करून घेतां येतो. रेशमानें गुंडाळलेली तार घेऊन त्या तारेचें वेटोळें केलें व त्यांत जर एकदम लोहचुंबक घातला तर त्या वेटोळ्यांत वीज उत्पन्न झालेली दिसून येईल. या विजेचा प्रवाह विद्युन्मापकांत (ग्यालव्हानो मिटर) सोडला तर हा प्रवाह क्षणिक असून जोपर्यंत लोहचुंबक हालत नाहीं तोपर्यंत तो बंद रहातो. परंतु जर वेटोळ्यांतून चुंबक बाहेर काढला तर फिरून एक वार विद्युत्प्रवाह उत्पन्न होतो. परंतु हा प्रवाह पूर्वीच्या प्रवाहाच्या उलट दिशेनें वहातो. चुंबक आणि विद्युत् यांच्यामधील यासंबंधाचा शोध १८३१ सालीं प्रसिद्ध शास्त्रज्ञ फाराडे यानें लावला. आणि तेव्हांपासून या विषयांत प्रगतीच होत आहे. या तत्त्वास अनुसरून अनेकांनीं विद्युज्जनक यंत्रें तयार केलीं आहेत. त्यांपैकीं एका यंत्राची माहिती पुढें दिली आहे:—धावडी लोखंडाच्या तुकड्याभोंवतीं रेशमानें गुंडाळलेल्या तारेचे वेढे दिलेले असतात. ह्या लोखंडाचीं अग्रें लोहचुंबकाच्या जवळून जातील अशी योजना केलेली असते. त्यामुळें उलट सुलट असे प्रवाह वाहूं लागतात. हा प्रवाह दोन अर्ध कंकणें उलटसुलट आंसास जोडलीं आणि त्याला लागून दोन फांद्यांच्या टोंकांवरून घेतला तर येणारा प्रवाह एकाच दिशेनें सतत येतो; कारण ज्या वेळेस प्रवाहाची दिशा बदलते तेव्हां एका कंकणाच्या तुकड्याचा स्पर्श बंद होतो व दुसरीकडे दुसऱ्या बाजूच्या फांद्यावर तो प्रवाह जातो; म्हणजे प्रवाहाची दिशा कायम रहाते.

आतांपर्यंत उपयोगांत आणलेल्या चुंबकजन्य विद्युद्यंत्रांत वापरलेला चुंबक साधा पोलादाचा असे. त्याऐवजीं एखाद्या विद्युद्घटमालेच्या ( ब्याटरीच्या ) प्रवाहाच्या योगानें उत्पन्न झालेला चुंबक वापरतात. त्याकरितां साध्या लोखंडावर रेशमानें गुंडाळलेल्या तारेचीं वेटोळीं देऊन विद्युत्प्रवाहानें चुंबकत्व उत्पन्न करितात. या चुंबकाचा उपयोग केला तर जास्त फायदा होतो; कारण विद्युत्प्रवाहानें उत्पन्न केलेलें चुंबकत्व फार जोरदार असतें व त्यामुळें जोरदार चुंबक रेषा असलेल्या क्षेत्रांतून जर तारेचीं वेटोळीं फिरविलीं तर जोराचा प्रवाह उत्पन्न होतो. परंतु अलीकडे चुंबकत्व उत्पन्न करण्याकडे विद्युद्घटमालेचा उपयोग न करितां त्याऐवजीं चुंबकविद्युद्यंत्रानें (डायनामोनें) उत्पन्न झालेल्या विद्युत्प्रवाहाच्या योगानेंच चुंबकत्व उत्पन्न करण्याची पद्धति प्रचारांत आहे. या पद्धतीमध्यें घटमालेच्या प्रवाहानें उत्पन्न होणाऱ्या चुंबकाच्या शक्तीपेक्षां यंत्र-जन्य-प्रवाहानें उत्पन्न होणारी चुंबकशक्ति जास्त जोरदार असते; व त्यामुळें असल्या प्रकारच्या यांत्रिक रचनेपासून जास्त जोरदार प्रवाह उत्पन्न होतो व प्रवाहाच्या जोराच्या प्रमाणांत फायदा होतो.

कोळशापासून वाफ उत्पन्न करून तिच्या योगानें गति उत्पन्न केली तर उष्णतेच्या गतींत रूपांतर होत असतांना बऱ्याच शक्तीचें रूपान्तर न होतांच दुसरीकडे ती व्यर्थ निघून जाते. चुंबकविद्युयंत्राचा ( डायनामोचा ) उपयोग करून गतीचें विद्युत्प्रवाहांत रूपान्तर केलें तर गति व्यर्थ न जातां ती प्रवाहांत रूपांतर पावते, त्यामुळें अशा यंत्रापासून व्यवहारांत फार फायदा होतो. तसेंच विद्युत्प्रवाह फार दूर अंतरावर नेतां येतो व त्यामुळें व्यापाराच्या केंद्रापासून दूर अंतरावर असलेल्या धबधबे आदिकरून नैसर्गिक साधनांचा उपयोग करतां येतो.

दोन प्रकारचे प्रवाह पाठविणारे डायनामो आहेत. एका प्रकारच्या डायनामोमधून क्षणोक्षणीं उलट सुलट असे प्रवाह येतात आणि दुसऱ्या प्रकारच्या डायनामोमधून एकाच दिशेनें सतत प्रवाह येतो.

उ प यो ग.—विजेनें मुलामा चढवितां येतो. त्याकरितां विद्युच्चालक शक्तीचा दाब ५। ७ व्होल्टपेक्षां जास्त असतां कामा नये. मुलामा चढविण्याचीं ५।५० भांडीं एका रांगेनें जोडलीं असतां यापेक्षां कांहींसा जास्त असा विद्युच्चालक शक्तीचा दाब असला तरी चालतो. विजेनें ट्रॅम, आगगाड्या, गिरण्या, वात्या, दळण्याच्या चक्क्या वगैरे चालवितात. याकरितां एका दिशेनें वहाणाऱ्या प्रवाहाचा उपयोग करितात. या शिवाय धातु वितळविणें आणि दिवे लावणें या कामाकडे याचा उपयोग होऊं शकतो. परंतु या कामाकडे उलट सुलट येणाऱ्या प्रवाहाचा जास्त फायदेशीर रीतीनें उपयोग करतां येतो. उलट सुलट येणाऱ्या प्रवाहांत एक विशेष गुण आहे कीं, असल्या प्रकारच्या प्रवाहाची विद्युच्चालक शक्ति अतिशय सुलभ रीतीनें कमी जास्त करितां येते व ह्या कामांत शक्तीचा अत्यल्प प्रमाणांत व्यय होतो. एकाच दिशेनें येणाऱ्या प्रवाहांत इतकी सुलभता असत नाहीं, म्हणून दिवे लावणें आणि रासायनिक क्रियेकरितां उष्णता उत्पन्न

करणें या दोन्हीहि कामांकडे उलट सुलट येणाऱ्या प्रवाहाचा उपयोग बहुधा करितात.

**चुंबकत्व.**—कांहीं जातींचे दगड लोखंडास आकर्षितात. त्यांची रासायनिक घटना लो$_3$ प्र$_४$ या रासायनिक संकेतानें दर्शवितां येते. हे दगड लोखंडाच्या किसांत बुडविले तर त्यांच्या विशिष्ट दोन टोंकांस कीस चिकटतो परंतु मध्यंतरींची जागा त्या किसास आकर्षण करूं शकत नाहीं. त्या दोन टोंकांस ध्रुव अशी संज्ञा आहे. पंधराव्या शतकाच्या अखेरीच्या सुमारास चुंबकाचे फक्त दोनच गुणधर्म यूरोपियनांच्या ध्यानांत आले होते. त्यांपैकीं एकाच्या आधारें त्यांनीं होकायंत्र तयार केलें. यूरोपियन लोकांस पंधराव्या शतकापूर्वी होकायंत्र माहीत नव्हतें. परंतु चिनी लोकांस हेंच होकायंत्र इ. स. पूर्वी ११०० च्या सुमारास माहीत होतें असें तज्ज्ञांचें मत आहे.

एखाद्या चुंबकाच्या सांनिध्यानें साध्या लोखंडाच्या अंगीं चुंबकत्व येतें. हा शोध पहिल्या शतकांतील ग्रीक आणि रोमन ग्रंथकारांस माहित होता. दूर अंतरावरून अगर सांनिध्यानें जें चुंबकत्व उत्पन्न होतें त्यास “प्रवर्तनीय चुंबकत्व” असें नांव देतात.

प्रवर्तनानें चुंबकत्व उत्पन्न करण्यास धावडी लोखंड ( साधे लोखंड; सॉफ्ट आयर्न ) न घेतां पोलाद घेतल्यास उत्पन्न झालेलें चुंबकत्व फार दीर्घ कालपर्यंत रहातें, परंतु धावडी लोखंडांत उत्पन्न झालेलें चुंबकत्व असें टिकाऊ नसतें. त्यामुळें कृत्रिम लोहचुंबक करण्यास पोलाद घेतात. सन १८२० सालापर्यंत पाषाणचुंबकापासूनच कृत्रिम चुंबकत्व करीत असत. परंतु त्यानंतर विद्युत्प्रवाहाचा उपयोग करून कृत्रिमचुंबक तयार करूं लागले. पृथ्वीवर सांपडणारे पाषाणचुंबक विद्युत्प्रवाहानेंच झाले आहेत असा तज्ज्ञांचा शोध आहे. पाषाणचुंबकापासून कृत्रिम चुंबक न बनवितां विद्युत्प्रवाहाच्या योगानें कृत्रिमचुंबक तयार करणें म्हणजे मूल साधनांनाच उपयोग करण्यासारखें आहे. एखाद्या तारेंतून विद्युत्प्रवाह पाठविला असतां त्या तारेसभोंवार चुंबकरेषा उत्पन्न होतात; म्हणून सर्पिल तारेंतून विद्युत्प्रवाह पाठविला असतां त्या वर्तुल परंपरेच्या अंतर्भागीं जोरदार चुंबक-क्षेत्र उत्पन्न होतें. म्हणून सर्पिल प्रवाहाचा उपयोग कृत्रिमचुंबक तयार करण्याकडे करितात. नैसर्गिक उर्फ पाषाणचुंबकाचा व्यवहारांत फारसा उपयोग होत नाहीं. एक चमत्कारिक वस्तु म्हणून पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यालायक तो पदार्थ आहे अशी त्याविषयीं सध्यां कल्पना आहे.

होकायंत्राची रचना पुढें दिल्याप्रमाणें असते. एक पोलादी तार घेऊन तिच्या अंगीं चुंबकत्व आणतात. तिचा उत्तर ध्रुव ओळखतां यावा म्हणून तो चिन्हांकित करतात. ही पोलादि तार समतोल राहील अशा बेतानें एका पोलादी अगर दुसऱ्या कोणत्या तरी धातूच्या अग्रावर ठेवितात. असें केलें म्हणजे उत्तर-ध्रुव उत्तर दिशेकडेच सारखा वळलेला रहातो. या तारेच्या पातळींतून आणि खस्वस्तिकांतून जाईल असें एक बृहद्वर्तुल काढलें असतें तर त्या वर्तुलास चुंबक-याम्योत्तर अशी संज्ञा आहे.

चुंबकाच्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवाच्या आकर्षणाचे नियम ऋण आणि धन विद्युतच्या नियमांसारखेच आहेत. उदा॰ दक्षिण ध्रुव उत्तर ध्रुवास आकर्षितो व उत्तर ध्रुव दक्षिण ध्रुवास आकर्षितो. समान ध्रुव एकमेकांचें प्रतिसारण करितात व विषमधुव एकमेकांस आकर्षितात.

दोन ध्रुवांमधील आकर्षण अथवा प्रतिसारण अंतराच्या वर्गाच्या व्युत्क्रम प्रमाणांत असतें. पहिल्या नियमाची सत्यता पहाणें सोपें आहे. परंतु दुसऱ्या नियमाची सत्यता पाहणें तितकें सोपें नाहीं. कारण त्याकरितां नुसताच उत्तर किंवा दक्षिण ध्रुव घेऊन यावर प्रयोग केला पाहिजे; परंतु चुंबकाच्या बाबतींत उत्तर ध्रुवाव्यतिरिक्त दक्षिण ध्रुव किंवा दक्षिण ध्रुवाव्यतिरिक्त उत्तर ध्रुव घेणें शक्य नाहीं. व दोन दोन ध्रुव एकत्र आले तर एकाचें आकर्षण आणि दुसऱ्याचें प्रतिसारण होऊं लागतें; त्यामुळें प्रयोग पायाशुद्ध होत नाहीं. याकरितां सी. ए. कोलंब यानें बारीक आणि लांब असे चुंबक घेऊन त्यायोगानें आकर्षण आणि प्रतिसारण पाहून या वरील नियमाची सत्यता आजमावून पाहिली.

चुंबकत्वाचा तिसरा महत्त्वाचा नियम पुढें दिला आहे. इतर गोष्टी तशीच राहतील तर दोन ध्रुवांतील आकर्षण आणि प्रतिसारण ध्रुवशक्तीच्या गुणाकाराच्या प्रमाणांत असतें.

**चुंबकरेषा:**—एखादी पोलादी कांब घेऊन तिच्या ठिकाणीं चुंबकत्व उत्पन्न करावें. नंतर ती कांब पृष्ठभागावर ठेऊन तिच्यावर एक जाड कागद ठेवावा. नंतर एका चाळणींतून त्या कागदावर लोखंडाचा कीस टाकावा व कीस पडत असतांना तो कागद किंचित् हलवीत असावें अगर बोटानें त्या कागदावर हळूंच टिक् टिक् करावें, म्हणजे त्या कागदावर किसाच्या उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुव यांस जोडणाऱ्या वक्र रेषा उठलेल्या दिसतात त्यांस चुंबक-क्षेत्रांतल्या रेषा किंवा चुंबकरेषा अशी संज्ञा आहे. ( या रेषांची नीट कल्पना येण्याकरितां विद्युत्‌रेषांवरील माहिती पहावी. ) ज्या ठिकाणीं त्या रेषांची गर्दी झालेली असते त्या ठिकाणीं चुंबकक्षेत्र बलवत्तर आहे असें समजावें. ह्या चुंबक-रेषा शोधून काढण्याची दुसरी एक रीति आहे ती अशीः—एक बारिकशी सुई घेऊन ती होकायंत्राप्रमाणें टांगावी. नंतर ती सुई चुंबकक्षेत्रांत कोणती तरी एक रेषा करून स्थिर राहील. ती रेषा कागदावर युक्तीनें नमूद करून ठेवावी. नंतर त्या सुईचें एक टोंक अगदीं लगतच्या भागांत त्या रेषेच्या एका टोंकास लाऊन ठेवावें. सुईची ही स्थिति कागदावर नमूद करून ठेवावी; व पुढें असाच

क्रम चालू ठेवावा. याप्रमाणें रेषा काढल्यास त्या रेषा चुंबकक्षेत्र व त्यांतील चुंबक रेषा या दोहोंसहि दाखवितील. वरील प्रकारची सुई घेऊन ती एका चुंबक-क्षेत्रांत टांगल्यास ती क्षितिजाशीं समान्तर रीतीनें हलेल व अशी गति तिला दिली असतां ती सुई लंबकाप्रमाणें हलूं लागेल; मात्र लंबक उभा हालतो व ही सुई आडवी हलेल एवढाच लंबक आणि ही सुई यांच्यांत फरक आहे. असो लंबकाप्रमाणें या सुइच्या हेलकाव्याचा काल सारखाच असेल. चुंबकक्षेत्राच्या बलाच्या वर्गाच्या व्युत्क्रम प्रमाणांत हेलकाव्याच्या या कालांत फरक पडला पाहिजे असें सिद्ध झालें आहे. अर्थात् यावरून दोन चुंबकक्षेत्रांची तुलना करितां येते.

चुंबकाचा कल.—वरील प्रकारची एक साधी सुई घ्यावी; परंतु तिच्या अंगीं चुंबकत्व आणण्यापूर्वी तिचा गुरुत्व-मध्य काढून ठेवावा: नंतर तिच्या अंगीं चुंबकत्व उत्पन्न करून ती सुई गुरुत्वमध्यबिंदूंत तोलून धरावी असें केलें असतां ती सुई क्षितिजाशीं समान्तर न राहतां एक विशिष्ट कोन करते. हा कोन भूगोलावरील निरनिराळ्या प्रदेशांत भिन्न भिन्न असतो. या कोनास 'कल' ( इंक्लिनेशन ) अशी संज्ञा आहे.

चुंबकाचा बांक—वरील प्रकारची सुई टांगली असतां ती एका उभ्या पातळींत स्थिर रहाते. भूगोलाचें याम्योत्तर वृत्त आणि चुंबकज उर्ध्वपातळी यांत जो कोन होतो त्यास बांक ( डेक्लिनेशन ) अशी संज्ञा आहे. व ज्या उर्ध्वपातळींत चुंबकाची सुई रहाते तिला चुंबकज याम्योत्तर वृत्त अशी संज्ञा आहे. हा बांक पश्चिमेस अगर पूर्वेस असूं शकतो व निरनिराळ्या शहरीं या बांकाच्या कोनाचा अंश निरनिराळा असतो. एकाच स्थलीं भिन्नभिन्नकालीं भिन्न असूं शकतो. उदाहरणार्थ लंडन शहराचा बांक १८१६ सालीं २४ अंश ३० कलांइतका होता तो कमी कमी होत १९०० सालीं १६ अंश १६ कलाइतका झाला. याच शहराचा कल १८३० सालीं ६९ अंश ३ कला इतका होता तो कमी कमी होत १९०० सालीं ६७ अंश ९ कलांइतका झाला.

अनेक ध्रुवांचा चुंबक.—आतांपर्यंत आपण अशी कल्पना केली कीं, कोणत्याहि लोखंडाच्या अगर पोलादाच्या तुकड्यावर फक्त दोनच ध्रुव असूं शकतात. परंतु विशेष कृतीनें त्यावर दोहोंपेक्षां जास्त ध्रुव उत्पन्न करितां येतात. एखादी पोलादी कांब घेऊन तिच्या मध्यभागापासून दोन्ही शेवटांपर्यंत एखाद्या बलवत्तर चुंबकाचा दक्षिण ध्रुव ओढल्यास असें आढळून येईल कीं त्या कांबीच्या दोन्हीं टोंकांस उत्तरध्रुव उत्पन्न झाला असून त्या कांबीच्या मध्यभागीं दक्षिण ध्रुव उत्पन्न झाला आहे. याच पद्धतीनें मध्यभागीं दोन-तीन-चार किंवा अनेक ध्रुव असून टोंकांस समान ध्रुव असलेला चुंबक तयार करितां येतो.

अध्रुवात्मक चुंबक.—याशिवाय ध्रुव नसून अंगीं चुंबकत्व असलेल्या जिनसा तयार करितां येतात. त्या करितां एखादी पोलादी कडी ( आंगठी ) घेऊन तिच्या सर्भोवार रेशीम गुंडाळलेली तार गुंडाळून तारेंतून विद्युत्प्रवाह सोडल्यास ती कडी चुंबकत्व धारण करिते; परंतु तिला ध्रुव असत नाहींत. त्यामुळें असल्या कडीच्या योगानें लोखंडी कीस आकर्षिला जात नाहीं. परंतु असली कडी तोडून सरळ केली तर तिचे ध्रुव दृष्टोत्पत्तीस येतात व ते ध्रुव लोखंडी कीस आकर्षितात. परंतु हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, नुसता एकच ध्रुव असलेला असा चुंबक तयार करितां येणें शक्य नाहीं. केव्हांहि कोणत्याहि चुंबकावर दोन किंवा जास्त ध्रुव असणारच.

अण्वात्मक चुंबकसिद्धान्तः—एखादी चुंबककांब घेऊन तिचे दोन तुकडे केले तर त्या तुकड्यांवर दोन ध्रुव उत्पन्न होतात; फिरून त्या तुकड्यांचे एकवार तुकडे केले तर त्यांवर ध्रुव दिसतात. याप्रमाणें शक्य तोंवर तुकडे केले तरी त्या लोहखंडावरील चुंबकत्व अगर ध्रुवत्व नष्ट होत नाहीं. चुंबकाच्या या गुणामुळें अण्वात्मक-चुंबक सिध्दान्त बसवितां आला आहे. त्या सिध्दान्ताचें सामान्य दिग्दर्शन येथें केलें आहे. व याविषयीं जास्त माहिती पुढें दिली आहे.

प्रत्येक चुंबकाच्या ठिकाणीं याप्रमाणें वाटेल तितके तुकडे केले असतां त्यांच्या ठिकाणीं चुंबकत्व असतेंच. या धर्मास अनुलक्षून शास्त्रवेत्त्यांनीं अशी कल्पना केली कीं व्यवहारांतील चुंबक, अण्वात्मक चुंबक एकत्रित होऊन बनलेले असावेत. साध्या धावडी लोखंडाचा तुकडा चुंबक- क्षेत्रांत ठेविला असतां त्यांतील लोहाचे अणु स्वतःच्या अंगासभोवार फिरत असावेत. व हे अणु स्वभावतःच अंगीं चुंबकत्व असलेले असे असावेत; व हे चुंबकत्वयुक्त अणु चुंबकक्षेत्रांत आल्यामुळें वर्तुलाकृति फिरून चुंबकरेषेशीं समान्तर होत असावेत. लहान सुया घेऊन त्यांचे चुंबक बनवून नंतर दक्षिण व उत्तर ध्रुव समान्तर येतील अशा रीतीनें त्या सुयांचा जुडगा केला तर एक बलवत्तर चुंबक तयार होतो; यावरून आपणांस असें म्हणावयास हरकत नाहीं कीं या सुयांप्रमाणेंच अण्वात्मक सूक्ष्मचुंबक वर्तुलाकृति फिरून एक मोठा चुंबक तयार करतात. परंतु जेव्हां लोखंड त्या चुंबक-क्षेत्रांतून काढून घेतलें जातें तेव्हां ते स्थितीस्थापकत्वामुळें पूर्वीची स्थिति धारण करतात; यामुळें तो लोखंडाचा तुकडा चुंबकत्वरहित होतो. आतां पोलादाच्या अणूंच्या अंगीं लोहकणांप्रमाणें स्थितिस्थापकता नसावी. त्यामुळें ते कण चुंबक-क्षेत्रांत आल्यावर वर्तुलाकृति फिरतात;परंतु याप्रमाणें स्थिति पालटल्यावर मूळची स्थिति प्राप्त करून घेण्यास ते असमर्थ होत असावेत; व त्यामुळें पोलादी तुकड्यांच्या अंगीं चुंबकत्व कायमचें येत असावें. प्रत्येक चुंबकाच्या उत्तर आणि दक्षिण ध्रुवाचें बल अगदीं समतोल असतें हें पुढील प्रयोगानें सिद्ध करितां येतें. एक लहानसा चुंबक घेऊन तो एका बुचांत खोंचावा व नंतर तो पाण्यांत टांगावा; म्हणजे तो

पाण्यांत तरंगेल. परंतु तो भूचुंबकाकडून उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडे ( दिशेकडे ) आकर्षिला जाणार नाहीं. अर्थात् तो पाण्यांत कोठेंहि राहील. एखादा पोलादी तुकडा घेऊन तो अतिशय उत्तम अशा तराजूंत वजन केला व नंतर त्याच्या ठिकाणीं चुंबकत्व उत्पन्न केलें तर त्याच्या वजनांत यत्किंचितहि फरक पडत नाहीं. यामुळें खालीं किंवा वरच्या बाजूस 'लब्धबल' असत नाहीं हें सिद्ध होतें. त्यामुळें तुकड्याच्या दोन्ही ध्रुवांवर सारखेंच आकर्षण-प्रतिसारण होत असलें पाहिजे. तेव्हां या प्रयोगानेंहि हें सिद्ध होतें कीं, दक्षिण आणि उत्तर ध्रुवांचें बल अगदीं समतोल आहे.

लोहाव्यतिरिक्त चुंबकत्व विशिष्ट धातूः—लोखंड आणि ज्यांत लोह प्रामुख्यानें आहे अशा मिश्र-धातूंत व दुसऱ्या रासायनिक द्रव्यांत चुंबकत्व असूं शकतें. परंतु यावरून असें मात्र समजूं नये कीं लोहाच्या अंगींच तेवढा हा गुण आहे; सृष्टींत असे दुसरे पुष्कळ पदार्थ आहेत कीं, ज्यांच्या अंगीं हा गुण थोड्याबहुत अंशानें असतो. दुसरे असे कांहीं पदार्थ आहेत कीं, त्यांवर चुंबकानें फक्त प्रतिसारणच तेवढें घडतें. या कोटींत बिस्मथ नांवाचा धातु येतो. बिस्मथ आणि दुसऱ्या कांहीं पदार्थांच्या अंगीं हा गुण अत्यल्प प्रमाणानें वसत असल्यानें या गुणाचें अस्तित्व बराच कालपर्यंत शोधकांच्या नजरेस आलें नाहीं.

सन १८४५ सालीं फाराडे यानें दाखवून दिलें कीं सर्व पदार्थ चुंबकानें आकर्षिले जातात किंवा प्रतिसारिले जातात. जे पदार्थ आकर्षिले जातात त्यांनां चुंबकत्व-विशिष्ट पदार्थ अशी संज्ञा आहे. आणि जे प्रतिसारिले जातात त्यांनां चुंबकत्वविरोधी अशी संज्ञा आहे. प्राणवायु हा चुंबकत्व-विशिष्ट पदार्थांत अत्यंत बलवत्तर आहे तरी पण त्याची चुंबकत्वशक्ति लोखंडाच्या चुंबकत्व-शक्तीच्या एक पांच लक्षांश ( $\frac{१}{५०००००}$ ) इतकी आहे. यावरून दुसऱ्या चुंबकत्वविशिष्ट पदार्थांची चुंबकत्व शक्ति किती अल्प असली पाहिजे व ती मापण्याकरितां किती यंत्रें पाहिजेत याची थोडीशी कल्पना येईल. बिस्मथ या चुंबकत्वविरोधी पदार्थाची शक्ति लोखंडाच्या चुंबकत्वाच्या एक कोटयांश इतकी आहे. म्हणजे प्राणवायूच्या चुंबकत्व शक्तीच्या एक विसांशाइतकी बिस्मथची चुंबकत्वविरोधी शक्ति आहे.

चुंबकमंदता—एखादा लोखंडी तुकडा घेऊन त्याला चुंबक-क्षेत्रांत ठेवावें म्हणजे त्याच्या अंगीं चुंबकत्व येतें.आतां जर हें चुंबक-क्षेत्र कमी जास्त बलवत्तर केलें तर तत्क्षणींच त्या लोखंडाच्या तुकड्यांत ( चुंबक क्षेत्राच्या सप्रमाणांत ) फरक होत नाहीं; त्या तुकड्यांतील चुंबकत्वांत फरक होण्यास कांहीं काल जावा लागतो. म्हणजे तुकड्यांतील चुंबकत्व क्षेत्राच्या चुंबकत्वामागें रेंगाळतें. लोखंडाच्या या गुणास "चुंबक मंदता" अशी संज्ञा आहे. निरनिराळ्या जातींच्या लोखंडाच्या अंगीं ही मंदता निरनिराळ्या प्रमाणांत वास करिते.

चुंबकत्व नष्ट करणें:—कित्येक वेळां एखाद्या पदार्थांत वास करीत असलेलें चुंबकत्व नाहींसें करणें जरूर असतें. त्याकरितां तो लोहचुंबक तांबडा लाल होईपर्यंत तापवीत असत; परंतु पोलाद किंवा ओतीव लोखंड तापवून थंड केल्यास त्यांतील परमाणूंची रचना बदलते. अर्थात् तो तुकडा तापाविण्यापूर्वी व तापवून थंड झाल्यावर परमाणूंच्या रचनेच्या दृष्टीनें एकच आहे असें म्हणतां येत नाहीं. त्यामुळें त्याची चुंबकस्थिति आणि चुंबकरहित स्थिति या दोहोंची तुलना करितां येत नाहीं. या प्रकारची तुलना सुलभ रीतीनें करितां यावी म्हणून इविंग यानें पुढील पद्धत बसविली. ज्या तुकड्याचें चुंबकत्व नष्ट करावयाचें असेल त्याला विद्युत्-प्रवाहानें बनविलेल्या वारंवार ध्रुव बदलणाऱ्या व हळूहळू निःशक्त होत जाणाऱ्या क्षेत्रांत ठेवावें म्हणजे कोणत्याहि चुंबकांतील शक्ति नाहींशी करितां येते, व त्याला पूर्व-पदावर आणतां येतें.

प्रकाशाचें ध्रुवीभवनः-चुंबक क्षेत्राच्या योगानें प्रकाशाचें ध्रुवीभवन होतें. एखादी जाडी कांच घेऊन तींतून प्रकाश पाठवावा;व त्याच्या सभोंवर जोरदार चुंबकक्षेत्र उत्पन्न करावें; म्हणजे कांचेंतून जाणाऱ्या प्रकाशाचें ध्रुवीभवन होतें. ध्रुवीभवनाचा कोन आणि चुंबकक्षेत्राचें बल यांत एक ठराविक प्रमाण असतें. या ठराविक प्रमाणावरून ध्रुवीभवनाच्या कोनाच्या आधारें चुंबकक्षेत्राचें बल काढतां येतें.

चुंबकत्वानें पदार्थांच्या आकारमानांत पडणारा फरकः—सन १८४२ सालीं आणि सन १८४७ सालीं जे. पी. जोल यानें चुंबकासंबंधानें कित्येक मजेदार गोष्टी प्रसिद्ध केल्या. त्याकरितां त्यानें कांहीं प्रयोग लोखंड आणि पोलाद या दोहोंवर केले होते. त्याच्या या अनुभवाची खात्री कित्येकांनीं अनेकवार प्रयोग करून घेतली आहे. त्यानें असें दाखवून दिलें कीं, चुंबकत्व उत्पन्न केल्यानें पदार्थांच्या लांबीरुंदींत फरक पडतो. सन १८८२ सालीं डब्ल्यू. एफ. बारेट यानें असें दाखवून दिलें कीं,निकलच्या कांबीची लांबी चुंबकत्व उत्पन्न केल्यानें कमी होते. यानंतर दुसऱ्या कित्येक गोष्टी शास्त्रज्ञांच्या निदर्शनास आल्या आहेत, त्यांवरून चुंबकत्व काय असावें हें जास्त स्पष्टपणें समजूं लागलें व त्यांतील गुह्य गोष्टी उघडकीस आल्या आहेत. जोलनें असें दाखवून दिलें. कीं, लोखंडाच्या कांबीच्या लांबीची वाढ चुंबकत्व उत्पन्न करणाऱ्या क्षेत्राच्या जलाच्या वर्गाच्या प्रमाणांत असते; व जेव्हां त्या कांबीची स्थिति संपृक्तावस्थेजवळ येते, तेव्हां ही वाढ कमी प्रमाणांत होते व नंतर ती वाढ बहुतेक बंदच होते; परंतु सन १८८५सालीं बिडवेल यानें असें दाखवून दिलें कीं, ज्या ठिकाणीं जोल यानें आपला प्रयोग बंद केला त्यापुढें म्हणजे त्यापेक्षां जास्त बलवत्तर चुंबकक्षेत्र वापरलें तर कांबीची नुसती

वाढच बंद होते ; एवढेंच नाहीं तर उलट कांबीची लांबी मूळच्या लांबीपेक्षां कमी कमी होऊं लागते. व खूप जोरदार चुंबकक्षेत्र घेतलें असतां अशा रीतीनें ही लांबी कमी कमी होत कांब मूळच्या लांबीपेक्षां देखील आंखूड होऊं शकते.

पीळ दिल्यानें चुबक—मंदतेंत होणारा फरकः—चुंबकत्वाची मंदता एखाद्या लोखंडी तारेस पीळ दिल्यानें कशी काय बदलते हें के. होन्डा आणि एच्. नगाओका या दोन जपानी शोधकांनीं शोधिलें आहे. यांनीं जे आंकडे प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून चुंबकाविषयींचे सिद्धांत बसविण्यास फार मदत झाली आहे. लोखंड आणि तत्सदृश धातू यांना पीळ किंवा ताण दिला असतां किंवा त्यांवर दाब आणला असतां त्यांच्या चुंबकत्वशक्तींत कसकसा फरक पडतो हें जे. ए. इव्हींग, सी. जी. नाट आणि टोकिओ युनिव्हर्सिटीचे पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं तपासून पाहिलें आहे.

चुंबकत्वशक्ती आणि ताण यांचा अन्योन्य-संबंध खालील कोष्टकावरून स्पष्टपणें लक्षांत येईल.

लोखंड

| चुंबकशक्ति | ताण |
|---|---|
| निर्बल, चुंबकक्षेत्रांत चुंबकत्वानें लांबी वाढते परंतु तिचें जोरदार चुंबकक्षेत्रांत आकुंचन होतें. | ताण दिल्यानें निर्बल चुंबकक्षेत्रांत चुंबकत्व वाढतें परंतु जोरदार क्षेत्रांत तें कमी होतें. |
| ओतीव कोबाल्ट | |
| चुंबकत्वानें निर्बल क्षेत्रांत लांबी कमी होते परंतु बलवान् क्षेत्रांत वाढते. | ताण दिल्यानें निर्बल क्षेत्रांत चुंबकत्व कमी होतें, परंतु बलवान् क्षेत्रांत तें वाढतें. |
| निकेल आणि तापवून गरम केलेलें कोबाल्ट | |
| सर्व प्रकारच्या क्षेत्रांत चुंबकत्वानें लांबी कमी होते. | ताण दिल्यानें सर्व प्रकारच्या क्षेत्रांत चुंबकत्व कमी होते. |
| निकेली पोलाद | |
| सर्व प्रकारच्या चुंबकक्षेत्रांत लांबी वाढते. | ताण दिल्यानें सर्व प्रकारच्या चुंबकक्षेत्रांत चुंबकत्वाची वाढ होते. |

याप्रमाणेंच पीळ दिल्यानें अन्योन्य संबंध दृष्टोत्पत्तीस येईल. परंतु स्थलाभावामुळें निरनिराळीं कोष्टकें दिलीं नाहींत. म्याक्सवेल यानें याविषयीं गणित करून कांहीं सिद्धान्त बसविले आहेत. त्या सिद्धान्तांस नगाओका आणि होन्डा यांच्या प्रयोगानें बरीच पुष्टि मिळाली आहे.

चुंबकावर उष्णतेचा परिणामः—फार पूर्वीपासून लोकांस असें माहीत होतें कीं, लोहचुंबक तापविल्यानें त्यांतील चुंबकत्व नाहींसें होतें. चुंबकत्व आणि लोह यांच्यामधील परस्पर संबंध उष्णमानानें कसा काय बदलतो हें तपासून पहाण्यास शास्त्रज्ञांनीं अलीकडे सुरुवात केली; तेव्हां त्यांच्या असें नजरेस आलें कीं, लोखंड तापविल्यास ज्या उष्णमानावर त्याची चुंबकत्वशक्ति नाहींशी होते त्याच उष्णमानावर त्याची घनता, विशिष्ट उष्णता, विद्युद्वाहकता, प्रसरण गुणक इ. गुणधर्म एकदम बदलतात. एका दृष्टीनें असें म्हणतां येतें कीं, साधारण उष्णमानावर असणारें लोखंड आणि तप्त लोखंड हे दोन भिन्न पदार्थ आहेत. पोलादाचें उष्णमान वाढविल्यास त्याच्या ठिकाणीं वरीलप्रमाणेंच उच्च उष्णमानावर निश्चुंबक होण्याचा धर्म आहे असें दृष्टीस पडतें.

मिश्रधातू आणि चुंबकत्व—सन १८८९ सालीं हापकिन्सन यानें एक मिश्रधातू शोधून काढली. तीन भाग लोखंड आणि एक भाग निकेल याप्रमाणें घेऊन त्यांची मिश्र धातू बनविल्यास ती साध्या उष्णमानावर चुंबकत्व धारण करूं शकत नाहीं. परंतु ज्या दोन धातूंपासून ( निकेल आणि लोह ) ही मिश्र धातु बनविली आहे त्या दोन्ही चुंबकत्व धारण करितात. शिवाय ही मिश्र-धातु बर्फ वितळण्याच्या बिंदुखालीं कांहीं अंशापर्यंत थंड केली तर तिच्या ठिकाणीं चुंबकत्व धारण करण्याचा गुण येतो; व नंतर हा गुण साध्या उष्णमानावर अत्यंत दीर्घ काळपर्यंत टिकतो. या शोधानन्तर दुसऱ्या पुष्कळ मिश्रधातूंच्या चुंबकत्वाची शक्ति मापून पाहिली. त्या योगानें शोधकांनां बरीच उपयुक्त माहिती उपलब्ध झाली. त्या मिश्रणांपैकीं टंगस्टेन आणि मालीब्डेनम् असलेल्या मिश्रधातूंच्या अंगीं चुंबकत्व राखून ठेवण्याची शक्ति मोठया प्रमाणांत वास करिते. अतिहीन चुंबकत्व असणाऱ्या धातूंच्या मिश्रणानें चुंबकत्व असणारी मिश्रधातू तयार करतां येते, असें सन १९०३ सालीं एफ्. हेऊस्लर यानें दाखवून दिलें. या तऱ्हेच्या मिश्रणास हेऊस्लर याची मिश्रधातु अशी संज्ञा आहे.

विद्युल्लता आणि चुंबकत्व यांचा अन्योन्य संबंधः—चुंबकक्षेत्राच्या योगानें विद्युल्लतेच्या वाहक-शक्तीच्या गुणकांत फरक पडतो. याशिवाय हाल या शास्त्रज्ञानें पुढील शोध लावला. एखाद्या पट्टींतून विद्युत्प्रवाह जात असतां त्या पट्टीवरील दोन समबल बिंदू जोडून एखाद्या विद्युन्मापकाशीं ( गल्व्हानोमिटरशी ) संबंध जोडला असतां मापकाचा कांटा चलन पावत नाहीं; व त्यामुळें मापकामधून प्रवाह जात नाहीं हें सिद्ध होतें. परंतु ती पट्टी जर दोन चुंबकध्रुवामध्यें आणून काय होतें म्हणून अवलोकन केलें तर असें दिसून येईल कीं, विद्युन्मापकामधून प्रवाह जाऊं लागला आहे. याचा अर्थ असा होतो कीं, जे दोन बिंदू समबलं स्थितींत होते त्यांच्या विद्युद्बलांत फरक पडला. धातुच्या या गुणधर्मास " हालचा परिणाम " असें नांव आहे. तसेंच के. होन्डा आणि टी. टेराडा यांनीं परिश्रम

करून असें सिद्ध केलें की, चुंबकत्वानें " येंगचा स्थिति स्थापकत्वाचा गुणक " बदलतो. एकाच जातीच्या धातूच्या दोन पट्या घेऊन त्या अम्लांत बुडविल्या असतां विद्युत्प्रवाह उत्पन्न होत नाहीं. परंतु त्यांपैकीं एकींत चुंबकत्व उत्पन्न केलें असतां त्यांतून प्रवाह निघतो.

आतां अण्वात्मक-चुंबक सिद्धान्ताचें दिग्दर्शन करून चुंबकत्वाचा साधारण इतिहास देऊं.

अण्वात्मक चुंबक सिद्धान्तः—डब्ल्यू. इ. वेबरचा सिद्धान्त असा आहे कीं, पोलादासारखे धातु अण्वात्मक चुंबकत्वाचे बनले आहेत; परंतु त्यांचे ध्रुव एकाच दिशेंत नाहींत. त्यामुळें स्वाभावतः चुंबकग्राही धातूंच्या अंगीं चुंबकत्व वसत नाहीं. जेव्हां असल्या धातूचा तुकडा चुंबकक्षेत्रांत येतो तेव्हां त्यांतील अण्वात्मक ध्रुव एकाच विशिष्ट दिशेस वळतात. व त्या तुकड्याच्या अंगीं चुंबकत्व येतें. या सिद्धान्तांत एक दोष दृष्टीस पडतो तो हा कीं जर असें असेल तर अत्यंत अल्प अशा क्षेत्राच्या योगानें वाटेल तेवढें बल असणारें चुंबकत्व उत्पन्न झालें पाहिजे. परंतु असें होत नाहीं; याकरितां वेबरनें त्याला अशी पुस्ती जोडली कीं, त्या अण्वात्मक ध्रुवांच्या अंगीं स्थितिस्थापकता आहे. म्याक्सवेल, जे. ए. इविंग, एफ. जी. बेली यांनीं प्रयोग करून गणिताच्या अधारें असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, अशा प्रकारची स्थितिस्थापकता मानण्याची अवश्यकता नाहीं. त्यानें हें सिद्ध करण्याकरितां एका तक्त्यावर पुष्कळशा चुंबकत्वयुक्त सुया बसविल्या. त्यांचे ध्रुव इतस्ततः वळविले होते; नंतर तो तक्ता एका तारेच्या वेटोळ्यांत ठेऊन त्यांतून विद्युत्प्रवाह पाठवून चुंबकक्षेत्र उत्पन्न केलें. अशा प्रकारचा प्रयोग केला असतां अण्वात्मक चुंबकाचा उत्तम अनुभव येतो; व वस्तुस्थितीशीं ह्या अनुभवाचा छान मेळ बसतो.

अशा प्रकारें अण्वात्मक चुंबक सिद्धान्त वस्तुस्थितीशीं जुळतो. परंतु असा प्रश्न उपस्थित होतो कीं हा अति सूक्ष्म असा अण्वात्मक चुंबक कसल्या प्रकारचा असावा किंवा त्याची रचना काय असावी. ह्याचें शास्त्रज्ञांनीं पुढें दिल्याप्रमाणें उत्तर दिलें आहे. एका विशिष्ट दिशेनें वर्तुलाकार विद्युत्प्रवाह कसलाहि विरोध न होतां फिरण्याची सोय प्रत्येक अणूंत असल्यास त्यायोगें कायमचें चुंबकत्व उत्पन्न होऊं शकतें; अर्थात् अण्वात्मक चुंबकत्व अशा प्रकारचें असावें असें त्याचें मत आहे.

चुंबक-विरोधी पदार्थासंबंधानें वेबर यानें अशी कल्पना केली कीं, चुंबकविरोधी पदार्थांच्या अणूंत अशी एक प्रणालिका असावी कीं, त्यांतून विरुद्ध दिशेनें विद्युत्प्रवाह वाहण्यास रस्ता मिळत असावा; त्यामुळें विरुद्ध प्रकारचा ध्रुव उत्पन्न होतो व त्यामुळें चुंबक क्षेत्रांतून त्याचें प्रतिसारण होतें; व ज्या वेळेस हा चुंबकविरोधि पदार्थ त्या क्षेत्राच्या बाहेर काढला जातो त्यावेळेस त्या प्रणालिकेंतून विरुद्ध प्रवाह उत्पन्न होऊन ती प्रणालिका निर्विद्युत होत असावी. हा सिद्धान्तसुद्धां वस्तुस्थितीशीं जुळतो.

जे. जे. थॉमसननें असा सिद्धान्त बसविला आहे कीं, परमाणू विद्युत्कणांचे बनलेले असावेत. व परमाणूंत कमीजास्त विद्युत्कण असल्यानें त्यांच्या ठिकाणीं ऋणत्व किंवा धनत्व येत असावें. अशा प्रकारचे कण परमाणू सभोंवार वर्तुलाकृति फिरत असल्यामुळें चुंबकत्व उत्पन्न होत असावें हें अनुमानसुद्धां अनुभवाशीं जुळतें.

ऐतिहासिक माहितीः—इ. स. पूर्वी ८०० च्या सुमारास ग्रीक लोकांस पाषाणचुंबकाचा आकर्षण करण्याचा धर्म माहीत होता. चुंबकाविषयींचा उल्लेख होमर, प्लेटो, अरिस्टॉटल, थिओफ्रेस्टस, आणि कित्येक ग्रीक ग्रंथकार यांनीं केला आहे. ग्रीक लोकांनंतर रोमन लोकांना पाषाणचुंबक माहीत होता हें सांगावयास नको. तरीपण चुंबकध्रुव दक्षिणोत्तरच राहूं शकतात हें १२ व्या शतकापूर्वी युरोपियनांस माहीत नव्हतें. परंतु हा गुण चिनी लोकांस फार प्राचीन काळीं माहीत होता व त्याच्या योगानें होकायंत्र करून ते दूरवर प्रवास करीत असत. सन १५८१ सालीं रॉबर्ट नार्मन यानें समान आणि विषम ध्रुवांचें प्रतिसारण आणि आकर्षण याविषयीं शोध लावला. याच सुमारास सदहू शोधकानें चुंबकाच्या ध्रुवाचा कल शोधून काढला.

वरील काळास चुंबकत्वाचा पौराणिक काल असें नांव देऊं. विलियम् गिल्बर्ट यानें इ. स. १६०० च्या सुमारास प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांपासून आधुनिक कालास सुरुवात झाली; त्यानें आपल्या समकालीन लोकांच्या चुंबकत्वाविषयीं असलेल्या खुळ्या समजुती खोट्या आहेत हें सिद्ध करून दाखविलें. उदाहरणार्थ त्या काळीं अशी समजूत होती कीं, लसुणाचा रस चोपडण्यानें चुंबकत्व नष्ट होतें; परंतु हें खोटें आहे असें गिल्बर्ट यानें दाखवून दिलें. अशा प्रकारच्या अनेक भ्रामक समजुती त्यानें दूर केल्या. त्यानें पृथ्वी हाहि एक चुंबक आहे असें दाखवून दिलें.

गिलबर्टच्या कालानंतरचीं बरींच वर्षें कांहीं एक शोध न लागतां तशींच गेलीं.सन १७८५ सालीं कोलंब यानें चुंबकत्वाच्या प्रमाणाविषयीं गणितात्मक सिद्धांत बसविले व त्याविषयीं प्रयोग केले.गणितशास्त्राचा चुंबकशास्त्रांत प्रवेश झाल्यापासून या शास्त्रांत प्रगति होण्यास सुरुवात झाली. साधारण असा नियम आहे कीं, ज्या भौतिकशास्त्रांत गणिताचा प्रवेश होतो त्या शास्त्रांत नवीन शोध लागण्यास गणित हें एक अत्यंत बलवत्तर असें साधन उपलब्ध होतें. या कामीं कोलंब यानें बारीक आणि लांब असे चुंबक वापरले;त्यामुळें दोन ध्रुवांचा दुसऱ्या दोन ध्रुवांवर एकसमयावच्छेदेंकरून घडणारा परिणाम त्यास टाळतां आला. पुढें सन १८३२ सालीं प्रसिद्ध गणितशास्त्रविशारद गॉस यानें हा प्रश्न उत्तम प्रकारें सोडवून दाखविला. म्हणजे दोन ध्रुवांचा परस्पर घडणारा संबंध ध्यानांत

घेऊन एकदोन विशिष्ट उदाहरणें सोडविलीं व कोलंबचा नियम खरा आहे असें दाखवून दिलें. तत्पूर्वी पॉइसन यानें सन १८२१ साली एक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत त्यानें चुंबकत्व हें एक अदृश्य असें प्रवाही द्रव्य असून तें परमाणूमध्यें फिरूं शकतें, परंतु तें एका परमाणूपासून दुसऱ्या परमाणूंत जाऊं शकत नाहीं असें गृहीत धरून चुंबकशास्त्रांतील बरींच प्रमेयें सोडविलीं. याप्रमाणें बरींच प्रमेयें सुटूं लागल्यामुळें अदृश्य प्रवाही चुंबकत्व खरोखरच द्रव्य आहे असा तत्कालीन शास्त्रज्ञांचा समज होऊं लागला.

डब्ल्यू. थॉमसन ( लार्ड केल्व्हिन ) यानें सन १८४९ सालीं असें दाखवून दिलें कीं, कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्यायोगें हा अदृश्य प्रवाही पदार्थाचा सिद्धांत खरा ठरत नाहीं. म्हणून त्यानें गणिताच्या आधारें कांहीं प्रमेयें बसविलीं. आतां पाइसन आणि केल्व्हिन याचे सीद्धान्त एकमेकांशीं बहुतांशीं मिळते आहेत; परंतु केल्व्हिनच्या मतानें पाइसनपेक्षां जास्त गोष्टींचा उलगडा होऊं शकतो. केल्व्हिन याच्या मागून त्यानें दाखविलेल्या मार्गानें एफ्. इ. न्यूमन, जी. आर. किरचाफ आणि मॅक्सवेल यांनीं बरेच शोध केले व नवीन नवीन गोष्टी उघडकीस आणल्या.

सन १८१९ सालीं एक महत्त्वाचा शोध एच. सी. ओअर्स्टेड यानें लावला. त्यानें असें दाखवून दिलें कीं, एखाद्या होकायंत्राजवळून जर विद्युत्प्रवाह गेला तर होकायंत्राचा कांटा त्या प्रवाहाशीं काटकोन करितो. या शोधाच्या योगानें विद्युच्चुंबकशास्त्राचा पाया घातला गेला. नंतर लागलीच ए. एम्. ॲम्पिअर यानें विद्युत्प्रवाहाचा परस्परांवर होणारा परिणाम वर्तुलाकृति विद्युत्प्रवाहाचा परिणाम इ. इ. गोष्टी प्रसिद्ध केल्या. त्याच सुमारास डी. एफ. अरागो यानें विद्युत्प्रवाहाच्या योगानें लोखंड पोलाद इ. पदार्थांच्या अंगीं चुंबकत्व आणतां येतें असें दाखवून दिलें. सन १८२५ सालीं थॉमसन यानें बलहीन विद्युत्प्रवाहाच्या योगानें प्रबल चुंबकत्व उत्पन्न होऊं शकतें असें दाखवून दिलें. माइकेल फॅराडे यानें सन १८३१ सालापासून शोध करण्यास सुरुवात केली. त्याच्या शोधापैकीं विद्युत्चुंबकाच्या प्रवर्तनाचा शोध हा फार महत्त्वाचा आहे. दुसऱ्या शोधानें त्यानें ध्रुवीभूत प्रकाशकिरणांचें वर्तुलाकृति भ्रमण होतें असें सिद्ध करून दाखविलें. त्यानें हा शोध सन १८४५ सालीं प्रसिद्ध केला. त्यानें चुंबकत्वाचा मार्ग ( साधन—माध्यम ) ही खरी खरी चुंबकत्वाची निवासभूमि आहे असें मानलें. ही कल्पना त्याला सुचण्याचें कारण असें कीं, विद्युद्रेषा आणि विद्युन्नलिका यांची कल्पना फॅराडे याच्या डोक्यांत चांगली भिनल्यामुळें तीच कल्पना फॅराडे याला सहजच सुचली. इ. सन १८७३ सालीं मॅक्सवेल यानें फराडे याच्या कल्पनेला गणिताच्या विचारसरणींत घालून जास्त व्यवस्थित स्वरूप दिलें. अंतरावरून चुंबकत्वाचें कार्य घडतें असें मॅक्सवेलच्या पूर्वीच्या गणितवेत्त्यांनीं गृहीत धरलें होतें. तें योग्य न दिसल्याकारणानें चुंबकत्वाच्या मार्गांत ( माध्यमात ) दाब उत्पन्न झाल्यानें चुंबकत्वाचीं कार्यें घडतात असें मॅक्सवेलनें गृहीत धरलें. त्याला एका विशिष्ट उदाहरणांत असें दिसून आलें कीं, गणितानें काढलेली विद्युच्चुंबकत्वाची गति प्रकाशाच्या गतीबरोबर आहे; यामुळें प्रकाशाचा इथर (प्रकाशवहनाचें माध्यम ) आणि चुंबकत्वाचें व विद्युल्लतेचें माध्यम हीं एकच आहेत असें सिद्ध झालें. तसेंच प्रकाश हा एक प्रकारचा विद्युच्चुंबकत्वाच्या प्रकंपनाचाच प्रकार आहे असें दिसून आलें. एच. आर. हर्ट्झ यानें सन १८८८ सालीं प्रयोग करून विद्युल्लहरींसंबंधानें माहिती प्रसिद्ध केली. तेव्हांपासून मॅक्सवेल याच्या सिद्धान्तास सर्व पक्षांकडून मान मिळूं लागला.

**चुंबकीय दृक्‌शास्त्र**—प्रकाश आणि चुंबकत्व यांत असणारा संबंध प्रथमतः फॅराडे यानें दाखवून दिला. त्यानें असें दाखवून दिलें कीं, चुंबकरेषेच्या समान्तर मार्गानें प्रकाशकिरणांनीं कांहीं पदार्थांतून गमन केलें असतां त्या किरणांचें ध्रुवीभवन होतें. या प्रकारचें ध्रुवीभवन करण्याचा धर्म सर्व पारदर्शक पदार्थांच्या अंगीं आहे. या ध्रुवीभवनाची गति सर्व पदार्थांच्या अंगीं सारख्याच दिशेनें असत नाहीं. कांहीं पदार्थांतून वामतः ( वामावर्ती ) ध्रुवीभवन होतें व कांहींतून वामेतरतः ( दक्षिणावर्ती ) ध्रुवीभवन होतें. बहुतेक सर्व पदार्थांतून वामेतरतः ध्रुवीभवन होतें. वामेतर याचा अर्थ विद्युत्प्रवाहाच्या सर्पिलाकृति दिशेनें होणारें ध्रुवीभवन होय. याच्या उलट दिशेनें होणारें ध्रुवीभवन वामतः ध्रुवीभवन होय. व्हर्डेट यानें असें दाखवून दिलें कीं, द्रावणाच्या योगानें होणारें ध्रुवीभवन द्रावक आणि द्राव्य यांच्या ध्रुवीभवनाच्या बेरजेइतकें असतें. आतां प्राण्याच्या अंगीं वामेतर ध्रुवीभवन करण्याची शक्ति आहे, आणि फेरीसायनाइड ऑफ पोटयाशच्या अंगीं वामध्रुवीभवन करण्याचा धर्म आहे तेव्हां पोटयाशचा क्षार पाण्यांत विरघळवून त्यायोगें ध्रुवीभवनाचा धर्म अंगीं नसलेलें असें द्रावण तयार करता येणें शक्य आहे. परंतु असल्या द्रावणाच्या अंगीं चुंबकत्वविशिष्टत्व असू शकतें. चुंबकाच्या योगानें होणाऱ्या ध्रुवीभवनाचा रासायनिक घटकावयवांशीं कसा काय संबंध आहे याविषयींची माहिती पर्कीन वाल्मथ जान आणि शाइन्राक यांनीं मिळवून ठेविली आहे.

झीमनचा शोधः— फॅराडे यानें हा शोध लावल्यानंतर त्यानें चुंबकत्वाचा प्रकाशाच्या धर्मावर कांहीं परिणाम होतो काय हें पहाण्याचा फार प्रयत्न केला परंतु त्याच्या निदर्शनास कांहींच आलें नाहीं. सन १८८५ सालीं फिवेझ नांवाच्या बेल्जियन शास्त्रवेत्त्यास असें दिसून आलें कीं मिठाच्या ज्वालेच्या प्रकाशकिरणानें उत्पन्न होणाऱ्या रेषा विच्छिन्नकिरणदर्शक यंत्रांतून पाहिल्यास त्या किंचितशा स्थानभ्रष्ट झालेल्या दिसतात. परंतु त्याच्या या शोधाकडे त्या वेळेस कोणीच फारसें लक्ष्य दिलें नाहीं. सन १८९६ सालीं झीमन याला असें दिसून आलें कीं, लिथिअम् आणि

सोडिअम यांच्या ज्वालेच्या योगानें विच्छिन्नकिरणदर्शकांतून दिसणाऱ्या रेषा चुंबकत्वविशिष्ट क्षेत्रामुळें रुंदावतात. यावरून या गोष्टीकडे त्यानें विशेष लक्ष्य पुरविलें. तेव्हां त्यास असें आढळून आलें कीं, क्याडमिअम नांवाच्या मूलद्रव्यामुळें दिसणाऱ्या हिरवट निळ्या रेषा फारच रूंद होतात. कित्येक वेळां विशिष्ट परिस्थितीमुळें एका रेषेच्या जागीं दोन, तीन चार रेषा दिसूं शकतात. यावरून शास्त्रवेत्त्यांनीं प्रकाशलहरीं-विषयीं निरनिराळीं अनुमानें काढलीं आहेत. त्यांपैकीं एक अनुमान असें आहे कीं, 'क्याथोड किरण' आणि प्रकाश-किरण यांत कांहीं तरी निकट संबंध असावा; व या अनुमानास गणितदृष्ट्या बराच पुरावा उपलब्ध झाला आहे. सन १८७७ सालीं कर या शास्त्रज्ञानें असें दाखवून दिलें कीं, एखाद्या विद्युच्चुंबकाच्या जिल्हई दिलेल्या ध्रुवावर जर ध्रुवी-भूत प्रकाश पाडला तर तो प्रकाश वाम किंवा वामेतर दिशेनें वर्तुलाकृति भ्रमण पावतो. यांविषयीं पुढें रिघी, कन्डट, डुबाईस, सिसिंघ, हाल, हुरीअन, काझ, आणि झीमन वगैरे पुष्कळ शोधकांनीं निरनिराळ्या प्रकारानें परि-श्रम करून बरीच नवीन माहिती उपलब्ध केली आहे. ती केवळ शास्त्रीय व समजण्यास कठिण अशी असल्यानें येथें दिली नाहीं.

**चुंबन**—प्रीति, प्रेम व पूज्यभाव व्यक्त करण्याकरितां चुंबन म्हणजे मुका घेणें हा प्रकार सर्वत्र रूढ असलेला आढळतो. सामान्यतः चुंबनाचा विधि लौकिक व्यवहार म्हणून करतात. परंतु मातृप्रीति किंवा स्त्रीपुरुषप्रेम या बाबतींत मात्र चुंबनाची शारीरिक क्रिया ही हृदयांत उचंबळणाऱ्या भावनांचें केंद्रीभूत प्रतिबिंब असतें, व त्यामुळें मनोविकारांनां उत्तेजन मिळतें.

शारीर व मानसशास्त्रदृष्ट्या चुंबन हें प्रेम व क्षुधा या दोन आद्य भावनांचें संयोगीकरण होय. इंद्रियजन्य व्यापारांत स्पर्श हा प्रधान असून शारीरिक स्पर्शाच्या अनेकविध प्रकारांत 'चुंबन' हा अत्यंत उच्च वैशिष्ट्यदर्शक प्रकार आहे. त्यामुळें सुधारलेल्या समाजांतच चुंबनाचा प्रकार परिणत स्वरूपांत आढळतो. उदाहरणार्थ, अगदीं प्राचीन काळीं ईजिप्तमध्यें चुंबन माहीत नव्हतें असें दिसतें. आणि ग्रीक, असीरियन लोकांत अगदीं प्राचीन काळापासून तें रूढ होतें. प्राचीन भारती-यांत हें प्रचलित होतें किंवा नाहीं यांविषयीं मतभेद आहे. मांजर, कुत्रे, वगैरे प्राण्यांत एकमेकांनां नाकांनीं स्पर्श कर-ण्याचा प्रकार दृष्टीस पडतो, व त्याचेंच सुधारलेल्या स्वरूपांत अनुकरण सँडविचद्वीपस्थ, टाँगन, एस्किमो, मलायी वगैरे हलक्या मानव जातींत केलेलें दिसतें. डार्विन म्हणतो, "मलायी लोकांचें चुंबन म्हणजे एकानें आपलें नाक दुसऱ्याच्या नाकावर ठेवून घांसणें." गालावर नाक ठेवून हुंगणें, हा चुंबनाचा दुसरा एक रानटी प्रकार होय. मूळ जपानी भाषेत चुंबनाला शब्द नाहीं.

सुधारलेल्या समाजांत 'चुंबना'च्या तीन कृती आहेत. ओठांनीं शरीराच्या कोणत्याहि भागाला स्पर्श करणें ही एक. ओठांनीं गालाला स्पर्श करणें ही कृति पितृप्रेमाची किंवा मित्रप्रेमाची निदर्शक मानतात; आणि ओठांनीं मुखाला स्पर्श करणें ही कृति प्रेमी स्त्रीपुरुषविषयक संबंधाची निद-र्शक म्हणून गणली जाते. प्राचीन ग्रीकरोमन लोकांत व आधुनिक फ्रेंचइंग्रजादि यूरोपीयांत हाच शिष्टसंप्रदाय आहे.

बा ह्य—चुंबन घेणें या अर्थाचे जुने इंग्रजी शब्द 'बुस' व 'बास' व त्याच अर्थाचा पर्शियन व हिंदी शब्द 'बूस' यामध्यें विलक्षण सादृश्य दिसून येतें. तसेंच हिंदी व जर्मन कुस म्हणजे चुंबन घेणें आणि संस्कृत व कुस् इंग्रजी किस् या शब्दांमध्यें एक प्रकारचें साम्य दिसून येतें. आतांपर्यंत काढलेले सिद्धांत हिंदुखेरीजकरून इतर आर्य लोकांस लागू पडतात किंवा नाहीं हें आतां पाहूं. रोमन लोकांत ओष्ठ चुंबनाचीच पद्धति होती. पण रोमन लोक फार उत्तर कालांतील आहेत. मुखचुंबनाची वहिवाट पूर्वेकडील आहे असें ग्रीक लोकांनीं म्हटलें आहे. ग्रीक लोकांत खरें चुंबन होतें, परंतु मुखचुंबनाची चाल त्यांच्यांतहि नव्हती. इराणी लोकांत चुंबनाची वहिवाट होती. समान नात्याचे लोक मुख-चुंबन करीत, व वरिष्ठ दर्जाचे लोक कनिष्ठ दर्जाच्या लोकांच्या फक्त गालाचें चुंबन घेत असत. इंडो यूरोपियन लोकांत पूर्वी चुंबनाची वहिवाट होती कीं तेहि अवघ्राण करीत असत, हें समजण्याला कांहीं मार्ग नाहीं.

प्राचीन जपानी, ईजिप्शियन, केल्टिक, ग्वायनांतील इंडि-यन वगैरे लोकांत चुंबनाची आधुनिक कृति प्रचलित नव्हती हें खरें असलें तरी अगदीं आद्यकालीन समाजां-तहि चुंबनाचा कोणतानाकोणता तरी प्रकार रूढ असला पाहिजे यांत शंका नाहीं. शिवाय प्रेम प्रसंगाव्यतिरिक्त इतर धार्मिक किंवा राजकीय, सामाजिक वगैरे नमनप्रसंगीं चुंबन-सदृश कृती आचरलेल्या आढळतात. कनिष्टांनीं अत्यंत वरि-ष्ठांनां नमन करण्याकरितां पाय, गुडघे किंवा हात यांनां मुखानें स्पर्श करण हा प्रकार ग्रीक, इराणी, हिब्रू, ख्रिस्ती वगैरे अनेक प्राचीन व अर्वाचीन समाजांत रूढ असलेला आढळतो. प्राचीन रोमन बादशहा किंवा ख्रिस्ती धर्मगुरू पोप यांच्याबद्दल निष्ठा प्रदर्शित करण्याचा पादचुंबनविधि सुप्रसिद्ध आहे. सूर्यचंद्रादि देवतांनां नमन करण्याकरितां स्वतःच्याच हाताचें चुंबन घेणें हा प्रकार तुर्क व अरब लोकांत रूढ असून तोच प्राचीन ग्रीक व रोमन लोकांत होता. बॉक्सिंग वगैरे शारीरिक सामन्यांतले प्रतिस्पर्धी प्रथम हस्त-स्पर्श किंवा हस्तांदोलन करतात, त्याप्रमाणें मध्ययुगांतील यूरोपीय प्रतिस्पर्धी वीर शस्त्रसंग्रामापूर्वी किंवा पराभूत झाल्यानंतर शरणागतिदर्शक म्हणून, चुंबनाची कृति करीत असत. विशेषतः कायद्याच्या दृष्टीनें त्या काळांत विवाह-संबंधांत चुंबनाला फार महत्त्व होतें, म्हणजे वाङ्निश्चयाच्या वेळीं चुंबनविधि झाल्याशिवाय त्याला कायदेशीर स्वरूप येत

नसे. यूरोपांत कोर्टामध्ये शपथविधि करतांना न्यूटेस्टामेंट या धर्मग्रंथाचें चुंबन करावें लागतें. फ्रेंच मध्ययुगीन कायद्यान्वयें तर विवाहित स्त्रीचा पतीखेरीज इतरानें मुका घेतल्यास तो व्यभिचाराचा गुन्हा गणला जात असे. आणि अमेरिकेंत १९ व्या शतकांत अविवाहित स्त्रीनें पुरुषास चुंबन घेऊं दिल्याबद्दल तिला दंड केल्याचीं उदाहरणें डी टोकेव्हिलनें उल्लेखिलीं आहेत.

चुंबनाच्या कार्यासंबंधाची एक फारच विचित्र कल्पना यहुदी धर्मग्रंथांत आढळते. ती कल्पना म्हणजे पुण्यवान् माणसांनां केवळ चुंबनामुळें मृत्यु येणें ही होय. ईश्वराच्या प्रिय भक्तांनां ईश्वरानें चुंबन घेण्यानें मृत्यु येतो अशी या लोकांची कल्पना आहे. अर्थात् या रीतीनें मृत्यु येणें ही गोष्ट अगदीं बिनत्रासाची व सुखकर असल्यामुळें फक्त अत्यंत पुण्यवान् माणसांनां अशा प्रकारचें मरण लाभतें. आब्राहाम, ऐझॅक, जेकब, मोझेस वगैरे साधुपुरूषांनां अशा प्रकारें मृत्यु आला असें वर्णन आहे.

भा र ती य.—प्रोफसर हापकिन्स यांच्या मतें चुंबनाची आजची क्रिया प्राचीन भारतीयांत नव्हती. त्याच्या याविषयींच्या लेखाचा ( अमेरि. ओ. सो. जर्नल २८) सारांश येणेंप्रमाणें:—

वेदांमध्यें चुंबणें या अर्थाचा धातु नसून त्याच्या जागीं वास घेणें ( घ्रा ) ह्या धातूचा उपयोग केला आहे. " गाई अगर घोडे ज्याप्रमाणें आपल्या वासरांनां व शिंगरांनां हुंगतात, त्याप्रमाणें देव आपल्या मुलांनां ( सर्व प्राण्यांनां ) हुंगतो. " बापानें मुलाचें तीनदां अवघ्राण केलें म्हणजे, मुलांचें आयुष्य वाढतें अशी कल्पना हिंदुस्थानांत उपनिषद्कालापासून रूढ आहे. चुंबणें या अर्थाचा शब्द फार मागाहून प्रचारांत आला, परंतु चुंबणें व हुंगणें या अर्थाच्या शब्दांचा मूळचा अर्थ स्पर्श करणें, असा होता असें दिसतें. त्याचप्रमाणें मागाहून प्रचारांत आलेला शब्द " चुंब् " हा चुप् म्हणजे स्पर्श करणें ह्या धातूवरूनच तयार झाला असावा. शिवाय वरील शब्दाचा ठार मारणें या अर्थी उपयोग केलेला आढळतो. चुप् म्हणजे स्पर्श करणें, या शब्दावरूनच एकंदर सर्व अर्थ निघाले आहेत. वेदकालानंतरच्या पुस्तकांतून चुंबनाचे उल्लेख आले आहेत. शतपथ ब्राह्मणांत प्रणयवर्णनांत चुंबनाचें "मुखसंमीलन " असें वर्णन आलें आहे.

मनुस्मृतीमध्यें चुंबनाचें अधरामृतपान करणें, अशा अर्थाचें स्पष्टीकरण केलें आहे. महाभारतांत (पर्व ३, ११२, १२) चुंबनाचें वरील प्रमाणेंच वर्णन आलें आहे. बौद्ध लोकांच्या जातकांमध्यें चुंब हा शब्द रूढ आहे. परंतु घ्रा व चुंब या दोन शब्दांमधील फरक लक्षांत ठेवला पाहिजे. बाप व मुलगा, व एका कुटुंबांतीलच मंडळी यांच्या संबंधानें घ्रा शब्दाचा उपयोग केला जातो. उलटपक्षीं चुंब शब्दाचा उपयोग नवराबायकोसंबंधानेंच केलेला असतो. दोन पुरुष एकमेकांच्या मुखांचें चुंबन करीत नाहींत. हल्लीं दक्षिण हिंदुस्थानांत स्त्रिया एकमेकींचीं व पुरुष एकमेकांचीं चुंबनें घेतात. वात्स्यायनानें आपल्या कामसूत्रांत चुंबनाचे सर्व प्रकार दिले आहेत पण त्यांत अवघ्राण नाहीं.

जातकांमध्यें चुंबनाची बरोबर कल्पना असून तें आई व मुलगा यांच्यामध्यें चालत असल्याचें लिहिलें आहे. पण आई मुलाच्या टाळूचें चुंबन करते, व टाळूचें अवघ्राण करते असें जातकांत म्हटलें आहे. पुढें कालांतरानें " चुंब " या शब्दाचा ओष्ठपान अगर चुंबन असा अर्थ झाला तरी पण अद्याप त्यांत वास घेणें व चाटणें या दोन अर्थांचा बोध होतोच.

पूर्वी खरें चुंबन कोणालाहि माहीत नव्हतें. त्यावेळीं चुंबनाच्या ऐवजीं अवघ्राणाची चाल होती, व पुढें कालांतरानें अवघ्राणाचें चुंबनांत परिवर्तन झालें, हा सिद्धांत संस्कृत वाङ्मयाच्या आधारें सिद्ध केला. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं अवघ्राण व चुंबन हीं दोन्हीं कदाचित् पूर्वीच्या लोकांनां माहित असावींत, पण त्यांनीं फक्त एकाचाच उल्लेख केला असावा. याला उत्तर असें आहे कीं, एकंदर ग्रंथांतून प्रणयासंबंधीं पुष्कळ गोष्टी आलेल्या आहेत, परंतु त्यांत कोठेंहि चुंब् हा धातु वापरला नाहीं.

पुराणांतून चुंबनाचें जरी उत्कृष्ट वर्णन आलें आहे तरी चुंबनाचें अनेक प्रसंग पुराणांत आढळतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर ती साफ चुकीची आहे. कारण पुराणांत प्रणयासंबंधाची अगदीं रेलचेल असूनहि त्यांत चुंबनाचे प्रसंग क्वचित्च आढळतात. याचें कारण असें कीं, पूर्वी चुंबनाची वहिवाट नसल्यामुळें प्राचीन ग्रंथांतून चुंबनाला शिरकाव मिळाला नाहीं, पण पुढें अवघ्राण मागें पडून चुंबनाची सर्वत्र वहिवाट सुरू झाल्यावर गीतगोविंद आदिकरून पुस्तकांत चुंबनानें धुमाकूळ घातला आहे. कामसूत्रकार वात्स्यायन यानें चुंबन हें मनुष्यस्वभावाला धरून आहे, असें म्हटलें आहे तरी कांहीं प्रांतांतील स्त्रियांनां चुंबनाचा अगदीं तिटकारा वाटतो, असेंहि त्यानें कबूल केलें आहे. ह्या सर्व वादाचा एकंदर निष्कर्ष असा आहे कीं, अगदीं प्राचीन कालीं अवघ्राणाची चाल होती, परंतु वेदकालानंतर ती मागें पडून चुंबनाची वहिवाट सुरू झाली. तरी पण कांहीं लोकांनां चुंबनाचा तिटकारा असल्यामुळें बहुतेक प्रणयवर्णनांत चुंबनाचा उल्लेख आढळत नाहीं. ह्यासंबंधींचा पुरावा महाभारतांत ( पर्व १३, अध्याय १९ श्लोक ७९ ) पहावयास सांपडेल. प्रो. हापकिन्स यांच्या मतास आम्हीं पाठिंबा देत नाहीं.

**चुमलहारी**—हें भूतान व तिबेट यांच्या सरहद्दीवरील बर्फाच्छादित शिखर असून भूतानच्या वायव्येस आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून २३९३३ फूट आहे. याची तिबेटांतील पवित्र डोंगरांत गणना होते.

**चुरू**—राजपुतान्याच्या बिकानेर संस्थानच्या रेनी निझामतमधील त्याच नांवाच्या तहसिलीचें मुख्य ठिकाण असून बिकानेरच्या पूर्वेस १०० मैल अंतरावर वसलें आहे. हें १६२० त चुन्हू नांवाच्या जाटानें वसविलें. १९११ सालीं याची लोकसंख्या १६०३८ होती. येथें पुष्कळ सावकार लोक रहातात व पुष्कळ चांगलीं घरें, विहिरी व स्मारकें आहेत. येथील किल्ला १७३९ त बांधला. येथें एक प्राथमिक शाळा, पोस्टकचेरी व दवाखाना आहे.

पूर्वी हें शहर व त्याच्या सभोंवारचीं ८० खेडीं एका वजनदार ठाकुराच्या ताब्यांत होतीं. याचें व दरबारचें नेहमीं भांडण असे. १८१३ त दरबारनें फौज पाठवून ठाकुराच्या किल्ल्यास वेढा दिला व त्याला जर्जर केलें. शेवटीं टाकुरानें हिरकणी खाऊन प्राण दिला. यानंतर चुरू दरबारच्या ताब्यांत आलें. परंतु पुढें ठाकुराच्या वंशजांनीं अमीरखानाच्या मदतीनें तें परत घेतलें. यानंतर १८१८ त दरबारनें इंग्रजांच्या मदतीनें चुरू शहर कायमचें काबीज केलें. आतां ठाकुराच्या ताब्यांत फक्त ५ खेडीं आहेत.

**चूडामण**—एक बाणेदार जाट लढवय्या. औरंगझेबाच्या दक्षिणेंतील शेवटच्या मोहिमेंत त्याच्या सैन्यांतील खजिना लुटून हा श्रीमंत बनला होता. आग्र्यापासून चौदा कोसावर असलेला भरतपूरचा किल्ला यानेंच या लुटींतील कांहीं भाग खर्च करून बांधला. भरतपूरचे हल्लींचे जाट राजे हे चूडामणचे वंशज होत. महंमदशाह आणि सय्यद अबदुल्लाखान या उभयतांमध्यें झालेल्या लढाईंत चूडामण हा बादशाही सेनेकडून मारला गेला (नोव्हेंबर १७२०). त्याचा पुत्र वदनसिंग हा त्याच्यामागून गादीवर बसला. [ बील-ओरि. बॉया. डिक्श. ].

**चेकोस्लोव्हेकिया**—चेकोस्लोव्हेकियाच्या लोकसत्तात्मक राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा, महायुद्धाच्या अखेरीस १९१८ च्या आक्टोबर महिन्याच्या २८ व्या तारखेस झाली. तत्पूर्वी यांतील बराचसा भाग ऑस्ट्रियाच्या साम्राज्यांत अंतर्भूत होता. बोहेमिया, मोरेव्हिया, सायलेशिया वगैरेंसारख्या छोटया संस्थानांनीं १७ व्या शतकांत कांहीं कालपर्यंत आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केलें होतें पण १९१८ मध्यें या सर्व घटकांचें मिळून स्वतंत्र असें राष्ट्र प्रथमतः निर्माण झालें.

१९२१ सालच्या खानेसुमारावरून पहातां चेकोस्लोव्हेकियाचें क्षेत्रफळ ५५००० चौ. मै व लोकसंख्या १३५९५८१८ होती. या राष्ट्रांत बोहेमिया, सायलेशिया, स्लोव्हेकिया, रशियाना इत्यादि प्रदेशांचा समावेश झाला आहे. या लोकसत्ताक राष्ट्राच्या चतुःसीमा व्हर्सेलीस व ट्रियनन येथील शांतता परिषदेच्या चालकांनीं ठरविल्या. त्याप्रमाणें चेकोस्लोव्हेकियाच्या पश्चिमेस व उत्तरेस मोठमोठे पर्वत असून दक्षिणेस आस्ट्रिया हंगेरी, रुमानियाच्या सरहद्दीपर्यंत मोठा सपाट प्रदेश पसरला आहे. या वैराज्यांत स्नेझ्का ( ५२१६ फूट उंची ), कार्पेथियन, टायट्रा ( ७ ते ८०० फूट ) इत्यादि पर्वत आहेत. डान्यूब, लबे ( एल्बे ), मार्च इत्यादि नद्यांनीं या वैराज्याचा मुलूख भिजविला आहे. बहुतेक भागांत जंगलें पसरलीं आहेत. या वैराज्याची हवा समशीतोष्ण आहे. वैराज्याची राजधानी प्राग हें व्हाटव्हा नदीवर वसलेलें असून त्याची लोकसंख्या ६७७००० आहे. याची कलाकौशल्याबद्दल फार प्रसिद्धी आहे स्लोव्हेकियाची राजधानी ब्राटिस्लाव्हा हें डान्यूब नदीच्या कांठचें मोठें बंदर असून यूरोपच्या पूर्वेशीं व बाल्कन प्रदेशाशीं या बंदरामार्फत मोठा व्यापार चालतो. याशिवाय ब्रनो, पिल्सेन, कोसीस यूझोरॉड, लिबरेस, चॅब्लोनेक, कार्ल्सबाद, मरीनबाद, इत्यादि प्रसिद्ध शहरें आहेत. ब्रनो येथील विणकाम फार प्रसिद्ध आहे, पिल्सेन हें दारू व लोखंडाच्या कामासाठीं फार प्रसिद्ध आहे. कोसीस हें व्यापाराचें मोठें केंद्र आहे. त्याचप्रमाणें लिबरेस, जॅब्लोनेक हीहि व्यापाराचीं मोठीं शहरें आहेत. चेकोस्लोव्हेकिया हें यूरोपमधील संपन्न संस्थान असून खनिजसंपत्ति व सुंदर पाणी यांबद्दल याची फार ख्याति आहे. या संस्थानांत सुमारें २०० तलाव आहेत. जॅचीमोव्ह येथें रेडियम उत्पन्न होतें. या वैराज्यांत पांच प्रकारचे लोक आहेत. चेक लोकांची वस्ती सर्वांत अधिक म्हणजे सत्तर लक्ष आहे. त्याच्या खालोखाल स्लाव लोकांचा नंबर लागतो. चेकोस्लोव्हेतर लोकांत जर्मन, रूथेनियन, पोल इत्यादि लोकांची वस्ती आहे. अल्पसंख्याक जातीचे लोक येथें पुष्कळ असून त्यांच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठीं शांततापरिषदेनें खबरदारी घेतली आहे.

**इतिहास**.—ऑस्ट्रियानें सर्व्हियाविरुद्ध चढाईचें धोरण स्वीकारून महायुद्धाला सुरुवात केली. पण या गोष्टीला चेक्स व स्लाव्ह लोक हे विरुद्ध होते. त्यांनीं ऑस्ट्रिया व जर्मनीच्या धोरणावर कडक टीका करण्यास सुरुवात केली. अर्थातच ऑस्ट्रियन साम्राज्यवादी सत्ताधाऱ्यांनीं या लोकांची मुस्कटदाबी करण्यास प्रारंभ केला. मुद्रणस्वातंत्र्यावर घाला घालून व या चेक व स्लाव्ह लोकांच्या पुढाऱ्यांना कैदेंत टाकून या लोकांना गप्प ठेवण्याची आस्ट्रियानें खटपट सुरू केली. कांहीं पुढाऱ्यांनीं आपली कशीबशी सुटका करून घेऊन व साम्राज्यांतून पळ काढून परराष्ट्रांत वास्तव्य केलें व तेथून पुन्हां चेक्स व स्लाव लोकांमध्यें ऐक्य घडवून आणून ऑस्ट्रेलियाला शह देण्याची व आपल्या स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली. अशा पुढाऱ्यांपैकीं, प्रो. थॉमस गॅरिग, मसरिक व डॉ. डाइयूफर्ड वेनेस हे प्रमुख होत. ऑस्ट्रियाच्या जुलमामुळें चेकोस्लोव्हेकियन लोकांपैकीं मवाळ, जहाल, बंडखोर सर्वच पक्षांचे लोक एकत्र झाले व त्यांनीं आपलें ध्येय स्वातंत्र्यप्राप्तीचें आहे असा जाहीरनामा काढला. १९१८ च्या जानेवारी महिन्याच्या ६ व्या तारखेस त्यांनीं प्राग येथें ' ट्वेल्थ नाइट मॅनिफेस्टो ' काढून आपल्या राष्ट्राला पूर्ण स्वातंत्र्य हवें असल्याचें जाहीर केलें व यूरोपच्या शांततेच्या परिषदेस आपले प्रतिनिधी पाठवले. खुद्द युद्धांतहि

जे चेक लोक ऑस्ट्रियाच्या बाजूनें लढत होते त्यांनीं भर रणांत दोस्तांच्या बाजूस मिळण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी झाला. चेकोस्लाव लोकांनीं दोस्तांच्या बाजूनें लढून चांगला पराक्रम गाजविला. प्रो. मसरिक यानें परदेशस्थ चेकोस्लाव लोकांची संघटना करून त्यांनां आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांनां अनुकूल करून घेतलें. यामुळें दोस्त राष्ट्रांवर बराच परिणाम होऊन त्यांनीं चेकोस्लोव्हेकियाला तात्पुरतें स्वतःचें सरकार नेमण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणें सर्वपक्षीय प्रतिनिधींचें संयुक्त मंडळ प्राग येथें स्थापन होऊन या मंडळामार्फत चेकोस्लोव्हेकियाचें स्वतंत्र राष्ट्र स्थापन करण्यांत आलें. ब्रिटिशांनीं चेकोस्लोव्हेकिया स्वतंत्र आहे या अर्थाचा जाहीरनामा काढला व त्याला फ्रान्स, इटली, अमेरिका, जपान, इत्यादि राष्ट्रांनीं आपली संमति दिली. हें पहातांच ऑस्ट्रियाचें डोळे उघडले व त्यानें आपल्या साम्राज्यांतील सर्व संस्थानांनां साम्राज्यन्तर्गत स्वराज्य दिल्याचें जाहीर केलें पण ऑस्ट्रियाचें हें कृत्य वरातीमागून घोडें अशा स्वरूपाचें झालें. त्यामुळें ऑस्ट्रियाच्या या जाहीरनाम्याला कोणीच विचारिलें नाहीं. ऑक्टोबरच्या १८ व्या तारखेस प्राग येथील व संयुक्त राष्ट्रीय मंडळानें चेकोस्लोव्हेकिया राष्ट्र स्वतंत्र आहे असा जाहीरनामा काढला; व पुढें एक आठवड्यानीं ऑस्ट्रियानें नाखुषीनें कां होईना पण या जाहीरनाम्याला आपली संमति दिल्याचें जाहीर केलें.

अशा रीतीनें चेकोस्लोव्हेकियानें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतल्यानंतर नोव्हेंबरच्या १६ व्या तारखेस राज्यकारभारासाठीं राष्ट्रीय मंडल निर्माण करण्यांत येऊन त्या मंडळाचें अध्यक्षस्थान प्रो. मसरिक यांस एकमतानें देण्यांत आलें. डॉ. क्रामर हा प्रधान झाला व डॉ. बेनेस यांस परराष्ट्रमंत्र्याची जागा देण्यांत आली. पुढें एका आठवड्याच्या आंतच, स्लाव लोकांनीं आपला प्रदेश या राष्ट्रांत मोडला जाण्यास संमति दिली. रुसिनियानेंहि तोच कित्ता गिरविला. अशा रीतीनें थोडक्याच दिवसांत बोहेमिया, मोरेव्हिया, सायलेशिया, सोव्हेकिया, रुसिनिया वगैरे प्रदेशांचा या राष्ट्रांत अंतर्भाव झाला. यानंतर लोकांनीं आपल्या चेकोस्लोव्हेकिया वैराज्याला बळकटी आणण्यासाठीं व एल्ब ते डान्यूब नदीपर्यंतच्या राज्यांत आपली सत्ता बद्धमूल करण्यासाठीं कंबर बांधली. राष्ट्राची घटना ठरविण्यासाठीं एक कमिटी ठरविण्यांत येऊन त्या कमिटीच्या मताप्रमाणें चेकोस्लोव्हेकिया हें वैराज्य असल्याचें जाहीर करण्यांत आलें. राज्यकारभार चालविण्याकरितां दोन कायदेमंडळें स्थापन करण्यांत आलीं. सीनेटमध्यें १५० लोक असावेत व चेंबर ऑफ डेप्युटीमध्यें ३०० प्रतिनिधी असावेत असें ठरविण्यांत आलें. २१ वर्षांवरच्या स्त्रीपुरुषांनां मताधिकार देण्यांत आला. सीनेटच्या निवडणुकीसाठीं मात्र मतदारांचें वय २६ व्या वर्षावर असावें असें ठरवण्यांत आलें. या दोन्ही मंडळांनीं वैराज्याचा अध्यक्ष निवडावयाचा, त्याची मुदत सात वर्षांची असावी. दोन्हीपेक्षां अधिक वेळां एकाच माणसाला अध्यक्षाच्या मानासाठीं उभें रहातां येणार नाहीं इत्यादि पोटनियम करण्यांत आले. अध्यक्षाची सत्ता अनियंत्रित असून तो कायदेमंडळांनां जबाबदार नसतो. त्याच्या चुकीबद्दल तो जबाबदार नसून त्या त्या खात्याचा प्रधान हा त्या चुकीबद्दल जबाबदार धरला जातो. पार्लमेंटच्या ⅔ हून अधिक प्रतिनिधींचें मत असल्यास, घटनेमध्यें फरक सुचवितां येतो. सीनेटची व चेंबर ऑफ डेप्युटींची निवडणूक अनुक्रमें ६ व ८ वर्षांनीं व्हावयाची असें ठरविण्यांत आलें आहे. लष्करी खर्च व जमाबंदी यांसंबंधींचें बिल प्रथम राष्ट्रीय सभेपुढें मांडलें पाहिजे. कोणताहि कायदा चेंबर ऑफ डेप्यूटीनें पास केल्यास तो कायदा सीनेटविरुद्ध असतांना सुद्धां बंधनकारक होतो. अध्यक्ष हा आपलें कॅबिनेट निवडतो व त्यांत दोन्ही गृहाबाहेरच्या प्रतिनिधींनां घेण्याचा अधिकार त्याला आहे. मुद्रणस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य व धर्ममतस्वातंत्र्य या वैराज्यांत आहे. कार्यकारी मंडळांत निरनिराळ्या खात्याचे असे १५ मंत्री असून हे १५ हि मंत्री प्रत्येक मंत्र्याच्या कृत्याबद्दल जबाबदार आहेत. अध्यक्षाचें स्वतःचें स्वतंत्र खातें आहे. वैराज्याचे कारभाराच्या सोयीसाठीं स्वतंत्र भाग पाडण्यांत आले असून या भागांचे अधिकारी कायदेमंडळाला जबाबदार असतात. ब्रनो येथें वरिष्ठ न्यायकोर्ट असून प्राग व ब्रनो येथें हायकोर्टें स्थापन करण्यांत आलीं आहेत. चेकोस्लोव्हेकियांत एकंदर ३३ प्रांतिक व ४१० जिल्हा न्यायकोर्टें स्थापण्यांत आलीं आहेत. या न्यायकोर्टांनीं आपलें स्वतंत्र कायदेकोड करण्यासाठीं प्रयत्न चालविले आहेत.

प र रा ष्ट्र वि ष य क धो र ण.—चेकोस्लोव्हेकियाचें परराष्ट्रीय धोरण मुख्यतः स्वराष्ट्रसंरक्षक स्वरूपाचें आहे. आपल्या राष्ट्राची प्रगति व्हावी व आपल्या राष्ट्रांत व इतर राष्ट्रांत चांगल्या प्रकारचे हितसंबंध असावेत. यासाठीं चेकोस्लोव्हेकियाचे प्रयत्न चालू आहेत. या दृष्टीनें, चेकोस्लोव्हेकियानें जुगोस्लव्हिया, रुमानिया यांच्याबरोबर करारनामा केला. ऑस्ट्रियाशीं जरी या राष्ट्राचें वांकडें होतें. तथापि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ऑस्ट्रियाशीं व हंगेरीशींहि चेकोस्लोव्हेकियानें सलोख्याचें धोरण ठेवलें आहे. ऑस्ट्रिया व हंगेरीशीं व्यापारी हितसंबंध या राष्ट्रानें ठेवले आहेत. टेशनच्या प्रदेशावर चेकोस्लोव्हेकिया व पोलंड या दोघांनींहि आपला हक्क सांगितला होता. शांततापरिषदेनें या प्रदेशाची दोघांमध्यें वांटणी करून दिली. त्यामुळें चेकोस्लोव्हेकियाचें बरेंच नुकसान झालें. पण पोलंडशीं सख्य ठेवण्यासाठीं चेकोस्लोव्हेकियानें हाहि स्वार्थत्याग केला. रशियाशीं चेकोस्लोव्हेकियाचें धोरण तटस्थपणाचें पण सहानुभूतीचें आहे. मध्ययूरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांशीं व्यापारी तहहि चेकोस्लोव्हेकियानें केलेले आहेत. इतर राष्ट्रांप्रमाणें याहि राष्ट्रांत पुष्कळच राजकीय

पक्ष आहेत. त्यांत चेकोस्लोव्हेकियन सोशलडेमोक्रॅट हा पक्ष प्रबल आहे. त्याशिवाय, कम्यूनिस्ट, पॉप्यूलर, अग्रेरियन, नॅशनल सोशिआलिस्ट, नॅशनल डेमोक्रॅट,जर्मन पक्ष हे प्रमुख पक्ष आहेत.

इ. स. १९२२ च्या आक्टोबरमध्यें डॉ. बेनीस या मंत्र्यानें राजीनामा दिला. त्याच्या बदलीं, ॲन्टोनिन स्वेहला हा अग्रेरियन पक्षाचा पुढारी प्रधान झाला. त्यानें आपल्या मंत्रिमंडळांत बेखिन ( सोशल डेमोक्रट ), रसिन ( नॅशनल डेमोक्रॅट ), श्रिब्रनो ( चेकसोशालिस्ट ), चमेक ( कॅथोलिक ), डॉबेनीस परराष्ट्रमंत्री अशा पांच निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांनां निवडलें.

इ. स. १९२२-२३ मध्यें इमारती बांधण्यासाठीं सरकारनें ३२३ दशलक्ष क्राउन खर्च करावयाचे ठरविलें. रेल्वेमध्येंहि बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या. त्यामुळें दळणवळणाची सोय झाल्यानें चेकोस्लाव्हेकियाचा व्यापार भराभर वाढत चालला. पाण्याचा मुबलक पुरवठा व्हावा या हेतूनें १९२४ मध्यें लतवा व सझवा या नद्यांचें पाणी आणण्यासाठीं १७ नवीन विद्युत्गृहें बांधण्यांत आलीं व आणखीहि बांधण्याचें काम चालू आहे. स्लोव्हाक लोकांनीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं जी चळवळ चालविली होती, तिला कांहीं लोक विरुद्ध होते. अशा प्रमुख लोकांचा खून करण्याचा कट टेररिस्ट नांवाच्या एका संघामार्फत करण्यांत आला. पण पोलिसांच्या चतुराईमुळें तो सिद्धीस गेला नाहीं. डॅन्यूब येथें दरवर्षी जी प्रचंड यात्रा भरते त्यावेळीं बैलांची झुंज करण्यासाठीं एक स्वतंत्र फंड उभारण्यांत आला होता. ही झुंज पहाण्यासाठीं एक स्वतंत्र सभागृह बांधण्यांत आलें होतें. या कार्याचा लोकांनीं ताबडतोब निषेध केला पण शेवटीं झुंज व्हावयाची ती झाली.

इ. स. १९२४ त चेकोस्लोव्हेकियाजवळ १५०,००० सैन्य होतें व १२८ विमानें होतीं. १९२३ मध्यें लंडन, कोलोन, प्राग, व बुडापेस्ट यांमध्यें रोजच्या रोज वैमानिक दळणवळण सुरू ठेवण्यासाठीं एक कंपनी उघडण्यांत आली. यूरोपांत व्यापाराला वाव मिळावा यासाठीं इंग्लंड, फ्रान्स यांच्याशीं तह करण्याचे चेकोस्लोव्हेकियामध्यें प्रयत्न चालले होते. १९२३ मध्यें मसरिक हा पॅरीस येथें गेला असतां त्याचें तेथें अगी स्वागत करण्यांत आलें व त्याचा परिणाम फ्रान्स व चेकोस्लोव्हेकिया यांचा तह होण्यांत झाला. या तहाप्रमाणें यूरोपमध्यें अशांततेचा भंग होण्याची वेळ आल्यास परस्परांनीं परस्परांच्या सल्लयाप्रमाणें वागावें. होएनझोलर्न व हॅप्सबर्ग या राजघराण्यांनीं आपली सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केल्यास त्याला दोन्ही राष्ट्रांनीं विरोध करावा असें ठरविलें. त्याचप्रमाणें लष्करविषयक कांहीं अटी त्या तहांत ठरविल्या. त्या अटीप्रमाणें चेकोस्लोव्हेकियांत शस्त्रें तयार करण्याचा कारखाना स्थापन झाला असून तो फ्रेंचांच्या ताब्यांत आहे. चेकोस्लोव्हेकियाचा युद्धाध्यक्ष फ्रेंच माणूस आहे. हा जो तह झाला तो फ्रेंचांच्या दृष्टीनें फार उपयुक्त होता. पण त्यामुळें इतर राष्ट्रांनां या तहाचे भावी परिणाम अनर्थकारी होतील असें वाटूं लागलें. या तहामुळें इटलीच्या व्यापाराला धक्का बसेल असें इटालियन मुत्सद्याला वाटलें तर फ्रान्स व रशियाचें नातें या तहामुळें अधिक निकटचें होऊन दोघांच्या कचाटींत जर्मनी सांपडणार असें जर्मनीनें ध्वनित केलें. ब्रिटनलाहि अशाच प्रकारची भीति वाटूं लागली. या तहामुळें पोल व झेकोस्लोव्हिकन लोकांत लवकरच तह होईल व पोलंडचा या छोट्या राष्ट्रसंघांत समावेश होईल असा रंग दिसत आहे.

सा मा जि क का य दे—इ.स. १९१७ सालीं अपघात व आजाराविषयींचा इन्शुअरन्स ॲक्ट पास करण्यांत आला. कामकऱ्यांचे कामाचे तास आठ ठरविण्यांत आले व मजुरीसंबंधींचे नियम आंखून देण्यांत आले. घरभाड्यासंबंधींहि स्वतंत्र कायदा करण्यांत आला.

**चेंगीझखान** ( ११६२-१२२७ ):—यास चेंगीझखान व जंगीझखान असेंहि म्हणतात. मोंगल वंशांतील येसुकी नामक एका सुभेदाराचा हा मुलगा. याचें आडनांव तमुजिन्. जेंगीझखान हा ११६२ सालीं जन्मला; आणि वयाच्या तेराव्या वर्षी राज्य करूं लागला. परंतु पुढें प्रजेच्या असंतोषामुळें तो सुरक्षिततेकरितां आवन्तखान नांवाच्या तार्तरी राजाच्या आश्रयास पळून गेला. तेथें चेंगीझनें या राजाच्या मुलीशीं लग्न लावलें. कांहीं कालानंतर सासऱ्याजावयांत बेबनाव होऊन आवन्तखान हा चेंगीझच्या शत्रूस मिळाला. परंतु वयाच्या ४९ व्या वर्षी चेंगीझनें आपल्या सर्व शत्रूंवर जय मिळविला. त्यामुळें तार्तरीच्या सरदारमंडळाकडून चेंगीझ यास खाकन असा किताब मिळाला ( १२०६ ) व तार्तरांचा राजा म्हणून त्यास राज्याभिषेक करण्यांत आला. कराकर्म ही त्याची राजधानी होती. बावीस वर्षांच्या अवधींत चेंगीझनें, कोरिया, कॅथे ( चीनमधील एक प्रदेश ) आणि आशियामधील कांहीं सधन व सुपीक प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडिले. यूरोपांत जर्मनीपर्यंत चेंगीझची फौज गेली होती. त्यानें जिंकलेल्या राज्याची लांबी साडेपांच हजार मैल व रुंदी तीन हजार मैल होती. यामुळें शिकंदर बादशहाप्रमाणें सर्वत्र चेंगीझची कीर्ति झाली. तो २९ ऑगस्ट १२२७ रोजीं मरण पावला. आपलें राज्य त्यानें ज्युजी, ओक्ताई, चघ्ताई व तुलीखान या चार पुत्रांनां सारखें वाटून दिलें होतें. दिल्लीचा बाबरचा वंश हा चघ्ताई नांवाच्या पुत्राचा वंशज असल्यानें त्याला चकत्यांचा वंश व मोंगली राज्यास चकत्यांची पातशाही म्हणत असत. जगज्जेत्या वीरांमध्यें चेंगीझखानाची प्रामुख्यानें गणना करितात. लहान मोंगल संस्थानिक म्हणून त्याचा जन्म झाला पण मृत्युसमयीं चीनच्या समुद्रापासून यूरोपांतल्या नीपर नदीच्या तीरांपर्यंत त्याचें विजयी सैन्य

फिरून आलें होतें. [ सर रॉबर्ट डग्लस--दि लाईफ ऑफ चेंगीझखान; बील; होवर्थ-दि हिस्टरी ऑफ दि मोंगोल्स ].

**चेचेंझे**—हे लोक पूर्व काकेशस पर्वतावर रहातात त्यांनीं सर्व दघिस्थान व्यापलेलें आहे. ते जंगली व क्रूर असून १८ व १९ व्या शतकांत रशियन लोकांनीं त्यांच्यावर केलेल्या स्वाऱ्यांना त्यांनीं चांगलेंच तोंड दिलें. ते स्वातंत्र्यप्रिय व समतावादी आहेत. उत्तम पोषाख करण्याची त्यांनां फार आवड आहे. परंतु त्यांचीं घरें भिकार असतात. ते उदार व आदरशील परंतु सूड घेणारे आहेत. ते मुसुलमानी संप्रदायाचे आहेत; तथापि त्यांनां कांहीं ख्रिस्ती संप्रदायांतीलहि तत्त्वें व विधी मान्य आहेत.

**चेटवई**—मद्रासच्या मलबार जिल्ह्याच्या पोन्नानी तालुक्यांतील एक खेडें. येथील लोकसंख्या इ. स. १९०१ सालीं ३२१६ होती. हें झामोरिनपासून इ. स. १७१७ त डच लोकांनीं घेतलें. व त्यांत किल्ला बांधून आपल्या पश्चिमेकडील प्रांताच्या राजधानीचें ठिकाण केलें. हैदरअल्लीनें इ. स. १७७६ त हा किल्ला सर केला. इ. स. १७९० त जेव्हां हें ठिकाण इंग्रजांच्या ताब्यांत आलें तेव्हां त्यांनीं कोचीनच्या राजास इ. स. १८७५ पर्यंत मक्त्यानें दिलें. त्यानंतर कंपनी सरकारनें हें आपल्या राज्यास जोडिलें.

**चेट्टी**—चेट्टी ही जात नसून तो एक धंद्याचा वाचक शब्द आहे. चेट्टी म्हणजे व्यापारी ( श्रेष्ठी ). कित्येक तेलगु व तामीळ व्यापारी आपल्या नांवापुढें चेट्टी हें उपपद लावतात. मद्रास इलाख्यांत यांची वस्ती आहे. कांहीं ब्रह्मदेशांतहि आढळतात. १९११ च्या खानेसुमारींत सुमारें चार लाख चेट्टी नोंदले गेले आहेत. कोमटयांपासून यांनां वेगळें काढणें कठिण जातें हा चेट्टी श्रेष्ठीचा अपभ्रंश आहे. स्थानभिन्नत्वाप्रमाणें चेट्टींमध्यें पोटजाती बनल्या आहेत. त्रावणकोरकडे यांच्या ४ मुख्य पोटजाती आहेत. ( १ ) कोट्टर ( २ ) परकायी, ( ३ ) एलूर व ( ४ ) अत्तुंगल. यांचे बरेचसे आचारविचार तामिळ शूद्रांच्याच सारखे आहेत [ से. रि. ( कोचीन, त्रावणकोर व मद्रास ) १९११ ].

**चेदि**—अर्वाचीन चंदेल. बुंदेलखंडाचा दक्षिणभाग व जबलपूर ( रेवा )चा उत्तरभाग या दोहोंचा चेदी देशांत अन्तर्भाव होतो. हें एक प्राचीन राष्ट्र होतें. शिशुपालवधानंतर त्याचा मुलगा धृष्टकेतु हा चेदींचा राजा झाला. हा धृष्टकेतु एक अक्षौहिणी सैन्य घेऊन युधिष्ठिराकडे आला होता. द्यूतांत राज्य गेल्यावर नलराजा वनांत गेला. तेथें दमयंतीस निजल्याजागीं सोडल्यावर ती उठून फिरत फिरत चेदि देशास आली ( वनपर्व अ. ६५ श्लो. ४५ ). चेदि देश भीम द्विग्विजयांत पूर्वेस वर्णन केला आहे. पूर्वापार संदर्भावरून तो आग्नेयीस ( इंद्रप्रस्थाच्या ) होता असें दिसतें. यावरून विदर्भ देशाच्या बऱ्याच पूर्वेस किंवा ईशान्येस चेदि देश होता व त्याच्या पूर्वेस निषेध देश होता असें दिसतें. चेदि देशाची राजधानी शुक्तिमती नामक होती. द्विग्विजयार्थ भीमसेन पूर्वेस निघाला व त्यानें पूर्व देश जिंकला. नंतर तो चेदि देशांत गेला. तेथील राजा शिशुपाल यानें त्याचा फार सत्कार केला. शिशुपाल व भीम हे मावस भाऊ होते. चेदि देशांत भीमसेन तेरा दिवस राहिला होता. [ महाभारत; शं. बा. दीक्षित-भारतीय भूवर्णन ].

**चेदूब बेट**-खालच्या ब्रह्मदेशाच्या क्यउकप्यू जिल्ह्याच्या आराकान किनाऱ्यापासून कांहीं मैलांवर हें बेट आहे. याचें क्षेत्रफळ ३०८ चौ. मैल आहे. सन १९११ त याची लोकसंख्या ३०१९७ होती. याचा आकार त्रिकोणासारखा आहे. याच्या वायव्येकडील भागांत एक ज्वालामुखी टेकडी आहे. यांतून तांदूळ व तंबाखू बाहेर जातात. मुख्य शहर चेदूब. लो. सं. ( १९०१ ) १५४०.

**चेंबर्स, रॉबर्ट** ( १८०२-१८७१ ).—ऐतिहासिक व शास्त्रीय विषयांवर लिहिणारा हा प्रसिद्ध ग्रंथकार पीबलस येथें जन्मला. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यानें स्वतःच्या हिंमतीवर एडिंबरो येथें एक पुस्तकाचें दुकान काढलें. फावल्या वेळीं तो अभ्यासहि करीत असे. 'ट्रॅडिशन्स ऑफ एडिम्बरो' नांवाचें एक पुस्तक यानें १८२४ त प्रसिद्ध केलें. हें पुस्तक लिहिण्यांत त्यास सर वॉल्टर स्कॉटची मदत झाली होती. ऐतिहासिक, सामाजिक, व शास्त्रीय विषयांवर त्यानें अनेक निबंध व पुस्तकें लिहिलीं आहेत. आपल्या भावाच्या मदतीनें त्यानें 'चेंबर्स जर्नल' म्हणून एक नियतकालिक चालविलें व 'विलियम अँड रॉबर्ट चेंबर्स' नामक एक प्रकाशक कंपनीहि त्यानें काढली. १८४२-१८४४ च्या दरम्यान त्यानें इंग्रजी वाङ्मयाचा कोश ( सायक्लोपेडिया ऑफ दि इंग्लिश लिटरेचर ) तयार केला. या ग्रंथाच्या अनेक आवृत्ती निघाल्या आहेत. १८५९ ते १८६८ च्या दरम्यान त्यानें " चेंबर्स सायक्लोपेडिया " नामक ग्रंथ दहा भागांत छापून प्रसिद्ध केला. व्हेस्टिजेस ऑफ क्रिएशन ( उत्पत्तीचा छडा १८४४ ), पॉप्युलर ऱ्हाईम्स ऑफ स्कॉटलंड ( स्कॉटलंडचीं सर्वमान्य कवनें ), डिक्शनरी ऑफ एमिनंट स्कॉचमेन ( विख्यात स्कॉच पुरुषांचा चरित्रकोश ) वगैरे आणखी ग्रंथ त्यानें लिहिलेले आहेत. यास एल्.एल्. डी. ची बहुमानात्मक पदवी मिळाली होती.

**चेयूर**—मद्रासच्या चिंगलपट जिल्ह्याच्या मदुरांतकम् तालुक्यांतील शहर. यांत इ. स. १९११ सालीं ६०८० लोकसंख्या होती. यांत तीन जुनीं देवळें असून त्यांवर चोल घराण्यासंबंधीं शिलालेख आहेत. यांत पुष्कळ मिठाच्या खाणी आहेत.

**चेर घराणें**—चेर घराणें व कोंगु घराणें हीं भिन्नभिन्न होतीं किंवा एकच असून निरनिराळ्या नांवानें संबोधिलीं जात होतीं याबद्दल अद्यापपर्यंत बराच मतभेद आहे. परंतु चेर घराणें हें कोंगु घराण्याच्या पूर्वी होऊन गेलें व तें त्याच प्रांतावर राज्य करीत होतें या मतास बरीच बळकटी येत चालली आहे. कोंगु घराण्यांतील प्रथम सात पुरुषांस चेर हेंच नांव दिलें पाहिजे.

कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, चेर घराणें पश्चिम-किनाऱ्यावर राज्य करीत असून त्याचें राज्य पाण्ड्यांच्या उत्तरेस, पल्लव व चोल यांच्या पश्चिमेस, सह्याद्रीच्या समुद्र-कांठच्या भागांत व कोंकणच्या दक्षिणेस असून तें तेथें फार पुरातन कालापासून राज्य करीत होतें. हल्लींचा पालघाटच्या भोंवतालचा व सालेम आणि कोइंबतूरच्या आसपासचा प्रदेश यांत असे. शेवटीं कोंगु राजांनीं म्हैसुर व इतर प्रांत ( पश्चिम किनाऱ्यालगतच्या भागाशिवाय सर्व प्रदेश ) त्यांच्यापासून हिरावून घेतला. यूरोपांतील सर्व जुन्या भूगोलवेत्यांनीं व हिंदुस्थानांतील सर्व प्राचीन ग्रंथकारांनीं चेर राजांचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांनां चोल व पाण्ड्य यांचे समकालीन म्हटलें आहे व अशोकाच्या शिलालेखांतहि त्यांचा असाच उल्लेख असून त्यांच्या राजास केरळपुत्र म्हटलें आहे. टॉलेमीच्या मतें करूर ही त्यांची राजधानी होती. ह्युएनत्संग हा त्या राष्ट्राचा उल्लेख करीत नाहीं पण त्यांतील एका भागास कोंकणपुर ( कोंकण ) असें नांव देतो. प्लिनी व पेरिप्लुस यांच्या ग्रंथांतहि चेरांचा उल्लेख आढळतो.

पुराणांतून व तामीळ वाङ्मयांतून चेर राजवंशाचें नांव येत असतें. कावेरीच्या दक्षिणेकडे प्रथम चोलांचें मोठें साम्राज्य होतें. त्यांनां चेरांनीं जिंकलें व चेरांनां पुढें पाण्ड्यांनीं जिंकलें असें म्हणतात. ख्रिस्ती शकाच्या प्रारंभीं हीं तिन्हीं राज्यें सुव्यवस्थित रीतीनें दख्खनमध्यें नांदत होतीं. चेर व चोल यांचीं आपापसांत नेहमीं भांडणें होत व परस्परांचे प्रांत परस्पर नेहमीं काबीज करीत. कधीं कधीं त्यांच्यांत सोयरिकी होऊन तात्पुरतें भांडण मिटतहि असे. कारिकाल चोलानें, चेर राजाचा पराभव करून आपली मुलगी त्याच्या मुलास दिली होती. पुढें करिकालाच्या मुलानें आपल्या मेव्हण्याचा पूहर येथें स्वारी करून पराभव केला.

परंतु पुढें थोड्याच दिवसांत शेंगुत्तुवन (तांबड्या रंगाचा) चेरराजानें नेदुमुडी किल्लीराज चोलाला पराभूत करून आपला अधिकार त्याच्यावर बसविला. मात्र चेरांची ही राजसत्ता एकच पिढीपर्यंत टिकली. पुढें पाण्ड्यराजानें ती बळकाविली. हा शेंगुत्तुवन चेर मोठा पराक्रमी होता. यानें अश्वमेध यज्ञ करून वंजी ( पश्चिम किनाऱ्याकडील ) येथें एक पट्टिनी देवीचें मंदीर बांधलें. त्या समारंभासाठीं सीलोनचा राजा गजबाहु आला होता. शेंगुत्तुवनाचा मुलगा गजदृष्टी ( हत्तीसारखी दृष्टी असलेला ) हाहि एक प्रख्यात चेरराजा होता. हा आपल्या बापाच्या वेळीं तोंडी येथें राजप्रतिनिधी होता. यानेंहि बऱ्याच लढाया मारल्या होत्या. शेवटीं पाण्ड्यराजानें याचा तलैआलंगानम् येथील लढाईंत पराभव करून त्याला कैद केलें व येथून चेरांच्या अधिराज्यास उतरती कळा लागली ( ख्रि. पू. १ लें शतक ). गजदृष्टीच्या ताब्यांतील ( तो राजप्रतिनिधी असतांना ) प्रदेश, कोल्ली मलाईपासून तोंडीपर्यंत असून त्याच्या दोन्ही बाजूस चोल व पाण्ड्य हीं राज्यें होतीं. चेरांचें राज्य म्हणजे हल्लींचा सर्व मलबार किनारा ( मलबार जिल्हा व त्रावणकोर आणि कोचीन संस्थानें ) होय. कन्याकुमारीपासून उत्तरेस मंगलोरपर्यंत व आरबी समुद्रापासून पूर्वेस सह्याद्री (क्वचित् सह्याद्रीच्या पुढें म्हैसूरकडील थोडासा भाग) पर्यंत हा प्रदेश येतो. या घराण्याची राजधानी वंजी येथें होती. पेरियानदीच्या कांठीं वंजी हें शहर होतें. तिला वंची अथवा करूर असेंहि म्हणत हल्लीं या गांवास तिरूकरूर म्हणतात. व तें कोचीनच्या ईशान्येस चौदा कोसांवर पेरियरजवळ आहे. पुढें कुलशेखर अळवार याच्या वेळीं ही राजधानी क्वीलोन येथें गेली. पुन्हां तिरुवंजीकलम् नांवाची आणखी एक राजधानी झाली. ही पेरीयार नदीच्या मुखाशीं होती. तामीळवाङ्मयांतील ( इ. स. १ लें शतक ) उल्लेखावरून चेरांच्या राज्याचे पांच नाडू ( प्रांत ) होते असें दिसतें. ( १ ) पुली ( वालुकामय पुलिन भाग ) प्रांत, अगलप्पुलपासून पोनानी नदीच्या मुखापर्यंत;( २ ) कुडम (पाश्चिमात्य) प्रांत पोनानीपासून अर्णाकुलमपर्यंत; ( ३ ) कुट्टम ( सरोवरांचा ) प्रांत कोट्टायम व क्विलनजवळील; ( ४ ) वेणप्रांत, क्विलन ते कन्याकुमारीपर्यंतचा; ( ५ ) कर्क ( खडकाळ ) प्रांत. कुडमप्रांताच्या पूर्वेस चेर व केरळ हे एकच शब्द होत. तामीळ चेरळ शब्दाचेंच कानडी रूप केरळ होय. चेरांच्या देशाला चेरळम् किंवा चेरळनाडु म्हणत व राजांनां चेरळ आदन अथवा चेरळचुद्दसम पोरेई म्हणत. चेरळम् म्हणजे पर्वतांची रांग होय. मलबार याचाहि अर्थ असाच होतो.

या राजवंशाबद्दल याशिवाय जास्त माहिती आढळत नाहीं. ख्रिस्ती शकाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकांच्या मागील यांचा इतिहास चांगला आढळत नाहीं. व जो हल्लीं आढळत आहे तोहि वर दिल्याप्रमाणें अपुराच आहे. फक्त कांहीं राजांचीं नावें आढळतात. त्यापैकीं दोन नांवें वर दिलींच आहेत. त्याशिवाय आणखी दोन नांवें आढळतात. स्थाणुरवि चेरराज हा आदित्य चोलराजाचा समकालीन व मित्र होता. इ. स. ३८९ च्या सुमाराम नंबूरी व नायर लोकांनीं चेरराजाविरुद्ध बंड करून त्याचा कांहीं प्रांत बळकावला होता. या चेरांचा शेवटचा राजा चेरमाण पेरुमाल हा होय. हा सन ८२५च्या सुमारास होता. याच्या वेळीं अरबांनीं मलबार किनाऱ्यावर स्वाऱ्या केल्या. याचें राज्य पाण्ड्यराजानें घेतल्यावर हा आरबांच्या बरोबर मक्केला गेला. व तेथें त्यानें मुसुलमानी धर्म स्वीकारला. तो तेथें ८३१ त मेला. मलबार प्रांतांत मुसुलमानी धर्माच्या प्रसारासाठीं आरबांनां पाठविलें अशी एक गप्प तुहफतुल् मुजाहिदीन या मुसुलमानी बखरींत आढळते याच्या राज्यांत ग्रामपंचायतींनां अतिशय अधिकार दिलेले होते. याच्या शिलालेखांत कोल्लम किंवा मलबार शक वापरीत. हा इ. स. ८२४–२५ या सालीं सुरू झाला. कांहींचें म्हणणें हा शक चेरमाण यानें आपल्या राज्याभिषेकापासून सुरू केला व कोल्लम अथवा क्विलन हें शहरहि त्याच वेळीं स्थापिलें. या वंशाचीं जीं नाणीं सांपडतात

त्यांवर मनुष्य,बाण व तरवार यांचें चित्र असतें.[ माबेलडफ; अय्यंगार—एन्शन्ट इंडिया; इंडि. अँटिक्वरी. पु. १,२, ५, ८; एपिग्राफिआ इंडिका. पु. ५; सालेम डिस्ट्रिक्ट मॅन्युअल; साऊथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स; स्मिथ—अर्ली व ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ इंडिया; तामील्स, एटीन हंड्रेड इयर्स अँगो. ].

**चेरात**—हें वायव्येकडील प्रांताच्या पेशावर जिल्ह्याच्या नौशहर तहशिलींत रोग्यांकरिता हवा खाण्याचें व छावणीचें ठिकाण आहे. यांत सन १९०१ सालीं लोकसंख्या ३७६ होती. यांत उन्हाळयांत उष्णता ८२ डिग्री असते. यांत पाण्याचा पुरवठा चांगला केला आहे.

**चेरापुंजी**—आसामच्या खासी टेकडयांतील एक खेडें. यांत वर्षांत सरासरी ४५८ इंच पाऊस पडतो. याच्याइतका पाऊस आशियाखंडाच्या दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं पडत नाहीं. यांत सन १८६१ त ९०५ इंच पाऊस पडला होता, व १८७६ त २४ तासांत ४१ इंच पडला होता. येथें प्रथम खासी टेकडयांतील मुख्य ठाणें होतें. नंतर तें सन १८६४ त शिलांग येथें नेण्यांत आलें. येथें दवाखाना व एक इंग्रजी शाळा आहे. स. १८९७ त धरणीकंपाचा धक्का बसला होता. येथें उत्तम प्रकारच्या कोळशाची खाण आहे.

**चेरिअल**.—हैद्राबाद संस्थानच्या नलगोंड जिल्ह्याचा तालुका आहे. याचें क्षेत्रफळ ७३९ चौ. मैल आहे. लोकसंख्या १९११ त १८७२६५. यांत १९१ खेडीं आहेत; व त्यांपैकीं २७ जहागिऱ्या आहेत. यांतील जमीनीचें उत्पन्न १०७ लाख आहे. पहिल्यानें तालुक्याचें ठाणें चेरिअल येथें होतें. इ. स. १९०५ त वरंगळ जिल्हा जेव्हां रद्द करण्यांत आला तेव्हां त्या जिल्ह्याच्या वर्दन्नापेठ तालुक्यांतील पुष्कळ खेडीं यास जोडण्यांत आलीं व येथील मुख्य ठाणें जंगाव येथें नेण्यांत आलें. जंगाव निझाम स्टेट रेल्वेवर स्टेशन आहे. यांत तांदूळ पिकतात व जमिनीस तळ्याचें पाणी देतात.

**चेरुमन**—मद्रास इलाख्यांतील एक शेतकरी जात. एकंदर लो. सं. ( १९११ ) २५६४७३. ( यांत पुलैयन धरले नाहींत. ) ही विशेषेंकरून मलबारांत आढळते. उत्तर मलबारांत यांनां पुलयन म्हणतात. यांच्या चाळीसांवर पोटजाती आहेत; पैकीं कनक्कन, पुल, एर, रोळी व कूडान या मुख्य आहेत. ब्रिटिश राज्य सुरू होण्यापूर्वी वसुलाच्या बाकीबद्दल गुलाम देण्याची मलबारांत चाल असे. त्या काळीं चेरुमन हे गुलाम म्हणून दिले घेतले जात. लग्नाला, श्राद्धाला पैसे यांचे मालक देत. वरील जातींकडून ही जात अस्पृश्य गणली जाते. चेरुमन लोकांच्या घरांनां चाळ ( झोपडी ) म्हणतात. चेरुमींचे कटिवस्त्र गुडघ्यापर्यंत देखील नसतें वक्षस्थळ उघडें असतें. त्यांच्या हाताकानांत मोठमोठीं तांब्यापितळेचीं कडीं घालतात. लग्नांत नवऱ्याची बहीण नवरीला हुंडा देते. लग्न समारंभांत बायकापुरुष एकत्र नाचतात. गृहप्रवेशानंतर वधूनें मोठमोठ्यानें रडून आपल्या अवस्थेबद्दल शोक करण्याची चाल आहे. ऋतुस्नाता होण्यापूर्वी मुलींचीं लग्नें उरकलीं जातात. गरीबीमुळें एखादीचें लग्न होत नसेल तर शिष्ट लोक वर्गणी जमवून आपल्यापैकीं कोणा एकाशीं तिचें लग्न लावितात. ऋतुस्नाता कुमारीला वाळींत टाकण्यांत येतें. यांच्यांत घटस्फोट फार सोपा आहे. पुलयनांमध्यें लग्नाचा खर्च घेऊन नावडत्या बायकोला दुसऱ्याला देऊन टाकण्यांत येतें. पुष्कळदां चेरुमन नवराबायको एकाच धन्याजवळ रहातात. पहिलें मूल बायकोच्या धन्याचें म्हणून समजलें जातें. पुढील मुलेंहि वयांत आल्यावर आईच्या मालकाचे नोकर होतात. पराया पुरुषाशीं चेरुमीनें व्यभिचार केल्यास तिला बहिष्कृत करतात. बहुधा ती नंतर ख्रिस्ती किंवा मुसुलमान होते. यांच्यांत मृतांनां पुरून वर दगड रोवितात. [ थर्स्टन ].

**चेरो**—ही बिहार ओरिसामधील जात बरीच प्रसिद्ध आहे. लोकसंख्या ( १९११ ) सुमारें २००००. मुंडा व कोलेरियन वर्गांत हिचा समावेश होतो. छोटा नागपूर संस्थानांतहि यांची वस्ती आहे. बुकानन व डाल्टन यांच्या शोधावरून असें अनुमान निघतें कीं हे पूर्वी बिहारमध्यें सत्ताधीश होते. यांच्या बांधकामाचे अवशेष अद्याप दिसतात. शाहबाद येथील जुनाट बांधकामें यांचींच आहेत. बुद्धगयेंतील एका शिलालेखांत फुदीचंद्राचें नांव आहे. हा चेरो होता अशीं परंपरागत कथा आहे. यास शहाबादमधून कोणाच्या मतें सावारानीं कोणाच्या मतें हरीरानीं ख्रिस्ती शकाच्या ५ व्या किंवा ६ व्या शतकांत हांकून दिलें. चेरो व सावर या दोघांसहि ब्राह्मण अपवित्र समजतात, पण हरिरांस क्षत्रिय समजतात. मिथिला व मगध देशांत चेरो लोक आढळत नाहींत. आतां ते शहाबाद जिल्ह्यांत मात्र सांपडतात. पालामऊमध्यें मात्र यांचें राज्य कांहीं दिवस शिल्लक होतें पण इंग्रजांनीं तेंदेखील घेतलें. यांच्या दंतकथांवरून यांनीं पालामऊ प्रांतावर रजपूतांचें साह्य घेऊन स्वारी केली. मग रजपुतांवर रंका व चैनपूरच्या ठाकुरांनीं स्वारी केली व त्यांस सुरगुजांत घालविलें. चेरो लोकांनीं युद्धांत मदत केल्यामुळें त्यांस पुष्कळ जमीनी इनाम मिळाल्या. या अद्याप त्यांच्याकडे आहेत. खेरवारांनीं या लोकांस तेथें राहू दिलें. चेरो लोक मात्र रजपूत रिवाजाप्रमाणेंच रहातात. खैरवार हे चेरो व संताळ लोकांपासून झालेली एक शाखा असावी पालामऊमध्यें चेरो लोकांचे दोन वर्ग आहेत. एकाचें नांव 'बारा हजार' व दुसऱ्याचें 'तेरा हजार' बीरबांधीं असेंहि नांव आहे. बारा हजाराचा दर्जा वरचा आहे. तेरा हजार हे बारा हजारांचे लेकवळे आहेत.

यांच्या चेहऱ्याची ठेवण हिंदू रक्ताच्या मिश्रणानें बरीच निवळली आहे. तरी पण यांच्या चेहऱ्यांत मंगोल ठेवण स्पष्ट आहे.यांचा रंग गव्हासारखा असतो. यांच्या गालावरचें हाड उंच असतें डोळे तिरपे असतात, नाक रुंद व चपटें

असतें. तोंड मोठें व ओठ बाहेर आलेले असतात. [ रसेल व हिरालाल ].

**चेरों**—आसामच्या खासी टेंकड्यांमध्यें एक लहान संस्थान आहे. इ. स. १९११ त येथील लोकसंख्या ९११८ होती. याचें उत्पन्न १९०३–०४ सालांत ७९०० रु. होतें. यांत कोळशाची व लोखंडाची खाण आहे. यांत बटाटे, संत्रे, कापूस, बाजरी, सुपारी, विड्याचीं पानें, मोहरी, सुंठ व मध होतात. याचा संस्थानिक ठरलेला नाहीं. सन १९०१ त जेव्हां नवा संस्थानिक नेमण्यांत आला त्या वेळेस दंगेधोपे झाले होते.

**चेल**—पंजाबमध्यें पतियाळा संस्थानांतील पिंजार तहशिलींत पतियाळाच्या महाराजांचें उन्हाळयांतील हवा खाण्याचें मुख्य ठिकाण. सिमल्याच्या दक्षिणेस १९ मैल आहे. गुरख्यांबरोबर झालेल्या लढाईमध्यें इंग्रज सरकारनीं हें ठिकाण १८१५ मध्यें पतियाळा संस्थानास जोडलें.

**चेसेलडेन, विल्यम** ( १६८८–१७५२ ).—एक इंग्लिश सर्जन. विल्यम कौपर ( १६६६–१७०९ ) च्या हाताखालीं लंडन येथें शारीरविज्ञान शिकला व १७१३ त यानें ' अनाटॉमी ऑफ दि ह्यूमन बॉडी ' (मानव शरीरविज्ञान ) हा ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ फार लोकप्रिय होऊन त्याच्या तेरा आवृत्त्या निघाल्या. पुढें हा बडा सर्जन म्हणून निरनिराळया इस्पितळांवर नेमिला गेला. मूतखड्यावर पार्श्व शस्त्रक्रिया करण्यांत त्याची प्रसिद्धी होती. डोळयांतील बाहुलीवर शस्त्रक्रिया, कृत्रिम बाहुली बसवून कांहीं प्रकारचें अंधत्व बरें करणें या विद्येमुळें नेत्रशस्त्रक्रियेच्या शास्त्रांत त्यानें बरीच प्रगति घडवून आणिली. सर आयझॅक न्यूटनच्या शेवटच्या आजारांत चेसेलडेनचें औषध चालू होतें.

**चेस्टरफील्ड**—इंग्लंडच्या डर्बीशायरमधील चेस्टरफील्ड प्रतिनिधी विभागाचें चेस्टरफील्ड हें शहर असून म्युनिसिपालिटीचा विभाग आहे. मिडलंड आणि ग्रेट सेंट्रल रेल्वेवर डर्बीच्या ईशान्येस हें २४ मैल आहे. १९२१ सालीं येथील लोकसंख्या ६१२३६ होती. येथें सेंटमेरी ऑलसेंट प्रार्थनामंदीर आहे. १८७९ सालीं स्टीफनसनच्या स्मरणार्थ बांधलेल्या दिवाणखान्यांत मोफत वाचनालय,नाटकगृह आणि कलांचे व पदार्थविज्ञानशास्त्राचे वर्ग आहेत. हॅप्टन हाउसमध्यें रहाणाऱ्या जॉर्ज स्टिफनसन इंजिनिअरची कबर ट्रिनिटी प्रार्थनामंदिरांत आहे. कापसाचे, रेशमाचे, तंबाखूचे, लोखंडाचे व पितळेचे कारखाने येथें आहेत. स्लेटपाटीच्या दगडाच्या, लोखंडाच्या व जस्ताच्या खाणी आहेत. येथील कारभार मेअर, ६ सनदी शहरचे अधिकारी व १८ सभासदांच्या हातांत असतो. शहरचें क्षेत्रफळ १२१६ एकर आहे. चेस्टरफील्डच्या पश्चिमेस ब्रॅम्पटन व वॉल्टन जिल्हे आहेत. येथील लोकसंख्या २६१८ आहे. आग्नेयीकडील हॅसलंड प्रांताची लोकसंख्या ७४२७ आहे व ईशान्येकडील ब्रिमिंग्टन विभागाची लोकसंख्या ४५६९ आहे. सॅक्सन लोकांनीं या शहराला चेस्टरफील्ड असें नांव दिलें. डूम्सडेबुकवरून एवढेंच समजतें कीं हें न्युबोल्डच्या बेलिफाची हद्द असून राजाच्या मालकीचें होतें; व तें वुइल्यम पेव्हिरेलला मिळालें. १२०४ सालीं जॉननें वुइल्यम ब्रुअरला देऊन स्वतंत्र बरोचे सर्व हक्क शहरला दिले. १५९८ सालीं एलिझाबेथनें यास कॉरपोरेशन दिली. १८३५ पासून येथील कारभार मेअर, ३ सनदी शहरचे अधिकारी व १२ सभासदांच्या हातांत गेला. होलीक्रॉसच्या प्रीत्यर्थ येथें ८ दिवस जत्रा भरते. जॉनलॉर्ड वेक यानें येथें व्यापारी संघ स्थापण्याची परवानगी दिली. १२६६ सालीं बॅरन्स व राजकीय फौजेंत झालेल्या युद्धांत डर्बीचा अर्ल रॉबर्ट डीफेरर्स ह्याला कैद करण्यांत आलें. १५८६ सालच्या प्लेगनंतर झालेल्या यादवीमुळें पार्लमेंटच्या सैन्यास रजा मिळाली. कापसाच्या व रेशमाच्या धंद्यामुळें हें शहर चांगलेंच उर्जितावस्थेस आलें आहे.

**चेस्टरफील्ड फिलिफ डॉरमर स्टॅनहोप**( १६९४–१७७३ )—ह्याचें शिक्षण केंब्रिजमध्यें ट्रिनिटि कॉलेजांत झालें; व ह्या वेळांत त्यानें प्राचीन व अर्वाचीन भाषांचा चांगला अभ्यास केला. मोठाल्या वक्त्यांची त्याला विशेष आवड होती. नंतर त्यानें यूरोपांत प्रवास केला.

१७१५ सालीं कामन्ससभेंत ह्याला प्रवेश मिळाला. १७२६ त त्याला अर्ल ऑफ चेस्टरफील्ड ही पदवी मिळाली. १७२८ सालीं ह्याला वकील म्हणून हेगला पाठविलें. हेग येथें डच सरकारला १७४४ सालीं ऑस्ट्रियन सक्सेशन युद्धांत सामील करून घेण्याकरितां ह्याची पुनः नेमणूक झाली. तेथून परत आल्यावर त्याला आयर्लंडच्या लॉर्ड लेफ्टेनेंटची जागा देण्यांत आली. या कारकीर्दींत चेस्टरफील्डनें महत्वाचें काम केलें. त्यानें परंपरागत चालू असलेली लांच खाण्याची पद्धति मोडून टाकिली व उद्योगधंदे व शाळा स्थापिल्या. १७४६ मध्यें तो सेक्रेटरी ऑफ स्टेट या जागेवर आला आणि १७४८ त या जागेचा राजिनामा देऊन त्यानें पुढील आयुष्य वाचन व अध्ययन यांत घालविलें. दुसऱ्या जॉर्जनें " डयूक " हा किताब याला देऊं केला; परंतु ह्यानें तो स्वीकारला नाहीं. जॉनसनचा कोश प्रसिद्ध होण्याच्या वेळीं त्यानें चेस्टरफील्डला जें एक पत्र लिहिलें तें फार प्रसिद्ध आहे. त्यानें आपल्या मुलास लिहिलेलीं पत्रें फार प्रसिद्ध आहेत. ग्रंथकार या नात्यानें त्याचे चुटके व निबंध यांची ख्याति आहे. परंतु त्याचा वाङ्मयांतील दर्जा त्याच्या पत्रांवरच अवलंबून आहे. ह्या पत्रांत त्याचें चातुर्य, विनोद, स्वभावचित्र रेखाटण्याची कला आणि सूक्ष्मनिरीक्षण व अनुमान हीं उत्तम दिसून येतात.

**चैतन्य**—एका वैष्णव पंथाचा संस्थापक व धर्मसुधारक. हा बंगाल्यांत होऊन गेला. वल्लभपंथ व चैतन्यपंथ या दोहोंतील मुख्य भेद हा आहे कीं, एकानें ( वल्लभपंथानें ) धार्मिक आचारांवर म्हणजे बाह्य लक्षणांवर भर दिला होता तर दुसऱ्यानें भावनांवर म्हणजे अंतस्थ वृत्तींवर सर्व भर

दिला होता. चैतन्यानें भावनांचा परिपोष करण्याकडेच विशेष लक्ष दिलें. राधा व कृष्ण यांचें प्रेम, त्याचप्रमाणें इतर भक्तिविषयक विषयांसंबंधीं कीर्तनें करून लोकांचीं मनें (धर्माकडे) वळविण्याचा चैतन्यानें प्रयत्न केला. जयदेवादि संस्कृत कवींनीं व कांहीं प्राकृत कवींनीं सुद्धां कृष्ण व राधा यांच्या प्रेमासंबंधीं अनेक सुरस व मनोहर गीतें रचिलीं होतीं. त्या काळीं प्रचलित असलेल्या हिंदुधर्माच्या निवळ तान्त्रिक बाबतींची यथेच्छ निर्भर्त्सना करून त्याऐवजीं आध्यत्मिक भक्ति करण्याचा चैतन्यानें उपदेश केला. त्याचप्रमाणें जातिभेदाचा निषेध करून त्यानें मुसलमानांसकट सर्वांस आपल्या शिष्यशाखेंत घेतलें यावरून चैतन्य अधिक धैर्यशाली धर्मसुधारक होता असें म्हणावयास हरकत नाहीं.

चैतन्याचें मूळचें नांव "बिसंभर" (विश्वंभर) मिश्र असून त्याच्या पित्याचें नांव जगन्नाथमिश्र व आईचें नांव सची देवी होतें. जगन्नाथमिश्र प्रथम पूर्वबंगाल्यांत सिलहट येथें रहात असे; पण कनिष्ठ मुलगा जो विसंभर त्याच्या जन्मापूर्वी तो कलकत्त्याच्या उत्तरेस ६० मैलांवर भागीरथीच्या तीरीं असणाऱ्या नडिया अगर नवद्वीप येथें जाऊन राहिला होता. ज्येष्ठ पुत्राचें नांव विश्वरूप असून त्यास नित्यानंद असेंहि म्हणतात. जगन्नाथास मुलगे असे हे दोघेच या दोहोंच्या मध्यें आठ मुली झाल्या; पण त्या सर्व लहानपणींच वारल्या. श. १४०७ इ.स. १४८५ फाल्गुन शु. पौर्णिमा या दिवशीं चैतन्य जन्मला. पुढें कांहीं काळानंतर त्यास कृष्ण चैतन्य हें नांव मिळालें; त्याचे शिष्य त्यास कृष्णाचा अवतार समजत; व त्या नात्यानें गांवच्या स्त्रियांबरोबर तो पोरखेळ खेळला असेंहि सांगतात. पण ऐतिहासिक दृष्टया ही हकीकत खरी म्हणतां येत नाहीं. लहानपणीं भगवद्गीता व भागवत पुराण या ग्रंथांचा त्यानें विशेष अभ्यास केला होता. व बौद्धधर्माचा त्याच्या मनावर चांगला पगडा बसला होता असें समजण्यांत येतें. गौरंग व गौरचंद्र अशीं आणखींहि चैतन्यास दोन नांवें आहेत. अठराव्या वर्षी लक्ष्मी देवी (वल्लभाचार्यांची कन्या) नांवाच्या एका स्त्रीशीं लग्न करून त्यानें गृहस्थाश्रम पत्करला व शिष्य जमवून त्यांस प्रापंचिक शिक्षण देण्याचा क्रम सुरू केला. थोड्याच दिवसांत त्यानें प्रवास करावयास सुरुवात करून पूर्वबंगालमधील पुष्कळ ठिकाणें पाहिलीं. भिक्षा मागणें व गाणें हा त्याचा धंदा होता व यावर त्यानें बराच पैसा मिळवला. प्रवासांत त्याची बायको वारली. तेव्हां गृहीं परतल्यावर त्यानें दुसरें लग्न केलें. तो विसाव्या वर्षी गयेस पितृक्रिया करण्यास गेला व तेथून परत आल्यावर त्यानें आपल्या आयुष्यांतील मुख्य कामास सुरुवात केली. ब्राह्मणांच्या धार्मिक विधींचा अगर बाह्य आचारांचा निषेध करून मुक्ति मिळविण्याचा खरा व एकच मार्ग म्हटला म्हणजे श्रीहरीवर श्रद्धा ठेऊन त्याची भक्ति व नामसंकीर्तन करणें हा होय असें त्यानें प्रतिपादिलें. त्याचप्रमाणें जातिभेदाची निर्भर्त्सना करून विश्वबंधुत्वाचा उपदेश त्यानें केला.

ईश्वरावर श्रद्धा ठेवावी व त्याची भक्ति करावी ह्या दोन तत्त्वांचा उपदेश चैतन्याच्या पूर्वी अद्वैताचार्य नांवाच्या एका गृहस्थानें केला होता; दैनिक ब्रह्मकर्म संपल्यावर गंगाघाटाकीं जाऊन "धार्मिक बाह्य विधींच्या ऐवजीं श्रद्धा व भक्ति या दोन गोष्टी प्रस्थापित करण्याकरितां ईश्वरा तूं अवतार घे" असें ओरडण्याचा सदर ब्राह्मणाचा परिपाठ असे. असेंहि सांगतात कीं, सदर आचार्य चैतन्याचे गुरु असून पुढें चैतन्याचे शिष्य बनले. कांहींहि असलें तरी, इतर गोष्टी सोडून या दोनच तत्त्वांचा जाहीररीतीनें प्रसार प्रथमतः कृष्ण चैतन्यानेंच केला असें म्हणावयास हरकत नाहीं. त्याचा भाऊ नित्यानंद याचें त्यास साहाय्य असे. नित्यानंदास बलरामाचा अवतार समजत. श्रीहरीचें नामसंकीर्तन व यशवर्णन करण्यास यापुढें चैतन्यानें लोकांचा जमाव जमविण्यास आरंभ केला. आरंभीं आरंभीं अशीं कीर्तनें खासगी रीतीनें श्रीवास नांवाच्या (चैतन्याच्या) शिष्याच्या घरीं होत असत. लोक, विशेषतः कालीचे उपासक, या वैष्णवांचा तिरस्कार व उपहास करीत. एकानें तर हीं कीर्तनें जेथें होत असत त्या घराच्या पायऱ्यांवर बकऱ्याचें रक्त शिंपडून तांबडीं फुलें पसरून ठेवलीं. अशा कीर्तनप्रसंगीं भक्तीची तीव्रता इतक्या पराकाष्ठेस पोहोंचे कीं, मोठ्यांदा हरिनामाचा गजर करणारे व विशेषतः चैतन्य यांची "ब्रह्मानंदी लागली टाळी, कोण देहातें सांभाळी" अशी स्थिति होई. १५१० सालीं कट्व येथील केशवभारती यानें चैतन्यास संन्यासाश्रमाची दीक्षा दिली. संन्यास घेतल्यावर चैतन्य प्रथम पुरीस जगन्नाथाचें दर्शन घेण्यास गेला व तेथून सर्व देशभर आपल्या मताचा उपदेश करीत करीत ६ वर्षे हिंडला. एके प्रसंगीं तो काशीस गेला व तेथें शंकराचार्यांच्या अद्वैतपर मताच्या प्रकाशानंदाशीं त्यानें वादविवाद केल्याचें सांगतात. वेदांतसूत्रांवरील शंकराचार्यांचें भाष्य त्याज्य ठरवून त्यानें मुळांतील अर्थ उलट अधिकच गूढ करून ठेवला आहे असें चैतन्यानें म्हटलें आहे. बादरायणाचार्यांच्या शब्दांचा मूळ साधा, सरळ अर्थ न घेतां शंकराचार्यांनीं त्यांवर आपला स्वतःचा अर्थ लादला आहे. बादरायणाचार्यांनीं परिणामवादाचा पुरस्कार केला आहे पण शंकराचार्यांनीं तो टाकून देऊन त्याऐवजीं विवर्तवाद प्रतिपादिला आहे. चैतन्याच्या मतें पहिला परिणामवादच बरोबर आहे. येणेंप्रमाणें सर्व देशभर हिंडल्यावर तो पुनः पुरीस परत आला; तेथें त्यानें आपल्या आयुष्याचीं शेवटचीं अठरा वर्षे काढलीं व इ. स. १५३३ (शके १४५५) मध्यें तो निवर्तला. माबेल डफच्या मतें तो १५२७ त वारला. त्याच्या देहावसानाची कथा अशी सांगतात कीं, एकदा त्याला दृष्टांत झाला कीं श्रीकृष्ण जलविहार करीत आहेत. तेव्हां त्याला भेटण्या-

करितां तो समुद्रांत उतरला व बुडून मेला. कोणी म्हणतात तो देहासकट वैकुंठाला गेला.

चैतन्याच्या नांवावर जीं कांहीं मतें आहेत त्यांपैकीं कांहीं येणेंप्रमाणें:—कृष्ण हा परमेश्वर असून तो स्वतः इतका सुंदर आहे कीं प्रत्यक्ष मदनाच्या देखील मनांत त्याजविषयीं प्रेम उत्पन्न होतें. येवढेंच नव्हे तर स्वतःविषयींच तो कामुक होतो. त्याची परब्रह्म शक्ति सर्व विश्वाला व्यापून त्याच्याच मायाशक्तींच्या योगेंकरून ती सावयवरूप धारण करते. तो स्वतः सर्व वस्तूंचा आत्मा आहे. त्याच्या अंगीं विलासशक्ति असून ती द्विविध आहे. एकीच्या योगानें, गोपींशीं रासक्रीडा खेळत असतां, जितक्या गोपी तितकीं रूपें कृष्णानें धारण केलीं; ह्या शक्तीस "प्राभवविलास" म्हणतात. दुसऱ्या शक्तीच्या योगानें त्यास चतुर्व्यूह स्वरूप ( वासुदेव, संकर्षण इत्यादि ) धारण करतां येतें; हिला "वैभवविलास" म्हणतात. वासुदेव चित् अगर बुद्धीचा दर्शक आहे; संकर्षण आत्मसंवितचा, प्रद्युम्न प्रेमाचा व अनिरुद्ध विलासाचा दर्शक आहे. यांपैकीं एका व्यूहापासून नेहमींच्या अवतारांची उत्पत्ति आहे. सत्त्व, रज, तम हे तीन गुण ज्या मानानें प्रमुख भाग घेतात त्या मानानें श्रीकृष्ण हा अनुक्रमें विष्णु, ब्रह्मदेव, शिव हीं रूपें धारण करतो. सूर्याच्या उदयास्ताप्रमाणेंच श्रीकृष्णाचे विलासहि नित्य चालतात; त्याचे नित्य अगर शाश्वत स्वरूपाचे विलास गोलोकांत चालू असतात. श्रीकृष्णाच्या ठायीं तीन शक्ती आहेत. अंतःशक्ति म्हणजे चित्शक्ति, बाह्यशक्ति, म्हणजे जी आभास उत्पन्न करते ती; व विशिष्ट ( गुणान्वित ) शक्ति म्हणजे जी जीवस्वरूप धारण करते ती. त्याची मुख्य शक्ति म्हणजे जी मनाचा विकास करते अगर आनंद उत्पन्न करते ती; ही प्रेमशक्ति असावीसें वाटतें. हें प्रेम भक्ताच्या अंतःकरणांत जेव्हां स्थिर होतें तेव्हां त्यास महाभाव म्हणतात. प्रेम जेव्हां अगदीं परमावधीस पोहोंचतें तेव्हां तें राधास्वरूप बनतें. राधा ही सर्वांत अत्यंत प्रेम करण्यास योग्य ( प्रिय ) अशी असून ती सर्व गुणान्वित आहे. श्रीकृष्णाच्या परम प्रेमास ती पात्र झाली असून तीस प्रेमस्वरूप बनविल्यामुळें, अंतःकरणांतील कांहीं सुखकर भावना तिचीं भूषणें म्हणून समजण्यांत येतात. गोपींनीं विलास निर्व्याज प्रेमानेंच केले होते. परमात्मा अमित अगर मर्यादारहित असून तो चिन्मय असा एक परमाणु आहे. या दोघांचा एकमेकांशीं अगदीं नित्य संबंध असून, सदर संबंध कधींहि तोडून टाकतां येत नाहीं. भगवान श्रीकृष्ण हा "आश्रय" असून जीव हा "आश्रित" आहे. या दोहोंमधील संबंध अद्वैतपर त्याचप्रमाणें द्वैतपरहि आहे. म्हणजे चैतन्याचा वेदान्तविषयक सिद्धांत निंबार्काच्या सिद्धांताप्रमाणेंच आहे. ज्याप्रमाणें मधमाशी ही मधाहून वेगळी अगर भिन्न असून त्याभोंवती ती घिरट्या घालते व मधुपान केल्यानंतर ती मधानें युक्त अशी होते. म्हणजे मधवती होते तद्वत् जीव हा परमात्म्याहून वेगळा असून तो परमात्म्याचेंच सतत एकसारखें चिन्तन करतो. ( त्याच्या सहवासांत रहावयास पहातो. ) व नंतर प्रेमामुळें तो परमात्ममय होतो. तेव्हां व्यक्तिशः स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव तो विसरतो व त्याच्याच ( परमात्म्याच्या ) ठायीं तो लीन होतो. म्हणजे जीव व ईश्वर वस्तुतः भिन्न असूनहि ज्या ब्रह्मानंदाच्या स्थितींत जीव ईश्वराशीं पूर्ण तादात्म्य पावतो ती स्थिति या ठिकाणीं वर्णिली आहे. श्रीकृष्ण हा मायेचा स्वामी असून जीव हा तिचा दास आहे. जीव ज्या वेळीं मायापाश तोडतो तेव्हा त्यास आपलें स्वतःचें स्वरूप व ईश्वराशीं असलेला वास्तविक संबंध स्पष्ट कळून येतो. श्रीकृष्णाची प्राप्ति फक्त भक्तीनेंच करून घेतां येते.

कृष्णचैतन्य, नित्यानंद व अद्वैतानंद हे या संप्रदायाचे तीन 'प्रभु' समजले जातात. नित्यानंदाचे वंशज नडिया येथें व अद्वैताचे शांतिपुर येथें रहातात. हे या संप्रदायाचे ( आध्यात्मिक बाबतींत ) गुरु होत. खुद्द चैतन्यानेंच नित्यानंदास पीठाचा मुख्य अधिकारी नेमलें. नित्यानंदाचे स्त्रीवंशज बालेगार येथें, व पुरुषवंशज बराकपुराजवळ खोर्दु येथें राहतात. चैतन्यसंप्रदायाचीं मथुरा, वृंदावन येथें देवळें आहेत; मुख्य तीन देवळें बंगाल्यांत आहेत:—१ नडिया येथील चैतन्याच्या नांवाचें; २ आम्बिका येथील नित्यानंदच्या नांवाचें; ३ व अग्रद्वीप येथील गोपिनाथाच्या नांवाचें. सिल्हट जिल्ह्याच्या उत्तरभागांत ( येथेंच चैतन्याचा बाप प्रथम रहात होता ) भाकादक्षिण गांवाजवळच चैतन्याचें एक देऊळ आहे. जिल्ह्याच्या सर्व भागांतून येवढेंच नव्हे तर बंगालमधून सुद्धां पुष्कळ यात्रेकरू या ठिकाणाचें दर्शन घ्यावयास येतात. "राजशाही" जिल्ह्यांत "खेतुर" येथें त्याचें एक देऊळ बांधलें आहे. या ठिकाणीं आक्टोबर महिन्यांत जत्रा भरते. त्यावेळीं सुमारें २५००० माणसें येतात.

चैतन्य संप्रदायाचे लोक कपाळीं पांढरा "नाम" लावतात. एक रेघ नाकाच्या शेंड्यापर्यंत आलेली असते. गळ्यात तुळशीच्या मण्यांची तीन पदरी माळ घालतात व तशीच दुसरी एक माळ श्रीहरीनामाचा जप करतांना वापरतात. गुरूस देव समजून त्याची पूजा करणें हा ह्या पंथाचा विशेष होय. अद्वैतानंदाचे बहुतेक सर्व अनुयायी जातिभेद पाळतात. तथापि कांहीं थोडे ( बैरागी ) सदर भेद पाळीत नाहींत; या संप्रदायाच्या एका शाखेत जोगी व जोगिणी आहेत. ते एकाच मठांत रहातात; ते परस्परांशीं शारीरिक प्रेमसंबंधानें बांधलेले नसून अध्यात्मिक अगर सात्त्विक प्रेमसंबंधानें बांधलेले असतात. "सद्गोप" जातींतील राम सरम पाल नांवाच्या एका माणसानें सुमारें २०० वर्षांपूर्वी या पंथाची "कर्ताभाज" नांवाची शाखा स्थापन केली ( कर्ताभाज म्हणजे कर्ता अगर मुख्य त्याचे उपासक ). या शाखेंत सर्व जातींच्या लोकांस घेतलें जातें; भेदभाव

असा मुळींच पाळण्यांत येत नाहीं. मूळ प्रस्थापक ( याला कर्ता बाबा असेंहि म्हणत ) घोषपुर येथें निवर्तला. त्याच्या सन्मानार्थ त्याचे भक्त नियमितपणें जमतात. चैतन्यसंप्रदायाचे गुरु, मग ते पुरुष असोत अगर स्त्रिया असोत, अविवाहित असतात.

वर जे तीन प्रभू सांगितले त्यांनीं मुळींच ग्रंथ लिहिले नाहींत. तथापि चैतन्याच्या शिष्यांनीं विशेषतः " रूप " व " सनातन " यांनीं बरेच ग्रंथ लिहिले. सनातनानें लिहिलेल्या ग्रंथांपैकीं " रसामृतसिंधु" नांवाच्या एका ग्रंथांत भक्तिवृत्तीचें विशदीकरण करून भक्तिवृत्तिप्रत नेणाऱ्या निरनिराळ्या मानसिक अवस्था व भक्तीचे निरनिराळे प्रकार विशदपणें समजाऊन सांगितले आहेत. या संप्रदायाचें पुष्कळ वाङ्मय तयार झालें आहे.

[ वरील माहिती बहुंशीं डॉ. भांडारकर यांच्या ' वैष्णविझम् अँड मायनर रिलीजियस सिस्टिम्स ' या ग्रंथावरून घेतली आहे. याशिवाय एच्. एच्. विल्सनचे रोस्टन प्रसिद्ध केलेले ग्रंथ; हॉपकिन्स—रिलिजन्स ऑफ इंडिया; मोनियर विल्यम्स—ब्रॅम्हानिझम अँड हिंदुइझम बार्थ—रिलिजन्स ऑफ इंडिया, इत्यादि उपयुक्त ग्रंथ आहेत वृंदावनदासनें लिहिलेलें चैतन्यचरित्र बरेंच विश्वसनीय म्हणतां येईल. ].

**चैतसिंग**—काशीचा एक राजा. याचा बाप बळवंतसिंग इ. स. १७७० त वारल्यावर चैतसिंग हा गादीवर बसला. इ. स. १७७८ त फ्रेंच व इंग्रज यांच्यांत जेव्हां लढाई जुंपली, तेव्हां ई. इ. कंपनीला पैशाची अत्यंत गरज लागली व इंग्रजांची सत्ताहि धोक्यांत आली. त्यावेळीं वॉरन हेस्टिंग्जनें चैतसिंगाकडून लढाईच्या खर्चास मदत म्हणून ( ठराविक इजाऱ्याच्या रकमेशिवाय ) पांच लाख रु. वसूल केले. पुन्हां स. १७७९ व १७८० सालीं याचप्रमाणें ५।५ लाख मिळून तीन वर्षांत पंधरा लाख रु. त्यानें चैतसिंगाकडून काढले. अर्थातच इतकी रक्कम देण्याचें सामर्थ्य नसल्यानें चैतसिंग या जबर मागण्यांनीं नाखूष झाला व राहिलेली बाकी देण्यास त्यानें विलंब लाविला. तसेंच सर आयर कूट यानें ठरविल्याप्रमाणें काशी प्रांताच्या शेजारचा प्रांत जो बहार त्याच्या संरक्षणासाठीं ( काशी प्रांताच्या नव्हे ) चैतसिंगानें एक हजार घोडदळ ठेवावें असें कंपनीनें त्याला सांगितलें होतें. तें घोडदळ ठेवण्यास या प्रसंगीं पैशाच्या ओढाताणीनें राजास साधलें नाहीं. तेव्हां राजा बंड करण्यास तयार झाला असून व त्याच्याजवळ पैसा व माणसें भरपूर असूनहि तो कंपनीस तीं मुद्दाम देत नाहीं असा या त्याच्या वर्तनाचा विपरित अर्थ हेस्टिंग्जनें केला. एवढेंच नव्हे तर, तो मुद्दामच हट्टानें कंपनीची बरीच मागणी पुरवीत नाहीं व त्याचें कृत्य, तो कंपनीच्या हाताखालील मांडलिक राजा असल्यानें ( वास्तविक तो राजा कंपनीचा मांडलिक होता कीं दिल्लीच्या पादशहाचा मांडलिक होता हा प्रश्नच आहे. दिल्लीकरानें कंपनीस दिवाणीचा हक्क दिला असला तरी सार्वभौमसत्ता आपल्याकडे राखून ठेविली होती; ती कंपनीस मिळाली नव्हती. तेव्हां या दृष्टीनें कंपनीचा चैतसिंग मांडलिक बनूं शकत नाहीं. ) व त्यामुळें कंपनीस तिच्या संकटसमयीं आपल्या सर्व साधनांसह कांहीं एक आडकाठी पुढें न आणतां एकदम मदत करणें हें त्याचें कर्तव्य असल्यानें ज्याअर्थी तो ही मदत देण्यास टाळाटाळ करितो, त्याअर्थी तो राजद्रोहीहि आहे असें हेस्टिंग्जनें ठरविलें. हेस्टिंग्ज आपल्या कैफियतींत स्वतःच म्हणतो कीं, " या राजद्रोहाबद्दल मी त्याला खूप कडक शिक्षा देण्याचें ठरविलें होतें ". त्याप्रमाणें चैतसिंगाकडून पन्नास लाख रु. दंड घेण्याचें त्यानें ठरविलें व तो वसूल करण्यासाठीं हेस्टिंग्ज हा स्वतः काशीस गेला व चैतसिंगाच्या अडथळयास न जुमानतां त्यानें त्याला कैद केलें. तेव्हां तेथें रण माजून कंपनीच्या दोन तुकड्यांनां व त्यांवरील अधिकाऱ्यांनां चैतसिंगाच्या लोकांनीं कापून काढिलें ( २० आगष्ट १७८१ ) आणि राजास सोडविलें. तेव्हां हेस्टिंग्ज हा चुनारच्या किल्ल्यांत पळून गेला. पुढें कंपनीच्या व राजाच्या मध्यें बऱ्याच चकमकी झाल्या. हेस्टिंग्जनें राजाचा बराच प्रांत काबीज केला, तेव्हां चैतसिंग हा बुंदेलखंडांत मराठ्यांच्या आश्रयास गेला. हेस्टिंग्जनें त्याला गादीवरून पच्दयुत करून त्याच्या एका अज्ञान पुतण्यास राजा केलें व त्याच्यावर, चैतसिंग हा कंपनीस जितकी रसद ( शेतसाऱ्याची अथवा इजारा रक्कम ) देत असे, तिच्या दुप्पट रसद देण्याचें लादलें. तसेंच त्याचा स्वतंत्र नाणें पाडण्याचा हक्क व दिवाणी फौजदारी व न्याय निवाड्याचे सर्व हक्कहि काढून घेतले. पुढें चैतसिंगाचा लतीपूर येथें पराभव झाल्यानंतर त्याचा खासगी किल्ला विजयगड हा हेस्टिंग्जनें मे. पोफॅमच्याकडून लुटविला. त्यांत चैतसिंगाची सारी चीजवस्त नाहीशी झाली व त्याचें राजकुटुंब दरिद्री बनलें. त्यानंतर चैतसिंगास कुटुंबसुद्धां राजद्रोहाच्या आरोपावरून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. तो तेथें २९ वर्षें कैदेंत खितपत पडून अखेर तेथेंच मरण पावला ( २९ मार्च १८१० ). तो कैदेंत असतांनाच त्यास बलवानसिंग नांवाचा एक पुत्र झाला होता. चैतसिंगाच्या मृत्यूनंतर याला आग्रयास आणून ठेविलें होतें. व याला मासिक दोन हजारांची नेमणूक इंग्रजानें करून दिली होती. याला तत्प्रांतस्थ लोक काशीवाला राजा म्हणत असत. याला कुंवर चक्रवर्तिसिंग नांवाचा एकच मुलगा होता. तो तरुणपणींच निवर्तल्यानें ( डिसेंबर १८७१ ) त्या दुःखानें त्याच्या मागून नऊच दिवसांनीं बलवानसिंग हा मरण पावला. बलवानसिंग हा कवि होता. चक्रवर्तीला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं.

हेस्टिंग्जवर विलायतेंत जो खटला झाला त्याला चैतसिंगावरील उपर्युक्त जुलूम हेंहि एक कारण होतें. पिटनें हेस्टिंग्जच्या बाबतींतील वागणुकीस, " क्रूर, अन्यायी व जुलमी " अशीं विशेषणें दिलीं आहेत. परंतु हेस्टिंग्जच्या जातभाई

पंचांनीं त्याला निर्दोषी ठरविलें व कारण दाखविलें कीं, चैतसिंग हा कंपनीचा मांडलिक आणि बळवंतसिंगाचा औरस पुत्र नसून लेकवळा होता (आणि असें असतांहि हेस्टिंग्जनेंच त्याला गादीवर बसविण्यांत व्यक्तिशः पुढाकार घेतला होता). यावर व्हिन्सेन्ट स्मिथ म्हणतो कीं, "असें गृहीत धरलें तरी, हेस्टिंग्जनें चैतसिंगावर जबरदस्त ओझें लादलें, त्याला पकडण्यांत अन्याय व अविचारीपणा केला, आणि त्याला विनाकारण अतिशय कडकपणें वागविलें. चाळीस पन्नास लाखांचा दंड ही अतिशय जबरदस्त रक्कम होती. जुलूमजबरदस्तीशिवाय सर्व गोष्टी शांतपणें पार पाडतां आल्या असत्या." हेस्टिंग्जच्या विरुद्ध त्यावेळीं कलकत्त्यास जे सरकारी कौन्सिलांतील सभासद होते, त्यांच्याशीं चैतसिंगानें बरेंच दळणवळण ठेविल्यानेंहि हेस्टिंग्जनें त्याच्यावर हा सूड घेतला असावा असें म्हणतात. [बील-ओरि. बायो. डिक्शनरी; स्मिथ—ऑक्सफर्ड हिस्ट्री ऑफ इंडिया].

**चैत्य**—संस्कृत 'चिता' या शब्दापासून हा बनला असल्यामुळें चितेसंबंधीं कांहींहि गोष्ट(उदा. मृत मनुष्याच्या अस्थीवर उभारलेला चबुत्रा, किंवा ती जागा दर्शविणारें एखादें झाड) असा या संज्ञेचा अर्थ होतो. प्राचीन काळच्या भारतीय वाङ्मयामध्यें, मग तें ब्राह्मणी, बौद्ध किंवा जैन कोणतेंहि असो, चैत्याचा सर्वत्र अर्थ वरच्याप्रमाणें होता. पण पुढें विशेषेंकरून बौद्धांत व जैनांत थोर मृतांच्या अवशेषांवर स्मारकें उभारण्याची सरसहा चाल पडल्यामुळें त्यांच्याच वाङ्मयांत या शब्दाला विशेष महत्त्व आलें. बौद्ध संप्रदायाचा आशियाखंडांत जिकडे जिकडे प्रसार झाला तिकडे तिकडे हा शब्द किंवा याचे प्रतिशब्द कांहीं थोड्याफार फरकानें गेले. उदा. सिंहलद्वीपांत दागब (संस्कृ. धातुगर्भ), तिबेटांत चोर्टेन किंवा दुंग्टेन. पुढील काळांत, कोणतेंहि पवित्र झाड, अस्थि ठेवण्याचें स्थान किंवा समाधि अशा सामान्य अर्थानें चैत्य शब्दाचा उपयोग होऊं लागला. माहेश्वर कवि (इ. स. ११११) यानें रचिलेल्या विश्वप्रकाश नांवाच्या समानार्थक शब्दकोशांत चैत्य शब्दाचे वरील अर्थ आढळतात. कालिदासाच्या मेघदूतावर (श्लोक २३) टीका करतांना मल्लिनाथानें याचा उल्लेख केलेला आहे.

अर्वाचीन शिल्पकामांत चैत्य हा शब्द सामान्यतः एखाद्या बौद्ध किंवा जैन देवालयाला व कधीं कधीं बौद्ध शिल्पकलेच्या एका विशिष्ट प्रकाराला—चैत्य दालनाला—योजितात. चैत्य दालनें हिंदुस्थानांत अनेक आहेत. हें एक खडकांत कोरलेलें लेणें असून त्याला मूळ लांकडी छत असे; कांहीं अगदीं जुन्या लेण्यांतून तर याजूस वरील लांकडी छताचा भार सहन करण्याकरितां लांकडी कमानी बसविलेल्या आढळतात.

कार्ल्याच्या लेण्यांतील चैत्य उपलब्ध चैत्यांत सर्वांत मोठा आहे. त्याची खोली (अथवा लांबी) १२६ फूट व रुंदी ४५ फूट ७ इंच आहे. या चैत्याच्या आंत शेवटीं स्तूप आहे. पूर्वी स्तूपालाच चैत्य म्हणत; पण हल्लीं, मृतावशेषावर घुमटाकार बांधलेली समाधि म्हणजे स्तूप व त्यापुढील दालन म्हणजे चैत्य व भिक्षूंची रहाण्याची जागा तो विहार असे अर्थ रूढ झाले आहेत. [संदर्भ ग्रंथ.—विल्सन-एरिआना ॲंटिका, लंडन, १८४१; बोथलिंग आणि रॉथ—संस्कृत—वोर्टेबुच, सेंट पीटर्सबर्ग १८५५-७५ (चैत्य). हॉजसन—एसेज ऑन् दि लँग्वेजेस, लिटरेचर. एट. ऑफ नेपाळ ॲन्ड तिबेट. फर्ग्यूसन—हिस्ट. ऑफ इंडियन ॲन्ड ईस्टर्न आर्किटेक्चर. वाडेल—दि बुद्धिझम् ऑफ तिबेट]

**चैन**—' खोट्या गरजा भागविण्यासाठीं ज्यांच्या उत्पादनास अतिशय मेहनत पडली आहे अशा गोष्टींचा व्यय करणें म्हणजेच चैन ' असें प्रो. एमिले डि लॅव्हेलेये एके ठिकाणीं म्हणतो. अशी चैनीची व्याख्या करून तो तिचा खालील शब्दांत निषेध करतो. ' चैन ही व्यक्तीला घातक व समाजाला मारक आहे. आद्य ख्रिस्ती संप्रदायानें दान व दैन्य यांच्या नांवांनीं हिचा धिःकार केला. उपयुक्ततेच्या नांवानें राजकीय अर्थशास्त्र हिची हेटाळणा करतें. आणि समतेच्या तत्त्वावर न्यायाला याचा निषेध करावा लागतो. '

श्रीमंतांची चैन व उधळपट्टी कामकरी वर्गाच्या फार पथ्यावर पडते म्हणून त्यांचें समर्थन करणाऱ्या एका वर्तमानपत्राला उत्तर देतांना प्रो. आर. टी. ऐलीनें यांतील आर्थिक हेत्वाभास दाखवून असें म्हटलें आहे कीं, हाच खर्च जर इतरांकरितां झाला तर त्यामुळें कामगारांना सारखेंच काम मिळतें. सार्वजनिक इमारतीकरितां दहा लाख डॉलर्स देणाऱ्या इसमाचें एक उदाहरण घेऊन त्याची आपल्या स्वतःच्या घराकडे इतकीच रक्कम खर्च करणाऱ्या दुसऱ्या एका इसमाच्या उदाहरणाशीं तुलना करूं. या दोन्हीहि बाबतींत कामकऱ्यांना सारखेंच काम मिळतें; पण एकांत मेहनतीचा फायदा लोकांना मिळतो; व दुसऱ्यांत एका व्यक्तीच्या स्वार्थी सुखास या मेहनतीचा उपयोग होतो. आतां दुसरें उदाहरण, सायंकाळच्या करमणुकीकरितां १०,००० डॉलरांचा खर्च आणि सार्वजनिक वाचनालयाकरितां पुस्तकांकडे झालेला तितकाच खर्च यांची तुलना करतां असें दिसून येईल कीं, दुसऱ्या बाबतींतला खर्च कायम स्वरूपाचा व जास्त वाजवी आहे. जुगारीचे अड्डे व दारूचा व्यापार यांचें समर्थन करणें जितकें हास्यास्पद व गैरवाजवी आहे तितकेंच चैनीचें समर्थन करणें गैरवाजवी ठरेल.

सर्व अर्थशास्त्रज्ञ, नीतिशास्त्रज्ञ याच मताचे आहेत. तरी हल्लीं सर्व शहरांतून आणि विशेषतः न्यूयार्क शहरांत श्रीमंत अमेरिकन लोकांमध्यें चैन आणि उधळपट्टी वाढत्या प्रमाणावर आहे. या संपत्तीच्या दुरुपयोगाचीं अनेक उदाहरणें देतां येतील. लाडक्या कुत्र्याच्या वस्त्रांसाठीं दरवर्षी १,००० डॉलर्स खर्चिलेले आपण वाचतो. त्याचप्रमाणें वर हिरे मोती बसविलेले कुत्र्याचे पट्टे, पांच सात हजार डॉलर्स किंमतीचे कुत्रे, श्रीमंतांमध्यें

२४ नोकर ठेवणारी सामान्य कुटुंबें,५०००-१००००. डॉलर्स पगार असलेले आचारी इत्यादि आपण ऐकतों. मोठमोठ्या खर्चाचीं निरनिराळ्या प्रकारचीं जेवणें वाचून आपणांस काय वाटेल? उदाहरणार्थ, सोन्याच्या ताटांतून वाढलेलें जेवण, आंदोलन-झोपाळ्यावरचें-जेवण, घोड्याच्या पाठीवर जेवण, माकडजेवण, बैल आणि अस्वली जेवण, संगीत जेवण, विदुषकी जेवण, गवईपक्षी जेवण इ. एकदां न्यूयार्कच्या मनुष्यानें असें एक जेवण दिलें होतें कीं त्यांत जेवणाचें टेबल म्हणजे एका इजिप्तांतील अरण्यासारखें असून निमंत्रित पाहुण्यांनीं सोन्याच्या कुदळपावड्यांनीं त्यांतील जवाहीर उकरून घेतलें. न्यूयॉर्क शहरांतील श्रीमंत लोकांच्या अंगावरील जवाहिरांची किंमत २०,००,००,०००, डॉलर्स भरेल. बायकांचे मोत्यांचे कंठे २,००,००० डॉलर्स किंमतीचे किंवा जास्त भरतील. न्यूयार्कमधील कांहीं वीस एक लोकांच्या हाताच्या गुंड्या ५००० डॉलर्स किंमतीच्या आहेत. न्यूयार्क शहरापुरता हिशोब करून असें ठरविलें आहे कीं, ६,१०० बायका दरवर्षी कपड्यांकरितां एकंदर ४३,०००,००० डॉलर्स खर्च करतात.

श्रीमंत लोकांच्या विलासनौकांनां दरवर्षी इतका पैसा लागतो कीं, त्यांची किंमत ५,००,०००—७,५०,००० डॉलर्स भरेल. डब्ल्यू. के. व्हांडरबिल्ट नांवाच्या मनुष्याची जी एक घरची गाडी आहे तिची किंमत ५०,००० डॉलर्स आहे. एकेकाच्या घरीं कांहीं ठिकाणीं १७ मोटारगाड्या आहेत. कंटाळा घालविण्यासाठीं संध्याकाळच्या एका बैठकीला लोक १०,००० डॉलर्सचा जुगार खेळतात. बायका, साप, डुकरें, सिंह अस्वलें इ. बाळगून त्यांचे लाड करितात. कुत्र्यांचे दांत सोन्यानें मढवून काढतात व त्यांनां सर्व नौकरांच्या सरंजामासह गाडींत बसवून हवा खाण्याला किंवा नाटकाला धाडतात.

यूरोपमध्यें हेंच दृष्टीस पडतें, पण तेथें संपत्तीचा दिमाख कमी आहे. इंग्लंड आणि वेल्समध्यें लोक परवाना काढण्यास खालीलप्रमाणें पैसे खर्च करितात. गाड्यांसाठीं ५१३,२६१ पौंड; कुलचिन्हांसाठीं ६८,४७९ पौंड; पुरुषनौकरांसाठीं, १४८,६९० पौंड,शिकारीसाठीं ५८१२३२ पौंड. [ सायक्लो. सोशल रिफॉर्म्स.].

**चैबासा**—बिहार-ओरिसा प्रांतांतील सिंगभूम जिल्ह्यांतील मुख्य ठिकाण. १९११ मधील लोकसंख्या ९००९. १८७५ मध्यें येथें म्युनिसिपालटी स्थापन झाली. जिल्हातुरुंगांत कैद्यांकडून, तेल काढणें, गालिचे तयार करणें, दोऱ्या वळणें इत्यादि कामें घेतात.

**चोक**—मुंबई, काठेवाड. शत्रुंजी नदीच्या दक्षिण तीरावरील इस्टेट. याच्या समोर नदीच्या दुसऱ्या तीरावरील लोंच टेंकडीला जैनवाङ्मयांत हस्तागिरी म्हटलें आहे. कामलो टेंकडी ( कदमगिरी )हि जवळच आहे.

**चोखामेळा**—हा जातीनें महार असून पंढरपुरचा वारकरी व विठोबाचा भक्त होता. हा मंगळवेढ्याचा राहणारा होता. ज्ञानेश्वरानीं जी तीर्थयात्रा केली त्या यात्रेंत बऱ्याचशा संतमंडळीबरोबर हाहि होता. याला कर्मामेळा नांवाचा एक मुलगा होता. मंगळवेढ्याच्या गांवकुसवाचें काम करीत असतां तें कोसळून पडून त्याखालीं चोखामेळा हा शके १२६० च्या वैशाख वद्य पंचमीस वारला. तेथून त्याच्या अस्थी काढून पंढरपुरास नेल्या. हल्लीं याची समाधी पंढरीस नामदेवाच्या पायरीसमोर आहे. नामदेवाच्या कुटुंबाप्रमाणेंच याचेंहि कुटुंब वारकरी व कविता करणारें होतें. याचा विवेकदर्पण नांवाचा एक छोटासा ग्रंथ आहे. याची व याच्या बायकोची कविता सोपी व रसाळ आहे. याचें कवित्व अनंतभट नांवाच्या ब्राह्मणानें लिहून ठेवलें आहे. [ संतकाविकाव्य सूचि; महाराष्ट्र सारस्वत ].

**चोचो**—चोचो हें नांव महाराष्ट्रांत फार थोड्यांनां माहीत आहे. या झाडाचे वेल कांकडी किंवा दोडक्याच्या वेलांसारखे असतात. दोडक्यांप्रमाणें हा वेल उन्हाळ्यांत मरत नाहीं. तो अनेक वर्षें टिकतो. थंडीच्या दिवसांत याची वाढ खुंटते. परंतु उन्हाळ्यांत पुन्हां नवे धुमारे फुटून उन्हाळा व पावसाळ्यांत पूर्ण वाढ होऊन पुष्कळ फळें येतात. दिसण्यांत हीं फळें पेरूसारखीं असतात, पण पेरूपेक्षां ३।४ पट मोठीं होतात. त्यांवर कांकडीप्रमाणें बारीक कांटे असतात. चोचोची वरची साल सोलून दुध्या भोपळ्याच्या भाजीसारखी भाजी करितात. व ती दुध्याच्या भाजीप्रमाणेंच रुचकर होते. किंबहुना त्याच्यापेक्षांहि जास्त चांगली होते. ही भाजी पचण्यास हलकी आहे. चोचोचा " जाम " अथवा मोरंबा परदेशांतून येथें विकण्यास येतो व त्याचा यूरोपियन लोक उपयोग करितात. चोचोच्या दुध्याभोपळ्याप्रमाणें पाकाच्या सुक्या वड्या करतां येतील.

चोचो हा भोपळ्याच्या वर्गांतील वेल आहे. परंतु त्याच्या फळांत शेंड्याजवळ एकच बी असते. फळ जून झालें म्हणजे आंतील बी शेंड्यांतून बाहेर पडतें. व फळांत असतांनाच बी उगवून अंकुर बाहेर पडतो ही स्थिति फळ झाडावर असतांनाच होते. तोडून ठेविलेल्या जून फळासहि अंकुर फुटतात. अंकुर फुटलेलें फळ मातींत लावलें म्हणजे बियांजवळ मुळें फुटून तीं मातींत वाढीस लागलीं म्हणजे वेलहि वाढीस लागतो. वेल एखाद्या झाडावर अगर मांडवावर चढवावा.

सीलोन व मद्रास इलाख्यांत चोचोची बरीच लागवड करतात. महाराष्ट्रांत जसे दोडके पुष्कळ विकण्यास येतात तसे मद्रासकडे चोचोचे ढीगच्या ढीग मार्केटांत असतात. तिकडची हवा उष्ण असल्यामुळें तीं फळें तिकडे बारमास दृष्टीस पडतात. मुंबईच्या बाजूस तोंडल्याप्रमाणें चोचोची लागवड फायदेशीर होईल व बारमास फळें लागतील.

**चोडवरम**—हा मद्रास इलाख्याच्या गोदावरी जिल्ह्याच्या संस्थानिक प्रदेशांतील एक तालुका आहे. याचें क्षेत्रफळ ७१० चौरस मैल आहे. याच्या दक्षिणेस व पश्चिमेस गोदावरी नदी वहात असून यांत रम्य डोंगराळ प्रदेशाचा समावेश होतो. १९२१ सालीं याची लोकसंख्या २८०५१ होती. या तालुक्यांत एकंदर २३२ खेडीं असून चोडवरम हें त्याचें मुख्य ठिकाण आहे. १९०३-०४ सालीं याचें एकंदर उत्पन्न नऊ दहा हजार होतें. याचा बहुतेक भाग पूर्वघाट पर्वतानें व्यापिला असून यापैकीं ५७५ चौरस मैल प्रदेशावर जंगलें पसरलीं आहेत. या प्रदेशांत फक्त एकच पक्का रस्ता आहे. यांतील जंगलांत इमारती लांकूड चिंच, सत्रीं, मेण, वगैरेंचें उत्पन्न होतें. यांतील मुख्य पिकें म्हटलीं म्हणजे तांदुळ, कडधान्यें, कांबू मका वगैरे होत. याशिवाय यांत तंबाखूचेंहि थोडेसें उत्पन्न होतें.

**चोध्रा**—मुंबई इलाखा व बडोदें संस्थान यांतून हे शेतकरी जातीचे लोक आढळतात. मुंबई इलाख्यांतील लो. सं. (१९११) ३८१३८. सुरत जिल्हा व एजन्सी या प्रांतांत या राष्ट्रजातीचे लोक आढळतात. आपण रजपूत आहों असें हे म्हणतात. त्यांच्या चालीरीतीवरून ते रजपूत आहेत याबद्दल कांहीं पुरावा नाहीं. यांचा परंपरागत धंदा शेतीचा असून ते जाड भात फार चांगलें पिकवितात. यांचे ९ पोटभाग असून एका पोटभागांतील लोक दुसऱ्या पोटभागांतील लोकांशीं विवाहसंबंध करीत नाहींत. या पोटभागांपैकीं चोकापूर पोटभागांतील लोक सामाजिक दर्जात श्रेष्ठ समजले गेले आहेत.

बहुधां विवाह प्रौढपणीं होतात. नवऱ्याची (सुवासिनी) बहीण ही लग्नसमारंभांत पुढाकार घेते. कांहीं काळपर्यंत सासऱ्याच्या घरीं नवऱ्यानें काम करून बायको मिळविण्याची पद्धत या लोकांत फार प्रचलित आहे. या पद्धतीला "खंडालिया" असें म्हणतात. पुनर्विवाह व घटस्फोट या दोन्ही चाली आहेत. हे लोक मांसाहारी आहेत. तरी कोंकणे, भिल्ल, नाइकडा व इतर मासाहारी लोकांपेक्षां आपल्याला श्रेष्ठ समजतात. कुणबी, कोळी इत्यादि उच्च जातींतील लोक हे आपल्या जातींत घेतात.

वारसासंबंधीं कायदा हिंदुप्रमाणेंच आहे. खास हिंदु देवतांची पूजा करीत नाहींत. ते पृथ्वी, सूर्य, काकबालिओ (देवी), भवानी यांचे भक्त आहेत. सुरत जिल्ह्यांत खेड्यांतील लोकांचे सामाजिक खटले गांव सभेपुढें ठेविले जातात, परंतु जातीसंबंधीं महत्त्वाचे खटले सात गांवांच्या प्रतिनिधींच्या सभेंत मांडिले जातात. गुन्ह्याबद्दल दंड होतो.

बडोदें संस्थानांत यांची लोकसंख्या (१९११) ३१६६ आहे. चोकापुरी व वालवाडा या दोन मुख्य पोटजाती आहेत. चोकापुरी जातीला श्रेष्ठ मानण्यांत येतें व तिला पावागडिया असें दुसरें नांव आहे. यांचे आचारविचार मुंबई इलाख्यांतील इतर चोध्र्यांप्रमाणेंच आहेत [से. रि. १९११ पु. ७ व १६ ].

**चोपडे**, तालुका.—हा मुंबई इलाख्याच्या पूर्व खानदेश जिल्ह्यांतील एक तालुका असून याचें क्षेत्रफळ ३६८ चौरस मैल आहे. या तालुक्यांत चोपडे व अडावद हीं दोन गांवें व ९४ खेडीं आहेत. १९११ सालीं याची लो. सं. ८२६८८ होती. लोकसंख्येचें प्रमाण दर चौ. मैलास २०५ आहे. १९०३-०४ सालीं जमीनीचें व इतर उत्पन्न अनुक्रमें २.३ लाख व १५००० रु. होतें.

तापी नदीथडीवरील प्रदेशाच्या विहिरींत पाणी विपुल आहे परंतु यांतील जलप्रवाह कालव्याच्या निरुपयोगी आहेत. मुख्य नद्या म्हटल्या म्हणजे तापी व तिला मिळणाऱ्या अनेर व गुळी या होत. यांतील जमीन काळीची असून सुपीक आहे. या तालुक्यांत दरवर्षी २५ इंच पाऊस पडतो.

शहर.—मुंबई इलाख्याच्या पूर्व खानदेश जिल्ह्यांतील त्याच नांवाच्या तालुक्याचें मुख्य ठिकाण असून याची लोकसंख्या १९११ सालीं १७००८ होती. हें शहर फार जुनें असून तेथील मोडकळीस आलेल्या किल्ल्यावरून पुरातन हिंदू राजांच्या अमदानींत यास बरेंच महत्त्व होतें असें अनुमान निघतें. १६ व्या शतकांत हें एक दाट लोकवस्ती असलेलें मोठें शहर असून येथें रामेश्वराचें देवालय होतें. येथील देवदर्शन करण्यास फार दुरून लोक येत असत. १६७९ मध्यें हें शिवाजीनें लुटल्याचा उल्लेख आढळतो. १८२० त हें शिंद्याच्या स्वाधीन करण्यांत आलें व १८४४ इंग्रजांच्या ताब्यांत आलें.

येथें कापूस व जवस यांचा व्यापार चालतो. १८७० त येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. येथें दोन दवाखाने, ५ कापूस पिंजण्याच्या गिरण्या, २ रुईचे गठ्ठे बांधण्याचे कारखाने व एक मुलींच्या शाळेसुद्धां ६ शाळा आहेत.

**चोपदार**—सातारकर प्रतापसिंह छत्रपतींनीं आपल्या कारकिर्दींत सर्व सरकारी कामदार लोकांनां पूर्वीचे शिरस्ते पाहून नियम घालून दिले. त्याप्रमाणें मिर्धे व चोपदार आणि भालदार यांचेहि नियम होते, ते खालीं दिले आहेत. मिर्धा म्हणजे चोपदारांचा नाईक होय. भालदार व चोपदार साधारण एकच होत.

चोपदार व मिर्धे भालदार यांचा जाबता—मिर्धे यांनीं पाळीप्रमाणें रात्रंदिवस हजर असोन, सर्वांची ओळख राखोन, किताबती असतील त्यासुद्धां नांवें वेगळीं वेगळीं घेऊन, मुजरे सांगत जावे. सभेंत कमजाजती परवानगीशिवाय मंडळी बसूं न देतां नजरेचा इरादा समजोन, मंडळी शिस्तवार बसण्यास सुचवीत जावें. व मार्गानें स्वारीसमागमें चालतां, जागा पुढें उंचसखल येईल तशी खबर वरचेवर करीत जावी. समारंभास यादीप्रमाणें त्यांत न चुकतां वेळच्या वेळेस मंडळी बोलावणें ती बोलवावी.

कीर्तनसमयीं मुजरे समेंत सांगणें तें इराद्याप्रमाणें किताबतीसुद्धां सांगत जावें. कामांत इनाम बक्षिसाशिवाय कांहीं न खातां, व लबाडी न करितां, इमानें इतबारें चाकरी करावी. स्वारींत व स्वारांवर नजर हमेशा ठेवीत असावी. व सरकारचा हुकम मुत्सद्दी व शिष्ट ब्राह्मण यांस बोलावणें करावयाची आज्ञा होईल त्याप्रमाणें करीत जावें. ह्यदरहू लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त जलदीनें, हुशारीनें सरकारचाकरी करून दाखवील, त्याजवर सरकार मेहेरबान होईल. ज्याजकडुन हें न घडे, त्यास इजा पोहोंचून, पुन्हां त्या कामावर रहाणें होणार नाहीं. व रदबदली होऊन पुन्हां चाकरीच मिळणार नाहीं. हें स्पष्ट समजोन लिहिल्याप्रमाणें वागावें व चाकरी करावी. ज्यास चाकरीवर वागणें, त्यानें जें वस्त्रपात्र असेल तें निर्मळपणें, जेथील तेथें, प्रातःकाळीं अंघोळ करून सचीलपणें गळाठा न दिसतां स्वच्छपणें असावें. घरास वगैरे जातां येतां हुजीरनीस यास रुजू होऊन जात जावें. हें न केल्यास गेल्या दिवसांच्या तारखा मजुरा पडणार नाहींत.

भालदार यांनीं स्वारींत व हुजूर असोन सेवा शिस्तवार करावी. व मुजरे सांगत जावे. मानकरी व स्वारसुद्धां बोलावणें आज्ञेप्रमाणें करावे. कचेरीचे समयीं दोघांनीं दो बाजूंस उभे राहून, गलबला व हिंडणार यांचा बंदोबस्त राखावा. ज्याची विनंती व रदबदली करणें ते त्याचे समक्ष सरकारांशीं करूं नये.

सरकारांतून कायदे लावयाचे तेः—

( १ ) पाडव्याची नजर करून निंब व विडे घेत जाणें. ( १ ) सरदारमंडळाकडून इनाम मिळाल्यास घ्यावयाचा शिरस्ता असेल तसें घ्यावें. ( १ ) सरकारवाड्यांत रात्रौ निजावयास चोपदार यानें बारीप्रमाणें असावें. ( १ ) दसन्यास नजर करावी व पोशाख द्यावयाचा, तो सरकार कृपावंत होऊन दिल्यास घ्यावा. व बकरें व काठीची पूजा, नैवेद्य व दक्षिणा व बकरेची मुंडी मिर्धे याची, बाकी चोपदार व भालदार यांचे. ( १ ) सरकारांतून कोणास पोशाख दिले असतां त्याजकडून इनाम दिल्यास घेत जाणें (१) सरदारमंडळीकडून इनाम आणावयास मिर्धे यांनीं चोपदार व भालदार घेऊन जात जावें. तेथून जें येईल तें आपलेपाशीं ठेवून, चोपदार याचा मिर्धा व भालदार याचा मिर्धा यांनीं निमे दोन वांटण्या घेऊन बाकी दोन वांटण्या रहातील, त्यांपैकीं एक वांटणी चोपदारास व भालदारास देणें. ( १ ) वाड्याकडील ( अंतःपुरची ) व देवघरची व कचेरीची चाकरी करावी. ( १ ) दिपवाळीस तेल, अगेजा व फराळास शिरस्तेप्रमाणें पावेल. ( १ ) शिमग्याचे, होळीचा नारळ पावत जाईल. ( १ ) सरकारास मेजवानी इराद्याची जहाल्यास कारणानुरूप पोशाख व इनाम द्यावयाचा जाहल्यास देविला जाईल. ( १ ) सरकारस्वारी जेथें असेल तेथें मिर्ध्यानें असावें. व दाराबाहेर चोपदार यानें असावें. बाहेरून कोणी येईल त्याची वर्दी चोपदार यानें मिर्ध्यास सांगावी. नंतर सरकारचा हुकूम घेऊन आज्ञा होईल त्यास कचेरींत घेत जावें. ( १ ) सरकारांत चोपदार असतील त्यांनीं सरकारचाकरीविषयीं मिर्ध्याचे हुकुमांत असावें. (१) राखीपुनवेस राखी व विडे पावतील. गोकुळअष्टमीचें निशाण व लोणी व खिरापत व विडे पावतील. ( १ ) संक्रांतीबद्दल तीळ व विडे व खण व सुगडें शिरस्तेप्रमाणें पावेल. व गंजीपैकीं गवत ओलें व वाळलें सर्वांबरोबर पावेल. ( १ ) शिमग्याचे पोस्त सरकारमंडळी व मुत्सद्दी व शिलेदार यांजकडून त्यांनीं दिल्यास घ्यावें. ( १ ) तुळशीचें लग्नबद्दल ऊंस, आंवळे व चिंचा व चंपाषष्ठीबद्दल वांगी सर्वांबरोबर पावेल. ( १ ) मेसकुमाय राणीच्या घुगऱ्या पावतील. ( १ ) सरकारस्वारी तक्तावर आली असतां कचेरीचा बंदोबस्त राखावा. व इराद्याप्रमाणें ज्याचें त्यास बसवावें. ( १) फौजेस आज्ञा होणें ती मिर्धे यांजपाशीं व्हावी. मिर्धे यांनीं भालदारास सांगून बक्षीस कळवावें. आणि स्वार आणवावे. ( १ ) स्वारींत स्वार, शिबंदी व मानकरी वगैरे लोक इराद्याप्रमाणे चालवावे. व मजुरा देत जावा. ( १ ) विडे सणाचे चार, मिर्धे यास व भालदार यास दोन, व गोकुळ अष्टमीचें निशाण व लोणी व खिरापत सालाबादी पावत आल्याप्रमाणें पावेल.” या प्रमाणें चोपदार, भालदार व मिर्धे यांचे काम व त्याबद्दल त्यांना मिळणारें सरकारी वेतन आणि इनामहक्क काय असत याचा बोध या जाबत्यावरून होतो [ इतिहाससंग्रह. पु. ६. अं. ७।८।९. ].

**चोबारी**—मुंबई, काठेवाड. भिमोरा घराण्यांतील काठी लोकांच्या ताब्यांतील निराळी खंडणी देणारा तालुका. हल्लीं हा चोटिला ठाण्यांत आहे. येथें पंचमुखी नांवाची सुंदर विहीर आहे.

**चौंभा**—याचें उषाहरण नांवाचे ओवीछंदांत लिहिलेलें एक काव्य प्रसिद्ध आहे. 'चौंभा' हें पाळण्यांतलें नांव असल्यास ‘ शुंभ ’ नांवाचा आणि आडनांव असल्यास “ चतुर्वैदिक ” शब्दाचा अपभ्रंश असावा असें राजवाडे सुचवितात.

ग्रंथाची भाषा बहुतेक ज्ञानेश्वरीसारखी आहे. उनुप्रत्ययांत धातुसाधितें या काव्यांत सडकून आहेत. या प्रकारचीं धातुसाधितें ज्ञानेश्वरीपासून श्रीधरपर्यंत कालानुक्रमानें कमी कमी होत जातात. ग्रंथांत ‘ यज्ञा ’बद्दल ‘ येन्न ’ शब्द आला आहे. तसेंच श्वासाबद्दल सस, स्वामीबद्दल सामी, शस्त्रबद्दल सत्र, कालिंदीबद्दल कालिंद्री, धनुष्यबद्दल धनुक, जिव्हाबद्दल जीवा, अनिरुद्धबद्दल अनुध; कृष्णबद्दल क्रस्ण, पन्नग बद्दल पानक, भाषाबद्दल भास, या प्रकारचे शेंकडो अपभ्रंश महाराष्ट्री व अपभ्रंश प्राकृताप्रमाणें या ग्रंथांत आढळतात. ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेच्या व्याकरणांत सांगितली त्यापेक्षां विलक्षण अशीं रूपें या ग्रंथांत येतात. सा—सी. इ. षष्ठीचे प्रत्यय म्हणून वापरले आहेत. वरील भाषारूपांवरून ज्ञानेश्वरानंतर व दासोपंतापूर्वी हा कवि झाला असा निर्णय राजवाडे करितात. या कवीनें भागवत व हरिवंश हे ग्रंथ ताडून पाहिले

होतें असें कवि सांगतो. यावरून हा संस्कृतज्ञ असावा असें ठरतें.

काव्याच्या भागास " प्रसंग " असें म्हटलें आहे. ओंवी संख्या १८८५ पर्यंत उपलब्ध झालेल्या पत्रांत आली आहे. या काव्याविषयीं राजवाडे म्हणतात, " ह्यांत एक वैलक्षण्य आहे. तें अद्यापपर्यंत प्रसिद्ध झालेल्या किंवा माझ्या संग्रहास असलेल्या कोणत्याहि जुन्या ओंवीबद्ध ग्रंथांत नाहीं. प्रायः ज्ञानेश्वरी ओंवींत पहिले तीन चरण अंतीं सयमक असतात. प्रस्तुत ग्रंथांत प्रायः पहिले दोन चरण सयमक, तिसरा निर्यमक व चवथा सयमक असतो. कित्येक ओंव्यांत मुळींच यमक नाहीं. कित्येकांत कोणते तरी दोन चरण सयमक असतात. कित्येक वर्गांत यमकाचें सवर्गीय व्यंजन असतें. कोठें कोठें यमकाचे अंत्यस्वर भिन्न असतात. असे कांहीं विचित्र प्रकार या ग्रंथांत आहेत. ज्ञानेश्वरींत चौथा चरण अर्धा असतो. या ग्रंथांत तो पाऊण असतो, सबंध असतो किंवा दीडहि असतो. या ग्रंथांत पहिला, दुसरा, किंवा वाटेल तो चरण अर्धा असतो असा कांहीं स्वैर प्रकार या अद्वितीय ग्रंथांत आहे. पृथ्वीवरील कोणत्याहि भाषेतल्या कोण्याहि कवीच्या काव्यांत असले चमत्कार नसतील. बरें, कवीची वर्णनशैली सामान्य आहे म्हणावें तर तशांतलीहि गोष्ट नाहीं. युद्धांचीं वर्णनें, ब्रह्मदेवाची थट्टा, वगैरे प्रसंग चांगले खुलवून सांगण्याची कला कवीला माहीत आहे."

हा कवि कधीं व कोठें होऊन गेला हें नक्की कळत नाहीं. ग्रंथभाषेवरून शके १३०० च्या सुमाराचा हा असावा असें मानितात. रंगनाथस्वामी निगडीकर, शेख महंमद वगैरे कवींनीं आपल्या संतमालिकांत याला नमन केलें आहे. [ भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३३; सं. क. का. सू.; म. सारस्वत ]

**चोरांगल**—मुंबई इलाख्याच्या रेवाकांठांतील एक लहानसें संस्थान. यांत आठ गांवें आहेत. वस्ती बहुतेक कोळ्यांची आहे.

**चोरासी**—(चौऱ्यायशी) हा मुंबई इलाख्याच्या सुरत जिल्ह्यांतील एक तालुका. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत या मुलुखांत ८४ परगणे मोडत असत म्हणून हें नांव पडलें असावें. याप्रमाणें तापीच्या दक्षिणेकडील जिल्ह्यास २८ परगण्यांवरून अठ्ठाविशी हें नांव पडलें होतें. याचें क्षेत्रफळ ११४ चौ. मै. आहे. या तालुक्यांत सुरत व रांदेर हीं दोन शहरें व ७२ खेडीं आहेत. १९११ सालीं याची लोकसंख्या १७०१९१ होती. याचें १९०३-४ सालीं एकंदर उत्पन्न २.८ लाख होतें. याच्या उत्तर सरहद्दीवरून १८ मैलपर्यंत तापी नदी वहात जाते. हा तालुका दाट झाडीचें मैदान असून यांतील बहुतेक जमीन नांगरलेली दृष्टीस पडते. यांत पाण्याचा पुरवठा भरपूर नाहीं.

**चोरी**— हा शब्द संस्कृत चुर् या धातूपासून झालेला आहे. जंगम माल मालकाच्या परवानगीवांचून त्याच्या ताब्यांतून नेणें यालाच चोरी म्हणतात. चोरी हा सर्व आधुनिक कायदेपद्धतींत फौजदारी गुन्हा गणला जातो. चोरीशी सदृश असे इतर गुन्हे पीनल कोडांत दिले आहेत तेः—(१) जबरीची चोरी किंवा दरोडा ( रॉबरी ), (२) ठकबाजी ( चीटिंग ), (३) अपहार ( मिस अप्रोप्रिएशन), (४) विश्वासघात ( ब्रीच ऑफ ट्र ), व (५) अपक्रिया (मिस्चीफ).

कित्येक प्राचीन कायद्यांत साधी चोरी हा फौजदारी गुन्हा नसे. उदा. रोमन कायद्यांत चोरीबद्दल दिवाणी काम चालून मालकाला चोरीस गेलेला माल किंवा त्याच्या दुप्पट किंवा चौपट किंमत चोरांकडून देववीत असत. प्राचीन इंग्रजी कायदाहि तसाच होता. गुरें चोरणें वगैरे महत्त्वाच्या चोऱ्यांनां मात्र फौजदारी गुन्हा समजून फांशी, हद्दपारी, सक्तमजुरी वगैरे कडक शिक्षा असत. गुलाम वगैरे माणूस पळवून नेणें याचाहि रोमन कायद्यांत चोरींत समावेश करीत असत; पण आधुनिक इंग्रजी कायद्यांत तो ' ॲबडक्शन ' म्हणून निराळ्या जातीचा गुन्हा मानतात. रोमन कायद्यांत आणखी एक फरक असा होता कीं, विवाहित स्थितींत नवराबायकोला एकमेकांविरुद्ध चोरीचा आरोप करतां येत नसे. पण इंग्रजी कायद्यांत ' मॅरिड वुइमेन्स प्रॉपर्टी ॲक्ट ' ( विवाहित स्त्रियांच्या मालमत्तेबाबत कायदा ) झाल्यापासून तशी फिर्याद करतां येते. अलीकडील इंग्रजी कायद्यांत चोरीच्या गुन्ह्याला कमाल शिक्षा चौदा वर्षें सक्तमजुरी ही आहे. १६ वर्षांच्या आंतील मुलांनां फटक्यांची शिक्षाहि देतात.

भारतीय— स्मृतिग्रंथांत ' स्तेय ' म्हणजे चोरी ( थेफ्ट ) आणि ' साहस ' म्हणजे दरोडा ( रॉबरी ) असे दोन पृथक् गुन्हे मानले आहेत; व त्यांची मनूनें व्याख्या दिली आहे तीः—

स्यात्साहसं त्वन्वयवत्प्रसभं कर्म यत्कृतम् ।
निरन्वयं भवेत्स्तेयं हृत्वापव्ययते च यत् ॥

मनुस्मृति अ. ८ श्लोक ३३२.

स्मृतिग्रंथांतील कायदा चालू पिनल कोडांतील कायद्याच्या दृष्टीनें दोन महत्त्वाच्या बाबतींत भिन्न दिसतो. पहिली बाब म्हणजे वर्णभेदानुरुप दण्डभेद. म्ह. चोराला ब्राह्मण क्षत्रियादि भेदानें दण्डाचें प्रमाण कमजास्त असे तें येणेंप्रमाणेंः—

अष्टापाद्यं तु शूद्रस्य स्तेये भवति किल्बिषम् ।
षोडशैव तु वैश्यस्य द्वात्रिंशत्क्षत्रियस्यच ॥
ब्राह्मणस्य चतुःषष्ठिः पूर्णं वापि शतं भवेत ।

मनुस्मृति अ. ८ श्लो. ३३७—३८.

हा प्रकार ' कायद्याच्या दृष्टीनें सर्व इसम सारखेच असतात ' (ऑल मेन आर ईक्वल बिफोर लॉ ) या सुप्रसिद्ध कायदेतत्त्वाच्या विरुद्ध आहे. तसेंच शारीरिक शिक्षेसंबंधानेंहि स्मृतिग्रंथांतले नियम आधुनिक कायदेपद्धतीला अमान्य

असे आहेत. चोरीला पिनल कोडांत सक्तमजुरीहून अधिक कडक शिक्षा नाहीं. पण स्मृतिकार शिक्षा सांगतात त्या शरीरावयवच्छेद व प्रत्यक्ष वध इतक्या कडक आहेत. त्या अशा—

अङ्गुली ग्रंथिभेदस्य च्छेदयेत्प्रथमे ग्रहे ।
द्वितीये हस्तचरणौ तृतीये वधमर्हति ॥ मनुस्मृति.
येन येन परद्रोहं करोत्यंशेन तस्करः ।
छिन्द्यादङ्गं नृपस्तस्य न करोति यथा पुनः॥
कात्यायन.

कोणत्याहि आधुनिक सुधारलेल्या राष्ट्रांत चोरीला मरणाची शिक्षा नाहीं. आणि शरीरावयवच्छेदनाची शिक्षा तर खून वगैरेसारख्या कोणत्याहि भयंकर गुन्ह्याला नाहीं. मराठी रियासतींत वरील स्मृतिकारांच्या वचनांस अनुसरून व्यवस्था असे. चोरी आणि दरवडा ह्या दोन गुन्ह्यांस शिक्षा फार कडक देण्यांत येत असे. दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांच्या कामीं गुन्हेगारांस अटकेंत ठेवण्याची, ठार मारण्याची, हात, पाय, कान कापण्याची शिक्षा करण्यांत येत असे. शिवाय चोरीस गेलेला माल गुन्हेगारांकडून मालकांस परत देवविण्यांत येत असे. याखेरीज सरकारची गुन्हेगारी ही अपराध करणारांकडून वसूल करण्यांत येत असे. चोरी करणारास अगर दरवडा घालणारास अटक करण्यांत येत असे; एवढेंच नव्हे परंतु त्याच्यापाशीं रहाणाऱ्या त्याच्या आप्तांसहि अटक करण्यांत येत असे. रस्तालुटीच्या कामांत गुन्ह्याचा माग अमुक एक गांवापावेतों जाऊन पुढें त्या गांवांतील लोकांनीं माग काढून न दिल्यास लुटीस गेलेला माल भरपाई करून देण्याची जबाबदारी ज्या गांवापावेतों माग गेला असेल त्या गांवांतील लोकांवर असे. चोरी आणि दरवडा या दोन गुन्ह्यांच्या कामीं कोणत्या प्रकारची व्यवस्था करण्यांत येत असे याचें एक उदाहरण येणेंप्रमाणें:—

सित समीनान मया व अलफ या सालांत कोंकणप्रांतीं चोरट्यांनीं चोऱ्या करण्याचा फार सुळसुळाट चालविला. तेव्हां ५८ चोरांस धरून आणून त्यांची चौकशी करून त्यांचे अपराध हुजूर लिहून पाठविण्यांत आले. या एकंदर ५८ चोरांपैकीं २० चोरांचीं डोकीं मारावयाचा, १३ असामींचा उजवा हात व डावा पाय, अठरा असामींचा उजवा हात, चार असामींचा उजवा हात व एक कान, एक असामीचा उजवा हात व पाय व एकाचा कान कापण्याचा हुकूम करण्यांत आला. या अठ्ठावन्न चोरांच्या पुढाऱ्यांस विशोभित करून फिरवून मेक देऊन मारावा असा हुकूम सोडण्यांत आला. [ सित समानीन मया व अलफ, वाड भाग ८ पान ९६. ].

चोरी आणि दरवड्याचे गुन्हे करणाऱ्या लोकांचा तपास लागावा म्हणून हे गुन्हे करणाऱ्या लोकांबद्दल माहिती देणारांस सरकारकडून बक्षीस देण्यांत येत असे. ही गोष्ट वाड भाग ८ पान ९५ वरील उल्लेखावरून दिसून येते.

इतर देश.—चोरीच्या गुन्ह्याला शरीरावयवच्छेदनाची व मरणाची शिक्षा जपानी, इस्लामी, इराणी, आयरिश तसेंच शपथ व दिव्य करणें या गोष्टी पुष्कळ प्राचीन कायद्यांत असत. पण याशिवाय चोरीसंबंधीं कांहीं चमत्कारिक माहिती येथें देतों. केल्टिक कायद्यांत चोराला गुलामाप्रमाणें विकणें ही एक शिक्षा असे. प्राचीन रोमन कायद्यांत चोराला पकडून आणण्याचें काम फिर्यादीला करावें लागत असे; आणि तें शक्य झालें नाहीं तर मॅजिस्ट्रेटला चोर असेल तेथें नेऊन चोराला पकडण्यांत येत असे. हिब्रू कायद्यांत 'मालमत्तेविरुद्ध गुन्हे' या सदराखालीं व्यभिचार ( अल्पवयी माणसाला किंवा बायकोला ) फूस लावून किंवा जुलमानें नेणें, निष्काळजीपणामुळें दुसऱ्याचें नुकसान करणें, चोरी, व्याजखोरी ( यूझरी ), बळजोरी ( रेप ), हे गुन्हे दिले आहेत. ट्यूटन स्लाव्ह लोकांच्या कायद्यांत घोडा चोरणाराला सर्वांत अधिक कडक म्हणजे दगड फेंकून ठार मारण्याची शिक्षा असे.

**चोल**—हिमालयाच्या पूर्वेकडील रांगेंतील एका रांगेचें व त्यांतील सिकीम संस्थानांतून तिबेटांतील चेबादरीकडे जाणाऱ्या एका रस्त्याचें चोल हें नांव असून हा रस्ता अथवा घाट समुद्रसपाटीपासून १४५०० फूट उंचीवर आहे. [ इंपे. गॅझे. पु. १० ].

**चोल घराणें व चोल साम्राज्य**—प्राचीन चोल.—चोल हें नांव फक्त राजघराण्याचेंच नसून एका लोकसमूहाचेंहि आहे. हें नांव फार प्राचीन काळापासूनचें आहे. चोल लोक हे मूळचे कोठले व दख्खनमध्यें केव्हां आले हें नक्की सांगतां येत नाहीं. मात्र दख्खनचा प्राचीन इतिहास जेव्हांपासून सुरू होतो, तेव्हांपासून हे चोललोक व राजे तेथें नांदत होते एवढें खरें. महाभारत व इतर पुराणें यांत यांचा उल्लेख आहे. यांची खात्रीलायक वंशावळ मिळत नाहीं. अशोकाच्या दुसऱ्या व तेराव्या शिलालेखांत यांचा ( मित्रत्वाचा ) नामनिर्देश आहे. पुढें सिलोनच्या राजांचें व चोलांचें वैर माजल्याचें आढळतें. महावंश म्हणतो ख्रि. पू. पहिल्या शतकांत सहा तामीळ पुरुषांनीं सोळी ( चोळ ) देश बळकाविला होता. ( बर्नेलच्या मतें चोल देशास पूर्वी मलयकूट म्हणत ). सारांश, ख्रि. श. पहिल्या शतकापासून या चोलांची ऐतिहासिक माहिती मिळूं शकते. या माहितीला थोडा फार आधार तामीळ वाङ्मयाचाहि मिळतो. पेरिप्लसमध्यें यांचा उल्लेख असून टॉलेमीहि यांची माहिती देतो ( १३० ). यांच्या प्राचीन पूर्वजांच्या नांवांत, कपोतासाठीं मांस देणारा शिबी, कावेरीनदीचा पिता कवेर, इंद्रमित्र मुशुगुंडन, मनु, पेरुन्जोरुच्चोळन ( अन्नदान करणारा ) वगैरे राजे येतात. महाभारतीय युद्धांत चेर व पांडव यांच्या बरोबरच या चोलांनींहि दोन्ही सैन्यांस ( कौरव पांडवांस ) रसद पुरविली, म्हणून वरील अन्नदाते असें उपपद चोलांनां

लागलें अशी दंतकथा आहे. ह्युएनत्संग यांच्या राज्यांत गेला नव्हता. फक्त त्यानें यांची माहिती ऐकिली होती.

करिकालः—या घराण्यांतील पहिला ऐतिहासिक प्रख्यात पुरुष म्हणजे करिकाल चोल होय. याच्या पूर्वीचीं नांवें संगमादि ग्रंथांतून आढळतात. परंतु त्यांची ऐतिहासिक माहिती फारशी आढळत नाहीं. करिकालाच्या आजाचें नांव वेरपहरदक्कई पेरुनरकिळ्ळी असून तो कुडक्को नेडुमशेरलादन या चेरराजाचा समकालिन होता. हे दोघे परस्पर लढत असतां दोघेहि ठार झाले असें म्हणतात. करिकालाचा बाप उरुवप्पहरेर इळयोन ( इळंजेतचेन्नी ) नांवांचा होता. तो तरुणपणीं वारल्यानंतर करिकाल गादीवर आला. त्यावेळीं चेरांनीं याचें बरेंच राज्य आक्रमण केलें होतें; तेव्हां हा करूर येथें अज्ञातवासांत राहिला. पुढें एका आगींत सांपडून त्याचे पाय अधू झाल्यानें, त्याला नीलपाद किंवा कृष्णपाद असें म्हणत. लहानपणींच यानें न्यायनिवाडे उत्तम रीतीनें तोडल्याचें आढळतें. नानगुर वेळ कुटुंबांतील मुलीशीं यानें लग्न लाविलें. वेण्णिळ ( हल्लींचें तंजावर जिल्ह्यांतील कोईलवेण्णी ) येथें यानें पाण्डय व चेर या दोन्ही राजांचा पराभव करून चेर राजकन्येशीं लग्न लाविलें व आपली बहीण चेरराजास दिली व दोन्हीं घराण्यांत दोस्ती केली. सीलोनवर यानें स्वाऱ्या केल्या. आपली पहिली राजधानी उरैयूर ही बदलून, कावेरीपट्टनम् नांवाचें शहर स्थापून तेथें नेली. याचें कारण आपल्या राज्याची दक्षिण व पश्चिम सरहद्द मजबूत असावी. व्यापाराची भरभराट होऊन किनाराहि सुरक्षित रहावा म्हणून ही राजधानीची अदलाबदल झाली. तिच्या स्थापनेसाठीं करिकालानें सीलोनमधील बारा हजार लोक वेठीस पकडून आणले होते. पुढें सातव्या शतकांत गैल कुरम् ही राजधानी झाली. सिलप्पाधिकारम् वगैरे वगैरे काव्यांतून करिकालानें उत्तर हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून थेट हिमालयावर आपला व्याघ्रध्वज रोविल्याचा उल्लेख आहे ( पल्लवांचा ध्वजहि व्याघ्राचाच होता ). अवंतीराज व मगधराज आणि वज्र राज ( बुंदेलखंड ) हे त्याचे मित्र होते. याच्या कारकीर्दींत कावेरीपट्टनम् येथें दर्यावर्दी व देशावरील व्यापार फार जोरांत सुरू होता. याच्या कारकीर्दींत कांची नगरी सोन्याची केली असें वर्णन आहे. कावेरी नदीला बंधारे घालून कालवे काढले होते. यावेळीं चोल साम्राज्याची भरभराट झाली असून करिकाल हा सम्राट बनला होता. याच्या वर्णनपर पट्टिनप्पालै नांवाचें एक काव्य झालें; त्याच्या कर्त्यास एक लक्ष सव्वा हजार. सुवर्णमुद्रा, करिकालानें बक्षिस दिल्या. हा विद्वान असल्यानें याच्या पदरीं, परनर, कळ्ळाथलैयार वगैरे ( संगम ग्रंथांत प्रसिद्ध असलेले ) कवी होते. यानें बरींच वर्षें राज्य केलें.

नेडुमुडिकिळ्ळीः—हा करिकालाचा पुत्र किंवा नातु असून त्याच्या मागून राजा झाला. यानें बरींच वर्षें राज्य केलें. करिकाल वारल्यानंतर चेर पांड्यांनीं चोल राज्यावर स्वारी केली; परंतु नेडूनें, त्यांचा कारियारू येथें पराभव केला. या लढाईंत कांची येथील सुभेदार नेडूच्या भाऊ, हाहि हजर होता. यावेळीं कांची हें चोलें साम्राज्याचें उत्तर प्रांतांतील मुख्य ठिकाण होतें.

तोण्डमाणइळनीरयनः-नेडूचा पुत्र,एका नागकन्येपासून त्याला झाला होता. हा पुढें कांचीचा प्रसिद्ध सम्राट झाला. याची प्रशस्ती पेरुंबाणार्रुप्पदाई काव्यांत वर्णिलेली आहे. याच्या वेळीं जलदेवताच्या ओघानें कावेरीपट्टन व उरैयूर राजधान्या ( समुद्राच्या वाढीनें? ) वाहून गेल्या. शेंगुत्तुवन चेर राजानें याच्यावर स्वारी करून याचा पराभव केला व याचें बहुतेक राज्य काबीज केलें. पुढें पाण्डय व पल्लव यांचें प्राबल्य वाढल्यानें चोलघराणें हतप्रभ झालें. या तोण्डमाणाची हकीकत आढळत नाहीं.

कोच्चेंगणः—तोण्डमाणाच्या नंतर पल्लव अमदानींतील तीनशें वर्षांत चोलांचें फक्त नांव ऐकूं येतें. बाकीची माहिती आढळत नाहीं. या काळांत एका कोच्चेंगण चोलराजानें एका चेरराजाचा पराभव केल्याचा उल्लेख आढळतो. याला शैवपंथी व विष्णुपंथी लोक आपल्या बाजूचा म्हणतात. कारण त्यानें शिव-विष्णूचीं पुष्कळ ( एकट्या शिवाचीं सत्तर ) देवळें बांधिलीं होतीं. एक पाण्डयराणी चोलराजकन्या होती वगैरे या वेळची चोलांची त्रोटक माहिती आहे. पल्लवांप्रमाणेंच चालुक्यांनींहि या सुमारास चोलांनां नामशेष केलें होतें. सिंहलीं बखरींवरून चोलराजांनीं सीलोनवर पुढीलप्रमाणें ( या प्राचीनकाळीं ) स्वाऱ्या केल्या होत्या. पहिली ख्रि. पू. २४७; दुसरी ख्रि. पू. १४०, तिसरी इ. स. ११०, उलट सिंहलीलोकांनींहि त्यांच्यावर स. ११३ त स्वारी केली होती.

मध्यकालीन चोल.—पल्लव व चालुक्य यांचा उत्कर्ष होत होता तरी सुद्धां चोलांनीं आपली सत्ता थोडी फार जिवंत ठेवली होतीच. ह्युएनत्संगाच्या वेळीं या चोलांचे एक लहानसें घराणें टिकून होतें. पल्लवांनां राष्ट्रकूटांनीं पुढें नामशेष केलें व आपलें वर्चस्व दक्षिणेंत स्थापिलें. या वेळीं दक्षिणेंत पूर्व चालुक्य, राष्ट्रकूट, पांडय, गंग, पल्लव, बाण यांचीं राज्यें ठिकठिकाणीं पसरलेलीं होतीं. पुढें गंग–पल्लव–बाण या त्रिकूटानें वरगुण पांड्यराजाचा पराभव केल्यानें त्याचा फायदा घेऊन चोलांनीं आपलें डोकें वर उचललें ( ८५० ). वरीलप्रमाणें वरगुण पांड्यराजाचा पराभव झाल्यानंतर तत्कालीन विजयालय चोलराज यानें आपल्या जहागिरीचा विस्तार: वाढवून आपल्या चौतीस वर्षांच्या कारकीर्दींत तंजावर, कन्याकुमारी, कांची वगैरे प्रांत हस्तगत करून तंजावरास राजधानी केली. याची कारकीर्द ८४६–८८० पर्यंतची होती; याला परकेसरीवर्मा अशी पदवी होती. आदित्य पहिला हा विजयालयाचा पुत्र, याला राजकेसरीवर्मा ही पदवी होती. यानेंहि पुष्कळ प्रांत हस्तगत केले व अपराजित पल्लव व कोंगूराज यांचा पराभव

केला. यानें ८८०–९०७ पर्यंत राज्य केलें व आपली सरहद्द राष्ट्रकूटांच्या सरहद्दीशीं भिडविली. परान्तक पहिला हा आदित्याचा मुलगा असून याला परकेसरीवर्मा, वीरनारायण वगैरे पदव्या होत्या. याची कारकीर्द ९०७–९४७ पर्यंत झाली. यानें आपला राज्यविस्तार बराच केला. त्यानें केरळराजकन्येशीं विवाह केला व पाण्ड्यराजाचा, बाणराजाचा, वैडुंबराजाचा पराभव केला (९१०). याच्या कारकीर्दींत सर्वत्र शांतता नांदत असल्यानें, धार्मिक चळवळीस बराच जोर येऊन, काळमुख व पाशुपतादि शैवपंथांनां व वैष्णवपंथांनां राजदरबारीं मान्यता मिळाली. परान्तक स्वतः शैव असल्यानें त्यानें चिदंबरंच्या शंकराच्या देवळाचीं सर्व पटई सोन्यानें मढविली होतीं असें सांगतात. त्यानें आपल्या वयाच्या सद्दतिसाव्या वर्षी सीलोनवर स्वारी केली होती. याला पांच पुत्र होते. त्यांपैकीं तिघांनीं राज्य केलें. राजकेसरीवर्मन ऊर्फ राजादित्य हा परान्तकाचा जेष्ठ पुत्र त्याच्या मागें राजा झाला व त्यानें उत्तरेकडे राष्ट्रकूटांच्या प्रांतावर स्वाऱ्या केल्या तेव्हां बुत्तुग या (राष्ट्रकूटाच्या) सेनापतीनें राजादित्यावर चढाई करून तक्कोलम येथें त्याला लढाईंत ठार केलें (९५०). याप्रमाणें राजादित्यानें तीन वर्षे राज्य केलें (९४०–९५०). पुढें (तिसऱ्या) कृष्ण राष्ट्रकूटानें याच वेळीं चोलराजाचे बरेचसे प्रांत व कांचीशहर काबीज करून तंजावरासहि वेढा दिला. गंडरादित्तन हा राजादित्याचा धाकटा भाऊ, त्याच्या मागून राजा झाला; त्यानें कृष्ण राष्ट्रकूटाला परतवून लाविलें. यानें आपल्या नांवाचें एक शहर वसविलें. त्याच्या राणीनें त्याच्या पश्चात् कोनेरीराजपुरम् येथें एका देवळांत त्याचा पुतळा स्थापिला तो अद्यापिहि तेथें आहे. यानें १ वर्ष राज्य केलें. पुढें याचा मुलगा अज्ञान असल्यानें अरिंजय अथवा अर्जुन मधुरेकोंड, राजकेसरी हा राजा झाला. उत्तमशीली व अरिकुलकेसरिन् हे दोन परांतकाचे पुत्र (अर्जुनाचे भाऊ) होते. अरिकुल हा बापाच्या व अरिंजयाच्या वेळीं सेनापति असे. परान्तक दुसरा ऊर्फ सुंदर परकेसरी हा अरिंजयाचा पुत्र, त्याच्या मागून राजा होता. याच्या वेळीं वीर पांड्यानें उचल केली, परंतु यानें त्याचा चेवूर येथें पराभव केला. याच्या नंतर त्याचा मुलगा आदित्य दुसरा ऊर्फ करिकाल राजकेसरी हा राजा झाला. यानेंहि पल्लव, चेर व पांड्यराजांचा पराभव केला होता. त्याच्या मागें त्याचा चुलत चुलता परकेसरीवर्मन् मधुरांतक उत्तम हा ९६९ त राजा झाला. त्यानें १६ वर्षे राज्य केलें (९८५) व त्याच्या नंतर दुसऱ्या आदित्याचा धाकटा भाऊ पहिला राजराज हा गादीवर आला. या वेळीं चालुक्य व गंग यांची यादवी जुंपल्यामुळें राजराजानें त्याचा फायदा घेऊन आपलें राज्य वाढविलें. हा सर्व चोल राजांमध्यें श्रेष्ठ झाला. यानें प्रथम आपल्या राज्याची अन्तःस्थिति सुधारली व मग मुलुखगिरीस प्रारंभ केला. त्यांत प्रथम चेर आरमारावर स्वारी करून कांडलूरजवळ त्यांचा पराभव केला (९९५); नंतर गंगप्पाडी, नुळंबप्पाडी, तडिगैवळी व वेंगैनाडु हे प्रांत काबीज केले (९९७). पहिले दोन प्रांत गंगांचे असून त्यांवर चालुक्यांचाहि डोळा होता. पुढें चालुक्यांच्या राज्यांत यादवी माजल्यानें, राजराजानें त्यांच्यावर स्वारी करून त्यांनां मांडलिक बनविलें व विमलादित्य चालुक्यराजास कुंदव्वा ही आपली मुलगी दिली. याच सुमारास (९९७) त्यानें पांड्यांचाहि पराभव करून कोल्लम व कालिंग देश जिंकले; ईळम (सीलोन) वर स्वारी करून तेथें आपली सत्ता स्थापिली (१००३). यानंतर तीन चार वर्षांत त्यानें साडेसात लाख वसुलाचा रट्टपाडी प्रदेश जिंकून, सत्याश्रय चालुक्याचा पराभव केला (१००७). तंजावर येथील देवळांत राजराजानें आपण आपल्या राण्या व बहीण यांनीं दिलेल्या एकंदर धर्मादाय देणग्यांची यादी शिलालेखरूपानें खोदून ठेविली (१०१०) व तंजावर शहर पुन्हां वसविलें; कारण मध्यंतरीं चालुक्यांनीं त्याचा नाश केला होता. आयुष्याच्या शेवटीं त्यानें समुद्रांतील बारा हजार बेटें जिंकल्याचा उल्लेख आढळतो (१०१२). याप्रमाणें आपलें साम्राज्य वाढवून तो चोलसम्राट बनला. यानें आपली उत्तर सरहद्द कोवेरीच्या उगमाजवळील येडतोरेनाड गांवापासून थेट कृष्णेच्या मुखापर्यंत भिडविली. तसेंच याची दर्यावरील सत्ता रामनादपासून विजगापट्टमपर्यंत होती. राजराजाला राजाश्रय, अरुमोळीदेव मुम्मूडीचोळ, जयैमगोंडा वगैरे पदव्या होत्या. याच्या कारकीर्दींत प्रजा सुखी व धनधान्यसंपन्न होती. हा बहुधा १०१३ त वारला असावा. त्याच्या मागून त्याच्याच सारखा पराक्रमी त्याचा पुत्र, गंगई कोंड ऊर्फ मुडिगोंड, निगरिली उत्तम चोल राजेन्द्र हा राजा झाला. यानेंहि अनेक देश जिंकले, लोकोपयोगी कृत्यें केलीं व राज्यविस्तार केला. त्यानें युवराज असतांनाच बापाबरोबर पुष्कळ मोहिमांत भाग घेतला होता. इडैतुरैनाडु, दुर्गम बनवासी, अजिंक्य तटाचें कोळ्ळीप्पाक्कई, मण्णैकडगम हीं प्रसिद्ध तटबंदीचीं ठाणीं जिंकून, नंतर ईळम (सीलोन) वर स्वारी केली व तेथील राजाचा पराभव करून त्याचा, त्याच्या राणीचा, सुंदर नांवाच्या त्याच्या पुत्राचा असे तीन रत्नखचित मुकुट व राजाचा बहुमोल कंठा खंडणीदाखल घेतला. केरळ प्रांतावर स्वारी करून तेथील राजाचा सर्व खजिना, मुकूट व सूर्यमाला नांवाचा कंठाहि त्यानें यावेळीं घेतला. पुढें अनेक बेटेंहि त्यानें जिंकलीं (१०१५–२०) मुयंगी येथें जयसिंह चालुक्याचा पराभव करून शांदिमत्तीवु, रट्टपाडी (येथील कुबेराच्या नऊ निधीइतकी संपत्ती त्यानें मिळविली), विक्रमवीराचें चक्रकोट, मदुरमण्डल, नामनैक्कोणम, पंचप्पळ्ळी, माशुणीदेश, आदिनगर (येथील धीररथाला जिंकून त्याचा सर्व खजिना घेतला), ओड्डविषय, कोसलैनाडु, दंडभुक्ती

( येथें धर्मपाल राजा होता ) दक्कनलाट, (गोविन्द चन्द्राचा), वंगळदेश, निकोबार बेटें, शंगुक्कोट्टम, ( महिपालाचें ) व गंगराजाची राजधानी इतके देश व शहरें त्यानें जिंकलीं ( १०२०-२२ ). हीं नांवें तिरु व लंगाड्डु ताम्रपटांत येतात. कदाचित् ही यादी अतिशयोक्तीची असेल, तरी पण राजेन्द्र हा फार पराक्रमी होता एवढें खरें. नंतर त्यानें पाण्ड्य देश जिंकून त्यावर चोलपांड्य या आपल्या राजपुत्रास सुभेदार नेमिलें व केरळ देशावर दुसऱ्या राजपुत्रास सुभेदार नेमिलें. याच्या सेनापतीनें गंगातटाकापर्यंत मोहीम केली व ओरिसाच्या राजास आणि बंगालच्या महिपालाला मांडलिक बनविलें. राजेंद्रानें गंगैकोंड शोळापुरम् येथें एक मोठा तलाव बांधला व त्यांत गंगेचें पाणी ( तो शुद्ध करण्यासाठीं ) आणून घातलें. याचें नांव जयस्तंभतडाग होतें. याची एक बाजूची पाळ पंधरा मैल लांब होती. या तलावामुळें त्या प्रांतापैकीं अर्ध्या प्रांतास शेतीसाठीं पाणी पुरविण्यांत येई. यानें आपली मुलगी अम्मंगदेवी ही राजराज चालुक्यास दिली होती. राजशेखर विलास नांवाच्या काव्यांत यानें केलेल्या सर्व मोहिमांचा इतिहास आलेला आहे. त्यानें १०३३ पर्यंत ही मुलुखगिरी केल्यानंतर मग आपलें सारें लक्ष्य प्रजेच्या सुखसोईकडे लाविलें. या कामीं त्यानें बारा वर्षे घालविलीं. त्यानें गंगैकोंडशोळापुरमू येथें राजधानी स्थापून तेथें अनेक देवळें व वर सांगितलेला तलाव बांधला. कांहीं वर्षांपूर्वी या तलावाच्या पाळीचे व देवळांचे दगड काढून, ते सध्याचें कोलेरून येथील धरण बांधण्यास नेले. हल्लीं तो तलाव व देवळें नामशेष झालीं आहेत. एकोणिसाव्या शतकांत फेरोनें लिहिलेल्या गॅझेटियरमध्यें त्यांच्या बांधकामाच्या अजस्त्रपणाची व सौंदर्याची फार प्रशंसा केलेली आहे. राजेन्द्रानें आपल्या राजाधिराज नांवाच्या मुलाला स्वतः सर्व राज्यकारभाराचें शिक्षण दिलें होतें. राजेन्द्रानें एकतीस वर्षे राज्य करून प्रजेस सुख दिलें. तो १०४३ त वारला. त्याच्या मागून त्याचा दुसरा पुत्र राजाधिराज उर्फ जयमगोंड हा राजा झाला. याचा वडील भाऊ आळवंदान नांवाचा होता. यानें १०४३ते१०५२ पर्यंत राज्य केलें. राजाधिराज हा राईसच्या मतें राजेन्द्राचा भाऊ असावा; परंतु तें संशयास्पद आहे. अण्णिगिरी येथील ( १०७१ ) चालुक्यांच्या शिलालेखांत राजाधिराजाची बरीचशी माहिती आली आहे. यानें गंगमंडळाच्या पेरुमानडी राजाचा पराभव करून गंगमंडळ काबीज केलें व तेथील जैनमंदिरें लुटलीं. पुढें कांहीं वर्षांनीं गंगांनीं चोलांची अधिसत्ता झुगारली. राजाधिराज हा गादीवर येतांच त्यानें मोहिमांस सुरुवात केली. कारण राजेन्द्र मेल्यावर चोल मांडलिकांनीं बंडें केलीं होतीं, तीं याला मोडावीं लागलीं. तीं मोडून यानें त्यांच्या राज्यावर आपला चुलता व पांच भाऊ यांनां चेर, चालुक्य, गंग, पाण्डय, पल्लव, सीलोन वगैरे प्रांतांवर सुभेदार नेमिल. यानें सीलोन जिंकल्यानें त्या राजाची कनोजाधिपति ही पदवी याला मिळाली ( सीलोनच्या राजघराण्याचा मूळपुरुष कनोजच्या राजघराण्यांतील होता अशी दंतकथा आहे. ) पाण्डय राजे त्याच्यावर उठले तेव्हां त्यानें त्यांपैकीं मानाभरण याचा शिरच्छेद केला, वीरकेरळास हत्तीच्या पायीं दिलें व सुंदर यास हद्दपार केलें. यानें त्रावणकोर व चेर येथील राजांचा पराभव करून कांडलूरजवळ आरमारी जय मिळविला व चालुक्यांचा पराभव केला. विक्रमादित्य, विजयादित्य व जयसिंह हे चालुक्य राजे मागें हटवून त्यांची कोल्लीप्पाक्कोई ही एक राजधानी जाळली. मग यानें सीलोनच्या विक्रमबाहु, विक्रमपांडु, वीरसालमेघत व श्रीवल्लभमदन या चारी राजांचा पराभव केला व उत्तरहिंदुस्थानाकडे मोर्चा फिरवून तिकडील गणपति, नारायण, मधुसूदन वगैरे राजांनां जिंकलें. परंतु पुढें कोप्पम येथें शत्रूशीं लढत असतां हा लढाईंत मारला गेला ( १०५२ ). यानें आपलें राज्य निष्कंटक केलें व थोडासा नवीन प्रांतहि मिळविला. याच्या मागून राजेन्द्र हा त्याचा भाऊ राजा झाला. हा कोप्पमच्या लढाईंत हजर होता. त्या लढाईनें चोल राज्यास मोठाच धक्का बसला होता तो यानें सांवरला व आपलें राज्य स्थिरस्थावर केलें. यानें१६०२पर्यंत राज्य केलें व सिलोनच्या राजास पकडून सीलोन आपल्या राज्यास जोडलें आणि कोल्हापूर येथें एक जयस्तंभ उभारला. याची मधुरांतकी नांवाची मुलगी चालुक्य राजपुत्र राजेन्द्र चोल उर्फ कुलोत्तुंग यास दिली होती. याच्या नंतर याचा पुत्र राजमाहेन्द्र हा गादीवर बसला. हा अतिशय न्यायी असून यानें श्रीरंगम् येथील देवास वर्षासन नेमून दिलें होतें यानें राजमहेन्द्री हें शहर स्थापन केलें. व मल्ल चालुक्यानें राजमहेन्द्राचा पुष्कळ प्रांत काबीज केला.कारण या वेळीं चोलांच्या राज्यांत बंडाळी झाली होती व राजघराण्यांत सिंहासनावर कोणी बसावें याबद्दल यादवी सुरू झाली होती. चोल राजघराण्यांत या वेळीं बरेचसे राजपुत्र व राजसंबंधीं लोक आपापला हक्क प्रस्थापित करूं पहात होते.

राजमहेन्द्राच्या मागें त्याचा चुलता वीरराजेन्द्र हा राजा झाला. त्यानेंहि बऱ्याच स्वाऱ्या करून आपला राज्यविस्तार केला(१०६३-७०). याला चालुक्यांशीं एकंदर पांचदां लढावें लागलें. प्रथम यानें त्यांच्यांपासून गंगवाडी प्रांत ( सरकार प्रांत ) जिंकला. नंतर वेंगीच्या राज्याचा बंदोबस्त करून कृष्णा--तुंगा--संगमावर कुडलसंगम या ठिकाणीं चालुक्यांचा मोठा पराभव केला. यावेळीं चालुक्यांच्या मदतीस चोलांचे सर्व बंडखोर मांडलिक आले होते. या लढाईंत वीरराजेन्द्रास अपरिमित लूट मिळाली. या लढाईचें वर्णन एका शिलालेखांत आलें आहे. त्यावरून त्या वेळच्या युद्धाचें सामान्यस्वरूप दिसून येतें. त्या काळीं हत्तींचा युद्धांत फार उपयोग होई. त्यानंतर यानें (उलगै येथें) केरळ, पाण्ड्य, गंग व नोळंब या राजांचा पराभव केला व चालुक्यराजाच्या आव्हानावरून पुन्हां कुडलसंगम येथें जाऊन त्यांनां पळवून लावून तेथें एक

जयस्तंभ उभारला. पुढें त्यानें विक्रमादित्य चालुक्यास त्याच्या भावाविरुद्ध गादीवर बसण्यास मदत करून त्याला आपली मुलगी दिली. बेझवाडा येथें वेंगीदेशच्या सैन्याचा पराभव करून तो देश खालसा केला आणि कलिंगदेशावरहि स्वारी केली. त्यानें वेंगीदेश आपला आश्रित व जावई विक्रमादित्य चालुक्य यास दिला आणि स्वतः राजाधिराज राजराज ही पदवी धारण केली. पुढल्या वर्षी यानें कुडळसंगम येथें पुन्हां सोमेश्वर चालुक्याचा पराभव करून करडीक्कल येथें जयस्तंभ उभारला व कांपिली शहर जाळलें (१०६८); आणि ब्रह्मदेशाचा दक्षिण भाग ( तलैंग नांवाचा ) खालसा करून दर्यावर मोठा जय मिळविला (१०६९). लष्करी कामाप्रमाणें राज्यकारभाराच्या मुलकी कामांतहि तो प्रवीण होता. हा अखेरीस १०७० त मेला. त्याच्या मागून त्याचा पुत्र अधिराजराजेंद्र हा गादीवर आला. तामीळ व्याकरण वीरसोळीयम् नांवाचें ( बुद्धमित्रानें केलेलें ) वीरराजेन्द्राच्याच आश्रयानें झालें. याच्या मृत्यूनंतर चोल चालुक्य यांच्यांत पुन्हां भांडणें सुरू झालीं. अधिराजराजेन्द्र हा बापाच्या मागून गादीवर बसला. यानें एक वर्ष राज्य केलें. याला गादीवर बसविण्यांत याचा मेव्हणा विक्रमादित्य चालुक्य यानें मदत केली होती. पुढें याच्या प्रजेनें बंड करून याला ठार मारलें. एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, या अधिराजेन्द्रास राजेन्द्र कुलोत्तुंग ऊर्फ राजीग केशरीवर्मा यानें ( बंड उभारून ) ठार मारून त्याची गादी उपटली; तेव्हां विक्रमादित्यानें त्याच्यावर स्वारी करून कुलोत्तुंगाला पिटाळून लाविलें. अधिराजेंद्रास पुत्र नव्हता. कुलोत्तुंगास राजराज शार्ङ्गधर नांवाचा एक भाऊ होता असें म्हणतात. यापुढें कुलोत्तुंग हा राजा झाल्यानें पूर्वचालुक्यांचा वंश या चोलवंशांत कायमचा मिसळून गेला. कुलोत्तुंग हा दोनदां गादीवर बसला; एकदां ( १०७० त ) पैतृक राज्यावर म्हणजे वेंगीच्या सिंहासनावर; व दुसऱ्यानदां सर्व चोलसाम्राज्याच्या सिंहासनावर ( इ. स. १०७४ त ) असें भट्टनाथस्वामी म्हणतात; कारण १०७४ त त्यानें कुलोत्तुंग ही पदवी धारण केली; तत्पूर्वी त्याचें साधें नांव राजेन्द्रच होतें. राजेंद्र ऊर्फ कुलोत्तुंग चोल हा चालुक्यवंशी राजराज चालुक्याचा मुलगा असून राजेंद्र चोलाचा जांवई होता. याची आई अम्मंगदेवी ही गंगैकोंड चोल राजा याची कन्या होती. हा लहानपणीं आपल्या आजोळी (सासुरवाडीस) रहात असे.याच्या बापाचे मरणानंतर याच्या चुलत्यानें वेंगीचें राज्य बळकाविलें होतें. हा वेंगीचा राजा व्हावयास पाहिजे होता. परंतु चालुक्य राजवंशांत त्यावेळीं यादवी माजली होती व हा अज्ञान होता. मोठा झाल्यावर हा तिरुवोरीयुर प्रांताचा सुभेदार झाला. याला राजकेसरीवर्मा अशी पदवी होती. हा वर सांगितल्याप्रमाणें गंगैकोंड या चोल राजाचा (मुलीकडून) नातु होता. याचा बाप राजराज १०६१–६२ त मेला होता. यानें युवराज असतांना वैरागरम व चक्रकोट हीं महत्वाचीं ठाणीं काबीज केलीं होतीं. याच्या कारकीर्दीच्या एकूणपन्नास वर्षांपर्यंतचे शिलालेख प्रसिद्ध आहेत. त्यावरून तो १०७० त वेंगीच्या व चोलराजाच्या गादीवर बसल्याचें दिसतें. त्यापूर्वी तो आपल्या आजाबरोबर(गंगईकोंड)बऱ्याच लढायांत हजर असे. चोलसाम्राज्याच्या सिंहासनावर बसण्याची संधी लक्ष्य लावून तो पहात होता व ती अधिराजराजेंद्राच्या वेळीं त्याला लाधली. तत्पूर्वी तो आपल्याला चालुक्य न म्हणवितां चोलच म्हणवून घेई. त्याची आई व आजी कुंदव्वा या चोलवंशीय होत्या. त्याचा ध्वज चोलध्वज (व्याघ्रचिन्हांकित) होता, चालुक्यध्वज (वराह) नव्हता. यानें आपल्या राज्यारोहणाच्या चौथ्या वर्षी कुलोत्तुंग ही पदवी धारण केली व कुतन्लराजाचा व पांड्यराजाचा पराभव केला. याला कावेरी नदीतीरावर राज्याभिषेक झाला होता. त्यानें म्हैसूर प्रांतावर स्वारी करून (१०८१) विक्रमादित्य चालुक्याचा पराभव केला (१०८३) व त्याला तुंगापार घालवून गंगामंडल व सिंगण प्रांत काबीज केले. पाण्ड्यराजाला जिंकून मानार, तिनेवेल्ली, कन्याकुमारी, कुट्टरू, मलबार वगैरे प्रांत काबीज केले (१०८५). व त्या त्या प्रांतीं आपले अधिकारी नेमिले. याच्या एका तोंडमान चक्रवर्ती नांवाच्या लेकवळ्यानें पल्लवराजाचा पराभव करून तें राज्य खालसा केलें होतें. याप्रमाणें कुलोत्तुंगानें चोलसाम्राज्य वाढविलें. या वेळीं दख्खनमध्यें विक्रमादित्य चालुक्य व कुलोत्तुंग चोल हे दोन बलिष्ठ सम्राट होते. पाण्ड्य व चेर हे चोलांचे मांडलिक होते. मदुरेस कुलोत्तुंगानें आपला भाऊ यास अधिकारी नेमलें होतें. कुलोत्तुंगानें राज्यप्रसार करतांना राज्यांतील व्यवस्थेकडेहि लक्ष्य दिलें. आपल्या सर्व राज्याच्या जमीनींची मोजणी केली (१०८६). या मोजणींतील शेवटचें परिमाण श्रीपाद (कुलोत्तुंगाचें पाऊल) होतें. यानें दोनदां (१०९५,१११२) कलिंगदेश जिंकला. त्यामुळें त्याची कीर्ती जास्त वाढली. टेकी ताम्रपटावरून दक्षिण कलिंग चोलसाम्राज्यांत मोडत असल्याचें समजतें. कुलोत्तुंगानें शेवटीं गंगवाडी प्रांत होयसळापासून पुन्हां काबीज केला. कारण त्यांनीं त्याच्या सुभेदाराला गंगवाडींतून हुसकून देऊन उलट त्याच्याविरुद्ध चालुक्यांस मदत केली होती (१११६–१७ ). यावेळीं चोलांची कावेरी नदीवरील एक राजधानीहि होयसलांनीं घेतली. व म्हैसूर प्रांतांतील चोलांच्या मांडलिकांनीं त्यांच्याविरुद्ध बंड केलें. परंतु तें कुलोत्तुंगानें मोडलें ( १११८ ). सरहद्दीवर त्यानें लष्करी ठाणीं बसवून देशांत शांतता ठेवली. त्यामुळें याच्या अखेरच्या कालांत याच्या भोंवतालचे सर्व राजे याचे मित्र राहिले (फक्त म्हैसूर बाजूस थोडीशी खळबळ चाल ). हा शैव असल्यानें प्रसिद्ध रामानुज याला यानें आपल्या राज्यांतून हद्दपार केलें होतें. याला तीन ( दिन चिंतामणि, ईळीशैवल्लभी, त्यागवल्ली ऊर्फ लोकमहादेवी मधुरांतकी या ) राण्या होत्या. शेवटची पट्टमहिषी होती. हा चोल सम्राटांतील शेवटचा पराक्रमी सम्राट होय. याच्यानंतर चोल साम्राज्यास उतरती कळा लागली याच्यानंतरचे राजे शूर होते खरे पण त्यांनां आपली सत्ता मोठ्या

प्रयासानें राखतां आली. विक्रम हा कुलोत्तुंगाचा चवथा पुत्र. युवराज असतां हा वेंगीचा सुभेदार होता. कुलोत्तुंग १११८ त मेल्यावर हा राजा झाला. यानें एलोर व कलिंगवर स्वारी केली व १७१८ वर्षे शांतपणें राज्य केलें. जयमगोण्ड कवीनें आपलें कलिंगत्तुप्परणी हें काव्य याला अर्पण केलें. हा वैष्णव असल्यानें रामानुजाचार्य हा परत याच्या राज्यांत येऊन राहिला. याच्यामागून ( ११३५ ) याचा पुत्र कुलोत्तुंग दुसरा गादीवर आला. याच्यावर अनेक काव्यें झालीं आहेत. यानें चिदंबरम् येथील देवाची मूर्ति समुद्रांत टाकली. ती पुढें रामानुजानें काढली असें एका लेखांत वर्णन आहे. यानें चौदा वर्षे राज्य केलें. याच्यामागून ( ११४६ ). राजराज दुसरा हा त्याचा मुलगा राजा झाला. यानें ११७८ पर्यंत राज्य केल्यावर त्याचा पुत्र राजाधिराज दुसरा गादीवर आला. यानें ११८६ पर्यंत राज्य केलें. याच्या व याच्या मागच्या तीन राजांच्या कारकीर्दींत शांतता असल्यानें वाङ्मय बरेंच वाढलें. व शेकीळार, कंबन, ओट्टकुट्टन, पुगळेंद्री, वगैरे अनेक वाङ्मयभक्त होऊन गेले. याच्या कारकीर्दींत पाण्डय राजघराण्यांत यादवी माजली. एका पांडय राजपुत्राला याची व एकाला सीलोनचा पराक्रमबाहु याची मदत होती. व त्यामुळें पराक्रमबाहु व चोल यांच्यांत युद्ध उपस्थित झालें. पराक्रमबाहूनें रामेश्वर लुटून कुलशेखर (चोलमित्र) पांडयाचाहि पराभव केला. परंतु राजाधिराजानें शौर्यानें? पराभव करून मदुरेवर स्वारी केली. वीरपांड्याला ( पराक्रमबाहूचा मित्र ) त्याच्या सर्व कुटुंबासह ठार करून तेथें एक विजयस्तंभ उभारून व तेथील राज्यावर आपला एक मांडलिक ठेवून तो परतला. याच्यामागून ( ११८६ ) त्याचा पुत्र कुलोत्तुंग तिसरा हा गादीवर येऊन त्यानें ११९७ त पांडयराजाचा पराभव केला व कांचीच्या तेलगु चोलाला नामोहरम केलें. यानें अनेक शिवालयें बांधलीं. यानें अनेक मांडलिक उत्पन्न केले व त्यांनीच पुढें चोलसाम्राज्य खिळखिळें केलें. तसेंच होयसळ, काकतीय यादव वगैरे शेजारचे राजेहि आपले हातपाय पसरूं लागले. त्यामुळें चोल साम्राज्य मोडकळीस आलें. दक्षिणेंतील सर्व राजघराण्यांत अंतःकलह माजला. कुलोत्तुंगाच्या वेळीं जैन भवनन्दी यानें नन्नुल हें तामीळ व्याकरण लिहिलें. कुलोत्तुंगानंतर ( १२१६ ) त्याचा मुलगा राजराज तिसरा त्रिभुवनचक्रवर्ति, राजकेसरीवर्मा हा राजा झाला. यानें १२४८ पर्यंत राज्य केलें. पांड्यराजा याच्यावर चालून आला असतां, नारसिंह होयसळानें याला मदत देऊन पाण्डयांचा पराभव केला ( १२२३ ). पुढें काडव पल्लव यानें राजराजास पकडलें असतां पुन्हां नारसिंहानें त्याला सोडविलें; व त्याच्या राज्यांतील बंडाळी मोडिली ( १२३२ ). परंतु पुढें सर्वत्र बंडें उद्भवलीं. तेलेगुचोल हा नेलोरहून, सुंदरपाण्ड्य हा दक्षिणेकडून, काडव पल्लव हाहि दक्षिणेकडून चालून आला व त्यांनीं याचें राज्य घेतलें. शेवटीं याच्या नंतर याचा पुत्र तिसरा राजेन्द्र राजा झाला. त्याच्या वेळीं एक तोतया उत्पन्न होऊन त्यानें दंगल माजविली. अशा वेळीं सोमेश्वर होयसळानें राजेन्द्रास मदत केली व थोडीशी शांतता स्थापन केली. परंतु चोलसाम्राज्याचे तुकडे तुकडे व्हावयाचे थांबले नाहींत. अनेक मांडलिक स्वतंत्र बनले. शेवटीं वरंगळच्या काकतीय उर्फ गणपतिराजांनीं यांचें सर्व राज्य जिंकून घेतलें. त्यामुळें पेन्नार नदीच्या उत्तरेकडील सर्व चोल साम्राज्य नामशेष झालें. या तिसऱ्या राजेंद्रानंतर त्याचा पुत्र त्रिभुवन वीरदेव राजा झाला. यानें १३३२ पर्यंत राज्य केलें. हा शेवटचा चोल राजा होय. याच्या शिवाय आणखी पेरुंजिंग ( १२४४-६४ ), विजयगोंड ( १२६६ ) वगैरे नांवें चोलराजांचीं आढळतात. परंतु त्यांची फारशी माहिती सांपडत नाहीं. मुसुलमानांनीं स्वारी करून ज्या चोल राजाला पदच्युत केलें त्याचें नांव मधुरांतक पोरप्पि असून, त्यानें १२८६-१३१० पर्यंत राज्य केलें होतें. पुढें विजयनगरकरांच्या कारकीर्दींत भगप्पदेव, कांचीचा राजा नारायणराज ( १३३७-१३५६ ) व वीरचंप ( १३१४ ) या तीन चोल राजांचा उल्लेख येतो. मध्यंतरीं उडियार घराण्यानें व मदुराच्या नायक घराण्यानेंहि यांचें राज्य घेतलें होतें. त्या नंतर मराठ्यांनीं आपलें राज्य स्थापिलें.

चो ल सा म्रा ज्य.–चोल साम्राज्याला चोलमंडलम् म्हणत. चोल हें राष्ट्राचें नांव, चोल, चोळ, चोड, कोन अशा भेदांनें पुराणांत आढळतें. बृहत्संहितेंतहि हें देशाचें नांव आलेलें आहे ( १४. १३. ). हल्लींचें कारोमांडल नांव हें या कोन अथवा चोलमंडल शब्दांचेंच अपभ्रष्ट रूप होय. अशोक, या देशास चोर, चोड म्हणे. टॉलेमी चौरे म्हणे. ह्युएनत्संग चोलिय असें म्हणे. आणि प्लिनी हा सोर असें नांव देई.

राज्यव्यवस्था.—चोलसाम्राज्याची बहुतेक शासनव्यवस्था परांतकचोलानें ठरवून दिली होती व तीच अखेरपर्यंत पाळली जात असे. या राज्याचे पुढीलप्रमाणें विभाग व अधिकारी असत. मण्डपम् ( इलाखा ), त्याखालीं नाडु ( जिल्हा )व ऊर (शहर किंवा तालुका). दरेक मण्डपमूवर एकेक सुभेदार नेमीत. प्रत्येक खेडें शासनपद्धतीचा एकेक घटकावयव समजत; व त्या खेड्याच्या परंपरेप्रमाणें तेथें पंचायत असे. सुभेदारांखेरीज सेनापती व प्रधान असत. त्यांनां महासेनापति, दण्डनायक, संधिविग्रहिन् अशीं नांवें असत. महालानिहाय करवसुलीचे अधिकारी असत. ग्रामपंचायत शासनपद्धति ही फार प्राचीन होती. चोलराज्यांत पुढील निरनिराळीं सरकारी खातीं असत. सरोवरमंडळ, उपवनदुरुस्तीमंडळ, सर्वसाधारणदुरुस्तीमंडळ. कुटुंबु अज्ञानपालन शेतकी, ग्रामपरीक्षक, साधुसंन्याशांची तरतूद करणारें; या सर्व खात्यांत विद्वान ब्राह्मण अधिकारी असत. गांवांतील प्रत्येक पेठ निरनिराळ्या लोकांच्या ताब्यांत असे. त्यास ग्रामकोन म्हणत. शेतसारा कायमचा ठरावीक व उत्पन्नाच्या मगदुराबर चढता उतरता अशा दोन स्वरूपांत

वसूल करीत. शेती सुधारण्याचें ( मॉडेलफार्मसारखें ) कामहि त्यावेळीं होतें. पडजमीन अत्यंत स्वस्त भावानें प्रजेस लागवडीस देत.

तत्कालीन चलन माडै ( ऊर्फ मधुरांतकन ) नाणें होतें. एका माडैचे दोन काशु अथवा भाताचे साडेपांच कलम असत. या कलमाची किंमत कमी जास्त होई. नाणें पाडून देण्यास सरकारांत माडैकुली कर भरावा लागे. धान्य मोजण्याच्या मापास मरक्काल व द्रव पदार्थ मोजण्याच्या मापास एकनाथ म्हणत. राज्यांत पाटबंधारेखातें व लोकोपयोगी खातें होतें. कुलोत्तुंगानें सर्व जकाती काढून टाकल्या. त्यामुळें तो लोकप्रिय होऊन लोकांनीं त्याला सुंगन्दर्विर्ते ( जकाती माफ करणारा ) ही पदवी दिली.

कुलोत्तुंगाच्या राशियतींत धार्मिक व वाङ्मयिक पुनरुज्जीवन झालें. रामानुजाचार्य याच्याच वेळीं झाला. जयमकोण्ड हा कुलोत्तुंगाचा राजकवि होता. यानेंच शिल्पाधिकारम् टीका लिहिली. शेक्किळार हा शैव ग्रंथकार व आदियार वगैरे कवी व ग्रंथकार याच्या वेळीं झाले. कुलोत्तुंगापूर्वी बरेच आळवार होऊन गेले असें एका ( १०८८ च्या ) शिलालेखावरून ठरतें. त्यामुळें बाराव्या व तेराव्या शतकानंतर आळवार होऊन गेले, हें काल्डवेलचें मत चुकीचें दिसतें. कुलोत्तुंगानें कुलशेखराळवार याच्या ग्रंथपठणासाठीं उत्पन्न दिल्याचें आढळतें. आळवारांप्रमाणेंच नम्मळवारहि ११ व्या शतकापूर्वीच होऊन गेल्याचें दिसतें ( उक्कल शिलालेख ). तामीळ वाङ्मयाची वृद्धी चोलसाम्राज्यांत बरीच झाली.

ग्रामसभा.—ग्रामपंचायतीस तामीळ भाषेंत कुरम म्हणत. हिचे अधिकारी लोकांस जबाबदार असत. पंचायतींच्या महासभाहि असत. उक्कल येथील चौदा शिलालेख या ग्रामपंचायतीच्या कारभाराचे निदर्शक आहेत हे लेख सन ८०० ते ११०० पर्यंतचे आहेत. पंचायतीच्या ताब्यांत कर, बागा, देवळें, तळीं, कालवे, वगैरे कामें असत. त्यांच्या निरनिराळ्या समिती असत. जंगलखातेंहि त्यांच्या ताब्यांत असे. नवीन वसाहत करण्यास त्यांची परवानगी लागे; खंडानें द्यावयाच्या शेतजमिनीहि पंचायत देई; गांवचें पोलीसहि यांच्या अधिकारांत असे; सार्वजनिक फंड हिच्या ताब्यांत असत. बिनवारशी माल किंवा जमीनी यांची खरेदीविक्रीहि हीच करी. सारावसुली अगर माफी किंवा त्यासाठीं जमीन जप्त करणें वगैरे अधिकार हिला होते. सारावसुलीची शिल्लक राजधानीस न पाठवितां सभा आपल्याजवळ ठेवी व अडचणींत शेतकऱ्यांनां मदतीदाखल देई. करवसुलीच्या कामीं जबरदस्ती होत नसे. हिची निवडणूक दरसाल होत असे, व सर्व सभासद लोकनियुक्त असत. यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेखीसाठीं नेमणूक होई. मात्र त्यांचें काम हिशेब तपासण्याचें व अंदाजपत्रकाप्रमाणें राज्यांतील वसुलांतून तितकी रक्कम पुरविण्याचें एवढेंच असे. हे अधिकारी दोन असत. प्रथम देवस्थान व इनाम वगैरेंची रक्कम देऊन, बाकीचा गांवचा सर्व वसूल ( सरकार देण्याशिवाय ) पंचायतीच्या हातींच राही. न्यायनिवाडेहि पंचायत करी. फांशीची शिक्षा क्वचित् अमलांत येई. देवळांत नंदादीप लावणें अगर पंचायतीला अमुक इतक्या गाई पुरविणें या गोष्टी शिक्षा म्हणून देत असत. ज्यूरीचीहि पद्धत त्यावेळीं होती. पंच ( ज्यूरर्स ) देतील तो निकाल अखेरचा म्हणून सरकारकडून मानला जाई. फक्त सरकारी अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं खटला चाले एवढेंच. तत्कालीन दळणवळणाचीं अल्प साधनें व अफाट प्रदेशविस्तार लक्षांत घेतां ही पंचायतपद्धति बरीच निर्दोष होती असें वाटतें.

महाजनसभा:—हिच्या ताब्यांत अनेक ग्रामसभा असत. यांच्या सभासदांची संख्या कधीं कधीं पांचशेंपर्यंत असे. निरनिराळ्या खात्यांवर देखरेख करणारीं उपमंडळें ( कमेट्या ) असत. नाणें पाडण्यास जें सोनें आणून देण्यांत येई, त्याच्यावर देखरेख करणं या सभेच्या हातीं असे. सर्व खात्यांवर, पंचप्रधान, नांवाची देखरेख करणारी मंडळी असे.

निवडणुकीचे नियम:—भौगोलिक महत्त्वाप्रमाणें खेड्यांचे समूह केलेले असत; व त्या त्या समूहाचे पुन्हां विभाग पाडीत. मतदारीचा हक्क वयांत आलेल्या सर्वांना असे. गांवांतील सर्व उमेदवार लोकांचीं नांवें चिठ्यांवर लिहून त्या चिठ्या बंद करून एका पात्रांत घालून ( पत्र मोहोरबंद करून ) महाजन सभेकडे पाठविल्या जात. उमेदवार होण्यास खालील गोष्टींची जरूरी असे. ( १ ) कर देण्यायोग्य जमिनीचा ¼ तरी तुकडा ताब्यांत असणें. ( २ ) स्वतःच्या मालकीच्या जागयावर स्वतःचें घर बांधणें. ( ३ ) वय ३५ च्या वर व ७५ च्या आंत असणें. ( ४ ) मन्त्र ब्राह्मणें अवगत असणें व दुसऱ्यास शिकविणें. ( ५ ) वेदपारंगत व भाष्य पठिक असणें. ( ६ ) व्यवहारदक्ष व जबाबदारीचीं कामें पार पाडण्यास लायक असणें. ( ७ ) योग्य मार्गानें धनसंपादन करणें, सदाचारयुक्त असणें ( ८ ) निवडणुकीपूर्वी गेल्या तीन वर्षांत महाजनसभा अथवा तिच्या पोटमंडळाचा सभासद नसणें; याप्रमाणें पात्रतेचे नियम असत. अपात्रतेचे नियम पुढीलप्रमाणें असत. ( १ ) पूर्वीच्या महाजनसभेंतील अथवा पोटमंडळाचे खजीनदार असतांना ज्यांनीं तेथील आपल्या कामाचे हिशेब बरोबर सादर केले नाहींत असे लोक; व त्यांचे निकटचे आप्तलोक. या आप्तमंडळींत, मावसभाऊ, आतेभाऊ, मामेभाऊ, मामा, काका, भाऊ, सासरे दोन्ही प्रकारचे मेव्हणे, भाचा, जांवई, बाप, आणि स्वतःचीं मुलें इतक्यांचा समावेश होत असे. ( २ ) व्यभिचारी, पंचमहापातकी व त्यांचे संसर्गी आणि त्यांचे आप्त ( आप्तांत वर सांगितलेले सर्व लोक येत, हें नेहमीं ध्यानांत धरलं पाहिजे ). ( ३ ) हलक्या जातीच्या स्त्रीशीं संबंध ठेवलेला अथवा खालच्या जातीशीं संबंध ठेवल्यामुळें वाळींत टाकलेला. ( ४ )

साहसी, चोर वगैरे. ( ५ ) अभक्ष्यभक्षण करणारा, पापकर्मे करणारा, खोटी सही करणारा, पूर्वी गांवगुंडीबद्दल शिक्षा झालेला, व व्यभिचारी , ( इतक्या प्रकारच्या लोकांनीं जरी प्रायश्चित्तें घेतलीं तरीं सुद्धां हे ( पांचव्या कलमांतील ) लोक आमरण अपात्र समजले जात; पहिल्या चार कलमांतील लोकांनां कांहीं प्रायश्चित्तें घेऊन अपात्रता दूर करतां येई.

ठिकठिकाणच्या मतदारांच्या नांवाच्या पत्रिका महासभेच्या गांवीं आल्यानंतर एका नेमलेल्या दिवशीं, गांवांतील सर्व आबालवृद्ध, निवडणुकीच्या जागीं (देऊळ किंवा चावडी) जमत; तेथें गांवांतील सर्व उपाध्यायहि असत. मग सर्वांत वृद्ध ग्रामोपाध्या उभा राही व एक रिकामें भांडें घेऊन तें सर्वांनां खालून वरून दाखवी. नंतर एकादा ( ज्याला मतदारपत्रिकेबद्दल कांहींच कल्पना नाहीं असा ) लहान मुलगा बोलाऊन त्याच्याकडून निरनिराळ्या गांवांपैकीं एका गांवच्या चिठ्यांचा गठ्ठा, मोहोर फोडून, त्या सर्व चिठ्या त्या भांड्यांत घालीत, व त्यांची सरमिसळ करीत. नंतर त्यापैकीं एक चिठ्ठी तो मुलगा बाहेर काढून, त्या उभा राहिलेल्या वृद्ध उपाध्यायाच्या हातावर ठेवी. उपाध्याय त्या चिठ्ठीवरील नांव मोठ्यानें वाची व मग बाकीचेहि उपाध्ये तें नांव वाचून पहात व मग तें कायम झालें ( म्हणजे त्या नांवचा माणूस निवड होऊन सभासद झाला ) असें ठरे. अशा रीतीनें प्रत्येक गांवाला अवश्य असलेले सभासद निवडण्यांत येत. ग्रामसभेंतहि अशीच निवडणूक होई; त्या सभेचे सभासद किती असत, त्यांची संख्या या उक्कल शिलालेखांत आढळत नाहीं; बहुधां ती २०।३० असावी. महाजनसभेची सभासद. संख्या ५०० पर्यंत असे; व त्यांत साधारण ५०।६० गांवें असत ( म्हणजे महाजनसभेच्या हाताखालील गांवांचा समूह हल्लीच्या एका तालुक्याच्या मर्यादेऐवढा येतो ), आणि त्या प्रमाणांत दर गांवास ८।१० सभासदांची सरासरी पडते. याप्रमाणें निवडणूक झाल्यानंतर एक देखरेखमंडळ नेमीत. जे मागील निवडणुकींत उपवनमंडळांत देखरेख करणारे असत, जे वेदशास्त्रसंपन्न असत व वयोवृद्ध असत, अशांनां चालू सालीं या देखरेखमंडळांत नेमीत. बाकी राहिलेल्या सभासदांपैकीं कांहींनां उपवनमंडळ व बाकीच्यांनां तडाग ( पाटबंधारे ) मंडळांत नेमीत.

ही महाजना सभा ३६० दिवस अधिकारारूढ राही; नंतर ती मोडीत. सभासदानें गुन्हा केल्यास त्याला सभेंतून काढून लावीत. नवी महाजनसभा निवडणें, भरविणें वगैरे कामें न्यायमंडळ करी. सुवर्णावर ( नाण्यांच्या ) देखरेख करणाऱ्यांची व पंचप्रधानांची निवडणूक वरील पद्धतीवरच होई. यासाठीं फक्त बाराच जागा असत व प्रत्येक खेड्यानें फक्त एकच नांव कळविण्याचें असे. सहा सभासद सोनेंपारख मंडळावर व सहा पंचप्रधान या जागेवर नेमीत. ज्या गांवांतील हे बारा लोक निवडून येत, त्या गांवांस त्यापुढील निवडणुकींत वगळीत असत. हिशेबतपासनिसास ग्रामसभेचें अथवा महाजनसभेचें शिफारसपत्र लागे व तो अत्यंत सचोटीचा असा पारखून ठेवीत. कार्यकारीमंडळांतील सर्व अधिकाऱ्यांची निवडणूकहि अशीच चिठ्या टाकून होई.

या वार्षिक निवडणुकीमुळें ग्रामशासनपद्धतींत सर्व गांवकऱ्यांनां प्रत्यक्ष काम करण्याची संधि मिळे व त्यांच्यांत कार्यक्षमतेची वाढ होई. सर्वसाधारण सभा व न्यायसभेंतील सभासद सर्वांनां आदरणीय असतील असे नेमीत. यांच्या निवडणुकीची मात्र माहिती आढळत नाहीं.

दे श वि भा ग.—चोल साम्राज्यांत ५०।६० गांवांचा एक ग्रामसमूह असे; अशा कांहीं ग्रामसमूहांचा एक नाडु ( जिल्हा ) असे व अनेक जिल्ह्यांचा एक प्रांत (कोट्टम किंवा वलांडु ), व दोन तीन प्रांतांचा एक इलाखा ( मंडलम् ) असे. चोल साम्राज्याचे असे आठ वलांडु होते. ते (१) अरुमोळीदेव, (२) क्षत्रिय शिखामणी ( ३ ) उय्यकोंडाण ( ४ ) राजेंद्रसिंह ( ५ ) केरळान्तक ( ६ ) राजाश्रय ( ७ ) पंडयकुलाशनी ( ८ ) नित्तविनोध. या मंडलांवर जो अधिकारी असे तो बहुधा राजघराण्यांतील असे; याचें कारण राज्यांत सहसा बंडाळी होऊं नये व झाल्यास तिचा लवकर बीमोड व्हावा. चोल साम्राज्याचीं सहा मंडलें होतीं तीं ( १ ) तोण्डमण्डल ( दक्षिण व उत्तर पेन्नार नद्यांमधील दुआब ); ( २ ) खास चोलमण्डलें ( तंजावर व त्रिचनापल्ली जिल्हे ); ( ३ ) राजराजमण्डल (मदुरा जिल्हा व त्रावणकोर संस्थान), ( ४ )कोंगु अथवा आधिराजराजमण्डल (सालेम व कोईम्बतूरजिल्हे ), ( ५ ) गंगकोंड चोलमण्डल ( म्हैसूर व बंगलोर जिल्हे ), ( ६ ) निखरिली चोलमण्डल ( कोलार, उत्तर अर्काट; सालेम व कडाप्पा जिल्हे ).

स र का री खा तीं.—राजराज व परांतक यांच्या वेळीं निरनिराळ्या खात्यांचे सेक्रेटरी असत; त्यांस ओलैनायक म्हणत. तत्कालीन सरकारी कागदपत्रें हल्लीं उपलब्ध नाहींत. पण तीं जपून ठेवीत असत व दरबारांतून जाणाऱ्या प्रत्येक आज्ञापत्राची नोंदणी होत असे एवढें मात्र खरें. जमीनमोजणी अत्यंत कसोशीनें होई. चोलसाम्राज्यांतील एकंदर लागवडीच्या जमिनीची नोंदणी (राजराजाच्या वेळीं) एका मोठ्या नोंदपुस्तकांत करून ठेविली होती. या नोंदणींतून चुकून $\frac{1}{\dots}$ इंचाचा ( लागवडीच्या जमिनीचा ) तुकडा सुद्धां नोंदावयाचा राहिला नव्हता. मोजणीचें मूलमान श्रीपाद ( कुलोत्तुंगाचें पाऊल ) असे. वेली ($6\frac{2}{3}$ एकर) हें मोठें क्षेत्रफळाचें माप असे. सारांश विल्यम धि कॉंकररच्या डूम्सडेबुकाच्याहि आधीं एक शतक, राजराजानें वरील सुधारणा पूर्ण अंमलांत आणिली होती. वेली मापापूर्वी गज हें माप शेतसारा, नक्त सोन्याच्या नाण्यांत अथवा धान्यांत वसूल करीत. पूर्वापार चालत आलेला ( कायमधारा ) व नवीन मोजणीनें जास्ती बसविलेला असे दोन साऱ्याचे प्रकार असत; पैकीं दुसऱ्या प्रकारचा सारा महाजनसभा स्वतःच्या

अखत्यारीनें वसूल करी. सारा न दिल्यास जमीन जप्त करण्यांत येई व तोहि अधिकार महाजनसभेस असे. विक्रमचोलाच्या कारकीर्दींत एकदां अतिवृष्टीनें पीक वाहून जाऊन रयतेस सारा देण्यास सवड झाली नाहीं, तेव्हां सरकारनें सर्व शेत जप्त करून लिलावांत काढिलीं व बागाईत जमीन दर काशु ( नाणें ) ला ८० कुळी व जिराईत जमीन एका काशूस २१२ १/२ कुळी याप्रमाणें विकली.

राजे व त्यांचीं कर्तव्यें.—राजा राजधानींत असो अथवा मुलुखगिरीवर असो, दरबारी काम स्वतः पाही. राजधानींत असल्यास, राजा हा खलबतखान्यांत बसून फर्मान सोडी व सरकारी चिटणीस तें लिहून काढी. राजाच्या कोणत्याहि हुकुमास मुख्य मंत्री व इतर प्रधानमंडळ यांची संमति लागे; नंतर तो योग्य अधिकाऱ्या ( विद्याधिकारी ) मार्फत फर्मानांत नमूद केलेल्या व्यक्तीवर बजाविला जाई. तत्पूर्वी ती व्यक्ति ज्या प्रांतांत राही, त्या प्रांताच्या प्रतिनिधींची व तत्रस्थ महाजन सभेचीहि संमति राजाज्ञेस लागे. इतका बंदोबस्त व लोकांचें नियंत्रण राजाज्ञेवर असल्यानें अन्याय क्वचितच होई.

कर.—चोल साम्राज्यांत करांचा बोजा मात्र बराच दिसतो. कर यास कडमाई असें नांव आहे. भातपेरणी, मरवा ( दवणा मरवा ) उत्पन्न करणें, फुलबाग, धान्यविक्री विड्याचीं पानें, केशर, आलें, केळीं, हातमाग, तेलाचे घाणे, सोनार, मासे पकडणें, गुरांची विक्री, तलाव, नदीचे उतार, टोलनाकी, जकात, औषधें, मीठ वगैरेवर कर असत. जमीनमहसूल हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य भाग होय. तो जर भरपूर मिळत नसेल, तर उत्पन्न वाढविण्यासाठीं वरील प्रकारचे बारीक सारीक व सार्वत्रिक कर बसवावे लागतात. राजराजानें फक्त एकंदर उत्पन्नाचा १/६ च भाग कर गोळा करण्याची रीत पाडल्यामुळें तो प्रजेला फार प्रिय झाला होता. वरील करांशिवाय आणखी ( आय ) कर होते; त्यांस अन्तराय ( राज्यांतील कलाकौशल्याचे व उत्पन्नावरचे ) व बाह्य ( टोलनाकी व आयात जकात ) असें म्हणत.

नाणीं, वजनें व मापें.—भात मोजण्याच्या मापास आडवल्लन म्हणत. तें ११.२ तोळ्यांचें असे. दुसरें माप कलम नांवाचें असे. एक कलम म्हणजे तीन मण होत. सोन्याच्या नाण्यास कळंजु ( १/६ औंस ट्रॉय ) म्हणत. अगदीं लहान सोन्याचें नाणें काशु ( २८ ग्राम्स ट्रॉय ) नांवाचें होतें. चलन सर्वत्र सोन्याचेंच होतें. नाण्यांत जितक्या किंमतीची धातु असे, तितक्याच किंमतीचें नाणें पाडीत. दागीन्यांची वजनावरून खरेदीविक्री होई. एका काशूस दोन ते चार कलम भात मिळे. चलनांत रोख नाण्यांप्रमाणें धान्याचाहि समावेश होई.

व्याजः—सरकारी तिजोरींतील शिल्लक महाजनसभेस उसनवार मिळे व ती सभा तो पैसा शेतकऱ्याला कर्ज म्हणून देई. व्याजाचा दर दरसाल दरशेकडा १२॥ टक्के असे. कर्ज धान्यरूपानें अगर रोख नाण्यांच्या रूपानें मिळे. देवस्थानाकडून घेतलेल्या कर्जाचें व्याज, देवास तूप, तेल, कापूस वगैरे पुरवून वसूल करण्यांत येई.

सैन्य व आरमारः—चोलराज्यांत खडें सैन्य असे; त्यांत धनुर्धारी, पायदळ, घोडदळ व गजदळ असे. त्यांचें आरमारहि होतें. त्याच्या योगानें त्यांनीं चेरराजाच्या आरमाराचा पराभव केला व ब्रह्मदेश, सीलोन, निकोबार वगैरे प्रदेश स्वाऱ्या करून पादाक्रांत केले.

लोकोपयोगी खातें:—चोलांनां इमारती, देवळें, शहरें, कालवे, धरणें बांधण्याचा नाद असे. करिकालापासून पुढच्या अनेक राजांनीं, कावेरीचे पुष्कळ कालवे काढून आपल्या राज्यांत बागायती वाढविली. तंजावरजवळील हल्लींची वडवारु नांवाची नदी, ही पूर्वीच्या वीरराजानें कावेरीपासून काढलेला एक कालवाच होय. त्रिचनापल्ली जिल्ह्यांतील गंगैकोंडशोलापुरम् येथील प्रचंड तलाव हें चोलांचें एक जिवंत स्मारक आहे. हल्लीं हा तलाव नादुरुस्त आहे. जवळच एक प्रचंड देऊळ ( चोलांनींच बांधलेलें) आहे. या देवळांतील शंकराचें लिंग तीस फूट उंचीचें आहे. वेडिअरपलियम् तालुक्यांत एक आठ कोसांचें मोठें धरण आहे. असेंच दक्षिण कोलेरूनवेहि प्रचंड धरण होतें. वरील देऊळ ३७२ फूट रुंद व ५८४ फूट लांब आहे. तंजावरच्या देवळाचें शिखर तर २०० फूट उंचीचें असून तेथील मिनार ८० टन वजनाचा व एकाच दगडाचा आणि पायथ्याशीं २५ फूट औरस चौरस आहे. कावेरीचें धरण बांधल्यानंतर पैशाच्या टंचाईमुळें, करिकालानें मजुरांनां चामड्याचें नाणें मजुरीच्या ऐवजीं दिल्यानें त्याच्या राजधानींत मोठें वादळ उत्पन्न होऊन तिची वाताहत झाल्याची एक दंतकथा सांगतात. हिचा सारांश एवढाच कीं, पुढें पुढें सोन्याची टंचाई पडली असावी. देशांत त्या काळीं बांधीव सडका असत. सैन्याच्या हालचाली व व्यापार सतत चालू असल्यानें, रस्ते उत्तम ठेवावे लागत. ते रस्ते चौसष्ट विती रुंद असत. नदीच्या उतारावर ठिकठिकाणीं सरकारी खर्चानें नावा ठेवीत.

पगार व राहणीचें मान.—देवळांतील उत्पन्नांतून, तेथील कामगारांनां पगार मिळे. हिशेबनिसास दरसाल २०० कलम धान्य मिळे. पगार रोख किंवा धान्यरूपानेंहि मिळे. दुय्यम हिशेबनिसास ७५ कलम, देवळांतील ब्रह्मचाऱ्याला ६१ कलम व चार काशु, रखवालदारास १०० कलम मिळत. ज्या कुटुंबांतून अधिकारी नेमला गेला असेल त्या कुटुंबाच्या राहाणीच्या मानानें त्याला पगार मिळे. वरील आंकड्यांवरून ( हिशेबनीस हा ब्राह्मण असल्यानें ) ब्राह्मणकुटुंबास दरमहा १६ रुपये १० आणे व शूद्राला (रखवालदार शूद्र असल्यानें) दरमहा ८ रुपये ३ आणे लागत असें दिसतें.

धर्म.—चोलराजे हे वस्तुतः शैव होते; तरी पण त्यांनीं वैष्णवांस अगर जैनांनां फारसा त्रास दिला नाहीं. फक्त कुलोत्तुंगानें रामानुजाचार्याला तो वैष्णव असल्यानें श्रीरंगम् येथून हद्दपार केल्याचें एक उदाहरण आढळतें. राजराज व

त्याचा पुत्र यांनीं ज्याप्रमाणें शैवदेवस्थानांना वर्षासनें दिलीं तशींच वैष्णवदेवस्थानांनांहि दिलीं. वैष्णवदेवळांतून त्यांच्या धार्मिक पाठांचीहि ( नालायीर प्रबंध ) व्यवस्था होई. कोप्पेंगन यानें अनेक देवळें बांधलीं. त्यांत शिवाप्रमाणें विष्णूचीहि बरींच होतीं. राजराजानें अप्पर, सुंदरर याप्रमाणेंच कुलशेखर व तिरुमंगल या आळवारांचीहि देवळें बांधिलीं.

## चोल घराण्याची वंशावळ.

[ चोल राजांची खालील वंशावळ कृष्णस्वामी अय्यंगार यांच्या एन्शन्ट इंडिया या पुस्तकांतून घेतली आहे. ज्यांनें राज्य केलें त्याच्या नांवामागें अनुक्रमांक आहे. नांवें वंशावळींतील तक्त्यावरून व काळ पुस्तकांतील मजकुरावरून दिलीं आहेत ].

१ विजयालय ( ८४६–८० )
|
२ आदित्य पहिला ( ८८०—९०७ )
|
३ परांतक पहिला ( ९०७–९४७ )
|
४ राजादित्य (९४७–५०) | ५ गंडरादित्त (९५६–५७) | ६आरिंजय | उत्तमशीली | अरिकुल केसरी

५ गंडरादित्त → ९ मधुरांतक उत्तम (९६९–८५)
६ आरिंजय → ७ परांतक दुसरा, परकेसरी
७ परांतक दुसरा → ८ आदित्य दुसरा, करिकाल | देवी कुंदव्वा × पल्लवराज | १०राजराज पहिला (९८५-१०१३)

१० राजराज पहिला → ११ राजेंद्र गंगैकोंड ( १०१३–४३ ) | देवी कुंदव्वा × विमलादित्य चालुक्य (१०११)

११ राजेंद्र गंगैकोंड → १२ राजाधिराज (१०४३-५२) | १३राजेंद्र (१०५२-६२) | १५वीरराजेंद्र (१०६२-७०) | अम्मंग देवी × राजराज पहिला (१०२२-६२) | विजयादित्य वेंगीचा सुभेदार

१३ राजेंद्र → १४ राजमहेंद्र
१५ वीरराजेंद्र → १६ आधिराजेंद्र | मुलगी × विक्रम चालुक्य.
देवीमधुरांतकी × १७ राजेंद्रकुलोत्तुंग (१०७०–१११८)

( पुढें चालू )
|
चोडगंग वेंगीचा सुभा (१०८४) | मुम्मुडी वेंगीचा सुभा (१०७७) | वीरचोड वेंगीचा सुभा (१०७८-८९) | १८ विक्रमचोल (१११८-३५) | तीन इतर कुलें

१८ विक्रमचोल → १९ कुलोत्तुंग दुसरा (११३५–४६)
|
२० राजराज दुसरा (११४६–७८)
|
२१ राजाधिराज दुसरा (११७८–८६)
|
२२ कुलोत्तुंग तिसरा (११८६–१२१६)
|
२३ राजराज तिसरा (१२१६–४५)
|
२४ राजेंद्र तिसरा (१२४५–६७)
|
२५ त्रिभुवन वीरदेव (१२६७–१३३२)

[ खालची वंशावळ, राईस यानें सालेम डिस्ट्रिक्ट म्यानुअल व्हा. १. पृ. ३९. वरून दिली आहे ].

१आदित्यवर्मा, राजेंद्र; २ वीर नारायण, ३ दसोदित्य, ४ परांतकराय, हरिमाली; ५ दिव्य, देवराज; ६ हरिवरी, त्रिभुवन, वीरदेव.

[ पुढील वंशावळ, सेवेल याच्या दक्षिण हिंदुस्थानांतील घराणीं या पुस्तकांत आढळते. हीं नांवें अगदींच निराळीं दिसतात ].

१ करिकाल, २ चक्रवर्ति, ३ सुदामा, ४ रुचिर व नारायण

[ खालची वंशावळ ही बर्जेस यानें दिला असून, ती बृहदीश्वरमहात्म्य या बखरींत आढळते. बर्जेस हा तिलाखरी मानीत नाहीं ].

१ कुलोत्तुंग, २ देव, ३ शशिशेखर, ४ शिवलिंग, करिकाल, ६ भीम, ७ राजराजे, ८ वीरमार्तंड, ९ कीर्तिवर्धन, १० जय ११ कनक, १२ सुंदर, १३ कालकाल, १४ कल्याण, व १५ भद्र

[ सं द र्भ ग्रं थः—कलिंगत्तुप्परणी; सिळप्पधिकरम्; पट्टिनप्पालै; महावंश; दिव्यसूरिचरित्र; विक्रमांकदेवचरित्र; अय्यंगार-एन्शन्ट इंडिया; सिवेल लिस्ट ऑफ ॲन्टिक्विटीज्; फरोह–साऊथ इंडिया ग्याझे०: बुक्यानन–म्हैसूर, कानडा ॲंड मलबार; बर्नेल–साऊथ इंडियन पॅलिओग्राफी; राईस–म्हैसूर ॲंड कुर्ग; फ्लीट–कानरीज् डिनॅस्टीज्; स्मिथ–अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया; प्रोग्रेस ऑफ मद्रास प्रेसिडेन्सी;

एप्रिग्राफिस्ट्स् रिपोर्ट्स्, १८९९, १९००, १९०४ ते १०; साऊथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स. पु. २, ३; इंडियन अँटिक्करी पु. ६, ८, १३, १४, १८, १९, २०, २२, २३, ४१; एपिग्राफिआ इंडिका. पु २, ३, ४, ६, ७, १०; एपिग्रा. कर्नाटिका. पु. ५, ७, ११; बाँबे ग्याझे. पु. १ भा. २; सालेम डिस्ट्रिक्ट ग्याझे० ].

**चोवीस परगणा जिल्हा**—बंगाल इलाखा. बंगाल प्रांतांतील एक जिल्हा. क्षेत्रफळ ४८४४ चौरस मैल असून यांतच सुंदरवनचा भाग (२९४१ चौरस मैल क्षेत्रफळाचा) समाविष्ट होतो. कलकत्त्याचे जमीनदारी परगणे २४ म्हणून या जिल्ह्याला २४ परगणा जिल्हा असें म्हणतात. सन १७५७ सालीं बंगालचा नबाब नाझीम मीर जाफर यानें ईस्ट इंडिया कंपनीला २४ परगणे दिलेले होते. याच्या उत्तरेस नडिया व जेसोर जिल्हे, पूर्वेस खुलना, पश्चिमेस हुगळी नदी आणि दक्षिणेस बंगालचा उपसागर आहे. कलकत्त्याचें क्षेत्रफळ ३२ चौरस मैल असून २४ परगणा जिल्ह्यांत तें मुळींच येत नाहीं. तरी २४ परगण्याचा व कलकत्त्याचा कलेक्टर एकच असून त्या कामें मात्र दोन्ही करावीं लागतात.

२४परगण्याचा बराच भाग भागीरथीच्या पाण्यानें बनलेला नैर्ऋत्य दिशेकडील कोंपरा होय. यानंतर याचे सुंदरबनच्या हद्दीनें दोन भाग झालेले आहेत. पश्चिमेकडील भाग सागर-बेटाच्या टोंकापर्यंत गेलेला असून पूर्वभाग कलकत्त्याच्या रेखांशाची सरहद्द समजली जाते.या सरहद्दीच्या दक्षिणेस सुंदरबन असूनयानें२४ परगणा जिल्ह्याचा तीनपंचमांश भाग व्यापलेला आहे. लहानसहान बेटें अतिशय असून भरतीपासून नुकसान होऊ नये म्हणून धरणाचा वगैरे बंदोबस्त चांगला असल्यामुळें तांदुळाचें पीक सर्वोत्कृष्ट येतें. २४ परगणा जिल्ह्यांत हुगळी नदीच्या किनाऱ्यापासून व कलकत्त्यापासून थोडे मैल दूर असलेल्या बजबजपर्यंत वस्ती अतिशय दाट असून फार थोड्या अंतरावर तागाच्या गिरण्या व मोठाले बाजार दृष्टीस पडतात. याचे मागील भाग सपाट नसून तेथील हवा रोगट असते. नंतर जिल्ह्याचा पूर्वभाग लागतो. तो पूर्वबंगालसारखा बहुतेक असल्यामुळें मुसुलमान लोकांची वस्ती तेथें जास्त आहे. हुगळी नदी बरीच विस्तृत आहे व होड्यांमधून मालाची 'ने आण' सारखी चालत असल्यामुळें सबंध हुगळी नदी बाजारमय दिसते. आणि दोन्ही किनाऱ्यांवर गिरण्यांचीं धुराडीं, विटांचे कारखाने, मधून मधून हिंदु देवालयें व सुंदर सुंदर वाड्या नजरेस पडत असल्यामुळें फार रमणीय वाटतें. २४ परगणा जिल्ह्यांत मुख्य नदी भागीरथी व तिचे फांटे आहेत त्या प्रत्येकाचीं नांवें ज्या भागांतून ते वाहतात त्या त्या भागांत बदलत जातात. त्यांपैकीं मुख्य नद्या हुगळी, बिद्याधरी, पियाली व यमुना ह्या होत. या सर्व नद्या खोल असून गलबतें, होड्या, मचवे वगैरे नेहेमीं जा ये करीत असतात. बिद्याधरी जिल्ह्याच्या नैर्ऋत्येस पोर्ट क्यानिंग जवळून वहात जाते. कलकत्त्याच्या पूर्वेस खाऱ्या पाण्याचें सरोवर ज्याला म्हणतात त विद्याधरीच्या गाळानें भरत चाललें आहे. जिल्ह्याचा बहुतेक भाग लागवडीखालीं असतो. या ठिकाणीं तांदुळ व दुसरीं फळझाडें विपुल पिकतात. यांपैकीं कांहीं भागांत पूर्वी मनुष्यवस्ती अगदीं नव्हती त्या ठिकाणीं आतां दाट वस्ती झालेली दिसते. नाना प्रकारचें गवत, बोरू व बांबूचीं वनें व माडाच्या राई कित्येक नजरेस पडतात.

सुंदरबन भागांत हरिण, वाघ, पुष्कळ असून पाण्यांत मोठमोठीं कासवें आहेत. उत्तरभागीं चित्ते आढळतात. जंगली डुकरें कमी प्रमाणांत आहेत.

उष्णमान सरासरी ७८ अंशांवर असतें. जानेवारी महिन्यांत ६६ अंश उतरून मे महिन्यांत ८६ पर्यंत चढतें. अतिशय उष्णता म्हणजे एप्रील महिन्यांत ९६ अंशांपर्यंत चढते. पावसाचें मान दरसाल ६२ इंच असतें.

सन १८६४ सालच्या आक्टोबर महिन्यांत भयंकर वादळाच्या योगानें २४ परगण्यांचें दक्षिण भागांत मनस्वी नुकसान झालें. 'डायमंड बंदर' विभागांत ११ फूट उंचीच्या लाटा उसळल्यामुळें १२००० मनुष्यें प्राणांस मुकलीं. १८९७ च्या जून महिन्यांत भूकंपाच्या धक्क्यामुळें जिल्ह्याच्या बहुतेक भागाच्या विटबंदी इमारतींनां सुद्धा जबर धक्के बसले. १९०० च्या सप्टेंबर महिन्यांत भयंकर पुराच्या योगानें कलकत्त्यापासून डायमंड बंदरपर्यंत असलेल्या तांदुळाच्या पिकाचा सर्वस्वी नाश झाला.

**इतिहासः**—भागीरथी व ब्रह्मपुत्रा यांमधील व पद्मा नदीच्या दक्षिणेस जो प्रदेश आहे त्याला वंग अथवा बंग असें म्हणतात. रघुवंशांत असें वर्णन दिलें आहे कीं येथील लोक होड्यांत रहाणारे व तांदूळ पेरणारे आहेत. या प्रदेशाच्या दक्षिणेस २४ परगणा जिल्हा आहे. १० व्या शतकांत या प्रदेशावर सेन घराण्याची सत्ता होती व सन १२०३ मध्यें अफगाण लोकांनीं महंमद बख्तयार खिलजी याच्या नेतृत्वाखालीं बंगालवर ( २४ परगणा जिल्हा ) स्वारी केली होती.

त्यानंतर पुढें १६ व्या शतकांत २४ परगणा सातगांव सरकार ( भाग ) बनलेला होता. सातगांव हुगळीजवळ सरस्वतीच्या कांठीं असून त्यावेळीं व्यापारी घडामोडीचें मुख्य शहर होतें. परंतु पोर्तुगीज लोक १५३० सालीं आपला माल लहान होडक्यांतून पाठवीत असत. कारण मोठीं गलबतें सातगांवपर्यंत जात नसत. म्हणून १६ व्या शतकांत सातगांवचे बहुतेक व्यापारी गोविंदपूर ( सांप्रत फोर्ट वुइलियम ) येथें आले. पोर्तुगीज लोकांनीं सुतानुती ( कलकत्त्याचा मध्यभाग ) येथें आपली वखार घातली व इंग्रजांनीं हुगळी येथें एक कारखाना सुरू केला. स. १७५७ सालीं प्लासीची लढाई होऊन बंगालच्या नबाबांनीं कलकत्त्याच्या दक्षिणेकडचा प्रांत ( २४ परगणा जमीनदारी) ईस्ट इंडिया कंपनीला दिला. एक वर्षानंतर लागलीच कंपनीस दिवाणी सनद मिळाल्यामुळें २४ परगण्याची एकंदर वहिवाट कंपनीसरकारकडे आली.

पुढें बादशाहांनीं कंपनीला फरमान सनद दिल्यावरून जमीनींचे पूर्णपणें मालक कंपनीसरकार बनलें.

कलकत्त्यापासून सुमारें १५ मैलांवर बराकपूर नांवाची छावणीची जागा आहे. त्या ठिकाणीं दोनदां शिपायांचें बंड झालें १८२४ सालच्या व १८५७ सालच्या या दोन्ही बंडांत बंडवाल्यांनां अपयश आलें. सन १८२४ सालच्या पहिल्या बंडांत मंगळपांडे नांवाचा पुढारी होता. तितुमियन यांचें लहानसें बंड होतें. यानंतर २४ परगण्याचा इतिहास फारसा नाहीं. जिल्ह्याच्या सरहद्दी मात्र वारंवार बदलत.

लोकवस्ती—१९२१ सालीं जिल्ह्याची लो सं.२६२८२०५ होती. एकंदर लोकसंख्येपैकीं पंचमांश कलकत्त्यास व त्याच्या उपांत्य भागांत आहे. कलकत्ता शहराचे काशिपूर, चितपूर, माणिकतोळा गार्डनरीच, दक्षिणखेडी व तोलीगंज इतके विभाग आहेत. सन १८८९ पर्यंत सर्वांची मिळून एक म्यु. कमिटी होती. अलीपूर येथें जिल्ह्याचें ठाणें असे. जिल्ह्यांतील दुसरीं शहरें बारानगर, कामरहाटी, भाटपारा, नितेगड, बजबज आणि गारुलिया हीं होत.

शेतकी:—खरें महत्त्वाचें पीक म्हटलें तर तांदूळ व ताग हीं होत. तांदूळ एकंदर क्षेत्रफळाच्या १५१७ चौ मै. क्षेत्रांत पेरला जातो व ताग १२५चौ मै. मध्यें टाकतात. हिंवाळयांत कडधान्याचें पीक येतें व उंसाची लागवड जिल्ह्याच्या ईशान्येस बऱ्याच भागांत करतात.

जंगल.—सुंदरबन हा दक्षिण भाग बहुतकरून जंगल वेष्टित आहे. अलिकडे राखीव जंगलापैकीं ४४८ चौ. मै क्षेत्रफळाची जमीन लागवडीस आणली गेली.व बाकीच्या क्षेत्रांत मात्र जंगल कायम आहे. १९०३–०४ सालीं जंगलांचें उत्पन्न ५०००० व खर्च १८००० झाला. उत्पन्नाच्या बाबी-- बोल, मध, मेण, व चुन्याच्या शिंपा हीं होत.

व्यापार व दळणवळण.-या भागांत महत्त्वाचा असा एकहि धंदा नाहीं तथापि नातागड येथें नकली कुलुपें, फण्या, स्वस्त जोडे आणि नकशीचीं कामें करितात. कापूस, सूत, चाकू, भांडीं आणि चटया थोड्या प्रमाणावर करितात. जिल्ह्याच्या उत्तरेस कांहीं साखरेचे कारखाने होते. कांहीं कातडी कमावण्याचे व साबू करण्याचे कारखाने आहेत.

यांत्रिक धंदे बरेच आहेत हुगळी नदीच्या दोन्ही कांठांवर यांत्रिक कारखान्याला सवलती व साधनें पुष्कळ असल्यामुळें जल व लोह मार्गांचें दळणवळण सर्व प्रकारें असल्यामुळें शिवाय कलकत्यासारखें उत्तम बंदर व व्यापाराची भंकम पेठ जवळच, यामुळें यांत्रिक उद्योगाला ऊत येणें साहाजिकच आहे. १९०३ सालीं २५९ कारखान्यापैकीं ७५ कारखाने २४ परगण्यांत आहेत व १९०४ सालीं ते ७९ नें वाढले. एकंदर कामावर असलेली मजुरांची संख्या १२४००० होती.

तागाचे गठ्ठे बांधणें, गोणपाट तयार करणें, कापसाचें सूत काढून कपडे करणें, कागद करणें, साखर करणें व गलबतें बांधणें, लोखंड ओतणें चामडीं कमावणें, दोरखंडें तयार करणें, हाडांचें पीठ करणें, तेल काढणें व विटा तयार करणें वगैरे कारखाने आहेत.

या सर्व कारखान्यांतील काम करणारे मजूर बहुधां उत्तर प्रांतांतील असतात व त्यांची राहण्याची अतिशय गैरसोय असते. अलिकडे गिरण्यांच्या मालकांनीं त्यांची स्थिति सुधारण्याकडे लक्ष घातलेलें आहे. २४ परगणा जिल्ह्यांत बाहेरून येणारे जिन्नस म्हणजे राणीगंज व मानभूम जिल्ह्यांतून कोळसा, उत्तर पूर्व बंगालमधून ताग व कलकत्ता व बिहारकडून भाळशी हे होत. कच्चा कापूस वऱ्हाड व मध्यप्रदेश, तांदूळ बाकरगंज, वरद्वान आणि खुलनाकडून व धान्य बिरभूम व बोग्रा पुरवितें. नदिया व जेसोर कांहीं हरभरा व कडधान्यें पाठवितात केरोसीन तेलाचा मोठा खजिना बजबजला आहे. पूर्व बंगाल रेल्वे कलकत्त्याहून २४ परगण्याच्या उत्तर सरहद्दीवरून बारासत हात्रा घेऊन जेसोरकडे जाते; दुसरी शाखा कलकत्याहून बजबज, डायमंड बंदर व पोर्ट क्यानींगपर्यंत जाते २४ परगण्यांत रेल्वेची लांबी १५८ मैल आहे. कलकत्त्याच्या आणि पूर्वेकडील कालव्यांच्या योगानें पूर्व बंगालचे तांदूळ कलकत्यास येतात. १७७७ सालीं मेजर ढोली यानें कालव्याची पद्धत सुरू केली. त्यानें भागीरथीचा पाट काढून विद्याधरी नदीला किदरपूर येथें मिळविला आहे याला टोलीनाला असें म्हणतात पुढें भागीरथी नदीवर कालवे झाले. हे कालवे फार मोठे आहेत.

२४ परगणा जिल्ह्याचे ५ पोटविभाग असून अलीपूर येथें कलेक्टर मॅजिस्ट्रेट, व १ असिस्टंट व जॉइंट मॅजिस्ट्रेट असून ९ नबाब कलेक्टर आहेत. पोलिस मुख्य ठाणें कलकत्यास असून लहान विभागांकरितां पोलिस व्यवस्था कलकत्त्यापासून होते. अलीपूर व सेल्डा येथें मॅजिस्ट्रेटच्या कचेऱ्या आहेत. शाळासंस्थां ( सार्वजनिक व खाजगी मिळून ) ची संख्या १९५३ असून तत्प्रीत्यर्थ खर्च ३॥। लक्ष झाला. तो असाः– ५२००० प्रांतिक उत्पन्नांतून, ६०००० जिल्हा–फंडांतून, ११०००म्यु. फंडातून व जवळ जवळ २ लक्ष फी उत्पन्नांतून हा खर्च झाला.

**चौगझीन**—खालच्या ब्रह्मदेशांतील आम्हर्स्ट जिल्ह्यांतील तालुका.यांत बिलुग्यून नांवाच्या बेटाचा समावेश होतो. याचें क्षेत्रफळ १९३ चौ. मै आहे. येथील लोकसंख्या सन १९११ त ४९२७२ होती. याच्या मध्यभागीं एक टेंकडी आहे व तेवढा भाग खेरीजकरून सर्व जमीनींत लागवड करण्यांत येते. येथील शेतसारा सन १९०३–४ मध्यें १०५,८०० रु. होता

**चौगुला किंवा चौघुला**—हा महाराष्ट्राच्या प्राचीन ग्रामसंस्थेतील गांवची व्यवस्था ठेवण्याच्या कामीं पाटलास मदत करणारा एक अधिकारी असून,त्याचा दर्जा पाटलाच्या खालोखाल होता. हा साधारणतः कुणबी असे. परंतु कोणाहि वतनदारास पूर्वी आपल्या वतनाचा अंश दुसऱ्यास देण्याचा

किंवा विकण्याचा हक्क असल्यामुळें वाणी, मराठा, ब्राह्मण वगैरे जातींतहि चौगुला आहे. गांवच्या एकंदर जमीनीचा एक पंचवीसांशावा हिस्सा पाटील कुलकर्णी व चौगुले यांनां साऱ्यावांचून देण्याची वहिवाट असून याशिवाय त्यांनां दुसरेहि कित्येक हक्क असत. चौधरी व चौगुला हे साधारण एकाच दर्ज्याचे अधिकारी असत. [डफ. पु. १ पृ.२९, ३६]

**चौंगू**—वरच्या ब्रह्मदेशाच्या सगैंग जिल्ह्यांत पुष्कळ खेड्यांचा हा समूह आहे. याचें क्षेत्रफळ १८८ चौ. मै. आहे. यांत सन १९११ त लोकसंख्या ३३५१२ होती. हे सगैंग अलोन रेल्वेवरील स्टेशन आहे. यांत पश्चिमेस चिंदून नदी-पर्यंत तांदुळाचीं शेतें आहेत. १९०३-०४ सालांत याच्या क्षेत्रफळांपैकीं ९६ जमिनींत लागवड केलेली होती,व त्या वर्षी शेतसारा १२६४०० रु. होता.

**चौघाट**-मद्रास इलाख्याच्या मलबार जिल्ह्यांतील पोनानी तालुक्यांतील एक गांव. याची लोकसंख्या १९०१ सालीं ७४२६ होती. येथें मुन्सफाची व डेप्युटी तहसिलदाराची कचेरी आहे. याच्या पूर्वेस पलयुर येथें रोमोसीरियन पंथाचें ख्रिस्ती देवालय आहे. हें मलबारांतील मूळच्या सात देवळांपैकीं एक आहे असें म्हणतात. हें समुद्रालगतच्या सरोवरावर वसलें असून येथून पोनानी व त्रावणकोर या शहरीं कालव्यामधून जातां येतें.

**चौथाई, चौथ**—एकंदर उत्पन्नाचा ¼ हिस्सा म्हणजे चौथ. हा मूळ शिवाजीनें मुसुलमानांच्या राज्यांतून उघडपणें वसूल करण्याचा प्रघात पाडला. हा हक्क गांवकऱ्यांनीं ( अथवा गांवच्या सरकारी अधिकाऱ्यानें ) निमूट-पणें मराठ्यांच्या हवाली केल्यास, मग मराठे त्या गांवास ( अगर प्रांतास ) उपसर्ग देत नसत. शिवाजीनें आदि-लशाहींतून तीन व कुत्बशाहींतून पांच लक्ष होन चौथाई सालीना घेण्याचा प्रघात पाडला ( १६६८ ) व दिल्लीच्या मोंगली साम्राज्यांतूनहि १६७१ पासून चौथाई हक्क वसूल करण्यास प्रारंभ केला. त्यानंतर गोवेकर फिरंगी, बेदनूरकर, सोंधेकर व कर्नाटकचे पाळेगार वगैरे संस्थानिकांकडूनहि शिवराजानें हा हक्क वसूल केला. संस्थानिकानें चौथाई दिली म्हणजे त्याचें संरक्षण आपल्या पदरच्या फौजेनें शिवाजी करीत असे. वेलस्लीची तैनाती फौजेची कल्पना साधारण याच धर्तीची होती. शिवाजीच्या नंतरहि चौथ हा मराठ्यांचा एक कायमचाच हक्क होऊन बसला व तो ते दिल्लीच्या बाद-शहाच्या परवान्याच्या आधारावर सर्व हिंदुस्थानांत निर-निराळ्या राजेरजवाड्यांपासून सामोपचारानें अथवा सक्तीनेंहि वसूल करीत असत. दिल्लीच्या महंमदशहानें तर शाहुराजास चौथाईची ( सरदेशमुखीची आणि स्वराज्याची ) सनद राजीखुषीनें आपण होऊन दिली ( १३-३-१७१९ ). त्यांत दक्षिणेंतील साडेसहा सुभ्यांवर चौथाई वसूल करण्यास परवानगी होती व त्याबद्दल शाहूनें फौज ठेवून त्या सुभ्यांचें संरक्षण करावयाचें होतें. ही सनद बाळाजी विश्वनाथानें आणिली. ती देण्यास मोंगली दरबार नाखूष होतें; व तिच्या पायीं नाना फडणिसाच्या एका पूर्वजाचा खूनहि पडला. दक्षिणच्या सुभ्यांचें उत्पन्न सालिना अठरा कोट होतें. म्हणजे चौथाईचें मराठ्यांचें उत्पन्न साडेचार कोटींचें होतें परंतु ही रक्कम कागदींच असे. प्रत्यक्ष वसूल करण्यास मारामार पडे. बादशहानें चौथाई कबूल करणें म्हणजे मराठ्यांच्या संरक्ष-णाखालीं जाणें असा याचा अर्थ होतो. मराठी साम्राज्याचा विस्तार या (तिन्ही) सनदांच्या आधारावर पुष्कळच झाला. हें धोरण ( शिवाजीनें बांधलेलें ) चांगलें होतें, परंतु त्यास लागणारें पैशाचें, फौजेचें व एकीचें बळ पुढें पुढें मराठमंड-ळास राहिलें नसल्यानें तें त्यांच्या हातून अखेरपर्यंत उत्तम प्रकारें पार पडलें नाहीं. चौथाईची सनद मिळविण्यांत मराठे प्रथम वारंवार स्वाऱ्या करून एकएक प्रांतांतून सालोसाल चौथाईचे ( वगैरे ) हक्क वसूल करीत आणि असा क्रम कांहीं वर्षे चालल्यावर मग त्या प्रांताबद्दल त्या हक्काच्या सनदा राजेरजवाड्यांकडून राजरोस करून घेत. साडेसहा सुभ्याची दख्खन पदरांत पडल्यावर पेशव्यांनीं तोच हक्क गुजराथ व माळवा यांत चालविला व ते दोन प्रांत कबज्यांत आल्यावर हिंदुस्थानांतील बहुतेक इतर सर्व प्रांतांस म्हणजे पंजाब, बंगाल, म्हैसूर, कर्नाटक वगैरे भागांसहि आपल्या कक्षेत आणलें. खुद्द आग्रा व दिल्ली या प्रांतांतूनहि मराठ्यांनीं चौथाई घेतल्यावांचून सोडिली नाहीं. सन १७३७-३८ त या-प्रमाणें सर्व हिंदुस्थानांत त्यांची चौथ बसली. परापहाराचें, किंवा देश लुबाडण्याचें स्वरूप या मुलुखगिरीस येऊं नये म्हणून बादशाही सनदेचें केवळ निमित्त होतें. ती मिळाली नसली तरी मराठे आपला चौथवसूलीचा हक्क वाटेल तेथें सांगत. याचें उदाहरण म्हैसूर संस्थानचें. हें कांहीं मोंगलानें जिंकलेलें नव्हतें, अर्थात् मोंगलांच्या सनदेनें येथें चौथवसू-लीचा अधिकार कायदेशीर रीत्या मराठ्यांनां कसा येणार?तरीहि मराठ्यांनीं म्हैसूरवर ती लादलीच. इ. स. १७५७ सालच्या सुमारास म्हैसूरकरांच्या दरबारीं असलेल्या मराठ्यांच्या वकि-लानें पेशव्यांनां, त्या संस्थानाकडून चौथसरदेशमुखीचा हक्क मिळवून घेण्याचा फार आग्रह केला. त्याच्या पत्रांत पुढील वाक्य फार मुद्याचें आहे. तो म्हणतो, "आज चौथसरदेशमुखीचा अंमल बसतो, पुढें संस्थान आपलें होतें" ( इतिहाससंग्रह एप्रिल १९१० ). हाच मराठ्यांचा पातशाही धोरणाचा महामंत्र होय. [ सभासद बखर; पेशव्यांची बखर; मराठे व इंग्रज. ].

**चौधरी**—पूर्वी गांवांतील बारा बलुत्यांत चौधरी या नांवाचा एक हक्कदार असे. याचें मुख्य काम बाजारभावांत फारसा चढउतार होऊं न देतां रयतेस धान्याचा योग्य दरानें पुरवठा करणें हें होतें. दिल्लीस मुसुलमान पातशाहींत तर सैन्यास अगर सरकारास गल्ला ( धान्य ) पुरविण्याचें कामहि याजकडेच सोंपवीत असत. ही चाल निजामाच्या राज्यांतीहि होती. मराठी राज्यांत मात्र ही पद्धत (सरकारला

धान्य पुरविण्याची ) प्रचारांत नव्हती असें दिसतें. गांवांत धान्याची गोणी आल्यास तिची नोंद चौधरी करी; व त्याच्या हुकुमाशिवाय ती फुटत नसे. त्याला रोजची धान्याची नोंद सरकारांत समजावून सांगावी लागे. गांवांतील धान्याची निर्गत होई तीहि चौधऱ्याच्या देखरेखीखालीं व परवानगीनें होई. धान्याची आयात कमी झाल्यास व बाजारभाव वाढवावयाचा असल्यास व्यापाऱ्यांनां चौधऱ्याच्या हुकुमाशिवाय ( व चौधऱ्यास सरकारच्या हुकुमाशिवाय ) तो वाढवितां येत नसे. अशा वेळीं बाहेर प्रांतांतून धान्य आणून गांवास पुरविण्याची कामगिरीहि त्याला करावी लागे. हा चौधरीपणाचा हक्क सरकारांतून घेणें असल्यास सरकारास नजर ( कर ) द्यावी लागे. मोठमोठ्या शहरीं मक्त्यानेंहि हा अधिकार मिळत असे. अशा प्रकारचा मक्ता मिळविण्याचा एक अर्ज पुणें दरबारास केलेला उपलब्ध आहे [ इतिहाससंग्रह पु. ७. अ. ४।५।६ ]. चौधरी जातीची माहिती 'चौहाण' या जातींत अंतर्भूत झाली आहे.

**चौबे जहागीर**—मध्य हिंदुस्थानांत बाघेलखंडाच्या पोलिटिकल एजंटच्या देखरेखीखालीं ही सनदी जहागीर आहे. यांत पालदेव, पहरा, तरौन, भैसौंडा आणि कामटा–राजौला अशा पांच ठिकाणीं जमीनदाऱ्या आहेत. याचें क्षेत्रफळ १२६ चौरस मैल आहे. याच्यांत हिऱ्याच्या खाणीचा थोडासा भाग आहे. व हिऱ्याच्या विक्रीपासून कांहीं उत्पन्न आहे. येथील लोकसंख्या १९०१ त २०५११ होती. ही जहागीर जिझोटिया ब्राह्मणांकडे आहे व त्यांनां चौबे ही संज्ञा आहे. ते शूर असल्यामुळें पन्नाचा राजा छत्रसाल याच्या अमलांत वैभवास चढले होते. बांद्याचा नबाब, अलिबहादूरनें बुंदेलखंडावर स्वारी केल्यानंतर जे दंगेधोपे झाले, त्यांत रामकिशननें कलिंजर किल्ला बळकाविला. पन्नाच्या हिंदें साह राजाच्या वेळेस रामकिशन या किल्ल्याचा किल्लेदार होता. किल्ला परत घेण्याकरितां पुष्कळ प्रयत्न करण्यांत आले. परंतु रामकिशननें १० वर्षेपर्यंत दाद दिली नाहीं. ब्रिटिश सत्तेच्या आरंभीं हा किल्ला रामकिशनच्या मुलांच्या ताब्यांत होता. वास्तविक हा किल्ला नबाबाचा; परंतु ब्रिटिश लोकांनीं दर्यावसिंग नांवाच्या रामकिशनच्या मुलाच्या ताब्यांत सन १८१२ त दिला. दर्यावसिंग जेव्हां ब्रिटिशांची सत्ता जुमानीनासा झाला, प्रांतांत जिकडे तिकडे बंड करण्यास सांगूं लागला, तेव्हां १८१२ च्या जानेवारी १६ तारखेस ब्रिटिश लोकांनीं कर्नल मार्टिंडेलच्या नेतृत्वाखालीं किल्ल्यावर हल्ला केला. दर्यावसिंगनें हल्ला फेटाळून लाविला; परंतु पूर्वीच्या जमीनीऐवजी दुसऱ्या जमिनी घेऊन किल्ला ब्रिटिशांच्या स्वाधीन केला. या चौबे घराण्यांत असा प्रघात आहे कीं, जर एखादा वतनदार निपुत्रिक मेला किंवा दत्तक घेतला नाहीं तर त्या वतनाचे भाग करून कुटुंबांत दुसरीं जीं वतनें असतील त्यांत मिळवावे. सन १८१७ त या जहागिरीचे ९ तुकडे, १८३९ त ७ व १८६४ त ५ तुकडे करण्यांत आले.

**चौल** (चेऊल)—मुंबईच्या कुलाबा जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यांतील कुंडलीक नदीच्या मुखाजवळील एक बंदर. याची लोकसंख्या ( १९०१ ) ६५१७ होती. हें फार प्राचीन आहे. श्रीकृष्ण द्वारकेस राज्य करीत असतांना याचें नांव चंपावती ( ऊर्फ रेवती ) असें होतें अशी कथा सांगतात. परदेशीय प्रवाशी याला निरनिराळ्या नांवांनीं संबोधीत. टॉलेमी यास सिमुल्ल किंवा टिमुल्ल या नांवानें संबोधितो ( १५० ). सन २४७ त सेमुल्ल नांव होतें. ह्युएनत्संग यास चिमोलो म्हणतो. पुढें १०,११ व १२ व्या शतकांत अरब लोक यास सैमूर आणि जैमूर म्हणत होते. रशियन प्रवासी निकितिन यास चिव्हिल म्हणे ( १४७० ). देवगिरीकर यादवांच्या ताब्यांत हें होतें. नंतर मुसुलमानांच्या ताब्यांत गेलें. त्यांच्या हातीं असतांना येथें पोर्तुगीज लोक सन १५०५ त प्रथम आले. त्यांची व मुसुलमान लोकांची या ठिकाणीं सन १५०८ त आरमारी लढाई होऊन पोर्तुगीज लोकांचा पराभव झाला. सन १५१६ त पोर्तुगीजांनीं येथें वखार बांधली. सन १५२२ त विजापूरच्या आरमारानें या बंदरास आग लावली. १५२८ त तुर्की जहाजांनीं याच्यावर हल्ला केला होता. परंतु पोर्तुगीज व अहमदनगरच्या आरमारानें तुर्कांचा पराभव केला. सन १६०० त हें मोंगलांच्या ताब्यांत गेलें. सन १५८३ त हें बंदर तटबंदी केलेलें होतें व यांत व्यापार फार चालत होता. त्या वेळेस येथें अनेक कारखाने होते व त्यांत चांगले वाकबगार कारागीर असत. लांकडी कांतकाम व कापूस आणि रेशीम विणण्याचे कारखानेहि होते. शिवछत्रपतीच्या ताब्यांत हें आल्यानंतर, त्यांनीं तेथें आरमाराचें एक ठाणें वसविलें. मराठी राज्यात हें एक व्यापारी बंदर म्हणून प्रसिद्ध होतें. इंग्रजी झाल्यानंतर येथील कोष्टी व दुसरे कारागीर मुंबईस जाऊन राहिले, मात्र त्यांचे वंशज चौलीस नांवानें आज चौलास रहात आहेत. येथील राजकोट नांवाचा किल्ला, जवळील टेंकड्यांतील बौद्ध लेणीं आणि हिंगलाज नांवाचें देवीचें देऊळ हीं स्थळें पहाण्यासारखीं आहेत. [ गुजराथचा इतिहास; मराठी रियासत; इंपे. ग्याझि. पु. १० ].

**चौलमुग्रा**—हें झाड सिलहट, चित्तागांग, व ब्रह्मदेशच्या जंगलांत आढळतें. त्याची उंची ४० ते ५० फूटांपर्यंत असते. या झाडास कलवविन, कलरथी, वगैरे नांवें आहेत. चौलमुग्रीचें तेल हें गिनोकार्डिया झाडाच्या फळांपासून तयार केलेलें असतें असा यूरोपियन लोकांचा समज होता. परंतु तो चुकीचा आहे असें सिद्ध झालें आहे. या दोन झाडांचीं फळें सहज ओळखतां येतात. कारण गिनोकार्डियाचें फळ आखूड असतें; त्याच्या वरची कवची जाड व कठीण असून त्यावर बाजूला थोड्याबहुत शिरा असतात व मगज फिकट पिवळा असतो. चौलमुग्रीच्या

फळाची कवची एकसारखी असून मगज काळसर रंगाचा असतो.

उपयोगः—चौलमुग्रीचें तेल आर्यवैद्यकांत पुष्कळ वर्षे माहित असून कातडीच्या रोगावर लावण्याकरितां त्याचा उपयोग केला जात आहे. अलीकडे यूरोपांतहि त्याचा औषधाकरितां उपयोग करूं लागले आहेत. या तेलाचा इतिहास व घटना याची संपूर्ण माहिती हूपर यानें दिली आहे. तेलाचा भाव दरमणी ६० रु. असतो. हें तेल कुष्ट, महारोग इत्यादि त्वग्रोगावर फार गुणावह आहे असें म्हणतात.

**चौहाण** चव्हाण-चाहमान घराण्याची माहिती स्वतंत्र लेखांत देऊन येथें चव्हाण जातीची माहिती दिली आहे. ही जात विशेषेंकरून संयुक्तप्रांतांत आढळते. आग्रा, औध ( अयोध्या ), मोरादाबाद व बिजनोर या जिल्ह्यांत चौहान या जातीसंबंधी बराच घोटाळा आहे. गॅझेटिअरवरून असें कळतें कीं या जिल्ह्यांत रजपूत चौहान पुष्कळ आहेत व त्यांमध्यें शेरकोट आणि हलडोर या दोन्ही वंशांतील लोकांचा समावेश होतो. चौहान लोकांचे तीन वर्ग आहेत. ते येणेंप्रमाणें:—( १ ) चौधरी, ( २ ) परधान ( पधान किंवा बार ) आणि ( ३ ) खागी. यामध्यें चौधरी ही जात सर्वांत श्रेष्ठ आहे. चौधरी लोक आपल्या मुली हलक्या जातीस देत नाहींत. परंतु हलक्या जातींच्या परधानांच्या मुली ते स्वीकारतात. चौहान जातीसंबंधीं पुष्कळ दंतकथा आहेत. महाराजा मानसिंग याबरोबर १५८६ मध्यें सिंधुनद ओलांडल्यावर यांची जात भ्रष्ट झाली अशी एक दंतकथा आहे. १४८८ सालीं एका साधूनें फत्तेउल्लाखान नांवाच्या सुभेदाराचें पारिपत्य करण्यास बारा रजपूत घराण्यांतील माणसांना बोलाविलें, व त्याप्रमाणें त्याचा पराजय करून ते लोक या प्रांतांतच ( मुरादाबाद व बिजनोर ) स्थायिक झाले अशी दुसरी एक आख्यायिका आहे. रजपूत चौधरी लोक सधन आहेत आणि बारलोक भिकारी आहेत आणि त्यामुळें या जाती अगदीं भिन्न झालेल्या आहेत. चौधरी व बार या दोन्ही जातींची मिळून एक संयुक्त पंचायत आहे. तरीपण चौधरी आपल्या मुली, बारलोकांमध्यें पुनर्विवाह प्रचलित असल्यामुळें त्यांना देत नाहींत. मोरादाबादमधील चौहान जातींत फार घोंटाळा आहे. या जिल्ह्यांतील चौहान लोक जरी खरे रजपूत असले तरी ते पुष्कळ बाबतींत रजपूत चाली पाळीत नाहींत. बार लोकांत व मुरादाबाद येथील चौधरी लोकांत पुनर्विवाह प्रचलित आहे. यामुळें या लोकांचा दर्जा कमी होऊन रजपुतांशीं कांहीं संबंध नसलेल्या खागी चौहानामध्यें यांची गणना होते.

खागी चौहान हे लोक "खागी" या वेगळ्याच जातीचे असावे. पुनर्विवाह करून भ्रष्ट झालेल्या रजपूत चौहानांशीं आमचा संबंध आहे असें खागी लोक म्हणतात. चौहान लोकांत "खागी" म्हणून पोटजात आहे. त्याचप्रमाणें खागी लोकांत "चौहान" नांवाची एक पोटजात आहे. यामुळें या दोन जातींत निकट संबंध असावा एवढेंच सिद्ध होतें, परंतु खागी लोकांचा रजपूत चौहानांशीं संबंध होता असें अनुमान निघूं शकत नाहीं. याशिवाय खागी लोकांच्या चालीरिती रजपुतांहून अगदीं वेगळ्या आहेत. खागी लोकांत कायमची पंचायत आहे. दिराशीं लग्न लावण्याची व पुनर्विवाहाची चालहि या लोकांत आहे. ते परजातांशीं बेटीव्यवहार करीत नाहींत. खागी लोकांपैकीं शेंकडा ९० लोकांचें स्वरूप आर्यन लोकांहून अगदीं भिन्न आहे असें म्हणतात.

वऱ्हाड मध्यप्रांतांत एक चव्हाण नांवाची चौकीदारांची जात आहे. त्यांची लो. सं. सुमारें ७००० आहे. हे आपणांस मैनपुरीचे रजपूत म्हणवितात. यांचीं कांहीं रजपूत नांवें आहेत पण पुष्कळशीं पशुपक्षी यांच्या नांवांवरून घेतलीं आहेत. गोत्रनामाचे प्राणी पूज्य मानतात. हे कर्मकार्यांत ब्राह्मणांस बोलावतात व त्यांच्याखेरीज इतरांच्या हातचें कधीं जेवीत नाहींत. पण यांचा दर्जा नीच समजला जातो. लग्नांत 'नओदोरी' नांवाचा एक विधि असतो. वराच्या डोक्यावर पाण्यानें भरलेले ७ मातीचे पेले ठेवतात. व एकामागून एक डोक्यावर ओततात. डोक्यावर एक नवें वस्त्र ठेवतात, आणि मग सातदां जमिनीला लावतात. या सर्व समारंभांत वरानें डोळे झांकून असलें पाहिजे. वधू सासरी जाऊं लागली म्हणजे गांवापासून मैल दीड मैल जाईपर्यंत बरोबरच्या बायकांसह आक्रोश करीत असते. हे लोक पक्षी व डुकराचें मांस खात नाहींत. [से. रि.(संयुक्तप्रांत) १९११; रसेल व हिरालाल ].

**च्यवन**—च्यवान.एक प्राचीन ऋषि. ऋग्वेदांत या वार्धक्यपीडित ऋषीचें वर्णन आढळतें.(१. ११६,१०; ११७, १३; ११८, ६; ५. ७४, ५; ७. ६८, ६; ७१, ५; १०. ३९, ४, ) अश्विनीकुमारांनीं त्यास पुनः सामर्थ्य व तारुण्य प्राप्त करून दिलें व त्यामुळें च्यवन ऋषि आपल्या भार्येस व तरुणी जनांस सर्वस्वी प्रिय झाला. शतपथ ब्राह्मणांत (४. १, ५, १ पुढें ) अशी एक कथा आहे कीं, च्यवनाचा, शर्यातिकन्या सुकन्या हिच्याशीं विवाह झाला. भृगु अथवा अंगीरस असें दुसरेंहि च्यवन मुनीचें नांव आहे.एका सरोवरांत अवगाहन केल्यानें त्यास पुनः तारुण्य प्राप्त झालें असें म्हणतात. ऋग्वेदांत च्यवनाचा जो एक उल्लेख आहे ( १०. ६१, १–३)त्यावरून असें दिसतें कीं, इंद्रोपासक तुर्वयाण याच्या विरुद्ध च्यवन होता. अश्वींस हवि अर्पण केल्याबद्दल इंद्राचा च्यवनावर रोष झाला होता.सुकन्येच्या प्रार्थनेवरून अश्वींस यज्ञांतील विभाग मिळत असे, असें शतपथ ब्राह्मणावरून व्यक्त (४. १, ५, १३) होतें. पुढें इंद्र व च्यवन यांचा समेट झाला असावा असें ऐतरेय ब्राह्मणावरून स्पष्ट होतें (८. २१, ४ ). महाभारतांत या च्यवनाची कथा आहे. ( आदि. अ. ४–६; वन. अ. १२१–२५ ).

**छ**—तारखेकरितां खूण म्हणून पूर्वीच्या पत्रांतून छ सारखें अक्षर काढीत; उदा०



पा॥ छ २७ रविलावल. या वर्णाच्या चार अवस्था आहेत. १ ली अशोकाच्या गिरनार लेखांत; २ री इ. स. पहिल्या व दुसऱ्या शतकांतील मथुरेच्या लेखांत; ३ री ११ व्या शतकांतील उज्जनी येथील लेखांत व ४ थी तिसऱ्या अवस्थेपासून बनलेली आहे.

**छछरौली**—पंजाबच्या कलसिआ संस्थानाच्या राजधानीचें ठिकाण आहे. इ. स. १९११ त लोकसंख्या ४२४६ होती. येथें एक शाळा व दवाखाना आहे.

**छटू**—छटू हा पेशवाई अखेरीच्या पेंढाऱ्यांत एक प्रमुख पेंढारीनाईक होता. त्यावेळीं करीमखान, वासीलमहंमद व छटू हे तीन प्रमुख ( पेंढाऱ्यांचे ) पुढारी होते. हा जातीनें मेवाटी होता. करीमखान ग्वालेरास शिंद्याच्या अटकेंत असतांना, पेंढाऱ्यांचें अधिपत्य याच्याकडे आलें ( १८१० ). पुढें जेव्हां करीमखान कैदेंतून सुटला, तेव्हां याला मत्सर वाटून त्याला सोडून हा दौलतराव शिंद्याच्या पदरीं राहिला. इ. स. १८१७ त माळव्यांतून पेंढारी हुसकावून लाविले व १८१८ त त्यांचा पुरा मोड झाला. करीमखान शरण गेल्यानें त्याला गणेशपुरची जहागीर मिळाली व वासीलमहंमदनें कैदेंतच आत्महत्या केली. छटू हा इंग्रजांचे हातीं लागेना व शरणहि येईना म्हणून त्याचा सारखा पाठलाग सुरू झाला. त्यावेळीं तो पळत पळत अशीरगडच्या जवळ जंगलांत शिरला असतां तेथें एका वाघाच्या मुखांत त्याची आहुती पडली असें म्हणतात. [ माल्कम–सेन्ट्रल इंडिया; डफ–हिस्टरी ऑफ दि मराठाज्, पु. ३ ].

**छतारी**—संयुक्तप्रांताच्या बुलंद शहर जिल्ह्याच्या खुर्जा तहसिलींतलें एक शहर आहे. इ. स. १९०१ सालीं येथील लोकसंख्या ५५७४ होती. येथें मेवाटी लोकांतील छतरधारी घराणें होतें. हें ठिकाण पहासूचा मुराद अलीखान याचा भाऊ महमद अलीखान याची मालमत्ता आहे. अहमद सैयदखान हा लहान असल्यामुळें ही मालमत्ता आतां कोर्ट आफ वार्ड्सच्या ताब्यांत आहे. येथील उत्पन्न ८०० रु. आहे. गांवांत एक शाळा आहे.

**छत्तरपूर**, सं स्था न.—मध्यहिंदुस्थानाच्या बुंदेलखंड एजन्सीमधील एक सनदी संस्थान. याचें क्षेत्रफळ १११८ चौ. मैल आहे. यांतील बहुतेक भाग सपाट आहे व त्यांत पुष्कळ झाडें व तळीं आहेत. यांत कर्नी नदी आहे व तिच्या उर्मल व कुर्ता या दोन शाखा आहेत.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत कुंवर सोनेसाह पोंवार किंवा पमार नांवाच्या, पन्नाचा राजा हिंदुपत याच्या एका सेवकानें पन्नासंस्थानांतीलच कांहीं भागांचें हे संस्थान स्थापिलें. यानें पुढें इ. स. १७८५ त आपल्या मालकाची जहागिरी बळकविली व मराठयांच्या स्वारीच्या धामधुमींत पुष्कळसा प्रांत आपल्या जहागिरीस जोडिला. बुंदेलखंड जेव्हां ब्रिटिश अमलाखालीं आलें तेव्हां ब्रिटिशसरकारनें सोनसाहास सन १८०६ त या संस्थानाची सनद दिली. त्याच्या ताब्यांतील सर्व जमीन, छत्तरपूर गांव व दुसऱ्या कांहीं जमीनी खेरीज करून, त्याच्याचकडे ठेवण्यांत आली होती, परंतु १८०८ सालांत याहि जमीनी त्यास परत देण्यांत आल्या.

छत्तरपुरच्या संस्थानिकास राजा बहादूर ही पदवी सन १८२७ त बहाल करण्यांत आली. १८५४ त जेव्हां संस्थानिक प्रतापसिंग मेला तेव्हां ईस्ट इंडिया कंपनीच्या डिरेक्टरांनीं त्यास औरस संतती नसल्या कारणानें हें दत्तविधान नामंजूर ठरवून संस्थान खालसा केलें तथापि छत्रपुरच्या संस्थानिकांनीं जी राजनिष्ठा दाखविली, तिच्याकडे नजर देऊन ब्रिटिश सरकारनें नवीन सनद जगत राजास करून दिली व तो अल्पवयी, आठ वर्षांचा असल्यामुळें प्रतापसिंगाच्या दुसऱ्या राणीस प्रतिनिधि नेमण्यांत आलें. १८५७ सालच्या बंडांत ती याचा कारभार पहात होती. आणि नौगांगमधून आलेल्या लोकांस हिनें आश्रय दिला होता. १८६२ त या संस्थानिकास दत्तक घेण्याची सनद देण्यांत आली. १८६३ त अव्यवस्थेमुळें त्या राणीस अधिकारच्युत करून संस्थानावर एक यूरोपियन अधिकारी नेमण्यांत आला. १८६७ त जगतराजास अधिकाराचीं सूत्रें देण्यांत आलीं. १८६८ त तो मरण पावला. तेव्हां त्याचा मुलगा विश्वनाथसिंग १४ महिन्यांचा असतांनाच गादीवर बसला. हल्लीं हाच संस्थानिक आहे. हें संस्थान १८७५ पर्यंत युरोपियन अधिकाऱ्यांच्या व्यवस्थेखालीं होतें. नंतर येथील अधिकार या संस्थानिकाच्या आईकडे देण्यांत आला होता. परंतु १८७८ त अव्यवस्था होऊं लागल्यामुळें तिच्यापासून काढून घेण्यांत आला. १८८७ सालापासून विश्वनाथसिंग आपल्या संस्थानचा कारभार पाहूं लागला. १८९४ त त्याला आणखी फौजदारी अधिकार व १८९५ त महाराजा ही पदवी देण्यांत आली. येथील संस्थानिकास " हिज हायनेस " आणि राजा या पदव्या वंशपरंपरागत आहेत; व याला ११ तोफांची सलामी आहे. बुंदेलखंडांतल्या पोंवारांत हा मुख्य आहे.

यांत इमारतींची जुनीं:कामें पुष्कळ आहेत व उत्तर हिंदुस्थानांत सर्वांत अप्रतीम कामें केलेल्या इमारती व देवळें खजुराहो येथें आहेत. छत्रपूर गांवाच्या पश्चिमेस महोबा शहरांत परिहारी रजपुतांची जुनी राजधानी होती व त्या ठिकाणीं छत्रसाल महाराजांच्या वेळचीं अलीकडील पद्धतीवर बांधलेलीं घरें आहेत. महोबा शहरांत चंदेल लोकांनीं बांधलेल्या इमारतींचे अवशेष सांपडतात, त्यांत सुमारें इ. स. च्या ११५० त ला एक लेख सांपडला आहे. राजनगरांत चंदेल लोकांनीं पुष्कळ सुंदर तलाव बांधले आहेत. त्यांपैकीं महोबा येथें जगरसागर, राजनगर येथें इम्ली तलाव आणि लौरी येथें ज्ञानसागर हे सर्वांत मोठे आहेत. छत्रपूर गांवाच्या आग्नेयेस २० मैलांवर केन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर राजगडजवळ मन्यागडांत आठ किल्यांपैकीं ( बुंदेलखंडांत आठ कोट होते हे प्रसिद्ध आहे. ) एक किल्ला मोडून जंगलांत जमनदोस्त होऊन पडलेला आहे. चांदभाटाच्या म्हणण्याप्रमाणें चंदेल घराण्याची कुलदेवता मन्यादेवी होती व तिचेंच नांव या किल्ल्यास दिलें असावें. याची लोकसंख्या १९२१ त १६६५४९ होती. यांत तीन शहरें असून ३०८ खेडीं आहेत. यांत बुंदेलखंडी व तिच्या पोटभाषा बानाफरी आणि खतोल या भाषा प्रचलित आहेत. यांतील लोकसंख्येपैकीं शेंकडा ३९ शेतकीवर,१५ मोलमजुरी करून आणि ७ संस्थानांत नोकरी करून आहेत.

छत्तरपूर गांवाखेरीज करून यांत फारसा व्यापार चालत नाहीं. यांतून तीळ वगैरे धान्यें आणि मसाले बाहेर जातात व कापड, धान्य, धातू व मीठ आंत येतात. छत्तरपूर शहरांत तार आणि डाकघर आहे व त्याची फक्त डाकघराची एक शाखा राजनगर येथें आहे.

राज्यव्यस्थेकरितां या संस्थानांत छत्तरपूर, राजनगर, लौरी आणि देओर अशा चार तहसीली करून, त्या प्रत्येकावर एकएक तहसीलदार नेमिला आहे. हा तहसीलदार आपापल्या तहसिलींत न्यायाधीश व मुलकी अधिकारी असतो. एकंदर व्यवस्था आणि दिवाणी खटले करण्याचा पूर्ण अधिकार संस्थानिकास आहे. फौजदारी खटले ब्रिटिशांच्या कोडान्वयें चालविण्यांत येतात व दिवाणी खटल्यांसाठीं स्थानिक नियम करण्यांत आले आहेत. यांतील एकंदर उत्पन्न सुमारें चार लाख रु. आहे,त्यांपैकीं तीन लाख रु. शेतसारा आहे. यांत शेतसाऱ्याची रकम ठरलेली नाहीं. यांतील खेडीं वेळोंवेळीं मक्त्यानें देतात व हे मक्तेदार शेतसाऱ्याकरितां जबाबदार आहेत.

पूर्वी छत्तरपूर येथें पाडलेले राजाशाही रुपये व संस्थानांतील दुसरीं सर्व नाणीं बंद करून सन १८८२ त ब्रिटिश रुपया हें नाणें सुरू करण्यांत आलें.

शेंकडा १.६ जणांस ( ३ पुरुष, ०.१बायकांस ) लिहितांवाचतां येतें. सन १८६५ त यांत पहिल्यानें शाळा स्थापन झाली; व तिचे १८८४ सालांत हायस्कुल बनविण्यांत आलें. त्यांतील विद्यार्थी अलाहाबाद येथील विश्वविद्यालयाच्या परिक्षेस पाठविण्यांत येतात.

**श ह र.**—हें मध्यहिंदुस्थानांतील त्याच नांवाच्या संस्थानचें मुख्य शहर असून नवगांव छावणीपासून १५ मैल अंतरावर वसलें आहे. याची लोकसंख्या १९११ सालीं १०४१३ होती. हें इ. स. १७०७ त पन्नाच्या छत्रसालानें बसविलें. याच्या तीन बाजूनीं भिंत असून त्यांत पुष्कळ चांगल्या इमारती आहेत. त्यांपैकीं पहाण्यासारखी म्हटली म्हणजे राजवाडा ही होय. सुमारें २०० वर्षांपूर्वी पन्नाचा राजा पहारसिंग याच्या पदरीं पुष्कळ गोसावी होते व या गोसाव्यांनीं येथें पुष्कळ स्मारकें बांधून याची शोभा द्विगुणित केली आहे. याच गोसाव्यांनीं सोनेसहा याला हें शहर मिळवून दिलें. आगगाडी अस्तित्वांत येण्यापूर्वी याची व्यापाराकरितां बरीच प्रसिद्धी असून मीठ, साखर, लोखंड व पितळेचीं भांडीं हे येथील व्यापाराचे मुख्य जिन्नस होते. येथें एक दवाखाना, एक हायस्कूल व तीन मुलामुलींच्या शाळा व एक औद्योगिक शाळा आहे.

**छत्तिसगड विभाग**—मध्यप्रांताच्या पूर्वेकडील एक विभाग असून याचें क्षेत्रफळ २२०३९ चौरस मैल आहे. हा विभाग म्हणजे एक सपाट मैदान असून त्यांतून महानदी वहात जाते व हिचा प्रवाह या विभागाच्या उत्तर, पश्चिम, व दक्षिण दिशांस टेकड्यांच्या रांगांनीं थोपवून धरिला आहे. या विभागांत दुग, रायपूर, व बिलासपूर या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. लोकसंख्या ( १९११ ) ३३८१६८७ होती. यापैकीं सुमारें शेंकडा ९० हिंदू असून ८ वन्य होते. या विभागावर १८५० पर्यंत रतनपूरच्या हैहयवंशी घराण्याचें राज्य होतें. हा विभाग इतर प्रदेशांपासून अलिप्त असल्यामुळें त्यांतील लोकांच्या रीतीभाती पोषाख व भाषा इतर जवळच्या लोकांपेक्षां भिन्न आहेत. या लोकांस ' छत्तिसगडी ' अशी संज्ञा आहे. यांची भाषा हिंदी असून तिचे अयोध्येकडील भाषेशीं बरेंच साम्य आहे. या विभागांतील लोक बुद्धिहीन व शेतकींत मागासलेले असून शेजारच्या इतर लोकांपेक्षां रानटी आहेत. या विभागाचा कमिशनर रायपूर येथें रहातो. यांत ७ गांवें व १०१२८ खेडीं आहेत. याच्या मैदानाकडील सरहद्दीच्या पलीकडे १४ संस्थानें आहेत. त्यांवर कमिशनर हा एका वकीलाच्या मार्फत देखरेख करतो.

**छत्रपूर तहशील**—मद्रास. गंजम ( छत्रपूर ) जिल्हा. कालीकोट,बिडी, हुम्मा आणि पालूरु या चार वतनांनीं(इस्टेट्स ) मिळून ही जमीनदारी ( तालुका ) बनली आहे. क्षेत्रफळ ३०० चौ. मै. आहे. हा भाग नेहमीं मोठा रमणीय असून समुद्राकडे टेंकड्या कमी कमी उंच होत गेल्यानें नेहमीं थंडहि असतो. यांत ३२४ खेडीं आहेत. लोकसंख्या ( १९२१ ) १५९५८० व उत्पन्न ( कुंडलचें धरून ) साडेचार लाखांवर आहे.

**छत्रसाल**—बुंदेलखंडचा एक राजा. हे बुंदेले राजे अकबराच्या आधींपासून मुसुलमानांशीं आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं लढत होते. अकबराचा समकालीन मधुकर नांवाचा बुंदेलराजा होता. जहांगीर मेल्यानंतर सर्व बुंदेले राजांनीं एकत्र जमून मुसुलमानी सत्तेविरुद्ध युद्ध पुकारलें. त्यांचा नायक चंपतराय नांवाचा महोबाचा राजा होता. त्यानें दिल्लीवाल्याच्या फौजांचा अनेकदां पराजय केला होता. शेवटीं शहाजहानानें त्यांच्याशीं मित्रत्वाचा तह करून त्यांचें स्वातंत्र्य मान्य केलें. औरंगजेबानें आपल्या तख्तारोहणाच्या प्रयत्नांत चंपतरायाची मदत घेतली होती; परंतु गादीवर आल्यावर त्यानें चंपतचा अपमान केला; तेव्हां चंपतनें औरंगजेबाच्या विरुद्ध युद्ध उपस्थित केलें. औरंगजेबानें त्याच्यावर स्वतः स्वारी केली व कपटानें एका लढाईत त्याला ठार मारिलें ( १६६४ ). त्याचा पुत्र छत्रसाल याचा जन्म १६५० च्या सुमारास झाला. याचें बहुतेक चरित्र शिवछत्रपतीसारखेंच होतें. बाप वारल्यावर कांहीं दिवसांनीं बुंदेल्यांचें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचें काम त्यानें उचललें. याच सुमारास दक्षिणेंत शिवाजीनें स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न चालविला होता. छत्रसालानें शिवरायाची ख्याति ऐकून भीमेच्या कांठीं त्याची भेट घेतली. तेव्हां शिवाजीनें त्याला हिंदुराज्य स्थापण्याबद्दल प्रोत्साहन दिलें व एक तरवार बक्षीस दिली. ही हकीकत भूषण कवीनें साग्र वर्णिली आहे. नंतर छत्रसालनें परत बुंदेलखंडांत जाऊन औरंगजेबाशीं फटकून वागण्याचा क्रम आरंभला. तेव्हां औरंगजेबानें त्याच्यावर फिदाईखान यास पाठविलें असतां त्यानें त्याला पिटाळून लाविलें. याप्रमाणें छत्रसालचा पराक्रम पाहून जे इतर बुंदेले राजे मुसुलमानांस मिळाले होते, तेहि त्यांनां सोडून छत्रसालास मिळाले. त्यांच्या साह्यानें त्यानें आपलें राज्य वाढविलें. सर्व बुंदेलखंड जिंकला. हिंदुराजेच नव्हत तर ( आसपासचे ) मुसुलमान सरदारहि त्याचे मांडलिक बनले. औरंगजेबास त्याची धास्ती पडली. त्यानें रणदुल्ला, सदरुद्दिन, तुहव्वर व अन्वर या सेनापतींनां छत्रसालावर निरनिराळ्या वेळीं पाठविलें. पण त्या चौघांचाहि छत्रसालानें फडशा पाडला. अन्वरखानानें तर सव्वा लाख रु. दंड भरून आपली सुटका करून घेतली. औरंगजेबानें आणखीहि सरदार त्याच्यावर धाडिले. परंतु कोण्याहि मुसुलमान सेनापतीकडून छत्रसाल जिंकला गेला नाहीं; तेव्हां नाइलाजानें औरंगजेबानें त्याच्याशीं मैत्रीचा तह केला. छत्रसालाचा गुरु प्राणनाथ प्रभु नांवाचा होता. त्यानें छत्रसालाचें व औरंगजेबाचें युद्ध चालू असतां, बुंदेले लोकांत मुसुलमानांविरुद्ध आवेश उत्पन्न केला. बहादुरशहानेंहि छत्रसालाचें स्वातंत्र्य कबूल केलें होतें व त्याची अनेकवेळीं मदत घेतली होती. छत्रसालानें पन्ना येथें आपली राजधानी केली. पुढें मराठ्यांनीं माळवा काबीज करून दिल्लीला शह देण्याचें काम चालू केलें, तेव्हां छत्रसाल उघडपणें त्यांनां मिळाला ( १७२९ ). बहुतेक रजपुतराजेहि यावेळीं मराठ्यांनां धर्माच्या नांवावर मुसुलमानांविरुद्ध मिळाले होते. त्यामुळें महंमदशहानें छत्रसालावर महंमदखान बंगश याला पाठविलें. महंमदला बादशहानें जी जहागीर दिली होती ती बुंदेलखंडच्या लगतच असल्यानें, त्याला छत्रसालाचा उपसर्ग नेहमीं होई. बादशहानें त्याला छत्रसालावर पाठविल्यानंतर त्यानें आपल्या पीरखान नांवाच्या मुलास प्रथम पुढें धाडिलें; परंतु छत्रसालानें त्याला ठार मारून त्याच्या फौजेचा पराभव केला. तेव्हां महंमदनें पुन्हां आपला दुसरा मुलगा काईमखान यास पाठविलें. पण छत्रसालानें त्यालाहि पळवून लाविलें. तेव्हां खासा महंमद बंगष बुंदेलखंडांत शिरला. त्याला महंमदशहानें भरपूर मदत केली. छत्रसाल व त्याचीं दोन मुलें यांनीं जोरानें त्याला तोंड दिलें. परंतु बंगषची फौज अतिशय असल्यानें, जैतपूर येथें त्याचा पराभव झाला व वृद्ध छत्रसाल जखमी झाला ( १७२९ ).

यावेळीं थोरले बाजीराव हे माळव्यांत होते; त्यांनां छत्रसालानें मोठ्या विनवणीचें पत्र पाठविलें. हें पत्र संबंध उपलब्ध नाहीं, फक्त " जो गति ग्राहगजेंद्रकी सो गति भई है आज। बाजी जात है बुंदेलकी राखो बाजी लाज ॥ " हा दोहरा प्रसिद्ध आहे. पत्र पावतांच बाजीराव तावडतोब निघून धामोरा येथें छत्रसालास भेटला ( १३ मार्च ); नंतर उभयतां बंगषवर जाऊन त्यांनीं त्याचा जैतपूर येथेंच पुरा धुव्वा उडविला ( ३० मार्च १७२९ ). या लढाईत तीन हजार घोडे व तेरा हत्ती पाडाव झाले. या मदतीबद्दल छत्रसालानें बाजीरावास झांशी प्रांत ( ऊडीच लाखाचा) दिला. याच सुमारास मस्तानी ही बाजीरावास मिळाली. छत्रसालाच्या एका मुसुलमानी नाटकशाळेची मस्तानी ही मुलगी होती असें म्हणतात. पुढें छत्रसाल १७३३ त मरण पावला. त्याला हिरदेसा व जगतराज असे दोन पुत्र होते. बाजीरावास आपला तिसरा पुत्र मानून त्यानें आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा ( ३३ लाखाची जहागीर ) बाजीरावास बक्षीस दिली; त्यावर गोविंदपंत खरे यांची नेमणूक झाली होती. त्याच्या नंतर मस्तानीचे वंशजा ( अलिबहादूर ) कडे ही जहागीर गेली. आपल्या पश्चातहि पेशव्यांनीं आपल्या वंशजास मदत करावी असा तह छत्रसालानें बाजीरावाशीं केला होता. मराठ्यांनांहि बुंदेलखंडांत आपलें ठाणें देऊन दिल्लीची पातशाही खिळखिळी करण्यास या तहाचा उपयोग झाला. खास पेशव्यांच्या मालकीची सर्वांत जुनी जहागीर हीच होय. हिच्यांत काल्पी, हटासागर, झांशी, सिरोंज, कुंच, गडकोटा व हुरदेनगर या परगण्यांचा समावेश होतो. [ पॉग्सन-बुंदेला; पारसनीस-बुंदेलखंड; राजवाडे-खंड ३ ].

**छत्री**—प्रथम छत्रीचा उपयोग ऊन लागूं नये म्हणून करीत; व उष्ण कटिबंधांतच छत्र्यांचा विशेष प्रसार असे.

नंतर छत्री ( छत्र ) हें राजचिन्ह होऊन बसलें ( 'अबदागिरी' पहा ). मराठेशाहींत 'छत्रपति' ही सार्वभौमः बहुमानाची पदवी धारण करण्यांत राजांना भूषण वाटत असे. छत्री घेण्याचा मान राजांकडून विशिष्ट लोकांनां दिला जात असे. १८५५ त ब्रह्मदेशच्या राजानें हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलला लिहितांना, स्वतःला " पौरस्त्य देशांतील मोठमोठ्या छत्रधारी राजांवर राज्य करणारा " असें संबोधिलें होतें. सिंहासनें, आचार्यपीठें, प्रभावळी वगैरेंवर छत्रीसारखें कांहीं केलेलें असतें. त्याचाहि हेतु ऐश्वर्य सत्ता दर्शविण्याचा होय.

ग्रीक व रोमन लोकांत बायकाच फक्त छत्र्या वापरीत. पुरुषानें छत्री वापरणें स्त्रैणद्योतक समजत. दक्षिण यूरोपांत छत्र्या फार प्राचीन काळापासून प्रचारांत असत. पण इंग्लंडांत १७ व्या शतकापर्यंत छत्र्यांचें अस्तित्व भासत नाहीं. त्या शतकांत ऊन, पाऊस यांसाठीं छत्र्यांचा उपयोग माहीत असलेला दिसतो. १७८६ त मरण पावलेला इंग्रज प्रवासी जोनस् हॅन्वे हा अक्षय छत्री वापरणारा पहिला इंग्रज गृहस्थ म्हणून प्रसिद्धीस आला. यावरून व इतर कांहीं पुराव्यांवरून १८ व्या शतकांतहि इंग्लंडांत फारशा छत्र्या प्रचारांत नसाव्यातसें दिसतें.

पहिल्या छत्र्या पौरस्त्य छत्र्यांबरहुकूम करण्यांत येत. तेव्हां साहजिकच त्या जड व बेडौल असत. त्यांनां लांब दांडा असून बहुधा वेताच्या किंवा देवमाशाच्या हाडांच्या काड्या बसविलेल्या असत. कापड तेलया रेशमाचें किंवा सांधें असून तें फार जाड असे; व छत्री मिटविली असतां घड्या एकमेकांनां चिकटून बसत; नंतर तेलकापडाबद्दल जिंगहॅम वापरूं लागले. १८४८ त विल्यम सँग्स्टननें छत्रीला आच्छादन म्हणून अल्पाकाचा उपयोग करण्याचें पेटंट मिळविलें. १८५२ त सॅम्युएल फॉक्सनें टिकाऊपणा व हलकेपणा आणि काड्यांचा लवचिकपणा या बाबतींत चांगली सधारणा करून ' पॅरॅगॉन ' रिब ( काड्या )चें पेटंट घेतलें. छत्रीचें रेशमी कापड मुख्यतः लिऑन्स व क्रेफेल्ड या ठिकाणीं होतें. हल्लीं छत्र्यांच्या बाबतींत फारच सुधारणा व सोयी घडून आल्या आहेत.

**छत्रे, केरो लक्ष्मण** ( १८२४-१८८४ )—महाराष्ट्रीय गणित-ज्योतिषशास्त्रज्ञ. महाराष्ट्रांत इंग्रजी सत्ता आल्यावर पाश्चात्य विद्येंत निपुण अशी जी मंडळी झाली तींत केरोपंतनाना हे नामांकित होते. मुंबईच्या दक्षिणेस १३ कोसांवर अग्रागर प्रांतांत नागांव या नांवाचा गांव समुद्रतीरीं आहे. तेथें १८२४ च्या मे महिन्यांत यांचा जन्म झाला. हे काश्यप गोत्री ऋग्वेदी चित्पावन ब्राह्मण होते. यांचें इंग्रजी भाषेचें शिक्षण मुंबईस झालें. मुंबईस कुलाबा दांडीवर वेधशाळा इ. स. १८४० त झाली. तींत हे असिस्टंट होते. नंतर ते पुण्यास आले. तेथें नार्मल स्कूलांत अ. प्रोफेसर झाले. कांहीं दिवस अहमदनगर(इं.)शाळेंत हेडमास्तर होते. नंतर पुण्यास १८६५ मध्यें गणितशास्त्राचे प्रोफेसर झाले. नंतर १८७९ त त्यांनीं पेन्शन घेतलें.

यां चे ग्रं थ.—ग्रहसाधनाचीं कोष्टकें व तिथिचिंतामणि. शिवाय मराठी शाळांत उपयोगी अशीं पदार्थविज्ञानशास्त्र आणि अंकगणित हीं दोन पुस्तकें नानांनीं केलेलीं आहेत.

**छत्रे, विष्णु मोरेश्वर** (शके १७६२-१८२७)—महाराष्ट्रांतील पहिले सर्कसकार. यांचा जन्म तासगांवच्या पटवर्धनांचे आश्रित अशा वतणकिर छत्र्यांच्या कुळांत झाला. विष्णुपंतांचे वडील जमखिंडीकरांच्या पदरीं असत. लहानपणीं चरित्रनायक फार उनाड असे. पशुपक्ष्यांशीं खेळण्याचा त्याला विलक्षण नाद असे. घोड्यावर बसण्यांतहि तो पटाईत होता. पुढें त्यानें रामदुर्गकरांकडे चाबुकस्वाराची जागा पत्करली. नंतर यानें गायन शिकण्याकरितां ग्वाल्हेरला जाऊन प्रसिद्ध गवई रहिमतखां यांचे वडील हाद्दुखां यांजवळ राहिला व तेथेंच अश्वविद्याहि शिकला. चिंचुरकर, जव्हारकर व दक्षिण महाराष्ट्रांतील पटवर्धन संस्थानिक या अश्वहृदयज्ञ विष्णुपंतास जवळ रहाण्याचा फार आग्रह करीत असत, व त्यांनां या सर्व संस्थानिकांनीं चांगला आश्रयहि दिला होता. मुंबईतील विल्सन साहेबाची सर्कस पाहून आपणहि अशी सर्कस काढावी असें विष्णुपंतांच्या मनांत आलें व ते त्या उद्योगास लागले. इ. स. १८८३ त त्यांच्या सर्कशीच्या खेळांनां सुरुवात झाली, त्यांत घोड्यांचीं कामें फार अप्रतिम होत. पुढें सर्व हिंदुस्थानांत विष्णुपंतांच्या सर्कशीनें नांव मिळविलें. पण खुद्द त्यांना सुरा व कळावंतिणी यांचें जबर व्यसन जडून आपले धाकटे बंधु काशीनाथपंत यांच्या हवालीं आपली सर्कस त्यांनीं करून दिली. काशीनाथपंतांनीं हिंदुस्थानाबाहेर सयाम, जावा, चीन, जपान, अमेरिका वगैरे ठिकाणीं कंपनी नेऊन महाराष्ट्राचें नांव गाजविलें. विष्णुपंतांचे शिष्य देवलबंधु यांनीं स्वतंत्र सर्कस काढून छत्र्यांच्या सर्कशीप्रमाणें लौकिक मिळविला. सर्कस सोडल्यानंतर विष्णुपंतांचें राहिलेलें आयुष्य ऐषारामांत गेलें. इंदूरास मधुमेहाच्या विकारानें त्यांस देवाज्ञा झाली ( शके १८२७ ). [ रा. नारायण कृष्ण गद्रे यांनीं यांचें चरित्र लिहिलें आहे ( १८२८ ). ]

**छत्रे, सदाशिव काशीनाथ**—यांस लोक बापू छत्रे असेंहि म्हणत. यांची जन्मभूमी वालुकेश्वरनजीक मुंबई हा गांव होता. यांचा जन्म शके १७१० मध्यें झाला. व हे मरण पावले त्या वेळेस यांचें वय ४२ वर्षांचें होतें. मुंबई इलाख्यांत प्रथमतः शाळा स्थापन करणें हें काम इंग्रज सरकारांतून सुरू करतांनां मि. कर्नल कॅंडी व मि. जर्विस साहेब यांनां मदत देणारा हाच गृहस्थ होता. यानीं जे ग्रंथ इंग्रजींतून मराठींत उतरले त्यांपैकीं मुख्य बाळमित्र, इसापनीति, आणि वेताळपंचविशी हे होत. रा. ब. दादोबा पांडुरंग यानीं यांस आपल्या मोठ्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेंतील गद्यात्मक ग्रंथाचे जनक अशी पदवी दिली आहे. यानें

केलेली कांहीं कविताही आहे. परंतु ती उपलब्ध नाहीं. [ अ. कोश. ]

**छंदःशास्त्र**—एक वेदांग व वैदिक वृत्तांचें शास्त्र. वैदिक छंदःशास्त्रावर छंदोविवृत्ति नांवाचा पिंगल मुनीचा एक अति प्राचीन ग्रंथ आहे; यालाच ( छंदःशास्त्रीय ) वेदांग म्हणतात. ऋग्वेदांतील छंदांचे उल्लेख, वेदग्रंथ व इतरत्र उल्लिखित वृत्तांचीं नांवें व संख्या, वेदोत्तर ग्रंथांतील खास छंदःशास्त्रीय भाग व निदानसूत्रें, छंदःशास्त्राची वाढ, संस्कृत छंदःशास्त्राचा प्राकृत छंदःशास्त्राशीं संबंध, मराठी वृत्तें, तेलगू व चिनी छंदःशास्त्र, इत्यादि विवेचन 'विज्ञानेतिहास' ( प्रकरण ५ वें ) या ज्ञानकोशाच्या ५ व्या विभागांत सविस्तर आलेंच आहे.

**छप्पन देशाचे राजे**—दक्षिण हिंदुस्थानांत अशी एक जुनी कल्पना प्रचलित आहे कीं, हिंदुस्थानांत एकंदर छप्पन देश असून, त्यांचे छप्पन राजे आहेत. या छप्पन देशांचीं नांवें पुढील प्रमाणें आहेत:—( १ ) अंग, ( २ ) अरुण, ( ३ ) अवंति, ( ४ ) आंदिर, ( ५ ) इलाड ( लाट ), ( ६ ) ओढिय, ( ७ ) करुष, ( ८ ) कलिंग, ( ९ ) कन्नड, ( १० ) कन्नाड, ( ११ ) काश, ( १२ ) काश्मीर, ( १३ ) कंधार, ( १४ ) कंबोज, ( १५ ) किडार, ( १६ ) कुरुकु, ( १७ ) कूडक, ( १८ ) कुंतल, ( १९ ) कुरु, ( २० ) कुलिंद, ( २१ ) कू (गुर्ज )चेर( २२ )केकय, ( २३ )केरल, ( २४ ) कोंगन ( कोंकण? ), ( २५ ) कोल्ल, ( कोळवण ), ( २६ ) कोसल, ( २७ ) शक ( २८ ) शबर, ( २९ ) शाल्व, ( ३० ) सिंग ( हु? ) ल, ( ३१ ) सिंधु, ( ३२ ) शीन ( सेन?), ( ३३ ) शूरसेन, ( ३४ ) शोल ( चोल ), (३५) शोनक, (३६) दिराविड (द्राविड), (३७) तुलुव, (३८) तॅंगन, ( ३९ ) निदद ( निषाद? ), ( ४० ) नेपाल, (४१) पप्पर, ( ४२ ) पल्लव, ( ४३ ) पांचाल, ( ४४ ) पाण्ड्य, ( ४५ ) पुलिंद, ( ४६ ) पोंड ( पौण्ड्र?), ( ४७ ) मगध, ( ४८ ) मत्स्य, ( ४९ ) मरात, ( ५० ) मल्याळ, ( ५१ ) मालव, ( ५२ ) यवन, ( ५३ ) युगन्द, ( ५४ ) वङ्ग ( ५५ ) वङ्गाल ( बंगाल ), आणि ( ५६ ) विदर्भ. [ पं. नटेशशास्त्री—इंडियन अँटिक्वरी, पु. १६, पृ. २३१. ]

**छप्रौली**—संयुक्त प्रांताच्या मिरत जिल्ह्याच्या वाघपत तहसिलींतील एक शहर आहे. येथें इ. स. १९११ त ५७३१ लोकसंख्या होती. येथें जाट लोकांनीं इ. स. आठव्या शतकांत पहिल्यानें वस्ती केली. इ. स. च्या अठराव्या शतकांत शीख लोकांनीं पराभव केल्यानंतर मिरपूरचे जाट लोक येथें येऊन राहिले. येथील उत्पन्न रु. २००० आहे. येथून गहूं व साखर बाहेरगांवीं जाते. येथें एक लहान शाळा आहे.

**छब्रा**, जि ल्हा.—राजपुतानाच्या टोंक संस्थानच्या परगण्यांपैकीं एक परगणा आहे. कांहीं राजकीय कारणांकरितां हें ठिकाण ग्वाल्हेर येथील रेसिडेंटच्या ताब्यांत आहे. याचें क्षेत्रफळ ३०८ चौ. मैल आहे याच्या उत्तरेस ग्वाल्हेर आणि कोटा, पश्चिमेस कोटा, आणि दक्षिणेस व पूर्वेस ग्वाल्हेर आहे. याचे निसर्गतःच, अवगार, मुंजवार आणि पिचवार असे तीन तुकडे पडलेले आहेत. पैकीं अगवारमधील जमीन सपाट आणि सुपीक आहे. याच्या जवळून पारबती व अंधेरी या नद्या वाहतात. इ. स. १९११ सालीं लोकसंख्या ३३,२७० होती. छब्रा परगणा पहिल्यानें खिची चव्हाण रजपुतांनीं बसविला. या घराण्यांतील गुगल नांवाच्या रजपुतांनीं येथें एक किल्ला बांधला. इ. स. १८ व्या शतकाच्या शेवटीं हा प्रदेश यशवंतराव होळकर यांच्या ताब्यांत गेला. इ. स. १८१६ त होळकरांनीं अमीरखान यास दिला व इ. स. १८१७ सालीं तहामध्यें इंग्रजसरकारनें याचा ताबा अमीरखानाकडे दिला. याचा शेतसारा संस्थानासच मिळतो. यांत गहूं, ज्वारी, मका व खसखस होते. याचें उत्पन्न एक लाखावर आहे. येथें उत्तम संत्रीं होतात. या प्रदेशांतून जी. आय. पी. रेल्वेची एक शाखा गेलेली आहे.

श ह र.—राजपुतान्याच्या टोंक संस्थानाच्या छब्रा परगण्यांतील मुख्य ठिकाण आहे हें जी. आय. पी. रेल्वेच्या छब्रा स्टेशनापासून एक मैलावर आहे. याची लोकसंख्या इ. स. १९११ त ६१६४ होती. यांत खिची लोकांनीं इ. स. च्या १५ व्या शतकांत बांधलेला एक भक्कम किल्ला आहे.

**छलालः**—मुंबई, काठेवाड, भोयका ठाण्यांतील एक संस्थान. लिमडीच्या धाकट्या पातीकडे याचा अधिकार आहे.

**छात**, त ह सी ल.—संयुक्तप्रांताच्या मथुरा जिल्ह्याची तहसील आहे. क्षेत्रफळ ४०७ चौ. मैल. लोकसंख्या इ. स. १९११ त १३९९५२ होती. १९०३–०४ सालीं येथील शेतसारा रु. ३३८००० व करांचें उत्पन्न ५९००० होतें. याच्या पूर्वेस यमुना नदी व पश्चिमेस भरतपूर संस्थान आहे. हींत ज्वारीचें मुख्य पीक आहे. लागवडीची जमीन ३२९ चौ. मैल असून त्यांत ११३ चौ. मै. जमीनीस पाणी देतां येतें. येथील विहिरी खोल असून पाणी मचूळ आहे.

श ह र.—छात तहसिलींतलें मुख्य शहर आहे. यांत इ. स. १९११ सालीं ६६९३ लोकसंख्या होती. यांत एक मोठी सराई बांधलेली आहे. ती शेरशहा अथवा अकबरच्या वेळेस उभारलेली असावी. १८५७ सालच्या बंडांत ही सराई बंडखोर लोकांनीं काबीज केली होती.

**छापखाना**—" मुद्रणकला " पहा.

**छापिआ**—संयुक्तप्रांताच्या गोंडा जिल्ह्याचा उत्रौला तशसिलींत हें खेडें आहे. हें बंगाल आणि नार्थ वेस्टर्न रेल्वेवरील एक स्टेशन आहे. येथील लोकसंख्या इ. स. १९०१ त ७३२ होती. या ठिकाणीं सहजानंद साधूचा जन्म झाला. पुढें हा महात्मा स्वामी नारायण या नांवानें प्रसिद्धीस आला. त्यास कृष्णाचा अवतार मानीत. या ठिकाणीं एक मोठें देऊळ आहे. त्यांत या साधूची समाधी आहे. येथें वर्षांतून दोनदां यात्रा भरतात.

**छाप्री**—वऱ्हाड. मध्यप्रांत. कवर्धा राजधानीच्या पश्चिमेस ११ मैलांवर असलेलें गांव. क्षेत्रफळ ९५० एकर. लोकसंख्या १५०. मुख्यतः गोंड लोकांची वस्ती असून येथें एक वैष्णवाचें सुशोभित मंदीर आहे. त्यांत अकराव्या शतकांतील कित्येक प्रसंगांचे दर्शक असे अनेक शिलालेख आहेत. त्यांपैकीं मंडवा महालांत ठेविलेल्या एका शिलालेखांत संस्कृत भाषेंत नागवंशी राजांचें कुलवृत्त दिलें आहे. येथें जवळच दियाबार नांवची टेंकडी असून तीवर कांहीं दैवी शक्तीनें संतत प्रकाशाची ज्योत वरील देवळाचें बांधकाम पूर्ण होईपर्यंत जळत राहिली होती असें म्हणतात. सध्यां देवळांत श्रीरामदेवाची मूर्ति आहे.

**छायाचित्रपेटिका** (क्यामेरा आब्स्क्युरा)--या यंत्राच्या सहाय्यानें सृष्ट पदार्थांचें चित्र हातानें सहजगत्या काढतां येतें. या यंत्रांत एका पेटींत एक लेन्स व त्यासमोर ४५० अंशाचा कोन करून एक आरसा बसविलेला असतो व त्यामुळें लेन्सपुढील वस्तूची प्रतिमा आरशाच्या योगानें एका बाजूस वळवून घेतां येतें. पुष्कळदां असल्या प्रकारचें यंत्र एखाद्या लहानशा राहुटीच्या वरील टोंकास बसविलेलें असतें. या राहुटीच्या कनाती अगदीं अपारदर्शक असतात या यंत्राच्या योगानें राहुटींत एखाद्या तक्त्यावर किंवा एखाद्या टेबलावर बाहेरील देखाव्याचें उत्तम चित्र पडतें; व तें चित्र आंतील मनुष्यास उत्तम प्रकारें रेखाटून घेतां येतें. चितारी ड्राफ्ट्समन आदिकरून लोकांस या यंत्राच्या सहाय्यानें उत्तम स्केचेस (रेखात्मक चित्र) तयार करितां येतात. फोटोग्राफीची कला वाढल्याकारणानें या यंत्राचा प्रसार आतां फारच कमी झाला आहे.

**छाल**—उदेपूर संस्थानांतील याच नांवाच्या जमीनदाराचें राहण्याचें गांव. हें खुर्सिया-धरम जयगड सडकेवर असून बंगाल नागपूर रेल्वेच्या खुर्सिया स्टेशनपासून १० मैल आहे. येथें धान्याचें कोठार, पोलिस ठाणें व शाळा असून जवळच्या भागांत दगडी कोळशाची खाण सांपडली आहे.

**छालिअर**—मुंबई इलाख्याच्या रेवाकाठांतील एक संस्थान. मागें या संस्थानच्या हद्दींत वल्लापूर व राजपुर संस्थानें येत; पण वांटण्यांमुळें संस्थान कमी होऊन आतां त्याचें क्षेत्रफळ ११ चौरस मैल इतकें राहिलें आहे.

**छिंद, लल्लः**—देवल येथील स. ९९२ च्या एका शिलालेखावरून (गया प्रांतावर ?) या सुमारास लल्ल नांवाचा राजा राज्य करीत होता असें दिसतें. याच्या बापाचें नांव मल्हण व आईचें नांव अणहिला असून ती चुलुकीश्वर कुलांतील होती. याच्या आजाचें नांव वैरवर्मा असून याच्या वंशाला छिंदवंश म्हणत असत. गयायेथील एका शिलालेखांत या छिंदकुलांतील पुष्कळ पुरुषांचीं नांवें सांपडतात. परंतु त्यांचा व लल्लाचा काय संबंध होता तें स्पष्ट समजत नाहीं. [ माबेल डफ ]

**छिंदवाडा, जिल्हा.**—मध्यप्रांताच्या नर्मदा विभागांतील एक जिल्हा. याचें क्षेत्रफळ ४६३१ चौरस मैल आहे. याच्या उत्तरेस हुशंगाबाद व नरसिंपूर जिल्हे असून पश्चिमेस बैतूल जिल्हा आहे व पूर्वेस शिवनी जिल्हा असून दक्षिणेस नागपूर व आग्नेयीस उमरावती जिल्हा आहे. हा जिल्हा म्हणजे निरनिराळ्या उंचीचीं तीन पठारें असून तीं दक्षिणेकडून उत्तरेकडे अधिक अधिक उंच होत गेलीं आहेत.

उत्तरेकडील डोंगरी प्रदेशांत नर्मदेला मिळणाऱ्या पुष्कळ नद्या उगम पावतात. यांपैकीं कन्हान, पेंच, जाम या मुख्य होत. या जिल्ह्यांत वाघ, चित्ते, सांबर वगैरे जनावरें सांपडतात. या जिल्ह्याची हवा थंड व प्रकृतीला मानवेल अशी आहे. उष्णता फारशी नसते व पाऊस थोडा पडतो. उष्णतेचें प्रमाण निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें असतें. एकंदरींत याची हवा आरोग्यवर्धक आहे. या जिल्ह्यांत साथीचा रोग फार क्वचित् उद्भवतो.

इतिहासः—छिंदवाड्यापासून २४ मैलांवर देवगड नांवाचें एक खेडें आहे. येथें पूर्वी गवळी राजे राज्य करीत होते. पुढें जतबा नांवाचा गोंड रणशूर व घनशूर या गवळी राजांच्या पदरीं राहिला. यानंतर त्यानें त्या दोघांचा खून करून आपण स्वतःच राज्य बळकाविलें. जातबा गोंड राजानें घाटाखालील पाटणसावंगी व नगरधन हे दोन किल्ले बांधले असें म्हणतात. पुढें १७ व्या शतकाच्या अखेर वरील गोंड घराण्यांतील भक्त बुलंद नांवाचा राजा राज्य करीत होता. हा दिल्लीस गेला व औरंगझेबाच्या दरबारीं चाकरीस राहिला. पुढें यानें तेथें आपला पराक्रम गाजवून बादशहाची मर्जी संपादन केली. बादशहानें याला मुसुलमानी धर्माची दीक्षा देऊन ' देवगडचा राजा ' हा किताब दिला व मोठा सन्मान केला. यानंतर हा देवगडास परत आला. परत येतांना यानें आपल्या बरोबर पुष्कळ हिंदु व मुसुलमानी धर्माचे कारागीर व शेतकरी आणले होते. यानें मंडला व चांदा या दोन गोंड राज्यांचा प्रदेश काबीज करून आपल्या राज्याचा विस्तार वाढविला. व नागपूर शहर वसविलें. याच्या नंतर चांदसुलतान हा गादीवर आला. यानें नागपूर हें आपल्या राज्याचें मुख्य ठिकाण केलें. पुढें देवगडचें राज्य रघूजी भोसल्यानें काबीज केलें. यानंतर छिंदवाडा जिल्ह्याची गणना मराठ्यांच्या राज्यांत होऊं लागली. १८१८ च्या सिताबर्डी लढाईनंतर इंग्रजांनीं अप्पासाहेबांस कैद करून अलहाबादेस रवाना करून छिंदवाडा जिल्हा आपल्या ताब्यांत घेतला. इंग्रजांच्या वतीनें एक सुपरिंटेंडेंट या जिल्ह्याच्या कारभार पाहत असे. १८५३ त इंग्रजांनीं या जिल्ह्यावर आपली पूर्ण सत्ता स्थापन केली.

देवगड येथें पुरातन काळच्या पुष्कळ विहिरी, तळीं व इमारती आहेत.एकंदर जिल्ह्यांत मात्र महत्त्वाचा असा एकहि अवशेष नाहीं. या जिल्ह्याची १९२१ सालीं४९१८३५ लोकसंख्या होती. वन्य जातींच्या लोकांचें प्रमाण शेंकडा ३०

वर आहे. यांतील मुख्य जाती म्हटल्या म्हणजे ब्राह्मण, मारवाडी, कुरमी, कुणबी, भोयर, लोधी, किरार रघुवंशी, अहिर, गोंड, कोरकू वगैरे होत. या जिल्ह्याचे शेंकडा ७२ लोक शेतीवर उदर निर्वाह करतात.

शेतीः—या जिल्ह्यांत काळी, लाल व पिंवळी, अशा तीन प्रकारच्या जमीनी आहेत. यांपैकीं शेंकडा २३ उत्तम काळीच्या अथवा लाल असून बाकीच्या रेताड आहेत. यांत मुख्यत्वेंकरून गहूं, ज्वारी, अन्हर, कोद्रे, कुटकी, सण, ऊंस, तीळ, मका, जगनी वगैरेंचें पीक होतें. याशिवाय कापूस व तांदूळ यांचेंहि उत्पन्न होतें. या जिल्ह्याच्या पूर्वेकडील खमारपाणी प्रदेशांत व भटोरिआजवळील कन्हान नदीच्या थडीवर जातवान गुरेंढोरें आढळतात. गुराढोरांत बैल हें मुख्य जनावर होय. याशिवाय इतर जनावरें म्हटलीं म्हणजे म्हशी व बकऱ्या हीं होत बारा मैलांवर पेंच व कन्हान या नद्यांच्या थडीवर कोळशांच्या खाणी पूर्वपश्चिम पसरल्या आहेत. सौसर तहसिलींत काटोलच्या सरहद्दीवरील टेंकड्यांत व घाटाखालीं मँगनिज सांपडतें.

जंगलेंः—येथील जंगलांत साग व साज या इमारती लांकडांचे व लाख तिखाडी गवताचें रोशा तेल यांचें उत्पन्न होतें.

व्यापार व दळणवळणः—या जिल्ह्यांतील शहरांत व मोठमोठ्या खेड्यांत साधारण चांगलें कापड निघतें. गाद्री लोक मजबूत पांढरें व निळें सूत कांतून त्यांचीं पोतीं विणतात. कांहीं ठिकाणीं थोड्या प्रमाणावर तसर रेशमाचें कापड विणलें जातें. याशिवाय गाद्री लोक निरनिराळ्या रंगांच्या घोंगड्या विणतात. यांतून सण बाहेर रवाना होतो व बंजारी लोक त्याचे झोरे विणतात. कामी व चेथा गवतांचे दोर होतात. छिंदवाडा व लोधीखेडा येथें पितळेचीं भांडीं होतात. रामाकोना, लोधीखेडा, पांढुर्णा, मोरडोंगरी व मोहरवर येथें बाजार भरतो. या जिल्ह्यांतून गहूं, कापूस, गळिताचीं धान्यें, सण, गूळ, सुंठ, बटाटे, इमारती लांकूड, कातडीं, शिंगें, मँगनीज वगैरे जिन्नस बाहेर रवाना होतात व बाहेरून मीठ, साखर, कापड, लोखंड, पितळ वगैरे जिन्नस येतात. या जिल्ह्यांत अजून आगगाडीचे फारसे रस्ते झाले नाहींत. शिवनींहून छिंदवाड्यापर्यंत आगगाडीचा एक फांटा गेला आहे.

*राज्यव्यवस्थाः*—या जिल्ह्याचें दोन विभाग केले असून त्या प्रत्येकांवर एक तहसिलदार व एक नायब तहसिलदार यांची नेमणूक केली आहे. प्रत्येक विभागास तहसिल ही संज्ञा आहे. वरील अधिकाऱ्यांवर असिस्टंट कमिशनर व डेप्युटी कमिशनर हे कामगार देखरेख करतात. जंगलखात्याची पाहाणी करण्याकरितां साम्राज्य सरकाराकडून एक अधिकारी नेमलेला असतो. दिवाणी न्याय देण्याकरितां प्रत्येक तहसिलीच्या ठिकाणीं एक मुनसफ असून त्यांवर सबजज्ज व डिस्ट्रिक्ट जज्ज हे देखरेख टेवितात फौजदारी व दिवाणी खटल्यांत अखेरचा न्याय देण्याचा अधिकार नर्मदा विभागांतील स्पेशल जज्जास असतो. १९०३—०४ सालीं एकंदर सर्व छिंदवाडा जिल्ह्याच्या साऱ्याचें उत्पन्न २९७००० रु. असून एकंदर सर्व उत्पन्न ६८०००० रु. होतें. गांवसभेच्या सरहद्दीबाहेरील सर्व स्थानिक कारभार डिस्ट्रिक्ट कौन्सिलावर सोंपविला आहे. जहागिरी मुलुख धरून एकंदर अशीं तीन डिस्ट्रिक्ट कौंसिलें आहेत. १९०३–०४ सालीं त्यांचें उत्पन्न ४४००० रु. होतें. छिंदवाडा सौसर व पांढुर्णा या ठिकाणीं म्युनिसिपालट्या आहेत.

त ह सि ल.—छिंदवाडा जिल्ह्याच्या उत्तरेकडील एक तहसील. हींत खालसा व जमीनदारी असे दोन भाग आहेत. हिचें क्षेत्रफळ खालसा १९२५ चौ. मै. व जमीनदारी १५९७ चौ. मैल आहे. १९११ सालीं लोकसंख्या अनुक्रमें २८७७१७ व ७७७४४ होती. या तहसिलींत छिंदवाडा हें एक गांव व १४३८ खेडीं आहेत. १९०३–४ सालीं साऱ्याचें व इतर उत्पन्न अनुक्रमें १७८००० व २४००० रु. होतें. ही तहसील मधून मधून टेकड्यांच्या रांगा असलेला पठार व उत्तरेकडील जहागिरदारी डोंगरी व जंगली मुलूख यांची बनली आहे. यांपैकीं पठारावर मालगुजारी असून दुसऱ्या प्रदेशावर १० जहागिरी आहेत. १९०३–०४ सालीं या तहसिलींतील १२६९० चौ. मैल जमीन लागवडीस आणली होती. जहागिरीच्या मुलुखापैकीं ४९५ चौ. मै. प्रदेश जंगलांनीं व्यापिला आहे.

श ह र.—मध्यप्रांतांतील याच नांवाच्या जिल्ह्याचें व तहसिलीचें मुख्य ठिकाण असून हें आगगाडीचें स्टेशन आहे. हें सातपुडा पठारावर वसलें असून समुद्रसपाटीपासून २२०० फूट उंचीवर आहे. येथील हवा अल्हाददायक असून प्रकृतीस मानवेल अशी आहे. हें गांव कोणी रतन रघुवंशी नांवाच्या गृहस्थानें वसविलें असें म्हणतात. याच्या आसपास शिंदीचीं झाडें असल्यामुळें त्यांवरून याला छिंदवाडा हें नांव पडलें असावें. १९११ सालीं याची लोकसंख्या १२८७२ होती. १८६७ त येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. १९०३–४ सालीं हिचें उत्पन्न १७००० रु. होतें. हें स्थानिक व्यापाराचें केंद्रस्थान असून येथें हातमागावरून कापसाचें कापड विणलें जातें व मातीचीं भांडीं होतात. याशिवाय तसर रेशमाचें थोडेसें कापड निघतें व एक छापखाना आहे. यांतून दर महिन्यास एक हिंदी मासिक प्रसिद्ध होतें. येथें एक इंग्रजी हायस्कूल आहे.

**छिंदवाडा**—मध्यप्रांताच्या नरसिंगपूर जिल्हा व तहसील यांतील एक गांव असून येथें ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वेचें ठाणें आहे. १९११ सालीं याची लोकसंख्या ३४०४ होती. हें दक्षिणेंत जाणाऱ्या रस्त्यावर असून १८२४ सालीं सर डब्ल्यू स्लीमन यानें प्रवाश्यांच्या सोयीसाठीं वसविलें. येथें १८६७ सालीं म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. हिचें उत्पन्न १९०३–४ सालीं ४७००० रु.

होतें. येथून आसपासच्या प्रदेशांतील माल बाहेरगांवीं रवाना होतो. येथें दर आठवड्यास जनावरांचा बाजार भरतो व दर बाजारी १००० जनावरांची विक्री होते. येथें एक कापसाची गिरणी, दवाखाना व मिडलस्कूल आहे.

**छिपा**—एक रंगारी जात. छिंबा व छिपी अशीं दुसरीं नांवें आहेत. एकंदर लो. सं. ( १९११ ) २५११६५०. पंजाबांत छिंबांची वस्ती सर्वांत जास्त ( १२९३३५ ) आहे. त्यांच्यांत सर्व धर्मांचे लोक आहेत. हे लोक चिटें छापतात; व मंजिष्ठाचा कपड्यांनां रंग देण्याचेंहि काम करतात. कांहीं कपडे धुणारे परीट आहेत. चिटांवर छाप मारण्याचा धंदा बहुतेक नाहींसा होत चालला आहे.

मुंबई इलाख्यांत गुजराथी भागांत सुमारें १५ हजार छिंपा आहेत. दिसण्यांत व पोषाखांत भावसारांत व यांच्यांत फरक नाहीं. पण भावसारांसारखे नुसते शाकाहारी ते नाहींत. हे लोक वैष्णवधर्मी आहेत. यांच्यांत पुनर्विवाहाची चाल आहे. बाकीच्या चालीरीति वाण्यांच्या प्रमाणेंच आहेत. वऱ्हाड मध्यप्रांतांतहि आठ नऊ हजार छिंपा आहेत. उत्तरेकडील जिल्ह्यांत यांस छिंपा व दक्षिणेकडे रंगारी म्हणतात. ह्या दोन वर्गांत रोटीबेटी व्यवहार होत नाहीं. यांचे माळव्यांतून आलेले, गुजराथेंतून आलेले व गोलिवे असे वर्ग आहेत. यांखेरीज संयुक्तप्रांत ( ३३१८२ ), राजपुताना ( ३७९४० ), मध्यहिंदुस्थान ( १७७४९ ) व बडोदे संस्थान ( ६४९९ ) यांतून छिंपांची वस्ती आहे [ से. रि. १९११; रसेल व हिरालाल; मु. ग. ].

**छिब्रामऊ तहसील**—ही संयुक्तप्रांताच्या फरूकाबाद जिल्ह्यांतील एक तहसील आहे. हिच्यांत छिब्रामऊ व तालग्राम परगण्यांचा समावेश होतो. हिचें क्षेत्रफळ २४० चौ. मैल असून हिच्या उत्तरेस पूर्वकाली नदी व गंगा व दक्षिणेस इसन या नद्या आहेत. हिची लोकसंख्या १९११ सालीं १२६४६० होती. हिच्यांत छिब्रामऊ व तालग्राम हीं दोन गांवें व २४० खेडीं यांचा समावेश होतो. १९०३–४ सालीं जमीनीच्या साऱ्याचें व इतर उत्पन्न अनुक्रमें १९००० व ३२००० रु. होतें. लोकसंख्येचें प्रमाण दर मैलास ५२८ होतें. या तहसिलीच्या मध्यावरील दक्षिणोत्तर जमीन सपाट व सुपीक असून पश्चिमेकडील वाळवंटी आहे. पूर्वेकडील दलदलीची असून तींत पुष्कळ तळीं सांचलीं आहेत. १९०३-४ सालीं या तहसिलीची १६० चौ. मै. जमीन लागवडीस आणली होती व यापैकीं ६४ चौ. मै. जमीनीस कृत्रीमरीतीनें पाणी पुरविलें गेलें. हिच्या कित्येक खेड्यांत भात उत्पन्न होतें.

**छुईखदान ( कोंदका ) संस्थान**—मध्यप्रांतांतील एक संस्थान. हें खैरागड, नांदगांव व द्रुग जिल्ह्यांतील जमीनदारी यांनीं वेष्टिलें आहे. यांतील प्रदेश सुपीक मैदान असून याचें क्षेत्रफळ १५४ चौ. मैल आहे. याचें मुख्य ठिकाण छुईखदान नांवाचेंच असून त्याची लोकसंख्या १९०१ सालीं २०८५ होती. याचें राजघराणें बैरागी असून त्यांतील लोकांस लग्न करण्याची मोकळीक आहे. या घराण्यांत वडील मुलास गादीवर बसविण्याची चाल आहे. १८ व्या शतकांत महंतरूपदास याला जमीनदारापासून परपोडी जमीनदारीचा कोंदका प्रदेश कर्जाची भरपाई म्हणून मिळाला. याच प्रदेशाचें पुढें वरील संस्थान झालें. महंतरूपदास हा वरील राजघराण्याचा मूळपुरुष होय. १७८० च्या सुमारास नागपूरच्या भोसल्यांनीं महंतरूपदास याच्यानंतर गादीवर बसणाऱ्या तुलसीदासाला कोंदक्याचा जमीनदार केलें. १८६५ त त्याच्या घराण्यास संस्थानिकाचा मान मिळाला. १८६७ त महंत श्यामकिशोरदास हा गादीवर आला. याचें वर्तन ठीक नसल्यामुळें सरकारानें एक दिवाण नेमून त्याच्या सल्ल्यानें यानें राज्यकारभार पहावा असें ठरविलें. १८९६ त श्याम-किशोर मरण पावला व त्याचा मुलगा वल्लभ किशोरदास हा गादीवर बसला; पुढें २ वर्षांनीं याला याच्या एका मुलासह त्याच्या एका नातेवाईकानें वीष घालून मारलें. यानंतर याचा जेष्ठ मुलगा, दिग्विजयी जुगल किशोरदास हा गादीवर बसला. हा लहान असल्यामुळें याच्या वतीनें सरकार राज्यकारभार पहात असे. १९०३ मध्यें हा मरण पावून याचा भाऊ भूदेव किशोरदास हा गादीचा वारस झाला. याचें शिक्षण रायपूर येथील राजकुमार कॉलेजांत झालें. १९११ सालीं या संस्थानची लोकसंख्या ३११५० होती. संस्थानांत एकंदर १०७ खेडीं असून गोंड, लोधी, तेली, अहीर वगैरे जातींचे लोक आहेत. यांतील लोकांची भाषा छत्तिसगडी हिंदी आहे.

या संस्थानची १९०४ सालीं ११४ चौ. मैल जमीन लागवडीस आणली होती. यांत कोदोन, गहूं, तांदूळ यांचें पीक होतें. संस्थानचा १५ चौ. मैल प्रदेश जंगलांनीं व्यापिला आहे. १९०४ सालीं संस्थानचें उत्पन्न ७३००० रु. होतें. यापैकीं ५६००० जमीनीचें, २००० जंगलाचें व ४००० अपकारी खात्याचें होतें. याच वर्षी संस्थानचा खर्च ७६००० रु. होता. संस्थानांत ७ शाळा व एक दवाखाना आहे. या संस्थानवर एक पोलिटिकल एजंट देखरेख करतो. हा अधिकारी छत्तिसगड विभागाच्या कमिशनराच्या ताब्यांत असतो.

गांव.—छुइखुदान संस्थानांतील याच नांवाच्या तहसिलीचें गांव. हें बंगालनागपूर रेल्वेच्या राजनांदगांव व डोंगरगांव या दोन्ही स्टेशनपासून १२ मैल असून येथें तुरुंग, कचेऱ्या, पोलिस ठाणें, शाळा, दवाखाना, सराई व इन्स्पेक्शन बंगला, पोस्ट आणि तारऑफीस आहेत; व कांहीं देवळें आहेत. एकंदर वस्ती. ब्राह्मण, बैरागी, व वाणी लोकांची आहे.

**छुटिया**—बंगाल इलाख्याच्या रांची जिल्ह्यांतील एक खेडेंगांव असून रांची शहरापासून २ मैल अंतरावर वसलें

आहे. सन १९०१ साली येथील लोकसंख्या ८८८ होती. पूर्वी हे नागवंशी राजाची राजधानी होतें. व यावरूनच त्याच्या राज्यास छोटानागपूर हें नांव पडलें.

**छोटा उदेपूर**— मुंबई इलाख्याच्या रेवाकांठा संस्थानांतील एक संस्थान असून याचें क्षेत्रफळ ८७३चौ. मैल आहे. याच्या उत्तरेस बारिया संस्थान असून पूर्वेस अलीराजपूर आहे व दक्षिणेस सांखेडा मेवाडांतील लहान लहान संस्थानें असून पश्चिमेस बडोदा संस्थान आहे. या संस्थानाच्या भागांतून ओर्सींग नदी वाहत जाते व दक्षिण सरहद्दिवरून नर्मदा वाहते. यांतील प्रदेश डोंगराळ असून जंगलांनीं व्यापिला आहे. या संस्थानचें राजघराणें चौहान रजपूत आहे. १२४४ त मुसुलमानांनीं राजपुतान्यावर स्वारी केल्यावर हें घराणें गुजराथेंत आलें व नेर शहर व किल्ला हस्तगत करून तेथें या घराण्यानें आपलें राज्य स्थापन केलें. पुढें १४८४ त महमूद बेगडा यानें चांपानेर काबीज केल्यावर या घराण्यानें चांपानेरच्या पूर्वेकडील अरण्यमय प्रदेशांत जाऊन बारिया व छोटाउदेपूर हीं दोन राज्यें स्थापन केलीं. या वेळेस याच्या दोन शाखा झाल्या होत्या व त्यापैकीं एक शाखा छोटाउदेपूर प्रदेशावर राज्य करूं लागली. १८५७ च्या बंडांत येथील राजानें तात्या टोपीस सामील होण्याचें नाकारिलें व जेव्हां तो उदेपूरवर चालून आला तेव्हां जनरल पार्कर्नें त्याचा पराभव केला. येथील राजास महारावळ म्हणतात. याच्या वंशांत गादीवर ज्येष्ठ मुलास बसविण्याची चाल असून त्यास दत्तक घेण्याची सनद मिळाली आहे. त्यास ९ तोफांच्या सलामीचा मान आहे. कांहीं दिवस या संस्थानची राजधानी मोहन हें शहर होतें व म्हणून त्यास मोहन संस्थानहि म्हणतात. पुढें येथील संस्थानिक गायकवाडाचा मांडलिक झाला व स. १८२२ त इंग्रज सरकारास याचा राजकीय ताबा मिळाला.

या संस्थानची स. १९११ साली लोकसंख्या १०३६३९ होती. यांत १ गांव व ३८३ खेडीं यांचा समावेश होतो. यांत कापूस व तीळ यांचें पीक होतें. याच्या जमिनींत लोखंड व संगमरवरी दगडांच्या खाणी सांपडण्यासारख्या आहेत. यांतून बाहेर जाणारे मुख्य जिन्नस म्हटले म्हणजे इमारती लांकूड, कापूस व मोह हे होत. याचा राजा दुय्यम प्रतीचा संस्थानिक असून त्याला आपल्या प्रजेपैकीं गुन्हेगारास शिक्षा करण्याचा अधिकार आहे. संस्थानचें उत्पन्न ५लाख रुपये आहे. या संस्थानिकास बडोदें सरकारला इंग्रजामार्फत सालिना ८९०८ रु. खंडणी द्यावी लागते.

**छोटानागपूर**, वि भा ग.—हा बिहार ओरिसा प्रांताचा ५ वा विभाग असून रांची हें याचें मुख्य ठिकाण आहे. यांत हजारीबाग, रांची, पलामौ, मानभूम व सिंगभूम या पांच जिल्ह्यांचा समावेश होत असून १९११ सालीं याची लोकसंख्या ५६५३०२८ होती. हजारीबाग, मानभूम व सिंगभूम या जिल्ह्यांतील संताळ, रांचींमधील मुंडा, रांची, व सभोंवारच्या संस्थानांतील ओरान,सिंगभूमांतील हो, मानभूम व सिंगभूम यांतील व भूमजी संस्थानांतील गोंड या रानटी जाती आढळतात. या विभागाचें क्षेत्रफळ २७१०१ चौ. मै. असून उत्पन्न १९०३-४ सालीं ९६८००० रु होतें.

या विभागांत तीन पठारें असून अनेक डोंगरांच्या रांगा व त्यांच्यामधून जाणाऱ्या दऱ्या आहेत. या विभागांत १४ गांवें व २४७५९ खेडीं आहेत. यांत कोळसे व अभ्रक सांपडतात. १९०३ सालीं कोळशाचें व अभ्रकाचें उत्पन्न अनुक्रमें ३३२९००० व ५४७ टन होतें. परसनाथ टेकडीवर जैन देवालयें असून तेथें हजारों यात्रेकरू तीर्थयात्रेस जातात.

सं स्था नें.—या संस्थानांत पूर्वी छोटानागपूर विभागांतील ९ संस्थानांचा समावेश होत होता. त्यांची यादी येणेंप्रमाणेः—१ चांगभकार, २ कोरिआ, ३ सुरगुजा, ४ उदेपूर, ५ जाशपूर, ६ गंगपूर,७ बोनै, ८ खर्सावान, ९ सरैकेला. १९०५ सालीं यांपैकीं पहिली पांच संस्थानें मध्यप्रांतास जोडण्यांत आलीं.व गंगपूर व बोनाई संस्थानें ओरिसा प्रांतास जोडण्यांत आलीं. आतां वरील संस्थानांत फक्त खर्सावान व सरैकेला या दोघांचाच समावेश होतो. यांचें क्षेत्रफळ ६०२ चौ. मै. आहे. हीं दोन्ही संस्थानें मानभूम व सिंगभूम या दोन जिल्ह्यांमध्यें वसलीं असून यांच्या उत्तरेस रांची व मानभूम जिल्हे असून पूर्वेस व पश्चिमेस सिंगभूम जिल्हा आहे व दक्षिणेस ओरिसा प्रांतांतील मयूरभंज व सिंगभूम संस्थानें आहेत.

**छोटी साद्री**—हें उदेपूर संस्थानांतील त्याच नांवाच्या जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. या गांवाभोंवतीं तटबंदी असून १९११ सालीं याची लोकसंख्या ४५७५ होती. येथें एक दवाखाना, प्राथमिक शाळा व पोस्टकचेरी आहे. येथील जमीन काळी असून सुपीक आहे.

———

# महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

## ज



**ज**—समासांत याचा ' उत्पन्न झालेला ' हा विशेषणाचा अर्थ होतो. उदा, अंडज, अनुज, इ.



आधुनिक स्वरूप प्राप्त होण्यास या वर्णाला चार अवस्थांतून जावें लागलें. १ ली गिरनारच्या लेखांत; २ री इ. स. २ शतकांतल्या शक उषवदांत किंवा त्याची स्त्री दक्षमित्रा यांच्या नाशीकच्या लेखांत ( या अवस्थेंतील ज इंग्रजी ' ई ' सारखा हुबेहुब दिसतो ); ३ री, राजा दुर्गगणाच्या झालपाटन येथील लेखांत ( इ. स. ६८९ ); व शेवटचा ११ व्या शतकांतल्या उज्जनीच्या लेखांत दिसून येते.

**जकात**—सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींपैकीं कर म्हणून जी एक महत्वाची बाब आहे तींतच जकाती हा प्रकार आहे. जुन्या भाषेंत पट्ट्या ह्या हल्लीच्या जकातींच्या स्वरूपाच्या असत. आधुनिक अर्थशास्त्रदृष्ट्या ' अप्रत्यक्ष करांत' जकातींचा समावेश होतो. जकातींचेहि हल्लीं ' अन्तर्जकात ( एक्साईज ) व ' बाहिर्जकात ' ( कस्टम्स ) असे दोन प्रकार असतात. ' एक्साईज ' म्हणजे केवळ मादक पदार्थांवरील जकात, असा अर्थ नसून देशांत उत्पन्न होऊन देशांतच खपणाऱ्या मालावरील जकात असा अर्थ, आणि ' कस्टम्स ' म्हणजे परदेशांतून येणाऱ्या किंवा परदेशांत जाणाऱ्या उर्फ आयात व निर्गत मालावरील जकात असा अर्थ आहे. भारतीय प्राचीन ग्रंथांपैकीं कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत बाहिर्जकात ( निष्क्रम्य व प्रवेश्य ) असा जकातीचा स्वतंत्र भेद केलेला आहे ( ज्ञानकोश ' कर ' पहा ). मुसुलमानी व मराठी अमदानींत या दोन स्वतंत्र प्रकारच्या जकाती कोणत्या असत, त्यांचें सरकारला उत्पन्न किती होत असे, वगैरे माहिती उपलब्ध नाहीं. पुढें ब्रिटिश अमदानींत कर, अन्तर्जकात व बाहिर्जकात असे स्पष्ट भेद झाले असून त्यांच्या व्यवस्थेचीं स्वतंत्र खातीं आहेत.

ए क्सा ई ज ( अन्तर्जकात ).—दारू, भांग, तमाखू, अफू, ताडी इत्यादि मादक पदार्थांवरील जकातीची व्यवस्था अबकारी खात्याकडे असते. पण अन्तर्जकातीचा तो एक केवळ भाग आहे. अन्तर्गत जकातींची सर्व व्यवस्था 'एक्साईज ' खात्याकडे असून नव्या हिंदी सुधारणांच्या कायद्या-अन्वयें ही सर्वस्वी प्रांतिक सरकारच्या उत्पन्नाची बाब गणली जाते. मादक पदार्थांवर जकात बसविणें ती त्या पदार्थांचा खप कमी व्हावा पण चोरट्या धंद्यास उत्तेजन मिळूं नये अशा धोरणानें बसवितात. इतर सामान्य अन्तर्गत जकात एक उत्पन्नाची बाब म्हणून बसवितात [ ज्ञानकोश ' अबकारीखातें ' पहा ].

क स्ट म्स [ बाहिर्जकात ].—हिंदुस्थानांत बाहेरून येणाऱ्या आणि हिंदुस्थानांतून बाहेर जाणाऱ्या मालावर जकात वसूल करणारें कस्टम्स डिपार्टमेंट म्हणून स्वतंत्र खातें आहे. या बाहिर्जकातीसंबंधानें माहिती इतरत्र दिली आहे ( ज्ञानकोश ' कर ' व ' व्यापार ' पहा ) १९२३ सालीं हिंदुस्थान सरकारचें बाहिर्जकातीचें उत्पन्न ३३ कोटी ७७ लक्ष झालें होतें. आणि १९२४ सालीं ४० कोटी ६४ लक्ष झालें आहे. १९२४ सालीं पोलादावर वाढवलेल्या जकातीमुळें १ कोटी ८१॥ लक्ष रुपये जास्त उत्पन्न झालें.

### हिंदुस्थानांतील आयात जकातीचे दर (अदमासें)

( या दरांत दरवर्षी बजेटाच्यावेळीं थोडा बहुत फरक होतो )

| माल | माप | दर |
|---|---|---|
| धान्य. | किंमतीवर | शें. २॥ |
| कर्णाक. | किंमतीवर | शें. ११ |
| दारू. | इंपीरियल गॅलन | रु. २५ पर्यंत |
| सुगंधी अत्तरें. | इंपी. गॅलन | रु. ३० |
| स्पिरिट. | किंमतीवर | शें. ७॥ |
| साखर. | | शें. १५ |
| चहा. | | शें. ११ |
| काफी. | क्वार्टर किं. ३६ रु. | शें. ११ |
| मीठ. | मण | अन्तर्जकातीइतकी |
| सिगारेट. | किंमतीवर | शें. ७५ |
| कोळसा, कोक इ. | टन | ८ आ. |
| लाख, राळ. | ... | शें. ११ |
| कातडीं | | नाहीं. |
| लोखंड पोलाद. | क्वार्टर किं रु. ३ | शें. २॥ |
| अशुद्ध धातू | | नाहीं. |
| पेट्रोलियम | इंपी. गॅलन | १ आणा ६ पै |
| राकेल केरोसी. | टन | |
| पेट्रोलि.(१५० फा. | ... | शें. ७॥ |
| खोबरेल व इतर तेलें. | | शें. ११ |
| तेलाचीं धान्यें. | | नाहीं |
| कच्चा कापूस व लोंकर. | | नाहीं |

( कोष्टक पुढें चालू )

| माल | माप | दर |
|---|---|---|
| रेशीम. | …… | शें. ११ |
| जळाऊ लाकूड. | किंमतीवर | शें. २॥ |
| इमारती व इतर लाकूड. | किंमतीवर | शें. ११ |
| कवडया व शिंपा. | किंमतीवर | शें. ११ |
| हस्तिदंत. | किंमतीवर | शें. ११ |
| खतें. | | नाहीं. |
| हिरे, मोतीं वगैरे. | | नाहीं. |
| कागदाकरितां चिंध्या वगैरे | | नाहीं. |
| कचा माल. | | शें. ११ |
| बूट, शू वगैरे. | किंमतीवर | शें. ११ |
| हत्यारें. | … | शें. १ ते १५ |
| दारूगोळा. | किंमतीवर | शें. २० |
| मोटारी सायकली वगैरे. | किंमतीवर | शें. ११ |
| अफू | ८० तोळे | २४ रु. |
| क्विनाइन. | | नाहीं. |
| औषधी व रासायनिक द्रव्यें. | … | शें. ११ |
| शेतकीचीं आऊत यंत्रें. | | नाहीं. |
| घडयाळें. | किंमतीवर | शें. २० |
| चाकू कात्र्या वगैरे. | किंमतीवर | शें. ११ |
| डेयरींचें सामान | | नाहीं. |
| इलेक्ट्रो प्लेटेड वेअर. | किंमतीवर | शें. २० |
| टेलेग्राफीचें साहि. | किंमतीवर | शें. २० |
| वॉटर लिफ्ट, शुगर मिल, ऑईल प्रेस. | | नाहीं. |
| रंग. | | शें. ११ |
| लाकडी सामान. | किंमतीवर | शें. ११ |
| कांच व चिनी मातीचे जिन्नस. | किंमतीवर | शें. ११ |
| कांचेच्या बांगड्या, खोटीं मोतीं. | किंमतीवर | शें. २० |
| वाफेचीं यंत्रें वगैरे. | किंमतीवर | शें. २॥ |
| लोखंडी व पोलादी जिन्नस. | किंमतीवर | शें. २॥ |
| सोन्याचे जिन्नस व माल. | किंमतीवर | शें. २० |

| माल | माप | दर |
|---|---|---|
| सोनें, रुपें, निकेल वगैरे धातूंचीं नाणीं. | …… | नाहीं |
| चांदीचा माल व जिन्नस. | किंमतीवर | शें. २० |
| तांबें, पितळ वगैरे धातूंचे जिन्नस. | किंमतीवर | शें. ११ |
| पुस्तकें, कॅटलॉग, वगैरे. | | नाहीं |
| कागद व स्टेशनरी. | किंमतीवर | शें. ११ |
| रेल्वेचें सामान. | किंमतीवर | शें. २॥ |
| कापसाचें सूत कापड वगैरे. | किंमतीवर | शें. ११ |
| तागाचीं जुनी पोतीं | | नाहीं. |
| रेशमी माल. | किंमतीवर | शें. २० |
| लोंकर माल. | किंमतीवर | शें. ११ |
| चित्रें पुतळे वगैरे. | | नाहीं. |
| विमानें. | किंमतीवर | शें. २॥ |
| इमारती सामान. | किंमतीवर | शें. ११ |
| मेणबत्त्या. | किंमतीवर | शें. ११ |
| सिनेमा फिल्म. | फुटास कि. ४ आ. | शें. २० |
| दोरा व दोरखंड | किंमतीवर | शें. ११ |
| आगपेटया. | ग्रोस | १२ आ. |
| चटया. | किंमतीवर | शें. ११ |
| रबरी ( पोकळ ) टायर, टयूब. | किंमतीवर | शें. ११ |
| सुगंधी माल. | किंमतीवर | शें. २० |
| छापखान्याचें व लिथोचें सामान. | किंमतीवर | शें. २॥ |
| फोटो वगैरे. | किंमतीवर | शें. २० |
| जहाजें व बोटीं | किंमतीवर | शें. २॥ |
| जनावरें (जिवंत) | | नाहीं. |
| खेळणी, पत्ते खेळाचें सामान. | किंमतीवर | शें. २० |
| छत्र्या. | किंमतीवर | शें. ११ |
| साबण. | किंमतीवर | शें. ११ |
| जुनीं नाणीं, पदकें. | | नाहीं |
| दगड, फरशी व त्याचे जिन्नस. | किंमतीवर | शें. ११ |

## हिंदुस्थानांतील निगत जकातींचे दर

| माल | माप | दर |
|---|---|---|
| कच्चा ताग | ४०० पौंडांची वेल | १६८ ते ४६८ |
| तागाचे जिन्नस | २२४० पौंडांचा टन | रु. २० ते ३२ |
| तांदूळ | ८२ $\frac{2}{7}$ पौंडाचा मण | ८३ |
| चहा | १०० पौंड | १६८ |
| कातडीं | पौंड. | ८१ ते १ रु. |

पाश्चात्य देश.—यूरोपमध्यें 'एक्साइज 'चा अर्थ केवळ मादक पदार्थावरील कर असा नसून सामान्यतः 'देशी मालावरील कर' असा आहे. अर्थात् अशा प्रकारचा कर उद्योगधंदे वाढलेले आहेत, अशा देशांतच असतो. अशा करानें उद्योगधंद्याच्या वाढीस मोठा अडथळा होत असल्यामुळे मोठ्या अडचणींच्या प्रसंगाशिवाय इतर वेळीं तो क्वचितच बसवितात. तरी पण हा कर प्राचीन काळीं रोमन साम्राज्यांत असल्याचें आढळतें. मात्र रोमन सरकारचा हा कर शेंकडा एक इतक्या कमी प्रमाणांत असे. आणि तो फार थोडा काळच होता. म्हणजे ऑगस्टस बादशहानें तो प्रथम सुरू केला आणि इ. स. ३८ मध्यें तो बंद करण्यांत आला. असल्या करास रोमन लोक नाखूष असत. असले कर 'युनैटेड किंगडममध्यें' प्रथम सिव्हिलवॉर ( यादवी युद्ध १६४९ ) नंतरच्या लोकशाही सरकारनें हॉलंडचें उदाहरण पाहून बसविले; व ते निरनिराळ्या प्रकारच्या दारूवर मुख्यतः होते. या कराचें एक निराळें स्वरूप म्हणजे परवान्याबद्दलची फी हें होय. शिकार करणारे, बंदुकी वापरणारे, लिलाववाल्याचा धंदा, फेरीवाले, पेटंट औषधें विकणारे, तंबाखू व तपकीर तयार करणारे वगैरे लोकांनां परवाने ( लायसेन्स ) देतांना फी म्हणून कर घेण्यांत येत असे. रोमन लोकांप्रमाणें इंग्रजहि असल्या करांनां नाखूष असत, ही गोष्ट इंग्रजी गद्य व पद्य वाङ्मयावरून स्पष्ट दिसते. डॉ. जॉनसननें आपल्या डिक्शनरींत इतर अनेक शब्दांप्रमाणें 'एक्साइज ' या शब्दाचीहि तत्कालीन राजकीय परिस्थितीची निदर्शक अशी व्याख्या केली आहे. ती अशीः—'जिनसांवर बसविलेला तिरस्करणीय असा, आणि ज्यांनी कर द्यावयाचा त्यांच्याच क्षुद्र भाडोत्री हस्तकांनीं ठरविलेला कर. ' ब्लॅकस्टोन नामक प्रसिद्ध कायदेशास्त्रपंडितानेंहि असें म्हटलें आहे कीं, 'अगदीं आरंभापासूनच या कराचें नांव इंग्लंडांतील लोकांनां द्वेषार्ह वाटत आलें आहे. ' तथापि १७।१८ व्या शतकाच्या मानानें हल्लीं या कराच्या पद्धतींत पुष्कळ सुधारणा झाली असून लोक तो संतोषानें देऊं लागले आहेत. नेपोलियनाबरोबरच्या युद्धामुळें ब्रिटिश सरकारला पैशाची टंचाई पडली; त्यावेळीं विटा, मेणबत्त्या, चिटें, कांच, कातडीं, कागद, मीठ, साबण व इतर अनेक जिनसांवर कर बसविण्यांत आला होता. ब्रिटिश दारूवर जकात १६६० मध्यें दर गॅलनास कांहीं थोडे पेन्स इतकी प्रथम बसविली. ती वाढतां वाढतां १८२० मध्यें दर गॅलनास ११ शि. ८॥ पेन्स इतकी झाली. व मिठावरील कर तर तिप्पटचौपट वाढविण्यांत आला होता. अलीकडे असल्या करांपासून होणारें उत्पन्न वाढत गेलें असून मजूरवर्गाच्या भरभराटीची ही उत्तम कसोटी आहे असें मानलें जातें.

'कस्टम्स'म्हणजे परदेशांबरोबरच्या व्यापारावरील जकात असा अर्थ असून तोच अर्थ पाश्चात्त्य देशांतल्याप्रमाणें हिंदुस्थानांतहि रूढ आहे.

**जॅक्सन अँड्रू** ( १७६७–१८४५ )—हा युनैटेड स्टेट्सचा सातवा प्रेसिडेंट वार्सा वसाहतींत इ. स. १७६७ त जन्मला. त्याचे आईबाप मूळ आयर्लंडामधून तिकडे रहावयास गेले होते. जॅक्सन हा स्वातंत्र्ययुद्धांत १७८१ मध्यें शत्रूच्या हातीं सांपडून कैदी झाला असतां त्याला वाईट रीतीनें वागविल्यामुळें पुढें मरेपर्यंत तो ग्रेटब्रिटनचा द्वेष करीत असे. पुढें त्यानें कायद्याचा अभ्यास करून १७८७ मध्यें वकिली सुरू केली. १७८८त फौजदारी कामांतील सरकारी वकिलाच्या जागीं याची नेमणूक झाली. १७९१ त त्यानें मिसेस रॅचेलशीं लग्न लावलें. तथापि त्यावेळीं तिच्या पहिल्या नवऱ्याच्या घटस्फोटाच्या बाबतींत कोर्टाचा निकाल झालेला नव्हता. तो पुढें दोन वर्षांनीं हीं दोघें एकत्र आगाऊच रहात असल्याचें जाणून कोर्टाला द्यावा लागला. जॅकसननें १७९६ त टेनेसी स्टेटची घटना करण्याच्या कामांत मदत केली. त्याच सालीं तो फेडेरल प्रतिनिधीसभेचा सभासद झाला. व १७९६ त सेनेटर झाला. १७९८–१८०४ पर्यंत टेनेसीमधील वरिष्ठ कोर्टांतील जज्जचें काम त्यानें केलें. यानंतर पुढें प्रेसिडेंटच्या जागीं निवड होईतोंपर्यंतच्या काळांत जॅकसननें लष्करांत नोकरी करून अनेक धाडसाचीं कृत्यें केलीं. मात्र खासगी वर्तनांत त्याचें अज्ञान, बेफामपणा, विक्षिप्तपणा, भांडखोरपणा, मूर्खपणा वगैरे अनेक दोष दिसून आले. स. १८०६ मध्यें तर त्यानें चार्लस डिकिन्सनला द्वंद्वयुद्धांत ठार मारलें. तो लष्करी अधिकारी होता, तेव्हां न्यू ऑर्लियन्स येथें तळ असतां त्यानें लष्करी कायद्याचा कठोरपणें अम्मल केला व विरोध करणाऱ्या एका जज्जाला हद्दपारीची शिक्षा दिली. तसेंच फ्लॉरिडा येथें असतां त्यानें दोन ब्रिटिश इसमांनां कैद करून ठार मारलें; त्यामुळें तें प्रकरण विकोपास जाणार होतें. पण फ्लॉरिडाच अमेरिकेनें विकत घेतला व जॅकसनला तेथें लष्करी गव्हर्नर नेमिलें. १८२४ सालांतील प्रेसिडेंटच्या निवडणुकींत तो पहिला आल्यामुळें त्याला प्रेसिडेंट निवडलें. जॅकसन कोणावरहि एकदम पूर्ण विश्वास टाकीत असे. त्यामुळें धूर्त व कावेबाज राजकारणी पुरुषांच्या हातांतील तो बाहुलें बनला. मात्र तरुण पिढीला जॅक्सनच्या अंगचे जोमदारपणा, उल्हास, कडवेपणा, रोखठोकपणा, स्पष्टवक्तेपणा वगैरे गुण फार पसंत पडले होते. व या पिढीच्या खटपटीनें तो पुन्हां १८२८ त प्रेसिडेंट निवडून आला. जॅक्सनच्या वेळींच प्रथम

डेमोक्रॅटिक ऊर्फ रिपब्लिकन पक्षांत दुफळी होऊन जॅक्सनपक्ष व ॲडम्सपक्ष असे दोन पक्ष झाले. जॅक्सन स्वतः हुडेल-हप्पी वृत्तीचा असल्यामुळें तो प्रधानांनां राजकीय सल्लामसलतींत न घेतां आपल्या खासगी दोस्तांच्याच सल्ल्यानें राज्यकारभाराच्या गोष्टी ठरवीत असे. अशी वागणूक होती तरीहि जॅक्सन १८३२ त पुन्हां प्रेसिडेंट निवडून आला. या सुमारास युनैटेडस्टेट्स बँकविरुद्ध कोणी त्याचे कान फुंकल्यामुळें तो ती बुडविण्याच्या उद्योगास लागला. या त्याच्या अरेरावी कृत्याबद्दल सेनेट सभेनें एक निषेधपर ठराव पास केला. तेव्हां त्या सभेशीं झगडा करून त्यानें तो ठराव कायदेबुकांतून काढून टाकविला. नेपोलियनच्या 'काँटिनेंटल सिस्टिम'मुळें झालेल्या नुकसानभरपाईची रक्कम बऱ्याच यूरोपीय राष्ट्रांकडून त्यानें जरबेनें वसूल केली. याच सुमारास सर्व राष्ट्रीय कर्जाची फेड करून उरलेली ३५०००,००० पौंडांची जादा शिल्लक रक्कम एकंदर संस्थानांनां सार्वजनिक खर्चाकरितां त्यानें वाटून देवविली. याच वेळीं त्याची अध्यक्षपणाची मुदतहि संपली.जॅक्सन स्वतः गरीब कुलांत जन्मला असल्यामुळें तो गरीब वर्गाचा पुढारी बनला. त्यामुळें तो प्रेसिडेंटची जागा सोडल्यावर पूर्वीपेक्षांहि अधिक लोकप्रिय झाला. अखेर १८४५ जून ८ रोजीं तो मरण पावला. [ संदर्भग्रंथः—एनसायक्लो. ब्रिटा. भा. १५ ]

**जॅक्सन व्हिले शहर**—फ्लॉरिडामधील (अमेरिका) ड्यूव्हल विभागांतील हें एक मुख्य ठिकाण. "सेंट जॉन" नदीच्या दक्षिण तीरावर संस्थानाच्या ईशान्य दिशेस वसलेलें आहे. याची लोकसंख्या २८४२९ आहे. त्यांपैकीं, १६२३६ नीग्रो व ११६६ परकीय आहेत. शहर "फ्लारिडा" संस्थानांत सर्वांत मोठें असून शहराशीं आगगाड्या व बोटींचें दळणवळण आहे. रेल्वेचें हें मुख्य ठिकाण असल्यामुळें शहराला "फ्लॉरिडाचें प्रवेशद्वार" असें म्हणण्यांत येतें. येथें बऱ्याच सुबक व प्रेक्षणीय इमारती आहेत. दिसण्यांत शहर फार मोहक आहे. नीग्रो लोकांकरितां स्थापन केलेलीं दोन विद्यालयें 'फ्लॉरिडा बॅप्टिस्ट ॲकॅडमी' व 'कुकमन्स इन्स्टिट्यूट' प्रसिद्ध आहेत.शहरालगतचें फ्लॉरिडा ऑस्ट्रिच फार्म प्रेक्षणीय आहे. उद्योगधंद्याच्या दृष्टीनें शहर फार महत्त्वाचें असून येथें कारखाने बरेच चालतात. कारखान्यांचें एकंदर उत्पन्न ( इ. स. १९०५ ) ५३४०२६४ डॉलर होतें. १९०९ सालीं येथील ( मालाची ) निर्गत २५०४३७३ डॉलर व आयात ५१३४३९ डॉलर किंमतीची होती. व्यापारी नेआणीचें हें महत्त्वाचें ठिकाण आहे. १८३३ सालीं येथें कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत आली. व्यापारामुळें शहर भरभराटीस येत आहे. येथील हवा थंड असल्यामुळें बरेच लोक हिवाळ्यांत येथें मुक्कामास असतात.

**जखमा**—त्वचेचा भंग होऊन ती विदीर्ण होते त्यास हें नांव आहे. तथापि ठेंचाळणें, मुरगळणें, व त्यामुळें अंग काळेनिळें होणें या इजांमध्यें त्वग्भंग नसला तरी आंतील मांसल भागास त्यायोगें जखमा झालेल्या असतात. जेथें त्वचा विसविशीत असते तेथें सूज व काळेनिळें विशेष होतें. पण शरीराचे जे भाग कठिण आहेत तेथें हीं लक्षणें प्रमुख नसतात. आंतील मांसल भागांत केशवाहिन्या फुटून रक्तस्राव होतो हें या काळेनिळेपणाचें कारण व तें पुढें हिरवें पडून नंतर नाहींसें होतें. हा रक्तस्राव बराच असल्यास त्यास रक्तगांठ म्हणतात. ठेंचाळलेल्या भागास उपचारः—त्यावर थंडगार पट्टी ठेवावी. म्हणजे त्वचेखालील रक्तस्राव थांबतो. बहुशः सर्व प्रकारच्या लहानमोठ्या ठेंचाळण्यांतलि सांखळलेलें रक्त जिरून नाहींसें होतें. पण कधीं कधीं मात्र त्यामध्यें पूयवृद्धि होते व मग तें गळवाप्रमाणें फोडावें लागतें. अशा प्रकारच्या जखमांनां अव्यक्त जखमा म्हणावे व पहिल्या प्रकारच्या जखमांस व्यक्त जखमा म्हणावें. त्यांचे भेद असे आहेत. (१)शस्त्रव्रण,(२)विदीर्णव्रण, (३)विद्ध किंवा छिद्रितव्रण आणि (४) गुलीप्रक्षेपिणीव्रण. ( १ )शस्त्रव्रणाच्या बाजू साफ कापलेल्या असून रक्तवाहिन्याहि कापल्या गेलेल्या असतात ( २ ) ज्या जखमांच्या दोन्ही बाजू साफ कापल्या नसून तुटक्या असतात त्यांनां हें नांव आहे. यंत्रें अगर बिनधारेच्या मोठ्या यंत्रांचा आघात बसून या होतात. ( ३ ) विद्धव्रण म्हणजे जखमेच्या रुंदीपेक्षां खोली अधिक असते त्यास म्हणतात व अणकुचीदार शस्त्राच्या योगानें तो केला जातो. त्यापासून रक्तवाहिनी फुटल्यामुळें उदर, छातींतील एखाद्या महत्त्वाच्या इंद्रियास जखम होण्याचा संभव असतो. शिवाय या असल्या जखमांत नकळत दूषित जंतू तेव्हांच शस्त्रमार्गे अगर अन्य तऱ्हेनें जातात, व ती जखम बिघडते. या खोल जखमा खोलपर्यंत नीट दोन्ही बाजू शिवतां न आल्यामुळें नीट भरून येत नाहींत.

पाश्चात्य उपचारः—शस्त्रव्रण चांगला साफ करून रक्त थांबविणें व आंत कांच, शस्त्राचें टोंक वगैरे बाह्यपदार्थ असतील ते काढून दोन्ही बाजू रेशमी दोऱ्यानें, क्याटगटनें, किंवा रौप्य तारेनें शिवतात. दूषित जंतू आंत राहिले नसले तर जखमेच्या दोन्ही बाजू मिळून येऊन वांकडा तिकडा वण तेथें न रहातां व्रणविरोपण होतें. ( २ ) विदीर्ण व्रणांत पू होणें, कुजणें, धावरें होणें किंवा धनुर्वात यांपैकीं कांहीं होण्याचें भय असतें. या जखमा वाकडे तिकडे वण राहून बऱ्या होतात. व त्या बऱ्या होण्यास वरील दोष असतील किंवा नसतील त्या त्या मानानें अधिक किंवा कमी वेळ लागतो. असल्या जखमा स्वच्छ करण्यास कठिण जातात. त्यासाठीं कारबालिक आसीडाच्या धावनाचा उपयोग करावा व वेडेवांकडे फाटलेले, तुटलेले जखमेचे भाग कातरून काढून जखमेंतून निचरा होण्यासारखी तजवीज करावी. अशा जखमांनां एकदम टांक्यांनीं शिवून टाकणें बरें नव्हे; तर त्यांत आयडोफार्मचा जाळीदार बोळा घट्ट बसवून कांहीं दिवसांनीं जखम लाल व निरोगी दिसूं लागली व जखमेच्या तोंडापर्यंत भरून

आली म्हणजे येथें दुसरीकडील चामडी बसवून लवकर जखम बरी करावी. अशा जखमांतील मांस सडण्यास आरंभ झाला किंवा आंत अस्थिभंग अथवा अस्थीवरील मांसस्थान भ्रष्ट झाले असेल व जखम दूषित झाल्याचीं लक्षणें उघड असलीं तर तो भागच ( हात, पाय, बोट इ. ) कापून काढणें जरूर असतें. ( ३ ) विद्ध जखमांत आगंतुक कण, पदार्थ वगैरे शिरले असतील ते कारबालीक धावनाच्या पिचकाऱ्यांनीं बाहेर आणावेत. क्ष किरणांच्या योगानें सुया वगैरे पदार्थ कोठें अडकून मांसांत बसले असतील ते अगोदर निश्चित करतां आल्यानें बराच त्रास वांचतो. जखमेंत एखादी रक्तवाहिनी फुटली असल्यास ती अगोदर बांधावी, व त्यासाठीं जरूर तेवढी जखम आणखी मोठी करावी. हात, पाय, लुला पडल्यास एखादा मज्जातंतु तुटला असेल त्याचीं टोंकें जोडून शिवावीं. नंतर निचरा होण्यास पुरेशी तजवीज ठेवून जखमेंत आयडोफॉर्मयुक्त जाळीचा बोळा घट्ट बसवावा. (४) बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमा— जर त्या मॉसर किंवा ली मेटफर्ड असतील तर त्यांत रक्तस्राव फारसा नसतो. जेथें गोळी शिरते तेथें बारिक छिद्र असतें व बाहेर पडते तेथें भेग असते. घाणेरड्या कपड्यांच्या योगानेंच कायती ही जखम बिघडण्याचा संभव असतो, किंवा आंत एखादी रक्तवाहिनी फुटली असल्यास ती अगोदर बांधून घ्यावी लागते. या गोळया फक्त माणूस जायबंदी करतात. व त्या प्राणघातक नसतात. थोडे अपवाद वगळले असतां हाडांतूनसुद्धां ही गिरमिटानें सुंदर वाटोळें छिद्र पाडल्याप्रमाणें आरपार निघून जाते पण अस्थिभंग होत नाहीं. एखाद्या वेळीं मात्र हाडांचा चुराडा होतो. उदरांत व आंतड्यांत गोळी शिरली असतां शेजारील आंतडें त्या गोळीनें झालेल्या बारीक छिद्रास चिकटतें व भोंक बुजतें. भयंकर व मोठीं छिद्रें पाडणारी गोळी हेन्री मार्टिनीची. डमडम गोळी शरीरांत रुतून बसून फुटून पसरून मांस अस्थींचा फार नाश करते. कुलपी गोळे फुटून विदीर्ण जखमा करतात. छरे डोळ्यासारख्या ठिकाणीं लागले तर भयंकर इजा करतात. त्वचेला गोळी लागून गेल्यास त्वचा भाजल्यासारखी काळी होते. या गोळ्यांपासून रक्तस्राव, मेंदूस धक्का व जखम दूषित होणें हीं तीन मुख्य भयें असतात.

**आ यु र्वे दी य चि कि त्सा**:—ज्या जखमेंत तीव्र व्यथा असेल ती तावडतोब जेष्ठमधाचें तूप किंवा बलातेल किंचित् ऊन करून त्यानें शेकावी. त्यावेळीं क्षतांतील ऊष्मा वाढलेला असतो तो कमी करण्याकरतां तुरट, थंड, मधुर, व स्निग्ध असे लेप करावे. लांब लांब असलेल्या जखमा सांधण्याकरतां त्यांवर विशेषेंकरून मध तूप लावावें आणि पित्तनाशक थंड उपचार करावे. ज्या जखमांत क्षोभ झाला असेल त्यांवर वमन, विरेचन, उपास, पथ्यभोजन, रक्त काढणें हे उपाय करावे. घृष्ट व विदलित यांवर हेच उपाय विशेषतः करावे. कारण त्यांत रक्तस्राव कमी झाल्यामुळें त्या जखमा फार लौकर पुवळतात. बाकीच्या जखमांत बहुधा रक्त अतिशय जातें. रक्तक्षयानें वायु कुपित होऊन अतिशय वेदना करूं लागतो. त्यावर स्नेहपान, परिषेक, शेक, आणि वातनाशक औषधांनीं सिद्ध केलेला स्नेहबस्ती हे उपाय करावे. याप्रमाणें ही सात दिवसांची जखमेची चिकित्सा सांगितली. सात दिवसांनीं त्याचा क्षोभ कमी झाला कीं पूर्वी सांगितलेली व्रणाची चिकित्सा करावी.

ही सामान्य चिकित्सा आहे. विशेषेंकरून घृष्टांत (घांसलेल्या जागीं ) लगेच ठणका बंद करून वर चूर्ण लावावीं. अवकृत्तावर कल्क लावावें. विछिन्न व प्रविलंबित यांवर योग्य रीतीनें शिवून कापसाची घडी बसवून दाबून बांधावें. डोळा फुटला असल्यास तो बरा होत नाहीं, न फुटतां लोंबत असल्यास शिरांस इजा न होईल अशा रीतीनें तो जागच्या जागींच बसवून त्यांवर कमळाचें पान ठेवून हातानें दाबावा. नंतर त्यावर शेळीच्या तुपाचें सेचन, नस्य व तर्पण करावें. हें सर्व प्रकारच्या डोळ्यांतील आघातांवर हितावह आहे. गळा दाबल्यामुळें डोळा खोल गेला असल्यास वांति आणणें, उम्हासे आणणें, शिंका आणणें, श्वास बंद करणें, आणि फुटक्या डोळ्यांवरील उपाय हे करावे. कान तुटून पडला असल्यास तो शिवून तेल लावावें. वाटी कापली असून त्यांतून वायू जरी बाहेर येत असला तर ती जागच्याजागीं सारखी बसवून जवळजवळ टांके मारून बांधावी. त्यावर शेळीच्या तुपाचें सेचन करावे. रोग्यांस उताणा हालूं न देतां निजवावा आणि निजल्यानिजल्याच खाऊं घालावें. हातापायांस आडवा व तिरपा घाव लागल्यास तो नीट जेथल्या तेथें बसवून शिवून तेथें जाड व घट्ट वस्त्र वाटोळें गुंडाळून बांधावे. जखम बरोबर जुळत नसल्यास चामड्याचा गोफणाबंध करावा. अंडास आघात लागल्यानें ते, लोंबू लागलें असतां पायांवर व डोळ्यांवर पाणी शिंपडून अंड नीट बसवून तुन्नसेवनी नामक शिवणीनें शिवून कंबरेस पट्ट बांधून अंडास गोफणाबंधानें बांधून अडकवून ठेवावें. यांवर स्नेहाचें सेचन करू नये. कारण स्नेहानें तेथील व्रणांत पू होतो.

हातपाय साफ तुटून पडला असल्यास त्याचें थोटूक ( राहिलेला भाग ) युक्तीनें तेलानें भाजून त्यास टोपीसारखा बंध बांधावा आणि नंतर व्रणाप्रमाणें उपचार करावे. विद्धावर ( कोठ्याशिवाय इतर ठिकाणीं टोंचलें जाणें ) आंतील शल्य काढून व्रणाप्रमाणें चिकित्सा करावी. विदलितावर भंगाप्रमाणें चिकित्सा करावी. डोक्यांत शल्य गेलें असल्यास तें काढून त्या ठिकाणीं व्रणांत केसांची वळकटी घालावी. ती न घातल्यास मेंदूचा स्राव होऊन त्यामुळें कुपित झालेला वायू रोग्यास मारतो. जसजसा व्रण भरत जाईल तसतसा हळूहळू एक एक केस काढून टाकावा आणि कदाचित मेंदूचा स्राव झाल्यास ती उणीव भरून काढण्याकरितां दुसऱ्या प्राण्यांचे मेंद खावे. डोक्याशिवाय इतर ठिकाणीं

लागलेलें शल्य काढून टाकून त्या ठिकाणीं स्नेहांत बुडविलेली वात घालावी. फार लांब व खोल गेलेलें बारीक तोंडाचे आणि ज्यांतून रक्त वाहिलें आहे अशा व्रणांत बारीक तोंडाच्या पिचकारीनें ताजें कढत कढत तिळांचें तेल घालावें.

शल्यानें कोठा फुटून आमाशयांत रक्त जमलें असल्यास वमन आणि पक्वाशयांत रक्त जमल्यास विरेचन व स्नेहरहित उष्ण अशा रेचक औषधांचा बस्ती द्यावा. जव, बरी व कुळीथ यांच्या कढणाबरोबर अन्न खावें. ज्याचा कोठा फुटून फार रक्त गेलें आहे, त्यानें दुसऱ्या प्राण्यांचें रक्त प्यावें. कोठा फुटण्याचे दोन प्रकार आहेत. एकांत आंतडें ठेंचलें जातें व दुसऱ्यांत फाटतें. पहिल्यांत वर सांगितलेले मूर्छादि विकार कमी असतात आणि दुसऱ्यांत ते अतिशय बाधक होतात. पहिल्या विकाराचा रोगी कदाचित दैववशात् जगतो परंतु दुसऱ्या प्रकारचा रोगी कधींच जगत नाहीं. ज्याचें मल, मूत्र व वायु हे आपआपल्या नेहेमींच्या मार्गानें जात असतात आणि ज्यास पूर्वोक्त मूर्छादि उपद्रव नसतात त्याचा कोठा फुटला असला तरी तो खात्रीनें जगतो.

आंतडें न फाटतां बाहेर आलें असल्यास तें आंत घालावें, फाटलें असल्यास घालूं नये. परंतु याविषयीं कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं फाटलेल्या आंतड्यास डोंगळे डसवून त्यांचीं तोंडें आंत रुतलीं म्हणजे बाकीचें अंग काढून घेऊन मग तें आंतडें आंत लोटावें. आंतड्यास गवत, रक्त, व धुराळा लागलेला असल्यास तो पाण्यानें धुवून तूप लावून हाताचीं नखें काढून आंतडें हळू हळू आंत सारावें. आंतडें वाळलें असल्यास दुधानें भिजवून पुष्कळसें तूप लावून आंत घालावें किंवा बोट घशांत घालून फिरवावें. अथवा अंगावर पाणी शिंपडावें; म्हणजे त्या योगानें आंतडीं आपोआप आंत जातात व आकुंचित होतात. व्रण लहान असल्यामुळें तीं कोठ्यांत शिरत नसल्यास त्यांच्या मानानें पोट फाडून आंत ढकलावीं.

तीं जागच्या जागीं बसलीं म्हणजे मग व्रणास टांके मारावे. आंतडें जेथल्या तेथें न बसल्यास कुपित होऊन मनुष्यास मारतें. व्रण शिवल्यावर पोटासभोंवतीं पट्टा बांधून वर तूप सोडीत रहावें. नंतर मळास नरमपणा येण्याकरितां व वायू खालीं सरण्याकरितां त्यास तापलेल्या कोमट दुधांत दंती फळांचें तेल घालून तें पाजावें. नंतर वर्षभर पूर्वी सांगितलेलें व्रणाचें पथ्य पाळावें. पोटावर आघात होऊन त्यांतून मेदाची वळकटी बाहेर आल्यास तिच्यावर राख किंवा माती अथवा तुरट मुळ्यांचें वस्त्रगाळ चूर्ण टाकून सारखें घट्ट बांधून कुशल वैद्यानें अग्नीनें तापविलेल्या तीक्ष्ण शस्त्रानें मोठ्या शिताफीनें एकदम झटक्यासरसें कापून टाकावें. सावकाश कापीत बसल्यास पोटांत कळा व गुडगुड उत्पन्न होईल, किंवा कदाचित् मृत्यूहि येईल. बरोबर कापल्यावर व्रणास मध लावून तो बांधावा. आघात कोठें झाल्याचें कळत नसल्यास किंवा वेडा वाकडा अथवा उंचावरून पडल्यास वातरक्तहारक तर्पण, मर्दन, अभ्यंग वगैरे उपाय करावे. ज्याचें शरीर ठेंचलें आहे किंवा मर्मावर आघात झाला आहे त्यास मांसरसाचें जेवण घालून तेलाच्या पिपांत बसवावें.

**जगजीवनदास**—हा चंदेल ठाकूर जातीचा 'सत्नामी' नामक हिंदु पंथाचा आद्य प्रवर्तक होय. उत्तर हिंदुस्थानांत 'सत्नामी' या नांवानें ओळखिले जाणारे कमींत कमी तीन पंथ आहेत. (सत्नामी पहा). एका पंथाचा संस्थापक हा जगजीवनदास होय. हा इ. स. १६८२ सालीं लखनौपासून ४० मैलांवर असलेल्या सरदह गांवीं जन्मला. तो सहा महिन्यांचा झाला तेव्हां त्याच्या बापाचा गुरु बिशेश्वरपुरी यानें आपली घोंगडी त्याच्यावर टाकतांच केशरी तिलक त्याच्या कपाळावर उठला. तो आपला गांव सोडून फारसा गेला नाहीं. जगजीवनदास मूळ कबीरपंथाचा होता असें म्हणतात, व त्यानें काढलेला पंथहि त्याच पंथासारखा व्यापक आहे. त्यानें आपल्या पंथाचा 'अघविनाश' नांवाचा पवित्र ग्रंथ पद्यात्मक रचला आहे. याशिवाय त्याचीं ज्ञानप्रकाश (काल सुमारें १७६१), महाप्रलय व प्रथमग्रंथ इत्यादि पुस्तकें आहेत. मरणापूर्वी सुमारें दहा वर्षें जगजीवनदास यानें सरदह गांव सोडलें व तो तेथून पांच मैलांवर असलेल्या कोटवा गांवीं जाऊन राहिला. या ठिकाणीं तो इ. स. १७६१ सालीं मरण पावला.

जगजीवनदास बाबा याचे निरनिराळ्या जातींचे चार मुख्य शिष्य असून चौदा इतर शिष्य होते. या पंथाचे नुसत्या संयुक्त प्रांतांत सुमारें ७५००० लोक आढळून येतात. कोटवा हा गांव बाबा व त्याचे वंशज यांस इनाम असून त्या ठिकाणीं वैशाख व कार्तिक आमावास्येच्या दिवशीं मोठ्या जत्रा भरतात. सत्नामी पंथाची माहिती स्वतंत्र दिली आहे. [इं. अँ. पु. ८; क्रूक; नेव्हिल–बाराबंकी गॅ; विल्सन–स्केच ऑफ दि रिलिजिअस सेक्ट्स ऑफ दि हिंदूज].

**जगत्याल** (जगतियाल) ता लु का:—हैद्राबाद संस्थानांत करीमनगर जिल्ह्यांत हा तालुका आहे. क्षेत्रफळ ८६० चौ. मै. येथील लोकसंख्या (१९११) ४६८२८ होती. ह्या तालुक्यांत तीन गांवें व २३५ खेडीं आहेत. जमीन सुपीक असून महसूल सन १९०१ सालीं ३.९ लाख रुपये होता. येथें तांदुळ तलावाच्या पाण्यानें पुष्कळ उत्पन्न होतो.

गां व.—जगत्याळ तालुक्याचें मुख्य ठिकाण. येथील लोकसंख्या १९११ सालीं ११६८८ होती. ह्याच शहराजवळ जाफरुद्दौला नांवाच्या सरदारानें सन १७४७ त बांधलेला जुन्या काळचा प्रसिद्ध किल्ला आहे. येथें साळी लोक रेशमी लुगडीं तयार करतात. ह्या शहरीं सरकारी शाळा व दवाखाना आहे.

**जगदलपूर**, ता लु का.—वऱ्हाड–मध्यप्रांत. बस्तर संस्थानांतील मध्यवर्ती तालुका. उ. अ. १९°–३०' ते

१८°–३५′ व पू. रे. ८०°–३०′ ते ८२°–१५′. क्षेत्रफळ २६०८ चौ. मै. लोकसंख्या १,३०,५८२. यांत ७४३ गांवें असून २ पोलिस ठाणीं, सहा पोलिस चौक्या आणि एक इन्स्पेक्शन बंगला आहे. या तालुक्याच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत टेंकड्यांच्या रांगा आहेत. सावरी नदी जैपूर जहागीर व हा तालुका यांमधील सरहद्द झाली आहे. तीन-चतुर्थांश भाग जंगलानें व्यापला असून त्यांत साग व साल विपुल आहे. मुख्य पीक तांदळ आहे. वस्ती मारिया, मुरीया, परजा, भत्रा लोकांची आहे.

गां व—बस्तर संस्थानच्या राजधानीचें गांव. इंद्रावतीच्या तीरावर असून येथील लोकसंख्या ४६८१ आहे. येथील मुख्य इमारती नवा राजवाडा, इस्पितळ, कचेऱ्या, तुरुंग व शाळा. येथें मुलींकरितां व हलक्या जातींच्या मुलांकरितां शाळा आहेत. येथें व्यापाराची मोठी पेठ असून मोठमोठ्या पेढ्या आहेत. गांवासभोंवार असलेला पूर्वीचा खंदक कांहीं दिवसांपूर्वी शहरच्या आरोग्याकरितां बुजविला आहे. जवळच एक समुंदर नांवाचा टुमदार तलाव आहे.

**जगदीशपूर**—( १ ) हें शहर बंगालमध्यें शहाबाद प्रांतांत आहे. येथील लोकसंख्या ( १९११ ) ८९२४ आहे. येथें साखरेचा कारखाना जोरांत चालतो. येथें एक म्युनिनिसिपालिटी आहे.

( २ ) ह्या नांवाचें दुसरें शहर मध्यप्रांतांत जशपूर संस्थानांत आहे.

**जगन्नाथ**—एक मराठी कवि. हा सतराव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेला. याचें " शशिसेनाकाव्य " स्वतंत्र पद्धतीनें रचिलेलें आहे. त्यांतील कथानक नवीन असून बायरन, स्कॉट वगैरेंच्या पद्यकथांची आठवण करून देतें. या काव्याशिवाय पौराणिक आख्यानांवर व वेदांतविषयावरहि या कवीची बरीच रचना आहे. बोधवैभव, ज्ञानबत्तिशी, वाक्यसुधा आणि भगवद्गीता यांवर टीका आहे. [महाराष्ट्रसारस्वत].

**जगन्नाथपंडित**—या प्रसिद्ध संस्कृत कवीसंबंधींची विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. याच्या संबंधींच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. पण ऐतिहासिकदृष्टया त्यांची फारशी किंमत नाहीं. याच्या ग्रंथांमध्येंच याच्याविषयीं जी माहिती मिळते तेवढीच विश्वसनीय मानणें जरूर आहे.

भामिनीविलासाच्या व प्राणाभरण ग्रंथाच्या शेवटीं व आसफविलासाच्या प्रारंभीं जो मजकूर आला आहे त्यावरून तो तेलंगीय वेंगीनाडि नांवाच्या ब्राह्मणकुलांत जन्मला असें दिसतें. [ तैलंगान्वय मंगलालय ( प्राणाभरण ); तैलंग कुलावतंसेन जगन्नाथेन ( आसफविलास ) ]. रसगंगाधरांतील श्लोकावरून त्याच्या बापाचें नांव पेरुभट्ट व आईचें नांव लक्ष्मी होतें असें कळून येतें. पेरुभट्ट हा फार विद्वान होता. त्यामुळें जगन्नाथाला आपल्या पित्यापासून सर्व शास्त्रांची पूर्ण माहिती झाली. पुढें वयांत येतांच कोणा तरी राजाचा आश्रय मिळावा या हेतूनें तो कर्नाटकच्या राजाकडे गेला. पण तेथें त्याची मान्यता झाली नाहीं. त्यामुळें तो जयपुरास येऊन तेथें त्यानें संस्कृत शाळा काढली. पुढें तो शहाजहान बादशहाकडे गेला व त्याला आपलें काव्यकौशल्य व अगाध ज्ञान पटवून देऊन त्याचा आश्रय जगन्नाथानें मिळविला. त्याला शहाजहान बादशहानें पंडीतराज ही पदवी दिली होती. दिल्ली दरबारांत एका घमेंडखोर काजीशीं पंडिताचा वाद होऊन त्यानें काजीचा पराभव केला व त्यामुळें शहाजहान बादशहा त्याच्यावर फार संतुष्ट झाला असें म्हणतात. काजीशीं वाद करावयासाठीं जगन्नाथ पंडितानें फारसी व उर्दू भाषांचा अभ्यास केला. या भाषेवरील त्याचें प्रभुत्व त्याच्या ग्रंथांत आढळून येतें. शहाजहानाची मुलगी लवंगी हिच्यावर त्याचें प्रेम जडलें होतें व लवंगीचेंहि मन जगन्नाथाच्या रूपामुळें मोहित झालें होतें. पुढें त्याचें लवंगीशीं लग्न झालें व त्यानें आपला काळ बराच सुखांत घालवला. पुढें त्यास उपरति प्राप्त झाली व तो काशीस आला. तेथील पंडितांनीं त्यास लवंगीसह प्रायश्चित देऊन आपल्या जातींत घेण्याचें नाकारलें. तेव्हां त्यानें गंगेचें आराधन केलें व गंगेनें त्या दोघांनां दर्शन देऊन त्यांचा उद्धार केला अशी आख्यायिका आहे.

ग्रं थ.—जगन्नाथ पंडिताचे ( १ ) अमृतलहरी, ( २ ) आसफविलास, ( ३ ) करुणालहरी, (४) चित्रमीमांसाखंडन, ( ५ ) जगदाभरण, ( ६ ) पीयूषलहरी, ( ७ ) प्राणाभरण, ( ८ ) भामिनीविलास, ( ९ ) मनोरमाकुचमर्दिनी, ( १० ) यमुनावर्णन, ( ११ ) लक्ष्मीलहरी, (१२) सुधालहरी, (१३) रसगंगाधर इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत. अमृतलहरींमध्यें यमुनेची स्तुति केलेली असून हा ग्रंथ काव्यमालेंत प्रसिद्ध झाला आहे. आसफविलासात नबाब आसफखानाचें चरित्रवर्णन आलेलें आहे. हा ग्रंथ संपूर्ण उपलब्ध नाहीं. करुणालहरींत विष्णूची स्तुति केलेली आहे व हा ग्रंथ काव्यमालेंत प्रसिद्ध झाला आहे. अप्पया दीक्षितांचा चित्रमीमांसा नांवाचा ग्रंथ आहे. त्याच्यांतील दोषांचें खंडन करण्यासाठीं चित्रमीमांसाखंडन हा ग्रंथ जगन्नाथानें लिहिला. जगदाभरणांत दाराची स्तुति आलेली आहे. याची एक प्रत कोटाच्या राजाच्या पदरीं असलेल्या गंगावल्लभ नांवाच्या पंडितापाशीं असल्याचा उल्लेख दुर्गादासानीं रसगंगाधराच्या प्रस्तावनेंत केला आहे. पीयूषलहरी उर्फ गंगालहरी हें प्रसिद्ध काव्य गंगेच्या स्तुतिपर आहे. हें काव्य फार लोकप्रिय आहे. ग्रंथांतील कविता सुंदर व कल्पनाप्रचुर आहे. गंगेच्या प्रशांत प्रवाहाप्रमाणेंच गंगानदीच्या स्तुतीचा प्रवाह या काव्यांत गम्भीरपणानें वहात असलेला दिसतो. प्राणाभरण काव्यांत आसामचा राजा प्राणनारायण याच्या संबंधींची प्रशंसा आलेली आहे. हेंहि काव्य काव्यमालेंत छापण्यांत आलेलें आहे. भामिनीविलास हा तर जगन्नाथपंडितांचा अतिप्रसिद्ध ग्रंथ होय. यामध्यें त्याच्या स्फुट काव्यांचा संग्रह असून हीं काव्यें फार सुंदर आहेत. या ग्रंथांची अन्योक्तिविलास,

शृंगारविलास, करुणविलास, व शांतविलास हीं चार प्रकरणें असून तीं बोधपर व मनोरंजक आहेत. शांतविलासांत परमेश्वराची केलेली स्तुति फार प्रेमळ व हृदयंगम आहे. करुणविलासांतील त्याचे श्लोक सहजसुंदर व हृदयाला पाझर फोडणारे आहे. अन्योक्तिविलास बोधपर व रसभरीत आहे. शृंगारविलासांत स्त्रियांचें मनोरम वर्णन आहे. मनोरमाकुचमर्दिनी हा ग्रंथ भट्टोजी दीक्षितांच्या प्रौढ मनोरमा या व्याकरणविषयक ग्रंथाचें खंडन करण्याकरितां त्यानें लिहिला. यमुनावर्णन हा ग्रंथ गद्यांत लिहिलेला असून त्यांत यमुनेची स्तुति केलेली आढळते. लक्ष्मीलहरी व काव्यलहरी यांचें काव्यमालेंत मुद्रण झालेलें आहे. सर्वांत प्रसिद्ध असा याचा ग्रंथ म्हणजे रसगंगाधर हा होय. हा ग्रंथ अपूर्ण आहे. यांत अलंकारशास्त्राचें विवेचन आलेलें आहे. या ग्रंथावरून जगन्नाथाची अलंकारशास्त्रांतलि पारंगतता दिसून येते. या ग्रंथाशिवाय शशिसेना, पंडितराजशतक हे दोन ग्रंथ यानें लिहिले असें म्हणतात. पण त्याला पुरावा मिळत नाहीं.

जगन्नाथ नांवाचे दहाबारा पंडित होऊन गेले व त्यांचीं काव्यें व ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यामुळें त्यांच्या काव्यांची सरमिसळ होण्याचा संभव आहे. जगन्नाथपंडिताच्या ग्रंथांविषयीं व्हावा तितका अभ्यास झालेला नाहीं यांचें कारण कळत नाहीं. पण याच्या ग्रंथाचें अवलोकन केल्यास तो उत्तम कवि व पंडित होता असें दिसून आल्याशिवाय रहात नाहीं. रसगंगाधर, मनोरमाकुचमर्दिनी, चित्रमीमांसाखंडन या ग्रंथांवरून जगन्नाथाची असामान्य विद्वत्ता कुशाग्र बुद्धि, प्रशंसनीय व्यवहारचातुर्य, अलौलिक प्रसंगावधान इत्यादि गुण दिसून येतात. माधुर्यपदलालित्यादि काव्यपोषक गुण याच्या काव्यांत ओतप्रोत भरलेले आहेत. याचे गद्यलेख देखील जोरदार व उत्कृष्ट आहेत. याचीं काव्यें वाचतांना बिल्हण अगर जयदेव या कवींची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. प्रसाद हा याच्या काव्याचा मुख्य गुण आहे. हा विषयी व उद्दाम होता असें दिसतें.

जगन्नाथपंडिताच्या कालासंबंधानें थोडासा मतभेद आहे. भामिनीविलासटीकाकार वैद्यांच्या मतें जगन्नाथ हा अकबराच्या काळीं नसून शहाजहानाच्या वेळीं असावा दिसतें. पण आपटे ( सार्थ भामिनीविलास ) म्हणतात कीं हा अकबराच्या व शहाजहान बादशहाच्या, दोघांच्याहि काळीं असावा. तें कसेंहि असो, शहाजहान बादशहाच्या पदरीं हा कवि होता हें सर्वसंमत आहे. अप्पय्या दीक्षित व भट्टोजी दीक्षित यांच्या उल्लेखावरून हीच गोष्ट सिद्ध होते.

[ सं द र्भ ग्रं थ.—अर्वाचीन कोश; रसगंगाधर ( काव्यमाला ); भामिनीविलास, ( काव्यमाला ); भगवंत गोविंद तोडेवाले- पंडित जगन्नाथराय ( १९१६ ); वैद्य-भामिनीविलास टीका; शि. म. परांजपे; भामिनीविलास; दत्तात्रय अनंत आपटे—सार्थ भामिनीविलास; लक्ष्मणशास्त्री लेले—महाराष्ट्रछाया ].

**जगन्नाथपुरी**—‘ पुरी ’ पहा.

**जगन्नाथ शंकरशेट, मुर्कुटे** ( १७२५-१८६५ )—मुंबईचे एक दानशूर गृहस्थ. जात-दैवज्ञब्राह्मण; जन्म माघ वद्य १३ शके १७२५; लोकांत शिक्षण प्रसार करण्यासाठीं १८२२ त जी मंडळी स्थापन झाली तींत हे प्रमुख होते. त्यांच्या परिश्रमानें एतद्देशीयांनां १८२९ त ग्रॅन्ड ज्यूरींत बसण्याचा, १८३२ त जे. पी. होण्याचा, आणि १८४४ त रॉयल एशियाटिक सोसायटींत शिरण्याचा हे हक्क मिळाले. मुंबईच्या त्या वेळच्या बहुतेक सर्व सार्वजनिक चळवळींत यांचें प्रमुखत्वानें अंग असे; यांनीं मुलांची व मुलींची अशा शाळा काढल्या व त्याप्रीत्यर्थ ३० हजार रुपये दिले. तेच पुढें यांच्या चिरंजीवानीं ‘ जगन्नाथ शंकर शेट ’ शिष्यवृत्तीस दिले; यांनीं लोकोपयोगी कामांत पुष्कळच पैसा खर्च केला. राज्यकर्त्यांपुढें आपलें म्हणणें चांगलें मांडतां यावें म्हणून १८५२ त बॉंबे असोसिएशन काढली; १८६१ त एतद्देशीयांनां लेजि. कौन्सिलांत बसण्याचा हक्क मिळाला व त्यांत त्यांची स्वतःची निवडणूक झाली. यांनीं धर्मार्थ दवाखाने काढले, धर्मशाळा बांधिल्या व विहिरी खणल्या. हे सर्व जातीस फार प्रिय होते; सर फ्रेडरिक लिओपोल्ड आर्थर यांनीं आपल्या दुसऱ्या मुलाचें नांव ‘लिओनार्ड राबर्ट शंकर शेट’ असें ठेविलें; मुंबईतील हिंदु स्मशानभूमि प्रस्तुत जागेवरून दुसरीकडे न जाण्यांत यांचे परिश्रम बरेच कारणीभूत झाले. मुंबईतील लोकांनीं सार्वजनिक वर्गणीनें यांचा भव्य पुतळा टाऊन हालांत उभारला आहे; मृत्यु ता० ३१ जुलै. १८६५. [ मनोरंजन, दिवाळी अंक १९१० ].

**जंगम**—ही लिंगायत गुरूंची जात आहे. जंगम लिंगाचे ( देवळांतील स्थावर लिंगाचे नव्हे ) उपासक ते जंगम. प्रत्येक लिंगायताला गुरु हा असावाच लागतो. त्यामुळें या जंगमवर्गाला बरेंच महत्त्व आलें आहे. गुरुस्थल ( विवाहित ) आणि विरक्त ( ब्रह्मचारी ) असे या जंगमांचे दोन ठोकळ भेद आहेत. गुरुस्थल जंगमांकडे गृहसंस्कारांचें काम असतें. विरक्त जंगम वेदांतादि धार्मिक विषयांचें अध्ययन अध्यापन करतात. दोघेहि मठवासी असतात. जंगमांत पांच संप्रदाय आहेत. ( १ ) एकोरामाध्य ( २ ) पंडिताराध्य, ( ३ ) मरुलाराध्य ( ४ ) रेवणाराध्य आणि ( ५ ) विश्वाराध्य. लिंगाईत लोक असें मानतात कीं या पांच संप्रदायांचे उत्पादक शिवाच्या पांच मुखांपासून उत्पन्न झाले होते, व यांनीं लिंगाईत पंथाची प्रवृत्ति करण्यांत फार मेहनत घेतली होती. या पांच संप्रदायांचे जंगम एकत्र कधीं जमत नाहींत, परंतु त्यांमध्यें परस्पर हेवा किंवा स्पर्धा नाहीं. गृहस्थाश्रमी लिंगाईत जंगमांस फार पवित्र मानतात, व ते कोणत्या संप्रदायाचे आहेत, याचा विचार न करतां सर्वांची पूजा करतात. प्रत्येक संप्रदायांत १३

भेद आहेत. या भेदांस ते बगी म्हणतात. मुख्य पांच संप्रदायांचा तपशील पुढीलप्रमाणे.—

| संप्रदाय | उत्पत्ति. | मुख्यस्थान | गोत्र | सूत्र | प्रवर |
|---|---|---|---|---|---|
| एकोरामाध्य | द्राक्षारामक्षेत्र | केदार | भृंगी | लंबक | वीरशैव |
| मरुलाराध्य | श्रीसिधवत | उज्जैन | नंदी | वृष्टिक | ...... |
| पंडिताराध्य | शुद्धकुंडी | शैलपर्वत | वृषभ | मुक्तगुच्छ | ...... |
| रेवनाराध्य | कोलुपकिश | कडलीपूर | वीर | पद्विदि | ...... |
| विश्वाराध्य | विश्वेशलिंग. | कोल्लिपाके | स्कंद | पंचवर्ण | ...... |

विवाक्षित संप्रदायांतील एकाच भेदाच्या किंवा बगीच्या जंगमांत परस्पर लग्नें होत नाहींत. निरनिराळ्या प्रांतांत जंगमांचे निरनिराळे प्रकार आहेत. दक्षिण महाराष्ट्रांत विरक्त, पट्टदेवरू, अय्या, चरंती आणि मरी असे पांच प्रकारचे जंगम आढळतात. विरक्त जंगम लंगोटी घालतात. आंखूड बाह्यांचा पण सैल व लांब झगा घालतात आणि आपला बहुतेक काळ अध्ययनांत व भक्तिमार्गांत घालवितात. पट्टदेवरू जंगम लंगोटीच्या ऐवजीं धोतर नेसतात व विरक्तांपेक्षां कमी वैराग्यशील असतात. अय्या जंगम लग्नें करतात आणि मुख्यत्वेंकरून भिक्षेवर निर्वाह करतात. भिक्षेस जातांना पायांत गुडध्याखालीं जंग नांवाचा घुंगूर बांधितात, हातांत वेत्रदंड घेतात व भगवीं वस्त्रें अंगावर घेतात. चरंती जंगम नेहमीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं फिरतात आणि मठाच्या खर्चाकरितां गृहस्थाश्रमी लिंगाईतांपासून पैसा गोळा करतात. मरी जंगम अविवाहित असतात व ते जंगमाचे शिष्य असून त्यांची सेवा करितात. विरक्त मेल्यावर त्याच्या शिष्यांत जो मोठा विद्वान व योग्य मरी असेल त्यास त्याच्या स्थानीं स्थापितात. वाणी आणि चम या वर्गांतील लिंगाईत जंगम होऊं शकतात; परंतु जेव्हां जंगमास मुलगा किंवा दुसरा कोणी आप्त नसतो तेव्हां मात्र तो या वर्गांतील मुलास दत्तक घेतो. हा मुलगा विधवेच्या पोटचा नसून, अविवाहित असावा लागतो. अय्या-जंगम न्हावी, परीट आणि महार या तीन जातींच्या पैकीं लिंगाईतांशिवाय इतर लिंगाइतांच्या घरीं जेवतात- जेव्हां जंगम मोठें प्रयोजन करतो तेव्हां या तीन वर्गांच्या लोकांशिवाय इतर सर्व लिंगाईत येऊन एकत्र जेवतात. ज्या घरांत किंवा इमारतींत मठदय्या म्हणजे तेथला मुख्य जंगम राहतो, त्यास मठ असें म्हणतात. मठाधिकाऱ्यास कांहीं सरकारांतून उत्पन्न असतें; परंतु त्यास तेथच्या लिंगाइतांपासून मोठी मिळकत असते. लग्नकार्यें झालीं, किंवा दुसरीं कांहीं धर्मकृत्यें झालीं, म्हणजे मठाधिकाऱ्यास देणग्या देतात, आणि व्यापारी लोकहि आपल्या मिळकतीपैकीं कांहीं अंश मठाकडे देतात. तसेंच कापड विणणारांपासून कपडे, आणि जमीनदार व शेतकरी यांच्याकडून धान्य मठाधिकाऱ्यास मिळतें.

हे बदामी कपडे घालतात. जंगम गळयांत रुद्राक्षाच्या मोठमोठ्या माळा घालतात, व भस्महि पुष्कळ लावतात. गळयांत किंवा कंबरेस शिवाचें लिंग बांधतात. हें लिंग सोनें, चांदी, तांबें किंवा पितळेचें केलेलें असतें. जर कोणा स्त्रीपुरुषाचें लिंग हरवलें तर तें गुरूनें पुन्हां गळयांत घालीपर्यंत कांहीं सुद्धां खातां किंवा पितां कामा नये. त्या लिंगाची पूजा त्रिकाल बेल व भस्मानें केली पाहिजे. महादेवाशिवाय इतर देवास हे भजत नाहींत. जंगम लोक कडक शाखाहारी आहेत. हे लिंगाइतांखेरीज इतरांच्या हातचें अन्न खात नाहींत. जेवण झालें म्हणजे पान अगदीं स्वच्छ करून पाण्यानें धुवून तेंच पाणी तीर्थ म्हणून पितात. मूल झालें म्हणजे हे दुसऱ्या जंगमांस बोलावून त्याचे पाय एका ताटांत धूतात व तें पादोदक तेथें हजर असलेल्या माणसांच्या अंगाला चोपडतात व घरांच्या भिंतीवर शिंपडतात. मग त्या जंगमाचे अंगठे एका पेल्यांतील पाण्यांत बुडवून त्यांत त्याच्या गळयांतील शिवलिंग बुडवितात. तो जंगम स्वतः तें पाणी पितो व इतरांस तीर्थ म्हणून देतो. या विधीस ‘ करुणा ’ म्हणतात. मग नवें शिवलिंग त्या तीर्थांत बुडवून तें मुलाच्या गळयांत बांधतात व एक दोन मिनिटांनीं काढून तें मुलगा मोठा होऊन गळयांत घालण्यास योग्य होईपर्यंत आईजवळ ठेवण्यास देतात. प्रेतांस आसनमांडी घालून शिवलिंग हातांत देऊन पुरतात. शंभर वर्षांपूर्वी जंगम गुरू आपल्या शिष्यांच्या गांवीं गेला म्हणजे ज्या घरांत तो जाईल तेथील पुरुष तो असेपर्यंत आपले घर सोडून दुसरीकडे खुषीनें जात व घरांतील बायकांस त्याचा सर्वप्रकारें पाहुणचार व सेवा करण्यास सांगत; व बायका रात्रंदिवस गुरूची सेवा करीत. त्याबद्दल त्या स्त्रियांच्या नवऱ्यांस कधींच हेवा वाटत नसे. गांवांतील टवाळ लोक मात्र नेहमीं म्हणत कीं ज्या घरांतील बायका तरुण व सुंदर असत त्याच घरांत जंगम राहाण्यास जाई असें अबे डयुब्वा यानें वर्णन केलें आहे असें रसेल व हिरालाल आपल्या ग्रंथांत लिहितात. हें सध्यां अशक्य असून कदाचित काल्पनिक असावें. जंगम हें नांव कोणाहि लिंगायताला लावितात. त्यामुळें जंगमांची संख्या फार मोठी( १९११ त ११३६९२ ) दिसते. बहुतेक वस्ती मद्रास इलाख्यांतच आहे. [मुं. गॅ.; रसेल व हिरालाल; ट्राइब्स अँड कास्ट्स इन सी. पी. फर्कुहर—रिलिजिअस लिटरेचर ऑफ इंडिया.]

**जगय्या पेटा**—ह्या नांवाचें शहर मद्रास इलाख्यांत कृष्णा जिल्ह्यांत आहे. येथील लोकसंख्या सन १९११ सालीं ८८०२ होती. ‘ उत्तर सरकार ’ व निझाम सरकारचें राज्य ह्यांमध्यें चालणाऱ्या व्यापाराचें हें शहर मोठी पेठ आहे. या शहरचें मूळचें नांव बेटावल्लु होतें; पण एका स्थानिक सरदारानें व्यापारी लोकांस मुद्दाम बोलावून त्या गांवास आपल्या वडिलांचें नांव दिलें. ह्याच शहराजवळ कांहीं वर्षांपूर्वीं ६६ फूट व्यास असलेला बुद्धाचा एक स्तूप सांपडला.

**जंगल**—या शब्दाची व्याख्या मॅनवुड नामक इंग्रजानें केली आहे ( ११५९८ ) ती, राजानें स्वतःच्या आनंदाकरितां संरक्षण करून ठेवलेला आणि ज्यांत रानटी पशू व

पक्षी रहातात असा वृक्षाच्छादित प्रदेश 'ही साधी व्याख्य पुढें अर्थशास्त्रदृष्टया सुधारण्यांत आली, ती येणेंप्रमाणें ' इमारती लांकडाकरितां व इतर जंगली मालाकरितां किंवा हवेवर कांहीं विशिष्ट परिणाम घडवून आणण्याकरितां किंवा नजीकच्या प्रदेशाचा कांहीं अपायकारक परिणामापासून बचाव करण्याकरितां स्वतंत्र राखून ठेवलेला भूप्रदेश. '

सा मा न्य मा हि ती.—पृथ्वीसंबंधीं हल्लीं जीं अनुमानें ठरविलीं आहेत त्यावरून पहातां पृथ्वीवरील बहुतेक निर्जल प्रदेश एके काळीं जंगलांनीं व्यापलेला होता असें मानावें लागतें. जुन्या वृक्षांची आयुर्मर्यादा संपल्यावर ते नष्ट होऊन त्यांच्या जागीं नवे वृक्ष उद्भवले. मानवपूर्वकालांत उद्भिजांवर कांहींच नियंत्रण नसल्यामुळें जमीन व हवापाणी यांची अनुकूलता मिळाली तेथें तेथें जंगलाची वाढ बेसुमार झाली. नंतर पृथ्वीवर जेव्हां मानवोत्पत्ति झाली तेव्हांपासून जंगलाच्या नाशास सुरुवात होऊन हळूहळू बहुतेक देशांतील जंगल बरेंचसें नष्ट करण्यांत आलें. जंगल नष्ट करण्याचें पहिलें कारण माणसाळलेल्या जनावरांकरितां गवताळ कुरणें तयार करणें हें असावें. दुसरें कारण मानवानें शेतकीच्या धंद्यांत केलेली प्रगति हें होय. यानंतरचें व महत्वाचें कारण म्हणजे जळणाकरितां व इमारतीकरितां लांकडांची असणारी आवश्यकता.

या तीन कारणांनीं जंगल बरेंच नष्ट झालें असलें तरी अद्याप भूपृष्ठाचा बराचसा भाग अरण्याच्छादित आहे. बहुतेक जंगलें अनेक जातींच्या झाडांनीं भरलेलीं असतात, पण कांहीं जंगलांत दहापांच किंवा दोन चार जातींचीं झाडेंच आढळतात. ब्रह्मदेशांतील जंगलांत हजारों वृक्षजाती आहेत, तर मध्ययूरोपांत व उत्तर रशियांत चाळीस जाती, सिंधप्रांतांत दहा आणि स्वीडन व नार्वेमध्यें फक्त अर्धा डझन जाती आहेत. पाश्चात्त्य देशांतील कांहीं प्रमुख झाडांच्या जातींचीं नांवें येणेंप्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ पाईन | ५ रेडवुड | ९ पोपलर | १३ कॉटनवुड |
| २ फर | ६ सीडर | १० चेस्टनट | १४ बीच |
| ३ हेमलॉक | ७ ओक | ११ बासवुड | १५ एल्म |
| ४ स्प्रूस | ८ मॅपल | १२ बर्च | १६ ॲश |

देशाला जंगलाची जरूरी आहे कीं नाहीं, आणि असल्यास किती आहे, याबद्दल एक सर्वलागू नियम ठरविणें शक्य नाहीं. एखाद्या विशिष्ट देशाला जंगलाचा उपयोग किती व कसा करून घेतां येईल हा प्रश्न पुढील विशिष्ट गोष्टींवर अवलंबून असतो:( १ ) देशाचें भौगोलिक स्थान व त्याचा वसाहती वगैरे इतर देशांवर असणारा ताबा; (२) जंगलांत सांपडणाऱ्या मालाऐवजीं वापरतां येणाऱ्या मालाचें मोल व गुण; ( ३ ) जमीनीची किंमत व मजुरीचे दर आणि जंगलखेरीज इतर कार्याला जमीन लावल्यास त्यापासून होणारें उत्पन्न; ( ४ ) लोकसंख्येची विपुलता;( ५ ) उद्योगधंद्यांत घालण्यास लागणाऱ्या भांडवलाचें परिमाण, आणि (६ ) हवामान व समुद्र जवळ किंवा लांब असणें.

अ र ण्य वि ज्ञा न ( फॉरेस्ट्री )—मराठी भाषेंत 'अरण्यपण्डित ' विद्याविहीन बडबड्या इसम असा अपशब्दात्मक अर्थ रूढ झाला आहे. पण वास्तविक पाहतां ' अरण्यविज्ञान ' ही एक महत्वाची ज्ञानशाखा बनली असून हिचें शिक्षण देण्याकरितां पश्चात्त्य देशांत स्वतंत्र शाळा असतात; आणि या बाबतींत जर्मनीचा नंबर पहिला आहे. फ्रान्स, इटाली, ग्रेटब्रिटन, युनायटेडस्टेटस वगैरे देशांनीं या शास्त्राचें संशोधन व शिक्षण यांकडे चांगलें लक्ष पुरविलें. पाश्चात्त्य देशांतील या विषयाचें शिक्षण आणि सरकारी जंगलाची व्यवस्था यासंबंधीं कल्पना पुढील हिंदुस्थानांतील जंगलविषयक माहितीवरून येईल; कारण इंग्रजी अमदानींत हिंदुस्थानांतहि सर्व व्यवस्था पाश्चात्त्य पद्धतीप्रमाणें करण्यांत आली आहे.

पू र्व इ ति हा स.—भारतीय राजांच्या उत्पन्नाच्या बाबींत जंगल ही बाब असे. जंगलाचे कांहीं विशिष्ट भाग ज्यांत हत्ती उत्पन्न होत असत किंवा उत्तम गवत होई, असे भाग सरकारी जंगल म्हणून राखून ठेवलेले असत. शासनशास्त्रावरील प्राचीन प्रसिद्ध ग्रंथ जो चाणक्याचा ' कौटिलीय अर्थशास्त्र ' यांत करांच्या एकंदर बाबींत जंगलांचा समावेश केला असून (समाहर्ता दुर्गं राष्ट्रं खनिं सेतुं वनं व्रजं वणिक्पथं चावेक्षेत। २. ५. २४ ) जंगलखात्यासंबंधीं ' कुप्याध्यक्ष : ' नांवाच्या स्वतंत्र प्रकरणांत विशेष माहिती आहे. जंगलाचे शिकारीचें जंगल, इमारती लांकडाचें जंगल व हत्तींचें जंगल असे तीन प्रकार सांगितले असून ( पशुमृगद्रव्यहस्तिवनपरिग्रहो वनम् । कित्ता ) कुप्याध्यक्षानें जंगलांतील लांकूड व इतर माल आणवावा, व त्यापासून सरकारी कारखान्यामध्यें संसारोपयोगी किंवा राज्यरक्षणोपयोगी जिन्नस तयार करावे, असें सांगितलें आहे ( बहिरन्तश्च कर्मान्ता विभक्ताःसर्वभाण्डिकाः । आजीवपुररक्षार्थाः कार्याः कुप्योपजीविना ॥ २. १६. ३५ ). यांत अलीकडील फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूट संस्थेमधील कार्यासारखें कार्य सूचित केलें आहे.

मोगल व मराठी रियासतींत प्राचीन परंपरा परिस्थितीप्रमाणें चालू राहिली असावी असें वाटतें. पण त्याबद्दल ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं.

ब्रि टि श स र का र ची व्य व स्था—हिंदुस्थानांतील अरण्यें उत्तर अक्षांश आठपासून पस्तीस अंशांपर्यंत पसरलीं आहेत. तीं येथें समुद्राच्या सपाटीपासून सरासरी बारा हजार फुटांपर्यंत मोठ्या भरभराटींत आढळतात. ह्या सीमेंतील वनस्पतींचें महत्त्व आहे, फार पण तें महत्त्व अक्षांशांतील फरकामुळें कमी जास्त होत नाहीं. एवढेंच नाहीं तर अमुक अक्षांशापासून अमुक अक्षांशापर्यंत अमुक जातीचीं झाडें व अमुकपासून अमुकपर्यंत अमुक झाडें

अशी कांहीं भेदरेषा स्पष्टपणें गोचर होणारी आहे असेंहि नाहीं. कांहीं विशेष झाडें दक्षिणहिंदुस्थानांत व कांहीं विशेष झाडें उत्तरहिंदुस्थानांत आढळतात व कांहीं झाडें ज्या ठिकाणीं यथायोग्य जागा सांपडेल त्या ठिकाणीं सर्व देशभर अभेद रूपानें आढळतात याप्रमाणें पाहतां जंगलांतील झाडांचे वर्ग भूमध्यरेषेपासून नुसतें अंतर मोजून पाडितां येणें बिलकुल शक्य नाहीं. कारण, या वर्गीकरणांत दुसऱ्या कांहीं गोष्टींचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे. त्यांतील मुख्य म्हणजे पर्जन्यपात ही होय. ह्या पर्जन्यपाताचें नियमन प्रामुख्येंकरून, प्रत्येक स्थळीं आढळणारी भौगोलिक परिस्थिति व प्राकृतिक लक्षणें हीं करतात. तेणेंकरून पर्जन्यपाताचे परिणाम व वांटणी यांमध्यें अधिक उणेपणा होतो व त्यामुळें महत्त्वाच्या अरण्यांच्या वाढीच्या गुणधर्मांत व गुणविशेषांत पुष्कळ फरक पडतो.

अ र ण्यां चे स्वा भा वि क वर्ग.—ह्या आपल्या भरतखंडांतील अरण्यांच्या प्रदेशाचे समजुतीच्या सोईकरितां चार कटिबंध कल्पिता येतातः—१ अतिवृष्टीचा—ह्यांत पाऊस ७५ इंचांवर पडतो; २ सामान्य वृष्टीचा—ह्यांत पाऊस ५० इंचांवर पडतो; ३ मध्यम वृष्टीचा—ह्यांत पाऊस ३० इंचांवर पडतो; व ४ अनावृष्टीचा—ह्यांत पाऊस या वरील परिमाणाखालीं पडतो.

ह्या कटिबंधांतील १ सदा हिरवीं, २ पानें गळणारीं व ३ कोरडीं अरण्यें यांचा स्थलनिश्चय करणें फारसें कठिण नसतें. पण कांहीं स्थळीं ह्या पर्जन्यपातापेक्षां त्या ठिकाणाची समुद्रसपाटीपासून उंची, भरती ओहोटी, व पूर ह्यांचा परिणाम जास्त जाणवतो. अशा ठिकाणीं अरण्यांचे आणखी पुढील तीन प्रकार आढळतातः—१ डोंगरांतील अरण्यें; ह्यास कोणी डोंगरी अरण्यें असें म्हणतात. १ खाडीकाठचीं अरण्यें ह्यास कोणी खारीं अरण्यें असें म्हणतात. ३ नदीकांठचीं अरण्यें; ह्यास कोणी गोडीं अरण्यें असें म्हणतात. पहिलें सदा हिरवें आदिक तीन प्रकार व डोंगरी आदिक तीन प्रकार मिळून एकंदर सहा प्रकार झाले.

अ र ण्यां चे वि शे ष गु ण ध र्मा प्र मा णें व र्ग.—ह्यांचा विस्तार व उपयोग याप्रमाणें पाहतां, यांतील अग्रगण्य वर्ग म्हटला म्हणजे पानें गळणाऱ्या वृक्षांच्या अरण्यांचा होय. हीं अरण्यें हिमालयाच्या पायथ्यापासून सर्व द्वीपकल्पभर पसरलीं आहेत व जेथें ब्रह्मदेशांत त्यांच्या वाढीस योग्य जमीन व पाऊस मिळतो, तेथें तीं पूर्वेसहि प्रसार पावलीं आहेत. ह्यांत साल, लोखंडी, साग, चंदन, अबनूस वगैरे इमारतींचीं लाकडें पुरविणारे वृक्ष होतात. या प्रदेशांत खैर फार होतो. ह्यापासून कात उत्पन्न होतो. ह्याशिवाय तेलें व वार्निसें पुरविणारे अनेक वृक्ष होतात. पानें गळणाऱ्या वृक्षांच्या खालोखाल महत्वाचे वृक्ष म्हटले म्हणजे 'सदा हिरवे राहणारे' वृक्ष होत. ह्यांस हवा जरा जास्त दमट लागते. ह्यांचीं अरण्यें प्रामुख्येंकरून पश्चिम हिंदुस्थानचा किनारा, ब्रह्मदेश. अंदमान बेटें व हिमालयाच्या प्रदेशाचा खालचा भाग यांत आढळतात. तथापि या अरण्यांतहि साग, लोखंडी, खैर वगैरे झाडें मधुनमधून आढळतात. सदां हिरव्या अरण्यांतील मासलेवाईक वृक्षांचीं नांवें सांगावयाचीं तर त्यांत आंबा व तूण, हे ओळखीचे वृक्ष होत. कोरडीं रखरखीत अरण्यें पंजाब व मध्यहिंदुस्थान यांमध्यें आहेत. ह्यांचें उत्पन्न फारसें महत्वाचें नसतें. यांत बाभूळ वगैरे अनेक वृक्ष होतात. पण ते अगदीं खुरटलेले असतात.

डोंगरीं अरण्यें.—हीं उत्तर हिंदुस्थान, ब्रह्मदेश व आसाम यांत आहेत. हीं स्थूल मानानें ३००० फुटांपासून १२००० फुटांपर्यंत आढळतात. यांतील वृक्षपरंपरा साधारणतः ( इंडियन एम्पायर–इं. गॅ. भा. तिसरा पान १०३, प्रमाणें ) बुरण लेडोडेंड्रॉन, अयस ( ओक ), सुरु ( सायप्रस ), देवद्वार ( फर ), शिसपेन्सिलीच्या लाकडांचीं झाडें ( सिडार ), स्प्रूस वाड, भूर्जपत्र (बर्च) व धूपवृक्ष (जुनिपर) अशी आढळते; व चीर ( मायनस लॉंजिफोलिव ) व खाइया ( पा खाइया ) आणखी पुढें पूर्वेस वरच्या सखल प्रदेशीं होतात व मैदानातलि पानें गळणाऱ्या वृक्षांच्या अरण्यांत शेवटीं मिसळतात. ह्या डोंगराळ प्रदेशांत जमीन व उष्णतामान यांची परिस्थिति अनुकूल मिळाली कीं, तेथें यूरोपांतील यू, बॉक्स व अक्रोड ( वॉलनट् ) हे सुप्रसिद्ध वृक्ष होतात. व तेथें त्यावर चढणारी आयव्ही लता, परोपजीवी बांडगूळ( मिस्टलटो ) व तीन इंच घेराच्या तांबड्या व पिंवळया घमघमाट सोडणाऱ्या पुष्पांनीं भरलेले गुलाबांचे ताटवे किती आहेत यांची गणनाच करवत नाहीं.

खारीं अरण्यें.—हीं ज्या मळईच्या जमीनींत भरतीचें पाणी येतें त्यांत होतात. हीं अरण्यें फार करून ब्रह्मदेशचा किनारा, बंगाल्यातील सुंदरी वृक्षाबद्दल प्रसिद्ध असलेलें सुंदरबन व मद्रास इलाख्यांतील उत्तरेकडील समुद्रकिनाऱ्यावरील प्रांत यांत आहेत. कोंकणांतील खाजणांप्रमाणें ह्यांतील झाडांपासून मुबलक सरपण मिळतें. एवढेंच नाहीं तर बंगाल्यांतल्या सुंदरबनांतल्या सुंदरी वृक्षांपासून इमारती लांकडांचा भरपूर पुरवठा होतो. व ह्यांतील अनेक प्रकारच्या वृक्षांपासून 'बोर्निओकच' नांवाचा व्यापारोपयोगी चामडी रंगविण्याचा रापट पदार्थ पुष्कळ उत्पन्न होतो. ह्या नवीन सापडलेल्या द्रव्यानें ह्या जंगलाचें महत्व फार वाढलें आहे.

गोडीं अरण्यें.—गोडीं अरण्यें पंजाब व ब्रह्मदेशांत आहेत. यांपैकीं पंजाबांत पुष्कळ गोंद देणाऱ्या बाभळी आहेत व त्यांत मधून मधून उत्तम नकशीचें खोदकाम करण्यालायक काळें लांकूड पुरविणारे शिसव्याचे वृक्ष जागोजाग मिसळलेले आहेत. पण भरपूर पाण्याचा पुरवठा असलेल्या येथील जागेपासून जसजसें दूर जावें तसतसें खुरटीं झाडें, झुडपें व गवतें यांनीं युक्त असें रान लागतें. ब्रह्मदेशांत असलीं अरण्यें नद्यांचे पूर ( कांहीं ऋतूंन महापूर ) येणाऱ्या चिखलाच्या जमीनींत अतिशय गर्द होतात. ह्या नव्या प्रकारच्या नदी-

वरील पुराच्या गोड्या पाण्यानें भरणाऱ्या अरण्याचें रूपांतर हळूहळू समुद्रकिनाऱ्यावरील भरतीच्या खाऱ्या पाण्यानें भरणाऱ्या किरें अरण्यांत होतें. अरण्याची वाढ खालील गोष्टींवर अवलंबून असते. ( १ ) हवा, ( २ ) भूभागाचा खालवर देखावा(आस्पेक्ट) (३)जमीनीची घटना,(४)पाण्याची खोली. संकृत ग्रंथातून झाडांच्या महत्त्वाच्या मानानें त्यांचें वर्गीकरण १ अंतःसार, २ बहिःसार, ३ सर्वसार व ४ निःसार असें केलें आहे ( उदा.—मनुष्यालयचंद्रिका ).

अंतःसाराश्च वृक्षाः पनसतरुमुखाः सर्वसाराश्च शाकाः ।
चिंचाद्यास्तालकेरक्रमुकयवफलाद्या बहिःसारवृक्षाः ॥
निःसाराः शिग्रुसप्तच्छदशुकतरवः किंशुकाद्याश्च कार्याः ।
तेष्वाद्या मध्यभागे बहिरपिच ततः सर्वसारास्ततोऽन्ये ॥

पाण्याचा पुरवठा व हवा यांवर होणारा अरण्यांचा परिणामः—अरण्यांचा एखाद्या देशांतील हवेवर व जमीनीच्या सुपीकतेवर मोठा परिणाम होतो. अरण्यांचें अस्तित्व हें पावसाचें पडणारें पाणी, झिरपून येणारें पाणी, अथवा पुरानें मिळणारें पाणी यांवर अवलंबून असतें. तीं ह्या आपल्या भारतवर्षात पुढील कार्यें करतात. तीं पावसाचें पडलेलें पाणी जमीनींत सांचवून ठेवितात; तीं तें पाणी पुढें हळूच सोडून देतात; व तीं आपल्या झाडांच्या पानांनीं हवेस ओल पुरवितात उत्तरहिंदुस्थानांत पानें गळणाऱ्या झाडांचीं मोठमोठीं विस्तीर्ण अरण्यें आहेत. त्यांतील झाडांस उन्हाळ्याच्या आरंभीं वसंतऋतूंत आपल्या महाराष्ट्रांतील वृक्षांप्रमाणेंच नवी पालवी फुटते. त्यामुळें झाडांस जशीं नवीन पानें येतात, तसतसें हवेचें उष्णमान जाणवण्यासारखें उतरत जातें; व जोंपर्यंत हीं पानें जोरांत असतात तोंपर्यंत हे प्रदेश इतर प्रदेशांपेक्षां जास्त थंड रहातात. उलटपक्षीं ज्या ठिकाणीं अरण्यें तोडलीं गेल्यामुळें तेथील जमीन नागवी-उघडी झाली आहे त्या ठिकाणीं पर्जन्याच्या पाताचे कुपरिणाम तेथील रहिवाशांस भोंवूं लागतात. म्हणून यूरोपासारख्या समशीतोष्ण खंडांत सुद्धां अरण्याची फेरलावणी करण्याचा मोठा खर्च करावा लागत आहे. सारांश, " अरण्यें ही हवा व जमीन यांचें उष्णमान सर्वत्र सारखें ठेवितात. तीं हवेचा ओलावा वाढवून तेथील बाष्पीभवन कमी करितात ज्या प्रदेशांत जंगलें असतात, त्या प्रदेशांत इतर प्रदेशांपेक्षां पाऊस जास्त पडतो, पण तो मारवाडांत पडत नाहीं, कारण तेथें झाडें बिलकूल नाहींत. जंगलें झऱ्यांस व नद्यांस पाणी अखंड पुरवितात व तीं मोठमोठे पूर येऊं देत नाहींत. तीं जमीनीस घसरा बसूं देत नाहींत, तीं जमीन उघडी पडूं देत नाहींत, तीं जमीनिची कोसळ व नदीथड्यांची ढासळ व बर्फाच्या नद्यांच्या घसरी व वाळूच्या डुंग्यांची उडाऊड होऊं देत नाहींत, तीं हवेच्या प्रवाहाची गति कुंठित करून जवळच्या शेतांचें ऊन व थंड पाण्यापासून रक्षण करतात. तीं, गुरें पारधीचीं जनावरें व उपयुक्त सुंदर पक्षी यांस आसरा देतात. तीं एखाद्या देशाचें विशेष परिस्थितींत आरोग्य सुधारतात किंवा कायम राखितात. तीं देशांची शोभा वाढवितात; एवढेंच नाहीं तर तीं लोकांमध्यें जणू सौंदर्याची अभिरुचि उत्पन्न करतात. तीं मनुष्यास पानें, फुलें व फळें देतात. तीं जमीनीवर पाचोळ्याची वनस्पतिजात मृत्तिका तयार करितात, तीं जमीन पाळमुळयांनीं घट्ट बांधून ठेवितात.

सरकारास अरण्यांचा उपयोग.—हिंदुस्थानांतील अरण्यांपासून केवळ पैशाच्या रूपाचा जो फायदा होतो, त्यापेक्षां जास्त कांहीं फायदा त्यांस त्यांपासून होतो. या आपल्या देशांतील शेती केवळ गुरांच्या जिवावर चालणारी आहे. त्यांचे येथें हजारों कळप आहेत. अवर्षण पडलें म्हणजे त्यांतील गुरें चाऱ्याच्या अभावीं मरतात. पण येथें जंगलांचें संरक्षण नीट चांगलें केलें तर तेणेंकरून, दरवर्षी अगणित गुरांच्या कळपाचें पोषण सुकाळांत झालें तर नवल नव्हे; पण तें अशा व्यवस्थेत दुष्काळांतहि झाल्यावांचून रहात नाहीं. असल्या अरण्यांपासून जवळच्या खेड्यांस घरें बांधण्यास लांकडें, चुलीस सरपण, शेतीस आउतें व दुसरीं सुखसोयीचीं साधनें यांचा पुरवठा होतो. अरण्यांतील झाडांच्या पानांचा शेतकऱ्यांच्या शेतांस खतासारखा उपयोग होतो. लोकसंख्येच्या वाढीमुळें शेतांत खतें घालून जास्त पिकें काढण्याच्या तजविजी कराव्या लागूं लागल्या आहेत. पण त्यांस लागणाऱ्या टहाळतोडीस दाट वस्तीच्या पण थोड्या शेतीलायक जमिनीच्या डोंगराळ कोंकणपट्टींत सरकारास कांहीं विशेष निर्बंध करावे लागले आहेत, ते असेः—बंद जंगलांत टहाळ न तोडतां फक्त खुल्या जंगलांत तोडावा. साग, धावडा, मोह, हिरडा, शिसू, आंबा, खैर, आपटा, टेंभुर्णी, शिवणी, जांब यांचा टहाळ तोडूं नये. दीड पुरुषाहून जास्त उंच असलेल्या झाडांचा मुख्य कोंब राखून बाकीचे दोन तीन टहाळे तोडावे. मोठमोठे वृक्ष सर्व राखून ठेवावे परंतु त्यांच्या भोंवतींचीं रोपटें छाटून काढावीं. एकच बुंध्यावर एकच झाड असेल त्यास हात लावूं नये. तोडीकरितां दिलेल्या कूपांतील सहा इंचापेक्षां जाड बुंध्याच्या झाडांचा टहाळ तोडण्यास हरकत नाहीं.

जंगलांच्या योगानें अप्रत्यक्ष रीतीनें पाण्याचा पुरवठा कसा नियमीत होतो व हवा कशी माफक ठेवण्यांत येते याबद्दल विवेचन येऊन गेलेंच आहे. याप्रमाणेंच जंगलापासून शीत, समशीतोष्ण व उष्ण कटिबंधांतील लोकांस जीं हितवर्धक फळें प्रत्यक्ष मिळतात तीं सर्व विश्रुत आहेत. स्थानच्या अरण्यांपासून सरकारास कर मिळतो, दुनियेस इमारती लांकडें व दुसरीं उत्पन्नें मिळतात व कांहीं विशेष धंदे रोजगार चालतात. त्यांविषयीं विवेचन पुढें येईल. पण हल्लीं जें कांहीं कर्तव्य आहे तें हें कीं, अरण्यांची किती जमीन या वेळच्या सरकारच्या तांब्यांत आहे व या जमिनीपासून सर्व देशांचें हिताहित काय साधण्यासारखें आहे, हें पहातें होय.

स र का री अ र ण्यां चें क्षे त्र.—ब्रिटिश हिंदुस्थानांत जंगलाचें क्षेत्रफळ १९१९ सालीं २५१४६८ चौरस मैल होतें. यावरून प्रथम दर्शनीं असें कोणाला वाटेल कीं जंगल व दुसरी जमीन यांमध्यें या बाबतींत पुरें प्रमाण राखण्यांत आलें आहे, व जंगलांच्या क्षेत्राची वांटणी सर्वत्र सारखी असती तर ही गोष्ट खरोखरी संभवली असती. पण प्रांतवार आंकड्यांचीं कोष्टकें पाहिलीं तर जंगलांचें जमीनीशीं शेंकडा प्रमाण संयुक्त प्रांतांत ७.०, तर आसामांत ४४.५, ब्रह्मदेशांत ६४.४, तर आंदमानांत ७०.२ आढळतें. तेव्हां असें म्हणता येईल कीं, ज्या ठिकाणीं लोकसंख्या जास्त व जंगलाच्या उत्पन्नाची स्थानिक मागणी फार त्या ठिकाणीं हे जंगलचे फायदे तेथील लोकांस अगदीं कमी मिळतात. ही अडचण लोकसंख्येची वाढ व मागील पिढीच्या लोकांनीं जंगलाची केलेली नासधूस यांपासून उद्भवली आहे. फिरत्या जंगली लोकांच्या गुरांस जंगलांतील उत्पन्नाची गरज लागली तर त्यांनीं तें वाटेल तसें तोडून टाकिलें, त्यांस दळी नांवाची तात्पुरती शेती करणें झाली तर त्यांनीं त्याकरितां जंगलें काढून जमीन साफ केली, त्यांना कायमची शेती करावयाची झाली तेव्हां त्यांनीं तेथील सारें जंगल जाळून फस्त केलें. ही सामान्य वहिवाट भारतप्रसिद्ध खांडववनदहनापासून सर्रास चालू होती यांत नवल नव्हे. पण आजची सुधारलेली स्थिति पाहतां काय रिवाज आढळतो ? ज्या ठिकाणीं सरकार मनाई करीत नाहीं, त्या ठिकाणीं ह्या आत्मघातकी प्रघात सर्रास चालू आहे. " जेथें हिंदुस्थानच्या पूर्वेस दूरदूरच्या परगण्यांतल्या अरण्यांत वरील दळयासारखी ठाणपारुटाची शेती करणाऱ्या अनेक जंगली लोकांच्या टोळया आहेत, ज्या ठिकाणीं कायमच्या वस्तींतील शेतकऱ्यांस वृक्षराज जो साग त्याशिवाय झाडून सर्व इमारती लांकडांचे वृक्ष कःपदार्थ वाटतात, अशा पूर्वेकडील प्रांतांपासून जेथें पश्चिमेकडील सुधारलेल्या परगण्यांतील शेतकरी व व्यापारी इतर ठिकाणीं टाकाऊ ठरलेलीं लांकडें विकत घेण्यास अत्यंत आतुर आहेत असे पश्चिमेस प्रांत आहेत. ज्या ठिकाणीं लोकवस्ती दर चौ. मै. ६ पासून ६०० पर्यंत आहे अशा राज्यांतल्या अतिरेकाच्या ( एक्स्ट्रीम्स ) ठिकाणीं तेथील मनुष्यवस्तीचा परिणाम येथील जंगलावर काय होत असावा ह्याची केवळ कल्पनाच करणें बरें". असें हिंदुस्थानच्या इंपेरियल ग्याझिटियरमध्यें म्हटलें आहे.

अ र ण्यां ची प्र त वा री.—हल्लींच्या ( इंग्रज ) जंगलांचें वर्गीकरण तीन प्रकारें करण्यांत आलें आहे. ( १ ) बंद (रिझर्व्हड्), ( २ )राखीव ( प्रोटेक्टेड् ) व(३)खुलें (पब्लिक—लोकांचें ) ह्यांतील अरण्यें कायम बंद ठेवण्याचा उद्देश इमारती लांकडें, सर्पण व दुसरीं उत्पन्नें यांचा पुरवठा अथवा पाण्याच्या पुरवठ्याचें रक्षण किंवा असलींच दुसरीं कार्यें उरकावीं एवढाच होय. राखीव जंगलें हीं एकतर संक्रमणावस्थेंत असतात म्हणजे त्यांचीं पुढें बंद जंगलें करण्याचा इरादा असतो किंवा तीं एकतर कायमचींच राखीव म्हणजे दुसऱ्या वर्गांच्या जंगलांत रहावयाचीं असतात. बंद जंगलासंबंधीं विघातक कांहीं क्रिया बिलकूल करावयाच्या नसतात. पण यासहि कांहीं मर्यादा असते. ह्या जंगलास कांहीं विघातक क्रिया बाधणार नाहींत असें जेव्हां दिसूं लागतें, तेव्हां त्या सक्तीच्या नियमांच्या अंमलबजावणीची तहकुबी होते. पण राखीव जंगलांची स्थिति अशी नसते. त्यांचा उद्देश जागोजागच्या लोकसमूहाच्या हक्कांचा परस्परांस सुखकर व हितकर अंमल व्हावा एवढाच असतो. खुलीं जंगलें बिगर वर्गांतील असतात. तीं लोकांकरितांच ठेविलेलीं असतात. त्यांत जंगलच्या कायद्याची अंमलबजावणी अगदीं थोड्या बाबतींत होते. इ. स. १९१९ तील सरकारच्या ताब्यांतल्या २५१४६८ चौरस मैल क्षेत्रफळाच्या जंगलापैकीं १०१६३९ चौरस मैल क्षेत्रफळाचें जंगल बंद होतें. ८५५७ चौरस मैल क्षेत्रफळाचें जंगल राखीव होतें. व बाकीचें १४१२७२ चौरस मैल क्षेत्रफळाचें जंगल बिगर वर्गांतील अगर खुलें होतें. हें कोणासही सहज ताडतां येईल कीं ज्या ठिकाणीं दर मैली लोकवस्ती अगदीं कमी असते त्या ठिकाणीं असलें खुलें जंगल फार मोठें असतें. याप्रमाणें वस्तुस्थिति पाहतां, ब्रम्हदेशांत असल्या प्रकारचें जंगल सगळया क्षेत्रफळाच्या शेंकडा ८० भाग आहे. व बाकीचें बहुतेक आसामांत आहे. ब्रम्हदेशांतील शोधाचें काम अजून पुरे झालेलें नाहीं; व हजारों चौरस मैलांचें क्षेत्र, बंद जंगलाच्या खात्यास दरवर्षी जमा होत आहे. व ही मोठी सुदैवाचीच गोष्ट आहे कीं, ह्या जंगलाची नासाडी होण्यापूर्वी सरकारनें ह्याच्या रक्षणाचा योग्य बंदोबस्त केला आहे. यामुळें येथें कांहीं दिवसांनीं एक मोठी जंगलाची मालमत्ता तयार होईल. तिची व्यवस्था व किंमत करणें आज कल्पनेबाहेरचें आहे.

ह्या तिन्ही प्रकारच्या जंगलांची व्यवस्था येथील सरकारच्या जंगलखात्याकडे आहे. ह्या खात्याचें जंगलाची व्यवस्था सरकारच्या धोरणाप्रमाणें चालविण्याचें काम आहे. सदहु धोरणांत पुढील तीन हेतू धरिलेले आहेत. ( १ ) सगळया हिंदुस्थान देशाचें हित साधणें, ( २ )– जंगलाजवळच्या लोकांचें हित साधणें व ( ३ ) जंगलांच्या उत्पन्नाचा जमेल तितकें करून सरकारच्या महसुलांत भर घालणें.

जं ग ल खा त्या ची उ त्प त्ति, वा ढ व व्य व स्था.—ह्या खात्याची प्रथम स्थापना इ. स. १८०६ त मलबारांत सागाच्या जंगलाच्या संरक्षणार्थ झाली. त्या खात्याचा मुख्य कॅप्टन वॅट्सन हा होता. त्यानें साग हा केवळ एक सरकारच्या सत्तेतील जिन्नस करून त्याचा स्वतंत्र मक्ता ( ठेका ) चालविला, कारण त्याचा उपयोग लढाऊ गलबतें व इमारती बांधण्यास फार होता. मुंबई इलाख्यांत इ. स. १८४७ त डॉ. गिबसन हा पहिला कॉन्झर्व्हेटर झाला, व डॉ. क्लेगहॉर्नें मद्रास इलाख्यांत पहिल्यानें

झाला. त्यांनीं जंगलांच्या संरक्षणार्थ सरकारपुढें तीन गोष्टी मांडिल्या:— ( १ ) त्यांचें संरक्षण केल्यास डोंगर धुवून जाणार नाहींत, ( २ ) नद्यांत गाळ जमणार नाहीं व ( ३ ) पाण्याचा पुरवठा कमी पडणार नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, जंगलाचें संरक्षण हें सरकारच्या तिजोरींत प्रत्यक्ष पैसा आणण्याचें साधन होऊन बसलें. इ. स. १८२७ त सरकारचें लक्ष पूर्वेकडील टेनासरीमच्या भागाच्या जंगलाकडे वळलें. तेव्हां तेथील बेजबाबदार व अविश्वासी कंत्राटदाराच्या लुटालुटी व नासधुशी यांचा बंदोबस्त करण्यांत आला. इ. स. १८५२ त पेगूमधील जंगलाची खासगी लोकांनीं लूट मांडिली. लार्ड डलहौसीनें कायमचें सरकारी धोरण ठरवून तिचा बंदोबस्त केला. इ. स. १८५६ त डॉ. ब्रांडिस याची नेमणूक पेगूच्या जंगलावर झाली. हा जर्मन होता. हा इ. स. १८६४ त पहिला 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ् फॉरेस्ट्स ऑफ् इंडिया' झाला. ह्यानें व ह्याच्या पुढील शिष्यांनीं मिळून जंगलखातें निर्माण करून त्याची व्यवस्था लाविली व त्यांनीं या आपल्या देशांतील विस्तीर्ण अरण्याची जागोजागच्या विशेष परिस्थितीस अनुसरून यूरोपांतल्या उत्तम पद्धतीप्रमाणें व्यवस्था सुरू केली. डॉ. ब्रांडिसनें इ. स. १८६९ त विधायक सत्ता चालविण्यास दर वर्षास ९५०००रुपये खर्ची घालण्याचें ठरवून ५७ अंमलदार नेमिले. हल्लीं जंगल खात्यांतील नोकरीच्या तीन शाखा आहेत:—(१)'इंपीरियल सर्व्हिस'—या शाखेंत २५७ अधिकारी असून त्यांत इन्स्पेक्टर—जनरल ऑफ फॉरेस्टस, चीफ कांझर्व्हेटर्स, कांझर्व्हेटर्स, डेप्युटी व असिस्टंट कांझर्व्हेटर्स असे हुद्दे आहेत. या शाखेंत भरती खुद्द विलायतेंत ( युनैटेड किंगडम ) होते. इंग्लिश, वेल्श किंवा आयरिश युनिव्हर्सिटीची नॅचरल सायन्स या शाखेंत आनर्स डिग्री, किंवा स्कॉटिश युनिव्हर्सिटींत ' प्युअर सायन्स ' या शाखेंत बी. एस् सी. डिग्री मिळणारांपैकीं कांहीं प्रोबेशनर घेऊन त्यांनां आक्सफोर्ड केंब्रिज किंवा एडिनबरो युनिव्हर्सिटीच्या फॉरेस्ट स्कूलमध्यें शिक्षण देऊन व्यावहारिक शिक्षण देण्याकरितां यूरोपीय देशांत कांहीं काळ पाठवून नंतर त्यांच्या हिंदुस्थानांत नेमणुकी करतात. (२) दुसरी शाखा प्रॉव्हिंशिअल सर्व्हिस—यांत २६० अधिकारी असून एक्स्ट्रॉ डेप्युटी व एक्स्ट्रॉ असिस्टंट कांझर्व्हेटर्स असे त्यांचे हुद्दे आहेत. या शाखेंत भरती हिंदुस्थानांतील डेहराडूनच्या ' फॉरेस्ट रिचर्स इन्स्टिट्यूट ' या संस्थेंत शिक्षण घेतलेल्यांची होते. शिवाय रेंजर्सच्या हुद्यावरील विशेष लायकीच्या माणसांनांहि यांपैकीं कांहीं जागा मिळतात. ( ३ ) तिसरी शाखा ' सबॉर्डिनेट सर्व्हिस ', हिच्यामध्यें फॉरेस्ट रेंजर ( ८४० ), डेप्युटी रेंजर ( ९०० ), फॉरेस्टर ( २००० ) आणि फॉरेस्ट गार्ड ( ११५०० ) आहेत. रेंजरांचें शिक्षण डेहराडूनचें फॉरेस्ट कॉलेज, पाईनमानाचें ( ब्रह्मदेश ) बर्मा फॉरेस्ट स्कूल व कोइंबतूरचें ( मद्रास ) मद्रास फॉरेस्ट कॉलेज यांत झालेलें असतें. रेंजरच्या खालच्या दर्जाच्या नोकरांचें शिक्षण ठिकठिकाणच्या फॉरेस्ट स्कूल्स व ट्रेनिंग क्लासेसमध्यें झालेलें असतें. इलाख्याच्या पोटभागांस अनुक्रमें डिव्हिजन्स, डिस्ट्रिक्टस्, रेंजेस्, बिटस् वगैरे नांवें आहेत. पण प्रत्येक जिल्ह्यांतील रयतेच्या हितहिताच्या गोष्टी, जसें गुरचरणीच्या रानांचें रक्षण, गुरचणीची फी, जंगलांतील दुलक्षा उत्पन्नाचा पुरवठा यांसंबंधीं जिल्ह्यांतील विधायक सत्ताधारी जो कलेक्टर याच्या तंत्रानें त्या सर्वांस वागावें लागतें.

हिं दु स्था नां ती ल जं ग ला चा का य दा.— ह्या कायद्याचें मुख्य तत्त्व हें आहे कीं ज्या बिनवहती जमीनीवर लोकांचा हक्क नाहीं, ती सरकारी समजावी. ज्याला जें लागेल तें त्या जमीनींतील जंगलांतून पूर्वापार नेत असत, त्याप्रमाणें तें कोणी बिनपरवाना व फी दिल्याशिवाय इतः पर नेऊं नये. कारण पूर्वीच्या बेबंदशाहींत जंगलांची धुळधाण होत असे. सरकारचे हक्क व लोकांचे हक्क यांची तपशीलवार मर्यादा म्हणून इ. स. १८६५ त पहिला फॉरेस्ट ॲक्ट पास झाला. इ. स. १८७८ त नवीन कायदा झाला. तो सर्व हिंदुस्थानास इ. स. १८८२ पर्यंत मागें पुढें लावण्यांत आला. ह्या कायद्याचा उपयोग करून सर्व जंगलाच्या पुढील प्रती ( पायऱ्या ) पाडण्यांत आल्या:—( १ ) केवळ सरकारच्या मालकीची अरण्यांची जमीन; ( २ ) लोकांचे खासगी हक्क असलेली सरकारच्या मालकीची अरण्याची जमीन, व ( ३ ) खासगी व्यक्ती किंवा लोकसमूह यांच्या मालकीची पण कांहीं ताबा ठेवण्याची जरूरी असलेली अरण्यें. त्यांचे वर्ग—( १ ) बंद, (२) राखीव व (३) खुलीं अरण्यें, असे करून त्यांच्या मर्यादा ठरविल्या व त्यांत अतिक्रमण होऊन नवीन हक्क उत्पन्न न व्हावे म्हणून 'सेटलमेंट रेकॉर्ड' ( ठरावांचें दप्तर ) तयार केलें. त्यांत वंशपरंपरागत पूर्वोक्त दळ्यांची शेती करणाऱ्या वन्य जातींच्या हक्कांचा विचार करण्यांत आला.लोकांस तीन महिन्यांत अपिलें योग्य कोर्टापुढें करण्यास सवड ठेवण्यांत आली.नंतर बंद जंगलांचें रेकॉर्ड पुरें निकाल झालेलें असें ठरविण्यांत आलें. असाच कांहीं प्रकार राखीव जंगलांचा करण्यांत आला. याप्रमाणें कांहीं नियम करून लोकांच्या जंगलांतील उत्पन्नाची नासाडी न करतां घरगुती कामास उपयोग करण्याची व व्यापाराच्या देवघेवीस योग्य जिन्नसांवर कर देऊन नेण्याची परवानगी ठेवण्यांत आली. या योजनेनें जंगलाजवळच्या लोकांचा फायदा होऊन सरकारच्या तिजोरींत पुष्कळ महसूल येऊं लागला.

हद्दी—सव्वा लक्ष रुपये खर्चून जंगलांच्या हद्दींच्या खुणा व त्यांमध्यें पायरस्ते करण्यांत आले. नंतर त्या अरण्यांचे रेखीव व तपशीलवार उत्तम ' टोपोग्राफिकल ' नकाशे काढण्यांत आले. त्यांत जंगलाची वाढ व पाण्याच्या पुरवठ्याची खोलीहि दाखविली.

का र्य क्र म.—प्रांतिक सरकार एक अधिकारी नेमितें. तो कामाची योजना तयार करतो. त्या योजनेंत जंगलांच्या उत्पन्नाचे परिणाम किती आहेत व त्यांतील किती उत्पन्न नेण्यासारखें आहे याचा निर्बंध घालण्यांत आलेला असतो व त्यांत बीं पेरणी, रोप लावणी, दाटण मोडणी, (थिनिंग) व निकामी रान काढणी ( निंदणी-क्लीनिंग ) व दुसरी कशी काय करावी हें दाखविण्यांत आलेलें असतें. तीत वणवे अथवा गुरें यांपासून जंगलाचें रक्षण कसें करावें याचा तपशील देण्यांत आलेला असतो, व रस्ते, पूल व इमारती कशा व कोठें बांधाव्या हें आलेलें असतें. हा कार्यक्रम २० ते ४० वर्षांचा असतो. बंद अरण्यांपैकीं २२००० चौरस मैल अथवा चौथा हिस्सा जमीनीवर त्याची अंमलबजावणी चालू आहे.

द ळ ण व ळ ण व इ मा र ती.-डोंगर कड्यांत इमारती लांकडें नेण्यास घसरणी व रस्ते करण्यास फार खर्च येतो, पण मैदानांत ट्रामवे किंवा नॅरोगेज रेल्वे बांधाव्या लागतात. त्यांचा खर्च भागण्यास तेथील जंगलाचें उत्पन्न त्यांस भरपूर असावें लागतें. आसाम, बंगाल व ब्रह्मदेश यांत तेथील सृष्टिजात मोठ्या नद्यांच्या व उपनद्यांच्या जलमार्गांचा उपयोग करतां येतो. याप्रमाणेंच थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यास जंगलांच्या नोकरांस योग्य घरें बांधून द्यावीं लागतात.

अ र ण्या चें सं र क्ष ण, चोर गुन्हेगारांपासून रक्षणः—जंगलच्या अधिकाऱ्यांस लहान लहान गुन्ह्यांची तडजोड करण्याचा अधिकार ठेविलेला आहे. इमारती लांकडें तोडणें व नेणें, गुरें चारणें व जंगल जाळणें हे गुन्हेगारांच्या सदरांत येतात. त्यांतील आगी लावण्याचा गुन्हा फार मोठा आहे; कारण तेणेंकरून जंगलाचें नुकसान फार होतें. पण हे गुन्हेगारे शोधून काढणें फार मुष्किलीचें असतें. आगी स्वाभाविक असोत किंवा अस्वाभाविक असोत त्यांपासून जंगलाचें संरक्षण करणें हें फॉरेस्ट ऑफिसरचें ( अरण्यरक्षक ) मोठें मेहनतीचें व महत्त्वाचें काम आहे. आगींनीं जंगलाचा फायदा होतो, ही समजूत हल्लीं नष्ट झाली आहे. कारण जनतेस संरक्षित व असंरक्षित अरण्यांतील भेद तुलनेनें समजूं लागला आहे. पण ह्यास असंस्कृत लोकांच्या परंपरागत रूढीत अपवाद आल्यावांचून रहात नाहींत. ह्या लोकांच्या जमाती मागला पुढला विचार न करतां स्वतःच्या गुरांकरितां आळपोळ करून जंगलांत वाव करीत असतां निष्काळजीपणानें जवळच्या जंगलांत आगी पसरून त्यांची राखरांगोळी करतात. वास्तविक ही गोष्ट थोडीशी जंगल तोडण्याची मेहनत घेऊन त्यांस सहज करतां येते. म्हणून ह्या जंगलांतील अधिकाऱ्यांस हे अनर्थ टाळण्यास पुढील उपाय करावे लागतातः—( १ ) त्यांस अशा लोकांच्या पोटांत शिरून गोडीगुलाबीनें त्यांच्या वाईट संवयी मोडून त्यांच्या जागीं त्यांस नवीन संवयी लावाव्या लागतात. त्यांस त्यांचें विड्या ओढून त्या जळत टाकण्याचेंहि व्यसन हळू हळू समजूत घालून सोडवावें लागतें. त्याबरोबर त्यांचे आपसांतील हेवे दावेहि त्यांस काढून टाकावे लागतात. बंद व राखीव जंगलांत त्यांच्या सरहद्दीवरील गवत वगैरे ज्वालाग्राही पदार्थ काढून टाकून अग्निमर्यादा ( फायर लाईन्स ) जशा पाहिजेत तशा व त्या जंगलाच्या विस्ताराप्रमाणें मध्यें किंवा अनेक ठिकाणीं कराव्या व अशा प्रकारें तीं जंगलें जंगली जातींस दिलेल्या जंगलाच्या भागापासून अगदीं अलग किंवा तुटक करावीं व त्यांच्या आसपास कोणासहि शेकोटी किंवा चूल पेटवूं देऊं नये. ह्या कामाकरितां किंवा वाऱ्यानें पसरत जाणारी आग जागच्या जागीं टहाळानें दाबून टाकण्याकरितां लागतील तशा गस्तवाल्यांच्या ( पेट्रोल्स ) टोळ्या ठेवाव्या. ( २ ) ज्या लोकांस जंगलच्या उत्पन्नाचा उपयोग करावा लागतो, त्यांच्या स्वहिताच्या प्रवृत्तीस जागृत करावें, म्हणजे ते तदर्थ एकत्र होऊन दिलसफाईनें एक होऊन अरण्याचें व विशेषेंकरून लोकांच्या अरण्याचें तरी संरक्षण करण्यास धावूं लागतील.

गु रां पा सू न र क्ष ण.-सरकारी जंगलांत गुरचरणीस सवड ठेविलेली आहे. ती इतकी कीं, त्यांत इमारती लांकडाच्या उत्पन्नाहून गुरांचें चारणें जास्त महत्त्वाचें धरण्यांत आलें आहे. पण यांत शेतकऱ्यांच्या गुरांपेक्षां गोपाळांच्या गुरांच्या व धनगरांच्या शेळ्यामेंढ्यांच्या चरण्याची पीडा जंगलांस फार होते. त्यांत गाईम्हशींच्या चरण्यापेक्षां शेळ्यामेंढ्यांचें कुरतुडणें फार वाईट असतें. गाईम्हशींच्या चरण्यानें जंगलाच्या वाढीस नुस्ती पीडा होते, पण शेळ्यामेंढ्यांच्या कुरतडण्यानें जंगलाचें समूळ उच्चाटण होतें म्हणजे तें मरतें. म्हणून एकाच जागेंत गुरचरणी व वनसंवर्धन साधणें शक्य नाहीं; तेव्हां लोकांस गवत हवें किंवा इमारती लांकडें हवींत ह्याचा निर्णय प्रथम करावा व त्याप्रमाणें वागावें, अथवा जंगलाचे तुकडे पाडून ते आलटून पालटून ह्या प्रत्येक कामास द्यावे. पण गुरें जंगलांत मोकाट सोडिलीं तर त्यांत गवत नाहींसें होतें; एवढेंच नाहीं तर त्यांच्या जातींची शुद्धताहि रहात नाहीं, व जंगलहि वाढत नाहीं हें ध्यानांत धरून बंद जंगलें गुरचरणीस फार करून मोकळीं ठेवीत नाहींत. इ. स. १९०१ त ३५००० चौरस मैल जमीन गुरचरणीस बंद होती व ३३००० चौरस मैल जमीन शेळ्यामेंढ्यांस बंद होती. फुकट अथवा कमी दरानें दिलेल्या कुरणांतील गवताची किंमत ११,००,००० रुपये होती. दुष्काळाच्या वेळीं चरणीवरील नेहमींचे निर्बंध अनेक वेळां काढून टाकितात.

जं ग ला चें स्वा भा वि क पु न रु ज्जी व न.—हें करण्यास जेथील जंगल लांकडांसाठीं तोडलें जातें त्या ठिकाणीं मृगाच्या सुमारास नवीन बियांची लागण करून त्यांचें पाऊस, पशु वगैरेंपासून रक्षण करावें.

जंगलखात्यांतील अधिकाऱ्यांनीं जेव्हां सदा पानें गाळणाऱ्या वृक्षांच्या अरण्यांचा ताबा घेतला, तेव्हां त्यांना बहु-

तेक भाग खराब झालेला होता. कारण त्यांतील निकोप व पूर्ण वाढलेलीं झाडें मोलवान इमारतीकरितां काढून नेण्यांत आलीं होतीं. एवढेंच नाहीं, तर त्यांच्या नवीन वाढीवर कुऱ्हाड व विस्तव यांचा प्रताप दाखवून त्यांची भयंकर नासाडी करण्यांत आली होती. अशा परिस्थितींत जमी-नीचा खराबा न होऊं देतां ह्या जंगलांतील शिलक झाडें कशीं काढून टाकावीं हा जंगलखात्यांतील अधिकाऱ्यांपुढें मोठा प्रश्न होता. याशिवाय आणखी त्या जमीनीवर निरोगी झाडांची पुन्हां उत्पत्ति कशी होईल हा त्यापुढील प्रश्न होता. ह्यावरून पहिल्या कार्यक्रमांत झाडतोड ही जंगल सुधारण्यास झटपट कां करतात ह्याचें ज्ञान होईल. ह्या क्रियांची तीव्रता व व्यवस्था प्रत्येक जंगलाच्या विशेष परिस्थितीवर अवलं-बून असते; पण त्यांत मुख्य रोख योग्य संरक्षणाच्या तज-विजीनें जमिनीची उत्पादन शक्ति वाढविणें व निरुपयोगी व इजा झालेलीं झाडें काढून त्यांच्या ठिकाणीं निरोगी झाडें वाढविणें याकडे असतो. निवडलेल्या झाडांची तोड परिमा-णतः क्षेत्रतः अथवा या दोन्हीं दिशांनीं मर्यादित करून कोणत्याहि जंगलाच्या पिकाचें नियमन करणें सोपें असतें. पण जंगलांतील अगणित झाडांपैकीं अगदीं थोडीं झाडें मौल्यवान असतात व ह्यांपासून पुरें उत्पन्न काढण्यास व कमी महत्वाच्या झाडांचें जणूं बळी देऊन त्यांच्या उत्पा-दनास उत्तेजन देत असतां, त्यांचें काळजीपूर्वक सतत संगो-पन करावें लागतें. ही गोष्ट प्राथमिक उपचार झालेल्या खराब अरण्यांसच लागू आहे एवढेंच नाहीं; तर प्रतिकूल परिस्थितीच्या परिणामानें फारशा न बिघडलेल्या वाढत्या जंगलासहि लागू आहे. ह्या ठिकाणीं दाखविलेली अडचण वाढविण्यास आणखी एक कारण होतें. तें हें कीं, ज्या ज्या ठिकाणच्या लोकांस आपले हक्क चालविण्याची सवलत द्यावी व जंगलाचें उत्पन्न फुकट घेऊं देण्याची मुभा द्यावी त्या त्या ठिकाणीं जवळच्या भागांत हलक्या प्रतीच्या इमारतीच्या लांकडांस मागणी अगदीं बहुतेक बंद होते व म्हणून असलीं झाडें काढून टाकण्याचें काम. फायद्याच्या ऐवजीं अंत पड्याचें होतें. अत्यंत इष्ट झाडांची संख्या व गुण पाहिजे तितके व पाहिजे तसे असतात तेव्हांहि ही अडचण नसते असें नाहीं. कारण त्यांत हलक्या जातीच्या व भराभर वाढ-णाऱ्या झाडांची संख्या मोठी असल्यामुळें त्यांची पीडा बरच्या झाडांस फार होते. ती इतकी कीं तीं वनरक्षकास समळ काढावीं लागतात. ह्या कारणास्तव आपल्या हिंदुस्थानच्या कांहीं भागांतील मोलवान सागाच्या अरण्यांचें पुन्हां स्वाभाविक पुनरुज्जीवन करणें फार कठीण झालें आहे. तें इतकें कीं, पुष्कळ वर्षांच्या अभ्यास-पूर्वक घेतलेल्या अनुभवाचाहि उपयोग त्या कामास बिलकूल होत नाहीं. खैर व लोखंडी ह्या झाडांच्या उत्पादनासंबंधीं पाहतां ह्यापेक्षांहि कमी माहिती वनसवर्धकांस असते. वस्तुतः पाहतां इष्ट जातीचे वृक्ष मिश्र अरण्यभर चोहोंकडे थोड-थोडे पसरलेले असतात. तेव्हां पुष्कळ माहिती मिळविण्यांत आली असतांहि ती त्यांच्या वर्धनास अपुरी पडते. अशा परिस्थितींत पुढील नियम साधारणपणें अनुसरतात. झाडांस वाटोळ्या खांचणीचे कमरबंद घालून तीं काढून टाकावीं व खुजट झाडें नाहींशीं करावीं. यामुळें उजेड जास्त येऊं लागून महत्वाच्या वृक्षांचीं रोपें उगवून वाढतात. ही क्रिया करण्यास फार खर्च येतो व सक्त नजर ठेवून हें काम फारशा मोठ्या प्रमाणावर करतां येत नाहीं हें खरें; पण अनेक ठिकाणीं विशेषतः साल वृक्षांच्या अरण्यांत या कामांत फार यश आलें आहे. याचीं कारणें एक तर सागा-पेक्षां सालाचा विस्तार या देशांत मोठा आहे व सालवृ-क्षांच्या संगतीला जीं दुसरीं झाडें असतात, त्यापेक्षां सालाचें रक्षण व वृद्धि सहज करितां येते. डोंगरी अरण्यांत त्यांच्या स्वाभाविक पुनरुज्जीवनास असली यातायात बिलकूल करावी लागत नाहीं. त्यांच्या पानाच्या छताचें योग्य रक्षण व त्यांवर विचारपूर्वक उपचार केले म्हणजे झालें. त्याची वाढ खात्रीनें होते. जंगलांतील झाडांचा सांठा कायम राखण्या-करितां निसर्गाच्या पुनरुज्जीवक शक्तीवर बहुतेक सर्वस्वीं अवलंबून रहावें लागतें. पण कांहीं प्रसंग असे असतात कीं, त्यांत निसर्गाची पुनरुज्जीवक शक्ति पुरें काम करूं शकत नाहीं. तेव्हां तीस हातभार लावावा लागतो. यांकरितां (१) मनुष्यास बीं पेरण्यासारखीं क्षेत्रें शोधून तयार करावीं लाग-तात व (२) त्यास त्या इष्ट क्षेत्रांत (ठिकयांत) बींहि नेऊन टाकावें लागतें. उदाहरणार्थ, आपल्या मुंबई इलाख्यांतील सह्याद्रि आदिक डोंगर व टेकड्या यांच्या नापिक उतरणीवर मुठींनीं बियांची पेरणी करणें, व ब्रह्म-देशांतील फुलें आलेल्या बांबूंची आगीनें सफाई करून त्यांच्या ठिकयांत साग व खैर यांचें बीं कुदळीनें खळगा खणून त्यांत लावणें.

जंगलांचें पुनरुज्जीवन गुल्माच्या पद्धतीनें ( कॉपिस ) करतां येतें. ज्या ठिकाणीं लहान इमारती लांकडें व सरपण ह्यांची मागणी फार असते व ज्या ठिकाणीं मोठ्या झाडांच्या वाढीस त्या जागची परिस्थिती प्रतिकूल असते, त्या ठिकाणीं ही पद्धत विशेषकरून प्रचा-रांत आहे. असल्या अरण्यांत महत्वाच्या जातीच्या वृक्षां-तील फळें धरणारे कांहीं वृक्षच काय ते राखून ठेवितात. म्हणजे त्याखालीं स्वाभाविक बीजप्ररोह ( सीडलिंगस्–रोपे ) उत्पन्न होऊन त्यांच्या पुनरुज्जीवनास मोठें साहाय्य कर-तात. ह्या पद्धतीनें जंगलखात्यास अनेक वेळां फार पैसा मिळतो.

सं स्का र.—पूर्वोक्त ( १ ) कमरबंद व ( २ ) झाडतोड या क्रियांशिवाय जंगलांत आणखी पुढील क्रिया करतातः— ( १ ) वेलतोड, ( २ ) पातळाई किंवा दाटण मोडणी व ( ३ ) सफाई. ज्या झाडांचीं खोडें त्यापेक्षां जास्त महत्वाच्या कोंवळ्या झाडांच्या खोडांच्या वाढीस अडचण करीत

असतील त्या झाडांची खोडें सर्फा काढून टाकितात. पण ह्या कामास चांगल्या कुशल लोकांची देखरेख लागते. म्हणून हें काम जंगलांत बेताबातानेंच करून घेण्यांत येतें. उलट पक्षीं वेलतोड व बांडगुळमार करणाऱ्या खात्यांतील राखणदार लोकांस यंत्रांप्रमाणें, फारशी अक्कलहुषारी न खर्चितां हें काम करितां येतें. म्हणून त्या रोगांच्या नाशार्थ दर वर्षी मोठ्या प्रदेशभर असले उपचार करतात. स्वाभाविक अरण्यांत दाटीची पातळाई व हेकड वनस्पतींची सफाई यांचें काम साधारणतः निराळें म्हणून करीत नाहींत. हें काम इतर क्रियांबरोबर करतात व त्याचा खर्च त्या इतर संस्काराच्या खर्चांत घालितात.

कृत्रिम पुनरुज्जीवन.—हिंदुस्थानांतील अरण्यांत कृत्रिम जंगलाची लागवड १,००,०००एकर पसरली आहे.ह्या क्षेत्रांतील अर्धा भाग ब्रह्मदेशांत आहे, तिसरा भाग मद्रास इलाख्यांत आहे, व बाकीच्या भागाचे तुकडे इतर प्रांतांत आहेत. साग, शिसवी, खैर, रबर व देवद्वार हीं झाडें येथें मुख्यत्वेंकरून लावितात. मद्रास इलाख्यांत नीलांबूर येथें अत्यंत प्राचीन सागाची लागवड आहे. ह्या लागवडीस इ. स. १८४२ त सुरुवात झाली. अगदीं आरंभापासून ही लावण्याचा मूळचा झालेला खर्च भरून आला. व ह्यापासून पुढें फार फायदा होण्याचा संभव आहे. ब्रम्हदेशांतील लागवड प्रामुख्येंकरून ढोंग्याचा पद्धतीची ( म्हणजे सर्व जंगल जाळून साफ करून लागवड करणें ) चालते. हीस महाराष्ट्रांत दळ्याची पद्धती असें म्हणतात. शेतांतील पिकांबरोबर सागाची लागवड करण्याचें कबूल केलें तरच सरकार तेथील लोकांस ढोंग्याच्या पद्धतीची उडती शेती करू देतें. ही पद्धति ह्या देशांच्या वहिवाटीस योग्य असल्यामुळें ह्या देशांत ह्या मोलवान सागाचा मोठा सांठा करण्यांत आला आहे. ह्या स्वाभाविक उत्पन्नाच्या पुरवठ्यास रबराच्या लागवडीची भर घालण्यांत आली आहे. गेल्या तीस वर्षांपासून आसाममध्यें रबराची लागवड चालू आहे व तेथील व दुसऱ्या ठिकाणांतील थोड्या प्रमाणावर अनुभव घेऊन सरकारनें रबराची लागवड ब्रह्मदेशांत :मोठ्या प्रमाणावर करण्याचा निःश्चय केला आहे. इ. स. १९०१ त ह्या लागवडीवर खर्च १,३०,००० रुपयांचा होता. हिंदुस्थानांत स्वाभाविक जंगलाची लागवड फार मोठी आहे. ह्या लागवडीशीं तुलना केली असतां ही अस्वाभाविक जंगलाची लागवड अल्प आहे. पण ज्या ठिकाणीं बन निर्द्रुम:झालें असेल, त्या ठिकाणीं (१)वनस्पतींची भराभर पुन्हां भरती करण्यास, ( २ ) कांहीं विशेष अरण्याच्या उत्पन्नांत: फार . जरुरीच्या पदार्थांचा पुरवठा करण्यास, ( ३ ) पडित जमीनीचा उपयोग करण्यास अथवा ( ४ ) कांहीं महत्वाच्या वृक्षांच्या लागवडींतील क्षेत्र वाढविण्यास ह्या अस्वाभाविक लागवडीच्या क्रिया अनेक वेळां जरूरीच्या व तशाच फायद्याच्याहि असतात.

जंगलाचें उत्पन्न.—हिंदुस्थानांतील जंगलांत पुढील जिन्नस उत्पन्न होतातः—(१) इमारती लांकडें, ( २ ) बांबू, व ( ३ ) गवत. इमारती लाकडांतील महत्वाचीं लांकडें म्हटलीं म्हणजे साग, देवद्वार, साल, शिसवी, अबनूस, खैर, चंदन, बाभूळ वगैरे. त्यांत दुसरीं विशेष कामास उपयोगी अशी हजारों प्रकारचीं लांकडें आहेत. पण तीं जागच्याजागींच खपणारीं आहेत. तीं एखाद्या धंद्यांत उपयोगी पडतील इतकीं उत्पन्न होत नाहींत. अथवा तीं व्यापारांत दृढमूल झालेलीं नाहींत. इ. स. १९०१ त इमारती लाकडें व सरपण २,३२,००० घनफूट उत्पन्न झालें. प्रत्येक प्रांतांत ह्याचें मैली उत्पन्न लोकसंख्येच्या दाटीप्रमाणें व उत्पन्नाच्या जोराप्रमाणें निरनिराळें असतें. ८७,००,००० रुपये किंमतीचा ३५,००,००० घनफूट साग वर्षांत परदेशीं पाठविण्यांत आला. त्या ठिकाणींच चंदन, अबनूस व दुसरीं नकशी करण्यासारखीं लांकडें १०,०००० रुपये किंमतीचीं पाठविण्यांत आलीं येथील जंगलांत १,८५,००,००० बांबू उत्पन्न झाले. ह्यांतील ¾ बांबू ब्रह्मदेशांतून आले व बाकीचे बांबू बंगाल, आसाम व मध्यप्रांत यांतून आले. ह्या वर्षी जंगलाचें किरकोळ उत्पन्न ५० लक्षांचें झालें. ह्यांतील मुख्य बाबी गुरचरणी, गवत ‘ कौचुक, ’ लाख, रंग, कात वेलदोडे, हिरडे व दुसरीं चामडीं कमविण्याचीं द्रव्यें ह्या होत. किरकोळ उत्पन्नापैकीं १,७५,००० रुपयांची लाख परदेशांत गेली. यापैकीं ⅓ भाग लाख इंग्रज सरकारच्या राज्याबाहेरील म्हणजे संस्थानांतील होती.

जंगलविषयक औद्योगिक संशोधन.—ब्रिटिश सरकारनें जंगलखातें स्थापल्यानंतरहि पन्नास वर्षे संशोधन कार्य सुरू केलें नव्हतें. १९०६ सालीं डेहराडून येथें ‘फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिटयूट’ सुरू करण्यांत आली असून त्यांत पांच संशोधन शाखा आहेत. त्या सिल्व्हिकल्चर ( तंतुकीटसंवर्धनविद्या ), फॉरेस्ट बॉटनी ( जंगलविषयक वनस्पतिशास्त्र), फॉरेस्ट एकॉनमिक प्रॉडक्टस् (जंगलांतील उपयोगी पदार्थ ), झूलजी ( प्राणीशास्त्र ) व केमिस्ट्री ( रसायनशास्त्र ). प्रत्येक शाखेवर एकेक तज्ज्ञ संशोधक नेमला आहे. जंगलांतील माल मुख्य इमारती व जळाऊ लांकूड हा असून बांबू, पानें, फळें, तंतू, गवत, डीक, राळ, साली, प्राणिज व खनिज पदार्थ वगैरे दुय्यम प्रतीचा माल सांपडतो.

जंगलविषयक धंदे.—अरण्यामुळें देशांतील जनतेचें व्यापारी दृष्ट्या कितीं कल्याण होऊं शकतें व लोकांना भरपूर काम कसें मिळूं शकतें या प्रश्नांची पुष्कळ जणांस योग्य कल्पना होत नाहीं. जर्मनीमध्यें नुसत्या अरण्यांतील कामावर दहा लाख लोक गुंतून गेले होते आणि प्रतिवर्षी तीन कोट पौंड मिळविणारे तीस लाख लोक अरण्यांत पैदास झालेला कच्चा माल करण्याच्या कामीं लागले होते. हा कयास पंधरा वर्षांपूर्वी करण्यांत आला होता. जंगलावर अवलंबून असणारी जंगली वस्ती सोडून दिली व हिंदुस्थानांतील या

प्रमाणसंबंधीं नक्की अंदाजाचे आंकडे जर मिळणें शक्य झालें तर असें आढळून येईल कीं, कच्चा माल करणाऱ्या लोकांनां फाजील प्रमाणांत कामधंदा मिळूं शकतो या कामकऱ्यांत सुतार, नावा बांधणारे, दोर वळणारे, मुड्या करणारे वगैरे सर्व कसबी मजुरांचा अन्तर्भाव होतो. १९११ च्या खानेसुमारीवरून पाहतां ११९१३६७ लोक ब्रिटिश हिंदुस्थानांत आणि ३९४०९७ देशी संस्थानांत असे कामावर होते. जंगल राखणें, पद्धतशीर काम करणें, कच्चा माल तयार करणें व नवीन मालासंबंधीं संशोधन करणें इत्यादि औद्योगिक गोष्टीमुळें हिंदुस्थानांतील अरण्यावर अवलंबून असलेले उद्योगधंदे भविष्यकाळीं वृद्धिंगत होऊं शकतील अशी आशा करण्यास जागा आहे.

पाईन वृक्ष व राळः—हिमालयाच्या पायथ्यानजीक असलेल्या विस्तृत पाईनवृक्षांचें महत्त्व वायव्येकडील जंगल अधिकाऱ्यांनां आतां कळूं लागलें आहे. वृक्षांनां फारशी इजा पोहचूं न देतां राळीचें उत्पन्न करण्याच्या फ्रेंच पद्धतीचा अवलंब करण्यांत येऊं लागला आहे. १९१९ मार्च अखेरपर्यंतचे आकडे पाहतां संयुक्तप्रांत व पंजाब मिळून एकंदर राळीचें पीक १२५६३३ मण ( ४६१५ टन ) इतकें झालें व त्याकामीं ४००० मजूर कामावर लागले होते

कागदः—ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें या दोन ठिकाणीं १९०४ त कागदाच्या आठ गिरण्या होत्या. प्रतिवर्षी २०१०० टन कागदाचो निपज होत असे व मजुरांची दैनिक सरासरी ४२६६ इतकी होती. १९२० त नऊ गिरण्या झाल्या. २९४०० टनांइतकी निपज झाली व ५७५९ मजूर लागले होते. टिटागरच्या गिरणीची कागदाची निपज १७९४३ टन झाली असून सर्वांत तीच गिरणी मोठी आहे. उपरिनिर्दिष्ट नऊ गिरण्यांकडून सध्याची कागदाची मागणी पुरविली जाते. १९१२–१३ सालीं सुमारें १३२५० टन कागदाचा रांधा हिंदुस्थानांत परदेशाहून आला. १९१९–२० सालीं ९४०० टनांचीच फक्त आयात झाली. महायुद्धाच्या वेळीं परदेशाहून सामान मिळण्याची अडचण पडत असे तरी एतद्देशीय गिरण्यांची निपज वाढली. यावरून शांततेच्या काळांत बरीच प्रगति दिसते. कागद करण्याच्या कामीं ज्या कच्च्या मालाचा उपयोग होतो त्यांत सबै, भाबर वगैरे गवतांचा समावेश होतो व हें गवत, बंगाल, छोटा नागपूर, ओरिसा, नेपाळ व संयुक्तप्रांत येथील अरण्यांत पैदा होतें. चिंध्या, अंबाडी, ताग, जुने कागद व दोर यांचा कागद करण्याच्या कामीं हिंदुस्थानांत उपयोग करितात. मुंजनामक गवताचाहि उपयोग होतो. परंतु त्यापासून केलेला रांधा बरा नसतो. लांकूड व गवत यांपासूनच सामान्यतः रांधा करण्यांत येतो. हिंदुस्थानांतील अरण्यांत वृक्षांच्या अनेक जाती असल्यानें रांध्याच्या कामाची फार थोडी लांकडें मिळतात. बहुतेक लांकडें इमारतीच्या कामीं उपयोगिलीं जातात. बांबू व गवत यांचा मात्र बराच उपयोग होतो असें आढळून आलें आहे. निरनिराळ्या जातीच्या बांबूचें महत्त्व आतां कळून येऊं लागलें आहे. कित्येक कंपन्यांनीं बांबूंपासून रांधा तयार करण्यास सुरवात केली आहे व ब्रह्मदेश, बंगाल व मुंबई येथील जंगलखात्यानें त्यांनां कौलहि दिले आहेत. गवताचाहि उत्तम रांधा होतो असें अनुभवास आलें आहे.

आगकाड्याः—या बाबतींत हिंदुस्थान परदेशावर अवलंबून आहे. जपान, स्वीडन, नार्वे, ऑस्ट्रिया हंगेरी, बेल्जिअम व जर्मनी इतक्या देशांहून काड्याच्या पेट्या इकडे येतात. वीस वर्षांपूर्वी हा धंदा निघाला व पहिला कारखाना अहमदाबाद येथें 'गुजराथ इस्लाम मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड' या नांवानें सुरू झाला. या धंद्यांत अद्याप वाढ झाली नाहीं. भांडवल, संघटन, पूर्ण ज्ञान व धंदा चालविण्याची पात्रता इतक्या गुणांची सिद्धता झाल्याशिवाय हा धंदा येथें उर्जितावस्थेस येणार नाहीं. कपाशीचें लाकूड काड्या करण्यास उपयोजितात. इतर कित्येक झाडांचें लांकूडहि काड्या करण्यास योग्य असतें. ( 'आगपेटी' पहा. )

कृमिनाशक व्यवस्थाः—कृत्रिम उपायानें किड्यांपासून लांकडांचें रक्षण करण्याची पद्धत जुनीच आहे. लांकडास रंग लावणें किंवा डांबर फासणें हें रोमन लोकांस माहीत होतें. आधुनिक पद्धतींत कोलटार, क्रेओसॉट नामक तेल, लांकडांस कीड लागूं नये म्हणून लावतात. हिंदुस्थानांत या तेलाचा फारसा उपयोग अद्याप कोणी करीत नाहीं.

जं ग ला च्या उ प यो गा च्या प द्ध ती.–जंगलापासून फायदा करून घेण्याच्या पद्धती निरनिराळ्या प्रांतांच्या गरजाप्रमाणें निरनिराळ्या अमलांत आणाव्या लागतात. जंगलांतून तेथील उत्पन्न काढून नेण्याच्या पद्धतींचें वर्गीकरण पुढील सदरांत करावें लागतें.—( १ ) खुद्द सरकारचे अधिकारी, ( २ ) खरेदीदार, ( ३ ) हक्कदार. पूर्वी येथें स्वतंत्र खात्याची व्यवस्था नसल्यामुळें जंगलें व्यापाऱ्यांस मोकळीं करून देत असत. ते आपल्या कारभारांत त्यांच्या बऱ्याकडेहि लक्ष देत नसत किंवा ते काढून नेलेल्या मालाबद्दल सरकारास योग्य मोबदलाहि मिळूं देत नसत. पंजाब, ब्रह्मदेश, मध्यप्रांत व संयुक्तप्रांत यांतील डोंगरी अरण्यांमध्यें या पद्धतीचे कुपरिणाम अजून दृष्टीस पडतात. या पद्धतींत कंत्राटदारांनीं ( ठेकेवाले ) जंगलांतील उत्पन्न विक्रीच्या जागेकडे नेत असतां त्यांच्या बऱ्यावाईट कामावर केवळ देखरेख ठेवणें यापलीकडे सरकारी अधिकारी कांहीं करीत नाहींत. हिंदुस्थानांत पूर्वी जंगलांत लांकडें तोडण्याबद्दल मयमतादिशिल्प ग्रंथांत लिहिलें आहे कीं, राजे, पाटील, सुतार, लांकूडतोडे वगैरे यांस यथाभाग कर व देणग्या देऊन व कुऱ्हाडी दूध, तेल व तूप यांनीं पाजवून घेऊन द्रव्यार्थी मनुष्यानें जंगलांत जावें व इष्ट वनस्पती तोडावी. मुहूर्तांचा खांब सरळ व चौरस करून व पांढऱ्या वस्त्रानें झांकून त्यानें तो गाड्यावर घालावा. नंतर त्यानें तो कारखान्यांत नेऊन वाळूवर ठेवावा व तो वाळेतों त्यानें तो पूर्वेस किंवा उत्तरेस तोंड करून

ठेवावे व त्या लांकडाचा उपयोग सहा महिन्यांपर्यंत करूं नये. अशाच तऱ्हेचा मजकूर राजवळभांत आहे.

हल्लींच्या पद्धती.—हल्लीं इमारती लांकडें खरेदीदारांमार्फत काढून नेण्याच्या कामाचें नियंत्रणहि देशाचाराप्रमाणें अनेक प्रकारें करतात. ब्रह्मदेशांतील 'बॉंबे-बर्मा ट्रेडिंग कोर्पोरेशन'सारख्या मोठया खरेदीदार मंडळीस फार मोलवान झाडें तोडून नेण्याचा परवाना कांहीं शर्तींवर देतात. उदाहरणार्थ अशा मंडळीनें ठराविक महसुलाच्या नाक्यांवर राजभाग (कर) देण्याची तजवीज केली पाहिजे, वगैरे. कमी महत्त्वाच्या इमारती लांकडाच्या खरेदीदारांस लांकडें तोडून नेण्यास परवाना (पास अथवा लायसेन्स) देतात. हा परवाना देतांना प्रथमच खरेदीच्या किंमतीचा कांहीं भाग वसूल करतात. ह्या दोन्हीहि पद्धति जंगलाच्या संरक्षणार्थ उत्तम प्रकारच्या नसोत, पण ह्या व्यापाऱ्यांच्या गरजांस व लागणाऱ्या देखरेखीस जशा पाहिजेत तशा आहेत. कारण या पद्धतींत फक्त लांकडांच्या उचलसाचलींत जास्त मोलवान लांकूड घावयाचें नाहीं एवढी विशेष खबरदारी घ्यावयाची असते. अरण्यांतील किरकोळ उत्पन्न जमा करून नेण्याकरितां खरेदीदारांस असल्याच पद्धतीचे परवाने (पास) देतात; किंवा उत्पादक प्रदेशाचे मक्ते देतात; किंवा नियमित मुदतीनें माल गोळा करण्याबद्दल वैयक्तिक परवाने (लायसेन्स) देतात. अनेक वेळां गुरचरणीबद्दल फी मुलकी खात्यांतून (लँड रेव्हिन्यू डिपार्टमेन्ट) व कधीं कधीं जंगल कामदारांमार्फत (फॉरेस्ट ऑफिसर) वसूल करण्यांत येते.

हक्कदारास मोफत माल देण्याची मुभा जी द्यावयाची ती बहुतेक सर्वस्वी जंगलखात्यांतील मागणीवर अवलंबून असते. कांहीं प्रांतांत असल्या हक्कदार लोकांस बंद जंगलांत पुऱ्या हक्काची बजावणी करावी लागत नाहीं. कारण त्यांस आपल्या गरजा भागविण्याची पुरी सोय जवळच्या लोकांच्या जंगलांत पाहिजे तशी आहे. दुसऱ्या कांहीं जंगलांत जेथें त्याच्या उत्पन्नावर पुरा ताण बसला आहे, त्यांत इमारती लांकडांची फाजील वाहतुक न व्हावी म्हणून सक्त पहारा करावा लागतो. ह्या प्रकारांमधील नियंत्रणाचे नियम ठरवावे लागतात. एका बाबतींत नोंद, वह्या व परवाने लागत नाहींत पण दुसऱ्या बाबतींत ते परवाने देण्यावर व त्यांच्या नोंदीवर नजर ठेवावी लागते.

हिंदुस्थानांत जंगलाचें उत्पन्न वसूल करण्याच्या पद्धती प्रत्येक प्रांतांत निरनिराळ्या आहेत. व त्यावरून प्रत्येक प्रांतांतील लोकरूढीप्रमाणें अनेक प्रकारचे नियम करण्यांत आले आहेत.

हल्लींच्या सरकारास जंगलाची किंमत किती आहे याचा अंदाज जंगलापासून होणाऱ्या पैशाच्या जमेवरून बराच करतां येईल. (कोष्टक पहा). संरक्षण व सुधारणा झाल्यामुळें सरकारी जंगलाचें उत्पन्न इतकें वाढलें आहे कीं तें पुढील वाढती मागणी भागवून उरण्यासारखें आहे.

जंगलच्या उत्पन्नाच्या मोफत देणग्याः—जंगलापासून हल्लींच्या सरकारास जो एकंदर महसूल होतो, त्याची एकंदर निर्गतीशीं तुलना करीत असतां ह्या गोष्टीचें स्मरण ठेविलें पाहिजे कीं सरकारी जंगलांतील इमारती लांकडें व इतर उत्पन्न त्याजवळ राहणाऱ्या लोकांस फुकट अथवा कमी दरानें देण्यांत येतें. इ. स. १९०१ त ह्या देणग्यांची किंमत निदान सरकारी जंगलाच्या एकंदर उत्पन्नाचा शेकडा १६ भाग होतो व लोकांच्याकडून जंगलांच्या जमीनींतून राजभाग (कर) दिल्यावांचून जीं इमारती लांकडें व दुसरीं अगणित उत्पन्नें नेण्यांत आलीं, त्याची परिगणना ह्या हिशोबांत झाली पाहिजे. हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, हल्लींच्या ब्रिटिश सरकारच्या प्रत्यक्ष अमलाबाहेर या आपल्या देशांत पुष्कळ मोठमोठीं जंगलें आहेत. ही मालमत्ता देशी राजांची अथवा खासगी व्यक्तींची आहे. ह्या अरण्याच्या आंकड्यांचीं कोष्टकें मिळणें कठीण आहे. कारण त्या जंगलांची अजून फारकरून पहाणी करण्यांत आली नाहीं; एवढेंच नव्हे तर त्यांचा कारभारहि निराळा ठेवण्यांत येत नाहीं. पण त्यांचा पुढील वृत्तांत वाचकांस कांहीं कौतुक उत्पन्न करण्यासारखा होईल असें वाटतें. ज्या महत्वाच्या देशी संस्थानांत जंगलाच्या व्यवस्थेची थोडीबहुत पुरी तजवीज झाली आहे, त्याचा आपण प्रथम विचार करूं:—

(१) हैद्राबादः—ह्या संस्थानांत सरकारी जंगल सुमारें ५००० चौरस मैलांचें आहे. ह्या जंगलापासून त्या सरकारास २,८०,००० रुपयांचें उत्पन्न इ. स. १९०० त झालें व त्यांपैकीं निम्में उत्पन्न त्याच्या खर्चांत गेलें. ह्या जंगलच्या हद्दी कायम होऊन ठराव झाले कीं, हें उत्पन्न फार वाढणार आहे. हें करण्यास पुष्कळ वाव आहे

(२) म्हैसूरः—ह्या संस्थानांत बंद जंगल २००० चौरस मैलांचें आहे. त्याचा वसूल इ. स. १९०० त १३ ½ लाखांचा होता व निव्वळ महसूल सुमारें ९ लाखांचा होता. यांतील ¾ महसूल चंदनाच्या लांकडांचा होता. यांत आगीपासून जंगलाचें रक्षण करण्याची व्यवस्था १५०० चौरस मैलांत आहे.

(३) काश्मीरः—ह्यांत २,१८० चौरस मैल सरकारी कायम जंगल आहे. ह्याचें आगीपासून रक्षण करण्याची सोय आहे. इ. स. १९०१ त ह्याचा महसूल ८,८०,००० रुपये आला व ह्यावर खर्च ५,८०,००० रुपये झाला.

(४) जोधपूरः—ह्यांत इ. स. १९०१ त जंगलाचें क्षेत्र ३४३ चौरस मैलांचें होतें. ह्याचें उत्पन्न सुमारें २०,००० रुपयें झालें व याला खर्चसुद्धां इतकाच लागला.

## सरकारी जंगल व जंगलखात्याचा जमाखर्च १९१८-१९.

| प्रांत | प्रांताचें क्षेत्र (चौ. मैल) | जंगलाचें क्षेत्र: बंद (चौ. मैल) | राखीव (चौ मै) | संस्थानी (चौ. मैल) | एकूण (चौ. मैल) | क्षेत्रफळाशीं जंगलाचें शे. प्रमाण | जंगलाचा माल: इमारती व जळाऊ माल (घ फूट) | इतर माल (रु.) | उत्पन्न (रुपये) | खर्च (रुपये) | शिल्लक (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हिंदुस्थान सरकार | | | | | | | | | ३६,५७१ | ४,६६७,७९६ | ४३१२२५ |
| बंगाल | ७८८३६ | ४८८८ | १७११ | ४०३० | १०६२९ | १३ ५ | २१८१७०=० | ४०६७४३ | १९४४१०४ | ८२५८३५ | १११८२६९ |
| संयुक्तप्रांत | १०६७२५ | ६३११ | ११०१ | ६१ | ७४७३ | ७·० | ३२८९४००० | २३९०६४१ | ६६३७१६६ | ४५९८९६३ | २०३८२०३ |
| पंजाब | ९६६५० | २१०९ | ४१६९ | ७६७ | ७७४५ | ७·३ | ३४४०१००० | २५१६८७९ | २१५४१७८ | १७९५८०४ | ३५८३७४ |
| ब्रह्मदेश | २२६९११ | २९३३६ | ... | ११६८२९ | १४६१६५ | ६४·४ | १००७७५००० | ९५७१७७ | १२५२८८५२ | ५६९१९८२ | ६८३६८७० |
| बिहार ओरिसा | ८२४८४ | १७४७ | १०८९ | ... | २८३६ | ३·४ | २०३२६००० | २५५५८६ | ९४४७६३ | ४३०८४९ | ५१३९१४ |
| आसाम | ४८९५४ | ५४९५ | ... | १६३०९ | २१८०४ | ४४·५ | १३४४५००० | १२४८९५२ | १४९२७१८ | ६९०९६१ | ८०१७५७ |
| मध्यप्रांत वऱ्हाड | ९९९४८ | १९६४५ | ... | ... | १९६४५ | १९·७ | ३४८६७००० | २२७१८३५ | ३४८८४२२ | २०१५५४८ | १४७२८७४ |
| कुर्ग | १५८२ | ५२० | ... | ... | ५२० | ३२·९ | ६४९५७६ | २३४१९ | ६७७८७३ | ४२५५७२ | २५२३०१ |
| वायव्यसरहद्दप्रांत | १३१८४ | २३६ | ... | ... | २३६ | १·८ | ३०६९००० | ३०८८७ | ३८१३२२ | २०७३५७ | १७३६६५ |
| अजमीर मेवाड | २७६७ | १४२ | ... | ... | १४२ | ५·१ | १५८९९४ | ६७७४५ | ३७२८० | २८५०८ | ८७७२ |
| बलुचिस्तान | ५४२२८ | ३१३ | ... | ४७२ | ७८५ | १·४ | २५४३४८ | ४६३५६ | २५१०८ | २८७८७ | -३६७९ |
| अंदमान | ३१४३ | ८५ | ... | २१२२ | २२०७ | ७०·२ | १८०२००० | २७९२ | ११८४३८३ | ६१२८२६ | ५७१५५९ |
| मद्रास | १४२२१८ | १८७१२ | ... | ६८२ | १९३९४ | १३·६ | २२५०४००० | २४०८४६५ | ४७९१४६० | ३१८२५२० | १६.८९४० |
| मुंबई | १२३१६४ | १२१०० | ४८७ | ... | १२५८७ | १०·२ | ५६८८८००० | १६५७७११ | १०४९४०३१ | २८७२१९७ | २६२१८३४ |
| एकूण | १०८०७९४ | १०१६३९ | ८५५७ | १४१२७२ | २५१४६८ | २३.३ | ३४३८५०९१८ | १४२०४५८८ | ४६८१८२३१ | २३८७५५०५ | १७९४२७२६ |

(५) त्रावणकोरः—त्यांत बंद जंगल १८०० चौरस मैलांचें आहे. हें बहुतेक आगीपासून रक्षिलेलें आहे. इ. स. १९०१ त त्याचें उत्पन्न ५ ½ लाखांचें व खर्च सुमारें १ लाखांचा होता. ह्या संस्थानांशिवाय कांहीं लहान संस्थानांत मोठमोठीं जंगलें आहेत. तीं एकंदर ४२००० चौरस मैल क्षेत्रफळाचीं आहेत, व ब्रिटिशांच्या राज्यांत खासगी व्यक्तींचीं जंगलें ७७,००० चौरस मैल क्षेत्रफळाचीं आहेत. यावरून कोणी असें समजूं नये कीं, हीं झाडून सर्व जंगलें किर्र दाट झाडींनें भरलेलीं आहेत. यांतील कांहींत डोंगरांच्या उतरणांवर झुडपांचें जंगल आहे. दुसऱ्या कांहीं ठिकाणीं जंगलाचें मुख्य उत्पन्न म्हटलें म्हणजे गवत किंवा दुसऱ्या किरकोळ पदार्थांचें आहे. पण त्यांत मोलवान इमारती लांकडांचीं झाडें असणारेंहि जंगल आहे; व साधारणतः पाहतां सरकार खासगी जंगलाच्या कामांत बिलकूल ढवळाढवळ करीत नसल्यामुळें व त्या जंगलाच्या संरक्षणाकरितां मुद्दाम कायदा केला नसल्यामुळें त्यांची जोपासना मालकांच्या अक्कलहुषारीवर अवलंबून आहे.

जंगलांतील लोकांच्या जाती व त्यांची सामान्य आर्थिक स्थिति.—मागील संक्षिप्त वर्णनावरून हिंदुस्थानांत सरकारी जंगलांची उत्पत्ति कशी झाली? व तिची व्यवस्था हल्लीं कशी चालली आहे हे समजलें. पण ह्या बाबतींत पूर्वापार व्यवस्था कशी चालत आली याबद्दल फार थोडें वर्णन दिलें आहे. सरकारी जंगलें उत्पन्न करतांना प्रथम शोध करून जंगलांच्या कामास हात घालीत असतां आपलें काम सुधारणेच्या लाटेपुढें लोटत जाणारें आहे असें जंगलाच्या कामगारांस आढळतें. कारण ही सुधारणा सुस्थित प्रदेशांतील वाढत्या बरकतीनें झालेली असते. पुढील गोष्टींची तरतूद करूं लागलें असतां त्याची गांठ जंगली लोकांशीं पडते. सदरहू लोक भित्रे किंवा क्रूर, साधे किंवा कपटी असोत, पण त्यांतील प्रत्येकांत एक विशेष आढळतो. तो हा कीं त्यांच्या मूळच्या रहाणींत रूढी व संवयी यांशीं विरोध करणारी कोणतीहि गोष्ट कोणीहि केली कीं, ते त्याचा अत्यंत हेवादावा करूं लागतात. कारण, ही नवीन सुधारणा आली कीं, आपली यापुढें धडगत लागावयाची नाहीं. तिजपुढें आपल्यास एक तर नामशेष झालें पाहिजे किंवा आपल्यास आपल्यापेक्षां जास्त चिवट लोकांच्या संख्येंत गडप तरी होऊन गेलें पाहिजे असें त्यांस वाटूं लागतें. ह्यांत हिंदुस्थान सरकारचें धोरण ह्या जंगलांतील जातीच्या रहाणींत एकदम जमीन अस्मानाचें अंतर जेणेंकरून पडेल असें कोणतेंहि कृत्य करावयाचें नाहीं, पण सहानुभूतीनें व गोडीनें त्यांचा विश्वास संपादन करावयाचा व याप्रमाणें स्वतःच्या पायांवर उभा रहाणारा त्यांचा समाज स्थापन करावयाचा व आजपर्यंत जे त्यांच्यांतील तंटे केवळ ' बळी तो कान पिळी' ह्या तत्वांवर मिटत असत, त्यांचा निकाल आपल्या मध्यस्थीच्या न्यायानें होईल तो त्यास कबूल करावयास लावाव, याचा अशा तऱ्हेचें आहे. जसें धोरण कृतींत उतरेल, तसें त्या जंगलांच्या संरक्षणाच्या व पुनरुज्जीवनाच्या कामांतील यश किंवा अपयश अनेक वेळां अवलंबून असतें. कांहीं विशेष अपवाद सोडून दिले तर ह्या जंगलांतील जमातींतले बहुतेक लोक आपल्या अन्नाच्या पुरवठ्यांत भर घालण्यास कांहीं अंशीं शेतीवर अवलंबून असतात. मग त्यांची पारध करणें, मासे मारणें, व जंगलांत उत्पन्न होणारे जिन्नस जमा करणें हा केवढाहि महत्वाचा धंदा असो. ह्यांतील बहुतेक लोक फिरते असतात. ते पारधीच्या प्राण्यांच्या शोधार्थ आपल्याकडील कातकरी, राधरी फासेपारधी वगैरे लोकांप्रमाणें जागोजाग फिरतात व आपल्या तूर्तातूर्तच्या मुक्कामाच्या ठिकाणीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें दळ्याची उडती शेती करतात. ह्यांच्याजवळ स्वतः केलेलीं किंवा मिळवलेलीं उत्तम शस्त्रें असतात, व त्यांच्या अंगावर तांबडें किंवा हिरवें गोंदकाम असतें. हें उघड आहे कीं, ज्या मोठ्या प्रदेशभर हे जंगली लोक भटक्या मारीत रहातात, त्यांचें नियंत्रण केल्याबरोबर त्यांच्या अन्नाच्या पुरवठ्यांत तुटवडा पडतो व असें झालें असतां त्यांच्या हळूहळू कायमची शेती करणाऱ्या जमाती खेड्यांत राहूं लागणें संभाव्य असतें. व असल्या खेड्यांतील लोक प्रथम हरएक बाबतींच्या आपल्या गरजा स्वतःच्या स्वतः भागविणारे असले, तरी कालांतरानें त्यांच्या स्थायिक वस्तींत त्यांच्या पूर्वीच्या जंगलांतील आयुष्यक्रम व उद्योग यांची जरूरी त्यांस बिलकूल न राहिल्यामुळें आपोआप अंतर्धान पावतात.

[ संदर्भग्रंथ.—राजवल्लभ ( अप्रकाशित ); मयमतः बॉम्बे क्रॉनिकल ( ८-११-२२ ); ऋग्वेद संहिता; अरण्यसंहिता-सामवेदी; थत्ते-जंगलाची जोपासना ( अप्रकाशित ); एन्साक्लो-ब्रिटानिका; महाभारत-उपसंहार; कौटिलीय अर्थशास्त्र; सरडी. ब्रँडिसकृत 'इंडियन फॉरेस्ट्री;' ई. सी. कोटस्कृत ' इंडियन फॉरेस्ट झूलजी; ' ए. पी. स्टेबिंगकृत 'इंज्यूरियस इन्सेक्टस ऑफ इंडियन फॉरेस्टस्; ' डब्ल्यू. आर. फिशरकृत ' मॅन्युअल ऑफ इंडियन फॉरेस्ट, बॉटनी; बेडन-पावेलकृत ' फॉरेस्ट लॉ; ' इंडियन ईयर बुक; ' इंपीरियल गॅझि ].

**जंगल महाल**—इंग्लिशांचा ज्यावेळीं बंगाल्यांत चांगला जम बसला नव्हता, त्यावेळीं त्यांच्या ताब्यांतील कांहीं भागास हें नांव होतें. इ. स. १८०५ सालीं त्याचे निरनिराळे १५ परगणे केले व सर्वांस जंगलजिल्हा हें नांव दिलें. पुढें इ. स. १८३३ सालीं जंगल महाल जिल्ह्यांतील भाग आसपासच्या जिल्ह्यांत विभागण्यांत आला.

**जगलूर**—हा तालुका म्हैसूर संस्थानांत चितलदुर्ग जिल्ह्यांत आहे. ह्याचें क्षेत्रफळ ३७२ चौ. मै. आहे व येथील लोकसंख्या ( १९११ ) ५३५७४ होती. ह्या तालुक्यांत जगलूर शहर व १२९ खेडीं आहेत. ह्या तालुक्यां त

जनगद्दला नांवाची नदी आहे. ह्या तालुक्यांत कापूस, पांढरा' जोंधळा ' ऊंस व तांदुळ हीं पिकतात.

**जगाम्री** त ह सी लः—पंजाब प्रांतांत अंबाला जिल्ह्यांत ही तहसील आहे. येथील लोकसंख्या ( १९११ ) १४०२९५ असून याचें क्षेत्रफळ ४०६ चौ. मैल आहे. ह्या तहशिलींत जगाम्री व बूरिया हीं दोन शहरें व ३७५ खेडीं आहेत. येथील जमीनमहसूल सन १९०३-४ सालीं २.९ लाख होता.

श ह र.—हें पंजाब प्रांतांत अंबाला जिल्ह्यांत नॉर्थ वेस्टर्न रेल्वेवर रेल्वेपासून ५ मैलावर आहे. ह्या शहरची लो. सं. सन १९११ सालीं १२०४५ होती. ह्या शहरचें महत्व बूरियाचे शीख सरदार रायसिंग ह्याच्यामुळें आहे. मूळचें शहर नादिरशहानें उध्वस्त केलें होतें. तें १७८३ सालीं रायसिंग सरदारानें व्यापारी व हुन्नरी लोक आणून पुनः उर्जितावस्थेला आणिलें व तें शहर १८२९ सालीं ब्रिटिश सरकारला मिळालें. हें शहर लोखंडी व पितळेचीं भांडीं, टांकणखार, शिशाचें प्राणिद ह्यांबद्दल प्रसिद्ध आहे.

**जग्रांव** त ह सी लः—पंजाबमध्यें लुधिआना जिल्ह्यांत ही तहसील आहे; व हिचें क्षेत्रफळ ४१७ चौ. मै. आहे. येथील लोकसंख्या सन १९११ सालीं १४६६५९ होती. ह्या तहसिलींत जग्रांव व रायकोट हीं दोन शहरें आहेत व १७० खेडीं आहेत. या तहसिलीचा जमीनमहसूल ३.३ लाख सन १९०३-४ सालीं होता. शीख युद्धामधलें आलिवालचें रणक्षेत्र याच तहसिलींत आहे.

श ह र.—तहसिलीचें मुख्य ठिकाण आहे. येथील लो. सं. सन १९११ सालीं १५०३९ होती. हें व्यापारी शहर आहे व येथें गहूं,साखर, हस्तिदंती कोरीव जिनसा व बिलियर्डचे खेळण्याचे चेंडू ह्या जिनसांचा व्यापार जोरांत चालतो. येथें म्युनिसिपालिटी आहे. येथें सरकारी दवाखाना व म्युनिसिपालिटीच्या अँग्लोव्हर्नाक्युलर स्कूल्स आहेत.

**जंगीपुर** वि भा ग.—बंगाल. मुर्शिदाबाद जिल्ह्याचा उत्तरेकडील एक विभाग. उ. अ. २४°-१९' ते २४°-५२' व पू. रे. ८७°-४९' ते ८८-°२१' क्षेत्रफळ ५०९ चौ. मै. या विभागाचे भागीरथी नदीमुळें दोन भाग झाले असून पश्चिमेकडील भाग उंचवटयाचा आहे व पूर्वेकडील मळीचा सपाट प्रदेश आहे परंतु यास पुराचें भय आहे. लो. सं. (१९११) ३५७९३० यांत दोन गांवें व ४३४ खेडीं आहेत.

गां व.—विभागाचें मुख्य ठिकाण. उ. अ. २४°-२८ पू. रे. ८८°-४'. इ. स. १९११ सालीं येथें ११४०८ लोकसंख्या होती. हा गांव जहांगीर बादशहानें वसविला असें म्हणतात. ब्रिटिश अंमल ज्यावेळीं येथें नुकताच धुरू झाला होता त्यावेळीं येथें रेशमाचा व्यापार बराच होत होता. या ठिकाणीं ईस्ट इंडिया कंपनीची एक शाखाहि होती. इ. स. १८६९ सालीं येथें म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

**जंघाशूल**--जंघेच्या पार्श्व भागांतून मोठा मज्जातंतू जातो, त्यामध्यें तीव्र वेदना उत्पन्न होते त्या शूलाला हें नांव आहे. ही वेदना ढुंगणापासून मांडीच्या मागील भागांतून पोटरीच्या बेचकळीपर्यंत व कधीं तर तेथून पायाच्या तळव्यापर्यंत असते. कारणें:-आंतड्यांतील मळांच्या गांठीचा दाब अगर गर्भाशयाच्या साध्य अगर असाध्य ग्रंथींचा दाब,संधिवात,हिमज्वर, पादांगुष्टवात, फिरंगोपदंश, अतिश्रम,गारठा व ओल यांपैकीं एखाद्या अगर अनेक कारणांमुळें शूल सुरू होतो. रोग्यानें अंथरुणांत पडून पूर्ण विश्रांति घ्यावी व मांडी शेकावी. पोटांत पोटयाशियम आयोडाइड व सोडासॅलिसिलास हें औषध घ्यावें. पादांगुष्टवात रोगांत क्षारयुक्त व रेचक औषधें, वेदना शमण्यासाठीं कोकेन अगर मार्फीया टोंचून घालवा. अगर त्वचा लाल होईल असें एखादें उष्ण तेल चोळावें; विजेची पेटी लावावी. इतर जागीं अर्धशिशि वगैरे शूल उत्पन्न होतात. त्या प्रकारापैकींच हा शूल आहे. अधिक माहितीसाठीं मज्जातंतूशूल हा लेख पहावा.

**जंजिरा** सं स्था न—यासच हबसाण ( आफ्रिकनचा प्रदेश ) असें म्हणतात. मुंबई इलाख्यामधील कोंकण प्रांतांतील कुलाब्याच्या पोलिटिकल एजन्सींतील हें एक संस्थान आहे. हा प्रांत उत्तर अक्षांश १८° ते १८° ३१' व ' पूर्व रेखांश ५३' ते ७३° १७ असून याच्या उत्तरेस कुलाबा जिल्ह्यांतील कुंडलिका पूर्वेस त्याच जिल्ह्याचें रोहें आणि माणगांव हे तालुके; दक्षिणेस रत्नागिरी जिल्ह्यांतील बाणकोटची खाडी;:पश्चिमेस अरबी समुद्र आहे. याचें क्षेत्रफळ ३७७ चौरस मैल असून, यांत लोकसंख्या (१९२१) ९८५७३ व गांवें२३६आहेत. यांत काठेवाड संस्थानांतील जाफराबादहि धरलें आहे. हेंहि याच संस्थानांत आहे. संस्थानचे आठ तपे अथवा महाल आहेत. एका तप्यांत साधारण २८ खेडीं व ४० चौ. मैल प्रदेशाचा समावेश होतो.' जंजिरा ' हें नांव जझीराह् ( म्हणजे बेट ) या अरबी शब्दाचा (मराठी) अपभ्रंश आहे. प्रदेश डोंगराळ असून डोंगर समुद्रकिनाऱ्यास समांतर आहेत. हबसाणांतील सर्वांत उंच पहाड मदगड नांवाच्या किल्ल्याचा आहे (१३०० फूट). डोंगराच्या उतारावर दाट रानें आहेत. लहान लहान खाड्यांच्या बाजूस व किनाऱ्यावर नारळीपोफळीचीं झाडें आहेत. याच्या मागें थोडी दलदलीची जमीन लागत असून त्याच्या पलिकडे भातशेतीची जमीन आहे. सावित्री नदीच्या मुखाजवळ कुंजरींचें खोरें हें देखाव्याच्या दृष्टीनें कोंकणांतील एक प्रख्यात ठिकाण आहे. येथील खेड्यांतील लोक खाऊन पिऊन सुखी आहेत. डोंगरांत कातकरी रहातात. पूर्वी पावसाळ्यांत या भागांत प्रवास करणें जवळ जवळ अशक्य होतें. परंतु इ. स. १८८३ सालापासून नवीन रस्ते तयार होऊन पावसाळ्यांत प्रवास करण्याची सोय झाली आहे. किनाऱ्यावर राजपुरीखेरीज प्रत्येक खाडीच्या मुखाशीं पुळण असल्यामुळें गलबतें आंत जात नाहींत येथील वाहणारे ओढे पावसाळ्यांत भरपूर

वाहतात. परंतु इतर वेळीं कोरडे असतात. सर्वांची लांबी ५–६ मैलांच्या आंतच असते. कोणत्याहि खाडीच्या मुखाच्या आंत शिरतांना प्रथम खडक लागतात. परंतु एकदां आंत गेलें म्हणजे मुळींच भय नसतें. राजपुरी खाडीचें मुख मुंबईच्या दक्षिणेस ४५ मैल आहे. ही खाडी जंजिऱ्याच्या आग्नेयीस १४ मैलांवर म्हशेळे गांवापर्यंत आहे; तींत सुमारें १२ फूटपर्यंत ( भरतीच्या वेळीं ) पाणी चढतें. या संस्थानांत सांपडणारा दगड काळा आहे. इमारती लाकडांत सागवान पुष्कळ आहे. रानांत वाघ, चित्ते, डुकरें, रानमांजरें वगैरे सांपडतात. विषारी सर्प इकडे फार आहेत.

हवा थोडीशी दमट असली तरी निरोगी आहे. समुद्रावरील वाऱ्यानें किनाऱ्याजवळील भाग थंड असतो. पाऊस सरासरी १०७ इंच पडतो. जंगलचें उत्पन्न बरेचसें होतें. १९२२ सालीं १७८५०० पर्यंत उत्पन्न झालें. साग, ऐन, काजू, माड, आंबे वगैरेंपासून उत्पन्न मिळतें. संस्थानांत इंग्रजी हायस्कूल एक, इंग्लिश मिडल स्कूल एक, मराठी शाळा २६ व हिंदुस्थानी शाळा ३६ ( एकंदर ५२ मुलांच्या व १२ मुलींच्या ) असून एकंदर विद्यार्थी ३२६६ आहेत. एकंदर लोकसंख्येच्या २५.६ शेंकडा विद्यार्थी आहेत. संस्थानिक शिद्दी वंशाचा असून सुनी पंथाचा मुसलमान आहे व त्यास नबाब ही पदवी आहे.

यांत मुरूड व श्रीवर्धन हीं दोन गांवें मुख्य आहेत. सुमारें शेंकडा ८२ हिंदू व १७ मुसलमान लोक येथें आहेत. येथें राहणाऱ्या प्रमुख जाती आगरी, कोळी, कुणबी, महार, ब्राह्मण, प्रभू, मुसलमान, शिद्दी या होत. येथें बेने इस्रायल लोकांचीहि थोडीशी वस्ती असून ते मराठी भाषा बोलतात. हे धर्मानें ज्यू आहेत. मुंबई बंदरांतील होड्यांवरचे खलाशी तसेंच किनाऱ्यावर व्यापार करणाऱ्या आगबोटी यावरील खलाशी बहुतेक याच बाजूचे असतात. इ. स. १९०३–०४ सालीं ४१ चौरस मैल जमीन लागवडीखालीं होती. मुख्य पिकें म्हटलीं म्हणजे भात, नागली, वरी, सुपारी आणि नारळ हीं होत. मीठ पिकविणें फक्त सरकारच्या हातीं आहे. समुद्रांतील मासे धरणें हा येथें पुष्कळांचा धंदा आहे. संस्थानांत व्यापार धंदे म्हणण्यासारखे नाहींत. साग, चामडीं, हाडें, मासळी, ताग, नारळ वगैरे माल निर्गत होतो. खुद्द जंजिरा येथें कागद तयार होतो. सन १९२२ सालीं ११४९५५५ रुपयांची आयात व ५३०९५३ रुपयांची निर्गत झाली. कारभार नबाबाच्या हुकमानें कारभारी सर्व कारभार करतो. त्यावर पोलिटिकल एजंटची देखरेख असते. संस्थानचें उत्पन्न ६ लाख ७० हजार ( यांतच जाफराबादचे ७०००० रुपये आले आहेत. व इंग्रजसरकारचे अबकारी बद्दलचे १३ हजार रुपयेहि यांतच आहेत ) रुपये आहे. मुरुड आणि श्रीवर्धन येथें म्युनसिपालिट्या आहेत. तिहींचें उत्पन्न १५२४० रुपये व खर्च १०१९३ झाला ( १९२२ ). एक जमीनदारसभाहि सध्यां स्थापन झाली आहे. संस्थानाकडून इंग्रजसरकारला खंडणी मिळत नाहीं. संस्थानिकास मुसलमानी कायद्याप्रमाणें दत्तक घेण्याची कायमची सनद मिळालेली आहे. जो मुलगा सर्व मुलांत राज्य चालविण्यास लायक आहे असें संस्थानच्या मुख्य मुख्य अधिकाऱ्यांनां व पुरुषांनां वाटेल तो गादीवर बसूं शकतो. ही चाल जंजिऱ्याच्या बाबतींत पूर्वीपासून प्रचारांत आहे. नबाबास स्वतःचें नाणें पाडण्याचा अधिकार आहे पण सध्या संस्थानांत एकहि टाकसाळ नाहीं. नबाबास ११ तोफांची सलामी होती, ती गेल्या महायुद्धांत ( नबाबानें दिलेल्या मदतीमुळें ) वाढवून १३ ची केली आहे. या संस्थानांत, अरावी, दंडाराजपुरी, हरेश्वर उर्फ देवगड, जंजिरा ( राजधानी ), खोकरी, मदगड, म्हसळें, मुरुड, नांदगांव, पद्मदुर्ग उर्फ कांसाकिल्ला, पंचायतन बोरळी, श्रीवर्धन व वेळास हीं मुख्य व पाहण्यासारखीं ठिकाणें आहेत.

इतिहास.—बहामनी राज्य हें दिल्लीच्या राज्यांतून फुटून निघाल्यानंतर, ( १४३७ ) तेथील राजांनीं आबिसिनीयन लोकांचा भरणा आपल्या राज्यांत करण्याचा क्रम आरंभला. ईशान्य आफ्रिकेच्या एका प्रांतास हशिब असें नांव असे; तेथील अरबांना हबशी असें नांव मिळालें व तेथीलच सैद जातीच्या अरबांनां सिद्दी म्हणूं लागले. हे हबशी प्रथम गुलाम म्हणून हिंदुस्थानांत येत; परंतु पुढें अंगच्या गुणांवर त्यांनां ब्राह्मणी राज्यांत मोठमोठया जागा मिळूं लागल्या. हे लोक दर्यावर्दीपणा व चांचेपणाहि करीत. स. १४९३ च्या सुमारास एका याकुत नांवाच्या शिद्यानें, माहीमचा किल्ला गुजराथच्या सुलतानापासून घेतला होता. गुजराथच्या राज्यांतील २५ सरकारां ( जिल्हा ) पैकीं दंडाराजपुरी हा एक सरकार होता. अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक अहंमद यानें १४९० त गुजराथकरापा दंडाराजपुरीचा किल्ला हिसकून घेतला, त्यावेळीं अहंमदनें ६ महिने किल्ल्यास वेढा दिला होता. एका दंतकथेवरून समजतें कीं, पेरिमखान नांवाच्या शिद्दी सरदारानें, किल्लेदार रामजी पाटील कोळी यास आपल्या गलबतावरील मालाच्या पेटया किनाऱ्यावर उतरण्यास परवानगी मागितली व ती मिळाल्यावर, किल्ल्यावरील शिबंदीस दारू पाजून, पेटयांत बसविलेल्या हत्यारबंद शिपायांकडून किल्ला दगाबाजी करून काबीज केला. वर सांगितल्याप्रमाणें अहंमदशहानें जंजिरा घेतला, तरी अकबरानें गुजराथ काबीज करीपर्यंत(१५७८), जंजिरा हा गुजराथच्या शहाच्याच ताब्यांत गणला जाई. पुढें अकबरानें तो निजामशाहास पुन्हां दिला. येथें १५८४ त सलाबत म्हणून निजामशाही वजीरास कांहीं दिवस कैदेंत ठेविलें होतें. अकबरानें निजामशाही घेतली, तेव्हां व मलिकंबरनें ती पुन्हां स्थापिली तरीहि, सन १६१८ मध्यें, मोंगलांकडूनच जंजिऱ्यास सिद्दी सिरूलखान नांवाचा गव्हर्नर नेमला गेला. त्याच्या नंतर सिद्दी याकूत ( १६२० ) व सिद्दी अंबर ( १६२१ ) हे नेमले गेले. पुढें निजामशाही

नष्ट झाल्यानंतर जंजिरा किल्ला विजापुरकरांकडे गेला व त्यांनीं आपल्या सर्व आरमाराचा मुख्याधिकार येथील सुभेदारास दिला. व जंजिरा हें आरमारी मुख्य ठिकाण करून त्याबद्दल जंजिरेकरास बाणकोट ते नागोठाणेंपर्यंतचा प्रांत सरंजाम दिला. अंबर हा १६३२ त मेल्यानंतर युसूफ ( हा १६५५ त मेला ) व फत्तेखान हे सुभेदार झाले. शिवछत्रपतींनीं प्रथम १६४८ त जंजिऱ्यावर हल्ले करून शिद्दयापासून तळें, घोसाळें, रायरी हे किल्ले घेतले. नंतर स. १६५९ त शामराजपंत पेशवे यांनीं जंजिऱ्यावर स्वारी केली, परंतु तींत त्याना यश आलें नाहीं; तसेंच १६६० त रघुनाथपंत यानें केलेली स्वारीहि निष्फळ झाली. त्यामुळें खास शिवाजीनें १६६१ त भर पावसाळ्यांत स्वारी करून, फक्त जंजिरा किल्ल्याशिवाय बाकीचा सर्व प्रांत व दंडाराजपुरी ठाणेंहि काबीज करून फत्तेखानाचा पार धुव्वा उडविला. त्यानें विजापुरास मदत मागितली, परंतु ती त्याला मिळेना; तेव्हां इंग्रजांकडे मदत मागितली. मुंबईच्या वखारवाल्यांनां जंजिऱ्याचें इतकें महत्व वाटलें कीं, त्यांनीं सुरतेच्या गव्हर्नरास, मुंबई बंदर शिद्दयास देऊन त्याऐवजीं जंजिरा घ्यावा, म्हणून आग्रह चालविला होता. सन १६६१-७० पर्यंत शिवाजीच्या स्वाऱ्या नेहमीं जंजिऱ्यावर होत, पण तो किल्ला हातीं येईना; स. १६७० तील मोहीम जोराची असल्यानें व आदिलशहा मदतहि पाठवीना, तेव्हां फत्तेखान हा शिवाजीस शरण गेला व त्याच्या हवालीं जंजिरा देण्यास कबूल झाला. परंतु किल्ल्यांतील अधिकारी संबळ, कासीम व खैर्यत हे तीन शिद्दी नाकबूल होते. त्यांनीं फत्तेखानाच्या विरुद्ध सैन्य चिथवून त्याला कैद केलें व संबळ यास सुभेदार नेमून, मोंगलांकडे मदत मागितली. त्यावेळीं औरंगझेबाच्या सांगण्यावरून दख्खनचा सुभेदार खानजहान यानें जंजिऱ्यास मदत पाठविली व त्याबद्दल शिद्दयानें आदिलशाहीचा ताबा सोडून तो मोंगलांचा नौकर बनला. इतके दिवस जंजिरेकरास वझीर हा किताब असे; तो औरंगझेबानें काढून याकूतखान हा किताब व तीन लाखांचा सरंजाम त्याला नेमून दिला व सर्व मोंगली आरमार त्याच्या ताब्यांत देऊन मक्केच्या यात्रेकरूंची सोय करणें व कोंकणांतील दर्यावरील मोंगली व्यापाराचें रक्षण करणें हें काम त्यावर सोंपविलें. संबळ हा मोंगली आरमाराधिपती झाल्यानें जंजिऱ्याची किल्लेदारी कासीम यास मिळाली. त्यानें १६७१ च्या होळीच्या सणांत दंडराजपुरी ही मराठयांच्या हातून सोडविली. त्याबद्दल त्यास व त्याचा भाऊ खैर्यत यास औरंगझेबानें बक्षिसी दिली यावेळीं कासीमनें मराठे लोकांतील मुलें व बायका बाटवून म्हाताऱ्याकोताऱ्यांची कत्तल केली. पुढें १६७२-७५ पर्यंत मधून मधून शिद्दयानें मुंबईजवळ किनाऱ्यावर उतरून, इंग्रजांच्या धमकीस व तटस्थपणास न जुमानतां मराठी मुलखांत लुटालूट केली. तेव्हां शिवछत्रपतींनें इंग्रजास तंबी दिली. त्यामुळें त्यांनीं शिद्दयास हांकून दिलें. तिकडे मराठयांच्या आरमारानें गोव्यापर्यंतचा सर्व प्रदेश लुटून बेचिराख केला. तेव्हां शिद्दयानें औरंगझेबाकडून जास्त मदत घेऊन वेंगुर्ल्यावर हल्ला चढविला; पण शिवाजीनें जंजिऱ्यासच वेढा घातल्यानें वेंगुर्ल्याचा वेढा उडवून शिद्दी परतला ( १६७५ ). पुढें १६७७ त मोरोपंत पेशव्यांनीं जंजिऱ्यास पुन्हां मोहीम केली. पण ती निष्फळ झाली. त्याच वेळीं संबळनें जैतापुरावर हल्ला केला, पण तेथें त्याचा सपाटून पराभव झाला. कासमनें यावेळीं मुंबईवर येऊन तेथील मराठयांच्या हद्दींतील चार ब्राह्मणांनां पकडलें व त्यांनां त्रास दिला. तेव्हां चौलच्या मराठी अधिकाऱ्यानें मुंबईच्या अधिकाऱ्यास दपटशा दिल्यामुळें, त्यानें कासमला सांगून ब्राह्मण सोडवून त्यांनां त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांस शिक्षा करविली. या सुमारास कासम व संबळ यांच्यांत भांडण झालें ( १६७७ ). पुढें १६७८-७९ मध्यें शिद्दयानें मुंबईकडील मराठयांच्या मुलखांत लुटीलुटीचा व प्रजेस गुलाम करण्याचा प्रयत्न चालविल्यानें, शिवाजीनें खांदेरी ( कान्हेरी ) बेट काबीज करून व फिरंगी, इंग्रज आणि शिद्दी या तिघांच्या अडथळ्यांनां न जुमानतां एकीकडे लढाई चालू ठेवून तेथें एक बळकट किल्ला बांधला ( १६८० ). यावेळीं मराठयांनीं आपलें आरमारहि वाढविलें होतें. कासमनें १६८० मध्यें मुंबईस इंग्रजांशीं लढाई देऊन त्यांचा पराभव केला; आणि मुंबई बेटांतील त्यांच्या गलबतांनां व प्रजेलाहि लुटण्यास त्यानें सोडलें नाहीं. इंग्रजांनीं त्याबद्दल सुरतेच्या मोंगल सुभेदाराकडे तक्रार केली, पण त्यानें शिद्दीस जास्तच फूस दिली (१६८१). त्यानंतर कासमनें चेउलकडे स्वारी केली, पण मराठ्यांनीं त्याला पिटाळून लावलें. कासीम हा मुंबईस उतरून मराठ्यांच्या मुलखांत धुमाकूळ घालून माणसें पकडून नेई, गोवध करी व प्रजेस छळी, ( औरंगझेबाच्या भीतीनें इंग्रज त्याच्या वाटेस जात नसत ) त्यामुळें शिद्दयाच्या व मराठ्यांच्या नेहमीं चकमकी होत. दादाजी रघुनाथ देशपांडयानें जंजिऱ्यास वेढा दिला होता व संभाजीनें मोहीम करून किल्ल्याचे तट उडवून किल्ला बहुतेक हस्तगत केला होता. परंतु तितक्यांत मोंगलांचें सैन्य देशांत चालून आल्यानें संभाजीस वेढा उठवावा लागला ( १६८२ ). यावेळीं संबळचा मुलगा मिसरी हा मराठ्यांनां मिळाला होता. पुढें कासम ( हा यावेळीं मोंगली आरमाराचा अधिपति होता. व खैर्यत हा जंजिऱ्याचा किल्लेदार होता ) यानें १६८३ व १६८९ याच्या दरम्यान इंग्रजांवर अनेक हल्ले करून सर्व मुंबई बेट काबीज केलें व पुष्कळ लूट जमविली. अखेर इंग्रजी वकील औरंगझेबाकडे गेला व पातशहानें सांगितलेल्या सर्व अटी निमूटपणें त्यानें कबूल केल्यावर कासमनें १६९० मध्यें मुंबई बेट इंग्रजांस परत दिलें. खैर्यत हा १६९६ त व कासम हा १७०७ त मेला. मराठ्यांपासून रायगड घेण्याच्या वेळीं कासमनें यतिकदखानास मदत केली होती. कासमनंतर कासा ( पद्मदुर्ग ) किल्ल्याचा किल्लेदार सिरुलखान हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. यानें

१७१३ त मराठ्यांस शरण येऊन त्यांनीं सांगितल्याप्रमाणें तह केला, हा तह १७३२ पर्यंत टिकला होता. पुढें १७३२–३३ त याकूबखान ( पूर्वीचा हिंदु कोळी, नंतर बाटलेला) या स फितवून मराठयांनीं जंजिरा घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फसला. मात्र यापुढें शिद्दीचें आरमारी बळ कमी कमी होत चाललें व मराठयांचें (आंग्र्यांचें) वाढलें. दिल्लीचे पातशहाहि आरमाराकडे दुर्लक्ष करूं लागले. सुरतेचा मोंगल सुभेदार तेगबख्तखान हा शिद्दीच्या आरमारास ठराविक नेमणूक पोहोंचविनासा झाला व आपणच स्वतः ती रक्कम दाबून बसला. त्याच वेळीं शिद्दीचें व इंग्रजांचें बिनसल्यामुळें सुरतकर गव्हर्नरानें तेगबख्त यास सर्व मोंगली आरमाराचें आधिपत्य आपल्यास देण्यास विनंती केली व धाकदपटशाहि दिला. परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां इंग्रजांनीं तो नाद सोडला ( १७३३ ). पुढें शिद्दी व तेगबख्त यांत भांडण जुंपून अखेर तेगबख्तानें ९ लक्ष रु. ची रक्कम शिद्दीस देऊन तंटा मिटविला ( १७३५–३६ ). सिरूल हा १७३४त मेला. तेव्हां त्याच्या अबदुल्ला नांवाच्या वडील मुलाचा खून करून संबळ नांवाचा ( सिरूलचा ) एक गुलाम हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. परंतु त्याचा खून करून सिरूलचा दुसरा मुलगा रहमान हा गादीवर आला. मागें सांगितलेला याकूब ( बाटगा कोळी ) यानें रहमानच्या तर्फे यावेळीं शाहूकडे मदत मागितली होती व शाहूनें मानाजी आंग्रे यास मदतीस पाठविलें होतें. त्यानेंच संबळचा पराभव करून रहमान यास गादीवर बसविलें. त्याबद्दल रहमाननें रायगड, तळें, घोसाळें, अवचितगड व बिरवाडी हीं ठाणीं मराठ्यांनां दिलीं व आपल्या राज्याचा अर्धा वसूल खंडणी दाखल त्यांना लावून दिला. रहमान हा १७३९ त मेल्यावर त्याचा भाऊ हसन हा गादीवर आला. पुढें आंग्रयांच्या त्रासानें हसननें मदगडचा किल्ला पेशव्यांच्या हवालीं केला. (१७४४) व आंग्र्याविरुद्ध पेशव्यांशीं सख्य केलें. हसन हा १७४५ त मेल्यावर अल्लान नांवाच्या एका शिद्दयानें गादी बळकाविली, परंतु पुढल्याच वर्षी इब्राहिम हा खरा वारस गादीवर आला ( १७४६ ).

सुरतचा सुभेदार तेगबख्त हा १७४६ त मेल्यावर, मिया अचन ( हा इंग्रजांचा दोस्त ) तेथील सुभेदार बनला; परंतु १७५१ त सफदरखान यानें जंजिऱ्याचा सिद्दी मसूद, डच व दमाजी गायकवाड यांच्या साह्यानें अचनला हांकलून किल्ला घेतला. या वेळीं इंग्रजांचें ( सुरतेस ) पुष्कळ नुकसान झालें. मसूदच्या दपटशामुळें त्यांनीं सुरतेची आपली सर्व ( यूरोपियन व देशी ) शिबंदी काढून टाकली; त्यांच्या वखारींतील अधिकाऱ्यांनां मसूदनें कैदेंत टाकिलें व मसूद हाच सुरतेचा मुख्य अधिकारी बनला. तो १७५६ त मेल्यावर सुरतेच्या किल्ल्याच्या व आरमाराच्या अधिकाराबद्दल अहमद ( मसूदचा मुलगा ), नवाझ ( सफदरचा पुत्र ) व फारिक्ष या शिद्दयांमध्यें तंटे माजून, अखेर मिया अचनच्या सांगण्यावरून इंग्रज हे या भानगडींत पडले. त्यांनीं मराठ्यांची समजूत घालून, सुरतेवर हल्ला करून शिद्दयापासून सुरत घेतली व अचनला सुभेदार नेमून आपल्या ताब्यांत किल्ला घेतला व मोंगल आरमार ठेवण्याबद्दलचो ( अचनकडून ) सरकारी तैनात स्वतःकडे करून घेतली. तैनातीचे तीन भाग करून एक इंग्रज, एक पेशवे व तिसरा सुरतकर नबाब यांनीं वाटून घ्यावें असें ठरलें ( १७५९ ) याप्रमाणें सुरतेहून शिद्दयाचें उच्चाटन झालें.

याच सुमारास ( १७५९ ) जाफराबाद ( काठेवाडच्या किनाऱ्यावरील ) बंदर जंजिरेकरास मिळालें. स. १७३१ त जाफराबादच्या तुर्की पाटलानें सुरतेजवळ चांचेगिरी केली असतां, त्यावेळच्या शिद्दी हिलोल या अधिकाऱ्यानें त्याचा पराभव करून त्यावर खंड बसविला. खंडापुरता पैसा त्याच्याजवळ नसल्यानें, त्यानें जाफराबाद बंदरच हिलोल यास दिलें. पुढें १७४९. त हिलोलनें तेथें किल्ला बांधला. स. १७५९ त कांहीं भानगड हिलोल व जंजिरेकर यांच्यांत उत्पन्न होऊन जंजिरेकरानें जाफराबाद काबीज केलें.

यापुढें २५ वर्षे शिद्दी व मराठे यांच्यांत मैत्री टिकली. पण पुढें शिद्दयानें कुरापत काढिल्यामुळें रामाजीपंत बिवलकर यानें जंजिऱ्यावर चढाई केली व तो बहुतेक घेतला. पण इंग्रजांनीं शिद्दीस मदत केल्यानें अखेर जंजिरा पडला नाहीं. शिद्दयाच्या राज्यांतून इंग्रजांना खाण्यासाठीं जिवंत जनावरें ( गाई वगैरे ? ) मिळत; मराठी राज्यांतून मिळत नसत; यासाठीं मराठ्यांविरुद्ध इंग्रजांनं ही मदत दिली ( १७६१ ). या वेळचा शिद्दी इब्राहिम याचा ( १७६२ ) खून करून त्याचा गुलाम याकूत गादीवर बसला. त्याचें व खरा वारस अबदुल रहीम याचें भांडण लागलें, त्यांत अबदुलानें पुण्यास जाऊन पेशव्यांचा आसरा घेतला व इंग्रजानें याकूतची बाजू घेतली. परतु लढाई वगैरे भानगडी न होतां दोघांत समेट झाला. याकूत हा १७७२ त मेल्यावर अबदूल गादीवर बसला. त्याच्या कारकिर्दीत विशेष कांहीं न होतां तो १७८४ त मेला. त्याच्या मार्गे जोहर हा ( जंजिऱ्याचा सेनापती ) जबरदस्तीनें गादीवर बसला; तेव्हां अबदुल्लाचा मुलगा करीमखान ( बाळुमिया ) हा पेशव्यांच्या आश्रयास गेला; जोहरनें इंग्रजांकडे मदत मागितली. शेवटीं भांडणतंटे न होतां बाळुमियास सुरतेजवळ सालिना पाऊण लाखाची जहागीर मिळाली ( १७९१ ); घरच्या भानगडीमुळें मराठ्यांनीं यावेळीं या बाबतींत विशेष लक्ष्य घातलें नसावें. जोहर हा १७८९ त मेल्यावर इब्राहिम ( धाकले बाबा ) गादीवर आला. त्याला जमरूदखान यानें १७९२ त कैदेंत टाकून १८०४ पर्यंत राज्य केलें. जमरूद मेल्यानंतर ( १८०४ ) इब्राहिम पुन्हां गादीवर बसून त्यानें १८२६ पर्यंत राज्य चालविलें. त्याच्या मागें त्याचा पुत्र मुहम्मद हा नबाब झाला. याच्या कारकीर्दीत इंग्रजांची अधिराजसत्ता

जंजिऱ्यावर बसून त्यांनीं तेथील टांकसाळ बंद केली(१८३४). मुहम्मदनें १८४८ त राज्यत्याग केला व त्याचा मुलगा इब्राहिम हा नबाब झाला. स. १८५५ त इंग्रजी राज्यांतील एका व्यापाऱ्याला पळवून त्याचा खून झाल्यामुळें व इतर अव्यवस्थेमुळें इंग्रजसरकारनें संस्थानच्या अंतर्गत कारभारांत हात घातला;तोपर्यंत संस्थान स्वतंत्र होतें, त्यावर पोलिटिकल एजंटहि नव्हता. स. १८६७ च्या सुमारास नबाब व त्याचे सरदार यांच्यांत अनेक भांडणें उपस्थित झाल्यामुळें इंग्रजांनीं तेथें आपला न्यायाधीश नेमून, न्याय निवाडयाचे हक्क आपल्या हातीं घेतले व नबाबाचे इतरहि ( मुलकी व फौजदारी ) अधिकार मर्यादित केले. नबाब मुंबईस गेला असतां, मागें त्याच्या सरदारांनीं बंड करून त्यांच्या अहमदखान नांवाच्या मुलास गादीवर बसविलें ( १८७० ). पुढें इंग्रज सरकारनें चौकशी करून सरदारांच्या तक्रारी दूर केल्या व अहमद यास गादीवरून दूर केलें. स. १८७३ त नबाबाच्या आवडत्या प्रभु लोकांनां सरकारी नौकऱ्या देण्याचें बंद केलें, कारण त्यांनीं नबाबावर अयोग्य वजन खर्च केल्याबद्दलची बोलवा होती. (कुलाबा ग्याझे पृ. ४५०). स. १८७७ त गणपतीच्या उत्सवांत जंजिऱ्यास दंगेधोपे(वाद्यें वाजविण्याच्या बाबतींत ) झाले होते. पुन्हां सरदार व प्रजा यांचें व नबाबाचें भांडण जुंपलें. त्याचा निकाल इंग्रज सरकारनें लावला. प्रजेच्या मुख्य तक्रारी म्हणजे प्रभु अधिकाऱ्यांचा अधिकार, इनाम जमिनींतील रान तोडणें, इनामें जप्त करणें, इजारदारांचे हक्क काढणें व सरदारांचे मानमतराब दूर करणें या होत्या त्या दूर करून शिवाय, शिक्षण, रस्ते, पाणीपुरवठा, सारावसुली वगैरे बाबतींत सुधारणा केल्या.इब्राहिमखान हा १८७९ त वारला. त्याला दोन लेकवळे व एक औरस पुत्र (अहंमदखान) होता. किल्लयांतील कांहीं लोकांनीं लेकवळ्यापैकीं एकास गादीवर बसविलें; परंतु इंग्रज सरकारनें त्याला काढून अहंमदखान यांसच गादीवर कायम केलें. यांचा जन्म १८६२ त झाला. हे राजकोट येथें १८८१ पर्यंत राजकुमार कॉलेजांत होते. त्यानंतर त्यांना राज्याचा अधिकार मिळाला. नबाब सर अहंमदखान हे ता. २ मे १९२२ रोजीं वारले. हल्लीं त्यांचे चिरंजीव नबाब आहेत. यांचें नांव नबाब मुहम्मदखान आहे. यांचा जन्म ७ मार्च १९१४ रोजीं झाला. सध्यां ते अज्ञान असल्यानें त्यांच्या मातोश्री राज्यकारभार पहात असतात ( १९२४ ).

गां व—जंजिरा संस्थानची राजधानी असून मुंबई बेटाच्या दक्षिणेस ४४ मैलांवर आहे. इ. स. १९०१ सालीं येथें १६२० लोकवस्ती होती. स. १८६० त किल्ल्यांत आग लागून बरेंच नुकसान झालें. जुनें दप्तर जळून गेलें. जंजिऱ्याचा किल्ला अंडाकृति आहे. तो राजपुरी खाडीच्या मुखाशीं असून, पूर्वेस व पश्चिमेस एक मैल पलीकडे जमीन आहे. पूर्वेस मुख्य द्वार आहे. पश्चिमेचें द्वार बेट्याच्या वेळीं उपयोगांत आणीत. किल्ल्याच्या भिंती पाण्यापासून ५० फूट उंच सुळक्याप्रमाणें असून त्यांत माऱ्याची व्यवस्था केली आहे. एकोणीस बुरुजांवर व भिंतीवर एकंदर दहा तोफा ठेविल्या आहेत. सर्वांत मोठी कलालबांगडी या नांवाची आहे. किल्यांत नवंबर महिन्यांत एक उरूस भरतो. तटाची दुरुस्ती १६९४–१७०७ पर्यंत होत होती. आंत सिद्दूलचा एक पडका वाडा आहे; हल्लींचा राजवाडा साधा आहे. त्याशिवाय नबाबाचे मानकरी, सरदार व पूर्वीचे कोळी राजाचे वंशज हे सर्व किल्ल्यांतच रहातात. बालेकिल्ला समुद्रापासून २०० फूट उंचीवर आहे. किल्ल्याच्या पश्चिमेस व नैऋत्येस समुद्र, व बाकीच्या बाजूस राजपुरी खाडी आहे. किल्ल्याच्या पश्चिमेस २ मैलांवर नानोलीवर एक दीपगृह असून तें चोरकासा नांवाच्या धोक्याच्या जागेपासून गलबतांस दूर ठेवतें. हें दीपगृह समुद्रसपाटीपासून १५० फूट उंच आहे. जाफराबादेसहि एक दीपगृह आहे. जवळील कुड्याच्या डोंगरांतील बौद्ध लेण्यांवरून हा किनाऱ्याचा भाग पूर्वी व्यापाराकरितां प्रसिद्ध असावा असें दिसतें. स्ट्राबो ( ख्रि. पू. ५४—इ. स. २४ ) हा सिजेर्दिस या नांवाच्या बंदराचा उल्लेख करतो; तसेंच पेरिप्लुसच्या ग्रंथांतील ( स. १५५ ) मिलीझेगुरी व टॉलेमीचें मुसोपल्ली म्हणजेच सांप्रतचें जंजिरा व म्हशेंळे होत असें म्हणतात. राजपुरी ही पूर्वी कोंकणी शिलाहारांची ( ८१०–१२६० ) राजधानी असावी. देवगिरीकर यादवांच्या वेळीं राजपुरी ही एक मोठी महत्त्वाची जागा होती. मुसुलमानी झाल्यानंतर निजामशाहींत चौलाच्या नंतर या दंडाराजपुरीस महत्त्व आलें व त्यावेळीं ही व्यापाराची उतारपेठ होती. परंतु मराठे व सिद्दी यांच्या झगड्यांत या बंदराचें महत्त्व गेलें. [ ग्रँटडफ. पु. १, २, ३; इलियट. पु. ७; टेलर—सेलिंग डिक्शनरी; स्टॅन्ले-बर्बोसा; जर्व्हिस-कोंकण; वेअरिंग-मराटाज्; ब्रिग्ज—फेरिस्ता. पु. २, ३; बर्ड—गुजराथ; मराठी रिसायत. पु. १, २, ३; क्यूनस—इटिनेररी; कुलाबा ग्याझेटियर; हामिल्टन—न्यू अकाउन्ट्स् पु. १; जंजिरा स्टेट रिपोर्टे. सन १९२१—२२; ].

**जझिया**—हा एक कर असे. याचा शब्दशः अर्थ "बदला पैसा" असा आहे. मुसुलमान राजे हा हिंदुपासून जुलमानें वसूल करीत. कुराणांत असें म्हटलें आहे कीं, "नास्तिकांशीं, ते शरण येऊन जझिया देईपर्यंत लढा" ( ९–२९ ) व त्याप्रमाणें खुद्द महंमदपैगंबरानें हा कर मुसुलमानेतरांजवळून प्रथम वसूल केला होता. पुढें महंमद कासीमनें सिंधवर स्वारी केली, तेव्हां त्यानेंहि जझिया वसूल केला; मात्र त्यांतून त्यानें ब्राह्मणांनां वगळलें होतें. फिरोझशहा तुघलखानें ब्राह्मणांवरहि कर बसविला. हिंदुस्थानांतील बहुतेक मुसुलमान राजांनीं जझिया कर हिंदूपासून वसूल केला आहे. फक्त अकबरासारख्या क्वचित् एखाद्या शहानें तो माफ केला असेल. या करापायीं अनेक

रीतीनें हिंदूंवर जुलूम होत असत. फिरोजच्या वेळीं अनेक ब्राह्मणांनीं प्राणत्याग केल्याचें इतिहासांत नमूद आहे. सर्वांत जास्त जुलूम औरंगझेबाच्या वेळीं झाला. त्यानें हा कर ता. २ एप्रील १६७९ पासून पुन्हां सुरू केला. सर्व्या हिंदूंनीं तो दिलाच पाहिजे, याबद्दल त्याचे सक्तीचे हुकूम असत. फक्त बायका, चौदा वर्षांखालचीं मुलें व गुलाम ( आणि आंधळे, पांगळे, वेडे, संन्यासी हे लोक जर अगदीं कफल्लक असतील तर ते) आणि सरकारी अधिकारी यांनां माफी असे. हा कर कांहीं माणसांच्या उत्पन्नावर प्रमाणशीर बसविलेला नसे; कसा तरी बसविला होता. कर देणाऱ्यांचे तीन वर्ग पाडले होते. ( १ ) गरीब वर्ग-यांत ज्यांचें उत्पन्न २०० दीरम ( ५० रु ) असेल ते येत व त्यांनां दर डोईस वार्षिक ३ $\frac{1}{3}$ रु. हा कर भरावा लागे. ( २ ) मध्यम वर्ग-यांचें उत्पन्न ५० रु. पासून २५०० रु. पर्यंत धरलें असून त्यांनां सालीना ६ $\frac{2}{3}$ रु. कर द्यावा लागे. ( ३ ) श्रीमंत वर्ग-यांचें उत्पन्न २५०० रु. च्या वरचें धरून त्यांनां सालिना १३ $\frac{1}{3}$ रु. भरावे लागत. सारांश, गरीबांवर उत्पन्नाच्या शेंकडा ६ टक्के, मध्यमांवर शेंकडा ६ पासून $\frac{1}{4}$ टक्के व श्रीमंतांवर दर हजारीं २॥ असा हा उलटा ( म्हणजे गरीब लोकांस अत्यंत जाचक ) दर होता. श्रीमंतांत दलाल, कापड विकणारे, व्यापारी, वैद्य व जमीनदार यांचा समावेश केला होता व शिंपी, रंगारी, चांभार, कोळी वगैरेंचा भरणा गरिबांत केला होता. हा कर दर माणशीं दरसाल ३ $\frac{1}{3}$ च्या खालीं केव्हांच उतरला नाहीं. त्या वेळीं इतक्या किंमतीत ९ मण कणीक म्हणजे एका गरिबाचें एक वर्षाचें अन्न येत असे ( आयने अकबरी, १.६३ ). दिल्ली येथील हिंदु लोकांनीं या बाबतींत त्याला अनेकदां अर्ज केले; परंतु त्यांचें म्हणणें त्यानें ऐकिलें नाहीं; एवढेंच नव्हे तर, एकदां त्यानें त्यांच्या अंगावर हत्ती घालून त्यांनां चिरडून टाकण्यासहि कमी केलें नाहीं. या बाबतींत शिवछत्रपतींनीं त्याला एक खरमरीत पत्र लिहिलें होतें व उदेपुरच्या राजसिंहानेंहि त्याचा हुकूम ऐकिला नव्हता. औरंगझेबानें बऱ्हाणपुरच्या लोकांवरचा कर तीन महिन्यांत एकदम चौपट वाढविला व अत्यंत जुलुमानें वसूल केला ( १६८२ ). गुजराथचा एकंदर वसुलाचा ३॥ टक्के ( म्हणजे ५ लाख रु. ) वसूल जझियाचा म्हणून गोळा होई. मोंगलांच्या राज्यास जझियाच्या रूपानें बरेंच उत्पन्न मिळे; एकंदरींत प्रत्येक हिंदु प्रजेस या कराच्या रूपानें उत्पन्नाच्या $\frac{1}{4}$ इतकी रकम सरकारास द्यावी लागे. लष्करी नौकरींतून सूट मिळण्यासाठीं जझिया द्यावा लागे अशी जी समजूत आहे, ती चुकीची होय. [ जदुनाथ सरकार-हिस्टरी ऑफ औरंगझेब, भा. ३. पृ. ३०५-३१३; मआसीरुल अलमगिरी १७४; मनुची-स्टोरिआ द मोगोल, पु. २,२३४; खाफीखान, पु. २; इलियट, पु. १. ४७६, तारीख-इ-फिरू झशाही. २९० ]

**जटलंड**—डेन्मार्कच्या राज्याचा यूरोप खंडांतील प्रदेशाचा हा एक विभाग आहे. यांत कित्येक बेटें व द्वीपकल्पें आहेत. हें द्विपकल्प लूबेक व एल्ब नदीचें मुख यांमधील रेषेपासून उत्तरेकडे स्कॉ भूशीरापर्यंत २७० मैलपर्यंत पसरलेलें आहे, व अशा रीतीनें बाल्टिक व उत्तर समुद्र यांच्या मधील नैसर्गिक पूर्वपश्चिम दळणवळण यानें बंद केलें आहे. उत्तरेकडील भाग फक्त डॅनिश असून त्याला जटलंड म्हणतात. दक्षिणेकडील भाग जर्मन असून श्लेस्विग-होल्स्टनचा भाग आहे. हें द्वीपकल्प सरहद्दीजवळ अतिशय निरुंद म्हणजे ( ३६ मैल ) रुंद आहे, परंतु जटलंडची जास्तींत जास्त रुंदी ११० मैल आहे. व नैर्ऋत्य कोंपऱ्यापासून स्कॉपर्यंत याचा विस्तार १८० मैल आहे. जटलंडमध्यें नऊ ॲम्बटर म्हणजे कौंटी आहेत. ऑस्कनीच्या लॅंडीशीं तुलना केली असतां पश्चिम किनाऱ्यावर प्रदेश बरा आहे. आंतील प्रदेश सखल आहे. वार्डी, ओमी, स्कजेर्नि, स्टोर व कारुप या नागमोडीनें वाहणाऱ्या नद्या दलदलीच्या प्रदेशांत उगम पावतात व पश्चिमेकडील समुद्रतीरावर सरोवरांत मिळतात. पूर्वेकडे लिमफोर्ड नदी आहे. मोठी नदी गुडेना ही होय. १९१६ सालीं लो. सं. १२५३८०९ होती.

पुरातन काळीं जरी येथें जंगल होतें तरी जटलंडचा आंतील बराच प्रदेश वालुकामय होता व त्यांत हीथर शिवाय कांहीं एक उत्पन्न होत नव्हतें. परंतु १८६६ पासून व " पॅट्रिऑटिक हीथ ॲसोसिएशन " व सरकारची वार्षिक मदत यांच्या योगानें बराच प्रदेश लागवडीकरितां साफसूफ करण्यांत आला. (१) झाडें लावणें, (२) पाटबंधारे बांधणें व कुरणांनां पाणी देणें, ( ३ ) रेती मिसळलेली चिकण माती खणून काढणें, ( ४ ) फेनची झाडी असलेल्या प्रदेशांत लागवडीचे प्रयोग करणें, हे उपाय योजण्यांत येतात. तांबडा फर व डोंगरी पाइन हीं झाडें लावतात. या योगानें येथील लोकसंख्या फार झपाट्यानें वाढली. व्हिबोर्ग, रिंगजोबिंग, व राइब हे मुख्य निरोगी जिल्हे आहेत.

जटलंडमध्यें आगगाड्या चांगल्या प्रमाणावर आहेत. सरहद्दीवर दोन आगगाड्यांचे रस्ते एकमेकांनां छेदून समुद्रकिनाऱ्याजवळ उत्तरेकडे जातात. पूर्वेकडील रेल्वेरस्ता कोल्डिंग फ्रेडरिका, व्हेज्ले, हॉर्सेन्स, आऱ्हूस, रॅंडर्स, आलबोर्ग, फ्रेडरिकशॅव्हन व स्कॅगन या बंदरांवरून जातो. पश्चिमेकडे महत्त्वाचें बंदर एस्बजर्ग हें आहे. हा रस्ता स्कजार्ने, रिंगजोबिंग, व्हेम्ब, होल्स्टेब्रो या शहरांतून थिस्टेडला जातो. या दोन्ही रेलरस्त्यांनां पुष्कळ फांटे फुटतात. व्हायबोर्ग व जोरिंग हींच कायतीं देशांतील महत्त्वाचीं शहरें आहेत.

जटलंड येथें महायुद्धाच्या अमदानींत जी सुप्रसिद्ध आरमारी लढाई झाली त्यामुळें जटलंडला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. ही लढाई इंग्लिश व जर्मन आरमारांमध्यें १९१६ च्या मे महिन्यांत ३१ व्या तारखेस झाली.

ल ढा ई ची ह की ग त:–जर्मनीनें पाणबुड्यांच्या सहाय्यानें दोस्तांच्या जहाजांचा फन्ना उडविण्यास आरंभ केल्यामुळें या बोटींचा उपयोग न करण्याविषयीं अमेरिकेनें जर्मनीला ताकीद दिली. व जर्मनीनें कांहीं काळपर्यंत तें बंद केलें पण जर्मन आरमाराचा दर्यासारंग दीनहोल्डशीर झाल्यापासून पुन्हां या पाणबुड्या बोटींचा उपयोग करण्यास त्यानें सुरवात केली. नॉर्वेच्या किनाऱ्यावरील आपलें आरमार दूर नेल्यास इंग्लिश आरमार समुद्रांत वावरूं लागेल व नंतर या बोटींच्या योगानें इंग्लिश जहाजें आपण नष्ट करूं असा बेत करून शीरनें आपलें आरमार नार्वेच्या किनाऱ्यापासून बरेंच दूर नेलें; पण हा त्याचा डाव इंग्लिश लोकांच्या लक्षांत आल्यावांचून राहिला नाहीं. इंग्लिश ॲडमिरल जेलिको यानें जर्मनीचें हें कारस्थान उधळून लावण्याचा बेत केला. इंग्लिशांच्या आरमाराचे या भागांत दोन काफिले होते. एक जेलिकोच्या अधिपत्याखालीं स्कापा येथें होती व दुसरी बिटीच्या हाताखालीं फोर्थच्या खाडींत होती. जेलिकोनें या सर्व काफिल्यांनां ३१ तारखेच्या मध्यरात्रीं एका ठिकाणीं जमण्याचा हुकूम केला होता. यावेळीं जेलिको याच्या हाताखालीं १५१ पेन्नंट, ८२ बिनाशिका, ९ क्रूझर्स, ९ लढाऊ क्रूझर्स २२ हलकीं क्रूझर्स व २८ ड्रेडनॉट्स इतकें आरमार होतें. आतांपर्यंतच्या ब्रिटिश आरमाराच्या इतिहासांत, एका दर्यासारंगाच्या अधिपत्याखालीं इतकें अवाढव्य आरमार असल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जर्मनीचें आरमार १६ ड्रेडनॉट, ६ प्रे-ड्रेडनॉट, ५ लढाऊ क्रूझर्स, ११ हलकीं क्रूझर्स ७२ बिनाशिका एवढें होतें. या आरमाराचा दुय्यम अधिपति हिप्पर हा होता. ब्रिटिशांचें आरमार जर्मनच्या आरमाराहून श्रेष्ठ दर्जाचें होतें.

जटलंडच्या या लढाईचे साधारण तीन भाग पाडतां येतील. पहिला भाग–बीटी व हिप्पर यांच्यामधील लढाऊ क्रूझरांची लढाई; दुसरा भाग—जेलिकोच्या व शीरच्या आरमारांतील लढाई; तिसरा भाग–ब्रिटिश व जर्मन आरमारें यांची परस्परांपासून फारकत व लढाईचा अनिश्चित शेवट. बीटी व हिप्पर यांच्यामधील आरमारी लढाईंत ब्रिटिशांचीं दोन लढाऊ क्रूझर्स बुडलीं. शीर व जेलिको यांच्या आरमारामध्यें ज्या चकमकी झडल्या त्यांत एखादे वेळीं जर्मनांचा तर एखाद्या प्रसंगीं इंग्लिशांचा पराजय असें चाललें होतें. यानंतर ब्रिटिश व जर्मन आरमार हीं एकमेकांपासून अलग होऊन आपापल्या आश्रयस्थानीं गेलीं. या लढाईंत कोणाच्याच बाजूनें जय अगर अपजय ठरवितां येणार नाहीं. वास्तविक, ब्रिटिशांचें आरमार श्रेष्ठ दर्जाचें असल्यानें जेलीको जर्मन आरमाराचा पुरता धुव्वा उडवून देईल असें मानण्याला आशा होती. पण पहिल्यापासूनच यानें अंगचुकराईचें व सावधगिरीचें धोरण ठेवल्यामुळें ब्रिटिश आरमाराचा नाश झाला नाहीं पण त्याचबरोबर जर्मन आरमारांचा नाश झाला नाहीं. पाणबुड्या जर्मनांच्या बोटींचें ब्रिटिश आरमारास फार भय वाटत होतें असें दिसतें; त्यामुळें त्यानें लढाईचें धोरण स्वीकारलें नाहीं पण याचा परिणाम असा झाला कीं जर्मनीच्या आरमारानें बाल्टिक समुद्रांत आपलें वर्चस्व स्थापून रशियाला इंग्लंडकडून मदत मिळवूं न दिल्यामुळें रशियाचा कोंडमारा होऊं लागला.

या लढाईंत ब्रिटिशांचीं ३ लढाऊ क्रूझर्स, ३ क्रूझर्स व ८ बिनाशिका यांचा नाश झाला व जर्मनांचीं १ लढाऊ जहाज ४ हलकीं क्रूझर्स, १ लढाऊ क्रूझर्स ५ बिनाशिका यांनां जलसमाधि मिळाली.

**जटामांसि**—जटामांसि या वनस्पतीस लॅटिनमध्यें नार्डोस्टॅकिस जटामांसी, इंग्रजींत स्पाइकनार्ड, संस्कृतमध्यें बटिला, जटमान्सि इत्यादि नांवें आहेत. ही बहुवर्षजीवी वनस्पति हिमालयांत गढवालापासून पूर्वेकडील प्रदेशांत व सिक्कीममध्यें १७००० फुटांच्या उंचीवर होते. ह्या वनस्पतीच्या तीन जाती आहेत. साधी, सुगंधि व सूक्ष्म जटामांसी यांपैकीं सुगंधी जटामांसीच जास्त उपयोगीं अशी मानली जाते. याचें कुंड करांगुली एवढें जाडें असून त्याच्यावर लालसर तपकिरी रंगाच्या तंतूंचें वेष्टण असतें. हें सुवासिक असून कडू असतें व ऊर्ध्वपातनक्रियेनें याचें फार उपयोगी असें तेल निघतें. हिंदुस्थानांत जीं औषधीं व सुगंधी तेलें तयार करतात त्यांत हें सुवासाकरितां टाकतात. यानें केंस वाढून काळे होतात असा समज आहे. ह्या वनस्पतीचा खप उदबत्त्या वगैरे सुगंधी पदार्थ तयार करण्यांत अतिशय मोठा खप आहे.

**जटायु**--विनता पुत्र जो अरुण, त्याच्या दोन पुत्रांतील दुसरा, संपातीचा कनिष्ठ भ्राता. रावण सीतेला घेऊन जात असतां जटायु धांवला. रावणाचें व याचें युद्ध होऊन त्यांत याचे पंख छेदिले गेले व हा मरणोन्मुख होऊन भूमीवर पडला. यानें झालेलें वृत्त रामास सांगितलें व प्राण सोडला. जटायूस कर्णिकार, शतगामी, सारस, रज्जुबाल आणि भेरुंड, असे पांच पुत्र असल्याचें पुराणांतरीं आढळतें. [ वा. रा. अरण्यकांड ]

**जटासुर**—एक राक्षस. पांडव तीर्थयात्रा करीत फिरत असतां यानें पांडवांस मारून द्रौपदीस हरण करण्याचा प्रयत्न केला होता. पण याचा बेत फसून भीमसेनाकरवीं मारला गेला- ( भारत वन. अ. १५७ )

**जठरदाह**. ( तीव्र ) का र णें.–पोटाचा दाह कांहीं तरी तीव्र आग उत्पन्न करणारा पदार्थ पोटांत गेल्यानें होतो. तसेंच तीव्र अम्लें ( तेजाब ) अगर सोमल, रसकापूर या सारखा दाहक पदार्थ पोटांत जाऊन झालेल्या विषाराचें हें एक लक्षण आहे. हें कारण नसल्यास पचण्यास जड असें खेकडें, कालवे वगैरे जलचर प्राणी आहारांत येणें, अपक्क फळें, कुजण्यास आरंभ झालेलें मांस, मासे, फळें, भाज्या अगर दूध, श्रीखंड इत्यादि लवकर नासणारें अन्न पोटांत जाणें हीं

अथवा उन्हाळा व त्यामुळें पोटांत बरेंच पाणी जाणें हीं कारणें संभवतात. बालकांना हा रोग होतो तो अंगावरील अगर वरचें दूध बिघडल्यामुळें होतो. पोटास हात लावला म्हणजे व आपोआप फार वेदना होऊन चिकट व रक्तमिश्रित वांति होते व नंतर एकदम शक्तिपात होऊन मृत्यूहि येतो ( विषबाधा हा लेख पहावा. ). विषाव्यतिरिक्त रोगामध्यें पोटांत जड वाटून अन्न टोंचित आहे असा भास होतो व वेदना सुरू होतात. हात लावल्यानें अगर खाल्ल्यानें त्या जास्त होतात. नंतर मळमळ व कोरड्या ओकाऱ्या सुरु होतात व कांहीं थोडें खाल्लें कीं तें लागलेंच उलटून पडतें. या बाबतींत अन्नाचे कण व तुकडे प्रथम पडतात; नंतर पाण्यासारखी अगर चिकट किंवा पित्तमिश्रित वांति होते. प्रथम ती आंबट नसते परंतु मागाहून दांत आंबतात इतका आंबटपणा तींत येतो. रोगी सुस्त व बेभान पडून असतो. डोकें दुखणें, अरुचि, बद्धकोष्ठ, तहान, तोंडाची चव फार बदलणें जिभेवर दाट बुरशी व मुखास दुर्गंधि, थोडा ताप व नाडी जलद हीं लक्षणें असतात. पोटाच्या शिंपीजवळचा भाग दडस लागतो व दुखतो. नासलेलें अन्न कारण असल्यास अतिसाराचें लक्षण जोराचें असतें. अर्भकास हा रोग झाला म्हणजे पोट दुखून तें ताठ होतें. त्यांतील दुःख रहाण्यासाठीं पाय वर करून तें एकसारखें रडत व हातपाय नाचवीत असतें. त्यास दूध अगर अन्न घातलें तर तें मान फिरवितें अगर अधाशाप्रमाणें फार दूध पितें व तें दूध लागलीच उलटून पडतें. मूल लागलीच रोडावून खंगतें व त्याचा प्राणहि जातो. मोठ्या माणसांचें दुखणें एक दोन आठवड्यांत बरें होतें. पण वरचेवर दुखणें उलटल्यास जुनाट जठरदाहावर तें जातें. या आजारात जठरच्या अंतस्त्वचेवर पुटकुळ्या, लाली, बारीक व्रण, दिसतात, व जठररसाची उत्पत्ति कमी होऊन चिकट स्राव फार उत्पन्न होतो.

रो ग नि दा न.—या रोगाचीं लक्षणें आरंभीं विषमज्वरासारखीं वाटण्याचा संभव आहे. परंतु त्या ज्वरांत पुढें इतर लक्षणें व अंगावर लाल गुलाबी डाग व गळ्यावर पुरळ दिसतो. अंत्रपुच्छदाहरोग आहे काय अशी शंका येते. पण तें दुःख उजव्या जांघाडाच्या वरील बाजूस असतें.

उ प चा र.—जठरास अगदीं श्रम पडूं नयेत म्हणून तीव्र रोगांत तर पोटांत अन्न जाऊं देणें अगदींच बंद करावें; व लक्षणें सौम्य झाल्यावर अन्न फार अल्प प्रमाणांत द्यावें. एका दिवसांत उतार न पडल्यास गुदद्वारावाटें पोषणासाठीं दुधाचा बस्ती द्यावा. सौम्य रोगांत पोटांत थोडें दूध व सोडावाटर द्यावें. अगर पेपसीननें पचविलेलें दूध द्यावें. तहानेसाठीं बर्फाचे तुकडे चघळावे अगर बर्फमिश्रित सोडावाटर द्यावें. पोटांतील वेदना शेकल्यानें थांबेल; अगर त्या फार असल्यास तेथें जळवा लावाव्या. या वेदना शमविण्यासाठीं सूक्ष्म प्रमाणांत अफूमिश्रित औषध द्यावें; व हेंच औषध वांतीचेंहि शमन करणारें आहे. बिसमथ कार्बोनेट व फसफसणारें अमोनियम सैट्रेट अगर पोटयाश सैट्रेट त्यांत १।२ थेंब आयोडीन टिंकचर घालून वांती शमण्यासाठीं देतात. मलशुद्धीसाठीं एनीमा द्यावा अगर सीडलिट्झ चूर्ण द्यावें; परंतु विषमज्वरादीचा संशय असल्यास रेचक देऊं नये. दाह, पीडा व अपचन करणारें अमुक प्रकारचें दुष्ट अन्न पोटांत आहे असें नक्की माहीत असल्यास वांतिकारक औषध द्यावें. अगर जठर पिचकारीनें धुवून काढावें. हळुहळु सुधारणा होईल तर तसें प्रथम हलकें अन्न देऊन तें वाढवीत जावें. या जठरदाहामुळें विद्रधि झाल्याचीं क्वचित् उदाहरणें इतर ज्वरांत आगांतुक दोष म्हणून घडतात; व तीं प्रायः कष्टसाध्य अगर असाध्यच असतात.

दी र्घ का ली न ज ठ र दा ह, कारणें:—वरील प्रकारें रोगास आरंभ होऊन तीच व्याधि कायम रहाणें हें एक कारण आहे परंतु अति चहाकाफीपान, अपरिमित मद्यपान, फार फळें, मिठाई व तळकट पदार्थ खाणें, पचनास जड प्रकारचीं डुकराचीं वगैरे मांसें, नेहमीं जडान्न अगर मसालेदार व चमचमीत भोजन या कारणामुळें पोटांत दाहक्रिया टिकून कायम होते. तसेंच यकृत व हृदयरोग जठरव्रण व जठरांतील दुष्ट कॅन्सरादि ग्रंथि या रोगांमुळें जठरांतील भाग अगोदरच दूषित रक्तपूर्ण वाहिन्यांनीं विकृत झाल्यामुळें ह्या रोगास डोकें वर काढण्यास फावतें. तसेंच चर्वण नीट न करणें, भराभर व मोठाले घांस घेऊन जेवणें, सदा अनियमितपणें व अवेळीं जेवण, मानसिक चिंता, श्रमातिरेक, मोठ्या दुखण्यानंतर व ज्वरानंतर तसेंच क्षय व मूत्रपिंड रोगामुळें आलेली अशक्तता या सर्व कारणांमुळें रोजचेंच अपचन होऊन प्रथम अग्निमांद्य रोग जडून त्याचें या रोगांत रूपांतर होण्यास सर्वथैव अनुकूल स्थिति प्राप्त होते.

शारीर विकृतिः—मृत रोग्याचें जठर पाहिल्यानंतर जठराचा अंतर्भाग कमी अधिक लाल व तें बरेंच जाड झालेलें दिसतें. पूर्वी रक्तस्राव झालेला असेल त्या भागीं काळसर अगर स्लेट पाटीच्या रंगाच्या दिसतात. त्वचा खरपल्याप्रमाणें, कुरतडलेल्या जागा व बारीक व्रणरुधिरमय असलेलेहि दिसतात. अगर जठर सुरकुतवाळल्याप्रमाणें कृश झालेलें व आंतील जठर रसोत्पादक पिंड नष्ट व विकृत होऊन मांसल भागीं तंतुमय रचना बनलेली दिसते. यामुळें जठराच्या अधःछिद्रामध्यें खरबरीतपणा व सुरकुत्या दिसतात.

रोग लक्षणें:—पोटाच्या शिंपीच्या जागीं दाबलें असतां दुःख खास होतें पण तें असह्य नसतें. पण भोजनानंतर मात्र त्या ठिकाणीं अगर पाठींत दोन्ही खांद्यांच्यामध्यें फार दुखूं लागतें व पोटांत व घशांत फार जळजळ सुरू होते; यांसच परिणाम शूल म्हणतात. मळमळ सदा असते व कधीं कधीं वांति होते. जेव्हां मद्यपान हें कारण असतें तेव्हां मात्र वांति हें लक्षण प्रमुख असून रोगी अंथरुणांतून

उठण्याबरोबर तीस आरंभ होतो. वांतींत चिकटपणा फारच असतो पण रक्त फारसें नसतें. दांत कधीं कधीं आंबतात परंतु वांतींत हैड्रोक्लोरिक आसिड कमीच असतें. ढेकरा व पोटांत वायु धरणें, तहान वरचेवर लागणें, भूक अनिमितपणें व थोडी लागणें, तोंड बेचव व दुर्गंधि येत असलेलें होणें, हीं लक्षणें आणखी असतात. जिभेस बुरशी असून तिचा शेंडा व कडा फार लाल असतात. ती निमुळती व चिंचोळी तरी होते. हिरड्या लाल व स्पर्श होतांच रक्त स्रवणाऱ्या होतात; ओठांस चिरा पडतात. मलशुद्धि बहुधा चांगली होत नाहीं. अगर एकाद्या रोग्यास जुलाब होतात किंवा कधीं बद्धकोष्ठता तर केव्हां अतिसार असा अनियमित प्रकारहि आढळतो. थोडथोडी व अति आम्ल व लाल रंगाची युरेटक्षार जाणारी लघवी होते अगर कधीं फिकी, कमी आम्लतादर्शक व खर जाणारीहि लघवी असते. ज्वर थोडा येऊन अंग मोडून येतें. झोप शांत येत नाहीं, रोगी मंद, उदास, घाबरट व उचकणारा होतो. कांहीं दिवसांनंतर रोगी कृश होत जातो.

रोगनिदानः—(१) या रोगाचा अग्निमांद्य रोगाशीं घोंटाळा होण्याचा संभव आहे. पण यांत दाहाचीं तीव्र लक्षणें प्रमुख असतात. तीं अग्निमांद्यामध्यें मुळींच नसून त्या ऐवजीं अशक्तता, औदासीन्य,पंडुता यांचें प्राबल्य असतें व ज्वर अगदीं नसतो या रोगांत ज्वर व विशिष्ट प्रकारची जीभ, वांति, पोटात वेदना हीं मुख्य लक्षणें होत. (२) व्रण अगर कॅन्सरग्रंथीचीं अन्य लक्षणें नसलीं म्हणजे हाच रोग आहे असें समजावें. परिक्षेसाठीं रोग्यास भोजन घालून कांहीं ठरीव वेळानें तें ओकून पाडून पाहतां त्यांत बिनपचलेलें अन्न, अतिचिकट स्राव, कमी आम्लता व हैड्रोक्लोरिक असिडाचा अभाव या व अन्य गोष्टी पचनाची अशक्तता सिद्ध करतात. (३) रोग्याच्या अन्ननलिकेत अवरोध अगर वक्रता उत्पन्न होऊन जेवल्याबरोबर त्यामुळें वांति होते व हें खरें कारण न समजून हा जठरदाह रोग आहे असा भास होतो. (४) अजीर्ण होऊन हृदयाच्या ठायीं भोजनोत्तर वेदना व पीडा हें लक्षण असणें व तेंच लक्षण रोग्यानें अंमळ श्रम केल्यानें होणें हें अंजिना पेक्टोरिस या रोगाचें सूचक आहे.

साध्यासाध्य विचारः—हा रोग बरा होण्यास काल बराच लागतो. परंतु बरेच दिवस उपचार चालू ठेविल्यानें तो बरा होतो

उपचारः—रोगाचें कारण कोणतें असावें, तें शोधून काढून त्याचें निर्मूलन करण्याचा अगोदर प्रयत्न करून नंतर रोग्याची आरोग्यनियमानुसार राहणी, हवा, पाणी, स्वच्छता, व्यायाम, कामधंदा, सवयी, यांत बारकाईनें सुधारणा करून भोजनकालामध्यें नियमितपणा राखला पाहिजे. निरुपद्रवी सौम्यपण, पौष्टिक अन्नसेवन करावें. चहा, कॉफी व मद्यपान वर्ज करून शिवाय न पचण्यासारखे पदार्थ अगदीं खाऊं नयेत. रोग तीव्र असल्यास आरंभीं रोग्यास फक्त दुधावर राहण्यास सांगावें; नंतर दूध व स्टार्चमिश्रित साबूदाणा अगर तवकील या प्रकारचें हलकें अन्न त्यास द्यावें. यानंतर रोगाचीं तीव्र व त्रासदायक लक्षणें जसजशीं कमी होतील तसतसे यापेक्षां अधिक पौष्टिक परंतु पचनास हलकें असें तांदुळ व नंतर इतर धान्यांचे प्रकार आहारांत समाविष्ट व्हावेत. मांसाहाऱ्यांनां जातिधर्माप्रमाणें मासे, कोंबड्यांचें पिलूं, मेंढराचें मांस व गोमांस हीं पचनास हलकीं व पौष्टिक अन्नें आहेत. बटाटे, कालीफ्लावर व ज्या फार चोथट नाहींत अशा पाले व फळभाज्या खाण्यास प्रशस्त आहेत पुढें सांगितलेले पदार्थ वर्ज्य करावे. तेलातुपांत तळलेले पदार्थ,मिठाई,मुळे,गाजरें,नानाप्रकारचीं पचनास जड अशीं डुकराचीं वगैरे मांसें हे पदार्थ. मलशुद्धि होण्यासाठीं सोडा, सल्फेट, त्रिफळा अथवा दुसरे कोणतेंहि रोग्यास रुचेल व मानवेल तें सौम्य रेचक मधून मधून सुरू असावें. पचनेंद्रिय व पचनक्रिया सुधारण्यासाठीं बिसमथचे नाना प्रकारचे क्षार, सोडा बैकार्बनेट व जेनशियन अगर क्वाशिया अर्काशीं मिश्रित करून रोज दिल्यानें इष्ट कार्य घडतें. हीं आलकाली औषधें जेवणापूर्वी द्यावीत. पाणी घालून हीनवीर्य केलेलें हैड्रोक्लोरीक अगर नैट्रोहैड्रोक्लोरीक ॲसिडहि दिल्यानें पचनक्रिया वाढते, परंतु हीं औषधें भोजनोत्तर घ्यावयाचीं असतात. यांतहि कुचलाअर्क, अगर स्ट्रिकनीया अर्क आणि वराल जेनशियन अथवा क्वारिया अर्क हीं चांगलीं औषधें आहेत. वांतिशमन होण्यासाठीं एक औषध आलकाली जातीचे( सोडा बायकार्बनेट वगैरे) व दुसरें स्टारीक आसिड अगर सैट्रिकआसिड हीं मिश्र करून फसफसणाऱ्या स्वरूपांत पोटांत घेतल्यानें आराम वाटतो.व नंतर कांहीं दिवस त्यासाठीं हीनवीर्य हैड्रोसायानिक ॲसिड, सेरियम आक्सेलेट, टिंक्चर आयोडीन ( ½–३ थेंब अर्धा औस पाण्यांत घेणें) हीं औषधें चांगलीं आहेत. पोटांत वायू धरत असल्यास जेवणापूर्वीं एखादा मानवेल तो बिसमथ क्षार घ्यावा. अगर पेपरमिंटचें पाणी, अर्क, किंवा कार्बालिक ॲसिड, क्रियासोट हीं सूक्ष्म प्रमाणांत ( ॥–१ थेंब ) घ्यावीत. कोळशाच्या भुकटीचें चूर्ण हेंहि उत्तम वायुहारक आहे.पोटांतील शूलासाठीं शेकणें अगर पालिस्तर मारून फोड आणणें हे उपाय तीव्रतेप्रमाणें योजावे.जरूर पडल्यास पोटांत अफू अगर मार्फिया हीं औषधें द्यावीत.

**जठरव्रण**—हा रोग पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्यें व त्यांतले त्यांत विशेष श्रम पडणाऱ्या नोकरवर्गांतील स्त्रियांमध्यें विशेष आढळतो. या रोग्यांनां अगोदर पंडुरोगाप्रमाणें फिकटपणा असून जठरांतील रुधिराभिसरण नीट न चालल्यामुळें रक्तवाहिन्यांत एखादी रक्ताची गुठळी अडकून त्या जठरांतील भागास रक्ताचा पुरवठा कमी पडतो. पंडुरोगांतील निःसत्व रक्तामुळें तर हा रोग होतोच पण बरेच दिवस अपचन चालून त्याचा छवटहि या रोगांत होण्याचा संभव असतो.

रक्तवाहिनींत रक्ताची गुठळी अडकली असतां त्या विवक्षित भागामध्यें जठराचें पोषण नीट न होऊन तेवढ्या वाटोळ्या जागेवर जठरांतील आम्ल पाचक रसामुळें त्यावरील त्वचा निघून जाते; म्हणजेच तेथें व्रण पडतो. तो अगदीं वाटोळा अगर दीर्घ वर्तुळाकार असतो. व साधारणतः पावलीच्या आकाराएवढा असतो. आंत खोलपर्यंत व्रण असल्यामुळें त्याचे कांठ अगदीं शस्त्रानें कापल्याप्रमाणें रेखीव दिसतात, व छिद्रहि आरपार जठराच्या वेष्टणासहि पडलेलें असतें. जठराचा वरील वक्रभाग असतो त्याच्या मागील अंतराच्छादनावर हा व्रण बहुधा असतो. व आंतड्यानजीकच्या छिद्राजवळ असतो. हा अगदीं साफ बरा झाला तर त्याची खूण, वण वगैरे फारसें मागाहून रहात नाहीं. पण कधीं असें होतें कीं, तो बरा होतांना आंखडून भोंवतालच्या जठराचा भागहि आकुंचित करतो व त्यामुळें जठराच्या आंतड्यांकडील छिद्र अगर त्याचा मध्यभाग वाळूच्या घड्याळाप्रमाणें मध्येंच चिंचोळा होतो. हा व्रण फुटून रक्तस्राव झाला असतां प्राणास अपाय होण्याची धास्ती असते. पण जर अगोदर जठर एखाद्या इंद्रियास चिकटून राहिलें तर किंवा शस्त्रक्रिया करून रुधिरस्राव थांबविला तर रोगी बरा होतो. बहुधा एकच व्रण असतो पण क्वचित् दोनतीनहि असतात.

ल क्ष णें—कांहीं रोग्यांनां स्पष्ट लक्षणें फारशीं होत नाहींत. व कांहीं रोग्यांनां प्राणघातक रक्तस्राव सुरू होतो तेव्हां जठर व्रण असल्याचें कळतें.

याचें मुख्य लक्षण म्हणजे पोटांत अन्न खाल्ल्यावर शूळ उद्भवणें. हा शूळ उरास्थिच्या खालच्या बाजूस किंवा पाठीच्या मध्यभागीं असतो. कधीं शूळ उजव्या किंवा डाव्या कुशींतहि असतो. या वेदना मात्र अति तीव्र असतात. वेदनेच्या ठिकाणीं दाबलें असतां दुखतें व तेथें कांहीं फुगवटी सूज आहे अशी रोग्यास जाणीव असते. पोटावर घट्ट पट्टयानें बांधलें तर रोग्यास तें सहन करवत नाहीं. पोटांत अन्न गेलें म्हणजे निसर्गाच्या नियमाप्रमाणें त्यांत तें अन्न पचविण्यासाठीं हालचाल आपोआप सुरू होते. व्रणामध्यें मज्जातंतूंचीं टोकें असतात. त्यांनां त्या वेदनाचें ज्ञान होऊन हें लक्षण उद्भवतें.

दुसरें महत्त्वाचें लक्षण ओकारी होय. अन्न खाल्यानंतर लागलीच ओकारी होते अगर कांहीं वेळानें होते. पण ती एकदां झाली म्हणजे वेदना थांबतात व अस्वस्थता नाहींशी होते. या ओकारींत बहुधा रक्त असतें व तें असलें म्हणजे मोठें महत्त्वाचें लक्षण निदानासाठीं आहे असें समजावें. हें रक्त काळसर व ताजें, आंत गुठळ्या असलेलें असतें. किंवा पिंगट अगर काफीच्या गाळाच्या रंगाचें असतें. एक किंवा अनेक रक्तवाहिन्या फुटून त्यांतून हें रक्त येतें. मळावाटेहि रक्त पडतें व त्यामुळें मळ काळा, अगर डांबरासारखा दिसतो. रोग्याची एकंदरींत स्थिति व चर्या प्रकृति फारच बिघडली आहे हें स्पष्ट दर्शविते. जीभ लाल असते. शौचास बद्धकोष्ठ झालेला असतो. बरेच रोगी दीर्घकालीन व्रणामुळें हैराण स्थितींत असतात. चेहरा फिकट, शरीरयष्टि रोड व अतिअशक्तपणा अशी स्थिति असते. रोग कित्येक महिने किंवा वर्षेंपर्यंत असतो. अनेक मोठाले व्रण असले म्हणजे ते अर्धवटच बरे होऊन पुनः पुनः जास्त प्रकृति बिघडवितात. या व्रणापासून बाह्य लक्षणें क्वचित् दिसतहि नाहींत, हें वर सांगितलेंच आहे. अवचित प्राणघातक रक्तश्राव होऊन व्यवच्छेद परीक्षण केलें असतां हे मोठाले जुनाट व्रण आढळतात. हा रोग एकंदरींत घातुक खरा पण पुष्कळ रोगी बरेहि होतात. फारतर रोग्यांचें जठर अंमळ नाजूक स्थितींत मागाहून रहातें इतकेंच. व त्यामुळें त्यास पथ्यानें रहावें लागतें. प्राणघास होण्याचें मुख्य कारण वास्तविकपणें रक्तस्राव हें मुख्य नसून व्रण फुटल्यामुळें आंतील अन्नादि द्रव पदार्थ अंत्रावरणांत प्रवेश करून बारापासून अठ्ठे चाळीस तासांत शस्त्रक्रिया यशस्वी न झाल्यास दाहामुळें किंवा अंतःसंक्षोभामुळें प्राणघात करतात. मात्र कधीं कधीं वरील क्रिया सावकाश घडत गेल्यामुळें जठरास शेजारील एखाद्या इंद्रियास चिकटून त्यामुळें छिद्र बंद होण्यास अवसर सांपडतो व मग मात्र रोगी रक्तस्रावानें मरण न पावतां जन्मभर जठराची चलनशक्ति अमलांत न आल्यामुळें अजीर्ण अपचनादिनीं पिडलेला असतो किंवा आंतड्याकडील जठर फारच आंखडून मार्ग जवळ जवळ बंद होऊन त्यामुळें जठर विस्तीर्ण होतें.

उ प चा रः—अशा रोग्यांनां पूर्ण विश्रांति बिछान्यांत निजवून ठेवून दिली पाहिजे. खाण्यास दूध, किंवा दूध व पाणी अगर दुध व चुन्याची निवळ हें द्यावें. रक्तस्राव नुकताच होऊन गेला असल्यास अन्नतर बिलकूल देऊं नये. व फक्त गुदद्वारावाटे पोषक बस्ति रोग्यास देत जावा. पुढें जस जशीं लक्षणें हटत जातील त्याप्रमाणें दूध, अंडीं, मांस, रस अगर मांसविरहित पेयें—जीं पचनास हलकीं व पुष्टिदायक आहेत अशीं—रोग्याच्या पचनशक्तीचे मानानें द्यावींत. यानंतर पाव व दूध यासारखें व इतर हलकें व पौष्टिक अन्नहि द्यावें. लोह हें औषध फार उपयोगी आहे पण तें गोळ्यांच्या रूपांत देऊं नये. येणें प्रमाणें पथ्य पाळून, पडून राहिलें असतां हे व्रण बरे होतात यांत शंका नाहीं. प्रेत व्यवच्छेदन करतांना कित्येक रोग्यांच्या जठरांत पूर्वी बऱ्या झालेल्या व्रणाच्या स्पष्ट अगर पुसट खुणा नेहमीं पहाण्यांत येतात ही गोष्ट वरील म्हणण्याची सत्यता पटविते. शस्त्रवैद्यासहि शस्त्रक्रिया करतांना उदरामध्यें जठरांत अशा खुणा आढळतात. वर सांगितलेल्या उपचाराप्रमाणें वागलें तर व्रणांतून प्राणघातक रक्तस्राव होईल हें संभवनीयच नाहीं. आणि शस्त्रवैद्यास प्रकृति जरी दाखविली तरी शस्त्रक्रिया करावी असा सल्ला देणार नाहीं. कारण त्याची जवळ जवळ खात्रीच असते. उदर चिरून जठराच्या बाहेर व्रण फुटला आहे किंवा काय हें पाहिलें किंवा जठर चिरून आंत जरी पाहिलें तरी व्रण सहसा सांपडणार नाहीं. अशा प्रकारचा भयंकर रक्तस्राव सुरू झाला.

तरच मात्र शस्त्रवैद्यानें उदर चिरून रक्तस्राव कोठून येत आहे तें ठिकाण नक्की अजमावून तेथील धमनीबंधनानें रक्तस्राव थांबवावा; म्हणजे रोग्याचा मृत्यू टळेल.

व्रण फुटून त्या मार्गें जे जठरांत असणारे निरुपद्रवी जंतू असतील ते अन्नासह अंत्रावरणाच्या पोकळींत प्रवेश करितात. अशा फुटण्याचा तात्कालिक परिणाम उदराच्या वरील भागांत असह्य तीव्र वेदना व अंतःक्षोभाचीं लक्षणें हे होत. त्यामुळें रोगी मृत्युपंथास लागेल काय अशी भीति पडते. पोटाचे स्नायू टणक होऊन ताठतात. नंतर अंत्रावरणदाह झाला म्हणजे आंतड्यांत वायु कोंडून उदर मोठें होतें व उदरांत तणावा बसतो. व श्वासोछ्वासाच्या वेळीं दम लागतो. नंतर ताप येतो. जर शस्त्रक्रियोपचार केला नाहीं तर अंत्रावरणजन्य विषशोषणानें मृत्यु खास येतो. धमनी फुटून रक्तस्राव व्रणांतून सुरू झाला असतां शस्त्रक्रिया एकदम करण्यांत आली पाहिजे. ती येणें प्रमाणेंः—उदराच्या मध्यरेषेच्या वरील भागीं चिरावें आणि व्रण कोठें फुटला आहे तो तपास करावा. जेथें फुटकी जागा असते त्यावर लस जमून त्याचें कीट सांठलेलें असतें. यावरून व्रण शोधणें बहुधा अवघड नसतें. शिवाय त्या जागीं दाह, लाली हीं लक्षणें असतात; व अन्नादि जठरांतील पदार्थहि त्या छिद्रावाटे पाझरत असतात. हें छिद्र बंद करण्यासाठीं बटव्याला किंवा कशास ज्या प्रकारानें दोरी ओवून घालतात तशी शिंवण घालतात. छिद्राच्या भोंवती दाहरहित जागेमध्यें टांके घालावे म्हणजे ती जागा घड्या पडण्यानें दुमडून त्याच्यावरील व खालील जागा टांके घालून मजबूत करावयाची. यानंतर जठराच्या बाहेरील बाजूवर व शेजारील आंतडीं, यकृत, प्लीहादि इंद्रियांवर पोटांतलि अन्नमय व जंतुमिश्रित द्रव पदार्थ चिकटलेले असतात. ते जंतुघ्न धावनांत बुडविलेल्या बोळ्यांनीं साफ पुसून काढावे लागतात. म्हणजे अंत्रावरणदाह होण्याची भीति नसते.

यानंतर उदरांतील जखम अगोदर तींतून मलपूयोत्सर्जन होईल अशी व्यवस्था करून मिटवावी. बरेच रोगी अशा शस्त्रक्रियेनें बरे होतात.

**जडजीववाद**-सर्व आधिभौतिक व मानसिक चैतन्य जड प्रकृतीपासून आलें असें प्रतिपादणाऱ्या कोणत्याहि तत्वज्ञान मतास जडजीववाद हा शब्द लावतात. विचाराच्या इतिहासांत अस्तित्वासंबंधीं हें मत आढळतें. सर्वत्र विशेषतः भौतिक शास्त्रज्ञांत हें मत नेहमीं प्रचलित असतें. थेलीसपासून सुरू झालेला आयोनियन तत्वज्ञान पंथ जल, हवा व अग्नि वगैरे भौतिक पदार्थांपासून सर्व वस्तू उत्पन्न झाल्या असें दाखविण्याचा प्रयत्न करतो. ( आयोनियन पंथ-पहा) हीं तत्वें—हे पदार्थ-एका अर्थी सचेतन आहेत. व अ ित्वाच्या वाढीत कांही सक्रीय भाग घेतात अशी त्यांची समजूत असे. मध्ययुगांतील व विद्यापुनरुज्जीवन कालांतील विचारांत हा प्राचीन जडजीववाद पुन्हां पुढें आला व अर्वाचिन कालांतील जडैकवाद हा या मताचाच प्रतिनिधी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्राचीन जडजीववाद व अर्वाचिन जडैकवाद यांत विशेष भेद असा आहे कीं, जडजीववादांत मूळ जड प्रकृती ज्ञानयुक्त व मानसिक्रियायुक्त नसली तरी निदान सचेतन आहे असें मानण्यांत येतें तसें जडवादांत नाहीं.

**जडद्रव्य** ( मॅटर )—वायूंतून होणारें विद्युद्वहन आणि रेडिअम् व तत्सदृश धातूंच्या उत्सर्जनाची क्रिया या दोहोंकडे अलिकडे शास्त्रज्ञांनीं बरेंच लक्ष्य पुरविलें; त्यांनां जी माहिती वरील प्रयत्नाच्या योगानें प्राप्त झाली. तीवरून जडद्रव्याची रचना आणि धर्म याविषयीं बरेंच ज्ञान प्राप्त झालें; जड द्रव्याच्या धर्माविषयीं ( नेचर ऑफ मॅटर ) जे कित्येक भानगडीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत त्यापैकीं कांहींचा समाधानकारक असा खुलासा होतो; याशिवाय जडद्रव्याच्या रचनेसंबंधानें या नवीन शोधाच्या योगानें जास्त शोध करतां येण्यासारख्या पद्धति बसविल्या गेल्या आहेत. सध्या आपणास जडद्रव्याच्या रचनेविषयीं जी माहिती उपलब्ध आहे त्यापेक्षां जास्त माहिती थोड्याच काळांत या नवीन पद्धतीनें आपणांस उपलब्ध होईल अशी पूर्ण खात्री वाटत आहे.

जडद्रव्याच्या शास्त्रीय कल्पनेच्या विषयीं कसकशी प्रगति झाली आहे याचा विचार आपण करूं. प्रथमतः अशी कल्पना होती कीं, प्रत्येक जड वस्तु अणूंच्या(मोलिक्यूल)योगानें बनली आहे; व प्रत्येक जातीच्या अणूंच्या अंगीं तत्तत् विशिष्ट द्रव्यांचे गुण आहेत. उदाहरणार्थ जलाच्या अणूचे गुणधर्म हवेच्या अणूच्या गुणधर्मांपेक्षां निराळे आहेत; व दुसऱ्या सर्व द्रव्यांच्या अणूंच्या गुणधर्मापेक्षां भिन्न आहेत. नंतर डाल्टन याचा परमाणुवाद पुढें आला; त्याचें मत असें होतें कीं अणू हे परमाणूंच्या समुदायानें बनले आहेत व ह्या परमाणूंच्या जाती अणूंच्या जातीपेक्षां फार कमी आहेत; अणूंच्या भिन्न भिन्न अशा असंख्य जाती मानण्यांत आल्या होत्या; परंतु डाल्टननें परमाणूच्या सुमारें ६०—७० जाती आहेत असें दाखवून दिलें. यावरून असें दिसून येईल कीं, द्रव्याच्या जातींची संख्या दिवसानुदिवस कमी करण्याकडे शास्त्रीय प्रगतीचा कल आहे. अणूंच्या जाती असंख्य मानण्यांत आल्या तर परमाणूच्या फक्त ६०-७० च जाती मानण्यांत आल्या.

सन १८१५ सालीं प्रौट या शास्त्रज्ञानें नवीनच सिद्धान्त प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्याचें म्हणणें असें होतें कीं, रासायनिक मूलद्रव्यांपैकीं जीं मूलद्रव्यें जड होतीं त्यांचे परमाणू सर्वांत हलक्या अशा हायड्रोजनच्या परमाणूचे बनलेले आहेत; यावरून त्यानें असें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला कीं, हें सारें जड-विश्व हायड्रोजनच्या परमाणूंपासून झालेलें आहे. या सिद्धान्तास पुष्टी देण्या-

साठीं अनेक प्रयोग करण्यांत आले; परंतु हा सिद्धान्त अद्याप सिद्ध झाला नाहीं. असें जरी आहे तरी सर्व विश्वांतील जडद्रव्य एकाच मूलद्रव्यापासून झालें असावें असें अनुमान काढण्यास बरीच जागा आहे. मेन्डेलिफ यानें रासायनिक मूलद्रव्यासंबंधानें जो अवधि-नियम ( पीरिऑडिक लॉ) बसविला आहे त्यावरून वरील अनुमान कित्येक शास्त्रज्ञ काढतात.

मेंडेलिफचा नियम असा आहे कीं, निरनिराळया मूलद्रव्यांच्या परमाणुभारांच्या ( ॲटामिक वेट ) अनुरोधानें मूलद्रव्याचे पदार्थ-विज्ञान-शास्त्र-विषयक आणि रासायनिक गुणधर्म बदलतात. हेंच गणिताच्या भाषेत सांगावयाचें म्हणजे मुलद्रव्याचे गुणधर्म हे परमाणुंभाराचें फल (फँक्शन) आहे. परमाणुभाराप्रमाणें. मूलद्रव्याचे गुणधर्म बदलतात, तेव्हां परमाणुभार हा अति-परमाणूंच्या समुच्चयानें निर्माण झाला असावा असें कित्येक शास्त्रज्ञांचें मत आहे.

रेडिअम ( रद ) आणि तत्सदृश्य धातूंच्या किरणविसर्जन क्रियेपासून आपणांस जडद्रव्याच्या अंतिम मूलद्रव्याच्या एकत्वाविषयीं प्रत्यक्ष पुरावा मिळतो. कारण यूरेनिअम् ( वरुण ) या रासायनिक मूलद्रव्यापासून रेडिअम् नांवाचें दुसरें रासायनिक मूलद्रव्य उत्पन्न होतें; आणि सर्व रेडिअम् सदृश द्रव्यांच्या विसर्जनापासून हेलिअम् ( सौर ) नांवाचें दुसरें मूलद्रव्य उत्पन्न होतें; यूरेनिअम्, रेडिअम् इ. इ. मूलद्रव्यांपासून हेलिअम् नांवाचें मूलद्रव्य होत असतांना यूरेनिअम्, रेडिअम् इत्यादिकांच्या परमाणूंचें त्याहिपेक्षां सूक्ष्म अशा अति-परमाणूंत रूपान्तर होऊन नंतर त्या परमाणूंपासून पुनर्घटना होऊन हेलिअम् नांवाचें मूलद्रव्य तयार होत असावें असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे.

वरील विवेचनावरून असें मात्र कोणी समजूं नये कीं, रेडिअम्सदृश द्रव्यापासूनच अतिपरमाणूंसारखें सर्व जड द्रव्याचें अंतिम मूलद्रव्य तयार होतें. कारण ज्या जडद्रव्याच्या अंगीं रेडिअम्प्रमाणें किरणविसर्जन शक्ति नाहीं अशा द्रव्यावर कांहीं विशिष्ट परिणाम घडवून ऋणविद्युत्कण उत्पन्न करतां येतात; जडद्रव्यास शुभ्रतेजस्वी होईपर्यंत तापविणें किंवा जडद्रव्यांवर नीलकिरण-समीपस्थ अदृश्य किरण ( परानीलकिरण-अल्ट्राव्हायोलेटरेज ) पाडणें इ. इ. प्रकारानें ऋणविद्युत्कण उत्पन्न करतां येतात. या प्रत्येक ऋणविद्युत्कणांवर सारखीच विद्युत् असते; व त्या प्रत्येक कणांत सारखाच जडांश ( मास ) असतो; हायड्रोजनच्या परमाणूच्या जडांशापेक्षां विद्युत्कणांतील जडांश फारच कमी असतो. या अतिसूक्ष्म कणांस इंग्रजींत इलेक्ट्रॉन ( अतिपरमाणुविद्युत्कण पहा ) किंवा कॉर्प्युस्कल्स अशी संज्ञा आहे; अगदीं अलिकडे या विद्युत्कणाच्या जडांशाचें जें मापन करण्यांत आलें त्यावरून विद्युत्कणांत हायड्रोजनच्या परमाणूच्या १/१७०० इतका जडांश असतो; आणि हायड्रोजनच्या परमाणूच्या त्रिज्यच्या सुमारें १/१००० एकसहस्रांश त्रिज्य विद्युत्कणाची असते. सर्व प्रकारच्या जडपदार्थांपासुन ज्या अर्थीं विद्युत्कण प्राप्त होऊं शकतात त्याअर्थीं विद्युत्कणांपासून सर्व जडपदार्थ झाले असावेत असें अनुमान काढतां येतें. रासायनिक मूलद्रव्याच्या परमाणूपासून जे विद्युत्कण प्राप्त होतात त्यांची संख्या सारखीच असत नाहीं; जड-मूल द्रव्याच्या परमाणूपासून जितके विद्युत्कण प्राप्त होतात त्यापेक्षां कमी वजनाच्या मूलद्रव्याच्या परमाणूपासून कमी प्रमाणांत विद्युत्कण प्राप्त होतात. यावरून व यासारख्या दुसऱ्या कित्येक गोष्टींवरून असें अनुमान काढण्यास जागा होते कीं मूलद्रव्याच्या परमाणुभाराच्या प्रमाणांत विद्युत्कणाचें प्रमाण असतें. निरनिराळया पद्धतीनें परमाणूंतील विद्युत्कणांची संख्या मोजण्याचा जो प्रयत्न करण्यांत आला आहे त्यावरून असें दिसून येतें कीं, विद्युत्कणांची संख्या परमाणु-भाराच्या संख्येच्या जातीचीच असावी. प्रत्येक परमाणूंत ऋण-विद्युत्कण असतात, परंतु परमाणूंच्या ठिकाणीं विद्युत्‌नें ऋणत्व किंवा धनत्व दिसत नाहीं; त्याअर्थीं या ऋण-विद्युत्कणांच्या आसपास धन-विद्युत् असली पाहिजे; या दृष्टीनें पाहिलें असतां मूलद्रव्याच्या परमाणु-भाराच्या प्रमाणांत धन-विद्युत् असली पाहिजे. या धन-विद्युतची रचना (अणुमध्यें) कोणच्या प्रकारची असेल हें समजणें अगत्याचें आहे कारण ही रचना समजल्याच्या योगानें पदार्थाच्या मूलभूतस्थितीविषयीं जास्त माहिती प्राप्त होते. त्यामुळें असा प्रश्न उपस्थित होतो कीं ऋण-विद्युत्कणाप्रमाणें धनविद्युत्‌चे ठराविक प्रमाणांत भाग झालेले आहेत किंवा अणुमधील ऋणविद्युत्कण कमी झाल्यामुळें त्या अणूच्या अंगीं धनत्व आलें आहे; परंतु या शंकेचें योग्य प्रकारें निरसन झालें नाहीं. ऋणविद्युत्कण ज्या प्रमाणांत जडांशयुक्त आहेत त्याच्याशीं तुलना करतां येईल इतक्या सूक्ष्म प्रमाणाचे धन-विद्युत्कण सांपडले नाहींत. धन-विद्युत्‌चा सर्वांत कमी जडांश असलेला जो कण अद्यापपर्यंत उपलब्ध आहे तो हायड्रोजनच्या अणूच्या इतका आहे; आणि याबरोबरच आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, कमी दाब असलेल्या कोणत्याहि जातीच्या वायूंतून विद्युप्रवाह पाठविला असतां त्यायोगानें आपणांस हे धनविद्युत्कण मिळूं शकतात. या सर्व उपलब्ध ज्ञानावरून आपणांस जडद्रव्याच्या अणूच्या रचनेविषयीं विद्युद्दृष्ट्या अनुमान बसवितां येतें. धन-विद्युत्कण आणि ऋण-विद्युत्कण यांच्यासारख्या सारख्या संख्येच्या समुदायाच्या योगानें जड अणु तयार झाले आहेत, परंतु धनविद्युत्कणाच्या १/१७०० अंश इतक्या प्रमाणांत ऋण विद्युत्कणाचे जडांश आहे. अणुभाराच्या प्रमाणांत प्रत्येक जातीचे विद्युत्कण आहेत; आणि विद्युत्कणांची संख्या परमाणुभाराच्या जातीची आहे. या ऋणविद्युत्कण आणि धन विद्युत्कण याखेरीज जडद्रव्याच्या अणूमध्यें आणखी एखादें द्रव्य आहे किंवा नाहीं याविषयीं अद्याप कांहींच कळलें नाहीं. परंतु सध्यां शास्त्रामध्यें मानवी प्राण्याची जेवढी प्रगति झाली

आहे तेवढ्यावरून अनुमान काढावयाचें असल्यास या दोन विद्युत्कणांपेक्षां जास्त कांहीं असल्याचें गृहीत धरणें अयोग्य होईल. सर जे. जे. थॉमसन या प्रसिद्ध शास्त्रज्ञानें गतिमान संस्थितिविषयीं ( सिस्टीम इन मोशन ) विचार करून असें अनुमान काढलें आहे कीं सम प्रमाणांत धनविद्युत्नें संचारित अशा गोलकामध्यें निरनिराळ्या संख्येचे ऋणविद्युत्कण सतत सारख्या गतीनें फिरूं लागल्यास त्यांच्या निरनिराळ्या पद्धति होतात; आणि त्या पद्धतींमध्यें आणि मेन्डेलीफ याच्या अवधि-नियमामध्यें सारखेंच साम्य दिसून येतें. तसेंच ज्या प्रमाणांत विद्युत्कणांची संख्या वाढवावी त्या त्या प्रमाणांत अवधि-नियमाप्रमाणें बदल होतो.

जड-द्रव्यांचा विद्युत्सिद्धानुसार जडांशः—द्रव्यांच्या अंगीं विशेष महत्त्वाचें वैशिष्ट्य कोणचें असेल तर तें जडांशयुक्तता हें होय. या विषयीचें त्रोटक दिग्दर्शन पुढें केलें आहे. जर एक विद्युत्कण गतिमान झाला तर त्याच्या मार्गाच्या आजूबाजूस चुंबक-क्षेत्र उत्पन्न होतें; चुंबक-क्षेत्राची शक्ति विद्युत्कणाच्या वेगाच्या प्रमाणांत असते. चुंबक-क्षेत्रांत शक्ति असते; व विशिष्ट घनफळाच्या क्षेत्रांत त्या ठिकाणच्या चुंबक-क्षेत्राच्या वर्गाच्या प्रमाणांत ही शक्ति असते. जर प्रकाशाच्या वेगाच्या मानानें विद्युत्कणाचा वेग अल्प असेल तर आपणांस असें दिसून येईल कीं त्या विद्युत्कणाच्या सभोंवार जी शक्ति असते ती खालील सूत्रानें दर्शवितां येते;

$$\frac{य \times ए^2}{३ \times अ}$$

या सूत्रांत य = चुंबकत्वाची सभोंवारच्या प्रदेशांत प्रवेशशीलता समजावी; ए ही त्या कणावरील विद्युत् समजावी; आणि अ ही त्या कणाची त्रिज्या समजावी. आतां त्या कणाचा मूळचा जडांश 'म' असेल तर त्या कणाची गति विशिष्ट शक्ति $\frac{१}{२}$ म×व$^2$ या सूत्रानें दर्शवितां येईल. येथें 'व' याची किंमत विद्युत्कणाचा वेग अशी समजावी. यावरून त्या कणाची एकंदरींत गतिविशिष्ट शक्ति खालील सूत्रानें दर्शवितां येईल.

$$\frac{१}{२}\left\{ म \times व^2 + \frac{२}{३} \times \frac{य \times ए^2}{३ \times अ} \right\}$$

वरील सूत्रावरून हें दिसून येईल कीं, विद्युल्लतेच्या योगानें त्या कणाचा जडांश $\frac{२}{३} \times \frac{य \times ए^2}{३ \times अ}$ या प्रमाणांत वाढतो. आतां हा वाढलेला जडांश सभोंवतालच्या शक्तियुक्त प्रदेशांतून प्राप्त होतो; तेव्हां या प्रदेशाकडेच जडांशवर्धनाच्या कारणाकरितां लक्ष्य दिलें पाहिजे. विद्युत्संचारित कण गतिमान असल्याच्या योगानें शक्ति-नलिकांनीं ( ट्यूब्स ऑफ फोर्स ) सभोंवारचा प्रदेश भरून जातो; व या शक्ति-नलिका त्या कणाबरोबरच गतिमान होतात. गणितावरून असें दिसून आलें आहे कीं, शक्ति-नलिकेबरोबर कांहीं इथरद्रव्य ( आकाशसदृश द्रव्य ) नेलें जातें व या इथरच्या ठिकाणीं जडांशत्व असतें. वर जें सूत्र दिलें आहे त्यावरून हें दिसून येईल कीं, विद्युत्कणाची त्रिज्या ज्या ज्या प्रमाणांत कमी कमी होईल त्या त्या प्रमाणांत (त्या कणावर सारखीच विद्युत् असतांना ) हा वाढता जडांश जास्त मोठा असतो; परंतु जर कण मोठा असेल तर हा जडांश अगदींच क्षुल्लक असतो. अणूच्या त्रिज्येइतकी त्रिज्या असल्यास हा वाढता जडांश किंचित् असतो असें दिसून आलें आहे. परंतु ऋणविद्युत्कणाच्या ( अतिपरमाणुच्या ) त्रिज्येइतकी त्रिज्या असल्यास ऋणविद्युत्कणावर असणाऱ्या विद्युल्लतेच्या योगानें याच्या ठिकाणीं असणाऱ्या जडांशाचा बहुतेक सर्व भाग आलेला असतो. या संबंधानें काफमन, बुचरर आणि हुपका यांनीं रेडिअमपासून निघणाऱ्या ब ( = बी = बीटा ) किरणांवर जे प्रयोग केले आहेत त्यायोगानें वरील अनुमानास चांगलीच बळकटी आली आहे.

शास्त्रज्ञांस असें दिसून आलें आहे कीं ज्या प्रमाणांत संभाव्य शक्तींत ( पोटेन्शल एनर्जी ) फरक पडेल त्या प्रमाणात द्रव्याच्या जडांशांत फरक पडेल परंतु त्याबरोबरच मूळचा जडांश गतिविशिष्टशक्ति इ. इ. गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. ह्या दुसऱ्या गोष्टी लक्ष्यांत घेऊन जर आपण पाण्याविषयीं विचार करूं लागलों तर काय प्रकार दृष्टीस पडेल तें पाहूं या. प्राण ( आक्सिजन ) आणि उज्ज ( हायड्रोजेन ) हे एकत्र केले असतां पाणी उत्पन्न होतें; परंतु त्या बरोबरच उष्णता उत्पन्न होते. वरील दोन वायूंचा संयोग करून एक ग्राम पाणी तयार झालें असतां सुमारें $१.६ \times १०^{११}$ अर्ग [ अर्ग हें शक्तिचें एक माप आहे. एक सेंटिमिटर अंतराच्या उंचीवर एक मिलिग्राम वजनाचा पदार्थ एक डाईन शक्तिच्या विरुद्ध चढविला असतां एक अर्ग या परिमाणाचें शक्ति-कार्य होतें. ] या प्रमाणाची शक्ति उत्पन्न होतें. परंतु गणितानें असें दिसून आलें आहे कीं, एक ग्रामपासून इतकी शक्ति निघाली असतां, त्या एका ग्रामाच्या ( वजन ) $\frac{१}{३००००००००००}$ अंश इतक्या प्रमाणांत वजनांत फरक पडल्यास तो फरक सध्या उपलब्ध असलेल्य यंत्रानें मोजतां येण्यासारखा नाहीं.

आतांपर्यंत आपण जें विवेचन केलें आहे त्यावरून असें दिसून येईल कीं विद्युत्कारणानें जर द्रव्यांत जास्त प्रमाणांत संभाव्य शक्ति असेल तर त्या ठिकाणीं त्या संभाव्य शक्तीमुळें जास्त जडांश दिसून येतो. विद्युच्चुंबक सिद्धांतांत असें गृहीत धरलें आहे कीं, प्रकाशलहरींच्या समागमांत विद्युच्छक्ति असते आणि ही शक्ति संभाव्य स्वरूपाची असते. यामुळें असें मानावें लागतें कीं प्रकाशलहरींच्या ठिकाणीं जडांश असल्याप्रमाणें गुणधर्म दिसून आले पाहिजेत. याच दृष्टीनें पुढें पाहूं लागल्यास असें दिसून येईल कीं, त्या लहरींच्या ठिकाणीं वेगसंचय ( मुमेंटम् ) [ वेगसंचय याची व्याख्या पुढें दिली आहे. एकाद्या गति-

मान पदार्थाचा वेग आणि त्या पदार्थाचें वजन यांचा गुणाकार करून येणारी संख्या शक्तिसंचय म्हणून पदार्थविज्ञानशास्त्रांत गणिली आहे]. आहे या वेगसंचयाची दिशा त्या लहरीच्या दिशेप्रमाणेंच असते. ज्या वेळेस अपारदर्शक पदार्थांच्या योगानें प्रकाशाचें शोषण होतें त्यावेळेस त्या पदार्थाला त्या लहरींचा वेगसंचय प्राप्त होत असला पाहिजे; त्यामुळें त्या पदार्थावर प्रकाशकिरणामुळें दाब पडल्यासारखी स्थिति होत असावी. म्याक्सवेल यानें असें दाखवून दिलें कीं, विद्युच्चुंबकसिद्धान्त ग्रहण केल्यामुळें प्रकाशाचा हा दाब गृहित धरणें भाग पडतें. लिबेडू, निकोलस, हल आणि पायन्टिंग या शास्त्रज्ञांनीं प्रयोग द्वारां हा दाब सिद्ध केला आहे.

व ज न.—वजन आणि जडांश यांत काय फरक आहे असा प्रश्न उपस्थित होतो. वजन हें गुरुत्वाकर्षणाचा परिणाम आहे; अर्थात् ज्या ठिकाणीं गुरुत्वाकर्षण नाहीं त्या ठिकाणीं वजन असूं शकणार नाहीं. परंतु जडांश तसेंच राहील; व जडांशाशीं निकट संबंध असणारा वेगसंचय वगैरे गुरुत्वाकर्षणाभावीं राहूं शकतील. द्रव्याची रचना विद्युत्कणाच्या योगेंकरून झाली आहे अशा दृष्टीनें आपण येथपर्यंत विचार करीत आलों आहोंत. आतां द्रव्याच्या वजनाविषयीं याच दृष्टीनें विचार करूं. जडांश आणि वजन यांचें समीकरण मांडून पाहिलें तर तें समीकरण अगदीं साधें आहे. परंतु द्रव्याचा सर्वांत मूलभूत आणि अज्ञेय असा हा एक धर्म आहे. कोणत्याहि वस्तूचें वजन त्या वस्तूच्या जडांशाच्या प्रमाणांत असतें. न्यूटननें या नियमाची सत्यता पाहण्याकरितां पुष्कळ प्रयोग केले. सन १८३० सालीं बेसेल यानें फारच विस्तृत प्रमाणावर प्रयोग केले; बेसेलनें आपल्या प्रयोगास शक्य तितकी सूक्ष्मता आणण्याचा प्रयत्न केला, त्यावरून असें दिसून आलें कीं, वजन हें जडांशाच्या प्रमाणांत असतें. यांत जर फरक पडला तर तो वजनाच्या किंवा जडांशाच्या एकसाट हजारांशांपेक्षां कमी प्रमाणांत पडेल जडांश आणि वजन यांत जें प्रमाणाचें सातत्य दिसून येतें त्याकडे वस्तूंची जी विद्युन्मय रचना झालेली दिसते त्या दृष्टीनें या प्रमाणसातत्याकडे पाहिलें असतां या प्रश्नावर जास्त उजेड पडतो. हायड्रोजनच्या परमाणूच्या एक-सतरारों हा अंश जडांश विद्युत्कणाच्या ठिकाणीं असतो. त्यावर ठराविक प्रमाणाची ऋणविद्युत् असते. त्या कणाच्या ठिकाणीं जो जडांश दिसतो तो विद्युत्संचाराचा परिणाम आहे, व विद्युत्संचारित कणासभोंवारच्या शक्ति-नलिकांच्या योगानें कांहीं इथर पकडला गेल्या कारणानें हा जडांश उत्पन्न होतो. यावर अनेक प्रश्न उत्पन्न होतात. हा जडांश तौलनीय (पॉंडरेबल) आहे काय? याच्या योगानें पदार्थाच्या वजनांत भर पडूं शकते काय? व असें असेल तर साधारण वस्तूसंबंधानें जडांश आणि वजन यांच्यामध्यें जें एक नियमबद्ध असें सातत्य दिसून येतें त्याच प्रकारचें सातत्य वरील कणांच्या जडांशांत आहे काय? आतां आपण क्षणभर असें गृहीत धरूं कीं विद्युत्कणसंबंधीं जडांश तौलनीय नाहीं; त्यामुळें विद्युत्कणाच्या योगानें अणूचें जडांशत्व वाढतें परंतु अणूचें वजन वाढत नाहीं. तेव्हां ज्या अर्थी हायड्रोजनच्या अणूच्या $\frac{1}{1700}$ विद्युत्कणाचा जडांश आहे. त्या अर्थी क्ष परमाणुभार असलेल्या एखाद्या परमाणूंतून एक अतिपरमाणु काढल्यास किंवा एखादा परमाणु त्यांत मिळविल्यास त्या अणूचा जडांश १७०० क्ष या प्रमाणांत बदलेल, परंतु त्यायोगानें त्याचें वजन बदलणार नाहीं; असें असल्यास त्या योगानें वजन आणि जडांश यांत ज्या प्रमाणांत फरक पडेल त्याच प्रमाणांत फरक पडणारीं दुसरीं कार्ये होऊं लागतील व यावरून ज्या रासायनिक मुलद्रव्यांचे अणुभार फार कमी आहेत अशांच्या बाबतींत या रीतीनें पडणारा फरक 'बेसेल' याच्या पद्धतीनें प्रत्यक्ष प्रयोगानें मापतां येण्यासारखा आहे. आतां परमाणूमध्यें असणारे अतिपरमाणु परमाणु-भाराच्या प्रमाणांत असतात; व त्याप्रमाणें अतिपरमाणू परमाणुभाराच्या प्रमाणांत असल्यामुळें विद्युच्छक्तीनें उत्पन्न होणारा जडांश तौलनीय आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा निर्णय होऊं शकत नाहीं.

रेडिअम् आणि तत्सदृश धातूंवर प्रयोग करून वरील प्रश्नाचा निर्णय करतां येईल अशी आशा वाटूं लागली आहे. जे.जे.थॉमसन यानें या दिशेनें कांहीं प्रयोग केले परंतु या प्रयोगानां जितकी सूक्ष्मता यावी तितकी न आल्यामुळें कांहीं निर्णय करतां आला नाहीं. सदर्नेस या शास्त्रवेत्त्यानें क्याव्हेन्डिश येथील प्रयोगशाळेंत बराच दीर्घकालापर्यंत सतत प्रयोग केले; ते प्रयोग नुकतेच (सन १९१० त) पुरे झाले आहेत; त्यावरून असें सिद्ध झालें आहे कीं, रेडिअम्प्रमाणें उत्सर्जक वस्तू असोत किंवा सामान्य वस्तू असोत त्यांमधील विद्युदुत्पन्न जडांश परमाणुभाराच्या प्रमाणांत असतो.

याप्रमाणें जडांश आणि वजन यांमधील प्रमाणासंबंधानें थोडेसेच प्रयोग झाले आहेत; परंतु वस्तूच्या बाबतींत रासायनिक किंवा पदार्थविज्ञानशास्त्राविषयक फेरफार केल्यास त्या वस्तूच्या वजनांत कांहीं फरक होतो किंवा काय याविषयीं बरेच महत्वाचे प्रयोग करण्यांत आले आहेत. त्यावरून असें दिसून आलें आहे कीं, सध्यां आपणास उपलब्ध असणाऱ्या साधनांच्या सहाय्यानें त्यांत पडणारा (पडत असल्यास) फरक न समजून येण्याइतका सूक्ष्म असावा. याविषयीं लंडोल्ट, पॉयटिंग, फिलिप्स आणि सदर्नेस यांनीं फार परिश्रम केले आहेत.

गु रु त्वा क र्ष ण—जडद्रव्य आणि तत्संबंधीं जडांश, वजन इत्यादिकांविषयीं विवेचन करीत असतांनाच त्याबरोबर गुरुत्वाकर्षणासंबंधानें थोडेसें विवेचन करणें अवश्य आहे.

गुरुत्वाकर्षणाशीं समवायसंबंधानें वजन हें निगडित झालें आहे. गुरुत्वाकर्षणासंबंधानें शास्त्रज्ञांनीं उपपत्त्या ( किंवा कल्पना ) बसविल्या आहेत. त्यांच्याकडे लक्ष्य देणें आवश्यक आहे. परंतु सर्वच प्रकारच्या उपपत्त्यांचा विस्तारपूर्वक विचार करणें शक्य नाहीं, म्हणून दोनच कल्पनांचा विचार केला आहे.

यांपैकीं एक कल्पना याप्रमाणें आहे:—विद्युत् हें एक प्रवाही द्रव्य आहे. समान जातीच्या विजेमध्यें जें प्रतिसारण घडतें त्यापेक्षां किंचित् जास्त प्रमाणावर विजातीय विद्युल्लतेमध्यें आकर्षण घडतें. या प्रमाणें गृहित धरल्यावर गणिताच्या सहाय्यानें पुढें दिल्याप्रमाणें विचार करतां येतो. दोन वस्तू आहेत; त्यांपैकीं एकींत ‘क’ धनकण आहेत व तितक्याच ‘क’ संख्येचे ऋणकण आहेत; व दुसरींत ‘ड’ संख्येचे ऋणकण आणि धनकण आहेत. अशी स्थिति असतांना त्या दोन वस्तूंमध्यें अंतराच्या वर्गाच्या व्युत्क्रम प्रमाणांत आकर्षण असेल व क×ड याच्या समप्रमाणांत तें असेल. याप्रमाणें गृहित धरलें असतां गुरुत्वाकर्षणाचा उलगडा होऊं शकतो. प्रयोग करून या कल्पनेला प्रत्यक्ष दुजोरा मिळूं शकेल किंवा कसें या दृष्टीनें विचार करून शास्त्रज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं सध्यां उपलब्ध असलेल्या साधनांपेक्षां किंचित् जास्त सूक्ष्मता देणाऱ्या प्रयोगसाधनांनीं याचा निर्णय करतां येईल.

सन १८१८ मध्यें लसागे ( जिनिव्हाचा रहिवाशी ) यानें गुरुत्वाकर्षणाचा आपला सिद्धान्त प्रसिद्ध केला. त्यानें असें गृहित धरलें कीं सर्व विश्वभर अत्यंत सूक्ष्म असे कण पसरलेले आहेत व हे कण अत्यंत मोठ्या वेगानें फिरत आहेत; हे कण सूर्यमंडलबाह्य ( अल्ट्रामुन्डेन ) आहेत. तसेंच हे कण इतके भेदक(पेनिट्रेटिंग)किंवा प्रवेशशील आहेत कीं ते सूर्य, पृथ्वी, इत्यादिकांसारख्या मोठमोठ्या घनपदार्थांतून कांहीं एक अडथळा झाल्याशिवाय जाऊं शकतात; व या ग्रहादिकांतून हे कण जात असतांना या ग्रहांकडून अत्यंत अल्प प्रमाणावर त्यांचें अपशोषण होतें. ज्या परमाणूंच्या योगानें जड वस्तू झाल्या आहेत त्या परमाणूंच्या आकारमानानें त्यांमधील अंतर बरेंच मोठें असल्यास वस्तूंतील जडांशांच्या मानानें त्या वस्तूकडून सूर्यमंडलबाह्य सूक्ष्म कणांचें अपशोषण होतें. याप्रमाणें हे सूर्यमंडलबाह्य कण एखाद्या वस्तूंतून जात असतांना त्यांपैकीं कांहीं कणांचे त्या वस्तूच्या जडांशाच्या मानानें अपशोषण होतें व त्यामुळें त्या वस्तूला त्यामानानें त्या कणांकडून वेगसंचय दिला जातो. वस्तूंतून हे सूर्यमंडलबाह्य कण जात असतांना त्यांची दिशा चोहोंबाजूंला सारखीच असेल तर ती वस्तू त्या कणांकडून प्राप्त होणाऱ्या वेगसंचयामुळें कोणत्याहि एका विशिष्ट दिशेनें हलणार नाहीं; समजा कीं, जगांत ‘अ’ही एकच वस्तु आहे व तिला याप्रमाणें सूर्यमंडलबाह्य कणांकडून वेगसंचय प्राप्त झाला तरी ‘अ’ कोणत्याहि एका विशिष्ट दिशेनें चलन पावणार नाहीं. आतां या ‘अ’ शेजारीं कांहीं अंतरावर ‘ब’ ही वस्तु आहे; त्यामुळें ‘ब’ ही वस्तु ‘बअ’ या दिशेनें जाणाऱ्या कांहीं कणांपासून अचें ढालीप्रमाणें रक्षण करील; त्यामुळें ‘अ’ ला ‘अब’ या दिशेनें कांहीं वेगसंचय प्राप्त होईल; व याप्रमाणेंच ‘ब’ बद्दल विचार केल्यास बला ‘बअ’ या दिशेनें वेगसंचय प्राप्त होईल. यामुळें अ ही वस्तु बचें आकर्षण करील आणि ब ही वस्तु अचें आकर्षण करील लसागे यानें असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, अ आणि ब यांनां जो वेगसंचय प्राप्त होतो तो अ आणि ब यांच्या गुणाकाराइतका असतो व अ आणि ब मधील अंतर त्या दोन वस्तूंच्या आकारमानाच्या प्रमाणानें बरेंच मोठें असल्यास त्यांच्यांमधील आकर्षण अंतराच्या वर्गाच्या व्युत्क्रम प्रमाणांत असतें.

क्लार्क म्याक्सवेल यानें असें दाखवून दिलें कीं, सूर्यमंडलबाह्य कणांतील वेगसंचयाचें स्थानान्तर होऊं लागलें तर त्या योगानें वस्तूंमधील उष्णता वाढूं लागेल व सर्व वस्तु तापून पांढऱ्या शुभ्र दिसूं लागतील. परंतु आपणांस असेंच होईल असें समजण्याचें कारण नाहीं. विरलवायूंतून विद्युत्प्रवाह पाठविला असतां रॉंटजनचे किरण उत्पन्न होऊन व हे रॉंटजन किरण जास्त प्रवेशशील असतात त्यामुळें ते पदार्थांतून जातांना विद्युल्लतेच्या मानानें फारच अल्प प्रकाणावर उष्णता उत्पन्न करितात. सूर्यमंडलबाह्य कण वस्तूंतून जातांना त्यांनां जो अत्यल्प प्रमाणावर अडथळा होतो त्याच्या योगानें उष्णता उत्पन्न न होतां वरील दाखल्याप्रमाणें विद्युत्प्रवाहोत्पन्न रॉंटजन किरणाप्रमाणें एखादि अत्यंत सूक्ष्म अशी शक्ति उत्पन्न होत असावी व ती शक्ति अति सूक्ष्म असल्याकारणानें आपल्या नजरेस येत नसावी. अलिकडे जे शोध लागत आहेत त्यांच्या योगानें लसागे याच्या कल्पनामय सिद्धांतास पुष्टि प्राप्त होत आहे. लसागे यानें असें गृहीत धरलें आहे कीं, सूक्ष्म कण अतिशय वेगानें फिरतात; त्यांच्या अंगीं प्रवेशशीलता आहे; त्यामुळें ते घनपदार्थांतून जाऊं शकतात; त्यांच्या ठिकाणचा वेग-संचय दुसऱ्यास दिला जातो व त्यामुळें गुरुत्वाकर्षण घडूं लागतें. आतां आपण विद्युल्लता किंवा चुंबकत्व यांच्या लहरीकडे पाहूं या; या प्रकारच्या लहरी प्रकाशाच्या किंवा रॉंटजन किरणाच्या ठिकाणीं दिसून येतात; यामुळें लसागे याच्या सूर्यमंडलबाह्य कणांच्या ऐवजीं रॉंटजन किरणापासून गुरुत्वाकर्षणाचे परिणाम होतात असें मानण्याकडे प्रवृत्ति होते; परंतु रॉंटजन किरणाचें अपशोषण झालें असतां त्यापासून कमी प्रमाणांत असलेले प्रवेशशील किरण उत्पन्न होतात; किंवा त्या किरणासारखेच किरण उत्पन्न होतात; या कारणानें लसागे याच्या सूर्यमंडलबाह्य कणांच्या ऐवजीं रॉंटजन किरणांची स्थापना करतां येणें सध्यां तरी शक्य दिसत नाहीं.

वरील लेखांत विद्युत्कणापासून ( म्हणजेच पर्यायानें वेद्युल्लतेपासून ) जडद्रव्यमय वस्तूंची रचना झाली आहे असें प्रतिपादन केलें आहे; कारण या प्रकारच्या प्रतिपादनास शास्त्रीय प्रयोगानें प्रत्यक्ष जितका दुजोरा मिळाला आहे तितका दुजोरा एतद्विषयक दुसऱ्या कोणत्याहि कल्पनेस प्राप्त झाला नाहीं. या सिद्धान्ताप्रमाणें जे अत्यंत सूक्ष्म असे अतिपरमाणू गृहीत धरले आहेत ते अतिपरमाणू प्रयोगशाळेंत इतर वस्तूपासून निराळे करून त्यांचें कांहीं प्रमाणावर मोजमाप करण्यांत आलें आहे; व शास्त्रज्ञांस अशी खात्री वाटूं लागली आहे कीं थोड्याच कालांत या अतिपरमाणूंविषयीं म्हणजेच पदार्थांच्या आद्यघटकाविषयीं पुष्कळ माहिती उपलब्ध होऊं शकेल; व त्यामुळें वरील सर्व विवेचनांतील सर्व भागांस प्रत्यक्ष प्रयोगाची कसोटी लावतां येईल.

टीपः—वरील लेखांत विद्युत्कण आणि अतिपरमाणु हे दोन्ही शब्द जवळ जवळ समानार्थी वापरले आहेत.

**जडभरत**—प्रियव्रत वंशोत्पन्न जो प्रसिद्ध ऋषभदेव राजर्षि त्याच्या शतपुत्रांतील ज्येष्ठ भरत राजा. तो राज्य सोडून अरण्यांत तप करीत असतां,हरिण बालकाच्या ममतेनें अंतःकाळीं त्यास तोच ध्यास लागून, हरिण जन्म प्राप्त झाला. नंतर त्या योनींतून सुटल्यावर, आंगिरस गोत्री कोणी ब्राह्मणाच्या कनिष्ठ स्त्रीच्या उदरीं तो जन्मास आला असतां, त्यास पूर्वपुण्यानें मागचें स्मरण होतें म्हणून आसक्तीस भिऊन त्यानें तेंच जडचर्या अवलंबिली. त्या कारणानें जडभरत असें नांव पडलें.

वागण्यांत हा फार जड असल्यानें याला मजुरीचीं कामें करावीं लागत. एकदां तर त्याला देवीला बळी देऊं केलें होतें. पुढें हा मोठा तत्वज्ञानी बनला [ भा. ५ स्कं. अ. ९. ]. कालांतरें करून प्रसंगवशात् रहूगण राजाची व याची गांठ पडून त्यास यानें आत्मतत्वबोधानें कृतार्थ केलें. प्रा. को. ].

**जडवाद**—सर्व विश्वाचा जडप्रकृति व गति यांनीं खुलासा करण्याची पद्धति. सर्व मानसिक क्रियांचा खुलासा आधिभौतिक व रासायनिक फरकांनीं होतो असें हें मत म्हणतें. या मतांत मुख्य पांच प्रकार आहेत. ( १ ) निर्व्याज जडैक्यवाद; हा ज्या कारणांनीं उत्पन्न झाला तीं कारणें अद्यापि अस्तित्वांत आहेत. याची सुरवात सामान्य लोकांस आत्मिक ज्ञानवेत्त्यांच्या गोष्टी समजण्यास जड जातात या जाणिवेंत आहे. पूर्वसाक्रेटिक जडवादी या वर्गांत येतात. ते जडजीववादी असत. हक्स्ले व हेकेल यांस विचाराचा इतिहास, विचाराची सद्यस्थिति समजली नव्हती असें दिसतें. ( २ ) विश्वोत्पत्ति जडवाद; एकंदर जगाविषयीं सर्वव्यापक अशी विचारसरणी पुढें मांडण्याचा स्टोइक व एपिक्युरियन्सचा प्रयत्न या मतांत येतो. ( ३ ) आध्यात्मिक जडवाद, ख्रिस्तीमतास विरोध करणारें मत. ( ४ ) वैद्यकीय जडवाद; हें मत मानसिक आजाराचा शारीरिक आजारानें खुलासा करण्याच्या प्रवृत्तीनें उत्पन्न झालें. ( ५ ) सर्वांत महत्वाचा शास्त्रीय जडवाद; पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ, प्राणिशास्त्रज्ञ व जीवनशास्त्रज्ञ हें मत प्रतिपादन करतात. सृष्टीशास्त्रज्ञ सर्व गोष्टी भौतिक कारणांनीं समजावून देण्याचा प्रयत्न करतात. ते आध्यात्मिक कारणें अजिबात टाळतात. १९ व्या शतकांतील जर्मन जडवादाचें कारण हेगेलचा अध्यात्मवादच आहे. हें मत हॉब्सच्या वेळेपासून इंग्लंडांत प्रचलित झालें आहे.

**जडान्नविषबाधा**—कुजण्यास अगर आंबण्यास नुकताच आरंभ झालेलें अन्न खाण्यांत येऊन त्यामुळें पटकीप्रमाणें मोठाले जुलाब होतात त्या व्याधीस हें नांव आहे. या रोगांत तीन चार प्रकारचे जंतू मळांत व आंतड्यांत सांपडतात.

कारणें.—वरील प्रकारें बिघडलेलें अन्न, जुनी शिळी बासुंदी, श्रीखंड, अगर आटीव दूध नवीन मालांत हलवायानें भेसळ केलेलें खाण्यांत येणें, नासके खेकडे व मासे खाणें, डब्यांत ठेवलेलें मांस, उघडें असलेलें नासकें खाणें, नासका खवा, बटाटे, आइसक्रीम मलाई वगैरे खाणें, रोगट जनावरांचें मांस खाल्यानें अगर निरोगी जनावराचे परंतु नासण्यास आरंभ झालेलें मांस खाण्याने हा रोग होतो व चुकीनें अज्ञ लोक यास पटकी म्हणतात.

लक्षणें.—वरील प्रकारच्या आहारानंतर थोड्या तासांनीं ते पदार्थ खाल्ले असणारांपैकीं बहुतेक माणसांना वांति,जुलाब, पोटदुखी, हातपाय गारठणें व शक्तिपात हीं लक्षणें होऊं लागून शिवाय आलब्युमिनमेह, फुप्फुसदाह, जर उतणें, अंग लाल होणें, अंगावर पित्त उठणें व अंग फुटल्याप्रमाणें होणें हीं लक्षणें होतात. कधीं लक्षणें याहून अमळ सावकाशपणें प्रगट होतात. रोग नंतर बहुधां बरा होतो. परंतु कधीं कधीं रोगी दगावतो.

उपचार.—जठर धुवून काढावें व फार शक्तिपात नसल्यास सौम्य क्षालकामुळें कुजणें थांबून कोठा शुद्ध होतो. ब्रांडी, ईथर, अमोनिया हीं उत्तेजक औषधें द्यावीत. रेच फारच होऊन न थांबल्यास ४-१० थेंब अफूचा अर्क द्यावा. शक्तिपातासाठीं अमृतक्षारजल त्वचेखालीं टोंचून घालावें. कांहीं तऱ्हेचीं मांसाचें ( डुकराचें वगैरे ), कालवे व मासे जात्याच विषारी असतात, तीं आहारांतून वर्जावीं.

**जडावाचें काम**—एका धातूवर दुसरी धातू जडविणें किंवा तीवर थर देणें. या कामाच्या अनेक जाती आहेत. त्या सर्व हिंदुस्थानांत योजिल्या जात आहेत. पुष्कळ वेळां एकाच कलाकुसरीच्या कामांत या सर्व जातींचा समावेश होऊं शकतो. साधी व स्वस्त पद्धत म्हणजे लोखंडाच्या किंवा पोलादाच्या पृष्ठभागावर उत्तम नक्षी खोदावयाची व त्यांत सोन्याची किंवा चांदीची तार पाहिजे त्याप्रमाणें दाबून बसवावयाची व हातोडीनें ठोकून ठाकठोकी करावयाची अशा तऱ्हेचें सुंदर काम पंजाबमध्यें सियाल-

कोट येथें व त्रावणकोरांत करीत असतात. तसेंच धातूच्या पृष्ठभागावर खोल खाचण्या करून त्यांत तार घालतात. वरून ठोकलें असतां ती तार खांचण्यांच्या कडांनां घट्ट धरते; नंतर कानसून तो भाग सफाईदार करितात. पोलादावर सोनें किंवा चांदी आणि तांब्यावर चांदी किंवा पितळ, असें सामान्य संयोगीकरण असतें. दुसऱ्या तऱ्हेच्या कामांत थर देण्याच्या धातूचे लहान लहान पत्रे पृष्ठधातूवरील खोदलेल्या भागांत बसवून त्या भागांच्या कडा हातोडीनें आंत बसविलेले पत्रे धरून ठेवतील अशा बेतानें ठोकतात. धातूवर चपटे थर दिल्याचें व आंत तार बसविल्याचें परिचित उदाहरण म्हणजे बेदरी भांडीं होत. हीं भांडीं जस्त, शिसें आणि कथील या मिश्रधातूंपासून केलेलीं असतात. ही प्राचीन भारतीय कला असून दक्षिणेंतील बेदर शहराचें नांव हिला दिलें आहे. दुसरें महत्वाचें ठिकाण म्हणजे बंगालमधील पूर्णीया गांव होय. त्या ठिकाणीं तांब्यावर चांदी जडविण्याची विशिष्ट कला उदयास आली. चांदी जडविल्यानंतर बेदरी भांड्यांचा पृष्ठभाग रासायनिकरीत्या काळा करीत.

थर दिलेल्या भांड्यांच्या कांहीं जातींत नक्षी उठून दिसण्याकरितां खोदलेला भाग नक्षीदार करून त्यात दुसऱ्या धातूचा थर ठोकून बसविला असतां तो थर नक्षीदार दिसतो. अशा तऱ्हेचें काम हल्लीं तंजावरामध्यें होतें. लखनौच्या कांहीं बेदरी भांड्यांत याची छटा आढळून येते. तेथील भांड्यांत चांदीचा थर उठावदार नक्षीसारखा दिसतो. जुन्या कामांतून सुद्धां पितळेवर फक्त तांबें जडविलें असतें. हल्लीं त्याऐवजीं जी चांदी चढवितात ती कांहीं अंशीं दिखाऊपणाकरितां असते.

जडावाच्या दागीन्यांबद्दल हिंदु लोकांइतकी आवड दुसऱ्या कोणत्याहि लोकांत आढळणारनाहीं. प्राचीन काळापासून जडावाचे अलंकार वापरण्याची आपल्या लोकांत चाल आहे. भारतीय जडावाच्या दागीन्याचा नमुना सिंहलद्वीपांतील जाफ्ना शहरीं सांपडतो. एक सोन्याचा पत्रा घेऊन त्यावर मेण घालून त्यांत बारीक सोन्याच्या तारांच्या चौकटींत पातळ रत्नें, विशेषतः माणकें बसवितात; मधील रिकामी जागा मऊ सोन्यानें भरतात व हत्यारांच्या साहाय्यानें हळू हळू त्यांचें घट्ट व अखंड कोंदणांत रूपांतर करतात. फक्त हीच रत्नें बसविण्याची तऱ्हा शोभेच्या बाबतींत मिन्याच्या कामाशीं टक्कर मारते; दुसरा एक सुंदर नमूना म्हणजे मेणाच्या बैठकीवर सोनें जडवून केलेला द्राविडी जडावाच्या कामाचा होय. या कामांत भरीवपणा व झगझगीतपणा यांचा लहानच पण खऱ्या मोलाशीं आणि हलक्या वजनाशीं संयोग झालेला असतो. हिंदू जडावाच्या कामाबद्दल सर जार्ज बर्डवुड नांवाचा इंग्रज गृहस्थ असें म्हणतो कीं, "आपल्या सर्वोत्कृष्ट कौशल्यानें आणि पूर्ण ज्ञानानें व पृष्ठभागास व्यावहारिक शोभा आणण्याचें मर्म कळल्यानें हे लोक अतिशय हलक्या वजनाच्या धातूला आणि रत्नाला—त्याची व्यापारी किंमत मुळींच नसली तरी—अतिशय मोठी अशी कारागिरीची किंमत आणतात. ह्या कारागिरींत आणि सांप्रतच्या यूरोपीयन कारागिरींत महत्त्वाचा फेर आहे. यूरोपीय कारागीर पुष्कळशा वजनाच्या धातूवर थोडीशी कारागिरी करितात." हिंदी जडावाच्या कामाची रुफाई आणि तेजस्विता बहिर्गोल रत्नास पृष्ठभागावर पैलू पाडून सर्व रंग उठावानें दाखविण्यांत आहे. हल्लींची पाश्चात्य चाल म्हणजे एकच पातळ पैलू पाडावयाचा. ह्यांत पहिल्या खेपेस पहाणारास भपका वाटतो. कांहीं थोड्या सुशिक्षित हिंदी लोकांत अशा तऱ्हेचे जडावाचे जिन्नस वापरण्याची चटक दिसून येते. हे जिन्नस दुसऱ्या खेपेस नजर फेकण्याच्या योग्यतेचे मुळींच नसतात. कारण हल्लींचें सर्व काम म्हणजे यूरोपीय व्यापारी चोपड्यांतून नक्कल करून उठविलेलें असतें. अतुलनीय असें पूर्वीचें सुंदर काम निष्ठुरपणें वितळविण्यांत येतें व त्याचेंच हल्लींचें सुधारलेलें म्हणून समजलें जाणारें जडावाचें काम तयार करतात. लंकेंतील कँडि शहरचें जडावाचें काम द्राविडी पद्धतीशीं विशेषेंकरून निगडित आहे; कारण तेथील जडे व सोनार हिंदी वंशांतीलच आहेत. परंतु दक्षिण हिंदुस्थानी कारागिरींत कधीं कधीं आढळून येणारी दानवी कल्पना तेथील कामांत आढळून येत नाहीं. शिवाय तेथील स्थानिक असे कांहीं विशिष्ट नमुने आहेतच; जसें मिरींच्या मंजरींच्या माळा, कांहीं विशिष्ट आंगठ्या आणि कानांतील लोलक कँडीच्या बऱ्या लोकांच्या आंगठ्या त्यांच्या मोठ्या आकाराच्या दृष्टीनें प्रेक्षणीय असतात.

अशा कलांची मूळ भूमी इराण म्हणतां येईल; कारण बहुतेक ललितकला व नक्षीकामें इराण--तुर्कस्थानांतून बाह्य देशांत पसरलीं आहेत. धातुपृष्ठावर नक्षी खोदून तींत दुसऱ्या धातूच्या तारा बसविण्याची पद्धत 'दमास्कीनिंग' म्हणून प्रसिद्ध आहे. धातूंवर नक्षीदार जडावाचें काम अत्युत्कृष्ट व सुबक करण्यांत आज जपानचा हात धरणारा कोणी नाहीं असें म्हटल्यास चालेल. सुंदर ब्रॉंझमूर्तिकर्मांत फक्त सोन्याचांदीचा जडाव ते करितात; एरवीं मोठ्या वस्तूंनां व ओतीव भांड्यांनां हिणकस धातूच वापरतात. ब्रॉंझ पुतळ्यांवर जडाव करतांना मूळ नक्षी जास्त खोदून तींत चांदीसोन्याची तार भरून वर ठोकतात. पुष्कळदां लाखेच्या वस्तूंवरहि शिंपांसारख्या पदार्थांचा जडाव करतात. दमास्क-जडावाच्या कामांतील बहुतेक प्रकार जपान्यांनां माहीत आहेत. भिंतींत किंवा जमीनींत संगमरवरी दगडाचे किंवा कांचेचे तुकडे बसवून करण्यांत येणारें 'मोझेइक' काम हें एक प्रकारचें जडावयाचें कामच होय. याचा नमुना आग्र्याचा ताजमहाल होय. ही कला फ्रेंच कारागिरांनीं दिल्लीला नेऊन तेथील एतद्देशीय कारागिरांनां शिकविली. कांहीं जातींचें मिनाकामहि जडावांत येऊं शकेल. [कुमारस्वामी-आर्टस अँड क्रॅफ्टस इन् इंडिया अँड सीलोन; ब्रिटानिका.]

**जत**—मुंबई, विजापुर जिल्हा. जत संस्थान हें हल्लीं विजापुर एजन्सीमध्यें असून त्याच्या उत्तरेस सोलापुर जिल्हा, पूर्वेस विजापुर जिल्हा, दक्षिणेस बेळगांव जिल्हा आणि पश्चिमेस सांगली संस्थान आहे संस्थानचें एकंदर क्षेत्र-फळ ९८०.८ चौरस मैल असून लोकसंख्या ( सं.१९२१ ) ८२६४९ व एकंदर वसूल ३,३६ ९३२ आणि ११९ गांवें आहेत. राजधानीचें गांव जत हेंच असून विद्यमान संस्थानिक श्रीमंत रामराव अमृतराव ऊर्फ आबासाहेब डफळे हे आहेत. संस्थानिकांनां राज्यांतील मुलकी व फौजदारी बाबतींतील सर्व अधिकार आहेत. इंग्रजसरकारास संस्थानाकडून सालिना ६४०० रु. ( तैनाती फौजेसाठीं ) व ४८४७ रु. ( सरदेशमुखीबद्दल ) मिळून एकंदर ११२४७ रु. खंडणी मिळते.

संस्थानिक हे उच्चवर्गीय मराठे ( क्षत्रिय ) असून त्यांचें मूळचें आडनांव चव्हाण होतें; परंतु जतची जहागीर मिळाल्यानंतर त्यांनां ( व त्यांच्या भाऊबंदांनां ) डफळे हें नांव मिळालें. याचें कारण त्यांचे पूर्वज हे मूळचे ( जत संस्थानांतील ) डफळापुर या गांवचे पाटिल होत. सांप्रतहि डफळापुरची पाटिलकी संस्थानिकांचीच आहे.

संस्थानचें निशाण पांढऱ्या कापडाचें, त्रिकोणाकार व वरील भाग काळा असलेलें असें आहे. या घराण्यांतील पूर्वज सटवाजीराव हे विजापुरीं जात अ त एका चिंगीसाहेब नांवाच्या मुसुलमान अवलियानें त्यांनां जहागीर मिळेल असा आशिर्वाद देऊन आपला पांढरा फेटा त्यांनां बांधावयास दिला. त्याची खूण म्हणून डफळयांचें निशाण पांढरें असतें. पुढें औरंगझेबानें डफळयांनां, संस्थान पुन्हां जहागीर दिल्यानें, वरील निशाणावर हिरव्या रंगाचा एक चांद काढूं लागले व संस्थानांतील खूण म्हणून ( सर्व सरकारी वस्तूंवर ) तो चांद वापरूं लागले.

संस्थानिकांचा मूळ पुरुष सटवोजीराव डफळापुरचा पाटील होता.त्याच्या शौर्यानें तो विजापुरच्या अलि आदिलशहाच्या नजरेस आल्यानें, त्यानें त्याला नौकरींत घेऊन,जत, करजगी, बारडोल व हानवाड या चार परगण्यांचें देशमुखीवतन वंशपरंपरा जहागीर म्हणून दिलें; व त्याबद्दल सालिना ३ हजार मोहरा खंडणी ठरविली( १६७२ ).आदिलशाही नष्ट झाल्यानंतर सटवोजीनें आपली जहागीर वाढविण्याचा उपक्रम केला, तेव्हां औरंगझेबानें त्याला धरण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रथम सांपडला नाहीं.मात्र त्याचा भाऊ धोंडजीराव सांपडला. तेव्हां भावाच्या प्रेमानें सटवोजी आपण होऊन औरंगझेबास भेटला व त्यानें त्याची नौकरी करण्याचें कबूल केलें. त्याचा मुलगा बाबाजी यास औरंगझेबानें आपल्या सैन्यांत नोकर नेमिलें. पुढें औरंगझेबानें साताऱ्याच्या किल्ल्यास वेढा दिला असतां व मंगळाईच्या बुरुजास सुरुंग लावून तो उडला असतां, तटावर चढून याच बाबाजीनें किल्ल्यावर औरंगझेबाचें निशाण लाविलें व त्यामुळें बुरुजास अद्यापिहि डफळेबुरूज म्हणतात अशी एक दंतकथा आहे ( १७०० ). या लढाईंतील जखमांमुळें डफळापुरास परत जात असतां बाबाजी हा वाटेंतच मरण पावला. या कृत्यामुळें औरंगझेबानें खूष होऊन सटवोजीस जत व करजगी या महालांची जहागीर व पंचहजारी मनसब दिली ( १७०४ ). सटवोजीनें जत ही आपली राजधानी केली. याच सुमारास त्याचा दुसरा पुत्र कान्होजी हा वारला. त्यामुळें पुत्रशोकानें सटवोजी हा १७०६ त मृत्यू पावला. यावेळीं कान्होजीचीं मुलें अज्ञान असल्यानें बाबाजीची बायको येसूबाई ऊर्फ आऊसाहेब ही कारभार पाहूं लागली.

शाहूमहाराज सुटून गादीवर बसल्यानंतर येसूबाई ही त्यांच्या आश्रयास राहिली. ही बाई फार सच्छील असून ( बेळगांव जिल्ह्यांतील ) रामतीर्थ येथील रामेश्वराची उपासक होती. लोकांची तिच्यावर भक्ती असून ते तिला पूज्य मानीत. हल्लीं सुद्धां तिकडील भागांत तिला दुसरी अहिल्याबाई होळकर म्हणतात. तिला मूलबाळ नसल्यानें तिच्या विनंतीवरून शाहूनें तिचा वडील पुतण्या यशवंतराव यास गादीचा वारस कायम केलें ( १७४४ ). येसूबाईनें बाकीच्या तिघां ( रामराव, भगवंत, मुकुंद ) पुतण्यांस तनखा तोडून दिला व यशवंतरावाच्या हातीं कारभार सोंपवून ( १७५४ ) थोड्याच दिवसांत ती उमराणी येथें वारली ( १७५७ ).

बाई वारल्यानंतर धोंडजीरावाची सून बहिणाबाई हिनें जहागिरींत गडबड सुरू केली, तेव्हां यशवंतरावानें पेशव्यांकडे तक्रार केली. त्यावेळीं पेशव्यांनीं बहिणाबाईस तिच्या हयातीपर्यंत सहा खेडीं ( २ खेडीं खासगी खर्चासाठीं व ४ खेडीं कर्जफेडीसाठीं ) नेमून दिलीं. याच सुमारास रामरावानें सिद्दी अबदुल कादर खवासखान याच्यापासून कांहीं देशमुखीवतनें १५१२५ रुपयांस विकत घेतलीं; या वतनांस खवासखानीवतन असें अद्यापि म्हणतात. याचा उपभोग फक्त राजकुटुंबासच घेतां येतो.

यशवंतरावाच्या मागें त्याचा पुत्र अमृतराव गादीवर आला. त्याला पेशव्यांनीं देशमुखी वतन व जहागीर कायम केल्याची सनद दिली होती. तो १७९० त वारल्यावर त्याचा मुलगा कान्होजीराव गादीवर बसला. हा खर्ड्याच्या लढाईंत व इतर बऱ्याचशा लढायांत पेशव्यांच्या हाताखालीं हजर असे. हा सन १८१० त मरण पावला. याच्या वेळीं रावबाजी यांनीं मध्यंतरीं जतची देशमुखी जप्त करून त्रिंबकजी डेंगळ्याकडे सोंपविली होती.

कान्होजीच्या पाठीमागें त्याची वडील बायको रेणुकाबाई ही कारभार पहात होती. तिच्यांत व ईस्ट इंडिया कंपनींत ( जेम्स ग्रँट डफच्या विद्यमानें ) ता. २२ एप्रिल १८२० रोजीं एक तह झाला. त्यामुळें जतसंस्थान हें सातारकर छत्रपतीच्या अधिराज्याखालून निघून कंपनीच्या देखरेखीखालीं आलें; कंपनीनें संस्थान वंशपरंपरागत चालविण्याचें कबूल

केलें व संस्थानावर नांवाची हुकमत मात्र सातारकरांची राहिली. अशाच अर्थाचा तह छत्रपती व रेणुकाबाई यांच्यातहि याच वेळीं झाला. यानंतर बाई १८२२ त वारली. तिच्या नंतर तिची सवत साळूबाई ही कारभार करूं लागली; परंतु ती थोड्याच महिन्यांत मरण पावली ( १८२३ ). दोघी बायांनां मुलें नसल्यानें यशवंत कान्होजीचा वंश खुंटला, तेव्हां यशवंतरावाचा नातु रामराव नारायण यास सातारकर छत्रपतींनीं वारसदार म्हणून संमती दिली; आणि त्याप्रमाणें रामराव हा गादीवर बसला. त्यानें १८३५ पर्यंत राज्य केलें व शेवटीं तो संततीविरहित वारला.

तेव्हां सातारकर छत्रपतींनीं परवानगी दिल्यावरून, रामरावाच्या भागीरथीबाई नांवाच्या बायकोनें राज्याचा कारभार स्वतःच्या हातीं ( १ जुलै १८४१ त ) घेऊन व उमराणी येथील भगवंत बाबाजी डफळे याचा मुलगा भिमराव यास दत्तक घेऊन त्याचें नांव अमृतराव ठेविलें (१८४२); व त्याच्या लहानपणीं स्वतःच सारा कारभार पाहिला. ती १८४६ त वारली तेव्हां अमृतराव हे लहान असल्यानें सातारकरांनीं रेसिडेंटाच्या अनुमतीनें जतेस एक कारभारी नेमून संस्थानचा कारभार चालविला. पुढें सातारचें राज्य खालसा झाल्यामुळें जत हें सर्व बाजूंनीं इंग्रजांच्या अंमलाखालीं आलें ( १२ मे १८४९ ).

अमृतराव रावसाहेब हे वयांत आल्यावर त्यांना राज्याचा सर्व अधिकार १३ मे १८५५ त मिळाला पुढें १८६२ त लॉर्ड कॅनिंग यानें त्यांनां व त्यांच्या वंशजांनां दत्तकाची सनद दिली. मध्यंतरीं जत संस्थानानें एक गांव निपाणीच्या देसायास इनाम दिलें होतें; तेथील देसाई अमृतराव यांच्या वेळीं निपुत्रिक वारला असतां इंग्रजसरकारनें तें गांव स्वतःच खालसा केलें; परंतु अमृतराव यानीं योग्य तक्रार करून शेवटीं गांव आपल्या ताब्यांत घेतला ( १८६२ ). अमृतराव हे १८९२ ( जानेवारी ) त निपुत्रिक वारले. यांचीं दोन कुटुंबें व एक कन्या मागें राहिलीं. थोरल्या कुटुंबाचें नांव लक्ष्मीबाईसाहेब व धाकटया कुटुंबाचें नांव आनंदीबाईसाहेब असून मुलीचें नांव यशोदाबाई उर्फ अक्कासाहेब होय.

यानंतर उमराणी शाखेंतील परशुरामराव माधव डफळे यांचे चवथे चिरंजीव बोवाजीराव यांना लक्ष्मीबाईसाहेब यांनीं १८९२ मध्यें दत्तक घेतलें. इंग्रजसरकारनें दत्तक कबूल करून जत येथें दरबार भरवून बोवाजीराव यांनां गादीवर बसविलें ( १३ जानेवारी १८९३ ). दत्तविधान २१ फेब्रुवारी रोजीं होऊन बोवाजीराव याचें नांव रामराव ठेवण्यांत आलें. हेच सध्याचे जतचे अधिपति आहेत.

श्रीमंत रामराव आबासाहेब यांचा जन्म ११ जानेवारी १८८६ त झाला. कोल्हापुरास त्याचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर, त्यांनीं राजकोट येथें राजकुमार कॉलेजांत पुढील शिक्षण घेतलें व तेथील शेवटची परीक्षा उत्तम रीतीनें उत्तीर्ण होऊन ते जत येथें १९०६ त परत आले; आणि १ वर्ष संस्थानचा कारभार पाहूं लागले. पुढें ११ जुलै १९०७ मध्यें इंग्रजसरकारनें त्यांच्या हातीं अखत्यारीनें संस्थानचा सर्व कारभार सोंपविला.

श्रीमंतांच्या भगिनी सौ. अक्कासाहेब यांचा विवाह सातारचे विद्यमान छत्रपती श्रीमंत प्रतापसिंह उर्फ भाऊसाहेब महाराज यांच्याशीं झाला आहे. श्रीमंतांचा विवाह अक्कलकोटच्या राजकन्येशीं होऊन, राणीसाहेबांचें इकडील नांव सौ. भागीरथीबाईसाहेब असें ठेवण्यांत आलें आहे. त्यांचें लक्ष स्त्रीसुधारणेकडे विशेष असून, त्यांनीं स्त्रियांनां शिक्षण देण्यासाठीं एक गृहशिक्षणाचा वर्ग काढला आहे. श्रीमंतांनां युवराज विजयसिंह, अजितसिंह व उदयसिंह आणि प्रेमळाराजे व कमळाराजे अशीं पांच अपत्य आहेत. श्रीमंतांनीं आपल्या राज्यांत बऱ्याच सुधारणा केल्या असून, त्यांत सर्व संस्थानांत मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण व मोफत दुय्यम शिक्षण सुरू केलें, ही मुख्य आहे. जत येथें एक इंग्रजी शिक्षणाचें हायस्कूलहि आहे. [ जत संस्थानाकडून आलेल्या माहितीच्या आधारें; ग्रँट डफ; कैफियति–यादी ].

**जटिंग रामेश्वर**—म्हैसूर. चितळदुग जिल्ह्याच्या मोलकालमुरु तालुक्यांतील एक ३४६९ फूट उंचीची टेंकडी. या ठिकाणीं अशोकाचीं शासनें आहेत. येथें रामेश्वराचें पुरातन स्थान असून हल्लीं असलेलें देऊळ इ. स. ९६२ सालीं बांधलेलें आहे.

**जंतुजन्य रोग**—शरीरांत प्राणिज अगर उद्भिज सूक्ष्म रोगजंतूंचा प्रवेश होऊन निरनिराळे रोग होतात हें पुष्कळ दिवसांपासून माहित आहे खरें. परंतु त्यांची व्यवस्थित माहिती, या जंतूंच्या निरनिराळ्या जाती व त्यांपासून होणारे रोग यांचें निश्चित ज्ञान अलीकडील शोधकांस उपलब्ध झालें आहे. रोगोत्पत्तिविषयीं निदान बऱ्याच समजुती ज्या पूर्वींपासून चालत आल्या त्या या शोधांमुळें बदलाव्या लागून या शोधामुळें त्या त्या रोगांची चिकित्साहि भिन्न तऱ्हेनें हल्लीं करावी लागत आहे. तसेंच या रोगांचा प्रसार शहरांत थोड्या प्रमाणांत असो किंवा साथीच्या रूपानें मोठ्या प्रमाणांत असो; त्याचा प्रतिकार करण्याच्या साधनामध्यें व मार्गामध्यें जरूर तो बदल वरील शोधामुळें करावा लागत आहे. यापैकीं मुख्य बहुतेक रोगांचें समग्र वर्णन या ग्रंथांत वर्णानुक्रमे दिलें आहेच; परंतु या ठिकाणीं या सर्व रोगांचीं बिजें जे वरील सांगितलेले जंतू त्यांपासून होणाऱ्या रोगांचा समुच्चय दृष्टीनें विचार किंवा नुसता नामनिर्देश केला आहे. त्यावरून सामान्य वाचकांसहि विहंगम दृष्टीनें त्यांचे प्रकार, महत्व व भय किती आहे याची कल्पना व्हावी एतदर्थ खालील माहिती दिली आहे.



श्री रामराव अमृतराव उर्फ आबासाहेब डफळे
( राज्यारोहण सन १९०७ )



रामविलास राजमहाल, जत.



श्री. सौ. भागीरथीबाई डफळे.
राणीसाहेब, जत.



रामबाग, जत.

जमखिंडी.



श्री. परशुरामपंत भाऊसाहेब पटवर्धन
( जन्म १८८३, मृत्यु १९२४ ) [ पृ. ८५ ]

जंजिरा.



नवाब महंमदखान.
(जन्म सन १९१४) [ पृ. २६ ]



चांदबिबी [ पृ. ४८].

अ—उद्भिज्ज जंतूंपासून होणारे रोग.

(क) सूक्ष्म उद्भिज्ज जंतूंपासून होणारेः—

१ पूयोत्पादक गोलजंतूंपासून होणारे.

| | |
|---|---|
| गळूं, विद्रधि, पूय, जंतुजन्य | धांवरें, |
| सांन्निपातज्वर | पूयप्रमेह (परमा). |
| पूयजन्य हृदयातंरावरणदाह | |

२ विशिष्ट जंतुजन्य सांथीचे रोगः—

| | |
|---|---|
| विषूचिका (महामारी), | मस्तिष्कावरणदाह सन्निपात, |
| विषमज्वर, | शैत्यसन्निपातज्वर (इन्फ्लुएंझा), |
| माल्टाज्वर, | पीत सन्निपातज्वर |
| सप्तदिन पुनरागामी ज्वर, | घटसर्प सन्निपातज्वर |
| प्लेग ग्रंथिकसन्निपातज्वर, | धनुर्वात रोग. |
| फुप्फुसदाहज्वर, | |

(ख) महाजंतूंपासून होणारे रोग—

| | |
|---|---|
| मदुरापादरोगासारखे | छत्राजंतुजन्यरोग |

आ—प्राणिज जंतूंपासून होणारे रोग.

(क) लिंगविशिष्ट प्राणिज जंतूंपासून होणारे—

| | |
|---|---|
| हिंवताप, | काळा आजार, |
| हगवण (आमांश) | आफ्रिकन विषारी माशी-पासून होणारा रोग, |
| रक्तप्रमेहज्वर, | |
| फिरंगोपदंश (उपदंश), | निद्रारोग. |

(ख) मोठ्या प्राणिज (कीटक कृमि इत्यादि) जंतूंपासून होणारे रोग; नारू वगैरे रोग.

इ—कार्यकारणानिश्चित जंतुरोग.

ज्या स्पर्शसंचारी रोगांतील जंतूंचा शोध लागला आहे; तथापि तो रोग व त्यांत नेहमीं सांपडणारे जंतू यांचा कार्यकारणभाव अद्याप निश्चित झाला नाहीं असे रोगः—

जलसंत्रास (पिसाळलेल्या कुत्र्याचा दंश); रक्तपित्त ज्वर.

ई—अशोधित जंतुरोग.

ज्या स्पर्शसंचारी रोगांतील रोगजंतूंचा अद्याप निश्चित शोध लागला नाहीं—

| | |
|---|---|
| देवी, | गालगुंड, |
| टायफस, | डांग्या खोकला, |
| गोवर, | |

**जंतुनाशक औषधें.**— प्राणिज अथवा उद्भिज पदार्थांत जीं द्रव्यें अथवा पदार्थ घातले असतां जंतूंची वाढ न होतां ते पदार्थ नासणें अगर कुजणें बंद होतें त्या द्रव्यांस जंतुनाशक औषध म्हणतात. यांपैकीं कांहीं तर जंतूंस एकदम निर्जीव करून टाकितात व कांहीं औषधें जंतु एकदम मारून न टाकितां त्यांची वाढच फक्त बंद करतात. कोणताहि पदार्थ कुजूं लागला म्हणजे काय घडत असतें, याविषयीं पाश्चूरनें शोध लावून जंतूंची प्रथम कल्पना जगापुढें आणिली आणि त्याच आधारावर लॉर्ड लिस्टर या इंग्रज विद्वान शोधकानें जंतुनाशक औषधांचा जखमा बऱ्या करण्यांत उपयोग कितीं होतो हें सिद्ध केलें. (शस्त्रवैद्यकावरील लेख पहा). जंतूंची वाढ होण्यास अनुकूल स्थिति म्हणजे जंतूंचें पोषण होईल असा पदार्थ, थोडासा ओलावा, बेताचें उष्णमान आणि बहुशः प्राणवायू ही होय. ह्या शोधाच्या अनुरोधानें व अभ्यासानें नाना प्रकारचीं खाद्यें डब्यांत घालून टिकवितां कशीं येतील हें शोधून काढिलें व व्यवहारांत त्याचा फार उपयोग झाला. प्राचीन काळीं मृत माणसांच्या शरीरांत जंतुनाशक पदार्थ घालून तीं शरीरें रक्षण करण्याचा प्रघात होता व हें शक्य होण्यास कारण जंतुशास्त्राचें सत्यत्व हें होय. पूर्वीचे शोधक लोक कसें तरी करून सडणें व कुजणें ही क्रिया कशी थांबवावी येवढयासाठीं खटपट करीत व त्यासाठीं अमुक एका पदार्थांत चुकूनमाकून असलेल्या एखादद्दुसऱ्या जंतूची वाढ होऊं नये म्हणून किती जंतुनाशक औषध त्या पदार्थांत घालावें येवढेंच पहात असत; परंतु पुढें असें आढळून आलें कीं, जंतुघ्न औषधाची शक्ति अजमावण्यासाठीं हे प्रयोग बिनचुक नाहींत. हल्लीं कोणत्याहि या प्रकारच्या औषधाची शक्ति अजमावणें असल्यास विवक्षित व मोजक्या रोगजंतूंचा व त्याच्या अंड्यांचा त्यांत बुजबुजाट झालेला आहे असें मुद्दाम केलेलें मिश्रण घेऊन त्यांत तें जंतुघ्न औषध घालून त्याची सत्त्वपरीक्षा करतात. व अशा रीतीनें प्रचारांत असलेल्या बहुतेक जंतुघ्न पदार्थांची शक्ति अजमावून ठेविलेली आहे; व ज्या जंतुघ्न औषधाशीं इतर जुन्या व नव्या जंतुघ्न औषधाची येणेंप्रमाणें तुलना करावयाची तें मूलाधार जंतुघ्न औषध अमुक पाण्यांत विरघळवलेलें अमुक थेंब कार्बालिक आसिडबरोबर असतें असें प्रमाण सांगतां येतें.

विशेष प्रचारांत असलेलीं जंतुघ्न औषधें:— कार्बालिक आसिड, रसकापूर, बायनायोडाइड ऑफ मर्क्युरी, फॉर्मोलीन सालिसीलिक आसिड, इ. कार्बालिक आसिडमध्यें थोडें पाणी घातलें असतां तें जंतू मारून टाकितें. तेंच पाण्याचें प्रमाण वाढविलें कीं तें फक्त वाढ खुंटवितें. पाणी न घालतां तसेंच कार्बालिक आसिड क्षयजंतूंनीं व्यापिलेलीं अगर तशाच इतर रोगजंतूंनीं ग्रस्त अशीं कापलेलीं गळवें अगर नासूर इत्यादिकांना शस्त्रक्रियेच्या वेळीं तें मांस खरडून त्यावर लावलें असतां तो भाग रोगजंतूंसह भाजल्यासारखा होऊन रोग थांबतो. १ भाग आसिड व २० भाग पाणी घालून केलेलें औषध शस्त्रक्रियेपूर्वी शस्त्रें, लिंटचे तुकडे व फडकीं जंतुरहित करण्यासाठीं उपयोगांत आणतात. शस्त्रक्रियेच्या वेळीं मात्र हें औषध अशा बेतानें लावावयाचें कीं तें शरीरांत पचून जाऊन त्याची विषबाधा होऊं नये.

रसकापूर अथवा बायनाइड आफ मर्क्युरी हें एक जलाल जंतुघ्न आहे व हीं औषधें १ भाग पाणी २००० भाग, १००० भाग आणि ५०० भाग, अशीं तीन प्रकारचीं पातळ जंतुघ्न औषधें तयार ठेवितात. शस्त्रक्रियेस सुरुवात करण्यापूर्वी शस्त्रवैद्य व त्याचे मदतनीस या औषधांत आपआपलीं बोटें व हात धुवून जंतुरहित करितात. या औषधांत शस्त्रें बिघडतील म्हणून तीं त्यांत बुडवून ठेवीत नाहींत. अगर शरीरांत बराचसा भाग कापला असतां त्यांवर हें औषध लावीत

नाहींत, याचें कारण तें अति विषारी असल्यामुळें विषबाधा व्हावयाची. कापलेला भाग थोडाच असेल तर लावण्यास हरकत नाहीं. बोरॅसिक असिड यास जंतुनाशक असें लोक चुकीनें मानीत असत. पण त्यांत जंतु असलेलें मिश्रण थोडें टाकिलें असतां जंतूंस कांहीं एक पीडा होत नाहीं. त्याचा गुण एवढाच आहे कीं तें जखमेस न झोंबणारें व तिचा दाह शांत करणारें औषध आहे. चूर्णमय जंतुनाशक औषधांपैकीं आयोडोफार्म हा प्रसिद्ध आहे व त्याचा उपयोग हरएक रोगांत व जखमेंत करितात. शिवाय क्षयविकाराच्या जंतूंनीं नासलेल्या शरीराच्या कापलेल्या भागांत हें औषध लाविलें असतां त्या रोगाची वाढ हें औषध चांगल्या रीतीनें थांबवू शकतें. याचें कारण त्या मांसांत तो पदार्थ मिळून जाऊन त्यांतील आयोडीन मोकळें होतें व हें ताजें आयोडिन तो रोग बरा करितें. या प्रकारचीं अलीकडे निघालेलीं अन्य औषधें:-१ विनोसॉलही एक पिवळा पदार्थ आहे व २ लाय सॉल. हे दोन्ही पाण्यांत विरघळतात व दोन्ही जळलेल्या दगडी कोळशाच्या अवशिष्ट भागापासून तयार करितात व याचा उपयोगहि फार होतो. परंतु जंतुघ्न औषध किती जरी उत्तम असलें तरी लावल्यापासून कापलेल्या भागास थोडा तरी दाह व विषबाधा होतेच. म्हणून हें टाळण्याकरितां शस्त्रक्रियेमध्यें शस्त्रवैद्यांचा नवीन संप्रदाय निघाला व त्याचा उद्देश जंतुघ्न ( विषारी ) औषधें न वापरतां ज्या भागावर शस्त्रक्रिया करावयाची तो भागच शुद्ध व कढ आणलेलें पाणी अगर बोरासिक आसिड, इ. सौम्य व शीतल पदार्थांनीं घासून पुसून पूर्णपणें जंतुरहित करावयाचा व शस्त्रक्रिया आटोपल्यावर जखमेवर जंतुघ्न औषधविरहित पट्ट्या व कापसाच्या घड्या ठेवावयाच्या,याचा हेतु असा असतो कीं महत्प्रयासानें शुद्ध केलेल्या जखमेमध्यें बाहेरून पुनः जंतूंची वाढ होण्यास संधि सापडूं नये. जंतुघ्न औषधाच्या योगानें जंतू मारून टाकावे व कडक जंतुघ्न औषधें वापरून रोग्यास विषबाधा होऊं द्यावी हें त्यांच्या मताविरुद्ध आहे.

**जतोई**—पंजाब. मुझफरनगर जिल्ह्याच्या अलीपूर तहसिलींतील एक खेडें. उत्तर अक्षांश २१°३१' व पूर्व रेखांश ७०°५१'. इ. स. १९०१ मध्यें लोकसंख्या ४७५८ होती. बाबर बादशहाच्या वेळीं मीर बजारखान यानें हा गांव वसविला अशी स्थानिक दंतकथा आहे.अठराव्या शतकाच्या अखेरीस सिंधु नदाच्या पुरानें गांव वाहून गेला होता. नंतर थोड्या दिवसांनीं हल्लींच्या जागेवर गांव वसला. कांहीं काल भावलपूरच्या ताब्यांत हा गांव होता. मूलराजाबरोबर झालेल्या लढाईंत जतोई शीख लोकांनीं राजाचा अधिकार झुगारून ब्रिटिश सरकारास चांगली मदत केली.

**जत्रा**—वऱ्हाड-मध्यप्रांत. रायगड संस्थानांतील १३ गांवची जमीनदारी. जमीनदार गोंड जातीचा असून १९३६. संस्थानास टाकेळी देतो.

**जंदिआल गुरु**—पंजाब, अमृतसर जिल्हा. अमृतसर नॉर्थ वेस्टर्न रेल्वेवरील ६९५९ (१९११) लोकसंख्येचें एक ठिकाण. उत्तर अक्षांश ३१°३४' व पूर्व रेखांश ७५°२'. येथील जमीनदार जाट असून येथें जैन धर्मातील भाब्रा जातीची बरीच वस्ती आहे. ही व्यापारी जात आहे. येथें घोंगड्या व पितळेचीं भांडीं यांचा व्यापार बराच चालतो. १८६७ सालीं म्युनिसिपालिटी स्थापन झाली.

**जंदिआला**—पंजाब. जालंदर जिल्ह्यांतील फिलाउर तहसिलींतील एक गांव. उत्तर अक्षांश ३१ ° ३४' व पूर्व रेखांश ७५ ° ३७'. इ. स. १९०१ मध्यें ६६२० लोकवस्ती होती. इ. स. १८७२ पर्यंत येथें म्युनिसिपालिटी होती.

**जंदोला**—वायव्येकडील प्रांत. दक्षिण वझीरिस्तान पोलिटिकल एजन्सींतील महसूद प्रदेशाच्या सरहद्दीवरील टाकझाम नदीच्या दक्षिण तीरावर असलेलें एक भित्तानी खेडें. उत्तर अक्षांश ३२°२०' व पूर्व रेखांश ७९°९' येथेंच जवळ एक तटबंदी ठिकाण असून तेथें दोन लष्करी तुकड्या असतात.

**जनक**—(१) विदेहवंशीय प्रत्येक राजाचें साधारण नांव. याचें कारण, यांचा मूळ पुरुष केवळ पित्याच्याच देहापासून निर्माण झाला हेंच होय. याविषयींचा मूळ इतिहास असा आहे कीं, वैवस्वत मनूचा जेष्ठपुत्र इक्ष्वाकु, याच्या शतपुत्रांतील द्वितीय पुत्र जो निमिनामा राजा. त्यास वसिष्ठाचा शाप होऊन त्याचा देहपात झाला असतां ब्राह्मणांनीं त्याच्या देहाचें मंथन केलें व त्यांतून एक पुरुष निर्माण केला. त्याचें नांव मिथिनामा जनक. तेथून मग तेंच नांव प्रत्येक पुरुषास चालू झालें. एका जनकाची वैदिक व बौद्ध कालांतील सविस्तर माहिती 'बुद्धपूर्वजग' या विभागांत [पृ.२६९-२७०] आलेली आहे.

(२) सीतेचा पिता (पालक). हा विदेह राजा सदाचरणी व महाज्ञानी म्हणून प्रसिद्धीस आला. याला 'सीरध्वज' ( नांगराचा ध्वज असलेला ) असें म्हणत. यज्ञभूमी नांगरीत असतां त्याला सीता सांपडली अशी कथा आहे. याज्ञवल्क्य याचा गुरु होता. ब्राह्मणादि वैदिक वाङ्मयांत उल्लेखिलेला जनक व हा एकच कीं काय हें निश्चित नाहीं.

**जनजसवंत**—हा माध्यंदिन शाखेचा ब्राह्मण असून, पश्चिमखानदेश जिल्ह्यांत नंदुरबार तालुक्यांत बोरठें येथें रहात असे. हा रामभक्त होता. तुळशीदासानें याला उपदेश देऊन प्रसादादाखल मारुतीची एक मूर्ति दिली. एकदां तापी नदीस पूर येऊन गांव वहात जाऊं लागला, तेव्हां याच्या विनंतीवरून त्या मारुतीनें पूर ओसरविला अशी एक कथा आहे. ही मूर्ति तळोंदे तालुक्यांतील कुकुरमुंडे या गांवीं अद्यापि आहे. व तेथेंच या जनजसवंताचे वंशजहि रहात आहेत. जसवंताच्या कफनी वगैरे वस्तू व ग्रंथ त्यांच्या जवळ आहेत. बागलाणचा राजा प्रतापशहा याच्या जनार्दन नांवाच्या ब्राह्मण

प्रधानाचा जसवंत हा पुत्र. मुल्हेरोस यांचें पहिलें आयुष्य गेलें. पुढें यानें तीर्थयात्रा केल्या. सेंधव्याच्या घाटांतील बंडखोर भिल्लांचा यानें बंदोबस्त केला. गुजराथेंतलि एका निर्जल प्रदेशांत यानें एक विहीर बांधून पाण्याची सोय केल्यानें याला जलजसवंत म्हणूं लागले. ( जलनें पुढें जन झालें. पुढें मुल्हेरास परत आल्यावर प्रतापशहानें आपल्यावर कवित्व करण्यास यास सांगितलें; तें यानें नाकारलें. त्यामुळें राजाचा राग झाल्यावरून यानें मुल्हेर सोडलें व हा बोरठ्यास येऊन कायमचा राहिला. येथें त्यानें बांधिलेलें रामाचें देऊळ आहे. हल्लीं बोरठें उजाड झालें. यानें स. १६१७ च्या सुमारास बोरठें येथें समाधी घेतली. [ भा. इ. सं. मंडळ अहवाल १८३८ ].

**जननेंद्रियांचे गुप्तरोग**—ज्या स्त्री अगर पुरुषांच्या जननेंद्रियांत यांपैकीं एखादा रोग असून त्या ठिकाणीं अन्य निरोगी पुरुष अगर स्त्रियेचा संभोग घडला असतां निरोगी मनुष्यासहि तो संसर्ग बाधतो, व त्या मनुष्यास उपदंश झाला अगर गरमी भरली असें सामान्यपणें लोक म्हणतात. हे रोग तीन प्रकारचे अगदीं वेगवेगळाले आहेत ते असेः—( १ ) पूय, प्रमेह, अगर परमा; ( २ ) चट्टे व बंदे आणि ( ३ ) उपदंश अथवा फिरोङ्गोपदंश. पूर्वी या रोगांच्या कारणांविषयीं अज्ञान असल्यामुळें हे तिन्ही मिळून एकाच उपदंश रोगाच्या तीन निरनिराळ्या अवस्था आहेत असें मानीत. पण आतां तीन अगदीं पृथक् अशा ( जंतू ) कारणांमुळें हे तीन स्वतंत्र रोग असून त्यांचा एकमेकांशीं बिलकूल कार्यकारणसंबंध नाहीं, व फक्त जननेंद्रियाच्या ठिकाणींच ते सर्व रोग होतात, यापेक्षां दुसरें साम्यहि एकमेकांत नाहीं असें ठाम सिद्ध झालें आहे. या रोगाचें आदिकारण जे तीन प्रकारचे जंतू ते ( १ ) परमा रोगांत मूत्रमार्ग, योनिमार्ग, गर्भाशय यांसारखे व अन्य श्लेष्मावरणत्वचेचेच भाग दूषित करितात; ( २ ) चट्टे उत्पन्न करणारे जंतू श्लेष्मावरणत्वचा अगर साधी त्वचा प्रथम दूषित करून नंतर ते होतात; व ( ३ ) उपदंश रोगांत सर्व शरीर जंतूंनीं दूषित केल्यामुळें बिघडून नाना प्रकारचीं लक्षणें होतात. दूषित स्त्रीपुरुष संभोगामुळें हे रोग होतात असें वर सांगितलें आहे खरें; तथापि एखाद्या सुइणीनें अगर डाक्टरानें गरमी भरलेल्या स्त्रीचें बाळंतपण केलें; अगर डॉक्टरनें अशा मनुष्यावर शास्त्रक्रिया केली; किंवा एखाद्या दाईनें गरमी झालेल्या आईच्या पोटीं जन्मलेलें मूल आपल्या अंगावर पाजिलें तर या रीतीनें त्यांस नकळत विवक्षित संसर्ग होऊन उपदंश रोग होण्याचा संभव फार असतो हें उघड आहे. दुसरें असें कीं एखाद्या मनुष्यास उपदंश असला तरी त्यास त्याचवेळीं चट्टा रोग अगर परमा हाहि आणखी नसेल अशी स्थिति नसते. एकाच माणसास एकापेक्षां अधिक प्रकारचे असले रोग असूं शकतात, व म्हणून त्याशीं संभोग करणाऱ्या माणसासहि एक किंवा अधिक रोग होतात. फार तर रोगबीजाच्या निद्रितावस्थेच्या मानानें ते दोन्ही रोग एकदम न होतां एक अगोदर व दुसरा नंतर अशा क्रमानें होतात इतकेंच. उदाहरणार्थ, संभोगानंतर तीन चार दिवसांतच परमा व चट्टे रोगांचा या दुष्टसंभोग घडलेल्या मनुष्यास अनुभव येतो. कारण त्यांचीं रोगबीजें ( जंतू ) फार थोडा काल निद्रितावस्थेंत असतात. म्हणून हे रोग संभोगानंतर प्रगट होतात. पण उपदंश रोगबाजाची निद्रीतावस्था संपण्यास चार ते सहा आठवडे लागत असल्यामुळें त्यांत उपदंश रोगाचीं लक्षणें प्रगट होण्यास तितका अवधि लागतो. म्हणून संभोग घडल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं लक्षणें होणें हे रोगनिदान करण्यास उत्तम साधन आहे. उपदंश हा अगदीं स्वतंत्र रोग आहे; व केवळ चट्टे असले तर त्या बीजापासून परमा होत नाहीं. आणि एकंदरींत हे तिन्ही स्वतंत्र रोग आहेत हे महत्वाचे शोध फ्रेंच शास्त्रज्ञांनीं फार प्रयासानें व परिश्रमानें लाविले, व त्यांसाठीं त्यांस कित्येक वर्षें लागलीं. त्यांस दुजोरा येण्यासाठीं जंतुशास्त्रसहाय्यानें प्रयोगहि त्याच देशांत करण्यांत येऊन मेचिन कॉफ या जंतुशास्त्रज्ञ महापंडितानें "स्पायरोकेटा प्यालिडा" हाच उपदंशाचा खरा जंतु आहे असें पारिसमधील पाश्चुरसंस्थेमध्यें सिद्ध झालेलें मत जाहीरपणें ग्रहण केलें.

**पूय प्रमेह अथवा परमा रोग** (गनोरिया).—हा रोग विशिष्ट जंतूंमुळें होतो हे व अन्य सर्व जंतू सूक्ष्मदर्शक यंत्र सहाय्यानें पहावे लागतात, इतके ते सूक्ष्म असतात. अक्रोड चिरले असतां त्याच्या दोन फाकी व त्यांतलि मगज जसा दिसतो त्या आकाराचे हे दुहेरी जंतू असून मूत्रमार्ग अगर योनिमार्ग व अन्य दूषित श्लेष्मावरणाच्या जागीं हा रोग होतो हें वर आरंभीं सांगितलें आहेच. हा फार भयंकर रोग आहे. ज्या निरोगी मनुष्याचा या रोगानें पीडित असलेल्या माणसाशीं संभोग घडतो त्यास संभोगकाळीं मूत्रमार्ग झपाट्यानें रोगबीजाचा प्रवेश होऊन तेथें, त्या सर्व मार्गांत व अन्य ठिकाणीं प्रसारहि अति चपलतेनें होतो. रोगबीज अति त्वरेनें वाढत असतां त्यापासून भयंकर दाह व सूज उत्पन्न करणारें विष उत्पन्न होऊन तीन चार दिवस तें विष निद्रितावस्थेंत रहातें. नंतर मूत्रमार्गाच्या भयंकर व वेदनायुक्त दाहास आरंभ होतो. इंद्रियांतून अतिदाट पिंवळा असा चिकट पू पुष्कळ स्रवतो; लघवी होतांना असह्य तिडिक व आग उत्पन्न होते; जरा हालचाल झाली कीं इंद्रिय फार दुखल्यामुळें रोग्याच्यानें इकडे तिकडे हिंडवत नाहीं. या स्रावाच्या पुवांत पूयजंतू व हे परमारोगाचे दुहेरी जंतू हवे तेवढे सूक्ष्मदर्शक यंत्रानें पहातां येतात. रोगबीज पसरण्याची बळकट प्रवृत्ति असल्यामुळें शिश्नमार्गे शरीरांत प्रोस्टेटपिंड असतो त्याचा दाह होऊन लघवी कोंडते. या लक्षणास मूत्रकृच्छ म्हणतात. अंडाच्या शुक्रधातुवाहक नाडींचा दाह होतो, त्याचेंहि

हेंच कारण; व त्यामुळें कधीं कधीं मूत्राशयदाह तेथें संसर्ग पोंचल्यास होतो. इंद्रियाच्या ठिकाणीं या रोगामुळें गळवें होतात. रोगाचा दाह बरेच दिवस टिकल्यास उपदंशजन्य मांसग्रंथी बऱ्याच उत्पन्न होतात.

चिकित्साः—रोग नवीन झाला असतां रोग्यानें अंथरुणांत अगदीं पडून राहून मग उपचार केल्यानें अधिक गुण येतो. मद्यपान अगदीं वर्ज्य करावें. तसेंच जडान्न, संभोगक्रिया, व शृंगारविषयक चिंतन या गोष्टीहि वर्जाव्या. बार्ली अथवा यव धान्याचा अगर जवसाचा काढा करून तो अमळ कढत प्याल्यानें लघवी पुष्कळ होऊन तींतलि तिडीक व आग कमी होते. अमळ कढत पाण्यांत बसण्यानें अगर स्नान करण्यानें आराम वाटतो. शौचास साफ होईल असें औषध रोज दिल्यावांचून राहूं नये. एक पिंट पाण्यांत एक ग्रेन पोटयाश परमँगनेट हें औषध घालून त्या कोमट पाण्यानें मूत्रमार्ग वरच्यावर पिचकारीनें नुसता धुवावा. नंतर झिंक ( वंग ) क्षार अथवा रौप्यक्षारापासून तयार केलेलीं औषधें पिचकारीनें मूत्रमार्गांत घालावीं. पोटामध्यें चंदनी तेल, कोपेबा तेल यांच्या जाड गोळ्या आणि सोरा, कबाब चिनि, मिरीं, वेलदोडे वगैरे औषधांचें चूर्ण प्रशस्त आहे. नंतर रोगी फार अशक्त झाला असल्यास क्विनाइन व लोहमिश्रित औषध द्यावें. दहा किंवा पंधरा दिवसांत हे उपचार चालू ठेऊन रोगलक्षणें बरीं होतात; पण पाण्यासारखा पातळ स्राव मात्र थोडा फार चालू रहातो. तो थोडा कळत न कळत जरी असला तरी त्यांत रोगबीज असतें व म्हणून अशा स्थितींत त्या रोग्यास स्त्रीसंग घडला असतां त्या स्त्रीला एकदम तीव्र व कडकपणाचा पूयप्रमेह सुरू होतो. त्या दाहाच्या पसरण्याच्या प्रवृत्तीमुळें गर्भाशय व स्त्रीबीजवाहक नाड्यांतहि संसर्ग पोंचवितो. या नाडींत त्यामुळें विद्रधि होतो. तो फुटून अंत्रावरणदाह होण्याची धास्तीहि असते. व त्यामुळें प्राणास अपाय होतो. हा अनर्थकारक स्राव, ज्यास धातुपरमा असेंहि सामान्य लोक म्हणतात, तो फार दिवस चालू रहाण्याचें कारण मूत्रमार्गांत ठिकठिकाणीं बारीक व्रणारोपण झालेलें असतें व हा व्रण विद्युत्दीपानें दिसतो. रौप्यक्षारादि वर सांगितलेलीं पिचकारीचीं औषधें नीटपणें उपयोगांत आणलीं म्हणजे तो स्राव अगदीं थांबतो. हा स्राव व दाह फार दिवस चालू राहिल्यानें मूत्रमार्गांत तंतुमय जाल नवीन व्रणापासून निर्माण होतें. व त्याचें पुढें संकोचन झालें म्हणजे मूत्रमार्गहि संकोचित होऊन मूत्र अडणें ( मूत्रकृच्छ्र ) या रोगाचा पाया घातला जातो. वेळेवरच मधून मधून मोठी भरीव मूत्रमार्गशलाका घातल्यानें हा स्राव व मूत्रकृच्छ्र हे दोन्ही रोग बरे होतात. पण कधीं कधीं हा मूत्रकृच्छ्र रोग बरा होण्यास फारच जड जाऊन त्यामुळें प्राणास अपाय होईल असे मूत्रपिंड व मूत्राशयाचे विकार उत्पन्न करितात. हा रोग झाला असतां अगोदर डोळ्यांस संसर्ग बिलकुल न होण्याची खबरदारी घेणें हे रोग्याचें व वैद्याचेंहि आद्य कर्तव्य आहे. रोगाच्या दाहाची यथातथ्य कल्पना नसल्यामुळें हलगर्जीपणानें संसर्ग झालेल्या बोटाचा डोळ्यास स्पर्श झाल्यानें किंवा त्याच्या वापरण्यात आलेलीं जीं वस्त्रें असतील तीं दुसऱ्यांनीं वापरून त्या वस्त्रानें तोंड, डोळे पुसल्यास त्यांनां प्रमेहजन्य अक्षिपुटदाह हा भयंकर पू स्त्रवणारा नेत्ररोग होतो. किंवा हा रोग झालेली स्त्री प्रसूत झाली तर तिच्या मुलाच्या डोळ्यांस हा रोग होतो. अशा वेळीं डोळा बचावण्यासाठीं शिकस्तीनें उपाय अंमलांत आणले पाहिजेत व एक डोळा बिघडला तर दुसऱ्या डोळयास संसर्ग न बाधेल अशी तजवीज राखली पाहिजे.

हें रोगबीज रक्तांतहि नंतर प्रवेश करून त्यामुळें संधिरोग होऊन शरीरांतील निरनिराळे सांधे सुजतात व ठणकतात. ही स्थिति रोगाच्या आरंभापासून तिसऱ्या आठवड्यांत येते. त्यास इलाज न झाल्यास सांधे आंखडतात. फुप्फुसावरण अगर हृदयावरण अशा ठिकाणींहि क्वचित् रोगप्रवेश होतो. स्त्रीसंभोगास पुन्हां आरंभ रोग्यानें केव्हां करण्यास हरकत नाहीं हें सांगणें सोपें नाहीं. कारण फक्त कसल्याहि प्रकारचा स्राव बंद झाला येवढयावर समाधान मानून संभोग केला असतां स्त्रीला तीव्र प्रमेह रोग होतो असें पुष्कळदां घडतें. म्हणून मूत्रमार्गांतील स्राव पिळून काढून तो सूक्ष्मदर्शक यंत्रांत तपासून जंतुरहित आहे असें खास ठरल्यावर रोगी खरा बरा झाला असें म्हणावें. ही तपासणी करतेवेळीं रोगी बिनपथ्यानें रहात असला पाहिजे. कारण जोपर्यंत तो पथ्यानें वागत असेल तोपर्यंत त्याच्या मूत्रमार्गांत जंतू कदाचित् सांपडणार नाहींत-

च ट्टे ( मृदु अथवा साधे व घन अथवा उपदंशजन्य, व व द ( सॉफ्ट कॅन्सर्स व ब्यूबो ), मृदु प्रकारचे चट्टेः—हें नांव पडण्याचें कारण पुढें वर्णन दिलेला फिरंगोपदंशाचा चट्टा हात लावून पाहिला असतां त्यांत हातास काठिण्य लागतें. पण या मृदु प्रकारच्या चट्टयांत तें बिलकूल नसतें. हा चट्टा म्हणजे सुमारें चवलीच्या आकाराचा व्रण दुष्टसंभोग घडाल्यानंतर तीन दिवसांच्या आंत जननेंद्रियावर उठतो व नंतर आकार कांहींसा वाढत जाऊन तो पुवळतो. पृष्ठभाग अगदीं मऊ असतो. प्रकृति अगदीं खालावलेल्या रोग्यांत हा चट्टा अति त्वरेनें मोठा होऊन कुजतो. ( सन्निपातोपदंशव्रण ). ह्या व्रणाचा संसर्ग त्याच माणसास बाधक असल्यामुळें त्यास एक वेळीं दोन अगर तीनहि चट्टे होऊं शकतात. किंवा चट्ट्यावरील पू घेऊन दुसऱ्या ठिकाणीं तो त्याच्या अंगावर टोंचला तर त्यां ठिकाणीं हुबेहुब पहिल्याप्रमाणें नवीन चट्टा उठतो. चट्टयाच्या त्रासाखेरीज रोग्याच्या प्रकृतींत बदल होत नाहीं. पण उपदंशाच्या घन चट्टयाचें लक्षण वेगळें असतें. दिसण्यांत तो तसाच असतो, पण त्यावर पू कमी असतो व तो रोग्याच्या दुसरे ठिकाणीं टोंचला तर रोग्याच्या प्रकृतींत तें विष अगोदरच भिनलें असल्यामुळें नवीन टोंचण्यानें कांहं

परिणाम--जसें नवीन चट्टा होऊं शकत नाहीं. कारण भिनलेल्या रोगविषामुळें रोगप्रतिबंधक शक्ति त्याच्या अंगीं येते. ज्याप्रमाणें एकाच माणसास एके वेळीं पूयप्रमेह व उपदंश हे दोन्ही रोग होणें शक्य आहे असें मागें सांगितलें आहे, त्याप्रमाणें एखाद्या माणसास इंद्रियावर मृदु चट्टा पडणें व त्याचवेळीं उपदंश बाधा होणेंहि अगदीं संभवनीय असतें. मात्र अशा वेळीं मृदु चट्टा जसा एरवीं औषधोपचारानें बरा होतो तसा तो न होतां उपदंशबाधा असल्यास त्यांत काठिण्य येऊन क्रमाक्रमानें दीड ते दोन महिन्यांत उपदंश अंगांत मुरल्याचीं लक्षणें प्रकृतींत दिसूं लागतात. व अंगावर डाग इत्यादि अनेक लक्षणें होण्यास आरंभ होतो. या दोन्ही रोगांचे जंतू भिन्न आहेत.

उपचारः--चट्ट्यांवरील पुवामध्यें अति दूषित जंतू असतात म्हणून त्यांस प्रथमच शुद्ध कारबालिक आसिड लावावें. णजे तो व्रण शुद्ध व स्वच्छ होतो. किंवा हा तीव्र उपाय सहन न होईल तर त्या चट्यावर कारबालीक आसिडांत भिजवलेली तागाच्या कापडाची पट्टी बांधावी. शिश्नाग्रावरील त्वचा मागें सारून चट्टा स्वच्छ करतां येत नसेल तेव्हां या दुष्ट जंतूंनां चांगलेंच फावतें व रोग त्वरेनें पसरतो. म्हणून अशा वेळीं जरूर तर शिश्नाग्रत्वचोछेद करून देखील व्रण स्वच्छ ठेवण्याची व्यवस्था राखली पाहिजे.

बद होणेंः—दुष्ट संभोगानंतर चट्टा पडून मग जांधाडांतील गांठी एके अगर दोन्ही बाजूंस सुजणें अगर पिकणें यास हें नांव आहे, दुष्ट जंतू चट्यांतून अन्नरस केशवाहिन्यामार्गें जांधाडांतील अन्नरसग्रंथींत प्रवेश करतात म्हणून हें असें होतें. हालचाल न करतां विश्रांति घेतली तर त्या गांठी बसतात. पण तसें न होईल तर गांठ चिरून टाकावी व चांगली आंतून खरडून काढावी हें उत्तम. त्यांतील पू मात्र कोठें खरचटल्या जागीं लागल्यास नवीन चट्टा तयार होतो हें ध्यानांत ठेवावें.

उ प दं श, फि रं गो प दं श (सिफिलिस).—मनुष्यास हा रोग आनुवंशिक असो, किंवा त्यानें दूषितसंभोग करून स्वसंपादन केलेला असो त्या रोगाचा प्राणिज जंतु (ज्याला स्पायरोकेटा प्यालिडा असें नांव आहे) त्याच्या रक्तांत व नाना इंद्रियांत विपुल प्रमाणांत सांपडतो. त्याचा आकार चक्राकार सोपानपरंपरेप्रमाणें असतो. त्यास १४-१६ वेढे असतात. त्याच्या दोन्ही शेवटास टोकें असतात. चाबूक मारल्याप्रमाणें, स्क्रू पिळल्याप्रमाणें, व मागें जाणें पुढें येणें अशी तीन प्रकारची चेतनाशक्ति त्याच्या अंगीं असते. तो सूक्ष्मदर्शकांतून पहाण्यासाठीं त्यास गुलाबी रंग चढवितां येतो. रोग्यास चट्टा दिसूं लागण्याच्या अगोदरच इंद्रियाच्या त्वचेंत तो सांपडतो. त्याशिवाय चट्टा व त्याजवळील अन्नरसग्रंथि प्राथमिक व द्वितीयावस्थेंत अंगावर उठणाऱ्या पुळयांमध्यें, तोंडामध्यें व गुह्येंद्रियावरील कीलग्रंथींत ते जंतू सांपडतात. रक्त, पाणथरी व तृतीयावस्थेंतील उपदंशार्बुदांचा पृष्ठभाग येथेंहि ते असतात. रोगजंतू पाहण्यासाठीं वर सांगितलेल्या रोगठिकाणापासून एखादा लशीचा थेंब कांचपट्टीवर घेऊन त्यावर रेखाकलेंत लागणाऱ्या चिनी काळ्या शाईचा एक थेंब टाकून त्यावर ठेवण्याच्या पातळ कांचेच्या कतीच्या कडेनें तें मिश्रण तेथें पसरून पातळ थर बसेल असें करावें; म्हणजे तें लवकर सुकतें. नंतर तीव्र शक्तीच्या यंत्रांतून पहावें म्हणजे काळ्या भूमीवर झळक रंगांत असलेले हे जंतू दिसतात.

रोगाचें स्वरूप फार चमत्कारिक असून हा दीर्घकालीन रोग असल्यामुळें त्याचा आदि व अंतहि सुलभतेनें ध्यानांत येण्यासाठीं देवीच्या तोडण्याच्या लशीचें उदाहरण घेऊन त्या देवी टोंचण्यानें येणाऱ्या ज्वराशीं या रोगाचें साम्य कसें कसें जुळतें हें पाहूं. कारण उपदंश हाहि जंतुजन्य असा ज्वरच आहे. (१) प्रथम गोस्तन देवीची लस मुलाच्या दंडावर टोंचतात.याप्रमाणें संभोगाच्या वेळीं उपदंश बीजहि गुह्येंद्रियावर अगर चुंबनाच्या वेळीं ओठावर न कळत टोंचलें जातें. (२) नंतर दोन तीन दिवस मुलाच्या दंडास कांहीं होत नाहीं. त्याचप्रमाणें उपदंशांतहि संभोगानंतर निदान दहा बारा दिवसपर्यंत गुह्येंद्रियावरील चट्टा कठिण व कडक झाल्याचें चिन्ह नसतें. याप्रमाणें दोन्ही रोगांत कांहीं दिवस व्याधि निद्रितावस्थेंत असतो. (३) चवथ्या दिवशीं टोंचलेल्या देवी सुजूं व फुगूं लागून लाल होतात. त्याप्रमाणें दहा बारा दिवसानंतर पत्र्याची चकती आंत बसविली आहे किंवा काय अशा प्रकारचें काठिण्य अथवा कडकपणा त्या उपदंशाच्या चट्यास येतो. (४) आठव्या दिवशीं टोंचलेल्या देवीची पुळी जशी उत्तम फुगावी तशी फुगून मग ती फुटून लस वाहून तिची खपली धरते. पण ही लस त्याच मुलाच्या दुसऱ्या जागीं टोंचली तर त्याचे अंगी आतां तीं रोगप्रतिबंधक शक्ति आल्यामुळें नवी पुटकुळी येत नाहीं. उपदंशाच्या चट्यांतील लस त्याच माणसास दुसरे जागीं टोंचली तर नवीन चट्टा रोग्याच्या अंगी तो रोग प्रतिबंधकशक्ति आल्यामुळें उत्पन्न होत नाहीं. (५) ही प्रतिबंधकशक्ति त्या मुलाच्या अंगीं कांहीं वर्षें कधीं तर जन्मपर्यंत टिकते. त्याचप्रमाणें उपदंश रोगप्रतिबंधकशक्ति त्या रोग्याच्या अंगीं जन्मभर असते. यावरून या दोन्ही रोगांत प्रथम एक प्रकारचें विशिष्ट रोगबीज; त्याचा शरीरांत प्रवेश; रोगाची निद्रितावस्था; रोगप्रवेशाच्या जागीं ठरीव प्रकारची पुटकुळी अगर चट्टा; प्रकृतीवर परिणाम; व नंतर शेवटीं कांहीं दीर्घकालपर्यंत टिकणारी रोगप्रतिबंधकशक्ति ही परंपरा असलेली उघड दिसून येते. शिवाय ज्याप्रमाणें देवी एकदां टोंचल्या असतां प्रतिबंधक शक्ति संपल्यामुळें पुन्हां देवी येणें संभवनीय असतें तसें फार क्वचित् उपदंशहि त्याच रोग्यास पुन्हां दूषितसंभोगानंतर होणें संभवनीय असतें. रोगाचा प्रकृतीवर जन्मभर परिणाम घडतो. व म्हणून त्याच्या तीन किंवा चार अवस्था सोईसाठीं ठरविल्या आहेत. त्यांपैकीं प्रथमावस्था वर वर्णिली आहेच. हींत दूषित संसर्ग होऊन

कठिण प्रकारचा चट्टा सुमारें दीड महिन्याच्या अवधींत बनणें हें लक्षण होतें. चट्यापासून अन्नरसवाहिन्यामार्गे रोगविष नजीकच्या जांघाडांतील अन्नरसग्रंथींत शिरतें; डॉक्टर अगर सुइणीच्या बोटास चट्टा झाल्यास काखेंतील ग्रंथि, ओठावर चट्टा झाल्यास गळ्याखालील गांठ टणक होतात पण दुखत नाहींत. फार हालचाल करण्यानें क्वचित काळीं त्या सुजतात पण हें अपवादात्मक जाणावें. यानंतर शरीरांतील सर्वच रसग्रंथी टणक होतात. शरीरांत विष भिनतें. व हीसच रोगाची द्वितीयावस्था म्हणतात. तींत प्रकृतींत बिघाड होऊन सर्वांगावर दोन्ही बाजूंस कधीं कोंडयासारखे तर कोठें गुलाबी लालसर, कोठें पुळया तर कधीं चिघळलेल्या पुटकुळया अथवा वाटोळया गांठीच्या आकाराचे फोड उत्पन्न होतात. तोंड, ओठ गालाच्या आंतील भाग, गुद, योनि या ठिकाणीं त्वचा भंग पावून व्रणित होते. व यास कांहीं तरी क्षुल्लक निमित्त ( जसें तंबाकू ओढणें किंवा खाणें ) पुरें होतें. उपचार केल्यानें हे सर्व प्रकार बरे होतात. यानंतर रोगाच्या तृतीयावस्थेस आरंभ होतो. रोगी अशक्त झाला असेल किंवा औषधोपचार नीट झाले नसतील तर शरीरांत उपदंशजन्यार्बुदें होऊन तीं फुटून त्यांचे मोठाले व्रण होतात. हीं अर्बुदें त्वचा, स्नायू, यकृत, मेंदु, अस्थी व इतर कोणत्याहि भागांत होतात. हें या रोगाचें अति संक्षिप्त वर्णन झालें. कधीं रोग्यास वाटतें कीं इंद्रियावरील चट्टा म्हणण्यासारखा मोठा नाहीं व लवकर बरा झाला आहे. यावरून उपदंश सौम्य प्रकारचा असावा. कित्येक वेळां तर चट्टा झालेला रोग्यास कळत सुद्धां नाहीं इतका तो क्षुद्र असतो खरा. पण यावरून पुढें प्राप्त होणारी रोगाचा द्वितिय व तृतीयावस्था सौम्य येईल ही आशा मात्र निष्फल होते. या आशेमुळें रोगी औषधोपचारांमध्यें हलगर्जीपणा करितो व जरी चट्टा सौम्य असला तरी लक्षणें उलट दुप्पट जोरानें होतात. तेव्हां हा रोग झाला असतां औषधोपचार बंद करणें ही गोष्ट रोग्यानें आपल्या मर्जीवर न ठेवतां डॉक्टर अगर वैद्य पुरे म्हणेपर्यंत औषध घेतलें पाहिजे. पोटांत पारद रसायनें द्यावीं लागतात; व द्वितीयावस्थेंतील लक्षणें नाहींशीं झाल्यावरहि पुष्कळ दिवस म्हणजे एकंदरींत सुमारें दोन वर्षें औषध फक्त कधीं काळीं मध्यें थोडे दिवस सोडून घेतलें पाहिजे. वैद्याचें लक्ष रोगाचा आमूल उच्छेद करण्याकडे असतें व तो नुसत्या बाह्य लक्षणांकडे लक्ष देत नाहीं. रोगी मात्र फक्त बाह्य लक्षणें नाहींशीं झालीं म्हणजे औषध बंद ठेवून पुनरपि रोग दुप्पट वाढल्यामुळें पश्चात्तापांत पडतो.

साध्यासाध्य विचारः—रोगी वैद्यास नेहमीं विचारतो कीं हा रोग पूर्ण बरा होतो किंवा नाहीं. याचें उत्तर " होय " असें वैद्यानें देण्यास बिलकूल हरकत नसते. पण मोठी पंचाईत एवढीच असते कीं, या रोगास फार काळपर्यंत औषध घ्यावें लागत असल्यामुळें " मजवर विश्वास ठेवून न कंटाळता मी पुरे म्हणेपर्यंत औषध घेशील तर रोगमुक्त होशील." या वैद्यानें दिलेल्या सूचनेकडे प्रायः दुर्लक्ष केलें जातें. तसें न होईल तर हा रोग अगदीं साध्य आहे. शिवाय " साल-व्हरसॅन " या नवीन टोंचून घालण्याच्या औषधाचा शोध लागल्यापासून या रोगाची दीर्घकालीन चिकित्सा पुष्कळच कमी त्रासदायक झाली आहे. कांहीं रोग्यांनां आतां रोग झाल्यामुळें सर्वांगावर खात्रीनें चट्टे, डाग, पुळया उठतील, केश गळतील, सांध्यांनां व हातापायांनां कळा लागतील, चेहरा बिघडेल याची मनस्वी धास्ती बसून निराशेनें कांहीं प्रयत्न करीत नाहींत. त्यांनां असें कळलें पाहिजे कीं, आरंभापासून औषध घेतलें तर वरील गोष्टी कळत न कळतच होतील किंवा कदाचित मुळींच होणार नाहींत. कोणी रोगी विचारतात कीं, हा रोग वायुसंचारी आहे किंवा स्पर्शसंचारी आहे; म्हणजे मी घरांत राहूं किंवा नको. याचें उत्तर असें आहे कीं, त्यानें घरांत खुशाल रहावें; पण आपली ताटवाटी, पेलाबशी, वस्त्रें व बिछाना अगदीं वेगळीं असलीं व कोणास कडेवर घेणें, कुरवाळणें, मुकें घेणें बंद ठेविलें म्हणजे पुरें आहे.

रोगनिदानः—हा रोग ओळखणें अगदीं आरंभीं कधीं-कधीं जरा अवघड असतें; पण दीड महिन्यापासून पुढें केव्हांहि अवघड नसतें. तथापि वृद्धावस्थेंत कांहीं माणसांनां इंद्रियांत नाना व्याधी व क्षीणावस्था प्राप्त होऊन परिक्रमण कंपवायुरोग, सहपक्षाघात, चित्तभ्रम, वीक्षण-मज्जाक्षय, कनीनिकांची प्रकाशसंवेदनशक्तिऱ्हास, धमनी-काठिण्यरोग, धमनीविस्तरण रक्तार्बुद रोग व आणखी कांहीं रोग होतात;आणि यांपैकीं सर्वांनां जरी नाहीं तरी शेंकडा ७०ते८०जणांनां तारुण्यांत उपदंश झाला होता अशी माहिती मिळते. औषधोपचारासाठीं अशी बिनचूक माहिती मिळणें अवश्य असतें. परंतु कित्येकांनां तशी नीट माहिती देतां येत नाहीं; अगर मुद्दाम देत नाहींत. कित्येक जण पूयप्रमेह अगर साधा मृदु चट्टा तरुणपणीं झाला असून आपणांस उपदंश झाला होता अशी माहिती चुकून देतात. रोगाच्या अन्य लक्षणांवरून ( अंगावरील डाग, केस गळणें, हाडें व सांधे सुजणें, स्त्रियांनां वरचेवर गर्भपात ) उपदंश झाला होता असा अजमास करणें बिनचूक असेलच असें म्हणवत नाहीं. तृतीयावस्थेंत उपदंश हें कारण असून रोगोद्भव असावा अशी शंका असल्यास उपदंशावरील औषधोपचार केल्यानें एकदम उतार पडून तें औषध म्हणजे एक रोगनिदानाचें साधनच होतें. पण चतुर्थावस्था असल्यास तो औषधोपचार उपयोगी पडत नाहीं. अशा वेळीं या रोग्यास पूर्वी उपदंश झाला होता किंवा नाहीं ही शंका डॉक्टरास येणें साहजिक असतें. व यासाठीं या रोगनिदानाचें ' वॉसरमन प्रतिक्रिया 'नांवाचें नवीन चमत्कारिक व विश्वसनीय साधन उपलब्ध झालें आहे. त्याची उभारणी पुढील तत्त्वावर केली आहे. एका प्राण्याचें रक्त ( उदाहरणार्थ बैलाचें ) दुसऱ्या प्राण्याच्या शरीरांत ( उदा. सशाच्या ) वरचेवर टोंचून घातलें असतां सशाच्या

रक्तांतील लशींत रोगप्रतिबंधक शक्ति उत्पन्न होते. व नंतर ही लस बैल जातींतील प्राण्यांनां टोंचली तर त्यांच्या रक्तांतील रक्तपेशीनाश होतो. ही लस ५६° सेंटिग्रेडपर्यंत तापविली तर तींतील ही शक्ति नष्ट होते. हें रोगनिदान फार भानगडीचें व सूक्ष्म असल्यामुळें निष्णात जंतुशास्त्रज्ञाच्या हातूनच तें व्हावें लागतें. त्याची विस्तृत माहिती देणें येथें शक्य नाहीं. लस मिळण्यासाठीं ज्या माणसाचें रोगनिदान करावयाचें त्याचें थोडें रक्त घ्यावें लागतें व मग तें ५६° सेंटिग्रेडपर्यंत तापवितात. उपदंशरहित निरोगी माणसाची लसहि तुलनेसाठीं त्याबरोबर ठेवतात. त्या लशींत निरानिराळीं द्रव्यें घालून त्यास दोन तास आंच देऊन नंतर हें ' प्रतिक्रियानिदान ' सिद्ध होतें. जर रोग्यास खरोखरी उपदंश असेल तर रक्तपेशीनाश होणार नाहीं व उलटपक्षीं रक्तपेशीनाश होतो.

या रो गा व री ल उ प चा र.—भिन्न मनुष्याची भिन्न प्रकृति असल्यामुळें औषधोपचार हे अगदीं कायम ठशाचे नसतात व यासाठीं ठरीव औषधें व नियम घालून देतां येत नाहींत. पण पुष्कळ वर्षांचा अनुभव पाहतां हें स्पायरोकेटा नामक रोगबीज फार चिवट व दीर्घकाल टिकणारें असल्यामुळें त्यावर त्वरित व फार दिवस उपचार केले पाहिजेत असें सिद्ध झालें आहे. या कामीं तीन प्रकारचे इलाज व औषधें उपयुक्त आहेतः—( १ ) पारद व पारद रसायनें; ( २ ) पोटॅशियम आयोडाइड; ( ३ ) सोमलयुक्त रासायनिक औषधें—यांतच साल्व्हरसन व निओसाल्व्हरसन या प्रसिद्ध व नवीन औषधांचा समावेश होतो. हीं तीनहि प्रकारचीं औषधें उत्तम गुणावह आहेत. यांपैकीं साल्व्हरसन हें औषध नवीनच ( १९०९ सालापासून ) प्रचारांत आलें आहे व म्हणून आरंभीं त्याजविषयीं साशंक मत होतें हें ठीकच आहे. व चतुर्थावस्थेंतील रोगप्रतिकार त्यानें होतो किंवा कसें हें अद्यापहि अधिक पाहिलें पाहिजे. पण एवढें मात्र खास कीं, आरंभीं होणारीं त्रासदायक लक्षणें या औषधामुळें त्वरित नाहींशीं होऊन रोग्यास बरें वाटतें; चट्टा बरा होतो. तसेंच द्वितीय व तृतीयावस्थेंतहि यानें अति त्वरित गुण येतो. म्हणून उत्तम मार्ग म्हणजे या औषधाची एक दोन अंतःक्षेपणें रोग्यानें करून घेऊन नंतर पारदोपचार बहुतेक सतत दोन वर्षें चालू ठेवावे. पण ही अंतःक्षेपणक्रिया अगदीं बिनधोक आहे व सर्वांसच मानवते असें मात्र नाहीं. या औषधास " ६०६ " असें नांवहि कांहीं दिवस होतें. हें शिरांत टोंचून घालतात व तें शिराबाहेर यत्किंचितहि न पडेल याविषयीं कमालीची सावधगिरी ठेवावी लागते. तें टोंचण्याच्या कामीं अत्यंत दक्षता बाळगावी लागते. टोंचण्याचें औषध विरघळण्यासाठीं अत्यंत शुद्ध व ताज्या बाष्पजलाचा उपयोग करावयास हवा. औषध टोंचण्याच्या अगोदर सुईंतून थोडेसें ( अर्धा औंस ) अमृतजल शिरेंत घालतात म्हणजे सुई शिरेंत नीट गेली आहे किंवा नाहीं तें समजतें व " साल्व्हरसनचा " थेंब शिरेबाहेर सांडण्याचें भय थांबतें. नंतर " साल्व्हरसन " घातल्यावर पुन्हां सुईवाटे सुई धुवून जाण्यासाठीं अर्धा औंस अमृतजल घालावें. औषधाचें मोठ्या सदृढ माणसास पूर्ण प्रमाण ·६ ग्रॅम असतें. अशक्त माणसास प्रथम. ३ ग्रॅम टोंचावें व दहा दिवसानंतर पुन्हां तितकेंच टोंचावें. लहान मुलाचें प्रमाण ·१ पासून वयमानाप्रमाणें ·३ ग्रॅम इतकें असावें. दोन टोंचण्यांमध्यें निदान दहा दिवसांचें अंतर असावें. टोंचण्याच्या पूर्वीं रोग्यानें १२ ते १४ तास बिछान्यांत पडून रहावें व टोंचल्यानंतर तो दिवस व रात्र पडूनच असावें हें उत्तम. टोंचल्यानंतर कांहीं वेळां डोकें दुखी, मळमळ, अगर ओकारी, थोडा ज्वर, यांपैकीं लक्षणें होण्याचा संभव असतो. निओ साल्व्हरसन हें एक त्याच वर्गांतील औषध आहे. हें टोंचण्यांत एक फायदा असा आहे कीं मागाहून होणारीं त्रासदायक लक्षणें होत नाहींत व दुसरें, तें टोंचण्यापूर्वी त्यांत रासायनिक पदार्थ साल्व्हरसनप्रमाणें घालावे लागत नाहींत. त्याचें मोठ्या माणसाचें प्रमाण ·८ पासून १·५ ग्रॅम असतें आणि दोन टोंचण्यांमध्यें १ महिना अंतर असावें लागतें. हें टोंचणें स्नायूंमध्यें उपयोगी नाहीं. कारण त्यापासून इजा होते. म्हणून तें त्वचेखालीं टोंचावें. वरील दोन्ही औषधें जर्मन वैद्यांचीं आहेत. तसल्याच इंग्रजी औषधास " खारासिव्हन " आणि " निओ खारसिव्हन " अशीं नांवें आहेत. फ्रेंच औषधेंहि आहेत व हीं सगळीं जर्मन औषधाइतकींच गुणकारी आहेत असें म्हणतात. हीं औषधें तृतीयावस्थेंतील गोल व पसरट उपदंशजन्यार्बुदें बरीं होण्यासाठींहि उपयुक्त आहेत व परिक्रमणकंपवायूरोग आणि सहपक्षाघातचित्तभ्रमरोगांत उपयुक्त असतातच. निदान त्यापासून रोग्याचीं मानसिक लक्षणें तरी पुष्कळ कमी होतात व चित्तभ्रम रोगांत पूर्वी झालेला उपदंश फार जुनाट नसेल तर उपयोग होतो. मेंदू व पृष्ठवंश रज्जू सुद्धां रोगग्रस्त झाली असल्यास टोंचणें पाठाच्या कण्यांत करावें लागतें व तें जरा धोक्याचें आहे. त्यांत पारदयुक्त अल्ब्युमिन हें औषध मिश्र करून घातलें असतां फायदा झाल्याचें कांहीं रोग्यांत दिसून आलें आहे. कोणचेंहि औषध सुरू केलें तरी मधून मधून वॉसरमनप्रतिक्रिया निदानाच्या साहाय्यानें रोग बरा झाला आहे किंवा नाहीं हें पहात असावें. उदाहरणार्थ प्रथम " साल्व्हरसन " टोंचल्यानंतर दहा ते चौदा दिवसांच्या आंत पुन्हां टोंचावें. नंतर तीन चार महिने पारदरसायनें द्यावींत मग तीं बंद करून वरील प्रतिक्रियानिदानानें रोग अद्याप जागृत आहे असें ठरल्यास पुन्हां पारदरसायनें सुरू करावींत. जर रोग जागृत नाहीं असा निकाल मिळाला तर पुन्हां " साल्व्हरसन " टोंचून रोगास जागृत करण्याचा प्रयत्न करावा; व पुन्हां प्रतिक्रियानिदान करवावें. त्याचा निकाल " अस्तिपक्षि " आल्यास पुन्हा पारदरसायनें घेणें जरूर

आहे व " नास्ति " असा निकाल आल्यास कांहीं काळ औषध बंद ठेवावें. याप्रमाणें सुमारें दोन वर्षें क्रम सुरू ठेवला पाहिजे. पारदाचीं औषधें कित्येक महिने घ्यावयाचीं असल्यामुळें तीं पोटांत घेण्याचें प्रमाण असें बेतानें असावें कीं त्यानें गुण तर यावा पण हिरड्या सुजून लाळ गळून त्रास तर होऊं नये. या औषधाचे अनेक प्रकार आहेत. पण त्यांतील सौम्य प्रकारचीं औषधें घेणें उत्तम, तीं येणेंप्रमाणेः—( १ ) रसकापूर १/६ ते १/१२ ग्रेन; त्याचा द्रव, १० ते ८० थेंब. दिवसांतून तीन अगर चार वेळां. ( २ ) पारद कर्कादि ( हायड्रार्जिरम कमक्रेटा) एक ते दोन ग्रेन, तितक्याच वेळां; अगर पारदमय कर्कर १ ग्रेन व डोव्हरचूर्ण १ ग्रेन रोज दोन ते चारदां, हीं सर्व इंग्रजी औषधें आपल्या हिंदी रोग्यास निम्म्या प्रमाणांत द्यावींत.

पारदाचा अंमल प्रकृतीवर बसण्यासाठीं तें मलमाच्या रूपानें चोळल्यानें उत्तम उपयोग होतो यांत शंका नाहीं. पण हें चोळणें वक्तशीर व व्यवस्थितपणें त्यावर स्वतंत्र मनुष्य नेमून केलें पाहिजे. पारदाचें मलम ( ३० ग्रेन ) घेऊन त्यांत लानोलीन हा स्निग्ध पदार्थ तितकाच घालून तें मिश्र मलम दररोज नव्या जागीं पाव ते अर्धा तास चोळावें. एके दिवशीं दंड दुसऱ्या दिवशीं बाहू, पुढें मग छाती, मांड्या, पाय वगैरे व पुन्हां दंड असा क्रम ठेवावा. या मार्गानें पारद घेणें असल्यास दीड महिना वरीलप्रमाणें रोज अंग चोळून घेणें; नंतर तीन महिने विश्रांति; नंतर पुन्हां दीड महिना अंग चोळून घेणें व तीन महिन्यांची चोळण्यास विश्रांति; नंतर वीस दिवस चोळणें व एक महिना विश्रांति असा कार्यक्रम दोन वर्षांच्या मुदतीचा बसवावा.

पारद रसायण ढुंगणाच्या स्नायूंत टोचणेंयासाठीं यापुढें सांगितल्यापैकीं एखादें औषध योजतात.(१) रसकापूर १/६ ग्रेन; (२)पारदाचें रक्त आयोडाइड; (३) क्यालोमेल; (४)आलिव्ह तेलांत व लानोलीन या स्निग्ध पदार्थांत कालविलेली पारद धातु. हीं सर्व औषधें सैन्यांतील रोग्यांनां देण्यास सोइस्कर आहेत. टोंचण्यापासून दुःख मात्र जरा बरेंच असतें हा त्यांत एक विशेष तोटा आहेत. वरील प्रकारांपैकीं कोणत्याहि प्रकारानें शरीरांत पारद घेत असतां पाळण्याचें पथ्य येणेंप्रमाणें आहेः— रोग्यानें तमाखू खाणें व ओढणें वर्जावें. उत्तेजक गोष्टींचें सेवन करूं नये ( म्हणजे मद्य, अति चहाकाफीपान संभोग इ. ). मुख, दांत, दाढा व जीभ या ठिकाणीं अत्यंत स्वच्छता राखावी व जितक्या प्रकारांनीं शुद्ध तऱ्हेनें अनियमितपणाचा त्याग करून रहातां येईल तितकी शुद्ध रहाणी ठेवावी. मैथुन, अति थंडी अगर उष्णता वर्जावी. कपडे ऋतुमानाप्रमाणें घालावे. जाग्रणें करूं नयेत. एकंदरींत कोणी एकानें या रोगाविषयीं विनोदानें म्हटलें आहे त्याप्रमाणें या रोग्यांनीं अगदीं " साधुतुल्य " वृत्ति ठेविली पाहिजे. गोंवर, देवी हे सांथीचे रोग आपोआप बरे होतात तसें या रोगाचें बिलकूल नाहीं व रोग्यानें आपली प्रकृति सर्वस्वी वैद्य डाक्टरच्या नजरेखालीं ठेवावी. सबंध रोग पूर्ण बरा झाला पाहिजे. नुसताच चट्टा बरा होणें व अंगावरील फोड मावळणें म्हणजे रोग बरा झाला असें नव्हे. स्त्रियांनां रोग झाल्यावर त्यांनां गरोदरपणीं पूर्ण दिवस जात नाहींत त्यासाठीं अगर त्यांच्या पोटीं जन्मणाऱ्या सुरकतलेल्या व रोड बालकास पारद दिला असतां त्याचा रोग नाहींसा होतो. असल्या बालकाच्या गुदद्वाराशीं व तोंडाशीं जे व्रण पडतात ते अत्यंत स्पर्शसंचारी असतात. त्याच्या पायांचीं व इतर हाडें जाड होतात. नाक चपटें, डोकें मोठें व साधारण चौकोनी, तोंडावर रेषेप्रमाणें वण, खुजेपणा, पुढील दांतांचा अर्धचंद्राकृति टवका निघालेला, असे याचें स्वरूप असतें. हें मूल निरोगी बाईनें पाजलें तर तिच्या स्तनावर उपदंशाचा चट्टा उठतो पण त्याच्या स्वतःच्या आईस कांहीं होत नाहीं. ही सर्व माहिती ज्यांस पारद उपयोगी आहे त्याविषयीं झाली.

पोट्याशियम आयोडाइडः—या रोगाच्या उत्तरार्धांत अगर दोन वर्षांनंतर लागलीच हा क्षार व रसकापूर द्रवाचें मिश्रण रोग्यास फार उपयुक्त असतें व त्यानें यकृत्, अंड, मेंदु, त्वचा, हाडें इत्यादि ठिकाणीं मांसार्बुद होऊन भयंकर स्थिति झाली असतांहि व उपदंशजन्य इतर अनेक व्याधींत आश्चर्यकारक गुण लवकर दिसून येतो. ज्यांस लग्नापूर्वी उपदंश झाला आहे त्यानें औषधोपचार नीट दोन वर्षें करून पुढें कांहीं एक लक्षणें होत नाहींत असें पाहून मग लग्नांस कदाचित् उद्युक्त व्हावें.

प्रतिबंधक उपाय.—सरकारनें कायद्याचें साहाय घेऊन वेश्या वगैरे रोगप्रसार करणारांनां मनाई करणें अवघडच आहे. त्यांनां स्वतःला आपणास उपदंश आहे हें बरेच दिवस कळत नाहीं. सरकारनें वैद्यांनां साल्व्हरसन औषध मोफत पुरवून हा रोग स्वल्प खर्चानें रोग्यास बरा करतां यावा अशी तजवीज करावी. वासरमन प्रतिक्रियानिदान करविण्यासाठीं साधनें व सोई ठेवाव्या. म्हणजे नवीन रोगाचा प्रसार अंशतः बराच कमी होईल. कारण हा रोग म्हणजे समाजास मोठें भयच आहे.

गुह्य रोग निदान, आयुर्वेदीय विवेचन.—स्त्रीसंग वर्ज करणें, एकदम अविचारानें स्त्रीसंग करणें, दोषदूषित, संकीर्ण मलिन व बारीक असा जिचा योनिमार्ग आहे अशा स्त्रीशीं मैथून करणें, म्हैस गाय वगैरे अन्य जातीच्या स्त्रीव्यक्तींशीं संभोग करणें, जिची इच्छा नाहीं अशा स्त्रीशीं संग करणें, बहीण वगैरे अगम्य स्त्रीशीं गमन करणें, नुकत्याच बाळंत झालेल्या बायकोशीं संग करणें, मैथुनानंतर घाणेरड्या पाण्यानें शिस्न धुणें, किंवा मुळींच न धुणें, शिस्न वाढविण्याकरतां तीक्ष्ण औषधांचा लेप वगैरे करणें, मुष्टिमैथुन करणें, दांत किंवा नख लागणें. विषारी शुक्र लागणें व वीर्याचा वेग आवरून धरणें यांनीं फार वेळ घर्षण झाल्यानें किंवा अतिशय रखरखीत अथवा कठीण अशा इंद्रियाच्या घर्षणानें दोष दुष्ट

होऊन गुह्येंद्रियांत जाऊन पुढें सांगितलेले उपदंशादि तेवीस रोग उत्पन्न करतात.

उपदंशरोग पांच प्रकारचा आहे. वातजन्य, पित्तजन्य, कफजन्य, रक्तजन्य, व सान्निपातिक. वाताच्या उपदंशांत शिस्न सुजतें. नानाप्रकारच्या वेदना होतात. शिस्न ताठतें व त्वचा फाटते. पित्तज उपदंशांत पिकलेल्या उंबराप्रमाणें सूज येते व ताप येतो. कफजन्य उपदंशांत कठिण, गुळगुळीत, जड व थंड अशी सुज येते व तीस कंड सुटते. रक्तजन्य उपदंशांत शिस्नावर काळे फोड येतात, रक्त वहातें व ताप येतो. सान्निपातिक उपदंशांत वरील सर्व लक्षणें असून शिवाय वृषणहि सुजतात. तीव्र वेदना होतात. ती लवकर पिकते, फाटते; व किडे पडतात. त्यांत रक्तोपदंश याप्य व त्रिदोषजन्य उपदंशमारक आहे.

गुह्येंद्रियांतील रक्त व मांस यांच्या आश्रयानें दोष कुपित होऊन शिस्नाच्या आंत किंवा बाहेर मोड येतात, त्यांस खाज सुटते व त्यांतून बुळबुळीत रक्त वहातें. तसेंच ते बायकांसहि होतात. त्यांचा आकार छत्रीसारखा असतो. त्या मोडांची उपेक्षा केल्यास ते शिस्न, पुरुषत्व, योनी व आर्तव यांचा नाश करतात. कफ व रक्त यांपासून शिस्नाच्या आंत किंवा बाहेर शिरसाच्या दाण्यासारख्या व तेवढ्याच मोठ्या दाट पुळ्या येतात त्यांस सर्षपिका म्हणतात.

कफ व रक्त यांपासून शिस्नावर पुष्कळशा लांबट पुळ्या येऊन त्या मध्यें फाटतात. यांत वेदना होतात व रोमांच उभे रहातात. यास अवमंथ म्हणतात. रक्तपित्तापासून शिस्नावर जांभळाच्या बीसारखी पुळी येते तीस कुंभिका म्हणतात. एक प्रकारची लोंकर उत्पन्न होते ती उत्पन्न होतांच त्वचेचा दाह होतो. ती फार कष्टदायक असून पसरते, ती लाल किंवा काळी असते आणि तिच्या योगानें अतिशय तहान, फोड, दाह, मोह, व ज्वर हे विकार उत्पन्न होतात. हीस अण्डजी म्हणतात. रक्त व पित्त यांपासून उडीद किंवा मूग यांच्यासारखी पुळी होते, तीस उत्तमा म्हणतात. शिस्नावर कमळाच्या गर्भकोशासारखी पुळी होते व तिच्यावर आणखी दुसऱ्या पुष्कळशा पुळया येतात. तीस पुष्करिका म्हणतात. हातानें शिस्न अतिशय चोळल्यानें त्यावर पुळी येते तीस संव्यूढ पिटिका म्हणतात. कपड्यानें किंवा दुसऱ्या कशानें तरी घासल्यानें वायु कुपित होऊन जो विकार होतो त्यास मृदित म्हणतात. वायूनें उंच, सखल, कठिण व वांकडी अशी गांठ होते तीस अष्ठीलिका म्हणतात. चोळणें वगैरेनीं वायु कुपित होऊन तो शिस्नाचें कातडें मागें उलटवितो. त्यांत ठणका व दाह होतो. आणि कधीं कधीं तें पिकतेंहि. तें चामडें जमून गांठळल्यासारखें होऊन शिस्नाच्या पुढल्या बोंडाच्या खालीं लोंबूं लागतें. त्यांत कफाचा संबंध असल्यास कंड व कठिणपणा असतो. या विकारास निवत्त असें म्हणतात. पूर्वी व्रण झालेला असून तो धडपणीं भरून न येतां त्या ठिकाणची चामडी फाटल्यासारखी झाली म्हणजे त्यास अवपाटिका म्हणतात. वायूनें चामडें दूषित होऊन शिस्नाच्या बोंडास चिकटून राहून त्यानें लघ्वीचें भोंक बंद झाल्यास मूत्र कांहीं वेदना न होतां पण सावकाश येतें आणि बोंड विकास पावत नाहीं. या रोगास निरुद्धमणी असें म्हणतात. कफानें शिस्नावर पुष्कळशीं बारीक बारीक कुसें येतात त्यास ग्रथित म्हणतात. शुक्र दोषानें रक्तदूषित होऊन त्यापासून शिस्नास स्पर्श कळेनासा होतो त्यास स्पर्शहानी म्हणतात. वात व रक्त यांच्या कोपानें सगळया शिस्नभर बारीक तोंडांचीं भोंकें पडतात त्यास शतपोनक म्हणतात. पित्त व रक्त यांच्या कोपापासून शिस्नाच्या त्वचेचा पाक होतो त्यास त्वक्पाक म्हणतात यांत ताप व दाह हे विकार होतात. त्रिदोष कोपापासून मांसाचा पाक होऊन तें सडतें त्यास मांसपाक म्हणतात. यांत वरील सर्व प्रकारच्या वेदना होतात. सगळ्या शिस्नावर किंचित् तांबुस व काळे असे फोड व पुटकुळया येतात आणि त्यांत उग्र वेदना होतात. या रोगास रक्तार्बुद म्हणतात. ग्रंथ्यादि रोगविज्ञानांत मांसार्बुदाचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्याचप्रमाणें शिस्नावरचें मांसार्बुद होतें. हें त्रिदोषात्मक असतें. शिस्नावरचा विद्रधिहि मागें सांगितलेल्या त्रिदोषजन्य विद्रधीप्रमाणेंच समजावा. त्रिदोष प्रकोपापासून सगळया शिस्नावरचें मांस काळें होऊन पिकून गळून पडतें. या रोगास तिलकालक म्हणतात. मांसार्बुद, मांसपाक, विद्रधि, व तिलकालक, हे इतर रोग असाध्य समजून त्यांवर औषधोपचार करूं नयेत. बाकीच्या सोळा रोगांची ताबडतोब चिकित्सा करावी. दूषित अन्न खाल्ल्यानें, वेडेवांकडें अंग ठेऊन निजल्यानें, अतिशय मैथुन केल्यानें, आर्तव दूषित झाल्यानें, वाईट पदार्थांनीं, आईबापाच्या रक्तवीर्याच्या दोषानें किंवा दुर्दैवानें स्त्रियांस वीस प्रकारचे योनिरोग होतात. योनींत वायु कुपित होऊन त्या ठिकाणीं कळ, टोंचण, ताप, मेहरी, मुंग्या आल्यासारखें वाटणें, ताठणं, खरखरीतपणा, शब्द होणें, फेंसाळ, तांबुस रंगानें, काळें, थोडें, पातळ, व रुक्ष असें आर्तव येणें, जांघाडे, कुशी वगैरे गळणें व ठणकणें, आणि पुढें हळू हळू रक्तगुल्म व नाना प्रकारचे वाताचे रोग हे उत्पन्न होणें, या विकारांस वातिक योनिव्यापद् ( योनिरोग ) म्हणतात. हींच लक्षणें पण तीं फार मैथुनामुळें झालीं असून त्यांत आणखी सुज असल्यास त्या रोगास अतिचरणा म्हणतात. फार लहान वयाच्या मुलीशीं मैथुन केल्यानें तिचा वायु कुपित होऊन पाठ, पोटऱ्या, मांड्या, व जांघाडे यांत पीडा उत्पन्न करून योनीस दूषित करतो. या योनीरोगास प्राक्चरणा म्हणतात. वेगाचा अवरोध केल्यानें वायु कुपित फार पिडा करतो. त्या योगानें आर्तव उलटून तें फेंसयुक्त होऊन फार कष्टानें बाहेर येतें. या योनिरोगास उदावृत्ता म्हणतात. रुक्षतेमुळें दुष्ट झालेल्या आर्तवापासून उत्पन्न झालेल्या मुलास वायु जन्मतांक्षणींच

मारतो, अशा प्रकारच्या योनीस जातघ्नी म्हणतात. फार जेऊन वेडीवांकडी निजलेल्या स्त्रीशीं मैथुन केल्यानें योनि-मार्गांतील वायु अन्नानें दबला जाऊन तो योनीच्या आंतलें तोंड, हाड व मांस यांस वाकडें करतो. या योनिरोगास अंतर्मुखी म्हणतात. यांत तीव्र वेदना होतात. गर्भार बायकोनें फार वातुळ आहार केल्यास तिचा वायु कुपित होऊन तो गर्भांत मुलगी असल्यास तिच्या योनीचें द्वार बारीक करतो. अशा प्रकारच्या योनीस सूचीमुखी म्हणतात. ऋतुकाळीं वेगाचा अवरोध केल्यानें वायु दुष्ट होऊन तो मळमूत्राचा अवरोध करून योनीस शुष्क करतो. तींत अतिशय वेदना होतात. अशा प्रकारच्या योनीस शुष्का असें म्हणतात. जिच्या गर्भांतून वायु सहा किंवा सात दिवसांनीं शुक्र बाहेर टाकतो त्यावेळीं कधीं वेदना होते व कधीं होत नाहीं तीस वामिनी म्हणतात. आईची योनी वायूनें विकृत असतां गर्भांत मुलगी राहिल्यास बीजदोषानें ती मोठी बायको झाली तरी तिला स्तन येत नाहींत व पुरुषसंग आवडत नाहीं. तिला षंढयोनी म्हणतात. यावर उपाय नाहीं. दुष्ट झालेला वायु योनीच्या आंतलें तोंड व गर्भा-शय यांस अवष्टंभ करतो. त्यामुळें योनी पसरते व बाहेर येते. तिचें मांस फुगतें व तींत वातिक योनीव्यापत्तीप्रमाणें पीडा होतात व अतिशय वेदना होतात. हीस महायोनी म्हणतात. पित्त आपल्या निरनिराळ्या प्रकोपक कारणांनीं कुपित होऊन योनीचा आश्रय करून राहिलें असतां योनींत दाह, पाक, चुरचुर, कुजकट घाण हे विकार होतात. ताप येतो आणि अतिशय कढत, पुष्कळ, प्रेतासारखी घाण येत असलेलें, निळें, पिंवळें किंवा काळें असें रक्त योनींतून वाहतें. या योनिरोगास पैत्तिकी योनिव्यापद् म्हणतात. योनींतून अतिशय रक्त वहातें तीस रक्तयोनी म्हणतात.

अभिष्यंदि पदार्थांनीं कफ कुपित होऊन योनींत पुढील विकार उत्पन्न करतो. तींत वेदना होत नाहींत. ती थंड, पांढरी व बुळबुळीत असून तिच्यांतून तशाच प्रकारचा स्राव होतो व तीस फार कंड सुटते. या योनिरोगास श्लैष्मिकी अथवा कफ-जन्य योनिव्यापद् म्हणतात. वात व पित्त यांच्या कोपा-पासून आर्तवस्राव कमी होतो आणि योनींत दाह, कृशता व निस्तेजपणा हीं लक्षणें होतात. अशा प्रकारच्या योनीस लोहितक्षया म्हणतात.

पित्तप्रकृतीच्या स्त्रीनें पुरुषसंभोगाच्या प्रसंगीं शिंक किंवा ढेंकर ही जिरविली असतां पित्तसहित वायु कुपित होऊन योनीस दूषित करतो. त्यायोगें ती सुजते, व तिला स्पर्श सोसत नाहीं. अतिशय ठणका लागतो. निळें व पिंवळें रक्त वहातें. बस्ती व कुस हीं जड होतात. जुलाब होतात, अरुची होते, ताप येतो, आणि कंबर व जांघाडे यांत कळ व टोंचण होतें अशा योनीस परिप्लुता म्हणतात.

जींत वायु व कफ यांचे विकार होतात आणि जिच्यां-तून पांढरा बुळबुळीत स्राव होतो तीस उपप्लुता म्हण-तात. योनी स्वच्छ न धुतल्यामुळें तींत किडे पडतात, अतिशय खाज सुटते आणि खाज फार असल्याकारणानें त्या स्त्रीस मैथुनाची अतिशय इच्छा होते अशा प्रकारच्या योनीस विप्लुता म्हणतात.

बाळंत होतांना अवेळीं कुंथल्यानें कफ व रक्त यांच्याशीं वायु मिसळून योनींत आर्तवमार्गाला अडथळा करणारी कर्णिका म्हणजे मांसाची वळी उत्पन्न होते त्या योनीस कर्णिनी असें म्हणतात. वातादि तिन्ही दोष कुपित होऊन योनि व गर्भाशय यांच्या आश्रयानें आपापले विकार उत्पन्न करतात. या रोगास सांन्निपातिक योनिव्यापद् म्हणतात. याप्रमाणें हे योनिरोग सांगितले. यांच्यामुळें स्त्री वीर्य ग्रहण करीत नाहीं. त्यामुळें तिला गर्भ रहात नाहीं आणि रक्तप्रदर, मूळव्याध, रक्तगुल्म वगैरे दारुण रोग तसेच इतरहि वाता-दिकांपासून होणारे रोग उत्पन्न होतात.

उ प दं श चि कि त्सा आयुर्वेदीय विवेचन.—उपदंश नवीन असतांच शिस्नाच्या मध्यभागीं शीर तोडावी. लेप, सेचन वगैरे थंड उपचार करावे. शोधन करावें. त्यांत विशेषेंकरून रेचक द्यावें. पिकल्यास चिरून तिळांचा कल्क, तूप व मध यांचा लेप करावा. उपदंशाची चिकित्सा दोषानु-रोधानें प्रथम सुजेप्रमाणें व नंतर व्रणाप्रमाणें करावी. प्रथम उपदंशाचा पाक न होईल याबद्दल अगदीं होईल तितकी काळजी घ्यावी. कारण स्नायू, शिरा व मांस यांचा पाक झाला कीं बहुशः शिस्नाचा नाश होतो. लिंगार्श कापून क्षारानें किंवा अग्नीनें भाजून मग उपदंशाप्रमाणें चिकित्सा करावी. शिस्नावरील निरनिराळ्या पीटिका ( पुळया ) व्रणाप्रमाणें पिकवून फोडून बऱ्या कराव्या.

निरुद्धप्रकशात शिस्नास तूप लावून शेकून तीन किंवा पांच दिवस उपनाह स्वेद करावा. नंतर पुनः पुष्कळ स्निग्ध पदार्थांनीं शेकून चामड्यास तूप लावून शिस्नाचें बोंड हळूहळू दाबीत चामडें पुढें आणावें. बोंड चामड्यांत शिरलें म्हणजे वरचेवर पोटिसें बांधावीं; आणि रोग्यास स्निग्ध भोजन घालावें. अवपाटिकेवरहि वरच्यापैकीं स्नेह, स्वेद, व स्निग्ध भोजन हे उपचार करावे.

निरुद्ध मण्यावरहि लाख लिंपून गुळगुळीत केलेली आरपार नळी तेलांत बुडवून शिस्नात घालावी आणि तिच्यांतून बलातेल वगैरे वातनाशक तेलें आंत घालीत रहावें तीन तीन दिवसांनीं मोठमोठी नळी घालून भोंक मोठें करावें. या रीतीनें इष्ट सिद्धी न झाल्यास कुशल वैद्यानें शिवणीची जागा सोडून इतर ठिकाणीं मोठ्या दक्षतेनें फाडावें आणि नंतर त्यावर सगळी जखमेवरची चिकित्सा करावी.

रक्तार्बुदाची चिकित्सा रक्तविद्रधीप्रमाणें करावी. सामा-न्यतः सर्व प्रकारच्या शिस्न रोगांवर त्या त्या अवस्थेनुसार काढा, लेप, तूप, तेल, शोधन, रोपण वगैरे व्रणावरचे उपचार करावे. सर्व प्रकारच्या योनिरोगांवर व विशेषतः वातज योनि-रोगांवर बहुधा स्नेहन, स्वेदन, बस्ती वगैरे वातनाशक

चिकित्सा करावी. वातावांचून स्त्रियांची योनी दूषित होत नाहीं म्हणून प्रथम त्यास जिंकून नंतर इतर दोषांवर औषधोपचार करावे.

योनी भलतीकडे गेली असल्यास स्नेहन स्वेदन करून योग्य जागीं सारखी बसवावी. वांकडी झाली असल्यास हातानें सरळ करावी; संकुचित झाली असल्यास विस्तृत करावी; बाहेर आली असल्यास आंत घालावी; आणि उलटी झाली असल्यास सुलटी करावी. योनी आपल्या स्थानापासून सुटली कीं ती शल्यासारखी होते. स्त्रीला प्रथम हलकेसें वमन, विरेचन व नस्य द्यावें आणि त्यांच्या योगानें ती सर्व प्रकारें शुद्ध झाली म्हणजे मग बस्ती, अभ्यंग, शेक, लेप व औषधांत भिजविलेले कापसाचे बोळे योनींत ठेवणें हे उपाय करावे

पित्तजन्य योनिरोगांवर थंड व पित्तनाशक असे शेक, अभ्यंग व बोळे यांचा उपयोग करावा आणि स्नेहनार्थ घृत द्यावीं. पुष्यानुग नांवाचें चूर्ण या विकारांत फार गुणावह आहे असें आत्रेय ऋषि म्हणतात. कफजन्य योनिरोगावर सर्व रुक्ष व उष्ण औषधोपचार करावे. जवांचें अन्न, अभयारिष्ट, उंसाची दारू, तेल आणि पिंपळी, लोहभस्म व हिरडे यांचे मधुयुक्त प्रयोग यांचें सतत सेवन करावें. ताठरलेल्या व खरखरीत योनींत मांसाचा खेमा, खिचडी व दुधांत शिजविलेले पदार्थ धारण करावे, म्हणजे ती मऊ होते.

योनीस घाण येत असल्यास सर्व सुगंधी औषधांचा काढा, त्यांनीं सिद्ध केलेलें तेल, त्यांचा कल्क किंवा चूर्ण हीं लावावीं म्हणजे घाण जाते. कफजन्य योनिरोगावर बहुशः तिखट औषधांचे गोमूत्रमिश्रित बस्ती द्यावे. पित्तज योनिरोगांवर जेष्ठमधाचा कल्क व दूध घातलेले आणि वातज योनिरोगावर तेल व कांजी वगैरे आंबट पदार्थ घातलेले बस्ती द्यावे सांनिपातिक योनिरोगांवर त्रिदोषनाशक चिकित्सा करावी.

**जनमेजय**—या नांवाच्या अनेक प्राचीन व्यक्ती आढळतात ( प्राचीन कोश पहा. ). वैदिक माहिती तिसऱ्या विभागांत ( पृ. २७० ) आली आहे. पौराणिक कालांत अर्जुनाचा पुत्र परीक्षित राजाचा हा पुत्र म्हणून प्रसिद्ध आहे. यानें हस्तिनापूर येथें बापाच्या मागं ८४ वर्षें राज्य केलें. त्या वेळेस कलियुगाचीं १७८ वर्षें झालीं होतीं. याच्या मागें याचा पुत्र शतानीक राजा झाला. याच्याच कारकीर्दींत सर्पसत्र झालें. त्यांत तक्षकाचा बचाव आस्तिकानें केला. सर्पसत्राच्या वेळीं जनमेजयानें वैशंपायनास कौरव पांडवांचा इतिहास सांगण्यास विनंति केली व त्याप्रमाणें वैशंपायनानें महाभारत वाचिलें. ही जनमेजय-वैशंपायनाची जोडी पुराणश्रोत्यांना फार परिचयाची आहे. पुष्कळदां वैशंपायनाला वक्ता व जनमेजयाला श्रोता करून नवीन कथांनां पुराणाचें स्वरूप दिलेलें दिसतें. जनमेजयाला शतानिक व शंकुकर्ण असे दोन पुत्र होते. [ भारत, आदिपर्व; मत्स्यपुराण; वेदिक इंडेक्स ].

**जनस्थान**—द्वापारयुगांत नाशिकाला जनस्थान म्हणत अशी पौराणिक माहिती सांपडते. राम वनवासांत असतां या ठिकाणीं राहिले होते म्हणून या स्थानाचें महत्व मानतात. रामायणांत जनस्थानाचें वर्णन आढळतें. या ठिकाणीं खरादि राक्षस रहात. शूर्पणखेचें नासिकाच्छेदन याच ठिकाणीं झालें. १४ व्या शतकांतील जैन ग्रंथकार जिनप्रभसूरि जनस्थान हें नांव यज्ञस्थानावरून बनलें अशी व्युत्पत्ति देतो [ वा. रा. अरण्यकांड; मुं. गॅ. ].

**जनाबाई**—ही शूद्र जातीची स्त्री नामदेवाच्या घरीं दळण, कांडण वगैरे सेवा करण्याकरितां त्याची दासी होती. ही चंद्रभागेच्या वाळवंटांत नामदेवाला सांपडली. नामदेवाच्या कुटुंबांतील मंडळींबरोबर हीहि भक्तिमार्गांत शिरली व अभंग करूं लागली. हिनें भक्तिभावानें देव आपला इतका ऋणी केला होता म्हणून सांगतात कीं, तो हिला दळूं व कांडूं लागे, व हिच्या घरीं भोजनहि करी.

हिनें लग्न मुळींच केलें नव्हतें. नामदेवानें स्वतः आपण व घरचीं तेरा माणसें मिळून जे अभंग लिहिले, त्या १४ माणसांशिवाय ही एक पंधरावी त्यांत होती. हिनें १२॥ कोटी अभंग रचिले असें तुकाराम म्हणतो. हिचें "द्रौपदीवस्त्रहरण" प्रसिद्ध आहे. मुक्ताबाईप्रमाणेंच हिचे अभंग फारच प्रेमळ आहेत. हिनें देवास खंडोबा कल्पून त्यास नवस केल्याचा एक अभंग केला आहे. त्यांत हिनें मागितलेल्या गोष्टींचा पारमार्थिक अर्थ आहे.

या अभंगावरून हिला विषयसुख तुच्छ झालें होतें. परंतु देव एक व आपण एक एवढें द्वैतभान राहिलें होतें असें स्पष्ट दिसून येतें. जनाबाईच्या अभंगांचें थोडक्यांत परीक्षण व त्यांचा नमुना ' अभंग ' या लेखांत ( विभाग ६, पृ. २९९ ) पहावयास मिळेल. [ अ. कोशः महाराष्ट्र सारस्वत. ].

**जनार्दनस्वामी**—एक महाराष्ट्र संतकवि. हा देशस्थ आश्वलायन ब्राह्मण खानदेशांतील चाळीसगांवचा देशपांडे होता. जन्म चाळीसगांवीं शके १४२६ झाला. हा शांकरमतानुयायी असे. याची गणना साधुमंडळांत आहे. यास देवगडच्या किल्ल्यावर यवन किल्लेदाराच्या कारभारीपणाचें काम असे. गाणगापुर येथें जे नृसिंहसरस्वती होते, ( ज्यांस लोक दत्तात्रेयाचा अवतार समजत ) त्यांचा हा शिष्य होता. नृसिंहसरस्वतीवर यांनीं रचलेली आरती चमत्कारिक चालीची आहे. ती हल्लीं नृसिंहवाडीस प्रत्यहीं म्हणण्याचा पाठ आहे. जनार्दन स्वामींचे अभंग व पदें उपलब्ध आहेत. यांचा काल शके १४८७ च्या सुमारास झाला. यांचें नांव पुढें चालविणारे तिघे शिष्य परम गुरुभक्त निपजले. त्यांत पहिला एका जनार्दन ( एकनाथस्वामी ), दुसरा

रामाजनार्दन आणि तिसरा जनीजनार्दन याप्रमाणें होते. [ अ. कोश; महा; सारस्वत; सं क का. सू. ].

**जनावरें**—सामान्यतः आपण ज्यांस गुरेंढोरें अथवा जनावरें म्हणतों ते प्राणी सस्तन ( मॅमेलिया ) वर्गांतील खुरयुक्त ( अंगुलाटा ) गणांतील, खुरयुक्त अंगुलीतल ( अंगुलाटाव्हेरा ) या शाखेंतील समांगुली ( आर्थोडाक्टिला) उपगणांत मोडतात. यांचे पुन्हां ( १ ) गाई बैल, म्हशी, ( बोव्हिडी ), ( २ ) मेंढ्या ( ओव्हिस ) व बकरे (कॅप्रस) ( ३ ) घोडे, गाढवें ( ईक्वस ॲसिनस ) व खेंचरें, ( ४ ) डुकरें वगैरे पोटवर्ग पाडतां येतात. यांची माहिती त्या त्या स्वतंत्र लेखांत दिली आहे.

**जनीजनार्दन**—एक महाराष्ट्र कवि. याचें खरें नांव जनार्दन व उपनांव गोसावी होतें. हा जनार्दनस्वामींचा शिष्य व जातीचा वाजसनी ब्राह्मण मूळचा बीड येथील रहाणारा असे. हा विजापुरकर बादशहाच्या नोकरींत होता. पण दुष्काळांत दामाजीपंताप्रमाणेंच गोरगरीबांनां सरकारी कोठार लुटूं दिल्यामुळें यास नोकरीस मुकावें लागलें. यानें रामकृष्ण चरित्रपर बरींच पदें केलीं आहेत. ‘ निर्विकार- कल्प ग्रंथ ’ अध्यात्मपर असून उद्धवकृष्णसंवादरूपानें लिहिला आहे. मृत्यु शके १५२३. याची समाधि भूम ( मोंगलाईत ) येथें आहे. नाना फडणवीस यांच्या बेल- बागेंतील विष्णुपुढें गाण्याची जी गवयाची नेमणूक आहे त्या जागेवर जे मार्तंड नांवाचे पूर्वी गवई होते, ते याचेच वंशज होते असें अ. कोशकार सांगतात. [ अ. कोश; महा. सारस्वत; महा. कविचरित्र ].

**जपान**—हें पूर्व आशियांतील एक साम्राज्य आहे. याची जगांतील बलाढ्य राष्ट्रांत गणना होते. आशिया खंडाच्या पॅसिफिक महासागरांत उत्तरेस काम- श्चाटका व दक्षिणेस मलाका असे दोन फांटे गेले आहेत व या दोन फाट्यांमध्यें बेटांची एक रांग आहे. ही रांगच जपानी साम्राज्य होय. हें पू. रेखांश १३७° १४′ व उत्तर अक्षांश २९ ११′वर असून यांच्या उत्तरेस कुराईल (चिशीम) व दक्षिणेस फोरमोसा ( ताईवान ) हीं बेटें आहेत. या साम्राज्यांत ६ मोठ्या बेटांचा समावेश होतो त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—१ सखालीन ( जपानी कराफूटो ) २ एझोन येझो ( होक्काइडो ) ३ निप्पोन ४ शिकोकू ५ किऊशिऊ ६ फोर्मोसा व पेस्कॅडोर्स. हीं बेटें जपाननें १८९४–९५ च्या युद्धानंतर चीनपासून मिळविली. अर्धें साखलीन बेट १९०५मध्यें रशियाजवळून घेतलें.व१९१०त कोरिया जोडला.

प र्व त-या साम्राज्यांत दक्षिणोत्तर पर्वत पसरलें असून त्यांचे पूर्वपश्चिम दिशांसहि फांटे गेले आहेत. येथील पर्वत चिरकाल हिमाच्छादित नसतात. येथील देखावा फार रम- णीय आहे.

फुजियामा हा येथील पर्वतामध्यें सर्वांत उंच पर्वत आहे. याचें सर्वांत उंच शिखर समुद्रसपाटीपासून १२३९५ फूट आहे.

जपानचा आल्प्सः—हा पर्वत हायडा व टाटचिऊ प्रांताच्या सरहद्दीवर असून याची उंची ९००० फूट आहे.

निक्को हा पर्वत समुद्रसपाटीपासून ७४२२ ते ८१६९ फूट उंच आहे. याचा देखावा रमणीय आहे. कोझुके प्रांताच्या मध्यावर आसामयामा नांवाचा एक ज्वालामुखी पर्वत आहे ( उ. ८१३६ फू ).

ज्वालामुखी पर्वतः—या साम्राज्यांतील ज्वालामुखी पर्व- तांच्या कुराईल फुजी व किरिशिमा अशा तीन ओळी आहेत. फुजी नामक ज्वालामुखीच्या शिखरास जपानी लोक फार पवित्र मानतात. यांपैकीं महत्त्वाचे व सध्या जागृत असलेले कांहीं ज्वालामुखीपर्वत खालीं दिले आहेत. अगस्तूमा ( इवाकी ) ५२३० फूट याचा १९०३ मध्यें स्फोट झाला.

बंडाइसॅन ( इवाशिरो ) उंची ६०३७ फूट याचा १८८८ त स्फोट झाला. अझुमायामा ( फुकुशिमा )उंची ७७३३ फूट. हा १८९३ त जागृत होऊन याचा १९००मध्यें स्फोट झाला. शिरानें (काई)उंची.१०३३० याचा १९०५ मध्यें स्फोट झाला असोटेक ( हिगो ) उंची ५५४५. याचें तोंड जगांतील सर्व ज्वालामुखी पर्वतांच्या तोंडांपेक्षां मोठें असून त्याची लांबी- रूंदी १०×१५मैल आहे.याच्या मुखांतून धूर व वाफ निघत असते. आसामा ( आयसे )उंची ८१३६ फू. हा जपानमधील सर्व ज्वालामुखी पर्वतांपेक्षां सर्वांत मोठा आहे याचा १८८३ त स्फोट झाला.

ध र णी कं पः—या साम्राज्यास भूकंपाचे अतिशय धक्के सहन करावे लागतात.त्यांचें प्रमाण सरासरी दर दिवशीं ३ – आहे. विशेषेंकरून हे धक्के पॅसिफिक महासागराच्या सर्वांत खोल अशा विवक्षित स्थलीं उत्पन्न होतात असा समज आहे. नुकत्याच झालेल्या धरणीकंपांत टोकिओ व याकोहामा या शहरांचा फार नाश झाला.

मैदानेंः—या साम्राज्यांत बरींच मोठमोठीं मैदानें आहेत. त्यांपैकीं कुशीरो हें सर्वांत मोठें आहे.

न द्या.—या साम्राज्यांत पुष्कळ नद्या आहेत. परंतु एकहि मोठी नदी नाहीं. सर्वांत मोठी इशिकारीगावा इची लांबी २७५ मैल आहे.

स रो व रें व ध ब ध बे.—या साम्राज्यांत पुष्कळ लहान लहान सरोवरें असून तीं फार रमणीय आहेत. येथील मुख्य सरोवरांचीं नांवें हाकोन, चिमुझेंजी, शोजी, इनावाशिरो, निवा अशीं आहेत जपानमध्यें ऊन पाण्याचे झरे पुष्कळ आहेत त्यांपैकीं कांहीं खारे असून कांहींत गंधक सांपडतो. यांचें उष्णमान १७२° फपर्यंतहि असतें.

ह वा मा न.—या साम्राज्यांतील सर्वसाधारण हवामान उष्ण व सर्द आहे; तरी ठिकठिकाणच्या हवेंत बराच फरक आढळतो. येथें वर्षांतून एप्रिलपासून मेपर्यंत, जूनपासून जुलैपर्यंत व सप्टेंबरपासून अक्टोबरपर्यंत असा तीन वेळां पाऊस पडतो. येथील हिंवाळा अक्टोबरपासून एप्रील- पर्यंत असतो. या वेळीं येथें अशियाखंडाच्या पूर्व व पश्चिम

दिशांकडून येणारे सोसाट्याचे वारे वाहतात. येथील उन्हाळा मेपासून सप्टेंबरपर्यंत असतो व या वेळीं वारे उलट दिशांनीं वाहूं लागून त्यांचा जोरहि कमी होतो.या साम्राज्या- जवळच चिनीसमुद्रांत टायफून नांवाचीं वादळें होतात. या वादळांची गति ५ पासून ७५ मैल असते. यांपासून साम्रा- ज्याचें दरसाल फार नुकसान होतें.

लोकसंख्या व क्षेत्रफळ.—जपानची अगदीं प्रथमतः १९२० मध्यें खानेसुमारी झाली. तत्पूर्वी स्थानिक नोंद- बुकावरूनच लोकसंख्येचा अंदाज करण्यात येत असे. खुद्द जपानची लोकसंख्या १९२१ सालीं ५५९६११४० इतकी भरली; पण जपानच्या ताब्यांत असलेले फोर्मोसा, कॅरॉफ्यूटो व कोरिया हे प्रदेश धरल्यास जपानची एकंदर लोकसंख्या ७७००५५१० इतकी भरते. जपानचें क्षेत्रफळ १४८५७६ चौ. मै. आहे. म्हणजे क्षेत्रफळाच्या मानानें जगांतील राष्ट्रांत जपानचा सहावा नंबर लागतो.

शहरें.—जपानमध्यें एक लाखापेक्षां अधिक वस्तीचीं १६ शहरें आहेत. टोकिओ, ओसाका, कोबे, कियोटो, याकोहामा, नागासाकी इत्यादि शहरें प्रमुख आहेत. टोकि- ओची वस्ती २१७३१६२ आहे. व ओसाकाची वस्ती जवळ जवळ १३ लाख आहे. १०००० ते ५०००० वस्तीचीं शहरें २५ असून ३४ शहरें ५० ते ३० हजारांच्या मधलीं आहेत. बाकीचीं आठ ३०००० च्या खालचीं आहेत.

लोकांचें वैशिष्ट्य.—जपानी लोकांत आणि चिनी कोरियन लोकांत उंचीशिवाय करून बरेंच साम्य आहे. साधारण जपानी पुरुष व बायको यांची उंची अनुक्रमें ५ फूट साडेतीन इंच व ४ फूट साडेदहा इंच असते. डॉ. बाएल्झ याच्या मतें जपानी बेटांत मंचूकोरियन, मोंगोल, व मलायी या तीन वर्गांचे लोक आढळतात. यांपैकीं पहिल्या जातीचे लोक समाजांतील उच्च वर्गांत आढळतात. हे लोक उंच असून यांचा बांधा सडपातळ असतो व एकंदर शरीररचना सुबक असते. यांचा चेहरा लांबट असून डोळे थोडे तिरकस असतात. यांचें नाक गरुडासारखें वर्तुलाकार असून आणकुचिदार असतें. यांच्या हनुवटीचा कल किंचित् गळ्याकडे झुकता असून वरचे दांत मोठे असतात व मान लांब असते. यांची छाती अरुंद असून (गळ्याखालचा भाग) धड लांब असतें व हात नाजूक व आंखूड असून त्यांचीं बोटें बारीक व लांब असतात. दुसऱ्या जातींतील लोकांचा चेहरा रुंद असून त्यांचीं गालाचीं हाडें ठळक व डोळे तिर- कस असतात. त्यांचें नाक थोडेंफार बसकट असून तोंड रुंद असतें. यांचा एकंदर बांधा बळकट व समावयवक असतो. वर निर्दिष्ट केलेलें शेवटचें वैशिष्ट्य जपानी लोकांत क्वचित्च सांपडतें. तिसऱ्या जातींतील लोक ठेंगणे असून त्यांची शरीररचना नीट असते व गालांचीं हाडें वर आलेलीं असून चेहरा साधारण वाटोळा असतो. त्यांचें नाक व मान आंखूड असून जबडे पुढें आलेले असतात. यांची छाती रुंद व विकासित असून धड लांब असतें व हात लहान व नाजूक असतात. हे तिसऱ्या जातीचे लोक साम्रा- ज्याच्या आशिया खंडाकडील सर्व बेटांतून सांपडतात. हे वर सांगितलेल्या जातींचे लोक या साम्राज्यांतील मूळचे रहि- वाशी नाहींत. येथील मूळचे रहिवाशी अइनु नांवाचे आहेत. हे आतां येझो बेटांत रहातात. हे देखील मंगोल व मॅले ( मलायी ) लोकांसारखे ठेंगणे व समावयवक आहेत. परंतु भिवया ठळक असून यांना दाट व झुपकेदार केस असतात. यांचे डोळे वाटोळे असून खोल असतात. व त्यांच्या पापण्या फांकलेल्या असून लांब असतात. यांचें नाक सरळ असून त्यांच्या तोंडावर व शरीराच्या इतर भागांवर लव असते. सद्यःकालीन जपानी लोकांत खालील वैचित्र्य दिसून येतें. त्यांच्या डोक्यांची लांबी शरीराच्या मानानें अधिक असते. त्यांच्या धडाच्या लांबीपेक्षां पायांची लांबी अधिक असते. त्यांच्या डोळ्यांचा खळगा ( नेत्रस्थान ) लहान व उथळ असल्यामुळें व भुवयावरील हाड विशेष ठळक असल्यामुळें त्यांचे डोळे यूरोपियन लोकांपेक्षां अधिक बटबटीत असतात. जपानी लोकांच्या तोंडावर लव असून त्यांचे केस सरळ असतात. हे लोक मोठे बळकट व काटक असतात. त्यांचें हस्तकौशल्य व अंगचलाखी हीं वाखाणण्यासारखीं आहेत.

जपानी लोकांची नीतिमत्ताः—जपानी मनुष्य नेहमीं आनंदी असतो. तो सांसारिक अडचणीस फाजिल महत्त्व देऊन, त्याकरितां झुरणीस लागत नाहीं. त्यांचा स्वभाव चिड- खोर नसून फार शांत असतो.जपानी शिपाई समरांगणीं विज- यश्रीच्या आराधनेंत इतका गढून जातो कीं त्याला ऐहिक सुखदुःखाचें मुळीं भानच रहात नाहीं. आपले मनोविकार दुसऱ्याच्या उघडकीस न आणणें हें आपलें ब्रीदच आहे अशी त्याची समजूत असते. देशाकरितां, धन्याकरितां व आपली इभ्रत कायम राखण्याकरितां, धारातीर्थी आपल्या देहाची आहुती देण्यास तो एका पायावर तयार असतो. जपानी स्त्रिया निःस्वार्थी, विनयशील व धूर्त असतात. त्या संकटसमयीं धीर न सोडतां कोणतेंहि दुःख सहन करतात. त्या पतिव्रता, मायाळू माता व गुणवान् कन्या असून शौर्यांत प्रसंगीं पुरुषांवर ताण करितात. जपानांत बायकोच्या वाईट चालीमुळें नवराबायकोंत वितुष्ट आल्याचीं उदाहरणें फारशीं ऐकिवांत नाहींत. जपानी लोक साधारणतः सत्यवादी असतात. हे लोक विशेषतः अल्पव्ययी, काटक, आज्ञाधारक व दुसऱ्यावर प्रीति करणारे असतात. यांच्यांत प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं जाऊन अतिसूक्ष्म विवेचन करण्याचें बौद्धिक सामर्थ्य आहे.

जपानी कलाकौशल्य.—( चित्रकला जपानी पहा ).

शिल्प.—धातूवर व दगडावर नकशी करण्याची कला जपानी लोकांस प्राचीन काळापासून माहीत आहे. अलीकडे

जपानांतील नकशी काम व्यापारी धोरणावर करण्यांत येतें. १८७६ त जपानांत तरवारी कमरेस लटकाविण्याचें बंद झाल्यापासून अलीकडील कारागीर पुतळे, पेट्या, भांडीं वगैरे जिनसांवर नकशी करूं लागले आहेत.

जरतार व कलाबतू.—जपानांत कित्येक शतकांपासून उत्तम जरतारी कापड निघतें. हल्लीं देखील किओटो येथें उत्तम नकशी काढलेले व चित्रविचित्र रंगाचे भिंतींचे पडदे तयार होतात. या कलेंत कावाशिमा याची बरीच प्रसिद्धि आहे. जरतारीप्रमाणें जपानांत कलाबतूचेंहि काम फार उत्तम करतात. पूर्वी याचा रंगकामांत व विणकामांत समावेश होत होता. परंतु हल्लीं यास स्वतंत्र कलेचें महत्व प्राप्त झालें आहे. अलीकडे जपानांत या कलेची इतकी प्रगति झाली आहे कीं जपानी कारागीर कपड्यांवर कागदासारखीं चित्रें काढूं शकतात.

कुंभारकाम.—जपानांत पूर्वीपासून कुंभारकाम होत असे. १० व्या शतकांत मातीचीं भांडीं तयार करण्याच्या भट्या होत्या असा पुरावा सांपडतो. परंतु या कालांत तयार केलेलीं मातीचीं भांडीं ओबड धोबड असून त्यांचा धार्मिक विधींकडे व स्वयंपाकाकडे व अशाच इतर किरकोळ कामाकडे उपयोग होत असे. १३ व्या शतकांत जपानांत चहाचा प्रसार झाल्यावर तो तयार करण्यास व पिण्यास लागणारीं भांडीं तयार होऊं लागलीं. हीं भांडीं पूर्वीच्या भांड्यांपेक्षां चांगल्या प्रतीचीं असत. इ. स. १२२३ मध्यें जपानांतून केटो शिरोझेज नांवाचा मनुष्य कुंभारकाम शिकण्याकरितां चीनमध्यें गेला होता. तेथून शिकून आल्यावर यानें चहा तयार करण्याचीं व पिण्याचीं मातीचीं भांडीं तयार करण्याकरितां ओवारी प्रांतांतील सेटो शहरीं आवे लाविले. हीं भांडीं देखील नकशीदार नसून साधींच असत. पुढें १५२० मध्यें गोरोडाय् गोशोसुई या नांवाच्या मनुष्यानें फुचौ व किंगटेचेन या शहरीं पांच वर्षे कुंभारकाम शिकल्यावर जपानांत चिनीमातीचीं भांडीं तयार करण्याचा कारखाना काढला. या कारखान्यांत तयार होणाऱ्या भांड्यांस निळ्या रंगाची झिलई असून त्यांवर थोडी वेलबुट्टी काढलेली असे. यानंतर १६०५ मध्यें जपानांत चिनीमाती सांपडली व तेव्हांपासून त्या देशांत ही कला विशेष भरभराटीस आली.

लाखेचें कामः—जपानी लोक लाखेचें काम चीनी लोकांपासून सुमारें ६ व्या शतकांत शिकले. पहिल्यानें त्यांचें काम साधें असून काळ्या लाखेवर होत असे; परंतु पुढें ८ व्या शतकांत त्यावर सोनेरी झांक येऊन तें विशेष शोभायमान होऊं लागलें. ९ व १२ या शतकांच्या दरम्यान जपानांत लाखेवर चित्रें काढूं लागले. हीं सर्व चित्रें वनस्पती व इतर असल्याच किरकोळ वस्तूंचीं असून तीं खोदीव नसत. १४४९–१४९० च्या दरम्यान योशीमासा यानें उठावदार खोदीव चित्रें काढण्याची नवीन युक्ति शोधून काढली. १६ व्या शतकांत या कलेचें महत्व वाढून १७ व्या शतकांत तर तिच्या भरभराटीचा कळस झाला.

मुलामा देण्याचें काम.—अलीकडे जपानांत भांडीं वगैरेंवर मुलामा देण्याचें काम चांगलें होऊं लागलें आहे. पूर्वीःपासून जपानी लोकांस हें काम अवगत असे परंतु तें आतांसारखें उत्कृष्ट नसे.

जपानची सांपत्तिक स्थिति व दळणवळणः—इ.स.१८७५ सालीं जपानांत स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांची सभा भरून, तींत साम्राज्यांतील रस्ते दुरस्ती व देखरेख करण्याचें ठरलें. सडकांचे तीन मुख्य वर्ग करण्यांत येऊन प्रत्येक वर्गांत कांहीं पोटभेद करण्यांत आले. १८६९ सालीं साम्राज्यांतील किऊशिऊ बंदरांत तांदुळाचा दुष्काळ पडला व उत्तर भागांत तांदुळ मुबलक असूनहि स्वरूप व जलद दळणवळणाच्या अभावानें दुष्काळ पडलेल्या प्रदेशास तांदुळ पुरवितां न आल्यामुळें पुष्कळ प्राणहानी झाली. ही संधी साधून सर हेन्री पार्कस या इंग्रज वकीलानें आगगाड्या सुरू करण्याचें अगत्य प्रतिपादन केलें. ओटू व ओकुमा या सरकारी सभासदांनीं ही गोष्ट मनावर घेऊन १८७२ सालीं जपानांत पहिल्यानें आगगाडी चालू केली. जपानी लोक पहिल्यापासून जलपर्यटन करीत असत. परंतु १६ व्या व १७ व्या शतकांत जपानी सरकारानें राष्ट्रसंरक्षणार्थ एकलकोंडेपणाचें धोरण स्वीकारल्यामुळें जलपर्यटणाच्या प्रगतीस बरीच शिथिलता प्राप्त झाली. पुढें १९ व्या शतकांत टूकोगावा याच्या कारकीर्दीत जपानी सरकारानें जलपर्यटनासंबंधीं केलेले कायदे रद्द करून पुन्हां पर राष्ट्रांशीं जलमार्गानें दळणवळण सुरू केलें. १९१७ सालीं १४१७८५५२ टनांचीं जपानी जहाजें होतीं. जपानांत नौकानयन शिकविणाऱ्या पुष्कळ संस्था आहेत. त्यांपैकीं १८७५ त टोकिओंतील नौकानयनाचें विश्वविद्यालय मुख्य होय. जपान सरकारनें नौकानयनावर देखरेख करणारें एक खातें काढलें आहे. या खात्याचे तीन भाग असून त्यांपैकीं एकेकाकडे अनुक्रमें खलाशांची परिक्षा घेणें दर्यावर्दी व्यापारावर देखरेख ठेवणें व जहाजें तपासणें हीं कामें सोंपविलीं आहेत. जपानी किनाऱ्यावर परराष्ट्रीय आगबोटी नांगरतां येतील अशीं ३३ बंदरें आहे.

परदेशगमनः—जपानी लोक धाडसी असून परदेशीं जाण्यास त्यांना मुळींच भीति वाटत नाहीं. पुष्कळ जपानी लोक कोरिया, मांचूरिया व दक्षिण अमेरिका, यूरोप, हिंदुस्थान, कानडा, मेक्सीको, आस्ट्रेलिया, युनायटेड स्टेट्स वगैरे देशांत जाऊन राहिले आहेत. जपानी साम्राज्यांत देखील अमेरिका, चीन कोरिया, इंग्लंड, जर्मनी, रशिया, फ्रान्स वगैरे देशांतील लोक पुष्कळ आहेत.

पोस्ट व तारायंत्र.—या साम्राज्यांत पोस्टखातें १८७१ पूर्वीच स्थापन झालें होतें. पुढें लवकरच त्यामार्फत, वर्तमानपत्रें, पुस्तकें व्यापारी नमुने वगैरेंचा व्यवहार होऊं


जपान व कोरिआ
जपानचा समुद्र
कोरिआ
पॅसिफिक महासागर
येझो
सडू
ओकी
टोकिओ
याकोहामा
फुजी
किओटो
ओसाका
शिकोक
किऊशिऊ
नागासाकी

इतकें मोठें करण्यांत आलें व त्याची मर्यादा वाढवून प्रत्येक मोठमोठ्या ठिकाणीं पोस्ट ऑफिसें उघडण्यांत आलीं. सन १८९२ मध्यें त्याचा विस्तार इतका झाला कीं, त्याच्या मार्फत परदेशांशीं व्यवहार होऊं लागला. आणखी कांहीं दिवसांनीं याच खात्यास एक सेव्हिंग्ज बँक जोडण्यांत आली. जपानांत १८७७ च्या बंडानंतर तारायंत्राचा व टेलिफोनचा प्रसार झाला. स. १८८६ त पोस्टखात्यास तारखातें जोडण्यांत आलें. स. १८८० पर्यंत टेलिफोनचा फक्त सरकारी कामाकडे उपयोग केला जात असे; परंतु पुढें याचा खासगी कामाकडेहि उपयोग होऊं लागला. १९१९ सालीं जपानमध्यें ७७६४ पोस्ट ऑफिसें होतीं. व ५६५१ तारऑफिसें होतीं. हल्लीं ९ बीनतारी संदेशगृहें स्थापण्यांत आलीं आहेत.

रे ल्वे व ट्रॅ म.—सन १९०६ च्या मार्चमध्यें रेल्वे सरकारी मालकीची करण्याचा कायदा झाल्यानंतर जपाननें सर्व रेल्वे आपल्या ताब्यांत घेण्यास सुरुवात केली व इसवी सन १९१७ मध्यें जपानच्या ताब्यांत सर्व रेल्वे आल्या. १९२० मध्यें जपानमध्यें ६०७३ मैलभर रेल्वेचें जाळें पसरलें होतें. त्याचप्रमाणें जपानमध्यें ट्रॅमवेच्या कंपन्यांची संख्या ७४असून १०५९ मैलभर ट्रॅमरस्ते पसरले आहेत.

ज पा नी शे त की:—या साम्राज्यांतील फोरमोसा व साखालिन खेरीज एकंदर जमीन८९१६७८८०असून त्यांपैकीं ५३४८८०२२ एकर बादशहा, सरकार व स्थानिक सरकार यांच्या मालकीची असून ३५६८०८६८ एकर खासगी मालकीची आहे. या जमिनीचे, साळी पेरण्याची, रब्बीचें पीक काढण्याची व इतर पीक उत्पन्न करण्याची जमीन असे तीन वर्ग केले आहेत. यांपैकीं पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्गांत अनुक्रमें ६८७१४३७, ५७४१७४५ व २६८८११५ एकर जमीन आहे.जपानांतील मुख्य खाणें तांदुळाचें आहे व लोकसंख्या उत्पन्नाच्या मानानें जास्त झाल्यामुळें दिवसेंदिवस तांदुळ महाग होत आहेत. स. १९०१ सालीं एका बुशीलास ५ शि. ५ पे. पडत होते ते इसवी सन १९०६ मध्यें ६ शि. ९ पे. पडूं लागले. याशिवाय या साम्राज्यांत चहा व रेशमाची लागवड करितात. १९०६ सालीं येथें ( जपानांत ) ५८२७९१८६ पौंड चहा झाला. येथील चहा मुख्यत्वेंकरून युनायटेड स्टेट्समध्यें खपतो. एकंदरींत या पिकाची विशेष भरभराट नाहीं. याच वर्षी येथें २४२१५३२४ पौंड रेशीम निघालें. या पिकाची लागवड मात्र वाढत्या प्रमाणांत आहे. याचा अमेरिकेंत व यूरोपांत बराच खप होतो. याशिवाय जपानांत लाख, मेण, तंबाखू हे जिन्नसहि उत्पन्न होतात.

शेतकी सुधारणा:—जपानांतील शेंकडा ६० लोक शेती करणारे आहेत. शेतकींत शास्त्रीय तत्त्वांचा उपयोग करण्यांत जपान यूरोपांतील पुढें गेलेल्या राष्ट्रांपेक्षां फार मागासलेलें आहे. १९०० सालीं जपानांत शेतकरी लोकांच्या जमीनींचे अतिशय लहान पोटविभागांना प्रतिबंधक असा कायदा अमलांत आला. याशिवाय इतर महत्त्वाच्या गोष्टींकरितां दोन शेतांमधील पडीत जमीनीवर पीक उत्पन्न करण्याचा, रस्ते मर्यादित करण्याचा, शेतकी–कालवे सुलभ करण्याचा, शेतकींत यांत्रिक साधनांचा उपयोग सुगम करण्याचा, कृत्रिम खतांची उपयुक्तता नजरेस आणण्याचा, नद्यांस बांध घालून पाणी अडविण्याचा व पाणी बाहेर वाहूं न देण्याचा असे अनेक नियम घालण्यांत आले. शेतकीकरितां लागणारें भांडवल शेतकऱ्यांस मिळण्यास सुलभ जावें म्हणून प्रत्येक भागांत एक अशा ४६ शेतकी व व्यापारी पेढ्या स्थापन करण्यांत आल्या. याशिवाय सहकारी पतपेढ्यांसहि उत्तेजन देण्यांत आलें. ठिकठिकाणीं प्रयोगशाळा उघडण्यांत आल्या. जपानी सरकारनें रेशीम व चहा यांच्या प्रगतीकडेहि योग्य लक्ष देऊन त्यांच्या वाढीस उत्तेजन दिलें. जपानी लोकांस गोमांसाची चट लागल्यापासून शेतकीस बैल वगैरे अवश्यक गुरांची तूट भासूं लागली आहे; व हल्लीं शेतकीस गुरें कशीं पुरवावीं हा जपानी राष्ट्रापुढें एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. परदेशांतून उत्तम उत्तम सांड व घोडे आणून त्यांची अवलाद काढण्याचा जपानी लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

१९१६ सालीं जपानच्या जंगलाचें एकंदर क्षेत्रफळ ४५६७०१५१ एकर असून त्यांत १७९५७००० सरकारी व ३२२'५००० एकर बादशाही घराण्याचें होतें. १९१८–१९ सालीं जपानी सरकारास जंगलाचें १२७३९४८७ येन उत्पन्न झालें.

व न स्प ती.—जपानांतील अनेक वनस्पतींचा व पुष्पांचा अभ्यास अलीकडे वनस्पतिशास्त्रवेत्त्यांनीं केलेला आहे. फुलें, वनस्पती व सृष्टिसौन्दर्य यांबद्दल जपानी लोकांची उत्कट आवड असलेली पाहून परदेशच्या मनुष्यांस फार कुतूहल वाटतें. वसंतऋतूंतील पुष्पभरानें नम्र होणारीं झाडें व तऱ्हेतऱ्हेच्या छटा असलेले पल्लव पाहून कोणासहि आनंद होतो. तपकिरी, पांढरी, काळी, व पिंगट अशा विविध रंगांच्या छटांमुळें जपानी वृक्षांचे पल्लव फार खुलून दिसतात. ओक, बांबू वगैरे अनेक जातींचीं झाडें जपानांत आहेत व द्राक्षांचे वेलहि आहेत. जपानी लोकांचा वसंतऋतु फेब्रुवारी महिन्यांत सुरू होतो व तेथील जुन्या पंचांगाप्रमाणें, नूतन वर्षास तेव्हांपासूनच सुरुवात होते. प्लम व चेरी या झाडांची जपानी लोकांस फार आवड आहे; व माळ्याकडून त्यांची फार चांगली जोपासना केली जाते. प्लम, चेरी व पीच यांना चांगलासा मोहोर येत नाहीं व ह्यांचीं फळेंहि उत्कृष्ट नसतात; परंतु या झाडांवर जपानी लोकांचें फार प्रेम असतें. ग्रीष्म ऋतूंत सरोवरें कमलाच्छादित होतात. हिंवाळ्याशिवाय सर्व ऋतूंत जपानमध्यें फुलांची समृद्धि असते. उद्यानें तयार करण्याची प्रवृत्ति जपानांत फार आहे. दहाव्या

शतकापासून अनेक चित्रविचित्र सुंदर बागा तयार करण्याच्या कलेची दिवसेदिवस प्रगतीच होत गेली असें दिसतें. कृत्रिम सरोवरें, टेंकड्या खडक, वगैरे तयार करून उद्यानांस शोभा आणण्याचे प्रयत्न करण्यांत येतात. जपानी माळी वृक्षांना छाटून शाखा, पानें व बुंधा यांच्या वाढीस योग्य प्रमाणांत ठेवण्याची तो काळजी घेत असतो. जपानी फुलें साधारणतः गंधरहित असतात. अनेक जातींचीं पुष्पें व वनस्पती जपानमध्यें आहेत. सुपीक जमीन, अनुकूल हवामान व नियमित काळीं होणारी पर्जन्यवृष्टि, यामुळें जपानांतील वनस्पतींची समृद्धि कायम टिकून राहिली आहे. तांदूळ, गहूं, जवस वगैरे धान्यें होतात. घेवडा, वांगीं, मुळे, तेथें होतात. चहाची लागवड बरीच होते. तेथें तंबाकूचा प्रवेश १६ व्या शतकांत झाला.

प्रा णी.—महाद्वीपापेक्षां अथवा खंडांपेक्षां त्याच्या जवळ असणाऱ्या बेटांत प्राण्यांची संख्या फार कमी असते असा एक नियम आहे. परंतु जपान या नियमास अपवाद आहे. जपानांत सस्तन प्राण्यांच्या पन्नास उपजाती आहेत. व्याघ्र व सिंह तेथें नाहींत. पिंगट व काळया रंगाचीं अस्वलें, कुत्रा, कोल्हा व वानर हे प्राणी बरेच आढळतात. रानडुक्कर व काळवीट वगैरे प्राणी अरण्यांत आढळतात. घोडा, डुक्कर, कुत्रा, मांजर, बदकें व कबूतरें वगैरे पाळीव प्राणीहि तेथें आहेत. जपानांत अनेक पक्षी आहेत. गाणारा नाइटिंगेल, कोकिळा, भारद्वाज व चिमणी वगैरे अनेक पक्षी आढळतात. गरुड व बहिरीससाणा ह्या जपानी पक्ष्यांच्या ३५९ जाती आहेत असें म्हणतात. खाण्यासाठीं शिकार करून मारण्याचेहि अनेक जातींचे पक्षी आहेत. बगळा व क्रौंच हे जपानी चिताऱ्यांचे मोठे आवडते पक्षी आहेत. पोहणाऱ्या पक्ष्यांच्याहि अनेक जाती जपानमध्यें आहेत. सरपटणाऱ्या प्राण्यांत तीस जाती असून धार्मिकदृष्ट्या कांसवाला महत्व देण्यांत येतें. सापाच्या १० जाती असून त्यांपैकीं एकाच जातीचा साप विषारी असतो असें म्हणतात. सरडे, बेडूक वगैरे अनेक प्राणी आढळतात. जपानी बेटांच्या भोंवतालीं असणाऱ्या समुद्रांत अनेक जातींचे मासे सांपडतात व त्यांपैकीं, दुरून येणारे बरेच मासे असतात. जपानच्या भोंवतीं असणाऱ्या समुद्रांत ९ जातींचे मासे मुख्यतः सांपडतात व त्यांच्या उपजातीहि अनेक आढळून येतात. अनेक जातींचे व विविध रंगांचे पतंग व किटक जपानांत आहेत व रेशमाचे किडेहि तेथें बरेच सांपडतात. नद्या व सरोवरें यांत विविध जातीचे खेंकडे असतात.

व्या पा र.—राष्ट्रीय व सार्वराष्ट्रिय व्यापाराची वाढ होण्यास पूर्वी जपानांत अनुकूल अशी परिस्थिति नव्हती. सार्वराष्ट्रिय व्यापार करण्याबद्दल सरकारचा कटाक्ष असे व परकीयांशीं व्यापार करणाऱ्यांस कडक शासन होत असे. लष्करी नोकरीबद्दल जहागीर देण्याचा शिरस्ता जेव्हां अमलांत होता त्या वेळेपासून व्यापाराची दिवसेदिवस भरभराट झाली आहे असें दिसून येतें. मैजी युगापासून जपानी उद्योगधंद्यांचा उत्कर्ष होत गेला. त्याचप्रमाणें त्यांच्या परदेशच्या व्यापाराचीहि वाढ होत गेली असें दिसतें. प्रथमतः परदेशाबरोबर व्यापार करण्यांत बरेच अडथळे आले. सार्वराष्ट्रीय व्यापाराची कल्पना लोकप्रिय झाली नव्हती व सोन्याच्या बाबतींत जपानी नाणें आणि युरोपांतील देशांचें नाणें यांच्या किंमतींत मोठी तफावत असल्यानें जपानचें नुकसान होऊं लागलें. तिसरा अडथळा म्हणजे परदेशाशीं होणाऱ्या व्यापारासंबंधीं जपानी अधिकाऱ्यांनीं दाखविलेला मनाचा कोतेपणा चहा व रेशीम या बाबतींत जपानला फार फायदा झाला. फ्रान्स, इटली व इंग्लंड या ठिकाणीं जपानी कच्या रेशमाचा फार खप होऊं लागला. जपानचा हिरवा चहा अमेरिकेंत फार खपूं लागला. १८७३ पासून १९०७ पर्यंतचा जपानी व्यापाराचा इतिहास पाहिला तर जपाननें परदेशांशीं व्यापार करण्यांत फारच प्रगति केली आहे असें आढळून येतें. परकीय गुमास्त्यांची जपानला फार मदत झाली. जपानी व्यापाराच्या भरभराटीचीं अन्तर्बाह्य कारणें अनेक असून त्यांचा इतिहास बराच मोठा आहे. अमेरिका, चीन, ग्रेटब्रिटन, हिंदुस्थान, जर्मनी, फ्रान्स व कोरिया इतक्या देशांबरोबर जपानाचा आयात व निर्गत व्यापार सुरू असतो. याकोहामा व कोबे हीं व्यापारी बंदरें फार प्रसिद्ध आहेत.

जपानचा महायुद्धामध्यें परराष्ट्रांशीं असलेला व्यापार अतिशय वाढला. १९१३ सालीं १३६२ दशलक्ष ग्रेन व्यापार होता तो १९२० सालीं ४२८४ दश लक्षापर्यंत गेला. १९२० सालीं जपानमध्यें २३३६१७५ हजार ग्रेन किं. मालाची आयात व १९४८३९५ हजार ग्रेन किंमतीच्या मालाची निर्गत झाली. निर्गत वस्तूंत, रेशीम, सूत, औषधें, काड्यांच्या पेट्या, कोळसा, सीमेंट, भांडीं, मातीचीं व कांचेचीं, घड्याळें, जहाजें, साखर, धातूंचीं तांबें, तांदूळ, चहा, भांडीं, कापड इत्यादि वस्तू प्रमुख होत. आयात मालांत कापूस, लोखंड, लोंकर, तांदूळ, औषधें, यांत्रिक सामान, तेल, कातडीं, रंग ,कागद इत्यादि वस्तू मुख्य होत. १९१८ मध्यें, जपानांत १६१ सरकारी कारखाने व २२३९१ खाजगी कारखाने होते. १९१४–१८ सालाच्या दरम्यान जपाननें २३३ जहाजें बांधलीं. त्यांची एकंदर वाहकशक्ति ९७२८०७ टन होती. दर्यावरील व्यापारामध्यें महायुद्धानंतर जपानचा तिसरा नंबर होता. १९२० सालीं जपानजवळ २९९६००० टनांचीं जहाजें होतीं. नागासाकी, कवासाकी, इत्यादि ठिकाणीं जहाजें बांधण्याचे कारखाने आहेत.

उ द्यो ग धं दे.—शेतकी, रेशीम व लाखीकाम, मातीचीं व धातूंचीं कामें, व चित्रकला इत्यादि बाबतींत जपानची फार प्रसिद्धि आहे. मैजी युगाच्या आरंभीं जपानांत फारसे समायिक कारखाने नव्हते. १९०६ सालच्या अखेरीस जपानांत समायिक भांडवलाच्या व पतीच्या मंडळयांची संख्या

९३२९ इतकी झाली होती. प्राचीन काळीं कोरियांतील तज्ञ कोष्टी व रंगारी आणवून कारखाने चालविले जात असत. बौद्ध धर्माचा प्रसार झाल्यानंतर जपानांत कलाकौशल्याची झपाट्यानें वाढ झाली. बाराव्या शतकांत क्षात्रवृत्तीचा जपानांत चोहोंकडे उदय झाला व चिलखतें आणि तरवारी करण्याचे कारखाने चोहोंकडे सुरू झाले. पुढें पाश्चात्य राष्ट्रांशीं संबंध आल्यापासून उद्योगधंदे व कलाकौशल्य यांचें शिक्षण देणाऱ्या संस्था जपानांत निघाल्या. सीमेंट तयार करण्याचे, छापण्याचे, पुस्तकें बांधण्याचे, कापड करण्याचे, व साबण तयार करण्याचे अनेक कारखाने सुरू करण्यांत आले. चोहोंकडे प्रदर्शनें भरविण्यांत येऊं लागलीं व जपानी माल परदेशीं पाठविण्यासहि सुरुवात झाली. लोकांची दृष्टीच यांत्रिक साधनांनीं बदलल्यामुळें जुने पुराणे कारखाने बसत चालले. परंतु सरकारनें त्यांनां हात दिला. स्त्रियांनां कलाकौशल्य शिकविण्याची तजवीज करण्यांत आली. सर्व देशभर उद्योगधंद्यांची आवड उत्पन्न करून व प्रत्यक्ष मदत करून जपानी सरकारनें या कामीं फार श्रम घेतले.

जपानमधील रेशमी कापड तयार करण्याचा धंदा मुख्यतः बायकांकडूनच चालवला जातो. १७१८ सालीं जपानमध्यें रेशमाचे कारखाने ३८४८ असून त्यांत ४३०११० स्त्रिया व ६४१८८ पुरुष काम करीत होते. रेशमाच्या धंद्याच्या खालोखाल कापसाचें सूत काढणें व कापड विणणें हा प्रमुख धंदा आहे. १९१८ सालीं कापसाचें सूत काढणें व विणणें हें काम करणारे ६७१० कारखाने होते.१९१९ सालीं जपानमध्यें २५० लोखंडाचे कारखाने होते; व इतर यांत्रिक सामान तयार करणारे २७०० कारखाने होते. महायुद्धापूर्वी जपानमध्यें रंगाचे कारखाने नव्हते म्हटले तरी चालेल; पण महायुद्धाच्या प्रारंभानंतर जर्मनीमधून जपानला वेळेवर रंग येईनात तेव्हां जपाननें स्वतःच रंग तयार करण्यासाठीं खटपट केली. व सर्व प्रकारचे रंग जपानमध्यें निघूं लागले. १९१८ सालीं जपानमध्यें १०० कारखाने असून त्यांमधून ८० प्रकारचे रंग तयार होत होते. औषधी व रासायनिक द्रव्यें महायुद्धापूर्वीच जपानमध्यें तयार होत होतीं. पण महायुद्धामुळें तीं मोठ्या प्रमाणावर तयार होऊं लागलीं. रासायनिक द्रव्यें करण्याचे जपानमध्यें १९१८ सालीं ८४१ कारखाने असून त्यांमधून सल्फ्युरिक, हैड्रोक्लोरिक व नैट्रिक ॲसिड, सोडियम सल्फेट,कार्बोनेट ऑफ सोडा, कॅस्टिक सोडा, आयोडिन, पोटॅशम क्लोरेट इत्यादि द्रव्यें तयार होत असत.

**जमाबंदी व आर्थिक स्थिति**:--लष्करी जहागिरीची पद्धत जपानांत अमलांत होती त्यावेळीं जपानांतील सर्व जमीन सरकारच्या मालकीचीच आहे असें मानलें जात असे. सैन्य राखणें, राज्यकारभार चालविणें वगैरे गोष्टींकरितां लष्करी नोकरीबद्दल जहागीर धारण करणाऱ्यांनां सारा वसूल करण्याचा व वाढविण्याचा अधिकार असे. १८७१ च्या सुमारास लष्करी जहागिरीची पद्धत बंद झाली. १८६७ ते १८७१ च्या दरम्यान आर्थिक हलाखीमुळें नोटा प्रचारांत आणणें जपानला भाग पडलें होतें. परंतु पुढें नोटांची संख्या जास्त वाढल्यामुळें या बाबतींत सुधारणा करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. पूर्वी लष्करी नोकरीबद्दल जहागीर धारण करणाऱ्यांकडून निरनिराळ्या दरानें व पद्धतीनें सारा वसूल केला जात असे. परंतु राष्ट्रांत एकच पद्धत अमलांत आणण्याकरितां सर्व जमिनींची नवीन पाहणी करून जमाबंदी करणें जरूर झालें होतें. दोन वर्षांत. सर्व जमिनीची नवीन जमाबंदी करण्यांत आली व हें काम १८८१ मध्यें पूर्ण झालें.जमिनींच्या या नव्या पाहणीमुळें शेतकऱ्यांचा बराच फायदा झाला व त्यांच्यावरील करांचें ओझें बरेंच हलकें झालें. रेल्वे, पोस्ट, टेलिग्राफ, कालवे इत्यादि बाबींमुळें सरकारी उत्पन्नापेक्षां व्यय जास्त होऊं लागला; म्हणून सरकारला खात्रीलायक नोटा काढाव्या लागल्या. कागदी नाण्यांच्या प्रश्नाबरोबर पेढ्या काढण्याचा प्रश्न उपस्थित झाला. प्रिन्स इटो, मॅर्किस इनाऊये, मार्किस मटसुकाटा, काऊंट ओकमा व बॅरन शिबुसावा हे लोक जपानच्या आधुनिक आर्थिक संपन्नतेस कारणीभूत झाले आहेत. लष्करी जहागिरीची पद्धत होती त्यावेळीं पेढ्या नव्हत्या व कांहीं खासगी संस्था होत्या. त्या खासगी दुकानांत किंवा संस्थेंत बरीच अव्यवस्था असे. त्यावेळीं समाईक भांडवलाच्या मंडळ्यांची कल्पनाच लोकांनां आलेली नव्हती.१८७३ सालीं पाश्चात्यांच्या पद्धतीप्रमाणें राष्ट्रीय बँका जपानमध्यें स्थापन झाल्या. जपानी बँका अथवा पेढ्या अर्वाचीन पद्धतीप्रमाणें सुरू झाल्या तथापि त्यांमध्यें उत्तरोत्तर बरेच फरक कसे होत गेले याचा इतिहास बराच मोठा आहे.

रुसो जपानी युद्धानंतर जपानची सांपत्तिक स्थिति फार खालावली होती. पण जपाननें त्यांतून हळू हळू आपलें डोकें वर काढण्यास सुरुवात केली होती. महायुद्ध सुरू झाल्यानंतर मात्र जपानच्या व्यापाराला खरा रंग आला. यूरोपमधील बराच व्यापारी वर्ग व मजूर वर्ग युद्धांत गुंतल्यामुळें यूरोपमधील व्यापार मंदावूं लागला. ही संधी साधून जपाननें आपला माल मोठ्या प्रमाणावर काढण्यास सुरुवात केली. विशेषतः जहाजें,लोखंडी व पोलादी युद्धोपयोगी सामान, रसायनें इत्यादि बाबतींत तर जपाननें अतिशय माल उत्पन्न करण्यास सुरुवात केली; व या युद्धांत जपानला अतोनात फायदा झाला. पण युद्धतहकुबीनंतर युद्धोपयोगी सामानाला मागणी येईनाशी झाली. त्यामुळें बरेच कारखाने डबघाईस आल्यासारखे झाले. पण जपाननें पूर्वी भयंकर पैसा मिळवून ठेवल्याकारणानें जपानला ही सांपत्तिक निकृष्टावस्था तितकीशी जाणविली नाहीं. तात्पर्य या महायुद्धांत उद्योगधंद्यांच्या बाबतींत यूरोपियन राष्ट्रांच्या जोडीला जपान जाऊन बसलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

जमाखर्च—महायुद्धापूर्वी जपानचें ६७२८७३००० येन उत्पन्न व ५६९१५४००० येन खर्च होता. पण महायुद्धामुळें उत्पन्नांत व खर्चात दोन्हीं बाबतींत प्रचंड वाढ झाली. १९२१-२२ सालीं जपानचें उत्पन्न व खर्च१५६२५४२००० येन होता. १९१९-२० सालीं जपानला अंतर्राष्ट्रीय व परराष्ट्रीय मिळून २७९३०००००० येन कर्ज होतें.

राज्यकारभार.—जपानी बादशहास परदेशस्थ लोक 'मिकॅडो' असें म्हणतात व जपानी लोक त्यास 'टेनशी' असें म्हणतात. जपानी इतिहासावरून पाहतां हल्लीचा बादशहा हा मूळ दशजिम्मूटेन्नोयापासून १२१ वा पुरुष होय. या राजवंशाचा आरंभकाळ सुमारें इ. स. ७१२ पर्यंत जाऊन पोंचतो. जपानी इतिहासाला सुरुवात झाल्यापासून एकच राजवंश चालत आलेला आहे व त्याचीच चार मुख्य राजघराणीं आहेत. मूळ घराण्यांत औरस संतति नसेल तर या चार घराण्यांपैकीं जवळचा पुरुष गादीवर वारस होतो. जपानांत मोठें सरदारमंडळ पूर्वीपासून चालत आलें होतें; व १८८४ पासून की ( प्रिन्स ), करे( मार्किस ),हाकू (काऊंट), शि ( व्हायकाऊंट ),डन ( बॅरन ), अशा पांच पदव्या निर्माण करण्यांत आल्या आहेत. वरील पदव्या सरदारांशिवाय इतर लायख व्यक्तींनांहि देण्यांत येतात. १९०४-५ सालीं सरकारी बहुमानाच्या पदव्या धारण करणारे लोक जपानांत ९१२ होते. पूर्वी मिकॅडोच्या हातची सत्ता जाऊन शोगुन सेनापती राज्यकारभार पहात असे. १८६७ त शोगुनची सत्ता लयास गेली. पूर्वी जपानांत जाण्यास परकीयांना मज्जाव होता तो १९ व्या शतकांत काढून टाकण्यांत आला. १८७१ मध्यें जुन्या जहागिरदारांचा लय झाला. १८८२ मध्यें कॅबिनेट बनवून राज्यकारभार सुरू झाला. १८९० पासून जपानी पार्लमेंट सुरू झाली. राज्यकारभारांत एकंदर नऊ खातीं असून त्यांची व्यवस्था नऊ प्रधान पहातात. परदेश, गृह-कारभार, जमाबंदी, युद्ध, आरमार, न्यायखातें, शिक्षण, व्यापार, शेती व दळणवळण अशा नऊ खात्यांचा व्यवहार पाहणारे नऊ प्रधान व मुख्य प्रधान अशा दहा लोकांचें प्रधानमंडळ बनलेलें असतें. प्रधानमंडळाची नेमणूक बादशहा करितो. प्रधानमंडळ व बादशहा यांच्याशिवाय आणखी एक मंडळ असतें, त्यास'प्रौढ मुत्सद्दी' असें म्हणतात. या मुत्सद्यांच्या बळावरच जपानचा अभ्युदय झाला. एक प्रिव्हि कौन्सिल असून त्यांत १९०९ सालीं २९सदस्य होते व फील्डमार्शल प्रिन्स यामागाटा हा त्याचा अध्यक्ष होता. राजास सल्ला देणें हें प्रिव्हिकौन्सिलचें काम असतें.

प्रतिनिधिमंडळ व सरदारमंडळ असे जपानी कायदेमंडळाचे दोन विभाग आहेत. सरदार मंडळांतील बहुतेक लोक सरदारांकडून नेमण्यांत आलेले असतात व लोकांतर्फे निवडून आलेले लोक प्रतिनिधिमंडळांत असतात. प्रत्येक विशिष्ट गुणसंपन्न व्यक्तीस मतदानाचा हक्क असतो व मतदान गुप्त रीतीनें करण्यांत येतें. प्रतिनिधीमंडळाची निवडणूक चार वर्षांतून एकदां होते व सरदारमंडळाची सात वर्षांतून एकदां होते. बजेटाशिवाय कायदेमंडळास समान हक्क आहेत. 'डाएट' नामक वरिष्ठ कायदेमंडळ पूर्ण मुखत्यार असतें व तेथील काम पद्धतशीर असतें.

डाएट सभेच्या मंजुरीशिवाय कोणताहि कर बसविला जात नाहीं. युद्ध पुकारणें, तह करणें, अधिकारी नेमणें व काढून टाकणें, जरूरीचे कायदे पास करणें व पदव्या देणें वगैरे सर्व गोष्टी करण्याची जपानी बादशहाला पूर्ण सत्ता असते. लोकमतास पूर्णपणें वाव देण्याचें धोरण स्थानिक सरकारच्या कारभारांत असलेलें दिसून येतें. प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर व खेडें स्वयंशासित असावें अशीच योजना करण्यांत आलेली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणांत, प्रत्येक ठिकाणच्या सभेच्या सदस्यांची संख्या ठरविलेली असते. मतदानाचा हक्क प्रत्येकानें द्यावयाच्या कमी जास्त करावर अवलंबून असतो, व सर्व कारभार निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या मार्फत चालतो. कर बसविणें, बजेट पास करणें, व कर्ज उभारणें वगैरे कामें करतांना, गृहमंत्र्याची परवानगी घेणें जरूर असतें.

सैन्य.—सैनिकांचें राष्ट्र असा जपानचा पूर्वीपासून नांवलौकिक आहे. इ. स. ७ व्या शतकाच्या अखेरीस जितो नामक राणीच्या अमदानींत मुलकी व लष्करी अशीं दोन स्वतंत्र खातीं अमलांत आलीं. लष्करी खात्याची त्या काळापासून स्वतंत्र स्थापना झाली व प्रत्येक जिल्ह्यांत एकएक लष्करी खातें सुरू करण्यांत आलें. राष्ट्रांतील सुमारें ⅙ धष्टपुष्ट पुरुष लष्करी खात्यांत सामील होत असत असें म्हणतात. लष्करी नोकरांच्या मुदतींत करमाफी असे. शस्त्रसामुग्री सरकारच्या मालकीची असे व युद्धशिक्षण देण्याच्या वेळीं किंवा प्रत्यक्ष युद्धांत शस्त्रास्त्रांचा पुरवठा सरकारांतून होत असे. आठव्या शतकांत बंडें झाल्यापासून सैनिकांचा दर्जा वाढला व सैन्यभरतींत जास्त लोकांचा समावेश होऊं लागला. लष्करांतील कांहीं जागा पिढिजाद अशा असत. दहाव्या शतकाच्या आरंभीं शस्त्रास्त्रें बाळगण्याची परवानगी फक्त लष्करी वर्गास (सामुराई) मिळाली. लष्करी व मुलकी, (सामुराई व सामान्य मनुष्य) यांतील भेद, कोणत्याहि प्रकारच्या धर्मभेदावर व जातिभेदावर स्थापन झाला नव्हता.

प्राचीन काळीं जपानी वीरांचीं शस्त्रास्त्रें म्हटलीं म्हणजे धनुष्यबाण, तरवार व चिलखत हीं होतीं. लहान तट्टें लढाईंत फार उपयोगी पडत व त्यावेळीं जपानांत धिप्पाड लढाऊ घोडे नव्हते. उत्सवप्रसंगीं किंवा लढाईंत निशाणांचा उपयोग करीत असत. त्या निशाणांवर चंद्र, सूर्य, व्याघ्र किंवा एखादें पवित्र चिन्ह काढीत असत. वाद्यें वाजवून व शंखनाद करून लढाईच्या हालचाली होत असत. क्षात्रयुगामध्यें एखाद्या कैद्याचा नरबळी युद्धारंभीं देत असत.

जपानमध्यें पूर्वीपासून द्वंद्वयुद्धाची चाल आहे व व्यक्तिशः युद्ध करण्याची त्यांची पूर्वी फार प्रवृत्ति असे; परंतु १२७४ मध्यें मोंगोल लोकांनीं जपानवर स्वारी केली त्या वेळेपासून जपानी लोकांनीं आपल्या युद्धकलेंत इष्ट फरक घडवून आणला. यूरोपीयन युद्धकला जपानला १७ व्या शतकांत अवगत झाली व यामागा सोको यानें नवीन पद्धतीनें जपानी सैनिकांस शिक्षण देण्यास सुरवात केली. सतराव्या शतकांत यामागा यानें युद्धशास्त्रावरील प्राचीन चिनी ग्रंथ पाहिले व त्यांत आधुनिक काळास योग्य होतील अशीं कांहीं तत्त्वें त्यास आढळून आलीं. सामुराईनामक एक विशिष्ट लष्करी वर्ग जपानांत होता व त्याचे आठ मुख्य लष्करी शीस्तीचे नियम प्रसिद्ध आहेत. कमकुवतपणा उत्पन्न करणाऱ्या सुधारणेचा निषेध करून, लष्करीशिस्त, स्वावलंबन व संयम या गुणांची वृद्धि राष्ट्रांत घडवून आणावी असा प्रधान हेतु सामुराई पद्धतींत असलेला आढळून येतो. हाराकिरी नामक आत्महत्येची भयंकर पद्धत सामुराई वर्गानें स्वीकारली होती. मृत्यूचें अवास्तव भय न वाळगतां स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या कृत्याबद्दल स्वतः चा बळी देणें, एखाद्या उच्च कार्याकरितां मरण्यास तयार होणें, असे हाराकिरी करण्यां तील हेतू आहेत. आत्मयज्ञ हाच सामुराईच्या सर्व शिक्षणांतील मूळ हेतु होय. सन व गोनामक लोकांनीं चिनी ग्रंथांवरून जपानी युद्धशास्त्राचीं बरींच तत्त्वें संकलित केलीं आहेत.

केवळ जाज्वल्य कर्तव्यनिष्ठेपेक्षां सामुराई पंथांत, आत्मत्यागाची स्फूर्ति उत्पन्न करण्यास कांहीं तरी जास्त सामर्थ्य देणारें तत्व हवें होतें व तें बुद्ध धर्मामुळें त्यांनां प्राप्त झालें. परकीय विद्येवर सामुराईनें बहिष्कार घातला होता; परंतु नागासाकीचा गव्हर्नर, टाकाशिमा शुहन यास असें आढळून आलें कीं, परकीय विद्येच्या अभावीं, जपानचा चीन प्रमाणें नाश झाल्यावांचून राहणार नाहीं, म्हणून हॉलंडहून त्यानें नव्या पद्धताच्या तोफा व बंदुका आणविल्या व याबद्दल त्यास तुरुंगांत टाकण्यांत आलें. एगावा यानें पुन्हा यूरोपीयन तोफा व बंदुका आणल्या व दारूगोळा तयार करण्याचीं यंत्रें त्यानें हॉलंडहून विकत आणलीं. शेवटीं १८६२ मध्यें शोगुन सरकारनें पाश्चात्य लष्करी पद्धतीचा अंगिकार केला. १८६८ मध्यें किओटो येथें लष्करी शाळा स्थापन झाली ओम्यूरा मसुजिरो यानें लष्करी शाळा स्थापन केल्या, पिढिजाद लष्करी अम्मलदारांची पद्धति बंद केली व सर्व वर्गांतील लोकांनां सैन्यांत येण्यास व उच्च पदवीस चढण्यास त्यानें सुसंधि दिली. सर्व साम्राज्य सहा लष्करी जिल्ह्यांत विभागलें जावें अशीहि त्याची योजना होती. यामागा, टाअरि टोगोप्रभृति यूरोपांत गेले व तेथें लष्कराची पाहणी करून १८७२ मध्यें त्यांनीं, टोकिओ, सेंडाई, ओसाका व कूमामोटो या ठिकाणीं लष्करी छावण्या स्थापन केल्या. फ्रेंच व जर्मन लष्करी लोकांच्या देखरेखीखालीं जपानी लोक लष्करी शिक्षण घेऊं लागले. स्वयंसेवकमंडळें चोहोंकडे स्थापन करण्यांत आलीं. सर्व जातींच्या लोकांनां लष्करी शिक्षण देण्यांत येऊं लागलें.

आ र मा र.—नौकानयन विद्या जपानला पूर्वीपासून अवगत होती. मध्ययुगीन काळांत, जलमार्गानें जपानचा हिंदुस्थान व सयाम यांच्याशीं व्यापार चालत असे; आणि कोरिया व चीनच्या किनाऱ्यानजीक जपानी लोक चांचेगिरी करीत असत. तथापि नौका बांधण्याच्या कलेंत जपान आपल्या शेजारच्या देशांपेक्षांहि फार मागें होता असें दिसतें. १८५५ सालीं डच लोकांच्या नेतृत्वाखालीं नौकानयन विद्या शिकविण्याची सोय नागासाकी येथील शाळेंत करण्यांत आली व त्याच सालीं तेथें एक लोखंडाचा कारखाना काढण्यांत आला. १८५७ व १८५८ सालीं जपाननें दोन जहाजें डच लोकांपासून विकत घेतलीं व व्हिक्टोरिया राणीनें एक जहाज जपानला दिलें १८६० मध्यें पॅसिफिक महासागराचें जपानी आरमारानें प्रथमच उल्लंघन केलें. पुष्कळ जपानी लोक हॉलंडांत नौकानयन विद्या शिकण्यास जाऊं लागले. योकोसुका येथें एक गोदी बांधण्यांत आली. डच व फ्रेंच लोकांनीं आरमारखात्यांत जपानला अत्यंत मदत केली; परंतु समुद्रांतील युद्धाचे डावपेंच जपानला इंग्रजांपासूनच शिकावे लागले. सुकीजी येथील शाळेंत शिकविण्याकरितां १८७३ मध्यें इंग्लंडहून ३० तज्ज्ञ जपानात आले. १८८२ मध्यें जपानांत ३० क्रूझर्स व १२ टॉरपेडो बांधण्यांत आल्या. १८९४ मध्यें चीन व जपानमध्यें युद्ध झालें, त्यावेळीं जपानी आरमार फार सुधारलें होतें. रूसोजपानी युद्धांत जपानी आरमाराचा प्रभाव चांगलाच दिसून आला.

१९२० सालीं जपानमध्यें ८४ पायदळांच्या पलटणी, घोडदळांच्या २८ पलटणी गोलंदाजांच्या ३५ पलटणी, ४ वैमानिकदलांच्या पलटणी होत्या. जपानमध्यें १७ वर्षे वयाच्या माणसानें लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे असा सक्तीचा कायदा आहे. १९२१-२२ मध्यें अंदाजपत्रकाच्या बैठकीच्या वेळीं जपानसरकारनें एक कायदा करून, त्यांत १९२७ पर्यंत जपाननें ४ बॅटलशिप्स, ४ बॅटलक्रूझरें, १२ साधीं क्रूझरें, ३२ विनाशिका, ५ गनबोटी याशिवाय पुष्कळ पाणबोटी तयार करावयाच्या ठरविल्या आहेत.

शि क्ष ण.—प्राचीन काळीं चीन व कोरिया देशांतील संस्कृतीचा व वाङ्मयाचा जपानवर परिणाम झाला होता याबद्दल दुमत नाहीं. सहाव्या शतकाच्या अखेरीस जपानी लोक चीन देशांत कन्फूशियन व बौद्धधर्माचा अभ्यास करण्यास जाऊं लागले. सतराव्या शतकांत जपानमध्यें शाळा स्थापन झाली. इ. स. ७९४ मध्यें मोठ्या प्रमाणावर शिक्षणप्रसार करण्यास सुरुवात झाली व किओटो येथें एक विद्यापीठ स्थापन झालें. शिक्षणपद्धत व अभ्यासाचे विषय या बाबतींत जपाननें प्रथम चीन देशाचेंच अनुकरण केलें.

चिनी लोकांची पितृभक्ति व जपानी लोकांची राजनिष्ठा व देशाभिमान यांचें मधुरमीलन जपानी शिक्षणपद्धतींत घडून आलें. ११ व्या शतकाच्या अखेरीस जपानमध्यें अनेक विदुषी निर्माण झाल्या व त्यांच्या ग्रंथांस जपानी अभिजात वाङ्मयांत उच्च स्थान मिळालें. मध्ययुगांत लष्करी शिक्षणास महत्त्व प्राप्त झालें व केवळ पुस्तकीज्ञानास समाजांत मान राहिला नाहीं. बाराव्या शतकाच्या अखेरीस लष्करी नोकरीबद्दल जहागिऱ्या देण्याची पद्धत अंमलांत आल्यामुळें लोकप्रवृत्तीस निराळें वळण लागलें; परंतु पुढें राजकारण बदलत चालल्यामुळें व बौद्धधर्माचा प्रभाव टिकून राहिल्यामुळें शैक्षणिक प्रगति अगदींच कुंठीत झाली नाहीं. १२६० मध्यें शोमयोजींच्या देवळांत एक सार्वजनिक पुस्तकसंग्रह करण्यांत आला. बौद्ध भिक्षूंनीं शिक्षणप्रसार करण्याच्या बाबतींत बरीच मेहनत घेतली.

मैजी युगांत शिक्षणाचें पाऊल बरेंच पुढें पडूं लागलें. सतराव्या शतकांत, शोगुन घराण्याच्या अमदानींत शिक्षणाची चळवळ जोरानें सुरू झाली होती. अनेक सरदार लोक स्वतः शिकूं लागले व शिक्षणसंस्थांस मदत करूं लागले. वेधशाळा बांधण्यांत आली व भूगोल, गणित, वाङ्मय, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांस फार प्रोत्साहन मिळूं लागलें. २४० शाळा सरदार लोकांकरितां अस्तित्वांत आल्या व लष्करी शिक्षणाच्याहि शाळा काढण्यांत आल्या. अठराव्या शतकाच्या आरंभास पाश्चात्य सुधारणेचें महत्त्व जपानी लोकांस कळूं लागलें व ज्योतिष, वैद्यकी व भूगोल या विषयांची लोकप्रियता वाढूं लागली. येड्डो येथें परकीय भाषा शिकण्याची शाळा १८५७मध्यें स्थापन करण्यांत आली, व १८६२ त यूरोपीय व भौतिकशास्त्रें शिकविण्याची जपानमध्यें सोय करण्यांत आली. व्यापारी शिक्षणास उत्तेजन मिळूं लागलें व सुशिक्षितांखेरीज कोणालाहि उच्च सरकारी नोकरी द्यावयाची नाहीं असें ठरविण्यांत आलें. राष्ट्रांत सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू करण्याचें ठरलें. १८६८ सालीं राजाची नष्ट झालेली सत्ता जेव्हां पुनः प्रस्थापित झाली, तेव्हां जपानी शिक्षणपद्धतींत मोठा फरक पडला. हायस्कूलांतून व कॉलेजांतून शिकविण्याकरितां अमेरिकन, इंग्लिश व जर्मन प्रोफेसरांची नेमणूक झाली. सरकारनें हुषार विद्यार्थी परदेशीं पाठविले. स्त्रीशिक्षणाचीहि जपानमध्यें फार प्रगति झाली आहे. विश्वविद्यालयांतून भौतिकशास्त्रें शिकविण्याची सोय झाली व औद्योगिक शिक्षणहि मिळूं लागलें.

**धर्म**.—जपानी लोक आपल्या धर्मपंथाला ' देवमार्ग ' असें म्हणतात. त्याला चिनी भाषेंत शिंतो असा प्रतिशब्द आहे. म्हणून परस्थ लोकांनीं त्यास शिंतोधर्म असें नांव ठेविलें आहे. कांहीं सृष्टपदार्थपूजा व कांहीं पितृपूजा अशी त्या धर्मांत सरमेसळ असून त्या धर्माचें निराळें असें पुस्तक नाहीं. या धर्माचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न अलीकडील काळांत मोटूरीनामक एका जपान्यानें केला आहे. जपानी लोकांच्या समजुतीप्रमाणें मिकाडो हा सूर्याचा वंशज आहे. सूर्य, वायु, अग्नि वगैरे देवतांनाहि पूज्य मानण्यांत येतें. आईस प्रांतामध्यें एक सूर्याचें देवालय आहे. हिंदुस्थानांतून तिबेटांत, तिबेटांतून चिनांत, चिनांतून कोरियांत, व कोरियांतून जपानांत अशा क्रमानें बौद्ध धर्माचा प्रवेश झाला आहे. इ. स. ५५० मध्यें जपानमध्यें बौद्धधर्माचा प्रसार होऊं लागला व अनेक भिक्षू व भिक्षुणी कोरियांतून जपानांत जाऊं लागले. इ. स. ५९३ पासून ६२१ पर्यंत, जो मिकाडो जपानच्या गादीवर होता तो पक्का बौद्धधर्मी बनला. जपानी शिंतो धर्मापेक्षां बौद्धधर्मामध्यें ईश्वरविषयक उदात्त कल्पना असल्यामुळें व बौद्धधर्माची नीतिमत्ता श्रेष्ठ असल्यामुळें, जपानी लोकांवर बौद्धधर्माचाच परिणाम झाला. पुढें बौद्ध लोकांनीं शिंतो देव हे बुद्धांचेच अवतार अशी कल्पना लोकांत प्रसृत करून शिंतो व बौद्धधर्माचा मिलाफ करण्याचा प्रयत्न चालविला. या प्रयत्नास पुढें चांगलें यश आलें. जपानांतील बौद्धधर्म सिलोन व सयाम येथील बौद्धधर्माहून निराळा आहे. जपानी बौद्धांचा धर्मग्रंथ ' महायान ' पंथाचा आहे. तेराव्या शतकांत बौद्ध धर्मांत दोन भेद उत्पन्न झाले. त्यांचे उत्पादक नीचीरेन व शिन्रान असे अनुक्रमें होत. शिन्रानच्या पंथाचे लोक आपणांस शिनशियु असें म्हणवितात. जपानांत बुद्धांच्या बऱ्याच मोठ्या मूर्ती आहेत. चीनमध्यें कान्फ्युशिअस नांवाचा तत्त्वज्ञ खि. श. पूर्वी सुमारें पांचशें वर्षांच्या सुमारास होऊन गेला. त्याचें मत असें कीं, आईबापाची, राजकर्त्यांची आज्ञा पाळणें हेंच जगांतील इतिकर्तव्य असून परमेश्वराची भक्ति वगैरे गोष्टी निरर्थक आहेत. या मताचा प्रवेश जपानमध्यें खिस्ती शकाच्या आरंभीं झाला परंतु १७ व्या शतकापर्यंत बौद्धधर्माचाच तेथें अंमल होता. सतराव्या शतकांत इयेयिसू यानें कान्फ्युशिअस पंथाचें पुनरुज्जीवन केलें व त्यानंतर दोनशें वर्षेपर्यंत जपानांतील प्रतिष्ठितांचीं मतें, कान्फ्युशिअस धर्माला अनुकूल अशीं होतीं. जहागीरदार लोकांवर दाब राहण्यास या धर्माची बरीच मदत राजकर्त्यांस झाली परंतु १८६८ सालच्या राज्यक्रांतीच्या वेळीं सर्व गोष्टी पालटल्या व हा धर्म अगदींच मागें पडला. अलीकडे जपानमध्यें मिशनरी लोक खिस्तीधर्माचा हळूहळू प्रसार करूं लागले आहेत.

**भाषाः**--जपानी लोकांच्या उत्पत्तीविषयीं आजवर रूढ असलेले सिद्धान्त जर खरे असतील तर जपानी व कोरियन भाषा यांमध्यें व त्याचप्रमाणें जपानी व चिनी भाषा यांमध्यें बरेंच साधर्म्य असावयास पाहिजे. परंतु खिस्ती शकाच्या आरंभशकापासून जपानी व कोरिअन लोक यांचें दुभाष्याशिवाय दळणवळण होत नसे असें म्हणतात. जपानी व कोरिया या भाषांचें मूळ जर एकच असेल तर त्यापासून वरील दोन शाखा फार पुरातन काळींच भिन्न झाल्या

असल्या पाहिजेत. जपानी व चिनी भाषासंबंधीं पाहिलें तरी त्याहि परस्पराहून भिन्न आहेत असें दिसतें. जपानी भाषा ही चिनी वाङ्मय व शब्दसंपत्ति यांवरच पुष्ट झाली. आर्यन् व जपानी यांचें संभवस्थान एकच असलें पाहिजे असें सिद्ध करण्याचा के. हिराइ यानें प्रयत्न केला आहे

लेखनाची कल्पना चीन देशांत जेव्हां निघाली तेव्हां वस्तूंचे आकार म्हणजे चित्र काढून विचार कळविण्यास सुरुवात झाली. म्हणूनच तेथील लिपीस चित्रलिपी किंवा कल्पनालिपी असें म्हणतात. चिनी भाषा व लिपी अत्यंत अवघड आहे. जपानांत चिनीलिपी सुरू आहे पण जपानची भाषा मात्र निराळी आहे. उदाहरणार्थ 'सूर्य' हा शब्द चिनी व जपानी लोक एका अक्षरानेंच लिहितात. म्हणजे दोघांचीं अक्षरें एक पण चिनी लोक त्याचा उच्चार 'थाय्यीयो' असा करतात व जपानी लोक 'तिची' असा करतात. परस्परांचीं पत्रें वगैरे एकमेकांस वाचतां येतात; परंतु परस्परजवळ बोलतां येत नाहीं. दोन्हीं राष्ट्रांची लिपी एक असल्यामुळें १८९४च्या चिनीजपानी युद्धांमध्यें गुप्त पत्रव्यवहार कोणालाच करतां येईना. चिनी लोकांची लिपी जपाननें घेतली त्यामुळें जपानी भाषेंतहि ऐशीं हजार अक्षरें आहेत.

मूळ चित्रांत, उत्तरोत्तर फरक पडून हल्लींचीं अक्षरें बनलीं आहेत. तरी मूळ चित्रांशीं त्यांची बरीच साम्यता आहे. म्हणून ही लिपी चित्रांपासून उत्पन्न झाली यांत संशय नाहीं. चिनी लिपीचा जन्म होऊन दोन हजारांवर वर्षें होऊन गेलीं. ही लिपी अद्यापहि चीन, कोरिया, तिबेट, जपान व फोरमोसा या देशांमध्यें सुरू आहे. ही लिपी अत्यंत अवघड आहे. जपानी लोकांनीं काताकाना (बालबोध) म्हणून ७३ अक्षरांची एक सोपी लिपी तयार केली आहे.

ह्या लिपीवर सर्व काम भागते. तार करण्याच्या कामीं याच अक्षरांचा उपयोग तारायंत्राच्या खात्यांत करतात. स्त्रिया व मुलें प्रथम हींच अक्षरें शिकतात. एवढया अक्षरांच्या शिकण्यानें त्यांनां वाचतां येतें. कारण सर्वांच्या सोयीसाठीं वर्तमानपत्रें व पुस्तकें चिनी लिपींत लिहून पुढें 'काताकाना' लिहितात. 'कातकाना' (बालबोध) व लिहिण्याची 'हिरागाना' (मोडी) या अक्षरांची ओळख होण्यासाठीं मुलांनां प्रथमतः या लिपीचे धडे देण्यांत येतात. जपानी भाषा उच्चारण्यास फार सोपी आहे. जोडाक्षरांची पद्धत जपानींत नाहीं. लिपींतील चिनी व जपानी कांहीं अक्षरें वेगळीं काढून दाखविलें आहे.

वा ङ् म य.—जपानी वाङ्मयांतील उपलब्ध असलेला आद्यग्रंथ इ. स. ७१२ मध्यें लिहिला गेला असें म्हणतात. टम्मूनामक राजाच्या मनांत सर्व मुख्य राजघराण्यांचा इतिहास लिहावा असें होतें;परंतु तो इतिहास पूर्ण होण्यापूर्वीच तो वारला व हें काम जेम्मयो नांवाच्या राणीच्या अमदानींत पूर्ण झालें. 'कोजिकी' (प्राचीन गोष्टींचा इतिहास) असें वरील ग्रंथाचे नांव होय. प्रो. बी. एच. चेंबर्लेन यानें मार्मिक प्रस्तावना लिहून वरील ग्रंथाचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे. 'कोजिकी' हा ग्रंथ आर्षजपानींत लिहिलेला असून, विश्वाची उत्पत्ति, मूळचे राजवंश व अनेक राजांच्या कारकीर्दी, यांचें वर्णन त्यांत आढळतें. अभिजात जपानींत लिहिलेला दुसरा ग्रंथ निहोंगी हा होय. चिनी भाषा व वाङ्मय यांचा परिणाम जपानी भाषेवर झाल्यामुळें अभिजात जपानीमध्यें चिनीचें आधिक्य आढळून येतें. 'निहोंगी' च्या लोकप्रियतेमुळें 'कोजिकी' हा ग्रंथ १७ व्या शतकापर्यंत मागें पडला. सतराव्या शतकांत प्राचीन विद्येच्या पुनरुज्जीवनाची लाट सर्व जपानभर पसरली व आर्षजपानींकडे व 'कोजिकी' या ग्रंथाकडे लोकांचें लक्ष्य जाऊं लागलें. १७ व्या व १८ व्या शतकांत माबूची व मोहोरी हे प्रसिद्ध ग्रंथकार उदयास आले. 'केजिकिडेन' हा प्रचंड ग्रंथ मोटोरीनें लिहिलेला असून त्याचे ४४ विभाग झाले आहेत. 'केजिकी' चा अर्थ विशद करणें व जुन्या शिंतो पंथाचें समर्थन करणें असा दुहेरी हेतु वरील ग्रंथावरून दिसून येतो. मिटोच्या अधिपतीनें बुद्ध व शिंतो यांच्या मठांतील जुन्या ग्रंथांचा संग्रह करून, विद्वान लोकांकडून त्यानें एक प्रचंड इतिहास लिहविला. या 'दाइ निहोंताशी' चे २४० विभाग झाले असून हा ऐतिहासिक ग्रंथ फार परिश्रमपूर्वक लिहिण्यांत आला आहे. त्यानंतर इ. स. १८२७ मध्यें 'निहोंनग्वाइती' नामक दुसरा एक इतिहास प्रसिद्ध झाला. जुन्या इतिहासांतील अद्भुत गोष्टीच वरील ग्रंथांत बऱ्याचशा आढळून येतात. १७ व्या व १८ व्या शतकांत वरील ग्रंथांशिवाय अनेक ग्रंथ जपानमध्यें निर्माण झाले व वाङ्मयाचा झपाट्यानें प्रसार झाला.

काव्य.—काव्याच्या बाबतींत जपानी लोक पूर्ण स्वतंत्र बुद्धीचे असून परकीय कल्पनांचा त्यांच्या मनावर फारसा पगडा बसलेला दिसून येत नाहीं. जपानी कवितेंत वृत्तवैचित्र्य,यमक, छंद,अनुप्रास वगैरे गोष्टींस जवळ जवळ फांटा दिलेला असतो. जपानी कवितेंत पहिले व तिसरे चरण, पांच पांच अक्षरांचे व दुसरे आणि चौथे चरण सातसात अक्षरांचे असतात व शेवटीं सात अक्षरांचा पुन्हां एक चरण असतो. ८ व्या शतकांत हिटोमारो व अकाहिटो असे दोन कवी होऊन गेले. दहाव्या शतकाच्या आरंभीं सूरयूकी हा प्रसिद्ध कवि होऊन गेला. 'मनयोशू' नामक ग्रंथांत हिटोमारो व अकाहिटो यांच्या कवितांचा संग्रह करण्यांत आलेला असून वरील ग्रंथ ७६० मध्यें प्रसिद्ध झाला. 'कोकिनशू' नामक ग्रंथ सूरयूकी यानें प्रसिद्ध केला. त्यानंतर ११ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंतच्या सर्व काव्यांचा संग्रह 'निजू-इचि-दाइ-शू' नामक प्रचंड ग्रंथाच्या रूपानें प्रकाशित झाला. तेराव्या शतकांत टैकाकयो यानें शंभर वर्षांत होऊन गेलेल्या कविता प्रसिद्ध केल्या. उपर्युक्त ग्रंथ हेच जपानी अभिजात काव्यग्रंथ होत. एकोणिसाव्या शतकापर्यंत काव्याच्या बाबतींत फारशी प्रगति झाली नाहीं. पुढें प्रो. टोयामा यानें पाश्चात्य

पद्धतीप्रमाणें काव्यरचना करून जपानी वाङ्मयांत क्रांति करण्याचा प्रयत्न केला.

स्त्रिया व जपानी वाङ्मय.—जपानी वाङ्मयांत स्त्रियांचें अधिष्ठान असल्याचें आढळून येतें. इ. स. ६२० मध्यें प्रसिद्ध झालेला ग्रंथ सूईको नामक राणीच्या आश्रयामुळें लिहिला गेला. ७१२ सालीं 'कोजिकी' हा ग्रंथ जेमयो राणीच्या प्रोत्साहनामुळेंच अस्तित्वांत आला. आठव्या शतकापासून शुद्ध जपानी भाषेचें संवर्धन जपानी स्त्रियांकडूनच करण्यांत आलें. परंतु अभिजात चिनी भाषाच पुरुषवर्गांत सर्वमान्य झाली आहे. हा भेद हल्लींच्या काळींहि प्रचलित असलेला आढळून येतो. 'जेनजी मोनो गातरी' व 'मकुरा नो झोशी' या जपानी भाषेंतील उत्कृष्ट कादंबऱ्या होत. मुरासाकीनो शिकिबू आणि सैशोनागान या स्त्रियांनीं अनुक्रमें वरील कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

स्तिमित युग.—चवदाव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत जपानी वाङ्मयेतिहासाचा जो काल गेला त्यास जपानी वाङ्मयांतील स्तिमित युग असें म्हणतात.या कालांत 'जिनकोशोटोकी' व 'टैहैकी' हे दोन ग्रंथ निर्माण झाले. या ग्रंथांत या कालाचें चित्र प्रतिबिंबित झालें आहे. राजकीय व ऐतिहासिक असे वरील ग्रंथांचे विषय असून जिनको शोटोकी' या ग्रंथामुळें आधुनिक जपानी राजकारणाचें बीजारोपण झालें असें म्हणावयास हरकत नाहीं. आधुनिक जपानी लेखनशैलीचा पाया 'टैहैकी' या ग्रंथानें घातला. 'टिसूर झर म्यूसा' नामक ग्रंथहि जपानी वाङ्मयांत महत्त्वाचा गणला जातो.

नाटकें.—स्तिमित युगामध्येंच 'नो' या नांवाचें प्रसिद्ध जपानी नाटक लिहिण्यांत आलें. बौद्ध लोकांच्या चळवळी जोरांत सुरू होत्या त्याचवेळीं हें नाटक लिहिलें गेलें. 'हुंका' व 'गागाकू' हीं नाटकेंहि प्रसिद्ध आहेत. परंतु 'नो' या नाटकानें जपानी नाट्यवाङ्मयांत मोठीच क्रांति केली. पाश्चात्य सुधारणेची लाट जपानांत आली त्यावेळीं हें नाटक कांहीं काळ मागें पडलें होतें. परंतु अजूनहि त्याची लोकप्रियता कमी झालेली नाहीं.

जपानी लोक जात्याच आनंदी व रंगेल स्वभावाचे आहेत. त्यांच्यांत गांभीर्य आहे व आशावादित्वहि आहे. 'नो' मुळें उत्पन्न झालेला निराशावाद 'कयोजेन' या प्रहसनामुळें नष्ट झाला. 'नो' व 'कयोजेन' या नाटयकृतींनीं सुशिक्षितांस वेड लावलें परंतु अशिक्षित समाज व व्यापारी वगैरे लोकांत 'जोरूरी' व 'काबुकी' हीं दोन नाटकेंच फार लोकप्रिय झालीं. जपानी नाटकांत स्त्रियांची भूमिका स्त्रियाच घेत असत परंतु पुढें कायद्यानें मनाई केल्यामुळें पुरुष स्त्रियांच्या भूमिका घेऊं लागले. 'वागोटो' व 'सेवामोनो' हीं नाटकें सामाजिक असून 'अरागोटो' हें ऐतिहासिक नाटक सर्वश्रुत आहे. अलीकडे पाश्चात्य सुधारणा प्रसृत होऊं लागल्यापासून उच्च दर्जाचे लोक, नाटयविषयांत मन घालूं लागले आहेत व नाटकांवरील बहिष्कार उठला आहे. १८८७ सालीं स्वतः बादशहा सुद्धां नाटक पहाण्यास गेला होता जपानमध्यें यूराकूझा नामक पाश्चात्य पद्धतीवर एक नाटकगृह बांधण्यांत आलें. शेक्सपिअरचीं नाटकेंहि अलीकडे जपानी रंगभूमीवर होऊं लागलीं आहेत. सामाजिक नाटकें रचण्याची सध्या जास्त प्रवृत्ति दिसून येत आहे. या नाटकांत जपानी लोकांचा विनोद भरपूर असलेला आढळतो.

टोकूगावा युग (१६६३—१८६७):—या काळांत नाटक हा विषय लोकप्रिय झाला व जपानी वाङ्मय संपन्न झालें. येडो व किओटो हीं शहरें वाङ्मयोत्पादक स्थानें म्हणून मानलीं जाऊं लागलीं. चिनी भाषेचा अभ्यास करून विद्वत्व संपादन करणाऱ्या संघास 'कंगाकुश' असें म्हणतात. यांतील लोकांनीं अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. फूजीवरासैकवा यानें चूहीतत्वज्ञानाची ओळख देशबांधवांस करून दिली. इयाशीरारून यानें नैतिक विषयावर अनेक निबंध लिहिले आहेत. अराइ हकू सेकी, हा इतिहासकार, तत्वज्ञ व मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध आहे. जुनें चूही तत्वज्ञान लोकांस रुचत नसल्यामुळें, कन्फ्युशिअस व मेन्शिअस पंथांचा स्वतंत्र तऱ्हेनें अभ्यास करण्याची प्रवृत्ति राष्ट्रांत उत्पन्न झाली. इटोजुन्साइ, इटोटोगै, सोराइ, डझाइ, शंटाइ वगैरे विद्वान लोकांस बुद्धधर्म संमत नसल्यानें ते बुद्ध व जपानी पंडितांच्या दूषणास प्राप्त झाले. अठराव्या शतकांत धार्मिक विषयांच्या वादास जपानमध्यें ऊत आला होता. सतराव्या शतकांत लहान मुलांकरितां स्वतंत्र वाङ्मय निर्माण झालें व त्याची अलीकडे इंग्रजींत भाषांतरेंहि झालीं आहेत. अनेक गोष्टी व कादंबऱ्या, टोकूगावा युगांत निर्माण झाल्या आहेत. संतोक्योडन, बकीन, तानेहिको, सांब, शुनसुइ वगैरे कादंबरीकारांच्या अद्भुत कादंबऱ्या फार प्रसिद्ध आहेत. नैतिक विषयांवरील निबंध व ऐतिहासिक संशोधनाविषयीं लेख वगैरे या युगांत बरेच प्रसिद्ध झाले आहेत.

मैजी युग.—टोकुगावा युगांत, धर्म, तत्त्वज्ञान, इतिहास वगैरे विषयांवर वाङ्मय उत्पन्न झालें व राजकारणाबद्दल लोकमताची दिशा बदलून गेली. मैजीयुगांत पाश्चात्य भौतिक शास्त्रें, कला व वाङ्मय याबद्दल चोहोंकडे उत्कट आवड उत्पन्न झाली होती असें दिसतें. इंग्रजी शिकण्याची सर्वत्र प्रवृत्ति दिसून येऊं लागली. टोकिओ युनिव्हर्सिटीस जोडलेल्या तीन्ही कॉलेजांत ऑक्सफोर्ड व केंब्रिज येथें जाऊन आलेले विद्वान अध्यापक काम करूं लागले. याच काळांत जपानच्या राजकारणास उत्कृष्ट कर्णधार लाभले व इंग्रजी वाङ्मयाची आवड उत्पन्न झाली. स्माइलसकृत, 'सेल्फहेल्प,' मिल्लचें 'रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट' वगैरे पुस्तकांचीं जपानी भाषांतरें होऊं लागलीं. हर्बर्ट स्पेन्सर व गिझो,दवल यांचे ग्रंथ जपानांत छापले गेले व 'चेंबर्स एन्सायक्लोपेडिया'चेंहि भाषांतर करण्याचें काम

शिक्षणखात्यानें केलें. या नव्या काळांत पुढें आलेल्या लेखकांच्या प्रत्येक कृतींत राजकारण चमकूं लागलें. रुसोच्या सोशल कॉन्ट्रॅक्टचें भाषांतर करण्यांत आलें व राजकारणांतील नव्या तात्त्विक प्रमेयांचा उहापोह सुरू झाला. १८८२ मध्यें 'ज्युलिअस सीझर' ला जपानी पेहराव देण्यांत आला. मेकॉले, गोल्डस्मिथ, टेनिसन, थ्याकरे वगैरे इंग्रजी ग्रंथकारांच्या पुस्तकांचा शाळा व कॉलेजें यांमधून अभ्यास सुरू झाला. आधुनिक जपानी वाङ्मयांत रोहन यानें मोठी क्रांति केली. डिझराइली, बायरन, शेक्सपीअर, कार्लाइल, इमर्सन, ह्यूगो, डीकन्स, गोएटे वगैरे यूरोपिअन ग्रंथकारांच्या पुस्तकांचीं झपाट्यानें भाषांतरें होऊं लागलीं. अनेक पाश्चात्य शास्त्रीय ग्रंथांचेंहि परिशीलन सुरू झालें, व चोहों बाजूनें जपानी अभ्युदयास जोरानें सुरुवात झाली.

**वृत्तपत्रें व नियतकालिकें.**—प्राचीन काळीं जपानांत वृत्तपत्रांची कल्पना नव्हती; व एखादी महत्त्वाची गोष्ट घडून आल्यास दौंडी पिटवीत असत. त्यानंतरच्या काळांत नागासाकी येथील गव्हर्नरास, डच व्यापारी परदेशांतील वृत्तपत्रांत असलेल्या बातम्या कळवीत असत व त्यांचें जपानींत भाषांतर होत असे. १८५७ सालानंतर येडो येथील अधिकाऱ्यांनीं परकीय पुस्तकें, मासिकें व वृत्तपत्रें यांच्या व्यवस्थित अभ्यासाला उत्तेजन दिलें; परंतु बहुजनसमाजास त्यापासून फारसा फायदा झाला नाहीं. १८६१ सालीं "बटाव्हिया न्यूज" म्हणून पहिलें वर्तमानपत्र निघालें; पण तें फार काळ टिकलें नाहीं. १८६४ सालीं याकोहामा येथें 'शिंबनशी' नामक वृत्तपत्र सुरू झालें. 'कोको शिंबन' हें पत्र १८६७ त निघालें; परंतु सरकारवरील टीकेमुळें तें रद्द करण्यांत आलें. व त्याच्या फुकूची नामक संपादकास तुरुंगांत टाकण्यांत आलें. किडोच्या नेतृत्वाखालीं 'शिंबनझाशी' या पत्राचा उदय १८७१ त झाला. 'मेनिची शिंबन' हें दैनिकहि चांगलें लोकप्रिय होऊं लागलें. कोणताहि निश्चय करण्याच्या बाबतींत जपानी लोक थोडे मंद असतात. परंतु केलेला निश्चय यशस्वी करण्याच्या कामीं ते जिवापाड मेहनत घेतात असा जपानी लोकांचा लौकिक आहे; व तो वृत्तपत्रांच्या बाबतींत चांगला दिसून येतो. १८७५ सालीं सुमारें १०० नियतकालिकें व दैनिकें जपानमध्यें होतीं. त्यांपैकीं निचिनिचिशिंबन, यूबिनहोची, चोयाशिंबन, अकेबोनोशिंबन, व मेनिचीशिंबन हीं पत्रें फार प्रसिद्ध आहेत. वृत्तपत्रांची वाढ झाल्यामुळें चळवळ फार होऊं लागली, व १८७५ मध्यें प्रेसॲक्ट पास झाला, व बऱ्याच संपादकांस तुरुंगांत टाकण्यांत आलें. परंतु दडपशाहीमुळें वृत्तपत्रांची लोकप्रियता उलट जास्तच वाढली. चिनी शब्दांचें व कल्पनांचें आधिक्य असल्यामुळें व अभिजात ग्रांथिक भाषा लिहिण्याची त्यांनां संवय व हौस असल्यामुळें बहुजनसमाजास जपानी वृत्तपत्रांची भाषा कळत नसे. म्हणून १८७५ मध्यें 'योमियूरीशिंबन' नांवाचें एक वृत्तपत्र निघालें व त्याची भाषा अत्यंत सोपी व घरगुती भाषेसारखी असे. हें पत्र फार लोकप्रिय झालें होतें.

१८८१ सालीं जपानांत राजकीय पक्ष उत्पन्न झाले; व वृत्तपत्रें कोणता तरी एक पक्ष घेऊन त्याप्रमाणें लोकमत बनवूं लागलीं. वर्तमानपत्रांतील वादविवादास रंग चढूं लागला. पक्षभेद फार होऊं लागले; परंतु प्रधानमंडळावर टीका करणें हें सर्वांचें सामान्य धोरण असे. १८८२ सालीं 'जिजिशिंपो' (टाइम्स) हें पत्र फुकूझावायूकींची या प्रसिद्ध जपानी विद्वान् गृहस्थाच्या नेतृत्वाखालीं सुरू झालें. व्यक्ति, कुटुंब व राष्ट्र यांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याच्या अभिनिवेशानें हें पत्र चालविण्यांत आलें होतें.

टोकिओ येथील सर्व पत्रें राजकीय व वाङ्मयात्मक प्रश्नांचा उहापोह करणारीं होतीं. ओसाका येथें 'ओसाका असाइशिंबन' नांवाचें एक व्यापारी वृत्तपत्र सुरू झालें. जगांतील सर्व बातम्या या पत्रांत छापल्या जात असत. मरूयामा यानें १८८८ मध्यें टोकिओ येथें एक व्यापारी पत्र सुरू केलें. १८९७ सालीं वृत्तपत्रावरील कायद्याचें दडपण बरेंच शिथिल झालें. मुद्रणस्वातंत्र्यामुळें स्वैरपणा व जहालपणा यांच्याऐवजीं नेमस्तपणा, सभ्यपणा वगैरे गुण वृत्तपत्रांत दिसूं लागले.

जपानच्या सर्व भागांत मिळून एक हजार वर्तमानपत्रें आहेत. याशिवाय मासिकें व नियतकालिकें तीन हजार आहेत. दैनिक वर्तमानपत्राच्या साधारणतः पन्नास लाख प्रती रोज निघतात व रोज खपतात. जपानांतील वृत्तपत्र हें केवळ बातमीपत्र नसून त्याच्या द्वारा सामाजिक चैतन्य उत्पन्न करण्याचें कार्य होतें. प्रत्येक वर्तमानपत्राच्या मागें एक सुसंघटित अशी रचना असते. त्याच्या गगनचुंबी इमारतींत छापखाने असून शिवाय व्याख्यानमंदिरें, विश्रांतिगृहें, संगीतगृहें, प्रदर्शनें इत्यादि असतात. अबलोन्नति, सार्वत्रिक मतदान आणि इतर शैक्षणिक, राजकीय व सामाजिक वगैरे सर्व प्रकारच्या चळवळींत वृत्तपत्रांचा भाग नाहीं असें नाहीं. टोकिओ व ओसाका येथील एकंदर वीस दैनिकांपैकीं अकरा स्वतंत्र बाण्याचीं आहेत. 'हुजूरपक्षी' वृत्तपत्रांविरुद्ध ही एकच शक्ति सध्यां जपानमध्यें लोकशाहीसाठीं झगडत आहे.

जपानांत अधिकारपदाधिष्ठित वृद्धांच्या विरुद्ध वृत्तपत्रें हें तरुणांचें हत्यार आहे. राज्यकारभार हांकणारा वर्ग व संपादक वर्ग यांत शिक्षणविषयक फरकहि असतो. सरकारी दडपशाहीला स्वतंत्र जपानी पत्रें भीत नाहींत. १९१८ च्या 'तांदुळाच्या दंग्या'च्या वेळीं या पत्रांनां सेन्सारकडून फार त्रास झाला. वृत्तपत्रासंबंधीं असलेले कडक कायदे १९२२ सालीं रद्द करण्यांत आले. 'प्रत्येक वयांत आलेल्या माणसास मत असावें' ही नुकतीच झालेली चळवळ वृत्तपत्रमंडळामार्फत चालविली जात होती. अबलोन्नतीला तर दुसऱ्या कोणत्याहि चळवळीपेक्षां वर्तमानपत्रांचेंच अत्यंत साहाय्य झालें. अनेक सामाजिक बाबतींतहि वृत्तपत्रें प्रामुख्यानें भाग

घेतात. जपानांतील वृत्तपत्रांत तीव्र स्पर्धा नित्य चालू असते. शत्रूच्या गोटांत हेर पाठवून निरनिराळी कुलंगडी चव्हाट्यावर आणण्याचे त्यांचे प्रयत्न सतत चालू असतात.

जपानचा पौराणिक इतिहास, जगदुत्पत्तिः— जपानविषयीं प्राचीन माहिती कोजिका व निहोंगी या आठव्या शतकांत लिहून ठेवलेल्या ग्रंथांवरून मिळते. त्यांत जगाच्या उत्पत्तीबद्दल असें वर्णन दिलें आहे कीं आरंभीं उंच आकाशांत ई रार्चे त्रिमूर्तिरूप स्वरूप होतें, नंतर इतर देवता उत्पन्न होऊन त्यांपैकीं दोन देवतांनीं पृथ्वी व तिजवरील देश, नंतर चंद्र, सूर्य व असुर उत्पन्न केले. पुढें सोसनू नामक देवतेनें स्वर्गामध्यें बखेडा माजविल्यामुळें तिला पाताळांत हांकलून देण्याची शिक्षा झाली. पुढें सूर्यदेवतेचा नातु सोसून जपानांत येतो व त्याचा पणतु जिम्मु टेनो हा ख्रि. पू. ६६० मध्यें जपानचा पहिला राजा राज्य करूं लागतो. हा जपानी साम्राज्याचा आरंभशक मानतात.

प्रागैतिहासिक काल.— ख्रि. पू. ६६० ते इ. स. ४०० पर्यंतचीं १०६० वर्षे हा जपानी राष्ट्राचा इतिहासपूर्वकाल होय. ह्या काळांत एकंदर २४ राजे होऊन गेले व त्यांपैकीं पहिले १७ सरासरीनें शंभर वर्षांवर जगले असें वर्णन आहे. सूर्यदेवतेचा नातु सोसून याच्या वंशजांनीं जपानमध्यें येऊन इझुमो येथें राज्य केलें असें जें म्हणतात त्याचा अर्थ मोंगोलियन लोकांनीं कोरिया द्वीपकल्पाकडून जपानवर स्वारी केली असा दिसतो; आणि पुढें निनिगो हिऊग येथील टकचिहो डोंगरावर उतरून जपानांत प्रवेश केला. या गोष्टीवरून मलायी लोकांनीं दक्षिण समुद्राकडून येऊन जपानांत प्रवेश केला असे दिसतें. जिम्मु हिऊग येथून ख्रि. पू. ६६७ मध्यें निघाला व ६६० मध्यें त्याला यामाटो येथील राजवाड्यांत राज्याभिषेक झाला. अलीकडे जुन्या थडग्यांपैकीं बरीच उकरून काढलीं आहेत व त्यांवरून महत्त्वाची माहिती उपलब्ध झालेली आहे. तथापि त्यांत खोदींव लेख मुळींच सांपडले नाहींत. जिम्मूनंतरचे जे आठ राजे झाले त्यांच्या कारकीर्दींत एकहि महत्त्वाची गोष्ट झाली नाहीं. त्या काळांत अशी एक चाल होती कीं, प्रत्येक नव्या कारकीर्दीच्या आरंभीं राजधानी बदलावयाची; पण त्यामुळें कोणत्याच राजधानीच्या ठिकाणाची मोठ्या प्रमाणांत वाढ झाली नाहीं. १० व्या बादशहाच्या कारकीर्दींत खानेसुमारी, कातड्यांवर कर बसविणें, बंदरी व्यापाऱ्याकरितां बोटी बांधणें व शेतकीकरतां तलाव, पाट खणणें हीं चार महत्त्वाचीं कामें करण्यांत आल्याचें नमूद केलें आहे. या काळानंतर ८ शतकांनीं वृत्तकारांनीं या गोष्टी लिहिलेल्या आहेत; व त्यांच्या प्रत्यंतराकरितां कोरिया व चीन यांचे इतिहास ताडून पाहतां प्रथम १२० वर्षांच्या सनावळींत चूक असल्याचें दिसून येतें. ती सोडून दिली तरी राजांच्या इतक्या लांबलांब कारकीर्दी असणें मुळींच शक्य दिसत नाहीं. त्या वेळचे बादशहा आपल्या राज्यांतून अनेकदां दौऱ्यावर जात असत; व त्यांत ठिकठिकाणीं आढळणाऱ्या सुंदर रमणी आपल्या जनानखान्यांत समाविष्ट करीत असत. त्यांच्यापासून झालेली संततीहि प्रत्येक बादशहाला पुष्कळ असे. केइको बादशहाला ( इ. स. ७१–१३० ८० ) मुलें होतीं. या गोष्टीचा राजकीय दृष्टया महत्त्वाचा परिणाम असा झाला कीं, या सर्व राजपुत्रांना योगक्षेम चालण्याकरितां जहागीरी द्याव्या लागल्या व त्यापासून देशभर जहागीरदारांचा वर्ग निर्माण झाला. या वर्गाचा जपानच्या इतिहासावर फार मोठा परिणाम झाला. सुईनिन व केइको या तीन कारकीर्दींत मिळून एकंदर तलाव व पाट ८०० बांधण्यांत आले; या काळांत बादशाही अम्मलहि बऱ्याच प्रदेशावर पसरून एकंदर १५ प्रांतांवर म्हणून एक गव्हर्नर–जनरल नेमल्याचें व प्रत्येक प्रांतावर गव्हर्नर ( मियको ) व प्रत्येक शहराला नगराध्यक्ष ( इनकी ) नेमल्याचें इ. स. १२५च्या सुमाराचें वर्णन आहे. प्रांतांच्या मर्यादा नद्यापर्वतांनीं ठरविल्या होत्या; व शहरागांवांची पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर असे रस्ते बांधून आंखणी केलेली होती. भौगोलिक नांवें मात्र कोठें दिलेलीं नाहींत.

यानंतर महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे इ स. २०० मध्यें जिंगो बादशाहिणीच्या अधिपत्याखालीं जपानी सैन्यानें कोरियावर केलेली स्वारी होय. कोरियाच्या राजानें महाराणीचें तें अफाट सैन्य पाहून भीतीनें तिच्याबरोबर तह केला व जपानचा मांडलिक राहून सतत खंडणी देण्याचें कबूल केलें. कोरियांतील दुसऱ्या दोन राजांनींहि वरीलप्रमाणें तह केले व महाराणी मोठी विजयी होऊन जपानला परत आली. या हकीगतींत कित्येक अलौकीक गोष्टी घडल्याचेंहि वर्णन आहे; तें सोडलें तरी या स्वारीबद्दल अविश्वास उत्पन्न होण्यास मोठें कारण असें आहे कीं, एकतर त्या वर्णनांत कालविपर्यासाच्या चुका फार असून दुसरें चीन, किंवा कोरिया या देशांच्या इतिहासांत या स्वारीबद्दल मुळींच उल्लेख आढळत नाहीं.

चीन देशाच्या इतिहासांत जपानबद्दलची लांबलांब वर्णनें आलेलीं आहेत. जपानी लोक फार खुजे व देशांतील हवा फार सौम्य, असें वर्णन आहे. जपानला राणीदेश म्हटलें आहे. तेथें हिंवाळ्याउन्हाळ्यांतहि भाजीपाला होतो. तेथें बैल, घोडे, वाघ, चित्ते हे प्राणी नाहींत; लोक आपआपला दर्जा दर्शविण्याकरितां निरनिराळ्या प्रकारांनीं तोंडावर व अंगावर गोंदीत असतात; पुरुष सर्व अंगभर मिळून एकच वस्त्र परिधान करतात व स्त्रिया डोक्यावरून घ्यावयाचा झगा घालतात; पुरुषांचीं हत्यारें भाले, ढाली व धनुष्यबाण हीं होत; खाण्याचें काम हातांनींच करतात; मादक दारु फार पितात; लोक दीर्घायुषी, पुष्कळ १०० वर्षे जगणारे आहेत; स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां फार जास्त आहे; वरच्या दर्जाचे लोक चारचार, पांचपांच बायका करतात, तथापि त्या सर्व सवतीमत्सर न करतां पतिव्रता राहतात; खालच्या प्रतीचे लोकहि दोनदोन, तीनतीन बायका

करतात; कायदे मोडणाऱ्यांची बायकामुलें सरकारजमा करतात; सुतक दहा दिवस पाळतात व मृताचें क्रियाकर्म करतात. मासे धरण्याचा उद्योग फार चालतो; जमीनदारी अथवा कुळवारी पद्धत आहे, इत्यादि वर्णन आढळतें. शिवाय या वृत्तग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, इ.स. १४७ ते १९० पर्यंत जपानमध्यें मोठें अन्तर्युद्ध चालू होतें, व तें शेवटीं एका राज्यधारी स्त्रीनें बंद पाडलें. ती राजस्त्री फार वृद्ध, अविवाहित व जादूमंत्र जाणणारी होती. ही राजस्त्री म्हणजेच जपानी वृत्तकारांनीं वर्णिलेली जिंगो महाराणी होय, यांत शंका नाहीं. एकंदरींत वरील चिनी वृत्तकारांचें वर्णन फार यथातथ्य आहे. मात्र गोंदण्याची चाल वर वर्णिल्याइतकी सार्वत्रिक नव्हती.

प्रागैतिहासिक कालाच्या अखेरीअखेरीस जपानी संस्कृतीमध्यें वरील वर्णनाच्या मानानें बराच फरक होत गेला होता. ३ ऱ्या शतकाच्या सुमारास जपानमध्यें नाविक कलेमध्यें बरीच सुधारणा झालेली होती. शंभर फूट लांबीचीं जहाजें लोक बांधू लागलें होतें. कोरियाबरोबरचें शत्रुत्व लयास जाऊन मित्रत्व बरेंच वाढलें होतें; जपाननें कोरियापासून लेखनकला शिकण्यास आरंभ केला होता. चिनी व कोरियन शास्त्रग्रंथांचा प्रसार करणाऱ्या कोरियनांनीं जपानांत एक मोठी वसाहत केली होती.

आ द्य ऐ ति हा सि क का ल (इ. स. ४००–६७२):— इ. स. ३५३ च्या सुमारास जपानच्या ऐतिहासिक काळास सुरुवात होते. या ऐतिहासिक काळांतला रिचू हा पहिला बादशहा होय. तो इ. स. ४०० मध्यें राज्यावर आला. या काळांत राजकारणांतील इतर पुरुषांनीं बादशहाशीं राजनिष्ठ न राहतां पुष्कळ वेळां राज्य बळकावण्याचे प्रयत्न केल्याचीं उदाहरणें आहेत. एकाच पुरुषाच्या निरनिराळ्या स्त्रियांच्या मुलांमध्यें विवाहसंबंध या काळीं होत असत. समाजामध्यें धंदेवार वर्ग किंवा जाती बनत चालल्या होत्या. सरदारांपैकीं मोठ्या प्रसिद्धीस चढलेल्या इसमांच्या हातांत बहुतेक राज्यकारभार असे. तथापि बादशहाची इच्छा ते सर्वमान्य करीत असत. न्यायकोर्टांची स्थापना झालेली नव्हती. उकळणारें पाणी किंवा तप्त धातु या दिव्यांच्या साह्यानें अपराधीनिरापराधित्व ठरवीत असत. या कालांतील युरिअकु (४५७–४७९) व मुरेत्सु (४९९–५०६) हे दोन राजे फार क्रूर होते. युरिअकु हा विकाराच्या किंवा क्रोधाच्या भरांत निर्दयपणें लोकांनां कापून टाकीत असे; व दुसरा मुरेत्सु हा जपानांतील नीरोचा अवतारच होय. याला मनुष्यप्राण्यांचे वेदनाविलाप पाहण्याची मोठी आवड असे. या काळांतहि प्रजेपासून जमीनी बळकावून त्या राजघराण्यांतील इसमांनां दिल्याचीं व शेतकऱ्यांनां त्यांचीं उपरी कुळें बनविल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. चिनी व कोरियन विद्वानांनीं जपानांत येऊन चिनी संस्कृतीचा अधिकाधिक प्रसार केला व कारागिरांनीं उद्योगधंदे सुधारिले. इ. स. ५४० च्या सुमारास ७०५३ चिनी कुटुंबें जपानांत राहात असल्याचा व त्यांच्यापैकीं एका चिनी गृहस्थाला बादशाही खजिन्याचा डिरेक्टर नेमल्याचा उल्लेख आहे. या गोष्टींवरून व जपानच्या राष्ट्रीय नोंदणीबुकांतील माहितीवरून हें निःसंशय सिद्ध होतें कीं, जपानी लोकांत चिनी व व कोरियन रक्ताची मिसळ खास आहे.

बौद्धधर्माचा प्रवेशः—या काळांतील अत्यंत विलक्षण व चिरपरिणामकारी अशी गोष्ट म्हणजे बौद्धधर्माचा जपानांत प्रवेश ही होय. हें धर्मप्रसाराचें काम खुद्द कोरियाच्या राजानें आपल्या अंगावर घेऊन जपानांत एक धर्मप्रतिनिधी, बरोबर एक बुद्धाची कांश्याची मूर्ति (ब्रॉंझ = मिश्रधातु तांबे व कथील) व कित्येक सूत्रग्रंथ देऊन पाठविला. परंतु दुर्दैवानें त्याच सालीं जपानांत प्लेगची सांथ आली; त्यामुळें या नवीन धर्माच्या आगमनामुळें जुन्या देवतांचा कोप झाला, असें दरबारांतलि जुने भाविक लोक म्हणूं लागले. अर्थात् नव्या बौद्धधर्माच्या प्रसारास तो मोठा अडथळा झाला. तथापि तो फार वर्षें टिकला नाहीं. त्यानंतर सुमारें पसतीस वर्षांनीं जपानांत पहिलें बौद्धधर्मीय देवालय बांधण्यांत येऊन त्यांत बुद्धाची एक १६ फूट उंचीची लांकडी मूर्ति बसविण्यांत आली. जपानांत नव्या बौद्धधर्माचा प्रसार तरवारीच्या जोरावर करण्यांत आला असें कित्येक म्हणतात; पण तो गैरसमज आहे. खरा प्रकार असा आहे कीं, ५८८–५९२ या सालांत जपानमध्यें राज्याबद्दल तंटा झाला; त्यांतील एका पक्षाला नव्या बौद्धधर्माचे सोम व उमयडो हे राजपुत्र होते व आपला जय झाल्यास बौद्ध देवालयें बांधण्याचा त्यांनीं नवस केला. दैवयोगानें त्यांचाच जय झाला, तेव्हां अर्थात् बौद्धधर्माचा त्यांनीं जोरांत प्रसार चालविला. ५८८ मध्यें कोरियांतून बुद्धाचे अवशेष, बौद्ध भिक्षु, कित्येक मूर्ती जपानांत पाठविण्यांत आल्या; शिवाय वैद्यक, ज्योतिष, व प्रश्नशकून जाणणारे विद्वान लोकहि पाठविण्यांत आले होते. त्याच सुमारास राजपुत्र शोटोकु हा अत्यंत विद्वान तत्त्वज्ञ होऊन गेला. या सर्वांच्या प्रयत्नानें जपानांत बौद्धधर्माचा झपाट्यानें प्रसार होऊन ६२३ च्या खानेसुमारींत ४६ बौद्ध देवालयें, ८१६ भिक्षु व ५६९ भिक्षुणी जपानांत असल्याचें आढळून आलें.

बौद्धधर्मामुळें जपानांत नवे नीतिनियम सुरू झाले, इतकेंच नव्हे तर सर्वांगीण चिनी संस्कृतीच जपानी समाजांत शिरली. सूत्रग्रंथ जपानांत असल्यामुळें बौद्धधर्माचें आद्यस्थान जपान होऊन बसलें व त्यामुळें चिनी व कोरियन विद्यार्थी जपानांत सतत येऊं लागले. त्याचा परिणाम जपानच्या प्रतिष्ठित वर्गावर होऊन ८१४ च्या खानेसुमारींत ७९६ शुद्ध जपानी घराणीं व ३८२ चिनी व कोरियनमिश्रित घराणीं असल्याचें आढळलें. शिवाय सोन्यारुप्याचे डोक्यांतील दागिने, चित्रकला, सुगंधी द्रव्यें, चिनी नृत्य व संगीत कला वगैरे अनेक नव्या गोष्टी जपानी समाजांत पसरल्या. प्रिन्स शोटोकूनें

नवा नीतिनियमग्रंथ तयार केला. तथापि राज्याबद्दल तंटे राजघराण्यांत चालू असतच. प्रिन्स फुरु बिटो याच्या उदाहरणावरून राजघराण्यांतील पुरुषांनीं सुद्धां संन्यास घेऊन मठांत शिरण्याची पद्धत पडली. पुढें कित्येक वेळां प्रधानांनीं आपल्या हातांत सत्ता कायम राहण्याकरितां राजांनां संन्यासी बनण्यास भाग पाडल्याचीं उदाहरणें आहेत. शिवाय या काळांत शकुनादिकांवरील विश्वास, जादूटोणा, चेटकें वगैरे गोष्टीहि बऱ्याच पसरल्या.

कोटोकु बादशहाच्या कारकीर्दीपासून ( ६४५ ) पुढें प्रथमच कायदे करण्यास सुरवात झाली. हा बादशहा मोठा उदार, न्यायी व विद्वानांचा चहाता होता. त्याच्याकडे वेठींची पद्धत, न्यायखात्यांतील लांचलुचपत, शेतकरीवर्गाची विपन्नावस्था, करवसुली करणारांची पैशाची अफरातफर वगैरे अनेक अन्यायांसंबंधानें तक्रारी करण्यांत आल्या. तेव्हां त्यानें राज्यकारभारांत स्पष्ट कायदे व शिस्त घालून देण्यास सुरवात केली. त्यानें लागणजमीन, शेतकरी व मालक यांची नोंद करविली. ठिकठिकाणीं पहारे, चौक्या ठेवल्या; वरिष्ठ नोकरांनां वंशपरंपरा इस्टेटी दिल्या; राजद्रोह करणाराला मुलाबाळांसुद्धां फांशीची शिक्षा ठेवली; निस्पृह व लायक लोकांनीं न्यायाधीश नेमले; दरबारांत तक्रारी अर्जांकरितां एक पेटी ठेवण्यांत आली; व अर्जांनां उत्तर लवकर न मिळाल्यास वाजविण्याकरितां एक घंटा टांगून ठेवली. प्रौढ जपानी इसमांत जमीन सारख्या प्रमाणांत सहा सहा वर्षांच्या मुदतीनें वांटून देण्याचें ठरविलें; वेठींवर मर्यादा घालण्यांत आली; मृताबरोबर सोन्यारुप्याचे जिन्नस व इतर पदार्थ पुरण्यास बंदी करण्यांत आली; थडग्याजवळ बळी देण्याच्या व आत्मघात करण्याच्या पद्धतीला आळा घालण्यांत आला. राज्यकारभाराचीं निरनिराळीं आठ खातीं करण्यांत आलीं. या बाबतींत सर्वस्वीं म्हणजे राजमंत्री, राज्यकारभाराचीं खातीं व अधिकारीवर्गाचे पोषाक सुद्धां सर्व बाबतींत चीनचें अनुकरण करण्यांत आलें. शिवाय बौद्धधर्माचा प्रसार सारखा चालू होताच. कोटोकूनंतर राज्यावर आलेली महाराणी सइमेइ हिनें त्याला अंतःकरणपूर्वक भरपूर आश्रय दिला. सूत्रग्रंथाधारें जाहीर प्रवचनें तिनें करविलीं, अनेक प्रांतांत बुद्धालयें बांधविलीं व त्यांच्या खर्चाकरितां उत्पन्न म्हणून जमीनी तोडून दिल्या.

फुजिवर लोकांचा काल( ६७२-११५५ ):— जपानच्या बखरींमध्यें ६७२ हें साल दोन कारकीर्दींमधील संधीकाल म्हणून गणलें आहे; परंतु वास्तविक त्या सालीं अराजकता माजली होती. प्रिन्स ओटोबा ( इतिहासांतील कोबुन बादशहा ) आणि प्रिन्स ओअम ( इतिहासांतील टेम्यु ) यांच्यांमध्यें भयंकर सामना होऊन त्यांत अखेर टेम्यूचा जय झाला. येथपासून पुढील चार शतकांच्या फुजिवरांचा काल असें म्हणतात व त्याचें कारण असें कीं, या सर्व काळांत फुजिवर घराण्यांतल्या लोकांच्या हातांत सर्व राज्यकारभार होता. हे लोक राजांनां आपल्या मुली देत असत व आपल्या मुलांनां राज्यकारभारांतील सर्व वरिष्ठ जागांवर नेमवीत असत. नवीन सुरू केलेल्या चिनी राज्यपद्धतींत राजाकडे मुलकी किंवा लष्करी कोणत्याच खात्यांचा प्रत्यक्ष हुकमत नसे. सर्व मुलकी अधिकार नोकरवर्गाच्या व लष्करी अधिकार सैनिकवर्गाच्या हातांत पडला. त्यांतच पूर्वीची प्रत्येक कारकीर्दीच्या आरंभीं राजधानी बदलण्याची पद्धत बंद पडून ७०९ ते ७८४ सालापर्यंत नर हीच राजधानी होती; व पुढें दहा वर्षांनीं किओटो ही कायमची राजधानी होऊन बसली. नर ऊर्फ हेइजो येथें एकंदर सात राजे झाले. त्यांच्या काळांत अनेक देवालयें व मूर्ती नवीन स्थापन झाल्या. त्यांत एक ब्राँझची मूर्ति ५३ $\frac{1}{2}$ फूट उंच होती कोटोकूच्या जमिनधारी पद्धतमुळें शेतकी सुधारण्याकडे कोणाचेंच लक्ष लागेना; म्हणून त्याऐवजीं खासगी कायम मालकीचें तत्व लागू करण्यांत आलें. या सुमारास फुजिवर घराण्यानें आपलें महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न चालविला होता. आपल्या घराण्याच्या शाखांपैकींच कोणाची तरी मुलगी राजानें विवाहाला पत्करावी असा नियमच पाडून टाकला. राजाला मुलगा झाला कीं तो आजोळीं वाढावा व तो राज्यावर आला कीं, आजोबांनीं कारभारी बनावें असा प्रकार सुरू झाला. राजा स्वतंत्र अधिकार चालवूं पाहूं लागल्यास त्यास राज्यत्याग करून मठदीक्षा घेण्यास ते लोक भाग पाडीत इतके ते अरेराव बनले.

याप्रमाणें ८ व्या व ९ व्या शतकांत किओटो राजधानींत फुजिवर घराण्यांतील लोकांच्या हातांत सर्व सत्ता एकवटली होती. पण पुढील शतकांत तैरा व मिनमॉटो या लष्करी घराण्यांकडे अनुक्रमें ती गेली; त्याचें कारण असें झालें कीं, फुजिवर घराण्यांतील लोकांचा लष्करी पेशा जाऊन ते चैनी बनले; व दूरदूरच्या प्रदेशांत लष्करी जहागीरदारांचा वर्ग बळावत जाऊन वरील दोन घराणीं विशेष प्रबल बनलीं.

तैरा व मिनमॉटो या दोन लष्करी घराण्यांत राज्याबद्दल कलह लागून त्यापायीं पुढें ४५० वर्षें जपानमध्यें बहुतेक सारखें अंतर्युद्ध चालू होतें; व त्यांत लष्करी जमीनदारी पद्धती सुरू होऊन सर्व राष्ट्राला लष्करी शिक्षण घेऊन युद्धांत पडावें लागलें. या अन्तर्युद्धांत प्रथम तैरा घराण्याचा पुढारी कियॉमॉरी याला जय मिळून तो सर्व सत्ताधीश बनला. परंतु लवकरच मिनमॉटो घराण्यांतील यॉरिटॉमो हा जपानांतील तीन अत्यंत प्रसिद्ध मुत्सद्यांपैकीं एक व लष्करी जमिनदारी पद्धतीचा संस्थापक, व दुसरा यॉशित्सुनें हा जपानांतील प्रख्यात युद्धकलाविशारद या दोघांनीं मिळून तैरा घराण्याचा ११५५ मध्यें आरमारी युद्धांत डन-नौ उर येथें पराभव करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेतली.

सरंजामदारीचा काल ( ११५५-१५९८ ):—योरिटॉमो यानें उत्तरेकडे कमकुर येथें राजधानीला व सर्व प्रांतांवर

लष्करी गव्हर्नर नेमून पूर्वीच्या दक्षिणेकडून चालू असलेल्या मुलकी सत्तेऐवजी उत्तरेकडून लष्करी सत्ता सर्व देशभर सुरू केली. तथापि योरिटोमोनें पूर्वीच्या किओटो येथील राज्यसत्तेस व दरबारी वर्गास कायम राखून स्वतः बादशहाचा प्रतिनिधि म्हणून व प्रत्येक कृत्याला प्रथम नामधारी राजाची सम्मती मिळवून राज्यकारभार चालविला होता. योरिटोमो याच्या मृत्यूनंतर (११९८) मान कियोटो येथील फुजिवर घराण्याच्या वेळेसारखा प्रकार सुरू झाला. योरिटोमोची बायको मस ही होजो घराण्यांतील होती. तिच्या मुलाकडे प्रतिनिधीचा ऊर्फ शोगुनचा अधिकार नांवापुरता राहून प्रत्यक्ष सत्ता होजो घराण्यांतील पुरुषांच्या हातीं गेली. १२२० ते १३०८ पर्यंत असे ५।६ नामधारी शोगुन झाले. मध्यंतरीं १२२१ मध्यें गो-टोब या माजी बादशहानें कमकुर येथील होजोंची सत्ता नष्ट करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसून गो-टोब यासच भिक्षूची दिक्षा देण्यांत आली; व बादशाही गादीचे वारस व त्याची मुदत ठरविणें वगैरे अधिकार होजो घराण्याच्या हातांत पूर्णपणें गेले. होजो घराण्याचा त्या वेळचा पुढारी योशिटोकी यानें आपला भाऊ टोकिफुस यास किओटोचा लष्करी गव्हर्नर नेमलें. गेल्या बंडांतील राजपक्षाच्या सुमारें ३००० लोकांच्या मालमत्ता खालसा केल्या व आपल्या पक्षांतील लोकांत वांटून दिल्या. यामुळें लष्करी जमिनदारी पद्धत दृढमूल झाली होजो घराण्यांतील पहिले प्रतिनिधी मोठे हुषार व न्यायी होते; त्यामुळें १३ वें शतक जपानला मोठें उत्कर्षाचें गेलें. परंतु पुढील प्रतिनिधी चैनी व व्यसनी बनले. त्यावेळीं अशी एक पद्धत होती कीं, सुकाळांत सरकारी कोठारें धान्यानें भरून ठेवून दुष्काळांत तें धान्य अत्यंत स्वस्त दरानें विकावयाचें; पण एका दुष्काळप्रसंगीं टकसुके नांवाच्या होजो प्रतिनिधीनें अत्यंत महाग विकून मिळविलेल्या पैशावर स्वतःची खूप चैन चालविली. तेव्हां होजो घराण्यावद्दल अप्रीति उत्पन्न होऊन पूर्वीच्या फुजिवर व तैरा या घराण्याप्रमाणें तेंहि अधिकारच्युत झालें; व त्या वेळचा गो-डैगो राजा खरा सत्ताधीश झाला.

तथापि गो-डैगो हा हुषार राजा नव्हता. त्यानें अशिकगघराण्यांतील तकौजीशीं तंटा केला तेव्हां तकौजीनें गो डैगोस पदच्युत करून कोयोला गादीवर बसविलें (१३६-१३४८) व तकौजी शोगुन झाला. तथापि गो-डैगोच्या वंशजांनीं दक्षिणेकडे योशिनो येथें राजधानी नेऊन राज्यकारभार चालविला; व उत्तरेकडे कोयो व त्याचे वंशज किओटो येथें राहून राज्य करूं लागले. पुढें अशिकग घराण्यांतील योशिमित्सु या बलाढ्य शोगुननें वरील दोन राजघराण्यांतला तंटा मिटविला; चांचे लोकांचा बंदोबस्त केला व चीनशीं सख्य घडवून आणलें व पर्यायानें चिनचें सार्वभौमत्व कबूल केलें. पुढें योशिमित्सूच्या पश्चात् पुनः बेबंदशाही माजली. जमीनदार लोक आपसांत लढूं लागले शोगुनचा अधिकार प्राप्त करून घेण्याकरितां अशिकग घराण्यांतील पुरुषांत मारामाऱ्या झाल्या व दरबारचा खजिना, करवसुली बंद पडल्यामुळें रिकामा झाला. तो इतका कीं गो-त्सुची बादशहा मरण पावला (१५००) तेव्हां त्याच्या अंत्यविधीच्या खर्चास पैसा नसल्यामुळें त्याचें प्रेत चाळीस दिवस पडून राहिलें होतें.

याप्रमाणें मधूनमधून अंदाधुंदी चालू होती, तरी जपानांत बौद्धधर्माचा प्रसार व परिणाम वाढतच होता. या सुमारास कोबो नांवाच्या अत्यंत प्रसिद्ध बौद्ध साधु होऊन गेला. त्याचा यमटोमधील कोयतनवरील मठ ह्रियेइ-झनप्रमाणेंच फार प्रसिद्ध आहे. अशा मठांनां मोठाल्या इनाम जमिनी दिलेल्या असत. या मठांत राजपुरुषहि येऊन भिक्षू होऊन रहात असत; पण तेथेंहि ते राजकारणांतील उलाढाली चालू ठेवीत. यामुळें मठांनां भलतेंच राजकीय महत्व प्राप्त झालें होतें. तैरा घराण्यांतील कियोमोरी व मिनमोटो घराण्यांतील योरिटोमो यांनीं असल्या मठांवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न केला पण तो साधला नाहीं. याप्रमाणें १५ व्या व १६ व्या शतकांत चालू असलेला मठांतील, राजघराण्यांतील व लष्करी जमीनदारांतील गोंधळ नाहींसा करून शांतता व सुव्यवस्था चालू करण्याचें काम मानवी कर्तृत्वाच्या बाहेरचें आहे असें वाटूं लागलें होतें. परंतु परिस्थिति जरूरीप्रमाणें माणसें निर्माण करते असें म्हणतात तें खरें आहे. कारण वरील उद्वेगजनक स्थितींत जपानमध्येंहि अत्यंत मोठें युद्धनायक व मुत्सद्दी उदयास आले. ते ओद नोबुनागा, हिदेयोशी आणि टोकुगावा इयेयसु हे तिघे होत. त्यांपैकीं हिदेयोशी हा तर गरीब शेतकऱ्याचा मुलगा होता. तरी स्वतः तरवारबहाद्दर व कारस्थानकुशल असल्यामुळें शेवटीं तो सर्व सत्ताधीश झाला. नोबुनागा हा लहानसा जमीनदार होता. त्याच्या लवाजम्यांत हिदेयोशी हा प्रथम नोकरीस राहिला. त्याच्या मदतीनेंच नोबुनागानें पंचवीस वर्षांत सहा प्रांत आपल्या जहागिरींत सामील केले. त्यामुळें त्याची खासगी सेनाहि पुष्कळ वाढली. तेव्हां खुद्द बादशहानें त्याला देशांत सर्वत्र शांतता स्थापन करण्यास विनंति केली. तें काम करीत असतां कोणी फितुरी मनुष्यानें तरवार चालवून नोबुनागाचा प्राण घेतला. त्याच्यामागें जपानी साम्राज्यांत हिदेयोशी हाच प्रसिद्धीस चढला. त्याच्या बरोबरीचा दुसरा इसम टोकुगावा इयेयसु हा एकच होता. नोबुनागाच्या जहागिरीबद्दल त्याच्या मुलांत तंटा लागला. तेव्हां हिदेयोशीनें वडील नातवाची कायदेशीर बाजू पत्करून इयेयसूनें उचललेल्या दुसऱ्या पक्षाशीं लढाई सुरू केली. परंतु दोघे समबल ठरून उभयतांनीं शहाणपणानें युद्ध बंद केलें इतकेंच नव्हे. तर परस्परांनीं शरीरसंबंध जोडून कायमचें सख्य केलें. हिदेयोशीला मिकाडो राजानें कारभारी नेमलें, त्यामुळें तो सर्व सत्ताधीश बनला. त्याच सुमारास किऊशिऊ बेटांतील लष्करी जमीनदार प्रमुखांनीं (डेम्योनी) उभारलेलें बंड हिदेयोशीनें अत्यंत मोठें सैन्य बरोबर नेऊन पण

सैन्याच्या सामर्थ्यापेक्षांहि शहाणपणानें व दयाळूपणानें मोडलें;त्यामुळें हिदेयोशी तत्कालीन मुत्सद्यांत सर्वश्रेष्ठ ठरला. याप्रमाणें बहुतेक जपानवर हिदेयोशीनें आपला अम्मल बस विला. परंतु उत्तरेकडील प्रदेश, किल्ले, तटबंदी इत्यादिकांनीं फार मजबूत बनलेला होता. तेथील बलाढ्य जमीनदार उजिमस यास जिंकण्याकरितां हिदेयोशी १५९० मध्यें स्वतःचें १७०००० सैन्य आणि नोनुओ व इयेयसु यांचें ८०००० सैन्य यांसह चालून गेला व पूर्वींच्या अनेक स्वाऱ्यांप्रमाणेंच यशस्वी होऊन परत आला. याप्रमाणें सर्व जपानवर एकमुखी राज्यसत्ता सुरू झाली; पण टोकुगावा इयेयसु याला क्वंटोकडील आठ प्रांतांवर राज्य करण्याकरितां येदो येथें नेमण्यांत आलें. याप्रमाणें पूर्वींच्या कालांतील सर्व अंदाधुंदी मोडून सर्वत्र सुव्यवस्थित राज्यकारभार चालू करण्याचें श्रेय वरील दोन महान व्यक्तींकडे आहे. हिदेयोशीनें अखेरच्या आठ वर्षांत कोरियांतून खुद्द चीनवर स्वारी करण्याचे प्रयत्न चालविले होते. तो १५९८ मध्यें मरण पावला

टोकुगावा घराण्याचा काल (१५९८–१८६७):— हिदेयोशी मरण पावला त्यावेळीं त्याच एक ६ वर्षांचा मुलगा होता. त्या अल्पवयी मुलाची व राज्यकारभाराची व्यवस्था पाहण्याकरितां त्यानें एक कारभारी मंडळ नेमलें होतें. त्यांत टोकुगावा इयेयसु हा मुख्य होता;पण त्याला इशिद मित्सुनरी व त्याचे अनुयायी हे बलिष्ठ शत्रू होते. या शत्रूंशीं इयेयसूनें तयारी करून मिनोप्रांतांतील सेकिगहर येथें २१ आक्टोबर स. १६०० रोजीं लढाई दिली. व तींत इयेयसूला पूर्ण जय मिळाला. मित्सुनरीनें हिदेयोशीचा मुलगा हिदेयोरि व बायको योदो यांच्याशीं सख्य जमविलें होतें, पण इयेयसूनें त्यांनां शत्रूला मिळण्याचा अपराध माफच केला. सेकिगहरनंतर १६१५मध्यें ओसाका येथें मोठी लढाई झाली त्यांत हिदेयोशीची बायको व मुलगा तीं दोघेंहि गतप्राण झाली, ती लढाई १२शें ते १७शेपर्यंत चालू राहिलेल्या अन्तर्युद्धांतील शेवटची होय तथापि सेकिगहरच्या जयापासूनच जपानच्या इतिहासाला नवी दिशा लागली;व म्हणून ती जगाच्या इतिहासांतील क्रांतिकारक लढायांपैकीं एक होय. यानंतर १८६४ पर्यंत जपानांत केव्हांहि अन्तर्युद्ध उद्भवलें नाहीं.

टोकुगावा इयेयसूनें मिळविलेल्या विजयाबद्दल त्याची प्रसिद्धि आहेच. परंतु त्यापेक्षांहि जिंकलेल्या मुलखाचें एकीकरण करण्यामध्यें दाखविलेल्या चातुर्यामुळें तो पूर्वीं होऊन गेलेल्या सर्व मुत्सद्यांमध्यें अग्रणी ठरला. त्याच्या जहागिऱ्या सर्व देशभर पसरलेल्या असल्यामुळें सर्व ठिकाणच्या डैम्योवर त्याला नजर ठेवून त्यांस दाबांत ठेवण्यास सोपें गेलें. जपानमध्यें शांतता राखून भरभराट करण्याकरतां इयेयसू व त्याचे वंशज यांनीं पुष्कळ चांगल्या सुधारणा केल्या. त्या बद्दलची सर्व माहिती (टेस्टामेंट ऑफ इयेयसू) इयेयसूचा करारनामा (मृत्युपत्र) नांवाच्या ग्रंथांत आढळते. हा ग्रंथ इयेयसूचा नातु इयेमित्सु (१६२३—१६५०) याच्या कारकीर्दीत पुरा करण्यांत आला. टोकुगावा इयेयसूनें बौद्धधर्माच्या कार्यास जरी सढळ हातानें मदत केली होती आणि बुद्धाची एक लहानशी मूर्ति सतत हृदयाशीं बाळगली होती तरी त्यांनें आपलें नीतिनियमांचें कोड कॉन्फुशियसबरूनच तयार केले होते. इयेयसूचे असें मत असें कीं, सर्व कायदे कानू व राज्यकारभार करणें तें राजा व प्रजा, आईबाप व मुलें, नवरा व बायको, भाऊ व बहीण आणि मित्र व मित्र ही समाजांतील पांच प्रकारचीं नातीं लक्षांत घेऊन करावयास पाहिजे. कुटुंब हा सर्व समाजाचा पाया होय. यावरील नीतिनियमांव्यतिरिक्त लोकांनां अधिक कशाचें शिक्षण देण्याची जरूरी नाहीं. करारनाम्यामधील एकंदर १०० प्रकरणांपैकीं २२ प्रकरणांत कायद्याचे नियम दिलेले आहेत; ५५ प्रकरणांत राज्यकारभार व राजनिति यांची माहिती आहे. १६ व्या मध्यें नीतिवचनें दिलेलीं असून उरलेल्या प्रकरणांत ग्रंथकर्त्याच्या चरित्रांतील उदाहरणात्मक गोष्टी दिलेल्या आहेत.

लष्करी जमीनदारीच्या पद्धतीमुळें जपानी समाजात तीन वर्ग उत्पन्न झाले होते. (१) राजा व त्याचे दरबारी मानकरी, (२) सरदार (सामुराई अथवा बुके), (३) सामान्य लोक (हेइमिन). सर्वांवरील श्रेष्ठ मिकाडो राजे यांची मूळ उत्पत्ती देवापासून असल्यामुळें त्यांनीं समाजापासून अगदीं अलिप्त किओटो येथील राजवाड्यांत राहावयाचें आणि शोगुन व सामुराई यांजवर सर्व कारभार सोंपवून आपण स्वतः आपली प्रजा व प्राचीन पूर्वज यांच्यामध्यें मध्यस्थाचें काम करावयाचें असे. ते आपल्या राण्या व प्रधान यांच्याशिवाय इतर कोणाच्याहि दृष्टीस पडत नसत. त्यांनां तांदुळाचें दहा हजार कोकू (गिनी) वर्षासन मिळत असे. राजाला एक कोगो म्हणजे राणी असे व दुसऱ्या बारापर्यंत करण्याची परवानगी असे. कुगे उर्फ दरबारी मानकरी हे मूळ मिकाडो राजघराण्यांतील वंशज असून त्यांचीं १५५ कुटुंबें होतीं. लष्करी सरदारांपेक्षां व शोगुनपेक्षांहि त्यांचा दर्जा फार उच्च असे. त्यांनां दरबारांतील सर्व मानाच्या जागा वंशपरंपरेनें मिळत असत. तथापि त्यांनां जहागिरी नसल्यामुळें दारिद्र्यांतच पण छानछुकीनें रहावें लागत असे वाङ्मयाभ्यास, गायन व इतर कला या व्यवसायांत ते आपला काल घालवीत असत. यांच्या खालचा वर्ग सामुराई उर्फ लष्करी पेशाच्या कुटुंबांचा. त्यांनां वंशपरंपरा सरंजाम दिलेला असे, शिवाय राज्यकारभारांतील मोठयाला जगांवर त्यांनां नेमीत असत. त्या नोकऱ्याहि वंशपरंपरा असत. तिसरा वर्ग सामान्य लोकांचा. समाजांत त्यांनां कांहीं दर्जा नसे, तरवारी वापरण्याची त्यांनां मनाई असे, त्यांनां आयतें उत्पन्न नसे, सर्व कष्ट करून मिळवावें लागे. १००० लोकसंख्येंत ५५ सामुराई असत.

जपानी जनतेंत सामुराई हा सर्वांत महत्त्वाचा वर्ग होय. या वर्गांतले इसम तरवार वापरण्याच्या हक्काला अत्यंत

उच्च प्रकारचा हक्क समजतात. आपला देश, राजा किंवा जहागीर यांचे संरक्षक आपण आहों. असें ते मानतात; व त्याकरितां जीवावर उदार होऊन लढण्यास ते सतत तयार असतात ते आपलें बहुतेक लक्ष्य लष्करी शिक्षणाकडे देतात पण ग्रंथाध्ययनालाहि पुष्कळ महत्त्व देतात. राजाच्या खालोखाल ते मातापितरांनां पूज्य मानतात, व त्यांनां दुःख देणारांचा सूड घेतल्याशिवाय ते कधींहि राहावयाचे नाहींत. लढाईंत जय किंवा धारातीर्थी मरण असा त्यांचा निश्चय असल्यामुळें शत्रूला शरण जाणें किंवा शरणागत शत्रूला अभय देणें, यापैकीं कोणतीहि गोष्ट ते करीत नाहींत. तथापि तसा प्रसंग नसेल तेव्हां शत्रूंशींहि ते अत्यंत उदारपणें व सौजन्यानें वागतात.

पण टोकुगावाच्या शांततापूर्ण कारकीर्दींत सामुराइ ऊर्फ लढवय्ये लोक यांच्याहि सवई बदलत गेल्या. युद्धाचे प्रसंगच नसल्यामुळें हा लष्करी वर्ग लोकांनां अनवश्यक वाटूं लागला. बौद्ध भिक्षूंची वागणूकहि शिथिल व अनीतीची होऊं लागली. उमराव लोक तर चहापार्ट्या, कवनें, पोलो, फुटबॉल, तिरंदाजी, जुगार वगैरे चैनींत दंग होते. सामान्य लोकांनां त्यांचा हेवा उत्पन्न होऊन त्यांनीं स्वतःकरितां नाटकगृहें स्थापून नाचतमाशे सुरू केले; पोशाखाची ऐट चालविली, मल्लविद्येचा शोक वाढविला, व पूर्वीचे जातीनिर्बंध झुगारून देऊन धनिकसत्ताक पद्धति सुरू केली. अशा प्रकारची सामाजिक क्रांति चालू होती, त्याच वेळीं राजकीय क्रांति अशी झाली कीं, इयेयसूच्या घराण्यांतील शोगुनांची सत्ताहि दुर्बल होऊन खालच्या वर्गांतील सकैटकियो यानें सत्ता बळकावली. यामुळें किओटो येथील बादशहा व शोगुन हे दोघेहि नामधारी सत्ताधीश बनले; व लष्करी लोक निस्तेज होऊन सामान्य लोक अधिकारारूढ झाले. तसेंच १७ व्या शतकाच्या शेवटीं मिटो परगण्यामध्यें कांहीं विद्वान उदयास आले, त्यांनीं बौद्धधर्म व चिनी वाङ्मय यांविरुद्ध बंड करून राष्ट्रीयदृष्ट्या जपानच्या तद्देश्य वृत्तग्रंथांकडे लोकांचें लक्ष्य ओढलें. तेव्हां त्या ग्रंथांवरून शोगुन यांनीं राजाचा अधिकार बळकावला असल्याचें लोकांच्या नजरेस आणलें. व तात्विकदृष्ट्या द्विदलपद्धति नष्ट करून बादशहाला सर्व सत्ताधीश बनविण्याविषयीं विद्वानांची बुद्धि जागृत झाली. पण याची प्रत्यक्ष प्रतीति १९ व्या शतकांत परकीयांचीं जहाजें व त्यांच्या दळणवळणाचा प्रश्न यांस शोगुनाचा प्रतिकार करतां न आल्यामुळें आली. याशिवाय शोगुनांची सत्ता नष्ट करण्यास सत्सुम व चोशी या दोन घराण्यांचें वैमनस्यहि कारणीभूत झालें; आणि परकीयांच्या दळणवळणाचा महत्त्वाचा प्रश्न राष्ट्रापुढें आला त्यावेळीं परकीयांची हकालपट्टी व बादशहाची पुनः सत्ता या गोष्टीचा पक्ष त्यांनीं उचलला. परकीयांच्या हकालपट्टीच्या बाबतींत परकीय आरमारानें जेव्हां चोशू किल्ले व सत्सुमाची राजधानी तोफांच्या माऱ्यानें उध्वस्त केली त्यावेळीं त्यांचे डोळे उघडले; परंतु त्याबरोबरच द्विदलपद्धती बंद करून बादशहाला सर्व सत्ताधीश बनविण्यासंबंधानें सर्व राष्ट्राचें एकमत झालें.

१८६७ मधील विलक्षण क्रांति.—१८६६ मध्यें केइकी उर्फ योशिनोबु नांवाचा शेवटचा इसम शोगुनच्या अधिकारावर होता. केइकी स्वतः प्रगल्भ बुद्धीचा व मोठा कर्तृत्ववान होता. इतर बुद्धिमान जपानी इसमांप्रमाणें त्याचीहि लवकरच खात्री झाली कीं, परकीयांनां जपानांत सर्वस्वी मज्जाव करणें हें पाश्चिमात्यांच्या तोडीचें सुधारलेलें लष्कर व आरमार जपानजवळ असल्याशिवाय शक्य नाहीं; व तसेंच किओटो व येदो या दोन ठिकाणीं राजकीय सत्ता विभागलेली असेपर्यंत सर्व राष्ट्राची एकी होणें शक्य नाहीं. याच सुमारास त्याला येदोकडून जाहिर विनंती अर्ज करण्यांत आला कीं येदो येथील दरबारांत अव्यवस्था माजली आहे व ती मोडून सर्व राष्ट्र एकजीव व प्रबळ करण्याकरितां बादशहाच्या हातीं सर्व सत्ता देणें जरूर आहे. हा अर्ज किओटो येथें हातीं पडतांच केइकीनें साम्राज्याच्या राजधानींत सर्व लष्करी व बडे अम्मलदार यांची सभा बोलावली व त्या सभेंत सर्वांसमक्ष आपला राजीनामा बादशहापुढें सादर केला. ही गोष्ट १८६७ आक्टोबर १४ रोजीं घडली, आणि ह्या गोष्टीचा जगाच्या इतिहासांतील असामान्य गोष्टींमध्यें समावेश केला पाहिजे; कारण सुमारें तीन शतकें अप्रतिहतपणें संपूर्ण राजसत्ता उपभोगीत असणारांनीं ती स्वखुषीनें सोडून दिल्याचें हें अपूर्व उदाहरण आहे. वरील शोगुननें आपला राजीनामा मनापासून निष्कपटबुद्धीनें दिला होता, व तो जर निःसंशयवृत्तीनें स्वीकारला गेला असतां तर ही क्रांति पूर्णपणें रक्तपातावांचून शांततेनें पार पडली असती. पण केइकीचे प्रतिस्पर्धी सत्सुम व चोश यांनीं त्या वेळच्या १५ वर्षांच्या अल्पवयी बादशहाचे कान भारून शोगुनला शत्रू मानून त्याचा नाश करण्याचा बादशहाच्या सहीचा परवाना मिळविला. तसेंच शोगुनच्या पक्षाचे सर्व सरकारी नोकर अधिकारावरून दूर करण्यांत आले व शोगुनच्या लष्कराचा राजवाड्यावरील पहाराहि काढून टाकण्यांत आला. या कृत्यामुळें शोगुनचे सर्व पक्षपाती लोक खवळून जाऊन त्यांनीं किओटोवर चाल केली, पण बादशाही सेनेनें त्यांचा मोड केला, व केइकी स्वतः त्या सैन्याच्या हातीं गेला. येदो येथील दरबारी लोकांनींहि आपल्या पदव्या व अधिकार सोडून दिले. पण शोगुनच्या अनुयायांनीं सशस्त्र प्रयत्न चालूच ठेविले होते, त्याच्या आरमारानें येझो बेटांत स्वतंत्र लोकशाही स्थापण्याचा प्रयत्न केला. परंतु लवकरच ही सर्व वावटळ बंद होऊन द्विदलपद्धती मोडली व सरंजामीपद्धति हळूहळू नाहींशी होत गेली; आणि एकसूत्री राजसत्ता सुरू झाली. याप्रमाणें सुमारें पांच वर्षें चालत आलेली अंतस्थ बंडाळी अवघ्या पांच आठवड्यांत मोडून थोडी प्राणहानी व मालमत्तेची नासाडी होऊन ही राज्यक्रांति तडीस गेली; व

येणेंप्रमाणें ही जपानच्या इतिहासांतील अत्यंत अद्भुत व परिणामकारक गोष्ट घडून आली.

क्रांतीचें स्वरूप.—वरील राज्यक्रांतीचा उद्देश जरी बादशाही सत्तेची पुनःस्थापना करण्याचा असला तरी ज्या लोकांनीं ती घडवून आणली ते सर्वस्वी लोकसत्तावादि होते. ते सरकारांतील किंवा समाजांतील उच्च दर्जाचे लोक नव्हते. हा मुद्दा पुढील परिणामांच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. येदो येथील सत्ता अवघ्या पंचावन लोकांनीं उलथून पाडली व त्यांतले पांचच फक्त जमीनदार मानकरी होते. आठ दरबारी मानकरी होते, पण त्यांचा विशिष्ट दर्जा, दारिद्र्य व राजकीयदृष्ट्या अत्यल्प महत्त्व, त्यांच्यामधील परंपरागत चालत आलेले दोष त्यांनां नडत होते; आणि बाकीचे बेचाळीस ज्यांनीं ही क्रांतीची चळवळ करण्याचे ठरवून ती घडवून आणली ते बेचाळीस इसम महत्त्वाकांक्षी तरुण असून त्यांचा मुख्य उद्देश स्वतः नावारूपास यावें हा होता व त्यांत देशाचें कल्याण करणें हा भाग गौण होता. त्या सर्वांच्या वयाची सरासरी पाहिली तर ती तिसाच्यावर नव्हती.

पुन्हा राज्यस्थापना करणाऱ्या ( रेस्टोरेशनच्या ) प्रवर्तकांनीं असें ठरविलें कीं बादशहाच्या हातांत पुनः अधिकारसूत्रें येतांच त्यानें पुढील तीन गोष्टी ताबडतोब करण्याचें प्रतिज्ञापूर्वक जाहीर करावें; त्या गोष्टीः—( १ ) चर्चामंडळ मंडळाची सभा ( डेलिबेरेटिव्ह असेंब्ली ) भरविणें. ( २ ) राज्यकारभारांतील जागांवर सामाजिक दर्जाकडे न पाहतां हुशार व विद्वान लोक नेमणें, ( ३ ) लोकमतानुसार सर्व कारभार चालविणें.

या क्रांतीनंतर वरील आश्वासनाचा 'बादशहाची प्रतिज्ञा' म्हणून अनेकदां उल्लेख करण्यांत आलेला आहे; आणि जपानांत प्रातिनिधीक संस्था वरील आश्वासनानुसारच स्थापण्यांत आल्या असें म्हणतात; तरी वास्तविक पाहतां कोणत्याहि एका घराण्याच्या हातीं सर्व राजकीय सत्ता जाऊं नये हा मूळ वरील आश्वासनाचा उद्देश होता.

नवीन राज्यपद्धती स्थापन करूं पहाणाऱ्या पुढाऱ्यांनां जुनी सरंजामी पद्धति नाहींशी केली पाहिजे याची जरूरी प्रथम तितकी भासली नाहीं. एकराष्ट्रीकरण एवढीच त्याची मूळ कल्पना होती. परंतु निरनिराळ्या जमीनदाऱ्यांत निरनिराळ्या चालू असलेल्या कायदेव्यवस्था नाहींशा करून सर्व देशभर एकजातीय कायदे व कारभार सुरू केल्याशिवाय खरी राष्ट्रीय एकी होणार नाहीं, ही गोष्ट थोड्याशा अनुभवांतीं त्यांनां कळून आली. याकरिता सर्व लष्करी जहागीरदारांच्या हातून स्थानिक कारभाराचे अधिकार व जमाखर्चावरील ताबा काढून घेणें जरूर होतें. परंतु आजपर्यंत करवसूली स्वतः करून लष्कर बाळगून स्वतंत्रवृत्तीनें राहत आलेल्या या जमीनदारांनां अधिकारभ्रष्ट करण्याचें काम अत्यंत बिकट होतें. त्यांच्या मानानें राज्यक्रांतिकारकांनां कोणत्याहि प्रकारचें परंपरागत महत्त्व किंवा अधिकार नव्हते. त्यामुळें बादशहाचे हुकूम अमलांत आणण्याचें त्याच्यांत सामर्थ्य नव्हतें. उलटपक्षीं कोणत्याहि एका लष्करी घराण्यानें तें काम उचलल्यास इतर घराण्यांनीं त्याविरुद्ध जोराची ओरड केली असती. अशा या पेचातून सुटण्याकरितां या तरुण सुधारणावाद्यांनीं मोठी खुबीदार युक्ति काढली. त्यांनीं सत्सुम, चोशू, तौस व हिझेन या दक्षिणेकडील चार प्रमुख घराण्यांचें मन वळवून त्यांनां आपलीं संस्थानें बादशहाच्या चरणीं परत सादर करण्यास व त्यांचा सर्व कारभार बादशहानें हातीं घेण्याची विनंती करण्यास प्रवृत्त केलें. सत्सुमसंस्थानचा अधिकारी शिमझु व तोससंस्थानचा योदो या दोघांच्या हातांत फार मोठी स्वतंत्र सत्ता होती, व ती सोडण्यानें त्यांनीं अत्यंत प्रशंसनीय स्वार्थत्याग केलेला आहे यांत शंका नाहीं. पण चोशू, हिझेन व इतर संस्थानिकांनीं बहुतेक अधिकार निरनिराळ्या कर्त्या कुलपुरुषाकडे सोपविलेले असल्यामुळें आतां तेच अधिकार परत बादशहाच्या हवालीं करण्यांत त्यांचा कांहीं तोटा नव्हता व म्हणून त्याला स्वार्थत्याग म्हणता येत नाहीं; व स्वतःचें वास्तविक नुकसान नसल्यामुळें वरील चार संस्थानिकांचें अनुकरण २५० पैकीं बहुतेकांनीं निमूटपणें केलें; फक्त त्यापैकीं १७ संस्थानिकांनीं थोडेंसें कांकूं केलें.

नूतन सुधारणाः— नवीन राज्यव्यस्थेमध्ये जुन्या संस्थानिकांनां प्रांताप्रांतावर नेमण्यांत येऊन त्यांनां पूर्वीच्या त्यांच्या उत्पन्नाच्या ३० इतका पगार ठरविण्यांत आला. सामुराई लोकांनांहि त्यांच्या हाताखालीं अधिकाराच्या पगारी जागा देण्यांत आल्या. प्रांतोप्रांतीं करवसुली करून त्यांतून वरील खर्च भागवून उरलेली रक्कम बादशाही खजिन्यांत पावती करावी असें ठरविण्यांत आलें. सर्वांवर सत्ता चालविणारें किओटो येथें क्रांतिकारक पुढाऱ्यांचें एक मंत्रिमंडळ स्थापण्यांत आलें. दरबारी मानकरी व लष्करी मानकरी असले भेद नष्ट करण्यांत आले.

राजसत्ताक पद्धतीच्या दृष्टीनें नव्या व्यवस्थेंत असणारे दोष लवकरच निदर्शनास येऊं लागले. या व्यवस्थेनें बादशहाच्या हातांत खजिन्यावरील किंवा लष्करावरील कोणतीच सत्ता प्रत्यक्ष आली नाहीं. प्रांतोप्रांतीं कर वसूल करणें व लष्कर बाळगणें पूर्वीप्रमाणें हल्लींच्या गव्हर्नर संस्थानिकांच्याच हातीं राहिलें. तेव्हां हा दोष नष्ट करण्याकरतां क्रांतिकारक पुढाऱ्यांनीं सर्व प्रांतिक अधिकारी आपआपले स्थानिक अधिकार बादशहाकडे सोंपवितील अशी युक्ति केली व सामुराई लोकहि शस्त्र खालीं ठेवतील, असें करण्यांत आलें. हीं तत्त्वें राष्ट्राच्या अंगवळणीं पडत आहेत तों दुसऱ्या सुधारणांच्या योजना चालूच होत्या. सत्सुमघराण्याच्या माजी संस्थानिकाची त्याच्या संस्थानि प्रजेला क्रांतीमधील कामगिरीची

योग्य मोबदला न मिळाल्याबद्दल गैरमर्जी झालेली असल्यामुळें त्याला संतुष्ट करण्याकरितां त्यास व चोशू व टोस यांच्या माजी संस्थानिकांनांहि उच्च मंत्रीपदावर नेमण्यांत आलें. येणेंकरून प्रत्येक मोठाल्या कुलातर्फे मंत्रिमंडळामध्यें तीनतीन इसम आले. तसेंच टोकिओ येथें आतां नवीन स्थापना झालेल्या राजधानीस राष्ट्रीय सैन्य बनविण्याकरितां सर्व कुलांनीं आपआपलें स्थानिक लष्कर धाडून देण्याविषयीं त्यांचें मन वळविण्यांत आलें. वरील बाबी फार महत्त्वाच्या आहेत. कारण कुलवार प्रतिनिधीचें जें तत्व १८७१ च्या मंत्रिमंडळांत दिसून आलें, तेंच पुढें अनेक वर्षें अमलांत होतें, व याच तत्त्वांवर पुढें निरनिराळया पक्षांच्या राजकारणी पुरुषांनीं विशेष हल्ले चढाविले.

२९ आगस्ट स. १८७१ रोजीं बादशहाच्या हुकुमानें स्थानिक अधिकाऱ्यांच्या हातांतील सर्व सत्ता काढून घेण्यांत आली गव्हर्नराच्या जागेवरून सर्व संस्थानिकांस काढून टाकण्यांत आलें. संस्थानांतील करांचें सर्व उत्पन्न बादशाही खजिन्यांत भरणा करण्याचें ठरलें. सर्व अधिकारी बादशहानें नेमावयाचे, व सर्व संस्थानिकांनीं मूळ उत्पन्नाच्या एक दशांश जहागीर घेऊन टोकिओ येथें येऊन कायम राहावें असेंहि ठरलें. सामुराई लोकांचीं उत्पन्नें मात्र कायम ठेवण्यांत आलीं. असे लोक सुमारें ४,००,००० होते व त्यांच्या इनामाची रक्कम दरसाल २०,००,००० पौंड असे. हें राष्ट्रावरील ओझें आतां दूर करणें जरूर होतें. सामुराई लोक म्हणजे लष्करी जहागीर पद्धतीपैकींच एक भाग होता. ती पद्धत आतां मोडली तेव्हां सामुराई लोकांचा वर्गहि नष्ट होणें ओघानेंच प्राप्त झालें. परंतु लक्षावधि लोकांचीं उत्पन्नें एकदम बंद करणें अत्यंत निर्दयपणाचें झालें असतें. म्हणून सरकारनें तो प्रश्न लांबणीवर टाकून कालांतरानें सोडविण्याचें ठरलें.

सा मु रा ई लो कां चा स्वा र्थ त्या गः—सामुराई लोकांच्या प्रश्नासंबंधानेंहि हळूहळू लोकमत बनत चाललें होतें. सर्व इनामें सोडून देऊन स्वकष्टानें पोटाला मिळविणाऱ्या सामान्य लोकांची स्थिति त्यांनीं पत्करणें भाग आहे, असें स्पष्ट दिसूं लागलें. सामुराई लोकांनींहि ही कालक्रमप्राप्त आपत्ति मुकाटयानें सोसण्याचें ठरविलें. सामुराई लोक म्हणजे मोठा हक्कदारांचा वर्ग होता. ते हक्क त्यांनीं शेंकडों वर्षें स्वतःचें रक्त सांडून पैदा केले होते; तसेंच जपानी उच्च राष्ट्रीय गुणसमुच्चयाचे ते पुतळे म्हणून गणले जात असत. तथापि केवळ माजी वैभवानें विचारांध बनून न जातां खुद्द सामुराई लोकांनीं पालटलेल्या राजकीय परिस्थितीपुढें बिनतक्रार मान वांकविण्याचें ठरविलें. पुष्कळांनीं आपण होऊन शेतकी, व्यापार वगैरे पोटाचे धंदे सुरू केले. ही त्यांची तयारी पाहून दोन वर्षांनीं १८७३ मध्यें या बाबतींत सरकारनें असा ठराव केला कीं, वंशपरंपरा चाललेल्या इनामाबद्दल सामुराई इसमाला सहा वर्षांच्या इनामाची रक्कम एकदम देऊन त्याचा हक्क नष्ट करण्यांत येईल, व तहहयात इनामाबद्दल चार वर्षांची इनाम रक्कम देऊन इनाम बंद करण्यांत येईल. या वट रकमेपैकींहि निम्मी रोख व निम्मी शें. ८ दराच्या कर्जरोख्याच्या रूपानें देण्यांत येईल. या ठरावाअनुरूप वंशपरंपरा १० पौंड इनामाबद्दल ३० पौंड रोख व ३० पौंडाच्या रोख्यावरील २ पौं. ८ शि. व्याज इतकीच रक्कम मिळावयाची. अशा मोबदल्याला सामुराई लोक कबूल झाले, या गोष्टीवर कोणाचा विश्वासहि बसणार नाहीं. सामुराई लोकांमध्यें व्यापारी दृष्टी थोडीशी कमीच होती हें खरें; तथापि देशकल्याणाकरितां हा येवढा स्वार्थत्याग त्यांनीं केला, हेंहि खोटें नाहीं. सामुराई लोकांच्या एकंदर इतिहासांत त्यांच्या लष्करी बाण्याला या स्वार्थत्यागानें दिली इतकी शोभा देणारें दुसरें कृत्य नाहीं. तरवार बाळगिणें हा त्यांचा अनंतकालापासून चालत आलेला हक्क; तो हक्क सोडून एकदम नांगर, तागडी वगैरे हातांत घ्यावयास त्यांस सरकारी हुकमानें लावलें. तो हुकूम राजनिष्ठापूर्वक पाळण्यांत त्यांनीं दाखविलेल्या धैर्यविनम्रतादि गुणांची थोरवी गावी तितकी थोडीच आहे. कारण सरकारनें वरील हुकूमाची अम्मलबजावणी सक्तीनें न करतां केवळ सवलत म्हणून ती योजना प्रथम ठरविली, पण ती ग्रहण करून स्वखुषीनें पुष्कळ सामुराई लोकांनीं शस्त्रें खालीं ठेविलीं.

पा श्चा त्य सु धा र णां वि रु द्ध बं ड.—परकीयांबरोबरचें दळणवळण व परकीयांची संस्कृति या बाबतींत जपाननें कोणतें धोरण स्वीकारावयाचें, पंचावन्न प्रश्नासंबधानें या नव्या पुढाऱ्यांमध्यें बरेच मतभेद उपस्थित झाले. सुधारणावादी पुढाऱ्यांपैकीं पाच अग्रणी होते; दरबारी मानकऱ्यांपैकीं दोघे इवकुर व संजो, सत्सुमघराण्यापैकीं दोघे सैगो व ओकुबो; व चोगू घराण्यापैकीं किडो. याशिवाय इटो हा पुष्कळ विधायक कामगिरी करणारा मुत्सद्दी, ओकुमा हा मोठा तीव्र, सूक्ष्म व चौरस बुद्धीचा राजकारणी पुरुष, आणि इटागाकी हा त्या काळांतील प्रत्यक्ष रूसोच होय. पहिल्या पांचांपैकीं चार मात्र खरे देशहितार्थ झटणारे होते; पण पांचवा सैगो याच्या अंगीं जरी अनेक उत्तम गुण होते तरी त्यांत स्वार्थी महत्त्वाकांक्षा हा मोठा दोष होता. सामुराईचे शारीरिक व मानसिक सर्व गुण त्याच्यांत होते. त्याचें शरीर धिप्पाड नजर करडी व चेहरा प्रफुल्लित होता. आपल्या घराण्याकडे प्रमुख सत्ता यावी हा त्याचा मूळ हेतू असून त्याकरितां आपल्या हाताखालचें लष्कर वाढविणें हें त्याचें साधन होतें. उलट नव्या सरकारनें सामुराई लोकांस शस्त्रें खालीं ठेवून इनामेंहि थोडयाशा मोबदल्यावारी सोडण्यास सांगितलें. तेव्हां परंपरागत लष्करी व आरमारी नोकरीचा हक्क सोडण्यास बरेच सामुराई लोक तयार नव्हते; व तशा असंतुष्ट सामुराई बंडखोरांचा सैगो हा पुढारी बनला. अशा सुमारास कोरियांत बंडाळी माजली, ती मोडण्याकरितां नव्या सरकारजवळ पाठविण्यास सैन्य तयार नव्हतें, तेव्हां जुन्या सामुराई सैन्याचीच त्या कामावर योजना होईल व

कोरियांत यश मिळविल्यानें आपलें महत्त्व वाढेल अशी सैगोस आशा उत्पन्न झाली. तथापि कोरियाशीं युद्ध करण्याच्या बाबतींतहि मंत्रिमंडळांत दुमत होतें. सैगोच्या युद्धवादी पक्षाविरुद्ध दुसरा शांततावादी पक्ष होता, व महत्त्वाच्या अन्तःस्थ राजकीय संक्रमणावस्थेच्या काळीं युद्ध पुकारणें धोक्याचें आहे असें त्याचें मत पडलें, आणि मंत्रिमंडळाच्या बैठकींत खुद्द बादशहासमक्ष या प्रश्नावर वादविवाद होऊन शांततावादी पक्षाचेंच बहुमत झालें व युद्ध करण्याचा ठराव नापास झाला. तेव्हां सैगो आदिकरून चौघा सभासदांनीं राजीनामे दिले व त्यांपैकीं प्रत्येकानें देशांत बंडाळी उत्पन्न केली. पैकीं सैगोनें तर आपल्या सत्सुम संस्थानांत आपला स्वतंत्र कारभारच सुरू केला. मध्यंतरीं (१८७६) सरकारनें तरवारी न वापरण्याचा मनाई हुकूम सोडला, आणि सरदार व सामुराई लोकांनीं आपली जहागिरी इनामेंहि वरील अटींवर सोडून देण्याविषयीं सक्ती सुरू केली. पैकीं इनामें सोडण्यास सर्व सामुराई तयार होते, पण तरवारी वापरण्याचा हक्क सोडण्यास मात्र कबूल न होतां कित्येक सामुराई लोकांनीं सशस्त्र जमून एका सरकारी तुकडीवर हल्ला करून ३०० लोकांपैकीं कांहीं मारले व बाकी जखमी केले. तें पाहून दुसऱ्या अनेक सामुराई लोकांनीं दंग्यांत सामील होऊन सैगोच्या नेतृत्वाखालीं सत्सुम संस्थानांत एक मोठें बंडच सुरू केलें. सुमारें चार वर्षें सैगोनें बंडाच्या उद्देशानें तयारी चालविली होतीच; त्यामुळें अल्पावकाशांत ३०,००० कसलेले सामुराई लढवय्ये या बंडांत सामील झाले. सामुराई लोकांचे परंपरागत हक्क नष्ट न होऊं देणें व सत्सुमघराण्याच्या हातीं सर्व राजकीय सत्ता देणें हे बंडाचे उद्देश होते. अशा या उग्रस्वरूपी बंडास २९ जानेवारी १८७७ रोजीं आरंभ होऊन २४ रोजीं तें मोडलें. त्यांत सरकारी सैन्य ६६००० असून बंडवाले ४०,००० होते. त्यांत अखेर बंडवाल्यांचाच पूर्ण मोड झाला, आणि नव्या सरकारी सैन्याचा दरारा देशभर पसरला.

सुधारणांचें पाऊल.—याच वर्षी सरकारनें पाश्चिमात्य सुधारणेचीं सर्व अंगेंउपांगें सुरू करण्याचें काम चालविलें होतें. नव्या सुधारणावादी पुढाऱ्यांपैकीं बहुतेक यूरोप, अमेरिका या देशांत राहून सर्व पाश्चात्य गोष्टींचें अवलोकन करून आलेले असल्यामुळें जपानांत सर्व बाबतींत त्यांनींच पुढाकार घेतला होता व राजकीय सत्ताहि हल्लीं त्यांच्याच हातीं होती. त्यांनीं रेल्वे बांधणें, तारायंत्र सुरू करणें, समुद्रांत दीपगृहें बांधणें व आरमार तयार करणें या कामाकरितां तज्ज्ञ इंग्लिश लोक नेमले; कायदेग्रंथ करण्याकरतां व सैन्याला हालचाली डावपेंच व रचना शिकविण्याकरितां फ्रेंच लोक नेमले; शिक्षण, पोस्टखातें, शेतकी–सुधारणा व वसाहतींची स्थापना या गोष्टी अमेरिकन तज्ज्ञांवर सोंपविल्या; औषधिशास्त्र, व्यापारी कायदेबुकाची रचना, स्थानिक कारभारसंस्थांची मांडणी, व लष्करी अधिकाऱ्यांचें शिक्षण या गोष्टी जर्मन तज्ज्ञांच्या हातीं दिल्या, आणि खोदकाम व रंगकाम शिकविण्याच्या कामीं इटालियनांची नेमणूक केली. अशा रीतीनें विविध परदेशस्थ तज्ज्ञांच्या द्वारें एकदम सुरू केलेल्या अनेकविध सुधारणा जपानी लोकांच्या पचनीं पडणें मोठें कठीण आहे, असें परकीयांस साहजिक वाटे. परंतु जपानी लोकांनां त्यांचा कांहींच बाऊ वाटला नाहीं. आपला पुराणाभिमान कायम ठेवून त्यांनीं वरील बाह्य उपकरणांचा व सुखसोयींचा स्वीकार केला. अर्थात् यामुळें नव्या जपानी पिढीची रहाणी द्विविध बनली. हे लोक दिवसा ऑफिसच्या व कामाच्या वेळीं पोषाख,शिस्त वगैरे सर्व बाबतींत पाश्चिमात्यांच्या धर्तीवर वागत असत; आणि कामावरून सुटून मोकळे होतांच आपले जुने कपडे चढवून पुरातन पद्धतीनें कालक्रमण करीत. जपानी लोकांनीं रेल्वे, आगबोटी, तारायंत्रें, पोस्टआफीसें, बँका व सर्व प्रकारची यंत्रसामुग्री पाश्चिमात्यांपासून ग्रहण केली. पाश्चिमात्य भौतिक शास्त्रेंहि त्यांनीं आत्मसात् केलीं. पाश्चिमात्य तत्त्वज्ञान बऱ्याच अंशीं मान्य केलें. यूरोपीय कायदेपद्धतींचें श्रेष्ठत्व कबूल करून त्या नमुन्यावर आपले कायदेग्रंथ बनविले; आणि इतकें करूनहि आपलेपणा न गमावतां प्रत्येक बाबतींत आपलें जपानी वैशिष्ट्य त्यांनीं कायम राखलें. सर्व पाश्चात्य सुखसोयींचा उदारबुद्धीनें संग्रह करूनहि त्यांनीं आपल्या परंपरागत चालीरीतींनां व समजुतींनां फारसें दुखावलें नाहीं. ही जपानी सुधारणावाद्यांतील अत्यंत तारीफ करण्यासारखी गोष्ट आहे. दोन विजातीय संस्कृतींच्या संमिश्रणाचें हें अत्यंत अवघड काम करीत असतां त्यांच्या हातून कित्येक वेळां वेडगळपणाच्या चुक्या झाल्या पण त्या लवकरच दुरुस्त करून एकंदर सुधारणेच्या कामांत त्यांनीं चांगलें यश संपादन केलें आहे; व त्यामुळें पुढील सुधारणेच्या मार्गांतहि आपली राष्ट्रीय दृष्टी कायम ठेवून योग्य तितक्या गोष्टीच ते स्वीकारतील व समाजाच्या पचनीं पाडतील अशी खात्री वाटते.

प्रातिनिधिक शासनपद्धतीची वाढ.—सत्सुम संस्थानांतील बंड मोडल्यानंतर देशांतील चळवळ्या लोकांनीं प्रातिनिधिक राज्यपद्धति सुरू करण्यासंबंधानें नव्या सरकाकारकडे नेटाचें मागणें सुरू केलें. बादशाहानें नव्या मनूंत प्रथम कायदेमंडळ भरविलें त्यांत फक्त सरदार व सामुराई यांचेच प्रतिनिधी होते. शेतकरी, कारागीर व व्यापारी लोकांनां कायदेमंडळांत प्रतिनिधी होते. पहिलें कायदेमंडळहि दोन बैठकींनंतर कायमचेंच बरखास्त झालें होतें; आणि देशाचें खरें प्रातिनिधिक पार्लमेंट सुरू करण्याचा प्रश्न बऱ्याच लांबणीवर पडला असता. परंतु याच सुमारास इटागाकी टैसुके नांवाच्या पुढाऱ्यानें हा प्रश्न मोठ्या नेटानें हातीं घेतला. इटागाकी हा कोरियामध्यें जालीम उपाय योजण्याच्या पक्षाचा होता व लोकमत आपल्याच बाजूचं असल्याबद्दल त्याला

भरंवसा होता. म्हणून मंत्रिमंडळांतील मूठभर लोकांनीं त्याचा युद्धविषयक ठराव जेव्हां फेंटाळला तेव्हां चिडून जाऊन प्रचलित अल्पसत्ताकपद्धति मोडून पूर्ण प्रातिनिधिक उर्फ पार्लमेंटची राज्यपद्धति सुरू करण्याबद्दल त्यानें चळवळ सुरू केली. त्याच्या पक्षाला अल्पावधींत यूरोप व अमेरिकेंतील प्रातिनिधिक राज्यपद्धति पाहून आलेले अनेक जपानी तरुण मिळाले. आणि १८७३ ते १८७७ च्या दरम्यान एकीकडे सैगोच्या नेतृत्वाखालीं सामुराई लोकांच्या हक्कसंरक्षणाची धामधूम चालू होती तर दुसरीकडे इटागाकीच्या नेतृत्वाखालीं देशांत पार्लमेंट स्थापन करण्याविषयीं जोराची मागणी सुरू होती. १८७७ मध्यें सैगोच्या अनुयायांनीं प्रत्यक्ष बंड उभारलें, त्या संकटाची संधी साधूनच इटागकीनें सरकारकडे जाहीर विनंतिअर्ज पाठविला व त्यांत लोकांनां राजकीय हक्क देऊन पार्लमेंट स्थापण्याबद्दल मागणी केली. पण त्या अर्जांत सर्वसामान्य जनता अशिक्षित अतएव वरील राजकीय हक्कांस नालायक असल्याचें ध्वनित केलें होतें. आणि मूळ मागणी, राजसत्तेची पुनः स्थापना करण्याच्या कामीं भरपूर मदत ज्यांनीं केली त्या सामुराई लोकांनां राज्यकारभारांत अंशभागी करण्याबद्दलची होती. सर्व लोकांनां समान राजकीय हक्क मागितले नव्हते, असें कागदपत्रांवरून स्पष्ट दिसतें.

अर्जांतील नालायकीच्या कबूलीचा फायदा घेऊन सरकारनें कोणास कांहींहि राजकीय हक्क न देतां देशांतील लोकमत मात्र कळावें म्हणून प्रांतोप्रांतींच्या गव्हर्नरांच्या नियतकालिक सभा भरविण्याचा १८७४ सालीं उपक्रम केला. अशा सभांनां प्रातिनिधिक स्वरूपाचा गंधहि नव्हता हें उघड आहे. परंतु अशा सभांच्या द्वारेंच भांवी प्रातिनिधिक सभेचें बीज पेरलें गेलें. कारण गव्हर्नरांमार्फत खरें लोकमत कळणें अशक्य असल्याचें अनुभवास येतांच १८७५ त सरकारनें अधिकारीनियुक्त सभासदांचें सीनेट भरविण्याचा क्रम सुरू केला. या सीनेटमध्यें अर्थात् अधिकारलोलुप पण भग्नमनोरथ अशा लांगूलचालनवृत्तिच्या लोकांचा जमाव होऊं लागला व त्यांच्याकडून सरकारला बरीच उपयुक्त माहिती व सूचना मिळूं लागल्या. अशा परिस्थितींत १८७८ मध्यें ओकुबो टॉशिमित्सु नांवाच्या बड्या दिवाणाचा सैगोच्या एका अनुयायानें खून केला; व खुनाचा उद्देश सत्ताधारी लोकांनीं पार्लमेंटनियुक्त राज्यकारभार सुरू करण्यांत चालविलेली दिरंगाई असा जाहीर केला. सैगोचे अनुयायी कधींहि प्रातिनिधिक राज्यपद्धतीकरितां झगडत नव्हते हें खास माहीत होतें तरी, वरील खुनावरून योग्य इशारत घेऊन सरकारनें प्रांतोप्रांतीं व शहरोंशहरीं लोकनियुक्त प्रतिनिधि सभा स्थापून त्यांच्या हातीं स्थानिक कारभार देण्याचें जाहीर केलें. सभासदांची व मतदारांची लायकी संपत्तिमानावर ठरवून बड्या श्रीमंतांनांच फक्त वरील उमेदवारीचा व मतदारीचा हक्क देण्यांत आला. याप्रमाणें खऱ्या प्रातिनिधिक कायदेमंडळाचा पाया घालण्यांत आला. कारण या स्थानिक सभांतून लोकांनां पूर्ण निस्वार्थीपणानें सार्वजनिक कामें करण्याचें व महत्त्वाच्या प्रश्नांवर शिस्तवार वादविवाद करण्याचें वळण लागलें. तसेंच या सभांच्या द्वारें प्रांतिक गव्हर्नरांसारख्या अधिकाऱ्यांवरहि स्वमतांचें नियंत्रण घालण्याची धमक लोकांमध्यें उत्पन्न झाली.

रा ष्ट्री य का य दे मं ड ळा ची स्था प ना.—तथापि इटागाकीच्या पक्षाचें वरील स्थानिक कारभाराचे हक्क मिळाल्यानें समाधान झालें नाहीं, कारण त्यांचें मूळ मागणें वरिष्ठ राज्यकारभार जो बड्या घराण्यांतील कंपूनें आपल्या हातीं अनिर्बंध ठेवला होता त्यांत भागीदारी मिळण्यासंबंधानें होतें. म्हणून इटागाकीनें आपले प्रयत्न आतां दुप्पट जोरानें चालविले. त्यानें आपल्या मतवाल्यांची एक असोसिएशन बनवून तिला जियूटो (उदारमतवादी) असें नांव दिलें. राजकीय हक्कांकरितां झगडणाऱ्या या पक्षाचे अर्थात् सरकारबरोबर वारंवार खटके उडं लागले, व लोकांची सहानुभूति मात्र त्यांनां अधिकाधिक मिळूं लागली. एका बाजूनें सरकार, राष्ट्राची प्रातिनिधिक संस्था चालविण्याची व त्याचप्रमाणें भाषणस्वातंत्र्य व जाहीरसभास्वातंत्र्य उपभोगण्याची लायकी नाहीं असें प्रतिपादन करून भाषण व मुद्रणस्वातंत्र्यावर आळा घालण्याकरितां पोलीसखात्याला भरपूर हक्क देत होतें; उलट बाजूनें इटागाकीचा लिबरल पक्ष राजकीय हक्कांकरितां सरकारबरोबर भांडत असतां अधिकाऱ्यांच्या जुलमाला बळी पडत होता; पण त्यामुळें त्याची लोकप्रियता वाढून देशांत राजकीय चळवळ जोरानें फैलावत होती. अशा परिस्थितींत १८८१ मध्यें ओकुमा शिगेनोबु ( भावी काऊंट ओकुमा ) हाहि बड्या सत्ताधारी मंडळांतून फुटून निघाला व त्याच्या बरोबर त्याचे कित्येक अनुयायीहि सरकारी नोकरी सोडून गेले. ओकुमानें बाहेर पडून प्रतिनिधिक राज्यपद्धति सुरू करण्याबद्दलचेंच मागणें सुरू केलें व आपल्या पक्षाला शिंपोटो ( प्रागतिक ) असें नांव दिलें. ओकुमाच्या व इटागाकीच्या पक्षाचा राजकीय उद्देश एक असूनहि ते दोन पक्ष एकत्र न होतां उलट परस्परविरोधी बनले. यावरून जपानांतील राजकीय पक्ष तत्त्वनिष्ठ नसून व्यक्तिप्रेमी होते असें स्पष्ट दिसतें; व यामुळेंच जपानच्या राजकीय विकासाचा इतिहास परक्या अभ्यासकास समजण्यास फार कठिण जातो. इटागाकीला जपानचा रूसो म्हटल्यास ओकुमाला पील म्हणतां येईल. पण इतरांप्रमाणें हे दोघेहि व्यक्तिविषयक स्वार्थाकरितांच झगडत होते असें म्हणावें लागतें. तथापि प्रत्यक्ष सत्ताधारी मुत्सद्दीहि राष्ट्रास प्रातिनिधिक संस्था चालविण्यास लायख करून तावडतोब तशा संस्था स्थापन करण्याचें ध्येय ठेवूनच राज्यकारभार चालवीत होते. त्यामुळें ओकुबोच्या खुनानंतर स्थानिक कारभाराचे हक्क दिल्याचें ज्याप्रमाणें सरकारनें जाहीर केलें त्याप्रमाणें ओकुमा फुटून बाहेर पडतांच राष्ट्रीय कायदेमंडळ

१८९१ मध्यें मरविण्याचा सरकारी ठराव प्रसिद्ध झाला. परंतु येवढ्या ठरावानें संतुष्ट होऊन आपली चळवळ बंद न करतां सरकारविरोधकांनीं आतां अधिकाराधिष्ठित व्यक्तीं-बद्दल देशभर निंदा करीत फिरण्याचें सत्र सुरू केल. हेतु हा कीं, नव्या पार्लमेंटच्या मनूंत पूर्वीच्याच व्यक्तींच्या हातीं सत्ता जाऊं नये. या निंदाप्रसारक मोहिमेमुळें अर्थात् सत्ताधाऱ्यांबद्दल द्वेष उत्पन्न होऊन मंत्र्यांनां ठार मारण्याचे कित्येक गुप्त कटहि झाले. तेव्हां सरकारनें पोलीसमार्फत भाषणांनां व वृत्तपत्रांनां बंदी केली. तात्पर्य, सरकार व राज-कीय पुढारी यांचा लढा चालूच राहिला होता. मध्यंतरीं सत्ताधारी मुत्सद्यांनीं सुधारणा करण्याचें काम चालविलेंच होतें. पाश्चिमात्य तत्त्वांच्या आधारावर दिवाणी व फौजदारी कायद्यांची सुधारणा केली; जमाखर्चाच्या खात्यांतील घोटाळ नाहींसा करून त्याला योग्य शिस्त लावली; स्थानिक कार-भार सुयंत्रित सुरू केला; मध्यवर्ती राष्ट्रीय पेढी स्थापन करून तिच्या शाखा सर्वत्र सुरू केल्या; रेल्वे, पोस्टऑफिसें व तारायंत्रें यांची वाढ केली; पोस्टल सेव्हिंग बँका उघ-डल्या; समुद्रावरील व्यापार वाढविला; सरकारी नोकऱ्यां-करितां निरनिराळ्या योग्यतानिदर्शक परीक्षा ठेविल्या; व विद्यार्जनाकरितां युरोपअमेरिकेमध्यें अनेक विद्यार्थी पाठविले आणि मोठ्या कारस्थानपटुत्वानें जपानी साम्राज्याच्या परराष्ट्रांबरोबरच्या संबंधास नवें महत्त्वाचें स्वरूप प्राप्त करून दिलें. येणेंप्रमाणें तत्कालीन सत्ताधारी मुत्सद्यांनीं जपानचा राज्यकारभार अभूतपूर्व अशा उत्कृष्ट रीतीनें चालविला होता.

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें १८९० मध्यें नवी राज्यघटना प्रसिद्ध करण्यांत आली. त्याकरितां मोठा भारदस्त समा-रंभ करण्यांत आला. त्या समारंभाला राष्ट्रांतील सर्व प्रसिद्ध पुरुषांनां राजवाड्यांत हजर राहण्याबद्दल हुकूम करून नंतर त्या सर्वांसमक्ष बादशहानें तो महत्त्वाचा खलिता मुख्य प्रधानाच्या हातीं दिला त्यावेळीं तोफा सोडून जयजयकार करण्यांत आला, शहरांतून दीपोत्सव झाले व लोकांनीं सर्वत्र सणाप्रमाणें तो दिवस पाळला. तपशीलवार नवी राज्यघटना तयार करण्याचें काम मार्किस इटो (भावी प्रिन्स इटो) याच्या तंत्राखालीं करण्यांत आलें. इटोनें तत्पुर्वीच पाश्चिमात्य देशांत प्रत्यक्ष राहून तिकडील पार्लमेंटसारख्या संस्थांच्या वाढीचा व त्यांच्या प्रत्यक्ष कार्यपद्धतीचा अभ्यास केला होता. नव्या जपानच्या इतिहासांत मुत्सद्देगिरीच्या बहुधां प्रत्येक विधायक कामगिरीशीं इटोचा संबंध आहेच, आणि आतां ही राज्यघटना तयार करून देऊन तर त्यानें आपल्या पूर्वीच्या सर्व कामगिरीवर कळसच चढविला. राजानें स्वखु-षीनें आपल्या प्रजाजनांस राजकीय हक्क दिल्याचें हें एकच अपूर्व उदाहरण म्हणून जपानी लोक या सन-देला अभिमानपूर्वक नांवाजीत असत. इतर देशांत लोकांनां राजकीय हक्क मिळाले आहेत ते अनियंत्रित राज-सत्तेशीं दीर्घकाल झगडल्यावांचून कोठेंहि कोणाला मिळालेले नाहींत. फक्त एक जपानमध्येंच बादशहानें आपण होऊन आपले कित्येक अधिकार सोडून देऊन त्यांबद्दलचे हक्क लोकांनां अर्पण केले. हें प्रकरण या दृष्टीनें पाहतां कांहींसें अद्भुतरम्य आहे यांत शंका नाहीं. शिवाय सामान्यतः वरील वर्णन खरेंहि आहे, त्यांत असत्याचा किंवा अतिश-योक्तीचा भाग नाहीं.

ज पा नी पा र्ले मेंट चा का र भा र.—जपानच्या आधुनिक इतिहासांत पार्लमेंटसारख्या संस्थेची एकदम झालेली स्थापना हिच्याइतकी खरोखर धोक्याची गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. या दिशेनें राष्ट्राची थोडीशी तयारी झालेली होती. प्रांतोंप्रांतींच्या लोकसभांतून लोकांनां चर्चा-त्मक कारभारपद्धतीचें कांहींसें ज्ञान मिळालें होतें. तथापि लोकसभा म्हणजे बोलून चालून रस्तेदुरुस्ती, आरोग्यरचना पोलिसबंदोबस्त असलीं क्षुल्लक कामें करणाऱ्या संस्था; त्यांत नवे कायदे करण्याचे प्रश्न किंवा अखिल राष्ट्राच्या हिता-हिताचे गहन प्रश्न कधींच निघावयाचे नसतात. उलट आतां नव्या घटनेप्रमाणें स्थापन झालेल्या ‘ डायेट ’ सभे-तील, अज्ञ मतदारांनीं निवडून दिलेल्या अननुभवी सभास-दांच्या हातांत आजपर्यंत खुद्द बादशहा व त्याचे निवडक कसलेले मुत्सद्दी यांच्याकडे असलेली सर्व राज्याच्या जमा-खर्चाची व कायदेकानु करण्याची सत्ता जावयाची होती. या आमूलाग्र नव्या योजनेमुळें अंगावर पडलेलें संपूर्ण राज्य-कारभाराचें काम उदयोन्मुख जपानी राष्ट्रांतील होतकरू मुत्सद्द्यांच्या सामर्थ्याबाहेरचें जरी नव्हे तरी त्यांनां चांगलेंच कसोटीस लावणारें होतें यांत शंका नाहीं. आणखी मौज अशी कीं, आजपर्यंत राज्यकारभाराचा गाडा हांकलेल्या मुत्सद्दीवर्गानें नव्या निवडणुकींत निवडून येण्याच्या दृष्टीनें राजकीय अनुयायी मिळविण्याची यत्किंचितहि खट-पट केली नाहीं. डायट सभा सुरू होतांच सर-कारनें ज्यांचीं तोंडें कायद्याच्या नियंत्रणानें बंद पाडलेलीं होतीं अशा राजकीय चळवळ्यांनां खुद्द डायटसभेमध्यें राज-रोसपणें वाटेल तसें तोंडसुख घेण्याची पूर्ण मुभा मिळणार, वाग्युद्धांतील हे प्रामसिंह मोकाट सुटणार, ही गोष्ट कल्पना-चक्षूंनां धडधडीत दिसत असतांहि तत्कालीन अधिकारापन्न मुत्सद्दी त्यासंबंधानें पूर्ण बेफिकीर दिसत होते. पण जेव्हां सर्व नवी घटना प्रसिद्ध करण्यांत आली, तेव्हां त्याच्या वरील तटस्थ वृत्तीचें कोडें थोडेंसें उलगडूं लागलें. तें असें कीं, नवीन घटनेम-ध्येंहि मंत्रिमंडळ नेमण्यामोडण्याचा प्रश्न सर्वस्वी बादशहाच्या इच्छेवरच सोंपविलेला होता; मंत्रिपदाचे अधिकार राजाक-डेच कायम होते ही गोष्ट जपानच्या राजकारणांतील तत्त्वांनां धरूनच होती. कायद्यांत फेरबदल करावे, संस्था सुधाराव्या, पद्धती नव्या घालाव्या, परंतु कितीहि फेरफार, अदलाबदली केल्या तरी राजसत्ता कायम राखावयाची ही खुबी नवें जपान बनविणाऱ्या मुत्सद्दीवर्गाला चांगली माहीत होती; ते ही गोष्ट पक्की जाणून होते कीं, नव्या घटनेप्रमाणें

राजकारण जरी कोणीकडेहि वाहवलें तरी बादशहाच्या सत्तेबद्दल राष्ट्रांत पूज्यबुद्धि कायम आहे तोंपर्यंत राष्ट्ररूपी नौका त्या भक्कम नांगरानें बरोबर खेचून धरतां येईल. शिवाय नव्या घटनेचे निसर्गसिद्ध परिणाम त्यांना दिसत नव्हते असें नाहीं. प्रातिनिधिक राज्यकारभारी संस्था एकदां स्थापन झाल्या म्हणजे राजकीय पक्षनियोजित मंत्रिमंडळें अधिकारारूढ होऊं लागणार व जपानवर ती पाळी येणार हें ते जाणून होते. परंतु याप्रमाणें मंत्रिमंडळें बनविण्याची योग्यता राजकीय पक्षांच्या अंगीं येईपर्यंत बादशाही अधिकाराचें छत्र कायम राखण्याचा गेलें पावशतक जपानी साम्राज्याचीं सूत्रें ज्यांनीं अत्यंत यशस्वीपणामुळें चालविलीं त्या मुत्सद्यांनीं पक्का निश्चय केला होता. उलटपक्षीं सत्ताकांक्षी राजकीय चळवळयांच्या ध्यानांत ही गोष्ट आल्यावांचून राहिली नाहीं. बादशहाच्या अधिकारछत्राखालीं संपूर्ण राज्यकारभार करणाऱ्या या बड्या धेंडांनां मंत्रिपदच्युत करणें करावयाचें ह्या प्रश्नाचा त्यांनां आतां निजध्यास लागला. मंत्रिमंडळें नेमण्याचा मिकॅडोचा अधिकारच नष्ट करावा, असा रोमरोमीं राजनिष्ठा भरलेल्या आपल्या राष्ट्राला उघड उपदेश करण्याची त्यांनां छाती होईना. तेव्हां नव्या घटनेच्या कायद्याचाच त्यांनीं स्वोद्देशानुकूल असा अर्थ लावला; आणि कायदेमंडळाच्या मर्जीविरुद्ध मंत्रिमंडळास कोणतीहि गोष्ट करण्यास ते अडथळा करूं लागले.

डायेटसभेच्या पहिल्या बैठकीपासून येणेंप्रमाणें झगड्याला आरंभ होऊन तो झगडा बरींच वर्षें चालला. हें भांडण तत्त्वांपेक्षां व्यक्तिविषयक आणि मंत्रिमंडळाच्या कृत्यांपेक्षां मंत्रिपदावरील इसमाबद्दलचें असे. तथापि मुख्य मुद्दा केव्हांहि दृष्टिआड झाला नाहीं. मंत्रिमंडळाच्या चालत्या गाड्यास खीळ घालणें हेंच कायदेमंडळाचें मुख्य शस्त्र होतें. खरे राष्ट्रप्रतिनिधी आणि बादशहा यांच्यामध्यें फूट पाडून लांडा कारभार करणारे हे लब्धप्रतिष्ठित मंत्री नाहींसे केले पाहिजेत, अशी त्यांची मुख्य ओरड होती. या भांडणांत लार्डांच्या सभेनें नेहमीं सरकारचीच बाजू धरलेली होती म्हणून बरें झालें; नाहींतर राजकीय पक्षांच्या बेफामपणामुळें राष्ट्राचें बरेंच नुकसान झालें असतें. खरोखर पाहतां लोकांच्या हातांत सर्व राज्यकारभार देण्याची वरील मुत्सद्यांची मनापासून इच्छा होती; फक्त लोकनियुक्त सभासदांच्या अंगीं शिस्तवार काम करण्याची पात्रता येण्याची ते वाट पहात होते. परस्पर पक्षांतील पुढाऱ्यांनां ह्या गोष्टी बरोबर कळत होत्या. अशा स्थितींत सन १८९४—९५ मध्यें चीनबरोबर युद्ध सुरू झालें; तेव्हां वरील भांडण बाजूला ठेऊन लिबरलपक्ष मार्क्विस इटोच्या मंत्रिमंडळाशीं सहकार्य करण्यास तयार झाला. प्रागतिक पक्ष मात्र मंत्रिमंडळाबरोबर तसाच विरोध करीत राहिला.

जबाबदार प्रधानमंडळः—नंतर स. १८९८ मध्यें वरील दोन्ही पक्ष एक होऊन त्यांनीं राज्यघटनामूलक पक्ष (कॉन्स्टीट्यूशनल पार्टी ' केन्सेइ—टो) असें नांव घेतलें त्यामुळें कनिष्ठ सभेत त्यांचें चांगलें मताधिक्य होऊन मंत्रिपदाला लायक असे इसम त्यांच्यांत दिसूं लागले. तेव्हां मार्क्विस इटोच्या सल्ल्यावरहुकूम बादशहानें ओकुमाव इटागाकी यांनां मंत्रिमंडळ बनविण्याचा हुकूम केला. आतां मात्र मंत्रिपदाकरितां भांडणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांवर खरी परिक्षेची वेळ आली. विघातक टीका करण्याऐवजीं विधायक कामगिरी करून दाखविण्याचा प्रसंग आला. ओकुमाव इटागाकी यांनीं न डगमगतां राजाज्ञेनुसार मंत्रिमंडळ तर बनविलें, आणि अर्थात् त्यांच्या यशापयशाकडे राजाचे डोळे लागून राहिले. त्यांच्या लायकीचा निकाल सहा महिन्यांतच लागला. त्यांच्या आपसांतील पक्षविषयक भांडणांनीं लवकरच पुन्हां डोकें वर काढलें व मंत्रिमंडळांत एकदम दुफळी झाली. मंत्रिमंडळ मोडलें आणि सत्तेकरितां हापापलेल्या पार्लमेंटांतील वाचाळ पुढाऱ्यांचा पुरा फजितवाडा झाला. यावरून असेंहि स्पष्ट ठरलें कीं जुन्या कसलेल्या मुत्सद्यांच्या सहाय्यावांचून पार्लमेंटांतील कोणत्याहि पक्षाला राज्यकारभाराचें जूं झेंपणें शक्य नाहीं. याप्रमाणें पक्के डोळे उघडल्यावर लिबरल व प्रागतिक दोन्हीहि पक्षांनीं पूर्वीचें हाडवैर सोडून देऊन जुन्या मुत्सद्यांशीं सौजन्यानें वागण्यास सुरुवात केली. आपआपल्या पक्षांत ओढण्याकरितां दोन्ही पक्ष प्रिन्स इटोची फारच आर्जवें करूं लागले. पण तो कोणासच न मिळतां आपल्या आज्ञा शिरसामान्य करतील अशा लोकांचें निराळेंच मंडळ बनवूं लागला. कित्येक लिबरलपक्षीय लोक त्याच्या हुकमतीखालीं वागण्यास तयार झाले. त्यांच्यापासून त्यानें लोकनियुक्त मंत्रिमंडळाचें ( पार्लमेंटरी कॅबिनेटस ) तत्त्व सोडून देण्याचें वचन घेतलें; व आपल्या नव्या पक्षाला रिक्केन सेईयु कै ( राज्यघटना मंत्रिमंडळ ) असें नांव दिलें. तेव्हां लोकनियुक्त मंत्रिमंडळाकरितां एकटा प्रागतिक पक्ष भांडत राहिला, पण इटोचा सेइयु—कै पक्षच बळावत जाऊन १८९८ च्या निवडणुकींत १९५ सभासद त्या पक्षाचे निवडून आले, व बाकीच्या चार विरोधी पक्षांचे मिळून १९४ सभासद आले. या चारी पक्षांत आपसांतील फूट कायम होती. याप्रमाणें जपानच्या राजकीय प्रगतीमध्यें एक नवीनच तऱ्हा उद्भवली. इटोनें बादशहाच्या हुकमानें आपल्या सेइयु कै पक्षांतून मंत्रिमंडळ बनविलें. १९०३ मध्यें इटोनें आपल्या जागीं मार्क्विस सैओंजीची नेमणूक करविली; पण मंत्रिमंडळांतील सर्व घडामोडी बादशहाच्या आज्ञेनें होत होत्या. त्या बाबतींत पार्लमेंटकडे कांहींच अधिकार नव्हता. याप्रमाणें जपानची राज्यपद्धति अगदीं अपूर्व अशा नव्याच नमुन्यावर चालू झाली. पार्लमेंटांतील कामहि पूर्वीचीं वादळें बंद होऊन कांहींसें शांततेनें चालूं लागलें. पहिल्या आठ

वर्षांत कनिष्ठ सभा पांच वेळां मोडली; पण पुढल्या अकरा वर्षांत दोन वेळांच मोडली. तसेंच पहिल्या आठ वर्षांत सहा वेळां मंत्रिमंडळांत फेरफार झाले; पण पुढल्या अकरा वर्षांत पांचच वेळां झाले. दुसरी उत्साहजनक गोष्ट ही कीं अलीकडे धंदेवाल्या लोकांमध्यें पार्लमेंटमध्यें आपले प्रतिनिधी असावे, अशी जाणीव उत्पन्न झाली आहे. आरंभीं सर्व मतदारसंघातर्फे धंदेवाईक राजकीय पुढारी, बॅरिस्टर व वृत्तपत्रांचे संपादक हेच निवडून येत असत. पण १९०९ च्या निवडणूकींत कनिष्ठसभेंत धंदेवाले पन्नास सभासद निवडून आले. व वरिष्ठ सभेंतहि सर्वांत अधिक कर भरणाऱ्या तर्फे ४५ सभासद आले. म्हणजे तेथेंहि व्यापार व उद्योगधंदे यांची उत्कृष्ट काळजी घेणारे लोक आहेत. यांत शंका नाहीं.

**महायुद्धापूर्वी.**—चीनशीं व रशियाशीं जपाननें ज्या लढाया केल्या त्यांत जपाननें अपूर्व जय संपादन केल्यामुळें जपानी लोकांत आत्मविश्वास उत्पन्न झाला. आपलें राष्ट्र लहान असल्यामुळें आसपासचीं मोठमोठीं राष्ट्रें आपल्यावर केव्हां घाला घालतील याचा नेम नाहीं अशी जपानला भीती वाटत असे, पण वरील लढायांनीं ती भीती पार नाहींशी करून टाकली. व्यापाराच्या बाबतींतहि जपाननें बरीच प्रगति चालविली होती. पाश्चिमात्य शिक्षणाचा व तदनुषंगानें पाश्चिमात्य कल्पनांचा जपानमध्यें प्रसार होत चालला होता. सामाजिक चळवळ आस्ते आस्ते फैलावूं लागली होती. जपानच्या व चीनच्या प्राचीन वाङ्मयाच्या अभ्यासाकडे विद्वानांचें लक्ष जाऊं लागलें होतें. सृष्टिनिरीक्षणाचे फायदे लोकांनां समजावून सांगण्यासाठीं एक विद्वानांचें मंडळ स्थापन झालें होतें. कोरिया नुकताच आपल्या राज्याशीं जपानानें जोडला होता. चीनमध्यें जपानविरुद्ध चळवळ सुरू झाल्यामुळें व याच सुमारास कॅलीफोर्नियांमध्यें, जपानी लोकांनां येऊं न देण्याची चळवळ फैलावल्यामुळें जपानमध्यें लोकमत प्रक्षुब्ध झालें होतें. त्यांतच जपानी लोकांनां देवासमान वाटणारा त्यांचा बादशहा मीजी हा १९१२ सालीं वारल्यामुळें तर जपानी लोकांच्या अंतःकरणाला धक्का बसला होता. मीजी घराण्याची नक्कल होऊन टैशो घराण्याची सत्ता जपानवर सुरू झाली होती. महायुद्धाला सुरुवात होण्यापूर्वी दोन वर्षे जपानची अंतस्थ परिस्थिति वर सांगितल्याप्रमाणें होती.

**महायुद्धाच्या कालांत.**-महायुद्ध सुरू झाल्यानंतर जपानचा व्यापार अनपेक्षित तऱ्हेनें वाढूं लागला होता. महायुद्ध हें सुलतान शाहीविरुद्ध बंड आहे असा दोस्तराष्ट्रांनीं कंठशोष चालविला होता. व त्याचा परिणाम जपानवर झाल्याविना राहिला नाहीं. 'लोकशाही' हा मधुर शब्द जपानमध्यें आबालवृद्धांच्या तोंडीं खेळत होता. भांडवलवाल्यांच्या जुलमाचा निषेध म्हणून जपानमध्यें मजूरसंघाहि, वेळोवेळीं संप पुकारूं लागले होते. १९१८ सालीं धान्याची महर्गता अंदाजाबाहेर वाढल्यामुळें 'तांदुळाचा संप' काहीं खेड्यांतील कोळ्यांच्या बायकांनीं केला व त्याला पुढें उग्र स्वरूप प्राप्त होऊन या संपाचा वणवा सर्व जपानभर पसरला. त्यामुळें जपान सरकारला हा संप मोडल्यानंतर कडक कायदे अंमलांत आणावे लागले. जपानमध्यें जवळ जवळ २०० मजूरांचे संघ स्थापन झाले होते व त्यांनीं भांडवाल्याविरुद्ध आपली मोहीम सुरू केली होती. त्यामुळें या दोघांत तडजोड करण्यासाठीं १९१९ सालीं जपानसरकारच्या उत्तेजनानें प्रिन्स टोकूगावाच्या अध्यक्षतेखालीं रोशी कियोचो कै ही संस्था स्थापन झाली. १९१६ मध्यें फॅक्टरीलॉमध्यें सुधारणा करण्यांत आल्या. एकतंत्री शासनपद्धतीविरुद्ध जपानमध्यें चळवळ सुरू झाल्यामुळें १९१८ मध्यें सुधारणाकायदा मंजूर करण्यांत येऊन मतदानपद्धतींत पुष्कळ इष्ट सुधारणा घडवून आणण्यांत आल्या. महायुद्ध संपल्यानंतर बेकारी वाढल्यामुळें जपानांत पुन्हां असंतोष पसरण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. पण तो थोडक्याच दिवसांत शमविण्यांत आला.

**राजकीय परिस्थितिः**—१९ व्या शतकाच्या अखेरीस अखेरीस पाश्चिमात्य राष्ट्रांनीं पौरस्त्य राष्ट्रांत चढाईचें धोरण स्वीकारल्यामुळें, जपानला आपल्या राष्ट्राचें संरक्षण करण्याची आवश्यकता भासूं लागली होती. त्यामुळें जर्मनींतील एकतंत्री कायद्याच्या धर्तीवर जपानमध्यें राज्यकारभाराचें धोरण आखण्यांत आलें होतें. पण जपानमध्यें इंग्लिश इतिहासाचा व शासनपद्धतीचा अभ्यास जारीनें सुरू करण्यांत आल्यापासून जपानमध्यें इंग्लिश लोकांच्या पार्लमेंटप्रमाणें, पार्लमेंटरी शासनपद्धति अमलांत यावी असें प्रतिपादन करणारा एक वर्ग निर्माण झाला होता. १९११ सालीं प्रधान कत्सुरा यानें राजीनामा दिल्यानंतर मार्किस सैयोंझी हा प्रधान झाला. १९१९ मध्यें मुत्सुहिरोमीजी हा बादशहा मरण पावला व त्याच्या जागीं योशीहिटो शिन्नो हा राज्यारूढ झाला. कोरियामध्यें जी स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं चळवळ सुरू झाली होती, त्यामुळें कोरियामध्यें दंगेधोपे माजून राहिले होते. त्यासाठीं कोरियन, जपानी सैन्यांच्या दोन पलटणी जादा ठेवण्यांत याव्या असें यूयेहरा याचा युद्धमंत्र्याचें म्हणणें होतें; पण सैयोंझी व इतर मंत्री या गोष्टीला कबूल होईनात. तेव्हां यूयेहरानें राजीनामा दिला पण त्याची जागा भरून काढण्यास कोणीच तयार होईना. तेव्हां सैयोंझीनें राजीनामा दिला. त्याच्या जागीं पुन्हां कत्सुरा हा प्रधान झाला, पण कत्सुराला लोकमत अनुकूल नव्हतें. त्यामुळें त्यालाहि लवकरच राजीनामा देणें भाग पडलें. त्याच्यानंतर यमामाटो मंत्रिमंडळ स्थापन झालें; पण याच वेळीं आरमारखात्यांतील अंदाधुंदी उघडकीस आल्यामुळें, व त्यांत मंत्रिमंडळांतील अधिकाऱ्यांचा हात असल्यामुळें या मंत्रिमंडळानें राजीनामा दिला. त्याच्या जागीं कांऊंट मोबुइमा हा मुख्य प्रधान झाला. याच वेळीं महायुद्ध सुरू झाल्यामुळें जपाननें दोस्तांच्या वतीनें भाग घ्यावा म्हणून इंग्लंडनें जपानला विनंति केली. जपाननेंहि त्या म्हणण्याला रुकार दिला. पुढें

ओकुमा यानें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें राजीनामा दिला. त्याच्या जागीं तेरौची याला प्रधान नेमण्यांत आलें. त्याच्याविरुद्ध लोकांनीं गवगवा केला. तेव्हां नवीन निवडणूक होऊन पुनः तेरौची हाच प्रधान म्हणून निवडून आला. तेरौचीनें परराष्ट्रीय प्रश्नासंबंधीं सल्ला देण्यासाठीं एक स्वतंत्र सर्वपक्षीय कमिटी स्थापन केली. याच सुमारास ' तांदुळाचा संप ' उपस्थित होऊन त्या संपामुळें तेरौचीला राजीनामा द्यावा लागला.

तेरौचीच्या जागीं तकशीहारा हा प्रधान झाला. इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें कॉमन्ससभेंतील सभासदांपैकींच प्रधान निवडण्यांत येतो, तशीच पद्धत हाराच्या नेमणुकीनें येथें स्थापन झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानें आपल्या मंत्रिमंडळांतहि जपानमधील कनिष्ठ सभेचे सभासद घेतले होते. एकदोन मात्र वरिष्ठ गृहांतील नेमले होते. १९१८मध्यें त्यानें सुधारणा–बिल मंजूर करून घेतलें व मतदारांचें क्षेत्र व्यापक केलें. पण एवढ्यावर लोक संतुष्ट झाले नाहींत. त्यांनां याहूनहि व्यापक मतदानपद्धति पाहिजे होती. यासाठीं लोकपक्षीय सभासदांनीं राष्ट्रसभेंत तसें एक बिल पुढें आणलें. पण हारानें तें लांबणीवर टाकावयाची सूचना आणल्यामुळें तें लांबणीवर टाकण्यांत आलें.

प र रा ष्ट्री य हि त सं बं ध–मांचूरियाः—मांचूरियाचा दर्जा काय असावा यासंबंधीं जपान व रशिया यांमध्यें बरेच दिवस तंटा चालला होता. १९१० सालीं मांचूरियांतील रेल्वे सर्व राष्ट्रांनां सारखी खुली ठेवण्यांत यावी असें अमेरिकेनें प्रतिपादन केलें. हें मत मान्य केल्यास ' खुला दरवाजा ' या तत्त्वाला उत्तेजन मिळेल असें अमेरिकेचें म्हणणें होतें. पण या तत्त्वाला जपान व रशिया या दोघांचीहि संमति नव्हती. चीनला हें तत्त्व मान्य करणें म्हणजे आपल्या सार्वभौमत्वाच्या हक्कावर गदा येण्यासारखें वाटत होतें. त्यामुळें अमेरिकेची सल्ला कोणासच पसंत पडली नाहीं. शेवटीं १९१० मध्यें जपान व रशिया या राष्ट्रांमध्यें सलोख्याचा तह घडून येऊन मांचूरियामध्यें जपान व रशियानें एकमेकांशीं स्पर्धा न करतां व्यापार करावा असें ठरलें. १९१६ मध्यें पुनः या राष्ट्रांमध्यें तह होऊन पौरस्त्य राष्ट्रांवर जर कोणाकडूनहि अत्याचार घडण्याचा संभव असेल तर दोघांनींहि तें संकट दूर करण्याचा प्रयत्न करावा असें ठरविण्यांत आलें.

अँग्लो–जपानी तहः—हा तह मूळ १९०५ मध्यें घडून आला होता; पण त्यानंतर रुसोजपानी युद्ध व जपाननें कोरिया आपल्या राज्याला जोडणें या दोन गोष्टींनीं हा तह पुन्हां विचारांत घेणें दोघांहि राष्ट्रांनां भाग पडलें. त्याप्रमाणें व्हायकाऊंट ग्रे व बॅरन केटो या दोघांमध्यें चर्चा होऊन १९११ च्या जुलैच्या १३ व्या तारखेस नवीन तह झाला. हा तह १० वर्षें मुदतीचा होता. या मुदतीनंतर जर तो स्पष्ट शब्दांत दोन्हीं राष्ट्रांनीं रद्द केला नाहीं तर तो पुढें चालू रहावयाचा असें ठरलेलें होतें. महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची जी पहिली बैठक भरली तीं ठरविण्यांत आलेल्या कलमांशीं हा अँग्लोजपानी तह विरोधी आहे असा प्रश्न कांहीं मुत्सद्यांनीं काढला होता; पण इंग्लंड व जपान या दोन्ही राष्ट्रांनीं राष्ट्रसंघाला असें लिहून पाठविलें कीं, १९२१ नंतर ज्यावेळीं पुन्हां इंग्लंड व जपान यांच्यामध्यें नवीन तह होईल त्यावेळीं सकृद्दर्शनीं भासणारा विरोध दूर करून राष्ट्रसंघानें ठरविलेल्या कलमाबरहुकूम तो करण्यांत येईल. पुढें १९२१ नंतर या पूर्वीचा तहांत कांहींच्या नवीन कलमांची भर न पडल्यामुळें हा पूर्वीचा तहच कायम राहिला पण वॉशिंग्टन परिषदेमध्यें अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड व जपान या चार राष्ट्रांमध्यें तह झाला व त्यावेळीं अँग्लोजपानी तह रद्द करण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें.

चीन.-२० व्या शतकाच्या आरंभीं चीनमध्यें फारच अंदाधुंदी माजली होती व त्यामुळें चीन हे सांपत्तिकदृष्ट्या अगदीं डबघाईस आलेलें होतें. १९११ मध्यें चीनला पैशाची मदत करण्याच्या हेतूनें जर्मनी, फ्रान्स व अमेरिका या राष्ट्रांनीं हॉको झेच्यूयन रेल्वे तयार करण्याकरितां कर्ज देण्याचें कबूल केलें; व तसेंच चीनमध्यें चलनी नाण्याबाबत सुधारणा घडवून आणण्याकरितां व मांच्यूरियामध्यें व्यापार वाढवण्याकरितां लागणारा पैसाहि चीनला द्यावयाचें त्यांनीं ठरविलें. १९१२ मध्यें या चौघांच्या संघांत जपान व रशिया हींहि राष्ट्रें कांहीं अटींवर सामील झालीं. पुढें १९१३ सालीं वुइल्सन हा अमेरिकेचा अध्यक्ष झाल्यावर, त्यानें या संघातून अमेरिकेचें अंग काढून घ्यावयाचें ठरविलें. व महायुद्ध सुरू झाल्यामुळें जर्मनीनेंहि आपलें अंग काढून घेतलें. १९१७ सालीं उरलेल्या चौघां राष्ट्रांच्या बिनंतीवरून पुन्हां अमेरिका या संघांत प्रविष्ट झाली. अशा रीतीनें या पांचीं राष्ट्रांनीं चीनला कर्ज देण्यासंबंधांत परस्परांचे हितसंबंध कसे असावेत यासंबंधीं पॅरिस येथें चर्चा करून शेवटीं १९२० मध्यें न्यूयॉर्कमध्यें या राष्ट्रांनीं आपआपसांत तह केला. या तहाचा उद्देश केवळ व्यापारी स्वरूपाचा आहे असें या तहांत स्पष्ट केलें होतें. मांचूरिया व मोंगोलिया हे टापू सर्वत्रांनां खुले असावेत असें ठरविण्यांत आलें. चीनला मदत करण्याबाबींत प्रत्येक राष्ट्रानें आपल्याला शक्य होईल ती मदत चीनला करावी, परस्परांमध्यें कोणत्याहि प्रकारची स्पर्धा नसावी असें ठरविण्यांत आलें.

अमेरिकेंतील जपानच्याविरुद्ध चळवळः—जपानी लोक मोठ्या प्रमाणावर अमेरिकेंत वस्ती करण्यास जाऊं लागल्यापासून कॅलिफोर्नियामध्यें त्यांच्यासंबंधीं द्वेष वाढूं लागला होता. १९०५ मध्यें सान फ्रॅन्सिस्कोमधील शाळांत जपानी विद्यार्थ्यांनां एकीकडे बसविण्याचा ठराव अमलांत आला होता. त्यावेळींच रुझवेल्टनें या कृत्याबद्दल आपली नापसंती व्यक्त केली होती. पुढें १९११ सालीं जपाननें अमेरिकेशीं एक करार करून त्यांत जपानमधून अमेरिकेंत मजुरीसाठीं

जाणाऱ्या लोकांना पासपोर्ट न देण्याचें ठरविलें पण १९११ पूर्वी जे जपानी लोक अमेरिकेंत वस्ती करून राहिले होते, त्यांना मात्र तेथेंच राहूं देण्याचें अमेरिकेनें कबूल केलें. असें असतांना देखील, १९१३ मध्यें कॅलिफोर्निया सरकारनें ॲलीन्स लँड ॲक्ट पास करून तद्द्वारा परकीय लोकांना नागरिकत्वाचे हक्क देण्याचें बंद करण्यांत आलें व त्याचप्रमाणें परकीयांनां अमेरिकेंतील जमिनी विकत घेण्यास बंदी करण्यांत आली. परकीयांनीं वाटेल तर कौलानें जमिनी कराव्या पण जमीनींचे मालक मात्र बनूं नये अशा प्रकारचा हा ठराव केल्याबद्दल प्रेसिडेंट वुइल्सननें देखील कॅलिफोर्नियाची चांगली कानउघाडणी केली;पण कॅलिफोर्निया सरकारनें तिकडे दुर्लक्षच केलें.

महायुद्ध सुरू झाल्यावर मध्यंतरीं या कायद्याचा अंमल फार कडक रीतीनें करण्यांत आला नाहीं. पण महायुद्धानंतर १९१७ सालीं कॅलिफोर्नियानें आणखी एक कायदा पास केला त्यामुळें परकीय लोकांनां जमीनी कौलानें करण्याचा जो हक्क होता तोहि नाहींसा करण्यांत आला.या कायद्याला अमेरिकेंत पुष्कळ लोक विरुद्ध होते. पण त्याची पर्वा न करतां दक्षिण अमेरिकेंतील, नेब्रास्का, इदहो, ओरेगॉर, व वॉशिंग्टन या संस्थानांनींहि कॅलिफोर्नियाचेंच अनुकरण केलें.यामुळें अमेरिकेंत व जपानमध्यें खळबळ उडून गेली शेवटीं बॅरन शिदेहरा या वॉशिंग्टन येथील जपानी वकीलानें व मॉरिस या जपानमधील अमेरिकन वकीलानें, आपसांत या प्रश्नासंबंधीं खल करून एक योजना ठरविली; पण ती अद्यापि कॅलिफोर्निया सरकारनें मान्य केलेली नाहीं.

महायुद्धः—महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर ब्रिटिशांनीं जपानला आपल्या बाजूनें महायुद्धात भाग घेण्यास विनंति केली. चीन जपानच्या ताब्यांत असलेल्या समुद्रांमधून जर्मन जहाजें ज्यावेळीं संचार करूं लागलीं त्यावेळीं जपाननें जर्मन सरकाराला तीं जहाजें तेथून दुसरीकडे नेण्याबद्दल निर्वाणीचा खलिता पाठवला. व कियौचौ बंदर ताब्यांत देण्याबद्दल कळविलें. पण खलित्याला जर्मन सरकारनें कांहींच उत्तर न दिल्यामुळें जपाननें जर्मनीविरुद्ध लढाई पुकारली. कोरिया, मांचूरिया, सायबेरिया इत्यादि ज्या ज्या ठिकाणीं जर्मनांचें प्राबल्य होतें, तें नाहींसें करण्याचा जपाननें उद्योग आरंभला. कियाचौ सामुद्रधुनीवर सिंगटो येथें जर्मनांनीं एक मजबूत किल्ला बांधला होता. तो आपल्या ताब्यात घेण्याचें ठरवून जपाननें त्याजवर आपलें सैन्य पाठवलें. हें सैन्य लंगकौ येथें येऊन उतरलें व त्यांनीं येथें येऊन जर्मनांच्या ताब्यांत असलेलीं पुष्कळ ठिकाणें काबीज केलीं. नंतर थोडक्याच दिवसांत सिंगटोचा किल्ला जपानच्या ताब्यांत आला व कियाचौ बंदर हें १९१४ चा डिसेंबरमध्यें व्यापारासाठीं खुलें करण्यांत आलें.

पण सिंगटोचा किल्ला ताब्यांत आला तरी त्या भागांतील जर्मन सैन्याचा अद्यापि पुरा मोड झाला नव्हता. उलट जर्मनांनीं या भागांत आणखी ६ लढाऊ जहाजें पाठविलीं होतीं. या सहा जहाजांनीं पॅसिफिक महासागरांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली होती. एमडेन जहाज तर हिंदी महासागरांत इतःस्ततः संचार करीत होतें. त्यामुळें ब्रिटिशांच्या व्यापारी गलबतांनां फार त्रास होऊं लागला होता. अशी स्थिति असल्यामुळें दोस्तांच्या जहाजांनीं व जपानच्या लढाऊ जहाजांनीं पॅसिफिक व हिंदी महासागरांतून या जहाजांनां हांकलून देण्यासाठीं कंबर बांधली. एमडेन जहाज हें एका ऑस्ट्रेलियन जहाजानें बुडविलें. इतर जहाजाचीहि तीच दुर्दशा झाली व थोडक्याच अवधींत जपानच्या सहाय्यानें, या दोन्ही महासागरातील, जर्मनांचा उपद्रव नाहींसा करण्यांत आला.

याशिवाय जपाननें भूमध्यसमुद्रांतीहि दोस्तांच्या मदतीसाठीं अकरा हे लढाऊ जहाज व कांहीं विनाशिका यांची रवानगी केली होती. या आरमारानें भूमध्यसमुद्रांत महत्त्वाची कामगिरी बजावली. १९१७ सालीं वॉशिंग्टन येथें दोस्तराष्ट्रांच्या मुख्य प्रतिनिधींची महायुद्ध लवकर कसें संपवावें यासंबंधींची वाटाघाट झाली. तींत जपानतर्फे व्हायकउंट इशी हा त्या सभेला हजर होता. त्यावेळीं कोणत्या राष्ट्रानें किती सैन्य महायुद्धासाठीं उभारावें यासंबंधीं बरीच चर्चा झाली.

१९१७ मध्यें रशियांत राज्यक्रांति झाल्यानंतर बोल्शेव्हिक लोकांच्या सहाय्यानें जर्मनी व ऑस्ट्रिया—हंगेरियांच्या सैबेरियामध्यें असणाऱ्या कैद्यांनीं सैबेरियांतील बराचसा भाग आपल्या ताब्यांत घेतला व झेकोस्लाव्ह लोकांनां त्रास देण्यास सुरवात केली. त्यामुळें अमेरिका व जापन यांनीं हें बोल्शेव्हिकांचें भूत गाडून टाकण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें जपान व अमेरिकेच्या सैन्यानें थोडक्याच दिवसांत बोल्शेव्हिकांचा ठिकठिकाणीं पराभव केला. झेकोस्लाव्ह लोकाच्या ताब्यांत सैबेरियांतील बराच मुलूख आला. पण १९१९ सालीं हें पारडें अचानक रितीनें उलटून बोल्शेव्हिक सैन्यानें झेकोस्लाव्ह सैन्याची दाणादाण करून सोडली. याच सुमारास अमेरिकेनेंहि आपलें सैन्य सैबेरियांतून काढून नेलें. त्यामुळें या भागांत एकट्या जपानलाच झगडण्याची पाळी आली. १९२० मध्यें निलोलेव्हास्क येथील जपानी आबालवृद्धांची या बोल्शेव्हिक लोकांनीं एकजात कत्तल केली. त्यामुळें जपाननें सखलिन प्रांत काबीज करण्याचें ठरविलें. पण रशियनसरकारनें या प्रांतांची व्यवस्था लावण्याचें कबूल केल्यामुळें जपाननें आपला बेत सोडून दिला. पण १९२० मध्यें बोल्शेव्हिकांनीं पूर्वरशियामध्यें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. यामुळें पुढेंमागें यांची स्वारी जपानवर व चीनवर होईल या

भीतीनें, जपाननें चीनशीं गुप्त खलबत करून या संकटापासून आपलें रक्षण करण्याची तरतुद केली.

महायुद्धास प्रारंभ होण्यापूर्वी चीनमध्यें अंदाधुंदी माजली होती. चीन व जपान यांमध्येंहि पुष्कळ भानगडींचे प्रश्न उपस्थित झाले होते. जपानचे चीनमध्यें पुष्कळ हितसंबंध होते. अर्थात जपान व चीनमध्यें अशा प्रकारची धुसफुस राहूं देणें उभयपक्षींहि इष्ट नव्हतें. तेव्हां या प्रश्नांची वासलात लावण्यासाठीं ओकुमा प्रधानानें हियोकी या चीनमधील जपानी वकीलामार्फत चीनचा प्रधान युआन यास आपल्या २१ मागण्या सादर केल्या. या २१ मागण्यांचे पांच भाग पाडण्यांत आले होते. पहिल्या भागांत, शांटुंग प्रांतासंबंधीं चीन व जपान यांचे कशा प्रकारचे संबंध असावेत हें विशद करण्यांत आलें होतें. दुसऱ्या भागांत दक्षिण मांचुरिया व पूर्व मंगोलिया यांबद्दलचा खुलासा होता. तिसऱ्या भागांत, हन्येइपिंग कंपनीविषयींचा मजकूर होता. चौथ्या भागांत चीनच्या निरनिराळ्या भागांवरील स्वामित्वासंबंधाची चर्चा करण्यांत आली होती व पांचव्या भागांत किरकोळ मागण्या होत्या. या एकवीस मागण्यांबद्दल सर्वत्र खूप चर्चा झाली. कांहींच्या मतें जपानच्या या मागण्या फाजील कडक होत्या तर लंडन टाईम्ससारख्या प्रमुख वर्तमानपत्रांच्या मतें जपानच्या या मागण्या विशेष कडक स्वरूपाच्या नव्हत्या. या मागण्या कबूल करण्याला चीननें पुष्कळच आढेवेढे घेतले. पण शेवटीं चीनला या मागण्यांनां नाखुषीनें कां होईना संमति देणें भाग पडलें. १९२० मध्यें व्हायकाउंट इशी हा लढाई लवकर संपविण्यासंबंधीं वाटाघाट करण्यासाठीं वॉशिंग्टन येथें बैठक भरली होती, तेथें गेला होता. त्यावेळीं अमेरिकेचा स्टेटसेक्रेटरी व ईशी यांच्यामध्यें चीनसंबंधीं धोरण निश्चित होऊन, चीनच्या सार्वभौमत्वावर कोणत्याहि प्रकारें घाला घालण्याचा अगर त्याला कमीपणा आणण्याचा जपानचा इरादा नाहीं असें जपान सरकारचें धोरण इशीनें जाहीर केलें.

१९१९ सालीं शांतता–परिषदेची बैठक पॅरिस येथें भरली त्या बैठकीला जपानतर्फे सौयोंझी, मॅकिनो, चिंडा, मत्सुई, इजुइन इत्यादि प्रतिनिधी हजर होते. या प्रतिनिधींनीं परिषदेपुढें दोन तीन महत्वाच्या मागण्या मांडल्या. त्यांपैकीं पहिली मागणी वर्णभेदाला कोणत्याहि राष्ट्रानें थारा न देतां, ज्याला त्याला आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर पुढें येण्याला मोकळीक असावी अशा स्वरूपाची होती. या प्रश्नावर मतें घेतां १७ पैकीं ११ मतें या मागणीला अनुकूल पडलीं. पण या प्रश्नावर ऐकमत्य असण्याची जरूरी असल्यानें हा प्रश्न लांबणीवर टाकण्याचें शांततापरिषदेनें ठरविलें; व अशा रीतीनें या जपानच्या न्याय्य मागणीला खो बसला.

जपानची दुसरी मागणी कियौचौ बंदर आपल्या ताब्यां त देण्यासंबंधींची होती. कियौचौ बंदर आपल्या ताब्यांत आल्यावर, तें आपण चीनला मैत्रीखातर देऊन टाकूं असें जपाननें यावेळीं जाहीर केलें. पण चीननें कियौचौ बंदर जपानला मिळूं नये असें जोरानें प्रतिपादन केलें. त्यामुळें जपानचा बराच हिरमोड झाला. पण परिषदेनें जपानच्या बाजूनें मत दिलें व त्यामुळें कियौचौ बंदर जपानच्या ताब्यांत आलें. त्याचप्रमाणें पॅसिफिक महासागरांतील जर्मनीच्या ताब्यांत पूर्वी असलेलीं ठिकाणें, मार्शल, कॅरोलिन, पेल्यू, मॅरियना इत्यादि बेटें जपानच्या ताब्यांत देण्यांत आलीं. कियौचौ जपानच्या ताब्यांत आल्यानंतर जपाननें हें ठिकाण ताब्यांत घेण्यासंबंधींची वाटाघाट करण्याकरितां चीनसरकारला लिहून पाठवलें पण चीनसरकारनें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. जपाननें पुष्कळदा यासंबंधानें वासलात लावण्याची विनंति केली; पण चीननें त्यासंबंधी पूर्ण मौनव्रत धारण केलें. चीन या संबंधाचा प्रश्न राष्ट्रसंघाच्या पहिल्या बैठकींत काढणार अशा संबंधाची अफवा उठली होती. पण त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. या बैठकींत जर्मनीच्या ताब्यांत असलेल्या दक्षिण समुद्रामधील बेटांची ग्रेटब्रिटन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व जपान या राष्ट्रांत वांटणी करावयाचें ठरविलें. यासंबंधींच्या प्रश्नावर मात्र अमेरिकेनें आक्षेप घेतला. यापवर वास्तविक जपानचा हक्क होता पण याप हें ठिकाण सर्व राष्ट्रांनां मोकळें असावें, असें अमेरिकेचें म्हणणें होतें पण अमेरिकेशिवाय सर्व राष्ट्रें जपानला अनुकूल होतीं. शेवटीं अमेरिकेनें जपानचा यापवरील ताबा कबूल केला व जपाननेंहि अमेरिकेला यापमध्यें व्यापार वगैरे करण्याला मोकळीक दिली.

जपानच्या युवराजाची यूरोपमधील सफर—१९२१ सालीं जपानच्या युवराजानें यूरोपभर सफर काढावयाचें ठरविलें. आज दोन हजार वर्षे जपानचा राजा हा जपान सोडून बाहेर गेला नव्हता; तेव्हां ही रुढी मोडणें अनिष्ट आहे असें कित्येकांचें म्हणणें पडलें; पण शेवटीं युवराजानें दौरा काढावयाचें ठरविलें; युवराजाचें इंग्लंडमध्यें जंगी स्वागत करण्यांत आलें व त्याच्या भेटीमुळें जपान व इंग्लंडमधील हितसंबंध पूर्वीपेक्षांहि दृढतर झाले.

जपानचें सामान्य राजकारण (अंतर्गत):—लष्कर व आरमार यांवर बराच पैसा खर्च केल्यामुळें आर्थिक व सामाजिक प्रगतीला धक्का बसला. १९२१ च्या नोव्हेंबर महिन्यांत मुख्य प्रधान टकशी हारा याचा खून पडला व त्याच्या जागीं बॅरन तकहशी प्रधान झाला. १९२१ सालांत लष्करी पक्षाचा वरचढपणा दिसून येत होता.

१९२२ च्या जूनमध्यें बॅरन केटो मुख्य प्रधान झाला. व १९२३ च्या जून महिन्यांत टोकिओ शहरांत एक जरा महत्त्वाचा कट उघडकीस आला. त्याच्या मागून १९२३ च्या आगस्टांत काउंट उचिडा (कांहीं काळ) व काउंट यामामोटो प्रधानपदारूढ झाले.

१९२३ च्या अखेरीस जपानांत प्रचंड भूकंप होऊन एका टोंकास कियोटो–ओसाका व दुसऱ्या टोंकास सेंडाय एवढा मोठा पूर्वकिनाऱ्यावरील प्रदेश उध्वस्त झाला. याकोहामा

व टोकियो या भागांत सर्वात जास्त हानि झाली. एकंदर मृत्युसंख्या ५ लाखांपर्यंत गेली. ओशिमाबेट पृथ्वीच्या पोटांत गडप होऊन दुसरें एक वर आलें. सर्व जगांत या भूकंपानें जपानविषयीं सहानुभूति उत्पन्न करून मोठा फंड गोळा केला. तथापि पूर्वीची स्थिति प्राप्त होण्यास बराच काल लागेल यांत शंका नाहीं.

१९२३ सालच्या भयंकर भूकंपानंतर जपानपुढें पुढील प्रश्न येऊन पडले; (१) आपद्ग्रस्त अशा लाखों लोकांना घरेंदारें व अन्न पुरविणें; (२) दंगेधोपे व लुटालूट यांपासून प्रजेचें रक्षण करणें; व (३) टोकिओ शहर पुन्हां नवीन बांधणें. या संकटांना तोंड देण्यांत जपाननें स्वावलंबन चांगलें दाखविलें. पण एक अति निष्ठुर व काळीमा आणणारी जी गोष्ट त्यानें केली ती म्हणजे सुमारें ३००० गोदींत मजूरी करणाऱ्या कोरियनांची कत्तल होय. या दुष्कृत्यांत जपानी अधिकाऱ्यांनीं भाग घेतला होता. या भूकंपांचा एक चांगला परिणाम म्हणजे समाजाच्या वरपासून खालपर्यंत आर्थिक व राजकीय विचारांच्या लाटा सारख्या आदळत आहेत. या दैवी संकटांतून वर निघण्याला लष्करी तुकड्यांनीं जी उत्तम मदत दिली तीपासून जपानला आपत्कालीं सुव्यस्था राखण्याचें मोठें महत्व कळून आलें; व याचा उपभोग भावी युद्धकालांत होईल. १९२४ च्या जून महिन्यांत चहा, दारू, जवाहीर, रेशीम वगैरे चैनीच्या मालांवर १०० टक्के जास्त कर लादण्यांत आला

जमाबंदी—१९२४ सालच्या फेब्रुवारींत लंडन व न्यूयार्क शहरीं प्रत्येकीं २५ दशलक्ष पौंडांचें कर्ज उभारण्यांत आलें. हें कर्ज तीस चाळीस वर्षांच्या मुदतीनें काढलें आहे.

लष्कर—१९२३ सालांतलें शांतताकालीन खडें सैन्य म्हणजे १६८७९ अधिकारी व २१६११४ शिपाई होत. यामागील सालींच लष्कर व आरमार यांवरचा खर्च बराच कमी करण्यांत आला होता. १९२४ च्या आक्टोबर महिन्यांत लष्करी खर्चांत आणखी ३१ ½ दशलक्ष येनची काटकसर करावी असा जपानी कॅबिनेटनें एक ठराव पास केला.

आजला जपानला आर्थिक स्थिति अगदीं प्रतिकूल आहे. कारण रूसो-जपान युद्धानंतर सर्वच मालाची मागणी मोठ्या प्रमाणांत वाढली व गेल्या महायुद्धांत उत्पानदाचा खर्च वाढला. गुकस्याच झालेल्या भूकंपानें या निकृष्ट स्थितींत भर पडली. १९२३ च्या सुधारणांमुळें कारखान्यांतील मजुरांची स्थिति कांहींशी सुधारली आहे. पण वॉशिंग्टन परिषदेनें सुचविलेल्या कामाच्या तासांपेक्षां त्यांचे तास अजून जास्तच आहेत.

बाह्य राजकारण (सामान्य)-आरमारी निःशस्त्रताः—१९२१ च्या नोव्हेंबर महिन्यांत वॉशिंग्टन येथें भरलेल्या परिषदेंत ब्रिटन, फ्रान्स, इटली व अमेरिका या राष्ट्रांनीं ज्या प्रमाणांत आपलें आरमारी बळ कमी केलें त्या प्रमाणांत कमी करण्यास जपान नाखूष दिसला. त्यामुळें ब्रिटनला मोठा पेंच पडला; कारण पुन्हां इंग्लंड व जपान यांमधील मैत्रीच्या उजळणीमुळें अमेरिकेशीं विरोध यावयाचा. जपानला अशी भीति वाटत होती कीं इतर राष्ट्रांनां आपलें बल खच्ची करावयाचें आहे. तेन्हां संमति दिली किंवा न दिली तरी आपणावर संकट आहेच. सरतेशेवटीं डिसेंबर महिन्यांत असें ठरलें कीं, ब्रिटन व अमेरिका यांनीं प्रत्येकीं ५ आरमारी जहाजें ठेविलीं तर जपाननें ३ ठेवावीं. म्हणजे जपानचें आरमार बरेंच कमी होत होतें. १९२२ सालांत (फेब्रुवारींत) पंचराष्ट्र-सैन्य कमिटीनें १५ वर्षांच्या मुदतीच्या तहावर सही केली; यांतील दोन महत्वाची कलमें म्हणजे आरमारी बलाला मर्यादा घालणें व युद्धप्रसंगीं पाणबोटी आणि पातळ रसायनें यांच्या उपयोगावर निर्बंध घालणें हीं होत.

१९२३ सालच्या भूकंपानें इतर राष्ट्रांचें जपानशीं वर्तन पालटत चाललें; देणग्या व कर्जे देऊन जपानला ताब्यांत ठेवण्याकडे त्यांचें लक्ष होतें.

१९२४ सालच्या सप्टेंबर महिन्यांत जेनेव्हा येथें जपाननें वरील निःशस्त्रतेच्या करारांत कांहीं महत्त्वाच्या कलमांची अंमलबजावणी न करण्याविषयीं दाद मागितली. हेतु हा कीं परदेशगमनाच्या प्रश्नासंबंधानें राष्ट्रसंघाकडे अपील करण्याचा जपानला हक्क असावा. म्हणजेच राष्ट्रसंघाच्या कौन्सिलचें क्षेत्र विस्तृत व्हावें. इतर राष्ट्रांचे प्रतिनिधी जपानच्या या मागणीविरुद्ध असल्यामुळें तींत कांहीं फरक करून ती कांहीं अंशीं कबुल केली; पण याचा परिणाम अमेरिकेला नाखुष करण्यांत झाला.

चीनशीं धोरणः—वॉशिंग्टन परिषदेच्या प्रारंभीं (सप्टेंबर १९२१) शांटुंग रेलवे बांधण्याची योजना जर सामायिक होत असेल तर आपण व्हर्सेलीसच्या तहामुळें मिळालेले निरनिराळे हक्क सोडण्यास तयार आहों असें जपाननें बोलणें लाविलें. या सामायिक घटनेंत जमाखर्च व कारभार या बाबतींत जपानचें वर्चस्व राहाणार हें ठरलेलेंच होतें. शिवाय चीनला रेलवेलाइनवर जपानच्या वागणुकीचा कटु अनुभव असल्यामुळें त्यानें जपानचें बोलणें मान्य केलें नाहीं. तथापि दोघांत संधि होऊन १९२२ च्या एप्रिलपासून जपाननें त्या रेल्वेवरचें आपलें सैन्य काढून घेण्यास आरंभ केला.

युनायटेडस्टेट्सशीं धोरणः—१९२१ सालांत (जूनमध्यें) जपाननें याप केबलवरचे समान हक्क अमेरिकेला देऊं केले. वॉशिंग्टनच्या परिषदेंतहि जपाननें भाग घेतला होता. अमेरिकेंत जपान्यांनां येऊं न देण्याबद्दल अमेरिकन सरकारनें केलेल्या कायद्याचा जपाननें जोराचा निषेध केला. उलट अमेरिकेनें जपानी खलित्यांतील प्रच्छन्न धाकाबद्दल तिरस्कार दाखविला. हा परदेशगमनाचा प्रश्न फार महत्वाचा होता; कारण त्यावर सबंध आशियांतील लोकांचें भवितव्य अवलंबून होतें. जपानमध्यें अमेरिकेविरुद्ध मोठी क्षोभाची चळवळ सुरू झाली. अमेरिकेच्या मालावर बहिष्कार घाल-

ण्याचें ठरविण्यांत आलें. याचा सूड म्हणूनच की काय कॅलिफोर्नियांत तीन जपान्यांचे खून झाले.

रशियाशीं धोरणः—रशिया व जपान यांमध्यें १९२४ च्या आगष्टांत एक तह ओंखण्यांत आला. त्याअन्वयें जपाननें उत्तर साखलिन बेट सोडून द्यावयाचें होतें व त्या भागांत आणि पूर्व सायबेरियांत जपानला कांहीं सवलती मिळणार होत्या.

[ संदर्भग्रंथः—लॅफकॅडियो हर्न-ग्लिंप्सेस ऑफ अनफॅमिलीयर जपान ( २ भाग ); औट ऑफ दि ईस्ट; हर्बर्ट पॉंटिंग-इन् लोटस लँड जपान (मॅकमिलन अँड को. १९१०); गॅस्टन मीजीऑन-इन जपान ( लंडन १९०८ ); पर्सीव्हल लोवेल-ऑकल्ट जपान ( १८९५ ); दि सोल ऑफ दि फार ईस्ट ( १८८८ ); जॉन डक्रॅक-यंग जपान; ॲलिस मॅबेल बेकन-जॅपनीज गर्ल्स अँड वुइमेन; चेंबर्लेन-थिंग्स जॅपनीज ( १९०५ ); अर्नेस्ट क्लेमंट-ए हॅंडबुक ऑफ मॉडर्न जपान; ॲस्टन-ए हॅंडबुक ऑफ कलोक्वियल जॅपनीज; एडवर्ड मोर्स-जॅपनीज होम्स ( १८९५ ); डॉ. इनेसो नितोबे-दि जॅपनीज नेशन ( १९१३ ); मिटफर्ड-टेल्स ऑफ ओल्ड जपान; नील गॉर्डन मन्रो-दि कॉईन्स ऑफ जपान ( १९०४ ); जेम्स मर्डाक-हिस्ट्री ऑफ जपान ( १९१० ); विल्यम ग्रिफिस-मिकॅडोज एम्पायर; पॅपिनॉट-हिस्टरी अँड जॉग्रफी ऑफ जपान; ॲस्टन-हिस्टरी ऑफ जॅपनीज लिटरेचर; रीन-इंडस्ट्रीज ऑफ जपान; जोशाया कॅंडॉर-लँडस्केप गार्डनिंग इन् जपान; विल्यम अँडर्सन-दि पिक्टोरियल आर्ट्स ऑफ जपान; डॉ. मरे-जपान ( स्टोरी ऑफ नेशन्स सीरीज ); व्हायकौंट ओक्यूमा-फिफ्टी इयर्स ऑफ मॉडर्न जपान; प्रो. हॅरीसन-मॉडर्न जपान; स्टेड-जपान; स्कॉट-मॉडर्न फाउंडिंग ऑफ जपान; टेरी-गाइड टु दि जॅपनीज एम्पायर; एडवर्ड्स-जॅपनीज प्लेफेलोज ( १९०१ ); कॅप्टन ब्रिंक्ले-जपान ( १२ भाग ). ]

**जपानी वार्निस** ( ब्लॅक जपान ).—या झाडास लॅटिनमध्यें ऱ्हुस वार्निसिफेरा म्हणतात. या झाडापासून प्रसिद्ध जपानी वार्निश होतें. हें झाड जपानचें मुख्य बेट व किनशिन व शिकोकू यांत सर्वत्र होतें. टोकिओपासून उत्तरेकडील प्रदेशांत मात्र हें झाड जोरानें वाढतें. हिंदुस्थानांत याची लागवड करण्याचा बराच प्रयत्न झाला; परंतु त्यांत विशेष यश आलें नाहीं. जानेवारी अथवा फेब्रुवारींत याचें बीं पेरितात, किंवा चांगल्या झाडापासून कलमें तयार करतात. झाडाच्या खोडास खांचा पाडून रस गोळा करतात. दर चवथ्या दिवशीं नवीन खांचा करितात व एका पसरट लोखंडी हत्यारानें रस खरडून काढतात. खांचा वरपर्यंत करीत जातात. अशा रीतीनें शेंड्यापर्यंत पोहोंचल्यावर झाड तोडून त्याचे तुकडे करितात. त्यांचे गठ्ठे बांधून ते १० पासून वीस दिवसपर्यंत पाण्यांत बुडवून ठेवितात. नंतर साल काढून पहिल्याप्रमाणेंच रस गोळा करितात. रसाचा रंग करडा व तपकिरी असून तो चिकट असतो. रसाचें भांडें तसेंच ठेविलें तर चांगला भाग वर येतो व खराब खालीं बसतो. उघड्या हवेंत रस ठवळला म्हणजे लाख सुकते, त्यांत प्राणवायु मिसळतो व त्याचा काळा चकचकीत रंग होतो. लांकडाच्या वस्तूवर बहुतकरून हा लाखेचा रंग चढवितात. प्रथम वार्निसाचा पातळ हात देऊन पृष्ठभाग वारंवार दगडी कोळशानें घासतात. हरिणाच्या शिंगाच्या राखेनें वर (पॉलिश) देतात; त्यावर पुन्हां पुन्हां वार्निश देतात. बारीक लवचीक कागदावर नमुना तयार करितात, त्याला गरम करून पृष्ठभागावर चिकटवितात जर नमुना सोनेरी रंगांत काढावयाचा असेल तर लाखेंत बुडविलेल्या केंसासारख्या बारीक लेखणीनें त्यावर आकृती काढतात. तो वाळून चिकट झाल्यावर त्यावर सोनेरी पूड टाकतात.

**जबलपुर**, जिल्हा.-मध्यप्रांत,जबलपुर भागांतील जिल्हा. उत्तर अक्षांश २२° ४९' ते २४° ८' व पूर्व रेखांश ७९°२१' ते ८०° ५८'. क्षेत्रफळ ३९१२ चौरस मैल. पूर्वेस व उत्तरेस मैहर, पन्ना आणि रेवा हीं संस्थानें; पश्चिमेस दमो जिल्हा आणि दक्षिणेस नरसिंगपूर, शिवणी आणि मंडला. नर्मदा नदी या जिल्ह्यांतून वहाते. नर्मदेच्या उत्तरेस सपाट प्रदेश असून पलीकडे वायव्येस विंध्याद्रि पर्वत आहे; व दक्षिणेस देखील तसाच सपाट प्रदेश असून पलीकडे सातपुडा पर्वत आहे. वायव्येकडील सपाट प्रदेशास हवेली असें नांव असून हा मध्यप्रांतांत फार सुपीक आहे. हवेलीच्या उत्तरेस विंध्याद्रि व सातपुडा हे जवळ जवळ येत असून मुरवार तहसिलींत तर ते एकमेकांशीं जोडले गेले आहेत. या जिल्ह्यांत झाडी पुष्कळ असून डोंगरांत जंगलहि विपुल आहे. वाघ, चित्ते, सांबर वगैरे वन्य प्राणी साधारणपणें आढळतात. पावसाची वार्षिक सरासरी ५९ इंच असून हवा चांगली आहे. उन्हाळ्यांत १०६ अंशांच्यावर पारा कधीं जात नाहीं.

इतिहासः—जबलपुराहून थोड्या मैलांवर असलेलें तेवर नांवाचें खेडें म्हणजे त्रिपुर अथवा करणवेल नांवाचें प्राचीन शहर होय हें सिद्ध झालें आहे. हें पूर्वी कलचुरी राज्याच्या राजधानीचें शहर होतें. कलचुरी चेदी राज्याचा इतिहास जबलपुर, छत्तिसगड व बनारस येथें सांपडलेल्या शिलालेखांवरून तयार करण्यांत आला आहे. छत्तिसगडावर राज्य केलेल्या रतनपुर घराण्याच्या एका शाखेपैकीं हे असून हैहय रजपूत होते. ख्रिस्ती शकाच्या आरंभीं हे उदयास आले. यांचा चेदि संवत प्रसिद्ध असून तो इ. स. २४९ मध्यें सुरू झाला. त्यांच्या पहिल्या पांच सहा शतकांतील इतिहासासंबंधीं फार थोडी माहिती आहे. परंतु ख्रिस्ती शकाच्या नवव्या ते बाराव्या शतकापर्यंत म्हणजे सुमारें तीनशें वर्षांतील यांचा इतिहास बराच सांपडतो. या काळांतील झालेल्या अठरा राजांचीं नांवें, त्यांनीं केलेल्या लढाया व त्यावेळचीं आसपास असलेलीं राज्यें—कनोजचे राठोड, महोबाचे चंदेल

आणि माळव्यांचे परभार यांविषयीं कांहीं माहिती सांपडते. त्यांचें राज्य नर्मदेच्या वरील खोऱ्यांत पसरलें होतें. बाराव्या शतकापासून यांचा इतिहास मिळत नाहीं. बहुधां त्यावेळीं तें राज्य नाश पावलें असावें. पंधराव्या शतकाच्या सुमारास गोंड गढा-मांडला राज्याच्या प्रदेशांत जबलपुरचा समावेश होत होता; आणि त्यावेळीं गढा ही राजधानी होती. इ. स. १७८१ मध्यें मराठ्यांनीं गोंड राज्याचा नाश केल्यावर जबलपूर पेशव्यांच्या सागर मुलुखांत समाविष्ट झालें. इ. स. १७९८ सालीं हा मुलूख नागपूरच्या भोसल्यांकडे देण्यांत आला; व इ. स. १८१८ सालीं येथें ब्रिटिश राज्य स्थापित झालें. इ. स. १८५७ सालच्या बंडांत येथें थोडी गडबड झाली होती या जिल्ह्याचा बिजेराघोगड नांवाचा एक उत्तरेकडील परगणा पूर्वी एक संस्थान होतें. परंतु संस्थानिक बंडांत सामील झाला असल्या कारणामुळें त्यास पदच्युत करण्यांत आलें; व तो परगणा इ. स. १८६५ मध्यें जबलपूर जिल्ह्यात समाविष्ट करण्यांत आला. निरनिराळ्या वंशाच्या व धर्माच्या लोकांनीं या भागांत वास्तव्य केलें असल्यामुळें त्या त्या लोकांनीं करून ठेवलेलीं जुनीं कामें येथें पहाण्यास मिळतात.

लोकसंख्या ( १९२१ ) ७४५६८५. या जिल्ह्यांत शेंकडा ८७.५ हिंदु, ५.५ वन्यधर्मीय, ५.५ मुसुलमानी व सु. ७००० जैन लोक आहेत. पूर्वेकडील हिंदीच्या उपभाषेपैकीं बाघेली नामक उपभाषा या जिल्ह्यांतील लोक बोलतात. गहूं, भात, हरभरा, तिळ वगैरे. येथील मुख्य पिकें होत. या जिल्ह्यांत पुष्कळ ठिकाणीं, मुख्यत्वेंकरून सिरोहा तहसिलींत लोखंडाच्या खाणी आहेत. गोसलपूर, सिरोहा, खितोळा वगैरे गांवीं मँगेनीज धातूच्या खाणी आहेत. स्लीमनाबाद येथें तांबें सांपडतें. चुनखडीचा दगड या जिल्ह्यात विपुल आहे. संगमरवरी दगड येथून बाहेर जातो. हातमागाचा धंदा हल्लीं पूर्वीप्रमाणें चालत नाहीं. गोकुळदास स्पिनिंग ॲंड वीव्हिंग मिल्स, कौलें विटा, दारू वगैरे करण्याचे कारखाने, जबलपुर जिल्ह्यांत आहेत. गहूं, गळिताचीं धान्यें, कातडीं, शिंगें बाहेर जातात. मुंबई ते कलकत्ता जाणारा आगगाडीचा रस्ता या जिल्ह्यांतून जातो. जिल्ह्यांत निरनिराळे आगगाडीचे फांटे आहेत.

त ह सी ल.—मध्यप्रांत. जबलपूर जिल्ह्यांतील एक तहसील. उत्तर अक्षांश २२°४९′ ते २३° ३२′ व पूर्वरेखांश ७९°२१′ ते ८०°३६′. क्षेत्रफळ ११९७ चौरस मैल. लोकसंख्या ( १९११ ) १६१२०६. या तहसिलींत १ गांव व ७३५ खेडीं आहेत. इ. स. १९०३-०४ सालीं जमीन-महसूल ४५४००० व इतर कर ५१००० रुपये होता. पश्चिमेकडे जबलपूर हवेली म्हणून जो भाग आहे तो फार सुपीक आहे.

श ह र.—मध्यप्रांत. जबलपूर भाग, जिल्हा व तहसिलीचें मुख्य ठिकाण असून जी. आय. पी. रेल्वेनें मुंबईहून ६१६ मैल लांब आहे. उ. अ. २३ ° १०′ व पू. रे. ७९ ° ५७′. शहरापासून सुमारें सहा मैलांवरून नर्मदा नदी वहात गेली आहे. संगमरवरी दगडाच्या खडकांमधून ज्या ठिकाणीं नर्मदा नदीचा प्रवाह वहात चालला आहे तें भेडघांट ठिकाण येथून १३ मैलांवर आहे. जबलपूर शहर व्यवस्थित वसलें असून रस्ते रुंद आहेत व आसपास तळीं व बागा पुष्कळ आहेत. याची समुद्रसपाटीपासून उंची १३६० फूट आहे. त्यामुळें येथील हवा मध्यप्रांतांतील इतर ठिकाणांशीं तुलना केल्यास थोडी थंडच आहे. या शहराचें उत्तरोत्तर महत्त्व वाढत आहे. लोकसंख्या ( १९२१ ) १०८७९३.

पूर्वींच्या गढमांडलानामक गोंड राज्याची गढ नांवाची राजधानी या शहराच्या पश्चिमेस चार मैलांवर असून तिचा समावेश येथील म्युनसिपालिटींतच केलेला आहे. या ठिकाणीं ११०० सालीं मदनसिंगानें बांधलेला मदनमहाल हल्लीं पडक्या स्थितींत पहावयास मिळतो. सोळाव्या शतकांत मांडला राजधानी झाल्यामुळें गढचें महत्त्व कमी झालें. खुद्द जबलपुरचा इतिहास फारसा माहीत नाहीं. इ. स. १७८१ मध्यें मराठ्यांनीं मांडलाचें राज्य खालसा केल्यावर त्यांनीं जबलपुर हें त्या भागाचें मुख्य ठिकाण केलें. नागपूर म्युझिअममध्यें संगृहीत केलेल्या एका शिलालेखात याचें नांव जावलीपाटणा असें दिलेलें आहे. नंतर हें शहर सागर व नर्मदाकांठचा प्रदेश यावरील कमिशनरचें मुख्य ठिकाण करण्यांत आलें. पुढें हा भाग इसवी सन १८६१ मध्यें मध्यप्रांतांत समाविष्ट करण्यांत आला. पुढें १८६४ सालीं येथें म्युनिसिपालिटी स्थापन झाली. इ. स. १८८३ सालीं गांवात नळाच्या पाण्याची सोय करण्यांत आली.

हा गांव व्यापारी दृष्टीनें बराच महत्त्वाचा आहे. शिवणी, मांडला व जबलपुर या तिन्ही जिल्ह्यांतील उत्पन्न होणारा बहुतेक माल येथें येतो. येथें कापडाची गिरणी, कौलाविटांचें कारखानें, दारूची भट्टी, बर्फाचा कारखाना, तेलाच्या व पिठाच्या गिरण्या, जी. आय. पी. रेल्वेचीं वर्कशॉप्स वगैरे आहेत. याशिवाय हातमाग, पितळकाम, संगमरवरी दगडाच्या मूर्ती बनविणें, आणि अगेट नावाच्या दगडाचीं बटणें व इतर दागिने तयार करणें वगैरे धंदे चालतात. अगदीं अलीकडे ठग, कैदी व त्यांचे वंशज येथें तंबू तयार करीत असत. परंतु हल्लीं हा धंदा बंद झाला आहे.

येथें कमिशनर रहातो व जिल्ह्याच्या सर्व कचेऱ्या येथें आहेत. येथील तुरुंगांत बरेच लहान लहान धंदे शिकविण्याची सोय आहे. उच्च शिक्षणाचें येथें एक कॉलेज आहे. तरुण गुन्हेगारांस सुधारण्याकरितां एक रेफमेंटरी असून त्या गुन्हेगारांस छोटे छोटे धंदे शिकविण्याचीं तींत सोय केली आहे. सात आठ हायस्कूलें असून त्यांपैकीं

दोन मुलींचीच आहेत. रॉबर्टसन इंडस्ट्रियल स्कूल नांवाची एक धंदेशिक्षणाची शाळा आहे. पांच सहा वर्तमानपत्रें व नियतकालिकें निघतात. केवळ स्त्रियांकरितां लेडी एल्जिन हॉस्पिटल आहे.

**जंबुकेश्वरम्**—मद्रास इलाख्यांतील त्रिचनापल्ली जिल्ह्यांत श्रीरंगम् बेटावर हें एक प्रख्यात शिवालय आहे. सौंदर्य, शिल्पकला, आणि पुरातनपणा या बाबतींत जंबुकेश्वरम् प्रसिद्ध आहे. येथील शिवलिंग पंचतत्त्वांपैकीं एक असून, एका आपतत्त्वानें तें परिवेष्टिलें आहे. फर्ग्यूसननें देवळाचें खालील प्रमाणें वर्णन दिलें आहे.:—

बाह्य प्राकाराचें प्रथम द्वार मोठें नसून त्यांतून आंतील सभामंडपांत थेट जातां येतें. सभामंडप सुमारें चारशें खांबांचा आहे. याच्या उजव्या बाजूला एक तळें असून त्यांतील पाणी एका कायमच्या झऱ्यावाटे येतें. डावी बाजू ६०० खांबांकरितां राखून ठेवण्यांत आली होती असें दिसतें; पण तो खांबांचा भाग पुरा झालेला नाहीं. एकंदर हजार खांब बसवावयाचे होते पण त्यांपैकीं सारे ७९६ च खांब उभे आहेत. सभामंडपाशेजारील लहान तळ्याभोंवतालचे १४२ खांब धरल्यास हल्लींची खांबांची संख्या ९३८ होते. दुसऱ्या प्राकारावर दोन गोपुरांमध्यें स्वस्तिकाकृती एक सुंदर ढेलज असून त्यांतून गाभाऱ्यांत जाण्यास एक दरवाजा आहे.

फर्ग्युसनच्या मतें या देवळाचा काल सुमारें इ. स. १६०० हा असावा. तथापि तेथील एक शिलालेख इ. स. १४८० मधील असावा असें म्हणतात. पूर्वी, म्हणजे ज्या वेळीं संप्रदायासंप्रदायांत फारसा मत्सर नव्हता, त्यावेळीं वर्षांतून एक वेळ विष्णुमूर्ति या देवळाच्या आवारांत मोठया थाटानें आणीत, पण हल्लीं हा प्रकार शैववैष्णवपंथांतील तीव्र विरोधामुळें बंद पडला आहे.

**जंबुद्वीप**—पृथ्वीच्या सप्तमहाद्वीपांतील पहिलें. हें मेरूच्या आसमंताद्भागीं वर्तुलाकार असून याच्या मध्यभागीं मेरु आहे. याचा व्यास एक लक्ष योजनें आहे व यास इतक्याच रुंदीच्या क्षारसमुद्राचें वेष्टन आहे. येथील अधिपति कल्पारंभीं यवत राजाचा पुत्र अग्नीध्र होता. त्यास नऊ पुत्र होते म्हणून त्यानें त्याचे वर्षसंज्ञक नऊ भाग करून एकेक वर्षाचें आधिपत्य एकेकास दिलें. त्या भागांचीं नांवें अशीं - अजनाभवर्ष, किंपुरुषवर्ष, हरिवर्ष, भद्राश्ववर्ष, रम्यकवर्ष, हिरण्मयवर्ष कुरुवर्ष, केतुमालवर्ष आणि या सर्वांच्या मध्यभागीं इलावृतवर्ष. या द्वीपांत शत योजनें लांबीच्या व तितक्याच रुंदीच्या म्हणजे दशसहस्र योजनें क्षेत्रफळाच्या प्रमाणाचे सत्तावन सहस्र देश असून यास भारतांत सुदर्शनद्वीप असें म्हटलेलें आहे [ भीष्म. अ. ५ ].

**जंबूसर तालुका**—मुंबई इलाखा. भडोच जिल्ह्याचा उत्तरेकडील तालुका. उत्तर अक्षांश २१° ५४' ते २२° १५' व पूर्व रेखांश ७२° ३१' ते ७२° ५५'. लोकसंख्या ( १९०१ ) ६०६४४. क्षेत्रफळ ३८७ चौरस मैल. या तालुक्यांत एक गांव व ८२ खेडीं आहेत. इ. सन १९०३-४ सालीं एकंदर उत्पन्न ५.३ लाख होतें. पूर्वेकडील भाग जवळ जवळ ओसाड असून पश्चिमेकडचा भाग साधारण बरा आहे. या भागांत पाणी पुष्कळ असून गोड आहे. पूर्वेकडील भागांत पाणीपुरवठा कमी आहे. मुख्य पिकें म्हटलीं म्हणजे ज्वारी, बाजरी, गहूं हीं असून डाळी, तंबाखू, कापूस, नीळ इत्यादि पिकेंहि होतात.

**गांव**—मुंबई. भडोच जिल्ह्यांतील जंबूसर तालुक्याचें मुख्य ठिकाण. उत्तर अक्षांश २२° ३' व पूर्वरेखांश ६२° ४८' हें ठिकाण भडोचपासून २७ मैल असून स. १९११ सालीं ८९११ लोकसंख्या होती. ब्रिटिशांच्या ताब्यांत हा गांव प्रथमतः इ. स. १७७५ सालीं गेला. तो त्यांच्या ताब्यांत इ. स. १७८३ पर्यंत होता. पुढें तो मराठ्यांचा मराठयांस परत मिळाला. इ. स १८१७ च्या पुण्याच्या तहान्वयें हा पुन्हां ब्रिटिशांकडे आला. गांवाच्या उत्तरेस नागेश्वराचा सुंदर तलाव असून येथूनच गांवास पाणीपुरवठा होतो. या तलावामध्यें ४० फूट व्यासाचें एक लहानसें बेट आहे. ज्यावेळीं इ. स. १७७५ पासून इ. स. १७८३ पर्यंत गांव ब्रिटिशांकडे होता त्या वेळीं तेथील अधिकाऱ्यांनें एक किल्ला बांधला होता. तेथें हल्लीं सरकारी कचेऱ्या आहेत. म्युनिसीपालिटीची स्थापना इ. स. १८५६ मध्यें झाली. पूर्वी येथें व्यापार बराच चालत असे. परंतु रेल्वे झाल्यामुळें या भागांतील व्यापार बराच कमी झाला आहे.

**जमखिंडी संस्थान**—मुंबई इलाख्यांतील दक्षिण महाराष्ट्रांत कोल्हापुरच्या पोलिटिकल एजंटाच्या हाताखालीं असलेलें एक संस्थान. हें उ. अ. १६°२६' ते १६° ४६' व पू. रे. ७५° ७' आणि ७५° ३७' यांच्या दरम्यान असून याचें क्षेत्रफळ ५२४ चौरस मैल आहे. संस्थानांत जमखिंडी, बिद्री व कुंदगोळ हे तीन तालुके व बाठार, पाटखळ व ढवळपुरी हीं तीन ठाणीं आहेत.

इ. स. १९२१ सालीं १०११९४ लोकसंख्या होती. या संस्थानात ८७ । ८८ गांवें आहेत. गहूं व कापूस हें संस्थानाचें मुख्य पीक आहे. दक्षिण महाराष्ट्रांतील पहिल्या प्रतीचे सरदार म्हणून येथील संस्थानिकास मान असून त्यांना दत्तकाची परवानगी आहे. ब्रिटिश सरकारास २०५१५ रुपये खंडणी द्यावी लागते. संस्थानचें उत्पन्न(इनामी रक्कम सोडून )७१९४५७ रुपये आहे.

संस्थानिक व त्याचा परिवार यांच्या खासगी खर्चास पृथक् तनखा ठरवून दिला असल्यानें संस्थानच्या बजेटांत घोटाळा होत नाहीं. शिक्षणखात्याकडे सढळ हातानें खर्च होतो. एकंदर ७७०२९ रु. म्हणजे एकंदर उत्पन्नाच्या एक बारांश रक्कम खर्च होते. गरीब विद्यार्थ्यांना संस्थानांतून मधुकरी मिळते व शिक्षण मोफत मिळतें. सार्वत्रिक शिक्षण ( मराठी प्राथमिक ) मोफत व सक्तीचें असून सरकारी

इंग्रजी हायस्कुलांत ही अगदी थोडी घेतात. संस्थानचा जुना पुस्तकसंग्रह व अजबखाना अमोलिक आहे. येथील वाचनालयासहि सरकारी मदत आहे. शेतकीच्या उत्कर्षासाठीं दरसाल जनावरांचें प्रदर्शन भरविलें जातें. पाण्याच्या सोईसाठीं आतांपर्यंत लक्षावधी रु. खर्च संस्थाननें केला आहे; पण त्याबद्दल प्रजेकडून कांहींहि रकम घेतली नाहीं. संस्थानांत सर्वत्र दवाखाने आहेत. उच्च शिक्षणाकरितां शिष्यवृत्त्या आहेत. इतक्या सुधारणा माजी संस्थानाधिपती भाऊसाहेब यांच्या वेळीं होत्या. शिवाय, त्यांनीं आपल्या प्रजेची गऱ्हाणीं दरबार भरवून ऐकण्याचा परिपाठ ठेविला होता.जमखिंडीस लोकसभेची स्थापनहि त्यांनीं केली व संस्थानच्या कारभारावर टीका करण्याचा अधिकार प्रजेस दिला.

संस्थानांत ६ म्युनिसिपालिटया आहेत. इंग्रज सरकार संस्थानास अबकारी हक्काबद्दल सालिना ४६६०० रु. देतें. हातमागांचा प्रसार संस्थानांत बराच आहे. ज्वारी, कापूस, गहूं, गळिताचीं धान्यें व पढे यांची निर्गत संस्थानांतून होते, ती सरासरी ९ । १० लाखांची होते. एक हायस्कूल, तीन अँग्लोव्हर्न्यांक्युलर स्कूल्स, एक संस्कृत पाठशाळा, एक रात्रीची शाळा,सुमारें ७४ प्राथमिक शाळा ( मुलींच्या व अस्पृश्यांच्या धरून ) असून शिक्षितांचें प्रमाण लो. सं. शीं शेंकडा ६६ आहे. जमखंडीस एक सरकारी बँकहि आहे. संस्थानांत सॅनिटरी कमीटया बऱ्याच आहेत.

इ ति हा स.—येथील पटवर्धन घराण्याचें मूळ ठिकाण रत्नागिरीजवळील कोतवडें गांव होय. तेथील हरभट पटवर्धन हा या घराण्याचा मूळ पुरुष. त्याची स्त्री लक्ष्मीबाई ही शेंडे घराण्यांतील होती. दारिद्र्यामुळे हरभटानें शेजारील पुळयांच्या गणपतीपाशीं १२ वर्षे दुर्वारस पिऊन पुरश्चरण केलें. पुढें देशावर येत असतां वाटेंत इचलकरंजीकरांचा मूळ पुरुष नारोपंत जोशाची गांठ पडली. दोघेहि संताजी घोरपडे सेनापतीच्या पदरीं राहिले. पुढे नारोपंत हे घोरपड्यांच्या हाताखालीं मोठे सरदार झाले व हरभटजीस नारोपंताची उपाध्येगिरी मिळाली.

हरभटजीस सात पुत्र होते. रामचंद्र, महादेव, भास्कर, गोविंद, कृष्ण, त्रिंबक आणि बाळकृष्ण; यांपैकीं त्रिंबक, गोविंद व रामचंद्र हे पुढें नांवलौकिकास चढले. रामचंद्राचा मुलगा परशुरामभाऊ हा तर सर्व पटवर्धन सरदारांत प्रख्यात होऊन गेला. या भाऊच्याच जहागिरीपैकीं जमखिंडी संस्थान हा एक अवशिष्ट भाग आहे.

पेशवे व इचलकरंजीकर घोरपडे यांचा शरीरसंबंध झाला त्यावेळीं हरभटाच्या पुत्रांनां पेशव्यांच्या दरबारीं शिरकाव मिळाला. रामचंद्र व गोविंद या बंधूंस प्रथम इंद्रोजी कदम या एका पथकऱ्याच्या पागेच्या फडणिशीचें काम मिळालें. इंद्रोजीस संतती नसल्यानें त्यांच्या पश्चात त्याची पागा, त्याच्या इच्छेनुसार गोविंदरावास मिळाली. तसेंच रामचंद्रपंतास चिमाजीआप्पा पेशवे यांनीं आपल्या खाजगीपथकांत दाखल केलें; तेथें त्यांनीं पराक्रम गाजविल्यानें शेवटीं आप्पांनीं आपलें सारें खासगी पथक ( २४०० स्वारांचें ) त्याच्याच नांवानें केलें. रामचंद्रपंत इ. स. १७४९ च्या अबदालीच्या स्वाऱ्यांत त्याच्याशीं पेशव्यांच्या सैन्यातर्फे लढत होता. त्याच्याकडे अंतर्वेदच्या रक्षणाचें काम होतें. इकडे असतां उदराच्या व्यथेनें तो. स- १७४९ च्या नोव्हेंबरांत वारला. त्यावेळीं परशुरामभाऊ हा १० वर्षांचा होता. हरभटाचा कृष्णभट म्हणून एक पुत्र होता. त्याचा मुलगा पुरुषोत्तम हा लहानपणापासून रामचंद्रपंताजवळ असे. त्यानें रामचंद्राच्या नांवाची पथकाची सरदारी परशुरामाच्या नांवें करून घेतली.

परशुरामभाऊस पुरुषोत्तमदाजीनें चांगलें शिक्षण दिलें. भाऊनें बहुतेक मोहिमा कर्नाटक व हैदर–टिपूवर केल्या. लॉर्ड कॉर्नवालीस याला भाऊनें अनेक वेळां मदत केली होती. नाना फडणविसाचा भाऊ हा पुष्कळ दिवस उजवा हात होता. महादजी शिंद्यानें नानांचें वर्चस्व कमी करण्याचा घाट घातला तेव्हां भाऊनें नानांची पाठ सोडिली नाहीं. खर्ड्याच्या लढाईत मुख्य सेनापती भाऊच होता. पुढें सवाईमाधवरावसाहेबांच्या पश्चात् नानांच्या विरुद्ध जाऊन भाऊनें चिमणाजी माधवराव यांस पेशवे करून आपण स्वतःकारभारी झाला परंतु थोड्याच दिवसांत नानांनीं कारस्थान करून रावबाजीस गादीवर बसविलें; तेव्हां भाऊ, चिमणाजी माधवरावासह पळून जात असतां पकडले जाऊन कैदेंत पडला. पुढें कांहीं दिवसांनीं, सातारकर व कोल्हापुरकर छत्रपतींच्या दंग्यांचा मोड करण्याकरितां भाऊस सोडिलें; त्यांनीं ते दंगे मोडले. परंतु करवीरकरांनीं भाऊच्या गैरहजेरींत त्याचा तासगांव येथील रहाण्याचा चंदनी वाडा जाळून टाकला होता. त्याचा राग येऊन व पेशव्यांचाहि हुकूम झाला म्हणून, भाऊ कोल्हापुरकरावर चालून गेला. त्यावेळीं त्याचें वय ६५ वर्षांचें होतें. त्यानें आपली सर्व जहागीर व प्रांत कोल्हापुरकराच्या हातून सोडविला. शेवटीं पट्टणकुडीच्या लढाईंत भाऊ जखमी होऊन पाडाव झाला असतां, कोल्हापुरकरांनीं निर्दयपणें त्याला ठार मारिलें.

भाऊचा पुत्र रामचंद्रपंतआप्पा यासहि वरील लढाईंत जखमा झाल्या होत्या. याला हरि, माधव व गणेश असे तीन भाऊ होते. रामचंद्रपंत हाच जमखिंडीचा पहिला अधिपती होता. हा जमखिंडीस येऊन राहिला व तासगांवीं गणेशपंत राहिला. ही वांटणी स. १८११ च्या सुमारास झाली. यावेळीं जमखिंडी जहागिरीचें उत्पन्न ४५४१६० रु. होतें व त्याबद्दल पदरीं १७२८ स्वार बाळगावे लागत. तासगांवचें उत्पन्न २०८७७६ रु. असून, त्याबद्दल ६४० स्वार ठेवावे लागत.

पेशवाई गेल्यावर तासगांवीं गणेशपंत व त्याचे पुत्र गोपाळ व गोविंद हे होते. गणेशपंताचा वडील भाऊ हरि हा निपुत्रिक वारला. जमखिंडीकर रामचंद्रआप्पा या वेळीं

वारला असून त्याचा पुत्र गोपाळराव हयात होता. रामचंद्र-आप्पाचा दुसरा पुत्र माधव वारला होता व त्याचा पुत्र गोविंद जिवंत होता. माधवरावानें आपला स्वतंत्र वांटा घेतला नाहीं तो जमखिंडी संस्थानांतच राहिला.

जमखिंडीस रामचंद्रआप्पानंतर गोपाळराव अधिपती झाला. याच्याशीं इंग्रजांनीं तह करून त्याला तीस हजारांची जाततैनात देऊन त्याबद्दल ३००० स्वार ठेवण्यास सांगितलें. चिंचणीसंस्थान जमखिंडीतून फुटून निघाल्यानंतर (१८२१) जमखिंडीचें उत्पन्न २४३४०६ रु. राहिलें व चिंचणीचें २२५१५३ रु. उत्पन्न झालें. यावेळीं तैनाती फौज न ठेवितां रोख रुपयेच खंडणीदाखल देण्याचें ठरलें.त्याप्रमाणें १५० स्वारांबद्दल जमखिंडीसंस्थानानें २०५१५ रु. खंडणी दरसाल द्यावी असें ठरलें त्याप्रमाणें आजतागाईत इतकी रकम खंडणीदाखल दरसाल इंग्रजसरकारास मिळते.

गोपाळराव हा निपुत्रिक वारला ( १९ नोव्हेंबर १८४०). त्यानें एक मुलगा दत्तक घेतला; त्याचें नांव रामचंद्रराव आप्पासाहेब. हा दत्तकाच्या वेळीं ७ वर्षांचा होता. दत्तक प्रसंगीं इंग्रजसरकारनें १ लक्ष ४० हजार रु. नजराणा घेतला. आप्पासाहेबांच्या लहाणपणांत त्यांची दत्तक आई कारभार पाहत असे; परंतु अशामुळें बखेडा होऊं लागल्यानें इंग्रजांनीं कारभारी नेमला. आप्पासाहेबास योग्य शिक्षण देऊन ता. १० जानेवारी १८५३ त संस्थानचा अखत्यार दिला. यांच्या कारकीर्दींत संस्थानांत पुष्कळ (विशेषतः शिक्षणाच्या बाबतींत ) सुधारणा झाल्या. मध्यंतरीं बंडाच्या वेळीं(१८५७) आप्पासाहेबांच्या वर्तनाविरुद्ध इंग्रज सरकारास संशय येऊन त्यांनीं त्यांस २२ मार्च १८५८ रोजीं प्रतिबंधांत ( प्रथम बेळगांव व पुढें वेंगुर्लें येथें ) ठेविलें; पुढें चौकशी करून त्यांना मुक्त करण्यांत आलें (७ जानेवारी १८५९ ). त्यापुढें त्यांनीं पुष्कळ दिवस राज्य करून व सर्व तऱ्हेनें संस्थानची सुधारणा करून ता. १२ जानेवारी स. १८९७ रोजीं देह ठेविला.

आप्पासाहेब यांनीं (पुत्र न झाल्यामुळें) चिंचणी घराण्यातील गोविंदराव यांचा नातु व कृष्णरावाचा वडील पुत्र दाजीसाहेब यास ता. १५ डिसेंबर १८९६ रोजीं दत्तक घेऊन त्याचें नांव परशुरामपंत भाऊसाहेब ठेविलें यांचा जन्म १८८३च्या मे महिन्यांत झाला. त्यांना वयाच्या विसाव्या वर्षी ता. ४ जून स. १९०३ सालीं मुखत्यारी मिळाली. शिक्षण राजकुमार कॉलेजांत झालें होतें. त्यांना के. सी. आय ई. व सर या पदव्या होत्या. यांना शंकरराव आप्पासाहेब व ताराबाई ऊर्फ शकुंतलाबाई अशीं दोन अपत्यें आहेत. श्रीमंत भाऊसाहेब यांचें प्रथम कुटुंब पुण्याच्या थोरल्या रास्त्यांच्या घराण्यांतील होतें. त्यांचेच पुत्र शंकरराव होत. हें कुटुंब स. १९०७ त वारल्यानें श्रीमंतांनीं दुसरा विवाह ( पुण्याचे दामले घराण्यांतील मुलीशीं ) केला. यांचें नांव श्री. रमाबाईसाहेब आहे. चित्रकलेंत यांची बरीच प्रगति असून स्त्रीशिक्षणाबद्दल त्यांनीं खटपट केली आहे. त्यांनीं स्त्रियांसाठीं होमक्लासेस काढले आहेत. महायुद्धांत श्री. भाऊसाहेब हे फ्रान्समध्यें लढाईवर गेले होते त्यावेळीं त्यांना कॅप्टनचा हुद्दा मिळाला होता व नऊ तोफांची सलामी होती. यांनीं शिक्षणाच्या बाबतींत व इतर अनेक बाबतींत संस्थानांत पुष्कळ सुधारणा केल्या. यांना मर्दानी खेळांचा फार शोक होता. संस्थानांतील एका हत्तीस काम शिकवीत असतां तो चिडून त्यानें श्रीमंतांचा वध केला ( ता. २५ फेब्रुवारी १९२४ ). ते करारी, शिस्त पाळणारे, जिज्ञासु, धाडशी व पूर्वजाविषयीं अभिमान बाळगणारे होते. ते बहुधा रामतीर्थावरच रहात असत.

हल्लीं संस्थानची मालकी श्री.शंकरराव आप्पासाहेब यांच्याकडे आली आहे. यांचा जन्म स. १९०६ च्या सुमारास झाला. यांचें शिक्षण श्री भाऊसाहेबांच्या देखरेखीखालीं राजाराम कॉलेजांत झालें. यांचें लग्न नुकतेंच कै. भाऊसाहेबांच्या इच्छेप्रमाणें बावडेकर अमात्य घराण्यांतील मुलीशीं झालें व यांनीं आपली बहिणहि त्याच घराण्यांत दिली. यांच्या पत्नीचें नांव श्री. सौ. लीलावतीबाईसाहेब असें आहे. हल्लीं हे अज्ञान असल्यानें जमखिंडी संस्थानचा कारभार श्री. मा.राणीसाहेब रीजन्सीच्या मदतीनें पाहत असतात.(१९२५). [ इंपे ग्याझे पृ. १४; केसरी ता. ४।३।१९२४; जमखिंडी संस्थानाकडून आलेली माहिती ].

गांव-जमखिंडी हें गांव या संस्थानची राजधानी असून तें कोल्हापूरच्या पूर्वेस ६८ मैलांवर आहे. गांवची लो. सं. १३०२९ आहे. येथें म्युनिसिपालिटी आहे. उमा रामेश्वरची जत्रा येथें दरसाल भरते. येथें कापूस दाबण्याचा व सरकी काढण्याचा ( सरकारी ) कारखाना आहे. हातानें काढलेल्या सुताचा व कापसाचा येथें बराच व्यापार चालतो.

**जमदग्नि**—ऋचीकास गाधिकन्या सत्यवतीपासून झालेला पुत्र. याची स्त्री रेणुका. यास रेणुकेपासून परशुरामादि पांच पुत्र झाले. हा अतिशय कोपी म्हणून प्रसिद्ध असे. एकदां बायकोला नदीवरून येण्यास उशीर लागला म्हणून यानें परशुरामाकडून तिला ठार मारविलें. पुढें याचा कोप अजबात गेला. तो इतका कीं सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं यास मारिलें असतांहि यास मुळींच राग आला नाहीं. रागीट माणसास हल्लीं जमदग्नीची उपमा देण्यांत येते.

**जमरुड**— वायव्य सरहद्दप्रांत, पेशावर जिल्ह्यापलीकडचा एक किल्ला व लष्करी छावणी. पेशावर शहराच्या पश्चिमेस दहा मैलांवर खायबर घाटाच्या तोंडाशींच हें वसलें आहे. पेशावर ते जमरुड रेलवे-फांटा आहे. लो. सं. (१९११) १४५२. १८३६ त रणजितसिंगाचा सेनापति हरिसिंग यानें हें जिंकून घेतलें; पण पुढील सालीं दोस्तमहमदानें त्यावर हल्ला चढविण्यासाठीं एक अफगाण पलटण पाठविली. पण शेवटीं शीखांचाच मोठा जय झाला. १८७८-७९ च्या अफगाण

युद्धांत व १८९७-९८ च्या टिन्हा मोहिमेंत लष्करीदृष्ट्या जमरूडला फार महत्त्व होतें.

**जमाखर्च**—( बुककीपिंग ) व्यक्ती किंवा संस्था यांनीं चालविलेला किंवा इतर उद्योगधंदा यासंबंधीं होणाऱ्या देवघेवीची व्यवस्थित पद्धतीनें ठेवलेली नोंद याला जमाखर्च म्हणतात. याचा उद्देश, ( १ ) देवघेवीच्या सर्व बाबी थोडक्या त्रासानें व उद्योगधंद्याला कोणताहि व्यत्यय न येतां समजाव्या, आणि ( २ ) धंद्याची प्रगति व धंद्याची सांपत्तिक स्थिति यांचा एकमेकांवर काय परिणाम होत आहे तो समजावा हा असतो. जमाखर्च या विषयाला कांहीं शास्त्रीय व कांहीं कलेचें स्वरूप आहे. या विषयांत अलीकडे कांहीं मोठाले नवे शोध लागले आहेत असें नाहीं, तर पूर्वापार चालत आलेल्या पद्धतींत सुधारणा झाली असून उत्तरोत्तर व्यवहारांतल्या गुंतागुंतीबरोबर सुधारणाहि होत रहाणार. जमाखर्चाची अत्युत्तम पद्धति म्हटली म्हणजे कमींत कमी श्रमांत जास्तींत जास्त माहिती देतां येणें ही होय. शिवाय लिहिलेले हिशोब वाटेल तेव्हां सहज तपासतां आले पाहिजेत. हल्लीं सार्वजनिक संस्थांचे हिशोब तपासण्याकरितां हिशोबाच्या कामांत वाकबगार असलेले स्वतंत्र तपासनीस ( ऑडिटर्स ) नेमलेले असतात. शिवाय जेथें जमाखर्चाचें काम करणारे नोकर पुष्कळ असतात तेथें एकमेकांची एकमेकांवर देखरेख राहील अशी ' स्टाफ-ऑडिट ' किंवा ' इन्टर्नल चेक' ची व्यवस्था असते.

'जमाखर्च' ही 'हिशेब पद्धति'(अकौन्टन्सी ) या विषयाची एक शाखा असून पेढ्या ( बँकिंग )व तपासणी ( ऑडिटिंग ) अशा त्या विषयाच्या आणखी दोन शाखा आहेत. जमाखर्चाच्या रोखीचा व्यवहार( कॅश सिस्टिम ) व पतीचा व्यवहार ( क्रेडिट सिस्टिम ) अशा दोन पद्धती असून व्यापारी लोक गिऱ्हाईकांना पतीवर उधार माल देतात. त्यामुळें ' पतीच्या व्यवहारानें ' हिशेब लिहावे लागतात. शिवाय धंद्यामध्यें मालमत्तेची नासधूस फूटतूट होत असल्यामुळें त्यापासून होणारा तोटा धंद्याची स्थिति ठरवितांना विचारांत घ्यावा लागतो.

**इतिहास.**—जमाखर्चपद्धतीचा आरंभ केव्हां झाला हें अज्ञात आहे. पण अलीकडील संशोधनावरून हें सिद्ध होतें कीं अगदीं प्राचीन राष्ट्रांत जमाखर्चपद्धती अस्तित्वांत होत्या. खि. पू. २६००च्या सुमाराच्या बाबीलोनी विटांवरील लेखांत, तसेंच इजिप्तमधील पापीरसवरील लेखांत व इतर पुराव्यावरून जमाखर्चलेखनाचा पुरावा मिळतो. तथापि या प्राचीन पद्धतींत जमाखर्चलेखन म्हणजे घडलेल्या व्यवहाराचें इतिहासवजा टिपण ठेवणें, असें स्वरूप दिसतें. पैसा किंवा नाणें हें विनिमयाचें साधन प्रचारांत येईपर्यंत जमाखर्चाची व्यवस्थित पद्धति सुरू होणें शक्य नव्हतें.

आधुनिक काळांतील प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे एडिंबरो येथील ॲडव्होकेटांच्या लायब्ररींतील १६९७ साल असलेली एक जमाखर्चाची खतावणी ( लेजर ) हा होय. दुहेरी नोंदीची 'डबलएन्ट्री ' ची जमाखर्चपद्धति त्यापूर्वी अस्तित्वांत होती. व्हेनिस येथें ल्युकापासिओलोनें १४९४ मध्यें छापून प्रसिद्ध केलेलें ' एव्हरीथिंग अबाऊट ॲरिथमेटिक, जिऑमिट्री ॲंड प्रपोर्शन ' नांवाचें पुस्तक आहे. त्यांत ' बुक कीपिंग ' ( जमाखर्च ) बद्दलची माहिती आहे. त्यानंतर १७६९ मध्यें ब्रिस्टल ( इंग्लंड ) येथें प्रसिद्ध झालेलें जोन्सचें ' इंग्लिश सिस्टिम ऑफ बुक कीपिंग बाय सिंगल ऑर डबल एन्ट्री,' (एकेरी किंवा दुहेरी नोंदीची जमाखर्चाची इंग्रजी पद्धति) या नांवाचें पुस्तक आहे.

हिंदुस्थानांत जमाखर्च या विषयावर स्वतंत्र पुस्तकें पूर्वी नव्हतीं; तथापि महाभारत, कौटिलीय अर्थशास्त्र, स्मृतिग्रंथ, चिटणीसकृत ' राजनीति, वगैरे ग्रंथांत राजाचा ' आयव्यय ' ( जमाखर्च ) यांविषयीं लिहिलेलें आहे. आणि हिशेबलेखकांना ' गणकलेखक ' असा शब्द महाभारतांत आढळतो. पण, निष्क, वगैरे सोन्याचांदीचीं नाणींहि त्या काळीं होतीं; त्यावरून जमाखर्चाची व्यवस्थित पद्धति अगदीं प्राचीन काळींहि येथें असावी असें दिसतें. शिवाय जमाखर्चाची देशी पद्धति येथें रूढ असून तिच्यांतील तेरीज, कीर्द, खतावणी, रोजखर्डा, पस्तेर, गुदस्त, वगैरे शब्द मुसुलमानी रियासतीपासून रूढ झालेले दिसतात.

जमाखर्चाविषयीं करणग्रंथ मराठेशाहींत होते एवढेंच नव्हे तर जाधवांच्या कारकीर्दीतहि होते. मुसुलमानी जमाबंदीचें काम बरेंचसें हिंदूंच्याच हातीं ठेवलें होतें ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. अशी कल्पना होते कीं, जाधवांची पद्धत मुसुलमानांनीं मुसुलमानी नांवें करून कायम ठेवली; आणि तींच पुढें थोडासा बदल करून शिवाजीनें घेतली. यांविषयींचा करणग्रंथ मेस्तक होय. मेस्तकांत सांगितलेली हिशेबपद्धति म्हणजे खातीं वगैरे आणि मोडी लिपी हीं ब्राह्मणमहत्वास कारण झाली असें मेस्तकावरील एक भाष्य सुचवितें. ' अप्रसिद्ध जगामाजीं पिशाच लिपी हे योजी जेणें प्रतिष्ठा समाजीं विप्र पावती. ' सर्वच विप्र जमाखर्चाचें काम ठेवण्यास सारखेच योग्य नाहींत तर गोदावरी कांठचे नेमावेत म्हणून मेस्तक भाष्यकार सांगतात. [ मेस्तक पहा ].

**देशी पद्धत.**—देशी हिशेबपद्धतींत जमाखर्च व पेढी किंवा अडत व्यवहार ( बँकिंग ) ह्या दोन शाखा आहेत; पण हिशेबतपासणी ( ऑडिटिंग ) ही शाखा दिसत नाहीं. जमाखर्च या विषयासंबंधीं मुख्य वह्या दोन, एक कीर्द व दुसरी खतावणी. ज्या चोपडींत जमेच्या व खर्चाच्या रकमा तपशीलवार लिहून शिल्लक काढतात तिला कीर्द; आणि कीर्दमध्यें उल्लेखिलेला प्रत्येक इसम किंवा बाब यांसंबंधीं प्रत्येकी घेणें देणें किती झालें त्याचा एके ठिकाणीं वेगळा जमाखर्च ठेवतात तिला खतावणी म्हणतात. शिवाय रोजच्या रोज तपशीलवार जमाखर्च कच्च्या वहींत

लिहून शिल्लक काढतात त्यास रोजखर्डा म्हणतात. रोजखर्ड्यांवरून कीर्दीमध्यें पक्के लिहूर्ण लिहितात. कीर्दीचे रोजकीर्द व बैठीकीर्द असे दोन प्रकार आहेत. मितीवार रोजचा जमाखर्च लिहून शिल्लक काढतात, तिला रोजकीर्द म्हणतात. आणि जींत कांहीं मुदतीचा जमाखर्च लिहून एकदम शिल्लक काढतात, तिला बैठीकीर्द असें म्हणतात. व्यापार लहान असल्यामुळें रोजच्यारोज देवघेव होत नसली तर बैठीकीर्द ठेवतात. कीर्दीच्या वह्यांत आठ रकाने असून त्यांपैकीं ' जमा ' व ' नांवें ' ( खर्च ) यांना प्रत्येकी चार चार रकाने देतात. 'जमे'च्या व 'नांवे'च्या सदरांत प्रथम रकमेचा आंकडा लिहून नंतर तपशील लिहितात; व प्रत्येक ठिकाणीं खातेंपान ( ती बाब खातेवहींत ज्या पानावर लिहिली असेल तो पानाचा आंकडा ) लिहितात. देशी पद्धतींत जमाखर्च लिहिण्याचा वर्षारंभ कार्तिक शु॥ १ किंवा चैत्र शु॥ १ पासून करतात.

खतावणींत, (१) खुद्द खातें ( स्वतःच्या जमीनीचें उत्पन्न किंवा पगार आणि चाकर माणसांचा पगार वगैरे खासगी खर्चासंबंधीं ), ( २ ) भांडवलखातें, ( ३ ) ठेवखातें, ( ४ ) अनामतखातें (रक्कम काय कारणाकरितां आली तें कळलें नसल्यास), ( ५ ) रवानगी खातें (कोणास पैसा पोचतां होण्यासाठीं किंवा मालाच्या खरेदीसाठीं पाठविलेल्या रकमेकरितां), ( ६ ) तसलमातखातें ( एखाद्या कामासाठीं रक्कम दिली तिचा हिशेब मागाहून समजणें असल्यास ),(७) खरेदीविक्रीखातें ( अनेक जिनसा असल्यास जिन्नसवार खातीं घालतात), ( ८ ) नफातोटा खातें, वगैरे खातीं असतात. शिवाय पक्कीं खातीं ( पुढील सालीं उतरावीं लागतात तीं विशेषतः इसमवारखातीं) आणि कच्चीं खातीं (रवानगी,तसलमात,व्याज, नफा तोटा वगैरे वर्षाअखेर पुरीं होणारीं) असे दोन प्रकार पडतात. खातेवही अकारविल्हेप्रमाणें लिहितात.

शिवाय जमाखर्चाचा ताळा पहाण्याकरितां पत्रक तयार करतात त्याला ' तेरीज ' म्हणतात. तेरीज महिनाअखेर, किंवा सालअखेर करतात. तसेंच सालअखेर किंवा व्यवहार पुरा झाल्यावर येणें व देणें किती तें समजण्याकरितां पक्क्या खात्यांचें बाकी येणें व देणें ह्यांचें टांचण करतात त्यास ' अखेर आढावा ' म्हणतात. आणि सालाच्या आरंभीं गुदस्त सालचें येणें देणें समजण्याकरितां टांचण लिहितात त्यास ' अवल आढावा ' म्हणतात. कीर्दीवरून महिन्याचा किंवा वर्षाचा जो एकंदर हिशेब ( दुबेरजी रकमा गाळून ) लिहितात त्यास ताळेबंद म्हणतात.

याशिवाय जमाखर्च लिहिण्याची एक पद्धति आहे, तिच्यांत कीर्द व खतावणी या दोन वह्यांऐवजीं एकाच चोपडींत इसमांचीं व बाबींचीं खातीं घालून त्यांत त्या त्या खात्याचा जमाखर्च तपशीलवार लिहिलेला असतो. अशा वहीस ' पठाण वही ' व या पद्धतीस ' पठाणी पद्धति ' म्हणतात. पोकळ जमाखर्चाला ' अनागोंदी ' जमाखर्च म्हणतात ( ' अनागोंदी ' पहा ).

पा श्चा त्य प द्ध ति.—या पद्धतींतहि जमाखर्चाची ' डे बुक ' अथवा ' बुक ऑफ फर्स्ट एन्ट्री ' ( कीर्द ) व ' लेजर ' ( खतावणी ) हीं दोन बुकें ऊर्फ वह्या असतात. पण वह्या लिहिण्याच्या पद्धतींत दोन महत्त्वाचे भेद आहेत. देशी पद्धतींतील ' जमा ' व नांवें हीं सदरें पाश्चात्य पद्धतींत नांवें व जमा अशीं उलटीं म्हणजे वहीच्या पानावर डाव्या बाजूस खर्च व उजव्या बाजूस जमा लिहितात. व त्यांच्या दर्शक 'डीआर' डेटर ( नांवें ) आणि 'सीआर' ( क्रेडिटर जमा ) अशीं अक्षरें लिहितात.दुसरा फरक कॉलम ऊर्फ रकान्यांचा. नांवें व जमा या प्रत्येक सदराखालीं तीन तीन स्वतंत्र रकाने ( कॉलम ) असून त्यांपैकीं पहिल्यांत मिती, दुसऱ्यांत तपशील व तिसऱ्यांत रकमेचा आंकडा याप्रमाणें लिहितात. उदाहरणार्थः—

नांवें( डीआर ) जमा( सी आर )

| मिती | तपशील | रक्कम | मिती | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

तथापि वरील फरक विशेष महत्त्वाचे नसून वास्तविक देशी व पाश्चात्य पद्धतींत साम्यच आहे असें दिसेल. तथापि अलीकडे पाश्चात्य पद्धतींत दोन महत्त्वाच्या सुधारणा झाल्या आहेत; त्या ( १ ) डबल एन्ट्री ( दुहेरी नोंद ) ची पद्धति; आणि ( २ ) कांहीं महत्त्वाच्या व्यवहारांचीं स्वतंत्र वही ठेवणें.

वर दिलेल्या जमाखर्चाच्या सामान्य पद्धतीला 'सिंगल-एन्ट्री ' ( एकेरी नोंद ) ची पद्धति म्हणतां येईल. या पद्धतीनें लिहिण्यांत कांहीं चुका वगैरे असल्यास त्या उघडकीस येण्यास साधन नसतें. ही उणीव दूर करण्याकरितां ' डबल एन्ट्री ' ची पद्धति अलीकडे अवलंबिली जाते. या पद्धतीचा अर्थ हा कीं, प्रत्येक व्यवहार जमा व नांवें या दोन्ही सदराखालीं नोंदणें. असें केल्यानें जमेच्या व नावेच्या रकमांची बेरीज नेहमीं जमते व ती तशी न जमल्यास जमाखर्चांत चूक आहे असें निःसंशय समजतें. तथापि या पद्धतीनेंहि सर्व साधतें असें नाहीं. कारण एखादा व्यवहार मुळींच नोंदला नाहीं, किंवा तो भलत्याच जागीं नोंदला किंवा मालाच्या किंमतीं चुकीच्या लावल्या किंवा खोटाच व्यवहार नोंदला, वगैरे प्रकारच्या गोष्टी उघडकीस येणें शक्य नाहीं. विशेषतः व्यापाऱ्यामध्यें मालाच्या किंमती वरचेवर कमजास्ती होत असतात. याकरितां खातेवहींत ' नफा तोटा ' असें एक खातें स्वतंत्र ठेवतात. या खात्यावरून धंद्याची विशिष्ट वेळेची स्थिति ताबडतोब कळते. या खात्यांतील—जमा नांवें रकमांच्या तक्त्याला ' बॅलन्स—शीट ' म्हणतात.

जमाखर्चांचे दररोजचे सर्व व्यवहार किंवा बाबी एकाच वहींत ( कीर्दींत ) लिहितात. अशा वहीस ' जर्नल ' म्हणतात. परंतु अलीकडील व्यापारी युगांत व्यवहार फार मोठाले होत असल्यामुळें एका वहीऐवजीं कीर्दीच्या अनेक वह्या करण्याची पद्धत सुरू झाली आहे. उदा. उधार विक्रीचे सर्व व्यवहार ' सेल्स जर्नल ' अथवा ' सेल्स डेबुक ' नांवाच्या स्वतंत्र वहींत नोंदतात उधार खरेदीचे सर्व व्यवहार 'बॉट जर्नल' अथवा 'इनव्हॉइस' बुक किंवा 'परचेसेस बुक' नांवाच्या निराळ्या वहींत नोंदतात; त्याच्याप्रमाणें विकलेल्या पण गिऱ्हाईकाकडून परत आलेल्या मालासंबंधीं हिशेबाचे ' रिटर्नस् इनवर्डस् बुक, दुकानाकरितां विकत घेऊन मागाहून परत पाठविलेल्या मालासंबंधीं ' रिटर्नस् आऊटवर्डस बुक,' ऋणकोकडून आलेल्या बिल्स ऑफ एक्स्चेंज संबंधाचें ' बिल्स रिसिव्हेबल बुक, ' धनकोंनां दिलेल्या बिल्स ऑफ एक्स्चेंजसंबंधीं ' बिल्स पेएबल बुक, ' वगैरे अनेक वह्या असतात. ( कीर्द ) डेबुकाप्रमाणें लेजरच्या ( खतावणी ) ' कॅश बुक, ' ' सेल्स लेजर्स; ' ' परचेसेस लेजर्स' वगैरे नांवाच्या निरनिराळ्या खातेवह्या असतात.

एवढ्या सुधारणा पाश्चात्य पद्धतींत झाल्या. पण त्यामुळें लिहिण्याचें काम फार वाढलें. म्हणून लिहिणें कमी करण्याची युक्ति निघाली. ती अशी कीं, एका कीर्दवहींत किंवा खातेवहींत अनेक कॉलम पाडून अनेक प्रकारचे व्यवहार एकाच पुस्तकांत लिहिण्याची सोय करतात. याला ' टॅब्युलर बुक कीपींग ' म्हणतात. या पद्धतीमुळें एखाद्या दुकानांत विक्रीच्या ज्या अनेक शाखा असतात त्या सर्व शाखांतील विक्रीचा हिशेब एकत्र ठेवण्याची सोय होते

यापेक्षांहि लिहिण्याचें काम कमी व्हावें म्हणून ' स्लिप-सिस्टिम' ( चिठ्यांची पद्धत ) निघाली आहे; तींत मोठाल्या वह्या न बांधतां एकेक कागद सुटा ठेवतात; व कार्बनपेपरच्या साह्यानें प्रत्येक नोंदीच्या दोन प्रती करून नंतर हे सुटे कागद खातेवह्यांतील नोंदीकरितां एका अनुक्रमानें लावतात. नंतर तेच कागद दुकानांतील प्रत्येक शाखेच्या विक्रीची एकूण बेरीज काढण्याकरितां निराळ्या अनुक्रमानें लावतात; आणि शेवटीं वाटेल तेव्हां पहाण्यास सोयीचे पडतील त्या अनुक्रमानें एका फाईलीमध्यें बांधून ठेवितात. या पद्धतींत आंखलेले व कॉलम पाडलेले जाडे कार्डबोर्ड ( सुटे तक्ते ) वापरतात, किंवा लूज-लीफ लेजर ( पानें सोडवतां येण्यासारख्या वह्या ) वापरतात.

इतर पाश्चात्य देशांत जमाखर्चाचीं मुख्य तत्त्वें हींच आहेत. पण कांहीं देशांत सरकारी कायद्यांनीं विशिष्ट गोष्टी आवश्यक ठरविलेल्या आहेत. फ्रान्समध्यें जर्नल, इन्व्हेंटरी, व लेटरबुक अशीं तीन बुकें ठेवावीं लागतात. जर्मनींत बहुतेक अशीच पद्धति आहे. बेल्जममध्यें प्रत्येक व्यापाऱ्याला जर्नलमध्यें रोजमितीवार लिहिणें लिहून त्यावर नेमलेल्या अधिकाऱ्याची सही घ्यावी लागते. शिवाय सर्व पत्रें व तारा यांचें आवकजावक दहा वर्षांचें ठेवावें लागतें. स्पेनमध्यें इनव्हेंटरी, जर्नल, लेजर, लेटरबुक व इनव्हाईस बुक इतके पांच प्रकार लागतात. युनैटेडस्टेट्समध्यें कांहीं प्रकारच्या कंपन्यांनां ऑडिटरास हिशेब दाखविणें भाग पडतें.

शि क्ष ण सं स्था.—प्रथम युनैटेडस्टेट्सच्या युनिव्हर्सिटयांनीं हा विषय अभ्यासक्रमांत समाविष्ट केला. ग्रेटब्रिटनमध्यें लंडन स्कूल ऑफ एकॉनमिक्स, बर्मिंगहॅमची युनिव्हर्सिटी व मँचेस्टरची व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटी यांनीं या विषयाच्या शिक्षणाची सोय केली. जपान व इतर देशांतहि या विषयाकडे लक्ष देण्यांत आलें आहे. इंग्लंडमध्यें सोसायटी ऑफ आर्टस्, लंडन चेंबर ऑफ कॉमर्स, ओवेन्स कॉलेज ( मँचेस्टर ) वगैरे संस्थाहि परीक्षा घेऊन डिप्लोमा देतात.

हिंदुस्थानांत मराठी सातवीच्या ( व्हर्नाक्युलर फायनल ) परीक्षेस जमाखर्च हा अवश्य विषय असून देशी जमाखर्च पद्धतीचें शिक्षण मराठी शाळांतून दिलें जातें. हायस्कुलांत स्कूल फायनल परीक्षेसाठीं हिशेब व जमाखर्च हा एक ऐच्छिक विषय आहे. व्यापारी कॉलेजांतून हा विषय असतोच. शिवाय इंग्लंड-अमेरिकेंतील संस्थांनां जोडलेल्या कांहीं व्यापारी शिक्षणाच्या संस्था या विषयाचें शिक्षण देऊन परीक्षा घेतात. देशी जमाखर्चाची पद्धति व्यापाऱ्यांनीं आपल्या मुलांकरितां काढलेल्या लहान लहान शाळांतून शिकविण्यांत येते. तथापि या विषयाचें शिक्षण घेणारे विद्यार्थी थोडे निघतात. बहुतेकांनां जमाखर्चाची अजीबात माहिती नसते असें आढळेल.

**जमाबंदी किंवा राष्ट्रीय जमाखर्च** (फायनान्स)— 'राष्ट्रीय जमाखर्च' हा शब्दप्रयोग अगदीं अलीकडला म्हणजे ब्रिटिश अमदानींतील आहे. 'राजाचा आयव्यय' हा रामायण-भारत काळांतील शब्द होय. मराठी अमलांत 'राज्याचा जमाखर्च' ही कल्पना प्रचलित होती. हे शब्दसमूह अनियंत्रित राज्यसत्ताकपद्धतीपासून लोकनियंत्रित किंवा लोकसत्ताक राज्यपद्धतीपर्यंतच्या निरनिराळ्या राज्यकारभार पद्धतींचे समकालीन आहेत. 'राजाचा आयव्यय' हे शब्द सरकारचें उर्फ राजाचें उत्पन्न व राजाचा खर्च यांवर सर्व राजाची मालकी व अधिकार आहे असें दर्शवितात. राष्ट्रीय जमाखर्च' ह्या शब्दयोजनेंत पुढील गोष्टी अन्तर्भूत होतात. ( १ ) कर कोणते बसवावे व कसे वसूल करावे हा अधिकार लोकांचा आहे. ( २ ) खर्च कोठें व किती करावा, म्हणजे सरकारनें कोणतीं लोकोपयोगी कामें करावीं, हें ठरविण्याचा अधिकारहि लोकांचा आहे. ( ३ ) खजीना कोठें व कोणत्या अधिकाऱ्याच्या ताब्यांत ठेवावा, व ( ४ ) दरसाल जमाखर्चाचा मागील वर्षाचा हिशोब पुरा करून शिल्लक किंवा तूट येईल तिची माहिती लोकांपुढें मांडावी, व पुढील सालाच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक तयार करून करवसुली व खर्च या दोन्ही बाबतींत सरकारनें लोकप्रतिनि-

धींची संमति घ्यावी. ( ५ ) सालअखेर तूट आल्यास किंवा नव्या वर्षांत जादा खर्च व्हावयाचा असल्यास त्याकरतां कर्ज काढणें त्याला 'राष्ट्रीय कर्जाचें' स्वरूप असावें व तें लोकप्रतिनिधींच्या संमतीनें काढावें.

सरकारी जमाखर्चाच्या पद्धतीचा इतिहास म्हणजे, जमाखर्चावरील राजाची खासगी मालकी नष्ट होऊन त्यावर लोकांची उर्फ राष्ट्राची मालकी कशी उत्पन्न झाली, म्हणजे वरील पांच तत्त्वें त्यांत कशी प्रविष्ट झालीं, त्याची माहिती होय.

जमाखर्चाचा इतिहास.—समाज अत्यंत प्राथमिक अशा मृगयावृत्तींत व गोपालवृत्तींत असतो म्हणजे शिकार करून व गुरांचें व मेंढ्यांचे कळप बाळगून उदरनिर्वाह करणारा असतो तेव्हां प्रत्येक पुरुष आपलें अन्नवस्त्र मिळविणें व संरक्षण करणें या गोष्टी स्वतःच करतो. शिकारीबरोबर लढाई करण्याचें ज्ञान व हत्यारें त्याच्याजवळ असतात. अशा समाजाच्या नेत्यावर लढाईकरितां सैन्य तयार करण्याची किंवा लोकांच्या धारणपोषणाकरितां उद्योगधंदे काढण्याची कसलीच जबाबदारी नसते. त्यामुळें सार्वजनिक किंवा राज्याचा जमाखर्च हा प्रश्न तेथें उत्पन्नच होत नाहीं. अशा प्रकारचे रानटी समाज हिंदुस्थानांतील डोंगरांत, जंगलांत अद्यापहि पहावयास सांपडतात. पण सर्व हिंदुस्थान एक देश या दृष्टीनें पाहतां वैदिक काळापूर्वी म्हणजे ख्रिस्तपूर्व सात आठ हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत तशी स्थिति असावी असें वाटतें. पण त्याबद्दलची विश्वसनीय माहिती फारशी उपलब्ध नाहीं. ज्याची थोडीफार ऐतिहासिक माहिती आहे असा हिंदुस्थानचा प्राचीनतम काळ म्हणजे वैदिक काळ, विशेषतः अथर्ववेदऋचाकाळ होय. त्यावरून हे लोक कृषिवृत्तींतील म्हणजे शेतकी हा मुख्य धंदा व इतर किरकोळ धंदे करून रहाणारे होते असें दिसतें. वैदिक काळांत 'राजा' व 'राज्यकारभार' या कल्पना बऱ्याच प्रगल्भ झाल्या होत्या. इतकेंच नव्हे तर 'अधिराज्य', 'साम्राज्य', 'वैराज्य' वगैरे शब्दप्रयोगहि रूढ होते. राजानें शत्रूपासून प्रजेचें रक्षण करावें, व त्या खर्चाकरितां जमिनीच्या उत्पन्नांतून $\frac{1}{6}$ भाग प्रजेपासून घ्यावा, इत्यादि राजाच्या कर्तव्याविषयींचे उल्लेख वेद-ग्रंथांत आहेत.

यानंतरच्या रामायण महाभारतकाळांतील राजे व राज्यकारभार याविषयीं भरपूर माहिती महाभारतांत सांपडते व तेव्हांपासूनच 'राजाचा आयव्यय' हे शब्द वाङ्मयांत शिरले. राज्यांतील रोजची जमा व रोजचा खर्च लिहिलेला पहाणें हें राजानें स्वतः रोज करावयाच्या कर्तव्यांपैकीं एक सकाळचें कर्तव्य असे, असें पुढील श्लोकांवरून स्पष्ट दिसतें:—

कच्चिदायव्यये युक्ताः सर्वे गुणकलेखकाः ।
अनुतिष्ठंति पूर्वाह्णे नित्यमायव्ययं तव ॥
(स. भा. ५. ७५)

कर व राजाचें कर्तव्य यांसंबंधीं पुढील श्लोकांत असा नियम दिला आहे कीं, राजानें शेतांतील उत्पन्नाचा $\frac{1}{6}$ कर घेऊन प्रजेचें शत्रूपासून संरक्षण करावें:—

आददीत बलिं चापि प्रजाभ्यः कुरुनंदन ।
स षड्भागमपि प्राज्ञस्तासामेवाभिगुप्तये ॥
(शांति.अ. ६९)

याशिवाय आणखी कोणत्या प्रकारचे कर राजानें घ्यावेत व कशावर घेऊं नयेत याबद्दलचे स्पष्ट नियम महाभारतांत आहेत ('कर' हा लेख पहा). तसेंच राजाला विशेष प्रसंगानिमित्त कर्ज लागल्यास तें त्यानें प्रजेपासून घ्यावें व पुढें यथावकाश तें फेडावें, असा नियम दिला आहे. ('राष्ट्रीय कर्ज' सदर पहा). राजांनीं प्रजाहितार्थ करावयाचीं इतर कर्तव्यें म्हणजेच खर्चाच्या बाबी. यासंबंधीं सभापर्वांतील 'कच्चित्' अध्यायावरून चांगली कल्पना येते. प्रजेचें चोरदंगेखोरांपासून रक्षण करणें, पाटबंधारे बांधून शेतीला पाणी पुरविणें, गोरक्ष्य व वाणिज्य म्हणजे गुरें पाळणारे व व्यापारधंदा करणारे यांच्या उत्कर्षास मदत करणें म्हणजे पोलीसखातें, पाटबंधारे, औद्योगिक खातें वगैरे गोष्टींची व्यवस्था राजाला करावी लागत असे. एकंदरींत 'राजाच्या आयव्यय' खात्याचा व्याप फार मोठा असे. तथापि त्यांत अर्थशास्त्रदृष्ट्या राज्यकारभारांतील परिणत तत्त्व म्हणजे जमाखर्चांतील लोकांचें नियंत्रण कोठें दिसत नाहीं. सदरहु उच्च आर्य संस्कृतीच्या काळांतील बहुतेक राजे प्रजाहितदक्ष किंबहुना कित्येक श्रीरामचंद्रासंबंधींच्या 'स्नेहं दयांच सौख्यंच' या श्लोकांतील वर्णनाप्रमाणें प्रजाहितैकदृष्टि असत. तथापि अनेक शतकांच्या राजसत्ताक पद्धतीमुळें 'राजाचा आयव्यय' म्हणजेच 'राज्याचा जमाखर्च' अशी अर्थशास्त्रदृष्ट्या मागासलेली स्थिति त्या वेळीं होती.

त्यानंतर मध्ययुगीन हिंदुराज्यें व अर्वाचीन मराठेशाही यांमध्यें राज्याच्या जमाखर्चासंबंधाची स्थिति बहुतेक प्राचीन पद्धतीची होती. निदान राजांच्या पुढें राज्यकारभारविषयक ध्येय भारतकालीन होतें, ही गोष्ट एतद्विषयक तत्तत्कालीन ग्रंथांतील विषयांची तुलना केल्यास दिसून येईल. भारतकालीन 'शुक्रनीतिसार' व मराठेशाहींतील 'चिटणीसकृत राजनीति' या ग्रंथांतील प्रकरणें येणेंप्रमाणें आहेतः—

| शुक्रनीतिसार | चिटणीसकृत राजनीति |
|---|---|
| १ नृपकार्यनिरूपण अध्याय | १ राज्याभिषेक प्रकरण |
| २ युवराजादिलक्षण अध्याय | २ सिंहासनसभा प्रकरण |
| ३ नृपराष्ट्र सामान्य लक्षण अ. | ३ राजगुण प्रकरण. |
| ४ चतुर्थोध्याय- १ सुहृदादिलक्षण प्रकरण; २ कोशनिरूपण ३ विद्याकलानिरुपण; ४ लोकधर्मनिरूपण; ५ राजधर्म; इ. | ४ अमात्य प्रकरण<br>५ राजान्हिक प्रकरण<br>६ कोश प्रकरण<br>७ बलप्रकरण |
| ५ खिलनीति निरूपण अध्याय | |

येणेंप्रमाणें ब्रिटिश अमदानीच्या आरंभापर्यंत ध्येय या दृष्टीनें हिंदुस्थानांतील राजांच्या पुढें जमाखर्चासंबंधाचे प्राचीन नियमच होते. तथापि मध्यंतराच्या राजकीय घडामोडी म्हणजे बौद्धधर्मी राजे, पुन्हां हिंदुधर्मी राजे, मुसलमानी

राजे नंतर मराठे राजे या स्थित्यंतरामुळें प्रजेच्या मनांतील व्यक्तिविशिष्ठ 'राजनिष्ठा' कमजोर होत जाऊन त्या जागीं 'राज्यनिष्ठे'ची भावना अधिकाधिक दृढमूल होत गेली; व त्यामुळें 'राजाचा आयव्यय' या शब्दप्रयोगाऐवजी 'राज्याचा जमाखर्च' हे शब्द अधिकाधिक प्रचलित होत गेले. आरंभी सांगितलेल्या अर्थशास्त्रांतील तत्त्वांच्या दृष्टीनें पाहतां ही प्रगति होय. कारण जमाखर्चावर राजाची खासगी मालकी ही कल्पना मागें पडून त्यावर राज्याची म्हणजे पर्यायानें लोकांची मालकी आहे हें तत्त्व अमलांत आलें. लोकनियंत्रित किंवा लोकसत्ताक राज्यपद्धतीची स्थापना होण्याची ही पूर्वतयारीच होय. राज्यकारभार लोकप्रतिनिधींच्या हातीं असावा हें तत्त्व जरी मराठेशाहींत उदयास आलें नाहीं, तरी राज्यकारभार लायक माणसांच्या हातीं असावा, मग तो राजघराण्यांतलि नसला तरी चालेल, अशी वृत्ति बळावत होती. म्हणूनच रायगडच्या किंवा सातारच्या गादीवर राजा कोणीहि असला व पुण्यास पेशवा कोणीहि असला तरी कर देण्यास व सरकारचें राज्य रक्षणादि कार्य करण्यास प्रजा नेहमीं तयार असे. आमच्या मराठेशाहींतील मुत्सद्दी राज्याच्या जमाबंदी व जमाखर्चां बाबतींत बरेच प्रवीण होते. व त्यामुळेंच मुसुलमानी रियासतीपेक्षां मराठी रियासतींमध्यें या कामीं बराच व्यवस्थितपणा दिसून येतो. शिवाय याबद्दलचा उत्कृष्ट पुरावा म्हणजे इंग्रजी अमलांतील वसुलीपद्धत इंग्रजांनीं पेशवाईच्या वेळच्या पद्धतीवरूनच उचलली हें होय. तालुका, जिल्हा, प्रांत हे जमाबंदी विभाग पेशवाईतीलच आहेत. सरकारी जमाखर्चाची अंदाजपत्रकें तयार करणें व वर्षाअखेर जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें यासंबंधाचीं तत्त्वें त्या काळच्या फडणीसांनां व मुत्सद्यांनां माहीत होतीं. इतकेंच नव्हे तर 'राष्ट्रीय कर्ज' या तत्त्वाचा बीजरूपानें पेशवाईंत आरंभ झाला होता. पेशवे सरकारला झालेलें डोईजड कर्ज फेडण्याकरितां 'कर्जपट्टी' म्हणून एक प्रकारचा जादा कर जहागिरदार, इनामदार वगैरे श्रीमंत लोकांवर कर्जाच्या फेडीकरतां बसविल्याचे दाखले आहेत. तात्पर्य, सरकारची जमा व सरकारचा खर्च, तसेंच सरकारचें कर्ज या गोष्टी खासगी नसून सार्वजनिक आहेत, राज्यांतील सर्व लोकांच्या आहेत, असें मानण्यापर्यंत प्रगतीची मजल गेली होती. त्यानंतर हीं तत्त्वें अत्यंत स्पष्टपणें अमलांत आणण्याचें, तसेंच सरकारी जमाखर्चावर लोकप्रतिनिधींचा पूर्ण ताबा पाहिजे हें तत्त्व हिंदुस्थानला शिकविण्याचें म्हणजेच जमाखर्चाला 'राष्ट्रीय' स्वरूप देण्याचें काम ब्रिटिश सरकारनें केलें आहे. आतां इंग्रजांच्या देशांत तरी हीं तत्त्वें केव्हां व कशीं शिरलीं तें पाहूं. त्याकरितां यूरोपच्या इतिहासाचें थोडेंसें पर्यालोचन केलें पाहिजे.

**यूरोपीय जमाखर्चपद्धतीचा इतिहास.**— सरकारी जमाखर्चाला विशेष महत्त्वाचें स्वरूप आल्याचें यूरोपमध्यें प्रथम प्राचीन ग्रीक राज्यांत पहावयास मिळतें. अथेन्स येथील अथेनियन सरकारच्या स्वतःच्या मालकीच्या बऱ्याच जमीनी असत. शिवाय लॉरियम येथील रुप्याच्या खाणी सरकारच्याच होत्या. याप्रमाणें जमीनीचें उत्पन्न व खाणींतील मौल्यवान धातूंचें उत्पन्न सरकारचें असे. शिवाय या प्राचीन ग्रीक राज्यांत विशेष गोष्ट ही असे कीं, राज्यांतील सर्व प्रजाजन व त्यांची खासगी मालमत्ता यांवर सरकारचा बराचसा ताबा असे. त्यामुळें आरमार बांधण्याकरितां किंवा सार्वजनिक खेळांचे सामने करण्याकरितां, वगैरे कोणत्याहि कामाकरितां सरकार श्रीमंत लोकांवर जादा कर बसवून पैसा वसूल करीत असे. शिवाय बाजारांत विकावयास येणाऱ्या मालावरहि जकाती असत. त्या काळांत गुलाम बाळगण्याची चाल असल्यामुळें गुलामांवरचा म्हणून स्वतंत्र कर असे. ख्रिस्तपूर्व ३७८ पासून प्राप्तीवर कर कायमचा बसविण्यांत आला होता. त्याचें वार्षिक उत्पन्न ६० टॅलेंट (१४,४०० पौंड ) असे; व विशेष प्रसंगीं २०० टॅलेंट ( ४८,००० पौंड ) पर्यंत सरकार उत्पन्न वाढवीत असे. पुढें डेलॉसचा राज्यसंघ म्हणून स्थापण्यांत आला. तेव्हां या संघाच्या प्रत्येक सभासद राज्याला संघ-संरक्षणाप्रित्यर्थ म्हणून खंडणीवजा रक्कम द्यावी लागे. ती सर्व रक्कम संघाचें प्रमुख राज्य या नात्यानें अथेन्सच्या ताब्यांत असे. ही रक्कम वर्षास ४६० टॅलेंट ( ११०, ४०० पौंड ) जमत असे.

प्राचीन ग्रीक राज्यें नष्ट होऊन पुढें यूरोपांत रोमन साम्राज्य प्रस्थापित झालें. रोमचें प्रथम लहान राज्य होतें. तेव्हां तेथील करव्यवस्था ग्रीक राज्यांतल्याप्रमाणें असे. पुढें युद्धकार्याकरितां प्राप्तीवर तात्पुरता जादा कर बसविण्यांत येऊं लागला. पुढें ज्यूलियस सीझरनें रोमचें साम्राज्य फार वाढविलें. तेव्हांपासून जिंकलेल्या प्रांतांतून कराच्या मोठमोठ्या रकमा रोमच्या खजिन्यांत दरसाल येऊं लागल्या. त्यामुळें प्रत्यक्ष रोममधील लोकांवरचे कर बहुतेक नाहींसेच झाले. सिसिली, स्पेन, आफ्रिका वगैरे प्रांतांतून जमीनबाबांचें मोठें उत्पन्न रोमला मिळूं लागलें. शिवाय धान्य, जहाजें, लांकूड वगैरे माल लष्करी उपयोगाकरितां म्हणून प्रांतिक अधिकाऱ्यांकडून रोमन साम्राज्यसरकार मागवीत असे. पण प्रांतोप्रांतीं करवसुलीचें काम कॉंट्रॅक्टरनें देण्यांत येत असे. त्यामुळें रयतेवर जुलुम होई. शिवाय सरकारी अधिकारी लांच खात असत. अशा रीतीनें करवसुलीची अव्यवस्था सर्वत्र होती हें पुढें रोमन रिपब्लिक नष्ट होण्याचें कारण झालें. पुढें रोमन बादशाही सुरू होतांच करवसुलीची मक्ता-पद्धती बंद होऊन जमीनीची पहाणी करून रयतवारीनें जमीनमहसूल ठरविण्यांत आला. व सरकारी अधिकाऱ्यांमार्फत वसूल होऊं लागला. आयात निर्गत मालावर पूर्वी ५ टक्के जकात होती ती वाढत जाऊन अखेर ११ टक्के झाली. एकंदर कर-व्यवस्था पाहतां कर-वसुलीसंबंधाची, न्याय्य प्रमाणशीरपणा व किमान खर्चानें कमाल

वसुली, हीं तत्त्वें रोमन मुत्सद्यांनीं अमलांत आणण्याचा प्रयत्न केल्याचें दिसत नाहीं. राजधानी रोम व कित्येक शहरांतील लोकांवर कर मुळींच नसत. जिंकलेल्या प्रांतांतहि श्रीमंत वजनदार लोक वगळले जाऊन उद्योगधंदा करणाऱ्या सामान्य लोकांवरच करांचा बोजा वाढत गेल्यामुळें सर्वत्र असंतोष माजला व रोमन बादशाहीच्या नाशास तो कांहीं अंशीं कारणीभूत झाला.

यानंतरच्या यूरोपमधील अज्ञानयुगांत म्हणजे इ. स. ५०० ते १००० पर्यंत सर्वत्र अंदाधुंदी माजलेली होती.त्यानंतर हळूहळू यूरोपभर लहान लहान राज्यें स्थापन होऊन त्यांत सरंजामी पद्धत अमलांत आली. लष्करचा किंवा इतर कोणताहि सार्वजनिक खर्च राजाला करावा लागत नसे; आणि राजाचा खर्च त्याच्या खासगी उत्पन्नावर चालत असे. या बहुवंशीं प्राथमिक स्थितींतून हळूहळू राष्ट्रीय जमाखर्चाची उपर्युक्त पांच तत्त्वें कशीं उद्भूत झालीं, त्याचा इतिहास अगदीं अलीकडला म्हणजे इ. स. १४ व्या शतकानंतरचा आहे.

आधुनिक सुधारणांच्या दिशेनें प्रथम आरंभ,सरंजामी सैन्य मोडून सरकारी खर्डे सैन्य ठेवण्याच्या बाबतींत फ्रान्समध्यें ७ व्या चार्लसनें केला व सरकारी जमखर्चाला नवीन वळण लावलें. इंग्लंडनें लवकरच सरकारी आरमार तयार केलें व राज्याचा जमाखर्च लोकप्रतिनिधिसभेच्या उर्फ पार्लमेंटच्या संमतीनें झाला पाहिजे असा नियम घातला. इंग्लंडच्या राज्याचा सर्वच कारभार लोकनियंत्रित उर्फ पार्लमेंटरी पद्धतीचा व्हावा, याबद्दल इंग्रज देशभक्तांनीं स्टुअर्ट राजाबरोबर सतत पाऊणशेंशंभर वर्षें झगडून जें यश मिळविलें, त्यांतूनच राष्ट्रीय जमाखर्चाची उपयुक्त पद्धति निघालेली आहे, असें साधारणपणें म्हणण्यास हरकत नाहीं. राजसत्ताक पद्धति देशांत असल्यास सरकारी जमाखर्चाची रक्कम ठराविक व स्वतंत्र खर्ची घालून राज्याचा एकंदर जमाखर्च निराळा दाखविण्याची पद्धत इंग्लंडांतच प्रथम कडक रीतीनें अमलांत आली. पार्लमेंटच्या संमतीवांचून एक पैचा करहि सरकारनें वसूल करतां कामा नये, व पार्लमेंटच्या संमतीवांचून एक पैसाहि खर्च सरकारनें करतां कामा नये याबद्दल इंग्लंडच्या पार्लमेंटचे हजार बाराशें सभासद १६८८ पासून डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवीत आलेले आहेत. तसेंच सरकारी कर्ज सर्व राष्ट्राच्या पतीवर काढून युद्धें किंवा मोठमोठीं खर्चाचीं लोकोपयोगी कामें पार पाडण्याची उपयुक्त कल्पना इंग्लंडनेंच ३ऱ्या विल्यमच्या (१६८८–१७०२) कारकीर्दीपासून अमलांत आणून गेल्या महायुद्धासारखी जगाड्व्याळ युद्धें यशस्वी रीतीनें पार पाडून दाखविलीं आहेत. तात्पर्य, सरकारी जमाखर्चावर लोकांचा ताबा, राजाच्या खासगी खर्चाची स्वतंत्र नेमणूक, व राष्ट्रीय कर्जाची कल्पना, हीं सर्व तत्त्वें इंग्लंडच्या राज्यकारभार पद्धतींत परिणतावस्थेत पोहोचलेलीं असून ब्रिटिश सत्तेमुळें तीं हिंदुस्थानांतील राज्यपद्धतींतहि आतां कायमचीं शिरलीं असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**सरकारी खर्चाच्या आधुनिक बाबी.**—सरकारी जमाखर्चाचा विचार करितां, 'आदा पाहून खर्च करावा' हें खासगी व्यक्तींच्या बाबतींत लागू होणारें तत्त्व सरकारला अवलंबणें शक्य नसतें असें दिसून येतें. राज्यकारभार चालू असतां कित्येक खर्चाच्या गोष्टी अशा उद्भवतात कीं, त्याप्रीत्यर्थ खर्च करण्यावांचून गत्यंतरच नसतें. यामुळें आधीं खर्चाच्या बाबी लक्षांत घेऊन नंतर त्याला लागणारा पैसा कसा जमवावा, त्याचा विचार सरकारच्या फडणीसांनां करावा लागतो. म्हणून येथेंहि खर्चाच्या बाबींचा म्हणजेच पर्यायानें सरकारच्या कर्तव्यकर्मांचा प्रथम विचार करूं.

या प्रश्नाचा विचार अॅडाम स्मिथनें आपल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथांत सविस्तरपणें केला आहे. परंतु त्याचें विवेचन तर्कशास्त्रांतील व्यक्तिगणनापद्धतीचें आहे, वर्गीकरण पद्धतीचें नाहीं. म्हणून अॅडाम स्मिथनंतरच्या अर्थशास्त्रज्ञांनीं केलेलें सरकारच्या कर्तव्यांचें शास्त्रीय वर्गीकरण येथें देतों.

हें वर्गीकरण सरकारपासून प्रजेला होणाऱ्या फायद्याच्या तत्त्वानुरूप केलें आहे; व त्याप्रमाणें एकंदर कर्तव्याचे चार पोटभेद होतात. कर्तव्यकर्मांचा पहिला प्रकारः—ज्या कर्तव्याच्या अंमलबजावणीपासून देशांतील सर्व प्रजेचा फायदा होतो तो कर्तव्यांचा पहिला वर्ग होय. या वर्गामध्यें देशांतील अन्तर्बाह्य शांतता राखणें हें मुख्य कर्तव्य होय.म्हणजे देशांतील सर्व लोकांचें जीवित व मालमत्ता यांचें संरक्षण करणें, हें तें कर्तव्यकर्म होय; व हें साधण्याकरितां प्रत्येक सुधारलेल्या सरकाराला सैन्य व फौजफांटा, आरमार, किल्ले, तटबंदी व पोलीस वगैरे संस्था लागतात. या सर्वांचा मुख्य उद्देश जीवित व मालमत्ता यांनां सुरक्षितता आणणें होय व यापासून अमुक व्यक्तीचा फायदा व अमुक व्यक्तीस नाहीं असा मुळींच प्रकार नाहीं.यापासून सर्व प्रजेला सामान्य फायदा होतो. याच वर्गांत दळणवळणाच्या साधनांचा, तसेंच प्राथमिक शिक्षण–सामान्य व औद्योगिक–या दोन कर्तव्यांचा समावेश होतो. या दोन्ही गोष्टी सरकारनें हातीं घेतल्या पाहिजेत; व शिक्षण तर सार्वत्रिक व सक्तीचें केलें पाहिजे; असें अर्वाचीन काळचें मत आहे. त्याचें कारण या गोष्टी प्रजेच्या सर्वसाधारण फायद्याच्या आहेत व म्हणून त्या सरकारनें जीवित व मालमत्तेच्या संरक्षणाप्रमाणें आपल्या आद्य कर्तव्यांपैकीं समजल्या पाहिजेत. टांकसाळी व पैसा यांसंबंधानें सरकारचें कर्तव्यकर्म तसेंच एकंदर उद्योगधंद्यावर नजर ठेवणें हें या पहिल्या वर्गांतच मोडतें.

कर्तव्याचा दुसरा वर्गः—कांहीं सरकारी कृत्यांचा उपयोग कांहीं विशेष व्यक्तींनांच होतो खरा; तरी पण हा उपयोग सर्व सामान्य जनांनां होतो असें धरलें जातें; कारण ज्या व्यक्तींनां त्याचा उपयोग होतो त्यांनां खर्च करण्याचें सामर्थ्य नसतें. अशा प्रकारचीं कृत्यें दुसऱ्या वर्गांतल्या

कर्तव्यकर्मामध्यें मोडतात. उदाहरणार्थ, अनाथ व पंगु लोकांच्या पालनपोषणाचीं अनाथालयें, आजाऱ्यांकरितां दवाखाने, वयातीत लोकांकरितां पेनशनची व्यवस्था, गरीब मजुरांचा आजारीपणा,अपघात वगैरेंकरितां विमा उतरण्याची पद्धति; इत्यादि प्रकारचीं कर्तव्यकर्में सुधारलेलें सरकार अर्वाचीन काळीं अंगावर घेतें. या सर्वांच्या मुळाशीं हेंच तत्व आहे कीं, जरी या कर्तव्यकर्मांपासून विशिष्ट व्यक्तींनां मग त्या संख्येनें पुष्कळ कां असेनात—फायदा होत असला तरी सरकारनें हीं कामें हातीं घेतल्याखेरीज चालावयाचें नाहीं. कारण ज्या विशिष्ट लोकांनां यापासून फायदा होणार त्यांनां आपण होऊन या गोष्टी करणें त्यांच्या सांपत्तिक सामर्थ्याच्या मर्यादेबाहेरचें आहे. करितां हीं कर्तव्यकर्में सार्वजनिक असलीं पाहिजेत व त्यांनां लागणारा खर्च सरकारानें आपल्या उत्पन्नांतून केला पाहिजे.

कर्तव्यकर्मांचा तिसरा प्रकारः—यामध्यें ज्या कृत्यांनीं कांहीं विशिष्ट व्यक्तींनां फायदा होऊन सर्व साधारण लोकांनांहि त्यांचा फायदा होतो अशा कृत्यांचा समावेश होतो. म्हणजे सरकारच्या या कर्तव्यकर्मांच्या अंमलबजावणीनें व्यक्तिफायदा व सामान्य फायदा असे दुहेरी हित होतें. या वर्गामध्यें न्यायकोर्टांची व्यवस्था ज्या ज्या ठिकाणीं एखादा विशिष्ट धर्म सरकारनें अंगिकारिला आहे तेथें तेथें त्या धर्मखात्याचा खर्च, पोस्ट व तारायंत्रखातें ( हीं केव्हां केव्हां चवथ्या वर्गांतहि धरलीं जातात ), हक्कनोंदणीची व्यवस्था; तसेंच कांहीं विशिष्ट धंद्यांनां व उद्योगांनां दिलेल्या सवलती व बक्षिसें या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष व पहिला उपयोग कांहीं विशिष्ट व्यक्तींनां होतो खरा; तरी पण त्याचा अप्रत्यक्ष व दुसरा उपयोग न्यायकोर्टांची पायरी चढणारांनां होतो. तरी न्यायाची व्यवस्था चोख असली म्हणजे एकंदर जीवित व मालमत्ता यांची सुरक्षितता वाढते व याचा फायदा सर्वत्रांनांच मिळतो. त्याप्रमाणें जरी उद्योगधंद्याच्या संरक्षणानें प्रत्यक्षतः कांहीं कारखानदार व कांहीं व्यापारी इतक्या व्यक्तींनांच फायदा होतो तरी एकंदर देशाची सांपत्तिक स्थिति सुधारल्यामुळें अप्रत्यक्ष रीतीनें सर्व लोकांचाच फायदा होतो.

कर्तव्यकर्मांचा चवथा प्रकारः—यामध्यें सरकार जीं कृत्यें करतें त्यांचा उद्देश फक्त विशिष्ट व्यक्तींच्या फायद्याचा असतो. किंवा सरकारला इतर कर्तव्यकर्में बजावतां यावीं म्हणून जे उत्पन्न पाहिजे असतें तें उत्पन्न मिळविण्याचा हेतु असतो. सरकार जे प्रत्यक्ष उद्योगधंदे हातीं घेतें त्यांचा यांत समावेश होतो. बाकीच्यांचा येथें संबंध येत नाहीं.

हल्लींचीं सुधारलेलीं सरकारें जीं जीं कामें हातीं घेतें त्या त्या कामांचा या कर्तव्यचतुष्टयांमध्यें समावेश होतो असें थोडक्या बारकाईनें विचार केला म्हणजे दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं. यावरून सरकारी खर्चाच्या एकंदर बाबी ठरतात त्या येणेंप्रमाणेः—

१ ला प्रकारः—( १ ) लष्कर, आरमार, किल्ले, तटबंदी वगैरे; ( २ ) पोलीसखातें; ( ३ ) प्राथमिक शिक्षणसामान्य व औद्योगिक; ( ४ ) टांकसाळी.

२ रा प्रकारः—( १ ) अनाथालयें, ( २ ) दवाखाने, ( ३ ) पेन्शनें, प्राव्हिडन्ट फंड वगैरे व्यवस्था, ( ४ ) मजुरांकरितां विमा उतरण्याची व्यवस्था.

३ रा प्रकारः—( १ ) धर्मखातें, ( २ ) पोस्ट व तार खातें, ( ३ ) हक्कनोंदणी, ( ४ ) उद्योगधंद्यांनां सवलती व बक्षिसें, ( ५ ) न्यायकोर्टें ( ६ ) रस्तेसडका.

४ था प्रकारः—( १ ) जंगलखातें, ( २ ) रेल्वेखातें, ( ३ ) पाटबंधारे, ( ४ ) टांकसाळी.

स र का री उ त्प न्नां च्या आ धु नि क बा बी.—कांहीं बाबींवर खर्च करण्याकरितां उर्फ आपलीं कर्तव्यकर्में बजावण्याकरितां सरकारला पैसे लागतात. कारण यांतलीं शेवटल्याखेरीज बाकीचीं कर्तव्यकर्में बऱ्याच खर्चाचीं असतात. तेव्हां सरकारला हीं कर्तव्यकर्में बजावतां येण्याकरितां कायमच्या उत्पन्नाच्या बाबी लागतात. कारण हीं कर्तव्यकर्में कायम व सतत चालणारीं असतात. सरकारचीं कांहीं कर्तव्यकर्में ह्यामधूनच परंतु प्रसंगानें व आकस्मिक तऱ्हेनें उद्भवतात. जसें लढाई किंवा एखाद्या शोधाकरितां लागणारा खर्च किंवा खानेसुमारीचा खर्च. तेव्हां सरकारलाहि दोन तऱ्हांचा खर्च आहे. एक सततचा व नेहेमीं लागणारा खर्च. व एक आकस्मिक व प्रासंगिक कारणांनीं लागणारा खर्च पहिल्या प्रकारचा खर्च सरकार बहुतेक कायमच्या व नेहमीं येणाऱ्या करांसारख्या उत्पन्नांतून भागवितें. व दुसऱ्या प्रकारचा खर्च व एकंदर कर्तव्यांपैकीं उद्योगधंद्याचा प्रारंभीचा खर्च सरकार कर्ज काढून भागवितें, या राष्ट्रीय कर्जाचा विचार स्वतंत्र केला आहे. पुढें ( ' राष्ट्रीय कर्ज सदर पहा.) येथें सरकारच्या कायमच्या उत्पन्नाच्या बाबींचा विचार करूं.

अर्वाचीन काळीं सुधारलेल्या सरकारच्या उत्पन्नांच्या बाबींचे तीन वर्ग करतां येतील. पहिला व प्रमुख वर्ग करांचा होय, दुसरा फीचा होय; तिसरा किंमतीचा किंवा संपत्तीच्या विक्रीचा होय. सरकारच्या कर्तव्यकर्मांच्या अंमलबजावणीस लागणाऱ्या खर्चाकरितां हीं कर्तव्यकर्में प्रजेच्या फायद्याचींच असतात. सरकारी अधिकाऱ्यानें व्यक्तीकडून अगर व्यक्तिसमूहाकडून त्यांच्या संपत्तीपैकीं सक्तीनें घेतलेला हिस्सा अगर भाग म्हणजे कर होय. प्राप्तीवरील कर, जमीनीवरील कर, मिठावरील कर, आयात मालावरील जकात, वगैरे प्रकारच्या सर्व उत्पन्नाच्या बाबी कर या सदरांत मोडतात. या सर्वांमध्यें सरकारी कर्तव्यकर्मांच्या अंमलबजावणीकरितां लागणाऱ्या खर्चाकरितां सक्तीनें व्यक्तीच्या संपत्तीतून एक भाग घेणें हा सामान्य गुण आहे. मग उत्पन्न काढण्याची तऱ्हा कोणतीहि असो.प्राप्तीवरील कर हा ठरलेल्या प्राप्तीवरच्या प्रत्येक माणसाकडून रोख घेतला

जातो. जमीनीवरील कर असाच जमिनदारांकडून रोख घेतला जातो. पूर्वं काळीं डोईपट्टी, म्हैसपट्टी अशा प्रकारचे कर असत ते असेच सक्तीनें घेतले जात असत. निरनिराळ्या आयात अगर निर्यात मालावर बसविलेल्या जकाती याहि व्यापाऱ्याकडून सक्तीनें वसूल केल्या जातात. या कराच्या निरनिराळ्या प्रकारांचा विचार स्वतंत्र लेखांत केला आहे ( 'कर' हा लेख पहा ).

सरकारच्या उत्पन्नाची दुसरी बाब फीची होय. मागील भागांत सांगितलें आहे कीं, सरकारचीं कांहीं कर्तव्यकर्मे विशिष्ट व्यक्तींनां फायद्याचीं असतात. तेव्हां अशा कर्तव्यकर्मांच्या बजावणीस लागणारा खर्च त्या व्यक्तीकडून घेण्यांत यावा हें वाजवी आहे. अॅडाम स्मिथनें हें विशिष्ट व्यक्तिहितार्थ तत्त्व पुष्कळ गोष्टींनीं लागू केलें आहे. व अशा गोष्टींचा खर्च त्या त्या लोकांकडून घ्यावा असें त्याचें म्हणणें होतें. सर्व न्यायखात्याचा खर्च,रस्तेसडकांचा खर्च, शिक्षणाचा खर्च वगैरे पुष्कळ खर्च; फी किंवा विशेष पट्टी यांतून भागवितां येतील; त्याकरितां सर्वसामान्य कर बसविण्याचें कारण नाहीं. असें तो म्हणे परंतु अर्वाचीन काळीं एकंदर सामान्य कर बसविण्याची सरकारची प्रवृत्ति जास्त आहे. तरी पण कांहीं कांहीं उत्पन्नाच्या बाबी फीच्या वर्गांत येतात. दिवाणी कोर्टाचा पुष्कळ खर्च वादीप्रतिवादीकडून फीच्या रूपानें घेतला जातो. तसेंच कागद रजिष्टर करण्याची फी, वारसाच्या सर्टिफिकीटाची फी, शिक्षणाकरितां घेतली जाणारी विद्यार्थ्याची फी, वगैरे तऱ्हेच्या बाबी या वर्गांत मोडतात. या उत्पन्नाच्या प्रकारचा हा विशेष आहे कीं, ही फी सरकार जें काम करतें त्याच्या मोबदल्यावजा असते. म्हणून हें काम करण्यास जितका खर्च येतो तितकीच किंवा केव्हां त्यापेक्षा कमी फी ठेवण्यात येते व या दृष्टीनें ही बाब करापासून भिन्न आहे.

उत्पन्नाची तिसरी बाब किंमतीची होय. सरकार कांहीं संपत्ति उत्पन्न करीत असेल व इतर खाजगी व्यक्ती ज्याप्रमाणें आपला माल विकून उत्पन्न अगर नफा मिळवितात, त्याप्रमाणें सरकार खाजगी व्यक्तींप्रमाणेंच संपत्ती गिऱ्हाइकांनां विकून त्यापासून उत्पन्न काढीत असेल. सरकार कांहीं कारखाने प्रत्यक्ष चालवीत असेल;तसेंच सरकार जमीनींचे मालक असेल व त्याबद्दल त्याला भाडें मिळत असेल; किंवा सरकारच्या मालकीचें जंगल असेल व त्याच्या विक्रीपासून सरकारला सालोसाल उत्पन्न मिळत असेल; तसेंच सरकार पाटबंधाऱ्याचीं कामें करून लोकांनां पाणी देऊन त्यापासून उत्पन्न काढीत असेल; सरकारच्या मालकीच्या रेल्वे असतील व त्यापासून सरकारला उत्पन्न होत असेल; सारांश, सरकार मालक अगर कारखानदार या नात्यानें जें उत्पन्न मिळवीत असेल तें सर्व या सदरांत येतें.

पूर्व काळीं या सदराला महत्त्व असे. यूरोपांतील जाहागिरी पद्धतीच्या काळीं राजाला कराची गरजच नसे. कारण त्याचा खर्च स्वतःच्या मालकीच्या जमीनीच्या खंडांतून भागे. शिवाय दुसऱ्याहि सदरांपासून उत्पन्न मिळे. परंतु सुधारलेल्या सर्व राष्ट्रांमध्यें दुसरे दोन्ही वर्ग कमी महत्वाचे झाले आहेत व सरकारी मुख्य बाब म्हणजे करच होय. हिंदुस्थानांत उत्पन्नाच्या बाबींचे दोन्ही प्रकार अस्तित्वांत आहेत ते येणेंप्रमाणें:—

१ ला प्रकार = कर,(१)प्रत्यक्ष कर = जमीनमहसूल; प्राप्तीवरील कर.(२) अप्रत्यक्ष कर = आयात जकाती, व निर्गत जकाती, अन्तर्जकाती वगैरे.

२ रा प्रकार = फीः ( १ ) कोर्ट फी; ( २ ) रजिस्ट्रेशन फी; ( ३ ) वारसाच्या सर्टिफिकिटाबद्दलची फी; ( ४ ) शिक्षण फी;

३ रा प्रकार = सरकारी कारखानेंः(१)रेल्वे; (२)कालवे; ( ३ )जंगल;

हल्लीं सुधारलेल्या सर्व राष्ट्रांतून जमाखर्चाची पद्धत सारखीच आहे. हिंदुस्थानांतहि तीच पद्धत चालू आहे. तेव्हां हिंदुस्थानांतील पद्धतीची माहिती फक्त पुढें देत आहों.

हिं दु स्था न स र का र चा ज मा ख र्च.—हिंदुस्थानांतील सरासरी शेंकडा ९० लोकांचें पोट शेतकीवर अवलंबून आहे व सरकारचें उत्पन्न दररोज वाढतें आहे. विलायत हा देश इतका श्रीमंत असून तेथें देखील हिंदुस्थानच्या अर्ध्या उत्पन्नाइतकें उत्पन्न सरकारला मिळत नाहीं. सरकार हा साधा सावकार नसून एक भला मोठा व्यापारी किंवा पेढ्यांचा मालक आहे. जमीन, लोहमार्ग, कालवे, जंगलें, मीठ, अफू, इत्यादींचा मालक असून ३० कोटी लोकांचा राजा आहे. त्यामुळें वाटेल तो कर, वाटेल तितका कर, वाटेल तशा रितीनें सरकारला बसवितां येतो व उत्पन्न वाढवितां येतें. खासगी व्यापारी एखाद्या वेळीं भांडवल गमावेल अशी भीति बाळगितो. परंतु येथील सरकारची गोष्ट फार निराळी आहे.इंग्लंडची गोष्ट फारच निराळी आहे. तेथील लोक जित नसून जेते आहेत. तेथें लोकांची मनधरणी केल्याशिवाय सरकारला एक पैदेखील मिळावयाची नाहीं.

सरकारी उत्पन्नाच्या बाबी.–निरनिराळ्या उत्पन्नाच्या बाबी देण्यापूर्वी कोणकोणच्या वर्षी, कशा तऱ्हेनें सरकारचें उत्पन्न वाढत गेलें व तें वाढवावें लागलें ह्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करूं. कम्पनीच्या राज्यांत निरनिराळ्या प्रकारचे कर नसल्यामुळें, व लढाया वगैरे फार कराव्या लागल्यामुळें कंपनीचा खर्च उत्पन्नापेक्षां जास्तच होई. त्यामुळें कंपनीला सरकारचें कर्ज काढावें लागे. ह्या कर्जाची रक्कम १८५७ पर्यंतची ६० कोटी झाली. नंतर बंड झालें, त्याकारणानें बंड मोडण्याकरितां शिपाई, लष्कर इत्यादि वाढवावें लागलें. ही एक खर्चाची बाब होती. शेवटीं १८६० पर्यंत ९० कोटींची तूट पडली. ती भरून काढण्याकरितां कसे प्रयत्न झाले ते पाहूं. स. १८६०–६५ सालीं इंग्लंडांतून एक विल्सन नांवाचे फडणीस येथें नेमले गेले. त्यानीं एकदम आल्याबरोबर

बरीच काटकसर सुरू केली. लष्करचा वगैरे खर्च जवळ जवळ ६॥। कोटी कमी केला व उत्पन्नावर कर पांच वर्षांकरितां म्हणून बसविला. शिवाय जकाती बसविल्या; परंतु आयात मालावरची जकात शेंकडा १० होती ती ७॥ केली. अशा तऱ्हेनें दोन वर्षांतच जमाखर्च बरोबर होऊं लागला.

१८६६–७०.—पुढें दोन दुष्काळ,त्यामुळें धारण व मजुरी वाढ, शिवाय जिकडे तिकडे सुधारणा घडून आणल्यामुळें वाढता खर्च, ह्यास्तव उत्पन्न न वाढतां जवळ जवळ ६ कोटींची तूट आली. ही तूट भरून काढण्याकरितां उत्पन्नावरील कर ५ वर्षांचा काल संपल्यामुळें बंद करण्यांत आला होता तो पुनः सुरू केला. स्टँम्प ड्यूटी वाढविण्यांत आली; मीठावरील कर वाढविण्यांत येऊन जकाती वाढविण्यांत आल्या. परंतु लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, अशा अडचणीच्या वेळीं देखील आयात मालावरील कांहीं वस्तूंवरील कर काढून टाकण्यांत आला. आणखी एक गोष्ट अशी आहे कीं, ह्या वेळपर्यंत हिंदुस्थानसरकार प्रांतिकसरकारकडे लागतील तसे पैसे पाठवीत असे. ह्यामुळें कोणीहि काटकसर करावयाचें लक्षांत आणीना. ह्याला उपाय मेयोसाहेबांनीं प्रांतिक सरकारांना फक्त एक ठरीव रकम द्यावयाची व त्यांत त्यांनीं आपला काटकसर करून निर्वाह करावयाचा.जास्त लागल्यास प्रांतिक सरकारची प्रजा उदार आहेच. अशा पद्धतीनें जी तूट पडली होती ती भरून निघून जास्त शिल्लक वाढली. म्हणून उत्पन्नावरील कर १८७३ मध्यें काढून टाकण्यांत आला. १८७३–६ सालीं जमाखर्चांत बरोबरी होते न होते इतक्यांत दोन जोराचे धक्के येऊन बसले. एक बहारचा दुष्काळ, व दक्षिणेकडचा दुष्काळ, आणि वटावांत तूट. विलायतेंत येथील रुपयाला २१½ पेन्सांनीं वटाव कमी झाला. ह्यामुळें खजिन्यांत बरीच तूट पडली. परंतु तूट पडली तरी आयात मालावरची जकात ७ होती ती सरसकट शेंकडा ५ करण्यांत आली.

१८७७–८३.—ह्या काळांत दक्षिणेकडचा दुष्काळ सुरू होतांच, आणखी अफगाणिस्थानाबरोबर लढाई करावी लागली, व हुंडणावळीचा दरहि आणखी कमी झाला. त्यामुळें ह्यावेळीं देखील बरीच तूट पडली. ही तूट व मागील काळची तूट भरून काढण्याकरितां जमिनीवरील कर, लायन्सेस, टॅक्स, वाढविण्यांत आले. मालावरील जकात दर मणास २ रु. करण्यांत आली, व प्रांतिकसरकारकडे ठरीव रकम देत गेल्यामुळें सरकारी खजिन्यांत बरीच शिल्लक राहूं लागली. ही शिल्लक दुष्काळाकडे व दुष्काळ नसल्यास मागील कर्ज देण्याकडे उपयोगांत येऊं लागली. ह्या सुधारणांमुळें सगळी तूट भरून निघून १८८१ पर्यंत बरीच शिल्लक राहिली, परंतु १८७८ सालीं बाहेरून जो जाडा भरडा कापसाचा कपडा येत असे त्यावर क्षुल्लक जकात होती तीहि काढून टाकण्यांत आली. कारण काय तर हिंदुस्थानांतील जाडा भरडा कपडा ह्या जकातीमुळें जास्त खपत असे म्हणून. १८८२–३ सालीं इतकी शिल्लक वाढली कीं सरकाराला कोणचा तरी कर कमी करावा असें वाटूं लागलें व त्याप्रमाणें पटवारी कर काढून टाकण्यांत आला. हा कर सरासरी सर्व हिंदुस्थानांतून २४ लक्ष येत असे.

१८८४–९१.—हा जमाखर्चाचा मेळ बसतो न बसतो तोंच आणखी खर्चाची बाब उत्पन्न झाली. हुंडणावळींत तूट सरासरी रुपयापाठीमागें ३ पेन्स पडूं लागली व १ पेन्स तूट म्हणजे १ कोटीचें नुकसान, शिवाय हिंदुस्थानच्या वायव्येकडे रशियासारखा जबरदस्त शत्रू उत्पन्न होऊन त्या बरोबर लढाई करावी लागेल असें वाटूं लागलें. म्हणून लष्कर वाढवावें लागलें. लोहमार्ग, किल्ले व इतर युद्धोपयोगी गोष्टी कराव्या लागल्या. आणखी उत्तर ब्रह्मदेश जिंकल्यामुळें त्याबरोबर युद्धांत व जिंकल्याबर शांतता आणण्याकरितां जवळ जवळ ६० लक्ष रुपये खर्च लागला. हा सर्व खर्च भागविण्याकरितां ५०० वर उत्पन्नावर कर बसविण्यांत आला. मीठावरील जकात मणापाठीमागें २॥ रुपये ठेवण्यांत आली व रॉकेल तेलावर जकात बसविण्यांत आली. त्याचप्रमाणें लष्करशिवाय इतर ठिकाणीं मोठी काटकसर करण्यांत आली. ह्यामुळें जमाखर्चाचा मेळ बसला व लष्कराप्रीत्यर्थ अतिशय खर्च होऊनहि शिल्लक वाढली.

१८९२–४.—ह्याहि सालांत वटावांत बराच फरक पडल्यामुळें मागील काळांत जी शिल्लक वगैरे राहिली होती तीहि जाऊन तूट बरीच आली. म्हणून सरकारनें मोफत रुपये पाडण्याचें काम बंद केलें. तरीहि पण कांहीं मात्रा चालेना. शेवटीं आयात मालावर शेंकडा ५ जकात बसवावी लागली. व ह्या जकातीमुळें इंग्लंडच्या व्यापाराचें नुकसान होऊं नये म्हणून येथील गिरण्यांतून जो माल बाहेर पडेल, त्यावर जकाती बसविण्यांत आल्या. ह्यामुळें जवळ जवळ वार्षिक उत्पन्नांत ३ कोटींची भर पडूं लागली.

१८९५–१९०६.—हा काल मात्र बराच सुखदायक झाला. कारण ह्या काळांत दोन दुष्काळ पडले. वायव्येकडील टोळ्यांचा बंदोबस्त करण्याकरितां लष्कर वाढवावें लागलें, प्लेग आला, तरीहि पण जमाखर्चांत तूट न पडतां बरीच शिल्लक जवळ राहिली. अशी गोष्ट झाल्यावर लागलीच बाहेरून आयात होणाऱ्या कापसाचा कपडा, सूत वगैरे वरील जकात शेंकडा ५ होती ती ३॥ करण्यांत आली व बाहेरील यूरोपमधील साखरेवर थोडी जकात बसविण्यांत आली. तरीहि पण १९०१–२ सालीं शिल्लक बरीच राहिली. म्हणून सरकाराला कालवे, शाळा, दवाखाने वगैरेकडे पैसा जास्त देतां आला. तरीहि पण तूट पडलीच नाहीं उलट ५१½ कोटींची शिल्लक राहिली.

ह्याकरितां सरकारनें १९०३–४ सालीं मीठावरील जकात २१½ रु. होती ती मणापाठीमागें २ रु. केली. १००० रु. वर ज्याचें उत्पन्न असेल त्यावरच कर बसविण्यांत आला. व इतर

ठिकाणीं बराच पैसा खर्च करण्यास मिळाला. तरीहि पण १९०४-५ सालीं शिल्लक ६ कोटी राहिली. म्हणून सरकारनें पुन्हां मिठावरील जकात २ ते १½ केली. उत्तरहिंदुस्थानांतील दुष्काळ-कर काढून टाकण्यांत आला. शिवाय प्रांतिक सरकाराला शिक्षण, पोलीस, शेतकीसुधारणा वगैरे करण्याकरितां देणग्या देण्यांत आल्या. १९०६-७ सालच्या बजेटांत आणखीहि कांहीं ( पोलिस वगैरे ) सुधारणा करण्याकडे जास्त खर्च दिला होती. तरी पण शिल्लक १.३ कोटींची राहिली. कायद्यानें बजेटावर चर्चा करण्याचे अधिक हक्क कौन्सिलाना मिळाले, तेव्हां उत्पन्न व खर्च यांच्या बाबींवर अधिक बारकाईनें टीका होऊं लागली. ब्रिटिश सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींपैकीं कर या बाबीचा विचार दुसरीकडे केला आहे ( 'कर' हा लेख पहा ). कराखेरीज इतर उत्पन्नाच्या बाबींचा उहापोह येथें करावयाचा आहे. अशा उत्पन्नाच्या बाबी येणेंप्रमाणें:—( १ ) जंगल, ( २ ) रेल्वे, ( ३ ) पाटबंधारे, ( ४ ) पोस्ट व तारखातें, ( ४ ) कोर्ट व रजिस्ट्रेशन स्टँप, ( ५ ) अफू व दारु, ( ६ ) खंडणी वगैरे. यांपैकीं अफूचें उत्पन्न चीनबरोबरच्या अलीकडील करारामुळें बहुतेक बंद झालें आहे ( 'अफू' हा लेख पहा. ) दारूचें उत्पन्नहि अलीकडील मद्यपाननिषेधाच्या जगभर जोरांत सुरू असलेल्या चळवळीवरून पाहतां, लवकरच नष्टप्राय होईलसें वाटतें( ' मद्यपान ' हा लेख पहा ). सरकारी जंगल मात्र हिंदुस्थानांत पुष्कळ असून ती एक सरकारच्या फार मोठ्या उत्पन्नाची बाब आहे. शिवाय या जंगलांतलि मालाचा उद्योगधंद्याकडे उत्तरोत्तर अधिकाधिक उपयोग केला जाऊं लागणार असल्यामुळें सरकारी जंगलाचें उत्पन्नहि वाढत जाण्याचाच संभव आहे. जंगल सरकारच्या मालकीचें समजलें जावें हें तत्त्वहि आतां हिंदुस्थानांत मान्य झालेलें असल्यामुळें उत्पन्नाची ही बाब नष्ट होण्याची कधींच धास्ती नाहीं.पोस्ट व तारखातेंहि लोकांची सेवा फार उत्तम बजावीत असून ही उत्पन्नाची बाब अबाधित रहाणारी व वाढतें उत्पन्न देणारी आहे. ( विशेष माहितीकरितां ' जंगल, ' ' पोस्ट ' व ' तार' खातें, हे लेख पहा )

रेल्वे:—हिंदुस्थानांतलि रेल्वेपासून सरकारला अलीकडे चांगला फायदा होऊं लागला आहे. तथापि प्रथम बरींच वर्षे रेल्वे ही सरकारला फायद्याची बाब नसे; इतकेंच नव्हे तर त्याबद्दल पूर्वी५० कोट रुपये तोटा सोसावा लागला होता. १९०४ पासून अलीकडे मात्र रेल्वेपासून सरकारी उत्पन्नांत वाढत्या प्रमाणांत भर पडूं लागली आहे. १९१५-१६ सालीं एकंदर ३६,६३३ मैल रेल्वे होती, व सर्व रेल्वे मिळून खर्च ५३७.०७ कोटी झाला होता. रेल्वेचें एकंदर उत्पन्न ६४.६७ कोटी होतें. त्यांत चालू खर्च ३२.९२ कोटीचा होता. वरीलपैकीं सुमारें शेंकडा ७२ मैल रेल्वे सरकारी आहे; व बाकीच्या खासगी कंपन्या व देशी संस्थानांच्या मालकीच्या आहेत.रेल्वेमुळें उद्योगधंदे व व्यापार यांना फार फायदा होतो, याबद्दल आतां बिलकूल शंका नाहीं. तथापि रेल्वे बांधण्याच्या खर्चाचें जड ओझें सरकारी खजिन्यावर दरसाल घालीत गेल्यानें प्राथमिक शिक्षणासारख्या अत्यावश्यक बाबीला पैसा उरत नाहीं. यामुळें कर देणारे लोक रेल्वे वाढविण्यांत खर्च करण्यास नाखूष आहेत. रेल्वेमुळें हिंदुस्थानांत कशा प्रकारची घातुक औद्योगिक क्रांति घडून आली हें दुसरीकडे वर्णिलें आहे ( ' व्यापार ' पहा . ). तरीहि कित्येक केवळ परदेशचा माल हिंदुस्थानच्या कान्याकोपऱ्यांत सुद्धां भरून निव्वळ दलालीचा धंदा करणारे व्यापारी रेल्वे अधिकाधिक दरसाल वाढविण्याबद्दल सरकारला आग्रह करीत असतात. तथापि फक्त १८ कोटी रुपये दरसाल रेल्वेकडे खर्च करावे, असा एक साधारण नियम अलीकडे सरकारानें केला आहे रेल्वेची वाढ अद्याप बरीच व्हावयास पाहिजे आहे, हें खरें असलें तरी सरकारी जमाखर्चाच्या एकंदर बाबींवर त्याचा अनिष्ट परिणाम होतां कामा नये. रेल्वेबाबत कर भरणारांनीं पूर्वी बराच तोटा सोसला आहे. करितां रेल्वे ही आतां कायमच्या उत्पन्नाची बाब राहिली पाहिजे; म्हणजे रेल्वेपासून मिळणारा वार्षिक नफा सर्वच नव्या रेल्वे तयार करण्यांत खर्च करतां कामा नये. शिवाय सर्वच रेल्वे सरकारी मालकीच्या करून त्या सर्व स्वतः सरकारनें चालवाव्या किंवा काय हा वादग्रस्त प्रश्न अलीकडे उपस्थित झाला आहे. इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या देशांतील रेल्वे खासगी कंपन्यांनीं चालविलेल्या आहेत. उलट पक्षीं, प्रशिया व इतर कांहीं कांहीं देशांत सर्व रेल्वे सरकार स्वतः चालवितें. येथील परिस्थितीचा विचार करतां येथील सर्व रेल्वे सरकारनें चालविणें आर्थिक व सामाजिक दृष्ट्या फायद्याचें आहे. या विषयाचा मागें सांगोपांग स्वतंत्र विचार केला आहे ("आगगाडी ' हा लेख पहा). येथें थोडक्यांत एवढेंच सांगावयाचें कीं, रेल्वेच्या या प्रश्नाचा पुन्हां पूर्ण विचार होऊन आजपर्यंतच्या ब्रिटिश धोरणांत पुष्कळच फेरबदल व्हावयास पाहिजे आहे. त्यांत मुख्यतः तीन तत्त्वें लक्षांत ठेविलीं पाहिजेत तीं हीं कीं, ( १ ) सर्व रेल्वे सरकारनें चालविल्या पाहिजेत म्हणजे अप्रत्यक्षपणें त्यांवर लोकांचा ताबा पाहिजे. ( २ ) रेल्वेपासून दरसाल सरकारास कायमचें उत्पन्नच होत गेलं पाहिजे; आणि ( ३ ) देशी उद्योगधंदे व हिंदी लोकांच्या सोयी यांकडे पूर्ण लक्ष ठेऊन रेल्वेची वाढ केली पाहिजे.

पाटबंधारे:—सरकारला चांगला फायदा करून देणारी व आर्थिकदृष्ट्या देशाची उन्नति करणारी दुसरी बाब कालवे ही होय. येथील सर्व कालवे सरकारनें बांधिलेले असून सरकारच त्यांची सर्व व्यवस्था पाहतें. लहानसहान तलाव, विहीरी या खासगी मालकीच्या असतात; पण सर्व कालव्यांवर सरकारची म्हणजे पर्यायानें राष्ट्राची मालकी आहे.

तथापि या कामाकडे सरकारचें रेल्वेपेक्षां कमी लक्ष्य आहे, अशी तक्रार करण्यास जागा आहे. वास्तविक हिंदुस्थान शेतकीप्रधान देश असल्यामुळें लोकांच्या दृष्टीनें रेल्वेइतकाच हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या विषयाचाहि सांगोपांग विचार स्वतंत्र लेखांत केला आहे. ('कालवे' हा लेख पहा). याप्रमाणें उत्पन्नाच्या मुख्य बाबींचें परीक्षण झाल्यावर आतां खर्चाच्या बाबींकडे वळूं.

खर्चाच्या बाबी:—इतरत्र दिलेल्या तक्त्यांवरून खर्चाच्या बाबी कोणत्या आहेत हें नीट कळून येण्यासारखें आहे ('कर' पहा). त्यांमध्यें मुख्य खर्चाची बाब म्हणजे देशांतील मुलकी कारभार (सिव्हिल ॲडमिनिस्ट्रेशन) ही होय. या व्यवस्थेकरितां बराच वाढता खर्च आहे. या वाढत्या खर्चाची मुख्य तीन कारणें आहेत. बटवड्या-करितां द्यावा लागणारा खर्च. सर्व व्यवहार इंग्लंडबरोबर असल्यामुळें येथें जो रुपाया चालतो तो तेथें चालत नाहीं, तर त्यांच्या नाण्यांबरोबर येथून रुपये पाठवावे लागतात व त्यांच्या नाण्यांत बटवडा करावा लागतो. येथील रुप याची पोकळ किंमत असल्यामुळें बटवडा करण्यांत फार खर्च लागतो. दुसरी गोष्ट येथें जे यूरोपीयन अधिकारी असतात ते स्वदेशीं निघाले म्हणजे त्यांनां तेथील नाणें घेण्यांत येथील रुपयांमुळें जें नुकसान येतें तीं भरपाई करण्याकरितां म्हणून देणगी द्यावी लागते. तिसरी गोष्ट उत्तरब्रह्मदेशाची व्यवस्था करणें ही होय. त्या तक्त्यांत मुलकी व्यवस्थेकरितां म्हणून जो खर्च दाखविला आहे त्याचे तीन भाग पाडले आहेत. जमीनसारा, मुलकी-खातीं, व किरकोळ मुलकी खर्च. पहिल्या बाबतींत नवीन जिल्हे होणें, त्याप्रमाणें त्यांचें काम वाढणें इत्यादि व बट-वडा ह्यांचा समावेश होतो. दुसऱ्या प्रकारांत सर्व प्रका-रची व्यवस्था, कचेऱ्या, तुरुंग, पोलिस, समुद्रकिनाऱ्या-संबंधीं, शिक्षण, दवाखाने, राजकीय बाबी, धार्मिक व इतर बारिकसारीक गोष्टी यांचा समावेश होतो. सर्व प्रकारची व्यवस्था म्हणून जी बाब आहे तींत भारतमंत्री, व्हॉइस-रॉयसाहेब, गव्हर्नर इत्यादींच्या पगाराचा समावेश होतो. इतर बारीकसारीक गोष्टी म्हणजे हिंदुस्थानची मोजणी, भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र वगैरेंची जीं खातीं आहेत तीं. किरकोळ मुलकी खर्चांत पेन्शनी, स्टेशनरी व छपाई खर्च, भत्ता वगैरेंचा समावेश करावा. ही मुलकी व्यवस्था झाली. शिवाय खर्चाच्या बाबी पुष्कळ आहेत. डाकघरें, तार-ऑफिसें व टांकसाळी, आणि लोहमार्ग. रेल्वेकरितां जो खर्च झाला तो पुढील तक्त्यावरून नीट लक्षांत येईल १९०४-५ सालापर्यंत हिंदुस्थानांत २७,७२८ मैलांची रेल्वे तयार करण्यांत आली व त्याचा खर्च २०२ कोट रुपये झाला. त्यांतील मोठी रक्कम कर्जाऊ आहे. ती रक्कम व त्याचें व्याज देण्याचा एक खर्च आहे. पाटबंधारे, कालवे वगैरे करणें, सडका, इमारती वगैरे बांधणें, हीं कामें देखील बरींच खर्चाचीं आहेत. यांच्याकरितां इतका खर्च करण्याचा हेतु हाच कीं त्यापासून व्यापाऱ्याला दोन पैसे मिळावे. म्हणजे प्रजेच्या पैशानें प्रजेच्या फायद्याकरितां म्हणून कामें करावयाचीं व त्यांच्यापासून जो फायदा मिळेल तो इंग्लंड-मध्यें जावयाचा. वरील गोष्टींचा निर्देश करून खर्चाची यादी पूर्ण झाली असें नाहीं. अद्याप बरीच लांबलचक यादी आहे. राष्ट्रीय कर्ज व त्यावरील व्याज ही एक मोठी खर्चाची बाब आहे. तिची माहिती या लेखाच्या शेवटीं स्वतंत्र दिली आहे. याशिवाय लष्करावर खर्च होतो तो निराळाच. परंतु हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या मानानें येथें लष्कर फार थोडें आहे, तरी पण खर्च जास्त लागतो. जवळ जवळ २ लक्ष सैन्य असून सन १९०४ सालीं २७ कोट रुपये खर्च आला. हा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. कारण सुधारलेलीं शस्त्रास्त्रें, दारू गोळा, कवायत वगैरे शिकविण्याकरितां फार खर्च लागतो. इतका खर्च लागून देखील पुरेसें लष्कर हिंदु-स्थानांत नाहीं अशी ओरड आहे. महायुद्धाच्या काळांत व पुढेंहि हा खर्च फार वाढला गेला. सन १९१७ मध्यें ४५ कोटी, १९१८सालीं ६७कोटी, १९२२सालीं ७१कोटी झाला. या खर्चाविरुद्ध हल्लीं कायदेमंडळाची मोठी तक्रार आहे. वरील सर्व वर्णन सामान्य खर्चाचें झालें. आतां जादा खर्चाचा थोडा इतिहास दिला पाहिजे. हा जादा खर्च जादा उत्पन्नांतून केला जातो. म्हणजे जी शिल्लक रहाते त्यांतून आणि जादा कर वगैरे बसवून उत्पन्न होतें त्यातून केला जातो. वरील जादा खर्चाच्या बाबी पांच आहेत. लष्करी हालचाली, विशेष प्रतिकार, दुष्काळकामें, लोहमार्ग, (उत्प-न्नांतून), लोहमार्ग (दुष्काळ फंडांतून) ह्या प्रत्येकाचा थोड-क्यांत विचार करूं.

अमुक एक लढाई करावी लागेल हें भविष्य कळत नसल्यामुळें अकस्मात एखादी स्वारी आल्यास किंवा बंडाळी झाल्यास तिचा नायनाट करण्याकरितां खर्च करावा लागतो किंवा किल्ले वगैरे बांधावे लागतात. याच प्रकारांत अफगाण युद्ध, ब्रह्मीयुद्ध, चित्रळ-बंड, आणि तिऱ्हावरील स्वाऱ्या वगैरे येतात. त्यांबद्दल जादा खर्च करावा लागला. आणखी किल्ले वगैरेहि बांधावे लागले. पहिला दुष्काळ १८७७सालीं दक्षिणेंत पडला. त्या सालीं अतिशय लोक मृत्युमुखीं पडले व नंतर देखील हा दुष्काळ कोणत्या तरी एका प्रांतांत असावयाचाच असा साधारण नियम होता. आणि हा नियम १९०० पर्यंत टिकून पुढें तो दुष्काळ सर्व हिंदुस्थानभर पसरून सतत वास्तव्य करीत आहे. १८७६ सालची स्थिति पाहिल्यावर सरकारनें याचा प्रतीकार करण्याकरितां एक नेहमीचा फंड उभारण्यांत आला. व त्या फंडाची जरूर भासत नसल्या-मुळें त्या फंडाचा उपयोग पूर्वीचें जें कर्ज आहे तें फेडण्या-करितां उपयोगांत आणलें जात आहे.

येथपर्यंत सर्वसाधारण जमाखर्चाची हकीकत झाली. ह्या ठिकाणीं त्यांतील कांहीं विशेष किंवा ठळक गोष्टी सांगणें अवश्य आहे. ह्या ठिकाणीं तीन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. विलायतेंतील हिंदुस्थान संबंधीं खर्च, प्रांतिक जमाखर्च, उपाय व साधनें यांचें नियमन.

हिंदी जमाखर्च म्हणजे हिंदुस्थान व हिंदुस्थानसंबंधानें विलायतेंतील जमाखर्च. ह्याचे तीन प्रकार आहेत. विलायत सरकारचा जमाखर्च; हिंदुस्थानसरकाराचा जमाखर्च; व आठ प्रसिद्ध प्रांतिकसरकारचा जमाखर्च. पूर्वीची स्थिति अशी होती कीं प्रांतिकसरकारनें खर्च करावा व हिंदुस्थान सरकारनें पुरवावा. परंतु ही स्थिति अनिष्ट वाटल्यामुळें एक ठरीव रक्कम प्रांतिक सरकारकडे देण्यांत येऊं लागली व त्यांनां जास्त लागल्यास आपली व्यवस्था आपल्या प्रांतात करून घ्यावी असें ठरलें. ह्या पद्धतीमुळें प्रांतिक सरकारला काटकसर करण्याचा धडा मिळाला. ह्या नियमानें प्रांतिक सरकारनें असें समजतां उपयोगी नाहीं कीं,त्यांनीं वाटेल त्या जिनसावर जकात किंवा कर बसवितां येईल. परंतु कांहीं ठरीव बाबींपासून प्रांतिकसरकारनें उत्पन्न घ्यावें असें ठरवून टाकण्यांत आलें. वरिष्ठ सरकारचीं उत्पन्नाचीं साधनें मीठावरील व इतर जकात, अफू, आणि खंडणी; जमीनसारा, स्टँप, अबकारी, जंगल, नोंदणी,ह्यांच्यापासून उत्पन्न येईल तें प्रांतिक उत्पन्न.

प्रांताचें काम किंवा व्यवस्था करण्याकरितां जो खर्च तो प्रांतिक सरकारनें करावा व वरिष्ठ सरकारनें कर्ज, सैन्य, आरमार, मध्यवर्ती राज्यव्यवस्था आणि परराष्ट्रीय संबंध, ह्यांच्यासंबंधी खर्च आपल्या हातीं ठेविला आहे. त्याचप्रमाणें होमचार्जेसहि वरिष्ठ सरकारकडेच आहेत. व्यापारीखात्याचें उत्पन्न, डाकघरें, तारायंत्र, टाकसाळ, आणि रेल्वे ह्यांचा कारभार वरिष्ठ सरकारकडे असून, कालवे फक्त विभागलेले आहेत. सर्व प्रांतांच्या खर्चाच्या तिप्पट खर्च वरिष्ठ सरकारचा आहे. खर्च किंवा उत्पन्ना संबंधीं योजना प्रांतिक सरकारनें स्वतंत्रपणें करतां उपयोगी नाहीं, तर सर्व जमाखर्चाच्या योजना वरिष्ठ सरकारच्या परवानगीनें झाल्या पाहिजेत. सारांश प्रांतिक सरकारें केवळ वरिष्ठ सरकारचे प्रतिनिधी आहेत.

प्रांतिक सरकारच्या जमाखर्चाची पंचवार्षिक चाचणी वरिष्ठ सरकारकडून होत असते. ह्या चाचणीमुळें एखाद्या वेळीं त्यांच्या खजिन्यांत शिल्लक राहिल्यास ती वरिष्ठ सरकारला कर्ज किंवा त्यांचा खर्च जास्त असल्यामुळें वरिष्ठ सरकारकडे तशाच जात असते. म्हणून ही शिल्लक बहुतेक रहातच नसे. परंतु पुढें असें ठरविण्यांत आलें कीं,शिल्लक राहील तिचा कांहीं भाग प्रांतिक सरकारकडे ठेवून बाकीचा मोठ्या खजिन्यांत घेऊन जावयाचा. ह्या पद्धतीमुळें बरीच काटकसर होऊं लागली, व ब्रह्मदेशाशिवाय सर्व प्रांतांनां त्याचा फायदा मिळूं लागला. प्रांतिक सरकारच्या खजिन्यांच्या ओहोटी किंवा भरतीवर वरिष्ठ सरकारी खजिन्याची ओहोटी भरती अवलंबून असे. युद्ध, अफूचें कमी उत्पन्न, वटावांत तूट-व दुष्काळ ह्या चार गोष्टींत साधारण प्रांतिक सरकारला वरिष्ठ सरकारकडून पैशाची मागणी येते. पहिली गोष्ट सर्वस्वी वरिष्ठ सरकारकडेच असते. व तिकडील मागणी कशी असते हें अनुभवानें कळतच आहे. इतर गोष्टींत बहुतेक स्वतःवर परस्परांवर अवलंबून असत.

हिंदुस्थानच्या उत्पन्नांतून इंग्लंडांत १९०२–३ सालीं १७,७००,००० पौंड गेले. त्यांचा तपशील; रेल्वेचें उत्पन्न ६,५००,०००; व्याज व कर्ज मिळून २,८००,००० पौंड; स्टोअर्स १,८००, ००; लष्कर १३,००,००० पौंड; मुलकी व्यवस्था ४,००,००० पौंड; समुद्रसंबंधीं १००,००० पौंड. पेन्शनी, फर्लो, भत्ते वगैरे ४, ७००, ००० पौंड. इंग्लंड व हिंदुस्थान या दोहोंच्या सामान्य हित संबंधाकरितां झालेल्या खर्चाच्या वांटणीबद्दल या दोन सरकारांत अनेकवेळां वादविवाद होऊन वेलबी कमिशननें सुमारें अर्डाच लाख पौंडांचा हिंदुस्थानावरील बोजा कमी केला.

हा जो पैसा इंग्लंडमध्यें पाठवावा लागतो तो नगदी न पाठवितां तेथल्या तेथेंच त्याची व्यवस्था केली जाते. कारण विलायतेंतून हिंदुस्थानांत जो माल येतो त्याच्यापेक्षां हिंदुस्थानांतलि माल विलायतेंत जास्त जातो. या निर्गतीचा पैसा विलायतेंतील व्यापारी नगदी न पाठवितां त्याबद्दल भारत मंत्र्याकडून हुंड्या विकत घेतात व त्या हुंड्या इकडे हिंदुस्थान सरकारकडे येतात. व अशा तऱ्हेनें देवघेव होते. परंतु या देवघेवींत हिंदुस्थानचें फार नुकसान होतें कारण येथील रुपयाची किंमत कमी झाल्यामुळें तेथील पौंडाबद्दल पूर्वीपेक्षां जास्त रुपये द्यावे लागतात; त्यामुळें हिंदुस्थानवर कर्जाचा बोजा वाढत जातो. १८७२–७३ सालीं या हुंड्यांची किंमत १६·६ कोट रुपये होती तीं १९०४-५ सालीं २८.९ रु. कोट झाली म्हणजे ही १२ कोट रुपयांची रक्कम येथील सर्व जमीनसाऱ्याच्या निव्वळ उत्पन्नाच्या निमे होती रक्कम फुगण्याचें कारण व्यापाराची तेजी नसून वटावांत तूट हें होय.

कर्जाच 'अनुत्पादक व ' उत्पादक ' असे दोन प्रकार आहेत. सरकारनें पहिल्या प्रकारचें कर्ज १९१०-१२ सालापर्यंत अगदीं कमी करीत आणलें पण १९१४ मध्यें महायुद्ध सुरू होतांच सरकारी जमाखर्चाची एकदम घडी विस्कटली. सरकारवरील विश्वास कमी होऊन लोक बँकांतून पैसे काढून घेऊं लागले. तसेंच इंग्रज लोक लंडनकडे पैसे पाठविण्याबद्दल उतावीळ करूं लागले. तथापि १९१९ पर्यंत लोकांचा ब्रिटिश सरकारसत्तेवर विश्वास स्थिर झाला आणि सरकारला कर्ज मिळूं लागलें.१९१६-१७सालीं सरकारनें काप-

साचें कापड, ताग, चहा, वगैरेवर जकाती वाढविल्या. मिठावरील व उत्पन्नावरील करहि थोडा वाढविला. १९१७–१८ सालीं १० कोटी पौंड युद्धखर्चाकरितां हिंदुस्थाननें देण्याचें ठरविलें. त्या करितां पुन्हां ताग, कापड, रेल्वेचें सामान, यांवरील जकाती वाढवून शिवाय उत्पन्नावर ' सुपर-टॅक्स ' नांवाचा जादा कर बसविण्यांत आला. शेतींचें पीकहि त्या सालीं चांगलें आलें. १९१८ च्या आरंभीं दोस्त राष्ट्रांनीं जर्मनीवर जोराची चढाई सुरू केली व हिंदुस्थानांतून धान्य, चहा, वगैरे माल अधिक प्रमाणांत बाहेर गेला व सरकारचें उत्पन्न वाढलें. १९१८ नवंबरमध्यें महायुद्ध थांबलें; व त्याबरोबर एकदम मालाच्या किंमती सपाटयानें उतरूं लागल्या. त्या सालीं शेतींचें पीक बुडून मुंबई, मध्यप्रांत व संयुक्तप्रांत यांत दुष्काळ पडला; व त्याच सालीं इन्फ्युएन्झाच्या सांथीनें सर्वत्र फार मोठी प्राणहानी झाली. १९१९ सालीं पीक चांगलें आलें पण अफगाण युद्धामुळें जमाखर्चांत २३ कोटींची तूट आली. १९२० मध्यें पीक वाईट आलें, व जमीनमहसूल, अफू, पोस्टतारखातें वगैरेंचें उत्पन्न कमी होऊन एकंदर २२ कोटींची तूट आली. याच सालीं सुधारणांचा कायदा लागू होऊन वरिष्ठ व प्रांतिक जमाखर्च स्वतंत्र झाला. १९२१-२२ च्या बजेटांत तूट भरून काढण्याकरितां आगपेटया, दारू, मोटारी वगैरे चैनीचे जिन्नस, व साखर, तमाखू, यांवरची जकात वाढविली. पोस्टतारखात्यांत दर वाढविण्यांत आले. नव्या कायदे कौन्सिलनें लष्करी खर्च कमी करण्याच्या सूचना केल्या व वाढत्या करांनांहि संमति दिली. १९२३ सालीं मिठावरील कर दुप्पट करून जमाखर्चाची तूट पूर्ण भरून काढण्याचें ठरलें. १९२४ त नव्या निवडलेल्या असेंब्लीनें सर्वच बजेट नामंजूर केलें; तसेंच बंगाल व मध्यप्रांत प्रांतिक कौन्सिलांनीं बजेट नामंजूर करून सरकारची अडवणूक केली. बजेटावर लोकनियुक्त कायदेमंडळाचा पूर्ण ताबा असावा हें लोकपक्षाचें मागणें आहे.

हिं दी ज मा ख र्च व्य व स्थे तील आ व श्य क सु धा र णा.—यापुढें येथील जमाखर्च पद्धतींत सुधारणा पुढील दिशांनीं व्हावयास पाहिजे. (१) हिंदुस्थानांतील राज्यकारभार ही या देशांतील गरीबीच्या मानानें पाहतां फारच जबर कर्जाची बाब झालेली आहे. म्हणून प्रथम हा खर्च शक्य तितका कमी करावयास पाहिजे; व त्याकरितां प्रथम वरिष्ठ दर्जाच्या सरकारी नोकरींत युरोपियनांऐवजीं हिंदी इसमांचा पगार कमी करून नेमणुकी करावयास पाहिजेत. सुधारलेल्या पाश्चात्त्य पद्धतीवर राज्यकारभार चालविण्याकरितां लागणारा आवश्यक खर्च हिंदुस्थाननें हल्लींच्या दारिद्र्यावस्थेंतहि सोसला पाहिजे. तरीहि चालू पद्धतींतहि खर्चाची छाटाछाट करण्यास पुष्कळ जागा आहे. (२) वरीलप्रमाणें खर्च कमी केला तरी देशांत अनेक प्रकारच्या सामाजिक व आर्थिक सुधारणा करण्याकरितां सरकारचा खर्च वाढत जाणार. उदाहरणार्थ, सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण या एकाच बाबीकडे कित्येक कोटी रुपये दरसाल लागणार आहेत. या खर्चाला भिऊनच आजपर्यंत हा प्रश्न पुढें पुढें ढकलण्यांत आलेला आहे. तथापि हा खर्च स्वराज्य सरकारला प्रथम सोसावयास पाहिजे. शिक्षण, उद्योगधंदे, सार्वजनिक कामें, व आरोग्य या कामाकडे केलेला खर्च सरकारला प्रत्यक्ष पैशाच्या दृष्टीनें फायदेशीर नसला तरी त्यामुळें देशांतील लोकांची शेंकडों प्रकारें उन्नति व कल्याण घडून येत असतें. म्हणून या वाढत्या खर्चाकरितां लोकांनीं करांचा वाढता बोजा सहन करण्यास तयार असलें पाहिजे. (३) हे नवे कर बसविण्याची बाब मुख्यतः आयातनिर्गत जकाती ही होय. त्यानंतर दुसरी बाब प्राप्तीवरील कर, वारसाहक्कांवरील फी वगैरे. तिसरी बाब म्हणजे चैनीचे पदार्थ व नाटक सिनेमादि चैनीच्या संस्था. शिवाय जादा नवे कर वाढविण्यापूर्वी हल्लीं आहेत त्या करांचेंच उत्पन्न शक्य तितकें अधिक वाढविण्याची व्यवस्था झाली पाहिजे. (४) या सर्व गोष्टी बरोबर होण्याकरतां प्रथम जमाखर्चावर पूर्णपणें लोकमताचा अधिकार चालू झाला पाहिजे. (५) सरकारी हिशेब तपासण्याचें काम अधिक कडक व चोख रीतीनें व्हावयास पाहिजे. इंग्लंडमध्यें या कामाकरितां एक स्वतंत्र ऑडिटर–जनरल व पार्लमेंटची एक कमेटी असते, तरी तेथें अधिक कडक तपासणी असावी अशी मागणी सुरू आहे. निदान इंग्लंडप्रमाणें तरी येथें व्यवस्था असणें जरूर आहे. (७) वरिष्ठ, प्रांतिक व स्थानिक जमाखर्चाच्या बाबी ठरवून त्या स्वतंत्र तोडून दिल्या पाहिजेत. म्युनिसिपालटया व लोकलबोर्डें यांच्याकडून शिक्षण, आरोग्य, दवाखाने व सडकादि लोकोपयोगी कामें चांगलीं होण्याकरितां त्यांनां कांहीं कर बसविण्याचा अधिकार व प्रांतिक सरकारांनीं वाढत्या प्रमाणावर पैशाची मदत द्यावयास पाहिजे.

ज मा ख र्च प द्ध ती ती ल वि भा ग णी चें त त्त्व.—हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचें राज्यकारभाराचें धोरण गेल्या कित्येक पिढ्या केंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार चालू होतें, म्हणजे राज्यकारभाराचा सर्व अधिकार वरिष्ठ सरकार, गव्हर्नर जनरल व त्याचें कौन्सिल यांच्या ताब्यांत असे. परंतु अलीकडे प्रांतिक सरकारांच्या हातीं जमाखर्चाच्या बाबतींत स्वतंत्र अधिकार देण्याचा उपक्रम झाला आहे, इतकेंच नव्हे तर १९१९ च्या सुधारणांच्या कायद्याअन्वयें उत्पन्नाच्या ठराविक बाबी प्रांतिक सरकारकडे पूर्णपणें दिलेल्या असून प्रांतिक सरकारांनींच, जरूर तर वरिष्ठ सरकारला पैशाची मदत देत जावी असें ठरलें आहे. हिंदुस्थानांतील प्रांत राज्यकारभाराच्या दृष्टीनें युनैटेड स्टेट्समधील संस्थानांइतके स्वतंत्र नाहींत; तथापि जमाखर्चाच्या बाबतींत प्रांतांनां पूर्ण स्वातंत्र्य देणें जरूर आहे. म्हणून आयातनिर्गत जकाती, रेल्वे, पोस्टखातें, मीठ व अफू या उत्पन्नाच्या बाबी वरिष्ठ सरकारच्या; आणि जमीनमहसूल, देशी मालावरील जकाती, स्टँप, प्राप्तीवरील कर व जंगल या उत्पन्नाच्या बाबी पूर्णपणें प्रांतिक सरकारच्या

असें ठरवितां येईल. खर्चासंबंधानें विचार करतां लष्कर, आरमार, व इतर खर्च वरिष्ठ सरकारनें करावा, आणि जरूर पडेल तेव्हां ठराविक तत्त्वांनुसार प्रांतिकसरकारांनीं पैशाची मदत वरिष्ठ सरकारला करावी. याप्रमाणें जमाखर्चाच्या बाबतींत प्रांतांनां पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे.

स्था नि क स्व रा ज्या च्या सं स्थां चा ज मा ख र्च.— म्युनिसिपालिटया व लोकलबोर्डें या संस्थांची सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे. उत्पन्न वाढत जाईल अशा करांच्या बाबी त्यांच्या ताब्यांत देऊन स्थानिक कारभारांत त्यांनां हल्लीं आहे त्यापेक्षां पुष्कळ अधिक स्वातंत्र्य द्यावयास पाहिजे. तसेंच नवे कर बसविण्याची परवानगी त्यांस द्यावयास पाहिजे. १९१३–१४ सालीं जिल्हा लोकलबोर्डें, म्युनिसिपालिटया, कँटोन्मेंट कमेटया, पोर्ट ट्रस्ट वगैरे सर्व स्थानिक संस्थांचें मिळून उत्पन्न सुमारें २१॥ कोटी रुपये होतें. त्यांपैकीं जिल्हा लोकलबोर्डांचें उत्पन्न रु. ६,६८,९३,८९० होतें; व म्युनिसिपालिटयांचें उत्पन्न ८, ७३, ४५, ५७८, रुपये होतें. म्युनिसिपालिटयांचें उत्पन्न आयात मालावरील जकाती (ऑक्ट्रॉयड्यूटी = म्युनिसिपालीटीच्या हद्दींत येणाऱ्या मालावरील जकाती), घरपट्टी व पाणीपट्टी या बाबींपासून होत असतें; व लोकलबोर्डांचें उत्पन्न लोकल फंड (जमीनमहसुलाबरोबर रुपयास एक आणाप्रमाणें घेतला जाणारा कर) व दुसऱ्या कांहीं किरकोळ बाबींपासून होत असतें. हें उत्पन्न फार थोडें असतें; व त्या मानानें आरोग्यविषयक सुधारणा, पाणीपुरवठा, सडका, दवाखाने वगैरे सोयी सर्वत्र करण्याकरतां अधिक खर्च करणें अत्यावश्य असून या बाबतींत जितकी सुधारणा होईल त्यावर सामान्य रयतेचें कल्याण अवलंबून आहे. हिंदुस्थानच्या मानानें इतर सुधारलेल्या देशांतील स्थानिक संस्थांची सांपत्तिक स्थिति फार चांगली असते. या बाबतींत ना. गोखले यांनीं वरिष्ठ कौन्सिलांत स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाच्या बाबीसंबंधानें केलेल्या भाषणांत (१९१२ मार्च १३ रोजीं) खात्रीलायक पुरावा दिला आहे. इंग्लंडमध्यें राष्ट्राच्या एकंदर उत्पन्नापैकीं दोन पंचमांश उत्पन्न स्थानिक संस्थांच्या हातीं असतें, तर हिंदुस्थानांत फक्त १/२० असतें व या १/२० च्या १/२ ची सरकारच व्यवस्था करीत असतें.

स्थानिक संस्था व देशांतील सरकार यांच्या कार्यांची व जमाखर्चाची विभागणी कोणत्या तत्त्वांनुसार केलेली असते त्याची माहिती दुसरीकडे दिली आहे ('म्युनिसिपालिटया' व 'लोकल बोर्ड' हे लेख पहा). हिंदुस्थानचा विचार करतां या संस्था एतद्देशीय नसल्यामुळें त्यांची स्थिति अद्याप बांडगुळासारखी आहे. या संस्थांऐवजीं पूर्वापार चालत आलेल्या ग्रामपंचायतीच पुन्हां अस्तित्वांत आणणें फायद्याचें होईल असें कांहींचें मत आहे. या संस्थांचें स्वरूप कसेंहि असलें तरी त्या लोकप्रिय होतील अशी व्यवस्था व्हावयास पाहिजे. प्राथमिक शिक्षण व आरोग्यविषयक कामें, शिवाय स्थानिक रस्ते, सडका, पूल, तलाव, दवाखाने वगैरे सर्व कामें त्यांनीं केलीं पाहिजेत. परंतु त्याकरितां लागणाऱ्या पैशाची या संस्थांनां हल्लीं फार उणीव असते. याला उत्तम मार्ग म्हणजे जमीनमहसुलाचें उत्पन्न या संस्थांच्या ताब्यांत देणें. विशिष्ट मर्यादेच्या वरील शेतीच्या उत्पन्नावरचा कर सरकारनें घ्यावा, पण त्या मर्यादेच्या खालील करांचें सर्वच उत्पन्न स्थानिक संस्थांनां दिलें जावें. वर सांगितलेलीं सर्व कर्में स्थानिक लोकोपयोगाकरितां असल्यामुळें त्यांचा खर्च स्थानिक उत्पन्नांतून म्हणजे जमीनमहसुलांतून व्हावा हेंच न्याय्य होय.

फ्रान्समध्यें वरिष्ठ सरकारच्या कराबरोबरच जादा कराची आकारणी करून तें उत्पन्न स्थानिक संस्थांनां घेण्याचा अधिकार दिलेला आहे. जर्मनींत प्राप्तीवर स्वतंत्र कर बसविण्याचा अधिकार स्थानिक संस्थांनां आहे. हिंदुस्थान शेतकीप्रधान देश असल्यामुळें विशिष्ट मर्यादेपर्यंत जमीनीच्या उत्पन्नावरील करच स्थानिक संस्थांनीं घ्यावा असा अधिकार देणें सोयीचें आहे.

ही सूचना मोठी क्रांतिकारक आहे हें खरें आहे. करितां तिची अंमलबजावणी हळूहळू व्हावी. आज फक्त तत्त्व मान्य केलें गेलें म्हणजे पुरे आहे. हा जमीनमहसूल जमा करण्याची आज अस्तित्वांत असलेली व्यवस्था व मामलेदार, तलाठी, कुळकर्णी वगैरे अधिकारीच कायम ठेवावे; मात्र या जमीनमहसूलापैकीं बराचसा भाग स्थानिक संस्थांच्या खर्चाकरितां तोडून द्यावा. पूर्वीं सांगितलें आहे त्याप्रमाणें जमीनमहसूलाला प्राप्तीवरील कराचें स्वरूप द्यावें; आणि अल्प उत्पन्नावर कराचा दर अल्प प्रमाणांत असावा. प्राप्तीवरील कराच्या दराप्रमाणेंच शेतीच्या उत्पन्नावरील कराचे दरहि विशिष्ट मर्यादेच्या पुढें वाढत्या प्रमाणांत असावे. इतर देशांच्या मानानें हिंदुस्थानांतील लोकांवर कराचा बोजा हलका आहे ही समजूत चुकीची असल्याचें 'कर' या लेखांत दाखविलें आहे. मात्र स्थानिक संस्था व सरकार यांमध्यें जमीनमहसूलाची वाटणी हल्लीं होते ती फार असमाधानकारक आहे. हा मुद्दा ना. गोखले यांनीं आपल्या उपरिनिर्दिष्ट भाषणांत उत्तम प्रकारें सिद्ध केलेला आहे.

इतर देशांत स्थानिक संस्थांच्या उत्पन्नाचा बराचसा भाग जमीनमहसूलांतून मिळालेला असतो. येथेंहि लोकांच्या स्थानिक गरजा व सोयी उत्तम तऱ्हेनें भागविण्याकरितां हाच उपाय अमलांत आणला पाहिजे. त्याकरितां चालू व्यवस्थेंत बराच फेरबदल करून सर्व रचना उपर्युक्त तत्त्वानुसार करावयास पाहिजे.

हिं दु स्था न चें रा ष्ट्री य क र्ज.—'राष्ट्रीय कर्ज' म्हणजे देशांतील सरकारनें राष्ट्राच्या पतीवर व जबाबदारीवर राष्ट्रहिताच्या कामाकरितां काढलेलें कर्ज अशा कर्जाची कल्पना अधुनिक असून ब्रिटिश साम्राज्याबरोबर ती हिंदुस्थानांत आलेली आहे. रामायणमहाभारत काळांतील प्राचीन राजांनां राज्यकारभाराच्या विशेषतः युद्धांच्या खर्चाकरितां कर्जें

काढण्याची पाळी येत असे. परंतु अशा कर्जाला राष्ट्रीय स्वरूप नसून राजाच्या खासगी कर्जाचें स्वरूप असे. असें कर्ज मागतांना राजानें प्रजेची प्रार्थना कशी करावी त्याचें वर्णन महाभारतांत आहे तें असेः--

अस्यामापदि घोरायां संप्राप्ते दारुणे भये ।
परित्राणाय भवतां प्रार्थयिष्ये धनानि वः ॥
प्रतिदास्ये च भवतां सर्वं चाहं भयक्षये ।
( शांतिपर्व अध्याय ५६ ).

" मी ह्या घोर आपत्तीच्या प्रसंगीं दारुण भय प्राप्त झालें असतां तुमच्याच संरक्षणाकरितां तुमच्यापासून धन मागत आहे. भयाचा नाश झाल्यावर मी तें सर्व तुम्हांस परत देईन." अशा रीतीनें घेतलेलें कर्ज परत देण्याचा उपाय शत्रूपासून घेतलेलें द्रव्य हेंच होय. राजानें कर कोणते व किती प्रमाणांत बसवावे हें धर्मग्रंथांनीं किंवा राजनीतिपर ग्रंथांनीं ठरवून ठेविलेलें असल्यामुळें प्राचीन राजांनां जादा-कर बसविणें शक्य नसे त्यामुळें कर्जफेडीचा दुसरा उपाय म्हणजे खर्चांत काटकसर हा असे तात्पर्य, या एकंदर वर्णनावरून पूर्वी अशा कर्जाला राष्ट्रीय स्वरूप नसे असें स्पष्ट दिसतें.

हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास पाहतां राष्ट्रीय कर्जाच्या तत्त्वाचा बीजरूपानें प्रारंभ पेशवाईंत झाला होता, असें म्हणण्यास सबळ पुरावा आहे. मात्र मराठेशाहींतील राज्य-कारभारपद्धति अनुकूल नसल्यामुळें राष्ट्रीय कर्जासंबंधाच्या शास्त्रीय तत्त्वांची वाढ त्यावेळीं पूर्णपणें झाली नाहीं व त्यामुळें पेशव्यांनां खासगी पतीवर कर्ज काढावें लागून कसा त्रास झाला, व राजकीयदृष्ट्या मराठेशाहीचें काय नुकसान झालें तें इतरत्र दिलें आहे [ 'अर्थशास्त्र' पहा ].

कोणत्याहि देशांत जोंपर्यंत कायमचें असें सरकार नसतें, आज हा राजा तर उद्यां दुसरा कोणी जास्त सैन्य घेऊन येणारा मनुष्य राजा अशी जोंपर्यंत स्थिति असते, तोपर्यंत; तसेंच जोपर्यंत देशांत दंगेधोपे राजरोस होत आहेत, जोंपर्यंत प्रजेचें जीवित व मालमत्ता यांचें रक्षण करणाऱ्या पोलिसादि संस्था उत्पन्न झाल्या नाहींत, जोंपर्यंत व्यक्ति-व्यक्तींचे तंटे मोडणाऱ्या व व्यक्तींमधील करारमदार यांची न्यायानें अंमलबजावणी करणाऱ्या संस्था प्रचलित झाल्या टाकितात तितका ते पुरून ठेवितात किंवा दुसऱ्याच्या नजरेस न येईल अशा तऱ्हेनें आपल्या संग्रहीं ठेवितात. परंतु देशांतील सरकारास बरेंच स्थैर्य आलें, सरकारनें देशांतील बंडफितूर मोडून जीवितास व मालमत्तेस सुरक्षितता आणली, न्यायाचीं कोर्टें स्थापून व्यक्तींचे व्यवहार सुरळीत चालतील अशा प्रकारची व्यवस्था केली. व देशाच्या व्यापारधंद्याला उत्तेजन दिलें म्हणजे देशांत बरेच संपन्न लोक दृष्टीस पडूं लागतात. अशी देशांतील स्थिति राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीच्या उत्पत्तीला अनुकूल स्थिति होय. कारण अशा लोकांच्या पैसा वसूल करण्यास विलंब लागणार व तेवढा तर अवधी नाहीं म्हणून व्याजानें कर्जाऊ पैसे घेण्याचा सरकारनें विचार केला तर लोक सरकारास कर्ज देण्यास एका पायावर तयार असतात. कारण सरकारसारखा शहाजोग कर्जदार दुसरा कोण मिळणार आहे? सरकारच्या स्थैर्यामुळें व सरकारच्या न्यायपद्धतीनें सरकारवर लोकांचा विश्वास बसतो व आपला शिल्लक पैसा नुसता पुरून किंवा पेटींत न ठेवितां थोड्या व्याजानें सरकारास तो कर्जाऊ देण्यांत लोकांचें नुकसान न होतां उलट फायदाच होत असतो अशा वेळीं सरकारसहि थोड्या व्याजावर पैसे मिळतात. कारण देशांतील सर्व सुखवस्तु लोकांची सरकारास कर्ज देण्यांत चढाओढ असते.

ब्रिटिश अमदानींत हिंदुस्थानचें राष्ट्रीय कर्ज सारखें वाढतच गेलें आहे. कंपनी सरकारनें व नंतर ब्रिटिश सरकारनें अनेक युद्धें केलीं व सार्वजनिक हितार्थ अनेक अंतर्गत सुधारणा करण्याकरितां कर्जे काढलें या कर्जाचे दोन भाग करतां येतात. एक फायदेशीर उद्योगधंद्याकरितां रेल्वे, कालवे वगैरे बांधण्याकरितां जें कर्ज काढावें लागलें तें व दुसरें सामान्य अथवा युद्धें वगैरे बुडित खर्चाकरितां कर्ज. हें कर्ज व त्याचें व्याज फेडण्याकरितां नेहमी खर्च करवा लागतो. १८४० सालीं हें कर्ज तीन कोटी १० लक्ष पौंड होतें तें १९०४-५ सालीं तेरा कोटी तीस लक्षांवर आलें. १८४० सालीं येथील रुपयाची किंमत २ शिलिंग होती ती हल्लीं १२ आण्यांपेक्षां कमीच झाली आहे. परंतु १९०४-५ सालचें जें कर्ज लिहिलें आहे त्यांतील बराचसा भाग सरकारनें जास्त व्याजानें संस्थानें, म्युनिसिपालिट्या, मोठमोठ्या पेढ्या शेतकरी इत्यादिकांनां दिलें आहे व त्यांच्यापासून व्याज बरेंच येत असल्यामुळें सरकारला आपल्या खजिन्यांतून व्याज द्यावें लागत नाहीं. ह्या कर्जाशिवाय इतर पोष्टांतील ठेवी वगैरेंसारख्या ठेवी असून त्या एक प्रकारच्या कर्जेच आहेत. त्या कधीं तरी लोकांना परत द्याव्या लागणारच. ह्याकरितां सरकारच्या खजिन्यांत नेहमीं कांहीं तरी शिल्लक ठेवावी लागते.

१८७६ पासून या कर्जाच्या दोन प्रकारांपैकीं बुडित कर्ज सरकारनें कमी करीत आणलें पण १९१४ च्या महायुद्धामुळें तें पुन्हां वाढलें. त्याची कल्पना पुढील कोष्टकावरून येईल.

हें सरकारी कर्ज हिंदुस्थानांत व इंग्लंडांत दोन्ही ठिकाणीं काढलेलें आहे. हिंदुस्थान सरकारनें जेव्हां जेव्हां सवड मिळाली त्यावेळीं अनुत्पादक कर्ज फेडीत आणून १९१५ सालीं तें ३ कोटींपर्यंत आणलें. पण पुढें महायुद्धामुळें त्यांत एकदम भर पडून १९१८ सालीं तें १३२ कोटी झालें. यावेळीं वॉरलोन म्हणून जें कर्ज उभारलें तें हिंदुस्थानांत अवघे १५० कोटी मिळालें; व तें पाश्चात्य देशांच्या मानानें फार कमी आहे, आणि त्यावरून हिंदुस्थान देश फार दरिद्री आहे असें दिसून आलें. १९२० सालीं हिंदुस्था-

युद्धखर्चाप्रीत्यर्थ हिंदुस्थाननें इंग्लंडला १५० कोटी रुपये देण्याचें ठरलें. कर्जाची रक्कम ( १ ) वार बॉंड, व ( २ ) कॅश सर्टिफिकिट, अशा दोन प्रकारांनीं ही रक्कम उभारण्यांत आली.

राष्ट्रीय कर्जपद्धतीचा यूरोपीय इतिहास.- राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीला अनुकूल स्थिति युरोपांत असल्यामुळें या पद्धतीचा फैलाव युरोपच्या सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत अतोनात झाला आहे. राष्ट्र जेवढें मोठें, धनसंपन्न व बलाढ्य तितकें त्याचें राष्ट्रीय कर्ज मोठें. जणूं काय राष्ट्रीय कर्जाची वाढ ही सुधारणेच्या व संपन्नतेच्या वाढीची खूणच आहे. ज्याला इंग्रजी इतिहास व अर्थशास्त्र यांची चांगली माहिती नाहीं त्याला हें काय गौडबंगाल आहे असें वाटेल. इंग्लंडसारखा सर्व जगामध्यें धनाढ्य देश, पण त्याचें राष्ट्रीय कर्ज अजमासें ७४ कोटी पौंड आहे. त्याचें वार्षिक व्याज २॥ कोटी आहे. अमेरिका तर संपत्तींत इंग्लंडच्यापुढें जात आहे. व त्या देशाच्या अवाढव्यतेप्रमाणें त्याचें राष्ट्रीय कर्जहि अवाढव्यच आहे. अमेरिकेचें कर्ज हल्लीं सुमारें २॥ अब्ज डॉलर्स इतकें आहे. अशीच यूरोपांतल्या इतर राष्ट्रांची स्थिति आहे. फ्रान्सचें कर्ज सुमारें ३० अब्ज फ्रँक आहे. यूरोपांतली सुधारणा उचलणाऱ्या जपानलाहि कर्ज काढावें लागलें, व मागल्या लढाईंत आणखी कोटयावधी येनचें कर्ज त्याला काढावें लागलें आहे.

युरोपखंडांत ही राष्ट्रीय कर्जाची पद्धति प्रथमतः इटली देशांतलि व्हेनिस, जिनोआ, फ्लॉरेन्स वगैरे संस्थानांत सुरू झाली. कारण वर निर्दिष्ट केलेली अनुकूल परिस्थिति या संस्थानांनां फार लौकर प्राप्त झाली. केप ऑफ गुड होपला वळसा घालून जलमार्गानें हिंदुस्थानांत जाण्याचा मार्ग वास्को दिगामा यानें शोधून काढण्यापूर्वी इटलींतलीं बंदरें व शहरें यूरोप व आशिया यांमधील दळणवळणाचीं व व्यापाराचीं नाकीं होतीं व त्या काळीं यूरोपपेक्षां हिंदुस्थानांत व चीन वगैरे आशियांतील देशांची जास्त सुधारणा झालेली असल्यामुळें व हेच देश व्यापारधंद्यांत यूरोपपेक्षां पुढें असल्यामुळें इटली देशांतील शहरांना या व्यापारापासून फार फायदा होत असे. यामुळें या शहरांनां याकाळीं फार महत्त्व असे व तीं फार धनाढ्य झालीं होतीं. इटली देशांतील हीं शहरें व्यापारानेंच कीर्तीस चढलीं असल्यामुळें व्यापारी लोकांचें प्राबल्य तेथें फार झालें व म्हणूनच तेथील राज्यें प्रजासत्ताक म्हणण्यापेक्षां धनीकसत्ताक होतीं असें म्हणणें वाजवी आहे. लहान लहान संस्थानांत सरकारचें स्थैर्य असल्यामुळें व शांतता असल्यामुळें व्यापाऱ्यांचा आपल्या सरकारवर पूर्ण विश्वास होता व अशा स्थितींत व्यापारी आपल्या धंद्यास न लागणारें भांडवल सरकारास देण्यास अगदीं एका पायावर तयार असत.

इंग्लंडचें राष्ट्रीयकर्ज:—इंग्लंड, फ्रान्स वगैरे मोठमोठ्या राष्ट्रांनीं इटली देशांतल्या या संस्थांच्या पद्धतीवरून राष्ट्रीय कर्जाची पद्धति उचलली. युरोपांतल्या सर्व मोठमोठ्या राष्ट्रांमध्यें इंग्लंडला लवकर अनुकूल स्थिति असल्यामुळें इंग्लंडमध्यें या पद्धतीचा प्रसार फार लवकर झाला. यामुळेंच इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज इतर सर्व देशांपेक्षां फार जुनें आहे. नॉर्मन लोकांनीं इंग्लंड काबीज केल्यापासून तेथें जोरदार सरकार उत्पन्न झालें व सर्व देशभर शांतता झाली व फ्रान्सप्रमाणें सरदार लोकांचें प्राबल्य राहिलें नाहीं. इंग्लंडमध्यें सरंजामीपद्धति सुरू होती, तोंपर्यंत राजाला लढाईकरितां खर्च नसे. कारण प्रत्येक सरदारानें व इनामदारानें कांहीं लोकांनिशीं राजा बोलावील तेव्हां आलेंच पाहिजे असा नियम होता. राजाच्या स्वतःच्या जमीनीहि पुष्कळ असत. त्यांचें उत्पन्न त्याच्या नेहमींच्या खर्चास पुरत असे; परंतु सरंजामीपद्धतीचा नाश झाल्यावर लढाईकरितां पैशाची जरुरी लागूं लागली; तसेंच राजाच्या जमिनी नाहींशा झाल्यामुळें राजाच्या नेहमींच्या खर्चास नियमानें पैसे वसूल करणें भाग पडूं लागलें व इंग्लंडच्या राजकीय प्रगतीमुळें पैशासंबंधीं व करासंबंधीं सर्व अधिकार पार्लमेंट सभेस आला होता. जेव्हां राजास पैशाची जरूर लागे तेव्हां त्याला पार्लमेंटची दाढधरणी करणें भाग पडे. व पार्लमेंटच्या परवानगीवांचून कर वसूल करण्याचें धाडस केल्याबद्दल व इंग्रजी साम्राज्यपद्धतीच्याविरुद्ध वर्तन केल्याबद्दलच इंग्लंडच्या पहिल्या चार्लस राजास आपल्या प्राणास मुकावें लागलें हें महशूरच आहे. तेव्हांपासून इंग्लंडच्या राजाचा अधिकार फारच मर्यादित झाला. बहुतेक सर्व बाबतींत पार्लमेंटच्या सल्लयाखेरीज राजास वागतां येईनासें झालें. इतकेंच नव्हे तर पुढें पार्लमेंटमध्यें ज्या पक्षाचें बहुमत असेल त्या पक्षांतूनच आपले प्रधान सुद्धा निवडावे लागले. कराचे पैसे वसूल होण्यास विलंब लागल्यास राजाचे प्रधान पार्लमेंटजवळ तात्पुरतें कर्ज काढण्यास परवानगी मागत व पुढें पुढें तें कर्ज कायमच करावें लागे. कारण आणखी नवीन खर्च उत्पन्न होतच असत. इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज दुसरा चार्लस याच्या वेळेपासून सुरू झालें आहे. पूर्वी सुरक्षितपणाकरितां लोक आपलें जडजवाहीर लंडन येथील सरकारी किल्लयांत ठेवीत असत. दुसऱ्या चार्लस राजाला पैशाची फार जरूर लागल्यामुळें त्यानें त्या किल्लयांतील जडजवाहीर घेऊन त्याचा विनियोग करून टाकला. याप्रमाणें चार्लस राजानें दांडगाईनें व बळजबरीनें लोकांचे पैसे घेतले. यामुळें आपली शिल्लक सरकारी किल्लयात न ठेवतां लंडन लोक मधल्या सराफाजवळ ठेवूं लागले व त्यांच्याच पुढें मोठमोठ्या पेढ्या झाल्या. सरकारला झालेलें कर्ज एकत्र करण्याकरितां व सरकारास वेळोवेळीं लागणारें कर्ज जास्त सुलभतेनें काढतां यावें म्हणून बँक ऑफ इंग्लंड नांवाची एक नवीन पेढी तिसरा विल्यम राजा याच्या कारकीर्दीत स्थापन झाली. या पेढीनें सरकारचें पूर्वीचें सर्व कर्ज फेडून तें आपल्याकडे घेतलें. व नवें लागणारें कर्ज उभारून देण्याची हमी घेतली.

याबद्दल त्या बँकेला सरकारनें विशेष प्रकारच्या सवलती दिल्या. चार्लस राजानें जुलमानें व बळजबरीनें घेतलेल्या पैशाबद्दल लोकांनां या बँकेचे शेअर दिले व त्यांनां नियमित रीतीनें व्याज मिळेल अशी तजवीज केली. जसजसा इंग्लंडचा राज्यविस्तार वाढत चालला तसतसा राज्याचा खर्च वाढत चालला व लढाया वगैरे विशेष कारणांचा खर्च कर्जानें भागविणें सोईचें असल्यामुळें इंग्लंडचें राष्ट्रीय कर्ज इंग्लंडच्या राज्यविस्ताराप्रमाणेंच अवाढव्य होत गेलें. परंतु या राज्यविस्ताराबरोबरच इंग्लंडच्या व्यापारधंद्याची वाढ होत जाऊन इंग्लंडास व्यापारी बाबतींत वर्चस्व मिळाल्यामुळें इतक्या राष्ट्रीय कर्जाचें जडजूं इंग्लंडसारख्या धनाढ्य देशास उचलतां आलें व राष्ट्रीय कर्जापासून इंग्लंडच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला नाहीं. परंतु दुसऱ्या पुष्कळ देशांचें अवाढव्य राष्ट्रीय कर्जापायीं फार नुकसान झालें.

युद्धापूर्वी इंग्लंडला बाहेरून कर्ज काढण्याचे प्रसंग फारच क्वचित आले होते. परंतु महायुद्धांत मात्र इंग्लंडला १९१५ सालीं अमेरिकेकडून कर्ज काढणें भाग पडलें. त्या सालीं इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांनीं मिळून व स्वतंत्रपणें असें ५००,०००,०००, डॉलर्स कर्ज ५ वर्षांच्या मुदतीनें काढलें; व त्या मुदतीच्या आंत त्यांनीं तें फेडूनहि टाकलें. यामुळें या राष्ट्रांची पत अमेरिकेंत सहजगत्याच वाढली. यानंतर दोन वर्षांच्या मुदतींत दुसऱ्यांदा २५०,०००,००० डॉलर्स व तिसऱ्यांदा तीन व पांच वर्षांच्या मुदतीनें पुन्हां २५०,०००,००० डॉलर्स कर्ज न्यूयार्कमधून काढण्यांत आलें. यशिवाय १९१७ च्या जूनमध्यें, ५,०००,००० डॉलर्स बँकेच्या व्यवहाराकरतां, व २५,०००,००० डॉलर्स गहूं खरेदी करण्याकरितां इतका पैसा कर्जरूपानें अमेरिकेंत उभारण्यांत आला. सारांश अमेरिका युद्धांत पडण्यापूर्वी इंग्लंडनें अमेरिकेपासून ११३१,४००,००० डॉलर्सचें कर्ज काढलें होतें. महायुद्धांत अमेरिका पडतांच तिनें इंग्लंडला वाटेल तितकें कर्ज देण्यास सुरुवात केली. कर्ज फेडण्याची मुदत १९२२ पर्यंत ठरवण्यांत आली. याशिवाय इंग्लंडनें स्पेन, जपान, स्विट्झर्लंड, अर्जेंटिना, युराग्वे, स्वीडन, चिली इत्यादि राष्ट्रांकडून कर्ज काढलें; पण तें ठराविक मुदतींत फेडूनहि टाकलें. फक्त अमेरिकेंचें कर्ज मात्र स.१९२१ पर्यंत एक कवडी देखील फिटलें नव्हतें. पण १९२१च्या अखेरीस इंग्लंडनें अमेरिकेचें व कानडाचें अनुक्रमें ७५,०००,००० व २९,०००,००० पौंड कर्ज फेडून टाकलें. १९२१ च्या मार्च महिन्यापावेतों इंग्लंडनें स्वीडनचें ८२६,००० पौंड देणें होतें.

डिसेंबर १९१५ पासून इंग्लंडनें सारखें कर्ज काढण्याचा सपाटा चालविला होता. त्या महिन्याच्या १७ व्या तारखेस ५ टक्के व्याजाचे इंग्लंडनें एक्श्चेकर बाँड्स विक्रावयास काढले व त्यांचा खप होतो असें दृष्टांस पडतांच पुन्हां एका वर्षाच्या अवधींत तीन वेळां आणखी अशाच प्रकारचे कर्जरोखे काढले. यानंतर १९१७ सालापासून इंग्लंडनें, नॅशनल वार बाँड्स काढावयाचें ठरविलें व हे कर्जरोखे मोठ्या प्रमाणावर खपवावयाचें ठरविलें. ही पद्धत पूर्णपणें यशस्वी झाली. लढाईच्या अमदानींत, थोडक्या दिवसांच्या मुदतीनें कर्ज काढण्यांत येत होतें. त्यामुळें, लोक पुष्कळ रकमा देण्याला तयार होते. पण महायुद्ध संपल्यानंतर बऱ्याच वर्षांच्या मुदतीनें ज्यावेळीं कर्ज काढण्याची टूम इंग्लंडनें काढली तेव्हां सरकारच्या अंदाजाप्रमाणें लोकांकडून कर्ज मिळेना तेव्हां ही पद्धत बंद करण्यांत आली.

पण महायुद्धांत थोड्या वर्षांच्या मुदतीनें जें कर्ज काढण्यांत आलें होतें त्याची फेड करण्याची मुदत अगदीं जवळ आली होती व तें कर्ज कसें फेडावयाचें हा मोठा प्रश्न १९२१ मध्यें इंग्लंडच्या पुढें उभा राहिला. त्यामुळें सरकारनें कर्जरोखेवाल्या सर्वांची सभा भरवून कर्जरोखेदारांनां त्यांच्यापाशीं असलेल्या कर्जरोख्यांच्या बदलीं नवीन कर्जरोखे अधिक सवलतीनें पण अधिक मुदतीनें द्यावयाचें ठरविलें. १०० पौंडाला सरकारनें १६७ पौंडांचा कर्जरोखा द्यावयाचें कबूल केलें. पण यांत सरकारला यावें तसें यश आलें नाहीं.

या पद्धतीखेरीज इतर पद्धतीहि इंग्लंडनें प्रयोगांत आणल्या. पण सर्वांत यशस्वी पद्धत म्हणजे वॉर सेव्हिंग्ज बाँड्सची पद्धत होय. दर पौंडाच्या बाँडला १५ शिलिंग ६ पेन्स दिले असतां एक कर्जरोखा मिळत असे. हे कर्जरोखे पोस्ट, सार्वजनिक संस्था, बँका यांच्यामधून विकावयास ठेवले होते. प्रथमतः हे पैसे ५ वर्षांच्या मुदतीनें घेण्यांत आले होते पण पुढें त्याची मुदत १०वर्षे करण्यांत आली. ही पद्धत बरीच यशस्वी ठरली. स.१९२० च्या मार्च महिन्यांत इंग्लंडचें कर्ज ७८२९,०००'००० पौंड भरलें. हा इंग्लंडचा आतांपर्यंतचा सर्वांत मोठा आंकडा होय. १९२१ च्या मार्च महिन्यांत कर्जाचा आंकडा ७५७३,०००,००० पौंड होता.

महायुद्धाच्या अमदानींत राष्ट्रीय कर्जाचा आंकडा अंदाजाबाहेर फुगला. विशेषतः युद्धमान राष्ट्रांचें कर्ज तर अतोनात फुगलें. महायुद्धापूर्वी एखाद्या राष्ट्राला महायुद्धानंतरच्या इतकें कर्ज झालें असतें तर त्या राष्ट्राला इतर राष्ट्रांनीं वेड्यांतच काढलें असतें व तें राष्ट्र कर्जाखालीं चिरडून गेलें असतें; लॉईड जॉर्जनें या महायुद्धांतील राष्ट्रीय कर्जाचा अंदाजी आंकडा ४०००० दश लक्ष पौंड केला होता व तो यूरोप व अमेरिका राष्ट्रांतील फडनीस व आंकडेशास्त्रज्ञांनीं मान्यहि केला होता. १९२० सालीं राष्ट्रसंघाची ब्रुसेल्स येथें बैठक भरली त्यावेळीं राष्ट्रीय जमाबंदीचा खर्डा तिजपुढें सर्व राष्ट्रांनीं सादर केला. त्यावरून प्रत्येक राष्ट्राचें कर्ज खालीलप्रमाणें होतें:—

## कोष्टक

पौंडांचे आंकडे हजारांचे आहेत.

| राष्ट्राचें नांव | स. १९१९ कर्ज पौंड | स. १९१३ कर्ज पौंड | १९१९ दर माणसी कर्ज |
|---|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | ७८३२००० | ७०६००० | १६८–०–० |
| ऑस्ट्रेलिया | ३५०००० | १७५०० | ६२–०–० |
| कानडा | ५०५००० | ५७२०० | ५८–०–० |
| हिंदुस्थान | ६१६४०० | २७४००० | १–५–९ |
| न्यूझीलंड | २०११०० | ९०००० | १७२–१५–० |
| साउथ आफ्रिका | १७३८०० | १२६२०० | ०–०–० |
| ईजिप्त | ९३३८९ | ९४२०० | ७–०–० |
| फ्रान्स | ८४७२००० | १३४५००० | २२२–८–० |
| बेल्जम | ७८४००० | १८५००० | ९९–८–० |
| इटली | ३१२४००० | ६११००० | ७९–३–० |
| स्पेन | ४८०००० | ३८२००० | २१–५–० |
| पोर्तुगाल | ३४२००० | १३०००० | ५७–०–० |
| हॉलंड | २३०००० | ९७००० | ३१–७–० |
| स्वित्झर्लंड | १४८००० | ६८००० | ३५–४–० |
| नॉर्वे | ५६५०० | २०००० | २०–१२–० |
| स्वीडन | ८७००० | ३६००० | १३–१८–० |
| डेन्मार्क | ५१००० | २००५० | १४–१४–० |
| फिनलंड | ७४००० | — | — |
| लॅटाव्हिया | २३७०० | — | — |
| चेकोस्लोव्हेकिया | ३८०८०० | — | — |
| सर्वकोटस्लोव्हेन | २३४००० | २६५०० | — |
| ग्रीस | १२९००० | ४८६०० | २२–०–० |
| पोलंड | ४४०००० | — | — |
| रुमानिया | ४४५००० | ६५६०० | २५–१५–० |
| जर्मनी | ९८५०००० | २५८००० | १५९–१०–० |
| ऑस्ट्रिया | ३४७०००० | ५१०००० | — |
| हंगेरी | १५८७००० | २७०००० | — |
| बल्गेरिया | २१८००० | ३५००० | २२–०–० |
| तुर्कस्तान | ४१२००० | १५११६०० | २१–०–० |
| यूनैटेडस्टेट्स | ५०९६८०० | २०५८०० | ४५–०–० |
| अर्जेंटिना | १२७०८० | १२३८०० | १६–९–० |
| ब्राझिल | १७९६०० | १९४००० | ७–६–११ |
| चिली | ४९६२० | ३२८०० | १२–८–० |
| सियाम | ६७०० | ६३०० | ०–१४–६ |
| जपान | ३५२७०० | २७१९४० | ६–१–० |
| चीन | १७१९०६ | १३०००० | ०–१०–० |

वर दिलेलें कोष्टक गणितदृष्टया अगदीं खरें मानतां येत नाहीं. याचें कारण कागदी नोटांचा सर्वत्र सुळसुळाट झाला हें होय. फक्त अमेरिका व जपान या राष्ट्रांनीं मात्र सोन्याचें नाणेंच चालू ठेवलें होतें. त्यामुळें सोन्याचा भाव उतरला; त्या मानानें या कर्जांतहि कमीअधिक फेरफार करावा लागेल. १९२१च्या मे महिन्यांत सोन्याच्या पौंडाचा भाव शेंकडा २०टक्के उतरला. त्या दृष्टीनें पहातां वरील कर्जांत बराच फेरफार करणें आवश्यक आहे. विशेषतःरशिया, पोलंड, ऑस्ट्रिया, हंगेरी इत्यादि राष्ट्रांत तर सोन्याचा भाव अंदाजाबाहेर उतरल्यामुळें त्यांच्यापुढें जे कर्जांचे आंकडे पडलेले आहेत त्यांत पुष्कळच फेरफार करणें जरूर आहे. सोन्याचा भाव युद्धपूर्वस्थितीला केव्हां येईल व कोणत्या राष्ट्रांमध्यें तो येईल हें अनुमान करणें धाडसाचें होईल.

राष्ट्रीय कर्ज काढण्याचीं कारणें:—राष्ट्रांतील सरकारास तीन कारणांमुळें राष्ट्रीय कर्जाच्या पद्धतीचा अंगिकार करण्याचा प्रसंग येतो. प्रथमतः वार्षिक जमाखर्चाची तोंडमिळवणी न झाल्यामुळें तिजोरींत येणारी तूट भरून काढण्यास कर्ज काढण्याची पाळी येते. तसेंच हल्लींच्या काळीं एखाद्या राष्ट्रांतील सरकारास परराष्ट्रांशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला म्हणजे कर्जाखेरीज गत्यंतर नसतें. तसेंच सरकारच्या हातीं कांहीं धंदे राजकीयदृष्टया असणें जरूर असल्यास ते धंदे अनुत्पादक असले तरी सरकारास चालविणें भाग पडतें. अशा वेळीं किंवा उत्पादक धंदे उभारण्यास देशांतील खासगी व्यक्ती किंवा व्यक्तिसमूह धाडस करून पुढें येत नाहीं, म्हणून असे उत्पादक धंदे देशांत सरकारनें काढणें जरूर असेल, अशा वेळीं भांडवलाचे पैसे कर्जानेंच काढणें प्राप्त असतें.

सुधारलेल्या प्रत्येक राष्ट्रांत प्रजासत्तातत्त्वाचा अंमल कमी अधिक प्रमाणानें चालू असल्यामुळें अशा राज्यांतल्या सरकारानें वार्षिक जमाखर्चाचें अंदाजपत्रक वर्षारंभापूर्वी तयार करून प्रजेच्या प्रतिनिधिसभेस सादर करून त्या जमाखर्चास त्या सभेची संमति घेतली पाहिजे, असा साधारण नियम असतो. अर्वाचीन राष्ट्रांची उत्पन्नाची मुख्य बाब म्हणजे निरनिराळ्या प्रकारचे कर होत. यांतील बरेच कर अप्रत्यक्ष असल्यामुळें त्यांचा बरोबर अंदाज करतां येत नाहीं. ज्या करांचें उत्पन्न मालाच्या खपावर अवलंबून आहे, त्या करांचें उत्पन्न कमी जास्त होणें, तसेंच विशेष कारण नसतांना सुद्धां खर्चाच्या अंदाजांतहि फरक पडणें साहजिक आहे. जमेकडील व खर्चाकडील दोन्ही बाजूंकडे अशा प्रकारानें अनिश्चितता असल्यामुळें वर्षअखेर जमाखर्चाची तोंडमिळवणी होत नाहीं; व तिजोरींत तूट येते व अशा वेळीं सरकारास तात्पुरतें कर्ज काढावें लागतें. कारण नवीन कर बसविण्यास प्रतिनिधिसभेची परवानगी लागते. व कर बसविला तरी त्याचें उत्पन्न एकदम वसूल होत नाहीं. बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांत अगदीं अवश्य लागणाऱ्या खर्चाचा अंदाज आधीं करतात व त्या खर्चाला लागे इतकेच कर बसवितात. म्हणजे जमाखर्चाच्या खड्यांत होतां होई तों शिल्लक दाखवीत नाहींत. जेमतेम दोन्ही तोंडें मिळालीं आहेत असें दाखवितात, व नेहमींच्या साधारण खर्चापुरता वसूल लोकांकडून करतात व कोण-

त्याहि विशेष प्रसंगीं कर बसावितात किंवा कर्ज काढतात. याला तुटीची जमाखर्चाची पद्धत म्हणतात. परंतु कांहीं देशांत आपल्यास कर्ज काढण्याचा प्रसंग पडूं नये व प्रसंगविशेषीं उपयोगी पडावी म्हणून जास्त शिल्लक पडण्यासारखा जमाखर्चाचा खर्डा तयार करतात. या पद्धतींत खर्चाचा अंदाज पुष्कळ अधिक करून त्या सर्व खर्चास पुरून उरेल इतका पैसा कररूपानें प्रजेकडून वसूल करतात. या पद्धतीला शिलकेची जमाखर्चाची पद्धत म्हणतात. अलीकडे पांच सात वर्षे हिंदुस्थानसरकारच्या फडणिसांनीं या दुसऱ्या पद्धतीचा आपल्या जमाखर्चाच्या खर्ड्यांत अवलंब केलेला आहे. या दुसऱ्या पद्धतीनें सरकारास फार मोठ्या अवघड व खर्चाच्या प्रसंगाशिवाय कर्ज काढण्याची पाळी येत नाहीं हें उघड आहे. कारण सरकारी तिजोरींत हजारों रुपये शिल्लक असतात.

राष्ट्रीय कर्जखोरीचें समर्थनः— आतां अर्थशास्त्रदृष्टीनें तुटीच्या जमाखर्चाच्या पद्धतीची व शिलकेच्या जमाखर्चाच्या पद्धतीची तुलना करणें इष्ट आहे. प्रथमदर्शनीं दुसरी पद्धत चांगली असें भासतें. कारण ज्याप्रमाणें खासगी मनुष्य वेळप्रसंगाकरितां म्हणून कांहीं शिल्लक मागें टाकतो; या त्याच्या कृत्यास आपण दूरदर्शीपणा म्हणतों; याच्या उलट आदा तितका खर्च करणाऱ्यास आपण उधळ्या समजतों; त्याप्रमाणें वेळप्रसंगाकरितां शिल्लक ठेवणारें सरकार व त्याची जमाखर्चाची पद्धत तुटीच्या जमाखर्चाची पद्धतीपेक्षां जास्त दूरदर्शीपणाची आहे व म्हणूनच ती अर्थशास्त्र दृष्ट्याहि क्षम्य असावी असे सकृद्दर्शनीं वाटतें खरें. परंतु या बाबतींत खासगी व्यक्ति व सरकार यामध्यें साम्य नाहीं व म्हणूनच जें व्यक्तीच्या दृष्टीनें चांगलें तें राष्ट्राच्याहि दृष्टीनें चांगलें असलेंच पाहिजे असें म्हणतां येत नाहीं. खरोखरी पाहतां तुटीच्या जमाखर्चाची पद्धतच सरकारच्या व प्रजेच्या फायद्याची आहे. कारण सरकार हें एक व्यक्ति नाहीं. सरकारी तिजोरींत पैसे शिल्लक असले कीं, सरकारी अम्मलदारांनां खर्च करण्याचा मोह होणें अगदीं स्वाभाविक आहे. तेव्हां शिलकेच्या जमाखर्चाच्या पद्धतीनें सरकार दूरदर्शी न रहातां उधळें मात्र होण्याचा फार संभव आहे. या गोष्टीला ऐतिहासिक प्रमाण आहे. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांमध्यें कांहीं दिवस ही पद्धत चालू होती व त्यामुळें नेहमीचाच खर्च आतोनात वाढला. इंग्लंडमधला हाच अनुभव आहे. हिंदुस्थानांतहि तीच स्थिति झाली. लिटनसाहेबांच्या कारकीर्दींत दुष्काळाकरितां अगदीं स्वतंत्र कर बसविला व याचा दुसरीकडे विनियोग करावयाचा नाहीं, असें प्रजेला आश्वासन दिलें. परंतु त्याचा उपयोग दुष्काळ निवारणाकडे न होता सरकारी अंमलदारांनीं त्याची वाटेल ती विल्हेवाट लाविली. सारांश काय कीं, राष्ट्रांतील सरकारच्या तिजोरींत जास्त पैसे शिल्लक असणें हा दूरदर्शीपणा नसून उधळेपणाचा पाया होय. दुसरें असें कीं, सरकारच्या तिजोरींत असलेली शिल्लक अनुत्पादक राहिल्यास तिचा राष्ट्रीय संपत्ति वाढविण्याकडे कांहीं उपयोग होत नाहीं.

[संदर्भग्रंथ.—सर जॉन आणि सर रिचर्ड स्ट्रॅची—फायनॅन्सेस अँड पब्लिक वर्क्स ऑफ इंडिया ( १८८२ ); इंडियन फायनॅन्स कमिटी ( १८८६ ) चा रिपोर्ट;दि फायनॅ. स्टेटमेंट्स ( वार्षिक ); अॅडाम्स—सायन्स ऑफ फायनॅन्स; बॅस्टेबल डॅनिएल्स—पब्लिक फायनॅन्स; मीड—ट्रस्ट फायनॅन्स कॅरोल—प्रिन्सिपल्स अँड प्रॅक्टिस आफ फॉयनॅन्स; वैद्य-महाभारत, उपसंहार; भाटे—अर्थशास्त्र; इं. गॅ;ब्रिटानिका. ]

**जमालखान**—सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दींत लष्करीपेशानें वागणारी व लष्करी कवाईत वगैरे जाणणारी एक युरोपियन बाई आली होती. ती फ्लारेन्स येथील मूळची रहाणारी असून तिनें मिस्टर जेम्स हॉल नांवाच्या एका मद्रास येथील यूरोपियन बॅरिस्टराबरोबर लग्न केलें होतें. तिचें व तिच्या नवऱ्याचें पुढें पटेना; तेव्हां तिनें शिपाईगिरीचा धंदा स्वीकारून ती हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संस्थानिकांजवळ राहून त्यांच्या दरबारांत स्त्रियांची पलटणें तयार करीत असे. तिचें खरें नांव मिसेस जेम्स हॉल होतें. परंतु पुढें तिच्या लष्करी पेशावरून तिचें नांव 'जमालखान' उर्फ 'जमाल सरदार' असें पडलें.

ही बाई इ. स. १७७८ च्या सुमारास पुण्यास आली. पेशव्यांच्या दरबारांत स्त्रीसैन्य तयार करण्याचा तिचा विचार होता. पण तिच्या तैनातींतील एका ब्राह्मण नोकरानें तिचा कांहीं अपराध केल्यामुळें तिनें त्यास मरेमरेपर्यंत चोप दिला. या अपराधाबद्दल नाना फडणीसानें तिला कैद करून लोहगड किल्ल्यांत ठेविलें. तेथें ती ७ वर्षे होती. पुढें फ्रेंच सेनापति मुसा पेरू ह्यानें मध्यस्थी करून तिला सोडविलें. ती पुण्याहून मुंबईस गेली व तेथें १७९८ सालीं मरण पावली. पुण्यामध्यें 'जमालखान' या नांवानें तिची प्रसिद्धी होती. [इ. सं. जुन्या ऐतिहासिक गोष्टी, पृ. १९]

**जमालपुर**—( १ ) बंगाल, मैमनसिंग जिल्हा. हें जमालपुर विभागाचें मुख्य ठिकाण असून जुन्या ब्रह्मपुत्रा नदीच्या पश्चिम तीरावर वसलेलें आहे. उ. अ. २४° ५६' व पू. रे. ८९° ५६'. लो. सं. ( १९११ ) २११०९. ईस्टर्न बंगाल स्टेट रेल्वेचें हें स्टेशन असून इ. स. १८६९ मध्यें म्युनसिपालिटीची स्थापना झाली. बंडापूर्वी जमालपुर हें लष्करी ठाणें होतें.

( २ ) बिहार ओरिसा, मोंघीर जिल्हा. जमालपूर विभागाचें मुख्य ठिकाण. उ. अक्षांश २५°१९' व पू.रे.८६°३०'. हें गांव ईस्ट इंडियन रेल्वेवर कलकत्त्यापासून २९९ मैल आहे. लोकसंख्या ( १९११ ) २०५२६. येथें रेल्वेचे कारखाने आहेत; त्यांनीं बरीच एकर जागा व्यापलेली आहे व त्यातच काम करणारांचा भरणा मोठा आहे.

म्युनिसिपालिटी १८८३ साली स्थापन झाली. येथें एक रेल्वे हॉस्पिटल व शाळा आहे.

**जमिकुंता—**हैद्राबाद संस्थान. करीमनगर जिल्ह्यांतील एक तालुका. क्षेत्रफळ ५५२ चौरस मैल. लोकसंख्या (१९११) १५१५९९. यांत १३० खेडीं व ९ जहागीरी आहेत. सन १९०१ सालीं ४ लाख रुपये वसूल होता. हा तालुका पश्चिमेकडे डोंगराळ आहे. या तालुक्यांत जंगल नसून भात हें मुख्य पीक आहे.

**जमीन—**भूपृष्ठाचे दोन भाग पडतात–जमीन व पाणी. जमीनीपेक्षां पाण्याचें क्षेत्र जास्त आहे (पांच शोडषांश जमीन व अकरा शोडषांश पाणी). भूपृष्ठावरच्या जमीनीच्या भागाची सविस्तर माहिती 'भूपृष्ठवर्णन' या लेखांत सांपडेल. कृषिकर्माला लागणाऱ्या जमीनीचे प्रकार 'कृषि' या लेखांत विवेचिले आहेत. 'जमीनदार व कुळें' व 'जमीनमहसूल' लेखांतून अर्थशास्त्र व शासनशास्त्र या दृष्टीनें जमीनीचा विचार केला आहे.

**जमीनदार व कुळें,** ता त्वि क वि वे च न.—मानवी इतिहासाच्या प्रारंभींच्या कालीं सर्व जमीन कोणाच्याहि मालकीची नसून अविभक्त स्थितींत होती. ज्याला वाटेल त्यानें वाटेल तितकी जमीन कसावी व खावी. हळूहळू समाज स्थायिक होत जाऊन जमीनीवर मालकी उत्पन्न झाली व पुढें दुर्बलांनां दुसऱ्या प्रबळ लोकांच्या आश्रयाखालीं जावें लागून त्यांचे अंकित अगर दास बनावें लागलें. जमीनीच्या मालकीच्या इतिहासांत कुलवसाहत हीच पहिली पायरी आहे असें कांहींचें म्हणणें आहे. हळूहळू जमीनीची मालकी कायम झाल्यावर मालकास जमीनीची मशागत करण्यास नोकर व बायका लागूं लागल्या व पुढें गुलामपद्धति अस्तित्वांत आली. कांहीं देशांत दासवृत्तीची पुढील पायरी म्हणून सरंजामवृत्ति (फ्यूडॅलिझम) बनत चालली. हिंदुस्थानांत सध्यांची जमीनदारपद्धति कशी अस्तित्वांत आली हें पुढें दाखविलेंच आहे. वैयक्तिक मालकीची कल्पना ग्रीस व रोमन राष्ट्रांत प्रथम अस्तित्वांत आली. ग्रीसमध्यें सिटी-स्टेट (नगर-संस्थान) नें जमीनीवर ताबा मिळवून स्वतंत्र नागरिकांनां ती वाटून दिली. श्रीमंत जमीनदारांच्या जमीनी गुलाम करीत. अशा तऱ्हेनें खासगी मालकीच्या मोठमोठ्या इस्टेटी बनल्या व या इस्टेटींच्या जहागिरी झाल्या. कांहीं मोठ्या बलिष्ठ व चैनी जमीनदारांच्या हातीं रोमन साम्राज्य जाऊन तें अवनत झालें व बरेचसे प्रजाजन दरिद्री व दास बनले. यूरोपमधील सरंजामीपद्धतीची कांहींशी उभारणी या रोमन जहागिरीवर असावी असें बऱ्याच तज्ज्ञांचें मत आहे. जर्मनींतील 'मार्क', इंग्लंडमधील 'मॅनॉर' हीं मध्ययुगांतील जमीनदार व कुळें यांतील संबंध दर्शवितात. सरंजामीपद्धतीवर स्वतंत्र लेख दिला आहे. त्या पद्धतीचा परिणाम म्हणजे राजास द्यावयाचा कर व स्वतःचें भाडें असा दुहेरी पैसा जहागीरदार कुळांकडून घेत. अशा रीतीनें जमीनीवरचा मालकी हक्क प्रस्थापित होऊं लागून आजची स्थिति प्राप्त झाली. यूरोपमध्यें मध्ययुगीन लढायांनंतर जमीनदारवर्ग' दरिद्री होऊन आपल्या जमीनी शेतकीपेक्षां अधिक किफायतशीर अशा लोंकरीच्या धंद्याकरितां मेंढयांची निगा राखण्याच्या कामासाठीं देऊं लागला. यामुळें कृषिकर्माची हानी होऊं लागली; व सार्वजनिक गुरचरणांनां कुंपणें पडूं लागलीं. याप्रमाणें सार्वजनिक हक्कांवर गदा येऊन इंग्लंडमधील जमीनींची इस्टेट वाढत गेली. आतां जरी इंग्रजी कायदा जमीनीवरची सबंध खासगी मालकी मान्य करीत नाहीं तरी व्यवहारांत ती सर्वस्वी खरीच ठरते.

युनायटेडस्टेट्स व ऑस्ट्रेलेशिया या भागांत वरील इंग्रजी हक्काची पद्धत अंमलांत आहे. ज्या ज्या ठिकाणीं इंग्रज माणसाला जमीन सांपडली त्या त्या सर्व ठिकाणीं त्यानें तीवर आपल्या राजाचा हक्क प्रस्थापित केला; व राजानें ती एखाद्या कंपनीला किंवा व्यक्तीला बेचन देऊन टाकिली असें आजपर्यंत घडत आलें आहे. इंग्लिश वसाहतींतील सर्व जमीनी राजाकडून मिळालेल्या म्हणून धरतात.

जमीनीची मालकी:—१९०० च्या खानेसुमारीवरून पाहातां असें आढळते कीं, युनायटेड स्टेट्समध्यें शेंकडा ६४.४ कुटुंबांनां स्वतःचीं घरें होतीं. ग्रेट ब्रिटनमध्यें इतर देशांतल्यापेक्षां फार थोड्यांच्या हातीं जमीनी आहेत. ७१० माणसांच्या हातीं १/४ इंग्लंड, ७० च्या हातीं १/२ स्कॉट्लंड व १३००० माणसांच्या हातीं संबंध युनायटेड किंग्डमचा २/३ हिस्सा आहे असें म्हणतात. खरी जमीनदारी सत्ता येथें पहावयास सांपडते. जमीनदार कुळांनां किती छळतात याचीं हृदयस्पर्शी वर्णनें अलफ्रेड रसेल वॉलेसनें आपल्या 'लँड नॅशनॉलिझेशन' या ग्रंथांत दिलीं आहेत. फ्रान्समध्यें लोकसंख्येपैकीं शेंकडा ९, आस्ट्रियांत १४, व राशियांत (महायुद्धापूर्वींच्या) १४ जणांच्या हातीं शेतकीची जमीन आहे. प्रशियांत १८५९ त तर शंभरांत एकाच्या पदरीं एकंदर जमीनीच्या ५/८ जमीन होती. पण पुढें या जमीनीचे तुकडे पडून ते गरीबांनां मिळूं लागले.

जमिनीची मालकी म्हणजे काय:—मनुष्य हा भूमीचर प्राणी आहे. तेव्हां त्याला जमीनीखेरीज कांहींच करतां येणार नाहीं. अर्थशास्त्रीयदृष्ट्या जमीनीकडे पाहतां असें दिसून येईल कीं, जमीन म्हणजे विश्वांतील केवळ भूपृष्ठ नव्हे तर सर्व विश्वांतील पृष्ठभाग, जमीन आणि पाणी, जमीन आणि पाणी यांतील मानव व मानवी श्रम खेरीजकरून सर्व गोष्टी होत. सर्व नैसर्गिक साधनांत जमीनीची बरोबरी कोणाला येणार नाहीं. तेव्हां साहजिकच जमीनीचा कबजा घेण्याकडे सर्वांचें लक्ष्य लागलें.

आतां जमीनीवरील 'मोनॉपोली'मुळें काय परिणाम झाले तें पाहूं. पहिला परिणाम म्हणजे सर्व सुधारलेल्या देशांतून जमीनी नसलेल्या लोकांनां जमीनी असलेल्या लोकांवर अवलंबून रहावें लागत आहे. म्हणजे जमीन

नसलेले लोक स्वतंत्र नाहींत. या भूमिदास्यत्वामुळें शहरांतून खेंचाखेंच होत असून गरिबांवर अनेक आपत्ती कोसळत आहेत. या मोनॉपोलीमुळें जसें अतिशय दारिद्र्य येतें तसेंच अतिशय श्रीमंतीहि येते. जमीनीच्या बळावर श्रीमंतांचे मोठमोठे सट्टे चालतात व त्यांच्या संपत्तींत बिनश्रमी भर पडते. शहराच्या भरभराटीमुळें त्यांतील जमीनी व घरें-दारें यांची अतिशय किंमत चढते व जमीनदारांनां अनायासें लाखपती होतां येतें. याचा परिणाम समाजाच्या नीतिमत्तेवर बराचसा होतो व सामाजिक अनीतीमागून राजकीय अनीति उद्भवते.

सुधारणा प्रश्नः—या सर्वांवर उपाय म्हणून जो सुचविण्यांत येतो तो म्हणजे जमीनीच्या लहान लहान वांटण्या शेतकऱ्यांमध्यें करून देणें; या दिशेनें अर्थशास्त्रज्ञांचे प्रयत्नहि चालू आहेत. मोठाल्या शहरीं व व्यापाराच्या ठिकाणीं मजुरांनां स्वतःचीं घरें विकत घेण्याच्या सवलती मिळवून देणाऱ्या संस्था स्थापन झालेल्या आहेतच. पण या उपायावर पुष्कळांचा विश्वास नाहीं. कारण इंग्लंडेतर यूरोपियन राष्ट्रांत यासारखीच पद्धत अमलांत असून तीपासून कांहीं फायदा झालेला दिसून येत नाहीं. तेव्हां इंग्लिश अर्थशास्त्रज्ञ पुढील उपाय सुचवितातः—

वैयक्तिक मालकीचे मोठमोठे विभाग करून ते कुळांनां खंडानें देणें. या मालकी व कुळहक्कांचें संरक्षण करण्यासाठीं वाटेल तर कडक कायदे असावेत. याचें कारण लहान जमीनदारांनां जमीनींत भांडवल घालून ती ऊर्जितावस्थेस आणतां येत नाहीं व लहानशी शेती फार खर्चाची होते. तेव्हां थोडे मोठे जमीनदार व बरींचशीं कुळें या पद्धतीनेंच जमीनीचा उपभोग होत आहे व पुढें होत जाईलहि. मुळांत कांहीं फरक न करतां होणारी ही सोपी सुधारणा आहे. इंग्लंडांत याचे फायदे दृष्टीस पडत आहेत तर ही पद्धत सर्व देशांनीं उचलावी. पण हें मत टिकाऊ नाहीं. कारण लोकसत्तेचा उत्कर्ष सारखा होत जाणार. खुद्द इंग्लंडांत ही पद्धत फार काळ रहाणार नाहीं.

कांहीं सुधारणेच्छू एककरपद्धतीचा पुरस्कार करतात. या पद्धतीची माहिती ‘ कर ’ या लेखांत ( पृ. ८९ ) दिली आहे. या पद्धतीनें जमीनदारी मोडूनहि प्रामाणिक मजुरदारांनां निरुत्साह वाटणार नाहीं; कराचा बोजा प्रमाणशीर पडून प्रत्येक मनुष्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें फायदा मिळत जाईल.

आणखी एक अति जहाल मताचा जो वर्ग आहे त्याचें म्हणणें सर्व जमीन खुली ठेवावी व ज्याला जितकी पाहिजे तितकी त्यानें घ्यावी व तिचें संरक्षण एकाकी किंवा सहकारित्वानें करावें. या मताच्या अगदीं विरुद्ध असें मत समाजसत्तावादी पंथाचें आहे. एककरपद्धतीमुळें संस्थानचें क्षेत्र कमी होतें तर समाजसत्तावादी तें उच्च कोटीला पोंचवितात. जमीनीचें राष्ट्रीकरण करण्याच्या बाजूचा पक्ष म्हणते कीं, जमीनीची खासगी मालकी अजीबात बुडवून ती सर्व राष्ट्राच्या मालकीची करावी व जमीनी बाळगून असणारे सर्व लोक राष्ट्राचीं कुळें समजावींत. व त्यांनीं सरकारला वार्षिक खंड द्यावा. या पद्धतीमुळें सर्व प्रजेला जमीन कसण्याची सारखीच संधी दिल्यासारखें होईल व कोणी जरूरीपेक्षां जास्त जमीन घेणार नाहीं. खासगी मालकीचे पुरस्कर्ते या पद्धतींत बरेच दोष दाखवितात व त्यांतील कांहीं खरेहि आहेत. [ संदर्भग्रंथ–डि लाव्हेले–प्रिमिटिव्ह प्रापर्टी; मेन–अर्ली हिस्टरी ऑफ इन्स्टिटयूशन्स; कूलेंज–ऑरिजिन ऑफ प्रापर्टी इन् लँड; वाकर्स–लँड अँड इट्स रेंट; जॉर्ज–प्रोग्रेस अँड प्रापर्टी; वालेस–लँड नॅशनॅलिझेशन. ]

जमीनदार व कुळें यांचा परस्पर संबंध. हिंदुस्थानः—जमीनदार व कुळें यांच्या संबंधींचा कायदा निरनिराळ्या प्रांतात भिन्नभिन्न प्रकारचा आहे. प्रत्येक प्रांतांत जमीनदार वर्ग निरनिराळ्या मार्गांनें अस्तित्वांत आला. त्या त्या प्रांतांतील विशिष्ट परिस्थितीप्रमाणें जमीनदारांचे हक्क ठरले गेले. अर्थातच त्या त्या प्रांतांतील परिस्थिति व जमीनदार व कुळें यांचे हितसंबंध लक्षांत घेऊनच मग त्यासंबंधींचा कायदा करावा लागला.

जमीनदारीचा इतिहास—जमीनदारीचा उदय व तिचा इतिहास समग्र रीतीनें प्रस्तुत लेखांत देणें अशक्य आहे व त्याचें विशेष प्रयोजनहि नाहीं. हल्लीं निरनिराळ्या प्रांतांत जो जमीनदारांचा वर्ग दृष्टीस पडतो तो तीन प्रकारानें अस्तित्वांत आला असें आढळून येतें. ( १ ) पूर्वी एतद्देशीय राजांच्या अमदानींत जमीनीची देखरेख करण्याकरितां नेमलेले अधिकारी अगर सारा वसूल करण्याकरितां नेमलेले अधिकारी होते त्यांच्यामधून हा निर्माण झाला असावा, ( २ ) अगर लहानलहान खेड्यांचे अगर तालुक्यांचे जे अधिपती होते त्यांची सत्ता नाहींशी होऊन ते फक्त जमीनदार झाले असावेत, ( ३ ) अगर पूर्वीच्या व ब्रिटिश सरकारच्याकडून मोहबतीखातर ज्यांनां जमिनी देण्यांत आल्या त्यामुळें हा जमीनदारांचा वर्ग निर्माण झाला असावा.

यांपैकीं पहिल्या वर्गाचें उत्तम उदाहरण म्हटलें म्हणजे, बंगालमधील जमीनदारांचें होय. १७९३ मध्यें लॉर्ड कॉर्नवालीसच्या अमदानींत यांनां जमीनदार हें नांव प्राप्त झालें. पण खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं बंगालमधील जमीनदारांचा वर्ग वरील तिन्हीं कारणामुळें निर्माण झाला. हे जमीनदार पूर्वी सारा वसूल करण्याकरितां नेमलेले अधिकारी असत. आपापल्या भागांतील जमीनींचा सारा वसूल करून तो सार्वभौमसरकारकडे पाठवून द्यावयाचा एवढेंच यांचें काम होतें. आपल्या भागांतील जमीनींवर यांची कोणत्याहि प्रकारें मालकी सत्ता नसे. पण सार्वभौम सत्ता जसजशी ढिली होत गेली त्या मानानें हे अधिकारी प्रबळ होऊन ते आपापल्या भागांचे खरेखुरे अधिपती बनले. प्रत्येक अधिकाऱ्याच्या

भागांत पडीक जमीन बरीच असे, ती त्यांनीं आपल्या मालकीची केली; अशा प्रकारच्या जमीनीला खामार असें नांव आहे. तसेंच या अधिकाऱ्यांनीं आपल्या मुलुखांत गहाणवटीचा व सावकारीचा धंदा सुरू करून आपल्या मुलुखांतील बरीच जमीन आपल्या मालकीची केली. शिवाय सारावसूलीखातर त्यांनां पोटखर्चासाठीं स्वतंत्र वेतन देण्यांत येत असे तें निराळेंच.

याशिवाय बंगालमध्यें लहान लहान संस्थानें होतीं. ब्रिटिश अमदानींत या संस्थानिकांचा दर्जा बदलून ते जमीनदार म्हणून गणण्यांत येऊं लागले. तीच स्थिति तालुकदारांची झाली. अशा प्रकारें बंगालमधील जमीनदारवर्गाचा इतिहास आहे. संयुक्तप्रांतांतील जमीनदारांचा वर्ग बंगालमधील जमीनदारांप्रमाणेंच निर्माण झाला. मुंबई इलाख्यांत, बंगालमधील जमीनदारांचा सदृश असा वर्ग म्हणजे खोतांचा होय हे खोत पूर्वी सारा वसूल करणारे अधिकारी होत पण पुढें बंगालमधील अधिकाऱ्यांप्रमाणेंच तेहि जमीनदार म्हणून गणण्यांत येऊं लागले.

(२) पण सारावसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांमधून ज्याप्रमाण हल्लींच्या जमीनदारांचा वर्ग अस्तित्वांत आला त्याचप्रमाणें बंगालमध्यें छोटयाछोटया मांडलिक राजांच्या राजपदाचा लोप होऊन त्यांच्यामधूनहि जमीनदार वर्ग उदयास आला. वास्तविक बंगालमधील पहिल्या वर्गाच्या जमीनदारांमध्यें व या दुसऱ्या वर्गामध्यें फारसा फरक नाहीं. जो थोडाफार फरक आहे तो हाच कीं पहिल्या प्रकारच्या जमीनदारावर कलेक्टरचा ताबा असतो व दुसऱ्या प्रकारांतील जमीनदार हे दरवर्षी सरकारला ठराविक खंडणी देतात व त्यांच्यावर ब्रिटिशसरकारचा सर्वसाधारण ताबा असतो. आपल्या जमीनदारीमध्यें ते वाटेल तें करण्याला मुखत्यारच असतात. या दुसऱ्या प्रकाराच्या जमीदारांचें उदाहरण मद्रासमध्यें पहावयास सांपडतें. या प्रांतांत जीं हिंदु राजघराणीं उदयास आलीं त्यांनां उतरती कळा लागल्यावर त्यांचा राजांचा दर्जा नाहींसा होऊन ते फक्त जमीनदार बनले. त्याचप्रमाणें या प्रांतांत जीं छोटीं संस्थानें होतीं त्यांच्या संस्थानिकांचीहि हीच गत झाली. मद्रासमधील पालेगार वर्ग हा या प्रकारचें उदाहरण होय.

मध्यप्रांतांतहि हीच स्थिति होती. या प्रांतांत गोंड घराण्याच्या वर्चस्वाखालीं पुष्कळ मांडलिक व सरदार होते यांचीं संस्थानें डोंगराळ प्रदेशांत होतीं. मराठयांनीं ज्यावेळीं हा मुलूख जिंकला त्यावेळीं त्यांनीं या सरदारांनां अगर मांडलिकांनां कोणत्यहि प्रकारें त्रास दिला नाहीं. त्यामुळें ब्रिटिश अमदानीपर्यंत हे स्वतंत्रच राहिले; व खुद्द ब्रिटिश अमदानींत ब्रिटिशांनीं त्यांचा पूर्वीचाच दर्जा कायम ठेवला.

मुंबई इलाख्यांत व विशेषतः गुजराथ प्रांतांतहि वरीलप्रमाणेंच स्थिति होती. गुजराथमध्यें जे दुय्यम प्रकारचे सरदार होते. त्यांच्याकडून ठराविक खंडणी घेऊन, मुसलमान व मराठ्यांनीं त्यांनां त्यांच्या अधिकारावर राहूं दिलें; व आपल्या भागांत आपली सत्ता स्थापित करून ते जमीनदार बनले. अशा प्रकारच्या जमीनदारांनां गुजराथमध्यें बंता अगर मेवासी असें नांव आहे. (३) तिसऱ्या प्रकारचा जमीनदार वर्ग, ज्या जमीनीच्या देणग्या वेळोंवेळीं देण्यांत आल्या त्यामुळें निर्माण झाला. जमीनीच्या देणग्या देण्याचे दोन प्रकार अस्तित्वांत होते. एक पडिक जमीनीची मालकी देंणे व दुसरा जमीनीवरील सारा माफ करणें. ब्रिटिशांच्या अव्वल अमदानींत पहिला प्रकार प्रचारांत होता पण पुढें तो नाहींसा होऊन दुसरा प्रकार अंमलांत आला. याशिवाय मोंगलशाहींत मोंगलांनीं आपल्या सरदारांनां ज्या जहागिरी दिल्या त्यांचाहि एक स्वतंत्र वर्ग होता. ब्रिटिशाच्या कारकीर्दींत या जहागिरदारांसंबंधीं प्रश्न उपस्थित होऊन, मुंबई व मद्रास इलाख्यांतील जहागिरदार हे जमिनीचे मालक आहेत असें ठरविण्यांत आलें. उत्तर हिंदुस्थानांत जहागिरदार हा जमिनीचा मालक आहे अगर नाहीं हें त्याच्या सनदांवरून ठरवण्याचा प्रघात सुरू झाला. बंगालमध्यें हीच पद्धत अंमलांत आली.

वरील तीन वर्गांशिवाय, दुय्यम जमीनदारांचाहि वर्ग हिंदुस्थानांत आढळतो. दुय्यम जमीनदारांचे हक्क बहुतेक मुख्य जमीनदारांप्रमाणेंच असतात. पण दुय्यम जमीनदार हा वरिष्ठ जमीनदाराला जबाबदार असतो.

जमीनदार व कुळें यांच्यासंबंधीं अधिक प्रकाश पाडण्याकरितां खालीं मुद्दाम त्यांचे हितसंबंध नमुद केले आहेत. जमीनींत अधिकाधिक म्हणजे चार प्रकारचे हितसंबंध उद्भुत होतात.

खास जमिनी (१ त्या जमिनींवर सरकारचा पूर्ण ताबा असतो. उदाहरणार्थ बंगालमधील खास जमिनी.)

(२) सरकार व रयत, (या प्रकारच्या जमिनींत सरकार हें मालक असून तें रयतेला जमिनी करावयास देतें. व रयतेचा त्यांत थोडासा हितसंबंध येतो. उदा. रयतवारी–मुंबई व मद्रास.

(३) सरकार, जमीनदार व रयत.

(४) सरकार, जमीनदार, दुय्यम जमीनदार व रयत.

आतां आपण निरनिराळ्या प्रांतांमध्यें जमीनदार व कुळांचे संबंध त्या त्या प्रांतांतील कायद्यान्वयें कसे आहेत तें पाहूं.

बंगाल—जमीनदार व कुळें यांमधील संबंध निश्चित करणारा १८८५ सालचा बंगाल टेनंट कायदा होय. या ॲक्टांत प्रथम कूळ व रयत यांमधील फरक स्पष्ट करून दाखविण्यांत आला आहे. जमीनदार व रयत यांच्या दरम्यान पुष्कळ प्रकारचे जमीनदारांच्याहून खालच्या दर्जाचे गौण जमीनदार आहेत. त्यांनां या कायद्यान्वयें टेनंट उर्फ कुळें असें म्हटलें आहे. बंगालमध्यें जमीनीच्या पद्धती

पुष्कळ आहेत. पण या बहुतेक पद्धती कायम, बदलाऊ व वंशपरंपरागत चालणाऱ्या अशा आहेत.

कुळामध्यें ठराविक सारा देणारा रयत हा पहिल्या दर्जाचा मानला जातो. यानें मालकाला द्यावयाचा खंड कायमचा ठरलेला असतो. तो जमीनदाराला वाढवितां येत नाहीं अगर विशेष प्रकारचा रयतेच्या हातून अपराध घडल्याशिवाय त्याला काढतां येत नाहीं. याखेरीज इतर प्रकारचीं कुळें म्हणजे १८८५ च्या पूर्वी कायद्यानें अथवा रूढीनें, ज्यांच्याकडे जमीन करण्याचा हक्क आहे अगर सतत १२ वर्षे ज्यांनीं एकच जमीन केली आहे अशीं कुळें. या दोन वर्गांखेरीज इतर रयतांचा समावेश 'टेनंट्स ॲट वुइल' या सदरांत होतो. या वर्गाच्या संरक्षणासाठीं विशेष नियम करण्यांत आले आहेत. याशिवाय पोटकुळांचा वर्गहि बंगालमध्यें आढळतो व त्यांच्यासंबंधींहि या कायद्यांत नियम घालण्यांत आले आहेत.

आग्रा—या प्रांतांत जमीनदार व कुळें यांच्यासंबंधीं १९०१ चा आग्रा प्राव्हिन्स ॲक्ट हुसरा हा कायदा आहे. या प्रांतांत विशेषतः बनारस जिल्ह्यांत बंगालप्रमाणेंच कायमधारा देणारा रयतांचा वर्ग आहे. त्याचप्रमाणें बंगालमध्यें इतर जे वर्ग आहेत तेहि या ठिकाणीं आढळतात.

मध्यप्रांत—मध्यप्रांतांत १८९८ सालच्या ११ व्या ॲक्टान्वयें जमीनदार व कुळें यांच्यासंबंधींचे नियम खालीलप्रमाणें आहेत. मध्यप्रांतांत मालगुझार नांवाचा जमीनदारांचा वर्ग आहे. हा प्रबल वर्ग असल्याकारणानें यांच्यापासून रयतेचें संरक्षण करण्याकरितां विशेष नियम करण्यांत आले आहेत. मालगुझारला आपल्या कुळाला काढून टाकावयाचें असल्यास त्याला कोर्टाची परवानगी घेऊन कोर्टाच्या हुकुमानें तसें करतां येतें. सारा सेटलमेंट ऑफिसरकडून निश्चित केला जातो व त्यामुळें मालगुझारला वाटेल त्यावेळीं सारावाढ करतां येत नाहीं. या कायद्यान्वयें कुळाचे ' खास कुळें'व' साधीं कुळें ' असे दोन वर्ग करण्यांत आले आहेत. खास कुळाला केव्हांहि काढून टाकण्याचा मालगुझारला अधिकार नाहीं. ग्रामसेवेसाठीं वेतनादाखल जी जमीन कुळाला मिळते त्याचाहि या कायद्यामध्यें उल्लेख करण्यांत आला आहे.

पंजाब—पंजाबमध्यें १८८७ चा १६ वा कायदा प्रचारांत असून त्या कायद्यान्वयें पंजाबमध्यें कुळांचे तीन प्रकार पाडण्यांत आले आहेत. ( १ ) सारा अगर चाकरी यांपैकीं कोणतीहि गोष्ट न करणारीं कुळें, ( २ ) स्वतंत्र कुळें, व ( ३ ) केवळ सरकारी सारा देणारीं कुळें. पंजाबमध्यें निरनिराळ्या लोकांच्या स्वाऱ्या वारंवार होत असल्याकारणानें जमीनदारांनां आपल्या जमीनींच्या संरक्षणार्थ आपल्या कुळांची मदत घ्यावी लागे व त्यामुळें कुळें जमीनदारांनां सारा देत नसत. ब्रिटिशांचें राज्य स्थापन झाल्यानंतरहि हाच प्रकार चालू होता. कुळें खुद्द सरकाराला ठरीव सारा देत व त्यांतून सरकार जमीनदाराला कांहीं रक्कम देत असे.

मद्रास—मद्रासमध्यें जमीनदारानें कुळाला लेखी पट्टा लिहून देण्याची वहिवाट आहे. तो पट्टा कुळानें स्वीकारल्याशिवाय, त्याच्यावर खंडाबद्दल दावा करतां येत नाहीं. पट्टयांमध्यें जे करार असतात ते कुळाला बंधनकारक होतात. खंडाचा उल्लेख पट्टयांत नसेल तर स्थानिक जमीनींच्या दराप्रमाणें खंड आकारण्यांत येतो. सारा वाढवावयाचा असल्यास कलेक्टरची संमति घ्यावी लागते. कोर्टाच्या हुकूमनाम्याशिवाय कुळाला काढून टाकण्याचा जमीनदाराला अधिकार नाहीं. कुळाला केव्हांहि सालअखेर जमीन करण्याचें सोडून देण्याचा अधिकार आहे. कुळानें सारा वेळीं दिला नाहीं तर तो जप्तीनें, जमीनीचें उत्पन्न विकून अगर कुळाची जंगम मालमत्ता विकून, अथवा कुळाचा जमीनीवरील हक्क विकून जमीनदाराला सारा वसूल करून घेतां येतो. हे सर्व प्रकार निष्फळ झाल्यास त्याला कोर्टाकडून हांकून लावण्यांत येतें. फसवेगिरीचा प्रकार दिसल्यास कोर्टाकडून कुळाला तुरुंगांत टाकतां येतें.

मुंबई ( १८७९ चा पांचवा कायदा )—रेव्हेन्यू कायद्यांत या विषयाचा ऊहापोह करण्यांत आला आहे. खोतासोर्टी १८८० चा पहिला ॲक्ट लागू आहे ( खोत पहा ). कुळामध्यें व जमीनदारामध्यें जो करार झाला तो उभयतांनां बंधनकारक आहे. प्रतिवार्षिक भाडेपद्धतीमध्यें सालअखेरच्या पूर्वी तीन महिने नोटीस देऊन जमीनदाराला कुळाला काढून टाकतां येतें. सारावसुलीसाठीं कलेक्टरची मदत घेण्याची जमीनदाराला मुभा आहे. [ संदर्भग्रंथ.—बेडन पॉवेल—लॅंड रेव्हेन्यू इन् ब्रिटिश इंडिया; दांडेकर--लॅंड टेन्यूअर; शहा--लॅंड टेन्यूअर; जोगळेकर--लॅंड रेव्हेन्यू कोड; फडनीस--लॅंड टेन्यूअर. ]

रोमन कायदा:—जमीनदार व कुळें यांच्यामधील संबंध जमीन भाड्यानें देणें व घेणें या कारणामुळें उपस्थित झाला. जमीनदार व कुळें यांच्यामधील संबंध दोन प्रकारांनीं येत असे. जमीनदार आपल्या कुळाला चिरकालीक भाडेचिठ्ठीनें जमीन करावयास देत असे अगर कांहीं वेळां कुळाच्या इच्छेप्रमाणें वाटेल तितके दिवस जमीन करण्याच्या अगर सोडण्याच्या करारावर जमीन देत असे. पहिल्या पद्धतीला एंफीटयूसिस व दुसरीला प्रिकेरियम हें नांव असे.

इंग्लिश कायदा:—इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड या तिन्ही देशांत राजा हा जमीनीचा मालक असें मानण्यांत येतें; व जमीनदार हे सरकारचे रयत मानले जातात. पण सरकार व जमीनदार यांच्यामधील संबंध कसा असतो हें या लेखांत दाखवावयाचें नाहीं. जमीनदार व त्याचीं कुळें यांचा संबंध इंग्लंडमध्यें कशा प्रकारचा असतो हें या लेखांत विवेचन करावयाचें आहे.

इंग्लंडमध्यें जमीनदार व कुळें यांचा संबंध कौल अगर कौलाचा करार, प्रतिबंध, बेचन, मुखत्यारी इत्यादि प्रकारांनीं येत असे. जमीन, इमारती, इत्यादि स्थावर जंगम मालमत्ता अगर जमीनीचे अथवा जंगम मालमत्तेचे हक्क देखील भाड्यानें देतां येतात. कोणाहि व्यक्तीला भाड्यानें एखादी वस्तु देणें अगर घेणें या गोष्टीला मोकळीक आहे. पण याला कायद्यानें कांहीं अपवाद सांगितले आहेत. अज्ञानाला भाड्यानें एखादी वस्तु देतां अगर घेतां येते; पण तो करार पाळणें अगर न पाळणें त्याच्या मर्जीवर अवलंबून असतें. १८७७ च्या सेटल्ड एस्टेट्स ॲक्ट व १८८२ च्या सेटल्ड लॅंड्स ॲक्टनें अज्ञानाची मालमत्ता भाड्यानें देण्याच्या बाबतींत पुष्कळ हक्क दिले आहेत; योग्य मनःस्थितींत नसलेल्या माणसाला करार करण्याच्या स्थितींत तो जर असेल तर मालमत्ता भाड्यानें देण्याला अगर घेण्याला पूर्ण मुभा आहे. वेड्या माणसाच्या वतीनें, भाडेचिठ्ठीनें मालमत्ता घेण्याला अगर देण्याला कायद्यानें परवानगी दिली आहे. विवाहित स्त्रीला तिची स्वतंत्र मालमत्ता नवऱ्याच्या परवानगीशिवाय भाड्यानें देतां येते. इतर बाबतींत मात्र नवऱ्याची संमति घ्यावी लागते. पण १८७० च्या नॅचरलाइझेशनच्या कायद्यान्वयें ही उणीव भरून काढण्यांत आली आहे. गुन्हेगाराची मालमत्ता गुन्हेगार शिक्षा भोगीत असतांना, त्याच्या जिंदगीची व्यवस्था पाहणाऱ्या माणसाच्या ताब्यांत असते व ती भाड्यानें देण्याची सवलत त्याच्या व्यवस्थापकाला दिलेली आहे. म्युनिसिपॅलिटीसारख्या संस्थांनां अगर इतर खासगी संस्थांनांहि करारपत्रानें मालमत्ता भाड्यानें देण्याघेण्याचा पूर्ण अधिकार आहे.

जमीनीमध्यें एखाद्या माणसाचा जितका हक्क असेल तेवढ्या हक्काची त्याला वाटेल त्या तऱ्हेनें व्यवस्था करतां येते. एखाद्या कुळानें जमीनदाराकडून चार वर्षांच्या करारानें जमीन घेतली असेल तर चार वर्षेंपर्यंत त्याचा हक्क त्याला, जमीनदाराच्या हक्काला बाध न येईल अशा तऱ्हेनें दुसऱ्याला देतां येतो. पण या दुसऱ्या कुळाला जमिनदार संमति देईल तर हें दुसरें कुळ जमीनदाराला जबाबदार राहतें व चार वर्षांच्या अवधींत जमीनदाराचा या जमिनीवरलि हक्क विस्तृत होईल तर त्याचा फायदा दुसऱ्या कुळाला मिळतो. ज्या जमीनदाराची अगर कुळाची भाड्यानें दिलेल्या अगर घेतलेल्या जमीनींत मर्यादित सत्ता असेल त्यांच्याबद्दल सेटल्ड लॅंड ॲक्टनें स्वतंत्र नियम केले आहेत.

भाडेचिठ्ठी करणारे दोघेहि इसम कायद्यानें लायख असले पाहिजेत. भाड्यानें देण्याला केवळ संमत्ति असून उपयोगी नाहीं तर प्रत्यक्ष करार झाला पाहिजे. भाडेचिठ्ठीच्या वस्तुवर देणाऱ्याचा खराखुरा ताबा असला पाहिजे. करारनाम्यांत देण्याच्या संमतिदर्शक स्पष्ट शब्द असले पाहिजेत. त्यांत मुदतीचा व अटींचा असंदिग्ध उल्लेख पाहिजे. करारपत्र नसेल तर कुळाला वर्षभर त्या जमीनीचा भोग घेण्याचा अधिकार आहे. कॉमनलॉप्रमाणें तोंडी कराराला देखील मोकळीक आहे. पण स्टॅटयूट ऑफ फ्रॉड्सच्या कायद्यान्वयें तीन वर्षांच्यांहून अधिक वर्षांचा काळ असेल तर लेखी करारनामा करण्यांत आला पाहिजे व त्याच्यावर दोन्ही पक्षांच्या सह्या असल्या पाहिजेत. दोन्ही पक्षांच्या गुमास्त्यांनीं जरी सह्या केल्या तरी चालतें.

या भाडेपद्धतीचे एकंदर सहा प्रकार आहेत. ( १ ) कुळाच्या हयातीपर्यंतच्या मुदतीची भाडेपद्धति याला करारनामा अवश्य आहे. जमीनदाराला आपल्या अगर वारसाच्या हयातीपर्यंत जमीन भाड्यानें देतां येते व कुळाला आपल्या अगर वारसाच्या जीवमानापर्यंत भाड्यानें जमीन घेतां येते. या पद्धतीनें जमीन करणाऱ्या कुळाला कायद्यानें विशेष हक्क दिले आहेत. या प्रकारच्या कुळाला सर्व जमीन अगर कांहीं भाग, दुसऱ्याला भाड्यानें देतां येतो. व इमारत तर ९९ वर्षांच्या करारानें दुसऱ्याला देतां येते. खाणी ६० वर्षांच्या करारानें देतां येतात. इतर बाबतींत २१ वर्षेंपर्यंत दुसऱ्याला भाड्यानें देण्याचा हक्क त्याला मिळतो. ( २ ) विशिष्ट मुदतबंदी भाडेपद्धती—या प्रकारांत कुळानें जमीनीचा किती कालपर्यंत उपभोग घ्यावयाचा याची निश्चित कालमर्यादा ठरलेली असते व शेवटीं मुदत संपतांच कुळाचा त्या जमीनीवर कांहीं हक्क ठरत नाहीं. ( ३ ) प्रतिवार्षिक भाडेपद्धती—या प्रकारांत कुळाचा जमीनीवर एक वर्षपर्यंत ताबा असतो. कालमर्यादा करारपत्रांत नसेल तर कायद्यानें कालाची मर्यादा एक वर्षपर्यंत समजली जाते. जमीनदारानें सहा महिने अगाऊ कुळाला नोटीस दिली पाहिजे. ( ४ ) मासिक अगर वर्षापेक्षां कमी कालाची भाडेपद्धती—यांत पांक्षिक, साप्ताहिक, त्रैमासिक, षण्मासिक भाडेपद्धतीचा समावेश होतो. आठवड्याची कालमर्यादा असल्यास मालकानें एक आठवडा अगोदर भाडेकऱ्याला नोटीस दिली पाहिजे. ( ५ ) उभयेच्छानाशी भाडेपद्धती—या प्रकारांत उभयतांच्या राजीखुषीनें कुळाचा हक्क नाहीसा होतो. या पद्धतींत नोटीसीची जरूर लागत नाहीं. मालकानें कुळाला न कळत आपला हक्क दुसऱ्याला विकला तरी चालतो व अशा स्थितींत कुळाचा त्या वस्तूवरील हक्क आपोआपच नाहींसा होतो. ( ६ ) या पद्धतींत कुळानें कालमर्यादेच्या नंतर जर वस्तूचा उपभोग घेण्याचें चालू ठेवलें तर मालकाला त्याला काढून टाकण्याचा अधिकार आहे.अगर कुळापासून भाड्याच्या दुपटीनें रकम घेण्याचाहि त्याला हक्क आहे. ' डिस्ट्रेस अँड रेंट ॲक्ट ' ( १७३७ ) व ' लॅंडलॉर्ड अँड टेनंट ॲक्ट ' ( १७३० ) कायद्यांनी ही सवलत मालकाला दिली आहे. मालकानें कुळाला वस्तूवरील हक्क सोडून देण्याची अगाऊ नोटीस मात्र दिली पाहिजे; तसें न झाल्यास मालकाची रयतेच्या उपयोगाला गर्भित संमति आहे गृहीत धरण्यांत येऊन दुप्पट रकम

वसूल करण्याचा त्याचा अधिकार नष्ट होतो व ती एक प्रकारें उभयेच्छानाशि भाडेपद्धति होते.

भाडेचिठ्ठीः—भाडेचिठ्ठींत खालील गोष्टींचा समावेश होतो. ( १ )उभयपक्षांचीं नांवें २ त्यांचे हक्क,(३) त्यांची आवश्यक माहिती, ( ४ ) भाडवस्तूंचे संपूर्ण वर्णन, ( ५ ) कालमर्यादा (६)इतर अटी. १८८१ 'कन्व्हेन्सिंग ॲक्टानें' जमीनीबरोबरच जमीनीवरील इमारती, जमिनीवरील ईजमेंटसारखे ( वहिवाटीचे ) विशिष्ट बोजे, इत्यादींवरहि तद्विरुद्ध निर्देश नसेल तर कुळाचा ताबा रहातो. जमीनींत खाणी असतील तर त्या खणण्याचा हक्कहि कुळाला प्राप्त होतो. खाणीचा हक्क मालकानें राखून ठेवल्यास, जमीनीला कोणत्याहि प्रकारें धक्का न पोहोंचतां खाणी खणण्याचा अधिकार मालकाला आहे.

करारपत्रः—करारपत्रांतील करारांचे चार प्रकार आहेत. ( १ ) गर्भित करार-कांहीं करार असे असतात कीं त्यांचा स्पष्ट निर्देश नसला तरी दोन्ही पक्षाला कायद्यानें तें बंधनकारक असतात. उदाहरणार्थ कुळानें अगर भाडेकऱ्यानें भाडेवस्तू सुरक्षित तऱ्हेनें वापरली पाहिजे. याचा स्पष्ट निर्देश करारपत्रांत नसला तरी हें कुळावर बंधन असतें. ( २ ) व्यावहारिक करार—या करारांत सरकाराला कर देणें, वेळेवर मालकाला भाडें देणें इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. ( ३ ) वस्तुसहगामी करार—या करारांत वस्तूची निगा राखणें, दुरुस्ती करणें, इत्यादींचा समावेश होतो. तो करार मालकाचे अगर कुळाचे हक्क ज्याच्याकडे खरेदीनें अगर गहाणानें येतात त्यांनां बंधनकारक होतो. ( ४ ) प्रतिबंधक करार— यांत, मालकाच्या संमतीवांचून दुसऱ्याला वस्तू वापरण्यास न देणें, जमीनीवर एखादा धंदा न उभारणें इत्यादि करार येतात. याशिवाय इतर अनवश्यक अटीहि करारपत्रांत घालण्याचा प्रघात आहे. उदाहरणार्थ कर देणें, भाडें देणें, बोजांचा उल्लेख करणें इत्यादि.

मालक व कुळ भाडेकरी यांचे हक्क व कर्तव्यें:—मालक व भाडेकरी यांचे हक्क व कर्तव्यें मुख्यतः करारनाम्यावरून ठरवावयाचे असतात. मालकाचे हक्क येणेंप्रमाणें—कुळ अयोग्य वर्तन करील, भाडें वेळेवर न देईल, भोग्य वस्तूची चांगली निगा राखणार नाहीं तर त्याला काढून टाकण्याचा मालकाला हक्क आहे. भोग्य वस्तूच्या संरक्षणासाठीं तिचा विमा उतरण्यास कुळाला भाग पाडणें, व तसें न करील तर त्याला हांकलून लावणें हाहि मालकाचा हक्क आहे. भाडेकऱ्याचे हक्क—मालकाचा वस्तूवर ताबा नसेल तर तो ताबा त्यास मिळवण्यास भाग पाडणें, व भोग्य वस्तूचा पूर्ण उपभोग घेणें, इत्यादि भाडेकऱ्याचे हक्क आहेत.

मालक अगर कुळ या दोघांनांहि आपापले हक्क परस्परांच्या अनुमतीनें अगर संमतीवाचून दुसऱ्याला विकतां येतात, अगर देतां येतात. कांहीं वेळां कायद्यानेंच ते दुसऱ्याकडे जातात. मालकानें आपला हक्क दुसऱ्याला दिला तर तो नवीन मनुष्य मालक बनतो व कुळानें त्याच्याकडे भाडें दिलें पाहिजे. तीच गोष्ट कुळाच्या बाबतींतहि लागू पडते. दुसऱ्याला हक्क देतांना तसे दिल्याबद्दल करारपत्र करण्यांत आलें पाहिजे. जेव्हां नवीन मनुष्याला मालकाचे हक्क मिळतात व त्याला कुळ संमति देतो तेव्हां त्या प्रकाराला 'ॲटॉर्नमेंट 'अधिकारपत्रदान असें म्हणतात. कुळानें दुसऱ्या कुळाला आपली भोग्य वस्तूवरील हक्क दिला व ही गोष्ट मालकाला ठाऊक नसली तर मूळ रयत मालकाला जबाबदार रहातो पण मालकाला जर ती गोष्ट माहित असेल तर कायद्यानें या दुसऱ्या रयतेशीं मालकाच्या मालकीचें नातें प्रस्थापित होतें व या दुसऱ्या रयतानें करारपत्रांतील कांहीं अटी न पाळल्यास त्या पाळण्यास भाग पाडण्याची सक्ति मालकाला त्याच्यावर करतां येते. कुळ दिवाळखोर बनल्यास त्याचे हक्क व हितसंबध त्याच्या व्यवस्थापकाकडे कायद्यानें येतात व ( २ ) या प्रकारच्या भाडेपट्टयान्वयें मालकाला आपली इमारत ९। वर्षांच्या अगर ९॥ वर्षांच्या करारानें भाडेकऱ्याला देण्याचा हक्क आहे. या अवधींत भाडेकरी हा वस्तुतः मालकच होतो. फक्त तेवढी मुदत संपल्यानंतर त्याचा हक्क नष्ट होतो एवढाच काय तो फरक.

आयरिश कायदाः—पूर्वी आयर्लंडमधील जमीनदार व कुळें यांचा कायदा इंग्लंडमधील कायद्यासारखाच होता. पण अलीकडे त्या कायद्यांत पुष्कळ फरक करण्यांत आलेले आहेत. अल्स्टरमध्यें अशी चाल आहे कीं, एखाद्या मालकानें कुळाला जमीन भाड्यानें दिली तर कुळाच्या ताब्यांत जितके दिवस जमीन असेल, व त्या जमीनीवर त्याचे जेवढे हितसंबंध असतील तेवढे हितसंबंध तेवढ्या मुदतीपर्यंत त्याला दुसऱ्याला विकत देतां येतात ही पद्धति १८७० च्या लँड ॲक्टानें मान्य करण्यांत आली.

युनैटेड स्टेटसः—या राष्ट्रांतील कायदा इंग्लंडमधील कायद्याप्रमाणेंच आहे.

फ्रान्सः—फ्रेंच कायद्यान्वयें जमीनदार व कुळें याच्यासंबंधाचे दोन भाग पडले आहेत. ( १ ) बेल अ लॉयर--घरभाडेपट्टा ( २ ) बेल अ फार्म-- जमीनीचा भाडेपट्टा. या दोन्ही प्रकारांत लेखी करारनाम्याची आवश्यकता नाहीं. तोंडी करारनामा झाला असेल व तो एका पक्षानें मान्य केला नाहीं तर साक्षीदाराच्या साहाय्यानें तो करारनामा सिद्ध करतां येत नाहीं. भोग्य वस्तूवरील हक्क नष्ट झाल्याची नोटीस, विशिष्ट ठिकाणीं जी विशिष्ट रूढी असेल त्या रूढीला अनुसरून देण्याची वहिवाट आहे. करारनाम्यांत जर तद्विरुद्ध अट घातली नसेल तर कुळाला आपला हक्क दुसऱ्याला देतां येतो. भाड्यानें जमीन देण्यासंबंधींचे नियम जवळ जवळ इंग्लंडप्रमाणेंच येथेंहि आहेत. जमीनीचें उत्पन्न अर्धें अर्धें वांटून घेण्याचा करार मालक व कूळ यांच्यामध्यें झाला असेल तर मालकाच्या संमतीवांचून कुळाला आपला हक्क दुसऱ्याला देतां येतो. जमीनीसंबंधीं कांहीं भानगडींचे प्रश्न उपस्थित झाल्यास कुळानें मालकाला

तसें कळविलें पाहिजे. अपघात झाला तरी वस्तूची भरपाई कुळानें करून दिली पाहिजे. गुराढोरांच्या बाबतींत येथें कांहीं विशिष्ट नियम प्रचारांत आहेत. जमीनीची मशागत करण्याकरितां असेल अगर दुसऱ्या कांहीं कारणाकरितां मालकानें कुळाला आपलीं गुरेंढोरें दिलीं असतील तर कुळानें निम्में नुकसान अगर निम्मा फायदा सोसला पाहिजे. या प्रकारास सिंपल चेप्टेल असें नांव आहे. चेप्टेल बाय मोएटी या प्रकारांत मालकानें व कुळानें निम्मीं निम्मीं गुरें द्यावयाचीं असा नियम आहे.

फ्रेंच कायद्याचें अनुकरण, बेल्जम, इटली, स्पेन, पोर्तुगॉल हॉलंड या राष्ट्रांनीं थोड्या फार फरकानें केलें आहे. त्याचप्रमाणें ब्रिटिशांच्या वसाहतींत, इंग्लिश कायदा व तद्देशीय कायदा भेसळ करून हल्लींचा कायदा करण्यांत आला आहे.

[ संदर्भ ग्रंथः—इंग्लिश लॉ-वुल्स्टेनहोल्म, ब्रिटन व चेरी-कन्व्हेयान्सिंग अँड सेटल्ड लँड ॲक्टस ( १९०५ ); फॉआ-ऑन लँडलॉर्ड अँड टेनंट ( १९०७ ); वुडफॉल-ऑन लँडलॉर्ड अँड टेनंट ( लंडन १९०५ ). स्कॉट्स लॉ-हंटर-ऑन लँडलॉर्ड अँड टेनंट ( एडिंबरो १८७६ ); रॅंकिन-' ऑन लँड ओनरशिप (एडिंबरो १८८१). आयरिश लॉ-क्विल, हॅमिल्टन व लँगवर्थ-आयरिश लँड ॲक्ट्स ऑफ १९०३ अँड १९०४ (डब्लिन १९०४). अमेरिकन लॉ-मॅक ॲडॅम-राइट्स, रेमेडीज लायाबिलिटीज ऑफ लँड-लॉर्ड अँड टनट (न्यू यॉर्क १९००). फॉरिन अँड कलोनियल लॉज-फील्ड-लँड होल्डिंग अँड दी रीॲक्शन ऑफ लँड लॉर्ड अँड टेनंट इन व्हेरियस कंट्रीज ( १९०१ ). ]

**जमीनमहसूल**—( लँड-रेव्हेन्यू ) याचा अर्थ जमिनीपासून कराच्या रूपानें राजाला होणारें उत्पन्न. प्राचीन किंवा मागसलेल्या देशांत जमीनबाब हीच राजाच्या उत्पन्नाची मुख्य बाब असते. जमीनीवरचा कर हिंदुस्थानांत फार प्राचीन काळीं म्हणजे प्रारंभीं मनूच्या काळीं लावून दिलेला एक दशांश असे. परंतु हा नियम पुढें बदलला; आणि एक षष्टांश कायम झाला. भारतीकाळांत व पुढें स्मृतिकाळांत हें प्रमाण कायम राहिलेलें दिसतें. महाभारतांत यासंबंधीं उल्लेख आहे तोः—

आददीत् बलिं चापि प्रजाभ्यः कुरुनंदन।
स षड्भागमपि प्राज्ञस्तासामेवाभिगुप्तये ॥
( शांतिपर्व अ. ६९ )

सभापर्वांत नारदानें असेंच सांगितलें आहे. शेतांत धान्य उत्पन्न होईल त्याच्यापैकीं एक षष्टांश भाग ग्रामाधिपती लोकांकडून वसूल करीत असत, व अशीं धान्याचीं कोठारें ठिकठिकाणीं भरून ठेवलेलीं असत. जमीनमहसूल धान्याच्या रूपानें देण्याचा प्रघात असल्यामुळें जमीनीची मोजणी करण्याची अवश्यकता पूर्वकाळीं नव्हती. तथापि जमीनीचे निरनिराळे तुकडे पाडलेले असून त्यांजवर विशिष्ट माणसांचें स्वामित्व निश्चित झालेलें असे. कारण जमीनीचा क्रयविक्रय झाल्याचा उल्लेख महाभारतांत कित्येक ठिकाणीं आलेला आहे. पुढें मनुस्मृतीच्या काळापर्यंत उत्पन्नाचा किती भाग घ्यावा याबद्दल एकमत नव्हतें, कारण मनुस्मृतींत धान्याचा अष्टमांश, एकषष्ठांश किंवा एक एक द्वादशांश भाग घ्यावा असें सांगितलें आहेः—

पंचाशद्भाग आदेयो राज्ञा पशुहिरण्ययोः।
धान्यानामष्टमो भागः षष्ठो द्वादश एव वा ॥
( मनस्मृति ७. १३० )

मध्ययुगीन हर्षादि हिंदु राजे स्मृतिवचनें प्रमाण मानून जमीनीच्या उत्पन्नाचा एकषष्ठांशच कर वसूल करीत असत; व क्वचित्प्रसंगीं एकचतुर्थांश घेत असत. तात्पर्य मुसुलमानी अमलापर्यंत हिंदुस्थानांत जमीनमहसुलासंबंधीं गोष्टी स्पष्ट दिसतात. त्या ( १ ) जमीनीच्या उत्पन्नाचा एकषष्ठांश इतका कर राजा घेत असे; ( २ ) हा कर नाण्यांत नसून धान्यांत असे; आणि ( ३ ) कर जमीनीच्या बिघाएकरादि क्षेत्रफळावर आकारलेला नसून दरसालच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचा एकषष्ठांश असे. म्हणजे उत्पन्नाच्या कमजास्तपणानें कमजास्त होत असे.

महाराष्ट्रांतील जमीनमहसुलाची सगळ्यांत जुनी पद्धति आनेगुंदी ऊर्फ विजयानगर राजांची होय. ही पद्धति १६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत चालू होती. त्यानंतर विजापूरच्या आदिलशाही राजघराण्याची ' चाळी ' पद्धति इ. स. १५५३ पासून सुरू झाली. त्यानंतर शिवाजीची पद्धत प्रचारांत आली. पेशवाईंतहि हीच शिवाजीच्या वेळची पद्धति थोड्या फरकानें अमलांत होती. कधीं कधीं विजापूरच्या चाळी पद्धतीचा अवलंब करण्यांत येई. पेशवाईअखेर मक्त्याची रीत अमलांत आली.

अनेगुंदी ऊर्फ विजयानगरचा राजा कृष्णराव यानें जमीनीची मोजणी केली. हिला राय-रेखा ऊर्फ हुलमार असें म्हणतात. या हुलमार मोजणीच्याच आधारावर आदिलशहानें आपली पद्धत बसविली. तिला 'रकम-बेरीज' असें नांव आहे. ' राय रेखा ' मोजणींत फक्त जिराईत जमीनीचीच पाहणी झाली होती असें दिसतें. कारण पश्चिमेकडील मलनाड परगण्यांत बागाईत जमीन असे. तिचीं मापें निरनिराळीं असत व त्या मापांचीं नांवेंहि निराळीं असत. ' मलनाड 'मधील बागाईत जमिनीस लागू केलेल्या पद्धतीस ' बिजावरी ' म्हणत असत. जमीन पेरण्यास लागणारें बीं ( बीज) खंडीं किंवा कुडवांनीं मोजून इतक्या ( खंडी ) ची जमीन असें म्हणत. एका वर्षी खळ्यावरच्या धान्यांतून गांवच्या अधिकाऱ्याची फी काढल्यावरहि बाकीच्यापैकीं निम्मा हिस्सा साऱ्याकरितां सरकारास व निम्मा मालकास मिळत असे व हाच वार्षिक सारा समजला जात असे. ही पद्धति जिराईत जमिनीसहि कोठें कोठें लागू करीत. ही पद्धति अनेगोंदी अमलांत चालू होती. राय-रेखा मोजणींत एकंचें प्रमाण ७ फूट

९॥ इंचांचें असून, अशीं वीस मापें म्हणजे एक बिघा व असे ३६ बिघे म्हणजे एक राय रेखा 'मार.' अनेगुंदी अमलांत विठ्ठलपंत नांवाच्या सरकारी मोजणीदारानें काळ्या जमिनी-करितां 'विठ्ठलपंती मार' नांवाचें १०॥ फुटी माप सुरू केलें, पण त्याचा सार्वत्रिक प्रचार झाला नाहीं. पट्टा, गुली, चिंगर, अशीं फार प्राचीन मापेंहि आढळून येतात. बागाईत जमिनीस 'स्थळ' अगर 'थळ' (म्हणजे विविक्षित झाडांनीं व्यापलेली जागा) हें माप लागूं होतें. जिराईत जमिनीस अगदीं जुन्या काळीं 'कोलवेम' ऊर्फ 'हून कोलवेम' असेंहि एक माप लागूं केलेलें आढळतें. साऱ्याचे ४ रुपये म्हणजे एक 'हून 'ज्या जमिनींतून निघतील तितकी जमीन. हा या 'कोलवेम' मापाचा एकं समजावा.

आदिलशाहींत वरील मापें चालू होतीं असें दिसतें. ज्या ठिकाणीं इतर कोणतीहि पद्धति चालू नव्हती त्या ठिकाणीं औरस चौरस १२० बिघ्यांचें 'चावर' माप लागूं होतें. या सर्व मापांत जमिनीच्या सरसनीरस मानानें जमिनीचें क्षेत्रफळ कमीजास्त असे. तुकुमरेझी (म्हणजे बियांचा हिशेब),व गल्ला (हंगामाच्या वेळच्या उत्पन्नाच्या हिशेब) असे दोन प्रकारचे हिशेब असत. याबद्दलचे कागद अद्यापि उपलब्ध होतात. आदिलशाहींत जमिनीवर सारा जबर झाल्यामुळे तो सुधारण्यांत येऊन इ.स.१५६९ मध्यें त्यास 'तनखा' असें नांव प्राप्त झालें. हा पूर्वीच्या रकमेपेक्षां बराच कमी होता.

पुढें मोंगलांच्या अमलांत या 'तनखा' साऱ्यावर जो वाढावा घेत त्यास 'इसाफतौफिर' असें नांव होतें. म्हणून तनखा व तौफिर यांची बेरीज ही मोंगली अमलांतील 'कमाल बेरीज' म्हणजे सरकारनें घेतलेला पूर्ण सारा दाखवी. ही कमाल—बेरीज कधींहि वसुल मात्र करीत नसत.' आफत ' (नुकसान )या सदराखालीं नुकसान दाखवून शिल्लक तेवढी वसूल करीत. या सर्व जमीनधारण करण्याच्या रीती 'चाळी' पद्धतीवर होत्या हें मागें सांगितलेंच आहे.

मराठ्यांनीं ही पद्धति पूर्णत्वास नेली. या पद्धतींत गांवांतील सर्व कामें गांवांतील प्रमुख लोक करीत व सरकारी अधिकाऱ्यांबरोबरचें कामकाज करीत. सरकारी सारा वसविण्याजोग्या गांवांतील सर्व जमिनी हिशेबांत 'ऐनाती' (प्रमाण सारा) या सदराखालीं दर्शविण्यांत येऊन, त्यांचे (१) चाळी, (२) कटगुत, (३) मक्ता उर्फ खंडमक्ता, (४)टोंबुल उर्फ कौल, व (५) पैकारी असे पांच प्रकार असत. गांवांतील अगदीं नजीकच्या, व अतिशय सुपीक जमीनी 'चाळी' जातीच्या समजाव्या, 'कटगुत' जमीनींवर 'ऐनाती 'पेक्षां थोडा जास्त सारा असे; 'मक्ता' जमीनीवरलि सारा कधींहि वाढवावयाचा नसे; व 'कौल' जमीन वाहित झाल्यावर अनुकूल स्थितींत तिच्यावर फक्त 'ऐनाती' घेत असत. 'पैकारी' जमीनी उपऱ्या लोकांच्या ताब्यांत असत.गांवांतील प्रमुख लोकांच्या ताब्यांत 'चाळी' जमिनी असल्यामुळें त्यांस 'चाळीदार' अशी संज्ञा होती. वार्षिक सरकारी सारा ठरतेवेळीं 'ऐनाती' पेक्षां कांहीं जास्त सारा 'पट्टी' या नांवानें फक्त 'चाळीदार' देत व आपसांत वाटून घेत. गांवचा सर्व वसूल जमा-करण्याची जबाबदारी 'चाळीदारा 'वर असे. म्हणून वरील जबाबदारी पार पाडण्यास एखादा चाळीदार असमर्थ झाल्यास त्याजकडून 'कटगुत' किंवा 'मक्ता' सारा वसूल करीत, व नव्या एखाद्या इसमास चाळीदार करीत. चाळीदारांवर वसुलाची जबाबदारी असे; पण गांवांत व सरकारांत त्यांचा मान बराच असल्यामुळें चाळीदार होण्याची महत्वाकांक्षा प्रत्येकास उत्पन्न होई. चाळीदारांनांच फक्त पड जमीन, लागवडींत आणतां येत असे व पैकारी कुळें त्यांनांच फक्त घेतां येत असत. इतर लोकांनां फक्त 'इरली' आणि 'इस्तावा' कौल मिळत.

याकरितां चाळी ही संज्ञा जमिनीला लावण्यापेक्षां व्यक्तीस लावणें बरें. चाळीदारांच्या जमिनींपैकीं कांहीं जमिनी चाळी व कांहीं कटगुत, मक्ता आणि कौल स्वरूपाच्या असत. म्हणून चाळी जमीन कोणती हें सांगणें कधीं कधीं अवघड जाई.

'पट्टी' आरंभीं कमी जास्त होत असे, पण कालांतरानें ती कायमची होऊन तिला 'मामुल' हें नांव प्राप्त झालें. पुढच्या काळांत या पट्टीपेक्षांहि जो जास्त सारा घेत त्यास 'जास्ती पट्टी' असें नांव असे. पण या जास्ती पट्टीचा हिशेबांत उल्लेख नसे.

कृष्णा व भीमा या नद्यांच्या दरम्यान जे जिल्हे आहेत तेथें पाटिल व त्यांचे भाऊबंद हेच काय ते बहुशः चाळीदार असत. हे 'जुडी' देत नसत. पण त्याजकडे 'सर्व इनाम' किंवा 'मिराशी' जमीनी बिनसाऱ्यानें असत. यांपैकीं कोणावर जर आपली कांहीं चाळी जमीन सोडण्याचा प्रसंग आला तर त्या मानानें त्यास सर्व इनाम (मुफ्त) जमीन ही सोडावी लागे.

कर्नाटकांतील मिरासदार हे आतां चाळीदारांचें जें वर्णन प्रथम केलें आहे त्यांसारखे आहेत. पण भिमथडीचे इंदी व मुद्देबिहाळ हे जे जिल्हे आहेत तेथील चाळीदारी गुजराथेंतील 'भागीदार' स्वरूपाची कांहींशी आहे. बल्लारी व कडाप्पा येथें या 'चाळी' पद्धतीसारखी पद्धत 'अप्पनं' या नांवानें पूर्वी चालू होती व आतां निजामशाहींतील तेलगू भागांत ती अजूनहि बहुशः चालू असावी.

गांवांतील सर्व कामकाज गांवांतील प्रमुख लोकांनीं एकवटून करावयाचें अशी जी हिंदुस्थानांत सर्व साधारण पद्धति एके काळीं होती तिचा अवशेष या जमीन धारण करण्याच्या पद्धती बहुशः असाव्या.

(इं. ॲ. मधील सर बाल्टर इलियट यांच्या लेखावरून, पु. १५ पा २६८ ते २७२.)

मुसुलमानी अंमल.—मुसुलमानी अंमलांत जमीनीची मोजणी करून व तिची प्रतवार करून मग प्रत्येक (प्रकारच्या) प्रतीच्या जमीनीवर कमजास्त कर घेत असत. बहुधां जमीनीचे चार प्रकार केलेले होते. त्यांस अव्वल (पहिला, श्रेष्ठ), दुय्यम (दुसरा), सीम (तिसरा) व चाहरुम (चौथा किंवा कनिष्ठ) अशीं नांवें होतीं. मोजणीचें माप प्रथम प्रथम बादशहाच्या हाताच्या लांबीइतका गज असे. पुढें दोरी उपयोगांत आली. बिघा, चाहुर (१२० बिघ्यांचा) हीं प्रमाणें ठरलीं गेलीं. वरील चार जातींच्या जमीनीवर $\frac{1}{4}$ पासून $\frac{1}{6}$ पर्यंत सारा बसविला जाई. तोडरमल मलिकअंबर, इब्राहिम लोदी, अल्लाउद्दीन खिलजी, शेरशाहा, फिरूज तुघलक दादोनरसू, दादाजी कोंडदेव वगैरे पुरुषांनीं पुन्हां:पुन्हां ही जमीनमोजणी केली आहे. सारा बहुतेक नक्त पैशाच्या रूपानेंच वसूल होई. धान्यरूपानें क्वचित् करीत. सारावसुलीचें काम गांवच्या पाटीलकुळकर्ण्यांकडे व तालुक्याच्या देशमुखदेशपांड्याकडे असे व त्याबद्दल त्यांनां मानपानाचे कांहीं हक्क व इनाम जमिनी दिलेल्या असत. जुलुमी मुसुलमान राजे सारा कमीजास्ती वाढवीत.

ठाणें, साष्टी, वसई प्रांतांत अकराव्या शतकांत जमीनमहसुलाची पद्धति (बिंब राजांच्या वेळीं) पुढीलप्रमाणें होती. सरकारसारा देतांना त्याबरोबरच धर्म व शीळोत्तर या बाबी द्याव्या लागत. धर्माची रक्कम सरकारसाऱ्याच्या $\frac{1}{16}$ ते $\frac{1}{17}$ असे व ती गांवांत येणाऱ्या तडीतापसी साधूसंतांच्या कामीं लागे. शीळोत्तराची रक्कम साऱ्याच्या $\frac{1}{8}$ असे. कोंकणांत समुद्रकांठच्या गांवीं खाजणांत सांचलेलें पाणी बाहेर काढण्यास दगडाचे बांध घालावे लागतात. या कामास शिलोत्तर म्हणत (या बांधास दरवाजा असे व त्यांतून पाणी आंत घेत अगर बाहेर सोडीत). हें काम करणारा तो शिळोत्तरा अथवा शिळोत्री पाटील. हा सरकारचा कामगार असल्यानें त्याला नेमणूक द्यावी लागे. ती याप्रमाणें परभारे शेतकऱ्यांकडून वसूल करीत. एकंदरींत सर्व बाबी धरून एकंदर उत्पन्नापेक्षां $\frac{1}{6}$ जास्त रक्कम सरकारदेणें नव्हतें. सन १३३२ च्या सुमारास नागरशाच्या वेळीं भागडचुरी या त्याच्या प्रधानानें जमीनीची (उत्तर कोंकणच्या) मोजणी केली होती. ती सात हातांच्या काठीनें केली. अशा बारा काठ्यांचा एक बिघा होई व १२८ बिघ्यांचा एक चावर असे. दर बिघ्यास दोन फरे (धान्य) सारा द्यावा लागे.

दादाजी कोंडदेवानें सारापद्धति बहुतेक मलिकअंबरचीच उचलली होती. दरसाल पिकाच्या मानानें वसूल घेण्याची रीत पाडली. सार्पिक जमीनी पुष्कळ वर्षेपर्यंत प्रजेस साऱ्याशिवायच लागवडीस दिल्या. त्याचा परिणाम जेथें पूर्वी रान होतें तेथें १० वर्षांत उत्तम बागाईती तयार झाल्या. झाडझाडोरा (आंबे, चिंचा डाळिंब वगैरे) लावल्यास १० झाडांत १ झाड लावणाऱ्यास इनाम मिळे; बाकीच्या ९ झाडांत सरकारचीं ३ झाडें व लागवडवाल्याचीं ६ झाडें असत.

मलिकअंबरनें उत्तरेकडील तोडरमल्लाचीच रीत दक्षिणेंत प्रचारांत आणिली. त्या कामीं सबाजी आनंदराव (हाच चतुर सबाजी. चतुर हें आडनांव), शिवाजीपंत व सखाराम मोकाशी यांचेंहि सहाय्य त्याला होतें. इजाऱ्याची चाल साफ बंद करून वसुली काम ब्राह्मण कारकून नेमून त्यांच्याकडे दिलें. कित्येक वर्षांच्या पिकाची सरासरी काढून सरकारदेणें ठरविलें. तें पिकाच्या मानानें कमजास्त देण्यास सवड ठेविली, ते बहुधां नक्त यावें लागे.

तोडरमल्लानें गुजराथ व बंगाल या प्रांतांची मोजणी व सारापद्धति ठरविली होती. गुजराथेंत साराभरणीच्या त्याच्या रीतीला दरठरोती म्हणत. तोडरमल्लानेंहि मागील १९ वर्षांच्या सरासरीवर धान्याची रक्कम ठरविली होती. जमीनीच्या उत्तम, मध्यम, कनिष्ठ अशा तीन प्रती केल्या. साधारणतः उत्पन्नाचा $\frac{1}{3}$ सरकारसारा ठरविला. शेरशहाचा धारा यापेक्षां कमी होता. तोडरमल्लाचा सारा धान्य अथवा नक्तरूपानें भरीत हिंदु व मुसुलमान शेतकऱ्यांत ठेवलेला पूर्वींचा भेदभाव तोडरमल्लानें काढून टाकिला. तीन वर्षांत पडीत जमीन लागवडीस आणण्याची एक योजना तयार केली. मात्र तींत प्रथम प्रथम लोकांवर जुलूम झाला. या कामीं करोडे नांवाचे अधिकारी नेमले जात. प्रत्येकाकडे नवीन मापणीप्रमाणें २५ हजार रु. उत्पन्नाची जमीन सोंपवण्यांत येई तीन वर्षांत लागवड करण्याबद्दल करोड्याकडून जामीन घेत; त्यामुळें करोडे हे त्यासाठीं लोकांनां लुबाडून आपल्या तुंबड्या भरीत. तत्कालीन मुसुलमान करोड्यांबद्दल असा उल्लेख आढळतो कीं, लोकांवर फार जुलूम होई. सरकारपित्रकांत पडीत जमिनी पिकाऊ जमीन म्हणून अधिकारी दडपून देई; खोटी मापणी करून पाऊण बिघ्याच्या ठिकाणीं एक बिघा लिहीत; खजीनदार दर रुपयामागे कांहीं रक्कम शेतकऱ्याकडून वसूल करी; त्यामुळें शेतकऱ्यास गुरेंढोरें विकावीं लागत. असल्या लोकांनां तोडरमल्लानें जबर शिक्षा केल्या.

मराठी अंमल.—शिवाजीनें स्वराज्य स्थापल्यानंतर जशी राज्यकारभारांतील प्रत्येक गोष्ट नवीन (पण पूर्वींच्या वळणावर) तयार केली अथवा दुरुस्त केली तशी याहि बाबतींत सुधारणा केली. दोरी हें मोजणीचें माप काढून टाकून सांखळी उपयोगांत आणली, पांड हें एकचें प्रमाण ठरविलें. पांच हात व पांच मुठी (शिवाजीच्या) यांची एक कांठी तयार केली. ही काठीहि मोजणींत उपयोगांत आणीत. जमिनीच्या मगदुराप्रमाणें उत्तम, मध्यम, कनिष्ठ, वरकस, खारी वगैरे प्रकार पाडून त्याप्रमाणें त्यावर हलका व भारी दर बसविला होता. देशांतील जमीनीचा सारा भारी असे; तर कोंकणांतील जमीनीचा हलका असे. पेरलेल्या धान्याच्या (भात, वरी, नाचणी, तीळ, गहूं) वगैरे प्रकारांवरहि सारा कमजास्ती वसूल होई. हलक्या पिकावर सारा हलका असे.

शिवाजीनें अण्णाजी दत्तो या सचिवाकडून स्वराज्यांतील बहुतेक प्रांतांची ( जमिनीची ) मोजणी करून धारे ठरवून दिले. त्या त्या गांवांतील १० वर्षांची धान्याच्या उत्पन्नाची सरासरी काढून व पंचाईनी ( ग्रामसभे ) पुढें ती मांडून त्यांची अनुमति मिळाल्यावर मग साऱ्याचे दर ठरविले व हा मग कायमचा (धागा) राहिला. या प्रकारास अण्णाजीपंताचा धारा असें नांव मराठी रियासतीच्या अखेरपर्यंत होतें सारा धान्यरूपानेंहि वसूल ( नक्त पैसा देण्याची ताकद नसल्यास ) करण्याचा प्रचार शिवाजीनें सुरू केला. देशमुख, देशपांडे वगैरेंमधला वर्ग सारावसुलीच्या कामामुळें शिरजोर होतो म्हणून त्यांच्या हातीं हा अधिकार मर्यादित ठेवून त्यांवर देखरेख करण्यास आपले पगारी अंमलदार नेमले जमिनीची मोजणी करून ती खातेदाराच्या नांवावर चढवावयाची व सरकारी साऱ्याबद्दल कबुलायत लिहून घेऊन मग जमीन खातेदाराच्या हवालीं करावयाची असा नियम ठरविला. जर्व्हिसचें म्हणणें असें आहे कीं, कोणत्याहि मुसुलमान राजांच्यापेक्षां शिवाजीची धारापद्धति प्रजेस जास्त सुखकर व सुलभ असल्यानें त्याच्या राज्यांत मुसुलमानी अंमलापेक्षां जास्त शांतता नांदत होती व साऱ्याचें उत्पन्नहि एकंदरींत वाढलें होतें. साऱ्याचें प्रमाण एकपंचमांश ( क्वचित् दोनपंचमांश अथवा तीनपंचमांश ) असे. नवीन लागवडीस कांहीं दिवस सारा माफ असे. एवढेंच नव्हे तर हल्लींप्रमाणें तगाईची पद्धतीहि त्यावेळीं अमलांत असे ( मात्र व्याजाचा दर अत्यंत हलका, जवळजवळ नाहींच असा असे. ). ती ४।४ अथवा ५।५ वर्षांनींहि हप्त्यानें वसूल करीत. पेशवाई अखेर अखेर मक्त्यानें मामलती देण्याचा प्रघात पडल्यानें सारा वाढविण्यांत येऊं लागला व त्यामुळें शेतकऱ्यांनां तो जड होऊं लागला.सवाई-माधवरावाच्या वेळीं जमीनमोजणी पुनः सुरू झाली. त्यावेळीं त्याच्या हाताचें माप मोजण्याकरितां योजण्यांत आलें. शनवारवाड्याच्या तटाच्या एका भिंतीवर या हाताच्या लांबीची एक खूण असे व वाटेल त्या शेतकऱ्यानें ( गरज पडल्यास ) त्या मापाचा नमुना घेऊन आपलें शेत मोजावें व सरकारी अधिकाऱ्यानें जास्त मोजणी केली असल्यास थेट पेशव्यांकडे तक्रार करावी अशी एक दंतकथा आहे ( खानदेश गॅझिटियरमध्येंहि असा उल्लेख आहे). जिराईत व बागाईत अथवा पाटस्थळ असे शेतीचे दोन प्रकार करून बागाईत जमिनीवरील कर जिराईत जमिनीपेक्षां जास्त असे. त्यांतहि हळद, ऊंस, भाजीपाला, फळफळावळ वगैरे पदार्थांच्या पैदाशीच्या बागाईत जमिनीवर कमजास्त सारा असे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हल्लींप्रमाणें रिव्हिजन सेटलमेंट ( दर वीस अथवा तीस वर्षांनीं पहाणी करून साऱ्यांत वाढ करणें ) त्या काळीं नव्हती. जुलमी अधिकारी कमजास्त कर एखाद्या वेळीं घेत; परंतु ठराविक मुदतीनें शेताचा सारा वाढविण्याचा भुंगा त्यांच्यामागें लागला नव्हता. त्यामुळें प्रजेला बरेंच सुख मिळे. शिवाजीपासून पेशवाई-अखेर बहुधां हीच पद्धति अंमलांत होती. पेशवाईअखेर ( व मध्यंतरीं कांहीं काल ) मक्त्याची मामलतदारपद्धति पडल्यानें रयतेला थोडासा त्रास होई हे वर सांगितलेंच आहे.

मराठी राज्यांत गरीब शेतकऱ्यास इस्तावापद्धतीनें जमीन लागवडीस देत. हा सारा दर वर्षी थोडथोडा वाढवून पांच ते सात वर्षांपर्यंत खऱ्या (ठराविक) रकमेवर आणून ठेवीत. त्यामुळें शेतकऱ्यास एकदम बोजा वाटत नसे. मुसुलमानी अमलांत ‘कमाल’ आकार म्हणून जो सारा असे तो सर्वच्या सर्व वसूल होत नसे म्हणून मुसुलमानांनींच ‘तनखा’ ( वसूल करतां येईल इतकीच रकम ) दर केला. त्यांतहि आणखी रकम कमी करून मराठ्यांनीं सारावसुलीचा प्रघात घातला. लढाई अगर दुष्काळांत शेतकऱ्यांस भरपूर सूट मिळे. बिबियाणे वगैरेंकरितां सरकार रकम शेतकऱ्यांस देई. रकम साऱ्याच्या वेळीं बेरजेंत धरून एकतृतीयांश भाग ( धान्य ) त्यांनां देई व बाकीचा आपण घेई. हिला बटाईपद्धत म्हणत. दक्षिण कोंकणांत दर बिघ्यामागें १० मण भात घेत. प्रांतभेदानें १० चे ९ व ८ मणहि घेत. रोख नक्त साऱ्याचा प्रकार दर खंडीस १५, २० किंवा ३० रु. असा होता. शेतकरी ब्राह्मणांनां दर बिघ्यास ५ मण भात द्यावे लागे (उत्तर कोंकणांत). नापीक जमिनींत दर बिघ्यास ३ ते ५ रु. नक्त सारा घेत ( ३० नेरळ तालुका ). ऊंसाच्या लागवडीस दर बिघ्यास ५ रु. धारा असे. नाशिक भागांत नक्त साऱ्याची पद्धति होती. तेथें जमिनीच्या प्रतीप्रमाणें प्रत्येक बिघ्यास २ ते १ रु. जिराईतीस; व ५ ते ६ रु. बागाइतीस असा दर होता. रावबाजीच्या वेळीं पुणें जिल्ह्यांत दर बिघ्यामागें ३ रु. धारा होता. गुजराथेंत दर चढीचे होते. दुष्काळांत भरपूर सूट मिळे. पेशवाईच्या मध्यकालीं जी कमावीसपद्धत प्रचारांत आली ती पुढीलप्रमाणें असे. कमावीसदार ( मामलतदार ) व त्याची कचेरी (कारकून, शिपाई, प्यादे वगैरे यांचा खर्च सरकार ( पगाररूपानें ) देई. हा खर्च जमीनमहसुलाच्यावर शेंकडा दहा या प्रमाणांत ठरलेला असे. कारकून व शिबंदी वगैरेंचा खर्च याचा समावेश सरकारच्याकडे सालिना बेहड्यांत ( बजेट ) दाखल करावा लागे. त्यामुळें मामलतदारास जुलमजबरदस्ती व लांचलुचपत करतां येत नसे. मामलतदारानें केलेल्या जमाबंदीस अखेर सुभा व सरसुभ्याची परवानगी लागे. तसेंच रयतेच्या मामलेदारांच्या विरुद्ध तक्रारी हे सुभेदार लोक ऐकून तात्काळ न्याय देत. त्यामुळें मामलेदारांनां जुलमजबरदस्ती करतां येत नसे. मामलेदार बहुधां दरवर्षी बदलत असत. ग्रँट डफनें सुद्धां या कमाविशीपद्धतीची स्तुति केली आहे. मागें सांगितल्याप्रमाणें बीबियाण्याबद्दल तर तगाई देतच; परंतु शेतकऱ्यास ( आग लावून जळालें असल्यास ) नवीन घर बांधण्यास व गुरें विकत घेण्यासहि देत असत. ही रकम १।२ वर्षांत फेडावी लागे, तरीपण त्यासाठीं तगादा नसे ( व

ब्याजहि प्रजेपासून घेत नसत ). आणि ती वसूल होईपर्यंत मामलेदाराची बदली होत नसे. झाल्यास येणारा मामलेदार ती रक्कम आपण स्वतः जबाबदारीवर पत्करी. पेशाच्या टंचाईच्या वेळीं मामलेदार ही रक्कम सरकारांत आपल्या पदरची भरी व मग ती सावकाश शेतकऱ्यांकडून वसूल करी. अशा वेळीं सरकार कमाविसदारास १२ टक्के व्याज आपण होऊन भरीत असे (शेतकऱ्यांकडून सर्व रक्कम वसूल होईपर्यंत ). कै. न्या. रानडे यांच्या मतें (स. १९०० च्या पूर्वी) गेल्या ८० वर्षांत पेशवाईच्या या जमीनमहसुलीच्यापेक्षां जास्त फायदेशीर रीत ( सुधारणा ) अमलांत आली नाहीं.

ब्रि टि श अ म दा नी.—ब्रिटिशांनां बंगालची सनद मिळाल्यावर जमीनमहसूलाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर कंपनीसरकारपुढें आला व १७९३ मध्यें कायमधारापद्धति ( पर्मनेंट रेव्हेन्यू सेटलमेंट ) लागू करण्यांत आली. पुढें इतर प्रांत अमलाखालीं आल्यावर निरनिराळ्या पद्धती अवलंबिल्या. या पद्धतींचे मुख्य तीन प्रकार आहेत. ( १ ) जमीनदारीपद्धति, ही बंगाल, उत्तर मद्रास व अयोध्या या प्रांतांत आहे, ( २ ) 'मौझावार' किंवा 'महालवार' पद्धति; ही संयुक्तप्रांत व पंजाब यांमध्यें आहे; आणि ( ३ ) रयतवारीपद्धति, ही मुंबई, मद्रास, वऱ्हाड, ब्रह्मदेश, आसाम, कुर्ग वगैरे भागांत आहे. ही वर्गवारी जमीनसारा भरण्यास सरकारला जबाबदार कोण, यावरून ठरते. दुसरा मुद्दा जमीनसारा कायमचा किंवा वीसतीस वर्षें तात्पुरत्या मुदतीचा ठरविण्याबद्दलचा. या दृष्टीनें ( १ ) कायमधारापद्धति व ( २ ) फेरधारापद्धति असे दोनच प्रकार आहेत. म्हणजे बंगाल्यांतली जी कायमधारापद्धति तिच्यांत जमीनीवरचा सारा सरकारनें कायम ठरवून दिला आहे. त्यांत केव्हांहि फेरफार होत नाहीं. दुसरी फेरधारापद्धति ( रिव्हिजन सेटलमेंट ) यांत दर वीस किंवा तीस वर्षांनीं धाऱ्यामध्यें फेरफार सरकार करते. हीच दुसरी पद्धति बहुतेक सर्व हिंदुस्थानांत आहे.

ब्रिटिश पद्धतींत दोन मुख्य फरक आहेत. एक जमीनीची मोजणी, व दुसरा क्षेत्रफळानुसार साराआकारणी. जमीनीची पहाणी सरस निरस अशी करून प्रतवारी सरकारचे मोजणीखातें ठरवितें, व नंतर एकरी उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे तीन दर लावतात. पीकाच्या दृष्टीनें जमिनीचे आणखी तीन प्रकार असतात ते; ( १ ) बागायती, ( २ ) बिनपाणी, व ( ३ ) माळ. हे होत.

हिंदुस्थानांत जमीनमहसूलाबाबत सांप्रत दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत ते; ( १ ) कायमधारापद्धति कीं, फेरधारापद्धति असावी; आणि ( २ ) जमीनधारा हा कर आहे कीं भाडें ( रेंट ), हे होत म्हणजे जमीनीवर मालकी रयतेची असून सरकार जमीनीच्या उत्पन्नावर कर घेतें, कीं सरकार हें जमीनीचें मालक असून तें रयतेपासून जमीन वापरण्याबद्दल भाडें घेतें.

बंगाल्यांतील कायमधारापद्धतीसंबंधीं तत्त्वतः मतभेद आहे. एक मत असें आहे कीं, धारा कायमचा कधीं न बदलणारा ठरविण्यांत सरकारनें मोठी चूक केली आहे. कारण कृषिशास्त्राच्या वाढत्या ज्ञानाबरोबर जमीनीचें पीक अधिकाधिक येणार व शिवाय वाढत्या किंमतीबरोबर धान्याच्याहि किंमती वाढणार, यामुळें जमीनदारांनां जो वाढता फायदा मिळतो त्या प्रमाणानें सरकारला धारा वाढवितां न आल्यामुळें नुकसान होतें. माणसाचें उत्पन्न वाढल्यास सरकारला करहि वाढवितां येणें जरूर आहे. उलटपक्षाचें म्हणणें असें आहे कीं, बंगाल्यांत कायमधारापद्धतीमुळें रयतेला फार फायदे झाले आहेत. शेतकरीवर्ग संपन्न स्थितींत दुष्काळांनां तोंड देण्यास अधिक समर्थ आहे. शेतकीची सुधारणा करणारा व शिवाय शेतकीच्या उत्पन्नांतून भांडवल जमवून त्यावर उपयुक्त उद्योगधंदे करणारा बनला आहे, असे अनेक फायदे असल्यामुळें बंगालप्रमाणें सर्व प्रांतांत कायमधारापद्धति लागू करण्यांत यावी.

दुसरा प्रश्न जमीनमहसूल हा कर कीं भाडें; म्हणजेच जमीनीचे मालक सरकार कीं रयत. लँड रेव्हीन्यू कोड नांवाच्या कायद्यांतील कांहीं कलमांचें धोरण सरकारी मालकी ठरविण्याकडे आहे. ब्रिटिश अमदानीपूर्वी पूर्वापार स्मृतिग्रंथानुसार जमीनीची मालकी रयतेकडे होती. ब्रिटिश अंमलाखालीं कॉर्नवालिसनें बंगाल्यांत कायमधारापद्धति लागू करतेवेळीं जमीनदार पूर्ण मालक असल्याचें कबूल केलें. पेशवाई नष्ट झाल्यावर मुंबई इलाख्यांत एलफिन्स्टन साहेबांनीं जमीनधारापद्धतीबद्दलच्या रिपोर्टांत शेतकऱ्यांचा मिराशी हक्क कबूल केला आहे. १८५६ सालीं कंपनीसरकारच्या डायरेक्टरांनीं " रयत हेच जमीनीचे हक्कदार आणि सरकार नुसत्या तरमबंदीपुरतें मालक असून शेतसारा हा मालकी हक्कानें घेतलेला खंड नसून राजकीय हक्कानें वसूल केलेला कर आहे" हें तत्त्व मान्य केलें आहे. १८६५ च्या रेव्हेन्यू सेटलमेंट ॲक्टानें असें ठरविलें कीं शेतीकरितां दिलेल्या जमीनीवर नांगराचा फाळ जातो तेथपर्यंत शेतकऱ्याची मालकी, त्याच्या खालच्या जलतरुकाष्ठपाषाणनिधिनिक्षेप इत्यादिकांवर सरकारचा मालकी हक्क. पुढें १९०१ च्या लँडरेव्हेन्यू अमेंडमेंट ॲक्टानें रयतेचा मालकी हक्क नष्ट करण्याचा हेतु होता; पण त्याला प्रचंड विरोध झाला. तेव्हांपासून मुंबई प्रांतिक कौन्सिलरांनीं या प्रश्नाकडे पूर्ण लक्ष दिलें असून सांप्रत तरमबंदीच्या पद्धतीबद्दल चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमली. या योगानें या प्रश्नाचा कायमचा निकाल लागेल अशी आशा आहे. जमीन रयतेच्या मालकीची हें तत्त्व ठाम ठरल्यावर जमीनमहसूलाची आकारणी प्राप्तीवरील कराप्रमाणें केली पाहिजे

('कर' पहा). याशिवाय 'जमीनदार व कुळें' पहा. [महाभारत; कौटिलीय अर्थशास्त्र; मनुस्मृति; इं. अँ. पु. १५; इं गॅ; महिकावतीबखर; ऐनीअकबरी; पेशव्यांच्या रोजनिशी; मराठी रिया.]

**जमुई**—बिहार ओरिसा. मोंघीर जिल्ह्यांतील जमुई पोटविभागाचें मुख्य ठाणें असून ईस्ट इंडियन रेल्वेवरील जमुई स्टेशनच्या उत्तरेस चार मैलांवर सुमारें चार हजार लोक वस्तीचें ठिकाण आहे. उ अ. २४° ५५' व पू. रे. ८६ ° १३.' मोहाची फुलें, तेल, तूप, लाख, धान्यें, गूळ वगैरे येथून बाहेर जातात. कापूस, तंबाखू व इतर माल आंत येतो. व्यापार आगगाडीमार्गें व बैलगाडीनें चालतो. याच्या दक्षिणेस दंद्दपेणग नांवाच्या किल्ल्याचे अवशेष आहेत.

**जमेका**—हें ब्रिटिश वेस्ट इंडीज बेटांपैकीं सर्वांत मोठें बेट असून क्यूबाच्या दक्षिणेस ८० मैलांवर आहे. हें बेट उत्तर अक्षांश १७ ° ४३' व १८ ° ३२' आणि पश्चिम रेखांश ७५°१०' व ७८ ° २०' यांमध्यें आहे. ह्या बेटाची लांबी १४४ मैल व रुंदी ५० मैल व क्षेत्रफळ ४२०७ चौ. मै. आहे. पूर्वेकडून पश्चिमेस जाणारी ब्ल्यू ( नील ) पर्वताची ओळ आहे. याचें नीलगिरि ( ब्ल्यू ) नांवाचें शिखर ७३६० फूट उंच आहे. रिओग्रँड, फँटेनगार्डन, ब्लॅक, साल्ट, वगैरे नद्या जमेका बेटांत आहेत. ह्या बेटांत कित्येक ठिकाणीं मधून मधून ज्वालामुखींचीं चिन्हें दृष्टीस पडतात. शिवाय कांहीं ऊन पाण्याचे झरे देखील आहेत. पोर्टमॉरन्ट किंग्स्टन ओल्डहार्बर ( जुनें बंदर ) मांटेगोबे, फालमाऊथ, सेंट ॲन्सबे, पोर्टमराया आणि पोर्टॲटोनिओ हीं मुख्य बंदरें आहेत.

समुद्रकांठची हवा उष्ण व सर्द आहे. परंतु अंतःर्भागांतील हवा थंड आहे. पाऊस एकंदरींत ६६.३ इंच पडतो. ह्या बेटांत नाना तऱ्हेच्या वनस्पतींची वाढ चांगली होते. जमेका बेटाची लोकसंख्या ( १९११ ) ८३१३८३ आहे. मूळच्या अरॅवाक नांवाच्या लोकांचे पुष्कळ अवशेष सांपडले आहेत. लोकसंख्येंत मेरुन, नीग्रो, हिंदी मजूर, व बरेच मिश्र लोक आहेत. हिंदी ( ईस्टइंडियन ) लोक सुमारें १७ हजार आहेत.

राजधानी किंग्स्टन आग्नेयकिनाऱ्यावर आहे. जवळच पोर्ट रॉयल शहर आहे. याशिवाय जुनें राजधानीचें शहर स्पॅनिश टाऊन, मांटेगोबे, पोर्ट ॲंटिनिओ वगैरे शहरें आहेत. शेतकी व जनावरें पाळणें असे मुख्य धंदे आहेत. केळीं, संत्रें, कॉफी, साखर, रमदारू, पिमेंटोचें लांकूड, कोको, कंकोळ, आलें, नारळ, लिंबें, जायफळ, अननस, तंबाखू, द्राक्षें, व आंबे उत्पन्न होतात. जमेकांत एक कृषिसभा व एक कृषिमंडळ अशा दोन संस्था आहेत फळें, साखर व रम यांची निर्गत होते. १९१७–१८ सालची आयात ३२९७६६५ पौंड असून निर्गत २४७८९१७ पौंड होती.

ह्या बेटांत चांगल्या सडका व रस्ते आहेत. किंग्स्टन, मांटेओबे, पोर्टेनिओ व एकार्टन हीं शहरें रेल्वेनें जोडलेलीं आहेत. १९१८ च्या मार्च अखेरीस १९७ मैलांची रेल्वे जमेकांत सुरू झाली होती.

जमेका बेटाचे सरे, मिडल सेक्स, व कॉर्नवाल असे तीन प्रांत असून प्रत्येक प्रांताचे पांच पोटविभाग आहेत. मुख्य अधिकारी गव्हर्नर असतो. पांच अधिकारी सभासद, दहा सरकार नियुक्त व १४ निवडलेले अशा सभासदांचें एक कायदेकौन्सिल असतें. याशिवाय एक प्रिव्ही कौन्सिलहि असतें. १९१७–१८ सालची जमाबंदी १०५२४८५ पौंड असून खर्च १०९८४०९ पौंड होता व कर्ज ३७९७२७३ पौंड होतें. निरनिराळ्या धार्मिक संस्थांनीं स्थापिलेलीं विद्यालयें व शाळा आहेत; प्राथमिक शिक्षण मोफत पण सक्तीचें नसून सरकारी मदतीनें खासगी रीतीनें चालतें. उच्च शिक्षणाची सोय आहे. १९१७–१८ सालीं जमेकांत ६९६ सरकारी प्राथमिक शाळा, बायकांकरितां तीन व पुरुषांकरितां एक अध्यापन शाळा व दोन दुय्यम शिक्षणसंस्था होत्या.

कोलंबसानें जमेका बेट इ. स. १४९४ मध्यें शोधून काढिलें. स्पॅनिश लोकांनीं १५०९ सालीं येथें कायमची वस्ती केली. स्पॅनिश अंमलांतील चिरस्मरणीय गोष्ट म्हणजे बेटाचे मूळचे रहिवाशी अरॅवाक इंडियन यांचें निर्मूलन होय. क्रॉमवेलनें १६५५ त ॲडमिरल पेन व व्हेनेबल्स यांनां पाठवून हें बेट ताब्यांत घेतलें. प्रथम ह्या बेटावर लष्करी अंमल होता. नंतर कार्यकारी कौन्सिल, इंग्लंडसारखी संघटित राज्यपद्धति व कायदेकौन्सिल या सुधारणा करण्यांत आल्या. १६७० सालच्या मॅड्रिच्या तहान्वयें ब्रिटिश हक्क वसूल करण्यांत आले. ह्या बेटांशीं गुलामांचा व्यापार १६७२ पासून सुरू झाला. गुलामांनां १८३३ मध्यें स्वातंत्र्य देण्यांत आलें. त्यामुळें मळेवाल्यांचें फार नुकसान झालें. ह्याच्या नंतर निग्रो लोकांनीं बंड केले; परंतु गव्हर्नर आयर यानें तें बंड मोडलें. राज्यपद्धति १८८४ त सुरू करण्यांत आली. व १८९५ मध्यें तींत आणखी फरक करण्यांत आले. १९०७ मध्यें फार मोठा भूकंप झाला. यामुळें राजधानी पोर्ट रॉयल ॲंड्रयूज या शहरांतील इमारतींचें फार नुकसान झालें. [कुंडाल—स्टडीज इन् जमेका हिस्टरी; जमेका इन् १९१२ व हिस्टरी ऑफ जमेका; गार्डनर–हिस्टरी ऑफ जमेका; हेंडरसन–जमेका; हिल–दि जिऑलॉजी ॲंड फिजिकल जिऑग्रफी ऑफ जमेका; लिसर–ट्वेन्टिएथ सेंचरी जमेका.]

**जमेसाबाद**—मुंबई इलाखा, सिंध प्रांत. थर आणि पारकर जिल्ह्यांपैकीं एक तालुका. उ. अ. २४° ५०' ते २५° २८' व पूर्व रेखांश. ६९° १४' ते ६९° ३५' क्षेत्रफळ ५०६ चौरस मैल. लो.सं. सन ( १९०१ ) २४०३८.

या तालुक्यांत १७१ खेडीं असून जमेसाबाद हें मुख्य ठिकाण आहे. जामराव कालव्याचें पाणी या तालुक्याला मिळतें. ज्वारी, गहूं हीं मुख्य पिकें आहेत.

**जम्नोत्री**—संयुक्त प्रांत. तेहरी संस्थानांतील एक क्षेत्र. उ. अ. ३१° १' व पू. रे. ७८° २८'. जम्नोत्रीचें हें देऊळ समुद्रसपाटीपासून १०८०० फूट उंचीवर असून येथून चार मैलांवर यमुना नदीचा उगम आहे. जम्नोत्रीचा विशेष म्हणजे तेथील अद्भुत उष्ण जलप्रवाह हे होत. या झऱ्यांपासून जरा खालच्या बाजूला पहाडाच्याच एका बारीक फटींतून एक लहानशी जलधारा पूर्वेकडे पडत आहे.हाच यमुनेचा उगम असें यात्रेकरू मानितात. जम्नोत्रीच्या मंदिरासमोर दोन गुंफा आहेत. या गुंफांच्या खालून उष्ण झरे वहात असल्यामुळें बाहेर कितीहि थंडी असली तरी या गुंफा चांगल्या गरम रहातात. येथें स्वयंपाक करण्याचा एकच मौजेचा मार्ग असतो. तो असा कीं टुवालांत किंवा धोतरांत तांदुळ बांधून उष्ण कुंडांत त्या आयत्याच उकळत असलेल्या पाण्यांत सोडून द्यावयाचे. थोड्या वेळानें तांदूळ शिजून भाताचें फडकें पाण्यावर येतें. अशाच तऱ्हेनें उकळून काढलेल्या बटाट्याशीं तो भात खाऊन येथें येणारे सर्व यात्रेकरू जेवण करतात.

जम्नोत्रीच्या मुख्य उष्ण प्रवाहाच्या आसपास व गुंफांजवळ वगैरे जितके कांहीं उष्ण झरे व कुंडें आहेत त्या सगळ्यांचीं नारदकुंड, ब्रह्मकुंड, इ. इ. नांवें आहेत. जम्नोत्री येथील मंदिरांत गंगा, यमुना, सरस्वती यांच्या मूर्ती आहेत. दुसऱ्या एका बाजूला गणेश, नारद व अशाच दोन तीन लहान लहान मूर्ती आहेत. जम्नोत्रीला जाण्याचा रस्ता फार वाईट असल्यामुळें इकडे येणाऱ्या थोड्याशा यात्रेकरूंपैकीं बहुतेक सगळेच पायीं येणारे असतात.

**जम्मलमडुगु** तालुका.—**मद्रास.** कडप्पा जिल्ह्यांतील एक तालुका. उत्तर अक्षांश १४° ३७' ते १५° ५' व पूर्व रेखांश ७८°४' ते ७८° ३०'. क्षेत्रफळ ६१२ चौ. मै. लोकसंख्या ( १९२१ ) ९८५७२. यांत १ गांव व १२७ खेडीं आहेत. १९२१-२२ सालीं जमीनमहसूल व कर यांचें उत्पन्न २४२००० रुपये होतें. येथें सरासरी २२ इंच पाऊस पडतो. पेन्नर आणि चित्रावती या नद्यांचा संगम या तालुक्यांत होतो. या नद्यांना पूर आला म्हणजे आसपासच्या गावांचें फार नुकसान होतें. ज्वारी, कापूस, नीळ, हरबरा, गळिताचीं धान्यें वगैरे येथें पिकतात. कर्नूल-कडप्पा नांवाचा कालवा या तालुक्याच्या ईशान्य दिशेकडून वहातो.

गां व—तालुक्याचें मुख्य ठिकाण हे पेन्नर नदीच्या वाम तीरावर वसलें आहे. उ. अ. १४°५१' व पू. रे.७८° १४'. लोकसंख्या ( १९११ ) १६०९९. हें व्यापाराचें ठिकाण असून येथून कापूस व नीळ हे पदार्थ बाहेर जातात. नरपुरस्वामीचा रथ येथें दर वर्षी मे महिन्यांत निघतो. तो पाहण्यास पुष्कळ लोक येतात.

**जम्मू**—काश्मीर संस्थानचा एक मोठा प्रांत. हा हिंदुस्थानालगत असून सर्व बाबतींत बहुतेक पंजाबसारखा आहे. याचें जहागिरी धरून क्षेत्रफळ १२४३९ चौ. मै. आहे व लो. सं. ( १९११ ) १५९७८६५ आहे. पैकीं मुसुलमान सुमारें ९॥ लाख आहेत. प्रांताचें मुख्य ठिकाण जम्मू आहे. येथील हवा पंजाबप्रमाणें उष्ण आहे. पावसाची सरासरी ४१ इंच आहे. या प्रांताची जास्त माहिती ' काश्मीर ' या लेखांत सांपडेल.

श ह र—ही जम्मू प्रांताची राजधानी असून महाराज येथें हिवाळ्यांत रहाण्यास येतात. पेशावरकडे जाणाऱ्या आगगाडीच्या रस्त्यावर वजीराबाद स्टेशन आहे. त्यापासून जम्मूला एक फांटा जातो. वजीराबादहून जम्मू५५मैल आहे. उ. अ. ३२° ४४' व पू. रे. ७४° ५५'. हें समुद्रसपाटीपासून १२०० फूट उंच असून येथें ३१७२६ लोकसंख्या ( इ. स. १९११ ) आहे तावी नदीच्या तीरीं हा गांव असून गांवाचें क्षेत्रफळ सुमारें एक चौ. मैल आहे. येथें रघुनाथजींचें देऊळ आहे. रेल्वेची सोय आहे तरी गांव कांहीं म्हणण्यासारखा भरभराटीस आला नाहीं. अठराव्या शतकाच्या उत्तर भागांत राजा रणजितदेव राज्य करीत असतांना या गांवाची लोकसंख्या दीड लाख होती असें म्हणतात. हें खरोखरी काश्मीरच्या व्यापाराचें मुख्य ठिकाण व्हावयास पाहिजे. परंतु कोहाल ते श्रीनगरपर्यंत गाडीरस्ता झाल्यामुळें सर्व व्यापार त्या मार्गानें होऊं लागला आहे. कदाचित जम्मू ते श्रीनगरपर्यंत रेल्वे झाली तर येथील व्यापार सुधारेल असें दिसतें. काश्मीरचे महाराज रणवीरसिंग यांच्या वेळेस येथें पुष्कळ व्यापार चालत होता. परंतु हल्लीं फक्त हिवाळ्यांत राजघराण्यांतील मंडळी व संस्थानांतील मुख्य कचेऱ्या येथें असतात.

**जयगड**—मुंबई इलाख्यांत रत्नागिरी जिल्ह्यांत हें बंदर आहे. हें मुंबईपासून ९९ मैलांवर आहे. हें बंदर व्यापारास फार सोईचें आहे कारण येथें पाणी दूरवर असून खोल आहे व जहाजांनां समुद्राच्या पाण्यापासून बिलकूल त्रास होत नाहीं.या ठिकाणाहून गूळ व जळाऊ लांकडें बाहेर गांवीं पाठविलीं जातात व बाहेर गांवाहून तांदुळ व मीठ हीं येतात. जयगड येथें एक किल्ला आहे पण तो हळू हळू पडत चालला आहे. हा किल्ला मूळ हिंदू राजांनीं बांधला पण संगमेश्वरचा प्रसिद्ध चांचा नाईकानें आपल्या ताब्यांत घेतला. सन १७१३ सालीं हें जयगड बंदर मराठे सरदार आंग्रे ह्यांच्या ताब्यांत होतें; पण १८१८ सालीं तें इंग्रजांच्या ताब्यांत गेलें. ह्या ठिकाणीं १३ मैल लांब दिसणारें एक दीपगृह आहे.

**जयचंद**-हा कनोज येथील गहरवार घराण्यांतील शेवटचा स्वतंत्र राजा होय. याची माहिती ज्ञानकोशाच्या दहाव्या विभागांत कनोज या नांवाखालीं ( पृ. ४४।४६ ) पहा.

**जयदेव**—हा प्रसिद्ध संस्कृत कवी जगन्नाथपुरी प्रांतांत उत्कल देशामध्ये, बिंदु बिल्व या गांवीं जन्मला. याच्या बापाचें नांव श्रीभोजदेव व आईचें नांव राधादेवी अगर रमादेवी होतें. याच्या बायकोचें नांव पद्मावती होतें. इच्या अलौकिक पातिव्रत्यासंबंधींच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. जयदेवासंबंधींची माहिती विश्वसनीय अशी मिळत नाहीं. हा परम कृष्णभक्त व महासाधु होता. याची माहिती चंद्रदत्तकृत भक्तमाला ग्रंथाच्या ३९ ते ४१ सर्गांमध्यें आलेली आहे. पण ऐतिहासिकदृष्ट्या ती कितपत ग्राह्य आहे याबद्दल शंका वाटते. जयदेवाचा काल ११ व्या शतकांत ठरविण्यांत आला आहे. तत्कालीन वंगदेशाचा राजा लक्ष्मणसेन याच्या सभाद्वारावर एक शिलालेख आहे. त्यांत लक्ष्मणसेनाच्या पदरीं जयदेव कवि होता असें वर्णन आलें आहे व त्यावरून हा लक्ष्मणसेनाच्या काळीं होता असें उघड होतें.

जयदेवाचा गीतगोविंद हा एकच ग्रंथ प्रसिद्ध आहे. याच्या नांवाचे दुसरे पुष्कळ कवी होऊन गेले व त्यामुळें कदाचित् घोटाळा होण्याचा संभव आहे. परंतु जयदेवाचा या ग्रंथाशिवाय दुसरा ग्रंथ उपलब्ध नाहीं. गीतगोविंद हें एकच काव्य जयदेवाचें नांव अजरामर करण्याला पुरें आहे. गीतगोविंद हें कृष्णाच्या बालपणच्या चरित्रावर रचलेलें काव्य आहे. राधाकृष्णाच्या व कृष्ण व इतर गोपगोपींच्या लीला यांत बहारीनें वर्णन केलेल्या आहेत. या काव्यांत सकृद्दर्शनीं केवळ शृंगाराचींच वर्णनें आढळतात; तथापि त्यांत गूढ अर्थ भरलेला आहे. आत्म्याची परमात्मस्वरूपीं विलीन होण्याची धडपड हें गीतगोविंदांत गूढ तऱ्हेनें शृंगाराच्या बुरख्याच्या द्वारें दाखविलें आहे. काव्यांतील भाषा फार रसाळ व प्रसन्न आहे. याच्या कवनांत मोठमोठे समास आले आहेत. हा गौडी भाषापद्धतीचा भोक्ता होता असें दिसतें. कांहीं कांहीं काव्यांत, यमक, प्रास इत्यादि भाषेचे नमुने सांपडतात. शिवाय यांतील कांहीं अष्टपदीं गातां येतात हा याच्या काव्याचा मुख्य गुण आहे. रागबद्ध संस्कृत कविता आपल्या संस्कृत वाङ्मयांत फार थोड्या आढळतात; पण जयदेवाच्या काव्यानें ती उणीव भरून काढली आहे. या कविता गातांना फारच कर्णमधुर लागतात.

गीतगोविंदावर, कुम्भराजाची ‘रसिकप्रिया’ व शंकरमिश्राची ‘रसिक मंजरी’ या टीका आहेत. गीतगोविंदाचीं हिंदी अर्थासकट आवृत्ति निघाली आहे. मराठींत मराठी गाण्यांच्या रूपानें गीतगोविंद ग्रंथाचें भाषांतर झालें आहे. जोन्स नांवाच्या प्राच्य पंडीतानें याच्या काव्याचा कांहीं भाग भाषांतरला आहे. एडविन आर्नोल्डनें या काव्याच्या भाषांतराचा एक खंड प्रसिद्ध केला आहे. या काव्याची एक प्रत लॅटिन भाषेंत टीकांसह लॉसेननें प्रसिद्ध केली आहे. इतर पाश्चात्य भाषांतहि याचीं भाषांतरें झालीं आहेत. [ संदर्भ ग्रंथ—मोल्सवर्थ, डौसन-अर्वाचीन व प्राचीन कोश; आफ्रेक्ट; काव्यमाला, निर्णयसागर ग्रंथमाला. ]

**जयद्रथ**—सिंधुदेशचा राजा वृद्धक्षत्र याचा पुत्र व धृतराष्ट्रकन्या दुःशला हिचा पति. पांडव वनवासांत असतां एकदां यानें द्रौपदीस हरण करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून पांडवांनीं त्याचे पांच पाट काढून जिवंत सोडून दिलें. पुढें यानें उग्र तप करून शंकरापासून ‘अर्जुनेतर पांडवांचा युद्धांत पराभव करशील’ असा वर मिळविला. याच वरामुळें यानें चक्रव्यूहांत अभिमन्यूचा वध करून इतर पांडवांचा पराभव केला. तेव्हां अर्जुनानें ‘उद्या सूर्यास्तापूर्वीं जयद्रथास मारीन’ अशी घोर प्रतिज्ञा करून कृष्णाच्या सहाय्यानें तडीस नेली. [ महाभारत, वन व द्रोणपर्व ]

**जयनगर**—बंगाल, चोवीस परगण्यांतील एक गांव. उ. अ. २२° ११' व पू. रे ८८° २५'. हा गांव कलकत्त्याच्या दक्षिणेस ३१ मैल असून याची लोकसंख्या इ. स. १९११ सालीं ९२५५ होती. इ. स. १८६९ सालापासून येथें म्युनिसिपालिटी आहे.

**जयनगर**—बंगाल दरभंगा जिल्हा मधुबनी विभागांतील एक खेडें. उ. अ. २६° ३५' व पू. रे. ८६° ९'. कमळा नदीच्या पूर्वेस व नेपाळ सरहद्दीच्या दक्षिणेस थोड्या मैलांवर हें तीन चार हजार लोकवस्तीचें खेडें आहे. येथें बंगालचा नवाब अल्लाउद्दीन ( इ. स. १४९३—१५१८ ) यानें बांधलेली एक मातीची गढी आहे. नेपाळच्या लढाईंत या गढीजवळच ब्रिटिशांनीं आपली छावणी ठेवली होती.

**जयपाळ**-हा काबूलच्या शाही राजघराण्यांतील भीमपाल याचा मुलगा; याचें राज्य पंजाब व अफगाणिस्तानांत पसरलें होतें. याची राजधानी भाटिंडा येथें होती. याच्या व सबक्तेगीन आणि गझनीकर महमूद यांच्या अनेकदां लढाया झाल्या होत्या. याचा दोन वेळ पराभव झाल्यानें व दोन वेळ पराभव ज्याचा झाला असेल तो सिंहासनावर बसण्यास अनधिकारी होय अशी त्यावेळीं समजूत असल्यानें यानें आपल्या आनंदपाल ( रा. वैद्यांच्या मतें त्रिलोचनपाल ) नांवाच्या मुलास गादीवर बसवून आपण अग्निकाष्टें भक्षण केलीं. याची बाकीची माहिती ज्ञा. को. च्या बाराव्या विभागांत गझनी घराणें या नांवाखालीं पहावी. [ स्मिथ-अर्लि हिस्टरी ऑफ इंडिया ]

**जयपूर**—बिहार ओरिसा. कटक जिल्ह्यांतील जयपूर भागाचें मुख्य ठिकाण. हें वैतरणी नदीच्या दक्षिण तीरावर वसलें आहे. उ. अ. २०°५१' व पू. रे. ८६°२०' लोकसंख्या ( १९११ ) १२२४१. पूर्वी केसरी ( गजपति ) वंशाच्या राजांचें जयपूर हें राजधानीचें ठिकाण होतें. सोळाव्या शतकांत या ठिकाणीं हिंदुमुसलमानांच्या पुष्कळ लढाया झाल्या व त्याच वेळीं हें मोडकळीस आलें. येथें व्यापार फारच थोडा आहे. येथें प्रेक्षणीय अशा पुष्कळ

इमारती आहेत. बिरोदा देवीचें देऊळ व गांवाबाहेर एक मैलावर असलेला सूर्यस्तंभ दर्शनीय आहे. देवतांच्या मूर्ती इतस्ततः पडलेल्या दृष्टोस पडतात. त्यावरून मुसुलमानांनी येथें बराच धिंगाणा घातला होता हें स्पष्ट होतें. मूर्ती बहुतेक छिन्नभिन्न केलेल्या आहेत. पृथ्वीच्या सप्तमातांच्या मूर्ती येथें आहेत. नबाब अबु नासीर यानें सतराव्या शतकांत बांधलेली मशीद सुंदर असून तिची सरकारतर्फे नुकतीच दुरुस्ती झाली आहे. इ. स. १८६२ मध्यें जयपुर गांवांत म्युनिसिपालिटीची स्थापना झाली. येथें सर्व मुख्य कचेऱ्या असून एक लहानसा तुरुंग आहे.

**जयपुर जमीनदारी**—मद्रास इलाख्यामधील विजगापट्टम् जिल्ह्यांतील उत्तरेकडच्या सर्व भागची उरिया एजन्सीतील एक व्यापारी ( १२१३ गांवाची ) जमीनदारी. या जमीनदाराचे बंगालमधील कलहंडी संस्थाननें पूर्वेकडील व पश्चिमेकडील असे दोन भाग केले आहेत. पश्चिमेकडील विभाग सरकारी आहे. संस्थानचें क्षेत्रफळ १०१५ चौ. मै. असून लो. सं. ( १९११ ) १६२१५६ व उत्पन्न ९६ हजार आहे. येथें पूर्वी वन्य जाती रहात असत. हल्लीं देखील त्यांची वस्ती गंजम डोंगरांत असून त्यांच्या भाषा व आचार अजून निराळे आहेत. येथील एका जातीमध्यें मनुष्याचा बळी देण्याची चाल इ. स १८६१ पर्यंत होती. यापुढ ती कडक कायद्दे अमलांत आणून बंद करावी लागली. मध्यप्रांताशीं येथून बराच व्यापार चालतो.

जयपुरचें घराणें पूर्वी ओरिसाच्या गजपती राजाचें मांडलिक होतें. पंधराव्या शतकांत गजपती राजानें आपली मुलगी या घराण्याचा मूळ पुरुष विनायकदेव यास दिली; व जयपूरची अखत्यारी त्याचबरोबर दिली. इ. स. १६५२ मध्यें विनायकदेवाच्या वंशजास विजयानगरच्या राज्याचें मांडलिक व्हावें लागलें. परंतु इ. स. १७९४ त मद्रास सरकारनें, जयपूरराजानें विजयनगरच्या विरुद्ध सरकारास मदत दिल्यावरून त्यास स्वतंत्र सनद दिली.

इ. स. १८०३ मध्यें पेशकश ( खंडणी ) १६००० रु. ठरली होती. याशिवाय कोटपाड परगण्याबद्दल १३६६६ रु. द्यावे लागतात. इ. स. १८४८सालीं कांहीं कारणावरून कांहीं तहशिली सरकारांत घेण्यांत आल्या. इ. स. १८५५ मध्यें देखील कांहीं बखेडे झाले होते. तेव्हां इ. स. १८६० त सरकारनें एक अधिकारी नेमला. हल्लीं तेथें व्यवस्था चांगली आहे. राजा श्री विक्रमदेव यास महाराजा हा किताब मिळाला.

इ ति हा स.—जयपूरचें घराणें फार जुनें आहे. परंतु त्याचा काल कांहीं सांपडत नाहीं. याचा जो वंशपरंपरा भाट असे तो ८७ पुरुषांची यादी देतो. जयपुरच्या जुन्या वंशावळींत नन्दपुरम् येथील घराण्याचा संस्थापक जो विनायकदेव त्याचें नांव येतें. कांहींचें म्हणणें असें आहे कीं विनायकदेव हा गजपती राजांच्या दरबारांतील एक महत्त्वाचा सरदार होता. हे चंद्रवंशीय रजपूत आहेत. यांची पुढील वंशावळ पी. डब्ल्यू. मूर. सी. एस्. यांच्या यादीवरून दिलेली आहे.

विनायकदेव ( मूळ पुरुष )—विजयचंद्रक्षयदेव—भैरवदेव-विश्वनाथ-बलराम-अनंत-विक्रम-कृष्ण-विश्वंभर-मलकीमर्दन कृष्ण-हरि-बलराम-रघुनाथकृष्ण-रामचंद्र-बलराम विश्वंभर ( या विश्वंभरास दोन, कृष्ण व विक्रम नांवाचे पुत्र होते. पैकीं कृष्णदेवास विजयानगरकर राजानें १७६० त गादीवरून पदच्युत करून त्याच्या धाकट्या विक्रम नांवाच्या भावास गादीवर बसविलें. तेव्हां विक्रमानें विजयानगरकराला बराचसा मुलुख व खंडणी दिली )-विक्रम-रामचंद्र-विक्रम-रामचंद्र-विक्रमदेव. हे हल्लींचे महाराज आहेत. [ इंपे. ग्या. पु. १४; विझगापट्टम् डिस्ट्रिक्ट म्यानुअल ]

**जयपुर सं स्था न**—हें संस्थान राजपुतान्यांत ( शेखावती धरून ) उ. अ. २५°४०′ ते २७° ४०′ व पू.रे. ७५° ८′ ते ७७° २०′ यांच्यामध्यें आहे. याच्या उत्तरेस बिकानेर व हिसार, पूर्वेस अलवार व भरतपुर, दक्षिणेस केरोली, ग्वाल्हेर, बुन्दी, मेवाड, अजमेर, व पश्चिमेस किशनगड, बिकानेर हीं संस्थानें आहेत. या संस्थानचें क्षेत्रफळ १५५७९ चौ. मै. व लोकसंख्या २३३८८०२ आहे. खुद्द जयपुर शहराची लो. सं.(स. १९२१) १,२०२०७ आहे. आणि एकंदर उत्पन्न ६५ लक्ष असून संस्थानांत दहा जिल्हे व ३८ शहरें आहेत. प्रजेंत शेंकडा ९० वैष्णवपंथी आहेत. खर्च ५२ लाख आहे.

संस्थानचा सपाट मध्यभाग समुद्रसपाटीपासून १४०० ते १६०० फूट उंचीवर आहे. हा भाग व सांबर सरोवर यांच्यामध्यें तूरवती व खेत्री नांवाचे डोंगर आहेत. त्यांची जास्तींत जास्त उंची २ हजार फूट आहे. रघुनाथगड हें शिखर सर्वांत उंच( ३४५० फूट ) आहे. डोंगराजवळ पाणी नजीक लागतें. डोंगरापासून दूरच्या भागांत पाणी खोलखोल लागतें. डोंगरामधील वाळूचीं मैदानें तापतात तेव्हां व वारे सुटून वाळू उडते, तेव्हां शेजारच्या वस्तीस व प्रवाश्यांना फार त्रास सोसावा लागतो. संस्थानांत जयपुरी, बाग्री व डांगीया भाषा आहेत. बनास नदी ही या राज्यांतील मोठी नदी असून ती पुढें चंबळनदीस मिळते. हिच्या कांठीं रणथंबोर व कंदाहार हे किल्ले आहेत. हे पूर्वी अजिंक्य समजले जात. बाणगंगा म्हणून दुसरी एक नदी असून बाकी लहान लहान ओढे आहेत. सांबर तळें हें प्रख्यात तळें आहे. संस्थानचा पूर्वेकडील प्रदेश सखल असून हवा उत्तम आहे. दलदल नसल्यामुळें मलेरियासारखे रोग होत नाहींत. थंडी कडक पडते व पाऊस सालिना २२ ते २८ इंचांपर्यंत पडतो. कापूस तंबाखू, अफू, गहूं, वगैरे पिकें मुख्य आहेत. संस्थानांत जाती पुष्कळ असून त्यांतील ब्राह्मण, जाट व मीना हे शेतकी व नोकरी करतात.

शेखावती व जयपुर प्रांतांत मका, कापूस, तीळ, बाजरी, ज्वारी, मठ, मूग पिकतो. इकडे एक प्रकारचीं झाडें आहेत, त्यांचीं फुलें माणसें खातात व पानें वगैरे उंट खातात. इकडील नांगरटी उंटाकडून करवितात. फळांपैकीं कलिंगडें बरींच होतात. या प्रांतांत रामगड, लक्ष्मणगड, फत्तेपुर हीं मोठीं गांवें आहेत. रेताड जमीनींत सातु व गहूं होतो. सांबर सरोवरांतील मिठाचें उत्पन्न बरेंच होतें. दरसाल जवळ जवळ १४ हजार टन मीठ निघून त्याची किंमत ४ लक्ष रु. पर्यंत होते. शिवाय कोबाल्ट, निकल, तांबें, लोखंड यांच्याहि खाणी संस्थानांत आहेत. राजमहालजवळ चुनडी नांवाचें रत्न सांपडतें. संस्थानांतील कांहीं लोक लढाऊ असल्यानें लष्करांतील घोडदळांत त्यांची बरीच भरती होते. मीना जातीचे लोक लुटारूपणा करतात.

संस्थानांत लहान लहान जहागिरदार, सरदार व जमीनदार बरेच आहेत. त्या सर्वांचें उत्पन्न धरून एकंदर जयपुरसंस्थानच्या जमाबंदीचा आंकडा १ कोटी ७ लक्ष आहे. संस्थानची तीन पंचमांश जमीन अशा लोकांनां इनाम असून दोन पंचमांश तेवढी संस्थानच्या खास मालकीची आहे.

जहागिरदार लोक फक्त खंडणी देतात. संस्थानची चाकरी करीत नाहींत. यांनां मिळालेलें इनाम दिल्लीच्या बादशहाच्या वेळचें आहे. सीकूर (लो. सं. ४लक्ष), खेत्री (लो. सं. २॥ लक्ष), ऊनिआरा (लो. सं. १॥ लाख) वगैरे जहागिरदार हे फार प्राचीन आहेत. जयपुरचें राज्य स्थापन होण्यापूर्वींचीं कांहीं संस्थानें अशा प्रकारचीं आहेत. हे सर्व जहागिरदार मिळून संस्थानास ३॥ लाख खंडणी भरतात. यांचें उत्पन्न १५ लक्षांचें आहे. संस्थानची नौकरी करणारे जे जहागिरदार आहेत, त्यांनां शेतसारा माफ असतो. असल्या जहागिरदारांचें उत्पन्न २८ लाख आहे. देवस्थान व धार्मिक इनामेंहि जवळ जवळ २८ लखांचें आहे.

शिपाईखातें नांवाचें एक उत्पन्नाचें खातें आहे. चोरांनां झालेला दंड, चोरीचा बिनवारसी माल विकून त्यापासून मिळणारें उत्पन्न वगैरे बाबींचा यांत समावेश होतो. सरळ वारसदारास जमीनीच्या ताब्याबद्दल नजर द्यावी लागत नाहीं. मात्र तेव्हां वारसदारास (उत्पन्नाच्या) शेंकडा ८ टक्के रक्कम नजराणा म्हणून द्यावी लागते. संस्थानांत लोंकरी कपडा, बारीक सूत, कापड, चिंट, संगमरवरी दगडी जिन्नस, कांचेचीं मिना केलेलीं भांडीं तयार होतात. सोन्यावर मिना काम करण्यांत जयपूर प्रसिद्ध आहे. संस्थानांत राजपुताना माळवा ही रेल्वे मुख्य आहे. संस्थानचे मुख्य दोन भाग केले आहेत. त्यांस पूर्व व पश्चिम दिवाणी म्हणतात. त्यांचा मुख्य दिवाण असतो. दिवाणीचे दहा भाग निझामत नांवाचे असून त्यांवर नाझीम हा अधिकारी असतो. प्रत्येक नीझामचे एकतीस तहशील आहेत. त्यावर तहशीलदार असतो. त्यास मुनसफाचेंहि अधिकार असतात. अखेरचें अपील संस्थानच्या मुख्य (दहा मंत्र्यांच्या) कौन्सिलाकडे असतें. कौन्सिलचे अध्यक्ष महाराज असतात. शेतसारा उत्पन्नाच्या (धान्य वगैरे) अगर नक्तरूपांत भरतां येतो.

शिक्षण, चार भाषांचें (हिंदी, ऊर्दु, फारशी व इंग्रजी) मिळतें व त्यावर बराच खर्च होतो. स. १८६८ पूर्वी संस्थानांत (संस्थानचें व जहागिरदारांचें मिळून) घोडदळ पायदळ व किल्ल्यांवरील शिबंदी मिळून एकंदर १६॥ हजार सैन्य होतें. सैन्यांत नाग नांवाचे लोक बरेच असत. हे विश्वासू असतात. त्यांनां त्यावेळीं दरमहा २ रु. पगार मिळे. सत्तावनसालच्या बंडांत ते राजाशीं इमानानें वागले. थोड्या खर्चांत पुष्कळ उपयोगी पडणारे हे लोक आहेत. जहागिरदार, ठाकूर वगैरे लोक त्यांच्या जयपुर संस्थानाशीं असलेल्या कराराप्रमाणें जयपुरकरास फौज पुरवितात. साधारण ५०० ते ७०० रु. उत्पन्नावर एक घोडेस्वार असें हें प्रमाण पडतें. संस्थानांत तीन कॉलेजें व इतर शिक्षणसंस्था ८०० पर्यंत असून शिक्षितांचें प्रमाण शेंकडा ३ पडतें. मात्र शिक्षण मोफत आहे.

जयपुरच्या घराण्यास धुंदरचे घराणेंहि म्हणतात. हल्लींच्या जयपुरशहराच्या दक्षिणेकडील भागास पूर्वी धूंदर हें नांव होतें. जयपुरघराण्यास दत्तक घेणें झाल्यास झोल्ली, चंदेल, सिंधोटो धोलिओ या घराण्यांतील दत्तक घ्यावा लागतो. रजपुत लोकांत असा एक प्रघात आहे कीं, घराण्यांतील कनिष्ठशाखेकडे जर गादी चालू असेल, तर वडील शाखेचा वारसा गादीवर पुढें सुरू होत नाहीं. एवढेंच नव्हे तर वडील शाखेतील मूल दत्तक म्हणूनहि (धाकट्या शाखेंत) घेतां येत नाहीं. असलें उदाहरण जयपुरच्या राजघराण्यांत घडलेलें आहे. या घराण्यांतील मूळ पुरुषानें प्रथम शोणनदीच्या कांठच्या रोहटस गांवीं गादी स्थापिली व मग पुढें तिसऱ्या शतकांत ग्वाल्हेर नखरकडे हें घराणें आलें. येथें हें घराणें ८०० वर्षें राज्य करीत होतें; व बहुधां तें कनोजचे मांडलिक असे. वज्रदमन नांवाचा राजा स्वतंत्र झाला व त्यानें ग्वाल्हेर शहर घेतलें पुढें एका दुल्हारायनें ग्वाल्हेर राजधानी मोडून दवोसा ही (आपल्या सासऱ्याची) राजधानी कायम केली. तेव्हांपासून हें घराणें राजपुतान्यांत आलें. दवोसा ज्या प्रांतांत होतें त्यास धुंदर प्रांत म्हणत.

इतिहासः—जयपुराला अंबरचें अथवा धुंदरचें राज्य असें रजपुत लोक म्हणतात. हें स. ९५७ त धोल राजानें स्थापिलें. श्रीरामपुत्र कुश, त्याचा वंशज नलराजा (यानें नरवाड –नरवर शहर स्थापिलें), त्याच्यापासून धोलराय हा ३४ वा वंशज होता असें सांगतात. जयपुरकरांनां (कुशवह) कच्छवाह कुळीचें म्हणतात. धोलरायाबद्दल पुष्कळ दंतकथा आहेत. त्यानें अजमेरराजकन्येशीं लग्न लावून दिल्लीच्या हिंदुराजाच्या साम्राज्याखालीं जयपुराकडील मीना लोक जिंकून तेथें राज्य स्थापिलें (९६७); पुढें धोल हा रणांत मेला. त्याचा पुत्र कुंकल; त्याचा मैदुल (१०३७);

त्याचा हूण; त्याचा कुंतल ऊर्फ जनदेव, यानें पुष्कळसे मीना लोक जिंकून राज्य वाढविलें. कंकल व मैदुल यांनींहि मीना लोकांनां पुष्कळ सवलती दिल्या होत्या.

कुंतलामागून पुजून राजा झाला; हा फार शूर होता; याची राणी दिल्लीच्या पृथ्वीराज चव्हाणाची बहिण होय. पृथ्वीराजास याचें सहाय्य असे. संयोगिताहरणांत हा प्रमुख होता. मुसुलमानांवर यानें दोनदां जय मिळवून शिवाय उद्दीनला पिटाळून लाविलें. चंदेल्लांचें महोबा यानें काबीज केलें होतें. हा ठाणेश्वरच्या युद्धांत ( पृथ्वीराजाबरोबर ) ठार झाला. त्याच्यानंतर मालेसी, विजूल, राजदेव, कितुला, कोंतुल, जुन्सी, उदयकर्ण, नरसिंग (यानें अमृतसर प्रांत व शहर काबीज केलें,), बनवीर ऊर्फ शेखजी (यानें सर्व शेखावत रजपुतांचें एकीकरण केलें. याच्या वंशाच्या ५ शाखा झाल्या) उद्धरण, चंद्रसेन व पृथ्वीराज हे राजे झाले.

पृथ्वीराजापर्यंत विशेष कांहीं घडल्याचें आढळत नाहीं. त्याला १७ मुलें होतीं. पैकीं १२ जणांनां १२ महाल वांटून दिले. तेव्हांपासून कच्छवाहांच्या १२ कोठड्या ( घराणी ) झाल्या. तो यात्रेस जात असतां त्याच्या भीमजी नांवाच्या मुलानें त्याचा खून केला. नंतर बहारमल्ल राजा झाला. यानेंच प्रथम मुसुलमानांची ( बाबरची ) अधिसत्ता कबूल केली. याला अंबरचा राजा ही पदवी व पंचहजारी हुमायूननें दिली. याचा पुत्र भगवानदास याची बहिण अकबरास व मुलगी जहांगिरास दिली होती. तिच्याच पोटीं खुश्रू झाला. रजपुत राजांनीं आपल्या कन्या मुसुलमानांस दिल्याचें प्रथम उदाहरण याच घराण्यानें ( बहारमल्ल व भगवान ) घालून दिलें. भगवान निपुत्रिक असल्यानें त्याचा पुतण्या मानसिंग हा राजा झाला. भगवान हा अकबराचा मित्र होता. मानसिंग हा मोंगली दरबारांत प्रख्यातीस आला; अकबर त्याला फार मान देई. हा त्याचा सेनापति असून यानेंच त्याच्या राज्याचा ( खोतान, काबूल, आसाम, ओरिसा, बंगाल, बहार वगैरे देश जिंकून ) विस्तार केला. बंगाल, बहार, दख्खन व काबूल येथील सुभेदाऱ्या यानें केल्या. पुढें यानें खुश्रु यास गादी मिळावी म्हणून मसलती केल्या त्यामुळें तो संकटांत सांपडला; परंतु त्याला उघड शिक्षा करतां येईना;कारण तो फार बलाढ्य होता पुढें बंगालच्या सुभेदारीवर असतांनां तो वारला ( १६१५ ). त्याच्या मागून त्याचा पुत्र भावसिंग उर्फ जगतसिंग व नातु महासिंग हे राजे झाले ( १६२० ). त्यानंतर मानसिंगाचा पुतण्या जयसिंग याला गादी देण्याबद्दल, जहांगिराजवळ जयपुरराजकन्या जोधाबाई हिनें रदबदली केली व तो राजा झाला. हा पहिल्यानें दाराच्या बाजूचा होता पुढें आयत्यावेळीं त्याला फसवून तो औरंगझेबास मिळाला. याला मिर्झा राजा म्हणत ( मिर्झा हा किताब फक्त राजपुत्रास लावीत असत ). औरंगझेबासाठीं त्यानें पुष्कळ मेहनत घेऊन त्याचें राज्य वाढविलें व औरंगझेबानेंहि त्याला बरीच बढती ( सहा हजारी मनसब ) दिली. शिवछत्रपतीचा पराभव करण्यासाठीं इतर सर्व सरदार थकल्यानें यालाच पाठविण्यांत आलें होतें. आग्र्याहून निसटण्याच्या शिवाजीच्या मसलतींत याचें अंग असावें, असा औरंगझेबास संशय आल्यानें त्याची याच्यावर गैरमर्जी झाली व त्यानें याला विषारी पोषाख पाठवून ( व कोणाच्या मतें याचा धाकटा मुलगा कीरतसिंग याला राज्याची आशा दाखवून त्याच्याकडून विषप्रयोग करवून) याचा प्राण बऱ्हाणपूर येथें घेतला. कीरतसिंगास ( वरील कामगिरीबद्दल ) औरंगझेबानें फक्त एकच महाल दिला. शिवाजीनें जयसिंहास औरंगझेबाविरुद्ध सर्व राजपुतांनां उठवून हिंदुधर्म राखण्याबद्दल परोपरीनें सांगितलें होतें; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. याच्यानंतर त्याचा पुत्र रामसिंग व त्याच्यामागून बिशनसिंग राजा झाला. यांच्या वेळीं कांहीं विशेष घडलें नाहीं.

सवाई जयसिंग हा फार विद्वान, शूर व हिंदूधर्माभिमानी होता. हा १६९९ त राजा झाला. त्यानें प्रथम दख्खनमध्यें औरंगझेबाची चाकरी केली. औरंगझेबानंतर बेदरबख्तास हा मिळाला. बेदरबख्त हा धोलपुरास १७०७मध्यें लढाईंत मेल्यावर बहादुरशहा गादीवर आला. त्यानें याचें राज्य जप्त करून त्यावर एक सुभेदार नेमला. परंतु यानें त्याचा पराभव करून राज्य सोडविलें आणि उदेपूर व जोधपूर यांच्याशीं मुसुलमानांविरुद्ध मैत्रीचा तह केला. हा कलाकौशल्य व शास्त्रें यांत (विशेषतः गणित व ज्योतिषांत ) निष्णात होता. त्यानें स्वतः ग्रहांचीं कोष्टकें तयार केलीं. त्यावरून हल्लीं पंचांगें तयार होतात. युक्लिडचीं मूलतत्वें व नेपीयरचें लागर्तम यांचीं त्यानें संस्कृतांत भाषांतरें केलीं. त्यानें अंबरहून राजधानी हलवून जयपूर वसवून तेथें नेली (१७२८ ). हें शहर साऱ्या हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें, एकाच नमुन्यावर सोंगट्यांच्या पटाप्रमाणें बांधलेलें असें आहे. तो शिल्पशास्त्रांतहि होता. त्यानें दिल्ली, जयपूर, काशी, मथुरा, उज्जनी वगैरे ठिकाणीं वेधशाळा बांधून स्वकल्पनेनें यंत्रें तयार करून तीं तेथें ठेवलीं व वेध घेतले.हे वेध त्यावेळीं अगदीं बरोबर उतरत. या सर्व वेधांची माहिती एकत्र करून त्यानें १७२८ त ग्रहांच्या सारण्या ( झैज महंमदशाही नांवाच्या ग्रंथांत ) तयार केल्या. लोकोपयोगी कृत्यें त्यानें पुष्कळ केलीं ( धर्मशाळा वगैरे ). महंमदशहानेंच साम्राज्यांतील सर्व पंचांगांचें शुद्धिकरण त्याच्याकडे सरकारीरीत्या सोंपविलें होतें.वेधशाळेंतील धातूंचीं यंत्रें झिजतात म्हणून त्यानें पाषाणाचीं व चुन्याचीं केलीं. जयप्रकाश, यंत्रसम्राट, भित्तीयंत्र, वृत्तषष्ठांश इ. इ. नवीं यंत्रें त्यानें स्वतः तयार केलीं. सिद्धांतसम्राट नांवाचा एक संस्कृत ग्रंथ तयार केला. यावेळीं (१७३१) यूरोपांत ग्रहगतीचे जे सूक्ष्म वेध घेत असत त्यांहिपेक्षां यानें जास्त सूक्ष्म वेध घेतले होते. सिद्धांतसम्राटांत वर्षमान सायन आहे. नयनसुखोपाध्याय याच्या-

कडून यानें कटर नांवाचा एक ग्रंथ (मूळच्या यूनानी भार्षेतून) भाषांतरीत करविला. सर्वत्र लढायाचा धुमाकूळ चालू असतां त्यानें आपलें राज्य वाढवून व जतन करून शेजारच्या सर्व राज्यांत उच्चतेस चढविलें. औरंगझेबाच्यानंतर दुर्बल राजे याला बराच मान देत असत. महंमदशहानें याला आग्रा व नंतर माळवा येथील सुभेदाराच्या दिल्या (१७२०–२२). औरंगझेबानें बसविलेला जझिया यानें यावेळीं उठवून जाटांचा बंदोबस्त केला. हा माळव्यावर पुनः (१७३२) सुभेदार नेमून आला. तेव्हां मोंगली राज्यांत सारी अव्यवस्था झाली होती. ती पाहून व सर्व हिंदूंनीं मुसुलमानांविरुद्ध एकवटून हिंदूपदपातशाही स्थापन करावी या अंतस्थ हेतूनें त्यानें (बाह्यतः मराठ्यांविरुद्ध लढून निभावणूक होणार नाहीं. म्हणून महंमदशहाची समजूत घालून त्याच्या अनुज्ञेनें) थोरल्या बाजीरावाशीं तह करून मराठ्यांच्या साम्राज्याकांक्षेस वाव करून दिला. त्यानेंच १७३४ त माळवा मराठ्यांच्या हवालीं (पातशहाकडून) करविला. तो असें न करतां तर मराठ्यांची धाड खुद्द दिल्लीवर जाती. याप्रमाणें धोरणानें व शहाणपणानें यानें ४० वर्षे राज्य करून तो १७३४ त वारला. टॉड म्हणतो कीं जयसिंगाबरोबर शास्त्रांचा लय झाला.

नंतर याच्या इसरीसिंग व माधवसिंग या दोन पुत्रांत तंटे लागून माधवसिंग यानें होळकरांच्या साह्यानें (होळकरांस रामपुरा, भानपुरा व टोंकरामपुरा हे प्रांत आणि ८४ लक्ष रुपये खंडणी देऊन) गादी मिळविली. तो उदेपुर राजकन्येचा पुत्र असल्यानें उदेपुरकरानेंहि त्यास मदत दिली होती. त्यानें जाटांवर स्वाऱ्या करून त्यांचा पराभव केला. मात्र या लढायांत त्याचे कर्ते सरदार मारले गेले. शेवटीं तोहि थोड्याच दिवसांत वारला. बापाच्या खालोखाल हाहि विद्वान व विद्वानांचा आश्रयदाता होता; यानेंहि कांहीं नवीन शहरें वसविलीं; त्यात रणथंबोर जवळील मधुपुर हें प्रमुख होय; यानें १७ वर्षे राज्य केलें. त्याच्यामागून दुसरा पृथ्वीसिंग गादीवर आला; परंतु हा अज्ञान असल्यामुळें त्याची सावत्र आई कारभार पाहत होती. ती फार वाईट चालीची असून तिचा एक उपपति (टॉड; पु. २ पृ. ४१२) फिरोझ नांवाचा माहुत होता; त्याच्या तंत्रानें ती वागे; तिनें नऊ वर्षे बदफैलीपणा केला. शेवटीं पृथ्वीसिंग हा वारला (कोणी म्हणतात तिनें विषप्रयोग केला). त्याला मानसिंग म्हणून पुत्र होता. त्याला त्याच्या आप्तांनीं पळवून शिंद्यांच्या आश्रयास ठेविलें.

पृथ्वीनंतर त्याचा सावत्र भाऊ प्रताप हा राजा झाला. त्यानें १५ वर्षे राज्य केलें. याच्या वेळीं याची जारिणी आई व तो माहुत यांना कोणी विषप्रयोग करून त्यांच्या त्रासांतून रयतेस सोडविलें. इतक्यांत मराठ्यांचे हल्ले सुरू झाले. तेव्हां यानें जोधपुरच्या विजयसिंगाच्या मदतीनें मराठ्यांशीं तोंड देऊन त्यांना कांहीं काळ थोपविलें (१७८७–९१); पण पुढें मराठ्यांनीं १७९१ त त्याचा पाटण व मैर्थ येथें पराभव केला व तिकडे याचें व जोधपुरकरांचेंहि बिनसलें. तेव्हां होळकरानें त्याच्यावर जबर खंडणी बसवून कांहीं दिवसांनीं ती वसूल करण्याचें काम अमीरखान पठाणावर सोंपविलें. तेव्हांपासून १८०३ पर्यंत केव्हां शिंदे तर केव्हां दुसरा कोणी येऊन याचा प्रांत लुटून फस्त करीत. हा शूर व शहाणाहि होता. परंतु त्याचा या धामधुमीच्या काळीं कांहीं इलाज चालला नाहीं. तो १८०३ त वारला.

याच्यामागून त्याचा पुत्र जगत्सिंग गादीवर आला. याच्या सारखा दुर्व्यसनी राजा या कुलांत कोणी झाला नाहीं. हा भित्रा, व्यभिचारी व उधळ्या होता. उदेपुरच्या कृष्णाकुमारी ला मिळविण्याकरितां यानें अमीरखानाची योजना करून सर्व राजपुतान्यांत धुमाकूळ उडवून दिला होता. इंग्रजांचा संबंध जयपूर राज्याशीं याच्याच वेळीं आला; परस्परांनीं परस्परांस सहाय्य करावें अशा स्वरूपाचा एक तह यावेळीं झाला (१८०३). पुढें कॉर्नवालीस यानें हा तह केला व इंग्रजांचें वर्तन इवें तसें न दिसल्यानें जगत्सिंगानेंहि तह मोडला. परंतु कंपनीच्या डायरेक्टरास कॉर्नवालीसचें हें करणें पसंत न पडून पूर्ववत् तह करण्याचा त्यांनीं हुकूम सोडला. तेव्हां पेंढाऱ्यांच्या पारिपायासाठीं सर्व राजेरजवाड्यांशीं तहाचें प्रकरण सुरू झालें. त्यावेळीं (१८१७) जयपुरवाल्यांशीं बोलणें लागलें; परंतु राजानें तें नाकारलें. शेवटीं शेजारच्या राजांनीं इंग्रजांशीं स्वतंत्र तह केले, राज्यास निरनिराळ्या अडचणी येऊं लागल्या व अमीरखानाचा उपसर्ग जास्त वाढूं लागला. स्वतःच्या जहागिरदारानींहि परभारें इंग्रजांशीं संधान बांधलें हें पाहून, जगतनें कंपनीशीं तह केला (२।४।१८१८). त्यांत असें ठरलें कीं इंग्रजानें राज्याचें रक्षण करावें, त्याबद्दल राजानें कंपनीच्या मदतीस फौज द्यावी. राज्याचा वसूल ४० लक्ष होईपर्यंत दरसाल ८ लाख खंडणी द्यावी, व ४० लाखांवर वसूल आला, म्हणजे एकंदर उत्पन्नापैकीं पांच आणे (सदर खंडणीशिवाय) वर्षास द्यावे. या सुमारास जयपुरच्या कांहीं सरदार जहागिरदारांनीं राज्यांतील बराचसा मुलूख बळकाविला होता. तो ऑक्टरलोनी यानें त्यांची समजूत करून सोडविला; व त्यांच्या जहागिरी वंशपरंपरा चालण्याबद्दल कंपनी जबाबदार राहिली. यानंतर जगत्सिंग हा लवकरच (डिसेंबर १८१८) वारला. त्याला त्यावेळीं संतती नव्हती. प्रेताला अग्निसंस्कार एका मोहनसिंग नांवाच्या भाऊबंदानें दिला. पुढें त्यालाच दत्तक घेण्याचें ठरत होतें; पण त्यामुळें गृहकलह माजला. इतक्यांत त एक राणी गरोदर असल्याचें समजलें व त्यामुळें दत्तकाची भानगड मिटली. जगत्सिंगाची ही राणी २५।४।१८१९ रोजीं प्रसूत होऊन मुलगा झाला; याचें नांव जयसिंग होय.

जयसिंग (तिसरा) लहान असतां, त्याची आई कारभार पाहूं लागली; परंतु त्यामुळें अव्यवस्था माजली. तेव्हां आपली खंडणी वेळेवर यावी व नुकसान होऊं नये म्हणून

कंपनीनें आपला एक अधिकारी जयपुरास नेमून त्यानें राज्यकारभार ताब्यांत घ्यावा असें ठरविलें. पुढें (१८३४–३५) शेखावती प्रांताची व्यवस्था लावण्याच्या निमित्तानें इंग्रजांनीं आपली फौज तेथें ठेविली व तिच्या खर्चाचा पैसा म्हणून सांबरसरोवराच्या उत्पन्नांतील जयपुरचा हिस्सा तारण लावून घेतला. या गडबडींत जयसिंग वारला (१८३५). राजाचा कोणी जीव घेतला असावा असें म्हणतात. जोध (जूठा) राम नांवाचा दिवाण व राजमाता यांचें सूत्र जमून, तिच्या कृपेनें तो इतका अधिकार चालवूं लागला कीं, ब्रिटिश सरकारनें नेमलेल्या कारभाऱ्यास दूर करून आपण त्या पदावर बसला. तेव्हां कंपनीनें एक अधिकारी चौकशीस पाठविला. जयसिंग वारला तेव्हां त्याला दीड वर्षांचा एक मुलगा होता. तो कंपनीच्या अधिकाऱ्यानें ताब्यांत घेतला. यावेळीं एजंट (अधिकारी) याचा खून करण्याचा कट जोधरामानें केला; तेव्हां त्याला जन्मभर कैदेंत टाकण्यांत आलें. राज्यांतील पांच प्रमुख लोक निवडून त्यांचें कौन्सिल (व त्यांचा मुख्य इंग्रजांचा एजंट) नेमून राज्यकारभार चालविला. याचवेळीं संस्थानांतील लष्कर कमी करून, गुलामगिरी, सती, बालहत्या वगैरे बंद केल्या. इंग्रजसरकारास जी खंडणी द्यावी लागे, ती संस्थानच्या जमाबंदीच्या मानानें जबर असल्यानें व मागील बाकी तुंबली म्हणून ४६ लाखांची सूट घालून दरसाल चार लक्षांची खंडणी ठरविली (१८४२).

जयसिंगाच्या मागून सवाई रामसिंग हा गादीवर बसला. यानें १८५७ सालीं इंग्रजांस सात हजार सैन्यानिशीं मदत केल्यामुळें त्यांनीं त्यास कोट कासिम प्रांत इनाम दिला. हा विद्वान् होता. यानें सडका व आगगाड्या सुरू करून संस्थानांत सर्वत्र शाळा स्थापिल्या. एकदां (१८६८) राजपुतान्यांत दुष्काळ पडला असतां यानें आयात धान्यावरील जकात उठविली व दुष्काळनिवारणाचे पुष्कळ प्रयत्न केले. हा सन १८६९–१८७५ पर्यंत हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलचा सभासद होता.

याच्यानंतर सवाई माधवसिंग हे राजे झाले (१८८०). यांचा जन्म १८६१ त झाला. यांच्या लहानपणीं कौन्सिलतर्फे राज्यकारभार चालत होता. यानां १८८२ त मुखत्यारी दिली. यानां २१ तोफांच्या सलामीचा मान व जी. सी. एस्. आय; जी. सी. व्ही. ओ; एल्. एल्. डी. वगैरे पदव्या असून, हे १९२१सालीं ब्रिटिश सैन्यांतल्या जनरलच्या अधिकारावर नेमले गेले. यांनीं राज्यकारभारासाठीं १० जणांचें एक कौन्सिल नेमलेलें आहे. हल्लीं ६ हजारांपर्यंत सैन्य संस्थानांत आहे. येथील सैन्यानें चित्रळ (१८९५), टिरा (१८९७) व गेलें यूरोपांतील महायुद्ध, यावेळीं इंग्रजसरकारांस पुष्कळ साहाय्य केलें. महाराजांनीं दुष्काळफंड २५ लाख व इतर धार्मिकफंड ४८ लाख व महायुद्धांत इंग्रजसरकारास मदत म्हणून ३३ लाख इतकी रक्कम वांटली आहे. (शिवाय २५ लाखांचे कर्जरोखे घेतले होते.) या महाराजांनीं स. १९२१ मध्यें कुमार मानसिंह यास दत्तक घेतलें. महाराजांनीं आपल्या राज्यांत सडका, पाटबंधारे, आगगाड्या, दवाखाने, दुष्काळ कामें वगैरे कामांवर १कोटी ७२ लाख रु.खर्च केले.व स.१९११त प्रजेला ५० लक्ष रु.ची (साऱ्याची) सूट दिली. [टॉड—राजस्थान, पु. २; एतद्देशीय राजांचा इतिहास, गोडबोलेकृत; इंडिया गव्हर्मेंट सिलेक्शन रिपोर्ट्स पु. ५५; इंडियन इयरबुक १९२२

श ह र.—हें शहर जयपुर संस्थानाची राजधानी असून मुंबईपासून ६९९ मैल दूर आहे. हें सर्व राजपुतान्यांत मोठें व सुंदर आहे. ह्या शहराला हें नांव सवाई जयसिंगाच्या नांवावरून १७२८ सालीं मिळालें. हें शहर एका लहान मैदानावर आहे व भोंवतालीं (दक्षिण दिशेखेरीज) पर्वत असून महत्त्वाच्या माऱ्यांच्या ठिकाणीं किल्ले बांधलेले आहेत. ह्या सर्व किल्ल्यांत नाहरगड नांवाचा किल्ला महत्त्वाचा आहे व तो वायव्य दिशेस आहे शहराभोंवतीं मोठा तट असून त्याला सात वेशी आहेत व ठिकठिकाणीं तोफांकरितां बुरुज बांधलेले आहेत. हें शहर सुंदर रस्ते व व इमारती यांबद्दल फार प्रसिद्ध आहे. येथील रस्ते सारख्या आकाराचे असून ठिकठिकाणीं चौक आहेत. शहराच्या मध्यभागीं महाराजांचा राजवाडा आहे व वाड्याभोंवतालीं सुंदर बागबगीचे आहेत. राजवाड्याच्या उत्तरेस ताल कटोरा नांवाचा तलाव व ह्या तलावाच्या पलीकडे राजा मालका नांवाचा दुसरा तलाव आहे. ह्या शहरांत विशेष पहाण्यासारखी इमारत म्हटली म्हणजे सवाईजयसिंगानें बांधलेली वेधशाळा व येथील वेधयंत्रें होत. शहरास पाण्याचा पुरवठा चांगला आहे. शहरास म्युनिसिपालिटी आहे. ह्या शहरांतल्या कला व उद्योगधंदे म्हटले म्हणजे कपड्यांस रंग देणें, संगमरवरी दगडावर काम करणें, सोन्याच्या मुलाम्याचें काम करणें, चित्रें काढणें वगैरे, ह्या शहराची व्यापारी पेढ्यांबद्दल ख्याति आहे. शहरांत शिक्षणसंस्था पुष्कळ आहेत. महाराजा कॉलेज, ओरिएन्टल कॉलेज व संस्कृत कॉलेज हीं तीन कॉलेजें आहेत. शहरांत दवाखाने व इस्पितळें पुष्कळ आहेत. रामनिवास नांवाच्या सार्वजनिक उद्यानामध्यें हाल नांवाची इमारत आहे;व तीमध्यें औद्योगिक वस्तूंचें व शिक्षणविषयक नमून्याचें पदार्थसंग्रहालय आहे.

**जयमल्ल**—अकबरानें चितोडवर १५६७ त स्वारी केली असतां चितोडचा किल्ला लढविण्याचें काम या जयमल्लाकडे राणा उदयसिंगानें सोंपविलें होतें. हा वेदनोर येथील ठाकोर असून राठोड वंशांतील मैर्त्य शाखेचा होता. ही शाखा मारवाडांत सर्वांत शूर गणली जाई. जयमल्ल हा स्वारींत चितोडचा सेनापति होता. त्याच्या हाताखालीं हजार लोक होते; परंतु अकबराचें सैन्य अफाट व त्याच्याजवळ तोफखाना असल्यानें शेवटीं त्याचा जय झाला. चैत्र शुद्ध ११ संवत १६२४ (मे. १५६८) या दिवशीं घनघोर संग्राम झाला. जयमल्लानें आपल्या लढण्याची शिकस्त केली. अखे-

रीस अकबरानें स्वतः आपल्या संग्राम नांवाच्या बंदुकीनें नेम धरून जयमल्लास गोळीनें ठार केलें. चितोड येथें जोहार झाला व मग भग्न किल्ला अकबराच्या हातीं पडला. यावेळीं झालेल्या युद्धाचें व जयमल्ल आणि पुत्त ( दुसरा सेनापति ) यांनीं केलेल्या शौर्याचें वर्णन भाटांच्या काव्यांत आढळतें. साऱ्या राजपुतान्यांत या दोघांचीं नांवें माहीत नाहीं असा एकहि रजपूत आढळावयाचा नाहीं. खास अकबरानेंहि जयमल्लाची स्तुति केली होती. त्यानें दिल्लीस आपल्या राजवाड्याच्या महाद्वाराजवळ दोन हत्तिवर जयमल्ल व पुत्त यांचे पुतळे करून बसविले होते; ते बर्निअर याच्या वेळेपर्यंत होते. त्यानें त्याबद्दलचें वर्णन आपल्या १६६३ च्या जुलैच्या एका पत्रांत केलें आहे. चितोड येथें जयमल्ल जेथें पडला ती जागा अद्यापि दाखविण्यांत येते. टॉडनें त्या जागेवर फुलें वाहिलीं होतीं असें तो म्हणतो. टॉड– राजस्थान बु. १; मुसुलमानी रियासत; बील—ओरि बायाग्रा. डिक्शनरी ]

**जयरथ शृंगार**—काश्मीर प्रांतांतील तत्त्ववेत्ता. जयरथ शृंगार अथवा शृंगाररथ हा इ. स. १२०० च्या सुमारास उदयास आला. अभिनव गुप्ताच्या " तंत्रालोक " नांवाच्या ग्रंथावर त्यानें " तंत्रालोकविवेक " नांवाची टीका लिहिली. त्याचा भाऊ जयद्रथ यानें रुय्यकाच्या अलंकारसर्वस्वावर " अलंकारविमर्षिणी " नांवाची टीका लिहिली व " हरचरितचिंतामणि " या नांवाचा आणखी एक ग्रंथ लिहिला.

**जयरामस्वामी**—( वडगांवकर ) एक महाराष्ट्र संतकवि. हा कात्राबाज मांडवगणाच्या देशपांडे कुळांतला असून याचें उपनांव कसरे असें होतें. जन्मतीथ शके १५२१ ची गोकुळाष्टमी. कृष्णा आप्पास्वामी याचे गुरु होते. दशमस्कंध टीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर व अपरोक्षानुभव हे जयरामस्वामींचे मुख्य ग्रंथ होत. यांखेरीज लहान लहान वेदांतप्रकरणें, अभंग व पदें पुष्कळ आहेत. समाधिकाळ भाद्रपद व॥ ११ शके १५९४.

**जयरामात्मज**—एक महाराष्ट्र संतकवि. हा गोसावी नंदनाच्या मागाहून होऊन गेला. यानें कोकिळगंगाधर, राघव चिद्घन, श्रीधर, अनंत, यांचा आपले संतमालिकेंत उल्लेख केलेला आहे. संतमालिका, द्रौपदीचा धांवा, घडियाळें, अंबेची आरती, रासमंडळ, वगैरे ग्रंथ आहेत. [ सं. क. का. सू. ]

**जयविजय**—विष्णूचे उभय द्वारपाल. हे सनकादिकांच्या शापानें वैकुंठांतून पतन पावून असुरयोनींत आले होते. हिरण्याक्ष, हिरण्यकश्यप, रावण, कुंभकर्ण व शिशुपाल, वक्रदंत हीं रूपें यांनींच धारण केलीं होतीं. [ भागवत ३. १६–१०; १०. ७४ ]

**जयसिंह** ( सिद्धराज )—एक गुजराथचा राजा. याची माहिती ज्ञा. को. च्या १२ व्या विभागांत गुजराथ प्रांत पृ. १३७ वर आलेली आहे. त्याशिवाय जास्त माहिती येथें देतों. हा याच्या बापास लक्ष्मीच्या वरदानानें झाला होता. यानें श्रीस्थल ( सिद्धपुर ) तीर्थाच्या रक्षणासाठीं बर्बरक यवनाला कैद केलें. पण त्याची बायको पिंगलिका हिच्या विनंतीवरून खंडणी घेऊन त्यास सोडून दिलें. जयसिंहानें पाटलदेशचा ( भोगावती शहराचा ) नागराजा कनकचूड यास सहाय्य करून त्याजपासून अजिंक्यतेचा वर मिळविला. माळव्यावरील स्वारींत त्याला एका भिल्लराजानें पर्वतांतलि रस्ते दाखविले होते. तिकडून परत येतांना त्यानें बऱ्याच राजकन्यांशीं लग्नें लाविलीं. सिद्धपुरास रुद्रमाळेशिवाय एक महावीरस्वामींचें देऊळहि त्यानें बांधिलें. तेथून तो सोमनाथ, गिरनार व सिंहपुर ( सिहोर ) येथील यात्रा करून पट्टणास परतला. त्यानें पुष्कळ तळीं, विहिरी, मंदिरें, बगीचे सदावर्तें, ज्योतिष न्याय-पुराणादिकांच्या अभ्यासासाठीं शाळा वगैरे स्थापन केल्या. त्यानें चंडिकादेवीचीं १०८ देवळें बांधिलीं. याचें वर्णन द्व्याश्रय या काव्यांत बरेंच आलें आहे. [ रासमाला, पु, १; इंडियन अँटिक्वरी, १८७५ ]

**जर उतणें** ( हर्पीस )—त्वचेखालीं मज्जातंतूंत अगर मज्जापेशींच्या समूहामध्यें विकृति उत्पन्न होऊन त्यावरील त्वचेवर लहान मोठ्या दाणेदार पुटकुळयांचे समूह अगर सुट्या पुटकुळया उत्पन्न होणें हें या रोगाचें लक्षण आहे. या पुटकुळयांत चिकट व पाण्यासारखी लस असून त्या अतिवेदनायुक्त असतात. या पुटकुळया फुटतात अगर सुकून खपल्या पडून जातात. याचे दोन भेद पहाण्यांत येतात ते असेः—( १ ) ओंठ अगर नाकाच्या ठिकाणचा— एखादा मोठा तीव्र ज्वर अगर पुप्फुसाचें दुखणें किंवा बळकट सर्दीचें दुखणें येऊन गेल्यावर वरील ठिकाणीं पुटकुळया दिसून नंतर त्या बऱ्या होतात. ( २ ) शारीरिक जर--पानांत शिरा असतात त्याप्रमाणें त्वचेखालीं शाखायुक्त संवेदन मज्जातंतु शरीरभर असतात. यांपैकीं एखादा मज्जातंतू व त्यांच्या शाखा याच्या अनुरोधानें अशा पुटकुळया उठणें हा दुसरा प्रकार छाती, हात, पाय व अन्य ठिकाणीं पहाण्यांत येतो. हें दुखणें सर्व वयाच्या माणसांना झालेलें आढळतें. तरी उतार वयांत होण्याचा संभव जास्त असतो. त्या उगवण्याच्या अगोदर कांहीं दिवस नांगी मारल्यामुळें त्या जागीं अगोदर वेदना होतात, व त्या पुटकुळया उगवल्यावर असतात यांत नवल नाहीं; परंतु पुटकुळया बऱ्या झाल्यावरहि कांहीं दिवस त्या वेदनांमुळें फार त्रास होतो. पुनः पुनः मात्र हा रोग उलटून त्रास होत नाहीं.

उ प चा र.— पुटकुळयांस धक्का, हवा लागून वेदना होऊं नये एतदर्थ त्यावर बोरिक आसिड व झिंक ऑक्साईड यांच्या समभाग मिश्रणाच्या भुकटीचा शिडकाव टाकावा. अगर त्या भुकटीचें मलम मऊ फडक्यावर पसरून ती पट्टी पुटकुळयांवर लावून त्यावर मऊ कापसाची घडी ठेवून पटयानें तें सर्व न पडेल असें बांधून ठेवावें. व रोज पट्टी व पुड नवी टाकून बदलीत जावी. एखाद्या वेळीं वेदना असह्य

वाटल्यास पोटांत अफू अगर पोटयाशियम ब्रोमाइड हीं औषधें द्यावींत व मज्जातंतूस व शरीरास हितावह व पौष्टिक म्हणून कोयनेल अल्प प्रमाणांत द्यावें.

**जरतार**—सोनें हें जसें फार प्राचीन काळापासून लोकांस माहीत होतें त्याच प्रमाणें कलाबतूची कलाहि लोकांस माहिती असावी. निदान ती प्राचीन आर्यांस तरी माहीत असावी याबद्दल शंका रहात नाहीं. ऋग्वेदांत ( १०.१५५, ६ ) 'हिरण्मयानत्कान्' असा सोनेरी वस्त्रासंबंधीं उल्लेख आहे. तसेंच व 'पेशस्कारी' म्हणजे जरीची वेलबुट्टी काढणारी स्त्री असा यजुर्वेदांत उल्लेख आढळून येतो. सायण मतानें मरुत् म्हणजे सोनेरी वेलबुट्टी काढलेलें वस्त्र वापरीत. ऋग्वेदांत पेशस्, पेशन या जरतारी वस्त्रांचा उल्लेख आढळतो हे ( ऋ २. ३, ६ १०. १, ६ ). शुक्रनीतिकारांनीं कलाबतूची कला ही चौसष्ट कलेंत गणली आहे. अर्थात् ही त्या वेळीं फारच प्रचारांत होती. त्यांतील कला या शब्दाचा अर्थ त्याप्रमाणेंच केला आहे व त्यावरून कलाबतु हा शब्द संस्कृतोद्भव असावी याबद्दल संशय रहात नाहीं. कारण कला म्हणजे 'कृत्रिम स्वर्णरजतक्रिया लेपादि सत्क्रियः' (शुक्रनीति) सोनें रुपें तयार करणें अगर खरें सोनें रुपें हलक्या धातूवर चढविणें अगर त्याचा थर देणें या क्रियेस कला असें म्हणतात.

यानंतर रुद्रयामल तन्त्रांत धातुकल्पामध्यें या कलेचें सविस्तर वर्णन आलें आहे. या ग्रंथाच्या कालनिर्णयासंबंधीं निश्चित मत सांगतां येत नाहीं. महाभारत काळींहि कला पूर्ण अवगत असावी. कारण राजसूय यज्ञाच्या वेळीं युधिष्ठिराला चहूंकडून करभार आले त्यांत काम्बोजाच्या राजानें अनेक दासी युधिष्ठिराला नजर केल्या आहेत. त्या दासी जरीचीं वस्त्रे नेसलेल्या होत्या असा स्पष्ट उल्लेख आहे.

और्णान्बैलान्वार्षदन्ताञ्जातरूपपरिष्कृतान् ।
प्रावाराजिन मुख्यांच कंबोजः प्रददौ महान्॥

महाभारताचा रचनाकाल चिंतामणराव वैद्यांच्या मतानें इ. स. पू. २०० वर्षांचा आहे. व प्रत्यक्ष राजसूय यज्ञाचा काल ख्रिस्तपूर्व २००० वर्षांपर्यंत जातो तरी ऐतिहासिक रीत्या या कलेच्या उगमाचा काल निदान ख्रि. पू. २००० वर्षे म्हणतां येईल.

संस्कृतेतर वाङ्मयांत इतका जुना उल्लेख कोठेंहि असलेला ऐकिवांत नाहीं. व म्हणूनच पुष्कळ पाश्चात्य विद्वानांच्या मतें ही कला हिंदुस्थानांत उगम पावली व पश्चिम मार्गानुवर्ती होऊन बाबीलोन, टायर, बगदाद, दमास्कस, सैप्रस सिसली, कान्स्टांटिनोपल, व्हेनिस वगैरे शहरांतून क्रमाक्रमानें जाऊन फ्रान्समध्यें लियान्स व जर्मनीमध्यें न्युरेनबर्गपावेतों पसरली.

आपल्याकडे पुराणकालानंतरचा इतिहास चांगलासा उपलब्ध नाहीं व या कलेची प्रगति कसकशी होत गेली याबद्दल सविस्तर माहिती सांपडणें फारच कठिण होऊन गेलें आहे. तरी पण सुमारें ८ व्या अगर ९ व्या शतकापासून अगर त्यापूर्वीपासून उत्तरेंत बनारस व दक्षिणेंत पैठण हीं शहरें या धंद्याच्या कारागिरीबद्दल प्रसिद्ध आहेत. हीं शहरें त्यावेळीं चोहोंबाजूनें पुढें असत. व्यापार म्हणा अगर विद्वत्ता म्हणा या दोहोंमध्यें या शहरांचा हात धरण्यास सबंध हिंदुस्थानांत एकहि शहर नव्हतें.

मुसुलमानी रियासतींत या शहरांनां बरेंच गौणत्व प्राप्त झालें; तरी पण मुसुलमानी पातशहा हे विलासी व ऐषआरामी असल्यामुळें या कलेस उत्तेजनच मिळालें; व निरनिराळ्या जास्त पेठा बसूं लागल्या. उत्तरेस दिल्ली, लखनौ, कानपूर, बऱ्हाणपूर इत्यादि व दक्षिणेस बीड, जालना, पैठण, येवला व खालीं सालेम, मदुरा व मद्रास वगैरे.

पाश्चात्त्य ग्रंथकारांच्या मतें सर्वांत जुना असा कलाबतूसंबंधीं निर्देश त्यांच्या 'जुना करार' नामक धार्मिक ग्रंथांत आढळून येतो. अरान नांवाच्या धर्मोपदेशकाच्या झग्याला जरतार होती. ती अशी कीं त्यांनीं सोन्याच्या तारा ठोकून तयार केल्या आणि नंतर चपटया केल्या. अशा त्या तार निळ्या व अस्मानी धाग्यावरती फारच कुशलतेनें वळल्या होत्या. ग्रीक लोकांच्या ईलीयड व ओडेसी नांवाच्या पुराणग्रंथांत जरतारीच्या कपड्याचा उल्लेख वरचेवर येतो. त्यांच्या पौराणिक युगांत हातोड्यांनीं अगर मठारीनें सोनें ठोकून तार चपटया करीत असावेत; व त्या मग रेशीम अगर सूत यावर गुंडाळीत असावेत.

असीरिया अगर असुर राष्ट्रांतील मोठमोठ्या राजांपैकीं असुर नझिरपाल ( ख्रि. पू. ८८४ ) याच्या झग्यास कलाबतूचें फारच सुंदर काम केलें होतें. यावरून त्यावेळच्या असुरी राष्ट्रांत अगर बाबिलोनिया राष्ट्रांत ही कला बरीच ऊर्जितावस्थेत आली होती असें दिसतें. असुरी राष्ट्राचा बीमोड झाल्यावर त्यांच्या जेत्याकडे म्हणजे इराणी राष्ट्राकडे या कलेचें पुरस्कर्तृत्व आलें. त्यांनीं या कारागिरीचा फारच उत्कृष्ट रीतीनें समाचार घेतला. व त्या कलेस पुढें आणलें. इराणचा प्रख्यात बादशहा डरायस हा नेहमीं भरजरीचा झगा घालीत असे. या झग्यावर जरीचें भरतकाम केलें होतें व दोन पक्षी एकमेकांशीं झुंजत आहेत असें दाखविलें होतें. महाप्रतापी शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आला त्यावेळीं त्यास सर्व पौरस्त्य राजे भरजरीच्या झग्यामध्यें आढळले असें वर्णन आहे. आलेक्झांडरनंतर दोन शतकांनीं परगाममचा राजा तिसरा अत्लुन्स यानें सोनेरी कलाबतूनें विणण्याच्या कलेला फारच उत्तेजन दिलें; असें प्लीनीनें लिहिलें आहे. व हेंच तें इतिहासप्रसिद्ध आटालिक कापड. रोमन लोकांच्या ग्रंथांतरीहि याचा बराच उल्लेख सांपडतो. आग्रिपिनाचीं विख्यात वस्त्रें सर्वस्वी भरगच्चीचीं होतीं. आणि हायड्रिअन बादशहाच्या संग्रहित वस्तूंमध्यें मार्केस आरकेस यास पुष्कळ झगे जरीचेच दिसून आले.

ईजिप्त व बाबिलोनियाच्या भागांत सध्यां जें उत्खनन चालू आहे त्यांत कांहीं कांहीं ठिकाणीं जरीच्या पोषाखांतील अवशिष्ट अशा चांदी सोन्याच्या तारा सांपडल्या आहेत. होनोरियसच्या बायकोचें थडगें उकरलें त्यावेळीं जरतारीचे अवशेष अशा तारा सापडल्या व त्या सर्व आटवून त्यांतून ३६ पौंड सोनें निघालें.

यूरोपांतील मध्ययुगांत कान्स्टांटिनोपल व पालेर्मो येथील विणकर जरतारीचें काम करीत असत; त्यानंतर स्पेनमधील मूर लोकांनीं ही कला उचलली. १२ व्या शतकांत या लोकांत जरीचा फारच प्रसार झाला होता. त्यानंतर सायप्रसमध्यें फारच मोठ्या प्रमाणांत जरतार तयार होऊं लागली. बहुतेक व्यापारी सायप्रसमधील जर पसंत करूं लागले व सायप्रसचा व्यापार फारच जोरानें वाढूं लागला. त्यानंतर हळू हळू इटालींतहि कारखाने निघूं लागले व १४ व्या शतकांत व पुढें इटालीच्या या क्षेत्रांत फारच प्राबल्य वाढलें.

याच सुमारास जर्मनीमध्यें न्युरेनबर्ग शहरीं कलाबतूचे कारखाने निघूं लागले व जन्त्रांतून तार ओढणें वगैरे गोष्टींत त्यांनीं बरीच प्रगति केली. पश्चिमेकडील या कलेंत स्थित्यंतरें घडवून आणण्यांत न्युरेनबर्ग व लिआन्स हीं दोन शहरें फार विख्यात आहेत. जंत्र म्हणजे अस्सल पोलादी पट्टींत छेद करून त्यांतून तार ओढून बारीक करण्याच्या कृतीचा शोध न्यूरेन्बर्गनिवासी कारागिराकडून १४ व्या शतकांत लावला गेला असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

कृ ति व प्र का र.—जरतार म्हणजे काय, ती कशाची करतात यासंबंधानें आपणांस आतां विचार करणें आहे शुक्रनीतिकारानें सांगितल्याप्रमाणें हलक्या धातूंवर सोनें अगर रुपें अगर चांदी याचे थर बसवून ती तार रेशीम अगर सूत यावर गुंडाळणें. अशा रीतीनें गुंडाळलेली तार ती जरतार होय. आतां यांत दोन प्रकार करता येतील. एक खरी व एक खोटी.

खरी—जिच्यामध्यें चांदीवर सोनें चढविलेलें असतें ती. ही चांदीवर सोनें चढविलेली तार रेशमावर अगर सुतावर गुंडाळलेली असते. हिचा उपयोग व्यवहारांत जास्त होतो. ही बहुधा काळी पडत नाहीं. ही तार जाळल्यावर पांढरी पडते. ही तिची कसोटी आहे. स्लेटपाटीवर घासल्यास कस पांढरा दिसतो.

खोटी—तांबें, लोखंड, जर्मनसिल्व्हर, पितळ, इत्यादि धातूंच्या तारेवर चांदी अगर सोनें चढवून तयार केलें असतें ती सर्व खोटी होय. ही फार लवकरच काळी पडते. जाळली असतांना ही तार काळी पडते. स्लेटपाटीवर घासली असतां या जातीच्या जरतारीचा कस लाल दिसतो व खऱ्याचा पांढरा दिसतो.

कृतिः—५० भार चांदी घेऊन (कांहीं कांहीं ठिकाणीं ज्यास्तहि घेतात ) तिच्या साधारण अर्धा इंची जाड व फूटभर लांब गोल लगडया पाडतात; त्या गोल करून कानस मारून अतिशय स्वच्छ करतात व त्यांवर ज्या प्रमाणांत आपणास जरतार हलकी अगर भारी करावयाचा असेल त्या प्रमाणांत सोन्याचा पातळ पत्रा गुंडाळतात. हा पत्रा वेष्टिल्यानंतर त्यास ताव देतात नंतर त्या लगडया हातोडीनें ठोकून एकजीव करतात व पुन्हां निवाल्यावर पुना तापवितात व पुन्हां हातोड्यानें लांबवितात. अशा रीतीनें दोनदां अगर तीनदां तापवून एकजीव झाल्यानंतर लोखंडी वेजांतून ओढून लांबवितात. प्रथम जाड मग बारीक मग त्याच्या पेक्षां बारीक असें क्रमाक्रमानें साधारण बारीक करतात हें सर्व काम पावटेकरी आपल्या दुकानांत करतात. पावटा म्हणजे एक भरीव लांकडाचा रहाट असतो. यास चार हात अगर मोठाले दांडे असतात. त्यापैकीं एका हातास लोखंडी साखळदंड अडकविलेला असतो. या साखळदंडास एक मोठा चिमटा बसविलेला असतो. या चिमटयानें वरील लगड्या धरून त्या लोखंडी वेजांतून ओढून काढतात. अशा रीतीनें बारीक सुतळीइतकी तार बारीक झाल्यावर या ५० भार तारेचे दोन भाग करितात या ५० भारास पासा (सं. पाशम्) म्हणतात या पाशाचे दोन भाग करतात. प्रत्येकास वाकळें असें म्हणतात.

हीं वाकळीं यापुढें दुसऱ्या जातीच्या कारागिराच्या हातांत जातात. या कारागीरांना तानीये (सं. तन् ताणणें) असें म्हणतात. या तानीयांचीं हत्यारें म्हणजे एक घडवंची ( खोडसे अगर पाड ) त्यावर दोन बाजूस दोन खिळे असतात व दोन खिळयांत दोन वाटोळीं परडीं असतात या दोहोंच्या मध्यंतरीं दोन लोखंडी पट्या असून त्या पट्यांस बारीक बारीक भोंके पाडलेलीं असतात. या भोंकांतून तार ओढून बारीक करितात. हीं भोंकें असणारी पट्टी अस्सल पोलादी असते. अलीकडे जंत्राच्या ऐवजीं माणकाचे खडे बसविलेले वेध, अगर पैशाप्रमाणें वाटोळ्या पितळी तुकड्यांत माणिकाचे खडे बसविलेले असतात. क्वचितप्रसंगीं हिऱ्याचे तुकडेहि उपयोगांत आणतात. या माणीक अगर हिरा यांच्या वेधांतून तार लवकर बारीक होते. ती फारच बारीक म्हणजे केसाइतकीहि बारीक होते. ही तार वेधातून ओवून ओढून बारीक करतात म्हणूनच त्यास स्यूत ( सं. )अगर सूत असें म्हणतात.

हें सूत तयार झाल्यानंतर तें चपटें करितात. पूर्वीच्या काळीं ऐरणीवर भटारीनें हें चपटें करीत असत आतां दोन रुळांतून ती तार चपटी केली जाते व अशा या तारेस बादला असें म्हणतात.

हे बादेल तयार झाल्यानंतर वळाई (सं.वलय) सुरू होते. वळाई म्हणजे हे बादले अगर चपटी केलेली सोन्यानें वेष्टीलेली चांदीची तार रेशमावर गुंडाळणें. ही वळाई

पूर्वीच्या पद्धतीनें फारच थोडें काम देत असे. एका मातीच्या कोळंब्यांत बादले नुसते टाकून देत असत; व एक रेशमाची चाती हातांत घेऊन वर आढ्यास टांगलेल्या हुकांतून ओवून घेऊन त्याला मांडीवर अगर पायावर चाती फिरवून पीळ देत असत. असा पीळ दिला गेला म्हणजे जरतार अगर बादले लपेटले जाई. अशा रीतीनें पूर्ण जरतार तयार होई. आतां नवीन पद्धतीचीं यंत्रें निघालीं आहेत. त्यास संचा म्हणतात. या संचांत जितके तराक अगर चात्या काम करितात, तितकीच माणसे पूर्वी कामास लागत असत. तात्पर्य हल्लींच्या काळांत दोन माणसे जितकें यंत्रांच्या साहाय्यानें काम करितात तेवढेंच काम पूर्वी हातानें करण्यास ३६ पासून चाळीस माणसे लागत असत.

आतां एक नवीन पद्धत अमलांत आली आहे. ही बहुधां फ्रान्समध्यें प्रथम रूढ झाली असावी. या पद्धतीस विद्युत्साहाय्य लागतें. पासे करितांना निव्वळ चांदीचे करावयाचे व जरतार निव्वळ चांदीचीच करावयाची. व संपूर्ण तयार झाल्यावर त्यास सोन्याचें पाणी द्यावयाचें. या पद्धतीनें निम्म्या सोन्याची बचत होते व मालहि उठावदार होतो. शिवाय अतिशय बारीक सोनेरी जरतार अल्पायासानें व सोन्याची विशेषशी नासधूस न होता तयार होते.

खोटी जरतारहि बहुधां याच पद्धतीनें तयार होते व तीस जरूरीप्रमाणें चांदीचें अगर सोन्याचें गिलीट अगर मुलामा देतात. हा मुलामा देण्यासाठीं यंत्रें आहेत व तीं प्रत्येक कारखानदार आपल्या विशिष्ट पद्धतीनें तयार करतो.

तार अगर सूत तयार झाल्यानंतर त्याचे पुष्कळ प्रकार होतात. ते म्हणजे सलमा, झीग, गोटा वगैरे; परंतु त्यास जरतार असें म्हणता येत नाहीं. म्हणून त्याचा येथें नुसता उल्लेखच केला आहे.

व्या पा र.—आतां कलाबतू कोणकोणत्या देशांतून येते हें पाहूं. फ्रान्स, जर्मनी, इटली, आस्ट्रियाहंगेरी, चेकोस्लाव्हेकिया, तुर्कस्तान, जपान, युनायटेड किंगडम, सीलोन वगैरे हिंदुस्थानांत खऱ्या जरीचे कारखाने खालील शहरीं आहेत. बनारस, सुरत, पुणें, येवले, अहमदाबाद, पैठण, औरंगाबाद, बऱ्हाणपुर, मद्रास, मुंबई.

खोट्या जरीचे कारखानेः—दिल्ली, लखनौ, कानपूर, अमृतसर, सुरत, मुंबई वगैरे.

सरासरी दहा लाख रुपयांचें जरतार दरवर्षी मुंबई बंदरांत उतरते. पैकीं मद्रास १२ लाख, कलकत्ता अर्धालाख, कराची १ लाख, व ब्रह्मदेश दहा हजार.

विदेशी मालावर ३० टक्के जकात आहे. देशी मालावर अप्रत्यक्ष रीतीनें १५ टक्के बसते. कारण चांदी, सोनें इत्यादीवर १५ टक्के जकात आहेच.

या धंद्यांत सुधारणा होणें अगदी जरूर आहे. येथील माल विलायतीपेक्षां जरा नीरस निघतो तो सरस निघण्यासाठीं थोडी सुधारणा झाली पाहिजे; व ती उत्तरोत्तर होत जाईल अशी आशा धरण्यास बळकट जागा आहे. ती सुधारणा होणें व विलायती माल हिंदुस्थानांत न उतरूं देणें हें पुष्कळसें सुशिक्षित व कर्तृत्ववान कारखानदारांच्या हातांत आहे. जर भरण्याची कला व तिचे नमुने यासंबंधीं 'भरतकाम' (एम्ब्रायडरी) लेख पहा.

[ रा. श्रीधर बाळकृष्ण अंतरकर हे पुण्यांतले जरतारीचे सुशिक्षित कारखानदार आहेत. त्यानी पुरविलेल्या माहितीचा येथें उपयोग केला आहे. ]

**जरत्कारु**—भृगुकुलोत्पन्न एक ऋषि. यास संतति नसल्यानें अधोगति प्राप्त झालेल्या पितरांस उद्धरण्यासाठीं यानें जरत्कारु नांवाच्याच वासुकीच्या बहिणीशीं लग्न केलें. याचाच पुत्र आस्तीक ऋषि होय ( ' आस्तीक ' पहा ).

**जरदाळू**—या फळास लॅटिनमध्यें प्रूनस आर्मेनिआका, इंग्रजींत अप्रिकट, मराठींत व हिंदींत जरदाळू इत्यादि नांवें आहेत. हें एक साधारण उंचीचें झाड असून याची पश्चिम हिमालयांत लागवड करितात. हें मूळचें चीनदेशांतील असावें असें कांहीं विद्वानांचें मत आहे. प्राचीन खोतानमध्यें ऐतिहासिक शोधार्थ जमीन खणीत असतांना या झाडाचें लांकूड सांपडलें. यावरून आठव्या शतकाच्या अखेरच्या दशकाच्या अगोदर या झाडाची तेथें लागवड होत असावी असें दिसतें.

उ त्प न्न व गै रे.—बदामासारखा या झाडापासून डिंक निघतो. त्याला बाजारांत ' चेरीगम ' म्हणतात. बियांपासून काढलेल्या स्वच्छ तेलाचा जाळण्याकरितां व खाण्याकरितां उपयोग होतो. ज्या मानानें झाड उंच स्थळीं असेल त्या मानानें मे महिन्यापासून सप्टेंबरपर्यंत जरदाळू पिकतो. वायव्य हिमालयांत वाळलेल्या जरदाळूंचा लोक खाण्याकडे उपयोग करतात व ताजीं फळेंहि खातात. यूरोपियन लोक ताज्या जरदाळूंचा मोरंबा करतात व सुके जरदाळू स्वयंपाकांत उपयोगास आणतात. अफगाणिस्तान व आसपासच्या डोंगरांतून पुष्कळसा जरदाळू हिंदुस्थानांत येतो. लेह हें जरदाळूच्या व्यापाराचें केंद्र असून तेथून बाल्टीस्तान व लहान तिबेटमधून दरसाल ३०० मण जरदाळू बाहेर जातो. अफगाणिस्तानांतील खुबनीसमपाला व्यापार काबुली लोकांच्या हातांत आहे. या झाडाचें लांकूड दिसण्यांत सुंदर असून तें निरनिराळें सामान करण्याकडे लावितात.

**जरा**—जरा म्हणजे म्हातारपण. याची व्याख्या सोपी व उघड आहे; पण वाटते तितकी ती सोपी नाहीं. म्हातारपण म्हणजे पांढरे केस एवढा अर्थ घेतला तर शाळा कॉलेजांतील मुलांचेहि केस पांढरे होण्यास आरंभ झालेले दिसतात. शरीराचीं गात्रें, व मानसिक शक्ति क्षीण होणें, दांत पडणें, वगैरे लक्षणें घेतलीं तरी आपल्या देशांत व परदेशांत व्यक्तिपरत्वें

कांहीं माणसें चाळिशीच्या सुमारास वृद्ध दिसूं लागतात; व कांहीं माणसांची साठी उलटली तरी त्यांची तडफ, तरतरी प्रजोत्पादन सामर्थ्य नष्ट होत नाहीं. ७० च्या पुढें मात्र वार्धक्याचीं लक्षणें शरीरांत दिसतातच. म्हातारपण वाईट कां तर या अशक्ततेमुळें. गंजलेल्या हत्याराप्रमाणें घरीं स्वस्थ बसणें व चिडक्या स्वभावामुळें व रोगांच्या पीडेमुळें स्वतःचें व इतरांचें जीवित कष्टमय करणें ही परम करुणास्पदच स्थिति आहे असें नाकबूल करणें शक्य नाहीं. म्हातारपण कोणास आवडतें असें नाहीं. तरी तें आपणास क्रमानें येणें प्राप्तच आहे असें समजून ज्या अर्थी कांहीं वृद्ध लोक परपीडनास कारण न होतां संसारांतील आनंदांत आपल्या निरोगी व तेजस्वी रहाणीनें भर टाकतात, तसें आपणासहि वृद्धपणीं करतां यावें ही उमेद प्रत्येकानें धरली पाहिजे; व त्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. आपले जुने आचार आरोग्यकारक व वार्धक्यहितकारक असेच प्रायः आहेत. तथापि नवीन मतें काय आहेत व तीं नवीन वैद्यशास्त्राच्या कोणत्या तत्त्वांवरून रूढ झालीं आहेत हें कळावें व वार्धक्यांतील हालअपेष्टा आपणास अंशतः अगर पूर्णपणें कशा टाळतां येतील एतदर्थ सूचक उपाय सुचविले आहेत त्यांचें मनन व अभ्यास करावा.

(१) बालपणीं रोगराई, इजा वगैरे क्रमप्राप्त संकटें आलीं तर ज्वर, दुःख, सर्व शारीरिक चलबिचल फार जोरानें होते; परंतु हींच स्थित्यंतरें म्हातारपणीं झालीं असतां तीं वैद्यास ओळखतां येतील अशीं वरील ज्वर, वेदनादि बाह्य लक्षणें एवढीं तीव्र नसतात.व म्हणून वृद्ध मंडळींतील रोगाचें निदान लवकर न झाल्यामुळें रोग वाढीस लागण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, पित्तनलिकाशूल अगर मूत्रनलिकाशूल यांसारख्या तरुण रोग्यास रडविणाऱ्या व लोळविणाऱ्या भयंकर वेदना वृद्धपणीं सह्य असतात, असें पुष्कळदां पहाण्यांत येतें. वृद्धांच्या त्वचेंतील उष्णता वाजवीपेक्षां नेहमीं कमी असल्यामुळें अंमांतज्वर असूनहि तो उष्णतानलिकेस तितका लागत नाहीं; व म्हणून म्हाताऱ्या माणसाचें उष्णतामान कळण्यास कित्येक वेळां तोंडामध्यें थर्मामिटर धरल्यानें खरा ताप कळतो. म्हाताऱ्या मंडळींचें रोगनिदान करण्याची संवय वैद्यास हवी. वैद्य फसला जाण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे नाडी व श्वास अगर ताप व नाडीचे ठोके यांचें जें एरवीं व ज्वरांमध्यें प्रमाण तरुण रोग्यांत आढळतें तेंच प्रमाण वृद्ध रोग्यांत नसतें. यामुळें रोगस्थिति वैद्याच्या लक्षांत न येण्याचा संभव बराच असतो. (२) शरीरांतील जोम कमी झाला म्हणजे परोपजीवी त्वचा, रोगकारक जंतू नानातऱ्हेचे त्वग्रोग उत्पन्न करतात. वार्धक्यावस्था अशापैकींच अनुकूलस्थिति असल्यामुळें उवा (डोक्यांत व अगावर), खरूज, नायटे, गजकर्ण, इसब, कंडुरोग व इतर त्वग्रोग न व्हावेत अशी त्वचेची काळजी व पुरंदर प्रकृतीची निगा अगोदरपासून ठेवावी. याउपर त्वग्रोग झाल्यास योग्य त्या उपायांनीं त्याचें शमन व निर्मूलन करून त्यास वाढूं व उलटूं देऊं नये. (३) वार्धक्यामध्यें जठर व आंतडीं यांतील पचनक्रियेंत मंदत्व असल्यामुळें तत्संबंधी रोग होतात हें साहजिक आहे. परंतु या वयांत अन्नमार्गांत व यकृतादि पचनेंद्रियांत कॅन्सर होण्याचा संभव असतो. हा रोग असाध्यच आहे. तथापि त्याच्या शमनार्थ योग्य ते उपाय करावे. जठर व लघु अंत्र या ठिकाणीं व्रणरोग होतो व तो योग्य उपचारांनीं बरा होतो. शौचास साफ न होणें यामुळें बरेच वृद्ध लोक जिकीरीस येतात व या बद्धकोष्टतेमुळें नाना पीडा व मूळव्याध वगैरे नाना व्याधी उद्भवतात. मलशुद्धि वेळेवर न झाल्यामुळें कोठयांत विषें सांचून तें विषशोषण रक्तामध्यें होतें व त्यामुळें वार्धक्यास अकालीं आरंभ होतो असा मेचिनकॉफ या महा शोधकाचा शोध आहे. तो म्हणतो कीं सस्तन प्राण्यांमध्यें मोठ्या आंतड्याची वाजवीपेक्षां जास्त लांबी लांब गटाराप्रमाणें निसर्गदत्त असल्यामुळें आतड्यांच्या शिथिल स्थितीमध्यें तेथें सांचलेला मळ कुजतो व त्या विषशोषणामुळें अकालीं वार्धक्य येतें व अगोदर असलेलें वार्धक्य वाढतें. मत्स्यामध्यें हें गटाररूपी आंत्र नसतें म्हटलें तरी चालेल; सरपटणारे प्राणी व पक्षी यांमध्यें हें आंतडें फार लहान असतें म्हणून हे सर्व प्राणी सस्तन व मानवीप्राण्यांप्रमाणें जर्जर होऊन आत्मविषशोषणानें खितपत पडत नाहींत. यास पुढील उपाय करणें—बस्ती घेणें, सौम्य रेचकें घेणें, आहारांत योग्य प्रकारचें अन्न, फळें, भाज्याचा उपयोग करणें, आरोग्यनियमपूर्वक रहाणी ठेवणें, विरजलेलें दहीं व ताक रोज आहारांत उपयोगांत आणणें व जंतुनाशक औषधें पोटांत घेणें, व आरोग्यपूर्वक रहाणी ठेवणें हे मेचिनकॉफच्या मतें उपाय आहेत. आंत्रासंबंधी अंतर्गळ हा रोगहि वृद्धावस्थेंत उद्भवण्याचा संभव असतो; त्या रोगावरील उपाय त्या सदरांत वाचावयास मिळतील. (४) हृदय व रक्तवाहिन्यांतील रोग वार्धक्यांत होतात; कारण त्यांतील लवचिकपणा कमी होऊन त्यांत काठिण्य आलेलें असतें. या अनेक रोगांवरील उपाय त्या त्या स्थळीं प्रस्तुत कोशांत सांपडतील; परंतु या बदललेल्या रचनेमुळें म्हातारपणीं अति अंगकष्टाचे श्रम करूं नयेत. (५) नाना तऱ्हेचे मज्जास्थानांचे व मज्जातंतूचे रोग उद्भवण्यास हा काल अनुकूल असल्यामुळें मज्जातंतूदाह, अर्धांगवायु वगैरे अनेक सदराखालीं याविषयीं माहिती दिली आहे. येणेंप्रमाणें ढोबळ व मुख्य वार्धक्यासंबंधी रुग्णावस्थेचें दिग्दर्शन मात्र येथें केलें आहे.

वर कथन केलेंच आहे कीं, कोणास अकालीं ३५।४० च्या वयांत म्हातारपण येतें व कांहीं जणांस साठसत्तरानंतर जरा दिसूं लागते. अशी विषमता कां असावी याचें उत्तर त्या माणसांची विशिष्ट प्रकृति हें होय. प्रकृति म्हणजे काय याचें उत्तर आजपर्यंत देणें कठीणच होतें. परंतु आतां बरेंच समाधानकारक उत्तर सांपडलें आहे तें असें. बाल

वयामध्यें शरीराचा बांधा कसा मजबूत होईल याची म्हणजे शरीरांतील आयात माल जें अन्न तें पचून त्याचे स्नायू, अस्थिमज्जा व रक्त यांत रूपांतर व्हावें ही अपेक्षा असते. यौवनावस्थेनंतर व वृद्धावस्थेंत ही वाढ बंद होते व वार्धक्यांत तरी निदान शरीरांत आयात मालरुपी अन्न किती गेलें या हेतूपेक्षां शरीरांतील निर्यात मालाचीच निर्यात म्हणजे मलशुद्धि, लघवी ( यूरीक ॲसिड ), घाम यांचा निकाल बरोबर रीतीनें व्हावा ही अपेक्षा असते. ज्यांच्या शरीरांत ही निर्यात उत्तम चालते त्यांच्या रक्तांत विषशोषण न झाल्यामुळें त्यांची प्रकृति चांगली असें म्हणावें; मग त्यांचें वय साठसत्तर असलें तरी जरा त्यांनां जराहि पीडा करीत नाहीं. परंतु ज्यांच्या शरीरांत ही निर्यात नीट चालत नाहीं ते मात्र आपआपल्या विषशोषणानें जशी चुलींतील राख न काढली व आंत हवा लागू न दिली तर तींतील विस्तव विझूं लागतो तसे हे लोक अकालीं आपले विषांची निर्गत बंद होऊन वृद्ध होतात व त्यांची प्रकृति वाईट असते असें म्हणावें. शरीरांतील आयात व निर्यात यास आयव्यय व्यापार म्हणतात: व तिची बरोबर मोजदाद व नियमन करणारी अंतःस्रावक पिंडसंस्था नामक विविध रसोत्पादक पिंडांचा समुदाय असतो. याविषयीं थायराइडपिंडवृद्धि रोग या लेखांत समाविष्ट असलेला अंतःस्रावक पिंडचिकित्सा हा लेख पहावा. हे पिंड वृषण, स्त्रीअंडाशय, पिच्युइटरी, पाइनियल, मूत्र पिंडावरील ग्रंथि, प्यांक्रियास वगैरे पिंड असून त्यांचा अधिपति थॉयराइड नामक पिंड आहे. हे सर्व पिंड एकएकटे व संघशक्तीनें शरीरयंत्राची मानसिक, शारीरिक, जननसंबंधीं व आयव्ययव्यापारादि क्रिया आपोआप व घड्याळाप्रमाणें बिनचूक व बिनबोभाट चालवितात अशी त्यांची नियामक शक्ति आहे; व त्यांतलि रसांचा औषधाप्रमाणें किंबहुना औषधीपेक्षां उत्तम उपयोग होतो. वृद्ध माणसांनीं आहार कमी करावा हें वरील आयव्ययाच्या वर्णनावरून कळेलच; परंतु कित्येकदां ही गोष्ट वृद्धमाणसांस व त्यांच्या कनवाळू आप्तेष्टांस नीटशी कळत नाहीं व ते शक्ति येण्यासाठीं त्यांनां पौष्टिक अन्न देत असतात. वृद्धांनां युक्तआहार म्हणजे मासे व मत्स्य वर्ज करून फळें व न शिजविलेले व पचण्यासारखे वनस्पतिपदार्थ होत. त्यांत आबालवृद्धांस हितावह असा व्हायट्यामिननामक पदार्थ असल्यामुळें हे पदार्थ देणें उत्तम; हा पदार्थ गुराढोरापासून दूध, दहीं, साय, ताक, मलइ, खव्यांत असल्यामुळें हे पदार्थ व अंडीं, कांकडी, टोम्याटो, खजूर, केळीं व इतर भाज्या व फळें हीं खावींत. कंदभाज्यापेक्षां पाले व फळभाज्या चांगल्या; आणि मांसमत्स्याशनापेक्षां शिजवलेलें शाकान्न वृद्धास चांगलें. कोणी म्हणतात माणसास चिंता नसावी. चिंतेनें शरीर जळतें व तें म्हणणें शरीरांतील अंतःस्रावक पिंड विकृत झालें असतां खरेंहि असेल; परंतु सुधारलेल्या देशांतील रणधुरंधर, वीर, मुत्सुद्दी, शोधक लोक, कर्ते लोक यांनीं लढाईच्या वेळीं व शांततेच्या वेळीं मोठ्या राष्ट्रांची व शिवाय आपली खासगी चिंता वाहूनहि आपली शरीरप्रकृति प्रायः नीट राखिली असे दाखले नेहमीं आढळतात. यावरून मनोव्यापार जोरानें चालले म्हणजे शरीरहि चालतें असा उलट व सुलट संबंध आहे असें वाटतें. हत्यार गंजून वाया जाण्यापेक्षां झिजून गेलेलें बरें अशी म्हण आहे. शरीररूपी यंत्रास हा गंज न चढावा एतदर्थ वृद्धांस गंज घालविणारें उत्तम औषध म्हणजे कांहीं तरी बेताचा सदुद्योग त्यांनां असणें हें होय. येणेंप्रमाणें वृद्धावस्थेसंबंधीं मुख्य बाबींचा विचार येथें केला आहे. या कामीं पाश्चात्यांचे दीर्घ प्रयत्न केवढे चालू आहेत यासंबंधीं आणखी चमत्कारिक व विश्वसनीय माहिती देऊन हा विषय पुरा करूं.

पुरुषांच्या शुक्रग्रंथी अगर वृषण यांचें काम फक्त वीर्य उत्पन्न करण्याचेंच नसून तें अनेक प्रकारचें असतें असें खच्ची केलेल्या प्राण्यांवरील व मनुष्यांवरील परिणाम पाहून समजून आलें आहे. तेव्हां या पिंडांत शुक्राखेरीज अन्य आंत्ररस निर्माण होत असून तो रक्तप्रवाहमार्गें शरीरांत खेळून पुरुषत्वाची इतर अंतर्बाह्य लक्षणें उत्पन्न करण्यांत व आरोग्य व तारुण्य जतन करण्याच्या कामीं उपयोगांत येतो. वृषणांतील हा रस "लीडिग्ज पेशी" नामक रचनेमध्यें तयार होतो व असाच रस स्त्रीअंडाशयांत तयार होऊन स्त्रीगुणविशिष्ठ जे मार्दवादि गुणधर्म ते त्यांनां प्राप्त होतात असा निश्चित शोध लागला आहे. या रसांनां "स्त्री हारमोन" व "पुरुष हारमोन" अशीं नांवे दिलीं आहेत. शुक्र शोणितांचा संयोग होऊन गर्भधारणा होते तेव्हां यापैकीं या दोन "हारमोन" पैकीं जें अधिक असेल त्याप्रमाणें गर्भाला स्त्रीचें अगर पुरुषांचें स्वरूप प्राप्त होतें असें प्रयोगांवरून सिद्ध होतें.

तारुण्याचें पुनरुज्जीवन (स्टायनॉकचा प्रयोग):—वृषणाची वीर्यवाहक नलिका शस्त्रानें उघडी करून ती बांधून व काढूनहि टाकतात. म्हणजे त्यामुळें वीर्योत्पादक भाग नष्ट होतो. व दुसऱ्या म्हणजें आंत्ररसोत्पादक भागांत वृद्धि होऊन नव तारुण्यास आरंभ होतो. यास सहा महिने तरी लागतात. ज्यांनीं ही शस्त्रक्रिया केली आहे ते शस्त्रवैद्य म्हणतात कीं ही बिनधोक्याची क्रिया आहे.

डॉ. व्हारोनॉफ नामक विख्यात शस्त्रवैद्य माकडाच्या वीर्यग्रंथींचें कलम मनुष्याच्या वृषणांत लावून देतात व तें एकदां जडलें म्हणजे कित्येक वर्षें चांगलें काम देतें. इतर प्राण्यांच्या वीर्यग्रंथी एकंदरींत निरुपयोगी ठरतात. माकडाचे वीर्यग्रंथींचे चारपांच तुकडे एकमेकांस न लागतील असे माणसांच्या वृषणाच्या थैलींत (ती कापून उघडी करून) ठेवतात. ६०।६५ वर्षांपेक्षां म्हातारे लोक उपयोगी नाहींत. प्रथम थट्टा झाली तरी पुढें हे शस्त्रप्रयोग सफळ झाले. शरीरांतील शैथिल्य नष्ट होऊन जोम व तरतरी येऊन उल्हास वाटतो व काम अधिक करवतें. सातशें लोकांनां हा रस टोंचल्यानें प्रत्येकांस फायदा झालाच; शिवाय दमेकऱ्यांचा दमा गेला व क्षयरोग्याची शक्ति वाढली.

आर्यवैद्यकांत रसायनतंत्र किंवा जराचिकित्सा म्हणून चिकित्सेचें एक अंग आहे. या चिकित्सेंत रसायनें वापरण्याविषयीं सांगितलें आहे. या रसायनाच्या सेवनानें आयुष्य शंभर वर्षांहूनहि अधिक वाढवितां येतें असें लिहिलें आहे. या रसायनांत दोन प्रकार आहेत--(१) कुटी प्रावेशिक व (२) वातातपिक. हे प्रकार घेतांना कोणकोणत्या परिस्थितींत रोग्यानें राहिलें पाहिजे याची सविस्तर माहिती रसायन तंत्रांत आहे सोमरसायन घेतल्यानें म्हातार्‍याला तरुणपणाचीं कशीं लक्षणें होतात हें निरनिराळ्या सोमवनस्पतींच्या गुणधर्मासह सुश्रुतकारांनीं विवेचिलें आहे. याखेरीज इतर वनस्पती व चूर्णे अरेवर सांगितलीं आहेत.

**जरासंध**—पुरुकुलोत्पन्न अजमीढ राजाच्या वंशांतील उपरिचर वसु राजाचा पौत्र व बृहद्रथ राजाच्या दोन पुत्रांतला एक. याचा जन्म दोन मातांपासून दोन शकलानें होऊन तीं शकलें जरा राक्षसीनें सांधिलीं म्हणून यास असें नांव पडलें. हा मगध देशाचा अधिपति असून याच्या राजधानीचें नांव गिरिव्रज होतें. याच्या दोन कन्या अस्ति व प्राप्ति कंसास दिल्या होत्या. कंसास कृष्णानें मारल्यामुळे यानें सतरा वेळां कृष्णाशीं युद्ध केलें. परंतु तितक्या वेळां याचा पराभवच झाला. यानें शतावधि राजे युद्धांत जिंकून पशुवत् बद्ध करून तुरुंगांत ठेवले होते. शतवर्षे पूर्ण झाल्यावर त्यांस हा रुद्रयाग करून बळी देणार होता. राजांस बद्ध होऊन ८६ वर्षे झालीं असतां त्यांनीं गुप्त रूपानें आपणांस सोडविण्याविषयीं कृष्णाकडे संदेश पाठविला. त्यावरून कृष्ण, भीम व अर्जुन घेऊन मगध देशास गेला. आम्हां तिघांतून ज्याच्याशीं युद्ध करणें असेल त्याशीं कर असें त्यानें तेथें जरासंधाला आव्हान केलें. भीमाशीं बाहुयुद्ध करण्यास जरासंध तयार झाला. १४ दिवस सतत युद्ध झाल्यावर भीमानें जरासंधास पाडलें. तथापि तो पुन्हां सांधला जाऊन युद्धास सज्ज झाला. याप्रमाणें बरेच वेळां झाल्यावर कृष्णानें सुचविल्याप्रमाणें भीमानें उजवा भाग डावीकडे व डावा उजवीकडे टाकून देतांच जरासंध मृत्यु पावला. [भारत, सभा. अ. १७–२४; भाग. दशम. अ. ७२–७३]

**जरीपटका**—मराठ्यांचा भगवा झेंडा म्हणून राष्ट्रीय निशाण प्रसिद्धच आहे. तो मूळ रामदासस्वामींनीं शिवाजीस प्रसादादाखल दिलेल्या अंगावरील छाटीचा होता असें म्हणतात. त्याशिवाय जरीपटका म्हणून दुसरें एक मराठ्यांचें निशाण असे. तें राजारामाच्या कारकीर्दींत प्रचारांत आलें असावें. राजाराम हा जिंजीस गेल्यावर तेथें त्यानें जें प्रधानमंडळ नेमिलें त्यांत संताजी घोरपड्यास सेनापतीचें पद दिलें होतें. त्यावेळीं त्या पदाचीं वस्त्रें व इतर मानमरातब देतांनाच हें जरीपटका निशाण त्याला दिलें. जरीपटक्याबरोबरच नौबत असे. तिला साहेबी नौबत म्हणत. पुढें सेनापति (दाभाडे) दुर्बल झाल्यावर व पेशव्यांच्या हातीं सर्व राज्यकारभार आल्यावर, त्यांच्या खास हुजरातींत जरीपटका व साहेबीनौबत आली. ज्या ज्या वेळीं मोहिमेवर जाण्याचा प्रसंग येई त्यावेळीं लढाईंत हा जरीपटक्याचा हत्ती मराठ्यांच्या सैन्याच्या अघाडीस असे. त्याचें रक्षण करण्याच्या कामीं अत्यंत शूर सरदाराची नेमणूक होत असे. खुद्द पेशवे ज्या मोहिमेंत हजर नसत त्यावेळीं जो सरदार मोहिमेवर नेमला जाई त्याच्या हवालीं जरीपटका व नौबत करीत. शत्रूनें तो हस्तगत केल्यास तो परत मिळविण्यासाठीं मराठा सेनापती समर्ई प्राणहि देई. परशुरामभाऊ, त्र्यंबकराव मामा पेठे, हरिपंततात्या फडके वगैरे सरदारांच्या हवालीं जरीपटका नेहमीं करण्यांत येई. प्रस्तुत हा जरीपटका नेपाळांत राणीपुर येथे (पेशव्यांची गादी जेथें नानासाहेब–धोंडोपंत–पेशव्यांच्या कुटुंबानें स्थापन केली आहे, तेथेंच) आहे असें म्हणतात.

**जर्मन सिल्व्हर**—३ भाग तांब्यांत १ भाग निकेल धातु मिश्र केली म्हणजे रुप्यासारखा पांढर्‍या रंगाची मिश्र धातु बनते व त्यास निकेलचें रुपें असें म्हणतात. यांत थोडें जस्त मिळवून जर्मन सिल्व्हर करतात. जस्ताच्या योगानें याच्या अंगीं कांहीं दिवसांनीं पिंवळटपणा येतो; तथापि त्यामुळें त्याचा आकार वाढतो व स्वस्त विकतां येतो. वस्तुतः पितळ्यांतच थोडें निकेल मिळवून त्याला पांढरेपणा आणलेला असतो. यास 'कोपर ब्रास' असें म्हणतात. चमचे वगैरे करण्याकरितां दोन भाग तांबें, १ भाग जस्त व १ भाग निकेल मिश्र करितात. चाकूच्या मुठी वगैरे करण्याकरितां ५ भाग तांब्यांत २ भाग निकेल आणि २ भाग जस्त मिसळतात आणि पातळ पत्रे करण्याकरितां ३ भाग तांब्यांत १ भाग निकेल व १ भाग जस्त मिळवितात. या धातूंचें ओतींव काम करणें असेल तर १०० भाग मिश्र धातूंत ३ भाग तांबें मिसळतात. [पदार्थ वर्णन]

**जर्मनी**—महायुद्धापूर्वीचा जर्मनी अथवा जर्मनसाम्राज्य हा मध्ययूरोपांतील एक देश असून टयूटॉनिक वंशांतील व टयूटॉनिक भाषा बोलणारे लोक ज्या प्रांतांत रहातात त्यांनां प्रायः जर्मन म्हणण्याचा प्रघात आहे. तथापि ज्याला जर्मन साम्राज्य म्हणत त्याशिवाय आस्ट्रिया, स्वित्झरलंड व हालंड या देशांतील जर्मन भाषा बोलणारे प्रांतहि जर्मनींत अंतर्भूत केले पाहिजेत. जर्मन साम्राज्याची घटना इ. स. १८७१ त उत्तरजर्मनसंघ व दक्षिण जर्मन संस्थानें यांच्यांतील तहामुळें झाली होती. याच वर्षीं झालेल्या फ्रँकफोर्टच्या तहानें या प्रांतांत अल्सेस–लॉरेनची भर पडली; आणि १८९० मध्यें हेलिगोलँड हें बेट ग्रेटब्रिटनकडून जर्मनीस मिळालें. याशिवाय आफ्रिकेंत व पासिफिक महासागरांत जर्मनीच्या कित्येक वसाहती होत्या.

जर्मनसाम्राज्य हें उत्तरअक्षांश ४७°१६' आणि ५०°५३' व पूर्वरेखांश ५०° ५२' आणि २२° ५२' मध्यें पसरलेलें आहे. टिल्सिटपासून मेटझ शहराचें अंतर म्हणजे जर्मनीची ईशान्य नैर्ऋत्य लांबी ८१५ मैल होती. परंतु तेंच

र्तिच ज्यास्तींत ज्यास्त दक्षिणोत्तर अंतर (कॉन्स्टन्स सरोवरापासून हुंडर्सलेबेन शहरापर्यंत ) सारे ४५० मैलच होतें. जर्मनीच्या पूर्वपश्चिम बिंदूंच्या वेळांत जरी १ तास ८ मिनिटांचा फरक होतो, तरी सर्व देशभर ग्रीनविचच्या पुढें एक तास हाच वेळ प्रमाणभूत मानण्यांत येतो. या देशाच्या आग्नेयीस व दक्षिणेस आस्ट्रिया व स्वित्झरलंड; नैर्ऋत्येस फ्रान्स; पश्चिमेस लक्झेंबर्ग, बेल्जम व हालंड; उत्तरेस जर्मन महासागर व बाल्टिक समुद्र; आणि पूर्वेस रशिया, याप्रमाणें मर्यादा होत्या. देशाची एकंदर सरहद्द ४५६९ मैल लांबीची असून, त्यापैकीं १२२० मैलांचा समुद्रकिनारा होता. या देशाचें क्षेत्रफळ २,०८,८३० चौरस मैल असून १९०५ मध्यें लोकसंख्या ६०५,४१.२७८ होती. इ. स. १९०५ मध्यें क्षेत्रफळाच्या मानानें पाहिलें असतां, जर्मनीचा दर्जा सर्व यूरोपखंडांत रशिया व आस्ट्रिया हंगेरीच्या खालोखाल लागत होता; व लोकसंख्येंत तर रशिया सोडून यूरोपखंडांतील दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां हा श्रेष्ठ होता.

रा ज की य वि भा ग.—पुढें दिलेलीं २६ संस्थानें व विभाग मिळून जर्मन साम्राज्य बनलें होतें; प्रशिया, बव्हेरिया, सॅक्सनि व वुर्टेंबर्ग हीं राज्यें, बेडन, हेस्से, मॅक्लेनबर्ग-श्वेरिन, मेक्लेनबर्ग स्ट्रेलिट्झ, ओल्डनबर्ग आणि सॅक्सेवायमर ह्या ग्रँडचीं; अनहाल्ट, ब्रुन्सविक, सॅक्स-अल्टेनबर्ग, सॅक्स-कोबर्ग गोथा आणि सॅक्स मायनिंजेन या डचीं; लिपे डेटमॉल्ड, रुस प्राइझ, रुस श्लाइझ, शाउंबर्ग लिपे, श्वार्झबर्ग, रुडोल्स्टाड, श्वार्झबर्ग—सॉंडरशाउसेन आणि वाल्डेक पायरमॉंट हीं संस्थानें; ब्रेमेन, हॅंबर्ग व ल्युबेग हीं स्वतंत्र शहरें; आणि अल्सेस लॅरेनचा बादशाही प्रांत या राजकीय विभागांशिवाय जर्मनीच्या कांहीं भागांस अजून त्यांचीं पुरातन नांवेंच आहेत. या पुरातन विभागांच्या सीमा व हल्लींच्या राजकीय विभागाच्या सीमा भिन्न भिन्न आहेत.

स मु द्र कि ना रा.—श्लेस्विग हॉलस्टोन किनाराखेरीज करून इतर ठिकाणीं जर्मन किनाऱ्याजवळचा समुद्र उथळ असल्यामुळें जर्मनीला नैसर्गिक बंदरें जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. म्हणूनच श्लेस्विग-होल्स्टाइन किनाऱ्यावरील कील वगैरे थोडींशीं बंदरें सोडून देऊन बाकीचीं एमडेन, बेमेन, ल्युबेक, हॅंबर्ग, स्टॅटिन, डॅंझिग, कोनिग्जबर्ग, मेमेल वगैरे महत्वाचीं व्यापारी बंदरें नद्यांवर आहेत. उत्तरसमुद्राचा किनारा व बाल्टिक किनारा यांतील कांहीं भेद लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. उत्तर समुद्राच्या किनाऱ्यावर ज्या ज्या ठिकाणीं प्राचीन काळीं झालेल्या किनाऱ्याजवळच्या वाळूच्या टेंकड्या समुद्राच्या लाटांनीं वाहून गेल्या आहेत, त्या त्या ठिकाणीं धक्के बांधून आतां देशाचें समुद्राच्या पाण्यापासून रक्षण करावें लागतें. किनाऱ्याजवळ याच कारणानें बरींच लहान मोठीं बेटें झालीं आहेत; व किनाऱ्याच्या आसपास वाळू इतकी पसरली आहे कीं, मार्गदर्शकाच्या मदतीशिवाय जहाजें बंदरांत येऊं शकत नाहींत. येथें समुद्राच्या लाटा भरतीच्या वेळीं बारा बारा, तेरा तेरा फुटांपर्यंत वर येतात. उलटपक्षीं बाल्टिक किनारा जरी एकंदरीत पाहतां उथळच आहे, तरी किनाऱ्याच्या आसपास बेटें फार नाहींत, किंवा वाळूहि इतकी पसरलेली नाहीं. हिंवाळ्यामध्यें किनाऱ्याचा बराचसा भाग बर्फाच्छादित असल्यामुळें दरवर्षी कित्येक महिनेंपर्यंत नौकानयन बंद असतें. ल्युबेक, पामेरानिया यासारखीं आखातेंहि बाल्टिक किनाऱ्यावर आहेत. जर्मन किनाऱ्यावर दीपगृहांची चांगली सोय केलेली आहे.

भू व र्ण न.—उत्तरेकडील जर्मनीचा चार सप्तमांश भाग हा जवळ जवळ एक विस्तीर्ण सपाट मैदान आहे असें म्हटलें तरी चालेल. बाकीच्या मध्य जर्मनींतील व दक्षिणेकडच्या तीन सप्तमांश भागांत,बव्हेरियासारखीं मोठीं पठारें, ऱ्हाइन प्रांताप्रमाणें मैदानें व फार उंच नाहींत अशा दळणवळणाच्या मार्गांत आड न येणाऱ्या तुटक तुटक पर्वतांच्या ओळी आहेत. ऑस्ट्रो-बव्हेरियन सरहद्दीवर बव्हेरियन आल्प्स नांवाची पर्वताची ओळ असून झुग्सपिटस नांवाचें जर्मनींतील सर्वांत उंच शिखर म्युनिकच्या दक्षिणेस ५७ मैलांवर याच ओळींत आहे. त्याची उंची ९७३८ फूट आहे. बव्हेरियन आल्प्स व डान्यूब नदीच्या उत्तरेस असलेलें बव्हेरियन अरण्य या दोन पठारांच्या उतारामध्यें बव्हेरियांतील डान्यूब नदीचा पाणवठा आहे. बव्हेरिया व बोहीमिया यांच्या सरहद्दीवर बोहीमियन अरण्य नांवाचें जें पठार आहे त्यावर इतकें दाट अरण्य आहे कीं या भागाविषयीं फारच थोडी माहिती आज उपलब्ध आहे. वुर्टेंबर्गच्या पश्चिमेस ब्लेडनमध्यें ब्लॅक फॉरेस्ट व फ्रान्सच्या सरहद्दीवर व्होस्टेज, अशीं जीं दोन पठारें आहेत, त्यांच्यामधून ऱ्हाइन नदी कॉन्स्टन्स सरोवरांतून बाहेर पडून व बेडन प्रांताला वळसा घालून दक्षिणोत्तर वहात जाते. व्होस्टेज पर्वतामधून फ्रान्सकडे जाण्याचा सोयीचा मार्ग म्हटला म्हणजे झाबेर्न येथें असलेली खिंड होय. या खिंडींतूनच स्ट्रासबर्गपासून पारिसकडे जाणारी रेल्वे गेली आहे. बव्हेरियन अरण्य व व्होस्टेज या ठिकाणीं विशेषतः वज्रतुंड खडक आढळून येतात. पॅलॅटिनेटमध्यें हार्ड नांवाच्या वाळूच्या खडकाचें पठार आहे. लॉरेन पठाराचा जरी बराच मोठा भाग फ्रान्सकडे आहे, तरी जर्मनीकडे असलेल्या भागांत सारच्या कोळशाच्या खाणी व लोखंडी दगडाच्या खाणी विपुल आहेत. नॉडर हायनिशच्या उत्तर टोंकास वेस्ट फालियांतील रूहरचा कोळशाच्या खाणींचा विस्तृत प्रदेश असून, दक्षिण सीमेवर हेस्से नासाड प्रांतांत द्राक्षांचे चांगले चांगले मळे व हॉंबर्ग आदिकरून कित्येक ठिकाणीं खनिजोदकाचे झरे आहेत. थ्युरिंजियन अरण्याच्या आग्नेयेस बव्हेरियाच्या उत्तरसीमेवर फ्रॅंकनवाल्ड नांवाचें जें पठार आहे, त्यापासून दक्षिणेस डान्यूबकडे नाब नदी, पश्चिमेस ऱ्हाइनकडे मेन नदी आणि पूर्वेस व उत्तरेस

एल्बकडे एगर व साल या नद्यांचे प्रवाह सर्व दिशांस वहात जातात सॅक्सनि व बोहीमिया यांच्या सरहद्दीवर जें पठार आहे त्यावर, फ्रायवर्ग आसपास कोळशाच्या व निरनिराळ्या धातूंच्या खाणी आहेत, व एल्ब नदीच्या खिंडींतील वाळूच्या खडकाच्या खाणींतून इमारतीकरितां दगड पुरविले जातात. सिलेशियन पर्वतांत कोळशाच्या खाणीचा थोडासा प्रदेश आहे. उत्तरजर्मन मैदान हें देखील सर्वत्रसारखें सपाट नाहीं. हॅनोव्हरच्या उत्तरेस व बाल्टिक किनाऱ्याजवळ कांहीं कांहीं उंचवट्याच्या जागा आहेत. मध्य एल्बजवळचा प्रांत, होलस्टाइनचा पश्चिम किनारा, ओल्डेनबर्ग, पूर्वफ्रीझिया व हॅनोव्हरचा उत्तर किनारा एवढे भाग सोडून बाकीचें जर्मनमैदान चांगलें सुपीक नाहीं.

न द्या व स रो व रें —मेमेल, प्रेजेल, व्हिश्चुला, ओडर, एल्ब, वेसेर, एम्स, ऱ्हाइन व डान्यूब या ज्या नऊ मुख्य नद्या जर्मनींत आहेत, त्यांपैकीं प्रेजेल, वेसेर व एम्स या तीनच नद्या उगमापासून मुखापावेतों जर्मन सरहद्दींत आहेत. ओडर नदीचा उगम जरी जर्मन सरहद्दीपलीकडे आहे तरी तिचा बहुतेक भाग जर्मनींतच आहे. डान्यूबचा उगम जर्मनींत आहे. पण तिचा फक्त एक पंचमांश भागच जर्मन प्रांतांतून वहातो कान्स्टन्स सरोवरापासून बसेल-शहरापर्यंत ऱ्हाइन नदी जर्मनसरहद्दीवर आहे; व बसेल-पासून एमेरिशपावेतों ती जर्मनींतून वहात जाते. तिचा जर्मनींतील सर्व भाग नौकानयनार्ह आहे. विश्चुला नदीचें जर्मनींतील पात्र बरेंच विस्तृत व मोठें आहे. या नद्या, त्यांच्या उपनद्या व एम्मजेड, डॉर्टमंड–एम्स इत्यादि अनेक कालवे या सर्वांचा विचार केला असतां जर्मनींत मुबलक जलमार्ग आहेत असें दिसून येईल. या सर्वांची लांबी एकूण ७०० मैल असावी असा अंदाज आहे. याशिवाय जर्मनींत अनेक सरोवरें आहेत. कॉन्स्टन्स सरोवर अथवा बोडनसी हें जर्मनसामाज्याच्या सरहद्दीवर असून त्याचे उत्तर किनाऱ्याचे निरनिराळे भाग बव्हेरिया, वुर्टेंबर्ग व बेडन या संस्थानांच्या ताब्यांत आहेत. शियसी, ॲमरसी आणि वुर्मसी अशीं तीन मोठीं सरोवरें बव्हेरियन आल्प्समध्यें आहेत. उत्तरजर्मन मैदानांत एकंदरींत सुमारें २५०० चौरस मैल क्षेत्रफळ असलेलीं ५०० च्या वर सरोवरें असून, त्यांपैकीं ओडर हाफ, फ्रिश हाफ व क्युरिश हाफ हीं सर्वांत मोठीं आहेत हीं तिन्हीं अनुक्रमें ओडर, प्रेजेल व मेमेल या नद्यांच्या मुखांशीं आहेत.

ह वा मा न व पा ऊ स.—जर्मनींतील हवामान समुद्र-किनाऱ्यावरील देशाप्रमाणेंहि नाहीं किंवा एखाद्या महाद्वीपांतील प्रांताप्रमाणेंहि नाहीं; परंतु दोहोंच्या मध्यें आहे. अटलांटिक समुद्रावरून वाहणारे उष्ण किंवा पावसाळी वारे आडविण्याकरितां पश्चिमेस उंच पर्वत नसल्यामुळे या वाऱ्यापासून अगदीं पूर्वेकडील प्रांतास देखील थोडाबहुत फायदा होतो. दक्षिणेकडीच प्रांत समुद्रसपाटीपासून उंच, व उत्तरेकडील मैदानांत असल्यामुळें निरनिराळ्या ठिकाणच्या वार्षिक सरासरी उष्णमानांत म्हणण्यासारखा फरक पडत नाहीं, हें खालीं दिलेल्या आंकड्यांवरून दिसून येईल.

सरासरी वार्षिक उष्णमान

| | | |
|---|---|---|
| नैर्ऋत्येकडील प्रांत | ५२°–५४° | ( फॅरेनहीट ) |
| मध्यजर्मनी | ४८°–५०° | ” |
| उत्तरेकडील मैदान | ४६°-४८° | ” |
| पामेरानिया व पश्चिम-प्रशिया | ४४°–४५° | ” |
| पूर्व प्रशिया | ४२°–४४° | ” |

जर्मनींतील सर्वांत उष्ण प्रांत म्हटले म्हणजे ऱ्हाइन मैदानचा कार्लस्रुहेच्या उत्तरेचा भाग व नेकर, मेन आणि मोसेल नद्यांची खोरीं होत. म्हणूनच या भागांत द्राक्षांची चांगली लागवड होते. जसे जसे अधिकाधिक पूर्वेकडे जावें तसतसा हिंवाळा अधिकाधिक कडक भासूं लागतो. वेसेर नदीच्या पश्चिमेस जानेवारींतील सरासरी उष्णमान ३०° खालीं कधीं जात नाहीं, परंतु तेंच तिच्या पूर्वेस ३०° पावेतों जातें. पूर्वप्रशियांत व सिलेशियाच्या वरच्या भागात तर हें २६° ते २८° अंशांपर्यंत असतें. याच महिन्यांतील बव्हेरियाचेंहि उष्णमान २५° ते २६° पर्यंत असतें. जर्मनींत पाऊस जरी बहुधां सर्व ऋतूंत पडतो तरी तो विशेषतः उन्हाळ्यांत अधिक पडतो. जर्मनींत ज्या ठिकाणीं चांगला पाऊस पडतो असे भाग म्हटले म्हणजे, बव्हेरियाचें पठार, थ्युरिंजियन अरण्य, ब्लॅक फॉरेस्ट, व्हास्जेस, सॅक्सनीचें राज्य व सिलेशिया यांच्या दक्षिणेकडील डोंगराळ मुलूख, आणि हॅनोव्हर व ब्रेमेनपावेतों वायव्य किनारा हे होत. या ठिकाणीं ३० पासून ३४ इंचांपावेतों पाऊस पडतो. बाकीच्या पश्चिमजर्मनींत पामेरानियाच्या ईशान्य किनाऱ्यावर आणि पूर्वप्रशियांत साधारणतः २४ इंचांच्या वर वृष्टि होते. परंतु स्ट्रासबर्गच्या दक्षिणेकडील ऱ्हाइन नदीचें खोरें पॅलॅटिनेट, पेननदीचा पाणवठा, बॅडेनबर्ग, लुसॅटिआ सॅक्सनि, अरण्याच्या उत्तरेकडील थ्युरिंजियन पठार, पश्चिम प्रशिया प्रोसेन व सिलेशियाचा सखल भाग या ठिकाणीं तर पाऊस फारच कमी म्हणजे सुमारें १६पासून२० इंचांपर्यंतच पडतो. विशेषतः जुलै महिन्यांत तुफानें फार होतात. जसजसे पूर्वेकडे जावें तसतशी त्यांची संख्या कमी होत जाते.

व न स्प ती.—गहूं, जव, ओट व राय हीं धान्यें जर्मनींत सर्वत्र होतात. बटाट्याची लागवड जरी सर्व देशांत होते तरी उत्तरेकडील वाळूच्या मैदानांतील बटाटे विशेष चांगले असतात. मका मात्र फक्त दक्षिण भागांतच होतो. शिरस शक्य तेथें सर्व देशभर जवस उत्तरेकडे व सण मध्य जिल्ह्यांत होतो. नारिंग, पिअर, चेरी इत्यादि साधीं फळें जरी सर्व देशभर होऊं शकतात, तरी अंजिरासारखीं वरिष्ठ

दर्जाचीं फळें फक्त उष्ण प्रांतांतच होतात. द्राक्षाची लागवड उत्तरेकडे फक्त ५१ अक्षांशापर्यंतच होते. त्यांत विशेषतः ऱ्हाइनच्या व डान्यूबच्या प्रांतांतील द्राक्षांपासून चांगलें मद्य निघे. उत्तरेकडील मैदानांत ( विशेषतः सॅक्सनि प्रांतांत ) बीटपासून साखर करतात. ऱ्हाईन नदीच्या वरच्या भागांत व ओडर नदीच्या खोऱ्यांत तमाखू होते.

अ र ण्य.—दक्षिण जर्मनींतील पठारावरील अरण्यांतील व उत्तरेकडलि सखल प्रदेशाच्या पूर्वभागांत इमारती लांकडांचीं झाडें विपुल आहेत. एल्बनदीच्या पूर्वेस असलेल्या जर्मन मैदानांत विशेषतः देवदाराच्या वर्गांतील वृक्ष आढळून येतात. जर्मनीच्या उत्तर व वायव्य भागांत मात्र जंगलाचें नांव नाहीं तरी देखील तेथील मैदानांत खुरटीं झाडें विपुल असल्यामुळें लोकांनां सर्पणाची उणीव भासत नाहीं.

प्रा णी.—जर्मनींत रानटी जनावरें फारशीं नाहींत. कोल्ह्यासारखे प्राणी सर्व देशांत आढळून येतात. परंतु अस्वल फक्त आल्प्स पर्वतांतच सांपडतें. या देशांत जरी लांडगा विरळाच दृष्टीस पडतो, तरी हे प्राणी कधीं कधीं फ्रान्समधून पश्चिमजर्मनींत, व पोलंडांतून प्रशियांत व पोसेनमध्यें येतात. जर्मनींतील शेतांनां उंदरापासून बराच उपद्रव होतो. पारधीच्या जनावरांपैकीं हरीण,काळवीट, ससा, रानडुक्कर, इत्यादि प्राणी जर्मनींत आहेत. येथें पक्ष्यांची मात्र कांहीं कमतरता नाहीं. जर्मनींतील नद्यांत, सरोवरांत किंवा किनाऱ्यावरील समुद्रांत जरी मासे पुष्कळ आहेत तरी त्यांचे फारसे प्रकार सांपडत नाहींत.

लो क व स्ती.— जकातसंघाची स्थापना होईपर्यंत जर्मनींत पद्धतशीर खानेसुमारी होत नसल्यामुळें त्यापूर्वीच्या आंकड्यांवर फारसा भरवसा ठेवितां येत नाहीं. महायुद्धापूर्वी जर्मनसाम्राज्याची लोकसंख्या ६०६४११२७८ असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

डिसेंबर १ सन १९०५ रोजीं झालेल्या खानेसुमारीप्रमाणें जर्मनींत एक लक्षाच्यावर लोकसंख्या असलेलीं ४१ शहरें होतीं. जर्मनींत प्रत्येक चौरस मैली २९० याप्रमाणें लोकसंख्या होती. या आंकड्याची इतर युरोपियन राष्ट्रांच्या आंकड्यांशीं तुलना केली असतां असें दिसून येईल कीं बेलजम, हॉलंड व इग्लंड हे देश वगळून दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां जर्मनींतील वस्ती अधिक दाट होती. १८७१ मध्यें जर्मनसाम्राज्य स्थापन झाल्यापासून जर्मनीच्या ताब्यांत जो मुलूख होता तो, व्हर्सेलिसच्या तहानंतर पुष्कळच कमी झाला. या तहामुळें, अल्सेस-लोरेन हे प्रांत फ्रान्सला परत मिळाले. जर्मनीच्या पूर्वभागांत जे मुलूख होते त्यांपैकीं बराचसा प्रदेश पोल लोकांनां मिळाला. उत्तरेस असलेला श्लेसविग होलस्टनि हा प्रांत डेन्मार्कला मिळाला. यल्टझीन प्रांत हा श्लाव लोकांच्या ताब्यांत गेला. यूपेन व मालमेडी हे प्रदेश बेल्जमच्या वांट्याला आले. डॅझिग व मेमल हीं बंदरें जर्मनीच्या ताब्यांतून गेलीं.

अशा रीतीनें १९१९ सालीं जर्मनसाम्राज्याची जी पुनर्घटना झाली त्या पुनर्घटनेप्रमाणें जर्मनीचें क्षेत्रफळ ४७३, ३१४. ९ चौरस किलोमीटर होतें. १९२० सालीं जर्मनसाम्राज्याची १८ लोकसत्ताक टापूमध्यें विभागणी करण्यांत आली. या सालीं जर्मनीची लोकसंख्या६०८३७५७९ होती. याच सालीं जर्मनींत सुमारें ८४५८ लोकांनीं परदेशगमन केलें.

शे तीं—जर्मनींतील व्यापाराची व उद्योगधंद्यांची भयंकर वाढ झालेली होती तरी देखील राष्ट्राच्या संपत्तीचा बराचसा भाग शेतीवर व जातिवंत गुरें तयार करण्यावरच अवलंबून होता. लागवडीसारख्या जमीनीपैकीं बहुतेक ३/४ भागांत शेतें व कुरणें आहेत. पामेरानिया, पोसेन, सॅक्सनि, पूर्व व पश्चिम प्रशिया, या प्रशियन प्रांतांत मोठमोठ्या जमीनदाऱ्या आहेत. परंतु प्रशियाचा ऱ्हाइन प्रांत बेडन व बुर्टेंबर्ग या देशांत बहुधां शेतकऱ्यांकडे वेगवेगळीं स्वतंत्र शेतेंच आहेत.

अर्वाचीन काळांत कुरणांची स्थिति सुधारल्यामुळें हल्लीं जर्मनींत जातिवंत गुरांची विपुल पैदास होत असे. ती इतकी कीं, स्वतःच्या गरजा भागवून जर्मनींतून फ्रान्स व इंग्लंड या देशांत पुष्कळ गुरें पाठविलीं जातात. याशिवाय येथून इंग्लंडमध्यें लोण्याचीहि निर्यात होत असे. प्रशियन सॅक्सनींतील व पूर्व प्रशियांतील जातिवंत घोडे सर्व यूरोपभर प्रसिद्ध आहेत. अलीकडे अलीकडे मेंढ्या बाळगण्याकडे लोक दुर्लक्ष करूं लागल्यामुळें इंग्लंडमधून जर्मनींत दिवसेंदिवस लोकरीची अधिकाधिक आयात होऊं लागली आहे. उत्तर अथवा ईशान्य जर्मनींसारख्या टाकाऊ जमीन असलेल्या भागांतच लोक मेंढ्या बाळगण्याकडे विशेष लक्ष्य देतात. गुरें, डुकरें, इत्यादिकांच्या पैदासीकरितां जर्मनी इतकी काळजी घेते तरी तिला स्वतःकरितां परदेशांतून मांस आणावें लागतेंच. मच्छीच्या बाबतींतहि जर्मनीची तशीच परावलंबी स्थिति आहे.

महायुद्धानंतरच्या खानेसुमारीवरून पहातां, महायुद्धाच्या पूर्वी जर्मनींत जितकी पेराऊ जमीन होती त्यापेक्षां ती महायुद्धानंतर शेंकडा १४ टक्यांनीं कमी झाली. जमीनीपैकीं एक भाग जंगलवजा आहे. या भागापैकीं निम्में जंगल सरकारी व निम्में खासगी आहे.जंगलांत देवदारू वृक्षांची फार समृद्धि आहे. त्याशिवाय, फर, बीच, ओक, इत्यादि झाडेंहि पुष्कळ आहेत. स.१९०७ मध्यें जर्मनींत १३८१२७४ हेक्टेरच्या टापूमध्यें गहूं पेरण्यांत आला. त्याच्या खालोखाल स्पेल्ट व त्यानंतर सातू, ओट, बटाटे, गवत, बीट, राय इत्यादि पिकांचा नंबर लागतो. स. १९१९ मध्यें जर्मनींत ११४७७ ताडीचे कारखाने होते. तंबाखू व द्राक्षें यांचीहि उत्पत्ति मोठ्या प्रमाणावर होते.

गुराढोरांच्या संख्येंतहि महायुद्धानंतर तर पुष्कळ कमतरता दिसून आली.१९२० सालीं जर्मनींत ३५८१३८० घोडे,

१६७९९८४४ गुरें, ६१३९२९९ मेंढ्या इत्यादि जनावरें होतीं. प्रशियामध्यें गुराढोरांची संख्या सर्वांत अधिक आहे. स. १९२० मध्यें ११६४८७ टन मासे जर्मनींत पकडण्यांत आले.

ख नि ज प दा र्थ.—खनिजद्रव्यांत जर्मनीनें फ्रान्सला बरेंच मागें टाकलें असून महायुद्धापूर्वी ती ग्रेटब्रिटनशीं व संयुक्तसंस्थानांशीं यासंबंधांत स्पर्धा करित होती. यूरोपांतील कोणत्याहि दुसऱ्या देशांपेक्षां जर्मनींत रुपें अधिक निघतें. तिनें स. १९०५ सालीं आपल्या खाणींतून ४०० टन रुपें व ४ टन सोनें काढलें. याशिवाय जर्मनींत शिसें, तांबें, जस्त, निकेल, माती, अँटिमनि, कोबॅल्ट, अर्सेनिक, पारा, ग्रॅफाइट, चीनी माती, अँबर, चुना, जिप्सम, मीठ, कोळसा, व लोखंड या खनिज पदार्थांच्या खाणी आहेत. यांपैकीं मीठ, कोळसा, लोखंड, शिसें, तांबें व जस्त या धातूंचा जर्मनीची गरज भागून उरलेला भाग रवाना होतो.

महायुद्धाच्या पूर्वी लोखंड, पोटॅशम, कोळसा या खनिज वस्तू जर्मनींत सर्व यूरोपपेक्षां अधिक निघत होत्या. महायुद्ध सुरू होतांच खनिज वस्तूंचें मोठ्या प्रमाणांत खोदून काढण्याचें काम सुरू झालें. व्हर्सेलिच्या तहानें जर्मनीच्या ताब्यांतील, खनिजसंपत्तीचा टापू पुष्कळ कमी झाला. अल्सेस-लोरेन प्रांत फ्रान्सकडे गेल्यामुळें, त्यांतील लोखंडाच्या मोटमोठ्या खाणी जर्मनीच्या ताब्यांत गेल्या. तसेंच सार जिल्ह्यांतील खनिज संपत्तीवरील ताबाहि १५ वर्षेपर्यंत जर्मनीच्या हाताबाहेर गेल्यामुळें जर्मनीला फार नुकसान सोसावें लागलें. त्यामुळें स. १९१९ सालीं जर्मनींतील खनिज संपत्ति २२८८४४१०० टन होती. या खनिज वस्तूमध्यें लोखंड, शिसें, तांबें, जस्त, निकेल या धातू प्रमुख होत. लिग्नाइट कोळसा व पिट कोळसा यांचें उत्पन्न अनुक्रमें १४७५७००० व ११६३००० टन झालें. पिटकोळसा शहर प्रांतांत, व अप्परसायलेशिया प्रांतांत फार होत असे; पण महायुद्धानंतर हे प्रांत जर्मनीच्या ताब्यांतून गेल्यामुळें जर्मनीचें फारच नुकसान झालें.

उ द्यो ग धं दे.—जर्मनींत गेल्या कांहीं वर्षांत उद्योगधंद्याची विलक्षण वाढ झाली आहे. स्थूलमानानें जर्मनींतील उद्योगधंद्याची खालीं दिल्याप्रमाणें प्रांतवारी वर्गवारी करतां येईल.

| कारखान्याचें नांव. | ठिकाण. |
|---|---|
| लोखंडी सामान ... ... | प्रशिया, अल्सेसलॉरेन बव्हेरिया व सॅक्सनि. |
| पोलाद ... ... | व्हेनिश प्रशिया. |
| विणकाम ... ... | मुख्यत: सॅक्सनि. |
| ताग ... ... | सिलेशिया, वेस्टफालिया. |
| सुती वस्त्रें | वेडन बव्हेरिया अल्सेस-लॉरेन, वुर्टेंबर्ग. |
| लोकरीचीं वस्त्रें ... ... | सॅक्सनि, व्हाइनप्रांत. |
| रेशमी वस्त्रें ... ... | व्हेनिश प्रशिया, अल्सेस, बेडन. |
| कांच व चीनई माती ... ... | बव्हेरिया. |
| तमाखू ... ... ... | ब्रेमेन हँबर्ग. |
| रासायनिक द्रव्यें ... ... | प्रशियन सॅक्सनि. |
| घड्याळें ... ... ... | सॅक्सनि, न्यूरेंबर्ग. |
| बिअरमद्य ... ... ... | बव्हेरिया व प्रशिया. |
| फीत ... ... ... ... | सॅक्सनि. |
| सोन्यारुप्याचें काम ... ... | ...बर्लीन, अरॉव्हेनबर्ग. |

याशिवाय कागदाचे कारखाने देशांत बहुतेक सर्वत्र आहेत. मेंझ व वर्म्स हीं शहरें कांतड्याचें सामान करण्याकरितां प्रसिद्ध आहेत. साखरेचे कारखाने विशेषतः प्रशियन सॅक्सनींत आहेत. मॅगडेबर्ग म्हणजे जर्मनींतील साखरेची पेठच आहे. तेथून सर्व जर्मनींत साखर पुरविली जाते.

जकातसंघाची स्थापना झाल्यापासून जर्मनीच्या व्यापाराची वाढ झपाट्यानें होण्यास सुरुवात झाली. या संघाचा उगम १८२८ मध्यें प्रशिया व हेस्से या संस्थानांत झालेल्या तहांत आहे. यानंतर एकामागून एक जर्मनींतील दुसरीं संस्थानें या संघास येऊन मिळूं लागलीं. तरी देखील १८७९ पावेतों सामान्यतः पाहूं गेलें असतां जर्मनींत खुला व्यापारच होता. या जकात-संघाच्या कलमान्वयें संशोधित लोखंड, यंत्रें, इंजिनें, धान्य, इमारती लांकूड गुरें, घोडे, मेंढ्या, चरबी इत्यादि अनेक वस्तूंच्या आयातीवर जबर जकात बसविण्यांत आली. कच्चा माल, शास्त्रोपयोगी उपकरणीं, जहाजें, वाङ्मयविषयक व कलाकौशल्याचे पदार्थ व क्षुल्लक जिनसा यांना मात्र जकातीच्या पदार्थांतून वगळण्यांत आले. व स. १८६५ त निर्यात मालावरील जकात काढून घेतली. दरवर्षी सरकार नियुक्त तज्ज्ञ आंकडेशास्त्री आयात व निर्यात पदार्थांची सरहद्द ओलांडण्यापूर्वीच्या अलग अलग किंमती ठरवीत. जकातीच्या नाक्यावर मालाचें परिणाम व्यापाऱ्यांच्या सांगण्यावरून ठरवितात. परंतु आयात मालाच्या संबंधांत संशय आल्यास तो नाक्यावर मोजण्यांत येत असे. माल आला कोठून व जावयाचा कोठें याचीहि नोंद ठेवली जात असे. १९२० सालीं जर्मनींत बागाईत, गुरांढोरांची पैदास, खानिखोदन, रासायनिक धंदे, साबण, कापड, कागद, चामडी, फोटोग्राफी, इत्यादि प्रमुख धंदे चालत होते. या सालीं जर्मनीमध्यें खाणींतील तेलें आयर्न मँगनीज, तांबें, लोखंड, ॲल्यूमिनम, कथील, शिसें, जूट, ताग, कापूस, रेशीम, कोळसा, रबर, चिनीमाती, लोंकर इत्यादि वस्तूंच्या कच्या मालाची आयात झाली व साखर, कोळसा, जंगलांतील लांकूड, रासायनिक द्रव्यें; नीळ, रेशीम, कापड, भांडीं, कांचसामान, लोखंड, शिसें, कथील, यांत्रिकसामान, कागद, विद्युत्साहित्य, घड्याळें इत्यादि जिनसांची प्रामुख्यानें निर्गत झाली.

नौ का न य न.—जर्मनींतील गोद्यांत आपल्या देशाची गरज भागविण्यापुरती जहाजें बांधूं लागल्यामुळें स. १९०४ मध्यें इंग्लंडांतून होणारी जहाजांची आयात जवळ जवळ


जर्मनीचा नकाशा.
उत्तर समुद्र
बाल्टिक समुद्र
डेन्मार्क
फ्रिसिअन बेटें
बोर्नहोम
रूजेन
कील
डँझिक
कोनिग्जबर्ग
हॅम्बर्ग
लुबेक
मक्लेनबर्ग
ब्रेमेन
एल्बनदी
ओडरनदी
बर्लिन
पोलंड
रशिया
ब्रेसला
डेटमोल्ड
ब्रन्सविक
अॅनहाल्ट
ब्रावार्डबर्ग
कोलोन
सक्सनी
अॅलटेनबर्ग
कोबर्ग
चेकोस्लोव्हाकिआ
फ्रान्स
बव्हेरिया
रॅटिसबन
स्ट्रॅसबर्ग
वुर्टेंबर्ग
म्युनिच
डॅन्यूबनदी
स्वित्सर्लंड
ऑस्ट्रिया

बंदर झाली होती. परंतु इ.स.१९०५ पासून आरमारखात्याची मागणी वाढल्यामुळें जर्मनींतील गोद्यांस काम अधिक पडूं लागलें. म्हणून जरूरीच्या तेवढ्या व्यापारी जहाजांच्या मागण्या ब्रिटिश गोद्यांकडे येऊं लागल्या.

जर्मनींतील मुख्य मुख्य बंदरें म्हटलीं म्हणजे हँबर्ग, स्टेटिन, ब्रेमेन, कील, ल्युबेक, फ्रेन्सबर्ग, ब्रेमरहॅवन, डँझिग, नीस्टमुंड व एमडेन हीं होत. स. १८६८ पासून सर्व जर्मन जहाजांवर काळ्या, पांढऱ्या, लाल रंगांचें निशाण वापरूं लागले. जहाजांच्या संख्येंत जर्मनीचा नंबर ग्रेटब्रिटन, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व नॉर्वे या देशांखालीं होता. परंतु भरताडाच्या मानानें पाहिलें असतां फक्त ग्रेटब्रिटन व अमेरिकेंतील संयुक्तसंस्थानें यांच्याखालींच लागे. स.१९०८ सालीं जानेवारीच्या पहिल्या तारखेस २,७९०,४३५ टन भरताडाचीं एकूण ४५७१ जहाजें व आगबोटी जर्मनीच्या मालकीच्या होत्या. याशिवाय सुमारें ४० लक्ष टन भरताडाच्या २५,००० लहानमोठ्या बोटींनीं नद्यांतून, कालव्यांतून व किनाऱ्यावरून देशांतल्या देशांत व्यापार चालत असे. १९१४ सालीं जर्मनींत ५२३८९३८ टन वहनशक्तीचीं व्यापारी जहाजें होतीं. पण महायुद्धानंतर त्यांपैकीं १२००० टनांचीं जहाजेंच तेवढीं जर्मनीजवळ शिल्लक राहिलीं. व्हर्सेलिसच्या तहानें जर्मन नौकानयनाला मोठाच धक्का बसला.

आ ग गा ड्या.—१८३५ मध्यें जर्मनींत न्युरेंबर्गपासून फुर्थपावेतों ( चार मैल लांबीची ) पहिली रेल्वे सुरू झाली. आरंभीं निरनिराळ्या कंपन्यांनीं निरनिराळे लोहमार्ग घातल्यामुळें त्यांत पद्धत अशी कांहींच नव्हती. परंतु स.१८८१ त प्रशियन सरकारानें आपल्या राज्यांतील बहुतेक सर्व रेल्वे खरेदी केली, व आपल्या राज्यांत सर्वत्र एकरूपता आणली. इतकेंच नव्हे तर इतर संस्थानांसहि त्याचप्रमाणें करावयास लावलें. यामुळें मुख्य मुख्य शहरांमधील दळणवळणास अनावश्यक विलंब लागूं नये म्हणून सरळ मार्ग करतां आले, व निरनिराळ्या संस्थानांतील लोहमार्ग जोडले गेल्यामुळें, बर्लिन–व्हिएन्ना–बुडापेस्ट, बर्लिन–कोलोन–ब्रुसेल्स–पारिस, बर्लिन–हॅले–फ्रँकफोर्ट–ऑन-मेन–बसेल, हँबर्ग-कॅसेल–म्युनिच–व्हेरोना, ब्रेस्लॉ—ड्रेस्डेन-बँबर्ग-व्हिनेव्हा आदिकरून मुख्य लोहमार्ग तयार झाले. स.१९०७ पासून सर्व रेल्वेचे भाड्याचे दर ठराविक करण्यांत आल्यामुळें हिशोबांतील घोटाळा बराच कमी झाला. या नियमाप्रमाणें उतारूंच्या गाड्यांचे दर पहिल्या वर्गास मैलामागें सवा आणा, दुसऱ्या वर्गास सात दशांश आणा, तिसऱ्या वर्गास अर्धा आणा व चवथ्या वर्गास पाव आणा याप्रमाणें होता. १९१३ सालीं जर्मनींत ५७४८१ किलोमिटर रेल्वे चालू होती. पण १९२० सालीं यापैकीं ७००० किलोमिटर रेल्वे दुसऱ्या राष्ट्रांच्या ताब्यांत गेली. जर्मनींतून दूर दूरच्या देशांस जाणाऱ्या उतारूंकरितां, उत्तरसमुद्रावर ब्रेमेन व हँबर्ग हीं दोन बंदरें आहेत.

ज ल मा र्ग.—जर्मनींतील बहुतेक सर्व जलमार्ग सरकारच्याच ताब्यांत आहेत. ज्यांतून जहाजें जाऊं येऊं शकतात अशांपैकीं मुख्य कालवा म्हटला म्हणजे उत्तरसमुद्र व बाल्टिक समुद्र यांनां जोडणारा ६१ मैल लांबीचा कैसर विल्हेल्म कालवा ( १८८७–१८९५ ) होय. देशांतल्या देशांतील नौकानयनाकरितां केलेल्या कालव्यांत डॉर्टमंड–एम्स ( लांबी १५० मैल व सरासरी खोली ८ फूट ) आणि एल्ब–ट्रॅव्ह ( लांबी ४३ मैल व सरासरी खोली ७॥ फूट ) या कालव्यांची मुख्यत्वेंकरून गणना होते. सर्वांत जास्तींत जास्त कालव्यांची संख्या बर्लिनच्या आसपास आहे. हे कालवे स्प्री व एल्ब या नद्यांनां जोडतात. या देशांतील कालव्यांची एकूण लांबी २६०० मैल आहे.

स ड का.—नेपोलियनशीं झालेल्या युद्धापासून जर्मनींत चांगल्या चांगल्या सडका तयार करण्याकडे अधिक लक्ष दिलें जाऊं लागलें. थ्युरिंजिया व हॅनोव्हर या भागांतील सडकांच्या चांगुलपणाची प्राचीन काळापासून प्रसिद्धी आहे. सर्व देशांतील सार्वजनिक सडकांची एकंदर ८०००० मैल लांबी असावी असा अंदाज आहे.

पो स्ट व ता र खा तें.—पोस्टखात्याच्या सोयीकरितां वुर्टेंबर्ग व बव्हेरिया सोडून बाकीचा सर्व जर्मन देश एकच इलाखा समजण्यांत येई. वुर्टेंबर्ग व बव्हेरिया या दोन राज्यांनीं मात्र आपलीं स्वतःचीं वेगवेगळीं खातीं ठेविलीं होतीं. इ. स. १८७४ त पोष्टखातें व तारखातें हीं दोन्ही एकत्र करण्यांत आलीं. महायुद्धांतांपूर्वी बव्हेरिया व वुर्टेंबर्ग संस्थानांतील पोस्टखातें जर्मनीच्या ताब्यांत नव्हतें. पण १९१९ सालीं जर्मनींत लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्यामुळें सर्व राष्ट्रभर जर्मन साम्राज्याचें पोस्टखातें निर्माण झालें. १९१४ सालीं ४३५०० किलोमीटर इतकी तार जर्मन तारखात्याच्या मालकीची असे. हल्लीं ६५०० किलोमिटर फक्त आहे.

रा ज्य प द्ध ति.—जर्मनसाम्राज्याची राज्यपद्धति मुख्यत्वेंकरून १८६७ मध्यें स्थापन झालेल्या उत्तर–जर्मन–संघाप्रमाणें होती. याच्या नियमानुसार संघाचा अध्यक्ष वंशपरंपरेनें प्राशियाचा राजा असे. फ्रँको-जर्मन युद्धानंतर दाक्षिणजर्मन संस्थानें या संघास येऊन मिळालीं; व ता. १८ जानेवारी सन १८७१ रोजी प्रशियाच्या राजास जर्मन बादशहा ( जर्मनीचा बादशहा नव्हे ) हा किताब देण्यांत आला. ही पदवी होहेंझोलेर्नच्या वंशांत वंशपरंपरेनें वडील मुलाकडे राहावयाची होती. जर्मन बादशहा आपली बादशाही सत्ता संयुक्त संस्थानच्या नांवानें चालवित असे. त्याच्या मदतीकरितां निरनिराळ्या जर्मन संस्थानांच्या अधिकाऱ्यांनीं आपले प्रतिनिधी म्हणून पाठवलेल्या ५८ सभासदांचें एक मंत्रिमंडळ असे. या मंत्रिमंडळांत प्रशियाला १७, बव्हेरियाला ६, सॅक्सनि व वुर्टेंबर्ग यांनां प्रत्येकीं चार, बेडन व हेस्सेच्या ड्यूकांनां प्रत्येकीं तीन, मेक्लेनबर्गश्वेरिन व ब्रुन्सविक येथील ड्यूकांनां प्रत्येकीं दोन, अल्सेस–लॉरेन

खेरीज करून बाकीच्या १७ संस्थानांस प्रत्येकीं एक सभासद पाठविण्याचा हक्क असे. अल्सेस-लॅरेनचा लेफ्टनंट आपल्या प्रांतांतून या सभेकरितां चार कमिशनर पाठवी; पण यांनां मतें देण्याचा हक्क नसे. मंत्रिमंडळांतील सभासदांची नेमणूक बैठकीच्या काळापुरतीच होत असे. याशिवाय रीचर्स्टॅग म्हणून लोकप्रतिनिधींचें एक कायदेकौन्सिल असे. यांतील एकंदर सभासदांची संख्या ३९७ असून यांपैकीं २३६ फक्त प्रशियाच्या राज्यांतील लोकांनींच निवडून दिलेले असत. प्रत्येक पांच वर्षांनीं कायदेकौन्सिलची नवी निवडणूक होत असे. लष्करीखातें, आरमारखातें व दुसऱ्या इतर खात्यांतहि जेथें जेथें साम्राज्याच्या संरक्षणाचा संबंध येतो तेथें तेथें साम्राज्यसंबंधीं संपूर्ण सत्ता बादशहाच्या हातीं असे. कोणताहि कायदा पास होण्यापूर्वी त्याला कायदेकौन्सिलांत व मंत्रिमंडळांत मताधिक्य मिळून बादशहाची संमति लागे बादशहास कायदेकौन्सिल मोडण्याचा अधिकार असे; परंतु तें मोडल्यापासून ६० दिवसांच्या आंत नवी निवडणूक करवून ९० दिवसांच्या आंत पुन्हां तें भरविलें पाहिजे असा नियम होता. कायदेकौन्सिलांची बैठक वर्षांतून निदान एकदां तरी झालीच पाहिजे. १९०६ सालापासून कायदे कौन्सिलच्या सभासदांस पगार मिळूं लागले. मंत्रिमंडळांच्या हातीं कार्यकारी सत्ता असे. मंत्रिमंडळाच्या (किंवा कार्यकारी कौन्सिलच्या) नऊ कमिट्या करून त्यांच्याकडे साम्राज्याचीं निरनिराळीं खातीं दिलेलीं असत. प्रत्येक कमिटींत निदान चार संस्थानांचे तरी प्रतिनिधि असत. मुख्य मंत्र्याची नेमणूक बादशहा करी व हा कार्यकारी कौन्सिलचा अध्यक्ष असे. निवळ लष्करी बाबी सोडून देऊन बाकीच्या साम्राज्यविषयक सर्व कारभाराबद्दल मुख्य मंत्री जबाबदार असे. अंतस्थ राज्यकारभारांत मात्र सर्व जर्मन संस्थानांनां पूर्ण स्वातंत्र्य असे. महायुद्ध सुरू होण्यापूर्वी एकंदर जर्मन वसाहती क्षेत्रफळ १०,०६४चे चौरस मैल व लोकसंख्या १,२१,९२६००२ होती. या सर्व वसाहती जर्मनीनें इ. स. १८८४ पासून १८९९ पावेतोंच्या १६ वर्षांत मिळविल्या. किआचौ खेरीजकरून इतर सर्व वसाहतींवर कलोनियल ऑफिसची देखरेख होती. कियाचौ मात्र आरमारखात्याच्या अधिकाऱ्याकडे होतें. जर्मनींतील सर्व संस्थानांची स्थानिक स्वराज्याची पद्धति मुख्य मुख्य गोष्टींत प्रशियाप्रमाणेंच आहे. तींतील मुख्य तत्त्व हें आहे कीं, तज्ज्ञांनीं कारभार पहावयाचा; त्यांच्यावर लोकमताचा दाब व तिजोरीवर ताबाहि लोकांचाच; परंतु या सर्वांवर देखरेख मात्र प्रांतिक सरकारची. परंतु गंमत अशी होते कीं, एकदां स्थानिक स्वराज्याचा अध्यक्ष निवडला गेला कीं, तो प्रांतिकसरकारास जबाबदार असल्यामुळें नोकरशाहीचाच एक भाग होऊन बसतो; व प्रांतिक सरकारच्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजतो. शिवाय इंग्लंडमध्यें शिक्षण, आरोग्य, पोलीस, इत्यादि ज्या कांहीं बाबी स्थानिक स्वराज्याकडे सोंपविल्या असतात, त्या जर्मनींत प्रांतिक-सरकारच्या अधिकारांतील समजल्या जातात. अशा विचित्र परिस्थितींतहि सर्व कारभार सुरळीत चालतो. याचें कारण लोकांस झालेली शिस्तीची संवय व जर्मन नोकरशाहीचीं उदात्त व प्रागतिक मतें. "महायुद्धापूर्वी बर्लिन येथील व्यवस्था कशी होती हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल." नगर व्यवस्था–१८८१ सालीं बँडेनबर्ग प्रांतापासून बर्लिन शहरास वेगळें करून त्याचा स्वतंत्र जिल्हा बनविण्यांत आला. परंतु प्रांतकचेऱ्या, धर्मसभा, शिक्षण, आरोग्य वगैरे खात्यांवर ब्रँडेनबर्ग प्रांताच्या खात्यांचीच हुकमत चालते. नगरव्यवस्थेचें कांहीं काम पोलिसखात्याकडे व कांहीं म्युनिसिपालिटीकडे आहे. पोलिसखात्याकडे असलेली कामें:-(१) सर्वसाधारण, (२), व्यापार, (३) इमारती, (४) फौजदारी, (५) परवाने, (६) बाजारपेठ. याशिवाय सार्वजनिक शांतता, सर्व परराष्ट्रीय माणसांवर देखरेख या खात्याकडे असून फायर ब्रिगेडवर (अग्निशमन खातें) देखील या खात्याचीच हुकमत चालते. मुलकी कारभार नगरसभेकडे आहे. शहराच्या प्रत्येक भागांतून तीन प्रतिनिधी निवडून येतात. अशा निवडून आलेल्या १४४ प्रतिनिधींची सार्वजनिक सभा असते. या निवडणुकीस बादशहाची संमति अवश्य असली पाहिजे. बादशहास कांहीं एक कारण न देतां कोणाहि सभासदाची निवडणूक रद्द करतां येते. सार्वजनिक सभेच्या सभासदांपैकीं ६२ सभासदांची एक नगरसभा असते. त्यांतील १५ सभासद पगारी असून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक सार्वजनिक सभा करते. अध्यक्ष हा प्रशियन अपर हाऊसचा प्रतिनिधि असणें जरूर असतें सार्वजनिक सभेच्या निवडणुकीकरितां वयांत आलेल्या प्रत्येक पुरुषास मत देण्याचा अधिकार असतो. नगरसभेकडे (सिटिकौन्सिल) सर्व मुलकी कारभार असतो. सर्व कामाकरितां नगरसभा व सार्वजनिक सभा एक होऊन त्यांच्या निरनिराळ्या पोटकमिट्या स्थापन होतात. त्या पोटकमिट्यांचे अध्यक्ष नगरसभेंतील प्रतिनिधी असतात. त्यांच्या ताब्यांत पाणीपुरवठा, दवाखाने, शाळा, शहररोषनाई वगैरे खातीं असतात.

*न्या य प द्ध ति*, प्राचीन कायदे:—फ्रँकच्या कायद्याशिवाय जर्मन प्राचीन कायद्याचे मुख्य भाग—(१) विसिगोथोरम कायदा, (२) बरगन्डिओनम कायदा, (३) र्‍याबटस ॲलेमन्नारम व ॲलेमन्नोरम कायदा, (४) बॅजुव्हरिओरम कायदा, (५) सॅक्सोनम् कायदा, (६) फ्रिसिओनम् कायदा (७) अँग्लिओरम एट् वेरिनोरम हाकूएस्ट थुरिंगोरम व (८) लॅंगोबारडोरम.

विसिगोथोरम कायदा—विसिगॉथ लोकांचा अतिप्राचीन कायदा युरिक राजाच्या कारकीर्दींत (४६६-४८५) लिहिला गेला. आपल्या स्वतःच्या कायद्याशिवाय युरिक राजानें आपल्या पूर्वीच्या राजांचे कायदेहि यांत घेतले; व

त्यांची पुन्हा व्यवस्थित रीतीनें मांडणी केली. या कायद्याच्या २७६ व ३३६ भागांचा कांहीं भाग पारिस येथें आहे. स्पेनमधील विसिगॉथ लोकांत युरिकचा कायदा लियोविजिल्डच्या कारकीर्दीपर्यंत ( ५६८–५८६ )चालू होता. त्यानें या कायद्यांत सुधारणा केली व त्याच्यानंतर विसिगॉथ कायद्यांत फरक झाला; व पूर्वी निरनिराळ्या जातींकरितां निरनिराळा कायदा असे. तो सर्व देशाकरितां एक करण्यांत आला. स. ६८१ मध्यें हारवीग राजानें यांत फरक केला व त्याला विसिगोथोरम कायदा म्हणतात.

बरगंडिओनम कायदाः—हा कायदा गन्डोबॅल राजानें ( ४७४–५१६ )रचिला. त्यानें अथवा त्याच्या मुलानें त्यांत थोडा फरक केला. याला लिबर कान्स्टिटयुशनम व गन्डोबॅल्ड कायदा म्हणत. हा कायदा बरगंडीच्या लोकांत रूढ होता.

प्याक्टस् अलमॅन्नोरम व अलमॅन्नोरम कायदा— ऱ्हाईन व लिच या नद्यांच्यामध्यें रहाणाऱ्या अॅलेमानि लोकांच्या कायद्याचीं दोन पुस्तकें आहेत. एक प्राचीन असून त्याला प्याक्टस अलॅमॅन्नोरम म्हणतात व हा कायदा ७ व्या शतकाच्या पहिल्या अर्धभागांत पहिल्या डॅगाबर्टच्या कारकीर्दीत झाला. त्यानंतरच्या पुस्तकाला लेक्स अलॅमॅन्नोरम म्हणत व तो ७०९ ते ७३० या अवधींत लिहिला गेला असावा.

बॅजुव्हेरिओरम कायदाः—लिचनदीच्या पूर्वेस राहणाऱ्या बव्हेरिअन लोकांचा हा कायदा आहे. हा विसिगॉथ व अलेमन्नि यांच्या कायद्यावरून केलेला आहे. हा कायदा ७४३ ते ७४९ या अवधींत रचला गेला असला पाहिजे.

सॅक्सोनम कायदा–सक्सनि नांवाच्या भागाच्या प्राचीन कायद्याला सक्सोनम् म्हणतात व तो इ. स८०३ पासून चालू होता.

फ्रिसिओनम् कायदाः–हा कायदा निरनिराळया कायद्यांची खिचडी आहे; व यांतील कायदे परस्परविरोधी आहेत.

लेक्स अँग्लिओरम एट् वेरिनोरम हाक् एस्ट थुरिंगोरमः–९ व्या शतकांत अनस्ट्रा नदीच्या दक्षिणेस थूरिंजियांत सोराबि व वार्बिन अँग्लि लोक रहात. या लोकांचें नांव धारण करणारा हा कायदा होता. व हा कायदा म्हणजे स्थानिक चालीरीतींचा संग्रह होता.

लँगोबार्डेरम कायदः—हा लॉंबर्ड लोकांचा कायदा आहे. स. ६४३ मध्यें याचा पहिला भाग रचला गेला. कांहीं भाग त्याच्यानंतर म्हणजे स.६६८ मध्यें जोडला गेला.

**अ दा ल ती.**—जर्मनींत एकंदर चार प्रकारचीं कोर्टें आहेत. त्यांपैकीं लाइपझिगला असलेलें वरिष्ठ कोर्ट मात्र साम्राज्यसरकारच्या अधिकाराखालीं असून बाकीच्या कोर्टांवर ज्या ज्या संस्थानांत तीं असतात त्या त्या संस्थानांची सत्ता असते. या वरिष्ठ कोर्टांत कार्यकारी कौन्सिलच्या सल्ल्यानें बादशहाकडून नेमले गेलेले ९२ न्यायाधीश असत. खालच्या कोर्टांवरील अपीलांचा निकाल लावण्याकरितां व कायद्यासंबंधीं भानगडीच्या प्रश्नांवर विचार करण्याकरितां, सातसातांची एक एक याप्रमाणें या न्यायाधिशांच्या दहा सिनेट केलेल्या असतात. अर्थात् दिवाणी किंवा फौजदारी मुकदम्यांनां सर्व जर्मनींत तोच कायदा लागू पडतो हें सांगावयास नकोच. १९०४ सालीं जर्मनींत गुन्ह्यांचें प्रमाण दर दहा हजार लोकांमागें १२४.२ असें होतें. या गुन्हेगारांत बायकांची संख्या जवळ जवळ ⅕ होती. जर्मनींत निराश्रित लोकांनां मदत करणें हें स्थानिक स्वराज्यसंस्थांचें कर्तव्यकर्म समजलें जातें. वृद्धापकाळामुळें, अपघातामुळें, अजारीपणामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणानें मनुष्य आपलें पोट भरण्यास असमर्थ झाला असेल तर त्यास मदत मिळण्याची सोय केल्यामुळें देशांतील दारिद्र्य व गुन्हे पुष्कळअंशीं कमी झाले.

१८८३ सालीं असा कायदा झाला कीं, कारखान्यांतील सर्व मजुरांनीं, आपण अजारी पडल्यास, किंवा आपल्याला अपघात झाल्यास, किंवा कोणत्याहि कारणानें आपल्यांत स्वतःचें पोट भरण्याचें सामर्थ्य न राहिल्यास आपल्याला मदत मिळावी म्हणून आपले विमे उतरलेच पाहिजेत. अशा प्रकारें ज्यानें विमा उतरला असेल तो अजारी पडल्यास किंवा त्याला अपघात झाल्यास किंवा कांहीं कारणामुळें त्याच्या अंगीं स्वतःचें पोट भरण्याचें सामर्थ्य न राहिल्यास त्याला मदत मिळेल इतकेंच नव्हे तर मेल्यास त्याच्या मागें त्याच्या निराश्रित बायकापोरांस वर्षासन मिळत राहील. यानंतर पुढें निरनिराळ्या वेळीं या कायद्यांत फेरफार होऊन त्याचें स्वरूप अधिकाधिक सामान्य करण्यांत आलें, व त्यांत दुसऱ्याहि कित्येक कामकरीवर्गांचा समावेश केला गेला.

**ध र्म.**—जर्मनीमध्यें प्रत्येक संस्थानाच्या धर्मविषयक संस्था वेगवेगळ्या असतात. उदाहरणार्थ जर्मन बादशहा जरी प्रशियाचा राजा म्हणून त्या राज्यांतील प्रॉटेस्टंट धर्माचा आद्यगुरू समजला जात असे, तरी इतर संस्थानच्या धर्मसंस्थांशीं त्याचा कांहींच संबंध नसे. प्रशियाच्या रोमन कॅथोलिक समाजाचे आपल्या प्रॉटेस्टंट राजाशीं कोणत्या प्रकारचे संबंध रहावयाचे, हें प्रशियाचा राजा व पोप यांच्यांत वाटाघाट होऊन ठरलेलें होतें. बव्हेरियाचा राजा जरी रोमन कॅथोलिक धर्माचा असला तरी कायद्यानें तो आपल्या राज्यांतील प्रॉटेस्टंट धर्माचा आद्यगुरू मानला जातो. अल्सेस–लॉरेन, बव्हेरिया व बेडन या संस्थानांत रोमन कॅथोलिक फार आहेत; पण प्रशिया, वुर्टेंबर्ग, हेस्से आणि ओल्डेनबर्ग यांत प्रॉटेस्टंट लोकांचें आधिक्य आहे. बाकीच्या संस्थानांत दोहोंची सरमिसळ आहे. सर्व जर्मन साम्राज्यांत १९०० सालीं शेंकडा ६२·५ प्रॉटेस्टंट व ३६·१ रोमन क्याथोलिक होते. यहुदि लोकांचें प्रमाण शेंकडा १ च असून बाकीचे लोक दुसऱ्या पंथाचे होते. कायद्यानें जरी यहूदि लोकांस सरकारी नौकरींत कोणतीहि जागा

मिळावयास हरकत ठेविली नाहीं तरी त्यांनां कित्येक खात्यांत जागा मिळत नाहीं एवढी मात्र गोष्ट खरी आहे. तरी देखील हा वर्ग फारच संपत्तिमान आहे. इतकेंच नव्हे तर देशांत त्यांचें वर्चस्वहि बरेंच आहे. देशांतील बहुतेक वर्तमानपत्रें यहूदि लोकांच्याच ताब्यांत आहेत व शहरांत अर्धेअधिक वकील यहूदिच असतात. व्यापारी लोकांतहि यांचा मोठा भरणा असून यांच्यापैकीं बरेचसे लोक पैशाची देवघेव करतात. इतर लोकांशीं बरोबरीच्या नात्यानें वागावयास मिळावें म्हणून यांच्यांतील कांहीं लोक अलीकडे धर्मांतर करूं लागले आहेत.

शि क्ष ण.—जर्मनींत सर्वत्र सक्तीचें शिक्षण असल्यामुळें सहापासून चौदा वर्षापावेतोंच्या सर्व मुलांस शाळेंत जावेंच लागतें. खेड्यापाड्यांतून व शहरांतून प्राथमिक शिक्षणाच्या अनेक शाळा आहेत. १९०७ सालीं त्यांचें प्रमाण ९०० लोकांमागें एक शाळा असें होतें. त्या वर्षी प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ एकंदर अडीच कोटी पौंडांवर खर्च झाला होता, व या रकमेपैकीं पाऊण कोटि पौंड सरकारांतून दिले गेले होते. १९२१ सालीं जर्मनींत २३ विश्वविद्यालयें, ११ धंदे शिक्षणाचीं कॉलेजें, ३ पशुरोगचिकित्सा शिक्षणाच्या संस्था, ४ शेतकी कॉलेजें, २ खनिजविज्ञानाचें. ३ जंगलजोपासनेचें, ४ व्यापाराचें, १८ कलाकौशल्याचें व ११ संगीतशास्त्राचें शिक्षण देणारीं कॉलेजें होतीं.

जर्मनींत एकंदर २२ विश्वविद्यालयें आहेत. पोसेनखेरीजकरून प्रत्येक मोठ्या प्रांतांत निदान एक तरी विश्वविद्यालय आहेच. मन्स्टर सोडून देऊन बाकीच्या सर्व ठिकाणच्या विश्वविद्यालयांत धर्मज्ञान, कायदेशास्त्र, वैद्यकशास्त्र व तत्वज्ञान या चार शाखा आहेत. मन्स्टरला मात्र वैद्यकशास्त्राची शाखा नाहीं. जर्मनींत बर्लिन, म्युनिच, डार्मस्टाड, कार्लसरुहे, हॅनोव्हर, ड्रेस्डेन, स्टटगार्ट, एक्स–ला—शॅपेल, ब्रुन्सविक व ड डॅन्झिग या दहा ठिकाणीं वरिष्ठ प्रतीचीं कलाभुवनें, व बर्लिन, क्लास्थाल ( हार्झ पर्वत ) आणि फ्रीबर्ग ( सॅक्सनि ) येथें खनिखोदन शिक्षणाकरितां विद्यालयें आहेत. याशिवाय शेतकीशिक्षण, व्यापारीशिक्षण, पशुवैद्यशास्त्र इत्यादि गोष्टींच्या अध्ययनाकरितां कित्येक ठिकाणीं शाळा असून, युद्धशास्त्राकरितां बर्लिन व म्युनिच येथें व आरमारशास्त्रासाठीं कील येथें विद्यापीठें आहेत. बर्लिन, म्युनिच, हायडेल्बर्ग, गॉटिंजेन स्ट्रासबर्ग, ड्रेस्डेन, हॅंबर्ग, स्टटबर्ग, लाइपझिग, वुर्झबर्ग, ट्युबिंजेन, रोस्टॉक, ब्रेस्लॉ-फ्रीबर्ग व बॉन या ठिकाणीं असलेल्या ग्रंथसंग्रहालयांत अडीच लक्षापासून दहा लक्षापर्यंत पुस्तकांचा संग्रह आहे. बर्लिन,म्युनिच,गॉटिंजेन, एर्फर्ट गॉलिझ व लाइपझिग या शहरांत निरनिराळ्या शास्त्रांत नवीन शोध लावण्याकरितां विद्वान लोकांच्या नामांकित मंडळ्या स्थापन झाल्या आहेत. बॅंबर्ग, बर्लिन आदिकरून एकंदर १९ ठिकाणीं जर्मन साम्राज्यांत वेधशाळा आहेत. जर्मनींतील ग्रंथप्रकाशनाचीं मुख्य ठिकाणें म्हटलीं म्हणजे लाइपझिग, बर्लिन व स्टाटगार्ट हीं होत. स. १९०७ सालीं या देशांतील ग्रंथप्रकाशकांची संख्या सुमारें ६००० होती व १९०२ सालीं एकंदर २६९०२ ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले होते. इंग्लंडमध्यें चांगलीं वर्तमानपत्रें थोडीं आहेत; पण त्यांचा खप फार आहे. जर्मनींत अशीं वर्तमानपत्रें बरींच असल्यामुळें त्यांचा प्रत्येकीं खप थोडा आहे. तरी देखील बर्लिनमधील कांहीं वर्तमानपत्रांच्या रोजच्या १० लक्ष प्रती खपतात.

जर्मनींत ललितकलांनां प्राचीन कालापासून राजाश्रय मिळत असल्यामुळें व पूर्वीपासून देशांत लहान मोठ्या अशा अनेक संस्थानांचें अस्तित्व असल्यामुळें लंडनप्रमाणें किंवा पारिसप्रमाणें जर्मनींत फक्त बर्लिन शहरानेंच ललितकलासौष्ठवाचा मक्ता घेतलेला नाहीं. ड्रेस्डेन, म्युनिच किंवा कॅसेल यांपैकीं कोणत्याहि शहरांतील चित्रकलेच्या कामाचा संग्रह बर्लिनच्या तोडीचाच आहे. किंवा बर्लिनप्रमाणेंच लाइपझिग, ड्रेस्डेन, म्युनिच व फ्रॅंकफोर्ट–ऑन–मेन येथेंहि नामांकित संगीतशाळा आहेत.

ल ष्क र.—१८७१ सालीं जर्मनींत जो एक कायदा पास झाला त्याअन्वयें वयाच्या विसाव्या वर्षापासून प्रत्येक जर्मन रहिवाशी लष्करांत चाकरी करण्यास पात्र होतो.परंतु अनेक अडचणीमुळें हा कायदा पूर्णपणें अमलांत आणतां येत नाहीं. १९०७ सालच्या आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, त्यावर्षी लष्करी चाकरीस पात्र झालेल्या लोकांतून जे लोक नौकरीकरितां लायक ठरविले गेले, त्यांपैकीं अर्ध्या लोकांसच लष्करी शिक्षण देण्याची सरकारला सोय करतां आली; बाकीच्या लोकांस शिक्षण न देतां शिलकी फौजेंत टाकणें भाग पडलें. अशा लोकांचा सैन्यांत नोकरी करण्याचा काळ दोन वर्षे आहे परंतु ज्या सुशिक्षित तरुणांचें शिक्षण एका ठरलेल्या इयत्तेपर्यंत झालेलें असे त्यांनां फक्त एकच वर्ष चाकरी करावी लागे. असे लोक बहुधां आपल्या शिक्षणाचा खर्च देत; व या लोकांतूनच पुढें शिलकी फौजेंतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका होत. जर्मनीच्या लष्करी धोरणांत प्रत्येक पांच वर्षांनीं सुधारणा करण्यांत येत असे. १९१० सालीं जर्मनींत, ६१५,००० लोकांचें खडें सैन्य होतें; परंतु आत्मसंरक्षणाकरितां युद्ध करण्याची पाळी आली असती तर जर्मनीस ७०लाख सैन्य रणांगणावर आणतां आलें असतें--यापैकीं शिक्षण मिळालेले ४० लाख व शिलकी फौजेंतील ३० लाख. परंतु चढाई करून जाण्याकरितां मात्र यांतूनच २४ लाखच लोक उपयोगी पडले असते. जर्मन सैन्याचे एकंदर २३ विभाग केलेले असून शांततेच्या काळांत ते निरनिराळ्या प्रांतांतील मुख्य मुख्य शहरीं ठेविलेले असत. साम्राज्यांतील कुल सैन्याचें अधिपतित्व आपल्या स्वतःकडेच ठेवण्याची जर्मन बादशहाची वहिवाट असे, व निरनिराळ्या विभागांवरील अधिकारीहि बहुधां राजघराण्यांतील मंडळीच असत. अर्थात बादशा-

ह्रास सल्ला देण्याकरितां एक जबाबदार अधिकारी नेमलेला असे. स. १९०५ पासून स. १९०९ पर्यंत जर्मनीचा लष्करी-खात्याकडे होणारा वार्षिक खर्च ४२०००००० पौंड व ५१०००००० पौंड यांच्या दरम्यान होता.

महायुद्धानंतर जर्मन लष्कर बरेंच कमी झालें व कमी करण्यांत आलें. १९२० सालीं सारें ५ लाखपर्यंत जर्मन लष्कर असेल पण एकंदर १४ लाखांपर्यंत सैन्य लागलीच खडें करतां येईल असा अदमास होता.

त ट बं दी.—स.१८७१ पासून स.१८९९ पर्यंत जर्मनीचें धोरण फ्रेंच व रशियन सरहद्दींखेरीज करून देशांतील इतर तटबंदीच्या जागा शक्य तेवढ्या कमी कराव्या असें होतें. मॅगडेबर्ग, उल्म, कोलोन, मेंझ, कोब्लेंझ इत्यादि ठिकाणीं मात्र स्वारी करून येणाऱ्या शत्रूस अडथळा करतां यावा म्हणून शहराची तटबंदी कायम ठेविली होती. उलटपक्षीं मेट्झ, स्ट्रासबर्ग, कोनिग्जबर्ग, डँझिग, थॉर्न इत्यादि फ्रेंच व रशियन सरहद्दीवरील शहरांच्या तटबंदींत आधुनिक पद्धतीप्रमाणें पुष्कळ उपयुक्त सुधारणा करण्यांत आली. स. १८९९ नंतर जर्मनीचें लक्ष्य आपलीं संरक्षणाचीं साधनें सुधारण्याकडे लागलें. या सुमारास तिनें फ्रेंच व बेलजियम सरहद्दीवरील लष्करी हालचालीच्या दृष्टीनें उपयुक्त अशा जागीं तटबंदी करण्यास व लोहमार्ग घालून रेल्वेस्टेशनें बांधण्यास सुरुवात केली.

आ र मा र.—जर्मनीच्या आरमाराची वाढ १९ व्या शतकाच्या अखेरीस, जर्मनीनें आरमारासंबंधीं नवीन धोरण स्वीकारल्यापासून झाली. परंतु त्यापूर्वी १८५४ सालींच प्रशियाच्या राजानें ओल्डेनबर्गच्या ड्यूकापासून जेडउपसागराजवळचा भाग खरीद करून तेथें १८६९ सालीं बिल्हेल्मशॅव्हन बंदर बांधून तयार केलें होतें व स. १८६४ मध्यें होल्स्टोन प्रशियास जोडल्यापासून, कीलसारखें महत्वाचें बंदर प्रशियाच्या ताब्यांत आलें. उत्तर जर्मनसंघ स्थापन झाल्यावर प्रशियाचें आरमार संयुक्तसंघाचें मानलें जाऊं लागलें. १८८९ सालीं आरमारखातें युद्धमंत्र्याकडून काढून त्याकरितां स्वतंत्र अधिकाऱ्याच्या व मंत्र्याच्या नेमणुका झाल्या. स. १८९५ मध्यें कैसर विल्हेल्म कालवा उघडण्यांत आला. याशिवाय कुक्सहॅवन डँझिग, व सॉंडरबर्ग या दुसऱ्या आरमाराच्या जागा आहेत. कोळी, खलाशी इत्यादि लोकांकडून आरमारखात्यांत सक्तीनें चाकरी घेतां येत असे. शिवाय कित्येक स्वयंसैनिक लोक सैन्यापेक्षां आरमार खात्यांतीलच नौकरी पसंत करून या खात्यांत येत. १९०६ सालीं जर्मन आरमारांत अधिकाऱ्यांसुद्धां ५३७६९ लोक नौकर होते. याखेरीज १ लाख शिलकी लोक होते ते निराळेच. आज जर्मन आरमाराविषयीं बोलावयास नकोच. तें बहुतेक खच्ची झाल्यासारखें आहे; कारण महायुद्धांत त्याचा फार नाश झाला व तहानें पुढील वाढीला बरींच बंधनें पडलीं.

ज मा ख र्च.—साम्राज्याचें बजेट दरवर्षी वरिष्ठ कायदेकौन्सिला(रीचस्टॅग)कडून पास करून घ्यावें लागे. १८७१ सालीं अशी पद्धत स्वीकारली होती कीं, साम्राज्यविषयक खर्च, आयातनिर्यात मालावरील व देशी मालावरील जकात, तारखातें डाकखातें, स्टांपाचें उत्पन्न, अल्सेस-लॉरेनच्या रेलवेचें उत्पन्न, इत्यादि ज्या साम्राज्याच्या वसूलाच्या बाबी आहेत त्यांतूनच व्हावा. परंतु आरमारी व लष्करी खर्चाच्या वाढीमुळें जेंव्हां यांतून खर्च भागत नाहीं असें दिसून आलें, तेंव्हां लोकसंख्येच्या मानानें प्रत्येक संस्थानाकडून ठराविक रक्कम घेण्याचा क्रम सुरू केला. परंतु इतकें करून साम्राज्यास कर्ज काढण्याची पाळी आलीच. १९०७ सालीं हें कर्ज ३६४३० लक्ष मार्क ( १ मार्क = १ शिलिंग )पावेतों वाढलें. देशाची सांपत्तिक स्थिति दिवसेंदिवस सुधारत असतां, लोकांवरील कर न वाढवितां कर्ज काढून खर्च भागविणें युक्त न दिसल्यामुळें, १९०९ मध्यें कर वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण पार्लमेंटानें तो हाणून पाडला. या धरास गोष्टी आल्यामुळें साम्राज्याच्या जमाबंदींत लवकरच कांहीं महत्वाच्या सुधारणा घडून येण्याचा रंग दिसूं लागला होता. पण महायुद्धामुळें जर्मनीला १५७,७००,०००,००० मार्कांचें कर्ज झालें. या रकमेचें व्याजच ७९,००,०००,००० मार्क होत असे. १९१९ सालीं एकंदर वसूल ३७२०३८३८१ पौंड असून खर्च ३८७९३८३८१ पौंड होता.

च ल न.—जर्मनींत हल्लीं चालू असलेलें चलन १८७३ सालापासून प्रचारांत आलें. जर्मनींत सोनें, चांदी, निकेल, ब्रांझ वगैरे नाणीं आहेत. मार्कची किंमत शिलिंगाबरोबर असे.

जर्मनींत बर्लिन, म्युनिच, ड्रेसडेन, स्टटगार्ट, कार्लश्रुहे व हंबर्ग या सहा ठिकाणीं नाणीं पाडण्याच्या टांकसाळी आहेत. निकेलचीं, तांब्याचीं व रुप्याचीं नाणीं पाडण्याचा हक्क जर्मनसरकारानीं आपल्याकडे ठेवला आहे. परंतु सोन्याच्या नाण्यांची गोष्ट तशी नाहीं. ठराविक आकार घेऊन सरकार कोणालहि सोन्याचीं नाणीं पाडून देतें. चलनी नाणीं पाडण्याबद्दल असा नियम आहे कीं देशांतील एकंदर रुप्याच्या नाण्याची किंमत दर माणशी १० मार्कांपेक्षां अधिक व निकेलच्या व तांब्याच्या नाण्यांची किंमत २॥ मार्कांपेक्षां अधिक न झाली पाहिजे.

पे ढ्या.—ज्यांनां खासगी नोटा काढतां येतात. अशा जर्मनींत हल्लीं सहा ब्यांका आहेत. पूर्वी त्यांची संख्या ३२ होती. परंतु खाजगी नोटांचा बाजारांत सुळसुळाट झाल्यामुळें त्यांची संख्या कमी करण्याकरितां जर्मनीनें स. १८७५ त एक कायदा केला.याच्या नियमाप्रमाणें १,९२,५०,००० पौंडांपेक्षां अधिक किंमतीच्या नोटा बाजारांत नसल्या पाहिजेत व प्रत्येक ब्यांकेनें बर्लिन किंवा फ्रँकफोर्ट–आन–मेन येथें आपल्या नोटा वटविण्याकरितां

आपली शाखा उघडली पाहिजे असें ठरलें. तेव्हां बव्हेरियन, सॅक्सन, वुर्टेनबर्ग, बेडन, ब्रुन्सविक व सरकारी या सहाच ब्यांकांनींहि खाजगी नोटा काढणें चालू ठेविलें. सरकारी बँकेच्या हिस्सेदारांनां निवळ फायद्यांतून आधीं ३॥ टक्के व्याज देऊन बाकी राहिलेल्या रकमेंतून शेंकडा २० इतकी रक्कम ३० लक्ष पौंड शिल्लक राहीपावेतों शिलकेंत टाकावयाची; यानंतर जो फायदा उरेल, त्यांतून एक-चतुर्थांश भाग हिस्सेदारांनां वाटून द्यावयाचा, व बाकीचा सरकारी खजिन्यांत जमा व्हावयाचा असें ठरलें होतें. एखाद्या वर्षी शेंकडा ३॥ टक्के व्याज देण्यापुरता फायदा झाला नाहीं तर तूट भरून काढण्याकरितां शिलकेंतून रक्कम घेतली जात असे. सरकारी बँकेशिवाय इतर बँकांनां आपल्या संस्थानाच्या बाहेर सावकारी करावयाची असल्यास त्यांनां ती कांहीं ठराविक अटीवरच करतां येते.

**जर्मन वाङ्मय.**—इतर वाङ्मयांप्रमाणें जर्मन वाङ्मयाचा प्रवाह एकसारखा व अखंडीत चालू नव्हता. मधून मधून बराच काळपर्यंत त्यांत बौद्धिक प्रगतीचा व पराक्रमाचा पूर्ण अभाव दिसून येतो. असा प्रकार यूरोपांतील इतर कोणत्याहि देशांत दृष्टीस पडत नाहीं. राजकीय बाबतींत जर्मन लोकांवर जे अनेक प्रसंग आले त्यामुळें त्यांच्या वाङ्मयाच्या वाढींत अशी विषमता उत्पन्न झाली असेंच केवळ नव्हे तर वाङ्मयाच्या बाबतींत जर्मन लोकांचा जो एक प्रकारचा चिडखोर स्वभाव दिसून येतो त्यामुळें ती उत्पन्न झाली असावी असें दिसतें. फ्रान्स व इटलीमध्यें ज्या वाङ्मयविषयक चळवळीच्या लाटा वेळोवळीं उत्पन्न झाल्या व ज्यांचा प्रभाव यूरोपांतील सर्व देशांवर दिसून आला त्यांचा जर्मन लोकांवर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. त्यांच्या सर्व वाङ्मयाच्या इतिहासांत परकीयांच्या विचारसरणीस दूर सारून आपले विचार स्वतंत्र पद्धतीनें नमूद करण्याची प्रवृत्ति दिसून येते. यामुळें जर्मन वाङ्मयवृक्षाला बहर येण्याचे काळ व इतर देशांतील तसले काळ यांचा जम बसत नाहीं. विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवनासारख्या यूरोपांतील इतर सर्व देशांत झालेल्या चळवळीच्या काळांतहि जर्मनीमध्यें एखादा महाकवि निर्माण झाला नाहीं. जर्मनींतल्या या वाङ्मयविकासाच्या विलक्षण प्रकारामुळें त्याचें वर्गीकरण करण्याचें काम सुलभ झालें आहे. भाषेच्या विकासांतील निरनिराळ्या अवस्थांवरून जे काळाचे भाग पडतात त्यांस अनुसरून वाङ्मयाचें वर्गीकरण करणें हा त्यांतल्या त्यांत अत्यंत सुलभ मार्ग आहे. या मार्गानें जर्मन वाङ्मयाचें वर्गीकरण केलें तर त्याचे पुढील विभाग पडतील:—

( १ ) " पुराण अभिजात जर्मनयुग "—प्राचीन काळापासून तों अकराव्या शतकार्धापर्यंत.

( २ ) " मध्य अभिजात जर्मनयुग "—अकराव्या शतकार्धापासून तों चवदाव्या शतकार्धापर्यंत.

( ३ ) " संक्रमण युग "—चवदाव्या शतकार्धापासून त सोळाव्या शतकांतील धर्मसुधारणेपर्यंत.

( ४ ) " विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवनाचें किं मिथ्याभियुक्त वाङ्मयाचें युग "—सोळाव्या शतकाच्य अंतापासून तों अठराव्या शतकार्धापर्यंत.

( ५ ) " अर्वाचीन अभियुक्त वाङ्मयाचें युग "—अ राव्या शतकाच्या मध्यापासून तों इ. स. १८३२ त गो टेच्या मृत्यूपर्यंत.

( ६ ) " हल्लींचें युग "—गोएटेच्या निधनकालापासू तों चालू दिवसांपर्यंत.

( १ ) पुराण अभिजात जर्मन युग ( अजमा ७५०–१०५० ):—ज्या जर्मन वंशासंबंधीं आपणांस ये विशेष विचार करावयाचा आहे त्यांतील लोकांची बौद्धि परिपक्कता फार उशीरां झाली. गॉथ लोकांनीं स्वभाषें बायबलचें भाषांतर केलें, उत्तरेकडील जर्मनवंशांतील लोकां " ईडा " नामक आपला ग्रंथ तयार केला, इंग्लंडांती जर्मनवंशाच्या लोकांनीं जुन्या इंग्रजी भाषेंत काव्यग्रं निर्माण केले तथापि खुद्द जर्मनींत वाङ्मयाचा ठिका नव्हता. पांचवें शतक व चालेस धी ग्रेटची कारकीर्द यांच्य दरम्यानच्या काळांत कांहीं काव्य नव्हतें असें नाहीं पर तें एक लिहून ठेवलें नसावें किंवा त्याचा पत्ता तरी लाग नसावा. परंतु तें होतें ही गोष्ट अप्रत्यक्ष ऐतिहासिक पुराव्या वरून व ज्यांच्यातून पुढें जर्मनांचे राष्ट्रीय वीररसप्रधा काव्य निर्माण झालें त्या पांचव्या शतकाच्या उभतीच्य काळांत प्रचारांत आलेल्या आख्यायिकांवरून सिद्ध करत येण्यासारखें आहे. जेव्हां आठव्या शतकांत जर्मन भाषें तील वाङ्मय लिहून ठेवण्याचा प्रघात सुरू झाला तेव्ह मठाधिपतींच्या धार्मिक लेखांचें अंधुक प्रतिबिंब त्यांत दिसू येऊं लागलें. कांहीं अपवाद वजा केले तर पुराण अभिजा जर्मन वाङ्मय बहुतेक अशाच प्रकारचें होतें. उपासनांच भाषांतरें, धर्मोपदेशपर कांहीं भाग इत्यादि प्रकारच्या लेख चाच त्यांत बहुतेक भरणा आहे. या धर्मग्रंथांच्या लेखन पद्धतीचा पुढें पुढें फार आश्चर्यकारक रीतीनें विकास झाल परंतु त्यांत मूळचा कांहीं जोम नव्हता. खरोख पाहूं गेलें तर हें जर्मन वाङ्मय शार्लेमेनच्या हुकमावरू अस्तित्वांत आलें. लॅटिन भाषेच्या जागीं स्वभाषा वापर ण्याचें शार्लमेनचें धोरण दूरदर्शीपणाचें होतें. परंतु त्यामु जर्मन वाङ्मयास मूळचा जोम नव्हता हें सिद्ध होतें; शार्लेमेनच्या मागून गादीवर बसणाऱ्या राजांच्या मर्जीप्रमा तें कसेंतरी चालूं राहिलें. अखेर जेव्हां तदनंतर गादीव बसणाऱ्या सॅक्सन बादशहांनीं त्यास प्रोत्साहन देण्या नाकारलें तेव्हां त्याचा प्रचार आपोआप बंद पडला. " मर्स बर्ग चार्मस, " " धी वेसोब्रन प्रेयर, " ज्याच्यांत अखेरच्य न्यायाच्या दिवसांचे काल्पनिक वर्णन आहे तें " मुस्पिली व ऐतिहासिक पोवाड्यास जेथून सुरुवात होते तें " लुड्वि

स्लीड" हीं लहान लहान काव्यें जर बाजूस ठेवलीं तर ह्या वेळपर्यंतच्या जर्मन वाङ्मयांत विसनबर्गच्या ऑट् फ्रिडनें रचलेलें " गॉस्पेल बुक " हें एकच महत्त्वाचें काव्य निर्माण झालें. सदर काव्याचें महत्त्वहि त्यांत विसनबर्गनें कांहीं काव्यरस उत्पन्न केला या गोष्टीवर नसून जर्मन काव्यांत प्रासाच्या जागीं यमक वापरण्याचा प्रघात या कवीनें प्रथम पाडला या गोष्टीवर आहे. यावरून या काळचें खरें काव्य आपणास अभिजात जर्मन वंशाच्या लेखकांच्या ग्रंथांत पहावयास सांपडत नसून तें अनभिजात वंशाच्या लेखकांच्या ग्रंथांत सांपडतें. या अनभिजात वंशाच्या लोकांनींच पांचव्या शतकापासून चालत आलेल्या तोंडीं आख्यायिकांस वाङ्मयाच्या कक्षेत आणलें. " लेडी ऑफ हेल्डिब्रँड " नांवाच्या राष्ट्रीय काव्याचा जो एक खंड हल्लीं उपलब्ध आहे तो सॅक्सन आख्यायिकेवरून रचलेला असून "हेलिअॅन्ड" ही धर्मपुस्तकांतील कथा व "जेनेसिस" ह्या जुन्या करारांतील भाग यांवर एक प्रासप्रचुर काव्य निर्माण करणारा कवीहि सॅक्सनच होता. हें प्रासप्रचुर काव्य ख्रिस्ती धर्मांतर्गत आख्यायिकेवर रचलेलें एकटेंच असे जर्मन काव्य आहे. त्या काळीं जर्मनींत वीणाकाव्य ( भावगीत-लीरिक पोइट्री ) होतें असें म्हणतात. अद्याप पावेतों सर्व यूरोपखंडांत ललिताच्या पलीकडे नाट्यकलेची मजल गेलेली नव्हती. कसेंहि असलें तरी हें पुराण अभिजात युगांतील वाङ्मय फार वेळ टिकलें नाहीं; आणि दहाव्या व अकराव्या शतकांत जर्मन वाङ्मयाच्या दृष्टीनें चहूंकडे अंधार पसरला होता. या दोन शतकांतील जर्मन वाङ्मय लॅटिन भाषेंत आहे. तथापि त्यास महत्त्व नाहीं असें नाहीं. कारण त्यावरून जर्मन राष्ट्राचें मन कोणत्या तऱ्हेनें विकास पावत होतें तें कळून येतें.

( २ ) मध्य अभिजात जर्मनयुग ( १०५०-१३५० ):—

( अ ) मध्य अभिजात जर्मन युगांतील प्रारंभींचें काव्य—पूर्वीच्या युगांतील वाङ्मयाप्रमाणें या युगाच्या प्रारंभींचें वाङ्मयहि प्रयोगावस्थेच्या फारसें पुढें गेलेलें नव्हतें. सॅक्सन बादशहांचा लॅटिन व बायझंटाईन भाषांकडे विशेष अनुकूल कल असल्यामुळें सुप्रसिद्ध ग्रंथकार नोटलर यानें जर्मन वाङ्मयाचा धागा जेथवर वळला त्याच्यापुढें तो नेणें अत्यंत दुरापास्त झालें. धर्मखात्याकडून काव्यकर्तृत्वास उत्तेजन मिळेनासें झालें. कारण अकराव्या शतकार्धाच्या सुमारास बरगंडी प्रांतांतील क्लूनी येथील मठाची स्थापना होऊन वैराग्यपर अशी धार्मिक चळवळ सुरू झाली व ती सर्व यूरोपभर पसरून तिचा अंमल जर्मन लोकांवर बसल्यावांचून राहिला नाहीं. एक शतकपर्यंत धर्मखात्याची नीट जोपासना करण्याशिवाय कोणत्याहि वाङ्मयास कोठें थारा नव्हता. ही जोपासना करणें म्हणजे आयुष्यांतील उज्वल भागास जवळ जवळ मुकण्यासारखेंच होतें. धार्मिक वैराग्याच्या छटेमुळें " मिमेंटो मोरी, " "व्हॉम् ग्लोबन" व "धी रिमेम्ब्रन्स ऑफ डेथ" हीं या काळचीं काव्यें कॅटाळवाणीं झालीं आहेत. ख्रिस्ताचें चारित्र, चमत्कार व अंत यावर बॉम्बर्गच्या मठवाशानें लिहिलेलें इझोलॉइड नांवानें तेजस्वी काव्य व कोलोनच्या अगो नामक धर्मगुरूच्या स्तुतिपर लिहिलेलें " अॅनोलॉइड " नांवाचें काव्य यांत मात्र प्रतिभेची कांहींशी चुणुक दिसून येते.

कालांतरानें हें जर्मन वाङ्मयाचें धार्मिक व सोवळें स्वरूप बदलून तें अधिक स्वतंत्र व अधिक कल्पनामय झालें. ही गोष्ट " व्हर्जिन " विषयक वीणाकाव्यें, बाराव्या शतकांतील संतांच्या अद्भुत चमत्कारांसंबधीं लिहिलेलीं अनेक काव्यें व गूढविद्येकडे जाणारा एकंदर काव्यांचा ओघ यांवरून कळण्यासारखी आहे. अँट्रिअस, पायलेटस, एजिडिअस व अल्बानिअस हे त्या काळच्या मठवाशांसंबंधींच्या अद्भुत काव्याचे नायक होते व सिल्व्हेस्टर आणि क्रिसेन्शिया यांच्या गोष्टीमुळें त्या वेळच्या सुप्रसिद्ध "कायसर्क्रानिक" काव्याचे कांहीं भाग मनोवेधक झाले आहेत. लोकादरास पात्र होणाऱ्या त्या वेळच्या वाङ्मयांत राष्ट्रीय महाकाव्यास ( नॅशनलसागा ) प्राधान्य प्राप्त झालें. स्तिमित युगांतील (डार्क एजिस) खुषमस्करे व शाहीर यांचे वंशज जे फिरते "स्पायल्यूट" यांनीं हीं काव्यें रचण्यास प्रथम सुरुवात केली. "खोनिग् रॉथर" नांवाचें अद्भुत काव्य व ओरेंडेल, आस्वॅल्ड इत्यादि गोष्टी ह्या सर्व कृती त्यांच्याच आहेत. या त्यांच्या एकंदर कृतीवरून जर्मन लोकांच्या मनावरील धर्माचा दाब कमी होऊन त्यांची कल्पनाशक्ति त्या वेळीं प्रदीप्त होत चालली होती हें कळण्यासारखें आहे. धर्मयुद्धांच्या वेळीं जेव्हां जर्मन लोकांस पूर्वेकडे येण्याचा प्रसंग आला तेव्हां इकडचे रम्य प्रदेश पाहून त्यांस किती हर्ष व आनंद वाटला हें "अलेक्झांडरलीड" व "हरझोग अर्न्स्ट" या त्यांच्या काव्यांवरून दिसून येतें.

हिल्डेसहीमचा रहिवाशी इलहार्ट व्हॉन ओबर्ज यानें प्रथम दरबारी काव्य रचण्याची पद्धत सुरू केली. त्यानें आपल्या "ट्रिस्टंट" नांवाच्या काव्यांत दरबारी काव्य लिहिण्याची जी पद्धत घालून दिली तीच इतर कवींनीं पुढें चालू ठेवली. शेवटीं ऑस्ट्रिया व दक्षिण जर्मनीमध्यें बाराव्या शतकाच्या शेवटच्या शतकांत ज्या वीणाकाव्याचा विलक्षण जोरानें प्रसार झाला त्याचा विचार करणें जरूर आहे. जर्मनींतली प्रारंभींची वीणाकाव्यें अगदीं क्षुल्लक असून वीणाकाव्याची पद्धत जर्मनींत स्वतंत्रपणें उत्पन्न झाली कीं ती जर्मन लोकांनीं फ्रेंचांपासून उचलली हा एक अद्याप वादग्रस्त आहे. कारण अगदीं प्रारंभींच्या जर्मन वीणाकाव्यांत व तत्कालीन दक्षिण फ्रान्सच्या वीणाकाव्यांत पुष्कळसें साम्य दिसून येतें. परंतु क्युरेन्बर्ग, डिटमार व्हॉन ईस्ट व मीन्लॉ व्हॉन सेव्ह लिंगन या दक्षिण जर्मनींतल्या प्रारंभीच्या कवींच्या कृतींचें नाविन्य व स्वयंभूपणा यांविषयीं शंका घेण्यास जागा नाहीं. यापुढें औपरोधिक व उपहासात्मक काव्य करण्याचा प्रघात सुरू होऊन त्या पद्ध-

तीचे पुष्कळसे ग्रंथ निर्माण झाले. परंतु वाङ्मयाचें सूत्र उमरावांच्या हातांतून सामान्य शहरवासी यांच्या हातीं जाईपर्यंत ती औपरोधिक वाङ्मयाची पद्धत प्रगल्भ दशेस पोहोंचली नाहीं.

(ब)मध्य अभिजात जर्मन युगांतील काव्याची भरभराट हा भरभराटीचा काळ म्हणजे पहिला फ्रेडरिक बार्बेरोसास हावा हेन्री व दुसरा फ्रडरिक, ( फ्रेडरिक धी ग्रेट ) या बादशहांच्या कारकीर्दीचा काळ होय. या बादशहांनीं आपल्या महत्त्वाकांक्षा व पराक्रम यांच्या योगानें आपल्या प्रजेमध्यें सर्व जगांत उच्चस्थान प्राप्त करून घेण्याची लालसा उत्पन्न केली. क्षात्रधर्माचे पाठ फ्रेंच लोकांपासून ते शिकले तोंच आपण सर्व जगास क्षात्रधर्म शिकविण्यास समर्थ झालों असें त्यांस वाटूं लागलें. त्याचप्रमाणें बाराव्या शतकांत जे जर्मन कवी फ्रेंच अद्भुत काव्यांचे केवळ भाषांतरकार होते ते तेराव्या शतकाचा उदय होतांच फ्रेंच विनोदपर काव्याच्या जागीं स्वराष्ट्रीय आख्यायिकांवर रचलेलीं महाकाव्यें लिहूं लागले. अद्भुत काव्यावर आपला जर्मन छाप मारू लागले व ज्यांच्या पुढें फ्रेंच वीणाकाव्यहि फिकें पडलें अशीं जर्मन गाणीं गाऊं लागले. राष्ट्रगीत दरबारीगीत व प्रणयगीत आणि अल्प प्रमाणांत रचलेलें उपदेशपर काव्य इतकेंच कायतें या युगांतील जर्मन वाङ्मय होतें. गद्यग्रंथाला तर अद्याप ठिकाण नव्हता; व नाटयवाङ्मय जें काय होतें तें सर्व लॅटिन भाषेंत होतें.

सर्व राष्ट्रगीतांमध्यें "नायबेलंगनलीड" यास अग्रस्थान दिलें पाहिजे. बाराव्या व तेराव्या शतकांत ऑस्ट्रीयामध्यें या राष्ट्रगीतास हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें. सिजफ्रिडची न्हेनीश आख्यायिका, गुंथर आणि हेगन यांची बर्गेडियन आख्यायिका व डायट्रिक आणि एट्झेल यांची गॉथिक आख्यायिका या सर्वांचें या राष्ट्रगीतांत मिश्रण केलें असल्यामुळें त्या काळीं जर्मन लोकांचा जीवनक्रम कशा प्रकारचा होता याचें त्यांत उत्तमप्रकारचें प्रतिबिंब पहावयास सांपडतें. त्याचा वाङ्मयांतील अधिकार, त्यांत दिसून येणारा नाटयकलेचा परिपाक व त्यांतील उद्देशाचा सुसंगतपणा या दृष्टीनें त्याचा दर्जा कांहीं सामान्य नव्हता. निरनिराळ्या आख्यायिकांचें त्यांत मिश्रण असल्यामुळें त्या सर्वांचा नीट मिलाफ झाला नाहीं असें जरी कांहीं ठिकाणीं दिसून आलें तथापि तेवढ्यानें तें एक समग्र काव्य असल्याबद्दलच्या कल्पनेस बाध येत नाहीं. या काव्याचा कर्ता कोणी असला तरी त्याच्यांत उच्चप्रकारची कल्पनाशक्ति व महाकाव्यास लागणारे सर्व गुण होते असें दिसून येतें. या काव्याहून किंचित् कमी दर्जाचें असें "गुद्रुन" नांवाचें दुसरें जर्मन राष्ट्रगीत तेराव्या शतकाच्या प्रारंभीं लिहिण्यांत आलें. हें एका ऑस्ट्रीयन कवीचें काव्य आहे. परंतु त्याचा विषय उत्तर समुद्राच्या किनाऱ्यावर राहाणाऱ्या लोकांत प्रचलित असलेल्या आख्यायिकांवरून घेतलेला आहे. "सिगफ्राईड" यास "नायबेलंगनलीड" या राष्ट्रगीतांत प्रधान स्थान मिळावें व ज्यास जर्मन लोक शतकेंच्या शतकें आपला राष्ट्रवीर असें लेखीत असत त्या डायेट्रिकव्हॉन बर्नेला नायबेलंगनलीडसारख्या एकाहि महाकाव्यांत स्थान मिळूं नयें हें केवळ दैवदुर्विलसित होय.

जर्मनींत "दरबारी गीत" रचण्याची पद्धत सुरू करणारा कवि हेन्रिख व्हॉन् वेल्डेक हा होऊन गेला. इ. स. ११७३ व ११८६ याच्या दरम्यान लिहिलेलें त्याचें 'एनीट' नांवाचें काव्य एका मूळ फ्रेंच काव्याच्या धर्तीवर रचलेलें आहे. हरबर्ट व्हॉन फ्रिट्झ्लर यासारख्या त्या वेळच्या अन्य कवींनीं हेन्रिखचें अनुकरण केलें; व जुनीं पुराणीं कथानकें घेऊन त्यावर फ्रेंच काव्याच्या धर्तीवर जर्मन काव्यें रचलीं. अलब्रेक व्हॉन हल्बरस्टाट यानें १२१० च्या सुमारास ओव्हिडच्या " मेटॅफॉसेस "चें जर्मन भाषेंत भाषांतर केलें. दरबारी काव्यें रचणारांमध्यें ( १ ) हार्टमन व्हॉन यू ( २ ) वोल्फ्राम व्हॉन एशेन्बॅक व ( ३ ) गॉट्फ्रिड व्हॉन स्ट्रॅस्बर्ग हे अग्रगण्य होते. हार्टमन यानें एरेक व आयवीन, ग्रेगोरिअस व डर आर्म हेन्रिख हीं काव्यें रचल्यानंतर त्यानें आपलीं नमुनेदार दरबारी काव्यें रचलीं. त्याची काव्य निष्ठा, भाषापद्धति, रचनाचातुर्य व लेखनशैली त्या काळच्या सर्व कवींमध्यें फार श्रेष्ठ दर्जाची होती. वोल्फ्राम व गॉट्फ्रिड यांच्या संबंधानें विचार केला तर त्यांच्या बाह्यसृष्टीकडे पहाण्याच्या दृष्टीवरून ते अगदीं परस्पर विरोधी कवी होते. वोल्फ्रामचें परझिव्हल काव्य हें गूढविद्येंतील व अध्यात्मविद्येंतलि विचारांनीं भरलेलें आहे. त्यांतील विनोदानें वाचकांच्या मनांतील उदासीनपणा नाहींसा होतो. वोल्फ्रामनें विलेहाम व टिटयूरेल नांवाचीं दुसरीं काव्यें लिहिलीं आहेत. परंतु परझिव्हलमध्यें त्याची काव्यप्रतिभा विशेष रीतीनें दिसून येते. गॉट्फ्रिड हा कांहीं कमी प्रासादिक व कमी कल्पक नव्हता. परंतु तो अगदीं निराळ्या प्रकारचा कवि होता. हार्टमनच्या "आयवीन"पेक्षांहि त्याचें ट्रिस्टन काव्य अधिक तेजस्वी आहे; व त्याची काव्य रचण्याची पद्धति साधारणपणें अधिक बाह्यवस्तुवर्णनप्रधान आहे. " परझिव्हल " काव्यांत बऱ्याच मोठ्या प्रमाणांत दृष्टीस पडणाऱ्या भावनातरंगांचा गॉटफ्रिडच्या काव्यांतून पूर्ण अभाव दिसून येतो. ट्रिस्टन काव्याचें कथानक शोकपर्यवसायी असलें तरी तें काव्य एकंदर तेजस्वी व प्रसादपूर्ण असें आहे. आणि विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवनाच्या युगांत असलेल्या प्रणयकथांतून दिसून येणारा छचोरपणा याचा त्यास अगदीं संपर्क झालेला नाहीं.

परझिव्हल व ट्रिस्टन हीं काव्यें जर्मन राजगीतांतील भिन्न पद्धतींच्या केंद्रस्थानी आहेत. आणि राजगीतपद्धतीचा यापुढील विकास हार्टमन, वोल्फ्राम व गॉटफ्रिड यांच्याच अनुरोधानें घडून आला. तेराव्या शतकांतील कवी या तिघांपैकीं कोणाचें अनुकरण करतात त्यावरून त्यांचे तीन वर्ग पड-

नात. हार्टमनचे अनुयायी व अनुकरण करणारे कवी या सदरामध्ये लान्झेलेटचा कर्ता उल्रिख व्हॉन झट्झिखोवन, विगलॉइसचा कर्ता विर्न्ट व्हॉन ग्रॅफनबर्ग, " डर स्ट्रिकर " या नांवानें प्रसिद्ध असलेला स्पिल्मन कवि व डायक्रोन नांवाच्या महाकाव्याचा कर्ता हेन्रिख व्हॉन डेम टूलिन हे होते. वोल्फ्रामच्या अनुयायांमध्यें डर ज्युन्जेरी टिटयूरेलचा कर्ता ऑल्ब्रेट व्हॉन स्कार्फेनबर्ग व लोहेन ग्रीनचा कर्ता या कवींचा समावेश होतो. गॉट्फ्रिडच्या अनुयायांत फ्लोरे अन्ड ब्लॅन्स्पेफ्लूरचा कर्ता कोन्राड फ्लेक, इ. स. १२५४ त ज्याचें देहावसान झालें तो रुडॉल्फ व्हॉन एम्स व इ. स. १२८७पर्यंत जो हयात होता तो कान्राड व्हॉन वुर्झबर्ग हे कवी येतात.महाकाव्यांचे विषय व त्यांच्या रचनापद्धती यांचा कल हळू हळू वस्तुवादपर व बोधपर काव्यकर्तृत्वाकडे होत गेला. हे तेराव्या शतकाच्या वर्णनात्मक काव्यांतील फार महत्त्वाचे बदल होत.

" राष्ट्रगीत " किंवा " दरबारी " गीत या दोन शाखांतील उत्तमोत्तम कवींपेक्षांहि " प्रणयगीत " शाखेंतील काव्यें रचणारा वाल्थर व्हॉन डर व्होगेलवीड हा कवि आपल्या कलेंत अत्यंत वाकबगार होता प्रणयगीतांचा असा एकहि प्रकार नाहीं कीं ज्याचा त्यानें विचार केला नाहीं; किंवा ज्याला त्यानें पूर्णावस्था प्राप्त करून दिली नाहीं. दरबारांतील शृंगार व झोंपडींतील शृंगार, धार्मिक श्रद्धा व निसर्गांतील आनंद, स्वदेशप्रीति व राजनीति यांपैकीं वाटेल त्या विषयावर गीतें रचण्यांत त्याचा हातखंडा होता. अन्य समकालीन कवींपेक्षां या कवीच्या चरित्राविषयीं आपणांस थोडी अधिक माहिती उपलब्ध आहे. तो इ. स. ११७० मध्यें जन्मला; व इ. स. १२३० मध्यें मृत्यु पावला. ऑस्ट्रियामध्यें त्यानें आपल्या कलेचा अभ्यास करून नंतर दक्षिणजर्मनींत प्रवास केला. त्यांत तो जेथें जेथें गेला तेथें तेथें त्याचा योग्य सत्कार झाला. परंतु तत्कालीन राजकीय उलाढाल्यांत तो राष्ट्रकार्याचा कट्टा अभिमानी असल्याकारणानें त्याला मित्रांबरोबर शत्रूहि बरेच झाले. अनेक शतकेंपर्यंत तो सर्वानुमतें अनुकरणीय असा जर्मन वीणाकाव्यकर्ता कवि म्हणून मानण्यांत येत होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो जर्मन वीणाकवींमध्यें अग्रगण्य व प्रतिभेच्या व्यापकपणांत, स्वयंप्रेरणेंत व पावित्र्यांत अतिशय मोठा कवि होऊन गेला.

वाल्थरच्या देहावसानानंतर व त्याच्या उदाहरणानें जर्मन प्रणयगीतांचा कसकसा विकास झाला हें थोडक्यांत सांगतां येण्यासारखें आहे. वाल्थरच्या वीणाकाव्यांतील द्विविधपद्धतीचा पगडा त्याच्या समकालीन कवींवर बसला होता. एक उच्च प्रकारचें आणि दरबारी वीणाकाव्य व दुसरें हलक्या प्रकारचें आणि वाच्य वीणाकाव्य असे त्यांनीं वीणाकाव्याचे दोन विभाग केले होते. दुसऱ्या म्हणजे हलक्या प्रकारच्या वीणाकाव्यांत सामाजिक व वाङ्मयीन निर्बंध मुळीच पाळण्यांत येत नसत. वाल्थरच्या समकालीन उच्च कुलीन कवींचीं आयुष्यें दरबारच्या आश्रयानें गेलीं असल्यामुळें त्यांनीं उच्च प्रकारचीं वीणाकाव्यें रचलीं; परंतु अधिक बुद्धिमान् व स्वतंत्र वृत्तीच्या तत्कालीन कवींनीं निर्बंधविरहित काव्यपद्धतीच अधिक पसंत पडली व ती तशी पडावी हें काळाच्या व लोकमताच्या प्रवाहास अनुसरूनच होतें. अशा प्रकारचीं काव्यें रचणारा मोठा कवि निढार्ट व्हॉन रुएन्टल हा अमीरउमरावांच्या पसंतीनापसंतीला भीक घालणारा नव्हता. त्यानें आपल्या " ऑफिशे डॉर्पोशी " या काव्याचें कथानक एका खेड्यांतून घेतलें होतें. व जशी लहर लागे त्याप्रमाणें उपहासात्मक किंवा उपरोधात्मक पद्धतीनें तो आपल्या काव्यांत खेडवळांचीं वर्णनें करीत असे. साधारणपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं तेराव्या शतकांतील कवी वाल्थर व्हॉन डर व्होगेलवीडचें किंवा निढार्ट व्हॉन रुएन्टलचें अनुकरण करीत किंवा वीणाकाव्याचा कोणत्या तरी एका पद्धतींत निष्णात असत.काव्यविषयक आवडीनिवडीच्या बाबतींत अमीरउमरावांचें व आपलें जमण्यासारखें नाहीं ही भावना मात्र त्या काळच्या सर्व कवींत साधारणपणें वसत होती. शिवाय या कवींत उपदेशपर कविता करण्याची प्रवृत्तीहि दिसून येते. हें उपदेशपर काव्य तेराव्या शतकांतील प्रणयगीतात्मक काव्य व पंधराव्या व सोळाव्या शतकांतील उपरोधात्मक काव्य यांतील सांधा होता असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रस्तुत युगांत जर्मन गद्यवाङ्मय नव्हतेंच म्हटलें तरी चालेल व जें कांहीं उपलब्ध आहे त्यावरून वाङ्मयांत ज्यास स्थान मिळेल अशा विचारविनिमयास गद्यलेखन हें साधन होऊं शकेल अशी कल्पना तेराव्या शतकांतील जर्मन लोकांस नव्हती असें दिसून येतें.

( ३ ) संक्रमण युग (१३५०-१६००):—( अ ) चवदावें व पंधरावें शतक वाङ्मयाच्या—इतिहासांतील सर्व संक्रमण कालांस अनुलक्षून जर्मन वाङ्मयांतील या युगाचेंहि पर्यालोचन दोन दृष्टींनीं केलें पाहिजे. एका बाजूस मध्ययुगांतील वाङ्मयाचा ऱ्हास व शेवट आपणांस पाहिला पाहिजे व दुसऱ्या बाजूस काव्याच्या आधुनिक पद्धतीचा प्रारंभ व प्रॉटेस्टंट लोकांनीं केलेल्या धर्मसुधारणारूपी पारमार्थिक क्रांतीची तयारी यांचाहि आपणास विचार केला पाहिजे.

चवदाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास क्षात्रवर्गाच्या व त्याच्या आर्तत्राणवर कल्पनांचा झपाट्यानें ऱ्हास होत होता आणि ज्या परिस्थितींत मध्ययुगीन काव्याची भरभराट झाली तिच्यांतहि बदल होत होता. समाजांत जो फरक झाला त्यामुळें आर्थरच्या क्षात्रमंडळाविषयीं रचलेल्या दरबारी काव्यांचें रहस्य नवीन पिढींतील तरुणांस पुष्कळ अंशीं समजेनासें झालें व राष्ट्रकाव्यांतील नायकांच्या वागणुकीचें मर्महि त्यांस कळेना. मध्यमवर्गीतील लोकांचें

अभिरुचि भ्रष्ट झाल्यामुळें तीस अनुसरून चालणाऱ्या प्रणयगीत रचणाऱ्या कवींची कृतीहि दूषित झाली. भाषासौंदर्यादि बाह्यस्वरूपावरील लक्ष काव्याचें नैतिक तात्पर्य काय आहे व अर्थ म्हणजे त्यापासून कोणता बोध घेण्यासारखा आहे इकडे विशेष जाऊं लागलें. स्फूर्तिजन्य कविकल्पनापेक्षां व कथानकांतील पात्रांच्या यथातथ्य गुणवर्णनापेक्षां भावनोद्दीपक कथानकाची किंमत अधिक वाटूं लागली. येणेंप्रमाणें मध्ययुगीन वाङ्मयाच्या ऱ्हासाचीं चिन्हें अनेक ग्रंथांतून दृष्टीस पडतात. रूपकात्मक काव्यांतून तर ऱ्हासाचीं कारणें अधिक स्पष्टपणें दिसून येतात. कालांतरानें काव्यांतील कथानकें गद्यांत उतरविण्याचा प्रघात सुरू झाला; व यानंतर अनेक शतकें हे गद्यग्रंथ वाचणेंच लोकांस पसंत पडूं लागलें. तसेंच ज्या वेळेपासून वीणाकाव्य रचण्याचें काम मध्यमवर्गांतील कवींकडे गेलें तेव्हांपासून वीणाकाव्याचें प्रधान गुण नष्ट होत चालले. प्रणयगीतांच्या जागीं नैतिक व धार्मिक कल्पनाप्रचुर काव्यें निर्माण झालीं. नियमबद्ध ग्रंथरचनेवर विशेष भर देण्यांत आला व जुन्या वीणाकाव्यांतील साध्या रचनेच्या जागीं कृत्रिम काव्यरचना दिसूं लागली. पंधराव्या व सोळाव्या शतकांत जर्मनीच्या दक्षिणेकडील सर्व शहरांतून क्लिष्ट व कृत्रिम काव्यरचना शिकविणाऱ्या अनेक संस्था प्रस्थापित झाल्या व तसल्या कृत्रिम काव्यरचनेंत प्राविण्य मिळविण्याविषयीं तेथील काव्यलेखकांत सारखी चढाओढ सुरू असे.

चौदाव्या व पंधराव्या शतकांतील मध्यम अभिजात जर्मन युगांत ज्या वाङ्मयाची विशेष भरभराट होती त्याच्या ऱ्हासकालाचें हें स्वरूप होतें. यानंतर लोकप्रिय असलेल्या वीणाकाव्याचें पुनः पुनरुज्जीवन झालें व त्याचा इतका विस्तार झाला कीं, तसा यामागें किंवा यापुढे केव्हांहि दिसून येत नाहीं. प्रणयगीत, युद्धगीत, धर्मगीत, मदिरापानगीत, शिशिरवसंतगीत, ऐतिहासिक पोवाडा इत्यादि अनेक स्वरूपांत या काळची काव्यरचना दृष्टीस पडते. पूर्वीच्या युगांतील काव्याचा परिपोष प्रस्तुत युगांत कसा झाला हें विनोदी कथानकाच्या संबंधानें तरी विशेष स्पष्टपणें दिसून येतें. पंधराव्या व सोळाव्या शतकांत असल्या विनोदपर काव्यग्रंथांची रेलचेल होती. या विनोदी काव्यरचनेचा औपरोधिक काव्यरचनेंत कसा विकास झाला हें सबॅस्टिअन ब्रँट याच्या 'न्यारनशिफ' नामक काव्यावरून कळण्यासारखें आहे. सदर ब्रँटचा अज्ञानी लोकांच्या अश्लीलपणाविषयीं तिरस्कार व सर्वसाधारण जनतेमध्यें बौद्धिक विकासाकडे व प्रतिष्ठितपणाच्या राहणीकडे विशेष कल असल्यामुळें व तें सर्व ' न्यारनशिफ ' मध्यें प्रतिबिंबित झालें असल्यामुळें सदर काव्यानें धर्मसुधारणायुगास प्रारंभ केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पशुकथा व पशुकाव्य यांचाहि प्रघात याच सुमारास सुरू झाला मध्यम अभिजात जर्मन युगाच्या शेवटीं उलरिख बोनर यानें इसॉपच्या कल्पित कथांचें पुनरुज्जीवन केलें व तदनंतर त्यांचीं भाषांतरें होऊन धर्मसुधारणेच्या युगांत उपरोधात्मक व विवादात्मक काव्यें रचण्याच्या कामीं पशुकथांचा उपयोग होऊं लागला.

मध्यम अभिजात जर्मनयुगांत जिचा मागमूस नव्हता त्या नाट्य ...ला यापुढें सुरुवात झाली. यूरोपांतील इतर सर्व वाङ्मयांप्र... या वाङ्मयांतहि धार्मिक उपासनांतून फार सावकाश व अडचणींनें नाट्यकलेचा उदय झाला. पहिली नाट्यरचना लॅटिन भाषेंत झाली. परंतु लवकरच लॅटिन भाषेच्या जागीं जर्मन भाषेचा उपयोग होऊं लागला. त्याचप्रमाणें प्रथम हीं नाटकें देवळांत होत असत, परंतु नाटकें पहाण्याची लोकांस चटक लागल्यामुळें लवकरच तीं देवळाच्या बाहेरील आवारांत किंवा बाजारच्या मार्गांत होऊं लागलीं अशा रीतीनें नाट्याचें पहिलें धार्मिक स्वरूप जाऊन त्याला प्रापंचिक स्वरूप प्राप्त झालें. हें प्रापंचिक स्वरूप इ. स १४८० त डायट्रिक शर्नबर्ग यानें लिहिलेल्या स्पायेल व्हॉन फ्रॉ ज्युटेम नांवाच्या नाटकांत दृष्टीस पडतें. याशिवाय ज्याच्याशीं धर्माचा कांहीं संबंध नाहीं अशा स्वतंत्र रीतीनेंहि नाट्यकलेच्या विकासास सुरुवात झाली. या स्वतंत्र नाट्यकलेचा प्रारंभ वर्षांतील मोठमोठ्या उत्सवप्रसंगीं जे गमतीचे खेळ करण्यांत येत असत त्यांपासून झाला.

( ब ) धर्मसुधारणेचें युग:—वर दाखविल्याप्रमाणें पंधराव्या शतकाच्या प्रारंभीचें वाङ्मय जरी त्याची पुढें भरभराट होईल अशी आशा उत्पन्न करण्यासारखें होतें तरी जर्मन लोकांच्या बौद्धिक इतिहासांतील त्या काळाचें खरें महत्त्व वाङ्मयाच्या प्रगतीवर अवलंबून नसून तें ज्या दोन सामर्थ्यवान गोष्टींनीं धर्मसुधारेणचा पाया घातला त्या म्हणजे ( १ ) गूढ विद्यावाद ( २ ) उदात्त वाङ्मयाचा अभ्यास, यांवर अवलंबून आहे. मध्य युगांतील जर्मन लोकांच्या धार्मिक विचारांत गूढ विद्यावाद हा नेहमीचाच एक भाग होता. परंतु मीस्टर एखार्ट ( १२६०–१३२७ ), हेन्रिख सूसो ( १३००–१३६६ ) व जोहानीज टॉलर ( १३००–१३६१ ) या गूढवाद्यांपासून धर्माच्या बाबतींत गूढ विद्यावादाला एका निश्चित मनोवृत्तीचें स्वरूप प्राप्त झालें. असें ख्रिस्ती धर्मग्रंथाचा अर्थ ज्याला जसा वाटेल तसा करावा असा त्या योगानें प्रघात पडला. ही गोष्ट व्यक्तिस्वातंत्र्याला साहजिकपणेंच अनुकूल होती आणि तिचा पूर्ण फायदा अखेर प्रॉटेस्टंट पंथाच्या लोकांस मिळाला. यावरून ख्रिस्ती धर्मपुस्तकाचीं प्रारंभीचीं जर्मन भाषांतरें गूढवाद्यांनीं केलीं यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. सबॅस्टिअन ब्रँटचा स्नेही व उदात्त वाङ्मयाभ्यासी जोहान जेलर व्हॉन केसरबर्ग ( १४४५–१५१० ) यास एखार्टादि गूढवादी व लूथर यांच्या मधला दुवा समजतात. इ. स. १३४८ त प्रागच्या विश्वविद्यालयाची स्थापना झाल्याबरोबर जर्मनींत उदात्त वाङ्मयाच्या अभ्यासास सुरुवात झाली व त्याची

बाढ गूढविद्येच्या प्रसारापेक्षांहि अधिक सपाट्यानें झाली. त्याचा तात्कालिक अंमल फक्त सुशिक्षित वर्गावरच दिसून आला. धर्मसुधारणेच्या पूर्वीचे उदात्त वाङ्मयाभ्यासी आपल्या देशी भाषेचा अव्हेर करून लॅटिन भाषेतच लिहीत व विचार करीत होते. यामुळें जरी जोहान र्‍युक्लीन, अल्बेशिअन, जेकब विम्फेलिंग किंवा इरॅस्मस अशा सारख्या उदात्त वाङ्मयाभ्यासकांना जर्मन वाङ्मयाच्या इतिहासांत स्थान नाहीं. तरी धर्मखात्याच्या पुराणमतांतील संकुचितपणा घालवून टाकून विचार व विद्वत्ता यांच्यांत उदारपणा आणण्याच्या कामीं त्यांनीं जो झगडा केला त्यानें जर्मन भाषा बोलणाऱ्या लोकांत जोमदार राष्ट्रीय वाङ्मय उत्पन्न होण्याचा मार्ग खुला झाला. धर्मसुधारणायुगाच्या पूर्वी औपरोधिक लेख लिहिणारे जे जर्मन लेखक होते, त्यांच्या लिहिण्यांत नेहमीं ग्राम्यपणा व निर्दयपणा दिसून येत असे. परंतु उदात्तवाङ्मयाभ्यासकांच्या औपरोधिक लेखांतील खोंचदार कोट्या व वक्रोक्ती यांच्यामुळें धर्मसुधारणायुगांतील औपरोधिक लेख लिहिणाऱ्यांच्या लेखांत तसल्या प्रकारचे दोष दिसून येत नाहींत. शिवाय उदात्तवाङ्मयाभ्यासकांच्या प्रयत्नांचा असाहि एक परिणाम झाला कीं, पंधराव्या शतकापासून लॅटिन व इटालियन भाषेंतून जर्मन भाषेंत बरींच भाषांतरें झालीं. वाङ्मयांत भर घालणाऱ्या ग्रंथकारांमध्यें निक्लस व्हॉन बिल, वुर्टेम्बर्गचा चान्सेलर व त्याचा समकालीन अल्ब्रेट व्हॉन इब ( १४२०–१४७५ ) हे प्रमुख होते.

मार्टिन लूथर ( १४८३–१५४६ ) हा या बौद्धिक नवजीवनाच्या युगांत जर्मनींतील अत्यंत श्रेष्ठ मनुष्य होऊन गेला. त्याच्या धर्माच्या व धर्मसंबंधींच्या चळवळी लक्षांत घेतां जें स्थान त्यास प्राप्त झालें आहे त्यापेक्षांहि अधिक मानाचें स्थान त्यास वाङ्मयाच्या इतिहासांत दिलें पाहिजे. कारण त्याला वगळून त्या काळच्या वाङ्मयविषयक चळवळीचा विचार करतां येणार नाहीं. विटेन्बर्ग येथें थीसिस अगेन्स्त इंडलजन्सिस (पापविमोचन पत्रांविरुद्ध निबंध ) या नांवाचा जो ग्रंथ इ. स. १५१७ अक्टोबरच्या ३१ व्या तारखेस लूथरनें प्रसिद्ध केला. त्यानें धर्मसुधारणेस प्रारंभ केला आणि तेव्हांपासून अगदीं साध्या गद्यपद्यात्मक ग्रंथापासून तें औपरोधिक व नाट्यग्रंथापर्यंत सर्व जर्मन वाङ्मयास तोच एक प्रतिपाद्य विषय होऊन बसला. इ. स. १५२० मध्यें लूथरनें जीं तीन लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध केलीं, त्यांत त्यानें आपली धर्मसुधारणेची तत्त्वें नमूद केलीं. व त्याच्या पुढील वर्षी वर्म्स येथील कौन्सिलपुढें जी त्याची जबानी झाली तींत त्यानें आपलीं प्रचलित धर्मविरुद्ध मतें परत घेण्याचें साफ नाकारलें. जर्मन लोकांचा धार्मिक व बौद्धिक कल्याणाच्या दृष्टीनेंच केवळ नव्हे तर त्यांच्या वाङ्मयाचा दृष्टीनेंहि लूथरनें प्रसिद्ध केलेल्या बायबलचें विलक्षण महत्त्व होतें. लूथरचें बायबल म्हणजे एक वाङ्मयाचें स्मारक आहे तो एक अभियुक्तवाङ्मयाचा नमुना आहे; आणि ज्या चळवळीनें मध्ययुगीन सरदारांस घालवून त्यांच्या जागीं नागरिक उत्पन्न केले आणि जिनें मध्यअभिजात जर्मन काव्याचें उच्चाटन केलें त्या चळवळीचा हा ग्रंथ म्हणजे परिपाक होय व तिचें समर्थनहि त्या ग्रंथानें केलें आहे. आपल्या कार्याची सर्व मदार आपण केलेल्या बायबलाच्या भाषांतरावर आहे हें लूरथला पूर्णपणें माहीत असल्याकारणानें आपला ग्रंथ केवळ भाषेनेंच नव्हे तर आंतील भावार्थानेंहि सर्वथैव जर्मन व्हावा याविषयीं अतोनात परिश्रम केले. शिवाय ज्या भाषेंत बायबलचें भाषांतर करावयाचें ती जर्मन भाषा बोलणाऱ्या अत्यंत विस्तृत प्रदेशांतील सर्व लोकांस समजावी हें अत्यंत महत्त्वाचें असल्याकारणानें त्यानें आपल्या ग्रंथांतील शब्द व त्यांचीं रूपें फार कसोशीनें वापरलीं आणि लोकांत प्रचलित असलेल्या आख्यायिकांस धरून आपलीं स्तोत्रें रचणें फार अगत्याचें आहे हेंहि ल्यूथरला पूर्णपणें ठाऊक असल्यामुळें त्यानें तशींच स्तोत्रें रचलीं आणि तेणेंकरून पुढील शतकामध्यें जर्मनींत धार्मिक काव्यग्रंथांचा जो एवढा विस्तार झाला त्याचा त्याच्या स्तोत्रांनीं पाया घातला असें म्हणावें लागतें.

या काळचें अतिशय जोमदार वाङ्मय म्हणजे औपरोधिक वाङ्मय हें होय. या औपचारिक पद्धतीनेंच बुडत्या धर्माचे अभिमानी प्रॉटेस्टंट पुढाऱ्यांवर हल्ले चढवीत असत. लूथरच्या अनुयायांमध्यें फिलिप मेलँक्थॉन व उलरिख व्हॉन हटन हे धर्मसुधारणेचे पक्के पुरस्कर्ते होते. परंतु त्यांच्या मनाचा ओढा लॅटिन भाषेंतील उदात्तवाङ्मयलेखकांकडे होता आणि हटनचे जर्मन भाषेंतील कांहीं जोमदार गद्यपद्यात्मक लेख वजा केले तर त्या दोघांचे सर्व ग्रंथ लॅटिन भाषेंतच लिहिले आहेत. निक्लस मॅन्युअल याचीं औपरोधिक नाटकें आणि इरॅस्मस अल्बेरस याच्या वादविवादात्मक कल्पित कथा यांच्यांत विशेष जोम नाहीं. परंतु त्या मानानें थॉमस मर्नरनें प्रॉटेस्टंट धर्मावर उडविलेले कोरडे बरेच जालीम आहेत. त्यावेळच्या औपरोधिक लेख लिहिणाऱ्या जर्मन ग्रंथकारांमध्यें मर्नर हा अगदीं बेमुर्वतखोर टीकाकार होता. अश्लील भाषा वापरण्यास तो मागें घेत नसे. लूथरवर व्यक्तिविषयक टीका करण्यासहि त्यानें कमी केलें नाहीं. एक पिढी उलटून जाईपर्यंत प्रॉटेस्टंट पक्षांत मर्नरच्या तोडीचा जोमदार व बुद्धिवान औपरोधिक लेखक उत्पन्न झाला नाहीं. तदनंतर जोहान फिस्कार्ट हा तशा तऱ्हेचा लेखक झाला. परंतु फिस्कार्टची व पूर्वीच्या लेखकाची तुलना करतांना पन्नास वर्षांच्या पूर्वीची व फिस्कार्टच्या वेळची प्रॉटेस्टंट धर्माची स्थिति यांत बराच फरक झाला होता हें लक्षांत घेतलें पाहिजे. प्राटेस्टंट धर्म व उदात्तवाङ्मय या संयुक्त पायावर फिस्कार्टनें आपल्या ग्रंथांची उभारणी केली होती. व्यक्तिविषयक व मर्मभेदक औपरोधिक लेखनाचा काळ गेला होता आणि सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील लेखकांनीं

उदात्त वाङ्मयाच्या अभ्यासकांच्या शिष्ट पद्धती अधिकाधिक स्वीकारल्या होत्या. बार्थोलोमिअस रिंगवॉल्ट व जॉर्ज रोलेनहागेन यांच्या लेखनांत फिस्कार्टपेक्षां शब्दसौष्ठव अधिक असून वास्ताविक उपरोध फार कमी आहे.

धर्मवादाच्या बंधनांतून सोळाव्या शतकांत ज्यानें आपली सुटका करून घेतली होती तें वाङ्मय म्हटलें म्हणजे नाट्यवाङ्मय होय. नाट्यवाङ्मयाच्या बौद्धिक व वाङ्मयात्मक विकासाला प्रॉटेस्टंटधर्म अनुकूल असून लॅटिन भाषेंतील आनंदपर्यवसायी नाटकांचें अनुकरण करण्याचा ज्यांस अभिमान वाटत असे त्या उदात्त वाङ्मयाच्या बाह्यरचनेकडे व प्रमाणशीरपणाकडे लक्ष देणारी दृष्टि उत्पन्न केली. लॅटिन संप्रदायाप्रमाणें आनंदपर्यवसायी नाटकें लिहिण्याची पद्धत जे विंफेलिंग व जे. न्युखालिन यांनीं जर्मनीमध्यें प्रथम सुरू केली. थॉमस कर्चमेअर किंवा निवाजिऑर्जस, कास्पर बूर्लो व निकोडेमस फ्रिस्चलिन हे सोळाव्या शतकांतील प्रमुख लॅटिन नाटककार होते. ते कधीं कधीं स्वभाषेंतहि नाटकें लिहीत असत. या नाटककारांच्या नाटकांवरून नाटकांचे बाह्यांग व त्यांतील विषय या बाबतींत सोळाव्या शतकांतील लॅटिन व जर्मन नाट्यग्रंथ यांचा किती निकट संबंध होता हें दिसून येण्यासारखें आहे. धर्मसुधारणेच्या स्फूर्तीनें उत्पन्न झालेल्या जर्मन वाङ्मयाचा उगम प्रथम स्वित्झरलंडमध्यें झाला. बासेल येथें पँफिलस जिन्जेन्बाख यानें इ. स. १५१५—१६त फासनाट स्पील नांवाचा नीतिपर नाट्यग्रंथ लिहिला आणि बर्नेचा निक्लस मॅन्युएल यानें त्याच ग्रंथाचा उपयोग धर्मोपासनेविरुद्ध व पापविमोचनपत्रिकेच्या विक्रीविरुद्ध तीव्र उपरोध व्यक्त करण्याकडे केला. जर्मन नाटककारांनीं या उदात्त वाङ्मयाभ्यासकांचें अनुकरण करण्यास लवकरच सुरुवात केली. बर्कर्ड वाल्डिस, सिक्स्त बर्क, पॉल रेभून व फ्रिस्क्लिन इत्यादि लेखकांनीं लिहिलेलीं नाटकें म्हणजे अभियुक्तवाङ्मयपद्धतीनें धार्मिक विषयावर नाटकें लिहिण्यासंबंधीं केलेले प्रयत्न होत. सोळाव्या शतकांतील जर्मन वाङ्मयाच्या दृष्टीनें केन्द्रस्थानीं असलेल्या न्युरेम्बर्ग येथें मूळच्याच पद्धतीनें नाट्यकलेचा उत्कर्ष झाला; हॅन्स सॅश ( १४९४–१५७६ ) हा विपुल ग्रंथरचना करणारा लेखक होता. परंतु त्यानें आपली ग्रंथरचना स्वतंत्र पद्धतीनें केली. उदात्तवाङ्मयाभ्यासी भाषांतरकारांनीं विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवनासंबंधींच्या वाङ्मयाची जर्मनीमध्यें यावेळीं रेलचेल करून दिलेली होती. त्या वाङ्मयाचा हॅन्स सॅश यानें पूर्ण फायदा घेतला होता व शिवाय तो लूथरचा निस्सीम भक्तहि झाला होता. परंतु जर्मन नाट्यवाङ्मयाच्या प्रगतीसंबंधीं त्यानें आपल्या स्विस व सॅक्सन समकालीन नाटककारांइतकाहि भाग उचललेला नाहीं. कारण त्याच्या शोकपर्यवसायी व आनंदपर्यवसायी अशा दोन्ही प्रकारच्या नाट्यग्रंथांत नाट्यरचनेस लागणारे सद्गुण फार कमी प्रमाणांत दिसून येतात. त्याचे ग्रंथ म्हणजे संभाषणात्मक गोष्टी आहेत. ज्या फासनाटस्पील ग्रंथास नाट्यरचनेची फारशी गरज नसते व ज्यांत फक्त संक्षिप्त व चटकदार गोष्टींचा भरणा अधिक असतो त्या ग्रंथांत त्याची उत्कृष्ट कामगिरी दिसून येते. सोळाव्या शतकांत नाट्यकलेची भरभराट होईल असें जरी वाटत होतें तरी त्या काळची एकंदर परिस्थिति राष्ट्रीय नाट्यरचनेचा विकास होण्यास फारशी अनुकूल नव्हती. परंतु त्या शतकाच्या शेवटीं आंग्लनट जर्मन रंगभूमीवर दिसूं लागल्यापासून उदात्तवाङ्मयात्मक व वृत्तान्तपर जर्मन नाट्यरचनेंत ज्या नाटकी थाटाची व रंगभूमीला योग्य अशा आविर्भावाची उणीव होती ती दूर झाली . ही सुधारणा जेकब आयरेरं व ब्रन्सविकचा ड्यूक हेन्री ज्युलिअस यांच्या नाट्यग्रंथांत दिसून येते. तथापि दुर्दैवानें अशा तऱ्हेचा उपक्रम होतो न होतो तोंच विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवनाची लाट सर्व जर्मनीभर पसरली व त्या योगानें जर्मनींत सेनेकाप्रणीत शोकपर्यवसायी नाटकपद्धतीचा उपक्रम झाला. तदनंतर त्रिंशद्वार्षिक युद्ध सुरू झालें व त्यामुळें लोकप्रिय व राष्ट्रीय नाट्यरचनेला अवश्य लागणारी समाजव्यवस्था नाहींशी झाली.

धार्मिक वाद व औपरोधिक लेखनपद्धति यांच्या जोडगोळींतून नाटककारांइतकीहि कादंबरीकारांस आपली सुटका करून घेतां आली नाहीं. परकीयांचें अनुकरण करण्याकडे फिस्कार्टचें इतकें लक्ष्य होतें व त्याची मनोवृत्ति इतकी चंचल होती कीं, सोळाव्या शतकांतील राष्ट्रीय स्वरूपाच्या जर्मन कादंबरीची स्थापना त्याजकडून होणें शक्य नव्हतें. यामुळें अगदीं साधारण बुद्धिमत्तेचा जॉर्ग विक्रम हाच कायतो त्या काळचा प्रख्यात कादंबरीकार होऊन गेला. त्याच्या डर न्याबेनसिपगेल आणि डर गोल्डफडेन या दोन मोठ्या कादंबऱ्यांनीं अठराव्या शतकांतील भरभराटीच्या जर्मन कादंबरी–युगाचा पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

( ४ ) विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवनाचें युग (१६००-१७४०):—सतरावें शतक व तत्पूर्वीचें शतक यांत वाङ्मयाच्या दृष्टीनें जर्मनींत पूर्ण विरोध दिसून येतो. त्रिंशद्वार्षिक युद्धांमुळें, खेडींपाडीं नष्ट झालीं होतीं. नगरांच्या वैभवाचा विध्वंस झाला होता आणि लोकांच्या सामाजिक प्रगतीची अनेक पिढ्यांनीं पिछेहाट झाली होती. यावरून सतराव्या शतकांतील जर्मन अवनतीचा बराच उलगडा होतो. परंतु यावेळीं देशांत बुद्धीचीं कामें करण्याविषयीं जी अनावस्था चहूंकडे दिसून येत होती, परकीयांचे आचार व विचार यांचें अनुकरण करण्याच्या गुलामगिरीमुळें जी राष्ट्राची वाढ खुंटली होती त्या सर्वांचें तें युद्ध येवढेंच कारण होतें असें म्हणवत नाहीं. धार्मिक बाबतींत विचारस्वातंत्र्य असावें असें प्रतिपादन करणाऱ्या लूथरनें जो प्रॉटेस्टंट धर्म प्रस्थापित केला त्याची पुढें इतकी अवनति झाली कीं त्यानें ज्या रोमन कॅथॉलिक धर्माचें उच्चाटन केलें त्याच्या इतकेंच

त्यानेंहि विचारस्वातंत्र्य नष्ट केलें. त्याचप्रमाणें उदात्त-वाङ्मयाभ्यासकांची ध्येयासक्ति नष्ट होऊन तिचो जागा स्कूल-मेनच्या तर्कवादानें घेतली. हा तर्कवाद सतराव्या शतकांत साऱ्या जर्मनीभर बोकाळला होता. शेवटीं लिबनिझ यानें त्याचें उच्चाटन केलें. सर्वांत खेदाची गोष्ट म्हटली म्हणजे सोळाव्या शतकांत ज्या वाङ्मयाची स्थिति मोठी आशाजनक वाटत होती आणि ज्याच्यांत नवीन कल्पनांचा प्रादुर्भाव होत होता ती स्थिति पालटून त्या वाङ्मयाच्या जागीं मिथ्याभियुक्त वाङ्मय अस्तित्वांत आलें. धर्म-सुधारणा युगांतील असंस्कारित वाङ्मयावर शिस्तीचे व सुधारणेचे संस्कार होणें अवश्यक होतें या विषयीं वाद नाहीं; परंतु सतराव्या शतकांत त्या वाङ्मयाला अद्भुत वाङ्मयाचे नियम व कायदे लागू करण्याचा जो प्रयत्न करण्यांत आला त्यामुळें ही सर्व अनिष्टापत्ति घडून आली.

तथापि जर्मन काव्याचे कांहीं भाग असे होते कीं त्याच्या-वर या परदेशीय विचारक्रांतीचा कांहीं परिणाम झाला नव्हता. चर्चमधील स्तोत्रसंग्रहांत लूथरनें घालून दिलेली श्रेष्ठ परंपरा स्तोत्रलेखकांनीं चालू ठेविली व या परंपरेप्रमाणें स्तोत्रसंग्रहाची स्तोत्रसंख्येच्या व काव्यगुणाच्या दृष्टीनें सारखी वाढ होत होत सतराव्या शतकांत या वाढीचा अगदीं कळस झाला. या काळांत जितके लूथरानुयायी ख्रिस्ती पालक स्तोत्रलेखक होऊन गेले त्या सर्वांत पॉल गरहार्ट हा श्रेष्ठ होता. जेकब बोएमे याच्या गुढार्थगर्भित कल्पनांमध्यें केवढें काव्यभांडार सांठविलें होतें हें कॅथॉलिक पंथाच्या वतीनें अँजेलस सायलेशिअस किंवा जोहान शेफलर ( १६२४–१६७७ ) यांनीं दाखविलें. त्या काळचा कॅथॉलिक पंथाचा दुसरा सुप्रसिद्ध कवि फ्रेडरिक व्हान स्पी ( १५९१–१६३५ ) यानें पुनरुज्जीवन युगांतील गोपगी-तांचा विकास केला. बोएमेच्या गूढविद्येचा प्रसार सतराव्या शतकांतील सर्व धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांत झाला. स्तोत्रा-त्मक वाङ्मय सोडून लौकिक गीतांचा विचार केला तर असें आढळून येईल कीं त्यानें लढाईच्या धुमश्चक्रींतहि स्वदेशाभिमानपूर्ण विचार बाढत्या प्रमाणांत प्रगट केले. त्याच्यावर कल्पनाकुशल व अभिजात लेखकाचा यत्किंचितहि अधिकार चालत नव्हता व त्याचा विकास अगदीं स्वतंत्र पद्धतीनें झाला. या व्यतिरिक्त इतर सर्व जर्मनवाङ्मयांत लॅटिन भाषेंतील वाङ्मयपुनरुज्जीवनाच्या अनुरोधानें फेरबदल होत गेले.

हायडलबर्ग हें सोळाव्या शतकांत उदात्तवाङ्मयाचें केंद्र-स्थान होतें आणि वाङ्मयपुनरुज्जीवनाचाहि आरंभ तेथेंच झाला. या ठिकाणीं जे. डब्ल्यू. झिंग्रेफ ( १५९१–१६३५ ) याच्या नेतृत्वाखालीं कांहीं विद्वान लेखकांनीं आपलें जर्मन भाषेवरील प्रेम व्यक्त करण्याच्या बुद्धीनें प्रत्यक्ष कार्य कर-ण्यास सुरुवात केली, पुनरुज्जीवन युगांतील अत्यंत विख्यात लेखक जो ऑपिझ त्याच्याहि पूर्वी ज्यानें आपल्या काव्यानें जर्मनीमध्यें त्या युगास प्रारंभ करून दिला तो जी. आर. वेखरलीन ( १५८४–१६५३ ) हा होय. परंतु या युगांतील सर्वांत श्रेष्ठ कवि म्हटला म्हणजे ऑपिझ ( १५९७–१६३९ ) हाच होय. तो सायले-शियाचा रहाणारा असून ज्यावेळीं हायडबर्ग येथें विद्या-र्जनासाठीं गेला त्यावेळीं झिंग्रेफनें स्थापन केलेल्या लेखक-मंडळाशीं त्याचा परिचय झाला. नंतर तो हॉलंडमध्यें प्रवास करीत असतां त्या देशाचा सुप्रसिद्ध विद्वान कवि डॅनिअल हेन्शिअस याच्या कृतीच्या अवलोकनानें व चिंतनानें त्याच्या विचारांस एक प्रकारचें निश्चित वळण लागलें. त्यानें संबो-धनात्मक लघुकाव्यें, वीररसप्रधान काव्यें यांपासून तों गोप-गीतें व सेनेकन धर्तीचीं नाटकें येथपर्यंत पुनरुज्जीवन युगांत प्रसिद्धीस आलेली सर्व प्रकारची काव्यरचना केली. परंतु त्याचीं नाटकें अंतःप्रेरणेनें किंवा अंतःस्फूर्तीनें लिहिलेलीं नाहींत. त्याच्या काव्यरचनेचाच तेवढा विचार केला तर त्याच्या समकालीन कवींमध्यें त्याला जो अग्रपूजेचा मान मिळत असे तो कां मिळावा याचा उलगडा होण्यासारखा नाहीं. परंतु ज्यांत पुनरुज्जीवनाचें सोपपात्तिक विवेचन केलें आहे असा बुक व्हॉन डर डॉएटश्चेन पोएट्री या नांवाचा ग्रंथ त्यानें लिहिला हें लक्षांत घेतलें म्हणजे त्याच्या मान्य-तेचें कोडें सहज उलगडण्यासारखें आहे. या ग्रंथांत ऑपि-झनें स्कॉलिगर व रोन्सार्ड या पुनरुज्जीवन युगांतील कल्पना-कुशल लेखकांचीं ठराविक मतेंच नमूद केलीं आहेत. त्यांत त्यानें आपल्या रसहीन पद्यरचनेचें समर्थन केलें इतकेंच नव्हे तर त्यायोगानें एक शतकभर वाङ्मयाचें नियमन करील असें पद्यरचनाशास्त्र त्यानें जर्मनीला दिलें.

ऑपिझचें सुधारणाकार्य वाङ्मयकार्यकर्त्या अनेक मंड-ळ्यांनीं पुढें चालविलें. या मंडळ्यांचें वाङ्मयकार्य जरी क्षुल्लक होतें तरी त्यांनीं जर्मनभाषेसंबंधीं महत्त्वाची कामगिरी केली. परकी व जर्मनेतर भाषेंतील शब्द व शब्दप्रयोग यांचें उच्चाटन करून जर्मनभाषेचें शुद्धीकरण करण्याकडे त्यांच्या प्रयत्नांचा मुख्य रोख होता. दरम्यान काव्यदेवतेचें ठाणें हायडेलबर्ग येथून उठून कोनिंग्जबर्ग येथें गेलें होतें. त्या ठिकाणीं सुशिक्षित कवींचा एक संघ स्थापन झाला आणि त्यांनीं ऑपिझच्या काव्यरचनापद्धतीला प्रत्यक्ष स्वरूप प्राप्त करून दिलें. या कवींत सायमन डाख (१६०५–१६५९) हा प्रमुख होता. त्याची कवीता सौम्य असून विलासगीतस्वरूपाची आहे. त्याच्या काव्यरचनेस ऑपिझच्या नियमांनीं अडथळा केला नाहीं. तो व त्याच्याहून अधिक विरश्रीचीं व आवेशाचीं काव्यें करणारा त्याचा समकालीन कवि पॉलफ्लेमिंग ( १६०९–१६४० ) या दोघांनीं ऑपिझचे काव्यरचना विषयक नियम संभाळूनहि चांगली व सरस काव्यरचना करितां येते हें सिद्ध करून दिलें.

गेल्या शतकांत औपरोधिक वाङ्मय सर्वांत पुढें गेलेलें होतें आणि नव्या परिस्थितींतहि त्याच पद्धतीची काव्य-

रचना पुढें चालू होती. परंतु ही औपरोधिक पद्धतीची काव्यरचना धर्मसुधारणाकाळच्या संपूर्ण स्वरूपाची किंवा सतराव्या शतकांत फिस्कार्टेनें प्रचलित केलेल्या जोमदार स्वरूपाची नव्हती. पुढें हॅंबर्ग येथील धर्मोपदेशक जे. बी. स्कूप ( १६१०–१६६१ ) याच्या आवेशयुक्त व झणझणीत प्रवचनांत औपरोधिक पद्धति उच्च विचार व्यक्त करण्याकडे उपयोगांत येऊं लागली. सर्वांत फ्रेडरिख व्हॉन लोगॉ ( १६०४–१६५५ ) या प्रासादिक कवीच्या सूत्ररूपी म्हणी अत्युत्कृष्ट आहेत. त्याच्या तीन हजार म्हणी म्हणजे सतराव्या शतकांत देशाची बौद्धिक प्रगति किती झाली होती हें जाणण्याचें एक साधन होय. त्या युगांतील ज्ञानभांडाराचें जणूं त्याच्या म्हणींत सारच काढलेलें आहे. फ्रेंच लोकांच्या चालीरीतींचें अगदीं डोळे झांकून अनुकरण करणें, जें जें म्हणून राष्ट्रीय किंवा जर्मन असेल त्याजविषयीं तिटकारा असणें इत्यादि त्या काळचे सर्व दुर्गुण त्या म्हणींत प्रतिबिंबित झाले आहेत. ख्रिस्तीधर्माकरितां युद्ध करून रक्तपात करणाऱ्या कृतीचा लोगॉ यानें कडक शब्दांत उपहास केला आहे आणि जरी त्यानें ऑपिझची स्तुति केली तरी त्याची अवास्तव स्तुति करण्याचें काम त्यानें कधींहि केलें नाहीं. सारांश लोगॉ याचा सूत्ररूपी म्हणी लिहिण्याच्या कामीं हातखंडा असून जर्मनीचा पुनरुज्जीवन युगांतील नमुनेदार लेखक होता यांत तिलप्राय शंका नाहीं.

अभियुक्तवाङ्मयाच्या नियमाबरहुकूम नाटयग्रंथ लिहून जर्मन वाङ्मयांत भर घालण्याचें काम ऑपिझकडून झालें नाहीं. त्यानें स्वतः सोफोक्लीज व सेनेका यांच्या ग्रंथांच्या भाषांतरापलीकडे कांहीं केलें नाहीं, आणि हॅंबर्ग येथील नाटककार जोहान रिस्ट यानें ऑपिझचें अनुकरण न करतां ब्रन्सविक येथील ड्यूक हेन्रिख ज्युलिअसच्या धर्तीवर नाटयरचना केली आहे ऑपिझ परलोकवासी झाल्यानंतर पुनरुज्जीवन युगांतील प्रमुख नाटककार अँड्रीज ग्रिफिअस ( १६१६–१६६४ ) हा उदयास आला. ग्रिफिअस हा ऑपिझप्रमाणें सायलेशिआचा रहिवाशी असून त्यानें रचलेल्या वीणाकाव्यावरून तो सामान्य कोटींतला कवि नव्हता असें दिसून येतें. परंतु सेनेकाच्या नमुन्यावर रचलेलीं त्याचीं शोकपर्यवसायी नाटकें, त्यांचे कोणी प्रयोग न केल्यामुळें आणि फ्रान्समध्यें अत्यंत प्रगल्भ दशेस पोंचलेल्या नाटयकलेविषयीं त्याच्या अज्ञानामुळें जितकीं लोकादरास पात्र व्हावीत तितकीं झालीं नव्हतीं. त्यानें फक्त डच नाटकांचा नमुना पुढें ठेवून आपली नाटयरचना केली. आनंदपर्यवसायी नाटकें रचण्याच्या कामांत नाटयरचनेचे नियम त्याच्या आड येत नसल्याकारणानें त्यानें डच प्रहसनांत आणि जर्मनींत नाटकें करणाऱ्या इंग्रजी नटांच्या विनोदी नाटयप्रयोगांत दिसून आलेल्या निरंकुशत्वाचा पूर्ण फायदा घेतला. हॉरिबिलिक्रिब्रिफॅक्स व हरे पिटर स्केन्ट्झ या नांवाचीं सतराव्या शतकांतील अतिशय उत्कृष्ट दोन जर्मन नाटकें ग्रिफिअसनें लिहिलीं आहेत.

इतर प्रकारच्या वाङ्मयापेक्षां सतराव्या शतकांतील जर्मन कादंबरी-वाङ्मयावर पुनरुज्जीवन चळवळीचा परिणाम फारच अल्प प्रमाणांत झाला. शिवाय जर्मन कादंबरीवाङ्मयाची वाढ जरी परकी वाङ्मयाच्या तंत्रानें होत होती तरी तें वाङ्मय विविध स्वरूपाचें होतें. सतराव्या शतकाच्या प्रारंभींच डॉन क्विझोटचें अंशतः भाषांतर झालें होतें. एच्. एम्. मॉश्चेरॉश ( १६०१–१६६९ ) यानें आपल्या गेसिट फिलँडर्स व्हान सिटेवाल्ड (१६४२–४३) या कादंबरींत त्या काळच्या चालीरीतींचें उपरोधमिश्रित हुबेहूब चित्र रेखाटलें आहे. एच्. जे. ख्रिस्टोफेल व्हॉन ग्रिमेलशॉसेन ( १६२५–१६७६ ) यानें रचलेली डर अबेन्टयूर्लिश सिंप्लिसिसिमस ही सतराव्या शतकांतील अत्युत्कृष्ट जर्मन कादंबरी असून तिच्यांत अनेक प्रसंगांचीं बहारीचीं वर्णनें आहेत. तिच्यांतील मजकूर बहुतेक आत्मचरित्रपर असून सामाजिक विस्खलितपणा व त्रिंशद्वार्षिक रणसंग्रामाचे भयोत्पादक प्रसंग तिच्यांत अगदीं हुबेहूब रेखाटले आहेत. परंतु हिच्यासारखी कादंबरी हीच होती. ग्रिमेलशॉसनेचे इतर लेखहि तिच्याच कथानकाचे धागे होते व त्यानें स्थापन केलेली परंपरा पुढें चालविण्यास तितक्या योग्यतेचे लेखक त्याच्यामागून झाले नाहींत. ख्रिश्चन वीज ( १६४२–१७०८ ) यानें थोड्या औपरोधिक कादंबऱ्या लिहिल्या; परंतु त्यांतील यथार्थ व औपरोधिक लेखन हें उघड उघड नैतिक स्वरूपाचें आहे. त्याच्या नाटयग्रंथांत त्याचें लेखनकौशल्य अधिक दिसून येतें. त्याच्या छात्रवर्गाच्या प्रयोगाकरितां त्यानें पन्नासापेक्षां अधिक नाटकें लिहिलीं आहेत.

सिंप्लिसिसिमस या कादंबरीनंतर इंग्रजी कादंबरी रॉबिन्सन क्रुसो हिचें जर्मनींत भाषांतर झालें ( १७२१ ). त्याच प्रमाणें आणखीहि कांहीं कादंबऱ्यांचीं जर्मन भाषांतरें झालीं. जे. जी. श्नाबेलच्या "इन्सेल फेल्सनबर्ग" ( १७३१–१७४३ ) या कादंबरीखेरीज या भाषांतरित कादंबऱ्यांची वाङ्मयाच्या दृष्टीनें फार अल्प किंमत होती. तथापि फिलिप व्हॉन झेसेन, ड्यूक अँटन उलरिख, ए. एच्. बुछोल्ट, एच्. ए. व्हॉन झिग्लर, सि. सि. व्हॉन लोहेनस्टीन इत्यादि कादंबरीकारांनीं ज्या प्रणयकथांचा विस्तार केला व ज्यांचा पुनरुज्जीवनयुगापासून प्रारंभ झाला त्या कथांतील वाङ्मयापेक्षां या भाषांतरित कादंबऱ्यांचें वाङ्मय अधिक निर्दोष व स्वाभाविक पद्धतीचें होतें. इटॅलिअन गॅरिनी व मारिनी व स्पॅनिश गॉंगोरा या लेखकांच्या शब्दाडंबर व सौम्यपर्याय यांनीं युक्त अशा लेखनपद्धतीचा अंगिकार करून तिचा विकास केल्यामुळें लोहेन्स्टीन व हॉफमनस्वाल्डॉ यांच्या हातांमध्यें जर्मन कविता अवनतीच्या

नीचतम स्थितीला पोहोंचली. दुसऱ्या कोणीहि तिची इतकी दुर्दशा केली नाहीं.

परंतु सुदैवानें ही लेखनपद्धतींतील रुचिभ्रष्टता फार वेळ टिकली नाहीं. युद्धामुळें जर्मन लोकांची समाजव्यवस्था जी विस्खळीत झाली होती तिची पुनर्व्यवस्था जरी सावकाश व कष्टानें होत होती तरी परकीय तत्त्वज्ञांच्या विचारांची छाप पडल्यामुळें जर्मन लोकांच्या बुद्धिमत्तेचा विकास झपाटयानें होत होता. सॅम्युएल पुफेन्डॉर्फ, ख्रिश्चन थेॉमॅशिअस, ख्रिश्चन व्हॉन वोल्फ आणि सर्वांत मोठा म्हटला म्हणजे ग्राटफ्रिड विल्हेम लिबनिझ (१६४६-१७१६) इत्यादि लेखकांनीं ज्या बुद्धिप्रामाण्यवादाचा पाया घातला त्यानें अठराव्या शतकाचीं बरींच वर्षे जर्मन लोकांवर आपला अंमल चालविला. शिवाय फिलिप जेकब स्पेनर (१६३५-१७०५) याच्यासारख्या गूढविद्यासंशोधकांनीं भक्तिभावाचें वळण लावल्यामुळें जर्मन लोकांची धार्मिक प्रवृत्तीहि बळावली होती. अशा सर्व बाजूंनीं अनुकूल परिस्थितींत वाङ्मयविषयक रुचीलाहि चांगलें वळण लागावें हें स्वाभाविक होतें. आणि त्याप्रमाणें लोहेन स्टीन व हॉफमन स्वाल्डॉ यांच्या अगडबंब व आळ्यतेखोर काव्यरचनेच्या मार्गी बॉइलूनें घालून दिलेल्या नियमबद्ध व विचारपूर्ण वळणाची काव्यरचना दृष्टीस पडूं लागली. ज्यास राजकवि म्हणत असे रुडॉल्फ व्हॉन केनिझ, जोहान्न व्हॉन बेसर व बेन्जामिन न्यूकर्च हे प्रतिभासंपन्न नव्हते. तथापि त्यांच्या काव्यरुचींत बिनचुकपणा होता. त्यांच्यामधून जोहान्न ख्रिश्चन गुन्थर (१६९५-१७२३) नांवाचा एक प्रासादिक व प्रतिभावान वीणाकाव्यकर्ता उदयास आला. प्रणयगीताच्या युगापासून अद्यापपर्यंत त्याच्यासारखा "प्रणयगीत" रचणारा कवि जर्मनीमध्यें झाला नव्हता. हॅंबर्गमध्यें मात्र हॉफमन स्वाल्डाच्या काव्यरचनेचा बराच प्रचार होता. परंतु ख्रिश्चन वर्निकेच्या सूत्ररूपी खोंचदार म्हणी व बरथोल्ड हेन्रिख ब्रॉक्स यानें इंग्रजी काव्यापासून घेतलेली निसर्गविषयक सदभिरुची यांच्या योगानें तेथें प्रचलित असलेल्या कृत्रिम काव्यरचनेस बराच फांटा मिळाला. याप्रमाणें इंग्रजी वाङ्मयाच्या संसर्गानें काव्यरचनेस निराळें वळण मिळालें इतकेंच नव्हे तर स्पेक्टेटर, टॅटलर व गार्डिअन यांचीं जर्मन भाषेंत भाषांतरें व रूपांतरें झाल्यामुळें जर्मन लोकांच्या काव्याभिरुचीस उत्तम वळण लागलें व मध्यमवर्गांतील जर्मन लोकांच्या नैतिक विचारांस उत्तम वळण देण्याच्या कामींहि त्याचा चांगला उपयोग झाला.

सायलेशियांतील "राजकवींनीं" ज्या वाङ्मयविषयक चळवळीचा पाया घातला तिचा जोहान्न ख्रिस्तोफ गॉटशेड (१७००—१७६६) हा प्रमुख पुरस्कर्ता होता. त्यानें १७२४ तें १७४० पर्यंत अनेकविध प्रयत्न करून सतराव्या शतकाच्या फ्रेंच अभियुक्तवाङ्मयांतील सदभिरुचीच्या पायावर रचलेल्या वाङ्मयिक सुधारणा जर्मन अभिरुचीचें माहेरघर समजल्या गेलेल्या लैपझिक येथें प्रविष्ट केल्या. फ्रेंच कल्पनांच्या अनुरोधानें त्यानें नाटयकलेस शुद्ध करून तिची सुधारणा केली. त्यानें आपल्या "क्रिटिश डिकन्स" या ग्रंथांत चांगलें वाङ्मय कसें उत्पन्न करावें व वाङ्मय उत्तम आहे हें कसें ठरवावें याविषयींचीं तत्त्वें प्रतिपादिलीं आहेत. ज्याप्रमाणें रोन्साडेच्या मदतीनें ऑपिझनें जर्मन वाङ्मयाची सुधारणा केली त्याप्रमाणें गॉटशेड यानें समकालीन फ्रेंच टीकाकार व कल्पनाकुशल लेखक यांनीं केलेल्या अर्थाच्या अनुरोधानें बॉइलूच्या तत्त्वावर सुधारणाविषयक चळवळ घडवून आणली. गॉटशेड हा जर्मन वाङ्मयाच्या पुनरुज्जीवन युगांतील अखेरचा लेखक होता. इ. स. १७४० त जर्मन काव्यकलेच्या नवीन युगास प्रारंभ झाला.

(५) अर्वाचीन अभियुक्त वाङ्मयाचें युग (१७४०-१८३२):—(अ) स्विस वाङ्मयवादाच्या काळापासून धामधुमीच्या लेखनयुगापर्यंतः—ऑपिझपासून गॉटशेडपर्यंत जर्मनीमध्यें जे लेखक होऊन गेले त्यांच्या लेखांवरून पहातां जर्मनवाङ्मय हें पुनरुज्जीवन युगांतील इतर वाङ्मयाप्रमाणें निरनिराळ्या अवस्थांमधून गेलें. आणि हुबेहुब फ्रेंच वाङ्मयाप्रमाणें जर्मन वाङ्मयाचें पुढें पाऊल पडण्यापूर्वी 'प्राचीन' व "अर्वाचीन" लेखकांमध्यें एक लेखनसंग्राम घडून आला. "प्राचीन" पद्धतीच्या लेखकांचा गॉटशेड हा पुरस्कर्ता असून "अर्वाचीन" लेखकांत जे. जे. बॉडमेर (१६९८—१७८३) आणि जे. जे. ब्रेटिंजर (१७०१-१७७६) हे स्विसवाङ्मयसुधारक होते. गॉटशेड यानें "क्रिटिश डिकन्स" या नांवाच्या ग्रंथांत जे सिद्धान्त प्रस्थापित केले होते त्याच्या अगदीं उलट सिद्धान्त ब्रेटिंजर यानें आपल्या त्याच नांवाच्या ग्रंथांत प्रतिपादन केले आणि बॉडमेर यानें त्याच्या लिहिण्यास पुष्टि दिली. याप्रमाणें लेपझिग व झ्यूरिच येथील लेखकांमध्यें एक लेखनसंग्राम सुरू झाला व तेथूनच अर्वाचीन अभियुक्त वाङ्मयाच्या युगास प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्विस लेखक स्वतंत्र विचाराचे नसल्याकारणानें त्यांनीं आपल्या कल्पना इटॅलिअन व इंग्रजी टीकाकारांच्या लेखांतून घेतल्या होत्या. आणि त्या कल्पनांवरूनच मिथ्याभियुक्ततेच्या बंधनांतून जर्मन वाङ्मयाची कशी सुटका करावी हें त्यांस कळून आलें. "मिल्टनच्या पॅरडाइज लॉस्ट" या काव्याचें उदाहरण देऊन त्यांनीं असें प्रतिपादन केलें कीं ज्याच्या ठिकाणीं अलौकिक बुद्धिवैभव व स्फूर्ति असते त्या लेखकास अधिक लेखनस्वातंत्र्य पाहिजे. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा होता कीं तर्क व सारासार विचार यांच्या पलीकडची मजल मारण्यास कल्पनाशक्तीला कोणत्याहि प्रकारचा प्रत्यवाय नसावा. हें त्यांचें म्हणणें लोकांस पटून त्यांचा विजय झाला. याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांनीं आपलें म्हणणें मोठ्या चातुर्यानें लोकांस पटविलें तर त्यावेळीं वाङ्मयप्रदेशांत अधिक स्वातंत्र्याची जरूरी आहे अशी लोकांची समजूत होती. तो विजय व्यक्तींचा किंवा पुढा-

त्यांचा नसून कल्पनेचा होता. वर सांगितलेल्या लेखन-संग्रामाचे काय परिणाम झाले हें लैपझिक येथील गॉटशेड पंथाच्या लेखकांवर झालेल्या परिणामावरून कळण्यासारखें आहे. सी. एफ् गेलर्ट (१७१५-१७६९), जी. डब्ल्यू रॅबेनर (१७१४-१७७१) जे. एलिअस श्लेजेल (१७१९-१७४९) इत्यादि गॉटशेड पंथाच्या लेखकांनीं आपल्या पुढाऱ्यांशीं उघड उघड विरोध केला नाहीं. तथापि स्विस पंथाच्या लेखकांनीं प्रतिपादन केलेलीं बरींच तत्त्वें त्यांनीं पर्यायानें अंमलांत आणिलीं. एफ्. जी. क्लॉप्स्टाक यानें आपल्या वीररसप्रधान काव्याचा "उरमिसायस" नांवाचा पहिला हप्ता इ. स. १७४८ त प्रसिद्ध केला. सदर कवीनें गॉटशेडच्या तत्वाविरूद्ध काव्यरचनेचे नियम कसे पार झुगारून दिले याचें तें काव्य एक उत्कृष्ट उदाहरण आहे व बाडमेरच्या निःसत्त्व व शुष्क प्रतिपादनापेक्षां क्लॉपस्टॉकच्या मिसायसनें व त्यापेक्षांहि त्याच्या संबोधनात्मक लघुकाव्यांनीं अठराव्या शतकांतील अर्वाचीन वाङ्मयाचा पाया अधिक परिणामकारक रीतीनें घातला. त्याच्या अनुयायांनीं त्याचें कार्य फारसं पुढें नेलें नाहीं. बॉडमेर आणि जे के. लॅव्हेटर (१७४१-१८०१) यांनीं धार्मिक विषयावर वीररसप्रधान काव्यें लिहिलीं. परंतु त्यांचें आतां कोणी नांवहि काढीत नाहीं. क्लॉपस्टॉकचीं असंबद्ध-काव्यात्मक नाटकें व मॅकफरसनचें "ऑशिअन" काव्य यांनीं मात्र जर्मनींत बरीच खळबळ उडवून दिली आणि त्यामुळेंच त्यावेळीं झालेल्या भाटांच्या चळवळीस प्रारंभ झाला. परंतु त्या भाटांच्या चळवळीचे पुढारी जे. एच. डब्ल्यू. व्हॉन जर्स्टेनबर्ग (१७३८-१८२३), के. एफ्. क्रेशमन (१७३७—१८०९) आणि मायकेल डेनिस (१७२९-१८००) यांच्या असंबद्ध काव्यांत क्लॉपस्टॉकच्या संबोधनात्मक लघुकाव्यांत दिसून येणाऱ्या काव्यस्फूर्तीचा मागमूसहि नाहीं.

जर्मनीच्या अर्वाचीन वाङ्मययुगांतील पहिला प्रतिभाशाली कवि म्हणून आणि ज्यानें बॉडमेरच्या कल्पनांस व्यावहारिक स्वरूप दिलें म्हणून क्लॉपस्टॉकच्या लिहिण्याचा जर्मन वाङ्मयावर जो अप्रत्यक्ष परिणाम झाला त्याची किंमत करावी तेवढी थोडीच आहे. फ्रेडरिक धी ग्रेट हा फ्रेंच संस्कृतीचा निस्सीम भक्त असल्यामुळें त्याला भावनांचें अनियन्त्रित आविष्करण करणें पसंत नव्हतें. आणि त्यामुळें क्लॉपस्टॉक व त्याचें अनुकरण करणारे यांस बर्लिन येथें मान नव्हता. परंतु बॉडमेरनें सुरू केलेल्या चळवळीचा हॉल विश्वविद्यालयांत बराच बोलबाला होता. सदर विश्वविद्यालयांत क्लॉपस्टॉकचें नांव माहीत होण्यापूर्वी जे. आयपिरा (१७१५-१७४४) व एस्. जी. लँग (१७११-१७८१) या दोन तरुण कवींनीं फ्रुंडशाफ्लिश लिडर (१७३७) नांवाचीं काव्यें लिहिलीं आणि तीं क्लॉपस्टॉकच्या नियमक वीणाकाव्याच्या धर्तीचीं होतीं. प्रशियांतील कवी जे, डब्ल्यु. एल. ग्लीम, जे. पी. ऊझ, जे. एन्. गोश्च व के. डब्ल्यू. रॅम्लेर यांनीं जरी फक्त अनॅक्रिऑनच्या व होरेशिओच्या धर्तीचीं लघुकाव्यें लिहिलीं तरी हॅम्बर्ग येथील फ्रेडरिक व्हान हेजडॉर्न (१७०८-१७५४) यानें अनॅक्रिऑनच्या धर्तीचीं व हलकीं सामाजिक काव्यें लिहिण्यांतहि किती नैपुण्य मिळवितां येईल हें दाखवून दिलें. स्विसइन्द्रियविज्ञानपटु अल्ब्रेट व्हॉन हालर (१७०८-१७७७) हा पहिलाच असा जर्मन कवि होऊन गेला कीं ज्यानें आपल्या काव्यांत आल्प्स पर्वतावरील देखाव्याचें सौंदर्य व गांभीर्य वर्णन केलें आणि प्रशियन अंमलदार एवल्ड क्रिश्चन व्हॉन क्लेस्ट (१७१५-१७५९) यानें दर फ्रुलिंग (१७४९) नांवाचें या युगांतील अत्यंत प्रसादपूर्ण व सृष्टिविषयक काव्य लिहिलें. क्लॉपस्टॉकचा विशेष मोठेपणा जर कशांत असेल तर तो धामधुमीच्या लेखनयुगाचा अग्रगामी होता यांत आहे. हें धामधुमीचें लेखनयुग म्हणजे काय याचा उलगडा करण्यापूर्वी लेसिंग व वायलंड या दोन लेखकांचा परामर्श घेणें जरूर आहे.

ज्याप्रमाणें क्लॉपस्टाक हा अर्वाचीन जर्मनवाङ्मयांतील पहिला प्रतिभाशाली कवि होऊन गेला त्याप्रमाणें गॉडोल्ड एप्रोमलेसिंग (१७२९—१७८१) यानें पहिल्या प्रतीचा टीकाकार होऊन सर्व युरोपखंडात जर्मनीचें नांव उज्वल केलें. शिवाय तो अठराव्या शतकांतील बुद्धिप्रामाण्यवादाचा अत्यंत उदार मनाचा प्रतिपादक होता. गॉटशेडप्रमाणें अभियुक्तवाङ्मयांतील नियमबद्ध काव्यरचनेवर त्याची अढळ निष्ठा होती. परंतु त्याच्यांत व गॉटशेडमध्यें हा फरक होता कीं गाटशेडनें नियमबद्ध काव्यरचनेची कल्पना फ्रेंच मिथ्याभियुक्तवाङ्मयापासून घेऊन ती जर्मन वाङ्मयावर लादण्याचा प्रयत्न केला आणि लेसिंगनें आपली नियमबद्ध काव्यरचनेची कल्पना ग्रीक कला व वाङ्मयापासून घेतली होती. इतकेंच नव्हे तर शेक्सपिअरची ग्रंथरचना अनेक जागीं नियमबाह्य असूनहि तो असें प्रतिपादन करीत असे कीं शेक्सपिअरनें आपली ग्रंथरचना अगदीं आरिस्टॉटलच्या नियमाबरहुकूम केली आणि म्हणून तो फ्रेंच अभियुक्त-वाङ्मय-लेखकापेक्षांहि मोठा कवि होता. जर्मन नाट्यकलेंत नवजीवन उत्पन्न करण्याच्या कामीं त्याची भिस्त फ्रेंच वाङ्मयावर नसून इंग्लिश वाङ्मयावर होती आणि या दिशेनें त्याचे नाट्यग्रंथ अग्रगामी होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचे दोन तरुण व होतकरू अनुयायी जे एफ्. क्रोनेक (१७३१-१७५८) व जे. डब्ल्यू. व्हान ब्रॉ (१७३८-१७५८) हे दुर्दैवानें अल्पायुषी झाले व त्याचा तिसरा अनुयायी जो सी. एफ्. वेसे (१७२६-१८०४) याच्यांत नाट्यवाङ्मयाची अभिवृद्धि करण्याइतकी करामत नव्हती.

सी एम्. वायलंड यानेंहि कल्पनाप्रधान जर्मन वाङ्मयाचा विस्तार करण्याचें काम केलें. परंतु त्याचा मार्ग लेसिंगहून भिन्न होता. मिथ्याभियुक्तवाङ्मयाशीं जरी त्याचा

कोणत्याहि प्रकारचा विरोध नव्हता तरी त्यानें गॉटशेड व त्याचे अनुयायी यांच्या दुराग्रहीपणाचा इनकार केला आणि दक्षिण युरोपमध्यें प्रचलित असलेल्या हलक्या काव्यरचनेचा जर्मनींत उपक्रम करून क्लॉपस्टॉकच्या लेखनांतील धार्मिक स्वरूपाला बराच सौम्यपणा आणिला. ऑबेरॉन नांवाचें वीररसप्रधान काव्य खेरीजकरून त्याचे ग्रंथ कोणी फारसे वाचीत नाहींत. तथापि त्यानें ॲगॅथॉननामक कादंबरी व डाय अब्डेरिटन नामक एक विनोदपूर्ण व औपरोधिक ग्रंथ लिहून जर्मन गद्यवाङ्मय-विकासनाच्या कामीं महत्त्वाची कामगिरी केली. पुष्कळसे कवी व गद्यलेखक वायलंडचे अनुयायी होते विशेषेंकरून ऑस्ट्रियामध्यें त्याचा फारच बोलबाला होता. त्या देशांतील कवी व अलॉइस ब्लूमार (१७५५-१७९८) व जे. बी. व्हॉन अल्किंझगर (१७५५-१७९७) यांनीं आपलीं हास्यरसपूर्ण व वीररसपूर्ण काव्यें त्याच्याच धर्तीवर लिहिलीं. सॅक्सनींतील सुप्रसिद्ध ग्रंथकार एम. ए. व्हॉन थुमेल (१७३८-१८१७) यानें आपल्या ग्रंथांत वायलंडच्या लेखनपद्धतीचें अनुकरण केलें होतें. वायलंडच्या अगॅथॉन कादंबरीमुळें जर्मन कादंबरी-वाङ्मयास बरेच महत्त्वाचें स्वरूप प्राप्त झालें हें खरें. परंतु वायलंडनें आपल्या ग्रंथरचनेचा पाया व स्वरूप इंग्रजी नमुन्यावरून घेतलें होतें. प्रथम गेलर्ट यानें इंग्रजी कादंबरीकार रिचर्डसन याचें अनुकरण करून आपली स्वेडिश प्राफिन नांवाची कादंबरी लिहिली. नंतर जे. टी. हर्मीज, सोफी व्हॉन लॅरोची, ए. व्हॉननिगे आणि जे. के. ए. मुसॉस या कादंबरीकारांनीं त्याचें अनुकरण केलें. या सुमारास जर्मनींतील सुशिक्षित मध्यमवर्गांत बुद्धिप्रामाण्य मत फार झपाट्यानें फैलावत होतें.

यानंतर अर्वाचीन जर्मन अभियुक्तवाङ्मयांत अतिशय पुढें सरसावलेला पहिला लेखक जे. जी. हर्डर (१७४४-१८०३) हा उदयास आला. हर्डरच्या लेखनशैलीस रूसोचे लेख पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले. हर्डरपासून जर्मन वाङ्मयांत जी ही लेखनक्रांति घडून आली तिचे थॉमन ॲब्ट (१७३८-१७६६) व जे. जी. हॅमन (१७३०-१७८८) यासारखे आणखी पुरस्कर्ते होते. प्रतिभासंपन्न लेखकांस फाजील कडक नियमनाची जोखड असावी ही कल्पना दुःसह वाटून हर्डरनें ही लेखनक्रांति घडवून आणली. यावरून हर्डर हा धामधुमीच्या लेखनयुगाचा केवळ अग्रेसरच नव्हता तर आद्यप्रवर्तक होता. या चळवळींत भाग घेणारे दुसरेहि अनेक कवी होते. इ. स. १७७२ मध्यें कांहीं तरुण विद्यार्थ्यांनीं "गॉटिंजन बंड" नांवाचें एक मंडळ स्थापन करून पुढें कित्येक वर्षें "गॉटिंजर मुसेनलमनाफ" नांवाच्या नियतकालिकांत त्यांनीं आपली कविता प्रसिद्ध केली. सी. एच. क्ष्रू. स्टॉटलबर्ग व एफ्. एल्. क्ष्रू स्टॉलबर्ग या बंधुद्वयाखेरीज या मंडळांतील इतर सर्व सभासद खेड्यांतील शेतकरीवर्गांतील होते. "बंड" मंडळाचा पुढारी जे. एच्. व्हॉस (१७५१-१८२६) हा जर्मनीच्या उत्तरेकडील प्रांतांतील शेतकरी होता. त्यानें आपल्या "लुइस" नामक पशुकाव्यांत जर्मन प्रांतिक आयुष्यक्रमाचें हुबेहुब चित्र रेखाटलें आहे. त्याचप्रमाणें एल्. एच्. हॉल्टी व जे. एम्. मिलर यांचें साधीं वीणाकाव्यें रचण्याच्या कामीं लेखनकौशल्य दिसून येतें. व्हॉस व जी. ए. बर्गर यांनीं अगदीं पहिल्या प्रतीचा व सुप्रसिद्ध पोवाडा "लेनोर" यासारखे आपले पोवाडे "गॉटिन्जर मुसेनलमनाफ" मध्यें प्रसिद्ध केले. गॉटिंजर मंडळाची महत्त्वाची वाङ्मयकामगिरी म्हणजे हे पोवाडे होत; व त्यांवरून त्यावेळीं वीणाकाव्यें व पोवाडे रचण्याची कला किती प्रगल्भदशेस पोहोंचली होती हें आपणास चांगलें दिसून येतें.

याप्रमाणें "गॉटिंजन बंड" या मंडळाच्या कार्याची दिशा होती.तथापि ती जर्मनींमध्यें त्यावेळीं प्रचलित असलेल्या इतर वाङ्मयविषयक प्रमुख चळवळींपासून कांहींशी वेगळी होती. कारण जरी धामधुमीच्या लेखनयुगांतील वाङ्मय-कार्याची ती एक बाजू होती, तरी ज्या चळवळीवर सुप्रसिद्ध कविवर्य गोएटेनें आपल्या व्यक्तित्त्वाचा छाप मारला त्यापेक्षां ती फार थंड व नरम स्वरूपाची होती. जोहान्न वोल्फगँग गोएटे (१७४९-१८३२) यानें लैपझिक् येथें विद्यार्थीदशेंत असतांनाच कांहीं वीणाकाव्यें व नाटकें लिहिलीं होतीं. इ. स. १७७०-१७७१ मध्यें जेव्हां तो स्ट्रॅसबर्ग येथें पुढील अभ्यास करण्याकरितां गेला तेव्हां त्याची व हर्डरची गांठ पडली. हर्डरनें त्याच्या मनांत नूतन वाङ्मयविषयक चळवळींत भाग घेण्याविषयीं प्रेरणा केली. शिवाय त्यानें आपल्या आद्यकालीन इतिहासाच्या व गॉथिक बांधकामाच्या महत्त्वाविषयींच्या कल्पना गोएटच्या मनांत भरवून दिल्या आणि जर्मनराष्ट्राविषयीं अभिमान उत्पन्न केला. होरेस किंवा अनॅक्रेऑन यांचें अनुकरण करणाऱ्या साऱ्या जर्मन कवींच्या काव्यापेक्षा एखाद्या साध्या जर्मन लौकिक गीतामध्यें अधिक अस्सल काव्यप्रतिभा आहे अशी हर्डरनें गोएटची खात्री पटवून दिली. सर्वांत विशेष गोष्ट म्हटली म्हणजे त्यानें गोएटच्या मनांत शेक्सपिअरविषयीं आवड उत्पन्न केली. गोएटे,हर्डर व इतिहासकार जस्टस मोझर (१७२०-१७९४)या तिघांनीं मिळून लिहिलेला निबंध व्हॉन डॉएत्सचेर आर्ट नुड कुन्स्ट हा धामधुमीच्या लेखनक्रांतीचा जाहिरनामाच होता. गोएटेच्या मनावर या नवीन कल्पनांचा ताबडतोब परिणाम झाला. त्यामुळें त्याच्या काव्यस्फूर्तीस एकदम वाव मिळाला. आणि इ. स. १७७१ ते १७७५ पर्यंत त्याच्याकडून अनेक काव्यकल्पना व काव्यग्रंथ निर्माण झाले. त्याचें गॉट्झ व्हॉन बर्लिचिंगेन हें नाटक धामधुमीच्या लेखनयुगांतील पहिलेंच नाटक होतें. त्यानंतर एका वर्षांत त्या युगांतील पहिली कादंबरी वेर्टर्स लीडेन प्रसिद्ध झाली. थोड्याच दिवसांत क्लॅव्हिगो व स्टेला हे दोन ग्रंथ त्यानें लिहून टाकले. याशिवाय सिंगस्पिएल नांवाचीं अनेक नाटकें व प्रहसनेंहि

त्यानें प्रसिद्ध केली. ज्याप्रमाणें त्याचें पहिलें नाटक व पहिली कादंबरी लेखनकलेंत क्रांति घडवून आणणारी होती त्याप्रमाणेंच त्याचीं वीणाकाव्येंहि तसल्या प्रकारच्या वाङ्मयांत क्रांतिकारक होतीं; कारण ज्या जर्मन वीणाकाव्यरचनेस शतकानुशतकें एका प्रकारच्या कृत्रिम नियमबद्ध व्यवस्थेनें जखडून टाकलें होतें तिला त्यानें पार झुगारून दिलें. वाङ्मयाच्या सर्व प्रकारांत त्यानें आपल्या समकालीन लेखकांस स्वतंत्रपद्धतीचे नमुने घालून दिले. गोएटेच्या नाटयकृतीचा नमुना पुढें ठेवून जे. एम्. आर. लेन्झ, एफ्. एम्. व्हॉन क्लिंगर, जे. ए. लिजविट, एच् एल् वॅग्नर आणि फ्रेडरिक उर्फ मेलर मुल्लर यांनीं आपलीं नाटकें लिहिलीं. धामधुमीच्या लेखनयुगाचें वैशिष्टय नाटयरचनेंतच होतें. इतकेंच नव्हे तर त्या युगाचें नामाभिधानहि क्लिंगरच्या एका नाटकावरून पडलें. या काळांतील सर्व नाटकांचा कल भावनाप्रधान व आवेशयुक्त नट रंगभूमीवर आणण्याकडे होता आणि हा कल शेक्सपिअरच्या नाटकांचें अनुकरण करण्याच्या इच्छेमुळें उत्पन्न झाला होता. नाटकाचें संविधानक, त्याची रचना व त्याचें बाह्य स्वरूप या सर्वांस त्यांतलि पात्रांच्या स्वभावपरिपोषापेक्षां गौणस्थान देण्यांत आलें होतें. धामधुमीच्या लेखनयुगांतील कादंबरीकारहि आपल्या कादंबऱ्या गोएटच्याच धर्तीवर लिहीत होते. एफ्. एच् याकोबी, जे. एम्. मिलर, जे. जे. डब्ल्यू. हेन्से, क्लिंगर, के. पी. एच. मॉरिझ हे त्या वेळचे कादंबरीकार होते.

जॉन फ्रेडरिक शिलरनें आपलें डाय रानबेर या नांवाचें नाटक लिहिल्यापासून धामधुमीच्या लेखनयुगांतील नाटयरचनेचा नवीन तऱ्हेनें विकास झाला. त्याचीं नाटकें जरी खळबळ उडवून देणाऱ्या प्रसंगाच्या बाबतींत क्लिंगर व लिजविट यांच्या नाटकांपेक्षां कमी नव्हतीं तरी शोकपर्यवसायी नाटकें प्रयोगाच्या सोयीचीं लिहिण्यांत त्यानें आपलें बरेंच चातुर्य प्रगट केलें आहे. त्याचीं इतर शोकपर्यवसायी नाटकें फिएस्को व कबाल उंड लीबे हींहि प्रयोगार्ह आहेत. त्याच्या डॉन कार्लोस या नाटकांत त्यानें गद्यास फांटा देऊन त्याची रचना नियमक पद्यांत केली. ही नवीन प्रकारची नाटयरचना शिलरचा समकालीन ओ. व्हॉन जेमिंगन ( १७५५–१८३६ ) याच्या व एफ्. एल्. श्रॉडर व ए. डब्ल्यू. इफलंड यांच्या नाटकांतहि पहावयास सांपडते. या धामधुमीच्या लेखनक्रांतीमुळें जर्मनींत चहूंकडे नाटकगृहांची स्थापना झाली. या काळांतच हॅम्बर्ग, मॅनहीन, गोथा व व्हियेन्ना येथें देखील कायमचीं नाटकगृहें बांधण्यांत आलीं. जर्मनींतील सर्वांत मोठें हॉफबर्ग नाटकगृह याची इ. स. १७७६ मध्यें स्थापना झाली.

( आ ) जर्मन अभियुक्तवाङ्मय—धामधुमीच्या लेखनक्रांतीची चळवळ विध्वंसक स्वरूपाची असल्यामुळें ती लवकरच लयास गेली. इ. स. १७७५ मध्यें गोएटे हा वेमर येथें गेल्यावर त्याच्या या लेखनपद्धतीचा शेवट झाला; आणि शिलरनें डॉन कॅर्लास हें काव्य लिहिल्यावर काव्यलेखनास रामराम ठोकला व इतिहास आणि तत्त्वज्ञान यांच्या अध्ययनास त्यानें सुरुवात केली. अनेक वर्षें या विषयांत त्याचें लक्ष गुंतलें होतें. शेवटीं या शतकाच्या अखेरीस गोएटेच्या स्नेहाकर्षणामुळें तो फिरून नाटयरचना करूं लागला. गोएटे हा वेमर येथें रहावयास गेल्यावर पहिलीं दहा वर्षें त्याच्या हातून फारसें कांहीं झालें नाहीं. त्यानें धामधुमीच्या लेखनपद्धतीस रजा दिली. कारण त्याचा अधिकाधिक विकास करणें त्याला आवडेनासें झालें यानें अद्याप दुसरी एखादी पद्धति शोधून काढली नव्हती. वेमर येथें अभियुक्तवाङ्मयाच्या, इतकेंच नव्हे तर मिथ्याभियुक्तवाङ्मयाच्या कल्पना प्रचलित होत्या व त्यांचा परिणाम गोएटेच्या मनावर झाला. त्यामुळें अठराव्या शतकांत चालू असलेल्या उदात्त वाङ्मयाच्या कल्पना व प्राचीन ग्रीस देशांतील काव्यमय कल्पना यांचा मेळ कसा बसवावा याचा तो विचार करूं लागला. परंतु इ. स. १७८६—१७८८ मध्यें इटलीचा प्रवास करीपर्यंत त्याचें त्याविषयीं निश्चित मत झालें नाहीं. इटलीमध्यें त्याला प्रथम प्राचीनत्वाची किंवा प्राचीन लेखनकलेची खरी कल्पना आली. ज्या अभियुक्तवाङ्मय कल्पनेचा अंमल पुढील वीस वर्षें जर्मन वाङ्मयावर एकसारखा चालू होता आणि वेमर हें जिचें मुख्य ठिकाण होऊन बसलें ती कल्पना गोएटनें प्रथम इटलीमध्यें निश्चित केली. इटलीमध्यें असतांच त्यानें इफिटगी ऑफ टॉरिस एग्माड व टॉर्क्काट टॅसो हे ग्रंथ लिहिले. विल्हेल्म मीस्टर्स लेऱ्हजऱ्हे या त्याच्या ग्रंथावरून त्याच्या कलाविषयक व लोकव्यवहारविषयक कल्पना किती विशद व निश्चित स्वरूपाच्या झाल्या होत्या हें दिसून येतें.

गोएटेचें विल्होल्म मीस्टर हें पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीपासूनच जर्मनीच्या विचारांत व वाङ्मयपद्धतींत एक प्रकारची स्थीरता व आत्मविश्वास दिसून येऊं लागले होते. लेसिंगच्या मरणसमयीं म्हणजे इ. स. १७८१ त सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता इम्यान्युएल कांट ( १७२४—१८०४ ) यानें आपलीं क्रिटिक डेर रनिन वेरनुंफ्ट, क्रिटिक डेर प्रॅक्टिश वेरनुंफ्ट, आणि क्रिटिक डेर उरटेलस्क्रॅफ्ट हीं तीन पुस्तकें प्रसिद्ध केलीं होतीं. आणि त्यामुळें विचारवन्त राष्ट्रांमध्यें जर्मनीस एकदम अग्रार्हांचें स्थान प्राप्त झालें. कांटच्या लेखांचा शिलरच्या मनावर इतका परिणाम झाला कीं त्यानें इतिहासाचें अध्ययन सोडून देऊन तत्त्वज्ञान व सौन्दर्यशास्त्र यांचें अध्ययन सुरू केलें. त्याचीं तत्त्वज्ञानपूर्ण वीणाकाव्यें व इतर त्यावेळचे ग्रंथ हे तात्त्विक व चिकित्सक दृष्टीनें नव्या वाङ्मयचालनेचे निदर्शक होते. पूर्वीच्या धामधुमीच्या लेखनप्रकारांत बेजबाबदार मनस्तरंगाचें स्तोम माजविलें जात असे हें स्तोम माजविण्याची प्रवृत्ति नव्या चालनेंत मागें पडून तिच्या जागीं अभियुक्त वाङ्मयांत दृग्गोचर होणारी शांततापूर्ण ध्येयोपासनेची प्रवृत्ति रूढ झाली. त्याचप्रमाणें

जस्टिस मोझर, थॉमस अब्ट, आय. आयसेलिन, एफ. सी. श्लोसर, शिलर व जोहानीस व्हॉन मिलर यांसारख्या लेखकांच्या नेतृत्वाखालीं या काळचें जर्मन ऐतिहासिक लेखनहि पूर्वीप्रमाणें असंबद्ध व अव्यवस्थित न राहतां विचारपूर्ण, तात्त्विक व शास्त्रीय स्वरूपाचें झालें. जे. जी. ए. फॉर्स्टर ( १७५४–१७९४ )व अलेक्झांडर व्हॉन हुंबोल्ट ( १७६९ १८५९ ) यांनीं सुबोध व सुस्पष्ट असे वर्णनात्मक ग्रंथ लिहिले. व्यावहारिक राजकारणांत व अर्थशास्त्रांत अस्सल रूसो पंथाचे तारतम्यशून्य व लहरी विचार प्रमाण मानीत असत. ते लोकांनां अप्रमाण व अप्रयोजक वाटूं लागल्यानंतर जर्मनीमध्यें त्या विषयावर पुष्कळ शहाणपणाचे व विचारपूर्ण ग्रंथ निर्माण झाले. त्यामुळें फ्रेंच राज्यक्रांतीचा जर्मनींमध्यें प्रसार झाला नाहीं आणि शिवाय त्या राज्यक्रांतीमुळें यूरोपमध्यें पूर्वीची राज्यव्यवस्था केवळ अशक्य झाल्यानंतर तिच्या जागीं नवीन सामाजिक व राजकीय संघटना अस्तित्वांत आणणें अवश्य झालें होतें तेंहि कार्य त्या योगानें सुलभ झालें. विल्हेम व्हॉन हुंबोल्ट व सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी जे. जी. फिचे यांसारखे लेखक आपआपल्या पद्धतीप्रमाणें वर सांगितलेल्या बौद्धिक कामगिरीचे प्रणेते होते.

इ. स. १७९४ मध्यें गोएटे व शिलर यांचा जी मैत्री जडली ती इ. स. १८०५ मध्यें शिलर मरेपर्यंत अखंडितपणें कायम होती. दरम्यानच्या काळांत गोएटे व शिलर यांनीं अभियुक्तवाङ्मयास अतिशय उच्च स्थान प्राप्त करून दिलें व वेमर हें वाङ्मयविषयक चळवळींचें केंद्रस्थान होऊन राहिलें. शिलरच्या ग्रंथांतून वाङ्मयाचें औपपत्तिक ज्ञान होण्यासारखें होतें.त्यानें व गोएटे यांनीं मिळून मुसेनाह्मनतकमध्यें आपल्या पोवाड्यासारख्या कविता प्रसिद्ध केल्या. गोएटे हा उमरावी नाट्यवाङ्मयाचा नियन्ता असल्यामुळें त्याला जर्मनींतील त्यावेळच्या नाट्यकलेस पुष्कळसें आपल्या मताप्रमाणें वळण देतां आलें. त्यानें उत्तेजन दिल्यावरूनच शिलरनें आपला तत्त्वज्ञानाचा अभ्यास सोडून फिरून काव्यरचनेकडे मन घातलें आणि वालेनस्टीन, विल्हेम टेल व डेमेस्ट्रीयसचा कांहीं भाग हीं नाटकें लिहिलीं. यावेळेस गोएटेनें आपलें हरमन अँड डोराथिआ हें वीररसप्रधान काव्य लिहिलें. त्याचप्रमाणें डाय नॅचरलुशे टोचर व पँडोरा हीं नाटकें लिहिलीं. शिवाय शिलरच्या आग्रहावरून फॉस्टचा पहिला भाग पुरा केला.

गोएटे व शिलर हे जरी त्या काळच्या जर्मन वाङ्मयाचे नेते म्हणून समजले जात होते तरी त्यांनां पुष्कळ प्रकारच्या विरोधास तोंड द्यावे लागत असे. धामधुमीची लेखनचळवळ अद्याप लुप्त झाली नव्हती;आणि बुद्धिप्रामाण्यवादाचे अभिमानी तर उद्दाम व उद्धट वर्तन करीत असत. परंतु या दोन्ही प्रकारच्या वाङ्मयास उतरती कळा लागली होती. तें वाङ्मय व गोएटे आणि शिलर यांनीं प्रचलित केलेलें वाङ्मय यांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. येणेंप्रमाणें जेव्हां आपण जर्मनींतील अभियुक्तवाङ्मययुगाच्या मोठेपणाविषयीं बोलतों तेव्हां आपण वास्तविक त्या दोन सुप्रसिद्ध कवींच्या कृतीचा मुख्यत्वेंकरून विचार करतों. त्यांच्यांत व त्यांच्या पूर्वी नुकेच होऊन गेलेल्या समकालीन लेखकांत फारच मोठें अंतर होतें. अठराव्या शतकाच्या अखेरीस मात्र वेमर येथील अभियुक्तवाङ्मयचळवळीस उघड उघड विरोध करणारी एक नवीन प्रकारची वाङ्मयचळवळ सुरू झाली. ती चळवळ म्हणजे अद्भुत रसात्मक वाङ्मयाची चळवल होय. ही चळवळ तरुण पिढीच्या लेखकवर्गांत फार लोकप्रिय झाली. ज्याप्रमाणें पूर्वीच्या पिढींत धामधुमीचें लेखनयुग जाऊन त्याच्या जागीं अभियुक्तवाङ्मयाची स्थापना झाली त्याप्रमाणें आतां ज्या अभियुक्तवाङ्मयांत गोएटे व शिलर यांनीं वालेनस्टीन व हरमन अँड डोराथिआ असे उत्कृष्ट ग्रंथ लिहिले तें नष्ट होऊन त्याच्या जागीं ज्याच्यांत व्यक्तिवैशिष्ट्य व भावनावैशिष्ट्य प्रामुख्यानें दिसून येतें तें अद्भुतरसात्मक वाङ्मय उदयास आलें. या अद्भुतरसात्मक वाङ्मयानें सर्व एकोणिसाव्या शतकभर जर्मनींत आपला पगडा बसविला.

( इ ) अद्भुतरसात्मक वाङ्मयाची चळवल—ही चळवळ वेमर येथील अभियुक्तवाङ्मयाच्या चळवळीस विरोध करण्याच्या बुद्धीनें अस्तित्वांत आली नसून बर्लिन येथील उथळ व उपयुक्ततावादी बुद्धिप्रामाण्यवादास आळा घालण्याकरितां सुरू करण्यांत आली होती. लडविग टीक ( १७७३–१८५३ ) हा या चळवळीचा मुख्य पुरस्कर्ता होता. फ्रेडरिक होल्डरलिन( १७७०–१८४३ )हा त्या काळचा अत्यंत प्रतिभाशाली कवि होता; आणि त्याच्या ग्रंथांवरूनहि धामधुमीच्या वाङ्मयांतून अद्भुतरसात्मक वाङ्मय कसें उदयास आलें हें कळण्यासारखें आहे. तथापि अद्भुतरसात्मक वाङ्मयाचा औपपत्तिक पाया ऑगस्ट विल्हेम व व फ्रेडरिक श्लेगेल या बंधुद्वयानें घातला. त्यांनीं शिलरचे सौंदर्यशास्त्रीय नियम घेऊन त्यांत आपल्या वाङ्मयविषयक वैयक्तिक विचारांप्रमाणें फेरफार केले. शिलरचें म्हणणें असें होतें कीं टीकाकारांनीं टीकानियमांस धरून टीका करावी; परंतु अद्भुतरसात्मक वाङ्मययुगांतील टीकाकारांच्या मतानें टीकाकारांचें पहिलें कर्तव्य म्हणजे टीकाविषयग्रंथाचें मर्म नीटपणें ओळखणें व त्याची योग्य किंमत करणें हें होय शिवाय प्रतिभासंपन्न लेखकांस आपल्या कलाप्रमाणें वागण्याची कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं. नोव्हॅलिस या नांवानें प्रसिद्ध असलेल्या फ्रेडरिक व्हॉनहार्डेबर्ग ( १७७२–१८०१ ) याचीं स्तोत्रें व त्रोटक कादंबऱ्या आणि टीकचीं नाटकें व काल्पित कथा हे या अद्भुतरसात्मक वाङ्मययुगांतील विशिष्ट ग्रंथ होत. या युगांत झालेलीं भाषांतरें व त्यांतल्या त्यांत श्लेगेलनें केलेलें शेक्सपिअरचें भाषांतर यावरून प्रस्तुत युगांतील चळवळीची सहानुभूतिपर व्यापकता दिसून येते. अद्भुतरसात्मक वाङ्मय

चळवळीचें वैशिष्ट्य म्हणजे तडजोडीची तत्पुरता हें होय. याचा अर्थ असा कीं काव्याचा व इतर सामाजिक व बौद्धिक विषयांचा मेळ घालून देणें हा या चळवळीचा उद्देश होता. काव्याचा विषय कोणता असावा व कोणता असूं नये या विषयीं पूर्वीच्या साहित्यशास्त्रकारांनीं जे निर्बंध घालून दिले होते ते या चळवळीच्या प्रवर्तकांनीं एका बाजूस ठेऊन वाङ्मयाचें क्षेत्र सर्वव्यापी केलें. चित्रकला व काव्यकला, तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र हे सर्व विषय अद्भुतरसात्मक काव्याचे पोटविभाग किंवा परिपोषक समजण्यांत येऊं लागले. फिक्टे व एफ्. डब्ल्यु. जे व्हॉन शेलिंग ( १७७५–१८५४ ) यांनीं अद्भुतरसात्मक तत्त्वज्ञान निर्माण केलें व एफ्. ई. डी. श्लेरमॅकर ( १७६८–१८३४ ) या धर्मशास्त्र लेखकानें धर्मविचारास व्यक्तिवैशिष्ट्य किती अगत्याचें आहे हें सिद्ध करून दिलें.

अद्भुतरसात्मक वाङ्मयपंथाचे मुख्य प्रवर्तक श्लेजेल बंधू, टीक, वॅकेनरोडर व नोव्हॉलिस हे होते व इ. स. १७९८ त जेव्हां श्लेजेल बंधूंनीं अथेनिअम नांवाचा निबंध प्रसिद्ध केला. तेव्हांच सदर वाङमयाचा पाया घातला गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं.परंतु हा पंथ फार वेळ टिकला नाहीं. वॅकेनरोडर व नोव्हॅलिस हे अल्पायुषी होऊन गेले आणि इ. स. १८०४ मध्यें या पंथाच्या इतर सभासदांत पांगापांग झाली. तथापि दोन वर्षांनंतर हेडेलबर्ग येथें या अद्भुतरसात्मक वाङ्मयाचें दुसरें स्वरूप प्रगट झालें. के. ब्रेन्टनो एल्. ए. व्हॉन अर्निम व जे. जे. व्हॉन गॉरिस हे या दुसऱ्या किंवा अभिनव अद्भुतरसात्मक वाङ्मयाच्या चळवळीचे मुख्य प्रवर्तक होते. पूर्वीच्या पंथांतील लेखकांशीं तुलना केली तर हेडलबर्ग येथील लेखक अधिक व्यावहारिक व यथार्थतादर्शक असून त्यांचे लेख निसर्गास व दैनिक आयुष्यक्रमास जास्त धरून आहेत असें आढळून येईल. जर्मनीच्या पूर्वकाल व मध्ययुगें यासंबंधीं त्या लेखकांस कळकळ वाटत होती; परंतु सामान्य गोष्टींनां लोकोत्तरतेचा रंग चढविणारे असे त्यांच्या पूर्वकालीन लेखकांनीं लावलेले कल्पनेचे चष्मे बाजूस ठेवून त्यांनीं आपली सारी भिस्त ऐतिहासिक सत्यावर ठेविली. नोव्हॅलिसनें ज्याप्रमाणें मध्ययुगाचें काल्पनिक चित्र डोळ्यापुढें ठेवून कादंबऱ्या लिहिल्या त्याप्रमाणें न लिहितां त्यांनीं ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आणि जेव्हां त्यांनीं लौकिक गीतांचा व लौकिक ग्रंथांचा संग्रह केला तेव्हां साध्या आख्यायिकांस त्यांनीं संगीताचाहि पोषाख दिला नाहीं व काव्यकल्पनेस अद्भुतरसात्मक व्याजोक्तीचाहि मुलामा दिला नाहीं. त्यामुळें त्यांच्या लेखांचा जर्मनबुद्धिमत्तेवर तात्कालिक परिणाम झाला. त्यांनीं जर्मन लोकांमध्यें त्यांच्या गतकालाविषयीं अभिमान जागृत करून तो दृढमूल केला. शिवाय त्यांनीं जर्मन भाषेतील शब्देतिहासशास्त्र व मध्ययुगीन वाङ्मय यांचा पाया घातला. इतकेंच नव्हे तर हेडेलबर्ग येथील कवींनीं स्वकीयांच्या राष्ट्रीय व देशभक्तीच्या भावना बलवत्तर केल्या. इ. स. १८१३ मध्यें जर्मनीनें नेपोलिअनबरोबर जो सामना दिला त्याजविषयीं राष्ट्राचें मन तयार केलें आणि देशभक्तीच्या गीतांची जिकडे तिकडे रेलचेल करून दिली.

अद्भुतरसात्मक वाङ्मयाचा यापुढील इतिहास हेडलबर्ग पंथाच्या लेखनविषयक चळवळीशीं निगडीत झालेला आहे; आणि इ. स. १८०९ च्या सुमारास तो पंथ मोडला आणि अर्निम व ब्रेन्टॅनो बर्लिन येथें जाऊन राहिले तेव्हां अद्भुतरसात्मक वाङ्मयाच्या विकासाला दोन वाटा फुटल्या. एक उत्तरजर्मनीच्या बाजूची व दुसरी वुर्टेबर्गच्या बाजूची. प्रशियाची राजधानी हें जरी बुद्धिप्रामाण्यवादाचें मुख्य ठिकाण होतें तरी त्या राजधानीच्या व अद्भुतरसात्मक चळवळीच्या वाङ्मयाचा अत्यंत निकटचा संबंध होता.सदर चळवळीच्या पहिल्या पंथाची तेथें स्थापना झाली होती आणि हेनरिख व्हॉन क्लीस्ट(१७७७–१८११)व झकॅरिअस वर्नर ( १७६८–१८२३ ) या उत्तर जर्मनींतील लेखकांनीं अद्भुतरसात्मक वाङ्मयाच्या दोन्ही पंथांतील लेखकांपेक्षां अद्भुतरसमय नाटयकलेचा विकास करण्याच्या कामीं परिश्रम केले होते. या लेखकांनीं व शिलरनें प्रस्थापित केलेली अभियुक्तवाङ्मयाची परंपरा यांचा मेळ कसा बसवावा व त्या कल्पनांचा राष्ट्रीय नाटयकलेच्या कामीं कसा उपयोग करावा हें दाखवून दिलें. परंतु बर्लिन शहर हें अद्भुत कल्पनांच्या विकसनास योग्य असें क्षेत्र नव्हतें आणि अर्निम व ब्रेन्टॅनो यांच्याभोंवतीं जमा झालेल्या कविमंडळांतील कांहींनीं या अद्भुत कल्पनांचा ऱ्हास झाला आहे असें सिद्ध केलें व कांहींच्या लेखांत अद्भुतरसात्मक वाङ्मयाच्या ऱ्हासाचीं बीजें होतीं व त्याचा ऱ्हास लवकर घडून आला. हे विघातक परिणाम वीणाकाव्यावर फार कमी प्रमाणांत घडून आले. तथापि उत्तरजर्मनींतील अद्भुतवाङ्मयलेखकांमध्यें पहिल्या प्रतीचा असा जे. व्हॉन इचेन्डॉर्फ हा एकटाच वीणाकाव्यलेखक निर्माण झाला. सुप्रसिद्ध कवि ए. व्हॉन कॅमिसो ( १७८१–१८३८ ) याच्या काव्यांत तर अद्भुतरसाचा बहुतेक अभाव दिसून येतो. फ्रेडरिक रूकर्टसारख्या कांहीं कवींनां अद्भुतरसात्मक काव्यांत कांहींच स्वारस्य न वाटून त्यांनीं पौर्वात्यवाङ्मयाकडे धांव घेतली. याशिवाय विल्हेम-मुल्लरप्रमुख कांहीं कवींनीं तर बायरन कवीचें अनुकरण करून त्रस्त व गांजलेल्या ग्रीक व पोल लोकांविषयीं जर्मन लोकांच्या मनांत सहानुभूति उत्पन्न करण्यासारखीं काव्यें लिहिलीं.

इचेन्डॉर्फ हा कवि बाजूस ठेवला तर अद्भुतरसात्मक वाङ्मययुगाच्या शेवटच्या भागांत सुप्रसिद्ध कवि ऊलंड याच्याभोंवतीं जमा झालेल्या स्वेबिअन कविमंडळांनीं वीणाकाव्याची जोपासना केली असें म्हटलें पाहिजे लडविग ऊलंड ( १७८७–१८६२ ) हा हेडलबर्ग कवींचा अनुयायी होता आणि त्याच्या वीणाकाव्यावरून आणि विशेषेंकरून

त्याच्या पोवाड्यावरून असें दिसून येतें कीं त्यानें बर्गर, शिलर व गोएटे यांच्यापासून चालत आलेल्या जर्मन पोवाड्यांच्या मूळ वृक्षावर अद्भुतरसात्मकवाङ्मयांतील वीणाकाव्याच्या नूतन वृक्षाचें यशस्वी रीतीनें कलम बांधलें. स्वेबिअन कविमंडळांत पुढील कवी प्रमुख होते. ( १ ) जे. कर्नर, (२)जी. श्वाब, ( ३ ) डब्ल्यू. वेवलिंगर, ( ४ ) डब्ल्यू. हौफ, आणि सर्वांत विशेष प्रतिभाशाली ( ५ ) ई. मोरिक. या कवींचा विशेष गुण म्हटला म्हणजे ज्याप्रमाणें उत्तरजर्मनींतील त्यांच्या समकालीन कवींनीं अद्भुतरसात्मक वाङ्मयपरंपरेचा ऱ्हास होऊं दिला त्याप्रमाणें यांनीं होऊं दिला नाहीं. या कवींनीं म्हणजे वीणाकाव्यांत कांहीं नवीन सुधारणा घडवून आणली असें नाहीं तर त्यांनीं पूर्वींची परंपरा कायम ठेवली आणि जेव्हां अद्भुतरसात्मकवाङ्मयाविरुद्ध तरुण जर्मनानीं केलेली चळवळ लयास गेली तेव्हां अद्भुत कल्पनांकरितां जर्मनीला कुर्टेन्बर्गकडेच पहावें लागलें.

इ. स. १७९८ पासून १८३२ पर्यंत जर्मनीमध्यें चालू असलेल्या अद्भुतरसात्मक वाङ्मयचळवळींच्या विविधस्वरूपी चित्रपटाच्या मार्गे गोएटची भव्य व तेजस्वी मूर्ति दृष्टीस पडते.सदर चळवळीच्या प्रथमावस्थेंत जेव्हां त्यास असें वाटलें कीं त्या चळवळीचे प्रवर्तक हे स्वानुभववादि व निरङ्कुशता पुन्हां प्रस्थापित करूं पहातात, तेव्हां तो पुनः प्रस्थापनेच्या विरुद्ध गेला इतकेंच नव्हे तर तो आपल्या स्वतःस अद्भुत रसात्मक वाङ्मयकवि न समजतां अभियुक्तवाङ्मयकवि मानीत असे. परंतु तो उदारमनवादी व चिकित्सक बुद्धीचा असल्यामुळें नवीन चळवळींचे सुपरिणाम त्याच्या लक्षांत न येणें शक्य नव्हतें. नवीन युगांतील यच्चयावत तरुण कवींशीं तो सहानुभुतिपूर्वक व सदय अंतःकरणानें वागत असे आणि इंग्लंड, फ्रान्स व इटली येथील वाङ्मयाच्या नवीन विकासाकडे तो फार बारकाईनें व शोधक बुद्धीनें लक्ष पुरवीत असे. त्याचे फॉस्ट, डाय हालवेरवॉंडटशॅफ्टन, डिक्टुंग उंड हर्न्हेट,वेस्टोस्टलीचेर डिव्हान व विल्हेल्म मीस्टर वांडरजऱ्हे हे ग्रंथ त्या काळच्या अद्भुतरसात्मक वाङ्मयाशीं कोणत्याहि प्रकारें विसंगत नाहींत. गोएटे हा अभियुक्त व अद्भुतरसात्मक या दोन वाङ्मयांचा सांधा होता असें म्हटलें असतां चालेल व त्याच्या ग्रंथांनीं त्या दोन चळवळींचा मेळ बसवून दिला आणि तोच तर अद्भुतरसात्मक वाङ्मयाभिमान्यांचा मुख्य हेतु होता.

( ६ ) गोएटेच्या नंतरचें जर्मनवाङ्मय ( १८३२–१९०६ ):—( अ ) तरुण जर्मनी गोएटेच्या निधनाबरोबर जर्मन काव्याचें एक महत्त्वाचें युग समाप्त झालें. इ. स. १८३२ च्या फार पूर्वींपासून अद्भुतरसात्मक वाङ्मयास उतरती कळा लागली होती व इ. स. १८३० त फ्रान्समध्यें जी क्रांति झाली तिचा जर्मनीवर इतका परिणाम झाला कीं त्या योगानें सदर वाङ्मयाचा अंत झाला. दरम्यान खुद्द जर्मनींत वाङ्मयविचाराची दिशा अद्भुतरसात्मक वाङ्मयास अनुकूल नव्हती. जर्मन तत्त्वज्ञानांत शेलिंगची जागा डब्ल्यू. एफ. हेगेल ( १७७०–१८३१ ) यानें घेतली होती व फिक्टे आणि शेलिंग यांच्या लेखांचा वाङ्मयावर जितका परिणाम झाला तितकेंच हेगेलचें तत्त्वज्ञान त्या दृष्टीनें निरुपयोगी होतें. व्यावहारिक धर्म व राजकारण यांत अद्भुतकल्पना घुसडण्यांत येऊं लागल्यामुळें त्याचा परिणाम अद्भुतरसात्मक वाङ्मयास विघातक झाला. गॉटिंजन, हेडेलबर्ग व बर्लिन येथील विश्वविद्यालयांत मात्र सदर वाङ्मयाची चळवळ जोरांत होती. अद्भुतरसात्मक काव्याचा शेवट झाल्यानंतर बराच काळपर्यंत जर्मन शब्देतिहासशास्त्र जर्मन इतिहासशास्त्र व जर्मन न्यायतत्त्वशास्त्र यांत अद्भुतरसात्मक कल्पनांचा उपयोग करण्यांत येत होता. तथापि अद्भुतरसात्मक वाङ्मयाचे दिवस आतां भरले होते. परंतु अठराव्या शतकांत प्रचलित असलेले अभियुक्तवाङ्मय किंवा उदात्तवाङ्मय यांचे दिवस फिरून उगवणें शक्य नव्हतें. फ्रेंच राज्यक्रांतीमुळें यूरोपखंडातील समाजव्यवस्थेंत विलक्षण फरक पडला होता औद्योगिक प्रगतीमुळें नवीन आर्थिक प्रश्न उत्पन्न झाले होते व नवीन शास्त्रीय शोधांमुळें जुने गैरसमज नाहींसे झाले होते. आणि १८३० च्या फ्रेंच राज्यक्रांतीनें जी सामाजिक खळबळ झाली तिनें तर वेमर येथील अभियुक्तवाङ्मयाचें पुनरुज्जीवन होणें अशक्य झालें. परंतु त्यांबरोबर हीहि गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं कीं गोएटेनंतर तरुण पिढींतील जे जर्मन लेखक उदयास आले त्यांचा गोएटेबद्दल फारसा आदर नव्हता.

"तरुण जर्मनी"म्हणून कांहीं एखादा निराळा पंथ नव्हता. परंतु राजकीय बाबतींतल्या छळामुळें तो एक संघ झाला होता. इ. स. १८३५ च्या डिसेंबर महिन्यांत जर्मनींतील "बंड" नांवाच्या सभेनें "तरुण जर्मनी" या नांवानें ख्यात असलेल्या वाङ्मयमंडळांतील लेखकांचे लेख जप्त करण्याबद्दल एक फर्मान सोडलें आणि त्यांत हेनरिख हीन, कार्ल गट्झको, ल्युडॉल्फ बेनबार्ग, थिओडर मुन्ट आणि हेनरिख लॉब यांचा नांवानें उल्लेख केला होता. यांत हीन ( १७९७—१८५६ ) हा विशेष प्रसिद्धीस आलेला लेखक होता. इ. स. १८२६ व १८२७ त रायसे हर्झरिझ डासबुक डरलीडर हे दोन ग्रंथ लिहिल्यावरून त्याचा येवढा लौकिक झाला होता. त्या ग्रंथांवरून तो अद्भुत आख्यायिकांत किती निष्णात होता हें दिसून येतें. परंतु आपली वाङ्मयपद्धति जनमनांतून उतरत चालली हें हीन यानें सर्वांच्या आधीं ओळखलें. त्यामुळें त्यानें अद्भुतरसात्मक वाङ्मयाची चळवळ सोडून दिली. आणि मानवजातीच्या स्वातंत्र्याची पहिली पायरी म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीचें अभिनंदन केलें. शेवटीं जें स्वातंत्र्य व बौद्धिक कार्य करण्यास लागणारें उत्तेजन त्याला जर्मनींत प्राप्त झालें नाहीं तें त्यानें फ्रान्समध्यें जाऊन संपादन केलें. संक्रमणयुगांत जन्मल्यामुळें हीनला

पुष्कळ अडचणी सोसाव्या लागल्या. त्यानें फ्रान्समध्यें जाऊन ज्या नवीन चळवळीस कवटाळलें तिच्यांत चांगलें किती आहे व काय आहे हें त्यास समजलें नाहीं. तो जरी आशावादी होता तरी त्याला पुष्कळ वेळां असें वाटे कीं ज्या देशांत मी लहानाचा मोठा झालों त्या अद्भुतरसमय जर्मनीमध्यें माझे सर्व आयुष्याचे दिवस घालवितां आले तर फार बरें होईल. खासगी आयुष्यांतील निराशा व दुःखें यांनींहि हीनच्या त्रासिक स्वभावांत भर पडली आणि तो जरी मूळचा मोठा प्रतिभाशाली वर्णिकाव्यलेखक व तितक्याच योग्यतेचा औपरोधिक लेखक होता तरी तो अखेर तुसडा व मनुष्यद्वेषी झाला. त्याच्या मर्मभेदक टीकेपासून कोणाचीही सुटका नव्हती.

हीनच्या समकालीन लेखक व सहयोद्धा याच्या लेखांवरून " तरुण जर्मनां "ची वाङ्मयात्मक मतें काय होतीं हें पूर्णपणें कळण्यासारखें आहे. त्यानें आपल्या 'ब्रीफ ऑस पॅरीस' नांवाच्या वक्तृत्वपूर्ण ग्रंथांत फ्रान्ससंबंधीं मनांत असलेलें प्रेम व्यक्त केलें व त्यामुळें जर्मन गद्यपद्धतीच्या विकसनाचें कामीं फार महत्त्वाचा फरक घडून आला. कार्ले गट्झको ( १८११--१८७८ हा वाङ्मयक्षितिजावर चमकूं लागल्यापासून " तरुण जर्मनी "च्या वाङ्मयचळवळींचें स्वरूप विशेष ठळकपणें दिसूं लागलें. त्याच्यावरहि फ्रेंच राज्यक्रांतीचा परिणाम झाल्यामुळें तो वाङ्मयलेखक झाला होता. त्यानें वॉले डाय इवेइफ्लेरिन ही कादंबरी लिहून नवीन कल्पनांचा पुरस्कार केला. त्याची उत्कृष्ट वाङ्मयकामगिरी म्हटली म्हणजे त्यानें लिहिलेलीं आनंदपर्यवसायी नाटकें व डाय रिटर व्हान गीस्टे व डर झांबेरर व्हाम रोम कादंबऱ्या ही होय. हेनरिख लॉब ( १८०६--१८८४ ) यानें लांबलचक सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या व तो नवीन चळवळीचा एक पुरस्कर्ताहि होता. परंतु तो एक श्रेष्ठ दर्जाचा नाटयसूत्रचालक अशा रीतानें लोक त्याची आतां आठवण करितात. ज्या काळांत व्हिएन्ना येथील बर्गनाटकगृहाशीं लॉबचा संबंध होता तो एक आधुनिक जर्मन युगाच्या इतिहासांतील उज्ज्वल काळ समजला जातो. हीन व बोर्ने आणि गट्झको व लॉब हे " तरुण जर्मन " चे आधारस्तंभ होते. त्यांच्या अनुयायांत अनेक साधारण लेखक होते. परंतु त्यांचीं नांवेंहि हल्लीं कोणास माहीत नाहींत. विद्वत्तेच्या व ज्ञानाच्या बाबतींत " तरुणजर्मनां "च्या चळवळींत हेगेलचें विशेष प्राबल्य होतें. त्याशिवाय डी. एफ. स्ट्रॉस, जी. जी. जव्हीयनस व डब्ल्यू. मेन्झेल हे इतिहासकार आणि तत्त्ववेत्ता एल्. ए. फयुअरबाक हे सदर चळवळीचे मुख्य प्रवर्तक होते. फयुअरबाक हा हेगेलचा शिष्य होता. परंतु अखेर त्याचें वजन नष्ट करण्यास तो कारणीभूत झाला.

त्याज्य झालेल्या अद्भुतरसात्मकवाङ्मयाच्या जागीं दुसरें एखादें वाङ्मय उत्पन्न करण्याबद्दल " तरुण जर्मनी " म्हणून प्रसिद्ध असलेल्या लेखकमंडळाच्या बाहेर कांहीं लोकांकडून तात्पुरते प्रयत्न करण्यांत आले. अर्निमसारख्या अद्भुत वाङ्मय लेखकानें ज्या ऐतिहासिक कादंबरीच्या पद्धतीची जोपासना केली होती ती लवकरच सर वॉल्टर स्कॉटच्या ताब्यांत जाऊन तिला निराळें वळण लागलें. विल्हेम हॉफ, हेनरिख शोक व के. स्पिंडलर यांनीं स्कॉटच्या पद्धतीचें अनुकरण केलें. क्लीस्ट व वर्नर यांच्या वेळेपासून ज्या नाटयलेखनपद्धतीस कांहीं ठराविक नियम नव्हते. तिच्यावर ऑस्ट्रियांतील नाटयवाङ्मयाचा परिणाम होऊन तिला व्यवस्थित स्वरूप प्राप्त होऊं लागलें. खुद्द जर्मनीमध्यें ही नाटयलेखनकला अगदींच साधारण प्रतीच्या लेखकांच्या हातांत होती. यावेळीं जर्मनलेखकांचा संगीतनाटयलेखनावर विशेष भर होता. हे संगीतनाटयलेखक अद्भुतरसात्मक वाङ्मयपद्धतीस चिकटून राहिले. ऑस्ट्रियामध्यें या नाटयलेखनपद्धतीचा विकास अगदीं स्वतंत्र पद्धतीनें झाला. येथें प्रारंभींच एच. जे. व्हॉन कोलिन ( १७७१-१८११ ) यानें आपल्या नाटयग्रंथांत एरेन हॉफ याची निर्जीव मिथ्याभियुक्त शोकपर्यवसायी नाटयपद्धति सोडून शिलरची अभियुक्तनाटयलेखनपद्धति स्वीकारली होती हा त्याचा प्रयत्न लक्षांत घेण्यासारखा आहे. कारण गॉटशेडपासून शिलरपर्यंत जो वाङ्मयविकास जर्मनीमध्यें झाला होता तो ऑस्ट्रियांतील वाङ्मयामध्यें झालेला नव्हता. वरील कोलिनचा भाऊ जो एम्. व्हॉन कोलिन यानेंहि अद्भुतरसात्मक नाटकें लिहून आपल्या भावाप्रमाणेंच वाङ्मयसेवा केली. फ्रान्झग्रिलपार्झर ( १७९१–१८७२ ), हा ऑस्ट्रियाचा सर्वश्रेष्ठ कवि यानेंहि आपल्यापरी नाटयवाङ्मयाची सेवा केली. त्यांतल्या त्यांत गोएटे व शिलर यांची अभियुक्तपद्धति व एकोणिसाव्या शतकांतील अद्भुत व अर्वाचीन पद्धति यांचा मेळ बसविण्याचें काम त्यानें त्या शतकांतील इतर कोणत्याहि नाटककारापेक्षां अधिक यशस्वी रीतीनें केलें. काव्यमयनाटयलेखनासंबंधीं पाहूं गेलें तर ग्रिलपार्झर यास कोठेंच जोड मिळणार नाहीं. नाटयवाङ्मयाच्या इतर प्रकारांमध्येंहि आपआपली कामगिरी करणारे लेखक ऑस्ट्रियामध्यें होऊन गेले

त्या वाङ्मययुगाचें संक्रमणस्वरूप दोन सुप्रसिद्ध लेखकांच्या ग्रंथांवरून कळण्यासारखें आहे. लेखनपद्धतींतील किंवा हेतूंतील साधर्म्यामुळें त्या दोन लेखकांची सांगड घालण्यांत येत नसून त्याला कांहीं अवांतर बाह्य गोष्टी कारणीभूत झाल्या. ते दोन लेखक म्हणजे के. एल्. इमरमन ( १७९६--१८४० ) व ए. व्हॉन प्लेटन हॅलरमुंड ( १७८६—१८३५ ) हे होत. इमरमनचीं नाटकें प्रयोगाच्या सोयीच्या दृष्टीनें अगदीं कुचकामाचीं आहेत. परंतु त्यानें आपल्या व डाय एपिगोवेन व मुंचानसेन या कादंबऱ्यांत त्या काळचे विचार उत्तम रीतीनें प्रतिबिंबित केले आहेत. त्याची दृष्टि मागें होती, पुढें नव्हती.

तो आपल्या स्वतःस गत झालेल्या युगांतील लेखक मानीत असे. नूतन युगाचा अग्रगामी मानीत नसे. अद्भुतरसात्मक वाङ्मयानें निघालेलें दिवाळें व काव्याच्या बाबतींत असलेला "तरुण जर्मनी" चा रुक्ष प्रदेश पाहून त्याला भविष्यकाळांत वाङ्मयाचा उत्कर्ष होईल याविषयीं फारसा भरंवसा वाटत नसे. पण हेटन मात्र स्वतंत्रपणें आपलें कार्य करीत होता. तोहि अद्भुतरसात्मक वाङ्मय-पद्धतीच्या व "तरुण जर्मनीच्या" लेखनपद्धतीच्या विरुद्ध होता आणि इमरमनबरोबर त्याचा जोराचा खटका उडाला. परंतु त्याच्या काव्यावरून त्या वेळच्या परस्परविरोधी निरनिराळ्या वाङ्मयपंथाच्या वादाची तो पर्वा करीत नसे असें दिसून येतें. त्यानें जर्मन पौर्वात्य कवींचें अनुकरण करण्यास सुरुवात केली व जेव्हां त्यानें आपलें सोनफ ऑस व्हेनेडीग हें अलौकिक काव्य लिहिलें तेव्हां तो काव्यलेखनांत कसलेला व सर्व वीणाकाव्यलेखकांत अत्यंत कमी आत्मनिष्ठ कवि झाला होता.

"तरुण जर्मनी"च्या चळवळींत राजकीय स्वरूपाचा जो भाग होता तो हाणून पाडण्याचा "जर्मन बंड" या सभेचा हेतु होता. परंतु इ. स. १८३० व इ. स. १८४८ मध्यें ज्या राज्यक्रांत्या झाल्या व त्यामुळें देशांत जी चहूंकडे अस्वस्थता माजली, त्यामुळें "तरुण जर्मनी"च्या चळवळीस उलट जोरच चढला. तेव्हां राजकीय काव्यप्रधान ऊन आला. इ. स. १८४८ च्या राज्यक्रांतींत ज्या तत्त्वांचा जयजयकार झाला तीं बहुतेक इ. स. १८४१-१८४२ च्या जर्मन कवींनीं प्रस्थापित केलीं होतीं. हें क्रांतिकारक वाङ्मय लिहिणारे जरी एन्. बेकर व आर्. ई. प्रुझ यांच्यासारखे मध्यमप्रतीचे लेखक होते तरी कालांतरानें त्या चळवळीस उचलून धरण्यास जॉर्ज हर्वे व फरडिनंड फ्रेलिग्राथ यांच्यासारखे लेखक पुढें सरसावले. या स्वातंत्र्याच्या लढ्यामध्यें आणखीहि दुसरे लेखक व कित्येक ऑस्ट्रियन लेखक यांनीं भाग घेतला. इ. स. १८४८ या वर्षीं राजकीय वीणाकाव्याचा शेवट झाला. राज्यक्रांतीपासून किती अल्प फलनिष्पत्ति झाली हें पाहिल्यावर राज्यक्रांतीला अनुकूल असलेल्या लेखकांची जरी शांति झाली नाहीं तरी त्यांची वटवट बंद झाली. फ्रेलिग्राथला जर बाजूस ठेवला तर असें दिसून येईल कीं या वेळचे प्रमुख वीणाकाव्यलेखक क्रांतिकारक चळवळीपासून अलिप्त राहिले. पुढील युगांतील काव्यगुणांचा निदर्शक ई. गिबेल (१८१५-१८८०) हा कवीहि राजकीय बाबतींत फारच थोडें लक्ष घालीत असे. आणि त्याचा उत्कृष्ट ग्रंथ वीणाकाव्यस्वरूपाचा आहे. एम्. व्हॉन स्ट्रेंचविझची कुशाग्र बुद्धि राजकीय क्षेत्रांत फारशी चालली नाहीं. अनेटे व्हॉन ड्रॉस्टे हुलशॉफ (१७९७-१८४८) व ऑस्ट्रियन कवि निकोलस लेना (१८०२-१८५०) हे दोघेहि राजकीय बाबीपासून अलिप्तच राहिले. त्यांच्या ग्रंथांत जागोजाग निराशेची व विरक्तपणाची झांक आहे व इ. स. १८५० पासून १८७० पर्यंतच्या जर्मन वाङ्मयांत ही उदासीनतेची छटा बहुतेक सर्वत्र आढळून येते.

(आ) इ. स. १८५० च्या सुमारचें जर्मन वाङ्मयः— इ. स. १८२८ च्या राज्यक्रांतीचा शेवट झाल्यावर जर्मन-वाङ्मयाला शांततेचें स्वरूप प्राप्त झालें. परंतु ही शांतता खरोखरीची आशापूर्ण मनःस्थिति किंवा खरें समाधान यापासून उत्पन्न झालेली नसून भविष्यकाळ कशा प्रकारचा होईल याविषयींच्या शंकेनें उत्पन्न केलेली होती. इ. स. १८५० च्या सुमारास ग्रंथकर्तृत्व नव्हतें असें नाहीं. परंतु त्यावेळच्या वाङ्मयांत कोणत्याहि प्रकारचा जोम किंवा उल्हास दिसून येत नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं हेगेलचें जें वजन चहूंकडे होतें तें अद्याप विश्वविद्यालयांत कायम होतें. परंतु वाङ्मयांत व सार्वजनीक आयुष्यक्रमांत त्याचें वजन खालावत चाललें होतें. हेगेलपंथांत जे अत्यंत पुढें गेलेले होते त्यांचीं मतें इतकीं सुधारलीं होतीं कीं त्यांचा व हेगेलच्या मतांचा मुळींच मेळ बसत नव्हता. नवीन सामाजिक व आर्थिक कल्पना हेगेलच्या समाजस्वामित्ववादाशीं जुळेल्या नव्हत्या. जे. मोलशॉट, कार्ल व्हॉग व लडविग बुचनेर यांच्या ग्रंथांनीं लोकांच्या मनांत सृष्टिविज्ञानाविषयीं जी जिज्ञासा उत्पन्न केली त्यामुळें लोकमताचा वारा हेगेलच्या तत्त्वज्ञानाविरुद्ध वाहूं लागला. यावरून हेगेलच्या लेखांचा वाङ्मय व कला यांवर अनिष्ट परिणाम झाला होता असें दिसून येईल. त्याची जागा तात्त्विक निराशावादाचा जो मुख्य पुरस्कर्ता आर्थर शोपेनहार (१७८८-१८६०) त्यानें घेतली. शोपेनहारचा हेगेलशीं फार दिवसांचा विरोध होता. परंतु एकोणिसावें शतक अर्धें उलटून जाईपर्यंत त्याच्या कल्पनांचा प्रसार झाला नाहीं व त्याच्या निराशावादाचा पगडा लोकांच्या मनावर बसला नाहीं.

इ. स. १८५० तें १८७० पर्यंत जें वाङ्मय उत्पन्न झालें तें प्राधान्येंकरून कल्पनाप्रधान गद्यस्वरूपाचें होतें. गट्झकोनें रिटर व्हॉन गेस्टे ही अत्युत्कृष्ट कादंबरी लिहून ज्या सामाजिक स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहिण्याचा प्रघात पाडून दिला त्याचाच पुढील काळांत फार विस्तार झाला. गट्झकोच्या मागून लागलीच फ्रेडरिख, स्पीलहेगन यानें त्याकाळीं ज्या सामाजिक प्रश्नांनीं जर्मन लोकांच्या मनांत खळबळ उडवून दिली होती त्यांचा उहापोह करून प्रॉब्लेमॅटिश नॅटुरेन (१८६०) पासून स्ट्रम्फ्लूट (१८७६) पर्यंत अनेक कादंबऱ्या लिहिल्या त्यानंतर गॅस्टाव्ह फ्रेटॅग(१८१६-१८९५)याची सोल उंड हॅबेन(१८५५)ही कादंबरी वाचनीय आहे. हा काळ सामाजिक व राजकीय खळबळीचा असल्यामुळें यावेळीं ऐतिहासिक कादंबरीस महत्त्व देण्यांत येऊ नये हें साहजिक आहे. एका वेळेस स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचा फार बोलबाला होता. परंतु त्याचें उदाहरण पुढें ठेवून ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणारा विल्हेम हेरिंग हा एकच कादंबरीकार

झाला. डर रोलँड व्हान बर्लिनपासून डोरोथापर्यंत त्यानें वेव्हर्ले नॉव्हेल्सच्या धर्तीवर सहा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. ऐतिहासिक कादंबरीच्या मागून ज्या तऱ्हेच्या कादंबरीचा प्रकार सुरू झाला तिच्यांत फार प्राचीन काळच्या परिस्थितीचें हुबेहुब वर्णन करणें हें काव्यप्रतिभा किंवा रचनाचातुर्य यापेक्षांहि अधिक महत्वाचें समजण्यांत येत होतें. अशा प्रकारच्या कादंबऱ्या म्हणजे जॉर्ज एबर्स ( १८३७-१८९८ ) यानें प्राचीन इजिप्शिअन चालीरितीविषयीं लिहिलेल्या आणि फेलिक्स डान यानें जर्मनांच्या प्राचीन इतिहासावरून रचलेल्या या होत.

अद्भूतयुगांत ज्या प्रसव पावल्या व "तरूण जर्मन" युगानंतरहि ज्या प्रचलित होत्या, त्या आख्यायिकांच्या स्फूर्तीनें लिहिलेल्या कादंबऱ्या अधिक महत्वाच्या होत्या. या कादंबऱ्यांत शेतकऱ्यांचे आयुष्यक्रम व त्यांच्या चालीरिती यांचें वर्णन होतें इमरमन यानें या प्रकारची डर ऑबेरॉफ या नांवाची उत्कृष्ट कादंबरी लिहिली आहे. जेरेमियास गॉठेल्फ या टोपण नांवानें प्रसिद्ध असलेला आल्ब्रेट बिझिअस नांवाचा एक स्विस धनगर या प्रकारच्या कादंबऱ्यांचा खरा उत्पादक होता. त्यानें आपल्या स्विस शेतकऱ्यांसबंधाच्या साध्या, सरळ व बोधपर गोष्टी लिहिल्यानंतर बरथोल्ड ऑरबेक याची श्वार्झवाल्डर डॉफगेशिश्टेन ही सुप्रसिद्ध कादंबरी प्रसिद्ध झाली. यथावद्वस्तुवर्णनाच्या व साधेपणाच्या बाबतींत ऑरबॅकला गॉटेल्फची सर येणार नाहीं. परंतु श्वार्झवाल्डर डॉफ्गेशिश्टेन या ऑरबॅकच्या ग्रंथाचा वाङ्मयावर विशेष परिणाम झाला. त्याच्या मागून पुष्कळसें क्षत्रियवाङ्मय निर्माण झालें. या लेखकांमध्येंच ए. स्टिफ्टर या ग्रंथकाराची गणना होते.

याप्रमाणें प्रांतिक भाषा व शेतकऱ्यांची रहाणी या संबंधानें विचार करून ग्रंथ लिहिण्याची जी चाल पडत चालली होती तिचा फायदा दक्षिणेकडील जर्मन लोकांसहि मिळाल्यावांचून राहिला नाहीं. फ्रिट्झ रूटरनें ( १८१०-१८७४ ) वाङ्मयाची योग्य सेवा करून उत्तरेकडील आपल्या प्रांताचें नांव राखलें. त्याच्या मेक्लेंबर्ग कादंबऱ्यांत व विशेषेकरून उटड फ्रांझोसेंटिड, उट मिने फेस्टुङ्टिट व उट मिने स्ट्राम्टांड या कादंबऱ्यांत मेक्लेंबर्ग येथील लोकांचा स्वभाव व त्यांच्या चालीरीती उत्तम रीतीनें प्रतिबिंबित झाल्या असून त्या, त्या काळच्या अत्युत्कृष्ट कादंबऱ्यांच्या तोडीच्या आहेत. रूटरनें जी वाङ्मयकामगिरी गद्यासंबंधीं केली तीच त्याचा समकालीन कवि व क्लिकबॉर्ने या काव्याचा कर्ता क्लॉस ग्रॉथ (१८१९-१८९९)यानें पद्यासंबंधीं केली. तथापि या काळच्या अत्यंत श्रेष्ठ कादंबऱ्या पुढील दोन कादंबरीलेखकांच्या आहेत. एक उत्तरेकडील जर्मन थिओडर स्टॉर्म (१८१७-१८८८) व दुसरा झ्यूरिचचा रहिवाशी गॉटफ्रीड केलर ( १८१९—१८९० ).

या वेळच्या जर्मन नाट्यवाङ्मयांत प्रयोगाच्या दृष्टीनें विशेष अर्थ नव्हता. जिकडे तिकडे फ्रेंचवाङ्मयाचा पगडा असल्यामुळें नाटककंपन्यांचें लक्ष विशेषेकरून फ्रेंच नाटकांच्या भाषांतरांकडे असे. आर. बेनिडिक्स व शार्लट बर्च फीफर या जर्मन नाटककारांचीं नाटकें वाङ्मयदृष्टीनें विचारांत घेण्यासारखीं नाहींत.गस्टाव्ह फ्रेटॅगचें आनंदपर्यवसायी नाटक डाय जर्नेलिस्टु हें या काळच्या नाट्यवाङ्मयांत अर्थ नव्हता या नियमास अपवाद आहे. प्रयोगाच्या योग्यायोग्यतेवरून या काळच्या जर्मन नाट्यवाङ्मयाचा विचार करावयाचा नाहीं. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला जर्मनीमध्यें असे दोन नाट्यलेखक होऊन गेले कीं मुख्यत्वेंकरून ज्यांच्या नाट्यग्रंथामुळें हल्लींच्या जर्मन नाट्यवाङ्मयाचा इतका विकास झाला आहे. फ्रेडरिक हेबेल (१८१३-१८६३) व ओटो लडविग ( १८१३—१८६५ ) हे ते नाटककार होत. या शतकाच्या शेवटीं ज्या स्वरूपाचें नाट्यवाङ्मय परिणत झालें त्याचे हे दोघे नाट्यलेखक अग्रगामी होते. सदरहू नाट्यवाङ्मयाच्या परिणत स्वरूपाची कल्पना द्यावयाची म्हणजे त्यांत वस्तुवादाचे सर्व नियम पाळण्यांत येत असून शिवाय नाटक केवळ बाह्यतः परिणामकारक व्हावें हा हेतू न धरतां मानसशास्त्रांतील निरनिराळ्या वादांचा व सामाजिक प्रश्नांचा त्यांत उहापोह केलेला आहे. विशेषेंकरून हेबेल हा एकोणिसाव्या शतकांतील अत्यंत स्वतंत्र विचाराचा व क्रांतिकारक जर्मन नाटककार समजला पाहिजे. त्याचा समकालीन भिलपार्झर याचा उद्देश स्पॅनिश नाटकांच्या नमुन्याच्या मदतीनें अभियुक्तनाट्य व अद्भुतरसात्मक नाट्य यांचा मेळ घालण्याचा होता. परंतु हेबेल यानें तसें न करितां मानसशास्त्रविषयक व समाजशास्त्रविषयक नाटकें लिहिण्याचा प्रघात सुरू केला. या पंथाचा अगदीं अलीकडचा नाटककार म्हटला म्हणजे हेन्रिक इब्सेन हा होय. हेबेलनें आपलें जुडिथ नांवाचें पहिलें शोकपर्यवसायी नाटक इ. स. १८४० त प्रसिद्ध केलें आणि त्याचीं अत्युत्कृष्ट नाटकें हेरोड्स उंड मारिअम्ने, आग्निस बर्नोव्हेर, गायजिस उंड सेइन रिंग आणि त्रिभागात्मक डाय निबेलुंजेन हीं इ स. १८५० पासून १८६२ पर्यंत प्रसिद्ध झालीं.

वाङ्मयाच्या या स्थितींत एका लेखकमंडळाचा येथें उल्लेख केला पाहिजे. हें मंडळ त्यांतील सभासदांच्या उद्देशसाम्यावरून प्रस्थापित झालें नसून केवळ आकस्मिक रीतीनें झालें होतें. हें मंडळ इ. स. १८५२ पासून १८६० पर्यंत म्युनिच येथें बव्हेरियाचा दुसरा मॅक्झिमिलियन यानें आपल्याभोंवतीं जमा केलें होतें. ज्यानें या युगांतील नमुनेदार वर्णाकाव्य निर्माण केलें तो इमॅन्युएल गिबेल हा या मंडळाचा प्रमुख सभासद होता. एफ्. व्हॉन बोडनस्टेट (१८१९—१८९२) हा एक दुसरा सभासद असून तो मिर्झा शाफी या ग्रंथाचा कर्ता होता. तसाच जे. व्ही. व्हॉन शेफेल ( १८२६-१८८६ ) हा डेर ट्राम्पेटेर व्हॉन साकिंगेन

या अद्भुतरसात्मक काव्याचा कर्ता होता. जे. वॉल्फ आणि आर. बांबॅक हे या अद्भुतरसात्मक काव्यलेखनांत अत्यंत निष्णात होते. एच. लिंग ( १८२०–१९०५ ) आणि आर. हॅमरलिंग ( १८३०–१८९९ ) यांनीं वीररसप्रधान काव्यलेखनाच्या कामीं परिश्रम केले. या मंडळाच्या एकंदर वाङ्मयांत जागोजाग निराशेची छटा दृष्टीस पडते. एच. लॉर्मे ( १८२१–१९०२ ) आणि एच्. ल्युथोल्ड ( १८२७–१८७९ ) यांच्या ग्रंथांत आध्यात्मिक तत्त्वज्ञानांत दृष्टीस पडणारी निराशा चोहोंकडे दृष्टीस पडते. म्युनिकमंडळाचा सर्वांत प्रमुख सभासद पॉल हेसे ( ज. १८३० ) हा असून नॉव्हेलेन किंवा संक्षिप्त गोष्टी यांचा लेखक म्हणून तो स्टॉर्म व केलर यांच्या तोडीचा होता. शिवाय हेसे यानें विस्तृत कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत. त्यांपैकीं कांहींचीं नांवें येणेंप्रमाणें आहेत—( १ ) किंडर डेर वेल्ट, ( २ ) इम पॅराडाइझ, ( ३ ) डायरिटेर व्हॉन गेइस्टे, ( ४ ) प्रॉब्लेमॅटिश्च नॅटुरेन, ( ५ ) सोलउंड हॅबेन.

( इ ) इ. स. १८७० च्या नंतरचें जर्मन वाङ्मय— फ्रान्स व जर्मनी या दोन देशांत जें युद्ध झालें व जें 'फ्रँको जर्मन वॉर' या नांवानें प्रसिद्ध आहे, त्यानंतरच्या काळांत जर्मनींतील परिस्थिति वाङ्मयोत्पादनास अनुकूल नव्हती. आणि साम्राज्याची पुनः प्रस्थापना झाल्यावर त्याचा राष्ट्रीय वाङ्मयावर कांहीं परिणाम झाला नाहीं. सर्व लोकांचें लक्ष संस्कृतीचा वाद, आर्थिक अडचणी, सट्टयाच्या व्यापाराचें वेड आणि सामाजिक लोकशाहीची जलद गति इत्यादि विषयांत गुंतलें होतें. फर्डिनंड लॅसेल ( १८२५–१८६४ ) आणि 'दासकॅपिटल' या ग्रंथांचा कर्ता कार्ल मार्क्स (१८१८–१८८३)यांनीं सामाजिक लोकशाहीचा बौद्धिक पाया घातला. अशा रीतीची प्रतिकूल परिस्थिति नसती तरी सुद्धां जोमदार वाङ्मय उत्पन्न करण्याइतका त्याकाळीं जर्मन लोकांच्या मनांत उल्हास नव्हता. अद्याप जिकडे तिकडे हेगेलचें प्राबल्य होतें आणि हेगेलचा अनुयायी डी. एफ्. स्ट्रॉस यानें जी "ऐतिहासिक" पद्धत आपल्या डर अल्टे उंड डर नेने ग्लॅबे यांत दिली आहे ती जर्मन विश्वविद्यालयांत साधारण चहूंकडे मान्य झाली होती. भौतिक व अधिभौतिक शास्त्रांमध्यें एच्. लोट्झे यानें जी तडजोड करण्याचा प्रयत्न केला तो हेगेलच्या परंपरेपेक्षां अधिक मान्य झाला. परंतु वाङ्मय व कला यांमध्यें युद्धापूर्वीप्रमाणेंच शोपेनहारच्या तत्त्वज्ञानाचें प्राबल्य होतें. ई. व्हॉन हार्टमन ( १८४२–१९०६ ) यानें आपल्या फिलॉसॉफिक डेस उंबेकस्टेन या नांवाच्या ग्रथांत निराशावाद व कल्पनावाद यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. वीणाकाव्यांत जो एकसुरीपणा होता तो युद्धामुळें परिस्थितींत बदल झाल्यानें नाहींसा झाला आणि जे वीणाकाव्यलेखक इ. स. १८४८ च्या राज्यक्रांतीचें स्तुतिस्तोत्र गात होते तेच आतां जर्मनीच्या विजयाचें आणि एकछत्री अंमलाखालीं येण्याचें अभिनंदन करण्यांत अग्रेसर होते. त्याबरोबर हरवे, फेलिग्राथ व गिबेल यांच्यासारख्या जुन्या पिढींतल्या लेखकांस नवीन राज्यव्यवस्थेसंबंधीं जी एक प्रकारची निराशा वाटत होती ती त्यांच्या लेखांतून प्रगट झाल्याशिवाय रहात नसे. त्यांची सर्व भिस्त फ्रँकफोर्ट पार्लमेंटावर होती आणि इ. स. १८७१ त सर्व जर्मनी एक छत्राखालीं येईल ही गोष्ट त्यांच्या स्वप्नांतहि आली नव्हती.

इ. स. १८७० च्या पूर्वी ज्याप्रमाणें कादंबरी ही जर्मन वाङ्मयाचें एक अत्यंत जोमदार अंग होतें तसेंच तें पुढें चालू राहिलें. परं इ. स. १८७० नंतर लागलीच जे कादंबरीकार लोकप्रि झाले ते सर्व जुनेच लेखक होते. लॅबे, गट्झको आणि ऑरबॅक हे अजून लेखनाचें काम करीत होतें फ्रिट्झ रटर हा सर्वांचा आवडता लेखक होता; आणि संक्षिप्त गोष्टी लिहिणारांमध्यें स्टॉर्म व पॉल हेसे हे सर्वांच्या मतानें अग्रगण्य होते. यानंतर एक वर्षदशक उलटून गेल्यावर गॉटफ्रिडकेलरची योग्यता लोक कबूल करूं लागले. ऐतिहासिक कादंबरीच्या पुनरुज्जीवनाची आतां फारशी आशा नव्हती. गस्टाव्ह फ्रेटॅग यानें आपली डाय अहनेन ही कादंबरी लिहून तशा प्रकारचा प्रयत्न केला होता. परंतु त्याची कादंबरी एबर्स व डॅान यांच्या धर्तीची असून तिच्यांत स्कॉट किंवा त्याचा अनुयायी विलिबाल्ड अलेक्सिस यांचें लेखनकौशल्य नव्हतें.

इ. स. १८७० नंतरच्या दशकांत जर्मनीच्या नाट्यवाङ्मयाची स्थिति पूर्वीपेक्षांहि अधिक शोचनीय झाली होती. १८७०–१८८० या दशकांत होऊन गेलेला अत्यंत बुद्धिमान नाटककार अॅन्झेन्ग्रबर हा होता. फारेर व्हॉन किर्च फेल्ड हें अॅन्झेन्ग्रबरचें पहिलेंच नाटक होतें. त्यानें तर ऑस्ट्रिअन शेतकऱ्यांचीं चरित्रें ज्यांत वर्णन केलीं आहेत अशीं अनेक नाटकें लिहिलीं. परंतु यावेळीं खरोखर लोकप्रिय असलेले नाटककार दोन प्रकारचे होते. एक मध्यमवर्गीतील लोकांचें आयुष्यचित्र दाखविणारे व दुसरे फ्रेंच नमुन्यावरून नाटकें लिहिणारे. या काळच्या नाट्येतिहासांत झालेली विशेष प्रगति म्हटली म्हणजे नाट्यगृहाची विलक्षण सुधारणा ही होय; ही सुधारणा होण्यास दोन गोष्टी कारणाभूत झाल्या. मॉनिंजनराज—रंगमंदिरांत मॅनिंजनच्या सरदारानें ज्या शिल्पचातुर्याच्या सुधारणा केल्या त्या एक कारण, व राष्ट्रीय नाटकगृह कसें असावें याविषयीं जी रिचर्ड वॅगनेरची कल्पना होती तिला अनुसरून त्यानें बेरूथ येथें एक नाटकगृह बांधलें हें उपरिनिर्दिष्ट सुधारणेचें दुसरें कारण होय. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झालेला अत्यंत मोठा नाटककार हा प्रमुख जर्मन नाटककारांपैकींहि एक होता; आणि इ.स.१८७६च्या उन्हाळ्यांत बेरूथ येथें जो डर रिंग डेस निब्लेलुंजेन या नाटकाचा पहिला प्रयोग झाला त्यानें जर्मन नाट्येतिहासाच्या नवीन युगास प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

एकोणिसाव्या शतकाचीं शेवटचीं पंधरावीस वर्षें जर्मनीमध्यें वाङ्मयविषयक चळवळ फार जोराची होती. संयुक्त-जर्मन साम्राज्यांतील तरुण पिढीचे नागरिक अधिक उत्साहि व आशावादी होते. शोपेनहॉरचीं मतें आतां फारशीं ग्राह्य वाटत नव्हतीं. आणि विश्वविद्यालयांत हेगेलचा पूर्वीचा प्रभाव नष्ट झाला होता. कांट हा नवीन तत्त्वज्ञानविषयक चळवळीचा जनक असून अठराव्या शतकांतील सर्व ज्ञानसंग्रहाचा स्वामी तो होता नूतनकांट मतांचा जिकडे तिकडे अंमल सुरू झाला त्यायोगानें जर्मन तत्त्वज्ञान व दैवतशास्त्र हीं अधिक जोमदार झालीं. एल्. व्हान रँक ( १७९५-१८८६ ) हा अद्याप जर्मन इतिहासशास्त्राचा प्रमुख होता आणि इ. स. १८८१ पासून १८८८ पर्यंत वेल्टगेशिर्टे या त्याच्या शेवटच्या ग्रंथाचे नऊ भाग प्रसिद्ध झाले. त्यावेळचे दुसरे इतिहासकार म्हटले म्हणजे एच्. व्हान सिबेल ( १८१७-१८९५ )आणि एच्. व्हान ट्रिटक्के ( १८३४-१८९६ ) हे होत. त्यांपैकीं ट्रिटक्के हा तर नवीन राजकीय चळवळीचा जोरदार व स्फूर्तिदायक पुढारी होता. कुल्टुरडेर रिनाइसन्स इन इटालिएन या ग्रंथाचा कर्ता व नित्शेचा मित्र जे. बरखार्ट ( १८१८—१८९७ ) याचें वजन फक्त सुशिक्षितांवरच नसून सर्वांवर सारखें होतें. हेगेलचें प्राबल्य नष्ट झाल्यानें व शोपेनहॉरच्या ग्रंथांचें चिकित्सक बुद्धीनें निरीक्षण करण्याच्या पद्धतीनें वाङ्मयविषयक टीकाकारांचा पुष्कळच फायदा झाला. जर्मन लोकांनीं प्रथम आपल्या महाकवींचा दर्जा व योग्यता यांचा विचार करून त्यांच्याविषयीं आपल्या कल्पना निश्चित केल्या. हेगेल किंवा शोपेनहार यांच्या वेळेस जें लोकमत गोएटेविषयीं अनुकूल नव्हतें तें आतां अनुकूल झालें. शिलरविषयींहि लोकांच्या मनांत जी अप्रीति होती ती दूर झाली व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे पूर्वी क्लीस्ट, ग्रिलपार्झर, हेबेल व केलर यांच्याविषयीं जी अनास्था होती तिच्या जागीं त्यांच्याविषयीं योग्य आदर दाखवून तिची भरपाई केली.

या काळचें विचारसर्वस्व ज्याच्यांत प्रतिबिंबित झालें आहे असा तत्त्वशोधक व कवि म्हटला म्हणजे फ्रेडरिक नित्च्छे ( १८४४-१९०० ) हा होय. हेगेलच्या अध्यात्मशास्त्रविषयक विचारांस त्यानेंच तिलांजली दिली. नित्च्छे हा प्रथम शोपेनहारचा अनुयायी व वॅग्नेरचा मित्र होता परंतु शेवटीं तो व्यक्तिस्वातंत्र्यवादी व आशावादी व तत्त्वज्ञानाचा पुरस्कर्ता झाला. त्याच्या तत्त्वज्ञानांत व एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकाळांत जो निराशावाद प्रचलित होता त्याच्यांत तीव्र विरोध होता. जातीचें महात्म्य न वाढवितां व्यक्तीनें जेथें तेथें आपलें वर्चस्व स्थापन करावें, गुलाम न होतां नेहमीं मालक होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी, स्वत्वविनाशक विरक्ति धारण न करतां जेव्हां तेव्हां आपलें म्हणणें प्रस्थापित करावें इत्यादि त्याच्या नवीन आशावादी नीतिशास्त्रांतील मूलभूत कल्पना होत्या. परंपरेनें भारावलेली व जखडलेली जीर्ण संस्कृति नष्ट होऊन मूळ उपजतबुद्धीच्या अनुरोधानें वागणारी मानवजात व्हावी अशी नित्च्छेची उत्कट इच्छा होती.

पूर्वी होऊन गेलेल्या शोपेनहारप्रमाणें नित्च्छेची लेखनपद्धति अतिशय उत्कृष्ट व अनुकरणीय होती आणि वाङ्मयाच्या दृष्टीनें त्याचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आल्सो स्प्राक झरथुस्ट्र हा त्या काळचा सर्वांत श्रेष्ठ व कल्पनाप्रचुर असा ग्रंथ समजला जातो.

नवीन वाङ्मयविकासास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांपैकीं नित्च्छेचा व्यक्तिस्वातंत्र्यवाद ही एक होती. फ्लॉबर्ट, धी गॉंकोर्ट्स, झोला आणि मॉपासंट यांनीं जो वाद फ्रान्समध्यें प्रतिपादन केला, डोस्टाइव्स्की व टॉलस्टॉय यांनीं रशियामध्यें केला व नॉर्वेमध्यें इब्सेन व जोर्सन यांनीं केला तो भौतिकवाद कांहीं काळ जर्मनीमध्यें माजला होता आणि तरुण पिढींतील टीकाकारांनीं त्या वादाचा मोठ्या उत्साहानें अंगीकार केला. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे बर्लिन हें या सर्व वादांचें केन्द्रस्थान होतें. बर्लिन ही जेव्हांपासून साम्राज्याची राजधानी झाली तेव्हांपासून तें शहर वाङ्मयाचेंहि मुख्य ठिकाण होऊं लागलें. वर सांगितल्याप्रमाणें जर्मनीमध्यें जी भौतिकवादविषयक चळवळ चालू होती ती जिवंत स्वरूपाची होती; कारण ती चळवळ केवळ इतर वाङ्मयांतील त्या विषयावरचे उत्तम उत्तम उतारे घेऊन चालविलेली नसून अगदीं स्वतंत्र रीतीनें चालविली होती.

प्रसिद्ध कादंबरीकार ए. विल्ब्रँट यानें इ. स. १८९० पासूनच तरुण पिढीच्या वस्तुवादविषयक कल्पना आपल्या ग्रंथांत उत्तम रीतीनें उतरल्या होत्या. एफ्. स्पिलहेगन हाही भौतिक वस्तुवादाला पुष्कळसा अनुकूल होता आणि थिओडर फॉंटेन यानें तर ज्यांत फ्रेंच वस्तुवादाचे अगदीं सूक्ष्म भागहि प्रतिबिंबित झाले आहेत असे अनेक ग्रंथ इ. स. १८८० पासून १८९८ पर्यंतच्या काळांत लिहून प्रसिद्ध केले होते. विल्हेम जेन्सन ( ज. १८३७ ), विनोदी लेखक विल्हेम राबे ( ज.१८३१ ) आणि एच्. सिडेल ( १८४२-१९०६ ) व डब्ल्यू. बुश ( १८३२-१९०८ ) हे सर्व ग्रंथकार जुन्या पंथाचे अनुयायी होते. कांहीं मनोरंजक जर्मन कादंबऱ्या अलीकडे ऑस्ट्रिया व स्वित्झरलंड या देशांत तयार झाल्या आहेत. मेरीव्हॉन एब्नेर एशेनबॅक ( ज. १८३० ) व फर्डिनंड व्हॉन सार ( १८३३--१९०६ ) हे दोघे नाणावलेले ऑस्ट्रियन ग्रंथकार असून संक्षिप्त गोष्टी लिहिण्यांत ते विशेष निष्णात होते. फर्डिनंड व्हॉनसार हा तर ज्या निराशावादाचा ऑस्ट्रियांत मागील पिढीपासून प्रसार झाला होता त्याचा पुरस्कर्ता होता. स्वित्झरलंडमध्यें दोन पहिल्या प्रतीचे जर्मन गद्यलेखक होऊन गेले. त्यांपैकीं गॉडफ्रिड केलर याचा वर निर्देश केलेलाच आहे आणि दुसरा कॉन्राड फर्डिनंड मेअर ( १८२५-१८९८ ) यानें वाङ्मयलेखनास

फार उशिरां सुरवात केली. केलरप्रमाणें जरी तो जोरदार व स्वतंत्र पद्यरचना करीत असे तरी कादंबरीकार म्हणूनच मेयरची विशेष ख्याती होती. मेयरचा संक्षिप्त गोष्टी लिहि- ण्यांतहि हातखंडा होता. त्याच्या ग्रंथांचे विषय पंधराव्या शतकांतील विद्या व कला यांच्या पुनरुज्जीवन काळांतून निवडून घेतलेले असत आणि त्याच्या लेखनपद्धतींत जर्मन लेखकांत क्वचित् दृष्टीस पडणारे बाह्यसृष्टिविषयता व निर्दो- षता हे गुण आढळून येतात. त्या काळच्या वस्तुस्थिति- वर्णनपर कादंबऱ्या एच्. कॉन्रॅडी, मॅक्स क्रेट्झर, एम्. जी. कॉन्रॅड, एच् हेबर्ग, के. डब्ल्यू. के. अल्बर्टी आणि हरमन सुडरमन इत्यादि कादंबरीकारांनीं लिहिल्या आहेत. परंतु जर्मनींतील वस्तुवादविषयक चळवळींत स्थिरता नव्हती. जर्मन लोकांची मूळची कल्पनामय मनोवृत्ति आणि फ्रेंच लोकांचा निर्भेळ वस्तुवाद यांचा मेळ बसणें शक्य नव्हतें आणि म्हणून जे जर्मन लेखक तो वस्तुवाद स्वीकारून कादंबऱ्या व नाटकें लिहूं लागले ते अखेर त्या वादांतून पळवाट काढूं लागले. ज्याच्या फ्रान सोर्गे, डेर काटझेनस्टेग व एस वॉर या सुद्धां कादंबऱ्या त्यावेळीं नाणावल्या गेल्या, तो सुडरमन कधींच सुसंबद्ध रीतीनें वस्तुवादी नव्हता. म्हणून थोड्याच अवधींत मानसशास्त्राच्या व भावनासंबंधींच्या प्रश्नांचा विचार करून मानवी आयुष्यक्रमाचें काव्यमय व काल्पनिक चित्र रेखाटण्याकडे जर्मन कादंबरीकारांचा कल व्हावा यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. फ्लॉबर्ट किंवा झोला यांच्या यथावद्वस्तुवर्णनपद्धतीपेक्षां अशीं काल्पनिक चित्रें रंगविणें हे जर्मन लोकांच्या स्वभावधर्मास जास्त पटणारें होतें. अशा तऱ्हेची प्रवृत्ति गस्टाव्ह फ्रेन्सेन याच्या ग्रंथांत दिसून येतें. त्यामुळें त्याची जॉन उह्‌ल ही कादंबरी अति- शय लोकप्रिय झाली. तीच प्रवृत्ति हल्लींचे तरुण ग्रंथकार हर्मन हेसे ( ज. १८७७ ), एमिल स्ट्रॉस ( ज. १८६६ ), रुडॉल्फ हुच ( ज. १८६२ ) आणि फ्रेडरिक हुच ( ज. १८७३ ) यांच्या शिशुसंगोपनविषयक व शिक्षणविषयक ग्रंथांतून दिसून येते. जर्मन कादंबरीचें परंपरागत जुनें स्वरूपच विसाव्या शतकांत फिरून दिसूं लागलें असें कोणी म्हटलें तर शोभण्यासारखें आहे. यासंबंधांत जे. जे. डेव्हिड ( १८५९–१९०७ ), ई. व्हॉन केसरलिंग ( ज. १८५८ ), डब्ल्यू. हेगेलर ( ज.१८७० ), जी. व्हॉन ऑम्पटेडा ( ज. १८६३ ), वासरमन ( ज. १८७३ ), हेन्रिखमॅन ( ज. १८७१ ) आणि थॉमसमॅन ( ज. १८७५ ) इत्यादि कादंबरीकारांचा नामनिर्देश केला पाहिजे. थॉमसमॅनचा बुडेन ब्रूक्स ही कादंबरी ही हल्लींहि अत्यंत लोकप्रिय असलेली कादंबरी आहे. अगदीं अलीकडच्या काळांतील कांहीं अत्युत्कृष्ट कादंबऱ्या स्त्रियांनीं लिहिल्या आहेत. हेलेन बोह्‌लां ( ज. १८५९ ), ग्रेबीलरूटर ( ज. १८५९ ), क्लाराव्हायबिग ( ज. १८६० ) आणि रिकार्डा हुच ( ज. १८६४ ) या त्यांतील कांहीं प्रमुख स्त्रीलेखिका होत. ही जी जर्मन काव्यरूप व कादंबरीरूप वाङ्मयानें शेवटची दिशा घेतली तिनें कायमचा फायदा होईल कां नाहीं हें जरी आतांच सांगतां येणार नाहीं, तरी तिजमुळें स्वभाववादाच्या उतरत्या कळेस आळा बसला असें म्हण- ण्यास हरकत नाहीं.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं व विसाव्या शतकाच्या प्रारंभीं इतर वाङ्मय व नाट्यवाङ्मय यांचा जितका निकटचा संबंध होता तितका दुसऱ्या कोणत्याहि वेळीं नव्हता. हल्लीं ज्या- प्रमाणें रंगभूमीवर वाङ्मयचकमकी झडतात त्याप्रमाणें त्या पूर्वी कधींहि झडल्या नाहींत. कलाकौशल्याच्या व सांपत्तिक स्थितीसंबंधीं जर्मननाट्यकलेची काय स्थिति होती व तिच्यांत काय सुधारणा झाली होती हें वर आलेलेंच आहे. परंतु इ. स. १८८९ पर्यंत त्या सुधारणांचे परिणाम नाट्य- वाङ्मयावर झालेले दिसले नाहींत हें सांगितलें पाहिजे. त्या सालापूर्वीं अर्स्ट व्हॉन विल्डेनब्रच ( १८४५–१९०९ ) यानें ऐतिहासिक शोकपर्यवसायी नाटयाचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच्या नाटकांत मनोभावना व देशाभिमान यांचा अतिरेक झाल्यामुळें त्याच्या ग्रंथाच्या बऱ्याच वाङ्मयविषयक गुणधर्मांचा लोप झाला. त्याच- प्रमाणें रिचर्डव्हॉस हा जरी बुद्धीमान लेखक होता तरी त्याला कायमची सुधारणा करितां आली नाहीं. इ. स. १८८९ च्या आक्टोबरांत मात्र गर्हार्ट हॉपमनच्या व्हॉर सोम्नेनांफगंग नांवाच्या नाटकाचा प्रयोग बर्लिन येथील त्यावेळीं नुक्त्याच बांधलेल्या फ्रेइ बुह्‌न नांवाच्या मोफत नाटकगृहांत करून दाखविण्यांत आला. आणि एक महिन्यानंतर" डाय एऱ्हे" नांवाचें जें हरमनसुडरमन यानें एक नाटक लिहिलें तें बर्लिन येथें फारच लोकप्रिय होऊन त्याचा इतका बोलबाला झाला कीं तसा एका पिढींत कोण- त्याच जर्मन नाटकाचा झाला नव्हता.

हॉपमन(इ. स १८६२ ) हा त्याच्या समकालीन सर्व जर्मन ग्रंथकारापेक्षां अधिक कल्पक असल्यामुळें त्याच्याशीं दुसऱ्या कोणाची तुलना करिता येत नाहीं. त्याच्या पहिल्या ग्रंथावरून त्यावेळीं त्याच्या मनावर वस्तुवादाचा अंमल असावा असें दिसून येतें. परंतु त्याच्या हॅनेलीस हिम्नेल- फार्ट या ग्रंथांत वस्तुवाद व काव्यकल्पकता यांचें मिश्रण आहे. हॉरिअन गेयर या ग्रंथांत त्यानें ऐतिहासिक विषयांत वस्तुवादपद्धतीचा उपयोग केला आहे; आणि इ. स. १८९६मध्यें त्यानें वस्तुवाद सोडून देऊन डाय वेर्सुकेने ग्लॉके या नांवाचें एक औपरोधिक नाट्यरूप काव्य लिहिलें.

हरमन सुडरमन याच्या नाट्यरचनाचातुर्याचा विकास अधिक समधातस्वरूपाचा होता. सुडरमननें आपल्या वेळच्या कल्पना आणि नाट्यप्रयोगाच्या नवीन तऱ्हा व परंपरागत जर्मन नागरिक चारित्र्यपर नाट्यरचना यांचा मेळ बसविण्यांत जें कौशल्य दाखविलें त्यामुळेंच त्याचें"डाय एऱ्हे" हें नाटक यशस्वी रीतीनें लोकप्रिय झालें. त्याच्या

हेइमत, ठासव्लुकइम विंकेल आणि एसलेबे डासलेबेन या नाटकांसंबंधानेंहि तेंच म्हणण्यासारखें आहे. सुडरमन हा बाह्यसृष्टीचा सूक्ष्म निरीक्षक, सूचक कल्पनांचा लेखक आणि सर्वांचा विशेष म्हणजे व्यवहारज्ञ नाटयलेखक होता; परंतु त्यांच्या ग्रंथांत नाटकी भाग फार असल्यामुळें त्यांतील वाङ्मयात्मक गुण उठावदार रीतीनें दिसून येत नाहींत.

इ. स. १८८९ पासून जर्मन वाङ्मयक्षेत्रांत नाटयलेखनानें अघाडीचें स्थान पटकाविलें आहे. तथापि त्यामुळें कायमचा जर्मन नाटयनिधि हा फारसा वाढला आहे असें नसून जर्मन नाटयलेखक मिळालेल्या यशावर संतुष्ट न रहातां नित्य नवीन प्रकारच्या नाटयरचना शोधून काढतात हें त्यांस भूषणावह आहे. हापमन व सुडरमन यांच्या शिवाय मॅक्स हालवे, ओ. इ. लार्कबेन, जी. हिर्शफेल्ड इ. रॉस्मेर, लुडविग फुल्डा, मॅक्स डेअर, एर्स्ट आणि फ्रँक वेडेकिंड हे जर्मनींत आधुनिक बुद्धिवान नाटककार झाले आहेत. ऑस्ट्रियामध्यें बर्लिनचें बरेंच प्राबल्य असतांहि ऑस्ट्रियन नाटयकलेनें आपलें राष्ट्रीय स्वरूप कायम ठेविलें आहे. आणि आर्थर श्नीटझलर, हर्मन बहर ह्यूगो, व्हॉन हॉफ मनस्थल, व आर. बीअर हॉफमन या ऑस्ट्रियन नाटककारांनीं तर उत्तर जर्मनीच्या नाटयवाङ्मयांत दृष्टोस न पडणारे असे केवळ ऑस्ट्रिअन विषय आणि नवीन नवीन कल्पना आपल्या नाटयग्रंथातून आणल्या आहेत.

अलीकडच्या जर्मन वीणाकाव्यांत नवीन भावनांचें व काव्यकल्पनांचे विविध प्रकार दृष्टीस पडतात. कादंबरी किंवा नाटय यांच्यापेक्षां वीणाकाव्यावर नित्स्छेच्या आशावादित्वाचा परिणाम अधिक झाला. अद्भुत वाङ्मयाच्या काळापासून वीणाकाव्याची जी परंपरा चालत आली होती आणि म्युनिच येथील कविवर्गांनीं जिची काळजीपूर्वक जोपासना केली होती तिचें उल्लंघन करणारांपैकीं डेटले व्हॉन लिलीनक्रॉन ( १८४४–१९०९ ) हा एक होता. डब्ल्यू ॲरट ( ज. १८६४ ) यानें प्रसिद्ध केलेल्या आधुनिक वीणाकाव्यांतील वेच्यांवरून कादंबरी व नाटय याच्या वस्तुवादाच्या काळांत वीणाकाव्याचा विकास कसा होत गेला हें कळण्यासारखें आहे. रिचर्ड डेहमेल ( ज. १८६३ ), के. हेन्केल ( ज. १८६४ ), जे. एच्. मॅके ( ज. १८६४ ), जी. फाक ( ज. १८५३), एफ्. अव्हेनेरिअस ( ज. १८५६ ), एफ्. एव्हर्स ( ज. १८७१ ), एफ्. डॉमेन ( ज. १८७० ), व के. बुसे ( ज. १८७२ ) इत्यादि कवी या वीणाकाव्यविकासास मुख्यत्वेंकरून कारणभूत झाले. यापुढील वीणाकाव्यविकास हॉफमनस्थाले व स्टीफन जॉर्ज यांच्या काव्यांत पहावयास मिळतो. यथावद्वस्तुवर्णनपर वाङ्मयाचा काळ जरी वीररसप्रधानकाव्याला अनुकूल नव्हता तरी त्या काळांत वीररसप्रधान काव्याचीहि हेळसांड झाली नव्हती.

इ. स. १८८९ पासून जर्मनीमध्यें जें इतकें वाङ्मय निर्माण झालें त्यानें जर्मन राष्ट्रीय वाङ्मयांत कायमची भर पडली असें मानलें जावो अथवा न जावो, लेखकांनीं आपल्या कडून होईल तितक्या कसोशीनें व निष्ठेनें वाङ्मयसेवा केली याविषयीं कोणालाहि शंका घेतां येणार नाही. विसाव्या शतकाच्या प्रारंभीं जर्मन वाङ्मयाच्या उत्पादनास परिस्थिति अनुकूल होती यावरून यापुढील काळांत तें वाङ्मय उत्तरोत्तर अधिकाधिक निर्माण होत जाईल अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे.

अर्वाचीन वाढ—इ. स. १९१० ते १९२० सालांच्या दरम्यानच्या जर्मनवाङ्मयाकडे नजर फेंकल्यास या काळांत जर्मनवाङ्मयांतील निरनिराळ्या क्षेत्रांमध्यें नवीन कल्पनांचा सुळसुळाट झाला असें दिसून आल्याशिवाय रहात नाहीं. इ. १९१० पूर्वी कांहीं वर्षांपासूनच आधिभौतिक ध्येयाच्या दृष्टीनें निर्माण झालेल्या व होत असलेल्या वाङ्मयाविरुद्ध बंड करण्यासाठीं धडपड चालली होती. आधिभौतिकशास्त्रावर जर्मनभर अतोनात वाङ्मय निर्माण होत असे. पण १९१० सालानंतर तत्त्वज्ञानाकडे व सृष्टीच्या आद्य तत्त्वासंबंधीं विचार करण्याकडे वाङ्मयपंडितांचें लक्ष हळूहळू वेधूं लागलें. मानवी शोधाला अगम्य असें या जगामध्यें व जगाला व्यापून टाकणारें एक सत्तत्त्व आहे व त्याकडे पुनः आपण लक्ष दिलें पाहिजे अशी नूतन दृष्टि या काळांत प्रामुख्यानें पुढें आली. अर्नेस्ट हेकेलच्या वेल्ट्रएट्सेलमध्यें आधिभौतिक शास्त्रांच्या दृष्टीनें सृष्टीचें गूढतत्त्व उकलण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. त्याविरुद्ध तीन दिशांनीं निरनिराळ्या लोकांनीं आपलीं मतें प्रगट केलीं. जगांत एक अनाद्यनंत असें सत्तत्त्व आहे असें प्रतिपादन करणाऱ्या 'व्हायटॅलिस्ट' पंथाचा म्होरक्या नीत्शे यानें, आधिदैविक ध्येयवादाचा पुरस्कार करणाऱ्या कांटच्या अनुयायांनीं व बेडन संप्रदायाच्या पुरस्कर्त्यांनीं या हेकेलच्या आधिभौतिक ध्येयवादावर कडक टीका करण्यास आरंभ केला. नीत्शे हा 'अतिमानुष विभूती'च्या कल्पनेचा पुरस्कर्ता होता. याच्यापेक्षांहि जॉर्ज सिमेल नांवाचा ग्रंथकार व 'व्हायटॅलिस्ट' पंथाचा कट्टा अनुयायी यानें मानवी जीविताचा केवळ आधिभौतिकदृष्ट्याच विचार न करतां आध्यात्मिक दृष्टीनेंच या गूढ तत्त्वाचा उलगडा केला पाहिजे या तत्त्वाचें प्रतिपादन केलें. एडुआर्ट स्प्रँगर या तत्त्वज्ञाच्या मतें तत्त्वज्ञान हें आध्यात्मिक स्वरूपाचें असून त्याचें परमोच्च स्वरूप आत्मचिंतनांत आढळतें या तत्त्वाचा पुरस्कार मॅक्स शेलर या तत्त्वज्ञानें केला. तत्त्वज्ञानाचें खरें ध्येय सामान्य व सार्वजनिक कल्पना शोधून काढणें हें नसून ऐतिहासिक दृष्ट्या आत्म्याची उत्क्रांति कशी होत गेली हें विशद करून सांगण्याचें आहे असें शेलरनें म्हटलें आहे. कायझरलिंग नांवाच्या तत्त्वज्ञानें आत्म्यामध्यें परमेश्वरी अंश असून तो जागृत करून मनुष्यप्राण्यानें व राष्ट्रानें आपली स्वार्थी बुद्धि जिंकली पाहिजे असें म्हटलें आहे. रवींद्रनाथ टागोरच्य

मतांचा याच्यावर फार परिणाम झाल्यानें त्यानें टागोरच्या सल्ल्यानें डार्मस्टाट येथें ' ज्ञानमंदिर ' उघडलें आहे.

लिओपोल झिगलर यानें 'गेस्टल्ट वँडेल गॉटर' या पुस्तकांत यूरोपच्या भविष्यकालीन ध्येयासंबंधीं चर्चा केली आहे. परमेश्वर हा विशिष्ट आकाराचा कोणी दैवी प्राणी नसून तो अनाद्यनंत व व सच्चीद्घन आहे असें याचें मत आहे. बुद्ध अगर नीत्शे याच्याप्रमाणेंच परमेश्वराच्या अज्ञेय स्वरूपाचा हा पुरस्कर्ता आहे. गोएटेच्या वाङ्मयांत जी विकासवादाची कल्पना जागजागीं दृग्गोचर होते त्या तत्वाच्या आधारें स्टीनर यानें सृष्टीचें गूढतत्व उकलण्याचा प्रयत्न केला आहे. महायुद्ध सुरू होण्यापूर्वी जोहान्स मुल्लर यानें 'आपल्या आत्म्याचा उद्धार करा' या तत्वाचा उपदेश यूरोपभर हिंडून प्रसृत करण्याचा आरंभ केला.

१८व्या शतकाप्रमाणेंच या २० व्या शतकांतहि जर्मनींत आध्यात्मिक तत्वज्ञानाचा जनतेंत पुष्कळ प्रसार होऊं लागला. खोलींत बसून विचार करण्यांत आपलें जीवित खर्च करण्यापेक्षां तत्त्वज्ञानाचा प्रसार करून त्याचें लोण गरीबांच्या झोपड्यांमध्येंहि फैलावण्याची लालसा या शतकांत विशेष जोरानें उद्भूत झाली; व त्याप्रमाणें मार्गबर्गपंथाचा मुख्य जो पॉल नॅटॉर्प यानें जनतेंत शिक्षणाच्या द्वारा तत्त्वज्ञानाची सुलभ शब्दांत सर्वांनां माहिती करून देण्यास आरंभ केला. कान्टच्या तत्त्वज्ञानांतील प्रमुख तत्वें, लोकांनां समजतील अशा तऱ्हेनें सांगण्यास, कॅसिरेव यानें सुरुवात केली. त्यानें ' फ्रीहीट अंड फॉर्म ' ' इडी अंड जेस्टाल्ट '' अशीं छोटीं छोटीं पुस्तकें लिहून तत्वज्ञानाचे ढोबळ सिद्धांत जनतेपुढें मांडले आहेत. बेडनपथाच्या अनुयायांनींहि अशाच प्रकारें तत्वज्ञानाचा प्रसार करण्याचा प्रारंभ केला आहे. १९२१ सालीं सर्वश्रेष्ठ म्हणून गणला गेलेला हीनरीच रिकर्ट हा जर्मन तत्वज्ञ या पंथाचा प्रमुख पुरस्कर्ता असून त्यानें, सिस्टम डर फिलॉसफी ' या ग्रंथांत व 'फिलॉसफी डेस लेबेन्स' या ग्रंथांत, नीत्च्छे, बर्गसन, व जेम्स यांच्या तत्वँज्ञानावर टीका केली आहे व तत्वज्ञानाचें क्षेत्र आकुंचित नसून अतिशय व्यापक असतें, तत्वज्ञानाचें खरें कार्य तात्विक सिद्धांताचें केवळ उद्घाटन करणें एवढेंच नसून तें जनतेंत प्रसृत करण्याचें आहे असें त्यानें प्रतिपादन केलें आहे.

आधिभौतिकवाद व आध्यात्मिक वाद या दोहोंतहि जो विचारांतील कृत्रिमपणा दृष्टीस पडतो त्याविरुद्ध यूकेन या प्रसिद्ध तत्वज्ञानें मोहीम सुरू केली व थोडक्याच काळांत त्याचीं मतें अमेरिका, जपान, इत्यादि राष्ट्रांतहि फैलावलीं. जर्मनीमध्यें यूकेनचा सुप्रसिद्ध अनुयायी ट्रोल्टश हा होता. यानें ख्रिश्चन नीतीचा समाजांत फैलाव करण्याची आवश्यकता लोकांनां पटवून दिली.

तात्पर्य जर्मनींत या काळांत जें तत्वज्ञानात्मक वाङ्मय निर्माण झालें त्याचा इतर शास्त्रांवरहि फार परिणाम घडून आला. शास्त्रीय, ऐतिहासिक व अर्थशास्त्रासंबंधींचे प्रश्न सोडवितांनाहि तात्विकदृष्टीनें त्या प्रश्नाचा विचार करण्याची प्रवृत्ति ग्रंथकारांत निर्माण झाली वाल्थर राथेनु या सुप्रसिद्ध व्यापाऱ्यानेंहि आपल्या लेखांत, साम्राज्यसत्तावाद व भांडवलवाले यांच्यावर टीका करतांना जर्मन तरुणांनीं आधिभौतिक स्वार्थी दृष्टी सोडून दिली पाहिजे असा उपदेश केला आहे.

काव्यः—तत्वज्ञानाच्या बाबतींत जें विचारनाविन्य निर्माण झालें त्याचाच पडसाद काव्यक्षेत्रांतहि दृग्गोचर होऊं लागला. काव्य हें बाह्यबंधनांनीं मर्यादित न होतां, स्वैरपणानें विचार करून सहज बाहेर पडणाऱ्या उद्गारांचें चित्र असलें पाहिजे अशा प्रकारची विचारसरणी उदयास येऊं लागली. काव्याचें क्षेत्र व्यापक झालें पाहिजे ही जाणीव उत्पन्न झाली व काव्यांत गूढ कल्पनांचा अंतर्भाव होऊं लागला.

१९१० सालीं जर्मनीमध्यें स्टेफन जॉर्ज, रैनर मरिया रिल्के, व रिचर्ड डेहमेल हे तीन प्रसिद्ध वीणाकाव्यें अथवा भावगीतें लिहिणारे कवी होते. काव्याचें ध्येय केवळ मनोरंजन एवढेंच आहे या मताचा स्टेफन जॉर्ज हा पुरस्कर्ता होता. काव्याचें खरें कार्य म्हणजे पारमार्थिक स्वरूपाची ओळख करून देणें होय असें त्याचें मत होतें. ' डर सीबेंटे रिंग ' या काव्यांत त्यानें हें ध्येय पूर्णपणें तडीस नेलें आहे. याचा शिष्य रूडोल्फ शोडर याच्या एलिशियन काव्यांत, गोएटेच्या काव्यांतील कल्पना आढळून येतात. त्याच्या ओड्समध्यें, ग्रीक कल्पनांचें प्रतिबिंब आढळून येतें. याच्या काव्याची भाषा स्पष्ट व हृदयंगम आहे.

रूडोल्फ बोरचार्टच्या काव्यांत शब्दांची कसरतच अधिक दिसून येते. रूडोल्फ याची कवि या नात्यानें जितकी योग्यता आहे त्यापेक्षांहि निबंधकार या नात्यानें अधिक योग्यता आहे. फ्रांड्रिच गुंडोल्फच्या काव्यांत विशेषतः 'प्रोझैशे स्क्रिफ्टन' या काव्यांत, शब्दलालित्य व मधुर कल्पनांचा संयोग दिसून येतो. रैनर मरिया रिल्केच्या काव्यांत जागजागीं तात्विक कल्पना सुंदर विचारांनीं व गोड भाषेंत मांडलेल्या आढळतात. या बाबतींत त्याचें अनुकरण करणारा कोणीहि कवि झालेला नाहीं. नाहीं म्हणावयाला जॉर्ज ट्रॅकल या कवीच्या काव्यांत मात्र रिल्केचे गुण थोड्याफार अंशानें आढळून येतात. एल्स लास्कर शूलर या कवयित्रीच्या काव्यांत शृंगारिक तऱ्हेनें गूढ तत्वांचें विवरण केलेलें आढळतें. प्रिन्सेस लिचनौस्कीच्या काव्यांत धार्मिक कल्पना आढळतात; तसेंच हिच्या काव्यांत शब्दांची जुळणी मार्मिक तऱ्हेनें केलेली दिसते. आल्फ्रेड मोबर्ट हा कवि ध्येयप्रवण आहे. त्याच्या काव्यांत व्यावहारिक सत्यतेपेक्षां उच्च कल्पनांचे तरंगच आढळून येतात.

रिचर्ड डेहमेलच्या काव्यांत, भविष्यकालीन नीतीची काय कल्पना असावी याबद्दलचे विचार जागोजाग ग्रथित

झालेले आहेत. डेहमेल्नें भावगीतें अशीं फार थोडीं लिहिलीं आहेत. त्याच्या इतर काव्यामुळेंच तो अधिक प्रसिद्धीस आला आहे. याच्या काव्यांत भारदस्तपणा व तेजस्वी विचार आढळून येतात. फ्रांझ वर्फेलच्या काव्यांत सामाजिक व्यंगाचें निदर्शन केलेलें दिसतें. दुःखें सहन करण्यांतच आत्मोद्धाराचें बीज आहे अशी त्याची शिकवण आहे. विरोधी प्रेमाचें चित्र रंगविण्यांत याचा हातखंडा आहे. याच्या कवितेंत प्रसाद भरलेला आहे. डेहमेलच्या काव्याशीं ज्यांच्या काव्याचें साम्य आहे असे जे पुष्कळ कवी आहेत, त्यांमध्यें हीम, हीनेक, ऊल्फेन्स्टीन व पाल झेक हे प्रमुख होत. यांच्या कवितेंत सामाजिक गाऱ्हाणीं चव्हाट्यावर मांडलेलीं असून समाजात जे दोष आहेत त्यांच्यावर झणझणीत टीका केलेली आढळते. अर्न्स्ट सॅडलरची कविता जोरदार आहे. 'डर अनब्रुच' या त्याच्या काव्यसंग्रहांत मार्मिक शब्दरचना व गंभीर विचार यांचा मिलाफ झालेला दिसतो. डॉथेंडी याच्या काव्यांत निसर्गाची हृदयंगम वर्णनें व अद्भुत विचार आढळतात. ओस्कार लार्के याची कविता उत्तान आहे. त्यांत परिपक्व विचारांचा मागमूसहि नाहीं. एर्न्स्ट लिसौएर हा भावनाप्रधान कवि आहे. त्याची 'हसगेसंग ऑफ इंग्लंड' 'डर इन्विडंगेवेग' हीं काव्यें स्फूर्तिदायक व ओजस्वी विचारांनीं युक्त आहेत. महायुद्धानंतरचें काव्यवाङ्मय पुष्कळच आहे व तें वर्तमानपत्रांतून व मासिकांमधून विखुरलेलें आहे. या काव्यभांडारांतील कांहीं कविता एकत्रित करून त्या 'अर्विटरडिची टंग' या नांवाखालीं छापलेल्या आहेत.

नाटकें:—जर्मनीमध्यें नाटकें म्हणजे केवळ मनोरंजन करणाऱ्या अनेक साधनांपैकीं एक साधन अशा प्रकारची जर्मन लोकांची दृष्टि नाहीं. रंगभूमी ही लोकशिक्षणाचें एक प्रमुख अंग असून, तद्द्वारा मानवी संसारांतील अनेक व्यक्तींच्या स्वभावाचें चित्र लोकांच्या डोळ्यासमोर मांडणें, हें रंगभूमीचें खरें काम आहे अशी त्यांची कल्पना आहे. 'संसारालेख्य भाण्डार' हें वर्णन जर्मन रंगभूमीला पूर्णपणें शोभेल. जर्मन लोकांनीं निरनिराळ्या क्षेत्रांत जे नानाप्रकारचे शोध लावले त्यांची माहिति रंगभूमीच्या द्वारां जनतेला मिळण्याची व्यवस्था जर्मन रंगभूमीकडून केली जाते. आधिभौतिकवादापासून आध्यात्मिक कल्पनांकडे ज[illegible] लोकांचें स.१९१० पासून लक्ष्य जाऊं लागलें. त्याची छटा जर्मन नाटकांतहि दृग्गोचर होते. ऑटो ब्रह्म, मॅक्स, रीन हार्ट, लीओपॉल्ड फेस्नर इत्यादि जर्मन रंगभूमीच्या मालकांनीं चांगलीं नाटकें जनतेसमोर आणण्याच्या कामीं प्रशंसनीय कामगिरी बजाविली आहे. सन १९१०–१९२१ च्या दरम्यान, जर्मन नाटककार जरहार्ट हॉप्टमॅन याचीं नाटकें फारच लोकप्रिय झालीं. हा नाटककार अद्भुतरम्य नाटकें लिहिण्यांत फार तरबेज होता. त्याचा भाऊ कार्ल हाहि जरहार्टइतका नाहीं तरी त्याच्या खालोखाल उत्कृष्ट प्रकारचा नाटककार होता. हरमन सुडरमन यास हॉप्टमनच्या तोडीचा नाटककार कांहींजण मानतात; पण एकंदरीनें पहातां हाप्टमनच्या पंक्तीला त्याला नेऊन बसवितां येत नाहीं.

हॉप्टमननंतर मॅक्स हॅल्बे, जॉर्ज हर्शफील्ड, एरिच हार्टलेबेन, लुडविग थोमा, जोसेफ ऱ्युडरर, हे चांगले नाटककार होते. पण यांच्या नाटकांत आधिभौतिक कल्पनांचाच सुळसुळाट असल्यानें यांचीं नाटकें व्हावीं तशीं लोकप्रिय झालीं नाहींत. थोमाच्या नाटकांत, चर्च व राजकारण यावर झणझणीत टीका केलेली आढळते. त्याच्या मागून हीनरिक लौटेनसक यानेंहि धर्मोपदेशकांच्यावर नाटकांच्या द्वारें सणसणीत टीका कर यास सुरुवात केली. हरमन एसिंग हा काल्पनिक कथानकें लिहून त्यांत व्यावहारिक गोष्टींचा उल्लेख करण्यांत कुशल असे. याच्या नाटकांत जर्मन पौराणिक कथा व बायबल यांचा उपयोग वारंवार केलेला आढळतो. विल्हेल्म शामिट यानें बायबलमधील 'उधळ्या मुलगा' या गोष्टीवर व 'ग्रफ व्हॉन ग्लेशेन' या पौराणिक कथेवर नाटकें रचिलीं व तीं फारच लोकप्रिय झालीं.

याशिवाय हॉफमन स्थाल, हॉफमन बिल्डगन्स, व्होलमुल्लर, एडवर्ड स्टकेन, अर्न्स्ट हार्ड हरमन बर्ट, एबरहार्ड कोनिग, कर्ट न्यूके हर्बेर्ट यूलेनबर्ग इत्यादि नाटककार या काळांत जर्मनींत उदयास आले. पण या सर्वांपेक्षां अधिक लोकप्रियता मिळविणारा नाटककार म्हणजे फ्रँक वेडेकिंड हा होय वेडेकिंड याच्या नाटकांत समाजांतील व्यक्ती कामुकतेच्या आहारीं कशा पडतात यासंबंधींचें उत्कृष्ट विवेचन आढळतें. याचीं पात्रें व्यावहारिक नसून कल्पनासृष्टींत वावरणारीं असतात. नाटकाच्या द्वारें सामाजिक दोषांचें निर्भिडपणें विवरण करण्याच्या बाबतींत याचा हातखंडा आहे. फ्रुकालिंग्स एर्वाचेन, अर्डगिस्ट डाय बूचसे डर पॅडोरा, व फ्रान्सिस्का हीं त्याचीं तीन प्रसिद्ध नाटकें आहेत. याचा प्रतिस्पर्धी, कार्ल स्टर्नहिम हा असून त्यानें जर्मनींतील मध्यमवर्गांत जे दुर्गुण शिरले होते ते रंगभूमीवर कुशलतेनें मांडण्याची अप्रतिम कामगिरी बजाविली. याला जर्मन मोलियर असें नांव पडलें आहे. याची भाषा जोरदार असून त्यांत पाल्हाळिकपणा मुळींच नसतो. नाटकांतील पात्रांच्या तोंडीं उत्कृष्ट संवाद घालण्याच्या बाबतींत [illegible]या कोणीहि हात धरणारा नाहीं. याचीं मुख्य नाटकें म्हणजे, डाय होस, बर्गर शिपेल, डर स्नॉब हीं होत. याच्या नाटकांत हाणाहाणी व मारामारी इत्यादि प्रकार आढळून येतात.

पण परंपरागत आचारविचारांविरुद्ध, बंड करणारे प्रसिद्ध नाटककार म्हणजे, रीन हार्ट सोर्जे, वाल्टर हर्सेन क्लेव्हर, पॉल कॉनफिल्ट हे होत. सोर्जेचें बेटलर हें नाटक फार प्रसिद्ध आहे. हर्सेन क्लेव्हर व कॉनफिल यांचीं अनुक्रमें सॉन व वरफुअरंग हीं नाटकेंहि सुंदर आहेत. रीन हार्ट गोरिंग याचें शीशलाक्ट हें नाटकीहि अप्रतीम आहे. फ्रिट्स अनसह

यांचीं प्रिन्स लुइ फर्डिनंड व ईन गेशेलेक्ट, हीं प्रसिद्ध नाटकें असून त्यांत, मारामारी व दंगेधोपे यांचें चित्र दृष्टीस पडतें. जॉर्ज कैझर याच्या नाटकांनीं रंगभूमीला निराळेंच वळण लागलें म्हटलें तरी चालेल. याच्या नाटकांत कथानकांचा सहजविकास आढळून येत नाहीं. तरी पण जर्मन लोकांच्या वाढत्या आंकांक्षाचें, क्षणोक्षणीं बदलणाऱ्या कल्पनांचें चित्र याच्या नाटकांत पहावयास सांपडतें. त्याचा व्हॉन मोर्गेन बिस मिटरनॅक्ट या शोकपर्यवसायी नाटकांत कामानें वेड्या झालेल्या एका गुन्हेगाराचें चित्र रंगविलेलें आढळतें. तसेंच कोरले व गॅस या नाटकांत, जर्मनींतील व्यापारी-युगाचा शेवट लवकरच होणार या कल्पनेस मूर्त स्वरूप दिलेलें दिसतें.

कादंबरीः—कादंबरी लिहिण्याच्या बाबतींत जर्मनीमध्यें पुरुषांपेक्षां बायकांनींच पुढाकार घेतला आहे म्हटलें तरी चालेल. क्लॅरा व्हीबिग, हेलन बोहम्लु, इंडलमॅक्षेटी इत्यादि स्त्रियांनीं चांगल्या कादंबऱ्या लिहून कादंबरीवाङ्मयांत भर घातली. स. १९१० नंतरच्या काळांतहि कादंबरीवाङ्मयाच्या बाबतींत बरीच प्रगति झाली. जर्मनींत मोठमोठ्या शहरीं विद्वानांचे संघ असत; त्यांच्या कादंबऱ्यांमध्यें शहरांतील पात्रांचेंच वर्णन असे. यांच्याविरुद्ध खेड्यापाड्यांतील लोकांचा आयुष्यक्रम रंगविण्याचें काम गस्टाव फ्रेनसेन, टिप क्रोजर, हरमन लॉन्स इत्यादि कादंबरीलेखकांनीं केलें. फ्रेनसेन याच्या जॉर्ज उहूल या कादंबरींत एका शेतकऱ्याचें चरित्र आलें आहे. ऑर्थर श्निटझ्लर याच्या डर वेग इन्स फ्री या कादंबरींत ज्यू लोकांच्या निकृष्ट स्थितीचें वर्णन आलें आहे. कॅसेनोव्हसलेटझ्तेस ॲबेंटयूर या लोकप्रिय कादंबरींत जर्मनींतील खेड्यांमधील आयुष्यक्रमाचें वर्णन केलेलें आढळतें. एमिल स्ट्रास, हरमनहेस यांच्याहि कादंबऱ्या फार प्रसिद्ध आहेत. जेकबशॅफिनर याची ' कान्रड पिलेटर ' या प्रसिद्ध कादंबरींत विश्वप्रेमाचें चित्र दिसून येतें. आल्बर्ट, स्टेफेन यांच्या कादंबऱ्यांत तात्त्विक चर्चा आढळून येते. त्याच्या ' बेस्टिमंग डर रोहीट ' या कादंबरींत एका जर्मन साधूचें चरित्र ग्रथित केलें असून मनुष्यानें आत्मोन्नति करून आपल्या पापाचें क्षालन कसें करावें याचा मार्ग दाखविला आहे. हॉप्टमन याची एमॅन्यूअल क्विंट डर नर इन क्रिस्टो ही कादंबरी धर्मपर आहे. या कादंबरींत तत्कालिन धार्मिक परिस्थितीचें बहारीचें वर्णन केलेलें आढळून येतें. जेकब वाशरमन याच्या कादंबऱ्यांतहि धर्मप्रवणता दिसून येते. बर्नहार्ड केलरमन याच्या कादंबऱ्यांत जर्मन समाजाचें यथार्थ चित्र रेखाटलेलें आढळतें. गस्टेव मेरिक याच्या ' डर गोलेम ' व ' डास ग्रून जेसिइट ' या प्रसिद्ध कादंबऱ्यांत कल्पनांचें अवडंबर फार दिसून येतें. थॉमस मॅनच्या कादंबऱ्या लोकशिक्षणाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्याची कॉनिंचे होगिलहीट ही कादंबरी फार प्रसिद्ध आहे. या कादंबरींत एक दरिद्री झालेल्या जर्मन राजपुत्राच्या व एका अति श्रीमान अशा तरुणीच्या लग्नाची हकीकत आलेली आहे. डर टॉड इन व्हेनेडिग या त्याच्या अति प्रसिद्ध कादंबरींत प्रेमानें वेड्या झालेल्या एका तरुणाचें कथानक आहे. थॉमस मॅनचा भाऊ हीनरिच मॅन याच्या कादंबऱ्यांत दक्षिणयूरोपमधील, विशेषतः इटलीमधील समाजस्थितीचें मार्मिक वर्णन केलेलें आढळतें. आल्फ्रेड डॉवलिन याच्या वॅलेन्स्टीन कादंबरींत तीस वर्षांच्या युद्धाच्या वेळच्या परिस्थितीवरील कथाभाग आलेला आहे. एडवर्ड स्टयूकेन याच्या ' डायवीसेन गॉटर ' या कादंबरींत, फर्डिनंड कॉर्टेझ याच्या मेक्झिकोच्या दिग्विजयावर व त्या ठिकाणीं मेक्सिकोमधील संस्कृतीशीं स्पेनच्या संस्कृतीचा जो झगडा झाला त्यासंबंधीचें कथानक गोंवण्यांत आलें आहे. वल्डेमरच्या ' इंडीनफहर्ट ' व ' मेनशेन बेज ' या कादंबऱ्यांत प्रवासवर्णनें आढळून येतात. आल्फॉन्स पॅक्वेटच्या कादंबऱ्यांत पूर्वेकडील देशांचीं वर्णनें आढळतात. शीकल याच्या कादंबऱ्यांत विश्वबंधुत्वाच्या कल्पनेला प्राधान्य दिलेलें आढळतें.

[ जर्मनवाङ्मयावर जर्मन ग्रंथ बरेच आहेत. कांहीं उपयुक्त इंग्रजी संदर्भ ग्रंथ पुढील होत. मॅक्स मुल्लर-दि जर्मन क्लासिक्स ऑफ दि फोर्थ टु दि नाइन्टीन्थ सेंचरी; कुनोफ्रॅके-जर्मन लिटरेचर अॅज डिटर्मिंड बाय सोशल फोर्सेस; हरफोर्ड-—स्टडीज इन दि लिटररी रिलेशन ऑफ इंग्लंड अँड जर्मनी इन् दि सिक्स्टीन्थ सेंचरी; नोलेन-ए क्रॉनॉलॉजी अँड प्रॅक्टिकल बिब्लिओग्रॉफी ऑफ मॉडर्न जर्मन लिटरेचर ( १९०३ ) ब्रिटानिका. ].

इ ति हा स, पूर्वेतिहासः—इसवी सनापूर्वी ५९ व्या वर्षी ज्युलिअस सीझर यास गॉल प्रांताचा गव्हर्नर नेमिलें. तेव्हांपासून आपणांस जर्मनींनी माहिती मिळूं शकते. यापूर्वीहि जर्मनांचा आणि दक्षिणेंतील सुधारलेल्या राष्ट्रांचा संबंध असल्याचा पुरावा आढळतो. त्यानंतर रोमचा राजा नीरो ह्यानें इ. स. पूर्वी १२ व्या वर्षी नेदरलंड्सपर्यंत मुलुख रोमच्या साम्राज्यांत आणला व पुढें इ. स. ५व्या वर्षी टायबेरिअस नांवाच्या रोमन सरदारानें हा सर्व प्रदेश पादाक्रांत केला व तेथें शांतता राखण्याकरितां कांहीं फौज ठेविली. पुढें फ्रेबिअन घराण्यांतील राजांनीं रोमचें राज्य वाढवून ऱ्हाईनच्या पलीकडील मुलुख आपल्या ताब्यांत घेतला.

ह्या वेळीं जर्मनीच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या नांवाचे लोक लहान लहान टोळ्या करून रहात असत. पुढें इ. स. १६६-१८० च्या दरम्यान स्वेविक आणि व्हँडॉल नांवाच्या टोळ्यांशीं रोमन लोकांचें मोठें युद्ध झालें व अखेरीस पुष्कळ खंडणी घेऊन कामोडिअस राजानें इ. स. १८० या वर्षी तह केला. इ. स. च्या ४ थ्या शतकांत जर्मनीचा पूर्वेकडील भाग हूण लोकांनीं काबीज केला. स. ४५३ या वर्षी अटिला राजा मरण पावला व हुण लोकांची सत्ता लयास गेली. सहाव्या शतकांत फ्रँक्, सॅक्सन, अलेमानी वगैरे पुष्कळ निरनिराळे लोक उदयास आले. ह्या शतकाच्या अखे-

रीस एल्ब नदीच्या आसपासच्यां सर्व मुलखावर स्लाव लोकांनीं आपली सत्ता स्थापन केली. इ. स.७७२-७७३च्या सुमारास सॅक्सन् लोकांचा पूर्ण नाश करून शार्लेमेन ह्यानें हालंडपर्यंत आपलें राज्य स्थापिलें व जर्मनीपैकीं ट्यूटन लोकांच्यां सर्व प्रदेशावर आपला अंमल बसविला.

मध्यकालीन व अर्वाचीन इतिहासः—जर्मन ख्रिस्तीधर्माचा प्रसार मुख्यतः हेरिस्टल चापेपिन, त्याचा मुलगा व नातु याचे वेळीं झाला. शार्लेमेन राजाच्या कारकीर्दीत ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. सॅक्सन लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यावर बहुतेक सर्व जर्मनींत ह्या धर्माचा प्रसार झाला. इ. स. ८४३ त व्हर्डूनच्या तहानें पूर्व फ्रँकिआ (ह्यालाच जर्मनी असें म्हणतात) हें इतर देशाहून भिन्न असें स्वतंत्र राज्य झालें. पुढें राज्यासंबंधीं अनेक तंटे उपस्थित होऊन इ. स. ८८२ या वर्षी शार्लेमेनच्या वेळचें सर्व राज्य चार्लस ("लठ्ठ") च्या ताब्यांत आलें. ह्याचा मुलगा लुई (दि चाईल्ड— "पोर") हा राज्यावर आल्यावर मग्यार नांवाच्या व इतर लोकांनीं राज्यावर चढाई केली व ह्या वेळीं उमरावशाहीचा प्रसार झाला. इ. स. ९११ या वर्षी लुई मेल्यानंतर इ. स. ९१९ मध्यें पहिला हेनरी ("फाऊलर") हा राजा झाला. ह्यानें इ. स. ९२४ या वर्षी मग्यार लोकांचा मोड करून त्यांस हांकून दिलें. ह्यानें सर्व राज्यांत शांतता स्थापन करून पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी घडवून आणल्या. इ स. ९३३ या वर्षी मग्यार लोकांनीं फिरून हल्ला केला, परंतु त्यांचा पूर्ण पराभव झाला. हेनरी इ. स. ९३६ त मरण पावला व त्याच्या मागून त्याचा मुलगा (दि ग्रेट-"महापराक्रमी") हा राज्यावर बसला. ह्यानें आपल्या बापाची राज्य चालविण्याची पद्धत बदलली व ह्यामुळें पुष्कळ सरदारांनीं बंड केलें. परंतु शेवटीं ओटोचाच विजय झाला. व पुढें इ. स. ९६१ मध्यें इटली देशांत जाऊन तेथील धर्मगुरूच्या हस्तें ह्यानें साम्राज्यमुकुट धारण केला व अशा रीतीनें "पवित्र रूमी साम्राज्य" स्थापन झालें. ह्याच्या नंतर दुसरा व तिसरा ओटो, दुसरा हेनरी व दुसरा कॉनरड असे राजे झाले व इ. स. १०३९ त तिसरा हेनरी राज्यावर बसला. ह्याच्या राज्याच्या अखेरीस जर्मनीची स्थिती पुष्कळ डळमळीत झाली. इ. स. १०७६ या वर्षी धर्मगुरूचें व ह्याचें भांडण होऊन त्यानें राजावर बहिष्कार घातला. कोणत्याहि धर्मगुरूनें ह्यापूर्वी इतकी अनन्वित सत्ता गाजविली नव्हती.

पुढें सन ११२२ त ह्या तंटयाचा शेवट झाला. इ. स. ११५२ त फ्रेडरिक नांवाचा मोठा राजा गादीवर बसला. ह्यानें पुष्कळ लढाया मारून राज्यांत शांतता स्थापन केली व इ. स. ११८९ मध्यें धर्मयुद्धावर गेला. पुढें हेनरी (सहावा) व ओटो (चवथा) हे राजे झाल्यावर दुसरा फ्रेडरिक राज्यावर आला. हाहि प्रसिद्ध राजा होऊन गेला.

एकंदरींत होहेन स्टॉफिन् घराण्यांतलि राजांचा काळ ऐतिहासिकदृष्ट्या सर्व बाजूंनीं महत्वाचा होऊन गेला. ह्या काळांत प्रसिद्ध व्यक्ती पुढें आल्या; मोठमोठ्या कल्पनांचा विस्तार झाला व शिल्पशास्त्र, कला, वाङ्मय इत्यादिकांची वाढ झाली. तथापि ह्याच सुमारास राजकीय सत्ता बरीच दुर्बळ झाली. चवथ्या कान्रॅडपासून तों स.१२७४ पर्यंत जो काळ गेला त्यास "दि ग्रेट इन्टररेग्नम" असें म्हणतात. ह्या काळांतील राजांनीं पुष्कळ मुलूख काबीज करून आपली सत्ता वाढविली. ह्या वेळेपावेतों राज्य वंशपरंपरा चालत असे परंतु ह्यापुढें राजा निवडून देण्याची पद्धत सुरू झाली. ह्या काळांत मोठमोठीं शहरें अस्तित्वांत आलीं.

इ. स. १२७३ मध्यें स्पेनिअन लोकांपैकीं हॅब्सबर्गचा सरदार रूडॉल्फ ह्यास राजा निवडलें. ह्यानें जर्मनींतील बोहेमियाचा राजा दुसरा ऑटाकार ह्याच्याशीं लढाई करून त्यास जिंकलें. हा हॅब्सबर्ग घराण्याचा मूळपुरुष होय. मध्यंतरीं रूडॉल्फच्यानंतर ॲडॉल्फ हा राजा झाला. पण रूडॉल्फचा मुलगा आलबर्ट ह्यानें आणखी कांहीं सरदारांच्या मदतीनें इ. स. १२९८ त ह्याला गादीवरून काढून टाकिलें व स्वतः राजा झाला. हा इ. स. १३०८ त मारला गेला व त्याच्यानंतर सातवा हेन्‍री व बव्हेरिआचा लुई व ऑस्ट्रेलिआचा फ्रेडरिक् हे राजे झाले. फ्रेडरिक् व लुई ह्या दोघांस निरनिराळया दोन पक्ष्यांनीं निवडल्यामुळें ह्यांचीं आपसांत लढाई होऊन इ. स. १३२२ त मुह्लडॉर्फच्या लढाईंत फ्रेडरिकचा पराभव झाला व राज्यसत्ता लुईच्या हातीं आली. ह्याचें व धर्मगुरूचें भांडण झालें व ह्यानें धर्मगुरू जॉन् यास पदच्युत केलें. ह्याचें राज्य एका दृष्टीनें फार महत्त्वाचें होतें. ह्याच्या वेळीं धर्मगुरूंच्या राजकीय चळवळीला चांगलाच धक्का बसला. ह्याच्या नंतर चवथा चार्लस् राजा झाला. ह्यानें गोल्डन बुल् नावांच्या जाहिरनाम्यानें राजाच्या निवडणुकीच्या बाबतींत मोठाच फरक घडवून आणला. ह्याच्या नंतर ह्याचा मुलगा वेन्सेस्लॉस् हा राजा झाला. ह्याच्या अमलांत जर्मनींत यादवी सुरू झाली व इ. स. १४०० त तिसरा रूपर्ट हा राजा झाला. ह्याच्या नंतर सिजिमंड, तिसरा आलबर्ट वगैरे राजे होऊन इ. स. १४५२ मध्यें तिसरा फ्रेडरिक् यास रोमशहरीं राज्याभिषेक झाला. याची कारकीर्द ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाची होती. ह्याच्या वेळीं आपआपसांत तंटे उपस्थित होऊन मध्यवर्ती सत्तेचा न्हास झाला. शेवटीं ह्यानें राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें व ह्याचा मुलगा मॅक्झीमिलिअन् हा इ. स. १४८६ त राजा झाला. ह्याचें राज्य ऑस्ट्रिया नेदरलंड्स वगैरे प्रदेशांवर असून मोठें विस्तृत होतें. इ. स. १४९४ त फ्रान्सच्या आठव्या चार्लस् राजानें इटालीवर स्वारी केल्यामुळें मॅक्झीमिलिअनचा तिकडे वळण्याचा विचार होता. परंतु पैशाच्या अडचणींमुळें त्याला तसें करतां येईना. ह्या वेळीं जर्मनींतील कायदे करणाऱ्या मंडळांनीं राजकीय सुधारणांची मागणी केली व वर्म्स येथें मोठी

परिषद् भरून त्या ठिकाणीं कांहीं सुधारणा अमलांत आणण्याचें ठरलें. अशा रीतीनें मॅक्झीमिलिअनची कारकीर्द फार महत्त्वाची झाली. मध्यकालीन राजांपैकीं हा शेवटचा राजा होय. ह्या वेळीं उमरावशाही बहुतेक नाहींशीं झाली. लोकांचीं मनें निरर्थक दण्डेलीपासून व आपआपसांतील तंटयापासून परावृत्त होऊन उद्योगधंद्याकडे लोकांचें लक्ष्य लागत चाललें. ह्याच राजाच्या कारकीर्दींत प्रसिद्ध 'धार्मिक सुधारणा' ज्यास 'रेफॉर्मेशन' म्हणतात त्या घडून आल्या. ह्या धार्मिक सुधारणांचा आद्यप्रवर्तक लूथर हा होय. ह्यानें इ. स. १५१७ त धर्मगुरूंच्या पवित्र नांवाखालीं कसकशा गर्हणीय गोष्टी घडत असत त्या सर्व लोकांच्या नजरेस आणून दिल्या. लूथरसारखा जबरदस्त प्रतिस्पर्धी असल्यामुळें धर्मगुरूंच्या विरुद्ध ही चळवळ फारच लवकर फैलावली. इ. स. १५१९ त मॅक्झिमिलिअन् गेल्यानंतर त्याचा नातू चार्लस हा इ. स. १५२० त राजा झाला. ह्यानें इ. स. १५२१ त वर्म्स येथील परिषदेंत लूथर आणि त्याचे धार्मिक अनुयायी ह्यांच्याविरुद्ध जाहीर चळवळ सुरू केली; इ. स. १५२३ त हटन आणि सिकिंन्जेन ह्या दोन नवीन धर्मप्रवर्तकांचा पराभव केला. तथापि सुधारणेच्या ह्या नवीन प्रवृत्तीला आळा बसला नाहीं. इ. स. १५२६ त स्पायर्स येथें सभा होऊन तींत धार्मिक सुधारकांची सरशी झाली. असें होतां होतां इ. स. १५२९ त सर्व चळवळी बंद करून पूर्वींच्या १५२६ सालीं केलेल्या सुधारणा रद्द केल्याबद्दल राजाचा हुकूम सुटला व ह्यामुळें लोकमत फार कलुषित झालें व लढालढीची पाळी आली. परंतु पुढें राजावर तुर्कांशीं अकस्मात् लढण्याचा प्रसंग आल्यामुळें सुधारकांनां बरीच सवलत मिळाली. पुढें स. १५४७ पर्यंत राजानें हळुहळु ह्या नवीन धर्माच्या प्रवर्तकांचा नायनाट केला व धार्मिक चळवळी बंद करून सर्व राज्य आपल्या छत्राखालीं आणिलें. ह्याच्या मागून फर्डिनंड व दुसरा मॅक्झिमिलिअन हे राजे झाले. ह्यानंतर दुसरा रूडॉल्फ व दुसरा फर्डिनंड यांच्या कारकीर्दींत नवीन धर्माच्या लोकांनीं अनेक चळवळी केल्या व त्या पुष्कळ अंशीं यशस्वी झाल्या. पुढें युरोपखंडांत 'तीस वर्षांचें युद्ध' झालें ह्या युद्धाचा शेवट इ. स. १६४८ त वेस्ट फॅलिआच्या तहानें झाला. ह्या युद्धानें एवढें झालें कीं, कोणत्याहि धार्मिक मताच्या लोकांनीं इतर मताच्या लोकांचा छळ करणें इष्ट नाहीं असें तत्त्व लोकांच्या मनावर ठसलें हाच काय तो फायदा धार्मिक सुधारकांच्या—प्रॉटेस्टंट लोकांच्या—पथ्यावर पडला. ह्या युद्धांत संयुक्त प्रांत आणि स्वित्झरलंड हीं स्वतंत्र झाल्यामुळें जर्मनीच्या राज्याची मर्यादा आकुंचित झाली. निरनिराळीं संस्थानें एकमेकांपासून अलिप्त राहूं लागलीं व मध्यवर्ती राजसत्तेचीं बंधनें शिथिल होऊं लागलीं. रोमन कॅथोलिक किंवा प्रॉटेस्टंट ह्यांपैकीं कोणत्याहि एका पक्षास अनुकूल असें राजास रहातां येईना. तथापि राजे बहुतेक रोमन कॅथोलिक लोकांसच अनुकूल असत. राज्यकारभार चालविणाऱ्या मंत्रिमंडळांतहि असेच दोन पक्ष दिसूं लागले. ह्याप्रमाणें तीस वर्षांच्या युद्धाच्या पूर्वीपासूनच जर्मनीचें राष्ट्रीय स्वरूप जाऊन जर्मनी म्हणजे लहान लहान स्वतंत्र संस्थानांचा व शहरांचा संघ बनला व हळुहळु हीं संस्थानें फारच स्वतंत्र झालीं. राजाची सत्ता म्हणजे राज्यकर्त्या परिषदेची सत्ता एवढेंच राजाचें महत्व राहिलें. तीस वर्षांच्या युद्धामुळें लोकसंख्याहि फारच कमी झाली व लोकांत जोम राहिला नाहीं. निरनिराळ्या संस्थानांचे मांडलिकहि आळशी, चैनी व निरुत्साही बनले. ह्यानंतर तिसरा फर्डिनंड हा राजा झाला व त्याच्या मागून पहिला लिओपोल्ड हा गादीवर आला. हा राजा दुर्बल होता. जर्मनीच्या अशा स्थितीचा फायदा करून घेण्याची संधी फ्रान्स पहातच होतें. सुमारें स. १६७८ च्या सुमारास फ्रान्सचा राजा चवदावा लुई ह्यानें जर्मन सरहद्दीवर लुटालूट करण्यास आरंभ केला. व इ. स. १६८९ त कांहीं क्षुल्लक कारणावरून मोठया सैन्यानिशीं स्वारी केली. परंतु ह्या लढाईंत लुई राजास कांहीं फायदा झाला नाहीं.

ह्यानंतर पुढें स्पेनच्या सिंहासनाच्या वारसासंबंधीं युद्ध झालें. ही लढाई पहिला जोसेफ व सहावा चार्लस ह्यांच्या कारकीर्दींत झाली. ब्लेनहीम, रॅमिलीज, मालप्लाकेट वगैरे लढायांत फ्रान्सला बराच धक्का बसला. तथापि सहावा चार्लस ह्यास जर्मन प्रांताचें कांहींच महत्त्व वाटत नसल्यामुळें फ्रान्सला जर्मन हद्दींतील एक प्रसिद्ध किल्ला व कांहीं जर्मन मुलुख मिळाला. ह्याच सुमारास प्रशिया हळुहळु डोकें वर काढूं लागला. फ्रेडरिक विल्यम दि ग्रेट इलेक्टर व इ. स. १७४० नंतर दुसरा फ्रेडरिक यांच्या अमलांत ह्या प्रांतांनां उर्जितावस्था प्राप्त झाली. फ्रेडरिक (दुसरा) ह्यास मरीया थेरीसाकडून सायलेशिआ प्रांत मिळाला. पुढें इ. स. १७५६ ते १७६३ पर्यंत 'सप्तवार्षिक युद्ध' झालें व शेवटीं प्राशिया व सायलेशिआ हीं एकत्रच राहिलीं, व प्रशिया हे युरोपांतील एक प्रमुख राष्ट्र बनलें. ह्यानंतर फ्रान्स देशांतील राज्यक्रांतीच्या वेळीं जर्मनीला फारच उपसर्ग पोंचला. प्रशिया व ऑस्ट्रिया ह्यामध्यें आपापसांत बेबनाव झाला व ऑस्ट्रियाला हार खावी लागून फ्रान्सशीं तह करावा लागला. दक्षिणेंतील व मध्यवर्ती संस्थानांनीं भरविलेल्या ऱ्हाईनच्या इ. स. १८०६ च्या परिषदेंत जर्मन सत्तेचा पूर्ण नायनाट झाला व ऑस्ट्रियाचा पहिला फ्रान्सिस ह्यानें आपलें राज्य सोडून दिल्यामुळें प्रसिद्ध पवित्र रोमन साम्राज्याचा अंत झाला. इ. स. १८०६ व १८०७ त येना व फ्रीडलंड येथें फ्रेडरिक दि ग्रेट ह्याच्या प्रशियन सेनेचा नेपोलियननें पाडाव केला व जर्मनी नेपोलिअनच्या हस्तगत झाला. तथापि जर्मनीचा असा पाडाव झाल्यावरहि त्याला पुनः पूर्ववत् होण्यास फार अवकाश लागला नाहीं. ऑस्ट्रियांत मेटरनिकसारखे व प्रशियांत स्टेनसारखे कर्ते पुरुष पुढें आले व इ. स. १८१३ सालीं लिपझिकच्या लढाईंत फ्रेंच लोकांनां चांगलाच मार मिळाला. इ. स. १८१५ त

मेटरनिक याच्या अध्यक्षतेखालीं व्हिएन्ना येथें एक राष्ट्र-परिषद भरली व तींत जर्मनीतील संस्थानांचा एक संघ तयार झाला. या संघाचें कार्यकारी मंडळहि स्थापन झालें तथापि ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्यामधील तंटा मिटला नाहीं. इ. स. १८२० त व्हिएन्ना येथें झालेल्या सार्वराष्ट्रीय करारनाम्यांत थोडेबहुत फेरफार करण्यांत आले व प्रशियाचा विकास होऊं लागला आणि व्हिएन्ना राजधानीपेक्षां बर्लिन राजधानीचेंच महत्त्व वाढत चाललें.

इ. स. १८४० मध्यें फ्रेडरिक वुइल्यम चवथा हा राज्यावर आला. हा फार बुद्धिमान असून याचीं मतें उदारमतवादी लोकांनां अनुकूल होतीं. याच्या वेळीं जर्मनींत बंड झालें. व पुढें जर्मनींतील राष्ट्रीय धोरणाचें एकीकरण करण्याकरितां फ्रांकफोर्ट येथें एक मोठी परिषद भरली. या परिषदेंत सर्व पक्षांचे प्रतिनिधि हजर होते. राष्ट्रीय तत्त्वावर मोठा वाद होऊन निरनिराळ्या पक्षांचे लोक हातघाईवर आले व भररस्त्यांत रक्तपात होईपर्यंत मजल गेली. पुढें आस्ट्रिया–हंगेरी, बोहेमिया व इटलींतील संस्थानें यांतील लोकांनीं बंड केलें. फर्डिनंड राजानें राजीनामा दिला. प्रशियांतहि सुधारणाविषयक चळवळी चालूच होत्या. आस्ट्रिया व प्रशिया यांच्या श्रेष्ठत्वासंबंधीं बराच खल झाला व शेवटीं कांहीं अटी ठरविण्यांत आल्यावर चवथा फ्रेडरिक वुइल्यम हा राजा व्हावा असें ठरविण्यांत आलें पण त्यानें तें नाकबूल केलें व सॅक्सनी व हॅनोव्हर येथील राजांच्या मदतीनें 'युनियन' नांवाची राजकीय संस्था स्थापली. या सर्व गोष्टींचा परिणाम एवढाच झाला कीं सार्वराष्ट्रीय दुही जास्तच माजली. जर्मनीच्या संपूर्ण इतिहासांत या काळाइतक्या हीन अवस्थेंत जर्मनी कधींच नव्हता इ. स. १८४८ त उदारमतवादी मंत्रिमंडळ कामावरून दूर करण्यांत आलें. अधिकारी वर्गावर व ज्या लोकांवर सरकारची इतराजी झाली होती अशा लोकांस कडक शिक्षा ठोठावण्यांत आल्या व यामुळें लोक इतके जेरीस आले कीं शेंकडो लोकांनीं देशत्याग करण्यास सुरुवात केली. यानंतर पुढें क्रिमियाचें युद्ध झालें. तथापि राष्ट्रीय चळवळी जोरानें चालूच होत्या. जर्मन लोक दुर्बल झाले. पुढें स. १८५७ च्या सुमारास स्वित्झर्लंडांतील लोकांशीं दोन हात होण्याची पाळी आली होती पण फ्रेडरिक राजानें तह करून त्या संस्थानावरचा आपला सर्व हक्क सोडून दिला.

इ. स. १८५८ त प्रशियाचा राजा विल्यम याच्या हातांत राज्यसूत्रें आलीं. याचीं मतें उदारमतवाद्यांनां अगदीं प्रतिकूल होतीं. ओटो व्हॉन बिस्मार्क याचें वुइल्यमशीं सख्य असल्यामुळें अर्थात त्याची सल्लामसलत यास पटली. स. १८६१च्या जानेवारी महिन्यांत फ्रेडरिक राजा मरण पावला व पुढच्याच आगस्ट महिन्यांत राज्यसूत्रें बिस्मार्कच्या हातांत पडलीं. अशा वेळीं बिस्मार्कसारख्या माणसाची निवडणूक फार फायद्याची झाली. कारण त्यास जर्मनीच्या परिस्थितीची व वादग्रस्त राजकीय मुद्यांची पूर्ण माहिती होती. आस्ट्रियाचा फ्रान्सिस जोसेफ यानें वुइल्यम यांस सर्व संस्थानिकांच्या सल्ल्यानें राजकीय सुधारणा अमलांत आणण्याविषयीं विचारणा केली पण बिस्मार्कच्या सूचनेवरून वुइल्यमनें त्यास होकार दिला नाहीं, व पुढें भरलेल्या फ्रँकफोर्टच्या परिषदेंत प्रशियाचा प्रतिनिधी मुळींच नव्हता.

इ. स. १८६४ त आस्ट्रिया व प्रशिया ह्यांनीं आपसांत तह करून दोन्हींहि राष्ट्रें स्वतंत्र असल्याचें जाहीर केलें. हा तह फक्त नांवापुरता होता. परंतु प्रसिद्ध लढाऊ बंदर "कील" ह्याच्यावर बिस्मार्कचा डोळा होता व हें बंदर ताब्यांत असल्यास जर्मनीला दर्यावर्दी राष्ट्र होण्यास अत्यंत उपयोगी पडेल हें तो जाणून होता. इ. स. १८६४ त बिस्मार्कनें युक्तिप्रयुक्ति करून इंग्लंडला लढण्यास उभें केलें व ऑस्ट्रिया आणि प्रशिया ह्यांचीं दोन्हीं सैन्यें मिळून डेन्स लोकांचा पराभव केला व त्याच वर्षी व्हिएन्ना येथें तह झाला. ह्यामुळें प्रशिया व आस्ट्रिया ह्यांनां दोघां मिळून श्लेसविग, हॉल्स्टेन् व लॉएन्बर्ग हीं मिळालीं. शिवाय इ. स. १८६२ मध्यें फ्रान्सशीं खुल्या व्यापाराच्या तत्त्वावर प्रशियानें तह करून घेतलाच होता. त्यामुळें प्रशियाचें महत्त्व बरेंच वाढलें. इ स. १८६५ च्या गेस्टिन् येथील परिषदेंत ठरल्याप्रमाणें श्लेस्विग् व लॉएन्बर्ग हीं प्रशियास मिळालीं. आस्ट्रिआ आणि प्रशिआ ह्यांचें आपापसांतील वैमनस्य तसेंच धुमसत होतें. मध्यंतरीं प्रशिआनें आपलें लष्कर शिक्षण देऊन तरबेज करून ठेविलें.

ऑस्ट्रियाच्या ताब्यांतील व्हेनेशिआ हें ठाणें इटलीस पाहिजे असल्यामुळें इटलीनें इ. स. १८६६ त प्रशियाशीं तह केला व प्रशिआनें इटलीची मदत घेऊन ऑस्ट्रियाशीं लढावें व जय झाल्यास व्हेनेशिआ हें ठाणें इटलीस द्यावें असें ठरलें. पुढें त्याच वर्षी प्रशियानें राजकीय संघांतून आपलें नांव काढून घेतलें. राजकीय हक्कासंबंधीं मतभेदावरून ऑस्ट्रियाशीं युद्ध पुकारलें व सात आठवडे लढाई होऊन कॉनिग्रेट्झ येथें आस्ट्रिआचा पूर्ण पराभव झाला. आणि प्रेग येथें तह होऊन युद्धसमाप्ति झाला. प्रशियांतील लोकांत राष्ट्रीय उदारमतवादी म्हणून एक पक्ष होता. त्याचें समाधान झालें नव्हतें. त्यामुळें बिस्मार्कच्या कृतीला त्याची पूर्ण सहानुभूती नव्हती. तथापि त्यानें आपापसांतील दुही माजूं न देतां मोठया शहाणपणानें आपला मार्ग काढला व हा तंटा मिटविला. प्रशियाचें असें प्रस्थ माजल्यानें फ्रान्सच्या पोटांत दुखूं लागलें. बिस्मार्कनें हें अगोदरच ओळखून ठेविलें होतें व तो फ्रान्सशीं युद्ध करण्याच्या तयारींतहि होता. प्रशियाच्या अरेरावीच्या वर्तनासंबंधीं फ्रान्सांतहि असंतोष उत्पन्न झाला होता. पुढें स्पेनच्या गादीचा वारस म्हणून होहेनझोलर्न घराण्यांतील पुरुष उभा राहिला हें फ्रान्सला खपलें नाहीं; व हेंच लढाईचें कारण झालें प्रशियाचा राजा हा हक्क सोडून देण्याचें कबूल करीना, त्यामुळें

पौंड युद्धांत जखमी झालेल्या शिपायांच्या व त्यांच्या मुलांबाळांच्या खाण्यापिण्याकरितां निराळे राखून ठेवण्यांत आले. जर्मन राष्ट्रीय फौज किंवा जर्मन युद्धखात्याचे प्रधान अशीं निराळीं नसूनहि व जर्मनीची फौज म्हणजे निरनिराळ्या संस्थानिकांची फौज असें असतांहि फौजेची इतकी सुव्यवस्था आहे ही एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. इतकी व्यवस्था झाली तरी उदारमतवादी व कॅथोलिक पक्षाचे लोक ह्यांच्यामधील तंटा मिटला नव्हता. ही दुही मिटविण्यासाठीं निरनिराळे कायदे करण्यांत आले व बिस्मार्क व पुराणमतवादी ह्यांचे वांकडें आलें. इ. स. १८७६ त त्यांचें पुन्हां एकमत झालें, तथापि ह्याचा परिणाम इतकाच झाला कीं, उदारमतवादी पक्षाशीं लढा उत्पन्न झाला. असें होतां होतां समाजसत्तावादीपक्षहि बळावत चालला व राजाचा खून करण्याचाहि प्रयत्न केला गेला. इ. स १८८१ मध्यें सोशालिस्ट पक्षाविरुद्ध नवीन कायदा करण्यांत येऊन त्यांची चळवळ बंद पाडण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु ह्याचा कांहीं विशेष फायदा झाला नाहीं. इ. स १८७८ च्या निवडणुकींत उदारमतवाद्यांचा पक्ष बराच खालावला व ह्या संधीचा फायदा घेऊन बिस्मार्कनें जमाबंदीविषयक सुधारणा अंमलांत आणल्या. व संरक्षित व्यापारपद्धति सुरू करून आयात मालावर कर बसविले. त्यामुळें राष्ट्राचें उत्पन्न सात हजार लक्ष पौंडांनीं वाढलें. ह्या नवीन व्यापारी धोरणामुळें व कॅथोलिक लोकांशीं ऐकमत्य झाल्यामुळें बिस्मार्कचें व राष्ट्रीय उदारमतवादी पक्षाचें बिनसलें व कार्यकारी सभेंत पुष्कळ घडामोडी झाल्या. सेसिसिओनिस्ट नांवाचा एक नवीन पक्ष उपस्थित झाला. अशा रीतीनें कार्यकारीसभेची स्थिति पुन्हां डळमळींत होऊन शेवटीं इ. स. १८९० त धार्मिक चळवळी बंद झाल्या. ह्याच सुमारास बिस्मार्कनें आपलें रेलवे कंपन्यांसंबंधींचें काम साधून घेतलें व इ. स. १८९६ पावेतों बहुतेक सर्व आगगाडीचे रस्ते व त्यांचा व्यवहार हे सरकारच्या ताब्यांत आले. ह्यानंतर लागलीच जलमार्गानें दळणवळण सुरू करण्याच्या सोईसाठीं कालवे काढण्यांत आले. सुप्रसिद्ध 'कील" कालवा १८९६ सालीं पूर्ण झाला.

ठिकठिकाणीं वसाहती करून जर्मन साम्राज्याची मर्यादा वाढविण्याच्या विचाराच्या बिस्मार्क हा विरुद्ध होता. परंतु पुढें कांहीं कारणांनीं त्याचा हा विचार बदलला. इ.स.१८८४ पासून आफ्रिकाखंडांत व दक्षिण समुद्राकडे जर्मनीच्या ठिकठिकाणीं वसाहती झाल्या. प्रथमतः वसाहतींच्या कोणत्याहि कारभारांत सरकारनें हात घालावयाचा नाहीं व त्यांनां लागेल ती सुधारणा तेथील व्यापारी मंडळींनींच करून घ्यावी असें बिस्मार्कचें धोरण होतें. एवढेंच नव्हे तर वसाहतींस ब्रिटिश वसाहतींप्रमाणें सनदा देऊन त्यांनां " चार्टर्ड कंपनी " चे हक्क द्यावे असें त्याचें मत होतें. तथापि असें होणें शक्य नव्हतें व हळुहळू न्यूगिनी येथील व आफ्रिकेंतील वसाहतींचें संरक्षण करण्याची जबाबदारी साम्राज्यावर पडूं लागली. आणि साम्राज्याकडे अशा रीतीनें वसाहतींची मालकी आल्यामुळें दुसऱ्या देशांतील वसाहतींशीं संबंध येऊन ठिकठिकाणीं तंटे उपस्थित झाले. व विशेषतः प्रथमच ब्रिटिश वसाहतवाल्यांशीं प्रसंग आला.

व्यापारी दृष्टीनें इंग्रज व जर्मन ह्यांच्या परस्पर विरोधी चळवळीमुळें आफ्रिकेंत पुष्कळ ठिकाणीं वाद उत्पन्न झाला. जर्मन वसाहतींच्या शेजारीं फ्रान्स व इंग्लंड ह्यांच्याहि वसाहती होऊं लागल्या व तिघांनीं मिळून एकमेकांच्या सल्ल्यानें आपापल्या मुलुखाची मर्यादा ठरवून टाकिली. इ. स. १८८६ त दक्षिणसमुद्रांतील व इ. स. १८९० त आफ्रिकेमधील वसाहतींची मर्यादा ठरविण्यांत आली. ह्या गोष्टी बिस्मार्कच्या गैरहजरींत झाल्यामुळें पूर्वआफ्रिकेंत जर्मन राष्ट्र प्रस्थापिण्याची त्याची महत्वाकांक्षा निष्फळ झाल्यासारखी झाली. पुष्कळ वसाहतवालेहि झाल्या गोष्टीच्या विरुद्ध होतेच. वसाहतीसंबंधीं झालेल्या ठरावांत जर्मनीला इंग्रजांकडून हेलिगोलंड हें बेट मिळालें.

पार्लमेंटांतील विरुद्ध पक्षाच्या लोकांनां प्रचलित सरकारच्या ह्या धोरणावर टीका करण्यास पुष्कळच जागा सांपडली. आफ्रिकेंतील मूळच्या रहिवाशांशीं मैत्री करून व्यापारविषयक धोरणानें आगगाड्या इत्यादिकांचा प्रसार करावयास लागणाऱ्या पैशाचा पुरवठा करण्यास प्रचलित सरकारनें कुरकुर केल्यामुळें तद्देशीय लोकांशीं वैर वाढलें व इ. स. १९०५-६ मध्यें बंड झालें व प्राणहानीहि पुष्कळ झाली. इंग्रज व बोअर लोकांच्या युद्धांत इंग्रजांनां बोअर लोकांचा पराभव करण्यास फारच प्रयास पडले असें जरी जर्मन लोकांस वाटत होतें तथापि दक्षिणेंतील लोकांशीं जर्मनांचा जेव्हां संबंध आला तेव्हां त्यांनांहि तोच अनुभव आला. इ. स. १८८५ त १५ वर्षेपर्यंत जहाजें बांधण्याच्या कामीं दरवर्षी ४० लक्ष मार्कस देण्यांत यावे असें ठरलें व उद्योगधंद्याची वाढ करण्याकरितां अनेक प्रयत्न करण्यांत आले. पूर्वेकडील राष्ट्रांशीं ( तुर्की व इराणी ) व्यापारी दळणवळण वाढवावें म्हणून विद्यार्थ्यांनां पौरस्त्य भाषांचा अभ्यास करण्याकरितां शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या.

कॅथोलिक लोकांनीं मजूरवर्गाच्या हिताकरितां सामाजिक चळवळ करून आजारीपणांत किंवा म्हातारपणांत ह्या लोकांच्या खाण्यापिण्याची व कपड्यालत्त्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी सरकारकडे असावी असा प्रश्न पुढें आणला व इ. स. १८७६ त अरफुर्ट येथें जंगी परिषद भरवून चळवळीचा प्रसार केला. पुढें यहुदी लोकांच्याविरुद्ध चळवळ सुरू झाली उदारमतवादी पक्षाचे पुष्कळ लोक, तसेच पुष्कळ सावकार व्यापारी हे यहुदी होते. इ. स. १८७९ ते१८८१ पर्यंत ही चळवळ बरीच बळावली. इ. स. १८८४ त मजूर लोकांनां अपघातानें इजा वगैरे झाल्यास त्यांच्या आयुष्याचा विमा उतरून ठेवण्यासंबंधीं

फ्रांकोजर्मनयुद्ध झालें व इ. स. १८७१ त प्रशियाचा विजय होऊन फ्रांकफूर्ट येथें तह झाला व प्रशियाचा पहिला विल्यम् हा जर्मनीचा बादशहा झाल्याचें जाहीर झालें.

ह्याप्रमाणें स. १८७१ हें वर्ष जर्मनीच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें आहे. ह्या वेळेपासूनच जर्मनीला राष्ट्राचें खरें स्वरूप आलें. ह्या वेळेपासून निरनिराळ्या संस्थानिकांचे आपापसांतील तंटे मिटून प्रशियाच्या एकछत्राखालीं सामोपचारानें सर्व संस्थानें राहूं लागल्यामुळें राष्ट्रशक्ति दृढावली. ह्या नवीन राज्यव्यवस्थेचा अनुचित परिणाम होईल असें जरी भय वाटत होतें,तथापि तसें न होतां पूर्वीची संस्थानें जशींच्या तशींच स्वायत्त राहून त्यांचे आपसांतील तंटे कायदेशीर रीतीनें व न्यायाला धरून मिटविण्यांत आले. परराष्ट्रीय मंत्रि व प्रधानमंडळाचा सभापति हीं दोन्हीं कामें बिस्मार्कच्या हातांत देण्यांत आलीं आणि हें काम त्याच्याकडे सतत वीस वर्षे राहिलें. शिवाय होहेनझोलर्न घराण्यांतील राजाच्या स्वाभाविक विशिष्ट गुणांमुळें व इतर राजघराण्यांशीं त्यांचा आप्तसंबंध असल्यानें ह्या घराण्यानें इतर राजेरजवाड्यांबरोबर आपलें नांव राखिलें.

पुढें मॅकलेनबुर्गच्या बाबतींत प्रश्न उपस्थित झाल्यामुळें बॉकिंग ह्यानें प्रत्येक संस्थानास स्वतंत्र पार्लमेंटसभा असावी अशी मध्यवर्ती परिषदेंत सूचना आणिली. उदारमतवादी लोकांनीं ह्या सूचनेस पुष्टी दिली. तथापि ही अमान्य झाल्यामुळें इ. स. १८९४ पासून ह्या पक्षाचें महत्व अगदींच नाहींसें झालें. ह्या वेळीं जर्मनींत पुराणमतवादी ( कॉन्झरव्हेटिव्ह ), ल्यूथरच्या मताचे, उमरावशाहींतील बडे सरदार, राजकीय उदारमतवादी व लोकपक्षीय वगैरे निरनिराळे राजकीय पक्ष अस्तित्वांत होते. शिवाय मध्यभागांत सेंटम नांवाचा पक्ष अस्तित्वांत होता. हे लोक कॅथोलिक धर्माचे होते. शिवाय प्रशियाच्या राज्यांत इतर कांहीं परकीय लोक होते त्यांच्या संबंधींच्या प्रश्नाचाहि निकाल लागला नव्हता. बिस्मार्क ह्याची पोलिश लोकांसंबंधीं सहानुभूती नव्हती. कॅथोलिक लोकांचा आधार असल्यामुळें पोलिश भाषेंतहि पुष्कळ सुधारणा झाली व त्यांची लोकसंख्याहि वाढत चालली. ह्या गोष्टीस आळा घालण्यासाठीं अनेक उपाय योजण्यांत आले. परंतु ते सर्व निष्फळ झाले. त्याचप्रमाणें दुसरा वर्ग डेन्स लोकांचा होता. ह्यांनांहि पोलिश लोकांप्रमाणें शक्य तितक्या रीतीनें जर्मन भाषेचा प्रसार करून शक्य तितके जर्मन बनविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. अल्सेस लोरेन प्रांतांतील लोकांसंबंधींहि तीच अडचण उपस्थित झाली. हा प्रश्न सामोपचारानें तुटेना असें पाहून इ. स. १८८८ त होहेनलो यानें कडक उपाय योजिले व इ. स. १८९० त र्‍हाईन नदीच्या तीरावर जर्मन वसाहती झाल्यामुळें जर्मन राष्ट्रीय मताचा बराच प्रसार झाला. अशा रीतीनें स. १९०७ पर्यंत जर्मनींतील परराष्ट्रीय लोकांचें वर्चस्व पुष्कळच कमी झालें.

सर्व जर्मनी एक छत्राखालीं आणण्याच्या इ. स. १८६६ व इ. स. १८७१ त सुरू केलेल्या प्रयत्नास इ. स. १८७८ पर्यंत बरेंच मूर्त स्वरूप आलें. व ह्या सर्व कामाचें श्रेय बिस्मार्क याच्या धूर्त मुत्सद्देगिरीसच आहे.

इ. स. १८७० पासून १८७८ पर्यंत बिस्मार्क ह्यानें राष्ट्रीय उदारमतवादी लोकांच्या मदतीनें पुष्कळशा उपयुक्त संस्था राष्ट्रांत उत्पन्न केल्या. ह्या सर्वांच्या मुळाशीं राष्ट्रीय सुधारणा हा मुख्य हेतु होता. त्यांतील पहिलें काम म्हणजे कायद्यांची सुधारणा होय. आजपर्यंत निरनिराळ्या संस्थानांतून चालणाऱ्या कायद्यांचें बीज म्हणजे रोमचा लष्करीबाबीखेरीज इतर बाबतींत लागू पडणारा सर्वसाधारणविषयक कायदा होय. पूर्वीपासून चालत आलेल्या कायद्याखेरीज प्रशियन कोड, ऑस्ट्रियन कोड व नेपोलियन कोड हे ऱ्हाईन नदीच्या डाव्या किनाऱ्यावरील सर्व मुलुखांत चालू लागले. निरनिराळ्या भागांत चालणाऱ्या निरनिराळ्या कायद्यांचें व कायदेकारी सभेनें केलेल्या कायद्यांचें संमिश्रण होऊं लागल्यामुळें एकच गोंधळ होऊं लागला. ह्यामुळें निरनिराळ्या प्रश्नांसंबंधीं कायदे एके ठिकाणीं ग्रथित केले गेले इ. स. १८६१ त व्यापारविषयक कायदा व इ. स. १८७१-७२ त दिवाणी व फौजदारी कायदा यांची व्यवस्थित रचना करण्यांत आली. इ. स. १९०० पर्यंत ह्यांत पुष्कळ सुधारणा झाली. व ह्या वर्षी झालेला कायदा तारीख एक जानेवारी १९०० पासून अमलांत आला.

तसेंच व्यापारविषयक बाबतींतहि सुधारणा करण्यांत आली. इ. स. १८६८ त एकाच तऱ्हेच्या वजनामापांचा सर्व राष्ट्रांत प्रसार झाला. राष्ट्रीय चलनी नोटांखेरीज बाकी सर्व नोटा बंद करण्यांत आल्या व इ. स. १८७३ त प्रशियन पेढी ही राष्ट्रीय पेढी झाली. इ. स. १८७५ त पेढ्यांचा कायदा तयार झाला व १९०६ मध्यें त्यांत सुधारणा करण्यांत आली. त्याचप्रमाणें हार व्हॉन स्टीफन ह्यानें डाकखातें निर्माण करून १८९७ पर्यंत स्वतःच त्या खात्याच्या मुख्याचें काम केलें.

सन १८७३ पर्यंत निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळ्या कंपन्यांच्या आगगाड्या चालत असून त्यांची व्यवस्था निरनिराळ्या लोकांच्या हातांत होती. ह्यामुळें व्यापारास फार अडथळा येऊं लागला. इ. स. १८७३ त एक कायदा करण्यांत आला व ह्या कायद्यामुळें साम्राज्यसरकारच्या नियंत्रणाखालीं सर्व आगगाड्यांच्या मंडळ्या कामें करूं लागल्या. ह्यांमुळें आगगाड्या, तारायंत्रें व डाकखातें ह्यांची सुव्यवस्था लागून व्यापार, फौजेची नेआण वगैरे व्यवहार चांगले चालू झाले. बिस्मार्कच्या मनांतून सर्व आगगाड्या सरकारच्या मालकीच्या असाव्यात असें होतें. पण लोक या मताविरुद्ध असल्यामुळें तसें घडून आलें नाहीं.

राष्ट्रसंरक्षणाकरितां तटबंदी वगैरे करून युद्धसामुग्रीकरितां पुष्कळ पैसा खर्च करण्यांत आला व दरवर्षी दहा लक्ष

ठराव झाला व इ स. १८८९ मध्यें मजूरवर्गाच्या वृद्धावस्थेंत त्यांच्या सोयीकरितां विमा उतरवून ठेवण्यासंबंधा कायदा झाला.

त्याच सुमारास बिस्मार्कनें ऑस्ट्रियाबरोबर सलोख्याचा तह करून रशियानें प्रशिया किंवा ऑस्ट्रिया यांपैकीं कोणावरहि चाल केल्यास एकमेकांनीं एकमेकांस मदत करावी असें ठरविलें.व पुढें इ. स. १८८३ त इटलीहि या तहांत सामील झाला. दिवसेंदिवस रशियाचें भय वाढत चालल्यामुळें जर्मनीनें आपली खडी फौज वाढवावी अशी सूचना करण्यांत आली. पण सरकारी पक्षानें ती हाणून पाडली. बिस्मार्कनें १८८४ सालीं रशियाशीं सलोख्याचा गुप्त तह केला, पण १८९० सालीं बिस्मार्क हा पदच्युत झाल्यामुळें या तहाचा फायदा झाला नाहीं

इ. स. १८८८ मध्यें विल्यम राजा मरण पावला व पुढें त्याचा मुलगा तिसरा फ्रेडरिक या नांवानें राज्यावर बसला. त्यानें ९९ दिवस राज्य केलें उदारमतवादी लोकांनां याचा पाठिंबा होता परंतु त्याचा कांहीं फायदा झाला नाहीं. त्याच्यानंतर दुसरा विल्यम गादीवर आला. त्यानें आपल्या आजाचा कित्ता गिरविण्याचा निश्चय केला. मजूरवर्गाच्या कामासंबंधीं पगारासंबंधीं वगैरे प्रश्नांचा विचार करून या वर्गाची स्थिति सुधारण्याकरितां एक राष्ट्रीय परिषद भरविण्याविषयीं सूचना केली. या बाबतींत राजाचें व बिस्मार्कचें भिन्न मत पडलें व इ. स. १८९० मध्यें राजानें बिस्मार्कला राजीनामा देण्याचा हुकूम केला. प्रथमतः राजाच्या कृतीविषयीं लोकांच्या मनांत दहशत बसली. परंतु हळूहळू तेव्हां राजाची राष्ट्रोन्नतीसंबंधांची काळजी व शांतता राखण्याविषयींचे प्रयत्न लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आले. तेव्हां त्यांचा ग्रह बदलला. मजूरवर्गाकरितां १८८८ सालीं कारखान्यासंबंधीचा कायदा करण्यांत आला व मुलांना व बायकांनां कारखान्यांतील कोणत्याहि कामास लाऊं नये आणि रविवारीं कारखाने बंद असावे अशा आशयाचे ठराव पास झाले. सोशॅलिस्टांविरुद्ध केलेला कायदा रद्द करण्यांत आला व त्यामुळें या पक्षाची उन्नति झाली स. १८९१ पासून १८९६ पर्यंत करासंबंधींचे कायदे, फौज वाढविण्यासंबंधीं कायदा असे अनेक कायदे करण्यांत आले. १८९२ सालीं ऑस्ट्रिया-हंगेरी, स्वित्झरलंड व बेलजम यांच्याबरोबर व्यापारी तह होऊन जर्मन कारखान्यांत तयार झालेला माल या देशांत खपूं लागला

खुला व्यापार सुरू झाल्यामुळें अमेरिका व रशिया येथून माल येऊं लागला व जर्मनींतील शेतकरीवर्गाचें नुकसान होऊं लागलें. इ. स. १८९३ त जमीनदार लोकांनीं एक मोठा संघ स्थापन केला व स १८९४त केप्रिव्ही यास चान्सेलरच्या हुद्यावरून काढून टाकण्यांत आलें. कॅप्रिव्हीच्या जागेवर होहेनलो हा मंत्री झाला. शेतकरीवर्गाचें गाऱ्हाणें अद्याप संपलें नव्हतें. हा वर्ग येथें बराच बलिष्ठ झाला होता. इ. स. १८९६ मध्यें हुंडणावळीचे नियम (एक्सचेंज लॉज) पास झाले व देवघेवीच्या खात्यावरील मुख्य कार्यकारीमंडळांत शेतकरीवर्गाचा एक प्रतिनिधि असावा असें ठरलें.

कॅप्रीव्ही यास मुख्य मंत्र्याच्या जागेवरून काढून टाकल्यापासून धार्मिक, शैक्षणिक व राजकीय बाबतींत सरकारचें धोरण पुराणप्रिय आहे असें दिसूं लागलें. धार्मिक व नैतिक शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां ठिकठिकाणीं देवालयें बांधण्यांत आलीं. धार्मिक व नैतिक गुन्हे हे फौजदारी गुन्ह्यांखालीं येऊं लागले व त्यांच्या संबंधींचीं कलमेंहि फौजदारी कायद्यांत घालण्यांत आलीं.

मध्यंतरीं राजाची मुख्य खटपट म्हणजे आरमार वाढविण्यासंबंधीं होती. या वेळेपावेतों "कील" कालव्याचें कामहि संपलें होतें व हेलिगोलंड हें बेटहि अगोदर जर्मनीस मिळालें होतें. इ. स. १८९७ त चीन देशांतहि व्यापारी बंदर मिळालें व राजानें तेथील मुलुख कबज्यांत घेण्याकरितां आपला भाऊ प्रिन्स हेन्री यास पाठविलें.त्याचप्रमाणें तुर्की राज्यांतहि बादशहानें पुष्कळ पगडा बसविला. इ.स. १८९९ त एका जर्मन व्यापारी मंडळीला बगदादपर्यंत आगगाडीचा रस्ता बांधण्याची परवानगी मिळाली.

इ. स. १९०० मध्यें आरमारासंबंधीं पुन्हां सूचना आणली गेली. चीन देशांतील जर्मन वकीलाचा खून झाल्यामुळें तेथें २० हजार फौज पाठविण्यांत आली. त्यावेळीं होहेनलो यास राजीनामा द्यावा लागला. हारव्हान ब्युलो हा परराष्ट्रीय मंत्री झाला.

या सुमारास जर्मनीची अंतस्थ स्थितीहि बरीच बिघडली होती. राजाच्या एकतंत्री वर्तनानें लोकांचीं मनें बिघडलीं होतीं. व निरनिराळ्या राष्ट्रीय पक्षांचे तंटे चालूच होते. प्रशियाच्या मध्यवर्ती सत्तेविषयींहि इतर संस्थानिकानांत मत्सर उत्पन्न झाला होता. पण ही चळवळ दडपून टाकण्यांत आली. मंत्रिमंडळाच्या सल्ल्याशिवाय कोणत्याहि बाबतींत पाहिजे ती ढवळाढवळ करूं नये असेंहि राजाकडून कबूल करून घेण्यांत आलें.

त्याचप्रमाणें जर्मनीच्या साम्राज्यांत अंतर्गत असलेले जे परराष्ट्रीय लोक होते त्यांच्यांत जर्मन भाषा, कलाकौशल्य व जर्मन आचार व विचार यांचा प्रसार करण्याचीहि खटपट चालूच होती.

त्यावेळीं जमाबंदीखात्याकडे सरकारला अगोदर लक्ष द्यावें लागलें. राष्ट्रीय खर्च काढून कर्जाचा बोजा फारच वाढला होता. इ. स. १९०९ मध्यें दोन कोटी पन्नास लक्ष पौंड कर बसवून वसूल केल्याशिवाय आरमार वाढविण्याची सूचना अमलांत येणें शक्य नाहीं असें दिसून आलें. प्रिन्स व्हॉन ब्यूलो यानें राजीनामा दिला व राजानें कसें तरी करून अंदाजपत्रकास संमति मिळविली. व्हान

ब्यूलोच्या नंतर थिओबॉल्ड व्हॉन बेथमन हॉलोरेग हा राष्ट्रीय मंत्री झाला.

अलीकडचा इतिहासः—स. १९१० मध्यें प्रागतिक पक्षानें सार्वत्रिक मतदानपद्धति प्रशियांत सुरू करावी अशा प्रकारची चळवळ सुरू केली. पण हालवेग यानें स्वतः जर्मन डायटेमध्यें कांहीं अधिकार देणारें एक बिल पुढें आणलें पण तें नापास झालें. यानंतर एक दोन वर्षें जर्मनींत या मतदानपद्धतीच्या प्रश्नावर मोठें रण माजलें होतें. त्यामुळें मंत्रिमंडळांत पुष्कळच फेरफार घडून आले. याच सुमारास राजाची सत्ता अनियंत्रित अगर नियंत्रित असावी यासंबंधींहि बराच वादविवाद झाला. राजानें आपण परमेश्वराचे प्रतिनिधि या नात्यानें जर्मनीवर राज्य करीत आहों असें दरबारांत जाहीर केलें. त्यामुळें जर्मनींत राजपक्षाला प्रतिकार करण्याची चळवळ सुरू झाली. अशा रीतीनें विरुद्ध पक्ष बलवान असतांना देखील हालवेगच्या मंत्रिमंडळानें समाजांतील निरनिराळया घटकांचें संरक्षण योग्य रीतीनें करतां यावें यासाठीं, समाजसंरक्षक बिल पुढें आणलें. त्याचप्रमाणें विम्या ( इन्शुअरन्स ) संबंधींचे कायदेहि नवीन करण्यांत आले.

स. १९११ मध्यें दुसरें एक महत्त्वाचें बिल पुढें आलें;व तें म्हणजे अल्सेस-लोरेन प्रांताला शासनपद्धति देण्याबद्दलचें होय. या पद्धतीप्रमाणें रिचस्लंडमध्यें बादशहाला स्टाटहाल्टर नेमण्याचा व फर्स्ट चेंबरमध्यें १९ प्रतिनिधी नेमून घेण्याचा अधिकार देण्यांत आला होता व याशिवाय आणखी १९ प्रतिनिधी लोकपक्षानें निवडून द्यावयाचे होते. अल्सेस लोरेनतर्फें फेडरल कौन्सिलमध्यें तीन प्रतिनिधी निवडून येण्याची सोय केली गेली; व त्यांना, स्टाटहाल्टरच्या मताप्रमाणें वागावयाची शर्त घालण्यांत आली होती. सेकंड चेंबरमध्यें मात्र लोकपक्षाचे पुष्कळ प्रतिनिधी घेण्यांत आले होते. हें बिल चर्चेला निघण्याच्या सुमारासच, हुजुरपक्षामध्यें, अल्सेस-लोरेन प्रांत हा प्रशियांत अंतर्भुत करण्यांत यावा अशाबद्दल स्वतंत्र चळवळ सुरू करण्यांत आली होती. हालवेग हा स्वतः या चळवळीच्या विरुद्ध होता. अल्सेसलोरेनला इतर जर्मन संस्थानचा समान दर्जा देण्यांत यावा व त्याचा प्रशियांत अंतर्भाव व्हावा हें जें बिस्मार्कनें आपलें मत पुढें मांडलें होतें त्याप्रमाणें हालवेगचें मत होतें. स. १९११ मध्यें जी नवी निवडणूक झाली तींत क्लेरिकल पक्षाचें मताधिक्य झालें.

इ. स. १९११ मध्यें जून महिन्याच्या १८ व्या तारखेस, साम्राज्यस्थापनेचा चाळीसावा वाढदिवस जर्मन राष्ट्रानें साजरा केला. याच वर्षी अगदीर येथें जर्मनांनीं एक सशस्त्र जहाज रवाना केलें. त्यामुळें साऱ्या यूरोपमध्यें मोठी खळबळ उडून गेली. पुढें, फ्रान्स व जर्मनी यांच्यामध्यें मोरोक्को व कोंगो संस्थानांची अदलाबदल करण्याबद्दल जी परिषद भरली, तीप्रमाणें या संस्थानांची अदलाबदल करण्याचें ठरलें. स. १९१२मध्यें रिचस्टॅगची नवी निवडणूक झाली. तींत समाजसत्तावाद्यांचा जय झाला. पण त्यामुळें कार्यकारीमंडळामध्यें फरक होण्याचें तत्कालीनजर्मनशासनपद्धतीच्या नियमानुसार कांहींच कारण नव्हतें. पुढें रिचस्टॅगच्या अध्यक्षाची व उपाध्यक्षाची जी निवडणूक झाली तींत, कंफ हा प्रागतिक पक्षाचा पुढारी अध्यक्ष म्हणून निवडून आला व डॉ. पाशी हा समाजसत्तावाद्यांचा पुढारी उपाध्यक्ष म्हणून निवडून आला.

जर्मन संस्थानांपैकीं बव्हेरिया संस्थानांत याच वेळीं निवडणुकीची दंगल चालू होती. या निवडणुकींत कॅथोलिक सेंटर पक्षाचा पुढारी व्हॉन हर्टलिंग हा निवडून आला. बव्हेरियामध्यें याच सुमारास जेसूट लोकांनां कांहीं विशिष्ट चळवळी करण्याला परवानगी देण्यांत आली. पण जर्मन फेडरल कौन्सिलांत यासंबंधी कडाक्याचा वादविवाद होऊन त्यामुळें ही परवानगी पुन्हां रद्द करण्यांत आली. स. १९१२ मध्यें बव्हेरियाचा प्रिन्स रीजंट लिओपोल्ड हा मरण पावला व त्याच्या जागीं प्रिन्स लुई लुडविग हा आला. ब्रुन्स्विक संस्थानांतहि १९१३ सालीं रीजंटीची जागा रिकामी झाली. या जागेवर ड्यूक ऑफ कंबर्लंड याचाच हक्क होता. पण फेडरल कौन्सिलनें त्याच्या नेमणुकीला अडथळा केला होता. शेवटीं या ड्यूक ऑफ कंबर्लंडच्या मुलाचें जर्मन बादशाची मुलगी व्हिक्टोरिया लुई इच्याशीं लग्न ठरल्यामुळें हा वाद मिटून ऑगस्टस याला ब्रुन्स्विकची गादी मिळावी असें ठरलें. पण या कार्याला खुद्द जर्मनींतच सहानुभूति नव्हती. स्वतः राजपुत्रहि या गोष्टीला विरुद्ध होता. शेवटीं हॅनोव्हरच्या राजघराण्याला या संस्थानचें राज्यपद मिळावें असें ठरविण्यांत आलें.

बाल्कनयुद्धामुळें व रशिया व ऑस्ट्रिया यांमध्यें नाजुक परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें, लवकरच युरोपमध्यें वादळ होण्याचा रंग दिसूं लागला होता. अशी परिस्थिति निर्माण झाल्यामुळें जर्मनीनें लष्करवाढीचें बिल पार्लमेंटमध्यें आणून आपली सेना वाढवावयाचें ठरविलें, व तन्निमित्त लागणारा खर्च जर्मन संस्थानांनीं व जर्मन राष्ट्रांतील धार्मिक गृहस्थांपासून मदत घेऊन उभारावयाचें ठरविलें. या बिलानें जर्मनीची सैना ६६११७६ इतकी झाली. आरमारी वाढीसंबंधानेंहि व्हान टिरपिझ यानें पार्लमेंटमध्यें एक सूचना पुढें मांडली. स.१९१३ मध्यें जर्मनस्वातंत्र्याची शतसांवत्सरिक तिथी अखिल जर्मन राष्ट्रांत मोठ्या प्रमाणांत साजरी करण्यांत आली. यावेळीं जर्मनराष्ट्रानें स. १९१३ पर्यंत जी प्रगति केली तिचा आढावा घेण्यांत आला.

महायुद्ध—महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर जर्मनीमध्यें जिकडे तिकडे लढाईला अनुकूल असें वातावरण उत्पन्न झालें. जर्मनींत जे निरनिराळे पक्ष होते त्या सर्व पक्षांनीं जर्मनीनें जें युद्ध पुकारलें त्याला संमती दिली. जर्मनीनें बेल्जमचा पाडाव केल्यामुळें व हिंडेनबर्गनें रशियाचा प्रचंड पराभव

केल्यामुळें तर जर्मनीला या महायुद्धांत जय मिळविण्याची महत्त्वाकांक्षा उद्भवली. इंग्लंडनें जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याबद्दल मात्र जर्मनीला फारच आश्चर्य वाटलें. पुढें स. १९१५ मध्यें इटलीनेंहि जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें. तरी पण जर्मनीला आपल्या लष्करी सामर्थ्यावर ही लढाई जिंकूं असा प्रबळ आत्मविश्वास वाटत होता. पण पुढें हळूहळू या भावनेवर आघात होऊं लागले. समाजसत्तावादीपक्षापैकीं कांहीं पुढाऱ्यांनीं योग्य संधि साधून जर्मनीनें तह करावा अशीं मतें प्रतिपादन करण्यास सुरवात केली. त्यांतच प्रशियाला सार्वत्रिक मतदानपद्धति देण्याबद्दलची चळवळ, अन्नाची महर्घता व उत्तरोत्तर होत जाणारा अन्नाचा तुटवडा, पेट्रोलियम मिळण्याची टंचाई इत्यादि मोठमोठे प्रश्न जर्मनीपुढें उभे राहिले. या बिकट परिस्थितींतून जर्मनी कसाबसा आपला मार्ग काढीतच होता. युद्धाला लागणारें द्रव्यबल कसें मिळवावें याबद्दल जर्मनीला फार काळजी वाटूं लागली होती. निरनिराळे कर लादून व इतर हरएक प्रकारांनीं जर्मनी कसेंबसें द्रव्यबळ जमा करीत होता. स. १९१६–१७ त जर्मनीला फार कर्ज झालें होतें. अशा तऱ्हेनें सन १९१७ पर्यंत जर्मनीमध्यें बिकट परिस्थिति निर्माण झाली होती.

इंग्लंडनें जर्मनीचा दर्यावर कोंडमारा चालविला होता व त्यामुळें जर्मनीचा व्यापार खालावत चालला होता. इंग्लंडच्या बोटींचा नाश करण्यासाठीं जर्मन आरमारखात्यानें यूबोटींचा उपयोग करण्याची कृति काढली. प्रथम जर्मन आरमारखात्यामध्यें व जर्मन सरकारमध्यें मतभेद होता; पण शेवटीं समेट होऊन यूबोटींचा उपयोग करण्याविषयींची परवानगी देण्यांत आली. जर्मनीनें तहासंबंधीं वाटाघाट करावी असें ज्या पक्षाचें म्हणणें होतें त्याचा जर्मन प्रधान हॉलवेग यानें तीव्र निषेध केला. जोंवर जर्मन राष्ट्राचा पाडाव करण्यासाठीं इंग्लंड टपून बसलें आहे तोंपर्यंत तहाचा प्रश्न काढणें नामुष्कीचें आहे असें या प्रधानानें निक्षून सांगितलें. तरी पण उत्तरोत्तर तहाला अनुकूल असें वातावरण जर्मनीमध्यें उत्पन्न होत चाललें होतें. जर्मन लष्करखातें मात्र तहाला सर्वस्वीं प्रतिकूल होतें. अशी परिस्थिति उत्पन्न झाल्यानें हॉलवेगची कुचंबणा होऊं लागली. लढाईला लागणारें द्रव्यबळ उभारण्याच्या कल्पनेला जर्मन रिचस्टॅगमध्यें जोराचा विरोध होऊं लागला. जर्मन सोशलडेमोक्रॅटिक पक्षांच्या सर्व पुढाऱ्यांनीं, एकत्र जमून जर्मनीनें चालविलेल्या लढाईबद्दल पूर्ण नापसंती प्रदर्शित करून सर्व राष्ट्रीय हितसंबंध पुन्हां सुरू करण्याचें ठरविलें. या पक्षाला जर्मनींत पुष्कळच मनुष्यबळ मिळूं लागलें होतें. हॉलवेगविरुद्ध तर प्रमुख पुढाऱ्यांकडून टीकांचा भडिमार होऊं लागला होता. अन्नाची महर्घता तर उत्तरोत्तर वाढत चालली होती.

इ. स. १९१७ तर जर्मनींत असंतोषाचें साम्राज्यच माजलें. तरी हॉलवेगनें व जर्मनलष्करखात्यानें अद्यापहि लढाई थांबवण्याच्या धोरणाचा स्वीकार न करण्याचा निश्चय कायम ठेवला होता. आपल्या पानबुड्या बोटींच्या जोरावर इंग्लंडच्या आरमारीवर्चस्वाचा नायनाट करूं असा या पक्षाला आत्मविश्वास वाटत होता. स. १९१७च्या मे महिन्यांत जर्मन रिचस्टॅगची बैठक भरली. तींत सोशलडेमोक्रॅटिक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं तहासंबंधीं अनुकूल भाषण करून लोकमताचा वारा तहाला अनुकूल वहात आहे हें स्पष्टपणें पुढें मांडलें. याच सुमारास अमेरिका ही दोस्तांच्या वतीनें युद्धांत पडल्यामुळें इंग्लंडचें आरमारी सामर्थ्य नष्ट करण्याची जी जर्मनलष्करशाहीला आशा वाटत होती ती नष्ट झाली होती. त्यामुळें तर तहाला अधिकच अनुकूल वातावरण होत चाललें. अशी जिकडून तिकडून कुचंबणा होऊं लागल्यामुळें हॉलवेग याला प्रधानकीचा राजीनामा द्यावा लागला व त्याच्या जागीं डॉ. मिचेलिस हा प्रधान म्हणून निवडण्यांत आला. पण डॉ. मिचेलिसपुढें पुष्कळ अडचणी होत्या. कॅथोलिक सेंटर पार्टी, पीपल्सपार्टी व सोशलडेमोक्रॅटिक पार्टी या तिन्ही पक्षांनीं एकत्र जमून जर्मन सरकारास तह करण्यास भाग पडण्याचा व जर्मनीला नमतें घ्यावें लागलें तरी हरकत नाहीं पण यापुढें महायुद्ध बंद केलें पाहिजे अशा अर्थाचा ठराव केला होता. हा ठराव जर्मन रिचस्टॅगमध्यें येऊन तो बहुमतानें पसार झाला. त्याप्रमाणें कैसरला ही गोष्ट कळवून या प्रश्नावर त्याच्याशीं चर्चा करण्याकरितां रिचस्टॅगनें एक प्रतिनिधिमंडळ नेमलें. त्या मंडळाची व कैसरची मुलाखत होऊन या प्रश्नासंबंधानें बरीच चर्चा झाली.

डॉ. मिचेलिसनें सर्व पक्षांतील प्रमुख पुढाऱ्यांचें मिळून एक संयुक्त प्रधानमंडळ नेमलें. पण ही कल्पना पुष्कळांनां पसंत पडली नाहीं. १९१७ सालीं रिचस्टॅगची बैठक भरली त्यावेळीं, यासंबंधीं पुष्कळ टीका करण्यांत आली. याच सुमारास आरमारी सैन्यांत बंडाळ्या माजल्या होत्या. या बंडखोरांपैकीं कांहीं बंडखोरांनां इंडिपेंडंट सोशियालिस्ट पक्षाच्या हास व डिटमन या पुढाऱ्यांची आंतून मदत होती असें डॉ. मिकेलिसला तपासांतीं कळल्यावरून त्यानें या पुढाऱ्यांवर रिचस्टॅगच्या बैटकींत सडकून टीका केली. भक्कम पुरावा नसतां डॉ. मिचेलिसनें जी टीका केली त्याबद्दल रिचस्टॅगमध्यें खळबळ उडून गेली; व मिचेलीसवर त्यांनीं कडक टीका केली. त्यामुळें मिचेलिसनें चिडून जाऊन राजीनामा दिला.

मिचेलीसनंतर, कांउंट हर्टलिंग हा मुख्य प्रधान झाला. त्यानें, प्रधानकीची जागा पत्करतांच प्रथम सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांची भेट घेऊन तत्कालीन परिस्थितीसंबंधानें चर्चा केली. मिचेलीसप्रमाणेंच त्यानेंहि संयुक्त प्रधानमंडळ नेमलें. लढाई चालूं ठेवण्यांत जर्मनीचा मुख्य हेतु मुलुखगिरी करण्याचा नसून आपल्या राष्ट्राचें संरक्षण करणें हा होय असें त्यानें रिचस्टॅगमध्यें जाहीर केलें. पोपनें जर्मनीला तह करण्यासंबधीं संदेश पाठवला. त्यांतहि त्यानें पोपला थोडा काळ दम धरण्यास सांगितलें.

याच सुमारास जर्मनीमधल्या कांहीं प्रमुख गृहस्थांनीं व्हॅटरलँडस पार्टी नांवाचा एक पक्ष स्थापन केला. त्यांत ड्यूक जोहान अलब्रेक्ट, व्हॉन टिपिट्झ अशा प्रकारचीं बडीं बडीं धेंडें होतीं या पक्षाचा उद्देश जर्मनींत तहाच्या विरुद्ध लोकमत बनविण्याचा होता. अंतस्थ राजकारणाशीं या पक्षानें कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवला नव्हता. तेव्हां या पक्षांत जर्मनींतील सर्व पक्षांतील तहाला अनुकूल अशी मंडळी सभासद झाली होती. त्यामुळें थोडक्याच दिवसांत या पक्षाला जर्मनींत मोठें महत्त्व प्राप्त झालें. पण त्याचबरोबर या पक्षावर विरुद्ध पक्षाकडून टीका होण्यास सुरुवात झाली. या नवीन पक्षाजवळ मुबलक पैसा असल्यामुळें या पक्षाचें वर्चस्व जर्मनींत भराभर पसरूं लागलें. पण त्यामुळें जर्मनींतील अंतस्थ परिस्थितीहि अधिकच गुंतागुंतीची होऊं लागली. स.१९१७ मध्यें जर्मनींत अन्नाची महर्घता अतिशय झाल्यामुळें लोकांनां पुरेसें अन्न मिळण्याची देखील टंचाई पडूं लागली. त्यामुळें १९१८ च्या प्रारंभीं पुन्हां तहाला लोकमत अनुकूल होत चाललें. याच सुमारास प्रेसिडेंट विल्सन यानें तहासंबधींचीं आपली चौदा कलमें प्रसिद्ध केलीं होतीं. त्यासंबंधानें सर्व यूरोपभर चर्चा चालली होती. हीं चौदा तत्त्वें हार्टलिंग याला एकंदरीनें पसंत होतीं व त्या तत्त्वांवर तह करण्याची त्याची खुषी होती. ऑस्ट्रिया, हंगेरी व तुर्कस्थान या राष्ट्रांच्या हक्कांनां कोणताहि बाध येतां कामा नये, एवढीच त्याची अट होती. या प्रश्नावर तहाला अनुकूल व तहाला प्रतिकूल असे दोन तट पडले. तहाला अनुकूल असणाऱ्या पुढाऱ्यांत अर्झबर्ग हा प्रमुख होता. त्यानें सोशल डेमॉक्राट पक्षाच्या सहाय्यानें ऑस्ट्रिया हंगेरींत चळवळ करून जर्मनीनें तहाला अनुकूल व्हावें यासाठीं पुष्कळच खटपट केली. याच सुमारास जर्मनी व रशियांमध्यें तह घडून आला. त्यासंबंधानेंहि बरीच खळबळ उडून गेली. सेंटर पक्षानें हर्टलिंगची तळी उचलून धरली.

स. १९१८ च्या मे महिन्यांत इंग्लंडमधील जर्मनीचा वकील लिकनौस्की यानें, एक पत्रक प्रसिद्ध करून त्यांत जर्मनीनें आपण होऊनच महायुद्धास सुरुवात केली असें प्रतिपादन केलें. त्यामुळें तर जर्मनींत मोठीच खळबळ उडाली. जर्मन वकीलाचें म्हणणें खोटें आहे असें जर्मन व्हाईस चान्सेलर पेयर यानें प्रसिद्ध केलें. अशी जर्मनींत गुंतागुंतीची परिस्थिति होती तरी हर्टलिंगनें जर्मनीच्या अंतस्थ कारभारांत पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. रीचस्टॅगमधील सभासदांचें वेतन ५००० मार्क ठरविण्यांत आलें. पण सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची एवढ्यावर तृप्ति झाली नाहीं. त्या पक्षानें जर्मनींत इंग्लंडसारखी पार्लमेंटरी शासनपद्धति अमलांत यावी असा हट्ट धरला. त्याप्रमाणें त्यांनीं तात्कालीन शासनपद्धतींत कोणत्या सुधारणा घडून आल्या पाहिजेत यासंबंधाच्या आपल्या सूचना पुढें मांडल्या पण हर्टलिंग हा त्या सुधारणांनां अनुकूल नव्हता. कॅथोलिक सेंटर व डेमोक्रॅटिक पक्षाच्या लोकांनींहि पार्लमेंटरी पद्धतीबद्दलच हट्ट धरला तेव्हां हर्टलिंग यानें राजिनामा दिला. हर्टलिंगच्या ऐवजीं प्रिन्स मॅक्स हा राजघराण्यांतील एक पुरुष प्रधान झाला. हा लोकसत्तावादी होता. यानें पार्लमेंटरी पद्धतीचा उपक्रम जर्मनींत करावयाचें ठरवलें. विल्सनच्या चौदा तत्त्वांनां त्यानें पूर्ण संमति दिली; व या तत्त्वावर जर्मनी आपलें नुकसान सोसूनहि तह करण्यास तयार आहे असें आपलें म्हणणें विल्सनला त्यानें कळविलें. पण आपलीं मतें व्यवहारांत आणण्याची संधि मॅक्सला मिळाली नाहीं. १९१८ च्या आक्टोबरमध्यें जर्मनींत तहाला अनुकूल असें वातावरण पूर्णपणें निर्माण झालें. म्युनिकमध्यें बंडाळी माजून तेथें लोकसत्ताक राज्य स्थापन करण्यांत आलें. आरमारी सैन्यांत बंडाळी माजली. त्यामुळें मॅक्सला राजीनामा देणें भाग पडलें. मॅक्सनंतर एबर्ट हा सोशल डेमोक्रॅट पक्षाचा पुढारी मुख्य प्रधान झाला; व त्यामुळें जर्मनींत एक प्रकारची क्रांति घडून आली म्हटलें तरी चालेल.

या क्रांतीची नक्की तारीख ९ नोव्हेंबर स. १९१८ होय. याच्या पूर्वींहि या चळवळीला सुरुवात झाली. पण या चळवळीला या दिवशीं मूर्तस्वरूप प्राप्त झालें. महायुद्धामुळें जर्मनींत भयंकर स्थिति निर्माण झाली होती. लोकांच्या आकांक्षा थोड्याफार रीतीनें पूर्ण करून, लोकांनां शमविण्यांत आलें असतें तर हा क्रांतीचा प्रसंग आलाच नसता, पण जर्मनसरकारनें तसा प्रयत्नच केला नाहीं. प्रिन्स मॅक्सनें अशा प्रकारचा उपक्रम सुरू केला होता. पण तो फार उशीरां होता. त्यामुळें त्याच्या हातूनहि या क्रांतीची चळवळ शमली गेली नाहीं. या क्रांतीला कीलमध्यें तोंड लागलें. तेथील खलाशांनीं अधिकाऱ्याविरुद्ध बंड करून त्यांच्यापैकीं कांहींनां ठार केलें. या बंडाचा वणवा तावडतोब ट्रुहेंमुंड, हँबर्ग व विल्हेल्मशेव्हन या ठिकाणीं पसरला. अशा रीतीनें अचानक बंडें होऊं लागल्यामुळें पुढें काय करावें हें प्रिन्स मॅक्सला कळेना. सोशल डेमोक्रॅटिक पक्षानें मॅक्स याला कैसरला राज्यपदावरून हांकून लावण्याविषयीं प्रयत्न करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें कैसरला राज्यपद सोडण्याविषयीं विनंति केली व कैसरनें आपल्या मुलाच्या तर्फेनें राजीनामा द्यावयाचें ठरविलें. कैसरनें राजीनामा दिल्यामुळें हा बंडाचा वणवा शांत होईल अशी मॅक्सची कल्पना होती, पण ती खोटी ठरली. बंडाची लाट फार जोरांत पसरली असल्यामुळें ती सहजासहजीं शमणें शक्य नव्हतें. त्यामुळें नाइलाज होऊन राजीनामा देण्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं.

इकडे पश्चिम सरहद्दीवर तहाची वाटाघाट जर्मन अधिकाऱ्यांनीं मार्शल फॉकशीं सुरू केली होती व त्याप्रमाणें पुष्कळ वाटाघाटीनंतर युद्धतहकुबीच्या अटी ठरविण्यांत

आल्या. याच संधीस कैसर हा हालंड येथें पळून गेला. राजपुत्राला मात्र झूडर प्रांतांतील विरिंजन गांवीं अटकेंत ठेवण्यांत आलें. स १९१८ च्या नोव्हेंबरच्या २८ व्या तारखेस कैसरनें राज्यपद सोडल्याबद्दलच्या कागदावर सही केली. डिसेंबरमध्यें राजपुत्रानेंहि तोच मार्ग पत्करला. जर्मनींतील इतर संस्थानांतील संस्थानिकांचीहि तीच स्थिति झाली. जर्मनीमध्यें लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापल्याचें जाहीर करण्यांत आलें.या बंडाची कारवाई स्पेशल डेमोक्रॅट पक्षाकडून करण्यांत आली होती. या बंडाची तयारी स.१९१६ पासूनच करण्यांत आली होती असें मागाहून उघडकीस आलें.मॅक्सच्या बदली या पक्षाचा पुढारी रॉबर्ट हा प्रधान झाला होता. त्यानें इंडिपेंडंट सोशियालिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाट करून लोकपक्षाचें प्रधानमंडळ बनविलें. हें प्रधानमंडळ बनवितांना त्यांत सोशालिस्ट लोकांनां मुद्दाम वगळण्यांत आलें होतें. या प्रधानमंडळानें ताबडतोब हुकूम काढून किरकोळ बंडें पार मोडून टाकलीं. राजकीय कैद्यांना मुक्त करण्यांत आलें. भाषणस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य सर्वांनां दिल्याचें जाहीर करण्यांत आलें. प्रथमतः या प्रधानमंडळांनां जर्मनींतील अंदाधुंदी नाहींशी करितां आली नाहीं; पण लवकरच त्या अंदाधुंदींतून त्यानें आपला मार्ग काढला.

पण याच सुमारास इंडिपेंडंट सोशालिस्ट पक्षांतील जहाल पक्षापैकीं कांहीं पुढाऱ्यांनीं ' स्पर्टोकस ' संघ स्थापन केला होता. त्यामध्यें डॉ. लिबक्नेक्ट, रोझा लक्झेंबर्ग, डॉमिग इत्यादि प्रमुख पुढारी होते. यांनां लोकशाहीचीं तत्वें पसंत नव्हतीं. रशियामध्यें जसें ' सोव्हिएट रिपब्लिक ' स्थापन झालें होतें, त्या धर्तीवर जर्मनीमध्यें शासनपद्धति स्थापन व्हावी असा यांचा प्रयत्न होता. त्यासाठीं त्यांनीं जोराची चळवळ सुरू केली. लोकशाहीच्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध त्यांनीं बंड पुकारलें व डिसेंबर २४ तारखेस तर यांच्या सैन्यामध्यें व जर्मन लोकनियुक्त सरकारच्या सैन्यामध्यें चकमक झडून जर्मनसरकारच्या सैन्याला नमतें घ्यावें लागलें. हें पाहतांच बार्थ, डिट्मन व हास या जर्मनसरकारच्या अधिकाऱ्यांनीं राजीनामा दिला.

प्रशियामध्यें देखील लोकशाही स्थापन झाली होती. तेथील कारभाराची व्यवस्था पाहण्याकरितां स्पेशल डेमोक्रॅट व इंडिपेंडंट सोशियालिस्ट पक्षाच्या प्रतिनिधींचें संयुक्त मंडळ स्थापन झालें होतें.

१९१९ साली जर्मनींत फारच बेबंदशाही माजली. स्पर्टोकस संघानें बंड करण्याची जोरांत तयारी चालविली होती. जानेवारी महिन्याच्या ५ व्या तारखेस या बंडवाल्यांनीं बर्लिन येथें बंड उभारलें. जर्मनसरकारजवळ त्यावेळीं फारच थोडें सैन्य होतें; तरी या बंडवाल्यांनां सरकारी कचेऱ्या व इमारतीवर हल्ला करण्याचें धैर्य होईना. अशी स्थिति पहातांच जर्मनसरकारनें आपलें सैन्य जमाविण्यास सुरुवात केली. या नवीन सैन्याच्या जोरावर जर्मनसरकारनें या बंडवाल्यांचा सर्वत्र पराभव केला. या बंडखोरांच्या पुढाऱ्यांपैकीं प्रमुख पुढारी मारले गेले व अशा रीतीनें हा बंडाचा वणवा कसाबसा शांत करण्यांत आला.

१९१९ सालच्या जानेवारीच्या १९ व्या तारखेस नॅशनल असेंब्लीची नवीन निवडणूक होऊन तींत सोशालिस्ट पक्षाचें बहुमत झालें. या सभेची पहिली बैठक बर्लिन येथें न भरतां वीमर येथें भरविण्यांत आली. स्पर्टाकस संघापैकीं बरेचसे पुढारी जरी मारले गेले होते तरी त्यांनीं खचून न जातां व्यापक असा कम्युनिस्ट पक्ष पुन्हां स्थापन करून बंडें करण्यास सुरुवात केली. बर्लिनमध्यें तर या बंडाला बरेंच उग्र स्वरूप प्राप्त झालें. पण पुन्हां या खेपेसहि बंडवाल्यांचा पुरा मोड करण्यांत आला. वीमर येथें जी बैठक भरली होती तींत मेजॉरिटी सोशल पक्षाचा पुढारी डेव्हिड हा अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आला. यानें कॅथोलिक सेंटर, डेमोक्रॅट, सोशल डेमोक्रट या तिन्हीं पक्षांशीं संगनमत करून आपलें मंत्रिमंडळ बनविलें. डेमोक्रॅट पक्षाचा पुढारी एबर्ट हा रीचस्टॅगचा अध्यक्ष झाला. थोडक्याच काळानें डेव्हिडनें राजीनामा दिल्यावर, फेरेनबॅच हा नॅशनल असेंब्लीचा अध्यक्ष झाला. रीचस्टॅगमध्यें या सोशालिस्ट पक्षाला विरोध करणारे पक्ष दोन होते, ते म्हणजे जर्मन नॅशनॅलिस्ट पक्ष व जर्मन पीपल्स पार्टीचा पक्ष होत. या पक्षामध्यें व अधिकारारूढ पक्षामध्यें नेहमीं खडाजंगी उडूं लागली. विशेषतः उद्योगधंद्याचें सामाजीकरण करण्याच्या बाबतींत तर या दोन पक्षांमध्यें फारच खडाजंगी उडाली. व्हर्सेलिस येथें जो तह घडून आला, त्यास संमति द्यावयाची कीं नाहीं या प्रश्नावरहि कडाक्याचा वादविवाद माजला. पुष्कळसे सभासद तहाला संमति देण्याच्या अगदीं विरुद्ध होते पण पुढें अर्झबर्गच्या मुत्सद्दीपणानें व प्रयत्नानें तहाला अनुकूल असणाऱ्यांचें मोठ्या कष्टानें बहुमत होऊन तहाला संमति मिळाली: व तहाला जर्मनी एका अटीवर तयार असल्याचें पॅरिस सरकाराला कळविण्यांत आलें. ती अट म्हणजे जर्मनीनें आपण होऊन महायुद्धाला सुरवात केली असा तहपरिषदेपुढें जो मसुदा मांडण्यांत येणार होता त्याच्या प्रास्ताविक भागांत दोस्तांनीं जर्मनीवर आरोप केला होता तो पाळण्यांत यावा ही होय. पण दोस्तसरकारनें बिनशर्त तहाच्या मसुद्याला जर्मनीनें मान्यता दिली पाहिजे असें कळविल्यामुळें पुन्हां राष्ट्रसंघाची बैठक भरून तींत जर्मनीनें बिनशर्त तह करण्याला संमति द्यावी असा ठराव करण्यांत आला. अखेरीस स. १९१९ जून २७ व्या तारखेला जर्मनीनें व्हर्सेलीसच्या तहनाम्यावर सही केली.

जुलैच्या ३१ व्या तारखेस जर्मनसरकारनें आपली नवीन शासनपद्धतीची योजना राष्ट्रसभेपुढें मांडली व ती पसार करून घेतली. या घटनेप्रमाणें जर्मन मतदारांनीं जर्मनीचा अध्यक्ष निवडावयाचा होता. व्हर्सेलिसच्या तहा-

प्रमाणें जर्मनराष्ट्राच्या मर्यादा अद्यापि ठरावयाच्या असल्यामुळें त्या ठरेपावेतों तात्पुरता अध्यक्ष निवडावयाचें ठरून एबर्ट हा जर्मनीचा अध्यक्ष निवडण्यांत आला. जर्मन पार्लमेंटची पहिली बैठक बर्लिन येथें भरली. तीमध्यें सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांचें संयुक्त प्रधानमंडळ बनविण्याचें ठरून त्याप्रमाणें नवीन संयुक्तप्रधानमंडळ बनविण्यांत आलें. जर्मनीच्या ताब्यांत कोणतीच वसाहत शिल्लक नसल्यामुळें वसाहतखातें मोडून टाकण्यांत आलें. जर्मन कारखानदार व मजुर यांच्यासाठीं एक स्वतंत्र कायदा करण्यांत येऊन, त्यांची स्वतंत्र मंडळें बनविण्यांत आलीं व त्या मंडळांनीं कारखानदारांचीं व मजुरांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेऊन त्यांचा निकाल लावावा असें ठरलें. जर्मनींतील सर्व खाणी संस्थानच्या मालकीच्या आहेत असें जाहीर करण्यांत आलें. जर्मनीला या वेळीं अतिशय कर्ज झाल्यामुळें नवीन कर बसविण्याची सविस्तर योजना अर्झबर्ग यानें पुढें मांडली व ती राष्ट्रसभेनें मंजूर केली.

स. १९२० च्या जानेवारीच्या १० व्या तारखेस व्हर्सेलिसच्या तहाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. त्याप्रमाणें जर्मनीच्या ताब्यांत असलेला बराचसा मुलूख परकीय राष्ट्रांच्या ताब्यांत गेला. या तहामुळें जर्मनीचें आर्थिक दृष्ट्या अतोनात नुकसान झालें. मार्कसचा भाव झपाट्यानें उतरला; व आयातमालाची किंमत देण्याची देखील कुवत जर्मनीला राहिली नाहीं. जूनच्या ३० व्या तारखेस राष्ट्रसभेची बैठक भरली. जर्मनकारखान्यांसंबंधींचा जो नवीन फॅक्टरी लॉ करण्यांत आला होता त्याचें तिसरें वाचन या बैठकींत व्हावयाचें ठरलें होतें. हा कायदा बऱ्याच लोकांना व विशेषतः मजूरांना पसंत नव्हता. त्यांनीं त्या दिवशीं दांडगाई करून राष्ट्रसभेंत आपला प्रवेश करून घेण्याची शिकस्त केली. पण त्यांत त्यांना यश न येतां त्या बैठकींत बिलाचें तिसरें वाचन होऊन तें पसार झालें.

व्हर्सेलिसच्या तहानंतर दोस्तराष्ट्रांनीं कैसरला हॉलंडमधून हांकलून लावावें असा हट्ट धरला. पण हॉलंडनें तसें करण्याचें नाकारलें. कैसरला जरी जर्मनींत फारसा मान नव्हता तरी या दोस्तांच्या कृत्यानें सर्व जर्मनराष्ट्राला आपला अपमान झाला असें वाटूं लागलें. त्याचप्रमाणें जर्मनीला महायुद्धाच्या भानगडींत पाडण्यास जे कारणीभूत झाले त्यांची फ्रेंच सरकारनें एक यादी करून त्या माणसांना जर्मनींतून हुसकून लावावें अशीहि दोस्तांनीं मागणी केली. पण या प्रश्नावर बरीच भवति न भवति होऊन शेवटीं जर्मनींतील सुप्रीम कौन्सिलनें या लोकांची चौकशी करून त्यांना योग्य ती शिक्षा फर्मावावी असें ठरलें. शेवटीं या लोकांपैकीं पुष्कळांची चौकशी होऊन बरेचसे लोक निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत आले व कांहीं लोकांना शिक्षा देण्यांत आल्या. पण या शिक्षांची अंमलबजावणी करण्याचें पुष्कळशा जर्मन अधिकाऱ्यांनीं नाकारलें. व्हर्सेलिसच्या तहानें आणखी एक गोष्ट अमलांत यावयाची होती व ती म्हणजे जर्मनीचें सैन्य कमी करून तें एका लाखावर आणणें ही होय. त्याप्रमाणें जर्मनीनें आपलें सैन्य एका लाखावर आणलें.

जर्मनीमध्यें जी नवीन शासनपद्धती अंमलांत आली होती त्यांतील कलमाप्रमाणें जर्मनराष्ट्रानें आपला अध्यक्ष निवडावयाचें असें ठरलें होतें. पण याला कांहीं पुढाऱ्यांचें अनुकूल मत नव्हतें. जर्मनराष्ट्रानें अध्यक्ष न निवडतां जर्मन रिचस्टॅगनें आपला अध्यक्ष निवडावा असें यांचें म्हणणें होतें. पण त्यांचें म्हणणें राष्ट्राला पसंत पडलें नाहीं. तेव्हां जर्मनीचें सैन्य कमी केल्याबरोबर, रजा मिळालेल्या सैनिकांच्या कॅप्प नांवाच्या एका पुढाऱ्यानें बंड करून सरकारी कचेऱ्या व तिजोरी आपल्या ताब्यांत घेतली; व आपलें एक स्वतंत्र सरकार स्थापन केलें पण हें सरकार फार दिवस टिकलें नाहीं. थोडक्याच दिवसांत जुनें सरकार पुन्हां प्रस्थापित झालें. रुहर प्रांतांतहि या कॅपाच्या बंडामुळें अंदाधुंदि माजलेली होती. त्या प्रांतांतील समाजसत्तावाद्यांनीं जर्मनींत सोव्हिएट रिपब्लिकच्या धर्तीचें लोकसत्ताक राज्य स्थापन करण्याचा घाट घातला होता. पण तोहि सुदैवानें फसला. पुढें जर्मनीमध्यें व्यापाऱ्यांचा मोठा संप घडून आला. राज्यकारभारांत आपल्याला शिरकाव मिळावा असें यांचें म्हणणें होतें. त्यांच्यामध्यें व जर्मन सरकारमध्यें वाटाघाट करून जर्मन सरकारनें थोड्या फार फरकानें त्यांचें म्हणणें मान्य केलें. त्याप्रमाणें नवीन निवडणुकी होऊन नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. रूहर प्रांतांत जी बंडाळी माजली होती तिचा फायदा घेऊन फ्रेंचांनीं रूहर प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. त्यामुळें जर्मनीमध्यें व फ्रान्समध्यें पुन्हां बेबनाव उत्पन्न झाला. पण पुष्कळ झटापटीनंतर रूहर प्रांतांतून फ्रेंचांनीं आपलें सैन्य काढून घेतलें.

लवकरच पुन्हां निवडणुकी होऊन त्यांत निरनिराळ्या पक्षांचे प्रतिनिधी निवडून आले. त्यांत नॅशनल लिबरल पक्षातर्फेहि कांहीं प्रतिनिधी निवडून आले होते. यांपैकीं डॉ. सायमन याची परराष्ट्रमंत्र्याच्या जागेवर नेमणूक झाली. व डॉ. फेहरेन बच याला रीचस्टॅगचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. व्हर्सेलिसच्या तहांतील कांहीं भागांची अंमलबजावणी अद्यापि व्हावयाची होती. ती कशी करावी याकरितां लाईड जॉर्ज, मिलेरँड व जर्मनप्रतिनिधी सायमन्स व फेरेन बच यांची बैठक भरली. त्या बैठकींत जर्मन सैन्याची संख्या लाख ठरविण्यांत आली व जर्मनीनें २० लाख टनांपेक्षां अधिक टन कोळसा बाहेर पाठवूं नये असें ठरलें. त्याप्रमाणें जर्मनीनें तावडतोब अंमलबजावणी केली.

जर्मनीमध्यें या सुमारास कम्यूनिस्ट पक्षानें आपली चळवळ सुरू केली होती; या कम्युनिस्ट लोकांनीं मध्यजर्मनीमध्यें बंडाळी माजविण्यास सुरुवात केली. नागरिकांवर फार अत्याचार केले पण शेवटीं ही बंडाळी मोडण्यांत आली.

दोस्तराष्ट्रांनीं, जर्मनीनें १३२ मिलर्ड सोन्याचे मार्क्स खंडणी-दाखल दोघांनां द्यावे, अशी मागणी केली होती. त्याप्रमाणें जर्मनीनें एक मिलर्ड मार्कसचा पहिला हप्ता देऊन टाकला. अपर सायलेशियांत जर्मनीचा व्यापार बराच फैलावला होता. पण तो प्रांत पोलंडला देऊन टाकण्याचें दोस्त राष्ट्रांनीं ठरविल्यामुळें जर्मनीची सांपत्तिक स्थिति फारच खालावली त्यामुळें प्रधानमंडळानें राजीनामा दिला. पण वर्च यानें पुन्हां प्रधानकीची जागा पत्करली.

बव्हेरिया संस्थाननें आपलें लष्कर कमी करावें याबद्दल जर्मन सरकार व बव्हेरिया यांमध्यें बरीच भानगड उपस्थित झाली होती. पण शेवटीं बव्हेरियानें जर्मन सरकारचें म्हणणें कबूल केलें. यामुळें बव्हेरियाचा प्रधान व्हॉन कहर यानें राजीनामा दिला. इकडे जर्मनींत अर्झबर्गरचा खून झाल्यामुळें त्याच्या पक्षांत मोठी खळबळ उडाली होती. प्रधानमंडळामध्यें सर्व पक्षांचें योग्य प्रमाण असल्यास सर्वांच्या मदतीनें जर्मनीची आर्थिक स्थिति सुधारेल या हेतूनें रिचस्टॅगनें भिन्न भिन्न पक्षांशीं बोलणें सुरू केलें होतें. १९२१ पर्यंत जर्मनींत जे वारंवार दंगेधोपे होत असत ते हळू हळू कमी होऊं लागले होते. रशियांतील बोल्शेव्हिझमच्या भुतानें जर्मनींत संचार केला होता. पण तोहि सुदैवानें कमी होऊं लागला होता. १९२१ सालापासून जर्मनींत पूर्वस्थिति नांदू लागली. तरी पण उदरनिर्वाहाला आवश्यक अशा ज्या बाबी, त्या अतिशय महाग झाल्यामुळें जर्मनींतील खालच्या वर्गाचे फार हाल होत असत. त्यामुळें देशांतल्या देशांत, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत जाणाऱ्या मालावर जकात न ठेवण्याचें जर्मन सरकारें ठरविलें. पण त्यामुळें उलट अन्नाची महर्घता अधिकच वाढली. व मध्यमवर्गांतील लोकांचेहि फार हाल होऊं लागले. जर्मनीची आर्थिक परिस्थिति कर्जबाजारीपणामुळें फार खालावली होती व त्यामुळें जर्मनी डबघाईस आला होता.

नुकसानभरपाई—महायुद्धांत दोस्तराष्ट्रांचें जें नुकसान झालें त्याची भरपाई करण्यासाठीं दोस्तांनीं जर्मनीकडे मागणी केली होती. त्यासाठीं स. १९२१ मध्यें हर स्टिन्नेस याचें एक शिष्टमंडळ इंग्लंडमध्यें गेलें होतें ( डिसेंबर ). त्यानें जर्मनीची स्थिति एकदम इतकी रकम देण्यासारखी ऐपतदार नसल्यानें कांहीं दिवसांच्या तहकुबीची मागणी केली. परंतु दोस्तांनीं जर्मनीची हप्तेबंदी समाधानकारक नाहीं या कारणावर ती फेंटाळून लाविली. जर्मनीच्या व्यापाराची गळचेपी दोस्तांनीं केल्यामुळें जर्मनी हलाकीस आला आहे. हें इंग्रज उदारपक्षास मान्य होतें. परंतु हुजूरपक्षाचें म्हणणें जर्मनीस कर्जफेडीची ताकद असून तो देत नसल्यास जबरीनें त्याच्याकडून वसूली करावी. तेव्हां जर्मनीनें इंग्लंडला ५ कोटी पौंड ( सोन्याच्या चलनांत ) कसे बसे दिले. पुढें क्यानेस येथें इंग्लंड, फ्रान्स व इटली यांची एक बैठक भरून जर्मनीला थोडीशी तहकुबी देण्यांत आली ( १९२२ जानेवारी ). त्यावेळीं पोष्टाचे वाढलेले दर व आगगाडीच्या भाड्यांचे दर यांची हमी देण्यांत आली होती. पण मार्च-एप्रिलांत दोस्तांनीं आपल्या ( जर्मनींत व्यापून बसलेल्या ) सैन्याच्या व नुकसानभरपाईच्या खर्चासाठीं ६० अब्जांची मागणी केली, परंतु ती जर्मनीनें धुडकावून दिली; मात्र आतांपर्यंतची हप्त्यांतील तूट भरून काढण्यासाठीं या वेळीं जर्मनीनें १ कोटी ८० लक्ष सुवर्णमार्क दोस्तांनां भरले. यावेळीं पुन्हां जर्मनीनें तहकुबीची मागणी केली; पण ती निष्फळ झाली. त्यानंतर आगस्ट ( १९२२ ) मध्यें लंडन येथें ही नुकसानभरपाई कमेटी भरली तेव्हां लॉईड जार्ज हा जर्मनीला सवलतील अशा अटी घालण्यास तयार झाला; परंतु फ्रान्सनें तें नाकारून एकट्याच्या जबाबदारीवर जर्मनींतील सरकारी खाणी व जंगल आणि रूहरप्रांत यांचा ताबा घेण्याचें ठरविलें. या सुमारास मार्कसचा भाव फार उतरला; एका पौंडास ९ हजार मार्क्स मिळूं लागले. तेव्हां जर्मनीनें दगडी कोळसा व लांकूड या स्वरूपांत कर्जफेडीचा नवीन हप्ता देण्याचें ठरविलें. नोव्हेंबरांत जर्मनीचें रीथचें प्रधानमंडळ मोडून कुन्होचें प्रधानमंडळ निवडून आलें. त्यावेळीं जर्मनीच्या वार्षिक बजेटांत ८९० अब्ज मार्कांची तूट आली. डिसेंबरांत लंडन येथें पुन्हां नुकसानभरपाईमंडळ बसलें; तेव्हां फ्रान्सनें ईसेन व बोचेम हे रूहरमधील जिल्हे ताबडतोब ताब्यांत घेण्याचा आग्रह धरला; परंतु अमेरिका मध्यें पडली व तिनें जर्मनीला मोठी रक्कम आगाऊ कर्जाऊ देण्याचें ठरवून हा तंटा मिटविला. पुढें पॅरीस येथें १९२३ च्या जानेवारींत भरलेल्या नु. भ. मं. च्या बैठकींत इंग्लंडनें जर्मनीस कांहीं खंडणीची सूट देण्याचें सुचविल्यावरून फ्रान्सचा इंग्लंडशीं खटका उडून ती बैठक मोडली गेली.

लगेच जानेवारींत ( १९२३ ) फ्रान्सनें रूहरमध्यें सैन्य पाठवून प्रांत काबीज करण्यास प्रारंभ केला. त्यामुळें जरी प्रे. एबर्टनें प्रजेस शांतता राखण्यास फर्मावलें होतें, तरी देशांत सर्वत्र असंतोष पसरला. फ्रान्सचा निषेध करण्याकरितां अमेरिकेनें आपलें जर्मनींत असलेलें सैन्य परत बोलाविलें; जर्मनींतील मोठमोठ्या भांडवलवाल्यांनीं थोडासा अडथळा केला. या वेळीं मार्कसचा भाव एका पौंडास ८० हजारांपर्यंत उतरला होता व बजेटांत ६२२ अब्जांची खोट आली होती. फ्रेंचांनीं रूहर प्रांतांतील सर्व सरकारी खाणी ताब्यांत घेतल्या व ज्या खाणींच्या व्यवस्थापकांनीं अडथळे केले त्यांनां कैद केलें. इटलीनें याबद्दल फ्रान्सची कानउघाडणीहि केली. मुख्य प्रधान कुन्होनें जाहीर केलें कीं, फ्रान्सनें ऱ्हाईनलँड ही नुकसानभरपाईच्या नांवाखालीं जर्मनीपासून कायमची बळकावण्याचा उद्योग आरंभिला आहे. फ्रान्सनें तर या वेळीं ब्रिटिशांच्या ताब्यांतील प्रदेशांत असलेल्या सर्व जर्मनांची हकालपट्टी करण्याची मागणी केली व रूहरप्रांत आम्हीं दोन वर्षें ताब्यांत ठेवणार असें जाहीर

केलें; त्यासाठीं आणीक जास्त सैन्य आणून प्रख्यात व अत्यंत श्रीमान अशा सहा जर्मन भांडवलवाल्यांनां जबर दंड ठोठाविले. मार्चमध्यें नु. भ. मंडळानें ४२०० टन नायट्रेट्सची मागणी केली. मेमध्यें जर्मनीनें, ( सर्वराष्ट्रीय कर्ज काढून त्यांतून ) २० अब्ज एकदम व ५ अब्जांचे दोन हप्ते अशी एकंदर २५ अब्जांची ( सोन्याचे मार्क्स ) कर्जफेडीची रक्कम देण्याचें कबूल केलें. परंतु फ्रान्सनें तें म्हणणें "विश्वासघाताचें" म्हणून फेटाळून लाविलें. इंग्रजांनींहि जर्मनीच्या म्हणण्यास नाखुषी दर्शविली. मात्र फ्रान्सच्या उतावळीबद्दल खेद प्रदर्शित केला. मेमध्यें जर्मनीनें हमेबंदीबद्दल पुन्हां हमी भरली; परंतु फ्रान्स रोख पैसा घेतल्याशिवाय रूहर सोडण्यास कबूल होईना. जुलैंत मार्कसचा भाव १ पौंडास ४५ लक्षांपर्यंत उतरला, त्यामुळें जर्मन लोकांनीं सरकारास ही स्थिति न सुधारण्याबद्दल दोष दिला. या परिस्थितीमुळें फ्रान्स जर्मनीचें बोलणें ऐकण्यास तयार झाला; मात्र रूहरप्रांतांतील निःशस्त्रप्रतिकाराची चळवळ थांबली पाहिजे असें त्याचें म्हणणें होतें; इतक्यांत आयात मालाच्या किंमतीच्या निकडीच्या मागणीमुळें मार्कसचा भाव घसरगुंडीस लागून ( एका पौंडास ) १ कोटी ८० लक्षांवर आला. कुन्होनें निःशस्त्रप्रतिकार थांबविण्याचें नाकारलें. फ्रान्सनें पुन्हां ओढून धरलें. त्याचें म्हणणें कीं जर्मनीनें लुच्चेगिरीनें दिवाळें काढलें आहे; वाहतुकीचा दर कमी करणें, नोकरांचा पगार वाढविणें, उद्योगधंद्यावर हलके कर बसविणें, व्यापारी जहाजें बांधणें, वगैरे गोष्टी करण्यांत जर्मनीनें पैसा गुंतविला आहे; तेव्हां आम्ही जर्मनीची विनवणी वगैरे ऐकत नाहीं. यावेळीं मार्कसचा भाव कमालीचा ( १ पौंड = २ कोटी ७० लक्ष ) घसरला. म्हणजे जवळ जवळ त्याचें अस्तित्वच नाहींसें झालें. सप्टेंबरमध्यें बाल्डविन हा इंग्लंडहून तडजोडीसाठीं फ्रान्समध्यें आला; परंतु त्याचाहि फारसा उपयोग झाला नाहीं.

रूहरमध्यें आपल्यालाहि दोस्तांबरोबरच काम करण्याची परवानगी असावी हें जर्मनीचें म्हणणें फ्रान्सनें नाकारलें. त्यानंतर डिसेंबरांत जर्मन भांडवलवाले हे पॅरीस येथें गेले व जर्मन व्यापारांत फ्रान्सनें भागीदारी करावी अशी योजना त्यांनीं पुढें मांडली.परंतु तिचा फ्रान्सनें स्वीकार केला नाहीं.

स. १९२४च्या एप्रिलांत पॅरीस येथें एक तज्ज्ञांची कमिटी बसून जर्मनींतील आगगाड्यांचा ताबा घेण्याची योजना निघाली होती. तिचा निकाल मान्य करावा कीं नाहीं यावर वाद माजून जर्मनींतील पार्लमेंट बरखास्त झालें. राष्ट्रीय पक्षास ही मागणी कबूल नव्हती.शिवाय बव्हेरियानें आपली आगगाडी फ्रान्सच्या ताब्यांत देण्याचें साफ नाकारलें (जुलै). तेव्हां लंडन येथें दोस्तांची बैठक भरली व जर्मनीच्या प्रतिनिधींना बोलावण्यांत आलें. तेथें रूहरचा कबजा सोडण्याच्या मुदतीवरच वाद माजला. फ्रान्सनें आणखी एक वर्ष ताब्यांत ठेवण्याचा हट्ट धरला. शेवटीं आगस्टमध्यें जर्मनीनें फ्रान्सचें म्हणणें कबूल करून डॉज-योजना अमलांत आणण्यास संमति दिली. राष्ट्रीय पक्ष या योजनेस विश्वासघाती असें म्हणतच होता, तरीहि रिचस्टॅगनें ती ता. २९ ( आगस्ट ) रोजीं पास केली. फ्रान्सला जानेवारी स. १९२३ ते जून १९२४ पर्यंत रूहर प्रांतांतून ( त्यावर अंमल असल्यानें ) १ अब्ज २९ कोटी फ्रँक्स आपोआपच मिळाले होते. आक्टोबर महिन्यांत इंग्लंड व अमेरिकेकडून जर्मनीस ७ टक्के व्याजानें २५ वर्षांच्या मुदतीनें कर्ज मिळालें.

यानंतर स. १९२५ च्या जानेवारीपासून डॉज योजनेप्रमाणें जर्मनी आपले हप्ते भरूं लागला;कोलोन प्रांत दोस्तांनीं अद्याप न सोडल्याबद्दल त्यानें तक्रार चालविली असतां दोस्तांनीं व्हर्सेलिसच्या तहांतील ४२९ व्या कलमाकडे बोट दाखविलें. तेव्हां डॉ. लूथरनें सांगितलें कीं जर्मनीनें तहांतील अटीइतका नसला तरी पुष्कळ अटीनें शस्त्रसंन्यास केला आहे. त्यावरून फ्रान्सनें त्या प्रांतांतील थोडेसें सैन्य काढून घेतलें. ( १९२५ फेब्रुवारी )च्या महिन्यांत दोस्तांच्या बैठकींत जर्मनीला लवकर निःशस्त्र करण्याचें ठरलें.

जर्मनी व राष्ट्रसंघ—इ. स. १९२४ च्या सप्टेंबरांत जर्मनीला राष्ट्रसंघांत दाखल करावयाचें कीं नाहीं याबद्दल ( त्यास निःशस्त्र करण्याच्या निमित्तानें) प्रश्न निघाला होता. त्यावेळीं राष्ट्रसंघांतील सभासद- राष्ट्रांनीं त्याचा हक्क कबूल केला. परंतु फ्रान्सनें हरकत घेतली कीं, जर्मनी राष्ट्रसंघांत दाखल झाल्यास तो तहांतील अटी पाळणार नाहीं, निदान त्या कमी कडक करण्याबद्दल खटपट करील. जर्मनीचें म्हणणें होतें कीं, आम्ही अगदीं निःशस्त्र आहों; राष्ट्रसंघांतील सर्व सभासद ( राष्ट्रें ) शस्त्रधारी आहेत तर आपल्याला निदान विमानें बांधण्याची परवानगी असावी. गेल्या आक्टोबरमध्यें जर्मनीनें, दोस्तांनीं नेमलेल्या लष्करी नियंत्रणमंडळा ( कमिशन ) पुढें, महायुद्धापूर्वी व महायुद्ध चालू असतां शस्त्रास्त्रांची निपज व सांठा कितपत होता त्याची माहिती मांडण्याचें कबूल केलें आहे.

इंग्लंडशीं व्यापार—सन १९२४ च्या आक्टोबरमध्यें जर्मनीनें ब्रिटिश निर्गतमालाला पुढील तीन अटींवर सवलत देण्याचें ठरविलें. ( १) लंडन येथें जर्मन ब्यांका उघडण्यास परवानगी असावी; ( २ ) ब्रिटिश जहाजांवर जर्मन खलाशांनां नोकरी मिळावी; ( ३ ) जर्मन मालावर शेकडा २६ टक्के जकात माफ करावी. या अटींपैकीं तिसरी अट इंग्लंड व फ्रान्स या दोघांनांहि कबूल नाहीं.

चालू राजकीय उलाढाली—इसवी सन १९२१ च्या सप्टेंबरांत एर्झबर्गच्या मध्यवर्ती सरकारांत व बव्हेरिया संस्थानांत भांडण तंटे सुरू झाले. बव्हेरियन वर्तमानपत्रांनीं प्रे. एबर्टला या प्रकरणाबद्दल दोष दिला. राजपक्षीय लोकांचा हात या भानगडींत होता. बव्हेरियाचे राजकीय हक्क थोडे सुद्धां कमी करण्यास तेथील मुख्य प्रधान तयार नव्हता.

सन १९२२ च्या फेब्रुवारींत मजुरीच्या दरावरून आगगाडीच्या मजुरांचे मोठमोठे संप सर्व देशांत सुरू झाले. नोव्हेंबरमध्यें वेस्टफालिया प्रांतांत अन्नावाचून दंगे सुरू झाले. सन १९२३ च्या मार्च महिन्यांत फ्रान्सनें रुहर प्रांतांत आपलें पाऊल जास्त गाडल्यानें जर्मनींत विशेष असंतोष पसरला. त्याचा फायदा घेऊन फ्रान्सनें कार्लस्रूहे व मानहीम हीं ऱ्हाईन नदीवरील दोन बंदरें एकाएकीं काबीज केलीं. तेव्हां कांहीं जर्मन लोकांनीं कांहीं फ्रेंचांना गोळ्या घालून ठार केलें. पण त्यामुळें फ्रेंचांची अरेरावी जास्त वाढली. सप्टेंबरांत डॉ. स्ट्रेसमन व इतर प्रधान यांनीं रुहरमधील निःशस्त्रप्रतिकार थांबविला. तेव्हां फ्रेंचांनींहि आपलें धोरण सौम्य केलें. डिसेंबरमध्यें मार्क्स यानें नवीन प्रधानमंडळ बनविलें व रिचस्टॅगकडे नांवाचा अधिकार ठेऊन सर्व मुखत्यारी मंत्रिमंडळाकडे दिली. इ. स. १९२४ च्या फेब्रुवारींत जर्मनीनें लष्करी कायद्याचा अंमल थांबविला. स. १९२५ च्या जानेवारींत डॉ. लूथर हा मुख्य प्रधान झाला व त्यानें निर्गत मालाचा व्यापार वाढविण्याची योजना अमलांत आणली. त्यामुळें खंडणाचा पैका लवकर उभा रहाण्यास मदत झाली. जर्मन विद्यार्थी लष्करी शिक्षण अद्यापी घेतात याबद्दलच्या दोस्तांच्या लष्करी नियंत्रणमंडळाच्या तक्रारींकडे सोशालिस्ट पक्षानें थोडाफार कानाडोळा केला. राष्ट्रीय पक्षाचा ओंढा अद्यापींहि राजसत्ता सुरू करण्याकडे आहे. प्रे. एबर्ट हा स. १९२५ च्या मार्च महिन्याच्या प्रारंभीं मरण पावला.

स. १९२३ च्या आगस्टमध्यें ऱ्हाईन प्रदेशांतील कांहीं लोकांनीं जर्मन साम्राज्यांतून ऱ्हाईनप्रांत फोडून त्याचें स्वतंत्र लोकसत्ताक संस्थान बनविण्याचा प्रयत्न फ्रेंच लोकांच्या चिथावणीनें व त्यांच्या आसऱ्यानें सुरू केला. त्यांत फ्रेंचांचा फायदा असल्यानें त्यांची त्या फुटून निघणाऱ्या पक्षाला पूर्ण संमति होती. त्याप्रमाणें आक्टोबरमध्यें एक्सलाचापेल येथें दोन हजार सशस्त्र लोकांनीं हें स्वातंत्र्य पुकारलें. परंतु त्याला तात्काळ विरोध झाला इंग्लंडनें असें करणें व्हर्सेलिस तहाच्या विरुद्ध आहे व जर्मनसाम्राज्याचे असे तुकडे केल्यानें अखेर दोस्तांच्या नुकसानभरपाईलाच अडचण येईल या मुद्यावर या कृत्यास हरकत घेतली. नोव्हेंबरमध्यें बेल्जमनें वरील पक्षाला एक्सलाचापेल येथून हांकलून दिलें. स. १९२४ च्या जानेवारींत या पक्षाच्या जुलमाबद्दल ऱ्हाईन प्रांतांतील प्रजेनें इंग्लंडकडे दाद मागितली व या जुलमास फ्रेंच सरकार मदत करते असा उघड आरोप याच वेळीं त्यांनीं फ्रेंच लोकांवर केला. फेब्रुवारींत या पक्षाची सत्ता बहुतेक नाहींशी झाली. पुढें फ्रेंचांनींच या पक्षाला आपली चळवळ बंद ठेवण्यास सांगितलें व आगष्टमध्यें तर या पक्षाचें मोठें स्वरूप जाऊन त्याला ऱ्हाईनप्रांतीय मजूरपक्ष असें नांव प्राप्त झालें.

सन १९२३ च्या जुलैंत कम्युनिस्ट पक्षाचें महत्व नाहींसें झालें. परंतु सोशालिस्टपक्षानें (मॉडरेट्स व रॅडिकल्स मिळून) देशाची सांपत्तिक हलाखी पाहून सरकारशीं निमुटपणें वागण्याचें धोरण सोडलें व त्यानें आगष्टमध्यें डॉ. कुनो याचें प्रधानमंडळ उलथून पाडण्याची धमकी दिली. सर्व राज्यांत संप व अन्नासाठीं दंगेधोपे सुरू झाले. लगेच डॉ. स्ट्रेसमन हा मुख्य प्रधान झाला व मार्कसचा भावहि ( हुंडणावळ ) जरासा सांवरला. त्यामुळें सोशालिस्टपक्षानें बर्लिन येथील प्रचंड सार्वत्रिक संप थांबविला. आक्टोबरमध्यें स्ट्रेसमनच्या प्रधानमंडळांतील सोशलिस्ट लोकांनीं त्याच्या सॅक्सनीच्या धोरणाबद्दल आपली नापसंती दर्शविली. सन १९२५ च्या फेब्रुवारींत हल्लींचें सरकार उलथून टाकण्यासाठीं म्यूनीक येथें स्थापन झालेल्या कम्युनिस्टांच्या एका गुप्तसंस्थेच्या ४० सभासदांना कैद करण्यांत आलें.

बव्हेरियाच्या मनांत जर्मनलोकसत्ताक साम्राज्यांतून स्वतंत्र होण्याचें होतें हें वर सांगितलेंच आहे. सन १९२२–२३ मध्यें त्या प्रांतांत राजपक्षानें बराच धुमाकुळ घातला व बंडें केलीं. सन १९२३ च्या मे महिन्यांत हिटलरच्या हाताखालीं फॅसिस्ट पक्षानें आपलें वर्चस्व जास्त प्रस्थापित केलें बव्हेरियन सरकारनें सभाबंदीचा कायदा पुकारून वर्तमानपत्रांवर सेन्सरची देखरेख ठेविली. आक्टोबर महिन्यांत बव्हेरियानें सॅक्सनीशीं ( सोशालिस्ट सरकारशीं ) असलेला आपला राजकीय संबंध तोडला. तरीसुद्धां सॅक्सनींतील सोशालिस्टांचें सैन्य कमी करण्याच्या बाबतींत मध्यवर्ती सरकारास फार जड गेलें. बव्हेरियन लोकांनीं लोकसत्ताक सरकारच्या नोकऱ्या पत्करूं नये असे हुकूम बव्हेरियानें काढले. सॅक्सनीनेंहि मध्यवर्तीसरकाराविरुद्ध चळवळ चालविल्यानें त्याचें प्रधानमंडळ मोडून त्याच्यावर अधिकार गाजविण्यास एक कमिशनर बर्लिनहून धाडण्यांत आला. नोव्हेंबरमध्यें लुडेन्डार्फच्या हाताखालीं फॅसिस्टपक्षानें बव्हेरियन अधिकारीमंडळ उधळून लाविलें. जर्मन युवराजानें जर्मनींत पुष्कळदां प्रवेश केला. सन १९२३ च्या नोव्हेंबरांतल्या त्याच्या फेरीनें फ्रान्स व बेल्जममध्यें जरा खळबळ उडाली. सन १९२४ च्या शेवटीं शेवटीं राजपक्षाच्या तर्फे होणाऱ्या चळवळींत बव्हेरियाचा राजपुत्र रूपर्टनें भाग घेतल्याबद्दलहि खळबळ उडाली होती.

[ संदर्भ ग्रंथः—जेम्स सिमे— हिस्टरी ऑफ जर्मनी ( १८७४ ); हेंडरसन-हिस्टरी ऑफ जर्मनी ( १९०२ ); ॲटकिन्सन— हिस्टरी ऑफ जर्मनी ( १९०८ ); फिशर— मिडीव्हल एम्पायर ( १८९८ ); ब्राइस— होली रोमन एम्पायर; एडवर्ड डौसन— एव्होल्यूशन ऑफ जर्मनी; लोवेल— गव्हर्मेंट अँड पार्टीज इन कॉंटिनेंटल यूरोप ( १८९८ ); बार्कर- मॉडर्न जर्मनी; बर्नहार्डी जर्मनी अँड दि नेक्स्ट वार, कोलिएर-जर्मनी अँड दि जर्मन्स; वेब्लेन-इंपीरियल जर्मनी अँड दि इंडस्ट्रियल रेव्होल्यूशन. ]

**जलंगी**—बंगालमधील नडिया जिल्ह्यांतील तीन नद्यांपैकीं एक नदी. ज्या ठिकाणीं गंगा नदी नडिया जिल्ह्यांत शिरते तेथून ही नदी निघून जिल्ह्याच्या ईशान्येस ५० मैलपर्यंत वाहते. नंतर कृष्णगरच्या दक्षिणेकडे वहात जाऊन नडिया गांवाजवळ ती भागिरथी नदीस मिळते. नंतर या जोडप्रवाहाला हुगळी असें नांव मिळालें आहे. ही नदी गाळानें भरली असून सुमारें ३६ मैल व्यापाराला निरुपयोगी झाली आहे. या नदीवरील व्यापाराचीं मुख्य गांवें:—कृष्णगर, करीमपूर, चाप्रा आणि स्वरूपगंज. व्यापार मुख्यत्वेंकरून धार्धी व गळिताचीं धान्यें यांचा चालतो.

**जलजन्य विद्युत्शक्ति**—जलजन्य विद्युतशक्तीचा प्रसार करण्यासंबंधानें जगांतील ज्या ज्या देशांत आजपर्यंत यशस्वी रीतीनें प्रयत्न झाले अशा देशांमध्यें हिंदुस्थानास लौकरच प्रमुख स्थान मिळेल असा अंदाज दिसतो. हिंदुस्थानांत ह्या शक्तीचे आणखी कारखाने सहज निघूं शकतील इतकेंच नव्हे, तर तसल्या कारखान्यांची किंवा योजनांची देशांत सध्यां फार जरूर आहे. दगडी कोळसा व रॉकेल तेल यांच्या खाणी हिंदुस्थानांत फारच थोड्या ठिकाणीं असल्यामुळें रेलवे भाड्याखालींच फार खर्च होऊन किफायतशीर रीतीनें गिरण्या व इतर लहानसान कारखाने चालविणें अशक्य होतें. ह्यामुळें जलशक्ति व तिचें विद्युत्शक्तीनें स्थलांतर जितक्या ठिकाणीं होऊं शकेल त्यामानानें देशांतील सर्व भागांत उद्योगधंद्यांनां कायमचें उत्तेजन मिळेल. हिंदुस्थानांतील पावसाळा अनिश्चित असून वर्षांतून तीन किंवा चार महिनेच पाऊस पडत असल्यामुळें निवळ जलशक्तीनें काम करणारी योजना चालविणें बहुतकरून फार कठीण जातें. सर्व वर्षभर पाण्यानें भरलेल्या नद्या हिंदुस्थानांत बहुतेक नाहींतच असें म्हटलें तरी चालेल. ह्या कारणामुळें उष्ण काळांत उपयोगांत आणतां येतील असे जलसंचय कृत्रिम रीतीनें तयार करणें जरूर पडतें. ह्या कार्याकरितां सोईचीं कित्येक स्थळें डोंगराळ प्रदेशांत निरनिराळ्या इलाख्यांत आहेत. व कित्येक डोंगरावर अतिवृष्टि होत असल्यानें आजपर्यंत निघालेल्या जलजन्य विद्युत्शक्तीच्या योजनांप्रमाणें आणखी कितीतरी नवीन योजना तयार करून देशांत नवीन उद्योगधंद्यांची वाढ करण्याकडे त्यांचा उपयोग करून घेतां येईल. ह्या तऱ्हेच्या योजनांपासून कारखाने चालण्यास भरपूर शक्तीचा पुरवठा मिळेल इतकेंच, नव्हे तर आजूबाजूच्या प्रदेशांतील शेतीलाहि त्या पाण्याचा उपयोग होईल. सर टॉमस हॉलंड यांच्या अध्यक्षतेखालीं सन १९१६ पासून स. १९१८ पर्यंत बसलेल्या औद्योगिक कमिशननें ह्या विषयासंबंधानें सर्व हिंदुस्थानांत पहाणी करावी अशी शिफारस सरकारास केली होती. त्या शिफारशीप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें कित्येक तज्ज्ञ लोकांची नेमणूक केली. त्यांपैकीं जे. डब्ल्यू. मिअरस यांनीं स. १९२२ मध्यें प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टांत फार महत्त्वाची माहिती दिली आहे.

हिंदुस्थानांत चालू असलेल्या जलजन्य विद्युत्शक्तीचें अंदाजपत्रक:—

| प्रांताचें नांव. | शक्तीचें परिमाण. ( अश्वशक्ति ) |
|---|---|
| आसाम | २२५५० |
| बंगाल (कलकत्त्याचें क्षेत्रफळ सोडून) | २५३१८ |
| कलकत्ता ( शहराशिवाय ) | १७६२०० |
| बहार (कोलिरीज इत्यादिशिवाय ) | २३२५ |
| मुंबई इलाखा | ३२८७२ |
| मुंबई शहर | ७५०००० |
| ब्रह्मदेश ( तांदुळाच्या गिरण्या वगैरे सोडून ) | १७७५० |
| मध्यप्रांत | ३२७७३ |
| मद्रास | ६०००० |
| वायव्येकडील सरहद्दीवरचा प्रांत | ......... |
| पंजाब | ९०००० |
| संयुक्तप्रांत | ३८५४८ |
| एकूण | १२४८३३६ |

ह्याखेरीज यत्न केल्यास हिंदुस्थानांत खालील कोष्टकांत दाखविलेल्या आंकड्यांइतकी शक्ति मिळण्याचा वाव आहे. म्हणून तेहि आंकडे दिले आहेत.

| प्रांताचें अगर संस्थानाचें नांव | कमींत कमी शक्ति. |
|---|---|
| आसाम | ६२१००० |
| बंगाल | १०००००० |
| बहार व ओरिसा | ९५००० |
| मुंबई | ७७३००० |
| ब्रह्मदेश | १३२७००० |
| मध्यप्रांत | १६५००० |
| जम्मू आणि काश्मिर | ४५८००० |
| मद्रास | १३८००० |
| वायव्य सरहद्दीवरचा प्रांत | १०००००० |
| पंजाब | ११९०००० |
| संयुक्तप्रांत | ६०५००० |
| इतर ठिकाणीं | १६०००० |
| एकूण | ७५३२००० |

वरील आंकडे किलोवॅटमध्यें दिले आहेत. १¾ किलोवॅट म्हणजे १ अश्वशक्ति असें ठोकळ प्रमाण आहे. स. १९२२ सालपर्यंत निरनिराळ्या प्रांतांत मुख्य मुख्य तयार झालेल्या योजनांची माहिती येणेंप्रमाणें आहे:—

बंगाल:—ह्या प्रांतांतील मुख्य कारखाना दार्जिलिंग येथें आहे. व रंगीत आणि तिस्ता या दोन नद्या अडवून ही योजना तयार झाली आहे.

मुंबई इलाखा:—भाटघर धरण, आंध्रा खोऱ्यांतील धरण व गोकाक कंपनीचें धरण हीं तीन धरणें मुख्य आहेत. टाटा

कंपनीनें काढलेल्या योजनांसारख्या वाढत्या प्रमाणावर आहेत. व त्यापासून मुंबईतील पुष्कळ गिरण्यांना सध्यां विद्युत्‌शक्तीचा पुरवठा होत आहे. व ह्या योजनांची जगांतील अतिशय प्रमुख योजनांत गणना होते. कित्येक तज्ज्ञ लोकांच्या मताप्रमाणें पाण्याच्या सहाय्यानें विद्युत्‌शक्ति उत्पन्न करण्याकरितां मुंबई इलाख्यांत निसर्गजन्य जितक्या सोयी आहेत, तितक्या हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रांतांत नाहींत. मुंबईजवळील घाटामध्यें ही शक्ति मोठ्या प्रमाणावर उत्पन्न करतां येईल, ही कल्पना प्रथम डेव्हिड गॉसलिंग या नांवाच्या गृहस्थानें काढली समुद्राच्या पृष्ठभागापासून दोन हजार फूट उंच असलेल्या सह्याद्रि पर्वतांच्या रांगावर पावसाळ्यांत भरपूर पाऊस पडून जे पाण्याचे लोंढे समुद्रास जाऊन मिळतात ते अडविल्यास त्यांपासून प्रचंड विद्युत्‌शक्ति उत्पन्न करतां येईल अशी प. वा. जमशेटजी टाटा यांची मि. गॉसलिंग यांनीं खात्री केली. ह्यासंबधानें पाहणी करून जास्त माहिती मिळविण्याकरितां इंग्लंडहून कांहीं तज्ज्ञ लोक आणविले व त्यानंतर कंपनी काढण्यासंबंधानें दीर्घ प्रयत्न करून सरकारची सम्मति मिळविली. त्या वेळेस मुंबईचे गव्हर्नर सर जार्ज क्लार्क यांच्या प्रयत्नानें पुष्कळ देशी संस्थानिकांनीं कंपनीस भांडवल देण्याच्या कामीं फार महत्त्वाची मदत केली. व त्या मदतीमुळें १॥। कोटि रुपयांचें भांडवल देशांतच तयार झालें. ह्या योजनेसंबंधानें टाटाकंपनीचीं एंजिनिअरिंग कामें बोरघाटावर लोणावळ्याच्या आजुबाजूस आहेत. लोणावळा, वलवण व शिरौटा ह्या तीन ठिकाणीं पाणी सांठविण्याकरितां धरणें बाधण्यांत आलीं आहेत. कंपनीचें मुख्य शक्तिगृह घाटाच्या पायथ्याशीं खोपवली येथें आहे. तेथें नळांच्या सहाय्यानें १७२५ फूट उंचीवरचें पाणी नेलें जातें. इतक्या उंचीवरून खालीं येतांना या पाण्यापासून एका चौरस इंचावर७ ५० पौंड दाब पडणारी शक्ति उत्पन्न होते. हीच शक्ति विद्युत् उत्पन्न करण्यास उपयोगी पडते. आरंभीं ३०००० पर्यंत अश्वशक्ति उत्पन्न व्हावी एवढ्याच हेतूनें कंपनी काढली गेली. परंतु मुंबईतील गिरण्यांची मागणी वाढत गेली. त्या वाढत्या मागणीप्रमाणें शक्तीचा पुरवठा करतां यावा म्हणून कंपनीनें आपलें भांडवल तीन कोट रुपयांपर्यंत वाढवून चाळिस हजारपर्यंत अश्वशक्ति पुरविण्याची व्यवस्था केली आहे. सध्यां मुंबईच्या ४४ वर गिरण्या या शक्तीचा उपयोग करीत आहेत. मुंबईची ट्रॅमवेकंपनी सुद्धां आपल्या पांच स्टेशनांकरितां या शक्तीचा उपयोग करीत आहे. मावळांत निळा आणि मुळा या दोन नद्या अडवून तेथेंहि विद्युत्‌शक्ति उत्पन्न करण्याचा टाटा कंपनीचा हेतू आहे. व त्याप्रमाणें लोकांच्या सत्याग्रही मोहिमेला न जुमानतां कंपनीनें कामाला मोठ्या अडचणींत सुरुवात करून काम संपवीत आणलें आहे. काम पुरें झाल्यास अदमासें ५०००० किलोवॅट शक्ति उत्पन्न होईल असा अंदाज आहे. ह्याच ठिकाणापासून दक्षिणेस सुमारें शंभर मैलांवर कोयना नदीच्या दरींत दोन धरणें बांधण्याचा टाटा कंपनीचा विचार आहे. आंध्रा दरीमध्यें ठोकरवाडीजवळ एक १९२ फूट उंचीचें धरण बांधून त्या पाण्याच्या साहाय्यानें सुमारें १ लक्ष अश्वशक्ति उत्पन्न करण्याकरितां दुसरी एक नवीन कंपनी स्थापन झाली आहे. या कंपनीचें बांधकाम पुरें होऊन बांद्रा व कुर्ला येथील म्युनिसिपालिटयांस व मुंबई बेटांतील कापडाच्या गिरण्यांस शक्ति पुरविण्याची व्यवस्था लौकरच अमलांत येईल असें वाटतें.

म्हैसूरः—म्हैसूर संस्थानांतील कावेरी नदी अडवून शिवसमुद्रम् येथें १९०२ सालीं विद्युत्‌शक्ति उत्पन करण्याचा केलेला यत्न हिंदुस्थानामधील पहिलाच आहे. कावेरी नदीचा उगम ब्रिटिश हद्दींत असून म्हैसूर संस्थानांतून ती वहात गेली आहे. ही योजना काढते वेळेस कोलार येथील सोन्याच्या खाणींस विद्युत्‌शक्ति पुरविण्याचा मूळ हेतु होता. शक्तिगृहापासून खाणी ९२ मैलांच्या अंतरावर असल्यामुळें सर्व जगांत हें अंतर अतिशय मोठें असें मानलें जात होतें, ह्या शक्तीपैकीं एक प्रवाह ५९ मैल अंतरावर असलेल्या बंगलोर शहरापर्यंत नेला आहे. तेथें औद्यौगिक कामाकडे व दिवाबत्तीसाठीं ( रोषनाईकडे ) त्याचा उपयोग होतो. ह्या योजनेचा आरंभ ६ हजार अश्वशक्तीपासून झाला. तो आतां सुमारें २५ हजार अश्वशक्तीपर्यंत वाढला आहे. जास्त शक्तीची आजुबाजूला मागणी असल्यामुळें शिवसमुद्रम्‌पासून जवळच शिमशानदीम्हणून कावेरी नदीचा जो फांटा आहे. त्याच्या उपयोग करावा लागेल व दुसरा बंधारा शिवसमुद्रम्‌पासून पंचवीस मैल अंतरावर तयार करण्याचा विचार आहे. शिवसमुद्रम् येथें ४०० फूट खोलीचा व शिमशाम येथें ६१८ फूट खोलीचा धबधबा होऊं शकेल, व त्यापासून ३९५०० अश्वशक्ति उत्पन्न होईल अशा अंदाज आहे. तसेंच मेकदातू ह्या गांवाजवळ कावेरीचा एक मोठा धबधबा आहे. त्याचाहि विद्युत्‌शक्ति उत्पन्न करण्याकडे उपयोग होईल.

काश्मीरः—काश्मीर संस्थानामध्येंहि या बाबतीसंबंधानें बरीच खटपट चालू आहे. बारामुला गांवाजवळ झेलम नदी आडवून त्या धरणापासून विद्युत्‌शक्ति उत्पन्न करण्याचा यत्न सिद्धीस गेला आहे. श्रीनगर शहराच्या ईशान्येस सुमारें ३४ मैल अंतरावर बारामुळें हें गांव आहे. शक्तिगृहापासून सुमारें ६॥ मैल अंतरावर मुख्य कारखाना आहे. ह्या योजनेपासून सुमारें वीस हजार अश्वशक्ति उत्पन्न होते. हा प्रवाह श्रीनगर जवळील रेशमाच्या गिरणीपर्यंत आणलेला आहे. श्रीनगर शहरापैकीं बहुतेक भागांत दिव्याची व्यवस्था ( रोषनाई ) याच कारखान्यामुळें झाली आहे. शहरांतील रहिवाशांना विद्युत्‌शक्तीचे उपयोग माहीत होऊन उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळावें म्हणून सुमारें शंभर किलोवॅट इतकी शक्ति शहरच्या लोकांकरितां वांटून दिली आहे.

मद्रासः—मद्रास इलाख्यांत तीन ठिकाणीं विद्युत्शक्तीच्या योजना आहेत. व तीन्ही कारखाने मिळून सुमारें ७४० किलोवॅट इतकी शक्ति उत्पन्न होते.

वायव्यसरहद्द:--मलकांड येथील बोगद्याजवळ एक योजना तयार केली आहे. तिजपासून सुमारें २५० किलोवॅट शक्ति उत्पन्न होते.

पतियाळ संस्थानः—सरहिंद कालव्याच्या निदाम पूर येथील घागरशाखेवर असलेल्या धबधब्याचा उपयोग करून सुमारें ३०० किलोवॅट शक्ति उत्पन्न करण्याची योजना झाली आहे.

पंजाबः—अमृतसर, धारीवाल व सिमला या तीन ठिकाणीं विद्युत्शक्तीच्या योजना चालू आहेत. त्यापासून म्युनिसीपालिटया व कांहीं लोकरीच्या गिरण्यांस या शक्तीचा पुरवठा होतो.

त्रावणकोरः—या संस्थानांत मुन्नर गांवाजवळ एक योजना तयार करण्यांत आली आहे. तिजपासून सुमारें ४५० किलोवॅट शक्ति उत्पन्न होते.

संयुक्तप्रांतः—बहादुराबाद गांवाजवळ हरिद्वार येथील गंगेच्या नवीन कालव्याकरितां ह्या लहान योजनेचा उपयोग करण्यांत येतो. ह्या प्रांतांतील दुसरी योजना मसुरीपासून तीन मैलांच्या अंतरावर आहे.

बांधकाम चालू असलेल्या योजना, ग्वाल्हेर संस्थानः—ह्या संस्थानांतील रेव्हिन्यूखात्यांतील मेंबर व कालव्याचे एंजिनिअर मिस्टर एस्. के. गुर्टु यांच्या देखरेखीखालीं पर्वती-विद्युत्शक्ति-योजना या नांवाचें काम सध्यां सुरू आहे. या योजनेचा हेतु लष्कर शहरास व शेतकी करितां पाण्याचा पुरवठा करणें हा आहे. व ह्या सर्व योजनेस एक कोट एकोणतीस लाख रुपये खर्च होतील असा अजमास आहे. सध्यां बांधलें जात असलेलें धरण सुमारें १२५ फूट उंच होईल. धरणापासून सुमारें एक हजार किलोवॅट शक्ति उत्पन्न होईल असा अंदाज आहे.

म्हैसूर संस्थानः—कृष्णराज गांवाजवळ कावेरी नदीच्या बंधाऱ्यास लागूनच दुसरा एक बंधारा बांधण्याचें काम सरकार करीत आहे. हें काम पुरें झाल्यावर सुमारें ४५०० किलोवॅट इतकी शक्ति तयार होईल असें म्हणतात.

पंजाबः—बाबा हरदयाळसिंग यानीं काढलेल्या कंपनीशीं पंजाबसरकाराबरोबर नुकताच करार झाला आहे. त्याप्रमाणें रसूल गांवाजवळ उत्तर झेलम कालव्यानजीक एक सत्तर फुटांचा धबधबा आहे. तसेंच त्याच कालव्याचे आणखी दोन धबधबे आहेत, त्या सर्वांचा उपयोग केल्यास बरीच विद्युत्शक्ति उत्पन्न होण्यासारखी आहे.

संयुक्तप्रांतः—नैनिताल येथील सरोवर व त्याच्या भोंवतालचे ओढे यांचा विद्युत्शक्ति उत्पन्न करण्याकडे उपयोग करावा अशाबद्दल आज वीस वर्षे वाटाघाट सुरू आहे. ह्या पाण्याचा संचय फार लहान आहे. म्हणून नैनिताल शहराला दिवाबत्तीची ( रोषनाई ) सोय होण्यापुरतीच विद्युत्शक्ति उत्पन्न होईल असा अजमास आहे.

मुंबईः—निळा-मुळा स्कीम सुरू आहे.

जलजन्य विद्युत्शक्तीचा उपयोग.—कापसाच्या गिरण्यांचीं यंत्रें चालविण्याकडे, शहरांत रोषनाई किंवा दिवाबत्ती करण्यास, तसेंच पीठ दळण्याच्या गिरण्या वगैरे लहानसहान धंद्याकडे या शक्तीचा उपयोग करतां येतो हें बहुतेक सर्वांनां माहीत आहे. परंतु ह्याखेरीज कित्येक महत्त्वाच्या कामांकरितां ही शक्ति उपयोगी पडते. उदाहरणार्थ, पोलाद व त्याचीं मिश्रणें तयार करणें, अशुद्ध लोखंडाच्या दगडाचें पाणी करणें, भांड्यांच्या किंवा यंत्रांच्या निरनिराळ्या भागांचे सांधे जोडून त्यांचा एकजीव करणें, मातीपासून अॅल्युमिनीयम धातु काढणें, कॅलशियम कारबाईड व तज्जन्य अनेक पदार्थ तयार करणें, फॉस्फरस आणि क्लोराईन गॅस तयार करणें, अल्कली तयार करणें,वगैरे शेंकडो कारखाने ह्या विद्युत्शक्तीनें जगांतील सर्व प्रगत राष्ट्रांत चालू आहेत. विद्युत्शक्तीपासून अमेरिकेंत व इतर देशांत घरगुती कामेंहि करून घेतात. तसेंच हवेंतील नायट्रोजनपासून नायट्रिक अॅसिड व शेतीला उपयोगी पडतील अशीं निरनिराळीं खतेंहि तयार होतात. [ मीयर्स—हायड्रो एलेक्ट्रिक सर्व्हे ऑफ इंडिया, पु. ३; इंडियन इंडस्ट्रियल कमिशन ( १९१६-१८ ) चा रिपोर्ट; इंडियन ईयर बुक, १९२२ ]

**जलधा**—आसाममधील या जातीची लोकसंख्या १९११ सालीं ६७०९ आहे. दरंग जिल्ह्यांत ह्या जातीच्या लोकांनां काचारि जातींतील पतित लोक समजतात. परंतु ते लोक काचारी लोकांपेक्षांहि आपण श्रेष्ठ आहों असें म्हणतात. अॅलनच्या म्हणण्याप्रमाणें जलधा व काचारी लोकांचा परस्पर विवाह होत नाहीं. परंतु तसा विवाह करावयाचा झाल्यास प्रथम मुलीला प्रायश्चित्त देऊन मुलाच्या जातींत घेतात. गोलपारा जिल्ह्यांत हे लोक धार्मिक विधींकरितां ब्राह्मण व नापीत यांनां बोलावितात. [ से. रि ]

**जलपैगुरी**, जिल्हा.—बंगाल, राजशाही विभाग. उ. अ. २६° ते २७° व पू. रे. ८८°२०' ते ८९°५३'. क्षेत्रफळ २९६२ चौरस मैल. या जिल्ह्याचे दोन भाग करतां येतात. तिस्ताच्या पश्चिमेस असलेल्या भागांतील राज्यव्यवस्था बंगालप्रमाणें चालते. हा भाग फार सुपीक आहे. तिस्ताच्या पूर्वेकडील भाग १८६५ सालीं भूतानपासून घेण्यांत आला. बहुतेक भाग सपाट आहे. फक्त ईशान्येस सिंकुला डोंगर असून त्याची उंची ४००० फूट ते ६००० फूट आहे. यापैकीं एका डोंगरावर बक्सा नांवाचें लष्करी ठाणें ब्रिटिशांनीं बांधलें असून त्यानें भूतानमध्यें जाणाऱ्या मुख्य रस्त्यांपैकीं एक रस्ता रोंखला आहे. या बक्सा नांवाच्या डोंगराखेरीज